

सरस्वतीकोश

दोन्ही भागांची] भाग दुसरा [किंमत ८ रुपये

लेखक

विद्याधर वामन भिडे

मराठी भाषेचा

सरस्वतीकोश

(मराठी भाषेची उत्पत्ति ह्या विषयावर एक निबंध
आणि अनेक परिशिष्टें यांसह)

हा कोश

विद्याधर वामन भिडे

(अनेक काव्यें, कादंबऱ्या, निबंध, इ०चे कर्ते)

ह्यांनीं रचिला

तो

शंकर नरहर जोशी

मॅनेजर, चित्रशाळा प्रेस, पुणें, ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला

भाग दुसरा

आवृत्ति पहिली

इ० स० १९३०

दोन्ही] किंमत ८ रुपये [भागांची

मुद्रक व प्रकाशक
शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा' प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

ध

ध हें मराठी व्यंजनमालेंतील एकोणिसावें व्यंजन. ❀ धचा मा करणें १ वाक्याचा भलताच अर्थ करून किं० अर्थ धरून गोंधळ माजविणें. २ सद्‌बुद्धीनें केलेल्या कृत्यावर दुष्टत्वाचा हेतु आरोपिणें. टीप,–हा वाक्प्रचार पेशवाईतील एका प्रसंगावरून रूढ झालेला आहे.

धक, धग [हिं०] **स्त्री०** १ विस्तवाची आग; अग्नीचा शेक; झळया. २ लहानशी शेकोटी किं० आगटी.

धक (–ग–) टी स्त्री०, धक (–ग–) टें न० पेटविलेल्या गवत, काटक्याकुटक्या, इ० ची रास; आगटी.

धकधक न०भयानें छाती धडधडणें.

धकधकणें अ० क्रि० ऊर भयादि कारणांनी जोराजोरानें उडणें. ❀ **माझा जीव धकधकतो** माझा घाबरगुंडी होते.

धका, धक्का [हिं०]**पु०**१एका पदार्थाचा दुसऱ्या पदार्थावर झालेला आघात; तडाखा (देणें, मारणें, लागणें, लावणें). २ व्यापारादिकांत आलेली बूड किं० लागलेली ठोकर. ३ हानि, नुकसान. ४ दुर्दैवाचा घाला. ५ कठड्याची भिंत. ६ पाण्याचा जोर जमीनीला उपद्रवकारक न व्हावा म्हणून बांधतात ती भिंत. ७ कांहीं अत्यन्त अनिष्ट गोष्ट घडल्यामुळें मनाला बसतो तो हिसका किं० देहाच्या क्रियांचें कांहीं काळ होतें स्तंभन (बसणें). ❀ **धकाबुकी स्त्री०** रेटारेटी; ढकलाढकली. **धकाधकी स्त्री०** रेटारेटी.

धकाधक स्त्री० १ छाती जोरानें उडणें. २ कामाची जिकीर; कामाचे कष्ट. ३ व्यर्थ किं० निष्फळ खटपट किं० खटाटोप.

धकावणें [**म०** धका] **अ० क्रि०** १ ठोकर खाणें; नुकसानीस पात्र होणें. २ बुडणें; नष्ट होणें. ३ खचणें; नाउमेद होणें. ४ कुंठित होणें.

धकी स्त्री० धक्का; ठोसा; तडाखा.

धक्क न० १ कांहीं आकस्मिक भयाच्या कारणामुळें छातीला आंचका बसतो तो; उ० वाघ हणतांच माझ्या छातींत धक्क झालें. २चकचकीत; झगझगीत (धातूचें भांडें, हिरा, इ०). ३ खरें, बाजारांत चालेल असें (रुपाया इ० नाणें). ४ कामाला न डरणारा; कामानें न खचणारा; धट्टमुट्ट; बळकट (माणूस, प्राणी, पदार्थ).

धक्क क्रि० वि० उज्ज्वल होऊन; तेजस्वीपणें (दिवा जळणें, चूल पेटणें, इ०).

धक्कड वि० भक्कम, मजबूत, बळकट.

धक्का, धक्की वर ' धका, ' ' धकी ' पहा.

धग, धगटी, धगटें वर ' धक ,' 'धकटी, ' ' धकटें ' पहा.

धगड [**अ०**] **पु०** १ जार; यार; उपपति. २ नवरा (निंदेंत). ३ सर्वांस पुरून उरणारा; सर्वांना टक्कर द्यावयाला समर्थ; सर्वांस हार खावयाला लावणारा; कोणाची मात्रा न चालूं देणारा (माणूस, औषध, इ०); उ० मंडूर हा पंडुरोगाचा धगड आहे; उ० हा पुणेंकर शास्त्री सर्व पंडितांचा धगड आहे; उ० रामा तुझा धगड आहे.

धगडी स्त्री० राख; रखेली. ❀ **धगडीचा पु०** व्यभिचारापासून किं० रखेलीपासून जन्मलेला पुत्र. [चाळे.

धंगडे पु० अ० व० खोड्या; उपद्रवकारक

धगधग स्त्री० १ विस्तवाची किं० उन्हाची आंच. २ तापानें अंग तापल्याची उष्णता. ३ मिरे, मिरची, सुंठ, इ० पदार्थ जिभेला किं० त्वचेला लागल्यानें होते ती आग. ४ छातीचें जोराजोरानें धडधडणें.

धगधग उ० वा० अ० हत्तीनें जलद चालावें म्हणून महात हा शब्द उच्चारतात.

धगधगणें अ० क्रि० १ (ऊर) जोराजोरानें उडत असणें. २ (चूल, शेगडी, ऊन्ह, इ०) प्रखरपणें जळत किं० प्रकाशत असणें. ३ (तापानें अंग) तापून ऊन्ह किं० कढत झालेलें असणें.

धगधगीत वि० १ प्रज्ज्वलित (विस्तव). २ रखरखीत (ऊन्ह). ३ तापानें कढत झालेलें (अंग).

धंगधोत्र, धंगधोत्रेकरी मागें 'ढंगधोत्र,' 'ढंगधोत्रेकरी' पहा.

धगाटा पु० १ प्रज्ज्वलित अग्नि. २ प्रखर ऊन्ह किं० उन्हाचा ताप.

धगावणें अ० क्रि० विस्तवानें किं० विस्तवाच्या प्रखरतेमुळें होरपळणें किं० जर्जर होणें.

धगें न० काटक्याकुटक्या, गवत, वाळलेलीं पानें इ० ची जळती रास किं० जळता ढीग.

धगोधगो उ० वा० अ० हत्तीला जल्द जल्द चालण्याची इशारत महात ह्या शब्दानें करतो. मागें ' धगधग ' उ० वा० अ० पहा.

धचोट, धश्चोट वि० दांडगेश्वर; उद्धट.

धज [हिं०] स्त्री० १ नोक; झोक; ऐट. २ भाषण, वर्तन, इ०चा तरतरीतपणा ३(शरीराचा) गोंडस बांधा.४ (घोड्याची) उंची. ५ (घोड्याचा मानेचा) ऐटदार बाक. ❀ **धज देणें** मदत करावयाला सरसावणें; कामाला हात लावणें. **धज मारणें** दाटींतून घुसणें.

धज न०, स्त्री०, **धजा** स्त्री० [सं० ध्वज] निशाण; पताका; झेंडा. ❀**धजदार** वि०१झोकदार, भव्य (माणूस, पशु, पदार्थ). २ उदार प्रवृत्तिचा. ३ धीट.

धजणें, धजावणें अ० क्रि० १ धैर्यानें पुढें होणें; धीटपणानें पुढें सरसावणें; कांहीं धाडसाचें किं० चिकाटीचें काम करावयाला सिद्ध होणें.४गर्दीतून किं० दाटींतून पुढें घुसणें. ३ न कचरतां किं० न दमतां काम चालू ठेवणें. ४ (पेरलेलें शेत) जोरानें पक्व दशेस येणें किं० आलेलें असणें.

धजाव पु० १शेताची परिपक्व दशा; परिपक्व दशेस येत असलेल्या पिकाचा देखावा.२ शेताच्या वाढीचा जोर. ३ छाकटेगिरी किं० नखरेबाजी (बोलणें, चालणें, पोशाख, इ० तील).

धट [सं० धट=तागडी] पु०१ भरलेलीं पोतीं, सर्पण, इ०जोखावयाची मोठी तराजू,–जी तिकाटण्याला किं० तुळईला लोंबती ठेविलेली असते. २ अशा तराजूची दांडी. ३ गाड्यांचा अड्डा. ४ ४ जमाबंदीच्या हिशेबाचें पत्रक. ❀ **धट घेणें, धट घेऊन बसणें** धरणें घेऊन किं० धरून बसणें; तगादा करावयाला बसणें. (**खाणें, पिणें, चालणें, मारणें, खेळणें, इ० क्रियांचा**) **धट लावणें** ती क्रिया एकसारखी करीत राहाणें किं० करीत सुटणें. (**एकाद्या क्रियेचा**) **धट लागणें** ती क्रिया एकसारखी चाललेली असणें. **धटास लावणें** खाजगी किं० वैयक्तिक गोष्टीची शहानिशा करण्यासाठीं ती लोकांपुढें मांडणें (कोणेकाची निंदा करतांना प्रयोग).

धट, धट्ट वि० १ धीट. २ चलाख, तल्लख. ३ उद्धट. ४ सरळ(रस्ता).

धट क्रि० वि० अगदीं समोरच्या दिशेस (रस्ता गेलेला असणें).

धटांगण, धाटिंगण, धटिंग, धटकुला [हिं० धाटिंगर] वि० १ शरीरानें धिप्पाड. २ मजबूत बांध्याचा. ३ दांडगेश्वर; आडदांड. ४ कोणाची भीड किं० मुरवत न धरणारा किं० न राखणारा.

धटाल्या वि० १ तल्लख; चलाख. २ नेटदार; करारी.

धटी, धटी स्त्री० १ स्त्रिया नेसतात तें एक प्रकारचें रेशमी वस्त्र.२धोतर इ०चा जाड कांठ.

धट्ट, धट वि० १ धीट, साहसी. २ दांडगेश्वर; आडदांड; उद्धट. ३ सरळ (रस्ता). ❀ **धट्टाई** स्त्री० धीटपणा.

धट्टाकट्टा, धट्टाखट्टा वि० १ मजबूत. २ नीरोगी स्थितींत असलेला.

धटी स्त्री० वर ' धटी ' पहा.

धड [हिं०] न०१मान तुटून अवशिष्ट राहिलेलें शरीर. २ गळ्यावरचा भाग सोडून बाकीचें शरीर. ❀ **धडांत टाकणें** (किं० **घालणें**) १ (कांहीं खाद्य) खाणें, गिळणें (तिरस्कारार्थ). २ (पैसा, लाच) खाणें.

धड न० सुस्थिति; प्रकृतीचे बाबतींत चांगलेपणा; आराम.

धड वि० १ अभग्न; न फुटलेलें; न तुटलेलें; न फाटलेलें. २ ज्यांत कांहीं विघ्न, अडचण, कष्ट, इ० नाहीं असें. ३ पूर्ण; निर्दोष; उपयोगीं पडण्याच्या स्थितींत असलेलें. ४ खाऊन पिऊन सुखी. **क्रि० वि०** १ सुरळीत रीतीनें; विघ्न किं० अडचण न येतां. २ स्पष्टपणें; असंदिग्ध रीतीनें. ३ पूर्णपणें. ❀ **एक धड ना भाराभर चिंध्या** एकही वस्त्र उपयोगीं पडण्याच्या स्थितींत नाहीं आणि शेकडों फाटकींतुटकीं वस्त्रें असलीं तर त्यांचा काय उपयोग होणार ? एकही विद्या, कला, किं० विषय पूर्ण अवगत नसल्यास अनेक विद्या, कला, विषय, इ०ची अर्धवट माहिती काय कामाची? **धडांत ना भाकडांत** त्याज्य कोटींतही नाहीं

आणि ग्राह्य कोटांतही नाहीं असा. **धड गांडीनें**
क्रि० वि० कांहीं हानि किं० नुकसान न होतां;
चट्टा न लागतां; आबरू गमावून न घेतां.
धड ना गोडाचा, धडाना गोडाचा वि० १
कोणत्याही कामाला निरुपयोगी; नादान;
टाकाऊ. २ संदिग्ध;कोणत्याही पक्षाला उपयोगीं न
पडेल असा. **धडगत, धडगति** [**म०** धड+गति]
स्त्री० १ सुरळीतपणें शेवटास पोंहोंचण्याची
शक्यता किं० संभव. २ सुखांत किं० आनं-
दांत शेवट होण्याची चिन्हें; परिणाम किं०
पर्यवसान इच्छिल्याप्रमाणें होण्याची आशा.
टीप,–ह्या दोन्ही अर्थी बहुधा अकरणरूपी प्रयोग
होतो; उ० ह्या रोग्याची धडगत दिसत नाहीं;उ०
राम्या अभ्यास न करतां उनाडत असतो, त्याची
मला धडगत दिसत नाहीं. **धडधाकट** (–ड),
धडधोप, धडधोपट वि० १ निकोप, नीरोगी
(प्रकृति, माणूस, जनावर, इ०). २ वापर
किं० कष्ट सोसावयाला पूर्णपणें समर्थ.
धडवरें, धडभलें [**म०**धड+वरें, भलें] **न०** १
सुस्थिति. २सुरळीतपणा. ३सुरळीतपणाची व्यवस्था
किं०मांडणी किं० सरणी. ४तर्कांत येणारी पुढची
स्थिति;पुढच्या स्थितीचा अंदाज.५पुढची सुस्थिति;
उ०त्या रोग्याचें धडवरें दिसत नाहीं.

धड [**हिं०** धडक] **स्त्री०** १ बाजू. २ एका
बाजूचें दर्शन. ३ कांठ. ३ कठडा, धक्का.

धडक स्त्री० १ रट्टा; ठोसा; तडाखा. २ एका
पदार्थाचा दुसऱ्या पदार्थावर आघात. ३ व्यापा-
रांत बसलेली ठोकर किं०आलेली किं०बसलेली बूड.

धडक क्रि० वि० १ सपाट्यानें; झपाट्यानें. २
न कचरतां; हिमतीनें; जोरानें. ३ थेट; समोर;
मध्यें वळणें न घेतां (रस्ता जाणें).

धडकण स्त्री० भीतीनें मनाला किं० हृद-
याला बसतो तो धक्का.

धडकणें अ० क्रि० १ (विस्तव) जोरानें
पेटणें. २(दिवा) तेजस्वी रीतीनें तेवणें. ३ तापानें
(अंग) तप्त होणें. ४ (छाती) भयानें किं०उत्कं-
ठेनें जोरानें उडणें. ५ (एकाद्या ठिकाणीं पत्र,
माणूस इ०) येऊन किं० जाऊन पोंचणें. ६ (तोफ,
बंदूक, फटाकडा, सुरुंग,इ०) उडणें.७ (एक पदार्थ
दुसऱ्या पदार्थावर) वेगानें येऊन जोरानें
आदळणें.

धडकफडक, धडकभडक वि० साधा; स्पष्ट
(बोलणें किं० बोलणारा); मनांत येईल तें
कोणाची भीड न बाळगतां बोलणारा.

धडका वि० १ नीरोगी, निकोप, मजबूत
(माणूस, प्राणी); धटमुट (पदार्थ).

धडका क्रि० वि० मागें ' धडक ' **क्रि० वि०**
पहा.

धडकी स्त्री० १ भयादि कारणांनीं छातीचें
जोरानें उडणें; भीतीचा उद्रेक (भरणें). २
दुःखाचा हृदयावर होतो तो आघात. ३ (मार-
लेला)रट्टा.

धडंग वि० घटमुट, मजबूत. **क्रि० वि०** १
जोरानें. २ मोठा आवाज करून (दार
लोटणें इ०).

धडका पु० १ रट्टा; ठुसा. २ दुःख, निराशा.

धडधडणें अ० क्रि० १ (छाती)जोराजोरानें
उडणें. २ कोसळून पडणें. ३ (कोणत्याही पदा-
र्थाचा) धडधड असा आवाज होत असणें.

धडधडीत वि० स्पष्ट; शंकारहित; असंदिग्ध;
प्रत्यक्ष. **क्रि० वि०** १ स्पष्टपणें. २ भीड न धरतां.

धडपड, धडफड, धडबड, स्त्री० १ फाजील
उत्सुकता. २ कांहीं कामासाठीं किं० ध्येयासाठीं
अत्यन्त उत्सुकतेनें केलेला प्रयत्न किं० सोसलेले
कष्ट किं०केलेली यातायात. ३ नेटाचा किं०
चिकाटीचा प्रयत्न. ४ मनाला किं० शरीराला
स्वस्थता वाटत नसल्या कारणानें हातपाय इकडे
तिकडे आपटण्याची क्रिया.५ उंदीर, घुशी, इ०चा
गोंगाट किं० खडबडाट.

धडपडणें, धडफडणें, धडबडणें अ० क्रि०
१ नेटाचा प्रयत्न करणें. २ फाजील उत्सुकता
बाळगणें. ३ गात्रें जोराजोरानें आपटणें. ४ रागानें
किं० असंतुष्टपणानें ओरडणें. ५ चांगलें पोहतां
येत नसतां पाण्यांत हातपाय आपटणें किं० गटां-
गळ्या खाणें.

धडल्याव वि० अगडबंब; अवाढव्य.

धडवई पु० बाजारपेठेंत येणारा माल मापणें
किं० तोलणें ह्या कामावरचा अधिकारी. **स्त्री०**ह्या
अधिकाऱ्याचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र.

घडवत, घडोत [म० घड] **न०** १ नित्य नेसणें, पांघरणें, अंग पुसणें, इ० कामासाठीं योजावयाचें वस्त्र किं० चिरगुट (धोतर, पंचा, लुगडें, इ०). २ दणगट किं० खरखरीत वस्त्र.

घडवती, घडोती [**म०** घड] **स्त्री०** १ नित्य नेसणें, पांघरणें, इ०च्या उपयोगाचें वस्त्र (धोतर, लुगडें, इ०). २ अशा वस्त्रांची बेगमी. ३ अशीं वस्त्रें समुच्चयानें; उ० आम्हाला वर्षाला दोनशें रुपयांची घडवती लागते. ३ मकरसंक्रांतीला सुवासिनीला देतात तीं वर्षभर पुरण्याइतकीं लुगडीं, चोळ्या, इ० वस्त्रें समुच्चयानें. **वि०** दणगट, घटमुट (वस्त्र). ❀ **घडोतीचें पाटगें**(किं० **पाडगें**)**न०** कामसू आणि फारशी आजारी न पडणारी आणि सशक्त बायको. **घडवती ल्याख** [**म०** घडवती+ **अ०** लायक (योग्य)] **वि०** रोजच्या वापरण्याच्या उपयोगाचें आणि दणगट (वस्त्र).

घडस, घडसा, घडसखडस, घडसाखडसा **वि०** १ मजबूत; भक्कम; कामाला लायक; बळकट; (माणूस, पशु, पदार्थ). २ शारीरिक किं० मानसिक व्यंग ज्याचे ठायीं कांहीं नाहीं असा (मनुष्य किं० पशु).

घडा पु० १ विद्यार्थ्याला ठराविक कालावधींत तयार करावयास नेमून दिलेलें काम. २ नोकराला लावून दिलेली शिस्त; कोणेकाला वर्तनाच्या बाबतींत घालून दिलेल्या नियमांचा समुच्चय; कामाची कोणेकाला लावून दिलेली सरणी. ३ मनाचा निश्चय. ४ हिय्या, करारीपणा. ५ अजमास; अटकळ. ६ बेगमी, पुरवठा, इ०मुळें येते ती निश्चिंतता; उ० एक पितांबर घेऊन ठेविला म्हणजे बारा वर्षांचा घडा होतो.

घडा [**हिं०**] **पु०** १ दहा शेर इतक्या परिमाणाचें वजन. २कांहीं पातळ पदार्थ वजन करून विकत द्यावयाचा असतां बारदान तराजूच्या एका पारड्यांत घालून दुसऱ्या पारड्याशीं तें समतोल करावयासाठीं घालतात जे दगड, लोखंड, इ०चे तुकडे ते समुच्चयानें; अभंड; उ० प्रथम ह्या तपेलीचा घडा करा आणि मग तींत तूप ओता. ३ मोठ्या वजनाचा दगड, लोखंड, इ० दुकानदाराजवळ नसतां तो त्याच्याजवळ असेल त्या लहान वजनाची दुप्पट, चौपट, आठपट, सोळापट, तराजूच्या साहाय्यानें करीत जाऊन मोठें वजन त्या वेळेपुरतें तयार करतो तें.

घडाका पु० १ रट्टा, ठोसा. २ तोफा, बंदुका, इ०चा कडकडाट. ३ कशाचाही मोठा आवाज. ४ कोणत्याही क्रियेचा जोर; जोराची कोणतीही क्रिया (खाणें, पिणें, खेळणें, अभ्यास, इ०रूप); उ० राम्यानें तीन दिवस गणिताचा घडाका लाविला.

घडाखडा वि० मजबूत; धट्टाकट्टा; अव्यंग.

घडाडणें अ० क्रि० (तोफ, बंदूक, इ०नीं) मोठ्या आवाजानें उडणें; (झाड इ०नीं) मोठा आवाज करून मोडून पडणें. ३ (धोंडा इ०) उंचावरून मोठा आवाज करून खालीं आदळणें. ४ मोठमोठ्या ज्वाळांनीं (विस्तव) पेटणें. ५ (छाती भयादि कारणांमुळें) जोरानें उडणें. ६ (जमीन) भेगाळणें; (भाकरी) भेगाळणें.

घडाडी स्त्री० धैर्य; नेट; अखंडित क्रम; उत्साहपूर्वक प्रयत्न.

घडाघड, घडाघडा क्रि० वि० १ जोराजोरानें. २ झपाट्यानें; सोसाट्यानें. ३ एकामागून एक अशा जलदीच्या क्रमानें.

घडाधोंगडा वि० मजबूत; भक्कम.

घंडाळी, घांडाळी स्त्री० एकसारखी हगत राहाण्याची विकृति (लागणें).

घडिंग, घडिंगण वि० मजबूत, भक्कम.

घडी [**म०** घड] **स्त्री०** १ वस्त्राचा जाडी कांठ. २ अभंड; वर 'घडा' (हिं०)चा तिसरा अर्थ पहा. ❀ **त्याच्या घरीं घडीनें पैसे मोजतात** तो अतोनात श्रीमंत आहे. **घडीपगडी स्त्री०** १ पोशाख. २ विशेष प्रसंगीं ल्यावयाचीं वस्त्रें शेला, पागोटें, इ० समुच्चयानें. ३ पोशाख करण्याची कोणेकाची ऐटबाज पद्धति.

घडेल वि० अगडबंब (शरीर किं० प्राणी).

घडोत इ० वर ' घडवत ' इ० पहा.

घड्डु [**कानडी** दोड्डु=मोठा] **वि०** वयाच्या मानानें असावें तितकें ज्ञान, बुद्धि, विचार, इ० ज्याला नाहींत असा; ठोंब्या.

घण [**सं०** धन] **स्त्री०** एकाच्या मरणामुळें, नाशामुळें, वैतागामुळें, रागामुळें, किं० अप्रीतीमुळें त्याची वस्तु किं० त्याणें टाकून दिलेली

वस्तु जी आयतीच दुसऱ्याला मिळते ती किंवा अशा रीतीनें दुसऱ्याचा होतो तो अकल्पित लाभ; उ० त्यानें नानाप्रकारचे कष्ट सोसून पैसा मिळविला, पण तो आणि त्याचा मुलगा असे दोघे एकदम पटकीनें मेल्यामुळें त्याच्या भावाची धण झाली; उ० तो रागानें पान टाकून उठला आणि मांजराची धण झाली.

धण, धणी [सं० धन्य] **स्त्री०** उत्कट इच्छा (पुरणें). ॐ **धण घेणें** (कांहीं पदार्थ) यथेच्छ घेणें. **एकाद्याची धण पुरणें** त्याणें उत्कटतेनें इच्छिलेली वस्तु त्याला तृप्ति होई इतकी मिळणें. **एकाद्याची धण पुरविणें** त्याची इच्छा भागविणें; तो जें जितकें मागत असेल तें तितकें त्याला देणें.

धणंगणें [म० धण=लाभ] **अ० क्रि०** भोगणें; उपभोगणें; खाद्यपेयांवर हात मारणें.

धणगर पुढें ' धनगर ' पहा.

धणधणणें अ० क्रि० (विस्तव) जोरानें पेटणें.

धणधोप मागें ' धडधोप ' पहा.

धणा, धना पु० कोथिंबिरीचें बी.

धणी [सं० धन्य=तृप्त, सुखी] **स्त्री०** उत्कट इच्छा; एकाद्या पदार्थाच्या प्राप्तीबद्दल लागलेला ध्यास (पुरणें, पुरविणें). ॐ **धणीवरी क्रि० वि०** १ तृप्ति होईतोंपर्यंत. २ इच्छेप्रमाणें.

धणी पु० खालीं ' धनी ' **पु०** पहा.

धंतरमंतर [सं० ' तंत्र+मंत्र ' चें अपभ्रष्ट रूप] **न०** १ जादूटोणा. २ तात्पुरती दागदुजी. ३ कोणेकाची गोड बोलून समजूत पाडणें. मागें ' थंतरमंतर ' पहा.

धताल (–ल्या) **वि०** १ स्पष्ट आणि निर्भीडपणें बोलणारा. २ बाता झोकण्याच्या स्वभावाचा. ३ ढिल्या हातानें खर्च करणारा; खर्चिक. ४ उधळेपणानें खर्च करणारा. ॐ **धताली वि०** १ उधळ्या. २ खर्चिक. ३ बाता झोकणारा; थापबाज.

धत्तूर [सं०] **पु०** धोत्रा हें झाड किंवा त्याचें बोंड किंवा त्याचें फूल.

धतुरा, धत्तूरा [सं० धत्तूर=धोतरा] **पु०** पुरुषाचें जननेंद्रिय (साम्याच्या लक्षणेनें). ॐ **कोणेकाला धत्तूरा दाखविणें** १ त्याला देणें जें योग्य आहे तें त्याला न देणें; त्याला फसवून निराश करणें. २ दुसऱ्यांचें द्रव्यादि घेऊन निर्लज्यपणानें खोटें दिवाळें काढून त्यांना ठकविणें. ३ दुसऱ्याला अमुक देईन अशा थापा मारून त्याला कांहीं न देणें. **धन्याला धत्तरा आणि चाकराला मलिदा** ज्याला जें योग्य किंवा हक्काचें आहे तें त्याला न देतां त्याच्या पंक्तिबारगिरांना किंवा नोकरांचाकरांना देणें (हा अन्याय होय किंवा देणाराचा हा मूर्खपणा होय).

धंदरणें स० क्रि० फसविणें, ठकाविणें.

धंद्या वि० अजागळपणानें किंवा मूर्खपणानें काम करणारा; घोटाळा नाहीं तेथें घोटाळत बसणारा.

धंदा [हिं० धन्धा] **पु०** १ चरितार्थाचा जो नित्याचा उद्योग किंवा व्यवसाय तो. २ नोकरी. ॐ **उद्योग धंदा, धंदा रोजगार पु०** ' धंदा ' चे दोन्ही अर्थ. **धंदेवाईक पु०** पोटासाठीं धंदा करणारा; विशिष्ट धंद्यांत वाढविटलेला; विशिष्ट धंदा करणारा. याच्या उलट ' गमतीनें किंवा हौसेनें कांहीं धंदा करणारा. '

धन [सं०] **न०** १ रुपये, होन, मोहोरा, इ० रूप कोणेकाची संपत्ति. २ जें विकलें असतां रुपये इ० रूप धन मिळतें तें,–दागिने, शेतें, गुरें ढोरें, वतनवाडी, घरदार, इ०. ३ अत्यन्त प्रिय वस्तु. ४ मूल्यवान वस्तु. ५ विद्या, शास्त्र, कला, इ० ज्याचे पासून पैसे मिळतात तें त्याचें धन. ६ (**गणित**) मिळवावयाची संख्या. वजा करावयाच्या संख्येला ' ऋण ' म्हणतात. ७ (' धनुस् ' चा अपभ्रंश) धनरास (ज्योतिषांत). ८ मागें ' धण ' **स्त्री०** [सं० धन] शब्दाचें सर्व अर्थ पहा. ॐ **धनाधिकृत पु०** १ वारस. २ खजिनदार. **धनाधिप, धनाध्यक्ष, धनद, धनापति पु०** कुबेर. **धनपिशाचिका स्त्री०** अतिलोभ; उ० सावक्याराम्याला म्हातारपणीं धनपिशाचिका लागली. **धनदौलत स्त्री० ए० व०** कोणेकाची संपत्ति पैसा, दागिने, घरदार, गुरेंढोरें, शेतवाडी, इ० रूप. **धनवंत वि०** श्रीमंत. **विद्याधन न०** विद्या ह्या रूपाचें द्रव्य; ह्याच सरणीनें ' कीर्तिधन, ' ' यशोधन, ' ' गोधन, ' ' तपोधन, ' ' पशु-

धन, ' आरोग्यधन, ' इ० ह्यांचे अर्थ जाणावे. **धन लावणें (किं० पाडणें)** अक्षय पावणें; वैभवास चढणें (निंदेंत). **धनत्तर** [सं० धनवत्तर] **वि०** १ अतिशय श्रीमंत. २ मुबलक; उ० आमच्या विहिरीला उन्हाळ्यांत सुद्धां धनत्तर पाणी असतें. ३ खूप मोठा, विस्तीर्ण (वाडा, पटांगण, वडाची छाया, इ०). **धनको, धनकोनाम पु०** १ पैसे उसने देणारा. २ कोणाचे पैसे उसने घेतल्यानें येणारी मिंधेगिरी. **धनचल पु०** १ पैशाचें वेड. २ पैसा गेल्यामुळें लागतें तें वेड. **धनतेरस, धनत्रयोदशी स्त्री०** आश्विन वद्य त्रयोदशी ही तिथि,–व्यापारी ह्या दिवशीं लक्ष्मी देवीची पूजा करतात. **धनपिशाची, धनपिशाचिका स्त्री०** १ पैशाचा अति लोभ. २ पैशाचें रक्षण करीत बसणारी हडळ. **धनपिसा वि०** पैशाचा अति लोभी. **धनमद पु०, धनमस्ती स्त्री०** पैशानें अंगीं येतो तो उन्मत्तपणा. **धनमत्त, धनमस्त वि०** संपत्तीनें उन्मत्त झालेला. **धनरेषा स्त्री०** मनुष्याच्या हातांवरील एक विशिष्ट रेषा,–जिच्यावरून त्या मनुष्याला, कधीं, किती, आणि केव्हां द्रव्य मिळेल हें समजतें. **धनलाग पु०** द्रव्यलाभ,–अचानक आणि अनपेक्षित रीतीनें झालेला. **धनलुब्ध वि०** पैशाचा फाजील लोभी. **धनान्ध वि०** पैशानें उन्मत्त झालेला. **धनासा वि०** श्रीमंत. **धनी पु०** खालीं 'धनी' स्वतंत्र शब्द पहा. **धनाढ्य** [सं० धन+आढ्य] **वि०** श्रीमंत. **धनिक वि०** १ श्रीमंत. २ धनको. ३ वैश्य.

धन [सं० धनुस्] **पु०** धनुष्य. ❀ **धनकुटा पु०** उंदीर पकडण्याचें धनुष्यासारखें एक साधन. **धनकुंबी स्त्री०** खडे मारावयाचें धनुष्य. **धनकुली, धनुकली स्त्री०** लहान धनुष्य.

धनगर पु० शूद्रांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम; हे लोक शेळ्यामेंढ्या पाळतात आणि लोकरीचीं वस्त्रें विणतात. **धनगरकी स्त्री०** धनगराचा धंदा. **धनगरवेड, धनगरी वेड न०** पराकाष्ठेचा अजागळपणा.

धनंजय [सं०] **पु०** १ अग्नि. २ अर्जुन, मध्यम पांडव. ३ देहांतील उपप्राणविशेष.

धनभर क्रि० वि० पोटभर; यथेच्छ.

धनवडी (–डी) वि० धनवड गांवचा. ❀ **धनवडी दांडगा पु०** अडदांड; दांडगेश्वर.

धनवर, धनवरी, धणीवरी क्रि० वि० तृप्ति होईतोंपर्यंत, यथेच्छ.

धनसाळ स्त्री० तांदुळाची एक जात.

धना [सं० धन्याक=धना, कोथिंबीर] **पु०** कोथिंबिरीचें बी.

धनाश्री स्त्री० एक रागिणी.

धनिष्ठा [सं०] **स्त्री०** तेविसावें नक्षत्र. ❀ **धनिष्ठापंचक न०** धनिष्ठेपासून रेवतीपर्यंत जीं पांच नक्षत्रें तीं समुच्चयानें.

धनी [सं० धनिन्=धन आहे ज्याचेपाशीं तो] **पु०** १ मालक; स्वामी. २ यजमान; नोकर ज्याच्या आज्ञेंत वागतो तो. ३ कांहीं कामाची जबाबदारी ज्याच्या शिरावर आहे तो. ४ हमी घेणारा किं० जामीन राहाणारा. ५ कांहीं गोष्ट करण्याला ज्याला शास्त्र, रूढि, जनसंमति, इ०नीं अधिकार प्राप्त झाला आहे तो; लायख माणूस. ❀ **धनीगोसावी (–मी) पु०** मालक; यजमान; स्वामी. **धनीजोग** [म० धनी+योग्य] **वि०** हुंडी विकत घेणाऱ्याला जिचे पैसे द्यावयाचे अशी (हुंडी); उलट ' शहाजोग. ' **धनीधावण्या वि०** पोसणारा; काळजी किं० जबाबदारी वाहाणारा.

धनु [सं० धनुस्=धनुष्य] **न०** धनुष्य. २ मेषपासून नववी रास (ज्योतिषांत). ३ कापूस पिंजावयाचें साधनविशेष. ४ चार हात ही लांबी. ५ **(गणित)** परिघाचा भाग. ❀ **धनुर्धर, धनुर्भृत् पु०** तिरंदाज. **धनुर्विद्या स्त्री०, धनुर्वेद पु०** तिरंदाजीचें शास्त्र. **धनुकली स्त्री०** १ लहान धनुष्य. २ कापूस पिंजण्याचें साधनविशेष. **धनुःफल, धनुष्फल न०** वृत्तपरिधीच्या विवक्षित खंडांचीं अंशात्मक जी मापणी गणितानें येते ती. **धनुर्मास पु०** १ धनुराशीस सूर्य असतो तो कालावधि. २ धनुराशीस सूर्य असतां सकाळीं धनुर्लग्न आहे तोंपर्यंत देवनैवेद्यादिपूर्वक भोजन. **धनुर्वात पु०** ज्या वातविकारांत शरीर धनुष्यासारखें कमानदार होतें तो. **धनुष्कोटि पु०, स्त्री०** धनुष्याचीं जीं दोन टोकें तीं प्रत्येक.

धनुष्य [सं० ' धनुस् ' पासून] **न०** १ बाण फेकावयाचें कमानदार साधनविशेष. २ वातावरणांतील जलबिंदूंवर सूर्याचे किरण पडले असतां आकाशांत जी सात रंगांची कमानदार आकृति

दिसते तो; इंद्रधनुष्य. ३ जमीन मोजण्याचें एक प्रमाण किं० माप. ४ परिघाचा एक खण्ड.

धनेश्वरी स्त्री० एक रागिणी (संगीतांत).

धन्य [सं०] वि० १ श्रीमंत. २ सुखी दैववान्; पुण्यवान. ३ पाहिजे आहे तें मिळून सुखी झालेला किं० समाधान पावलेला; कृतकृत्य. स्त्री० पराकाष्ठा; परमावधि. ❀ **धन्यवाद** पु० १ स्तुति. २ आभार. **धन्य तुझी** ! भले खाशी ! शाबास ! (स्तुतींत किं० निंदेंत) **कोणेकाला धन्य वाटणें** त्याला स्वताच्या गुणाबद्दल किं० श्रीमंतीबद्दल मोठा अभिमान वाटत असणें. **तूं धन्य केलीस** तूं मोठा पराक्रम केलास (स्तुतींत किं० निंदेंत).

धन्वन्तरि [सं०] पु० १ देवांनीं समुद्राचें मथन करून जीं चवदा रत्नें काढिलीं त्यांतील धन्वंतरि वैद्य हें एक रत्न होतें. हा देवांचा वैद्य. २कोणीही कुशल आणि चतुर वैद्य. ३ वैद्य लोकांचा औषधें ठेवण्याचा बटवा किं० झोळणा.

धपका पु० १ रट्टा; ठुसा. २दुःख, निराशा, भीति, इ०नीं हृदयाला बसतो तो धक्का, आंचका, किं०धडकी (भरणें, बसणें). ३जाडी भाकरी किं० थालीपीठ. ❀ **धपका सोसतो पण ठिपका सोसत नाहीं** कोणी आपणाला रट्टा मारला तर तो पथकरतो, पण आपल्या आबरूला लागलेला किं० दुसऱ्यानें लाविलेला कलंक पथकरत नाहीं.

धपकाविणें [म० धपका] स० क्रि० १रट्टा किं० तडाखा मारणें. २ तरवार, कुऱ्हाड, इ०च्या प्रहारानें तोडणें. ❀ **विचारी तो विचारी आणि धपकावी तो लष्करी** काय करूं, करूं कीं नको, कसें करूं, असा विचार करीत बसतो त्याची दीनवाणी स्थिति होते, आणि जो प्रसंगावधानीपणानें किं० धाडसानें पाऊल टाकतो तो विजयी होतो किं० ध्येय गांठतो.

धपधाई मागें ' डफधाई ' पहा.

धपला पु० लाकूड, दगड, भिंतीचा गिलावा, इ०चा गळून किं०तुटून किं०फुटून पडतो तो खंड.

धपाटा पु०१ तळहाताचा प्रहार. ❀ **पोटाचा धपाटा होणें** (किं० **वळणें**) १ पोट बखाटीस किं० खपाटीस जाणें. २ रोड होणें.

धपाटें न० भाजणीची भाकरी; थालीपीठ.

धपाधप क्रि० वि० एकामागून एक वेगानें (फळें पडणें, कोणेकाला रट्टे लगावणें, इ०).

धपेला पु० १ जिकीरीचें किं० कष्टाचें काम. २ आडदांड किं० आडमुठा माणूस.

धप्पा पु० रट्टा; तडाखा.

धबकणें स० क्रि०(कोणेकाला) रट्टे लगावणें. अ० क्रि० आदळून पडणें.

धबदूल वि० लठ्ठ; धिप्पाड; अवाढव्य.

धबधबा पु०, **धबधबी** स्त्री० उंचावरून पडणाऱ्या पाण्याचा लोट किं० झोत; उ०गोकाकचा धबधबा.

धबधबीत वि० गुबगुबीत; गोंडस; लठ्ठ असून [सुंदर.

धबला पु० एक प्रकारचें जाडी वस्त्र.

धबाधबी स्त्री० १ मुलांचा एक खेळ. २ एकामागून एक असे अनेक रट्टे मारणें.

धबाफळ न० विरूप दिसण्याइतकें लठ्ठ माणूस किं० जनावर.

धबुला वि० १ लठ्ठ, जाडी (फळ). २ठेंगणा आणि ठुसका (मनुष्य, जनावर).

धबेला पु० वर ' धपेला ' पहा.

धब्बल स्त्री० धपाटा; रट्टा; तडाखा. वि०लठ्ठ.

धब्बें न०लठ्ठ आणि पिकलेला आंबा,फणस,इ०

धमक [हिं०] स्त्री० १ अमुक काम मी मी करीनच करीन अशी हिंमत किं०असा उत्साह; स्वसामर्थ्याची जाणीव. २ शक्ति, सामर्थ्य (सामान्यत्वें). ३ उष्ण,—गात्रांत उठते ती. ४विस्तवाची धग किं० आच. ५ फुलें, अत्तरें, इ०ची दरवळ. ६ मिरच्या, शिकेकायी, इ०कुटल्या जात असतां किं० कांहीं पदार्थ तळला जात असतां त्यांचा जो असह्य खाट उत्पन्न होतो तो किं० ओरड पडते ती. ७ ओलाव्याचा भपकारा किं० दर्प. ८ सोनें, हिरे, इ०चा झगझगाट. ९ पोटांत किं० एकाद्या गात्रांत एकदम उठते ती कळ किं० शिणीक.

धमक क्रि० वि० ' पिवळा ' ह्या शब्दापुढें पिवळ्या रंगाचा किं० 'गोरा'ह्या शब्दापुढें गोरेपणाचा गडदपणा दाखविणारा हा शब्द आहे; उ० पिवळाधमक, गोराधमक.

धमकट वि० १ मजबूत; भक्कम; टिकाऊ (पदार्थ). २ लठ्ठ आणि शक्तिमान माणूस किं०

पशु. ❀ बायको धमकट दादला कसपट नागें ' कसपट ' मध्यें पहा.

धमकणें अ० क्रि० वायुविकृतीनें (शरीरांतील शीर) वेदना उत्पन्न करून उठणें. **स० क्रि०** १ कोणेकाला रट्टे लगावणें.२(विस्तव) वारा घालून प्रज्वलित करणें.

धमका पु० १ रट्टा; ठोसा. २ज्वरानें अंगाची होते ती आग. ३ पाऊस थांबल्यावरचा उकाडा. ४ कोणेकाला घातलेली भीति किं०दहशत;धमकी.

धमकावणी [**म०** धमकावणें] **स्त्री०** कोणेकाला दहशत किं० धमकी घालण्याची क्रिया.

धमकावणें [**हिं०** धमूकाना] **स० क्रि०** (कोणेकाला) धमकी घालणें किं० रागें भरणें.

धमकी [**हिं०**] **स्त्री०** १ भीति (घालणें); रागें भरणें. २ तापाची आग. ३ कामांत नेट किं० उत्साह.

धमधमा [**फा०** दमदमाह्] **पु०**१ उंचवटा; टेकाड. २ कारंजें इ० मध्यें पाणी यावयासाठीं उंचावर बांधलेली टांकी. ३ टेकडीवर चढावयाचा मार्ग. ४आसंमंतात भागाचें निरक्षिण करण्यासाठीं केलेला उंचवटा किं० ओटा.

धमधमीत क्रि० वि० 'पिवळा' ह्या शब्दाचा अर्थ जोरदार करण्यासाठीं ' पिवळा ' च्या पुढें हा शब्द योजतात.

धमनी [**सं०**] **स्त्री०** १ फुंकणी. २ भाता (वारा घालावयाचा).३ शरीरांतील रक्तवाहिनी.

धमाटा पु० १ रट्टा;तडाखा;धपाटा.२गुराखी, धनगर,इ० लोक आपल्या हातावर गोवरी,सशाची लेंडी,इ० च्या विस्तवानें डाग घेतात तो.

धमाधमी स्त्री० १ मुलें चेंडूनें खेळतात तो एक प्रकारचा खेळ. २ धडपड, मारामारी.

धमामा पु० १ मोठा नगारा. २ बोभाटा (होणें, करणें).३ उंचवटा.४ कारंज्याला पाणी पुरविण्यासाठीं उंचावर केलेली टांकी. ५ मातीचा गारा (बांधकामासाठीं केलेला). ६ मातीचीं चित्रें करण्याकरतां किं० चूल रचण्यासाठीं कमावून तयार केलेली माती.

धमार, धमाल [**हिं०** धमार] **पु०**गायनांतील एक ताल.

धमाल वि० लठ्ठ; अवाढव्य.

धमासा पु० एक औषधी कांटेरी झुडूप.

धर [**सं०** धृ=धारण करणें] **पु०** १ अडकावून किं० निरोधून ठेवण्याची किं० राहाण्याची ताकद किं० शक्ति; उ० मला लघवीला (किं० शौचाला) लागली असतां अगदीं थोडा वेळ सुद्धां मला धर धरवत नाहीं (किं०धर निघत नाहीं.) २ चिकटलेल्या स्थितींत राहाण्याची ताकद; चिकटपणा; उ० ह्या ठिकाला धर नाहीं; उ० हा चना आतां जुना झाला, त्याला धर नाहीं; उ० त्या आंब्याला धर नाहीं, मोहोर येतांच गळून पडतो. ३ संपादिलेलें ज्ञान,घोकलेला धडा,ऐकिलेला किं० पाहिलेला देखावा,कोणेकाचें नांवगांव,इ० लक्ष्यांत ठेवण्याची ताकद; धारणाशक्ति; उ० गोविंदाच्या बुद्धीला धर नाहीं, त्याला एक श्लोक दहा वेळां सांगावा लागतो. ४ देहकष्ट सोसण्याची किं० एकसारखे मानसिक श्रम करण्याची ताकद. ५ श्वास कोंडून धरण्याचें सामर्थ्य.६आधाराचा भक्कमपणा; पायाचा मजबूतपणा. ७ वर्तन, विचार, इ० चा एकसूत्रीपणा; एकवाक्यता; उ० गोपाळाच्या बोलण्याला धर नाहीं, आतां एक बोलेल घटकेनें दुसरेंच कांहीं बोलेल. ८ नियमबद्धता; शिस्त; सरणीची एकरूपता; उ० ह्या राज्यामध्यें अमुक अपराधास अमुक शासन करावें असा कांहीं धर नाहीं. **टीप,**–संस्कृत समासांच्या अंत्यपदीं ' धर ' शब्दाचा अर्थ धारण करणारा किं० आधार देणारा, असा होतो; उ० गंगाधर म्ह० गंगेला डोक्यावर धरणारा (शंकर); उ० जलधर म्ह० मेघ; महीधर म्ह० पर्वत; इ० इ०. ❀ **धर सुटणें** धैर्य नाहींसें होणें.

धरण [**सं०**] **न०** १ पाणी तुंबवून मळा, बाग, इ० मध्यें पाण्याचा पाट नेतां यावा म्हणून पाण्याच्या प्रवाहांत जी भिंत घालतात ती. २ चोवीस गुंजांइतकें वजन. ३ गर्भिणीचा भलत्याच वेळीं गर्भपात न व्हावा म्हणून तिच्या गळ्यांत औषधिविशेषाची मुळी बांधतात ती. ४ नऊ आणे समुच्चयानें. ५ धारण करणें. ६ आश्रय; टेका. ❀ १ **मुलीचें धरण फुटणें** तिला प्रथम रजोदर्शन होणें. २ कोणीही स्त्री रजस्वला स्थितींत जाणें. **टीप,–**.हे दोन्ही अर्थ वात्रटपणाच्या संभाषणांत मात्र येतात

धरणखांब पु० घराचे जमीनीपासून आढ्या-पर्यंत जे खांब असतात ते प्रत्येक. **धरणमूल** न० वृक्षाचें मुख्य मूळ,—जें जमीनींत खोल गेलेलें असतें आणि ज्याला शाखा फुटलेल्या असतात. **धरणकरी** खालीं ' धरणें ' न०मध्यें पहा.

धरणी [म० धरणें] **स्त्री०** १ धरण्याची क्रिया किं० रीति. २ धरती; पद्धति; शिस्त; तऱ्हा. ३ कोणेकाला पकडून धरून आणणें किं० ह्या कामीं पाठविलेल्या लोकांची टोळी. ॐ **धरणीची मुलगी स्त्री०** लग्नासाठीं बलात्कारानें पकडून आणलेली मुलगी. तिच्या लग्नाला ' धरणीचें लग्न' म्हणतात.

धरणी [सं०] **स्त्री०** १पृथ्वी. २जमीन. ॐ**धरणीकंप पु०** पृथ्वीच्या पोटांत रासायनिक द्रव्यांचा क्षोभ होऊन तिचा पृष्ठभाग हालणें, किं० उलथणें, किं०हादरणें; भूकंप. **दे माय धरणि ठाय** ! (किं० ठाव) मागें ' ठाय ' मध्यें पहा.

धरणें [सं०धृ] **स०क्रि०** १पकडणें; उ० हातांत काठी धर; उ० उंदीर तोंडांत धरून मांजर पळालें. २ दाबांत किं०भाराखालीं चेपून ठेवणें; उ०पानें वाऱ्यानें उडतील म्हणून तीं पायाखालीं धरून ठेव. ३ पकडून कबज्यांत किं० नियंत्रणेंत ठेवणें; उ० धरीन तर डसेल सोडीन तर पळून जाईल. ४ पळून गेलेल्या चोराला, जनावराला, मुलाला, किं० दुसऱ्या कोणाला हुडकून काढून पकडून आणणें. ५ (ज्ञान, विद्या, शास्त्र, कला, खुबी, युक्ति, इ०) मनांत साठवून म्हणजे न विसर-लेल्या स्थितींत ठेवणें; उ० ह्या मुलाला जें शिक-वावें तें तो चांगलें धरतो; उ० माझा उपदेश नीट मनांत धर, त्यांत तुझें कल्याण आहे. ६ (कांहीं नियम, सरणी, क्रम, शिस्त, किं० व्रत) घेऊन, स्वीकारून, किं० अवलंबून तदनुसार वागणें; उ० सदानंदानें प्रातःस्नान धरलें आहे; उ० गणपत-रावांनीं गीतेचा पाठ चातुर्मास्यांत धरला आहे. ७ दुसऱ्याला उलगडावयासाठीं कांहीं प्रश्न किं० कोडें मनांत ठरवून ठेवणें; उ० तूं एक अंक धर मी तो सांगतों. ८ मानणें; समजणें; अमुक गोष्ट अशी आहे असा मनाचा ग्रह करून घेणें किं० अशा ग्रहानें वागणें. ९ (माणूस, जनावर, किं० पदार्थ बुद्धिपूर्वक) कांहीं विशिष्ट कामीं किं० प्रसंगीं योजणें, लावणें, किं० नियुक्त करणें; उ० हा बैल तुम्ही राहाटाखालीं धरा म्हणजे त्याची मस्ती जिरेल. १० कोणा पदार्थाविषयीं किं० माणसाविषयीं कांहीं विशिष्ट मत, ग्रह, किं० भावना मनांत वागविणें. ११ हिशेबांत किं० विचारांत घेणें; उ० त्या मूर्ख माणसाचें अद्वातद्वा बोलणें तुम्ही धरूं नका. १२ (नोकर, माणूस, जमीन, घर, शेत, किं० कांहीं वस्तु) आपल्या कबज्यांतून न जाईल आणि आपल्या उप-योगाला येत राहील असें करणें. १३ स्वीकारणें; अवलंबिणें; अनुसरणें. १४ कार्यविशेषासाठीं स्थलविशेष किं० समयवि-शेष मुक्रर करणें किं० ठरविणें; उ० गोदीच्या लग्नाला सूर्यास्तानंतर मुहूर्त धरणें मला सोयीचें आहे. १५ संपादणें, मिळविणें, साठविणें. १६ शोधून काढणें; हुडकणें. १७ समाविष्ट करणें; गण-तींत किं० हिशेबांत घेणें; गणणें; उ० त्या पंचवी-सांत तुम्ही विठ्ठलरावांना धरलें काय ? १८ मह-त्वाचा समजणें; विचारांत घ्यावयाच्या लायकीचा मानणें. १९ पछाडणें; जर्जर करणें; आक्रान्त करणें. २० कांहीं प्रमाण, माप, किं० वजन ठरावेणें किं० स्वीकारणें. ॐ **धरून बसणें** हट्ट, हेका, मत, किं० सरणी न सोडणें. **धरून सोडून क्रि० वि०** १ मधून मधून; खंडित क्रमानें. २चंचल किं०अस्थिर मनानें; खंडित सरणीनें. ३ संदिग्ध रीतीनें. **धरून सोडून कोणेकाशीं वागणें** १ त्याची मर्जी संभा-ळून त्याच्याशीं वागणें. २ धूर्तपणानें, शाहाणपणानें वागणें. **त्याला मी दोन शब्दांत धरीन** १ त्याचें म्हणणें चुकीचें किं० लबाडीचें आहे असें **मी** तेव्हांच सिद्ध करून देईन. २ त्याला मी हांहां म्हणतांच निरुत्तर किं० कुंठित करीन. **सूर धरणें** वीणा इ०च्या सुरास आपल्या कंठाचा सूर मिळविणें किं०दुसरा कोणी गात आहे त्याच्या मागून त्याचा स्वर पूर्ण करणें किं०लांबविणें. **ताल धरणें** गीताच्या तालानुरूप ठोका देणें. **द्वार, वाट, किं० रस्ता धरणें** लोकांच्या जाण्यायेण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीनें बसणें किं० उभें राहणें. **आपला मार्ग धरणें** दुसऱ्याच्या कामांत न लुडबुडतां आपल्या संबंधाच्या कामांतच मन घालणें. **वाट**

धरणें विशिष्ट स्थल सोडून निघून जाणें. **ओल धरणें** ओलेपणींच भूमि नांगरून ठेवणें. **धरून बसणें** कांहीं विशिष्ट मागणी लोकांनीं पुरविली पाहिजे असा आग्रह चालविणें; उ० तो पंचवीस रुपये धरून बसला आहे म० आग्रहानें मागत आहे. **टीप**,–' धरणें ' हें क्रियापद आज्ञार्थी असतां 'ध्यावयाला सिद्ध होणें ' असा त्याचा अर्थ होतो; उ० तुला शाई पाहिजे आहे ना ? हीं धर शाई.

धरणें [सं० धृ] अ० क्रि० १ चिकटून बसणें; ठेविलेल्या स्थितींत किं० जागीं राहणें; उ० ह्या चुन्याची विरी गेली आहे, तो भिंतीस धरत नाहीं; उ० तेलकट कागदावर शाई धरत नाहीं. २ वृक्षादींनीं फलादि उत्पन्न करणें; उ० ह्या कलमावर यंदा पुष्कळ आंबे धरले; उ० ह्या जमीनीला पोपटें फार धरतात. ३ थंडी, वारा, इ०नीं गात्रविशेष किं० इंद्रियविशेष विकृत होणें किं० जर्जर होणें; उ० आज आठ दिवस माझी कंबर धरली आहे; उ० माझे हातपाय थंडीनें (किं० वातानें) धरतात. ४ स्मरणांत राहणें; न विसरलेल्या स्थितींत असणें; उ० तो श्लोक तुम्हीं मला सांगितला पण मला धरला नाहीं. ५ विहित कृत्य म्हणून गणलेलें असणें; उ० ब्राम्हणाला नित्य स्नान धरलें आहे; उ० ज्वरास लंघन हा उपाय धरला आहे. ६ निवारलें जाणें; उ० पासोडीनें थंडी धरत नाहीं बुरणुसानें धरते तशी; उ० नुसत्या भातानें माझी भूक धरत नाहीं. ❀ **पोट धरणें** हगवणीचा उपद्रव शमणें.

धरणें [म० ' धरणें ' हें क्रियापद] **न०** १ देवानें आपली कांहीं प्रार्थना सफळ करावी म्हणून त्याचेंपुढें उपाशी बसून राहणें (बसणें). किं० एक दिवस जेवून आणि एक दिवस उपाशीं राहून बसणें. २ गुन्हेगाराला पकडून आणण्यासाठीं पाठविलेली शिपायांची टोळी (येणें, पाठविणें). ३ आपलें कर्ज कोणी द्वाड मनुष्य फेडीत नसल्यास त्याच्या दाराशीं सावकारानें किं० त्याच्या नोकरानें बसून राहाणें. ❀ **धरणेकरी, धरणेदार पु०** १ वर अर्थ २ प्रमाणें गेलेली किं० पाठविलेली टोळी. २ वर अर्थ ३ प्रमाणें बसणारा मनुष्य. **धरणें पारणें न०** पु०व०१ एक दिवस जेवावें आणि एक दिवस उपवास करावा असें व्रत. २ दारिद्र्यामुळें कधीं जेवण मिळावें, कधीं उपाशीं राहावें, अशी होते ती स्थिति; उ० माझी नोकरी गेल्यापासून माझें धरणें पारणें चाललें आहे.

धरती [म० धरणें] **स्त्री०** १ तऱ्हा; प्रकार; सरणी. २ विशिष्ट प्रदेश; उ० पुणें धरती.

धरधरणें, धरधरावणें [म० धरणें] अ० क्रि० १ आजारांतून उठणें किं० उठून पूर्व स्थितीवर येणें. २ टिकून राहणें.

धरनेम [म० धरणें+नेम (नियम)] **पु०** १ भाषण, वर्तन, इ०तील एकसूत्रीपणा. २ स्थिरपणा.

धरपकड [म० धरणें + पकडणें] **स्त्री०** चोर, वेठबेगारीसाठीं माणसें, गुन्हेगार, किं० संशयित माणसें यांना एका मागून एक पकडण्याची सरकारच्या शिपायांची क्रिया. ❀ **धरपकडीचा** वि० लोकांना मोहांत पाडणारा, फसविणारा, किं० संकटांत लोटणारा (व्यवहार, भाषण, हकीकत).

धरफड इ० मागें ' धडफड ' इ० पहा.

धरबंध (–द) पु०, **धरबंधन न०** [म० धरणें, + बांधणें, बंधन, बंध] १ नियम, सरणी, नियंत्रणा. २ अमुक प्रकारचें वर्तन, भाषण, पोशाख, इ० अमक्याला योग्य, अमक्याला अयोग्य, अशी शिस्त, आचार, रूढि, किं० शास्त्राज्ञा (प्रयोग करणरूपी किं० अकरणरूपी होऊं शकतो). ३ अंगांत येणाऱ्या भूताला मंत्रतंत्रानें जखडण्याची क्रिया. ह्या अर्थी ' धरबांध ' ही रूढ आहे. ४ कोणेकास राजभत्यादिकांनीं धरणें, बांधणें. इ० रूप व्यापार. ❀ **सुताला धरबंधावर आणणें** त्याला मंत्रतंत्रादि उपायांनीं निर्बल करणें किं० नियंत्रिणें.

धरमधक्का [सं० धर्म+म० धक्का] **पु०** १ विनाकारण भोगावे लागणारे कष्ट किं० खाव्या लागणाऱ्या ठोकरा. २ आपलें काम न होतां व्यर्थ हेलपाटे पडतात ते. ३ डोक्यावर किं० खांद्यावर किं० पाठीवर ओझीं वाहणाऱ्या माणसांना कांहीं वेळ ओझीं उतरण्यासाठीं रस्त्याच्या कडेला ओटा बांधलेला असतो तो किं० चार खांबांवर आडवी फळी बसविलेली असते ती.

धरमेळ [म० धरणें+मेळ] **पु०** भाषणवर्तनादिकांत सरणीची समरूपता.

धरवणी [म० धरणें+पाणी] **न०** कौलारावरून गळणारें पावसाचें साठविलेलें पाणी.

धरसवर [म० धरणें+सवरणें] **स्त्री०** १ गृहव्यवस्था. २ पाहुणचार. ३ गृहस्थाचें कर्तव्य. ४ व्यवस्था; नीटनेटकेपणाची मांडणी किं० रचना.

धरसांड, धरसोड [म० धरणें, सांडणें, सोडणें] **स्त्री०** १ मनाचा किं० विचाराचा अस्थिरपणा; हें करूं कीं नको अशी मनाची साशंक वृत्ति; संदिग्धावस्था. २ प्रसंग पडेल त्याप्रमाणें जोर दाखविणें आणि प्रसंग पडेल त्या प्रमाणें माघार खाणें अशी वर्तनाची सरणी.

धरा [सं०] **स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. ꣸ **धराधिप पु०** राजा. **धराधर पु०** पर्वत. **धराकंप, धराणिकंप पु०** पृथ्वीच्या पोटांत रासायनिक द्रव्यांचा क्षोभ होऊन पृथ्वी हालणें, फाटणें, उलथणें, इ० रूप क्रिया. [' धरा 'पहा.

धरित्री [सं०] **स्त्री०** पृथ्वी. वर ' धरणी, '

धरून [म० ' धरणें ' पासून] **क्रि० वि०** –पासून. मूळाधरून, कालधरून, आजधरून, इ० हे शब्द अशिक्षित लोकांच्या बोलण्यांत येतात.

धर्ता [सं० धर्तृ=धरणारा] **पु०** १धरणारा. २ पकडणारा. ३पोसणारा; पाळणारा. ४ टेका; आश्रय.

धर्म [सं०] **पु०** १ जग उत्पन्न करणारा आणि चालविणारा जो परमेश्वर त्याच्या संबंधानें जें मनुष्याचें कर्तव्य तें किं० त्या कर्तव्याच्या प्रकारांच्या किं० तपशिलाच्या ज्या विविध बाबती त्यांचा समुच्चय. २ परमेश्वरावर निष्ठा असून तिला अनुसरून वागण्याच्या प्रवृत्तीनें जीं कर्में, जे विधि, जो वर्तनक्रम, त्या सर्वांचा समुच्चय. ३ पुण्यकर्म. ४ आचार, शास्त्रोक्त कर्तव्य. ५ कायदा, न्याय, शासनसरणी. ६ नीति; नीतीच्या नियमांचा समुच्चय. ७ स्वभाव, गुण; उ० सखल प्रदेशाकडे वाहात जाणें हा पाण्याचा धर्म आहे. ८ पुण्यकर्म. ९ परोपकारबुद्धि. १० परोपकारबुद्धीनें कोणास कांहीं फुकट देणें किं० जें दिलें जातें तें. ११विशिष्ट जातीचे जे विशिष्ट आचार, प्रकार, चालीरीति, इ० त्या सर्वांचा समुच्चय. १२ शास्त्रोक्त किं० वेदोक्त कर्म केल्यानें लागतें तें पुण्य. १३ पदार्थमात्राचा जो विशिष्ट गुण तो. १४ एकानें दुसऱ्याशीं कसें वागावें ह्या संबंधाची शिष्टसंमत सरणी. ꣸ **धर्मकर्म न०** धर्मानें विहित जें कर्म तें. **धर्मकर्मसंयोग पु०** मागें ' कर्म ' मध्यें पहा. **धर्मकार्य न०** विहिरी, धर्मशाळा, इ० बांधणें, रस्त्यावर झाडें लावणें, देवळें बांधणें, अन्नसत्रें स्थापणें, इ० रूप जें परोपकाराचें कृत्य तें. **धर्मखातें न०** धर्मासाठीं जो खर्च त्याचा हिशेब ठेवणें किं० नोंदणी करणें इ० संबंधाचें खातें. **धर्मतः क्रि० वि०** धर्माच्या दृष्टीनें. **धर्माच्या दारीं कुत्रें न०** यजमान परोपकारबुद्धीनें कोणास कांहीं देत असला तर त्याला आडविणारा, किंवा त्याला तसें न करावें म्हणून सूचना करणारा विघ्नसंतोषी किं० नीच स्वभावाचा माणूस. **धर्मध्वज पु०** धर्मनिष्ठेची बढाई किं० देखावा किं० फाजील अवडंबर (माजविणें, लावणें, उभारणें). **धर्मध्वजी वि०** आपल्या ठायीं जी धर्मनिष्ठा नाहीं तिचा खोटा देखावा करणारा इ० ढोंगी (माणूस). **धर्मनौका, धर्मनाव स्त्री०** उतरूंपासून भाडें न घेतां खाडीवरून किं० नदीवरून त्यांना इकडून तिकडे पोहोचविणारी नाव. **धर्मपत्नी स्त्री०** सशास्त्र विवाहाची भार्या. **धर्मपरायण वि०** १ धर्मविहित आचरण करण्याच्या प्रवृत्तीचा. २ सत्य, धर्म, न्याय, यांचेकडे दृष्टि ठेवून वर्तन करणारा. ३ धर्माच्या उद्देशानें केलेलें. **क्रि० वि०** धर्मासाठीं; धर्माच्या उद्देशानें; धर्मार्थ. **धर्मपुत्र पु०** १ युधिष्ठिर. २ उत्तरक्रियेपुरता मानलेला पुत्र; ज्याला पुत्र नाहीं त्याची उत्तरक्रिया करण्यासाठीं त्या वेळेपुरता जो त्याचें पुत्रत्व स्वीकारतो तो. **धर्मपुरी स्त्री०** १ज्या घरीं आल्यागेल्या पाहुण्याचा चांगला सत्कार केला जातो तें घर. २ ज्या पुरांत तपस्वी, विद्वान्, धर्मनिष्ठ ब्राम्हण पुष्कळ आहेत तें पुर. **धर्मपेटी स्त्री०** धर्मार्थ कोणी कांहीं द्रव्यादि दिलें तें साठवण्याची दऊळ इ० स्थळीं ठेविलेली असते ती पेटी. **धर्मपोई स्त्री०** आल्यागेल्यांस किं० प्रवाशांस जेथें पाणी, अन्न, इ० हीं फुकट दिलीं जातात ती जागा. **धर्मबंधु, धर्मभ्राता पु०** १मानलेला भाऊ. २ एका धर्माचा किं० त्याच धर्माचा किं० पंथाचा माणूस. **धर्मबुद्धि स्त्री०** धर्म करण्याची प्रवृत्ति; धर्मकृत्यें करण्याकडे मनाचा कल. **धर्ममर्यादा स्त्री०** धर्मानें घालून दिलेली सरणी किं० शिस्त किं० नियंत्रणा. **धर्मयुद्ध न०** ज्यांत सरळ मार्गाचा अवलंब केलेला असतो, ज्यांत लबाडीनें प्रतिपक्षावर हल्ला केला जात नाहीं,

ज्यांत उभय पक्ष तुल्यबळ असतात, असें युद्ध. **धर्मराज पु०** १ ज्येष्ठ पांडव; युधिष्ठिर. २ यम. ३ ज्याच्या मनांत कपट नाहीं, जो सर्वांशी समबुद्धीनें वागत असतो असा सत्त्वशील माणूस. ४ गौतमबुद्ध. **धर्मराज्य न०** ज्या राज्यांत सत्य, न्याय, आणि नि:पक्षपातीपणा आहे, आणि ज्यांत प्रजाजनांत फूट पाडून राज्याला बळकटी आणली जात नाहीं असें राज्य. **धर्मराजाची बीज** [म०बीज =द्वितीया ही तिथि] **स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वितीया ही तिथि. ह्या दिवशीं बहिणी आपल्या भावांना जेवावयास बोलवून त्यांचा सत्कार करतात आणि भाऊ त्यांना द्रव्यादि रूप कांहीं देणगी देतात. **धर्मलंड वि०** धर्मकृत्यें न करणारा. **धर्मवाट स्त्री०** शत्रु शरण आला असतां त्याला उपद्रव न करतां वाटेल तिकडे आम्ही जाऊं देऊं अशा शर्तीनें त्याला दिलेली वाट. **धर्मविवाह पु०** दरिद्री मनुष्याबद्दल आपला खर्च करून त्याचें किं० त्याच्या कन्यादिकांचें फुकट करून दिलेलें लग्न. **धर्मशाळा स्त्री०** मार्गादिकांत किं० शहरांत पांथांना उतरावयासाठीं जें घर बांधून ठेविलेलें असतें तें. **धर्मशास्त्र न०** वर्णाश्रमधर्मांचें प्रतिपादक जें मन्वादिप्रणीत शास्त्र तें. **धर्मशास्त्री पु०** धर्मशास्त्रांत निष्णात जो पंडित तो. **धर्मशाळेचें उखळ न०** वेश्या. **धर्मशिळा स्त्री०** पतीच्या चितेवर त्याची स्त्री चढतांना ज्या शिळेवर पहिलें पाऊल ठेविते ती शिळा. **धर्मशील (-ळ) वि०** धर्मानें विहित असें आचरण करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा. **धर्मसंतति स्त्री०, धर्मसंतान न०** कन्यारूप अपत्य. **धर्मसभा स्त्री०** १ न्यायाची कचेरी; कज्जांचे निवाडे करावयाची जागा. २ धर्माच्या संशययुक्त बाबतींत निकाल देणाऱ्या शास्त्र्यांची मंडळी. **धर्मसंस्थान न०** १ पुण्यक्षेत्र. २ पवित्र स्थळ; जेथील लोक धर्मनिष्ठ आहेत असें स्थळ, नगर, इ०. **धर्मसंस्थापन न०** १ नवीन धर्म प्रचारांत आणणें. २ धर्म यथाविधि आचरला जात नसला तर तो तसा आचरला जावा अशासाठीं केलेली योजना. **धर्मज्ञ वि०** १ खऱ्या स्वरूपाचा धर्म जाणणारा; धर्माच्या गुंतागुंतीच्या बाबी उकलूं शकणारा; धर्मशास्त्रांत निष्णात. २ आपलें कर्तव्य स्मरून वर्तन करणारा. **धर्माचा कांटा पु०** सोनें, चांदी, मोतीं, इ० चें खरें वजन लोकांना करून देण्यासाठीं सरकारनें किं० गांवच्या शिष्ट मंडळींनीं ठेविलेला कांटा. **धर्माचा पाहारा पु०** सूर्योदयाच्या पूर्वी दीड तास आणि सूर्योदयानंतर दीड तास असा एकंदर तीन तासांचा अवधि **धर्माची गाय स्त्री०** १ धर्म म्हणून बक्षीस दिलेली गाय. २ कन्या. ७ धर्माच्या गायीचे दांत पाहूं नयेत = धर्मार्थ दिलेली वस्तु बहुधा टाकाऊ असते. **धर्मात्मा पु०** १ धर्मशील माणूस. २ दानधर्म करण्याकडे प्रवृत्ति ज्याची आहे असा. **धर्मादाय (-व) पु०** १ धर्मार्थ जें कांहीं दिलें तें. २ सरकारांतून दरिद्री किं० अनाथ अशा लोकांस प्रतिवर्षी द्रव्यादिरूपें साहाय्य केलें जातें तें. **धर्मादाय टाकणें (किं० सोडणें)** धर्मार्थ देणें. **धर्मादायपट्टी स्त्री०** देऊळ, उत्सव, इ० चा खर्च चालविण्यासाठीं लोकांवर बसवितात ती वर्गणी. **धर्माधर्मी क्रि० वि०** पैसा खर्च न करतां फुकट; उ० असलीं कामें कधीं धर्माधर्मी होत नसतात. **धर्माधर्मीचा वि०** उपकार करण्याच्या बुद्धीनें दिलेला; फुकट दिलेला; उ० मला धर्माधर्मीचें कांहीं नको, माझा हक्क म्हणून मला द्या. **धर्माधिकरण न०** न्यायमंदिर. **पु०** न्यायाधीश. **धर्माधिकार पु०** १ न्याय देणें. २ धर्मकृत्यांवर देखरेख. **धर्माधिकारी, धर्माध्यक्ष पु०** न्यायाधीश. **धर्मासन न०** खटल्यांचे निवाडे करावयाला राजा किं० न्यायाधीश ज्या आसनावर बसतो तें आसन. **धर्म करतां कर्म उभें राहणें (किं० पाठीस लागणें)** एकाद्याचें बरें करावयास आपण झटत असतां आपणावर कांहीं संकट ओढवणें किं० आपण कांहीं तरी पंचाइतींत पडणें. **धर्मावर सोमवार सोडणें** पदरचें कांहीं एक खर्च न करतां पुण्य जोडणें किं० मोठेपणा मिळविणें किं० मोठेपणा मिळविण्याची युक्ति करणें. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ले० ३३७पहा. **धर्माआड कुत्रें न०** परोपकाराच्या कृत्याच्या आड येणारा दुष्ट आणि मत्सरी माणूस. **धर्मास येणें** योग्य वाटणें; मर्जीस येणें (ह्या अर्थांत वैतागाची छटा आहे); उ० तुला जो उपदेश करावासा मला वाटला तो मी केला, आतां तुझ्या धर्मास येईल

तसें कर. **धर्मास नको** अगदीं नको, बिलकूल नको. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' हें पुस्तक ले० ३३७ पहा. **धर्मक्षेत्र** न० १ पुण्यवान् माणूस २भारतवर्ष.**धर्मप्रवचन** न०धर्मशास्त्र. **धर्मचारिणी, सहधर्मचारिणी** स्त्री०पत्नी.**धर्मोडा** [म० धर्म+वडा (प्रत्यय)] पु० चैत्रादिमासीं ब्राम्हणाच्या घरीं दररोज एक घागर पाणी फुकट घालणें हें व्रत.

घर्षण [सं०] न० १ पकडणें. २ दांडगाई. ३ बलात्कारें केलेला स्त्रीसंभोग.

घर्षणें [सं० धृष्] स० क्रि० बलात्कारानें स्त्रीशीं संभोग करणें.

घलपट न०, **घलपी** स्त्री० १ लाकडाचा निघालेला किं० मोडून काढलेला वाकडातिकडा तुकडा. २ भिंतीच्या गिलाव्याचा गळून पडलेला खंड.

घलपा पु० लाकडाचा किं० दगडाचा किं० गिलाव्याचा किं० गुळाची ढेप इ० चा उडालेला किं० उडविलेला खंड. ❀ **वाळून घलपा होणें** अत्यन्त रोड होणें (मनुष्य, जनावर).

घव [सं०] पु० पति; नवरा; भर्ता.

घवड, घावड पु० लोहारांची एक जात किं० त्या जातीचा इसम.

घवताल (–ल्या), **घोताल** (–ल्या) [म० घोत=दोन तळहात एकाशीं एक जुळवून केलेला खळगा; पसा] वि० १ खर्चिक, उधळ्या. २ अव्यवस्थित. ३ वाटेल तें ताळतंत्राशिवाय बोलणारा. ४ चैनी, बाहेरख्याली.

घवघवीत क्रि० वि० गडद (पिवळा, पांढरा, गोरा).

घवल [सं०] वि० १ पांढरा. २ स्वच्छ; उजळ. ❀ **घवलपक्ष** पु० १ महिन्याचा शुक्लपक्ष. २ हंस. **घवलार** [सं० धवल+गृह] न० १ चुनेगच्ची जमीन किं० अशा जमीनचें घर. २ भव्य आणि विस्तीर्ण वाडा.

घंवशा, घंशा, घंवसा, घोंशा [सं०दंश] पु० १ कांहीं विशिष्ट काम करावयाचें आहे अशी मनाला लागून राहिलेली आंच किं० हुरहुर. २ कोणतीही नेटाची क्रिया (लावणें); उ० चार दिवस लढाईचा घंशा लाविला तेव्हां किला सर झाला.

घवा [सं० धवल=पांढरा] वि० पांढरा स्वच्छ. ❀ **घवाफल, घवाफूल** वि० पांढरा स्वच्छ.

घवेटी [म० धवा=पांढरा] वि० पांढरी स्वच्छ चिरगुटें किं० कपडे वापरणारा.

घशा, घश्शा वि० १ दांडगेश्वर; नाजूक हातानें काम न करणारा. २ काम दांडगाईनें रेटून नेणारा. ❀ **घशाखशा, घशाफशा** क्रि० वि० निष्काळजीपणानें किं० दांडगाईनें (काम करणें). **घशांफशीं** क्रि० वि० १ दांडगाईनें. २ उथळेपणानें. ३ अव्यवस्थित रीतीनें.

घशोर वि० दांडगेपणानें, ताळतंत्र न पाहतां, किं० कोणाची भीड न धरतां कोणतेंही काम करण्याच्या स्वभावाचा.

घष्ट, घष्टपुष्ट वि० खावयास प्यावयास यथेच्छ मिळाल्याकारणानें लठ्ठ, गुबगुबीत, निकोप असा (मनुष्य, जनावर).

घस पु० १ शस्त्रानें पदार्थ साफ कापलेला किं० तासलेला नसल्यास त्याचे राहातात जे अणकुचीदार अवयव ते प्रत्येक; कुसळ; उ० ह्या घडवंचीची फळी आणखी रंधून काढ नाहीं तर त्या फळीच्या घसांनीं चिरगुटें फाटतील. २ झाडें, दगड, इ० च्या पृष्ठभागांवर असतात जे बारीक बारीक अणकुचीदार अवयव ते प्रत्येक; उ० ह्या कुंपणांतून धोतर आवरून जा, नाहीं तर एकादा घस लागून तुझें धोतर फाटेल. ३ उद्धट किं० अडदांड माणूस. ४ नेटाचा किं० जोराचा तडाका (मारणें). ५ जोर, आवेश, नेट.६ भीति, दुःख, इ० नीं हृदयाला बसतो तो धक्का(पोटांत घस होणें). ७ टेकडीची किं० नदीच्या कांठाची बहुतेक शिडीसारखी उतरण. ❀ **घसास लावणें** किं० **घसावर घालणें** १ कांहीं गोष्ट सोयीच्या मार्गानें होण्याजोगी असतां तिच्यासाठीं कठोर उपाय योजणें. २ एकादी गोष्ट विसरून जावयाचा प्रयत्न करणें योग्य असतां ती वारंवार उकरून काढून तिच्याबद्दल बोलत राहून आपल्या जिवाची तळमळ करून घेणें आणि दुसऱ्याला त्रास देणें. **घसावर घस घालणें** कोणेकाला छळण्यासाठीं त्याचे अपकार करीत राहणें. **घसकट** न० १ वर ' घस ' १ आणि २ ह्या अर्थी पहा. २ जाडेंभरडें

(बल).धपमुपग्ना (-ळ्या)वि०दांडगेश्वर, दांडगाईनें कोणतेंही काम करणारा.

धसकणें स० क्रि०१जोरानें घालणें किं० खुपसणें. २ हिसकणें; हासडणें. अ० क्रि० १ जोरानें घुसणें किं० शिरणें. २ (झाडाची फांदी)कडाडून दिशीं मोडून पडणें. ३(दगड इ०) उलथून किं० कोसळून पडणें.

धसका पु० १ हिसका. २ तडाखा, रट्टा. ३ आकस्मिक भीति, दुःख, इ० नीं मनाला बसतो तो धक्का. ※ धसकधुय्या, धसकनंदन पु० दांडगेश्वर;आडदांड माणूस;दांडगाईनें कोणतेंही काम करणारा.

धसणें अ० क्रि० जोरानें शिरणें किं० घुसणें. स० क्रि० १ जोरानें खुपसणें. २ चेपणे, चोपणें, खुमसणें.

धसणें मागें ' धजणें ' पहा.

धसरड स्त्री० शिडीवजा उतरण,—नदीकांठची किं० टेकडीवरची.

धसाडा वि० १ जाडी, खरबडीत (कोणताही पदार्थ). २ दांडगा (माणूस).

धस्स न० भीतीनें अंत:करणावर किं० मनावर झालेला आघात; उ० वाघ आला म्हणतांच माझ्या पोटांत धस्स झालें.

धा [सं०] अव्यय संस्कृत संख्यावाचकांस हा प्रत्यय लागून तितके वेळां, तितक्या प्रकारांनीं, तितक्या रूपांत, असे याचे अर्थ होतात; इ० पंचधा, द्विधा, त्रिधा, इ०.

धाऊ, धाव पु० स्त्री० एक प्रकारचा तांबडा आणि गुळगुळीत दगड.

धाऊर स्त्री० एक झुडूप.

धाक [हिं०] पु०१अमुक गोष्ट अमुक प्रकारें न झाली तर आपणास शिक्षा केली जाईल अशी मनाला वाटते ती भीति (वाटणें). २ अमुक गोष्ट अमुक प्रकारें केली गेली नाहीं तर तुला मी शिक्षा करीन अशी कोणेकाला घातलेली दहशत किं० दिलेली ताकीद (घालणें). ※ धाकदपटशाविणें भीति घालणें धाक ना धोका कोणाची भीति, मुरवत, किं० दहशत बिलकूल वाटत नाहीं अशी स्थिति.

धाकटा, धाकला वि०(वयानें, उंचीनें,आकारानें, योग्यतेनें, किं० अन्य कांहीं बाबतींत) लहान किं० कमी किं० उणा. ※ धाकटा कुंवर पु० पुष्य नक्षत्र (शेतकऱ्यांचा शब्द). म्हातारा म्ह० पुनर्वसु नक्षत्र (शेतकऱ्यांचा शब्द).

धाकड वि० १ जाड भरड (वस्त्र) २भक्कम मजबूत (मनुष्य, जनावर).

धाकणें [म० धाक] अ०क्रि० भीति पावणें; गांगरणें.

धांगड स्त्री० दांडगी आणि खोडकर मुलगी. न० केतकी इ०च्या पानांची पत्रावळ छत्रीवर घालण्यासाठीं करतात ती.

धांगड, धांगडा वि० १ जाडें भरड(वस्त्र). २ ओबड धोबड (काम किं० कारागिरीचा पदार्थ). ३ दांडगा (माणूस). ४ धिप्पाड (माणूस ,जनावर, पदार्थ). ※ धांगडधिंगा पु० दांडगाईचे चाळे,—नाचणे, उड्या मारणें, इ० रूप. स्त्री० व्रात्य आणि खोडकर मुलगी.

धांगडा, धांगडो, धांगलो पु० दांडगाई, गोंधळ.

धागा [हिं०] पु० १ दोरा. २ हरवलेल्या किं० अज्ञात वस्तूचा तपास लावण्याचें साधन.(या दुसऱ्या अर्थी ' धागा दोरा ' असाही वाक्प्रचार आहे. वाजणें).

धांगोडा पु० कांहीं दुष्कर्मांचा बोभाटा(होणें,

धाट न० जेथील रहिवासी अगदीं अडाणी आणि रानवट आहेत असा गांव.

धाटणी, धाटी स्त्री०तऱ्हा; कोणेकाची बोलण्याचालण्याची, वागण्याची, पोशाख करण्याची रीति किं० पद्धति.

धाटा पु० वीतभर रुंदीचा आणि चार पांच हात लांबीचा वस्त्राचा पट्टा.

धाटामोटा वि०१ आजारीपणांतून उठून पूर्वीप्रमाणें लठ्ठ आणि सशक्त झालेला. २ ओबडधोबड (वस्त्र, अन्न, पदार्थ).

धाड [हिं०] स्त्री० १ जोराचा हल्ला (येणें, पडणें, घालणें). २ दरवडेखोर, टोळ, आग, इ० चें आगमन किं० त्यांनीं केलेली नासाडी. ३ जमावानें आलेल्या माणसांचा ,मुलांचा ,जनावरांचा, किं० पक्ष्यांचा कांहीं पदार्थावर किं० माणसावर हल्ला. ४ कांहीं पदार्थासाठीं एकानें किं० अने-

कांनीं घातलेली झडप किंवा केलेला प्रयत्न. ५ उपद्रवकारक पोर. ※ **धाड पडवी पण चीत पडूं नये** १ शेतावर टोळांनी धाड पडली तरी पुरवेल पण चित्रा नक्षत्रांत पडलेल्या पावसानें केलेली नासाडी पुरवत नाहीं (कारण ही नासाडी अधिक असते). चीत म्ह० चित्रांचा पाऊस. २ आपणावर दुर्दैवाचे घाले आले तरी आपण खचून जाऊं नये. **धाड भरणें, धाड पडणें, धाड लागणें** द्रव्याभाव, शारीरिक व्यंग, आजार, इ० कारणांमुळें कांहीं काम करावयाच्या बाबतींत आलेली कमजोरी, दुर्बलता, किं० नालायकी; उ० तूं कां नाहीं उचलीत हा धोंडा तुला काय धाड भरली आहे ? उ० पुरुषोत्तमपंताला पांचशे रुपयांचा एक शेअर घ्यावयाला काय झालें ? त्याला काय धाड लागली आहे ? **धाडघोडा** पु० आडदांड पोरगा.

धाडकन, धाडकर, धाडदिशीं क्रि०वि० धाड् असा आवाज करून (धोंडा पडणें, झाड उलथून पडणें, मूर्च्छेनें मनुष्य जमीनीवर आदळणें, तोफ उडणें, इ०).

धाडणें स० क्रि० पाठविणें; पाठवून देणें; रवाना करणें (पत्र, निरोप, पैसे, माणूस, जनावर, इ०).

धाडस [हिं०] न० धारिष्ट; हिय्या, जोखमीचें काम अंगावर घेण्याची हिंमत. वि० साहसी; धीट. ह्या अर्थी ' धाडसी ' असाही शब्द आहे.

धांडळ, धांडाळ वि० १ जाड आणि उंच असें (कडब्याचें किं० जोंधळ्याचें ताट). २ उंच आणि किडकिडीत (माणूस).

धांडळणें, धांडुळणें, धांडोळणें, धुंडाळणें स० क्रि० अव्यवस्थित पदार्थ इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे सारून हरवलेला किं० पाहिजे आहे तो पदार्थ हुडकणें किं० शोधणें. **टीप**,–पदार्थांतर किं० स्थलावर कर्मत्व येऊं शकतें; उ० मी आंगठीसाठीं सारी पटी धुंडाळली किं० साऱ्या पेटींत मी आंगठी धुंडाळली.

धांडली स्त्री० एकसारखें हगावयाला होत असावें ही विकृति; उ० आमच्या रामूला कालपासून धांडाली लागली आहे.

धाडी [हिं०] पु० मुसलमानांचा एक वर्ग किं० त्या वर्गाचा कोणी इसम. हे लोक राजेलोकांचे किं० बड्या माणसाचे नोकर असून त्यांची स्वारी निघाली असतां त्यांच्या स्तुतीचा गाणीं म्हणत पुढें चाललेले असतात.

धाडे स्त्री० वर ' धाड ' पहा.

धाडो स्त्री० १ बांबूच्या कामट्यांच्या ताटीवर गवत पसरून तें शिवून ती रचना पावसाच्या निवारणार्थ दारावर किं० खिडकीवर लावितात ती; झडप. २ हल्ला.

धांडुळणें, धांडोळणें वर ' धांडळणें ' पहा.

धांडेडा, धांडेरा, धांडोळा पु०, **धांडोरें** न० मागें ' डांगोरा ' पहा.

धाणें अ० क्रि० तृप्त होणें; पाहिजे आहे ती वस्तु यथेच्छ किं० मनमुराद मिळाल्यानें समाधान पावणें. **टीप**,–हें क्रियापद भूतकाळीं बहुधा योजण्यांत येतें; उ० पेढा निहून तुझा जीव धायला काय ?

धात [सं० धातु] स्त्री० पुरुषाचें रेत. ※ **कोणेकाची धात फुटणें** १ कांहीं रोगामुळें मूत्रविसर्जनादि प्रसंगीं त्याचें रेत आपोआप पडणें किं० गळणें. २ तो पूर्णपणें वयांत आलेला असून स्त्रीसंभोगाला लायक झालेला असणें. [चिखी.

धांत, धांतली स्त्री० वस्त्राची लांबलचक

धाता [सं० धातृ] पु० १ उत्पादक, कर्ता. २ संरक्षक. ३ सृष्टि उत्पन्न करणारा; ब्रम्हदेव. ४ (ज्योतिष) ध्रुवमत्स्यापैकीं एक तारा.

धातु [सं०] पु० १ घटकावयव. २ पृथ्वी इ० मूलतत्त्वें प्रत्येक. ३ रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, आणि रेत, हे देहांतील पदार्थ प्रत्येक. ४ कफ, वात, पित्त, हीं देहस्थ तत्त्वें प्रत्येक. ५ सोनें, रुपें, तांबें, लोखंड, इ० खनिज द्रव्यें प्रत्येक. ६ मनशीळ, काव, पारा, गंधक, इ०. ७ (व्याकरण) क्रियापदाचें मूळ रूप. ※ **धातु फुटणें** वर ' धात फुटणें ' पहा. **धातुपोषण** न० १ शरीर नीरोगी आणि सुदृढ करणें. २ थापबाजीनें कोणेकाला फसविणें किं० धीर देणें. **धातुपोषणाच्या गोष्टी** स्त्री० अ० व० थापबाजी. **धातुसाधित** वि० (व्याकरण) धातूपासून झालेलें (नाम, विशेषण, इ०). **धातुस्पर्श** पु० तांबें, पितळ इ० धातूचीं भांडीं, किं० सोनें, चांदी,

इ०चे दागिने यांचा स्पर्श म्ह० असणें; प्रयोग नेहमीं अकरण रूपी; उ० त्याच्या घराला (किं० घरांत) धातूचा स्पर्श नाहीं म्ह० तो इतका गरीब आहे कीं त्याच्या घरांत मडकीं वापरलीं जातात; उ० त्याच्या बायकोच्या अंगाला धातुस्पर्श नाहीं म्ह० तिच्या अंगावर सोन्याचे किं०चांदीचे कांहींच दागिने नाहींत.

धात्री [सं०] **स्त्री**० १ माता. २ उपमाता; दायी. ३ आवळी. ४ आवळकाठी.

धांद **स्त्री**० वस्त्र, कातडें, कागद, इ०ची लांब आणि अरुंद पट्टी; चिंधी.

धांदरणें अ० क्रि० १ घाबरणें; भयभीत होणें. २ घासणें; घासटणें; खरचटणें.

धांदल [हिं० धांधल] **स्त्री**० १ चित्तांत व्यग्रता उत्पन्न झाल्यामुळें हातांत घेतलेल्या किं० चालू कामांत जो मनाचा गोंधळ होतो तो; कांहीं काम करण्यांत कांहीं विघ्न उत्पन्न झाल्यामुळें किं० दुसरीकडे लक्ष्य द्यावें लागल्यामुळें जी गडबड उडते ती किं०भांबावलेपणाची स्थिति होते ती. २गडबड; अव्यवस्था; घोटाळा. ३ चित्ताची व्यग्रता. ॐ **धांदलपट्टी**, **धांदलाधांदल** **स्त्री**० हेही 'धांदल' त्याच अर्थाचे शब्द आहेत.

धादांत [सं० ' वेदान्त ' शब्दाच्या उलट अर्थाचा बनविलेला शब्द] **पु**० अनुभवानें किं० अवलोकनानें ज्याचा त्याणे ठरविलेला सिद्धान्त किं० आधार. याच्या उलट वेदांनीं किं० शास्त्रांनीं सांगितलेली गोष्ट; उ० आम्हाला तुमचें शास्त्र समजत नाहीं, आणि वेदान्तही समजत नाहीं, आम्ही आपले सर्व व्यवहार धादांताच्या मताप्रमाणें चालवितों. क्रि० वि० धडधडीत;उघड उघड; उ० हा मनुष्य धादांत चोर (लबाड, लुच्चा) आहे; उ० तुझें म्हणणें धादांत खोटें आहे; उ० तुझी मागणी धादांत आप्पलपोटेपणाची आहे. ॐ **धादांताला** सिद्धान्ताची गरज नाहीं जें स्पष्टपणें दिसत आहे तें तसें आहे हें सिद्ध करावयाला शास्त्राचा किं० वेदाचा पुरावा काय करावयाचा ? **धादांती** वि०शास्त्रांची संमति काय आहे हें न पाहतां आपल्या मनाला जें योग्य वाटेल तें करणारा.

धादांतणें, **धादावणें** अ० क्रि० कांहीं एका पदार्थाबद्दल अतिशय उत्कंठित होणें किं० उत्सुक झालेलें असणें.

धांदी, **धांदोटी** [म० धांद] **स्त्री**०अरुंद आणि लांब पट्टा (वस्त्राचा, घराचा, कागदाचा,इ०चा).

धांदूस वि० पदार्थ यथेच्छ उपभोगावयास मिळून जो पूर्ण तृप्त झाला असा.

धाधाटा **पु**०वाऱ्याचा सोसाटा; वाऱ्याचा झोत.

धांधुळणें स० क्रि० वर ' धांडळणें ' पहा.

धाधू क्रि० वि० धडाधडा, कडाकडा, फडाफडा असा आवाज करून (वाद्यें वाजणें, तोफा उडणें, वारा वाहाणें, इ०). **स्त्री**० १ गर्जना; धडधडाट. २ कचाकचीचें भांडण.

धान्य [सं०] न० १ जोंधळा, बाजरी, हरभरा, इ० पदार्थ जे मनुष्यादिकांच्या शरीरपोषणार्थ उपयोगाला येतात ते प्रत्येक. २ चैत्रांतल्या गौरीपुढें किं० नवरात्रांतल्या देवीपुढें गहूं किं०भात यांचे जें लहानसें शेत करतात तें,–ज्याला ' धान ' असेंही म्हणतात. ३ दसऱ्याच्या दिवशीं पागोटें, मुंडासें, रुमाल, इ०त खोवितात तो गहूं इ०च्या अंकुराचा तुरा किं० झुबका. ॐ **धान्यपलालन्याय** **पु**० तत्त्व मिळाल्यावर सर्व गौणभाग निरुपयोगी होतात हा सिद्धान्त. धान्य काढून घेतल्यावर टरफलाचा कांहीं उपयोग नाहीं, ते फेकून द्यावयाचें. **धान्यफराळ** **पु**० उपवासाच्या दिवशीं निर्लेप पदार्थांचें जें भक्षण तें. **धान्यभिक्षा** **स्त्री**०धान्य पिकलें म्हणजे शेतावर कोणी भिक्षुक गेल्यास त्याला देतात तें धान्य.

धाप [हिं०] **स्त्री**० १ जोराजोराचा श्वासोच्छ्वास. २ दमा हा रोग. ॐ **धापा देणें** श्रमामुळें किं० दम्यामुळें जोराजोरानें श्वासोच्छ्वास करणें. **धापेकरी**, **धापकरी**, **धापकरू** **पु**० दम्यानें जर्जर झालेला माणूस. **धाप खाणें** चेंडू, विटीदांडू, कवड्या, इ० च्या खेळांत चेंडू इ० मर्यादारेषेच्या पलीकडे जाणें.

धापट न० १ फिरावयासाठीं टाकलेला जो भोंवरा तो न फिरतां राहाण्याची स्थिति. २ भात कांडलें असतां विरून केवळ चूर्ण जें होतें तें. ३ सरड्यासारखा एक प्राणी.

धापटी स्त्री० उपवासामुळें किं० आजारामुळें पोट खोल गेल्याची स्थिति (वळणें, होणें).

धापड वि० अगदीं उखार असें (शेत,–विशेषत: भातशेत).

धापणें [म० धाप] अ० क्रि० १ जोराजोरानें श्वासोच्छ्वास करण्याच्या स्थितीस येणें. २ तृप्त होणें.

धापलणें अ० क्रि० धापा टाकणें; जोराजोरानें श्वासोच्छ्वास करण्याच्या अवस्थेस येणें किं० अवस्थेंत असणें.

धापा पु० १ एक प्रकारचें गवत. २ सपाट चपटें कौल. ॐ **धापा करणें** वस्तूचा विध्वंस किं० सत्यानाश करणें.

धापाळू वि० दम्याच्या रोगानें जर्जर.

धाबडधिंगा पु० वर 'धांगड' मध्यें 'धांगडधिंगा' पहा.

धाबळ, धाबळी स्त्री० १ सोंवळ्यांत नेसावयाचें लोकरीचें वस्त्र. २ खवुतरें ठेवण्यासाठीं करतात तें घरकूल. ३ काथ्याची हातांनीं वळून केलेली दोरी.

धाबें, धाबडें न० १ घराच्या माथ्यावर पर्जन्य, ऊन्ह, इ० च्या निवारणार्थ कौलें न घालतां केवळ मातीचा जाडी थर घालून सपाट जमीन करतात ती. २ अशा माथ्याचें घर. ॐ **कोणेकाचे धाबें दणाणणें** १ तो अत्यन्त घाबरून जाणें; तो फार भयभीत होणें. २ कांहीं अनपेक्षित अनिष्ट अंगावर कोसळल्यामुळें तो कर्तव्यमूढ होणें. **कोणेकाला धाब्यावर बसविणें** १ त्याचें सर्वस्व हरण करून त्याला भिकेस लावणें. २ त्याला त्याच्या हक्काचा पदार्थ न देतां निराश करणें. ३ त्याला देऊं म्हटलेली वस्तु न देणें किं० ती दुसऱ्या कोणास देणें. **धाबेंघर न०** ज्याचा माथा धाब्याचा आहे असें घर.

धाम स्त्री० १ महामारी, हगवण, इ० रोगांची साथ. २ लग्नें, मुंजी, किं० गर्भाधानविधि, इ० एकाच वेळीं गांवांत फार फार होऊं लागण्याची लाट (येणें). ३ कोणत्याही गोष्टीचा अनेक लोकांस एकदम लागलेला नाद, व्यसन, इ०; उ० इहीं घोडजुगारीची धाम आली आहे.

धाम [सं० धामन्=१ ठिकाण. २ तेज] **न०** १ वासस्थान; घर. २ ठिकाण; आश्रय. ३ चकचकीत पदार्थाचे किरण. ४ तेज; प्रकाश; झगझगाट. ५ वैभव, प्रभाव. ६ शक्ति. ७ पराक्रम. ८ महिमा. ९ देह. ॐ **धामनिधि पु०** सूर्य. **निजधामास जाणें** १ (ईश्वराचा मानवी अवतार किं० अंशावतार, तुळस, इ०) मरणें. २ (विनोदांत) परदेशांतील नोकरी संपवून स्वदेशास परत जाणें.

धामण [हिं० धामन्] **स्त्री०** १ सर्पाची एक जाति. २ एक वृक्ष. **टीप,**–' धामणी ' **स्त्री०** हा अर्थ १ चा पर्याय शब्द आहे.

धामणणें[म०धामण]**अ०क्रि०**धामण नामक सर्पाच्या दृष्टीनें (गाय, म्हैस, इ०)पीडित होणें.

धामधूम स्त्री० १ भयानें लोकांची पळापळ. २ गडबड, गोंधळ. ३ मोठमोठ्यानें बोलणें, ओरडणें, इ० नीं लोकांचें लक्ष्य आकर्षिलें जाणें. ४ गांवांत कांहीं अपूर्व प्रकार चाललेला असतां त्याच्या संबंधानें लोकांत जी खळबळ होते ती.

धामा पु० कांहीं गोष्ट अनेकांनीं एकदम करण्याची लहर किं० लाट (रडणें, जेवणें, जुगारी, इ० चीं). मागें ' धाम ' **स्त्री०** अर्थ ३ पहा.

धामा पु० गुराखी लोक आपल्या हातावर गोंवरी किं० सशाची लेंडी यांच्या विस्तवानें डाग घेतात तो. मागें ' धमाटा ' पहा.

धामा, धाम्या पु० माध्यंदिन (निंदेनें).

धामीण स्त्री० वर ' धामण ' पहा.

धाय स्त्री०१रडण्याची किंचाळी किं०आरोळी. २ रोदनाचा आकांत. दोन्ही अर्थी **क्रि०** फोडणें, मोकलणें. ॐ **धायधाय रडणें** मोठमोठ्यानें हुंदके देऊन किं० मोठमोठे सूर काढून रडणें. **धायमाय स्त्री०** मोठमोठ्यानें रडणें.

धायटी स्त्री० एक झाड.

धायती स्त्री० एक झाड.

धायरूं न० गुरांना होतो तो एक रोगविशेष.

धार [सं० धारा=१ प्रवाह. २ शस्त्राची कड] **स्त्री०** १ शस्त्राची तीक्ष्ण कड,–छेदनाच्या उपयोगाची. २ जलादि प्रवाही पदार्थ वरून खालीं पडत असतां त्याचा दोरीसारखा होतो तो आकार. ३ ज्याचा वेग फार असा नद्यादिकांच्या जळाचा प्रवाह. ४ चौरस काष्ठादिकांच्या ज्या शिरा त्या प्रत्येक. ५ तेल, तूप, इ०चें अल्प परिमाण; उ० झा भातावर

तुझी धार पाडीन. ६ पर्वताच्या माथ्याची कड. ७ (लक्षणेनें); तीक्ष्ण किंवा तल्लख किंवा तापट स्वभाव, प्रकृति, किंवा माणूस. ८ कालव्यावरून पडणाऱ्या पाण्याचा प्रवाह. ९ क्षितिज; उ० दिवस धारेस आला. १० डोंगरांची रांग. ११ (गाय, म्हैस, इ०चें) दूध (काढणें). ❀ **हत्याराला धार करणें** (किंवा **देणें**) त्याची धार घर्षणादि क्रियेनें तीक्ष्ण करणें. **धार काढणें** (किंवा **पिळणें**) (गाय, म्हैस, इ०चें) दूध काढणें. **कापलेल्या अंगावर, किंवा तापलेल्या डोक्यावर पाण्याची धार धरणें** त्यांच्यावर पाणी हळूं हळूं ओतीत राहाणें. **पावसानें धार धरणें** पाऊस एकसारखा पडत असणें. **धारभर** वि० थोडासा (पातळ पदार्थ,— दूध, तूप, इ०). **धार मारणें** तरवार गाजविणें; कांहीं पराक्रम करणें; यश मिळविणें. **धारेवरचा बाघ** पु० तुझा बाप; तुझा कार्याचा; उ० तूं नाहीं करीत म्हणजे काय? धारेवरचा वाघ करील (म्ह० तुझा बाप करील; मी तें तुझ्याकडून करवून घेईनच घेईन), उ० तुला हाक नको मारूं तर धारेवरच्या वाघाला हाक मारूं काय? (म्ह० तुझ्या बापाला हाक मारूं काय? मी तुलाच हाक मारणार आणि तुला आलेंच पाहिजे; मी तुला यावयाला भाग पाडीन). **कोणेकाला धारेवर धरणें** त्याच्यावर सक्त नियंत्रणा चालविणें. **धारेवर आणणें** कडक नियंत्रणेखाली ठेवणें किंवा नियंत्रणेंत धरणें. **कांहीं काम धारेवर येणें** तें सुरळीतपणें चालूं लागणें. **धारेवर वागणें** आपल्या हातून चूक न व्हावी अशी काळजी बाळगून वागणें. **कोणेकांच्या तोंडांत चारी धारा पडत असणें** त्याला सर्व प्रकारचे उपभोग मिळत असणें; तो अत्यंत सुखविलासांत राहात असणें. टीप,—गायी, म्हशी, इ०च्या चारी आंचोळ्यांचें दूध ह्यावर हा वाक्प्रचार आधारलेला आहे. **चारी धारा कोणाच्या तोंडांत पडत नाहींत** कोणाही माणसास ह्या जगांत सर्व सुखें प्राप्त होतात असें बहुधा घडत नाहीं. **धार बंद करणें** कांहीं क्रिया बंद पाडणें. **शरीराच्या एकाद्या द्वाराला धार लागणें** त्या द्वारांतून शेंबूड, मळ, पू, इ० एकसारखें पडत किंवा वाहात असणें. **पाऊस इ०स धार लागणें** पाऊस इ० एकसारखा पडत असणें. **गायीस धार फुटणें** तिणें विपुल दूध देऊं लागणें. **धारेकरी** पु० मोठा योद्धा. **धारकस** पु०, **धारकशी** स्त्री० [म० धार + कस (पारख)] सक्ती; तगादा; कडकपणाची वागणूक किंवा वागणूक; उ० मी तुझी धारकशी चालूं देणार नाहीं, मला वाटेल तेव्हां मी डाळ निवडीन. **कोणेकाच्या धारकशीं धरणें** १ त्याला सक्त नियंत्रणेखालीं घालून कडकरीतीनें वागविणें. २ त्याला तगादा करणें; त्याचेपाशीं नेटानें कांहीं मागणी करीत राहाणें. **कोणेकाला धारकशीं घालणें** (**टाकणें**, **लोटणें**, **सोडणें**, इ०) १ त्याला संकटांत किंवा पेचांत घालणें. टीप,—ह्या दोन्ही अर्थी 'धारकी धरणें,' 'धारेवर धरणें' हेही वाक्प्रचार रूढ आहेत. **धारबंद** स्त्री० १ धारेच्या शस्त्रानें इजा न होऊं देण्याचा मंत्र किंवा तोडगा. २ भाषणवर्तनादिकांचा एकसूत्रीपणा.

धारक [सं०] वि० धारण करणारा, पाळणारा, इ० (समासांत); उ० आज्ञाधारक इ०.

धारकें [सं० धृ; म० धरणें] न० बैलाच्या शिंगाभोंवतीं घालतात तो दोरीचा वेढा किंवा वळसा.

धारजणा, **धारजिणा** वि० १ अनुकूल. २ शुभकारक. ३ फलदायक. ४ उपयोगीं पडणारा. ❀ **कसाबाला** (किंवा **कसायाला**) **गाय धारजिणी** दुष्ट आणि कठोर माणसाशीं सारे लोक गरिबीनें वागतात. **मेसादेवी चोरांस धारजिणी** अर्थ वरच्याच म्हणीचा.

धारजणें, **धारजिणें** न० १ आनुकूल्य. २ फलरूपता. ३ उपयोगीं पडण्याची शक्यता किंवा संभव. ❀ **धारजण्यास येणें** अनुकूल किंवा कृपाशील होणें; मेहेरबानी करण्याकडे कललेला असणें. **मला ह्या म्हशीचें धारजिणें नाहीं** ही म्हैस मला दूध दुभतें देऊन सुखी करील असा संभव दिसत नाहीं किंवा मला सुखी करणार नाहीं.

धारण [सं०] न० १ धरणें; संभाळणें. २ पाळणें. ३ संग्रहीं ठेवणें. ४ (दागिना, वस्त्र, शस्त्र, इ०) शरीरावर यथास्थानीं ठेवणें किंवा संनिविष्ट करणें. ५ स्वीकारणें; अंगीकारणें; घेणें; उ० शिवाजीनें छत्रपति ही पदवी धारण केली.

६ स्मरणांत किं० लक्षांत ठेवणें किं० ठेवण्याची ताकद. ७ एकाग्रता. ❀ **धारण पारणें न०, धारणा पारणा स्त्री०** एक दिवस जेवणें आणि एक दिवस उपास करणें हें व्रत.

धारण [सं० धृ] **स्त्री०** बाजारभाव; क्रयविक्रयादिकांची किंमत (विशेषत: धान्यादिकांची). ❀ **कोणेकाची पांचावर धारण बसणें** १ तो भयानें घाबरून जाणें; तो अत्यंत विस्मित होणें. **धारण आणि मरण कोणास समजत नाहीं** उद्यां बाजारभाव काय असेल, आणि कोणास मरण कधीं येईल, हें सांगतां येत नाहीं किं० हें समजत नाहीं.

धारण [सं० धृ] **पु०** १ घराचा जमीनीपासून आढ्यापर्यंत असलेला खांब. **टीप**,–ह्या अर्थी 'धारणी' **स्त्री०** हाही शब्द आहे. २ (लाक्षणिक) राज्याचा किं० संसाराचा भार ज्यावर आहे तो पुरुष.

धारणा [सं०] **स्त्री०** १ स्मरणशक्ति; लक्षांत ठेवण्याचें सामर्थ्य. २ सन्मार्गाचा दृढ अवलंब. ३ धैर्य. ४ स्थैर्य. ५ तऱ्हा, ढब, चाल. ६ योगाच्या अष्टांगांपैकीं सातवें.

धारबोळ पु०, स्त्री०, धारमेर स्त्री० १ कांहीं व्यवहार किं० कारभार अमुक सरणीनेंच व्हावा, अन्य सरणीनें होऊं नये ह्या संबंधाचा नियम किं० शिस्त. २ भाषणवर्तनादि संबंधाची रीति किं० शिस्त; उ० अलीकडे विनायकरावांच्या वर्तनाला कांहीं धारबोळ राहिला नाहीं.

धारबोळ क्रि० वि० कांठोकांठ (भांडें पाण्यानें, तेलानें, दुधानें, इ० नें भरणें).

धारवणी [म० धार+पाणी] **न०** १ दूध तापविणें असतां त्यांत घालतात तें पाणी. २ वाहात्या पाण्यांतून आणलेलें पाणी; उंचावरून पडत असलेल्या पाण्याच्या धारेचें पाणी. याच्या उलट डबक्यांतील किं० डोणींतील पाणी.

धारवाडी [म० धारवाड ह्या गांवचा] **वि०** धारवाड येथें चालू असलेला किं० रूढ असा. ❀ **धारवाडी कांटा पु०** अगदीं तंतोतंत वजन दाखविणारा कांटा (तराजू); बरोबर किं० तंतोतंत वजन ज्यावरून समजतें असा तराजू.

धारशींव [सं० धारा+सीमा] **स्त्री०** गांव, शेत, इ० ची मर्यादारेषा नद्यांच्या प्रवाहाच्या अनुरोधानें झालेली किं० ठरलेली.

धारा [सं०] **पु०** १ शेत, आगर, इ०संबंधीं जें सरकारला द्यावयाचें तें. २ क्रयविक्रयाच्या पदार्थांच्या किंमतीच्या बाबतींतील जो शिरस्ता तो. **स्त्री०** १ शस्त्राची धार म्ह०तीक्ष्ण कड. २पाण्याचा वरून खालीं पडणारा बारीक दोरीसारखा प्रवाह. ३ बारदानाला पडलेल्या छिद्रावाटें आंतील पदार्थ एकसारखा बाहेर पडत असतो त्याची रेषा. ४विवाहविधिंत सुवर्णाभिषेकाचें द्रव्य. ❀ **धारा घालणें** (पाऊस) एकसारखा पडत असणें. **धारातीर्थ पु०** युद्धभूमीवर शत्रूशीं लढत असतां जेथें योद्धा मरतो तें स्थळ. ह्या तीर्थी मेलेला योद्धा स्वर्गास जातो. **धारापेंडोळा** [म० धारा+पेंडोळा] **पु०** १ शिरस्ता; नियम; चालू वहिवाट. २ सोयरीकीचा संबंध; लागाबांधा; कुटुंबाचा वंशपरंपरागत लौकिक. **धारावाहिक बुद्धि स्त्री०** १ अखंड चाललेली विचारसरणी, मनन, किं० चिंतन. २बुद्धीची एकाग्रता. **धारेएहसान न०** जमीनीवरचा कमी केलेला किं० माफ केलेला सारा. **धारेएहसानी वि०**असा सारा ज्या जमीनीचा आहे ती. **धारेकरी वि०** ज्याला सरकारचा सारा द्यावा लागतो असें कुळ. **धारेबंदी वि०** ज्या शेताचा किं० कुळाचा धारा न बदलणारा म्हणून ठरविण्यांत आलेला आहे असें (शेत किं०कुळ). **धारेमाप न०** सारा म्हणून द्यावयाचें धान्य मोजून घ्यावयाचें सरकारी माप. **धारेशुद्ध वि०** शिष्टसंमत चालीरीतींप्रमाणें चालणारा (मनुष्य) किं० चाललेले (निबंध).

धारा वि० १ धाकटा. २ आखूड.

धाराणें न० चुलीचा धूर स्वयंपाकघरांतून बाहेर पडावयासाठीं भिंत, छप्पर, इ० मध्यें ठेविलेलें असतें तें भोंक.

धारिष्ट [सं० धाष्टर्य] **न०** धीटपणा; साहस.

धारी [हिं०] **स्त्री०** वस्त्राची रंगीत किं० साधी किनार किं० कांठ.

धारी [सं० धारिन्] **वि०** (समासान्तीं) धारण करणारा; उ० शस्त्रधारी, दंडधारी, इ०.

धारें न० वर 'धाराणें' पहा.

धारोधार [म० धार+धार] **क्रि० वि०**

कांठोंकांठ (भांडें भरणें). ॐ **तेली सांठवी धारोधार खुदा लेजावे एकइ बार** तेली एक एक धार, एक एक धार वाचवून तेल सांठवितो आणि देवाच्या मनांत आलें तर ता तें सांठविलेलें सर्व तेल एकदम लवंडून टाकतो.

धाष्टर्य [सं०] न० १ धीटपणा. २ साहस. ३ उद्धटपणा; अमर्यादशील वर्तन किं० भाषण.

धाला [म० धाणें] वि० तृप्त झालेला. 'धालासाला' हा ह्याच अर्थाचा शब्द आहे. ॐ **धाला धाकटा** वि०१लहान आणि आटोपशीर.२ गोंडस आणि सुंदर.३ठेंगणा ठुसका. **धालेधन्याचा लेक** पु० गर्भश्रीमंत कुटुंबांतील मुलगा.

धाव पु०, स्त्री० एक प्रकारचा मऊ आणि तांबडा दगड.

धाव [सं०धाव्] स्त्री० १ त्वरेनें चालणें (मारणें, ठोकणें). २ धावण्यानें आक्रमिलेली मजल. ३गाडीच्या चाकाच्या परिघाला बसवितात ती लोखंडाची पट्टी. ४ मोटेचे बैल ज्या उतरणीच्या वाटेनें चालतात ती. ५ सामर्थ्याचा परमावधि; उ० कृष्णाच्या लग्नाला दीड हजार रुपये खर्चण्याची आमची धाव आहे. ६ इच्छेचा किं० मनोरथाचा परमावधि. ७ उंदीर, घूस, साप, इ० चें बीळ. ८ मर्यादेच्या पलीकडे गेलेली इच्छा, मागणी, किं० अपेक्षा. ॐ **सरडयाची धाव कुंपणापर्यंत** ज्याचें सामर्थ्य, ऐपत, ताकद, अत्यल्प आहे त्याणें आपणाकडून कितीही पराकाष्ठा केली तरी त्याचें काम अत्यल्पच असणार.

धावड पु० लोखंड उत्पन्न करणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

धावड (-ण)[म० धावणें] स्त्री० १ चालण्याची क्रिया. २ चालण्याची मेहेनत.

धावडणें [म० धावणें] स० क्रि० १ जलदीनें पिटाळणें. २ पिटाळून लावणें. अ० क्रि० पळणें; पळून जाणें; पळ काढणें.

धावडा पु० एक वृक्षविशेष.

धावडी वि० १ धावड जातीच्या संबंधाचा. २ लोखंडाचा बनविलेला. ३ ओबड धोबड (पात्र, पेटी, दागिना, इ०); दांडगाईचें (काम). ह्या शेवटच्या अर्थी ' धवडी ', असेंही रूप रूढ आहे.

धावण (-णी) [म० धावणें] स्त्री० १ धावण्याची क्रिया. २ (चोर इ० चा) पाठलाग.

धावणें [सं० धाव्] अ० क्रि० १ अतिशयित वेगानें चालणें. २ अत्यन्त उत्सुकतेनें किं० इतर कामें बाजूला सारून एकाद्या स्थळाकडे किं० माणसाकडे जाणें; उ० त्या साधूच्या दर्शनार्थ जो तो धावत सुटला आहे. ॐ **धावून** क्रि०वि० १ मोठ्या उत्सुकतेनें. २ मोठ्या आशेनें. **धावणें धुपणें** अ० क्रि० १ धावण्याचे श्रम सोसणें. २निष्फळ हेलपाटे मारणें. **धावणी धुपणी** स्त्री० निष्फळ येरझारा; फुकटची यातायात. **धावदवडा** पु० इतस्ततः धावणें; हेलपाटे; फुकट येरझारा (करणें, लागणें, पडणें). **धावाधाव** स्त्री० भांबावलेल्या स्थितींत किं० संकटसमयीं मदत मागण्यासाठीं इकडे तिकडे धावत सुटणें.

धावधूम [म० धावणें] स्त्री० कष्ट; यातायात.

धावता [म० धावणें] वि० १ धावणारा.२ जलदीचा. ३ वरवरचा. ४ओझरता. ॐ **धावती नजर** स्त्री० पदार्थाचें सूक्ष्म निरीक्षण न करतां वरवर त्याचेवर फिरविलेली दृष्टि. **धावता दोरा** पु० लांब लांब टांके घेऊन घातलेली शिवण (घालणें). याच्या उलट ' टीप. ' **धावतें पाणी** न० वाहणारें पाणी. याच्या उलट ' कोंडलेलें पाणी ' किं० ' सांचवणीचें पाणी. '

धावनी [म०धावणें]स्त्री०१धावण्याची क्रिया. २ भांबावलेल्या मनानें इकडेतिकडे धावत सुटणें.

धावन [सं०] न० १ धावण्याची क्रिया; धावणें. २ धुणें; स्वच्छ करणें. ॐ **दंतधावन** न० १ दांत घासणें. २ जें द्रव्य दांतावर घासून दांत धुतले जातात तें; उ० पोरवालचें दंतधावन उत्तम असतें. **पंचधावन** न० देहाचीं पांच अंगें किं० भाग धुण्याची क्रिया; गुदप्रक्षालन, डोळे धुणें, दांत घासणें, नाक साफ करणें,आणि स्नान.

धावरा[म०धावणें]वि० १ धावणारा. २चपल. ३नेहमीं जलद चालणारा. ॐ**धावरा गुणाकार** पु० गुणाकाराचा एक प्रकार. याच्या उलट'बैठा गुणाकार'. **धावरा भागाकार** पु० भागाकाराचा एक विशिष्ट प्रकार. याच्या उलट ' बैठा भागाकार. '

धावरें [म० धावणें] न० १ एक त्वग्रोग. २ खोकड, साळी, इ०चें बीळ.

धावशी स्त्री० एक झुडूप.

धावा [म० धावणें] पु० १ आपल्या संकटसमयीं देवानें किं० कोणी समर्थानें धावून यावें म्हणून त्याची केलेली प्रार्थना. २ अशा प्रार्थनेचें पद. ॐ **धावा मारणें** ' मदतीला धावून या ' अशा आरोळ्या ठोकणें.

धावांडा[म० धावणें]पु० १ धावण्याची एक मजल. २ एका दमांत धावलेलें अंतर; धावण्याची क्रिया. ॐ **धावांड्याचा वाघ पु०** दुसरीकडे राहाणारा आणि यदृच्छेनें एकाद्या गांवाकडे आलेला वाघ; गांवाच्या सन्निवास न राहणारा असा कोणीतरी फिरता वाघ. [पहा.

धावा दवडा वर 'धावणें' मध्यें ' धावदवडा '

धासळणें मागें ' ढासळणें ' पहा.

धास्त, धास्ती [अ० 'दहशत 'चें म० तोकडें रूप] स्त्री० १ एका विशिष्ट समयीं वाटलेल्या भीतीच्या कारणाचें स्मरण होतांच पुन्हां भीति वाटावी किं० हृदयाला धक्का बसावा अशी जी मनाची स्थिति होते ती (घेणें, वाटणें, बाळगणें). २कांहीं दुःखाचें कारण किं० भयाचें कारण यांनीं मनावर झालेला चिरस्थायी परिणाम. ३ भीति.

धास्तावणें [म० धास्त, धास्ती] अ० क्रि० धास्तीमुळें बुद्धिभ्रंशादि रूप विकृति पावणें;धास्तीनें गांगरणें; कांहीं विशिष्ट प्रसंगीं वाटलेल्या धास्तीनें मन सदैव जर्जर झालेलें असणें.

धिक् [सं०] **उद्गारवाचक** अ० तिरस्कार, तुच्छता, किळस, वीट,इ० भावना दाखविणारें हें अव्यय आहे; उ०धिक् त्याचें जिणें कीं जो स्वार्थासाठीं आपला देश शत्रूच्या स्वाधीन करतो ! उ० स्वदेशाची काळजी वाहात नाहीं त्याच्या जीविताला धिक् ! ॐ **धिक्कार पु०** तुच्छता किं० तिरस्कार (करणें). **धिक्कृत वि०** निंदिलेला; तुच्छ केलेला. [निंदिणें.

धिक्कारणें [सं० धिक्]स०क्रि०तिरस्कारणें;

धिंग वि० १ उदार. २ खर्चिक. ३ धिप्पाड; मजबूत. ४ व्यसनासक्त. ५ बाहेरख्याली.

धिंगड, धिंगाड, वि० विरूप दिसण्याइतका मोठा किं०अव्याढव्य(मनुष्य, प्राणी).

धिंगडणें अ० क्रि० उनाडक्या करणें; धिंगामस्ती करणें.

धिंगा पु० धिंगामस्ती, दांडगाईच्या खोड्या. ॐ **धांगडधिंगा** पु० ,**धिंगामस्ती** स्त्री० ह्याच अर्थी.

धिंगाई[म०धिंग]स्त्री० उधळेपणा; खर्चिकपणा.

धिंगाडा, धिंगाणा पु० वर ' धिंगा ' पहा.

धिटाई [म० धीट] स्त्री० १ धीटपणा. २ उद्धटपणा; अमर्यादशील वर्तन.

धिंड स्त्री० १ सार्वजनिक रीत्या कोणेकाची केलेली अप्रतिष्ठा,–त्याला गाढवावर शेपटीकडे तोंड करून बसवून गांवांतून फिरविणें इ० प्रकारांनीं केलेली. कोणेकाची धिंड काढणें किं० मिरविणें असा प्रयोग. २ सार्वजनिक रीत्या कोणेकाची झालेली किं०केलेली अप्रतिष्ठा.३ उपद्रवकारक माणूस. ह्या अर्थी ' धिंडका ' असाही शब्द आहे. ॐ **धिंडवडा, धिंडोडा** पु० सार्वजनिक रीत्या कोणेकाच्या बदकर्माचा बोभाटा(होणें, वाजणें). ह्या अर्थी अ० व० ही प्रयोग आहे. तुझी (किं० त्याची, तिची,इ०)धिंड(किं०**धिंडका**)उपद्रवकारक असा तूं (किं० तो, किं० ती, इ०) उ० तुझी धिंडका घराच्या बाहेर गेल्याशिवाय मला स्वस्थता वाटणार नाहीं.

धिंडावणें अ० क्रि० घराबाहेर कोठें तरी जाणें किं० भटकत असणें; (निंदेंत प्रयोग); उ० तूं जेवावयाच्या वेळीं घरीं येतोस, कामाच्या वेळीं कोठें तरी धिंडावत असतोस ? उ० मघाशीं मी हाक मारली तेव्हां कोठे मसणांत धिंडावत होतास रे?

धिपाड, धिप्पाड वि० आगडबंब; खूप मोठा (माणूस, जनावर).

धिबडी स्त्री० १ दाटी; गर्दी. २ धिंगामस्ती; दांडगेपणाचे चाळे.

धिंबडी स्त्री० १ खाद्यें, पेयें, भोग्यें, इ०ची चंगाळी किं० विपुलता. २ रंगेलपणाचीं कृत्यें;चैनबाजी. ॐ **दमडीवर धिंबडी** अल्प पैशावर चैनबाजी.

धिमा, धिम्मा वि० १ शांत प्रकृतीचा;रागावण्याला कारण घडलेलें असून जो रागावत नाहीं असा (मनुष्य). २ फार उंच नसून भरपूर असा (मृदंगादिकांचा सूर). ३ कामें संथपणानें करणारा (मनुष्य,–निंदेंत किं० स्तुतींत). ४त्वरारहित म्ह० सावकाश (गाणें म्हणणें, इ०). ॐ

धिमाई, धिम्माई स्त्री० धिमपणाचा गुण.

धिया पु० १ अवमान; हिंमत. २ नेट, जोर. ३ दृढनिश्चयीपणा. टीप,–सर्व अर्थी क्रि० धरणें, देणें, सुटणें, सोडणें.

धिरडें न० एक प्रकारचें पातळ आणि सच्छिद्र भाकरीसारखें वाटोळें खाद्य. ⊛ एकाद्याच्या पाठीचें धिरडें काढणें त्याला खूप मारून त्याच्या पाठीची त्वचा धिरड्यासारखी करणें.

धिरणें [म० धीर] अ० क्रि० १ धीर धरणें; उतावळी किंवा घाई न करणें; पैशासाठीं तगादा न करणें; उ० तुम्ही जर दोन वर्षे धिरणार असाल तर मी तुमचें कर्ज घेतों. २ थांबून राहणें.

धिरा [म० धीर] पु० १ टेका; टेकण; उ० ह्या तुळईला धिरा दिला पाहिजे. २ उत्तेजन; प्रोत्साहन (देणें). ३ टेकण म्हणून दिलेला खांब.

धिरां, धिरे, धिरेधिरे, धिराधिरे उ० वा० अ० सावकाश ! घाई करूं नका !

धिराई [म० धीर] स्त्री० संथपणा; सावकाशी.

धिरासा [म० धीर] पु० १ टेका; टेकण (देणें). २ उत्तेजन; प्रोत्साहन (येणें, देणें).

धिंवसा, धिंसा, पु० भीति, भय (कवितेंत).

धी [सं०] स्त्री० १ बुद्धि. २ मन. ३ विचार. ४ कल्पना. ⊛ **धीमान्** वि० बुद्धिमान्. **धीसखं, धीसचिव** पु० मंत्री; सल्लागार.

धीट [हिं०] वि० १ धैर्यवान्. २ साहसी. ३ उद्धट.

धीर [सं० 'धैर्य' चा अपभ्रंश] पु० १ धैर्य. २ समयविशेष प्राप्त होईपर्यंत उत्सुकता आवरून धरणें, किंवा आवरून धरण्याची ताकद (धरणें, येणें, सोडणें, इ०). ३ उत्तेजन; प्रोत्साहन. ४ अडचणीचे प्रसंगीं अमक्या मनुष्याचें आपणास साहाय्य होईल असा वाटतो तो भरंवसा; उ० माझ्या धीरावर तुम्ही हें कार्य बेलाशक पथकरा. ५ स्थिरपणा; नेटदारपणा. ६ टिकाऊपणा; मजबूतपणा; भक्कमपणा; वापर सहन करण्याची ताकद.

धीर पु० मागें 'धिरा' पु० पहा.

धीर वि० उतावळी न करणारा.

धीवर [सं०] पु० मासे पाण्यांतून धरून विकून उपजीविका करणारा; कोळी.

धुई स्त्री०, **धुकट** न० आकाशांत गोळा होतें तें धुकें.

धुकट क्रि० वि० अस्पष्टपणें; अंधुक रीतीनें.

धुकट पु० धूर.

धुकटावणें [म० धुकट] अ० क्रि० १ नाकांत किं० डोळ्यांत धूर गेल्यामुळें व्याकुळ होणें. २ (आजार, इ०मुळें) चिरडखोर किं० तिरसट होणें. ३ धुरानें काळवंडणें.

धुकटी स्त्री० १ पदार्थावर धुराचा संस्कार करणें. २ न्हाण्याची वस्त्रें इ० ठेवण्याची पेटी; खोकटी.

धुकारें, धुकें न० आकाशांत अति सूक्ष्म जलबिंदूंचें पटल उत्पन्न होतें तें.

धुगधुगी, धुगधुग स्त्री० १ मरणोन्मुख माणसानें अन्य अवयव निश्चेष्ट पडून कंठांत जो प्राणांश अवशिष्ट असतो तो. २ छाती उडणें. ३ छातीला लागून गळ्याला असतो तो खळगा.

धुडकणें, धुडकावणें, धुडकावणें, धुडविणें स० क्रि० १ वादी इ०कांस पराभूत करून टाकणें. २ हाकलून देणें.

धुडका पु०, **धुडका** स्त्री० १ वस्त्राचा वाभाडा. २ पराभव; दुर्दशा (करणें, उडविणें). ⊛ **कोणेकाचे धुडके उडाविणें** (किं० **करणें**), **कोणेकाच्या धुडक्या उडावणें** (किं० **करणें**) १ त्याला चीत करणें; त्याचा पराभव करणें. २ त्याचा फजिता करणें; त्याच्या बोऱ्या उडविणें.

धुडकूस, धडगूस, धुडगुसला पु० १ धांगडधिंगा; दांडगाईचे चाळे; धिंगामस्ती. २ वस्त्रादिकांवर नाचणें, लोळणें, उड्या मारणें, इ० रूप जो व्यापार तो किं० अशा व्यापारानें झालेली वस्त्रादींची दुर्दशा किं० नासाडी.

धुंडणी [म० धुंडणें] स्त्री० शोध; तपास.

धुंडणें, धुंडाळणें [हिं०] स० क्रि० शोधणें, हुडकणें. टीप,–पाहिजे आहे जो पदार्थ त्याच्यावर किं० जेथें तो असेल किं० असूं शकेल त्या स्थलावर कर्मत्व येऊं शकतें; उ० मी ती अंगठी पेटींत धुंडली किं० अंगठीसाठीं मी पेटी धुंडली.

धुणकणें, धुनकणें [सं० धनुस्, म० धनु] स० क्रि० (कापूस) स्वच्छ करणें.

धुणावळ [म० धुणें] स्त्री० वस्त्रें इ० धुण्या-

बद्दलची मजूरी किं० धुण्याची क्रिया.

धुणी [म० धुणें] स्त्री० १ धुण्याची क्रिया. २ धुण्यानें झालेली स्वच्छता. ३ घरांतील पैसा, चीजवस्त, इ० ची नासाडी किं० उधळपट्टी. ४ नदीकांठची वस्त्रादि धुण्याची जागा.

धुणी [हिं०] स्त्री० गोसाव्याची आगटी किं० ह्या आगटीसाठीं केलेला खळगा. ❀ **धुणी घालून बसणें** आपली कांहीं मागणी लोकांनीं पुरवावी म्हणून हट्ट घेऊन बसणें. **धुणीपाणी** स्त्री० दाट मैत्री. **धुणीपाणाचा सोबती** पु० विश्वसनीय कंठस्थ मित्र.

धुणें स० क्रि० १ जलादिकांनीं वस्त्र, भांडें, इ० घासून, झापटून, किं० विसळून स्वच्छ करणें. २ पदार्थांतील नको तो भाग काढून टाकणें; उ० जळवांनीं माझा पाय धुतला; उ० अतिसारानें कोठा धुतला. ३ लुटणें; लुबाडणें; उ० चोरांनीं घर धुतलें. ४ पाप, अपकीर्ति, इ० उपायविशेषांनीं निरस्त करणें. ❀ **धुतलेला विस्तव** पु० कोळसा; (लक्षणेनें) काळा माणूस. **धुतलेला तांदूळ** पु० १ निष्पाप माणूस. २ अगदीं स्वच्छ मोती, इ०. ३ अगदीं गोरा मनुष्य. **धुतवस्त्र** न० सामान्य सोंवळ्याच्या उपयोगासाठीं धुवून वाळविलेलें वस्त्र.

धुणें [म० 'धुणें' हें क्रियापद] न० धुवावयाचा पदार्थ वस्त्रादि. ❀ **लोकांचीं धुणीं धुणें** लोकांचे दोष काढीत बसणें.

धुतकारणें, धुतकावणें स० क्रि० कोणेकाला हिडिस्सफिडिस्स करणें; त्याची फजीती करणें किं० हाकलून देणें.

धुतरा [सं० धत्तूर] पु० धोतरा.

धुतरें [सं० धत्तूर] न० सूर, सनई, इ० च्या दांड्यांना खालीं पितळेचा धोतऱ्याच्या फुलासारखा अवयव बसविलेला असतो तो.

धुताडा [सं० अवधूत] पु० गोसावी (तुच्छतेनें).

धुतारणें [सं० धूर्त] स० क्रि० लुबाडणें, [फसविणें.

धुतारा [सं० धूर्त] पु० १ लबाड, लुच्चा. २ याकितें मागणारा.

धुतीपोती [म० धुणें + सं० पूत = स्वच्छ केलेला] स्त्री० १ स्वच्छता. २ धुणें; धुण्याची क्रिया.

धुत्कार पु० १ खिसखिसणें (सर्पादिकांचें). २ कोणेकाला लाखविलेला तिरस्कार; हेटाळणी.

धुत्तमशाई [सं० धूर्त + फा० शाही] स्त्री० थाटमाट; भपका; शुष्क देखावा.

धुंद [हिं०] वि० १ अस्पष्ट दृष्टीचा. २ अमली पदार्थांच्या सेवनानें ज्याला कैफ आला आहे असा. ३ पैसा, अधिकार, इ० मुळें ज्याला गर्व झाला आहे असा. ४ एखाद्या विषयांत गढलेला. ५ ढगांनीं व्याप्त झालेलें (आकाश किं० दिशा).

धुंद स्त्री० वाद्यादिकांचा सूर किं० मिश्र ध्वनि. ❀ **धुंद बांधणें** (किं० **धरणें**) कांहीं पदार्थाबद्दल फार दिवस इच्छा करीत राहाणें किं० तिचा नाद लागलेला असणें.

धुंदई, धुंदाधुंदी स्त्री०, **धुंदावें** न०, **धुंदावा** पु० गोंधळ, अव्यवस्था; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति.

धुंदाट वि० १ सरळ (रस्ता, मार्ग). २ आवेशी, तामसी (मनुष्य). ३ जोरदार आणि सोसाट्याचा (वारा, पाऊस).

धुंदी [म० धुंद + ई (प्रत्यय)] स्त्री० १ मद्यादिकांच्या सेवनानें आलेला उन्माद. २ पैसा, अधिकार, इ० मुळें अंगीं आलेला गर्व किं० उर्मटपणा. ३ अर्धवट झोपेची गुंगी.

धुंदाळणें इ० मागें 'धुंडाळणें' इ० पहा.

धुंदुर्मास मागें 'धनुर्मास' पहा.

धुंदूक, धुंधुक मुंदूक, धुंदूस मुदूस [म० धुंद] क्रि० वि० अस्पष्टपणें. न० १ पहाट; जेव्हां फारसें स्वच्छ दिसत नाहीं असा समय. २ अस्पष्ट देखावा.

धुनक, धुनूक स्त्री० १ छटा, लकेर. २ दूरचा अस्पष्ट ध्वनि (निघणें, येणें). ३ लोकांत अर्धवट म्ह० तपशीलवार नव्हे अशी पसरलेली कांहीं बातमी (उठणें). ४ पहाटेच्या किं० सायंकाळच्या समयाचा अस्पष्ट देखावा.

धुनकणें, धुनुकणें [म० धुनक] अ० क्रि० १ पहाटेच्या समयीं (दिशा, आकाश) प्रकाशित होऊं लागणें. २ (बंदुका, तोफा, इ०) दुरून वाजणें. ३ (बातमी) अर्धवट पसरणें. ४ (तंटा, कज्जा, इ०) विकोपास जाण्याच्या स्थितींत असणें. ५ (दिशा, आभाळ) स्वच्छ किं० प्रकाशमय होऊं लागणें.

धुनकाविणें स० क्रि० हाकलून लावणें; उच-

ळून किं० पिटाळून लावणें; नापसंत म्हणून फेटाळून लावणें किं० फेकून देणें.

धुनी [हिं०] स्त्री० गोसाव्याची आगटी किं० शेकोटी किं० तदर्थ केलेला खळगा; धुनी.

धुनी [सं०] स्त्री० नदी.

धुपट [म० धुणें] वि० १ धुतलेला. २ धुवून पांढरा स्वच्छ केलेला म्ह० खळ काढून वापरण्यास योग्य केलेला (धोतरजोडा, इ०).

धुपटणें, धुपाटणें [सं० धूप] न० कापूर, चंदनाचा कीस, इ०जाळावयाचें पात्र. ⊛**तेल गेलें तूप गेलें हातीं धुपाटणें आलें** दोन्हीकडून नुकसानी झाली; दोहोंपैकीं एकही उद्दिष्ट साध्य झालें नाहीं; दोहोंकडून फसगत झाली.

धुपणी [म० धुणें] स्त्री० १ नित्यशः धातुक्षय होण्याची विकृति (लागणें). २ सर्वस्वाची लुबाडणी.

धुपणें [म० धुणें]अ० क्रि० १ धुतलें जाणें. २ पाऊस, नदीचा प्रवाह,इ०च्या पाण्याच्या प्रवाहानें शेत,दरड,भिंत, इ०ची माती अंशतः निघून जाणें. ३ जळावयासाठीं पेटविलेलें लाकूड ज्वाळा उत्पन्न न करितां नुसता धूर उत्पन्न करीत राहणें, किं० धुमसत राहणें. ४ मत्सर, क्रोध, इ० भावनांना प्रकट व्हावयाला अवसर न मिळाल्याकारणानें त्या भावनेनें मन व्याकुळ झालेलें असणें; उ० मोठ्या सवतीस मुलगा होतांच धाकटी धुपूं लागली. ५ रेचक घेतल्यानें शरीर मलरहित होणें. ६ एकादा आजार पूर्ण बरा न होतां शरीराला पीडा देत राहणें; किं० तेणेंकरून शरीर झिजत राहाणें; उ० दम्यानें शास्त्रीबोवांच्या बायकोचें शरीर आज पांच वर्षें धुपत आहे. ७ एकादें काम निकालास न लागतां रेंगाळत राहाणें. ८ झिजणें, क्षीण होणें, दबणें, चेपटलें जाणें.

धुपवणी [म० धुपणें] स्त्री० धुरानें पदार्थ सुगंधित करण्याची किं० कीटरहित करण्याची क्रिया.

धुपविणें [म० धूप] स० क्रि० धूपाच्या धुरावर पदार्थ ठेवून तो सुगंधित किं० मलरहित करणें. २ पूर्णपणें धुणें किं० विसळणें ही क्रिया.

धुपा पु० १ एक प्रकारचें गवत. २ एक प्रकारचा बोरू. ३ एक प्रकारचा लव्हाळा.

धुपांगरा, धुपांगारा[सं०धूप+अंगार]पु०१ देवादिकापुढें धूप जाळावयासाठीं आणिलेला निखारा. २ शिजतांना बुडाशीं करपलेला भात.

धुपाटणें [सं० धूप] न० धूप जाळावयाचें धातूचें भांडें. मागें ‘ धुपटणें ’ पहा. ⊛ **जसा देव तसें धुपाटणें** मनुष्याची योग्यता असेल त्या मानानें त्याचा सत्कार केला जातो किं० केला पाहिजे.

धुपारती [सं० धूप+आरती]स्त्री० १ धूप, दीप, नैवेद्य, आरती, इ० उपचारांनीं युक्त जी देवाची पूजा ती. २ धूप जाळावयाचें पात्र. या दुसऱ्या अर्थीं ‘ धुपाळ ’ असाही शब्द आहे.

धुमक पु०वायुविकृतीनें पोटांत उठतो तो गोळा.

धुमकणें स० क्रि० गुद्धे मारून जर्जर करणें.

धुमका पु० बुक्कीनें मारलेला रट्टा.

धुमकूस मागें ‘ धुडगूस ’ पहा.

धुमड स्त्री० १ धिंगामस्ती; दांडगाईचे चाळे. २ चंगाळी, वैपुल्य; उ० आजच्या भोजनांत लाडवांची धुमड उडाली; उ० आज सकाळपासून पावसानें धुमड लाविली आहे.

धुमणें अ० क्रि० १ अग्निसंयुक्त काष्ट, गोवरी, इ० नीं पेट न घेतां धूमयुक्त अवस्थेंत असणें किं० राहाणें. २ आंबे इ०ची केसरें खार पडल्यामुळें करपणें.

धुमधाम मागें ‘ धामधूम ’ पहा.

धुमरा वि० न पेटतां धुमण्याचा स्वभाव ज्याचा असें (काष्ठादि जळण किं० सर्पण).

धुमशा पु० १ आडदांडपणाचे खेळ; दांडगाईचे चाळे. २ पूर्ण पराभव; शत्रूची दाणादाण. ३ कांहीं कामांत तल्लखपणा. ⊛ **कांहीं कामाचा धुमशा घेणें** तें काम नेटानें आणि चिकाटीनें एकसारखें करीत राहाणें.

धुमशान न०, **धुमश्चक्री** स्त्री० १ पदार्थांचें वैपुल्य. २ दांडगाईचे चाळे. ३ नेटानें चालविलेलें काम.

धुमस पु० गच्चीची जमीन चोपण्याचें लाकडाचें आणि लोखंडानें ठोकावयाचें आउत. चोपणें हा आउताची मूठ आडवी असते.

धुमसणें स० क्रि० १ (तांदूळ)वरवर कांडणें किं० अर्धवट कुटणें. २ दांडगाईनें योजणें किं० वापरणें (पदार्थ, माणूस, जनावर).

धुमसणें अ० क्रि० १ जोरानें न जळतां धूर

मात्र उत्पन्न करीत राहाणें. २निकालास न लागतां (वाद, भांडण) पूर्वस्थितींत राहाणें. ३ मनांतल्या मनांत राग, मत्सर, इ० नीं जर्जर झालेलें असणें.

घुमा पु० १ मृदंगादिकांचा जो मागला पुडा तो; धुमाडा; धुमाचा पुडा. २ अनेक वाद्यांचा मिश्र ध्वनि. ३ चोर, गुरें, इ०नीं शेत, गांव, इ०ची केलेली दुर्दशा. ४ सैन्य, जमा झालेले लोक, इ०ची दाणादाण किं० पळापळ.

घुमाकूळ पु० १ दांडगाईचीं कृत्यें,–नाचणें, बागडणें, ओरडणें, इ० रूप. २ स्वैराचार; ताळतंत्र सोडून केलेलीं कृत्यें.

घुमाडा पु० वर 'घुमा' अर्थ १ पहा.

घुमाडा पु० १ वृक्षाचा जोरदार कोंब. २ शरीरावर अकस्मात् उठतो तो फोड.

घुमाधार क्रि० वि० जोरानें, मोठ्या धारांनीं, संतत (पाऊस पडणें).

घुमाफळी स्त्री० दांडगाईचे चाळे,–नाचणें, ओरडणें, इ० रूप (करणें, मांडणें).

घुमारा पु० वृक्षाला नवी फुटलेली जोरदार फांदी; धुमाडा.

घुमाळ [हिं० घुमार] स्त्री० मृदंग वाजविण्याची एक गति.

घुमाळी स्त्री० १ गडबड; गोंधळ. २ शत्रु, दरवडेखोर, इ०चा जोराचा हल्ला किं० असा हल्ला आल्यानें गांवकऱ्यांची होते ती दाणादाण. ३ उधळपट्टीचा किं० बेताल खर्चाचा कारभार.

घुमाळी स्त्री० शिडीवजा उतरण.

घुमी स्त्री० गोसाव्याची आगटी. ॐ **घुमी घालून बसणें** कर्ज उगवावयासाठीं हट्टानें कोणेकाच्या दारीं बसून राहाणें.

घुमें न० धुकें.

घुरकट [म० धूर] वि० १ धुरानें खराब झालेला. २ धुराचा वास ज्याला येत आहे असा. वि० १ धुरानें युक्त (आकाश). २ अस्वच्छ (दृष्टि, नजर). ३ अस्पष्ट (देखावा).

घुरकणें अ० क्रि० (कांहीं पदार्थ) धुरामुळें खराब होणें.

घुरकटाण स्त्री० धुराची घाण.

घुरतावा [सं० धूर्त] पु० धूर्तपणा.

घुरंदळ [म० धूर + दळ] न० धुराचा लोट

धुरंधर [सं०] वि० १ राजकार्य किं० कोणतेंही मोठें कार्य अंगावर घेण्याची ज्याची ताकद आहे असा. २मुख्य; अग्रणी. पु० १पुढारी. २मुख्य व्यवस्थापक.

धुरपणें [म० धूर] अ० क्रि० (सर्पणानें) धूर उत्पन्न करणें. ॐ **धुरपत गौरी** स्त्री० सदा लोकांच्या अंगावर ओरडत असणारी किं० चरफडत असणारी स्त्री.

धुरला, धुरळा [म० धूळ] पु० १ रस्त्यावर जमलेली किं० रहदारीनें उत्पन्न झालेली बारिक धूळ. २पदार्थावर बसतो तो केर.

धुरा [म० धूर, धुरी] पु० १ शेताची किं० गांवाची मर्यादा किं० कड, किं० त्या स्थळीं पुरलेला दगड. २ मुदत; ठरविलेला कालावधि; उ० रोख्याचा धुरा; उ० धुऱ्याचे तीन हप्ते बाकी राहिले. ३कर्जफेडीचा शेवटचा हप्ता. ॐ **धुऱ्याचा बैल** पु० नांगर इ० ओढणाऱ्या बैलांच्या जोड्यांपैकीं अगदीं पुढच्या जोडींतील बैल.

धुरा [सं० धुर्य= भार सोसणारा] पु० मोठा कर्तबगार (उपहासांत).

धुराटी, धुराड, धुराडी [म० धूर] स्त्री० १ धुराचा लोट. २ धुरानें येते ती अंधारी; दाट धुरानें पडतो तो काळोख.

धुराडें, धुराणें [म० धूर] न० घरांतील धूर बाहेर पडावयासाठीं भिंतींत किं० छपरांत ठेविलेलें भोक.

धुराणी [म० धूर + आणी] स्त्री० जोकडाच्या शेवटाकडील विधोंतली जी शिवळ ती.

धुराळा [म० धूळ] पु० धूळ,–रस्तावरची किं० कपडे, भांडीं, इ० वर जमलेली.

धुरी [सं० धुर्=गाडीचें जोकड] स्त्री० १ जोड्याचा पुढचा म्ह० बोटांकडचा भाग. २ गाडी, नांगर, इ०ची दांडी किं० दांड्या. ॐ **धुरे एकट, धुरेकट** न० गाडीची धुरी आणि जूं यांतीं एकत्र बांधावयाची दोरी. **धुरेकरी** पु० गाडी किं० नांगर यांच्या बैलांना हाकणार.

धुरी [म० धूर] स्त्री० १ कांहीं औषधी द्रव्यें अग्नींत घालून करतात तो धूर २ अशा धुराचा संस्कार माणसावर किं० वस्तूवर करतात तो.

(देणें). ❀ **धुरी देणें** १ फसावणें. २ श्रीमंतांपासून पैसे उकळण्यासाठीं चोर, दरवडेखोर, जुल्मी राजे, त्यांना मिरच्यांच्या धुरांत बांधून बसावितात ती क्रिया. **धुरी घालणें** वावडिंग, इ० द्रव्यांचा धूर बाळंतिणीच्या खोलींत करणें.

धुरीण, धुर्य [सं०] वि० भार अंगावर घेणारा. पु० १ जोखडास जुंपलेला बैल, घोडा इ०. २ कार्य पार पाडणारा. ३ एकाद्या संस्थेंतील मुख्य माणूस. ४ प्रधान. ५ एकाद्या विद्येत किं० कलेंत निष्णात असा माणूस.

धुरु पु० १ जकातीच्या कामावरचा अधिकारी. २ हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम.

धुरु [सं० ध्रुव] पु० उत्तरेकडचा ध्रुव हा तारा.

[लोट.

धुरोडा, धुरोळा [म० धूळ] पु० धुळीचा

धुरोडा [म० धूर] पु० घरांतील धूर बाहेर पडावयासाठीं भिंतींत किं० छपरांत ठेवलेलें भोक.

धुरोळें न० हा ह्याच अर्थाचा शब्द आहे.

धुऱ्या वर ' धुरेकरी ' पहा.

धुलाई [म० धुणें] स्त्री० वस्त्रें धुण्याबद्दल दिलेली मजुरी.

धुवट [म० धुणें] वि० १ धुतलेला (वपडा). २ धुवून पांढरा स्वच्छ केलेला (कपडा). ३ धुवून ज्याची विणतेवेळची खळ काढून टाकली आहे असें (वस्त्र).

धुवडी स्त्री० भावाची मुलगी (भाची) किं० दिराची मुलगी (पुतणी); धूवडी.

धुवण [म० धुणें] न० तांदूळ ज्यांत धुतले आहेत असें पाणी; धूण.

धुवणें स० क्रि० धुणें.

धुवणी [म० धुणें+पाणी] न० पदार्थ ज्यांत धुतला आहे तें पाणी.

धुवा, धुंवा [सं० धूम] पु० १ पराभव; दाणादाण. २ सत्यानाश; विध्वंस. ३ वादादिकांत कोणकाचा पूर्ण पराभव (उडविणें).

धुवा [म० धुणें] वि० धुवट; धुतलेला; स्वच्छ पांढरा (रेशीम, सूत, तांदूळ, साखर, इ०). ❀ **धुवाधार** [म० धुणें + धार] स्त्री० १ जोराचा पाऊस, -जो जमीन साफ धुवून स्वच्छ करतो. २ झुगारणें, धुणें, धुवाडणें. क्रि० वि० जमीन धुतली जाईल अशा रीतीनें (पाऊस पडणें). **धुवारोटी** पु० भाकरी बांधावयासाठीं भाकरी पाण्यांत बुचकळून काढून तें पाणी पिणारा आणि भाकरी फडक्यांत बांधून ठेवणारा; चिक्कू माणूस धुवारोटीच्या पुढची पायरी ' छायारोटी ' म्ह० केवळ भाकरीची छाया पाण्यावर पाडवून तें पाणी पिणारा.

धुशा [हिं०] पु० एक प्रकारचें लोकरीचें वस्त्र.

धुस्स, दुस्स क्रि० वि० अत्यन्त (काळा). ❀ काळा दुस्स वि० अत्यन्त काळा.

धुसका फुसका वि० अशक्त; लेचापेचा. ❀ **कोणेकाची धुसकीं फुसकीं काढणें** त्याचीं वर्मैं कर्मैं काढणें.

[चरफड.

धुसकुस स्त्री० भांडण सुरू व्हावयाच्या आधींची

धुसमणें, धुसमुसणें अ० क्रि० १ हुंदके दाबण्याचा प्रयत्न करून रडणें; आपलें रडणें बाहेर न पडेल अशा प्रकारें रडणें. २ चरफडणें.

धुसा [हिं०] पु० एक प्रकारचें जाडेभरडें लोकरीचें वस्त्र.

धुळपट स्त्री० १ दुर्दशा; नामोडी; विध्वंस. २ पराभव; फजिती. दोन्ही अर्थीं क्रि० उडणें, उडविणें, करणें, होणें.

[(जागा).

धुळवट [म० धूळ] वि० धुळीनें व्याप्त

धुळवड, धुळवडी [म० धूळ] स्त्री० १ फाल्गुन वद्य प्रतिपदेस होळीची राख एकमेकांच्या अंगावर टाकून मुलें खेळतात तो खेळ. २ धुळीची जागा; जेथें केरकचरा किं० धुरळा फार आहे असें स्थळ.

[धूळ, केरकचरा.

धुळवरा, धुळारा, धुळोरा [म० धूळ] पु०

धुळवाड वर ' धुळवड ' पहा.

धुळाक्षर [म० धूळ+अक्षर] न० लाकडाच्या पाटीवर धूळ पसरून बोटांच्या लेखणीनें मुलें अक्षरें काढावयाला शिकतात तीं अक्षरें प्रत्येक किं० समुच्चयानें.

[धूळ.

धुळारा [म० धूळ] पु० वाऱ्यानें उडालेली

धुळवाफ [म० धूळ+वाफ] स्त्री० पावसानें धुरळा मेला नाहीं त्याच्या अगोदर पेरा करतात तो.

धुळोरा [म० धूळ] पु० धूळ; केर कचरा.

धूड स्त्री० एक वनस्पती. न० अवाढव्य शरीर

किं० अशा शरीराचा माणूस किं० प्राणी. २प्रचंड असा कांहीं पदार्थ,–मोडून पडलेलें मोठें झाड, कोसळून पडलेला धोंडा, इ०.

धूग [म० धुगें] न० तांदूळ, डाळ, इ०पदार्थ ज्या पाण्यांत धुतले आहेत तें पाणी.

धूत [सं०] वि० १धुतलेला; स्वच्छ केलेला. २हालविलेला; कंपित. ❀ **धूतवस्त्र, धुतवस्त्र** न० धुवून स्वच्छ केलेलें वस्त्र.

धूत्कार पु० सर्पादिकांचें खिसखिसणें.

धून [सं० ध्वनि] स्त्री० १ रागज्ञापक ध्वनींचा जो यत्किंचित् अंश तो; उ० हा शुद्ध सारंग नव्हे, ह्यांत किंचित् मल्हाराची धून मारते. २ लोकांत पसरलेली कांहीं बातमी; अफवा.

धूप [सं०] पु० १ ऊद इ० सुगंधी द्रव्यें किं० त्यांचा धूर. ❀ **धूप दाखविणें** १ भक्ष्यादि पदार्थ तृप्ति व्हावयाजोगा न देतां अत्यल्प देणें किं० वाटणें; उ० भाराभर गवतानें शंभर गुरांस धूप दाखवून आलों. २फाराची अशा दाखवून अत्यल्प देणें. ❀**धूप घालणें** १ रुसून बसलेल्या माणसाला बोलावयास लावण्यासाठीं त्याचीं आर्जवें करणें. २ अंगांत आलेल्या माणसास संतुष्ट करून प्रश्नांचीं उत्तरें द्यावयास त्याचें मन वळविणें. **धुपारती, धूपारती** स्त्री०देवापुढें धूप जाळून पूजा इ०करणें. **धूपवाल्या** पु०दोन माणसांत कलागती पेटविणारा.

धूम स्त्री०१वेगानें धावणें;निसटून जाण्यासाठीं वेगानें धावणें; पळ (ठोकणें) २ चंगाळी, वैपुल्य; उ० आमच्या गांवांत यंदा आंब्यांची धूम झाली. ३ दंगल, आकांत, दांडगाईचीं किं० क्रूरपणाचीं किं० विध्वंसकारक कृत्यें;उ०पेंढाऱ्यांनीं त्या गांवांत धूम मांडली आहे, तुम्ही तिकडे जाऊं नका; उ० क्षणभर पंतोजी वर्गाच्या बाहेर गेला कीं पोरें धूम मांडतात. क्रि० वि० १ जोरानें; वेगानें. २ एकसारखें, न खळतां (कांहीं काम करणें). ३ वैपुल्यानें; पुष्कळ प्रमाणांत; उ०जरीमरीनें त्या गांवांत धूम माणसें मरत आहेत. ❀ **धूमधडाका** क्रि० वि० एकदम. **धूमधडाका** पु० जोराचें किं० आवेशाचें कोणतेंही कृत्य.

धूम [सं०] पु० १ लाकडें, गोवऱ्या, इ० जळत असतां त्यांतून निघतो तो धूर. २ हवेंतील जलांश. ३ वाफ. ४धुकें. ❀ **धूमकेतन, धूमकेतु** पु० १ अग्नि. २ शेंडें नक्षत्र.

धूम्र [सं०] वि० १ धुरकट. २ जांभळा. ३ अधुक. पु० धूप. ❀ **धूम्रलोहित** पु० शंकर. **धूम्रपत्र** न०तंबाखूचा पत्ता; तंबाखू. **धूम्रपान** न० १तंबाखू, गांजा, इ० ओढणें म्ह० त्यांचा धूर सेवन करणें. २तपश्चर्येचा एक प्रकार. **धूम्रमार्ग, धूममार्ग** पु० पापाचरण,–जें मनुष्याला नरकाकडे नेतें. याच्या उलट ' तेजोमार्ग ' किं० 'अर्चिरादि मार्ग' म्ह० पुण्याचरण,–जें मनुष्याला स्वर्गाकडे नेतें.

धूर [सं० धूर्=गाडीची धुरी किं० जोखड] स्त्री० १ जोखडाचीं जीं दोन टोकें तीं प्रत्येक. २ गाडीच्या दांडीचा अग्रभाग. ३पायाच्या बोटांच्या पाठीमागें उंच जो पायाचा भाग तो किं० त्या जागीं येणारा जोडा, वाहाण, इ०चा भाग. ४ कोणत्याही पदार्थाचा अग्र भाग. **धूरएटक** न० जू आणि दांडी यांना एकत्र बांधावयाची दोरी.

धूर पु० १ जळत असलेल्या लाकूड, गोवरी, इ० तून पूर्णपणें न जळालेला जो कोळशाचा अंश बाहेर पडतो तो. २ सोनें, चांदी, इ० चा मुलामा पदार्थाला देतात तो. ३कोणेकाची कोणत्याही कामांत तल्लीनता; उ० रामभाऊचा त्या कामांत धूर आहे. ४ आकाशाची अभ्राच्छादित स्थिति (उठणें, निघणें, होणें). ५ तिखट पदार्थ खाल्ल्यानें नाकांतून, तोंडांतून, किं० कानांतून उष्ण भपकारे निघतात ते. ६ एकाच संस्थानांत फार वेळ बसल्यानें गात्रविशेषांत उठते ती कळ किं० तिडीक. ७ गर्व, ताठा, उन्माद (संपत्त, विद्वत्ता, अधिकार, शारीरिक बळ, इ०नीं उत्पन्न होतो तो) ❀ **धूर देणें** (किं० **दाखविणें**) फसविणें. **धुरावर धरणें** गांजणें, क्रूरपणें वागविणें.

धूर्त [सं०] वि० १ लुच्चा; लबाड. २खोडसाळ. ३ दूरदर्शी. ४ चतुर, चाणाक्ष. पु० शृंगारप्रकरणीं एका नायिकेस ठरवून दुसरीस भोगणारा. ❀ **धूर्ताई** स्त्री०, **धूर्तावा** पु० १ लुच्चेगिरी. २ चाणाक्षपणा.

धूलि [सं०] स्त्री० धूळ; सूक्ष्मरूपांतील माती. ❀ **धूलिवंदन** न० फाल्गुन वद्य प्रतिपदेस होळीची राख, मृत्तिका, इ०चा कपाळादिकांवर करतात तो टिळा.

धूव [सं० ' वधू ' चें परिवृत्त रूप] **स्त्री०** मुलगी; कन्या. ❀ **बोले सुने तें लागे धुवे** सुनेला मारलेला टोमणा मुलगी आपल्यावर ओढून घेते.

धूसर [सं०] **वि०** १ करडा, काळसर पांढरा. २ फिकट.

धूळ [सं० धूलि] **स्त्री०** १ अति सूक्ष्म कणांच्या रूपांत असलेली मृत्तिका. २ कांहीं नाहीं (निषेधीं प्रयोग); उ० मीमांसा शास्त्रांत तुला काय धूळ समजते ? ३ दुर्दशा; उ० सदोबाच्या सावकारीची धूळ झाली. ❀ **धुळीस मिळणें** नष्ट होणें; उ० आजपर्यंत अनेक मी मी म्हणणारे लोक धुळीस मिळाले आहेत. **धुळीचे दिवे खात जाणें** जवळची संपत्ति भलत्याच चैनींत खर्च करून टाकल्यामुळें भिकारी होऊन भीक मागत हिंडणें. **कोणंकानें धुळीचे दिवे लावणें** त्याणें बदकर्मांनें प्रसिद्धीस येणें. **धूळ फुंकणें** अन्नान्न दशेप्रत पावणें; उ० आज अभ्यास केला नाहींस तर उद्या तुला धूळ फुंकावी लागेल. **टीप,**—उकिरड्यांत चरत असलेल्या गाढवाच्या दाखल्यावर हा वाक्प्रचार आधारलेला आहे. **धूळ उडणें** नष्ट होणें; विध्वस्त होणें. **कोणेकाला धुळींत रत्न सापडणें** त्याला कांहीं अकल्पित आणि अनपेक्षित लाभ होणें. **धूळअक्षर न०** मागें ' धुळाक्षर ' पहा. **धूळकोट पु०** गांवाभोंवतालची मातीची भिंत. **धूळदर्शन न०**१ देवाल्यांत शिरावयाच्या अगोदर रस्त्यांतूनच देवाला केलेला नमस्कार. २पहिली भेट,—तपशीलवार भाषण व्हावयाच्या अगोदरची. ३ कोणेकाचें झालेलें ओझरतें दर्शन. ४ थोडाच वेळ झालेली भेट. **धूळदशा, धूळधाण, धूळधाणी, धूळधाम, धूळपट, धूळपट्टी स्त्री०, धूळधमासा पु०** १ विध्वंस, नासाडी. २ सैन्याची शत्रूनें उडविलेली दाणादाण. ३ वादादिकांत कोणेकाचा झालेला पूर्ण पराभव. ४ फजीती; बोऱ्या; नाचक्की. **कोणेकाची धूळपट्टी काढणें (उडविणें किं०करणें**)त्याला सडकून रागें भरणें; त्याची भोसडपट्टी काढणें. **धूळपाटी स्त्री०** धुळाक्षरें शिकणाऱ्या मुलाची फळी,—जिच्यावर धूळ पसरून तीवर तो लेखणीनें अक्षरें काढतो. **धूळवाफ स्त्री०** पाऊस पडावयाच्या अगोदर किं० पहिल्या पावसानें धूळ पूर्णपणें दबावयाच्या अगोदर भात इ०चा पेरा करणें, किं०असा केलेला पेरा.

धृत [सं०] **वि०** धरलेला. ❀ **धृतराष्ट्र पु०** १ पांडवांचा चुलता. २ जन्मांध असा कोणीही माणूस. **धृतव्रत वि०** एकनिष्ठ.

धृति [सं०]**स्त्री०**१धरणें;धरण्याची क्रिया.२ आधार.३स्थैर्य.४धैर्य.५सत्तावीस योगांतील आठवा.

धेंड, धेंडें न० १ प्रचंड आणि अवाढव्य शरीर किं० अशा शरीराचा माणूस किं० प्राणी. २ विद्या, पराक्रम, शौर्य, वक्तृत्व, इ० गुणांच्या योगानें सर्वविश्रुत माणूस.

धेड पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ❀ **धेडकचका पु०** निकराचें भांडण किं०कचाकची. **धेडकावळा पु०** डोमकावळा किं० महारकावळा ह्या नांवाचा पक्षी. **धेडगा पु०** धेड (तुच्छतेनें). **धेडगुजरी वि०**१अनेक भाषांचा संकर जींत आहे अशी (भाषा). २ अनेक प्रकार, तऱ्हा, रंग, इ० ज्यांत आहेत असा. ३ अस्पष्ट, दुर्बोध, अपुरतें (भाषण, इ०). **धेडवाडा पु०** १ धेडांच्या वसतीचा मोहल्ला.२ कचाकचीचें भांडण (मांडणें, माजविणें). ३ अव्यवस्था; गोंधळ; घोटाळा. **धेडसुगी स्त्री०** १ धेडाला मिळालेल्या बलुते हक्काचें धान्य,—जें तो बाजारांत आणून स्वस्त दरानें विकतो. २ अल्पकाळ टिकणारी स्वस्ताई.

धेंडशी स्त्री० एक वेल. **धेंडसें न०** त्या वेलीचें फळ.

धेडा पु० १ विवाहांत वरास मधुपर्क करतसमयो त्याच्या शेजारीं दुसरा कोणी मुलगा बसवितात तो. २सुरख्याबरोबर जें खोटें पान हुकूम होत असतें तें. ❀ **नवऱ्याला मिळेना काट आणि धेडा मागतो वरण** महत्त्वाच्या माणसाची जेथें बरदास्त राहात नाहीं तेथ क्षुद्र माणसानें ती अपेक्षिणें किं० इच्छिणें (हा मूर्खपणा होय).

धेंडा [अ० धेंढा] **पु०** वरातीच्या दिवशीं वधूवरांस कडेवर घेऊन कुलदेवतांचीं नांवें घेऊन नवरीच्या दारापुढें नाचतो तो मनुष्य.

धेंडाळणें, धेंढाळणें अ० क्रि० पातळ मळ गुदावाटें वारंवार पडत असल्यानें जर्जर होणें.

धेंडाळी, धेंडोळी [म० धेंडाळणें=पातळ हगणें] **स्त्री०** मळ पातळ होऊन एकसारखें हगावयास होण्याची विकृति,—जी मनुष्य किं० जनावर

यांस होते ती (लागणें).

धेंडी स्त्री० तानवड ह्या नांवाचें कर्णभूषण.

धेंडोली (-ळी) स्त्री० बलिप्रतिपदेच्या दिवशीं गवताची चुडी गुराखी जी गायीम्हशींच्या पुढें नाचवितात ती.

धेंड्या पु० वर ' धेंड ' पहा.

धेनवा, ध्यानवा [सं० धेनु] **स्त्री०** १ गाय (प्रेमानें). २ दांडगी किं० अडदांड पोरगी.

धेनू [सं० धेनु] **स्त्री०** गाय.

धैर्य [सं०] **न०** १ धाडस; संकटसमयीं न डरण्याचा गुण. २ शांति; शांत वृत्ति किं० स्वभाव. ꣸ **धैर्यवान, धैर्यशाली वि०** धैर्य आहे ज्याच्या अंगीं असा; धैर्यगुणानें शोभणारा.

धैवत [सं०] **पु०** सप्त स्वरांपैकीं सहावा.

धो स्त्री० गाडीच्या चाकाच्या पारिवाला मजबूतीसाठीं घालतात ती लोखंडाची पट्टी;धाव.

धोक [हिं०] **पु०**१शरीरानें धिप्पाड जो मनुष्य तो. २ मजबूत किं० दणगट वस्त्र.

धोकटी, धोगटी स्त्री० १ न्हाव्याची वस्तें, चटपटणें, इ० आउतें ठेवण्याची कातड्याची पिशवी किं० पेटी. २ पिशवी; पडशी. ३ शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचीं पुस्तकांची पिशवी.

धोकडा वि० शरीरानें लठ्ठ किं० अगडबंब (पुरुष, स्त्री, पशु).

धोका [हिं० धोखा] **पु०** १ भयाचें कारण. २ कांहीं अनर्थ गुदरेल अशी शंका. ३ अनर्थ; संकट. ४ अंगावर कोसळलेलें संकट. ५ व्यापार, व्यवहार, इ० त बसलेली ठोकर.

धोकाळ पु० मोठा प्रज्वलित अग्नि.

धोगटी स्त्री० मागें ' धोकटी ' पहा.

धोंगड वि० १ जाडेंभरडें, ओबडधोबड (वस्त्र किं० कोणताही कारागिरीचा पदार्थ).

धोंगडा पु०, धोंगडें न० जाडे भरडे कपडे, चिरगुटें, नेसावयाचीं धोतरें, इ०व्यक्तिशः.

धोटणें स० क्रि० मोठमोठ्या घोटांनीं पिणें.

धोटा [म० धोटणें] **पु०** मोठमोठ्या घोटांनीं पिणें (लावणें).

धोटामोटा मागें ' धाटामोटा ' पहा.

धोटें न० १ गुरांना ओषधें पाजावयाचें बांबू इ० चें नळकांडें. २ कोष्टी लोक सुताची कांडी हांडीच्या आकाराच्या शिंगाच्या ज्या साधनांत बसवितात तें.

धोंड स्त्री० १ खूप मोठी शिळा. २ (लाक्षणिक)व्यापारांत आलेली बूड. ३सरकारनें लादलेला जुलमी पारा. ४ कोणताही मोठा अनर्थापात. ५ असह्य आणि कठिण आणि जिकिरीचें काम. ६ आपणाला दारिद्र्यामुळें जड वाटणारें माणूस किं० जनावर,-ज्याला पोसणें आपणाला टाळतां येण्याजोगें नाहीं.**टीप**,-कोणेकाच्या डोकीवर धोंड देणें किं०चढविणें,कोणेकाच्या गळ्यांत धोंड बांधणें, असे प्रयोग होतात.꣸ **धोंडाळ, धोंडाळ वि०** जींत धोंडे फार अशी (जमीन). **धोंड दिवस पु०** ज्या दिवशीं कोणतेंही धर्मकृत्य होत नाहीं तो दिवस; लागोपाठच्या दोन तिथींचीं धर्मकृत्यें कर्तव्य असतां मध्यें जो एक दिवस तिथिवृद्धीमुळें रिकामा जातो तो. **धोंड फोड्या पु०** पाथरवट.

धोंडभट्टी [**म०** धोंडा+भट्टी किं० धोंडोपंत ह्या नांवाचा भट] **स्त्री०** स्नान न करतां भस्म, गंध, इ० लावून स्नान करून आपण शुचिर्भूत झालों आहों असा खोटा देखावा(करणें).**धोंडमहिना, धोंडमास पु०** अधिक महिना; पुरुषोत्तम मास,-ज्यांत कोणतेंही धर्मकृत्य होऊं शकत नाहीं. **धोंडवण न०** १ अधिक मासांत करतात तो ब्राम्हणभोजनाचा विधि. २अधिक मासांत ब्राम्हणाला जें पक्कानाचें वाण देतात तें. **टीप**,-याला ' धोंडवायन ' असेंहीं म्हणतात. **धोंडवणी न०** ठिकरीचा वास लाविलेलें ताक. **धोंडशीर स्त्री०** पायाच्या टांचेच्या वरची शीर.

धोंडा पु० १ दगड; फत्तर. २ अधिक महिना. ३ अधिक महिन्यांत कणकेचें वाण देतात तें. ४ पाषाणहृदयी माणूस. ५ अडाणी किं० अननुभविक माणूस किं० कारागीर. ꣸ **एकाद्यावर धोंडा लोटणें** (किं० **घालणें**) त्याची नालस्ती किं० बदनामी करणें. **कोणेकाचे धोंडे खणून काढणें** १ त्याचीं पाळेंमुळें खणून काढणें. २ अधिकाराच्या किं०मानाच्या जागेवरून तो हाकलून दिला जाईल असा त्याच्या विरुद्ध व्यूह रचणें. **धोंडे मारूं लागणें** १ शत्रुत्वानें कोणेकावर तुटून पडणें; त्याचेवर हला करणें. २

वेडयासारखे चाळे करणें; उपद्रवकारक खोडया करणें. **धोंडयाखालीं (किं० दगडाखालीं) हात सापडलेला असणें** मागें ‘ दगड ’ मध्यें पहा. **धोंडयाचे दोर काढणें** मागें ‘ दगड ’ मध्यें ‘ दगडाचे दोर काढणें ’ पहा. **धोंडयावर धोंडे घालून कांहीं काम करणें** हरएक प्रकारच्या युक्त्याप्रयुक्त्या करणें (एकादा हेतु साधण्यासाठीं). **धोंडयाशीं कपाळ घासणें** १ मूर्खाला बोध करण्याचे कष्ट सोसणें. २ निष्फळ यत्न करणें. **हातीं धोंडे घेणें** चिरडीस जाणें. **पायांवर धोंडा ओढून घेणें** मूर्खपणानें कांहीं लचांड आपणावर ओढवून घेणें. **आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणें** १ आपली हानि करून घेणें. २ आपल्या अन्नांत मूर्खपणानें माती कालवून घेणें. **चार ठिकाणीं धोंडे टाकून पाहाणें** आपलें इष्ट साधण्यासाठीं अनेक ठिकाणीं अनेक प्रकारांनीं यत्न करून पाहाणें. **बारोळा धोंडा पु०** दुसऱ्याच्या पेचांत कधीं न सापडणारा माणूस. **कोणेकाच्या नांवानें धोंडे फोडणें** त्याणें आपलें अहित केलें अशा समजुतीनें त्याला शिव्या देणें. **कोणेकाच्या कामामध्यें धोंडा घालणें** त्याच्या कामांत विघ्नें उपस्थित करणें. **धोंडयापेक्षां वीट मऊ** ‘ दगड ’ मध्यें हाच वाक्प्रचार पहा.

धोंडाविणें [**म०** धोंडा] **स० क्रि०** कांहीं काम करण्याविषयीं (कोणेकाला) टोंचणी लावणें.

धोंडाळणें मागें ‘ धुंडाळणें ’ पहा.

धोण न०, धोणा पु० १ झाडाचा बुडखा; झाडाचें खोड. २ लाकडाचा ओबडधोबड ओंडका.

धोणका, धोणा, धोण्या वि० अडाणी; अशिक्षित; गांवढळ. [जागा.

धोणी [**म०** धुणें] **स्त्री०** वस्त्रें इ० धुण्याची

धोण्या पु० माकडांच्या टोळीचा म्होरक्या.

धोत पु० १ पाण्याचा लोट. २ अग्नीच्या ज्वाळांचा झोत. **स्त्री०** हताची ओंजळ; पसा.

धोतर न० १ पुरुषांचें नेसावयाचें वस्त्र(नेसणें). २ पुरुष खांद्यावर घेतात तें उपवस्त्र (अंगावर घेणें). ❀ **धोतरजोडा पु०** नेसावयाच्या दोन वस्त्रांची जोडी,–एकापुढें एक अशी मागावर विणलेली. **धोतरपाडवा पु०** मागें ‘ दौहित्र ’ मध्यें दौहित्रप्रतिपदा ’ पहा.

धोतरा [**सं०** धत्तूर] **पु०** एक फुलझाड किं० त्याचें फूल. ❀ **वेडा धोतरा वि०** मूर्ख किं० अजागळ माणूस.

धोताल (–ल्या) [**म०** धोत=हाताचा पसा] **वि०** १ खर्चिक; उदारपणानें खर्च करणारा. २ उधळ्या. ३ रंगेल. ४ अव्यवस्थित वर्तन किं० भाषण करणारा. [बांध्याचा.

धोदया वि० अवाढव्य शरीराचा; ओजड

धोदर, धोदरी स्त्री०, धोदरा पु० फुगवटा, फुगारिपणा, सूज (येणें, चढणें, जाणें, उतरणें).

धोदरणें, धोदारणें अ० क्रि० एकदम फुगणें.

धोदराट पु० १ भडाभडा जळणारा विस्तव. २ एकाएकीं आलेली सूज. [पाण्याचा झोत.

धोदा, धोधा पु० उंचावरून पडणारा

धोधाट, धोदाट, धोधाटा पु० १ पाण्याचा जोराचा लोंट किं० लोंढा. २ आगीचा डोम. ३ बंदुका, तोफा, इ० चा कडकडाट. ४ समुद्राच्या लाटांचा प्रचंड खळखळाट. ५ वाऱ्याचा सोसाटा.

धोदाणा (–ना) पु०, धोदाणी (–नी) स्त्री० १ क्षतादिकांतून जोरानें बाहेर पडणाऱ्या पुवाची किं० रक्ताची धार किं० चिळकांडी. २ पाण्याचा जोरदार लोट किं० प्रवाह.

धोदारणें अ० क्रि० मागें ‘ धोदरणें ’ पहा.

धोधाटणें स० क्रि० मोठमोठ्या घोटांनीं पिणें. **अ० क्रि०** तहानेनें व्याकुळ झालेलें असणें.

धोधाणी स्त्री० १ पाण्याचा जोरदार लोट; धबधबा. २ जोराची रक्त, पू. इ०ची चिळकांडी.

धोधावणें अ० क्रि० कोसळून पडणें.

धो धो क्रि० वि० मोठा आवाज करून (बंदुका किं० तोफा उडणें, पाणी पडणें, पाऊस पडणें, वारा वाहाणें, इ०). [फोफशेपणा.

धोनशा वि० लठ्ठ, फोफशा. ❀ **धोनशी स्त्री०**

धोप [**हिं०**] **स्त्री०** १ लांब असून सरळ अशी तरवार. २ अशा तरवारीच्या सपाट अंगानें मारलेला रट्टा. ३ दोन्ही हातांनीं काठी धरून मारलेला तडाखा. ४ वृक्षाचें फताडें पान.

धोप क्रि० वि० अतिशय, गडद (पांढरा).

धोप, धडधोप वि० मजबूत, दणगट(वस्त्र इ०).

धोपट वि० अनेक लोक जिनें जातात अशी (वाट किं० वर्तनसरणी). ❀ **धोपटमार्ग पु०** १ अनेक

लोक ज्या मार्गानें जातात तो मार्ग; सरळ मार्ग. २ सरळ आणि प्रामाणिकपणाची वागणूक.

घोपटणें स० क्रि० १ काठी इ० नीं झोडपणें. २ धुण्यासाठीं (वस्त्र) दगडावर आपटणें.

घोपणें [हिं०] अ० क्रि० १ तहानेनें व्याकुळ होणें. २ कांहीं पदार्थासाठीं अतिशय उत्कंठित झालेलें असणें. [लेला तडाखा.

घोपाटी स्त्री०दोन्हीं हातांनीं काठी धरून मार-

घोबेड वि० १ पाहिजे आहे त्याहून मोठा. २ अवाढव्य.३बोजड (कारागिरीचा कांहीं पदार्थ). ⊛ **ओबडधोबड** वि० अडाणीपणानें केलेला (पदार्थ) किं० केलेलें (काम).

घोबी [हिं०]पु०परीट.**घोबीण** स्त्री०परटीण.

घोरडा पु० वस्त्रादिकांचा बाभाडा. ⊛ **कोणेकाचे घोरडे काढणें** १ त्याला लुबाडणें. २ त्याचा फजिती उडविणें.

घोरण न० १ अग्र भाग;अग्रभागाचा देखावा. २ एका दृष्टिनिक्षेपांत पदार्थाचें दिसतें तें रूप. ३ माणसाच्या भाषणवर्तनादिकांवरून त्याच्या विचारांची किं० उद्देशाची कळून येते ती सरणी किं० दिशा. ४ वस्तुस्थितीच्या अवलोकनानें किं० निरीक्षणानें आपला होतो तो तर्क किं० आपण करतों तें अनुमान. ५ कोणेकाचा प्रयत्न ज्या ध्येयासंबंधानें असतो तें; कोणेकाचें साध्य. ६ गमनाची दिशा गंतव्य स्थान. ७ भाषणवर्तनादि बाबतींत जी एकरूप सरणी ती. ८ भाषणवर्तनादिकांचा रोख. ९ प्रत्येकानें आपणाला अमुक साधावयाचें आहे असें जें ठरविलेलें असतें तें. १० लक्ष्य; विचारांत घ्यावयाची गोष्ट; निरीक्षणाचा विषय. ११सामान्य सरणी; वर्तनाची पद्धति. १२ शिस्त; तऱ्हा; प्रकार; ढब; शिरस्ता; चालू पद्धति. १३ परिस्थितीच्या अवलोकनानें आपल्या भाषणवर्तनादिकांना लागते ती दिशा. ⊛ **घोरणशुद्ध** वि० १ नीट विचार करून केलेलें; समंजसपणाचें. २ योग्य सरणीचा अवलंब करून केलेलें.**घोरणी** वि०अमुक भाषणवर्तनादिकांचा काय परिणाम होईल इ०गोष्टी विचारांत घेणारा ; अमुक गोष्ट साधावयाची आहे तर कोणच्या मार्गानें जावें हें बिनचूक ठरविणारा;धूर्त.

घोरें न० धूर घरांतून निघून जावा, घरांत वारा किं० प्रकाश यावा, म्हणून भिंतींत किं०छपरांत ठेविलेलें भोक.

घोंशा ,धंशा,धौंशा, धोंसा [सं० दंश]पु० अमुक गोष्ट अमुक प्रकारें अमुक वेळीं झाली पाहिजे असा दुसऱ्याला लाविलेला तगादा किं० अशी आपल्या मनाला लागलेली असते ती आंच किं० हुरहूर.

घोंशा, घोंसा [हिं० धोंसा] पु० १ मोठी नौबत. २ बोभाटा(होणें, वाजणें).३ नेटाचा किं० जोराचा प्रयत्न. ४ आवेशानें केलेला हल्ला. ५ आवेशानें केलेलें कोणतेंही काम. ६ धडाका; उत्साहपूर्वक कोणत्याही कामाला हात घालून तें तडीस लावण्याची हिंमत किं० तडीस लावण्याचा निश्चय. ७ नेट; जोर; हिंमत.

घोष्ट, घोष्ट्या वि० १ आळशी स्वभावाचा. २ अजागळ. ३ स्वतःची ऊर्जा न बाळगणारा.

घोसरा, ढोसरा, ढासरा पु० १ रट्टा,तडाखा. २ नेटाचा प्रयत्न.

घौताल, घौताल्या मागें ' धोताल ' पहा.

धौर्त्य, धौर्तक, धौर्तिक [सं०] न० धूर्तपणा; लबाडी.

ध्याणें [सं० ध्या=चिंतणें] स० क्रि० चिंतिणें (कवितेंत).

ध्यात [सं०] वि० चिंतिलेला.

ध्यातव्य [सं०] वि० चिंतावयास योग्य.

ध्याता [सं०ध्यातृ] वि०विचारांत घेणारा; चिंतिणारा; मनन करणारा.

ध्यान [सं०] न० १ मनन,चिंतन.२ एकाग्रता. ३ ईश्वराचें चिंतन. ४ विचार. ५ लक्ष्य, अवधान. ६ सर्व कामें यथायोग्य प्रकारें करण्याची मनाची स्थिति; उ० मी आतांच निजून उठलों आहें, मी पुरता ध्यानावर आलों म्हणजे तुमची हकीगत ऐकेन. ७ देहभान; शुद्धि. ८ देवाची मूर्ति किं० चित्र ह्यांत दिसतें किं० दाखविलेलें असतें तें देवाचें रूप किं० संस्थान किं० ठाण; उ० हें विष्णूचें ध्यान उग्र आहे, तें सौम्य आहे. ९ आवड, पसंती; उ० तूं जो सौदा केलास तो माझ्या ध्यानास येत नाहीं.१० प्रकार, शिस्त; रीति;सरणी;उ०आजच्या गाण्याचें ध्यानच निराळें; उ० दोघे सावकारी करतात पण त्याचें ध्यान निराळें आणि ह्याचें ध्यान निराळें. ११ देवाच्या प्रार्थनेचें गाणें. १२ मळकट चिरगुटें ज्याच्या अंगावर आहेत, ज्याचे केश अस्ताव्यस्त आहेत, किं० अंग मळलेलें आहे, किं० ज्याचें दर्शन विचित्र आहे, असा

माणूस, मूल, किं० मुलगी. १३योगाच्या अष्टांगांपैकीं सातवें. ॐ **एकाद्या गोष्टीच्या ध्यानास लागणें** तिच्या बद्दल विचार करीत राहणें; ती मनावर घेणें; ती गोष्ट करण्याचा मार्ग ठरवीत बसणें. **ध्यानधारणा स्त्री०** १ वस्तूचें दिसतें तें रूप; चर्या; मुद्रा. २ चिंतन. **ध्याननिष्ठ वि०** ईश्वराच्या स्वरूपाचें ध्यान म्ह० चिंतन करण्यांत गढलेला. **ध्यानमुद्रा स्त्री०** १ ध्यान करतेवेळची मुद्रा. २ ध्यान करतांना जी मुद्रा आणि शरीराचें संस्थान योग्य तें. **ध्यानयोग पु०** ईश्वरप्रीत्यर्थ जो ध्यानरूप शास्त्रयोग सांगितलेला आहे तो. **ध्यानस्थ वि०** १ ईश्वराचें ध्यान करण्यांत गढलेला. २ कोणत्याही गोष्टीचा एकाग्र चित्तानें विचार करण्यांत निमग्न झालेला. **ध्यानी वि०** ज्याणें ध्यान लाविलें आहे म्ह० जो ईश्वरचिंतनांत निमग्न झालेला आहे असा. **कांहीं गोष्ट ध्यानींमनीं असणें** तीच गोष्ट सदासर्वदा डोक्यांत घोळत असणें. **एकादी गोष्ट एकाद्याच्या ध्यानीं मनीं नसणें** त्याच्या स्वप्नांतही ती आलेली नसणें; त्याला तिची गंधवार्ताही नसणें; तिची शक्यता त्याला कधीं वाटलेली नसणें.

ध्यानवा, धेनवा [सं० धेनु] **स्त्री०**१ गाय. २ कुरूप किं० खोडकर किं० मळकट चिरगुटें धारण केल्यानें हिडिस्स दिसणारी मुलगी.

ध्यास [सं०'निदिध्यास' चें म० तोकडें रूप] **पु०** १ एकाद्या वस्तूची एकसारखी मनांत चाललेली घोळणी. २ उत्कट इच्छा.

ध्येय [सं०] **वि०** ध्यानाला योग्य. **न०** इच्छेचा विषय; जी गोष्ट साध्य करावयाची असें मनानें निश्चित ठरविलें आहे ती; जी वस्तु मिळवावयाची म्हणून आपण ठरवून ठेविलें आहे ती.

ध्रुपद [सं०ध्रुव+पद] **न०**१ गाण्याचें पालुपद; गीताचा प्रत्येक कडव्यानंतर म्हणावयाचा भाग.

ध्रुपद न० तालाचा एक प्रकार. ॐ **कोणेकाच्या मागें ध्रुपद धरणें** गाण्याचें ध्रुपद म्हणण्यांत त्याची साथ करणें. अशी साथ करतो त्याला ' ध्रुपद्या ' म्हणतात.

ध्रुव [सं०] **पु०** उत्तानपाद ह्या नांवाचा सूर्यवंशांत एक राजा होऊन गेला त्याचा पुत्र. ध्रुवानें उग्र तपश्चर्येच्या योगानें अचलपद मिळविलें आणि तें अचलपद म्हणजे आकाशांतील ज्या बिंदूभोंवतीं सर्व तारामंडल फिरतें तो. ह्या बिंदूंत जो तारा आहे त्यालाच ध्रुवाचा तारा म्हणतात. ॐ **ध्रुवतारा पु०** वर वर्णिलेला तारा. **ध्रुवपद न०** १ ध्रुवताऱ्याचें आकाशांतील स्थल. २ शाश्वत टिकणारें स्थान किं० वैभवाचें स्थान. **ध्रुवमत्स्य पु०** उत्तरेकडील ध्रुव, प्रजापति, अग्नि, इंद्र, धर्म, धाता, आणि विधाता, हे सात तारे समुच्चयानें. **ध्रुवपदीं बसविणें** १ उच्चस्थानीं बसविणें. २ ऐश्वर्याच्या शाश्वत पदावर कोणेकाला चढविणें.

ध्रुवक [सं० ध्रुवक] **पु०** ज्या अंकास कांहीं संस्कार करून विवक्षित तिथ्यादि किं० ग्रहादि विवक्षित काळांचे होतात असे जे अंक ते प्रत्येक.

ध्वज पु०, ध्वजा स्त्री० [सं०] १ देवालय किं० राजद्वार इ० पुढें उंच स्तंभ पुरून त्याचेवर चिन्हविशेषांनीं अंकित असें वस्त्र लावितात तें वस्त्र किं० त्या वस्त्रासहित तो स्तंभ. २ राजादिकांच्या स्वारीपुढें असाच जो उंच स्तंभ किं० दंड चालविलेला असतो तो. ३ निशाण; पताका. ॐ**ध्वज लावणें** यश संपादणें. **ध्वजापर्वणी स्त्री०** सिंहराशींत गुरु संक्रान्त होतो तो दिवस. **ध्वजारोपण न०, ध्वजारोप पु०** वर्षप्रतिपदेच्या दिवशीं गुडी उभारणें हा विधि. **ध्वजावर्त पु०** मस्तकावरील केशांचा मध्यबिंदु.

ध्वजाय [सं० ध्वज+आय] **पु०** गृहाच्या भूमीच्या लांबीरुंदीवरून आठ प्रकारचे आय सांगितले आहेत त्यांतील एक. मागें' आय ' पहा.

ध्वनि [सं०] **पु०** १ आवाज. २ गाण्याचा सूर. ३ वाद्याचा आवाज किं० गजर. ४ गर्जना. ५व्यंग्यार्थ. ६व्यंग्यार्थप्रधान काव्य. ७अफवा; भुमका.

ध्वनित [सं०] **वि०** १ ध्वनियुक्त. २ ध्वनीनें ज्ञापित(अर्थ). **न०** १आवाज. २ गर्जना.

ध्वंस [सं०] **पु०** १ सडणें. २ भुगा होणें. ३ नाश. ४ मरणें.

ध्वंसणें [सं० ध्वंस; म० ध्वंस] **स० क्रि०** १ नष्ट करणें; लोपाविणें; वस्तूची नासाडी करणें.

ध्वस्त [सं०] **वि०** १ नष्ट केलेलें किं० झालेलें; लुप्त; नष्ट.

ध्वाडी स्त्री० (पुरुषास) बंधूची कन्या आणि (स्त्रीस) दिराची कन्या.

ध्वांक्ष [सं०] **पु०** १ कावळा. २ एकाक्ष.

ध्वांत [सं०] **न०** १ काळोख; अंधेर. २ नरकविशेष. ३ सत्त्व, रज, आणि तम, हे जे तीन गुण त्यांतील तिसरा; तमोगुण.

न

न मराठी व्यंजनमालेंतील विसावें व्यंजन.

न क्रि० वि० नाहीं, विपरीत अर्थानें, उलट प्रकारें, असे ' न 'चें अर्थ होतात; उ० तो न गेला तर माझें काम अडून राहील. ॐ **नचा पाढा वाचणें** (कांहीं काम) करीत नाहीं असें म्हणणें.

न [म० ' आणि ' चें तोकडें रूप] **उभयान्वयी अ०** आणि. **टीप,**–दोन शब्दांच्या मध्यें ' न ' हा शब्द येतो तेव्हां त्याचा उच्चार 'न् ' असा केला जातो; उ० बिंदुनबिंदु म्ह० प्रत्येक बिंदु; उ० पुणें शहराची मला खडानखडा माहिती आहे म्ह० मला पुणें शहरांतील प्रत्येक खड्याची माहिती आहे म्ह० मला पुणें शहराची अगदीं बारीक सारीक माहिती आहे; याच संर-णीनें वर्षनवर्ष, दिवसनदिवस. हा न ' ना,' 'नु' अशा रूपांनींही उच्चारला जातो.

नई [सं० ' नदी ' चा अपभ्रंश] **स्त्री०** नदी. ॐ **इकडे नई तिकडे वई** दोहोंकडून पंचाईत किं० अडचण. वई=कुंपण.

नऊ [सं० नवन्] **वि०**एक, दोन, इ० क्रमांकांतील ' आठ ' च्या पुढचा आणि ' दहा ' च्या मागला अंक दाखवितो त्या संख्येइतका.

नकटा वि० १ ज्याचें नाक कापलें आहे, किं० बसकें आहे, किं० आखूड आहे असा (मनुष्य) किं० असें (नाक). २ उणें, अपुरें, अर्धवट (काम, विधि, कारभार, इ०). ॐ **नकटीच्या लग्नाला हजार विघ्नें** ज्याच्या अंगीं कांहीं उणेंपणा आहे त्याचें कार्य सफल होण्याच्या बाबतींत अनेक अडचणी उपस्थित होतात. **नकटें व्हावें पण धाकटें होऊं नये** शारीरिक व्यंग नडत नाहीं इतका वयाचा लहानपणा नडतो.

नकराई [म०नकारणें] **स्त्री०** १ हुंडी नाकारणें किं० परतविणें. २ हुंडी नाकारल्याबद्दल किं० परतविल्याबद्दल द्यावा लागतो तो दंड.

नकल, नक्कल [अ० न] **स्त्री०** १ लेखाबरहुकूम केलेली प्रत.२कोणत्याही वस्तुच्या बरहुकूम केलेली दुसरी वस्तु. ३ अनुकरण.४चमत्कारजनक, हास्यजनक, किं० गमतीची घडलेली गोष्ट. ५ दुसऱ्याच्या भाषणवर्तनादि प्रकारांचें अनुकरण. ६ निर्वंश;उ०राजाची नकल झाली; उ०मोरोपंताच्या कुटुंबाची नकल झाली.७एकसारख्या ज्या प्रती त्या प्रत्येक; पहिली मूळ प्रत किं० तिच्याबरहुकूम केलेल्या इतर प्रती त्या प्रत्येक. ॐ **नकलनवीस, नकलनीस** [म० नक्ल्+फा०नविश्तन्=लिहिणें] **पु०** मूळ पत्रादिकांच्या प्रती करणारा. **नकलनवीशी, नकलनिशी स्त्री०** नकलनवीसाचें काम, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र. **नकली वि०** १ मूळाबरहुकूम केलेला, बनविलेला किं० घडविलेला. २ दिसण्यांत खऱ्यासारखें पण वस्तुतः खोटें, लबाडीचें, किं० बनावट. ३ नकला करणें, विनोदीपणाच्या गोष्टी सांगणें, दुसऱ्याच्या बोलण्या चालण्याचें अनुकरण करणें, इ० मध्यें जो पटाईत तो.अशा माणसाला ' नकल्या ' म्हणतात. ४ गमतीचा;विनोदास्पद (गोष्ट,वृत्तान्त, इ०). **नकली स्त्री०** अस्सल लुगड्यासारखें दिसणारें लुगडें.

नकशा [अ० नक्शाह्] **पु०** १गृह,कांहीं पदार्थ, जमीन, इ०चें चित्र. २ आराखडा. ३ कशीदा, खोदणें, कोरणें, इ०रूपांनीं काढलेली आकृति, वेलबुट्टी, इ०.४ थाट, भपका,वैभव; उ० दिगंबररावांनीं प्रयोजनाचा नकशा केला.५सरशी; वरचढपणा; उ०मी हजारो रुपये खर्चीन पण तुजवर नकशा केल्याशिवाय सोडणार नाहीं. ॐ **एकाद्याचा नकशा उतरणें** त्याच्या गर्वाचा परिहार करणें.

नकशी, नखशी, नखजीन [फा०] न्हाव्याचें नखें कापावयाचें हत्यार; नराणी.

नकशी[हिं०नकशी ;अ०नक्शाह्]**स्त्री०**धातूचा पत्रा, कागद, लाकूड, दगड, इ०च्या पृष्ठभागावर वेल,फुलें,प्राण्यांच्या आकृति,इ० कोरकामानें किं० उठावकामानें किं० रंग वगैरेंनीं दाखविलेल्या असतात त्या समुच्चयानें किं०त्याचा देखावा.ॐ**नकशी, नकशीदार वि०** ज्यावर नकशी केली आहे असा(पदार्थ).

नकसणें [म०नकशा] **स०क्रि०**नकशीच्या कामानें किं० कारागिरीनें सुशोभित करणें. ॐ

नकशींव वि० नकशीनें शोभविलेला. नकसकंगोरा पु० नकशीचें काम.

नकळा [म० न+कळणें] वि० १ ज्याला कांहीं कळत नाहीं असा; मूर्ख; अडाणी. २ अज्ञात; ठाऊक नसलेला. ३ ज्याला कांहीं गोष्ट किं० हकीगत कळलेली नाहीं असा; ज्याच्या ऐकण्यांत कांहीं गोष्ट आलेली नाहीं असा.

नका [म० मूळ धातु भाषेंत आज नाहीं] **आज्ञार्थी रूप** मराठी भाषेंतील अपूर्ण किं० अनियमित धातूंच्या वर्गांतील एका अविद्यमान धातूचें ' नका ' हें आज्ञार्थक द्वितीय पुरुषाच्या **अ० व०** चें रूप असून तें जोडीदार क्रियापदाच्या आज्ञार्थीचा विरोध हा अर्थ दाखवितें; उ० तुम्ही जाऊं नका.

नकादुवा पु० कवड्यांनीं खेळावयाचा एक [खेळ.

नकार [म० न+कार] पु० १ नाहीं असें म्हणणें; निषेध; अमान्यता (करणें); उ० मी त्या जवळ रुपये मागितले पण त्याणें नकार केला. २ हुंडी परतविणें, किं० ह्या अर्थाचा शेरा.

नकारणी [म० नकारणें] स्त्री० अस्वीकार; न पथकरणें; उ० ह्या हुंडीची त्रिकमभाईनें नकारणी केली.

नकारणें [म० नकार] स० क्रि० १ (हुंडी) न स्वीकारणें. २ (कोणताही पदार्थ इ०) न स्वीकारणें.

नकाराई [म० नकारणें] स्त्री० १ हुंडीचा अस्वीकार केल्याबद्दलचा दंड. २ हुंडीचा अस्वीकार. सकाराई म्ह० हुंडीचा स्वीकार.

नकाशा [अ० नक्शाह्] पु० १ भूप्रदेशाचें कागद इ०च्या पृष्ठभागावर काढलेलें चित्र. २ कोणत्याही पदार्थाचें कागद, दगड, इ० वर काढलेलें चित्र.

नकास पु० गुरें विकत घेणारा माणूस दलालाला देतो तें द्रव्य.

नकासणें [अ० नकाष्] स० क्रि० कोरकामानें, कशीद्यानें, किं० रंगांच्या रेघांनीं, सुशोभित करणें.

नकी, नक्की [म० नाक] स्त्री० गायनामध्यें नाकानें सूर ओढतात तो.

नकी, नक्की [अ० नका=स्वच्छ, पवित्र] वि० विकावयाच्या पदार्थाची दुकानदारानें गिऱ्हाइकाला हडसून खडसून उतरावयाला कांहीं अंतर न ठेवतां सांगितलेली किंमत. २ अगदी बरोबर, तंतोतंत (वजन, माप, लांबी, रुंदी, इ०). ३ ठरलेली, शिरस्त्याप्रमाणें असलेली (भाषा, हिशेबाची पद्धति, इ०).

नकीदुवा पु० कवड्या इ० नीं खेळावयाचा एक खेळ.

नकीब [अ० नकीब्] पु० बड्या माणसाचा हुजऱ्या,–जो त्याचे किताब जाहीर करतो, किं० जो त्याला भेटावयास आलेल्या माणसाला त्याचे पर्यंत आणून पोंचवितो. **टीप**,–' नकीबदार ' ह्याच अर्थी योजला जातो.

नकीबदी स्त्री० पुढें ' नेकीबदी ' पहा.

नकील [हिं०] स्त्री० उंटाच्या नाकांतील वेसण.

नकुल [सं०] पु० मुंगुस ह्या नांवाचा एक [प्राणी.

नको 'नका' ह्याचें ' नको ' हें ए० व० रूप. वर ' नका ' हा शब्द आला आहे तो पहा.

नकल इ० वर ' नकल ' इ० पहा.

नक्का [म० नाक] पु० अरेरावीपणा; मगरूरी; गर्व; तोरा (उतरणें, दाखविणें, मोडणें, जिरणें).

नक्की वि० वर ' नकी ' पहा.

नक्त [सं०] न० १ रात्र. २ फक्त प्रदोषकाळीं जेवण्याचें व्रत. ह्या अर्थी ' नक्तभोजन ' असाही शब्द आहे. ह्या व्रताला ' नक्तव्रत ' असें म्हणतात.

नक्त, नगद [अ० नक्द्] न० रोकड नाणें.

✽ **नक्तेबाब, नक्तीबाब, नक्दबाब** स्त्री० चलनी नाण्याच्या रूपानें दिलेला सारा. ह्याच्या उलट ' धान्यादींच्या रूपानें दिलेला सारा. '

नक्तीशिरस्ता पु० पैशाच्या रूपानें आकारलेला सारा. पुढें ' नगद ' पहा.

नफ्तेल [अ० नफ्त्+म० तेल] न० एक [औषधी तेल.

नक्र [सं०] पु० सुसर; मगर.

नख [सं०] न० १ मनुष्याच्या बोटांच्या अग्रभागीं जो टणक शिंगासारखा भाग असतो आणि जो कापून काढतांना दुखत नाहीं

आणि जो कापला असतां पुन्हा वाढतो तो. २ पशु, पक्षी, यांच्या पादाग्रीं असाच पदार्थ असतो तो. ⊛ **नखानें काम होई तेथें कुऱ्हाड कशाला?** साध्या साधनांनीं ज्याचा नाश करतां येतो त्याच्या नाशासाठीं मोठमोठीं साधनें योजण्याची गरज नाहीं. **आपलींच नखें आपणास विखें होतात** आपल्याच कृत्यांनीं आपणावर संकटें ओढवतात. **नखनख बोलणें** दिमाखानें किं० तोऱ्यानें बोलणें. **नखभर वि०** अत्यल्प; अगदीं थोडें. **नख शिरणें** थोडासा प्रवेश मिळणें किं० शिरकाव होणें. **नखाएवढा वि०** अगदीं लहान (मूल, कर्ज, पदार्थ). **नखाबोटांवर कांहीं काम करणें** नाजूकपणाची ऐट करून कांहीं काम करणें. **कोणेकाला नखांबोटांवर खेळविणें** (किं० **नाचविणें**, किं० **चाळविणें**) सहज रीतीनें त्याला फसविणें किं० त्याच्या डोळ्यांत धूळ टाकणें; त्याला अत्यल्प श्रमानें आपल्या म्हणण्याप्रमाणें वागावयास लावणें. **नखांबोटांवर जेवणें** चोखंदळेपणानें जेवणें. **नखांबोटावर चालणें** पवित्रपणाचा किं० प्रामाणिकपणाचा देखावा करून वागणें. **नखांबोटांवर दिवस मोजणें** अत्यन्त उत्सुकतेनें एकाद्या गोष्टीची मार्गप्रतीक्षा करीत राहाणें. **नखाला आग लागलेली असणें** संकटपरंपरेची नुसती सुरवात झालेली असणें. **एकाद्याच्या नखीं दोष नसणें, एकाद्याच्या नखाला माती लागलेली नसणें** तो अत्यन्त शुचिर्भूत असणें किं० पवित्र किं० निष्पाप असणें. **नखें चावीत** (किं० **कुरतुडीत**, किं० **वाजवीत**) **बसणें** १ निराश होऊन किं० हिरमुष्टा होऊन बसणें; फजीती होऊन बसणें. २ पोटाला उद्योग धंदा कांहीं नाहीं अशा स्थितींत असणें. **नखखुरपा वि०** नखांनीं ज्याचें खोबरें खरवडून काढतां येईल इतका कोंवळा (नारळ, शहाळें). **नखमूळ, नखरडूं, नखरूं, नखुरडें, नखोरडें न०** नखाच्या शेजारीं बोटाला होतो तो एक रोग. **नखरूड न०** फार मोठें नख (तुच्छतेनें किं० निंदेत). **नखशिखान्त क्रि० वि०** पायाच्या नखापासून तों डोक्याच्या केशांच्या टोकापर्यंत म्ह० सर्व शरीरभागीं; उ० मी नखशिखान्त घामानें डबडबलों आहें.

नखजणें [म० नख] स० क्रि० १ वस्त्राला घातलेल्या टिपेवर नख चेपून फिरविणें,— टिपेचे टांके साफ बसण्यासाठीं. २ नखाच्या पृष्ठभागानें पदार्थ घासून गुळगुळीत करणें. ३ नखानें ओरबाडणें.

नखजीन [फा० नाखन्‌चीन्‌] न० नखें कापावयाचें न्हाव्याचें एक शस्त्रविशेष.

नखणें [म० नखी] स० क्रि० नखी नांवाच्या हत्यारानें कापणें.

नखरणें [म० नख] स० क्रि० १ अंगावर लाविलेले गंध नखांनीं रेखींव करणें किं० रेखांकित करणें. २ नखांनीं अंग ओरबाडणें. ३ नखांनीं अंग खाजविणें.

नखरा [फा० नख्राह्‌] पु० १ छाकटेगिरीचे ढंग. २ शृंगारचेष्टाप्रदर्शक नेत्रादींचा आविर्भाव. ३ शरीरावरील वस्त्रभूषणादिकांची झोकदार रचना. **नखरी स्त्री०** नखरे करणारी स्त्री.

नखलणें [म० नख] स० क्रि० बोटांनीं केश विंचरणें,—नखांनीं डोकीची त्वचा खरडून.

नखला [म० नख] पु० १ खीर करावयासाठीं दुधांत भिजविलेल्या सपीटाचे बारीक बारीक आणि आकारविशेषाचे नखांनीं करतात ते तुकडे. २ मुलांचा एक दागिना. ३ प्राणिविशेषाचें सुगंधी नख.

नखशी [फा० नक्‌चीन्‌ किं० नाखन्‌चीन्‌] स्त्री० १ नखें कापावयाचें हत्यार. २ नखरूं.

नखसूं [म० 'नखशी' चें एक रूप] न० १ नखें कापावयाचें हत्यार. २ ह्या हत्यारानें नखाला होतें तें दर्द. ⊛ **नखसूं, नखसूय न०** नखें अकुशलपणानें कापल्यानें होतें तें दर्द. **नखाग्रीं** नखांच्या टोकांवर,—म्हणजे लिहितांना तावडतोब आठवेल अशा प्रकारें (स्मरणांत राहिलेला विषय); उ० युक्लिडचे सिद्धांत माझ्या नखाग्रीं आहेत. **जिव्हाग्रीं** म्हणजे हावें तेव्हां म्हणून किं० बोलून दाखवितां येईल इतकें (पाठ किं० स्मरणांत राहिलेलें). **नखाची जीभ स्त्री०** नखाच्या मूलभागाचा नाजूक भाग.

नखी [म० नख+ई (प्रत्यय)] स्त्री० १ सारमंडल, सतार, इ० वाजवितेवेळीं जें तारेचें आकारविशेषाचें वलय बोटाच्या टोकाला घालतात

तें. २ धोतरजोडा इ०च्या कांठाला रेशीम इ०ची नखाइतकी बारीक धारी असते ती.

नखी [सं० नखिन्=तीक्ष्णनखयुक्त प्राणी] पु० १ सिंह, व्याघ्र, इ० प्राणी,–जे नखांनीं बैल, इ० प्राणी फाडून खातात.२ उंदीर.

नखुरडा [म० नख] वि०१नखांनीं ज्यांतील खोबरें ओरबाडून काढतां येईल असा (नारळ, शाहाळें). २ ज्याला एकसारखी कंड सुटत असते अशी (शरीराची त्वचा).

नखुला, नखोला पु० वर ' नखला ' पहा.

नखोरा [म० नख] पु० नखांनीं त्वचेवर काढलेला ओरखडा.

नग [सं० नग = १पर्वत. २ वृक्ष.] पु० १ पर्वत. २ वृक्ष.

नग पु० १ स्त्रियांचा एक दागिना. २ कोणताही दागिना. ३ (परिगणनाच्या प्रसंगीं) वस्तु, पदार्थ; उ०हापुसचे आंबे नग पंचवीस म्ह०पंचवीस हापुसचे आंबे;उ०पेट्या नग तीन म्ह०तीन पेट्या.४ (हत्तीच्या परिगणनांत) हत्ती हे प्राणी; उ० त्यांच्या पीलखान्यांत हत्ती नग दहा आहेत म्ह०दहा हत्ती आहेत.५आंगठीवर बसविलेला हिरा इ०खडा. ६ कच्या सुताची लड,–याच्या उलट ' कंकरी. '

नगद [अ० नक़द्] न० रोख पैसा. वि० अत्युत्तम;उत्तमोत्तम; सर्वोत्तम; उ०नगद आंबे, नगद जेवण,नगद लुगडीं,इ०. ❀**नगद दागिने** पु०अ०व० जे दागिने विकले असतां पैसे उभे राहातील असे दागिने. **नगद पैसा** पु०प्रत्यक्ष नाण्याच्या रूपांत असलेला पैसा. **नगद माल,नगदा माल, नगदी माल** पु० १ सोन्याचांदीचे दागिने किं० इतर पदार्थ,–जे विकून रोकड पैसा तावडतोब उभा करतां येतो. २ कोणत्याही वस्तूचा अत्युत्तम भाग किं० अंश. **नगद होऊन बसणें** दिवाळें काढून बसणें; राजरोस आणि निर्लज्जपणें कफल्लक होणें. **नगद विक्री** स्त्री० रोख पैसे घेऊन विकणें किं० जें विकलें तें. **नगदानगद** क्रि० वि० मालाची तावडतोब रोख किंमत घेऊन (विकणें इ०). **नगदानगदी** वि० अत्युत्कृष्ट;उत्तमोत्तम. क्रि०वि० विकलेल्या मालाची तावडतोब रोख किंमत घेऊन. **नगदी** स्त्री० रोख पैसा; रोकड पैसा.**नगदी** वि० जमाबंदीसंबंधाचा. **नगदी गोमास्ता, नगदी कारकून** पु० देशपांड्याच्या हाताखालचा एक अमलदार; पैशाचा भरणा सरकारांत आलेला जो त्याची नोंद ठेवणें, पैसे देणें, इ० कामें याच्याकडे असतात.**नगदी भांडवल** न०रोख पैशाच्या रूपीं भांडवल. **नगदी शिरस्ता** पु० पैशाच्या रूपांत ठराविलेला सारा.**नगदी सामान** न० रोकड पैसा.

नग नगोटा पु०,**नग नगोटें** न०दागदागिने समुच्चयानें.**नगवज** न० दागदागिने समुच्चयानें. वर ' नगनगोटा ' पहा. **नगोटा** पु०, **नगोटें** न० [म० नग]दागदागिने; लहान मोठे नग समुच्चयानें.

नगद नारायण, नगन नारायण [सं० नग्न+नारायण] पु० १ लठ्ठ आणि थिलथिलित शरीराचा माणूस,–जो बहुतेक वस्त्रहीन आहे. २ वस्त्रहीन, द्रव्यहीन,मित्रहीन,असा कोणतिही कंगाल माणूस.

नगदा पु० एक प्रकारची बांगडी.

नगर [सं०] न० मोठ्या जनवसतीचें गांव किं० शहर.❀**नगरनायक** पु० शहरांतील अत्यन्त श्रीमंत सावकार. **नगरप्रदक्षिणा** स्त्री० शहराभोंवतीं देवाची प्रदक्षिणा; देवाचा छबिना इ० कांसहित यात्रार्थ जी नगराभोंवतीं प्रदक्षिणा करतात ती. **नगरभवानी** स्त्री० गांवाच्या उठाठेवी करणारी रिकामटवळी स्त्री.

नगरी [सं०] स्त्री० नगर; शहर.

नंगा [हिं० नंगा;सं० नग्न] वि० १नागडा; नागवा. २ दरिद्री; अकिंचन. ❀ **नंगा नाच** पु० निर्लज्जपणानें घातलेला धुडगूस; अव्यवस्थित किं० ताळतंत्र सोडून केलेला कारभार; निर्लज्जपणाचीं कृत्यें; मनमानेल तशी वर्तणूक;बेबंदशाही (घालणें).

नगीन नागवा [सं० नग्न+म० नागवा] वि० अगदीं नागडा;ज्याच्या अंगावर एक सूतही नाहीं असा (पुरुष). **नंगी तरवार, नंगी समशेर** स्त्री० म्यानांतून बाहेर काढलेली तरवार; नागवी तरवार.

नगारा [अ० नकाराह्] पु० मोठ्या आकाराचें एक चर्मवाद्य. ❀ **नगारखाना** पु० चौघडा, नगारे,इ० ठेवावयाची किं० वाजवावयाची जागा. **नगारची**(–जी)पु० नगारे इ० वाद्यें वाजविण्याच्या कामावरचा इसम. **एकाद्या गोष्टीचा नगारा**

वाजगें तिचा बोभाटा होणें;तो जाहीर होणें. **नगाऱ्यावर टिपरूं पडणें** चव्हाट्यावर येणें;जगजाहीर होण. **नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई ?** (म्ह० काय ?) मोठया कार्याकडे लक्ष्य वेधलेलें असतां क्षुल्लक गोष्टींकडे कोण लक्ष्य देणार ? किं० लक्ष्य द्यावयाला कोणाला फुरसत सापडणार ?

नगीना [फा० नकीनाह्] **पु०** १ हिरा, माणिक, इ० मूल्यवान् खडा. २ कोणत्याही जातीची किं० प्रकारची उत्तम वस्तु; उ० काय नगिना लेखणी हो ?

नग्न [सं०] **वि०** १ नागवा; वस्त्रहीन. २ कंगाल; अति गरीब. ३ बुद्ध भिक्षु. ४ जैन भिक्षु. ꣸ **नग्न दिगंबर वि०** अगदीं नागवा. **नग्न दीक्षा स्त्री०** कांहीं काळ अगदीं नागवें राहण्याचें व्रत किं० हें व्रत पाळणें(घेणें);गोसावी अशी नग्न दीक्षा घेतात. **नगन नारायण** मागें 'नगदनारायण' पहा.

नचक, नचकल स्त्री० फुटकी कवडी.

नचनतु [सं० न+च+न+तु] **न०** १ कचर; साशंक वृत्ति; अमुक गोष्ट करूं कीं नको ह्या संबंधानें मनाची अनिश्चित स्थिति. २ कांहीं काम करावयाला आढेवेढे घेणें. **टीप**;–दोन्ही अर्थी **क्रि०** करणें, होणें.

नजर [अ० नज़र्] **स्त्री०** १ दृष्टि; दृष्टिनिक्षेप. २ कृपादृष्टि. ३ प्रेमपूर्वक कोणाला कांहीं बक्षीस दिलेला पदार्थ (देणें, करणें). ४ भेट; मुलाखत; बोलभाषण. ꣸ **नजर देणें** १ पदार्थविशेषाकडे दृष्टि वळविणें. २ कांहीं गोष्ट विचारांत घेणें. **नजर न पुरणें** नजरेच्या टप्प्यांत असून त्याच्याही पलीकडे असणें. **एकाद्याच्या नजरेनें पाषाण उलणें** त्याची नजर अति तीक्ष्ण आणि भेदक असणें. **कोणेकाची नजर फाकणें** १ अनेक मोठमोठ्या किं० नव्या नव्या वस्तु त्याच्या पाहाण्यांत आल्या कारणानें त्याच्या मनाची आकुंचितता नष्ट होणें. २ त्याचें मन महत्त्वाकांक्षी होणें; अल्पानें त्याचें समाधान न होणें. **नजर अंदाजा पु०** पदार्थावर केवळ नजर टाकून तिच्यासंबंधानें केलेली अटकळ किं० बांधलेला अजमास. **नजर कारखाना पु०** राजापूर तालुक्यांत घाटाजवळचें जंगल तोडण्याचा दिलेला मक्ता. **नजर खोलाई स्त्री०** शेतांचीं पिकें कापण्याच्या परवानगीबद्दल सरकारला द्यावा लागतो तो पैसा. **नजर गलबत, नजर जहाज न०** होड्या, गलबतें, इ० वर बसविलेला कर. **नजर गहाण न०** काढलेल्या कर्जाबद्दल गहाण म्हणून कबूल केलेली पण कर्ज काढणाऱ्याच्याच ताब्यांत असलेली वस्तु. याच्या उलट ' अमल गहाण ' किं० ' तांबे गहाण ',–जी कर्ज देणाऱ्याच्या ताब्यांत दिलेली असते. **नजर गुजारत स्त्री०, नजर गुजारा पु०** दृष्टादृष्ट; एकमेकांनीं एकमेकांस दृष्टीनें पाहाणें; गांठ पडणें. **नजरघी न०** सरकारी कामगारांना द्यावें लागतें तें तूप. **नजरेचा खेळ, नजरचा खेळ पु०** १ केवळ पाहिल्यानेंच करतां येण्याजोगी गोष्ट. २ क्षुल्लक किं० अगदीं सोपें असें काम. ३ चांगल्या दृष्टीनेंच करणें शक्य असें काम,–चित्र काढणें. यंत्र बनविणें किं० नीट करणें, कशीदा काढणें इ०. **नजरचूक स्त्री०** एकाद्या विषयाकडे नजर न गेल्यानें झालेली चूक;बुद्धिपूर्वक केलेली नव्हे अशी चूक. **नजरेचें पाप, दृष्टीचें पाप, डोळे पापी** सारें पाप किं० सारा खोडसाळपणा काय तो डोळ्यांचा असतो. आपणाला न कळतां पुष्कळ भलभलत्या गोष्टी होत असतात त्या आपणाला चालतात आणि खपतात; परंतु एकादी क्षुल्लक गोष्टही जर आपल्या डोळ्यांदेखत घडली तर ती आपणास खपत नाहीं. **नजरचोर पु०** जो नजरेस मुद्दाम पडत नाहीं तो. **नजर नजराणा पु०** १ बड्या माणसास बक्षीस म्हणून दिलेल्या वस्तु समुच्चयानें. २ एकमेकांनीं एकमेकांस प्रेमपूर्वक बक्षिसें देण्याची क्रिया. **नजरपाहणी स्त्री०** केवळ नजरेनें एकाद्या वस्तूचा आजमास करण्यासाठीं तिच्यावर टाकलेली दृष्टि. **नजरबंद पु०** प्रेक्षकाच्या दृष्टीला भूल पाडणारा गारोडी. **नजरबंदी स्त्री०** १दृष्टीला गारोडी पाडतो ती भूल किं० अशी भूल पाडण्याची विद्या. २ नजरेनें कोणेकावर घातलेली नियंत्रणा; त्याणें आपल्या नजरेच्या टप्प्याच्या बाहेर जाऊं नये अशी त्याच्यावर घातलेली नियंत्रणा. **नजरबाग पु०, स्त्री०** घरापुढें शोभेसाठीं बाग करतात ती; घरापुढें नजरेला तोषविणारी बाग केलेली असते ती. **नजरबाज वि०** सूक्ष्म नजरेनें वस्तूचें निरीक्षण करण्यांत कुशल. **नजरभेट स्त्री०**

१ सरकारी अमलदाराला पहिल्या भेटीच्या वेळीं देतात तो नजराणा. २ जमाबंदीच्या वेळीं सरकारला पाटील देतो तो एक रुपाया हा नजराणा. **नजरहुजुर, नजरेहुजुर** क्रि० वि० राजाच्या किं० बड्या अमलदाराच्या समक्ष. **नजरानजर** स्त्री० एकमेकांनीं एकमेकांच्या दृष्टीस पडणें; दोघांच्या नजरांची भेट.

नजराणा [अ० नजर; फा० नजरानाह्] पु० वरिष्ठाला किं० बरोबरीच्या माणसाला प्रेमपूर्वक बक्षीस दिलेली वस्तु.

नजला [अ० नजलाह्] पु० कांहीं विकृतीमुळें डोळ्यांतून गळतें तें पाणी.

नजारत [अ०] स्त्री० नाजीराचा हुद्दा.

नजीक(-ख) [फा० नजदीक्]क्रि० वि० समीप; सान्निधीला; शेजारीं.

नजीस [अ० नजस्] वि० १ चिक्कू;कंजूष. २ तिरसट; चिरडखोर. ३ द्वाड; उपद्रवी.

नजूस [अ० नजस्] वि० चिक्कू; कंजूष.

नट [सं०] पु० १ नाचणारा; नाच्या; नाच्या पोऱ्या. २ सोंग घेणारा. ३ कपटी. ४ हिंदूंची एक जाति. ५ नटण्याचा स्वभाव ज्याचा तो. ६ लुचा; सोदा. ॐ **नटेश्वर, नटवर** पु० शंकर. **नटी (साहित्य)** स्त्री० सूत्रधाराची बायको. **नटखट,नटबाज** वि० १लुच्चा.२द्वाड; खाष्ट स्वभावाचा. **नट नर्तक** पु० १अ०व०नाटकांत सोंगें घेणारे.२ दोऱ्यांवर नाचून पैसे मिळविणारे लोक. ३ बहुरूपी इ० प्रकारचे लोक.

नटंग,नडंग, नडघें न०, **नडंगी** स्त्री० ,**नडघा** पु०पायाचा गुडघा.ॐ**नटंगावर नेसणें** धोतर किं० लुंगडें गुडघ्याखालीं न येईल अशा प्रकारें तें नसणें म्ह० अति तोकडें नेसणें म्ह० शिष्टसंप्रदाय सोडून नेसणें.

नटणें [सं० नट्] अ० क्रि० १ वस्त्रें, अलंकार, इ० अंगावर धारण करून सुशोभित होणें. २ कोणेकाचा वेष घेणें. ३ (**साहित्य**) नाटकांत एकाद्या पात्राची भूमिका धारण करून तदनरूप भाषा, पेहेराव , इ० स्वीकारणें. ४ ऐट करणें, दिमाख करणें. ५दुसऱ्यास जें देणें वाजवी तें त्याला न देणें. ६ न पथकरणें; न स्वीकारणें. ॐ **नटणें थटणें** अ० क्रि० १ झोकदार पोशाख करून अंगावर दागदागिने घालून ऐटबाज होणें. २कोणा वरिष्ठाच्या भेटीस जावयाचें असतां नीटनेटका पोशाख करणें.

नटवा [म० नटणें] पु० दोऱ्यांवर नाचणें, सोंगें घेणें, इ० प्रकारें पोट भरणारा किं० अश लोकांची जात. वि० १ छाकटेगिरीचा पोशाख करणारा. २ नटण्याची हौस ज्याला फार असा.

नटाविणें [म० ' नटणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ वस्त्रालंकारांनीं सशोभित करणें (गौर, देवाची मूर्ति, मूल, इ०). २ नाटकांत एकाद्या पात्राच्या भूमिकेचा अभिनय करणें.

नटाई [म० नटणें]स्त्री० १लुच्चेगिरी;लबाडी; लबाड्यांचें डाव किं० डावपेंचाचें वर्तन (करणें).

नटिणी, नटी, नटीण [म० नट] स्त्री० नाचणारी पोरगी; कळवंतीण.

नठारा [म० नष्ट] वि० टाकाऊ; गदळ.

नड [म० नडणें] स्त्री० १ हरकत; अडचण. २ उपद्रव; तोशीस.

नडग पु०, स्त्री०, न०, **नडगी** स्त्री०, **नडगें** न० आस्वल. **नडग** पु० म्हातारा कुरूप माणूस. **नडगी** स्त्री०, **नडगा** न०, **नडघा** पु० गुडघा.

नडवें न० तबल्याचें एक परडें.

नडणी [म० नडणें] स्त्री० १ पेरलेल्या शेतांत जें विजातीय तृणादि उगवतें तें. २ असें विजातिय तृणादि उपटून काढण्याची क्रिया.

नडणें अ० क्रि० १ सुरळीतपणें, साफ, किं० सफाईनें, न चालणें, न होणें, किं० मार्गास न लागणें,किं० शेवटास न जाणें. २ प्रतिबंधक होणें; वाटेंत येणें; हरकत करणें; जाचक होणें. ३ शिवलेल्या कपड्याचा भाग अंगावर यथास्थित न बसतां तो तंग होणें. ४ घोडा चालतांना अडणें किं० बुझणें किं० जागच्या जागींच राहणें.५ अप्रिय होणें किं० असणें किं० वाटणें. **स० क्रि०** पेरलेल्या शेतांत उगवलेलें तृण आणि नकोत तीं झाडें झुडपें उपटून काढून शेत स्वच्छ करणें.

नडविणें [म० ' नडणें ' चें प्रयोजक] स० क्रि० विघ्नित करणें; आडविणें; थांबविणें; खोळंबविणें; रोधणें.

नडाव [म० नडणें] पु० १ हरकत; विघ्न; अडथळा. २ अडेलपणाची स्थिति.

नणंद [सं० ननान्दृ] स्त्री० पतीची बहीण. ❀ **नणदवडा, नणदावा** पु० नणंदेचा उपद्रव; नणंदेनें केलेला दुसवास किं०जाच. **नणंदा, नणदया, नणदोयी** पु० नणंदेचा नवरा.

नणदुली, नणदोली स्त्री० पतीची बहीण.

नत [सं०] वि० १ नमलेला. २ वाकलेला. ३ नम्र. ४ चपटा. ५ सखळ (प्रदेश). ६ वंदिलेला. न० खमध्यापासून ग्रहापर्यंतचें अंतर; ह्यालाच ' नतांश, ' ' नतभाग ' अशीं अन्य नांवें आहेत.

नतद्रक्ष, नतद्रष्ट [अडाणी संस्कृत=तें पाहूं शकत नाहीं असा] वि० दुष्ट; मत्सरी; दुसऱ्याचें ज्याला बरें पाहावत नाहीं असा.

नंतर [सं० अनंतर], क्रि० वि० त्याच्या पाठीमागून; त्याच्या पाठोपाठ.

नति [सं०] स्त्री० १ वाकणें. २ नमस्कार. ३ वक्रता.

नथ स्त्री० १ स्त्रियांचें नाकांतील एक भूषण. २ मस्तकांतील कांहीं विकृतिविशेषाचें निरसन करण्यासाठीं नाकांतून घालतात तें तूप इ०. ❀ **नथडा** पु० १ मोठी नथ. २ विरूप दिसण्याइतकी मोठी नथ (तिरस्कारांत). **नथणी** स्त्री० १ नथ,–नाकांतील भूषणविशेष. २ बैल इ०चें नाक टोचून त्या भोंकांत घालतात ती दोरी. ३ कोयंड्यांतून कडी निघू नये म्हणून कोयंड्यांत घालतात तें उघड्या तोंडाचें कडें. ४ तरवारीच्या मुठीला लावतात तें वलय.

नद [सं०] पु० १ मोठी नदी. २ प्रवाह, ओढा. ३ समुद्र.

नंद [सं०] पु० १ आनंद. २ पांवा; मुरली. ३ कुबेराचा निधिविशेष. ४ नऊ ही संख्या. ५ अंतःपटावर कुंकवाचें काढतात तें स्वास्तिक. ६ बाळंतिणीस वायु होतो तो. ७ अत्यन्त मूर्ख आणि बावळट माणूस. ८ जो प्रपंचाची काळजी वाहात नाहीं असा आळशी माणूस. ९ दलाली; दलालाची बक्षिशी. १० पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे दारें असलेलें घर. ❀ **नंदाचा पासोडा, नंदाचा शेला, नंदीचा शेला** पु० स्वस्तिकाच्या आकृतीनें चिन्हित असा अंतःपट. **नंदपूड** स्त्री० एक वैद्यकी चूर्णविशेष. **नंदबहिरा** पु० मूर्ख आणि अजागळ माणूस. **नंदभाषा** स्त्री० व्यापारी लोकांची एकमेकांसच समजेल अशी भाषा. **नंदाचें गोकुळ** न० मुलेंबाळें, नोकर चाकर, आश्रित, पाहुणे, इ०नीं गजबजलेलें घर किं० कुटुंब. **नंदादीप** पु० देवापुढें रात्रंदिवस तेवत ठेविलेला दिवा. **नंद्या** पु० व्यापाऱ्याशीं खरेदीदाराचा सौदा जुळवून देऊन गुप्तपणें व्यापाऱ्याचें हित करून ' नंद ' ही दलाली उपटणारा.

नंदक [सं०] वि० १ सुखदायक. २ कुलपालक. पु० १ विष्णूचें खड्ग. २ नांदुरकी नांवाचें झाड.

नंदन [सं०] वि० आनंददायक. पु० पुत्र. न० इंद्राची बाग.

नदर इ० मागें ' नजर ' पहा.

नंदा [सं०] स्त्री० १ शुक्ल प्रतिपदा, षष्ठी, आणि एकादशी, ह्या तिथि. २ नणंद. ३ दुर्गा. ४ समृद्धि.

नंदिनी [सं०] स्त्री० १ मुलगी. २ कामधेनूची मुलगी. ३ नणंद. ४ दुर्गा.

नदी [सं०] स्त्री० पर्वतादिकांत उगम पावून सखल प्रदेशावरून वाहात जाऊन शेवटीं समुद्र, सरोवर, इ० मध्यें पडणारा पाण्याचा लोट. ❀ **नदीपति** पु० समुद्र. **नदीज** पु० भीष्म. **नदीमातृक** वि० नदीच्याच पाण्यानें पिकणारा (प्रदेश). यांच्या उलट ' देवमातृक ' म्हणजे पावसाच्या पाण्यानें पिकणारा प्रदेश.

नंदी [सं० नंदिन्=शिववाहक बैल] पु० शंकराचें वाहन बैल. ❀ **नंदीबैल, नंदीबाळ** पु० मूर्ख अडाणी माणूस. ह्या अर्थी ' नंद्या ' असाही शब्द आहे.

नपटी स्त्री० वेळूच्या नळींत असणा इ० चें फळ घालून तें बारीक काठीनें एकदम आंतून ढोसून फाड दिशीं आवाज काढण्याचें मुलांचें खेळणें.

नपड [म० न + पडणें] स्त्री० दोन माणसांचें एकमेकांशीं न पटण्याची स्थिति.

नपतेल [अ० नफत + म० तेल] न० एक औषधी तेल. मागें ' नख ' मध्यें ' नखतेल ' पहा.

न पुत्रो न पुत्री [सं० पुत्र किं० पुत्री हें अजून निश्चित नाहीं] स्त्री० संदिग्ध स्थिति; अनिश्चित-

पणा; उ० आमच्या कार्याचा निश्चय अझून होत नाहीं, न पुत्रो न पुत्री असें दिसतें.

नपुंसक [**सं०**] **वि०** १ षंढ. २ भितरा. ३ पराक्रमशून्य. ४ (**व्याकरणांत**) पुल्लिंग नाहीं आणि स्त्रीलिंग नाहीं असा शब्द.

नपूर [**म०** न+पुरणें] **स्त्री०** अपुरेणा; तोकडेपणा; उणेपणा.

नप्ता [**सं०** नप्तृ=नातृ] **पु०** नातू.

नप्त्री स्त्री० नात.

नफर [**अ०**] **पु०** १ घोड्याची चाकरी करण्याच्या कामावरचा नोकर. २हलकीं कामें करणारा कोणीही नोकर. ३ कोणीही व्यक्ति; उ० दर नफरास एक एक रुपाया दिला. ४ व्यक्ति (उंटांच्या गणनाप्रसंगीं); उ० उंट नफर दहा.

नफा, नफ्फा [**अ०** नफ़अ] **पु०** फायदा; किफायत. ❀ **नफानुकसान न० ए० व०** १ कांहीं कृत्यांत किं० व्यवहारांत फायदा काय होऊं शकेल किं०तोटा काय होऊं शकेल ह्याचें निरीक्षण किं० ह्याचा अंदाज (पाहणें). २ नफा आणि तोटा ह्यांचें प्रमाण. **नफेची बाब स्त्री०** १ जी विकली असतां नफा किं० पुष्कळ नफा मिळेल अशी वस्तु. २कोणतीही मूल्यवान वस्तु(सोनें इ०). ३ हिताची किं० कल्याणाची गोष्ट, उपदेश,बोध, कृत्य, इ०.

नंबदा, नमदा [**फा०**] **पु०** १ लोकरीचें जाडेंभरडें वस्त्र. २ बुरणूस. ३ हत्तीच्या पाठीवर बसावयासाठीं घेतात तें लोकरीचें वस्त्र.

नबळा, नेभळा [**सं०** निर्बळ] **वि०** अशक्त किं० पराक्रमशून्य असा; कमजोर; कमकुवत.

नभ [**सं०** नभस्] **न०** आकाश. ❀ **नभश्चुंबित, नभश्चुंबक वि०** खूप उंच (वृक्ष,पर्वत, मंदिर, इ०). **नभोमंडप पु०** आकाशरूपी मांडव. **नभोमंडल न०** आकाशाचा घुमटाच्या आकाराचा विस्तार.

नम [**म०**नमणें] **स्त्री०** १ नमण्याची क्रिया. २पिछेहाटी; माघार; पडतें घेण्याची क्रिया.(खाणें, घेणें, इ०).

नमणें [**सं०** नम्=वाकणें] **स०क्रि०**वंदिणें; नमस्कारणें. **अ० क्रि०** १ वाकणें; दबणें; खचणें. २ साम्य किं० शांत होणें. ३ पड खाणें:पडतें घेणें.

नमता [**म०** नमणें] **वि०** १ वाकलेला; दबलेला; दबकलेला. २ नम्र; विनयशील.

नमतें [**म०** नमणें] **न०** पड; माघार;विनयवृत्ति; सौम्य वर्तन. ❀ **नमतें घेणें** १ आपला हेका किं० हट्ट किं० आग्रह कमी करणें.२थोडीशी माघार खाणें.

नमदा पु० मागें ' नंबदा ' पहा.

नमन [**सं०**] **न०** १ वाकणें. २ खचणें. ३ नमस्कार; वंदन. ४ पुराणादिकांच्या सुरवातीला ईश्वरस्तुतिपर श्लोक, पद, इ० म्हणतात तें. ❀ **कार्याचें नमन करणें** तें सुरू करणें;तें आरंभिणें. **कांहीं कार्याचें नमन होणें** तें सुरू होणें;त्याला प्रारंभ होणें किं० तें सुरू केलें जाणें.

नमविणें [**म०** ' नमणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०**१ वाकविणें; लवविणें. २ नम्र करणें;जिंकणें. ३ नियंत्रिणें. ४ (कोणेकाचा) नकशा उतरणें; (कोणेकाचा) गर्वपरिहार करणें.

नमस स्त्री० कोणा देवाचा नैवेद्य चालावा म्हणून बक्षीस दिलेली जमीन, शेत, इ०.

नमस्कार [**सं०**] **पु०** १ नमन करणें; वंदिणें; (करणें). २ सूर्याला शरीराचीं आठ अंगें जमीनीला टेकतील अशा प्रकारें केलेलें वंदन. **टीप,**–दोन माणसें एकमेकांना भेटलीं म्हणजे दोन तळहात एकाशीं एक जुळवून आणि डोकें थोडेंसें वाकवून नमस्कार करतात.

नमस्कारणें [**म०** ' नमस्कार ' पासून] **स० क्रि०** वंदिणें.

नमस्कार्य [**सं०**] **वि०** नमस्काराला योग्य.

नमाज [**फा०**] **स्त्री०, पु०** १ अल्लाप्रत मुसलमान करतात त्या नमनाची क्रिया (पढणें, करणें). २: **स्त्री०** अनिष्ट; संकट; अनिष्टापत्ति; उ० ती मामलत आणि पांच घोडे ह्या दोन नमाजी त्याच्या गळ्यांत पडल्यामुळें त्याचें दिवाळें वाजलें. ❀ **नमाज पढावयाला गेलों तों मशीद गळ्यांत आली** सत्कार्य करतांना भलताच परिणाम झाला.

नमुना, नमूना, नमोना [**फा०** नमूनाह्] **पु०** १ कांहीं पदार्थाच्या स्वरूपाचें ज्ञान व्हावें म्हणून त्याची आकृति जी कागद, जमीन, इ० वर रेषांनीं काढतात ती. २ पदार्थाच्या स्वरूपाचें

ज्ञान व्हावयासाठीं त्या पदार्थाचा अल्प अंश जो पाहण्यासाठीं घेतात तो; उ० तुमच्या तुपाचा नमूना पाहिल्याशिवाय आम्हीं तुमचें तूप कसें विकत घ्यावें ?

नमूद, नमोद [फा० नमूदन्=दाखविणें; नमूदाह् = दाखविलेला, नोंदलेला] **वि०** १ दाखविलेलें; नोंदलेलें. २ नक्की ठरविण्यांत आलेलें. ३ भपकेदार; थाटमाटाचा; भव्य. ४ मान्य; कबूल; संमत; उ० तुम्ही ठराव करतां त्याला मी नमूद आहें.

नमोनमः [सं० नमस्+नमस्] उ० **वा० अ०** नमस्कार ! माझा नमस्कार असो !

नम्र [सं०] वि० १ वाकलेला; वाकडा. २ विनयशील; आज्ञांकित. ३ नमन करणारा. ४ वश.

नय [सं०] **पु०** १ नीति; सन्मार्ग. २ न्याय.३ सद्वर्तन. ४ राजनीति. ५ शास्त्र;पंथ. ६ योजना; उपाय. ७ नियम; तत्त्व. ॐ **नयचक्षु वि०** शास्त्रानें चालणारा. **नयवादी पु०** मुत्सद्दी.

नयन [सं०] **न०** १ नेणें; मार्गानें नेणें. २ घेऊन जाणें. ३ डोळा. ॐ **नयनोपान्त पुं०** डोळ्याचा कोपरा.

नये [सं० न+येणें; कामास किं० उपयोगास न येणें] एका अनियमित धातूचें हें एक रूप आहे. याचा उपयोग निषेध दाखविण्यासाठीं क्रियापदाच्या ऊं प्रत्ययान्त किं० तां प्रत्ययान्त रूपापुढें होतो; उ० तूं हें कृत्य करूं नये; उ० तूं खोटें बोलतां कामा नये.

नर [सं०] **पु०** १ मनुष्य. २ अर्जुन. ३ घोडा. ४ सर्वजातीय पुरुषव्यक्ति. ५ शंकु; खुंटी; खिळा. ६ जीवात्मा. ७ परमात्मा. ८ ऋषिविशेष,-परमेश्वराचा एक अवतार. ९ विष्णु. १० नखाच्या मूळावरचें उचकटलेलें कातडें. ११ तुंबजोड, इ० जे जोडीचे पदार्थ त्यांमध्यें किंचित् मोठा जो पदार्थ तो. १२ मळसूत्री खिळा. १३ बिजागरें आडकाववायाचा खिळा. १४ सोंगटी. १५ बुदबळ. ॐ **नरांग पु०, न०** १ शिश्न. २ मुरमाची पुळी. **नराधिप, नरपति, नरेंद्र पु०** राजा. **नरान्तक पुं०** यम. **नरमालिनी स्त्री०** दाढीमिशा जिला आहेत अशी स्त्री. **नरयान न०** पालखी; शिबिका. **नरवाहन पु०** कुबेर. **न०** पालखी; डोली. **नरसिंह, नरहरि पु०** विष्णुचा चवथा अवतार,-हिरण्यकशिपूला मारणारा. **नरसिंहजयंती स्त्री०** वैशाख शुद्ध चतुर्दशी. **नरसोबा पु०** पूजेसाठीं घडविलेली नरसिंहाची आकृति. **नरहरदेवाची पालखी स्त्री०** जें काम करावयाला सर्व लोकांची मदत आवश्यक असते आणि ज्याची जबाबदारी कोणा एका विशिष्ट माणसावर नसते, आणि जें काम चांगलें झाल्याची किं० वाईट झाल्याची कोणालाच पर्वा नसते असें काम. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० ११८५पहा. **नरो वा कुंजरो वा** हें कीं तें आम्हाला ठाऊक नाहीं; आम्हाला याची कांहीं माहिता नाहीं. **नरसख पु०** नारायण ऋषि. **नरतनु स्त्री०** मानवी देह; मनुष्यजन्म. **नरपशु पु०** १ मनुष्य असून पशुप्रमाणें क्रूर कृत्यें करणारा. २ मूर्ख किं०अडाणी माणूस.३ ईश्वरभजनादि न करणारा माणूस. **नरमेध पु०**मनुष्ययज्ञ. **नर करे तो नरका नारायण होइगा** मनुष्याला हावें तें करतां येईल;मनुष्यानें मनांत आणलें तर तो हावें तें करूं शकेल. **नरमादी स्त्री०**खालीं स्वतंत्र शब्द पहा.

नरक [सं०] **पु०** १ यमनगरीचे ठायीं पू, विष्ठा, रक्त इ०नीं व्यापलेलें स्थळ आहे तें,-ज्यांत पातकी मनुष्यास यम घालतो. २ विष्ठेचें किं० कोणत्याही घाणीचें स्थळ.३ जेथें आपणाला अत्यंत जाच होतो, जेथें मनाला तिळमात्र शांति मिळत नाहीं असा गांव, असें स्थळ, अशी कचेरी, इ०. ४ एक असुरविशेष, याला विष्णूनें मारलें. ॐ **नरक देवता स्त्री०** मूर्तिमंत दुर्दैव; अक्काबाई. **नरककुंड न०** पातकी मनुष्याला मरणानंतर शिक्षा करण्याचा यमाच्या राज्याचा एक भाग. २ गर्भाशय; उ० नऊ महिने मानवी प्राण्याला नरककुंडांत वास घडतो. **नरककेस पु०अ०व०**मुलाच्या डोक्यावर जन्माच्या वेळचे असतात ते केश,-जे ज्याला गर्भस्थितींत आलेले असतात. **नरक चतुर्दशी स्त्री०** आश्विनवद्य चतुर्दशी ही तिथि; ह्या तिथीच्या दिवशीं विष्णूनें नरकासुरास मारिलें; **नरकड, नरकाड, नरकाडी स्त्री०**दुर्गंधी पदार्थाचा

ढीग किं० खड्डा. **नरकाची सामग्री** स्त्री० दुष्कृत्यें,– जीं केल्यानें मनुष्य नरकांत पडतो. **नरकाचें खापर, नरकाचें टोपलें** न० १ कर्ज; डोईजड कर्ज. २ अंगावर कोसळलेला धंदा, व्यापार, व्यवहार, इ० (डोईवर येणें, फुटणें, इ०). **नरकवणी** न० दुर्गंधियुक्त पाणी.

नरटी स्त्री० १ डोक्याचें वरचें हाड. २ करवंटी. ꠹ **नरटवणी** [म० नरटी+पाणी] न० करवंटीनें खरडून काढण्याइतकें विहीर, तळें, इ० तील पाणी.

नरटेल न० करवंटी जाळून काढतात तें तेल; हें ओषधी असतें.

नरड पु० गाई, म्हशी, इ० शिंगें असलेल्या प्राण्यांना होतो तो एक रोग.

नरडी स्त्री०, **नरडें** न० गळा; गळ्याचा पुढचा भाग. ꠹ **कोणेकाची (–चें) नरडी (–डें) धरणें** त्याला भोजनासाठीं खोळंबवून ठेवणें. **कोणेकाचा नरडीचा (किं० नरड्याचा) घोट घणें** (किं० **रक्त पिणें**) १ त्याला ठार मारणें. २ त्याचें अपरिमित नुकसान करणें. ३ त्याच्यावर सूड उगविणें. **कोणेकाच्या नरडीस (किं० नरड्यास) बसणें** कांहीं गोष्टीसाठीं त्याची पिच्छा पुरवून त्याला सतावणें.

नरणी, नराणी, नऱ्हाणी स्त्री० नखें कापावयाचें न्हाव्याचें हत्यार.

नरद [फा० नर्द] स्त्री० १ सोंगटी. २ बुदबळ.

नरपातें न० नखें कापावयाचें न्हाव्याचें शस्त्र.

नरम [फा० नर्म्] वि० १ मऊ; कोंवळा; टणक नव्हे असा; सौम्य (स्वभाव, बळ, इ०). २ फारसें कढत नव्हे असें (पाणी). ३ लाकडावर चालवावयाच्या हत्यारांना देतात तो ताव किं० तें पाणी. ४ कमी तेजस्वी (मोती, नाणें, इ०). ४ शांत किं० सौम्य (माणूस, स्वभाव, वर्तनसरणी, इ०). ꠹ **नरमगरम** वि० मागें ' गरम ' मध्यें ' गरम नरम ' पहा. **नरम चारा** पु० १ कोंवळा चारा (गुरांचा) २ खावयाचे मऊ पदार्थ,–जे चावण्याला फारसे कष्ट पडत नाहींत. ३ नाजूक आणि उंची खाद्यें. **नरमछापी** वि० ज्यावरच्या आकृति झिजल्या आहेत असा (रुपाया इ० नाणें). **नरमाइ** स्त्री० सौम्यपणा; मऊपणा.

नरमणें [म० नरम; फा० नर्म्] स० क्रि० १ सौम्य किं० मंद होणें (वारा, पाऊस, स्वभाव, इ०). २ खजील होणें; लज्जित होणें.

नरमद्या [म० नर्मदा नदी] वि० नर्मदा नदींत सापडणारा तांबडा (धोंडा),–जो गणपति म्हणून पूजिला जातो.

नरमादी [फा० नर्मादाह्] स्त्री० १ जोडीचे दोन पदार्थ,–ज्यांपैकीं एक लहान किं० हलका किं० अशक्त आहे आणि दुसरा मोठा किं० भारी किं० भक्कम आहे. पहिल्याला दुसऱ्याच्या अपेक्षेनें 'मादी' म्हणतात आणि दुसऱ्याला पहिल्याच्या अपेक्षेनें ' नर ' म्हणतात; उ० बंडीच्या बाह्या, पायांतलि जोडे, इ०. २ एकाच पदार्थाचे दोन भाग किं० अंगें,–ज्यांपैकीं एक (नर) दुसऱ्यांत (मादीत) शिरणारा असतो; उ० कुरड्यांचा सोरा, दाराची फळी चौकटीच्या बाहीस जोडणारी बिजागरी, इ० पदार्थांचें दोन भाग नरमाद्या असतात.

नरमावणें [म० नरम; फा० नर्म्] अ० क्रि० १ नरम होणें; सौम्य होणें. २ कमी होणें; कमी जोराचा होणें; मंदावणें.

नरमिना [फा० नर्मीनाह्] पु० रेशीम किं० [रेशमी वस्त्र.

नरवंटी, नरवटी, नराटी स्त्री०, **नरवंटें, नरवटें, नरोटें** न०, **नरोटा, नरवंटा** पु० १ मनुष्याच्या डोक्याचें वरचें हाड,– जें घुमटाकार असतें. २ वस्त्र्यानें ज्याच्यावरचे सर्व केश तासून टाकले आहेत असें डोकें. ३ नारळाचें खोबरें काढून टाकलेलें अर्धुक.

नरप [हिं०] वि० कमी प्रतीचा; हलक्या [दर्ज्याचा.

नरसाळें न० लहान तोंडाच्या भांड्यांत तेल, तूप, इ० ओतावयाचें पात्रविशेष. यांचें तोंड पसरट असून बुडाला नळी असते.

नरसें न० वेडाची किं० वात्रटपणाची लहर (उठणें, आठवणें, चळणें).

नरांडी स्त्री० १ पाण्याचा पाट किं० पन्हळ. २ गळा; नरडें.

नराणी स्त्री० नखें कापावयाचें न्हाव्याचें [आउत.

नरी, नऱ्ही स्त्री० जोडे करण्यासाठीं कमावलेलें कातडें.

नरी [सं०] स्त्री० स्त्री; मानवी जातीची कोणीही स्त्री व्यक्ति.

नरोटी स्त्री० १ करवंटी. २ अल्प दूध देणारी गाय किंवा म्हैस. ❀ **विहिरीला** (किंवा **नदीला**) **नरोटी लागणें** तींतील पाणी करवंटीनें भरून घेण्याइतकें आटलेलें असणें. **हातीं नरोटी घेणें** भीक मागणें.

नर्तक [सं०] पु० नाचणारा. **नर्तकी** स्त्री० नाचणारी स्त्री; कळवंतीण.

नर्तन [सं०] न० नाचणें; नाच.

नर्मदा [सं०] स्त्री० एक नदी. ❀ **नर्मदा गणपति** पु० नर्मदा नदींत सापडणारा धोंडा,–जो गणपति म्हणून पूजिला जातो.

नऱ्हाणी, नऱ्ही वर ' नराणी, ' ' नरी ' पहा.

नल, नळ [सं० नल] पु० १ देवनळ. २ निषधदेशचा राजा,–दमयंतीचा पति. ❀ **नल-कूबर** पु० कुबेराचा पुत्र. **नलद** न० वाळा, तृणविशेष.

नलक [सं०] न० हातापायांच्या नळ्या म्ह०हाडें प्रत्येक. ❀**नलकिनी** स्त्री०पायाची पोटरी.

नलगे [म० न (नाहीं)+लागणें] **अनियमित धातु** ह्या धातूचीं सर्व रूपें भाषेंत आज प्रचलित नाहींत. याचे अर्थ नको, इष्ट नाहीं, जरूर नाहीं, असे होतात.–णें प्रत्ययान्त किंवा -आवयास, –आवा प्रत्ययान्त धातु किंवा कांहीं क्रिया, किंवा पदार्थ दाखविणारीं नामें ' नलगे ' चे कर्तें होऊं शकतात; उ० जाणें नलगे, जावें नलगे, जावयास नलगे, मला भात नलगे, असे ह्याचे प्रयोग होतात.

नलिन [सं०] न० कमळ. ❀ **नलिनी** स्त्री० १ कमलाची वेली. २ कमलसमूह. ३ कमलपूर्ण तळें. ४ कमलाचा देठ किंवा तंतु.

नलिस्त [फा० नालिष्] वि० त्याज्य; वाईट; निंद्य.

नव [सं०] वि० १ नवीन. २ ताजें. ३ ऐन जोरांत असलेलें किंवा वैभवशाली (यौवन). ❀ **नवकीर्द** वि० नुकतीच लागवडीस आणलेली (जमीन). **नवखा** वि० १ स्थलविशेषीं नवीन आलेला किंवा चालू झालेला (माणूस,चाल, इ०). २ न वहिवाटलेला किंवा अपरिचित. **नवघड** वि० नवीन बनविलेला किंवा घडविलेला. **नवचांद** पु० अमावास्येनंतरचें चंद्राचें प्रथम दर्शन. **नवट** वि० ज्याचा नवेपणा अद्यापि गेला नाहीं असा. **नवतर,नवेतर नवथर** (–ळ) वि० नवा; नुकताच प्रचारांत आलेला. क्रि० वि० नुकताच; अगदीं अलीकडे.

नव [सं०नवन्=नऊ] वि०नऊ ही संख्या किंवा ह्या संख्येइतका. ❀ **नवद्वारें** न० अ० व० शरीरांचीं नऊ द्वारें,–दोन कान, दोन डोळे,दोन नाकपुड्या, तोंड, आणि दोन गुह्येंद्रियें. **नवद्वार** न० ए० व० देह. **नवरत्न** न० हिरा, माणक, पाच, गोमेद,मोतीं, इंद्रनीळ,पुष्पराज,पोंवळें,आणि वैडूर्य. **नवरस** पु० शृंगार, वीर,करुणा,अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, आणि शांत, हे मनोभाव. **नवरात्र** न० आश्विनांतील पहिले नऊ दिवस. **नवकोट नारायण** पु०अत्यन्त श्रीमंत मनुष्य. **नवखंडपृथ्वी** स्त्री० नऊ आहेत खंडें जीचीं अशी पृथ्वी. **नवग्रह** पु० १ सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, बृहस्पति, शुक्र, शनैश्चर, राहु, आणि केतु, हे नऊ ग्रह. २ एका टोळींतील किंवा जुटींतील नऊ उपद्रवी माणसें. **नवज्वर** पु० नऊ दिवस अंगांत राहून जो बहुधा मरणावह असतो असा ज्वर म्हणजे ताप. **नवविधा भक्ति** स्त्री० श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आणि आत्मनिवेदन, अशी नऊ प्रकारची ईश्वराची भक्ति.

नवटकें न० शेराचा आठवा भाग इतकें परिमाण.

नवतरणें. नवतारणें [म० नवा + उतरणें] स० क्रि० जुन्या वस्तूची डागडुजी करून तिला नवें रूप देणें.

नवती [म० नवा] स्त्री० १ तारुण्यदशा. ह्या अर्थी ' नवनवती ' असाही शब्द आहे. २ वसंतऋतूंत पानवेलीला नवीं पानें फुटण्याची स्थिति किंवा क्रिया.

नवमी [सं०] स्त्री० हिंदू महिन्यांतील शुक्ल-पक्षांतील आणि कृष्णपक्षांतील नववी तिथि.

नवरा पु० १ स्त्रीचा ज्याच्याशीं धर्मशास्त्रा-प्रमाणें विवाह झाला आहे तो तिचा नवरा; पति; भर्ता. २ विवाहविधींत ज्याचें लग्न व्हावयाचें किंवा झालें तो लग्नाच्या सोहाळ्यांत नवऱ्या मुलाला ' नवरस ' असाही शब्द योजतात. ३करडा अमल

चालविणारा; गर्विष्ठ किं० उन्मत्त झालेला मनुष्य; उ० तो आलीकडे नवरा झाला आहे (म्ह० फार चढला आहे). ४ उसाच्या चरकाचे दोन भाग,- ज्यांच्यांत ऊस चिरडला जातो; त्यांपैकीं एकास 'नवरा' म्हणतात आणि दुसऱ्यास 'नवरी' म्हणतात. ५ मळसूत्राचें जे दोन जावदार भाग त्यांपैकीं जो दुसऱ्यांत वाटोळा फिरवून बसवावयाचा असतो तो. ॐ **नवरा नवरी** वर 'नवरा'चा अर्थ ४ पहा. **नवरदेव**[म० नवरा+देव] पु० (लग्नाच्या सोहाळ्यांत) नवरा मुलगा.

नवरी स्त्री० १ लग्नाच्या विधींत जी पत्नी व्हावयाची किं० झाली ती. २ ' नवरीस ' असा ह्याच अर्थी शब्द आहे. ३ उसाच्या चरकाचें एक अंग;वर ' नवरा ' पहा. ४ मळसूत्राचे जे जावदार दोन भाग त्यांपैकीं ज्यांत दुसरा शिरतो तो.

नवल [सं० नव] न०१आश्चर्य किं० आश्चर्यजनक कांहीं गोष्ट. २ कोणतीही अद्भुत गोष्ट. ३ बातमी; खबर. ॐ **नवलकथा** स्त्री० १ आश्चर्यजनक कांहीं गोष्ट. २ कादंबरी. **नवलविशेष** न० इकडच्या तिकडच्या खबरी समुच्चयानें. **नवलपरी** स्त्री० १ नवी किं० आश्चर्यजनक बातमी. २ खणाळ्याचा एक प्रकार. ३ अद्भुत गोष्ट. **नवलाई** स्त्री० १ नवीनपणा. २ अपूर्वपणा; अपूर्वाई. ३ अशिक्षितांची एक देवता.

नवली [सं० नव; म० नवा] स्त्री० १ ताजेपणाचें तेज. २ वृक्षादिकांची टवटवी. ३वयांत आलेल्या मुलग्याचें किं० मुलींचें तेज किं० सौंदर्य किं० चटकदारपणा. ४ माणसाचा किं० जनावराचा किं० शेताचा डोळ्यांना दिसणारा देखावा.

नवशिका (-खा),**नवशिक्या** [म०नवा+शिकणें] वि० १ कोणत्याही शास्त्रांत, कलेंत, किं० विद्येंत जो नवथरच प्रविष्ट झाला आहे असा. २ अपूर्व; अदृष्टपूर्व; अश्रुतपूर्व. ३ प्रथमच जी प्रसूत होते आहे अशी (स्त्री). ४ प्रथमच जो लागास आला आहे असा (आंबा, फणस, इ०).

नवशीक (-ख) वि० वर ' नवशिका ' प्रथमार्थ पहा.

नवशीक, नवसीक [म० नवस] वि० नवसाची पूर्तता करण्यासाठीं केलेला (समाधारा इ० विधि).

नवस पु०माझा अमुक मनोरथ साध्य झाल्यास मी अमुक प्रकारें संतोष व्यक्त करीन अशी देवापुढें केलेली प्रतिज्ञा किं० घेतलेली शपथ (करणें, बोलणें). ॐ **त्यासाठीं मी नवस करीत होतों** ती गोष्ट मी अत्यन्त उत्सुकतेनें इच्छित होतो. **नवस पुरणें** तो पुरविला जाणें; तो फलद्रूप होणें. **नवस फेडणें** ज्या वस्तुसाठीं कोणी नवस केला असेल ती वस्तु त्याला मिळाल्यावर त्यानें कबूल केल्याप्रमाणें संतोष व्यक्त करणें **नवसास पावणें** कोणी भाविकानें श्रद्धापूर्वक देवाला केलेला नवस देवानें पुरविणें. **नवसें मागितलें तें मुळावर आलें** १ उत्कंठापूर्वक इच्छिलेलें (मूल) मला मिळालें पण तें मूळ नक्षत्रावर जन्मलेलें असल्यामुळें माझा नाश सुचवितें. २ इच्छिलेल्या वस्तूची प्राप्ति आपणाला कधा कधीं उपद्रवकारक होते.

नवसणें [म० नवस] स० क्रि० देवाला नवस करून कांहीं वस्तु मागणें आणि ती मिळाल्यास मी अमुक करीन अशी प्रतिज्ञा करणें.

नवसर मागें ' नवथर ' पहा.

नवसरणें,नवसारणें स० क्रि० १डागडुजी करून पदार्थ पूर्वीसारखा किं०त्याच्या खालोखाल चांगला करणें. २ पुन्हां ताकीद, सूचना, आज्ञा, इ०चें उच्चारण करणें.

नवसागर [फा० नवषादर] पु०एक क्षार,- जो भांड्यांना कल्हई देण्यांत योजिला जातो.

नवसारणें वर ' नवसरणें ' पहा.

नवळकी [म० नवा] वि० नवा; आलीकडचा.

नवा [सं० नव] वि०१ नवीन; नूतन; नवथरचा. २ अनभ्यस्त; नवशिका. ३ पूर्वी ज्याचा परिचय नाहीं असा; अपरिचित. ४ ज्यावर वापर पडलेला नाहीं असा (पदार्थ,-वस्त्र, भांडें, इ०). ५ न भोगिलेला; न वापरलेला; कामाला अद्यापि न लाविलेला. ६जो आपल्याजवळ येऊन किं०हातांत पडून फार दिवस झाले नाहींत असा (माणूस, पशु, पदार्थ). ॐ **नवाजुना करणें** जुने कागद, हिशोब, ठराव, इ० मध्यें दुरुस्त्या किं० फेरफार करून त्यांना चालू काळाला किं० परिस्थितीला अनुरूप किं० सोयिस्कर करणें. **नवेंजुनें करणें** जुने कांहीं भाग काढून त्यांच्या जागीं नवे भाग

घालून पदार्थ दुरुस्त करणें किं० पदार्थाची डागडुजी करणें. **नवाजुना होणें** परिचित होणें; वहिवाटींत येणें. **नव्याचे नऊ दिवस** नव्या वस्तुसंबंधाचें कौतुक अल्प काळ टिकतें. **नवाई स्त्री०** १ नवीनपणा; अपूर्वाई. २ टवटवी; तजेला. **नवाकरकरीत वि०** अगदा नवा. **नवातरणा वि०** ऐन-उमेदींत असलेला मनुष्य; शारिरीक आणि मानसिक सामर्थ्यानें पूर्णपणें संपन्न असा. **नवानवती स्त्री०** ऐन जोरांत असलेलें तारुण्य. **नवी नवरी स्त्री०** १ नुकतेच जिचें लग्न झालेलें आहे अशी मुलगी. २ लाजरा मुलगा किं० मुलगी. **नवी नवाळ, नवी नवलाई स्त्री०** १ शेतांत प्रतिवर्षी उत्पन्न होणारें धान्य प्रथम शिजवून खाण्याचा विधि. २ बाजारांत त्या वर्षी प्रथमत:च विकावयास आलेला कोणताही पदार्थ. **नव्या उमेदीचा वि०** जगाचा वट्ट अनुभव येऊन ज्याची महत्त्वाकांक्षा खचली नाहीं असा; उत्साही.

नवान्न [**सं०** नव+अन्न] **न०** त्या वर्षाचें शेतांतून काढलेलें धान्य किं० तें भाजून किं० शिजवून खाण्याचा विधि. **नवान्नपूर्णिमा स्त्री०** आश्विनी पौर्णिमा; ह्या दिवशीं शेतांतून काढलेलें धान्यादि खाण्यास कोकणांत सुरवात करतात. देशावर माघी पौर्णिमा हा दिवस. **नव्या ताण्याचा वि०** १ नवीन विणलेलें (वस्त्र). २ ज्यावर अजून वापर पडला नाहीं असें (सूत).

नवाब [**अ०**] **पु०** १ एक मुसलमानी हुद्दा. २ खूब श्रीमंत असा कोणीही मुसलमान. ‘ नबाब ’ हेंही रूप ह्या दोन्ही अर्थी रूढ आहे.

नवार [**हिं०**] **स्त्री०** तीन चार बोटें रुंद असा जाड्या भरड्या सुताचा पट्टा,–पलंग, बाज, इ० विणण्याच्या उपयोगाचा. **नवारणें स० क्रि०** नवारीनें (पलंग, बाज, इ०) विणणें.

नवाळ [**म०** नवा] **स्त्री०** १ ऋतूंतील नवें धान्य, नवीं फळें, नव्या शेंगा, इ० खाद्य पदार्थ. २ असल्या खाद्यांचें प्रथम भक्षण. ३ कोणतीही नवी तऱ्हा, पद्धति, चाल, किं० वस्तु. **टीप,**–ह्या सर्व अर्थी ‘ नवी नवाळ, ’ ‘ नवी नव्हाळ, ’ ‘ नवी नवलाई ’ हेही शब्द योजले जातात.

नवाळी [**म०** नवा] **स्त्री०** १ एक प्रकारची जास्वंदी. २ ऋतूंतील शेतें, फळझाडें, फुलझाडें, इ०तील धान्यें, फळें, फुलें, इ०. ३ ऐन उमेदीचें वय; तारुण्याचा भर. ४ कोणतीही नवी वस्तु, चाल, रीति, तऱ्हा, इ०.

नवीं, नवें [**म०** नऊ] **क्रि० वि०** नऊ पटीनें; उ० पांच नवीं (किं० नवें) पंचेचाळीस.

नवें [**म०** नवा] **न०** १ ऋतूंतील नव्या धान्यादिकांचें भोजन किं० भक्षण. २ नवान्नपूर्णिमेच्या दिवशीं भाताचे लोंगर, आंब्यांचीं पानें, फुलें, इ० ची दारावर बांधतात ती माळ इ०. ❀ **नव्याची पुनव स्त्री०** नवान्नपूर्णिमा ही तिथि,–ह्या तिथीस दारावर ‘ नवें ’ बांधतात. आश्विनी पौर्णिमा (कोकणांत) किं० माघी पौर्णिमा (घाटावर) ही तिथि.

नवोढा [**सं०**] **स्त्री०** १ नवीन लग्न झालेली स्त्री. २ कोणीही पुरुषानें न भोगिलेली स्त्री.

नव्याण्णव [**सं०** नवनवति] **वि०** शंभराहून एकानें उणा; नव्वदाहून नवानें अधिक. ❀ **नव्याण्णव हिश्शांनीं** (किं० **वाटांनीं**) **क्रि० वि०** शक्यतेचे शंभर अंश कल्पिले तर त्यांपैकीं नव्याण्णव अंशांनीं म्ह० बहुतकरून. **नव्याण्णवाचा फेरा पु०** अति लोभ,–जो मनुष्याला संसाराच्या गुंतागुंतांत भ्रमण करावयाला लावतो.

नव्यांयशीं [**सं०** नव (नऊ)+अशीति (ऐंशी)] **वि०** एकुणनव्वद; ऐंशी आणि नऊ इतका.

नव्वद [**सं०** नवति=नव्वद] **वि०** दहाच्या नऊ पटीइतका.

नव्वा, नववा [**म०** नऊ] **वि०** पहिला दुसरा, तिसरा, इ० श्रेणींतील आठव्याच्या पुढचा आणि दहाव्याच्या मागचा.

नव्हांड [**म०** नवी+हांडी] **स्त्री०** १ उणेपणा; कमताई. २ जरूर अशा वस्तूचा अभाव (पडणें, होणें); उ० आमच्या घरांत धान्य, गूळ, तूप, पैसा, इ०ची नव्हांड झाली (किं० पडली) आहे.

नव्हे [**म०** न+होणें] **अनियमित आणि अपूर्ण अ० क्रि०. टीप,**–यांचीं फक्त वर्तमान आणि भूत काळांचीं रूपें विद्यमान आहेत. (अमुक वस्तु अमुक प्रकारची, जातीची, स्वरूपाची किं० गुणाची) नाहीं; उ० ही बासुंदी नव्हे; हें आटीव दूध; उ० ह्या भाजींत मीठ नाहीं.

नशा, निशा [अ० नशा] **स्त्री०** १ अमली पदार्थ. २ अमली पदार्थाच्या सेवनानें आलेला कैफ किं० उन्माद. ३ (**लाक्षणिक**) पैसा, अधिकार, विद्वत्ता, इ० च्या योगानें येतो तो गर्व, ताठा, उन्मत्तपणा, इ०. ॐ **नशाखोर, निशाखोर वि०** अमली पदार्थाचें सेवन करण्याचें ज्याला व्यसन आहे असा.

नशिहत, नश्यत [अ० नसीहत=शिकवण] **स्त्री०** १ पारिपत्य. २ ठेच, ठोकर.

नशीब [अ० नसीब] **न०** दैव. ॐ**शिकंदर नशीब न०** मोठ्या संकटांतून निभावून किं० बचावून नेणारें दैव; उ० तूं खरोखरीं शिकंदर नशीबाचा म्हणून तुझ्या डोक्यावर त्या पठाणाचें दांडकें बसलें नाहीं. **नशीबवंत, नशीबवान् वि०** दैववान्. 'नशीब' ह्याच्याबद्दल 'नसीब' हें रूप कमी प्रचलित आहे. **नशीबाचे ताले पु० अ० व०** दैवगति; दैवानें प्राप्त झालेले भोग.

नश्वर [सं०] **वि०** नाशवंत; अशाश्वत.

नष्ट [सं०] **वि०** १ लोपलेला; नाहींसा झालेला. २ दुसऱ्याचें वाईट करण्याकडे कल असलेला; द्वाड; दुष्ट. ३ नाशकारक. ॐ **नष्टचर्य न०** दुर्दैव; आपत्काळ. **नष्टाई स्त्री०** दुष्टपणा; द्वाडपणा. **नष्टोळा वि०** द्वाड; उपद्रवी; खोडसाळ.

नर [अ०] **पु०** १ पोटांतील एक अवयव,— जो वायूच्या योगानें फुगतो. २ न्हाव्याची नराणी.

नस [सं० नसा=१नाक. २ नाडी.] **स्त्री०** १ नाक.२नाडी. ॐ**नस्य**[सं०]**वि०**नाकासंबंधीं. **नस्या स्त्री०** १ नाक. २ वेसण. **नस्य, नस्त न०** तपकीर. २ नाकांतून ओढावयाचें औषध. **नस घेणें** (**किं० तोडणें**) शीर कापून रक्त काढणें.

नसकोणा वि० अशक्त आणि ठेंगणा; खुजट.

नसणें [म० न+असणें] **अ० क्रि०** न असणें **टीप,**—' नसणें ' हें क्रियापद भूतकाळीं चालत नाहीं; त्याच्याबद्दल ' होणें ' चीं रूपें योजलीं जातात.

नसता [म० न+असता] **वि०** १ नसलेला; अविद्यमान. २ खरा नव्हे असा; खोटा; दिखाऊ. ३ निराधार. ४ ज्याचा स्थलविशेषीं किं० प्रसंगविशेषीं उपयोग नाहीं, किं० जो आगंतुक आणि फाजिल आहे, किं० जो अडचण करणारा आहे असा. ५ दुर्दैवानें ओढवलेला. ६ नुकसानीचा (व्यवहार, धंदा). ७ अकिंचन; दरिद्री. **पु०** दुराचारी (धटूंत). ॐ **अ०**त्याचे विकार न**सत्याच घोरंकार** ' असता ' मध्यें हीच म्हण पहा.

नसणखवडा [म० नसणें+खवडा] **वि०**१ एकलकोंडा; माणूसखाण्या. २ दुसऱ्याचें बरें ज्याला पाहावत नाहीं असा; दुष्ट; हेंवेखोर. ॐ **नसणखवडा आणि शेजारखवडा** एकलकोंडा माणूस, ज्याच्या शेजारीं कोणी चांगला माणूस राहूं शकत नाहीं.

नसरड, नसरूड स्त्री० अंगीं कांहीं पराक्रम नसून रिकामी टवळी चालविणारा किं० दुराचारीपणा मिरविणारा.

नसराणा, नसराणी [अ०] **वि०** १ लुच्चा; लफंगा. २ खोडकर; दुष्ट.

नसीहत मागें ' नशिहत ' पहा.

नसीब मागें ' नशीब ' पहा.

नस्कुटा वि० रोडका; हाडका; किडकिडीत.

नस्त न० १ समुद्रांतील किं० नदीच्या मुखांतील खडक. २ ज्या खडकावर समुद्राच्या लाटा आपटतात तो.

नस्तर [फा०] **न०** शरीराची त्वचा, गळूं, इ० कापावयाचें शस्त्रविशेष.

नस्य मागें 'नस' मध्यें ' नस्य ' पहा.

नहक, नहाक, नाहक क्रि० वि० १ अन्यायानें. २ विनाकारण; उगीचच्या उगीच. **टीप,**— ' हकनक, ' ' हकनाक ' हेही शब्द ह्या दोन्हीं अर्थीं योजले जातात.

नहर [अ०] **पु०** १ बाहेरचें पाणी शहरांत आणावयासाठीं भूमीच्या गर्भांतून बांधून आणलेला असतो तो पाट किं० दांडा. २ नासकें पाणी गांवाबाहेर नेऊन सोडावयासाठीं बांधून काढलेली मोरी.

नहला, नहेला, नहल्या, नह्यला पु० लहानशी करणी किं० थापी (गवंड्याचें एक आउत).

नहाडणें [म० नाडणें] स० क्रि० लुटणें; बुचाडणे अ० क्रि० लुटलें किं० बुचाडलें जाणें.

नहाडा [म० नहाडणें] पु० नाश; हानि; लुटलें जाणें.

नहाण [सं० स्नान] न० १ स्नान. २ अभ्यंग स्नान. ३ स्त्रीला प्रथम होतें तें रजोदर्शन (येणें) ॐ**नहाण घालणें** (मुलाला) नाहूं घालणें. **नहाणपदास येणें** (मुलगी) रजोदर्शन व्हावयाच्या वयाची होणें. **नहाणघर, नहाणंघर, न्हाणघर** न० घरांतील स्नान करावयाची खोली किं० जागा.

नहाणणें, नहाणें, न्हाणें [सं० स्नान; म० नहाणें] स० क्रि० १ (मूल इ०ना) अंघोळ घालणें. २ पाण्यांत बुडविणें किं० बुचकळून काढणें. ३ (कोणेकाला) फसविणें किं० बुचाडणें; उ० गोंधानें मला पंचवीस रुपयांना नहाणलें. अ० क्रि० १(मुलगी) प्रथमच्या रजोदर्शनानें दरमहिन्याच्या न्हाण्याच्या स्थितीस पोंचणें. २ घामानें भिजणें; उ० मी घामानें नहाणलों आहे. ॐ **नहाणमाखण** न० ए० व० (मुलांचें किं०स्त्रियांचें) स्नान करणें. **नहाणवणी** [म० •नहाणणें+पाणी] न० देवांच्या स्नानाचें पाणी. **नहाणवली, नहाणुली** स्त्री०जिला प्रथम रजोदर्शन झालें आहे अशी मुलगी. **नहाणी** स्त्री० १ न्हाण्याची किं० स्नान करण्याची जागा किं०मोरी;न्हाणीघर.२ शंकरादिकांवर केलेल्या अभिषेकाचें पाणी साचावयाचा खड्डा. **न्हाऊं(किं० नाहूं) घालणें** (मूल, विटाळशी, इ०ना)स्नान घालणें. **नाहूं लागणें** (मुलगी)मासिक रजोदर्शनाच्या वयाची झालेली असणें. **न्हाती धुती** स्त्री० मासिक रजोदर्शन होत असण्याच्या वयाची (स्त्री) असणें.

नहेला, नह्यला पु० मागें ' नहला ' पहा.

नळ [सं० नल] पु० १ शहरांत पाणी आणण्यासाठीं जमीनींतुन बांधून काढलेला पाट.२ सांडपाणी बाहेर काढून लावण्यासाठीं केलेला पाट. ३ लाकूड, बांबू, धातु, इ०ची केलेली नळी. ४ पोटांतील एक अवयव,–जो वायूच्या योगानें फुगतो. ५ देवनळ. ६ कमळाचा देठ. ७ गर्भाशयांत मुलाच्या बेंबीशीं जोडलेला जो मातेच्या गर्भाशयाचा लांब नळासारखा अवयव असतो तो; नाळ; वार. ॐ **पाणी नळांत भरणें** उभ्यानें किं० अनशापोटीं पाणी प्याल्यानें नस हा पोटांतील अवयव पीडित होणें किं० दुखूं लागणें. **नळकट, नळकुटें, नळकूट, नळकोटें, नळकंडें, नळकांडें, नळकुंड** न०, **नळकांडी** स्त्री० वर ' नळ ' चा अर्थ ३ पहा. **नळकुटी, नळगुटी** स्त्री० गुडघ्यापासून घोट्यापर्यंत जें पायाचें हाड तें. **नळकुटी** स्त्री० लहानशी नळी. **नळगुद** न० ज्यांत बेंबीपासून गुदापर्यंत सज येते असा एक रोगविशेष. **नळपट नारायण** पु० १ मागें ' नगन नारायण ' पहा. २ बेंबीखालीं धोतर नेसणारा. ३ ढेरपोट्या. **नळवायु** पु० पोटांतील नळांत कांहीं विकृतीनें उत्पन्न होतो तो वायु. **नळसंग्रहिणी** स्त्री० पोटांतील नळाचा एक रोगविशेष. **नळपाक** पु० १ उंचीं खाद्यें; पक्वान्नें. २ सात्त्विक खाद्यें; याच्या उलट ' भीमपाक ' किं०'तामस पाक.' **नळवडी, नळांडी** स्त्री० नासकें पाणी बाहेर घालवावयाची मोरी किं० पन्हळ.**नळपट** न० १ नळ किं० नळी (तुच्छतेनें).२ बबा (तुच्छतेनें).

नळा [म० नळ]पु० १ एक प्रकारचें कौल. २ आतिषबाजीचा एक पदार्थ; हा मातीचा किं० बांबूचा असून तो पेटविला असतां दारूचीं फुलें उंच उडतात.३गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचें पायाचें हाड.४ तेल ठेवण्यासाठीं बांबूचें वगैरे तें पात्र. ५ गाडीच्या चाकांत घालावयाचें तेल ठेवण्याचें गाडीवानाचें बांबूचें असेंच बारदान म्हणून केलेलें असतें तें नळकांडें.६वर 'नळ' मध्यें'नळकांडें'पहा. ७ पाणी यावयासाठीं जमीनींतून बांधून आणलेला पाट. ८गुरांना औषध पाजण्याचें बांबू इ०चें केलेलें असतें तें साधन.

नळांडी [म० नळ किं० नळा] स्त्री० १ गाण्याचा पाट. २ सांडपाण्याला करून दिलेली वाट. ३ इमारती चुना तयार करावयाचा वर्तुळाकार चर,–ज्यांतून दगडाचें चाक फिरतें. ४ पाण्याचा लहान ओहोळ. ५ अरुंद आणि लांबलचक पायवाट,–दोन डोंगरांमधून किं० शेतांमधून असते ती.

नळाळी, नळनळी स्त्री० चकाकी; तुकतुकी.

नळी [म० नळ किं० नळा] स्त्री० १ ज्याचीं दोन तोंडें मोकळीं आहेत आणि जो आंत

पोकळ आहे असा वेळू, लाकूड, धातु, इ०चा लांब तुकडा. २ गुडघ्यापासून घोट्यापर्यंत जें पायाचें हाड तें. ३ किडकिडीत मनुष्याचे हात आणि पाय प्रत्येक. ४ बंदुक किं० बंदुकीच्या ज्या भागांत दारू भरतात तो भाग. ५ दोन डोंगरांमधली किं० शेतामधली अरुंद आणि लांबलचक पाऊलवाट. ६ नाकपुडीचें रंध्र. ॐ **एकाद्याच्या नळीं नख देणें, किं० एकाद्याची नळी दाबणें** १ त्याच्या चरितार्थाचीं साधनें नष्ट करणें. २ त्याला क्रूरपणें वागविणें. **नळीवर नेसणें** (लुगडें किं० धोतर गुडघ्याच्या खालीं न येईल अशा प्रकारें नेसणें (असभ्यपणाचा प्रकार). **नळीचें कुलूप न०** जुन्या काळचें हातभर लांब आणि सळईच्या किल्लीचें कुलूप; परदेशी कुलपाला ' बेडकीचें कुलूप ' म्हणतात. **नळीचें कौल, नळीदार कौल न०** उभ्या चिरलेल्या नळीच्या अर्धुकाच्या आकाराचे घरावर शाकारणीसाठीं घालतात तें कौल. दुसऱ्या प्रकारचें कौल ' थालिपिटी कौल ' किं० ' थापींव कौल. '

नळुंडी, नळोंडी, नळहांडी [म० नळ] **स्त्री०** वर ' नळांडी ' पहा.

नक्षत्र [सं०] **न०** १ तारा. २ अश्विनी, भरणी, इ० जा सत्तावीस नक्षत्रें तीं प्रत्येक. ३ सूर्यचंद्राच्या किं० भूमीच्या चक्राच्या परिघाचा सत्ताविसावा भाग. ॐ **ती मुलगी नक्षत्रासारखी आहे** ती गोरी, सुंदर, आणि मोहक आहे. **नक्षत्रनाथ, नक्षत्रेश पु०** चंद्र. **नक्षत्रमाला स्त्री०** १ नक्षत्रसमूह. २ हत्तीच्या गळ्यातील अलंकारविशेष. ३ मोत्यांची माळ. **नक्षत्रविद्या स्त्री०** ज्योतिष शास्त्र. **नक्षत्रसूचक, नक्षत्रसूची पु०** अडाणी आणि ढोंगी ज्योतिषी. **नक्षत्रमाळ, नक्षमाळा स्त्री०** १ लग्नाच्या समारंभांत वधूवरांच्या मिरवणुकीपुढें कागदाच्या फुलांच्या माळा काठ्यांच्या टोकांना बांधून चालवितात त्या. २ देवांच्या पुढें शोभेसाठीं मांडून ठेवितात तीं पात्रें. ३ सत्तावीस मोत्यांची हार. ४ दोरीवर अस्ताव्यस्त लोंबत असलेलीं चिरगुटें (निंदेत). **कोणेकाच्या हातावर नक्षत्र पडलेलें असणें** तो चोरटा असणें. **कोणेकाच्या पायावर नक्षत्र पडलेलें असणें** त्याला सदा भटकत राहण्याची खोडी असणें. **कोणेकाच्या तोंडावर नक्षत्र पडलेलें असणें** त्याला सदा वटवट करीत बसण्याची खोडी असणें.

[इ० पहा.

नक्षा, नक्षी इ० मागें ' नकशा, ' ' नकशी '

ना उभयान्वयी अ० १ आणि नाहीं; किंवा नाहीं; उ० गांवात घर ना रानांत शेत; उ० धड दिवस ना रात्र; उ० बरा ना वाईट. २ कोण, काय, कांहीं, कसा, कोठें, केव्हां, कधीं, इ० ककारानें सुरू होणाऱ्या सर्वनामसाधित अशा द्विरुक्त शब्दांच्यामध्यें ' ना ' अव्यय येतें तेव्हां त्याचा अर्थ त्या शब्दापुढें ' तरी ' हा शब्द योजून दाखवितां येतो; उ० कोणी ना कोणी म्ह० कोणीतरी; उ० कोठें ना कोठें म्ह० कोठेंतरी; कधीं ना कधीं म्ह० कधीं तरी; उ० कोठून ना कोठून म्ह० कोठून तरी; इ०. **क्रि० वि०** १ क्रियापदाच्या रीतिभूत काळाच्या रूपापुढें ' ना ' हा शब्द आला असतां त्या क्रियापदाचें अकरणरूप सिद्ध होतें; उ० मी त्याला यावयाला खूप विनविलें पण तो येईना; उ० मी त्या घोड्याला दहा पांच छड्या मारल्या पण तो एक पाऊल चालेना. **टीप,**–हीं रूपें जोरदार करण्यासाठीं ' ना ' च्या मागें ' च ' योजतात; उ० तो बोलेचना, चालेचना, शिकेचना, इ०. २ प्रश्नार्थक वाक्यांत शेवटीं ' ना ' आल्यास प्रश्न विचारणाऱ्याच्या मनांत ती क्रिया घडावी अशी इच्छा किं० अपेक्षा आहे असा अर्थ होतो; उ० तूं जातोस ना ? हा प्रश्न अकरणरूपी असल्यास ती क्रिया न घडावी अशी तो वक्त्याची इच्छा दर्शवितो; उ० तूं जात नाहींस ना ? म्ह० तूं जाऊं नये अशी माझी इच्छा आहे. ३ क्रियापदाचा अर्थ ' ना ' नें जोरदार होतो; उ० मी जातोंना म्ह० मी जातोंच जातों; मी जातोंच आहें. ॐ **एव्हांना क्रि० वि०** इतका वेळ गेला आहे त्या अर्थीं; उ० तो एव्हांना मुंबईस पोचला असेल. **तेव्हांना क्रि० वि०** तितका वेळ गेला त्या अर्थीं.

ना [म० न; सं० न] **पु०** नकार देणें; उ० माझ्या मागणीला ना म्हणूं नको.

ना [फा०] **अव्यय** विशेषणाच्या पूर्वीं ' ना ' आल्यास तो उलटपणा हा अर्थ दाखवितो; उ० नापसंत, नाखूष, नापिकतें, नापीक, इ०. शब्दाच्या मागें

लागून हें अव्यय विरोध, अभाव, प्रतिकूलपणा, इ०अर्थ दाखवितें; असे बनलेले शब्द पुढें दिले आहेत.

नाइलाज वि० १ ज्याच्या हातीं इलाज नाहीं असा (माणूस). २ ज्याला इलाज नाहीं अशी (कांहीं गोष्ट).३अनिवार्य. **नाउमेद** वि० खचलेला; हताश झालेला. **नाहक** क्रि०वि० १ हकाशिवाय. २ विनाकारण; उगीचच्या उगीच. **नाखूष** वि० मान्य न करणारा. **नाकसबी** वि० अकुशल. **नाकिर्द** वि० लागवडीत न आलेली किंवा आण-ण्याजोगी. **नाकुवत** वि० अशक्त. **नाखूष** वि० अतृप्त; असंतुष्ट. **नाखुषी** स्त्री० १ असंमति. २ असंतोष. ३ अतृप्ति.

नाईक [सं०नायक] पु० १ पुढारी. २मुख्य. ३ सेनापति. ४ (**साहित्य**) पति; उपपति. नाटक, कादंबरी, गोष्ट, इ०तील मुख्य पुरुषपात्र. **टीप**–ह्या अर्थी फक्त 'नायक'हें रूप जोजलें जातें.५ कामकऱ्यांच्या टोळीचा मुकादम. ६ गाड्या,घोडी, बैल, इ० ज्या तळावर मुक्काम करतात तेथील देखरेख करणारा किंवा तेथें व्यवहार जुळवून देणारा किंवा भाडीं ठरविणारा; अडुवाला. ७ सराफीचा धंदा करणारा ब्राम्हण; उ० बाळाजी नाईक केळकर.

नाईब, नायब [अ०नायाब्] पु० मुख्याच्या वतीनें किंवा तर्फेनें काम पाहाणारा त्याच्या हाता-खालचा अधिकारी.

नाऊ, नहू [म० न्हावी] पु० न्हावी.

नाक न० १ मुखाचा पुढें आलेला अवयव; नासा; नासिका. २ बटाटा, आलें, धान्याचा दाणा, इ० ना जेथें मोड फुटतो किंवा नवा अंकुर उत्पन्न होतो ती जागा. ३ सुई, दाभण, इ०च्या माथ्याजवळचें म्ह० जाडी भागाजवळचें छिद्र,–ज्यांत दोरा, सुतळी, इ० ओवितात. ४ एकाद्या देशाचा, गांवाचा, किंवा संस्थेचा अग्रगण्य माणूस किंवा पुढारी; उ०रामपाटील आमच्या गावचें नाक आहेत.५एकाद्या देशाचा महत्त्वाचा किल्ला, शहर, किंवा स्थळ;उ०मुंबई शहर हें हिंदुस्तानचें नाक आहे. ६ नथ नाकांत घालण्यासाठीं पाडलेलें छिद्र. ७ आबरू;उ० ह्या व्यवहारांत माझें नाक गेलें (किंवा गमावलें) हें कबूल केलें पाहिजे. ❀ **कोणच्या नाकानें** ? कोणच्या तोंडानें ? कसा ? उ० मी तें काम करीनच करीन अशी प्रतिज्ञा भोगिली होती, पण तें काम फिसकटलें, आतां मी कोणच्या नाकानें पुरुषोत्तम-पंतांकडे जाऊं ? **आपलें नाक कापून दुसऱ्यास अवलक्षण करणें** दुसऱ्याचें नुकसान व्हावें म्हणून आपलें कांही तरी नुकसान करून घेणें. **टीप,**–बिननाकाचा मनुष्य पुढें आला असतां अपशकुन होतो असें समजण्यांत येतें. **उंच नाक करून क्रि० वि०** बेशरमपणानें; निर्लज्जपणानें. **एकाद्याचें नाक कापणें** त्याचा रेच उतरणें; त्याचा नक्षा उतरणें. **एकाद्याचें नाक खालीं पडणें (किं० होणें)** त्याचा गर्व नाहींसा होणें.**एकाद्याचें नाक खालीं पाडणें** त्याचा गर्व नाहींसा करणें. **एकाद्याचे पुढें नाक घासणें** त्याच्या पायीं नम्र होणें;त्याची क्षमा मागणें; दासाला योग्य असा नम्रपणा त्याचेपुढें स्वीकारणें. **नाक जळणें** नाकाला दुर्गंधी असह्य होणें. **नाक मुरडणें** किं० **नाकें तोंड मुरडणें** नापसंती दर्शविणें.**एकाद्याचें नाक ठेचणें** (किं० **चेचणें**) त्याची फजिती करणें; त्याचें पारिपत्य करणें. **टीप,**–येथें ' नाक ' बद्दल ' नकटें ' किंवा 'नकटी'असाही शब्द योजण्यांत येतो. **नाक मुरडणें** नापसंती दर्शविणें. **त्याणें आपलें नाक तोडून कडोसरीस लाविलें आहे** तो भारी निर्लज्ज झाला आहे. **एकाद्याचें नाक धरणें** कांहीं कामांत त्याचा खोळंबा करणें. **नाक (किं०नाकपुड्या) फेंदारणें (किं० पिंजारणें)** नाक फुगवून राग दाखविणें. **नाक मोडणें** नाक वाकडें तिकडें करून नापसंती दर्शविणें. **एकाद्याचें नाक मारणें** त्याची फजीती उडविणें; त्याचा रेच उतरणें. **नाक वर करून** १ ताठ्यानें; गर्वानें; तिरस्कारानें २ निर्ल-ज्जपणानें. **एकाद्याच्या नाकांत काड्या घालणें (किं० सारणें)** त्याला खिजविणें; त्याची कुरा-पत काढणें; त्याला चेतविणें; त्याला राग आणणें. **एकाद्याच्या नाकांत काड्या जाणें** त्याला एकादी गोष्ट न आवडल्यामुळें तो रागावणें. **नाकांत बोलणें** गेंगाण्या स्वरानें बोलणें. **नाकानें कांदे (किं० वांगीं) सोलणें** १ नसता शुचिर्भूतपणा किंवा पवित्रपणा दाखविणें. २ नसता अभिमान दाखविणें. ३ अस्थानीं बढाया मारणें. **एकाद्याच्या नाकावर पाय देणें** त्याची पर्वा न करणें. **टीप,**–

‘ एकाद्याच्या नाकावर वाट करणें ’ याचाही अर्थ वरीलप्रमाणेंच आहे. **नाकावर माशी बसूं न देणें** अपमान किं० तिरस्कार अगदी सहन न करणें. **कोणेकाच्या नाकावर रडें असणें** क्षुल्लक कारणानें रडें येण्याइतक्या नाजूक मनाचा तो असणें. **त्याच्या नाका (किं० नाकाशीं) सूत धरलें आहे** तो आतां मरतो कीं थटकेनें मरतो अशी त्याची स्थिति आहे. **टीप.**–मरणोन्मुख मनुष्याचा श्वासोच्छ्वास चालतो आहे किं० नाहीं हें पाहण्यासाठीं त्याच्या नाकाशीं सूत धरतात; तें हललें नाहीं तर तो मेला असें समजण्यांत येतें. **एकाद्याच्या नाकास चुना लावणें** १ त्याची खजाली काढणें. २ त्याच्यापुढें धमकीनें भांडावयास सिद्ध होणें. **नाकासमोर जाणें** अगदीं सरळ मार्गानें जाणें. **नाकीं दुऱ्हीं काढणें. किं० नाकदुऱ्या काढणें** अति नम्रपणानें विनविणें; शरण जाणें. **एकाद्याच्या नाकीं वेसण घालणें** त्याला आपल्या कबज्यांत आणणें; त्याला वठ्यांत ठेवणें. **नकट्यापुढें नाक खाजविणें** त्याला हिणविणें. **नाक मुठींत धरून** क्रि० वि० निरुपायास्तव; नाइलाजानें. **नाक गेलें तरी भोकें राहिलीं आहेत असें म्हणणें** निर्लज्जपणानें बोलणें किं० वागणें. **एकाद्याचें नाक झाडणें** त्याचा रंग उतरणें; त्याची फजीती करणें. त्याचें पारिपत्य करणें. **नाकावर असणें** वरचढ असणें. **नाकाची घाण मरणें (किं० जाणें)** वाईट वासानें त्रास होईनासा होणें (सवईमुळें, पडशामुळें, किं० अन्य कारणामुळें). **नाकापेक्षां मोती जड होणें** १ यजमानापेक्षां नोकराची मिजास किं० मानमान्यता अधिक होणें. २ एकाद्याच्या अंगचा खरा गुण लोकांच्या अपेक्षेपेक्षां कमी आहे असें आढळून येणें. **नाकाला जांभ लावणें** तिरस्कार दाखविणें; गर्व, ताठा, किं० दिमाख दाखविणें. **नाकाला पदर लावणें** अपकीर्ति झाल्यामुळें तोंड झाकणें; लज्जेनें तोंड झाकणें. **एकाद्याच्या नाकावर रुपये (किं० पैसे) टिचणें** १ ते देण्याला आपण नाखूष असलों तरी ते त्याला देणें; नाइलाजास्तव ते त्याला देणें. २ आपण त्याला पैसे दिले हे कोणी मनुष्य नाकबूल करीत असला म्हणजे आपण त्याला पैसे दिले हे ठासून सांगण्याचा हा प्रकार आहे; उ० मी पंचपाळें विकत घेतलें तेव्हांच मी सात आणे तुझ्या नाकावर टिचले आहेत. **नाकावर बोट ठेवणें** एकाद्याला चूप रहा म्हणून आपल्या नाकावर आपलें बोट ठेवून खूण करणें (रागानें किं० अन्य कांहीं कारणानें). **नाका ओठावर जेवणें** चोखंदळपणानें जेवणें. **एकाद्याच्या नाकीं नऊ (किं० नव) येणें** कांहीं काम करतांना त्याला अति त्रास, श्रम, किं० उपद्रव होणें. **त्याच्या नाकावर राग आहे (किं० राग अगदीं ठेवलेला आहे)** तो अगदीं अल्प कारणावरून रागावत असतो. **एकाद्याच्या नाकांतला बाल** त्याच्या आवडीचा किं० प्रेमाचा किं० जिव्हाळ्याचा माणस. **नाकाडोळ्यांचा वैद्य किं० नाका कानांचा वैद्य** पु० वैद्यविद्येंत वाकबगार नसून वृथा बडबड करणारा वैद्य. **नाकाचा पडदा** पु० दोन नाकपुड्यांच्या मधला पडदा. **नाकचिंब्या** वि० चपट्या किं० बसकट नाकाचा (मनुष्य). **नाकतोडा (-तोड्या)** पु० १ एक प्रकारचा टोळ. २ कोणी मनुष्य उदारपणानें कोणाला कांहीं देत असला तर त्याला तसें न करावें म्हणून दुष्टपणानें सल्ला देणारा. **नाकदुरई, नाकदुराई, नाकदुऱ्हाई, नाकधुराई** स्त्री० नम्रपणानें अपराध कबूल करून क्षमा मागणें. **टीप.**–याचा प्रयोग बहुधा अ० व० आणि ‘काढणें’ ह्या क्रियापदाच्या साहचर्यानें होतो. **नाकशिकणी** स्त्री० एक वनस्पति.–जिच्या पानांचें चूर्ण हुंगलें असतां शिंका येतात. **नाकाचा दांडा, नाकाचा वांसा** पु० नाकाच्या शेंड्यापासून कपाळापर्यंत जो नाकाचा उंच भाग तो. **नाकाचा पडदा** पु०, **नाकाची पडदी, नाकाची भिंत** स्त्री० दोन नाकपुड्यांच्या मधला पडदा. **नाकाचा शेंडा** पु०, **नाकाची शेंडी** स्त्री० नाकाचें टोंक. **नाकाटी नाकाटणी** [म० नाक+काटणें] खरडपट्टी; भोसडपट्टी; (करणें). **नाकाड** न०, **नाकाडा** पु० १ मोठें किं० विरूप नाक. २ डोंगराचा पुढें आलेला आणि उभा असलेला सुळका. ३ जमीनीचा पाण्यांत लांबवर घुसलेला भाग; भूशिर. ४ आंब्याच्या फळास मागल्या बाजूस पक्ष्यांच्या चोंचीसारखा आकार असतो तो. **नाकोटा** पु०, **नाकोंटें** न० फार मोठें नाक; विरूप नाक.

नाक ['नायक' शब्दाचें तोकडें रूप] **पु०** ' नाक ' हा महारांच्या नांवापुढें बहुमानार्थक शब्द लावतात; उ० रामनाक, भागनाक.

नाकस्वर, नाकसूर [सं० नाग+स्वर] **पु० न०** सर्पांना भूल पाडण्यासाठीं वाजवावयाचें एक वाद्य.

नाकस्ता [अ० नाकस्त्] **पु०** १ नुकसान; हानि; ठोकर (बसणें लागणें. इ०). २ व्यापार, व्यवहार, धंदा, इ०मध्यें मंदी. ॐ **नाकस्याचें साल** (किं० **वर्ष**) **न०** व्यापारादिकांत फार नुकसान ज्या वर्षी झालें तें वर्ष.

नाका [हिं०] **पु०** १ दोन किं० अधिक रस्ते जेथें मिळाले आहेत तें ठिकाण. २ जकाती वसूल करण्याची जागा.

नाकार पु०, नाकारणी स्त्री० कांहीं एका गोष्टीचा अस्वीकार किं० निषेध.

नाकारणें [म० नाकार] **स० क्रि०** नापसंत करणें; नको म्हणून म्हणणें; न स्वीकारणें.

नाकारा [हिं० नाकाराह्] **वि०** टाकाऊ; निरुपयोगी; त्याज्य.

नाकील [म० नाक] **वि०** सुरेख आणि सरळ नाक ज्याचें आहे असा.

नाकुरती, नाकोरती स्त्री०, नाकुष्टें नाकोष्टें न० नापसंत म्हणून नाक मुरडणें (मारणें, देणें, हाणणें).

नाकुच, नाकूछ [हिं०] **वि०** निरुपयोगी.

नाकूस, नाकूच [अ० नाकुस्] **वि०** कांहीं कार्यविशेषांत अकुशल, अचतुर, किं० बिनवाकबगार.

नाकें [हिं० नाका] **न०** १ जकाती वसूल करण्याचें ठिकाण. २ दोन किं० अधिक रस्ते जेथें मिळतात तें ठिकाण. ३ रस्त्यावरचें किं० वाटेवरचें वाकण. ॐ**नाकेदार पु०** रहदारीच्या रस्त्यावर जकाती वसूल करणारा अधिकारी. **नाकेबंदी स्त्री०** विवक्षित माणसें, जनावरें, किं० वाहनें, यांच्या खेरीज इतरांना जाण्यायेण्याचा प्रतिबंध,—कांहीं काळापुरता किं० नेहमीचा असतो तो.

नाकेशर पुढें ' नागकेशर ' पहा.

नाकोरती, नाकोष्टें मागें ' नाकुरती ' पहा.

नाखट्टू [हिं०] **वि०** अकुशल, अचतुर.

नाखवा, नाखोदा, नाखुदा [फा० नाखुदा] **पु०** १ गलबताचा मालक. २ गलबतावर हुकमत ज्याची चालते तो. ३ ज्याच्या घरचीं एक दोन गलबतें आहेत असा श्रेष्ठ किं० श्रीमंत कोळी.

नाखळ वि० द्वाड; खोडकर; आडदांड; व्रात्य (मनुष्य किं० पशु).

नाग [सं०] **पु०** १ हत्ती. २ भुजंग; सर्प. ३ पाताळवासी सर्पविशेष,—ज्याचें तोंड मनुष्यासारखें असून शरीर सर्पासारखें असतें. ४ ढेकर उत्पन्न करणारा शरीरांतील वायुविशेष. ५ नागचांफा. ६ पानवेल. ७ नागकेशर. ८ नागरमोथा. **न०** दहावें करण (ज्योतिषांत). ॐ **नागकन्या स्त्री०** पुराणप्रसिद्ध नागाची मनुष्याकृति कन्या. **नागकुंडल न०** नागाच्या वेटोळ्याच्या आकाराचें कुंडल. **नागकुल, नागकूल न०** १ नागपंचमीच्या दिवशीं नागाच्या आकृति शेण, गंध, इ०नीं काढून पूजितात त्या समुच्चयानें. २ सर्पांचें वारूळ किं० सर्पांचा समुदाय. **नागचंद्रकोर स्त्री०** स्त्रियांचें डोकीत घालावयाचें एक भूषण. **नागचंपक, नागचांफा पु०** एक पुष्पवृक्षविशेष. **नागचाट्या पु०** नागपंचमीच्या दिवशीं जेवावयास बोलावतात तो मुंज्या मुलगा. **नागदवण स्त्री०** एक वृक्ष. **नागदिवाळी स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध पंचमी ही तिथि; ह्या दिवशीं पिठाचे नाग करून त्यांची पूजा करतात. **नागनाथ पु०** बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. **नागपंचमी स्त्री०** श्रावण शुद्ध पंचमी ही तिथि; ह्या दिवशीं नागाची पूजा करतात. **नागपाश पु०** १ वरुणपाश. २ सर्पाकार बंधनसाधन,—लढाईत शत्रूला आडकविण्यासाठीं फेकतात तें. **नागपूजा स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध पंचमी ह्या दिवशीं पिठाच्या नागाची करतात ती पूजा. **नागफणी वि०** नागाच्या फण्याच्या डोक्यासारखें डोकें असलेला खिळा, खुंटी, इ०. अशा खिळ्याला 'चिपखिळा' असेंही म्हणतात. **नागबलि पु०, नागबळ, नागबळी स्त्री०** ज्याच्या हातून साप मारला गेला आहे त्यानें सर्पजातीस शांत करावयासाठीं द्यावयाचा बळी. **नागबल नारायणबळ स्त्री०** मरणोन्मुख किं० अतिशय आजारी माणसासंबंधानें करावयाचा एक धार्मिक विधि.

नागबिंब न० ग्रहणाच्या दिवशीं ब्राम्हणाला चंद्र किं०सूर्य,आणि राहु किं०केतु,यांच्या धातूच्या पत्र्यावर कोरलेल्या आकृति दान देतात त्या. **नागमणि पु०** ज्या मण्याच्या स्पर्शानें सापाचें विष उतरतें तो. **नागमोड स्त्री०** १ नागासारखें वळण आहे जिला अशी बांगडी (स्त्रियांचें कर-भूषण). २ नागासारखें रस्त्याचें किं०रेषेचें वळण. **नागमोडीचा पितांबर नेसणें** नागवें असणें.**नाग-मोडी वि०** नागाच्या वळणाची (वाट, बांगडी, रेषा, इ०). **नागलोक पु०** पाताळ. **नागवीथी स्त्री०**(ज्योतिष) अश्विनी,भरणी,आणि कृत्तिका. **नागपुर, नागांग न०, नागाव्ह, नागसाव्हय पु०** हस्तिनापुर. **नागांतक, नागाशन पु०** १ मोर. २ गरुड. ३ सिंह. **नागदंत. न.गदंतक पु०** हस्तिदंत. **नागवल्ली स्त्री०** पानवेल.

नागटा,नागडा [सं०नग्न] **वि०** १नागवा; ज्याचीं गुह्येंद्रियें वस्त्ररहित आहेत असा(मनुष्य).२ जिला म्यान नाहीं अशी(तरवार); जिच्या नेढ्यांत दोरा ओविलेला नाहीं अशी (सुई); पर्णरहित (वृक्ष किं० फांदी); छप्पर ज्याला नाहीं असें(घर, झोंपडी,इ०); ज्याला तारा लावावयाच्या आहेत किं०ज्याच्या तारा तुटल्या आहेत असें (तंतुवाद्य); ज्याची पानें शिवलीं नाहींत असें (पुस्तक); जेथील दागिना काढला आहे असा (कान, हात, इ०); जेथील सामानसुमान काढून टाकलें आहे असें (घर, इ०). ꙮ **नागडगोसावी पु०** सदा नागवें राहण्याच्या पंथाचा गोसावी.

नांगडा पु०,नांगड स्त्री०१विंचवाची नांगी.२ भक्ष्य धरावयाचे खेकड्याचे जे दोन आंकडे ते प्रत्येक.

नांगर, नागर [सं० लांगल] **पु०** १ जमीन उखळावयाचें शेतकऱ्याचें एक आउत. २ पाण्यांत गलबत एका ठिकाणापासून सरकूं नये म्हणून जें जड लोखंड इ० वजन दोरीनें बांधून पाण्यांत भूमीला टेकेंइतकें खोल सोडतात तें. ३ जाडी टोकाची लेखणी. ४ फणीचा जाडी दांता. ꙮ **नांगरास पाळ न०** १ सुरळीतपणें काम चाल-ण्यास हरकत. २ काम टाळण्यासाठीं उपस्थित केलेली कांहीं तरी क्षुल्लक सबब. पाळ म्ह० झाडाचें मूळ. ꙮ **जेथें जावें तेथें नांगरास पाळ** कोण-तेंही काम सुरळीतपणें कधीं होत नाहीं; कामांत कांहीं तरी विघ्नें किं० हरकती येतातच. **नांगरकी स्त्री०** शेत नांगरण्याची क्रिया.**नांगरखुंट न०** नांग-राचें टोक,–ज्यांत लोखंडाचा फाळ बसविलेला असतो. **नांगरजोत न०**अर्धेल्यानें आपल्या खोताला एक किं० अधिक दिवस नांगरण्याच्या कामासाठीं दिलेले दोन बैल आणि त्यांना हाकणारा गडी समु-च्चयानें.**नांगरट (–ठ)** [म०नांगरणें] **वि०**नांगरलेली (जमीन). **नागरडा पु०** नांगराचें जूं बांधा-वयाची दोरी. **नांगर पंचमी स्त्री०** श्रावण शुद्ध पंचमी ही तिथि;नागपंचमी (शेतकऱ्यांची संज्ञा). ह्या दिवशीं शेतकरी नांगर चालवीत नाहींत. **नांगऱ्या वि०** १ नांगर चालविणारा किं० ओढणारा (माणूस किं० बैल). २ अडाणी; अशिक्षित (माणूस). ३ अकुशल (माणूस). ४ ज्याच्याकडे पाटीलकीचा अधिकार आहे असा. ५ कुटुंब, संस्था, किं० मंडळी यांचा मुख्य.

नागर [सं० नगर] **वि०**१ शहरांत राहाणारा. २ शहरासंबंधाचा. ३ सभ्य. ४ चतुर. **पु०** गुज-राथी ब्राम्हणांची एक जात. **न०** १ सुंठ.२ नागर-मोथा. ३ बालबोध लिपि. ꙮ **नागरिक वि०**१ शहरांतील. २ सभ्य; शिष्ट. **पु०** शहरांत राहा-णारा माणूस. याच्या उलट खेडवळ किं० गावढळ.

नांगरणी [म० नांगरणें] **स्त्री०** १ शेत नांग-रण्याची क्रिया. २ गलबत नांगरण्याची क्रिया.ꙮ **नांगरणी दुणणी स्त्री०** शेत लांबीकडून नांग-रून पुन्हां रुंदीकडून नांगरणें अशी दुहेरी क्रिया.

नांगरणें [म० नांगर] **स० क्रि०** १ नांग-रानें जमीन उखणणें. २ नांगरानें गलबत पाण्यांत स्थिर करणें. ꙮ **नांगरणें दुणणें** शेत एकदा आडवें आणि एकदा उभें नांगरणें.

नागला पु०एक पुष्पवृक्ष.

नागली स्त्री० एक धान्य.

नागवण, नागवणूक [म०नागविणें] **स्त्री०** जुलमी सरकार, लुटारू, दुर्दैव, इ० मुळें हानि होऊन मनुष्याला जी गरीबी येते ती किं० अशी गरिबीची स्थिति.

नागवसा पु० पुढें ‘ नागोसा ’ पहा.

नागवा [**सं०** नग्न] **वि०** १ ज्याचीं गुह्येंद्रियें वस्त्रानें झाकलेलीं नाहींत असा. २ ज्याचें बहुतेक शरीर उघडें म्ह० वस्त्ररहित आहे असा. ३ द्रव्यहीन, साधनहीन, मित्रहीन असा. ❀ **नागवा पाऊस पु०** ऊन्ह पडलें असतां जो पाऊस पडतो तो. **कोणेकाला नागवें कोल्हें भेटणें** किं० **नागवी सवाशीण भेटणें** त्याला काहीं अनपेक्षित किं० अकल्पित लाभ होणें.

नागविणें [**म०** नागवें करणें] **स० क्रि०** जुलमी सरकार, चोर, दुर्दैव, इ० नीं (मनुष्याला). कंगाल करणें.

नागवें [**म०** ' नागवा ' चें **न०** लिंगरूप] **न०** १ कोणत्या कार्याला जरूर जी साधनसामग्री तींत अल्पांशानें किं० बऱ्याच अंशानें जें न्यून तें; कमीपणा. २ आपल्या शत्रूच्या किं० दुर्दैवाच्या आपणावर करावयाच्या हल्ल्याला सोयीचें ठिकाण; आपलें छिद्र,-ज्याच्या वाटे शत्रूचा किं० दुर्दैवाचा आपणावर तडाखा बसूं शकेल. ❀ **नागवें उघडें न० ए० व०** कोणेकाच्या अप्रामाणिकपणाचे पुरावे, दाखले, इ० किं० कामांत कसूर, टंगळमंगळ, इ० समुच्चयानें. **नागवें उदाहरण न०** चटकदार नव्हे असा दाखला.

नागवेल [**सं०** नागवल्ली] **स्त्री०** विड्याच्या पानाची वेल.

नागा [**फा०** नागाह्] **पु०** १ कामांत खळ किं० खंड किं० थांबणूक. २ बिन कामाचा दिवस; खाडा.

नागा वि० नागवा. वर ' नागवा ' पहा.

नांगा, नांगाडा पु० १ विंचवाच्या शेपटीचें अग्र,-ज्यात त्याचें विष असतें. २ खेकडा इ० प्राण्यांचे आंकड्यासारखे अवयव,-ज्यानीं ते आपलें भक्ष्य धरतात-ते प्रत्येक. ३ दुसऱ्या माणसाशीं बोलण्या चालण्यात मनुष्य ज्याच्या जोरावर मगरूरी करतो तें सामर्थ्य (पडणें, पाडणें); उ० तो लंब्यालंब्या गोष्टी सांगून मला बोध करीत होता पण काल त्याला कलालाच्या दुकानांत दारू पितांना मी पाहिलें असें ध्वनित करतांच त्याचा नांगा (किं० नांगाडा) पडला. ❀ **नांगा मारणें** १ टोमणा मारणें. २ कोणेकाच्या कार्यांत विघ्न आणणें.

नांगी स्त्री० वर ' नांगा ' अर्थ १, २, ३ पहा. ४ गोमहिष्यादिकांच्या खुराला असतो तो बोटासारखा अवयव. ३ शेर म्हणून जें झाड आहे त्याच्या डिन्या प्रत्येक. ४ पानाचा अंकुर. ❀ **कोणेकाची नांगी लागणें** (किं० **रुतणें**) दरबारांत किं० अन्यत्र त्याचा पूर्ण प्रवेश होणें. **नांगी मारणें** (भाषगांत) टोमणा मारणें. **नांगी टाकणें** पूर्णपणें पराभूत होणें; गर्व, मगरूरी, किं० ताठा सोडून देण्याच्या प्रसंगांत अडकणें. **त्याच्या घरांत गुरांची नांगी राहिली नाहीं** त्याचीं सर्व गुरें मरून गेलीं किं० नाहींतशी झालीं; त्याच्या गोठ्यांत एकही गुरूं राहिलें नाहीं.

नांगें न० काठी, वांसा, इ० चें दुबेळकें.

नागेशवळ स्त्री० देवाहून प्रकृति श्रेष्ठ अशा मताचे आणि कलगी लावणी म्हणणारे जे शाहीर ते किं० त्यांचा पंथ.

नांगोडा [**म०** नांगा] **पु०** १ विंचवाची शेपटी किं० तिणें मारलेला तडाखा. २ खेकड्याचे भक्ष्य धरावयाचे जे दोन अवयव ते प्रत्येक.

नागोबा न० १ ' बाळ ' असें ज्याला दुसरें नांव आहे तो दागिना. २ नागाचें चित्र.

नागोल, नागोला पु० १ दाराच्या एका किं० दोन पानांचीं वरचीं कुमवें जींत फिरतात ती फळी. २ पाण्याच्या रहाटाचा सुळखंबा ज्यांत बसविलेला असतो तें लाकूड.

नाघाण (-न), नाघाणी (-नीं) [**फा०** नाग्हान्=अकस्मात्, अवचित] **क्रि० वि०** अन्यायानें; कारणाशिवाय; जुलमानें.

नाच [**सं०** नृत्य **पु०** वेश्यादींचें तालासुरांवर हस्तपादादि अंगविक्षेपासह जें चलनवलन तें, किं० तन्निमित्त जो समारंभ तो. ❀ **नाच नाचणें** लग्नकार्यादि प्रसंगीं एका माणसानें अनेक प्रकारचीं कामें करणें. **नाच मांडणें** धांगडधिंगा चालविणें (पोरें इ० नीं).

नाचा, नाच्या पोऱ्या पु० स्त्रीवेष घेऊन लोकांच्या करमणुकीसाठीं तमाशांत किं० अन्य प्रसंगीं नाचतो तो पोऱ्या.

नाचकंद, नानकण न० नखें कापण्याचें न्हाव्याचें आउत; नखाजेन.

नाचकें न० भांड्याला बसविलेली असते ती

तोटी किं० तिचें छिद्र. ❀ नाचक्यांतून निघतो आणि कथ्यांत जातो तो झुकांड्या देणारा किं० चुकवाचुकव करणारा मनुष्य आहे.

नाचक्की स्त्री० १ बेआबरू; बदनामी. २ भांडण; वेबनाव.

नाचणा पु०, **नाचणी** स्त्री० एक धान्य. ❀ **नाचणकांड** न० नाचणा धान्याचें ताट. **नाचणे कुंवरी** स्त्री० नाचणा धान्याची एक उंची जात.

नाचणें [सं० नृत्] अ० क्रि० १ वेश्यादिकांनीं हात, पाय, डोकें, इ० चे विक्षेप करून गायन, ताल, सूर, इ० च्या अनुरोधानें शरीराचें चलनवलन करणें. २ मूल, घोडा, इ० नीं गमतीनें किं० द्वाडपणानें वागणें. ३ अरेरावीपणानें बोलणें. ४ वढाया मारणें; उ० मी अमकें करीन तमकें करीन म्हणून तो भारी नाचत होता पण आतां रामभाऊंस पाहातांच तो अगदीं नरम पडला. ❀ **नाचणें उडणें** १ आनंदानें वागणें. २ दिमाखानें किं० तोऱ्यानें बोलणें. ३ वढाया मारणें. **नाचतां येईना अंगण वाकडें, रांधतां येईना ओलीं लाकडें** आपला अकुशलपणा किं० अचतुरपणा कबूल करावयास कोणीही तयार नसतो आणि कार्य विघडलें तर तो सर्व दोष साधनसामग्रीवर लोटूं पाहातो. **कोणेकाचे पुढें नाचणें** १ त्याला ज्या ज्या वेळीं जो जो पदार्थ पाहिजे असेल तो तो पदार्थ त्या त्या वेळीं त्याला देणें. २ त्याची खुशामत करणें. **लग्नामध्यें खर्चापेक्षा नाचणें फार** लग्नाचा खर्च पुरवतो पण दगदग पुरवत नाहीं. **मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते** मोठ्याचें किं० समर्थाचें अनुकरण कोणी लहान किं० क्षुद्र करूं गेल्यास तें हास्यास्पद होतें.

नाचरा [म० नाचणें] वि० १ नाचण्याकडे ज्याचें मन कललेलें आहे असा. २ चंचल; अस्थिर. ३ समर्थांच्या पुढें लुडबुड करण्याच्या स्वभावाचा. **नाचरी** स्त्री० १ उनाडपणा किं० छाकटेगिरी करणारी स्त्री. २ चंचल मनाची स्त्री. ३ नाचण्याची हौस किं० खोडी; उ० तुमच्या घोड्याला नाचरी लागली आहे. ४ उद्योगधंद्यामुळें किं० अन्य कारणामुळें एकसारखें स्थलांतर करणें; उ० सावकारांमुळें आज ह्या गांवीं तर उद्या त्या गांवीं अशी मला सदा नाचरी करावी लागते. उ० येथें माशा हसतात यामुळें ह्या गायीला नाचरी लागली आहे, तिला दुसरीकडे बांधा.

नाचविणें [म० 'नाचणें' चें प्रयोजक] स० क्रि० १ कोणेकाला नाचावयास, किं० इकडून तिकडे हेलपाटे घालावयास लावणें. २ कोणेकाला कांहीं आशा दाखवून आपल्या भोंवतीं घिरट्या घालावयास लावणें. ३ मुलाला खेळवायासाठीं त्याला हातांवर झेलणें किं० डोलविणें. ४ घोड्याला कांहीं विशेष प्रकारच्या चालीवर चालविणें. ५ कोणेकाला कांहीं कामासाठीं हेलपाटे घालावयास भाग पाडणें.

नाचार [फा० ना (नाहीं)+चार (इलाज)] वि० १ गरीब; आकिंचन. २ ज्याचा निरुपाय झाला आहे असा. ❀ **नाचारगत, नाचारी** स्त्री० १ गरीबी; दरिद्री स्थिति. २ निरुपायाची स्थिति; कुंठितपणाची स्थिति.

नाजकाई [फा० नाजूक+म० आई (प्रत्यय)] स्त्री० नाजुकपणा (मनाचा, प्रकृतीचा).

नाजर, नाझीर, नाझर [अ० नाजर्] पु० न्यायाच्या कचेरींतील एक अधिकारी.

नाजुक [फा० नाजुक्] वि० १ देहकष्ट किं० मानसिक श्रम ज्याला सोसत नाहींत असा (मनुष्य, पशु). २ कोणी रागें भरलेलें ज्याला सोसत नाहीं असें (मन, मनुष्य). ३ जो दांडगाईनें वापरला असतां मोडतो किं० नादुरुस्त होतो असा (पदार्थ, यंत्र). ४ अति बारीक भेद, वजन, प्रकार, इ० दाखविणारी (तराजू, यंत्र, इ०). ५ जी चारचौघांस कळतां कामा नये अशी गोष्ट, मसलत, युक्ति, इ०. ❀ **नाजूक काम** न० १ लाच घेणें किं० देणें. २ रांडबाजीचा व्यवहार. ३ कुंटणकी. **नाजूक जागा** स्त्री० १ कोणेकाचें वर्म किं० बेआबरूची गोष्ट. २ शरीराचे गोपनीय भाग.

नाझर, नाझीर वर 'नाजर' पहा.

नाट न० १ पांच कवड्या समुच्चयानें. २ कवड्यांनीं खेळावयाचा एक खेळ किं० ह्या खेळांत जे बारीक बारीक ठोकळे घेतात ते किं० ह्या

खेळासाठीं काढतात जी आकृति ती किं० ही आकृति ज्यावर काढतात तो पाट. ३ दुर्दैव. ४ अपशकुन किं० अपशकुन करणारी कांहीं गोष्ट किं० कांहीं प्रकार (लागणें, लावणें); उ० आज कार्य व्हावयाचा रंग दिसत होता पण काय नाट लागलें कोण जाणे. ❀ नाट भाजणें (किं० जाळणें) सकाळीं दुकानदारानें दुकान उघडल्यावर पाहिलें जें गिऱ्हाईक येईल तें सौदा न करता गेल्यास तो त्या दिवसाला अपशकुन होईल, तो न व्हावा म्हणून दुकानदार थोडेसें नुकसान सोसून माल विकतो त्याला नाट भाजणें किं० नाट जाळणें म्हणतात. दिवसाच्या पहिल्या व्यवहाराला 'बोहणी' म्हणतात. **नाटबाट** [म० नाट+बाट] पु० १ अपशकुन; अपशकुनाची किं० दुर्दैवाची कांहीं गोष्ट किं० बाबत. २ उणेपणा; दोष; न्यून.

नाट वि० १ लुच्चा, लबाड, दिवाळखोर, किं० पैसे देण्याचें चुकवूं पाहणारा. २ अपशकुनी; प्रतिकूल. ३ सुना; फुकट; ज्यांत कांहीं काम झालें नाहीं असा (दिवस, काळ, इ०); उ० आजचा दिवस नाट लागला (किं० गेला). **क्रि० वि०** १ आटोक्याच्या किं० मर्यादेच्या किं० टप्प्याच्या पलीकडे. २ पत्ता किं० तपास न लागण्याच्या स्थितींत. ३ घोटाळ्यांत; पंचाइतांत; गोंधळलेपणाच्या स्थितींत. ४ समुद्रांत खूप दूरवर; उ० गलबताची नाळ नाट लाव. ❀ **नाट करणें** उपटून नेणें; चोरून किं० पळवून नेणें. **नाट जाणें** किं० **नाट येणें** कबूल केलेली किं० पथकरलेली गोष्ट अंगाबाहेर लोटणें किं० ती कांहीं तरी सबबीवर न करण्याचा प्रयत्न करणें; उ० ह्या महिन्याच्या अखेरीस मी तुला दहा रुपये खचित देईन, मी नाट जाणार नाहीं.

नाटक [सं०] न० १काव्याचा एक प्रकार,–हा दृश्य असून श्राव्यही असतो. २ दशावतारांचीं सोंगें घेऊन त्यांच्या कृतींचा केलेला अभिनय किं० देखावा. ३ गमतीचा घडलेला कांहीं प्रकार. ४ क्षणभंगुर असा सुखस्थितीचा प्रकार; अल्पकाळच टिकलेलें वैभव. ५ थट्टेचा विषय; हास्यास्पद प्रकार; लाजरवाणी अशी कांहीं गोष्ट ❀ **नाटकशाला स्त्री०** १ नाटकगृह. २ (**मराठी**) पोरीस नाचणें, गाणें, इ० कला शिकवून उपभोगार्थ विकत घेतलेली पोरगी. **नाटकी वि०** १ नाचणें, गाणें, कोणाची भूमिका करणें, इ० कामें करणारा. २ खोटा; दिखाऊ; कोरड्या वतावणीचा मनापासून नव्हे असा (राग, प्रेम, इ०). **नाटकीय वि०** नाटका संबंधाचा. **पु०** नाचणारा.

नाटन [सं०] न० १ नाचणें. २ अभिनय करणें.

नाटा, नाठा [म० नाट] वि० १ खोटा. २ भलत्याच प्रकारचा. ३ हानिकारक. ❀ **साठी आणि बुद्धि नाठी** म्हाताऱ्या माणसाला भलभलतें कृत्यें करण्याची प्रवृत्ति होते; म्हातारा माणूस मूर्खासारखें वर्तन करतो.

नाटाळ, नाठळ, नाठाळ, नठ्याळ [म० नाट=अपशकुनी; दुष्ट; द्वाड] वि० दुष्ट; खोडकर; त्रास; उपद्रवी (माणूस, जनावर).

नाटाळणें, नाठाळणें, नाडळणें [म०नाटाळ] द्वाड, खोडकर, किं० उपद्रवी होणें.

नाट्य [सं०] न० १ नृत्य. २ हावभाव. ३ नृत्य, गीत, वाद्य, इ० कला. ❀ **नाट्यप्रिय पु०** शंकर. **नाट्यमंदिर पु०, नाट्यशाला स्त्री०** १ नाटकें करण्याची जागा; नाटकगृह. २ नाचण्याची जागा; नृत्यकला शिकण्याची आणि शिकविण्याची जागा.

नाड [सं० नाडि, नाडी] स्त्री० १ शरीरांतील रक्त ज्या शिरांनीं किं० नळ्यांनीं वाहातें त्या प्रत्येक. २ कमळ इ०चा पोकळ देठ. ३ धान्याचें ताट. ३ हाताची मनगटाजवळची शीर,–जी वैद्य पातो (पाहणें, दाखविणें). ४ नक्षत्राचा भाग. **न०** १ कळकाचें नळकांडें. २ गुरांना औषधें पाजण्याचें नळकांडें. ❀ **कोणेकाची नाड सापडणें** युक्तिप्रयुक्तीनें त्याचा स्वभाव हस्तगत होणें किं० त्याच्या स्वभावाचें ज्ञान होणें. **कोणेकाची नाडी आटपणें** १ तो मरणोन्मुख होणें. २ तो मरणें. ३ कार्यविशेष करण्याला किं० पुढें चालू ठेवण्याला तो असमर्थ होणें. **नाडबंद वि०** स्त्रीचा उपभोग करावयाजोगें वय असून ज्याला स्त्रीसंग घडला नाहीं तो **नाडबंदी स्त्री०** स्त्रीसंगाचा अभाव किं० स्त्रीसंगवर्जन.

नाडकरणी पु० एक वंशपरंपरागत अधिकारी,– गांवाचा किं० प्रांताचा हिशेब पाहणारा.

नाडणूक [म० नाडणें] स्त्री० १ लुबाडणें; बुचाडणें. २ गांजणें; सतावणें.

नाडणें स० क्रि० १ लुबाडणें; लुटणें. २ कोणे-काचा घातपात करणें. ३ बुडविणें; हीनदीन दशेस पोचविणें. अ० क्रि० १ बुचाडलें जाणें; लुटलें जाणें. २ विपन्न होणें; हीन दशेस पोचणें. ३ बेजार होणें; सतावलें जाणें.

नाडा पु० १ तमाशा करतांना डोंबारी किं० बहुरूपी उंच स्तंभ रोवितात तो. २ खूप जाड दोरी; वरात. ३ ताबूतांच्या दिवसांत रंगविलेलें सूत जें फकीर हातांत बांधतात तें. ४ विजार कमरेशीं आवळावयाची सुताची बोट दीड बोट रुंदीची विणलेली पट्टी. ५ डोंबारी लोक तमाशांत ज्या दोरीवरून चालतात ती. ६ खालीं जमीनीवर डोकें टेकून पाय वर करून राहाणें. ॐ **काणेकाचा नाडा पसरणें** त्यानें कामकाज, कारभार, व्यवहार, इ०चा पसारा फार मोठा असणें किं० अव्यवस्थित स्थितींत असणें. **नाडापुडी** स्त्री० अबीर, गुलाल, बुका, इ० द्रव्यांची पानांत किं० कागदांत बांधलेली पुडी आणि रंगविलेलें सूत ह्या दोन वस्तु जोडीनें; ह्या सटवाई इ०ना वाहतात. **नाडेभोरपी, नाडेबहुरूपी, नाडेभोरीप, नाडेभोरूप** पु० नाडा उंच पुरून त्यावर किं० जाड दोरी उंचावर बांधून तिच्यावर चालणें, उड्या मारणें, इ० कामें करून चरितार्थ चालवितात ते.

नाडी [सं०] स्त्री० १ शरीरांतील रक्त इ० पदार्थ ज्या नळ्यांतून वाहतात त्या प्रत्येक. २ कमळाचा देठ. ३ पोपई इ०च्या पानाचा पोकळ देठ. ४ परकर, विजार, धोतर, इ० कंबरेशीं घट्ट आवळून बसावें म्हणून बांधावयाची अरुंद विणलेली पट्टी. ४ नळी; नळ. ५ प्रकृतीचें मान ठरवावयासाठीं वैद्य मनगटाची जी शीर पाहतो ती (पाहाणें). ६ अशीच शीर जी पायाच्या घोट्याजवळ असते ती. ७ चोवीस मिनिटांचा कालावधि. ८ पाव मुहूर्त हा कालावधि. ९ सत्तावीस नक्षत्रांपैकीं नऊ नऊ नक्षत्रांचा एक एक समूह असे जे तीन समूह होतात ते प्रत्येक. ह्या समूहांना 'आद्य नाडी,' 'मध्यनाडी,' आणि 'अंत्यनाडी' अशीं नांवें आहेत. १० वात, पित्त, आणि कफ, हीं जीं शरीरस्थ तीन द्रव्यें त्यांच्या ज्या वाहिन्या त्या प्रत्येक. ॐ **नाडीचक्र** न० १ शरीरस्थ स्नायु आणि शिरा यांचें जाळें. २ ज्योतिषोपयोगी एक आकृतिविशेष. **नाडीचा फटकळ** वि० वेश्यासक्त (पुरुष). **नाडीतरंग** पु० १ ज्योतिषी. २ वेश्यासक्त. **नाडीमंडल** न० खमध्य रेषा. **नाडीव्रण** पु० हाड्या रोग; शरीरांतील हाडें कुजण्याचा रोग.

नाणकं, नाणें न० रुपाया, पैसा, मोहोर, इ० नाणें. ॐ **नाणेवटी, नाणा वट्टी** [म० नाणें+वटविणें] पु० एका देशचीं नाणीं घेऊन त्यांच्या मोबदला दुसऱ्या देशचीं नाणीं देणारा सराफ.

नात, नातीण [सं० नप्तृ=नातू. नप्त्री=नात] स्त्री० आपल्या पुत्राची किं० कन्येची कन्या. ॐ **नात जांवई** पु० आपल्या नातीचा पति. **नातसून** स्त्री० आपल्या नातवाची पत्नी.

नातरूं, नातवंड, नातुंड, नातोंड [म० नातू] न० आपल्या पुत्राचें किं० कन्येचें अपत्य.

नातलग खालीं 'नातें' मध्यें पहा.

नातवान [फा०] वि० १ द्रव्याभावामुळें कमजोर. २ अशक्त. ३ आजारी. ॐ **नातवानी** स्त्री० १ दारिद्र्य किं० दारिद्र्यामुळें आलेली दुर्दशा. २ गंजिफांच्या डावांत एक तलफ देण्याचा प्रकार.

नातळणें [म० न+आतळणें (स्पर्शणें)] स० क्रि० न स्पर्शिणें (कवितेंत).

नाताळ, नाताळें, नाथाळ, नाथाळें [पोर्च्युगी] न० येशूख्रिस्ताचा जन्मदिवस,–डिसेंबर २५ ही तारीख.

नातुडणें [म० न+आतुडणें] स० क्रि० न स्पर्शिणें (कवितेंत).

नातू [सं० नप्तृ] पु० आपल्या पुत्राचा किं० कन्येचा पुत्र. ॐ **नातसून** स्त्री० आपल्या नातवाची पत्नी.

नातूक न० एक पक्षिविशेष.

नातें न० १ एका कुटुंबांत जन्मल्यामुळें, किं० विवाहादि संबंधामुळें, दोन माणसांचा जो परस्परांशीं संबंध तो. अशा संबंधानें जुळलेले जे लोक ते परस्परांचे नातलग. २ गुरुशिष्य, सेव्यसेवक, इ० प्रकाराचा संबंध. ३ एकाच संस्थेचे किं० एकाच

गांवचें असल्यामुळें किं० एकाच अमलदाराच्या हाताखालीं किं० राजशासनांत असल्यामुळ जो परस्परांचा संबंध तो. ❀ **नातेंगोतें, नातेंपोतें** न० कोणत्याही प्रकारचा दोन माणसांचा परस्परांशीं असलेला संबंध. **नातेदार, नातेवाईक** एका कुटुंबांतील असल्यामुळें किं० विवाहादि संबंधांमुळें जुळलेलीं जी दोन माणसें तीं परस्परांचीं. **नातलग** पु० वर अर्थ १ मध्यें पहा.

नातोंड वर ' नातवंड ' पहा.

नाथ [सं०] पु० १ स्वामी; यजमान; मालक. २ पति; नवरा. ३ रक्षक. ४ बैलाच्या नाकांतील वेसण. ५ गोसाव्यांचा एक गुरु. ❀ **नाथाचा बैल** पु० कबज्यांतील माणूस.

नाथणें [म० नाथ=वेसण] स० वेसणीनें (बैल) युक्त करणें.

नाथाळ (–ळें) वर ' नाताळ ' पहा.

नाथ [सं० नास्ति] अ० क्रि० नाहीं (कवितेंत). ❀ **नाथिला** वि० नसलेला; न झालेला (कवितेंत). [बारदान.

नांद [हिं०] स्त्री० मोठा रांजण किं० मोठें मातीचें

नाद [सं०] पु० १ आवाज; ध्वनि. २ गर्जना. ३ अनुनासिकाचें वर्तुलाकृति चिन्ह ँ असें. ४ (व्याकरण) वर्णाचा बाह्य प्रयत्नविशेष. ५ (कोणतेंही काम करण्यांत) एकनिष्ठपणा, किं० एकाग्रता, किं० तल्लीनता; उ० बोलण्याच्या नादांत मी तुमचें काम विसरून गेलों. ६ व्यसन, आसक्ति, खोडी; उ० रांडबाजीचा किं० दारुबाजीचा किं० घोडजुगारीचा नाद. टीप.–ह्या अर्थी नादांत असणें, नादीं लागणें (किं० भरणें, पडणें, लागणें, किं० लावणें), असे प्रयोग होतात. ❀ **भांड्याचा** (किं० **वाद्याचा**) **नाद जाणें** तें फुटल्या कारणानें. भिजल्याकारणानें, किं० तडकल्या कारणानें त्यांतून खणखणीत आवाज न निघतां बदबदीत आवाज निघणें. **कोणेकाला कांहीं गोष्टीचा नाद लावून ठेवणें** ती गोष्ट मी देतों किं० करतो अशी आशा दाखविणें. **कांहीं गोष्टीचा नाद जाणें** १ ती प्रकट होणें. २ तिची बदनामी होणें. **कोणेकाचा नाद जाणें** त्याची पत किं० लौकिक नष्ट होणें. **नादखोर** वि० १ कांहीं एका गोष्टीच्या नादाला लागलेला. २ कांहीं गोष्टीसाठीं कोणाचा पिच्छा पुरवून त्याला सतावणारा. ३ दुसऱ्याला आपल्या तंत्रानें चालवयास लावणारा. **नादलुब्ध** वि० वाद्यादिकांच्या नादानें म्ह० ध्वनीनें मोहित होणारा किं० आकर्षिला जाणारा (मनुष्य, हरिण, सर्प, इ०). **नादवाद** पु० ए० व० शुष्क वादविवाद. **नादब्रम्ह** न० १ भक्तजनांच्या गायनवादनाचा घोष. २ ध्वनि,–श्रोत्यांना तल्लीन करणारा किं० मोहविणारा. **नादबिंदुस्थान, नादस्थान** न० मस्तकाचा वरचा भाग.

नांदणें [सं० नंद्=आनंदित असणें] अ० क्रि० १ एकाद्या घरांत किं० गांवांत सुखांत आणि शांतेंतत स्थिरपणें असणें किं० राहणें; उ० आम्ही ह्या घरांत (किं० ह्या गांवांत) सात पिढ्या नांदत आहों. २ स्थिरपणें एकाद्या स्थानीं वसति करून राहणें. ३ टिकून राहाणें; नाश न पावणां राहाणें; दोन माणसांचा सलोखा शाबूत राहाणें; उ० त्याचें आणि आमचें नांदत नाहीं. **टीप**,–येथें भावकर्तरि प्रयोग किं० कर्ता अध्याहृत घ्यावा. ५ कबूल असणें; उ० तो आपली मुलगी त्या श्रीमंत पण अविद्य मुलाला देण्यास नांदत नाहीं; उ० हा दहा रुपयांना नांदत नाहीं. ६ सोयीचा किं० फायदेशीर किं० सुकर असणें (योजना, मसलत); उ० येथें तुमचें चहाचें दुकान नांदणार नाहीं.

नांदता [म० नांदणें] वि० १ जेथें वसति झालेली किं० केलेली आहे असें (घर, गांव, इ०). २ जी लागवडीस आलेली आहे अशी (जमीन, बाग, इ०). २ वैभवाच्या स्थितींत असलेला (धंदा, व्यापार, इ०). ३ संपन्न आणि वैभवशाली स्थितींत असलेला (सावकार, व्यापारी, पेढीवाला, इ०). ४ नवऱ्याच्या सहवासांत सुखानें राहाणारी (बायको). ५ एका घरांत किं० एका संस्थेनें न भांडतां राहाणारे (अनेक भाऊ, माणसें, इ०). ❀ **नांदतें घर** न० जेथील माणसें सुखांत आणि अकालीं न मरतां राहात आहेत असें घर. **नांदत्या घरची केरसुणी** स्त्री० जेथील माणसांपासून आपला फायदा होऊं शकेल अशा घरचीं हलकी कामें खुषीनें करणारा. **नांदती बायको** स्त्री० नवऱ्याच्या घरीं राहणारी बायको; उ० त्याला तीन बायका आहेत, दोन उठून गेल्या आणि एक नांदती आहे.

नादर [अ०] वि० कांहीं अलौकिक गुणानें श्रेष्ठ असा.

नादर स्त्री० गंजिफांच्या खेळांतील निकृष्ट शेवटील पान.

नांदरूक (–ख), **नांदरुकी** (–खी) स्त्री० उंबराच्या जातींचें एक झाड.

नादान [फा०] वि० १ न जाणणारा; अडाणी; मूर्ख. २ विशिष्ट जातींतील किं० वर्गांतील किं० समूहांतील अगदी हलक्या दर्जाचा (माणूस, पदार्थ). ❀ **नादानी**, **नादानकी** स्त्री० १ अडाणीपणा; मूर्खपणा. २ टाकाऊपणा; नालायकी.

नादार [फा०] वि० १ अकिंचन. २ विपन्न. ३ आपला स्वतःसंबंधाचा खर्च करण्यास किं० देण्यास असमर्थ.

नादावणें [म० नाद] अ० क्रि० १ व्यसनासक्त होणें. २ बदबदीत आवाजाचें होणें (भांडें, वाद्य). ३ (कांहीं रहस्य) प्रकट होणें. ४ बदकर्मानें प्रसिद्धीस येणें.

नादाळ (–ळ्या), **नादिष्ट**, **नादी** वि० १ कांहीं एका गोष्टीच्या नादास लागलेला किं० भरीं भरलेला. २ लोचटपणानें कोणेकाच्या पाठीस लागलेला.

नादाळी [म० नाद] स्त्री० १ बदलौकिक; अपकीर्ति; उ० कारायानें माझी उगीचच्या उगीच नादाळी मांडली आहे. २ व्यापारादिकांत नुकसान न व्हावें म्हणून गळ्यांत बांधतात तो तोडगा.

नांदी [सं०] स्त्री० १ नाटकाच्या आरंभीं ईश्वरस्तुतिपर, किं० तुमचें आणि आमचें कल्याण होओ अशा अर्थांचीं जीं पद्यें असतात तीं समुदायानें; मंगलाचरण; ईशस्तुति. २ भेरी ह्या नांवाचें वाद्य. ❀ **नांदीश्राद्ध**, **नांदीमुख** न० कुटुंबांत कांहीं मंगल कार्य करावयाचें असतां करतात तें श्राद्ध. **नांदीवांदी** [सं० नांदीवादिन्] पु० १ वाजंत्री. २ सूत्रधार.

नांदुरकी, **नादुरखी** स्त्री० एक वृक्षविशेष.

नाद्या [म० नाद] वि० ज्याला कांहीं गोष्टीचा नाद लागला आहे असा; नादिष्ट.

नांद्या, **नांद्याबैल** मागें ' नंदी, ' ' नंदीबैल ' पहा.

नानक पु० शीख धर्माचा संस्थापक. ह्याला ' नानकशाह ' असेंही म्हणतात. ❀ **नानकपंथी**, **नानकशाही** पु० नानकानें स्थापिलेल्या धर्माचा अनुयायी.

नाना [सं०] वि० १ अनेक. २ दोन. ❀ **नानात्व** न० अनेकपणा. **नानात्मवादी** [सं० नाना+आत्मन् +वादिन्] पु० सांख्यमताचा अनुयायी. **नानानाडें** क्रि० वि० अनेक वेळा.

नानू [म० ना] स्त्री०, न० संदेहरूप भाषण; संदिग्ध किं० अस्पष्ट भाषण. २ कचर; साशंकवृत्ति.

नापत [म० ना +पत] स्त्री० १ व्यापारांत किं० व्यवहारात कोणेकावर विश्वास ठेवण्याविषयीं जी त्याची नालायकी किं० अयोग्यता ती. २ बेआबरू; बदनामी. वि० ज्याच्यावर भरंवसा ठेवितां येत नाहीं असा; भरंवशाला अपात्र (मनुष्य).

नापसंत (–द) [फा०] वि० पसंत नव्हे तो; अमान्य.

नापाक [फा०] वि० १ अपवित्र. २ निषिद्ध. ३ घाणेरडा; मळलेला.

नापातेरा पु० बेआबरू; बदलौकिक.

नापिकल [म० ना +पिकल] न० पर्जन्यादिकाच्या अभावामुळें धान्यादि न पिकणें किं० न उत्पन्न होणें, किं० त्यामुळें होते ती खराबी.

नापित, **नापिक** [सं० नापित=न्हावी] पु० न्हावी; हजाम.

नापीक [म० ना+पिकणें] न० शेतांत धान्य न पिकणें.

नापूस [म० ना+पुसणें (विचारणें)] स्त्री० १ बेआबरू. २ कोणी आपली चौकशी करीत नाहीं अशी स्थिति; कोपऱ्यांत पडून राहण्याची स्थिति.

नापेर [म० ना +पेरणें] न०, स्त्री० १ ज्यांत धान्यादि पेरलें नाहीं असें शेत. २ शेतांत धान्यादि न पेरणें. टीप,–**नापेरा** पु०, **नापेरी** स्त्री० हेही शब्द ह्या दुसऱ्या अर्थी योजले जातात.

नाफरमानी [फा० नाफर्मान्] वि० जांभळ्या रंगाचा.

नावद स्त्री०, नावदा पु० विकावयासाठीं ठेविलेलीं उंसाचीं कांडकीं प्रत्येक किं० गंडेऱ्या प्रत्येक.

नावद [फा० नबात् + शुक्] **स्त्री०** एक प्रकारची पिठी साखर. हिला ‘ नावद साखर ’ असेंही म्हणतात.

नावर, नाबर [फा० नाबर्] **वि०** असमर्थ. **टीप**,–याचा प्रयोग निषेधार्थींच होतो; उ० तो तिमजली घर बांधावयाला नाबर नाहीं.

नाबूद [फा० नाबूद=न झाला; नव्हता] **वि०** १ अस्तित्वांत नसलेला. २ अस्तित्वांतून गेलेला; नष्ट किं० लुप्त झालेला; नाश पावलेला; विध्वस्त; उ० हरचरीहून लिमयांचें कुटुंब नाबूद झालें; उ० शेत नाबूद झालें; उ० गडी गेला तो कोणीकडे नाबूद झाला कोण जाणें. **क्रि० वि०** ठार, अजीबात, साफ (बुडणें, मरणें, इ०); उ० आत्मारामपंतांचें शेत थंदा नाबूद बुडालें. ❀ **नेस्तनाबूद** [फा० नेस्त=हल्लीं नाहीं; नाबूद= पूर्वीं नव्हतें] **वि०** ज्याचा मागमूस बिलकूल राहिलेला नाहीं असें; उ० नादिरशहानें गावेंचीं गांवें नेस्तनाबूद करून टाकिलीं.

नाभा पु०, नाभ स्त्री० [सं० नाभि] १ गाडीच्या चाकाचा तुंबा. २ कस्तूरीमृगाच्या कस्तूरीची पिशवी.

नाभि [सं०] **पु०, स्त्री०** १ बेंबी. २ चाकाचा तुंबा. ३ पुढारी; अग्रणी; मुख्य. ४ कस्तूरीमृग. ❀ **नाभिज, नाभिजन्मा, नाभिसंभव पु०** ब्रम्हदेव. **नाभिकमल न०** बेंबी. **नाभिकर्तन, नाभिवर्धन न०** नाळ कापणें.

नाभिकार [म० न+भी+कार] **पु०** भिऊं नको असें आश्वासन (कवितेंत).

नाम [सं० नामन्] **न०** १ नांव. २ (**व्याकरण**) पदार्थाच्या नांवाचा वाचक जो शब्द तो. ३ कपाळावर गंध उठवावयाचा धातूचा छाप. ४ घोडा, कुत्रा, इ० च्या कपाळावरची उभी लांबोडी रेषा. ❀ **नामानुशासन न०, नाममाला स्त्री०** शब्दकोश. **नामकरण, नामकर्म न०** नांव ठेवण्याचा विधि. **नामधारक, नामधारी वि०** केवळ; नांवाचा मात्र; उ० नामधारी राजा म्ह० केवळ राजा ही पदवी असलेला पण राजाचें कर्तव्य न करणारा राजा. **नाममुद्रा स्त्री०** मोहोरेची अंगठी. **नामशेष वि०** नष्ट; मृत. **नामघोष पु०** देवादिकांच्या नांवांचा जयजयकार. **नामजात (–द) वि०** १ ज्याला नांव ठेवण्यांत आलें आहे असा. २ प्रख्यात. **नामजोग वि०** घेणाऱ्याच्या नांवाचा निर्देश करणारी (हुंडी). **नामदार वि०** १ प्रख्यात. २ सरकारनें दिलेली एक विशिष्ट पदवी ज्याला आहे असा. **नामदेव पु०** ह्या नांवाचा एक शिंपी साधु होऊन गेला तो, किं० त्याच्या जातीचा कोणीही इसम. **नामधारक वि०** १ वर ‘ नामधारक ’ पहा. २ ईश्वराच्या नांवाचा केवळ जप केल्यानें मोक्ष मिळतो असें मत ज्याचें तो. **नामधेय न०** नांव. **नामना स्त्री०** प्रसिद्धि; प्रख्याति; कीर्ति. **नामनिर्देश पु०** पदार्थाचें नांव घेऊन त्याचा केलेला निर्देश म्ह० कथन. **नामरूप न०** नांव आणि रूप. **नामरूपातीत वि०** १ परमेश्वर,–ज्याचें नांव आणि रूप मनुष्याच्या बुद्धीला यथार्थ समजणें शक्य नाहीं. २ कोपऱ्यांत पडलेला; चारचौघांस ठाऊक नसलेला; ज्याचा बदलौकिक झाला आहे आणि ज्याचा सहवास लोक टाळतात असा. **नामवाच्य (व्याकरण) पु०** तृतीय पुरुष. **नामविधान न०** मुलाचें नांव ठेवण्याचा विधि. **नामसंकीर्तन न०** ईश्वराच्या नांवाचा घोष किं० जयजयकार. **नामस्मरण न०** देवाचें नांव मनांत घेणें. **नामांकित वि०** प्रख्यात; प्रसिद्ध. **नामाभिधान न०** १ नांव. २ नांव, गांव, इ० माहिती. **नामावलि स्त्री०** शिव, विष्णु, इ० चीं नांवें अनुक्रमानें किं० समुच्चयानें. **नामावळी, नामावळ स्त्री०** १ नांवांची यादी. २ एक प्रकारचें लुगडें.

नामबुरदा [फा० नाम्=नांव; बुरदन्=धारण करणें, वाहाणें] **वि०** वर सांगितलेला; उपरिनिर्दिष्ट.

नामर्द [फा०] **वि०** १ अशक्त; बद्ध; पराक्रमशून्य. २ भित्रा. **नामर्दी स्त्री०** १ बद्धपणा. २ भित्रपणा. ३ नपुंसकपणा.

नामा [सं० नामन्=नांव] **वि०** हें विशिष्ट नांव धारण करणारा; उ० पुंडरीकनामा एक मुलगा. **टीप**,–पुंडरीक हें आहे नांव ज्याचें असा.

नामी [सं० नामन्] वि० उत्तम; उत्कृष्ट.

नामोश (–स) पु०, स्त्री०, **नामोशी** स्त्री० [अ० नामूस्] बदलौकिक; अपकीर्ति; बेआबरू; कालिमा; कलंक (येणें, होणें).

नाम्या [म०'नाम'तृतीयार्थ] वि० ज्याच्या कपाळावर गंध लाविल्यासारखा पांढरा पट्टा आहे असा (घोडा, कुतरा, इ०).

नाय स्त्री० एक वनस्पति. ॐ नाय निरगुड, माका आणि सर्व औषधाचा काका किं०नाय, निरगूड, माका ह्या तिहाचा घेइजे फाका आणि उड जाय लंका ह्या तीन वनस्पतींच्या चूर्णाची एक चिमटी तोंडांत टाकली असतां लंकेकडे उडून जाण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें ह्या तीन वनस्पति अपूर्व तेज, वीर्य, आणि सामर्थ्य देणाऱ्या आहेत.

नायक [सं०] पु० १ पुढारी; अग्रणी. २ मुख्य; स्वामी. ३ सेनापति. ४ (साहित्य) पति; उपपति. ५ मुख्य पुरुषपात्र (नाटक, कादंबरी, गोष्ट, इ० मधील). ६ माळेतील पदक. **नायिका** स्त्री० १ पत्नी; उपपत्नी. २ नाटक, गोष्ट, कादंबरी, इ० तील मुख्य स्त्रीपात्र. ॐ **ग्रामनायक** पु० गांवाचा पुढारी. **नक्षत्रनायक** पु० चंद्र. **नायकडा** पु० महार जातांतील मुख्य किं० पुढारी. **नायकवडा** पु० रामोशी, बेरड, किं० महार, ह्या जातांतील पुढारी. **नायकी** स्त्री० नायकाचा हुद्दा, अधिकार, किं० कार्यक्षेत्र. **नायकी कानडा** पु० कानडा रागाचा एक प्रकार (गायनांत). **नायकीण** स्त्री० १ नायकाची बायको. २ एकाद्या संस्थेची मुख्य किं० चालक स्त्री. ३ नाचण्याचा धंदा करणारी पोरगी; कळवंतीण.

नायटा पु० चरत जाणारा एक त्वचेचा [विकार.

नायब, नाइब [अ० नायब्] पु०मुख्याच्या हाताखालचा अधिकारी.

नायरी [म० ना किं० नाहीं] स्त्री० सतत चालू ठेविलेला नकार; एकसारखें नाहीं म्हणण्याची क्रिया.

नार [सं० नारी] स्त्री०नारी, स्त्री(कवितेंत).

नार पु० १ जून वृक्षाचा कठिण आणि टणक असा गाभा. २ कोणत्याही पदार्थाचा सारभूत अंश किं० भाग.

नारक, नारकी, नारकीय [सं० नारक] वि० नरकांतील किं० नरकासंबंधाचा.

नारकत स्त्री० पानवेलीचीं पानें कापावयाची बाकदार सुरी.

नारकस न० छप्परबंधाचें एक आउत.

नारंग, नारंगी स्त्री० [सं० नारंग] एक फळझाड. नारिंग, नारिंगी, हेही शब्द ह्याच अर्थाचे आहेत.

नारंजी [फा०] वि० नारिंगाच्या रंगाचा.

नारद [सं०] पु० एक ब्रह्मर्षिविशेष.ह्याचें तीन्ही लोकीं गमन होत असे. हा कलहप्रिय असे.

नारद पु० काताऱ्याचें यंत्र. हें चोकटाच्या रूपाचें असून कातावयाच्या लाकडाला बहुधा कसणीनें वाटोळी गति दिली जाते.

नारसिंह मागें ' नर ' मध्यें ' नरसिंह 'पहा.

नारळ [सं० पु० नारिकेल, नारिकेर] पु० १ माडाच्या झाडास येतें तें फळ. २ मनुष्याचें डोकें (तिरस्कारांत). **नारळी** स्त्री० माडाचें म्ह० नारळाचें झाड. ॐ **कोणेकाला नारळ देणें** किं० **कोणकाच्या हातीं नारळ देणें** १ त्याला कामावरून काढून टाकणें. २ त्याच्या कामाची समाप्ति झाल्याकारणानें त्याला निरोप देणें. **नारळकाकडें** न०नारळ इ०फळें. **नारळाची आई** स्त्री०१ करवंटी; नरोटी. २ भिक्षापात्र (निंदेंत). **नारळी** स्त्री० १माडाचें झाड. २बारदान म्हणून योजावयाची करवंटी. **नारळीपदर** पु० नारळाच्या आकृति ज्यावर विणल्या आहेत असा पागोटें इ० चा पदर. **कोणेकाला नारळीपदरी पशाख देणें** सन्मानार्थ त्याला वस्त्र न देतां केवळ नारळावर त्याची संभावना करणें. **नारळी पौर्णिमा, नारळी पुनव** स्त्री० श्रावण महिन्याची पौर्णिमा. ह्या दिवशीं समुद्रांत मोठ्या समारंभानें नारळ टाकतात, आणि गलबतें, होड्या, इ० जलयानें जीं पावसाळ्यांत बंद असतात तीं चालू करण्यांत येतात. **नारळेल** न० नारळाचें ओलें खोबरें ठेचून आणि कढवून काढतात तें औषधी तेल.

नारा [सं० ' नारी ' चें म० पुल्लिंगी रूप] पु० स्त्रीवेष घेऊनः नाचणारा पोऱ्या. ॐ **कोणे-**

काचा नाराचाचणें त्याची अपकीर्ति होणें. नारा नाचाविणें वेडेवेडे चाळे करणें, अनियंत्रितपणें किं० ताळतंत्र तोडून भलभलतीं कृत्यें करणें. टीप,–वरील दोन्ही वाक्प्रचारांत ' नारे ' असा अ० व० प्रयोग बहुधा होतो. मी आणि माझा नारा दुसऱ्याचा नलगे वारा पाहुणचार किं० आदरातिथ्य न करणारें पतिपत्नीचें जोडपें; एकलकोंडें जोडपें; समाजांत न मिसळतां एकमेकांसंगें राहणारीं नवरा आणि बायको.

नाराजी [फा०] स्त्री० असंतुष्टपणा; नाखुषी.

नारायण [सं०] पु० १ विष्णु. २ रुपाया, पैसा, इ० नाणें (संन्यासी हा शब्द योजतात). टीप,–धाकटा नारायण म्ह० पैसा; थोरला नारायण म्ह० रुपाया. ३नारू हा प्राणी जो माणसाच्या अंगांत उत्पन्न होतो आणि जो सुतळीसारखा लांब असतो तो (थट्टेंत). 'नारोपंत' हाही शब्द असाच योजतात **नारायण तेल** न० एक औषधी तेल. **नारायणबलि** स्त्री० १ मुताखेतांच्या शांतीसाठीं करावयाचा एक विधि. २ संन्याशांच्या मरणानंतर तेराव्या दिवशीं विष्णूच्या प्रीत्यर्थ करावयाचा एक विधि. टीप,–' नारायण ' चें तोकडें रूप ' नारो '. ' **नारोशंकरी घंटा** स्त्री० खणखणीत आवाजानें बोलणें किं० बोलणारा माणूस.

नारावारा पु० १कामाची निष्काळजीपणानें किं० घाईघाईनें विल्हेवाट लावून टाकणें.२उडवाउडवीचीं उत्तरें देणें.३कांहीं रहस्याचा बोभाटा(होणें,करणें).

नारिकेल पु० **नारिकेली** स्त्री० [सं० नारिकेर, नारिकेल] नारळाचें झाड; माड. **नारिकेल** न० नारळ.

नारिंग [सं० नारंग, नार्यंग] न० एक लिंबाच्या जातीचें मधुर फळ. **नारिंग, नारिंगी** स्त्री० त्या फळाचें झाड.

नारी [सं०] स्त्री० १कोणीही स्त्री.२पत्नी.

नारींव [म०नार] वि० गाभ्याचें (लाकूड).

नारुकार [म० ना + रुकार] पु० असंमति, अमान्यता (देणें).

नारू [हिं०] पु० सुतळीसारखा एक लांब जंतु,–जो हात, पाय, इ० मध्यें उत्पन्न होतो.

नारू पु० गांवचे अलुते किं० अलुतेदार जे ते प्रत्येक. ❀ **नारूकारू** पु० अ० व० गांवचे अलुतेबलुते.

नाल [अ०] पु० घोड्याच्या खुरांस बसवितात ते लोखंडाचे अर्धचंद्राकार तुकडे प्रत्येक. ❀ **नालकरी, नालबंद** पु० घोड्याच्या पायांना नाल ठोकणारा इसम. **नालदबा** पु० चार नालांचा संच. **नालबंदी** स्त्री० १ घोडे इ० च्या पायांस नाल बसविणें. २ (लाक्षणिक) तंग, तोबरा, नाल, इ० बाबतींत सर्व सिद्धता करून स्वारीस निघण्याची तयारी. ३ शागीर्द इ० लोकांच्या दरमहाच्या पगारांतील दर महिन्यास कांहीं भाग ठेवून देतात आणि साल अखेर सर्व बाकी देऊन टाकतात ती. ४ घोडेस्वार नेमल्यावर किं० स्वारीवर पाठवितांना त्याला आगाऊ जे किरकोळ खर्चाकरतां पैसे देतात ते. **नालमेख** स्त्री० १ घोड्याच्या पायाचा नाल ठोकण्याचा खिळा. २ नाल ठोकण्याला जरूर तीं हत्यारें समुच्चयानें. **नालसाहेब** पु० मोहोरमाच्या सणांत काठीच्या टोकाला नाल ठोकून ती काठी मिरविणारा इसम.

नाल स्त्री० पखवाजाचा सांगाडा.

नाल [सं०] पु० १ पाण्याचा नाला.२पाट. न० १ पोकळ देठ. २ कांडें. ३ मुलाच्या बेंबीला चिकटलेली मातेच्या गर्भाशयाची नळी; नाळ.

नाल पु० १ विटीदांडूच्या खेळांत विटीला मारतात तो टोला. २ वात्रट किं० लफंगा माणूस.

नालदस्ती स्त्री० ' नालिस्त ' पहा.

नाला [सं० नाल] पु०१शहरांतील सांडपाणी वाहून नेणारा पाट. २ पाण्याचा लहान ओहोळ.

नालिश, नालिस्त, नालिस्ती, नालस्त, नालस्ती, नालदस्ती [फा० नालिष्] स्त्री० १ कोणेकाविरुद्ध केलेली तकरार. २ कोणेकाची निंदा किं० बदनामी (करणें, सांगणें). ३ कोणेकाचा उणेपणा.

नांव स्त्री० दोन तीन सुताडें किं० झोळे एकत्र शिवून बसावयासाठीं करतात ती बैठक.

नाव [सं० नौ] स्त्री० पाण्यावर इकडून तिकडे माणसें, माल, इ० न्यावयाचें साधन; होडी. ❀ **एका नावेंत असणें** सारख्याच सुख-

दुःखस्थितींत किं० परिस्थितींत असणें. **नावकरी, नावेकरी** पु० नावाडी.

नांव [सं० नामन्] न० १ पदार्थमात्राचा निर्देश करावयाचा असतां त्याच्या संबंधानें योजतात तो शब्द. २ कोणत्याही वस्तूचा वाचक जो शब्द तो. ३ (पदार्थाचें) अत्यल्प परिमाण (अकरणरूपी प्रयोग); उ० ह्या बरणींत मधाचें नांव नाहीं. ४ कीर्ति; लौकिक (चांगल्या अर्थानें); उ० नांव मिळविणें; नांव करणें, इ०. ५ वाईट नांव; निंदा; एकाद्या वस्तूला नांव ठेविणें म्ह० तिची निंदा करणें; तिच्यांत उणेपणा किं० दोष दाखवून देणें; तिच्यावर टपका ठेवणें. ❀ **नांव मिळविणें** कीर्ति किं० लौकिक संपादणें. **नांव ठेवणें** निंदिणें; निर्भर्सिणें. **एकाद्याच्या नांवावर पाणी घालणें** त्याचा बदलौकिक करणें; त्याच्या कीर्तीला काळिमा लावणें किं० आणणें. **एकाद्याच्या नांवानें (किं० नांवावर) विकणें** त्याच्या संबंधाचा किं० त्याचा आश्रित म्हणून आदरास पात्र होणें (लायकी नसतां). **त्याचें नांव जळो, त्याचें नांव बुडो, त्याच्या नांवास हळद लागो** त्याचें निसंतान होओ, त्याला आग लागो; **टीप,**–तिरस्कार, द्वेष, वैर, इ० भावना व्यक्त करतांना असा उद्गार काढतात. **त्याचें नांव नको** १ (त्या पदार्थाचें) अत्यल्प प्रमाण देखील नाहीं; (तो पदार्थ) मुळींच नाहीं. २ त्याची गोष्ट माझ्यापुढें काढूं नका. **एकाद्या माणसाचें (किं० पदार्थाचें) नांव न घेणें** त्याच्या वाटेस न जाणें; त्याच्याशीं बिलकूल संबंध न ठेवणें. **एकाद्या मनुष्याचें (किं० पदार्थाचें) नांव टाकणें** (किं० सोडणें) त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवणें; त्याच्याशीं बोलणें, चालणें, किं० कोणत्याही प्रकारचा व्यवहार न करणें; त्याच्यांशीं संबंध अजीबाद वर्ज करणें; उ० माझें तोंड आल्यापासून मी मेतकुटाचें नांव सोडलें; उ० कासोबा दारोड्या आहे असें माझ्या कानावर येतांच मी त्याचें नांव टाकलें ! **एकाद्याच्या नांवानें बोंब मारणें** (किं० **शंख करणें**) त्याला उघडपणें दोष देणें (मग तसें करणें सकारण असो किं० नसो). **एकाद्या वस्तूचें नांव देखील न राहणें** (किं० **न उरणें**) ती अत्यल्प प्रमाणांत सुद्धा शिलक राहिलेली नसणें. **एकाद्याच्या नांवानें** (किं० **नांवें**) जळणें त्याच्या वर रागावणें किं० चरफडणें. **नांवास चढणें** लौकिक किं० कीर्ति संपादणें. **नांवाला नसणें** किं० **नांवाला देखील नसणें** अगदीं सुद्धां नसणें; अगदीं अल्प प्रमाणांतही नसणें; उ० ह्या पंचपाळ्यांत नांवाला देखील हळद नाहीं. **ज्याचें नांव तें** अगदीं देखील; मुळींच. **टीप,**–याचा नेहमीं अकरणरूपी प्रयोग होतो; उ० तुमचा सदवाजी ज्याचें नांव तें कांहीं काम करीत नाहीं. **नांव धुळींत(किं० मातींत) घालणें** आबरू गमावून घेणें; दुर्लौकिक करून घेणें. **एकाद्याच्या नांवानें पाणी तापवणें** १ त्याचें मरण किं० नुकसान चिंतीत किं० इच्छींत बसणें. २ त्याचा सर्वस्वी घात करावयास उठणें. **टीप,**–प्रेत घरांतून बाहेर काढावयाच्या पूर्वी त्याचेवर ऊन्ह पाणी ओतीत असतात या चालीवरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. **नांवानें शंख, नांवानें पूज्य,** किं० **नांवानें आंवळयाएवढें** अत्यन्त अभाव; बिलकूल कांहीं नाहीं अशी स्थिति; उ० ह्या निबंधांत नव्या माहितीच्या नांवानें शंख आहे (म्ह० नवी माहिती मुळींच कांहीं नाहीं). **नांवारूपाला येणें** मानमान्यतेच्या पदाला. **नावगांव** न० ए० व० ठाव ठिकाण. **नांवानिराळा** अगदीं अलिप्त; उ० ही चंद्रिकाबाई शेजारणींत कळागतीं लावून देऊन पुन्हा आपली नांवानिराळी! **नांवाचा** वि० नुसता; नांवापुरता; वास्तविक रीत्या नव्हे तो; उ० तो नांवाचा बादशहा होता, खरी सत्ता वजीराच्या हातीं होती. **नांवकरी** वि० १ प्रख्यात; नामांकित. २ त्याच नांवाचा. **नांवनष्ट** [म० नांव+नष्ट] वि० १ साफ बुडालेला; समूळ नष्ट झालेला किं० लोपलेला. २ ज्याचा थांग किं० पत्ता नाहीं असा; उ० त्याची गाय गुराख्यानें नांवनष्ट केली. **नांवनिशाण** न० तपशिलवार माहिती. **नांवनिशी** स्त्री० नांवांची यादी. **नांवनिशीवार** क्रि० वि० नांवाप्रमाणें; नांवांच्या अनुक्रमानें. **नांवनेम** पु० ए० व० राशि, गण, नक्षत्र, इ० माहिती मनुष्याच्या नांवावरून काढणें. **नांवरूप** न० ए० व० १ कीर्ति; लौकिक; नांव लौकिक; उ० माझा मुलगा नांवारूपास चढलेला मी केंव्हा पाहीन असें मला झालें आहे. २ स्वताचें स्वतंत्र अस्तित्व; व्यक्तित्व.

नांवानिराळा वि० कांहीं वाईट गोष्टीचा टपका न घेणारा, किं० चुकवूं पाहणारा, किं०त्याच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें म्हणणारा किं० दाखविणारा; उ०गांव जळाला मारुतं गांवानिराळा.

नांवमकी स्त्री० प्रसिद्धि;प्रख्याति. **नांवसत** वि० प्रख्यात (चांगल्या किं० वाईट अर्थी).

नावलि, नावली [सं० न+आवलि (पंक्ति)] स्त्री० एकसारखें ' नाहीं ' असें म्हणत राहणें; कोणाचें कोणतेंही काम मी करीत नाहीं किं० करणार नाहीं किं०माझ्यानें होणार नाहीं असें म्हणणें.

नांवांजणी. नांवांजणूक [म० नांवांजणें] स्त्री० स्तुति; प्रशंसा; तारीफ.

नांवाजणें [म० नांव] स० क्रि० स्तविणें; प्रशंसणें; ०ची तारीफ करणें.

नावाडी (–ड्या) [सं० नौ; म० नाव] १ होडी किं० नाव चालविणारा. २ हाडी इ० जलयानानें उतारू, माल,इ० जलमार्गानें नेणारा.

नाविक [सं०] पु० १ सुकाणूवाला. २ खलाशी ꠱ **नाविकशिल्प** न० होड्या, गलबतें, इ० बांधण्याची कला.

नावेक क्रि० वि० अगदीं थोडा वेळ; क्षणमात्र (कविनें). [' नाव ' पहा.

नावेकरी [म० नाव] पु० नावाडी. मागें

नाव्य [सं०] वि० होडी, गलबत, इ० जलयानांनीं ओलांडतां येईल अशी(नदी,खाडी,इ०). ꠱ **नाव्य नदी** स्त्री० होडीनें किं० गलबतानें तरून जातां येईल अशी नदी.

नाव्हगंड, न्हावगंड [म० न्हावी] पु० न्हावी (तुच्छतेनें).

नाश [सं०] पु० १ विध्वंस. २ नाहींसें होणें. ३ नासाडी. ४ बिघाड; अव्यवस्था. ꠱ **नाशवंत** वि० नश्वर; अल्पकाळमात्र टिकणारें; उ० राजकृपा नाशवंत वस्तु आहे. **नाशवेळ** स्त्री० १ अपशकुनाचा काळ किं० समय. २ मरण, नुकसान, इ० होण्याचा काळ किं० समय. **नाशा**,**नाश्या** वि० १खोडकर; व्रात्य.२पदार्थांची नासाडी करण्याचा स्वभाव ज्याचा असा (मुलगा, माणूस, पशु).

नाशक [सं०] वि० १ विध्वंसक. २नाहींसा करणारा;उ०कृमिनाशक;वडेकृत कफनाशक गोळी.

नाशकत [म० ना+ सं० शक्ति] वि० अशक्त; कमजोर.

नाशणें, नाशिणें [सं० नाश] स० क्रि० १ विध्वंसिणें. २ बिघडविणें.

नाशह [फा० नाशह] पु० बुद्धिबळांच्या खेळांत प्रतिपक्ष्याच्या राजाला पेचांत घातलें असतां त्या राजाची त्या पेचांतून सुटका (करणें). आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक लेखांक ५५८ पहा.

नाशिक न० १ गोदावरीच्या कांठचे एक शहर; हें प्रसिद्ध क्षेत्र आहे. २ (वर्णसाम्यावरून थट्टेंत) नाक. ꠱ **कोणेकाचा नाशिक परगणा ओसाड असणें** (किं० **पडणें**), किं० **कोणेकाचें नाशिक त्रिंबकास जाणें** त्याचें नाक बसकें किं०चपटें किं०अपरें असणें;तो नकटा असणें. नाशिकपासून त्रिंबक सुमारें वीस मैलांवर असून तेथेंच गोदावरीचा उगम झाला आहे. **नाशिकची कल्हई** (किं० **जिल्हई**) स्त्री० अल्पकाल टिकणारी चकाकी किं० तकतकी.

नास [सं० नाश] पु० १ विध्वंस. २खराबी; बिघडवणूक. ३ व्यापारादिकांत ठोकर किं० नुकसान. ꠱ **नासधूस, नासतूस, नासघोस, नासधूळ** स्त्री० नासाडी; विध्वंस.

नासका [म० नासणें] वि० १ नासलेला; कुजलेला; सडलेला; किडलेला; बिघडलेला; दुर्गंधी येऊं लागलेला. २ कलुषित किं० मत्सरी दृष्टीनें वस्तूकडे पाहून बनलेला (विचार, अभिप्राय, इ०) किं० अशा दृष्टीनें पाहाणारें (मन, बुद्धि, मेंदू, इ०). ३ लवकर खराब होणारा; अल्पकारणानें सडणारा किं० कुजणारा. ꠱ **नासका कुजका, नासका विडका** वि० अत्यन्त नासका. **नासकें केणें** न० १ लवकर नासूं किं० सडूं लागेल असा पदार्थ (आंबा, पालेभाजी, इ०). २ सडलेली किं० कुजलेली वस्तु. ३ भिकार, दरिद्री, कुचकिमतीची, किं० कुचलायकीची वस्तु (घोडें, गाय, माणूस, इ०).

नासणें [सं० नश्] स० क्रि० खराब करणें; बिघडविणें; विध्वंसिणें; अव्यवस्थित करणें. अ० क्रि० सडणें; कुजणें; खराब होणें.

नासपात [फा० नाशपाती=संत्रा] **स्त्री०** लिंबाच्या जातीचें एक फळ.

नासमज, नासमजदारी [म० ना+समज, फा० दारी] **स्त्री०** बुद्धीचें मांद्य; समजुतदारपणाचा अभाव; अडाणीपणा.

नासमजूत [म० ना+समजूत] **स्त्री०** १ बुद्धीचें मांद्य. २ असंतुष्टपणा; अतृप्ति; असमाधानीपणा.

नासरा [म० नासणें] **वि०** १ नासलेला. २ लवकर नासणें किं० बिघडेल असा. ३ वस्तूची मोडतोड करणारें (दांडगें पोर).

नासरी स्त्री० अर्धी दमडी इतक्या किंमतीचें एक नाणें.

नासवणी [म० नासकें+पाणी] **न०** १ पिकांची नासाडी करणारा पाऊस. २ ढवळलेलें, गढूळ केलेलें, किं० नासलेलें पाणी.

नासवीट पु० नासाडी; विध्वंस.

नासा [सं०] **स्त्री०** १ नाक. २ दाराच्या चौकटीचें वरचें लांकूड. ꣸ **नासाग्र न०** नाकाचें टोक. **नासाग्रीं दृष्टि ठेवणें** योगसाधनविधींत नाकाच्या टोकावर दृष्टि लावण्याची क्रिया. **नासापुट, नासारंध्र न०** नाकपुडी. **नासार्श पु०** नाकांत होतो तो एक रोगविशेष. **नासावंश पु०** नाकाचा कपाळालगतचा भाग. **नासाशोष पु०** नाक कोरडें पडणें हा विकार किं०रोग. **नासाव्रण पु०** नाकाचा एक रोग.

नासाड, नासाडी स्त्री०, नासाडा पु० [म० नास; सं०नाश]पदार्थाची दुर्दशा किं०विध्वंस किं० खराबी. **नासाडया वि०** विध्वंसक; नासाडी करणारा.

नासावणें [म० नास] **अ० क्रि०** पूर्ण वाढ न होतां स्त्रीचा गर्भ पडणें; पूर्ण मुदत भरावयाच्या अगोदर (स्त्रीनें) प्रसूत होणें.

नासिका, नासिक [सं० नासिक] **स्त्री०** नाक. ꣸ **नासिकाचूर्ण न०** १ तपकीर. २ नाकांत ओढून घ्यावयाचें कांणतेंही औषध.

नासूर [अ०] **पु०** नाक आणि डोळे यांना होतो तो एक रोग.

नास्ति, नास्त [सं० न+अस्ति=नाहीं] **पु०** नाहीं असें म्हणणें;अभाव. ꣸ **नास्त भाकणें** १ गरीबीचें ढोंग करणें; जवळ पैसा असून दारिद्र्याची रड गाणें. २ अनर्थाचें किं० अशुभाचें भाकित करणें. **नास्तभाक्या वि०** १ आपण दरिद्री आहों असें भासविणारा. २ वाईट भाकितें करण्याच्या स्वभावाचा. **नास्तिनष्टे विचारः** [सं०] **पु०** सर्व नाश होऊन गेल्यावर सुचलेला विचार; नाश व्हावयाचा तो झाल्यावर सुचलेली युक्ति,–जिचा कांहीं उपयोग होऊं शकत नाहीं. **नास्तिपक्ष पु०** १ जरूर अशा पदार्थाचा अभाव. २ विरुद्ध मत, बाजू, किं०पक्ष. २ अमुक वस्तु अमुक स्वरूपाची नाहीं असें म्हणणें किं० असें विधान. ३ इतर सर्व इलाज निरुपयोगी ठरले आणि आतां अमुक इलाज केल्याशिवाय गत्यन्तर नाहीं अशी स्थिति; नाइलाजाची किं० निरुपायाची स्थिति.

नास्तिक [सं०] **पु०** देवाचें अस्तित्व न मानणारा; परलोक न मानणारा. ꣸ **नास्तिकवाद पु०** पाखंडी मत. **नास्तिकवादी पु०** ईश्वर नाहीं आणि परलोक नाहीं अशा मताचा माणूस. **नास्तिक्य न०** नास्तिकपणा.

नाहक, नाहक्क, नाहाक [फा०] **क्रि० वि०** १ विनाकारण; उगीचच्या उगीच. २ अन्यायानें.

नाहडणें, नाहाडणें [म० नाडणें] **स० क्रि०** (कोणेकाळा) लुटणें किं०लुबाडणें. **अ० क्रि०** लुटलें किं० लुबाडलें जाणें.

नाहडा [म० नाहडणें] **पु०** १ नाश; लुटलें जाणें; नुकसानी. २ लुबाडलें गेल्यामुळें आलेली विपन्नावस्था.

नाहण, नाहणणें, नाहणमाखण, इ० मागें ' नहाण, ' ' नहाणणें, ' ' नहाणमाखण, ' इ० पहा.

नाहबी स्त्री० हानि; नुकसान; ठोकर.

नाहवी, नाहावी, न्हावी पु० हजाम; नापित.

नाहाक मागें ' नाहक ' पहा.

नाहाडणें इ० मागें ' नाहडणें ' इ० पहा.

नाहाब पु०, नाहाबी स्त्री० हानि; नुकसान; ठोकर.

नाहीं [सं० न+अस्ति; प्राकृत न + अथी (आहे)] अनियमित अपूर्ण अकर्मक धातु.

याचीं फक्त वर्तमान काळचीं रूपें होतात. अविद्यमानता, अनुपस्थिति, अभाव, इ० अर्थ हें क्रियापद दाखवितें. ꣸ न हींसा होणें नष्ट होणें; लोपणें; संपणें. नाहीं तेंच वि० भलतेंच; मूर्खासारखें. नाहीं पक्षीं क्रि० वि० १ दुसऱ्या पक्षीं; तें शक्य नसल्यास. २ किमानपक्षीं.

नाहू, न्हाऊ पु० न्हावी; नापित; हजाम. ꣸ पक्ष्यांत कावळा माणसांत नाहू १ पक्ष्यांत कावळा नीच तसा माणसांत न्हावी. २ पक्ष्यांत कावळा कावेबाज किं० धूर्त तसा माणसांत न्हावी.

नाळ [सं० नाल] न० १ कमळाचा देठ. २ गर्भाशयाशीं गर्भस्थ मुलाला जोडणारी नळी.

नाळ स्त्री० १ गलबताचा अग्रभाग. २ घोडा इ० च्या पाठीच्या संबंधाचें क्षत. असें क्षत ज्याच्या पाठीवर झालें आहे त्या पशूला 'नाळी,' 'नाळ्या,' 'नाळपठ्या' म्हणतात. ३ तोफ. पु०, स्त्री० १ पखवाजाचा सांगाडा. २ जात्यांला दळतांना चिकटून बसतें तें पीठ; उ० नाळ मोडल्याशिवाय पीठ गळणार नाहीं. स्त्री० १ दोन डोंगरांमधील अरुंद पायवाट. २ भुयार किं० भुयाराचा मार्ग. ३ पाण्याच्या प्रवाहानें जमीनींत पडलेला चर. ३ जुनीं फुटकीं तुटकीं भांडीं. ꣸ नाळीवर पडणें (किं० लागणें) मर्माला लागणें.

नाळकें न० १ धातूच्या पात्राला पडलेलें मोठें भोक. २ पायाची नळी,—गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचें हाड. ३ गुडघा, कोपर, इ० शरीराच्या कोपऱ्याचें हाड किं० हाडाचा कोपरा.

नाळगूत, नाळगूद न० बेंबीपासून उरापर्यंत सूज ज्यांत येते असा एक रोग. मागें 'नळगूद' पहा.

नाळचें न० लहान तोंडाच्या पात्रांत कांहीं पदार्थ ओतावयाचें साधनविशेष; नरसाळें. याचें तोंड पसरट असून खालीं नळी असते.

नाळीक [म० नाळकें] न० जुनें फुटकें तुटकें मोडकें आणि पोचे आलेलें धातूचें भांडें व्यक्तिशः किं० अशीं भांडीं समुच्चयानें.

नाक्षत्र [सं०] वि० नक्षत्रासंबंधाची. पु० ज्योतिषी. न० साठ घटकांचा दिवस, किं० अशा तीस दिवसांचा महिना. ꣸ नाक्षत्रिक वि० नक्षत्रासंबंधाचा.

नि [सं०] उपसर्ग याचे संस्कृतांत अनेक अर्थ आहेत; १ खालीं; उ० निषण्ण म्ह० खालीं बसलेला. २ अतिशय; उ० निकाम म्ह०फार किं० अतिशयत्वानें. ३ आज्ञा; निदेश म्ह० आज्ञा. ४ इजा; उ० निकृति म्ह०उपद्रव, अपकार; इ०.

नि [म० न=नाहीं] अव्यय नष्ट; लुप्त; उ० निकोप, निकामी, इ०.

नि [म० 'आणि' चें तोकडें रूप] अव्यय आणि; उ० रामा नि गोविंदा असे दोघे बाजारांत गेले. टीप,—ह्याच अर्थी 'अन्' " न्' हेही शब्द योजण्यांत येतात.

निउटकें, निवटकें न० एक माप,—चौटक्याचा अर्धा भाग किं० शेराचा बत्तिसावा भाग.

निउता क्रि० वि० नुकताच; नवथर.

निकट [सं०] वि० जवळचा. श०यो०अ० जवळ; शेजारीं.न०सांनिध्य; शेजार.꣸निकटवर्ती, निकटवासी वि० जवळ असलेला; समीपस्थ. निकटीं क्रि० वि० शेजारीं.

निकट, निकड स्त्री० १ घाई. २ त्वरा.

निकटणें [म० 'निखळणें' चें एक रूप] अ० क्रि० कोणेकानें काळें करणें किं० निघून जाणें.

निकटणें [सं० निकट=जवळ] अ० क्रि० जवळ येणें किं०जवळ जाणें; बिलगणें. [इ०).

निकंठ वि० कष्टकर; असह्य; (पथ्य, अनुपान, निकड मागें 'निकट' पहा.

निकंड वि० ज्याला फारशा फांद्या नाहींत आणि ज्याचें खोड उंच आहे असा (आंबा, फणस, इ० वृक्ष).

निकंडु [सं० निः+कंडू (खाज)] वि० ज्याची खाज शमली आहे अशी (त्वचा).

निकण न० जोंधळा, बाजरी इ०चीं कणसें,— बैलांनीं दुसऱ्यांदा तुडविलेलीं. मागें 'आकण' पहा.

निकण वि० १ धान्याचे दाणे ज्यांत नाहींत असें (कणीस). २ ज्यांतील धान्य झोडपून काढलें आहे अशीं (कणसें). ३ कृमिकीटांनीं खाऊन फोल केलेलें (धान्य). ४ ज्यांत फुटके कण नाहींत असे कांडलेले (तांदूळ). ५ कांड-

तांना न फुटणारा (तांदूळ, गहूं, इ०). ६ लोणी कढावल्यानंतर ज्यांत कण्या धरल्या नाहींत असें (तूप); विसविशीत (तूप)

निकता क्रि० वि० नुकताच; थोड्या वेळापूर्वी.

निकती [हिं०] स्त्री० सोनार, सराफ, इ० चा लहान तराजू.

निकर पु० १ अनर्थ. २ हट्ट. ३ राग. ४ सतावणूक. ५ अतिरेक. ६ आवेश; जोर. ७ वैपुल्य. ८ पराकाष्ठा. ॐ **निकरावर येणें** किं० **निकर करणें** भांडणांत किं० वादांत आवेशास चढणें किं० बेफाम होणें. **कोणेकावर निकर करणें** त्याचेवर जोराचा हल्ला करणें. २ त्याचेवर गहजब करणे. **निकरी** [म० निकर] वि० हट्टी; रागीट.

निकरणें स० क्रि० १ खरडणें; ओरखडणें. २ निपटून काढणें (भांड्याला चिकटलेला पदार्थ)

निकरून क्रि० वि० खचितपणानें; हटकून; निक्षून.

निकल्हा, निकल्ही, निकला [म० नि (नाहीं) + कल्हई] वि० ज्याला कल्हई अजून लाविली नाहीं किं० ज्याची कल्हई झिजून गेली आहे असें (तांब्याचें किं० पितळेचें भांडें).

निकशी वि० १ हट्टी; हेकेखोर. २ कांहीं कामाबद्दल दुसऱ्याला निकड लावणारा किं० घाई करणारा.

निकशी, निकस [म० नि (नाहीं) + कस (सत्त्व)] वि० पुष्टिकारक अंश ज्यांत फारसा नाहीं असें (धान्य, शेत, इ०).

निकलंक, निष्कलंक [सं० निस् + कलंक (डाग)] वि० १ ज्याला डाग नाहीं असा (पदार्थ). २ पापरहित (माणूस). २ शुद्ध; स्वच्छ; लांछनरहित.

निकळा वि० १ बेचव, पचपचीत, पांचट (भात, भाजी, भाकरी, इ०). २ ज्याला कल्हई नाहीं असें (भांडें).

निका [अ०] पु० मुसलमान लोकांतील गांधर्वविवाह.

निका [अ०] वि० १ शुद्ध; पवित्र; पापरहित; दोषरहित. २ अगदीं बरोबर; तंतोतंत. ३ ज्यांत मिसळ किं० भेसळ नाहीं असें (दूध, तूप, इ०). क्रि० वि० स्पष्टपणें; ठासून; असंदिग्ध रीतीनें.

निकाटणें [म० निखळणें] अ० क्रि० कोणेकानें निघून जाणें किं० तोंड काळें करणें.

निकाढा [सं० निष्कर्ष] पु० ज्या औषधी द्रव्यांचा एकवार काढा उकळून काढलेला आहे त्यांचा पुन्हा उकळून काढलेला काढा; उ० ह्या द्रव्यांचा सकाळीं काढा आणि संध्याकाळीं निकाढा घ्या.

निकामी [म० नि (नाहीं)+काम] वि० १ निरुपयोगी. २ ज्याला उद्योगधंदा कांहीं नाहीं असा.

निकाल [हिं०] पु० १ उलगडा. २ वादग्रस्त विषयाचा निर्णय; भांडणाऱ्या दोन माणसांचें म्हणणें ऐकून घेऊन न्यायाधीशानें दिलेला निर्णय किं० केलेला ठराव. २ अव्यवस्थित कामाची लाविलेली व्यवस्था. ३ पाणी इ० ना बाहेर पडावयाला करून दिलेली वाट. ॐ **निकाल हुकूम** पु० दोन्ही पक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन न्यायाधीशानें शेवटीं सांगितलेला निर्णय किं० दिलेला हुकूम.

निकुटणें अ० क्रि० शेतांत फार दिवस राहिल्यानें (भात) टणक आणि शुष्क होणें; (भात) कडंगणें.

निकुरणें स० क्रि० भांडें इ० ना चिकटलेला पदार्थ नखांनीं खरवडून काढणें.

निकृंतन [सं०] न० १ कापण्याची क्रिया; छेदन. २ कापण्याचें हत्यार.

निकृष्ट [सं०] वि० १ नीच; क्षुद्र. २ अगदीं हलक्या दर्जाचा. ३ पतित. ४ जवळचा. ॐ **निकृष्ट युद्ध** न० हातघाईचें युद्ध. **निकृष्ट पक्षीं** क्रि० वि० निदान; किमान पक्षीं.

निके मागें ' नकी ' पहा.

निकेतन [सं०] न० वास्तव्याची जागा; [घर.

निकोचा पु० एक प्रकारचा लांकडाचा खिळा.

निकोप, निकोपी वि० १ रोगरहित (शरीर). २ दोषरहित; ज्यांत कोणत्याही प्रकारचा उणेपणा नाहीं असा (पदार्थ).

निक्खळ क्रि० वि० १ पूर्णपणें. २ दुसऱ्या कोणत्याही पदार्थाची भेसळ नसतां.

निक्खानेमाचा **वि०** अगदीं नियमितपणें म्ह० खंड न पडतां चाललेला किंवा येणारा किंवा होणारा. **क्रि० वि०** नियमितपणें (लिंगवचनाप्रमाणें फिरणारें).

निखट्ट [**हिं०**] **वि०** १ टाकाऊ; कुचकामाचा (मनुष्य, पदार्थ). २ बद्दू; गांडू; नपुंसक. ३ बिनदाढीमिशांचा पुरुष.

निखडणें **अ० क्रि०** १ (वृक्षादींचीं) पानें गळून पडणें किंवा झडणें. **स० क्रि०** (पदार्थांचे भाग किंवा अवयव) काढून वेगळे वेगळे करणें; उ० कोकणामध्यें पावसाळ्यांत गाडी निखडून ठेवितात.

निखती, निखाती [**म०** नि (नाहीं)+ खत] **वि०** जींत खत घातलें नाहीं अशी (जमीन, शेत).

निखंदणें **स० क्रि०** दूर सारणें; अनादरणें; हाकलून देणें (कवितेंत).

निखरड **वि०** जिच्यांत शेत चांगलें होत नाहीं अशी (जमीन).

निखरणें [**सं०** निः+क्षर् (वाहून जाणें, बंद पडणें)] **अ० क्रि०** (पाऊस, ढगांचें पटल, धूर, धुकें, इ०) साफ नाहीसें होणें. **स० क्रि०** भांडें खरवडून साफ किंवा स्वच्छ करणें. ॐ **निखरणीचे दिवस** **पु० अ० व०** पावसाळ्याची समाप्ति होऊन ज्या दिवसांत आकाश अभ्ररहित होतें ते दिवस.

निखराड [**म०** निखरणें] **वि०** जलरहित, शुष्क (विहीर, तळें, ओढा).

निखर्व [**सं०**] **न०** शंभर अब्ज ही संख्या.

निखळ **वि०** मागें ' निखळ ' पहा.

निखळणें **अ० क्रि०** स्वस्थानावरून सरकणें किंवा गळून पडणें; स्थानभ्रष्ट होणें. **स० क्रि०** (पदार्थाला) त्याच्या स्थानावरून उपटून काढणें; स्थानभ्रष्ट करणें; (कोणेकाला) कांहीं कामावरून किंवा अधिकारावरून हुसकून काढणें किं० बडतर्फ करणें.

निखाडा, निखाड्या, निखाडू [**म०** नि (नाहीं)+खाड (दाढी, मिशा)] **वि०** दाढी मिशा यावयाचें वय झालेलें असून ज्याला त्या आल्या नाहींत असा पुरुष. मागें ' खाड ' पहा.

निखाडा [**म०** नि (नाहीं)+खाडा (खंड)] **वि०** ज्या कामांत किंवा सरणांत खंड म्ह० रिकामा दिवस नाहीं असें. मागें ' खाडा ' पहा.

निखाडा, निखारा [**म०** निखारणें] **पु०** आकाशाची अभ्ररहित स्थिति.

निखाती **वि०** जींत खत घातलेलें नाहीं अशी (जमीन, शेत).

निखाद [**सं०** निषाद] **पु०** गायनांतील सातवा स्वर.

निखार **वि०** १ परमावधीची (समुद्राची ओहोटी). २ अभ्ररहित (आकाश).

निखार [**म०** नि(नाहीं)+खार(क्षार म्ह० मीठ)] **वि०** अगदीं शुष्क (लोणचें).

निखारणें [**सं०** निःक्षर्] **अ० क्रि०** (सूज इ०) पूर्णपणें ओसरणें; (ढग इ०) पूर्णपणें किंवा साफ नाहींसे होणें. **निखारणें** **स० क्रि०** खरवडून काढणें (भांड्याला चिकटून बसलेला पदार्थ). ॐ **निखारून** **क्रि० वि०** पूर्णपणें; अगदीं मुळापासून; जोरानें; खरडून (विचरणें, नांगरणें, झाडणें, इ०). वर 'निखरणें' पहा.

निखारणें [**म०** निखारा] **अ० क्रि०** (विस्तव) झळझळीतपणें पेटणें; प्रज्वलित होणें.

निखारा **पु०** प्रज्वलित कोळसा; जळून तांबडा लाल झालेला कोळसा. ॐ **निखारंगी** **वि०** तांबडा लाल,–निखाऱ्यासारखा. **निखारा देणें** भूक लागलेली असतां ती न शमविणें; उ० उद्या तिसऱ्या प्रहरापर्यंत निखारा दे म्हणजे तुझा अजीर्णाश मोडेल. **आपल्या पोळीवर निखारे कोण न ओढी ?** कोणचा मनुष्य आपल्या स्वार्थासाठीं दुसऱ्याची हानि करणार नाहीं ? **एकाद्याच्या घरावर निखारा ठेवणें** १ त्याचीं निंद्य कर्में जगजाहीर करणें. २ त्याचें नुकसान करणें. **निखाऱ्याचें करणें** जेवणें; भोजन करणें.

निखारा [**म०** निखारणें] **पु०** आकाशाची निरभ्र स्थिति (ढग नाहींसे झाल्यामुळें).

निखालस [**हिं०**] **वि०** १ दुसऱ्याच्या उपसर्गाशिवाय असलेली, स्वतंत्र; अलग (जागा, घर, खोली). २ स्पष्ट; भीडभाड न धरणारा (माणूस, भाषण, वागणूक). ३ ज्यांत भेस

नाहीं असें (तेल, तूप, दूध, इ०). ४वेगळा; भिन्न. क्रि० वि० १ खचित. २ स्पष्टपणें. ३ अगदीं; धडधडीत.

निखिल [सं०] वि० सर्व; सर्व भागांसहित.

निखेड वि० ज्यांत कोणत्याही प्रकारची भेसळ नाहीं असा (तांदूळ इ० धान्य).

निखोडा(–डां)[म० नि (नाहीं) + खोड (उणेपणा)] वि० ज्यांत कोणताही दोष किंवा उणेपणा किंवा न्यून नाही असा.

निखोडा वि० अत्यन्त विपन्न; दीनदीन.

निख्खळ मागें ' निखळ ' पहा.

निगड, निगडी, निर्गुंडी [सं० निर्गुंडी, निर्गुंठी] स्त्री० एक झुडूप.

निगडुला वि० १ खाण्यापिण्याच्या बाबतींत चिकित्सखोर किंवा चोखंदळ. २मिताहारीपणाची पेंट करणारा.

निगम [सं०] पु० १ वेद. २ वेदवाक्य. ३ वेदांगभूत कोणताही ग्रंथ. ४ प्रतिज्ञा; निश्चय. ५ बोध; उपदेश. ६ संक्षेप. ७ प्राप्ति. ८ नीतिशास्त्र. ९ वाण्यांचा संघ. १० नीतिशास्त्र. ११ परिणाम. १२ देव. ❀ **निगमशास्त्र** न० वेदान्त शास्त्र.

निगरगट, निगरगट्ट [म० निबर+घट्ट] वि० ज्याला कितीही रागें भरलें किंवा शिक्षा केली तरी सुधारत नाहीं असा; लोचट; कोडगा.

निगरण [सं०] न० १गिळणें; मटकावणें. २पूर्णपणें व्यापणें. ३(साहित्य) वाक्यामध्यें उपमेय मुळींच न घालतां उपमानपदानेंच त्याचा निर्देश करणें. हा अतिशयोक्ति अलंकाराचा एक प्रकार आहे. याचें प्रसिद्ध उदाहरण'हारच्या पुन्हा पुन्हा कां काढयां नाकांत घालिशी शशका ? इ०. विशेष खुलासा आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत ' अतिशयोक्ति ' मध्यें पहा.

निगर्व, निगर्वी [म० नि (नाहीं)+गर्व] वि० ज्याला गर्व नाहीं असा; साधा.

निगळ [म० नि (नाहीं) + गळणें] न० जिच्या प्रसादानें पावसाचें पाणी कौलार, केंबळें, इ० तून गळत नाहीं ती देवता; उ० आज घरशिवणी झाली आहे, निगळास नैवेद्य घातला पाहिजे. वि० ज्याच्या छपरांतून किंवा कौलांतून पावसाचें पाणी गळत नाहीं असें (घर, झोपडी). ह्या अर्थी ' निगळता ' असाही शब्द आहे.

निगा, निघा [फा० निगाह्] स्त्री०माणूस, जनावर, किंवा पदार्थ सुस्थितींत राहावा यासाठीं त्याच्या संबंधानें त्या त्या वेळीं योग्य त्या तजविजी करणें, किंवा काळजी घेणें, किंवा त्याला जपणें (करणें, ठेवणें, राखणें). 'निगादास्त', 'निघादास्त,' 'निगाबानी,' 'निघाबानी 'हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

निगाळ [म० नि + गाळणें] पु० पदार्थ दोन वेळां घोटल्यावर जो त्याचा चाळ म्ह० खरखरीत अंश राहातो तो.

निगीर्ण [सं०] वि० १ खाहिलेला; गिळिलेला. २ व्यापिलेला; झाकिलेला.

निगुता, निगुतीं क्रि० वि० नुकताच; अल्पकाळाच्या मागें.

निगुताई [म० निगूत +आई (प्रत्यय)] स्त्री० पदार्थांची काळजीपूर्वक जोपासना किंवा जपणूक. खालीं ' निगूत ' सं० पहा.

निगुतीं क्रि० वि० खचित; खात्रीपूर्वक.

निगूड [सं० निर्गुंडी] स्त्री० एक झुडप.

निगूढ [सं०] वि० १ लपलेला; झाकलेला. २ गुप्त; गूढ. ३ दुर्बोध.

निगूत क्रि० वि० नुकतांच.

निगूत [सं० युक्ति; म० युगत] स्त्री० १ युक्ति; खुबी. २ हिकमत. ३ पदार्थांची जोपासणूक किंवा काळजी.

निगृहीत [सं०] वि० १ पकडलेला; धरलेला. २ अटकेंत घातलेला. ३ नियंत्रणेखालीं ठेविलेला; आवरलेला.

निगोड [म० नि (नाहीं)+गोड] वि० ज्यांत योग्य प्रमाणांत साखर, गूळ, इ० घालण्यांत आला नाहीं असा (पुरण, कवठाची चटणी, इ०).

निगोळी स्त्री० १ घराची वळचण. २ वळचणीवरून गळणारें पावसाचें पाणी.

निग्रह [सं०] पु० १ पकडणें; कबज्यांत आणणें किंवा ठेवणें. २ अटकाव; प्रतिबंध; निरोध; नियंत्रणा. ३ शिक्षा; दंडन. ४ जिंकणें. ५ पराभव. ६ रोगाचा प्रतिकार. ७ मनाचा दृढनिश्चय. ❀

निग्रहानुग्रह पु० दुष्टांचें पारिपत्य आणि साधूंचें रक्षण. **निग्रही** वि० १ दृढनिश्चयी. २ हेकेखोर. ३ मनाचा बद्ध.

निघंट [सं० निघंटु] पु० १ वेदांतील शब्दांचा कोश. २ कोणताही कोश.

निघड [म० नि (नाहीं)+घड (घट= घागर)] क्रि० वि० एकाला एक चिकटून (रहाटाला लोटे बांधणें). मागें ' दुघड, ' ' तिघड ' हे शब्द पहा.

निघणें [सं० निर्गम्=बाहेर पडणें] अ० क्रि० १ बाहेर पडणें. २ प्रकट होणें; दृष्टोत्पत्तीस येणें. ३ ठरणें; सिद्ध होणें; गुणविशेषानें प्रसिद्धीस येणें. ४ घडून येणें; घडणें. ५ उत्पन्न होणें; अस्तित्वांत येणें. ६ सुरू होणें; स्थापिलें जाणें. ७ नाहींसा होणें; नष्ट होणें; उ० त्याची चाकरी निघाली. ८ ओकून पडणें; उ० त्याला भात निघाला. टीप,–ह्या अर्थी **भावकर्तरि** प्रयोगही होतो; उ० त्याला निघालें म्ह० त्याला वांति झाली. ९ (कांहीं क्रियेचा) उपक्रम करणें; उ० तो जाऊं निघाला. ❀ **निघतें घेणें** गुपचूप निसटून किं० पळून जाणें; पोबारा करणें. **कोणेकाची पाठ निघणें** त्याच्या आश्रयास जाणें; त्याचें संरक्षण मागणें. **निघतें घेणें** काढतें घेणें; आपला हेका सोडणें किं० कमी करणें. **ह्या लेखणीनें चांगलें अक्षर निघतें** म्ह० काढतां येतें किं० लिहितां येतें. **मालिक, शाळा, दुकान, गिरणी इ० निघणें** म्ह० सुरू होणें; चालू होणें; उत्पन्न होणें; स्थापिलें जाणें.

निघा, निघादास्त, निघाबानी मागें ' निगा ' ' निगादास्त, ' ' निगाबानी ' पहा.

निघावा [म० निघणें] पु० दुसऱ्या गांवीं जावयास निघणें किं० जावयाची तयारी.

निघोर, निघोरी [म० नि (नाहीं)+घोर (चिंता, भीति)] वि० ज्याला विवंचना, चिंता, किं० काळजी नाहीं असा; ज्याच्या मनाला स्वास्थ्य किं० निश्चितता आहे असा.

निघ्न [सं०] वि० १ पराधीन; दुसऱ्याच्या तंत्रानें ज्याला चालावें लागतें असा. २ (**व्याकरण**) शब्दविशेषाच्या अनुरोधानें ज्याचीं रूपें बनतात असा (शब्द); उ० विशेषण हें विशेष्यनिघ्न आहे; उ० ' चांगला ' हा शब्द पुरुष, स्त्री, किं० मूल, ह्यांप्रमाणें चांगला, चांगली, चांगलें, ह्या रूपांत घालावा लागेल.

निंच [सं० नीच] वि० १ ठेंगणा. २ हलक्या प्रतीचा; खालच्या दर्जाचा.

निचकणें स० क्रि० तडाखा मारून शरीराचा सांधा निखळविणें.

निचरणें [सं० निस् (बाहेर)+चर् (बाहेर पडणें)] अ० क्रि० १ (गळूं, कोठा, इ० तील रक्त, पू, मळ, इ०) बाहेर पडणें. २ रक्त, पू, मळ, इ० बाहेर पडल्यानें (गळूं, कोठा, इ०) स्वच्छ होणें. टीप,–' निचरणें ' चें कर्तृत्व गळूं इ० वर असतें किं० त्यांतून जें बाहेर पडतें त्याचेवर असतें.

निचरा [म० निचरणें] पु० गळूं, कोठा, इ० तील कुजका, सडका, किं० नासका भाग पूर्णपणें बाहेर पडणें किं० बाहेर पडून गळूं, कोठा, इ० स्वच्छ होणें.

निचल (–ळ) [सं० निश्चल] वि० हालचालरहित; स्तब्ध.

निचव [म० नि (नाहीं)+चव (रुचि)] वि० बेचव; पचपचित; पाणचट.

निंचा [सं० नीच] वि० १ ठेंगणा. २ हलक्या दर्जाचा किं० प्रतीचा.

निचाड, निचाडा [म० नि (नाहीं) + चाड (परवा)] वि० १ ज्याला दुसऱ्याच्या गुणाची, मोठेपणाची, प्रतिष्ठितपणाची, किं० आबरूची परवा वाटत नाहीं असा. २ उन्मत्त; दांडगा; मगरूर.

निचावणें [सं० नीच] अ० क्रि० दबणें, खचणें (भिंत, घर, खांब).

निचिंत [सं० निश्चिन्त] वि० चिन्तारहित; स्वस्थ; शान्त.

निचूळ [सं० निचुल] पु० १ जळवेतसाची एक जात. २ कडूलिंब. ३ आच्छादन; बुरखा. ४ (म०) फणस.

निचेतन [सं० निश्चेतन] वि० १ चेतनारहित; हालचाल न करणारा. २ मूर्च्छित.

निचेष्ट [सं० निश्चेष्ट) वि० १ अगदीं हाल-

चाल न करतां पडलेला. २ मूर्च्छित.

निज [सं०] **वि०** १ आपला; स्वताचा. २ उपजत. **न०, स्त्री०** आपलें हितगुज किं० रहस्य, (सांगणें,बोलणे). ꙮ **निजगुज न०**आपल्या खाजगी गोष्टी समुच्चयानें. **निजबोध पु०** आत्मज्ञान. **निजेवांचून पूजा नाहीं** एकाद्याविषयीं प्रेम नसल्यास त्याला आदर दिला जात नाहीं **निजधामास जाणें** ' धाम ' मध्यें पहा.

निजणें [सं० निद्रा] **अ० क्रि०** १ निद्रेनें युक्त होणें; झोपणें. २ झोप घ्यावयाच्या संकल्पानें अंथरुणावर आडवें होणें. ३ (स्त्रीशीं पुरुषानें) संग करणें. ४ कायमचें निजणें म्ह० मरणें. ५ लोकांस कर्जाऊ दिलेला किं० व्यापारादिकांत घातलेला पैसा बुडणें. ꙮ **निजून काम साधणें** पड घेऊन किं० नम्रपणानें आपलें इष्ट मिळविणें.

निजध्यास [सं० निदिध्यास] एकाद्या गोष्टीचें सततचे चिंतन, किं० मनन.

निजविणें [म० ' ' निजणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (मुलाला) थोपटून किं० गाणें म्हणून झोप येईल असें करणें. २ (**लाक्षणिक**) खाऊन किं० पिऊन टाकणें. ३ (**लाक्षणिक**) आडवें ठेवणें किं० घालणें (तुळई इ०). ४ (**लाक्षणिक**) पराभूत करणें.

निजसुरा [म० नीज] **वि०** १ ज्याच्या डोळ्यावरची झोप पुरतेपणीं गेलेली नाहीं असा. २ ज्याला झोपेची गुंगी येत आहे असा.

निजाळू [म० नीज] **वि०** ज्याला झोप फार येते असा.

निजोखमी [म० नि (नाहीं)+जोखीम] **वि०** ज्यांत बूड येण्याचा किं० ठोकर बसण्याचा संभव नाहीं किं० असला तरी अत्यल्प आहे असा (व्यवहार, व्यापार, इ०).

निझर [सं० निर्झर] **पु०** १ पर्वतावरून वाहणारा ओढा. २ बारदानाला पडलेल्या छिद्रांतून गळणाऱ्या जलादिकांची धार.

निझरणें [म० निझर; सं० निर्झर] **अ० क्रि०** १ बारदानांच्या छिद्रांतून(तेल, तूप, पाणी, इ०). थेंबथेंबांनीं गळणे. २ झाडाच्या खोडांतून (चीक दूध, इ०) गळून पडणें. ३ अंगांतून (घाम) गळणें; घामेजणें. ꙮ **निझरवणी न०** बारदानाच्या छिद्रांतून गळालेलें पाणी.

निझाडा [म० नि (पूर्ण)+झाडा] **पु०** १ अगदां संपलेपणाची स्थिति. २ साफ नकार; उ० मी त्याच्याजवळ पांच रुपये उसने मागितले परंतु त्याणें निझाडा दिला. ꙮ **निझाडून क्रि० वि०** १ भीडभाड न धरतां आणि स्पष्ट शब्दांनीं (नकारात्मक उत्तर देणे) २ स्पष्ट शब्दांनी (कांहीं उत्तर देणें).

निझूर [सं० निर्झर] **वि०** जींत कस नाहीं अशी (जमीन, शेत); ज्याला त्राण नाहीं असें (माणूस, जनावर); ज्याच्यांत वापर सहन करण्याची ताकद नाहीं असें(वस्त्र,भांडें,किं०कोणताही पदार्थ).

निटस [म० नीट] **वि०** नीटनेटका;असावा तसा; ठाकठिकीचा.

निटाई [म० नीट] **स्त्री०** नीटनेटकेपणा; यथास्थितपणा.

निटावणी [म० निटावणें] **स्त्री०** नीट करणें किं० होणें ही क्रिया; खालीं' निटावणें ' पहा.

निटावणें [म० नीट] **अ० क्रि०** १ नीट होणें; दुरुस्त होणें. २ अंगापिंडानें लठ्ठ किं० गुबगुबीत होणें ३ सुंदर, सुरेख, किं० तजेलदार दिसणें. ४ समोर सरळ जाणें.५ उत्साहानें कामास किं० उद्योगास लागणें. ६ पुढें सरणें. ७ प्रगति करणें(कोणत्याही कलेंत, विद्येंत, किं० धंद्यांत). **स० क्रि०** १ नीट करणें. २ दुरुस्त करणें; नीटनेटका करणें; व्यवस्थित करणें. ३ शिस्तवार मांडणें, रचणें, किं० जुळविणे.

निटावा [म० नीट] **पु०** १ नीटपणा; सरळपणा. २ योग्य सरणीचा अवलंब.३ आधार किं० टेका (देणें, घेणें).

निटाळा पु० १ अतिकडक उन्हाळा. २ ग्रीष्म ऋतूचा अत्यन्त कडक भाग.

निटोपा [म० नीट] **पु०** १ सरळपणा; नीटपणा. २ व्यवस्थितपणें केलेली मांडणी किं० रचना.

निठवें न० पायलीचा आठवा भाग; आछेर.

निडाकी [म० नि (नाहीं) + डाक]

वि० ज्याला डाक लाविलेला नाहीं असा (दागिना, पात्र, इ०).

निडोळ [प्रा० नि (नाहीं) + डोळ] वि० जांत मुळींच डोळ नाहीं अशी डाळ.

निढळ, निढाळ [म० नि (नाहीं) + ढळणें, ढाळणें] न० १ नशीब,–जें कोणालाही चुकवितां येत नाहीं आणि जे माणसांच्या कपाळावर लिहिलेलें असतें. २ कपाळ. ‌‌‌‌‌‌* **निढळाच्या घामाचा पैसा** पु० प्रामाणिकपणें आणि देहकष्टानें मिळविलेला पैसा. याच्या उलट लफंगेगिरीनें, लुचेगिरीनें, चोरीनें, किं० खोटें दिवाळें काढून मिळविलेला पैसा.

नित [सं० नित्य] क्रि०वि० नेहमीं; सदोदित.

नितकोर पु० भाकरी, पोळी, इ० चा आठवा भाग; अर्धा चतकोर.

नितंब [सं०] पु० १ (स्त्रियांचें) ढुंगण. २ कंबर. ३ पर्वताची बाजू. ४ नदीचा कांठ. * **नितंबिनी** स्त्री० १ स्त्री. २ मोठ्या आणि गोंडस ढुंगणाची स्त्री.

नितरणें अ० क्रि० पदार्थांतील जलादिकांचा अंश गळून किं० पाझरून जाणें.

नितराम् [सं०] क्रि० वि० १ पूर्णपणें. २ अगदीं.

नितळ वि० १ स्वच्छ; शुद्ध; निर्मळ. २ घोटून घोटून सपाट आणि चकचकीत आणि गुळगुळीत केलेला (पृष्ठभाग). ३ निश्चल; स्वस्थ; स्तब्ध.

नितल [सं० नितल] न० पातालविशेष.

नितळणा [म० नितळ] पु० पदार्थ घोटून तो गुळगुळीत आणि चकचकीत करण्याचें सोनारांचें एक आउत.

नितळणें [म० नितळ] स० क्रि० घोटून घोटून साफ आणि चकचकीत करणें. अ० क्रि० नीटनेटका, चकचकीत, किं० तजेलदार होणें (डाळे, चेहेरा, झाडें, शेतें); (आकाश) निरभ्र आणि स्वच्छ होणें; सन्मार्गावर येणें (माणूस).

नितळाई [म० नितळणें] स्त्री० १ घोटींवपणा; नीटनेटकेपणा; चकाकी; तजेला. २ जलादींचा स्वच्छपणा. ३ सपाटपणा आणि गुळगुळीतपणा.

नितळेल [म० नितळ+तेल] न० वडे इ० तळणें संपल्यावर कढईंत शिल्लक राहिलेलें तेल.

नितांत [सं०] वि० परमावधीचा. क्रि० वि० फार; अतिशय; अत्यंत.

नितांतणें, नितांदणें [सं० नितान्त=फार] १ (भुकेनें, तहानेनें, झोपेनें) व्याकुळ किं० पीडित होणें. २ पदार्थविशेषासाठीं अति उत्कंठित होणें; उ० सखवारबाई मुलासाठीं नितांतली आहे.

निताव [म० नि (नाहीं)+ताव (ताप)] वि० जें अग्नींत घालून तापविलेलें नाहीं असें (सोनें, इ०).

नित्य [सं०] वि० १ कायमचें; सततचें; स्थिर. २ अविनाशी; सनातन; उ० परमाणु नित्य आहे. ३ नेहमीचें; नेहमीं करावयाचें. ४ स्वभावसिद्ध; जन्मजात. क्रि० वि० १ नेहमीं; सदोदित. २ प्रतिदिवशीं; उ० गुलाबसिंग नित्य मला भेटतो. ३ सर्वदा; उ० हा शब्द नित्य पुल्लिंग आहे. * **नित्य उठून** क्रि० वि० प्रतिदिवशीं. **एकादी गोष्ट नित्याखालीं पडणें** ती सवईखालीं पडणें; ती परिपाठांतली होणें. **नित्यकर्म** न० रोजच्या रोज म्ह० प्रतिदिवशीं करावयाचें जें स्नानसंध्यावंदनादि कृत्य तें. **नित्यजागृति** स्त्री० योगसाधनामध्यें सांगितलेली जागृति. **नित्यनवा** वि० १ सदा नव्यासारखा म्ह० टवटवीत किं० तजेलदार. २ कामाला कधींही न कंटाळणारा; नेहमीं उत्साहानें काम करणारा. ३ ज्याला तीच तीच गोष्ट रोज रोज सांगावी लागते, एकदा सांगितलेलें ज्याच्या स्मरणांत राहात नाहीं, असा; अत्यन्त विसराळू. **नित्यनियम, नित्यनेम** पु० १ शास्त्रांत अमुक गोष्ट रोज करावी अशी सख्तीची आज्ञा नसतां जी गीतापाठादि गोष्ट चांगली किं० पुण्यदायक असें समजून मनुष्य करतो ती. २ कोणी मनुष्य रोजच्या रोज किं० सदासर्वदा करतो जी गोष्ट ती; उ० या गोष्टीचा जेवतांना रडावयाचा नित्यनियम आहे. **नित्यनैमित्तिक** न० नित्य करावयाचीं आणि प्रसंगानें करावयाचीं अशीं दोन्ही प्रकारचीं कर्मैं समुच्चयानें. न० अ० व० नित्य करावयाचीं कर्मैं आणि कांहीं प्रसंगानें करावयाचीं कर्मैं. **नित्यपाठ** पु० नियाचा परिपाठ; रोजच्या रोज करावयाची गोष्ट. **नित्यपाठांत पडणें** सवईचा होणें. **नित्य-**

पाठांतला वि० अगवळणीं पडलेला; सवईचा झालेला. नित्यसमास पु० ज्याचीं पदें वेगळीं करून वाक्यांत घालतां येत नाहींत असा समास; उ० जयद्रथ, जमदग्नि, इ०. नित्यमुक्त पु० परमेश्वर. नित्यशः क्रि० वि० नेहेमीं. नित्यशंकी वि० ज्याचें मन सदा शंकित असतें असा. नित्यावळ स्त्री० १ आमच्या घरीं दररोज तुम्ही जेवावयास या असें कोणेकाला आमंत्रण एकदाच देऊन ठेवून त्याला रोज जेवावयास घालणें हा प्रकार किंवा आमंत्रणाचा हा प्रकार. नित्यें क्रि० वि० सदासर्वदा.

नियकर, नियकोर पु० मागें 'नितकोर' पहा.

निथणणें अ० क्रि० १ अति श्रम झाल्यामुळें बेंबीच्या देठापासून जोर करून बोलणें. २ रागानें दांत ओठ खाऊन बोलणें.

निथम स्त्री० पोटांत आमांश झाला असतां शौचाचे समयीं इंद्रिय ताणलें गेल्याची व्यथा किंवा भावना होते ती.

निथरणें अ० क्रि० पात्रादीतून जलादि थेंबाथेंबांनीं गळणें.

निथळ वि० स्वच्छ; शुद्ध; ज्यांत गदळ किंवा केरकचरा नाहीं असा.

निथळणें अ० क्रि० भिजलेला वस्त्र इ० पदार्थ उंचावर धरला किंवा ठेविला असतां त्यांतून थेंबाथेंबांनीं जलादि गळून पडणें. स० क्रि० १ वस्त्रादिकांतून (फाजिल जलादि अंश) काढून टाकणें. २ फाजिल जलांशरहित (वस्त्रादि) करणें.

निथळ, निथळा [म० निथळणें] पु० १ पात्रादिकांत निथळून पडला जो जलादीचा अंश तो. २ बुडाशीं राहिलेला गाळ.

निंदक [सं०] वि० १ निंदा करण्याकडे ज्याची प्रवृत्ति तो. २ दोष काढणारा; टपका ठेवणारा.

निंदखोर, निंदाखोर [सं० निंदा; फा० खोर (प्रत्यय)] वि० सदैव निंदा करण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा; दोषैकदृष्टि.

निंदण (–न), निंदण (– न) न० १ पेरलेल्या शेतांत भलतेंच उगवलेलें तृणादि. २ शेतांतून असलें तृणादि काढून टाकण्याची क्रिया.

निंदणी, निंदणी [म० निंदणें] स्त्री० शेतांतून उनाड उगवलेलें तृणादि काढून टाकण्याची क्रिया.

निंदणें, निंदणें स० क्रि० उनाड उगवलेलें तृणादि उपटून काढून (शेत) स्वच्छ करणें.

निंदणें, निंदिणें [सं० निंद] स० क्रि० निर्भर्त्सिणें; (वस्तूचा किंवा माणसाचा) दोष किंवा उणेपणा वर्णिणें.

निंदन [सं०] न० निंदण्याची क्रिया.

निंदनीय, निंद्य [सं०] वि० निंदेला पात्र.

निदर्द, निदर्दी [म० नि (नाहीं)+फा० दर्द (दुःख)] वि० १ दुसऱ्याच्या दुखानें किंवा हानीनें ज्याला दुःख होत नाहीं असा; कठोर. २ ज्याला रागें भरल्यानें लाज वाटत नाहीं असा; कोडगा; निर्लज्ज.

निदर्शन [सं०] न० १ पाहाणें. २ दाखविणें. ३ जाहीर करणें. ४ देखावा; वस्तूचें दिसतें तें रूप. ५ पुरावा. ६ दृष्टान्त; उदाहरण. ७ नियम; कायदा. ० निदर्शनास येणें आढळून येणें; दृष्टोत्पत्तीस येणें; अनुभवास येणें. निदर्शनीं क्रि० वि० अनुभवानें; परिणामीं (कळून येणें).

निदर्शना [सं०] स्त्री० (साहित्य) दोन वाक्यांचे अर्थ किंवा दोन पदार्थ ह्यांच्यांत जो संबंध असणें शक्य किंवा संभवनीय नाहीं तो संबंध असल्याचें जर विधान केलेलें असलें आणि तें विधान जर उपमेमध्यें पर्यवसान पावत असलें तर त्या विधानाला ' निदर्शना ' म्हणतात. उपमेंतच पर्यवसान व्हावें; एऱ्हवीं अर्थ लागू नये असा दोन वस्तूंचा किंवा दोन वाक्यांचा संबंध वर्णिलेला असल्यास ' निदर्शना ' हा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

निदसुरा, निजसुरा वि० अर्धवट निद्रेंत असलेला; पुरता जागा न झालेला; झोप ज्याला येत आहे असा.

निंदा [सं०] स्त्री० निर्भर्त्सना; दोष देणें. ० निंदाखोर, निंदाखाऊ वि० निंदा करण्याचा स्वभाव ज्याचा असा.

निदांती [म० नि (नाहीं)+दांत] वि० ज्याला दांत अद्यापि पाडावयाचे आहेत किंवा

ज्याचे दांत मोडलेले आहेत असा (तुंबजोड, फणी, इ०).

निदान [सं०] न० १ आदिकारण; मूळ-कारण. २ कारण (सामान्यत्वें). ३ रोगपरीक्षा. ४ निरुपायाची किं० नाइलाजाची स्थिति. ५ ज्यांत कांहीं कमी किं० ज्यास्ती करतां येणें शक्य नाहीं म्ह० जें अगदीं पक्कें किं० ठाम असें मान किं० परिमाण; उ० या धोतरजोड्याला दहा रुपये पड-तील हें मी निदान सांगतों, पाहिजे तर तो विकत घ्या नको तर नका घेऊं. **क्रि० वि०** कमींत कमी; अगदीं निकृष्ट पक्ष अवलंबून किं० स्वीकारून; उ० विठून्या मुंजीला मला निदान पांचशे रुपये खर्चावे लागतील. ❀ **निदानचा वि०** १ अन्य उपाय सरल्यावर आणि नाइलाज म्हणून करावयाचा (उपाय), अवलंबावयाचा (आश्रय किं० मित्र), प्रार्थावयाचा (समर्थ). **निदानपक्षीं क्रि० वि०** १ कमींत कमी प्रमाण घेतलें तरी. २ अन्य इलाज किं० मार्ग हरल्यावर.

निदारुण क्रि० वि० स्पष्टपणें, स्पष्ट शब्दांनीं (नाकारणें). **वि०** अत्यन्त उग्र किं० भयंकर.

निदावा [म० नि (नाहीं) + फा० दावा] **पु०** दुसऱ्या कोणाचा पदार्थविशेषावर हक्क नाहीं अशी स्थिति; उ० सर्व भाऊबंदांचा निदावा करून गदाधरभटानें ही जमीन खरेदी केली. ❀ **निदावा-पत्र, निदावेपत्र न०** पदार्थविशेषावर आपला कांहीं हक्क नाहीं किं० आहे तो हक्क मी सोडला आहे अशा अर्थाचा कोणाला लिहून दिलेला कागद.

निदाळू [सं० निद्रालु] **वि०** १ ज्याला झोप येत आहे असा. २ ज्याची झोप अझून साफ गेली नाहीं असा.

निंदित [सं०] **वि०** निंदिलेला.

निदिध्यास [सं०] **पु०** १ सततचें चिंतन. २ एकतानता. **टीप,**–ह्या शब्दाचें ' निजध्यास ' हें मराठींतील अपभ्रष्ट रूप.

निदुधी [म० नि (नाहीं) + दूध] **वि०** जिला थोडें दूध आहे, किं० मुळींच दूध नाहीं अशी (गाय, म्हैस).

निदेश [सं०] **पु०** १ आज्ञा; हुकूम. २ कथन.

निंद्य [सं०] **वि०** निंदेला पात्र.

निद्रा [सं०] **स्त्री०** १ झोप. २ सुरती. ❀ **निद्रालु, निद्राळ वि०** झोपेंत असलेला; झोप ज्याला येत आहे असा; झोपाळू.

निद्रित [सं०] **वि०** १ झोपलेला; झोपीं गेलेला. (**लाक्षणिक**) गैरसावध; अनवधान. **टीप,**–**निद्रिस्त, निद्रिस्थ** हे शब्द ह्या दोन्ही अर्थी योजले जातात.

निधई, निधय खालीं ' निधाई ' पहा.

निधड, निधडा वि० १ धिटाईनें कोणतेंही काम अंगावर घेऊन तें पार पाडण्याचें सामर्थ्य आणि दृढनिश्चय ज्याच्या अंगीं आहे असा; कोण-त्याही कामीं माघार न खाणारा; धीट. २ धाडसी; साहसी. ❀ **निधड्या छातीचा वि०** धीट; कचर न खाणारा; साहसी. **निधडक क्रि० वि०** धिटाईनें; धाडसानें; न कचरतां.

निधणी [म० निधणें] **स्त्री०** शेतांतील उनाड उगवलेलें गवत इ० उपटून काढण्याची क्रिया.

निधणें स० क्रि० १ उनाड गवत उपटून काढून (शेत) साफ करणें. २ सूर्याच्या उन्हानें किं० अग्निसंयोगानें तापविणें.

निधणें अ० क्रि० तापणें (जमीन, अंग, इ०).

निधन [सं०] **न०** १ मरण. २ नाश.

निधय पुढें ' निधाई ' पहा.

निधा पु० १ विस्तवाची धग किं० आंच. २ जमीनीच्या आर्द्रतेचा किं० जलांशाचा भपकारा. ३ भोंवरा फिरतांना एकाच बिंदूवर फिरणें (धरणें).

निधाई, निधाय, निधास्ती स्त्री०, निधाव पु० मोठा पराक्रम, शतकृत्य, दिग्विजय. **टीप,**– ह्या शब्दांचा उपयोग नेहमीं निदेंत होतो आणि लावणें, पाडणें, लागणें, पडणें, ह्या क्रियापदांच्या साहचर्यानें होतो; उ० पांच वर्षें नोकरी करून पंचवीस रुपये घरीं पाठविलेस; मोठी निधाई लावि-लीस ! **टीप,**–' निधाया ' हें **अ० व०** रूपही ह्याच अर्थानें योजलें जातें.

निधाडा पु० मागें ' निधडा ' पहा.

निधान [सं०] **न०** १ ठेवणें; स्थलविशेषीं पदार्थ संनिविष्ट करणें. २ ठेव. ३ राखणें. ४ स्थान. ५ खजिना; साठा. ६ खाण.

निधाय, निधारती, निधाव मागें ' निधाई ' पहा. [प्रयोग).

जिधारती वि० प्रख्यात, नामांकित (निंदेत

निधावणें [म० निधा] अ० क्रि०(भोंवरा) फिरते समयीं एका बिंदूवर फिरणें.

निधि [सं०] पु० १ साठा. २ कोठार; खजिना. ३ महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील, आणि खर्व, हे कुबेराचें खजिने प्रत्येक. ꙮ **निधिनिक्षेप** पु० जमीनींत दुसऱ्या कोणी पुरून ठेविलेलें द्रव्य जें आपणास सापडतें तें.

निधोट [सं०निर्धूत] वि० १ अत्यन्त स्वच्छ. २ अत्यन्त दारिद्री. **टीप,**–हे दोन्ही अर्थ कवितेंत.

निनंगत क्रि० वि० एका बाजूस; कोन्या-कोपऱ्यांत; आडवळणाला.

निनांवा, निनांव्या [म० नि (नाहीं)+ नांव] वि० बिन नांवाचा; ज्यावर सही नाहीं असा (कागद, पत्र, इ०).

निनांवा [म० नि (नाहीं)+नांव] पु० खात्री; दुसऱ्याबद्दल दिलेली खात्री किं० सांगितलेली भलावण किं०घेतलेली हमी; उ०त्याला तुम्ही बेलाशक नोकरीस ठेवा. त्याचा मी निनांवा देतों.

निनिबाळ न०, पु० १ लहान मूल (प्रेमाचा शब्द).२ टोणपा (मोठ्या माणसाला निंदेंत).

निपचेत, निपचीत, निपचिप [म० नि (नाहीं)+चेतना] वि० अगदीं स्वस्थ किं० निश्चेष्ट; कोणत्याही प्रकारची हालचाल न करतां पडलेला (माणूस, जनावर).

निपज स्त्री० (शेत,कारखाना इ० तून उत्पन्न होऊन बाहेर पडलेलें धान्य, माल, इ०.

निपजणें अ० क्रि० १ उत्पन्न होणें. २ शेत, कारखाना, इ०तून (धान्य) कारागिरीचा पदार्थ, इ०)उत्पन्न होणें.३(कोणी मनुष्य जनावर, किं० पदार्थ,) अमुक गुणाचा आहे असें ठरणें किं० आढळून येणें; उ० हा मनुष्य मला कामसू वाटला म्हणून मीं त्याला नोकरीस ठेवला पण तो आळशी निपजला.

निपजत मागें ' निपचेत ' पहा.

निपट [हिं०] क्रि० वि० अगदीं; सर्वथैव. पूर्णपणें; उ० निपट नागवा, निपट बावळा; निपट धळा, इ०.

निपटणी [म० निपटणें] स्त्री० निपटून काढण्याची क्रिया. खालीं ' निपटणें ' पहा.

निपट निरंजन पु० १ अत्यन्त पवित्र माणूस; निष्पाप माणूस. २ (लक्षणेनें) अट्टल सोदा; इरसाल भामटा; पक्का बिलंदर. ३ (लक्षणेनें)अगदीं अकिंचन. ४ ज्याचें दिवाळें निघालें आहे असा.

निपटणें स० क्रि० १ दुसऱ्या पदार्थाला चिकटून राहिलेला पातळ पदार्थ काढून टाकण्यासाठीं तो नखें, कांहीं हत्यार, इ०नीं खरवडणें. २ (अवशिष्ट राहिलेलें कांहीं काम)संपवून किं० उरकून टाकणें. ३ (कांहीं आजार, खाण्यापिण्याची आबाळ, इ० कारणांनीं मनुष्य, पशु इ०) रोड करणें. ꙮ **कोणेकाला निपटून टाकणें** त्याला तुच्छता दाखवून दूर सारणें किं० गप्प करणें.

निपटारा वि०कोणत्याही कामाला निरुपयोगी; अगदीं टाकाऊ; कुचकामाचा.

निपटी [म० निपटणें]स्त्री०लहान मुलाला जेवू घालतेवेळीं ताटांतील अन्न निपटून निपटून त्याला दिलेला शेवटचा घास. **टीप,**–' निपटी चिपटी, ' ' निपटी शिपटी ' स्त्री०, ' निपटा शिपटा ' पु० हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

निपटें न० चिपट्याच्या अर्ध्याइतकें माप.

निपणजा पु०आपल्या आजाचा आजा.

निपणजी स्त्री०आपल्या आजीचा किं०आजाची आजी. **निपणजोळ, निपणजूळ निपणज्वळ,** न० निपणजाचें घर.

निपणतू पु० नातवाचा नातू.

निपणत्वंड (–तुंड) न० नातवाचें नातवंड.

निपतळा, निपताळा पु० कोणेकापासून द्रव्यादि लाभ झाल्यामुळें त्याचा झाला जो ओशाळा तो.

निपत (–ता–) ळा पु० पदार्थाचा निपटून काढलेला भाग किं० अवशेष. वि० ज्याची बेअब्रू झाली आहे असा.

निपरजत वि० निश्चेष्ट(पडणें,असणें,निजणें).

निपराळ वि० जींत जलांश नाहीं जी म्ह० अगदीं शुष्क आहे अशी (जमीन, शेत).

निपरूस वि० चमचमीत, झणझणीत, मसालेदार (खाद्य).

निपसणें स० क्रि० १ उपसून काढणें(म्यानां-तून तरवार इ०).२उपटून काढणें(केस,पंख,गवत, इ०). ३ उपसर्गें,बाहेर काढणें (सामान्यें करून).

निपळ [सं० निष्प्लवन] वि० शुष्क, रूक्ष, आर्द्रतारहित (शेत, जमीन). ०० **निपळवट** वि० ह्याच अर्थी.

निपाडसा पु०,**निपाडशी** स्त्री०,**निपाडसें** न० वि० १ गाय, म्हैस, शेळी, इ०चें जें नूतन अपत्य तें'तान्हें;' तान्ह्याच्या पूर्वीचें अपत्य तें 'पाडसें;' पाडशाच्या पूर्वीचें अपत्य तें'निपाडसें.'२ **निपाडशी** स्त्री० तीन वेळां व्यालेली गाय, म्हैस,शेळी, इ०.

निपाणी [म० नि (नाहीं) +पाणी]वि० १जेथें मुबलक किं० विपुल पाणी नाहीं असा(गाव, देश, इ०). २ ज्याला पाऊस, नदी, इ०च्या पाण्याची जरूरी नाहीं, आणि जें केवळ भूमीच्या दमानें वाढतें असें (पीक,झाड);अशा झाड, पीक, इ०ना ' निपाण्याचा ' म्हणतात. ३ ज्यात पाणी मिसळलेलें नाहीं असें (दूध, इ०).

निपात [सं०] पु० १ खालीं पडणें. २ उडी; झडप; हल्ला. ३ मरण; नाश. ४ आघात.५ आकस्मिक प्रसंग.६ कांहीं गोष्ट होणें किं० घडणें. ७ (**व्याकरण**) अनियमित रूप; नियमानें सिद्ध न झालेला शब्द. ८(व्याकरण) अव्ययें (कांहीं प्रकारचीं).

निःपात [सं० निर् (पूर्णपणें)+पात]पु० १ पूर्ण विध्वंस किं० नासाडी. २ पूर्ण पराभव.३ सत्यानास.

निपातन [सं०] न० १ खालीं पडणें. २ रट्टा; प्रहार. ३ ठार मारणें. ४ खालीं उडी मारणें. ५ वर ' निपात ' अर्थ ७ आणि ८ पहा.

निपालवाचा [म० नि+पालव (सं० पल्लव)] वि० शेवटल्या बाराचा (भोपळा,वांगें, इ० फळ); उ० वांग्याला पाणी घातलें नव्हतें तरी निपालवाचीं वांगीं लागूं लागलीं.

निपाळ, निपळ वि० आर्द्रतारहित; शुष्क; रूक्ष (जमीन, शेत, इ०).

निपुटी, निपुठी [म० नि (नाही)+ पूट, पूठ] वि० पुटें न देतां बनविलेलें (औषध).

निपुण [सं०] वि० १ हुशार. २ प्रवीण; वाकबगार.

निपुत्र, निपुत्री, निपुत्रिक [सं० निः; म० नि; पुत्र] वि० ज्याला पुत्र नाहीं असा.

निपुट शिपूट मागें ' निपटी शिपटी ' पहा.

निपुर, नपुर [म० न+पुरणें] स्त्री० उणे-पणा; कमताई; अपुरतेपणा.

निपोटारा, निपटारा वि० त्याज्य; टाकाऊ; कुचकिमतीचा.

निपोटी [म० नि (नाहीं)+पोट] वि० फक्त पगार देण्याच्या ठरावाचा (नोकर) किं० ठरावाची (नोकरी). पगार देऊन शिवाय पोटाला देण्याच्या ठरावाचा नोकर किं० नोकरी ' सपोटी नोकर ' किं० ' सपोटी नोकरी. '

निपोताशांत, निपोतशांति, निपुताशांति, निपुताशांत [म०नि (नाहीं)+पोत (पुत्र) +शांति] १ कुटुंबांत एकही माणूस न राहणें. २ पूर्ण विध्वंस (राज्य, अरण्य, लागवड,इ०चा).

निप्राण [सं० निस् (नाहीं)+प्राण]वि० अत्यन्त अशक्त.

निप्राळ वि० शुष्क; रूक्ष; आर्द्रतारहित. मागें ' निपराळ ' पहा.

निप्रूस वि० चमचमीत; झणझणीत; मसाले-दार. मागें ' निपरूस ' पहा.

निफाशी [म० नि (नाहीं)+फासा]वि० जिला फासा नाहीं अशी (पुतळी इ०).

निफाळी [म० नि (नाहीं) +फाळ]वि० ज्याला फाळ नाहीं असा (नांगर).

निंब [सं०] पु० ' लिंब ' ह्या नांवाचा वृक्ष. लिंबाच्या तीन मुख्य जाति आहेत. कढी लिंब, कडूलिंब (किं० बाळंतलिंब), आणि बकाणलिंब.००**कोणेकाला निंब**(किं०**लिंब**)**लावणें** (किं०**ठेवणें** किं०**देणें**)त्याचेवर कांहीं टपका ठेवणें.

निंबलोण, लिंबलोण न० ज्या कोणाला दृष्ट लागलेली असेल त्याच्यावरून कडूलिंबाचीं पानें, मीठ, मोहोऱ्या, इ० पदार्थ ओवाळून टाकतात ते समुच्चयानें (उतरणें, करणें).

निबद्ध [सं०] वि० १ बांधलेला. २ जुळ-विलेला; रचलेला. ३ पक्का बसलेला किं०बसविलेला किं० खिळविलेला. ४ कांहीं संबंधानें जुळलेला.

निबंध वि० अगदीं वृक्षरहित (कातळ,खडक, इ०).

निबंध [सं०] पु० १ बांधणें २ बंधन. ३ अटकाव; प्रतिबंध. ४ बेडी. ५ ग्रंथ किं० ग्रंथरचना. ६ एकाद्या विषयाच्या सांगोपांग विवेचनाचा लेख. निबंधाच्या जाति, ते लिहिण्याची मोडणी इ० साठीं आमचें ' निबंधलेखन आणि अनुवाद ' हें पुस्तक पहा.

निबर वि० १ जून आणि टणक (लाकूड). २ घट्ट; फोडावयास कठिण(धोंडा,गळूं,त्वचा,इ०) ३ वयानें प्रौढ. ४ कडक, तीव्र (ऊन्ह). निबर न० सूर्याच्या उन्हाची रखरख किं० तलखी. ॐ

निबरट वि० १ फारच टणक, कठिण, जून,किं० निबर. २ वय लहान असून अधिक वयाचा जूनपणा ज्याचा तोंडावर दिसतो आहे असा (मुलगा, मुलगी). ३ लहान वयाचा कोवळेपणा ज्याच्या तोंडावर दिसत नाहीं असा (मुलगा, मुलगी).

निबरढोण, निबरढोंड वि० अत्यन्त टणक, कठिण, जून. **निबराट, निबराट** न० उघडें आणि झाडेंझुडपें ज्यावर नाहींत असें मैदान.

निबा [हिं०] वि० लग्नाचें वय ज्याचें उलटून गेलें आहे पण अद्यापि लग्न झालेलें नाहीं असा.

निबाकी [सं० नि (नाहीं)+बाकी] स्त्री० सावकार इ०च्या देण्याघेण्याचा उलगडा करून जी निःशेषता ती.

निबाप्या [सं० नि (नाहीं)+बाप+या (प्रत्यय)] वि० ज्याचा बाप कोण हें ठाऊक नाहीं असा; गवशा पोरगा. [२ त्याचें फळ.

निंबारा [सं० निंब] पु० १एक वृक्षविशेष.

निबिड [सं०] वि० १ घट्ट; कठिण; टणक. २ दाट, गाढ (अरण्य, जनसमुदाय, अंधकार, झोप, पाऊस, इ०).

निबीं [सं० नि (नाहीं)+बी (बीज)] न० लहानसें बीजही शिल्लक राहिलें नाहीं अशी स्थिति (अरण्याची, संपत्तीची); सफाईचा नाश किं० विध्वंस.

निंबीं, निंबुणी, निंबूण [सं० निंबू,निंबूक] स्त्री० कागदी लिंबाचें झाड. लिंबी,लिंबुणी,लिंबूण, हेही शब्द ह्याच अर्थी योजले जातात.

निंबू, लिंबू [सं० निंबूक] पु० कागदी लिंबू;सालर लिंबू & त्याच्या तोंडावर लिंबू (किं० निंबू) ठरत नाहीं तो लठ्ठ, गुबगुबीत, गुटगुटीत आहे; तो गोटीदार अंगाचा आहे. माणूस, घोडा बैल, इ०च्या संबंधानें प्रयोग.

निंबूर पु० बाजरीच्या कणसाची जवळ आलेली पक्वदशा.

निंबोटी, लिंबोटी [सं० निंबू, लिंबू]स्त्री० १ लिंबाच्या अर्धुकावर साखर, सुंठ, सैंधव, इ० पदार्थ घालून तापवून औषधासाठीं करतात तें. २ अर्धें लिंबू.

निंबोणी, लिंबोणी, निंबूण, लिंबूण [सं० निंबूक] स्त्री० लिंबी किं० निंबी हें झाड किं० त्याचें फळ.

निबोध पु०, **निबोधन** न० [सं०] १ जागणें. २ कळविणें. ३ झोपेनंतर आलेली जागृति; निजून उठणें.

निंबोर पु० मागें ' निंबूर ' पहा.

निंबोळी (–णी), लिंबोळी (–णी) [सं० निंब] स्त्री० लिंबाचें झाड किं० त्याचें फळ. ॐ

निंबाला (किं० लिंबोणीला) आल्या निंबोण्या (किं० लिंबोण्या) आणि काढल्याला आल्या गळचुट्या उपभोगावयाची वस्तु सिद्ध असता उपभोग घेण्याची ताकद नाहींशी होणें (हें मोठें दुर्दैव होय).

निब्बर इ० ' निबर ' इ० पहा.

निभगणें अ० क्रि० खापरपोळ्या इ० भाजावयाचें मातीचें भांडें भेगाळणें म्ह० त्याला चिरा पडणें.

निभणें, निभावणें [सं० निस्+वह्] अ० क्रि० १ सामर्थ्य, सत्त्व, दार्ढ्य, इ० गुण प्रसंगविशेषां न खचतां टिकून राहाणें; उ० हें लाकूड तासतेवेळीं मोडेल असें वाटत होतें पण तें निभलें; उ० हा मुलगा हाकतरी तपासणींत नापास होईल असा रंग दिसत होता पण तो निभला आणि त्याला नोकरी मिळाली २ कांहीं काम करण्यांत मनुष्य वाढवाढून लायक होणें. ३ (कांहीं काम) कोणकाच्या हातून तडीस जाणें किं० (तें करणारा मनुष्य) नहटणें ४ कांहीं कामांत अडचणी आल्या असतांसुद्धां (तें काम) तडीस जाणें.५

५ पुरे पडणें; ज्यास्तीची जरूरी न वाटणें; उ० हा तंटा पांचशे रुपायांवर निभला; उ० शेराच्या लांडव्यांवर निभलें (भावकर्तरि प्रयोग).

निभयां [म० नि (नाहीं)+भय (भीति, शंका)] क्रि० वि० अगदीं; साफ; ठार; पूर्णपणें; उ० पाऊस निभया गेला; उ० शेत निभयां बुडालें. **वि०** पक्का, अट्टल, बिलंदर (सोदा, भामटा, वेडा, इ०).

निभर, निबर न० सूर्याच्या उन्हाची तलखी किं० रखरख

निभाती [म० नि (नाहीं)+भात] **वि०** ज्यांत भाताचे दाणे नाहींत अशी (करड, तांदूळ, इ०).

निभाव [म० निभावणें; सं० निर्वाह] **पु०** १ पुरे पडणें; अपुरतें न ठरणें; पुरेपणा; पुरतेपणा. २ काम सुरळीतपणें चालणें. ३ कांहीं काम करण्यांत कोणा मनुष्याचा टिकाव.

निभावणी, निभावणूक [म० निभावणें] १ पुरें पडणें; लायक किं० समर्थ ठरणें; टिकाव. २ रयतेच्या आबादानीसाठीं जमादारांच्या रकमेतून जिल्ह्याला बक्षीस दिलेली रक्कम. ह्या अर्थी 'निभावणी सूट ' असाही शब्द आहे. ३ दुष्काळाच्या प्रसंगीं शेतकऱ्याला दिलेली सूट किं० माफ केलेला सारा. ॐ **निभावणी जामीन पु०** बक्षीस म्हणून दिलेली जमीन कसली जाईल अशाबद्दल जो जामीन राहातो तो.

निभावणें वर ' निभणें ' पहा.

निभ्रांत, निर्भ्रांत [सं० निर्+भ्रांति] **वि०** ज्याला कांहीं कामांत किं० गोष्टांत कचर, शंका, संशय किं० भीति वाटत नाहीं असा; स्वस्थ; शांत; निर्भय; उ० माझ्या पैशाला मरण नाहीं, मी निभ्रांत आहें. **क्रि० वि०** बेलाशक; भ्रांति किं० भीति न बाळगतां; न कचरतां; उ० ह्या वाटेनें चोराचिलटांची अगदीं भीति नाहीं तूं निभ्रांत जा.

निम [फा० नीम्=अर्धा] **वि०** अर्धा. ॐ **निमकें** [फा० नीम्=अर्धुक] **न०** १ एकापासून शंभरापर्यंत जे क्रमांक त्यांच्या अर्ध्या पटींची मालिका; ह्या अर्थी ' निमकी ' **स्त्री०** हाही शब्द रूढ आहे. २ बैलाच्या किं० घोड्याच्या पाठीवरच्या ओझ्याची एकीकडची बाजू किं० एका बाजूच्या ओझ्याचें वजन किं० परिमाण. **निमखाई, निमकाई** [म० निमा] **स्त्री०** सर्कारानें केलेली शेतकी, सावकारी, इ० मध्ये अर्धी पाती; अर्धें भांडवल पुरविणें किं० अर्ध्या नफानुकसानीला वाटेकरी होणें. **निमकंठादार वि०** ज्याच्या छातीवर अर्ध्याकंठाची आकृति आहे असा (अंगरखा). **निमगोणी, निमकगोणी स्त्री०** अर्ध्या गोणी इतक्या परिमाणाचें ओझें (बैलाच्या किं० घोड्याच्या पाठीवरचें) **निमगोरा वि०** साधारण गोरा. **निमगोल वि०** ज्याची एक बाजू सपाट असून दुसरी बाजू कमानदार आहे असा पदार्थ (कानस, चोपण, इ०) **निमजरी वि०** ज्याच्या विणींत अर्धी जर आहे असें(वस्त्र). **निमताजीम स्त्री०** बसल्या जागेवरून न उठतां आलेल्या गृहस्थाचें स्वागत करणें किं० जाऊं लागलेल्या गृहस्थाला निरोप देणें. याच्या उलट ' खडीताजीम ' किं० ' पुरी ताजीम ' म्ह० स्थानावरून उठून केलेला सत्कार. **निमथल स्त्री०** शेतकाऱ्या धंद्यांत अर्धी पाती. **निमदस्ती वि०** अर्धाच सारा जीवर घेतला जातो अशी (जमीन). **निमपट स्त्री०** पदार्थाची अर्धी पट किं० अर्ध्याइतके परिमाण. **निमशाई स्त्री०** अर्ध्या पातीचा म्ह० अर्धेलीचा व्यवहार. **निमसारा पु०** अर्धा सारा माफ करून वसूल केलेला बाकीचा अर्धा सारा. **निमा पु०** अर्धा भाग. **निमाई स्त्री०** वर ' निमखाई ' पहा.

निमक [फा०] **पु०, न०** मीठ,—मनुष्याच्या जीविताला अत्यन्त जरूर असा एक पदार्थ. ॐ **निमकहराम वि०** कृतघ्न. **निमकहलाल वि०** कृतज्ञ.

निमग्न [सं०] **वि०** १ बुडलेलें. २ कांहीं कामांत किं० विचारांत तल्लीन किं० एकाग्र किं० गढलेला.

निमचा [फा० नीम्चाह्] **पु०** एक प्रकारची तरवार; ही लहान, बाकदार, आणि टोकाकडे रुंद असते.

निमज्जन [सं०] **न०** १ बुडणें. २ स्नानार्थ बुडी मारणें. ३ कांहीं कामांत किं० विचारांत तल्लीन होणें.

निमणें अ० क्रि० १ शांत होणें. २ समाप्त होणें.

३ मरणें. ४ कांहीं कामांत किं० विचारांत नाहींसें होणें. या क्रियापदाचा भूतकाळ 'निमाला.'

निमताना पु० १ अमुक शेतांत किती पीक येईल ह्याचा आजमास करण्यासाठीं त्यांतील कांहीं भागाची केलेली तपमाणी (पाहणें, घेणें, करणें). २ वर सांगितल्या प्रकारची दुसऱ्या कोणी केलेली तपासणी खरी झाली किं० नाहीं हें तपासून पाहाणें.

निमंत्रण [सं०] न० १ बोलावणें. २ साक्षी-साठीं न्यायाधीशानें केलेलें बोलावणें. ३ भोजन, सभा, इ० साठीं बोलावणें. [बोलावणें.

निमंत्रिणें [सं० नि+मंत्र] स० क्रि०

निमंत्रित [सं०] वि० बोलाविलेला.

निमाज [फा०] स्त्री०, पु० मागें 'नमाज' पहा.

निमाणा [फा० नीम्+आनाह; म० निमा+आणा] पु० एकंदर उत्पन्नावर आधा आणा ह्या सरणीनें घेतलेला जादा सारा.

निमित्त [सं०] न० १ कारण. २ साधन. ३ सामग्री. ४ कांहीं कार्याचें किं० उद्योगाचें ध्येय; उ० पोटाच्या निमित्तानें त्याला नोकरी करावी लागली. ५ कोणेकावर विनाकारण ठेविलेला टपका किं० आरोप. ६ खोटी सबब. ꣸ **निमित्ताचा** वि० १ केवळ नांवाचा. २ दिसण्यांत बरा पण असण्यांत खराब, अशक्त, किं० लेचापेचा. ३ कामचलाऊ; सध्याची गरज कशीबशी भाग-विणारा. **निमित्तास टेकणें** कांहीं काम बिघड-ण्याला खोटें कारण किं० कांहीं तरी सबब सांगणें किं० पुढें आणणें. **निमित्त ठेवणें** व्यर्थ दोष देणें. **निमित्त टाळणें** आपणावर वास्तविकपणें येणारा दोष कांहीं तरी खोटी सबब पुढें करून चुकविणें किं० चुकवूं पाहाणें. **निमित्तकारण** न० मागें 'कारण' मध्यें पहा. **निमित्ताचें भांडें** (किं० पात्र), **निमित्ताचें घर** न० कांहीं काम बिघडल्याचा दोष ज्याचेवर (विनाकारण) ठेवावयाचा असा माणूस किं० पदार्थ. **निमित्ताचा साधु** पु० खोटा साधु; भोंदू.

निमित्य न० निमित्त.

निमिष, निमेष [सं०]पु० १ डोळे मिटणें. २ फुलाचें मिटणें. ३ एक वेळां डोळे मिटण्यास लागतो तितका वेळ. ४ अगदीं अल्प काळ. ꣸ **निमेषोन्मेष** पु० डोळे उघडणें आणि मिटणें ही क्रिया.

निमुळता, निमोळता वि० क्रमानें बारीक होत गेलेला; एका टोकास रुंद किं० जाड आणि दुसऱ्या टोकाकडे बारीक असलेला.

निमूट वि० स्वस्थ; शांत; कांहीं हालचाल किं० गडबड किं० बडबड न करतां बसलेला. ꣸ **निमूटपणें** क्रि० वि० स्वस्थपणानें; शांतपणानें.

निमूर वि० १ छिद्ररहित (बांध, नळे, इ०). २ फट, चीर, भग, भोंक, इ० दोष ज्यांत नाहींत असा. ३ पूर्णपणें विध्वस्त; अगदीं संपलेला; कामांतून गेलेला. ४ चेतनारहित; निपचीत; मूर्च्छित.

निमे [फा० नीम्] स्त्री० अर्धा भाग. वि० अर्धा. मागें 'निम' पहा. ꣸ **निमेनीम, निमोनीम** क्रि० वि० अर्धेअर्धे भाग घेऊन, देऊन, किं० करून.

निमेष पु० मागें 'निमिष' पहा.

निमोला [म० नि (नाहीं) + मोल(किंमत)] वि० बिनकिमतीचा; निरुपयोगी.

निमोळता वि० वर 'निमुळता' पहा.

निम्न [सं०] वि० १ खोल. २ सखल. न० १ सखल जमीन किं० भाग. २ उतार. ꣸ **निम्नगा** स्त्री० नदी.

निम्मा इ० मागें 'निमा' इ० पहा.

नियत [सं०] वि० १ ताब्यांत ठेवलेला. २ बांधलेला. ३ जितेंद्रिय. ४ स्थिर. ५ निश्चित; ठराविक; उ० आमच्या घरीं नियत वीस पात्रें होतात, शिवाय अतीत अभ्यागत. ६ एकाग्र. ७ अनिवार्य. ꣸ **नियतकालिक** न० ठराविक अवधीनें भागशः प्रसिद्ध करावयाचें पुस्तक इ०.

नियत पुढें 'नेत' पहा.

नियंता [सं० नियन्तृ] पु० १ सारथि. २ शास्ता, स्वामी. ३ शिक्षा करणारा.

नियम [सं०] पु० १ आटोक्यांत ठेवणें; आळा घालणें; ताब्यांत ठेवणें. २ कायदा, शिस्त, परि-पाठ. ३ निश्चितपणा; निश्चय. ४ आचरावयाचें किं० पाळावयाचें व्रत. ५ धर्माचरण. ६ ऐच्छिक धर्माचरण (स्नान, उपोषण, तीर्थयात्रा, जागरण, इ०). ७ शर्त, अट, ठराव. ८ योगाच्या अष्टांगांपैकीं दुसरें. ꣸ **नियमविधि** पु० नित्यधर्मकृत्य. **नियमाचा** क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) नियमानें; न चुकतां.

नियमन [सं०] न० शासन; निग्रह. २

आटोक्यांत किं० नियंत्रणेंत ठेवणें. ३ व्यवस्थित करणें.

नियमित [सं०] १ नियंत्रणेंत ठेविलेला. २ ठराविक. ३ सरणींत न चुकणारा. ४ व्यवस्थित.

नियामक [सं०] वि० १ नियंत्रणेंत ठेवणारा; नियम लावून किं०ठरवून देणारा; शास्ता; व्यवस्थापक. २ सुकाणूंवाला. ३ सारथि.

नियुक्त [सं०] वि० १ नेमिलेला. २ योजलेला. ३ ठरविलेला.

नियुत [सं०] न० १ दशलक्ष. २ लक्ष.

नियोग [सं०] पु० १ विनियोग; उपयोग. २ आज्ञा.३ नेमून दिलेलें काम. ४ अवश्य करावयाचें असें काम. ५ अधिकार; कार्यक्षेत्र. ६ वंश कुंठित होऊं नये म्हणून दीर इ०कांचे कडून स्त्रीनें प्रजोत्पत्ति करवून घेणें.

नियोगी [सं० नियोगिन्] पु० १ अधिकारी. २ प्रधान. ३ कामें नेमून देणारा.

नियोजिणें [सं० नि+युज्]स०क्रि० १कांहीं कामाकडे (कोणी माणूस किं० कांहीं पदार्थ) लावण्याचा बेत करणें. २ नेमणें; ठरविणें; ठरवून ठेविणें.

निर [सं०] अव्यय हें अव्यय शब्दारंभीं येतें आणि पुढें स्वर किं० मृदुव्यंजन आल्यास त्याचें ' निर ' असें रूप राहातें; पुढें कठोर व्यंजन आल्यास त्याचें ' निस्, ' ' निप्, ' किं० ' निश ' असें रूप होतें. असे शब्द स्वतंत्र रीत्या पुढें वर्णक्रमानें दिले आहेत. ह्या अव्ययाचे अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहेत. १ नकार. २ निश्चय.३ दूर. ४ बाहेर. ५ त्याग. ६ निषेध, इ०.

निरंकुश [सं० निर (नाहीं)अंकुश+(नियंत्रणा)] वि० १ नियंत्रणा किं० ताबा ज्याला नाहीं किं० ज्याचेवर चालत नाहीं असा.२बेताल; स्वच्छंदी. ३ठराविक नियम प्रसंगविशेषीं मोडणारा किं० उल्लंघिणारा. ❀ **निरंकुशाः कवयः** व्याकरण, वस्तुस्थिति, इ० चें उल्लंघन कवि करतात किं० उल्लंघिण्याची त्यांना मोकळीक असते.

निरख [फा० निर्ख्] पु० पदार्थांचा बाजारांत चालू भाव किं० दर. ❀ **निरखी, निरख्या** पु० १ बाजारभाव ठरविणारा. २ धूर्त; वस्ताद; खरेंखोटें ओळखणारा.

निरखणें, निराखिणें, निरेखणें, निरोखिणें [सं० निर+ईक्ष् (पाहाणें)] स०क्रि०न्याहाळणें; सूक्ष्म नजरेनें पाहाणें.

निरंगळी स्त्री० १झोपेचा किं०श्रमाचा थकवा किं० म्लानपणा किं० जाड्य. २ उपवासामुळें येतो तो अशक्तपणा किं० सुस्ती.

निरगांठ, निगांठ [सं० निर+सं० ग्रंथि; म० गांठ] स्त्री० दोरी, सुतळी, नाडी, इ०ची पक्की गांठ. याच्या उलट ' सुरगांठ. '

निरगुंड, निरगुडी, निरगूड [सं० निर्गुंठी, निर्गुंडी] स्त्री० एक झुडूप. मागें ' नाय ' पहा.

निरंजन [सं० निर् (नाहीं)+अंजन (काजळ, मळ)] वि० १ रागद्वेषादिरहित;शुद्ध. २ काजळ ज्यांत नाहीं असा (डोळा). ३ परमात्मा. ❀ **निरंजनी गोसावी** पु० गोसाव्यांचा एक पंथ. निर्वाणी गोसावी नग्न असतात तसे हे निरंजनी गोसावी नसतात.

निरंजन, निरांजन [सं० नीराजन=ओवाळणें, आरति] न० देवापुढें दिवा लावण्यासाठीं केलेलें असें धातुमय पात्र तें.

निरडणें स० क्रि० पात्राला लागलेला पदार्थ बोटांनीं खरवडून काढून टाकणें.

निरड(–ढ–)णें, निरढल (–ळ–)णें, निरढविणें,निरढावणें स०क्रि०१नवें मातीचें भांडें सौम्य आंच देऊन तें टणक करून वापरावयाला योग्य करणें. २ कांहीं व्यसनांत किं० दुर्वर्तनांत (कोणेकाला) दृढ करणें; (कोणेकाला) कांहीं व्यसनाची पक्की चटक किं० सवय लावणें. अ० क्रि० (मातीचें भांडें)वापरण्यानें टणक किं०बळकट होणें. २ सवईनें कांहीं कामांत प्रवीण होणें. ३ व्यसन, सवय, खोडी, इ०त पक्केपणीं आसक्त होणें.

निरण न० १ नाभीच्या खालचा आणि पुच्छाच्या वरचा भाग. २ गाय, म्हैस, इ० ची योनि. ❀ **गाय, म्हैस, इ० नीं निरण करणें** प्रसूत व्हावयाच्या समयीं त्यांनीं निरण ताणणें,— वासरूं सुलभ रीतीनें बाहेर पडावें म्हणून.

निरत [सं०] वि० १ अनुरक्त; प्रेमळ; प्रीतियुक्त. २ संतुष्ट. ३तत्पर.

निरंतर [सं० निर् (नाहीं)+अंतर] वि० १ दुसऱ्या पदार्थाशीं चिकटलेला किं० ऱ्याला लाग-

लेला किं०त्याच्या अगदीं जवळ असलेला. २ शाश्वत टिकणारा. क्रि० वि० नेहमीं; सदोदित.

निरातिशय [सं० निर्+अतिशय] **वि०** १ अद्वितीय. २ अनुपम. ३ पुष्कळ. ४ परमावधीचा. **पु०** परमेश्वर.

निरपण न० भांडें, ताट, इ० ना चिकटून बसलेला खाद्य किं० अन्य पदार्थ खरवडून काढण्याची क्रिया.

निरपणें स० क्रि० १ (भांडें, ताट, इ० ना चिकटून बसलेला पदार्थ) खरवडून काढणें. २ (चुकीची) दुरुस्ती करणें;(केलेलें कर्म) निस्तरणें.३ (तरवार, सोटा, इ० शस्त्र कोणेकावर) उगारणें. ॐ **कोणेकावर निरपणें** किं० **तरवार इ० निरपणें** त्याच्यावर रागावणें किं० तोंड सोडणें किं० त्याला मारावयास उठणें.

निरपराध, निरपराधी [सं०निर् (नाहीं)+ अपराध (गुन्हा)] **वि०** ज्याणें गुन्हा केलेला नाहीं असा; बेगुन्हा.

निरपूज न० एक प्रकारचा तांदूळ.

निरपेक्ष [सं० निर् (नाहीं)+अपेक्षा] **वि०** १ इच्छारहित. २ निरिच्छ. ३ निःस्वार्थ. ४ स्वतंत्र. ५ विरक्त. ६ ज्याला कशाचीही गरज नाहीं असा. ७ ज्याचें कशावांचूनही अडत नाहीं असा.

निरबुजणें अ० क्रि० भयभीत होणें; घाबरणें; दचकणें. **स० क्रि०** गुद्दी किं०वृच मारून(भोक) बंद करणें.

निरभिमान (-नी) [सं० निर् (नाहीं) +अभिमान] **वि०** १ गर्वरहित; ज्याला ताठा नाहीं असा. २ साधा; नम्र.

निरभ्र [सं० निर् (नाहीं)+अभ्र (मेघ)] **वि०** ज्यांत ढग नाहींत असें (आभाळ). **न०** आकाशाची मेघरहित स्थिति; स्वच्छ आकाश.

निरय [सं०] **पु०** १ नरक. २ दुःख, दुःस्थिति. ३ पाप.

निरर्गल [सं० नि (नाहीं)+अर्गला (अडसर)] **वि०** १ निर्विघ्न. २ स्वतंत्र. ३ स्वच्छंदी; बेताल. ४ जोराचा (पाण्याचा लोट, वारा). ५ भीड, मर्यादा, सभ्य सरणी, इ० चें उल्लंघन करणारा (माणूस, भाषण, वर्तनक्रम,इ०).

निरर्थक [[सं० निर् (नाहीं) + अर्थ+क (प्रत्यय)] **वि०** १ दरिद्री; ज्याच्याजवळ पैसा नाहीं असा; गरीब. २ अर्थशून्य; भरमसाट (भाषण). ३ निष्फळ; व्यर्थ; ज्याचा उपयोग नाहीं असें; फुकट जाईल असें. क्रि० वि० १ उगीच्या उगीच.२कारणावांचून.३काहीं लाभ नसतां.

निरलस [सं० निर्+म० आळस] **वि०** १ ज्याला आळस नाहीं असा. २ कामांत तत्पर. ३ न दमतां काम करणारा.

निरवकाश [सं० निर्+अवकाश] **वि०** १ ज्याला फुरसत नाहीं असा (माणूस).२जें करावयाला वेळ नाहीं असें (काम). ३ज्याला स्थान नाहीं असा (पदार्थ). ४ जेथें पदार्थ ठेवण्याला जागा नाहीं अशी (खोली); जेथें माणसांना राहावयाला जागा नाहीं असें (घर इ०).

निरवधि, निरवधिक [सं० निर् (नाहीं) + अवधि (मर्यादा)] **वि०** अमर्याद; अनंत.

निरवानिरव [म० निरविणें] **स्त्री०** आपली अनेक कामें, कारभार, माणसें, पशु, इ० कांहीं कारणानें अनेक माणसांकडे सोंपविणें; उ० सगळी निरवानिरव करून गिरिधरराव काशीयात्रेस गेला.

निरविणें स० क्रि०आपल्या कामाची व्यवस्था कोणेकाकडे सोंपविणें. वर ' निरवानिरव 'पहा.

निरशन [सं०निर् (नाहीं) +अशन (खाणें)] **न०** १ कांहीं न खाणें. २ उपवास.

निरस, नीरस [सं० नीरस] **वि०** १ हलक्या दर्जाचा किं० प्रतीचा. २ बेचव, पचपचीत (खाद्य, पेय). ३ अर्थ किं० चटकदारपणा किं० खुबी ज्यांत नाहीं असें (भाषण). ४ उदासीनपणाचें किं० आनंदहीन (जीवित).

निरसणें [सं० निर्+अस् (फेकणें)]**स० क्रि०** १ दूर सारणें. २ अंगावर आलेला टपका किं० कोसळलेली वाजू यांचें निराकरण करणें म्हणजे अस्थानीं किं०खोटीं आहेत असें सिद्ध करणें. ३ विध्वंसिणें. ४ प्रतिपक्ष्यानें आपणावर केलेल्या हल्ल्याचें निराकरण करणें. ५ वाऱ्यानें आकाशांतून (ढग) घालवून लावणें. ६ अंगीकृत कार्यांत आलेलें(विघ्न)नाहींसें करणें. **अ० क्रि०** दूर होणें; नष्ट होणें.

निरसन [**सं०**] **न०** निरसण्याच्या व्यापार. वर ' निरसणें ' पहा.

निरसा [**सं०** नीरस] **वि०** पाणी न घातलेलें आणि न तापावलेलें (दूध). ⊛ **स्त्री०** निरशी. **न०** निरसें. **निरशी स्त्री०** वीट; कंटाळा; शिसारी.

निरसित [**सं०**] **वि०** उडवून लाविलेला; टाकलून दिलेला; दूर सारलेला; खंडित (विधान).

निरसी, निरशी [**सं०** नीरस; **म०** निरस] **स्त्री०** १ कंटाळा; वीट; किळस. २ पदार्थाचा हलका दर्जा किं० हलकी योग्यता; कमलायकी.

निरस्त [**सं०**] **वि०** १ दूर फेकून दिलेला; दूर सारलेला. २ खंडित (प्रतिपक्ष्याचें विधान). ३ उडवून लाविलेला. ४ जिंकलेली (अविद्या, माया). ५ नष्ट केलेलें(अज्ञान, गैरसमज, इ०).

निरहंकार [**सं०**] **वि०** अभिमानरहित.

निरक्षर [**सं०**] **वि०** १अशिक्षित.२अडाणी.

निरा पु०१एक पांढरें गवत.२एक प्रकारचें मद्य. **स्त्री०** एक नदीविशेष.

निरा [**हिं०**] **वि०** १ निरसें (दूध). २ ज्यांत भेसळ नाहीं असें; शुद्ध.

निराकरण [**सं०**] **न०**१ घालवून किं० टाकलून देणें; दूर सारणें. २ हद्दपार करणें. ३ निवारण. ४ आक्षेपाचें खंडण.

निराकार [**सं०** निर् (नाहीं) +आकार (रूप)] **वि०** १आकाररहित. २ बेढब; कुरूप. **पु०** परमेश्वर.

निराकांक्ष [**सं०**] **वि०** ज्याला कशाचीच इच्छा नाहीं असा; निरिच्छ; निस्पृह.

निराकृत [**सं०**] **वि०**१ दूर सारलेला; उडवून लाविलेला;टाकलून दिलेला. २खंडित (आक्षेप इ०) ३ निषिद्ध.४ पराभविलेला.

निराकृति [**सं०**] **वि०** १ सांग वेदाध्ययन किं० स्वशाखेचेंही अध्ययन न केलेला; मूर्ख. २ पंचमहायज्ञ न करणारा. **स्त्री०** १ वर ' निराकरण ' पहा. २ नकार. ३ टवाळकी.

निराचार [**सं०**] **वि०** शिष्टाचार न पाळणारा; रानवट, रानटी; असभ्य.

निरांजन न० मागें ' निरंजन ' **न०** पहा.

निराट वि० वृक्षादिकांची छाया जेथें नाहीं असा (प्रदेश).

निराधार [**सं०** निर् (नाहीं) +आधार] **वि०** १ आधाररहित;आश्रयरहित.२दीन, अनाथ, विपन्न. ३ खोटा (दोषारोप).

निरानिपटा, निरानिपटारा [**म०**निरपणें+ निपटणें] **पु०** १ कार्याला किं०कामाला शेवटचा म्ह० समाप्तीचा किं० सफाईचा हात देणें. २ आरंभिलेलें कार्य समाप्त झाल्यावर त्या कार्यासाठीं गोळा केलेली साधनसामग्री जिकडच्या तिकडे ठेवणें किं० पोचविणें. ३ कार्याला पुरून उरलेल्या साधनसामग्रीची व्यवस्था लावणें इ० कामें समुच्चयानें (करणें).

निरानिस्तरा [**म०** निरपणें+निस्तरणें]**पु०** १ समाप्त केलेल्या कामावर शेवटचा म्हणजे सफाईचा हात देणें. २ समाप्त केलेलें काम पुन्हा काळजीपूर्वक तपासून त्यांत कांहीं न्यूनें दिसल्यास तीं भरून काढणें, सुधारणा करणें, इ० कामें समुच्चयानें. अज्ञेय किं० दुर्ज्ञेय.

निराभास [**सं०**] **वि०** १ भ्रमरहित. २

निराम [**सं०**] **वि०** अजीर्णापासून उत्पन्न झालेला नाहीं असा (ताप इ०).

निरामय [**सं०**] **वि०** १ रोगरहित;निरोगी (माणूस, जनावर). २ जेथें रोग, जलाभाव, कृमिकीट,टोळ, इ०चा उपद्रव नाहीं असा(देश). **न०** क्षेम; कल्याण.

निरालंब, निरवलंब (**सं०**] **वि०** १आधाररहित; आश्रयरहित. २ स्वतंत्र; दुसऱ्यावर अवलंबून नसलेला.

निराविणें स० क्रि० (वस्त्रें इ० पदार्थ) हवेंत किं० उन्हांत पसरून ठेवणें.

निराश [**सं०**] **वि०** १ आशारहित. ज्याची आशा सफळ झाली नाहीं असा.

निराशणें, निरासणें [**म०** निराशा] **अ० क्रि०** निराश होणें; इच्छिलेली वस्तु मिळणें शक्य नाहीं असें मत होणें किं० होऊन खचणें.

निराशा [**सं०** ' नैराश्य ' चा अपभ्रंश किं० मराठी घटना] **स्त्री०** आशेचा भंग; इच्छिलेली वस्तु मिळत नाहीं अशी खात्री.

निराश्रय [**सं०** निर+आश्रय] **वि०** १ ज्याला आधार नाहीं असा. २ ज्याला मित्र इ० कोणी नाहीं असा. ३ ज्याला पोसणारा कोणी नाहीं असा. ह्या सर्व अर्थी ' निराश्रित ' हाही शब्द योजण्यांत येतो.

निराहार [**सं०** निर+आहार (खाणें)] **पु०** १ उपवास. २ कांहीं न खातां राहाणें. ३ धर्माचा एक विधि ह्या नात्यानें कांहीं न खातां राहाणें.

निराळ न० आकाश (कवितेंत).

निराळा वि० १ भिन्न जातीचा, स्वरूपाचा, किं० गुणाचा. २ विवक्षिताहून अन्य किं० वेगळा. ३ बाजूस काढलेला. ❀ **निराळें पोटीं क्रि० वि०** अनशपोटीं; पोट रिकामें असतां.

निरिच्छ [**सं०** निर (नाहीं)+इच्छा] **वि०** १ इच्छारहित. २ निःस्पृह.

निरिंद्रिय [**सं०** निर (नाहीं)+इंद्रिय] **वि०** धर्ममंत्ररहित. २ दुर्बळ; वृद्ध. ३ षंढ; क्लीब.

निरी स्त्री० १ नेसावयाच्या वस्त्राची जी हाताचा अंगठा आणि एक बोट ह्यांच्या योगानें पाडतात ती घडी. २ कोणत्याहीं प्रकारची घडी. ३ मळसूत्राचें जें पन्हाळाच्या रूपाचें वळण त्याच्या दोन्ही बाजूचे उंचवटे. ४ मळसूत्राचा पन्हळ आणि दोन्ही बाजूंचे उंचवटे एकत्वानें.

निरीम, निलीम पु०, न० गलबत, होडी, इ० यांनीं पाण्यांत हेलकावे खाऊं नये म्हणून जें दगड, वाळू, इ० वजन त्यांत घालतात तें.

निरीह [**सं०** निर (नाहीं)+ईहा (इच्छा)] **वि०** १ इच्छारहित; निःस्पृह. २ सर्व संग ज्याणें सोडिले आहेत असा.

निरीक्षण [**सं०**] **न०** १ निरखून पाहणें; न्याहाळणें. २ तपासणें; परीक्षा. ३ तपास, शोध, हुडकणें. ४ विचार. ५ पुस्तक इ०तील गुणदोषांचें विवेचन.

निरुक्त [**सं०**] **वि०** १ स्पष्ट केलेलें. २ ज्याचा निर्णय केला आहे असा. ३ शब्दप्रमाणानें सिद्ध केलेलें. **न०** १ स्पष्टीकरण. २ वैदिक शब्दांच्या विवरणाचा एक ग्रंथ. ❀ **निरुक्तकार पु०** यास्क ऋषि. [करण.

निरुक्ति [**सं०**] **स्त्री०** १ व्याख्या. २ स्पष्टी-

निरुता, निरुतें क्रि० वि० खचित; निश्चयानें; खरोखर (कवितेंत).

निरुत्तर [**सं०** निर+उत्तर] **वि०** जो उत्तर देऊं शकत नाहीं असा; वादांत ज्याचीं सर्व प्रमाणें खंडित करण्यांत आलीं आहेत असा; गप्प केलेला (प्रतिपक्षी).

निरुत्साह [[**सं०** निर+उत्साह] **वि०** १ खचलेला; कुंठित झालेला. २ ज्याच्या अंगांत कांहीं काम करण्याची धमक किं० ताकद नाहीं किं० उरली नाहीं असा. ३ निराशा किं० नाउमेद झालेला.

निरुंद [**म०** नि+रुंद] **वि०** अरुंद, लहान विस्ताराचा.

निरुद्ध [**सं०**] **वि०** १ अडकाविलेला; प्रतिबंधांत घातलेला. २ थांबविलेला; बंद पाडलेला.

निरुद्योगी [**सं०** निर+उद्योग] **वि०** उद्योगरहित; आळशी; कांहीं काम न करणारा.

निरुपकारी [**सं०** निर+उपकार+इ (**म०** प्रत्यय)] **वि०** १ कोणाच्या उपयोगीं न पडण्याच्या स्वभावाचा. २ कृतघ्न.

निरुपद्रव [**सं०** निर+उपद्रव] **वि०** १ अपाय ज्याला नाहीं किं० जेथे नाहीं असा. २ कोणाला उपद्रव न करणारा. ह्या दोन्ही अर्थी ' निरुपद्रवी ' हाही शब्द योजला जातो.

निरुपम [**सं०** निर+उपमा] **वि०** ज्याला उपमा किं० समान गुणाची वस्तु नाहीं असा; उत्कृष्ट; अलौकिक. ' निरुपम्य ' सुद्धां ह्याच अर्थी योजण्यांत येतो.

निरुपयोगी [**सं०** निर+उपयोग] **वि०** १ विवक्षित कामीं जो योजतां येत नाहीं असा. २ व्यर्थ; निष्फळ.

निरुपाधि, निरुपाधिक [**सं०** निर (नाहीं) +उपाधि (उपद्रव)] **वि०** उपसर्गरहित; जेथें कोणत्याही प्रकारचा त्रास किं० उपद्रव नाहीं असा.

निरुपाय [**सं०** निर+उपाय] **वि०** १ ज्याला इलाज नाहीं असा. २ जो उपाय करूं शकत नाहीं असा; कुंठित. ३ कांहीं उपाय किं० इलाज नाहीं अशी (स्थिति). [शुद्ध.

निरू पु० सनल्याचा चुना. **वि०** निर्मळ;

निरूपण [**सं०**] **न०** १ पाहाणें; न्याहाळणें. २ एकाद्या विषयाचें विवेचन किं० चर्चा. ३

शोध; चौकशी. ४ व्याख्या. ५ विचार. ६ निदर्शन.

निरूपिणें [सं० नि+रूप्] स० क्रि० १ बारकाईनें पाहाणें. २ एकाद्या विषयाचें विवेचन किं० चर्चा करणें. ३ शोधणें. ४ वर्णिणें. ५ सांगणें; निवेदिणें.

निरेखणें [सं० निर्+ईक्ष्] स० क्रि० १ न्याहाळून पाहाणें. २ हिरा, सोनें, अक्षर, इ० तपासून पाहाणें.

निरोग, निरोगी [सं० निर्+रोग] वि० ज्याला कांहीं रोग किं० आजार नाहीं असा.

निरोध [सं०] पु० तुरुंगांत टाकणें. २ झांकणें. ३ नियंत्रणा; प्रतिबंध; अडथळा. ४ अंतःपुर.

निरोधणें [सं० नि+रुध] स० क्रि० १ प्रतिबंधांत घालणें; आडकावणें. २ बंद करणें; थांबविणें; आवरणें; कुंठित करणें.

निरोप पु० १ कोणा मनुष्याला कोणेकाच्या मुखानें कळविलेली किं० कळवावयाची आपली इच्छा (पाठविणें, कळविणें, इ०). २ कोणेकाला जावयाला संमानपूर्वक दिलेली रजा किं० परवानगी किं० अनुज्ञा. ३ कामावरून किं० नोकरीवरून दूर करणें किं० काढणें,—त्याचें काम संपल्यामुळें किं० त्याला काम करतां येत नसल्यामुळें (क्रि० देणें.) ४ मी जातों अशी वर्दी कोणेकाला देणें. (क्रि० घेणें). ॐ **कोणेकाला निरोप देणें** त्याची पाठवणी किं० रवानगी करणें. **कोणेकाचा निरोप घेणें** मी जात आहें असें त्याला सांगणें; त्याची रजा घेणें. **दिव्याला निरोप देणें** तो मालविणें.

निरोप्या पु० केवळ निरोप पोंचविण्याचें काम [करणारा.

निर्ऋति [सं०] स्त्री० मृत्यूची देवता. पु० नैर्ऋत्य दिशेचा अधिपति.

निर्गणचा वि० कुचकामाचा; निरुपयोगी; बे-अकली; मूर्ख (कारकून, कारागीर, अधिकारी, इ०).

निर्गत [सं०] वि० १ बाहेर गेलेला; बाहेर पडलेला; बाहेर पाठवावयाचा. २ उत्पन्न झालेला. स्त्री० १ परदेशाकडे जाणाऱ्या मालावरची जकात. कार्याची निभावणी किं० समाप्ति; कार्य पार पाडणें; कार्याचा सुरळीत शेवट.

निर्गंध [सं०] वि० वास ज्याला नाहीं असा.

निर्गम [सं०] पु० बाहेर येणें; बाहेर पडणें. २ निघून जाणें. ३ नाहींसें होणें. ४ दार; मार्ग; बाहेर पडण्याची वाट. ५ उत्पत्ति.

निर्गांठ [सं० निर्ग्रंथि] स्त्री० पक्की मारलेली किं० बसविलेली दोरी, नाडी, इ० ची गांठ. याच्या उलट ' सुरगांठ ' किं० ' सरगांठ '.

निर्गुंडी [सं०] स्त्री० एक वनस्पति.

निर्गुण [सं] वि० गुणरहित. ह्या अर्थी ' निर्गुणी.' पु०, न० त्रिगुणातीत ब्रह्म; परमात्मा.

निर्घृण [सं०] वि० दयारहित; क्रूर; कठोर.

निर्घोर [म० निर्+घोर (चिंता, संकट)] वि० ज्याला भय किं० विवंचना नाहीं असा; स्वस्थ; शांत.

निर्जन [सं०] वि० १ ओसाड. २ परिवार ज्याला नाहीं असा.

निर्जर [सं०] वि० १ तरुण. २ ज्याला म्हातारपण नाहीं असा. ३ अमर; अविनाशी. पु० देव.

निर्जल [सं०] वि० १ जलरहित. २ ज्यांत पाणी सुद्धा प्यावयाचें नाहीं असा (उपास). स्त्री० निर्जली, निर्जळी.

निर्जित [सं०] वि० पूर्णपणें जिंकिलेला किं० आटोक्यांत आणलेला; पूर्णपणें पराजित.

निर्जीव [सं०] वि० १ प्राणरहित. २ निर्बळ; अशक्त. ३ म्लान; सुकलेला.

निर्झर [सं०] पु० १ पर्वतावरून वाहात येणारा ओढा. २ पाण्याचा झरा.

निर्णय [सं०] पु० १ निश्चय. २ निकाल; निवाडा. ३ सिद्धान्त. ४ न्यायाधीशानें सर्व गोष्टी विचारांत घेऊन केलेला ठराव.

निर्णयात्मक [सं०] पु० निर्णय देणारा; निकाल देणारा(मनुष्य न्यायाधीश, इ०). वि० जिच्यावरून निकाल करतां येईल अशी(कांहीं गोष्ट.

निर्णीत [सं०] वि० १ ज्याचा निकाल करण्यांत किं० लावण्यांत आला आहे असा; ठर-विण्यांत आलेला २ ज्याच्याबद्दल शंका किं० संशय नाहीं असा.

निर्तुटक [म० निर+तुटणें] न० कर्ज

मांडण, इ० पूर्णपणें तुटणें; विरोधाचें कारण न राहाणें; निकालास लागणें; मिटणें. वि० फुटलेली, मोडलेली, किं० विस्कळित झालेली (संस्था, सरकार, पार्टी, इ०).

निर्तुला [सं० निर्+तुला (तराजू)] **वि०** अप्रतिम; अनुपम; सर्वोत्कृष्ट.

निर्ददात, निर्दधात [म० निर्+ददात, दवात] **वि०** ज्याला खाण्यापिण्याची पंचाईत नाहीं असा; सुस्थितींत असलेला.

निर्दय [सं०] **वि०** दयारहित; क्रूर; कठोर. ' निर्दया ' याच अर्थानें योजला जातो.

निर्दलन [सं०] **न०** १ फोडणें. २ नष्ट करणें. ३ विध्वंस. **निर्दलना, निर्दलणी, निर्दाळणी स्त्री०, निर्दळण न०** हेही शब्द ह्याच अर्थानें योजण्यांत येतात.

निर्दाळणें [सं० निर्+दल (चिरडणें)] **स०क्रि०** १ विध्वंसिणें, छिन्नविच्छिन्न करणें. २ समूळ उपटून काढणें. ३ पराभविणें.

निर्दिष्ट [सं०] **वि०** १ दाखवून दिलेला; सांगितलेला. २ वर ज्याचा उल्लेख केला आहे असा.

निर्दुष्ट [सं० निर्+दुष्ट] **वि०** दोषरहित; न्यूनरहित.

निर्देश [सं०] **पु०** १ दाखविणें. २ सांगणें. ३ आज्ञा. ४ उपदेश. ५ नांव. ६ नांव, गांव, इ० चें कथन. ७ वर्णन.

निर्दैव [सं०] **वि०** दुर्दैवी; कमनशीबाचा.

निर्दोष [सं०] **वि०** दोषरहित; ज्यांत कांहीं उणेपणा नाहीं असा. ' निर्दोषी ' ह्याच अर्थी योजला जातो.

निर्द्वंद्व [सं०] **वि०** १ ज्याला कोणी जोडीदार नाहीं असा. २ सुखदुःखादि भावनारहित. ३ अद्वितीय; उत्कृष्ट. ४ उदासीन.

निर्धन [सं०] **वि०** ज्याच्याजवळ द्रव्य नाहीं असा; दरिद्री.

निर्धातु, निर्धातुक [सं०] **वि०** १ प्रजोत्पादक वीर्य ज्याचें अंगीं नाहीं असा; षंढ. २ गरीब; कंगाल.

निर्धार [सं०] **पु०** १ ठरविणें; निश्चित करणें. २ निवडणें. ३ निश्चितार्थ. ४ मनाचा पक्का निश्चय; मनानें पक्केपणीं ठरविलेला विचार किं० वर्तनसरणी.

निर्धारणें [सं० निर्+धृ] **स०** कांहीं एक गोष्ट निःसंदिग्ध रीतीनें ठरविणें किं० मनानें जाणणें.

निर्धास्त [सं० निर्; म० निर्; अ० धप्र; म० धास्ती] **वि०** भीतिरहित; साशंकवृत्तिरहित; स्वस्थ; शांत; भीति किं० कचर ज्याला नाहीं असा (अग्नि).

निर्धूत [सं०] **वि०** धुऊन टाकलेला. २ उटवून लावलेला. ३ नष्ट केलला. ४ जिच्या अंगावर कांहीं दागिने नाहींत अशी (स्त्री).

निर्धूम [सं०] **वि०** ज्यांतून धूर निघत नाहीं असा (अग्नि).

निर्धोक [म० निर्+धोका] **वि०** जेथें किं० ज्यांत कांहीं धोका नाहीं असे (स्थळ, व्यापार, इ०); सुरक्षित; अपायरहित असे.

निर्बंध [सं०] **पु०** १ आग्रह. २ हट्ट; दुराग्रह. ३ लोचटपणा. ४ गढणें. ५ आसक्ति. ६ अति किं० पराकाष्ठेचा प्रयत्न.

निर्बल, निर्बळ [सं० निर्बल] **वि०** बलरहित; अशक्त; कमजोर; असमर्थ. ॐ**निर्बळी खेळ** (किं० **डाव**) **पु०** (बुद्धिबळांच्या खेळांत) ज्या मोहोऱ्यांना दुसऱ्या मोहोऱ्याचा जोर नाहीं अशांच मोहोरीं मारून खेळण्याचा प्रकार.

निर्बाण **वि०** ज्याला घरदार, बायकोमुलें, उद्योगधंदा नाहीं असा.

निर्बाणी [सं० निर्वाण] **पु०** गोसाव्यांचा एक पंथ. हे गोसावी नग्न असतात. **वि०** स्वताच्या हिमतीवर कार्याला हात घालणारा; धाडसी; साहसी.

निर्बीज [सं०] **वि०** १ ज्याचें बीज बिलकूल शिलक राहिलें नाहीं असा; ज्याचा बीमोड झाला असा; उ० ह्या खोलींतील ढेकूण आतां निर्बीज झाले. २ ज्याला कांहीं आधार, प्रमाण, पुरावा नाहीं असा (आरोप, बातमी, टपका, इ०). ३ ज्यांत बीज नाहीं किं० अगदीं लहान बीज आहे असें (फळ); उ० केळें हें निर्बीज फळ आहे; उ० बेदाणा निर्बीज आहे. **न०** समूळ नाश किं० विध्वंस.

निर्बुद्धि [सं० निर्+बुद्धि] **वि०** बुद्धिहीन; अशिक्षित; अडाणी.

निर्भय [सं० निर्+भय] वि० १ ज्याला भीति नाहीं असा; सुरक्षित. २ ज्याला अपाय नाहीं असा. न० भीति नाहीं अशी स्थिति; सुरक्षितपणा.

निर्भर [सं०] वि० १ अतिशय. २ गाढ. ३ पूर्ण; भरलेला; व्याप्त; उ० आनंदनिर्भर. पु० १ आवेशाचा प्रयत्न; दृढनिश्चय; दृढ आसक्ति. २ कांहीं काम, कला, विद्या, इ० मध्यें पूर्ण वाकबगारी.

निर्भर्त्सिणें [सं० निर्+भर्त्स् (निंदिणें)] स० क्रि० निंदिणें; दोषी ठरविणें; तिरस्कारणें.

निर्भीड [म० निर्+भीड] वि० १ भीति ज्याला नाहीं असा; धीट. २ संकोच ज्याला नाहीं असा; कोणाची मुरवत न ठेवणारा.

निर्भेल (–ळ) वि० ज्यांत दुसऱ्या पदार्थाचा कांहीं अंश नाहीं असा; अस्सल (दूध, तूप, इ०).

निर्भ्रांत, निर्भ्रांति [सं० निर्+भ्रांत] स्त्री० खात्री; मनाची निश्चितपणा; मनाची असंदिग्ध वृत्ति.

निर्भ्रांत वि० ज्याला खात्री वाटत आहे असा; ज्याला संशय किं० शंका उरली नाहीं असा.

निर्भ्रांत क्रि० वि० १ निःसंशय; खात्रीपूर्वक; खचित. २ बेलाशक; न कचरतां. ३ आढेवेढे न घेतां.

निर्मनुष्य [सं० निर् (नाहीं)+मनुष्य] वि० १ मानवी वसति जेथें नाहीं असा (गाव, घर, इ०). २ मनुष्यबळ ज्याला नाहीं असा; असहाय.

निर्मम [सं०] वि० १ ममत्वरहित; विरक्त; देहिक गोष्टींनीं जो आकर्षिला जात नाहीं असा. २ उदासीन.

निर्मल (–ळ) [सं०] वि० मळ ज्याला किं० ज्यांत नाहीं असा; स्वच्छ. २ निष्पाप. ३ निर्भेळ; ज्यात दुसऱ्या पदार्थाची भेसळ किं० मिश्रण नाहीं असा.

निर्माण [सं०] न० १ मापणें; मोजणें. २ बनविणें; उत्पन्न करणें; घडविणें. ३ केलेली किं० बनविलेली वस्तु. ४ घडण, ठेवण, घाट, रचना. वि० उत्पन्न केलेलें; घडविलेलें; बनविलेलें.

निर्मानुष [सं०] वि० मनुष्याची वसति जेथें नाहीं असा; ओसाड (गांव, देश, इ०).

निर्माल्य [सं०] न०, पु० १ देवावरून उतरून किं० काढून टाकलेलीं फुलें, दूर्वा, तुळशी, इ०. २ वास घेतल्यामुळें किं० मनुष्यानें वापरल्यामुळें देवांना वाहावयास अयोग्य झालेलीं फुलें इ०. ३ (लाक्षणिक) राजकृपा, अधिकार, संपत्ति, लौकिक, इ० नष्ट झाल्यामुळें कोपऱ्यात पडलेला किं० अनादरास किं० तिरस्कारास पात्र झालेला मनुष्य. ४ (लाक्षणिक) जो मनुष्य कोणत्याही कारणानें निरुपयोगी झाला तो.

निर्मिणें [सं० निर्+मा (उत्पन्न करणें)] स० क्रि० १ अस्तित्वांत आणणें; उत्पन्न करणें. २ बनविणें; घडविणें; तयार करणें. ३ ईश्वरानें मनुष्यमात्राचे इहलोकचे भोग ठरविणें; उ० ईश्वरानें जसें जसें निर्मिलेलें असेल तसें तसें घडेल, तुम्ही काळजी करून (किं० खेद करून) काय उपयोग?

निर्मित [सं०] वि० १ उत्पन्न केलेलें. २ अस्तित्वांत आणलेलें. ३ केलेलें; घडविलेलें; बनविलेलें. ४ ईश्वरानें मनुष्याचे ठरवून ठेविलेले (सुखदुःखादि भोग). ५ कृत्रिम; बनावट.

निर्मुक्त [सं०] वि० १ मोकळा सोडण्यांत आलेला. २ सुटलेला. ३ विरक्त. ४ कवच, कात, इ० टाकली आहे ज्याणें असा (साप, इ०). ५ बंधन ज्याला नाहीं असा. ६ कर्ज, संकटस्थिति, काळजी, इ० तून मोकळा झालेला.

निर्मूल (–ळ) [सं०] वि० १ ज्याला मूळ नाहीं किं० ज्याचे मूळ तुटलेलें आहे असा (वृक्ष इ०). २ आधाररहित. ३ मुळासकट उपटलेला. ४ प्रमाणरहित; सत्यावर न स्थापिलेली (बातमी, अफवा). ५ बनावट; खोटा.

निर्मूलन [सं०] न० समूळ उच्छेद किं० विध्वंस. ' निर्मूल ' न० हाही शब्द ह्याच अर्थानें योजला जातो.

निर्मोचन [सं०] न० बंधनापासून मोकळें [करणें.

निर्मोह [सं० निर् (नष्ट)+मोह] वि० १ मोह, अज्ञान, माया, प्रपंचांत आसक्ति, इ० तून मोकळा झालेला. २ सांसारिक बंधनें ज्याला अद्यापि जडलीं नाहींत असा. पु० शिव.

निर्याण [सं०] न० १ बाहेर पडणें. २ स्थलविशेष सोडून जाणें. ३ मरण. ४ मोक्ष.

निर्यातन[सं०] न० १ कर्ज फेडणें २ सूड उगविणें; प्रतिकार. ३ दान ४ ठेव परत देणें. ***वैरनिर्यातन** न० सूड उगविणें; अपकाराची फिटंफाट.

निर्यास [सं०] पु० १ वृक्षादिकांचा चीक

डांक, दूध, पाझर, इ०. २ काढा; अर्क; सार; सारभूत अंश.

निर्युक्ति [सं०] **स्त्री०** १ अयोग्यता. २ वियोग. ❀ **निर्युक्तिक** वि० असमंजसपणाचा; युक्तीशी न जुळणारा.

निर्लज्ज [सं०] वि० ज्याला लाज नाहीं असा; बेशरम.

निर्लिप्त [सं०] वि० १ न माखलेला. २ कलंकित किं० दूषित न झालेला. ३ कामक्रोधादींनीं अदूषित. ४ कांहीं दुष्कृत्यांत सामील नसलेला. टीप,—वरील सर्व अर्थी ' निर्लेप ' हाही शब्द योजला जातो.

निर्लेप [सं०] वि० ' निर्लिप्त'चे सर्व अर्थ पहा. ५ शिजवून किं०भाजून खरखटा न झालेला (खाद्य पदार्थ); ओंवळ्यानें खावयाला हरकत नाहीं असा (खाद्य पदार्थ).

निर्वचन [सं०] **न०** १ उच्चार. २ म्हण. ३ प्रशंसा. ४ शब्दव्युत्पत्ति. ५ शब्दकोश.

निर्वचनीय [सं०] वि०वर्णन करण्यास योग्य.

निर्वंश [सं०] **पु०** कुटुंबाचा समूळ उच्छेद. वि० पुत्ररहित. ❀ **निर्वंशी कलम न०** वंशक्षय आलेल्या पिढींतील जे पिशाच ते. क्षय पावलेल्या कुटुंबाच्या घरांत जें नवें कुटुंब राहात असतें त्याला हें पिशाच उपद्रव करतें.

निर्वाण [सं०] वि० १ विझलेलें. २ शांत झालेलें. ३ मृत. ४ क्षय पावलेला. ५ मोक्ष मिळालेला आहे ज्याला असा. ६ अस्तंगत. **न०** १ विझणें. २ नष्ट होणें. ३ मृत्यु. ४ मोक्ष. ५समाधि. ६ समाधान, तृप्ति. ७ सुख, आनंद. ❀ **निर्वाण करणें** पराकाष्ठा करणें. **निर्वाणचा, निर्वाणीचा** वि० १ सर्व अन्य इलाज हरल्यावर योजावयाचा. २ आणीबाणीच्या प्रसंगीं योजावयासाठीं राखून ठेविलेला (उपाय, इलाज, प्रमाण, इ०). **निर्वाणीचा जबाब पु०** अगदीं शेवटचें ठामसर दिलेलें उत्तर. **निर्वाणीचा समय पु०** अंतकाळ.

निर्वात [सं०] वि० जेथें जोराचा वारा नाहीं असें (ठिकाण); निवाऱ्याचें (स्थळ) **न०** शांतपणा; उपद्रव नाहीं अशी स्थिति.

निर्वासन [सं०] **न०**हाकलून देणें;हाकालपट्टी.

निर्वासन [सं०निर् + वासना] वि० निरिच्छ; वासनारहित.

निर्वाह [सं०] **पु०** १कार्यसिद्धि. २ समाप्ति; तडीस लावणें. ३ नाश. ४ पुरवठा. ५ चरितार्थ. ६ निवारण.

निर्वाहक [सं०] वि० कांहीं काम चालविते किं० शेवटास लावतो तो; पार पाडणारा.

निर्वाळा पु० कोणा माणसाविषयीं किं० पदार्थाविषयीं आपणास वाटत असते ती खात्री किं० भरंवसा (असणें, होणें). ❀ **कोणेकाबद्दल निर्वाळा देणें** त्याच्याबद्दल हमी घेणें; त्याच्याबद्दल खात्री देणें; उ० हा गडी तुम्हीं नोकरीस ठेवा, त्याचा निर्वाळा मी देईन (किं० मला आहे).

निर्विकल्प [सं०] वि० भेदरहित.

निर्विकार [सं०] वि० १ विकाररहित;शांत. २ निस्पृह. ३ उदासीन. **पु०** परमात्मा.

निर्विघ्न [सं०] वि० अडचणी, हरकती, खोळंबा, इ० ज्यांत नाहींत असें(काम इ०).**न०** विघ्नरहितता; उ० ईश्वरस्मरणानें निर्विघ्न होतें. **क्रि० वि०** अडचणी, विघ्नें, अडथळे, इ० न येतां (कांहीं काम पार पडणें).

निर्विण्ण [सं०]वि०१ खिन्न. २ दुःखग्रस्त. ३ कंटाळलेला; वीट आलेला. ४ जीर्ण; शिथिल; गळालेला.

निर्विवाद [सं०] वि० ज्याबद्दल वाद नाहीं असें; संशयरहित. **क्रि० वि०**खचित;खात्रीपूर्वक; धडधडीत; स्पष्टपणें.

निर्विष [सं०] वि० १विषरहित(सर्प इ०). २ अहंकार, काम, क्रोध, इ०विकार ज्याणें जिंकिले आहेत असा.

निर्विषय [सं०] वि० १ ऐहिक वस्तूंवर ज्याची आसक्ति नाहीं असा. २देशहीन;स्थानहीन. ३ ज्याला अवकाश नाहीं असा.

निर्वीर [सं०] वि० प्रतिस्पर्धी किं०शत्रु जेथें उरला नाहीं असें स्थळ किं०ज्याला शत्रु नाहीं उरला नाहीं असा (माणूस).

निर्वीर्य [सं०] वि० १ वीर्य ज्याचें ठायीं नाहीं असा (माणूस, औषध इ०).२ भित्रा; ज्याचें ठायीं कांहीं मर्दुमकी, पराक्रम, कर्तृत्व, इ० नाहीं असा (मनुष्य).

निर्वृति [सं०] **स्त्री०** १ सुख; संतोष. २ शांति; स्वास्थ्य. ३ मोक्ष. ४ समाप्ति. ५ नाश; क्षय. ६ मृत्यु.

निर्वृत्ति [सं०] **स्त्री०** १ सिद्धि; कार्य तडीस जाणें; घडणें. २ समाप्ति; शेवट; पर्यवसान.

निर्वेद [सं०] **पु०** १ खेद; नाउमेद; खचलेपणा. २ दुःख, शोक. ३ मानखंडना. ४ वीट; किळस; शिसारी. ५ वैराग्य.

निर्वेध [सं० निर् + वेध (उपद्रव, खंड)] **वि०** १ उपद्रवरहित (स्थल). २ हरकती, त्रास, किं० दगदग ज्यांत नाहीं असें (काम, उत्पन्न, प्राप्ति, इ०); अविच्छिन्न; उ० ह्या धंद्यांत तुम्ही भांडवल घाला, म्हणजे शंभर रुपये तुम्हाला निर्वेध मिळत राहातील.

निर्व्यसन [सं० निर् (ना) + व्यसन (वाईट खोडी)] **वि०** १ ज्याला कोणतीही वाईट खोडी किं० सवय नाहीं असा (मनुष्य). २ शुद्ध; पवित्र (देव). **टीप**,–पहिल्या अर्थानें 'निर्व्यसनी' असाही शब्द आहे.

निर्व्यपेक्ष [सं०] **वि०** निस्पृह; उदासीन.

निर्व्याज [सं०] **वि०** १ निष्कपट. २ अस्सल; खरा.

निर्हरण [सं०] **न०** १ सर्वस्वाचें हरण, विध्वंस, इ०. २ जाळण्यासाठीं प्रेत इ० बाहेर नेणें. ३ कांटा काढणें. ❀ **निर्हरणाशौच न०** प्रेत वाहून नेल्याचा विटाळ.

निऱ्हार, निऱ्हारी मागें 'निराहार,' 'निराहारी' पहा.

निलाख, निलाखी, निलखी [म० नि (नाहीं) + लाख] **वि०** ज्यांत लाख नाहीं असा (दागिना).

निलागी [म० नि (नाहीं) + लागणें] **वि०** १ किड्यांनीं न खाल्लेलें (धान्य, लाकूड). २ ज्याला बहुधा कीड लागत नाहीं असें (धान्य, लाकूड).

निलाजरा [म० नि + लाजरा] **वि०** निर्लज्ज; बेशरम; लतकोडगा.

निलाम [हिं० नीलाम्] **न०** लिलाव.

निलीम पु०, न० गलबत किं० होडी पाण्यांत डळमळूं नये म्हणून त्यांत घालतात तें वाळू, धोंडे, इ० वजन.

निवगरी, निवग्री स्त्री० तांदुळाच्या पिठाचें वाटीच्या आकाराचें शिजवून किं० उकडून करतात तें खाद्यविशेष.

निवटणें [म० नि + वटणें] **अ० क्रि०** १ फळें, गळूं, इ० पिकून आपोआप फुटण्याच्या दशेस येणें. २ (चांगल्या किं० वाईट गुणांनीं) प्रसिद्धीस येणें. ३ स्पष्ट रूपांत (कांहीं काम, व्यवहार) दृष्टोत्पत्तीस येणें.

निवटणें स० क्रि० १ उच्छिन्न किं० विध्वस्त करणें (कवितेंत). २ (सरकी काढून कापूस) स्वच्छ करणें.

निवड [म० निवडणें] **स्त्री०** १ एका जातीच्या अनेक पदार्थांतून एक पदार्थ बाजूस काढणें किं० असा बाजूस काढलेला पदार्थ. २ अशा क्रियेनंतर राहिलेला गाळ.

निवड [म० नि (नाहीं) + आवड] **स्त्री०** नापसंती. **टीप**.– हा शब्द 'आवड निवड' ह्या शब्दसंहतींतच येतो.

निवड, निवडक [म० निवडणें] **वि०** १ मोठ्या समुदायांतून पसंत करून बाजूस काढलेला (भाग किं० अंश).

निवडंग, निवडुंग, निवडिंग, निवडुंगट पु०, न० असंख्य कांटे ज्याला असतात असें एक झुडूप. हें कुंपणाला लावतात. ह्याचीं फळें तांबडीं असून तीं डांग्या खोकल्यावर योजतात.

निवडणी, निवडणूक [म० निवडणें] **स्त्री०** मोठ्या समुदायांतून विशिष्ट अंश किं० व्यक्ति पसंत करणें. **निवडणूक स्त्री०** एकाद्या अधिकाराच्या जागेवर कोणा मनुष्यास नेमण्याबद्दलची पसंती.

निवडणें स० क्रि० १ समुदायांतून (विशिष्ट अंश किं० व्यक्ति) पसंत करून बाजूस काढणें किं० (विशिष्ट अंश किं० व्यक्ति) नापसंत करून बाजूस टाकणें. २ भांडण, तंटा, वाद, इ० मध्यें निकाल लावणें.

निवडणें अ० क्रि० मागें 'निवटणें' अ० क्रि० पहा.

निवण न० डोळे आले असतां किं० तळावले असतां डोळ्याला दुधाची घडी ठेवणें इ० जे शीतोपचार करतात ते प्रत्येक.

निवण, निवणें न० चुलीशेजारी पदार्थ निव-विण्यासाठीं जो खळगा केलेला असतो तो.

निवणें न० वाटोळ्या बुडाचें भांडें कलमळूं नये म्हणून गवत इ० चें कडें जें त्याच्याखालीं ठेवितात तें.

निवणें अ० क्रि० १ उष्ण पदार्थ थंड होणें. २ सार्थाचा उपद्रव, कलकलाट, भांडण, इ० शमणें किं० कमी होणें किं० अजीबाद बंद पडणें. ३ भड-कलेला मनोविकार शांत होणें. ꙮ **डोळे निवणें, कान निवणें** इष्ट गोष्ट पहावयास किं० ऐकावयास मिळाल्यामुळे डोळे, कान, संतुष्ट होणें.

निवंता [सं० न्यूनता] स्त्री० कमताई, उणे-पणा (अकरणरूपी); उ० आमचें शेत असल्या-कारणानें आम्हाला धान्याची निवंता नाहीं.

निवरंगी, निवगरी स्त्री० मागें ' निवगरी ' पहा.

निवर्तक [सं०] वि० १ थांबविणारा. २ परतविणारा.

निवर्तन [सं०] न० १ परतणें; परतून मागें येणें. २ प्रतिकार; निवारण. ३ दोनशे हात लांब रुंद असें क्षेत्र.

निवविणें [म० ' निवणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ उष्ण पदार्थ थंड करणें. २ क्रोधादि मनोविकार (आपला किं० लोकाचा) शांत करणें; गोड आणि सौम्य बोलून कोणकाचा राग घालविणें.

निवळ, निवळी स्त्री० १ मृत्तिकेचा अंश किं० केरकचरा इ० ज्यांत नाहीं असें पाणी इ०; दाट अंश भांड्याच्या बुडाला बसून वर जें ताकाचें पाणी असतें तें; चुन्याच्या कळ्या विरविल्यावर भांड्यांत घट्ट चुना तळाशीं बसून वर जें पाणी जमतें तें. २ ऐन रकम. **वि०** १ स्वच्छ; मळ, गढूळपणा, माका, इ० ज्यांत नाहीं असें (पाणी, डोळा, आकाश, इ०). २ कपट ज्यांत किं० ज्याचे ठायीं नाहीं असा (व्यवहार, मनुष्य). **क्रि० वि०** १ स्पष्टपणें; धडधडीत; निःसं-शय; खात्रीपूर्वक; उघड उघड. २ साधारणानें; सरळ रीतीनें. ꙮ **निवळ गांठ स्त्री०** शांतपणांत बोलतां चालतां येईल अशी कोणकाची पडलेली गांठ किं० झालेली भेट; मोकळ्या मनानें बोलतां येईल अशी कोणकाची पडलेली गांठ.

निवळ, नितळ वि० १ स्वच्छ; मळरहित. २ शांत; अक्षुब्ध. ३ झोप, अमल, इ० पूर्णपणें जाऊन जागा किं० शांत झालेला. **निवळशंख वि०** १ अगदीं निमळ; अगदीं मळरहित (पाणी इ०) २ अगदीं अडाणी किं० मूर्ख. ३ ज्याचेजवळ एका कवडीचीही संपत्ति नाहीं असा (मनुष्य). ४ ज्याचेवर विद्येचा कांही संस्कार झाला नाहीं असा; अगदीं निरक्षर.

निवळण [म० निवळणें] न० १ तळावलेले किं० लाल झालेले डोळे यांना केलेला थंडाईचा उप-चार. २ कोणत्याही गढूळ पातळ पदार्थाचा किं० मिश्रणाचा शुद्ध अंश जो वर जमतो किं० तळाला बसतो तो. ३ गढूळ पाणी स्वच्छ करण्याकरतां त्यांत घालतात तें द्रव्य (निवळीचा बी उगाळून, किं० दुसरें कांही).

निवळणें [सं० निर्मल] अ० क्रि० १ पाणी इ० स्वच्छ किं० निर्मळ होणें. २ आकाश, डोळे, इ०, हे माका, लाली, इ० जाऊन स्वच्छ होणें. ३ भरकटलेला किं० दुर्मार्गाला लागलेला मनुष्य सन्मा-र्गवर्ती होणें. ४ क्षुब्ध झालेला मनोविकार किं० मनुष्य शांत होणें. ५ हरीक, तंबाखू इ० तील उन्मादक गुण किं० अंश कमी होणें. ६ कला, विद्या, इ० मध्यें (कोणी मनुष्य) प्रगतीच्या मार्गाला लागणें. ७ अर्धवट समजलेला विषय स्पष्टपणें समजणें. **निवळलें लोखंड न०** वृद्ध असून धट्टाकट्टा आणि मजबूत असा माणूस.

निवळी [म० निवळ] स्त्री० १ कांहीं ढवळलेला किं० डवचलेला पातळ पदार्थ कांही वेळ स्थिर ठेविल्यानें त्याचा जो अगदी पातळ भाग किं० पाण्याचा अंश खालीं बसतो किं० वर जमतो तो. २ गढूळ पाणी ज्या झाडाच्या बीनें स्वच्छ करतां येतें तें झाड किं० तें बी. ३ एक वेली. ४ बैलाच्या शिंगाला बांधतात ती दोरी किं० काढणी.

निवाडा [म० निवडणें] पु० भांडण, कज्जा, वाद, संदिग्ध विषय, इ० चा उलगडा; निर्णय. ꙮ **निवाडापोवाडा पु०** १ संकटांतून किं० अड-चणीच्या प्रसंगांतून निभावून निघणें. २ गरोदर स्त्री प्रसूत होऊन तिची आणि अपत्याची सुस्थिति. **निवाडपत्र न०** कज्जा, भांडण, इ० चा निकाल ज्या कागदावर लिहिलेला असतो तो कागद.

निवाणें [सं० निर्वाण] न० १ उच्छेद; नाश. २ नासाडी.

निर्वात [सं०] वि० १ जेथें गडबड, कलकल, गोंगाट, इ० नाहीं असें (स्थळ). २ जेथें फारसा वारा नाहीं असें (स्थळ)

निवांत [सं० ' निर्वात 'चा अपभ्रंश] वि० १ शांत; स्वस्थ (मनुष्य). २ जेथें कलकलाट किं० गोंगाट नाहीं असें (स्थळ). क्रि० वि० १ स्वस्थपणानें. २ आरामाच्या स्थितींत.

निवात [सं०] वि० १ स्वस्थ; शांत. २ वायुरहित (स्थळ). न० १ वायुरहित स्थळ. २ निवाऱ्याची जागा. ३ शांतता.

निवांतलें [म० नांव=छपराचें एक पाखें; आंतलें=आंतील] न० उदरापासून जो विकार होतो त्यास संकेतानें म्हणतात; उ० त्याला निवांतलें झालें आहे; उ० त्याला निवांतल्याचा उपद्रव, निवांतल्याची बाधा, झाली आहे.

निवारक [सं०] वि० निवारण करणारा; दूर करणारा; उपद्रव नाहींसा करणारा; उ० कृमिनिवारक चूर्ण.

निवारण [सं०] न० १ दूर करणें २ संकटापासून रक्षण. ३ उपद्रवापासून बचाव. ४ मागें खेंचणें. ५ थांबविणें; आडविणें.

निवारणें [सं० नि+वृ] स० क्रि० १ टाळणें. २ दूर करणें किं० सारणें. ३ कोणकाला कांहीं कार्यापासून निवृत्त किं० पराङ्मुख करणें. ४ थांबविणें; आडविणें.

निवारसा [म० नि (नाहीं)+वारस]पु० संपत्ति, कांहीं पदार्थ, इ० वर हक्क नसणें किं० स्वामित्वाचा ताबा न लागू होणें. ॐ **निवारशी, निवारशीक, निवारीस** वि० ज्याला कोणी वारस, पालक, किं० स्वामी नाहीं असा (पदार्थ, जनावर, इ०).

निवारा पु० उपद्रवाचा अभाव; सुरक्षितपणाची जागा; आश्रयाला योग्य असें स्थळ. ॐ **निवाऱ्याचा** वि० १ सुरक्षित किं० निरुपद्रव स्थितींत किं० जागेंत असलेला. २ जीविताचे कष्ट किं० खलजनाचा उपद्रव इ०चा अनुभव ज्याला आला नाहीं असा.

निवारित [सं०] वि० १ थांबविलेला; आडविलेला; परतविलेला. २ संरक्षिलेला; संकटापासून ज्याचा बचाव करण्यांत आला आहे असा.

निवारीस (–स) वर ' निवारशी ' पहा.

निवार्य [सं०] वि० थांबविण्याला किं० आडविण्याला किं० टाळण्याला शक्य किं० योग्य.

निवास [सं०] पु० १ राहाणें, वसति करणें. २ गृह; राहण्याची जागा. ३ आश्रयाची जागा. ॐ **निवासी** वि० स्थलविशेषीं राहणारा; उ० काशीनिवासी, मथुरानिवासी.

निवाळणें वर ' निवळणें ' पहा.

निविष्ट [सं०] वि० १ बसलेला. २ स्थळविशेषीं बसलेला किं० खिळलेला किं० स्थिरावलेला ३ मुक्काम करून राहिलेलें(सैन्यादि). ४ एकाद्या विषयांत किं० कामांत तल्लीन झालेला. ५ प्रविष्ट. ६ कांहीं कामावर किं० अधिकारावर स्थापिलेला.

निवी पढें ' नीवी ' पहा.

निवीत [सं०] पु०, न० माळेसारखें घातलेलें जानवें. ॐ **निवीती** [सं० निवीतिन्] वि० माळेसारखें जानवें ज्यानें गळ्यांत धारण केलें आहे असा.

निवृत्त [सं०] वि० १ परतलेला; परत गेलेला. २ अदृश्य; नष्ट. ३ विरक्त; सर्व संग ज्यानें सोडले आहेत असा. ॐ **निवृत्तात्मा** पु० साधु पुरुष.

निवृत्ति [सं०] स्त्री० १ परतणें. २ टाळणें; परित्यागणें. ३ शेवट; अखेर; पर्यवसान. ४ कांहीं कार्य थांबविणें किं० बंद करणें; खळ. ५ वैराग्य. ६ स्वस्थ बसणें. ७ नकार; निषेध. ८ मोक्ष; मुक्ति. ९ दोष, आजार, इ०चें निरसन; उ० औषध घे म्हणजे ज्वरनिवृत्ति होईल. ॐ **निवृत्तिमार्ग** पु० प्रपंचांतून मन काढून ईश्वराकडे लावणें. याच्या उलट ' प्रवृत्ति मार्ग. '

निवेदक [सं०] वि० सांगणारा; कथिणारा; वर्दी देणारा; वर्णिणारा.

निवेदणें [सं० नि०+विद्] स० क्रि० १ सांगणें. २ जाहीर करणें. ३ (कांहीं वस्तु) कोणेकाला देणें किं० अर्पिणें.

निवेदन [सं०] न० १ सांगणें; कथिणें. २ जाहीर करणें. ३ कांहीं वस्तु कोणकाला देणें किं० अर्पण.

निवेद्य [सं०] वि० सांगतां, वर्णितां, किं० देतां येण्याजोगें.

निवेद्य, नैवेद्य [सं० निवेद्य, नैवेद्य] न०, पु० आराध्य देवतेस अर्पिलेलें किं० अर्पावयाचें अन्न किं० खाद्य वस्तु.

निवेश [सं०] पु० १ प्रवेश. २ स्थलविशेषीं राहाणें. ३ गृह; वसतीची जागा. ४ मुक्काम किं० मुक्कामाची जागा. ५ सैन्याचा तळ; शिबिर. ६ गांव स्थापणें किं० वसविणें. ७ ठेवणें; स्थापणें. ८ विद्या, कला, अभ्यास, इ० मध्यें झालेला शिरकाव, किं० प्रगति, किं० मिळविलेलें प्रावीण्य.

निवेशन [सं०] न० १ ठेवणें; स्थापणें. २ गांव वसविणें. ३ गृह, मंदिर.

निःशंक, निश्शंक [सं०] वि० ज्याला शंका, भीति, कचर, किं० संशय नाहीं असा. **क्रि० वि०** शंका न बाळगतां; न कचरतां; बेलाशक.

निःशक्त, निश्शक्त [सं०] वि० शक्तिहीन; दुर्बल; दुबळा.

निःशब्द, निश्शब्द [सं०] वि० कांहीं शब्द न बोलणारा; कांहीं आवाज न करणारा.

निशा [सं०] स्त्री० १ रात्र. २ हळद; दारु-हळद. ३ (ज्योतिष) राशि. ॐ **निशाट** पु० १ घुबड. २ राक्षस, -जे रात्रीं हिंडणारे असतात. **निशाकर, निशापति, निशामणि** पु० चंद्र. **निशाचर** पु० १ पिशाच. २ राक्षस. ३ चोर. ४ घुबड. **निशाचर वृत्ति** स्त्री० १ रात्रीं चोरी कर-ण्याचा धंदा. २ रांडबाजीचें व्यसन. **निशिभार्गव** पु० लक्ष्मीदेवीच्या प्रीत्यर्थ दर शुक्रवारीं दिवसास कांहीं न खातां रात्रीं जेवणें हें व्रत.

निशा [अ०] स्त्री० १ उन्मादक पदार्थाच्या सेवनानें आलेला कैफ किं० अमल. २ कैफ किं० अमल आणणारा कांहीं पदार्थ. ॐ **निशाधुंद** वि० ज्याला फारच कैफ किं० अमल चढला आहे असा. **निशापाणी** न० १ अमली पदार्थ. २ अमली पदार्थांचें सेवन (करणें).

निशा [फा० खातरनिशीन्] स्त्री० १ खात्री; संशयनिवृत्ति (करणें, होणें, पुरविणें). २ दुसऱ्याबद्दल हमी घेणें; उ० मी पांचशें रुपायांची निशा सावकारी देतों. ३ वीट येण्याइतका कोणत्याही विषयाचा उपभोग. **निशापाती** स्त्री० १ मनाची झालेली खात्री. २ दुसऱ्या कोणाबद्दल घेतलेली हमी किं० सांगितलेली खात्री.

निशाण [फा० निषान] न० १ झेंडा; देऊळ इ० वर लाविताात ती पताका. २ बाण, बंदुक, इ० ज्यावर सोडावयाची तो पदार्थ; लक्ष्य; वेध्य. ३ रुपाया इ० नाण्यावर पोतदार इ० चें चिन्ह असतें तें. ॐ **निशाण उतरणें** लक्ष्यावर बाण, गोळी, दगड, इ० मारणें. **निशाणीं वाव घालणें** (किं० देणें) १ शत्रूच्या निशाणावर हल्ला करणें. २ कोणे-काच्या मर्मावर अचूक घाव घालणें; कोणेकाच्या मर्मावर बिनचूक प्रहार करणें. **निशाणाचा हत्ती** पु० १ ज्या हत्तीवर सैन्याचें निशाण असतें तो. २ एकाद्या संस्थेचा मुख्य माणूस.

निशाणा, निशणा, निसण पु० [सं० निश्राण] शस्त्राला धार द्यावयाचा दगड.

निशाणी [फा०] स्त्री० १ खूण; चिन्ह. २ पदार्थ ओळखतां येण्यासाठीं त्याच्यावर केलेली कांहीं खूण किं० सही किं० आकृति. ३ नाणें पारखावयाचें सराफ लोकांचें हत्यार. ४ कांहीं परिणाम घडवून आणणारी किं० घडलेला परिणाम दाखविणारी कांहीं गोष्ट; उ० वाघाच्या घरांत जाणें ही मरणाची निशाणी.

निशित [सं०] वि० १ तीक्ष्ण. २ धार दिलेलें (शस्त्र). न० लोखंड.

निशिदिनीं [सं० निशि=रात्रीत: स० दिनि =दिवसास] क्रि० वि० रात्रंदिवस; अहोरात्र; सर्वकाळ.

निशीं श० यो० अ० सहित; बरोबर घेऊन; अंगावर असतां; उ० जोड्यानिशीं माजघरांत शिरूं नये.

निशीण, निशणी [सं० निश्रेणी] स्त्री० शिडी, दादर, जिना.

निशीथ [सं०] पु० मध्यरात्र.

निशेंड्या [म० नि (नाहीं) + शेंडी] वि० ज्याला शेंडी नाहीं असा (मुसलमान इ०).

निःशेष, निश्शेष [सं०] वि० ज्याचा कांहीं शेष उरला नाहीं असा. **क्रि० वि०** कांहीं शेष किं० बाकी न राहतां किं० राहूं देतां.

निशोत्तर न० तेड ज्याला म्हणतात तें औषधी मूळ.

निश्वक [सं०] वि० कांहीं न खातां केलेला (उपास).

निश्चय [सं०] पु० १ ठरविणें; ठराव; निवाडा. २ ठाम म्ह० पक्कें ठरलेलें मत किंवा मनाचा झालेला ग्रह. ३ मनानें स्वीकारलेला सिद्धान्त. ४ शंकेचें निरसन. ५ खात्री; भरंवसा. ६ निर्धार. ❀ **निश्चयपूर्वक, निश्चयात्मक** क्रि० वि० खात्रीपूर्वक; खचित; संशय न राहूं देतां.

निश्चल, निश्चळ [सं० निश्चल] वि० १ चलनवलनरहित; स्थिर; दृढ. २ कायमचें. क्रि० वि० कांहीं हालचाल न करतां; स्वस्थपणें.

निश्चित [सं०] वि० १ ठरलेलें; नक्की झालेलें किंवा नक्की करण्यांत आलेलें. ❀ **निश्चितार्थ** पु० १ ठरलेली गोष्ट. २ खात्रीची गोष्ट. ३ मनानें ठरविलेलें ध्येय.

निश्चिन्त [सं०] वि० ज्याला चिंता, काळजी, किंवा अस्वस्थता वाटत नाहीं किंवा उरली नाहीं असा. ❀ **निश्चिंती** स्त्री० १ काळजी किंवा विवंचना नाहीं अशी स्थिति. २ धान्य, पैसा, इ० संग्रहीं असण्याच्या योगानें मनाला वाटते ती स्वस्थता.

निश्चेतन, निश्चेष्ट [सं०] वि० १ चेतनारहित. २ जो कांहीं हालचाल करीत नाहीं असा. ३ मूर्छेनें मृतवत् पडलेला. [सोडणें.

निश्वास [सं०] पु० १ सुसकारा. २ श्वास

निषद, निशाद [सं०] पु० १ शूद्रीला ब्राम्हणापासून झालेला पुत्र. २ चांडाळ. ३ गायनांतील सातवा स्वर. ४ कोळी ह्या जातीचा इसम.

निषिद्ध [सं०] वि० १ शास्त्रानें किंवा धर्मानें त्याज्य म्हणून सांगितलेला. २ जें करण्याची सरकारची मनाई आहे तें.

निषेध [सं०] पु० १ मनाई; बंदी; प्रतिबंध. २ नकार. ३ अमुक गोष्ट अमुक प्रकारची नाहीं असें विधान. ४ सरकारची अमुक किंवा गोष्ट सरणी आम्हाला मान्य नाहीं किंवा पसंत नाहीं असें स्पष्टतेनें केलेलें विधान किंवा जाहीर केलेलें मत. ❀ **निषेधमुखें** क्रि० वि० अमुक वस्तु अमुक अमुक प्रकारची नाहीं असें सांगून (त्या वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान करून देणें).

निष्कंटक [सं०] वि० १ ज्याला कांटे नाहींत असें (झाड, पान, इ०). २ शत्रुरहित (राज्य इ०).

निष्कपट [सं०] वि० ज्यांत किंवा ज्याचे ठायीं कपट नाहीं असा (व्यवहार, मनुष्य).

निष्कल (–ळ) [सं० निष्कल] वि० १ वृद्ध, क्षीण, जीर्ण. २ निरुपाधिक; निरवयव. ३ वांझ; निर्वीर्य. ४ कलारहित. न० ब्रम्ह. ❀ **निष्कला** स्त्री० विटाळ बंद झालेली स्त्री.

निष्कलंक [सं०] वि० १ कलंकरहित, शुद्ध, पवित्र. २ ज्याला अपकीर्तिरूप डाग नाहीं असा.

निष्काम [सं०] वि० फळाची इच्छा न धरतां केलेलें किंवा आचरलेलें.

निष्कारण [सं०] क्रि० वि० १ कारणावांचून; उगीचच्या उगीच. २ जरूरी नसतां. वि० १ ज्याला कारण नाहीं असें. २ ज्याचा उपयोग नाहीं असें. [हाकलून देणें.

निष्कासन [सं०] न० १ बहिष्कार. २

निष्काळजी [म० निष्+काळजी] वि० कर्तव्याकडे लक्ष्य न देणारा; कामांत दुर्लक्ष्य करणारा. स्त्री० कर्तव्यांत दुर्लक्ष्य; कामामध्यें हेळसांड. 'निष्काळजीपणा' हाही शब्द ह्याच अर्थानें आहे.

निष्कृति [सं०] स्त्री० १ प्रायश्चित्त. २ उपकाराची फेड. ३ माफी; क्षमा.

निष्क्रम पु०, **निष्क्रमण** न० [सं०] १ बाहेर येणें; बाहेर पडणें. २ निघून जाणें. ३ बाहेर पडण्याची वाट.

निष्क्रय [सं०] पु० विकत घेणें, खरेदी करणें. २ मोल; किंमत. ३ मोबदला. ४ बक्षीस द्यावयाचा पदार्थ (गाय, वस्त्र, इ०) न देतां त्याच्या किंमतीइतक्या द्रव्याचें दान.

निष्टंक [सं० टंक=छन्नी; छन्नीनें न फोडतां येईल असें] वि० पूर्ण; भक्कम; मजबूत. क्रि० वि० १ सर्वथैव; पूर्णपणें; अगदीं. २ फक्त. **टीप**,–हा शब्द कवितेंतच येतो.

निष्टणें [म० 'निसटणें' चा अपभ्रंश] अ० क्रि० १ सुळकदिशीं निघून जाणें; पळून जाणें. २ एकदम बाहेर पडणें किंवा स्थानभ्रष्ट होणें.

निष्ठ [सं०] वि० १ राहिलेला; राहणारा. २ युक्त; विशिष्ट. ३ वाहिलेला; उ० धर्मनिष्ठ.

निष्ठा [**सं०**] **स्त्री०** १ पाया. २ स्थिरता. ३ दृढ भक्ति; श्रद्धा. ४भरंवसा. ५वर्तनाची सरणी. ६ स्थिति; अवस्था.

निष्ठुर [**सं०**] **वि०** १ कठिण; टणक. २ जोराचा; आवेशाचें. ३ निर्दय; कठोर; क्रूर. ४ कर्कश. ५ मनांत प्रेम किं० आपलेपणा न वाळगतां बोललेलें किं० केलेलें (भाषण, वर्तन, इ०).

निष्णा, निशणा, निसणा [**सं०** निश्राण] **पु०** शस्त्राला धार धावयाचा धोंडा.

निष्णात [**सं०**] **वि०** १ चतुर; हुशार. २ (एकाधा विषयांत) पारंगत किं० पूर्ण वाकबगार. ३ वरच्या दर्जाचा; उत्कृष्ट.

निष्पत्ति [**सं०**] **स्त्री०** १ उत्पत्ति; जन्म. २ परिपक्व दशा. ३ पूर्णता. ४ पर्यवसान; शेवट. ५ परिणाम.

निष्पन्न [**सं०**] **वि०**१उत्पन्न झालेला.२परिणामरूप. **न०** निर्णयानें जें ठरलें तें; सिद्ध झालेली गोष्ट; उ० आपण इतकी वाटाघाट करून निष्पन्न काय झालें ?

निष्पत्र, निष्पर्ण [**सं०**] **वि०** ज्याला पानें नाहींत किं० ज्याचीं पानें झडून गेलीं आहेत असें (झाड इ०).

निष्पक्षपात, निःपक्षपात [**सं०**] **पु०** कोणत्याही पक्षाकडे किं० बाजूकडे मन न ओढलें जाणें; जें सरळ किं० न्याय्य तेंच सांगणें. ❀ **निःपक्षपाती वि०** कोणत्याही पक्षाकडे गैरशिस्त रीतीनें न कलणारा किं० न कललेला (मनुष्य किं० विचारसरणी किं० निकाल).

निष्पादणें [**सं०** निस् (बाहेर)+पद्, पाद् (उत्पन्न करणें)] **स० क्रि०** उत्पन्न करणें.

निष्पादन [**सं०**] **न०** १ उत्पन्न करणें. २ घडवून आणणें.

निष्पादित [**सं०**] **वि०** १ घडवून आणलेलें. [२ उत्पन्न केलेलें.

निष्पाप [**सं०**] **वि०** १ ज्याचे ठायीं पाप नाहीं असा: ज्यांत पाप किं० लबाडी नाहीं असें. २ सरळ, निष्कपट(मनुष्य, भाषण, वर्तन).

निष्प्रपंच [**सं०**] **वि०** १ ऐहिक वस्तूंवरून ज्याणें मन निवृत्त केलें आहे असा; विरक्त. २ निष्कपट.

निष्प्रयोजन [**सं०**] **वि०** १ ज्याचा उपयोग कांहीं नाहीं असा. २ ज्यांत कांहीं हेतु किं० उद्देश नाहीं असा. **क्रि० वि०** कारणाशिवाय; उगीचच्या उगीच.

निष्फळ [**सं०** निष्फल] **वि०** १ व्यर्थ. २ ज्याला फळ येत नाहीं असें (झाड). ३ ज्याचा कांहीं परिणाम होत नाहीं असें (कृत्य). ४ अंड काढून टाकलें आहे ज्याचें असा(प्राणी). **क्रि०वि०** उगीचच्या उगीच; व्यर्थ.

निःसंग, निस्संग [**सं०**] **वि०**१ज्याला कोणी मित्र, सोबती, किं० जोडीदार नाहीं असा (साधु, किं० कोणीही माणूस). २ जो चालरीत, शिष्टाचार, इ० पाळीत नाहीं असा. ३ निर्लज्ज. ४ कोणाची पर्वा न करणारा. **टीप,–** ह्या अर्थी ' निसंगळ ' हाही शब्द आहे.

निसटणें अ० क्रि० १ जोरानें बाहेर पडणें; उ० तो पिकलेला आंबा हातांत धरून आवळतांच आंतून कोय निसटली. २ वेगानें हातचा सुटणें; झटदिशीं पळून जाणें. ३ ३ पकडलेला पदार्थ किं० माणूस किं० जनावर आपल्या कबज्यांतून किं०प्रतिबंधांतून बाहेर पडून नाहींसा होणें किं० पळून जाणें. ४घसरणें,सरकणें; उ० त्या जमीनीवरून जपून चाल, नाहींतर पाय निसटेल, आणि तूं धाडदिशीं जमीनीवर आपटशील.

निसण[**सं०**निःश्रयणी, निःश्रेणी] **स्त्री०**शिडी; दादर; जिना.

निसणा [**सं०** निश्राण] **पु०**हत्याराला धार [धावयाचा धोंडा.

निसणें स० क्रि० १ तांदूळ, भाजी, इ०पदार्थ निवडणें. २ पदार्थांचे साल, त्वचा, टरफल, किं० कवच काढून टाकणें; उ० मी सकाळपासून आतां पर्यंत हजार नारळ निसले. ❀ **निसण न०** वर वर्णिलेली निसण्याची क्रिया.

निसत वि० १ निर्लज्ज; बेशरम. २ समाजानें सोडलेला (माणूस).

निसंतान [**म०** नि(नाहीं)+संतान(**पुत्र**)] **न०** १ आपला वंश चालवावयाला कोणी पुरुष नाहीं अशी स्थिति; उ०तुझें निसंतान होओ ! २ नाश; फडशा; कांहीं अल्पस्वल्प सुद्धां अवशेष न

राहूं देतां केलेला किं० झालेला नाश; समूळ उच्छेद. ॐ कुसंतानापेक्षा निःसंतान बरें वाईट मुलगे असण्यापेक्षां मुळींच मुलगे नसणें ही स्थिति अधिक चांगली.

निःसत्त्व, निस्सत्त्व [सं०] वि० १ दुर्बल; शक्तिहीन; वीर्यरहित; नेभळा; पिसविशीत. २ नीच; अधम. ३ असत्य. ४ अविद्यमान.

निःसंदिग्ध [सं०] वि० संशयरहित; स्पष्ट.

निःसंदेह [सं०] वि० १ ज्यांत किं० ज्याच्या संबंधानें शंका नाहीं असा. क्रि० वि० खचित; निश्चयानें; खात्रीपूर्वक.

निसपटणें अ० क्रि० वर ' निसटणें ' पहा.

निसबत [अ०] स्त्री० ताबा; देखरेख; हवाला; दिमत. क्रि० वि० ०च्या संबंधानें; ०च्या तर्फेनें; ०च्या वतीनें किं० बाजूनें; उ० गांव निसबत, सरकार निसबत, देऊळ निसबत, इ०. ॐ **निसबतचा** वि० ०च्या संबंधाचा किं० तर्फेचा. **निसबतदार** वि० ताबा चालविणारा; देखरेख करणारा; व्यवस्था पाहाणारा; दिमतदार. **निसबतवार** वि० जो कोणाच्या निसबतीस राहातो तो; ताब्यातील.

निसरगांठ [म० निसरणें+गांठ] स्त्री० सरकणारी गांठ; आसुड गांठ. ॐ **निसरगांठ देऊन ठेवणें** पंचाइतीची वेळ आली असतां, म्हणजे अंगावर बाजू कोसळण्याचें चिन्ह दिसतांच, पळून किं० निसटून किं० सुटून जाण्याची अगोदरपासून तजवीज करून ठेवणें.

निसरड, निसरंड, निसरट, निसरडा [म० निसरणें] वि० वर ठेविलेला पदार्थ सरकेल अशा प्रकारचा बुळबुळीत (पृष्ठभाग). स्त्री० बुळबुळीत जागा.

निसरणें [सं० निस्+सृ, सर्] अ० क्रि० आधारभूत पदार्थ बुळबुळीत असल्याकारणानें वर ठेविलेला पदार्थ सरकणें.

निसरवा पु० १ शेतांतील किं० बागेंतील धान्यें, फळें, इ० काढून घेतल्यावर राहिलें असेल तें धान्य किं० राहिलीं असतील तीं फळें समुच्चयानें २ ग्रामजोशानें प्रदोष, एकादशी, इ० माहिती सांगितल्याबद्दल त्याला जी बक्षीशी देतात ती.

निसरसांड [म० निसरणें+सांडणें] स्त्री० ज्या गोष्टींकडे लक्ष्य दिलें पाहिजे, किं० लक्ष्य देणें आपलें कर्तव्य आहे, किं० लक्ष्य न देणें पाप होय, तिच्याकडे दुर्लक्ष्य किं० तिची उपेक्षा किं० तिची हेळसांड (करणें); उ० तूं कितीही संपत्तिमान् झालास तरी आईची निसरसांड तूं केल्यास लोक तुला नांवें ठेवितील; उ० मी तुला सांगत आहें तो तपशील महत्त्वाची आहे, तो लक्ष्यपूर्वक ऐक, त्याची निसरसांड करूं नको; उ० गजानन आलीकडे अभ्यासाची निसरसांड करूं लागला आहे.

निसराड वर ' निसरड ' पहा.

निसर्ग [सं०] पु० १ सृष्टि. २ ब्रम्हदेवानें उत्पन्न केलेलें जग. ३ डोंगर, अरण्यें, नद्या, आकाश, इ० समुच्चयानें; (शहरें, बंगले, पूल, गिरण्या, इ० मानवी कृतीच्या व्यावर्तकत्वें). ४ मनुष्याचा किं० कोणाही प्राण्याचा जन्मजात स्वभाव. ५ दान; देणें. ६ उत्पत्ति.

निसवणी, निसवील [म० निसवणें] स्त्री० धान्याची ताटें पक्व दशेस येऊन त्यांनीं कणसें बाहेर टाकणें.

निसवणें [सं० निस्+सृ] स० क्रि० १ पक्वदशेस आलेल्या धान्याच्या ताटांनीं कणसें उत्पन्न करणें म्ह० त्यांना कणसें येणें. २ असन्मार्गांत आसक्त होणें; दुर्वर्तनांत निढावणें. ३ प्रसिद्धि पावणें (लिहिण्यांत, बोलण्यांत, तालमिबाजीच्या कामांत, गाण्यांत, इ०). ४ धाडसानें पुढें सरसावणें. ॐ **उसवल्यास दोरा घालतां येतो, निसवल्यास इलाज नाहीं** थोडेसे व्यंग किं० उणें असलें तर त्याला इलाज करतां येतो पण जो पक्का निर्लज्ज किं० लतकोडगा झाला त्याला सद्वर्तनी करणें शक्य नाहीं.

निःसंशय, निस्संशय [सं०] वि० १ ज्याला संशय किं० शंका नाहीं असा. २ ज्याच्या संबंधानें संशय उरला नाहीं असा. क्रि० वि० खात्रीनें; खचीत.

निसळ क्रि० वि० १ मिसळीशिवाय; शुद्ध प्रकारें. २ सर्वथैव. ३ सर्व भागीं.

निसळणें स० क्रि० चकचकीत करणें; उजळा देऊन तकतकीत करणें.

निसाठा पु० संपत्ति, धान्याचा साठा, इ०चा फन्ना किं० फडशा.

निःसार, निस्सार [सं०] वि० साररहित; सत्वांशशून्य.

निःसारण, निस्सारण [सं०] न० १ बाहेर काढून टाकणें; हाकलून देणें. २ दार; मार्ग; वाट.

निसास, निसासा [सं० निश्वास] पु० सुमकार; श्वास बाहेर सोडण्याची क्रिया (टाकणें, सोडणें, देणें).

निसासणें [सं० निस्+श्वस्] अ० क्रि० १ धापा टाकणें. २ श्रमामुळें जोराजोरानें श्वासोच्छ्वास चालविणें.

निःसीम, निस्सीम [सं०] वि० अमर्याद; परमावधीस पोंचलेला.

निसुरणें [म० निसूर] अ० क्रि० लोकव्यवहार ज्याणें सोडलें आहेत असा; निर्लज्ज; उत्सृंखळ.

निसुरता, निसुटता, निसटता [म० निसटणें] वि० १ पूर्ण स्पर्श न करतां किं० लक्ष्याला न वेधतां पुढें गेलेला (धोंडा, बंदुकीची गोळी, तरवारीचा वार, इ०). २ अर्धवट (दिसलेला, पाहिलेला, इ०).

निसूक, निसूग [म० नि (नाहीं)+चूक] वि० १ सरळ, वाटेंत न आडतां किं० न थांबतां, गेलेला (धोंडा, बाण, इ०). २ निर्लज्ज; बेशरम; लतकोडगा. क्रि० वि० सरळ मार्ग धरून; न आडतां; इकडे तिकडे न वळतां (धोंडा, बाण, इ० जाणें). **निसक्या माणसाला लाज नाहीं कालचें बोलणें आज नाहीं** जो पक्का कोडगा झाला आहे त्याला कितीही रागें भरलें तरी तें फुकट जातें; काल ज्या कृत्याबद्दल त्याची कानझाडणी केली तें कृत्य तो पुन्हां आजही करतो.

निसूर वि० १ काळजांतून किं० विवंचनेंतून मुक्त झालेला. २ निर्लज्ज; बेशरम.

निःसृत, निस्सृत [सं०] वि० बाहेर आलेला; बाहेर पडलेला.

निसोत्तर, निशोत्तर न० एक औषधी मूळ.

निस्कारणें [सं० निस्+कृ] स० क्रि० १ धिक्कारणें. २ हाकलून देणें.

निस्तरण न०, **निस्तार** पु० [सं०] १ बाहेर जाणें. २ पैल जाणें. ३ सांडाविणें; मुक्त करणें. ४ उपाय; इलाज; प्रतिकार. ५ इष्ट वस्तूची प्राप्ति; सिद्धि. ६ व्यवस्था करणें. ७ (दिलेलें वचन) पुरविणें; (केलेली प्रतिज्ञा) पूर्ण करणें.

निस्तरणें, निस्तारणें [सं० निस्+तृ(तरणें)] स० क्रि० १ (सुरू केलेलें काम बिघडलेलें असतां त्र) सुधारून कसेंबसें शेवटास लावणें. २ (करावयास घेतलेलें काम) कटाळा आलेला असतां कष्टानें शेवटास लावणें ३ कोणी केलेली किं० झालेली अव्यवस्था मोडून कांहीं काम व्यवस्थित रूपांत आणणें. ४ (कुत्कर्माचे दुष्परिणाम) भोगणें; उ० तूं हें देशद्रोहाचें कर्म केलें आहेस पण तें निस्तरावयास तूं नरकांत जाशील हें लक्ष्यांत ठेव. ५ (कोणतेंही काम) तडीस लावणें किं० समाप्त करणें. ७ (दिलेलें वचन) पुरविणें; (केलेली प्रतिज्ञा) पूर्ण करणें. **निस्तरणें** अ० क्रि० १ संकटांतून किं० पेंचांतून मुक्त होणें. २ कसास उतरणें; निभावणें; अडचण न येतां पार पडणें. ꙮ **निस्तरानिस्तर** स्त्री० आरंभिलेलें काम समाप्त झाल्यावर त्यासंबंधाची साधनसामग्री इ० ची विल्हेवाट लावणें किं० आवराआवर करणें. २ अव्यवस्थित पडलेले पदार्थ जागच्या जागीं ठेवणें.

निस्ता, नुस्ता क्रि० वि० १ इतर पदार्थ जवळ, शेजारी, किं० मदतीला नसतां. २ इतर अंगभूत क्रिया किं० गोष्टी न करतां. ३ कोणत्याही प्रकारें मदत न करतां, उपयोगी न पडतां, किं० जबाबदारी शिरावर न घेतां. ४ व्यंजनें, तोंडीलावणीं, इ० नसतां; उ० मी निस्ता भात कसा खाऊं ? लोणचें, पापड, मेथकूट, कांहीं तरी घाल. **टीप**,–हें अव्यय लिंगवचनांप्रमाणें फिरणारें आहे.

निस्तार पु०, **निस्तरण** न० [सं०] १ फेड. २ मोक्ष. मागें ' निस्तरण ' पहा.

निस्तुप [सं०] वि० १ टरफलें, कोंडा, इ० ज्यांत किं० ज्याला नाहींत असें (धान्य इ०). २ बिलकुल अवशेष न राहिला आहे ज्याचा असा (आजार).

निस्तुषित [सं०] वि० वर ' निस्तुष ' चे दोन्ही अर्थ पहा. ३ तासलेलें; सोललेलें.

निस्तूक [सं० निस्तुष] क्रि० वि० १ सर्वथैव; पूर्णपणें; उ० माझा हिंवताप निस्तूक गेला. २

कांही बाकी न राहतां किं० राहूं न देतां; उ० गूळ निस्तूक सपला; उ० पाऊस निस्तूक गेला. ३ अगदी. ४ सर्व प्रकारांनीं. ५ फक्त; केवळ; उ० हा ब्राह्मण निस्तूक वैदिक आहे. ६ अट्टल; पक्का; उ० तो निस्तूक सोदा आहे. टीप,—वरील सर्व अर्थांनीं 'निस्तोप' हेंही रूप प्रचलित आहे.

निस्तेज. निस्तेजस्क [सं०] वि० ज्याला तेज किं० तकाकी किं० टवटवी नाहीं असा; फिका (चेहरा इ०).

निस्तोप वर ' निस्तुष ' ' निस्तूक, ' पहा.

निस्त्याला, निस्त्यास [म० निरता] क्रि० वि० तोंडा लावावयाला; उ० आज निस्त्याला कांहीं किं० आंबटवरण करा. टीप,—'कोरड्यास' हाही शब्द ह्याच अर्थानें योजतात.

निस्वन, निस्वान [सं०] पु० आवाज; ध्वनि; उ० मेघांचा निस्वन होऊं लागला म्हणजे मोर नृत्य करूं लागतात.

निःस्नेह [सं०] वि० १स्नेह किं० प्रेम ज्यांत किं० ज्याला नाहीं असा; रूक्ष; कठोर. २ तेल किं० ओषटपणा ज्याला नाहीं असा. ३ शुष्क.

निस्पृह [सं०] वि० १ निरिच्छ. २ बेफिकीर. ३ सर्वांशीं तुसडेपणानें वागणारा; कोणाची मुरवत न राखणारा किं० भीडभाड न धरणारा. ४ अलग; न चिकटलेलें; उ०आमचें विऱ्हाड विस्पृह आहे, आम्हाला कोणाचा उपसर्ग होत नाहीं.

निस्यंद. निष्यंद [सं०] पु० १ पाझर; गळती; प्रवाहाच्या रूपानें जें वाहलें तें. २पाणीं, दूध, झाडाचा चीक, इ० ची धार किं० त्यांचें थेंबांथेंबांनीं गळणें किं० वाहाणें.

निःसंग, निस्संग [सं०] वि० १ निस्पृह.२ ज्याला स्वार्थबुद्धि नाहीं असा.३विरक्त.४एकलकोंडेपणाच्या स्थितींत राहाणारा. ५ वाईट मार्गाला लागलेला आणि निर्लज्ज झालेला. ह्या शेवटच्या अर्थीं 'निस्संगळ' हाही शब्द प्रचलित आहे.

निस्सुरा मागें ' निजसुरा ' पहा.

निस्स्नेह मागें ' निःस्नेह' पहा.

निहाय [अ० निहायाह्=सीमा, परमावधि] श० यो० अ० याचा अर्थ सप्तमीचा असून तो ज्या शब्दाला लाविलेला असेल त्या शब्दानें दर्शविलेली प्रत्येक वस्तु बोधित होते; उ० महालनिहाय म्ह० प्रत्येक महालांत; जिल्हा (-ल्हे-) निहाय म्ह० प्रत्येक जिल्ह्यांत; पाटील निहाय म्ह० सर्व पाटील मंडळींत.

निहाळणें [सं० निर्+ईक्ष्] स०क्रि०लक्ष्यपूर्वक पाहाणें; टक लावून अवलोकिणें.

निहित [सं०] वि० १ ठेविलेला;मांडलेला; स्थापिलेला. २ चेपलेला; दडपलेला. ३ अनामत ठेविलेला. ॐ **संनिहित.** वि० १ शेजारीं ठेविलेला. २ चिकटून असलेला.

निळंगणी, निळंगी, निळंगळी, निरंगळी [म० निळंगणें] स्त्री० १ थकवा. २ झोपेची ग्लानि. ३ श्रमातिशयानें येते ती सुस्ती.

निळंगणें, निळंगळणें, निरंगळणें अ० क्रि० १ श्रमानें किं० झोपेनें ग्लान किं० सुस्त होणें. २ संबंध शरीर किं० एकादें गात्र ताठणें म्ह० कांहीं वेळ चलनवलन करावयाला असमर्थ होणें (फार श्रमामुळें किं० एकाच संस्थानांत ते फार वेळ असल्यानें).

निळंघी, निळंघणें वर ' निळंगी, '' निळंघणें' पहा.

निळंबी स्त्री० निळीचें झाड.

निळवा पु० जोंधळ्याची एक जात.

निळवें न० धान्य इ० मोजावयाचें एक माप, कोळव्याचें अर्ध किं० शेराचा सोळावा भाग उतक्या परिमाणाचें हें असतें.

निळा [सं० नील] वि० १ आकाशाच्या रंगाचा पण दाट छटेचा. २ पांढरा,—फक्त घोड्यासंबंधानें. ३ कोंवळें (गवत किं०उभें पीक).पु०, स्त्री० चेहेऱ्याची टवटवी. २ तजेला. **निळें** न० १ निळा रंग. २ हिरवें गवत किं० पीक.३टवटवी; तजेला; तुकतुकी. ॐ **निळातुतिआ** पु० मोरचूद. **निळाहिरवा,हिरवानिळा** वि० विषारामुळें, तडाखे मारल्यामुळें, किं० तापामुळें बेरंगी झालेलें (शरीर, त्वचा).

निःक्षत्र, निःक्षत्रिय [सं०] वि० क्षत्रियरहित; उ० परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्र (किं० निःक्षत्रिय) केली.

निक्षिप्त [सं०] वि० १ ठेविलेला. २ फेकलेला. ३ तारण किं० गहाण म्हणून ठेविलेला.

निक्षी, निक्षीचा वि० कडक किं० कठोर स्वभावाचा किं० वर्तणुकीचा. **निक्षी स्त्री०**कडकपणा; कठोरपणा.

निक्षून क्रि० वि० ठासून किं० स्पष्ट शब्दांनीं किं० भीडभाड न धरतां (सांगणें, बजावणें, उत्तर देणें).

निक्षेप [सं०] पु० १ फेकणें; टाकणें. २ ठेव म्हणून कोणेकाच्या हवालीं केलेली वस्तु. ३ गुप्तपणें बाजूस काढून ठेविलेलें द्रव्य इ०. ४ पुरून ठेविलेली संपत्ति.

निक्षेपणें [सं० नि+क्षिप् (टाकणें)] स० क्रि० १ फेकून देणें. २ गहाण ठवणें.

नी [म० आणि]उ०अ० आणि;उ० रामा नीं गोविंदा कांहीं खलबत करीत आहेत.

नीच [सं०] वि० १ ठेंगणा. २ सखल. ३ खोल. ४ अधम; दुष्ट. ५ कमी दर्जाचा, योग्यतेचा, किं० किंमतीचा; आकृति, गुण, जाति, किंमत, इ० बाबतींत विवक्षिताहून कमी; उ० ह्या झाडापेक्षां तें झाड नीच आहे; उ० हेमगर्भापेक्षां आनंदभैरव नीच आहे. उ० ह्या सगंधापेक्षां तें सगंध नीच आहे; उ० हा वीणा (किं० पखवाज) नीच आहे (म्ह० त्याचा सूर खालचा आहे).**न० (ज्योतिषांत)** ज्या ज्या ग्रहाचें जें जें उच्च स्थान सांगितलें आहे त्या त्या स्थानापासून जें सातवें स्थान तें किं० त्या स्थानावरचा ग्रह.

नीज [सं० निज=आपलें] न०, स्त्री० १ आपलें रहस्य. २ कळवळा; माया; प्रेम. ꕥ **निजेवांचून पूजा नाहीं** ज्याच्या संबंधानें आपल्या मनांत प्रेम नाहीं त्याला आपण मान देत नाहीं किं० त्याच्याकडून आपणाला मान मिळत नाहीं.

नीज [म० निजणें; सं० निद्रा]स्त्री० झोंप.ꕥ **नीजमोड,नीदमोड स्त्री०** झोंपेंत आलेला व्यत्यय.

नीट वि०१ सरळ. २ असावा तसा. ३ वाकडा नव्हे तो.**क्रि० वि०**१सरळ मार्गानें.२योग्य प्रकारें. ꕥ**नीटकरणें** दुरुस्त करणें. **नीटनेटका वि०**असावा तसा; यथास्थित. **नीटवाकडा करणें** चालढकल करून,फारसा कडकपणा न दाखवितां,किंवा थोडीशी पड घेऊन, कांहीं काम शेवटास लावणें किं० कांहीं कामाचा निकाल करून टाकणें **नीटवीट क्रि०वि०** अगदीं उघड उघड; संशयाला किं०तकरारीला जागा न राहतां किं०राहूं देतां; उ०तुम्ही माझें देणें नीटवीट पंचवीस रुपये नियतें.

नीड [सं०] पु०, न० १ पक्ष्याचें घरटें. २ रथांतील बैठक.

नीत स्त्री० पुढें ' नीति ' **स्त्री०** पहा.

नीत [सं०] वि० नेलेला.

नीत [सं० नित्य] वि० नित्याचा; नेहमींचा. ꕥ**नीत मजूर पु०**पोटासाठीं ज्याला नेहमीं लोकांचीं कामें करावीं लागतात असा मजूर.

नीति [सं०] स्त्री० १ व्यवस्था. २ वर्तनक्रम. ३ शिष्टाचार. ४ न्याय्य वर्तन. ५ युक्ति; योजना. ६ राजकारण. ७ सदाचरणाचें शास्त्र.ꕥ **नीतिमान् वि०** सन्मार्गानें चालणारा; कपट, लबाडी,किं० अप्रामाणिकपणा न करणारा.

नीद [सं० निद्रा] स्त्री० झोंप.ꕥ**निदसुरा, निजसुरा, निस्सुरा वि०** झोंप ज्याला येत आहे असा.

नीध[सं०निधि=खजिना;मूल्यवान् वस्तु]स्त्री० १ खजिना. २ **(लाक्षणिक)** कोणतीही मूल्यवान् वस्तु; उ० हा गडी आम्हाला नीध सापडला आहे. ꕥ **सीध वागे तो नीध पावे** जो मनुष्य सरळपणानें आणि प्रामाणिकपणानें आणि सभ्याचार पाळून वागतो त्याचा परिणामीं फायदा होतो.

नीम [सं० नियम] पु० भुतांखेतांना नियमित प्रसंगीं जें खाद्यादि द्यावें लागतें तें (देणें, मांडणें).

नीम [फा० नीम्] वि० अर्धा. मागें 'निम' इ० पहा.

नीर इ०[सं०] न० पाणी.ꕥ **नीरद पु०** मेघ. **नीरक्षीरन्याय, क्षीरनीरन्याय पु०** दूध आणि पाणी यांचा होतो तो किं०होतो तसा पूर्ण मिलाफ.

नीर [सं० निर्णय] पु० निकाल; निर्णय; वादग्रस्त विषयांत केलेली तडजोड; यांचाइत्यादि इत्यर्थ (काढणें, निवडणें, घेणें). ꕥ **निरावर येणें** समाप्तीच्या स्थितीत येणें किं० येऊं लागणें,निकालास लागण्याच्या रंगास येणें (आजार,व्यवहार, भांडण, इ०).

नीरस [सं०] वि० १ रसहीन; बेचव; पचपचीत; पांचट. २ रसिकता किं० गुणग्राहकता ज्याचे ठायीं नाहीं असा (मनुष्य). ३ ज्यांत चटकदारपणा नाहीं असें (भाषण).

नीराजन [सं०] न० १ ओंवाळणें. २ आरती.

नील [सं०] वि० १ निळा; निळ्या रंगाचा. ॐ**नीलाक्ष** पु० हंस. **नीलांजन** न० १ मोरचूद. २ सुरमा. **नीलांबर** पु० बलराम. **नीलोपल, नीलमणि** पु० इंद्रनील मणि. **नीलकंठ** पु० १ मोर. २ शंकर. **नीललोहित** पु० शंकर. वि० जांभळा (रंग).

नीलिमा [सं० नीलिमन्] पु० निळा रंग.

नीव [सं० नीप] पु० एक वृक्ष. न० त्या वृक्षाचें फळ.

नीव न०, पु० छपराचें एक पाखें.

नीवि [न०] स्त्री० १ नेसलेल्या वस्त्राच्या निऱ्यांवरची गांठ. २ स्त्रियांचें नेसावयाचें वस्त्र.

नीस पु० श्रमातिशयामुळें किं० रट्टा बसल्यामुळें पाठींत किं० छातींत भरते ती शिणीक (भरणें, उतरणें).

नीस [म० निसणें] पु० १ सारभूत अंश; उत्कृष्ट भाग (काढणें, निवणें). २ बारकाईनें केलेली तपासणी; सूक्ष्म परीक्षा (करणें). क्रि० वि० अगदीं; पूर्णपणें; सर्वथैव; उ० नीस नंगा.

नीस, नवीस [फा० नविष्तन्=लिहिणें] वि० लिहिणारा. (फक्त फारशी शब्दांत);उ०चिटनीस,चिटनवीस,अखबारनीस,अखबारनवीस इ०.

नीळ [सं० नील] स्त्री० निळा रंग ज्यापासून उत्पन्न होतो असें एक झाड. २ ह्या झाडापासून काढलेला निळा रंग. ३ वानराची एक जाति. ४ अंगठींत बसवावयाचा एक मूल्यवान् खडा. स्त्री० पाण्यावर निळ्या किं० हिरवट रंगाचा तवंग जमतो तो. ॐ **नीळ नासणें, नीळ रापणें**, किं० **निळीचा रंग नासणें** खोटी बातमी उठविणें.कोणी सांगितलेली बातमी खोटी आहे असें आपणास वाटत असल्यास आपण म्हणतो ' नीळ नासली आहे असें वाटतें. ' टीप,–निळीचा रंग बिघडला असल्यास कांहींतरी खोटी बातमी उठविल्यानें तो सुधारतो अशी लोकांची समजूत आहे; यावरून वरील वाक्प्रचार उत्पन्न झाले आहेत.

नुकसान न०, स्त्री०,**नुकसानी** स्त्री० [अ०] १ हानि; तोटा; अपेक्षित लाभांत आलेली कमताई. २ नाश; नासाडी. ३ प्रतिपक्ष्याचा जो खर्च झाला असेल त्याच्या भरपाईसाठीं द्यावा लागतो तो पैसा किं० कांहीं पदार्थ.ह्या अर्थी 'नुकसानीचा पैका ' असाही शब्द आहे.

नुक्ता [अ० नुक्तह्] पु० १ कांहीं चटकदार किं० गमतीचा विचार किं० शब्द;विनादी विचार किं० कल्पना. २मनोहर गायनाचा चुटका. ३उंटाच्या नाकांतील वेसण किं०नथणी. ३ टपका. आरोप; आळ (ठेवणें, येणें). [मागें.

नुक्ता,नुकता क्रि०वि० अगदीं अल्पकाळाच्या

नुनू स्त्री० झोप (मुलांशीं बोलतांना).

नुनूबाळ मागें ' ननूबाळ ' पहा.

नुपेक्षिणें[म०न+उपेक्षिणें] स०क्रि० ०कडे दुर्लक्ष्य करणें; ०ची हयगय किं० हेळसाड करणें. **टीप**,–याच सरणीनें नुमजणें म्ह०न उमजणें.नुगणें म्ह०न उमगणें;नुरणें म्ह० न उरणें इ० इ०.**टीप**,–हें शब्द कवितेतच येतात. [पक्षी.

नुरी [हिं०] स्त्री० राघूच्या जातीचा एक

नुसकान, नुसकानी, लुसकान, लुसकानी मागें ' नुकसान, '' नुकसानी ' पहा.

नुस्तां, नुस्त्यास मागें ' निस्ता, "निस्त्यास पहा.

नूतन [सं०] वि० १नवा; नवीन. २तरुण. ३ ताजा. ४ विलक्षण; तऱ्हेवाईक.ॐ**नूतनवयस्क** वि०नुकतांच वयांत आलेला;प्रौढ दशेस आलेला.

नूपुर [सं०] पु० न० बायका, मुलें,यांच्या पायांतील एक भूषणविशेष.

नूर [अ० नूर्=प्रकाश] पु० १ प्रकाश. २ चकाकी. ३ पद यांचा सत्त्वसपणा, वीर्य, कसदारपणा, किं० झोकदारपणा. ४ चेहऱ्याचा, पोशाखाचा, बोलण्याचा, किं०चालण्याचा ऐटदार देखावा किं० भपका किं० झोकदारपणा.

नृत्य, नृत्त [सं०] न० १ नाचणें. २ हावभाव. ॐ **नृत्यप्रिय, नित्तप्रिय** पु० १ शंकर. २ मोर.

नृप, नृपति, नृपाल (–ळ) [सं०] पु० राजा ⊛ **नृपासन** न० सिंहासन.

नृशंस [सं०] वि० क्रूर; कठोर;प्राण हरण करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा.

नृसिंह [सं०] पु० मागें ' नरसिंह ' पहा.

नेआण [म० नेणें+आणणें] स्त्री० पदार्थ इकडून तिकडे नेणें, आणणें, इ० कामे समुच्चयानें (करणें).

नेऊर पु०, न० घोड्याच्या पावलाला वर जी गांठ असते ती.ह्या गांठीवर लांब लांब केश असतात.

नेक [फा० नेक] वि० प्रामाणिक; सचोटीचा. ⊛ **नेक, नेकी** स्त्री० प्रामाणिकपणा; सचोटी; व्यवहाराचा खरेपणा. **नेकबाजी** स्त्री० सद्वर्तन; सचोटीचा व्यवहार; प्रामाणिकपणाची वर्तनसरणी. **नेकीचा** वि० १ प्रामाणिक.सरळ.आणि सद्वर्तनी (मनुष्य). २ सचोटीचा (व्यवहार). **नेकनजर** स्त्री० कृपादृष्टि **नेकनामदार** वि० एक पदवी. **नेकवाल** वि० खरें बोलणारा. **नेकसल्ला** पु० हितावह उपदेश. **नेकपट्टी, नेगपट्टी** स्त्री०, **नेगाचें** न० भोजन; जेवण (करणें, काढणें). **नेकीबदी** [फा० नेकी=चांगलें, शुभ; बदी=वाईट; अशुभ] स्त्री० नफा नुकसानी; इष्टानिष्ट प्रकार; उ० नेकीबदी झाल्यास मी भरून देईन.

नेखवाड न० कारागीर लोकांची ऐरण ज्यांत बसविलेली असते तो ठोकळा.

नेगपट्टी स्त्री०, **नेगाचें** न० जेवण; भोजन. वर ' नेकपट्टी ' पहा.

नेचा पु०, **नेचरी** स्त्री० एक वनस्पतीविशेष.

नेचा [फा० नेचाह्] पु० १ गुरगुडीचा धूर तोंडांत ओढून घ्यावयाची जी लांब नळी असते, आणि जिचें बहुधा वेटोळें केलेले असतें ती. २ अशा नळीसकट आणि चिलमीसकट जी गुरगुडी ती. ३ (अशा गुरगुडीच्या धुराचें सेवन करणारा मनुष्य एकाच स्थानांत पुष्कळ वेळ बसलेला असतो यावरून) तगादा; आग्रहाची मागणी. ४ कांहीं काम करण्याचा दृढनिश्चय करून तें काम संपविण्याची चिकाटी; नेचा देऊन बसणें, नेचा लावून बसणें.नेचा गाडून बसणें,नेचा गाडणें, असे प्रयोग ह्या शब्दाचे होतात.

नेजा [फा० नेजाह] पु० भाला किं० बर्ची.

नेट पु० १ कांहीं काम करतांना योजलेलें परमावधीचें बळ किं० शक्ति. २ पदार्थावर पडलेला किं० घातलेला भार, वजन.किं० ओझें. ३ याचकाची, तगादेदाराची, किं० काम करवून घेणाराचा गर्दी किं० घाई (करणें).४ टेका; आधार (देणें). ५ जोर(लावणें) ६ विहिरीच्या रहाटाच्या आसाला आधारभूत जे दोन उभे खांब ते प्रत्येक. ७ लोहार किं० सुतार याचा कारखाना. ८ तोडावयाच्या पदार्थाखाली ठेवितात तो ओंडा किं० ओंडका किं० ठोकळा. ⊛ **नेटाचा प्रयत्न** पु० जोराचा प्रयत्न; सर्व शक्ति वेचून केलेला प्रयत्न.**नेटपाट** पु० १जोराचा यत्न;निग्रहाची खटपट (देणें,लावणें,करणें).२तगादा (लावणें,बसणें,येणें). **नेटापाटाचा** वि० १ चिवट; दणगट; कसदार; कणखर (मनुष्य, प्राणी, तुळई, इ०).२धाडसी, साहसी. ३ चिकाटीचा; दृढनिश्चयी (माणूस). ४ फोफावलेलें (पीक, झाड); जोराचा, सोसाट्याचा (वारा, पाऊस, पाण्याच्या प्रवाह, इ०); निकराचें(भांडण,लढाई);घाईनें करावयाचें(काम). **नेटबाजीचें** वि० तातडतीनें,वेळ न गमावतां करावयाचें (काम); जवळ येऊन भिडलेलें किं० ठेपलेलें (काम).

नेटक,नेटदार,नेटाचा [म०नेट]वि०चिकाटीनें काम करणारा.

नेटका [म० नीट] वि० १ सरळ. २ यथास्थित;असावा तसा. ३ कामाला लायक; कसदार. ४ नेटदार. क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) नुकताच; अगदी अल्प काळामागें; आतांच.

नेटणें अ० क्रि० १ झटणें;खटपटणें; सर्व शक्ति खर्चणें; उ० तूं नेटून अभ्यास केल्यावांचून पास होणार नाहींस. २ जवळ जाणें; भिडणें; बिलगणें. ३ कोणेकाला तगादा लावणें.

नेटावणें [म० नेट] अ० क्रि० कांहीं काम करावयाला जोरानें आणि उत्साहानें सरसावणें.

नेटावा पु० १ जोराचा टेका(देणें). २कोणत्याही कामावर एकदम दिलेला जोर.

नेडें. नेढें न० १ सुई, दाभण, इ०चें भोक,–ज्यांत दोरा, सुतळी, इ० ओवितात. २ कुऱ्हाड, कुदळ, हातोडा, इ०चें भोक,–ज्यांत लाकडाचा दांडा बसविलेला असतो.

नेणणें [**म०** न जाणणें] **अ० वि०** न जाणणें (कवितेंत). ह्या जातीचे इतर शब्द कांहीं पुढें देतों. नाठवणें म्ह० न आठवणें; नातळणें म्ह० न आतळणें किं० न स्पर्शिणें; नुमजणें म्ह० न समजणें; नोळखणें म्ह० न ओळखणें. मागें ' नुपेक्षा ' पहा. ꣸ **नेणतपण न०** १ अज्ञान. २ अननुभव; नवशिकेपणा. **नेणता वि०** १ न जाणणारा. २ नवशिका. **नेणीव स्त्री०** १ अननुभव. २ अज्ञान.

नेणें [**सं०** नी] **स० क्रि०** (कांहीं पदार्थ) एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जाणें किं० पोचविणें.

नेत [**अ०** नीत, नेत] **स्त्री०** १ सचोटी; साखी; प्रामाणिकपणा. २ सचोटीची वर्तनाची सरणी.

नेता [**सं०** नेतृ] **पु०** १ नेणारा. २पुढारी; अग्रणी; म्होरक्या. ꣸ **नेतृत्व न०** पुढारीपणा किं० पुढारीपणाचा मान, अधिकार, इ०.

नेति [**सं०** न + इति=नाहीं असें (म्हणणें)] तसें नव्हे. ꣸ **नेति नेति पु०** अडाणी माणूस; धड्ड; ढढ्ढाचार्य.

नेत्र [**सं०**] **पु०, न०** १ डोळा; अवलोकनाचें इंद्रिय. २ (**लक्षणेनें**)वाट्याड्या; मार्गदर्शक; अध्यापक. ३ (**लक्षणेनें**) प्रवर्तक. ꣸ **नेत्रकोराज्ञ न०** ज्या वस्तु उपभोगावयाला आपणाला मिळणें शक्य नाहींत, ज्या केवळ डोळ्यांनींच पाहून (किं० कानांनीं त्यांचीं वर्णनें ऐकून)शक्य तितकें समाधान मानणें जरूर आहे, अशा वस्तु व्यक्तिशः; उ० विमानांत बसून फ्रान्सला जाणें हें तुम्हा आम्हाला नेत्रकोराज्ञच होय ! **नेत्रपल्लवी स्त्री०** डोळ्यांच्या खुणांनीं विचारांचा विनिमय करण्याची भाषा **नेत्रसंकेत पु०** डोळ्यांनीं केलेली इशारत. **नेत्रस्पर्श पु०**डोळ्यांना पाणी लावणें किं० ओलीं बोटें डोळ्यांवर टेकणें,–आचमनाच्या ऐवजीं करावयाचा संस्कार.

नेपटी स्त्री० खडे किं० बारीक बारीक फळें उडवावयाची बांबूची नळी; पटावफळी.

नेपती स्त्री० एक झाड. **नेपतें न०**त्याचें फळ.

नेपथ्य [**सं०**] **न०** १ अलंकार. २ पोशाख. ३ अंगावर भूषणें, पोशाख, इ० धारण करण्याची क्रिया. ४ (**नाटकांत**) वेष घेण्याची जागा.

नेपळ स्त्री० कोरडी जागा; शुष्क आणि रूक्ष जमीन.

नेपा, नेफा [**फा०** नेफाह] **पु०** विजार, चड्डी, तुमान, इ० कमरेभोंवतीं आवळावयाची नाडी ओवावयासाठीं जो भाग पोकळ मार्ग ठेवून शिवलेला असतो तो.

नेपाळ पु० एक झाड;याचें फळ रेचक म्हणून योजलें जातें.

नेपाळ वि० १ गुळगुळीत आणि सपाट जमीन, भिंत इ,०. २क्रमानें उतरता किं०सखल होत गेलेला (प्रदेश).

नेपाळणें स० क्रि० १ (जमीन, भिंतीचा गिलावा,इ०) घोटून सपाट आणि गुळगुळीत, करणें. २ (शरीराचीं गात्रें) चेपणें,मर्दिणें, चोळणें, किं०रगडणें. ३ (मिशा) कुरवाळून त्यांना अकडबाज वळण लावणें. ४ (पोशाख) अंगावर नीटनेटका आणि चापून चोपून बसविणें. ५ (पातळ पदार्थ) पन्हळीनें किं० विशिष्ट सरणीनें वाहावयास लावणें. **अ० क्रि०** १ (पातळ पदार्थ) योग्य पाटानें किं० पन्हळीनें वाहणें. २ क्रमानें (जमीन इ० चा पृष्ठभाग) उतरता किं० सखल होत जाणें. ꣸ **नेपाळ्या वि०** मिशा, अंगावरचा पोशाख, इ० एकसारखा नीटनेटका करण्याचा ज्याला नाद आहे असा(पुरुष);ज्यागिने लुगड्याचा पदर केस, इ० सदैव नीटनेटके करण्याची जिला खोडी आहे अशी (स्त्री) **स्त्री० नेपाळी. नेपाळणी स्त्री०** १ पदार्थ सपाट आणि गुळगुळीत करण्याची क्रिया. २अंग चोळणें किं०रगडणें.

नेपूर [**सं०** नूपुर] **न०** मुलें, स्त्रिया, इ० चें पादभूषण.

नेफा वर ' नेपा ' पहा.

नेबळ, नेबळा, नेबळभट खालीं 'नेभळ,' ' नेभळा, ' ' नेभळभट ' पहा.

नेभरा वि० खालीं ' नेभळा ' पहा.

नेभळ, नेभळा वि० १ लठ्ठ आणि थिलथिलीत असून शक्तिहीन (माणूस). २ अव्यवस्थित (पोशाख, काम, कारभार, वर्तणूक, भाषण, इ०). ३ षंढ; नपुंसक. **नेभळ भट पु०** नेभळा माणूस.

नेम [सं०] **पु०** १ नियम. २ बाण, धोंडा, इ० ज्यावर मारावयाचा तो पदार्थ. ३ पदार्थविशेषावर बाण, धोंडा, इ० रोखण्याची क्रिया किं० रोखण्याचें संस्थान (बांधणें, धरणें). ४ कांहीं कामाची लाविलेली शिस्त. ५ पिंपळाला प्रदक्षिणा घालणें, रात्रीस जेवणें, स्तोत्रें म्हणणें, इ० धार्मिक कृत्यें श्रद्धापूर्वक करण्याची लावून घेतलेली सरणी (धरणें). ⊛ **नेमधर्म पु०** पाळावयासाठीं पथकरलेली धार्मिक कृत्यें,—पिंपळाला प्रदक्षिणा घालणें, अमुक धान्य वर्ज करणें, इ०. **नेमका क्रि० वि०** (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) ठरलेला समय किं० स्थळ न चुकतां किं० न चुकवितां; उ० कोणाच्या घरीं केव्हां चहा पितात हें नारोपंतानें लक्षांत ठेविलें आहे आणि रोज त्या त्या वेळीं तो त्या त्या घरीं नेमका जातो आणि त्याला आयताच चहा मिळतो. **नेमिष्ट, नेमनिष्ट, नेमशील वि०** नेमधर्म करण्यांत किं० पाळण्यांत तत्पर. **नेमानेम पु०** १ आपल्या प्रारब्धांत ठरवून ठेविलेला योग किं० संकेत; कर्मधर्मसंयोग. २ अकल्पित किं० अनपेक्षित घटना किं० जुळणी; योगायोग. **नेमळ, नेमाळ्या वि०** विशिष्ट सरणी किं० नियम किं० उपोषणादि धार्मिक कृत्यें न चुकतां चालविणारा (निंदेंत).

नेम [सं० नियम] **पु०, न०** खुंटा, खांब, रोप, इ० पुरण्यासाठीं किं० रोवण्यासाठीं केलेला खळगा. ⊛ **वाकड्या मेढीस वाकडाच नेम करावा लागतो** कुटिल माणसाशीं कुटिलपणानेंच वागावें लागतें.

नेमणूक [म० नेमणें] **स्त्री०** १ एकाद्या विशिष्ट अधिकाराच्या स्थानीं एकाद्या माणसास नेमणें किं० स्थापणें. २ कोणा माणसाला किं० देवस्थानाला किं० कांहीं कामासाठीं नियमानें द्यावयाची म्हणून ठरविलेली पैशाची रक्कम किं० धान्यादींची रसद.

नेमणें [म० नेम; सं० नियम] **स० क्रि०** १ विशिष्ट स्थानीं (विशिष्ट माणूस) स्थापणें. २ ठरविणें. ३ रोखणें (बाण, बंदूक, धोंडा, इ०); उ० सकाळपासून मी शंभर केळीं नेमिल्या. ४ खांब इ० जमीन इ० मध्यें खुपसणें किं० पुरणें. ४(कांहीं विशिष्ट मरणां) ठरविणें. ५ दैवानें किं० प्रारब्धानें (मनुष्यादिकांचे भोग) ठरविणें; उ० दैवानें नेमिलें होतें तसें झालें; उ० दैवानें नेमिल्या ठिकाणीं त्याला मरण आलें.

नेमविणें [म० नेम; नेमणें] **स० क्रि०** (खांब, खुंटी, रोप, इ०) तदर्थ केलेल्या खळग्यांत बसविणें किं० घालणें; उ० तें ईडलिंबाचें झाड ह्याच जागीं नेमविलें तर त्याला पुष्कळ फळें येतील.

नेमस्त [म० नेम] **वि०** १ मध्यम प्रतीचा किं० दर्जाचा. २ सौम्य वृत्तीचा; शांत स्वभावाचा. ३ कोणत्याही पक्षाकडे हेकटपणानें न कलणारा; मध्यम सरणी अवलंबिणारा. ४ खाणें, पिणें, निद्रा, व्यायाम, इ० मध्यें नियमितपणा राखणारा किं० पाळणारा. ५ विवाहासाठीं ठरविलेला (वर) किं० ठरविलेली (वधू). **क्रि०** करणें; उ० मार्तंडराव देशमुख यांचा पुत्र वर नेमस्त केला आहे तर आपण समारंभास यावें.

नेमी [सं०] **स्त्री०** १ चाकाची धाव. २ वर्तुळाचा परिघ. ३ कांठ, कड, मर्यादा.

नेमोत्तर [म० नेम; सं० नियम; उत्तर] **न०** नक्की जबाब; ठासून दिलेलें उत्तर किं० केलेलें विधान.

नेरवा, नेरा पु० सोनाराच्या शेगडीतील राख इ० मध्यें पडलेले असतात ते सोन्याचे कण समुच्चयानें. हे कण झारेकरी गोळा करून विकतात.

नेरवां क्रि० वि० आजच्या दिवसाच्या मागचा किं० पुढचा जो चवथा दिवस त्या दिवशीं. काल किं० उद्या, परवा, तेरवा, आणि नेरवा, अशा क्रमानें हे शब्द योजले जातात.

नेरा मागें ' नेरवा ' पहा.

नेरेभार [म० ने + रे + भार = हें ओझें वाहा] **पु०** एका जातीचीं अनेक कृत्यें करतांना दर खेपेस कोणाला बजावणें किं० हें मी करीत आहें पहा असें सांगणें (लावणें).

नेव **स्त्री०** एका जातीचा मासा.

नेवकदंबा **पु०** एक वृक्षविशेष.

नेवता [**हिं०**] **पु०** आमंत्रण; बोलावणें; (करणें, देणें).

नेवर **पु०, न०** १ घोड्याच्या पायाचा घोटा (लागणें). २ दोन घोटे एकावर एक आपटू नयेत किं० आपटल्यानें इजा होऊं नये म्हणून ह्या घोट्यावर बांधतात तो पट्टा (बांधणें).

नेवरा **वि०** घोडा, गाय, इ०चा पांढरा खूर किं० अशा खुराचा (घोडा, गाय, इ०).

नेवरी **स्त्री०** करंजीसारखा एक खाद्य पदार्थ.

नेवाळ, नेवाळी **स्त्री०** एक फुलझाड. **नेवाळें** **न०** त्याचें फूल.

नेवेद्य, नैवेद्य [**सं०**] **पु०, न०** आराध्य देवतेस अर्पण करावयाचें अन्न.

नेव्हारा **पु०** कोणेकाविरुद्ध केलेली तक्रार किं० चालविलेली पिरपिर किं० ओरड (गाणें). टीप,–**नेव्हारे गाणें** असा **अ० व०** प्रयोग बहुधा होतो.

नेशीव [**म०** नेसणें] **वि०** १ नित्याच्या नेसण्यात असलेलें (वस्त्र). २ नित्य नेसून जीर्ण झालेलें (वस्त्र).

नेष्ट [**सं०** न+इष्ट] **वि०** अनिष्ट, अशुभ, अपायकारक(ग्रह); उ० हल्लीं तुह्मांला मंगळ नेष्ट आहे, तुम्ही योजलेलें काम कांहीं दिवस लांबणीवर टाका.

नेसण, नेसणें [**म०** नेसणें] **न०** १ धोतर, लुगडें, इ० शिष्टाचाराप्रमाणें कमरेभोवती वेष्टणें किं० योग्य प्रकारें परिधान करणें. २ अंगावर कपडे पेहेरणें.

नेसणें **स० क्रि०** लुगडें, धोतर, पंचा, इ० शिष्टाचाराप्रमाणें कटिप्रदेशीं परिधान करणें. ❀ **मुसळ नेसणें** दुर्भाषण किं० दुर्वर्तन, इ० निर्लज्जपणानें करणें; उ० आमची शेजारीणबाई आलकिडे जशी मुसळ नेसली आहे.

नेसविणें [**म०** ' नेसणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ धोतर, लुगडें, इ० मुलगा किं० मुलगी यांच्या कटिप्रदेशीं शिष्टाचाराप्रमाणें गुंडाळणें. २ लेखांत (कांहीं बाबत) नमूद करणें; उ० माझ्या भावाच्या नांवावर ज्या रकमा आहेत त्या माझ्या नांवावर नेसवा. ३ खर्चाची कांहीं बाबद तपशील देऊन पूर्ण करणें. ४ शीघ्र पेट घेणारे पदार्थ,– (गवत, कडबा, इ० किल्ला, डोंगर, रान, जमीन, इ० मध्यें किं० इ०वर) साठवून ठेवणें. ५ (घराच्या माथ्यावर) गवतीं छप्पर घालणें; ' घर नेसविणें ' असा प्रयोग होतो; उ० आमचें घर शिवावयाला हजार गुंड्या लागतात पण यंदा गुंड्या महाग झाल्यामुळें आम्हीं पांचशें गुंड्यांनींच घर नेसविलें. ६ ज्या पदार्थाचें कांहीं कामासाठीं जितकें परिमाण पाहिजे तितकें न मिळाल्यामुळें मिळालेल्या परिमाणावरच काम उरकून घेणें किं० भागविणें किं० संपविणें किं० निर्वाह करणें.

नेसींव मागें ' नेशींव ' पहा.

नेस्त मागें ' नस्त ' पहा.

नेहटणें, नेहेटणें [**सं०** निकट; **म०** नेट] **अ० क्रि०** १ अगदा जवळ आलेलें असणें; ठेपलेलें असणें. २ उपद्रव किं० अस्वस्थता करण्याइतकें भिडलेलें किं० जवळ आलेलें असणें; उ० सावकाराचें देणें अगदीं नेहटलें आहे; उ० मला परक्षाकडेला (किं० लग्नाला) अगदीं नेहेटली आहे, कांहीं सुचत नाहीं. ३ गर्दीनें, दाटीनें, किं० खेचाखेच करून असणें, बसणें, इ०; उ० ह्या गांवांत घरांशीं घर नेहटलेलें आहे; उ० तासगांवकरबोवांच्या कथेला आलेले श्रोते देवळांत अगदीं नेहेटलेले होते.

नेहमीं, नेहेमीं [**सं०** नियम] **क्रि० वि०** १ नियमानें; नियमितपणाणें; खंड न पडूं देतां; उ० बलभीम नेहमीं कमरुद्दिन वस्तादजकिडे सतार शिकावयाला जातो. २ अगदीं; कायमचा; बक्षीस म्हणून; उ० हें घर आम्हीं तुम्हाला नेहेमीं देतों. ❀ **नेहेमींखर्च, नेहेमींचा खर्च** **पु०** चालू खर्च; रोजच्या रोज, किं० महिन्याच्या महिन्यास, किं० वर्षाच्या वर्षास, करावा लागणारा ठराविक खर्च. याच्या उलट 'प्रसंगविशेषीं करावयाचा खर्च.'

नेहर, नेहेर **न०** रुपण; रुपणीची पुळण; विश्वासघातकी पुळण.

नेहाळणें, न्याहाळणें **स० क्रि०** टक लावून किं० सूक्ष्म नजरेनें (पदार्थ) पाहाणें किं० अवलोकिणें.

नैपुण्य [सं०] **न०** १ चातुर्य. २ एकाद्या विषयांत निष्णातपणा किं० प्रावीण्य.

नैमित्तिक [सं०] **वि०** १ प्रसंगोपात्त; आनुषंगिक. २ विशेषप्रसंगीं करावयाचा. **पु०** ज्योतिषी. **न०** प्रासंगिक संस्कार.

नैयमिक [सं०] **वि०** नेमाचा; नेमानें करावयाचा. **न०** नियमितपणा.

नैयायिक [सं०] **पु०** न्यायशास्त्रांत प्रवीण.

नैरंकुश्य [सं०] **न०** अनियंत्रितपणा; बेतालपणा; उच्छृंखल वृत्ति.

नैरंतर्य [सं०] **न०** १ सततपणा; सातत्य; अखंडितपणा. २ निकटपणा.

नैराश्य [सं०] **न०** १ आशेचा भंग; आशा सफल न होणें. २ निरिच्छपणा.

नैर्ऋत [सं०] **पु०** १ राक्षस. २ नैर्ऋत्येचा स्वामी. **नैर्ऋती स्त्री०** नैर्ऋत्य दिशा.

नैर्गुण्य [सं०] **न०** सद्गुणाचा अभाव.

नैर्मल्य [सं०] **न०** १ निर्मलपणा. २ पापरहितता.

नैवेद्य [सं०] **पु०, न०** १ आराध्य देवतेस अर्पावयाचें अन्न (दाखविणें, अर्पिणें, समर्पिणें). २ जेवण, भोजन (करणें). ❀ **घरच्या देवांस नैवेद्य नको** लग्न, मुंज, इ० प्रसंगीं आमंत्रिलेले जे बाहेरचे लोक त्यांची बरदास्त अगोदर राखिली पाहिजे; घरच्या वडील माणसांकडे थोडेसें दुर्लक्ष्य झालें तरी हरकत नाहीं. **न खात्या देवाला नैवेद्य** १ शाब्दिक औदार्य पुष्कळ लोक दाखवितात; सक्रिय औदार्य फार थोडे लोक दाखवितात. २ ज्याला मदतीची गरज नाहीं त्याच्या पुढे हांजी हांजी करावयाला पुष्कळ लोक येतात; ज्याला मदतीची गरज आहे त्याच्याकडे कोणी ढुंकून पाहात नाहीं.

नैश, नैशिक [सं०] **वि०** रात्रीचें; रात्रींच्या वेळीं करावयाचें.

नैश्चल्य [सं०] **न०** निश्चलपणा; स्थिरपणा.

नैषध [सं०] **वि०** निषध देशासंबंधाचा. **पु०** नल राजा.

नैष्कर्म्य [सं०] **न०** कर्मापासून मुक्तता.

नैष्ठिक [सं०] **वि०** १ शेवटचें. २ शाश्वत; निश्चल. ३ पूर्ण; परमावधीस पोंचलेलें. ४ ठराविक; आवश्यक. ५ निश्चित; कायमचा. **पु०** आजन्म ब्रम्हचारी. **न०** आजन्म ब्रम्हचर्य आणि संन्यास. ❀ **नैष्ठिक ब्रम्हचर्य न०** मुंज सुटल्यानंतर ब्रम्हचारी धर्मानें राहाणें. **नैष्ठिक ब्रम्हचारी पु०** नैष्ठिक ब्रम्हचर्य पाळणारा.

नैसर्गिक [सं०] **वि०** स्वाभाविक; स्वभावसिद्ध.

नो उ० वा० अ० अहो ! उ० सर्व लोकांनो, इकडे लक्ष्य द्या.

नोक [फा०] **पु०** १ भाला, बरची, इ० ची अग्र किं० टोक. २ भाषणांतील खुबी किं० मख्खी (दाखविणें, मारणें). ३ झोंक; ऐट; नखरा. ❀ **नोकझोंक स्त्री०, पु०** १ बोलण्याचालण्यातील ऐट किं० नखरा. २ ओझरतें दर्शन किं० भेट; उ० दामोदरपंत नुसते नोकझोंक दाखवून गेले. ३ आपल्या विचारांचें ईषन्मात्र दर्शन किं० चुणूक. **नोकदार वि०** १ झोकदार, धारदार (पदार्थ). २ खुबीदार (भाषण). **नोकानोकी स्त्री०** भाषणांत दोन माणसांनीं एकमेकांस टोमणे मारणें किं० कुचकें बोलणें हा प्रकार.

नोकर [हिं०] **पु०** पैसे घेऊन किं० पगार घेऊन, दुसऱ्या मनुष्याचें किंवा सरकारी अगर खाजगी कचेरींत वगैरे काम करणारा मनुष्य; चाकर. (' नौकर ' असेंही अन्य रूप रूढ आहे). ❀ **नोकरी स्त्री०** नोकराचें काम, धंदा, किं० कर्तव्य. **नोकरमाना पु०** १ नोकरीचा धंदा करणारा. २ मोठ्या दर्जाचा नोकर. **नोकरचाकर पु०** आपलीं कामें (विशेषत: खाजगी) करावयासाठीं पगार देऊन ठेवलेलीं माणसें. **नोकरशाही स्त्री०** हिंदुस्तानावर राज्य करण्याची इंग्लंडच्या पार्लमेंटनें रूढ केलेली सरणी.

नोडगा, नोडग्या पु० मुसलमान (निंदेंत).

नोंद [म० नोंदणें] **स्त्री०** पत्रें, खतें, हुंड्या, इ० चें स्मरणार्थ केलेलें टिपण. ❀ **नोंदवही स्त्री०** अशीं टिपणें करावयाची वही.

नोंदणी [म० नोंदणें] **स्त्री०** हुंडी, पत्रें, इ० चें स्मरणार्थ केलेलें टाचण किं० अशा टाचणाची चोपडी. ह्या दोन्ही अर्थी ' नोंद ' असाही शब्द आहे.

नोंदणें स० क्रि० १ हुंडीचा स्वीकार केला म्हणजे (तिची नक्कल) ठेवणें किं० करून घेणें. २ कोणत्याही प्रकारच्या कागदपत्राचें स्मरणार्थ (टिपण) करणें.

नोर [हिं०] पु० गलबतें, होड्या, इ० चें भाडें; गलबतें, होड्या, इ० जलयानांनीं सामान घाहून नेण्याबद्दलचें भाडें. ‡ **नोरी** वि० भाड्यानें ठरवून उपयोगासाठीं घेतलेलें (गलबत, होडी, इ०).

नोवरा पु० मागें ' नवरा ' पहा.

नोवरी स्त्री० मागें ' नवरी ' पहा.

नोळखणें [म० न+ओळखणें] स० क्रि० न ओळखणें. मागें ' नुमजणें, ' ' नुमगणें ' इ० पहा.

नौ, नौका [सं०] स्त्री० नाव; होडी; तारूं. ‡ **नौदण्ड, नौकादण्ड**, पु० वल्हें. **नौजीवी, नौकाजीवी** पु० नावाडी.

नौबत, नौबद [अ०] स्त्री० मोठा नगारा. ‡ **नौबत (–द–) घाई**, **नगाऱ्याची घाई** स्त्री० १ नगारा, इ० वाद्यें वाजविणें बंद करावयाची वेळ आली असतां त्या वाद्यांवर जी शेवटीं आघात करतांना दाखविली जाते ती घाई किं० तो वेग. २ कोणतेंही काम नेहमींपेक्षां कमी वेळांत संपवावयाचें असतां जी धांदल किं० गडबड उडते ती. **नगाऱ्याची (किं० नौबतीची) घाई तेथें टिमकी तुझें काई** ? मागें ' टिमकी ' शब्दांत पहा.

न्यग्रोध [सं०] पु० वटवृक्ष; वडाचें झाड.

न्यसणें [सं० नि+अस् (फकणें)] स० क्रि० १ ठेवणें. २ फेकून देणें.

न्यस्त [सं०] वि० १ फेकून दिलेला. २ ठेविलेला.

न्यहा पु० सुतार, लोहार, शिकलगार, इ० चीं काम करावयाची जागा.

न्यहार वि० मृदु; गुळगुळीत.

न्यहारणें स० क्रि० गुळगुळीत करणें (फळी इ०).

न्यहारी [फा० निहारी] स्त्री० सकाळीं कामावर जावयाच्या आधीं शेतकरी, गडी, इ० जो राळ करतात तो.

न्यहाल [फा०] वि० वरच्या दर्जास चढलेला; उत्कर्ष पावलेला; उदयास आलेला. ‡ **न्यहाली** स्त्री० मेहेरबानी. २ दरबारांत शिरकाव. ३ अभ्युदय; उत्कर्ष.

न्यहाली [फा०] स्त्री० चटई.

न्याहाली स्त्री० वस्त्रामध्यें कापूस इ० घालून अंगाखालीं घालावयासाठीं करतात तें. मागें ' न्यहाली ' पहा.

न्यहाळणें मागें ' निहाळणें ' पहा.

न्यात [सं० ज्ञाति; म० ज्ञात] स्त्री० एकाद्या विशिष्ट जातीचें लोक समुच्चयानें म्ह० त्या जातीचे सर्व लोक.

न्याय [सं०] पु० १ पद्धति; सरणी; विधि. २ सन्मार्ग; नीतीची सरणी. ३ खटला किं० खटल्याचा निवाडा. ४ राजनीति. ५ दृष्टान्त, दाखला. ६ सामान्य नियम. ७ न्यायशास्त्र,–षड्दर्शनांपैकीं एक. ९ अनुमानवाक्य १० तर्क; विचार; उपपत्ति. ११ कांहीं गोष्ट ठरवावयाची असतां जें नियामक प्रमाण घेतात तें. १२ म्हण. **टीप**.–न्याय म्हणजे दाखला किं० दृष्टान्त. मराठीमध्यें म्हणींनीं किं० सांप्रदायिक वाक्यांनीं जें काम होतें तें संस्कृतांत न्यायांनीं होतें; उ० तुला सबंध पुस्तक वाचण्याचें कारण नाहीं, तूं एक दोन पानें वाचलीस म्हणजे म्हणजे तुला स्थालीपुलाक न्यायानें साऱ्या पुस्तकाचें रहस्य कळून येईल. आमचें, 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०'हें पुस्तक पहा. ‡ **न्यायतः** क्रि० वि० १ यथाविधि. २ खरें पाहिलं असतां; वास्तविक रीत्या. **न्यायनिष्ठ** वि० सन्मार्गानें चालणारा; पक्षपात न करणारा (राजा, न्यायाधीश, इ०) **न्यायनिष्ठुर** वि० अत्यन्त सचोटीनें आण सचोटीनें वागणारा, किं० बोलणारा किं० निवाडा करणारा. **न्यायाधीश** पु० राजानें किं० सरकारनें किं० संस्थेनें खटल्याचा किं० वादग्रस्त प्रश्नाचा निकाल करावयासाठीं अधिकृत केलला किं० नेमलेला इसम. **न्यायासन** न० ज्या आसनावर राजा, न्यायाधीश, इ० इसम कज्जाचा निकाल करावयास असतात तें आसन. **न्यायी** वि० पक्षपात न करतां निकाल करणारा. **न्याय्य** वि० न्यायाला धरून केलेलें; योग्य. **न्यायसभा** स्त्री० खटल्यांचे निकाल

करावयाला राजा किं० कोणी अधिकृत इसम जेथें बसतो ती जागा.

न्यारा [हिं० नियारा; म० निराळा] **वि०** १ वेगळा; भिन्न; निराळा. २ बाजूस काढलेला किं० असलेला.

न्याव [म० न्याय] **पु०** १ न्याय; योग्य सरणी. २ खटल्याचा निकाल. ꣸ **फासा पडेल तो डाव, राजा बोलेल तो न्याव** मागें 'डाव' शब्दांत ही म्हण स्पष्टावली आहे ती पहा.

न्यास [सं०] **पु०** १ ठेवणें. २ खूण; छाप; निशाणी. ३ गहाण म्हणून ठेविलेली वस्तु. ४ खालीं ठेवणें; उ० शस्त्रन्यास. ५ संन्यास दीक्षा. ६ मंत्रांनीं देव इ०चीं शरीराच्या अवयवांवर स्थापना करणें. ७ कोणाकडे कांहीं काम किं० कांहीं पदार्थ सोपविणें. ८ सोडून देणें; परित्यागणें; उ० कर्मन्यास, फलन्यास, इ०. ९ गणितामध्यें गुणाकार, भागाकार, इ० कृत्यें करावयाचीं असतां ते ते अंक मांडणें ही क्रिया. १० बाणादिकांवर मंत्रादिकें करून जें देवतेचें स्थापन तें; उ० त्यानें त्या बाणावर देवतेचा न्यास करून तो बाण सोडला.

न्याहरी इ० मागें 'न्यहारी' इ० पहा.

न्याहाळणें **स० क्रि०** सूक्ष्म दृष्टीनें अवलोकिणें; उ० त्याचे डोळ्यावर चाळिशी आली त्यामुळें त्याला अक्षर न्याहाळत नाहीं (म्ह० स्पष्टपणें दिसत नाहीं). मागें 'न्यहाळणें' पहा.

न्याहाल [फा०] **वि०** संपत्ति, अधिकार, इ० नीं संपन्न किं० वृद्धिंगत; उ० रामभाऊंनीं गदाधरशास्त्र्यास न्याहाल केलें; उ० तो न्याहाल झाला. ꣸ **तुम्ही न्याहाल पाडाल** तुम्ही शतकृत्य कराल; तुम्ही मोठा दिग्विजय मिळवाल (निंदेत प्रयोग).

न्यून [सं०] **वि०** १ कमी. २ ताकडा. ३ हलक्या दर्जाचा किं० पायरीचा किं० योग्यतेचा; उ० झारेकऱ्याच्या वसनापेक्षां सोनाराचें वसन न्यून. ꣸ **न्यूनपूर्ण, न्यूनाधिक, न्यूनातिरेक** **वि०** कमी अधिक; अधिक उणें; असावें त्याहून कमी किं० अधिक. **न्यूनवचन** **न०** जें किं० जितकें बोलणें जरूर त्यांत कांहीं झालेली कमताई; उ० माझें न्यूनवचन तूं चातुर्यानें भरून काढ. **न्यूनांग** **न०** हात, पाय, इ० पैकीं एका किं० अधिक गात्रांचा अभाव. **वि०** हात, पाय, डोळा, इ० पैकीं एकादें गात्र ज्याला कमी आहे असा (मनुष्य, पशु, इ०). **न्यून पडणें** कांहीं व्यापारांत किं० कामांत वैगुण्य पडणें किं० तें यथायोग्य न होणें.

न्हाऊ, नाहू **पु०** न्हावी; नापित.

न्हाण, न्हाणघर, इ० मागें 'नहाण' 'नहाणघर,' इ० पहा.

न्हावगंड **पु०** न्हावी (तुच्छतेनें).

न्हावेर **पु०** १ विधवेशीं लग्न. २ स्त्रीनें केलेलें दुसरें लग्न. दोन्ही अर्थी **क्रि०** करणें; किं० लावणें. दोन्ही अर्थी 'पाट' हाही शब्द योजला जातो.

न्हावी [म० न्हाणें, नहाणें] **पु०** नापित; हजाम.

न्हावी **पु०** एक किडा,–जो आपणाला कांटे एकाशीं एक चिकटावून रहावयाला घर करतो. ꣸ **न्हाव्यचें घर** **न०** वर वर्णिलेल्या किड्यानें खतासाठीं केलेलें कांट्यांचें घर.



प

प [सं० १ पा = पिणें. २ पा=रक्षिणें] वि० १ पिणारा. २ रक्षिणारा. टीप,–संस्कृत समासान्तीं मात्र ' प ' चा उपयोग होतो. गोप= गायी राखणारा म्ह०गुराखी;नृप=माणसांस रक्षिणारा म्ह० राजा; क्षितिप=पृथ्वी रक्षिणारा म्ह० राजा; इ० द्विप=दोन वेळां पिणारा म्ह० हत्ती,–जो सोंडेनें एकदा आणि मुखानें नंतर पाणी इ० पितो तो; मधुप=मध पिणारा म्ह० मधमाशी इ०.

पईज, पईल, पईस इ० पुढें ' पैज, ' ' पैल ' ' पैस ' इ० पहा.

पईलवान [हिं०] पु० मर्दुमकीचे खेळ कुस्त्या, दांडपट्टा,इ० उदरनिर्वाहासाठीं किं० हौसेसाठीं खेळतो तो.

पउतें, पऊल इ० ' पौतें, " पौल ' इ०पहा.

पंक[सं०]पु०१चिखल.२लाडू इ०साठीं साखर, गूळ,इ०भाजून किं०शिजवून करतात तो राधा.३ मळ.४ पाप.॰**पंकज** न०कमळ.**पंकजिनी** स्त्री०१ कमळिनी. २ कमलांचा समूह. ३ कमळांनीं सुशोभित असें तळें.

पकड,पक्कड [हिं०] स्त्री० १ पदार्थ कामाचे वेळीं पक्का धरून ठेवण्याचे सोनार,सुतार,लोहार, इ० कारागिरांचें एक आउत. २ कुस्तीमध्यें प्रतिपक्ष्याला पाडण्यासाठीं योजतात ज्या युक्त्या त्या प्रत्येक. ३ भाषणामध्यें दुसऱ्याला निरुत्तर करण्यासाठीं जी युक्ति योजिली जाते ती. ४ आपल्या भाषणाचा अर्थ प्रसंग पडेल तसा बदलतां यावा यासाठीं जी खुबी राखिलेली असते ती. ५ भाषणांतील कांहीं दोष,–ज्यावर प्रतिपक्षी हल्ला करूं शकतो.॰**पकड धरून बोलणें** प्रतिपक्ष्यानें आपणास शब्दांत पकडूं नये अशा सावधगिरीनें बोलणें. **पकडींत सापडणें** पेंचांत अडकणें. **पकडांत धरणें** पेचांत आडकावणें.

पकडणें [हिं० पकड़ना] स० क्रि० १ पळून किं० निसटून जात असलेल्या माणसास किं० प्राण्यास हातांनीं धरणें किं० त्याला स्वतंत्रपणें म्ह० आपल्या परवानगीशिवाय कांहीं हालचाल करतां न येईल अशा नियंत्रणेंत आणणें किं० घालणें किं० ठेवणें; उ० चोर, राघू, चिमणी, इ० पकडणें. २ भाषणादिकांत कांहीं कोटिक्रम योजून कोणेकाला निरुत्तर करणें.

पकवा पु० कांहीं खेळांत मुली तोंडानें काढतात तो अव्यक्त शब्दविशेष.

पकार [म० पावली, पावला, प्यादें, ह्या शब्दांचें 'प' हें आद्याक्षर] पु० १ चार आण्याचें नाणें; पाव रुपाया; पावली किं० पावला. मागें ' चकार, ' ' चकारी ' हे शब्द पहा. टीप,– ह्या अर्थी ' **पकारी** ' स्त्री० असेंही रूप आहे. २ प्याद्यानें प्रतिपक्ष्यावर केलेली मात किं० दिलेला शह.

पकोरडी स्त्री० एक पक्षिविशेष.

पक्का [सं० पक्व] वि० १ पिकून खावयाला योग्य झालेलें (आंबा इ० फळ). २ शिजवून खावयाला योग्य झालेलें (खाद्य). ३ टिकून राहाणारा (रंग, शिवण, शाई, इ०). ४ न ढळणारा (निश्चय, बेत). ५ अंगीं खिळलेली (सवय, व्यसन). ६ टणक, मजबूत (भाजलेलें कौल, वीट, धोंडा, इ०). ७ निढाविलेला, निष्णात अट्टल, पुरापूर, भरपूर (पंडित, गांजेकस, भामटा, कोल, शेर, इ०). ॰ **पक्का पैसा** पु० दुवाला; दोन पैसे किंमतीचें नाणें. **पक्कें तूप** न० योग्य उष्णता देऊन कढविलेलें तूप. याच्या उलट ' कच्चें तूप ' म्ह० ज्याला उपयोगांत आणतेवेळीं एक दोन कढ आणखी द्यावे लागतात. **पक्की शाई** स्त्री० धुण्यानें किं० कालगतीनें कमी गडद न होणारी शाई. **पक्का रंग** पु० धुतल्यानें किं० भट्टींत घातल्यानें न जाणारा रंग. **पक्का डाक** पु० सोनें, चांदी, पितळ, ह्या द्रव्यांचा केलेला डाक. याच्या उलट ' कच्चा डाक ' जो कथील, शिसें,इ० चा केलेला असतो. **पक्का ख्याल** पु०एक प्रकारचें गीत. **पक्कीकुंदी** स्त्री० भट्टींत शिजवून वस्त्रादि धुणें. **पक्की मुदत** स्त्री०हुंडी वटावण्याची पूर्ण झालेली मुदत.

पंक्ति [सं०] स्त्री० १ ओळ; रांग. २ जेवावयास बसलेल्या लोकांची ओळ (सजातीयांची).

टीप,–ह्या अर्थी ‘ पंगत ’ असाही शब्द रूढ आहे. ३ एकजातीय पदार्थांची रांग. ॐ**पंक्तिदोष** पु० १ धर्मभ्रष्ट किं० आचारभ्रष्ट माणसाच्या पंक्तीस बसून जेवल्यानें घडतें तें पाप. २ ज्या दोषामुळें आपल्या जातीच्या लोकांच्या पंक्तीस बसून जेवणाची आपणाला मनाई होते तो दोष. **पांक्तिपठाण** [सं० पंक्ति; हिं० पठाण] पु० १ घोडेस्वार,–जो यजमानाच्या सैन्यांत नोकरी करतो आणि जो यजमानाच्या पंक्तीस जेवतो तो. २ कोणा माणसाचें वैभव दिसावें म्हणून पंक्तीस फुकट जेवावयास घेतलेले लोक. ३ लोकांच्या घरीं फुकट जेवणें मिळविणें हा धंदा ज्यांचा असे लोक. ह्या सर्व अर्थीं ‘ पांक्तिबारगीर ’ हाही शब्द रूढ आहे. **पंक्तिपावन** वि० पापाचरण घडल्यामुळें जो पंक्तींत जेवावयास अपात्र झाला परंतु प्रायश्चित्त घेतल्यामुळें जो पुन्हा पंक्तीस जेवणारा योग्य झाला तो; उ० मंदाराला यवनान्नभक्षणाचें पाप लागलें होतें, त्याला शिवाजीनें ब्राम्हणांकडून प्रायश्चित्त देववून पंक्तिपावन करून घेतलें. **पंक्तिबाह्य, पंक्तिभ्रष्ट** वि० कांहीं पापाचरण घडल्यामुळें ज्याला सजातीयाच्या पंक्तींत जेवण्याचा हक्क राहिला नाहीं असा. **पंक्तिभऊ** पु० एकत्र बसून किं० एका पंक्तींत बसून जेवणारे लोक ते एकमेकांचे पंक्तिभाऊ. **पंक्तिप्रपंच** पु० १ एका पंक्तींत जेवावयास बसलेल्या कांहीं माणसांस म्ह० आपल्या वशिल्याच्या माणसांस साजूक तूप, उंचीं पक्वान्नें, इ० वाढणें आणि इतरांस वाशेरें तूप, हलकीं पक्वान्नें, इ० वाढणें हा निंद्य प्रकार. २ पक्षपात ह्या दोन्ही अर्थीं ‘ पंक्तिभेद ’ असाही शब्द आहे. **पंक्तिभेद** पु० १ ‘ पंक्तिप्रपंच ’ पहिला अर्थ. २ एके ठिकाणीं परंतु वेगळ्या पंक्ति करून जेवणें हा प्रकार; उ० पंक्तिभेद असल्यास ब्राम्हण सोनाराच्या घरीं जेवतात. **पंक्तिलाभ, पंक्तीचा लाभ** पु० कोणेकाच्या पंक्तींत बसून जेवण्याचा मान. **पंक्तींतला नळा** पु० भोजनार्थ बसलेल्या लोकांच्या करमणुकीसाठीं पंक्तींत उडवावयाचा दारूकामाचा नळा.

पक्क [सं०] वि० १ भाजलेलें. २ शिजविलेलें. ३ पिकलेलें (फळ, गळूं, इ०). ४ पूर्णतेस आलेलें. ५ अनुभविक. ६ प्रौढ वयाचा. ७ प्रौढ, प्रगल्भ (बुद्धि). ॐ **पक्वान्न** न० १ शिजविलेलें (अन्न). २ मालमसाला घालून केलेलें उंची खाद्य,– जिलबी इ०. **पक्वाशय** पु० १ बेंबीच्या खालचें पोट. २ खाल्लेल्या अन्नाची व्यवस्था लावणारें इंद्रिय.

पकाशी स्त्री० लोखंडाची कांब किं० पट्टी.

पंख [सं० पक्ष] पु० १ पक्षी हवेमध्यें ज्या साधनांनीं उडतात तीं प्रत्येक. २ ह्या साधनांतील जे घटक अवयव ते प्रत्येक; पीस. ॐ **पंखी** स्त्री० जात; संबंध; उ० तूं जो उखाणा मला घातलास त्याची पंखी सांग. **कोणेकाला पंख फुटणें** तो स्वतंत्रपणें व्यवहार करावयाच्या वयाचा झालेला असणें (निंदेंत प्रयोग). **पंखडी** स्त्री० पंख(निंदेंत किं० लघुत्व दाखवतांना).

पखचन्नी स्त्री० राघूच्या जातीचा पण मोठ्या आकाराचा एक पक्षी.

पंखवाळी स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण. ‘ पंखा ’ पु० हाही शब्द याच अर्थाचा आहे.

पंखरडा पु०, **पखळ**, **पखळण**, **पखरणी** स्त्री० [म० पसरणें] १ अस्ताव्यस्त किं० अव्यवस्थित पडलेले पदार्थ किं० सामानसुमान समुच्चयानें. २ पदार्थांची अव्यवस्थितपणाची स्थिति; उ० येथें तुझ्या पुस्तकांचा सध्यापासून पखरडा पडला आहे तो आवर.

पखरणें, पखळणें [म० पसरणें] स० क्रि० (सामानसुमान) अव्यवस्थितपणानें इकडे तिकडे टाकणें.

पखवा पु० कांहीं खेळ खेळतांना मुली तोंडानें जो अव्यक्त ध्वनि काढतात तो.

पखवाज [सं० पक्षवाद्य] पु० मृदंग. ॐ **पखवाजची (–जी)** पु० पखवाज हें वाद्य वाजवितो किं० वाजवावयाला शिकवितो तो.

पंखा पु० वर ‘ पंखवाळी ’ पहा.

पखळ, पखळण स्त्री० वर ‘ पखरडा ’ पहा.

पंखा [सं० पक्ष] पु० १ वारा घ्यावयाचें कागद, ताडपत्र, वाळा, वेळू, इ० चें केलेलें असतें तें साधनविशेष. २ बायकाच्या चोळीचे छातीवर येणारे जे दोन भाग ते प्रत्येक. ३ एक प्रकारचा

मोठा पतंग,-हवेंत उडवावयाचा.

पंखाड [म० पंख] न० १पक्ष्याचा खूप मोठा पंख. २ पंख (तुच्छतेनें). [पहा.

पखाडा [म० पसरणें] पु० वर ' पखरण '

पखाल [सं० पयस् (पाणी) + खल (चर्मपात्र)] स्त्री० १ पाणी वाहून न्यावयासाठीं पडशीच्या किं० कंठाळीच्या आकाराचें जें कातड्याचें बारदान बैलाच्या पाठीवर घालतात तें. २ पोट (निंदेंत). ※**पखालची** (-जी) पु० पखाली बैलावरून पाणी वाहून नेण्याचा धंदा करणारा. **पखाल पार्वती** स्त्री० लठ्ठ आणि थिलथिलीत अंगाची स्त्री (निंदेंत).**पखाल्या** वि० १पखाल वाहाणारा (बैल). २ बैलाच्या पाठीवर पखालींत घालून पाणी वाहणारा (माणूस).

पखाळणी, पखाळणें, पखाळपूजा, पखाळणी पुढें 'पाखळणी, 'इ० पहा.

पंखी स्त्री० वर ' पंख ' मध्यें पहा.

पंखी [म० पंख] स्त्री० पक्ष्याच्या पिसांचा केलेला एक पदार्थविशेष.

पखेबाळी, पंखबाळी [सं० पक्ष; म०पंख; बाळी=कर्णभूषणविशेष] स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

पंखेरूं, पांखरूं [सं० पक्षिन्=पक्षी] न० १ पक्षी (तुच्छतेनें). २ लहान पक्षी.

पंख्या [म० पंख] पु० एक पक्षिविशेष.

पग [सं० पद] न० १ पाऊल; उ० पग पाहून मोर झुरे (म्ह० आपला पिसारा अत्यंत मनोहर असतां आपले पाय हिडिस्स म्हणून मोराला दुःख होतें). २ रहस्य; खुबी; कोणेक व्यवहाराचा मूलभूत जो मर्मांश,-ज्याच्या ज्ञानानें तो व्यवहार स्पष्टपणें समजतो तो; उ० हा रघुनाथ बारा वर्षें हिशेब शिकत आहे परंतु हिशेबाचें पग अझून याच्या लक्ष्यांत आलेलें नाहीं. ३ बुद्धिबळें, सोंगट्या,इ०च्या पटांचीं जीं घरें तीं प्रत्येक. ※ **पगीं सापडणें** भाषणांत अडकणें. **पगीं धरणें कोणेकाला** भाषणांत पकडणें किं०धरणें किं० अडकावणें.**पगदस्त, पगदस्ती** [म० पग (खेळाच्या पटावरील घर) + फा० दस्त (हात)] वि० १ एकदा एक बुदबळ एकाद्या घरांत ठेविलें असतां विचार बदलून तें तेथून उचलून दुसऱ्या एकाद्या घरांत ज्यांत ठेवितां येत नाहीं असा (खेळण्याचा प्रकार किं० अशी नियंत्रणा). २ स्थिर; कायमचा; न बदलावयाचा; पक्का; (निश्चय, विचार). ३ दुसऱ्यास शब्दांत पकडणारा. ४ शब्दांत न आडकणारा. ※ **कोणेकाला पगदस्ती धरणें** त्याला शब्दांत पकडणें; त्याचें बोलणें त्याच्याच विरुद्ध योजणें.

पगडा [म० पग] पु० १ फाशांवरील संख्याबोधक चिन्ह. २ कांहीं कृत्याचा परिपाठ किं० चाल (घालणें, पडणें); उ० आलीकडे गदाधर भटजींनीं आमच्या घरीं येण्याजाण्याचा पगडा घातला आहे.३कांहीं कार्यांत किं०व्यवहारांत प्रवेश किं० शिरकाव; उ० कांहीं पैसे जवळ असल्याशिवाय व्यवहारांत पगडा बसत नाहीं. ४ कोणेकावर स्थापित झालेलें वर्चस्व किं० बसलेली छाप किं० पडलेलें वजन; उ० आलीकडे मीयासाहेबांचा पगडा नवाबसाहेबांवर बराच बसलासा दिसतो. ※ **पगडडाव** पु० सोंगट्यांच्या खेळाचा एक प्रकार.

पगडी [हिं०] स्त्री० पगडबंधानें बांधलेल्या पागोट्यासारखें दिसणारें टणक आणि कागद खळीनें चिकटावून आणि वर कापड शिवून तयार केलेलें पुरुषांचें शिरोवेष्टन. ※ **पगडबंध** पु० पागोटीं बांधून चरितार्थ करणारा. त्याला दिलेली मजुरी किं०त्याचा धंदा याला'पगडबंधी'किं०'पगडबंधकी' म्हणतात.**कोणेकाची पगडी घेणें** त्याच्याहून वरचढ किं०श्रेष्ठ ठरणें; त्याचा नक्षा उतरणें; त्याला पराजित करणें. **पगडी फिरविणें** १ प्रथम धरलेला पक्ष सोडून प्रतिपक्षाला मिळणें. २ वर्तनसरणी बदलणें. ३सौम्यपणाची वृत्ति सोडून कठोरपणानें वागूं लागणें.

पंगत [सं० पंक्ति] स्त्री० १ ओळ; रांग. २ जेवावयास बसलेल्या लोकांची रांग. ३ एका संस्थेचीं किं० जुटीचीं माणसें समुच्चयानें. ४ सहवास; सलोखा; जाण्यायेण्याची वसड. ※ **पंगत चुकणें** जेवावयास येण्याला कोणेकाला उशीर झाल्यामुळें त्याला मोठ्या पंगतीस बसण्याची संधी न मिळून त्याला एकट्याला कोठें तरी बसून जेवावें लागणें. **पंगतीस चुकला तो जेवावयास मुकला**

जो वेळीं हजर नसतो त्याला त्या वेळीं मिळणारा लाभ होत नाहीं. **पंगत मांडणें** जेवावयास बसणाऱ्या माणसांसाठीं पाट मांडणें, पानें ठेवणें, रांगोळ्या घालणें, इ० पूर्व तयारी करणें. **पंगत वाजविणें** भोजनाला मंडळी बसली असतां त्यांच्या करमणुकीसाठीं सनई, अलगुज, इ०वाद्यें वाजंत्र्यांकडून वाजविणें. **पंगत वाढणें** पंगतीला खाद्य पदार्थ वाढणें. **पंगत साधणें** पंगतींत बसून जेवावयाला मिळेल अशा वेळीं जेवावयास हजर होणें. **कोणेकास पंगतीस घेणें** १ त्याच्यासह भोजन करणें. २ त्याला पंक्तिपावन करून घेणें. **त्याची आमची पंगत होत नाहीं** त्याची जात आणि आमची जात ह्या सारख्या उच्च नीच नसल्या कारणानें आम्ही एका पंगतींत बसून जेवूं शकत नाहीं.

पगर पु० अनियमित किं० अतिपुष्कळ रक्तस्राव (स्त्रीच्या अस्पर्श स्थितींत होतो तो. **क्रि०** लागणें). पगराचे दोन प्रकार आहेत,—पांढरा आणि तांबडा.

पगरा पु० महार लोकांचें एक कर्णभूषण.

पगार [**पोर्च्युगीझ**] **पु०** वेतन; मुशाहिरा; तनखा.

पगार पु० नाजूक प्रकारें बांधलेली आणि नीटनेटकी केलेली होडी.

पगिस्त [**म०** पग=पाऊल] **वि०** पायानें अधू किं० लंगडा.

पंगु [**सं०**] **वि०** लंगडा; पांगळा. २ कमी; उणा; कमजोर; उ० डोळ्यानें पंगु, हातानें पंगु, भाषणांत पंगु, व्यवहारांत पंगु, इ०.३ असमर्थ; उ० धनावांचून (किं० धान्यावांचून किं० धन्यावांचून) दुनिया पंगु. **पु०** शनि हा ग्रह. ꙮ **पंगुवात पु०** कंबरेखालचें शरीर ज्यांत निकामी होतें असा अर्धांग वायु.

पंगुळवेल स्त्री० एक प्रकारची वेली.

पंगेरा, पांगारा पु० एक वृक्षविशेष.

पंघणें अ० क्रि० झोंपेमुळें डुलक्या खाणें; पेंगणें.

पंघणें [**म०** पंघणें] **न०** डुलक्या (घेणें, [खाणें).

पघळ वि० १ विस्तृत; जरूर तितक्या विस्ताराचें (घर, इ०). २ पुष्कळ बोलणारा. **क्रि० वि०** यथेच्छ; दाटी न करतां; मध्यें मध्यें रिकाम्या जागा सोडून. **टीप,**– ह्या सर्व अर्थी 'पघळ' बद्दल ' अघळ पघळ ' असाही शब्द रूढ आहे. मागें ' अघळ पघळ ' पहा.

पघळणें [**म०** पघळ] **अ० क्रि०** १ तूप, रातांबेल, खोबऱ्याचें तेल, इ० पदार्थ घट्ट असतां ते उष्णतेनें पातळ होणें. २ जोडा इ० पदार्थ पाणी इ० च्या योगानें सैल किं० विस्तृत होणें. ३ दया, प्रेम, इ० विकारांनीं अंतःकरण आक्रान्त होणें किं० सद्रव होणें किं० नरमणें. **स० क्रि०** सतरंजी, धोतर, इ० जमीनीवर आंथरणें किं० पसरून घालणें.

पघा पु० सोनें, चांदी, इ० धातु अग्नीनें पातळ करून त्यांना विशिष्ट आकार यावयासाठीं ज्या पात्रांत ओतितात तें.

पच [**सं०** पच्=शिजविणें] **वि०** (समासान्तीं) शिजविणारा; उत्पन्न करणारा; घडवून आणणारा; अस्तित्वांत आणणारा; उ० दुःखपच, अल्पंपच, इ०.

पंच [**सं०** पंचन्=पांच] **वि०** १(' पंच ' तील ' च 'तालव्य) एक, दोन, तीन, इ० क्रमांकांतील चाराच्या पुढचा आणि सहाच्या मागचा जो अंक त्याच्या इतका; पांच. २ (' पंच ' तील ' च ' दंततालव्य) वादग्रस्त विषयाचा निकाल देण्यासाठीं वादी प्रतिवादी यांणीं नेमून दिलेले असामी. हे बहुधा पांच असतात. या असामींपैकीं प्रत्येकालाही ' पंच ' असा शब्द आहे. ꙮ **पंचाग्नि पु०** दाक्षिण, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य, आणि आवसथ्य, हे पांच अग्नि. **पंचाग्निसाधन न०** चार बाजूंस अग्नि आणि डोक्यावर सूर्याचें ऊन्ह घेऊन केलेली तपश्चर्या. **पंचांग वि०** पांच आहेत अंगें ज्याचीं असा (विधि, संस्कार, ग्रंथ, इ०). **न०** १ तिथि, वार, नक्षत्र, योग, आणि करण, हीं ज्यांत दिलेलीं आहेत असा ग्रंथ. ३(**वैद्यक**) एका वृक्षाची साल, पान, फूल, मूळ, आणि फळ. ३ राजनीतीचीं पांच अंगें; (१) कार्यारंभ, (२) माणसें आणि द्रव्य यांचा पुरवठा, (३) देशकालांची अनुकूलता, (४) संकटाचा प्रतिकार, आणि (५) कार्य-

मिळे. **पंचांगशुद्धि स्त्री०** कांहीं शुभ कार्य करावयाचें असतां तिथि, वार, नक्षत्र, योग, आणि करण, यांची निर्दोषता. **पंचांगश्रवण न०** वर्षप्रतिपदेच्या दिवशीं (किं० नित्यशः) करतात जें तिथि, वार, इ० चें श्रवण तें. **पंचामृत न०** गाईचें दूध, दहीं, तूप, मध, आणि साखर यांचें मिश्रण. **पंचात्मकदेह पु०** पंचमहाभूतांनीं बनलेला देह. **पंचक न०** १ पांच वस्तूंचा समूह. २ धनिष्ठेच्या उत्तरार्धापासून अश्विनीच्या पूर्वार्धापर्यंत जीं पांच नक्षत्रें तीं समुच्चयानें. ह्या अवधींत कांहीं विशिष्ट गोष्टी निषिद्ध मानिलेल्या आहेत. ३ विवक्षित काळींचे लग्नसंख्येस गत तिथि मिळवून बेरजेस नवांनीं भागून १, २, ४, ६, ८, हे शेष राहिल्यास त्याला 'पंचक' म्हणतात. हीं सर्व पंचकें अशुभ गणिलीं आहेत. **पंचकल्याण, पंचकल्याणी वि०** १ ज्याचे गुडघ्यापर्यंत चारी पाय पांढरे असून कपाळावर पांढरा पट्टा आहे असा (घोडा). २ ज्याचीं सर्व गात्रें बेढब आहेत असा (मनुष्य). ३ चालावयाला अति मंद असा (घोडा). ४ शेंबडे (पोर). **पंचकेणें न०** हिंग, जिरें, मिरें, इ० सर्व पदार्थ दुकानांत थोडथोड्या प्रमाणांत विकावयासाठीं बाळगिलेले असतात ते समुच्चयानें. **पंचानन पु०** १ शंकर. २ सिंह. **पंचेंद्रियें न० अ० व०** १ पांच ज्ञानेंद्रियें. २ पांच कर्मेंद्रियें. **पंचायतन न०** २ विष्णु, शंकर, देवी, गणपति, आणि सूर्य, ह्या देवता समुच्चयानें. २ पांच माणसांची जूट किं० टोळी. **पंचारती स्त्री०** पांच दिवे तबकांत घालून देवाला ओवाळणें. **पंचेषु, पंचबाण पु०** मदन. **पंचकोश, पंचकोष पु०** १ अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आणि आनंदमय, हे देहाचे पांच कोश. २ वर सांगितलेल्या पांच कोशांचा अभिमानी जीव. **पंचकोण, पंचास्त्र वि०** ज्याला पांच बाजू किं० पांच कोन आहेत अशी आकृति. **पंचखाद्य** [**म०** ख ह्या अक्षरानें सुरू होणारें] **न० ए० व०** पांच पौष्टिक पदार्थ; खारीक, खोबरें, खसखस, खिसमिस, आणि खडीसाखर समुच्चयानें. यांना 'पंच खाजें' **न०** असेंही म्हणतात. **पंचगौड पु०** ब्राम्हणांच्या पांच मोठ्या जाति किं० वर्ग,—गौड, कनोज, मैथिल, मिश्र, आणि गुर्जर. सारस्वत, कान्यकुब्ज, गौड, उत्कल, आणि मैथिल, अशाहीं पंचगौडांची अन्य गणना केली जाते. **पंचकोशी स्त्री०** १ काशी क्षेत्र. २ पांच कोशांचा प्रदेश. **पंचगव्य न०** गायीचें दूध, दहीं, तूप, मूत्र, आणि शेण, यांचें मिश्रण. **पंचतत्त्व न०** १ पंचमहाभूतें; पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकाश. २ (**तंत्रशास्त्रांत**) मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, आणि मैथुन. **पंचतन्मात्र न०** पांच सूक्ष्म भूतें. **पंचता स्त्री०, पंचत्व न०** मरण; नाश. **पंचदशी स्त्री०** पूर्णिमा; अमावस्या. **पंचबाण, पंचशर पु०** मदन. **पंचद्रविड पु०** ब्राम्हणांचे पांच मोठे वर्ग; तैलंग, द्राविड, कर्णाटक, महाराष्ट्र, आणि कोंकण. **पंचद्वयी, पंचादेवी स्त्री०** कोणेका पदार्थाचे पांच भाग करून एकास दोन आणि एकास तीन ह्या प्रमाणांत वाटणी. **पंचधान्यें न०अ० व०** लाखोलीमध्यें बायका गहूं, बाजरी, तांदूळ, तीळ, आणि मूग, यांचे एक एक लक्ष दाणे शिवाला वाहातात ते. **पंचधान्यांचा काढा पु०** धने, वाळा, सुंठ, नागरमोथा, आणि दालचिनी, ह्या पांच द्रव्यांचा काढा तापावर उपाय म्हणून देतात तो. **पंचधार स्त्री०** तुपाच्या भांड्यांत हाताचीं पांच बोटें बुडवून भातावर शिंपडतात ह्या रूपाची अन्नशुद्धि. **पंचधारा स्त्री०अ० व०** १ तिखट पदार्थ खाल्ल्यानें दोन डोळे, दोन नाकपुड्या, आणि तोंड, यांतून गळूं लागतात त्या धारा. २ मूल रडत असतां अशाच गळतात त्या धारा. **पंचधारें न०** देवावर एकदम पांच धारांच्या रूपानें अभिषेक व्हावा म्हणून पांच छिद्रांचें केलेलें असतें जें पात्र तें. **पंचनख पु०** १ मनुष्य, माकड, वाघ, इ० प्राणी,-ज्यांच्या एका एका हातास किं० पंजास पांच पांच नखें असतात. २ ज्याच्या खुरावर पांच रेघा किं० पट्टे आहेत असा घोडा,-जो अशुभ समजला जातो. **पंचनवटे पु०अ०व०** संसार, संस्था, इ० चे मतभिन्नत्वामुळें झालेले पांच तुकडे; अव्यवस्था; गोंधळ; नासाडी; उ०हमीदखान त्या तालमींत गेल्या पासून तीन महिन्यांत त्या तालमीचे पंचनवटे झाले. **पंचपक्वान्नें न० अ० व०** लाडू, जिलब्या, इ० उंचीं खाद्यें. **पंचपंच उषःकाल पु०** १ सूर्योदयाच्या अगोदरच्या पांच घटकांचा काळ. २ प्रभातकाळाचा सर्व अवधि. **पंचपदी स्त्री०** श्रद्धाळू

माणूस निद्राच्या नियमानें देवापुढे म्हणतो तों पदें, अभंग, स्तोत्रें, इ० समुच्चयानें. **पंचपल्लव** न० पु० व० १ (घटस्थापनार्थ वैदिक कर्मांत) पिंपळ, उंबर, पायरी, आंबा, आणि वड, यांची पानें समुच्चयानें. २ (तांत्रिक कर्मांत) फणस, अंबा, पिंपळ, वड, आणि बकुळ, यांचीं पानें समुच्चयानें. **पंचपात्र** [सं० पंच मोठें किं० मोठ्या तोंडाचें) + पात्र] न० तांब्याचें किं० पितळेचें मोठें उभें पात्र,—पाणी साठविणें इ० च्या उपयोगाचें. **पंचपात्री** [सं० पंच (मोठ्या तोंडाचें) + पात्री (पात्र)] स्त्री० पाणी प्यावयाला घेतात तें लहान भांडें (तांब्या, लोटी, इ० च्या व्यावर्तकत्वें). **पंचपाळें** न० पु० व० १ हिंग, जिरें, हळद, इ० स्वयंपाकांत नित्य लागणारे पदार्थ ठेवण्याचें लाकडाचें किं० धातूचें पांच घरांचें लहान डारदान. २ पांच घरांचें कोणत्याही उपयोगाचें लहान भांडें. टीप,—पंचपाळ्याला पांचाहून कमी किं० अधिक पाळींही असतात. **पंचप्राण** पु० अ० व० प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, हे शरीरस्थ पांच वायु. **पंचप्राणाप्रमाणें प्रिय** वि० अत्यंत प्रिय. **पंचप्राणाहुति** स्त्री० भोजनांच्या आरंभीं प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, ह्या पांच प्राणांना उद्देशून तोंडांत टाकतात ते पांच घास घेणें. **पंचभूतातीत** पु० १ मोक्ष ज्याला मिळाला तो. २ २ परमेश्वर. **पंचभेळ, पंचमिसळ** वि० पांच किं० पुष्कळ धान्यांची मिसळ ज्यांत आहे असे (वरण इ०). **पंचमघा** स्त्री० अ० व० १ मघा नक्षत्रांत सूर्य शिरल्यावरचे पांच लागोपाठचे दिवस. २ मघा नक्षत्रापासून पुढचीं पांच सूर्याच्या गतीचीं नक्षत्रें. **पंचमहापातकें** न० अ० व० ब्रह्महत्या, सुरापान, चौर्य, मातेशीं किं० गुरूच्या पत्नीशीं व्यभिचार, हीं पातकें आणि हीं करणाराशीं समागम. **पंचमहायज्ञ** पु० ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, आणि मनुष्ययज्ञ. **पंचमिसळ, पंचमेळ** स्त्री० १ पांच किं० अधिक डाळींच्या मिश्रणाचें वरण किं० कांहीं खाद्य. २ अनेक पोट जातींच्या शरीरसंबंधानें बनलेली नवी जात. ३ अनेक पंथांचे, अनेक मतांचे, अनेक देशांचे, अनेक जातींचें लोक इ० जेथ आहेत अशी संस्था. **पंचरंगी** वि० १ ज्याचे कांहीं भाग तांबडे, कांहीं भाग हिरवे, कांहीं भाग पांढरे, कांहीं भाग आणखी अशाच रंगांचे आहेत असा (नाडा, लोकर, पोपट, सूत, इ०). २ गांजा, अफू, धोतरा, इ० पांच अमली पदार्थांच्या मिश्रणाचा बनविलेला (घोटा). **पंचरत्नें** न० अ० व० सोनें, हिरा, नील, पाच, मोती, हे पांच मूल्यवान पदार्थ. सोनें, रुपें, मोती, राजावर्त, आणि पोवळें, हे पांच मूल्यवान पदार्थ असेंही अन्य गणती आहे. **पंचरसी (-शी)** वि० पांच किं० अनेक धातूंच्या मिश्रणाचा बनविलेला (कांहीं पदार्थ). **पंचराशिक** न० जें प्रमाण दोन गुणोत्तरांचें साम्य दाखवितें किं० ज्यांत उत्तर शोधण्याला तीनच राशि पूर्णपणें दिलेले असतात त्याला 'साधें प्रमाण' किं० 'त्रैराशिक' म्हणतात. ज्या प्रमाणांत अनेक युग्मांचा संबंध येतो किं० ज्यांत उत्तर शोधण्याला तिहींपेक्षां अधिक राशि दिलेले असतात त्याला संयुक्त प्रमाण किं० बहुराशिक म्हणतात. पांच राशि असतां 'पंचराशिक,' सात राशि असतां 'सप्तराशिक,' इ० नांवें आहेत. **पंचरुखी** वि० सागवान, शिसू, आणि खैर ह्या झाडाशिवाय इतर (जीं झाडें तीं). ह्या अर्थी 'पंचरूढ' हाही शब्द योजला जातो. **पंचवकार** पु० अ० व० विद्या, वपु (शरीरसामर्थ्य), वाचा (भाषणांत किं० संभाषणांत कौशल्य), वस्त्र, आणि विभव (ऐश्वर्य), ह्या पांच गोष्टी (प्रत्येकानें संपादण्याचा प्रयत्न करावा). **पंचवीस** वि० चोविसाच्या पुढचा आणि सव्वीसाच्या मागचा जो क्रमांक त्यानें दर्शविलेल्या संख्येइतका. **पंचविशी** स्त्री० पंचवीस वर्षांचें कोणाही माणसाचें वयोमान किं० ह्या वयोमानाची अवस्था. **गध्धेपंचविशी** स्त्री० वयाचें पंचविसावें वर्ष,—ज्या वर्षाच्या सुमारास मुलगा गाढवासारखें वर्तन करण्याचा म्हणजे बिघडण्याचा संभव असतो. **पंचहत्यारी** वि० पुढील पांच हत्यारांनीं सज्ज होऊन लढणारा (मराठा वीर); ढाल, तरवार, तीरकमान, बंदुक, आणि भाला. भाल्याच्या ऐवजी पेशकबाज आणि बाकीचीं चार हत्यारें घेऊन लढणारा (रजपूत). **पंचांगुळें** न० अ० व० चांदीच्या किं० सोन्याच्या सांखळीनें जोड-

लेल्या पांच अंगठ्या,- ज्या मुलांच्या पांच बोटांत दागिना म्हणून घालतात त्या. **पंचाक्षरी पु०** मंत्र-तंत्रादिकांच्या योगानें भूत, पिशाच, इ० ना नियंत्रित करतो तो. **पंचीकरण न०** आकाशादि जीं पंचमहाभूतें त्यांचें देहादि सृष्ट्यर्थ ईश्वरानें स्वसामर्थ्यानें केलेलें संमिश्रण. **पंचीकृत वि०** १ पांचाचा केलेला. २ ज्याचें पंचीकरण केलें तो. ३ पंचीकरण केलें गेल्यामुळें एकमेकांशीं संबद्ध (पृथिव्यादि पंचमहाभूतें). **पंचोपचार पु० अ० व०** गंध, पुष्प, धूप, दीप, आणि नैवेद्य,–जे पूजेमध्यें देवाला अर्पितात. **पंचोपप्राण पु० अ० व०** नाग, कूर्म, कृकल, धनंजय , आणि देवदत्त, हे पांच उपप्राण. **पंचोपाख्यानी वि०** चटकदार आणि गमतीच्या गोष्टी सांगून लोकांना रमविणारा (वृत्तान्त किं० मनुष्य).

पंचकडी [**सं०** पंचन्=पांच] **स्त्री०** पांच एकजातीय वस्तूंचा समुच्चय किं० समूह.

पचकरणें [**म०** पंजा] **स० क्रि०** हाताचीं बोटें ताणून (साखर, मीठ, कोंडा, बोरें, इ०) पकडणें.

पचकळ [**सं०** बाष्कळ] **वि०** असभ्य आणि ग्राम्य शब्द ज्यांत फार असें (भाषण), किं० असें भाषण करणारा (मनुष्य).

पचकी स्त्री० दमडीच्या किंमतीचें एक नाणें.

पचंग न०, पचंगी स्त्री० १ पासोडी गळ्यापासून कंबरेपर्यंत छाती आणि पोट झाकेल अशा रीतीनें वेष्टून घेण्याचा प्रकार (घालणें). २ नेसण्याचा एक प्रकार (घालणें).

पचणी [**म०** पचणें] **स्त्री०** १ खालेल्या अन्नाची जठरानें लाविलेली विल्हेवाट; जिरमाणी. ⚘**पचणीस पडणें** १ (औषध, अन्न ,इ०) हितावह परिणाम करूं लागण्याच्या पंथांत असणें. २(मनुष्य) आजारीपणाच्या स्थितींत रेंगाळत राहाणें.

पचणें [**सं०** पच्=शिजविणें] **अ० क्रि०** १ खालेलें अन्नादि जठराग्नीच्या योगानें योग्य परिणाम पावणें. २ खालेला पैसा, बोललेलें असत्य, किं० केलेलें दुष्कृत्य उघडकीस न येणें. ३ (भाकरी इ०)योग्य प्रकारें भाजून किं० शिजून खाण्याला सिद्ध होणें. ४ (आजारी मनुष्य) खितपत पडणें. ⚘**पचेल तें खावें आणि शोभेल** (किं० **रुचेल**) **तें बोलावें** जो पदार्थ खाल्ला असतां शरीराला अपायकारक होणार नाहीं तोच खावा आणि जें योग्य असेल (किं०लोकांना आवडेल)तेंच बोलावें.

पचन [**सं०**] **न०** खालेल्या अन्नाची जठराग्नीनें होते ती विल्हेवाट. [पेय).

पचपचीत वि० १ पाणचट; बेचव (खाद्य,

पचंब्रा पु० दर श्रावणी सोमवारीं शाहीर लोक लावण्या, पोवाडे, इ० म्हणून जो देवाप्रीत्यर्थ समारंभ करतात तो, किं०त्या प्रसंगाची जत्रा.

पंचम [**सं०**] **वि०** पांचवा. **पु०** १ गाण्यांतील पांचवा स्वर. २ विड्यानंतर खावयाचा जरदा किं० तंबाकू. ३ श्रावक लोकांचा एक वर्ग; दुसरा वर्ग ' चतुर. ' ४ वीण्याची पहिली तार,–जी छेडली असतां पंचम स्वर निघतो. ⚘**कोणेकाचा पंचम करणें** त्याची छाथु किं० बेअब्रू करणें. **पंचमसाली वि०** लिंगाइतांचे चार पंथ आहेत त्यांपैकीं एका पंथाचा (इसम). हे चार पंथ (१) चिलवंत, (२) पंचम, (३) तिलवली, आणि (४) कुलंग. मागें ' चिलवंत ' पहा.

पचमणें अ० क्रि० (कांहीं काम, योजना, इ०) फिसकटणें किं० बिघडणें.

पंचमी [**सं०**] **स्त्री०** १ हिंदू महिन्याची पांचवी तिथि,–शुक्ल पक्षांतील किं० कृष्णपक्षांतील. २ (**व्याकरणांत**) पांचवी विभक्ति; उ० घरून, गांवाहून, इ०.

पचरट वि० १ मागें ' पचकळ ' पहा. २ मुताच्या घाणीचा.

पचरणें अ० क्रि० (नायटा, इसब, खरूज, इ० त्वग्रोग) चरत म्हणजे पसरत जाणें म्ह० त्यांनीं अधिक त्वचा विकृत करणें.

पचविणें [**म०** ' पचणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (जठराग्नीनें किं० खाणाऱ्यानें) अन्नादीची योग्य प्रकारें विल्हेवाट लावणें. २ (औषध) परिणामकारक न होऊं देणें; उ० गोदीनें चमचाभर एरंडेल जिरविलें (म्ह० तिला जुलाब झाले नाहींत). ३ खालेला लाच उघडकीस न येऊं देणें. ४ (अन्नादि) रांधणें किं० शिजविणें किं० भाजणें.

पंचवीस [**म०** पांच; **म०** वीस; **सं०**पंचन्

+विंशति] वि० चोविसाच्या पुढच्या आणि सव्वीसाच्या मागच्या क्रमांकाइतका. ꙳ पंच-विशी स्त्री० पंचवीस वर्षांचे वयोमान. मागें 'पंच' मध्यें ' पंचवीस ' पहा.

पंचा पु० सुमारें दीड हात रुंद आणि पांच सहा हात लांब असें नेसावयाचें वस्त्र.

पंचा [म० पंजा] पु० १ माणसाच्या हाताचीं पांचीं बोटें ताणून होतो तो आकार. २ पक्ष्याच्या किं० मांजर इ० च्या पायांचीं बोटें समुच्चयानें.

पंचाईत, पंचायत [हिं० पंचायत] स्त्री० १ वादग्रस्त विषयाचा निर्णय करावयासाठीं नेमिलेले असामी (जे बहुधा पांच असतात). २ ह्या असामींनीं केलेली चौकशी. ३ वादग्रस्त विषय. ४ पंचांनीं दिलेला निकाल. ५ अडचण; जरूर जो पदार्थ त्याच्या कमताईमुळें वाटतें तें संकट; प्रतिकूल परिस्थितीमुळें होते ती गैरसोय; साधनसामग्रीच्या अभावामुळें किं० कमताईमुळें होतो तो त्रास किं० पडतात ते कष्ट. ६ तकरार (सांगणें). ꙳ एकाद्या गोष्टीची पंचाईत करणें तिचा बोभाटा करणें, किं० तींत लुडबुडणें, किं० तींत नसतां घोटाळा उत्पन्न करणें. पंचाईत करणें व्यर्थ घासाघीस करणें. पंचाईतदार पु० वादग्रस्त विषयाचा निर्णय करावयाला नेमलेल्या इसमांपैकीं कोणीही एक. पंचाईतनामा पु० पंचांनीं केलेला आणि कागदावर लिहिलेला निकाल. पंचाईत मत न० पंचांनीं दिलला निकाल.

पचाग पु० जोराचा किं० नेटाचा प्रयत्न.

पचांग न० वर ' पचंग, ' ' पचंगी ' पहा.

पंचायत स्त्री० वर ' पंचाईत ' पहा.

पंचारणें [सं० पंचन्; म० पांच] अ० क्रि० (घोडा) पांच वर्षांच्या वयाचा होणें.

पचाल, पचाळ वि० वर ' पचकळ ' पहा.

पंचावन्न वि० पन्नास ह्या संख्येंत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पंचाळ [सं० पांचाल] पु० सुतार, कोष्टी, न्हावी, धोबी, आणि चांभार, ह्या पांच जातींपैकीं कोणत्याही जातीचा इसम. सोनार, सुतार लोहार, कासार, आणि पाथरवट, अशीही गणना केली जाते.

पंचाळ वि० वटवट करणारी किं० गलागला बोलणारी (स्त्री). या शब्दाचा उपयोग निंदेंत होतो.

पंचाळ [म० पंचा + आळ; सं० आलय] न० मागावर एकापुढें एक असे सलग विणलेले पांच पंचे समुच्चयानें.

पंचिका [सं०] स्त्री० १ ऐतरेय ब्राह्मणाचे भाग (प्रत्येकी). २ पांच फाशांचा डाव. ३ जमाखर्चाची वही.

पचुरणें [सं० प्र+सृ (सरणें)] अ० क्रि० नायटा, इसब, इ० त्वचेवर पसरत जाणें.

पंचेचा (–ता–)ळ, पंचेचा(–ता–) ळीस [म० पांच+चाळीस] वि० चाळिसांत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पंचोतरा [सं० पंचन् + उत्तर] पु० १ दरमहा दर शेंकडा पांच रुपये हा व्याजाचा दर किं० ह्या दराचें व्याज. २ कडव्याच्या शंभर पेंढ्यांवर फुकट देतात त्या ज्यादा पांच पेंढ्या. ह्या अर्थी 'पंचोतरी ' स्त्री० शब्दही योजण्यांत येतो.

पच्ची क्रि० वि० पक्केपणा (बसविलेलें, खिळविलेलें, झाकलेलें, सांधलेलें, किं० जडविलेलें). स्त्री० वादांत पराभव; फजीती; बोऱ्या (करणें, उडविणें).

पंचाऐंशी, पंचायशी [सं० पंचाशीति] वि० ऐंशींत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पंच्चाण्णव [सं० पंचनवति] वि० नव्वदांत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पंचाहत्तर [म० पांच+ सत्तर] वि० सत्तरांत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पछाडणी [म० पछाडना] स्त्री० १ पछाडण्याची क्रिया. २ कुस्तींत किं० वादांत कोणेकाला चीत करणें.

पछाडणें [हिं० पछाड्ना] स० क्रि० १ कुस्तींत प्रतिपक्ष्याला चीत करणें म्हणजे त्याला जमीनीवर उताणें पाडणें. २ वादांत पराभविणें किं० निरुत्तर करणें. ३ भाषण, वर्तन, इ० मध्यें कोणेकाची चूक दाखवून देणें किं० त्याला पकडणें. ४ भूत, समंध, आजार, किं० उपद्रवी माणूस, यांनीं कोणेकाला जर्जर करणें. ५ धरणें; पकडणें (सामान्येंकरून).

पंछी [सं० पक्षिन्] **पु०** १ पक्षी. २ (शृंगारिक लावण्यांत) प्रियकर.

पंज [सं० पंचन्; फा०पंज] **वि०** पांच वर्षे वयाचा (घोडा).

पंजट, पंजरट, पंजरूट न० पूर्णपणें न पोसलेले धान्याचे दाणे प्रत्येक किं० समुच्चयानें. **पंज्या स्त्री० अ०-व०** ह्याच अर्थी योजतात.

पंजडी [सं० पंचन्] **स्त्री०** फाशांच्या खेळांत पांचाचें दान (टाकणें, पडणें).

पंजर [सं०] **पु०** १ पिंजरा. २ प्राण्याच्या हाडांचा सांगाडा. ह्या अर्थी ' अस्थिपंजर ' असाही शब्द आहे.

पंजरी [हिं०] **स्त्री०** १ कृष्ण, राम, इ० च्या उत्सवांत सुंठ, साखर, इ० चें मिश्रण प्रसाद म्हणून वाटतात तें; खिरापत. २ मुलांच्या वाढदिवशीं वाटतात ती खिरापत.

पंजा [फा०] **पु०** १ मणगटाच्या पुढचा मनुष्याच्या बाहूचा भाग. २ वाघ, मांजर, इ० प्राण्यांच्या चारी पायांचीं टोकें. ३ पत्त्यांच्या डावांतील पांच ठिबक्यांचें पान. ४ फाशांच्या खेळांत पांचाचें दान. ५ मुसलमानांच्या पांच साधुपुरुषांचें दर्शक चिन्ह,—जें हाताच्या पंजाच्या आकाराचें असतें. ६ हाताला घालावयाचें आच्छादन. ७ गोसावी इ० ची पांच टोकांची काठी. ८ पणजा.

पंजा पु० शृंगारिक लावणीचा एक प्रकार; कलगी लावणी. मंजा लावणीला ' मंजा ' म्हणतात.

पंजादुई(–वी), पंजादिवी, पंजादेवी स्त्री० ' पंच ' मध्यें ' पंचद्वयी ' पहा.

पंजाबी [फा०] **वि०** १ पंजाब देशासंबंधाचा. २ धूर्त; चाणाक्ष; अट्टल (सोदा). ❀ **पंजाबी सालंमिश्री स्त्री०** पंज्याच्या आकाराचें सालंमिश्री नांवाचें पौष्टिक द्रव्य.

पंजारणें अ० क्रि० (घोडा) पांच वर्षांच्या वयाचा होणें.

पट [सं०पट] **पु०** १ वस्त्र. २ उचीं वस्त्र. ३ रंगीत वस्त्र. ४ पडदा. ५ चित्र काढण्याचें कापड. ६ लिहिण्याच्या कामीं योजावयाचा धातूचा पत्रा; उ० ताम्रपट. ❀ **पटवास, पटवासक पु०** बुक्का हें सुगंधी द्रव्य.

पट [सं० पट्ट] **पु०** १ सोंगट्या, बुद्धिबळें, इ० खेळ खेळावयाच्या कामीं योजावयाचा आणि विशिष्ट प्रकारें घरें आखलेला कपडा. २ नांवांची यादी; परिगणनार्थ केलेलें टिपण. ३ स्मरणार्थ केलेलें टिपण. ४ अमुक प्रसंगीं अमुक करावें, अमक्याला अमुक द्यावें, अमके आचार पाळावे, इ० संबंधाची केलेली असते ती नोंद किं० ती नोंद ज्या कागदावर किं० ज्या चोपडींत केलेली असते तो कागद किं० ती चोपडी. ५ रामरावणयुद्धादि प्रसंगांचीं चित्रें ज्यांवर काढिलीं आहेत असे कागद एकापुढें दुसरा, दुसऱ्यापुढें तिसरा असे चिकटावून लांबलचक केलेला असतो तो कागद; त्याला ' चित्रपट ' असेंही नांव आहे. ६ सूर्याची गति, ग्रहांच्या गति, ग्रहणें, शुभ समय, इ० ज्यांत वर्णिलेली आहेत असा कागद.

पट न० १ दार, खिडकी, इ० चें एक पान म्ह० उजवीकडची किं० डावीकडची फळी. २ जमीन, शेत, इ० चा लांबलचक चिंधोटी.

पट स्त्री० विशिष्ट संख्या किं० परिमाण ह्यांच्या विशिष्ट आवृत्त्यांचा समुच्चय; उ० दसपट म्ह०(पदार्थांच्या)दहा आवृत्त्या समुच्चयानें; किती पट म्ह० किती आवृत्या समुच्चयानें. ह्याच सरणीनें जितका, तितका, इ० पुढें ' पट ' शब्द घालून अर्थ होतात.

पट वि० खालीं तोंड करून पडलेलो (कवडी, पैसा, इ०); चीत म्ह० वर तोंड करून पडलेली (कवडी, पैसा, इ०). हा शब्द मुलांच्या खेळांत योजला जातो.

पटई स्त्री० तक्तपोशी; घराची जमीन किं० कड्यांवरचा पृष्ठभाग यांचेवरचें लाकडाच्या तक्त्यांचें आस्तरण; तक्तपोशी; पाटणी.

पटकन्, पटकर, पटादिनीं, पटदिशीं क्रि० वि० झपाट्यानें; वेगानें; अत्यल्प काळांत.

पटकणें स० क्रि० रट्टा देणें; जोराचा तडाका देणें.

पटकर, पटकूर,फटकूर न० १ जीर्ण वस्त्र किं० जीर्ण वस्त्राचा तुकडा. २ फाटकें तुटकें वस्त्र. ३ वस्त्र (तुच्छतेनें).

पटका [**सं०** पट] **पु०** १ वीत दीडवीत रुंद आणि चार पांच हात लांबीचें वस्त्र,–जें कमरे-भोंवतीं बांधतात तें. २ डोकीला बांधावयाच्या उपयोगाचें असेंच अरुंद वस्त्र असतें तें.

पटका [**म०** पडणें] **पु०** १ जोरानें पडणें; अनेक वस्तु एकदम पडण्याची क्रिया (वादळांत झाडांचीं पानें, फळें, इ०). २ महामारी, साथ, इ० नीं माणसें, जनावरें, इ० आजारी पडणें किं० मरणें (लागणें).

पटकावणें स० क्रि० १ जोरानें पकडणें. २ ज्या पदार्थावर आपला हक्क नाहीं किं० जो पदार्थ आपणाला दुसरा मनुष्य द्यावयाला तयार नाहीं तो पकडणें,लाटणें, किं० कबज्यांत घेणें.३गाण्याची चाल,एकाद्या कामाची खुबी,इ० पकडणें म्हणजे ती सहजासहजीं किं० अटदिशीं शिकून घेणें किं० उचलणें. **पटकावणी स्त्री०** पटकावण्याची क्रिया.

पटकी स्त्री० जरीमरी; मरकी; ज्या साथीनें अनेक लोक एकदम तडकाफडकीं मरतात ती साथ. ❀ **कोणेकाला पटकी देणें** (किं० **लावणें** किं० **दाखविणें**) त्याला फसविणें; त्याला टोपी घालणें. **कोणेकानें पटकी खाणें** व्यापारादिकांत त्याला ठोकर बसणें. **कोणेकाला पटकी बसणें** व्यापारादिकांत त्याचें नुकसान होणें.

पटकूर, पटकुरें [**सं०** पट] **न०** मागें ' पटकर ' **न०** पहा.

पटकूळ स्त्री० एक जंगली फुलझाड. याला ' पेटकुळी ' किं० ' बकाळी ' असेंही म्हणतात.

पटकोडगा वि० अति निर्लज्य; बेशरम.

पटंगण, पटांगण [**सं०** पट+अंगण] **न०** खूप लांब रुंद असा जमीनीचा विस्तार; विस्तीर्ण भूभाग.

पटण, पटणी, पटनी स्त्री० तांदुळाची [एक जात.

पटणें अ० क्रि० १ हुंडी, दुसऱ्यानें सांगितलेली कांहीं गोष्ट, किं० सांगितलेला अनुभव मान्य होणें. २ कांहीं नाणें इ० व्यवहारांत पथकरलें जाणें. ३ मनुष्य, जनावर, पदार्थ, इ० आपणास हवा तसा असणें. ४ कांहीं खबर खरी ठरणें. ५ कोणी सांगितलेलें भविष्य प्रत्ययास येणें. ६ पटवेकऱ्या-कडून दुशा, टिका, पेट्या, इ० दागिने रेशीम, तार, इ० मध्यें गुंफिले जाणें.

पटपट, पटांपटां क्रि० वि० झपाट्यानें;त्वरेनें; मध्यें न थांबतां; एका मागून एक अशा क्रमानें.

पटरी [**सं०** पट्टिका] **स्त्री०** जुन्या किं० फार दिवस बांधून ठेविलेल्या शालो, पागोटीं, लुगडीं, इ० पसरून साफसूफ करण्याचा तक्ता.

पटल [**सं०**] **न०** १ आवरण; आच्छादन.२ छत; छप्पर. ३ धूळ, मेघ, इ० चा दाट समूह. ४ डोळ्यावरील पडदा. ५ नेत्ररोगविशेष. ६ सत् आणि असत् जाणणें किं० त्यांचा विवेक करणें हें जें बुद्धीचें काम तें करावयाला तिला प्रतिबंध करणारी कांहीं गोष्ट; उ० मोहपटल; मायापटल; अज्ञानपटल.

पटवणी [**म०** पटविणें] **स्त्री०** १ हुंडीचा स्वीकार. २ दुशा, पेट्या, माळ, इ० दागिन्यांचे भाग किं० अवयव रेशीम, तार, इ० मध्यें ओवून गुंफिण्याची क्रिया.

पटवा [**हिं०**] **पु०** पुतळ्या, मोती, टिका, इ० दागिने रेशीम, तार, इ० मध्यें ओवून गुंफितो तो. ' पटवेगार, ' ' पटवेकरी ' असेही ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

पटवादोर न० केळीचीं सोपटें इ० चा वळून केलेला दोर.

पटवारी [**हिं०**] **पु०** गांवचा कुलकरणी. ❀ **पाटीलपटवारी पु०** पाटील हा गांवकामगार.

पटाविणें [**सं०** पट्=गुंफिणें] **स० क्रि०** १ रेशिम, तार,इ० मध्यें मोती, पुतळ्या, पेट्या, इ० ओवून गुंफिणें. २ हुंडी स्वीकारणें.३ प्रत्ययास आणून देणें.

पटवेकर(–री),पटवेगार पु० मागें ' पटवा ' [पहा.

पटाई स्त्री० मागें ' पटई ' पहा.

पटांगण न० मागें ' पटंगण ' पहा.

पटाड, पठाड, पठार स्त्री० बैलाच्या पाठीवर लादलेलें ओझें बांधण्याचा किं० आवळण्याचा पट्टा किं० वादी किं० चऱ्हाट.

पटाडा वि० ठेंगणा आणि लठ्ठ(माणूस); ठेंगणा आणि विस्तीर्ण (वृक्ष);'फताडा 'हाही शब्द ह्याच अर्थाचा आहे. ❀ **पटाडी घेवडी स्त्री०** घेवडीची एक जात.

पटाडा पु० फुलें, फळें, गारा, इ० चें जोराजोरानें किं० वेगानें पतन.

पटाधिकारी पु० ज्याला कांहीं हक्क, सनद, किं० माफी देण्यांत आला आहे असा इसम.

पटाविणें [म० 'पटणें' चें प्रयोजक] स० क्रि० हुंडी इ० स्वीकारणें.

पटाशी (-सी) स्त्री० सुतारांचें एक हत्यार (लाकूड तोडणें, किं० कुसवें, विंध्या, इ० करणें, इ० च्या उपयोगाचें).

पटिंग न० एक प्रकारचें गवत.

पटु [सं०] वि० १ चतुर; वाकबगार. २ कामांत तल्लख. ३ कांहीं काम करण्यांत गुंतलेला.

पटेकरी पु० पुढें 'पट्टेकरी' पहा.

पट्ट [सं०] पु०, न० १ वस्त्र. २ मुकुट. ३ पागोटें. ४ रेशीम. ५ रेशमी वस्त्र. ६ ताम्रपट; राजशासनपत्र. ७ सिंहासन. ८ बैठक. ॐ **पट्टकुल, पटकुल** न० रेशमी वस्त्र. **पटार्हा, पट्टराज्ञी** स्त्री० १ पट्टराणी; राजाबरोबर जिला राज्याभिषेक करण्यांत आला आहे अशी राजाची पत्नी. २ राजाची श्रेष्ठ बायको; महिषी. **पट्टशिष्य** पु० १ गुरूजींचा श्रेष्ठ म्ह० वरच्या दर्जाचा शिष्य. २ गुरूजींचा आवडता शिष्य. **पट्टोपाध्याय** पु० सनदा लिहिणारा कारकून.

पट्टण, पट्टन, पत्तन [सं० पट्टन=शहर] न० शहर; नगर.

पट्टा [हिं०] पु० १ लांब, दुधारी, आणि सबंध पंजा आच्छादणाऱ्या मुठीची तरवार; खोबळ्या मुठीची तरवार. २ जमीन, वस्त्र, कागद, इ० ची लांबच लांब चिंधोटी. ३ वस्त्रादिकांवर जी रंगीत किं० दडस्स विणीची आणि रुंद रेषा असते ती. ४ कंबरेस घालावयाची धातूची किं० वस्त्राची किं० कातड्याची जी पट्टी असते ती. ५ शिपाई लोक कमरेस किंवा छातीवर घालतात ती अधिकाराची दर्शक सखलादीची किं० कातड्याची शिवलेली चिंधोटी. ६ शेत कोणाला ज्या शर्तीवर करावयास दिलेलें असतें त्या शर्ती ज्यावर नमूद केल्या आहेत तो कागद. ६ मक्तयाच्या किं० भाड्याच्या शर्ती ज्यावर नमूद केल्या आहेत असा कागद. ॐ **पट्टेवाला, पटेकरी, पट्टाईत पटाईत** पु० १ पट्टा खेळण्यांत चतुर. २ कोणत्याही कामांत वाकबगार किं० निष्णात. **पट्टेवाला** पु० पट्टा धारण करणारा शिपायी, —कचेरीतील किं० कोणा अधिकाऱ्याचा.

पट्टाईत वि० अंगावर पट्टे पट्टे असलेला (वाघ इ०). **पट्टाईत शराईत** वि० कोणत्याही कामांत तरबेज किं० निष्णात (निंदेंत किं० स्तुतींत). **पट्टाधिकार** पु० १ राजाच्या वजीराचा हुद्दा, दर्जा, किं० अधिकार. २ सनदेनें प्राप्त झालेला अधिकार. **पट्टाधिकारी** पु० राजाचा मुख्य प्रधान किं० वजीर. **पट्टाधूळ** स्त्री० कोणेकाचा उडविलेला बोऱ्या किं० फजितवाडा. २ पूर्ण पराभव, नासाडी, किं० विध्वंस. **पट्टापट्टी** स्त्री० १ अंगावर गंधाचे पट्टे उठविणें ही क्रिया. २ दागिने, पोषाख, इ० नीं केलेला थाटमाट. ३ सतरंजी, जाजम, इ० वर आडवे, उभे, रंगीत, इ० पट्टे विणतांना विणण्याची क्रिया. **पट्टाभिषेक** पु० धर्मशास्त्राप्रमाणें कोणेकाला राजपदीं केलेला अभिषेक. **पट्टाभिषिक्त** वि० धर्मशास्त्राप्रमाणें ज्याला राजपदीं अभिषेक करण्यांत आला आहे असा. **पट्टा ओढणें** (किं० ओढून ठेवणें) १ न्हाव्यानें हजामतीला सुरवात करणें (किं० करून ठेवणें). २ कोणाही माणसानें कोणत्याही कामाला सुरवात करणें (किं० करून ठेवणें). **टीप**—क्षेत्राच्या ठिकाणीं क्षेत्रोपाध्यायाला कामाची घाई असल्या कारणानें न्हाव्यानें यात्रेकरूंच्या डोक्यावर केशांचा एक पट्टा भादरल्यावर उपाध्याय त्या यात्रेकरूला पुढील संकल्प सांगू शकतो. ज्या न्हाव्यानें कोणा माणसाचा पट्टा काढून ठेविलेला असेल त्याची पुरती हजामत त्याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणी म्हावी करीत नाहीं. **कामाचा पट्टा ओढणें** काम कसेंबसें किं० निष्काळजीपणानें करणें किं० करून टाकणें. **पट्ट्याचा हात फिरविणें** १ पट्टा खेळतांना हातांचा विक्षेप करणें. २ कोणेकाला भूलथापा देऊन फसविणें. **पट्टा परजणें** १ पट्टा खेळणें. २ वक्तृत्व उठावदार व्हावें म्हणून हातांचे विक्षेप करणें. **पट्टा मारणें** (किं० देणें) कोणेकाच्या घरावर हात मारणें.

पट्टी [सं० पट्टी, पट्टिका] स्त्री० १ रुंदीच्या मानानें ज्याची लांबी फारच मोठी असा जमीन, कागद, कातडें, धातूचा पत्रा, लाकडाची फळी, इ० चा तुकडा किं० खंड किं० आकार. २ जखम, गळूं, इ० वर बांधतात तो वस्त्रादीचा तुकडा. ३ दार, खिडकी, इ० बंद करावयासाठीं लावितात

तो लोखंड, लाकूड, इ०चा तुकडा. ४गांवावर, घरां-वर, माणसांवर, किं० लग्न, मुंज, इ० कार्यावर, वाजंत्रांवर, बसविलेली वर्गणी किं० ह्या वर्गणीच्या तपशिलाचा कागद किं० गोळा झालेली रक्कम. ५ कोणत्याहीं कार्यासाठीं लोकांवर बसविलेली वर्गणी. ६पागोटें इ०बांधतांना पागोट्याचीं एका वेढ्यापुरता पगडबंध करून घेतो ती घडी. ७ विडा. तंबाखू खाणारे लोक, रांडा, इ०'पट्टी'हा शब्द विड्याला लावितात. ८ गांवाचा एक भाग किं० मोहल्ला. ९ शिवलेल्या कपड्याला लावितात ती झालर. १० स्त्रियांच्या वेणीफणीच्या विधींत कपाळालगतच्या केशांची चापूनचोपून केलेली रचना. ११ फुलांची माळ, हार, इ०. १२ सभा इ० मध्यें बस-लेल्या लोकांची रांग. १३ वेद म्हणणें ह्यासाठीं एकाद्या स्थळीं जमलेले वैदिक समुच्चयानें; पट्टीचा वैदिक म्ह० नामांकित वैदिकांच्या मंडळींत बसून न अडखळतां वेद म्हणणारा. १४ भोजनार्थ बस-लेल्या लोकांची ओळ. १५ भोसडपट्टी, हजाम-पट्टी, भादरपट्टी, इ० शब्दांत 'पट्टी' चा अर्थ ती क्रिया (वाच्यार्थानें किं० लाक्षणिक अर्थानें) दांडगाईनें किं०कठोरपणानें करणें असा होतो;उ० मी त्याची चांगली भोसडपट्टी(किं०खरडपट्टी किं० तासडपट्टी) केली (किं०काढली). ❀ **कचर-पट्टी स्त्री०** गांवांतलि केरकचरा गोळा करून जेथें टाकला जातो ती जागा. **पट्टीचा वि०** पटाईत; अग्रगण्य माणसांत बसावयाच्या योग्यतेचा; खूप वरच्या दर्जाचा; कोणत्याहीं कामांत किं० कोणाला हार न जाणारा; उ० पट्टीचा पहिलवान , वैदिक, वाजंत्री, कथेकरी, भामटा, चोर, इ०. **पट्टीपासोडी स्त्री०** वर्गणी किं० वर्गणीनें वसूल झालेली रक्कम. **पट्टीलंगोटी स्त्री०** शेतकऱ्यावर सरकारनें बस-विलेला सारा.

पट्टू [**सं०** पट्ट] **पु०** एक प्रकारचें लोकरीचें वस्त्र.

पट्टें [**सं०** पट्ट] **न०** वस्त्राचा किं० शेताचा लांबलचक अरुंद तुकडा.

पट्टेवाला, पट्टेकरी पु० १ कमरेस किं० छाती-वर अधिकार दर्शविणारा पांचव्या अर्थाचा पट्टा धारण करणारा शिपाई.२पट्टा(प्रथम अर्थाचा)खेळ-ण्यांत निष्णात असा माणूस.

पठंगा, पठिंगा [**सं०** पृष्ठग=पाठीमागून चालणारा] **पु०** मदतनीस; पाठीराखा.

पठडा, पठाडा, फताडा वि० १ठेंगणा आणि थिलथिलीत. २ बेढब दिसण्याइतका मोठा.

पठणें [**सं०** पठ=पढणें] **स० क्रि०** १ वेद, शास्त्र,इ० म्हणणें. २ वाचणें. ३ स्तोत्रें इ०म्हणणें.

पठन [**सं०**] **न०** १ वाचन. २ वेद म्हणणें. ३ स्तोत्रें इ० म्हणणें.

पठाड, पठाडी [**सं०** पृष्ठ] **स्त्री०** बैलाची मूठ आवळावयाची वादी. **पठाड न०** पाठ (तुच्छतेनें).

पठाडा वि०बेढब दिसण्याइतका मोठा.

पठाडी [**सं०** पृष्ठ] **स्त्री०** वर 'पठाड' पहा. **वि०** रुंद पाठीची किं० फारच रुंद (वेणी, गोम, धामण, शेंग,इ०).

पठाण [**म०** पाठ] **न०** रुंद आणि पसरट कौल (आढ्यावर किं० कुंदाला घालावयाचें). ❀ **पठाणी मिरची स्त्री०**लांब आकाराची मिरची.

पठाण [**हिं०**]**पु०**मुसलमानांची एक जाति. ❀ **पठाणी खातें न०** अव्यवस्थितपणें नोंदी कर-वयाची चोपडी.याच सरणीनें पठाणी वही,पठाणी याद, पठाणी हिशेब, यांचे अर्थ जाणावे.

पठार [**म०** पाठ] **स्त्री०** बैलाची मूढ आव-ळावयाची वादी. **न०** १ डोंगराच्या माथ्यावरची सपाटी; सपाट डोंगरमाथा. २ गलबत, होडी, इ० चा तळ. ३ सैन्यादींची पिछाडी. ४ पाठ (तुच्छ-तेनें). ५ कांहीं कामाची सुरवात किं० त्यासाठीं साधनसामग्री जुळविणें (**क्रि०** घालणें); उ० त्याणें घर बांधावयाचें पठार घातलें आहे.

पठारा [**म०** पाठ]**वि०**रुंद पाठीची(गोम).

पठारा [**म०** पाठ; **सं०** पृष्ठ] **पु०** डोंगरा-वरचा सपाट प्रदेश.

पठिंगा, पठिंबा वर 'पठंगा' पहा.

पठित [**सं०**] **वि०**जें म्हटलें, घोकलें, किं० पाठ केलें तें.

पठ्ठा, पठ्ठ्या [**हिं०**] **वि०** तरुण, ठसठ-शीत, आणि मजबूत अंगाचा (माणूस,पशु,इ०).

पड [**म०** पडणें] **स्त्री०** १पडण्याची क्रिया. २ पाठीवर ओझें फार लादलें गेल्यामुळें बैलाचें खचून बसणें.३कुस्ती,वाद,भांडण,इ०मध्यें आपल्या

अंगां सामर्थ्य असतां तें न योजतां पराभव करून घेण्यास सिद्ध होणें (घेणें, खाणें,पथकरणें). ४ वाऱ्याच्या सोसाट्यानें आंबे इ०फळें झाडावरून खालीं पडणें किं० अशीं पडलेलीं फळें समुच्चयानें. ५ लागवड झाल्यावांचून राहिलेलें शेत. ६ज्वरादि कारणानें एका गांवांत किं० एका घरांत अनेक माणसांना एकदम आजारी पडणें किं० अशा आजारी पडलेलीं माणसें समुच्चयानें; (क्रि०पडणें); उ० आमच्या गांवांत खोकल्यानें दोनशें मनुष्यांची पड पडली आहे. ७ पत्ते, गंजिफा, इ० खेळांत एकाच बाजूवर सर्व किं०बरेंच डाव लागणें ही दैवगती (लागणें).*पडीं पडणें १ रद्द होणें; रद्द पडणें. २ नामशेष होणें; समूळ नष्ट होणें.

पड [सं० प्रति] **वि०**१दुसरा. २खालचा. * **पडचाकर पु०** खालच्या दर्जाचा चाकर किं० मुख्य चाकराच्या हाताखालचा दुसरा चाकर. **पडशिष्य पु०** आपल्या शिष्यानें शिकवून तयार केलेला शिष्य. **पडजीभ स्त्री०** लहान जीभ,– जी घशांत लोंबत असते. **पडकोट पु०**किल्ल्याच्या आंतल्या कोटाभोंवतीं बाहेरच्या बाजूनें जी भिंत असते ती. **पडछाया स्त्री०** सावली. **पडखर वि०** स्पष्ट;भीडभाड न धरतां केलेलें (भाषण).**पडखळण न०** १ पायाच्या बोटांतून जोडवीं ओघळूं नयेत म्हणून जें तांब्याचें वळें जोडव्याचे पुढें बोटांत घालतात तें. २ कान, नाक, इ०ना भुगड्या, बाळ्या, नथ, इ० साठीं टोंचलेलें भोंक बरें होई-पर्यंत जें तांब्याचें वळें त्या भोकांत घालतात तें. **पडगहाण न०** आपल्याकडे गहाण असलेली वस्तु दुसऱ्याकडे गहाण ठेवणें किं० अशी वस्तु. **पडघर न०** नादुरस्त आणि पडीत घर. **पडताळा पु०** ठरांवलेला सिद्धान्त किं० आलेला अनुभव खरावण्यासाठीं केलेला प्रयोग किं० युक्ति किं० कृति. **पडथळ न०** १ आपल्या प्रश्नाला एका देवानें दिलेलें उत्तर दुसऱ्या देवाला तोच प्रश्न विचारून खरें करून घेणें किं० असें खरें करून घेतलेलें उत्तर. २ पुजाऱ्यानें कागदावर लिहून दिलेलें देवाचें उत्तर. **पडदोरा पु०** गळे-सरी, माळ, इ०च्या गुंफणीच्या दोऱ्याला जोड लावितात तो दोरा. **पडनांव न०** कागदोपत्रीं जें कोणा व्यक्तीचें नांव त्याहून भिन्न जें व्यावहारिक नांव तें. **पडपापणी स्त्री०** डोळयांच्या पोटांवर आंतल्या बाजूस उगवतात ते केश समुच्चयानें. 'पडपापण्या' असा अनेकवचनी उपयोग होतो. **पडपेठ स्त्री०**१ अनेक ठिकाणचे बाजार-भाव किं० त्यांची तुलना (पाहाणें). २ माहि-तीचा उगम; पूर्ण तपास; साद्यंत चौकशी; उ० मुलाची पडपेठ पाहून मुलगी द्यावी (म्ह० मुलाचें कुलशील, विद्या, इ०बाबतींत पूर्ण तपास करून). **पडभिंत स्त्री०** एका भिंतीशेजारीं बळकटीसाठीं घातलेली दुसरी भिंत. **पडभोजन न०** १ वरप-क्षानें वधूपक्षाला लग्नानंतर दिलेली मेजवानी. २ आपणास कोणी मेजवानी दिली असतां आपण त्याला उलट दिलेली मेजवानी. **पडमूत न०** स्वार पाठीवर बसतांच घोडीनें मुतणें.स्त्री०स्वारी वाहून जात असतां वारंवार मुतणें जशी खोडी जिला आहे अशी घोडी. **पडलंका स्त्री०** लंकेपेक्षां अधिक दूर अशी दुसरी लंका; उ० तूं लंका पाहिली आहेस, मी तर पडलंका पाहिली आहे. **टीप,–** आपले अनुभव किं० आपण पाहिलेले देश विशाळ आहेत अशी कोणी मनुष्य बढाई मारीत असतां त्याला हिणावण्यासाठीं हें वाक्य योजलें जातें. **पडशब्द पु०** प्रतिध्वनि. **पडशाला (–ळा), पडशाळ, पडसाल स्त्री०** १ मुख्य घरापासून कांहीं अंतरावर बांधलेला सोपा. २ पडवी. ३ देवळाच्या शेजारीं पुजारी, पांथस्थ, इ० साठीं बांधलेलें घर. **पडसरी स्त्री०** पाणी वाहून जाण्यासाठीं केलेला किं० खणलेला चर; ओहोळ. **पडसाद पु०, स्त्री०** प्रतिध्वनि. **पडसा-वली स्त्री०**प्रकाशकिरणांना प्रतिबंध झाला असतां पडते ती सावली. **पडसूत्र न०** मंगळसूत्र, गळ-सरी, इ० ओवून गांठ दिल्यावर जीं त्या दोऱ्याचीं कांहीं शेवटें राहिलीं असतात तीं. **पडसाळ स्त्री०** वर 'पडशाला' पहा. **पडसाक्ष स्त्री०** १ कोणे-कानें पुढें आणलेला पुरावा किं० सांगितलेला वृतान्त खरा आहे किं० खोटा आहे हें ठरविण्या-साठीं दुसऱ्या माणसाकडून त्याच बाबतींत घेत-लेला पुरावा किं० विचारून घेतलेला वृतान्त. २ कोणेकानें पुढें आणलेला पुरावा खरा आहे असें सांगणारा दुसरा मनुष्य. ह्या अर्थीं 'पडसाक्षी' असाही शब्द आहे.

पढ **पु०** दोन शेरांचें धान्याचें माप.

पडक **न०** पिकलेलें पोफळ.

पडकणें **अ० क्रि०** जडणें; चिकटणें; एकादी चाल किं० रीति किं० संवय अंगीं खिळणें (चांगल्या किं० वाईट अर्थी).

पडकय [**सं०** प्रतिक्रय] **स्त्री०** १ मोबदला. २ आपलीं माणसें, बैल, इ० दुसऱ्यास कांहीं काळ द्यावीं आणि आपल्या गरजेस त्याचीं आणावीं असा जो शेतकऱ्याचा परिपाठ तो.

पडकर [**म०** पडणें] **वि०** १ पडीत (जमीन). २ उद्योगधंद्याशिवाय राहिलेला (माणूस). ३ वापरण्यांत किं०उपयोगांत नसलेला किं०रद्दी पडून राहिलेला (पदार्थ, सामान, इ०). ४ ओसाड (गांव, घर, इ०).

पडका [**म०** पडणें] **वि०** १ जें मोडकळीस आलें आहे असें (घर).२लवकर घोगरा होणारा (आवाज). २ जिचें पातें मिटवितां येतें अशी (विळी). याच्या उलट ' उभीविळी. '

पडकें **न०** जनावराला बांधावयाच्या दाव्याची एककानी.

पडकेणें [**म०** पडणें+केणें] **न०** १ लवकर नासणारे पालेभाज्यांसारखे खाद्य पदार्थ. २ न खपतां बाजारांत पडून राहिलेला माल.

पडकेल **वि०** शेजारच्या शेतकऱ्याच्या गरजेला आपलीं माणसें, जनावरें,इ० देतो आणि आपल्या गरजेला त्याची घेतो तो.

पडगा, पडघा **पु०** १ चटण्या, कोशिंबिरी, इ० पदार्थ ठेवण्याचें लांकूड कोरून केलेलें बारदान. २ संबळ, तबला, इ० वाद्यांचा एक भाग किं० एक बाजू. ३ कुंभार लोकांचें मडकीं थापटावयाचें एक साधन.

पडगी, पडघी **स्त्री०** १ भांड्याला खालीं बसविलेली असते ती बैठक. २ संबळ नांवाच्या चर्मवाद्याचा एक भाग. वर ' पडगा, ' ' पडघा ' अर्थ २ पहा.

पडगी, पडघी, पडघणी, पडघाणी **स्त्री०** अग्निसंयोगानें वितळलेले धातु ओतावयाचा साचा.

पडगें, पडघें **न०** १ चर्माशिवाय जो नगाऱ्याचा भाग तो. २ संबळ किं० तबला या चर्मवाद्यांची एक बाजू. ३ एक प्रकारची लहानशी हांडी. ४ चटण्या, कोशिंबिरी, इ० ठेवण्याचें लांकूड कोरून केलेलें पात्र. वर ' पडगा, '' पडघा ' अर्थ १ पहा.

पडघम **(-गम**), पडघाम **(-गांव**) **न०** ढोलकें,-सैन्यांतील एक चर्मवाद्य.

पडघा, पडघी, पडघें वर ' पडगा,' 'पडगी', ' पडगें ' पहा.

पडझड [**म०** पडणें+झडणें] **स्त्री०** १ तळावरून सैन्य उठलें असतां त्या जागीं जो केरकचरा किं० रद्दी पदार्थ इ० पडलेले असतात ते समुच्चयानें.२ झोडपलेलें धान्य खळ्यावरून उचलून नेलें असतां तेथें जें गदळ राहातें तें. २ घरांतील सामान नेहमींच्या जागेवरून उचलून दुसरीकडे नेलें असतां पहिल्या जागीं जो केरकचरा साचलेला असतो तो.३ बांधकामांत झालेली मोडतोड.

पडण [**म०** पडणें] **न०** १कांहीं कार्य घडावयाचा समयविशेष किं० हंगाम; उ० ह्या पडणास आंबे लागले नाहींत यावरून पुढच्या पडणास दुप्पट जोरानें आंबे लागतील असें वाटतें. २ चरावयास गेलेल्या गुरांची विश्रांतीची जागा. ३ मुसाफर, सैन्य, फिरतीवर गेलेल्या कचेऱ्या, इ० च्या मुक्कामाच्या जागा प्रत्येक.

पडणी [**म०** पडणें] **स्त्री०** १ पडण्याची क्रिया. २ पिकलेलीं धान्याचीं ताटें कणसांच्या भारानें वाकणें; उ० आमच्या शेतांतील जोंधळा पडणीस आला. २ अपकर्षाच्या दशेस येणें. ४ वयानें उतार होणें.

पडणें [**सं०** पत्] **अ० क्रि०** १ पतन पावणें; आधारावरून भ्रष्ट होणें; पूर्वीच्या स्थानापासून खालीं येणें; उ० झाडावरून **आंबा** पडला. २ बंद होणें;कमी जोराचा होणें; मंदावणें;उ०वारा पडल्यामुळें गलबत मघाच्या वेगानें चालत नाहीं.३ व्यापार किं० धंदा चांगलासा न चालणें;किफायतशीर असण्याच्या स्थितींत नसणें; उ० दुष्काळामुळें मोत्यांचा व्यापार पडला. ४ निरुपयोगी होणें. ५ मित्रत्वाचा किं० सलोख्याचा किं० परस्परोपकारित्वाचा संबंध असणें; उ० त्याचें आणि माझें पडत नाहीं;उ०विद्येस आणि लक्ष्मीस पडत नाहीं;उ०अंबाडीची भाजी आणि भाकरी ह्यांस चांगलें पडतें. ६ कर्मधर्मसंयोगानें असणें; उ० तो पडला वरिष्ठाचा

मंगलवरचा, नाहीं तर त्याचा वमेकर्में मी चव्हाट्यावर आणावयाला कमी केलें नसतें; उ० इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस आणि शिवाजी यांची तुलना करतां यावयाची नाहीं, एक पडला विलासी व निरुद्योगी आणि दुसरा अगदीं त्याच्या उलट (गो० स० स०). ७ होणें; शक्य असणें; उ० ह्या तक्त्यांत दोन पाट पडतील. ८ निरुद्योगी बसणें किं० असणें;उ०येथें काय पडला आहेस, ऊठ आणि कामाला लाग. ९ लढाईत मारला जाणें; उ० संगमनेरची लढाई शिवाजीनें जिंकली खरी पण तींत शिधोजी निंबाळकर पडला (म्ह० मरण पावला). १० आवश्यक होणें; जरूर केलेंपाहिजे असें होणें; उ० चिंतामणरावांनी हातपाय गाळले म्हणून मला हा त्रास सोसणें पडलें. ११ एकादा पदार्थ विकत घेतांना किंमत द्यावी लागणें; उ० नागपुरी उपरण्यांना अकरा रुपये पडतात. १२ घडून येणें. १३ वाद, कुस्ती, लढाई, इ० मध्यें पराभव पावणें. १४ हीन दशेस येणें. १५ चाल-रीति, परिपाठ, इ० सुरू होणें. १६ वांतिरूपानें पोटांतून बाहेर येणें; उ० त्याला पित्त पडलें. १७ पत्ते इ० खेळांत हरणें; उ० मी दहा रुपये पडलो. ❀ एकाद्या वस्तूवर किं० गोष्टीवर पडणें तीच एकसारखी करीत राहाणें; ती तत्परतेनें करूं लागणें किं० करीत असणें; ती स्वीकारणें किं० अंगीकारणें; उ० सुजनसिंग आलीकडे कादंबऱ्यांवर पडला आहे (म्ह० त्यानें कादंबऱ्यांच्या वाचना-वर झोड दिली आहे). थंडी, प्रकाश, अंधेर, किं० काळोख पडणें सुरू होणें, पसरणें, भास-मान होणें. एकाद्या पदार्थांत किडे पडणें त्यांत किडे किं० आळ्या उत्पन्न होणें. एकाद्या कामांत पडणें तें पथकरणें; त्यांत मन घालणें; उ० तुझ्या कामांत भट पडो ! एकाद्याचा जीव खालीं पडणें (किं० भांड्यांत पडणें) त्याची काळजी दूर होणें; त्याच्या जिवाला शांतता किं० स्वस्थता प्राप्त होणें. मागें ' जीव ' मध्यें ' जीव भांड्यांत पडणें ' हा वाक्प्रचार पहा. उघडें पडणें आश्रय-रहित होणें; हीन दीन होणें; कोणी त्राता किं० कैवारी नाहीं अशा दशेस येणें. तोंडघशीं पडणें मागें ' तोंड ' मध्यें हा वाक्प्रचार स्पष्टावला आहे तो पहा. एकाद्यावर तुटून पडणें त्याच्यावर निकरानें हल्ला करणें (युद्धांत किं० वादांत किं० भाषणांत). एकाद्याचें एकाद्या गोष्टीला अनु-मोदन पडणें ती त्याला पसंत असणें; तिला त्याचा रुकार पडणें. शरपंजरीं पडणें आजारानें खितपत किं०झिजत असणें. पंचाईत पडणें किं० मारामार पडणें अडचण भासणें;दुष्कर होणें; जड जाणें. चैन पडणें आराम वाटणें; उ० माझी मुलगी सासरीं गेल्यापासून मला चैन पडेनासें झालें आहे; उ० या खेडेगांवांत तुम्हाला चैन पडणार नाहीं. पडलेलें शेण माती घेऊन उठतें चांगल्या माणसावर कांहीं टपका आला आणि त्या टपक्याचें त्याणें जरी पूर्णपणे निरसन केलें तरी त्याची थोडी तरी बदनामी होतेच होते. पडूं पडूं करणें झोप ज्याला येत आहे अशा मुलानें किं० दमलेल्या माण-सानें किं० जनावरानें ठिकठिकाणीं बसण्याकडे कललेलें असणें. कांहीं जिन्नस अंगावर पडणें १ त्याची आपणाला जरूरी नसतां तो पथकरावा लागणें. २ विकत घेतलेला पदार्थ निरुपयोगी किं० गैरसोयीचा ठरणें. कांहीं काम अंगावर पडणें त्याची जबाबदारी आपणांकडे येणें. [सूट.

पडत [म० पडणें] स्त्री० जकातीत दिलेली

पडतउभें [म० पडणें + उभा] न० १ गर्भा-शयांतून बाहेर पडतांच उभें राहाण्याची ज्याला ताकद असते असें गाय, म्हैस, इ० चें वांसरूं. २ जें कार्य आरंभावें तें सुरळीतपणानें शेवटास जावें असें जें कोणाचें नशीब असतें तें किं० असें कार्य.

पडतन, परतन [म० परतणें] न० १नांग-राच्या एका फेरीत जितकी नांगरली जाते तितकी जमीन. २ जमीनीची चिंधोटी. ३ नांगराची एका फेरीनें उकरलेली रेघ.

पडतपोशी [फा० पर्दाहपोशी] स्त्री० १ निवारा; खाजगीपणा. २ जाणाऱ्या येणाऱ्याच्या दृष्टीस सहजासहजीं पडत नाहीं अशी जागा; एकान्त. ३ निवाऱ्याची जागा.

पडतळ, पडताळ [हिं०परतल] न० प्रवासांतील सामानसुमान.

पडतळणें, पडताळणें [म० पड (सं०पर) + ताळा]स० क्रि० १एकदा केलेली गणती, मोजणी, मापणी, किं० तपासणी पुन्हा आपण किं० लोकां-

कढून करून किं० करवून ती चुकीची आहे किं० बरोबर आहे हें पाहाणें किं०ठरविणें. २हत्यार परजणें.३ कांहीं कामासाठीं स्वतास तयार किं०सिद्ध करणें. ४ शिव्या, अपकार, अपमान, इ० ची फेड करणें; उ० त्याणें मला गालिप्रदान केलें तें आज मी पडताळलें.

पडता [म०पडणें] **वि० पु०** १ पडणारा;पडण्याकडे कल असलेला.२अपकर्षाचा. ❀ **पडता पाया पु०**ऱ्हास;अपकर्ष;कमीपणा;उ०माझ्या सावकारीला पडता पाया गुदस्ताच्या दुष्काळापासून लागला;उ० आतां पावसाचा पडता पाया लागला. **पडती भावना स्त्री०** १ थंडी, उन्ह, पाऊस, इ० सुरू होण्याचा रंग. २ सुरुवातीचा समय किं० चिन्ह किं० लक्षण.

पडताळ्या [**म०** पडताळ] **वि०** सामान वाहाण्याच्या कामाचा (पशु,–उंट, घोडा, बैल, इ०).

पडद [**म०** पडदा] **स्त्री०** मोठ्या मेजवानीच्या प्रसंगीं अनेक भांड्यांत शिजविलेला भात, वाटलेलें पुरण,इ० ज्या वस्त्रावर ओततात तें.

पडदणी [**म०** पडदा] **स्त्री०** अंग धुण्याच्या वेळीं चांगलें लुगडें सोडून त्याच्याबद्दल जें जुनें, फाटकें किं० तेलकट वस्त्र बायका नेसतात तें.

पडदळ [**हिं०** परतल] **न०** १ प्रवासांत बरोबर घेतलेलें सामानसुमान. २ तरवार इ०आयुध अंगावर लोंबत सोडावयाचा किं०अडकावावयाचा शिपाई इ० चा पट्टा. ❀ **पडदळ्या, पडदाळ्या वि०** सामान वाहावयाच्या कामीं लावावयाचा (घोडा, बैल, इ०).

पडदा [**फा०** परदाह्] **पु०** १ कांहीं पदार्थ किं० कोणी माणूस किं० कांहीं व्यवहार लोकांच्या दृष्टीस पडूं नये म्हणून पुढें जें कापड इ० लावलेलें किं० लोंबत सोडलेलें असतें तें.२वारा,पाऊस, प्रकाश,इ० ना प्रतिबंध करण्यासाठीं वस्त्र,तट्ट्या, इ०जें लाविलेलें किं० उभारलेलें असतें तें.३एकान्त; निवाऱ्याची जागा. ४ सभ्याचाराची शालीनता; विनयाची राहाणी. ५ कांदा, दगड, अभ्रक, इ० चे जे पदर ते प्रत्येक. ६ दृष्टीला मांद्य आणणाऱ्या सायीचा थर. ७ ध्वनि ज्यावर आदळतो तो कानांतील अवयव. ८ दोन नाकपुड्यांमध्यें असतो तो नाकांतील अवयव. ९वर ' पडद ' शब्द पहा. १० अंगरख्याचा उरावर येणारा भाग. ११पेटी,पिशवी,बटवा,इ० मध्यें कप्पे पाडण्यासाठीं जें लाकूड, वस्त्र, इ०चे तुकडे शिवलेले किं० बसविलेले असतात ते प्रत्येक. १२ मोकळ्या मनानें बोलणें शक्य किं० इष्ट किं० सोयीचें नसतां ज्या गोष्टी अनुक्त किं० संदिग्ध ठेविलेल्या असतात त्या समुच्चयानें; **क्रि०** ठेवणें, राखणें. १३ परकेपणाची किं० बेभरवंशाची भावना; उ० त्याच्या आमच्या स्नेहांत पडदा नाहीं. ❀ **पडदा फेकून देणें** किं० **पडदा उडविणें** १ पूर्वी राखिलेली भीड, मुरवत, किं० संकोच वृत्ति, किं० दुटप्पी वर्तनाची सरणी सोडून देणें आणि आपलें खरें स्वरूप प्रकट करणें; ज्याला फसवावयाचें त्याला फसवून तो पूर्णपणें आपल्या तावडींत आल्यावर आपली सौम्य आणि लहीन सरणी झुगारून देणें.२ निर्लज्ज होणें. **पडदा राखणें** योग्य शालीनता अवलंबणें.**सातव्या पडद्यांत बसणें** अत्यन्त एकान्तांत बसणें किं० राहणें.

पडदी [**म०** पडदा] **स्त्री०** १ लहान पडदा. २ एका जागेचे दोन विभाग करावयासाठीं मध्यें घातलेली एका विटेची भिंत किं० उभारलेला कूड.

पडन न० मागें ' पडण ' पहा.

पडप, पडीप न० १ आपल्या आवडीच्या किं० प्रेमाच्या माणसाची किं० पदार्थाची किं०विषयाची फाजील किं०एकसारखी चालविलेली स्तुति(करणें, चालविणें). २ मिजास, प्रतिष्ठा; उ० तुमच्या घरांत ह्या नोकराचें भारी पडीप आहे.३ कौतुक; भपका, आश्चर्यकारक वस्तु.

पडपावणी [**म०** पडण+(ठरलेला समय)+पावणें (येणें)] **स्त्री०** न्हाव्यानें दरवर्षाला किं० दर महिन्याला अमुक पगार घेऊन अमुक घरांतील माणसांच्या हजामती कराव्या असा केलेला असतो तो ठराव किं० असा ठरलेला पगार.

पडम न० पडशा, बैठका, इ० करण्यासाठीं जें जाड सुताचें विणलेलें असतें तें वस्त्र.

पडला [**म०** पडणें]**वि०** पडलेला. ❀ **पडलें पान न०**गांवकीचें एकाकडे असलेले सर्व अधिकार

समुच्चयानें; ३० जोशीपणा आणि कुरक-रण हे दोन अधिकार त्याच्याकडे आहेत असें नव्हे तर पडलें पान त्याचें आहे. **कोणेकाचा पडल्या पानावर हक्क असणें** सर्व अधिकार, हक्क, कर्तव्यांची जबाबदारी, इ० त्याच्याकडे असणें. **पडल्या पडल्या. क्रि० वि०** १ आरामांत; आरामाच्या स्थितींत. २ सहजासहजीं; अनायासानें; अटक्या मरशीं.

पडवळ [**सं०** पटोल] **स्त्री०** ज्याला लांब सापासारखीं फळें येतात असा एक वेल. **न०** त्या वेलाचें फल.

पडवा पु० एक वाळलेलें औषधोपयोगी फळ.

पडवी स्त्री० १ मुख्य घरावर वांसे घातलेले असतात तें संपतात तेथें दुसरे वांसे लुपसून छपर वाढवून केलेली असते ती घराची वाढ. २ घराच्या चांधईला चिकटून जे पाखें उतरलेलें असतें तें. ३ डोक्यावरून वाहावयाचें ओझें पावसाच्या पाण्यानें भिजूं नये म्हणून इरल्याला दिलेला असतो जो जोड तो.

पडवें न० घराच्या दारापुढें चार खांबांवर उभारलेलें छपर,—हें चारी बाजूंनीं उघडें असतें.

पडशी स्त्री० माणसाच्या खांद्यावर किं० बैलाच्या पाठीवर टाकावयाची पिशवी,—जिच्या दोन बाजूंस दोन कप्पे सामानासाठीं केलेले असतात.

पडशेणें, पडसावणें [**म०** पडसें] **अ०क्रि०** पडशानें विकृत झालेलें असणें.

पडसर [**म०** पडणें+सर (प्रत्यय)] **वि०** १ न कसतां रिकामें पडलेलें (शेत); न कसतां रिकामी पडलेली (जमीन). २ रिकामें किं० ओसाड (घर, गांव, इ०).

पडसळ, पडसाळ स्त्री० १ धर्मशाला. २ घराची पडवी. ३ देवी बऱ्या झाल्यावर उठतो तो पुरळ. ४ शेताची कापणी झाल्यावर ताटांना दुसरे फुटतात ते अंकुर समुच्चयानें.

पडसें न० शैत्य फार झाल्यामुळें नाकांतून शेंबूड किं० पाणी गळत राहातें असा आजार.

पडळ [**सं०** पटल] **न०** १ डोळ्यावर धरतो तो साका किं० जमतें तें पटल. २ आवरण; आच्छादन. ३ माशा, मुंग्या, इ० चा थवा. ह्या अर्थी **पडली स्त्री०** हाही शब्द कवितेंत येतो.

पडाव [**हिं०**] **पु०** मुक्कामाची जागा,—सैन्य, पांथ, गुराखी, व्यापारी, यात्रेकरू, इ० चीं.

पडाव [**हिं०** परीवा] **पु०** सुमारें वीस खंडींचें ओझें वाहाणारी होडी.

पंडित [**सं०**] **पु०** १ विद्वान. २ हुशार. ३ युरोपी माणसाला संस्कृत किं० देशी भाषा शिकविणारा शिक्षक. ❀ **पंडितमानी, पंडितंमन्य** [**सं०** पंडित+मानिन्, मन्य] **वि०** मी मोठा पंडित आहे अशी ज्याला घमेंड आहे असा. **पंडितराव पु०** राजाला शास्त्रार्थ सांगणारा किं० राजाच्या दरबारचा पंडित. हा अष्टप्रधानांपैकीं एक असे.

पडिपाड पु० बरोबरी; सर (कवितेंत).

पडिभार, पडिवार, बडिवार पु० १ वैभव; थोरवी; मोठेपणा. २ कोणेकानें स्वताची गायिलेली थोरवी, किं० स्वताच्या कर्तृत्वाबद्दल मारलेली बढाई, किं० करून घेतलेली स्तुति(सांगणें, गाणें, इ०).

पडित, पडीत [**म०** पडणें] **वि०** १ शेताच्या उपयोगाला येण्याजोगी असून शेत न करतां रिकामी टाकलेली जमीन. २ कामाला न लावतां राहूं दिलेला (पदार्थ). ३ रद्दी म्हणून बाजूस काढून टाकलेला (पदार्थ). ❀ **पडीतचाराव पु०** लागवडींत न आलेल्या जमीनीवर गुरें चारणें किं० अशा चराईवर बसविलेला कर.

पडू, पड्या [**म०** पडणें] **वि०** मंद; सुस्त; सदा आळसटलेला. ❀ **उड्या पुरवतो पण पड्या पुरवत नाहीं** दांडगेपणानें काम करणारा माणूस किं० पशु पथकरतां येईल पण मदतपणानें काम करणारा कोणालाही आवडत नाहीं.

पंडू [**सं०** पांडू] **पु०** रक्ताच्या कमतरतेमुळ ज्यांत त्वचा फिक्की पडते असा एक रोग. ‘ पंडूरोग ’ असाही शब्द आहे.

पडें न० जनावराचा मुडदा.

पडोशी [**सं०** प्रतिवेशिन्=शेजारी; प्रतिवेश=शेजार] **पु०** आपला शेजारी.

पडोस [**सं०** प्रतिवेश=शेजार] **क्रि० वि०** सांनिध्याला; शेजारीं. ❀ **पडोसरी स्त्री०** घराच्या मागल्या बाजूची पडवी.

पडोसा [**सं०** प्रतिवेश=शेजार] **पु०** १

शेजार; सांनिध्य. २ दोन पदार्थ शेजारीं शेजारीं मांडून केलेली तुलना. ३ आपणास विकत घ्याव-याच्या पदार्थाची दुकानदारानें सांगितलेली किंमत योग्य आहे किं० नाहीं हें ठरविण्यासाठीं तसल्याच पदार्थाची दुसऱ्या दुकानीं किंमत विचारून पहाणें किं० ते दोन्ही पदार्थ शेजारीं शेजारीं मांडून तुलना करणें. ॐ **पदार्थाचा पडोसा पाहाणें** एकाच जातीचे दोन पदार्थ वर सांगितल्या रीतीनें तुलना करून पाहाणें; पडताळा पाहाणें. **पडोशास उतरणें** तुलनेनें योग्य ठरणें.

पडोळ स्त्री० वर ' पडवळ ' पहा.

पड्या वि० वर ' पड्डू ' पहा.

पंड्या पु० उत्तर हिंदुस्तानांतील ब्राम्हणांची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

पंड्या, पंड्याऊस पु० उसाची एक जात.

पढण न० १ जुन्या शस्त्राच्या झिजलेल्या भागीं नवें पोलाद घालणें (करणें, घालणें). २ असा घातलेला नवा तुकडा.

पढणें [**सं०** पठ] **स० क्रि०** १ म्हणणें. २ शिकणें. ३ योग्य वेळीं म्हणून दाखवावयासाठीं (कांहीं मजकूर) पाठ करणें. ॐ **पढतमूर्ख वि०** शास्त्र जाणत असून मूर्खासारखा वागतो तो. **पढीक वि०** शास्त्रें जो पढला आहे तो.

पढणें [**म०** पढणें] **न०** शिकलेली किं० संपादिलेली विद्या किं० मिळविलेलें ज्ञान.

पंढरी [**म०** पंढरपूर] **स्त्री०** १ पंढरपुरास जाऊन केलेली यात्रा. २ पंढरपुर हें गांव. ॐ **पंढरीची वारी स्त्री०** १ नियमित वेळीं पंढरपुरच्या विठोबाच्या दर्शनास जाणें किं० असें जाण्याचें चालविलेलें व्रत. २ पुनःपुनः होणारी खेप; निष्फळ खेप; एकाच परीक्षेस अनेक वेळां जाऊन नापास होण्याचा क्रम. **पंढरीनाथ पु०** पंढरपुरचा विठोबा. **पंढरीनिधान न०** पंढरपुरची अति मूल्यवान् वस्तु म्ह० विठोबा किं० विठोबाची मूर्ति. **कोणेकाची पंढरी पिकणें** तो उत्कर्षाच्या किं० वैभवाच्या स्थितीस चढणें;त्याची चैन उडणें; उ० राजा राज्यकारभार पाहाणारा नसला म्हणजे पाजी आणि लांचखाऊ नोकरांची पंढरी पिकते; उ० राज्यक्रान्ति झाली असतां लुटारूंची पंढरी पिकते; उ० यंदा चांगला पाऊस पडला, शेतकऱ्यांची पंढरी पिकेल.

पढळ न० टाळ नांवाचें जें वाद्य याची जीं दोन हातांत धरावयाचीं दोन अर्धुकें तीं प्रत्येक.

पढियंता वि० आवडता, प्रिय (कवितेंत).

पण [**सं०**] **पु०** १ केलेली प्रतिज्ञा. २ दिलेलें वचन. ३ केलेला ठराव. ४ मारलेली पैज; द्यूत किं० द्यूतांत लावलेला पैसा किं० पदार्थ. ५ पूर्वी प्रचलित असलेलें एक नाणें. ६ उमेदीचें वय; प्रौढदशा. ॐ **पण भोगणें** खात्रीपूर्वक सांगणें. **पणांत येणें** प्रौढ दशेला येऊन पोचणें; उमेदींत येणें; उ० तुमची मुलगी शालिनी आतां पणांत येऊं लागली आहे (म्ह० पोक्त होत चालली आहे; ती पोक्ती पुरवती होऊं लागली आहे; तिचे अल्लडपणाचे दिवस आतां सरलेच म्हणावयाचे); उ० बाळू आतां पणांत आला आहे (म्ह० तो ऐन उमेदींत आला आहे; त्याचें शरीरसामर्थ्य आणि बुद्धिसामर्थ्य पूर्ण विकास पावलें आहे). **पणबंध पु०** १ करार. २ प्रतिज्ञा. ३ तह.

पण उ०अ० १ परंतु; असें जरी आहे तरी. २ पादपूरक; उ० येतों पण ! उ० जरा धीर धर पण ! उ० अरे हो पण ! **श० यो० अ०** सुद्धां देखील; उ० श्रीनिवास गेला आणि सुभ्राव पण गेला.

पण न० (**व्याकरणांत**) विशेषणें किं० नामें यांच्यापासून भाववाचक नामें घडवावयाचा एक प्रत्यय; उ० चांगला, चांगलेंपण; बाल, बालपण, इ०; ' पणा ' ह्या प्रत्ययानें पुल्लिंगी भाववाचक नामें होतात; उ० म्हातारा, म्हातारपणा; स्त्री, स्त्रीपणा इ०.

पणंज, पणजें न० कोणत्याही धान्याच्या कणसांत आणि विशेषतः भाताच्या कणसांत जे चिंबलेले दाणे निघतात ते.

पणजा पु० आईचा किं० बापाचा जो आजा त्याचा बाप. **पणजी स्त्री०** पणजाची बायको. **पणजोळ न०** आईचें किं० बापाचें आजोळ.

पणत स्त्री० नातवंडाची कन्या. ॐ **पणतसून स्त्री०** पणतूची बायको.

पणती, पणतोली, पणथी स्त्री० मातीचें लहानसें पसरट पात्र,—ज्यांत प्रकाशार्थ तेल घालून वात पेटविलेली असते.

पणतुंड, पणतोंड, पणतवंड न० नातवंडाचें अपत्य.

पणतू पु० नातवाचा मुलगा.

पणपणें अ० क्रि० १ उत्पन्न होणें. २ रुजणें. ३ (झाड) जोरानें वाढणें. ४ वैभवास चढणें.

पणस पुढें ' फणस ' पहा.

पणा पु० हा प्रत्यय विशेषणें आणि नामें ह्यांना लागला असतां भाववाचक नामें उत्पन्न होतात; उ० चांगला, चांगुलपणा; दुष्ट, दुष्टपणा; द्वाड, द्वाडपणा; घर, घरपणा; इ०. वर ' पण ' पहा.

पणीत न० सोनार लोकांचें एक आउत.

पण्य [सं०] वि० विकावयाचा; विकाऊ. ॐ **पण्यांगना** स्त्री० वेश्या.

पंत [सं० पंडित] पु० १ राजाच्या अष्ट प्रधानांपैकीं एक; उ० पंत प्रतिनिधि, पंत अमात्य, पंत सचिव, इ०. २ शास्त्र न पढलेला आणि कारकुनी पेशाचा ब्राम्हण. ३ पुरुषांच्या नांवापुढें सन्मानार्थी जोडितात; जसें नरसोपंत, शिवरामपंत, इ०.

पत स्त्री० प्रामाणिकपणानें सदैव व्यवहार करीत असल्यांमुळें लोकांचा आपणावर बसतो तो भरंवसा. ॐ **पतघाण** स्त्री० १ व्यापारांत पत नष्ट होणें. २ व्यापारांत बसलेली ठोकर. **पतपात, पतपासोडी** स्त्री०, **पतपातेरा** पु० व्यापार, व्यवहार, इ० मध्यें कोणेकाची पत किं० प्रामाणिकपणाबद्दल प्रसिद्धि.

पतक पु०, न० १ घोडेस्वारांची तुकडी. २ जकातिवर अधिकार. ३ पदक (माळेचें). ॐ **पतक्या** पु० घोडेस्वारांच्या तुकडीचा अंमलदार.

पतखल, फतकल स्त्री० १ जमीनीवर एकदम आसनमांडी घालून बसणें. २ निरुद्योगीपणांत किं० लोकांचीं बसावयाची अडचण करून आपण घातलेली आसनमांडी. दोन्ही अर्थी क्रि० घालणें किं० घालून बसणें.

पतंग [सं०] पु० १ पक्षी. २ सूर्य. हे दोन्ही अर्थ संस्कृतांतच आहेत. ३ एक क्षुद्र जंतु,—जो दिव्यावर झडप घालीत असतो. ४ मुलांची हवेंत उडवावयाची कागद इ० द्रव्यांची वावडी. ५ ज्याचें तांबडें लाकूड असतें असें एक झाड. ॐ **पतंगकुगडी** स्त्री० मुलांचा एक खेळ.

पतंगी स्त्री० पाण्यांत उडी मारण्याचा एक [प्रकार.

पतन [सं०] न० १ पडणें. २ उतरणें. ३ उडणें. ४ अस्त. ५ नरकांत पडणें. ६ जातिभ्रंश; धर्मभ्रंश. ७ अप्रतिष्ठा; अपकीर्ति; अधिकाराच्या किं० मानाच्या जागेवरून झालेला भ्रंश. ८ अवनति; ऱ्हास; अपकर्ष. ९ मरण. १० (ज्योतिषांत) उच्च ग्रह नीच स्थानीं जाणें. ' पतन पावणें ' ह्या अर्थी अशिक्षित लोक ' पत्त पावणें ' योजतात.

पंतवंड, पणतवंड न० नातवाचा मुलगा किं० मुलगी. मागें ' पणतुंड ' पहा.

पतळी, पातळी स्त्री० धातूच्या कांबी तोडण्याचें एक हत्यार.

पताक, पताका [सं० पताका] स्त्री० १ झेंडा; निशाण. २ वारकरी लोक हातांत घेतात तें निशाण.

पताड स्त्री० १ बैलाच्या पाठीवर ओझें आवळावयाचा पट्टा. २ गलबतांत सामान उंच भरतां यावें म्हणून बांबूच्या काठ्या, तट्ट्या इ० ज्या योगानें गलबताचा चढवितात तो कांठ.

पताडा, फताडा वि० १ ठेंगणा आणि बसकट; चापट; चपटा; (म्हशीचें शिंग, केळें, शेंग, किं० कोणताही पदार्थ).

पताडें न० १ म्हैस, रेडा, इ० चें चपटें शिंग. २ बारीक सारीक सामानसुमान किं० तें भरावयाची पिशवी. ह्या अर्थी ' पातडें ' ' पोतडें ' न०, ' पोतडी ' स्त्री० असेंही शब्द आहेत.

पति [सं०] पु० १ धनी; स्वामी; मालक. २ नवरा. ॐ **पतिदेवता, पतिप्राणा, पतिव्रता** स्त्री० पति हेंच दैवत समजणारी. **पतिवत्नी** स्त्री० सुवासिनी. **पतिंवरा** स्त्री० पतीला स्वतः पसंत करून वरणारी स्त्री.

पतिंगा पु० १ वल्ह्याचा दांडा. २ मोठें वल्हें.

पतित [सं०] वि० १ दुष्ट; अनीतिमान. २ जातिभ्रष्ट; बहिष्कृत. ३ पातकी. ४ (अमुक प्रदेशांत) समाविष्ट किं० अंतर्भूत झालेला. ॐ **पतितसावित्रीक** पु० यथाविधि किं० मुळीच ज्याची मुंज झाली नाहीं तो. **पतितपावन** पु० पातकी माणसाचा उद्धार करणारा देव, साधु, इ०. **पतितोद्धार** पु० पापी माणसाचा उद्धार. वि० पापी माणसांचा उद्धार करणारा.

पंती, पंतोली, पंतुड, पंतोड, पंत मागें ' पणती, ' ' पणतोली, ' इ० पहा.

पतेमारी, फत्तेमारी स्त्री० एक प्रकारचें जलद चालणारें गलबत.

पंतोजी [म० पंत; सं० पंडित; जी(प्रत्यय)] पु० मुलाला प्राथमिक शिक्षण देतो तो.

पत्तन [सं०] न० शहर; मोठा गांव.

पत्तर [सं० पात्र] न० भिकाऱ्यांचें भिक्षा घ्यावयाचें लाकडाचें किं० भोपळ्याचें पात्र. भैरोबाचे भक्त कांहीं प्रसंगीं त्याची पूजा करतात. ॐ **मांगिणीचें पत्तर** न० अमावास्या, ग्रहण, इ० प्रसंगीं मांगीण जें पात्र घेऊन भिक्षा मागते तें पात्र. **पत्तरपूजा** स्त्री० १ भैरोबाचे भक्त पत्तराची करतात ती पूजा. २ कोणेकाला धोंडे मारणें किं० काठ्या मारणें. ३ कोणकाची काढलेली भोमडपट्टी किं० खरडपट्टी.

पत्ता [हिं०] पु० १ बातमी; खबर. २ कोणाकाच्या राहण्याच्या ठिकाणाचें वर्णन किं० तपशील. ३ हें पत्र अमक्याला अमुक स्थलीं द्यावें असा जो पत्रावर असतो तो तपशील. ४ तपास; शोध. ॐ **पत्तादोरा** पु० तपास; कोणेकाचा ठावठिकाणा. **पत्तासुद्दा** पु० तपशीलवार पुरावा किं० मिळालेली माहिती. **पत्तेवार** वि० पूर्ण पत्ता ज्यावर आहे असें (पत्र). क्रि० वि० पूर्ण पत्त्यानिशीं.

पत्ता [सं० पत्र] पु० तंबाखू इ० चें पान.

पत्ती [सं० पत्र] स्त्री० भांगेचें पान.

पत्थर, फत्तर [सं० प्रस्तर] पु० १ धोंडा. २ (**लाक्षणिक**) बुद्धिहीन किं० अडाणी माणूस.

पत्नी [सं०] स्त्री० धर्मशास्त्राप्रमाणें झालेल्या लग्नाची बायको; भार्या.

पत्र [सं०]न० १ (झाडाचें) पान. २ (फुलाची) पाकळी. ३ कागद. ४ धातु इ० कोणत्याही पदार्थाचा पातळ तुकडा; पत्रा. ५ कोणेकाला कागदावर लिहून कळविलेला आपला विचार किं० तो कागद. ६ शर्ती, करारनामा, इ० लेख किं० ते ज्यावर लिहिले आहेत तो कागद; उ० मुखत्यारपत्र, वकीलपत्र, शिफारसपत्र, इ०. ७ पुस्तकाचें पान. ८ पक्ष्याचा पंख. ॐ **पत्रपरशु** पु० कानस ह्या नांवाचें हत्यार. **पत्रपुट** पु० पानाचा द्रोण. ॐ **पत्रदर्शनीं** क्रि० वि० पत्र पाहतांच; पत्र हातांत पडतांच. **पत्रद्वारा** क्रि० वि० पत्रांत लिहून; पत्रांच्या साधनानें. **पत्रवल्ली, पत्रावली** स्त्री० हातावर शोभेसाठीं चंदन इ० ची काढलेली वेलबुट्टी. **पत्रवडी** स्त्री० अळू इ० च्या पानाला पीठ लावून त्याच्या वळकट्या करून त्या कापून आणि तळून करतात तें खाद्य. **पत्रशाक** स्त्री० पालेभाजी. **पत्रक** न० १ कोणतीही हकीगत, माहिती, इ० ज्या कागदावर नमूद केलेली असते तो कागद; उ० वेळापत्रक. २ कोष्टकाच्या रूपांत दिलेली माहिती किं० केलेलें वर्णन. **पत्रावळ** [सं० पत्र + आवली]स्त्री० १ अनेक पानें चोयीनें टाचून जेवण इ० च्या उपयोगासाठीं केलेला असतो तो पदार्थ. २ (**लक्षणेनें**) पुष्कळ मोती गुंफल्यामळें वेढब दिसणारी नथ.

पत्रा [सं० पत्र] पु० धातु, दगड, इ० चा पातळ तुकडा.

पत्राज, पत्रास, पत्राजी, पत्राशी स्त्री० कोणकाची स्वताच्या कर्तृत्वाची, थोरपणाची, महत्त्वाची, किं० गुणाची प्रौढी, मिजास, अभिमान, किं० ऐट; उ० तुझी कशाला पाहिजे एवढी पत्रास? मी स्वतां जाऊन हावी तितकी अम्हीची पानें गोळा करून आणीन.

पत्रिका [सं०] स्त्री० १ लहान पत्र. २ जायपत्री; पत्री. ३ कोणा मनुष्याच्या जन्माचें वर्ष, मास, तिथि, ग्रहांची आकाशांतील स्थिति, इ० माहिती ज्यांत दिलेली असते तो कागद. ह्या कागदाला ' जन्मपत्रिका ' असें बहुधा म्हणतात. ४ जन्मपत्रिकेवरून त्या माणसाची दैवगति ज्यांत वर्तविलेली असते तो कागद. ५ लग्न, मुंज, इ० प्रसंगीं शुभसूचक समय ज्या कागदावर नमूद केलेला असतो तो कागद. ६ कोणेकाला पाठविलेलें पत्र. ७ वरील अर्थ ५ च्या पत्रिकेच्या पूजनाचा विधि (करणें).

पत्री [सं०] स्त्री० १ जायपत्री. २ देवतेला अर्पण करावयासाठीं जमविलेलीं झाडांचीं पानें. ३ खावयाची तंबाखू (सांकेतिक शब्द).

पंथ [सं० पथ] पु० मार्ग; रस्ता. २ तऱ्हा; रीति; सरणी. ३ धर्मादि बाबतींत कोणी रूढ केला जो संप्रदाय तो; उ० ज्ञानेश्वरपंथ, नाथपंथ, कबीरपंथ. ॐ **एक पंथ दो काज** एका कृतीनें

दोन गोष्टी साधणें. **आल्या पंथें क्रि॰वि॰** १ आलेल्या वाटेनें. २ ताबडतोब. **पंथास लागणें** (किं॰ **टेकणें**) मरणाच्या द्वारीं असणें. **पंथास पोचणें** मरणें. **कांहीं काम पंथास लागणें** तें सुरळीतपणें चालूं लागणें.

पथ, पंथा [**सं॰**] **पु॰** मार्ग; वाट; रस्ता. ॐ **पंथाप्रश्न पु॰** ग्रामान्तराहून येणारें माणूस केव्हां येईल किं॰ ग्रामान्तरास गेलेलें माणूस परत केव्हां येईल असा जोशास विचारलेला प्रश्न किं॰ त्याचें त्याणें दिलेलें उत्तर.

पथ स्त्री॰ व्यापार, व्यवहार, इ॰ मध्यें कोणेकाची सचोटी किं॰ साखी.

पथक पु॰, न॰ घोडेस्वारांची तुकडी.

पथकर, पथकरा, पथकार [**म॰** पथकरणें] **पु॰** १ कोणेकानें कांहीं काम अंगावर घेऊन तें मी शेवटास लावीन असें कोणेकाला दिलेलें आश्वासन. २ कामाचा स्वीकार (घेणें).

पथकरणें, पथकारणें स॰ क्रि॰ (कांहीं काम) अंगावर घेणें किं॰ स्वीकारणें. **अ॰ क्रि॰** कांहीं गोष्ट, शर्त, सरणी, नोकरी, इ॰ कोणेकाला मान्य असणें.

पथवर [**सं॰** प्रथम वर] **पु॰**(अशिक्षितांत रूढ) प्रथमच ज्यांचें लग्न होत आहे असा. ह्याच्या व्यावर्तकत्वें बिजवर आणि तिजवर.

पथाडा वि॰ लठ्ठ आणि बसकट; अति जाडी.

पथारी [**सं॰** प्रस्तर=बिछाना, पथारी]**स्त्री॰** १ बसावयासाठीं किं॰ निजावयासाठीं पसरलेली सतरंजी, झोऱ्या, जाजम, चटई, इ॰. २ इतस्ततः पडलेलें किं॰ टाकलेलें सामानसुमान,–पुस्तकें इ॰. ३ पसारा.

पथिक [**सं॰**] **पु॰** १ प्रवासी; वाटसरू. २ परगांवाहून आलेला मनुष्य. ॐ **पथिकाश्रम पु॰** १ धर्मशाळा; सराई. २ परगांवाहून आलेल्या लोकांच्या जेवणाखायाची किं॰ राहाण्याची सोय जेथें केलेली असते असें घर. **पथिकशाला (–ळा)स्त्री॰** धर्मशाळा.

पंथी [**म॰** पंथ] **वि॰** नामापुढें हा शब्द घातला असतां त्या पंथाचा किं॰ संप्रदायाचा असा अर्थ होतो; उ॰ दादूपंथी, नाथपंथी, इ॰.

पथ्य [**सं॰**] **वि॰** १ मार्गांत उपयोगी पडण्याजोगें. २ फायदेशीर; हितावह; कल्याणकारक. ३ योग्य; उचित. **न॰** १ आजारी माणसाला हितकर अन्न. २ (**विपरीत लक्षणेनें**) वावडा पदार्थ; उ॰ आमचे सध्यांचे महाराष्ट्रीय विवेकभ्रष्ट झाले हेंच खरें, त्यांना अकाबाईनें पुरें घेरलें आहे; असें नसतें तर पूर्वजांच्या इतिहासाचें स्मरणसुद्धां त्यांस पथ्य कां होऊन बसतें ? (धनुर्धारी). ३ कल्याण. ४ आरोग्य. ॐ **पथ्यकर वि॰** हितावह; कल्याणकारक. **पथ्यकरी वि॰** पथ्य पाळीत आहे असा (रोगी). **पथ्यपाणी न॰ ए॰ व॰** आजाऱ्याचें खाणें, पिणें, औषधें, इ॰. **पथ्यपाणी करणें** आजाऱ्याला योग्य वेळीं अन्न, पाणी, औषधें, इ॰ देणें.

पद [**सं॰**] **न॰** १ पाय. २ पाऊल. ३ जमीन इ॰ वर उमटलेली पायाची आकृति. ४ व्रण; जखम किं॰ फोड बरा झाल्यावर त्याचें राहातें तें चिन्ह. ५ स्थान; स्थिति. ६ आश्रय; ठिकाण. ७ दर्जा; पदवी; हुद्दा; अधिकार; विशिष्ट स्थान. ८ प्रसंग; निमित्त. ९ श्लोक; कविता; चरण. १० (**व्याकरण**) शब्द. ११ एकत्वाच्या दृष्टीनें पहावयाच्या शब्दांशांचा समूह. १२ और्ध्वदेहिक विधीच्या सांगतासिध्यर्थ ब्राम्हणांना वस्त्रादि जे पदार्थ देतात त्या विधींत प्रत्येकाच्या वाट्याला पदार्थ येतात ते समुच्चयानें. १३ (**व्याकरण**) समासाचे जे घटक भाग ते प्रत्येक; उ॰ ' जानकीविरहानलदग्ध 'ह्या तत्पुरुष समासाचें पहिलें पद ' जानकीविरहानल ' हें आहे आणि ' दग्ध ' हें दुसरें. ' जानकीविरहानल ' ह्या कर्मधारय समासांत ' जानकीविरह ' हें पहिलें पद आहे आणि ' अनल ' हें दुसरें. ' जानकीविरह ' ह्या तत्पुरुष समासांत ' जानकी ' हें एक पद आणि ' विरह ' हें दुसरें पद आहे. १४ वेदमंत्रांतील प्रत्येक शब्द. १५ गाणें; एक प्रकारची कविता. १६ वर्तुळाचा चतुर्थांश. १७ वर्ग किं॰ घन यांचें मूळ; उ॰ चार ह्या वर्गाचें पद दोन; सत्तावीस ह्या घनाचें पद तीन. १८ प्रथमादि विभक्त्यन्त शब्द, क्रियापद, अव्यय, इ॰ जे वाक्याचे अवयव ते प्रत्येक. १९ (**गणित**) कोणत्याही श्रेणींतील एक एक अवयव. २० गुणाकार, भागाकार, इ॰ चिन्हांनी जोडलेल्या ज्या

संख्या त्या प्रत्येक. ॐ **पदानुग** पु० अनुयायी. **पदानुशासन** न० व्याकरण. **पदार्थ** पु० वस्तु. पुढें ' पदार्थ ' शब्द स्वतंत्र रीत्या पहा. **पदपंक्ति** स्त्री० १ शब्दरचना. २ यज्ञकुंडाची वीट. **पदपाठ** पु० संहितेतील पदांची क्रमशः मांडणी. **पदकृत्य** न० व्याख्या किं० लक्षण यांत योजलेल्या प्रत्येक पदाचा उपयोग किं० आवश्यकता स्पष्ट करून सांगणें. **पदच्छेद** पु० संहितारूप जो ग्रंथ त्यांतील पदरूप जे अवयव ते भिन्न भिन्न करणें; सामासिक शब्दांचीं घटकपदें वेगळीं करणें. **पदच्युत, पदभ्रष्ट** वि० स्वस्थानावरून खालीं पडलेला. **पददान** न० पद (अर्थ १२) ब्राम्हणास देण्याचा विधि. **पदलालित्य** न० वाक्यामध्यें योजलेल्या शब्दांची कर्णमधुरता. **पदशः** क्रि० वि० पदापदानें; एक एक पद घेऊन. **पदसंवाहन** न० पाय चेपणे किं० रगडणें. **पदोंपदीं** क्रि० वि० १ प्रत्येक पावलास; पावलोंपावलीं. २ प्रत्येक क्षणास; क्षणोंक्षणीं;सदासर्वदा. **मूळ पदावर येणें** १ हरिदासानें जें पद म्हणून कथेला सुरवात केली त्या पदावर कथेचें पर्यवसान आणून ठेवणें किं० तें पद म्हणून कथेच्या विषयाचा शेवट करणें. २ प्रयत्नानें घडवून आणलेली सुधारणा निष्फळ होऊन पूर्वीच्या वाईट स्थितीस येणें किं० जाणें.

पदक [सं०] न० १कंठी,कंठा, इ० च्या मध्यभागीं पिंपळाच्या पानाच्या आकाराचें सोन्याचें किं०जडिताचें जें पान घातलेलें असतें तें. २ शिमग्याच्या सगांत करतात त्या साखरेच्या गांठ्यांतील एक एक भाग व्यक्तिशः. ३ कोणेकाच्या अंगच्या कांहीं गुणाबद्दल त्याला राजा, संस्था, इ० नीं दिलेला सोनें, रुपें, इ०चा त्या गुणाच्या प्रशंसेचा लेख इ० असलेला तुकडा. पु० पदपाठ शिकलेला किं० जाणणारा वैदिक.

पदर पु० १ धोतर, लुगडें, पागोटें,इ०चें टोक. २ नक्षी, वेलबुट्टी, इ० नीं सुशोभित केलेलें लुगडें, शालजोडी, इ० चीं शेवटें. ३ कंठी, चंद्रहार,इ०चे सर.४वाईट जातकुळीचा संबंध. ५लुगडें नेसून त्याचा बहुतेक भाग कंबरेभोंवती गुंडाळल्यावर त्याचा जो थोडासा भाग ऊर किं०डोकें झाकण्यासाठीं उरविलेला असतो तो. ६ ताबा;कबजा; देखरेख; स्वामित्व; मान्यता; स्वीकार, उ० ही कामगिरी मी गुरुनाथाच्या पदरांत घातली; उ० हें भात तुम्ही आपल्या पदरांत घ्या; उ० तुकोबाची चूक मी त्याच्या पदरांत घातली (म्ह०त्याला कबूल करावयास लाविली); उ० मी तुमच्या पदरांत पडलों आहें मला संभाळून घ्या; उ० माझ्या पदरा मुलें बाळें आहेत, उधळेपणा करून कसें चालेल ? ७ साल, पान, त्वचा, कवच, किं० त्यांचे एकावर एक असे थर; उ० ह्या कांद्याला जाडे जाडे पदर आहेत. ८ डोळ्याच्या बुबुळावर किंचित् अपारदर्शक असा जो पातळ थर येतो तो. ९ दोरीचा एक एक पेड; उ० ही दोरी तीन पदरी आहे.१०कांहीं पदार्थ घ्यावयासाठीं लुगडें, धोतर, शेला, इ०चा पसरलेला भाग. ११ पोळी,चिरोटा, इ०चे घटक जे पापुद्रे ते प्रत्येक. १२ अंगरख्याचा छातीवरील भाग. १३ स्त्रीचें पहिले रजोदर्शन (येणें); उ० चिंगीला पदर आला म्ह० तिला न्हाण आलें. ॐ **एकपदरीवर येणें** एकाद्याशी बोलतांना बहुवचनाचा उपयोग न करतां एकवचनाचा उपयोग करूं लागणें (रागानें किं० असभ्यपणानें). **पदर खर्चणें, पदर खाणें, पदर मोडणें** जवळ असलेला किं० शिल्लकीचा पैसा खर्चणें. **दिव्याला पदर देणें** (किं० **घालणें**) लुगड्याच्या, धोतराच्या, किं० उपरण्याच्या पदराचा वारा घालून दिवा मालविणें. **टीप**,–मागें ' दिवा ' मध्यें हा वाक्प्रचार पहा. **पदरचा** वि० १आपल्या मालकीचा किं० स्वामित्वाचा किं० आपल्या संग्रहीं असलेला; उ० तुकारामानें मला दिलेल्या पैशांत आला तसला माल मी आणला, मी पदरचे पैसे घालावयाला थोडाच बसलों आहें ? २ नियंत्रणेत किं० आज्ञेंत वागणारा; उ० सदोबा माझ्या पदरचा आश्रित. ३ आपल्या कल्पनेनें योजिलेला किं० ठरविलेला; ज्याला आधार किं० प्रमाण नाहीं असें (वाक्य, विधान, विचार, कल्पना, इ०); उ० मी बाळूकाकांच्या तोंडून ऐकिली ती हकीगत तुला सांगितली, मी तींत कांहीं आपल्या पदरचें घातलें नाहीं; उ० एकाद्या वाक्याचा अनुवाद करतांना विद्यार्थ्यांनें त्यांत पदरचा कांहींही मजकूर घुसडून देऊं नये. **पदरचें घालणें** मूळांत नसतां आपल्या कल्पनेनें किं०

पदरांनें एकादा शब्द, वाक्य, इ० एकादा ग्रंथ इ०मध्यें घुसडून देणें. **तो पदरचें पापही देणार नाहीं** पापासारखी त्याज्य वस्तु सुद्धां तो देणार नाहीं मग उपयुक्त वस्तु कशी देईल ? (म्ह० तो अत्यन्त चिक्कू आहे). **कोणेकापुढें पदर पसरणें** त्याला नम्रपणें विनाविणें किं० प्रार्थिणें; त्याची काकुळतीनें दया भाकणें; त्याला शरण जाणें; त्याची क्षमा मागणें. **पदरीं पडणें** किं० **पदरांत पडणें** १ उपयुक्त होणें: फायदेशीर होणें; लाभाची वस्तु मिळणें; निष्फळ न होणें; उ० आजचा दिवस तर पदरांत पडला आतां उद्याची काळजी उद्या. २ कबज्यांत किं० ताब्यांत येणें. ३ आपल्या आश्रयाला किं० संरक्षणाला येणें किं० असणें. **पदरांत पाडून देणें** प्रयत्नानें मिळविणें किं० संपादणें; प्राप्त करून घेणें. **पदराला गांठ देणें** (किं० **मारणें**) एकाद्या कामांत मिळालेला अनुभव नीट लक्ष्यांत धरून वागणें. **एकाद्याच्या पदराला खोंच पडणें** त्याला ठोकर बसणें; त्याला नुकसान लागणें. **पदराला खार लागणें** नुकसान होणें. **कोणेकाच्या पदराला खार लावणें** त्याचें नुकसान करणें; त्याच्या हानीस कारण होणें. **एकाद्याच्या पदरीं असणें** त्याच्या आश्रयाला असणें; त्याच्यावर अवलंबून असणें; उ० भोजराजाच्या पदरीं पुष्कळ कवि होते. २ त्याच्या मालकीचा किं० सत्तेचा असणें; प्रारब्धाप्रमाणें मिळावयाचा असा असणें; उ० अंगीं असेल तें काम, आणि पदरीं असेल तो दाम (म्ह० जें काम आपणाला स्वताला करतां येत असेल त्याच कामाची खात्री बाळगतां येते आणि जो प्रत्यक्ष आपल्याजवळ पैसा असेल तोच आपल्या अडचणीच्या वेळीं आपल्या उपयोगास खात्रीनें येण्याजोगा असतो. **टीप**,–ह्या म्हणीचा अर्थ किंचित् वेगळाही करण्यांत येतो. मागें 'अंग' मध्यें ह्या म्हणीसारखी एक म्हण आली आहे ती पहा. ३ संग्रहाला असणें; जवळ असणें; हावा तेव्हां उपयोग करून घेतां येईल असा असणें; उ० शिरके, जाधव, निंबाळकर, घाडगे, मोरे, महाडीक, गुजर, हे सरदार बलाढ्य असून त्यांच्या पदरीं दहा दहा, वीस वीस हजार फौज असे. **एकाद्याच्या पदरीं घालणें** (किं० **पदरांत घालणें**) १ त्याच्या स्वाधीन करणें. २ त्याची चुकी, त्याचा अपराध, इ० त्याला पूर्णपणें दाखवून देणें; चुकी, लबाडी, किं० अपराध, त्याचा आहे अशी त्याची खात्री करून देणें. ३ त्याला जितकें कांहीं द्यावयाचें असेल किं० द्यावयाचें ठरलेलें असेल तितकें त्याला पूर्णपणें देणें. **पदरांत घेणें** पथकरणें, स्वीकारणें; स्वाधीन करून घेणें; मान्य करणें. **पदरीं धरणें** गुन्हा करीत असतां कोणेकाला पकडणें; चोर इ० ना चोरी करीत असतांना पकडणें. **पदरीं पडलें पवित्र झालें** तें चांगलें असो किं० वाईट असो, तें माझ्या वांट्याला आलें आहे त्या अर्थी तें मला पथकरलें पाहिजे, रागावून किं० चरफडून उपयोग नाहीं; तें चांगलें असो किं० वाईट असो, तें माझ्याकडे आलें आहे तेव्हां तें पवित्रच आहे असें मी म्हटलें पाहिजे किं० गृहीत धरलें पाहिजे. **पदरमोड करणें** शिलकींतील पैसा खर्चणें. **पदर भरीस घालणें** आपल्या जवळचा पैसा किं० कांहीं पदार्थ भरतीला घालून कार्यविशेष पार पाडणें. **मुलीला पदर घालणें** मुलगी दहा अकरा वर्षांची झाली म्हणजे तिचें परकराचें नेसणें बंद करून पदराचें नेसणें सुरूं करण्याचा विधि किं० संस्कार करणें. **पदर फाडून देणें** काडी मोडून देणें; विवाहसंबंध तोडणें. **पदर टाकणें** मृत पतीबरोबर सती जाण्याचा आपला निश्चय ठाम ठरला हें दाखविण्यासाठीं स्त्रीनें डोक्यावरचा पदर काढून खांद्यावर घेणें. **पदर घालणें** दूरच्या मनुष्यास जवळ येण्यासाठीं वस्त्राचा पदर हालवून खूण करणें. **पदरीं धरणें** १ कोणी आपणासंबंधानें कांहीं खोटी आणि बदनामीची गोष्ट बोलला असतां ती सिद्ध करून दे म्हणून त्याच्या गळीं पडणें. २ चोराला मुद्यानिशीं पकडणें. **डोकीवर पदर येणें** १ विधवा होणें. २ आपली अप्रतिष्ठा झाल्यामुळें किं० आपलें कांहीं दुष्कृत्य चवाट्यावर आल्यामुळें समाजांत उघडपणें वावरण्याची बंदी होणें किं० लाज वाटणें. **पदरकरीण स्त्री०** जिला नहाण आलेलें नाहीं आणि पदर मात्र घालण्याचा संस्कार झाला आहे अशी मुलगी. **पदरमोड स्त्री०** उद्योग, धंदा, इ० पैसा मिळविण्याचें कांहीं साधन नसल्या कारणानें शिलकीचा पैसा खर्चून संसाराच्या गरजा भागविणें

उ० माझी नोकरी गेल्यापासून मी पदरमोड चालविली आहे. **पदरगांठ स्त्री०** स्वताचा खाजगी पैसा. **पदरानपदर** [**म०** पदर + आणि + पदर] **पु०** १ विवाहसंबंधामळें परंपरेनें उत्पन्न आलेला दूरचा नात्याचा संबंध.

पदवी [**सं०**] **स्त्री०** १ रस्ता; मार्ग. २ स्थिति; स्थान. ३ दर्जा, अधिकार, हुद्दा. ४ सरकारनें किं० संस्थेनें किं० शंकराचार्य इ० कोणी संमान्य पुरुषानें कोणेकाला दिलेलें मानाचें नांव.

पंदाड न० एक प्रकारचें गवत.

पदाति [**सं०**] **पु०** १ लढणारा पायदळी शिपाई. २ पायानें प्रवास करणारा. ३ पायानें चालणारा; पादचारी. ॐ **पदातिभार पु०** सैन्यांतील पायदळ.

पदार्थ [**सं०**] **पु०** १ पदाचा म्ह० शब्दाचा अर्थ. २ कोणतीही वस्तु किं० चीज. ३ कोणतीही अजब किं० चमत्कारिक वस्तु. ४ आहे किं० नाहीं असें विधान ज्याच्या संबंधानें करतां येईल तें. ५ वर्ग; कोटि; वर्ग किं० कोटि यांतील एक एक भाव. ह्या भावी वैशेषिक सात मानितात, सांख्य पंचवीस मानतात, पातंजल सव्वीस मानतात, आणि वेदान्ती दोन मानतात. ६ भोजन, फराळ, इ० खाद्यें किं० पेयें जीं तीं प्रत्येक; उ० यंदा कार्तिकी एकादशीच्या दिवशीं वीस वेगळे वेगळे पदार्थ केलेले होते; उ० मांडवपरतण्याच्या दिवशींचे व्याह्यांचें सगळेच पदार्थ बिघडलेले होते. ७ तुच्छ वस्तु; उ० तूं काय पदार्थ आहेस? ८ वस्तूची किं० माणसाची योग्यता (फक्त पुढील प्रयोगांत); त्याचा काय पदार्थ आहे ? ॐ **कःपदार्थ पु०** गण्य कोटींत गणले जावयाची ज्याची योग्यता नाहीं तो (माणूस, पदार्थ); उ० रामभाऊ कःपदार्थ आहे, त्याला मी केव्हांच चिरडून टाकीन. **पदार्थानुसमय पु०** पंक्तींतील प्रत्येक व्यक्तीस द्यावयाचे जे अनेक पदार्थ त्यांपैकीं प्रथम प्रत्येक व्यक्तीस एक एक पदार्थ देणें, मग दुसरा पदार्थ देणें, मग तिसरा, अशा रीतीनें पदार्थ देण्याचा जो क्रम तो. द्यावयाचे सर्व पदार्थ एकदम एका व्यक्तीस देणें, मग सर्व पदार्थ एकदम दुसऱ्या व्यक्तीस देणें, अशा क्रमानें पदार्थ देण्याला 'कांडानुसमय' म्हणतात.

पदें न० १ एक प्रकारचें गवत. २ एक कंदविशेष,—ज्याच्या पिठाचे लाडू करतात.

पद्धति [**सं०**] **स्त्री०** १ मार्ग; पायवाट. २ काही कामाची सरणी; काम करण्याची रीति. ३ वर्तनाचा क्रम. ४ पंक्ति; ओळ. ॐ **पद्धतवार, पद्धतशीर क्रि० वि०** योग्य सरणीचा किं० रीतीचा किं० क्रमाचा अवलंब करून. **वि०** योग्य सरणी, पद्धति, किं० क्रम न मोडतां केलेले किं० आचरलेलें.

पद्म [**सं०**] **न०** १ कमळ. २ कमळाचें मूळ. ३ पद्माच्या आकारानें केलेली सैन्याची रचना किं० मांडणी. ४ शंभर कोटि ही संख्या. ५ कमळाच्या आकाराचें एक भूषण. ६ शरीरांतील नाडीचक्र. ७ हत्तीच्या सोंडेवर शोभेसाठी काढलेली आकृति. ८ सर्पाच्या फणीवर जे दहाच्या आकृतीचें चिन्ह असतें तें. **पु०** कुबेराचा एक निधि. ॐ **पद्मकाष्ट न०** एक औषधी लाकूड. **पद्मनाभ पु०** विष्णु. **पद्मराग पु०** माणिक किं० लाल. **पद्माक्ष पु०** कमलबीज. **पद्माकर पु०** १ पद्मांचा समूह. २ पद्मयुक्त सरोवर. **पद्मा, पद्मालया स्त्री०** लक्ष्मी. **पद्मासन, पद्मगर्भ, पद्मज, पद्मभू, पद्मयोनि, पद्मसंभव पु०** ब्रम्हदेव. **पद्मासन न०** एक आसनविशेष (डावा पाय उजव्या मांडीवर ठेवून बसणें). **पद्मकाष्ट, पद्मगंध न०** एक सुगंधी औषधिविशेष. **पद्मपुराण न०** एक पुराणविशेष. **पद्मबंधु पु०** १ सूर्य. २ भ्रमर. **पद्मरेखा स्त्री०** हातावर जी द्रव्यसूचक पद्माकृति असते ती. **पद्महस्त, पद्महस्ती वि०** ज्याचा हातगुण चांगला आहे असा; ज्याणें आरंभिलेलें किं० हातीं घेतलेलें काम कधीच निष्फळ होत नाहीं असा; ज्याला सर्व कामांत यश मिळतें असा (मनुष्य).

पद्मा [**सं०**] **स्त्री०** लक्ष्मी देवी.

पद्मिनी [**सं०**] **स्त्री०** १ कमळाची वेली. २ पद्मांचा समूह. ३ पद्मयुक्त सरोवर. ४ नायिकाविशेष. ५ कामशास्त्रांत स्त्रियांच्या ज्या जाती सांगितल्या आहेत त्यांपैकीं उत्कृष्ट जातीची स्त्री. ६ सुंदर स्त्री. 'पद्मीण' हें रूढ रूप; उ० ती काय अशी पद्मीण लागून गेली आहे कीं तिला मी भुलेन ?

पद्य [**सं०**] **न०** १ श्लोक, अभंग, आर्या,

इ० कवितेचे जे प्रकार त्यांपैकीं एक किं० त्या प्रकारांतील रचना. २ शूद्र.

पद्या पु० ब्राम्हणांतील एक जाति किं० त्या जातीचा इसम.

पद्या [म० पदर] पु० १ डोळ्यावर येतो तो पदर किं० येतें तें पटल. २ जखम बरी झाल्या-वर त्याचेवर धरते ती खपली. ३ पापुद्रा.

पंधरकी [म० पंधरा] स्त्री० १ पंधरा वस्तूंचा समुदाय किं० समूह. २ पंधरा विघ्याचे जे जमीनीचें परिमाण तें. ३ पंधरा माणसें करावयाला लागतील असें काम.

पंधरा [म० पांच+दहा] वि० एक, दोन, तीन, इ० जे क्रमांक त्यांतील चवदाच्या पुढचा आणि सोळाच्या मागचा जो क्रमांक त्याच्या परि-माणाइतका. ॐ **पंधरवडा पु०** १ हिंदू महि-न्याचा एक अर्ध; पौर्णिमेपासून अमावास्येपर्यं-तचा किं० अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंतचा हिंदू म-हिन्याचा भाग. २ दोन आठवडे हा अवधि.

पंधाड, पंधें, पद्दें न० एक प्रकारचें खरख-रीत गवत. मागें ' पद्दें ' पहा. [जात.

पनवेल (– ळ) स्त्री०, पु० तांदुळाची एक

पनस [सं०] पु० फणस हें कांटेरी फळ.

पना पु० एक झाड.

पनाळ, पनाळी इ० ' पन्हळ, ' ' पन्हाळी ' [खवा. इ० पुढें पहा.

पनेर, पनेरी, पन्हेर [फा० पनेर] स्त्री०

पन्नग [सं०] पु० साप; नाग.

पन्ना पु० हिरव्या रंगाचा एक मणि.

पन्नास वि० पांच दसकड्या किं० दहा पंच-कड्या इतक्या परिमाणाचा. ॐ **पन्नाशी स्त्री०** १ पन्नास वर्षांचें वय. २ पन्नास पदार्थांचा समुदाय किं० गट.

पन्याकार पु० अ० व० १ पदार्थ रुचकर लागावा म्हणून त्यांत मालमसाला इ० घालणें (करणें). २ जेवण चवीनें जावें म्हणून जीं नाना प्रकारें खाद्यें, पेयें, व्यंजनें, इ० करतात तीं. ३ कोणतेंही काम करतांना त्यांत जे छांदिष्टपणाचे किं० चोखंदळपणाचे प्रकार करतात तें. ४ खाण्या-पिण्याच्या बाबतींत ज्या कोणेकाच्या लहरी त्या.

पन्हळ, पनळ [सं० प्रणाली] पु० १ पाट; नळ; पाणी इ० वहावयाची सरणी. २ पाणी इ० विविष्ट मार्गानें वहावें म्हणून दगड, विटा, इ० नीं बांधून काढलेला चर, किं० धातू इ०ची बनविले-ली नळी. ३ वरील दोन्ही अर्थांनीं वाहलेलें जें पाणी इ० तें. ४ पाणी इ० सतत वाहात असल्या-मुळें जमीन, डोंगर, यांमध्यें पडतो तो चर. ५ कोण-त्याही लांबट पदार्थाचा कडांना समान्तर असा खोलगट भाग. ॐ **पन्हळी कौल न०** घराच्या कुडावर पडलेलें पावसाचें पाणी वाहून जावें म्हणून जें मोठें आणि लांबोडें आणि मध्यें खोलगट असें केलेलें असतें तें कौल.

पन्हा [फा० पहन्] पु० विणलेल्या वस्त्राची रुंदी.

पन्हाळी स्त्री० मणि करावयाचें सोनार लोकांचें एक आउत; याला ' मणी घोळणी ' असेंही म्हणतात.

पन्हें न० १ आंबे भाजून त्यांचा गर पाण्यांत कोळून त्यांत साखर, वेलदोडे, इ० मसाल्याचीं द्रव्यें घालून करतात तें पेय. २ चिंच, लिंबू, इ० चें साखर इ० घालून करतात तें पेय.

पन्हेर, पन्हेरी [फा० पनेर] स्त्री० अनेक बीजें प्रथम एके ठिकाणीं रुजवून नंतर त्यांचीं आलेलीं जीं रोपें तीं तेथून उपटून दुसरीकडे विरळ विरळ लावावयासाठीं नेतात तीं रोपें समुच्चयानें किं० तीं रोपें ज्या वाफ्यांत तयार केलेलीं असतात तो वाफा.

पन्हेरी [म० पन्हें+घर] स्त्री० मार्गानें जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना पाणी ज्या घरांत दिलें जातें तें मार्गावर मुद्दाम बांधलेलें घर.

पप उ० वा० अ० गाडी, नांगर, इ० हाक-णारे लोक उजव्या हाताकडच्या बैलाला जलद चालण्याविषयीं इशारत ' पप ' ह्या शब्दानें कर-तात. डाव्या हाताकडच्या बैलाला अशीच इशा-रत ' मप ' ह्या शब्दानें ते करतात.

पपई खालीं ' पपैया ' पहा.

पपन्नस, पपनस, पपणीस पु० एक फळ; ह्याची साल फार जाडी असते. **स्त्री०** ह्या फळाचें झाड.

पपिता पु० एक औषधी झाड. ह्याचीं बीजें इगवण इ० आजारांवर योजितात.

पपैया पु०, पपई, पोपई स्त्री० एक फळ, किं० त्याचें झाड. ह्याचीं पानें एरंडाच्या पाना-सारखीं असतात.

पय [**सं०** पयस] **न०** १ दूध. २ पाणी. ❀ **पयोद, पयोवाह पु०** मेघ. **पयोधर पु०** १ मेघ. २ स्त्रीचा स्तन. ३ गाई, म्हशी, इ० चें अंचोळ किं० कास. **पयोधि, पयोनिधि पु०** समुद्र. **पयोव्रत न०** फक्त दूध पिऊन राहाण्याचें व्रत. **पयस्विनी स्त्री०** १ दुभती गाय किं० म्हैस. २ नदी. ३ सुवासिनीच्या और्ध्वदेहिक विधीत ब्राम्हणाला देतात ती दुभती गाय.

पयाळ स्त्री० गलबत, होडी, इ० वर असतें तें कपाटासारखें बारदान.

पयाळ, पयाळू, पायाळ, पायाळू वि० जन्म-समयीं प्रथम ज्याचे पाय मातेच्या उदरांतून बाहेर येतात असें (मनुष्य). अशा मनुष्यास विजेपासून भीति असते, आणि अशा माणसास चोर उमगून काढतां येतो अशी समजूत आहे.

पयेण, पद्याण न० गुरांना खावयासाठीं कापून उन्हांत वाळविलेलें गवत.

पर, परी [**सं०** प्रकार] **स्त्री०** १ कोणे-काची बोलण्या चालण्याची किं० पोशाख इ० करण्याची तऱ्हा, पद्धति, किं० सरणी. २ खाद्यें, पेयें, इ० तील जे वेगळे वेगळे प्रकार ते प्रत्येक. ❀ **परीचा वि०** विलक्षण; असाधारण; नवीन तऱ्हेचा. **परीप्रकारचा वि०** अनेक पदार्थ किं० पदार्थांचे वेगळे वेगळे प्रकार ज्यांत आहेत असा. **परीप्रकारें क्रि० वि०** अनेक प्रकारांनीं; उ० मी त्याला परीप्रकारें सांगून पाहिलें पण तो ज्याचें नांव तें ती वस्तु पथकरावयाला तयार होत नाहीं.

पर [**सं०**] **वि०** १ निराळा; दुसरा; भिन्न; उ० परदेश, परधन, परमुलूख, पराठिकाण. २ पलीकडील. ३ पुढचा; नंतरचा. ४ वरचा; वरच्या दर्जाचा. ५ श्रेष्ठ; उत्कृष्ट. **पु०** १ परका. २ शत्रु. ३ आपलें अकल्याण चिंतिणारा किं० करणारा. ४ उच्च ध्येय; मनानें उत्कृष्ट म्हणून साध्य करावयाची ठरविलेली वस्तु; उ० ध्यानपर म्ह० ध्यान हें आहे उच्च ध्येय ज्याचें असा म्ह० ध्यानांत निमग्न किं० ध्यानस्थ. ५ परमात्मा. ६ विष्णु. ७ ईश्वर. ८ शत्रूच्या पक्षाचा मनुष्य. **न०** १ ब्रम्ह. २ मोक्ष. ३ परलोक. ४ तीर्थादि पवित्र स्थळ. **उ०अ०** १ परंतु. २ आणखी असें कीं. **क्रि० वि०** अत्यन्त. ❀ **परान्न न०** १ दुस-ऱ्याचें अन्न. २ दुसऱ्याच्या घरचें जेवण. **परान्नं प्राणसंकटं** [**सं०**] दुसऱ्याच्या घरीं जेवावयास जाणें हें भारी त्रासदायक असतें. **परान्नपुष्ट वि०** लोकांच्या घरीं जेवणारा किं० जेवून पुष्ट झालेला किं० माजलेला. **परान्नरुचि वि०** दुसऱ्याच्या घरीं जेवणें ज्याला आवडतें असा. **परचक्र न०** १ दुस-ऱ्या देशच्या राजानें एकाद्या देशावर केलेली स्वारी. २ शत्रूचें सैन्य. **परापर वि०** १ मागचें आणि पुढचें. २ कमी किं० ज्यास्ती. ३ खालचा वरचा; उच्च नीच. **परायण वि०** १ तत्पर. २ निमग्न. **न०** १ निष्ठा; भक्ति. २ आश्रय; आश्रय-स्थान. ३ ध्येय; साध्य. **परार्थ पु०** १ मोक्ष. २ दुसऱ्याचें हित किं० कल्याण. **परार्थ क्रि०वि०** दुसऱ्यासाठीं. **परार्ध न०** १ उत्तरार्ध. २ एक, दहा, शंभर, इ० श्रेणींतील अठराव्या स्थानची संख्या. **परार्ध्य वि०** १ श्रेष्ठ. २ मोल्यवान्. **पराण्ह पु०** दुपार. **परायत्त वि०** पराधीन. **परतंत्र वि०** १ पराधीन. २ दुसऱ्याच्या तंत्रानें किं० लहरीनें ज्याला वर्तावें लागतें असा. **परंतप वि०** शत्रूस जिंकणारा किं० छळणारा. **पु०** योद्धा. **परपुष्ट, परभृत पु०** कोकिळ. **परब्रम्ह न०** १ उच्चतम जें ब्रम्ह तें. २ कोणेकाला वाटत असते ती अत्यन्त महत्त्वाची किं० मूल्यवान वस्तु. **परलोक पु०** स्वर्ग; मरणानंतर मिळणारा लोक. **परलोक-विधि पु०** और्ध्वदेहिक जें क्रियाकर्मान्तर केलें जातें तें. **परकाय (–या–) प्रवेश पु०** मंत्रादि सामर्थ्यानें आपल्या देहांतून निघून एकाद्या प्रेतांत किं० दुसऱ्याच्या जिवंत शरीरांत प्रवेश करणें. **परकोट पु०** किल्ल्याच्या तटबंदीच्या बाहेरच्या बाजूस बांधलेली दुसरी भिंत. **परत्र क्रि० वि०** १ दुसऱ्या ठिकाणीं. २ मरणानंतर मिळणाऱ्या लोकीं. **परनिष्ठ वि०** १ ईश्वराच्या ध्यानांत काळ घाल-विणारा. २ लोकांसंबंधानें सहानुभूति किं० कळ-वळा ज्याला आहे असा. **परनिष्ठा स्त्री०** १ ईश्व-

राचें ध्यान करण्याची आवड. २ सहानुभूति. **परद्वार** **न०** लग्नाच्या स्त्रीहून अन्य स्त्रीशीं संग. **परद्वारी** **वि०** व्यभिचारी. **परधन** **न०** १ दुसऱ्याचें म्ह० आपलें नव्हे तें धन. २ कन्यारूप अपत्य. **परपुरुष** **पु०** स्त्रियांस आपल्या पती व्यतिरिक्त जो अन्य पुरुष तो. **परस्वाधीन** **वि०** १ दुसऱ्याच्या तंत्रानें ज्याला वागावें लागतें असा. २ आपल्या इच्छेप्रमाणें न होणारी (गोष्ट). ३ दुसऱ्याच्या ताब्यांतील. **पराकाष्ठा** **स्त्री०** परमावधि; कांहीं एका गोष्टीच्या अतिशयितपणाची शेवटची दशा,–जी पुढें अतिशय होण्याची मर्यादा राहिली नाहीं ती; उ० यंदा पराकाष्ठेची महागाई झाली. **परपाकरुचि** **वि०** दुसऱ्याच्या घरीं भोजनें एकसारखीं झोडण्याची ज्याला आवड फार असा. **परपांडित्य** **न०** अमुक करावें असें दुसऱ्यास सांगणें (स्वतः वेगळें वर्तन करून). **परघर** **न०** खालीं स्वतंत्रपणें पहा.

पर [**फा०**] **पु०** पक्ष्याचें पीस. ❀ **कोणेकाला पर फुटणें** १ तो स्वच्छंदानें आणि अव्यवस्थितपणें वागूं लागणें. २ त्याला आश्रयदाता किं० मदतनीस भेटणें. **पर लावून** **क्रि० वि०** वेगानें; जलदीनें (जाणें, येणें, पळणें, इ०). **पराचा कावळा** **पु०** क्षुल्लक गोष्टीला दिलेलें मोठें किं० भयंकर स्वरूप (करणें). **पराचा लखोटा** **पु०** जलदीनें पोचतें करण्यासाठीं महाराच्या हवालीं केलेलें पत्र. ह्या पत्राला पीस बांधलेलें असतें,–महारानें पक्ष्याप्रमाणें पळत जावें हें त्याला सुचविण्यासाठीं.

परकर, परकोर [**सं०** परिकर] **पु०** लहान मुलींना नेसण्यासाठीं खण इ० चीण घालून शिवतात तो.

परकळा, परकाळा [**फा०** परकाला] **पु०** १ एक प्रकारचें विणलेलें वस्त्र. २ वस्त्राची चिंधी. वाभाडा. ३ खीर दाट करण्यासाठीं घालतात तें पीठ इ०. ❀ **कोणेकाच्या संसाराचे** (किं० **द्रव्याचे**) **परकाळे होणें** त्याच्या संसाराचा (किं० द्रव्याचा) विध्वंस किं० नासाडी होणें. **कोणेकाच्या जिवाचे परकाळे होणें** तो अति विपन्न दशेस येणें; तो दुःखीकष्टी स्थितीस पोचणें.

परका, परखा, परकी [**सं०** परकीय] **वि०** १ वेगळा. २ भिन्न जातीचा किं० देशाचा. ३ अपरिचित; तिऱ्हाईत; अनोळखी. ❀ **परकाई, परखाई** **स्त्री०** परकेपणा; तिऱ्हाईतपणाची वागणूक.

परकाळा वर ' परकळा ' पहा.

परकी **वि०** वर ' परका ' पहा.

परकीय [**सं०**] **वि०** १ जें आपलें नव्हे तें; दुसऱ्याचें. २ बाहेरचें.

परकीया [**सं०**] **स्त्री०** दुसऱ्याची पत्नी.

परकोर वर ' परकर ' पहा.

परखंडा [**सं०** पर + **म०** खंडणें] **पु०** ज्याचें अग्र कापून टाकलेलें आहे असें केळीचें पान.

परगणा [**फा०** परगनाह्] **पु०** १ जिल्हा किं० मोठें शहर यांचे नांवाखालीं मोडतो जो प्रान्त किं० देशाचा विस्तार तो. २ (**लक्षणेनें**) कामाचा, व्यवहाराचा, अभ्यासाचा, किं० स्वयंपाकाचा पसारा; उ० राम्या, पुरे झाला तुझा अभ्यास ! साऱ्या माजघरभर तुझीं पुस्तकें पसरलीं आहेत, आवर हा परगणा !

परघर [**सं०** पर (दुसऱ्याचें) + **म०** घर] **न०** १ दुसऱ्याचें घर; आपलें नव्हे असें घर. २ व्यभिचार,–लग्नाच्या बायकोचा परपुरुषाशीं किं० नवऱ्याचा परक्याच्या पत्नीशीं. तिनें किं० त्याणें परघर पाहाणें (रिघणें किं० शिरणें) असा प्रयोग होतो. ३ कारणपरत्वें दुसऱ्याच्या घरीं राहाणें किं० राहाण्याची आवश्यकता. ❀ **परघरनिवारण** **वि०** दुसऱ्यापाशीं याचना करण्याचा प्रसंग न येईल इतक्या किंमतीची कोणी दिलेली किं० आपल्याजवळ असलेली वस्तु,–केवळ गरज भागविणारी.

परचुरण [**सं०** परि + चूर्ण] **न०** १ अनेक देशचे चलनी रुपये ह्या नाण्यांची खिचडी किं० गल्लद; अनेक प्रकारचे एकत्र ठेविलेले रुपये. २ मोडकीं किं० फुटकीं भांडींकुंडीं, दागिने, इ० चा समूह. ३ अनेक प्रकारच्या सटरफटर वस्तु. **टीप**,–मोडक्या तुटक्या दागिन्यांना ' रेजगण ' असा शब्द आहे.

परज **पु०** १ तरवारीची मूठ. २ ढालीची मूठ. ३ गायनांतील एक राग. [शब्द).

परजकुंवर **पु०** पुष्यनक्षत्र (शेतकऱ्यांत रूढ

परजणें स० क्रि० तरवार, पट्टा, इ० चीं मूठ हातांत धरून कांपित करणें किं० आपल्या अंगाभोंवतीं फिरविणें.

परंजय, परंजल (–ळ) [सं० 'प्रांजल' चा अपभ्रंश] वि० निष्कपट; साधा; सरळ; प्रामाणिक.

परटवणें [म० परीट] न० परटाकडे धुवावयास द्यावयाचें वस्त्र किं० परटाकडून धुवून आलेलें वस्त्र किं० वस्त्रें.

परटी [म०परीट] वि० परटानें धुवून आणलेलें (चिरगूट).

परटीण [म० परीट] स्त्री० परटाची बायको किं० धुण्याचा धंदा करणारी स्त्री किं० परीट ह्या जातीची कोणीही स्त्री.

परटीस [म० परीट] क्रि० वि० परटाकडे (देणें, टाकणें, घालणें).

परटीहून [म० परीट]क्रि० वि० परटीकडून (धुवून आलेलें किं० आणलेलें वस्त्र).

परड पु० सर्पासारखा एक प्राणी.

परडी स्त्री० १ बांबूच्या पातीची केलेली टोपली. २ धान्याचें पीक कापून गोळा करण्याचें वेळीं देवी किं० पिशाच यांना फुलें, बकऱ्याचें मांस, इ० पदार्थ परडींत घालून अर्पण करतात ते समुच्चयानें. ❀ **परडूल** न० १परडी (तुच्छतेनें). २ लहान परडी.

परडें न० १ तराजूच्या दांडीच्या दोन्ही टोकांना लोंबत सोडलेलीं असतात जीं दोन खोलगट पात्रें तीं प्रत्येक. ह्या दोन पात्रांपैकीं एकांत तोलावयाचा पदार्थ आणि दुसऱ्यांत वजन घालतात. २ शिंप इ० चीं जीं दोन अर्धुकें त्यांपैकीं प्रत्येक. ३ पळी, चमचा, इ० च्या एका टोकाकडचा खोलगट भाग. ४ लाकूड कोरून केलेलें लहानसें बारदान.५घराच्या भोंवतालचें आवार,– विशेषत: मागल्या बाजूचें. ६ शेताचें पीक काढतेसमयीं देवी किं० पिशाच यांना अर्पितात तो बळी. ❀ **कोणेकाचें परडें** (किं० **पारडें**) **जड होणें** १ तो उत्कर्षास चढणें. २ तो पैसा, अधिकार, इ० नीं उन्मत्त होणें. **कोणेकाचें परडें बसणें** (किं० **उतरणें**) १ त्याचा दर्जा किं० वैभव कमी होणें. २ त्याचा नक्षा उतरणें.

एका तागडीचीं परडीं न० अ० व० दोन सारखीच वाईट माणसें.

परणाली [सं० प्रणाली] स्त्री० १ जलादीचा प्रवाह किं० अशा प्रवाहानें जमीन इ० मध्यें पडलेला चर. २ कांहीं कामाची व्यवस्थित सरणी.

परत क्रि० वि० १ एखादा माणूस जिकडून आला तिकडे (पुन्हा जाणें) किं० जेथून गेला तेथें (पुन्हा येणें). २ पुन्हा; पुनरपि. स्त्री० १ पदार्थाचें पुनरागमन किं० पुनर्गमन; पुन्हा येणें किं० पुन्हा जाणें; आपल्याकडे आलेली दुसऱ्याची वस्तु त्याला देणें किं० त्याची आपण घेतलेली वस्तु त्याला देणें; अशी पुन्हा दिलेली किं० घेतलेली वस्तु. २ खोटें म्हणून नाकारून ज्याचें त्याला दिलेलें नाणें. ३ एखाद्या वस्तूचें किं० कामाचें पुनर्निरीक्षण, अवलोकन, किं० परीक्षण. वि० उलट किं० पुन्हा दिलेलें, केलेलें, झालेलें, आलेलें, किं० गेलेलें. ❀ **परत आहेर** पु०लग्न इ० समारंभांत आपणास ज्या कोणी आहेर केला असेल त्याला आपण तसाच केलेला आहेर. **परतकूळ** न०, **परतवेल** स्त्री० ज्या घरीं आपण आपली मुलगी दिली ती जिवंत असतां त्याच घरची मुलगी आपल्या घरीं करणें हा प्रकार. **परत गोष्ट** स्त्री० विचारलेल्या प्रश्नाला उद्धटपणें किं० बरोबरीच्या नात्यानें दिलेलें उत्तर (सांगणें). **परत जवाब, परत जबाब** पु० उद्धटपणानें किं० बरोबरीच्या नात्यानें दिलेलें उत्तर; आपल्या दर्जाला न शोभेल असें उद्धट उत्तर. **परत जामीन** पु० ज्याच्याबद्दल आपण जामीन राहिलों तो आपणाशीं प्रामाणिकपणानें वर्तेल अशी आपली खातरी पटण्यासाठीं त्याच्याकडून आपण घेतलेला जामीन. **परत ताप** पु० बरा झालेला ताप पुन्हा येतो तो. **परत पंचाईत** स्त्री० पंचांनीं किं० पंचायतीनें दिलेल्या निकालाची तपासणी. **परत फैसला** पु० पुन्हा विचार करून किं० चौकशी करून दिलेला निकाल. **परत भाडें** न० कोणी गाडीवाला जेथें भाडें घेऊन गेला असेल तेथून तो परत स्वस्थानीं यावयाच वेळीं त्याला मिळालेलें भाडें. **परत वेळ** स्त्री० दुपार उलटून गेल्यावरची वेळ; सूर्य कलता झाल्यावरची वेळ.**परत हुंडी** स्त्री०नाकारलेली हुंडी.

परतणी [म० परतणें] **स्त्री०** १ परत करणें. २ पुन्हा तेच करणें किं० होणें; पुनरावृत्ति. ३ माघारें येणें किं० जाणें. ४ एका अंगावर किं० बाजूवर स्थित जो पदार्थ तो दुसऱ्या अंगावर किं० बाजूवर स्थित होणें किं० करणें.

परतणें अ० क्रि० १ पहिल्या ठिकाणीं जाणें किं० येणें. २ पूर्वीच्या स्थितीस जाणें. ३ ताप किं० कांहीं आजार बरा झाल्यावर तो पुन्हा येणें किं० पुन्हा सुरू होणें. ४ एक फेरा करून पूर्वस्थळीं येणें. ५ (सूर्य) कलता होणें म्ह० पश्चिम क्षितिजाकडे जाऊं लागणें. ६ (मध्यान्ह किं० मध्यरात्र) अतिक्रान्त होणें. ७ जुन्या किं० पूर्वीच्या मताकडे, पक्षाकडे, किं० बाजूकडे जाऊन मिळणें. ८ (गाय किं० म्हैस) प्रसूतीनंतर पुन्हा लवकर गाभण होणें. **स० क्रि०** १ वळविणें. २ खालची बाजू वर आणि वरची बाजू खालीं होईल अशा रीतीनें (पदार्थ) वळविणें. ३ उलटा करणें; वेगळा करणें; फिरविणें; बदलणें. ४ परत पाठविणें. ५ इकडचा तिकडे आणि तिकडचा इकडे ठेवणें, करणें, किं० घालणें. ६ (कांहीं खाद्य पदार्थ) घाईघाईनें तव्यावर, चुलीत, किं० निखाऱ्यांवर भाजणें किं० शेकणें.

परतव [म० परतणें] **न०** १ नांगराच्या एका फेरीत नांगरली जाईल इतकी जमीन. २ जमीनीची चिंधोटी किं० लांबलचक पट्टी.

परतवण [म० परतणें] **न०** वधूचें बापाच्या घरून पतीच्या घरीं परत जाणें.

परतळणें, परताळणें, परतळा, परताळा मागें ' पडतळणें, ' ' पडताळणें, ' ' पडतळा, ' ' पडताळा ' पहा.

परता [सं० पर] **वि०** पलीकडचा, तिकडचा. अरता म्ह० आलीकडचा, इकडचा.

परता [सं० परत] **क्रि० वि०** (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) १ पलीकडे; दुसऱ्या बाजूस. २ तुमची इच्छा असल्यास. ३ कृपाकरून. ४ कसेंही करून. ह्या शेवटल्या तीन्हीं अर्थाचीं उदाहरणें; जा परता; त्याला अगोदर वाढीनास परती; शेंबूड शिंकरून टाकीनास परता; इ०. **श० यो० अ०, क्रि० वि०** पेक्षां; उ० रामापरता सदाशिव बरा; उ० पितळेंपरतें तांबें चांगलें.

परतान मागें ' परतन ' पहा.

परंतु [सं० परं + तु] **उ० अ०** तथापि; तरी देखील. **टीप,**–पूर्वविधान मान्य करून त्यांत कांहीं कमीपणा दाखवावयाचा असतां 'परंतु' चा उपयोग केला जातो; उ० विष्णु बुद्धिमान् आहे परंतु तो अभ्यास करीत नाहीं.

परत्वें [सं० परत्व] **श० यो० अ०** मुळें; ०च्या कारणानें; ०च्या अपेक्षेनें किं० उद्देशानें; ०च्या मानानें; उ० देशपरत्वें, कालपरत्वें, कारणपरत्वें, वयःपरत्वें, इ०.

परंपरा [सं०] **स्त्री०** १ ओळ; रांग; पंक्ति. २ मागपासून चालत आलेली रीति किं० सरणी. ३ समूह. ꣸ **शिष्यपरंपरा स्त्री०** मुख्य किं० पहिला जो गुरु त्यानें एक शिष्य तयार करावा, ह्या शिष्यानें दुसरा तयार करावा, ह्या दुसऱ्यानें तिसरा तयार करावा असा क्रम. **वंशपरंपरेनें क्रि० वि०** बापापासून मुलाकडे, मुलाकडून त्याच्या मुलाकडे म्ह० पहिल्याच्या नातवाकडे, अशा सरणीनें. **परंपरागत, परंपरायात वि०** परंपरेनें आलेलें किं० मिळालेलें. **परंपराविटाळ पु०** एकाचा दुसऱ्यास, दुसऱ्याचा तिसऱ्यास, तिसऱ्याचा चवथ्यास, असा झालेला विटाळ. **परंपरासंबंध पु०** आपला जो संबंधी त्याच्याशीं ज्याचा संबंध त्याचा आणि आपला जो संबंध तो.

परपार [सं०] **पु०** पलीकडचा कांठ किं० तीर.

परबाण, परभाण [हिं० पर्वान्] **न०** ज्या काठीस शीड बांधून डोलकाठीवर चढवितात ती काठी.

परभारां, परभारें, परभारीं क्रि० वि० १ ज्याची संमति मिळविणें किं० अनुमोदन घेणें किं० ज्याला कांहीं गोष्ट कळविणें जरूर आहे त्याची संमति न मिळवितां किं० त्याचें अनुमोदन न घेतां किं० त्याला न कळवितां. २ नेहेमींचा क्रम किं० शिरस्ता सोडून. ३ बाहेरच्या बाहेर; तिकडच्या तिकडे. ४ ०च्या पाठीमागें.

परम [सं०] **वि०** १ उच्च; उत्कृष्ट. २ श्रेष्ठ; मुख्य. ३ वरच्या पायरीचा. **क्रि० वि०** अत्यन्त. ꣸ **परममर्यादा स्त्री०, परमावधि पु०** पराकाष्ठा. **परमाणु पु०** उन्हाच्या कवडशांतील एका कणाचा तीसावा अंश. **परमान्न न०** १ खीर. २ पक्वान्न.

परमार्थ पु० १ खरेपणा; सत्यत्व. २ ईश्वरी ज्ञान. ३ उच्च हेतु. ४ ईश्वरसाधनरूप जो पुरुषार्थ तो. ५ कांहीं एका गोष्टींतील अगदीं खरा असा जो अंश तो; वस्तुस्थिति; वस्तूचें खरें स्वरूप. ६ सत्य सांगण्याच्या बुद्धीनें जें सांगितलें तें. **परमहंस पु०** संन्याश्यांचा एक भेद. **परमात्मा पु०** सर्वव्यापी, सर्वसाक्षी, समष्टिस्वरूप जो आत्मा तो. **परमायु न०** त्या त्या प्राण्याची जी आयुष्याची अगदीं पराकाष्ठेची मर्यादा ती. **परमेश्वर पु०** जग उत्पन्न करणारा ईश्वर.

परमणी स्त्री० वेलीवर काढलेलीं सुतें सोडवून साफ करणें; परमणी केल्यावर कांडी पाजणी, मांडणी, पोपती, इ० संस्कार ह्या सुतांवर करतो.

परमा पु०, परमें न० [**सं०** प्रमेह] एक वातरोग.

परमाठीव वि० पूर्णपणें गुळगुळीत केलेला (धोंडा).

परमातखाऊ [**सं०** परमार्थ + **म०** खाणें] **वि०** निरुद्योगीपणांत काळ घालवून दुसऱ्याच्या खर्चीं भोजनें उकळण्याचा धंदा करणारा आणि भूमीला भारभूत झालेला (मनुष्य).

परमान [**हिं०** परवान] **न०** मागें ' परवाण ' पहा.

परमें [**सं०** प्रमेह] **न०** वर ' परमा ' पहा.

परवचा, परवाचा [**म०** परवा म्ह० कालच्याच्या मागच्या दिवशीं शिकलेला धडा] **पु०** १ पूर्वीं शिकलेली उजळणी, पाडे, इ० शाळेंत विद्यार्थ्यांकडून रोज म्हणवून घेतात ते समुच्चयानें (**क्रि०** म्हणणें). २ कोणी स्वतासंबंधानें सांगतो ती प्रौढीची आणि लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत (सांगणें, लावणें). **टीप,**— पहिल्या अर्थानें ' परवड ' **स्त्री०**,आणि 'परवता' **पु०** अशींही रूपें आहेत.

परंवट, परंवटा पु० लहान मुलीच्या साडी नेसण्याचा एक प्रकारविशेष,—यांत साडीचा पदर डोक्यावरून किं० खांद्यावरून घ्यावयाला न उरवितां तो कंबरेभोंवतीं गुंडाळलेला असतो आणि साडीच्या निऱ्यांची पोटावर केळ्याच्या आकाराची रचना केलेली असते. ह्या रचनेला ' परंवट 'किं० ' परंवटा ' असा शब्द आहे. अशा प्रकारें साडी नेसणारी मुलगी ' परवंटी, ' ' परवंटकरी, ' किं० ' परवंटकरीण. ' मुलगी मोठी झाल्यावर ती साडीचा पदर काढते तिला ' पदरकरी ' किं० ' पदरकरीण ' म्हणतात.

परवड स्त्री० १ खाण्यापिण्यांत चोखंदळेपणा. २ अशा चोखंदळेपणाच्या खाण्यापिण्यासाठीं केलेली विविध किं० तऱ्हेचीं खाद्यें आणि पेयें प्रत्येक. ३ छांदिष्टपणा; लहरी वृत्ति; उ० हा रघुनाथ परवडीनें जेवतो, बोलतो, पेहेराव करतो, इ०. ४ अव्यवस्था; गोंधळ; उ० मी घेटाला नोकरीवर दोन वर्षे गेलों होतों तेव्हां माझ्या मागें संसाराची अतोनात परवड झाली.५ आळीपाळी;क्रम,शिस्त; उ० आपल्या गांवांत एकच विहिर आहे, परवडीनें पाणी भरल्यानें सर्वांची सोय होईल. ६ तात्पुरता केलेला उपाय किं० योजना. ७ भिंत, विहीर, इ०च्या रचाईंत विटा,दगड, इ० चा एक एक थर; उ०ही पडदी पन्नास परवडींनीं पाटणीपर्यंत जाईल. ८ हकीगतीचा पाल्हाळ (लावणें, मांडणें); उ० तुला काय मागावयाचें आहे तें थोडक्यांत सांग, उगीच परवड लावूं नको. ९ परवचा; वर ' परवचा ' पहा.

परवड स्त्री०, परवता पु० वर ' परवचा ' पहा.

परवडणें अ० क्रि० मान्य होणें; सोयीचा असणें; गरज भागविणारा असणें; उ० पांच रुपयांना ही साडी विकणें तुला परवडत असेल तर दे; उ० हा पत्रावळी विकण्याचा धंदा मला परवडत नाहीं.

परवणी स्त्री० मागें ' परमणी ' पहा.

परवणें अ० क्रि० कण्हणें (आजाऱ्यानें).

परवत, पर्वत पु० १ व्यापार; व्यवहार. २ व्यापार,व्यवहार, इ० चा पसारा. **श० यो० अ०** साठीं; निसबत; उ० आत्मकार्यापरवत (म्ह० स्वतासाठीं किं० स्वताच्या कामासाठीं).

❀ **परवतसंबंधीं क्रि० वि०** व्यवहाराच्या सरणीनें किं० संबंधानें; व्यवहारांत.

परवता पु० मागें ' परवचा ' पहा.

परवर पु० १ घराची जमीन म्हणजे चोपून सपाट केलेली भुई. २ खळ्यावरचें धान्य भरून नेल्यानंतर खळ्यावर जे धान्याचे दाणे राहिलेले असतात ते समुच्चयानें.हे धान्याचे दाणे महाराला

एक म्हणून यावयाचें असतात. ३ विहिरींच्या सभोंवतीं केलेली असते ती फरसबंदी जमीन. ४ जमीनीच्या पोटांतील माती, रेती, दगड, इ० चे जे थर असतात ते प्रत्येक.

परवर [हिं० परवर] **न०** पडवळ हें भाजीचें फळ. **स्त्री०** ह्या फळाची वेली.

परवरीस, परवरशी, परवस्ती [फा० परवर्ष] **स्त्री०** १ संगोपन; संरक्षण. २ कोणकाला दिलेला आश्रय.

परवा पु० पाण्याचा पाट.

परवा [**फा०**] **स्त्री०** १ काळजी; चिंता; विवंचना; उ० हें काम माझ्याकडे लागलें त्याची तुम्ही परवा करूं नका. २ कोणा माणसाला किं० गोष्टीला दिलेलें महत्त्व किं० त्याच्याबद्दल वाटत असते ती भीति; उ० मला काय तुझी परवा ? **टीप**:– वरील सर्व अर्थी नकारात्मक किं० नकार-रूप प्रयोग बहुधा होतो.

परवां, परव्हां [**सं०** परश्वः] **क्रि० वि०** १ कालच्याच्या मागच्या दिवशीं. २ उद्याच्या पुढच्या दिवशीं. ❀ **परवाचा पु०** पूर्वी शिकलेले पाढे इ० मुलें रोज संध्याकाळीं उजळणी म्हणून म्हणतात ते समुच्चयानें. मागें ' परवचा ' पहा. **परवां परवां क्रि० वि०** अगदीं थोड्या दिवसांच्या मागें.

परवानगी [**फा०**] **स्त्री०** अनुज्ञा. ❀ **परवानगी बरदार पु०** राजाकडून किं० कोणा बड्या माणसाकडून कोणेकाला जो कांहीं कामासाठीं परवानगी आणून किं० मिळवून देतो तो. **परवानगी रसवानगी स्त्री०** १ परवानगी. २ परवानगी मिळवून देणे किं० मिळविणें ह्या संबंधाचा खटाटोप.

परवाना [**फा०** परवानाह्] **पु०** १ कांहीं गोष्ट करण्याबद्दल कोणी अधिकाऱ्यानें कोणेकाला दिलेली अनुज्ञा किं० संमति (तोंडी किं० लेखी). २ लेखी अनुज्ञा ज्यावर लिहिली असते तो कागद किं० ती चिठ्ठी. ३ कोणेकाला कांहीं व्यापारी मालाची खरेदी किं० विक्री करण्याबद्दल दिलेली सनद. ४ लांबलचक हकीगत (गाणें, सांगणें).

परवार अ० पूर्वी व्यालेली गाय किं० म्हैस दुसऱ्या फळण्याचा वेळीं न फळतां राहणें ह्याला ' परवार जाणें ' म्हणतात.

परवारी पु० महार.

परवेशी, परवेस्ती स्त्री० वर ' परवरीस ' पहा.

परव्हा पु० अंगावर दूध पीत असलेल्या मुलाची आई पुन्हा गरोदर राहिली असतां तिच्या दुधानें त्या मुलाला जो अशक्तपणा किं० आजार येतो तो.

परव्हां क्रि० वि० मागें ' परवां ' पहा.

परव्हाण, परव्हान न० गाडी, बैल, घोडा, गाढव, इ० वाहतुकीचें साधन; उ० घोड्याच्या परव्हाणापेक्षा गाडीचें परव्हाण तुम्हाला स्वस्तें पडेल.

परशु [**सं०**] **पु०** १ कुऱ्हाड. २ कोणतेंही शस्त्र. ❀ **परशुराम, परशुधर पु०** दशवतारांपैकीं सहावा अवतार. **परशुराम क्षेत्र न०** सह्याद्रीच्या पश्चिमेकडील आणि आरबी समुद्राच्या पूर्वेकडील जमीनीचा पट्टा. हा समुद्रानें परशुरामाला दिला. त्याला त्या काळीं 'शूर्पारक देश' असें नांव होतें.

परस, परसूं न० घराच्या पिछाडीची जागा. ❀ **परसाकडे** मलविसर्जनास(जाणें). **परसांतील भाजी स्त्री०** सुसाध्य गोष्ट; नेहमींच्या परिपाठां-तील आणि विन कष्टाची कोणतीही गोष्ट. **परसदार न०** घराचें मागल्या बाजूचें दार.

परस [**सं०** पुरुष] **पु०, न०** पुरुषभर उंची किं० खोली म्हणजे सुमारें चार पांच हात.

परसविणें स० क्रि० मातीचें भांडें वापरावयाला योग्य करणें,–त्यांत पाणी तापवून किं० त्याला तुपाची वेरी फासून किं० दुसऱ्या कांहीं प्रकारांनीं.

परसा पु० शेकणें इ० कामासाठीं काटक्या कुटक्या, गवत, पानें, इ०ची पेटविलेली रास.

परसूं न० मागें ' परस ' पहा.

परस्त, परस्थ [**सं०** परस्थ] **वि०** १ दुसऱ्या गांवचा, देशचा, किं० ठिकाणचा. २ निःपक्षपाती; कोणत्याही पक्षाकडे ज्याच्या मनाचा ओढा किं० कल नाहीं असा.

परस्पर [**सं०**] **वि०** १ एकमेक. २ एक-मेकांशीं कांहीं नात्यानें किं० संबंधानें जुळलेले; उ० हे परस्पर सखे आहेत म्ह० हा त्याचा आणि तो ह्याचा मित्र. **पु० अ० व०** एकमेकांशीं तीच क्रिया करणारे दोघे; उ० परस्परांनीं परस्परांच्या थोबा-डांत मारलें. ❀ **परस्परं समर्पयामि** [सं० नै

अडाणी अर्थहीन अनुकरण] क्रि० वि० मुख्याला किं०मालकाला न कळवितां; बाहेरच्या बाहेर ;तिकडच्या तिकडे.

परस्पर, परस्परां, परस्परें [सं०] क्रि० वि० मागें ' परभारें ' पहा.

परस्मैपद [सं०] न० संस्कृत व्याकरणांत क्रियापदांना लावावयाच्या प्रत्ययांचे दोन वर्ग आहेत,–एकाला परस्मैपदाचे आणि दुसऱ्याला आत्मनेपदाचे प्रत्यय म्हणतात.

परळ पु०मातीचें पसरट पात्र,–जेवणें, भाकरी भाजणें,इ०च्या उपयोगाचें.**परळी स्त्री०**लहान परळ.

परळ पु० एक झाड.

परळी स्त्री० एक क्षेत्रविशेष; बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक येथें आहे. मागें ' ज्योति ' मध्यें ' ज्योतिर्लिंग पहा.

परा [सं०] **स्त्री०** शब्दाचें योगगम्य सूक्ष्म स्वरूप. परा, पश्यन्ती, मध्यमा, आणि वैखरी, अशीं शब्दांचीं चार स्वरूपें आहेत.⊛**परादिवाचा स्त्री०** १ सर्व प्रकारच्या शब्दांनीं विचाराचें प्रकटीकरण. २ वाणी सामान्यतः.

पराई [सं० पर + म०आई (प्रत्यय)] **स्त्री०** १ तारुण्य आणि वार्द्धक्य ह्या ज्या जीविताच्या दोन दशा त्यांपैकीं दुसरी. २ आयुष्याची वार्द्धक्य ही दशा; उतार वयाची स्थिति.

पराकाष्ठा स्त्री० मागें ' पर ' मध्यें पहा.

पराक्रम [सं०] **पु०** १ शौर्य. २ प्रयत्न; उद्योग. ३ मोठें कृत्य;शतकृत्य. ⊛ **पराक्रम करणें** (किं० **दाखविणें**) कांहीं मोठें किं० जोखमीचें कृत्य करणें.**पराक्रमी वि**०शौर्याचीं कृत्यें करणारा.

पराक्रान्त [सं०] वि० शत्रूनें जिंकिलेला.

पराग [सं०] **पु०** १ फुलांतील पुंकेसराचे रेणू. २ धूळ. ३ उटणें,–बुक्का इ०.४ (**ज्योतिष**) ग्रहण.

परागंदा [**फा०** परागंदाह्] **वि०** १ स्वदेश सोडून पळून गेलेला. २ पळून जाऊन बेपत्ता झालेला. ३ कोणत्याही कारणानें परदेशांत जाऊन राहिलेला किं० स्वदेशीं न राहिलेला. ४ उधळून लाविलेला. ⊛ **परागंदा जमीन स्त्री०** जिचा मालक निघून गेला आहे किं० बेपत्ता झाला आहे अशी जमीन.

पराङ्मुख [सं०] वि० १ पाठमोरा. २ नाकारणारा; नापसंत किं० अमान्य करणारा. ३ विमुख; निवृत्त. ४ विरुद्ध.

परांची स्त्री० उंच भिंत बांधावयाची असतां किं० तिला गिलावा इ० करणें असतां गवंडी इ० कामकऱ्यांना उभें राहण्यासाठीं जी खांब, फळया, इ० चीं तात्पुरती रचना केलेली असते ती.

पराजय [सं०] **पु०** १ पराभव. २ जिंकणें. ३ अभीष्ट न मिळणें. ४ फजीती. ५ वादादिकांत आलेली हार.

परांजल (–**ळ**) [सं० प्रांजल=सरळ,प्रामाणिक] **वि०** प्रामाणिक; सरळ; निष्कपट.

पराजित [सं०] वि० जिंकिलेला.

पराड, पराडी स्त्री० डोंगराची ओळ; पर्वताची रांग.

पराणी स्त्री० बैल, घोडा,इ०नी जलद चालावें म्हणून त्याच्या अंगांत टोंचतात ती टोंकणासारखी खिळी.

परात स्त्री० ताटाच्या आकाराचें उथळ पात्र-[विशेष.

परात्पर [सं०] **पु०** परमेश्वर.

पराधीन [सं०] **वि०** १ दुसऱ्याच्या तंत्रानें किं० लहरीनें ज्याला वागावें लागतें असा. २ आपल्या हातांत नसलेली (गोष्ट); दुसऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असलेली (गोष्ट).

परान्ह मागें ' पर ' मध्यें ' पराण्ह ' पहा.

पराभव [सं०] **पु०** १ पराजय; प्रतिपक्ष्यानें किं०शत्रूनें केलेला आपला पाडाव.२ मानहानि; मानखंडना.

पराभविणें [सं० पराभव;म० पराभव]**स०** क्रि० वादांत, कुस्तींत, किं० युद्धांत (कोणेकाला) चित करणें किं० हटविणें किं० त्याच्यावर सरशी मिळविणें.

पराभूत [सं०] वि० वादांत, युद्धांत, किं० कुस्तींत जिंकलेला किं० हटविलेला.

परामणी स्त्री० मागें ' परमणी ' पहा.

परामर्श [सं०] **पु०** १ धरणें; ओढणें. २ स्पर्शिणें. ३ हल्ला. ४ अडथळा. ५ विचार;मनन; चिंतन. ६ बलात्कार. ७ स्मरण. ८ तजवीज. ९ पक्षस्थ हेतूचें ज्ञान; अनुमितीस कारणभूत जें ज्ञान तें. १० पूर्वी सांगितलेल्या पदार्थाचा उल्लेख किं०

त्याचें ग्रहण; उ०'जो पढतो तो योग्यतेस चढतो'ह्या वाक्यांत ' जो ' ह्या शब्दानें उपात्त जो पढणारा माणूस त्याचा' तो ' ह्या शब्दानें परामर्श होतो. ॐ **कोणेकानें कोणेकाचा परामर्श घेणें** १ त्याच्या सुस्थितीसंबंधाची काळजी घेणें कि०जबाबदारी वाहाणें. २ त्याची चौकशी किं० विचारपूस करणें. **कांहीं खाद्य पदार्थाचा परामर्श घेणें** तो खाणें; तो मनमुराद खाणें; तो खाऊन संपविणें (थट्टेंत प्रयोग). **चोरादिकांचा परामर्श घेणें** त्यांना योग्य शासन करणें; त्यांचा बंदोबस्त करणें.

परायण [सं०] वि० मागें ' पर ' मध्यें [पहा.

पराया, पराय [सं० पर] वि० दुसऱ्याचें; दुसऱ्याच्या मालकीचें.

परायी मागें ' पराई ' पहा.

परार्ध [सं०] न० ब्रम्हदेवाचें अर्धे आयुष्य.

परावर्त पु०, **परावर्तन** न० [सं०] १ मागें फिरणें किं० वळणें. २ दुसरीकडे जाणें. ३ निवाडा किं० निर्णय बदलणें. ४ उलटापालट, उलथापालथ. ५ गरगर फिरणें. **परावर्तन** न० प्रकाशकिरण किं० ध्वनि यांणीं एकाद्या पृष्ठभागावर आदळून त्याशीं तितकाच कोन करून दुसऱ्या दिशेस वळणें. ॐ **परावर्त्य व्यवहार** पु० वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पुन्हा अर्ज करणें.

परावा [सं० पर] वि० १ दुसरा; तिऱ्हाईत; बाहेरचा. २ आपला नव्हे तो; परकीय. ३ आपलें अहित चिंतिणारा; आपला शत्रु किं० प्रतिपक्षी.

परास्त [सं०] वि० १ फेकून किं० हाकलून दिलेला. २ दूर सारलेला.

पराहत [सं०] वि० १ मारलेला. २ ठोकलेला. ३ कुटलेला; चिरडलेला.

पराही, पराई [सं० पर] स्त्री० मानवी आयुष्याचें एक अर्ध किं० उत्तरार्ध.

पराळ [सं० पलाल] न०पेंढा; कडबा; भातेण.

पराळ पु० भाकरी भाजण्याचें किं० जेवण्याचें शूद्रांचें ताटासारखें मृत्तिकापात्र; परळ.

परि [सं०] अ० हा उपसर्ग संस्कृतांत सभोंवार, अधिक, विरोध, अत्यन्त, अजमासें, इ० अनेक अर्थ दाखवितो. ' परि ' नें सुरू होणारे शब्द जे मराठींत आलेले आहेत ते खालीं वर्णक्रमानें दिले आहेत.

परिकर [सं०] पु० १ परिवार; लवाजमा. २ गर्दी; दाटी. ३ समुदाय. ४ कंबरपट्टा; काचा; कंबरबंध. ५ (**साहित्य**) गर्भित शब्दानें हेतूचें कथन. साभिप्राय विशेषणें योजिलीं असतां परिकर हा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० साठीं आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' हें पुस्तक पहा.

परिकर्म [सं० परिकर्मन्] न० १ अंगावर भूषणें इ० धारण करण्याची क्रिया. २ पूजा; सेवा; शुश्रूषा. ३ शुद्धि. ४ (**गणित**) संख्यांवर करण्याची कांहीं क्रिया. ह्या क्रिया आठ आहेत; बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, आणि घनमूळ. ह्या क्रियांना 'परिकर्माष्टक' म्हणतात.

परिकल्पन न०, **परिकल्पना** स्त्री० [सं०] १ ठरविणें. २ रचना; मांडणी. ३ तरतूद. ४ विभागणें. ५ सज्ज होणें किं० सज्ज करणें.

परिकीर्तन [सं०] न० १ सांगणें; निवेदिणें. २ जाहीर करणें. ३ बढाई.

परिक्रम पु०, **परिक्रमण** न० [सं०] १ हिंडणें; जाणें. २ सहल करणें. ३ प्रदक्षिणा; सभोंवतालीं हिंडणें. ४ कामाची सरणि, क्रम, किं० परंपरा.

परिखा [सं०] स्त्री० खंदक (किल्ला, घर, इ० च्या सभोंवतालचा).

परिखा, परखा [सं० पर] वि० दुसरा; तिऱ्हाईत; नवा. [पुरी मोजदाद.

परिगणन [सं०] न० १ गणणें; मोजणें. २

परिगणनीय [सं०] वि० हिशेबांत किं० विचारांत घेण्याच्या लायकीचा.

परिगृहीत [सं०] वि० मान्य केलेला; संमत असलेला; कबूल केलेला.

परिग्रह [सं०] पु० १ धरणें; पकडणें. २ धारण करणें. ३ वेष्टणें; गराडणें. ४ स्वीकार; संमत्ति; मान्यता; कबूली. ५ कोणेकाचा जमीनजुमला, द्रव्य, मालमत्ता, इ०. ६ विवाह. ७पत्नी. ८ कृपा; प्रसाद. ९ जमविणें; गोळा करणें. १० कोणेकाचा परिवार किं० लवाजमा. ११ जिला

मालक नाहीं अशी जमीन, विहीर, इ० चा नावा येणें.

परिघ [**सं०**] **पु०** १ दाराचा अडसर. २ अडथळा. ३ लोखंडाचे कांटे बसविलेला सोटा. ४ कुंपण; मर्यादेची भिंत. ५ सूर्य किं० चंद्र यांच्या-भोंवतीं पडतें तें खळें. ६ सत्तावीस योगांतील एकोणिसावा योग.

परिचय [**सं०**] **पु०** १ ओळख. २ ओळखीच्या योगानें एकाद्या माणसाच्या किं० पदार्थाच्या किं० कामाच्या संबंधानें प्राप्त होते ती माहिती. ३ तंबाखू, गांजा, इ० च्या सेवनाची सवय किं० सेवनाचा अभ्यास किं० त्यांच्या संबंधाची माहिती. ४ (**संस्कृतांत**) ढीग करणें; एकावर एक असे पदार्थ रचणें.

परिचरण, परिचर्य न०, परिचर्या स्त्री० [**सं०**] १ सेवा; चाकरी; शुश्रूषा. २ उपासना. ३ आचरण.

परिचायक [**सं०**] **वि०** पदार्थाचें स्वरूप निश्चयात्मक रीतीनें ठरविण्याचें कांहीं चिन्ह किं० लक्षण.

परिचार [**सं०**] **पु०** १ सेवा. पूजा. २ सेवक. ३ हिंडणें. ४ सभोंवती हिंडणें.

परिचारक [**सं०**] **पु०** सेवक; **परिचारिका स्त्री०** दासी.

परिचित [**सं०**] **वि०** १ माहीत असलेला. २ अभ्यास केलेला. ३ ओळखीचा; मित्रत्वाच्या किं० सलोख्याच्या संबंधाचा.

परिच्छिन्न [**सं०**] **वि०** १ परिमित; मर्यादित. २ मोजलेलें; मापलेलें. ३ वर्णनानें स्पष्ट केलेलें. **क्रि० वि०** १ (**मराठींत**) खात्रीपूर्वक; खचित; निश्चयानें; उ० मी परिच्छिन्न रुपये घेईन तेव्हां येथून उठेन. २ (**मराठींत**) स्पष्टपणें, असंदिग्ध रीतीनें (बोलणें, सांगणें). ३ (निषेध वाक्यांत) बिलकूल; अगदीं; कांहीं केल्या.

परिच्छेद [**सं०**] **पु०** १ कापणें. २ (ग्रंथाचा) भाग, अध्याय, इ०. ३ स्पष्ट लक्षण किं० वर्णन. ४ निश्चयरूप ज्ञान. ५ पदार्थाच्या स्वरूपाचें स्पष्टीकरण.

परिजन [**सं०**] **पु०** १ सेवक. २ नोकर-चाकर; कोणकाचे सर्व नोकर समुच्चयानें.

परिणत [**सं०**] **वि०** १ वाकलेलें, लोंबलेलें. २ वृद्ध. ३ पूर्ण वाढलेलें. ४ पिकलेलें(फळ इ०). ५ पक्व, प्रौढ (बुद्धि). ६ शेवटास गेलेलें (काम).

परिणति [**सं०**] **स्त्री०** १ वाकणें; कलणें. २ वाढ; विकास; परिपाक. ३ परिणाम; शेवट; समाप्ति. ४ वार्धक्य; उतार वय. ५ खाल्लेल्या अन्नादीचें पचन.

परिणय पु०, परिणयन न० [**सं०**] लग्न; [विवाह.

परिणाम [**सं०**] **पु०** १ बदल; पालट. २ अन्नादीचें जठरांत पचन. ३ फळ; शेवट; समाप्ति. ४ विकास; परिपक्व दशा. ❀ **वयःपरिणाम पु०** म्हातारपण; वार्धक्य. **वरिष्टाला खूप ठेवल्या-वांचून परिणाम नाहीं** म्ह० धडगत नाहीं किं० गत्यंतर नाहीं. **मला चारशें रुपये मिळालें नाहींत तर माझा परिणाम लागणार नाहीं** म्ह० माझ्यानें टिकाव धरवणार नाहीं. **परिणाम-शूळ पु०** १ खाल्लेलें अन्न पचूं लागलें असतां किं० पचून पोट रिकामें होऊं लागलें असतां पोट दुखणें ही व्यथा. २ मरणसमयीं अंगाचा होतो तो दाह. **टीप,**—ह्या दोन्ही अर्थी ' परिणामदाह ' असाही शब्द आहे.

परिणीत [**सं०**] **वि०** लग्न झालेली (स्त्री).

परितः [**सं०**] **क्रि० वि०** सभोंवतालीं.

परितुष्ट [**सं०**] **वि०** संतुष्ट; समाधान पावलेला; इष्ट वस्तु मिळाल्यानें तृप्त झालेला.

परितोष [**सं०**] **पु०** १ इष्ट किं० आवडती वस्तु मिळाल्यानें वाटतें तें समाधान; संतोष; तृप्ति. २ सुख; आनंद.

परित्यक्त [**सं०**] **वि०** सोडून किं० टाकून दिलेला; दूर केलेला किं० सारलेला.

परित्याग [**सं०**] **पु०** १ सोडून किं० टाकून देणें. २ टाकणें; वर्ज करणें. ३ देणें; दान करणें.

परित्राण [**सं०**] **न०** १ रक्षण; संरक्षण; संकटापासून बचाव.

परित्राता [**सं०** परित्रातृ] **पु०** १ रक्षण करणारा. २ जोपासना करणारा. ३ संकटाचें निवारण करणारा.

परित्वा, परीत्वा [**मराठी सं०**] **पु०, स्त्री०** व्यर्थ हेलपाटा किं० खेद; भटकंती; (**क्रि०** करणें,

पडणें);उ० तीन तास इतकी परिरक्षा करून सदोबा भेटला नाहीं तो नाहींच.

परिंद [सं० ' प्रवीण'चा अपभ्रंश] वि० हुशार; वाकबगार.

परिदान [सं०] न० १ अदलाबदल. २ मोबदला दिलेला पदार्थ. ३ ठेव परत देणें.

परिदाह [सं०] पु० १ ताप. २ दुःख.

परिदेवन [सं०] न० १ शोक; दुःख. २ विलाप: रडणें. ३ पश्चात्ताप.

परिधान [सं०] न० १ अंगावर वस्त्र धारण करणें,–नेसणें किंवा पांघरणें कि० अंगांत घालणें. २ नेसण्याचें वस्त्र. ३ तरवार इ० शस्त्राचें म्यान किं० कवच.

परिधि [सं०] पु० १ कुंपण; वई. २ चंद्र किं० सूर्य यांचे भोंवतीं पडतें तें खळें. ३ तेजाचें मंडल. ४ क्षितिज. ५ वर्तुळाचा परिघ. ६ स्थंडिला भोंवतालची समिध. ७ दिशा.

परिनाळिका [सं० प्रणालिका] स्त्री० १ पाट; नळ; पन्हळ. २ परंपरा. ३ कामाची सरणी, शिस्त, किं० परिपाटी. ४ (लाक्षणिक) लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट(लावणें, चालणें).

परिपक्व [सं०] वि० १ पूर्णपणें पिकलेलें (फळ इ०). २ पक्केपणीं भाजलेलें. ३ प्रौढ, प्रगल्भ (बुद्धि).

परिपाक [सं०] पु० १ पूर्णपणें किं० पक्केपणीं भाजणें किं० शिजणें. २ पचन (अन्नादींचें). ३ विकास; प्रगल्भ दशा. ४ परिणाम. ५ शास्त्रादि अभ्यासांत नैपुण्य. ६ केलेलें जें सत् किंवा असत् त्याचें भोगाला आलेलें फळ.

परिपाटी (–ठी) [सं०] स्त्री० १ पद्धति; सरणी; शिस्त; मागपासून चालत आलेला क्रम. २ व्यवस्था.

परिपाठ [सं०] पु० १ सविस्तर कथन. २ चालरीति. ३ वेद, शास्त्र, इ० चें पठन. ४ शिरस्ता; रावता; उ० नायकिणीचें गाणें ऐकायाला जाण्याचा आमचा परिपाठ नाहीं. ५ अमुक गोष्ट अमुक प्रसंगीं करण्याची बहुजनसमाजाची चाल. [सभोंवार.

परिपार्श्व [सं०] क्रि० वि० सर्व बाजूंनीं;

परिपालन [सं०] न० १ रक्षण. २ पालन पोषण; संगोपन. ३(विशिष्ट चाल,रीति, शिरस्ता, शिस्त, इ० व्रत, चें)अवलंबन किं० अनुसरण.

परिपुष्ट [सं०] वि० १ पूर्णपणें पोसलेला. २ यथेच्छ खाऊन लठ्ठ झालेला किं० माजलेला.

परिपूरण [सं०] न० १ भरणें; ठासून भरणें. २पूर्णतेस नेणें. ३ कमी असेल तें भरणें किं० पूर्ण करणें.

परिपूर्ण [सं०] वि० १ पूर्णपणें भरलेला. २ पूर्णपणें समाप्त केलेला किं० संपविलेला. ३ ज्यांत कांहीं न्यून राहिलें नाहीं असा. ४ तृप्त.

परिपूर्ति [सं०] स्त्री० १ पूर्णता. २ न्यून भरून काढणें. ३ तृप्ति.

परिप्लुत [स०] वि० १ ग्रस्त. २ व्याप्त. ३ खेचून आणि ठासून भरलेला. ४ विपुल प्रमाणांत भरलेला.

परिबर्ह [सं०] पु० १ परिवार; लवाजमा. २ सामान सुमान. ३ मालमत्ता. ४ अहेर; सन्मानार्थ दिलेला शेला, पागोटें, लुगडें, इ० पदार्थ.

परिभव [सं०] पु० १ निंदा; अनादर; तिरस्कार. २ पराभव.

परिभाषण [सं०] न० १ निंदा; निर्भर्त्सना. २ ताकीद; बजावणूक. ३ करार. ४ कोणेकाला मारलेला टोमणा; कुचकें भाषण.

परिभाषा [सं०] स्त्री० १ भाषण. २ संभाषण. ३ निंदा; निर्त्सर्भना.४नियम. ५ व्याख्या. ६ विशिष्ट जे शास्त्रीय शब्द ते प्रत्येक किं०समुच्चयानें. ७ निर्णायक नियम. ८ विशिष्ट ग्रंथांत योजलेल्या संक्षेपांची यादी.९पाणिणीचीं सूत्रें स्पष्टावणारें सूत्र. १० (वैद्यक) रोगाचिकित्सा.

परिभ्रमण [सं०] न० १ घिरट्या घालणें; सभोंवार हिंडणें. २ भटकणें. ३ गरगर फिरणें.

परिभ्रमणें [सं० परि+भ्रम्] अ० क्रि० १ सभोंवार हिंडणें. २ डोक्यांत (कांहीं विचार) घोळत राहाणें. ३ भटकणें.

परिमल (–ळ) [सं० परिमल]पु०१सुगंध. २ सुगंधी पदार्थ.३ सुगंधी पदार्थाचें मर्दन ४रतिसंभोग.

परिमाण [सं०] पु० १ मोजणें; मापणें; तोलणें. २ प्रमाण; इयत्ता. ३ वजन;माप. ४मोज-

दाद; गणती (तोळा, शेर, पायली, महिना, इ०). ५ आकारमान.

परिमार्गण [सं०] न० शोध; तपास.

परिमार्जन [सं०] न० १ धुणें; स्वच्छ करणें. २ धुवून, पुसून, किं० नाहींसें करून टाकणें. ३ क्रोध इ०चें निरसन किं० शमन. ४ पापाबद्दल प्रायश्चित्त.

परिमित [सं०] वि० १ मर्यादित. २ अल्प. ३ मापलेला; मोजलेला. ४ बेताबेताचा; फार मोठा किं० फार लहान नव्हे असा.

परिमिति [सं०] स्त्री० १ प्रमाण; माप. २ मर्यादा. ३ मर्यादा किं० सीमा दाखविणारी रेषा.

परिवर्जन [सं०] न० पूर्ण त्याग; अजीबात सोडून देणें.

परिवर्त [सं०] पु० १ फेरा; चक्कर. २ वाटोळी गति; भोंवतीं फिरणें. ३ आवृत्ति. ४ काल जाणें; काल उलटणें. ५ क्रांति; बदल; उलथापालथ. ६ युगाचा अंत. ७ मोबदला; अदलाबदल.

परिवर्तन [सं०] न० १ गडबडां लोळणें. २ वाटोळें फिरणें. ३ बदल करणें; फिरवाफिरव; उलथापालथ. ४ पुनः पुनः घडणें, होणें, किं० येणें.

परिवार [सं०] पु० १ सेवक जन. २ आश्रित मंडळी; लवाजमा.

परिवाह, परीवाह [सं०] पु० १ पूर; पाण्याचा लोट. २ प्रवाह. ३ पाण्याचा उच्छ्वास.

परिवेदन [सं०] न० ज्येष्ठ बंधूच्या अगोदर कनिष्ठाचें लग्न.

परिवेश [सं०] पु० १ वेष्टन. २ वस्त्र.

परिवेष पु०, **परिवेषण** न० [सं०] १ अन्न वाढणें. २ तेजाचें मंडल. ३ सूर्य किं० चंद्र यांचे भोंवतीं पडतें तें खळें. ४ परिघ. ५ बिंब.

परिवेषक [सं०] पु० १ जेवणारांस वाढतो तो; वाढपी. २ सेवक.

परिवेषण [सं०] न० १ जेवणारांना वाढणें. २ वेष्टणें; गराडणें.

परिवेष्टा [सं० परिवेष्टृ] पु० वाढपी.

परिशीलन [सं०] न० १ स्पर्श. २ संबंध; परिचय; दळणवळण. ३ एकाद्या विषयाचा अभ्यास.

परिशिष्ट [सं०] वि० उरलेला. न० १ मागाहून केलेली भरती किं० दिलेला जोड. २ जी माहिती मुख्य ग्रंथांत देण्याजोगी नसते किं० जी माहिती मुख्य ग्रंथांत गौणत्वानें द्यावयाची ती ग्रंथाच्या शेवटीं जी दिलेली असते ती.

परिशुद्ध [सं०] वि० शुद्ध; निर्दोष; मलरहित; निष्पाप.

परिशेष [सं०] पु० १ पुरवणी; पुस्ती; मागाहून दिलेला जोड किं० केलेली भरती. २ बाकी; शिलकीचा भाग. ३ वगळलेला भाग. ४ समाप्ति; पर्यवसान. ५ एका समुदायांतील कांहीं व्यक्ति वगळावयाच्या असतां त्यांचा मुळीच निर्देश न करतां ग्रहण करावयाच्या वस्तूंचाच निर्देश करणें आणि अशा रीतीनें अप्रत्यक्ष रीतीनें त्याज्य वस्तूंचा त्याग करणें.

परिश्रम [सं०] पु० १ थकवा. २ फार श्रम; एकाद्या कामीं केलेले कष्ट किं० सोसलेले श्रम. ३ शरीर कसण्याच्या उद्देशानें केलेले श्रम; व्यायाम.

परिश्रांत [सं०] वि० दमलेला; कष्ट पावलेला.

परिश्रुत [सं०] वि० विख्यात; प्रसिद्ध.

परिश्लेष [सं०] पु० आलिंगन.

परिषद् [सं०] स्त्री० १ सभा. २ धर्मांच्या बाबतींत निर्णय ठरविणाऱ्या मंडळीची सभा. ३ समुदाय; टोळी; मंडळी. **परिषद्य** [सं०] पु० सभासद.

परिषेक [सं०] पु० १ सेचन; शिंपडणें. २ [सेचनपात्र.

परिष्कर, परिष्कार [सं०] पु० १ शोभविणें; भूषविणें. २ भूषण; दागिना. ३ स्वच्छ किं० निर्मल करणें. ४ स्वयंपाक. ५ दोषाचें निरसन. ६ सामग्री. ७ न्यूनाधिक्यरहित लक्षण. ८ संस्कार.

परिष्कृत [सं०] वि० १ शोभविलेला; भूषविलेला. २ शिजविलेला; भाजून किं० शिजवून खावयास सिद्ध केलेला (पदार्थ).

परिष्यंद [सं०] पु० १ नदी. २ ओलावा. ३ पाझरणें.

परिष्वंग [सं०] पु० १ आलिंगन. २ [संबंध.

परिसंख्या [सं०] स्त्री० १ गणना; परिगणन. २ बेरीज. ३ विशिष्ट कथन. ४ वगळणें;

निरास. ५ (साहित्य) जी गोष्ट सर्वविश्रुत आहे ती जेव्हां मुद्दाम सांगितलेली असते तेव्हां तिच्यासारखी असणारी किं० भासणारी दुसरी गोष्ट त्याज्य करावयाची, आणि हीच घ्यावयाची असें श्रोत्याला कळवावें अशा उद्देशानें केलेलें जें विधान त्याला परिसंख्या म्हणतात; उ० श्रुतेंच कीं श्रोत्र न कुंडलानें साजे. परिसंख्येचे प्रकार, विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकाराचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

परिसणें [सं० परि+श्रु (ऐकणें)] स० क्रि० ऐकणें; श्रवण करणें.

परिसाविणें [म० ' परिसणें ' चें प्रयोजक] स० क्रि० ऐकविणें म्ह० सांगणें.

परिस्पंदन, परिष्पंदन [सं०] न० १ फुलें इ० नीं केश इ० शोभविणें; अलंकृत करणें. २ माळा गुंफणें. ३ परिवार; लवाजमा. ४ हलणें; हदरणें; कंपन.

परिस्फुट [सं०] वि० १ अगदीं स्पष्ट; उघड दिसून येणारें. २ पूर्ण विकसलेलें (फूल). ३ जाहीर झालेलें; चारचौघांस कळलेलें.

परिस्फोट [सं०] पु० १ फुलाची कळी उमलणें. २ कांहीं गोष्ट उघडकीस येणें किं० जाहीर होणें. ३ गूढ किं० अज्ञात किं० दुर्बोध विषयाचें विवरण किं० स्पष्टीकरण.

परिहरण न०, **परिहार** पु० [सं०] १ त्याग, वर्जन. २ टाळणें; वगळणें. ३ दोषनिरसन; आक्षेपाचें खंडन. ४ बलात्कारानें ताब्यांत घेणें; पकडणें. ५ विरोध भासमान आहे, वास्तविक विरोध नाहीं, असें दाखवून देणें.

परिहार्य [सं०] वि० टाळण्यास योग्य; टाळतां येईल असा. पु० पोंची; करभूषण; कडें.

परिहास, परीहास [सं०] पु० थट्टा; गंमत; विनोद.

परिहित [सं०] वि० धारण केलेलें (वस्त्र, भूषण, इ०).

परिहृत [सं०] वि० १ टाळलेला; चुकविलेला. २ अपहरण केलेला. ३ सोडून दिलेला. ४ खंडित (आक्षेप, विरोध). ५ पकडलेला.

परिळ मागें ' परळ ' पहा.

परिज्ञात [सं०] पूर्णपणें जाणलेला किं० ओळखिलेला.

परिज्ञान [सं०] न० १ पूर्ण ज्ञान किं० माहिती. २ तुलनात्मक चर्चेनें मिळालेलें ज्ञान; चिकित्सक बुद्धीनें मिळविलेली माहिती.

परी स्त्री० प्रकार; तऱ्हा. मागें ' पर ' पहा.

परी श० यो० अ० १ प्रमाणें (कवितेंत); उ० चंद्रापरी हें मुख आल्हादकारक आहे. २ ह्या नात्यानें; ह्या दृष्टीनें; उ० बापापरी बाप गेला आणि बोंबलतांना हात गेला (गेला =मेला; दुखं लागला); उ० घोडजुगारीचा नाद भारी वाईट, माझा पैशापरी पैसा गेला आणि मित्रमंडळींत उपहास झाला. ३ सामर्थ्य, वकूब, किं० ताकद मनांत किं० विचारांत घेतां; उ० ह्या पांच वर्षांच्या मुलानें हा कागदाचा बंगला केला, तो त्याच्यापरी उत्तम झाला आहे; उ० संसारांत काय नको ? तुपापरी तूप पाहिजे, तेलापरी तेल पाहिजे, तांदुळापरी तांदुळ पाहिजे, इ०. उ० अ० परंतु, पण (कवितेंत). ॐ **ज्याच्या त्याच्या परी** क्रि० वि० प्रत्येक माणसाचा दर्जा, अधिकार, मान, इ० मनांत घेऊन.

परी [फा०] स्त्री० १ मनुष्याचें तोंड आणि घोड्याचें शरीर ज्याला आहे असा एक कल्पित प्राणी. ताबुताखालीं ह्या प्राण्याचा आधार मुसलमान लोक देतात. २ कोणीही सुंदर स्त्री.

परीघ [सं० परिघ] पु० १ वर्तुळाची मर्यादारेषा. २ कुंपण; वई.

परीट [हिं० परवंठा] पु० १ कपडे धुण्याचा धंदा करणारा. २ एक पक्षिविशेष; हा राखी रंगाचा असून त्याचें शेपूट लांब असतें. ॐ **परीटघडीचा कपडा** पु० परटानें धवून घडी घालून आणलेला कपडा,—ज्याची घडी अद्यापि मोडलेली नाहीं आणि जो स्वच्छ आहे. **परीटधुणा** वि० परटानें धुवून आणलेला.

परीस [सं० स्पर्श] पु० १ ज्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें असा कल्पित दगड. २ आपल्या जातींत किं० वर्गांत अत्यंत सुंदर मुलगा. ३ (लक्षणेनें) ज्याच्या योगानें अलोट संपत्ति प्राप्त होते असा मनुष्य, वस्तु, औषध, कला, खुबी, इ०; उ० काणे डाकटरनीं डोंगरे यांना बालामृत हा परीस दिला आणि झंडू यांना सार्सापरिला हा परीस दिला.

परीस श० यो० अ० पेक्षां; उ० नीळकंठा-परीस विश्वंभर बुद्धिमान् आहे. · [पहा.

परीहास [सं०] पु० मागें ' परिहास '

परीक्षक [सं०] पु० पारखणारा; परीक्षा घेणारा किं० परीक्षा करणारा.

परीक्षण [सं०] न० १ परीक्षा घेणें; परीक्षा पाहाणें; पारखणें. २ कसोटी.

परीक्षिणें [सं० परि + ईक्ष्] स० क्रि० १ तपासणें; पारखणें; कसणें. २ बारकाईनें निरीक्षिणें.

परीक्षा [सं०] स्त्री० १ तपासणी; उ० वैद्यानें रोगाची परीक्षा चांगली केली. २ अनुभव. ३ चांगलें आणि वाईट, खरें आणि खोटें, यांची निवड म्ह० ह्यांच्यांतील भिन्नता किं० भेदभाव प्रत्ययास येणें; उ० आपत्काळीं मित्राची परीक्षा होत असते. ॐ **परीक्षावान, परीक्षावंत** वि० परीक्षा करण्यांत कुशल; दर्दी; तज्ञ.

परीक्षित [सं०] वि० १ ज्याची परीक्षा झाली आहे असा; ज्याची परीक्षा घेण्यांत किं०पाहाण्यांत आली आहे असा. २ कसोटीस उतरलेला. ३ अनुभव ज्याचा घेण्यांत आला आहे असा.

परुष [सं०] वि० १ खरखरीत; कठिण; गांठळ; टणक (लाकूड, इ०). २ निर्दय, कठोर (मन, अंतःकरण). ३ कर्कश, कर्णकटु(ध्वनि). ४ झोंबणारें (भाषण); भीडमुरवत न ठेवणारें (भाषण). ॐ **परुषोक्ति** स्त्री० गालिप्रदान; शिव्या देणें.

परूस न० १ घराभोंवतालचें कुंपण. २घराच्या पिछाडीची जागा. ॐ **परुसदार** न० घराच्या मागचें दार किं० मागच्या जागेंत जावयाचें दार.

परेच्छा [सं० पर (दुसरा) + इच्छा] स्त्री० दुसऱ्याची इच्छा. ॐ **परेच्छाप्रारब्ध** स्त्री० दुसऱ्याच्या इच्छेनें जी दैवगति आपणास अनुभवावी लागते ती. मागें ' अनिच्छा ' पहा.

परेळ पु० न० ताटाच्या आकाराचें वाटोळें उथळ असें मातीचें पात्र; परळ.

परोचा, परोता पु० मागें 'परवाचा' पहा.

परोड स्त्री० मागें ' परवड ' पहा.

परोपकार [सं०] पु० १ दुसऱ्यावरं केलेला उपकार. २ उदारबुद्धीनें दुसऱ्यास जें दिलें तें. ॐ **परोपकारी** वि० दुसऱ्यावर उपकार करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याच्या स्वभावाचा.

परोपरीं [म० परी + परी] क्रि० वि० १ नानाप्रकारें. २ अनेक प्रयत्न करून किं० कष्ट सोसून. ॐ **परोपरीनें** क्रि० वि० नानाप्रकारांनीं; अनेक प्रयत्न करून. **परोपरीचा** वि० अनेक प्रकारचा; भिन्न भिन्न तऱ्हांचा.

परोक्ष [सं०] वि० १दृष्टीच्या आड असलेला; न दिसणारा; नजरेच्या टप्याबाहेरचा. २गैरहजर. ३ अज्ञात. ४ इंद्रियांना अगोचर. पु० संन्यासी. न० अदृश्यता. क्रि० वि० पाठीमागें; उ० माझ्या परोक्ष गिरिधर माझी निंदा करीत असतो. ॐ **परोक्षभूत** न० (**संस्कृत व्याकरण**) एक प्रकारचा भूतकाळ.

पर्जन्य [सं०] पु० पाऊस.

पर्ण [सं०] न० १ झाडाचें पान. २ पुस्तकाचें किं० पोथीचें पान. ॐ**पर्णकुटी, पर्णशाला** स्त्री० १पानांची झोपडी. २घर (लहान घर तुच्छतेनें). **पर्णबीज** न० चुकाचाकवत.

पर्द पु०, **पर्दन** न० [सं०] अपानद्वारानें वायु बाहेर पडणें; पादणें.

पर्यंक, पल्यंक [सं०] पु० १ बाज; पलंग; माचा. २ पालखी. ३ जेठा,-बसण्याचें एक संस्थान; गुडघे, मांड्या, आणि पाठ, यांचे भोंवतीं वस्त्र बांधून होते ती बैठक. ४ वीरासन.

पर्यटन [सं०] न० भटकणें; हिंडणें.

पर्यंत [सं०] वि० १ मर्यादित. पु० १ परिघ. २ सीमा; हद्द. ३ डोंगराचा कडा. ४ बाजू; शेजारचा भाग. ५ समाप्ति. क्रि० वि० विशिष्ट प्रदेश किं० विशिष्ट समय किं० विशिष्ट फळ किं० अवधि येई पावेतों; उ० बायकांचें ज्ञान चुलीपर्यंत.

पर्यवसन्न, पर्यवसित [सं०] वि० समाप्त; संपलेलें; शेवटास गेलेलें.

पर्यवसान [सं०] न० १ शेवट; समाप्ति. २ फलनिष्पत्ति.

पर्या, पर्ह्या पु० नाला; ओहोळ.

पर्याप्त [सं०] वि० १ प्राप्त झालेलें. २ संपविलेलें. ३ परिपूर्ण; सर्व. ४ समर्थ. ५ पुरेसें; ज्या कार्याला पदार्थविशेष जितका पाहिजे तितका.

पर्याप्ति [सं०] स्त्री० १ लाभ. २ तृप्ति. ३ पूर्णता. ४ योग्यता. ५शेवट. ६ज्या कार्याला पदार्थविशेष जितका पाहिजे तितकें त्याचें परिमाण.

पर्याय [सं०] पु० १ फेरा. २ प्रवाह; गति; जाणें. ३आळीपाळी; आलटपालट; फेरबदल ४ वेगळे वेगळे पदार्थ; भिन्न भिन्न प्रकार; उ० आज जांवईबोवा जेवावयाला यावयाचे आहेत, जेवणांत चार पर्याय करा. ५ प्रकार; तऱ्हा; सरणी. ६ अडचणींतून सुटण्याचा इलाज; युक्ति; उपाय. ७ समानार्थक शब्द; उ० ' वेगळा ' ह्याचा पर्याय ' निराळा. ' ८ कार्यविशेष साधण्यासाठीं एका वेळीं केलेला प्रयत्न किं० मारलेला नेट; उ० शास्त्र केवळ पहिल्या पर्यायास समजतें असें नाहीं, दोन तीन पर्याय करावे लागतात. ९ गौण पक्ष; उत्तमाच्या खालचा उत्तम पक्ष; उ० निरशन होत नसल्यास धान्यफराळाचा पर्याय करावा. १० कांहीं काम एका दमांत किं० एका प्रयत्नांत किं० एकदम करणें शक्य नसल्यास मध्यें मध्यें केले जातात ते खंड किं० विराम; उ० एकदम दहा कोश तुला चालवत नसल्यास वाटेंत चार पर्याय कर; उ० वसंतरावांनीं चार पर्यायांनीं सहस्रभोजन घातलें. ११ एका कार्याचे अनेक विभाग पाडून एक एक विभाग एका एका माणसाच्या माथीं मारणें हा प्रकार; उ० कोंडींतील हजार ब्राम्हणांस मी एकटा कशी दाक्षिणा वाटीन ? मी दहा पर्याय केले म्हणून दोन घटकांच्या आंत दक्षिणा वाटण्याचें काम उरकलें. १२ टाळाटाळीचें किं० चुकवाचुकवीचें उत्तर; उ०मला नक्की काय तें स्पष्ट शब्दांत सांग, उगाच शंभर पर्याय लावूं नको. १३ सुरळीत सरणी; शिस्तवार अनुक्रम. १४ पोटविभाग,–अंगें आणि उपांगें; उ० तें काम कांहीं साधें नाहीं, त्यांत पर्याय पुष्कळ आहेत. १८ (**साहित्य**)एक वस्तु क्रमानें एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणास जाते, दुसऱ्या ठिकाणापासून तिसऱ्या ठिकाणास जाते, असें वर्णन असतें तेव्हां पर्याय हा अलंकार होतो. हा पर्याय अलंकाराचा एक प्रकार. एका ठिकाणीं अनेक वस्तु क्रमानें येत आहेत किं० आढळत आहेत असें वर्णन असतें तेव्हां पर्याय अलंकाराचा दुसरा प्रकार होतो. उदाहरणें आणि खुलासा आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

ꕥ **पर्यायोक्त न०** (**साहित्य**) जी गोष्ट आपणास सांगावयाची आहे तिचे प्रत्यक्ष वाचक शब्द न योजतां ती अप्रत्यक्ष रीतीनें ज्ञात करून दिली असतां पर्यायोक्त हा अलंकार होतो; उ० अंगदेशचा राजा शत्रूच्या देशांतील विधवांची संख्या वाढवितो म्ह० अंगदेशचा राजा शत्रूच्या देशांतील वीरांना कापून काढतो. पहिलें वाक्य पर्यायोक्त सरणीचें आहे. विशेष खुलासा आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

पर्यालोचन न०, **पर्यालोचना** स्त्री०[सं०] १ जागरूकता; दक्षता; काळजी. २ चिंतन; विचार; मनन. ३ चिकित्सक बुद्धीनें केलेलें परीक्षण. ४ जाणणें. [शिंपडणें.

पर्युक्षण [सं०] न० अग्नीभोंवतीं पाणी

पर्युत्सुक [सं०] वि० १ अति उत्सुक किं० उत्कंठित. २ अस्वस्थ; क्षुब्ध.

पर्युदास [सं०] पु० निषेध गौण असणारा विधि; विशिष्ट व्यक्तीवर किं० अर्थावर जो विधि लागू करावयाचा नाहीं ती व्यक्ति किं० तो अर्थ विधींतून बाजूस काढणें किं० वगळणें; उ०'अनृतातिरिक्त सर्व बोलावें, ' ह्या वाक्यांत विधिसंबंधानें अनृताचा पर्युदास केला आहे; ' हीं पांच नक्षत्रें मुंजीच्या उपयोगाचीं नाहींत ' ह्या वाक्यांत बाकीच्या नक्षत्रांवर मुंज करतां येते असा विधि आहे आणि अपवाद गौण आहे.

पर्युषित [सं०] वि० १ शिळें. २ शिजविलेलें अन्न, घरांत आणिलेलें पाणी, फुलें, इ० वरून एक रात्र उलटून गेल्यामुळें त्याज्य झालेलें.

पर्व [सं० पर्वन्] न० १ पौर्णिमा, अमावस्या, वैधृति, व्यतिपात, संक्रान्ति, ग्रहण, कपिलाषष्ठी, इ० जे समुद्रस्नान, श्राद्ध, दान, इ० पुण्यकर्मांना योग्य म्हणून काळ सांगितले आहेत ते प्रत्येक. ह्या काळीं आचरलेलें पुण्यकर्म कोटिगुणित होतें अशी हिंदूंची समजूत आहे. २ कांहीं गोष्ट जेव्हां वैपुल्यानें होते तेव्हां त्या गोष्टीचें तें पर्व असें म्हणतात; उ० हल्लीं हुरड्याचें पर्व चालू आहे. ३ सांधा. ४ ऊस, बोरू, धान्याचें ताट, इ० चें पेर. ५ लाकडाची गांठ. ६ महाभारताचा एक एक मोठा खंड; उ० उद्योगपर्व, शांतिपर्व, इ०.

७ वेळ; प्रसंग. ८ हिंदु महिन्याच्या प्रत्येक पक्षाची अष्टमी आणि चतुर्दशी, पौर्णिमा, आणि अमावस्या, हे चार दिवस प्रत्येक. ९ दर्श आणि प्रतिपदा यांचा संधि. १० उत्सव. ११ पर्वानिमित्तानें केलेला होम. १२ सूर्याचा एका राशींतून दुसऱ्या राशीत प्रवेश किं० ह्या प्रवेशाचा समय. १३ कोणत्याही कामाला अति योग्य असा समय किं० संधी.

पर्वणी [**सं०**] **स्त्री०** १ पौर्णिमा. २ अमावस्या. ३ उत्सव. ४ डोळ्याचा एक रोग.

पर्वत [**सं०**] **पु०** १ सह्याद्रि, विंध्य, हिमालय, इ० जे पृथ्वीच्या पृष्ठभागावरचे लांबच लांब उंचवटे ते प्रत्येक. २ (**लक्षणेनें**)दुःसह भार; ओझें; उ०कर्जांचा पर्वत; दुःखाचा पर्वत. ३ मागें 'परवत'पहा. ❀ **पर्वतफळ न०** मोठा धोंडा किं० फत्तर; खडक.**पर्वती वि०**डोंगर चढावयाला समर्थ (पशु).

पर्ह्या पु० ओढा; नाला; ओहोळ.

पल [**सं०**] **न०** १ मांस. २ चार कर्ष इतकें वजन; चाळीस मासे वजन. ३ अत्यंत अल्प काल; पळ. **पु०** पेंढा.

पलक, पलख [**फा०** पल्क=क्षण] **पु०, न०** डोळ्यांच्या एकदा लवण्याला लागतो तितका काळ; अत्यल्प कालावधि; एक क्षण. ❀ **पलक दर्याव, पलखदर्याव** [**फा०** पल्क=क्षण; दर्याव =समुद्र] **पु०** पावसाची जोराची वृष्टि.

पलंग [**सं०** पर्यंक] **पु०** बाज, माचा, ह्या वस्तूंप्रमाणें निजावयाच्या उपयोगाचा पण अधिक कारागिरीचा पदार्थ.❀**पलंगडी स्त्री०**लहान पलंग.

पलंगपोस [**सं०** पर्यंक + **फा०** पोशीदन्= झाकणें] **पु०** गादीवर आंथरावयाचें वस्त्र; चादर.

पलटण (**न०**) [**इंग्रजी** प्लाटून] **स्त्री०** लढाऊ शिपायांची टोळी.

पलतड [**सं०** पर+तट] **स्त्री०** नदी, गांव, इ० ची पलीकडची बाजू.

पलपलाट पु० १ मैत्री, घरोबा, स्नेहसंबंध, इ० चा अतिरेक किं० ह्या अतिरेकाचा देखावा. २ चोर, उंदीर, मांजरें, इ० चें एकाद्या ठिकाणीं वैपुल्य किं० त्यांचा स्वच्छंदी संचार.

पलभा [**सं०**] **स्त्री०** अयनांशसहित सूर्य केवळ विषुववृत्तावर असतां मध्यान्हीं द्वादशांगुळ शंकूची ज्या ज्या देशीं जी जी अंगुलाद्यात्मक छाया पडते ती त्या देशाची पलभा.

पलवा वाघळी स्त्री० ' वाघळी 'नांवाचा जो खाऱ्या पाण्यांतील मासा त्याची एक जात.

पलाखती मार, पलाखतीचा मार पु० जोराचें किं० आवेशाचें मारणें किं० चोपणें.

पलाटणें न० वस्त्र साफ करावयाचें न्हाव्याचें कातडें; चटपटणें.

पलाटन [**सं०** पर्यटन] **न०** १ भटकणें; भटकंती. २ चक्कर; फेरा; लहानशी फेरी किं० खेप (मारणें).

पलांडु [**सं०**] **पु०** कांदा.

पलाण [**सं०** पल्ययण, पल्याण] **न०** १ हत्ती, उंट, इ० च्या पाठीवरची बैठक. २ स्वारीसाठीं शिकवून तयार केलेल्या घोड्यावर प्रथम घातलेलें खोगीर किं० प्रथम खोगीर घालणें (करणें). ३ मातीचा बांध.

पलाणणें [**म०** पलाण] **स० क्रि०** व्यापणें; आच्छादणें (कवितेंत).

पलायन [**सं०**] **न०** पळून जाणें; पोबारा करणें; यःपलाय करणें.

पलाल [**सं०**] **पु०, न०** पेंढा; कडबा.

पलाश [**सं०**] **पु०** १ राक्षस. २पळसाचें झाड. **न०** झाडाचें किं० फुलाचें पान; पाकळी.

पालित [**सं०**] **वि०** १ पांढरे (केश इ०). २ वृद्ध. ३ टक्कल पडलेलें (डोकें). **न०** १ केश पिकणें किं० पांढरे होणें. २ केशांचा झुबका.

पलिता, पलिदा [**फा०** पलीताह्] **पु०** १ हिलालांत घालून पेटविण्यासाठीं चिरगुटाची वळकटी किं० गुंडाळी करतात ती. २ तोफ पेटविण्यासाठीं घेतात तो लांब काकडा. ३ बंदुका, तोफा, इ० ची एक फेर (झडणें, झाडणें).

टीप,–शेवटच्या दोन्ही अर्थीं **पलिती स्त्री०**हाही शब्द रूढ आहे.

पलिस्त [**फा०** पलिधृत्=पिशाच] **न०** उपद्रवी किं० त्रासदायक माणूस, पोर, काम,आजार, गोष्ट, इ०.

पलीकडे [**म०** पैल+कडे] **क्रि० वि०** दुसऱ्या बाजूस. ❀ **पलीकडे होणें** विशिष्ट स्थळापासून किं० माणसापासून दूर जाणें.

पलेटण न० वर ' पर्यटन ' पहा.

पल्याण वर ' पलाण ' पहा.

पल्लव [सं०] पु० १ कोंब; पालवी. २ कळी. ३ फांदी. ४ विकास; विस्तार. ५ वस्त्राचा पदर. ६ कांहीं वृत्तान्त मनोरंजक करण्यासाठीं त्यांत घातलेली पदरची भर. ७ लटांबर.

पल्लवित [सं०] वि० १ ज्याला पल्लव फुटले आहेत असा (वृक्ष). २ मनोरंजक करण्यासाठीं ज्यांत पदरचा मजकूर घातला आहे असा(वृत्तान्त). ३ वाढविलेला; फुगविलेला.

पल्ला [हिं०] पु० १ तीस पायली हे परिमाण. २ पल्लाभर धान्य ज्यांत मावेल असे पोतें किं० असा गोणता.

पल्ला [फा० पल्लाह्] पु० १ विस्तार; लांबी, रुंदी, इ०चें परिमाण; उ० लांब पल्ल्याची तरवार, बंदूक इ०. २ बहुत काळ चालणारें काम किं० मोठें अंतर यांचे जे विभाग ते प्रत्येक; उ० मालिनीचें लग्न मुहूर्त ठरविण्याच्या पल्ल्यापर्यंत आलें; उ० इतका लांबचा पल्ला आपणास संध्याकाळपर्यंत गांठतां यणार नाहीं म्हणून येथेंच मुक्काम करूं. ३ अंतिम साध्य किं० ध्येय; कामाचा शेवट; कार्याचें पर्यवसान. ४ सामर्थ्याचा आटोका; सामर्थ्याचें प्रमाण किं० परिमाण. ५ वशील्यांच्या सांखळींतील एक एक दुवा. ६ पक्ष्यांदींचा थवा किं० जमाव किं०कळप. ७शेला इ०चा जरीचा मोठा पदर. ❀ **कोणेकाचे पल्ल्यावर असणें** १ त्याचें हित करावयास तत्पर किं० जागरूक असणें. २ त्याचें नुकसान करावयास टपून राहणें. **पल्ला करणें** (किं० **बांधणें**) वशील्यांची परंपरा किं० सांखळी जुळविणें किं० जुळवून ठेवणें.

पल्लेदार वि० १ लांब (तरवार, बाहु, काठी, इ०). २ जरीचा मोठा कांठ असलेला(शेला इ०).

पल्लाण [फा० पलाह्] न० १ कालावधि. २ मजल ; टप्पा.

पाल्लि, पल्ली [सं०] स्त्री० चुकचुक असा शब्द करणारा एक प्राणी; पाल.

पव [हिं०] पु० फाशावरील एकत्वबोधक चिन्ह. ❀ **पवबारा, पोबारा** पु०तिफाशी खेळांत एक दान. **पोबारा करणें** सुळुकदिशीं पळून आणें.

पवणें स० क्रि० पावणें; संपादणें; (कवितेंत).

पवन [सं०] पु० वारा; वायु. ❀ **पवनाशन** पु० साप; सर्प. **पवनतनय** पु० १मारुति. २ भीमसेन. **पवनचक्की** स्त्री० वाऱ्याच्या जोरानें चालणारी गिरणी, यंत्र, इ०.

पवन्या पु० एक प्रकारचें गवत.

पंवळें, पोंवळें [सं० प्रवाल] न० समुद्रांत उत्पन्न होणारा एक टणक पदार्थ. दागिन्यांत, आणि जपमाळा करण्यांत याचा उपयोग केला जातो.

पवा, पंवा, पावा, पांवा पु० एक प्रकारचें नळीच्या आकाराचें वायुवाद्य.

पवाडा, पोवाडा पु०पराक्रमी पुरुषाच्या वर्णनाचें एक प्राकृत गीतविशेष.

पवारी स्त्री० एक औषधोपयोगी झाड किं० त्याचेपासून मिळतें तें सुगंधी द्रव्य.

पवित्र [सं०] वि० १ शुद्ध; निर्मळ. २ निष्पाप. ३ निष्कलंक. ४ धुणें, सारविणें, गोमूत्र शिंपडणें, इ० संस्कार केल्यानें विटाळ गेला आहे जिचा अशी (जमीन),असें (वस्त्र), इ०. न० १ दर्भ. २ तांबें. ३ जानवें, पोवतें. ४ हातांतील पवित्रक. ❀ **पवित्रारोपण** न० जानवें धारण करणें. **पवित्री पूर्णिमा** स्त्री० श्रावण महिन्याची पूर्णिमा,–ज्या दिवशीं पवित्रारोपण करतात. **पवित्रक** न० १ श्राद्धादि विधींत दर्भाचें बोटांत घालावयाचें वलय. ह्या अर्थी **पवित्री** स्त्री० हाही शब्द आहे. २ उंबर किं० पिंपळ.

पवित्रा पु० १ कुस्तीला सिद्ध झालेला पहिलवान ज्या संस्थानांत उभा राहतो तें संस्थान. २ कांहीं व्यवहार करावयाचा असतां उभय पक्षाचे लोक एकमेकांचीं मनें आजमावण्यासाठीं जीं विधानें आरंभीं करतात तीं प्रत्येक (करणें,चालविणें). ❀ **पवित्रे चालविणें** आपलें खरें मत बाहेर न पडूं देतां एकाद्या विषयावर चतुरपणानें भाषण किं० संभाषण चालविणें.

पविन्न [नंदभाषेंत] वि० सात ही संख्या.

पशम [फा० पश्म्] न० उपस्थावरील केशसमुदाय.

पशमी [फा०] वि० लोकरीचा (कपडा, इ०). [शिवलेला कपडा.

पशमीना [फा० पषूमीनाह्] पु० लोकरीचा

पशु [सं०] पु० १ जनावर; गुरूं. २ यज्ञपशु; बळी. ३ बोकड. ४ (**लक्षणेनें**) तारतम्यहीन माणूस. ❀**पशुधर्म** पु० १ पशूसारखें वर्तन. २ निर्विवेक मैथुन. ३ मैथुन (सामान्यतः). **पशुपति** पु० १ शंकर. २ गवळी. **पशुपाल** पु० गवळी.

पशेरी [म० पांच+शेर+ई (प्रत्यय)] स्त्री० १ पांच शेरांचें वजन. २ चरितार्थाचें साधन. ३ चरितार्थ.

पश्चात् [सं०] क्रि० वि० १ मागून; पाठीमागें; नंतर. २ शेवटीं. ३ पश्चिमदिशेकडे. ❀ **पश्चात्ताप** पु० केलेल्या वाईट कृत्याबद्दल मनाला होतो तो ताप. **पश्चार्ध** पु० मागचा अर्धा भाग. **पश्चात् स्वरितक** न० क्षितिजाचा पश्चिम बिंदु. **पश्चाद्द्वारगामी** वि० गुदमैथुन करणारा.

पश्चिमा [सं०] वि० १ पाठीकडचा. २ शेवटचा. ३ पश्चिम दिशेकडचा. ४ नंतरचा. ❀ **पश्चिमा** स्त्री० पश्चिम दिशा. **पश्चिमावस्था** स्त्री० अन्त्यावस्था; मरण. **पश्चिमाक्रिया** स्त्री० प्रेतसंस्कार; और्ध्वदेहिक क्रिया. **पश्चिमद्वार** न० १ घर, किल्ला, गांव, इ०चें पश्चिम दिशेकडे असलेलें किं० पिछाडीचें दार. २ प्राण्याच्या शरीराचें मलविसर्जनाचें द्वार. **पश्चिम धान्य** न० वर्षाऋतूच्या नंतर किं० शेवटीं पिकणारें धान्य. **पश्चिमवायु** पु० प्राण्याच्या गुदाच्या वाटें बाहेर पडलेला वारा. **पश्चिमबुद्धि** स्त्री० प्रतिपक्ष्याला वादांत चीत किं० निरुत्तर करावयाला योग्य असें पण ऐन वेळीं न सुचतां मागाहून सुचलेलें उत्तर किं० शकल किं० प्रमाण.

पश्मिना [फा० पश्मीनाह] पु० लोकरीचें कापड किं० लोकरीचा शिवलेला कपडा.

पश्यंती [सं०] स्त्री० १ वेश्या. २ नाभीमध्यें किंचित् उमटणारी वाणी. वाणीचे इतर तीन प्रकार परा, मध्यमा, आणि वैखरी.

पश्यतोहर [सं०] पु० १ आपल्या डोळ्यादेखत चोरी करणारा; सोनार, शिंपी, इ० आपल्या डोळ्यांत धूळ टाकून चोरी करणारा. २भामट्या.

पसगैबत [फा०] क्रि० वि० ०च्या पाठीमागें किं० गैरहजीरींत.

पसंत, पसंद [फा० पसंद] वि० १ मान्य, संमत, कबूल; उ० माझी योजना (युक्ति) तुम्हाला पसंत आहे काय ?. २ उत्तम; स्वीकारण्यास योग्य; ग्राह्य. ❀ **पसंत करणें** अनेक वस्तूंपैकीं एक निवडून ती स्वीकारणें.

पसतीस [म० पांच+तीस] वि० तिसांत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ❀**पसतिशी** स्त्री० पसतीस वर्षांचें कोणेकाचें वय किं० वयोमान.

[क्रियेचें सातत्य.

पसर [सं० प्रसर] पु० विस्तार; वाढ;

पसरट, पसरडा [म० पसरणें] वि० १ खोलीच्या मानानें ज्याचा परिघ मोठा असें भांडें इ०. २ आटोपशीर नाहीं असा (कारभार इ०).

पसरणी [म० पसरणें] स्त्री० १पसरण्याची क्रिया. २ विस्तार.

पसरणें [सं ० प्र+सृ (सरणें)] अ० क्रि० लांब होणें; अधिक विस्तृत होणें; अधिक जागा व्यापण्याजोगा होणें; दूरवर जाणें. स० क्रि० विस्तृत करणें; अधिक क्षेत्रफळ व्यापील असा करणें; संकुचित आकारांत स्थित जो वस्त्रादिपदार्थ तो अधिक जागा व्यापील असा करणें. ❀ **(कांहीं बातमी) पसरणें** अ० क्रि० ती पुष्कळ लोकांस विदित किं० ज्ञात होणें किं० कळणें. स० क्रि० ती पुष्कळ लोकांस सांगणं किं० कळविणें.

पसवणें [सं० प्र+सू] अ० क्रि० १ (घोडी, गाढवी इ०) विणें म्ह० त्यांनीं अपत्य प्रसवणें. २ (केळीनें) केळफूल बाहेर टाकणें. ३(नाचणी, वरी, भात, इ०नीं) कणसें, तुरे, इ० उत्पन्न करणें.

पसा [सं०प्रसृति=हाताचा पसा]पु० १कांहीं पदार्थ हातांत घ्यावयासाठीं बोटें पसरून आणि जुळवून आणि तळहात खोल करून होतो तो आकार. २ दोन्ही हात असे शेजारीं शेजारीं जोडून होतो तो आकार; ओंजळ. ❀ **उलथ्या पालथ्या पशानें** क्रि० वि० उधळेपणानें: धौतालीपणानें (द्रव्यादि खर्चणें). **पशाचें पायलीस उटेना** स्वल्प पैशानें किं० सामग्रीनें व्हावयाचें काम करावयाला किं० करवावयाला अधिकाचा व्यय करणें आवश्यक होणें. **पसा..ठ** स्त्री० १ पसाभर किं० मूठभर धान्य घ्यावयाचा ज्या बलुतेदार इ०चा हक्क आहे त्यांनीं आपआपल्या हक्काचें मागितलेलें किं० त्यांना दिलेलें किं० द्यावयाचें धान्य. २ कोणेकाला जें कांहीं

द्यावयाचें थोडें फार तें; उ० मला काय पसामूठ देणार तें द्या आणि माझी रवानगी करा.

पसार [पोर्च्युगीझ्] पु० फेऱ्या करणें;खेपा घालणें. **वि०** १ निघून किं० पळून गेलेला; उ० तो गडी बाराच्या ठोक्याबरोबर पसार झाला. २ परीक्षेंत उत्तीर्ण; उ० शामसुंदर बी. ए. च्या परीक्षेंत पसार झाला. ३ मंजूर झालेला (ठराव इ०). ४ अतिक्रांत झालेला म्ह० भरलेला (काल,समय, अवधि, इ०); उ० आठ पसार.

पसारा [म० पसरणें] **पु०** १राज्य,व्यापार, धंदा, सावकारी, इ०चा विस्तार किं० त्यांची विस्तृतपणाची स्थिति. २अस्ताव्यस्त पडलेले पदार्थ समुच्चयानें. ३ रात्रीं गुरांना चरावयास नेणें. ४ दुकानांतील वजनें इ० ठेवण्याचें बारदान. ❀ **एकाद्या स्त्रीचा पसारा पडणें** ती प्रसूतीच्या समयीं अडणें.

पसारी [हिं०] **पु०** १ काष्टौषधी विकणारा. २ हिंग, जिरे, मिरे, कांदा, लसूण, इ० जिन्नस विकणारा दुकानदार; किराणा माल विकणारा.

पसुरडा पु०, पसुरडी स्त्री० [**म०** पैसा] पैसा हें नाणें (तुच्छतेनें).

पसू [**म०** पसवणें] **वि०** शिंगरें उत्पन्न करण्यासाठीं बाळगिलेली (घोडी).

पस्त [**फा०**] **क्रि० वि०** पूर्णपणें (लुटणें, जाळणें, चोरणें, विध्वंसिणें, खाणें, इ०).

पस्तावणी [**म०** पस्तावणें]**स्त्री०**पश्चात्ताप.

पस्तावणें [**सं०** पश्चात्+तप्] **अ० क्रि०** केलेल्या वाईट कृत्याबद्दल दुःखित होणें.

पस्तावा, पस्ताव [**म०** पस्तावणें] **पु०** केलेल्या वाईट कृत्याबद्दल वाटतें तें दुःख. **टीप,– पस्ताई स्त्री०** ह्याच अर्थाचा शब्द आहे. ❀ **पस्तावीं पडणें, पस्तायीं पडणें** पश्चात्तापानें जर्जर होणें.

पस्तीस वि० मागें ' पसतीस ' पहा.

पहाट [**सं०** प्रभात] **स्त्री०** सूर्योदयापूर्वीचा सहा घटकांचा कालावधि. ❀ **पहाटपटी स्त्री०** मोठी पहाट; सूर्योदयाच्या पूर्वीचा बराच अवधि. **पहाटपटीं क्रि० वि०** मोठ्या पहाटेस.

पहाड [**हिं०**] **पु०** १ डोंगर; टेकडी. २ उंच आणि चढावयास कठिण असा डोंगराचा कडा किं० सुळका. ३ घराच्या भिंती इ० ची रचाई करतांना गवंडी इ० कामकऱ्यांना उभे राहाण्यासाठीं वांसे, तक्ते, इ० ची जी तात्पुरती रचना करतात ती. ४ अत्यंत उंच जो कंठध्वनि तो. ❀ **पहाडमूळ न०** एक औषधाच्या उपयोगाचें मूळ. **पहाडची यात्रा स्त्री०** हिमालय इ०डोंगरावरच्या देवस्थानास जाण्याची यात्रा. **पहाडी किल्ला पु०** डोंगरावर बांधलेला किल्ला; गड.

पहाडी [**हिं०** पहाड] **स्त्री०** १ पालखी, मेणा, इ० वाहणारे जे लोक त्यांचा ताफा किं० त्यांची टोळी. २ डोंगराळ देश किं० भूमीचा विस्तार.

पहार [**सं०** प्रहार] **स्त्री०** १ दगड फोडणें, पदार्थ उखळांत कुटणें, जमीन खणणें, इ० कामीं योजावयाचें लोखंडाचें जाडी आणि सरळ असें आउत. २ ' प्रहर ' चा अपभ्रंश. पुढें ' प्रहर, पहा.

पहारा [**सं०** प्रहर] **पु०** १ चोर इ० ना चोरी इ० करूं देऊं नये म्हणून स्थलविशेषीं केलेला असतो तो बंदोबस्त.२ असा बंदोबस्त करण्यासाठीं नेमिलेला शिपायी किं० अशा शिपायांची टोळी. ३ कोणत्याही पदार्थाच्या किं० स्थळाच्या रक्षणार्थ नेमिलेला शिपायी किं० नेमिलेल्या शिपायांची टोळी. ४ अशा शिपायांची जागा किं० कामाचा अवधि. ५ पदार्थाच्या रक्षणार्थ केलेली तजवीज, घेतलेली काळजी,किं०केलेली जागरूकतेची योजना. ❀**पहारेकरी,पहारेदार पु०**पहारा करीत असलेला शिपायी. **पहारेबंदी स्त्री०** अंतरा अंतरावर शिपायी नेमून किं० उभे करून केलेला बंदोबस्त.

पहाळ स्त्री० १ पावसाची मोठी सर. २ डोंगरावरून वहात येणारा ओहोळ. ३ झाडाच्या बुडाशीं पाण्यासाठीं केलेलें आळें. ४ उपासामुळें पोटाला पडलेली खळगी.

पहाळ पु० एक वनस्पति.

पहाळी स्त्री० पावसाची मोठी सर.

पहिलटकर, पहिलटकरू, पहिलार, पहिलारू, पहिलकरीण, पहिलटकरीण [**म०** पहिला] **स्त्री०** प्रथमच जी प्रसूत होत आहे किं० होणार आहे अशी स्त्री, गाय, म्हैस, इ०.

पहिलवान, पैलवान [**हिं०**] **पु०** १ ताल-

मीचीं कामें करण्याचा ज्याला षोक आहे तो;मल. २ एक क्षुद्र प्राणी, उकिरड्यांत राहाणारा. ॐ **पहिलवानकी** स्त्री० पहिलवानाचा धंदा किं० व्यवसाय किं० षोक.

पहिला वि० आदितम; ज्याच्या अगोदर किं० वर कोणी नाहीं असा. **क्रि० वि०** (लिंगवचनां-प्रमाणें फिरणारें) पहिल्यानें; अगोदर; पूर्वी. ॐ **पहिलेप्रथम, पहिल्या प्रथम** क्रि० वि० १ सर्वांच्या अगोदर. २ पहिल्याच खेपेस. **पहिल्या घरचें मूल** न० पहिला नवरा मेल्यावर किं० त्याला काडी मोडून दिल्यावर स्त्रीच्या बरोबर तिच्या पाटाच्या धरीं येतें तें पहिल्या नवऱ्याचें मूल. **पहिल्यापहील, पहिल्यानें** क्रि० वि० अगो-दर; प्रथम; मूळारंभीं.

पहीपाहुणा [म० पाहुणा; सं० प्राघूर्णक] पु० आला गेला जो आपल्या पंक्तीस जेवावयास बसतो तो; पाहुणा.

पहुंची, पोंची [हिं०] स्त्री० १ मणगट. २ पुरुषाचें मणगटांत घालावयाचें एक भूषण.

पहुडणें अ० क्रि० बिछान्याला पाठ लावून हातपाय पसरून किं० ताणून आरामांत पडणें.

पह्याण न० कापून उन्हांत वाळविलेलें गवत,-गुरांना खावयासाठीं.

पळ [सं० पल] न० १ मांस. २ चार कर्ष हें वजन. ३ क्षण,-विशिष्ट कालावधि; घटिकेचा साठावा अंश. ४ अठ्ठावीस ढब्बूंचें वजन,-लोणी, तूप, इ० तोलतांना योजतात तें.

पळ [म० पळणें] पु० १ सरकारचें धरणें, दरवडेखोर, भूतपिशाच, साथीचा रोग, इ० च्या भयानें एकाद्या स्थळापासून वेगानें निघून जाणें (काढणें ,सुटणें); उ० महामारीनें दोन चार माणसें मरतांच गांवांत पळ सुटला; उ० आमचे गांवांत पळ आला आहे; उ० सरकारचे शिपायी आपल्या पाठीस लागले आहेत असें कळतांच म्हादबानें गांवांतून पळ काढला. २ भयानें पळून जाणाऱ्या लोकांचा समुदाय. ३ एकाद्या ठिकाणा-पासून कांहीं संकट टाळण्यासाठीं कोणेकाचें मुका-ट्यानें हळूंच निघून जाणें; उ० वर्गणीची यादी फिरूं लागलेली पाहातांच व्यंकटरावांनीं सभेंतून पळ काढला. ॐ **पळ काडणें** पळून जाणें. **कोणे-काचा पळ काढणें** त्याला पिटाळून लावणें. **कोणेकाला पळ सुटणें** त्याला पळून जाण्याची प्रवृत्ति किं० घाई होणें.

पळ [म० पळणें] स्त्री० १ कोणी पाठीस लागलें असतां कोणेक करतो तें पलायन (घेणें). २ शेतांतील ज्यादा पाणी बाहेर काढून लावावया-साठीं खणलेला चर.

पळक [म० पळणें] वि० १ वेगानें पळ-णारा किं० चालणारा. २ पळून जाण्याकडे कल असलेला; पळपुटा.

पळका [म० पोळणें] पु० पोळल्यामुळें गळून जातें ती शरीराची त्वचा.

पळंज न० वांझोटें कणीस; पूर्णपणें न पोस-लेलें धान्याचे दाणे प्रत्येक किं० समुच्चयानें. ' पळंजी ' स्त्री० ह्याच अर्थाचा शब्द आहे.

पळटेल पु० शेजारच्या शेतकऱ्याला शेतकी कामांत मदत करून आपल्या गरजेला त्याची मदत घेणारा शेतकरी.

पळण न०, **पळणी, पळपट, पळापळ** स्त्री० [म० पळणें] भयादि कारणानें अनेक लोकांनी एकदम एकाद्या स्थानापासून पळून जाणें.

पळणें [सं० प्र किं० परा+इ (जाणें)] अ० क्रि० स्वताच्या बचावासाठीं, किं० कांहीं संकट टाळण्यासाठीं, किं० पुढें येणारी कांही अडचण चुकविण्यासाठीं एखादें स्थळ सोडून जाणें. धावणें म्ह० वेगानें जाणें. ' धावणें ' आणि ' पळणें ' ह्यांच्यातील भेद आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ह्या पुस्तकांत ले० १३६१ पहा. ॐ **पळोंपळों करणें** कोणे-काला पळून जाण्याची इच्छा होईल इतकें छळणें किं० गांजणें. ' सळों कीं पळों असें करणें ' ह्याचाही असाच अर्थ आहे.

पळता [म० पळणें] वि० १पळून जाणारा. २ लवकर नष्ट होणारा; क्षणभंगुर; थोडक्याच अवधीपर्यंत उपयोगीं पडणारा किं० कामाला लावतां येण्याजोगा. ॐ **पळतें पीक** न० १ फला-दिकांचा शेवटचा बार किं० भर. २ व्यापार, धंदा, इ० बंद व्हावयाच्या वेळीं जो लाभ, द्रव्य, इ० होतें तें. ३ क्षणभंगुर सुख,-जें आतांच भोगून घ्यावयाचें आणि ज्याची पुढें खात्री बाळगतां येत नाहीं.

पळपटा, (-ट्या) **पळपुटा** (-ट्या) [म० पळणें] **वि०** १ पळून किं० निसटून जाणारा किं० जात असलेला किं० जाण्याकडे प्रवृत्ति ज्याची असा. २ क्षणभंगुर; अशाश्वत.

पळपळाट, फळफळाट पु० १ वैभवाची स्थिति; समृद्धि. २ वैपुल्य. ३ कोणत्याही पदार्थांची बेसुमार वाढ किं० समृद्धि.

पळपळींत वि० १ पचपचीत, पाणचट (खाद्य, पेय). २ नीरस (भाषण, विवरण).३ ज्याला धरबंध नाहीं असा (कारभार, व्यवस्था, इ०).

पळवा पु० वाळवून ठेविलेली पालेभाजी. उसर किं० उसरी म्ह० भाजीच्या उपयोगासाठीं वाळवून ठेविलेल्या भेंडीं, वांगीं, इ० च्या फोडी किं० मेथी इ० चे पाले. 'पळवा' हा शब्द पालेभाज्यांना आणि 'उसर' किं० 'उसरी' हा शब्द पालेभाज्यांना आणि फळभाज्यांना आणि विशेषत: फळभाज्यांना लावितात.

पळवाढा, पळीवाढा [म० पळी+वाढणें] **वि०** पळीनें वाढतां येण्याइतका किं० पळीनें वाढला पाहिजे असा खाद्य पदार्थ (भाजी इ०). याच्या व्यावर्तकत्वें हाताच्या बोटांनीं वाढतां येईल असा.

पळविणें [म० 'पळणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ पळावयास लावणें किं० भाग पाडणें. २ उधळून लावणें; हाकलून देणें. ३ चोरून नेणें; परवानगीवांचून कांहीं पदार्थ उचलून घेऊन जाणें. ४ कोणेकाला पळून जावयाला मदत करणें; कोणेकाला गुप्त रीतीनें दुसरीकडे घेऊन जाणें.

पळशा पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम.

पळशी स्त्री० एक झुडूप.

पळस [सं० पलाश] **पु०** एक झाड. याचीं फुलें तांबडीं असून त्यांचा रंग रंगपंचमीच्या दिवशीं मुलें एकमेकांच्या अंगांवर उडवितात.७**पळसाला पानें तीन** १ कोठेंही गेलें तरी मनुष्यस्वभाव सारखाच असावयाचा. २ कोणतीही स्थिति घेतली तरी तींत सारखींच सुखें,दु:खें,सोयी, गैरसोई,इ० असावयाच्या.**पळसपापडी स्त्री०**पळसाच्या झाडाचें बीज.

पळसुला [म० पळस+ओला] **पु०** मुंज झाल्यानंतर चवथ्या दिवशीं करावयाचा एक विधिविशेष.

पळा पु० मोठी पळी.

पळाटी, पळहाटी स्त्री० कापसाच्या झाडांची काठी किं० खोड.

पळापळ मागें 'पळण' पहा.

पळिंज, पळिंजी मागें 'पळंज,' 'पळंजी' पहा.

पळींव न० १ नांगराचा एक अवयवविशेष. २ लहानशी कुदळ,-विशेषत: बंधारा बांधण्यासाठीं मातीचीं ढिखळें उकरून काढण्याच्या उपयोगाची.

पळीवाढा वि० मागें 'पळवाढा' पहा.

पळूं न० पळीचें परडें.

पळहाटी स्त्री० कापसाच्या झाडाची काठी.

पळें, पळ्हें न० कापशीचें झाड किं० कापशीच्या झाडांचें शेत.

पक्ष [सं०] **पु०** १ पक्षी ज्या दोन अवयांच्या योगानें आकाशांत उडतात ते प्रत्येक;पंख. २ बाणाला लाविलेलें पीस. ३ वाद, भांडण, राजकारण, युद्ध, समाजांतील व्यवहार, इ० प्रसंगीं मतभिन्नत्वामुळें पडतात जे तट किं० गट ते प्रत्येक; अशा तटाचीं किं० गटाचीं जीं मतें तीं समुच्चयानें. ४ एकच वस्तु, कृति, विधि, इ० करण्याचे जे वेगळे वेगळे प्रकार असतात ते प्रत्येक;वैकल्पिक गोष्ट. ५ शरीराची उजवी किं० डावी, खालची किं० वरची बाजू. ६ सैन्याची बगल. ७ कोणत्याही उद्देशानें, नात्यानें, किं० संबंधानें जुळलेलीं माणसें समुच्चयानें. ८ पदार्थाची बाजू, कड, किं० अंग. ९ घराचें पांखें. १० पंधरवडा. ११ हिंदू महिन्याचें एक अर्ध,-पौर्णिमा ते अमावास्या आणि अमावास्या ते पौर्णिमा हे कालावधि प्रत्येक. प्रमेय, मत. १२ (**न्याय**) ज्याबद्दल कांहीं सिद्ध करावयाचें तें; संदिग्ध रूपें साध्य ज्यावर राहातें तें. 'पर्वत वन्हिमान् आहे, त्यावर धूम आहे म्हणून' ह्या उदाहरणांत पर्वताचें वन्हिमत्व सिद्ध करावयाचें आहे म्हणून पर्वत हा पक्ष होय. १३ महालय श्राद्ध,-जें भाद्रपदाच्या कृष्णपक्षांत करावयाचें असतें.७ **पक्षान्त पु०** १ पौर्णिमा.२ अमावस्या.**पक्षान्तर न०**दुसरी बाजू.**पक्षादि पु०**प्रतिपदा.**पक्षारंभ पु०**भाद्रपद महिन्याच्या कृष्णपक्षाचा

प्रारंभ. पक्षाघात, पक्षघात, पक्षवायु पु० ज्यांत अर्धे अंग निकामी होतें असा रोग. पक्षाभास पु० १ भ्रामक कोटि. २ खोटा दावा. पक्षाहार वि० व्रत म्हणून पंधरा दिवसांनी जेवणारा. पक्षपात पु० १ अन्यायाची तरफदारी. २ कैवार; ओढा; कल. पक्षी पु० खालीं स्वतंत्र शब्द पहा. कोणाचा पक्ष धरणें वाद, युद्ध, इ० मध्यें त्याचा कैवार घेणें, किं० त्याची बाजू स्वीकारणें. पक्षकर, पक्षकार पु० फिर्याद करणारा किं० ज्यावर फिर्याद करण्यांत आली आहे तो. पक्षिणी स्त्री० खालीं स्वतंत्र शब्द पहा.

पक्षिणी [सं०] स्त्री० १ पौर्णिमा. २ पक्ष्याची मादी. ३ मागची आणि पुढची दिवसयुक्त रात्र (बारा प्रहर). ४ एक रात्र आणि दोन दिवस किं० एक दिवस आणि दोन रात्री हा कालावधि.

पक्षी [सं० पक्षिन्=पंख आहेत ज्याला असा] पु० १ कावळा, चिमणी, गरुड, गिधाड, इ० पंखांनी हवेंत उडणारे प्राणी; पांखरूं. २ पिसें लाविलेला बाण. ॐ पक्षिराज पु० गरुड.

पक्षीं [सं० पक्ष; म० 'पक्ष' ची सप्तमी] क्रि० वि० १ हा पक्ष धरून. २ दुसऱ्या पक्षानें किं० बाजूनें. ३ विकल्पानें. ४ दुसऱ्या दृष्टीनें.

पां अ० १ खचित; निश्चयानें. २ कवितेंत चरण भरून काढावयासाठीं योजावयाचें अक्षर. 'पै' ह्याचाही असाच उपयोग केला जातो.

पाइंड, पाईड स्त्री० इंचाच्या चतुर्थांशाइतकी लांबी.

पाईक पु० १ किरकोळ कामें करणारा पाटील इ० चा नोकर. २ शरीरसंरक्षक; हुजऱ्या; पट्टेवाला. ३ निरोप, पत्रें, इ० नेणारा किं० आणणारा जासूद. ॐ पाइकी, पायकी स्त्री० पाइकाचा हुद्दा किं० अधिकार.

पाई [सं० पाद] स्त्री० १ चवथा भाग; चतुर्थांश. २ पई हें नाणें,–पूर्वीं पैशाचा चवथा भाग, हल्लीं तिसरा भाग. ३ राहुटीच्या दोऱ्यांच्या खालच्या आणि वरच्या अशा दोऱ्यांच्या दोन रांगांमधील भाग किं० अंतर. ४ तंबूच्या सभोवार खणलेला चर.

पाईण, पाईन स्त्री०, पु० १ पांच पडतनां इतकी जमीन; तीस विघे क्षेत्रफळ. २ इंचाचा चतुर्थांश.

पाईत न० १ पलंग, बाज, इ० चा खूर. २ डोंगराचा पायथा. ३ बाग, शेत, मळा, इ० ची सखल बाजू.

पाईर पु०, स्त्री०, पायरी स्त्री० वड, पिंपळ, इ० च्या वर्गांतील एक वृक्ष.

पाउठणी, पावठणी [म० सं० पाय+ सं० स्थान] स्त्री० जिना, शिडी, इ० चा पाहिरी.

पाउंड पु० १ पाऊल. २ पाहिरी.

पाउणकें न०, पाउणकी स्त्री०, पाउणेआठ, पाउणेपांच वि० पुढें 'पाऊण' मध्यें पहा.

पाउणकें न०, पाउणकी स्त्री० एक, दोन, तीन, इ० जे शंभरापर्यंत अंक त्यांच्या पाऊण पटींची मालिका,–जी लहान मुलाकडून घोकून पाठ करून घेतात.

पाउतका स्त्री० पुढें 'पादुका' पहा.

पाउलवा [म० पाऊल] पु० १ पावलाचें चिन्ह किं० आकृति. २ नाचतांना केलेला पादविक्षेप.

पाउसाळा पु० पुढें 'पाऊस' मध्यें पहा.

पाऊ स्त्री० पुढें 'पाव' पहा.

पाऊठ [म० पाय+उठणें] स्त्री० १ जाणें येणें इ० रूप फेरा किं० खेप. २ एक वेळ; एक खेप.

पाऊड पु०, न० १ पांगूळ, वाघ्या, मुरळी, वासुदेव, इ० भिकारी धर्मार्थ पैसा मागतांना पैशाला 'पाऊड' म्हणतात. २ गोंधळ्याला दिलेला पैसा. ३ देवापुढें ठेविलेला पैसा.

पाऊंड [म० पाय] पु० १ पाऊल. २ शिडी, जिना, इ०ची पाहिरी.

पाऊण [म० पाव+उणा] वि० पाव उणा आहे ज्यांत असा (कोणताही पदार्थ); उ० पाऊण रुपाया म्ह० बारा आणे; उ० पाऊण फूट म्ह० नऊ इंच. ॐ पाऊण म्हातारी स्त्री० कःपदार्थ; उ० माझ्यापुढें विश्वंभरभट पाऊण म्हातारी आहे ! टीप,–कोणा माणसाच्या गुणादिकाची तुच्छता करणें असतां ह्या शब्दाचा उपयोग केला जातो. पाऊणकी स्त्री०, पाऊणकें न० एक, दोन, तीन, इ० जे शंभरापर्यंत अंक त्यांच्या पाऊण

निंदा. ३ कोणाकाविरुद्ध दुष्टपणानें प्रचलित केलेली निंदा; मुद्दाम चालविलेली नालस्ती किं० बदनामी.

पांखडणें [म० पाखडणें] **न०** १ सुपांत घालून तें हलवून धान्यादींतील कोंडा बाहेर काढणें. २ कोंडा काढून टाकण्यासाठीं सुपांत घातलेलें धान्य.

पाखडणी [म० पाखडणें] **स्त्री०** पाखडण्याचा व्यापार.

पाखडणें स० क्रि० धान्य, इ० पदार्थांतील सूप इ० साधनांच्या योगानें कोंडा, केरकचरा, इ० उडवून लावणें. ॐ **कोणेकावर आग पाखडणें** १ त्याच्याविरुद्ध कुभांडें रचून, किं०त्याची बदनामी करून किं० अन्य प्रकारानीं त्याचा नाश होईल, असें करणें. २ त्याच्यावर रागानें शिव्यांचा वर्षाव करणें. **हातपाय पाखडणें** रागानें किं० वाचूच्या लहरीनें किं० झटक्यानें हातपाय. इतस्ततः आपटणें किं० आदळणें.

पाखंडी [स० पाखंड] **वि०** १ वेदविरुद्ध (मत) किं० वेदाविरुद्ध वर्तन करणारा. २ कोणेकाविरुद्ध बदनामीच्या गोष्टी कल्पून त्यांचा प्रसार करणारा. ३ तोतया; मी अमुक इसम असें ढोंग करणारा.

पाखर [सं० पक्ष = पंख] **स्त्री०** १ पक्षी आपल्या पिलांवर आपलें पंख पसरून त्यांचें करतात तें रक्षण (घालणें). २ कोणेकानें कोणेकाचें केलेलें रक्षण किं० त्याच्या सुस्थितीबद्दल वाहिलेली काळजी किं० जबाबदारी; उ० समर्थानें ज्यावर पाखर घातली त्याचें कोण नुकसान करूं शकेल? ३गाई, म्हशी,इ०च्या आंचोळाची एक एक बाजू,—उजवी किं० डावी;उ० एक पाखर पिळली, एक वासरासाठीं ठेविली. ४रखालीची एक बाजू. ५ डोंगराची उतरती बाजू किं० कड.

पाखर [सं० प्रखर, प्रक्षर] **स्त्री०** १ हत्ती, घोडा इ० ना बंदुकीची गोळी, भाला इ० पासून इजा होऊं नये म्हणून त्यांच्या अंगावर जें चिलखत घालतात तें. २ शोभेसाठीं घोडा, हत्ती, इ० च्या अंगावर घालतात तें वस्त्र, ती झूल, इ०.

पाखर स्त्री० एक लहान वेल.

पाखरूं [सं० पक्षिन् = पक्षी] **न०** १ पक्षी. २ पक्षी (प्रेमानें किं० तुच्छतेनें.) ३ सुंदर परस्त्री,—भोग्य विषय ह्या दृष्टीनें किं०विषयवासनेनें. ४हवेंत उडणारा क्षुद्र कीट. ॐ **पाखरखाद वि०** पक्ष्यांनीं अर्धवट खाल्लेलें किं० चोंची मारलेलें(फळ, धान्याचें कणीस, इ०). **स्त्री०** पक्ष्यांनीं केलेली शेत इ० ची नासाडी. **पाखरराख्या वि०** शेताच्या किं० फळझाडांच्या रक्षणार्थ असतो तो माणूस,—जो गोफणीनें धोंडे फेकून किं० ओरडून पक्ष्यांना हाकलून लावतो. **पाखरासारखी वाट पाहाणें** (चातक वर्षाकाळाची वाट पाहात असतो ह्या कल्पनेवर) अत्युत्कंठेनें कोणेकाच्या येण्याची इच्छा करून राहाणें. **पांखरें राखणें** फळझाडें, धान्याचीं कणसें, इ० चीं पक्ष्यांनीं नासाडी करूं नये म्हणून त्यांना उडवून लावणें.

पाखल [सं० पक्ष=पंख] **स्त्री०** १ पोटांत बराच वेळ अन्न न गेल्या कारणानें पोटाला पडतो तो खळगा. २ कोणेकाचा कोणी केलेला सांभाळ किं० त्याची घेतलेली काळजी. ३ गायी, म्हशी, इ०च्या आंचोळांची एक बाजू.

पाखळ स्त्री० झाडावरून तोडलेलीं फळें जमीनीवर टाकलेलीं असतात तीं,—तीं गोळा करून हारा इ० मध्यें भरावयाच्या अगोदर; उ० त्या झाडाखालीं आंब्यांची गुडघ्याइतकी उंच पाखळ पडली होती.

पाखळणी [म० पाखळणें] **स्त्री०**१ देवांची मूर्ति घासून स्वच्छ करण्याची क्रिया. २ वर्षाचीं शेतकीचीं कामें आटोपल्यावर शेतकरी लोक करतात ती मेजवानी; उ० आज आमच्या येथें पाखळणी आहे,तुम्ही जेवावयास या.

पाखळणें [सं० प्र+क्षल् =धुणें]**स० क्रि०** १ देवाची मूर्ति घासून धुवून स्वच्छ करणें. २ दही, दूध, तूप, मध, आणि साखर, ह्या द्रव्यांनीं देवांच्या मूर्ति माखून धुणें. ॐ **पाखळपूजा स्त्री०** १ पाखळणी नंतर देवाच्या मूर्तींची पूजा. वर ' पाखळणी ' पहा. २ तुच्छतापूर्वक कोणेकाची केलेली हकालपट्टी. ३ एकादें व्यसन किं० खोड यांचा सर्वथैव परित्याग.

पाखा [म० पाख] **पु०** १ चोळीची एक बाजू,—उजवीकडची किं० डावीकडची. २ पाको-

ळीची एक लहान आकाराची जात. ३ छपराची एक बाजू; पाखें. [पहा.

पाखांड, पाखांडी वर ' पाखंड, ' 'पाखंडी'

पाखाड, पाखाडें [म० पाखें] न० १ भिंतीच्यापुढें आलेला छपराचा भाग. २ छपराची बाजू. ३ पक्ष्याचा पंख. ४ दोन भागांत असलेल्या कोणत्याही पदार्थाचें एक एक अर्धुक.

पाखाडा [म० पाखडणें] पु० पाखडण्याच्या क्रियेनें निघालेला कोंडा इ०.

पाखाडी [म० पाखें] स्त्री० १ फरसबंदी वाट,–बाग इ० मध्यें केलेली. २ गांवांतील रस्ते, आळया, बोळ, जे ते प्रत्येक. ३ घराची पडवी,–मुख्य घराचें छप्पर लांबवून किं० वाढवून केलेली. ४ घराचें आढें आणि इंद्रकट यांच्यामध्यें वांशांस आधारभूत जीं आडवी लाकडें असतात तीं प्रत्येक. इंद्रकट म्ह० तोंडकडी; आढें आणि तोंडकडी यांच्यामध्यें आणि यांना समांतर जे वांसे असतात ते प्रत्येक. मागें ' इंद्रकट ' पहा.

पाखाळणी, पाखाळणें, पाखालपूजा मागें ' पाखळणी, ' पाखळणें,' पाखळपूजा ' पहा.

पाखी स्त्री० मागें ' पाकी ' पहा.

पाखुरडें [म०पाखरूं] न०, पक्षी, पाखरूं, (तुच्छतेनें).

पाखें [म० पाख] न० १ घराच्या आढ्या-पासून पावसाचें पाणी उतरावयासाठीं जे दोहोंकडे दोन भाग किं० चोहोंकडे चार भाग पक्षाकार करतात ते प्रत्येक. २ गायी, म्हशी, इ०च्या आंचोळाची उजवीकडची किं० डावीकडची बाजू.

पांग पु० १ अन्न, वस्त्र, पैसा, जोपासना कर-णारा माणूस, इ० आपणाला असावें किं० मिळावें अशी जी कोणेकाला अति उत्कट इच्छा असते ती (फेडणें, फिटणें); उ० असतील बाळ तर फेड-तील पांग; उ० तूं माझें अगदीं ऐकत नाहींस,– माझ्या म्हातारपणीं चांगले पांग फेडशील!२ जरूर किं० आवश्यक अशा वस्तूंची भासते किं० वाटते ती अडचण किं० उणीव; उ० मोठ्याचा आश्रय मिळाला म्हणजे खाण्यापिण्याचे पांग फिटतात. ३ आपणावर उपकार करणाऱ्या संबंधानें आपणाला वाटते ती मिंधेगिरी किं० ओशाळगत; उ०याच्या पांगांत माझ्यानें रहावत नाहीं. टीप,–सर्व अर्थी ' पांग ' शब्दाचा अनेकवचनी प्रयोग होतो. ❀ **येतील वांग तर फिटतील पांग** ज्याच्या अंगा-वर वांग असतात त्याच्या सर्व इच्छा भागतात. **टीप**,–अंगावर वांग येणें तें शुभ चिन्ह समजलें जातें.

पांग पु० १ समुद्रादिकांत मासे धरावयाच्या कामीं योजतात तें मोठें जाळें. २ मोठ्या गलबताला होडी बांधावयाची दोरी. ३ एक प्रकारची लहान होडी. ४ लाकूड इ० तरंगणारा पदार्थ गलबता-मागून ओढून न्यावयाची दोरी.

पाग स्त्री० १ बंदरांतून गलबत हाकारतांना द्यावा लागतो तो पैसा. २ बैलाला रस्त्यानें चाल-वीत वाटेनें नेतांना त्याच्या गळ्याला बांधलेली असते ती दोरी.

पांगणी [म० पांगणें] स्त्री० इतस्ततः पदार्थ टाकणें किं० पसरणें; कांहीं कामांसाठीं एकाद्या ठिकाणीं जमलेली माणसें काम समाप्त झाल्यावर आपआपल्या घरीं जाणें.

पांगणें स० क्रि० समुद्राच्या पाण्यांत पांग टाकून (मासे) धरणें, ' पांग ' म्ह० मासे धरा-वयाचें मोठें जाळें.

पांगणें अ० क्रि० १ एके ठिकाणीं जमलेल्या माणसांनीं घरोघर निघून जाणें. २ अनेक माण-सांनीं आपआपल्या सोयीप्रमाणें भिन्न भिन्न ठिकाणीं जाणें किं० वसति करून राहणें.

पागनीस खालीं ' पागा ' मध्यें पहा.

पांगरा पु० खालीं ' पांगारा ' पहा.

पांगली स्त्री० एक वनस्पति.

पांगशी स्त्री० झाडें, वेली, इ०ना फुटतात ते अंकुर किं० धुमारे. क्रि० फुटणें. **पांगशी, पांग-शीचा** वि० ज्याचा फळांचा बहर ओसरून गेला आहे असें (मिरचीचें झाड किं० एखादा वेल). **पांगशीची तंबाखू** स्त्री० पहिला जोराचा बहर संपून गेल्यावर दुसऱ्या बहराला आलेली(तंबाखू). ह्याच सरणीनें ' पांगशी फळ, " पांगशीचें फळ' यांचे अर्थ जाणावे.

पागळ, पागळणें पुढें ' पाघळ, 'पाघळणें '

पटींची मालिका. **पाउणे आठ, पावणे आठ वि०** १ जो पूर्णत्वानें पुरुष नाहीं तो; षंढ; नपुंसक. २ कर्तृत्वशून्य माणूस. **पावणेपांच वि०** चारांत पाऊण मिळवून होणाऱ्या परिमाणाचा; पांचांतून पाव उणा करून होणाऱ्या परिमाणाचा. **घे मेरे पावणेपांच** कितीही प्रयत्न केला तरी ज्याची समजूत पडत नाहीं आणि जो आपला हेका सोडीत नाहीं त्याची निंदा करतांना हें वाक्य योजतात. **पाऊणवाटा पु०** बहुतेक सर्व.

पाऊल न० १ पायाच्या घोट्याखालचा भाग. २ पायाच्या घोट्याखालच्या भागाची ठेवण. ३ जमीनीवर उमटलेली पावलाची आकृति. ४ चालतांना दोन पावलांतील अंतर. ५ पायाचा तळवा. ६ चालण्याचा वेग; उ० रामाचें पाऊल गोदीच्यापेक्षां सावकाश आहे. ७ पायाच्या लांबीइतकी लांबी; उ० सगळ्यांचीं पावलें हत्तीच्या पावलांत. ८ चालण्याची तऱ्हा किं० ढब; विशिष्ट प्रकारची चाल; उ० आमच्या तट्टाला तुर्की पाऊल चांगलें लागलें. ❀ **चांगल्या (किं० वाईट) मार्गांत पाऊल ठेवणें** चांगल्या (किं० वाईट) प्रकारें वागणें; नीतिच्या (किं० अनीतिच्या) सरणीचा अवलंब करणें. **कोणेकाचें पाऊल ओळखणें** (किं० **जाणणें** किं० **समजणें**) त्याचा कल किं० स्वभाव जाणणें. **पाऊल जपून ठेवणें** काळजीनें वागणें; कांहीं काम करण्यांत काळजी बाळगणें. **पाऊल पुडें ठेवणें** एखादें काम करावयाला किं० पथकरावयाला सिद्ध होणें किं० पुढें सरसावणें. **पाऊल पुढें पडणें** हातीं घेतलेल्या कामांत प्रगति होणें; पुढें जाणें. **पाऊल माघारें घेणें (किं० काढणें)** माघार घेणें; माघार खाणें; मागें हटणें. **पाउलें (पावलें) मोजीत चालणें** सावकाश किं० मंद गतीनें चालणें. **कोणेकाचें पाऊल वाकडें पडणें** किं० **वाकड्या मार्गानें पाऊल पडणें** सत्पथ किं० नीतीचा मार्ग सोडून असत्पथानें किं० अनीतीच्या मार्गानें तो जाणें किं० वागूं लागणें. **एकाद्याच्या पावलावर पाऊल (किं० पाय)ठेवून जाणें** त्याचें अनुकरण करणें. **पाऊलबुद्धि वि०** क्षणोक्षणीं ज्याचे विचार किं० मतें बदलतात असा (मनुष्य). **स्त्री०** क्षणोंक्षणीं पालटणारी बुद्धि; अस्थिर किं०चंचल बुद्धि. **पाऊल वाट स्त्री०** अरुंद वाट,-जींतून गाडी जाऊं शकत नाहीं किं० जींतून फक्त माणसालाच जातां किं० चालतां येईल.

पाऊस [सं० प्रावृष्] पु० १ पर्जन्य; मेघांतून गळतें तें पाणी. २ मेघांतून गळणाऱ्या पाण्याची एक सर. ३ झाडाचीं पानें, फळें,इ० चें वैपुल्यानें पतन; कोणत्याही वस्तूचें वैपुल्य. ❀ **दोनशे पाऊस पु०** पावसाची मुसळधार किं० विपरीत लक्षणेनें अगदीं थोडा पाऊस. **पडत्या पाडसांत** ऐन पावसाळ्यांत; उ० सदोबानें पडत्या पावसांत घर बांधलें; उ० पडत्या पावसांत मी पुण्याहून रत्नागिरीस गेलों. **पाऊस उतरणें** सर येण्याचीं पावसाचीं चिन्हें दिसणें. **पाऊस डोकीवर येणें** १ पावसाची सर येण्याचीं चिन्हें दिसूं लागणें. २ पावसाळा येऊन ठेपलेला असणें. **पाऊसभर क्रि० वि०** पावसाळ्याच्या संबंध ऋतूंत. **पाऊस हडकणें** पाऊस बंद होणें; पाऊस पडावा तेव्हां न पडणें. **पावसाचें पोट फुटणें** मुसळधार पाऊस पडत असणें; एकसारखा पाऊस पडत राहणें. **पावसानें झाडणें**१पावसाळा संपणें.२ पावसाची सर थांबणें. **पावसानें डोळे उघडणें** पाऊस पडणें बंद होणें;उघाडी होणें. **पावसानें डोळे वटारणें** पाऊस पडणें जरूर असतां मुळींच पाऊस न पडणें. **पावसानें दिवा लावणें** अवर्षणाचा रंग दिसणें. **पाऊसकाळ पु०** पावसाळा; मृगनक्षत्र आणि हस्तनक्षत्र ह्यांच्या दरम्यानचा काळ. **पाऊसपाणी न० ए० व०** पाऊस पडणें किं० न पडणें, धान्य चांगलें पिकणें किं० न पिकणें,इ०गोष्टी समुच्चयानें; उ० यंदा सोलापुरच्या बाजूस पावसापाण्याची काय हालहवाल आहे ?

पाक [सं०] पु० १ स्वयंपाक. २ भाजणें, शिजणें, शिजविणें, ह्या क्रिया प्रत्येक. ३ आंबा, केळें, फणस, इ० फळांची पक्वदशा म्ह० त्यांचें पिकणें. ४ दहा पांच औषधें एकत्र करून त्यांचा करतात तो रांधा. ५ खाल्लेल्या अन्नाचें पचन किं० खाल्लेल्या अन्नावर होतो तो जठराग्नीचा संस्कार. ६ विकास, प्रगल्भ दशा (बुद्धीची). ७ केलेल्या कर्माचा परिणाम किं० फळ किं० पर्यवसान. ८ जठराग्नि. ९ गळूं इ० मध्यें पू साचणें. १० साखर किं० गूळ यांत पाणी घालून चुलीवर ठेवून त्यांना

ळींची एक लहान आकाराची जात. ३ छपराची एक बाजू; पाखें. [पहा.

पाखांड, पाखांडी वर ' पाखंड, ' ' पाखंडी '

पाखाड, पाखाडें [म० पाखें] न० १ भिंतीच्यापुढें आलेला छपराचा भाग. २ छपराची बाजू. ३ पक्ष्याचा पंख. ४ दोन भागांत असलेल्या कोणत्याही पदार्थाचें एक एक अर्धुक.

पाखाडा [म० पाखडणें] पु० पाखडण्याच्या क्रियेनें निघालेला कोंडा इ०.

पाखाडी [म० पाखें] स्त्री० १ फरसबंदी वाट,–बाग इ० मध्यें केलेली. २ गांवांतील रस्ते, आळया, बोळ, जे ते प्रत्येक. ३ घराची पडवी,–मुख्य घराचें छप्पर लांबवून किं० वाढवून केलेली. ४ घराचें आढें आणि इंद्रकट यांच्यामध्यें वांशांस आधारभूत जीं आडवी लाकडें असतात तीं प्रत्येक. इंद्रकट म्ह० तोंडकडी; आढें आणि तोंडकडी यांच्यामध्यें आणि यांना समांतर जे वांसे असतात ते प्रत्येक. मागें ' इंद्रकट ' पहा.

पाखाळणी, पाखाळणें, पाखालपूजा मागें ' पाखळणी, ' पाखळणें,' पाखळपूजा ' पहा.

पाखी स्त्री० मागें ' पाकी ' पहा.

पाखुरडें [म०पाखरूं] न०, पक्षी, पाखरूं, (तुच्छतेनें).

पाखें [म० पाख] न० १ घराच्या आढ्यापासून पावसाचें पाणी उतरावयासाठीं जे दोहोंकडे दोन भाग किं० चोहोंकडे चार भाग पक्षाकार करतात ते प्रत्येक. २ गायी, म्हशी, इ०च्या आंचोळाची उजवीकडची किं० डावीकडची बाजू.

पांग पु० १ अन्न, वस्त्र, पैसा, जोपासना करणारा माणूस, इ० आपणाला असावें किं० मिळावें अशीं जी कोणेकाला अति उत्कट इच्छा असते ती (फेडणें, फिटणें); उ० **असतील बाळ** तर फेडतील पांग; उ० तूं माझें अगदीं ऐकत नाहींस,– माझ्या म्हातारपणीं चांगले पांग फेडशील! २ जरूर किं० आवश्यक अशा वस्तूंची भासते किं० वाटते ती अडचण किं० उणीव; उ० मोठ्याचा आश्रय मिळाला म्हणजे खाण्यापिण्याचे पांग फिटतात. ३ आपणावर उपकार करणाऱ्या संबंधानें आपणाला वाटते ती मिंधेगिरी किं० ओशाळगत; उ०याच्या पांगांत माझ्यानें रहावत नाहीं. टीप,–सर्व अर्थी ' पांग ' शब्दाचा अनेकवचनी प्रयोग होतो. ❀ **येतील वांग तर फिटतील पांग** ज्याच्या अंगावर वांग असतात त्याच्या सर्व इच्छा भागतात. **टीप**,–अंगावर वांग येणें तें शुभ चिन्ह समजलें जातें.

पांग पु० १ समुद्रादिकांत मासे धरावयाच्या कामीं योजतात तें मोठें जाळें. २ मोठ्या गलबताला होडी बांधावयाची दोरी. ३ एक प्रकारची लहान होडी. ४ लाकूड इ० तरंगणारा पदार्थ गलबतामागून ओढून न्यावयाची दोरी.

पाग स्त्री० १ बंदरांतून गलबत हाकारतांना द्यावा लागतो तो पैसा. २ बैलाला रस्त्यानें चालवीत वाटेनें नेतांना त्याच्या गळ्याला बांधलेली असते ती दोरी.

पांगणी [म० पांगणें] स्त्री० इतस्ततः पदार्थ टाकणें किं० पसरणें; कांहीं कामासाठीं एकाद्या ठिकाणीं जमलेली माणसें काम समाप्त झाल्यावर आपआपल्या घरीं जाणें.

पांगणें स० क्रि० समुद्राच्या पाण्यांत पांग टाकून (मासे) धरणें, ' पांग ' म्ह० मासे धरावयाचें मोठें जाळें.

पांगणें अ० क्रि० १ एके ठिकाणीं जमलेल्या माणसांनीं घरोघर निघून जाणें. २ अनेक माणसांनीं आपआपल्या सोयीप्रमाणें भिन्न भिन्न ठिकाणीं जाणें किं० वसति करून राहणें.

पागनीस खालीं ' पागा ' मध्यें पहा.

पांगरा पु० खालीं ' पांगारा ' पहा.

पांगली स्त्री० एक वनस्पति.

पांगशी स्त्री० झाडें, वेली, इ०ना फुटतात ते अंकुर किं० धुमारे. क्रि० फुटणें. **पांगशी, पांगशीचा** वि० ज्याचा फळांचा बहर ओसरून गेला आहे असें (मिरचीचें झाड किं० एखादा वेल). **पांगशीची तंबाखू** स्त्री० पहिला जोराचा बहर संपून गेल्यावर दुसऱ्या बहराला आलेली(तंबाखू). ह्याच सरणीनें ' पांगशी फळ, " पांगशीचें फळ' यांचे अर्थ जाणावें.

पागळ, पागळणें पुढें ' पाघळ, 'पाघळणें '

पटींची मालिका. **पाउणे आठ, पावणे आठ** वि० १ जो पूर्णत्वानें पुरुष नाहीं तो; षंढ; नपुंसक. २ कर्तृत्वशून्य माणूस. **पावणेपांच** वि० चारांत पाऊण मिळवून होणाऱ्या परिमाणाचा; पांचांतून पाव उणा करून होणाऱ्या परिमाणाचा. **घे मेरे पावणेपांच** कितीही प्रयत्न केला तरी ज्याची समजूत पडत नाहीं आणि जो आपला हेका सोडीत नाहीं त्याची निंदा करतांना हें वाक्य योजतात. **पाऊणवाटा पु०** बहुतेक सर्व.

पाऊल न० १ पायाच्या घोट्याखालचा भाग. २ पायाच्या घोट्याखालच्या भागाची ठेवण. ३ जमीनीवर उमटलेली पावलाची आकृति. ४ चालतांना दोन पावलांतील अंतर. ५ पायाचा तळवा. ६ चालण्याचा वेग; उ० रामाचें पाऊल गोदीच्यापेक्षां सावकाश आहे. ७ पायाच्या लांबीइतकी लांबी; उ० सगळ्यांचीं पावलें हत्तीच्या पावलांत. ८ चालण्याची तऱ्हा किं० ढब; विशिष्ट प्रकारची चाल; उ० आमच्या तट्टाला तुर्की पाऊल चांगलें लागलें. ❀ **चांगल्या (किं० वाईट) मार्गांत पाऊल ठेवणें** चांगल्या (किं० वाईट) प्रकारें वागणें; नीतिच्या (किं० अनीतिच्या) सरणीचा अवलंब करणें. **कोणेकाचें पाऊल ओळखणें** (किं० **जाणणें** किं० **समजणें**) त्याचा कल किं० स्वभाव जाणणें. **पाऊल जपून ठेवणें** काळजीनें वागणें; कांहीं काम करण्यांत काळजी बाळगणें. **पाऊल पुढें ठेवणें** एखादें काम करावयाला किं० पथकरावयाला सिद्ध होणें किं० पुढें सरसावणें. **पाऊल पुढें पडणें** हातीं घेतलेल्या कामांत प्रगति होणें; पुढें जाणें. **पाऊल माघारें घेणें** (किं० **काढणें**) माघार घेणें; माघार खाणें; मागें हटणें. **पाउलें (पावलें) मोजीत चालणें** सावकाश किं० मंद गतीनें चालणें. **कोणेकाचें पाऊल वाकडें पडणें** किं० **वाकड्या मार्गानें पाऊल पडणें** सत्पथ किं० नीतीचा मार्ग सोडून असत्पथानें किं० अनीतिच्या मार्गानें तो जाणें किं० वागूं लागणें. **एकाद्याच्या पावलावर पाऊल (किं० पाय)ठेवून जाणें** त्याचें अनुकरण करणें. **पाऊलबुद्धि वि०** क्षणोक्षणीं ज्याचे विचार किं० मतें बदलतात असा (मनुष्य). **स्त्री०** क्षणोक्षणीं पालटणारी बुद्धि; अस्थिर किं०चंचल बुद्धि. **पाऊलवाट स्त्री०** अरुंद वाट,–जींतून गाडी जाऊं शकत नाहीं किं० जींतून फक्त माणसालाच जातां किं० चालतां येईल.

पाऊस [सं० प्रावृष्] **पु०** १ पर्जन्य; मेघांतून गळतें तें पाणी. २ मेघांतून गळणाऱ्या पाण्याची एक सर. ३ झाडाचीं पानें, फळें,इ० चें वैपुल्यानें पतन; कोणत्याही वस्तूचें वैपुल्य. ❀ **दोनशें पाऊस पु०** पावसाची मुसळधार किं० विपरीत लक्षणेनें अगदीं थोडा पाऊस. **पडत्या पावसांत** ऐन पावसाळ्यांत; उ० सदोबानें पडत्या पावसांत घर बांधलें; उ० पडत्या पावसांत मी पुण्याहून रत्नागिरीस गेलों. **पाऊस उतरणें** सर येण्याचीं पावसाचीं चिन्हें दिसणें. **पाऊस डोकीवर येणें** १ पावसाची सर येण्याचीं चिन्हें दिसूं लागणें. २ पावसाळा येऊन ठेपलेला असणें. **पाऊसभर क्रि० वि०** पावसाळ्याच्या सबंध ऋतूंत. **पाऊस हडकणें** पाऊस बंद होणें; पाऊस पडावा तेव्हां न पडणें. **पावसाचें पोट फुटणें** मुसळधार पाऊस पडत असणें; एकसारखा पाऊस पडत राहणें. **पावसानें झाडणें** १ पावसाळा संपणें. २ पावसाची सर थांबणें. **पावसानें डोळे उघडणें** पाऊस पडणें बंद होणें; उघाडी होणें. **पावसानें डोळे वटारणें** पाऊस पडणें जरूर असतां मुळींच पाऊस न पडणें. **पावसानें दिवा लावणें** अवर्षणाचा रंग दिसणें. **पाऊसकाळ पु०** पावसाळा; मृगनक्षत्र आणि हस्तनक्षत्र ह्यांच्या दरम्यानचा काळ. **पाऊसपाणी न० ए० व०** पाऊस पडणें किं० न पडणें, धान्य चांगलें पिकणें किं० न पिकणें, इ०गोष्टी समुच्चयानें; उ० यंदा सोलापुरच्या बाजूस पावसापाण्याची काय हालहवाल आहे ?

पाक [सं०] पु० १ स्वयंपाक. २ भाजणें, शिजणें, शिजविणें, ह्या क्रिया प्रत्येक. ३ आंबा, केळें, फणस, इ० फळांची पक्वदशा म्ह० त्यांचें पिकणें. ४ दहा पांच औषधें एकत्र करून त्यांचा करतात तो रांधा. ५ खालेल्या अन्नाचें पचन किं० खालेल्या अन्नावर होतो तो जठराग्नीचा संस्कार. ६ विकास, प्रगल्भ दशा (बुद्धीची). ७ केलेल्या कर्माचा परिणाम किं० फळ किं० पर्यवसान. ८ जठराग्नि. ९ गळूं इ० मध्यें पू साचणें. १० साखर किं० गूळ यांत पाणी घालून चुलीवर ठेवून त्यांना

दिलेलें पातळ रूप (पक्वान्नें, हलवा, मोरआंबा, इ० साठीं).११ काव्यादिरचनेची धाटणी; उ० कालिदासाच्या काव्याचा पाकच निराळा. १२ युक्ति, हिकमत, शक्कल, इ० ची घटना किं० रचना. ꙮ **पाकनिष्पत्ति स्त्री०** स्वयंपाकाची सिद्धता; स्वयंपाकाचे सर्व पदार्थ तयार होणें. **पाकशाला(–ळा) स्त्री०** स्वयंपाक घर.

पाक [फा०] **वि०** १ शुद्ध; निर्भेळ. २ स्वच्छ; निर्मळ. ३ निष्कपट (मनुष्य). ४ पवित्र. ꙮ **लावली राख आणि झाली पाक** पवित्रपणाचा देखावा केल्यानें अंत:करण पवित्र होतें असें नव्हे. **पाकदोस्ती स्त्री०** दोन माणसांतील नि:स्वार्थ बुद्धीची मैत्री. **पाकी स्त्री०** अंत:करणाची पवित्रता.

पाकचंदन पु० तांबड्या पंखाचा राघूसारखा [एक पक्षी.

पाकटी स्त्री० तांदूळ वालदरशेत आहेत इतक्यांत वाळलेले भात किं०अशा भातांतून काढलेले तांदूळ.

पाकड पु० भाताच्या शेतांत उत्पन्न होतें तें एक तृणधान्यविशेष,–टीप पाकड उपधान्यांत गणला जातो.

पाकडी, पैकडी स्त्री० मधमाश्यांच्या पोवळ्यातील त्यांची रहावयाची जागा.

पाकणें, पाकविणें [म० पाक] **स० क्रि०** १ साखर, गूळ, इ०च्या पाकानें खाद्यविशेष तयार करणें. २ पाकाचें पुट पदार्थास देणें.

पाकळी स्त्री० १ फुलाचे जे वेगळे वेगळे वर्तुळाकार भाग त्यापैकीं अत्यंत मनोहर जो भाग त्याचे घटक अवयव. २ लिंबू, संत्रा, इ० फळांचे पातळ पापुद्र्यानें वेष्टित जे पांच सहा भाग असतात ते प्रत्येक. ३ पाकोळी हा प्राणी. ꙮ **एकपाकळी, दुपाकळी, तिपाकळी,** इ० **वि०** पाकळ्यांचा एक घेरा, दोन घेरे, तीन घेरे असलेलें(फूल).

पाकी [फा० पाक्=स्वच्छ] **स्त्री०** १ मनाची निष्कपटी वृत्ति. २ उपस्थावरी केश तासावयाला योजावयाचा वस्त्रा किं० ह्या वस्त्र्यानें ह्या केशांची केलेली तासणी.

पांकुलें न० वांसरूं (मुलांचा शब्द).

पाकुळकी, पाकुळता [म० पाकुळणें] **स्त्री०** मनाला दया, प्रेम, इ० भावनांनीं आलेला गहिंवर; अंत:करणास आलेला द्रव.

पाकुळणें, पाकोळणें [म०पाक=पाणी घालून झालेली किं० पचपचीत स्थिति,–साखर, इ०चा] **अ० क्रि०** १ (आजार, खाण्यापिण्याची आबाळ, यामुळें मनुष्य, जनावर, पावसाळ्यांत माशा, इ०) निर्वीर्य, नि:सत्त्व, निर्बल होणें. २ (फूल) विसविशित होणें किं० कोमेजणें. ३ (फळ) बाशें किं० शिळें होणें किं० सुकणें. ४कोणत्याही कामांत ढिलाई किं० हयगय करणें. ५ (कोणी माणसाचें) दया, प्रेम, इ० भावनांनीं (मन, अंत:करण) द्रवणें किं० आक्रान्त होणें. ६ स्त्रीसंभोग सुरू किं० समाप्त व्हावयाच्या अगोदरच (पुरुष किं० जननेंद्रिय) निर्बल होणें. ७ (दूध, दहीं, तूप, लोणी, इ०) नासून त्यांत कृमि उत्पन्न होणें.

पाकोळी [म० पाख] **स्त्री०** १ एक प्रकारचें वावूळ. २ फुलाची पाकळी. ३ लिंबू, संत्रा, इ० फळांतलि जे पांच सहा विभाग ते प्रत्येक. ४ चिमणीसारखें एक लहान पांखरूं. ५ लोणी, दही, इ०नासून त्यांत उत्पन्न होतात ते कृमि प्रत्येक.

पांक्त [सं०] **वि०** १ मूळ ग्रंथाच्या प्रत्येक पंक्तीस म्ह० ओळीस धरून किं० अनुसरून असलेला, वाचलेला, शिकलेला, किं० शिकविलेला (ग्रंथ). २ पंक्ति करून बसविलेला, मांडलेला, किं० रचलेला. ३ जो जातिभ्रष्ट नव्हे म्ह० जो जातवाल्यांच्या पंक्तींत वसून जेवूं शकतो असा (मनुष्य). ꙮ **पांक्त ग्रंथ पु०** मूळ ग्रंथ,–टीका, टिपणें, इ० सोडून. **पांक्तोपस्थिति स्त्री०** १ ग्रंथाच्या प्रत्येक ओळीचें न विसरलेलें अध्ययन; ग्रंथाशीं पूर्ण परिचय,–मलिन न झालेला किं० न विसरलेला. **श्लोक, ग्रंथ** इ० **पांक्त लागणें** त्यांतलि एकही शब्द किं० पंक्ति न अडतां श्लोक, ग्रंथ, इ० समजणें.

पाख [सं० पक्ष] **पु०** १ पक्ष्याचा पंख. २ हिंदू महिन्याचा (शुक्ल किं० कृष्ण) पक्ष म्ह० पंधरवडा. ३ घराचें पाखें; छपर किं०एका बाजूचें छपर.

पाखड, पाकड पु० भाताच्या शेतांत उगवतें तें एक धान्यविशेष.

पाखंड, पाषंड [सं०] **पु०** नास्तिक; वेदबाह्य. **न०** १ वेदाच्या उलट प्रतिपादिलेलें मत. २ आपल्या उपास्य देवतेहून भिन्न अशा देवतेची

पहा. [पांवा ' पहा.

पांगळपोवा (–पोहो,–पोहा)पुढें ' पांगूळ-

पांगळा,पांगूळ पु० १ मोठ्या सकाळीं भिक्षा मागणाऱ्या भिकाऱ्यांची एक जात किं० त्या जातीचा इसम. २ नंदीबैल बाळगून भिक मागणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

पांगळा, पांगा, पांगूळ [सं० पंगु] वि० १ पायानें जो अधू तो. २ लंगडा. ※ **पांगूळकाठी** स्त्री०, **पांगूळ घोडा, पांगूळधिरा** पु० पांगळा माणूस आधारार्थ घेतो ती काठी. **पांगूळगाडा** पु० मुलांना चालावयाला शिकवावयाची लहान चाकांची गाडीसारखी रचना. **पांगा** [सं० पंगु] वि० १ ज्याचे पाय गुडघ्यापाशीं बाहेरून कमानीसारखे वळलेले आहेत असा. २ ज्याची चालण्याची ढब ऐवट आहे असा. **फेंगडा**

पांगूळपोवा (–पोहा,–पोहो) पु० लंगडे, पांगळे, थोटे, अंधळे, अशक्त, दुर्बळ, अशा व्यंग माणसांचा जमाव. **पांगूळवाडा** पु०अशा लोकांचा मोहल्ला.

पागा [हिं०] स्त्री० १ घोडशाला. २ एका माणसाच्या देखरेखीखालीं किं० हुकमतीखालीं असलेले घोडे समुच्चयानें.२कोणा माणसाच्या मालकीचे जे घोडे ते समुच्चयानें. ※ **पागेस लागणें** कांहीं पदार्थ कांहीं काळ कोणेकाच्या स्वाधीन केला जाणें. **पागेस लावणें** १ कांहीं पदार्थ कांहीं काळ जोपासनेसाठीं कोणेकाच्या स्वाधीन करणें. २कोणा माणसास कोणेकाच्या देखरेखीखालीं ठेवणें.३पदार्थ-विशेष योग्य स्थळीं किं० जेथल्या तेथें ठेवणें.**पाग-नीस** पु० १पागेच्या अधिकाऱ्याच्या हाताखालचा कारकून. २ पागेच्या पैशाचा जमाखर्च ठेवणारा. **पागेकरी** पु०१पागेकडचा अधिकारी.२पागेकडचा इसम.३ज्याच्या मालकीचे पुष्कळ घोडे आहेत असा. **पागेचें तट्टू** न० चुणचुणीत, तल्लख, हुशार माणूस किं०मूल.**पागेदार** पु०घोडदळाचा वरिष्ठ अधिकारी. **पाग्या** [म० पागा] पु० पागेवरचा अधिकारी किं० अमलदार; उ० आधीं होता वाग्या मग झाला पाग्या इ० (तुकाराम).

पांगापांग (–गी) स्त्री० माणसें, जनावरें, इ० जेथें जमलेलीं किं० गोळा झालेलीं आहेत तेथून त्यांचें निघून जाणें.

पागार पु० धान्याचे दाणे जमीनींत पेरावयाचें शेतकऱ्याचें एक आउत.

पांगारा, पांगेरा पु० एक वृक्षविशेष.

पांगिला [म० पांग] वि० दुसऱ्याच्या आश्रयास राहिला आहे तो (कवितेंत).

पांगुळणें [म० पांगूळ] अ० क्रि० १पायानें अधू किं० लंगडे होणें. २ प्रेमादिकारणानें कोणी मनुष्य स्थळविशेषीं चिकटून किं० अडकून राहणें किं० राहिलेला असणें.

पांगूळ वर ' पांगळा ' पहा.

पांगूळ पु० १ पहाटेस भिक मागणारा किं० नंदीबैलास बरोबर घेऊन भिक्षा मागणारा भिकारी. २पिंगळा नांवाचा पक्षी. ※ **पांगूळबैल** पु०पांगूळ नांवाचे भिकारी बाळगतात तो नंदीबैल.**पांगूळवेळ** स्त्री०पांगूळ भिकाऱ्यांची भकि मागावयाची वेळ,– म्ह० सूर्योदयाच्या थोडी अगोदरची किं० थोडी नंतरची.

पांगूळ पु० एक प्रकारचा किडा,–जो अति दुर्गंधियुक्त फुसकारे सोडतो 'पांगूळ किडा' असाही शब्द आहे.

पांगेरा पु० वर ' पांगारा ' पहा.

पागोटें [हिं०] न० डोक्याचें आच्छादन करणारा पोशाखाचा भाग (घालणें,डोकीवर ठेवणें, बांधणें). ※ **आपलें पागोटें बगलेंत मारणें** मारामारीस सिद्ध होऊन राहणें. **आधीं आपल्या पागोट्यांशीं भांडावें मग दुसऱ्याच्या पागो-ट्यांशीं भांडावें** अगोदर आपल्या घरची व्यवस्था नीटनेटकी आहे अशी आपली खात्री करून ध्यावी आणि नंतर दुसऱ्याच्या घरच्या व्यवस्थेंत दोष काढीत बसावें. **एकाद्याचें पागोटें खालीं करणें** त्याची बदनामी करणें;त्याच्या संबंधानें खोट्या कंड्या उठविणें.**पागोटें गमावणें** १ फसविलें जाणें. २ नुकसानीस पात्र होणें. ३ अपमानास किं० बद-लौकिकास पात्र होणें. **दुसऱ्याचें पागोटें गुंडा-ळणें** त्याला फसविणें. **एकाद्याचें पागोटें घेणें** १ त्याला फसविणें. २त्याच्याशीं व्यवहार करतांना आपण न फसतां त्याला फसवून आपला फायदा करून घेणें. **एकाद्याचें पागोटें पडणें** (किं० **वाकडें होणें**) त्याची फजीती होणें. **एकाद्याला पागोटें बांधणें** (किं० **बांधून देणें**) त्याला

टीप,–ह्या कोशाच्या ११४८ च्या पुढें ११५१ आणि ११५२ हीं पानें वाचावीं.

संमानपूर्वक पागोटें बक्षीस देणें; त्याला पागोट्याचा आहेर करणें. **पागोटें बाळगणें** किं० **पागोट्याची लाज धरणें** आपला लौकिक कमी न होईल अशाविषयीं जपणें. **पागोटें संभाळणें** किं० **पागोट्याचे पेच संभाळणें** किं० **पागोटें वागविणें** एकाद्या व्यापारांत किं० व्यवहारांत बूड न लागेल किं० तो अंगावर न येईल अशी खबरदारी घेणें. **पागोट्याचे पेच गळ्यांत येणें** १स्वताच्या दुर्वर्तनाचे परिणाम भोगण्याचा प्रसंग येणें.२ आपण केलेली कांहीं मसलत फसणें किं०ती आपल्याच हानीस कारण होणें. **एकाद्याच्या पागोट्याला फुलें बांधणें** त्याची खुशामत करणें; त्याला आपला स्वार्थ साधण्यासाठीं खूष ठेवणें किं० करणें. **पागोटें टाकणें** संसाराचा त्याग करून संन्यासी होणें. **एकाद्याचें पागोटें पालथें पडणें** (किं० **वाकडें होणें**) त्याचा बोज्या उडणें; तो पराजित होणें. **पागोट्याचा धनी** **पु०** पतीचा माणूस. **पागोटें फिरविणें, पगडी फिरविणें** पूर्वी स्वीकारलेला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षास मिळणें. ' फेरपगडी करणें ' याच अर्थाचा वाक्प्रचार आहे.

पागोरा, पांगोरा [म० पांग+दोरा] **पु०** १ जमीनींत उभा पुरलेला किं० ठेविलेला जो उंच स्तंभ तो डळमळूं नये किं० त्यानें हेलकावे खाऊं नयेत म्हणून त्याला जे दोर बांधतात किं० टेके देतात ते प्रत्येक. २ पिशवीचें तोंड बांधावयाची दोरी. ३ चाबकाची वादी किं० दोरी,-जी लाकडाच्या दांड्याला एका टोकानें बांधलेली असते. ४ झगा, अंगरखा, इ०चा घेर किं० घोळ. ५ मासे धरावयाच्या जाळ्याला खिळवावयाची दोरी. ६ वृक्ष, वेली, इ०च्या मुळांचा जो विस्तार त्याची एक एक शाखा. ७ वेली ज्या तंतूंनीं लाकूड, झाड, इ० वर चढते ते तंतु प्रत्येक. ८ गवत, धान्याचीं ताटें, इ० ना फुटतात ते नवीन मोड किं०धुमारे प्रत्येक. ९डोंगराची लांबवर गेलेली शाखा किं० डोंगराचा बाहु. १० नदी इ०चा फाटा. ११ (**लाक्षणिक**) भाषण, लेखन, इ०मध्यें विषयांतर (फांटे). १२ (**लाक्षणिक**) वक्त्याचें भाषण चालू असतां मध्यें मध्यें त्याला वात्रटपणानें विचारलेले प्रश्न प्रत्येक (फोडणें).

पागोळी [म० पाऊस+गळणें] **स्त्री०** १ कौलाराची सखल बाजू,-जेथून पावसाचें पाणी गळून खालीं पडतें. २ असें कौलारावरून पडलेलें पाणी. किं०या पाण्याची धार. ३ रोदनांत डोळ्यांतून गळतात त्या धारा प्रत्येक.

पांघरणें [सं० प्र+वृ (आकणें)] **स०** **क्रि०** ऊर, पाठ, इ० अवयव आकतील अशा प्रकारें धोतर, उपरणें, इ० अंगावर धारण करणें (थंडी, वारा, इ०चें निवारण करण्यासाठीं किं० शोभेसाठीं). ❀ **वेड पांघरणें** मुद्दाम वेड्यासारखें भाषण किं० वर्तन करणें.

पांघरूण [म०पांघरणें]**न०**देहाचें किं०देहाच्या कांहीं भागाचें आच्छादन करण्यासाठीं अंगावर घेतात जें वस्त्र तें,- शालजोडी, शेला, उपरणें, इ० सारखें. २ शिवलेला कपडा,-सदरा, बंडी, अंगरखा. ३ संरक्षण, जोपासना किं० पालनपोषण करणारें माणूस; उ०आई हें मुलाचें पांघरूण, राजा हें राज्याचें पांघरूण. ❀ **कोणेकाच्या दुष्कृत्यावर पांघरून घालणें** १त्याच्या दुष्कृत्याचा बोभाटा न होऊं देणें; तें दुष्कृत्य चेपून टाकणें. २ तें कृत्य त्याणें सद्बुद्धीनें केलें असें सिद्ध करण्याची खटपट करणें.

पाघळ [म० पाघळणें] **पु०** गूळ, साखर, खडीसाखर, इ०ना हवेंतील जलांशानें सुटतो तो द्रव किं० पाझर.

पाघळणी [म० पाघळणें]**स्त्री०**पाघळण्याची क्रिया (सर्व अर्थी).खालीं ' पाघळणें ' पहा.

पाघळणें [**सं०** प्र+गल] **अ० क्रि०** १ (गूळ, साखर, खडीसाखर, इ०) हवेंतील जलांशानें द्रवरूप होऊन गळणें किं० ओघळणें. ' वितळणें, ' ' विरघळणें ' हीं क्रियापदें भिन्न अर्थींचीं आहेत. २ (ओलें वस्त्र) ठिपकत राहणें. ❀ **कोणेकाची जीभ पाघळणें** न बोलावयाची गोष्ट त्याणें बोलून जाणें (निंदेंत प्रयोग). **पाघळत जाणें, पाघळत येणें** फजीती होऊन जाणें किं० येणें.

पांघुरणें ' पांघरणें ' पहा.

पाच [**सं०** पाची] **पु०, स्त्री०** एक सुगंधी वनस्पतीविशेष.

पाच पु० हिरव्या रंगाचें एक रत्न.

पांच [सं० पंचन्] **वि०** १ एक,दोन,तीन, इ० क्रमांकांतील चाराच्या पुढचा आणि सहाच्या मागचा जो क्रमांक त्याच्या इतका. २ थोडेसे; कांहीं; उ० त्याच्या संग्रहीं पांच जनावरें आहेत; उ० पांच माणसें करतील तसें आपण करावें. **पांचामुखीं परमेश्वर** पांच माणसें जें बोलतील तें खरें; पांच म्ह० वरेच लोक किं० पुष्कळ लोक जें बोलतात तें देवाचेंच बोलणें धरून चालावयाला हरकत नाहीं. **पांचीं बोटें सारखीं नसतात** सर्व मनुष्यें सारख्याच स्वभावाचीं किं० सारख्याच कर्तृत्वाचीं नसतात. **पांचांवर धारण बसणें** अत्यन्त विस्मित आणि भयभीत होणें; पांच प्राण निघून जातात कीं काय अशा फिकीरींत पडणें. **टीप,**– हिंदुस्थानचा पैसा परदेशांत जात नसे तेव्हां बाजारांत पांच शेरांची धारण ही अत्यन्त दुर्भिक्षाची किं० संकटाची स्थिति लोकांना वाटत असे. **पांचां बुद्धि ती पन्नासां बुद्धि** पांचांच्या अभिप्रायावरून बाकीच्या सर्वांचे अभिप्राय जाणतां येतात. **पांचकळशी पु०** हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम. **पांचांची पांच बुद्धि, पांचांचे पांच प्रकार** सर्व लोकांची वर्तनसरणी सारखी नसते. **पांचांतून उठणें** शिष्टसंप्रदाय सोडून अनियंत्रितपणें वागणें. **पांच पाखांड न०** पांच नास्तिक मतें. **पांच पाट पु० अ०व०** कोणाची सार्वजनिक रीत्या अप्रतिष्ठा करावयाची असतां त्याच्या डोक्यावरच्या केशांचे वस्त्र्यानें काढतात ते पांच पाट. असे पांच पाट काढून नंतर त्याला गांवांतून चालवितात. **पांचपाली वि०** अनेक पाले एकत्र शिजवून केलेली भाजी. **पांचपावली स्त्री०** कांहीं अंतरावर असलेल्या देवाच्या दर्शनास जाण्याचा नियम कांहीं अडचणीमुळें पाळतां येत नसल्यास पांच पावलें म्हणजे थोडीशी वाट चालत जाऊन परत घरीं येणें (करणें,चालणें). **पांचशेरी** [**मं०**पांच+शेर] **स्त्री०** पांच शेर वजन करावयाचा धोंडा,लोखंडाचा तुकडा,इ०.

पाचक [**सं०**] **वि०** १ शिजविणारा. २ पचविणारा. ३ (गळू) पिकविणारें (पोटीस). **पु०** १ आचारी. २ अग्नि. **न०** पित्त.

पाचकळ, पचकळ वि० असभ्यपणानें (बालणें) किं० असें बोलणारा.

पाचंग न० धोतराचा काचा मारणें किं० पासोडी पांघरणें यांची एक विशिष्ट पद्धति. (घालणें). मागें ' पचंग ' पहा.

पांचजन्य [**सं०**] **पु०** विष्णूचा शंख. १ (**मराठींत**) बोंबलण्याची क्रिया (करणें). २ (**मराठींत**) पदार्थाचा बारदानांत पूर्ण अभाव. ३ (**लक्षणेंनें**) बेआबरू,बदलौकिक. ☞ **परीक्षेंत त्याचा पांचजन्य वाजला** तो नापास झाला. **मेहेनतीच्या नांवानें पांचजन्य** मेहनतीचा पूर्ण अभाव.

पाचट न० १ उसाचा पाला. २ चरकांत पिळून काढलेल्या उसाचीं नीरस ताटें. ३ दोरा इ० चा गुंडा. ह्या अर्थी ' पाचुट ' असाही शब्द आहे. पुढें ' पाचूट ' पहा. ४ पाचर.

पाचत [**सं०** पच] **वि०** आलें, अळू, इ० कंद ओल्या जमीनींत पुरणें,–त्यांना मोड फुटावे म्हणून (घालणें).

पाचन [**सं०**] **वि०** पाचक. **पु०** १ अग्नि. २ आंबटपणा. **न०** १ शिजविण्याची क्रिया. २ पिकविण्याची क्रिया. ३ पोटीस. ४ पाचक औषध. ५ अनेक द्रव्यांचा काढा. ६ (**मराठींत**) खाल्लेल्या अन्नाचें जठरांत होतें तें पचन.

पांचपट स्त्री० पहाट; प्रभातकाळ.

पाचपेच, पेचपाच [**म०**'पेच' ची द्विरुक्ति] **पु० अ० व०** १ कुस्तीमध्यें प्रतिपक्ष्याला चीत करावयाच्या ज्या अनेक युक्त्या त्या. २ कोणेकाला कांहीं व्यवहारांत फसवावयाचें असतां किं० आपलें धोरण त्याला कळूं न देतां त्याचें धोरण जाणून घ्यावयाचें असतां जीं दुटप्पी, दुहेरी, संदिग्ध, किं० तर्कात्मक विधानें केलीं जातात तीं (चालविणें, लढविणें, इ०).

पांचभौतिक [**सं०**] **वि०** पांच महाभूतांचें किं० त्यांनीं बनलेलें

पाचर स्त्री०,न०,पाचरवट स्त्री०[**हिं०** पचर] १ खुंटा, खांब, इ० घट्ट बसविण्यासाठीं किं० छिद्र बुजविण्यासाठीं घालतात तीं धलपी इ०. २ जड पदार्थ हालविण्यासाठीं त्याच्याखालीं किं० बाजूस शिरकावितात तें पातळ टोकाचें

लाकूड, लोखंडाची कांब, पहार, इ०. ४ **कांहीं कामांत पाचर मारणें** त्यांत कांहीं विघ्न उपस्थित करून तें सुरळीतपणें न चालेल असें करणें.

पांचवंदा, पांचुंदा [**म०** पांच] **पु०** १ गवत, कडबा, इ० च्या पांच पेंढ्यांचा समुच्चय. २ कोणत्याहि पांच वस्तूंचा समुच्चय. ३ पांच लाडू, पांच पुऱ्या, पांच पोळ्या, पांच जिलब्या, इ०: उ० शामभट, हात राखून तुम्ही जिलब्या खात आहां, आणखी एक पाचुंदा घ्या.

पांचवा पु० १ आजार पूर्ण बरा व्हावयाच्या अगोदर घराच्या बाहेर पडल्यानें त्या आजाऱ्याला कोणा दुष्टाची दृष्टिबाधा होऊन तो आजार उलट खातो ती उलट. २ एक वृक्षविशेष,–ज्याच्या लाकडाचे मणि अशा उलटलेल्या आजाराच्या शमनार्थ गळ्यांत बांधतात.

पांचवी [**म०** पांचवा] **स्त्री०** स्त्रीची प्रसूति झाल्यावर पांचव्या दिवशीं जीवंतिका देवतेची पूजा करतात ती पूजा किं० ती देवता.

पाचार वर ' पाचर ' पहा.

पाचारण न० आमंत्रण; बोलावणें.

पाचारणें स० क्रि० १ बोलावणें; आणविणें. २ कोणेकाचा समाचार घेणें; खुशालीची विचारपूस करणें. ३ कोणी मनुष्य मेलें असतां त्याच्या आप्तांच्या दुखवट्याच्या भेटीस जाणें.

पाचावा पु० १ ज्वरादि आजार पूर्ण बरा व्हावयाच्या अगोदर मनुष्य बाहेर पडल्यास त्याला दुष्टाच्या दृष्टीची बाधा होऊन तो आजार उलटतो तो. २ पाचुंदा नांवाचा वृक्ष.

पांचाल मागें ' पंचाळ ' पहा.

पाचित [**सं०**] **वि०** शिजविलेला; तळलेला; पक्व केलेला.

पांची [**म०** पांच] **स्त्री०** पांच रुपये किंमतीचें एक सुवर्णाचें नाणें.

पांचों, पंचे [**म०** पांच] **क्रि० वि०** पांचपट केली असतां; उ० एकी पांची पांच; उ० आठा पंचे चाळीस.

पांचींव न० गाई, म्हशी इ०चें मूत.

पाचुटें, पांचूट, पाचोट, पाचोटें न० अर्धे चिवट इतक्या लांबीचा दोरा, दोरी, सूत, इ०.

पाचुंदा मागें ' पाचवंदा ' पहा.

पाचू, पाच स्त्री० हिरव्या रंगाचें एक रत्नविशेष.

पांचेट वि० पानचट; बेचव; पचपचीत.

पांचेरूं न० वर ' पाचर ' पहा.

पांचोरा पु० १ पाचुंदा नांवाचें झाड. २ पाचोळा; कडबा, वाळलेलीं पानें, इ० चा सडा किं० ढीग.

पाचोळा [**म०** पात+चोळा] **पु०** वाळलेलीं पानें, कांद्याच्या वरचें पातळ नीरस पदर, इ० चा थर किं० समूह किं० कचरा.

पाच्छाई, पाच्छाय, इ० पुढें ' पादशाही ' इ० पहा.

[पाऊलवाट.

पाज [**पोर्चुगीज़**] **स्त्री०** डोंगरांतील

पाजण, पांजण [**म०** पेज] **न०, स्त्री०** वस्त्र विणावयाच्या ताण्यांना खळ किं० पेज लावण्याची क्रिया.

पाजणी, पांजणी [**म०** पाजणें] **स्त्री०** १ पिकें घालण्याची क्रिया. २ हत्यारांना धार देणें. ३ विणावयाच्या वस्त्राच्या ताण्यांना लावितात ती खळ किं० पेज किं० ती लावण्याची क्रिया. ४ मागावर ताणे घालणें.

पांजणें, पाजणें स० क्रि० १(मागावर घालावयाच्या ताण्यांना)पेज किं० खळ लावणें. २(नवी वळलेली दोरी) खांबाला वळसा घालून मागेंपुढें ओढणें,–तिची केसरें घालविण्याजोगी किं० ती लवचीक करण्यासाठीं. **अ० क्रि०** हातावरून दोरी जोरानें सरकत गेल्यामुळें हात खरडला जाणें.

पाजणें [**सं०** प्र+अश्] **स० क्रि०** १कोणेकाला पाणी इ० प्यावयास देणें. २ कोणेकाला त्याच्या इच्छेविरुद्ध पाणी इ० प्यावयास लावणें. ३ (शस्त्रांना) निसणा इ० वर घासून धार देणें. ४ कोणेकाला फसवून (त्याला कांहीं खोटी गोष्ट किं० बातमी) खरी अशी वाटविणें.

पांजरण [**सं०** पंजर; **म०** पिंजरा] **न०** झाडाझुडपांच्या काटक्याकुटक्या,–घराच्या छपराच्या वांशांवर आणि कौलांच्या खालीं पसरून घालावयाच्या; ओंबण.

पांजरा [**सं०** पंजर] **पु०** १ राघू, चंडोल, साळुंकी, इ० पाळलेले पक्षी ठेवावयाचा रचनाविशेष. २ प्राण्याच्या पाठीच्या कण्यापासून

छातीवर, मिळणारी जी हाडें त्यांची रचना; प्राण्याच्या हाडांचा सांगाडा. ३ ताड, माड, इ० च्या झावळ्यांचा विस्तार किं०त्या झाडांचा माथा. ४ घर, गलबत, इ० चा सांगाडा,-भिंती व्यतिरिक्त रचना. ꙮ **अंगाचा (किं० शरीराचा) पांजरा पु०** खाण्यापिण्याची आबाळ झाल्यामुळें किं० आजारामुळें रोडावलेला मनुष्यादि प्राणी किं० त्या प्राण्याच्या हाडांची रचना. **पांजरपोळ, पांजरपोळा, पांजरापोळा** [**म०**पिंजरा+पोळ (बैल)]**पु०** अशक्त किं०जीर्ण किं० बिनवारशी गुरें ढोरें कोंडून ठेवावयाचें पटांगण.

पाजवणी [**म०** पाजविणें] **स्त्री०** १ प्यावयास पाणी इ० देणें. २ शस्त्रास धार देणें.

पाजविणें [**म०** 'पाजणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (पाणी इ०) कोणेकाकडून कोणेकास प्यावयास देणें. २ (शस्त्रास) निसण्यावर धार देणें. ३ (मिशीवर) ताव देणें म्ह० (ती) बेटीनें कुरवाळणें.

पाजळणी [**म०** पाजळणें] **स्त्री०** १ दिवटी, समई, मशाल, दिवा, इ० पेटविण्याची क्रिया. २ शस्त्रांस धार देण्याची क्रिया.

पाजळणें [**सं०** प्र+ज्वल्] **स० क्रि०** १ दिवटी, मशाल, इ० पेटविणें किं० फुंकर घालून अधिक तेजस्वी करणें. २ (शस्त्रास) निसण्यावर धार देणें.

पाजी [**हिं०**] **वि०** हलकट वर्तनाचा;नीच कृत्यें निर्लज्जपणें करणारा.

पांजी स्त्री० १ शेताची कापणी झाल्यावर भुतें खेतें इ० ना बकरें, कोंबडें, इ० चा बळी अर्पण करून त्याच्या मांसाची मेजवानी शेतकरी करतात ती. २ भुताला अन्य कोणत्याही काळीं बळी देण्याचा विधि किं० दिलेला बळी. ꙮ **कोणेकाची पांजी करणें** १ त्याचा बोऱ्या किं० फजिता उडविणें किं० करणें. २ त्याला निरुत्तर करणें किं० गप्प राहावयास लावणें.

पाझर पु० १ गूळ, साखर, मीठ, बर्फ, इ० ना हवेंतील जलांशानें सुटतो तो द्रव. २ मडकें, डोंगर, इ० तून पाण्याचे पडतात ते थेंब समुच्चयानें किं० त्यांचा प्रवाह (सुटणें, फुटणें).ꙮ **अंतःकरणास पाझर फुटणें** (**कि०येणें**)दुसऱ्याचें दुःख पाहून अंतःकरण द्रवणें म्ह० सहानुभूतीच्या दुःखानें आक्रान्त होणें; उ० मी तुझी आर्जवें करीत आहें तितकी दगडाची केली असती तर दगडालाही पाझर फुटला असता आणि तुला तर ढिम्म कांहीं होत नाहीं !

पांझरट न०नवरात्र इ०प्रसंगीं देवतांच्या मूर्तीवर घालतात त्या कातरलेल्या कागदाच्या जाळ्या.

पाझरणी [**म०** पाझरणें] **स्त्री०** १ पाझरण्याची क्रिया. २ जें पाणी इ० पाझरलें तें.

पाझरणें [**सं०** प्र+झृ] **अ०क्रि०** १ डोंगर, फुटकें भांडें, इ० तून (जलादि) थेंबांथेंबांनीं गळून बाहेर पडणें; (डोंगर, फुटकें भांडें, इ० नीं जलादि पदार्थ) बाहेर टाकणें. २ दया, प्रेम, परदुःख, इ०च्या योगानें(अंतःकरण) कळवळणें.

पाट [**सं०** पट्ट=पाट हें आसन] **पु०** भोजनाचे वेळीं किं० इतर वेळीं बसावयासाठीं जें लाकडाच्या फळीला खालीं आडवीं लाकडें बसवून आसन केलेलें असतें तें. [**सं०** पट्ट=वस्तूचा लांबट तुकडा] **पु०** नदी, तळें, इ० पासून पाणी वहावयासाठीं जो चर खणून किं० बांधून केलेला असतो तो किं० त्यांतून वाहतें तें पाणी. ꙮ **पाटपाणी न० ए० व०** १ भेटीस आलेल्या गृहस्थाला बसावयास पाट देणें, प्यावयास पाणी देणे, इ० प्रकारें त्याचा केलेला सत्कार (देणें). २ आदरातिथ्य; सत्कार (देणें, करणें). **पाटपासोडा पु० ए० व०** विवाहादिकांत वधूवरें बसावयासाठीं सखलाद, शालजोडी, इ० नीं आच्छादित जे दोन तीन पाट रांगोळीच्या चौकटींत मांडतात ते समुच्चयानें किं० त्या पाटावर बसून जो विधि करतात तो. **पाटपिढें न० ए० व०** संसारांत जरूर असें लाकडी सामानसुमान. **पाटीं बसणें** स्त्री रजस्वला स्थितींत असणें;स्त्री अस्पर्श म्ह० विटाळशी होणें. **पाटकरी पु०** १ पाण्याच्या पाटावर देखरेख करणें, त्याची दुरुस्ती करणें, इ० कामावर गांवकऱ्यांनीं नेमलेला अधिकारी. २बांधून आणलेल्या पाण्याच्या पाटाचे जे वाटेकरी ते प्रत्येक. **पाट**

कुळी स्त्री० पाण्याचा लहानसा पाट. **पाटवडी** [म० पाट+वडी] स्त्री० हरभ-ऱ्याचें पीठ शिजवून त्यांत मसाल्याचीं द्रव्यें घालून पाटावर थापून तोंडीं लावण्यासाठीं कर-तात त्या वड्या प्रत्येक. **पाटवण** न०, **पाटवड** स्त्री० बागेंत झाडांच्या बुडाशीं पाणी खेळविण्यासाठीं केलेले असतात जे पाट ते प्रत्येक. **पाटवणी** [म० पाट+पाणी] न० १ पाटानें नेलेलें पाणी. २ अशा पाण्यानें ऋषि-पंचमीस खावयासाठीं पिकविलेलीं पांफळें, नारळ, इ० समुच्चयानें. **पाटशेवई** स्त्री० पाटावर वळून केलेली शेवई. याच्या व्यावर्तकत्वें ' हातशेवई. ' **पाटसरी** स्त्री० पडवीच्या भिंतीचा माथा,–ज्यावर वस्तु ठेवतां येतात. **पाटस्थळ** न०, **पाटस्थळ जमीन** स्त्री० पाटाच्या पाण्यानें पिकणारी जमीन. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' मोट-स्थळ.' **पाटागर** [म०पाट+आगर]न० पाटाच्या पाण्यानें नारळ इ० च्या झाडांची केलेली लाग-वड.

पाट पु० शूद्र विधवेचें दुसरें लग्न (लावणें). पाटाची बायको, म्ह० विधवेशीं कोणी लग्न केलें असतां त्या पुरुषाची ती बायको पाटाचा नवरा म्ह० शूद्र विधवेचा दुसऱ्या लग्नाचा नवरा. ॐ **पाटकर बायको, पाटकर, पाटकरीण** स्त्री० दुसरें लग्न जिनें केलें आहे अशी शूद्र विधवा. **पाटकरी** पु० एका नवऱ्यानें टाकलेल्या स्त्रीशीं किं० विधवेशीं ज्याणें लग्न केलें आहे असा पुरुष. **पाटकरूं** न० जिणें दुसरें लग्न केलें आहे अशी शूद्री (तुच्छतेनें); उ० पाटकरूं तें बटकरूं. **पाटदाम** पु० शूद्र जातींत पाटाचें लग्न झालें असतां गांवकऱ्यांना द्यावी लागते ती पैशाची रकम.

पाट [सं० पट्ट=पट्टा] पु० १ वस्त्राची रुंदी. २वस्तऱ्यानें डोक्यावरच्या केशांची तासून काढलेली ओळ(काढणें). **टीप**,–चोरादींना शिक्षा म्हणून त्यांच्या डोक्यावरच्या केशांचे पांच पाट काढून त्यांना गांवांतून पूर्वीं हिंडवीत असत.३नदीचें पात्र. किं०पात्राची रुंदी.४समुद्राचा जमीनींत घुसलेला अरुंद प्रवाह.५ मिरच्या, वांगीं, इ०ची शेताच्या सभोंवार केलेली असते ती लागवड.६ सूत गुंडा-ळावयाचें कोष्ट्याचें एक आऊत. ७खांबाची उंची वाढविण्यासाठीं खांबाच्या माथ्यावर तुळईनें खालीं बसवितात तो लांकडाचा ठोकळा.

पाट न० बैल, टोणगा इ० नें गाय, म्हैस, इ० वर उडणें.

पाट, पाठ स्त्री० शेळीचें अपत्य.

पाटंगण मागें ' पटांगण ' पहा.

पाटगा पुढें ' पाठगा ' पहा.

पाटगें [म० पाट] न० वस्त्राचा लांबच लांब तुकडा,–सर्व भागीं सारख्याच रुंदीचा.

पाटणी स्त्री० एक प्रकारचा तांदूळ.

पाटणी, पाटण [म० पाटणें] स्त्री० घराच्या जमीनीवर केलेली तक्तपोशी म्ह० लाकडाच्या तक्त्यांची जमीन.

पाटणें [म० पाट] स०क्रि०(घराची जमीन) तक्तपोशीनें आच्छादणें.

पाटथर, पाटथरा [म० पाठ+थर] पु० १ घराचें जोतें किं० ओटा, इ०च्या चौफेर रचा-ईतील दगडांचा अगदीं वरचा थर. २ दारापुढें पाहिरीसाठीं बसविलेला गुळगुळीत चिरा.

पाटल [सं०] वि० तांबूस गुलाबी.

पाटली स्त्री० १ स्त्रियांचें एक करभूषण. २ जीभ खरवडून साफ करण्याचें एक साधन.

पाटव [सं०] न० १ चातुर्य. २ चलाखी. ३ बुद्धीचा तल्लखपणा. ४ कांहीं कृत्यांत कोणे-काची दिसून येते ती सफाई.

पाटा [सं० पट्ट] पु० १ पुरण, चटणी, इ० पदार्थ ज्यावर वरवंट्यानें वाटतात तो टांकी दिलेला दगड. २ एक सारखी लागत गेलेली जी मोठी शेतजमीन ती. ३ एक झाड. ४ लहान होड्यांचा लोखंड, दगड, इ० रूपाचा नांगर. ५ चाकाचा लाकडी परीघ ज्या पांच सहा तुक-ड्यांचा केलेला असतो ते प्रत्येक. ॐ **पाटखंड** न० १ फुटलेला पाटा (वर अर्थ १ पहा). २ पाटा (तुच्छतेनें). **कोणेका देशाचा पाटावर-वंटा होणें** दुष्काळ, रोग, लुटारू,इ० मुळें त्याचा सत्यानास होणें. **मी कांहीं तुझ्या जन्माचा पाटावरवंटा घेतला नाहीं** तुला जन्मभर पोस-ण्याची जबाबदारी मीं पत्करलेली नाहीं. **टीप**,– ह्या वाक्प्रचाराचा नेहमीं नकाररूप प्रयोग होतो.

पाटाऊ, पाटाव पु०, न०, **पाटावू** पु० [सं० पट्ट] एक प्रकारचें उंची रेशमी वस्त्र. ❀ **वेडीचें सोंग घेतलें म्हणजे पाटाव फाडलें पाहिजेत** मूर्खपणाची बतावणी करणें ती मूर्खपणाची कृत्यें करून करावी लागते. **नेसेन तर पाटाव नाहीं तर नागडी बसेन** जें उत्तम तें मला द्या नाहीं तर मी मुळींच कांहीं घेणार नाहीं.

पाटांगण मागें ' पटांगण ' पहा.

पाटी [सं० पट्ट] स्त्री० १ आंग्लाईच्या अगोदर मुलें ज्या फळीवर धूळ पसरून बोटाच्या लेखणीनें अक्षरें काढावयास शिकत असत ती फळी. ह्या चालीवरून वर्णमालेंतील अक्षरांना ' धूळाक्षरें ' हा शब्द रूढ झाला. ह्या प्रकारच्या शिक्षणसरणीवरून 'पाटी उचलणें' ह्याचा अर्थ 'त्या दिवसाचें किं० त्या वेळेचें काम बंद करणें' असा रूढ झाला. २ पोथीच्या खालीं आणि वर ज्या फळ्या पोथीच्या रक्षणार्थ घातलेल्या असतात त्या प्रत्येक. ३ चरकाच्या मुसळाच्या खालीं आणि वर अशा ज्या दोन फळ्या असतात त्या प्रत्येक. ४ शेवया लाटावयाची फळी. ५ आट्या-पाट्यांच्या खेळांतील एक मर्यादेची रेषा. ६ ज्याची रुंदी थोडी आणि त्या मानानें लांबी फार असें शेत किं० जमीन. ७ भात भरडावया-च्या किळावर जी आडवी लोखंडाची पट्टी बस-विलेली असते ती. ८ स्त्रियांचें एक कंठभूषण-विशेष. ९ मोठें आणि लांब चौरस लाकूड,– तुळई, इ० करण्याला योग्य असें. १० कांहीं कृत्याची सरणी किं० तऱ्हा. ❀ **मुलाला पाटी-वर घालणें** त्याला प्राथमिक शिक्षणासाठीं शाळेंत पाठविणें. वर अर्थ १ पहा.

पाटी स्त्री० वांबूच्या पाती, बाभळीचे फोक, इ० ची केलेली टोपली,–पदार्थ भरून ठवण्याच्या उपयोगाची किं० पदार्थ इकडून तिकडे वाहून न्यावयाच्या उपयोगाची. ❀ **पाटींतलें मांस** न० १ कुचकामाचा माणूस. २ अनाथ, विपन्न, किं० दुबळा माणूस. **पाटीभर बोलणें** वायफळ बोलणें. **पाटें** न० रुंद तोंडाची मोठी पाटी.

पाटील [हिं० पटील] पु० १ गांवचा कारभार पाहाणारा एक वतनदार अधिकारी. २ मराठे लोकांसंबंधानें योजावयाची बहुमानाची पदवी. **पाटील पटवारी** पु० अ० व० पाटील, कुळकरणी इ० गांवकामगार. **पाटिलकी** [म० पाटील] स्त्री० पाटलाचा हुद्दा किं० अधिकार. **पाटिली** [म० पाटील] स्त्री० १ पाटलाला देतात तें वेतन. २ पाटलाचा हुद्दा, दर्जा, किं० अधिकार.

पाटेस [म० पाठ+आस] पु० घराच्या छपराचें आढें.

पाठ [सं०] पु० १ शिकावयासाठीं विद्यार्थी गुरूपासून शास्त्रादींचा जो भाग समजून घेतो तो; धडा. २ म्हणणें. ३ मुखानें हवें तेव्हां म्हणून दाखवितां येईल असें ज्ञान, माहिती, विषय, इ०. ४ अभ्यास. ५ वेदपठन. ६ एकाद्या ग्रंथाच्या दोन प्रती किं० नकला भिन्न माण-सांनीं केलेल्या असतात त्यांत लेखकाच्या नज-रचुकीनें किं० अन्य कारणांनीं शब्द, अक्षरें, इ० बाबतींत जो फरक होतो किं० पडतो तो. हा फरक पाठावर = ह्या चिन्हानें दाखवितात. ७ कांहीं कार्यांत अनुसरावयाची काहीं चाल, रीत. आचार, संप्रदाय, इ०,–जे भिन्न काळीं, भिन्न जातींत, आणि भिन्न देशीं, भिन्न असूं शकतात. **पाठ** वि० मुखोद्गत; स्मृतींत पक्कें झालेलें. ❀ **पाठ करणें** अनेक वेळां वाचून, म्हणून, किं० घोकून मुखोद्गत करणें किं० स्मृतींत निविष्ट करणें. **एकाद्या काम इ०चा पाठ पडणें** त्याचा शिरस्ता, दाखला, संवय, किं० चाल रूढ होणें. **पाठांत असणें** परिचयाचा असणें; नित्य क्रमांतील असणें. **पाठशाला, पाठशाळा** [सं० पाठशाला] स्त्री० शास्त्रें इ० जेथें विद्यार्थ्यांना शिकविण्यांत येतात ती शाळा. **पाठान्तर** न० १ वेगळ्या माणसांनीं एकाच ग्रंथाच्या केलेल्या वेगळ्या प्रतींत शब्द, वाक्यें, इ०मध्यें जे भेद होतात ते प्रत्येक. २ कोणेकाच्या वाचनाचा विस्तार. ३ कोणेकाच्या स्मरणांत असलेले श्लोक इ०. ४ बहुश्रुतपणा. ५ पुन्हा तोच पाठ म्ह० धडा घेणें, वाचणें, किं० शिकणें.

पाठ [सं० पृष्ठ] स्त्री० १ छातीच्या आणि पोटाच्या मागचा शरीराचा भाग (मानेपासून तो कंबरेपर्यंत). २ कोणत्याहीं वस्तूची मागची बाजू किं० वरची बाजू; उ० आरशाची, तस-

विरांचा, पेटांचा, पुस्तकाचा पाठ. ३ आश्रय: टेका: मदत: साहाय्य (देणें). ४ पृष्ठभाग:वरचा तळ: पातळी: सपाटी: उ० पृथ्वीच्या पाठीवर अनेक प्राणी आहेत. ५ पदार्थाचें अगदीं वरचें किं० बाहेरचें आच्छादन: साल: कवच. ६ **पाठ-कांव स्त्री०** वेळ किं० बांबू यांची सालासकट जी चिरफळी ती. **पाठकुळी** (–स) **पाठकोळी** (–स), **पाठुं-गुळी** (–स), **क्रि० वि०** पाठीवर: पाठीच्या आधारावर किं० आधारानें: (घेणें, मारणें,बसणें, आणणें):उ०मी गोंदीला पाठुंगळीस बसवून स्टेशन-पासून घरापर्यंत आणली.**पाठकोरा वि०**ज्याच्या एकाच बाजूस लिहिलें आहे किं० ज्याची पाठ कोरी आहे असा (कागद).**पाठकोरें न०**ज्याच्या पाठीवर कांहीं लिहिलेलें नाहीं असा कागद. **पाठजाळ पु०** पाठीवरचें भावंड मेल्याबद्दलचें दुःख: उ० पाठजाळ पुरवेल पण पोटजाळ पुर-वणार नाहीं. **पाठनळ पु०** पाठीच्या कण्याच्या दोन बाजूंचे दोन स्नायु जे ते प्रत्येक. याच्या व्यावर्तकत्वें ' पोटनळ '. **पाठ-निघ्या वि०** कोणेकाच्या आश्रयास गेलेला (माणूस). **पाठपळाणें न०** लग्नाच्या सोहळ्यांत वरानें आपल्या सासूला, किं० वधूच्या आईनें आपल्या विहिणीला दिलेलें लुगडें आणि खण. **पाठपुरावा पु०** कोणेकाला केलेली मदत; कोणेकाच्या कांहीं विधानाचें किं०कृतीचें समर्थन; कांहीं काम करावयाला प्रवृत्त झालेला जो माणूस त्याला हरएक बाबतींत साहाय्य करणें आणि त्याचें कांहीं कमी पडूं न देणें. **पाठपोट क्रि० वि०** दोन्हीं बाजूंनीं (लिहिलेला कागद). **पाठपोट न० ए० व०** मकरसंक्रांतीच्या दिवशीं बायका दोन जोंगल्या सुतानें बांधून एक-मेकींना वाण म्हणून देतात त्यांची जोडी. **पाठ-फळी स्त्री०** झाडाचा बुंधा किं० फांदी यांच्यांतून चौरस तुळई काढावयाची असतां चारी बाजूंच्या ज्या निमगोल फळ्या करवतून काढतात त्या प्रत्येक. **पाठबळ न०** कोणी कांहीं काम करा-वयास प्रवृत्त झाला असतां त्याला हरएक प्रकारें साहाय्य करणारे त्याचे मित्र, अनुयायी, इ०समु-च्चयानें किं० त्यांणीं केलेलें साहाय्य.

पाठवांळ, पाठवेळ न० पाठीसकट जी बांबूची चिरफळी ती. **पाठमोड स्त्री०**पाठ मोडणारें म्ह० अति कष्टाचें काम. **पाठमोरा वि०** १ कोणेका पदार्थाकडे किं० माणसाकडे ज्याची पाठ आहे तो. २ प्रतिकूल: विमुख: पराङ्मुख. **पाठमोरा क्रि० वि०** पाठ करून किं० वळवून. **पाठमोरा पाहाणें** १ गत गोष्टी लक्ष्यांत आणणें. २ डोकें वळवून मागें दृष्टि फेकणें. **पाठराखणा, पाठ (–ठी–) राख्या पु०** १नवीन लग्न झालेल्या मुली-बरोबर तिच्या सासरीं तिच्या बरोबर जातें तें माहे-रचें माणूस. २ नवीन लग्न झालेल्या मुलाबरोबर त्याचा मित्र जो त्याच्या बरोबर दिवाळसणांत त्याच्या सासुरवाडीस जातो तो.३कोणाही मदतनीस किं० साहाय्य करणारा. **पाठरिघावा, पाठरि-गावा पु०** पाठबळ; कोणेकाला कांहीं कामांत मदत करावयाला सिद्ध असलेलीं माणसें समुच्च-यानें. **पाठरिघ्या पु०** जो कोणी समर्थाच्या आश्रयास जातो तो.किं० गेला तो. **पाटलग पु०** विद्या, कला, इ० शिकण्याच्या संबंधांत कोणे-काचा केलेला आश्रय. **पाठलाग पु०** कोणी पुढें गेलेला जो माणूस त्याला गांठावयासाठीं किं० पळून जात असलेला जो चोर त्याला पकडावया-साठीं त्याच्या मागून जाणें (करणें). **पाठवटीं (–डीं) क्रि० वि०** १ पाठीमागून; पाठीमागें. २ कांहीं काम करणाराला त्याच्या पाठीमागून साहाय्य करावयासाठीं. **पाठवळ**[**म०** पाठ+ वळणें] **न०** १ स्वारी वहावयासाठीं शिकवून तयार केलेलें जनावर,–बैल, घोडा इ०. २ ओझें वहावयासाठीं शिकवून तयार केलेला घोडा इ०.३जो सांगितलेलें काम मुकाट्यानें म्ह०तकरार न करतां करतो तो. ४ लोकांच्या थट्टेचा विषय झालेला माणूस. ५ दणगट किं० जहांबाज स्त्री. ६ रखेली; ठेविलेली रांड. **पाठशील** [**म०** पाठ+ साल] **न०** नारळाचें अगदीं वरचें कवच,– ज्याच्या आंत काथ्यांचे तंतु असतात. **पाठसरीं क्रि० वि०** पिछाडीस. **पाठाळ न०** पाठीवरून ओझें किं० स्वारी वाहणारें जनावर.**पाठाळ वि०** रुंद आणि मजबूत आहे पाठ ज्याची असा(घोडा). **पाठिंगा, पाठिंबा पु०** मदत किं० मदतनीस; साहाय्य करणारा. **पाठिचा वि०** पाठीवरून

स्वारी किं० ओझें वाहणारें (जनावर).**पाठीचा तक्ता** पु० रुंद पाठ; पाठीचा विस्तार. **पाठी-राखा (-ख्या) पु०** १ मदतनीस; साहाय्य करणारा. २ मागें ' पाठ राखणा ' पहा. **पाठुं-गळी, पाठोंगळी क्रि० वि०** पाठीवर (मूल इ० घेणें). **पाठोपाठ (-ठां) क्रि० वि०** मागो-माग; बिलकूल विलंब न होऊं देतां.**पाठ्याळ न०** पाठीवरून स्वारी किं० ओझें वाहणारें जनावर. **पाठीवर मारावें पण पोटावर मारूं नये** कोणी अपराध केला असतां त्याला वेळाशक शिक्षा करावी परंतु त्याची कायमची नुकसानी होईल असें कांहीं करूं नये; त्याचा चरितार्थाचा साधनें बुडवूं नयेत. **आपली पाठ आपणास दिसत नाहीं** एखादी गोष्ट अगदीं आपल्या शेजारी घडत असते पण आपणास तिची गंधवार्ताही नसते. **पाठचें भावंड न०** आपल्यामागून जन्मास आलेलें भावंड म्ह० आपलें धाकटें भावंड.**पोटचा द्यावा पण पाठचा देऊं नये** १ प्रत्यक्ष आपल्या मुलाकडे दुर्लक्ष्य केलें तरी चालेल पण आश्रयास आलेल्या माणसाकडे दुर्लक्ष्य होऊं देऊं नये. २ आपल्या मुलाची हयगय केली तरी चालेल पण आपल्या धाकट्या भावंडाची हयगय करूं नये. **कोणेकाची पाठ उघडी पडणें** त्याच्या पाठचें भावंड मरणें.**पाठ उचलणें** सावरणें; पुन्हा वैभवास चढणें; गमावलेली शक्ति किं०सामर्थ्य पुन्हा मिळ-विणें. **पाठ भुईस लागणें** चीत होणें;संकटाखालीं दडपून जाणें; वैभव किं० सामर्थ्य गमावणें. **कोणेकाची पाठ घेणें(किं० पुरविणें)** १ त्याचा पिच्छा पुरविणें; एखाद्या गोष्टीबद्दल त्याच्यावर भार घालून बसणें; अमुक वस्तु मला द्या म्हणून त्याला सतावीत राहणें. २ त्याच्या पाठोपाठ जाणें. ३ त्याचा पाठलाग करणें. **पाठ चोरणें** कांहीं काम करतांना कुचरपणा करणें; आपल्या पाठीवर फार सामान किं०ओझें लादलें जाऊं नये म्हणून तें चुकविण्याचा किं० झुगारून देण्याचा प्रयत्न करणें. **त्यानें अमक्याची पाठ झाकली** तो अमक्याच्या पाठीमागून जन्मला. **पाठ टाकणें** विश्रांतीसाठीं जमीनिवर किं० अंथरुणा-वर अंग आडवें करणें. **पाठ थापटणें (किं० थोपटणें)**उत्तेजनार्थ प्रेमानें पाठीवर हात मारणें; वाहवा करणें; शाबासकी देणें. **पाठ दाखविणें** पळून जाणें; कर्तबगारी न करितां भित्रेपणानें निघून जाणें. **पाठ देणें** १ मदत करणें (चांगल्या किंवा वाईट कामा).२ कोणेकाची विनंती ऐकि-ली न ऐकिली अशा रीतीनें वागणें.३परिस्थिती पाहून निघून जाणें. **कोणेकाची पाठ धरणें** त्याच्या मागून धावत जाऊन त्याला पकडणें. **एखाद्याची पाठ पोट सारखें होणें** उपासानें किं० आजा-रानें तो रोड होणें. **एकाद्याची पाठ फोडून निघणें** त्याच्या मागून त्याची बहीण किं० भाऊ यांनी जन्मणें. **कोणेकाची पाठ भुईस लागणें** तो द्रव्य, शक्ति, इ० बाबतींत खालावणें. **एकाद्याची पाठ राखणें** त्याला मदत करणें.**पाठ सोडणें** १ एकादा व्यवसाय नेटानें चालविण्याचें सोडून देणें. २ एकाद्याच्या मागोमाग जाण्याचा क्रम सोडून देणें. **एकाद्याच्या पाठीं क्रि० वि०** त्याजवर अवलंबून ; त्याच्या परिवारांत; त्याच्या आश्रितांत ; त्याच्यानंतर किं० मागोमाग; उ० माझ्या पाठीं (किं० पाठीशी)चार पोरें आहेत; उ० माझ्यापाठीं नेहमी चार पट्टेवाले असतात (म्ह० माझ्या सेवेला) ; उ० नानासाहेबाच्या पाठीं कांहीं थोडी थोडकी माणसें नाहात, वेळेस पंगतीस पंचवीस पान जेवतें आहे म्ह० त्याचे आश्रित पंचवीस आहेत. **एकाद्याच्या पाठीचे चकदे काढणें** त्याला खूप मार देणें किं० चोप देणें. **एकाद्याच्या पाठीचे चकदे निघणें** त्याला खूप मार बसणें; खूब चोप बसणें. **एकाद्याच्या पाठीचें साल जाणें** त्याला नुकसानी सोसावी लागणें. **पाठी ना पोटी** त्याला धाकटें भावंडही नाहीं आणि स्वताची संततीही नाही. **पाठीमागें क्रि० वि०** १ समक्ष नव्हे अशा रीतीनें. २ मेल्यानंतर.**पाठीमागें ठेवणें** मेल्यावर मागें ठेवणें (पैसा, माणसें) ;उ०त्या म्हाताऱ्यानें पाठीमागें कांहीं सुद्धा ठेवलें नाहीं (म्ह० त्याच्या कुटुंबीयांना कांहींही पैसा मिळाला नाहीं); उ० त्यानें पाठीमागें लग्नाच्या पुष्कळ पोरी ठेविल्या आहेत (म्ह० तो मरून गेला पण त्याच्या पोरी-ची लग्नें करण्याची जबाबदारी दुसऱ्याच्या अंगा-वर पडली आहे. **कांहीं जिन्नस पाठीमागें देणें** तो परत करणें ; तो परत देणें. **पाठीमागें पडणें**

२ द्यावयाची रक्कम वेळीं न दिल्याकारणानें तें ओझें होऊन राहिलेलें असणें ; उ० तुझे चार हप्ते पाठीमागें पडले आहेत (म्ह० ते हप्ते द्यावयाची मुदत टळून गेली आहे ; हल्लीं तितके हप्ते तुझ्या अंगावर आहेत). २ कांहीं एक गोष्ट जुनी पुराणी होणें ; ती जुनी झाल्याकारणानें तिचें महत्व कमी होणें. ३ कांहीं चाल, रीत, आचार, नियम, कायदा, हल्लीं इ० पाळला जात नसणें. **पाठीवर क्रि० वि०** १ रक्षण करण्यासाठीं ; उत्तेजन द्यावयाला ; मदत करावयाला. २ उपद्रव करावयाला ; त्रास द्यावयाला. **पाठीवर टाकणें** लांबणावर किं० दिरंगाईवर पडूं देणें. **पाठीला तेल लावून ठेवणें** मार खावयाला सिद्ध होऊन राहाणें. **कोणेकाच्या पाठीवरून हात फिरविणें** त्याला प्रेमानें कुरवाळणें. **पाठीवर पाय देऊन येणें** मागून जन्मणें किं० मागून येणें. **एकाद्याच्या पाठीस काळीज असणें** तो धाडसी किं० साहसी असणें. **पाठीस पोट लागणें** १ अति रोड असणें किं० होणें. २ उपासामुळें पोट बसावटीस जाणें. **पोट पाठीस लागणें** पोटाला मिळवून खाण्याची जबाबदारी अंगावर असणें **टीप,**–' पाठीस पोट लागणें ' आणि ' पोट पाठीस लागणें ' ह्या दोन वाक्प्रचारांतील फरक विद्यार्थ्यांनीं नीट ध्यानांत धरावा. **एकाद्याच्या पाठीस लागणें** त्याचा पिच्छा पुरविणें. **पाठीशीं क्रि० वि०** अंगावर ; उ० माझ्यापाठीशीं शंभर लचांडें आहेत ; तुझें काम मी केव्हां करूं ? **कोणेकाला पाठीशीं घालणें** त्याला आश्रय देणें. **कांहीं काम पाठीशीं घेणें** तें पथकरणें ; तें अंगावर घेणें. **झाकल्या पाठीनें** आबरू गमावून न घेतां ; प्रतिष्ठितपणानें. **तापल्या पाठीनें** अंगांत शक्ति, उमेद, किं० ताकद आहे तोंपर्यंत. **पुरती पाठ घेणें, पुरती पाठ पुरविणें** पिच्छेस लागणें ; पथकरलेलें काम नेटानें चालविणें ; इष्टवस्तु मिळविण्यासाठीं प्रयत्न चालू ठेवणें.

पाठगा [**म०** पाठ] **वि०** स्वारी वहावयासाठीं शिकवून तयार केलेला (घोडा).

पाठण [**म०** पाठ] **न०** १ पाठ (तुच्छतेनें). २ चोळीची पाट. ❀ **पाठणचें गळूं न०** पाठीला झालेलें गळूं. **कोणेकाचें पाठण मऊ करणें** त्याला पाठीवर खूप मारणें.

पाठवणी, पाठवणूक [**म०** पाठविणें] **स्त्री०** १ पाठविण्याची क्रिया. २ कोणेकाला निरोप देतेसमयीं त्याला संमानार्थ दिलेलीं द्रव्य इ० ची देणगी किं० अशी देणगी देऊन त्याची करून दिलेली रवानगी. ३ दुसऱ्या गांवीं द्रव्यादि पाठविणें किं० जें पाठविलें तें.

पाठाड, पाठाडी, पाठाण, पाठार मागें ' पठाड, ' ' पठाडी ' ' पठाण, ' ' पठार ' पहा.

पाठारा पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

पाठारी पु० पांच कळशी हिंदूंची जात किं० त्या जातीचा इसम.

पाठोरा [**म०** पीठ] **पु०** श्रावण महिन्याच्या अमावास्येस चवसष्ट योगिनींच्या आकृति पिठानें काढून त्यांची पूजा करतात ती. ' पाठोरा 'पिठोरा' असेंहीं ह्या पूजेला अन्य नांव आहे.

पाड पु० १ बाजारभाव ; निरख. २ थोरवी ; वरचढपणा ; बरोबरीचें नातें ; कोणेकाचें कोणेकाशीं युद्धांत टिकून राहाण्याचें सामर्थ्य ; याचा उपयोग निषेधवाक्यांत होतो ; उ० ससा सिंहाशीं पाड पावेल काय ? उ० त्याचा काय पाड आहे माझ्या थोबाडांत मारण्याचा ? ३ आंबे इ० फळें झाडावरून काढण्याइतकी त्यांची पक्व दशा. ४ पेंढा, गवत, इ० मध्यें घालून पिकविण्याच्या दशेला येणें. ५ भिंत इ० ची रचाई करतांना गवंडी इ० ना उभें राहाण्यासाठीं करतात ती रचना ; पहाड. ❀ **फळ पाडास येणें** तें बहुतेक पक्व दशेस आलेलें असणें. **पाडास जाणें** १ फळझाडाला फळें येण्याचा ऋतु टळणें. २ गाय, म्हैस, इ० चा फळण्याचा समय टळणें.

पांड पु० बिघ्याचा वीसावा भाग ; वीस काठ्यां इतकें क्षेत्रफळ.

पाडकुळा वि० वयानें मोठा असून लहान वयाचा कोंवळेपणा ज्याचा अद्यापि नष्ट झालेला नाहीं असा (पुरुष). ' पाडकुळी ' हें स्त्रीलिंगी रूप ; उ० जानकीबाईला पंधरा पोरें झालीं तरी ती अझून पाडकुळी दिसते.

पाडगा [म० पाठ] वि० स्वारीसाठीं शिकवून तयार केलेला (घोडा). वर ' पाठगा ' पहा.

पांडगा [म० पांड] पु० शेत जमीनीचा एक तुकडा.

पाडगें [म० पाट] न० १ पासोडी इ०चें एक पट्टें. २ एका मागावर एकापुढें एक अशी विणलेलीं जीं लुगडीं किं० खण ना किं० ते प्रत्येक.

पाडणी [म० पाडणें] स्त्री० पाडण्याची क्रिया.

पाडणें [म० ' पडणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ उभा असलेला पदार्थ जोरानें आडवा करणें; उ० भिंत पाडणें, इ०. २ कुस्ती इ० त (कोणेकाला) चीत करणें; उ० मुकुंदानें हरीला पाडलें. ३ कोणेकानें कोणेकावर सरशी मिळविणें. ४ उत्पन्न करणें; अस्तित्वांत आणणें; प्रचारांत आणणें; उ० भिंतीला भोंक पाडणें; उ० चाल, शिरस्ता, प्रचार, इ० पाडणें; उ० रुपये पाडणें; उ० विहीर पाडणें, पाहिऱ्या पाडणें; उ०फणीला दांते पाडणें; उ० रस्ता पाडणें; उ० विटा पाडणें. ❀ **कोणेकाची समजूत पाडणें** भानगडीचा विषय किं० गुंतागुंतीचें काम त्याला समजावून सांगणें. **पैका (किं० रुपये) पाडणें** हर प्रयत्नांनीं पैसे मिळविणें. **माल पाडून घेणें** माल विकणाऱ्याला पैशाची फारच जरूर असल्यामुळें त्याच्या मालाची त्याला वाजवीपेक्षा कमी किंमत देऊन तो माल विकत घेणें.

पाडथळ [म० पाट+थळ (स्थळ)] न० १ पाटाच्या पाण्यावर पिकें जांतून काढलीं जातात अशी जमीन. ❀ **पाडथळी बिघा, पाडथळ बिघा** पु० पंधरा पांडांचा बिघा.

पाडपंचाईत स्त्री० १ पदार्थांच्या किंमतींची चौकशी किं० वाटाघाट. २ पंचाइतीनें केलेली चौकशी.

पाडव पुढें ' पाडाव ' पहा.

पांडव [सं० पंडु] पु० पंडूचे पुत्र; धर्म, भीम, अर्जुन, नकुल, आणि सहदेव, हे पांच सख्खे भाऊ प्रत्येक. ❀ **पांडवकृत्य, पांडवांचें लेणें** न० डोंगर पोखरून केलेलें देऊळ, सभामंडप, इ०. ही रचना पांडवांना वनवासांत असतां केली अशा समजुतावरून रूढ झालेला हा शब्द आहे.

पाडवा [सं० प्रतिपद (-दा)] पु० हिंदू महिन्याच्या शुक्ल किं० कृष्ण पक्षांतील पहिली तिथि; उ० गुडीपाडवा, धोतरपाडवा (म्ह० दौहित्र प्रतिपदा), इ०. ❀ **पाडव्याचें साल** न० चैत्री प्रतिपदेला सुरू होणारें वर्ष. मृगसाल, दिवाळीचें साल, हीं इतर सालें.

पाडवा [म० पाडणें] पु० उलथून पाडणें. ❀ **कोणेकाचा पाडवा करणें** त्याला पराभूत किं० चीत करणें; त्याचा नक्षा उतरणें.

पाडविणें [म० ' पाडणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ पाडणें. २ वाढणें, घालणें, ओतणें.

पाडस १ हरिणाचा वत्स. २ गाय, म्हैस, इ० चें वासरूं. ३ मानव जातीचें मूल (प्रेमानें).

पाडस, पाडसा वि० तान्हें नव्हें असें (गाय, म्हैस, इ० चें वासरूं).

पाडसडणें, पारसडणें अ० क्रि० (झाड) पर्णरहित होणें; (झाडांचीं पानें) गळून पडणें.

पाडसडें न० घराच्या आढ्याच्या दोन्ही बाजूंचीं जीं पाखीं तीं प्रत्येक.

पाडळ, पाडळी [सं० पाटला, पाटली] स्त्री० एक वृक्षविशेष.

पाडा पु० १ गायीचें पुमपत्य,-बाल्यदशेंतील. २ मुख्य गांवाशेजारची दहा पांच घरांची किं० झोपड्यांची वसाहत. ३ पोफळें, नारळ, रातांबे, इ० फळें झाडांवर जून झाल्यावर तीं पाडवून गोळा करण्याची क्रिया. ४ झाडाचें रोप; बाल्यदेशेतील झाड. ❀ **पाडेकरी** पु० नारळ, पोफळ, इ० चीं झाडावरून तोडणी करणारा किं० करण्यांत कुशल किं० अनुभविक.

पाडा, पाढा पु० १ एक, दोन, तीन, इ० जे तीसापर्यंत क्रमांक त्याच्या एक, दोन, पासून दहा पर्यंत पटींच्या ज्या पंक्ति त्या प्रत्येक; उ० पांच एके पांच, पांच दुणी दहा, पांच त्रीक पंधरा, इ० पासून पांच दाहीं पन्नास हीं पंक्ति हा पांचाचा पाडा (किं० पाढा). २ एखाद्या प्रसंगाची, अनुभवाची, सुखदुःखादि

भोगांची तपशीलवार हकीगत; (क्रि०वाचणें): उ० नोकरी मिळवावयाला ज्या ज्या अडचणी त्याला आल्या त्यांचा पाढा (कि० पाटा) त्यानें मजपुढें वाचला.

पांडा, पांड्या [सं० पंडित] **पु०** उत्तर हिंदुस्तानांतील ब्राम्हणांची एक जाति कि० त्या जातीचा इसम. हे लोक परदेशांचे आणि भय्ये लोकांचे उपाध्ये असतात.

पांडा पु० वाघाचा बच्चा.

पाडाव [**म०** पाडणें] **पु०** पराजय; उ० त्यानें दोन वाक्यांत काशीकर शास्त्रयांचा पाडाव केला;उ०त्या वीरानें दोन घटकांच्या आंत शत्रुसैन्याचा पाडाव केला. **वि०** जिंकून कबज्यांत घेतलेला कि० कैदी केलेला; उ० त्यानें पहिल्या धडाक्यात दोनशें घोडा पाडाव केला. ॐ**पाडाव करून कांहीं जिन्नस विकत घेणें** विकणारा नडलेला आहे ही संधी साधून अत्यल्प किंमतीस तो पदार्थ घेणें.

पांडित्य [**सं०**] **न०** १ विद्वत्ता. २ शहाणपणाची किं० पराक्रमाची किं० विद्वत्तेची बढाई; उ० पुरे कर तुझें पांडित्य !

पाडी स्त्री० गायीचें स्त्री अपत्य.

पाडी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

पाडी [**हिं०** पहाडी] **स्त्री०** पालखी कि० मेणा वाहणाऱ्या भोयांची एक टोळी.

पांडु [**सं०**] **वि०** पांढरें; फिक्कें. **पु०** १ फिक्कट रंग. २ पंडु रोग. ॐ **पांडुकंबल न०** राजाच्या हत्तीची झूल. **पांडुशर्करा** एक प्रकारचा प्रमेह. **पांडुकामला स्त्री०** कावीळ हा रोग.

पाडूक न० वासरूं. **पाडुकें, पाडकें न० अ० व०** गायी.

पाडें न० गायीचें वासरूं.

पाडेवार पु० महार जातीचा इसम (कवितेंत).

पांड्या पु० १ मध्यम वयाचा वाघ. २ जकाती वसूल करणें इ० कामावरचा एक वतनदार ग्रामाधिकारी. ३ कुळकरणी (शूद्रांचा शब्द). ४ उत्तर हिंदुस्तानांतील एक ब्राम्हणांची जात. ह्या जातीचे लोक हे भय्ये किं० परदेशी यांचे उपाध्ये असतात.

पांढ्या, पुंढ्या पु० उसाची एक जात.

पांढर, पांढरी [**म०** पांढरा] **स्त्री०** १ एकाद्या गांवचे सर्व गांवकरी समुच्चयानें. २ एकाद्या गांवाचा विस्तार; एकाद्या गांवाची टापू कि० प्रदेश (हवा, पाणी, रोगराई, चोरचिलट, धान्याची सुबत्ता, इ० संबंधानें); उ० ह्या पांढरीत गेल्या शंभर वर्षांत दुष्काळ आला नाहीं; उ० ह्या पांढरीचें पाणी कोणाला बाधणार नाहीं; उ० ह्या पांढरीस अन्न पचून भूक चांगली लागते; उ० यंदा पांढरीनें हात दिला; उ० पांढरीनें पीक सोडलें. ३ गांवाच्या चतुःसीमांच्या आंतील प्रदेशाची कल्याणकर्ती देवता कि० देवतेच्या स्थानीं मानिलेली गांवकऱ्यांची मंडळी.उ० तुझ्या असल्या लबाड्या पांढरीस खपणार नाहींत, तुला येथून लवकरच काळें करावें लागेल. ४ गांवांतील कोणा मनुष्याच्या मालकीची जमीन, शेत, इ०. ५ लोकांचें गांवांत वास्तव्य; उ० भुतांच्या भीतीनें येथील पांढरी उठली. ६ पांढरी माती. ७ गांवाचा लोकांच्या राहाण्याचा प्रदेश. गांवांतील लोकांच्या शेतांच्या प्रदेशाला 'काळी' हा शब्द लावितात; उ० काळी पिकली म्हणून पांढरी वाचली (म्ह० शेतें चांगली पिकली म्हणून गांवचे लोक वाचले कि० जिवंत राहिले). ८ जमीनीवरचा सारा वर्ज्य करून इतर बाबतींपासून सरकारला मिळतो तो पैसा. ॐ **पांढरीचा डोळा पु०** गांवचा महार. **पांढरकूळ, पांढरगण न०** गांवचे सर्व लोक समुच्चयानें. **पांढरगणा पु०** गांवचे बारा बलुते हे गांवकामगार समुच्चयानें. **पांढरपट्टी स्त्री०** गांवचे कारागीर, दुकानदार, व्यापारी, इ० वर बसविलेली पट्टी.

पांढरा [**सं०** पांडुर] **वि०** दुधाच्या रंगाचा; श्वेतवर्ण. **पु०** सर्प,–सांकेतिक शब्द. ॐ **पांढराफटफटीत, पांढराशुभ्र, पांढरा सफेत, पांढराफेक वि०** अत्यंत पांढरा. **पांढरा कावळा पु०** १ अत्यंत दुर्मिळ वस्तु. २ निसर्गांत नाहीं ती वस्तु. **पांढरे कावळे असतील तिकडे जा** येथून काळें कर; निघून जा. **टीप,**–मागें 'कावळा' शब्दांत हा वाक्प्रचार पहा. **पांढरपाल स्त्री०** आजारानें फिक्कट झालेलें

माणूस. **पांढरपेशा पु०** ब्राम्हण, परभू, लोहार, कासार, सोनार, इ० जातीचा कोणीही इसम. हे लोक कृषिकर्म न करणारे आहेत. **पांढरपायी वि०** १ ज्याचा मागचा एक पाय पांढरा आहे असा (घोडा). असा घोडा अशुभ समजला जातो. २ अपशकुनी (माणूस); जेथें जाईल तेथें अशुभ करणारा. **पांढरमाती स्त्री०** पांढरी माती. **पांढरा परीस पु०** १ अशुभ माणूस; जेथें जाईल तेथें नासाडी करणारा; जो जवळ असतां कार्यनाश होतो असा माणूस. २ अट्टल लुच्चा माणूस. **पांढरे केश पु० अ० व०** म्हातारपण. **पांढरें पाणी न०** १ ताक. २ फार पाणी घालून लांबविलेलें ताक (निंदेत). **पांढऱ्या पायाचा वि०** ज्याच्या सहवासानें, आगमनानें, किं० स्नेहानें संकटें ओढवतात असा (माणूस). **पांढुरका वि०** किंचित् पांढरा. **पांढऱ्यावर काळें करणें** कागदावर नमूद करणें; लिहिणें.

पाढा पु० मागें ' पाडा, ' ' पाढा ' पहा.

पाणपट [**म०** पानिपत] **न०** पूर्ण विध्वंस; पराभव. **टीप**,–पानिपत येथें मराठी सैन्याची पूर्ण खराबी अहमदशहा अबदालीनें केली यावरून ' पाणपट ' याचा वरीलप्रमाणें अर्थ रूढ झाला. ' पानपत, ' ' सोनपत पानपत ' हेही शब्द याच अर्थानें योजले जातात.

पाणद, पाणंद, पाणंध, पाणंदी, पाणंधी स्त्री० दोन्ही बाजूंस शेराचें किं० अन्य झुडपांचें कुंपण असून मधून असते ती अरुंद पायवाट,– गांवांतील किं० गांवालगतची.

पाणसरा पु० डोंगराच्या घाटांतून जाणाऱ्या बैलांवर किं० घोड्यांवर कर बसवून तो वसूल करून त्या पैशांतून घाटाची दुरस्ती करणारा वतनदार अधिकारी. **पाणसरकी स्त्री०** पाणसऱ्याचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र.

पाणारणें [**म०** पाणी] **अ० क्रि०** फणस, आंबा, इ० चें फळ, किं० ऊस इ० पर्जन्याच्या पाण्याचा अंश आंत गेल्यामुळें बेचव, पचपचीत, किं० नीरस होणें.

पाणि [**सं०**] **पु०** हात. ॐ **पाणिग्रह, पाणिग्राह, पाणिबंध पु०, पाणिग्रहण, पाणिपीडन न०** विवाह; लग्न. **पाणितल न०** तळहात.

पाणी [**सं०** पानीय] **न०** १ उदक; सलिल. २ पाऊस; पर्जन्य. ३ हत्यारें भट्टींत तापवून तीं पाण्यांत बुडवून त्याच्या अंगीं आणतात ती दृढता. ४ धमक; अवसान; वीर्य; शक्ति; उत्साह. ५ मोतीं, हिरा, इ०चें तेज,कांति,किं०चकाकी. ६ डोळ्याचें (मोहक किं० उग्र किं० सौम्य) तेज. ७चेहऱ्याची टवटवी किं० तजेला. ८सोन्याचा किं० रुप्याचा किं० अन्य धातूचा पदार्थविशेषावर चढविलेला मुलामा. ९ हत्यार निसण्यावर घासून त्याच्या अंगीं आणिलेली तीक्ष्णता (देणें). १० संमान; आबरू; लौकिक; कीर्ति; (जाणें, चढणें, उतरणें). ॐ **पाणउतारा पु०** अपमान; तेजोभंग. **पाणकापड न०, पाणपट्टी, पाण्याची पट्टी स्त्री०** शस्त्राची जखम अंगाला झाली असता तिच्यावर ठेवितात जी पाण्यानें ओली केलेली चिंधी ती. **पाणकावळें न०** खाली ' पाणमोट ' पहा. **पाणकुकडें, पाणकोंबडें न०** घशांत किं० जिभेच्या खालीं होते ती विकृति. **पाणकोंबडा पु०, पाणकोंबडें न०** १ कोंबड्या सारखा एक प्राणी,– जो पाण्यांत संचरत असतो. २ चंद्राच्या प्रभेचें मंडल. **पाणकोळी पु०** एक पक्षिविशेष. **पाणक्या पु०** १ लोकांच्या घरीं मोलानें पाणी भरणारा माणूस. २ अशिक्षित किं० ठोंब्या किं० निरक्षर माणूस. **पाणखार पु०** उकडआंबे खारविण्यासाठीं मीठ घालून खारें केलेलें असतें तें पाणी. **पाणघर न०** १ स्नानासाठीं पाणी तापविण्याची घरांतील खोली. २ घरांत उपयोगाला लागणारें पाणी इ० पात्रांत जेथें सांठविलेलें असतें ती घराची खोली. ३ (विहीर खणावयाची असतां) पाण्याच्या झऱ्यांचा प्रदेश; उ० तुम्ही पांच सहा पुरुष खोल विहीर खणली म्हणजे तुम्हाला पाणघर लागेल. **पाणघोणस पु०** पाण्यांत राहाणारा एक प्रकारचा निर्विष सर्प. **पाणचक्की स्त्री०** वाहात्या पाण्याच्या प्रवाहाच्या जोरावर चालणारें यंत्र, गिरणी, इ०. **पाणचट वि०** १ योग्य प्रमाणाहून अधिक पाणी घातलें गेल्यामुळें बेचव झालेला(खाद्य किं०पेय पदार्थ). २ताळ-

तंत्र किं० चटकदारपणा ज्यांत कांहीं नाहीं असें (भाषण, गायन, इ०) किं०असें भाषण,गायन, इ० करणारा (माणूस). **पाणचूल स्त्री०** स्नानार्थ जींवर पाणी तापविलें जातें ती चूल. **पाणजंजाळ न०** फार पाऊस पडल्या कारणानें जिकडे तिकडे पाणी, चिखल,इ०होणें किं०त्याच्यामुळें होतो तो त्रास किं०उपद्रव. **पाणजांवई पु०**जांवयाचा भाऊ (विनोदांत),–जो त्याला प्यावयास पाणी देतो. **पाणझेली स्त्री०** (विटीदांडूच्या खेळांत) खेळणारानें टोलेलेली विटी पाण्यांत (किं० झाडावर) न पडूं देतां ती वरच्यावरच झेलणें. **पानड्या, पाणाडी, पाणाड्या पु०** अमुक ठिकाणीं विहीर खणली असतां किती पुरुष खोल झरे लागतील हें कांहीं आडाख्यांनी सांगूं शकतो तो. **पाणढाळ पु०**पाणी जोरानें वाहात जाण्याला सोयीचा किं० गैरसोयीचा उतार किं० सखल-पणा. **वि०** मोठा (उतार); मुळकेंवजा (उतार). **पाणताव पु०** सोनें किं० रुपें ताप-वून पाण्यांत बुडवून त्याचा पाहिलेला कस. (**सुखताव पु०** अग्नींत तापवून हवेंत थंड करून पाहिलेला सोनें किं० रुपें यांचा) कस. **पाणतुटी वि०** ज्यांतील फाजील पाणी वाळून जाऊन शिजवावयाला योग्य झाली आहे अशी (पालें भाजी). **पाणथरी स्त्री०** पोटांत होतो तो एक रोगविशेष किं० तो रोग ज्या अवयवास होतो तो. **पाणथळ, पाणदळ न०** १ जेथें पाटा-च्या पाण्यानें शेत पिकतें ती जमीन. २ पर्जन्य-काळ गेला असतांही जिच्या पोटांत आर्द्रता असते अशी जमीन. **पाणापिकलें, पाणपीक न०**पाऊस पडत असतांच पिकतें असें जें हळवें धान्य त्याचें पावसाळ्यांत करतात तें शेत. **पाणपिता वि०** १ फाजील पर्जन्यामुळें नासलेली (कणसें). २ पचपचीत, पुळपुळीत, पाणचट, निरस (भाषण, हिकमत, व्यवहार, काम,इ०).३ तल्लखपणाचा, कर्तबगारीचा (व्यवहार, कारभार, काम,इ०). ४ तडकाफडकी किं० भिडमुरवत न ठेवतां दिलेला (जबाब). **पाणपिशी स्त्री०** फाजील पर्जन्यामुळें वांझोटें झालेलें धान्याचें कणीस. **पाणपिसा, पाणफोल वि०** फाजील पर्जन्यामुळें वांझोटें झालेलें (धान्याचें कणीस). **पाणपोई स्त्री०** वाटसरांना प्यावयास पाणी देणें किं० जेथें पाणी दिलें जातें तें घर. **पाणफोल न०** भाता-च्या फुलांवर पर्जन्य पडल्यामुळें त्यांत होतें तें फोल. **पाणबुडी स्त्री०** १ पाण्यांत मारलेली बुडी. २पाण्याच्या पृष्ठभागाखालून चालणारी आगबोट. **पाणबुड्या पु०** विहिरींत पडलेली घागर इ० जो काढतो तो.२ एक पक्षिविशेष.३ समुद्रांतील मोत्यांच्या शिंपा काढण्याचा धंदा करणारा. **पाणभर जमीन स्त्री०** नवीन विहीर खणून किं० पाण्याचा पाट आणून शेताच्या उपयोगाला योग्य केलेली जमीन. **पाणभरणीचा, पाण-भरीत, पाणभरिताचा वि०**पाटाच्या पाण्यानें पिकणारी जमीन. याच्या व्यावर्तकत्वें ' कोरड वाही '. **पाणभरा वि०** पाटाच्या पाण्यावर उत्पन्न झालेलें (धान्य .–हरभरा, जोंधळा, इ०). **पाणभऱ्या पु०**लोकांच्या घरीं मोलानें पाणी भरतो तो. **पाणमांजर न०** मांजरासारखा पाण्यांत रहाणारा एक प्राणी. **पाणमोट, पाणमो-टली (–ळी) स्त्री०** प्रसूतिकाळीं गर्भ बाहेर पडावयाचे अगोदर पाण्यानें भरलेली एक चर्मा-ची मोट बाहेर येते ती. गायी, म्हशी, इ० वि-तांना मोट बाहेर पडते तिला ' पाणकावळें' **न०** म्हणतात. **पाणरस पु०** ज्यांतील रस पिळून काढलेला आहे असे आंबे पाण्यांत ठेवून आणखी काढलेला रस. **पाणरहाट पु०**पाण्याच्या प्रवाहाच्या जोरावर फिरणारा रहाट. **पाणलोट पु०**ज्यावरून पाणी खळकिनीं वाहून जातें असा जमीनीचा उतरता प्रदेश. २ डोंगराची उतरती बाजू. ३ पाण्याचा जोराचा प्रवाह. **पाणवटा(-ठा), पाणवथ (–था) पु०** नदीच्या कांठीं बांधलेला दगड इ० चा घाट,–जेथें पाण्याच्या घागरी बायका, पुरुष, इ० भरतात किं० धुणीं धुतात. **बारा कोशांवरचा पाऊस, शिवेंचा राऊत, आणि पाणवठ्याची घागर बरोबर गांवांत येतात** नदीवरून पाणी भरून आणावयाला गेलेली बाई नदीवरून परत घरीं येते तितक्याच अवधींत (म्ह० हाही म्हणतां) बारा कोशांवरचा पाऊस आणि शिवेवरचा राऊत हे गांवांत येतात. **पाणवड स्त्री०**पाणी साठविण्याचीं भांडीं(रांजण, डेरे, इ०) ठेवण्यासाठीं केलेला ओटा किं० केलेली

खोली. **पाणवसा, पाणसा पु०** गुराढोरांना चरावयाच्या जमीनी, प्यावयाचें पाणी, इ० बाबतींत सोयी किं० सोईस्करपणा: उ० ह्या गांवचा पाणवसा (किं० पाणसा) आमच्या गुरांस मानवत नाहीं. **पाणवळ वि०** ज्यांत आर्द्रता, बहुत काळ राहूं शकते असा (प्रदेश). **पाणवळ वि०** फार पाणी असल्यामुळें पाणचट, पचपचीत, किं० नीरस असा (खाद्य किं० पेय पदार्थ). **पाणवारू पु०** पाण्यांत चालणारा घोडा म्ह० गलबत, होडी, इ०. **पाणशाई स्त्री०** पखवाज किं० मृदंग यांच्या कातड्यावर पातळ काळ्या रंगाचा करतात तो लेप. भरशाई म्ह० असा जाड लेप. **पाणशेंग स्त्री०** खाद्योपयोगी मासा (विनोदांत). **पाणशोष, पाणसोस, पाणसोक पु०** ज्वरादि आजारांत एकसारखें पाणी पीत राहावें अशी रोग्याला होते ती इच्छा. **पाणसरडे न०** १ पाण्यांत राहणारा सापासारखा एक प्राणी. २ पायराहाटाची लोटे बांधलेली माळ रहाटावरून सरकूं नये म्हणून जें आडवें लाकूड घातलेलें असतें तें. **पाणसळ स्त्री०** १ जमीनीच्या पृष्ठभागाची सपाटी किं० घराच्या बांधकामांत मांडलेली तुळई इ० ची सपाटी तपासण्याचें गवंडी, सुतार, इ०चें एक साधनविशेष. २ शेत इ०तील जादा पाणी बाहेर काढून लावण्यासाठीं खणलेला उतरणीच्या रूपाचा चर. **पाणसा पु०** वर 'पाणवसा' पहा. **पाणसाप पु०** पाण्यांत राहणारा एक प्रकारचा साप. **पाणसापुड स्त्री०** घराच्या पाख्याचा वांशांच्या टोकांजवळ जी मोठी आणि मजबूत सापूड ठोकलेली असते ती. सापूड म्ह० घराच्या पाख्याचे वांसे, कुंपणाच्या काठ्या, इ० एका रांगेत राहाण्यासाठीं त्यांना बांधलेल्या असतात ज्या आडव्या काठ्या किं० बांबूच्या चिरफळ्या त्या प्रत्येक. **पाणसासरा पु०** भावाचा सासरा (विनोदांत). **पाणसासू स्त्री०** भावाची सासू (विनोदांत). **पाणसाळ स्त्री०, पाणसाळी भात न०** पाटाच्या पाण्यावर मळा इ० मध्यें पिकविलेलें भात. **पाणसाळ स्त्री०** मुशाफरांना प्यावयाला पाणी द्यावयासाठीं जें घर बांधलेलें असतें तें. **पाणसाळ स्त्री०** फरसबंदी जमीन किं० इमारतींत बसवावयाची तुळई ही कोणत्या बाजूस उतरती किं० चढती आहेत हें तपासण्याचें गवंडी, सुतार, इ०चें एक साधन. लाकडी त्रिकोणाच्या शिरोबिंदूपासून लोंबत सोडलेल्या ओळंब्याच्या रूपाचें हें साधन असतें. अन्य प्रकारचींही साधनें असतात. **पाणसाळ करणें** पाणसाळीच्या योगानें जमीन, तुळई, इ०ची सपाटी तपासणें. **पाणसोस पु०** वर 'पाणशोष' पहा. **पाणी कांजी न०** घरांत पाणी भरणें इ० घरगुती कामें समुच्चयानें: घरांतील कामधाम. **पाणी खाल्लेला वि०** पाण्यांत बुडवून ठेवल्यामुळें उपयोगी पडण्याजोगा झालेला. **पाणीदार वि०** १ तेज किं० चकाकी ज्याची स्वच्छ आहे असा (हिरा, मोती, इ०). २ तेजोभंग किं० अपमान ज्याला बिलकूल सोसत नाहीं किं० खपत नाहीं असा (माणूस). ३ सुंदर, मजबूत, आणि चपल (घोडा, इ०). ४ तीक्ष्ण धारेचें (हत्यार). **पाणीपाऊस पु० ए० व०** १ पाऊस, पिकाची स्थिति, इ० गोष्टी समुच्चयानें. २ ज्याच्या योगानें पाण्याची समृद्धि होईल असा पाऊस. **पाणीभरा वि०** पाटाच्या पाण्याची ज्याला जरूरी आहे असें (पीक इ०). **पाणीवैद्य पु०** मंतरलेलें पाणी देऊन रोग बरा करणारा वैद्य. **पाणीशेणी स्त्री० ए०व०** झाडणें, सारविणें, रांगोळी घालणें, पाणी आणण, इ० स्त्रियांचीं घरगुती कामें समुच्चयानें (करणें). **पाणेरा पु०, पाणेरें न०** पाणी भरलेलीं भांडीं ठेवण्याच्या सोयीची घरांतील जागा,—चिरेबंदी जमीन, ओटा, इ०रूप. **पाणोटा(-ठा), पाणोथा, पाणवटा पु०** नदी, तळें, इ० च्या कांठावर पाणी भरणें, अंघोळी करणें, चिरगुटें धुणें, इ० च्या सोयीची जागा. **अंगाचें (किं० रक्ताचें) पाणी होणें** (किं० **करणें**) अतिश्रमानें किं० दुःखानें जर्जर होणें (किं० करणें). **रक्ताचें पाणी आणि हाडाचा माणि करणें** इमानानें आणि मेहनतीनें कामगिरी किं०कर्तव्य करणें. **एखाद्या कामांत** (किं० **व्यवहारांत**) **पाणी शिरणें** तें काम (किं० तो व्यवहार) बिन किफायतीचा, धोक्याचा, किं० त्रासाचा होणे. **खोल पाण्यांत**

शिरणें १ एकाद्या कामांत किं० व्यवहारांत फार मन घालणें किं० फाजील चिंकस्पा किं० चचा करीत बसणें. २ एकाद्या विषयाच्या गूढ,कठिण, किं० दुर्बोध भागाचें ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करणें.३ आपल्या आवांक्याच्या किं०आटोक्याच्या बाहेरच्या गोष्टींबाबत प्रयत्न करणें. **तापल्या पाण्याला चव नसतें** एकदा मैत्रीचा भंग झाल्यावर ती मैत्री पुन्हा जुळत आली तरी ती पूर्वीप्रमाणें सुखकर होऊं शकत नाहीं. **पाणी होणें** (किं० **करणें**) एकाद्या वस्तूचा नाश किं० नासाडी होणें (किं० करणें); उ० मी तिसऱ्या प्रहरीं थोडेंसें थालीपीठ खाल्लें त्यामुळें माझ्या संध्याकाळच्या जेवणाचें पाणी झालें. **केस तोडण्याइतका पाण्याला जोर आहे** पाण्याच्या प्रवाहाला इतका जोर आहे कीं त्यांत केस धरला तर तो तुटेल. **टीप,**–पावसाळ्यांतील ओढ्याच्या पाण्याचा जोर वर्णावयाचा असता ही अतिशयोक्ति करतात. **पाणी घालणें** १ (**शब्दशः**) वृक्षादींच्या वाढीला जरूर जें पाणी तें त्यांच्या बुडाशीं ओतणें.२ (**लक्षणेनें**) एकाद्या गोष्टीच्या अभिवृद्ध्यर्थ किं० उत्कर्षार्थ प्रयत्न करणें; एकाद्या वस्तूच्या जोपासनेबद्दल उपाय योजणें. ३ (**लक्षणेनें**) एकाद्या वस्तूवर पाणी घालणें म्ह० ती गमावून घेणें किं० तिचा नाश करणें; उ० शामराव अति अव्यवस्थित माणूस, त्याणें आपल्या हातानें आपल्या नोकरी-वर पाणी घातलें. **टीप,**–विस्तवावर पाणी घात-ल्यानें विस्तव विझतो ह्या रूपकावर हा वाक्प्र-चार आधारलेला आहे. **एकाद्या वस्तूवर पाणी सोडणें** १ ती स्वेच्छेनें कायमची देऊन टाकणें. २ नाइलाजास्तव ती सोडावयास किं० तिच्याकडे दुर्लक्ष्य करावयास किं० ती विसरून जावयास किं० तिचा नाश करावयास सिद्ध किं० तयार असणें; उ० आलीकडे जानराव पाटलाचा मुलगा फार बिघडला आहे; पाटील बोवांनीं आतां पुत्रप्रेमावर पाणी सोडलें पाहिजे; कडक उपाय योजल्याशिवाय तो पोरगा सुधारण्याची आशा नाहीं. ३ तिची आशा सोडून देणें; ती गेली असें समजून स्वस्थ बसणें; उ० रामू पटवर्धनाकडे जे एकुणतीस रुपये आहेत ते तो परत देईल असें दिसत नाहीं, त्या रुपयांवर तूं पाणी सोड कसा. **पाणी छाटणें,** (**तोडणें** किं० **कापणें**) पोहणा-ऱ्यानें आपल्या अंगाच्या जोरानें पाणी दुभागून पुढें सरणें. **कोणेकाला पाणी छाटणें** (म्ह० छाटलें जाणें), **कोणेकाला पाणी कापणें** (म्ह० कापलें जाणें). **कोणेकाला पाणी तुटणें** पोहा-णाराला अंगच्या जोरानें पाणी दुभागून पुढें जातां येणें. **पाणी जाळणें** करडा अमल चालविणें; क्रू-रपणानें वागविणें. **एकाद्याचें पाणी जोखणें** (किं० **ओळखणें**) त्याची धमक, विद्वत्ता किं० कर्तृत्व-शक्ति आजमावणें किं० पारखणें; त्याची लायकी पाहाणें. **एकाद्याच्या नांवानें** (किं०**नांवावर**) **पाणी तावणें** त्याचा सर्वस्वीं घात करावयास उद्युक्त होणें. **टीप,**-प्रेत घरांतून बाहेर काढावयाच्या पूर्वी त्यावर ऊन पाणी ओतीत असतात ह्या प्रघातावरून ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति आहे. **हत्याराला पाणी देणें** त्याला निसण्यावर घासून धार देणें. **मृत माणसाला पाणी देणें** श्राद्धविधि करून त्याला पाणी देणें.मृताच्या नांवानें पाणी देणें किं० सोडणें ह्याच.ही वरील अर्थानेंच उपयोग होतो; **एकाद्या वस्तूवर पाणी पडणें** ती फुकट जाणें; तिचा नाश होणें; तिचा सुखकरपणा नाहींसा होणें. उ० तूं नियमानें कौमुदीची उज-ळणी करीत जा,नाहींतर तिच्यावर पाणी पडेल; उ०चिंतामणरावांची बायको मेल्यापासून त्यांच्या संसारावर पाणी पडलें. **टीप,**–डफ, ढोलकें, इ० चर्मवाद्यांवर पाणी पडलें असतां त्यांचा आवाज बदबदीत होतो, ह्या सादृश्यावरून वरील वाक्प्र-चार उत्पन्न झाला आहे. **एकाद्याला पाणी पाजणें** १ तो मेल्यावर त्याला तिलांजलि देणें. २ त्याला खूप झोडपणें. ३ त्याला फसविणें. ४ त्याला पराजित करणें. **पाणी पाणी करणें** ' पाणी द्या, पाणी द्या ' असें म्हणणें; एकसारखें पाणी मागत राहाणें. **एकाद्याचें पाणी पाणी करणें** त्याच्याकडून अतोनात काम करवून घेऊन त्याला जर्जर करणें किं० दमविणें. **पाणी पाणी होणें** एकसारखें किं०पुन्हा पुन्हा पाणी पिण्याची प्रवृत्ति होणें. **पाणी पिऊन भांडणें** (किं० **वाद करणें**) नेटानें, हट्टानें, आणि निर्लज्ज-पणानें भांडत रहाणें. **एकाद्याचें घरीं पाणी**

भरणें त्याच्या सेवेंत तत्पर असणें;त्याला पूर्णपणें वश किं० अनुकूल असणें;उ०ज्योत्याचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी. **टीप,**–' पाणी वाहणें, ' पाणी घालणें ' यांचाही वरील अर्थानें उपयोग होतो. **पाणी मरणें** पाणी बेचव होणें. **टीप,**–पिण्याचें पाणी निर्दोष करण्यासाठीं त्याला उकळी आणतात तेणेंकरून तें निर्दोष झालें तरी बेचव होतें. ह्या पाण्याला ' मेलेलें पाणी ' म्हणतात. **पाणी मागूं न देणें**१एकदम तडाक्यासरशीं ठार मारणें. २बेदम मारणें;उ० तूं त्या गोंद्याच्या वाटेला जाऊं नको, त्यानें तुला बडविलें तर पाणी मागूं देणार नाहीं. **पाणी मारणें** पोहोतांना पाणी दु ा.गणें. **पाणी मुरणें** कमीपणा,वैगुण्य, मर्मस्थान, द पाला जागा, लबाडी,वगैरे असणें; उ० गोंदोबा लके स्वरांत त्याच व्यवहाराबद्दल लखोबाशीं बोलत होता ह्यावरून तेथें कांहीं पाणी मुरत आहे असा मला संशय आला. **पाणी लागणें** १ वाईट पाणी पिण्यांत आल्यामुळें आजार येणें; उ० तुम्हांला पुण्याचें पाणी लागलें खास, एरव्हीं तुम्हाला हा मलेरियाचा ताप कशानें जडला ? २ ज्याची संगति धरली असेल त्याचे गुण किं० जेथें वसति केली असेल तेथल्या लोकांचे गुण अंगीं जडणें. **पाण्याचा कांटा मोडणें** पाणी थोडेंसें तापणें. **पाण्यांत घाम येणें** अतोनात संतप्त होणें; रागानें अंगाचा भडका होऊन जाणें. **एकादी वस्तु पाण्यांत घालणें** १ ती बुडवून टाकणें. २ तिचा नाश करणें. ३ तिजकडे दुर्लक्ष्य करणें. **एकाद्याला पाण्यांत पाहाणें** त्याचा अतिशय द्वेष करणें; त्याच्याशीं वैरभावानें वागणें. **पाण्यांत दिसणें** द्वेषपात्र असणें किं० होणें; भीतीचें कारण असणें किं० होऊन राहिलेलें असणें; उ० मोंगलांना शिवाजी पाण्यांत दिसत असे (म्ह० मोगल लोक शिवाजीला फार फार भीत असत). **एकाद्याला पाण्यापेक्षां पातळ करणें** त्याची फजीती किं०पाणउतारा करणें;त्याला लाजविणें; त्याचा तेजोभंग करणें. **पाण्यापेक्षा पातळ होणें** फजीती पावणें; शरमिंदें होणें. **ऊन पाण्यानें घरें जळत नसतात** निराधार निंदेनें कोणाचा बदलौकिक होत नाहीं; दिसण्यांत खरा पण असण्यांत निराधार असा कोणेकावर आरोप केल्यानें त्याची अपकीर्ति होत नाहीं. **त्याला पाणी देखील घोटत नाहीं** तो अगदीं मरणोन्मुख झाला आहे.**पाण्यापेक्षां शीतळ वि०** अत्यन्त सौम्य किं० शांत प्रकृतीचा (मनुष्य). **पाण्यावरचा बुडबुडा पु०** क्षणभंगुर वैभव. **पाण्यावरची रेघ स्त्री०** अचिरस्थायी बंधन, करार, उपदेश, इ०. **पाण्याला आधार** (किं० **आश्रय**) अनशापोटीं पाणी प्याल्यास बाधेल म्हणून जें कांहीं थोडेंसें खातात तें.

पात [सं०] पु० १ उडणें. २ उतरणें. ३ पक्ष्यादींनीं घातलेली झडप. ४ नाश; विध्वंस. ५ (शस्त्रादींचा) प्रहार, रट्टा, किं० तडाखा. ६ (वृक्षादींचीं पानें) गळणें. ७ पडणें. ८ (शत्रूचा) हल्ला. ९ कांहीं गोष्ट घडणें. १० चंद्रसूर्याचें क्रान्तिसाम्य. ११ व्यतिपात. १२ ज्योतिषांतील सतरावा योग. १३ ग्रहाच्या गतींतील अति नीच बिंदु.

पात न० १ शस्त्राचें पातें. २ डोळ्याचें पुट.३ अगदीं लहान झाड.

पात स्त्री०१धान्य मळणीला खळ्यावर घालून त्याचेवरून चालवितात ती बैलांची पंक्ति. २ताड, माड, इ०च्या झावळीस मध्यभागाच्या दांड्याच्या दोहीं बाजूंस जे लांब लांब अवयव असतात ते प्रत्येक. ॐ **पातकिरला वि०** फुंकर घातला असतां उडून जाईल इतका हलका, रोडका, किडकिडीत (मनुष्य, पशु, इ०). ३ कांदा, लसूण, ऊस, इ० चीं पानें प्रत्येक. **पातीकांदा पु०** एक प्रकारचा कांदा. कांद्याचा दुसरा प्रकार बोडका कांदा. **पातीचा चहा पु०** ज्याला लांब लांब पाती येतात असें एक भुईसरपट वाढतें तें झाड. ह्या पातींचा काढा ताप, पडसें, इ०वर योजतात.

पात पु० १ खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष. २ कुदळ, कुऱ्हाड, इ० मध्यें दांडा बसवावयाचें भोक. [वनस्पति.

पात स्त्री०, पु० पाच नांवाची एक सुगंधी

पांत[सं०पंक्ति]**स्त्री०** १शेतांत लावणी,कापणी, इ०कामें करतांना माणूस जो पट्टा किं०ओळ धरून काम करीत जातो तो किं० ती.२ कोल शाकार

णारा गडी जी रांग धरून कोलें काढीत किं० बसवीत जातो ती. ३ खळ्यांत धान्याचीं कणसें तुडविणाऱ्या बैलांची पंक्ति. ४ रांग, ओळ (सामान्यतः).

पातक [**सं०**] **न०** १ पाप; अयोग्य अशी कांहीं गोष्ट करणें. २ अयोग्य गोष्ट केल्यानें घडतो तो दोष. ꣸ **पातकनिरास पु०, पातकनिरसन न०** केलेल्या पातकाबद्दल घेतलेलें प्रायश्चित्त किं० ह्या प्रायश्चित्तानें पुन्हा आलेली शुद्धि. **मी केलेलें पातक माझ्या मनाला खात आहे** तें माझ्या मनाला डवचत आहे.

पातडें न० १ पंचांग. २ कोणेकाचे शुभाशुभ ग्रह, त्यांचीं फळें, इ० ज्यावरून ज्योतिषी काढतो तें कोष्टक, कुंडली, इ०. ३ कोणत्याही धंद्याच्या उपयोगाचीं साधनसामग्री ठेवावयाचें पोतें, पेटी, बटवा, इ०.

पातणें [**सं०** प्रत्यय] **अ० क्रि०** कोणेकावर भरंवसा टाकून असणें किं० राहाणें; उ० तूं रघुनाथावर पातलास म्हणून तोंडघशीं पडलास.

पातणें अ० क्रि० १ जवळ येणें. २ घडून येणें. ३ अनुभवास येणें. **टीप,**—हे तीन्ही अर्थ कवितेंतच येतात.

पातफणस पु० फणसाची एक जात किं० त्या जातीचा फणस.

पातमुळा पु० मुळ्याची एक जात.

पातरी, पाथरी स्त्री० एक वनस्पति.

पातवडा पु० खपली; धलपी; साल; त्वचा.

पातवडी स्त्री०, पातवड पु० १ अळू इ० च्या पानांस डाळीचें पीठ लावून त्या पानांच्या वळकट्या करून शिजवून कापून तळून करतात तें खाद्य. २ तांदुळाच्या पिठाच्या करतात त्या पापड्या.

पातळ [**हिं०** पतला] **वि०** १ पदार्थाची लांबी, रुंदी, आणि उंची (किं० खोली किं० जाडी) ह्या तीन परिमाणांपैकीं तिसरें ज्याचें कमी असा(कागद, पान, थर, इ०).२ ज्यांतील घनांशापेक्षां द्रवांश अधिक असें (ताक, सार, कढी, इ०). ३ ज्याच्या विणीचे तंतु अंतरा-अंतरावर आहेत असें (वस्त्र, जाळें, इ०). ४ एकमेकांपासून विलग असे ज्यांत पदार्थ मांडलेले किं० ठेविलेले आहेत अशी (आरास इ०). ५ विशेष घरोब्याची किं० प्रेमाची नव्हे अशी (ओळख, मैत्री). ६ ज्यांतील झाडें अंतरा-अंतरावर आहेत व० जवळ जवळ नाहींत असें (जंगल, रान). **टीप,**—याच सरणीनें 'पातळ' ह्याचे अर्थ पुढच्या शब्दांच्या अनुरोधानें करावे.

पातळाई स्त्री० पातळपणा (सर्व अर्थीं).

पातळांगी, पातळांग्या वि० पातळ आहे अंग ज्याचें असा; किडकिडीत.

पातळ [**सं०** पाटल=गुलाबी] **न०** स्त्रियांचें नेसावयाचें एक प्रकारचें वस्त्र.

पातळी [**म०** पातळ] **स्त्री०** १ सुतार लोकांचें एक आउत; पटाशी. २ पातळपणा (सर्व अर्थीं; वर ' पातळ ' पहा). ३ पदार्थाचा पृष्ठभाग. [शिंग.

पाताडें न० हैस इ० चें लठ्ठ आणि चपटें

पाताल, पाताळ [**सं०** पाताल] **न०** १ अधोलोक. २ भूलोकाचे खालीं सात लोक आहेत ते प्रत्येक किं० विशेषतः सातवा लोक. ३ पदार्थाचा अतिशयित खोलपणा वर्णावयाचा असतां त्याला पाताळ म्हणतात; उ० ह्या आजारानें त्याचे डोळे पाताळांत गेले; उ० काळच्या उपासानें त्याचें पोट पाताळांत गेलें.४(**ज्योतिष**) जन्मलग्नापासून चतुर्थ स्थान. **पु०** धातुभस्म करण्याची मातीचीं दोन पालें प्रत्येक किं० जोडीनें. ꣸ **पातालमुख न०** खोल खळगा. **पाताळयंत्र न०** १ उदेल इ० काढण्याचें यंत्र. २ अति गुप्त मसलत किं० व्यूह. **पाताळयंत्री वि०** गुप्त मसलती करणारा. **टीप,**—जें पाताळांत ठेविलेलें असल्यामुळें दिसत नाहीं पण ज्याची तेथें कळ दाबल्यानें पृथ्वीवर कार्य घडतें तें ' पाताळयंत्र '- त्या यंत्राप्रमाणें काम करणारा जो माणूस तो ' पाताळयंत्री '. **कोणेकाला पाताळीं घालणें** त्याचा सत्यानास करणें;त्याचा साफ विध्वंस करणें. **कांहीं गोष्ट पाताळांतून काढणें** (**किं०पाताळ फोडून काढणें**) १ती कितीही गुप्त किं०असाध्य असली तरी ती उघडकीस आणणें किं०ती हस्तगत करून घेणें. २ अत्यन्त असंभवनीय किं० लोकांना सहज न सुचणारा तर्क करणें. **पाताळगंगा स्त्री०** हिमालयांतील उगमस्थानची गंगा नदी.

पाताळपाणी न० अत्यन्त खोल अशा विहिरीचें पाणी.

पातित्य [सं०] न० कांहीं दुष्कर्म केल्यामुळें होतो जो जातिभ्रंश किं०धर्मभ्रंश तो.

पातिव्रत्य [सं०] न० स्त्रीची आपल्या पतीवर भक्ति; स्त्रीची पतिनिष्ठा.

पाती स्त्री० १ दोन किं० अधिक माणसांनी चालविलेल्या कांहीं कामांत किं० व्यवहारांत प्रत्येकाचा जो भांडवल, नफा, नुकसान, इ० बाबतींत असतो तो अंश. २ सोनें, रुपें, इ०चें बांधकाम करण्याच्या उपयोगाचा जो डाकाचा पत्रा किं० तुकडा असतो तो. ३ जनव्यासाठीं सूत करावयाचें असतां तें प्रथम ज्या पट्टीभोंवतीं गुंडाळतात ती. ४ ऊस,कांदा, माड,पोफळ, इ० चें पान किं० झावळी.५फणसाच्या गऱ्याच्या भोंवतीं भाजीच्या उपयोगाचा जो सागूळ नांवाचा खाद्यांश असतो त्याची एकएक चिंधोटी. ६ खळ्यावर कणसें तुडविणाऱ्या बैलांची रांग.॥ **पातीदार** पु० सर्कतीनें व्यवहार करणारे जे असामी त्यांपैकीं प्रत्येक.

पान्तु [सं० 'पान्तु दक्षिणाः ' याचा पहिला शब्द] स्त्री० १ ब्राम्हणाला दिलेली दक्षिणा. २ रुपाया हें नाणें(भिक्षुकांच्या सांकेतिक भाषेत). मागें ' चकार, ' 'चकारी' पहा. ॥ **पांतूचें** न० ब्राह्मणाला दिलेली दक्षिणा. **पांतु** पु० अ० व० रुपये.

पातें न० १ हातरहाट इ० च्या कण्यांत किं० तुंब्यांत चक्रासारखा आकार व्हावा म्हणून जे अनेक दांडे बसविलेले असतात ते प्रत्येक. २ डोळ्याची पापणी. ३ तरवार, सुरी, इ०चें पान. ४ फणस ह्या फळांतील अत्यन्त कोंवळा गरा,—ज्यांतील अठळी पुढें टणक व्हावयाची असते. ५ ह्या कोंवळ्या गऱ्याभोंवतालचें वेष्टन,—ज्याला सागूळ म्हणतात ६ माड, ताड, इ०च्या झावळीच्या दांड्याच्या दोहीं बांजूस असतात ते पानासारखे लांब लांब अवयव. ७ कांदा, लसूण, ऊस, इ०ची लांब लांब पानें प्रत्येक. ८ चौकटीच्या रूपाचें जें जोकड त्याचा खालचा किं० वरचा आडवा दांडा.॥**पात्यास पातें न लागणें** अत्यल्प सुद्धां झोप न येणें किं० न लागणें.

पातेजणें, पात्यविणें, पातेविणें [सं०प्रत्यय] स० क्रि० आपण स्वता ज्याची जपणूक केली पाहिजे असा पदार्थ(मूल,माणूस,जनावर,काम,इ०) जपणुकीसाठीं दुसऱ्याच्या हवालीं करणें किं० त्याच्या जपणुकीकडे दुर्लक्ष्य करणें; उ० विहिरीवर मुलाला पातेजतांना तुला लाज कशी नाही वाटली ? उ० विसू फुले याच्यावर तुम्ही आपली म्हैस पात्यविली ही मोठी चुकी केली.

पातेरा पु०,**पातेरें** न०[सं०पत्र] कांदा,लसूण, यांचीं सालपटें; उसाचीं किं० झाडांचीं वाळलेलीं पानें, गवत, इ० निरुपयोगी पदार्थांचा समूह.

पातेरा [म० पत] पु० व्यापार, व्यवहार, इ० मध्यें कोणेकाची पत किं० साखी.

पातेली [सं० पात्र] स्त्री० संसारांत उपयोगीं पडणारें लहान पातेलें.

पातेलें, पात्येलें [सं० पात्र] न० संसारोपयोगी धातूचें आकारविशेषाचें भांडें.

पातेविणें स० क्रि० मागें ' पातेजणें ' पहा.

पातोडा, पापोडा पु० फळ, लाकूड, इ०चा तुकडा, साल, धलपट, इ०.

पातोडी स्त्री० मागें ' पातवडी ' पहा.

पातोवळा, पातोळा [म० पान+पोळी] पु० तांदुळाचें पीठ, भोपळ्याचा गर, इ० पदार्थांच्या मिश्रणाचें एक खाद्यविशेष.

पात्यविणें मागें ' पातेजणें ' पहा.

पात्येलें न० मागें ' पातेलें ' पहा.

पात्र [सं०] न० १ पेला. २ भांडें. ३ आधार; आश्रयस्थान. ४ कांहीं दिलेलें दान घेण्याला, केलेला उपदेश ऐकावयाला, योग्य असा जो माणूस तो. ५ स्तुतीला किं० निंदेला योग्य असा मनुष्य, विषय, कृति, वरत, इ०.६ सद्गुण, दुर्गुण, इ० चा सांठा. ७ नदीची रुंदी. ८ नाटकांत विशिष्ट भूमिका करणारा. ॥ **पात्रें नाचविणें** उधळपट्टी करणें; उधळेपणानें पैसा खर्चणें. ॥ **कोणेकाच्या पात्रांत राख कालविणें** किं० **अन्नांत माती घालणें, कोणेकाला पात्रावरून उठविणें** त्याचीं चरितार्थाचीं साधनें बुडविणें. **पात्रीं बसणें** भोजनार्थ जमलेल्या मंडळींनीं जेवण्यासाठीं पाटावर बसणें.**पात्रें पूजणें** खाद्य किं० पेय पदार्थ अत्यल्प वाढणें. **पात्रें वाढणें** कांहीं

कामाची पूर्व तयारी करणें किं० सर्व साधन-सामग्री सिद्ध करून ठेवणें. **पात्रेसमित** **पु०** १ निरुद्योगी माणूस. २ दुसऱ्याच्या घरीं फुकट जेवणें मिळवून काळ घालविणारा. **पात्रवस्त्र, वस्त्रपात्र न०** पु० **व०** संसाराच्या उपयोगाचीं भांडींकुंडीं इ०.

पात्रा स्त्री० १ वेश्या. २ नर्तकी स्त्री.

पात्रूट (–ड) **पु०** धोंडे फोडून घडविणारा पाथरवट.

पात्सर, पात्सार पु० कोणेकावर टाकलेला भरंवसा; मदार; भिस्त. [ओळ.

पाथ, पांथ, पात [**सं०** **पंक्ति**] **स्त्री०** रांग,

पांथ [**सं०**] **पु०** १ वाटसरू; मुशाफर; प्रवासी. २मार्ग; रस्ता; वाट.

पाथर [**सं०** प्रस्तर] **स्त्री०** १ स्नानाचे वेळीं बसावयाचा घडविलेला धोंडा. २ वस्त्रें ज्यावर धुवावयाचीं तो धोंडा. ३ चटणी ज्यावर वाटावयाची तो धोंडा ; पाटा. **पु०** धोंडा(सामान्यतः). ॐ **पाथर आमटी स्त्री०** जांबोत्री खडकावर पर्जन्यकाळीं उगवते ती एक आंवट वनस्पति. **पाथरफोड, पाथरफोड्या पु०** १ एक पक्षी,–जो चोंचीनें दगड फोडीत असतो. २ पोलादी हत्यारांनीं दगडाला आकारविशेष देणारा कारागीर; पाथरवट.

पाथरा [**सं०** पंक्ति] **पु०** कापलेलीं धान्यांचीं किं० तंबाखूचीं पानें किं० रोपडीं यांची ओळ.

· **पाथरी स्त्री०, पाथरा पु०** एक लहानशी वनस्पती.

पाथरी [**म०** पाथर; **सं०** प्रस्तर] **स्त्री०** १ आंघोळीचा धोंडा. २ पुरण, चटणी, इ० वाटावयाचा लहान धोंडा; लहान पाटा.

पांथरी, पाणथरी, पानथरी स्त्री० मनुष्याच्या पोटांत होतो तो एक रोग किं० तो रोग ज्या अवयवाला होतो तो अवयव.

पांथस्थ, पांथ [**सं०** पांथ] **पु०** वाटसरू; प्रवासी; मुशाफर.

पांथा [**सं०** पथ किं० पथिन्=रस्ता] १ मार्ग; रस्ता. २ कामाची सरणि; पद्धति. ३ मागें ' पांत ' पहा.

पाथी स्त्री० सरकत. मागें ' पाती ' पहा.

पांथी स्त्री० खळ्यावर कणसें तुडविणाऱ्या बैलांची पंक्ति. ह्या पंक्तींतील म्होरक्या बैलाला ' पांथ्या ' म्हणतात.

पाथेय [**न०**] १ प्रवासांत खावयासाठीं घेतलेले पदार्थ. २ श्राद्धविशेष.

पाद [**सं०** पर्द] **पु०** अपानवायु. ॐ **पादघ्राण स्त्री०** अपानवायूची घाण किं० दुर्गंधी.

पाद स्त्री० गांव, शेत, इ० तील अरुंद पाऊलवाट; पाणंद.

पाद [**सं०**] **पु०** १ मनुष्य, जनावर, पक्षी, इ० चे जे पाय ते प्रत्येक. २ चंद्र, सूर्य, इ० चीं जीं किरणें तीं प्रत्येक. ३ बाज, पलंग, चौरंग, इ० चा खूर. ४ वृक्षाचा बुंधा. ५ डोंगराचा आसमंतात भाग. ६ चवथा भाग; चतुर्थांश. ७ श्लोक, इ० चा चरण. ८ वर्तुळाचा चवथा भाग. ॐ **पादाग्र न०** पायाचा चवडा. **पादोन वि०** पाऊण. **पादोदर पु०** साप. **पादचार पु०** पायीं चालणें. **पादचारी पु०** पायानें चालणारा वाटसरू. **पादत्राण, पायतण न०** जोडा, वाहाणा. **पादप पु०** वृक्ष,–जो पायांनीं म्ह० मुळांनीं पाणी शोषून घेतो. **पादपीठ पु०, न०** पाय ठेवावयाचा चौरंग, घडवंची, इ०. **पादपूरण न०** वाक्यांत किं० कवितेच्या पंक्तींत निरर्थक शब्द घालणें किं० असा घातलेला शब्द. **पादग्रहण न०** पायाला हात लावून केलेला नमस्कार. **पादच्छाया स्त्री०** उन्हांत पडलेली सावली पावलांनीं मोजतात ती,–दिवसाच्या घटका मोजण्यासाठीं. **पादपाश पु०** १ जनावरांच्या पायांना बांधावयाची दोरी. २ तोरडी इ० पायांत घालावयाचें भूषण. **पादप्रहार पु०** लाथ. **पादशोथ पु०** पाऊल सुजणें हा रोग. **पादसंवाहन न०** पाय चेपणें. **पादसेवन न०** १ देवाच्या मूर्तीला स्नान घालणें, गंध लावणें, फुलें वाहाणें, इ० रूप पूजा. २ कोणत्याही प्रकारची सेवा किं० चाकरी. **पादस्फोट पु०** पावलाची त्वचा भेगाळणें ही विकृति. **पादहर्ष पु०** पावलाला कशाचाही स्पर्श झाला असतां गुदगुल्या होणें, किं० स्पर्श सहन न होणें. **पादाक्रान्त वि०** १ जिंकिलेला (देश, शत्रु). २ कबज्यांत घेतलेला (देश, शत्रु). **पादांगुली**

स्त्री०पायाचें बोट. **पादांगुष्ठ पु**०पायाचा आंगठा.

पादडणें स० **क्रि०** मनुष्य, जनावर, इ०ना जिवाविशेष काम करावयाला लावून जर्जर करणें.

पादडा [**म०** पादडणें] **पु०** १मनुष्य, जनावर, इ०कांडून जिवाविशेष काम करून घेणें (काढणें, घालणें). २ अतिकामामुळें आलेला थकवा (निघणें).

पादणें [**सं०** पर्दन] **अ० क्रि०**अपानद्वारानें वायु बाहेर घालविणें.

पादरा [**म०** पादणें] **वि०** १ अपानद्वारानें एकसारखा वायु सोडणारा; ज्याच्या अपानद्वारें वारंवार वायु सरतो असा. २ भितरा; पुचाट; कर्तृत्वशून्य. ३ अशक्त, कमजोर (घर, पदार्थ, जनावर,इ०).ꙮ **पादरी मामी स्त्री०** एक वनस्पति. **पादरठाण** [**म०** पादरा+घाण] **स्त्री०** पादण्याची घाण;पादऱ्याच्या अंगाला येते ती घाण. **पादरधिटाई स्त्री०** अंगीं सामर्थ्य किं० कर्तृत्व कांहीं नसतां पराक्रमाची मारलेली बढाई किं० दाखविलेलें खोटें अवसान. **पादरकुसका वि०** १ विशिष्ट कामाला नालायक किं० निरुपयोगी (मनुष्य, वस्तु, इ०). २ अशक्त, कमजोर, लेचापेचा (पदार्थ). **पादऱ्याला पावटऱ्याचें** (किं० **वालाचें** किं०**वरणाचें**) **मीस** कर्तृत्वशून्य माणसानें करावयास घेतलेलें काम बिघडलें असतां तो त्याचा दोष आपणाकडे न घेतां साधनसामुग्रीच्या वाईटपणावर किं० अपुरतेपणावर ढकलतो. मीस म्ह० निमित्त.

पादविणें [**म०** ' पादणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** मनुष्य, पशु, इ०ना जिवाविशेष काम करावयास लावून जर्जर करणें.

पाद(-त-)शहा,पाद(-त-)शाहा[**फा**०पादशाह]**पु**०मुसलमान राजा. ꙮ**पादशाही वि०** १ पादशहा संबंधाचें; पादशहाला योग्य;पादशहानें दिलेलें किं० केलेलें. २ थाटमाटाचें;भव्य; वैभवशाली.**पादशाही जुलूम, लबाडी, कारखाना** इ० पराकाष्ठेचा, परमावधीचा, टोलेजंग, प्रचंड, जगडव्याळ जुलूम लबाडी, कारखान,इ०. **पादशाही, पादशाहत स्त्री०** पातशहाचा दर्जा, अधिकार, कार्यक्षेत्र, अमल, किं० राज्याची सरणी. **मन पादशाही पण दैव गांडू** विचार उदात्त किं० हिंमतदार असून दैव अनुकूल नसल्यास ते विचार निरुपयोगी ठरतात.**पादशहास पादशाही झाली म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये** कोणी मनुष्य वैभवास चढला तर त्याचें वैभव तो भोगील,इतरांनीं हुरळून जाण्याचें कारण नाहीं.

पांदी, पांधी स्त्री० मागें ' पाणंद ' पहा.

पादुका [**सं०**] **स्त्री०** १ खडावा; जोडा. **२** देवादिकांच्या खडावा प्रत्येक. ३ देव, गुरु,इ० चें दगड इ० वर कोरलेलें पावलाचें चिन्ह असतें तें.

पादेलोण [**म०** पाद+लवण] **न०** पादाची घाण ज्याला येते असा एक औषधी क्षार.

पाद्य [**सं०**] **न०** १ पाय धुण्याचें पाणी. २ गुरु, देव, इ० चे पाय धुवून निघतें तें पाणी. ꙮ **पाद्याचें घालणें** (किं० **करणें**) कोणेकाला लाथाबुक्या मारून जर्जर करणें.

पान [**सं०**] **न०** १ पिणें. २ मद्यपान. ३ कांहींही प्यावयाचा पदार्थ; पेय. ४ पाणी इ० प्यावयाचें भांडें. ꙮ **पानागार न०, पु०, पानगोष्ठी स्त्री०** दारूचा गुत्ता. **पानशौंड वि०**अट्टल दारूबाज.

पान [**सं०** पर्ण] **न०** १ झाडाचें पर्ण. **२** कागद किं० कागदाचा ताव किं० बंद. ३ पुस्तकांचें पृष्ठ किं० पृष्ठाची एक बाजू. ४ नागवेलीचें पर्ण किं० त्याचा खावयासाठीं केलेला विडा. ५ सोनें, रुपें,इ० धातूंचा पातळ पत्रा.६ घोड्याच्या कपाळावर किं०मोठ्या माणसांच्या गळ्यांत घालावयाचा एक दागिना. ७ धोतरजोड्याचे जे दोन नेसावयाच्या उपयोगाचे तुकडे किं० भागते प्रत्येक. ८ उपरण्याच्या जोडींतील अंगावर घेण्याचा एक एक भाग. ९ केतकीच्या झाडाची किं० केवड्याच्या कणसाची एक एक पात. १० शस्त्राची मूठ खेरीज करून अवशिष्ट जो भाग ता.११गंजिफा,पत्ते,इ०च्या संचांतील एक एक नग किं० पत्ता. १२ (**संकेतानें**) साप. १३ घराच्या छपराच्या वांशांच्या टोकांना बसविलेली असते ती लांबलचक फळी किं०ती तक्ता.

याला ' पानपट्टी, "म.हटीचें पान ' अशीं अन्य नांवें आहेत.१४किल्ल्याच्या तटबंदीच्या माथ्याला जी पिंपळाच्या पानासारखी रचना केलेली असते ती. १५ एक प्रकारचें गवत. याला ' एरका ' असें वैद्यकांत म्हणतात. १६ संबळ नांवाचें वाजंत्र्याचें जें चर्मवाद्य त्याचा चर्म बसविलेला माथा. **कोणेकाला पान लागणें** (किं० **पान चावणें**) त्याला सर्पदंश होणें. **पानावर पान टाकणें** (किं०**घालणें** किं०**ठेवणें**) कांहीं गोष्टीची वाच्यता न होऊं देणें; तिचा बोभाटा किं० बिचका न होऊं देणें; ती दाबून किं० चेपून टाकणें; उ०त्या कज्जाची चौकशी कांहीं एक न करतां ह्यानें उगीच पानावर पान टाकलें. **पानावर पान ठेवणें** कांहीं गोष्ट,मसलत,इ० गुप्त ठेवणें. **कासोबाचें गोंदोबावांचून पान हालत नाहीं** गोंदोबाच्या मदतीशिवाय, संमतीशिवाय, किं० परवानगीशिवाय कासोबा कांहीं करूं शकत नाहीं; गोंदोबावांचून कासोबाचें पदोंपदीं नडतें. **कोणकाला पांचा पानांचा विडा** (किं० **पांचा पानांची पट्टी**) **देणें** १ त्याला कांहीं कामगिरीवर नेमणें. २ त्याला रुखसत देणें किं० हाकलून देणें.**पानें पुजणें** भोजनाचे पदार्थ पानावर थोडथोडे वाढणें.**एकाद्याच्या पुढच्या पानांत माती घालूं नये** किं० **एकाद्याच्या पुढचें पान ओढूं नये** त्याच्या चरितार्थाचीं साधनें बुडवूं नयेत. **पुढें वाढलेल्या पानास लाथ मारणें** १ कोणेकाचा अनुनय किं० कृपेची देणगी तुच्छ करणें किं० नाकारणें.२ ऐन उमेदीच्या किं० वैभवाच्या काळांत मरणें. **पानगा पु०,पानगी स्त्री०** [म० पान]पानावर पीठ थापून करतात ती लहानशी भाकरी किं० दशमी. **पानघोंगडें** [म०पान +घोंगडें] **न०** विरलें,–पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घेतात ती कामट्या, पानें, इ० चीं बनविलेली वस्तु. **पानझाड** [म० पान+झाड] **न०**एक जाडी पानांचें झाड. याचीं पानें जमीनीवर पडलीं असतां पानाच्या कडेच्या दुबेळक्यांतून बारीक बारीक मुळें आणि पानें फुटून त्यांपासून नवीन झाडें रुजतात. **पानताटी** [म० पानें+ताटी] **स्त्री०** पत्रावळी करावयासाठीं जंगलांतून पानें आणतात त्यांची बांधोळी आणि लांब मोळी. **पानदान**[म० पान+फा० दान्(=आधार)] **न०** विड्याचीं पानें ठेवावयाचा डबा. ' पानपूड ' म्ह०बांबूच्या पातींचा ह्याच उपयोगासाठीं केलेला लांबट आकाराचा करंडा किं० डबा.**पानपोय**,**पानपोई स्त्री०** गुरांच्या औषधाच्या उपयोगाची एक वनस्पति. **पानसांखळी** [म० पान+सांखळी] **स्त्री०** अनुक्रमणिका; ग्रंथाच्या कोणच्या पानांत काय विषय आहे हें दाखविणारें पत्रक. **पानसुपारी** [म० पान+सुपारी] **स्त्री ए० व०** १विड्याचें साहित्य. २ चेरीमिरी, लहानसा लांच.

पानई [म० पाणी] **स्त्री०** पाण्याचे हंडे, तपेलीं, इ० ठेवण्याची जागा.

पानक [सं०] **न०** सरबत इ० पेय.

पानडी [म० पान] **स्त्री०** कंठा इ० मध्यें पदकाच्या जागीं त्रिदलाकार किं०पर्णाकार पदार्थ करून घालतात तो.

पानपोत स्त्री० स्त्रियांच्या गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

पानबाजी, पानबाजू स्त्री० राजा आणि वजीर ह्यांशिवाय जीं उंचीं पानें गंजिफांच्या डावांत वांटणीस आलेलीं तीं. [विशेष.

पानबाळी स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

पानबोर न० मुलांचें एक कर्णभूषण.

पानवठा (–**ठा**,–**था**) **पु०** मागें 'पाणवठा' पहा.

पानखंडें न० विड्यांचीं पानें, सुपारी, कात, इ० विड्याचें साहित्य ठेवावयाची बटवी.

पानसळ,पानसाळ मागें ' पाणसळ ' पहा.

पाना [म० पाणी] **वि०** पुरतें पिकल्यानंतर पर्जन्यामुळें नासलेलें (भात इ०).

पानाडी वर ' पाणाडी 'पहा.

पानारी [म० पान] **पु०** जंगलांतून पानें गोळा करून आणून विकतो तो.

पानीय [सं०] **वि०** पिण्याला लायक. **न०** पाणी.

पानेणें [म० पाणी]**अ० क्रि०** (परिपक्क भात) पर्जन्यामुळें खराब होणें.

पान्हणें, पान्हविणें,पान्हेणें [म० पान्हा] **अ० क्रि०** (गायीनें) पान्हा सोडणें.

पान्हा [सं० प्रस्नव] पु० १ गायी, म्हशी, मानवी स्त्री, इ० च्या कांसेंतील किं० स्तनांतील दुधाचा प्रवाह सुरू होणें (फुटणें). २ दया, प्रेम, वात्सल्य, इ० भावनांनीं अंतःकरणास आलेला द्रव किं० कळवळा (येणें, फुटणें). ❀ **खाजवून पान्हा आणणें** प्रयत्न करून कोणेकाचें अंतःकरणांत आपणाविषयीं सहानुभुति, दया, किं० कळवळा उत्पन्न करणें. **पान्हाचोर** वि० दुध बाहेर न पडूं देण्याची जिला खोडी आहे अशी (गाय, म्हैस ,इ०).

पाप [सं०] वि० १ दुष्ट; कुकर्म करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा.२ अनिष्ट किं० अशुभ(ग्रह). न० १ धर्मशास्त्राविरुद्ध जें आचरण तें.२ कोणी माणूस आपलें अहित चिंतीत आहे किं० करीत आहे अशी आपणाला आलेली शंका.३ कोणेकाचें वाईट करण्याकडे प्रसंगविशेषीं आपल्या मनांत उत्पन्न झालेली दुष्ट वासना. ३ कुडाभाव; अंतःकरणाची मलिनता;कपट.५ कोणी उपद्रवी माणूस,त्रासदायक काम, नसतें लचांड; उ० हें काय पाप माझ्या मागें लागलें आहे ? ६ पंचाइतीची किं० अडचणीची स्थिति ; पेच. ❀ **तो पापही देणार नाही मग पुण्य कोठून देणार ?** तो पापासारखी त्याज्य वस्तु देणार नाहीं मग पुण्यासारखी मूल्यवान वस्तु तर नाहींच देणार;तो भारी अदत्त, कंजूष, चिकू, किं० दुष्ट आहे. **तुझें पाप तुला उभें राहीलच** १ तुला तुझ्या पापाबद्दल दंड होईलच होईल. **तुझें पाप तुला खाईलच** तूं जें पापकृत्य केलें आहेस तें तुझ्या मनाला डचत राहील. **पाप बोंब देऊन (किं० मारून) उठतें** केलेलें पाप उघडकीस येतेंच येतें. **ज्याचें पाप त्याचे पुढें येऊन नाचतें** आपण केलेलें पापकृत्य उघडकीस येतेंच येतें आणि आपली फजीती होतेच होते. **तुला पापाचा वांटा उचललाच पाहिजे** तूं ह्या जन्मांत जरी सच्छील असलास तरी तूं पूर्वीच्या जन्मीं केलेल्या दुष्कृत्यांचा परिणाम हल्लीं तुझ्या भोगास येत आहे तो तुला भोगलाच पाहिजे. **पापानें पाय धुतलेला** वि० सदा-सर्वदा आणि प्रत्येक व्यवहारांत लबाडी करणारा. **सर्वांनींच कांहीं पापानें पाय धुतलेले नाहींत** सर्वच माणसें लबाड असतात असें नव्हे. **पापकष्ट** पु० मोठी यातायात, खटपट, श्रम, किं० कष्ट; उ० मी पापकष्टानें स्वयंपाक केला तो मेल्या कुत्र्यानें विटाळला. **पापखाण** स्त्री० दुष्कृत्यांची खाण म्ह० अत्यंत दुष्कर्मी किं० दुष्ट माणूस. **पापग्रह** पु० आपलें अनिष्ट, अशुभ, किं० आहत करणारा मंगळ,शनि,इ० ग्रह. **पापदृष्टि** स्त्री० दुसऱ्याची वस्तु चोरण्याची किं० भोगण्याची इच्छा किं० प्रवृत्ति; दुसऱ्याची वस्तु चोरण्याकडे किं० भोगण्याकडे ज्याची सदैव प्रवृत्ति असते असा. **पाप्याचें पितर** न०ए०व० रोडका आणि किडकिडीत माणूस. टीप,-पापी लोक श्राद्धादिक कर्में करीत नाहीत त्यामुळें त्यांच्या पितरांस पिंडोदक मिळत नाहीं म्हणून ते पितर रोड असतात ह्यावर हा समस्तकल्प शब्द आधारलेला आहे. **पापभीरु** वि० आपल्या हातून पापकृत्य न होऊं देण्याविषयीं दक्षता बाळगणारा. **पापमूर्ति** स्त्री०, **पापराशि** पु० **पापरूप, पापस्वरूप** न० अत्यन्त पापी माणूस; मूर्तिमंत पाप. **पापवासना** स्त्री० दुष्कर्म करण्याकडें कल किं० प्रवृत्ति. **पापवेळ** स्त्री० रात्रीचे अकरा ते पाहाटेस तीन वाजे पर्यंतचा अवधि,-जो शुभकृत्याला किं० धर्मकृत्याला अयोग्य मानलेला आहे. **पापाचा बाप** पु० जनक बाप,-ज्याला मुलाच्या दुराचरणाबद्दल लोक निंदितात. याच्या व्यावर्तकत्वें ' धर्माचा बाप, ' ' पुण्याचा बाप, ' ' दत्तक बाप. ' **पापात्मा** पु० पापी माणूस. **पापिष्ट** वि० अत्यंत पापी.

पापड [सं० पर्पट=पापड] पु० उडीद इ० च्या डाळीच पीठ, केळीच्या कालाचें पाणी इ० मध्यें भिजवून हिंग, पापडखार, मीठ, इ० द्रव्यें त्यांत घालून लाटून उन्हांत वाळवून करतात त्या तबकड्या,-ज्या तळून किं० भाजून तोंडीं लावावयाला घेतात. ❀ **पापडखार** पु० एक क्षार.

पापडी [सं० पर्पट=पिठाची पापडी] स्त्री० तांदुळाच्या पिठाच्या उकडून उन्हांत वाळवून करतात त्या पातळ तबकड्या,-ज्या तळून किं० भाजून तोंडीं लावावयाला घेतात. २ घारगा हा खाद्य पदार्थ. ३ उसाचा रस काहिलांत कढविला जात असतां त्याची साय ताटांत घालून करतात ती पातळ वडी. ३ फरसबंदी जमीन. ४ बुंदीच्या

-कळ्या पाकवून ताटांत थापून करतात तो वटा. ५ कणीक काकवींत भिजवून थापटून करतात ती वडी.

पापणी [सं० पक्ष्मन्=पापणीचे केश] स्त्री० डोळ्यास जी कडांना केशांची रांग असलेलीं दोन खालची आणि वरची अशीं चर्मरूप आच्छादनें आहेत तीं प्रत्येक.

पापलिष्ट पु० खाऱ्या पाण्यांतील एक प्रकारचा पांढरा मासा.

पापा पु० १ भाकरी (मुलांचा शब्द). २ मुका (मुलांशीं प्रेमानें बोलतांना).'पापी' स्त्री० ह्याच अर्थाचा शब्द आहे. ३ बाप (मुलांच्या भाषेंत).

पापुदरा, पापोदरा, पापोडा, पापोटा पु० १ शरीराची,फळाची, किं० फोडाची त्वचा यांचे-वर जो पातळ त्वगंश असतो तो. २ भाकरी, इ० च्या पदरांपैकीं जो वरचा पातळ पदर असतो तो. ३ कांदा इ० कंदांचे जे एक एक थर ते प्रत्येक.

पाकुडणें अ० क्रि० १(जमीन, फळ, भाकरी, इ०) भेगाळणें. २ (गळूं, खरूज, इ० वर) खपल्या धरणें. ३ रागानें बेफाम होणें.

पांबरी, पामरी [सं० 'पीतांबर' चें लघुत्व रूप] स्त्री० मुलांना नेसावयाचा पीतां-बर. 'पीतांबरी' स्त्री० असेंही रूप रूढ आहे.

पाभर, पाभार, पाभारी स्त्री० शेतांत बी पेरावयाचें आऊत.

पाभळ स्त्री० १ वृक्षावरून पानें, फळें, इ० ची होते ती दाट वृष्टि. २ ढेकूण, मुंग्या, इ० चा एकाद्या पदार्थांतून बाहेर पडतो तो लोट.

पामर [सं०] वि० क्षुद्र, नीच, अधम, किं० निर्वीर्य प्राणी.

पामरी [स० 'पीतांबर' चें लघुत्वदर्शक रूप] स्त्री० मुलांचा पीतांबर.

पामा पु० खरूज, नायटा, इ० सारखा त्वग्रोग.

पाय [सं० पाद] पु० १ घोड्याच्या खालचा तंगडीचा भाग. २ सबंध तंगडी. ३ टेबल, खुर्ची, घडवंची, तिवई, इ० चे जे खूर ते प्रत्येक. ४ पायाच्या आकृतीची कोणतीही वस्तु. ५ (लाक्ष-णिक) लक्षण; चिन्ह; रंग; उ० मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात (म्ह० मूल पुढें म्ह० मोठें झाल्यावर कोणच्या गुणांचें होईल याची अगो-दरच म्ह० त्याच्या बालदशेंतच अटकळ करतां येते). ६ (लाक्षणिक) कारण; उ० भिकेचा पाय (म्ह० ज्या वर्तनामुळें पुढें भीक मागावी लागेल किं० भीक मागण्याचा प्रसंग येईल असें वर्तन); उ० घोडजुगारीचा नाद हा दारिद्र्याचा पाय आहे. ॥ आपले पाय माझ्या घरा लागावे आपण माझ्या घरीं राहावयास (किं० जेवावयास) येऊन मला धन्य करावें. आपल्या पायावर धोंडा ओढून (किं० पाडून) घेणें आपलें नुकसान आपणच मूर्खपणानें करून घेणें; आपल्या नुकसानीस आपणच कारण होणें. घोड्याच्या (किं० हत्तीच्या) पायांनीं येणें आणि मुंगीच्या पायांना जाणें (आजार, संकट, अडचण, इ०) जलदीनें येणें किं० कोस-ळणें आणि सावकाश किं० धीमेधीमे जाणें. मुंगीच्या पायानें येणें आणि हत्तीच्या (किं० घोड्याच्या) पायांनीं जाणें (संपत्ति, वैभव, इ०) सावकाश येणें आणि त्वरेनें निघून जाणें. चहूं पायांनीं (किं० दोहीं पायांना) उतरणें शिंगरूं, वासरूं, पाडा, इ० नीं पुढें चार पाय (किं० पुढें दोनच पाय) करून मातेच्या उदरां-तून बाहेर पडणें म्ह० जन्मणें. जळता पाय जाळणें एकाद्या कामांत, व्यवहारांत, किं० व्यापारांत नुकसान होत असतांही तो तसाच पुढें चालूं ठेवणें. त्याच पायीं किं० त्याच पावलीं तावडतोब.पाय(किं०पाऊल) उचलणें जलदीनें चालणें;घाईनें चालणें. कोणेकाला पाय उताऱ्यां (किं० पायउतारां) आणणें त्याला नम्र करणें; त्याचा नक्षा उतरणें; त्याला तोरा कमी करावयास लावणें. टीप,-वरच्या पाहिरी-वरील पाऊल खालच्या पाहिरीवर ठेवावयास भाग पाडणें,यावरून नम्र करणें असा अर्थ झाला. पाय उतारां (किं०पाय उताऱ्यां)येणें नम्र होणें; गर्व सोडणें.वरची टीप पहा. पाय काढणें एकाद्या कामांतून बाहेर पडणें किं०त्यांतून आपलें अंग काढून घेणें; एकादें काम किं० ठिकाण सोडून जाणें किं० टाकून देणें; तें झुगारून देणें. कोणेकाचा पाय घेणें

तो कांहीं काम करावयाला प्रवृत्त होणें किं० खुशी असणें; उ० त्या नोकरीला माझा पाय घेत नाहीं (म्ह० ती पत्करावी असें मला वाटत नाहीं). **टीप,**–येथें 'घेणें' अकर्मक क्रियापद. **पाय देणें** १ पायाचा भार घालून चेपणें; उ० माझी पाठ दुखत आहे, रामा, माझ्या पाठीवर पाय दे. २ तुडविणें; कुरापत काढण्याठीं किं० उपद्रव देण्यासाठीं कोणेकाला पायानें ताडन करणें. **एकाद्याचे पाय धरणें** त्याच्या पायावर डोकीं ठेवून त्याला विनंती करणें; त्याला शरण जाणें; त्याचा आश्रय मागणें. **त्याचे पाय धरले आहेत** (थंडीनें किं० दुसऱ्या कांहीं कारणानें) त्याचे पाय दुखत (किं० ठणकत) आहेत. **टीप,**–'धरणें' येथें अकर्मक क्रियापद आहे. **पाय पसरणें** पूर्णपणें उपभोगणें; उपभोगेच्छेला पुरी वाव देणें. **पाय फासटणें** इच्छेविरुद्ध जाणें किं० चालणें; एकादें काम करण्यासाठीं कोठेंतरी पायानें चालत जाणें,–इच्छा नसतां किं० कंटाळा आलेला असतां; तंगड्या तोडणें; उ० काडीचा-ही लाभ होण्याची आशा नसतां इतक्या लांब मी नाहीं पाय फासटीत जाणार! **एकाद्या पदार्थाला पाय फुटणें** १ तो हळूंच नाहींसा होणें; कोणाच्या नजरेस न पडतां तो ठेवल्या ठिकाणाहून नाहींसा होणें. २ तो वाढत जाणें;तो विस्तार पावणें;उ०तूं पहिल्यानें मला फक्त पोस्टांत पत्र टाकून ये म्हणून सांगीतलेंस, आतां म्हण-तोस कीं चार आण्यांचीं तिकिटें आण; तुझ्या कामाला आणखी पाय फुटणार आहेत कीं काय? (म्ह० तूं मला आणखीही कामें सांग-णार आहेस कीं काय?). **पाय फुटणें** थंडीच्या योगानें किं० जाळवातानें पाय भेगाळणें. **पाय फोडणें** विस्तार करणें; उ० तुमचें व्याख्यान विषयाला धरून चालवा, त्याला उगीच पाय फोडूं नका. **पाय लागणें** किं० **पाय भुईशीं लागणें** कायमपणा येणें; उ० त्या आफिसांत त्याचा एकदा पाय लागूं द्या कीं तो लगेच आपले काकेमामे आणून तेथें भरील. **एकाद्याचे पाय मोकळे करणें** त्याला अडचणींतून सोड-विणें किं० बाहेर काढणें. **(आपले) पाय मोकळे करणें** फेरफटका करणें. **पाय मोकळे होणें** १ अडचणींतून बाहेर पडणें. २ पायांचा आखडलेपणा नाहींसा होणें. **पाय मोडणें** १ पाय अशक्त होणें. २ निराशेमुळें गलितधैर्य होणें. **टीप,**–ह्या दोन्ही अर्थी 'मोडणें' अकर्मक. **एकाद्याचे पाय मोडणें** त्याच्या कामांत हरकत आणणें;त्याला खचाविणें; त्याला एकादें काम कर-ण्यापासून निवृत्त करणें.**टीप,**–येथें'मोडणें'सकर्मक आहे.**पाय वाहाणें** एकाद्या स्थळीं जाण्याला किं० कांहीं काम करण्याला मनाचा कल होणें. **एका-द्याचे पाय शिवणें** शपथ घेतांना त्याच्या पायास स्पर्श करणें;उ० मी तुमचे पाय शिवून सांगतो कीं तुमच्या विषयीं माझ्या मनांत कपट नाहीं. **तळपायाची आग मस्तकास जाणें** संतापणें; रागानें जळणें; उ० तुझा उर्मटपणा पाहून माझ्या तळपायाची आग मस्तकास जाते. **पायांची वाहाण पायांतच बरी(किं०पायांतच ठेवावी)** हलक्या मनुष्याला फाजील महत्त्व देऊं नये. **आपल्या पायांची धूळ माझ्या घरीं झाडावी** माझ्या घरीं आपण यावें (नम्रपणाचें आमंत्रण). **आपल्या पायापाशीं मी आलों आहें** मी आपणाकडें आलों आहें(नम्र-पणा दाखविणारा प्रयोग). **एकाद्याच्या पायां पडणें** १ त्याच्या पायावर डोकें ठेवणें (प्रार्थना किं० विनंती करण्यासाठीं). २ त्याला नम्रपणानें कांहीं विनंती करणें किं० याचना करणें. **पाया-पाशीं पाहाणें** जवळ जें असेल त्याचाच विचार करणें; आपल्या स्थितीचा आणि परि-स्थितीचा विचार करणें. **पायाला** किं० **पायांत अढी पडणें** म्हातारपणामुळें एका पायाला दुसरा पाय चालतांना घासणें. **पायांना खुंट्या येणें** एके जागीं फार वेळ बसल्या कारणानें पाय ताठणें. **एकाद्याच्या पायावर कुत्रीं मांजरें घालणें** फार फार प्रार्थना करून त्याला कांहीं करावयास उठविणें. **पायावर पाय टाकून (किं० घालून) निजणें** चैनींत निजून किं० पडून राहणें. **एका-द्याच्या पायावर पाय देणें** १ त्याच्या पाठो-पाठ जाणें किं० चालणें. २ त्याचें अनुकरण करणें. **त्याच्या पायावर भोंवरा (किं०भिंगरी) आहे, त्याच्या पांयावर भोंवरा पडला आहे** तो सदास-र्वदा भटकत असतो;तो घरांत मुळींच ठरत नाहीं.

एकाद्याच्या पायाशीं पाय बांधून बसणें त्याचा पिच्छा पुरवून कांहीं मागणी करणें. **त्याच्या पायांस वाहाण बांधलेली आहे** तो सदा भटक्या मारीत असतो. **पायीं** पायानींच चालून. **कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें** १ लटपटी करणें; भलभलत्या खटपटी करणें. २ असंभवनीय गोष्टी बरळत सुटणें. **एकाद्याच्या पाया** त्याच्यामुळें; त्याच्यासाठीं. **भरल्या पायांचा** वि० ज्याचे पाय मळलेले आहेत असा. **भरल्या पाया** बाहेरून चालून आल्यावर पाय न धुतां; उ० भरल्या पायीं बाळंतिणीच्या खोलींत जाऊं नये. **टीप,**—' पायीं भरलें जाऊं नये ' असेंही म्हणतात. (**एकाद्याचा**) **मागला पाय पुढें न घालूं देणें** (किं० **पुढें न ठेवूं देणें**) त्यानें आपली मागणी पुरविल्याशिवाय त्याला पुढें पाऊल टाकूं न देणें. **मागला पाय पुढें न ठेवणें** एकाद्या जवळ मागितलेली वस्तु त्यानें आपणास दिल्याशिवाय त्याला सोडावयाचें नाहीं असा निश्चय करून असणें. **मागला पाय पुढें नाहीं आणि पुढला पाय मागें नाहीं अशा नेटानें तो होता** तो एका जागीं करारी-पणानें ठाव धरून राहिला होता; तो केस-भरही हालला नाहीं. **मागल्या पायीं परत येणें** निरोप पोंचविल्यानंतर किं० एकाद्या ठिकाणीं काम करावयास जाऊन तें झाल्यानंतर वेळ न गमावतां परत येणें. **तूं आपल्या पायां पाशीं** (किं० **पायांखालीं**) **काय जळतें आहे तें पहा** तूं आपल्या परिस्थितींतील जो दोष किं० उणेपणा आहे त्याचेकडे लक्ष्य पोंचीव; म्ह० त्याचेकडे दुर्लक्ष्य करून असूं नको. **पायउतार** पु० होडी इ० साधनांशिवाय नदी, खाडी, इ० च्या पैलतीराला जाण्या-इतक्या बेताचें पाणी असण्याची स्थिति. **वि०** पायानें ओलांडतां येईल अशी (नदी, खाडी, इ०). **पायउतारां क्रि० वि०** १ घोडा इ० वाहनावरून उतरून पायानें (चालेंग); उ० थोरांचें दर्शनास पायउतारां जावें. २ पायानें चालून; उ० आम्ही दोन वेळां पायउतारां काशीस गेलों. **पायकष्ट** [स० पाय+कष्ट] **स्त्री०** पाय-पिटी; पायानें चालण्याचे कष्ट किं० यातायात. **पायकस्ता पु०** एका गांवीं राहून दुसऱ्या गांवीं स्वताचीं शेतें दुसऱ्याकडून कसविणारा. मागें ' ओंवडेकरी ' पहा. **पायकाळा पु०** १ कृषिकर्म इ० कामासाठीं ठेविलेला गडी. २ कोणीही शेतकरी. ३ कोणीही शूद्र. **पायखाना पु०** शौचकूप; शेतखाना; संडास. **पायखुंट न०, पायखुंटी स्त्री०** गाय, म्हैस, इ० ना पळून जातां येऊं नये म्हणून गळा आणि पाय यांना किं० दोन पाय यांना बांधतात ती दोरी किं० त्या दोरीनें केलेलें बंधन. **पायगत न०** १ गादी, पलंग, इ० ची पायांकडची बाजू. याच्या उलट ' उशागत ' म्ह० डोक्याकडची बाजू. २ डोंगर, टेकडी, इ० चा पायथा. **पायगत देणें** बाजेचें सुंभ ओढून तिच्या विणीचा झोल नाहींसा करणें. **पायगुण पु०** कांहीं पदार्थ, माणूस, पशु, इ० आपल्या घरीं येण्यानें किं० त्यांचा आपणाशीं संबंध घडल्यानें शुभाशुभरूप जो परिणाम होतो तो किं० हा शुभाशुभ रूप परिणाम घडवून आणण्याचें त्याच्या अंगीं आपण कल्पितों तें सामर्थ्य. ' हातगुण ' म्ह० कोणेकानें हातानें केलेली कांहीं गोष्ट यशस्वी किं० अयशस्वी होण्याचें त्याचे अंगीं आपण कल्पिलेलें सामर्थ्य. **पायगोवा** (स० पाय गोवणें) **पु०** १ पायाचें बंधन. २ गतीला किं० प्रगतीला विघ्न आणणारी कोणतीही गोष्ट. ३ कुंठितपणाची स्थिति. ४ खोळंबा. **पायघड्या** [स० पाय+घडी] **स्त्री० अ० व०** लग्नाच्या सोहाळ्यांत रासन्हाणीचें दिवशीं नवऱ्या मुलाच्या पक्षाच्या वऱ्हाडणीस आपल्या घरीं आणते वेळीं रस्त्यावर त्यांच्या पायांखालीं पासोड्या आंथरतात त्या. **पायघोळ वि०** १ ज्याचा घोळ म्ह० घेर पायापर्यंत उतरलेला आहे असा (अंगरखा, परकर, इ०). २ पावलापर्यंत ज्याची लांबी आहे असें (नेसलेलें किं० नेसावयाचें धोतर, लुगडें, इ०). ३ घोट्यापर्यंत येणारी (विजार, गळ्यांत घातलेली माळ, इ०). **पायचल पु०, स्त्री०** आपल्या रस्त्यावरून कोणीही दुष्ट माणूस किं० अपशकुनी माणूस किं० भूत, पिशाच, इ० आपल्यापूर्वीं चालून गेल्यामुळें आपल्या कामांत येतें तें अपयश किं० त्या अपयशाला कारणभूत असें त्याच्या ठायीं कल्पिलेलें सामर्थ्य. **पायचा, पायजा पु०** विजार, तुमान, इ० चा तंगडी झाकणारा भाग. **पायचाल स्त्री०** पायानें चालणें किं० पायानें चालण्याचा

तऱ्हा किं० वेग. **पायचाळा पु०**१पायानें केलेल्या खोड्या समुच्चयानें.२कोष्टयाच्या मागांतील पायानें दाबावयाचा भाग. ३ कोणेकाचा अपराकर्ता पायगुण. **पायटा** [म० पाय+ठाय] **पु०** १ शिडीची पाहिरी. २ माड इ० झाडांवर पाऊल टेकावयासाठीं ज्या खाचा पाडलेल्या असतात त्या प्रत्येक. ३ विहिरींत उतरावयासाठीं भिंतींत पाय ठेवण्याच्या सोयीचे जे कोनाडे केलेले असतात ते किं० जे दगड पुढें ठेविलेले असतात ते प्रत्येक. ४ पायवाट; पाऊलवाट. **पायटा पु०** १ सपाट जमीन भाजून तेथें नाचणी इ० चें केलेलें असतें तें शेत. २ चाकाच्या परिघाचे जे पांच सहा अवयव असतात ते प्रत्येक. **पायंडा पु०** १सुरवात; कांहीं कामाच्या आरंभीचें कृत्य. २ हातीं घेतलेल्या कामाला अमुक फळ येईल असें जें अगोदरपासून दिसत असतें तें चिन्ह. ३ झाडावर चढतां यावें म्हणून त्याच्या खोडाला पाडतात पाऊल ठेवावयाच्या सोयीच्या ज्या खापी त्या प्रत्येक. ४ ताड,माड, इ० वर चढणारे लोक पायांना किं० हातांत जी दोरी आडकावतात ती. ५ शिडी इ०ची एक एक पाहिरी. ह्या अर्थीं ' पायंडी ' **स्त्री०** असाही शब्द आहे. **कोणेका कामाचा पायंडा घालणें** त्याची सुरवात करणें. **कोणेकाशा पायंडा पाडणें** (किं०**घालणें** किं० **करणें**) त्याच्याशीं घरोबा किं० सहवास सुरू करणें. **पायंडा पडणें** (किं० **होणें**) चाल, शिरस्ता, किं० वहिवाट सुरू होणें. **पायतण, पायतन** [म० पाय+**सं०** त्राण]**न०** वाहाणा. **पायतांदूळ, पायपाटीचे तांदूळ पु० अ० व०** १ शूद्रांच्या लग्नाच्या सोहाळ्यांत लग्न लागावयाच्या समयीं ज्या तांदुळांवर वधू आणि वर उभीं रहातात ते तांदुळ किं० त्या समयीं त्यांच्या अंगावर उडविलेले तांदूळ. **टीप,**–ज्या तांदुळांवर वधूवरें उभीं राहिलेलीं असतात ते ज्या पाटींत किं० शिप्तरांत भरलेले असतात त्याला ' पायपाटी ' म्हणतात. **पायदळ** [**सं०** दल=सैन्य] **न०** पायानें चालणारे किं० पायावर उभें राहून लढणारे सैन्यांतील शिपायी समुच्चयानें. **पायदाज न०** सुरमाडाच्या लोंबत्या लोंगरांची केलेली चटई. **पायधरणी स्त्री०** कोणेकाची कोणेकानें केलेली काकुळतीची विनवणी किं० प्रार्थना. **पायधूळ स्त्री०** पायाची धूळ म्ह० येणें; हा नम्रपणाचा वाक्प्रचार. **एकाद्यावर पायधूळ झाडणें** त्याच्या घरीं जाणें; त्याच्या भेटीस जाणें. **पायपिटी, पायपीट स्त्री०** इकडे जा, तिकडे जा, अशा प्रकारें अनेक ठिकाणीं जाणें किं० अशा जाण्याचे कष्ट. **पायपोळ** [म०पाय+पोळणें (भाजणें)] **स्त्री०**१ तापलेल्या जमीनीवरून चालण्यानें पायांची होते ती आग. २ मध्यान्हाचा समय. ३ मध्यान्ह समयाची जमीनीची संतप्त स्थिति ; उ० एव्हां पायपोळ झाली आहे, संध्याकाळीं जा. **पायफोडणी स्त्री०** रोग्याला तपासावयाला आलेल्या वैद्याला द्यावी लागते ती बक्षीशी. **पायभार** [**म०** पाय+भार (सैन्याची तुकडी) **पु०** सैन्याचा पायदळ हा भाग. **पायमार्ग पु०** १ पायवाट; पायानेंच ज्या वाटेनें जातां येईल अशी वाट. २ भूमीवरील मार्ग; खुष्कीची वाट. याच्या व्यावर्तकत्वें ' जलमार्ग. ' **पायमोड** [**म०** पाय+ मोडणें] **स्त्री०** १ कोणेकास जाऊं किं० चालूं न देणें;त्याला आडकावून ठेवणें.२आडकलेपणाची स्थिति. **पायमोड** [**म०** पाय+मोडणें] **न०** १ हातीं घेतलेल्या कामांत विघ्न, हरकत, अडथळा, इ० येणें किं० अशा येण्यानें होतो उत्साहभंग तो. २ सुरळीतपणें चाललेल्या कामांत कठिणपणाची स्थिति येते ती. **पायमोड देणें** माघार खाणें; चालविलेल्या कामापासून भीति इ० कारणांनीं निवृत्त होणें. **पायलाग पु०** १ गुरांच्या पायांना किं० तोंडांना होतो तो एक सांथीचा रोगविशेष (येणें).ह्या सांथीला'खुरबुताची सांथ'म्हणतात. २ नदीवर स्नान इ०साठीं गेलेली स्त्री किं० नदीवरून परत येणारी स्त्री चालली असेल त्या जागेवरून कोणी हडळ इ०गेले असतां त्या स्त्रीच्या अंगांत जो त्या हडळ इ० चा संचार होतो तो. **पायवट** [**म०** पाय+वठणें] **स्त्री०** १ चालणाऱ्याच्या पावलांची पंक्ति म्ह० रस्त्यांत उमटलेल्या पावलांची रांग. खालीं ' पायवटणें स्वतंत्र शब्द पहा. २ ' पायवाट ' चा अपभ्रंश. **पायवणी** [**म०** पाय+पाणी] **न०** देवाचे किं० साधु पुरुषाचे

पादोदक. **पायवस, पायास न०** बाज, पलंग, इ० ची पायाकडची बाजू. **पायवाट स्त्री०** पायानें जाणाऱ्या येणाऱ्यांच्याच सोईची वाट. याच्या व्यावर्तकत्वें ' गाडीवाट. ' **पायशिरकाव पु०** एकाद्या कामांत, कारभारांत, व्यवस्थेंत, किं० कचेरीत आलेला प्रवेश,–जो झाला असतां आपली अनेक कामें साधून घेतां येतात. **पायसूट वि०** चालण्यांत चपळ. **पायस्वार पु०** पायानें चालणारा; पादचारी. **पायाखालले वि०** जेथें साप इ० प्राणी फार आहेत असें (रान). **पायाखालले न०** १ फुरसें इ० सर्पजातीय प्राणी. २ फुरसें इ० नीं केलेला दंश. **पायाखालची वाट स्त्री०** परिचयाची वाट; नेहेमींच्या जाण्यायेण्याच्या सवईची वाट. **पायाचा जड वि०** चालण्यांत मंद. **पायाचा नरम वि०** षंढ; नपुंसक. **पायांचा पारवा, पायींचा पारवा पु०** चालण्यांत पटाईत; झटदिशीं हवा तेथें जाणारा (माणूस). **पायांचा फटकळ वि०** लाथाळ (मूल, जनावर). **पायांच्या पोळया होणें** फार वेळ उन्हानें तापलेल्या रस्त्यानें चालल्यामुळें पायांच्या तळव्यांची होरपळलेपणाची स्थिति. **पायापुरती वाहाण कापणारा वि०** पदार्थ फाजील न खर्च होऊं देणारा; तांदूळ, डाळ, पैसा, इ० जरूर तितकाच खर्च करणारा; पदार्थांचा अपव्यय न होऊं देणारा (निंदेंत). **पायांपैस वि०** हातपाय पसरावयाला अवळपवळ. **स्त्री०** हात पाय मोकळेपणानें पसरतां येतील इतकी विस्तीर्ण जागा. **पायाशुद्ध वि०** आरंभापासून व्यवस्थित रीतीनें किं० प्रामाणिकपणानें किं० सद्बुद्धीनें चालविलेलें (काम, कारभार, अभ्यास, इ०). **पायांस, पायींत न०** १ बाज, पलंग इ० ची पायांकडची बाजू. २ डोंगराचा तळ. ३ शेताची सखल बाजू. **पायाळ, पायाळू** [**सं०** पाय] **वि०** जन्मसमयीं प्रथम पाय ज्याचे मातेच्या उदरांतून बाहेर येतात असें (मूल, जनावर).

पायगीर पु० मासे पकडावयाची टोपली.

पायजमा, पायजामा [**फा०** पाजामाह्] **पु०** एक प्रकारची विजार.

पायजिभी [**फा०** पाजेब] **स्त्री०** स्त्रियांचें एक पादभूषण; तोरडी.

पायणू [**सं०** पाय] **वि०** दलदलीच्या जमीनींत केलेलें भात, नाचणी, इ० चें शेत.

पायतें, पायतर, पायथर, पायथें न०, पायता, पायथा, पायथरा पु० [**सं०** पाय] १ पलंग, बाज, इ० ची पायाकडची बाजू. २ डोंगराच्या शेजारचा आणि डोंगराला लागून असलेला भूप्रदेश. ३ शेत, मळा, बाग, इ० ची सखल बाजू.

पायपोश (–स) [**फा०** पापोष्; पा=पाय; पोशीदन्=झाकणें] **पु०** पायांत घालावयाचा जोडा, वहाण, इ०. ❀ **कोणाचा पायपोस कोणाच्या पायीं नसणें** अंधाधुंदीची स्थिति असणें; गोंधळाची किं० धांदलीची स्थिति असणें. **पायपोस दांतीं धरणें** अत्यन्त नम्रपणा स्वीकारणें (माफी मागतांना, किं० विनंती किं० याचना करतांना). १ **पायपोसासारखें तोंड करणें** १ विडा खाऊन तोंड आणि ओठ रंगवून घेणें (वडील माणूस लहानाचा हा असभ्यपणा आहे असें सांगतांना); उ० राम्या, पायपोसासारखें तोंड करून मोठ्यापुढें यावयाला तुला लाज कशी नाहीं वाटत ? २ हिरवटपणाची मुद्रा धारण करणें. ३ फजीती झाल्यामुळें खिन्नतेची मुद्रा धारण करणें. **माझा गेला(किं० तुटला, किं० जळला) पायपोस** मला काय त्याची परवा ? **टीप,–**' डाव्या पायांतील पायपोस (किं० खेटर) ' असाही जोरदार वाक्प्रचार आहे. **पायपोसगिरी स्त्री०** १ कोणेकाला जोड्यानें मारणें. २ दोन भांडणाऱ्यांनीं एकमेकांना जोड्यांनीं मारणें. **पायपोसखाऊ पु०** खेटराखालीं झोडपलें जाण्याच्या लायकीचा माणूस म्ह० निर्लज्ज आणि बदमाष माणूस. **पायपोस पोहरा पु०** एक प्रकारचा पोहरा,–जो जोड्याचा आकाराचा असतो. **पायपोसापायपाशी स्त्री०** एकमेकांनीं एकमेकांस जोड्यांनीं मारणें; खेटराखेटरी.

पायबंद [**फा०** पा (पाय)+बंद (दोरी; बस्तन्=बांधणें] **पु०** घोड्याच्या मागल्या दोन पायांना बांधावयाच्या दोऱ्या प्रत्येक.

पायमर्दी [**फा०** पांमर्दी] **स्त्री०** १ कांहीं

कार्यासाठीं अनेक ठिकाणीं जाणें किं० जाण्याचे कष्ट (घेणें, करणें). २ धाडस; धैर्य; साहसी प्रवृत्ति.

पायमल्ली, पायमली, पायमाली, पायमेली [**फा०** पाय् माली] १ सैन्य, गुरेंढोरें, इ० नीं देश, शेत, गांव, इ० चो केलेली नासाडी किं० दुर्दशा (करणें, होणें). २ मूल्यवान् किं० गुणी माणूस किं० पदार्थ यांची जाणून बुजून केलेली हेळसांड किं० त्यांच्याशीं केलेली तुच्छतेची वागणूक. ३ कोणेकाच्या गुणाचें चीज न केलें जाणें किं० मुद्दाम न करणें; त्याचे गुण प्रकट न होऊं देणें किं० प्रकट व्हावयाला वाव किं० अवसर न देणें.

पायर, पाईर पु० एक वृक्षविशेष.

पायरव [**फा०** पय्‌रव्; रफतन् रवद् जाणें, चालणें] **पु०** १ चालणाऱ्याच्या पायांचा आवाज; चाहूल. २ अपशकुनी पाऊल. मागें ‘ पायचळ ’ पहा. ॐ **पायरवी** [**फा०** पय्‌रवी] **स्त्री०** १ जाणाऱ्या येणाऱ्यांची गडबड किं० रहदारी. २ एकाद्या ठिकाणीं घरोब्याच्या नात्यानें कोणेकाचें विशेष जाणें येणें.

पायरवणें [**म०** पायरव] **अ० क्रि०** १ जाणाऱ्या येणाऱ्या माणसांच्या रहदारीमुळें किं० उपद्रवामुळें दूध, कांहीं रासायनिक कृति, किं० कांहीं काम नासणें, किं० विघडणें, किं० आजाऱ्याचा आजार विकोपास जाणें. २ (हरवलेल्या वस्तूचा) सुगावा किं० तपास लागणें किं० (ती) आढळणें.

पायरी, पाहिरी [**म०** पाय] **स्त्री०** १ शिडी, जिना, दादर, इ० चढावयाच्या मार्गांत एक एक पाऊल ठेवण्यासाठीं जो आधार केलेला असतो तो. २ कोणेकाचा दर्जा,—अधिकार, विद्वत्ता, इ० गुणानें प्राप्त झालेला. ३ बोरू इ० ची लेखणी करतांना शोभेसाठीं जो एक उतरता तास घेतात तो. ४ (कातडीं कमावतांना) कातड्याचा एक भाग. ॐ **आपल्या पाहिरीवर असणें** आपली योग्यता किं० दर्जा मनांत आणून वागणें; आपल्या दर्जाला न शोभेल असें कांहीं न करणें किं० न बोलणें. **पाहिरीचा धोंडा होणें** (किं० **होऊन पडणें**) आपल्या योग्य स्थानीं कायम होणें किं० होऊन राहाणें. **पाहिरीनें ठेवणें** कोणेकाचा योग्य दर्जा असेल त्याप्रमाणें त्याला वागविणें. **कोणेकाच्या वैभवाची** किं० **सुखदुःखाची पाहिरी भरणें** त्याचें वैभव किं० सुखदुःख परमावधीस पोंचलेलें असणें. **कोणेकाच्या पाहिरीवर पाय देणें** (किं० **पाहिरीस पाय लावणें**) त्याच्या बरोबरीचे आपण आहों अशा अयोग्य समजुतीनें वागणें. **पाहिरी सोडणें** (किं० **टाकणें**) आपल्या दर्जाला न शोभेल असें वर्तन करणें.

पायरी, पाईर स्त्री० उंबर, वड, इ० च्या वर्गांतलि एक वृक्षविशेष.

पायली स्त्री० १ चार शेर परिमाणाचें एक एक माप. हें भिन्न प्रांतात भिन्न असतें. २ जांत्याच्या वरच्या तळीला धान्य घालावयाचें असतें तें भोक. ॐ **आपली पायली भरणें** आपलपोटेपणानें आपलें हित करून घेणें किं० स्वार्थ साधणें. **पायलीचा पसा करणें** परद्रव्याचा गुप्तपणें अपहार करणें. **पायलीचे पंधरा वि०** १ अत्यन्त विपुल; पुष्कळ. २ कमी योग्यतेचे किं० हलक्या गुणाचे पदार्थ, माणसें, इ०. **आण पायली करूं दे वायली** तुझें माझें पटत नाहीं, पायली आण, घरांत जें धान्यादि असेल त्याची आपण मोजून वाटणी करूं आणि विभक्त राहूं.

पायवटणें [**म०** पाय+वठणें] **अ० क्रि०** १ एकादी वाट रहदारीमुळें किं० अनेक लोकांच्या जाण्यायेण्यामुळें चोळवटलेली होणें. २ २ कोणी माणूस एकाद्या वाटेनें हरहमेश जात येत असल्याकारणानें ती त्याच्या माहितीची किं० परिचयाची झालेली असणें.

पायस [**सं०**] **न०** १ खीर. २ दूध, तांदूळ, आणि साखर यांचा बलि. ३ दूध.

पायळा पु० लहानसा कोयता; कोयता; कोयती. **पायळी स्त्री०** गवत कापावयाचें खुरपें.

पाया [**म०** पाय] **पु०** १ भिंत, जोतें, बुरूज, इ० ची रचाई करावयाच्या पूर्वीं जमीन खणून त्यांत दगड, चुना, घालून ठोकून करतात तो मजबूत आधार (घालणें). २ कांहीं विद्या, शास्त्र, कला, इ० शिकावयाला आरंभ करतांना जी पूर्व माहिती करून घ्यावी लागते ती किं०

मूलतत्त्वें शिकावीं लागतात तीं. ३ भूमापनामध्यें ज्या बिंदूला अनुलक्षून लांबी, रुंदी, चढ, उतार, इ० मोजतात तो.

पायु [**सं०**] **न०** प्राण्यांनीं खाल्लेल्या अन्नाचा त्याज्य भाग शरीराच्या बाहेर ज्या द्वारानें जातो तें द्वार; गुदद्वार.

पार [**सं०**] **पु०** १ नदी, समुद्र, इ० चा पैलतीर. २ पलीकडची बाजू. ३ परमावधि; पराकाष्ठा. ४ नदी इ०चा काठ. ५ अवधि; शेवट; पर्यवसान. ५ पूर्णता ; अंत. ७ कोणत्याही पदार्थाच्या विस्ताराचें परिमाण किं० इयत्ता. ८ (शास्त्रादींचें) पूर्ण अध्ययन. ९ वड, पिंपळ, इ० च्या मुळाभोंवतीं जो ओटा बांधलेला असतो तो; उ० शनीचा पार, नागनाथाचा पार. १० खाडी जेथें ओलांडता येते तो भाग. ११ समुद्राचा जमीनींत शिरलेला लहानसा फाटा. १२ समुद्रकांठीं भरतीच्या वेळीं माल ज्यांना उतार होत नाहीं अशा ज्या लहान लहान नद्या त्या प्रत्येक. **क्रि० वि०** १ पलिकडच्या काठाला. २ पूर्णपणें; अजीबात. ३ आरपार. ४ मधून. ५ समाप्तीच्या पल्ल्याला; पूर्णतेला. **श० यो० अ०** पलीकडे. ॐ **पारापार, पारावार पु०** समुद्र. **पारायण न०** १ उल्लंघिणें, तरून जाणें. २ सिद्धीस नेणें. ३ शास्त्रादींचें पूर्ण अध्ययन किं० वाचन. ४ पुराण इ० चीं एक आवृत्ति किं० वाचन. **पारग, पारंगत वि०** १ नदी इ० तरून गेलेला किं० जाणारा. २ शास्त्रादींचें अध्ययन पूर्णपणें केलेला. **पारदर्शक वि०** ज्याच्या आरपार दिसतें असा (कांच, अभ्रक, इ०). **पारदृश्वा** [**सं०** पारदृश्वन्] **वि०** १ दूरदर्शी; पुढें काय होईल याचा तर्क करूं शकणारा. २ शास्त्रादींचें पूर्ण अध्ययन ज्यानें केलें आहे असा. **पार पडणें** (कोणी माणूस) कांहीं अडचणींतून किं० संकटांतून निभावणें. **कांहीं काम पार पडणें** तें समाप्त होणें; तें शेवटास जाणें. **परीक्षा पार पडणें** परीक्षा उतरणें. **पार पाडणें** १ समाप्त करणें; संपविणें. २ संकटांतून सोडविणें; निभावून नेणें. **पार जाणें** मधून जाणें; आरपार जाणें; पलीकडे जाणें; निभावणें. **पिंपळास पार बांधून देणें** कोणेकाचें लग्न, मुंज, इ० कांहीं काम करून देणें किं० त्याच्या कांहीं कामांत हातभार लावणें किं० साहाय्य करणें. **पुण्याच्या पारीं बसणें** निरंतर परोपकार करीत असणें.

पार [**सं०** ' प्रहर ' चा अपभ्रंश] **पु०** तीन तासांचा अवधि; प्रहर.

पारई स्त्री० पहार.–खणणें, उकरणें, इ० उपयोगाची.

पारका वि० ' परका, ' ' पारखा ' पहा.

पारकिडा पु० १ घोड्याच्या पोटांत एक रोग होत असतो तो,–ज्यावर तावडतोब उपाय करावा लागतो. २ गवतांत राहाणारा एक किडा.

पारख [**सं०** परीक्षा] **स्त्री०** १ परीक्षा; तपासणी. २ माणूस, पदार्थ, इ० च्या गुणाची किं० योग्यतेची जाणीव. ३ तारतम्य भाव ठरविण्याची कोणेकाच्या अंगीं असते ती शक्ति. ४ नाणें, हिरा, मोती, माणिक, इ० ची किंमत ठरविणें. ॐ **पारखणावळ, पारखाई स्त्री०** १ नाणें, हिरा, मोती, इ० ची योग्यता, कस, किंमत, इ० ची परीक्षा करण्याबद्दल सराफ इ० कांना दिलेली मजुरी. २ हिरा, मोती इ० ची परीक्षा करण्याचें कोणेकाचें कौशल्य किं० हातोटी. **पारखणी स्त्री०** परीक्षा करणें; परीक्षा; तपासणी.

पारखणें [**सं०** परीक्ष्; **म०** पारख] **स० क्रि०** कोणत्याही रीतीनें, साधनानें, किं० कृतीनें तपासणें किं० परीक्षिणें; ०ची किंमत, योग्यता, गुण, इ० ठरविणें. **टीप,**–सोनें इ० धातूंची परीक्षा करणें असतां तावणें आणि सुलाखणें ह्या क्रियाही आणखी करण्यांत येतात.

पारखा, पारका [**सं०** परकीय] **वि०** १ अनोळखी. २ तिऱ्हाईत; तिऱ्हाईतपणानें वागणारा. ३ आपला नव्हे तो; आत्मीय नव्हे तो. ४ अपरिचित. ॐ **घर फिरलें का अंगण पारखें** एकाद्या माणसावर यजमानाची गैरमर्जी झाली असतां त्या यजमानाच्या घरीं जाण्याचीही बंदी होते. **टीप,**–ह्या म्हणीचा दुसराही अर्थ आहे. ' घर ' शब्दांत ' घर फिरलें म्हणजे वासे फिरतात ' ही म्हण पहा.

पारखी [**म०** पारखणें] **वि०** परीक्षा करणारा; तपासणारा.

पारखींव [म० पारखणें] वि० ज्याची पारख करण्यांत आलेली आहे असा.

पारंगत [सं०] वि० कोणत्याही शास्त्रांत किं० कलेंत निष्णात. मागें 'पार' मध्यें 'पारंगत' पहा.

पारंगा पु० पांगारा ह्या नांवाचा वृक्ष.

पारगींवारगी स्त्री० ए० व० आळीपाळी; उ० हें ओझें तुम्ही दोघे जण पारगींवारगीनें चावडीपर्यंत पोंचवा.

पारजत्क पुढें 'पारिजातक' पहा.

पारजापुरजा [फा० पुर्ज़ाह्=तुकडा]पु० कागदाचा तुकडा; चिठोरें.

पारंजी स्त्री० तंब, राहुटी, इ० च्या खांबाच्या माथ्याला बसविलेली असते ती लाकडाची तबकडी.

पारठा वि० १ व्याल्याला बरेच दिवस उलटून गेलेले असून जी अझून दूध देत आहे अशी (गाय, म्हैस).अशा गायी म्हशीचें दूध तें पारठें दूध.'पारठी' हें स्त्रीलिंगी रूप. २ मातेचें स्तनपान ज्याचें सुटलें आहे असें (वासरूं). 'पारठें' हें नपुंसकलिंगी रूप. ३ परिपक्व दशेस आलेला (नारळ). ॐ **पारठें पडणें** शिल्लकीस पडणें. **पारठें पाडणें** शिल्लकीस टाकणें; वांचविणें; राखून ठेवणें.

पारंडा पु० केंवळ छपराचें आढें आणि कोपरे.

पारडी स्त्री० १ लहान वयाची म्हैस. २ म्हशीचें अपत्य.

पारडूं न० म्हशीचें पोर. ॐ **कोणेकाच्या गळयांत पारडूं बांधणें** त्याच्यावर कांहीं कष्टाचें काम सोपाविणें किं० लादणें.

पारडें न० १ तराजूस लोंबत असलेलीं जीं वजन आणि तोलावयाचा पदार्थ घालण्याचीं दोन पात्रें असतात तीं प्रत्येक. २ ताक घुसळण्याच्या रवीची दोरी.

पारण, पारणें न०, पारणा स्त्री० [सं० पारण, पारणा] १ उपोषणरूप व्रताच्या समाप्तीचें जेवण. २ मेजवानी; साधें जेवण जेवण्याच्या क्रमांत एकादे दिवस जें चमचमीत पक्वान्नाचें जेवण मिळतें तें.ॐ **पारणें फिटणें** उत्कंठेनें किं० चिरकाळ इच्छिलेली भोग्य वस्तु मिळून इंद्रियविशेषाचें सामाधान होणें; अति मूल्यवान किं०उच्च दर्जाची वस्तु भोगावयास मिळाल्यानें मन, कान, डोळे, इ० चें समाधान होणें; उ० तुझें गाणें ऐकून माझ्या कानांचें पारणें फिटलें; उ० तुला हसतमुख पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें.

पारणें अ० क्रि० (खाद्य, औषध, हवा, पाणी, इ०) मानवणें किं० हितावह होणें.

पारतंत्र्य [सं०] न० १ परावलंबन; परतंत्रता. २ दास्य.

पारत्रिक [सं०] वि० १ परलोकसाधक. २ परलोकासंबंधाचा.

पारद [सं०] पु० पारा या नांवाचा धातु.

पारदारिक [सं०] वि० दुसऱ्याच्या पत्नीशीं संभोग करणारा. **पारदार्य** न० परस्त्रीशीं संग.

पारंदोज, पारंदोजी पुढें 'पारादोज' 'पारादोजी' पहा.

पारध स्त्री० १ शिकार. २ शिकार ज्याची करावयाची तो प्राणी. ३ शिकार करून मिळालेला प्राणी. ॐ **पारधी** पु० शिकार करणारा. **ज्याच्या हातीं ससा तो पारधी** ज्याणें खरोखरी सशाची पारध केलेली असते त्याच्या पराक्रमाकडे लोकांचें दुर्लक्ष्य होतें आणि ज्याच्या हातांत ससा असतो त्यालाच पारध केल्याचें श्रेय देण्यांत येतें. या म्हणीचा दुसराही अर्थ केला जातो. आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' हें पुस्तक लें० १४८४, आणि 'म्हणींविषयीं चार शब्द' हें पुस्तक पान २४ पहा.

पारंपरिय [स०] वि० परंपरेनें झालेलें किं० केलेलें; परंपरे संबंधाचें.

पारंपर्य [सं०] न० १ परंपरा. २ क्रम.

पारपळ, पारंपळ, पारपोळ, पारंपोळ वि० शास्त्याच्या नियंत्रणेंतून किं० कबज्यांतून सुटून स्वच्छंदीपणानें किं० बेफामपणानें वागणारा.

पारंबी स्त्री० १ वड, पिंपळ, पिंपरी, इ० झाडांच्या खांद्यांना ज्या मुळ्या उगवून खालीं तोंडें करून हवेंतून पुष्टि मिळवून लांब लांब होत जाऊन शेवटीं जमिनींत घुसतात त्या प्रत्येक. ह्या अर्थी 'पारंबा' पु० हा शब्दही रूढ आहे. २

आंब्याच्या बाठीच्या आंत जो द्विदल बी असते ती. ॐ शेंडी तुटो कीं पारंबी तुटो कांहीही होओ, कितीही कष्ट पडोत, कितीही नुकसान होओ (हें कृत्य मी करणारच). हा दृढ निश्चयाचा आणि करारीपणाचा उद्गार आहे.

पारमार्थिक [सं०] वि० १ सत्य; खरें. २ सत्यान्वेषी; सत्य हुडकून काढण्यांत गुंतलेला. ३ अध्यात्मविषयक.

पारय, पारई स्त्री० पहार,—कुदळें, खणणें, इ० कामां योजावयाचें एक आउत.

पारलौकिक [सं०] वि० परलोकासंबंधाचें. न० उत्तरकार्य.

पारवडा पु० एका गांवांतील जे अनेक विभाग ते प्रत्येक.

पारवसा पुढें ' पारोसा ' पहा.

पारवा [हिं० परेवा] पु० एक पक्षिविशेष. वि० ह्या पक्ष्याच्या रंगाचा.

पारशी, फारशी [सं० पारसीक] पु० इराण देशाचा रहिवासी. पारशी लोक हल्लीं मुख्यत्वें करून हिंदुस्तानांत वसति करून राहिलेले आहेत.

पारस पु० मागें ' परीस ' पहा.

पारसडणें [म० पान+सडणें] अ० क्रि० झाड किं० झाडाची फांदी पर्णरहित होणें.

पारसनाथ पु० श्रावक लोकांचा पूज्य देव.

पारसनीस [फा० फारसी नवीस्=पारशी लिपि लिहिणारा] पु० फारशी भाषेंत पत्रव्यहार चालविणारा कारकून किं० अशा कारकुनांच्या खात्याकडचा मुख्य अधिकारी.

पारसा पुढें ' पारोसा ' पहा.

पारळा [सं० पल्लव] पु० तपशीलवार हकीगत किं० इतिहास.

पारा [सं० पारद] पु० सोनें, चांदी, इ० प्रमाणें एक धातु. हा पातळ असतो.

पारा पु० कोंवळा फणस. २ घायाळ म्हणून जें झाड आहे त्याची पाती. ३ भिंतीच्या रचाईंतलि दगड, विटा, इ० चा एक थर.

पारा वि० पांढरे आणि काळे ठिपके यांच्या मिश्रणाचा (बैल, गाय, इ० प्राणी).

पारादोज [फा० पारह्‌दोज़्] पु० जोडे, बूट, इ० ना ठिगळें मारणें इ० प्रकारचें काम करणारा. ॐ **पारादोजी** स्त्री० जोडे इ० कातड्याच्या पदार्थांना ठिगळें मारण्याचा धंदा.

पारायण [सं०] न० पुराणादि ग्रंथांचें पठण. २ एकाद्या विषयाची पुनः पुनः केलेली आवृत्ति,—वाचन, पठण, इ० रूप. मागें ' पार ' मध्यें ' पारायण ' पहा. ॐ **पारायणी** वि० पारायण करणारा.

पारावार [सं०] पु० १ नदी, समुद्र इ० चा पैल तीर आणि पैल तीर. २ विस्तार; अंतिम मर्यादा. टीप,—ह्या दोन्ही अर्थी 'पाराभारा' हाही शब्द रूढ आहे. ॐ **पारावर नसणें** मर्यादा, गणती, मोजदाद न करतां येण्याइतका मोठा किं० विस्तृत किं० पुष्कळ असणें.

पारिजात, पारिजातक [सं०] पु० १ एक झाड. याच्या फुलाचा देठ पांढरा आणि नळीच्या आकाराचा असून त्याच्या पाकळ्या पांढऱ्या आणि संख्येनें पांच असतात. २ कडूनिंब.

पारितोषिक [सं०] न० कोणेकानें कांहीं चांगलें काम केल्याबद्दल त्याला दिलें जातें तें बक्षीस.

पारिपत्य, पारपत्य न० कोणेकानें केलेल्या कांहीं वाईट कृत्याबद्दल त्याला केलेला दंड किं० शिक्षा.

पारिभद्र, पारिभद्रक [सं०] पु० १ देवदार वृक्ष. २ मंदार वृक्ष. ३ कडूलिंबाचा वृक्ष.

पारिभाषिक [सं०] वि० १ शास्त्रीय; शास्त्रांत योजावयाचा(शब्द).

पारी स्त्री० १ केळफुलाच्या बाहेरचीं जाडीं जाडीं आवरणें प्रत्येक. २ केळफुलाच्या पोटांतील फण्यावरचीं आवरणें प्रत्येक. ३ मोदक ह्या खाद्याचें कवच,—ज्याच्या आंत पुरण भरलेलें असतें. ४ आंब्याची कोय किं० बाठ.

पारुषणें [सं० पर्युषित; म० पारोसा होणें] अ० क्रि० पारोसा म्ह० शिळा होणें; वरून एक रात्र उलटून गेल्यामुळें (खाद्य पदार्थ) शिळा होणें.

पारुष्य [सं०] न० १ कठिणपणा; टणकपणा. २ स्वभाव, भाषण, इ० चा निष्ठुरपणा किं० कठोरपणा. ३ निंदा; टोमणे मारणें.

पारूं न० दहिवर.

पारेठा वि० मागें ' पारठा ' पहा

पारोसा [**सं०** पर्युषित] **वि०** १ धुणें, स्नान, धासणें, पुसणें, इ० संस्कार ज्यावर न केले जातां रात्र उलटून गेली आहे असें (खाद्य, वस्त्र, भांडें, पाणी, माणूस इ०). १पूर्व दिवशींचा (घरांतील केरकचरा). ꕤ **पारोसें काम न०** घराची जमीन, अंगण, इ० वर सकाळीं झाडणें, सारविणें, सडा टाकणें, इ० रूप काम. **पारोसा थुंका पु०** सकाळीं निजून उठल्यावर आणि तोंड धुण्यावयाच्या पूर्वींची तोंडांतील थुंकी.

पारोसा [**सं०** पार्श्व]**वि०** बाजूला असलेला म्ह०रहदारीच्या ठिकाणीं नसलेला(पिंपळ). ꕤ **पारोसा पिंपळ पु०** १ जो कोणाशीं चिकटून वागत नाहीं, ज्याला कोणाची परवा नाहीं, आणि ज्याची कोणी परवा करीत नाहीं, असा माणूस. २ ज्याला आई, बाप, इ० नियंत्रणा घालणारें माणूस कोणी नाहीं, आणि ज्याचेवर अवलंबून असणारें कोणी माणसें नाहींत असा फटिंग.

पारोसें न० घोसाळ्याची एक जात.

पारोळा पु०, पारोळें न० पाभर किं० मोघण ह्या आउताच्या दांत्याचीं टोकें प्रत्येक.

पार्थक्य [**सं०**] **न०** वेगळेपणा; भिन्नपणा.

पार्थिव [**सं०**] **वि०** पृथ्वीसंबंधाचा; मातीचा. **पु०** १ राजा. २ नित्यपूजेसाठीं मातीचें करतात तें लिंग. ह्या लिंगाच्या पूजेला ' पार्थिवपूजा ' म्हणतात.

पार्वण [**सं०**] **वि०** १ पर्वणीसंबंधाचें. २ वाढणारा (चंद्र इ०). **न०** पर्वकालींचें पितृश्राद्ध.

पार्वती [**सं०**] **स्त्री०** शंकराची पत्नी.

पार्श्व [**सं०**] **वि०** जवळचें. **पु०, न०** १ शरीराची बाजू. २ कोणत्याही पदार्थाची बाजू. ३ सांनिध्य. ꕤ **पार्श्वास्थि न०** बरगडी. **पार्श्वग, पार्श्वचर, पार्श्ववर्ती पु०** १ सेवक. २सोबती. **पार्श्वतः क्रि० वि०** १ जवळ. २ शेजारीं. ३ एका बाजूस. **पार्श्वपरिवर्तन न०** १ (निजलेल्याचें) कुशीला वळणें. २ भाद्रपद शुद्ध द्वितीयेचा उत्सव,–ज्या दिवशीं विष्णु कुशीला वळतो. **पार्श्वशूल पु०** उसण. **पार्श्वस्थ वि०** शेजारीं असलेला. **पु०** १ पारिपार्श्वक. २ मित्र.

पार्‍हेरा, पार्‍हेळा पु० तपशीलवार माहिती किं० हकीगत (ऐकणाराला कंटाळवाणी).

पाल [**सं०**पल्ली] **स्त्री०**घराच्या भिंतीच्या सांदी-कोंदींत राहाणारा एक प्राणी. ही पाल शरीराच्या वेगळ्या वेगळ्या भागांवर पडली असतां वेगळे वेगळे परिणाम घडतात असें कोणी समजतात. हिचा शब्दही कांहीं गोष्टी सुचवितो अशी कांहीं लोकांची समजूत आहे.

पाल न० १ अनेक सुताडे एका शेजारीं एक शिवून लांब, रुंद, वस्त्र जमीनीवर आंथरणें किं० छाया करणें इ० कामीं योजतात तें. **पु०** मोठें लढाऊ गलबत. ꕤ**पाल घालणें, पाल मांडणें** स्त्रीनें प्रसिद्धपणें व्यभिचारावर पैसा मिळवूं लागणें. **पाल-पडदळ न० ए० व०** पालें, सतरंज्या, जाजमें, इ० चा समुच्चय. **पालछत्र न०** काठीस पागोटें बांधून नवऱ्या मुलाच्या डोक्यावर धरतात तें. **पालजत्रा स्त्री०** शेतें पिकल्यावर तीं कापावयाच्या वेळीं शेतकरी लोक करतात तो उत्सव. ह्या प्रसंगीं देवतेला बळी देऊन शेतकरी लोक मेजवानी करतात. **पालजत्रा, पालेजत्रा स्त्री०** वनदेवतेच्या प्रीत्यर्थ भरवितात ती जत्रा. ह्या जत्रेच्या वेळीं रानांत जाऊन पानांचे टहाळे लोक तोडून आणतात.

पाल [**सं०** पल्लव] **पु०** गवत, झाडें, इ० चे नवें अंकुर (फुटणें, निघणें).

पाल, पालक [**सं०**] **वि०** रक्षण करणारा. हा शब्द संस्कृत नामाच्या पुढें लागतो; उ० भूपाल, महीपाल, गोपाल, इ०.

पालक, पालख पु० पाळणा (मुलाला निजवावयाचा).

पालख स्त्री० १ सोनें, रुपें, इ० ची परीक्षा करावयाची असतां कानस इ० नें जी रेघ ओढतात ती (घालणें). २ अग्नींत तापविलेलें सोनें बाहेर काढतेसमयीं त्यावर सोनार शिंपडतात तें पाणी (घालणें).

पालखणें स० क्रि० सोनें, रुपें, इ० वर पालख ही क्रिया करणें. वर ' पालख ' पहा.

पालखी [**हिं०** पालकी] **स्त्री०** कोणी थोर किं० सामान्य माणूस बसून जावयाचें एक यान. हें भोयी लोक खांद्यावर वाहून नेतात. ꕤ**पालखी-**

पदस्थ वि० पालखींत बसून हिंडावयाचा ज्याला राजानें अधिकार, हक्क, किं० मान दिला आहे असा.

पालजा [**फ०** पालीज्, फालीज्] **स्त्री०** खरबुजें, कलिंगडें, इ० चा मळा.

पालट [**म०** पालटणें] **पु०** १ बदलण्याची क्रिया; केलेला किं० झालेला बदल. २ एकाद्या गोष्टीचा एकसुरीपणा नाहींसा करण्यासाठीं केलेला पर्याय. ३ एकाद्या मोठ्या कामाचे विभाग पाडून एकेकाकडे दिलेला एक एक विभाग. ४ भिन्नता. [क्रिया.

पालटणी [**म०** पालटणें] **स्त्री०** पालटण्याची

पालटणें [**सं०** परि+ अट् (भटकणें)] **स० क्रि०** १ बदलणें; फिरविणें; आळीपाळीनें (कांहीं काम) करणें किं० करविणें. ३ एक टाकून त्याच्या जागीं दुसरें घेणें किं० स्वीकारणें. **अ० क्रि०** १ फिरणें; वेगळें किं० भिन्न होणें.२ आजारानें उलट खाणें.

पालटवाणा [**म०** पालटणें] **क्रि० वि०** फेरबदल किं० पर्याय करण्यासाठीं.**टीप,**–लिंगवचनांप्रमाणें हें **क्रि० वि०** फिरतें. **पालटवाणी क्रि० वि०** बदल करण्यासाठीं. [पर्याय.

पालटवाणी [**म०** पालट] **स्त्री०** फेरबदल,

पालटवाणें [**म०** पालटणें] **न०** खाणें, पिणें, इ० मध्यें केलेला पालट किं० पर्याय.

पालटें न० धान्य साठवावयासाठीं तट्टया, चटया, इ० उभारून करतात तें बारदान.

पालथणें सं० क्रि० उपडें किं० पालथें करणें. **अ० क्रि०** पालथें किं० उपडें होणें.

पालथा वि० ज्याचें तोंड खालीं झालें आहे किं० केलें आहे असा.꠰ **पालथा येणें** जन्मसमयीं मातेच्या उदरांतून खालीं तोंड करून (मूल) बाहेर येणें. **कोणेकाला पालथा घालणें** त्याला पराभूत करणें. **पालथ्या घागरीवर पाणी** निष्फळ प्रयत्न किं० खटपट. (**घर, गांव** इ०) **पालथें घालणें** १ हरवलेली वस्तु शोधण्यासाठीं घर, गांव, इ० चा कोना कोपरा शोधणें. २ (घर, गांव, इ० मध्यें) भटकणें.

पालन [**सं०**] **न०** १ रक्षण; संगोपन. २ व्रतादि पाळणें. ३ दिलेलें वचन किं० केलेली प्रतिज्ञा पूर्ण करणें. ꠰ **पालनपोषण न० पु० व०** मूल इ० चें संरक्षण किं० संगोपन.

पालंबी स्त्री०वड,पिंपळ,इ० झाडांची मुळें जीं शाखांस उत्पन्न होऊन लोंबत राहून वाढून पुढें जमिनींत घुसतात तीं प्रत्येक. मागें 'पारंबी' पहा.

पालव [**सं०** पल्लव] **पु०** १ झाडाचीं कोंवळीं पानें किं० अंकुर समुच्चयानें. २ झाडाची कोंवळी फांदी. ३ अंगरखा, सदरा, इ० चा घेर. ४ शेला इ० चा पदर. ५ वस्त्राच्या पदरानें किं० अन्य प्रकारानें दूरच्या माणसास केलेली इशारत (घालणें, देणें इ०). ६ भिंतीच्या पुढें आलेला छपराचा भाग. ७ गोष्ट किं० वृत्तांत मनोरंजक करण्यासाठीं त्यांत घातलेली भर. ८ मैत्रीचा किं० घरोब्याचा लाभलेला संबंध. ९ कुटुंबांत अनेक पुरुष जन्मल्यामुळें झालेला विस्तार. १० (**लाक्षणिक**) हृदयास येते ती दया; उ० मुसळाला पालव फुटेल पण याच्या हृदयास पालव फुटणार नाहीं.꠰ **पालव कापून देणें** लग्नाचा संबंध तोडणें आणि पतिपत्नींनीं वेगळें राहाणें.**पालवानपालव पु०**एका कुटुंबाचा लग्नामुळें झालेला दुसऱ्या कुटुंबाशीं संबंध,दुसऱ्याचा तिसऱ्याशीं, तिसऱ्याचा चवथ्याशीं, अशा रीतीनें दोन अति दूरच्या कुटुंबांत उत्पन्न झालेला संबंध किं० नात्याचा संबंधीपणा.

पालवपद [**म०** पालव+पद] **न०** १ गाण्याचा जो भाग दर कडव्याच्या शेवटीं म्हणतात तो. २ कोणेकानें पुनः पुनः केलेली कांहीं विनंती. ३ बोलणाराच्या भाषणांत लकबीनें पुनः पुनः येणारा शब्द.

पालवट पु० कोष्ट्याच्या मागाच्या आडव्या काठ्या प्रत्येक.

पालवण [**म०** पालव; **सं०** पल्लव] **न०** झाडाला फुटलेले नवे अंकुर किं० कोंवळीं पानें समुच्चयानें.

पालवणी [**म०** पाला+पाणी] **न०** ज्या पाण्यांत कडू लिंब इ०चीं पानें उकळलीं आहेत असें पाणी.

पालवणी [**म०** पालविणें] **स्त्री०** वस्त्राच्या पदरानें कोणेकाला कांहीं इशारत करणें.

पालवणें, पालविणें [**म०** पालव]**स० क्रि०** वस्त्राच्या पदरानें कोणेकाला कांहीं इशारत करणें किं० सूचना देणें.

पालवणें [**म०** पालव] **अ० क्रि०** (वृक्षांनीं) कोंवळ्या किं० नव्या पानांनीं युक्त होणें.

पालवा [**म०** पालव] **पु०** झाडाची तोडलेली हिरवी काठी किं० छडी,—नांगराचे बैल हाकावयासाठीं योजतात ती.

पालवी [**सं०** पल्लव] **स्त्री०** १ झाडांना फुटलेलीं कोंवळीं किं० नवीं पानें (फुटणें). २ आजारांतून नुकतांच उठलेला जो मनुष्य तो बरा होऊं लागला असतां त्याच्या शरीरावर चढतो तो तजेला (फुटणें, येणें). ३ कोणेकाची सांपत्तिक स्थिति सुधारून त्याला प्राप्त होते ती उन्नति (फुटणें, येणें).

पाला [**सं०** पल्लव] **पु०** झाडाचीं पानें,—विस्काळित स्थितींत असलेलीं. **पालेभाजी** [**म०** पाला+भाजी] **स्त्री०** पानांच्या म्ह० पाल्याच्या रूपांत जी भाजी असते ती; मेथी, माठ, इ०. याच्या व्यावर्तकत्वें 'फळभाजी'; भोपळा,दोडका, पडवळ, इ०. [पहा.

पालाण, पालाणणें मागें 'पलाण,''पलाणणें'

पालाश [**सं०**] **वि०** १ पळसासंबंधाचें. २ हिरवा (रंग). ❀ **पालाश, पालाश विधि पु०** कोणा माणसाचें प्रेत सांपडलें नाहीं तर त्याचा पळसाच्या पानांचा पुतळा जाळून करतात तो अंत्यविधि.

पालि, पाली [**सं०**] **स्त्री०** १ कानाची पाळ. २ परिघ. [मळा.

पालीज स्त्री० कलिंगडें, खरबुजें, इ० चा

पालुपद मागें 'पालव' मध्यें 'पालवपद' पहा.

पालें [**सं०** पल्लव] **न०** १ गवत, झाडांचीं पानें, इ० चा समुदाय. २ धान्य साठवावयासाठीं काटक्या एकाला एक जोडून करतात तें बारदान.

पालेजणें [**म०** पाला] **अ० क्रि०** १ (वृक्षानें) पल्लवयुक्त होणें. २ कोणा मनुष्याची दारिद्र्यदशा संपून (तो) श्रीमंतीच्या दशेस चढूं लागणें.

पालेजत्रा स्त्री० मागें 'पाल' मध्यें 'पालजत्रा' पहा.

पालोटी स्त्री० भात इ० साठविण्यासाठीं तट्ट्या, चटया, किं० कामट्या, यांचें केलेलें बारदान.

पालोपद न० मागें ' पालुपद ' पहा.

पाल्हाण, पाल्लाण, पाल्लान न० हत्ती, उंट, इ० च्या पाठीवर घालावयाचें एक प्रकारचें खोगीर.

पाल्हाणणें [**म०** पाल्हाण] **स० क्रि०** १ पाल्हाण घालून सजविणें. २ सिद्ध करणें, सज्ज करणें (सामान्यतः).

पाल्हाळ [**सं०** पल्लव] **पु०** १ ऐकणाऱ्यास कंटाळवाणा होईल असा तपशील (लावणें). २ कांहीं घडलेल्या गोष्टींत प्रत्येक माणूस जी पदरची भरती घालीत जातो ती किं० अशा प्रत्येकानें घातलेल्या भरतीनें फुगलेली हकीगत. ३ दुःखाची हकीगत ऐकून हृदयाला येतो तो द्रव. ❀ **पाल्हाळीक वि०** लांबलचक आणि कंटाळवाणा (वृत्तान्त).

पाव [**सं०** पाद] **पु०** १ चवथा भाग. २ (मुलांच्या खेळांत) नवा खेळगडी किं० खेळाडू. ३ तीस विघे हें परिमाण. ४ पाय, पाऊल. **वि०** चवथ्या हिश्शाच्या परिमाणाचा; उ० पाव फणस, पाव शेर, पाव खंडी, इ० ❀ **परका पाव घरका अपाव** परका मनुष्य घराच्या अंतर्व्यवस्थेंत शिरला असतां घराचें नुकसान होतें. **पावशेर** [**म०** पाव+शेर] **पु०** शेराचा चतुर्थांश किं० चतुर्थांशा इतका गूळ, तूप, इ० (वजनी किं० मापी).❀ **पावशेरी स्त्री०** धान्याच्या व्यापाऱ्याकडून मोकाशाला धान्य जें मिळतें तें.

पाव स्त्री० १ फणस, अननस, रामफळ, इ० फळांच्या आंत देठाचें अग्र शिरलेलें असतें तें. २ जात्याच्या वरच्या तळीच्या आंतल्या बाजूस भोकाशेजारीं खालच्या तळीच्या खुंट्याला आश्रयभूत ज्या दोन बाजूंच्या दोन कडा असतात त्या प्रत्येक. मागें ' पाऊ ' पहा.

पाव [**पोर्च्युगीझ**] **पु०** गव्हाचा रवा आंबवून त्याचे चौरस ठोकळे पात्रविशेषांत खालीं वर निखारे घालून भाजून करतात तें खाद्य.

पावक [**सं०**] **पु०** अग्नि. ❀ **पावकात्मज पु०** कार्तिकेय. **पावकमणि पु०** सूर्यकांत.

पावका [**म०** पाय] **पु०** १ शिडी, दादर,

इ० ची पाहिरी. २ विहिरींत उतरण्याच्या सोयीचे भिंतींत ठेविलेले असतात ते पायाला आधारभूत कोनाडे प्रत्येक. ३ ताड, माड, इ० झाडावर चढावयासाठीं पावलांना आधारासाठीं पाडलेल्या असतात त्या खांचा प्रत्येक.

पावकें [म० पाव] **न०** १ चवथा हिस्सा (लोणी, तूप, इ० चा), किं० चवथा हिस्सा मावण्याच्या परिमाणाचें बारदान. २ एक, दोन, तीन, इ० शंभरापर्यंत जे क्रमांक त्यांच्या पावपटींची पंक्ति,—जी मुलांकडून पाठ करवून घेतात. ह्या अर्थी ' पावकी ' **स्त्री०** असाही शब्द आहे.

पावगर पु०, स्त्री० कोष्ट्याच्या मागांत गुलड्याला बांधलेली आणि बैलीच्या आंकड्याला जोडलेली दोरी.

पावजो पु० मीठ पिकविणारा व्यापारी.

पावटा पु० एक द्विदल धान्यविशेष. ह्याच्या जाति, ' कडवा ' ' वाल, ' इ० आहेत.

पावटा [म० पाय] **पु०** १ नृत्य, दांडपट्टा, इ० मध्यें पाऊल टाकण्याचा प्रकार; उ० तिला अजून नाचाचा पावटा साधला नाहीं. २ कांहीं आरंभिलेल्या व्यवहाराचें अमुक पर्यवसान होईल असा तर्क करावयाला साधनीभूत जी कांहीं गोष्ट ती. ३ सोनार लोकांचें चांदी, सोनें, इ० ची तार काढावयाचें यंत्र. **टीप**,—ह्या यंत्रावर जो उपजीविका करतो त्याला ' पावटेकरी सोनार ' म्हणतात. ४ वर्तन; क्रम; पाऊल; उ० तूं वाकड्या पावट्यानें चाललास तर तुझें अकल्याण होईल.

पावटी [म० पाय] **स्त्री०** पावलाचें चिन्ह किं० ठसा किं० आकृति. **पावट्या स्त्री० अ० व०** लोकांच्या रहदारीनें रुळलेला रस्ता.

पावटीं क्रि० वि० खेपेला; उ० तुला शंभर पावटीं सांगितलें तरी तूं रामड्याची संगत अजून सोडीत नाहींस.

पावठणी [म० पाय] **स्त्री०** १ शिडी इ० ची पाहिरी. २ माग चालवितांना कोष्टी पायानें एकंतराड दाबतो ज्या दोन फळ्या त्या प्रत्येक. ३ पावलाचा ठसा किं० आकृति.

पावठाणा पु० मागें ' पावठणी ' पहा.

पावठी [स० पाय] **स्त्री०** १ विहिरींत उतरावयाच्या सोयीचे कोनाडे प्रत्येक. २ झाडावर चढावयाच्या सोयीच्या खोडावर पाडलेल्या खाचा प्रत्येक. ३ कोष्टी माग चालवितांना ज्या दोन फळ्या पायानें एकंतराड दाबतो त्या प्रत्येक.

पावठीं क्रि० वि० वेळेस; खेपेस; उ० एक पावठीं म्ह० एकदा; शंभर पावठीं म्ह० शंभर वेळां.

पावंड [म० पाय] **पु०** १ पाऊल (टाकणें, पडणें). २ पावलें ठेवण्यासाठीं विहिरीच्या भिंतींत किं० झाडाच्या खोडावर पाडलेले कोनाडे किं० खाचा प्रत्येक. ॐ **पावंडाखालीं हाकणें** संथ वेगानें गाडीचे बैल चालविणें.

पावंडा [म० पाय] **पु०** १ विहिरींत उतरण्यासाठीं भिंतींत पावलें ठेवण्याच्या सोयीचे केलेले असतात ते कोनाडे प्रत्येक. २ पाऊल (टाकणें, घालणें). ३ ताड इ० झाडावर चढणारा आधारार्थ घेतो ती दोरी. ४ कोष्टी पायानें दाबतो ज्या फळ्यां त्या प्रत्येक. ५ शिडी इ० ची पाहिरी. ६ घडवंची, तिवई, इ० चा खूर.

पावडा पु० नांगराला लोखंडी फाटे जे असतात त्यांचीं टोकें प्रत्येक.

पावंडी स्त्री० वर ' पावंडा ' पहा.

पावडी, फावडी स्त्री०, पावडें, फावडें न० लीद, शेण, माती, इ० ओढावयाचें एक आउत.

पावण [म० पावणें] **पु०** माहेराहून सासरीं किं० सासराहून माहेरीं वधूला पोंचवितो तो मनुष्य. **न०** १ वधूला सासरीं आणण्याचा विधि. २ अशा प्रसंगीं वधूचा बाप तिला खाऊ देतो तो.

पावणा पु० सारा म्हणून किं० वेठ द्यावयाची म्हणून गांवकऱ्यांनीं सरकारला दिलेला किं० पुरविलेला खलाशी. [पहा.

पावणा, पावणारावळा पुढें ' पाहुणा, ' इ०

पावणी स्त्री० १ लिलांव. २ मार्गी अडथळा होऊं नये म्हणून सरकारचा शिपायी किं० परवाना घेतात तो.

पावणें [सं० प्र+आप (मिळविणें)] **अ० क्रि०** २ मिळणें; हातीं पडणें; उ० आपलें पत्र पावलें. २ विशिष्ट स्थळीं जाऊन पोंचणें; विशिष्ट

स्थितीप्रत किं० दशेप्रत जाणें; उ० मी संध्याकाळीं वडगांवास पावेन; उ० तानाजी सिंहगड घेतांना मरण पावला. ३ (देव) प्रसन्न होणें; उ० मला देव पावला. ४ (देवानें भक्ताचा नवस किं० अभीष्ट) पूर्ण करणें; उ० हा खंडोबा नवसास पावतो. ५ अंगीकाराचा विषय होणें; उ० हा उपदेश मला पावला.

पावणोत्रा [**म०** पाऊण+**सं०** उत्तर] **पु०** दरमहा दरशेकडा पाउण रुपाया हा व्याजाचा दर.

पावता [**म०** प.वणें] **पु०** वधूला सासराहून माहेरीं किं० माहेराहून सासरीं पोंचावितो तो इसम.

पावता [**म०** पावणें] **वि०** पोंचलेला; हातीं आलेला; पाठवून दिलेला.

पावती [**म०** पावणें] **स्त्री०** कांहीं रकम किं० वस्तु यथास्थानीं नेली जाऊन पोंचणें किं० अशी ती पोंचल्याबद्दलचा लेख.

पावंद स्त्री० भात झोडतेवेळीं झोडपणाऱ्याच्या पायापाशीं किं० मांदीचे आसपास पडतें तें भात.

पावधी स्त्री० वर्षास किं० महिन्यास अमुक द्रव्य द्यावयाच्या ठरावानें दुभती गाय किं० म्हैस आणलेली असते ती. **पावधें न०** वरील प्रकारची गाय किं० म्हैस (तुच्छतेनें). **पावधूक स्त्री०** अशा गायीबद्दल किं० म्हशीबद्दल द्यावा लागतो तो पैसा.

पावन [**सं०**] **वि०** १ पवित्र. २ पवित्र करणारें. ३ वायुभक्षण करून राहाणारा (मुनि). **पु०** १ अग्नि. २ धूप. **न०** १ शुद्धि; पवित्रपणा. २ प्रायश्चित्त. ३ गायीचें शेण. ४ पवित्र करण्याची क्रिया.

पांवरी [**म०** ' पांवा ' चें लघुत्वरूप] **स्त्री०** लहान पावा,—नळीच्या रूपाचें एक वायुवाद्य.

पावलट, पावलटणें मागें ' पायवट, ' 'पायवटणें ' पहा.

पावला [**म०** पाव] **पु०** रुपयाचा चतुर्थांश. [**म०** पाऊल] १ पायाचें चिन्ह. २ कोणेकाची चालण्याची तऱ्हा. ३ दांडपट्टा इ० खेळांत विशेष प्रकारें पाऊल टाकणें.

पावली [**म०** पाव] **स्त्री०** रुपयाच्या चतुर्थांशाच्या किंमतीचें नाणें.

पावशा [**म०** पाऊस] **पु०** चातक हा पक्षी; 'पावशा गुगूळ,' 'पावशाधो' हींही त्या पक्ष्याचीं नांवें आहेत.

पाक्सरा, पावसारा पु० १कोष्टी माग चालवितांना ज्या फळ्या पायानें दाबतो त्या प्रत्येक. २ मागाखालीं वहीं किं० ओवी ज्यांना जोडलेली असते त्या दांड्या प्रत्येक. ‖ **पावसरी स्त्री०** मागाचे जे दोन पावसरे त्यांना बांधलेल्या दोऱ्या प्रत्येक.

पावसारा पु० वर ' पावसरा ' पहा.

पावसाळा पु०, पावसाळी स्त्री० [**म०** पाऊस +काळ] मृग आणि हस्त ह्या दोन नक्षत्रांच्या मधला अवधि. ‖ **पावसाळें न०** पाऊस पडेल अशी आकाशाची स्थिति किं० असा देखावा.

पावळी, पाव्हळी, पागोळी [**म०** पाऊस +गळणें] **स्त्री०** १ भिंतीच्या पुढें आलेला छपराचा भाग,—ज्यावरून पावसाचें पाणी खालीं पडतें. २ असें गळलेलें पावसाचें पाणी.

पांवा पु० नळीच्या रूपाचें एक वायुवाद्य.

पावीत [**म०** पावणें] **वि०** पावता; पोंचता केलेला; हातीं पडलेला; पोंचलेला.

पावेतों [**म०** पावणें+तों] **क्रि०वि०** पर्यंत; (स्थल किं० काळ या दोहोंसंबंधानें).

पाव्हळी वर ' पावळी ' पहा.

पाश [**सं०**] **पु०** १ पदार्थ बांधण्यासाठीं दोरी इ० वलयाकार करून गांठ मारून तिचा करतात तो फास. २ दोरी. ३ जाळें. ४ वरुणाचें अस्त्र. ५ खेळांतील फासा. ६ समूह; उ० केशपाश. ७ कोणत्याही संबंधाचें बंधन; उ० भवपाश, संसारपाश, मायापाश, इ०.

पाशिष्ट न० घराचें आढें.

पाशी, फाशी स्त्री० गुरांना योग्य वेळीं पाणी प्यावयास न नेल्याकारणानें त्यांना होतो तो एक रोग.

पाशीं [**सं०** पार्श्व] **श० यो० अ०** जवळ; संनिधीस; शेजारीं; कडे. **टीप,**—' पाशीं ' चे रूढ प्रयोग कांहीं पुढें देतो. त्याला कोणी जोड्यापाशीं उभें करणार नाहीं म्ह० तो हलकट आहे. माझ्यापाशीं तुझ्या लटपटी चालावयाच्या नाहींत म्ह० मी त्या लटपटींनीं फसणारा

मनुष्य नाहीं. मजपाशीं तुला द्यावयाला पैसे नाहींत म्ह० माझ्या संग्रहीं तुला द्यावयाला पैसे नाहींत.

पाशुपत [सं०] **पु०** शिवाचा भक्त. ॐ **पाशुपतास्त्र न०** शंकराचें अस्त्रविशेष.

पाशुपाल्य [सं०] **न०** १ गुरें पाळणें. २ गुराख्याचा किं० धनगराचा धंदा.

पाशेरी [**म०** पांच+शेर+ई (प्रत्यय)] **स्त्री०** १ पांच शेराचें वजन किं० माप. २ (**लक्षणेनें**) चरितार्थाचें साधन. ३ (**लक्षणेनें**) रोजचें खावयाच्या अन्नाचें प्रमाण. [मत.

पाषंड [सं०] **पु०** नास्तिक. **पु०,न०**नास्तिक

पाषाण [**सं०**] **पु०**१दगड. ॐ (**लाक्षणिक**) बुद्धिहीन मनुष्य.२ (**लाक्षणिक**) कठोर अंतःकरणाचा. **पाषाण चतुर्दशी स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशी (गौरीव्रत). **पाषाणभेद पु०** दगडावर उत्पन्न होणारी एक वनस्पतिविशेष.

पाषाणा पु० घोड्याचा एक रोगविशेष.

पाष्ट,पाष्टें न०,पाष्टी स्त्री०अर्धे चिवट इतक्या परिमाणाचें सूत किं० दोरा.

पाष्ट न०, पु०, पाष्टा पु० घराचें आढें.

पाष्टा पु० सोन्याची तार. (कवितेंत).

पास [**सं०** पार्श्व] **श० यो० अ०** जवळ

पास स्त्री० १ कुळव किं० कुळवाचें लोखंडी अग्र. २ बादला करावयासाठीं करतात ती पसतीस तोळे वजनाची चांदीची लगड.

पासंग [**फा०**] **पु०** १ तराजू, कांटा, इ०चा विषमपणा म्ह० दोन्ही पारडीं समतोल नसणें. २ हा विषमपणा नाहींसा करण्यासाठीं हलक्या पारड्यांत घालतात तो दगड, लोखंड, इ०चा तुकडा.ॐ**पासंगास देणें** दोन्ही पक्ष किं० बाजू किं० पारडीं सारख्या प्रमाणांत व्हावींत म्हणून ज्यादा घातलेला किं० घेतलेला माणूस किं० पदार्थ. **कोणेकाला पासंगा न आणणें** तो कुचकिंमतीचा आहे असें मानणें किं०समजणें. **पासंगास न पुरणें** (किं०**न लागणें**) अगदीं थोडा किं०कमी योग्यतेचा असणें;उ०सदानंदाचा निबंध माझ्या निबंधाच्या पासंगासही लागणार नाहीं.

पासगाळ (–ळी) स्त्री ०वळचणीचा खालचा भाग.

पासचा, पासला [**सं०** पार्श्व; **हिं०** पास] **वि०** जवळचा; शेजारचा; कवज्यांतील; नात्याचा किं० कोणत्याही संबंधाचा.

पासंबा पु०केळीच्या कांद्यास फुटतो तो कोंब.

पांसरी [**म०** पांच+शेर] **स्त्री०** पांच शेरांचें वजन किं० परिमाण.

पासल [सं पार्श्व] **स्त्री०** भूमीवर शरीर आडवें करणें (घेणें).

पासलणें [**म०** पासल]**अ० क्रि०** जमीनीवर अंग टाकून विश्रांति घेत पडणें. याचा प्रयोग बहुधा निरुद्योगी माणसासंबंधानें होतो. ह्याच अर्थी ‘ पासल घेणें ’ किं० ‘ पासलपट्टी करणें ’ ह्याचा उपयोग होतो.

पासला मागें ‘ पासचा ’ पहा.

पासला [**न०** पासल] **वि०** भूमीवर आडवा पडलेला (मनुष्य, झाड,खांब, इ०). ॐ **पासला पाडणें** १ वाद, युद्ध, इ० मध्यें पराजित करणें. ३ कोणेकाचा व्यूह, बेत, किं० कावा हाणून किं० ढासळून पाडणें. ४ पाल्था पाडणें.

पासवा पु० १ लुगड्याचा विशिष्ट ठिकाणचा पदर. २ नदीचा फाटा.

पांसष्ट [**म०** पांच+ साठ] **वि०** साठांत पांच मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

पासाव श० यो० अ० पासून; पाशीं;जवळ; जवळून (कवितेंत).

पासून [**सं०** पार्श्व; **म०** पास; ऊन(प्रत्यय)] **श० यो० अ०** १ (परिगणन करतांना किं० गति किं० अंतर सांगतांना) विशिष्ट समय किं० स्थळ धरून; उ०पुण्यापासून मुंबई एकशे एकोणीस मैल आहे;उ० रामापासून मी चार रुपये उसने घेतले; उ० उद्यापासून मी दांडपट्टा शिकणार आहें. २ ०च्या कर्तृत्वानें;उ०हा पेला मजपासून फुटला;म्ह० माझ्या हातून:उ० तूं बापापासून कोणतीही गोष्ट चोरून ठेवूं नको म्ह० बापाला न कळवितां; उ० तूं उद्यापासून रोज संस्कृत शिकावयाला सुरवात कर म्ह० उद्यां शीक आणि नंतर दररोज शीक;उ०तो आमच्या गांवापासून गेला म्ह०गांवावरून.

पासोडा पु० चित्रविचित्र म्ह० अनेक रंगाचे पट्टे जीवर आहेत अशी पासोडी.

पासोडी स्त्री० १खादी इ०चीं दोन किं०चार पट्टीं एकत्र शिवून रात्रीं निजतांना पांघरावयास करतात तें वस्त्र. २ गांवच्या पाटलाला जी जमीन सरकारनें बक्षीस दिलेली असते ती (पासोडीच्या मोबदला म्हणून). ॐ**एका पासोडीचीं पाटगां न० अ० व०** एकाच गुणाचीं,स्वभावाचीं,चाली-रीतीचीं दोन किं० अधिक माणसें; एका माळेचे मणि.

पांसोळी, फांसोळी [**हिं०** पसली] **स्त्री०** बरगडी. ॐ **एका पासोळीचा वि०** अत्यंत किड-किडीत किं० हाडकुळा (मनुष्य).

पास्तपुस्त, पुस्तापास्त [**म०** पुसणें+तपा-सणें; **हिं०** पाचाह्+पूचाह्] **स्त्री०** १ चौकशी; शोध; तपास (करणें). २ कोणेकाचा घेतलेला समाचार (करणें).

पास्तर न०, स्त्री० मागें 'पाचर' पहा.

पाहणी [**म०** पाहणें] **स्त्री०** १ पाहण्याची क्रिया; पाहाणें. २ तपासणें; चौकशी करणें. ३ जमीन, शेतें, इ०ची तपासणी. ४परीक्षण.

पाहणें [**सं०** पश्य्] **स० क्रि०** नेत्रेंद्रियाचा विषय करणें; बघणें; अवलोकिणें. २ कोणत्याही इंद्रियानें जाणणें किं० समजून घेणें; उ० ह्या आंब्याची चव पहा;उ०हें कापड किती ऊबदार आहे पहा;उ०तो गवई किती उत्कृष्ट गातो तें पहा तर खरें.३एकाद्या माणसाची,गोष्टीची,कारभाराची, किं० प्रकरणाची जबाबदारी पथकरणें; त्याची तजवीज,व्यवस्था,इ० करण्याचें काम स्वीकारणें; उ०माझ्या मुलाचें गणित मीं पाहीन,तुम्ही संस्कृत पहा.४ ०ची परवा करणें किं०पर्वा बाळगणें; उ० तुम्हाला उत्तम घर बांधावयाचें असलें तर पैशा-कडे पाहून कसें चालेल ? (म्ह० पैशाची परवा करून, पैसा खर्चावयाला कचरून). ५पारखणें; तपासणें; उ० हें सोनें पहा; उ० ह्या मुलाच्या अक्षराचें वळण पहा. ३ इच्छिणें; उ० बहिरव-पंताची नोकरी गोंद्या बुडवूं पाहात आहे. ॐ **एकाद्याचा अंत पाहाणें** १ त्याची कसून परीक्षा घेणें किं०करणें.२त्याला कारण नसतां छळणें.**प्रश्न पाहणें** फलज्योतिष,रमल,पत्रिका,इ०वरून कोणे-काच्या आयुष्यांतील भूत आणि भविष्य गोष्टी जाणून घेणें आणि त्या त्याला सांगणें; उ०जोशी-बोवा, आमचा एवढा प्रश्न पाहतां काय ? **एकाद्या वस्तूकडे ढुंकून न पाहणें** त्या वस्तूला अनादर दाखविणें; तिच्यावर ओझरत्या नज-रेनें सुद्धा न पाहणें; ती दुरून टाळणें;तिच्याशीं मुळीच संबंध न ठेवणें; ती तुच्छ लेखणें. **बरें पाहणें** चांगलें म्हणून समजणें; ०चें कल्याण चिंतणें; उ०ह्या गांवांत एकही माणूस म्हादबाला बरें पहात नाहीं. **पाहून घेणें** १ योग्य तें शासन करणें. २ बंदोबस्त करणें; नीट नेटकें करणें;साव-रून घेणें. **दूरवर पाहणें** पुढें काय होईल हें विचारांत घेणें; अमुक गोष्टीचा काय परिणाम होईल हें लक्ष्यांत आणणें. **पाहत अर्थी, पाहतां अर्थी, पाहिलें असतां, पाहिल्या अर्थीं क्रि०वि०** खरें पाहिलें असतां; सर्व गोष्टी विचारांत घेतल्या असतां; खरोखरीं.

पाहण्या[**म०**पाहणें] **पु०**हरवलेली वस्तु अमुक दिशेकडे गेली आहे,अमुक स्थळीं आहे, हें मंत्रवि-द्येनें सांगूं शकतो तो;अमुक ठिकाणीं विहीर खणली असतां पाणी लागेल किं० न लागेल हें जो कांहीं आडाख्यावरून किं०शास्त्रावरून सांगूं शकतो तो.

पाहरा इ० मागें'पहारा' पहा.

पाहळी स्त्री० मागें ' पहाळी ' पहा.

पाहाट, पाहाड, पाहाडी, पाहाणें, पाहार, पाहारा, पाहाळ मागें ' पहाट, ' ' पहाड,' ' पहाडी,' ' पाहणें', ' पहारा,' 'पहाळ' पहा.

पाहाडी [**हिं०**] **वि०** डोंगरी; डोंगराळ; डोंगरांत राहाणारा किं० आढळणारा.

पाहिजे [**सं०** 'पश्य्'चें कर्मणिरूप]**अ०क्रि०** इष्ट आहे;आवश्यक आहे;**टीप**,–हें क्रियापद अनि-यमित आणि अपूर्ण आहे; उ० मला गेलें पाहिजे म्ह० मला जाणें आवश्यक आहे; मला एक आंबा पाहिजे म्ह० इष्ट आहे; उ० मला यावयाला पाहिजे म्ह० मला येणें जरूर आहे. ॐ **पाहिजे तेव्हां क्रि० वि०** कोणत्याही वेळीं.

पाहुणा [**सं०** प्राघूर्णक] **पु०** १ नेहमीं आपल्या घरीं राहात नसून जो प्रसंग-विशेषीं आपल्या घरीं राहावयास किं० जेवा-वयास येतो तो किं० आला आहे तो. २ चांचड हा प्राणी,–तांबड्या मुंगीसारखा. तो पाव-साळ्यांत प्रथम घरांत उत्पन्न होतो तेव्हां त्याला

' पाहुणा ' म्हणतात. ❀ **पाहुणचार पु०** पाहुण्याचा सत्कार. **पाहुणारावळा पु०** पाहुणा-विहुणा; पाहुणा किं० त्याच्यासारखा कोणी माणूस. **पाहुणेर पु०** पाहुणे इ० चा सत्कार किं० त्यांना जेवूं घालणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, इ० कृत्यें समुच्चयानें. **एक पाहुणा घर पाहुणें** आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यासाठीं जें पक्वान्न केलें जातें तें घरांतील सर्व माणसांस वाढावें लागतें. **दोहों घरचा पाहुणा उपाशीं** दोन आधारांवर भिस्त ठेवणारा मनुष्य अंतीं फसतो; दोन ध्येयें डोळ्यापुढें ठेवितो त्याला एकही ध्येय साध्य होत नाहीं. **बहुतांचा पाहुणा उपाशीं** अर्थ वरच्याच सारखा.

पाळ, पाळक न० वृक्षाचीं जीं मुळें त्यांची एक एक शाखा; उ० कुडयाचें पाळ. ❀ **पाळें-मुळें न० अ० व०** १ झाडाचीं सर्व मुळें. २ चिरस्थायिपणाचे सर्व आधार किं० अवलंब. **कोणेकाचीं पाळेंमुळें खणून टाकणें** त्याचा पूर्ण विध्वंस किं० सत्यानाश करणें. **कोणेकाचीं पाळेंमुळें जमीनींत जाणें (किं० खोल जाणें)** तो एखाद्या ठिकाणीं किं० अधिकारावर दृढपणें निविष्ट होणें. **एखाद्या रूढीचीं पाळेंमुळें फार खोल गेलेलीं असणें** त्या रूढीचा संबंध अनेक ठिकाणीं पोंचलेला असणें. **कोणेकानें कोणेक व्यवहारीं (किं० स्थानीं किं० उपाध्येपणाच्या वृत्तींत) पाळें घेणें** त्यांत तो पुरतेपणीं स्थिर किं० दृढ निविष्ट झालेला असणें (म्ह० त्याला तेथून हाकलून देणें अशक्य झालेलें असणें).

पाळ [सं० पालि, पाली] स्त्री० १ तळें, विहीर, इ० च्या भोंवतीं उभारलेली कठडयाची भिंत किं० त्यांच्या आसमंताचा प्रदेश. २ आंत पाणी रहावयासाठीं मध्यें खळगा करून सभों-वतीं उंचवटा केलेला असतो तो. ३ कानाची कड. ४ जांत्याच्या वरच्या तळीचें जें तोंड त्याच्या भोंवतीं जी उंच कड राखलेली असते ती,-जींत वैरण घालतात. ५ नाकाचा शेंडा. ६ धान्याचीं कणसें झोडपतेसमयीं खळ्याच्या सभोंवतीं धान्य उडूं नये म्हणून पेंडयांचें उंच कडें केलेलें असतें तें. ७ झाडाच्या बुडाशीं पाण्यासाठीं करतात तें आळें. ८ कोणत्याही प्रकारचें कोणत्याही पदार्थाच्या भोंवतीं केलेलें असतें तें कडें. ९ पाण्याच्या जोराच्या प्रवाहानें जमीनींत पडतो तो चर.

पाळ वि० १ सरकारनें ज्याचेवरचा कर माफ केला अशी (म्हैस, घर, कूळ, इ०); उ० चार म्हशी पाळ आहेत.२कोणेकाची वेठ बिगार पडेल ती करून त्याचे जागेंत घर बांधून पण घराचा कर न देतां राहातें असें (जें कूळ सर-कारनें सोडलेलें असतें तें);उ० म्हादबाला घर देणें पाळ आहे. ३ ज्याला कर, सारा, इ० कांहीं सरकारदेणें द्यावें लागत नाहीं असें (मनुष्य, कुटुंब, इ०).

पाळक, पालक [सं० पालक] वि० रक्षण करणारा; बाळगणारा; जोपासना करणारा. ❀ **पालकपुत्र, पाळकबेटा पु०** दुसऱ्याचा आपण पुत्र म्हणून बाळगलेला मुलगा. **पालकबेटी स्त्री०** दुसऱ्याची आपण कन्या म्हणून बाळग-लेली मुलगी.

पाळण,पालन [सं० पालण] न० १ रक्षण. २ व्रतादिकांचें चालविणें; व्रत, नियम, इ० पाळणें किं० आचरणें किं० अनुसरणें. ❀**पालन-पोषण न० ए० व०** मुल, जनावर, इ० ना खाऊं घालून त्यांचें संगोपन, शिक्षण, इ० करणें. **पाळणवाला पु०** जो कोणेकाचें पालन, पोषण, रक्षण, संगोपन, इ० करतो तो.

पाळणा [म० पाळणें] पु० १ लहान मुलाला निजवून झोके देण्याच्या सोयीचा लाकूड, बांबू, इ० चा रचनाविशेष केलेला असतो तो. २ मुलाला पाळण्यांत निजवून स्त्रिया जीं कृष्णाच्या बाललीलांचीं गाणीं म्हणतात तीं प्रत्येक.❀ **पाळ-ण्यांतलें नांव न०** जन्मलेल्या मुलाला पाळण्यांत घालून त्याचें ठेवतात तें नांव. हेंच नांव कागदो-पत्रीं चालतें. व्यावहारिक नांव वेगळें असतें किं० नसतें.

पाळणूक [म० पाळणें] स्त्री० १ पाळ-ण्याची क्रिया. खालीं ' पाळणें ' पहा. २ कर, सारा, इ० ची सरकारांतून मिळालेली माफी. वर ' पाळ ' वि० पहा.

पाळणें [सं० पाल्= रक्षिणें] स० क्रि० १

मनुष्य, जनावर, पक्षी, इ० ना खाऊंपिऊं घालून त्यांचें संरक्षण आणि संगोपन करून त्यांना वाढविणें. २ (कांहीं व्रत, नियम, इ०) आचरणें किं० आचरणांत आणणें. ३ (शपथ, प्रतिज्ञा, इ०) निस्तरणें किं० पूर्ण करणें. **अ० क्रि०** १ मानवणें; हितकर होणें; (व्रत,नियम, इ० निस्तरणें किं०ते आचरणें) शक्य असणें किं०शक्य होणें; उ०हें पाणी तुम्हाला पाळणार नाहीं; उ० संकष्टी चतुर्थीचें व्रत तुम्हास पाळणार नाहीं. २(केलेली प्रतिज्ञा किं० दिलेलें वचन)पूर्ण केलें जाणें.

पाळत, पाळथ [म० पाळणें] **स्त्री०** चोरी करण्याच्या उद्देशानें किं० दुसऱ्याचीं वर्मेंकर्मे हुडकून काढण्याच्या उद्देशानें किं० शत्रु इ० ना पकडण्याच्या उद्देशानें त्याच्या हालचालींवर गुप्तपणें ठेविलेली नजर किं० टेहाळणी (राखणें, ठेवणें).

पाळत (-थ-) वणें [म० पाळत, पाळथ] **स० क्रि०** (मनुष्य, जनावर, इ० ना) पाळथीचा विषय करणें म्ह० त्यांच्या हालचाली जाणून घेणें.

पाळती, पाळथी [म० पाळत, पाळथ] पाळथ राखणारा किं० पाळथ राखण्यासाठीं नेमलेला मनुष्य.

पाळंद मागें ' पाणंद ' पहा.

पाळंदिवड स्त्री०, न० पाण्यांत रहाणारा एक निर्विष साप.

पाळा पु० झाडाच्या काटक्या कुटक्या तोडण्याची लहानशी कोयती.

पाळा [**म०** पाळणें] **पु०** हुकूम, आज्ञा, वचन, इ० पूर्ण करणें.

पाळा [**सं०** पाली, पालि] पु० १ पदार्थ इ० च्या सभोंवतीं मनुष्यें इ० चें कडें किं० वेष्टन किं० गराडा. २ समुदाय; टोळी; जमाव; कळप; थवा. ३ पदार्थांची अस्ताव्यस्तता (घालणें, मांडणें). [तांबडा म.सा.

पाळा पु० एक प्रकारचा खाऱ्या पाण्यांतील

पाळिग्रहण, पाळग्रहण [**म०** पालणें+**सं०** ग्रहण (घेणें)] **न०** पालणपोषण; संगोपन.

पाळी स्त्री० १ पूर्वीं ठरलेल्या किं० ठरविलेल्या क्रमाप्रमाणें ज्याचा जो अपेक्षित समय किं० अवसर तो; क्रमाप्रमाणें घडावयाच्या ज्या गोष्टी त्यांपैकीं एकाद्या विशिष्ट गोष्टीचा प्राप्त झालेला समय; खेप. २ कोणेकाकडे नेमस्त केलेलें कांहीं काम; कोणेकावर टाकलेली कांहीं कामाची जबाबदारी. ३ कोणेकावर सोपविलेलें कांहीं काम. ४ फेरी. ꙮ **पाळेकरी पु०** पाळीनें काम करणारा. **पाळेकरीण स्त्री०** पाळीनें काम करणाऱ्या स्त्रिया प्रत्येक.

पाळींव [**म०** पाळणें] **वि०** पाळलेला (कुत्रा, मांजर, वाघ, इ०). ꙮ **पाळाव बकरा पु०** सांगितलेली कामगिरी आडवेढे न घेतां करणारा.

पाळुक न० गोगलगाय.

पाळं न० जांत्याची पाळ.

पाळें [**सं०** पालि, पाली] **न०** १ जांत्याचें वैरण घालावयाचें भोक. २ मीठ, चटणी, इ० पदार्थ ठेवावयाचें लाकूड कोरून केलेलें पात्र. ३ झाडाच्या बुडाशीं पाणी घालण्यासाठीं करतात तो खळगा; आळें.४ तळें इ० चा विस्तार किं० खोलीचें परिमाण. ५ डोंगराळ प्रदेशांतील सखल जमीन म्ह०द्रोणासारखा भाग. ꙮ**पाळेकरी,पाळकरी पु०**सरकारचा अधिकार न जुमानतां स्वतंत्रपणें डोंगरांतील वसतीवर अमल चालविणारा मनुष्य. **पाळें पडगें न० ए० व०** संसारोपयोगी भांडाकुंडीं समुच्चयानें.

पाक्षिक [**सं०**] **वि०** १ पंधवड्याचें. २ वैकल्पिक. ३ एकाच पक्षासंबंधाचें किं० बाजूचें.

पिंक [**हिं०** पीक] **स्त्री०** विडा, तंबाखू, इ० खाऊन तोंडांत जमलेली थुंकी किं०टाकलेली थुंकी (मारणें, टाकणें). ꙮ **पिंकदाणी, पिकदाणी स्त्री०** थुंकावयाचें पात्र.

पिक [**सं०**] **पु०** १ कोकिळ पक्षी. ꙮ **पिकानंद पु०** वसंत ऋतु.

पिकटणें पुढें ' पिकुटणें ' पहा.

पिकटाण [**म०** पिकणें+घाण] **स्त्री०** पिकलेले आंबे, फणस, इ० चा उग्र दर्प.

पिकटी [**म०** पिकणें] **स्त्री०** आजारामुळें फिक्का झालेला अंगवर्ण.

पिकणें [**सं०** पच्=शिजणें] **अ० क्रि०** १ पक्व दशेस येणें (फळ, गळूं, धान्य). २

फिकट वर्णाचा होणें (रंग, चटक, तजेला). ३ (केश) म्हातारपणानें किं० आजारानें पांढरें होणें. ४ (शेतांत धान्यादि) उत्पन्न होणें; उ० एका बिघ्यास दहा मण भात पिकतें. ५ (कांहीं बातमी, वदंता) प्रसृत किं० प्रचलित होणें. ६ सोंगटीचें काम संपून ती खेळांतून बाजूस काढली जाणें. ७ (कांहीं आरंभिलेलें काम) समाप्तीच्या स्थितीस पोचणें. ⊛ **गरोदर स्त्रीचें पोट पिकणें** प्रसूति जवळ आली आहे असें सुचविण्याइतकें तिचें पोट वाढणें. **पिकल्यावांचून विकत नाहीं** मूळांत कांहींतरी आधार असल्यावांचून बातमी प्रचलित होत नाहीं किं० सर्वतोमुखीं होत नाहीं. **पिकल्या झाडाखालीं उपाशी मरणारा** अत्यंत आळशी माणूस. **कोणेकाचें पिकणें** त्याला अनुकूल दशा प्राप्त होणें. **पंढरी पिकणें** मागें ' पंढरी ' मध्यें पहा. **ह्या विद्यार्थ्यांची समजूत पाडतां पाडतां माझा ऊर पिकला** माझी छाती दुखूं लागली.

पिकणें [**सं०** पिक] **न०** तोंड स्वच्छ करण्यासाठीं तोंडांत घेतलेलें पाणी.

पिकंदर [**पोर्च्युगीझ्**] **न०** जांबेत्री दगड खाणींतून काढण्याचें किं० दगड फोडावयाचें एक आऊत.

पिकदाव पु०, पिकराड, पिकळाड स्त्री०, पिकणें न० [**म०** पिकणें] १ शेतें पिकण्याचा समय. २ शेतांत जें पिकतें तें.

पिकला [**म०** पिकणें]**वि०**पिकलेलें (फळ). ⊛ **पिकलें झाड न०** ज्याच्या जवळ पैसा असून देण्याची बुद्धि ज्याच्या अंगीं आहे असा; उदार; खर्चीक. **पिकलें पान न०** अतिशय वृद्ध आणि जीर्ण मनुष्य.

पिकवण [**म०**पिकविणें]**न०** १ फळें पिकविण्यासाठीं गवत,पेंढा, इ०चा थर करतात तो.२ गळूं पिकविण्यासाठीं कणीक, आळशी, इ० चें करतात तें पोटीस.

पिकविणें [**म०** ' पिकणें'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ फळ, गहूं, इ० कृत्रिम उपायांनीं परिपक्व करणें. २ (माणूस, जनावर, यांना) झोडपून काढणें.

पिकली स्त्री० गोगलगाय.

पिका [**म०** पिकणें] **वि०** पिकलेला; परिपक्व झालेला.

पिकाऊ [**म०** पिकणें] **वि०** १ पिकण्याच्या दशेस आलेला.२ सुपीक (जमीन).

पिंकाणी, पिंपाणी स्त्री० केळीच्या पानाचीं सुरळी किं० कागद इ०ची वळकटी करून तोंडानें फुंकून आवाज काढण्यासाठीं मुलें करतात तें खेळणें.

पिकाव [**पोर्च्युगीझ्**] **न०** दगड फोडावयाचें किं० दगड खाणींतून काढण्याचें एक लोखंडाचें आऊत.

पिकी, पिंकी स्त्री० मागें ' पिक ' पहा.

पिकुटणें [**म०** पिकणें] **अ० क्रि०** फिकट वर्णाचा होणें; निस्तेज होणें.

पिकूट [**म०** पिकुटणें] **वि०** निस्तेज; फिकट; मालवलेल्या कांतीचा; (वस्त्र, चेहरा, इ०).

पिकूळ न० गोगलगाय.

पिखरणें, पिखुरणें, विखरणें, विखुरणें [**सं०** प्र किं० वि+कॄ (पसरणें)] **स० क्रि०** अस्ताव्यस्त करणें किं० टाकणें. **अ० क्रि०** अस्ताव्यस्त होणें विस्कलित असणें.

पिंगट [**सं०** पिंग] **वि०** १ पिवळसर. २ पिंगूळ किड्याची ज्याला घाण येत आहे असा; कुबट.

पिंगटणें [**म०** पिंगट] **अ० क्रि०** १ फिकट रंगाचा होणें; निस्तेज होणें. २ पिंगुळ किड्याप्रमाणें घाणणें.

पिंगल [**सं०** पिंगल]**वि०** पिंगट.**पु०** १ पिंगट रंग.२ कुबेराचा एक निधि. ३ पिंगळा नांवाचा पक्षी. ४ सूर्याचा एक पारिपार्श्वक. ५ मंगळ ग्रह.

पिंगला [**सं०**] **स्त्री०** १ दक्षिण दिग्गजाची स्त्री. २ शरीरांतील एक नाडीविशेष.

पिंगवी स्त्री० कांगोणी हें झाड. **पिंगवें न०** कांगोणी हें फळ. **पिंगवेल न०** कांगाण्यांचें तेल.

पिंगळ, पिंगळा, पिंगूळ पु०१ एक किडा,— याला फार घाण येते. २ ज्याच्या बोलण्यांत कुजकेपणा फार असा माणूस.

पिंगळा [**सं०** पिंगल] **पु०** १ एक पक्षी. २ भाकितें सांगणारा जोशी.

पिंगळा, पिंगा [**सं०** पिंगल, पिंग] **वि०** पिंगट वर्णाचा.

पिंगा, पिंगारा पु० मुलींचा एक खेळ.

पिंगाणें न० एक क्षुद्र कीटविशेष.

पिंगी, पिंगें, पिंगेल मागें ' पिंगवी ' ' पिंगवें ' ' पिंगवेल ' पहा. [पहा.

पिंगूट, पिंगुटणें मागें ' पिंगट, ' ' पिंगटणें '

पिघळणें अ० क्रि० विरघळणें; वितळणें. मागें ' पघळणें ' पहा.

पिचकट वि० १बारीक किं० किलकिला (डोळा).२ फुटलेलें, पिचलेलें,तडा गेलेलें(भांडें, मडकें, इ०).

पिचकळी स्त्री० टाकलेली थुंकी.

पिचका [**म०**पिचणें]**वि०**१तडा गेलेलें किं० फुटलेलें (भांडें, मडकें, इ०). २ ज्यांतून सदा पाणी गळत असतें किं० जो तिरळा आहे असा (डोळा). ३ अशक्त; लेचापेचा; ढिसूळ.

पिचकारी [**हिं०**] **स्त्री०** १ जोरानें पाणी उडविण्याचें एक साधन; चिपनळी. २ रक्त, पाणी,इ०ची जोराची धार किं० चिळकांडी. ३ तोंडातून टाकलेली चूळ.

पिचकुंडा वि० मागें ' पिचकट ' पहा.

पिचंड्या, पिचुंड्या, पिचोंड्या स्त्री० अ० व०, पिचुंडे, पिंचोंडे पु० अ० व० पाठीमागें हात वळवून दंड बांधणें.**कोणेकाच्या पिचुंड्या बांधून घेणें** त्याला लेख, पत्रें, इ०च्या साधनानें पूर्णपणें गुंतवून घेणें.

पिचणें अ० **क्रि०** १ (बांगडी, कांच, भिंग, मडकें, इ०) फुटून त्यांना तडा जाण किं० चीर पडणें. २ बोरू, बांबू, इ० पिंजणें म्ह० त्यांना चिरा पडणें. ३ फार वेळ भिजलेले तांदूळ ढिसूळ होणें म्ह० हाताच्या बोटांनीं चुरावयाजोगे होणें. ४ हाड, चुन्याचे खडे, शिंपा, इ० भस्मप्राय होण्याइतके भाजले जाणें.

पिचनळी स्त्री० मागें 'पिचकारी' पहा.

पिचपिचीत वि० ज्यांतून एकसारखें पाणी गळत आहे असे (डोळे) किं० अशा डोळ्यांचा (मनुष्य).

पिचबाही [**म०** पिच्छा+बाही] **स्त्री०** आसाराच्या दाराच्या चौकटीच्या आंतले जे उभे दोन खांब ते प्रत्येक.

पिचवणें भावकतृक क्रि०पित्ताच्या विकृतीमुळें घशांत किं० छातींत आग होणें; उ० माझ्या घशांत पिचवत आहे. अ० **क्रि०** पिचणें. मागें ' पिचणें 'पहा.

पिचंड्या, पिचोंड्या स्त्री०अ० व०, पिचुंडे, पिचोंडे पु० अ० व० मागें ' पिचंड्या ' पहा.

पिचोळी स्त्री० १ पिचकारी. २ रक्त,पाणी, दाबलेल्या फळांतील रस, इ०ची जोराची धार; चिळकांडी.

पिच्छ [**सं०**] **न०** १ पंख. २ मोराचें पीस; पिसारा. ३ बाणाला लाविलेलें पीस. ४ पंख. **पु०** शेपूट.

पिच्छा [**सं०** पृष्ठ] **पु०, स्त्री०** १पदार्थाच्या पाठीमागचा भाग; पिछाडी. २ कांहीं गोष्टसाध्य होण्यासाठीं चालविलेला अखंड प्रयत्न (०चा पिच्छा पुरविणें). ३ कोणी मनुष्यानें आपली कांहीं मागणी पुरवावी म्हणून त्याला एकसारखा लाविलेला नेट (चा पिच्छा पुरविणें). पिच्छा बसणें (किं० लागणें); पिच्छावर असणें (किं० लागणें), पिच्छा घेणें (किं० धरणें), पिच्छा पुरविणें असे प्रयोग होतात. **बंदुकीनें पिच्छा करणें** तिनें उडतांना मागें धक्का देणें किं०मागें हटणें.

पिच्छुंड्या स्त्री० अ० व०,पिच्छोंडे पु० अ० व० मागें ' पिचुंड्या ' पहा.

पिच्छाडा पु०, पिच्छाडी स्त्री०[**सं०** पृष्ठ] मागचा भाग; मागची बाजू.

पिच्छाडी [**सं०** पृष्ठ] **स्त्री०** १ मागची बाजू. २ घोड्याचे मागचे जे पाय त्यांना बांधावयाच्या दोऱ्या प्रत्येक. ३ सैन्याचा मागला भाग.अघाडी म्ह० पुढला भाग.

पिंजकट, पिंचका [**म०** पिंजणें] **वि०** १ सहज पिंजेल असें (लाकूड, इ०). २ पिंजलेलें (लाकूड इ०).

पिंजट [**म०** पिंजणें] **न०** बोरू,बांबू,इ०ची चिरफळी, चोय, धलपी, इ०.

पिंजणावळ [**म०** पिंजणें] **स्त्री०** कापूस, लोकर, काथ्या, इ० पिंजण्याबद्दलची मजूरी.

फिकट वर्णाचा होणें (रंग, चटक, तजेला). ३ (केश) म्हातारपणानें किं॰ आजारानें पांढरें होणें. ४ (शेतांत धान्यादि) उत्पन्न होणें; उ॰ एका बिघ्यास दहा मण भात पिकतें. ५ (कांहीं बातमी, वदंता) प्रसृत किं॰ प्रचलित होणें. ६ सोंगटीचें काम संपून ती खेळांतून बाजूस काढली जाणें. ७ (कांहीं आरंभिलेलें काम) समाप्तीच्या स्थितीस पोचणें. ॐ **गरोदर स्त्रीचें पोट पिकणें** प्रसूति जवळ आली आहे असें सुचविण्याइतकें तिचें पोट वाढणें. **पिकल्यावांचून विकत नाहीं** मूळांत कांहींतरी आधार असल्यावांचून बातमी प्रचलित होत नाहीं किं॰ सर्वतोमुखीं होत नाहीं. **पिकल्या झाडाखालीं उपाशी मरणारा** अत्यंत आळशी माणूस. **कोणेकाचें पिकणें** त्याला अनुकूल दशा प्राप्त होणें. **पंढरी पिकणें** मागें ' पंढरी ' मध्यें पहा. **ह्या विद्यार्थ्यांची समजूत पाडतां पाडतां माझा ऊर पिकला** माझी छाती दुखूं लागली.

पिकणें [**सं॰** पिक] **न॰** तोंड स्वच्छ करण्यासाठीं तोंडांत घेतलेलें पाणी.

पिकंदर [**पोर्च्युगीझ्**] **न॰** जांबेत्री दगड खाणींतून काढण्याचें किं॰ दगड फोडावयाचें एक आऊत.

पिकदाव पु॰, पिकराड, पिकळाड स्त्री॰, पिकणें न॰ [**म॰** पिकणें] १ शेतें पिकण्याचा समय. २ शेतांत जें पिकतें तें.

पिकला [**म॰** पिकणें]**वि॰**पिकलेलें (फळ). ॐ **पिकलें झाड न॰** ज्याच्या जवळ पैसा असून देण्याची बुद्धि ज्याच्या अंगीं आहे असा; उदार; खर्चीक. **पिकलें पान न॰** अतिशय वृद्ध आणि जीर्ण मनुष्य.

पिकवण [**म॰**पिकविणें]**न॰** १ फळें पिकविण्यासाठीं गवत,पेंढा, इ॰चा थर करतात तो.२ गळूं पिकविण्यासाठीं कणीक, आळशी, इ॰ चें करतात तें पोटीस.

पिकविणें [**म॰** ' पिकणें'चें प्रयोजक] **स॰ क्रि॰** १ फळ, गहूं, इ॰ कृत्रिम उपायांनीं परिपक्क करणें. २ (माणूस, जनावर, यांना) झोडपून काढणें.

पिकली स्त्री॰ गोगलगाय.

पिका [**म॰** पिकणें] **वि॰** पिकलेला; परिपक्क झालेला.

पिकाऊ [**म॰** पिकणें] **वि॰** १ पिकण्याच्या दशेस आलेला.२ सुपीक (जमीन).

पिंकाणी, पिंपाणी स्त्री॰ केळीच्या पानाची सुरळी किं॰ कागद इ॰ची वळकटी करून तोंडानें फुंकून आवाज काढण्यासाठीं मुलें करतात तें खेळणें.

पिकाव [**पोर्च्युगीझ्**] **न॰** दगड फोडावयाचें किं॰ दगड खाणींतून काढण्याचें एक लोखंडाचें आऊत.

पिकी, पिंकी स्त्री॰ मागें ' पिक ' पहा.

पिकुटणें [**म॰** पिकणें] **अ॰ क्रि॰** फिकट वर्णाचा होणें; निस्तेज होणें.

पिकूट [**म॰** पिकुटणें] **वि॰** निस्तेज; फिकट; मालवलेल्या कांतीचा; (वस्त्र, चेहेरा, इ॰).

पिकूळ न॰ गोगलगाय.

पिखरणें, पिखुरणें, विखरणें, विखुरणें [**सं॰** प्र किं॰ वि+कॄ (पसरणें)] **स॰ क्रि॰** अस्ताव्यस्त करणें किं॰ टाकणें. **अ॰ क्रि॰** अस्ताव्यस्त होणें विस्कळित असणें.

पिंगट [**सं॰** पिंग] **वि॰** १ पिवळसर. २ पिंगूळ किड्याची ज्याला घाण येत आहे असा; कुबट.

पिंगटणें [**म॰** पिंगट] **अ॰ क्रि॰** १ फिकट रंगाचा होणें; निस्तेज होणें. २ पिंगुळ किड्याप्रमाणें घाणणें.

पिंगल [**सं॰** पिंगल]**वि॰** पिंगट.**पु॰** १ पिंगट रंग.२ कुबेराचा एक निधि. ३ पिंगळा नांवाचा पक्षी. ४ सूर्याचा एक पारिपार्श्वक. ५ मंगळ ग्रह.

पिंगला [**सं॰**] **स्त्री॰** १ दक्षिण दिग्गजाची स्त्री. २ शरीरांतील एक नाडीविशेष.

पिंगवी स्त्री॰ कांगोणी हें झाड. **पिंगवें न॰** कांगोणी हें फळ. **पिंगवेल न॰** कांगाण्यांचें तेल.

पिंगळ, पिंगळा, पिंगूळ पु॰१ एक किडा,—याला फार घाण येते. २ ज्याच्या बोलण्यांत कुजकेपणा फार असा माणूस.

पिंगळा [**सं॰** पिंगल] **पु॰** १ एक पक्षी. २ भाकितें सांगणारा जोशी.

पिंजणी [**म०** पिंजणें] **स्त्री०** १ कापूस इ० पिंजण्याची क्रिया. २ वांबू, वोरू, इ०च्या चिरफळ्या करण्याची क्रिया.

पिंजणें [**सं०** पिंजा=कापूस] **स०** **क्रि०** १ (वोरू, वांबू, इ०) उभे फोडणें किं०उभे फाडून त्यांच्या उभ्या चिरफळ्या काढणें. २ कापूस, लोकर, इ०चे तंतु एकमेकांपासून सोडवून विरळ करणें. ३ (वस्त्र, कागद, इ०चें) उभे पट्टे फाडून काढणें. ४ वोलतांना(घशांतून)दुहेरी स्वर निघूं लागणें किं०घोगरा आवाज निघणें.**अ०क्रि०** १ (वांव, वोरू, इ०) उभा फाटणें. २ बोलतांना (आवाज) ताब्यांत न राहातां त्याचे भिन्नसमयीं भिन्न भिन्न सूर होणें. ३ (आवाज) घोगरा होणें. ४ (आवाज) पोरकट न राहातां मर्दानी होणें.

पिंजर [**सं०** पिंजर=तांबूस पिंवळा रंग]**स्त्री०** चूर्णरूपांत असलेलें कुंकू,–तेल घालून खलावयाच्या अगोदरचें.

पिंजर न०, पिंजरा पु० [**सं०** पिंजर] १ पाळलेले पक्षी उडून जाऊं नयेत म्हणून त्यांच्या साठीं वांव, तारा, गज, इ०चें केलेलें घर. २प्राण्यांच्या हाडांचा सांगडा. ३ घर,गलबत,इ० च्या रचाईतील भिंतीशिवाय बाकीचा भाग. ४ २ प्राण्याच्या वरगड्या समुच्चयानें. ५ ताड,माड, इ० झाडांचा माथा,–झावळ्यांच्या मधील. ६ उंदीर, घुशी, इ० पकडावयाचें साधनविशेष.‌ॐ **हाडांचा पिंजरा पु०** किडकिडीत माणूस. **कोणेकाला पिंजऱ्यांत घालून ठेवणें** त्याचे काळजीनें जतन करणें. **पिंजरापोळ पु०** मागें 'पांजरपोळ ' पहा.

पिंजरी [**सं०** पिंजर] **स्त्री०** १ पालखींत बसलेल्या माणसाला उन्ह लागूं नये म्हणून जें वस्त्र दांडीवर पसरून बांधलेलें असतें तें. २ गाडी वर अशाच उपयोगासाठीं जें वस्त्र किं० तट्टया इ० लाविलेला तो.

पिंजळ पु० एक वृक्षविशेष.

पिंजार [**म०** पिंजारणें] **न०** भातेणाच्या एकमेकांत गुंतलेल्या पाती किं० काड्या.

पिंजारणी [**म०** पिंजारणें]**स्त्री०**पिंजण्याची क्रिया. खालीं ' पिंजारणें ' पहा.

पिंजारणें [**म०** ' पिंजणें ' चें एकरूप]**स० क्रि०** १ (कापूस, लोकर, काथ्या, इ० चें तंतु) एकमेकापासून सोडविणें. २ (डोक्यावरचे केश, शेतांतील गवत, पानें, इ०) अस्ताव्यस्त करणें किं० पसरणें;उभारणें. ३ (ओलें गवत) वाळण्यासाठीं वाऱ्यावर किं० उन्हांत पसरून घालणें. ४ (डोळे) वटारणें. ५ (नाकपुड्या रागानें) फुगविणें. ६ न्हायल्यावर (केश) वाळविण्यासाठीं (ते) डोकीवर पसरणें. **अ० क्रि०** १ (झाडें, शाखा, इ०) नूतन पर्णांनीं युक्त होणें. २ (रागावलेल्या मांजर इ० च्या शेपटाचे केश) ताठ होणें.

पिंजारी [**म०** पिंजणें] **पु०** कापूस, लोकर, इ० पिंजून चरितार्थ करणारा. ॐ **पादशहास पादशाही झाली म्हणून पिंजाऱ्यानें तार तोडूं नये** मागें' पादशहा 'मध्यें पहा.

पिंजुळी, पिंजोळी [**स०** पिंजणें] **स्त्री०** वांबू, वारू, इ० ची उभी चिरफळी किं० चोय.

पिटकी स्त्री० थिलथिलींत किं० अर्धवट टणक अशा पदार्थाचा लहानसा खंड किं० लहानशी गोटी. [गोजिरवाणा.

पिटकुला, पिटकोला वि० लहान आणि

पिटकुली स्त्री० लहान आकाराचा आंबा, पेरू, इ०. [माणाचें माप.

पिटकें न० शेराचा अष्टमांश किं० ह्या परि-

पिटणें, पिटकुलें न० बाल्दशेंतील प्राणी,– उंदीर, घुस, इ०.

पिटणें [**सं०** पीड्=चेपणें, पिळणें]**स० क्रि०** १ मारणें; छडी इ० नीं मारणें. २ वेगानें चालविणें (घोडा, बैल, इ०). ३ (माणूस,जनावर, यांच्याकडून) त्यांच्या जिवाविशेष काम करवून घेणें; उ० मी घोडा दहा मैल पिटला. ४ जलदीनें किं० त्वरेनें (जासूद इ० ना) पाठविणें; पिटाळणें. ५ (कांहीं जाहीरनामा किं० दवंडी) सर्व लोकांस कळविणें. ६ (गोळा झालेलीं गुरें, मांजरें,पक्षी, इ० ना) हाकलून देणें. ७ (सोनें, लोखंड, इ० वर हातोडा इ०चे) आघात करणें.ॐ **टाळ्या पिटणें** तळहातावर तळहात मारून आवाज करणें (आनंद इ०मुळें). **चकाट्या पिटणें** गप्पा मारणें.

पिटाळणें, पिटळणें [**म०** ' पिटणें'चें एक रूप] **स० क्रि०** १ हाकलून देणें. २ (शत्रूचें सैन्य, गुरें ढोरें, इ० ना) उधळून लावून हाक-

लून देणें. ३ (घोडा इ० वाहन) वेगानें चालविणें. ४ (जासूद) त्वरेनें पाठविणें.

पिठडा पुढें ' पिठाड ' पहा.

पिठरडी [म० पीठ] **वि०** पीठ घालून केलेली (पडवळ इ० ची भाजी).

पिठलें [म० पीठ] **न०** डाळीच्या पिठाचें तोंडीलावणें. ह्याला ' झुणका ', ' आळण ' हीं अन्य नांवें आहेत.

पिठवण स्त्री० एक वनस्पति.

पिठा पु० जेथें प्यावयाची दारू विकतात तें ठिकाण.

पिठा [म० पीठ] **वि०** १ ढिसूळ किं० भुसभुशीत (धोंडा). २ पिठासारखी ज्याची चव असे (चिबूड इ० फळ).

पिठाड, पिठार पु०, न०, पिठाळा, पिठडा पु०[म० पीठ] १ भाकरी, गवत,इ० ची अर्धवट खाऊन झालेली नासाडी (करणें, पाडणें). २ अतिश्रमामुळें किं०कष्टाच्या कामामुळें आलेला थकवा.

पिठाळ [म० पीठ] **वि०** १ पुरता न भाजला गेल्यामुळें बेचव लागणारा (भाकरी इ० पिठाचा पदार्थ). २ पचपचीत आणि बेचव (भात). ३ ढिसूळ (धोंडा).

पिठाळणें, पिठुळणें [म० पीठ]**अ० क्रि०** (भात, भाकरी,इ०)बेचव,पचपचीत,किं०पाणचट होणें.

पिठाळें [म० पीठ] **न०** एक प्रकारचें मधमाशांचें पोवळें.

पिठी [म० पीठ] **स्त्री०** १ पापड, पोळी, इ० पोळपाट इ० वर लाटण्यानें लाटतांना जें बारीक पीठ खालीं आणि वर पसरून घालतात तें. २ तांदुळाचें बारीक दळलेलें पीठ. ३ तांदूळ इ० चें पीठ पाण्यांत शिजवून पातळ पेय आजाऱ्याला देतात तें. **वि०** पिठासारखी (साखर इ०).

पिठूर [म० पीठ] **वि०** पिठासारखें म्ह० अति स्वच्छ (चांदणें).

पिठूळ, पिठोळा [म० पीठ] **वि०** १ ढिसूळ (भाकरी, दगड, इ०). २ पचपचीत (भात इ०).३ बेचव, नीरस (फळ, खाद्य).

पिठेरा [म० पीठ] **पु०** ताण्यांना खळ लावावयाचा कोष्ट्यांचा कुंचा.

पिठोरा [म० पीठ]**पु०** श्रावण महिन्याच्या अमावास्येस चवसष्ट योगिनींच्या आकृति पिठानें काढून त्याची पूजा करण्याचें व्रत. ' पिठोरा पाठोरा ' असाही शब्द आहे. ❁ **पिठोरी स्त्री०** श्रावण महिन्याची अमावास्या,–ज्या दिवशीं चवसष्ट योगिनींची पूजा करतात.

पिठ्या [म० पीठ] **वि०** १ ढिसूळ (दगड इ०). २ नीरस, बेचव (फळ). ❁ **पिठ्या पाहुणा पु०** ज्याला जोंधळा, बाजरी, डाळी, इ० च्या पिठांचीं खाद्यें वाढलीं तरी चालतील अशा दर्जाचा पाहुणा. **गव्ह्या पाहुणा पु०** ज्याला गव्हाची कणीक, रवा, इ० चीं खाद्यें वाढलीं पाहिजेत अशा दर्जाचा पाहुणा.

पिंड [**सं**] **पु०** १ भात, माती, धातु, इ० चा गोळा किं० गोटा. २ मनुष्याचा देह. ३ देहाचे दोन विभाग कल्पून मस्तकांतील जी पोकळी तिच्या व्यतिरिक्त जो विभाग तो. ४ (क्षेल व्यवहारीं) जाडी. ५ मृताच्या नांवानें श्राद्धाच्या विधींत देतात तो भाताचा गोळा. ६ कोणताही वाटोळा पदार्थ. ७ गर्भाशयांतील प्राण्याचा अव्यक्त स्थितींतील देह. ८ (**गणित**) त्रिज्येचा एक चोवीसांश. ❁ **पिंडान्वाहार्यक न०** मासिक श्राद्ध. त्याला ' अन्वाहार्यक ' असेंही म्हणतात.**पिंडायस न०**पोलाद. **पिंडाशन पु०** भिकारी.**पिंडदान**,**पिंडनिर्वपण न०**श्राद्धांत पितरांस पिंड देणें.**पिंडलोप पु०**वंश कुंठित होणें. **पिंडरोगी वि०** जन्मापासून आजारी; सदा आजारी.**पिंडज्ञान न०** शरीराच्या रचनेचें ज्ञान. **पिंडास बसणें** (**किं० लागणें, खिळणें,जडणें**) (कांहीं खोड, आजार, उपद्रव इ०) मनुष्य मरेपर्यंत त्याला चिकटलेला किं० जडलेला असणें. **पिंडीं तें ब्रह्मांडीं** जें आपल्या ठायीं आहे तेंच सर्व जगांत आहे; जगाचें स्वरूप ओळखावयाचें असल्यास आपलें स्वताचें स्वरूप ओळखावें म्हणजे बस झालें. **पिंडे पिंडे मतिर्भिन्ना** जितकीं माणसें तितके स्वभाव; प्रत्येकाचे विचार वेगळे; मूर्तै तितक्या प्रकृति. **पिंडब्रह्मांडरचना स्त्री०** जी मानवी देहाची रचना तीच विश्वाची घटना. डोळे म्ह० चंद्र, सूर्य; रक्तवाहिन्या म्ह० नद्या; केश म्ह० झाडें, इ० रूप.

पिडणूक, पीडणूक [म० पीडणें] **स्त्री०** दुसऱ्यास पीडा देण्याची क्रिया.

पिडणें पुढें ' पीडणें ' पहा.

पिंडरी स्त्री० १ पायाची पोटरी. २ धान्याच्या कणसाचा फुगीरपणा किं० दाण्यांनीं ठासून भरलेलें कणीस. ३ व्यायामाच्या योगानें जाडी आणि टणक झालेले दंड, पोटऱ्या, इ० प्रत्येक. ४ दंड, पोटरी, इ० वर बुक्की मारली असतां कांहीं वेळ उठतो तो गट्टू. [गोटा.

पिंडा [सं० पिंड] **पु०** सुताचा गुंडा किं०

पिंडी [सं० पिंडि, पिंडी] **स्त्री०** १ गोळा; गोटा. २ पोटरी. ३ आलेल्या डोळ्यांना लावावयाचीं औषधें फडक्यांत बांधून त्यांची केलेली असते ती पुर्चुंडी. ४ शंकराचें पूजेसाठीं केलेलें लिंग. ५ कुंभाराच्या चाकावर ठेविलेला मातीचा लध्या,–ज्याला चाक फिरवून मडकें इ० चा आकारविशेष द्यावयाचा असतो. ॐ **पिंडीशूर पु०** शेंदाड शिपायी. [चौरंग.

पिढळें [म० पिढें] **न०** लहानसा पाट किं०

पिढी [सं० पीठ=पाया, तळ] **स्त्री०** १वंशाची जी परंपरा तींतील एक एक पुरुष किं० एका एका पुरुषाचें कालमान: उ० आमच्या कुटुंबांत सात पिढ्या भिक्षुकीवर चरितार्थ चालला आहे. २ तीस वर्षांचा कालावधि. ॐ **पिढीचा वि०** पूर्वजांचे गुण, दोष, विद्वत्ता, संपत्ति, स्वभाव, इ० ज्याचे ठायीं विद्यमान आहेत असा; उ० हा पिढीचा श्रीमंत, रोगी, विद्वान्, गवई, इ० आहे. **पिढीला लाथा मारणारा** १ पूर्वपरंपरेला झुगारून देणारा. २ व्याज तर देत नाहींच पण जो मुद्दलही देत नाहीं असा (ऋणको). **पिढी लागणें** दोन कुटुंबें एकमेकांना मुली देणें किं० घेणें अशा अनेक पिढ्यांच्या संबंधानें जुळलेलीं असणें. **पिढी तोडणें** एका पुरुषापासून उत्पन्न झालेल्या पुरुषांच्या वेगळ्या वेगळ्या शाखा किं० कुटुंबें यांनीं आपण भिन्न आहों (म्ह० सोयर सुतक पाळणारें नव्हत) असें ठरविणें. हें सात पिढ्यानंतर केलें जातें. **पिढीजाद, पिढीजादा, पिढीनदाज** [म० पिढी+फा० ज्यादाह् (जन्मलेला)] **वि०** १ कुलीन. २ पिढीचा. वर ' पिढीचा ' पहा.

पिढीदरपिढी, पिढीपेरतर क्रि० वि० वंशपरंपरेनें; वंशपरंपरेच्या क्रमानें.

पिढें [सं० पीठ] **न०** १ लाकडाचा लहानसा पाट. २ भात भरडावयाच्या घिरटाखालीं जे तीन ठोकळे घालतात ते प्रत्येक. ३ खांबाच्या माथ्यावर तुळईच्या खालीं जो लाकडाचा ठोकळा शोभेसाठीं किं० खांबाची उंची वाढविण्यासाठीं घालतात तो. ४ गाडीच्या चौकटीच्या पुढच्या बाजूस जें लाकूड बांधलेलें असतें तें. ५ खांबाखालीं घालतात ती उथळी. ६ सूत काढावयाच्या चरखयाखालीं बसविलेलें असतें तें लाकूड.

पिणीचा [म० पिणें] **वि०** १ मातेच्या दुधावर वाढलेलें (मूल, वासरूं). २ मातेचें दूध भरपूर मिळाल्यामुळें लठ्ठ आणि गोटीदार झालेलें (मूल, वासरूं).

पिणें [सं० पा, पिब्] **स० क्रि०** १ प्राशन करणें. २ दारू पिणें. ३ (गुडगुडी, चिलीम, इ० च्या धुराचें) सेवन करणें. ४ (लाकूड, कपडा, इ० नीं) तेल, पाणी, इ० शोषून घेणें किं० आपल्या घटक परमाणूंत ओढून घेणें. ५(बंदुकीनें ठासलेल्या दारूचा) बार न करणें. ६ अपमान, राग, इ० मनांत चेपून टाकणें. **टीप,**–ह्या अर्थीं ' गिळणें ' ह्याचाही उपयोग केला जातो.

पितर [सं० ' पितृ ' चें अ० व० पितरः] **पु०** अग्निष्वात्तादिक शास्त्रप्रसिद्ध देवता. **पितर पु० अ० व०, पितरें न० अ० व०** श्राद्धविधीनें ज्यांना पिंडोदक दिलें पाहिजे असे आपले नातलग. ॐ **कोणेकाचे पितर उद्धरणें, कोणेकाचीं पितरें उद्धरणें, कोणेकाचे पितर** (किं० **कोणेकाचीं पितरें**) **स्वर्गावर नेणें** त्याला आईबापावरून शिव्या देणें. **पितरखस्ता स्त्री०** १श्राद्धाची खटपट. २ कोणत्याही कामानिमित्त सोसावे लागतात ते कष्ट. **पितरलंड वि०** मृत नातलगांचीं श्राद्धादि कर्मे न करणारा. **पितरपक्ष, पितरपाख, पितरपाट** (–टा, –ठा, –ठ) **पु०** भाद्रपद महिन्याचा कृष्णपक्ष (अशिक्षितांचा शब्द). **काल मेला आणि**

आजा पितर झाला मानाला पात्र नसतां ज्याला मान द्यावा लागतो असा. **पितरें न० अ० व०** भाद्रपद महिन्याच्या कृष्णपक्षांत एकाद्या कुटुंबांत करावीं लागतात तीं श्राद्धें.

पितळ [**सं०** पित्तल] **न०** एक धातु,–ज्याचीं भांडीं इ० पदार्थ घडवितात. ॐ **पितळ बाहेर पडणें** (**किं० निघणें किं० दिसणें**) १ दागिना इ० पदार्थांच्या वरील मुलामा किं० पत्रा झिजून आंतील पितळ दृष्टीस पडूं लागणें. २कोणेकाचें मानभावी प्रेम किं० उपकारबुद्धि खोटी आहे असें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊन त्याचा नीचपणा प्रकट होणें. **पितळपान न०** पितळ धातूचा पातळ पत्रा किं० वर्ख.

पितळा [**सं०** पित्त] **वि०** पित्त प्रकृतीचा.

पितळी [**म०** पितळ] **स्त्री०** पितळ ह्या धातूचा लहान थाळा. **वि०** पितळ धातूचा बनविलेला किं० घडविलेला (दागिना, इ० पदार्थ).

पिता [**सं०** ' पितृ ' चें प्रथमेचें **ए० व०**] **पुं०** बाप. ॐ **यो वै पिता स वै पुत्रः** जो बाप तोच पुत्राच्या रूपानें पुन्हा जन्मलेला असतो.

पितांबर [**सं०** पीत+अंबर; किं० पट्ट+अंबर] **पु०** रेशमी वस्त्र,–सोंवळ्यांत नेसावयाचें. ॐ **पितांबरी, पामरी स्त्री०** १हलक्या दर्जाचा पितांबर.२मुलांना नेसावयाजोगा लहान पितांबर.

पितांबी [**सं०** पित्त] **स्त्री०** पित्त अतिशय झाल्यामुळें अंगावर उठते ती गांठ किं० गांध.

पितामह [**सं०**] **पु०** बापाचा बाप.

पितामही [**सं०**] **स्त्री०** बापाची आई.

पितृ [**सं०**] **पु०** बाप. पुढील सामासिक शब्दांत ' पितृ ' शब्द येतो. ॐ **पितृऋण, पितृण न०** १ बापाचें आपण फेडावयाचें ऋण,–श्राद्ध करून. २ पुत्र उत्पन्न करून पितरांचें फेडावयाचें ऋण,–त्यांना पिंडोदक मिळण्यासाठीं. दुसरीं दोन ऋणें ' देवाचें ऋण ',–जें यज्ञादि कर्में करून फेडावयाचें असतें आणि ' ऋषींचें ऋण ' जें वेदाध्ययनानें फेडावयाचें असतें. **पितृकर्म न०** श्राद्ध, तर्पण, इ० विधि. **पितृकानन न०** स्मशान. **पितृतर्पण न०** १ पितरांना दान. २ पूर्वजांना पाणी देणें. ३ आंगठा आणि तर्जनी यांच्यामधील भाग. **पितृतिथि स्त्री०, पितृदिन न०** १ अमावास्या. २ पितृश्राद्धतिथि. **पितृगया स्त्री०** गया येथें केलेला श्राद्ध विधी. **पितृत्रय न०** बाप, आजा, आणि पणजा. **पितृदैवत न०**मघा. **पितृदान न०** श्राद्ध इ० पितृकार्य. **पितृदिशा स्त्री०** दक्षिण दिशा. **पितृदैवत्य न०** श्राद्ध. **पितृद्रव्य न०** वडिलोपार्जित मिळकत. **पितृपति, पितृराज पु०** यम. **पितृपैतामह वि०** वडिलोपार्जित; वाडवडिलांपासून चालत आलेला. **पितृवन, पितृस्थान न०** १ स्मशान.२ यमलोक.

पितृव्य [**सं०**] **पु०** बापाचा भाऊ.

पित्त [**सं०**] **न०** १ प्राण्याच्या शरीरांत एक पातळ पदार्थ आहे तो,–जो योग्य प्रमाणापेक्षा कमी किं० अधिक झाल्यास शरीरांत कांहीं रोग उत्पन्न होतो. २ (**लक्षणेनें**) क्रोधाची लहर. ॐ **एकाद्याचें पित्त उसळणें** (किं० **खवळणें** किं० **चढणें**) त्याला एकदम रागाची लहर येणें. **उरांत पित्ताची ज्योत भरणें** छातींत जळजळ होणें. **घशांत पित्ताची ज्योत भरणें** घसा जळजळणें.**एकाद्याला पित्तानें जळजळणें** (किं० **पित्तानें उचमळणें**) छातींत किं० घशांत पित्तामुळें आग होत आहे अशी त्याला भावना होणें. **टीप,**–येथें ' जळजळणें ' आणि ' उचमळणें ' हीं भावकर्तृक क्रियापदें आहेत. **कोणेकाचें पित्त तापविणें** त्याला राग येईल असें भाषण करणें. **पित्तपापडा पु०, पित्तपत्र न०** एक पित्तनाशक औषधी. **पित्तज्वर पु०** शरीरांत पित्त फार झाल्यामुळें येतो तो ताप. **पित्तवेगी वि०** ज्याला झटक्यासरशीं राग येतो असा. **पित्ताळू वि०** १ ज्याचें पित्त क्षुल्लक कारणानें वाढून आजार येतो असा. २ ज्याच्या भक्षणानें शरीरांतील पित्त वाढतें असा (खाद्य किं०पेय पदार्थ).

पित्त्या [**सं०** पितृ; **म०** पिता] **पु०** १ एखाद्या खेळांत एकाद्या बाजूकडे एकादा गडी कमी असल्यास कल्पित गडी जो घेतात तो. २ कोणेकाचा आज्ञांकित किं० अर्ध्या वचनांत राहाणारा जो मनुष्य तो.३ कोणेकाचा बगलबच्चा.

पिधान [**सं०**] **न०**१ आच्छादन. २झांकण. ३ तरवार इ० चें म्यान किं० कवच.

पिनास, पिनस [सं० पीनस] **पु०** नाकांत होतो तो एक रोगविशेष.

पिंपरणी, पिंपरी स्त्री० एक वृक्षविशेष.

पिंपर, पिंपरूं, पिंपरें न० पिंपळाचें फळ. ※ **कोणेकाला पिंपरासारखा आपटणें** त्याच्या शरीराची मोटली उचलून ती जमीनीवर जोरानें आपटणें.

पिंपळ [सं० पिप्पल] **पु०** एक वृक्ष. **न०** पिंपळाचें फळ. ※ **पिंपळास पार बांधणें** १ कोणा गरीबाचें आपल्या खर्चानें लग्न करून देणें. २ कोणतेंही परोपकाराचें किं० सार्वजनिक हिताचें कृत्य करणें. **पिंपळपान, पिंपळवा** (–व–) **न न०** पिंपळाच्या पानाच्या आकाराचा एक दागिना,–जो मुलाच्या किं० घोड्याच्या कपाळावर शोभेसाठीं घालतात. **पिंपळवासी वि०** अंधाऱ्या रात्रीं निबिड अरण्यांतसुद्धां फिरावयाची ज्याला भीति वाटत नाहीं असा; को॰त्याही प्रकारचीं अघोरीं कर्में करणारा. **पिंपळावरचा मुंजा** किं० **बारा पिंपळावरचा मुंजा पु०** एके ठिकाणीं स्थिर न बसतां सदा हिंडत असणारा माणूस,–जो अमुक वेळीं अमुक ठिकाणीं असेल अशी खात्री सांगतां येत नाहीं. **पिंपळाचें फूल न०** जो वारंवार येत नाहीं किं० दिसत नाहीं असा मनुष्य; क्वचित् प्रसंगीं भेटणारा माणूस.

पिंपळा, पिंपिळा पु० केळीचीं पानें कापावयाचें एक हत्यार.

पिंपळी [सं० पिप्पली] **स्त्री०** १ एक औषधोपयोगी फळ किं० त्याची वेल. २ पानवेलीची शेंग. ३ दोरीचा एक पदर हातांत घट्ट धरून दुसरा पदर ह्या पदरावरून सरकाविला असतां त्या पदराभोंवतीं जें लांब वेटोळें होतें तें. ४ खूप पिळ भरलेलीं दोरी किं० सूत यांचीं दोन्हीं टोकें ताठ ओढलीं गेलीं नसल्यास त्यांना पडते ती मोड किं० ती वळ. ५ बायकांच्या नथेंमधील किं० कानांतील बुगडी इ० मधलि लोंबतें मोतीं.

पिंपाणी, पिंपारी, पिंपोणी, पिपाणी स्त्री० १ सनई, सूर, इ० वायुवाद्यांस ताडपत्रादियुक्त जी तांब्याची बारीक नळी लावितात ती. २ नारळीची पात, केळीच्या पानाची चिंधी, इ० ची वळकटी मुलें तोंडानें फुंकून वाजवावयासाठीं करतात ती. [तहान.

पिपासा [सं०] **स्त्री०** पिण्याची इच्छा;

पिपासु [सं०] **वि०** पिण्याची इच्छा करणारा; तान्हेला.

पिंपिळा स्त्री० वर ' पिंपळा ' पहा.

पिपीलिका [सं०] **स्त्री०** मुंगी. ※ **पिपीलिकामार्ग पु०** (**योगांत**) १ समाधि लावण्याची संथपणाची रीति. याच्या व्यावर्तकत्वें विहंगममार्ग. २ संथपणानें चालविलेलें इंद्रियदमन. ३ कोणतेंही काम अतिशय धीमेपणानें करण्याचा प्रकार.

पिंपोणी स्त्री० वर ' पिंपाणी ' पहा.

पियाल [सं०] **पु०** चार नांवाची वनस्पति.

पिरकणें अ० क्रि० फर्र असा आवाज होऊन (कोंबड्याच्या)गुदद्वारें अगदीं थोडा मळ बाहेर येणें.

पिरंगणें अ० क्रि० १ मुलानें पिरपिरणें किं० रडणें. २ याचकानें दीन स्वरानें भिक्षा मागणें.

पिरग(–गा–)ळणें स० क्रि० पिळवटणें.

पिरगळा, पिरगाळा [म० पिरग (–गा–) ळणें] **पु०** १ मुरगाळण्याची क्रिया. २ जें मुरगाळलें तें. ३ मुरगाळून होते ती नासाडी.

पिरगा पु० बुरीच्या जाळ्याला लोंबत सोडलेला असतो दगडाच्या रूपाचा नांगर तो.

पिरंगा वि० सदासर्वदा पिरपीर करण्याच्या स्वभावाचा.

पिरपिर स्त्री० १ असंतुष्टपणाची चरफड. २ भिकाऱ्याची याचना. ३ बारीकबारीक थेंबांचा पुष्कळ वेळ चाललेला पावसाचा वर्षाव.

पिरपिरणें अ० क्रि० १ चरफडणें. २ (भिकाऱ्यानें) भिक्षेसाठीं कटकट चालविणें.

पिरसा पु० काटक्याकुटक्या, गवत, पानें, इ० ची आगटी; परसा.

पिरसुपी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

पिलूं न० लहान मूल, बच्चा (प्रेमाचा शब्द). ※ **एकाद्याच्या मागें पिलूं लावणें** त्याला अप्रिय असें कांहीं काम त्याला करावयाला सांगणें किं० लावणें.

पिलंडा पु० दोरा, सूत, नाडी, इ० चा गुंडाळा.

पिलपील स्त्री॰ कंगोरा पाडावयाचें सुताराचें रंध्यासारखें एक आउत.

पिलूं, पिलें, पिल्लूं न॰, पिलवा, पिलां पु॰ कोणत्याही प्राण्याचा बच्चा.

पिवडी स्त्री॰ पिवळ्या रंगाची एक प्रकारची माती.

पिवळ पु॰ एक पक्षिविशेष.

पिवळा वि॰ हळदीच्या रंगाचा. **टीप,–** ह्याच्या पुढें ' चटक, ' ' जरद, ' ' धमक, ' ' धमधमीत, ' ' रसरशीत, ' हे शब्द पिवळ्या रंगाचा गडदपणा दाखविण्यासाठीं योजतात. ※ **पिवळोखी स्त्री॰** पिवळ्या रंगाची छटा (येणें, चढणें).

पिवा [**सं॰** पीव=लठ्ठ] **वि॰** लठ्ठ, गुटगुटीत (मूल, पशु, इ॰).

पिशवाज (–त,–द) [**फा॰**] **पु॰** नर्तकी स्त्रियांचा झगा.

पिशवी स्त्री॰ आंत पदार्थ भरावयासाठीं किं॰ ठेवावयासाठीं कागद, कातडें, वस्त्र, इ॰च्या कडा शिवून एक तोंड उघडें ठेवून करतात तें बारदान.

पिशाच [**सं॰**] **पु॰** भूत, ब्रह्मराक्षस, इ॰. ※**पिशाचभाषा स्त्री॰**संस्कृत भाषेचें एक अपभ्रष्ट रूप; पैशाची. **पिशाचपक्वान्न न॰** १ वडा. २ कडबोळें. **पिशाचलिपि, पिशाचलिप्त, पिशाचलीप स्त्री॰** मोडी लिपि,–जी हेमाडपंतानें लंकेंतून आणली अशी समजूत आहे. **पिशाचाधिपति पु॰** १ लहान मुलांत खेळणारा मोठा माणूस. २ उग्र किं॰ तापट स्वभावाचा माणूस. **पिशाची स्त्री॰**१ स्त्री पिशाच. २कुरूप स्त्री. **पिशानदेवरू** [**कानडी** पिशाच+देवरू (देव)], **पिशानवल्ली पु॰** वेडसर माणूस.

पिशाल पु॰ पिसा नांवाचें झाड.

पिशी स्त्री॰ जोंधळे, सजगुरे, इ॰ चें धान्यरहित कणीस.

पिशी [**म॰**' पिसा ' चें **स्त्री॰**] **वि॰** वेडी.

पिशुन [**सं॰**] **पु॰** १ चहाडखोर माणूस. २ दुष्ट किं॰ नीच माणूस. ३कळलाव्या; आगलाव्या.

पिशेल [**म॰** पिसा+तेल] **न॰** पिसा नांवाच्या झाडाच्या बीजांचें तेल.

पिष्ट [**सं॰**] **वि॰** मळलेलें, तिंबलेलें (पीठ). **न॰** १पीठ. २पीठ आणि पाणी यांचें मिश्रण. ३चूर्ण. ※ **पिष्टपेष पु॰, पिष्टपेषण न॰** १ दळलेलें पुन्हा दळणें (शब्दशः). २ (**लाक्षणिक**) व्यर्थ पुनरुक्ति; चर्वितचर्वण. **पिष्टमेह पु॰** पिठाच्या रंगाची लघवी ज्यांत होते असा मूत्ररोग.

पिसटणें, पिसाटणें [**म॰** पिसा=वेडा] **अ॰ क्रि॰** १ वेड्यासारखें वर्तन करूं लागणें. २पिशाचबाधेनें विकृत होणें.

पिसणावळ [**म॰** पिसणें] **स्त्री॰** दळण्याबद्दलची मजुरी.

पिसणें [**सं॰** पिष्=चूर्ण करणें] **स॰ क्रि॰** १ दळणें; चूर्णरूप करणें. २ (चंदन इ॰) उगाळणें. ३ पत्ते, गंजिफा, इ॰ वाटावयाच्या पूर्वी त्यांची पूर्वीची रचना बदलणें.

पिसवळा पु॰ १ दंश करणारा एक प्राणी. २ एक झाड.

पिसळणें, पिसाळणें [**म॰** पिसा=वेडा] **अ॰ क्रि॰** १वेडें होणें(कुत्रें इ॰). २ रागानें बेफाम होणें. ३ कुत्रा इ॰ चावल्यामुळें वेडें होणें. ४ अंगांत भूतसंचार झाल्यानें वेड्यासारखें बोलणें, वागणें, इ॰.

पिसा पु॰ एक वृक्षविशेष.

पिसा पु॰ हातोड्याचें टोक.

पिसा [**म॰** पिशाच] **वि॰**१ वेडा झालेला. २ वेड्यासारखें वर्तन करणारा. ३ रागानें बेफाम झालेला. **पिसें न॰** वेड (लागणें). ※ **पिसाट वि॰** वेडा झालेला. **न॰** १ मृत मनुष्याचा आत्मा जो पिशाच रूपानें भूतलावर संचरतो तो. २ वेड्यासारखें वर्तन करणारा मनुष्य. ३ वेड (लागणें).

पिसाटणें [**स॰** पिसा] **अ॰ क्रि॰** १ वेडें होणें. २ वेड्यासारख्या चेष्टा करूं लागणें. ३ पिशाचबाधेनें उपद्रुत होणें.

पिसाटीक [**म॰** पिसा] **वि॰** १ वेडा; वेड्यासारखें वर्तन करणारा. २ खोडकर; उपद्रवी; व्रात्य.

पिसाब, पिसाप [**फा॰** पेष् (पुढें)+आब् (पाणी)] **पु॰** लघवी; मूत्र (करणें).

पिसारणें [**म॰** पिसारा] **स॰ क्रि॰**१मांजरानें (शेपटींचे) केश ताठ करून (ती) जाडी करणें. २ पक्ष्यानें (पंख) ताठ करणें.

पिसारा [**म॰** पीस] **पु॰** १ पक्ष्याचें पीस.

२पक्ष्याचीं पिसें समुच्चयानें,–विशेषतः पसरलेल्या स्थितींत. ३ धान्याचें अपूर्ण पोसलेलें कणीस.

पिसाळणें मागें ' पिसळणें ' पहा.

पिसाळणें [**म०** पिसा] **न०** १ वेड. २ अंगांत झालेला पिशाचसंचार.

पिसुडणें [**म०** पीस] **स० क्रि०** १ (केश, पंख, फांदीचीं पानें, फुलाच्या पाकळ्या) उपटणें किं० तोडणें. २ (पदार्थ) मोडून तोडून टाकणें.

पिसुंडी स्त्री०वाल्यदशेंतील माडाची झावळी.

पिसुरडें न० सर्पासारखा एक प्राणी.

पिसू [**हिं०**] **स्त्री०** उवेसारखा एक सपक्ष कृमि.

पिसूक न० मंत्रानें किं०कांहीं शापानें कुत्रा, कोल्हा, वाघ, इ०चें रूप पावलेला मनुष्य.

पिसें [**म०** पिशाच; **सं०** पिशाच] **न०** १ वेड (लागणें). २ रागाची लहर (येणें, भरणें).

पिसोंड्या, पिसुंड्या, पिचुंड्या स्त्री० अ० व०, पिसोंडे, पिसुंडे पु०अ० व० पाठीचे मागें बाहु वळवून बांधणें. [स्पाति.

पिसोळा पु० १ एक क्षुद्र जंतु. २ एक वन-

पिस्ता [**फा०** पिस्ताह्] **पु०** एका वृक्षाचें फळ,–जें बदामासारखें असतें. ❀ **पिस्ताई वि०** काळसर हिरवा. [झगा.

पिस्वाद, पेशवाज पु० नर्तकी स्त्रियांचा

पिहा [**सं०** प्लीहन्=पानथरी किं० कौलूं] **स्त्री०** १ पानथरी. २ कौलूं.

पिहू क्रि० वि० कोकिळेप्रमाणें (ओरडणें).

पिहू, पियो पु० स्त्रीचा प्रिय पुरुष; जार.

पिळकणें अ० क्रि० जोरानें आणि आवाज करून गुदद्वारें मळ बाहेर पडणें ह्या विकृतीनें उपद्रुत होणें.

पिळकवणें न० दोरीचें बंधन घट्ट करावयासाठीं तिच्या दोन पदरांत घालून पिळावयाची काठी.

पिळकी स्त्री० १ एकसारखें आणि थोडेंथोडें हगत राहाण्याची विकृति. २ घाबरलेल्या मनुष्याच्या गुदद्वारें होतें तें मलविसर्जन.

पिळगुटणें [**म०** पिळणें] **स० क्रि०** पिळवटणें; मुरगाळणें.

पिळणें [**स०** पीड्=पिळणें] **स० क्रि०** १ पीळ घालून वळविणें; वाटोळा फिरवून (कांहीं पदार्थ) घट्ट करणें किं० घट्ट बसविणें. २ रस, पाणी, पू, लस, इ० बाहेर काढण्यासाठीं (फळ, गळूं, चिरगूट, इ०) पीळ घालून चेपणें किं० दाबणें.

पिळपिळीत वि० १ सईल (दोरी). २ विरळ विणीचें (वस्त्र). ३ नीरस (भाषण). ४ कमजोर किं०खात्री न करून देणारें (मुद्दे इ०).

पिळवट [**म०** पीळ] **वि०** घट्ट पीळ घातलेली (दोरी).

पिळवटणें स० क्रि० मुरगाळणें; (दोरी,बाहू, फांदी, इ०) पिळानें युक्त करणें; जोरानें वाटोळें वळविणें.

पिळा [**म०** पिळणें] **पु०** १ ज्यांतून पाणी पिळून काढलें आहे असें चिरगूट. २ पिशाचाचा उपद्रव किं० वायु ह्यांच्या योगानें पिळवटलेलें शरीर (होणें).

पिळें न० कापूस, काथ्या, इ०चें ओबडधोबड वळकटी.

पिळें स्त्री० मागें ' पिळकवणें ' पहा.

पी पुढें ' प्लीहा' पहा.

पीक [**सं०**पिक] **पु०** मागें ' पिक ' पहा.

पीक, पिंक, पिंकी स्त्री० तोंडांतून जोरानें टाकलेली थुंकी किं० चूळ. ❀ **पिकदाणी स्त्री०** ज्यांत थुंकावयाचें तें पात्र.

पीक [**सं०** पक्व] **न०** शेत, मळा, इ०मध्यें धान्य, फळें, भाज्या, इ० जें उत्पन्न होतें तें. ❀ **जमीनीनें पीक सोडणें** जमीनींतील सत्त्वांश नाहींसा झाल्यामुळें धान्य इ० कमी पिकूं लागणें. **पीकपाणी न० ए० व०** शेतांत पिकलेलें धान्य, पाण्याचा पुरवठा, इ० चा समुच्चय.

पीठ [**सं०** पिष्ट] **न०** १ जोंधळा, बाजरी, इ० चें चूर्ण,–ज्याची भाकरी इ० खाद्य पदार्थ करतात. २ कोणत्याही पदार्थांचें चूर्ण. ३ (**लाक्षणिक**)पदार्थाचा पूर्ण विध्वंस किं० नासाडी. ❀ **पिठासारखें गोरापीठ वि०** अतिशय गोरा. **पिठासारखें चांदणें न०** पांढरें धवधवीत चांदणें.

पीठ [**सं०**] **न०** १ आसन,–पाट, खुर्ची, चौरंग, इ०. २ दर्भासन. ३ देवाचें सिंहासन. ४

पाया, तळ, बूड. ५ देव्हारा. ६ मोठ्या दर्जाचें स्थान; अधिकाराचें स्थान. ७जेथें विद्वान,शास्त्री, इ० नामांकित लोक राहतात असा गांव इ०. ८ जेथें विद्वान लोक उद्देशपूर्वक कांहीं कार्यासाठीं एकत्रित केलेले असतात तें स्थळ किं० ती संस्था. ❀ **विद्यापीठ न०** जेथें विद्यार्थ्यांना विद्या,शास्त्रें, कला, इ० शिकविण्यांत येतात, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यांत येतात, विद्वानांना पारितोषिकें दिलीं जातात, अशी संस्था.

पीठिका [**सं०**] **स्त्री०** १ आसन. २ पाया. ३ ग्रंथाचा भाग.४शास्त्र, कला, इ० ची पूर्वपरंपरा किं० इतिहास. ❀ **पूर्वपीठिका स्त्री०** १ पूर्वीच्या गोष्टींची माहिती किं० इतिहास. २ उगमाची माहिती किं० इतिहास. २ उगमाची किं० आरंभाची माहिती.

पीडणें [**सं०** पीड्] **स० क्रि०** उपद्रविणें; गांजणें; सतावणें; छळणें.

पीडन [**सं०**] **न०** पीडण्याचा व्यापार.

पीडा [**सं०**] **स्त्री०** १ दुःख; त्रास. २ छळ; गांजणूक. ३ (**लाक्षणिक**) त्रासदायक माणूस किं० काम. ४ आजार, रोग.

पीण [**म०** पिणें] **स्त्री०** १ तान्ह्या मुलानें मातेचें केलेलें स्तनपान. २ तान्ह्याला चोखून मिळालेलें दूध.

पीत [**सं०** पीत=पिवळा] **वि०** पिवळ्या रंगाचा. **न०** पुष्पराग रत्न. ❀ **पीतांबर पु०** सोवळ्यांत नेसावयाचें उंची रेशमी वस्त्र. **टीप,**— पट्टांबर असाही अपभ्रष्ट शब्द म्हणतां येईल.

पीन [**सं०**] **न०** लठ्ठ; धष्टपुष्ट; गुटगुटीत.

पीनस, पिनास [**सं०** पीनस] **पु०** नाकाला होतो तो एक रोग.

पीप [**पोर्च्युगीझ**) **न०** पाणी इ० भरणें इ० उपयोगाचें लाकडाच्या फळ्यांचें बनविलेलें बारदान.

पीयूष [**सं०**] **न०** १ अमृत. २ व्यालेल्या गायीचें सात दिवसांपर्यंतचें दूध.

पीर [**फा०**] **पु०**१ मुसलमान साधु पुरुष (मेल्यावर देवत्व पावलेला). २ (**लाक्षणिक**) अधिक बलवान माणूस; नक्षा उतरणारा माणूस; उ० त्याला पीर भेटला म्हणजे तो दबेल.

पील न० कुत्रीं, मांजरें, ससे, इ० चे बच्चे प्रत्येक. **पु०** कोंबडी, राघू, कावळे, इ०चे बच्चे प्रत्येक. **पु०, न०** केळ, बांबू, इ० चे कोंवळे अंकुर.

पील [**फा०** फील्=हत्ती] **पु०** हत्ती. ❀ **पीलखाना पु०** राजा किं० कोणी श्रीमंत माणूस यांची हत्ती बांधावयाची जागा; गजशाला.

पीलु [**सं०**] **पु०**.१ परमाणु; २हत्ती.टीप,— हे दोन्ही अर्थ संस्कृतांतच आहेत. ❀ **पीलुपाकवादी पु०** उष्णतेचें कार्य पदार्थांच्या परमाणूंवर होतें असें मत प्रतिपादणारा; वैशेषिक मताचा अभिमानी. **पीलभक्ति स्त्री०** खोटी आस्था. **पीलभक्त वि०** खोटा मित्र.

पीस [**सं०** पिच्छ] **न०** १ पक्ष्याचा पंख किं० पंखांतील एक एक अवयव किं० घटक भाग. २ मोराच्या पिसाऱ्यांतील एक एक चित्रविचित्र अवयव किं० घटक भाग. ३ बाणाला लावलेलें पक्ष्याचें पीस. ४ पक्ष्याचें शेपूट. **स्त्री०, न०**भातशेतावर पडतो तो एक रोग.❀**पिसाचा कावळा करणें** क्षुल्लक गोष्टीचें महत्त्व वाढविणें; अत्यल्प वस्तूला भयंकर स्वरूप देणें; कांगावा करणें. मागें ' पर ' मध्यें ' पराचा कावळा करणें ' पहा.

पीस न० पिसू,—एक क्षुद्र कीट.

पीळ [**म०** पिळणें] **पु०** १ सूत, दोरी, इ० चें एक टोक धरून दुसऱ्या टोकाला आसाभोंवतीं अनेक वार वळविल्यानें त्या सूत, दोरी, इ०मध्यें उत्पन्न होतो तो पालट किं० तो संस्कार. २ अंगांतील अभिमान, ताठा, किं० हट्ट. ३ प्रेमादि भावनांनीं अंतःकरणांत उत्पन्न होतो तो कळवळा. ४ स्नेह, मैत्री, इ० मध्यें कांहीं कारणानें उत्पन्न होतें तें शैथिल्य (पडणें). ❀ **पीळदार वि०** १ जिला पुष्कळ पीळ आहे अशी (दोरी इ०). २ बाणेदार; अभिमानी; हट्टी; गर्विष्ट (माणूस, स्वभाव). **सुंभ जळतें पण पीळ जळत नाहीं** हट्टी मनुष्याचें हट्टामुळें नुकसान झालें तरी त्याचा हट्ट गळत नाहीं.

पुई स्त्री० १ लहानसा फोड; पुटकुळी. २ पुढें ' पोये ' पहा.

पुकार, पुकारणी स्त्री०, पुकार पु० [**म०** पुकारणें; **हिं०** पुकार्ना]१हकाटी; आरडाओरडा.

२ (कांहीं गोष्ट) जाहीर करणें किं० मोठ्यानें ओरडून सर्वांस कळविणें. ३ जाहीर करणें.

पुकारणें [हिं० पुकार्ना] **स० क्रि०** १ मोठमोठ्यानें ओरडून (कांहीं गोष्ट)जाहीर करणें. २ (कोणेकाला) मोठ्यानें ओरडून हाक मारणें.

पुंख [**सं०**] **पु०** १ बाणाचें मूळ. २बाणाचा पीस लाविलेला बुडखा.

पुख्खा [**म०**पुष्कळ+खाणें] **पु०**दुसऱ्याच्या घरीं फुकट मिळविलेलें आकंठ भोजन(झोडणें). ꙮ **पुख्खानंद पु०** चमचमीत भोजनें झोडण्यांत ज्याला आनंद असा.

पुंगट वि० कुबट (घाण, वास).

पुंगळ,पिंगूळ पु०कुबट घाण सोडणारें झुरळ. ꙮ **पुंगळ वेल (–ली) स्त्री०** एक लता.

पुंगी स्त्री० १ मुखानें वाजवावयाचें गारोडी इ०चें एक वाद्य. २ मुलें पान इ०चीं करतात ती पिपाणी. ꙮ **गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली** झाल्यास फायदा होईल नाहीं तर तोटा तरी खास होणार नाहीं. **टीप,–**' खाल्ली ' म्ह० खातां येतें. **एकाद्याची पुंगी बंद करणें** १ त्याला स्तब्ध बसविणें. २ त्याच्या बढाईखोरपणाच्या हालचालीं बंद करणें. ३ तो ज्याच्या जोरावर उड्या मारीत आहे तेंच त्याचेपासून हिरावून घेऊन त्याला निर्बल आणि निर्वीर्य करणें.

पुचट, पुचाट, पोचट वि० १ चिंबलेला. २ निर्वीर्य; निर्बल; भिकार; कर्तृत्वशून्य.

पुच्छ [**सं०**] **न०** शेपुट; शेपटीं.ꙮ**खर्चाला (किं० कामाला) पुच्छ फुटणें** तें पूर्वीच्या अटकळीपेक्षा वाढत जाणें.

पुंज [**सं०**] **पु०** १ समूह; ढीग; रास. २ खोत किं० धारेकरी यांणीं महार किं०गुरव यांना दिलेलें धान्य.

पुंजका [**सं०** पुंज] **पु०** रास; ढीग (केश, मुंग्या, जंत, पानें, इ०चा). [दाणा.

पुंजट, पुंजरट, पुंजरूट न०धान्यादींचा फोल

पूजणें, पुजणें [**सं०** पूज्] **स० क्रि०** गंध, फूल, इ० पदार्थांनीं देवें,ब्राम्हण,इ०ची संभावना करणें; अर्चिणें. ꙮ **लोकांची घरें पुजणें** (किं० **पूजणें**) १ लोकांच्या घरीं आपल्या कामासाठीं जाणें. २ आपला उद्योग टाकून लोकांच्या घरीं चकाट्या पिटावयास जाणें. **पात्रें** (किं० **पानें**) **पुजणें** खाद्य पदार्थ पानांवर थोडे थोडे वाढणें (निंदेंत प्रयोग).**कोणेक पदार्थ पुजून ठेवणें** त्याचा उपयोग किंवा उपभोग न घेतां तो तसाच जतन करून किं०राखून ठेवणें (निंदेंत प्रयोग).

पुजमाल [**फा०**] **पु०** घोड्याला खरारा करतेवेळीं किं० नाल ठोकतेवेळीं त्याच्या तोंडाच्या खालच्या जबड्याला बांधून मग शेपटीखालीं बांधलेली असते ती दोरी; ओठाळी.

पुंजा [**सं०** पुंज] **पु०** विशिष्ट लांबीच्या सुताचें गुंडाळें; उ० आठ पुंजे सुताचे दोन पंचें विणतां येतात. २ शेण, गू, इ० टाकाऊ किं० रद्दी पदार्थांचा ढीग.

पुजा, पूजा [**सं०** पूजा]**स्त्री०**१अर्चा; अर्चना. २देवांच्या मूर्ति,साधु पुरुष,इ०ना गंध फुलें इ०देऊन किं०वाहून त्यांचा केलेला सत्कार.३ **(लाक्षणिक)** किं०वाहून...शिवीगाळ;निर्भर्त्सना.४कोणाच्या अंगांत पिशाच-संचार झाला असतां पिशाचाच्या शांत्यर्थ शूद्र लोक करतात तो विधि. **कोणेकाची पूजा करणें** त्याची निर्भर्त्सना करणें;त्याला शिवीगाळ करणें; त्याची खरडपट्टी काढणें. **चांभाराच्या देवाला खेटराची पूजा** जशास तसें ह्या न्यायानें वागणें चांगलें; दुष्टाशीं दुष्टपणा करणें हेंच योग्य होय. आमचे ' म्हणीविषयीं चार शब्द ' पान ७० पहा.**एकाद्या देवाला पूजा बांधणें** गंध लावणें, फुलें वाहणें, दागिनें चढविणें, वस्त्र नेसविणें, इ० नीं देवाची मूर्ति सजविणें.

पुंजाणा [**सं०** पुंज] **पु०** केरकचऱ्याचा ढीग.

पुजारी [**सं०** पूजा] **पु०** देवाची पूजा कर- [णारा.

पुंजाविणें [**सं०** पुंज] **स० क्रि०** १ (विसकटलेले धान्याचे दाणे इ०) गोळा करणें किं० त्यांचा ढीग करणें. २ (दहन केलेल्या प्रेताची राख) गोळा करणें.

पुंजाळ [**सं०** पुंज] **पु०** रास,ढीग,समुच्चय.

पुंजी [**सं०** पुंज] **स्त्री०** १ रास, ढीग. २ पैशाचा पुरवठा. ३ (**लाक्षणिक**) अकलेचा जोर; हिकमत चालविण्याची ताकद. ४ सुताची अखंड केलेली असते ती सरोसर.

पुंजी [फा०पूजा] **स्त्री**०घोड्याच्या कपाळा-वर घालावयाचे वस्त्रादींचें गोंडे इ०.

पुट [**सं**०] **न**० १ घडी. २पोकळी;खळगा; पदार्थाचा खोलगट भाग. ३ पर्णपात्र,–द्रोण इ०. ४ उथळ भांडें. ५ (डोळ्याची) पापणी. ६ आच्छादन. ७ एकाद्या पदार्थावर दुसऱ्या पातळ पदार्थाचा लेप; लिंबाचा रस इ० मध्यें पदार्थ भिजविणें (देणें, करणें). ह्या अर्थी **ए० व०** ' पूट '. ॐ**पुटपाक पु**० (**वैद्यकांत**) सभोंवार पानें घालून वर माती लावून भाजणें.

पुटकळी, पुटकुळी [सं० स्फोट+कलिका] **स्त्री**० लहानसा फोड (त्वचेवर होतो तो).

पुटपुटणें अ० क्रि० दुसऱ्यास स्पष्ट न सम-जेल किं०स्पष्ट ऐकूं न जाईल अशा रीतीनें बोलणें, म्हणणें, पाठ करणें, इ०.

पुठा, पुठ्ठा [**सं**० पृष्ठ] **पु**० १ घोडा इ० प्राण्यांच्या शेपटीलगतचा पाठीचा भाग. २ (घोड्याची खरेदी करतांना) घोडा हा प्राणी. ३ जमाखर्चाची चोपडी, पोथी, शिवलेलें पुस्तक, इ०च्या रक्षणार्थ खालीं आणि वर जीं जाडीं आव-रणें घातलेली असतात तीं प्रत्येक. ४ सुटे कागद, भिन्न भिन्न वेळीं आलेली पत्रें,गहाणखतें,खरेदीखतें, इ० ठेवण्यासाठीं एकाला एक अशा जोडलेल्या दोन कवचांचें केलेलें बारदान. ५ हवापाण्याच्या किं० इतर बाबतींत सारखीं अशी जीं शेजारीं शेजारीं असलेलीं सात आठ गांवें तीं समुच्चयानें किं०त्यांचा प्रदेश किं०टापू.६विकावयाच्या अनेक पदार्थांचा एक संच किं० गठ्ठा किं० गट. ७ चाकाच्या परिघाचे जे पांच सहा घटक अवयव ते प्रत्येक. ८ (जराचा) गुंडा.

पुंड वि० १ द्वाड; आडदांड; खडिकर. २ लुटारू. ॐ **पुंडपाळ पु**० लुटारू किं० लुटारू टोळीचा नायक. **पुंडपाळगार पु**० लुटारू. **पुंडाई, पुंडायकी स्त्री**०, **पुंडायकें, पुंडावें, पुंडाव न**० १ द्वाडपणा.२लुटालूट.३ लुटारूपणा.

पुडका पु०, **पुडकें न**० कागद, पानें, पत्रें, इ० चा गठ्ठा.

पुंडा [**सं**० पुंड्र] **पु**० तांबडा ऊस. ह्याला ' पुंडा ऊस ' असेंही म्हणतात.

पुडा [**सं**० पुट] **पु**० १ साखर, पेढे, इ० कागद, पान, इ० मध्यें गुंडाळून होतो तो आकार. २ मृदंगादिकांचे पूड; उ० वाजता पुडा, धुमाचा पुडा. ३ कागद, पान, इ० चें गायदुमा-सारखें बारदान,–ज्यांत हलवा, साखर, इ० दुकानदार घालून गिऱ्हाइकास देतो.

पुंडा वि० पांढरा (बैल); पांढरी (गाय). ' पुंडी '' हें स्त्रीलिंगी रूप.

पुडी [**म**० ' पुडा ' चें लघुत्वदर्शक रूप] **स्त्री**० १ औषध, साखर, इ०कागद, पान,इ०मध्यें वेष्टन करून त्यांचा होतो तो आकार. २ कागद, पान, इ० चें गायदुमासारखें बारदान,–ज्यांत दुकानदार पदार्थ घालून गिऱ्हाइकाला देतो. ३ संन्याशाला भोजनार्थ केलेलें आमंत्रण; संन्या-शाला पाठविलेलें भोजन किं०कांहीं खाद्य.४अल्प भोजन. ५ परक्या ठिकाणाहून कोणी आण-लेली कांहीं गुप्त बातमी किं० खबर (आणणें, फुटणें, फोडणें, इ०).

पुंड्या, पुंड्याऊस पु० वर ' पुंडा, ' ' पुंडा ऊस ' पहा.

पुंड्र [**सं**०] **पु**० १ तांबडा ऊस. २ कस्तूर मोगरा. ३ गोपीचंदन, भस्म, चंदन, इ० चा टिळा.

पुढचा, पुढला, पुढील [**म**० पुढें] **वि**० १देश किं०काल ह्या बाबतींत नंतरचा; अग्रभागीं असलेला;नंतर होणारा किं०येणारा.२तोंडासमोर असलेला;तोंडाकडचा. ॐ**पुढल्यास ठेच मागला शहाणा** एकाला आलेली अडचण पाहून इतर लोक सावध होतात. **पुढचे दांत पु० अ० व**० मुलाला अगदीं प्रथम जे चार दांत येतात ते,– दोन खालचे आणि दोन वरचे. ॐ **पुढच्या जोताचा वि**० तल्लख, तरतरीत, हुशार (माणूस).

पुढवसा [**म**० पुढें] **पु**० दर्शनी भाग; पुढचा भाग.

पुढा [**म**० पुढें] **पु**० १ पुढचा भाग;दर्शनी भाग; तोंड; उ० दक्षिणेकडे पुढा करून बसूं नको. २ पुढचा प्रदेश; उ० माझ्या पुढ्यांतील भाकरी कुत्र्यानें पळविली.

पुढाईत, पुढाकारी, पुढारी [**म**० पुढें] **पु**० नेता; अग्रणी; म्होरक्या.

पुढाकार, पुढार, पुढारा पु०, पुढारकी स्त्री० [**म०** पुढें] १ अग्रेसरत्व; नेतृत्व. २ कांहीं कामाची पत्करलेली जबाबदारी.

पुढारणें [**म०** पुढें] **अ०क्रि०**१ पुढें सरणें.२ सुधारणें; प्रगति करणें.

पुढारां [**म०** पुढें] **क्रि० वि०** १ अगोदर. २ अग्रभागीं.

पुढें [**सं०** पुरस्] **क्रि० वि०, श० यो० अ०** १ अग्रभागीं; समोर. २ अगोदर. ॐ **पुढें पुढें करणें** १ लुडबुडणें.२खुशामत करणें.**कोणेकाच्या पुढें पुढें नाचणें**(किं०**करणें**) १ त्याची खुशामत करणें. २ त्याच्या कामांत लुडबुडणें.

पुढोसा [**म०** पुढें] **पु०** अग्रभाग; दर्शनी बाजू.

पुढ्यांत [**म०** पुढें; पुढा = अग्रभाग] **क्रि० वि०** १ अगोदर. २ समोर.

पुण्य [**सं०**] **वि०** १ पवित्र.२ शुभ. **न०** १ सद्गुण. २ सत्कृत्य ३ (**ज्योतिष**) जन्मलग्नापासून सातवें स्थान. ४ (**ज्योतिष**) मेष, तुला, कर्क, यांचा संघ. ॐ **पुण्याह न०** शुभदिन. **पुण्याहवाचन न०**विवाहादि मंगल संस्कारांतील प्रारंभींचें कर्म. **पुण्यकीर्ति वि०**प्रख्यात.**पुण्यजन पु०** १ राक्षस. २ यक्ष. **पुण्यजनेश्वर पु०** कुबेर. **पुण्यभूमि स्त्री०** आर्यावर्त; हिमालय आणि विंध्य यांच्या दरम्यानचा प्रदेश. **पुण्यलोक पु०** स्वर्गलोक. **पुण्यवान् वि०** भाग्यसंपन्न. **पुण्यश्लोक पु०** युधिष्ठिर, नल, आणि जनार्दन. **पुण्यश्लोका स्त्री०** १ द्रौपदी. २सीता. **पुण्यकाळ पु०** संक्रांति, ग्रहण, इ० पर्वकाळ. **पुण्यातिथि स्त्री०** १ संन्यासी मेला असतां बाराव्या दिवशीं किं० दरवर्षी मृततिथीस त्याचे पुत्र किं० शिष्य श्राद्धस्थानीं करतात तें कर्म. २ देशहिताचीं कामें ज्यानें केलीं आहेत त्याच्या स्मरणार्थ गरीबांना जेवूं घालणें किं० वस्त्र, धन, इ० देणें, ह्या रूपाचें देशांतील लोक कर्म करतात तें. **पुण्यक्षेत्र न०** जेथें वसति केल्यानें पुण्य लागतें असा गांव इ०:उ०काशी,वाई,नाशिक, इ० हीं पुण्यक्षेत्रें होत. **पुण्यपुरुष पु०** सच्छील माणूस. **पुण्यात्मा पु०** सदैव पुण्यकृत्यें करणारा; ज्याचें वर्तन, भाषण,किं०विचार,ह्यांत पापाचा लेश नाहीं असा माणूस. **पुण्याई स्त्री०** पुण्य केल्यानें प्राप्त होतें तें सामर्थ्य; पुण्याचा जोर. **पुण्याच्या पारीं** (किं० **पुण्यद्वारीं**) **बसणें, पुण्याचा पार बांधणें** पुण्यकारक कृत्यें सतत करीत राहाणें.

पुतणी स्त्री० १ (पुरुषाच्या) भावाची कन्या. २ (स्त्रीच्या) दिराची कन्या.

पुतण्या पु० (पुरुषाच्या) भावाचा पुत्र. २ (स्त्रीच्या) दिराचा पुत्र.

पुतळा [**सं०** पुत्तल] **पु०** १ माणूस, घोडा, इ० ची पाषाण, काष्ठ, धातु, इ० द्रव्यांची घडविलेली किं० ओतलेली मूर्ति. २ एकादा गुण मूर्तिमंत. ॐ **क्रौर्याचा पुतळा पु०** अत्यन्त क्रूर पुरुष. **औदार्याचा पुतळा पु०** अत्यन्त उदार पुरुष.

पुतळी [**सं०** पुत्तली] **स्त्री०**१ काष्ट,पाषाण, धातु, इ० ची केलेली किं० ओतलेली स्त्रीची मूर्ति. २ लहानशी बाहुली. ३ सुमारें चार रुपये किंमतीचें एक सोन्याचें नाणें. ४दागिन्यांत घालतात तो सोनें, चांदी, इ० चा नक्षीदार वाटोळा चपटा तुकडा. ५ (दसऱ्याच्या दिवशीं सोनें वाटतांना) आपट्याचें पान. ६ तरवारीचें अग्र. ७ घोड्याच्या खुराच्या खालच्या बाजूस जो मऊ शिंगासारखा पदार्थ असतो तो. ८ डोळ्यांतील बाहुली.

पुती [**सं०** पुत्र] **स्त्री०** १ पुत्रादि संतान. २ पुत्र. **टीप,**–समासानीं ' पुत्र असलेली ' असा ' पुती ' चा अर्थ होतो; उ० एकपुती म्ह० एक आहे पुत्र जिला; उ० सातपुती म्ह० सात आहेत पुत्र जिला; निंपुति म्ह० मुळींच पुत्र नाहीं जिला. ॐ **जाति तशी पुती खाण तशी माती** खाण ज्या गुणाची असेल ते गुण तिच्यांतील माती किं०दगड इ०मध्यें असावयाचे; कुटुंबांतील पूर्वज ज्या गुणांचे झाले तेच गुण पुढच्या संततींत उतरावयाचे.**एकपुती रडे, दुपुती रडे, सातपुती रडे,आणि निपुती रडे** सर्वच माणसें आपआपल्या स्थितींत असंतुष्ट असतात.

पुत्येण न० एक प्रकारचें गवत.

पुत्र [**सं०**] **पु०** १ मुलगा. २ बालक. ३ (**ज्योतिष**) जन्मलग्नापासून पंचम स्थान. ४

हिंदूंच्या धर्मशास्त्राप्रमाणें जे बारा प्रकारचे पुत्र गणिलेले आहेत त्यांपैकीं एक. ॐ **पुत्रेष्टि स्त्री०** पुत्रप्राप्तींसाठीं करावयाचा एक होम. **पुत्रैषणा स्त्री०**१मुलगा आपणास व्हावा ही इच्छा.२मुलावरचें प्रेम. **पुत्रपौत्रादिपरंपरा स्त्री०** पुढचे वंशज समुच्चयानें.**पुत्रावण न०**सोळा संस्कारांपैकीं एक,–जो जन्मलेल्या मुलाचें नाळ कापावयाच्या अगोदर करावयाचा असतो.

पुत्रवंती स्त्री० एक झाड; याच्या बीजांच्या माळा करतात.

पुत्रिका [**सं०**] **स्त्री०** १ कन्या, मुलगी. २ मुलीची खेळावयाची बाहुली. ३ लहानशी लाकूड इ० चीं मूर्ति.

पुत्री [**सं**] **स्त्री०** मुलगी.

पुंदडणें, पुदळणें स० क्रि० अव्यवस्थितपणें, क्रूरपणें,कठोरपणें माणूस, जनावर, पदार्थ, इ०चा उपयोग करणें किं० उपभोग घेणें.

पुदडा, पुदाडा, पुदाला (**–ळा**) [**म०** पुदड (–ळ–) णें] **पु०** अव्यवस्थितपणें, क्रूरपणें, दांडगेपणानें माणूस,जनावर, पदार्थ,इ०चा केलेला उपयोग किं० घेतलेला उपभोग (करणें).

पुदरट वि० अगदीं जीर्ण झालेलें (वस्त्र). ॐ **जुनें पुदरट वि०**जुनें आणि जीर्ण (वस्त्र).

पुदिना, पुदाना (–णा) [**फा०** पूदीनाह्] **पु०** उग्र वासाची एक वनस्पती; हिच्या पानांची चटणी करतात.

पुनः[**सं०**] **क्रि०वि०** १पुन्हा; दुसऱ्यांदा; दुसऱ्या खेपेस. २ परतून. ३ परंतु, तथापि. ४ शिवाय. ५ उलट पक्षीं. ॐ **पुनरागमन न०** पुन्हा येणें. **पुनरावृत्ति स्त्री०** १ दुसरी खेप किं० दुसऱ्या खेपेस जें केलें तें. २ पुनर्जन्म. **पुनरुक्त वि०** १ पुन्हा किं० दुसऱ्यांदा म्हटलेलें.२निरर्थक; अनावश्यक; ज्याची जरूरी नाहीं असें. **पुनर्वसु पु०** सातवें नक्षत्र.**पुनर्जन्म** [**पु०**मराठींत]१कठिण आजारांतून किं० संकटांतून निभावणूक. २ दुसरा प्राप्त झालेला जन्म.**पुनः पुनः क्रि०वि०**वारंवार; अनेक वेळां.**पुनरपि क्रि० वि०** पुन्हा; दुसऱ्यांदा. **पुनर्भू स्त्री०** पुनर्विवाहित स्त्री; पाटाची बायको. **पुनर्भव पु०**१ अंगावरचे केश. २ नख. **पुनर्भवा स्त्री०** एक वनस्पति. **पुनश्च क्रि० वि०** पुन्हा.

पुनई, पुनय स्त्री० एक जंगली झाड.

पुनव [**सं०** पौर्णिमा] **स्त्री०** पौर्णिमा ही तिथि. ॐ **पुनीव, पुन्येव स्त्री०** पौर्णिमा.

पुनव पु० एक झाड.

पुनीत [**सं०**] **वि०** शुद्ध केलेला.

पुन्नाग [**सं०**] **पु०** १ नागचांफा. २ उंडीण.

पुन्हा [**सं०** पुनः] **क्रि० वि०** वर ' पुनः 'चे पांच अर्थ पहा.

पुम् [**सं०** ' पुंस् ' चें ' पुम् 'हें रूप कित्येक सामासिक शब्दारंभीं होतें] **पु०** पुरुष. ॐ **पुमपत्य न०** पुरुष रूपाचें मूल. **पुमर्थ पु०** १ धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, ह्या साध्य वस्तु प्रत्येक. २ प्रयत्न. **पुंगव पु०** १ बैल. २ (**समासांतीं**) श्रेष्ठ; उ० मुनिपुंगव,नरपुंगव.**पुन्नग, पुन्नाग पु०** १ नागकेशर नांवाचें झाड. २ उंडीण (झाड). **पुंसवन न०**१ गर्भ.२स्त्रियांचा ऋतुकाल. ३ गर्भिणीचा पुत्रोत्पादक संस्कार.

पुयी स्त्री० मागें ' पुंई ' पहा.

पुर [**सं०**] **न०** नगर. ॐ **पुरारि पु०**शंकर. **पुरद्वार न०** १ गोपुर. २ नगराचा दरवाजा.

पुरकी,फुरकी स्त्री० ओठ दाबून काढलेला आवाज (मारणें). **टीप,**–या शब्दाचा उपयोग **अ० व०** होतो.

पुरखा, पुरखी [**सं०** पुरुष] **पु०** १ वृद्ध माणूस. २ वयोवृद्ध किं० ज्ञानसंपन्न माणूस.

पुरखांब [**म०** पुरणें+खांब] **पु०** जमीनींत पुरून किं० गाडून उभा केलेला खांब. याच्या व्यावर्तकत्वें ' उथळीवरचा खांब '.

पुरचुंडी, पुरचोंडी स्त्री० फडक्यांत बांधलेली लहानशी गठडी किं० गांठोडी.

पुरजा पु०,पुरजें न०[**फा०** पुरजाद]चिठोरा, तुकडा (कागद इ० चा). ॐ **पुरजे पुरजे करणें** तुकडे तुकडे करणें; चिंध्या चिंध्या करणें.

पुरढणें,पुरढावणें स० क्रि० १ नवीन मडकें कांहीं कृतीनें टणक किं० मजबूत करणें. २ दुर्वर्तनांत कोणेकाला दृढ करणें. **अ० क्रि०** १ नवें मडकें वहिवाटीच्या योगानें किं० अन्य कृतीनें टणक होणें. २ कोणी मनुष्य कांहीं व्यसनांत पक्का आसक्त होणें.

पुरण [**सं०** पूरण] **न०** १ मोदक, करंजी,

पोळी, इ० खाद्याच्या पोटांत नारळाचा चव, शिजवून वाटलेली डाळ, खवा, साखर, इ० घालतात तें.२पदार्थांचा आकार लठ्ठ करण्यासाठीं आंत जें घालतांत तें.३पाटल्या,गोठ,इ० करतांना सोन्याच्या पत्र्याच्या आंत तांबे,रुपें,इ०च्या पट्ट्या घालतात त्या.४भिंत, जोत्याच्या चार बाजू, इ०च्या पोटांत घालतात ते धोंडे,माती, इ० समुच्चयानें. न०, स्त्री० वेल, झाड, इ० लाविलें असतां त्यांच्या बुडाशीं शेण, माती, इ०चीं घालतात ती भर. ❀ **पुरणपोळी स्त्री०** दाळीचें पुरण पोटांत घालून केलेली पोळी. **पुरणभरण न० ए०व०** घराचें जोतें,ओटयाच्या चारी बाजूंच्या भिंती,ह्यांच्यांत जमीन सपाट करण्यासाठीं धोंडे,माती,इ०चें भरताड घालतात तें. **पुरणाचा वि०** सोन्याच्या पत्र्याच्या आंत तांब्याच्या पट्ट्या किं० सळ्या घालून केलेल्या असतात त्या (पाटल्या, गोठ,इ० दागिने). **पुरणावरणाचें न०** देवधर्मासाठीं किं० पाहुण्यासाठीं नित्य क्रमाहून अधिक उंची पक्वान्न केलेलें असतें तें.

पुरणी [म० पुरणें] **स्त्री०** १ जमीनींत खांब इ० पुरणें. २ वर ' पुरण ' चा अर्थ ४ पहा.३ झाडाच्या बुडाशीं शेण, माती, इ० चें घालतात तें खत. ❀ **पुरणीचा ऊस पु०** ज्याला पाणी घालावें लागत नाहीं असा ऊस. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' शिंपणीचा ऊस '

पुरणें [**सं०** पृ=भरणें] **स० क्रि०** १ जमीनींत गाडणें. २ (खांब, दगड, इ०)जमीन इ० मध्यें रोवणें.**अ० क्रि०**भरतीचा किं० पुरेसा होणें.

पुरता [म० पुरणें] **वि०** १ पुरेसा; पुरण्याइतका; पूर्ण.२ एकादें कार्य भागविण्याजोगा किं० कांहीं विशिष्ट उद्देश सफल करावयाला समर्थ (माणूस, पदार्थ, इ०). **क्रि० वि०**(लिंगवचनांप्रमाणें फिरणारें); पूर्णपणें; पक्केपणीं; भरपूर प्रमाणांत; समाप्तीच्या पल्ल्यापर्यंत.

पुरभय्या पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा एक इसम.

पुरमाशीण [म० पुरे+मास (महिने)] **स्त्री०** १ जिचे गरोदर अवस्थेचे महिने भरून जी प्रसूत व्हावयाच्या स्थितींत आहे अशी स्त्री. २ जी पूर्ण मुदत भरल्यावर प्रसूत झाली ती स्त्री.

पुरय [म० पुरणें] **स्त्री०** १ पुरवठा (येणें, पडणें). २ पूर्ण भरती;जितक्या प्रमाणांत एकाद्या पदार्थाची जरूरी आहे तितकें त्याचें प्रमाण; उ० ह्या मेजवानींत लाडवांची पुरव झाली. **टीप,–** ' एकादा पदार्थ पुरवेस पडणें ' असाही प्रयोग होतो.

पुरवटा (–ठा) [म० पुरणें] **पु०**१ एकाद्या कार्यासाठीं एकाद्या पदार्थाचें जरूर तितकें प्रमाण असणें (पडणें, येणें). २ बायकांचीं गाणीं किं० ओव्या इ०चें शेपपुरण (घालणें). ❀ **पुरवठेसार वि०** जितकें पाहिजे तितकें; विशिष्ट कार्याला पुरण्याइतकें; भरपूर.

पुरवणा [**सं०** पुराण] **पु०** राजा, कोणी मोठा माणूस, इ०चें चरित्र.

पुरवणी [म० पुरविणें] **स्त्री०** १ भरतीला जें घातलें तें. २ ग्रंथांत न घातलेला किं० न घालण्याजोगा जो भाग ग्रंथाच्या शेवटीं मागाहून जोडतात तो; ज्यादा मजकुर; भरतीचा मजकूर. ३ पदार्थाची कांहीं कामांत तूट पडली असतां दुसरा पदार्थ भरतीला घालतात तो. ४ कांहीं हकीगतीचें किं० विधानाचें समर्थन. ५ कार्यविशेषाला ज्या पदार्थाचें जितकें प्रमाण जरूर तितकें भरपूर प्रमाण. ६ मोत्यांच्या घोसांतील प्रत्येक सरांत अमुक संख्याक मोतीं असावीं म्हणून जी संख्या ठरविलेली असते ती. ७ नदी,नाला, इ०ला पाण्याचा एकदम येतो तो लोंढा.

पुरवणें [म० पुरणें] **अ० क्रि०** १ खपणें; सोसणें; मान्य होणें;पथकरलें जाणें;पथकरण्याच्या लायकीचा असणें; उ० तापजाळ पुरवेल पण पोटजाळ पुरवत नाहीं; उ० जेवणाला इतका उशीर झालेला मला पुरवत नाहीं; उ० तुझें हें वर्तन मला पुरवत नाहीं; उ० हा नोकर मला पुरवत नाहीं. २ शक्य होणें किं० असणें; ' तां ' प्रत्यान्त रूपाच्या साहचर्यानें; उ० त्या संस्थेंतील अंदाधुंदी सांगतां पुरवत नाहीं. ३ विद्यमान, उपस्थित, किं० हजर असणें (इष्ट किं० अनिष्ट माणूस इ० संबंधांत); उ० हा राम्या मला जेथें तेथें पुरवतो आहे (किं०पुरवला आहे);उ०प्रवासांत हा गडी मला सर्व अडचणींत पुरवला; उ० ही कादंबरी मला महिनाभर पुरवेल (म्ह०

महिनाभर माझी करमणूक करील); उ० हें काम मला तीन दिवस पुरवेल (म्ह० तें करण्याचे कष्ट सोसावे लागतील).

पुरवार [**म०** पुरणें] **स्त्री०** पुरावा देऊन किं० प्रमाणें दाखवून (कांहीं गोष्ट) स्थापित करणें किं० सिद्ध करणें; समर्थन.

पुरविणें [**म०** ‘ पुरणें ’ चें प्रयोजक] **स० क्रि०** १ पुरेल असा करणें; पुरा पाडणें; इष्ट कार्याला (कांहीं पदार्थ) कमी न पडूं देणें; उ०ह्या शिपतरांतील लाडू मी दोन्ही पंगतीस पुरविले.२ जो पदार्थ ज्या कामीं जितक्या प्रमाणांत पाहिजे असेल तितक्या प्रमाणांत तो देणें किं० त्याचा पुरवठा करणें; उ० आमचा कर्नाटक सर्व महाराष्ट्राला लागेल तितकी खादी पुरवील.

पुरशीस, पुरसीस [**फा०** पुर्सिष; पुरसीदन्=विचारणें, पुसणें] **स्त्री०** (खटल्याचा निवाडा करण्याच्या प्रसंगीं) सवाल करणें;चौकशी करणें; तपासणी.

पुरश्चरण [**सं०**] **न०** १ मंत्र आपणास सिद्ध व्हावा म्हणून त्या मंत्राचा अमुक संख्याक जप करावा इ० जें मंत्रशास्त्रांत अनुष्ठान सांगितलें आहे तें;ठराविक मंत्रजप. २ उपदेशविधि.

पुरस्कर्ता [**सं०** पुरस्कर्तृ] **पु०** १ पुढारी, नेता. २ उपकारशीलतेनें जो दुसऱ्याला आश्रय देतो किं० त्याचे हित करतो तो.३उत्तेजन देणारा. ४ एखाद्या वस्तूचा किं० माणसाचा चाहाता.

पुरस्कार [**सं०**] **पु०**१ पुढें ठेवणें; पुढें करणें. २ पसंत करणें; स्वीकार. ३ सन्मान; पूजा. ४ बरोबर जाणें. ५ पूर्ण करणें.

पुरस्सर [**सं०**] **पु०** १ पुढें पाठविलेला दूत. २ सेवक. ३ पुढारी; उ० इंद्रपुरस्सर देव ब्रम्हदेवाकडे गेले (म्ह०इंद्र आहे पुढारी ज्यांचा असे देव). ४ पुढें, अगोदर किं० प्रारंभीं जो आहे तो किं० जें आहे तें;उ०शपथपुरस्सर (म्ह०शपथ घेऊन);उ० बहुमानपुरस्सर (म्ह० बहुमानानें).

पुरळ, पुरळा, पुरूळ पु० बारीक बारीक पुटकुळ्या अंगावर उठतात त्या समुच्चयानें (उठणें).

पुरळी, पुळी, पुटकुळी स्त्री० त्वचेवर उठतो तो बारीक फोड.

पुरा [**सं०** पूरित] **वि०** १ पुरता; पूर्ण;भरपूर; ज्यांत कांहीं न्यून नाहीं असा. २ पुरता किं० पूर्ण केलेला; समाप्त केलेला. ३ पक्का, अट्टल (लुच्चा). **क्रि०वि०**(लिंगवचनांप्रमाणें फिरणारें). पूर्णपणें;सपशेल;सर्वथैव;उ० ती बंडी पुरी फाटली; उ० सदोबा पुरा फसला. **पुरी ताजीम स्त्री०** आपल्या स्थानावरून उठून कोणेकाचा केलेला सत्कार याला ‘ खडी ताजीम ’ असेंही म्हणतात. मागें ‘ निम ’ मध्यें हें शब्द पहा.

पुरा [**सं०** पुर] **पु०** गांवाचा एक भाग; उ०गोसावीपुरा; उ० कारकोळपुरा. उ० मेहुणपुरा.

पुराट (–ड) [**सं०** पूर] **न०** नदीच्या लोंढ्याबरोबर वाहात येतें तें गवत, पानें, केरकचरा, इ० समुच्चयानें.

पुराण [**सं०**] **वि०** १ जुना; प्राचीन. २ जीर्ण. ३ वृद्ध. **न०** १ जुनी गोष्ट. २ प्राचीन इतिहास. ३ सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, प्रलय, इ० चा इतिहास,ईश्वरचरित्र,इ० ज्यामध्यें सांगितलेलें असतें असे जे भागवतादि ग्रंथ ते प्रत्येक. हीं पुराणें अठरा आहेत आणि उपपुराणें अठरा आहेत. मागें ‘ अठरा ’ शब्द पहा. ४ भारी लांबट हकीगत; उ० तुझ्या बायकोचें पुराण माझ्यापुढें लावूं नको. ❀ **पुराणांतलीं वांगीं पुराणांत** उपदेश जागच्या जागींच राहातो आणि वर्तन मनुष्याच्या लहरीप्रमाणें घडत असतें. आमचें ‘ म्हणीविषयीं चार शब्द ’ पान ४४ पहा. **पुराणपुरुष पु०** विष्णु. **पुराणवैराग्य न०** अल्पकाळ टिकणारें वैराग्य, द्वेष, किं० अप्रीति. **पुराणिक पु०** पुराण सांगण्याचा धंदा करणारा. **पुराणोक्त वि०** पुराणांत सांगितलेला; पुराणांना अनुसरून असलेला. **पुराणोक्त आशीर्वाद पु०** ज्यांना वेदाधिकार नाहीं अशांना पत्रांत दिलेला आशीर्वाद.**पुराणपिसें न०** पुराण ऐकण्याचा किं० ऐकावयाला जाण्याचा फाजील नाद.

पुराणा [**सं०** पुराण=जुना] **वि०** १ वृद्ध. २ जीर्ण. ❀ **जुनापुराणा वि०** १ वृद्ध;म्हातारा. २ वहिवाटींत आलेला. ३ बहुत काळ परिचित झालेला किं० असलेला. ४ येऊन किं० घडून पुष्कळ दिवस ज्याला झाले आहेत असा (मनुष्य, वृत्तान्त, गोष्ट).

पुरातन [**सं०**] **वि०** प्राचीन; जुना; फार मागच्या काळचा.

पुरव, पुरावा [**म०** पुरणें] **पु०** १ पुरवठा; एकाद्या वस्तूचें जितकें पाहिजे आहे तितकें प्रमाण. २ घातलेली भर; भरती. ३ समर्थन; एकाद्या विधानादिकांस आणलेली बळकटी. ४ कोणेकाला कांहीं कामांत केलेली मदत किं० कुमक.

पुरी [**सं०**] **स्त्री०** १ नगर, नगरी. २ गव्हाचें तळून करतात तें एक खाद्यविशेष. ३ गोसाव्यांचा एक भेद किं० पंथ.

पुरी [**म०** पुरणें] **स्त्री०** पुरतेपणाची स्थिति. पुरवठा. ꙮ **लाडवांची पुरी पडली** लाडू पुरले किं० पुरवठ्याला आले.

पुरीष [**सं०**] **न०** विष्ठा; गू; शेण.

पुरुष [**सं०**] **पु०** १ ज्याचे ठायीं प्रजोत्पादक बीज किं० वीर्य आहे असा मनुष्य, घोडा, इ० प्राणी. २ मनुष्य. ३ साडेतीन हात इतक्या प्रमाणाची उंची किं० खोली; उ०आमची विहीर चार पुरुष खोल आहे; उ० हा माड दहा पुरुष उंच आहे. ४ जीव. ५ परमात्मा. ६ (**व्याकरणांत**) मी आम्ही, तूं तुम्ही, तो ते,इ० जे भेद ते प्रत्येक. ७ ज्या फुलांत किं० झाडांत पुंकेसर असतात आणि ते दुसऱ्या झाडाच्या स्त्रीकेसरांत संलग्न होऊन त्या झाडावर फळ धरतें तें फूल;पुरुष फूल किं० पुरुष झाड; उ० हीं पोपई पुरुष आहे, तीं स्त्री आहे. ८ बाळदशा संपून प्रौढ दशेला आला आहे तो मुलगा;बाप्या. ९(**व्याकरणांत**)पुल्लिंगी शब्द;उ०वृक्ष पुरुष आहे, काठी स्त्रीलिंग आहे. १० पिढी किं० पिढीची एक एक व्यक्ति; उ० माझ्या पूर्वींचा नववा पुरुष प्रथम कोंकणांतून पुण्यास येऊन स्थायिक झाला. ꙮ **पुरुषगांठ स्त्री०** बोटांत घालावयाच्या सोन्याच्या पवित्रकावर असते तशी गांठ;साध्या गांठीला 'बाईलगांठ' किं० 'रांडगांठ' म्हणतात. **पुरुषत्व न०** १ मर्दानी गुणांचा समुच्चय. २ प्रजोत्पादनाचें सामर्थ्य. ३ पराक्रम. **पुरुषसर्वनाम, पुरुषवाचक सर्वनाम न०** मी, तूं, तो, इ० जातीचें सर्वनाम. **पुरुषाद वि०** मनुष्यभक्षक; नरभक्षक; राक्षस. **पुरुषार्थ पु०** १ धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, ह्या ज्या चार साध्य वस्तु त्या प्रत्येक. २ पराक्रमाचें कृत्य; उ०तूं तो विंचू मारलास ह्यांत काय मोठा पुरुषार्थ केलास ?आमच्या गांवच्या बायका वाघ मारतात. **पुरुषार्थचतुष्टय न०** धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, ह्या चार साध्य वस्तूंचा समुच्चय. **पुरुषोत्तम पु०** १ विष्णु. २ परमात्मा. **पुरुषोत्तम मास पु०** हिंदू महिन्यांच्या गणतींतील अधिक मास; धोंडा महिना. **पुरुषांग न०** शिश्न. **पुरुषकार पु०** पराक्रम; कांहीं धाडसाचें कृत्य.

पुरूख [**म०** पुरुष] **पु०** अतिशूद्रांचा एक देव.

पुरूळ पु० अंगावर उठतात त्या बारीक बारीक पुटकुळ्या समुच्चयान.

पुरे [**म०** पुरणें] **वि०** जितकें जरूर आहे तितकें. अनेकवचन 'पुरेत.' उ० मला चार हात दोरी पुरे; उ० मला चार आंबे पुरेत. उ० **वा० अ०** अधिक नको. ꙮ **कोणेकाला पुरे पुरे करणें** त्याला सतावणें.

पुरोडाश [**सं०**] **पु०** अग्निहोत्राच्या अग्नीवर पीठ भाजून जें होमद्रव्य करतात तें.

पुरोभाग [**सं०**] **वि०** १ फाजील; लुडबुड्या. २ दोष हुडकून काढण्याकडे ज्याची प्रवृत्ति असा. ३ मत्सरी. ꙮ **पुरोभागी वि०** १ फाजील; लुडबुड्या. २ मत्सरी.

पुरोवर्ती [**सं०** पुरोवर्तिन्] **वि०** अग्रभागीं किं० पुढें असलेला.

पुरोहित [**सं०**] **पु०** १ कुलाचार्य. २ कारभारी.

पुलक [**सं०**] **पु०** हर्ष, भय, इ० मुळें अंगावर उभे राहतात ते केश समुच्चयानें; रोमांच.

पुलकित [**सं०**] **वि०** ज्यावर हर्ष, आश्चर्य, इ० भावनांमुळें रोमांच उठले आहेत असें (अंग).

पुलन [**म०** पू] **वि०** क्षत, गळूं, इ० मध्यें पू उत्पन्न करणारा (खाद्यपदार्थ,–पावटा इ०).

पुला, पुल्ला [**हिं०** पूला] **पु०** कडबा, गवत, इ० चा भारा.

पुलाव पु० मुसलमान लोकांचें एक पक्वान्न- [विशेष.

पुलिंद[**सं०**] **पु०** १भिल्ल इ० रानटी मनुष्य.

२ अशुद्ध, ग्राम्य, किं० बीभत्स भाषा बोलणारा किं० भाषण करणारा. [वाळवंट.

पुलिन [**स०**]**न०** वाळवंट. **पुळण स्त्री०**

पुली, पुेल्ला [**हिं०** पूलॉ] **स्त्री०** कडबा, गवत, इ० चा भारा किं० पेंढी.

पुलेजणें, पुलेणें, पुवळणें, पुवाळणें, पुवारणें [**म०पू**] **अ० क्रि०** (गळूं, क्षत, इ०)पुवानें युक्त होणें.

पुल्ला, पुल्ली वर ' पुला ' ' पुली ' पहा.

पुल्लिंग [**सं०**] **न०** (**व्याकरणांत**) तो, हा, इ० सर्वनामांनीं परामर्श केला जाण्याची शब्दाची पात्रता. **वि०** तो, हा, इ० सर्वनामांनीं ज्याचा परामर्श करावा लागतो असा (शब्द).

पुवा [**हिं०**] **पु०** एक खाद्यविशेष.

पुशी, पिसू स्त्री० उवेएवढा एक उडणारा क्षुद्र कीट. [चारिणी.

पुंश्चली [**सं०**] **स्त्री०** जारिणी; व्यभि-

पुष्कर [**सं०**] **पु०** १ तळें. २ नगारा. ३ मेघविशेष. ४ सारस पक्षी. **न०** १ निळें कमळ. २ हत्तीच्या सोंडेचें टोक. ३ नगाऱ्याचें कातडें. ४ तरवारीचें टोक. ५ म्यान, कवच. ६ आकाश. ७ एक वनस्पती. ८ सात मोठीं द्वीपें प्रत्येक. ९ एक तीर्थविशेष.

पुष्कराज पु० एक रत्नविशेष.

पुष्करिणी [**सं०**] **स्त्री०** १ तळें. २ कमलयुक्त तळें. ३ पायऱ्यांची विहीर.

पुष्कल, पुष्कळ [**सं०** पुष्कल] **वि०**संख्येनें किं० परिमाणानें मोठा; उ० पुष्कळ पाणी, पुष्कळ आंबे, पुष्कळ चर्चा.

पुष्ट [**सं०**] **वि०** लठ्ठ; पोसलेला. ꕥ **पुष्टीकरण न०** प्रमाणें, मुद्दे, इ० च्या योगानें एखाद्या विधानाचें समर्थन.

पुष्टि [**सं०**] **स्त्री०** १ पोषण. २ पोषक द्रव्यें समुच्चयानें. ३ वृद्धि; वाढ. ४ लठ्ठपणा. ५ समृद्धि; वैभव. ६ पुरावे, मुद्दे, प्रमाणें, इ० च्या योगानें हकीकतीला किं० विधानाला आलेली किं० आणलेली बळकटी. ७दिलेला जोड;घातलेली भरती. ८ सोळा मातृकांपैकीं एक.

पुष्ठि (–ष्ठी–) पत्र[**सं०** पृष्ठ+पत्र] **न०**मागें ' पुठा, ' ' पुठ्ठा ' ह्या शब्दाचे अर्थ २, ३, ४ हे पहा. ५ लिहितेसमयीं कागदाच्या खालीं जो अनेक कागद एकत्र चिकटावून किं० शिवून जाडी केलेला तक्ता आधारार्थ घेतात तो.

पुष्प [**सं०**] **न०** १ झाडाचें फूल. २ झाडाच्या फुलाच्या आकाराची कशीद्याची वस्त्रादिकांवर आकृती करतात ती. ३ फुलाच्या आकाराचा लाकूड, धातूचा पत्रा,इ० चा केलेला असतो तो तुकडा. ४ नक्षी, वेलबुट्टी, इ० मध्यें फुलांच्या आकाराची आकृति. ५ स्त्रियांचा मासिक रक्तस्राव. ६ डोळ्यांत पडतें तें फूल,–एक रोग. ꕥ **पुष्पक न०** १ वर अर्थ ६ पहा. २ कुबेराचें विमान. **पुष्पवती स्त्री०** विटाळशी स्त्री. **पुष्पधन्वा पु०** मदन. **पुष्पवाटिका स्त्री०** फुलबाग. **पुष्पांजलि स्त्री०** १ देवांच्या मूर्तीवर ओंजळींत फुलें घेऊन वाहातात तीं समुच्चयानें. २ (**लाक्षणिक**) कोणेकावर केलेला शिव्यांचा वर्षाव.

पुष्पित [**सं०**] **वि०** १ ज्याला फुलें आलीं आहेत असें (झाड). २ विटाळशी (स्त्री).

पुष्य [**सं०**] **पु०** पौषमास. **पु०, न०**आठवें नक्षत्र. ꕥ **पुष्यार्क पु०** रविवारीं पुष्य नक्षत्रीं चंद्र असणें हा योग.

पुसकट, पुसट [**म०** पुसणें] **वि०** १ अर्धवट पुसून गेलेलें (अक्षर किं० लेख किं० चित्र). २ प्रकाश भरपूर नसल्यामुळें अस्पष्ट दिसणारा (पदार्थ, देखावा, चित्र, इ०).

पुसकटणें [**म०** पुसणें] **स० क्रि०** (अक्षर, लेख, चित्र, इ०) अर्धवट रीतीनें पुसणें म्ह**०** चोळून किं० घासून नाहींसें करणें. **अ० क्रि०** (चित्र, अक्षर, इ०) घासलें किं० चोळलें गेल्यामुळें अस्पष्ट होणें. **पुसका** [**म०** पुसणें] **वि०** अस्पष्ट (अक्षर, चित्र, लेख, इ०).

पुसका वर ' पुसकट ' पहा.

पुसकुयरी (–ली), पुसकुंवरी (–ली) [**म०** पूस+कुयरी] **स्त्री०** पौष महिन्याच्या सुमारास फणसाच्या झाडाला लागतात ते कोंवळे फणस प्रत्येक. [पहा.

पुसट, पुसटणें वर ' पुसकट, ' ' पुसकटणें '

पुसणारा [**म०** पुसणें] **पु०** विचारण्याचा किं० रागें भरण्याचा ज्याला अधिकार आहे

असा मनुष्य; उ० तुला कोणी पुसणारा नाहीं म्हणून तूं असे ढंग करतोस होय ?

पुसणें [**सं०** प्रच्छ्=चौकशी करणें] **स० क्रि०** १ विचारणें; प्रश्न विचारणें. २ कोणे-काच्या प्रकृति, सुस्थिति, इ० संबंधाची चौकशी करणें; उ० मी ताईला पुसलें आहे असें तिला सांगा. **टीप,**–ह्या अर्थी अकरणरूपी प्रयोग केला असतां ' परवा न करणें, ' ' मान न देणें, ' ' किंमत न देणें, ' असे अर्थ होतात; उ० त्याला कोणी पुसत नाहीं. ॐ **पुसतां सोय नाहीं, पुसतां गरज नाहीं** विचारणें शक्य नाहीं; विचारण्याची जरूरी नाहीं; अतोनात; उ० ह्या पोरांनीं मांडवांत जो दंगा मांडला आहे तो पुसतां सोय नाहीं.

पुसणें [**सं०** पुस्, पोसयति–ते=घासणें, खरडून टाकणें, नष्ट करणें] **स० क्रि०** (अक्षर, चित्र, आकृति, इ०) फडकें, पाणी, इ० च्या योगानें घासून नाहींसें करणें. ॐ **त्याला लिहितां पुसतां येत नाहीं, त्याला लिहिणें पुसणें कांहीं नाहीं** १ लिहिणें किं० लिहिलेलें पुसणें हीं कामें, त्याला येत नाहींत; लिहिणें आणि लिहिण्याच्या अंगभूत क्रिया त्याला करतां येत नाहींत; तो अडाणी, अशिक्षित, निरक्षर आहे. २ तो कांहीं अभ्यास करीत नाहीं, तो उनाडक्या करीत असतो.

पुसणें [**म०** पुसणें; **सं०** पुस्=घासून टाकणें] **न०** पदार्थ पुसून स्वच्छ करण्याचें फडकें; उ० पायपुसणें, तोंडपुसणें, इ०.

पुसता [**म०** पुसणें=विचारणें; **सं०** प्रच्छ्] **वि०** १ विचारणारा; चौकशी करणारा. २ जबाबदार धरणारा; शास्ता; रागें भरण्याचा ज्याला अधिकार आहे असा; उ० त्याचा बाप मेल्यापासून त्याला कोणी पुसता नाहीं आणि तो भारी बदफैली झाला आहे.

पुसवण [**सं०** पुंसवन] **न०** गर्भिणीचा पुत्रोत्पादनसंस्कारविशेष.

पुसा [**सं०**पौष;**म०** पुस=पौषमहिना] **वि०** पौष महिन्यासंबंधीं.

पुस्त [**सं०** पृष्ठ; **फा०** पुष्त] **स्त्री०** गंजिफेची मागची बाजू. **पु०** पिढी; उ० हें वतन आमचे कुटुंबांत पांच पुस्त चालत आलें आहे.

पुस्त [**फा०** पुष्त=पाठ] **स्त्री०** १प्राण्याची पाठ. २ पिछाडी. ३ (कुटुंबाची) पिढी. ॐ **पुस्तंग** [**फा०** पुष्त (पाठ)+तंग (पट्टा)] **पु०** घोड्याचें खोगीर आवळावयाचा जो तंग त्याचा खोगिरावर यावयाचा जो कातड्याचा अवयव तो. **पुस्तदरपुस्त क्रि० वि०** एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत, दुसऱ्या पिढीपासून तिसऱ्या-पिढीपर्यंत, अशा क्रमानें (चालणारें वतन इ०). **पुस्तपना (–न्हा) पु०, पुस्तगारी स्त्री०** [**फा०** पनाह्=रक्षण; गिरफ्तन्=धरणें] मदत; टेका; आश्रय (करणें, देणें, ठेवणें). **पुस्तवानी (–णी) स्त्री०** मदत; पाठिंबा; (करणें, देणें). **पुस्तवान पु०,न०** दरवाज्याच्या उभ्या फळ्यांना बळकटीसाठीं आडव्या मारतात त्या रिपा.

पुस्तक [**सं०**] **न०** वेद, शास्त्र, पुराण, इ० ज्या कागदांवर अक्षरांच्या रूपानें लिहिले आहेत ते कागद समुच्चयानें,–पोथीच्या रूपांत किं० शिवलेल्या रूपांत. ॐ **पुस्तकावरून ओढलेला वि०** ज्याणें ग्रंथ वरवर वाचिला आहे असा (मनुष्य). **पुस्तकपानट, पुस्तकपानरट न०** पोथ्या, पुस्तकें, कागदपत्रें, इ० समुच्चयानें.

पुस्तपास (**–स्त**)**स्त्री०, पुसतपास पु०**[**म०** पुसणें+**अ०**'तफ्हस्'पासून तपास]शोध;चौकशी; विचारपूस.

पुस्ती[**सं०**पुस्ती=हस्तलेख;**फा०**पुष्ती] **स्त्री०** १मुलाला अक्षराचें वळण कितपत साधलें आहे हें पाहण्यासाठीं ठराविक दिवसांनीं त्याच्याकडून लिहवून घेतात तो कागद. २ जोडा, मोट, इ० फाटली असतां त्यांना मारतात तें ठिगळ.३ जर्णि किं० मोडकळीस आलेल्या पदार्थाला बळकटी-साठीं त्याच जातीच्या पदार्थाचा देतात तो जोड.– कागदाला चिकटावलेला कागद, वस्त्राला शिव-लेलें वस्त्र, एका खांबाशेजारीं बसविलेला दुसरा खांब, भिंतीशीं बांधलेली भिंत,इ०(**क्रि०** देणें). ४ पाठबळ; टेका; आधार.

पुंस्त्व [**सं०**] **न०** १पुरुषत्व. २ वीर्य, रेत.

पुळकणें अ० क्रि० प्राण्यानें पातळ मळ गुद-द्वारें विसृष्ट करणें.

पुळका पु० १ गुदद्वारें बाहेर पडलेला पातळ

मळ. २ पावसाची जोराची पण अल्पकाळच टिकणारी सर (येथें).३ कांहीं गोष्टीबद्दल मनांत एकदम आलेली लहर; उ०इतके दिवस तो धोतरें नेसत असे पण त्याला आलीकडे पाटलोणी घालण्याचा पुळका आला आहे.

पुळण [**सं०** पुलिन] **न०** समुद्राच्या किं० नदीच्या कांठचें वाळवंट. **स्त्री०** रेती, वाळू,– विशेषतः समुद्रकांठची. ꕥ **पुळणवट वि०**रेताड (जमीन).

पुळण [**सं०** पूयन=पू] **न०** गळूं, क्षत, इ० मध्यें पू उत्पन्न होणें किं० त्यांत पू उत्पन्न करणारें खाद्य.

पुळपुळीत, पुळपुळा वि० १ बेचव; पचपचीत (खाद्य, पेय). २ नीरस, कंटाळवाणें (भाषण). ३ इष्ट कार्य घडवून आणीलच असें सामर्थ्य ज्यांत नाहीं असा (माणूस) किं० अशी (युक्ति).

पुळाटा स्त्री० रामकांटी जातीच्या बाभळीचें रोपडें किं० लहान झाड.

पुळी [**सं०** पुलक] **स्त्री०** पुटकुळी; लहान फोड.

पू [**सं०** पूय] **पु०** १ फोड, जखम,इ०मध्यें उत्पन्न होतो तो दुर्गंधियुक्त पातळ पदार्थ. २ डोळ्यांतून येतो तो गू.३(**लाक्षणिक**) अत्यंत जीर्ण झालेला पदार्थ,–वस्त्र, पुस्तक, कागद, इ०.

पूग [**सं०** पूग=पोफळ; पूगी=पोफळी] **पु०** पोफळ. **पूगी स्त्री०** पोफळी. **पूगीफल, पूगफल न०** सुपारी.

पूजक [**सं०**] **वि०** पूजा करणारा; भजणारा.

पूजणें [**सं०** पूज्] **स० क्रि०** १ मानार्हसमजणें. २ मानाचा विषय करणें. ३ गंध, फूल, इ०च्या योगानें (देवाचीं मूर्ति, संमान्य पुरुष,इ०) सजविणें किं० युक्त करणें. **टीप,**–मागें ' पुजणें ' हें क्रियापद पहा.

पूजन [**सं०**] **न०** पूजिण्याचा व्यापार. वर ' पूजणें ' आणि मागें ' पुजणें ' पहा.

पूजन [**सं०**] **न०** अर्चा; संमान.

पूजनीय, पूज्य [**सं०**] **वि०** पूजनाला योग्य; मानाला उचित; वंद्य.

पूजा [**सं०**] **स्त्री०** देव, साधु पुरुष, इ०चें अर्चन किं० ह्या अर्चनार्थ जो गंध, फुलें, इ०रूप सामग्री ती.ꕥ **देवाला पूजा बांधणें** त्याची मूर्ति गंध, फुलें, वस्त्र, इ०नीं अलंकृत करणें. **पूजापुरस्कार पु० ए० व०** पूजा करणें इ० कर्मं समुच्चयानें. **पूजार्ह वि०** मानाला पात्र. **पूजोपचार पु० अ० व०** देवाची पूजा करण्याचीं सर्व उपकरणें, कर्में, तंत्रें, इ०.

पूजित [**सं०**] **वि०** पूजिलेला, वंद्य.

पूज्य [**सं०**] **वि०**मानाला पात्र; वंद्य.

पूज्य न० १ अक्षराच्या डोक्यावर देतात तो अनुस्वार. २ संख्या मांडतांना एकं, दहं, शतं, च्या स्थानीं त्या स्थानाच्या परिमाणाचा अंक नसल्यास तेथें मांडतात तें अभावद्योतक वर्तुळ,– ०असें. ३ पूर्ण अभाव; शून्य. ४ दशांश अपूर्णांक मांडला असतां डावीकडे देतात तें टिंब. ५ यादीमध्यें जो पदार्थ किं० माणूस उपस्थित नसेल त्याच्या नांवापुढें करतात तें वर्तुळ. ꕥ**विद्येच्या (पैशाच्या, अकलेच्या,** इ०च्या) **नांवानें पूज्य** विद्येचा (पैशाचा, अकलेचा, इ०चा) पूर्ण अभाव; उ०आज मजजवळ पैशाच्या नांवानें पूज्य आहे. **एकादी गोष्ट पूज्य करणें** १ ती वगळणें;खोडून टाकणें. २ ती विसरून जाणें; ती बुझवून टाकणें; तिचें नांव न घेणें. **त्याणें नोकरी धरली आणि त्याच्या विद्येवर पूज्य पडलें** त्याला विद्या बंद करावी लागली. **टीप,**–'पूज्य ' हा शब्द ' पूज', ह्या रूपानें लिहिलेलाही आढळतो.

पूट मागें ' पुट ' पहा.

पूट न० पुढें पिकणाऱ्या किं०उत्पन्न होणाऱ्या मालाच्या किंमतीचा आजमास किं० असा आदमास करून केलेली खरेदी (करणें, घेणें) किं० मालकानें विकलेला माल (देणें).

पूड स्त्री० पदार्थाचें केलेलें चूर्ण. **न०** नगारा, नौबत, इ०चें पाल.**पु०,न०** पेटी,पिशवी,इ० तील जे कप्पे किं० खण ते प्रत्येक. **न०** १ चुना, तपकीर, इ० ठेवण्याचें पात्र किं० ह्या पात्राचीं जीं दोन अर्धुकें तीं प्रत्येक. २ विड्याचीं पानें ठेवण्यासाठी वेत, बांबूच्या किं० माडाच्या पाती, गवत, इ० चें केलेलें असतें तें लहानसें बारदान. ३ दुहेरी तंबूच्या आंतलें किं० बाहेरचें आवरण किं० आच्छादन. ꕥ **पूड**

फोडणें १ गठ्ठा कि० वस्ता खोलणें. २ रहस्य फोडणें किं०तें जाहीर करणें. **पूड फुटणें,पूड बाहेर येणें** रहस्य प्रकट किं० जाहीर होणें.

पूत [**सं०** पुत्र] **पु०** मुलगा; पुत्र. ❀ **मायेचा पूत पु०** आईचा मुलगा म्ह० आई-पासून जन्मलेला मुलगा म्ह० मनुष्य. ह्याचा उपयोग पुढीलसारख्या वाक्यांतच होतो. असा कोण मायेचा पूत आहे कीं जो माझ्या वाटेस जाण्याचें धाडस करील?(म्ह० असा कोण मनुष्य आहे कीं जो इ०).**एकपुती स्त्री०** एक आहे पुत्र जिला अशी स्त्री. मागें ‘ पुती ’ पहा.

पूत [**सं०**] **वि०** पवित्र; शुद्ध; निर्मळ. ❀ **पूतात्मा पु०** विष्णु.

पूतना [**सं०**] **स्त्री०** एक राक्षसी. ही कंसाची अनुचर होती. कृष्णानें हिंचें स्तनपान करतां करतां हिचे प्राण शोषून घेऊन हिला ठार मारिलें. ❀ **पूतनामावशी स्त्री०** १ द्वाड मावशी. २ कोणीही द्वाड आणि त्रासदायक स्त्री.

पूप पु०,पूपिका स्त्री० [**सं०** पूप, पूपिका] पोळी; चपाती.

पूय [**सं०**] **पु०** पू (गळूं, जखम,इ० तील).

पूर [**सं०**] **पु०** १ नदी, ओढा, इ० ला येतो जो एकदम पाण्याचा लोंढा तो (येणें). २ पदार्थाचें वैपुल्य. **पूर** [**सं०** पुर] **न०** शहर; उ० शिकारपूर, मलकापूर, इ०.

पूरक [**सं०**] **वि०** भरणारा; भरून काढ-णारा; पूर्ण करणारा. **पु०** (**गणित**) गुणक. २ (**योग**) उजवी नाकपुडी दाबून डावींतून श्वास घेणें.

पूरणें [**सं०**] **न०** १ भरती; भर. २ फुगणें. ३ (प्रतिज्ञा, वचन) शेवटास नेणें किं० निस्तरणें. ४ करंजी, मोदक, पोळी, इ० त घालतात तें शिजविलेल्या डाळीचें पीठ, खोबरें, गूळ, इ०तें.

पूरित [**सं०**] **वि०**१भरलेली (पिशवी,पोतें, इ०). २निस्तरलेली (प्रतिज्ञा,वचन, आज्ञा,इ०).

पूर्ण [**सं०**] **वि०** १ भरलेलें; व्यापिलेलें. २ अपुरतें नव्हे तें; सर्व अवयव किं० भाग यांनीं संपन्न. ३ एकाद्या शास्त्रांत, विद्येंत, किं० कलेंत, वाकबगार, कुशल, किं० चतुर;पारंगत.**न०**अभाव दाखविण्यासाठीं जें वर्तुळाकार चिन्ह करतात तें.

❀ **पूर्णावतार पु०** नारसिंह, राम, आणि कृष्ण, हे तीन अवतार प्रत्येक. **पूर्णपात्र न०** १ वस्त्रा-लंकारांनीं पूर्ण आणि नोकरांकडून लुटविण्याचें पात्र. २ दोनशें छपन्न मुठी धान्य,–ऋत्विजास द्यावयाचें. ३ जलादींनीं भरलेलें पात्र. ४ विवा-हादि कर्मामध्यें घेतात तें अक्षतादिकांनीं भरलेलें पात्र. ५ राजानें ब्राह्मणाला दिलेलें धातूचें भांडें,– जें तो ज्याला दाखवील त्यानें धान्यानें भरून द्यावें लागतें. ६ कांहीं विधीच्या समाप्तीस जें तांदुळांनीं भरलेलें आणि वर गणपतीची मूर्ति ठेविलेलें भांडें पूजा करण्यासाठीं कळशाच्या तोंडावर ठेविलेलें असतें तें.**पूर्णपात्री वि०**ज्याला राजानें अर्थ ५ चें पूर्णपात्र बक्षीस दिलें आहे तो (ब्राह्मण).**पूर्णमास पु०**१ चंद्र. २पौर्णिमेची इष्टि. **पूर्णगर्भा स्त्री०** पुरणपोळी. **पूर्णकाम वि०** १ ज्याचे मनोरथ सफळ झालें आहेत असा. २ उमेदीच्या वयांत असलेला कोणीही माणूस. **पूर्णगर्भा स्त्री०**जिच्या गरोदरपणाचे नऊ महिने भरले आहेत अशी स्त्री. **पूर्णघटिका स्त्री०** लग्न, मुंज, इ० विधीसाठीं पाण्यांत तरंगत सोडिलेली आणि भरलेली शेवटची घटिका. घटिका=घटिका मोजावयाचें पात्र. **पूर्णघन वि०** सर्वत्र व्यापून असलेला(परमात्मा).**पूर्णचंद्र पु०** पौर्णिमेचा चंद्र. **पूर्णचंद्रोदय पु०**एक औषधी रांधा.**पूर्णा**[**सं०**] **स्त्री०** पंचमी, दशमी, आणि पौर्णिमा, ह्या तिथि. कोणी अमावास्याही ह्यांत भरीस घालतात. **पूर्णाभिषेक पु०** १ कांहीं इष्टापूर्त कर्म समाप्त झाल्यावर आचार्यादि ऋत्विज यजमानावर कल-शोदकानें जो अभिषेक करतात तो. २ मंत्रोपासना देणारा जो गुरु तो शिष्यास दीक्षापूर्वक मुख्य मंत्राचा उपदेश करून त्या शिष्यावर शेवटीं जो अभिषेक करतो तो. ३ (**लाक्षणिक**) कोणे-काचे सर्व सद्गुण किं० सर्व दुर्गुण कोणेकाचे ठायीं आहेत असें म्हणावयाचें असतां ‘ त्याणें त्याचेवर पूर्णाभिषेक केला आहे ’ असें म्हणतात. **पूर्णाहुति स्त्री०** १ कितीएक होमांचे शेवटीं मुख्य देवतेच्या उद्देशानें अग्नींत द्यावयाची एक विशिष्ट आहुति आहे ती. २ क्रमानें मारीत, जाळीत, किं० बुडवीत चाललेली महामारी, पिशाच, शत्रु, अग्नि, इ० यांचें ज्या एका मोठ्या

माणूस, पदार्थ, इ० लक्ष्यावर पर्यवसान होतें तें लक्ष्य. **पूर्णांक पु०** एक, दोन, तीन, इ० जे अंक ते प्रत्येक; अंशरूप जें परिमाण नव्हे त्याचा वाचक जो अंक तो. **पूर्णोपमा स्त्री०(साहित्य)**उपमान, उपमेय, साम्यबोधक शब्द, आणि समानधर्म, हीं चारीं अंगें ज्या उपमेंत उपस्थित आहेत अशी उपमा. जेथें ह्या चार अंगांपैकीं कांहीं अंगें उपस्थित नाहींत अशा उपमेला 'लुप्तोपमा' म्हणतात.

पूर्णिमा [**सं०**] **स्त्री०** चंद्रबिंब ज्या तिथीस तेजाच्या सर्व कलांनीं पूर्ण असतें ती तिथि.

पूर्त [**सं०**] **वि०** १ पूर्ण. २ आच्छादित. **न०** १ पोषण. २ शेवटास नेणें. ३ बक्षीस. ४ देऊळ, धर्मशाळा, तळें, अन्नदान, इ० रूप धर्मकृत्य. ꙮ **पूर्तता स्त्री०** भरपाई; जितकें जरूर तितकें परिमाण.

पूर्ति [**सं०**] **स्त्री०** १ पूर्णता. २ तृप्ति. ३ बक्षिशी.

पूर्भय्या [**सं०** पूर्वा (पूर्व दिशा) + भय्या (भाई, भाऊ)] **पु०** उत्तर हिंदुस्तानांतील एक जाति किं० त्या जातीचा इसम.

पूर्या पु० कल्याण रागांतील एक भेद. ꙮ **पूर्याधनाश्री स्त्री०** धनाश्री नांवाच्या रागिणीचा एक भेद.

पूर्व [**सं०**] **वि०** १ पूर्वेकडचा. २ प्रथमचा. ३ प्राचीन. ४ मागला. ५ वडील. ६ रूढ. ७ लहानपणचें. **पूर्वा स्त्री०** ज्या दिशेस सूर्य उगवतो ती दिशा; पूर्व दिशा. **पूर्व न०** १ पुढचा भाग. २ वरचा भाग. ३ कारण. ꙮ **अद्यपूर्व क्रि०**ह्यापूर्वीं; **वि०**आजपर्यंत. **पूर्वाग्नि पु०**आवसथ्य नांवाचा अग्नि. **पूर्वाचल पु०** सूर्य, चंद्र, इ० ज्या पर्वतावर येऊन त्यांचा उदय होतो तो पर्वत. **पूर्वापर न०** साधकबाधक विचार. **पूर्वार्जित न०** १ वडिलोपार्जित. २ पूर्वीच्या जन्मांतील कर्म. **पूर्वार्ध पु०, न०** १ पहिला किं० अगोदरचा अर्धा भाग. २ शरीराचा वरचा भाग किं० तोंडाकडचा भाग. **पूर्वार्ध पु०** दिवसाचे पहिले दोन प्रहर. **पूर्वावेदक पु०** फिर्यादी. **पूर्वाषाढा स्त्री०** विसावें नक्षत्र. **पूर्वोत्तरा स्त्री०** ईशान्य दिशा. **पूर्वकर्म न०** १नशीब; प्राक्तन कर्म. २तयारी. **पूर्वगंगा स्त्री०** नर्मदा. **पूर्वज वि०** १पूर्वी जन्मलेला. २प्राचीन. ३ पूर्वेकडचा. **पूर्वज पु०**१ज्येष्ठ बंधु. २ वाडवडील. ३ आपल्या अगोदरच्या पिढ्यांतील लोक. **पूर्वजन्म न०** मागला जन्म. **पूर्वदेव पु०** १ असुर. २ वृषपर्वा दैत्य. ३ नरऋषि,–अर्जुन. **पूर्वपक्ष पु०** १ पूर्वभाग. २ शुक्लपक्ष हा पंधरवडा. ३ शंका. ४ फिर्याद. **पूर्वपर्वत पु०** वर 'पूर्वाचल' पहा. **पूर्वपुरुष पु०** १ ब्रम्हा. २ बाप; आजोबा; पणजोबा. **पूर्वाप्रोष्ठपदा, पूर्वा भाद्रपदा स्त्री०** पंचवीसावें नक्षत्र. **पूर्वाफल्गुनी स्त्री०** अकरावें नक्षत्र. **पूर्वमीमांसा स्त्री०** कर्मकांडाचें शास्त्र. **पूर्वरंग पु०** प्रस्तावना; मंगलाचरण. **पूर्वरूप न०** रोगादिसूचक लक्षण. **पूर्ववय न०** तारुण्य. **पूर्ववाद पु०** खटल्याचा आरंभ. **पूर्ववादी पु०** फिर्यादी. **पूर्वविद् पु०** इतिहासज्ञ ऋषि. **पूर्वसंध्या स्त्री०** पहाट. **पूर्वसाहस न०** सर्वांत मोठी शिक्षा. **पूर्वद्वार न०** १ घर, नगर, इ० चें पूर्वेकडचें दार. २ प्राण्याचें तोंड. **पश्चिमद्वार न०** गुदद्वार; गुद. **पूर्वपद न०** १ हरिदासानें कथेच्या आरंभीं जें पद म्हणून कथेला सुरुवात केलेली असतें तें पद. २ समासांतील पूर्वींचा शब्द किं० पूर्वींचे शब्द समुच्चयानें,–समासाचा पहिला घटक अवयव; उ० 'गिरिशिखर' ह्यांत 'गिरि' हें पूर्वपद आहे; 'नरदेहयातना' ह्यांत 'नरदेह' हें पूर्वपद आहे. **पूर्वपदावर** (किं० **मूळपदावर**) **येणें** १ हरिदासानें जें पद म्हणून कथेला सुरवात केलेली असते त्या पदावर कथेचें पर्यवसान आणून ठेवणें. २ सुधारत चाललेल्या मनुष्यानें पूर्वीच्या असन्मार्गाकडे किं० आजाराच्या स्थितीकडे पुन्हां वळणें किं० येणें. **पूर्वपीठिका स्त्री०** १ पूर्वींचा इतिहास. २ पूर्वीं घडलेलीं हकीगत,–संक्षिप्त किं० संकलित रूपांत असलेली. **पूर्वरात्र स्त्री०** मध्यरात्रीच्या पूर्वींचा काळ. **पूर्वरेषा स्त्री०** नशीब,–जें जन्मसमयीं कपाळावर लिहिलेलें असतें असें समजलें जातें. **पूर्ववत् क्रि० वि०** पूर्वींप्रमाणें. **पूर्वांग न०** कांहीं मोठ्या कृत्याच्या पूर्वीं तयारी करावी लागते ती. **पूर्वापार वि०** पूर्वींपासून चालत आलेली (रीति, सरणी, वहिवाट, इ०). **टीप,–** 'पूर्व' शब्द संस्कृत

समासांत समाविष्ट होऊन पुढील प्रकारचे शब्द उत्पन्न होतात. श्रुतपूर्व म्ह० पूर्वी ऐकिलेला; दृष्टपूर्व म्ह० पूर्वी पाहिलेला; उक्तपूर्व म्ह० पूर्वी बोललेला; इ०.

पूर्वीं [सं० पूर्व] **क्रि० वि०** १ अगोदर. २ प्राचीनकाळीं; मागें.

पूर्वी [सं० पूर्व] **स्त्री०** १ (**संगीतांत**) एक राग. २ पत्राच्या सुरवातीचा मायना.

पूर्व्या, पूर्वय्या पु० पुरभय्या.

पूल [**फा०**] **पु०** नदी, खाडी, ओढा, इ० ओलांडून पैलतीरास जावयासाठीं लाकूड, दगड, लोखंड, इ० चीं रचना केलेली असते ती.

पूस [**सं०** पौष] **पु०**हिंदूंचा दहावा महिना ❀**पूसलाहणी स्त्री०** पौष महिन्यांत मेंढरांचें केश कातरणें.

पूस [**म०** पुसणें] **स्त्री०** चौकशी; विचारणें. ❀ **पूसतपास स्त्री, पु०** चौकशी.

पृच्छक [**सं०**] **वि०** प्रश्न विचारणारा; चौकशी करणारा.

पृच्छा [**सं०**] **स्त्री०** प्रश्न; चौकशी.

पृतना [**सं०**] **स्त्री०** सैन्य; फौज.

पृथक् [**सं०**] **वि०** वेगळा; निराळा.**टीप,–** मराठींत ' प्रथक ' असें रूप आहे. **क्रि० वि०** वेगळेपणानें; वेगळें समजून. ❀ **पृथगात्मा पु०** जीवात्मा. **पृथग्जन पु०** १ मूर्ख माणूस. २ क्षुद्र किं० नीच माणूस. ३ सटरफटर माणसें,–जीं विचारांत घेतलीं जाण्याच्या लायकीचीं नव्हेत अशीं माणसें. ४ पापी किं० दुर्व्यसनी माणूस. **पृथग्विध वि०** निरनिराळ्या प्रकारचे. **पृथक्करण न०** पदार्थाचीं घटक द्रव्यें वेगळीं वेगळीं करणें किं० काढणें.

पृथिवी, पृथ्वी [**सं०**] **स्त्री०** १ पर्वत, नद्या, समुद्र, नानाविध प्राणी ज्यावर आहेत असा प्रचंड गोल,–जो सूर्याभोंवतीं अंतरीक्षांतून फिरत आहे तो. २ (**न्याय**) गंध हा भेदक गुण ज्याचा तो पदार्थ,–पंचमहाभूतांतील एक. ३ माती; जमीन. ४ दुनिया; जग. ५ पृथ्वीवर राहणारे. ❀ **पृथ्वीची पाठ स्त्री०** पृथ्वीचा पृष्ठभाग; पृथ्वीच्या पाठिवर म्ह० ह्या जगांत, ह्या दुनियेंत(ह्या वाक्प्रचारांतच प्रयोग).**पृथ्वीश पु०** राजा.

पृथु [**सं०**] **वि०** १ विस्तृत. २ मोठा. ३ [पुष्कळ.

पृथुक [**सं०**] **पु०, न०** पोहे म्हणून जे खाद्य करतात त्यांतील एक एक व्यक्ति; पोहा.

पृष्ठ [**सं०**] **पु०, न०** १ पाठ,–छातीच्या मागचा शरीराचा भाग. २ पिछाडी. ३ मागची बाजू. ४ ग्रंथाचें पान. ५ पदार्थाचा वरचा भाग. ❀ **पृष्ठवंश पु०** पाठीचा कणा. **पृष्ठतोनुपृष्ठ क्रि० वि०** एकाच्या पाठीकडे दुसऱ्याचें तोंड येईल अशाप्रकारें (बसणें, उभें राहणें, इ०). **पृष्ठफळ न०** पृष्ठभागाचें क्षेत्रफळ. **पृष्ठमात्रा स्त्री०** अक्षराच्या डोक्यावर मात्रा न देतां पाठीमागें कित्येक लिपींत देतात ती.

पेक वि० कुबड्या. **न०** कुबड. **पेक्या वि०** कुबड्या.

पेकट, पेगट, पेकाड न० कंबर; कंबरेचा सांधा; उ० सकाळपासून हें काम करतां करतां माझें पेकाड मोडून गेलें.

पेकणें, पेखणें [**सं०** प्र+ईक्ष्] **स० क्रि०** (कोणेकाची) वाट पाहात खोळंबत राहणें.

पेंका पु० बेडकासारखा एक प्राणी.

पेंग [**म०** पेंगणें] **स्त्री०** झोपेमुळें बसल्या जागीं डोळे मिटून डुलक्या घेणें.

पेंगणें अ० क्रि० १ बसल्याजागीं झोपेमुळें डोळे मिटून तोल न संभाळतां आल्यामुळें डुकल्या खाणें. २ लंवडत चालणें.

पेगम, पैगम, पेगाम पैगाम [**अ०** पेगम्, पेगाम्=निरोप] १ पु० निरोप. २ युक्ति; हिकमत; डावपेच (करणें). ३ वशिल्याची परंपरा किं० सांखळी (करणें;बांधणें). ४कुभांड(रचणें). ५ वस्तुस्थितीची हकीगत; उ० झांशीच्या दरबारामध्यें कोणी चतुर मुत्सद्दी राहिला नसल्यामुळें......जुन्या मंडळीनें ग्वाल्हेरीस पेगाम पाठवून तेथील वकिलांची सल्लामसलत विचारली. ❀ **पेगंबर, पैगंबर** [**अ०** देवाकडून मनुष्याना निरोप आणणारा (महंमद)] **पु०** इसलामी धर्माचा प्रवर्तक महंमद. **पेगंबरी नवसागर पु०** एक प्रकारचा नवसागर.

पेंगळणें, पेंगुळणें [**म०** ' पेंगणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** अशक्तपणा, झोप, निरुत्साह, इ०मुळें मंदपणें (कोणेकानें) हालचाली करणें.

पेंगळा [**म०**पेंगळणें]**वि०**निर्वीर्य; निरुत्साह; अतिमंद किं० संथ. [युक्त किडा.

पेंगूळ, पिंगूळ पु० एक प्रकारचा अतिदुर्गंधि-

पेच [**फा०**] **पु०** १ कुस्तींत प्रतिपक्ष्यास पाडण्याचा ज्या अनेक युक्त्या त्या प्रत्येक.२अडचणीची किं० कुंठितपणाची स्थिति; पंचाइतीची स्थिति. ३ वादांत प्रतिपक्ष्याला निरुत्तर करणारें कांहीं विधान. ४ दोरी इ०चा वळसा. ५ पागोट्याचे जे वेढे किं० जे सारखे पीळ पडतात ते प्रत्येक. ॐ **पेचपाच पु० अ० व०** कुस्ती, वाद, इ०मध्यें योजावयाच्या हिकमती, युक्त्या, इ०.

पेचक स्त्री०, न०पितळेची तार,–विणकामांत घालतात ती.

पेचकळी स्त्री० पुढें ' पेशकळी ' पहा.

पेचणें स० क्रि० १ पिळवटणें; मुरगाळणें. २ पीळ घालून वळविणें. २ (कोणेकास) भाषण, वाद, इ० मध्यें निरुत्तर करणें. ३ (कोणेकाला) संकटांत किं० पंचाइतींत घालणें. ४ (वांबू, वोरू, लांकूड, इ०च्या) उभ्या चिरफळ्या पाडणें. **अ० क्रि०** (हात, पाय, इ०) मुरगाळले जाणें.

पेचाटी [**म०** पेच] **स्त्री०** अडचणीची किं० कुंठितपणाची स्थिति; कचाटी.

पेचापक्षी पु० एक पक्षी.

पेज स्त्री०, पेजपाणी, पेजवणी न० [**सं०** पेया=पेज; **म०** पाणी] १ पुष्कळ पाण्यांत तांदूळ शिजवून काढतात तें पाणी. २ भात शिजत असतां ज्यादा पाणी काढून टाकतात तें. **टीप,**–असें पाणी न काढतां जो भात होतो त्याला ' पेजबुडा भात' म्हणतात. ॐ **पेजट, पेजवरा, पेजकट वि०** १ ज्यांत पाणी फार राहिलें आहे असा शिजलेला (भात). २ थिलथिलीत शरीराचा आणि अशक्त (मनुष्य). अशा मनुष्याला' पेजा' **वि०** किं० 'पेजपात्र'**न०** म्हणतात.**पेजबुडें न०**भाताची पेज ताकांत घालून करतात तें कालवण.

पेजवरा वर ' पेजट 'पहा. [मध्यें पहा.

पेजवणें,पेजळी,पेजवत, पेजळूक खालीं'पेजें'

पेजें [**सं०** पेय] **न०** व्यालेल्या गायीचें किं० म्हशीचें दूध हें ' पेजें,'आणि वासरूं हें 'जावपें'. **टीप,**–कांहीं शर्तींवर दुसऱ्याची गाय किं० म्हैस आपल्या येथें आणिली असतां या शब्दांचा उपयोग केला जातो; उ० ही गाय तूं पोस, आणि ती व्याली म्हणजे जावपें तूं घे आणि पेंजें आम्हाला दे. मागें ' जावपें ' पहा. **पेजें जावपें, पेजें जापें न० ए० व०** दुसऱ्याकडे आपली गाय किं० म्हैस कांहीं शर्तींवर ठेवण्याची चाल. **पेजवणें, पेजवत न०, पेजळूक स्त्री०** भाड्यानें आणलेल्या गायीम्हशींबद्दल जें देय मालकास दिलें जातें तें. **पेजवतें न०**पावधूक.मागें'पावधूक' पहा.**पेजळी स्त्री०** पावधीं. मागें ' पावधीं ' पहा.

पेट [**म०** पेटणें] **पु०** १ बंदुकींत भरलेली दारू. २ बंदुकीचा बार. ३ (लांकूड इ०) जळू लागणें (घेणें).

पेटका पु० १ वायु, मोडशी, इ० विकृतीमुळें पोटरी, दंड, इ० गात्रांत जो गोळा येतो तो.ह्या अर्थीं'पेटका,''पेडगा',असेही शब्द आहेत. २ सर्पदंशामुळें अंगाचा होतो तो पिळवटा. ३ दंड, पोटरी, इ० वर बुक्की इ०चा आघात झाला असतां कांहीं वेळ तेथें उठतो तो मांसाचा गोळा.

पेटणें अ० क्रि० १ लाकूड इ० ज्वालाग्राही पदार्थांस अग्निसंयोग झाला असतां (त्यांनीं) जळूं लागणें किं० ज्वाला उत्पन्न करणें. २ रागानें उद्दीप्त होणें; रागावणें; संतप्त होणें. ३ भांडण, वाद, मारामारी, इ० मध्यें आवेशानें प्रवृत्त होणें. ४ नांगर, गाडी, इ० ओढावयास बैल इ० शिक्षित होणें किं० घटावणें. रागास पेटणें म्ह० रागावणें. हट्टास पेटणें म्ह० आपला हेका न सोडण्याकडे प्रवृत्त होणें.

पेटणें न० जमीन, भिंतीचा गिलावा, इ० ठोकून नितळ करण्याचें एक आउत.

पेटवण [**म०** पेटविणें] **न०** लवकर जळू लागणारा कोणताही पदार्थ,–धलप्या, गवत,वाळलेलीं पानें, इ०. चूल पेटविण्याला ह्याचा उपयोग केला जातो.

पेटविणें [**म०** ' पेटणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ लाकूड इ० पेटेल म्ह० जळूं लागेल असें करणें. २ घर, गवताची रास, इ० वर निखारे

इ० ठेवून तीं जळूं लागतील असें करणें; त्यांना आग लावणें. ३ (कोणेकास) रागास चढविणें; त्याला राग येईल असें वर्तन किं० भाषण करणें. ४ (बैल इ० जनावरांस) कामाला शिकवून तयार करणें.

पेटा [**सं०**] **पु०** १ मोठी पेटी; पेटारा; टोपली; हारा. २ राजकीय व्यवहारांत अनेक गांवांचा जो एक गट केलेला असतो तो; उ०उंब-रगांव पेटा; मुळशी पेटा. ३ बाबत; सदर; उ० हा खर्च घरखर्चाच्या पेट्यांत लिहिला पाहिजे. ४ वग, सलोखा, नियंत्रणा, इ० संबंध जो दोन माणसांत असतो तो; उ०लखोबा हा गोंदो-बाच्या पेट्यांतील मनुष्य आहे; उ० ही गोष्ट कासोबाला समजली तर त्याच्या पेट्यांतील सर्व माणसांस समजलीच असें गृहीत घेतलें पाहिजे; उ०मोठ्या माणसास आमंत्रण केलें म्हणजे त्याच्या पेट्यांत लहान सहान येतात. ५ वाघाला पक-डावयाचा पेटीच्या आकाराचा सांपळा. ६ नदी ओलांडून जावयासाठीं भोपळे इं०चा केलेला असतो तो तराफा. ७ वाघ, कुत्रा, मांजर,इ०चा गोजिरवाणा बच्चा. ८ (**गणित**) समीकरणाची एक बाजू. ९ काटक्याकुटक्यांचा भारा.

पेटारा [**म०** ' पेटा ' चें एक रूप] **पु०** १ बांब, वेत, इ०ची बनविलेली मोठी पेटी. ही लहान असल्यास तिला ' पेटारी ' म्हणतात. २ नांगरलेलें शेत इ०तील ढिखळें, माती, इ०सपाट करावयाचें सुपाच्या आकाराचें एक लोखंडी आउत.ह्या अर्थीं'पेटारी' **स्त्री**०असाहीशब्द आहे.

पेटारें [**म०** पेटा] **न०** १ बांबू, वेत, इ०ची टोपली. २ जमीन साफ आणि सपाट करण्याचें शेतकऱ्याचें एक आउत.याला ' फावडी ' असेंही म्हणतात.

पेटिया [**हिं०** पेट=पोट] **पु०**आपल्या कांहीं विशेष मुदतीच्या विशेष कामासाठीं योजलेल्या किं०नेमलेल्या माणसास द्यावा लागतो तो शिधा. ꙮ**घसिया घोडा आणि पेटिया नोकर काय कामाचा**?दाणा न देतां केवळ गवतावर पोसलेला घोडा आणि पगार न देतां केवळ जेवावयास घालून ठेवलेला नोकर हे दोन्ही चांगलें काम करीत नाहींत.

पेटी [**सं०**] **स्त्री०** काळजीपूर्वक जतन करावयाचे पदार्थ (दागिने, पैसे, वस्त्रें, इ०),– बंदोबस्तानें ठेवण्याचें लाकूड इ० द्रव्याचें बारदान. २ गळ्यांत घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना असतो त्याचे एक एक घटक अवयव प्रत्येक,–जे दोऱ्यांत किं० तारेंत ओंवितात. ह्या दागिन्याला **पेट्या स्त्री० अ० व०** शब्द आहे. ३ पुरुषांचें दंडावर बांधावयाचें एक चतुष्कोण भूषण. ४ चौरस आकाराचें कोणत्याही प्रका-रचें बारदान किं० वेष्टन; उ० दिव्याच्या काड्यांची पेटी, फटाकड्यांची पेटी, साबणाची पेटी, इ०. ५ घराच्या जोत्याचे जे तीन थर त्यां-पैकीं मधला,–जो थोडासा आंत गेलेला असतो. अगदीं वरच्या थराला 'पाटथर' किं० 'पाटथरा' म्हणतात आणि अगदीं खालच्या थराला 'बेंदरी' म्हणतात. मागें ' पाटथरा ' पहा. ६ बाळंतीण इ० च्या पोटाला बांधावयाचा पट्टा. ७ घोडा, इ० च्या पाठीवरचें जीन, खोगीर, इ० घट्ट आवळून बांधावयाचा पट्टा. ८ छाती आणि पाठ झाकणारा चिलखताचा भाग.

पेटें [**म०** पेटा] **न०** नदी किं० खाडी यां-वरून सामान किं० माणसें पैलतीरास पोंच-विण्यासाठीं एकाशीं एक भोपळे बांधून केलेली रचना.

पेठ [**हिं०**] **स्त्री०** १ जेथें अनेक देशचा माल विकावयास येतो किं०जेथें मोठ्या प्रमाणा-वर व्यापारी माल तयार करण्यांत येतो असें ठिकाण. २ व्यापारी माल जेथें मोठ्या प्रमाणांत विकण्यांत येतो असें ठिकाण किं० असा शह-राचा भाग. ३ शहराचे जे वेगळे वेगळे विभाग ते प्रत्येक; उ० बुधवार पेठ. ४ व्यापारी खबरा किं० बाजारभाव समुच्चयानें. ५ कोणत्याही प्रकारची आलेली खबर. ६ गप्पा मारणाऱ्यांचा अड्डा. ७ पदार्थविशेषाचा दर किं० भाव (चढणें, उतरणें, कडाडणें). ८ गडाच्या किं० किल्ल्याच्या आसमंतात भागांतील वसति. ꙮ **पेठ न व्ह.वी** ही बातमी जाहीर होतां कामा नये. **पेठ लागली** ही खबर सर्वांस कळली. **पेठकरी पु०** १ व्यापाऱ्यांचा आडत्या किं० दलाल. २ गांवचा कुलकरणी. ३ ज्याच्याकडे

विशिष्ट सालीं जोशीपणाची पाळी आली आहे तो. **पेठपाड पु०** बाजारभाव.

पेड [**हिं०**] **न०** १ झाड. **टीप,**–झाडाच्या नांवापुढेंच 'पेड' हा शब्द योजला जातो; उ० आंब्याचें पेड, बाभळीचें पेड, इ०. **पु०, न०** झाडाचा बुंधा. **न०** १ दुसरीकडे रोवण्यासाठीं एके ठिकाणचें उपटलेलें झाड. २ झाडाच्या बुंध्याचा घेर.

पेड पु० दोरी, वेणी, इ० चा एक एक पदर. **न०, स्त्री०** जांतें, घरट, यांचे जे दोन अवयव ते प्रत्येक. **स्त्री०** बसणें, निजणें, इ० साठीं केलेला ओटा. **न०** १ डोंगरावरील किं० डोंगराच्या बाजूवरील सपाट प्रदेश. २ मुंग्या इ० चें वारूळ.

पेंड [**सं०** पिण्याक] **स्त्री०** भुईमूग, तीळ, खोबरें, इ० घाण्यांत घालून त्यांतील तेल काढून घेतल्यावर त्यांचा राहातो तो चोथा,–जो गुरांना पुष्टिकारक असतो. **पु०** पदार्थाला चिकटून बसलेला चिखल, पीठ, इ० चा थर. **स्त्री०** नारळ, ताडफळें, इ० चा घोस किं० लोंगर. **पु०** नारळाचा चढू, निर्गुडीचा पाला, इ० चा कढत थर जो गळूं, निखळलेलें हाड किं० लचकलेलें स्नायु इ० वर बांधतात तो. २ हजीर बिगारीच्या सरणीनें मागच्या टप्यापासून चालत आलेलें ओझें, पत्र, इ०. ३ घराच्या माडीची जमीन करतांना जो चिखल इ० चा पाटणीवर चोपून टणक करतात तो थर. ४ शेताचा बांध रचण्यासाठीं जीं मातीचीं डिखळें काढतात तीं प्रत्येक. ꣸ **पेंड टाकणें** नवीन शेत करावयासाठीं योजलेली जमीन मातीचीं डिखळें सभोवार मांडून आंखून घेणें. **माणसें, गुरें इ० चा पेंड वळणें** तीं एकदम आजारी पडणें किं० मरणें. **सरकार किं० सावकार यांनीं कोणेकाची पेंड वळणें** त्याला त्याच्याच घरांत आडकावणें. **पेंडओल स्त्री०** खालीं ' पेंडवळ ' पहा. **पेंडपोहो पु०** निरुद्योगी किं० आळशी माणूस. **पेंडीचा खडा पु०** गवई, नर्तक, इ० च्या ताफ्यांत मुद्दाम जो सुंदर आणि नखरेबाज इसम लोकांच्या आनंदार्थ बसविलेला असतो तो. **पेंडचिं गुरूं न०** लाचखाऊ.

पेडका, पेडगा, पेंडगा पु० मागें ' पेटका ' पहा.

पेंडका पु०, पेंडकी स्त्री०, पेंडकें न० गवत, कडबा, काटक्याकुटक्या, इ० चा भारा किं० मोळी.

पेंडकें न० (कोष्टयाच्या मागांत) धातूची कडी किं० दोरीचा फास जो वैलीचा गुलडा इ० कांना घातलेला असतो तो.

पेडण न० मोदक, उंडे, इ० उकडतांना गवत, पानें, इ० चा थर जो पातेलांतील पाण्यांत घालून त्यावर मोदक, उंडे, इ० ठेविलेले असतात तो.

पेंडणें [**म०** पेंड] **स० क्रि०** १ (गळूं इ० वर) निगडीचीं पानें, नारळाचा चढू इ० तापवून बांधणें. २ (घरावर) छपर घालणें. ३ (घराची जमीन, पाटणी, इ० वर) मातीचा थर चोपून बसविणें. ४ (काणिंग इ० बारदानाचें तोंड) चिखल इ० नीं बंद करणें. ५ गुंडाळून वळकटच्या रूपांत घालणें.

पेंडवळ, पेंडओल स्त्री० जमीनीची आर्द्रता. ꣸ **पेंडवळ पाऊस पु०** केवळ जमीन भिजविण्याइतका थोडा पाऊस. **पेंडवळ जमीन (रस्ता, शेत, इ०)** अर्धवट भिजलेली जमिन (रस्ता, शेत, इ०).

पेंडस [**म०** पेंड] **पु०, न०** मुसळासारख्या दांड्याला लोखंडाची भाल मारून नेम, दरे, भोकें, इ० पाडण्याच्या उपयोगाचें एक आउत.

पेंडसणें [**म०** पेंड] **न०** गुरांनीं खावयाची पेंड.

पेंडसळ स्त्री०, पेंडसा पु० [**म०** पेंढा] घरावर किं० मांडवावर उन्हाळ्यांत घालतात त्या गवताच्या पेंढ्या.

पेंडा पु० १ ओलें गवत, झाडांचीं पानें, इ० चा भारा. २ भातेण. ३ चुलींत विस्तव जिवत ठेवण्यासाठीं गोवऱ्या, शेणी, इ० पुरून ठेवितात त्या. ꣸ **पेंडापट्टी स्त्री०** फळझाडावर सरकारनें बसविलेला कर.

पेडाबंद पु० गाण्याचें पालुपद.

पेंडाऱ्या [**म०** पेंड] **वि०** एका गांवापासून दुसऱ्या गांवापर्यंत ओझें इ० नेण्यासाठीं वेठीला धरलेला इसम.

पेंडूक [**म०** पेंडका] **न०** कडबा, गवत, इ०चा लहानसा भारा.

पेंडें न०१ मोत्यांचे अनेक सर एकत्र गुंफून करतात तें कंठभूषण. २ दावें, दावण, यांचा विरड्यानें युक्त जो अवयव गुरूं इ० ना घट्ट बांधण्यासाठीं केलेला असतो तो. ३ कांहीं कार्यासाठीं एके ठिकाणीं जमलेल्या माणसांची टोळी. ४ एकमताच्या मनुष्यांचा किं० एका कुटुंबातील माणसांचा जमाव. ५ (कोष्ट्याच्या मागांत) जुपणें आणि अटणी ह्यांना जोडणाऱ्या दोऱ्या प्रत्येक. ६ बैला किं० बैलीं बांधावयाचा फास.

पेंडोळा पु०, पेंडोळें न० १ नवार, दोरी, इ० चें वेटोळें.२लाकडाची मोळी,गवताचा भारा, इ०बांधावयाची,गवत,साल,लवचीक फांदी,इ०ची दोरी. ३ शेतांची मर्यादा दाखविणारी दगड, मातीं, इ०ची रांग किं० दगड, माती, इ० चा बांध. ४ वेठ बिगारीचे गडी ज्या मार्गानें ओझें इ० एका गांवापासून दुसऱ्या गांवास पोंचवितात तो मार्ग. ह्या अर्थी ' पेंडाची वळ ' **स्त्री०** हाही शब्द आहे. ५ कांहीं काम करण्याचा शिरस्ता.

पेढ पु० १ दोरी,वेणी, इ० चा पदर. २ जांत्याच्या ज्या दोन तळ्या त्या प्रत्येक. ३निवडुंगाची एक जात. **पु०** १ पोफळीचें किं० नारळीचें झाड (गणती करतांना). ३ डोंगराच्या बाजूवरचा सपाटीचा प्रदेश.

पेढा, पेडा [**हिं०**] **पु०** १ दुधाच्या खव्यांत साखर घालून करतात ते गोळे प्रत्येक. याला ' दूध पेढा ' असें म्हणतात. २ डोंगराच्या बाजूवरील सपाटीचा प्रदेश. ३ डोंगराशेजारची लहानशी टेकडी. ❀ **पेढवणी** [**म०**पेढा+पाणी] **न०** हलवाई पेढे ज्या ताटांत करतो तें धुवून निघतें पाणी.

पेंढा पु० १भाताचें तृण किं० भातेण किं० त्याचा गठ्ठा. २ जोंधळे पाण्यांत आंबवून करतात तें पेय. ३ भातेणापासून गुरांसाठीं करतात तें पेय.

पेंढार न०, पेंढारा पु० जमावानें लुटालूट करणारे लोक समुच्चयानें. **पेंढार न०** ह्या लोकांनीं केलेली लुटालूट. ❀ **पेंढारी, पेंढारकरी पु०** ह्या टोळींतील कोणीही इसम.

पेंढी स्त्री० १ गवत, कडबा, इ० चा भारा. २ जोंधळा इ० च्या ताटांची जुडी. ३ पुढें 'पेढें' (कोष्ट्याच्या मागांतील)पहा. ४ व्याज,कर्ज, देणीं, इ० ची वाढलेली किं० फुगलेली रक्कम. ❀ **जळत्यांत पेंढी टाकणें** कलह करणाऱ्या दोन माणसांस एकमेकांविरुद्ध चेतावणें.

पेढी [**सं०** पीठ] **स्त्री०** १ सराफ,हुंडीवाले, इ० चें दुकान. २ देवाच्या मूर्ति ठेवावयाचा ओटा. ३ दुकान.

पेढें न० १ (कोष्ट्याच्या मागांत) बैलीच्या गुलड्याच्या दोरीचा फास किं० कडी. २ ढेकणी आणि वही यांना जोडणारा फास.

पेव्या पु० निवडुंगाची एक जात.

पेणें न० प्रवासांतील मुक्कामाचें स्थळ.

पेंद न० १ गवत, भातेण, इ० चा एके ठिकाणचा झुबका. २ नारळांचा भारा.

पेंदारणें [**म०** पेंद] **अ० क्रि०** १ झुबक्याच्या रूपानें(गवत इ०) उगवणें.२गवत, रानझाडें, इ० नीं (जमीन) व्याप्त होणें.

पेंदी, पेंधी स्त्री० १ पेल्याची बैठक. २ कागदाच्या पतंगाचा खालचा भाग. ह्याला ' पेंदी पतंग 'ही म्हणतात.

पेंदी स्त्री० भोपळ्याच्या वीण्याच्या भोपळ्यास जो काष्ठादिकांचा पदार्थ बसविलेला असतो,ज्यांत तारांचीं अग्रें गुंतविलेलीं असतात तो.

पेंदी, पेंधी, पेंधवी [**फा०** पेवंद्] **स्त्री०** झाडावर कलम बांधणें.

पेपाणी स्त्री०,पेपरें न०१ताडपत्राची सुरळी,— जी सनई इ०च्या तोंडांत बसवितात ती.२मुलांची वाजवावयाची केळीचें पान इ० ची पिपाणी.

पेय [**सं०**] **न०** १ जें प्यावयाचें तें,—चहा, काफी, कोको, दूध, इ०. २ दूध. **वि०** पिण्यास योग्य. **पेया स्त्री०** भाताची पेज.

पेरू, पेरकें [**सं०** पर्व] **न०** १ बोट, ऊंस, बांबू, इ० चें कांडें किं० त्यांचा गांठळ भाग. २ बोटाच्या अग्राला होतो तो एक रोग.

पेर [**म०** पेरणें] **पु०** १ भात इ० कांतील दाणे कणसांतून निघून यावे म्हणून बैलांच्या

पायांखालीं तुडविलें जाण्यासाठीं जो भात इ०चीं ताटें पसरतात तीं (घालणें). २ फुलें, पुस्तकें, पानें, चिरगुटें, इ०चा जमीनीवर पडलेला पसारा (घालणें, पडणें, इ०). स्त्री० बी पेरणें ही क्रिया; उ० पेर तसें फळ.

पेर, पेरू स्त्री० एक झाड. **न०** त्याचें फळ.

पेरओल, पेरवल [**म०** पेरणें+ओल] **स्त्री०** बी पेरावयाला योग्य ती जमीनीची आर्द्रता.

पेरकूं [**म०** पेर] **न०** १ भिकार बोरू. २ (**लाक्षणिक**) लचांड; शुक्लकाष्ठ; ब्याद; उ० हें काय माझ्या मागें पेरकूं लाविलें आहेस ?

पेरकूट न० निवडुंगाची एक जात.

पेरकें वर ' पेर ' पहा.

पेरण, पेरणें, पेहेरण, पेहरण (–णें) [**फा०** पेराहन्] न० १ मुलांचें अंगडें. २ मोठ्या माणसाचा सदरा.

पेरणी स्त्री०, पेरा पु० [**म०** पेरणें] जमीनींत बीजें, धान्याचे दाणे, इ० पेरण्याची क्रिया.

पेरणें [**सं०** प्र+स्तृ (पसरणें)] **स० क्रि०** १ जमीनींत धान्यें, बीजें, इ० उगवावयासाठीं टाकणें. २ (**लाक्षणिक**)पदार्थ इतस्ततः जमीनीवर टाकणें. ३(**लाक्षणिक**) कार्यविशेषाची पूर्वतयारी करून ठेवणें किं० त्याचा पाया घालून ठेवणें. ४ (**लाक्षणिक**) (बातमी) अनेक लोकांना सांगूनठेवणें,–त्यांनीं ती ज्याला त्याला सांगून फैलावावी म्हणून. ५ (**लाक्षणिक**) अमुक वेळीं आनंदसूचक टाळ्या वडवाव्या, अमुक वेळीं फजीतीच्या टाळ्यां वडवाव्या किं० हुर्यो म्हणून ओरडावें असें पढवून ठेविलेलीं (माणसें) सभेमध्यें जागोजाग बसवून ठेवणें. ६ (**लाक्षणिक**) व्याज मिळण्यासाठीं अनेक माणसांस (कर्जाऊ रकमा) देऊन ठेवणें.

पेरवळ स्त्री० जमीनीची आर्द्रता. वर ' पेरओल ' पहा. [पेरण्याची क्रिया.

पेरा [**म०** पेरणें] **पु०** धान्यें, बीजें, इ०

पेरा पु० गोठ, अंगठ्या, इ०करतांना धातूची कांब वळविण्याची सोनार लोकांची क्रिया. ※ **पेरांची आवटी स्त्री०** सोनार लोकांचा ठसा.

पेराव, पेरावा,पेरावणी पुढें'पेहराव' इ०पहा.

पेरुजा, पेरोजा पु०, पेरोज पु०,न० [**फा०** फेरोजाह्] एक हिरवट रंगाचें मूल्यवान रत्नविशेष.

पेरू पु० एक फळविशेष.

पेरें [**सं०** पर्वन्]**न०** १ बोरू, ऊंस, इ० चें कांड. २ बोटाला होतो तो एक रोग. ३ पेऱ्याच्या आवटीवर ठोकून जागोजाग जिच्यावर नक्षी उठविली आहे अशी सोन्याची किं० रुप्याची पट्टी.

पेल पुढें ' पेलाव ' पहा. [येणें).

पेलकट न० तोहमत, आरोप, टपका (घालणें,

पेलण न०, पेळणी स्त्री० [**म०** पेलणें] १ तोलून धरण्याची क्रिया. २ जोर, सक्ती, वजन, (चालविणें).

पेलणें स० क्रि० १ (जड ओझें, उभा केलेला खांब, दगड, इ०) न डळमळूं देतां स्थिर धरणें. २ (मुद्गल, जोडी, इ०) हातांत धरून व्यायामासाठीं (तीं) नानाप्रकारें फिरविणें. ३ (संसार, कांहीं जोखमीचें काम, इ०) अव्यवस्था न होऊं देतां संभाळणें किं० चालविणें. ४ घर, खांब, इ० एका अंगावर कलणें. ५ मनुष्य, पशु, इ० ना पिटाळणें किं० जोरानें चालविणें.

पेलणें, पेलनें न० घराच्या माथ्यावर घातलेलें गवत वाऱ्यानें न उडावें म्हणून वर जे वांसे इ०घालतात ते प्रत्येक. [पटाईत.

पेलवान, पहिलवान पु० कुस्ती करण्यांत

पेला [**फा०** पियालाह्] **पु०** १ धातु, कांच, मृत्तिका, इ० चें आकारविशेषाचें भांडें. २ (कोष्ट्याच्या मागांत) ताण्याचे तंतु एकदा खालीं आणि एकदा वर दाबल्यानें त्या तंतूच्या दोन रांगांत उत्पन्न होतो तो त्रिकोनाकार अवकाश.

पेलाव, पेल [**म०** पेलणें] **पु०** १ कांहीं वजन, ओझें, इ० उचलून तें डळमळूं न देतां तोलून धरणें. २ उडी मारतांना शरीराचीं गात्रें विशिष्ट संस्थानांत ठेवणें. ३ कांहीं काम करतांना एकवटलेलें सामर्थ्य.

पेला पु०, पेलें न० काटक्याकुटक्यांचा भारा.

पेलु स्त्री० डोक्यावरील केशांची बट.

पेव, पेंव न०धान्यें साठविण्यासाठीं जमीनींत

केलेली खोली. ❀ पेव कुटणें भिकारी, याचक, मुंग्या,इ०चा मोठा समुदाय एकदम येणें.

पेवडी स्त्री० पळसाचीं फुलें गोमूत्रांत भिजत घालून करतात तो पिवळा रंग.

पेवणी [म० पेवणें] स्त्री० पोहण्याची क्रिया (मारणें, टाकणें).

पेवणें अ० क्रि० (पाण्यांत) पोहणें.

पेवंदी, पेवंधी [फा० पेवंद] वि० १ ज्या-वर कलम बांधलें आहे असें (झाड). २ ज्याला जोड दिला आहे किं० ठिगळ मारलें आहे असा.

पेश [फा० पेष्] वि० दरबार, शिष्टांची मंडळीं, इ०मध्यें ज्याला मान दिला जातो असा.

पेशकबज, पेषकबज [फा०] न० एक प्रकारची कट्यार.

पेशकश (–ष) [फा०] पु० कांहीं सनद, वडिलोपार्जित हक्क, सन्मान, इ० सरकारांतून मिळाल्याबद्दल जें सरकारास देय द्यावें लागतें तें.

पेश (–ष–) कळी, पेसकळी स्त्री० जे अनेक तुकडे शिवून अंगरखा केलेला असतो त्यांपैकीं एक विशेष आकाराचा तुकडा.

पेशजीं [फा० पेष्] क्रि० वि० मागें, कांहीं काळापूर्वीं (फक्त पत्रांत).

पेशवा [फा० पेष्वा] पु० १पुढारी.२ मुख्य मंत्री. ३ मराठ्यांच्या राज्याचा एक मुख्य मंत्री. ❀ **पेशवाई** स्त्री० पेशव्यांची राज्यसरणी.

पेश (–ष–)वाज, पेश (–ष–) वात (–द्) पु० १ झगा. २ नर्तकी स्त्रीचा झगा.

पेशा [फा० पेषाह्] पु० १ धंदा. २कारकून, शागीर्द, इ०चा व्यवसाय.

पेशाब, पेसाब [फा०पेष् आब्=पुढचें पाणी] पु० लघवी (करणें).

पेषकबज न० एक प्रकारची कट्यार.

पेषण [सं०] न० १ चिरडणें. २ कुटणें. ३ दळणें. ❀ **पिष्टपेषण** न० १ दळलेलें पुन्हा दळणें. २ निरर्थक उद्योग;अनावश्यक खटपट किं०याता-यात.३जें एकदा केलें तें जरूर नसतां पुन्हा करणें.

पेषणूक, पेसणूक [सं० प्रेषण=पाठविणें] स्त्री० पिशाचास कांहीं देऊं करून घालविणें.

पेषणें [सं०पिष्=दळणें]स०क्रि०(धान्यादि) जात्यांत घालून दळणें.

पेषवाज मागें ' पेशवाज ' पहा.

पेस स्त्री० भोपळा, काकडी, कलिंगड, इ०ची फोड किं० फाक.

पेसकळी वर ' पेशकळी ' पहा.

पेसणें [सं० प्रेष=पाठविणें] स० क्रि० कांहीं नवस करून कोणेकाला उपद्रव करण्या-साठीं त्याच्यावर (भूत) पाठविणें.

पेसणें [म० पेस] स० क्रि० (भोपळा, काकडी, इ०) फाकींच्या रूपानें चिरणें.

पेसतर [फा० पेष्तर]वि०येणारा;आगामी; पुढचा; उ० पेसतर साल, वर्ष, महिना, जमा-बंदी, इ०.

पेहरण, पेहरणें [फा० पेराहन्] न० १ मुलाचें अंगडें. २ सदरा.

पेहराव (–वा) [हिं०पेहराव]पु०पोशाख; पोशाखाची तऱ्हा किं० थाटणी. ❀ **पेहरावणी** स्त्री० कोणेकास पोशाख बक्षीस देणें किं० नजर करणें.

पेळ स्त्री० अंगण, खळें, इ०च्या सभोंवार उभारलेला कठडा किं० ओबडधोबड भिंत.

पेळू, पेळव स्त्री० १ कापूस, काथ्या, लोकर, इ०ची थोडासा पीळ घालून केलेली वळ-कटी. २ गुरांना होतो तो एक रोग.

पेक्षां [सं० ' अपेक्षा ' च्या तृ०चें ए० व०; ०च्या तुलनेनें] क्रि० वि० १ तुलनेनें;उ०रामा-पेक्षां गिरिधर उंच आहे. २ त्या संबंधांत; त्या अर्थीं; उ० ज्यापेक्षां तो रक्कमच नाकबूल करीत आहे त्यापेक्षां ती गमावून घेणें प्राप्त आहे.**टीप,–** ह्या अर्थीं ' पक्षीं ' असाही शब्द योजला जातो.

पै अव्यय खरोखर. **टीप,–**पादपूरक शब्द असाही ह्याचा कवितेंत उपयोग होतो.

पैकर्डी स्त्री० मोहोळाची पोळी,–माशांच्या वसतीची जागा.

पैकणें [सं० प्रेक्ष्] स० क्रि० (कोणेकाची) वाट पाहणें किं० मार्गप्रतीक्षा करणें.

पैका पु० १ पैसा. २ रुपयाचा चतुर्थांश किं० शिवराईचा बारावा भाग. ❀ **पैकेपूर, पैकेकरी, पैकेवाला, पैकेवान** पु० श्रीमंत मनुष्य. **पैकेपूत** पु० पैशासाठीं पुत्रत्व स्वीकारणारा.

पैकाना [**फा०** पाखानाह्] **पु०** शेतखाना; संडास.

पैकाना पु० गोठ्यांतील शेण इ० खरडून काढण्यासाठीं विरीचा किं० माडाच्या पोयीचा तुकडा घेतात तो.

पैकाळा पु० घरकामासाठीं किं० घर, शेत, इ० वर राखण करण्यासाठीं पगार देऊन ठेविलेला गडी.

पैकीं श० यो० अ० ०तून; ०मधून; उ० शंभर रुपायांपैकीं अकरा रुपये मी तुम्हांस आतां देत आहें.

पैखणें [**सं०** प्रेक्ष्=वाट पाहाणें] **स० क्रि०** (कोणेकाची) वाट पाहणें. [इ० पहा.

पैगम, पैगंबर, इ० मागें ' पेगम, ' 'पेगंबर '

पैंगळ मागें ' पिंगुळ ' पहा.

पैज स्त्री० १ मी करतों तें विधान खरें आहे, खोटें ठरल्यास मी अमुक दंड भरीन,असा करार. २ मी करीत आहें ती प्रतिज्ञा मी निस्तरीन, न निस्तल्यास मी अमुक दंड भरीन,असा करार. ३ अमुकगोष्टीचें अमुक पर्यवसान होईल,न झाल्यास मी अमुक दंड भरीन, असा करार. **टीप,**—वरील सर्व अर्थीं **क्रि०** करणें, मारणें. ४ कोणत्याही प्रकारचा ठराव. ॐ **पैजेचा विडा पु०** अमुक काम करावयाचें आहे,जो कोणी तें करावयास समर्थ असेल त्यानें हा विडा उचलावा असें म्हणून जो विडा सार्वजनिक रीत्या ठेविलेला असतो तो (मांडणें, ठेवणें, उचलणें). **पैजेचा विडा उचलणें** १वरचा अर्थ पहा.२कांहीं काम नेटानें चालविणें.

पैंजण [**हिं०** पैंचनी] **पु०** स्त्रिया किं० खबुतरें, ह्यांच्या पायांत घालावयाचें एक भूषण.

पैजार [**फा०**] **स्त्री०** जोडा(पायांत घालवयाचा); पायपोस. ॐ **पैजारखाऊ वि०** खेटरांनीं सडकला जाण्याच्या लायकीचा.**पैजारपगडी स्त्री०, पैजारी पागोटें न०** कांहीं एका विशिष्ट आकाराचें बांधलेलें पागोटें.

पैठण न० एक शहर. ॐ **पैठणी वि०** १ पैठण शहरीं (विणलेलें लुगडें, पागोटें, इ०). २ खोटा;बाह्यात्कारी;वरवरचा;उ०पैठणी आदरें. ३ आकारानें मोठा पण अत्यन्त लहान परिमाणाचा (द्रोण).

पैठा [**हिं०**] **पु०** प्रवेश; शिरकाव.

पैण स्त्री० १ त्वचेचा एक रोग.२ पैज (करणें, घालणें).ॐ**पैण धरणें** (किं० **भोगणें, बाळगणें, पाळणें**)१ हेका धरून बसणें. २ तुच्छ लेखणें.

पैण मागें ' पयेण, ' ' पह्याण ' पहा.

पैत्र, पैतृक [**सं०**] **वि०** वडिलोपार्जित.**न०** श्राद्ध.

पैत्तिक [**सं०**] **वि०** पित्तासंबंधाचा.

पैत्य न० पित्त.

पैदा [**फा०**] **वि०** १ मिळालेला. २ उत्पन्न झालेला. ३ बनविलेला.

पैदास्त [**फा० पैदाइष्**] **स्त्री०** १ लाभ; प्राप्ति; मिळकत; नफा. २ उत्पत्ति; निपज.

पैन मागें ' पह्यान ' पहा.

पैमाशी, पैमाषी,पैमाश (–ष) [**फा०**] **स्त्री०** जमीनीची मोजणी किं० मापणी.

पैरव पु०,स्त्री०, पैरवी स्त्री०[**फा०**] दळणवळण; जाणें येणें; घरोब्याचा संबंध (असणें, घालणें).

पैरा पु० १ दिवसाच्या बोलीनें कामासाठीं ठरविलेला गडी. २ (तापाची) पाळी. ३ इरजीक. मागें ' इरजीक ' पहा.

पैराव, पैरावा मागें ' पेहराव' पहा.

पैरें न० सकाळीं कांहीं घटकापासून संध्याकाळीं कांहीं घटकांपर्यंत शेतकामास मजूरीनें लाविलेली स्त्री किं० पोर किं० अशा स्त्रीनें किं० पोरानें एका दिवसांत केलेलें काम (घालणें). ॐ **पैरेपण न०** मजूराचा धंदा किं० त्याला दिलेलें वेतन.

पैल वि० नदी, तळें, इ० चा पलीकडचा कांठ. ऐल ह्य० आलीकडचा कांठ. ॐ **पैलतीं क्रि० वि०** पलीकडच्या कांठास. **पैलपार पु०** पलीकडचा कांठ. **क्रि०वि०**पलीकडच्या कांठाला. **पैला वि०** पलीकडचा. **पैलाड स्त्री०**दुसरा कांठ.

पैलवान पु० १ कुस्ती खेळण्यांत पटाईत. २ बळकट शरीराचा इसम. मागें'पहिलवान'पहा.

पैलीकडे इ० मागें ' पलीकडे' इ० पहा.

पैलू [**फा०** पहलू] **पु०** १ बाजू. २ हिरा, माणिक, इ० ची घासून चकचकीत केलेली एक बाजू किं० तोंड. ॐ **पैलूदार वि०** ज्याला पैलू

पाडण्यांत आलेले आहेत असा (हिरा इ०).

पैवंद इ० मागें ' पेवंद ' इ० पहा.

पैवस्ती [**फा०** पय्वस्त्] **स्त्री०** १ परठिकाणाहून आलेलें पत्र इ० आपल्या हातीं कोणत्या दिवशीं पडलें त्या दिवसाची तारीख, मित्ती, इ० त्याच पत्रावर नमूद करतात ती. २ कोणा माणसाची एकाद्या गांवीं कांहीं काळ जी वसति ती. ३ एकाद्या ठिकाणीं एकाद्या माणसाचें असलेलें जाणेंयेणें, दळणवळण, देवघेव, इ०.

पैशाच, पैशाचिक [**सं०**] **वि०** पिशाच्चासंबंधाचा. ॐ **पैशाचविवाह पु०** जबरदस्तीनें पळवून आणलेल्या मुलीशीं केलेलें लग्न.

पैशुन्य [**सं०**] **न०** १ दुष्टपणा. २ चहाडी. ३ ठकबाजी. ४ कोणेकाच्या ठायीं असलेला उणेपणा (काढणें, प्रकट करणें).

पैष्टी [**सं०**] **स्त्री०** पिठाची दारू.

पैस पु० मोकळी किं० अघळपघळ जागा. **वि०** अघळपघळ, संकुचित नव्हे अशी(जागा). **क्रि० वि०** मध्यें मध्यें अंतर सोडून मोकळेपणानें (बसणें,निजणें,इ०).**उ०वा०अ०**दूर व्हा!वाट द्या ! ॐ **पायांपैस नसणें** दाटीचा किं० गर्दीचा असणें.

पैसा पु० १ तीन पै ह्या किंमतीचें एक चलनी नाणें. २ द्रव्य; संपत्ति. ३ तीन रुके किं० साडेसात विघे इतकें क्षेत्रफळ.४एक कीटविशेष.ॐ **पैशापायली, पैशापासरी वि०** १अत्यंत विपुल.२ अति स्वस्त. **पैसाआडका, पैसारुका पु०ए०व०** अनेक प्रकारच्या नाण्यांच्या रूपांत असलेलें द्रव्य. २ घरांतील मूल्यवान जिनसा समुच्चयानें;द्रव्य. दागिने,सणंगे,इ०.

पैसाव [**सं० प्रसर**] **पु०** पूर्वीं दाटीनें किं० खेचाखेच करून बसलेल्या लोकांना नंतर अधिक जागा मिळून झालेला मोकळेपणा.

पैसावणें [**म०** पैसाव] **अ० क्रि०** पूर्वीं दाटीनें बसविलेले लोक, ठेविलेले पदार्थ नंतर विरळपणें किं० अघळपघळ बसणें किं० राहाणें.

पैसाविणें [**म०** ' पैसावणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** (माणसें) विरळ करणें किं० बसविणें; पूर्वीं चिकटून किं० जवळ जवळ असलेले (पदार्थ) विरळ विरळ ठेवणें किं० मांडणें.

पैसाळू वि०बंदरांत बाहेरून आलेला (माल).

निकाळू वि० बंदरांतून बाहेर गेलेला (माल).

पों, पोहो पु० एका खेपेस गुदद्वारें बाहेर पडलेल्या गू, शेण,इ० ची रास.

पोई पुढें ' पोय ' पहा.

पोईड न० ओहोळ (पाण्याचा).

पोऊळ, पोंवळ स्त्री० देवळाच्या पटांगणाच्या चारी बाजूंच्या भिंती प्रत्येक.

पोंक पु०, न० एक मासा.

पोंक न० कुबड. **वि०** वांकलेला, कललेला (घर, माणूस, खांब).

पोकटा पु० लहान किं० कोंवळा नारळ.

पोकटी,पोकोटी,पोकाटी स्त्री०कोंवळें पोफळ.

पोकण न० पोकळ दाणा (कणसांतील); किडीनें खाल्लेला दाणा.

पोकणें अ० क्रि० कलणें, वांकणें.

पोकळ वि० १ ज्याच्या आंत सार, स्थैर्य, दृढता, खरेपणा, वीर्य, भक्कमपणा, लभ्यांश, फायदा, उपयुक्त अंश, इ० गुण नाहीं असा (उद्योग, धंदा, भाषण, ग्रंथ, काम, इ०). २ सुलभ रीतीनें प्राप्त होणारें (ज्ञान, विद्या, कला, इ०).३ संदिग्ध, अस्पष्ट, कच्चा (भाषण, हिशेब, लेख, इ०). ॐ **पोकळ खर्च पु०** खरोखरीं जो झाला नाहीं पण केवळ यादींत घातला आहे असा खर्च. **पोकळ जमा स्त्री०** जी रक्कम मिळण्याची आशा नाहीं किं०जी रक्कम मिळालेली नाहीं अशीं चोपडींत नमूद केलेली जमा. **पोकळ जमाखर्च पु**०पक्का किं०निश्चित न झालेला जमाखर्च.**पोकळ जमीन स्त्री**०ढिसूळ किं० भुसभुशीत जमीन (सहज नांगरतां येईल अशी). **पोकळधोत्र्या, पोकळभट पु०** ब्राम्हण. ब्राम्हणांस निंदेनें हा शब्द ब्राम्हणेतर लावितात. **पोकळब्रह्म न०** दिखाऊ, सत्वहीन, वीर्यहीन, लाभहीन,असें काम, धंदा,भाषण,इ०.**पोकळसूत्री वि०** अव्यवस्थित,अजागळ,किं० गैबती (माणूस). **पोकळापोकळ (–ळी) वि०** ज्यांत कांहीं लभ्यांश, सत्वांश, इ० नाहीं असा (उद्योग, धंदा, भाषण,इ०).**पोकळिस्त वि०**१संदिग्ध; अस्पष्ट. २ खोटा (जमाखर्च, हिशेब, खत, इ०). ३ पक्का न केलेला (हिशेब, जमाखर्च). **बडा घर पोकळ**

वांसा जें भपकेदार दिसतें तें नेहमीं सत्त्वस असतेंच असें नव्हे.

पोकळा **पु०** एक पालेभाजी.

पोकळी [**म०** पोकळ] **स्त्री०** १ रिकामी जागा किं० अवकाश. २ अंतरीक्ष; आकाश. ३ कागदाची नळी (दारू इ० भरण्याची). ॐ **पोकळीस जाणें, पोकळीखालीं जाणें** (प्रयत्न, पैसा, कष्ट, इ०)फुकट जाणें किं० निरुपयोगी ठरणें. **पोकळीक स्त्री०** पोकळपणा; निःसत्त्वपणा.

पोकू [**नंदभाषेंत**] **वि०** चार ही संख्या.

पोक्त, पोक्ता [**फा०** पूख्ताह] **वि०** १ प्रौढ वयाचा (मनुष्य); प्रगल्भ किं० परिणत (बुद्धि, समजूत). २ साधकबाधक गोष्टी मनांत आणून ठरविलेला (बेत, विचार). ३ विपुल; कार्यविशेषास पुरेशी (साधनसामग्री). ४ जाडीं (खांब). ५ मजबूत (घर इ०). ६ पोरपणांतून अतिक्रान्त (मुलगा, मुलगी). ७ जड (ओझें). ८ विस्तर्णि पात्राची (नदी).ॐ **पोक्ता जिन्नस पु०** स्थलविशेषीं विपुल मिळणारा किं० उत्पन्न होणारा जिन्नस. **पोक्तादाणा पु०** स्थलविशेषीं बहुतेकांच्या खाण्यांत येणारा (दाणा, धान्य, इ०). [खांब, इ०).

पोक्या वि०ज्याला पोक आहे असा (मनुष्य,

पोंख स्त्री० वस्त्र, गांव, इ० चा शेवट.

पोखंड, पोवखंड न० पोफळीची विरी.

पोखर न०, पोखार, पोखारा पु० १ उंदीर, घुशी, इ० नीं भिंत, झाड, बांध, जमीन, इ० मध्यें पाडलेलें भोंक. २ अशा भोकांतून बाहेर पडलेली किं० काढलेली माती, भूस, इ०. ३ डोंगरांतील गुहेसारखें खोल विवर.

पोखर [**सं०** पुष्कर] **न०** तळें, सरोवर.

पोखर, पोखार वि० १ पोखरलेली (भिंत, जमीन, झाडाचें खोड, इ०). २ भुसभुशीत (जमीन इ०).

पोखरण [**सं०** पुष्करिणी] **स्त्री०** १ तळें. २ कमळाची वेली. ३ हत्तीची स्त्री. ४ एक औषधोपयोगी झाड.

पोखरणें [**म०** पोखर; **सं०** प्र+कृ] **स० क्रि०** १ आंतील अंश काढून टाकून (लाकूड, धान्य, डोंगर,इ०) पोकळ करणें. २(**लाक्षणिक**) आजार, रोग, इ० यांनीं (शरीर) निःसत्त्व किं० निर्वीर्य करणें. ३ (**लाक्षणिक**) अंतःकलहांनीं (राज्य, कुटुंब, इ०) ऱ्हासाच्या पंथाला लावणें.

पोखरणें [**म०** पोखरणें] **न०** झाड, खडक, इ० मधील भगदाड किं० विवर.

पोख्त, पोख्ता वर ' पोक्त, ' 'पोक्ता' पहा.

पोंग न० १ कुबड. **वि०** कुबड ज्याला आहे असा.

पोंगडा [**सं०** पोंगड] **पु०** पांच ते दहा किं० पांच ते सोळा वर्षें पर्यंतच्या वयाचा मुलगा. **पोंगडी स्त्री०** पांच ते दहा वर्षांपर्यंतच्या वयाची मुलगी.

पोंगणें अ० क्रि० (मनुष्याचें शरीर, भांडें, भिंत,इ०) मध्यें पोंग किं०कुबड यांनीं युक्त होणें.

पोंगा,पोंग्या [**म०** पोंग] कुबड. **वि०**कुबड ज्याला आहे असा (मनुष्य, भांडें, इ०). पोंगी **स्त्री०**.'पोंगे' **न०**. **पोंगा पु०** १ सर्पाचें पिल्लूं. २ झाडाचा अंकुर किं० मोड. [देठ.

पोंगाडा पु० कासाळूं नांवाच्या आळवाचा

पोगिरा पु० सुताराचें एक हत्यार,–कोरणें इ० कामाचें.

पोगा [**सं०** पूग] **स्त्री०** माड, पोफळ, इ० झाडांचा लोंगर,– फळांची फांदी.

पोच पु०१ समुद्रकांठीं असणारी सापाची एक जात किं० त्या जातीचा साप. २ लाकडावर बारीक रेघ ओढण्याचें सुताराचें एक हत्यार.

पोच,पोहोच,पोहच [**हिं०**] **स्त्री०** १ विशिष्ट स्थानाप्रत किं० स्थितीप्रत मनुष्य, पदार्थ, इ० चें येणें. २ पदार्थ, मनुष्य, इ० आपल्या हातीं येऊन पडणें किं० आपणापर्यंत येणें. **पु०** १ प्रवेश, शिरकाव, विशिष्ट स्थळीं जाणें किं० जाण्याची सोय किं० शक्यता; उ० श्रीमंतापाशीं गरीबाचा पोच कसा व्हावा?२बुद्धीचा पल्ला किं० टप्पा. ३अमुक केलें असतां अमुक होईल असा तर्क करण्याचें बुद्धीचें सामर्थ्य; उ० ह्या पोराला पोच नाहीं म्हणून तो आपल्या वरिष्ठाला हावें तसें बोलला आणि त्यानें नोकरी गमावून घेतली.

पोचणें, पोहोचणें, पोहचणें [हिं० पोहचना] **अ० क्रि०** १ विशिष्ट स्थलाप्रत किं० स्थितीप्रत जाणें. २ पैसा, पत्र इ० येऊन हातांत पडणें; मिळणें. ꣸ **तर्कास पोचणें** पाहिलेल्या कांहीं खुणा, ऐकिलेले कांहीं शब्द, इ० वरून (कोणेकाचा) कांहीं तर्क होणें किं० (कोणेकानें) कांहीं अटकळ करणें. **खुणेस पोचणें** कोणेकानें डोळे इ० नीं केलेली इशारत (कोणेकानें) जाणणें किं० (कोणेकाला) समजणें.

पोचता, पोहचता, पोहोचता [म० पोचणें] **वि०** पोचलेला; हातीं पडलेला; मिळालेला; पाठविलेला; उ० तुमचा कागद मला पोचता झाला; उ० मी आपल्या मुलीला तिच्या नवऱ्याकडे पोचती केली.

पोचविणें, पोहोचविणें, पोहचविणें [म० 'पोचणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** माणूस किं० पदार्थ विशिष्ट स्थलापर्यंत, स्थितीपर्यंत, किं० पल्ल्यापर्यंत नेणें किं० घेऊन जाणें.

पोचलेला, पोहोचलेला, पोहचलेला [म० पोचणें] **वि०** १ धूर्त; चाणाक्ष. २ पुढच्या गोष्टीची तजवीज किं० तरतूद अगोदरच करून ठेवणारा.

पोचट [म० पोचा] **वि०** १ आंत पोकळ असल्यामुळें जो दाबल्यानें सहज दबतो किं० चेपल्यानें सहज चुरगळतो असा (पदार्थ). २ दिसण्यांत बळकट पण खरोखरीं अशक्त असा (माणूस, जनावर). ३ बढाया मारणारा पण कर्तृत्वशून्य (माणूस). ४ ज्याला पोचे आले किं० पडले आहेत असें (भांडें).

पोचंडी, पोचुंडी, पुरचुंडी स्त्री० लहानशी गांठोडी किं० गठडी.

पोचळणें [म० पोचा] **अ० क्रि०** पोच्यांनीं (भांडें) युक्त होणें. **स० क्रि०** (भांड्याला) पोचे पाडणें.

पोचा पु० धातूचें भांडें, कांहीं दागिना, इ० वर आघात झाल्यानें त्यांना पडतो तो खळगा इ०.

पोचारणें [म० पोचा] **स० क्रि०** (वस्त्रादि) धुतांना त्याचेवर बुक्क्या मारणें; (वस्त्र) धुतांना चुबकणें.

पोचारा, पोंचेरा [म० पोचा] **वि०** ज्याचेवर पोचे किं० खळगे पडले आहेत असें (भांडें, दागिना, इ०).

पोंची [हिं० पोहंची] **स्त्री०** १ मनगट. २ कोणेकाचा वकूब, ताकद, सत्त्वसपणा, सामर्थ्य, किं० कर्तृत्वशक्ति. ३ पुरुषाच्या मनगटांत बांधावयाचें सुवर्णाचें किं० जडावाचें एक भूषणविशेष. ꣸ **एकाद्याची पोंची ओळखणें** त्याला कसणें; त्याचा वकूब किं० त्याची कर्तृत्वशक्ति आजमावणें. [कट.

पेंजड (-डा) वि० गलिच्छ; कळकट; मळ-

पेंझा, पोंझट, पेंझडा वि० लठ्ठ; थिलथिलित; अशक्त; लेचापेचा.

पोट न० १ शरीरांतील अन्नपचनाचें स्थान; जठर. २ बरगड्यांच्या खालचा आणि कंबरेच्या वरचा भाग. ३ स्त्रीचा गर्भाशय. ४ पदार्थाचा फुगीर भाग; उ० गडव्याचें किं० हंड्याचें पोट. ५ कोणत्याही वस्तूचा आंतला फुगीर भाग; पोकळी. ६ अवकाश किं० आधार,—ज्यांत लहान, किरकोळ किं० कमी महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश करतां येतो; उ० वरप्रस्थान, वाङ्निश्चय, इ० सर्व कर्मै विवाहाच्या पोटांत येतात; उ० तुम्ही आम्हापैकीं प्रत्येकाला वेगळें वेगळें आमंत्रण करीत बसूं नका, एक नारायणरावांना आमंत्रण केलें म्हणजे पुरें आहे, त्यांच्या पोटांत आम्ही येतोंच. ७ मन, अंत:करण; उ० नीळकंठ तुझ्याशीं गोड बोलला म्हणून फसूं नको, त्याच्या पोटांत कपट आहे. ८ मनांतील हेतु (म्ह० शब्दांनीं बोलून न दाखविलेला हेतु). ९ सदर; उ० हा खर्च मुंजाच्या पोटीं दाखवा. १० डोळ्याच्या खालच्या आणि वरच्या पापण्यांच्या जवळचा फुगीर भाग किं० पापणी. ११ नदी, ओढा, तळें, इ० ची खोली किं० पात्र. ꣸ **माझें पोट गळ्याशीं लागलें आहे, आतां मला लाडवांचा आग्रह करूं नका** मीं खाल्लेलें अन्न अगदीं कंठापर्यंत येऊन पोचलें आहे, आतां इ०. **पोट जाणें** हेंच होणें; उ० हगलें नाहीं पोट गेलें (म्ह० दोन्ही एकच); त्याचा अर्थ तोच. **पोट जाळणें** १ पोट भरणें (निंदेंत किं० वैतागांत); उ० समर्थांची लाळ घोटूं नको तर काय करूं ? हें पोट जाळावयाचें आहे ना ? २ दुसऱ्याचें नुक-

सान करून आपला फायदा करून घेणें; उ० ह्या वेळीं मला बढती मिळावयाची पण त्या शंकररावानें आपलें पोट जाळलें ना ? (म्ह० मला मिळावयाची जागा त्याणें उपटली). **पोट जिरणें** गर्भशमन होणें; उ० त्या सगुणाबाईचें पोट जिरलें आणि आज तीन वर्षें तिच्या पोटांत सल राहिला आहे. **त्याचें पोट आज सकाळपासून हालत आहे** त्याला आज सकाळपासून रेच होत आहेत. **पोट दुखणें, पोटांत दुखणें** १ अजीर्ण वगैरे कारणांमुळें पोटांत वेदना होणें. २ मत्सर वाटणें; असह्य होणें; न पाहवणें; उ० खरचणाराचें खरचतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें. **पोट पाताळास (किं० रसातळास) जाणें** पोटांत फार वेळ अन्न न गेल्याकारणानें पोट खोल जाणें किं० अगदीं रिकामें झालेलें असणें. **त्याच्या पोटाची पत्रावळ झाली आहे** किं० **त्याचें पोट बखाटीस गेलें आहे** जेवणाची वेळ टाळून गेल्यामुळें त्याचें पोट खोल गेलें आहे. **पोट फुगणें** १अजीर्णामुळें पोटांत वायु साठून पोट मोठें होणें. २एकादी गुप्त बातमी कोणाला तरी सांगण्याला संधि न मिळाल्याकारणानें चित्ताला अस्वस्थता वाटणें. **पोटाला गांठी देणें** चिक्कूपणामुळें किं०दारिद्र्यामुळें पोटाला पुरेसें अन्न न खाणें. **टीप,**-ज्यांना दोन दोन, तीन तीन दिवस खावयाला कांहीं मिळालेलें नाहीं असे गरीब लोक पोटाभोंवतीं खरोखरींच दोरी घट्ट बांधून तिला दोन तीन गांठीं मारतात. असें केल्यानें पोटाच्या रिकामेपणाच्या वेदना कमी होतात. सद्यःप्रसूत स्त्रीच्या पोटाला अशाच हेतूनें पट्टा घट्ट आवळून बांधतात. **पोट बाहेर पडणें** भोजनाचा खर्च बाहेर पडणें किं० आपल्या अंगावर न पडणें. **पोट फुटणें** खरोखरीं पोट फुटल्याप्रमाणें पोटाला वेदना होणें; उ० हसतां हसतां आमचीं पोटें फुटलीं. **पोट बुडणें** चरितार्थाचें साधन नाहींसें होणें. **पोट भरणें** १ चरितार्थ चालविणें. २ जास्ती अन्न खाण्याला पोटांत जागा न उरणें; उ० माझें पोट भरलें आंता एकही जिलबी मी खाणार नाहीं. **पोट सरणें** रेच होणें. **पोट सुटणें** १ खावयाला आणि प्यावयाला यथेच्छ मिळत असल्यानें दोंद येणें. २ दरनिर्वाहाचा खर्च बाहेर पडणें म्हणजे आपणाला करावा न लागणें. **पोटाचा डमामा (किं०नगारा) होणें** पोटांत वायु धरल्यामुळें पोट फुगणें. **पोटाचे पाठीस लागणें** चरितार्थाचीं साधनें मिळविण्याकडे सर्व वेळ आणि सर्व शक्ति खर्चणें किं० लावणें; उ०आम्ही पोटाच्या पाठीस लागलेलीं माणसें, आम्हाला कसचीं काव्यें आणि कसचीं नाटकें ? **पोटांत कालवणें** १ दुःखामुळें अस्वस्थता वाटणें. २ दयेनें मन कळवळणें. ३मळमळण्यामुळें अस्वस्थता वाटणें. **अपराध पोटांत घालणें** अपराधाची क्षमा करणें. **एकाद्याला पोटीं घालणें** त्याला ममतेनें आपल्या आश्रयाखालीं घेणें. **पोटांत ठेवणें** गुप्त ठेवणें; कोणाला कळूं न देणें; प्रगट न करणें. **पोटांत पोट चालणें** एकाच्या अन्नांत दुसऱ्याचा समावेश होणें. **पोटांत शूळ उठणें** किं० **पोटांत सलणें** मत्सर वाटणें. **एकाद्याच्या पोटांत शिरून एकादी गुप्त गोष्ट काढणें** त्याच्याशीं गोड गोड बोलून किं० आपल्यावद्दल त्याच्या मनांत विश्वास उत्पन्न करून देऊन त्याचा गुप्त बेत किं० विचार समजून किं० जाणून घेणें. **एकाद्याच्या पोटावर मारणें** किं० **पोटावर पाय देणें** किं०**पोटाआड येणें** त्याच्या उपजीविकेचीं साधनें बुडविणें किं० नाहींशीं करणें. **एकाद्याच्या पाठीवर पाहिजे तर मारावें, पोटावर मारूं नये** त्याणें कांहीं अपराध केला असल्यास त्याला देहदंड खुशाल करावा पण त्याचीं चरितार्थाचीं साधनें बुडवूं नयेत. **पोटावारी नोकरी करणें** फक्त जेवण हा मोबदला घेऊन नोकरी करणें. **पोटाशीं (किं० पोटिशीं, किं० पोटेशीं) असणें** गरोदर असणें. **एकाद्याला पोटाशीं धरणें** त्याच्यावर प्रेम करणें; त्याला प्रेमानें जवळ करणें. **पोटाला तडस लागणें** किं० **पोट तडीस लागणें** फार जेवण झाल्यामुळें अस्वस्थता वाटणें. **एकाद्याच्या पोटीं** जनक किं० जननी ह्या नात्यानें त्याला किं०तिला; उ० रामभाऊंच्या पोटीं संतान नव्हतें; उ० गंगाबाईच्या पोटीं संतान नव्हतें. **लग्नाच्या पोटीं हा खर्च मांडला पाहिजे** लग्नाच्या सदरांत इ०. (**गोवर वगैरे रोग) पोटीं पडणें** तो लवकर बरा न होण्याच्या स्थितीला जाणें. **पोट धरून** (किं०

धरधरून) हसणें मोठमोठ्यानें हसणें. **पोट मोठें करणें** दया दाखविणें; क्षमा करणें. **पोटाचें दुःख काढणें** (किं० **सोसणें**) भुकेची वेदना सोसणें. **त्याच्या पोटांत कावळें कोकलूं (किं० ओरडूं किं० तोडूं किं० टोंचूं) लागले आहेत** त्याला अतिशय भूक लागलेली आहे. **त्याच्या पोटांत कोंबडीं चरूं लागलीं आहेत** त्याला फार भूक लागली आहे. **पोटांत पाय शिरणें** खचून जाणें; भ्रांत होणें; उ० सदोबाच्या मरणाची खबर ऐकिल्यापासून माझे पायच जणों पोटांत शिरले आहेत (म्ह० मी दुःखानें अगदीं भांबावून गेलों आहें). **त्याच्या पोटांत ब्रह्मराक्षस उठला आहे** त्याला अतोनात खा खा सुटली आहे. **पोटाला पाटा बांधणें** भुकेच्या वेदना बंद करण्यासाठीं धोतरानें पोट बांधणें. **पोटाला विब्बे घालणें** उपास काढणें. **ज्याचें पोट दुखेल तो ओवा मागेल** ज्याला एकाद्या गोष्टीमुळें त्रास किं० उपद्रव होत असेल तो तिच्याबद्दल कांहीं तजवीज किं० उपाय करीलच. **एकाद्याच्या पोटीं येणें** त्याच्यापासून पुत्र किं० कन्या ह्या नात्यानें जन्मणें. **पोट करणें** (किं० **वाढविणें** किं० **फुगविणें**) व्यभिचारानें (स्त्रीनें) गरोदर होणें. **पोट पिकणें** पुत्र, कन्या, एतद्रूप संतति होणें. **पोट पाडणें** (किं० **झाडणें**) औषध घेऊन पोटांतील गर्भ पाडणें. **एकाद्याच्या पोटीं असणें** त्याला पुत्र किं० कन्या असणें. **पोट उकल स्त्री०, पोट उकाल पु०** मोकळ्या मनानें सांगितलेले आपले विचार (करणें). **पोटकटार (-री) स्त्री०** पोटांत कट्यार खुपसून घेऊन मरणें किं० मारणें. **पोटकरीण स्त्रीं०** गरोदर स्त्री. **पोटकांब स्त्री०** वांबूची आंतली चिरफळी. **पाठकांब स्त्री०** वांबूची सालीसकट म्ह० पाठीकडची चिरफळी. **पोटकिडा पु०** १ फळ, लाकूड, इ० च्या पोटांतील किडा किं० आळी. २ दुसऱ्यांचीं रहस्यें जाणणारा. **पोटकुळी स्त्री०** १ पोट (निंदेंत). २ विजार, धोतर, लुगडें, इ० पोटाला जेथें बांधलेलीं किं० वेष्टिलेलीं असतात तो भाग. ३ कडोस्त्री; कनवठ. **पोटकरपी स्त्री०** स्त्रियांना शिवी म्हणून हा शब्द योजला जातो. **पोटकूळ न०** पोट (निंदेंत). **पोटकूळ न०** जामीन राहिलला मनुष्य. **पोटखराब वि०** शेताला निरुपयोगी (भूप्रदेश,—खडक, कातळ, वाळवंट, इ०). **पोटखराबा पु०** शेतांतील खडकाळ भाग. **पोटखर्च पु०** भोजनखर्च. **पोटखर्ची स्त्री०** पोटासाठीं खर्च करावयासाठीं बरोबर प्रवासांत घेतलेली रकम. **पोटखीळ स्त्री०, पोटखिळा पु०** शिवाळ किं० जूं न हालावें म्हणून आंतल्या बाजूनें ठोकलेली असते ती खुंटी. बाहेरच्या बाजूस अशीच खुंटी असते तिला ' बोळखीळ ' म्हणतात. **पोटगडी पु०** १ सोंगट्याच्या खेळांत दुसऱ्या गड्याच्या हाताखालीं खेळणारा अंगगडी. २ ह्या खेळांत घेतलेला कल्पित गडी. ३ (सामान्यतः) मदतीस घेतलेला कोणाहि इसम. **पोटगी स्त्री०, पोटगें न०** १ खावयाच्या पदार्थांची बेगमी; पोटखर्ची. २ वतन, वृत्ति, इ० जें चरितार्थाचें कायमचें साधन तें. ३ गांवकामगाराला सादिल्वारांतून मिळते ती कचेरींत रुजूं होण्याबद्दल रकम. **पोटगुजारा पु०** अत्यल्प किं० अपुरें चरितार्थाचें साधन. **पोटचक पु०** शेताच्या किं० मळ्याच्या हद्दींतील पट्टा. **पोटचा वि०** १ स्वतःचें (संतान). २ संतति असलेला. ३ अंतर्भूत; समाविष्ट असलेला. **पोटचें ज्ञान न०** १ अंगचें ज्ञान; जन्मजात समजूतदारपणा. २ प्रसंगीं सुचलेलें ज्ञान किं० कल्पना. **पोटचा गोळा, पोटचा लोळा पु०** आपलें स्वतःचें अपत्य,—जें कसेंही असलें तरी तें संभाळणें किं० पोसणें आपलें कर्तव्य आहे. **पोटजामीन, पोटचा जामीन पु०** मागें ' परत जामीन ' पहा. **पोटघडी स्त्री०** गरोदरपणाचें चिन्ह दाखवावें म्हणून पोटावर बांधतात ती वस्त्राची घडी. **पोटघर न०** सोंगट्याच्या पटास ज्या तीन ओळी असतात त्यांतील मधल्या ओळीचें शेवटचें घर. **पोटजाळ पु०** पोटचा पुत्र किं० कन्या यांच्या मरणाचें दुःख. **पोटजीभ स्त्री०** घशांत जिभेच्या मूळाशीं लोंबत असते ती लहानशी मांसाची लोळी; पडजीभ. **पोटझाकणें न०, पोटझाकणी स्त्री०** विवाहामध्यें सुनमुखाच्या वेळीं वरमाईनें वधूच्या आईस द्यावयाचें लुगडें. **पोटदुखा पु०, पोटदुखी स्त्री०** १ सतत पोट दुखत असण्याची व्यथा; पोटशूळ. २ मत्सर. ३

द्रव्यलाभाची किं० लाचाची इच्छा (निंदेंत); उ० वैद्याची पोटदुखी, कारकुनाची पोटदुखी, इ०. **पोटनळ पु० अ० व०** पोटांतील स्नायु-विशेष. **पोटपाईक पु०** कष्ट केल्याशिवाय ज्याला खावयाला मिळत नाहीं असा. **पोटपाणी न०** खाण्यापिण्याची तरतूद. **पोटपूजा स्त्री०** जेवणें (थट्टेंत). **पोटपोशा वि०**चमचमीत खाद्यें खाण्याचा लोभी. **पोटफुगी स्त्री०** १ व्यभिचारानें जी गरोदर झाली ती स्त्री. २ अजीर्णादि कारणानें पोट फुगणें ही व्यथा. ३ दुसऱ्याच्या उत्कर्षानें वाटलेला मत्सर. ४ द्वेष; आकस. **पोटफूग स्त्री०** कांहीं गुप्त बातमी कोणाला तरी सांगावी अशी उत्कट इच्छा असतां ती ऐकावयाला कोणी न भेटल्यानें वाटते ती अस्वस्थता. **पोपफूग झाडणें** कांहीं गुप्त गोष्ट बोलून टाकणें. **पोटफोड स्त्री०** १ मन मोकळें करणें; मोकळ्या मनानें आपले विचार सांगणें. २कांहीं गुप्त गोष्ट प्रकट करणें. ३ कोड्याचा उलगडा सांगणें.**पोटफोडी वि०**एकदा व्यालेली (गाय किं० म्हैस). **पोटबंदा वि०** केवळ जेवण हा मोबदला घेऊन काम करणारा (गडी). **पोटबाबू पु०** १ पक्वान्नाचा लोभी; पुखानंद. २ चमचमीत खाद्यें खाण्याशिवाय दुसऱ्या कशाचीही परवा न करणारा.**पोटबूड स्त्री०** १ चरितार्थाचें साधन, नोकरी, इ० नाहींसें होणें. २ व्यापार इ० मध्यें बसलेली ठोकर. **पोटभर क्रि० वि०**१पोट पूर्ण भरण्याइतक्या प्रमाणांत.२ इच्छा तृप्त होण्याइतक्या प्रमाणांत;उ०तुमच्याशीं मला पोटभर बोलावयाला अझून फुरसत सापडत नाहीं.३करण्याची किं० भोगण्याची ताकद असेल तितक्या भरपूर प्रमाणांत;उ० हें काम मला पोटभर आहे. ४जरूर असेल तितक्या प्रमाणांत; उ० शेताला पोटभर पाणी मिळालें तर मुबलक पीक येईल. **पोटभरू पु०** १ खाण्याला लाचावलेला.२ पोट भरण्यासाठीं परदेशीं हिंडतो तो किं० परदेशास जातो तो. ३ क्षुधा पूर्णपणें शांत करण्याची ताकद ज्यांत आहे असें खाद्य. **पोटमांडणी स्त्री०** गृहादिकांचीं पाखीं न दबावीं म्हणून आधारार्थ प्रायः पाख्याच्या मध्य प्रदेशीं जें आडवें लाकूड वाशांच्या खालीं घालतात तें. **पोटमारा पु०** पोटाची आबाळ. **पोटम्हातारा वि०** खाण्यापिण्याला पुरेसें न मिळाल्यानें अकालीं आलेलें म्हातारपण. **पोटशूळ, पोटसूळ पु०** सतत पोट दुखत असण्याचा रोग. **पोटसर पु०** वर ' पोटमांडणी ' पहा. **पोटस्त, पोटस्थ न०** १ निर्वाहाचें साधन. २ लबाडीनें मारलेले पैसे. **पोटाचा अदळ** ज्याला वारंवार शौचास जावें लागतें असा. **पोटांतलें न०** मुलांना पोटांत होतो तो एक रोग; याला ' चीप ' असें म्हणतात. **पोटार्थी वि०**१चरितार्थासाठीं ज्याला कष्ट करावे लागतात किं० अपमान सोसावे लागतात असा. २ खादाड. ३ केवळ जेवण हा मोबदला घेऊन नोकरी करणारा.

पोटरा [म० पोट] **पु०** धान्याचें दाण्यांनीं ठासून भरलेलें कणीस.

पोटरी [म० पोट] **स्त्री०** १ पायाच्या नळीच्या मागचा प्रदेश. २ उताण्या बाहूचा मनगटापासून कोपरापर्यंतचा भाग. ३ वर ' पोटरा ' पहा.

पोटळणें [म० पोट] **अ० क्रि०** १ गाय, म्हैस, इ० नीं गरोदर होऊन लठ्ठ पोटानें युक्त होणें. २ धान्यांचीं कणसें पक्व दशेस येणें.

पोटळणें [म० पोट] **स० क्रि०** १ ताड, माड, इ० झाडांवर चढतांना तीं पोटाशीं घट्ट धरणें. २ लोभानें (पैसा) पकडणें. ३ प्रेमानें (माणूस इ० ना) जवळ करणें.

पोटळा, पोटाळा [म०] **पु०**१पोटाचा बाहेर पडतो जो कोथळा तो. २ गात्राचा फुगरिपणा.

पोटळी [हिं०] **स्त्री०**१ लहानशी गठडी. २ डोळ्यांच्या विकारावर लावावयाचीं औषधें बांधलेली पुरचुंडी,–जी डोळ्यावर टेकावयाची असते. ३ धोतर, लुगडें, इ० च्या पदराला बांधलेली लहानशी वस्तु.

पोटा [सं०] **स्त्री०** पुरुषाप्रमाणें जिला दाढी मिशा आहेत अशी स्त्री; पुरुषलक्षणी स्त्री.

पोटाग [म० पोट+आग] **स्त्री०** कांहीं काम करण्यांत जी कळकळ किं० आस्था ती; उ० पोटागीनें हें काम कर, भाडोत्र्यासारखें करूं नको.

पोटारा [म० पोट] वि० मोठें, विस्तीर्ण (भांडें, पोतें, इ० बारदान).

पोटाळणी [म० पोट] **स्त्री०** १ कोणेकाचें पालन पोषण. २ कोणेकाला प्रेमानें जवळ करणें.

पोटाळणें [म० पोट] स० क्रि० १ प्रेमानें (कोणेकाला) जवळ करणें. २ आत्मीय समजून (कोणेकाचा) संभाळ करणें.

पोटाळणें [म० पोट] अ० क्रि० १ पोटांतील गर्भामुळें गाय, म्हैस, इ० नीं लठ्ठ होत जाणें. २ धान्याचे दाणे वाढीस लागून (कणीस) लठ्ठ होऊं लागणें.

पोटोळी वर ' पोटळी ' पहा.

पोठरा, पोठरी मागें ' पोटरा, ' ' पोठरी ' पहा. [एक जात.

पोंडा, पोंडा ऊस, पुंडा ऊस पु० उसाची

पेंडी पुढें ' पोंढी ' पहा.

पोंड, पोंढ, पोंढा पु० १ चोंडे किं० काथ्या इ० कुजत घालावयासाठीं जमीनींत करतात ती खळी. २ विहिरींतून काढलेलें पाणी साठविण्यासाठीं करतात तो खळगा. ३ नारळाचें झाड लावण्यासाठीं करतात तो खळगा. ४ घरांतील जमीनीवर पाणी सांडून होतें थारळें. ५ कालवण घेण्यासाठीं भातांत जो खळगा करतात तो.

पोंढळणें [म० पोंढा] स० क्रि० माड, पोफळ, इ० चें रोप तयार केलेल्या खळग्यांत रोवणें. अ० क्रि० (डोळे) आजार, उपास, इ० कारणामुळें खोल जाणें.

पोंढी, पोंडी [म० ' पोंढ ' चें लघुत्वदर्शक रूप] **स्त्री०** १ लहानसा खळगा. २ मानेच्या मागल्या बाजूची खळी.

पोंढें [म० पोंढा] **न०** सर्व बाजूंस बांध घालून केलेलें भातशेत; खाचर.

पोत पु०, **स्त्री०** कांचेचे किं० सुवर्णाचे जे बारीक मणि ते समुच्चयानें. **पु०** अशा मण्यांचें केलेलें स्त्रियांचें एक कंठभूषणविशेष.

पोत [**फा०** फोताह्, पोताह्] **पु०** १ वस्त्राची अति घट्ट दोन हात लांबीची वळकटी, — जिला विडी बसवून मशाल करतात. २ हत्यार, काठी, इ० चें टोक. ३ जखम उत्पन्न करून ती वाहात राहाण्यासाठीं तींत घालतात ती चिंधी. रोग बरा करण्याचा हा एक तोडगा आहे. ' पोत घेणें ' असा प्रयोग होतो. ४ नांगराच्या फाळाचें भोंक.

पोत [हिं० पोत] **पु०, न०** वस्त्राची वीण (घट्टपणा, विरळपणा, इ० बाबतींत). ॐ **सूतपोत न०** वस्त्राची वीण आणि सुताचा मजबूतपणा जोडीनें; उ० हें उपरणें सुतापोताला बरें दिसतें.

पोत पु०, न० विब्याचा निखारा त्वचेवर चेपून करून घेतलेली जखम किं० त्या जखमेंत खुपसलेली चिंधी, — ती जखम वाहात ठेवण्यासाठीं. कांहीं रोगांवर हा तोडगा केला जातो.

पोतडी स्त्री०, पोतडें न० [म० पोतें] १ हत्यारें किं० किरकोळ जिनसा ठेवण्याची लहानशी पिशवी. २ सोनार इ० चा हत्यारें ठेवण्याचा बटवा.

पोतंडा स्त्री० १ डोळे शेकण्यासाठीं वस्त्राचा चोंभा करतात तो. २ वस्त्रांत औषधी द्रव्यें घालून त्यांची पुर्चुंडी डोळे शेकावयाला योजतात ती. ३ वस्त्राच्या पदरांत सुपारी किं० खडा घालून विरड्यांत आडकावण्यासाठीं करतात ती गुंडी.

पोतदार [**फा०** फोताह्दार्] **पु०** सरकारांत भरणा झालेले रुपये पारखून घेणारा मराठी राज्यांतील अधिकारी. हाच गांवचा सोनार असे. ॐ **पोतदारी स्त्री०** पोतदाराचा अधिकार, हुद्दा, कार्यक्षेत्र, किं० वेतन.

पोतनिशी [**फा०** फौताह् नवीसी] **स्त्री०** पोतनीसाचें कार्यक्षेत्र, हुद्दा, इ०. खालीं ' पोतनीस ' पहा.

पोतनीस [**फा०** फौताह्नवीस्] **पु०** सरकारचा खजीनदार.

पोतां, पोत्यां, पोत्यांनिशीं क्रि० वि० जातीनें; स्वतः.

पोती [**सं०** पुत्री] **स्त्री०** कन्या; मुलगी.

पोती पूर्णिमा, पोतें पुढें ' पोवती पूर्णिमा ' ' पोवतें ' पहा.

पोतें [**फा०** पोताह्, फोताह्] **न०** १ धान्य इ० पदार्थ भरून ठेवण्यासाठीं पडम, गोणपाट, इ० चा शिवून केलेला थैला. २ सरकारी पैसा ठेवण्याची मोठी पिशवी. ॐ **पोतेंखाद स्त्री०** बारदानाला चिकटल्यामुळें फुकट गेलेली साखर, गूळ, इ०. **पोतेचाल स्त्री०** सरकारांत ज्या तऱ्हेचीं नाणीं घेतलीं जातात ती तऱ्हा.

पोतेरें [म० पोतें] **न०** १ जमीन किं० भिंत शेण किं० माती इ० नीं सारविण्यासाठीं जो पोतें इ० चा तुकडा घेतात तो किं० अशा तुकड्यानें केलेलें सारवण(घालणें). २ चिरगूट, पुस्तक इ० चा गुधडा किं० चोळवटा (करणें).

पोंथ वर ' पोत ' **पु०, न०** पहा.

पोथंडी वर ' पोतंडी ' पहा.

पोथा पु० १ गुवाची किं० शेणाची रास; पोहो. २ अंगानें लठ्ठ आणि थिलथिलीत पण कामाला मंद असा मनुष्य.

पोथी [**सं०** पुस्तक] **स्त्री०** ज्याचीं पानें शिवलेलीं नाहींत आणि खालून वर उलटावयाचीं असतात असें जुन्या पद्धतीचें पुस्तक. **पोथीपाठ, पुस्तकपाठ वि०** डोळ्यापुढें पोथी (किं० पुस्तक) उघडी ठेवून न आडखळतां वाचतां येण्याइतकें किं०म्हणतां येण्याइतकें चांगलें पाठ झालेलें. मुखपाठ म्ह० पोथी किं० पुस्तक पुढें धरल्याशिवाय म्हणून दाखवितां येईल इतकें पक्कें स्मरणांत खिळलेलें. **पोथीपुस्तकें न० अ० व०** पोथ्या, पुस्तकें, कागद, लिहिण्याचें सामानसुमान, इ०.

पोंद न० भांड्याचा तळ,–आंतलां किं० बाहेरचा.

पोंदाडा पु० भांड्याला आलेला मोठा पोचा.

पोंदी, पोंद्या, पोंधी, पोंधा, पोंध्या वि० अंगानें लठ्ठ किं० स्थूल पण शक्तीनें कमी असा (माणूस किं० जनावर).

पोंद्या क्रि० वि० फुकट, व्यर्थ, विनाकारण.

पोंधा पु० १ रुमणी म्हणून जो नांगराचा भाग त्याला बसवावयाची खीळ. २ हळीस आणि नांगराचा फाळ यांना जोडणारी खीळ.

पोपट पु० राघू. ❀ **पोपटपंडित पु०** पाठ करून ठेविलेल्या कांहीं कोट्यांच्या जोरावर शास्त्री, पंडित, इ० बरोबर वाद करावयालां सिद्ध होणारा माणूस. **पोपटज्ञान न०** अर्थ न समजतां शिकलेला विषय. **पोपटपंची स्त्री०** केवळ पाठ म्हणून दाखविणें,–अर्थ अवगत नसतां.

पोपटी स्त्री० १ तांबूस वर्णाची कवडी. २ वाल इ० च्या शेंगा भाजून खावयाला करतात तें खाद्य.

पोपडा पु० भिंतीचा गिलावा, जमीन, फोड, इ०चा कळपा किं०उखळलेला किं० सुटलेला भाग.

पोपती स्त्री० (कोष्टयाच्या मागांत) सांधणीनंतर वाण्याचे तंतु कुंच्यानें साफ करण्याची क्रिया.

पोपनस, पोपनीस, पोपणस, पोपणीस न० जाड सालीचें लिंबाच्या वर्गातील एक फळ. **स्त्री०** ह्या फळाचें झाड.

पोपय, पोपया पु०, पोपई स्त्री० [**हिं०** पपया] एक फळ.

पोपली, पोपी स्त्री० लहान आणि जाडी भाकरीसारखा भाजून केलेला एक खाद्य पदार्थ.

पोपरें न० १ ताडपत्राच्या चिंधीची वळकटी,–जी सनई इ० च्या तोंडांत बसवितात. २ केळीच्या पानाच्या चिंधींचीं मुलें करतात ती शिटी किं० पिपाणी.

पोफळ, पोफळी [**सं०** पूग] **स्त्री०**सुपारीचें झाड.**पोफळ न०**ह्या झाडाचें फळ,–सोलून वाळवावयाच्या पूर्वस्थितींतील. ❀ **पोफळगांठ स्त्री०** एका गांठीशेजारीं मारलेली दुसरी गांठ,– पहिली पक्की करण्यासाठीं. **पोफळी वि०** मोठमोठ्या चौकटींचें (लुगडें, खण, इ०).

पोबारा, पवबारा [**हिं०** पब्बाराह्] **पु०** (तिफाशी खेळांत) दोन फाशांवर सहा सहा आणि तिसऱ्यावर एक मिळून तेरा शून्यांचें दान. ❀ **पोबारा करणें** (किं० **म्हणणें**) पळून जाणें; एकाद्याची नजर चुकवून निसटून जाणें.

पोम न० १ अंगीं विद्या, कौशल्य, चातुर्य, कर्तबगारी, इ० कांहीं गुण नसतां केलेला पोकळ डौल; उ० आलीकडे त्याचें पोम फार वाढलें आहे. २ प्रस्थ; बडेजावी; थाटमाट; महत्त्व. ३ ढोंगीपणा (माजणें, माजविणें). ❀ **एकाद्याचें पोम फुटणें** (किं० **बाहेर पडणें**) त्याची बढाई अस्थानीं आहे असें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येणें किं० येऊन त्याची फजीती होणें.

पोय स्त्री० माड, पोफळ, इ० च्या फळांचा नुकतांच बाहेर पडलेला लोंगर. ❀ **पोयकर वि०** ज्यांतून नुकतीच पहिली पोय बाहेर पडली आहे असा (माड, पोफळी, इ०).

पोय, पोई स्त्री० आल्यागेल्यांस किं० प्रवा-

ह्मांस जेथें पाणी, अन्न, इ० फुकट दिलें जातात ती जागा. ' धर्मपोय (–पोंयी) ' असाही शब्द रूढ आहे.

पोय स्त्री० नदी किं० नाला यांना जाऊन मिळणारा पाण्याचा लहान आणि अरुंद ओहोळ.

पोयती पूर्णिमा,पोयती पुनव स्त्री०,पोयतें न० पुढें ' पोवती पूर्णिमा ' इ० पहा.

पोयाड न० नदी, नाला, इ० ना मिळणारा पाण्याचा लहानसा ओहोळ.

पोयें न० भूमीच्या किं० झाडाच्या किं० खडकाच्या विवरांत मधमाशांनीं केलेलें मोहोळ.

पोर न० १ लहान वयाचा मुलगा किं० मुलगी. २ पशु, पक्षी, इ० चें पिलूं. ❀ **पोरकट वि०** पोराला शोभेल असें (भाषण,विचार,इ०). **पोरका वि०** १ पोरकट. २ ज्याची आई किं० बाप जिवंत नाहीं असा (मुलगा). **आई-पोरका वि०** ज्याची आई नाहीं असा (मुलगा). **बापपोरका वि०** ज्याचा बाप जिवंत नाहीं असा (मुलगा).**पोरकिडा पु०**धान्य खाणारा एक क्षुद्र किडा. **पोरखादी स्त्री० वि०** जिचीं पोरें फार दिवस जगत नाहींत अशी (स्त्री). **पोरखेळ पु०** १ मुलांचा खेळ. २ मूर्खपणाचें कांहीं कृत्य. ३ सोपें काम; साधें काम; उ० शिसवी लाकूड कोरून कमळ करणें हा कांहीं पोरखेळ नव्हे. **पोरगळ वि०** पोरकट; पोरालाच शोभेल असा; पोरांतच क्षम्य होईल असा. **पोरगा पु०** १ मुलगा. २ नोकर,–लहान वयाचा. ३ नाच्या पोऱ्या. **पोरगी स्त्री०** मुलगी. **पोरगें न०** लहान पोर. **पोरचाळवणी स्त्री०** एक पक्षिविशेष. **पोरचेष्टा स्त्री०** १ पोरासच शोभेल असें वर्तन, व्यवहार, इ०. २ (**लक्षणेनें**) हल्कें किं० सोपें काम. प्रयोग बहुधा अनेक वचनीं. **पोरजिन्नस पु०, स्त्री०** लहान वयाचा मुलगा किं० मुलगी. **पोरटा पु०,पोरटी स्त्री०, पोरटें न०**पोर (तुच्छ-तेनें). **पोरपिसा वि०** १ मुलें ज्याला आवडतात असा.२ आपणास मुलगा व्हावा अशी ज्याला उत्कट इच्छा आहे असा.**पोरपिसें न०** १मुलांची आवड. २ पुत्रप्राप्तीची उत्कट उच्छा. **पोरबुद्धि वि०** पोरकट विचार ज्याचे आहेत असा. **स्त्री०** पोरालाच शोभेल अशी बुद्धि. **पोरवट वि०** पोरालाच शोभेल असें (भाषण, वर्तन, इ०). **पोरवडा, पोरवंडा, पोरवाडा पु०** १ पोरांचा समुदाय. २ पोरकट विचार आणि वर्तन ज्यांचें अशा माणसांचा समुदाय; उ० रानड्यांच्या घरांत पोरवडा माजला आहे. **पोरवाला पु०** मुलें बाळें ज्याला आहेत असा. **पोरवाली स्त्री०** हळदीचा कोंब. **पोरसौदा वि०** लहान वयाचा; अप्रौढ. **पोरांडी स्त्री०, पोरांडें न०**पोरकट भाषण,वर्तन, व्यवहार, इ०करणाऱ्या माणसांचा समुदाय. **पोरापोरका वि०** ज्याला आईबाप किं० मायेचें माणूस कोणी नाहीं असा (मुलगा).**पोरापोरीं,पोरासोरीं क्रि०वि०**१पोरांनीं, पोरांत, पोरांमुळें. २ वंशपरंपरेनें. **पोरेंबाळें, पोरेंलेंकरें, पोरेंसोरें न० अ० व०** मुलें, मुली, इ०. **पोरबाळ न० ए० व०** मूलबाल; मुलगा किं० मुलगी; उ० त्याला पोरबाळ कोणी नाहीं, तो सडा आहे. **पोरोडा पु०**वर ' पोरवडा ' पहा. **पोऱ्या पु०** १ नोकर, हुजऱ्या. २ घोड्याचीं चाकरी करणारा. ३ नाचणारा पोरगा. ४ धान्यांतील किडा. ५ पागोट्याचा वताणा.

पोरा पु० धान्यांत उत्पन्न होणारा एक किडा. **पोरा वि०** रानवट, जंगली (झाड).

पोल, फोल न० १ पोखरलेला धान्याचा दाणा. २ धान्याच्या दाण्याचें टरफल. **फोल वि०** व्यर्थ, फुकट (उपदेश इ०). ❀ **पोलकट न०** वर 'पोल' दोन्ही अर्थीं पहा. **पोलकट वि०** ज्यांत कोय किं० आठली नाहीं असा (आंबा किं० फणस).

पोलक [**भ०** पोल] **पु०** पत्राचा लखोटा किं० पिशवी.

पोला [**स०** पोल] **वि०** किड्यांनीं पोखर-लेला किं० पूर्ण न पोसलेला (धान्याचा दाणा किं० कणीस).

पोलाद [**फा०**पौलाद,फौलाद] **न०** तिखें,–लोखंडाची एक जात. **पोलादी वि०** पोलादाचा बनविलेला.

पोलिस्त स्त्री०१लागवडींत असलेली जमीन. २ पाटील आणि महार यांना हक्क म्हणून द्याव-याचा पिकाचा भाग.

पोली [**म०** पोल] **वि०** मरून फोल झालेली (लीख). सपूट म्ह० जिवंत आणि वळवळ करणारी (ऊ).

पोलीस [**इंग्रेजी**] **वि०** शहरांत बंदोबस्त ठेवणारा(शिपाई).

पोलें न० एक चौरस काठी किं० विघ्याचा एक चारशांश इतकें क्षेत्रफळ.

पोल्हारा पु० स्त्रियांच्या पायांच्या बोटांतील एक दागिना.

पोव, पोहो पु०, पोवटी स्त्री० गू किं० शेण यांचा एका खेपेस विसर्जिलेला ढीग.

पोव पु० गवत आणि काटक्याकुटक्या यांचें घराच्या छपरावर घातलेले थर प्रत्येक(घालणें).

पोवई स्त्री० मागें ' पोई, ' ' धर्मपाई ' पहा.

पोवखंड [**म०**पोवा+खंड] **न०**पोफळाच्या लोंगराचें बाहेरचें आच्छादन.

पोवडा पु० माडाच्या झावळीचें टोंक.

पोवणें स० क्रि० १ केळीचें पान उन्हानें किं० विस्तवाच्या शेकानें लुसलुसीत करणें. २ वस्त्राच्या ताण्याचीं सुतें फणींत किं० ओवींत घालणें.

पोवतें [**सं०** पवित्र] **न०** १ श्रावण महिन्यांत पौर्णिमादि तिथींचें दिवशीं जानव्यासारखा सुताचा दोरा देवादिकांस अर्पितात किं० स्वता धारण करतात तो. २ श्रावण महिन्यांत नवें जानवें धारण करतात तें. ३ काचेचे किं० सोन्याचे मणि दोऱ्यांत ओवून स्त्रिया गळ्यांत घालतात तें भूषण. ४ शूद्र नवऱ्या मुलाच्या गळ्यांत घालतात तें सुताचें पेंडकें. **पोवती पूर्णिमा, पोवतीपुनव स्त्री०** श्रावण महिन्याची पौर्णिमा.

पोवरी [**म०** पोवा] **स्त्री०** नळीच्या रूपाचें [एक वाद्युवाद्य.

पोवली [**म०** पोवा] **स्त्री०** पोफळीची विरी; पोफळांच्या लोंगराचें आच्छादन.

पोवळ, पोवळी स्त्री० १ देवळाच्या आवाराची भिंत. २ पाण्याचा उच्छ्वास.

पोवळा [**सं०** प्रवाळ] **वि०** पोवळ्याच्या रंगाचा म्ह० तांबडा किं० तांबूस (बैल, गाय). **पोवळी स्त्री०** तांबूस रंगाची गाय. **पोवळा पु०** तांबूस रंगाचा बैल.꙳ **ढवळ्या शेजारीं पोवळा बांधला वाण नाहीं पण गुण लागला** मागें ' ढवळा ' मध्यें पहा.

पोवळें [**सं०** प्रवाल] **न०** तांबड्या किं० तांबूस रंगाचा एक मणि. **टीप,**–समुद्रांतील कांहीं कीटांचें निर्मित वसतिस्थान. पोवळीं पांढऱ्या रंगाचींही असतात. ꙳ **पोवळपाटली स्त्री०** सोन्याच्या पट्टीवर कोंदणांत पोवळीं बसवून केलेली पाटली,–स्त्रियांचें करभूषण. **पोवळसर पु०**पोवळ्यांचें बनविलेलें करभूषण.

पोवा पु० १ नळीच्या रूपाचें एक वायुवाद्य. २ सर्पाचें पिलूं. ३ छप्पर, कुंपण, इ० शिवावयासाठीं सुईप्रमाणें योजतात ती कामटी.४भिकारी, प्रवासी, इ०चा जमाव, टोळी, किं० थवा.५ केळफुलाचीं जीं जाडी जाडी पन्हळासारखीं आणि बाल्दशेंतील केळ्याचें रक्षण करणारीं आवरणें तीं प्रत्येक.

पोवाडा मागें ' पवाडा ' पहा.

पोवाणी, पोवाळी स्त्री० पोहोण्याची क्रिया.

पोवी मागें ' पोई, ' ' पोय ' पहा.

पोवें, पोयें न० खडक, झाडाची ढोली, इ० मध्यें असतें तें मधमाशांचें मध सांठविण्याचें आणि राहाण्याचें घर.

पोशा [**सं०** पुष्ट; **म०** पोसलेला] **पु०** १ आपण खाऊं पिऊं घालून संगोपन केलेला दुसऱ्याचा मुलगा. २ अगडबंड आणि शक्तिहीन माणूस.

पोशाक (–ख,–ग),पोषाक (–ख,–ग)[**फा०** पोषाक] **पु०** रस्त्यानें फिरतांना किं०राजाच्या दरबारीं जातांना किं० सणाच्या दिवशीं धारण करतात तो अंगारखा, शेला, पागोटें, इ०. ꙳ **पोशाक करणें** अंगावर शेला, पागोटें, इ० धारण करणें (फक्त पुरुषांसंबंधानें प्रयोग). **पोशाकी वि०** केवळ भपकेदार; दिसण्यांत मजबूत पण खरोखरीं अशक्त किं० लेचापेचा (माणूस,पदार्थ). **पोशाकी वस्त्रें न० अ० व०** सणावारीं घालावयाचे कपडे. **पोशाकी नांव न०** घरोब्याचें नांव,–याच्या उलट ' कागदोपत्रींचें नांव '.

पोशिंदा [**फा०** पोषिंदाह्] **पु०** आपला परामर्श घेणारा; आपणाला पोसणारा; आपलें कल्याण करणारा.

पोशोणें [म० पसवणें; सं०प्र+सू] **अ० क्रि०** (जोंधळा, बाजरी, इ०च्या ताटांनीं) कणसें उत्पन्न करणें.

पोशेरें न०, पोशेर पु०[सं० पुष्कर] तांबड्या कमलिनीचें कमळ.

पोषक [सं०] **वि०** १ राक्षिणारा; सांभाळ करणारा; वाढविणारा (माणूस). २ सत्त्वदायक, वीर्यवर्धक (खाद्य, औषध). ३ विधानाचें किं० मताचें समर्थन करणारें किं० बळकटी आणणारें (प्रमाण, उदाहरण, इ०).

पोषण [सं०]**न०** १प्रतिपाळ;संगोपन;सांभाळ. २ खाऊं पिऊं घालणें.

पोषणें [सं० पुष्] **स० क्रि०** रक्षिणें;पाळणें; खाऊं पिऊं घालून वाढविणें.

पोषाक वर ' पोशाक ' पहा.

पोष्णा [सं० पुष्] **वि०** १ दत्तक घेतलेला (दुसऱ्याचा मुलगा).२ खाऊं पिऊं घालून बाळगलेलें (दुसऱ्याचें जनावर).

पोष्य [सं०] **वि०** १ ज्याचें पालनपोषण आपण करतों किं० करणें आपलें कर्तव्य आहे तो. २ पोसण्यास योग्य. ३ वडिलांस पत्र लिहितांना लिहिणारा आपणास ' पोष्य ' म्हणवून घेतो. ꙮ **पोष्यवर्ग पु०** मोठ्या माणसाचे नोकर चाकर, आश्रित, इ०चा समुदाय.

पोसका, पोसगा [म० पोसणें] **वि०**आपल्या आश्रयास घेतलेला.

पोसणा, पोसण्या मागें ' पोष्णा ' पहा.

पोसणें [सं०पुष्] खाऊंपिऊं घालून वाढविणें किं० बाळगणें. **अ० क्रि०** सत्त्वांश मिळून लठ्ठ होणें किं० वाढणें किं० पुष्ट होणें (मनुष्य, जनावर, झाड).

पोसर मागें ' पोशेरें ' पहा.

पोसवणें [म०पसवणें;सं०प्र+सू] **अ०क्रि०** (जोंधळा, बाजरी, इ०च्या ताटांनीं) कणसें उत्पन्न करणें.

पोसिंदा मागें ' पोशिंदा ' पहा.

पोस्त [सं० पुष्टि] **न०** १ शिमग्यांतील खेळे लोकांपासून द्रव्य मिळवून करतात तो भोजनादि समारंभ.२त्या समारंभासाठीं लोकांपासून घेतात तें द्रव्य. ३ कामकऱ्यांस मजूरीपेक्षा अधिक द्रव्य देतात तें.४श्रमपरिहारार्थ पितात तें मद्य.५शाईच्या दवतींत ठेवितात तो फडक्याचा बोळा. **टीप,–** ' पोस्त 'हा शब्द पुलिंगी आमच्या परिचयाचा आहे. ꙮ **पोस्तपिंड पु०**दुसऱ्याच्या घरीं आश्रित म्हणून राहून यथेच्छ खाऊन लठ्ठ झालेला माणूस.

पोस्त [हिं०] **न०** अफूचें बोंड.

पोस्ती, पोस्त्या [म० पोस्त] **वि०** १दारूबाज. २ थिलथिलीत अंगाचा(मनुष्य);फोपशा.

पोहंच, पोहचणें,इ० मागें ' पोच,' पोचणें,' इ० पहा.

पोहटा पु० १ नदी, नाला, इ०च्या पुराचा लोंढा,–जो आजूबाजूचे खळगे भरून टाकतो. २ खाडीचा बारीक फाटा. ३ दलदलीची जागा. ४ गू, शेण, इ०चा ढीग,–एका खेपेस हगलेला.

पोहटी [म० पोहो] **स्त्री०** १ गाय, म्हैस, इ०चें एका खेपेचें शेण.२ नदी, नाला, यांना पूर आला असतां आजूबाजूंच्या खळग्यांत पसरतें तें पाणी. ह्या अर्थी ' पोहडी ' असाही शब्द आहे. ꙮ **पोहटीची माती स्त्री०** गायीच्या शेणाला चिकटलेली माती,–जिचें खत चांगलें असतें.

पोहणी [म० पोहणें] **स्त्री०** १ पोहण्याची क्रिया. २ एका दमांत पोहून आक्रमिलेलें अंतर. **वि०** पोहण्यास योग्य (पाणी); पोहण्याइतकें खोल (पाणी). ꙮ **पोहणीस घालणें** गुरांढोरांना पाण्यांत पोहावयास किं० डुंबावयास नेणें.

पोहणें, पोहोणें[सं० प्लु=तरंगणें, पोहणें]**अ० क्रि०** १ हातांपायांनीं पाणी तोडून नदी इ०च्या ठायीं तरणें किं० तरत तरत पुढें जाणें. २ तरंगत राहणें. **स० क्रि०** (नदी इ० हातांपायांच्या विशेष प्रकारच्या हालचालींनीं) आक्रामिणें किं० ओलांडणें. ꙮ **शास्त्रांत पोहणें** त्यांत वाकबगार असणें. **पैशांत पोहणें** पैशानें समृद्ध असणें. **पोहनाव वि०** नाव इ० जलयानाशिवाय जी उल्लंघितां किं० आक्रामितां येत नाहीं अशी (नदी इ०).

पोहरणें अ० क्रि० १ जमीन, भिंत, इ०वर पाणी पडल्यानें ती फुगणें किं० तिच्यावर पोपडे धरणें. २ वातुळ पदार्थ खाल्यानें (पोट)फुगणें.

पोहरा, पोहोरा पु० विहीर इ०तून पाणी काढण्याचें धातूचें कड्या असलेलें पात्र.

पोहा पु० वाटसरू, यात्रेकरू, भिकारी, इ० चा समुदाय. **पोहा [सं० पृथुक] पु०** साळीवर ऊन्ह पाणी घालून त्या मृदु झाल्यावर त्या कुटून त्यांचे चपटे दाणे होतात ते प्रत्येक. **अ० व०**पोहे.

पोहिटी इ० मागें ' पोहटी ' इ० पहा.

पोही स्त्री० मागें ' पोई, ' ' धर्मपोई ' पहा.

पोहोच, पोहोंचणें, इ०' पोच, ' ' पोचणें, ' इ० पहा.

पोळ पु० १ नवस म्हणून किं० केवळ देवताप्रीत्यर्थ म्हणून जो बैल स्वच्छंदानें हिंडावयास सोडलेला असतो तो; याच्या अंगावर त्रिशूलादि चिन्ह डागलेलें असतें. २ (**लाक्षणिक**) धष्टपुष्ट आणि निरुद्योगी मापूण.

पोळ स्त्री० वाटोळ्या दगडांची मातीशिवाय रचिलेली भिंत.

पोळ न० मधमाशांचें पोवळें,–ज्यांत त्या मध सांठवितात आणि वसति करतात.

पोळकी स्त्री० १ फुलबाजीसाठीं करतात ती कागदाची नळी. २ पत्राचा लखोटा.

पोळणें अ० क्रि० १ अग्नि, ऊन, इ० च्या योगानें भाजणें किं० होरपळणें. २ (**लाक्षणिक**) कांहीं व्यवहारांत ठोकर किं० नुकसान लागलेलें असणें;उ० रामड्या पटवर्धनाला एकोतीणस रुपये उसने देऊन मी चांगला पोळलेला आहें.३ (**लाक्षणिक**) प्रियजनाच्या मरणानें किं० विपत्तीनें व्यथित झालेलें असणें. ॐ **पोळभाज स्त्री०, न०** शेताची जमीन भाजणें इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें.

पोळपाटली, पोळसर इ० मागें' पोवळें'मध्यें ' पोवळपाटली, ' ' पोवळसर ' इ० पहा.

पोळा [म० पोळ] पु० श्रावण किं० भाद्रपद महिन्याच्या अमावास्येस बैलांच्या शिंगास काव लावून त्यांच्या कपाळांवर बाशिंगें बांधून त्यांना गांवांतून थाटानें मिरवितात तो उत्सव.

पोळा पु० १ गांधील माशा, मधमाशा, इ० चें घर. २ अनेक पानें एकाशीं एक चिकटावून झाडावर मुंगळे करतात तें घर. ३ शेताची दाढ भाजली जात असतां मधून मधून भाजल्याशिवाय राहतात जे पट्टे ते प्रत्येक. ४ घर, गवताची रास, इ० जळत असतां त्यांतून जे जळते पदार्थ वाऱ्यावर उंच उडतात ते प्रत्येक. ५ पोकळा किं० शेवग्याचीं फुलें केळच्या पानांत गुंडाळून भाजून मुलें करतात तें खाद्य.

पोळी स्त्री० १ कणीक, उकड, इ० ची भाकरीसारखी वाटोळी थापटी करून भाजून करतात तें खाद्य.२ आळित्याच्या रंगांत भिजवून वाळविलेली कापसाची वडी. हातानें पोथ्या लिहिणारे लोक ही वडी पाण्यांत भिजवून तांबडा रंग करतात. ३ मोहोळांत भाकरीच्या आकाराची रचना मधमाशा करतात ती. ४ गायच्या किं० बैलाच्या गळ्याखालीं लोंबतें पातळ कातडें असतें तें. ह्याला संस्कृतांत 'सास्ना' म्हणतात. ॐ **कांहीं व्यवहारांत कोणेकाची पोळी पिकणें** त्यांत त्याला लाभ होण्याची संधी येणें किं० प्राप्त होणें. **पोळपाट, पोळपट पु०** पोळी लाटावयाची लाकडाची वाटोळी जाडी फळी.

पोळी तुकडा पु० ए० व० पोळी, भाकरी, इ० समुच्चयानें; पोळी किं० भाकरी किं० असा कांहीं खाद्य पदार्थ. **पोळ्यापाठक पु०** आचारी; स्वयंपाक्या.

पौ, पव [हिं०] पु० फाशावरील एकत्वाचें [चिन्ह.

पौगंड मागें ' पोगंडा ' पहा.

पौची स्त्री० मागें ' पोची, ' 'पोहची' पहा.

पौढणें अ० क्रि० विश्रांतीसाठीं आंथरुणावर अंग आडवें करणें. ' पहुडणें ' हें ह्या शब्दाचें अन्य रूप आहे.

पौतें, पौतीपूर्णिमा मागें ' पवतें,' ' पवतीपूर्णिमा ' पहा.

पौत्र [सं०] पु० आपल्या मुलाचा मुलगा.

पौत्री स्त्री० आपल्या मुलाची मुलगी.

पौनःपुन्य [सं०] न० कांहीं गोष्ट पुनःपुनः होणें किं० करणें.

पौनरुक्त्य [सं०] न० कांहीं गोष्ट पुनःपुनः सांगणें किं० म्हणणें.

पौनर्भव [सं०] पु० पुनर्विवाहित स्त्रीचा [पुत्र.

पौबारा मागें ' पवबारा ' पहा.

पौर [सं०] वि० शहरांतील;नगरासंबंधाचा. **पु०** नागरिक.

पौराणिक [सं०] पु० पुराण सांगून चरितार्थ चालविणारा किं० परोपकार म्हणून पुराण सांगणारा. **वि०** पुराणांत वर्णिलेलें.

पौरुष [**सं०**] **वि०** १ मानवी. २ मर्दानी. **न०** १ उद्योग. २ पराक्रम. ३ पुरुषत्व. ४ रेत; वीर्य. ५ पुरुषभर उंची किं० खोली; पांच हात उंची किं० खोली. ॐ **पौरुषवाद पु०** ज्याच्या त्याच्या पराक्रमावर फळ अवलंबून असतें हें मत. दैवावर फळ अवलंबून असतें अशा मताला ' दैववाद ' किं० ' प्रारब्धवाद ' म्हणतात.

पौरुषेय [**सं०**] **वि०** १ मनुष्यानें केलेलें किं० निर्मिलेलें. २ मनुष्यसंबंधीं.

पौरोहित्य [**सं०**] **न०** पुरोहितपणा.

पौर्णमासी [**सं०**] **स्त्री०** पौर्णिमा.

पौर्वापर्य [**सं०**] **न०**१मागचा पुढचा संबंध. २ क्रम.

पौल पु० गायीचें किं० म्हशीचें अपत्य.

पौंश्चल्य [**सं०**] **न०** स्त्रीनें केलेला व्यभिचार किं० परपुरुषगमन.

पौष [**सं०**] **पु०** हिंदूंचा दहावा महिना. ॐ **पौषी स्त्री०** पौष महिन्यांतील पौर्णिमा. **वि०** पौष महिन्यांत येणारा किं० होणारा.

पौष्टिक [**सं०**] **वि०** १ पुष्टि देणारें. २ रक्षक. ३ श्रेयस्कर. ४ धन, धान्य, इ० देणारा (यज्ञ इ०).

पौळ स्त्री०चिखलाचा उपयोग न करतां केवळ दगडावर दगड मांडून रचिलेली ओबडधोबड भिंत.

प्याजी [**हिं०**] **कि०** कांद्याच्या रंगाचा.

प्यादा [**फा०** पियादाह्] **पु०** १ पायावर उभा राहून लढणारा शिपायी. २ बुद्धिबळाच्या खेळांत मोहऱ्याशिवाय जीं बुदबळें तीं प्रत्येक. ॐ **प्यादा पु०** पायदळी शिपाई. **प्यादेमात स्त्री०** प्याद्यानें शह देऊन केलेली मात. याला ' प्यादी ' **स्त्री०** असाही शब्द आहे. **प्याद्याचा फरजी होणें** हलकट आणि नादान मनुष्य दैवानें किं० राजकृपेनें वैभवास चढणें किं० अधिकाराच्या पदावर स्थापित होणें.

प्यादें [**फा०** पियादाह्] **न०** बुद्धिबळाच्या खेळांत मोहोऱ्या शिवाय जें बुद्धिबळ तें.

प्यार [**हिं०** पियार्] **स्त्री०** प्रेम; प्रीति. **वि०** आसक्त; बहाल; उ० माझी मर्जी त्याच्यावर प्यार झाली.

प्याला [**फा०** पियालाह्] **पु०** पेला,– आकारविशेषाचें पात्र. ॐ **प्याला पिणें** (किं० **घेणें**) मुसलमानी धर्माची दीक्षा घेणें. **प्यालेदार वि०** प्याल्यासारखा आकार ज्याच्या छातीवर होतो असा(अंगराखा).

प्यास [**हिं०** पियास्] **स्त्री०** १ तहान. २ (**लक्षणेनें**)उत्कट इच्छा. [कॉलू रोग.

प्याहा [**सं०** प्लीहन्] **पु०** १ पाणथरी. २

प्र [**सं०**] उपसर्ग. हा उपसर्ग संस्कृत शब्दांना लागून पुढील मुख्य अर्थ होतात.१ अतिशय; उ० प्रमत्त;२ आरंभ;उ० प्रयाण;३आधिक्य;उ०प्रवाद; प्रगुण; ४ उत्पत्ति; उ० प्रभव, प्रपौत्र (पुत्राचा पुत्र). ५ पूर्णता; उ० प्रभुक्त.

प्रकट [**सं०**] **वि०** १ उघड; स्पष्ट.२जाहीर.

प्रकटणें [**म०** प्रकट; **सं०** प्रकट] **अ० क्रि०** दिसण्याजोगा होणें; दिसूं लागणें.

प्रकटिणें [**म०** प्रकट] **स० क्रि०** दिसेसा करणें; उघडा करणें.

प्रकटित [**सं०**] **वि०** उघड, स्पष्ट, किं० जाहीर केलेला.

प्रकरण [**सं०**] **न०** १ खातें; कामाचा वर्ग. १ पुस्तकाचा भाग,–एका विषयाला अनुलक्षून असलेला.३कादंबरी इ०चा एक एक पोटविभाग.४ निरूपणाचा विषय.५ बाबत; काम; उ० लग्नाच्या प्रकरणीं माझे दोनशे रुपये खर्च झाले. ६ एका विशिष्ट मतानें किं० सरणीनें वागणारे लोक समुच्चयानें. ७ नामांकित किं० प्रसिद्ध किं० कर्तबगार पुरुष किं० स्त्री (स्तुतींत किं० निंदेंत). ८ वर्तनसरणी; चालरीत. ९ वडेजावी; वैभव. ॐ **प्रकरणोपात्त वि०** सध्याच्या प्रसंगाला धरून असलेलें किं० चालू विषयाशीं संबंध असलेलें.

प्रकर्ष [**सं०**] **पु०** १ श्रेष्ठता; उत्कर्ष; अतिशयपणा. २ परिणति.

प्रकांड[**सं०**] **वि०** विशाल.**पु०,न०**१ झाडाचें खोड किं० बुंधा. २ फांदी. **टीप**,–समासांतीं प्रकांड याचा अर्थ'उत्कृष्ट', 'श्रेष्ठ'असा होतो; उ० नृपप्रकांड, पुरुषप्रकांड, इ०.

प्रकार [**सं०**] **पु०** १ तऱ्हा; रीति. २ भेद; जाति. ॐ **एक गहूं प्रकार बहू** गहू ही एक वस्तु असली तरी त्या गव्हापासून नानाविध

खायें बनवितां येतात. **कोणेकाचे प्रकार करणें** त्याला नानाप्रकारें त्रास देणें किं० सतावणें.

प्रकाश [**सं०**] **पु०** १ उजेड; तेज; चमक. २ कांति; दीप्ति. ३ डोळ्यांची अवलोकन करण्याची शक्ति; उ० सावित्रीच्या सासऱ्याच्या नेत्रीं प्रकाश आला आणि अंधत्वाचा गंधही उरला नाहीं. ४ काव्यादिकांचें स्पष्टीकरण. ५ फैलाव; विस्तार. ६ ज्ञान; विषयाचें रहस्य जाणणें.

प्रकाशक [**सं०**] **वि०** १ चकचकीत किं० तेजस्वी किं० तजेलेदार करणारा. २ वर्तमानपत्र, पुस्तक, इ० प्रसिद्ध करणारा.

प्रकाशणें [**सं०** प्र+काश्] **अ० क्रि०** चकचकणें; चमकणें; झळकणें.

प्रकाशिणें [**सं०** प्र+काश] **स० क्रि०** १ प्रसिद्ध किं० उघड किं० जाहीर करणें. २ सुबोध करणें.

प्रकाशित [**सं०**] **वि०** १ तेजस्वी. २ प्रसिद्ध किं० प्रकट किं० उघड केलेला.

प्रकीर्ण [**सं०**] **वि०** १ फेकलेलें; उधळलेलें. २ अस्ताव्यस्त टाकलेलें किं० पडलेलें; विखुरलेलें; विसकटलेलें. ३ मिश्रित; सळमिसळीचा; नानाविध. ४ अव्यवस्थित, असंबद्ध (वर्तन, भाषण). ५ प्रसिद्ध किं० जाहीर केलेला किं० झालेला. **न०** विविध विषयांचा संग्रह.

प्रकृत [**सं०**] **वि०** १ वर्णन किं० निरूपण करावयाला हातीं घेतलेला(विषय, पदार्थ इ०). २ चालू; सध्या प्रचलित. **क्रि० वि०** सध्या; ह्या प्रसंगीं. ꙮ **प्रकृतार्थ पु०** चालू विषय; ज्याचें वर्णन किं० निरूपण चाललें आहे तो विषय.

प्रकृति [**सं०**] **स्त्री०** १ पदार्थमात्राचा मूळ धर्म, मूळस्वभाव, किं० मूळस्थिति. २ मूळकारण; उत्पत्तिहेतु. ३ अविद्या, आदिमाया. ४ ज्या कारणापासून जें कार्य उत्पन्न होतें त्या कार्याचें तें कारण. ५ (**सांख्यमत**) विश्वाचें आदिकारण. ६ ब्रह्म; परमात्मा. ७ (**व्याकरण**) शब्दाचें मूळ रूप. ८ सत्व, रज, आणि तम, ह्यांची साम्यावस्था. ९ स्वास्थ्य. १० (**वैद्यक**) शरीरावस्था. ११ राज्याचीं सात अंगें,—स्वामी, अमात्य, सुहृद्, कोश, राष्ट्र, दुर्ग, आणि बल. १२ पंचमहाभूतें, मन, बुद्धि, आणि अहंकार. १३ पंचमहाभूतें. १४ कांहीं व्यवहाराचा सामान्यतः चाललेला प्रकार. १५ प्रजा, रयत. १६ (**छंदःशास्त्र**) पंचकावली, स्रग्धरा, इ० जीं एकवीस अक्षरांच्या चरणांचीं वृत्तें त्यांचा वर्ग. ꙮ **प्रकृतिपुरुष पु०** कारभारी. **प्रकृतिमंडळ न०** प्रजाजनांचा समुदाय. **प्रकृतिसिद्ध वि०** स्वाभाविक; सहज; नैसर्गिक. **प्रकृतिस्थ वि०** १ मूळच्या स्थितींत असलेला. २ निरोगी. ३ बरा झालेला; आजारांतून उठलेला. ४ शुद्धीवर आलेला. ५ स्वस्थचित्त. ६ अविद्यायुक्त. **प्रकृतिस्वभाव पु०** १ मनुष्याचा मूळस्वभाव. २ पदार्थाचा अंगचा धर्म.

प्रकृष्ट [**सं०**] **वि०** १ लांबचें, दूरचें. २ मुख्य. ३ श्रेष्ठ. ४ अतिशयित.

प्रकोप [**सं०**] **पु०** १ राग. २ चित्तक्षोभ. ३ दंगा, बंड. ४ अतिवाढ; उ० पित्तप्रकोप.

प्रकोष्ठ, प्रकोष्ठक [**सं०**] **पु०** १ कोपरापुढचा हाताचा भाग. २ दाराजवळील खोली. ३ चौक.

प्रक्रम [**सं०**] **पु०** २ गमन; जाणें. २ पाऊल. ३ प्रारंभ; सुरवात. ४ चाल, रीति. ५ पद्धति, व्यवस्था. ६ प्रस्तुतकार्य. ७ वरचढ होणें. ꙮ **प्रक्रमभंग पु०** लिंग, वचन, प्रयोग, इ० बाबतींत वाक्याला जशी सुरवात केली असेल तशी समाप्ति न केल्यास होतो तो दोष.

प्रक्रांत[**सं०**] **वि०** १ वरचढ. २ आरंभिलेलें. ३ पूर्वोक्त. ४ प्रकरणप्राप्त.

प्रक्रिया [**सं०**] **स्त्री०** १ रीति; सरणी; पद्धति. २ विधि; संस्कार. ३ उपोद्घात. ४ निरूपण. ५ प्रकरण. ६ (**व्याकरणांत**) शब्द सिद्ध करण्याची कृति किं० सरणी. ७ (**व्याकरण**) शब्द सिद्ध करण्याचे नियम.

प्रखर [**सं०**] **वि०** १ अति उष्ण. २ अतितिक्ष्ण (शस्त्र). ३ अतितिखट किं० तीव्र.

प्रख्या [**सं०**] **स्त्री०** १ रूप, चेहेरा. २ कांति. ६ प्रसिद्धि; कीर्ति.

प्रख्यात [**सं०**] **वि०** नामांकित; सर्वविश्रुत.

प्रख्याति [**सं०**] **स्त्री०** १ प्रसिद्धि. २ कीर्ति.

प्रगट, प्रगटणें मागें ' प्रकट,' ' प्रकटणें ' पहा.

प्रगल्भ[**सं०**] **वि०** १ परिपक्व (बुद्धि). २प्रौढ (विचार). ३ धीट, धाडसी, साहसी. ४ सर्व बाजूंनीं पूर्ण वाढलेला.

प्रग्रह [**सं०**] **पु०** १ जबरीनें घेणें;लुबाडणें. २ बंधन, नियमन, नियंत्रण. ३ विळखा; कचाटी. ४ चाबूक. ५ लगाम. ६ कैदी. ७ शिक्षा; दंडन. ८ ग्रहणाचा आरंभ.

प्रघट्ट, प्रघट्टक [**सं०**] **पु०** १ नियम; कायदा. २ विषयाचें निरूपण.

प्रघात [**सं०**] **पु०** १ मारणें. २ युद्ध. ३ चाल, रीत, परिपाठ, शिरस्ता.

प्रचंड [**सं०**] **वि०** १जोरदार; आवेशी. २ अति उष्ण. ३ खवळलेला. ४ भयंकर. ५ खूप मोठा; अवाढव्य; जगडव्याळ.

प्रचलित [**सं०**] **वि०** १ सध्या चालू किं० रूढ (भाषा,नाणें, शब्द,आचार, वाद,इ०). २ विचारासाठीं पुढें घेतलेला.

प्रचार [**सं०**] **पु०** १ चाल,रीति,शिरस्ता. २ रस्ता; मार्ग. ३ वर्तणूक.

प्रचीती पुढें ' प्रतीति ' पहा.

प्रचुर [**सं०**] **वि०** १ पुष्कळ; विपुल. २ विस्तीर्ण; प्रशस्त. ३ पूर्ण; व्याप्त;ठासून भरलेला.

प्रचोदन न०,प्रचोदना स्त्री०[सं०]१प्रेरणा.२ उत्तेजन देणें; भर देणें; आग्रह करणें. ३ आज्ञा.४ नियम; विधि; कायदा.

प्रच्छन्न [**सं०**] **वि०** १ गुप्त; लपलेला. २ दूरून उल्लेख करून किं० अस्पष्ट रीतीनें मारलेला (टोमणा) किं० केलेली (निंदा).

प्रच्छादणें [**सं०** प्र+छाद्] **स० क्रि०** झाकणें; लपविणें.

प्रच्छादन [**सं०**] **न०** १ झाकणें; लपविणें. २ आच्छादन; झाकण. ३ वस्त्र; उपरणें.

प्रजा [**सं०**] **स्त्री०** १ (राजाची) रयत. २ संतति; मुलेंबाळें. ॐ **प्रजान्तक पु०** यम. **प्रजापति पु०** १ ब्रह्मदेव. २ सृष्टिकर्ता. ३ दक्ष. ४ राजा. ५ विश्वकर्मा. ६ शिश्न.**प्रजावती स्त्री०** १ भावजय. २ प्रौढ स्त्री.

प्रज्वलन [**सं०**] **न०** १ जळणें; दाह. २ पेटविणें. [जळत असलेला.

प्रज्वलित [**सं०**] **वि०** पेटलेला; जळणारा;

प्रणणें [**सं०** 'प्रणयन' पासून]**स०क्रि०** विवाहविधीनें (पत्नी किं० पति) स्वीकारणें.

प्रणत [**सं०**] **वि०** १ नम्र. २ वाकलेला; कललेला. [नम्रपणा.

प्रणति [**सं०**] **स्त्री०**१ नमस्कार.२ लनिता;

प्रणय [**सं०**] **पु०** १ प्रेम; स्नेह. २ सलगी. ३ विनंती; प्रेमाची प्रार्थना. ॐ **प्रणयकलह पु०** लटकें भांडण. **प्रणयकोप पु०** खोटा राग.

प्रणयन [**सं०**] **न०** १ आणणें. २ नेणें; घेऊन जाणें. ३ गार्हपत्य कुंडांतील अग्नि पूर्वेकडील कुंडांत नेणें. ४ समाप्त करणें. ५ निवाडा; खटल्याचा निर्णय करून शिक्षा देणें.

प्रणयी [**सं०** प्रणयिन्] **वि०** प्रेमळ.**पु०** १ स्नेही. २ याचना करणारा. ३ शरणागत.

प्रणव [**सं०**] **पु०** ओंकार.

प्रणाम [**सं०**] **पु०** १ वांकणें. २ नमस्कार.

प्रणाल पु०, प्रणाली, प्रणालिका स्त्री० [**सं०**] १ पाट; नळ; पन्हळ. २ परंपरा; सततचा क्रम; सरणी; शिरस्ता.

प्रणिधान [**सं०**] **न०** १ दीर्घोद्योग;प्रयत्न २ ध्यान; समाधि. ३ लक्ष्य देणें; काळजी घेणें. ४ कर्मफलत्याग. ५ एक प्रकारची भक्ति.

प्रणिधि [**सं०**] **पु०** हेर.

प्रणिपतन न०, प्रणिपात पु० [**सं०**] १ पायां पडणें. २ नमस्कार.

प्रणिहित [**सं०**] **वि०** १ केलेलें. २ सोपविलेलें; ठेविलेलें. ३ एकाग्र झालेला; अंतर्मुख. ४ दक्ष.

प्रणीत [**सं०**] **वि०** १ केलेला; रचिलेला; उ० व्यासप्रणीत. **पु०**१ मंत्रसंस्कृत (अग्नि).२मान्य केलेला.

प्रणेता [**स** प्रणेतृ] **वि०** १ प्रवर्तक; चालू करणारा. २ नायक. ३ग्रंथकार. [थोडा.

प्रतनु [**सं०**] **वि०** १ कृश. २ लहान. ३

प्रत स्त्री०१एकसारख्या अनेक वस्तूंपैकीं एक; एका जातीच्या वस्तूंतील एक व्यक्ति. २ नक्कल; मूळाची प्रतिकृति; मूळ वस्तूचें अनुकरण; मूळा-

बरहुकूम दुसरी बनविलेली वस्तु. ३ नमुना. ४ ज्याचा नमुना घेतला आहे किं० केलेला आहे तो पदार्थ. ५ गुणांवरून केलेले वर्ग प्रत्येक. ६ दक्षिणा किं० देणग्या देण्यामध्यें वरच्या दर्जाची जी दक्षिणा किं०देणगी;ती.॥प्रतवारा क्रि० वि०वर्गवारीनें.प्रतबंदी स्त्री०जमीनीची वर्गवारी.

प्रत [सं० प्रति] **श० यो अ०** १ ०कडे; ०ला; उ० तो गांवाप्रत गेला. २ ०ला,–सकर्मक क्रियापदाचें कर्म किं० सकर्मक क्रियापदापासून झालेल्या नामाचें कर्म दाखविणारा हा प्रत्यय आहे; उ० राजानें प्रधानाप्रत बोलविलें (किं० प्रधानाप्रत आमंत्रण पाठविलें). **क्रि० वि०**प्रत्येकाला उद्देशून; उ० घरास प्रत पांच रुपये दिले. ॥ **गांवाप्रत** (किं० **घराप्रत**)**होणें** गांवाला(किं० घराला) जाऊन पोंचणें.

प्रतरणा पुढें ' प्रतारणा ' पहा.

प्रतान [**सं०**] **पु०**लतेचा बारीक तंतु;ताणा. ॥ **प्रतानिनी स्त्री०** तंतुयुक्त वेल.

प्रताप [**सं०**] **पु०** १ उष्णता; दाह.२ऊन्ह. ३ चकाकी; दीप्ति; कांति; तेज. ४ वैभव;प्रभाव; पराक्रम. ५ शौर्य. ६ सामर्थ्य, वीर्य.

प्रतारक [**सं०**] **वि०** फसविणारा ; लुच्चा.

प्रतारण न०, प्रतारणा स्त्री० [**सं०**] १ फसवणूक; लबाडी. २ कपट. [ठकविणें.

प्रतारणें [**सं०** प्र+तृ] **स० क्रि०** फसविणें;

प्रति [**सं०**] **उपसर्ग** आणि **श०यो०अ०**१याचे अर्थ पुढें दिल्याप्रमाणें होतात. १ ०ला, ०कडे.२ परत; उ० प्रतिवचन. २ तुल्यता; सारखेपणा; उ० प्रतिबिंब. ३ विरोध; उ० प्रतिबल. ४ दुसरा; उ० प्रतिब्रह्मा; प्रतिसृष्टि. ५ बदली; उ० प्रतिनिधि. ६ मोबदला; उ० प्रतिदान. ७ (अव्ययीभावांत) प्रत्येक; उ० प्रतिक्षण; प्रतिदिन.

प्रतिकर्तव्य, प्रतिकार्य [**सं०**] **न०** सूड.

प्रतिकाय [**सं०**] **पु०** १ प्रतिमा.२निशाण; लक्ष्य.

प्रतिकार, प्रतीकार [**सं०**] **पु०** १ प्रत्युपकार. २ सूड. ३ उपाय; इलाज.४विरोध. ५ अनुकरण. ६ परस्परांस साहाय्य करण्याचा तह. ७ अडविण्याची क्रिया.

प्रतिकूल (–**ळ**)[**सं०**] **वि०** १ विरुद्ध. २ अप्रिय, कर्णकठोर (वर्ण, वाक्य). ३ अशुभ (दर्शन). ४ विसंगत (भाषण).

प्रतिकृत [**सं०**] **न०** १ इजा. २ प्रतिकार; विरोध. ३ फेड; भरपाई.

प्रतिकृति [**सं०**] **स्त्री०** १ फेड; जशास तसें करणें; सूड; प्रतिकार. २ प्रतिबिंब. ३ चित्र; मूर्ति; प्रतिमा. ४ बदली. ५ मोबदला.

प्रतिक्रिया [**सं०**] **स्त्री०** १ प्रतिकार;निवारण. २ फेड; सूड उगविणें. ३ विरोध; अडथळा. ४ नटणें; अलंकरण.

प्रतिगृहीत [**सं०**] **वि०** १ स्वीकारलेला. २ मान्य केलेला. ३ कबूल केलेला.

प्रतिग्रह [**सं०**] **पु०** १ स्वीकार. २ कोणी दिलेलें दान घेणें. ३ देणगी. ४ यथाविधि दान. ५ कबूली; मान्यता. ६ विवाह. ७सैन्याची पिछाडी.

प्रतिग्राहक, प्रतिग्राही [**सं०**] **वि०** १ कोणी दिलेलें दान स्वीकारतो तो. २ मान्य करणारा; कबूल करणारा.

प्रतिघात, प्रतीघात [**सं०**] **पु०** १ प्रतिकार. २ उलट प्रहार. ३ प्रतिबंध. ४ निरोध. ५ नाश. ६ निषेध. ७ ठार मारणें.

प्रतिघातक [**सं०**] **वि०** १ बाधक.२ प्रतिबंधक. ३ संकटें ज्यांत पुष्कळ असें; दुःखदायक.

प्रतिच्छाया [**सं०**] **स्त्री०** १ प्रतिबिंब. २ चित्र; मूर्ति; प्रतिमा. ३ सादृश्य. ४ सदृश वस्तु.

प्रतिजिव्हा [**सं०**] **स्त्री०** पडजीभ.

प्रतिदान [**सं०**] **न०** १ ठेव परत देणें. २ अदलाबदल. ३ मोबदला म्हणून दिलेली वस्तु.

प्रतिदिन [**सं०**] **क्रि० वि०** दररोज. **टीप**,– ' प्रतिदिनीं ' असेंही रूप मराठींत योजलें जातें.

प्रतिद्वंद्व [**सं०**] **पु०** शत्रु. **न०** शत्रुत्व. ॥ **प्रतिद्वंद्वी पु०** शत्रु. १ समानबलाचा माणूस.

प्रतिध्वनि [**सं०**] **पु०** पडसाद.

प्रतिनिधि [**सं०**] **पु०** १ एकाच्या जागीं किं० बदलीं दुसरा योजलेला माणूस किं० घेतलेला पदार्थ. २ मुखत्यार. ३ जामीन. ४ प्रतिमा, मूर्ति.

प्रतिपद, प्रतिपदा [**सं०**] **स्त्री०** १ बुद्धि, ज्ञान. २ शुक्ल किं० कृष्णपक्षांतील पहिली तिथि.

प्रतिपदीं [सं० प्रतिपद] **क्रि० वि०** पावलोपावलीं; क्षणोक्षणीं.

प्रतिपदोक्त [सं०] **वि०** शास्त्रादिकांच्या ठायीं तदर्थ शब्द योजून ज्याचें विधान केलें आहे तो विध्यादि अर्थ.

प्रतिपक्ष [सं०] **पु०** १ शत्रु; प्रतिस्पर्धी. २ प्रतिवादी. ३ विरुद्ध पक्ष.

प्रतिपादक [सं०] **वि०** १ कार्यसाधक. २ सिद्ध करणारा. ३ स्पष्ट करणारा. ४ समर्थन करणारा.

प्रतिपादणें [सं० प्रति+पद्] **स० क्रि०** १ सिद्ध करून देणें. २ समर्थित करणें. ३ तीच गोष्ट पुन्हा उच्चारून किं० बोलून सांगणें. ४ कांहीं पदार्थ कोणेकाला कायमचा देऊन टाकणें.

प्रतिपादन [सं०] **वि०** सिद्ध केलेला; निरूपिलेला.

प्रतिपादित [सं०] न० १ विषयाचें निरूपण किं० विवेचन. २ सिद्ध करणें.

प्रतिपाद्य [सं०] **वि०** १ ज्याचें विवरण किं० निरूपण करावयाचें तो (विषय). २ सिद्ध करावयाचा.

प्रतिपाल (–ळ) **पु०** **प्रतिपालन न०** [सं०] १ संरक्षण; पालनपोषण. २ जोपासना. ३ (व्रतादिकांचें) आचरण.

प्रतिप्रसव [सं०] **पु०** १ सामान्य निषेधाचा विशेष गोष्टीपुरता पुन्हा केलेला विधि.

प्रतिफळ (–ल) [सं०] **न०** १ प्रतिबिंब. २ फेड; सूड.

प्रतिबंध [सं०] **पु०** १ आडथळा; आटकाव. २ नियंत्रणा. ३ कैद. ४ हरकत.

प्रतिबिंब [सं०] **न०** पाणी, आरसा, इ० च्या पृष्ठभागावर दिसतें पदार्थाचें रूप.

प्रतिभट [सं०] **पु०** १ स्पर्धा करणारा. २ शत्रु; प्रतियोद्धा.

प्रतिभय [सं०] **वि०** भयंकर.

प्रतिभा [सं०] **स्त्री०** १ चेहेरा, स्वरूप. २ तेज; प्रकाश. ३ बुद्धि. ४ अलौकिक बुद्धि. ५ प्रत्युत्पन्न मति; स्फूर्ति. ६ कवीची दिव्य दृष्टि.

प्रतिभू [सं०] **पु०** जामीन.

प्रतिमा [सं०] **स्त्री०** १ प्रतिबिंब. २ मूर्तिः चित्र. ३ सादृश्य; उपमा; बरोबरी; उ० गोदीची प्रतिमा चिंगीला येणार नाहीं. ४ उमटलेली खूण. ५ धातूच्या पत्र्यांवर किं० पाषाणादिकांवर कोरलेली देवाची मूर्ति, पादुका, इ०. ६ नमुना; उ० गिरिधर आणि पिलोबा एका प्रतिमेचे. **टीप,–** बहुव्रीहि समासाच्या शेवटीं 'प्रतिमा' चें 'प्रतिम' असें रूप होतें आणि त्या सामासिक शब्दाचा अर्थ 'सारखा' असा होतो; उ० दैत्यप्रतिम म्ह० दैत्य आहे उपमा ज्याला असा म्ह० दैत्यासारखा म्ह० क्रूर; उ० सिंहप्रतिम म्ह० सिंहासारखा म्ह० शूर; इ०.

प्रतियोगी [सं० प्रतियोगिन्] **वि०** १ बाधक. २ जोडीचा. **पु०**, शत्रु प्रतिपक्षी. ३ भागीदार. ४ (**न्याय**) ज्याचा अभाव सांगावयाचा तो पदार्थ; उ० घट हा घटाभावाचा प्रतियोगी. ५ परावलंबी. ❀ **प्रतियोगी सहकारिता स्त्री०** ज्या प्रमाणांत प्रतिपक्षी आपणाशीं सहकारिता करील त्या प्रमाणांत त्याच्याशीं सहकारिता करणें ही सरणी.

प्रतिरथ [सं०] **पुं०** प्रतिपक्षी; प्रतियोद्धा.

प्रतिरव [सं०] **पु०** १ प्रतिध्वनि. २ कलह; विरुद्ध आरडाओरड करणें. ३ तकरार.

प्रतिरूप [सं०] **न०** १ ज्यांत प्रतिबिंब पडतें असा पदार्थ. २ हुबेहुब प्रतिमा. ३ उपमान.

प्रतिरोध [सं०] **पु०** १ अडथळा; हरकत. २ किल्ला इ० ला दिलेला वेढा. ३ प्रतिपक्षी. ४ लपविणें.

प्रतिलोम [सं०] **वि०** १ उलटा. २ वांकडें वर्तन करणारा; हट्टी. ३ परत फिरणारा. ४ विरुद्ध; विपरीत. ५ वरच्या वर्णाच्या स्त्रीचा खालच्या वर्णांतील पुरुषाशीं (विवाह; उ० ब्राम्हणी आणि क्षत्रिय यांचा). ६ दुष्ट; पापी.

प्रतिवच [सं० प्रतिवचस्] **न०** खालीं 'प्रतिवचन' पहा.

प्रतिवचन [सं०] **न०** १ उत्तर; जबाब. २ प्रतिध्वनि. ३ विरुद्ध भाषण.

प्रतिवाद [सं०] **पु०** निषेध.

प्रतिवादी [सं० प्रतिवादिन्] **पु०** १ प्रतिपक्षी. २ जाब देणारा. ३ शत्रु. ४ (न्यायसभेंत) वादीच्या विरुद्ध पक्षाचा माणूस.

प्रतिवार्षिक [**सं०**] **वि०** प्रत्येक वर्षी करावयाचा, येणारा, किं० होणारा.

प्रतिविधि [**सं०**] **पु०** १ प्रतिकार; इलाज. २ निषेधरूप कांहीं कृत्य.

प्रतिशब्द [**सं०**] **पु०** १ प्रतिध्वनि; पडसाद. २ एका शब्दाला जोड द्यावयासाठीं योजलेला दुसरा तत्सदृश शब्द,– ज्याला बहुधा कांहीं अर्थ नसतो आणि जो इत्यादि हा अर्थ दाखवितो; उ० दगडबिगड, पेटीबिटी, इ०.

प्रतिषिद्ध [**सं०**] **वि०** मनाई केलेला.

प्रतिषेध [**सं०**] **पु०**१ मनाई. २ निवारण. ३ निषेध; नकार. ४ त्याग. [विरोध.

प्रतिष्टंभ [**सं०**] **पु०** अडथळा; हरकत;

प्रतिष्ठणें [**म०** प्रतिष्ठा] **अ० क्रि०** १ राहणें; थांबणें.

प्रतिष्ठिणें [**म०** प्रतिष्ठा] **स० क्रि०** १ देवळांत मूर्तीची यथाविधि स्थापना करणें. २ एकाद्या अधिकाराच्या जागीं कोणेकाची स्थापना करणें. ३ ठेवणें, मांडणें (सामान्यतः).

प्रतिष्ठा [**सं०**] **स्त्री०** १ राहाणें. २ स्थान; आश्रय; आधार. ३ गृह; वसतिस्थान. ४ स्थैर्य; कायमपणा. ५ अढळ किं० अचल स्थान. ६ घराचा पाया. ७ श्रेष्ठत्व; दर्जा; योग्यता. ८ मोठेपणा; मानमान्यता; वैभव. ९ डौल; मिजास. १० अधिकाराच्या जागीं कोणेकाची स्थापना. ११ देवळांत देवाच्या मूर्तीची यथाविधि स्थापना. १२ स्थापना (सामान्यतः). १३ व्रतसमाप्तीच्या वेळचें कर्मविशेष. १४ व्रतादिकांची समाप्ति. १५ योगसिद्धि. ꙮ **प्रतिष्ठानाम न०** व्यवहारांत म्हणजे एऱ्हवीच्या प्रसंगीं योजावयाचें मनुष्याचें नांव; गौरवानें आव्हानादि करावें म्हणून नाना, बाबा, इ० नांवें योजतात तीं प्रत्येक; उ० दादा, तात्या, नाना, इ०. याच्या उलट ' कागदोपत्रीं योजावयाचें नांव.'

प्रतिष्ठापन [**सं०**] **न०** वर ' प्रतिष्ठा ' अर्थ १०, ११, आणि १२ पहा.

प्रतिष्ठित [**सं०**] **वि०** १ स्थिर; दृढमूळ; पक्केपणीं बसलेला. २ निश्चित. ३ प्रसिद्ध. ४ भपकेदार, चारचौघांत जावयाच्या प्रसंगीं धारण करावयाचा (पोषाख). ५ सभ्य चालीरीतीस अनुसरून असलेला. ६ समाजांत मानाला पात्र असलेला. ६ अधिकाराच्या जागीं स्थापिलेला किं० नेमिलेला (माणूस). ७ यथावीधि स्थापिलेली (देवाची मूर्ति). ८ लग्न, उद्योगधंदा, नोकरी, इ०च्या योगानें आयुष्याच्या मार्गाला लागलेला (माणूस).

प्रतिसांवत्सरिक [**सं०**] **वि०** दरवर्षी करावयाचें (श्राद्धादिकर्म).

प्रतिसूर्य [**सं०**] **पु०** १ सूर्याची प्रतिमा. २ सूर्याच्या तेजाचें मंडळ. ३ (**लाक्षणिक**) दुसरा सूर्यच जणों काय म्ह० तेजस्वी किं० विद्वान माणूस.

प्रतिस्पर्धा [**सं०**] **स्त्री०** कोणेकावरोबर जी स्पर्धा, चढाओढ, किं० बरोबरी ती.

प्रतिस्पर्धी [**सं०** प्रतिस्पर्धिन्]**वि०**१मत्सरी.२ उलट पक्षाचा; चढाओढीच्या प्रसंगीं बरोबरीच्या नात्यानें उभा राहिलेला.

प्रतिहत [**सं०**] **वि०** १ मागें हटविलेला. २ आडविलेला. ३ नष्ट झालेला. ४ निराश झालेला. ५ कुंठित झालेला.

प्रतिज्ञा [**सं०**] **स्त्री०** १ मी अमुक गोष्ट करीन इ०रूप कोणेकानें ठासून केलेलें विधान; बोलून दाखविलेला निश्चितार्थ; करार; ठराव. २ कबूली; अंगीकार. ३(**न्याय**) साध्याचा निर्देश. (१) हा पर्वत वन्हिमान् आहे ही प्रतिज्ञा; (२) त्यावर धूर आहे म्हणून हा हेतु; (३) जेथें जेथें धूर असतो तेथें तेथें वन्हि असतो; जसें स्वयंपाकघर हें उदाहरणं;(४) हा पर्वत धूमवान् आहे हा उपनय; (५) म्हणून ह्या पर्वतावर वन्हि आहे हें निगमन. ह्या पांच अवयवाचें जें वाक्य तें अनुमानवाक्य. वरील उदाहरणांत 'हा पर्वत वन्हिमान आहे'ही प्रतिज्ञा. ४ फिर्याद. ꙮ **प्रतिज्ञापत्र न०** दस्तऐवज; कबुलायत.

प्रतिज्ञात [**सं०**] **वि०** १ ज्याच्यासंबंधानें प्रतिज्ञा केली असे; कबूल केलेलें; मान्य केलेलें. २ ठासून सांगितलेलें.

प्रतीक [**सं०**] **न०** १ ग्रंथांतील वाक्य, श्लोक, इ० चें विववरण किं० स्पष्टीकरण करावयाचें असतां तें वाक्य, श्लोक, इ० चा निर्देश करण्यासाठीं त्यांतील जो पहिला शब्द घेतात

तो. २ मूर्ति. ३ तोंड. ४उदाहरण.५ प्रतिपक्षाच्या विधानांतील खंडनार्थ घेतलेला अंश. ५ प्रतिमा; सादृश्य. ['प्रतिकार' पहा.

प्रतीकार [**सं०**] **पु०** सूड उगविणें. मागें

प्रतीची [**सं०**] **स्त्री०** पश्चिम दिशा.

प्रतीचीन, प्रतीच्य वि० १ पश्चिमेकडचा. २ नंतरचा.

प्रतीत [**सं०**] **वि०** १ आनंदित. २ प्रसिद्ध. ३ विश्वासलेला. ४ प्रसन्न. ५ ज्ञात; अनुभवानें खरें ठरलेलें; प्रत्ययास आलेलें.

प्रतीति [**सं०**] **स्त्री०** १ अनुभव; अनुभव आल्यामुळें झालेली खात्री. २ कोणी केलेलें कांहीं विधान खरें आहे असें आढळून येणें. ३ ज्ञान;जाणीव;अनुभवास आलेली गोष्ट;पदार्थांच्या गुणादींचा मनावर झालेला संस्कार. **टीप,**–वरील सर्व अर्थीं ' प्रचीती ' ह्या शब्दाचाही उपयोग केला जातो. ꣸ **कांहीं गोष्ट प्रतीतीस येणें** ती खरी आहे असें आढळून येणें; अनुभवानें तिच्याबद्दल खात्री पटणें.

प्रतीप [**सं०**] **वि०** १ उलटें; विपरीत. २ विरुद्ध; प्रतिकूळ. ३ अप्रिय. ४ हट्टी. ५ निसर्गाच्या उलट. ६ (**साहित्य**) काव्यांतील एक अलंकार. उपमानाचें काम करावयाला उपमेय पूर्णपणें समर्थ आहे म्हणून उपमान ही जगांत निरुपयोगी वस्तु आहे असें विधान केलेलें असल्यास 'प्रतीप ' ह्या अलंकाराचा एक प्रकार होतो. उपमानाचा तिरस्कार करण्याच्या हेतूनें त्या उपमानाला उपमेय केलेलें असतें तेव्हां ' प्रतीप ' अलंकाराचा दुसरा प्रकार होतो; उपमेयासारखें उपमान आहे असें म्हटलेलें असलें म्हणजे प्रतीपाचा तिसरा प्रकार होतो. विशेष खुलासा आणि उदाहरणें आमचें 'अर्थाअलंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

प्रतीयमान [**सं०**] **वि०** अनुभवास किं० निदर्शनास येत आहे असा किं० ज्ञानाचा विषय होत आहे असा; ज्याची जाणीव होत आहे असा.

प्रतीक्षण [**सं०**] **न०** खालीं ' प्रतीक्षा 'पहा.

प्रतीक्षा [**सं०**] **स्त्री०** १ वाट पाहाणें. २ आशा. ३ आदर.

प्रतीक्षिणें [**सं०** प्रति+ईक्ष; **म०** प्रतीक्षा] **स० क्रि०** १(कोणेकाची) वाट पाहणें.२(कांहीं गोष्टीची) अटकळ करणें.

प्रतीक्ष्य [**सं०**] **वि०** पूज्य(साधुपुरुष इ०).

प्रतीहार [**सं०**]**पु०** द्वारपाळ.

प्रतीहारी स्त्री० अंतःपुराचें द्वारावरील अधिकृत स्त्री.

प्रतोद [**सं०**] **पु०** १ चाबूक. २ पराणी.

प्रत्यक् [**सं०** प्रत्यच्] **क्रि० वि०** १ परतून. २ मागें. ३ विरुद्ध दिशेनें. ४ पश्चिमेकडे. ५ पूर्वी.

प्रत्यंग [**सं०**] **न०** १ उपांग; पदार्थाचें एक अंग. २ इंद्रिय.

प्रत्यंच् [**सं०**] **वि०** १ कललेलें. २ नंतरचें; मागचें. ३ पराङ्मुख. ४ पश्चिमेचा. **टीप,**–हा शब्द पुढील सामासिक शब्दांत मराठींत आला आहे. **प्रत्यगात्मा पु०** जीवात्मा. **प्रत्यङ्मुख वि०** पश्चिमेकडे तोंड केलेला.

प्रत्यंचा स्त्री० धनुष्याची दोरी.

प्रत्यंतर न० १ अनुभव. २ अनुभवाची गोष्ट. ३ दाखला; दृष्टान्त. ४ पुरावा; खातरी पटवून देणारी कांहीं गोष्ट.

प्रत्यनीक [**सं०**] **पु०** १ शत्रु.२ विघ्न.**न०** १ वैर.२शत्रूचें किं० विरोधी सैन्य. ३ (**साहित्य**)एक अलंकारविशेष. जेव्हां एकाद्याच्या अंगीं आपल्या शत्रूचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य नसल्या कारणानें त्यानें त्या शत्रूच्या पक्षाच्या कोणाचें तरी पारिपत्य केलें असें वर्णन असतें तेव्हां 'प्रत्यनीक' हा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

प्रत्यय [**सं०**] **पु०** १ खात्री; पक्का झालेला विश्वास; निश्चित ज्ञान. २ भरंवसा; श्रद्धा;निष्ठा. ३ मत, कल्पना. ४. अनुभव; अनुभवास आलेली गोष्ट. ५ (**व्याकरण**) शब्दांना अर्थविशेष उत्पन्न करण्यासाठीं जीं अक्षरें लावण्यांत येतात तीं; ,–जीं अक्षरें बहुधा स्वतंत्रपणें अर्थहीन असतात; उ० ' घर ' याला ' हून ' हा प्रत्यय लागून 'घराहून' असा अपादान हा अर्थ दाखविणारा शब्द उत्पन्न होतो.

प्रत्यवाय [**सं०**] **पु०** १ ऱ्हास. २ अपकार

३ नुकसान. ४ अडथळा; विघ्न; हरकत. ५ प्रतिकूल आचरण. ६ पाप; दोष.

प्रत्यह [**सं०** प्रत्यहम्] **क्रि० वि०** दररोज; प्रत्येक दिवशीं. **टीप,**– 'प्रत्यहीं' असाही शब्द मराठींत योजण्यांत येतो.

प्रत्यक्ष [**सं०**] **वि०** १ दिसणारें; डोळ्यांपुढें असलेलें. २ हजर; उपस्थित. ३ इंद्रियगोचर. **न०** १ इंद्रियजन्य ज्ञान; उ० श्रोत्रेंद्रियावांचून शब्दाचें प्रत्यक्ष होत नाहीं. २ स्पष्टपणा. **क्रि० वि०** १ समक्ष; पाहातां पाहातां; साक्षात. २ जाहीरपणें. ३ स्वतः; जातीनें. ❀ **प्रत्यक्ष प्रमाण न०** १ डोळ्यांनीं दिसणारा पुरावा. २ इंद्रियांना गोचर होणारा पुरावा. **प्रत्यक्षतः क्रि० वि०** १ इंद्रियांना गोचर होईल अशा प्रकारें. २ साक्षात. ३ जातीनें; स्वतः. **प्रत्यक्षदर्शी वि०** घडलेली गोष्ट ज्याणें पाहिली आहे असा.

प्रत्याख्यात [**सं०**] **वि०** १ टाकून दिलेलें. २ नापसंत म्हणून दूर सारलेलें. ३ रद्द केलेलें. ४ नाकबूल केलेलें.

प्रत्याख्यान [**सं०**] **न०** १ निंदा; अनादर; तिरस्कार. २ नाकारणें; स्वीकार न करणें. ३ निराकरण; खंडन. ४ झिडकारणें; दूर सारणें.

प्रत्यादेश [**सं०**] **पु०** १ आज्ञा. २ कळविणें. ३ परित्याग; निराकरण; झिडकारणें. ४ निर्भर्त्सना; धिक्कार. ५ दैवी सूचना,–आकाशवाणी इ० रूप.

प्रत्याम्नाय [**सं०**] **पु०** १ (**न्यायशास्त्र**) अनुमानवाक्यांतील पांचवें विधान,–ज्याला 'निगमन' असें दुसरें नांव आहे. मागें 'प्रतिज्ञा' शब्द पहा. २ एकाच्या बदलीं दुसरें करणें; प्रतिविधि; मोबदला. ३ मुख्यत्वें करून जें प्रायश्चित्तादि कर्म सांगितलें आहे तें तसें घडणें शक्य नसल्यास द्रव्यदान किं० इतर कांहीं अनुष्ठान जें केलें जातें तें.

प्रत्यासत्ति [**सं०**] **स्त्री०** १ सान्निध्य; समीपता; शेजार. २ घरोबा; दळणवळण. ३ संबंध. ❀ **प्रत्यासत्तिन्याय पु०** वाक्यांत जो अर्थ स्पष्ट किं० पूर्ण उक्त नाहीं तो संदर्भावरून स्पष्ट किं० पूर्ण करून घेण्याची सरणी.

प्रत्यासन्न [**सं०**] **वि०** जवळ असलेला; समीपस्थ.

प्रत्याहार [**सं०**] **पु०** १ परत घेणें. २ (**योग**) इंद्रियदमन. ३ प्रलय. ४ अनेक वस्तूंचा थोडक्यांत संग्रह; संक्षेपानें परिगणन. ५ (**व्याकरण**) विशिष्ट क्रमानें सांगितलेलीं अनेक सूत्रें किं० अक्षरें किं० प्रत्यय ह्याच्या क्रमांतील पहिलें आणि शेवटलें अक्षर घेऊन बनविलेली संज्ञा,–जी मध्यंतरीच्या सर्व अक्षरांची किं० सूत्रांची किं० प्रत्ययांची द्योतक असते; उ० अण् हा प्रत्याहार अइउण् ह्या सूत्रांतील इ आणि उ ह्या अक्षरांचा द्योतक आहे.

प्रत्युत [**सं०**] **क्रि० वि०** उलट पक्षीं; उलट; आणखी; इतकेंच नव्हे तर; उ० तुम्हीं हें असें करतां यानें पुण्य लागणार नाहीं, प्रत्युत पाप लागेल.

प्रत्युत्तर [**सं०** [**न०** उत्तरावर उत्तर.

प्रत्युत्थान [**सं०**] **न०** १ दुसऱ्याच्या सन्मानार्थ आपण आपल्या आसनावरून उठणें. २ हल्ला; युद्धाची तयारी.

प्रत्युत्पन्न [**सं०**] **वि०** समयाला हजर; वेळीं किं० प्रसंगीं सुचलेली (मति). ❀ **प्रत्युत्पन्न मति स्त्री०** ऐनवेळीं सुचलेली युक्ति. **प्रत्युत्पन्नमति पु०** ऐन वेळीं ज्याला योग्य युक्ति सुचते असा मनुष्य.

प्रत्युद्गत [**सं०**] **वि०** सामोरा गेलेला.

प्रत्युद्गम पु०, प्रत्युद्गमन न०, प्रत्युद्गति स्त्री० [**सं०**] सामोरें जाणें.

प्रत्युद्वाह [**सं०**] **पु०** आपली मुलगी दुसऱ्याच्या घरीं देणें आणि त्याची मुलगी आपल्या घरीं करून घेणें.

प्रत्युपकार [**सं**] **पु०** दुसऱ्यानें आपणावर केलेल्या उपकाराची फेड व्हावयासाठीं आपण त्याच्यावर उलट केलेला उपकार.

प्रत्युपस्थान [**सं०**] **न०** आपला पराभव करावयाला उठलेला जो कोणी किं० आपला पराभव ज्याणें केला आहे त्याच्या पराभवासाठीं आपण उठणें किं० आपण सज्ज होणें.

प्रत्येक [**सं०**] **वि०** दरएक; हरएक; सर्व

उ० हिंदुस्तानांतील प्रत्येक देशाभिमानी गृहस्थास झांशीच्या राणीचा अभिमान वाटला पाहिजे.

प्रथम [**सं०**] **वि०** १ पहिला; आदितम. २ मुख्य; उत्तम. ३ अतिप्राचीन. ४ पूर्वीचा; मूळचा. **क्रि० वि०** अगोदर. ❀ **प्रथमा विभक्ति स्त्री०** व्याकरणांत ज्या विभक्ति आहेत त्यांतील पहिली म्हणजे जी क्रियापदाच्या कर्त्याची विभक्ति ती. **प्रथमतः क्रि० वि०** सर्वांच्या अगोदर; उपक्रमीं; सुरवातीला. **प्रथमदर्शनीं क्रि० वि०** १ पाहिल्याबरोबर; पाहातांक्षणीं. २ पहिल्यानें; सुरवातीला. **प्रथम पुरुष पु०(संस्कृतांत)** तो, ती, इ० चा पुरुष.(**मराठींत**) मी, आम्ही, इ० चा पुरुष. **प्रथम वर पु०** ज्याचें प्रथमच लग्न होत आहे असा नवरा मुलगा. याच्या व्यावर्तकत्वें ' बिजवर, ' ' तिजवर.' **प्रथम सवन, पहिलें सवन न०** बोलण्याचा साधा स्वर. मागें ' तिसरें सवन ' पहा. **प्रथमारंभीं क्रि० वि०** पाहिल्या प्रथम; सुरवातीला.

प्रथा [**सं०**] **स्त्री०** १ कीर्ति; प्रसिद्धि. २ सरणी; पद्धति. ३ लोकमत.

प्रथित [**सं०**] **वि०** नामांकित; विख्यात; प्रसिद्ध.

प्रद [**सं०**] **वि०** देणारा (समासान्तीं); उ० सुखप्रद, शान्तिप्रद, इ०.

प्रदर [**सं०**] **पु०** स्त्रियांना होतो तो एक रोगविशेष; यांत सदैव रजःस्राव होत असतो.

प्रदर्शन [**सं०**] **न०** १ दाखविणें. २समजाविणें; स्पष्टीकरण. ३ देखावा. ४ दृष्टान्त. ५ भविष्यकथन. ६ अनेक प्रकारच्या निसर्गांतील किं० कारागिरीच्या चीजा लोकांच्या दृष्टीस पडाव्या म्हणून त्या व्यवस्थित प्रकारें मांडून ठेवणें किं० त्या जेथें मांडून ठेविल्या जातात ती जागा.

प्रदक्षिण [**सं०**] **क्रि० वि०** पूर्व, आग्नेयी, दक्षिण, नैऋत्य, पश्चिम, वायव्य, उत्तर, आणि ईशान्य, असा क्रम धरून (केलेलें गमन इ०); घड्याळाचे कांटे फिरतात त्या दिशेनें. **वि०** १ उजव्या बाजूचें. २ आदरयुक्त. ३ शुभ. ४ अनुकूल; सरळ. ❀ **प्रदक्षिणा स्त्री०** पूर्व, आग्नेयी, दक्षिण, इ०दिशांच्या क्रमानें देवाची मूर्ति, साधु, इ० च्या भोंवतीं वाटोळें फिरणें. **सोमसूत्री प्रदक्षिणा स्त्री०** शंकराच्या लिंगाभोंवतीं घालतात ती प्रदक्षिणा.

प्रदाता [**सं०** प्रदातृ] **पु०** १ देणारा. २ उदार. [देणगी.

प्रदान [**सं०**] **न०** १ देणें. २ धर्मादाय. ३

प्रदीप [**सं०**] **पु०** १ दिवा. २(**लाक्षणिक**) ग्रंथावर केलेलें भाष्य, टीका, इ०.

प्रदीपक पु०, प्रदीपिका स्त्री० [**सं०**] मशाल; टेंभा.

प्रदीपन [**सं०**] **न०** पेटविणें; चेतविणें.

प्रदीप्त [**सं०**] **वि०**१ प्रकाशमान; तेजस्वी. २ जळत असलेला. ३ जळलेला.

प्रदेश [**सं०**] **पु०** विशिष्ट मर्यादांनीं नियंत्रित असा भूमीचा, शास्त्राचा, किं० कलेचा, भाग; विषय.

प्रदेशन [**सं०**] **न०** भेट; नजराणा.

प्रदेश (–शि–) नी [**सं०**] **स्त्री०** पुढचें बोट; तर्जनी.

प्रदोष [**सं०**] **पु०** १ तिन्हीसांजाचा समय; रात्रीचा प्रारंभसमय. २ सूर्यास्तानंतरच्या दोन घटिका. ३ रात्र. ४ दोष; पाप. ५ त्रयोदशीस नक्तव्रत करून प्रदोषसमयीं शिवपूजा करण्याचें व्रत. ह्या व्रताला ' पक्षप्रदोष ' असेंही म्हणतात. हें व्रत मंगळवारीं पडल्यास त्याला ' भौमप्रदोष ' आणि शनिवारीं पडल्यास त्याला ' शनिप्रदोष ' म्हणतात. ६ चतुर्थी, सप्तमी, आणि त्रयोदशी, ह्या तिथि पूर्वरात्रीस पडल्या असतां पाळतात तो अनध्याय. ❀ **प्रदोषकाळ पु०** संध्याकाळ.

प्रद्युम्न [**सं०**] **पु०** मदन; कामदेव; रतीचा पति.

प्रधान [**सं०**] **वि०** उत्तम; श्रेष्ठ; मुख्य. **पु०** राजकारभार करणारे जे राजाचे मदतनीस किं० सल्लागार ते प्रत्येक. **न० (सांख्य)**प्रकृति; जगाचें उपादानकारण; माया. ❀ **प्रधानात्मा पु०** विष्णु. **प्रधानधातु पु०** पुरुषाचें रेत.

प्रध्वंस [**सं०**] **पु०** नाश. ❀ **प्रध्वंसाभाव पु०** पदार्थाचा नाश झाल्यानें उत्पन्न होतो तो अभाव. ' मागें ' अभाव ' पहा.

प्रपंच [**सं०**] **पु०** १ विस्तार. २ स्पष्टीकरण. ३ पाल्हाळ. ४ वैपुल्य. ५ संसार; मनुष्याचें बायका, मुलें, घर, शेत, धंदा, इ० रूप खटलें. ६ कपट; वंचना; फसवणूक. ७ पक्षपात. आपल्या वशिल्याच्या माणसांना चांगलें किं० पुष्कळ देणें, तिऱ्हाइतांना वाईट किं० थोडें देणें, इ० रूप वर्तन. ह्यालाच ‘ पंक्तिप्रपंच ’ म्हणतात. मागें ‘ पांक्ति ’ मध्यें ‘ पंक्तिप्रपंच ’ पहा.८ तपशिलवार कथन, विवरण, किं० स्पष्टीकरण. ९ माया; अविद्या. ॐ **प्रपंचनिर्वाह पु०** संसारांत अगदीं जरूर ज्या वस्तु त्यांची तरतूद.

प्रपद [**सं०**] **न०** पादाग्र; चवडा.

प्रपा [**सं०**] **स्त्री०** पाणपोई; जलशाला.

प्रपात [**सं०**] **पु०** १ पडणें. २ धबधबा. ३ पर्वताचा तुटलेला कडा. ४ तीर; तट. ५ झरा. ६ हल्ला.

प्रपादणी [**म०** प्रपादणें] **स्त्री०** १ पुन्हा तेंच सांगणें; बजावणें. २ कोणेकाच्या शब्दाचें आपण केलेलें पुनरुच्चारण.

प्रपादणें [**सं०** प्रतिपादन] **स० क्रि०** १ सिद्ध करणें; समर्थिणें. २ आग्रहपूर्वक सांगणें. ३ कोणेकानें बोललेलें वाक्य खरावण्यासाठीं आपण त्याच्यापुढें तें पुन्हा उच्चारणें.

प्रपितामह [**सं०**] **पु०** बापाचा आजा. ह्या अर्थीं मराठींत ‘ प्रपिता ’ हेंही रूप रूढ आहे.

प्रपितामही [**सं०**] **स्त्री०** बापाची आजी.

प्रपौत्र [**सं०**] **पु०** मुलाचा नातू.

प्रपौत्री [**सं०**] **स्त्री०** मुलाची नात.

प्रफुल्ल, प्रफुल्लित [**सं०**] **वि०** उमललेलें (फूल); आनंदित (चेहेरा, डोळे).

प्रबंध [**सं०**] **पु०** १ बंधन. २ अखंडपणा; सातत्य. ३ नाटक, काव्य, इ० रूप रचना. ४ निबंध. ५ रचना (सामान्यतः).

प्रबल [**सं०**] **वि०** १ बळकट; बलिष्ट. २ जोराचा; आवेशयुक्त. ‘ प्रबळ ’ हें मराठी रूप.

प्रबळणें [**म०** प्रबळ] **अ० क्रि०** बळकट, समर्थ, किं० जोरदार होणें.

प्रबुद्ध [**सं०**] **वि०** १ ज्याची बुद्धि प्रौढ झाली आहे असा. २ ज्याचा पोरकटपणा जाऊन जो भारदस्त झाला आहे असा. ३ ज्याची झोप जाऊन जो पूर्णपणें जागा आणि हुशार झाला आहे असा. ४ प्रपंचासक्ति गळाल्यामुळें आत्मज्ञान पावला तो. ५ अतिशय बुद्धिमान. ६ सारासारविचार ज्याला करण्याची पूर्ण ताकद आली आहे असा.

प्रबोध [**सं०**] **पु०** १ जागृति; जागें होणें. २ फूल उमलणें; फुलाचा विकास. ३ जागरण; निद्रा न येणें. ४ जागरूकता; दक्षता. ५ यथार्थ ज्ञान.६ अंतर्यामीं पडलेला प्रकाश.७ वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान. ॐ **प्रबोधोत्सव पु०** विष्णूची निद्रा समाप्त झाल्यावर कार्तिक शुद्ध दशमी ते पौर्णिमेपर्यंत करतात तो उत्सव.

प्रबोधन [**सं०**] **वि०** १ वर ‘ प्रबोध ’ पहा. २ जागें करणें. ३ शिकाविणें; उपदेश करणें.

प्रबोधित [**सं०**] **वि०** १ जागा केलेला. २ शिकाविलेला; पढविलेला. ३ वस्तुस्थिति ज्याला कळविण्यांत आली आहे असा.

प्रबोधिनी [**सं०**] **स्त्री०** कार्तिक शुद्ध एकादशी,–ह्या दिवशीं विष्णु जागा होतो.

प्रभंजन [**सं०**] **न०** १ वारा. २ सोसाट्याचा किं० तुफानी वारा.

प्रभव [**सं०**] **पु०** १ उत्पत्ति; जन्म. २ उत्पत्तिस्थान. ३ मूळ कारण. ४ प्रभाव; पराक्रम. ५ वैभव; उत्कर्ष. ६ उगमाचें स्थळ; उ० भागीरथीचा प्रभव हिमालय.

प्रभा [**सं०**] **स्त्री०** १ प्रकाश; तेज; कांति; दीप्ति. २ किरण. ३ सावली; छाया. ४ कुबेराची नगरी. ५ (**मराठींत**) परवा; किंमत; उ० मला त्याची काय प्रभा ? उ० मी त्याची प्रभा बाळगीत नाहीं. **प्रभाकर पु०** सूर्य. **प्रभावळ स्त्री०** मूर्तीच्या पाठीमागें रुपें इ० धातूंची करतात ती माहिरप इ०.

प्रभाग [**सं०**] **पु०** अपूर्णांकाचा भाग.

प्रभात [**सं०**] **वि०** उजाडलेली (रात्र). **न०** सकाळ; पहाट. ॐ **प्रभातमेघाडंबर न०** १ प्रातःकाळचें मेघांचें पटल. २ पोकळ बढाया. ३ थापबाजी.

प्रभाव [**सं०**] **पु०** १ तेज. २ सामर्थ्य. ३ पराक्रम. ४ ऐश्वर्य. ५ राजतेज (कोशदंडज). ६

दैवी शक्ति. ७ निग्रहानुग्रह करण्याची शक्ति. ८ विस्तार. ९ उगम; उद्भव.

प्रभास [**सं०**] **पु०**द्वारकेजवळील एक पुण्यक्षेत्रविशेष.

प्रभु [**सं०**] **पु०** १ धनी; स्वामी; मालक. २ अधिकारी; राजा. ३ ब्रम्हा, विष्णु, महेश. ४ ईश्वर. ❀ **प्रभुशक्ति स्त्री०** राजाचें सामर्थ्य; कोश म्हणजे द्रव्यबल आणि सैन्य ह्यांच्या योगानें राजाला प्राप्त झालेलें सामर्थ्य.

प्रभूत [**सं०**] **वि०** पुष्कळ; विपुल.

प्रभृति [**सं०**] **स्त्री०** आरंभ; आदि; उ० इंद्रप्रभृति देव म्ह० इंद्र आहे आरंभीं ज्यांच्या असे देव,–ब्रम्हा, विष्णु, इ०. ❀ **अद्यप्रभृति क्रि० वि०** आजपासून. **जन्मप्रभृति क्रि० वि०** जन्मापासून.**ततःप्रभृति क्रि०वि०**१ तेव्हांपासून. २तेथपासून.**शिरःप्रभृति क्रि० वि०**डोक्यापासून.

प्रमत्त [**सं०**] **वि०** १ झिंगलेला. २ बेफिकीर. ३ गैरसावध; गाफिल. ४ कर्तव्यांत चुकणारा. ५ वेडा. ६ उन्मत्त; बेफाम झालेला. ७ अधिकार, संपत्ति, इ० मुळें गर्विष्ट किं० उन्मत्त झालेला. [सिंणें.

प्रमथन [**सं०**] **न०** १ पीडिणें. २ विध्वं-

प्रमद [**सं०**] **पु०** १ हर्ष; आनंद. २ प्रेम.

प्रमदा [**सं०**] **स्त्री०** १स्त्री. २ तरुण आणि सुंदर स्त्री.

प्रमा [**सं०**] **स्त्री०** १ शुद्धि; जाणीव. २ (**न्याय**) यथार्थ ज्ञान.

प्रमाण [**सं०**] **न०** १ माप. २ परिमाण; आकार; विस्तार. ३ लांबी रुंदी. ४ मर्यादा; इयत्ता; सीमा. ५ पुरावा; विवादविषयाचा निर्णय करणारा लेख, भाग, साक्षी, इ०. ६ आधार; पुरावा. ७ निर्णय करणारा. ८ यथार्थ ज्ञान. ९ यथार्थ ज्ञानाचें साधन; प्रमा उत्पन्न होण्यास कारणाभूत जीं आप्तवाक्य, इ० साधनें तीं प्रत्येक. १० (**संगीतांत**) द्रुत, मध्यम, आणि विलंबित, हीं तीन प्रमाणें. ११ त्रिराशीकांतील पहिली संख्या; उ० पांचास पंचवीस तर तिसांस किती ? ह्यांत पांच हा राशी. १२ उंची; उंचीचें परिमाण. १३ हेतु; कारण. १४ सत्यवक्ता; ज्याचा शब्द खरा म्हणून धरतां येईल असा.१५ जें खरें म्हणून घ्यावयाला हरकत नाहीं तें; उ० माझें भाषण प्रमाण आहे. १६ निश्चितपणा; उ० आज पाऊस पडेल असें प्रमाण नाहीं. १७ निश्चितपणाची कांहीं गोष्ट; निश्चयानें करतां येईल असें विधान. ❀ **प्रमाणपुरुष पु०** न्यायाधीश.**प्रमाणशास्त्र न०**वेद.**प्रमाणभूत वि०** प्रमाण म्हणून घेतां येईल असें; खरें; सत्याला धरून असलेलें. **प्रमाणसूत्र न०** लग्न ठरवावयाचें असतां मुलीची किं० मुलाची उंची दाखविणारें सूत्र किं० दोरा. **प्रमाणांक पु०** त्रिराशिकांतील पहिला राशि. दुसऱ्या दोन राशींस ' मध्यांक ' आणि ' इच्छांक ' अशीं नांवें आहेत.

प्रमाणिक कि० १ सप्रमाण बोलणारा. २ प्रमाणभूत.**प्रमाणें** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

प्रमाणें [**सं०** प्रमाण; **म०** ' प्रमाण ' च्या **तृ०**चें **ए०व०**]**श० यो० अ०**१ ०ला अनुसरून; उ० मी तुझ्या उपदेशाप्रमाणें चालेन. २ ०च्या सादृश्यानें; उ० गोदी तिच्या आईप्रमाणें नकटी आहे. ३ प्रमाण किं० आधार धरल्यास;उ० टिळकांच्या मताप्रमाणें.

प्रमाता [**सं०** प्रमातृ] **पु०** योग्य न्याय देणारा; खरी सल्लामसलत सांगणारा.

प्रमातामह [**सं०**] **पु०** आईच्या बापाचा बाप. [बायको.

प्रमातामही, स्त्री०आईच्या बापाच्या बापाची

प्रमाथ [**सं०**] **पु०** १ पीडिणें; गांजणें. २ वध; नाश. ३ बलात्कार; जबरी. ४ कुचलणें; चेचणें. ५ एक संवत्सरविशेष.

प्रमाद [**सं०**] **पु०** १ बेसावधपणा; गाफीलपणा. २ झिंगणें. ३ मूर्च्छा. ४ चूक; अपराध. ५ उन्मत्तपणा.

प्रमित [**सं०**] **वि०** १ सिद्ध केलेलें; ठरविण्यांत आलेलें. २ मोजलेलें; मापलेलें. ३ अत्यल्प. ❀ **हस्तप्रमित वि०** हाताच्या लांबीचें.

प्रमिति [**सं०**] **स्त्री०**१यथार्थज्ञान.२मोजणें. मोजदाद; गणाति.

प्रमुख [**सं०**] **वि०** मुख्य; श्रेष्ठ; उत्तम. २ पूज्य; संमान्य.[३ प्रथम. **टीप,**–' प्रमुख ' शब्द बहुव्रीहि समासांत उत्तर पद असतां पुढील प्रमाणें शब्द होतात. इंद्रप्रमुख म्ह० इंद्र आहे मुख्य

पुढारी, किं० अग्रगण्य ज्यांचा असे (देव).

प्रमुदित [**सं०**] **वि०** १ आनंदित; हर्ष पावलेला. २ तृप्त; संतुष्ट.

प्रमृष्ट [**सं०**] **वि०** १ उजळ; स्वच्छ केलेला. २ सफाईदार. ३ चोळलेला; घासलेला.

प्रमेय [**सं०**] **न०** १ करावयाची गोष्ट. २ अनुमान.

प्रमेह [**सं०**] **पुं०** मूत्ररोगविशेष.

प्रमोद [**सं०**] **पु०** आनंद. २ उग्र वास. ३ सुवास.

प्रयत [**सं०**] **वि०** १ शुद्ध; पवित्र. २ इंद्रियांचें ज्याणें नियंत्रण केलें आहे असा. ३ उत्साहयुक्त. ४ दक्ष; सावध.

प्रयत्न [**सं०**] **पु०** १ श्रम; यत्न; कांहीं कार्यार्थ केलेली खटपट. २ दीर्घोद्योग. ॐ **प्रयत्नवाद पु०** प्रयत्न केल्यानेंच इष्ट फळ मिळतें हें मत. यालाच 'पौरुषवाद ' असें दुसरें नांव आहे. याच्या उलट ' दैववाद ' किं० ' प्रारब्ध वाद. '

प्रयाग [**सं०**] **पु०** भागीरथी आणि यमुना यांच्या संगमाचें क्षेत्र किं० तेथें वसलेलें शहर; हल्लींचें आलाहाबाद हें शहर. ॐ **प्रयागवळ पु०** प्रयाग क्षेत्रीं संकल्प सांगणारा भट.

प्रयाण [**सं०**] **न०** १ निघणें; प्रस्थान. २ प्रवास. ३ हल्ला; मोहीम. ४ जेथून हल्ला करावयाचा ती जागा. ५ मरण.

प्रयास [**सं०**] **पु०** १ प्रयत्न. २ कष्ट; श्रम.

प्रयुक्त [**सं०**] **वि०** १ प्रेरित. २ युक्त; सहित. ३ ध्यानशील. ४ नेमिलेला; योजलेला.

प्रयुक्ति [**सं०**] **स्त्री०** १ प्रेरणा. २ हेतु; कारण. ३ यत्न. ॐ **युक्तिप्रयुक्ति स्त्री० ए० व०** हरएक प्रकारचीं युक्ति; कोणच्याही प्रकारची युक्ति किं० हिकमत किं० खटपट.

प्रयुत [**सं०**] **न०** दशलक्ष ही संख्या.

प्रयोक्ता [**सं०** प्रयोक्तृ] **पु०** १ कांहीं कार्यांचा प्रवर्तक; कर्ता. २ कामाला विशिष्ट सरणी लावणारा.

प्रयोग [**सं०**] **पु०** १ (शब्द) वापरणें किं० योजणें. २ कांहीं कामाची रीति किं० सरणी. ३ शस्त्र, अस्त्र, इ०चा उपयोग करणें किं० फेकणें. ४ नाटक रंगभूमीवर करून दाखविणें. ५ अनुष्ठान; प्रत्यक्ष क्रिया. ६ विधि, संस्कार, (श्रावणी, गर्भाधान, इ०चा). ७ युक्ति; कारस्थान. ८ राजाचे साम, दान, दण्ड, आणि भेद, हे उपाय प्रत्येक. ९ प्रेरणा. १० आज्ञा. ११ जादूटोणा करणें. १२ (**व्याकरण**) वाक्यांत कर्ता आणि कर्म यांचें लिंग, वचन, आणि पुरुष, यांच्या अनुरोधानें क्रियापदाची जी व्यवस्था असते तिला 'प्रयोग' असें म्हणतात. हे प्रयोग कर्तरि आणि कर्मणि असे दोन आहेत. जेव्हां असा अनुरोध नसतो आणि क्रियापद तृतीयपुरुषीं, नपुसकलिंगीं, आणि एकवचनीं असतें तेव्हां त्या वाक्याचा भावेप्रयोग असतो.

प्रयोजक [**सं०**] **वि०** कार्यप्रवर्तक. **पु०** १ कर्ता. २ (**व्याकरण**) क्रियापदानें दर्शविलेली क्रिया कर्ता स्वतां करतो किं० दुसऱ्याकडून करवितो किं० ती क्रिया कर्त्याला करण्याचें सामर्थ्य आहे किं० नाहीं हें दाखविणारी जी क्रियापदांत विकृति होते तिला ' भेद ' म्हणतात. कर्ता जर ती क्रिया स्वता करीत असला तर क्रियापद मूळरूप भेदांत असतें; उ० रघुनाथ भिंत बांधतो; कर्ता ती क्रिया लोकांकडून करवीत असला तर क्रियापदाचा प्रयोजक भेद असतो; उ० रघुनाथ गोपाळाकडून भिंत बांधवितो; कर्त्याला ती क्रिया करण्याचें सामर्थ्य आहे असें दर्शविणारा शक्य भेद; उ० रघुनाथाला भिंत बांधवते.

प्रयोजन [**सं०**] **न०** १ गरज; जरूरी; आवश्यकता. २ कारण; उद्देश; हेतु. ३ लग्न, मुंज, ब्राह्मणभोजन, इ० रूप जें कार्य तें.

प्ररोह [**सं०**] **पु०** १ वृक्षादींचा अंकुर. २ उगवणें. ३ संतति.

प्रलपन, प्रलपित न०, प्रलाप पु० [**सं०**] १ भाषण. २ शोक. ३ बडबड.

प्रलय [**सं०**] **पु०** १ नाश; संहार. २ जगाचा अंत. ३ मृत्यु. ४ महामारी, दुष्काळ, टोळधाड, दरवडे, इ० रूप देशावर येते ती आपत्ति. ५ लय; एकाग्रता.

प्रलाप पु० वर ' प्रलपन ' पहा.

प्रलोभन न० १ फसविणें; फूस लावणें. २ आमिष. **वि०** फसविणारा; मोह पाडणारा.

प्रवण [**सं०**] **वि०** १ उतरता; सखल;

कललेला. २ उन्मुख; उ० कार्यप्रवण. ३ आसक्त; तत्पर.

प्रवर [सं०] वि० उत्कृष्ट; श्रेष्ठ. पु० १ पूर्वजपरंपरा. २ कुळ, वंश. ३ पूर्वज. ४ गोत्रांतील मुख्य पुरुष. ५ वंशज. ६ वंश स्थापणारा.

प्रवर्तक [सं०] वि० १ करविणारा; उत्तेजन देणारा. २ उत्पादक; मूळप्रेरक. ३ पंच; लवाद.

प्रवर्तणें [सं० प्र+वृत्] अ० क्रि० १ सुरूं होणें. २ कांहीं कामांत पडणें; उद्युक्त होणें. ३ (कांहीं काम) चालूं असणें; किं० सुरूं झालेलें असणें.

प्रवर्तन [सं०] न० १ आरंभिणें; सुरवात. २ स्थापना. ३ कोणेकास कांहीं करावयाला उत्तेजन देणें. ४ कांहीं क्रिया. [केलेला.

प्रवर्तित [सं०] वि० सुरूं केलेला; रूढ

प्रवाद [सं०] पु० १ लोकवार्ता; वदंता. २ जनापवाद.

प्रवाल [सं०] पु० १ अंकुर; पल्लव. २ पोवळें (जपमाळ, दागिना, इ० मध्यें योजतात तें).

प्रवास [सं०] पु० स्वस्थान सोडून अन्यत्र जाणें. ॐ **प्रवासी** पु० मुसाफर; वाट चालणारा.

प्रवाह [सं०] पु० १ जल, वायु, इ० ची गति किं० एका दिशेकडे गमन. २ एकाद्या दिशेकडे चालूं असलेला वारा,पाणी,इ०.३कामकाजाची चाललेली सरणी. ४ एक विशिष्ट ध्येय डोळ्यांपुढें ठेवून अनेक लोकांचें एका मार्गानें जाणें किं० एकाच मार्गानें जाणाऱ्या अनेक लोकांचा समुच्चय.५ भाषणाचा अकुंठित ओघ. ६ गमन, गति (सामान्यत:). ॐ **प्रवाहांत पडणें** जनसमुदायाच्या वर्तनाप्रमाणें वर्तन करीत राहाण्याला बांधिलेलें असणें. **कालाचा प्रवाह** पु० कालाची गति,– जीवर कोणाची नियंत्रणा चालत नाहीं. **प्रवाहे मूत्रित** न० व्यर्थ किं० निष्फळ खटपट किं० काम किं० प्रयत्न.

प्रवाळ वर ' प्रवाल ' पहा.

प्रविष्ट [सं] वि०१ आंत शिरलेला किं० घुसलेला. २ ज्याचें त्याला देण्यांत आलेलें (पत्र) किं० कळविण्यांत आलेला (निरोप). ३ कांहीं कामांत किं० विषयांत किं० अध्ययनांत गुंतलेला किं० निमग्न. [गार.

प्रवीण [सं०] वि०हुशार; चतुर वाकब-

प्रवृत्त [सं०] १ कार्यामध्यें व्यग्र झालेला. २ चालूं किं० रूढ झालेला किं० असलेला. ३ कांहीं काम करावयाला उद्युक्त झालेला. ४ आरंभ होऊन आतां चालूं असलेला.

प्रवृत्ति [सं०] स्त्री० १ प्रगति; प्रवाह. २ उत्पत्ति. ३ प्रादुर्भाव. ४ आरंभ. ५ एकाद्या कामाकडे किं० विषयाकडे कोणेकाच्या मनाचा ओढा किं० कल. ६ वर्तन; क्रिया. ७ उद्योग. ८ प्रचार. ९ (**व्याकरण**) शब्दाचें अर्थबोधकत्व. १० व्यवहार. ११ वार्ता; बातमी. १२ चाल; प्रघात; रीति; रूढि. १३ संसारांत आसक्तता. याच्या उलट ' निवृत्ति '. ॐ **प्रवृत्तिनिमित्त** न० विशिष्ट अर्थानें शब्दाचा उपयोग किं० प्रयोग किं० रूढि होण्याचें किं० असण्याचें कारण. **प्रवृत्तिमार्ग** पु० ईश्वराची आराधना करणें ह्याहून वेगळा जो प्रापंचिक व्यवहाराचा मार्ग तो. याच्या उलट ' निवृत्ति मार्ग. '

प्रवृद्ध [सं०] वि० १ वाढलेला; वृद्धिंगत.२ जोरदार; आवेशी. ३ प्रौढ; प्रगल्भ. ४ फुगलेला.

प्रवेश [सं०] पु० १ शिरणें; शिरकाव. २ दार; मार्ग. ३ शास्त्रामध्यें किं० कलेमध्यें कोणेकाची गति सुरूं होणें.५रंगभूमीवर पात्राचें येणें.

प्रवेशणें [सं० प्र+विश्] अ० क्रि० आंत जाणें; शिरणें; घुसणें.

प्रवेशक [सं०] पु० १ कोणेक स्थळीं कोणेकाचा प्रवेश करून देणारा. २ मुख्य पात्र रंगभूमीवर यावयाच्या अगोदर हलक्या दर्जाचीं पात्रें येऊन श्रोत्यांना संदर्भ कळवितात तो.

प्रव्रजन [सं०] न० १ देशत्याग करणें. २ संन्यास घेणें. [शिष्य.

प्रव्रजित पु० १साधु. २ संन्यासी.३ जैनसाधूचा

प्रव्राजित न० १ प्रवास. २ देशत्याग. ३ तपस्व्याचें हिंडणें. ४ संन्यास. [घेणें.

प्रव्रज्या [सं०] न०१देशत्याग करणें.२संन्यास

प्रव्राजक [सं०] पु० १ तपस्वी. २ संन्यासी.

प्रव्राजन [सं०] न० हद्दपारी.

प्रशम [सं०] पु० १ शांति. २ विश्रांति. ३ नाश. ४ सांत्वन.

प्रशमन [**सं०**] **न०** १सांत्वन करणें. २दुःख, वेदना, इ० कमी होणें किं०करणें.३ दूर करणें. ४ विध्वंस. [पाठक

प्रशंसक [**सं०**] **वि०** स्तविणारा; स्तुति-

प्रशंसन न०, प्रशंसना, प्रशंसा स्त्री०[**सं०**] १ स्तुति. २ गुणवर्णन. ३ कीर्ति.

प्रशंसनीय [**सं०**]**वि०** स्तुत्य; स्तुतीस पात्र.

प्रशंसिणें [**सं०** प्र+शंस् (सांगणें)] **स० क्रि०** स्तविणें; वाखाणणें.

प्रशस्त [**सं०**] **वि०** १ स्तुत्य; स्तुतीस पात्र. २ स्तविलेलें; वाखाणलेलें. ३ उत्कृष्ट;श्रेष्ठ. ४ शुभ. ५ अवळपघळ, विस्तीर्ण (जागा). ६ मन मोकळें करून बोललेलें (भाषण). ७पुरण्या-इतकें मोठें (वस्त्र इ०). ८ दोषरहित; अनिंद्य.

प्रशस्ति [**सं०**] **स्त्री०** स्तुति; प्रशंसा; तारीफ; वाखाणणी.

प्रशांत [**सं०**] **वि०** १ शांत झालेला. २ काम, क्रोध, इ० मनोविकार ज्याचे शमले आहेत असा (माणूस). ३ शमलेले (काम, क्रोध, इ० विकार). ४ स्वस्थ झालेला. ५ क्षोभरहित. ६ बंद पडलेलें. ७ ज्याचें सांत्वन करण्यांत आलें आहे असा (मनुष्य). ८ शमलेला (समुद्र, वारा).९ मृत; नष्ट.

प्रशिष्य [**सं०**] **पु०** शिष्याचा शिष्य.

प्रश्न [**सं०**] **पु०** १ चौकशी; विचारपूस. २ पृच्छा. ३ एकाद्या विषयांत कोणेकाला किती ज्ञान प्राप्त झालें आहे हें पाहाण्यासाठीं त्याला त्या विषयांतील कांहीं माहिती विचारली जाते ती. ४ कांहीं काम करावयास निघालेल्या मनुष्यास पुढें अमुक प्रसंग येतील असें सुचविणारें चिन्ह जें त्याला दिसतें तें. ५ जोशी, साधु, इ० ना गतकाळची किं० भविष्यकाळची विचारलेली माहिती. ६ वादाचा विषय. ७ अडचणीची किं० पंचाइतीची स्थिति किं० प्रसंग. ८ विचारलेल्या भूत किं० भविष्य गोष्टीस जोश्यानें दिलेलें उत्तर. ❀ **प्रश्नार्थक सर्वनाम न०** (**व्याकरण**)प्रश्न विचारतांना ज्या सर्वनामांचा उपयोग केला जातो तीं प्रत्येक. **प्रश्नोत्तरी स्त्री०** प्रश्न विचारण्याच्या समयावरून कोणेकाचें जोशानें केलेलें भूतभविष्य गोष्टींचें टिपण.

प्रष्टव्य [**सं०**] **वि०** विचारावयास योग्य; जें मुद्दाम विचारून घेतलें पाहिजे असें.

प्रष्टा [**सं०** प्रष्टृ] **पु०**प्रश्न करणारा; चौकशी करणारा.

प्रसक्त [**सं०**] **वि०** १ जोडलेला; जुळलेला; संलग्न. २ जवळचा; शेजारचा. ३ जवळ येऊन ठेपलेला. ४ अति आसक्त. ५ गुंतलेला, व्यग्र; उ० निद्राप्रसक्त, कार्यप्रसक्त, अध्ययनप्रसक्त. ६ अखंडित. ७ भोगास आलेलें (सुख, दुःख, इ०).

प्रसक्ति [**सं०**] **स्त्री०** १ संबंध;स्थिति.२प्रीति; एकनिष्ठपणा; एकाद्या मनुष्य,पदार्थ,इ०वर असलेलें उत्कट प्रेम किं० आवड. ३ मनाचा एकाद्या विषयाकडे ओढा किं० कल. ४ काम करण्यांत चिकाटी किं० करारीपणा किं० दृढनिश्चय. ५ बोलण्याचा किं० चर्चेचा विषय. ६ (**न्याय**) व्याप्ति. ७ प्रसंग. ८(**व्याकरण**) लागूं पडणें.

प्रसंग [**सं०**] **पु०** १ संबंध; संगति. २ अनुराग; निष्ठा; आसक्ति; चटक; नाद; गोडी. ३ चर्चेचा विषय. ४ ओघानें प्राप्त झालेली गोष्ट. ५ अवसर; समय; वेळ; काळ. ६ कांहीं गोष्ट घडून येणें. ७ (**न्याय**) व्याप्ति. ८ शिरकाव. ९ आरंभ; उपक्रम; सुरवात. १० गाणें, बजावणें, इ० मन गुंतविणाऱ्या गोष्टी. ११ प्रस्तावना. १२ मुख्य कार्य करीत असतां सहजगत्या अन्य कार्य होणें किं० घडणें. १३ आपत्ति; कांहीं दुर्निर्वह संकटाचा समय. १४ (**व्याकरण**) प्राप्ति; लागूं पडणें. १५ बोलणें, वाद, भांडण, व्यवहार, इ० निमित्तानें एकाचा दुसऱ्याशीं होतो तो संबंध किं० पडते ती गांठ. १६ नित्य किं० वारंवार दिसणारी किं० घडणारी गोष्ट किं० वस्तु. १७ गांठ पडणें. १८ भोक्तृत्व म्हणून येणें. ❀ **प्रसंगविशेषीं क्रि० वि०**कारणपरत्वें; कांहीं विशिष्ट समयीं. **प्रसंगास येणें, सुचणें, आठवणें,** इ० ऐन जरूरीच्या वेळीं येणें, सुचणें, आठवणें, इ०. **प्रसंगवशात् क्रि० वि०** कारणपरत्वें; कर्मधर्मसंयोगानें; दैवानें. **प्रसंगसंगति स्त्री०** विषयाच्या निरूपणाच्या ओघानें आलेला दुसऱ्या विषयाचा संबंध. **प्रसंगसिद्धि स्त्री०** एकादें कार्य

करीत असतां दुसरें कार्य सहजासहजीं केलें जाणें किं० घडून येणें. **प्रसंगावधान न०** संकट-समयीं मति न भ्रांत होणें किं० न भांबवून जाणें. **प्रसंगोपात्त वि०** १ मुद्दाम सांगावयाच्या महत्त्वाची नसतां केवळ भाषणांत सहज प्राप्त झालेली (कांहीं गोष्ट).२गौणत्वानें बोलण्यांत आलेली(कांहीं गोष्ट). ३ संभाषणाच्या ओघानें आलेली किं० निघालेली (गोष्ट).

प्रसज्य [सं०] **वि०** १ संभवनीय. २ लागू. ॐ **प्रसज्य प्रतिषेध पु०** ज्यांत विधि गौण आहे असा निषेध.

प्रसन्न [सं०] **वि०** १ संतुष्ट. २ स्वच्छ; निर्मळ. ३ उघड (अर्थ).

प्रसर [सं०] **पु०** १ पुढें जाणें. २ गति. ३ विस्तार; उत्कर्ष. ४ शिरकाव. ५ नायटा इ०चा त्वचेवर विस्तार म्ह०त्यांचें चरत जाणें.६फैलाव; वाढ; वृद्धि. ७ पाणी, वारा, इ०चें वाहाणें. ८ वेग; जोर; आवेश. ९ समूह. १० अवकाश;संधि.

प्रसरण [सं०] **न०** १ पसरण्याची क्रिया.२ प्रसार; फैलाव. वर ' प्रसर ' पहा.

प्रसरणें [सं० प्र+सृ] **अ० क्रि०** पसरणें; फैलावणें; वृद्धि पावणें; (नायटा) चरत जाणें.

प्रसव [सं०] **पु०** १ जन्म; उत्पत्ति. २ बाळंत होणें. ३ अपत्य; संतति. ४ (वृक्षादींचें) फळ, मोहोर, किं० फूल. ५ परिणाम; पर्यवसान.

प्रसवणें [सं० प्र+सू (जन्म देणें)] **स० क्रि०** उत्पन्न करणें; ०ला जन्म देणें.

प्रसाद [सं०] **पु०** कृपा;अनुग्रह.२(चित्ताची) शांति; स्वस्थता. ३ (जल, आकाश, इ०ची) स्वच्छता किं० निर्मळता. ४ (काव्यांदींची) स्पष्टार्थता म्ह० अर्थ एकदम लक्षांत येण्याचा गुण; बुद्धीला कष्ट झाल्याशिवाय अर्थ समजणें हा गुण; सुबोधपणा.५देवाला अर्पिलेलें अन्न,फुलें, फळें, इ० चा अवशेष; देवनैवेद्य. ६ देव, गुरु, इ० ना अन्नादि देऊन उरलेला भाग. ७ बक्षीस दिलेली वस्तु. ८ यजमान, साधु, इ० नीं संतुष्ट होऊन भक्ताला दिलेला पदार्थ,—वस्त्र, फळ, इ०. ९ पुराण, कीर्तन, इ० च्या समासीस वाटतात ती साखर, बत्तासे, फुटाणे, इ०. १० देवाला शुभाशुभ विचारतांना देवाच्या मूर्तीच्या अंगाला चिकटावतात तीं फुलें, तांदुळ, इ० रूप कौल. ११ देव, गुरु, तपस्वी, इ० कांकडील भक्तीनें सेवन करावयाचें जें अन्न तें. ॐ **गुरविणीचों शितें प्रसादावारीं गेलों** प्रत्येकाला अगदीं थोडेंथोडें जरी आपण दिलें तरी आपण शेवटीं दरिद्री होतों; म्हणण्यासारखा कोणालाच लाभ न होतां आपण मात्र भिकारी होतों.

प्रसादन [सं०] **न०** १ कोणेकाची स्तुति करून किं० त्याला कांहीं देऊन त्याला अनुकूल करून घेणें किं० संतुष्ट करणें. २स्वच्छ होणें किं० करणें. ३ सांत्वन.

प्रसार [सं०] **पु०** १ फैलाव, २ वृद्धि;वाढ. ३ पसारा. ४ पसरणें.

प्रसारण [सं०] **न०** वर ' प्रसार ' पहा.

प्रसिद्ध [सं०] **वि०** १ प्रख्यात. २ सर्वांस ठाऊक असलेला. ३ अलंकारांनीं विभूषित.

प्रसिद्धि [सं०] **स्त्री०** १ कीर्ति. २ सर्व लोकांस कळलेलें असणें. ३ कांहीं गोष्टींची उघडीक.४ बोभाटा.

प्रसुप्त [सं०] **वि०** १ निद्रित; निजलेला.२ सुस्त. ३ कर्तव्याकडे लक्ष्य न देणारा.

प्रसूत [सं०] **वि०** उत्पन्न झालेलें;जन्मलेलें. **प्रसूता स्त्री०** बाळंतीण झालेली; व्यालेली.

प्रसूति [सं०] **स्त्री०** १ प्रसवणें. २ बाळंत होणें; विणें. ३ जन्म, उत्पत्ति. ४ प्रादुर्भाव. ५ संतान; अपत्य. ६ उत्पत्तिकारण; उत्पत्तिस्थान. ॐ**प्रसूतिवायु पु०**प्रसूतिकाळ येऊन ठेपला असतां गर्भ बाहेर पडण्यास कारणीभूत वायु पोटांत उत्पन्न होतो तो. **प्रसूतिवैराग्य** अल्पकाळ टिकणारें वैराग्य.

प्रसूतिका [सं०] **स्त्री०** बाळंतीण.

प्रसृत [सं०] **वि०** १ पसरलेलें.२ विस्तीर्ण.

प्रसृति [सं०] **स्त्री०** १ पसरणें; प्रसार. २ वाढ; फैलाव. ३ प्रवाह. ४ हाताचा पसा.

प्रस्तार [सं०] **पु०** १ पसरणें. २ विस्तार; फैलाव. ३ नदीचा घाट. ४ वृत्तविशेषांतील लघु आणि गुरु अक्षरें चिन्हांनीं दाखवून त्यांच्या स्थानांमध्यें शक्य तितक्या अदलाबदली करून त्या वृत्ताचे वेगळे वेगळे किती प्रकार होऊं शकतील हें पाहाणें.

प्रस्ताव [सं०] पु० १ आरंभ; उपक्रम; सुरवात. २ प्रस्तावना (ग्रंथ, भाषण, कथा, इ०ची). ३ उल्लेख; कथन, ४ योग्य काळ; प्रसंग; अवसर. ५ सामगानाचा दुसरा अवयव. ६ प्रकरण. ७ घडून आलेली लहानशी गोष्ट.

प्रस्तावना [सं०] स्त्री० १ ग्रंथ, भाषण, कथा, इ०च्या आरंभीं विषयाचें करतात तें दिग्दर्शन किं० स्वरूपकथन. २ नाटकाच्या आरंभीं सूत्रधार आणि एकादें पात्र यांचें संभाषण;— ज्यांत नाटकाच्या गोष्टीचें थोडेंसें वर्णन केलेलें असतें.

प्रस्तुत [सं०] वि० १ स्तुति केलेलें; स्तविलेलें; वाखाणलेलें. २ आरंभिलेलें; सुरू केलेलें. ३ विचारासाठीं घेतलेलें. ४ चालू असलेलें; आतांचें. ५ प्रकरणप्राप्त. **न०** १ बोलण्याचा, चर्चेचा, किं० विवरणाचा विषय. २ वर्ण्य वस्तु; उपमेय. ३अंगीकृत कार्य. ४ प्रसंग; समय.

प्रस्थ [सं०] **न०, पु०** १ सपाट प्रदेश; उ० इंद्रप्रस्थ. २ डोंगरावरील सपाट प्रदेश. ३ धान्य मोजावयाचें एक परिमाण. ४ विद्या, संपत्ति, वक्तृत्वादि गुण, इ०मुळें असामान्य कोटींत पडणारा माणूस. ५ तऱ्हेवाईक किं० छांदिष्ट माणूस. ६ लग्न, मुंज, समाराधना, इ० प्रसंगीं सामानासुमानाचा पडतो तो पसारा. ७लग्न, मुंज, इ० प्रसंगांचें ब्राह्मणभोजन. ८ अनेक कामांसाठीं जमलेल्या अनेक माणसांचा घोळका. ॐ **त्या देवऋष्यानें येथें मोठें प्रस्थ माजविलें** (किं० **वाढविलें**) **आहे** त्यानें आपल्या अंगीं अलौकिक सामर्थ्य आहे असा लोकांचा ग्रह करून देऊन त्यांना आपल्या नादीं लाविलें आहे. **कोणेकाचें प्रस्थ माजणें** (किं० **वाढणें**) त्याची बडेजावी, डामडौल, थाटमाट, स्तोम इ० फार वाढणें.

प्रस्थान [सं०] **न०** १ जाणें; निघणें; प्रयाण; प्रवास. २ स्वारीवर निघणें; मोहिमीवर जाणें. ३ मरणें; मरणाच्या पंथास लागणें (ठेवणें). ४परगांवास जाणें. ५प्रवासाला निघावयाला योग्य अशा समयीं खरोखरीं प्रवासाला निघणें कांहीं अडचणीमुळें शक्य नसल्यास करतात तो विधिविशेष. ६ अभ्यासाचीं पुस्तकें, धंद्याचीं हत्यारें, देवपूजेचीं उपकरणें, इ०चा जो पसारा तो. ७ ईश्वरप्राप्तीचे जे मार्ग योग, सांख्य, वेदान्त, इ०ते प्रत्येक. ८ एक प्रकारचें नाटक; उपरूपक. ॐ **प्रस्थानत्रय न०, प्रस्थानत्रयी स्त्री०** वेदान्तशास्त्राला आधारभूत जे तीन ग्रंथ (उपनिषद्, भगवद्गीता, आणि ब्रह्मसूत्रें) त्यांचा समुच्चय. **प्रस्थानी वऱ्हाडी पु० अ० व०** (लग्नांत) वरपक्षाकडील लोक.

प्रस्थापित [सं०] **वि०** पाठविलेला. **टीप**,—अडाणी लोक ' प्रस्थापित ' हा शब्द ' स्थापित ' बद्दल योजतात.

प्रस्थित [सं०] **वि०** १ ग्रामान्तरास जादयाला निघालेला किं० गेलेला. २ मृत.

प्रहर [सं०]पु० १साडे सात घटकांचा अवधि; सबंध दिवसाचा आठवा भाग. २ पहारा.

प्रहसन [सं०] **न०** १ मोठा हशा. २थट्टा; टर. ३ औपरोधिक भाषण इ०.४हास्यप्रधानरूपक

प्रहार [सं०] **पु०** १ मारणें. २ मारलेला तडाखा; रट्टा. ३ शब्दांनीं मारलेला टोमणा.

प्रहास [सं०] १ मोठा हशा. २ आनंद; रंगेलपणा. ३ थट्टा; मस्करी. ४ विनोद. ५ प्रहसन,—एक प्रकारचें नाटक. ६ फुलाचा विकास किं० प्रफुल्लितपणा.

प्रहित [सं०] **वि०** १ पाठविलेला. २ प्रवृत्त केलेला. ३ नेमलेला. ४ फेकलेला, सोडलेला (बाण इ०).५ प्रेरित.

प्रहेलिका [सं०] **स्त्री०** उखाणा; कोडें.

प्रळय इ० मागें ' प्रलय ' इ० पहा.

प्रक्षाल (–ळ–) **णें** [सं० प्र+क्षाल् (धुणें)] **स० क्रि०** (वस्त्र, भांडें, इ०) धुणें.

प्रक्षालन [सं०] **न०** १ धुणें (जलादींनीं मुखवस्त्रादि). २ शुद्धि.

प्रक्षिप्त [सं०] **वि०** १ फेकलेला. २ सोडलेला (बाण इ०). ३लोकांच्या ग्रंथादींत आपण आपल्या पदरचें घुसडून दिलेलें(वाक्य, शब्द, इ०).

प्रक्षेप[सं०]पु०१फेकणें; उडविणें. २आंत टाकणें. ३घुसडून देणें. ४ ग्रंथांत घुसडून दिलेला भाग. ५ व्यापारादिकांत प्रत्येक भागीदाराचें भांडवल.

प्रज्ञा [सं०] **स्त्री०** १ बुद्धि; अक्कल. २ ज्ञान. ३ विचारशक्ति. ॐ **प्रज्ञाचक्षु वि०** १ अंधळा. २ जन्मान्ध. **पु०** धृतराष्ट्र. **प्रज्ञावान् वि०** शाहाणा; हुशार.

प्रज्ञात [सं०] वि० १ प्रख्यात. २ पूर्णपणें ठाऊक असलेलें. [विवेक.

प्रज्ञान [सं०] न० १ ज्ञान. २ बुद्धि. ३

प्राक् [सं०] क्रि० वि० १ पूर्वी; अगोदर; पाठीमागें. २ पूर्वेकडे. ꙮ **प्रागग्र** वि० पूर्वेकडे आहे टोक ज्याचें असें. **प्राङ्मुख** वि० १ पूर्वदिशेकडे आहे तोंड ज्याचें असा. २ संमुख. **प्राक्तन** [सं०] न० दैव; नशीव. वि० पूर्वीचा; अगोदरचा; प्राचीनकाळचा. **प्रागभाव** [सं०] पु० वस्तु उत्पन्न व्हावयाच्या अगोदर तिचें नसणें.

प्राकट्य [सं०] न० प्रकटपणा; जाहीर होणें; उघडकी.

प्राकरणिक [सं०] वि० १ ओघानें आलेलें. २ प्रकरणाचा विषय असलेलें. ३ज्याचेविषयीं बोलणें चाललें आहे असा; वर्ण्य (विषय).

प्राकाम्य [सं०] न० १ इच्छेचें स्वातंत्र्य; सत्ता. २ स्वेच्छाचार; स्वच्छंदपणा. ३ इच्छेप्रमाणें गोष्ट घडणें; ही अष्टसिद्धींपैकीं एक आहे. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टसिद्धि ' पहा.

प्राकार[सं०]पु०१कुंपण; वई. २तटाची भिंत.

प्राकृत [सं०] वि० १ मूळचा;स्वभावसिद्ध. २ सामान्य; नेहमीच्या प्रचारांतला. ३ निरक्षर; अशिक्षित; अडाणी. ४ क्षुल्लक, क्षुद्र. ५ (**सांख्य**) प्रकृतीपासून उत्पन्न झालेलें. पु० नीच किं० हलका माणूस. न० संस्कृत भाषेपासून झालेल्या अपभ्रष्ट भाषा प्रत्येक. ꙮ **प्राकृत बोलणें** किं० **प्राकृतावर येणें** असभ्यपणाची भाषा योजूं लागणें; शिवीगाळीवर येणें.

प्राकृतिक [सं०] वि० स्वाभाविक; स्वभावसिद्ध. २ मायावी; कपटी. ꙮ **प्राकृतिक लय** पु० सर्व पंचमहाभूतांचा ईश्वरप्रकृतीच्या ठायीं कालेंकरून होतो तो लय.

प्राकृत्या [सं० प्रकृति+म० या (प्रत्यय)] वि० ज्याला संस्कृत येत नाहीं आणि जो मराठी पोथ्या पुस्तकें वाचतो तो.

प्रागल्भ्य [सं०] न० १ हिंमत; धिटाई. २ गर्व; उद्धटपणा; धार्ष्ट्य. ३ चातुर्य; नैपुण्य. ४ प्रौढता. ५ थाटमाट; डौल. ६ वक्तृत्व.

प्राघुण, प्राघुणक, प्राघुणिक, प्राघूर्णक, प्राघूर्णिक वि० १ पाहुणा म्हणून आलेला. २ क्षणभंगुर; अल्पकाळ टिकणारा. [पु०इंद्र.

प्राची [सं०] स्त्री० पूर्व दिशा. ꙮ **प्राचीपति**

प्राचीन [सं०] वि० १ पूर्वदिशेकडील. २ गतकाळचा. ꙮ **प्राचीनावीती** [सं० प्राचीन+आवीतिन्] वि० उजव्या खांद्यावर टेकलेलें आणि डाव्या कुशीवर लोंबणारें जानवें धारण करणारा. **प्राचीनवर्ही** पु० इंद्र.

प्राचुर्य [सं०] न० १ विपुलता; पुष्कळपणा. २ गर्दी; दाटी.

प्राच्य [सं०] वि० १ समोरचें. १ पूर्वीचें. ३ पूर्व दिशेकडचें. ४ जुनें.

प्रांजळ [सं०] वि० प्रामाणिक; सरळ.

प्राजापत्य[सं०]वि० १ प्रजापती संबंधाचें.२ ब्रम्हदेवापासून उत्पन्न झालेलें. पु० १ विवाहाचा एक प्रकार.मागें 'अष्ट'मध्यें 'अष्टविवाहविधि'पहा.२ प्रयागतीर्थ.ह्या अर्थी न०सुद्धां. ३ प्रजेला अपत्याप्रमाणें मानणारा राजा.न०१एक प्रकारचें प्रायश्चित्त. २ एक वर्ष ब्रम्हचर्य. ३ गर्भाधान. ४ आपणाला पुत्र नसल्यामुळें कन्येस होईल तो पुत्र घेण्याचा करार करून कन्यादानापूर्वी करावयाचा होम.

प्राण [सं०] पु० १ श्वास. २ जीव. ३ देहांतील पांच वायु,-प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान. ४ हृदयस्थ वायु. ५ वारा. ६ बळ; सामर्थ्य. ७ जीवात्मा. ८ परमात्मा. ९ स्वताच्या जीविताप्रमाणें प्रिय किं० आवडती अशी वस्तु. १० कवित्वशक्ति; काव्यरस. ꙮ **प्राणाधिनाथ, प्राणनाथ** पु० पति. **प्राणाधिप** पु० आत्मा. **प्राणान्त** पु० मरण. **प्राणान्तिक** वि० १ विध्वंसक; घातक. २ भयप्रद. ३ प्राणाचा नाश करणारी (शिक्षा,-कडेलोट, फाशीं देणें, इ०). ४ अति कठिण किं० असाध्य (आजार). ५ प्राण जाण्याची ज्यांत भीति आहे अशी (अवस्था). **प्राणायन** न० इंद्रिय. **प्राणाघात** पु० हिंसा. **प्राणाचार्य** पु० वैद्य. **प्राणायाम** पु० (योग) प्राणवायूच्या गतीचा निरोध करणें. **प्राणाहुति** स्त्री० भोजनाच्या आरंभीं पांच प्राणांना देतात ते पांच घांस. **प्राणेशा** स्त्री० पत्नी. **प्राणदण्ड** पु० देहान्त शिक्षा. **प्राणदान** न० १ ठार न मारतां जिवंत

सोडून देणें. २ संकटांतून बचाव करणें. **प्राणद्यूत न०** मारीन किं० मरेन अशा निश्चयानें लढणें. **प्राणधारण न०** १ जिवंत राहाणें; जगणें. २ (**योग**)श्वासाचा निरोध करणें. **प्राणपति पु०** १ जीवात्मा. २ पति. **प्राणनाथ, प्राणपति, प्राणप्रिय,प्राणप्यारा, प्राणविसावा पु०**१पति. २जार.**प्राणपूजा स्त्री०**जेवण;भोजन.**प्राणप्रतिष्ठा स्त्री०** १दाक्षिणाचार विधीमध्यें देवतेच्या मूर्तीमध्यें प्राण घालणें.२ आरंभ;सुरवात;चालना.**प्राणमित्र पु०**जिवलगामित्र. **प्राणसंकट न०** अत्यन्त कठिण अशी गोष्ट; उ० लोकांच्या घरीं जेवायला जाणें हें मला प्राणसंकट वाटतें. **प्राणाचा गिऱ्हाईक पु०** हाडवैरी. **प्राणभक्ष पु०** वायूवर निर्वाह करणारा. **प्राणमय वि०** पंचप्राणयुक्त; सजीव. **प्राणमयकोश पु०** (**वेदान्त**) आत्म्याच्या पंचकोशांपैकीं दुसरा कोश. मागें ' अन्न ' मध्यें 'अन्नमयकोश' पहा. **प्राणयम पु०** वर ' प्राणायाम ' पहा. **प्राणयात्रा स्त्री०** १ चरितार्थ; उपजीविका. २ जगणें. **प्राणहर वि०** प्राणनाशक. **प्राणखाऊ, प्राणघेणा वि०** अत्यन्त उपद्रवी (माणूस, काम). **प्राणघातक (–की) वि०** प्राणाचा नाश करणारा(वायु,वनस्पति,इ०).**प्राणजीवन न०**चरितार्थाचें साधन.**प्राणोत्क्रमण न०** मरण.**प्राणाशीं गांठ स्त्री०**जिवाला धोका;कठिण प्रसंग. **असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ** भलत्याच माणसाशीं गांठ पडली असतां किं० मैत्री जडली असतां आपले प्राण धोक्यांत पडतात.

प्राणी [**सं०** प्राणिन्] **पु०** १ प्राण ज्याला आहे तो. २ माणूस. ३ गाय, बैल, वाघ, इ० जीवमान वस्तु. ४ जखम, शेण, इ० मध्यें उत्पन्न होतात ते बारीक बारीक जीव, कीट,किं० कृमि. ॐ **प्राणिद्यूत न०** कोंबडे, एडके, बैल, इ०ची लाविलेली झुंज. **प्राणिहिंसा स्त्री०** प्राण्यांना पीडा देणें, किं० क्रूरपणें वागविणें.

प्रान्त [**सं०**] **वि०** १कांठ, कड. २ सीमा. ३ शेवट; अग्र.४ राजकीय व्यवहारांत देशाचे पाडलेले असतात ते विभाग. ५ भाषा, चालीरीति, हवापाणी, इ० बाबतींवरून देशाचे होतात ते विभाग प्रत्येक. ६ (शास्त्राचा) विषय.

प्रातः [**सं०** प्रातर्] **क्रि० वि०** सकाळीं; उजाडतांच. **टीप**,–हा शब्द पुढील सामासिक शब्दांत येतो. **प्रातःकाळ पु०** सकाळ; सकाळचा वेळ. **प्रातःसंध्या स्त्री०** ब्राम्हणांनीं करावयाची सकाळची संध्या. दुसऱ्या दोन संध्या ' माध्यान्ह संध्या ' आणि ' सायंसंध्या '. **प्रातःस्नान न०** अगदीं सकाळीं केलेलें स्नान किं० सकाळीं स्नान करण्याचा नियम. **प्रातःस्मरण न०** निजून उठल्याबरोबर देवाचें ध्यान करतात तें किं० म्हणतात तीं स्तोत्रें इ०.

प्रातिकूल्य [**सं०**] **न०** १ प्रतिकूलपणा; विरोध; वैरभाव. २ जरूर अशा पदार्थाची उणीव किं० तोकडा पुरवठा.

प्रातिपदिक [**सं०**] **न०** विभक्तिप्रत्यय लागावयाच्या पूर्वींचें शब्दाचें रूप.

प्रातिभासिक [**सं०**] **वि०** वास्तविक नसतां भ्रमानें भासतें तें.

प्रातिलोम्य [**सं०**] **न०** १ प्रतिलोमपणा. २ उलटा क्रम. ३ वैर. मागें ' प्रतिलोम ' पहा.

प्रात्ययिक [**सं०**] **वि०** १ भरंवशाला पात्र. २ जामीन राहिलेला.

प्राथमिक [**सं०**] **वि०** १ पहिलें. २ आधींचें. ३ सुरवातीचें. ३ अगदीं पहिल्यानेंच घडत आहे तें.ॐ **प्राथमिक शिक्षण न०**मुलाला अगदीं आरंभीं देतांत तें शिक्षण,–अक्षरें काढणें, वाचणें, दहापर्यंत पाढे, इ०. **प्राथमिक शाळा स्त्री०** मुलांना ज्यांत प्राथमिक शिक्षण दिलें जातें अशा शाळा प्रत्येक.

प्रादाक्षिण्य [**सं०**] **न०** १ भोंवतीं फिरणें. २ पूर्व, आग्नेयी, दक्षिण, नैऋत्य, इ० क्रमानें देवाची मूर्ति,साधु, इ० च्या भोंवतीं फेरी करणें.

प्रादुर्भाव [**सं०** प्रादुस्+भाव] **पु०** १ अस्तित्वांत येणें. २ दृग्गोचर होणें; दृष्टोत्पत्तीस येणें. ३ देवांचें भूतलावर येणें.

प्रादुर्भूत [**सं०**] **वि०** दृष्टोत्पत्तीस आलेला.

प्रादेश [**सं०**] १ टीच (लांबी). २ स्थान. ॐ **प्रादेशमात्र वि०** थोडेंसें; मासल्यादाखल.

प्राधान्य [**सं०**] **न०** १ महत्त्व; मुख्यत्व. २ वर्चस्व. ३ मुख्य कारण. ४ वैपुल्य. ॐ **प्राधान्यतः, प्राधान्यें करून क्रि० वि०** १ मुख्यत्वें-करून; विशेषतः. २ विपुलपणानें.

प्रापक [**सं०**] **वि०** १ मिळविणारा. २ मिळवून देणारा. ३ विशिष्ट स्थळीं पोंचविणारा.

प्रापंचिक [**सं०**] **वि०** १ प्रपंचांत गुंतलेला किं० आसक्त. २ ज्याला बायको, मुलें, धंदा, इ० आहे असा. ३ प्रपंचासंबंधाचा.

प्रापण [**सं०**] **न०** १ लाभ. २ पोहोंचविणें. ३ नेणें. [संपादित.

प्रापित [**सं०**] **वि०** १ पोंचविलेला. २

प्राप्त [**सं०**] **वि०** १ आलेलें. २ येऊन ठेपलेलें. ३ संपादित; मिळालेलें; मिळविलेलें. ४ भोगास आलेलें (सुख, दुःख, इ०). ५ घडलेलें; झालेलें. ६ अनुभविलेलें. ७ योग्य. ८ जरूर; आवश्यक. ❀ **प्राप्तकाळ, प्राप्तावसर वि०** १ समयोचित. २ दैवानें ठरवून ठेविलेलें. ३ लग्नाला योग्य; उपवर; प्रौढ. **प्राप्तव्यवहार वि०** (**कायद्यांत**) वयांत आलेला.

प्राप्तव्य [**सं०**] **वि०** १ मिळवावयाचें; मिळवावयाला योग्य. २ दैवीं लिहिलेलें. ३ मिळण्याजोगें. ❀ **प्राप्तव्यांश पु०** कोणेक व्यवहारापासून होते ती मिळकत.

प्राप्ति, प्राप्ती [सं०प्राप्ति] **स्त्री०**१शेत, सावकारी,धंदा,इ० पासून होते ती मिळकत किं० जें कांहीं मिळतें तें.२भोगास.येतें तें,सुख,दुःख इ०.३ अणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्यांपैकीं सातवी,–वाटेल तें मिळविण्याची शक्ति.मागें'अष्ट' मध्यें ' अष्टसिद्धि ' पहा. ४ मिळणें; सांपडणें. ५ विशिष्ट स्थळीं जाऊन पोंचणें. ६ टप्पा; पल्ला; आटोका. ७ तर्कानें उमगणें. ८ लागूं होणें. ९ सिद्धि; सफलता. १० नाटकाचे सुखरूपी पर्यवसान. ११ उदय; अभिवृद्धि. १२ (**मराठींत**) सामर्थ्य; छाती; उ० वाघापुढें जायला तुझी काय प्राप्ति ? ❀ **प्राप्तिपुरुष पु०** ज्याला भगवत्स्वरूपाचा साक्षात्कार झाला असा साधुपुरुष. **प्राप्त्यंश पु०** नफा; मिळकत.

प्राप्य [**सं०**] **वि०** मिळण्याजोगें; मिळविण्याला लायक किं० योग्य.

प्राबल्य [**सं०**] **न०** १ शक्ति. २ वर्चस्व. ३ वडेजावी; महत्व.

प्रामाणिक [**सं०**] **वि०** १ सप्रमाण. २ शास्त्रसिद्ध. ३ वेदावर आधारलेलें. ४ विश्वसनीय. **पु०** १ तर्कशास्त्रांत निपुण. २ व्यापारादि उद्योगांत मुख्य म्हणून गणलेला.

प्रामाण्य [**सं०**] **न०** १ आधार; प्रमाण. २ सप्रमाणता. ३ खरेपणा; विश्वसनीयता. ❀ **प्रामाण्यग्रह पु०** हें योग्य किं० खरें आहे असा ग्रह किं० मत किं० भरंवसा.

प्रामादिक [**सं०**] **वि०** चुकीचें.

प्राय [**सं०**] **वि०** १ सारखा; तुल्य. २विपुल. **टीप**,–समासांत अंत्यपदीं हा शब्द येतो. मृतप्राय म्ह०बहुतेक मेलेला;ज्याचें मरण जवळ येऊन ठेपलें आहे असा. पर्वतप्राय म्ह० पर्वताएवढा मोठा. जलप्राय म्ह० पाण्यानें भरलेलें.

प्रायः,प्रायशः [**सं०**] **क्रि० वि०** बहुतकरून; बहुधा.

प्राय [**सं०**] **पु०** कांहीं न खातां मरण आणून घेणें. ❀ **प्रायोपवेशन,प्रायोपगमन न०** कांहींच अन्न न खातां मरण ओढवून घेणें. **प्रायोपविष्ट वि०** १ मरण ओढवून घेण्याच्या निश्चयानें उपोषण करावयाला सिद्ध झालेला. २ पैसा इ० साठीं धरणें घेऊन बसलेला.

प्रायिक [**सं०**] **वि०** १ बहुतकरून असणारा. २ संप्रदायाला अनुसरून असलेलें.

प्रारब्ध [**सं०**] **वि०** सुरूं केलेलें; आरंभिलेलें. **न०** १ आरंभिलेलें कार्य. २ चालू जन्मांत भोगावयाचें पूर्वजन्मीं केलेलें कर्म. ३ नशीब;दैव. मागें ' अनिच्छा ' पहा. मागें ' दैववाद ' पहा.

प्रारंभ [**सं०**] **पु०** सुरवात; आरंभ.

प्रारंभिणें [**सं०** प्र+आ+रंभ्] **स० क्रि०** सुरूं करणें; चालू करणें.

प्रार्थन न०, प्रार्थना स्त्री० [**सं०**] १ विनंति; याचना. २ इच्छा.

प्रार्थिणें [**सं०** प्र+अर्थ्] **स० क्रि०** मागणें; याचिणें; विनविणें.

प्रावरण [**सं०**] **न०** आच्छादनाचें वस्त्र.

प्रावीण्य [**सं०**] **न०** नैपुण्य;शास्त्र, कला, इ०मध्यें निष्णातपणा.

प्रावृष्, प्रावृषा स्त्री०,प्रावृष पु०पावसाळा. ❀ **प्रावृषक, प्रावृषेण्य वि०** पावसाळ्यांतील; पावसाळ्या संबंधाचा.

प्राशन [**सं०**] **न०** १ खाणें किं० पिणें. २

खावाविणें किं० पिवाविणें. ३ खाद्य किं० पेय.

प्राशस्त्य [**सं०**] **न०** १ उत्कृष्टपणा, श्रेष्ठपणा. २ प्रशस्तपणा. ३ खुशाली.

प्राशित [**सं०**] **वि०** प्यालेलें; खाल्लेलें.

प्राश्निक [**सं०**] **पु०** १ परीक्षक. २ न्यायाधीश; पंच. ३ ज्योतिषी. ४कुशल प्रश्न करणारा. ५ सभ्य गृहस्थ.

प्रास [**सं०**] **पु०** १ फेकणें. २ भाला. ३ अनुप्रास हा शब्दालंकार. मागें 'अनुप्रास' पहा.

प्रासंगिक [**सं०**] **वि०** १ नात्याचा; जवळच्या संबंधापासून उत्पन्न झालेला. २ प्रसंगानें आलेला. ३ उपकथेच्या संबंधानें आलेला.

प्रासाद [**सं०**] **पु०** १ राजवाडा. २ मोठी किं० टोलेजंग हवेली. ३ देऊळ. ❀ **प्रासादप्रतिष्ठा स्त्री०** नव्या देवळाचा उद्घाटनसंस्कार.

प्रासादिक [**सं०**] **वि०** १ कृपेनें मिळालेलें. २ प्रेमळ. ३ सुंदर. ४ देव, साधु, इ०पासून कृपा म्हणून मिळालेला (पदार्थ). ५ ज्याच्या औषधानें रोगी हटकून बरा होतो असा (वैद्य); ज्यानें पढविलें असतां उत्तम शिष्य तयार होतो असा (गुरु); ज्याच्या पठनानें ईश्वरप्राप्ति होते असा (ग्रंथ). ६ ईश्वराचा ज्याला प्रसाद मिळालेला आहे अशा साधूनें केलेला (ग्रंथ). ❀ **प्रासादिक कविता स्त्री०** १ प्रसादगुणानें युक्त कविता. २ ईश्वरी प्रसादानें रचिलेली कविता.

प्रासूतिक [**सं०**] **वि०** १ बाळंतपणाच्या वेळच्या (वेदना). २ बाळंतपणासंबंधाचा (विधि, संस्कार, कृत्य, इ०). [समयोचित.

प्रास्ताविक [**सं०**] **वि०** १ प्रस्तावनारूप.

प्रास्तुत्य [**सं०**] **न०** चर्चेचा विषय होणें.

प्रास्थानिक [**सं०**] **वि०** प्रस्थान म्ह० परगांवीं जाणें किं० प्रवासाला निघणें इ० संबंधाचा किं० इ०ला शुभ किं० सोयीचा.

प्राहीं मागें 'पराई' पहा. [समय.

प्राण्ह [**सं०** प्राह्ण] **पु०** मध्यान्हापर्यंतचा

प्राज्ञ [**सं०**] **वि०** १ बुद्धिमान् असून शास्त्रादि विषय जाणणारा. २ शाहाणा; समंजस.

प्राज्ञा [**सं०**] **स्त्री०** १ बुद्धि; बुद्धिमत्ता. २ (**सराठींत**) सामर्थ्य; योग्यता.

प्रिय [**सं०**] **वि०** १ आवडता; आवडीचा. २ सुखकर. **पु०** पति; नवरा. **न०**१आवडती वस्तु २ इष्ट हेतु. ३ (कोणेकाला केलेली) मागणी. ❀ **कोणेकाचें प्रिय करणें** त्याणें मागितलेली वस्तु त्याला देणें; किं०देऊन त्याला संतुष्ट करणें.

प्रियकर पु० १ मित्र; हितकर्ता. २ पति. ३ जार. **प्रियतम पु०** पति. **वि०** अत्यन्त प्रिय. **प्रियदर्शन वि०** सुंदर. **प्रियवादी वि०** गोडबोल्या. **प्रियंवद वि०** गोडबोल्या.

प्रियंगु [**सं०**] १ वाघांटी. २ राळा.

प्रिया [**सं०**] **स्त्री०** १ पत्नी. २ रखेली.

प्रीणन [**स०**] **न०** १ संतुष्ट करणें. २तृप्ति.

प्रीत [**सं०**] **वि०** संतुष्ट; आनंदित.

प्रीति [**सं०**] **स्त्री०** १ सुख; आनंद.२कृपा; प्रसन्नता. ३ प्रेम; आवड; स्नेह. ४ तृप्ति; संतोष. ५ सत्तावीस योगांतील दुसरा. ❀**प्रीतिदान न०** १ कोणेकाची विद्या, शौर्य, इ० गुणांनीं संतुष्ट होऊन त्याला कोणी देतो वस्त्र,द्रव्य,इ०दान तें.२ प्रेमामुळें कोणेकाला जें कांहीं दिलें तें. **प्रीतिविवाह पु०** वधूवरांच्या पत्रिका न पाहतां म्ह० घटित न पाहातां करतात तो विवाह. **प्रीतिपात्र न०** आपल्या प्रेमाचें माणूस. **प्रीतिसंगम पु०** दोन दिशांनीं येणाऱ्या म्ह० समोरासमोरून येणाऱ्या दोन नद्यांचा जो संगम तो. **प्रीतिश्राद्ध न०** मातापितरांच्या नांवानें केलेलें एक प्रकारचें श्राद्ध. **प्रीत्यर्थ क्रि०वि०** साठीं; ०च्या उद्देशानें.

प्रेत [**सं०**] **वि०** १ मेलेला. २निघून गेलेला. **न०**१मुडदा.२सपिंड्यन्त उत्तरक्रिया होऊन पितृत्व ज्याला प्राप्त झालें नाहीं असा मेलेला मनुष्य. ❀ **प्रेतकर्म, प्रेतकार्य न०, प्रेतक्रिया स्त्री०** और्ध्वदैहिक विधि. **प्रेतकळा स्त्री०** १ मृत्यु जवळ येऊन ठेपला असतां तोंडावर जो फिक्केपणा येतो तो. २ आजारी मनुष्याच्या चेहेऱ्यावर येतो तो फिक्केपणा. **प्रेतभूमि स्त्री०** स्मशान. **प्रेताशौच न०** प्रेत वाहून नेण्यानें होतो तो विटाळ. **प्रेत्या पु०** कारटा; स्मशानांत और्ध्वदैहिक संकल्प सांगणारा ब्राम्हण.

प्रेम [**सं०** प्रेमन्] **न०** १ प्रीति; स्नेह; आत्मीयतेची भावना. २ आवड. ❀ **प्रेमपान्हा पु०** १ मूल पाहातांच मातेच्या स्तनांतून गळ

लागतें तें दूध. २ (निंदेंत) कोणेकाला कोणेकाबद्दल वाटतो तो फाजील आपलेपणा.

प्रेमळ [**म०** प्रेम; **सं०** प्रेमन्] **वि०** प्रीतियुक्त; ज्याला माणसांबद्दल प्रेम वाटतें असा; मायाळू; दयावान्.

प्रेमा [**सं०** प्रेमन्] **पु०** १ प्रेम; प्रीति. २ कोणेकासंबंधानें वाटतें तें उत्कट प्रेम.

प्रेरक [**सं०**] **वि०** १ प्रेरणा करणारा; प्रचोदक. २ उत्तेजन देणारा. ३ गति देणारा.

प्रेरणा स्त्री०, प्रेरण न०[सं०] १ उत्तेजन. २ प्रचोदन. ३ माणसाला कांहीं करण्यासाठीं दिलेली भर. ४ पदार्थाला दिलेली गति. ५ उठावणी.

प्रेरिणें [**सं०** प्र+ईर] **स० क्रि०** १ पाठविणें. २ फेकणें. ३ (दृष्टि) वळविणें.

प्रेषक [**सं०**] **वि०**पाठविणारा; धाडणारा.

प्रेषण न०, प्रेषणा स्त्री० [**सं०**] पाठविणें; धाडणें.

प्रेषिणें [**सं०** प्र+इष्] पाठविणें; धाडणें.

प्रेषित [**सं०**] **वि०** पाठविलेला.

प्रेष्य [**सं०**] **पु०** दास; सेवक.

प्रेक्षक [**सं०**] **वि०** १ पाहाणारा.२ नाटक, तमाशा, इ० पाहावयाला आलेलीं माणसें प्रत्येक.

प्रेक्षणा, प्रेक्षा [**सं०**], **स्त्री०** पाहाण्याची क्रिया. ❀ **प्रेक्षावंत वि०**चौकस; हुशार;दूरदर्शी.

प्रेक्षण [**सं०**] **न०** १ पाहाणें. २ दृष्टि. ३ डोळा. ४ देखावा. ५ खेळ, तमाशा, इ०.

प्रेक्षणीय [**सं०**] **वि०** १ पाहाण्यालायक. २ अवश्य पाहिलें पाहिजे असें.

प्रेक्षित [**सं०**] **वि०** पाहिलेलें; तपासलेलें.

प्रोक्त [**सं०**] **वि०** १ बोललेलें; सांगितलेलें. २ करावें असें सांगितलेलें.

प्रोत्साह [**सं०**] **पु०** १ उत्तेजन; चेतवणूक. २ आवेश; उत्साह.

प्रोत्साहन [**सं०**] **न०** उत्तेजन; चेतवणी.

प्रोषित [**सं०**] **वि०**गैरहजर; गांवाला गेलेला.

प्रोष्ठ खालीं ' प्रौष्ठ ' पहा.

प्रोक्षण [**सं०**] **न०** १ शिंपडणें. २ पवित्र करणें. ३ (यज्ञांत) पशुवध किंव्या वेळचे मंत्र.

प्रौढ [**सं०**] **वि०** १ प्रफुल्लित. २ पूर्ण वाढलेलें; परिपक्व. ३ पोक्त; वयोवृद्ध. ४ भारदस्त (भाषा). ❀ **प्रौढविवाह पु०** १ स्वताचें हिताहित ज्यांना समजूं लागलें आहे अशा वधूवरांनीं स्वताचें जुळवून आणलेलें लग्न. २वयांत आलेल्या वधूवरांचें लग्न.

प्रौढा [**सं०**] **स्त्री०** १ निर्भीड स्त्री. २ (**साहित्य**) एक प्रकारची नायिका. ३ तीस ते पन्नास वर्षांची स्त्री.

प्रौढि,प्रौढी [**सं०** प्रौढि] **स्त्री०**१पूर्ण वाढ.२ महत्त्व; ऐश्वर्य; डौल. ३ गांभीर्य. ४ गर्व. ५ धिटाई.६ फुशारकी; ऐट; बढाई. ❀ **प्रौढिवाद पु०** १ धाडसाचें विधान; पूर्ण विचार न करतां दिलेलें मत. २ थाटमाटाचें भाषण.

प्रौष्ठ, प्रोष्ठ [**सं०**] **पु०** १ बैल. २ आसन. ❀ **प्रोष्ठपद, प्रौष्ठपद पु०** भाद्रपद हा महिना. **प्रोष्ठपदा, प्रौष्ठपदा स्त्री०** पंचवीसावें आणि सव्वीसावें हीं दोन नक्षत्रें; पूर्वा भाद्रपदा आणि उत्तरा भाद्रपदा. **प्रौष्ठपदी, प्रोष्ठपदी स्त्री०** भाद्रपद महिन्यांतील पौर्णिमा.

प्लव [**सं०**] **पु०** १ पोहोणें. २ तरंगणें. ३ नदीला येतो तो पूर. ४ होडी; तराफा. ❀ **प्लवंग पु०** १ वानर.२सूर्याचा सारथि.

प्लीहा [**सं०** प्लीहन्] **पु०** पाणथरी; कौल्ह.

प्लुत [**सं०**] तीन मात्रा लांब उच्चार ज्याचा असा (जो आकारादि स्वर तो). **न०** १ उडी .२ स्नान.

प्लुति [**सं०**] **स्त्री०** १ पूर. २ उडी. ३ स्वराचें प्लुतत्व म्ह० तीन मात्रांची लांबी.



फ

फ मराठी वर्णमालेंतील बाविसावें व्यंजन.

फकड, फक्कड वि० १ थाटदार; अक्कडबाज; भपकेदार. २ स्वच्छंदानें वागणारा.

फकडी स्त्री० एकेरीं पाकळ्या ज्याला असतात असें (फूल किं०अशा फुलांचें फुलझाड).꙳ **एकफकडी वि०** एकेरी पाकळ्यांचें (फूल); याच सरणीनें दुफकडी, तिफकडी, इ०.

फकत, फक्त [अ०] **क्रि० वि०** केवळ.

फका पुढें ' फक्का ' पहा.

फकांडी स्त्री० बात; वढाई. **टीप,**–फकांड्या मारणें किं० झोकणें असा **अ० व०** प्रयोग बहुधा होतो.

फकाणा, फकांदा पुढें ' फक्का ' पहा.

फकिका, फक्किका [**सं०** फक्किका] **स्त्री०** १ चर्चेचा विषय. २ पूर्वपक्ष. ३ पूर्वग्रह. ४ कपट; फसवणूक. ५ सिद्धान्ताभास. ६ सिद्ध करावयाचें विधान.

फकिरी, फकीरी [**फा०** फकीरी] **स्त्री०** १ फकीराची राहाणी. २ डोल्यांचे दिवसांत फकीराला देतात ती भिक्षा. **वि०** फकीरासंबंधाचा; फकीराला शोभेल असा; अगदीं गरीबाऊ (राहाणी, पोशाख, इ०). ꙳**फकीरी बाणा पु०** १साधेपणाची राहणी. २ फकीराची निःस्पृहता.

फकीर [**अ०** फकीर] **पु०** १ मुसलमान भिकारी. २ मोहोरमाच्या सणांत फकीराचें सोंग घेणारा. ३ (**लाक्षणिक**) जगाचें व्याप किं० बंधनें ज्याला नाहींत असा. ꙳ **फकीर-फुकरा** [**अ०**] फकीरबिकीर; सर्व प्रकारचे भिक्षेकरी. **फकीरी द्राक्ष न०** द्राक्षाची एक जात.

फकोडा पुढें ' फाकडा ' पहा.

फक्किका वर ' फकिका ' पहा.

फक्की, फकी स्त्री० तोंडांत घातलेला लाहीपीठ, औषध, इ० चूर्णाचा घास (मारणें, घेणें).

फक्की वर ' फकी ' पहा.

फक्त वर ' फकत ' पहा.

फग स्त्री० सोयीची वेळ, संधी (फावणें).

फंगडा खालीं ' फनगडा ' पहा.

फगणें भावकर्तृक क्रि०फावणें.

फंगरूढ न०, फंगाड पु० १ कुत्सित कल्पना काढून आणलेली हरकत. २ भरकटलेलें भाषण. ३ कांहीं विचित्र किं० पोरकट अडथळा.

फंजट, फंजरट, फंजरूट न०, फंज्या स्त्री० अ० व० मागें ' पंजट ' इ० पहा.

फजर [**अ०** फज्र्] **क्रि० वि०** उद्या सकाळीं.

फजित वि० ज्याचा उपहास झाला आहे असा (होणें, करणें).

फजिता [अ० फजीहत्] **पु०** १ बोऱ्या; बचेरी; उपहास पावल्याची स्थिति. २ बेचव पातळ जो खाद्य पदार्थ तो. २ मिरच्या भाजून त्यांत दही घालून करतात तें तोंडीलावणें.

फजिती स्त्री० १ अप्रतिष्ठा होऊन प्राप्त झालेली उपहासाची स्थिति (उडणें, करणें). २ काय करूं, कसें करूं, अशा विचारानें होते ती कुंठितपणाची स्थिति (उडणें). ꙳ **फजितीचें जिणें न०**ज्यानें त्यानें हिडिसफिडिस करावें असें आयुष्य किं०अशी वर्तनसरणी.**फजितखोर वि०**१ ज्याची सदा अप्रतिष्ठा होत असते असा माणूस.२ ज्याच्यामुळें आपली सदा फजिती होत असते असें (माणूस, काम, वस्तु).

फजिंदार [**पोर्च्युगीझ्**] **पु०** १ विशिष्ट शर्तीवर जमीन कसणारा. २ ठिकाणदार.

फज्जा पु० पुढें ' भोग्या ' पहा.

फट स्त्री० १ चीर; भेग; खिंड. २ पळवाट; पेचांतून सुटण्याची कोणत्याही जातीची किं० प्रकारची युक्ति. ३ कमताई; उणेपणा; ज्यास्ती भर करण्याची सोय. ४ फुरसुतीचा वेळ.५मिष; कपट; लबाडीची हिकमत. ꙳ **फट फावल्यास** संधी सापडली तर.

फट वि०पराकाष्ठेचा;उ०फटफजीती,फटलंडी, फटगंड (बेइमानी रांड किं० वेश्या), फटलंडी (क्षुद्र किं० अधम किं० नीच माणूस).

फट, फट् उ० वा० अ० थुः ! छिः, ! हट ! ꙳ **कोणेकाला फट् म्हणणें** त्याला तुच्छ करणें किं० झिडकारणें. **फट म्हणतां ब्रह्महत्या** क्षुल्लक

अपराध घडल्यानें मोठ्या पापाइतकें शासन; अजाणपणानें केलेल्या कांहीं गोष्टीचा भयंकर परिणाम.

फटक क्रि० वि० अत्यंत (पांढरा); उ० पांढरा फटक, फटक पांढरा; 'फटक चांदणें म्ह० पांढरें शुभ्र चांदणें.

फटकडा पु० १ दिवाळींत मुलें उडवितात तो फटाकडा. २ तल्लख, चुणचुणीत, हुशार मुलगा किं० माणूस.

फटकडी स्त्री० १ तुरटी. २ दिवाळींत मुलें उडवितात तो फटाकडा. ३ ठेंगणी, ठुसकी, लठ्ठ, आणि चुणचुणीत मुलगी. ४ घोड्यानें एकदम मारलेली उडी (मारणें). ५ घोड्याच्या शेपटीचा फटकारा किं० तडाखा (मारणें, लागणें).

फटकणें स० क्रि० सुपामध्यें धान्य इ० पदार्थ घालून फट, फट, असा आवाज करून (तें) पाखडणें. २ पंख्यानें (विस्तवाला) वारा घालणें. **अ० क्रि०** दूर सरणें, बाहेर पडणें. ❀ **कोणेकानें कोणेकापासून फटकून असणें** (किं० **राहणें** किं० **वागणें**) त्याची पर्वा न करतां त्याच्याशीं तिऱ्हाइताप्रमाणें वागणें.

फटकणें न० अग्नि प्रज्वलित करण्याचा पंखा. २ धान्याला वारा घालून कोंडा उडवून लावण्याचें सूप, पंखा, इ० साधन. ३ भिंतीचा गिलावा ठोकण्याचें तिधारी साधनविशेष.

फटकन्, फटकर, फटदिनीं, फटदिशीं, क्रि० वि० झपाट्यानें; तडाक्यासरशीं; एकदम.

फटकफळी स्त्री० १ मुलांची एक प्रकारची बंदूक. ही बांबूच्या नळीच्या रूपाची असून तींत असाणा इ० चें फळ, लिंबोणी, पानाची गुंडाळी, इ० घालून गजानें रेटलें असतां फट असा आवाज होऊन आंत घातलेला पदार्थ जोरानें बाहेर उडतो. २ तल्लख, चुणचुणीत मुलगी.

फटकर न० १ फाटकें कांबळें किं० कोणतेंही चिरगूट. २ चिंधी; वस्त्राचा वाभाडा.

फटकळ वि० १ उमटपणाचें किं० शिवीगाळीचें (भाषण किं० असें भाषण करणारा मनुष्य किं० असें भाषण उच्चारणारें तोंड). २ एकलकोंडा; माणूसघाण्या; तुसडा. ३ शिवराळ (माणूस, भाषण, तोंड). ❀ **फटकळ काळ पु०** दुर्दैवाचा, अडचणीचा, किं० संकटाचा काळ.

फटका [हिं० फाटक्] **पु०** १ आवार, घर, झोपडी, गांव, इ० चा दरवाजा. २ तडाका, रट्टा. ३ एकप्रकारची आखूड आणि सरळ तरवार.

फटकाफटकी स्त्री० १ हातांनीं किं० काठ्यांनीं एकमेकांस मारून केलेली मारामारी. २ शिवीगाळ करून केलेलें भांडण.

फटकाफटकीं क्रि० वि० आवेशानें; झपाट्यासरशीं; एकदम.

फटकारणें स० क्रि० झपाट्यानें (कांहीं काम) करणें किं० संपविणें.

फटकारा पु० १रट्टा; तडाखा. २ एक दम किं० नेट(काम करण्याचा). ३ मध्यें न खळतां केलेला प्रयत्न. ४ भूतबाधा. ५ अनुप्रासयुक्त लावणी. ६ (पावसाची) जोराची सर; (वाऱ्याचा) सोसाटा; (गारांचा) वर्षाव. ७ (विंचवाच्या नांगीचा) प्रहार. ❀ **फटकाऱ्याचा पाऊस पु०** जोरानें आणि थोडा वेळ आलेली पावसाची सर. ह्याच्या उलट' भिजपाऊस.'

फटकाळ, फटकूळ वर ' फटकळ ' पहा.

फटकी [**सं०** स्फटिक] **स्त्री०** तुरटी.

फटकुरी स्त्री०, फटकुर, फटकुरें न० जीर्ण आणि फाटकें तुटकें वस्त्र, कांबळें, सतरंजी, जाजम, इ०. ❀ **फटकुऱ्या** जीर्ण आणि फाटकीं वस्त्रें अंगावर धारण करणारा.

फटंग वि० पुढें ' फटिंग ' पहा.

फटफजीती स्त्री० बोऱ्या; अपमानासह कोणेकाची फजिती. मागें ' फट '**वि०** पहा.

फटफटणें भावकर्तृक क्रि० उजाडणें; सूर्योदय होऊन दिशा प्रकाशयुक्त होणें. ❀ **रात्र फटफटणें** रात्र संपून दिवसाचा उजेड होणें. **काळोख** (किं० **दिवस** किं० **दिशा**) **फटफटणें** भूमंडळ प्रकाशयुक्त होणें.

फटफटणें, फटफटें न० केळीचा ताटोळा इ० चें फटफट आवाज करणारें खेळणें.

फटफटीत वि० १ स्वच्छ (पांढरा). २ निस्तेज (रक्त नसल्यामुळें आजाऱ्याचा चेहरा, कुंकू नसल्यामुळें स्त्रीचें कपाळ, इ०).

फटलंडी, फटरांड मागें 'फट '**वि०** मध्यें पहा.

फटवण स्त्री० फसवणूक; लबाडी.

फटविणें स० क्रि० फसविणें, ठकविणें.

फटसाळ, फटसूळ वि० शिवराळ (माणूस, तोंड). ꕥ **तोंडाचा फटसाळ वि०** जो सदा शिव्या देत असतो असा (माणूस).

फटाकडा पु०, फटाकडी स्त्री० दिवाळींत मुलें उडवितात ती ठासून दारू भरलेली दारूची नळी.

फटाकफळी स्त्री० मागें ' फटकफळी ' पहा (दोन्ही अर्थीं).

फटाका पु० १ ' फटाकडा ' पहा. २ तल्लख, चुणचुणीत मुलगी किंं० मुलगा. ३ तडाखा;रट्टा.

फटांगा, फटाडा वि० लठ्ठ आणि पसरट (शिंग, निवडुंग,इ०). [युक्त होणें.

फटाटणें अ० क्रि०(दिशा,आकाश) प्रकाश-

फटिंग पु० ज्याला बायको, मुलें, इ० कोणी नाहींत असा माणूस.

फटऱ्या वि० धीट; न कचरणारा; संकोच न बाळगतां मनांतील विचार बोलून दाखविणारा; कोणाची मुरवत न ठेवणारा.

फटऱ्याळ मागें ' फटकळ ' पहा.

फड [हिं०] पु० १ लिहिणें, वाचणें,शिवण-काम,पंचाईत करणें,इ०कामें एकत्र बसून करणारे लोक, त्यांचीं साधनें, इ०चा समुच्चय किं० त्यांची बसण्याची जागा.२ सरकारसंबंधीं लिहिणें, कुळें आणणें, त्यांचें वसूल घेणें, इ०संबंधाचीं कामें समुच्चयानें किं०तीं करण्याची जागा किं०तीं करणारे लोक समुच्चयानें. ३ वांगीं,मिरच्या, आलें, हळद,ऊस,इ०चें शेत.४ पोऱ्याला सजवून तमाशा करणाऱ्या लोकांची मंडळी.५खेळणें,नाचणें,गाणें, इ०चा आड्डा. ६ कुस्त्या, लेजीम, इ०चा अड्डा. ७ कोणत्याही कामाचा कारखाना. ८ नेटानें कोणतेंही काम करणाऱ्या लोकांची टोळी किं० जागा. ९ मोठ्या तोफेची बैठक. ꕥ **एकाद्या कामाचा फड पडणें** तें जोरानें अनेकांनीं एके ठिकाणीं जमून चालविणें. **फड मारणें**(किं०**संपादणें**) प्रशंसेस पात्र असें कांहीं कृत्य करणें; प्रसंगाला जें योग्य त्यांत न्यून न पडूं देणें. **फड मारणें** (किं० **संभाळणें** किं० **राखणें**) आपल्या लौकिकास कमीपणा न येऊं देतां कांहीं काम पार पाडणें. **फडाच्या मापानें क्रि०वि०**अघळपघळ किं०सढळ हातानें. **फडास येणें** चार चौघांच्या नजरेस येणें किं० टीकेचा विषय होणें. **फडकरी पु०** १फडाचा मुकदम. २ किरकोळीनें धान्य विकणारा.

फडझडती स्त्री० १ फडावरील कामांची तपासणी किं०तीं कामें निकालास लावणें.२कोणेकाची काढलेली खरडपट्टी किं० भोंडसडपट्टी.३कोणत्याही कामाची पूर्ण तपासणी. ४ दोन तमासगिरांच्या फडांतलि तंटा किं० वादाचा विषय.

फड संपादणी स्त्री० १ फडावर उत्तम प्रकारचें काम दाखवून यश मिळविणें. २ कोणतेंही काम उत्तम प्रकारें शेवटास लावून पूर्वीं मिळविलेला लौकिक न गमावून घेणें.

फडफरमाश (–स) [हिं० फड्; फा० फर्माइष्] स्त्री० १ सरकारी अधिकारी इ० गांवकामगारास हुकूम करून आपल्या उपयोगासाठीं आणवितात जें शाक, भाजी, पानें, पत्रावळी,इ० सामान तें. २ सरकारी कामगारांनीं रयतेकडून करवून घेतलेलें कोणतेंही वेठबिगारीचें काम. ३ पूर्वीं प्रत्येक ठिकाणच्या शेतांत जें पीक व जो माल तयार होईल त्याचा मासला सरकारांत द्यावा लागत असे,– जो पुढें सरकारचा हक्कच होऊन गेला होता,–तो.

फड, फडा पु०खजूराच्या झाडाच्या फांदीचें टोक किं० खजूराच्या फळांचा घोस.

फडकणें अ० क्रि० (निशाण, ध्वज, पताका, इ० नीं) वाऱ्यावर फडफड असा आवाज करीत उंचावर शोभत असणें.

फडकविणें, फडकाविणें [म० 'फडकणें**'चें प्रयोजक] स० क्रि०** १ वाऱ्यावर (ध्वज, निशाण, इ०) फडफड असा आवाज करतील अशा प्रकारें तें उंच उभारणें.२(उंची कपडा, वस्त्र, मंदील, इ०) अंगावर धारण करून ऐट करणें. ३ कोणेकाच्या तोंडावर (चपराक) मारणें. ' चपराक ' शब्द वगळला तरी चालतो.

फडका पु० १ वस्त्राचा तुकडा. २ स्त्रियांचा नेसावयाचा घागरा. ꕥ **फडका फाडून देणें, फडका फाडणें** सडेतोड उत्तर देणें; भीड न राखतां जबाब देणें.

फडकी स्त्री० लहान मुलांचें पांधरावयाचें लोकरीचें किं० कापसाचें वस्त्र.

फडकें न० वस्त्राचा तुकडा.

फडणिशी, फडणीस खालीं ' फडनिशी, ' ' फडनीस ' पहा.

फडतळ, फडताळ, फडतार न० १घराच्या भिंतीमध्यें पोकळ जागा ठेवून तिच्यांत फळ्या बसवून तिला दारें करून पदार्थ सुरक्षित ठेवण्यासाठीं पेटीसारखें करतात तें बारदान. २ लहानसें दुकान.

फडत्कार पु० ध्वजाच्या वस्त्राचा, पक्ष्यांच्या पंखांचा, किं०जनावरांच्या शेपट्यांचा फडफड असा आवाज.

फडनीस, फडणीस, फडनवीस, फडणवीस [**हिं०** फड्नविस्] **पु०** १ सरकारी दफतरांवरचा मुख्य अधिकारी. २ शिरस्तेदार. ❀**फडनिशी स्त्री०** फडणीसाचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र.

फडफडागत स्त्री०, फडफडाव पु० शेत, वाडी, गुरें ढोरें, नोकर, इ०रूप जें संसाराचें खटलें तें किं० त्यांचा जो पसारा तो.

फडफडीत वि० ज्याचीं शितें टणक आणि एकमेकांना न चिकटलेलीं आहेत असा (भात).

फडशा [**हिं०** फरछा] **पु०** १ खाऊन, पिऊन, खर्चून, संपवून टाकण्याची क्रिया. २ (कामाची) समाप्ति; निःशेषता. ❀ **फडशा फारक** [**हिं०** फर्छा+**अ०** फारग] **पु०** १ वादाचा किं० भांडणाचा पूर्ण निकाल. २ पदार्थाची निःशेषता होईल अशा रीतीनें तो खर्चून टाकणें.

फडसूळ वि० १ मनास येईल तें बोलणारा; भरमसाट रीतीनें बोलणारा. मागें ' फटसळ ' पहा. २ भिकार किं० थोडें पीक देणारी (जमीन, शेत). ३ ओसाड किं०फारसें सर्पण किं०इमारती लाकूड जेथें मिळत नाहीं असें (रान, जंगल). ४ किरकोळ (विक्री); मोठ्या प्रमाणांत नव्हे अशी (विक्री). ५ विस्तीर्ण, अघळपघळ (जमीन, क्षेत्र, इ०). **टीप,**–कुडताळ म्ह० आकुंचित. मागें ' कुडताळ ' पहा.

फडा [**सं०** फटा] **स्त्री०** सापाच्या कंठाच्या वरचा दशांकचिन्हित भाग,–पसरलेल्या स्थितींत. **स्त्री०, पु०** १ निवडुंगाचे सर्पाच्या फडेसारखे जे अवयव ते प्रत्येक. २ अनेक अवयव ज्याला फुटले आहेत असा आलें, हळद, वेखंड, इ० चा कंद. **पु०** शिंदी इ० ची झावळी किं० त्या झावळीचा केरसुणी करण्याच्या उपयोगाचा तुकडा.

फडाका पु० १ पक्ष्याच्या पंखाचा, गलबतांच्या अवजाराचा, निशाणाच्या चिरगुटाचा, वस्त्राच्या सोग्याचा फडफड असा आवाज. २ पावसाची जोराची सर. ३ शिव्यांचा वर्षाव.

फडी [**म०** फडा] **स्त्री०** सापाची फणा.❀ **फडी फेंदारणें** १ सापानें आपली फणा विस्तीर्ण करणें. २ कोणेकाकडे टवकारून पाहणें.

फडें न० गोफणीस किं० गलोलीस मध्यें खडा ठेवण्यासाठीं सर्पाच्या फणेसारखा विणलेला भाग असतो तो.

फड्डी, फड्डी कवडी स्त्री० १ (कवड्यांच्या खेळांत) पालथी पडलेली कवडी. उताण्या कवडीला ' चितकवडी ' म्हणतात. २ शेवटचा खेळणारा.

फड्या [**हिं०**] **पु०** किरकोळीनें धान्य विकणारा.

फड्या, फड्या निवडुंग पु० ज्याला फडे असतात अशा जातीचा निवडुंग.

फण पु० १ शेतकीचें एक आउत. २ नांगराचा एक अवयवविशेष. ३ सापाचा फणा; ह्या अर्थीं **न०** सुद्धां.

फणका, फणकारा पु० १ विंचवाच्या नांगीचा तडाका (मारणें) किं० तेणेंकरून एकदम उठणारी वेदना. २ तिखट पदार्थाचा जीभ, गाल, घसा, यांना बसतो तो चरका. ३ रागाची लहर. ४ तापानें अंगाची होते ती लाही किं० आग.

फणकावणें [**म०** फणका] **स० क्रि०** विंचवानें नांगी मारणें.

फणकूट [**म०** फणी] **न०** केश विंचरावयाची फणी (तुच्छतेनें).

फणगडा पु० १ कंद, झाड, इ० ना फुटणारा अंकुर (फुटणें). २ कामामध्यें कांहीं हरकत काढून त्या कामाला वेगळें वळण लावणें (फोडणें).

३ चालल्लेल्या कामांत आणलेलें विघ्न (फोडणें).

फणणें स० क्रि० फण नांवाचें आऊत (शेतावर) चालविणें.

फणफणणें अ० क्रि० रागानें किं० तापानें (शरीर) खूप तापणें.

फणशा वि० तल्लख; चुणचुणीत.

फणशी स्त्री० फणसासारखें एक जंगली झाड.

फणस [**सं०** पनस] **पु०** एक फळ किं० त्याचें झाड. ꙮ **फणसट न०** फणसाचें फळ, फणस (निंदेंत). **फणसपोळी स्त्री०** फणसाचे गरे ठेचून ते ताट इ० मध्यें पसरून वाळवून करतात तें खाद्य. **फणसंबें, फणसांबें न०, फणसांबा पु०** फणसाच्या कित्येक झाडांच्या खोडावर जी टणक गोट्यासारखी वाढ उत्पन्न होते ती. फणसांबा उगाळून तोंड आलें असतां लावितात.

फणा [**सं०**] **स्त्री०** १ सापाचा कंठाच्या पुढचा पसरलेला भाग. २ आलें, वेखंड, हळद, इ० चे अनेक अवयव फुटलेले जमिनिच्या पोटांतील भाग. ३ केळवंडीच्या दांड्याला जे अनेक घड असतात ते प्रत्येक. ४ गुऱ्हाळांत काहिलींत कढत असलेल्या गुळाची मळी काढण्याचें आउत.

फणाणणें अ० क्रि० तापानें किं० रागानें तप्त होणें.

फणी [**सं०** फणा] **स्त्री०** १ केश विंचरण्याचें एक साधनविशेष. २ वस्त्र विणतेसमयीं आडवे तंतु ठासून बसवावयाच्या उपयोगाचें एक साधनविशेष. ३ सर्पाचा फणा; फडा.

फणी [**सं०** फणिन्] **पु०** १ ज्याला फणा आहे असा सर्प. २ राहु. ३ पतंजलि,–महाभाष्यकार. ꙮ **फणिपाल, फणीन्द्र, फणीश्वर पु०** शेष किं० अनन्त हा सर्प,–जो पृथ्वी मस्तकावर धारण करतो.

फणेरें, फण्यारें [**म०** फणी] **न०** फणी, कुंकवाचा करंडा, काजळाची डबी, इ० सामान ठेवण्याची स्त्रियांची पेटी, पिशवी, इ०.

फणोले पु० अ० व० खीर करावयासाठीं गव्हाच्या रव्याचे करतात ते तुकडे.

फण्णा पु० फडशा; नासाडी(उडणें,उडविणें).

फण्या पु० अरकस कामांत अर्धवट चिरल्लेल्या तक्त्यांच्या फटींत ठोकतात ती पट्टी.

फण्या वि० निवडुंगाची एक जात. वर ' फड्या ' पहा.

फतकल, फतकण स्त्री० जमिनिवर ढुंगण टेकून लांबरुंद घातलेली मांडी (मारणें, घालून बसणें).

फतमाय स्त्री० लठ्ठ आणि ठेंगणी स्त्री (निंदेंत).

फतरडा, फताडा वि० जाडी आणि रुंद (निवडुंग, शेंग, शिंग, तोंड, इ०).

फतुला पु० नपुंसक; षंढ. ꙮ **फतुलाई स्त्री०** षंढपणा; नपुंसकपणा.

फते, फत्ते [**अ०** फतअ] **स्त्री०** विजय; कार्यसिद्धि. **वि०** सिद्धीस गेलेलें (काम, युक्ति). ꙮ **तें काम फत्ते करून ये** त्या कामांत यश मिळवून ये. **फतेलष्कर, फत्तेलष्कर न०** १ लठ्ठ थिलथिलीत आणि अशक्त माणूस, पशु, इ०.२ ज्याचें काम सदा शेवटास जातें असा मनुष्य. **फत्याबुरुज पु०** किल्ल्याचा सर्वांत मोठा बुरुज.

फतेमारी, फत्तेमारी [**हिं०** पातेमारी]**स्त्री०** एक प्रकारचें गलबत.

फत्तर [**सं०** प्रस्तर] **पु०** १ दगड; धोंडा. २ (**लाक्षणिक**) मूर्ख अडाणी माणूस. ꙮ **फत्तरपूजा स्त्री०** १ एकमेकांस दगड मारून केलेली मारामारी. २ कोणेकास दगड मारणें. **फत्तरफोड वि०** करावयास कठिण किं० कष्टदायक(काम). **स्त्री०** कठिण आणि त्रासदायक काम.

फत्ते, फत्तेमारी, फत्तेलष्कर वर ' फते, ' ' फतेमारी, ' ' फतेलष्कर ' पहा.

फत्या स्त्री० विजय; कार्यसिद्धि. वर ' फत्ते ' [पहा.

फत्या पु० किल्ल्याच्या तटावर गस्तीबरोबर एका चौकीवरून दुसऱ्या चौकीवर, दुसऱ्या चौकीवरून तिसऱ्या चौकीवर, पोचवावयाचा सोटा,–सर्व पहारेकरी जागे आहेत अशी खात्री करून घेण्यासाठीं.

फंद [**हिं०**] **पु०** १ बंड. २ रांडबाजी, जुगार, तमाशे पहाणें, इ० जे असभ्य आणि अशिष्ट नाद ते व्यक्तिशः किं०समुच्चयानें.३अयोग्य,

हानिकारक, किं० न झेपणारें कोणतेंही काम; उ० तुम्ही इतःपर सावकारीचे फंदांत पडूं नका, तुम्हाला ठोकर बसेल. ※ **फंदछंद, छंदफंद पु० अ० व०** भलभलत्या गोष्टी; अयोग्य नाद किं० कृत्यें. **फंदफितूर पु०,फंदफितूरी,फंदकुरई स्त्री०** देशद्रोह, विश्वासघात, इ० नीचपणाचीं कृत्यें.

फंदी वि० १ नादिष्ट. २ व्यसनासक्त. ३ दुष्ट; खोडसाळ. ४ देशद्रोह, विश्वासघात, इ०करणारा.

फंदीफाकडा वि० नटवा; छाकटा; नखरबाज.

फदूल वि० लठ्ठ, फोफशा, थिलथिलीत.

फद्या पु० एक पैसा (मुंबईचा शब्द).

फन न० नांगराच्या फाळाचें टोंक.

फनगडा पु० झाडाच्या फांदीचें किं०काठीचें दुत्रेळकें.

फना, फन्ना [अ०] **पु०** (पदार्थाचा) फडशा, समाप्ति, संपणें, खर्च केलें जाणें (उडणें, उडविणें).

फन्न पु०, स्त्री० तीन फण्यांची पाभर. मागें 'तिंफण' पहा.

फपोला वि० लठ्ठ, थिलथिलीत.

फर स्त्री० बाहूच्या किं० तंगडीच्या मूलप्रदेशाच्या संधीस रुंदट असें हाड असतें तें.

फरक [अ० फर्क्] **पु०** अंतर; भेद; भिन्नता. **क्रि० वि०** अंतरावर; अंतरा अंतरानें; मध्यें मध्यें रिकामी जागा सोडून. ※ **फरक होणें** दूर दूर सरणें; अंतर सोडून किं० विरळपणानें बसणें. **फरक करणें** गर्दी मोडणें.

फरकटणें अ० क्रि० ढुंगणानें जमीनीवर सरकणे. **स०क्रि०**(कांहीं काम)घाईनें किं०निष्काळजीपणानें करणें किं० संपवून टाकणें.

फरकटा (–डा) खालीं ' फरगडा ' पहा.

फरकंड स्त्री०पदार्थ जमीनीवरून सरकत गेल्यानें किं० सरकविल्यानें जमीनीवर जो मार्ग उमटतो तो.

फरकंडा पु० १ वस्त्राची चिंधी किं० वाभाडा. २ कामाची गुंतागुंत किं० घोंटाळा. ३ कुंठितपणाची स्थिति (घालणें, पडणें, पाडणें).४ पदार्थ जमीनीवरून ओढीत नेल्यानें किं०साप इ०सरकत गेल्यानें जमीनीवर उठतो तो मार्ग (पडणें).

फरकणें [**म०** फरक] **अ० क्रि०** १ दूर होणें किं० दूर सरकणें; ऐसपैस होणें.२फर असा आवाज करून सरकणें. ३ स्थळविशेषीं येणें किं० जाणें; फिरकणें; (अकरणरूपी प्रयोग); उ० मी रामभ्या पटवर्धनाच्या घराकडे आज तीन महिन्यांत फरकलों (किं० फिरकलों) नाहीं.

फरक्न्, फरकर, फरदिनीं, फरदिशीं क्रि० वि० फर असा आवाज करून वेगानें (फाडणें, फाटणें, ओढणें, इ०).

फरकाविणें स० क्रि० झोकदार रीतीनें किं० नखरेबाजीनें (कपडे, दागिने) धारण करणें.

फरगडा, फरकटा, फरगाडा पु०१लिहिण्यांतील फराटे किं० ऐटीनें काढलेल्या रेघा किं० वळसे प्रत्येक (ओढणें). २ बोलण्यांतील पोरकट कोट्या.३ शुष्क हरकती(फोडणें, काढणें). **टीप,–** ह्या दुसऱ्या दोन अर्थीं **अ० व०** प्रयोग होतो.

फरगाद [**इंग्रजी** फ्रिगेट्] **न०** एक प्रकारचें गलबत.

फरगूट न० वस्त्राचा वाभाडा; चिंधी.

फरडा वि० तल्लख आणि हुशार (लिहिणारा, कारकून).

फरडूक, फरडूकें न० १ भाषणांत योजावयाजोग्या कोट्या, म्हणी, गोष्टी, दाखले, इ० प्रत्येक. २ भाषणांत प्रसंगानें सांगितलेली उपकथा. ※ **फरडुक्या वि०**भाषणांत फरडुकें योजण्यांत पटाईत.

फरतळ, फरताळ, फरतार न० वर ' फडताळ ' पहा.

फरद [**अ०** फर्द्] **पु०** १ धोतरजोडा,शालजोडी, इ०च्या जोडीच्या दोन भागांपैकीं एक.२ २ गोठ, पाटल्या, बांगड्या, इ०च्या जोडींतील किं० चौकडींतिल एक एक नग. ३ कागदावर लिहिलेली यादी; चिठ्ठी. ※ **फरद खजूर पु०** खजुराची एक जात. हा खजूर लहान असतो.

फरदा [**अ०** फर्द्=एक, एकेरी] **पु०** १ तक्ता. २ दाराचें किं० खिडकीचें एक पान म्ह० उजवीकडची किं० डावीकडची फळी.

फरपट स्त्री० १कोणेकाचा हात,तंगडी,धोतर, इ० धरून त्याला जमीनीवरून ओढीत नेण्याची क्रिया (करणें). २ जमीनीवरून पदार्थ सरकत

गेल्यानें किं० नेल्यानें जमीनिवर उमटतो तो मार्ग; उ० सापाची फरफट. ३मागपासून चालत आलेली सरणी, परिपाठ, किं० रूढि. ❀ **कोणेकाची फरपट काढणें** त्याला जमीनीवरून फरांफरां ओढीत नेणें.

फरपटणें अ० क्रि० जमिनीवरून पोटानें किं० ढुंगणानें सरकत जाणें.

फरमान, फरमाना [**फा०** फरमान्] **पु०** राजाचा किं० कोणा अधिकाऱ्याचा हुकूम.

फरमाविणें [**म०** फरमान; **फा०** फर्मान्] (कोणेकाला) अमुक कर असा कोणा अधिकाऱ्यानें हुकूम करणें.

फरमाशी वि० खालीं ' फरमास ' मध्यें पहा.

फरमास [**फा०** फरमायिष्]**पु०** १कोणेकाला सांगितलेलें काम. २ वरिष्ठाला दिलेला नजराणा. ❀ **फरमाशी (–स्री) वि०**१ दिलेल्या सूचनांप्रमाणें केलेलें किं० पार पाडलेलें (काम, कारागिरीचा पदार्थ, इ०). २ उत्कृष्ट.**फरमाशी मार पु०** खूप मार; कोणेकाला सडकून दिलेला चोप.

फरामिंदा पुढें ' फामिंदा 'पहा.

फरश, फरस [**सं०** परशु] **पु०** कुऱ्हाड.

फरशी [**सं०** परशु] **स्री०** १ कुऱ्हाड. २ सुताराचें पटाशीं हें हत्यार.

फरशी [**सं०** परशु] **वि०** कुऱ्हाडीच्या चिन्हानें युक्त असें असें (नाणें,–रुपाया, इ०).

फरस पु०, फरशी स्री० [**अ०** फर्ष्] दगडाच्या चिऱ्यांची जमीन. ❀ **फरसबंदी वि०** दगडाचे चिरे चुन्यांत कळाशीनें बसवून केलेली (जमीन).**स्री०** अशी जमीन.

फरळ न० नाचणी, हरीक, इ० धान्यांचें टरफल किं० कोंडा.

फरा पु० १ तंगडीच्या मूलप्रदेशाच्या संधीस असतें तें रुंदट हाड. २ बाहूच्या मूलप्रदेशीं असेंच असतें तें हाड. ३ जनावराच्या पायाचें असेंच असतें तें हाड. ४ मनुष्यें, घोडीं, इ० ची पंक्ति, ओळ, किं० रांग. ५ धान्याचें विशिष्ट माप किं० परिमाण (सोळा किं० बारा पायल्या). ६ कपाळावर कुंकुमादिकांचा घाईघाईनें ओढलेला पट्टा.

फराकी स्री० खोगिराचा स्वाराच्या मांडीजवळचा भाग.

फराट पु० जमीनींत बिजें पेरल्यावर जमीन सारखी करण्याचें एक आउत.

फरांटा पु० मागें ' फरगडा ' पहा.

फराफर, फरांफरां, फरारां क्रि० वि० फर् फर् असा आवाज होईल अशा रीतीनें.

फरारा पु० १ध्वज, पताका,निशाण, इ०च्या काठीच्या टोकाला लाविलेलें वस्त्र. २ धोतर, लुगडें, इ०चा सोगा.

फरारी [**अ०** फरार्] **वि०** पळून गेलेला, नाहींसा झालेला (चोर, गुन्हेगार).

फराशीस [**फ्रेंच** फ्रांस्वा, फ्रांसे] **पु०** फ्रान्सचा राहिवाशी.

फरास, फराशी [**अ०** फराष्] **पु०** बड्या माणसाच्या घरांतील सतरंज्या झाडणारा, त्याच्या प्रवासांत त्याचे तंबू ठोकणारा,सामानासुमानावरची धूळ पुसून काढणारा नोकर. ❀ **मुडदेफरास पु०** मनुष्यांचीं प्रेतें धार्मिक कृत्य म्हणून किं० पैसे घेऊन श्मशानांत वाहून नेणारा. **फरासखाना पु०** बड्या माणसाचे तंबू, राहुट्या, इ० समुच्चयानें किं० ती ठेवण्यांची जागा.

फराळ [**सं०** फलाहार] **पु०** १ फळें खाऊन केलेला उपास. २ अल्प भोजन. ३ (**लक्षणेनें**) वाचतांना किं० लिहितांना शब्द वगळणें.

फरी स्री० १ धान्याचें एक विशिष्ट माप किं० परिमाण. २ तालमींतील एक आउत.

फरीद [**अ०** फर्द्=एकटा, एकेरी] **पु०** १ सडा माणूस; ज्याला बायको, मुलें, इ० खटलें नाहीं तो मनुष्य. २ पहाऱ्याच्या कामावरून मोकळा झालेला शिपायी किं० पहारेकरी.

फरें न० मांडीचें किं० दंडाचें हाड. मागें ' फरा ' पहा.

फरोक्त [**फा०** फरूख्त्] **वि०** विकलेला. ❀ **फरोक्तखत, फरोक्तपत्र न०** पदार्थ विकल्याचा कागद; खरेदीपत्रक.

फरोड पु० काम, कारभार, इ० चा पसारा.

फर्जी [**फा०**] **पु०** १ राजाचा मुख्य

प्रधान. २ (बुद्धिबळांच्या खेळांत) वजीर.

फर्द, फर्दा, फर्मान इ० मागें ' फरद, ' ' फरदा, ' ' फरमान ' इ० पहा.

फर्याद, फर्यादी पुढें ' फिर्याद, ' ' फिर्यादी ' पहा.

फल, फळ [**सं०** फल] **न०** १ झाडाची पूर्ण वाढ झाल्यावर त्यापासून फुलानंतर जो उद्भव होतो तो. २ पीक; धान्य. ३ परिणाम; शेवट. ४ उपयोग; फायदा. ५ नफा; लाभ. ६ (सावकारांत) व्याज. ७ संतति; कुटुंबविस्तार. ८ बाणाचें टोक. ९ सुताराच्या सामत्याचें पोलादी टोक. १० वृषणांतील गोटी. ११ **(गणित)** विस्तार; उ० घनफळ, क्षेत्रफळ, इ०. १२ (**गणित**) त्रैराशिकांत प्रमाण आणि इच्छा या राशींहून विजातीय जो तृतीय राशि तो. १३ कृतकर्माचा परिपाक जो भोगास येतो तो. १४ शस्त्राचें पातें. १५ वर्तुळाच्या क्षेत्राचें परिमाण. १६ नांगराचा फाळ. ॐ **फलागम पु०** शरदृतु. **फलोदय पु०** १ कार्याची सिद्धि; फलप्राप्ति. २ नफा; लाभ. **फलाहार पु०** फराळ. **फळकोश पु०** वृषणावरचें कातडें. **फलग्रंथ पु०** ज्योतिषशास्त्रामध्यें शकुन, मुहूर्त, प्रश्न, इ०चीं शुभाशुभ फळें ज्यामध्यें सांगितलेलीं असतात असा ग्रंथ. **फलत्यागी वि०** १ इष्ट हेतु साध्य होण्याचा समय प्राप्त झाला असतां तें इष्टफळ छांदिष्टपणाच्या लहरीनें किं० बुद्धिभ्रंशामुळें टाकून देणारा. २ दैवयोगानें जो फळास अंतरतो तो. **फलभोग्य वि०** फलद्वारा ज्याचा उपयोग घडतो अशी (वृत्ति, जमीन, इ०). **फलश्रुति स्त्री०** व्रत, स्तोत्र, यज्ञादि कर्म, इ० विषयक जो ग्रंथ त्याच्या ज्या विभागांत तें व्रत, स्तोत्र, यज्ञ, इ० काचीं फळें सांगितलेलीं असतात तो विभाग. **फलप्रदान न०** वाङ्निश्चयाच्या वेळीं वराचा बाप वधूच्या ओटींत नारळ घालतो तो विधि. **फलज्योतिष न०** कोणेकाच्या जन्मकुंडली इ० वरून त्याच्या आयुष्यांतील भूत आणि भविष्य गोष्टी सांगण्याचें कल्पित शास्त्र. **फलद, फलप्रद वि०** इष्ट फळ मिळवून देणारा; इष्ट हेतु सिद्धीस नेणारा. **फलन्यास पु०** कोणत्याही प्रकारच्या लाभाची इच्छा किं० आशा न बाळगतां कांहीं कर्म करणें. याच्या उलट ' फलवांच्छा ' म्ह० फळाची इच्छा किं० आशा. **फलवान् वि०** फल देणारा. **फलक्षम वि०** लाभदायक. **फलाकांक्षी वि०** फलाची इच्छा करणारा. **फलाफल पाहून क्रि० वि०** सारासार विचार करून; दूरवर दृष्टि फेकून.

फलकट, फोलकट [**म०** फोल; **सं०**फल्गु] **न०** धान्याचा पोकळ दाणा. **वि०** वायफळ.

फलकाविणें मागें ' फरकाविणें ' पहा.

फलंग, फलांग [**हिं०**] **स्त्री०** १ टांग; ढांग. २ उडी.

फलद्रूप [**सं०**] **वि०** ज्याणें फळ दिलें आहे असा; इष्ट हेतु सिद्धीस नेणारा.

फलफिलाल [**अ०** फेऽलइाल] **क्रि० वि०** तावडतोब; आतांच्या आतां.

फलम, फल्लम पु० सुमारें तीन रुपये किमतीचें प्राचीन काळचें एक सोन्याचें नाणें. ॐ **फलमाची माळ स्त्री०** अशीं नाणीं गुंफून गळ्यांत घालावयासाठीं केलेलें भूषण.

फलवा [**हिं०**] **पु०** एक औषधोपयोगी वनस्पति.

फलाणाबिस्ताण [**फा०** फलानाह] **न०** अरबटचरबट; सटरफटर; कांहीं तरी.

फलाणा [**फा०** फलानाह] **वि०** अमका; कोणी एक; अमुक एक. ॐ **फलाणा बिस्ताणा वि०** अमुकतमुक.

फलित [**सं०**] **वि०** १ फळें ज्याला आलीं आहेत असा. २ सिद्धीस गेलेला. ३ निष्पन्न. **न०** ध्वनितार्थ.

फल्गु [**सं०**] **वि०** १ निःसत्त्व; असार. २ क्षुल्लक; कुचकामाचें. ३ असत्य. ४ निरर्थक. ॐ **फल्गूत्सव पु०** शिमगा हा सण.

फल्लम मागें ' फलम ' पहा.

फवारा पु० १ हंजारीं कारंजा किं० त्याचें बोंड किं० त्यांतून उडणारें पाणी. २ शरीरावर घेतात ती पाण्याची वाफ.

फशाळा [**म०** फसणें] **वि०** फसलेला; ज्याला कोणी ठकविलें आहे असा.

फशाळी [**म०** फसणें] **स्त्री०** ठकणूक; फसणूक; फसलेपणाची स्थिति (करणें, होणें).

फशीं [म० ' फसणें ' पासून फस म्ह० फसलेपणाची स्थिति] **क्रि० वि०** फसलेपणाच्या स्थितींत (पडणें, पाडणें).

फसकटणें, फसकणें, फिसकटणें अ० क्रि० आरंभिलेलें कार्य, योजलेली मसलत, ठरविलेला विचार, सिद्धीस न जातां निष्फळ होणें.

फसकल [**हिं०**] **स्त्री०** लांबरुंद घातलेली मांडी (घालणें, घालून बसणें, मारणें, इ०).

फसकळ वि० मऊ, भुसभुशीत, चिखलट (जागा,–जिवरून चालतांना पावलें रुततात).

फसकी [**म०** पसा] **स्त्री०** १ पसाभर धान्य, भाजीपाला, इ०,–जें सरकारी कामगार दुकानदारांपासून हक्क म्हणून घेतात तें. २ सणाच्या किं० कांहीं कार्याच्या प्रसंगीं विद्यार्थी आपल्या गुरूजीला देतात ती पसाभर धान्यादींचीं भेट. ३ श्रावणे सोमवारीं किं० प्रत्येक सोमवारीं शिवाला वाहातात ती तांदुळाची मूठ.

फसगत [**म०** फसणें+गति] **स्त्री०** फसलेपणाची स्थिति; फशीं पडणें.

फसगपत, फसगयबत [**म०** फसणें; **अ०** गफ्लत्; पसगय्‌बत] **स्त्री०** वर ' फसगत ' पहा.

फसण [**म०** फसणें] **स्त्री०** १ दलदलीची जागा. २ फसविलेपणाची स्थिति. ३ लबाडीनें कोणेकाला फसविण्याची हिंकमत. ४ दिसण्यांत फायदेशीर पण परिणामीं हानिकारक असा व्यवहार, काम, कारभार, इ०.

फसणूक, फसणी [**म०** फसणें] **स्त्री०** गुंतून पडणें; फसलेपणाची स्थिति.

फसणें अ० क्रि० १ अनपेक्षित परिणाम घडल्यामुळें इष्ट हेतु सिद्धीस न गेल्याच्या स्थितींत किं० अडचणींत पडणें; ठकणें; ठकविलें जाणें. २ (कर्जाऊ दिलेला पैसा) बुडणें. ३ (मसलत, युक्ति, योजना, इ०) फलद्रूप न होणें. ४ दलदलीच्या जागेत रुतणें.

फसफशीत वि०ज्यांत स्निग्धपणा, ओलावा, किं०मऊपणा,नाहीं असें (पीठ,माती, रेती, तपकीर, इ०).२ फारच पातळ(चिखल, पीठ, इ०).

फसमामला [**म०** फसणें+मामला] **पु०** ज्यांत बूड लागावयाचीच किं०हानि व्हावयाचीच असें काम, कारभार, व्यापार, इ०.

फसल [**अ०** फस्ल] **स्त्री०**१ हंगाम; हंगामाचा समय. २ जनावरें,मुलें,इ०ना देतात तें पुष्टिकारक खाद्य. ꕥ **फसल हंगाम पु०** पिकें काढण्याचा समय.**फसलीसाल,फसली सन न०**एका शकाचें नांव. हें भिन्न प्रान्तांत भिन्न समयांपासून मोजलें जातें.

फसवणी, फसवणूक [**म०** फसविणें] **स्त्री०** १ दुसऱ्याला फसविणें; ठकबाजी. २फसलेपणाची स्थिति.

फसविणें [**म०** ' फसणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** (कोणेकाला) ठकविणें. [करणारा.

फसव्या[**म०**फसविणें]**वि०** लुच्चा;भामटेगिरी

फसाद इ० पुढें ' फिसाद ' इ० पहा.

फसाव [**म०** फसणें] **पु०** १ दलदलीची जागा. २ दिसण्यांत फायदेशीर पण परिणामीं हानिकारक असा व्यापार,व्यवहार, इ०.

फसावा [**म०** फसणें] **पु०**फसविलें गेल्याची स्थिति.

फसाविणें ' फसविणें ' पहा.

फस्त [**फा०** पस्त्=खालीं] **वि०** १उध्वस्त; छिन्नभिन्न. २ समाप्त केलेला. ३खाऊन टाकलेला.

फळ न०१मागें ' फल ' पहा.२ पिठाचा करतात तो एक भक्ष्य पदार्थ. ꕥ **फळास येणें** १ फायदेशीर होणें किं० होऊं लागणें. २ नवसानें जें इच्छिलें तें प्राप्त होणें. ३केलेल्या श्रमाचें चीज होऊं लागणें. **पडत्या फळाची आज्ञा स्त्री०** आपणाला आवडणारी गोष्ट करावयाला कोणी सांगितल्यास ती ताबडतोब करून टाकावी,–न जाणों, त्या आज्ञेला कदाचित् नियंत्रणा घातल्या जातील किं० ती आज्ञा रद्द केली जाईल. **फळफळावळ, फळावळ स्त्री०** अनेक प्रकारचीं फळें समुच्चयानें. **फळभाजी स्त्री०** फळाची भाजी,– भोपळा, दोडका, कारलीं,इ०. याच्या उलट मेथी अंबाडी,चाकवत,इ०पालेभाजी.**फळशोभन,फळेंशोभन न०** गर्भाधान संस्कार.

फळकट [**म०** फोल्कट] **वि०** १ हलकें; निःसत्त्व. २ अव्यवस्थितपणाचें; अजागळपणाचें (काम, वर्तन). ३ निष्काळजीपणानें धारण केलेला (पोशाख).

फळकट [**सं०** फल] **न०** फळी (तुच्छतेनें).

फळकट, फळकर [**म०** फळणें] **वि०** फळावयाचे योग्यतेस आलेली(गाय, म्हैस, इ०).

फळकवणी न० वेचव आणि पातळ असा खाद्य किं० पेय पदार्थ.

फळण [**म०** फळणें] **न०** गाय, म्हैस,इ०चा फळावयाचा समय.

फळणें [**सं०** फळ] **अ० क्रि०** १गाय,म्हैस, इ०पशूनीं बैल,रेडा, इ०शीं संगत होऊन गर्भयुक्त होणें;गाभण होणें.२फलद्रूप होणें;फल देऊं लागणें; सफल होणें; उ० तुमचा आशीर्वाद फळला. ३ अनिष्ट परिणाम भोगास येणें. ४ फायदेशीर किं० लाभदायक होणें.

फळणावळ [**म०** फळणें] **स्त्री०** गाय,म्हैस, इ०ना फळविण्यासाठीं बैल, रेडा, इ०च्या मालकांस द्यावें लागतें तें द्रव्य.

फळणें स० क्रि० (दार, खिडकी, इ०) झाकणें किं० बंद करणें. [ताड.

फळताड पु० फळ देणारें ताडाचें झाड; स्त्री-

फळफळणें अ० क्रि० १ फळफळ आवाज करून जनावरानें मुतणें, किं० पाणी, रक्त, इ० वाहणें. २ (कोणेकाचें नशीब) उदयास येणें. ३ (फाटकें पोतें, पिशवी, इ० नीं भोकातून)आंतील पदार्थ बाहेर सोडणें.

फळफळीत वि० १ फारच मोकळीं आहेत शितें ज्यांतील असा (भात). २ मऊ झाली नाहीं डाळ ज्यांतील अशी(भाजींतील डाळ,कडवे, इ०, किं० उसळ इ०).

फळवला, फळोला पु० क वर्ग, च वर्ग, ट वर्ग, त वर्ग, आणि प वर्ग, हे वर्णमालेंतील पांच वर्ग.

फळविणें [**म०** ' फळणें ' चें प्रयोजक]**स० क्रि०** १ गर्भयुक्त करणें. २ (दार, खिडकी) झाकणें किं० बंद करणें.

फळा [**सं०** फल] **पु०** १ नांगराचा फाळ. २ मोठा तक्ता. ३ शाळेंत खडूनें ज्यावर लिहितात तो तक्ता.

फळाटी, पळाटी, पल्हाटी स्त्री०कापशीच्या वाळलेल्या काटक्या.

फळार, फळाहार मागें ' फलाहार ' पहा.

फळी [**सं०** फल] **स्त्री०** १ लहान तक्ता; लाकडाचा चौरस तुकडा किं० पट्टी. २ दाराचें एक पान,—उजवीकडचें किं० डावीकडचें. ३ कट, तट, जूट, पक्ष, (राजकीय, सामाजिक, धार्मिक, इ० बाबतींत पडलेला). ४माणसें,जनावरें, इ०ची दाटी किं० गर्दी.

फळें [**सं०** फळ] **न०** १ बाण, नांगर, इ० चें टोक. २ विहिरीच्या भिंतीच्या खालीं जी चौकट बसवितात तिचीं चार लाकडें प्रत्येक. ३ फळीला दोऱ्या बांधून केलेला झोपाळा.४लाकडाचा ओबड धोबड तक्ता. ꣸ **एकाद्याचें फळें पडणें** त्याला पिशाचबाधा होऊन तो निश्चेष्ट पडणें.

फळेशोभन न० वर ' फळशोभन ' पहा.

फळोला पु० वर ' फळवला ' पहा.

फाक,फांक [**हिं०**] **स्त्री०** १ आंबा, कलिंगड, भोपळा, इ० ची कापलेली किं० चिरलेली फोड. २ शिमग्याच्या सणांत बोंब मारावयाचे पूर्वीं कोणेकाच्या नांवाचा ज्या बभित्स वाक्यानें पोरें उच्चार करतात तें वाक्य. **न०** फुरसें,घोणस,इ०च्या अंगावरील जे डाग ते प्रत्येक.

फाकट, फाटक [**म०** फाकणें, फाकटणें] **न०** आवार, बाग, परसू, इ०चें फारसें बळकट नव्हे असें दार. **वि०** वाकडे (पाय,शिंगें,फांद्या, रस्ता, इ०).

फाकटणें, फांकटणें,फाकाटणें [**म०** 'फाकणें' चें एक रूप] **स० क्रि०** १ दोन पावलांत पुष्कळ अंतर पडेल अशा रीतीनें तंगड्या एकमेकांपासून दूर करणें, ठेवणें, इ०.२ चिमटा,कातरी,इ०च्या दोन अवयवांत पुष्कळ अंतर पडेल अशा प्रकारें ते उघडणें. **अ० क्रि०** झाडाच्या फांद्या, गुरांचीं शिंगें, इ० एकमेकांपासून दूर दूर उगवलेली किं० वळलेला किं० वाढलेलीं असणें.

फाकटी [**म०** फाकटणें] **स्त्री०** तंगड्या, शिंगें, फांद्या, इ०ची फाकटलेपणाची स्थिति.

फाकड [**म०** फाकणें] **न०** वितंडवादांत काढलेली कुत्सित हरकत किं०अडथळा; खोडसाळपणानें कोणेकाविरुद्ध काढलेली कोटी किं० हरकत.꣸**फाकडपसारा, फापटपसारा पु०**कामाचा किं० पदार्थांचा अव्यवस्थितपणाचा पसारा.

फाकडा, फांकडा [**हिं०**] **वि०** १ हुशार, तल्लख (माणूस). २ झोकदार(पोशाख इ०).

फाकडी [**म०** फाकडा] **वि०** हेकेखोर; हेकट; आडमुठा (माणूस किं० त्याचें भाषण).

फाकणें, फांकणें स० क्रि० १ दूर करणें; दूरवर किं० अंतरावर टाकणें,लोटणें, किं०पसरणें. २(पोहे, चुरमुरे, इ०चे) घास घेणें किं० तोंडांत टाकणें. ३ (भोपळा, पेरू, इ०च्या) फाकी करणें. **अ०क्रि०**१दूर होणें, जाणें, किं०सरणें; विरळ होणें (जमलेलीं माणसें, गुरेंढोरें,इ०.) २ दूरच्या पल्ल्यावर किं० परिणामावर (दृष्टि) जाणें. ३ (बुद्धि) प्रगल्भ होणें किं० सारासार विचार करावयाला समर्थ होणें. ४(एके ठिकाणीं गोठून बसलेलें रक्त) पसरणें.

फाकरूट, फांकरूट न० १ गद्यरूप प्रबंध किं० निबंध. २ सूर्य किं० चंद्र यांच्या भोंवतीं पडतें तें खळें.

फाकळी, फांकळी [**म०** फांक] **स्त्री०** १ भोपळा, कारलें, आंबा, इ०चा कापलेला किं० चिरलेला तुकडा. २ लाकडाची पट्टी.

फाका, फांका [**हिं०** फांका] **पु०** १ पोहे, लाह्यापिठ, चुरमुरे, इ० चा तोंडांत टाकलेला घास (मारणें). २ उपास; खावयाला कांहीं मिळालें नाहीं अशी स्थिति; अपेक्षित खाद्य न मिळणें (पडणें). **वि०** लाभरहित; फुकट; उ० नित्य विक्री होते असें नव्हे,एकादा दिवस फाका जातो. ꙮ **फाकेबाज वि०** उपास पडले तरी बेहेत्तर पण ताठा न सोडणारा.

फाकाटणें मागें ' फाकटणें ' पहा.

फांकाफांक [**म०** फांकणें]**स्त्री०**एकेठिकाणीं जमलेल्या माणसें, गुरें, इ०चें भिन्न भिन्न ठिकाणीं निघून जाणें.

फाकी [**सं०** फक्किका] **स्त्री०** १ मागें ' फक्किका ' पहा. २ वाघ, साप, मांजर, इ०च्या अंगांवरचे पट्टे प्रत्येक. ह्या अर्थी ' फांक ' सुद्धां.

फाग पु० १ शिमग्यामध्यें वेश्यादि स्त्रिया जीं कृष्णाच्या लीलांचीं गाणीं गातात तीं प्रत्येक. २ शिमग्यांत बोंब मारावयाच्या पूर्वी पोरें जें बभित्स वाक्य उच्चारतात तें.ꙮ **फागपट्टी स्त्री०** शिमग्यांत गोवऱ्या, लाकडें,गुलाल, नर्तकी स्त्रिया, तमासगीर, इ० बद्दलचा खर्च भागविण्यासाठीं आळीकर किं० गांवकरी इ०वर बसवितात ती वर्गणी.

फांगळा पु० पदार्थ, माणसें, गुरें, इ०चा अस्ताव्यस्त स्थिति (पडणें पाडणें).

फागोटा पु० पोफळाचें कवच.

फांज, फांजी स्त्री० एक पालेभाजी.

फांज, फांद स्त्री० तट; गांवाभोंवतालची किं० आवाराभोंवतालची भिंत.

फांजणें स० क्रि० १ चिरणें; फाडणें. २ (मशाल) अधिक तेजस्वी करण्यासाठीं (तिचें डोकें) उकरणें किं० खरवडणें. ३ (नांगरलेल्या शेतांत) बीजें पेरावयाच्या अगोदर (त्याच्यावर) तिफण हें आउत फिरविणें.४ (खोगीर)दोऱ्याच्या वेलबुट्टीनें सुशोभित करणें. ५ पाजण किं० पेज लावून (ताण्याचीं) सुतें माखणें.

फांजणें, फांदणें अ० क्रि० (घोडा, हरिण, इ० नीं) उडी मारणें किं० उड्डाण करणें.

फांजी स्त्री० अडथळा; हरकत (पडणें,पाडणें).

फाजील [**अ०** फाजिल्] **वि०** १ जरूरीपेक्षां अधिक; वाजवीपेक्षां अधिक. २ अतिप्रसंग किं० अधिक प्रसंग करणारें(माणूस,भाषण,वर्तन).

फाट [**म०** फाटणें] **पु०, स्त्री०** १ हरकत; विरोध.२एका संस्थेंतील किं०कुटुंबांतील माणसांत भिन्न मतांमुळें होतो तो विभक्तपणा किं० होते ती फाटाफूट. ३ बेवनाव.४ लाकूड,मातीचें भांडें, इ०ला पडते ती भेग किं० चीर किं० फट. ५ जुळत आलेल्या व्यवहारांत कांहीं अडथळा आणून तो मोडणें. ६ पूर्व ग्रंथ आणि पुढचा ग्रंथ यांशीं न जुळणारा ग्रंथभाग; लेख, भाषण, इ०त झालेला पूर्वापर विरोध. ७ होडी, गलबत, इ० च्या गतींत बदल करण्यासाठीं वल्ह्यानें जो विशेष प्रकारें जोर किं० नेट लावतात तो.

फांट [**सं०**] **पु०** औषधी द्रव्य पाण्यांत भिजत घालून त्या पाण्यांत त्या द्रव्याचें आणलेलें सत्त्व.

फाटक [**हिं०**] **न०** १ पटांगण, आवार, इ० ची वाट आडविण्यासाठीं करतात तें दार. २ घराचें अंगण आणि रस्ता यांच्यामध्यें करतात तें कामट्या, रिपा,इ० चें दार. ३ जुनेर; फाटकें चिरगूट. ह्या अर्थी ' फाटकर ' असाही शब्द आहे.

फाटका [म० फाटणें] **वि०** १ फाटलेला; विदीर्ण; चिध्यांच्या किं० तुकड्यांच्या रूपांत असलेला. २ द्रव्यबळ, शरीरबळ, इ० बाबतींत जो कमजोर किं० हीन तो. ꙮ **फाटक्या अंगाचा वि०** अत्यन्त रोडका किं० किडकिडीत. **फाटक्यांत पाय शिरणें** नजरचुकीमुळें किं०दुर्दैवानें पेचांत अडकणें किं० संकटांत पडणें. **फाटकळ फुटकळ स्त्री०** १ मोडक्या तुटक्या वस्तु समुच्चयानें. २ सटरफटर सामान. **फाटकातुटका वि०** लेचापेचा; जीर्ण.

फाटणें [सं० स्फुट्] **अ०क्रि०** वस्त्र, कागद, चामडें, इ० विदीर्ण होणें. २ विस्कळित, खंडित, किं० भग्न होणें. ३ (कफ, शेंबूड) पातळ होणें. ४ भयाचें कारण, चिंता, इ० मुळें (छाती,हृदय, काळीज) जर्जर होणें किं० आक्रान्त होणें किं० दडपून जाणें. ५ भव्य, विस्तीर्ण, अत्यन्त मूल्यवान् पदार्थ पाहून (नजर, दृष्टि) आश्चर्यानें आक्रान्त होणें. ६ मत्सरानें (नजरेंत) दुसऱ्याचें वैभव किं० कीर्ति झोंबणें. ७ बेबनाव झाल्यामुळें दोन मित्रांनीं अलग राहणें; उ० रामभाऊंचें आणि माझें आलीकडे सहा महिने फाटलें आहे. ꙮ **फाटफूट स्त्री०** १ मोडतोड. २ फट्फट् असा आवाज (बंदुका, तोफा, इ० चा).३ विभक्तपणा. **फाटाफूट स्त्री०** १ माणसें, जनावरें, इ० ची पांगापांग.२मायलेकरें, मित्र, प्रवासी, इ०ची चुकामूक.

फाटा [म० फाटणें] **पु०** १ एका दिशेनें जात असलेला पाण्याचा प्रवाह, वृक्षाची फांदी, इ० ना मध्येंच जो लहानसा अवयव उत्पन्न होतो तो (फुटणें). २ कांहीं विशिष्ट सरणीनें चाललेल्या कामांत व्यावर्तक अशी घडलेली गोष्ट (फुटणें). ३ लिहिलेल्या मजकुरांत नको तो भाग खोडण्यासाठीं ओढलेली रेघ. ४ भाषणांत किं० कथेंत प्रसंगानें आलेली उपकथा किं० आलेला विषय (फुटणें, फोडणें).५(**नंदभाषेंत**) एक रुपयाचा षोडशांश; एक आणा. ꙮ **जेवणाला फाटा देणें** न जेवणें; लंघन किं० उपास करणें. **नोकराला फाटा देणें** त्याला काढून टाकणें. **फाटे फोडणें** चालेलल्या कामांत अडचण उत्पन्न करणें. **कोणकास फांटा फुटणें** मंत्रतंत्र, पिशाचबाधा, करणी, इ० मुळें त्याला वेड लागणें किं०तो भ्रमिष्ट होणें. **फाटा फुटलेला वि०** भ्रमिष्ट झालेला.

फाटी [म० फाटणें] **स्त्री०** झाडाची फांदी, रस्ता, पाण्याचा प्रवाह, इ०ला फुटलेला नवा लहानसा अवयव.

फाटी स्त्री०, फाटें न० मोठी आणि पसरट अशी पाटी किं० टोपली; हारा.

फाटुकलें न० एक जंगली फूल.

फाटें [**म०** फाटणें] **न०** सर्पण;जळाऊ लाकूड.

फाड [**म०** फाडणें] **पु०** १फाडणें किं० चिरणें ही क्रिया किं० ह्या क्रियेनें उत्पन्न झालेली चीर, फट, किं० भेग. २ कोणत्याही विषयाची चर्चा करून त्याचें स्पष्ट झालेलें स्वरूप (होणें,करणें). **फाड स्त्री०** पदार्थाचा कापून किं० चिरून काढलेला तुकडा; फाक; फोड.

फाड पु० ज्याचें एकच तोंड घडविलें आहे असा धोंडा किं० चिरा. **न०** पांच पेंढ्या इ० पदार्थांचा समुच्चय.

फाडकन् (–कर,–दिनीं,–दिशीं) **क्रि० वि०** मोठा आवाज करून; एकदम; जोरानें (थोबाडींत मारणें,फटाका किं० बंदूक उडणें,इ०).

फाडणें [**सं०** स्फुट्] **स० क्रि०** विदीर्ण करणें; चिरणें. ꙮ **कोणेकाला फाडून खाणें** त्याला बोलून, रागें भरून, किं० निंदून जर्जर करणें.

फाडा मागें ‘ पाडा ’ ‘ पाढा, ’ ‘ पाडा [वाचणें ’ पहा.

फाडी स्त्री० १ ज्याची एकच बाजू घडविलेली आहे असा दगड. २ पुढें ‘ फाडें ’ पहा.

फाडींव [**म०** फाडणें] **वि०** १ फाडून काढलेला (वस्त्रादींचा तुकडा). २ ज्यांतून कांहीं भाग फाडून काढला आहे असें (वस्त्र, कागद, कातडें, इ०).

फाडें न० पांच (किं० सहा) रुपये, फळें, पेंढ्या, इ० चा समुच्चय.

फाणस, फाणूस [**फा०** फानस्] **पु०** कंदील.

फातकीळ मागें ‘ फतकळ ’ पहा.

फातमाय स्त्री० लठ्ठ आणि कुरूप स्त्री.

फात्या [**अ०** फात्हाह्] **स्त्री० अ० व०** १ कुराणाच्या पहिल्या बाबांतील पहिला भाग.

२ चकाट्या (पिटणें); वात्रटपणाचीं बोलणीं (बोलणें). ※ **हलवायाच्या घरावर फात्या देणें** (किं० **मारणें**) दुसऱ्याच्या मालकीचा पदार्थ दान करणें किं० कोणेकाला देऊन औदार्याची बतावणी करणें.

फांद स्त्री० १ किल्ला इ० च्या तटाचीं भिताडें प्रत्येक. २ (झाडाची) फांदी. ३ एक भाजीच्या उपयागाची वनस्पति.

फांदडणें, फांदाडणें, [म०फांदी] स० क्रि० १ फाडणें, चिरणें. २ कोणेकाचा बुद्धिभेद करून (त्याला) प्रेमाच्या माणसापासून दूर करणें.

फांदडा[म०फांदी]पु० (वृक्षाची)मोठी फांदी. ※**फांदडे फोडणें** हरकती किं० अडथळे उपस्थित करणें.

फांदणें स० क्रि० १ उधळून किं० उडवून टाकणें; अस्ताव्यस्त करणें. २ खोगिरावर वेलबुट्टया काढून (तें) सुशोभित करणें.

फांदा[म० फांदी]पु० झाडाच्या खोडाला किं० फांदीला फांदी फुटून होतें तें दुबेळकें. ※**फांद्यांत घालणें** (किं० **पाडणें**) पेचांत किं० पंचाइतीत ढकलणें. [' फांदडा 'पहा.

फांदाडणें, फांदाडा मागें ' फांदडणें '

फांदाफांद [म० फांदणें] स्त्री० फाटाफूट; दाणादाण; पांगापांग.

फांदी स्त्री० १ झाडाची शाखा. २ दिवा, कंदलि,इ०लोंबत सोडण्यास।ठीं किं० ठेवण्यासाठीं ठोकलेला खिळा, आंकडा, इ०.※**फांद्या फोडणें** १ हरकती किं० विघ्नें उपस्थित करणें. २ विषयांतर करणें.

फांदोरी [म० फांदी] स्त्री० लहान फांदी. वर ' फांदी ' पहा.

फानस, फानूस [फा० फानस्]पु०कंदील.

फापट पसारा पु० (काम, पदार्थ, इ०ची) अव्यवस्थितपणाची स्थिति.

फापर [हिं०]न० त्वचेवर उद्भवलेली खरूज, नायटा, क्षत, इ०चा विस्तार.

फापरा, फापा वि०लागत लागत बोलणारा; तोतरा.

फापरी स्त्री० एक शाकभाजी.

फापसणें स० क्रि०१(खाद्य पदार्थ)डिवचणें किं० चिवडणें किं० इतस्ततः टाकणें. २ (कोणेकाला) रागें भरणें किं० (त्याची) भोसडपट्टी काढणें.

फापस्णें, फापसणें अ० क्रि० (शरीराची त्वचा) दगड इ० वर घासली जाणें; खरचटणें.

फापावणें अ० क्रि० १ (वृक्षादींचा) विस्तार होणें; (वृक्ष) फोपावणें.२जोरानें वाढणें.३लठ्ठ किं० विस्तीर्ण होणें.

फाप्या स्त्री० अ० व० दुःखातिशयानें बोंबा मारणें; उ० चोरांनीं सर्वस्व लुटून नेल्यामुळें गांवकरी फाप्या मारीत बसले.

फाफर इ० मागें ' फापर ' इ० पहा.

फाफू न० स्त्री० मंत्रतंत्र; जादूटोणा. ※ **(पैसा,धान्य इ०चें) फांफू करणें** तो उधळून किं० उडवून किं० खर्चून टाकणें.

फाम [अ० फहम्] स्त्री०प्रसंगावधान;प्रसंगीं न गोंधळणें, किं०न घाबरणें, किं०न बावचळणें.

फामिंदा [फा० फह्मींदाह्]पु० १ प्रकृतीपेक्षां ईश्वर श्रेष्ठ अशा मताचा आणि तुरा जातीच्या लावण्या रचणारा किं० म्हणणारा शाहीर. २ आडदांड माणूस; दांडगेश्वर.३ लफंगा; सोदा. ४ बुद्धिवान्; पटाईत; हुशार. **फामिंदी स्त्री०** दांडगी स्त्री; कठिण स्वभावाची स्त्री; कर्कशा.

फायदा [अ०] पु० नफा; लाभ. ※ **फायदेशीर वि०** ज्यापासून फायदा मिळेल किं० मिळणें संभवनीय आहे असा (व्यापार, व्यवहार, इ०).

फार पु० १ बंदुकींत भरलेली दारू (सोडणें, सुटणें).२ उखळांत घातलेल्या धान्यादींवर मुसळ, पहार, इ०चा घाव, रट्टा, किं० तडाखा (देणें, लावणें, घालणें).

फार वि० पुष्कळ; वहुत. ※ **फारकरून क्रि० वि०** बहुतकरून; बहुधा. **फार झालें हसूं आलें** कोणतीही अनिष्ट गोष्ट अतिरेकाला गेली असतां मनुष्याला हसूं येतें.

फारक (-ख), फारीक (-ख)[अ०फारग्] वि० देऊन टाकलेलें किं० फेडलेलें (कर्ज);निकालास लाविलेला (वाद, तंटा); संपवून टाकलेला (पैसा, सामग्री).

फारखत (-ती)[अ० फारग्+खत]**स्त्री०** १ वडिलोपार्जित जिंदगीची विभागणी इ० बाबतींत भाऊबंदांनीं एकमेकांस दिलेला निकालाचा स्वदस्तूरचा कागद. २सर्कतीनें चाललेल्या व्यापारादिकांत एकमेकांनीं एकमेकांस दिलेली सोडचिठ्ठी. ३ ऋणमुक्तिपत्र. ४ हक्क सोडल्याबद्दलचा लेख; सोडचिठ्ठी.

फारशी (-सी) [**सं०** पारसीक; **फा०** फारसी, पारसी] **वि०** १इराणी लोकांसंबंधाचा. २ इराणदेशासंबंधाचा. ३ इराणी भाषा.

फारसनीस [**फा०** फारसी+नवीस्; नविष्तन्=लिहिणें] **पु०** फारशींतील पत्रव्यवहार चालविणारा अमलदार किं० कारकून.

फारिखत, फारिखती वर ' फारखत, ' ' फारखती ' पहा.

फारीक (-ख) वर ' फारक ' पहा.

फारून फेरून,फेरून फारून [**म०** फेरणें] **क्रि० वि०** अनेक प्रकारें बदलून उलथन पालथून उताणा पालथा करून इकडून तिकडे तिकडून इकडे वळवून (तपासणें, शोधणें, परीक्षिणें).

फारोळा [**म०** फाळ]**पु०**१ वस्त्राचा वाभाडा. २ पाभरी किं०मोघण यांच्या खुंट्याला फाळासारखे लोखंडाचे अवयव लाविलेले असतात ते प्रत्येक; पाभरीच्या दांत्यांचीं लोखंडी टोपणें प्रत्येक. [अर्थ २ पहा.

फारोळें [**म०** फाळ] **न०** वर ' फारोळा '

फालतू [**हिं०**] **वि०** ज्यास्तीचा; शिल्लक असलेला; ज्याची सध्यांच गरज नाहीं असा.

फालस [**इं०** फॉल्स्=खोटें] **न०** खोटें किं० बनावट मोतीं.

फालसा [**हिं०**] **पु०** एक फलविशेष.

फाल्गुन [**सं०**] **पु०** १ हिंदूंचा बारावा महिना;चैत्राच्या मागचा आणि माघाच्या पुढचा हिंदू महिना. २ अर्जुन. ꕥ **फाल्गुनिक पु०** फाल्गुन महिना. **फाल्गुनि पु०** अर्जुनाचा पुत्र. **फाल्गुनी स्त्री०** फाल्गुनांतील पौर्णिमा. **फाल्गुन वाद्य न०** बोंब मारणें (वाजविणें).**फाल्गुना वि०** फाल्गुनांतील. ' फाल्गुनी ' हें स्त्रीलिंगी रूप.

फावडा [**हिं०**] **पु०** शेण, लिद, माती,इ० जवळ ओढण्याचें एक आउत.

फावडी [**हिं०**] **स्त्री०** १ शेण, लीद, इ० गोळा करण्याचें आउत. २ जोगी, फकीर, इ०ची झोळी खांद्यावरून वाहाण्याची बेळक्याची काठी. ३ काहिलींत कढत असलेल्या उसाच्या रसांतील केरकचरा, मळी, इ०काढण्याचें आउत. ४ दंड काढावयाचें तालमीचें एक आउत.५नांगर, कुळव, कोळपें, इ०च्या दांडीच्या दोन्ही बाजूंस जे दोन धिरे असतात ते प्रत्येक. ६ कामाची किं० संसाराची दुर्दैवादिकारणांनी होते ती दुर्दशा.

फावडें [**हिं०** फावरा] **न०** १ माती, शेण, इ० गोळा करावयाचें आउत. २ मानभाव इ० लोकांची खांद्यावर झोळी आडकावण्याची काठी. ३'फावडी'अर्थ ३ पहा. ४ उपद्रवी माणूस; कामांत विघ्न किं० घोटाळा उपस्थित करणारा माणूस. ꕥ **कामांत** (किं०**बोलण्यांत)फावडें घालणें** त्याची दिशा किं० धोरण बदलणें. **तो फावड्यांनीं पैसा ओढतो आहे** तो अतोनात पैसा मिळवीत आहे.

फावणें [**म०** पावणें=संधी मिळविणें]**भावकर्तृक क्रि०** कोणेकाला कांहीं काम करावयाला फुरसत सापडणें; बनणें;उ० मला आतां फावणार नाहीं; उ० मला फावल्यास तुझ्या भेटीला येईन. **अ० क्रि०** १ मिळणें; हातीं पडणें.२मोकळा किं० रिकामा होणें. ꕥ **कोणेकाचा हात फावणें** तो कामांतून मोकळा होणें.

फावती [**म०** फावणें] **स्त्री०** कामांतून सुटका; काम आटोपल्यावर मिळतो तो रिकामा वेळ; फुरसत.

फाविंदा वि० १ अट्टल;पक्का;(लफंगा,सोदा). २ हुशार; तल्लख; चटपटीत.

फाशी, फांशी स्त्री० गायी, म्हशी, इ०ना वेळेवर पाणी न प्यावयास दिल्यानें त्यांना होतो तो रोगविशेष.

फास [**सं०** पाश] **पु०** १ कितीही लहान किं० मोठा पदार्थ अडकावण्यासाठीं किं० बांधावयासाठीं लहान मोठी करतां येईल अशी सरक गांठ. २ पक्षी, गुरें, इ० ना पळून किं० सुटून न जातां येईल असें त्यांना घातलेलें दोरीचें बंधन. ३ उपद्रवी माणूस,-जो पदोपदीं आपल्या कामांत

हरकती आणीत असतो;शुक्काष्ट.४कामांत येणारीं विघ्नें प्रत्येक; लोढणें. ५ काटक्यांचा जमीनीवरून ओढून दुसरीकडे न्यावयासाठीं बांधलेला भारा. स्त्री० कुळवाची लोखंडी पट्टी. ह्या अर्थी ' पास ' असेंही रूप आहे.**फाशी स्त्री०** गळ्याला फास घालून लोंबत सोडून ठार मारण्याची शिक्षा.* **फाशीं देणें** १ कोणेकाच्या गळ्याला सरकफास घालून त्याला लोंबत सोडून त्याला ठार मारणें. २ घोटाळ्यांत किं० अडचणींत लोटणें. **फाशीं जाणें** गळ्याला फासानें लोंबत राहून मरणें. **फाशीं भरणें** (किं० **येणें** किं० **लागणें**)पेचांत अडकणें.

फासकी [**म०** फास] **स्त्री०** पक्षी किं० पशु ह्यांना धरण्यासाठीं करतात तो फास.

फासटणें [**म०** ' फासणें ' चें एक रूप] **स० क्रि०**१(माती,राख, इ०)भांडें,इ०ना लावणें किं० लावून घासणें. २माती राख,इ०नीं(भांडें, अंग,इ०)लिप्त करणें.३ (कोणेकाला)फसविणें किं० (त्याला) भुरळ घालणें. ४ फायदा कांहीं नसतां (पायांना) चालण्याचे कष्ट देणें.

फासडा [**म०** फास] **पु०** १ (दोरी, सूत, धागे, इ० ची) गुंतागुंत. २ दाराची किं०खिडकीची चौकट भिंतींत पक्की बसावी म्हणून चौकटच्या बाह्यांना ज्या खुंट्या ठोकतात आणि ज्या भिंतीच्या गर्भात गाडल्या जातात त्या प्रत्येक. ह्या खुंट्यांना 'बहिऱ्या' असेंही म्हणतात. बहिरी हें **ए० व०.** [तो ओंडका.

फासडें न०नांगरेलल्या जमीनीवरून ओढतात

फासणी, फासडी [**हिं०** फास्नी] **स्त्री०** कुजकें रक्त शरीरांतून काढून टाकण्यासाठीं त्वचेवर शस्त्रानें जे छेद करतात ते प्रत्येक. तुंबडी लावावयाच्या अगोदर असे छेद करावे लागतात. ' फासणी टाकणें (करणें), '' फासण्या टाकणें (करणें) ' असे प्रयोग होतात.

फासणें स० क्रि० १ (माती, राख, मलम, इ०)अंगावर,किं० भांडें,इ०वर लावणें किं०लेपणें.२ (भांडें, अंग, इ०) माती, राख, मलम, इ०नीं लिप्त करणें. ३ (कोणेकाला) भुलथापांनीं फसविणें. ४ (कोणेकाला) पेचांत घालणें. ५ कोणेकापासून(द्रव्य इ०)फसवून किं०हिरावून घेणें.

फासणें स० क्रि० शरीरांतलि कुजकें रक्त काढून टाकण्यासाठीं त्याचेवर शस्त्रानें वेध करणें म्ह० तें कापणें; फासण्या टाकणें. २ लाकूड इ० वर शस्त्रानें वेध करणें.

फासणें [**म०** फास] **अ० क्रि०** वेळेवर प्यावयास पाणी न दिल्याकारणानें (गाय, म्हैस, इ०चा) गळा आवळल्यासारखा होणें.

फासफुस स्त्री० १ चरफडाट; पिरपिर(असंतुष्टपणाची).२ रद्दी किं० कुचकिमतीचें सामानसुमान. [बरगडी.

फासळी, फासोळी [**हिं०** फस्ली] **स्त्री०**

फासा [**सं०** पाश] **पु०** १ सोंगट्या खेळणें, शकुन पाहणें, इ० कामीं योजावयाचे आणि चारी अंगावर चिन्हें असलेलें लाकूड, हस्तिदंत, इ० चे चौरस लांबट तुकडे जे ते प्रत्येक. २ सरी, नथ, इ० गळा,नाक, इ० मध्यें न पडतील अशा रीतीनें बसविण्यासाठीं त्यांच्या दोन्ही टोकांना जे नर आणि मादी आंकडे असतात ते प्रत्येक. ३ पशु, पक्षी, इ० ना धरावयासाठीं दोरी इ० चें जें सरकगांठीचें वेळकें करतात तें .४कोणेकाला अडचणींत घालण्यासाठीं रचिलेला व्यूह. * **फासा सोयीचा पडणें** अनुकूल परिस्थिति जमून येणें. **फासा उरफाटा पडणें** केलेली योजना प्रतिकूल होणें. **फासा टाकून पाहाणें** १ एकादी वस्तु प्राप्त करून घेण्यासाठीं एकादी धाडसी युक्ति करणें. २ नशीबावर हवाला ठेवून एकादें जोखमीचें काम पथकरणें. **एकाद्याचा फासा जाणणें** (किं० **समजणें** किं० **उमगणें**) त्याची गुप्त योजना किं० मसलत ओळखणें. **फासा टाकणें** आपलें म्हणणें कळविणें किं० एकादी गोष्ट कांहीं उद्देशानें करणें,–(आणि पुढें काय परिणाम होतो ह्याचा तर्क करणें). **फासा पडेल तो डाव आणि राजा बोलेल तो न्याव(न्याय)** फाशांनीं दिलेलें दान आपल्या इच्छेच्या किं० सोयीच्या उलट असलें तरी तें पथकरावें लागतें त्याप्रमाणें राजानें दिलेला न्याय सत्याच्या आणि प्रजाहिताच्या उलट असला तरी तो नाइलाज

म्हणून पथकरावा लागतो. **फासेपारधी पु०** १ जाळें पसरून त्यांत पक्षी, पशू, इ० ना पकडणारा पारधी. २ ठक, लुच्चा.

फासाटणें मागें ' फासटणें ' पहा.

फासाडणें [म० फास] **स० क्रि०** १ फासांत अडकाविणें किं० पकडणें. २ (कोणेकाला) फसविणें.

फांसूं न० नदी, खाडी, इ० ना फुटलेला [लहान फाटा.

फासोटी [म० फास] **स्त्री०** १ पक्ष्यादींना पकडावयाचें जाळें. २ कोणेकाला फसविण्याची हिकमत.

फांसोळी [हिं० पसली] **स्त्री०** बरगडी. ⊛ **फासोळीस उजळटिक्या वि०** ज्याच्या बरगड्यांवर पांढरे ठिबके आहेत असा (घोडा). हें घोड्याचें अशुभ लक्षण समजलें जातें.

फाळ [**सं०** फाल] **पु०** १ नांगराच्या अग्रास पर्णाकार जो लोखंडाचा अवयव लाविलेला असतो तो. २ (**लक्षणेनें**) जाडी टोकाची लेखणी. ३ लांबरुंद धलपी.

फाळका [म० फाळणें] **पु०** १ लाकूड, फळ, इ०चा मोठा तुकडा किं० काप. २ केळ, चवेण, इ० च्या डांगेच्या एका बाजूचा तुकडा (जेवावयास घ्यावयाच्या उपयोगाचा).

फाळकी [म० ' फाळका ' चें लघुत्वरूप] **स्त्री०** १ लहान फाळका. वर ' फाळका ' पहा. २ जमीन, शेत, इ०चा लांबच लांब तुकडा किं० चिंधी किं० पट्टी.

फाळट,फाळवट [म० फाळ] **न०** नांगराचा फाळ (तुच्छतेंत). २ ' फाळेटूं ' पहा.

फाळटणें [म० फाळ] **अ० क्रि०** (बैल, रेडा) नांगराचा फाळ लागून खरडला जाणें.

फाळणी [म० फाळणें] **स्त्री०** १ एक पदार्थ दोन किं० अधिक तुकड्यांच्या रूपांत फाडणें किं० तोडणें; विभागणी. २ एकादी रक्कम अनेकांवर विभागून देणें.

फाळणें [**सं०** स्फल्=कंप पावणें] **स० क्रि०** १ फाडणें; विभागणें. २ कांहीं काम किं० रक्कम अनेक माणसांवर वाटणें किं० वाटून देणें.

फाळवट [म० ' फाळका ' चें लघुत्वरूप] **न०** केळ, चवेळ, इ० च्या पानाच्या मधल्या दांड्याच्या एका बाजूचा पानाचा तुकडा.

फाळवट, फाळवटणें मागें ' फाळट ' ' फाळटणें ' पहा.

फाळा [म० फाळणें] **पु०** १ चिंधी; फाडून काढलेला तुकडा. २ वस्त्रादींचा फाटलेला भाग (काढणें, निघणें). ३ वस्त्राचा वाभाडा. ४ रेशमाचें सूत्र राहाटावर गुंडाळून जो कोपरीसारखा रचनाविशेष करतात तो. अशा चवदा रचनाविशेषांचा एक थोक किं० अर्धा शेरिया होतो. ५ शेत इ० संबंधीं जो सारा तो. ६ विभागणी किं०विभागणीनें पडलेले तुकडे प्रत्येक. ७ नांगराचा फाळ. वर ' फाळ ' पहा. ⊛ **फाळा फोडणें** वर्गणीची रक्कम अनेकांवर विभागणें.

फाळी [म० फाळ] **स्त्री०** जमीन, शेत, इ० ची लांबच लांब पट्टी किं० चिंधी.

फाळेटूं [म० फाळ] **न०** नांगराचा फाळ घट्ट बसावा म्हणून त्याजवर जें लाकूड बसवितात तें.

फाळोरें फारोळें न०, फाळोरा पु० [म० फाळ] पाभरीच्या दांत्यांचीं लोखंडीं टोपणें प्रत्येक.

फिकट, फिक्कट [म० फिका] **वि०** किंचित् फिका. खालीं ' फिका ' पहा.

फिकर, फिकीर [अ० फिक्र्] **स्त्री०** काळजी; चिंता; विवंचना.

फिका, फिक्का[हिं०फिका]**वि०** १ रंग,रुचि, तेज,इ०गुणांनीं विवक्षिताहून कमी असा.२निस्तेज (चेहरा); पाणचट(सरबत); निर्वीर्य (माणूस); मजीत (रंग).

फिगारणें स० क्रि० भिरकावणें; फेकणें.

फिंजारणें, फिंजारी मागें ' पिंजारणें, ' ' पिंजारी ' पहा.

फिटणें अ० क्रि० १ नेसलेलें धोतर, लंगोटी, लुगडें, इ० चें बंधन सैल होऊन तें गळूं लागणें किं० सुटणें. २ दोरी, गांठोडें, इ० ना बांधलेली (गांठ) सुटणें. ३ (कर्ज) वारलें जाणें. ४ (दिलेलें वचन, केलेली प्रतिज्ञा) निस्तरली जाणें किं० पुरी केली जाणें. ५ कोणी आपणावर केलेल्या (उपकारांतून)आपण प्रत्युपकारानें मोकळें होणें. ६ कोणी आपली कांहीं हानि केली असतां

आपण त्याची उलट हानि केल्यानें त्यानें केलेल्या हानीचें निराकरण केलें जाणें. ७ देवाला आपण नवस करून मागितलेली वस्तु आपणास मिळाल्यावर आपण अमुक करूं म्हणून जें पथकरलेलें असतें तें केल्यानें (तो नवस) पूर्ण होणें किं० निरतरला जाणें. ८ कुटुंबांत जनन किं० मरण झाल्यानें जें (अशौच) येतें त्याची मुदत संपणें. ॐ **फिटंफाट,फिटाफिट स्त्री०** कर्ज,उपकार,अपकार, पूर्णपणें फिटण्याची किं० फेडण्याची क्रिया.

फिटी स्त्री० १ भोक, चीर, फट, इ० बंद करण्यासाठीं किं० बुझविण्यासाठीं घातलेलें बूच, गुडदी, खुंटी, फडक्याचा बोळा, इ०. २ पदार्थाचा आकार वाढविण्यासाठीं किं० आकार फुगविण्यासाठीं त्यांत जें पुरण खुपसतात तें. ३ निमुळती धलपी, काठी, इ० पाचर म्हणून पदार्थांत किं० पदार्थाखालीं घातली जाते ती,—तो पदार्थ डळमळूं नये किं० हालू नये म्हणून.]

फिटी स्त्री०,फिटु पु०विटदांडूच्या खेळांतलि दांडू,—ज्याने विटी किं० इटी,—लहान तुकडा, उडवावयाचा असतो.

फिणफिणणें अ० क्रि० १ ज्वरानें (अंग) तापणें. २ कोणेकावर रागानें चरफडणें. ३ असंतुष्टपणानें पिरपिरणें. ५ शिजत असलेल्या (पदार्थानें) ध्वनिविशेष करणें.

फितणें [अ० फितनाह्] **अ० क्रि०** १ आपल्या यजमानाशीं किं० मित्राशीं विश्वासघात करून प्रतिपक्ष्यास मिळणें. २ फसणें (मूल, अजागळ माणूस).

फितना पु० एक प्रकारची सुगंधी दारू.

फितवणी, फितावणी [**म०** फितावणें] **स्त्री०** कोणेकाला फसवून किं० आमिष दाखवून त्याच्या कर्तव्यापासून किं० स्वामिनिष्ठेपासून त्याला च्युत करण्याची क्रिया.

फितविणें, फिताविणें [**म०** ' फितणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ स्वामिनिष्ठेपासून किं० कर्तव्यापासून आमिष दाखवून (कोणेकाला) च्युत करणें. २ विरुद्ध पक्षाकडे (कोणेकाला)वळविणें.

फितवा, फितावा [**म०** फितणें, फितविणें] **पु०** १बंड; स्वामिनिष्ठेपासून च्युत होणें किं०च्युत केलें जाणें. २ कोणेकाला स्वामिनिष्ठेपासून किं० कर्तव्यापासून च्युत करण्याचा व्यापार.

फितूरणें [**म०** फितूर] **स० क्रि०** (कोणेकाला)स्वामिनिष्ठेपासून किं० कर्तव्यापासून च्युत करणें. **अ० क्रि०** प्रतिपक्ष्याला मिळणें.

फितूरी स्त्री०, फितूर पु० [**हिं०** फितूर] १ बंडखोरी; स्वपक्षाशीं केलेला विश्वासघात. २ स्वपक्षाशीं विश्वासघात करणारा. ॐ **फितूरफांदा पु०** विश्वासघात, स्वपक्षाशीं द्रोह, लबाडी, इ० समुच्चयानें.

फित्याविणें, फित्येविणें वर' फितविणें' पहा.

फिदा [**अ०**] **वि०** आसक्त; अनुरक्त;प्रेमानें बद्ध; प्रसन्न किं० अनुकूल (होणें, असणें).

फिंदारणें [**म०** पिंजारणें] **स० क्रि०** १ (नाक, डोळे) विस्तारणें किं०फुगविणें.२मांजर, पक्षी, इ० नीं (शेपटी, पंख, इ०) फुगविणें किं० उभारणें म्ह० केश, पंख, इ० ताठ करणें.

फिदालखोर वि०१फिदिफिदी किं०मूर्खपणानें हसणारा. २ बढाया मारण्याच्या स्वभावाचा मूर्ख (माणूस).

फिरक [**म०** फिरकणें] **पु०, स्त्री०** १ गातेसमयीं घेतात तो कंप. २ विशिष्ट स्थळीं जाणें ही क्रिया; हालचाल; उ० मी त्याला इकडे फिरक करूं देत नाहीं. ३ हालचाल करणें किं० करण्याची शक्यता; उ० ही दाटी फिरक पडूं देत नाहीं. ४ रिकामा किं० फुरसुतीचा वेळ.

फिरकंडा पु०, फिरकंडी स्त्री० [**म०** फिरणें] १ चक्कर; वाटोळें फिरणें किं०फिरविणें.२जाण्यायेण्याचा हेलपाटा. ३घोटाळा;गुंतागुंतीची स्थिति (काम, कारभार, इ० ची). ॐ **फिरकंड्यांत क्रि० वि०** घोटाळ्यांत; पेचांत; अडचणींत.

फिरकणें [**म०** ' फिरणें ' चें एक रूप]**अ० क्रि०** १ इकडे तिकडे जाणें. २ हालचाल करणें. ३ विशिष्ट स्थळीं जाणें किं० हजर असणें; उ० त्या चौकीच्या आसपास कोणी चोर फिरकत नाहीं.

फिरका, फिरकांडा पु०, फिरकांडी स्त्री० वर ' फिरकंडा ' पहा.

फिरकी [**म०** फिरणें] **स्त्री०** १ गाण्यांत घेतलेला कंप. २ नाचतांना सफाईनें घेतलेला

वळसा. ३ मळसूत्र. ४ कठड्याचा उभा खांब. ५वाटोळा फिरणारा किं० फिरवावयाचा कोणताही पदार्थ. ६ लहानशी तराजू,–सोनार, सराफ, इ० ची. ७ मळसूत्राचा नर अवयव. ८ पाळणा, पलंग, इ०च्या कठड्यास जीं उभीं कांतीव लाकडें असतात तीं प्रत्येक. ९ करंज्यांचे कांठ कापावयाचें जें कांतणें त्यांतील चक्र,–जें दांड्यांत फिरतें. १० मराठीशाही मुंडाशांतील पीळ. ११ कोष्ट्याच्या मागांतील ताण्याचीं सुतें न सरकूं देण्यासाठीं योजतात जे दोरे ते प्रत्येक.

फिरंग स्त्री० तरवार.

फिरंगाण [**म०** फिरंगी] **न०** फिरंग्यांचा म्ह० पोर्च्युगीझ लोकांचा युरोपांतील देश किं० हिंदुस्थानांतील त्यांच्या अमलाखालचा देश किं० त्यांचा अधिकार, सत्ता, किं० अंमल.

फिरंगी [**फा०** फिरंग्; **फ्रेंच** फ्रांक्] **पु०** कोणीही युरोपी माणूस,–विशेषतः पोर्च्युगालचा रहिवासी. **वि०** यूरोपांतील माणसासंबंधाचा,–विशेषतः पोर्च्युगीझ माणसासंबंधाचा. ॐ **फिरंगूट न०** यूरोपी माणूस किं० विशेषतः पोर्च्युगीझ माणूस (तुच्छतेनें).

फिरणें [**हिं०** फिर्ना] **अ० क्रि०** १ (चक्र, लाकूड, इ०) आसाभोंवतीं एक वेळां किं० अनेक वेळां वळणें; उ० पृथ्वी आसाभोंवतीं फिरल्यानें दिवस आणि रात्र हे कालाचे विभाग होतात. २ स्वस्थान सोडून पदार्थानें मंडलाकार चालणें; उ० पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत आहे म्हणून उन्हाळा, पावसाळा, आणि हिंवाळा, हे ऋतु उत्पन्न होतात. ३ पूर्वींची गति, दिशा, धोरण, इ० सोडून तद्विपरीत गति, दिशा, धोरण, इ० धरणें; उ० हा ओढा त्या खेड्याजवळ पूर्वेच्या दिशेकडे फिरला आहे. ४ एकाद्या ठिकाणीं अनेक वेळां मागें पुढें, इकडे तिकडे, चालणें किं० जाणें; उ० मी संध्याकाळीं जेवल्यानंतर अन्नपचनार्थ पडवीमध्यें एक तास फिरतों. ५ बदलणें; पालटणें; भिन्न प्रकारचा होणें; उ० एक पाऊस पडतांच झाडांची नवली फिरली. ६ पूर्वींचा पक्ष सोडून दुसऱ्या पक्षास जाऊन मिळणें. ७ व्यवहारामध्यें हिशोबानें देणें किं०घेणें ठरणें; उ० माझ्याकडे जी तुमची बाकी फिरेल ती मी आतांच्या आतांच देऊन टाकून मोकळा होणार आहें. ८ प्रवास करणें; उ० मीं हिंदुस्तानांत पुष्कळ फिरलों आहे. ९ हुकूम, दवंडी, बातमी, इ० कळविली किं० सांगितली जाणें; उ० रस्त्यावर कोणी निजूं नये असा मामलेदारांचा हुकूम ह्या गांवांत फिरला आहे. १० विरुद्ध पक्षाचा होणें; उ० माझे तिन्ही साक्षीदार फिरले म्हणून खटला माझ्या उलट गेला. ११ सोनें, रुपें, इ० धातु वितळणें. ॐ **फिरवाफिरव स्त्री०** उलटापालट; बदल. **फिरून, फिरोन क्रि० वि०** १ पुन्हा. २ उलटपक्षीं. **घर फिरलें म्हणजे घराचे वांसेही फिरतात** मागें ' घर 'मध्यें ही म्हण पहा.

फिरता [**म०** फिरणें] **वि०** १ फिरणारा. २ चंचल; अस्थिर. ३ पक्का न बसविलेला किं० न खिळविलेला; मोकळा; सुटा. ३ तपासणीसाठीं किं० बंदोबस्तासाठीं एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं, दुसऱ्या ठिकाणापासून तिसऱ्या ठिकाणीं जाणारा (पहारेकरी, सैन्य, सरकारी अमलदार). ४ उतरत्या पंथास लागलेला(दिवस, दुपार, सावली, ऊन्ह, इ०). ५ फिरण्याचें काम जींत आहे अशी (नोकरी).**फिरती पाळी स्त्री०** स्त्रीच्या मासिक रजःस्रावाच्या पूर्वींचा काळ; उ०गोपिकाबाई फिरत्या पाळीवर गरोदर राहिली, ती ज्येष्ठांत प्रसूत झाली हें योग्यच झालें.

फिरती [**म०** फिरणें] **स्त्री०** फिरण्याचें कर्तव्य किं० फिरण्याचा काळ; उ० कलेक्टर हल्लीं फिरतीवर आहे, तो तुम्हाला साताऱ्यास भेटणार नाहीं.

फिरवणी [**म०** फिरविणें] **स्त्री०** फिरविण्याची क्रिया (सर्व अर्थांनीं).खालीं 'फिरविणें' पहा. २ विणलेलें वस्त्र कोष्टी ज्या तुळईभोंवतीं गुंडाळतो तिला खिळविणारी पट्टी किं० खीळ.

फिरविणें [**म०** ' फिरणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ वळविणें; बदलणें. २ पदार्थाला त्याच्या आसाभोंवतीं वाटोळी गति देणें. ३ माणूस, पशु, इ० वर्तुळाच्या मार्गानें चालविणें किं० दूर कांहीं अंतरावर नेऊन परत आणणें; उ० घोडा मैदानांत फिरविणें;उ० रडत्या मुलाला उगीं करण्यासाठीं त्याला अंगणांत फिरविणें.

३ सरकारी हुकूम, दवंडी, बातमी, इ० सर्वांस कळविणें किं० कळविण्याची व्यवस्था करणें. ४ आंतली बाजू बाहेर आणि बाहेरची बाजू आंत, इकडचें किं० तिकडे तिकडचें इकडे करणें.५ (तोंड) वळविणें; उ० शनीनें तोंड वळविलें खास.

फिरस्त, फिरस्ता, फिरिस्ता [**फा०** फिरिष्ताह्] १ प्रवासी; मुसाफर. २ भटकणारा. ३ यात्रेकरू. ४ एकाद्या ठिकाणचा स्थानिक नसून कांहीं कारणानें किं० प्रसंगानें तेथें आलेला माणूस. [पहा.

फिरून, फिरोन क्रि० वि० वर 'फिरणें' मध्यें

फिर्याद [**फा०** फर्याद्] **स्त्री०** आपला कोणी अपराध केला असतां त्याच्या विरुद्ध जी तकरार राजा इ० कडे केली जाते ती. ꣸ **फिर्याद होणें** तकरार करणारा होणें. **फिर्याद जाणें** (किं० **येणें**) फिर्याद करणें. **फिर्यादी वि०** फिर्याद करणारा.

फिशरत पुढें ' फिसरत ' पहा.

फिशारकी, फिशारणें, इ० पुढें ' फुशारकी ' ' फुशारणें, इ० पहा.

फिश्श, फिश्शो उ० वा० अ० ऊः ! त्यांत काय आहे ! तिरस्कार किं० तुच्छता दाखविणारा हा उद्गार आहे.

फिश्शी वि० बुळगट; पुचाट; मूर्ख; अजागळ.

फिसकटणें, फिसकणें अ० क्रि० (केलेली रचना, योजलेला व्यूह, चिंतिलेला बेत) निष्फळ होणें किं० बिघडणें किं० रद्द होणें. २ (घोडा) बिथरणें. ३ (गाय, म्हैस, इ०नीं) दूध देतांना लाथा झाडणें.

फिसकणें अ० क्रि० फसणें.

फिसका, फिसकारणें इ० पुढें ' फुसका ' इ० पहा.

फिसकाविणें [**म०** 'फिसकणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** (कोणेकाला) कर्तव्यापासून च्युत करणें किं० त्याचा मतिभ्रंश करणें.

फिसकें न० केसतूड; गळूं.

फिसरत स्त्री० विश्वासघात; द्रोह; हरामखोरी; लबाडी.

फिसरा वि० विश्वासघातकी; लबाड; ठग.

फिसाद [**अ०**] **स्त्री०** १ बंड; दंगाधोपा; राजशासनाविरुद्ध रयतेचा असंतोष. २ हिशेबांत मुद्दाम केलेली लबाडी; खोटा जमाखर्च. ३ वबेनाव;वैमनस्य. ꣸ **फिसादी, फिसदखोर वि०** १ बंडखोर. २ अव्यास्थित, खोटा, बनावट (जमाखर्च, तपशील, हकीगत, इ०).

फिळकवणी न० ' फळकवणी ' पहा.

फिळफिळीत वि० पानचट, वेचव, नीरस, (ताक, वरण, दूध, कढी, इ०).

फीट [**म०** फिटणें] **स्त्री०** १ कर्जांतून मुक्तता. २ उपकाराची प्रत्युपकारानें केलेली फेड. ३ दोरा गुंडाळावयाची सळई इ०. **न०** फट,चिर, भेग, इ० मिटूं नये म्हणून तिच्यांत खुपसलेली चिंधी, धलपी, पाचर, इ०.

फीत [**पोर्च्युगीझ** फीटा] **स्त्री०** लुगडें इ० स कांठ लावण्याच्या उपयोगासाठीं विणलेली अरुंद पट्टी; दाल; संजाप.

फीत [**सं०** स्फीत=वृद्धिंगत] **वि०** १ वृद्धिंगत. २ समृद्ध (देश). ३ पुष्ट; लठ्ठ. ४ विशाल; विस्तृत. ५ पुष्कळ; विपुल. ६ पूर्ण; व्याप्त. ७ सुजलेला; फुगलेला. ८ आनुवंशिक रोगानें ग्रस्त. **टीप,**–' स्फीत ' बद्दल अशिक्षित लोक ' फीत ' योजतात.

फीति [**सं०** स्फीति] **स्त्री०** १ वाढ. २ समृद्धि; वैपुल्य. ३ आनुवंशिक रोगानें ग्रस्तता.४ धनधान्यादींच्या योगानें देशाची संपन्नता. ५ बढाई; फुशारकी (मारणें). **टीप,**–हा अर्थ फक्त मराठींतच आहे. सुशिक्षित लोक ह्या अर्थी ' स्फीति ' योजतात.

फीर [**म०** फिरणें] **स्त्री०** १ परत वळणें किं० फिरणें. २ हेलपाटा; चक्कर; वेरझारा.

फींव पु० सोन्याच्या तारेच्या टोकाला किं० रेशमी गोफ इ० च्या अग्राला जी गोटी केलेली असते,–मणि, मोती, इ० त्यांतून ओघळूं नये म्हणून,–ती.

फुइजी, फुई [**हिं०** फूइया] **स्त्री०** सासू, आत,– (स्त्री हा शब्द आपली सासू किं० आत यांना बहुमानानें योजते). ꣸ **फुईबहीण स्त्री०** आतेबहीण. **फुईभाऊ पु०** आतेभाऊ.

फुंक [**म०** फुंकणें] **पु०, स्त्री०** आग्नि प्रज्व-

लित करण्यासाठीं किं० फोड इ०ची वेदना शमविण्यासाठीं तोंडानें किं०अन्य साधनानें घातलेला वारा (मारणें, घालणें).

फुकट क्रि० वि० १ मोबदला किं० किंमत न देतां. २ फलप्राप्ति न होतां; व्यर्थ; उगीचच्या उगचि. ꕥ **फुकटचा वि०** १ ज्याबद्दल कांहीं मोबदला दिला किं० घेतला नाहीं असा. २ श्रमाशिवाय मिळालला. ३ उगीचच्या उगीच किं० कुरापत नसतां दिलेल्या (शिव्या) किं० काढलेली (कुरापत). ३ कष्टाशिवाय करतां येईल असें; सोपें; सहजासहजीं होण्याजोगें; उ० पंचवीस लाडू खाणें फुकटचें नव्हे; उ० हें काम फुकटचें नव्हे. **फुकटखाऊ, फुकटया, फुकटचोद वि०** पैसे इ० न देतां किं० कांहीं काम न करतां जो दुसऱ्याच्या घरीं जेवतो किं० दुसऱ्याकडून आपलीं कामें करवून घेतो तो. **फुकटपसारा वि०** अजागळपणानें जो उगीचच हासतो तो. **फुकटफाकट क्रि० वि०** उगीचच्या उगीच; कारणाशिवाय; कांहीं लाभ नसतां. **फुकट बिसनी पु०** दुसऱ्याच्या पैशानें किं० खर्चानें चैनी करणारा. **फुकटशाई वि०** मोबदला ज्याबद्दल दिला नाहीं असा. **फुकटा, फुकटया वि०** मोबदल्याशिवाय मिळालेला (पदार्थ). **फुकटाईवारीं, फुकटाईखालीं, फुकटाफुकटीं क्रि० वि०** मोबदला न देतां.

फुंकण, फुंकणूं [**म०** फुंकणें] **न०** पोकळ दाणा (धान्याचा,–विशेषतः भाताचा).

फुंकणी [**म०** फुंकणें] **स्त्री०** १ फुंकण्याची क्रिया. २ विस्तव प्रज्वलित करण्यासाठीं त्यावर ज्या नळींतून वारा घालतात ती नळी. ३ काच सोनें, रुपें, इ० ची नळी.

फुंकणें स० क्रि० तोंडांतलि वायु किं० भात्यांतील वायु (अग्नि इ० पदार्थावर जोरानें)सोडणें; उ० तोंडानें विस्तव फुंकूं नको. २ पदार्थावर वारा जोरानें जाईल अशा प्रकारें (भाता) चालविणें; उ० भाता फुंकणाऱ्या गड्याला रामा लोहार रोज एक आणा मजूरी देतो. ३ (अलगूज इ० वाद्य) तोंडांतलि वाऱ्यानें वाजविणें. ४(लोकांना) बंड करावयास चेतविणें किं० उठविणें. ५ (पैसा, बेगमी, इ०) उधळून किं० खर्चून टाकणें. ह्या अर्थी'फुंकून टाकणें'असाही अधिक प्रचलित प्रचार आहे. ६ तोंडांतल्या तोंडांत (मंत्र) उच्चारणें किं० घालणें. ७ (प्रेत) चितेवर घालून जाळणें. ८ (व्यापारी किं० घरगुती माल किं० सामान) जाईल त्या किमतीस विकणें; 'फुंकून टाकणें' असाही प्रचार आहे. ९ (कोणतेंही काम) कसें बसें करणें किं० घाईघाईनें करणें.१० (कोणेकाच्या कानांत) कोणेकाविरुद्ध कांहीं गोष्टी सांगून त्याचें मन त्याच्याविषयीं कलुषित करणें; उ० शिवरामानें काशाचे कान फुंकले होते म्हणून काशानें मजविरुद्ध मत दिलें.११(शाबरादि मंत्र) सर्पादींवर चालविणें किं० उच्चारणेंꕥ.**कोणेकाचे कान फुंकणें** त्याला मंत्रोपदेश करणें; त्याचें मन कोणेकाच्या चहाड्या सांगून कलुषित करणें.**गडी फुंकणें** मैत्री तोडणें(मुलांचा शब्द).**बातमी फुंकणें** बातमी विविष्ट माणसाला तातडीनें कळविणें. **देश, गांव, तमाखू, भांग, रसायन,** इ० **फुंकणें** तें जाळून भस्मसात् करणें. **फुंकून पाऊल** (किं० **पाय**) **टाकणें** दूरवर विचार करून वर्तन करणें. **दुधानें भाजला तो ताक फुंकून पितो** एकदा एकाद्या बाबतींत कांहीं अद्दल घडली किं० ठोकर बसली म्हणजे मनुष्य प्रत्येक बाबतींत सावधगिरी बाळगितो जी,–कधीं कधीं अतिरिक्त होते.

फुंकर, फुंका [**म०** फुंकणें] **पु०** तोंडानें घातलेला वारा.

फुंकरणें, फुंकारणें [**म०** 'फुंकणें' चें एक रूप] **स० क्रि०** १ (कढत खाद्य किं० पेय पदार्थावर) तोंडानें वारा घालून तो निवविणें. २ डोळ्यांत केर गेला असतां(डोळ्यावर)मुखानें वारा घालणें.ह्या अर्थी 'डोळ्यांत किं० डोळ्यावर फुंकर मारणें 'असाही प्रयोग आहे.

फुंकार, फुंकारा [**म०** फुंकारणें] **पु०** १ तोंडानें जोरानें घातलेला वारा (मारणें, करणें). २ सर्पादि प्राण्यानें सोडलेला फूत्कार.

फुकी [**म०** फुकट] **स्त्री०** एकबेकीच्या मुलांच्या खेळांत मुठींत चिंचोके इ० चा अभाव.

फुगट [**म०** फुगणें] **वि०** किंचित् फुगलेला; फुगीर.

फुगटणें [म० ' फुगणें ' चें एक रूप] अ० क्रि० १ फुगणें; फुगीर होणें; आंत भर पडल्यामुळें आकारानें मोठा किं० लठ्ठ होणें. २ पोटांत वायु सांचल्यामुळें (पोट) फुगीर होणें. ३ गर्व, अभिमान, ताठा, इ० नीं बेफाम होणें किं० ताठणें. ४ रागानें किं० असंतुष्टपणानें हिरवटपणा करणें.

फुगडी [म० फूफू] स्त्री०मुलींचा एक खेळ. यांत मुली एकमेकींचे हात किं०दंड धरून वाटोळ्या फिरून नाचतात आणि ' फू फू ' असा शब्द तोंडांनीं उच्चारतात.

फुगणें अ० क्रि० १ लठ्ठ होणें; आकारानें वाढणें. २ पोटांत वायु सांचल्यामुळें (पोट) दब्ब होणें. ३ गर्वानें ताठणें. ४ कोणी आपली प्रशंसा केली असतां आनंदित होणें किं० फुशारणें. ५ पाण्याच्या प्रवाहाला वाट न मिळाल्यामुळें (तें) जागच्या जागीं तुंबून राहणें. ६ रुसून बसणें. ७ परिमाणानें वाढणें; उ० कर्ज, खर्च, व्याजाची रक्कम, करावयाच्या कामाचें ओझें, इ० फुगणें. [सुजलेला.

फुगरा [म० फुगणें] वि० १ फुगलेला. २

फुंगरूड न० मागें ' फंगरूड ' पहा.

फुगवटा पु०, **फुगवटी**,**फुगवशी** स्त्री०[म० फुगणें] १ फुगलेपणाची स्थिति. २ सूज.

फुगवणी [म० फुगवणें] स्त्री० १ पाण्याचा प्रवाह कुंठित झाल्यामुळें तुंबतें तें पाणी. २ माणूस, पदार्थ, इ० ची फाजील स्तुति.

फुगविणें [म० ' फुगणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ फुगेल असें करणें. २ अतिशयोक्तीनें वाढविणें. ३ तिखटमीठ लावून (हकीगत) महत्वाची वाटेल असें करणें. ४ आकारानें (पदार्थ) वाढेल असें करणें.

फुगा [म० फुगणें] पु० १ कागद, कातडें, इ० ची पिशवी करून आंत वारा, पाणी, इ० भरलें असतां जो आकार होतो तो. २ साबणाचें पाणी,कांहीं झाडाचा चीक,इ० मध्यें नळी घालून ती तोंडानें फुंकिली असतां जे बुडबुडे उत्पन्न होतात ते प्रत्येक. ३ पाणी इ०चा बुडबुडा. ४ अग्नीनें त्वचा भाजली असतां जो पातळ कवचाचा फोड अंगावर उठतो तो. ५ हजारी कारंजें इ०चा फुगीर जो मुखावयव असतो तो. ६ तांब्या, गडवा, किं० कोणताही पदार्थ यांचा जो फुगीर भाग तो. ७ वायु पोटांत सांचल्यामुळें पोटाला जो फुगीरपणा येतो तो (धरणें). ८ राग; घुस्सा (येणें). ९ घोड्याच्या गुढघ्याखालीं येते ती सूज. १० खोटें मोती.

फुगा [म० फुगणें] वि० १ सुजलेला; फुगलेला. २ गर्वानें किं० रागानें ताठलेला किं० हिरवट झालेला.

फुगारणें [म० फुगणें] अ० क्रि० फुगणें.

फुगारा [म० फुगणें] पु०१ फुगलेला भाग. २ फोड. ३ पदार्थाचा फुगलेला भाग. ४ गति कुंठित होऊन तुंबलेल्या पाण्याचा संचय. ५ भाकरी, पुरी, इ०चा फुगलेपणा.

फुगीर [म० फुगणें] वि० १ फुगलेला. २ गर्वानें ज्याच्या अंगांत ताठा किं० हेकटपणा भरला आहे असा.

फुगें [म०फुगणें] न० १ पाण्यांतील भोंवरा. २ वाहत्या पाण्यांत बंधारा घातल्यानें तुंबलेल्या पाण्याचा संचय (घालणें). ३ देवींचा अंगावर येतो तो फोड.

फुगोटी, **फुगोशी** [म० फुगणें] स्त्री० १ फुगलेपणाची स्थिति. २ वाहत्या पाण्याला बांध इ०चा प्रतिबंध झाल्यानें फुगतें तें पाणी.

फुंज [म०फुंजणें] पु० अभिमान; ताठा.

फुंजणें [सं० स्फुंद्] अ० क्रि० १ स्फुंदणें, हुंदके देणें. २ गर्वानें ताठणें.

फुंजारणें स० क्रि० मागें ' फिंदारणें ', पहा.

फुट अमल इ० पुढें ' फूट अमल ' इ० पहा.

फुटक, **फुटकर** [म० फुटणें] वि० १ फुटलेला; तडा गेलेला; भेग पडलेला. २ ढासळलेला (बंधारा, भिंत, इ०). ३ ज्यांत कांहीं भाग किं० अवयव कमी आहेत असा (पदार्थ).४ इतस्ततः पसरलेला; उधळलेला (सैन्यांतील शिपायी इ०). क्रि० वि० वेगळ्या प्रकारें; पृथकपणें.

फुटकर [म० फुटणें] न० फुटलेलें भांडें.

फुटकळ [म० फुटणें] वि० १ मधून मधून फुटलेला, तुटलेला, ढासळलेला, (बांध, कुंपण, इ०). २ ज्याचे मधले कांहीं भाग नाहींत असा

(ग्रंथ, बांध, तट, इ०). ३ लहान प्रमाणांत किं० परिमाणांत किं० किरकोळीनें विकलेला किं० विकत घेतलेला. ४ जमाखर्चात न नमूद केलेली (रक्कम). ५ सटरफटर: अनेक जातींचें (सामानसुमान). ६ शिवराळ (माणूस, भाषण); फटकळ.

फुटका [**म०** फुटणें] **वि०** १ फुटलेला; तडा गेलेला. २ किरकोळ. ३ ज्यावर किं० ज्याच्या दुसऱ्या बाजूस शाई पसरते किं० जाते असा (कागद). ४ जी कागदावर पसरते किं० दुसऱ्या बाजूस जाते अशी (शाई). ५ अस्पष्ट (लेख). ६ ज्याची अवलोकनाची शक्ति नष्ट झाली आहे असा (डोळा); ज्याची श्रवणशक्ति नाहींशी झाली आहे किं० जो वाहात आहे असा(कान). ७ प्रतिकूल (नशीब). ८ शिवीगाळीचें(भाषण). ९ शिवराळ (माणूस). १० फुटकळ किं० किरकोळ (रकम). ꣸ **द्वारकुताईच्या अंगावर फुटका मणि नाहीं** (किं० **फुटकी फोड नाहीं**) तिच्या अंगावर कांहींच दागिने नाहींत,–इतकी ती गरीब आहे. **फुटका डोळा काजळानें साजरा करावा** आपल्या अंगचा दोष जो नाहींसा करून टाकणें शक्य नाहीं त्याचा होईल तितका उपयोग किं० फायदा करून घ्यावा. **फुटक्या तिनीसांजा क्रि० वि०** अगदीं संध्याकाळीं; करकरीत संध्याकाळीं; कातरवेळीं. **फुटक्या कपाळाचा** (किं०**दैवाचा**) **वि०** दुर्दैवी; कमनशिबाचा. **फुटक्या मनाचा वि०** चंचळ स्वभावाचा; लहरी; छांदिष्ट.

फुटकुळी [**म०** फुटणें] **स्त्री०** त्वचेवर उठतो तो बारीक फोड–मागें 'पुटकुळी,' पहा. ꣸ **फुटकुळ्याचा** (किं० **फुटकळ्यांचा**) **दाथर पु०** अंगावर उठतो तो पुरळ.

फुटगुड्या पु० हिंदूची एक जात किं० त्या जातीचा इसम.

फुटणें [**सं०**स्फुट्] **अ० क्रि०** १**भग्न**, खंडित, विदीर्ण, किं० विसकळीत होणें; फाटणें;तुकड्यांचें रूप पावणें.२(पदार्थाला)भोक,फट,किं०चीर पडणें. ३ बाहेर पडणें; दिसूं लागणें; उ० झाडांना पालवी फुटली.४ (मुलाला हिरड्यांतून दांत) येऊं लागणें. ५ दही, दूध, बासुंदी, कढी,इ०)चोथापाण्याच्या रूपांत येणें. ६ लिहिलेल्या कागदाच्या दुसऱ्या बाजूस (शाई) जाणें. ७ (कागदाच्या) एका बाजूस लिहिलेलीं अक्षरें (कागदाच्या) दुसऱ्या बाजूस जाणें; उ० हा कागद फुटतो. ८ कागदावर लिहिलेलीं (अक्षरें) कागदावर पसरणें किं० दुसऱ्या बाजूस पोचणें. ९(रस्त्याला फाटा) उत्पन्न होणें. १० ताप यावयाच्या पूर्वी (अंग) मोडून येणें किं० कसकसणें. ११ (कांहीं बातमी) जाहीर होणें;-(मसलत, व्यूह) प्रकट होणें. १२ (माणसें, गुरें,इ० चीं) पांगापांग होणें. १३कटांतून (कोणी माणूस) बाहेर पडणें किं० प्रतिपक्षास मिळणें. १४ (गळूं पिकून त्याला) तोंड पडणें. १५ फार बोलल्यामुळें किं० गायल्यामुळें (कंठ, घसा) घोगरा होणें किं० पिंजणें. १६ वयांत आलेल्या मुलाचा (कंठ) मर्दानी होणें. १७ (राघूचा कंठ) शब्द उच्चारावयाला समर्थ होणें. १८ थंडी, जाळवात, इ० मुळें ओठ, हातपाय, इ० भेगाळणें. १९ (नारळ, फणस इ० फळ) झाडांतून उत्पन्न होऊन दिसेसें होणें. २० (डोळे, कान) पाहाणें किं० ऐकणें हे व्यापार करावयाला असमर्थ होणें. २१ दोन किं० अधिक माणसांची संस्था, सरकत, इ० मोडणें. **टीप,**– 'फुटणें' ह्या क्रियापदाच्या अर्थाच्या अनेक छटा आहेत त्या विद्यार्थ्यांला वरील अर्थ पाहून कळण्याजोग्या आहेत. ꣸ **फुटाफूट, फाटाफाट, फाटाफूट स्त्री०** संस्था, टोळी, सैन्य, इ० तील माणसांचीं पांगापांग किं० दाणादाण किं० विसकळितपणा.

फुटरा [**म०** फुटणें] **वि०** १ थंडी,जाळवात, इ० कारणांनीं ज्याला वारंवार भेगा पडतात असा (ओठ, हातपाय, इ०). २ वाऱ्याच्या योगानें जिला भेगा पडतात अशी (जमीन). ३ विस्तवाच्या आचीनें ज्याच्या लाह्या होऊं शकतात असा (जोंधळा, बाजरी, इ०). ४ आंत वारंवार फोड होऊन ते फुटून त्यांतून लस गळत असते असा (कान). ५ ढिसूळ.

फुटवा [**म०** फुटणें] **पु०** झाडाला आलेली नवी पालवी.

फुटळ [**म०** फुटणें] **स्त्री०** भात, हरीक, इ० भरडले असतां जे दाणे पडतात तें समुच्चयानें.

फुटा [**म०** फुटणें] **वि०** वर 'फुटकळ' पहा. ❀ **फुटागूळ पु०** ढेप फुटून ज्याचे अनेक तुकडे झाले आहेत असा गूळ.

फुटाणा [**म०**फुटणें+दाणा] **पु०**भिजत घालून नंतर कांहीं विशिष्ट कृतीनें भाजलेले जे हरभरे ते प्रत्येक. २ (**लाक्षणिक**) तल्लख आणि चुणचुणीत आणि हुशार मुलगा. ❀ **फुटाण्यासारखा उडणें** गर्वानें, ऐटीनें, किं०दिमाखानें चालणें किं० बोलणें. **फुटाणें उडणें** अस्खलित भाषण, वक्तृत्व ,किं० शिव्यांचा वर्षाव चालणें. **एकाद्याचे फुटाणे करणें** (किं० **भाजणें**) त्याला गांजणें किं० जेरसि आणणें किं०सतावणें.**फुटाणी वि०** फुटण्याच्या आकृति ज्यावर छापलेल्या आहेत असें (वस्त्र , चीट). **फुटाणी स्त्री०**पैठण गावीं विणलेला पितांबर,-ज्याच्या विणींत फुटाण्याच्या आकाराचे बिंदु किं० ठिपके विणलेले आहेत.

फुटाळ [**म०** फुटणें] **न०** वृक्षावरून पडून फुटलेलें फळ (आंबा इ०).

फुटाळू [**म०** फुटणें] **वि०** लवकर फुटणारा; ढिसूळ (फळ, धान्य, दगड, इ०).

फुटीर [**म०** फुटणें] **वि०** १ फुटलेलें, तुटलेलें. २ सहज फुटतें किं० मोडतें किं० चिरडतें असें; ढिसूळ. ३ ज्याला जाळवात,थंडी, इ० मुळें वारंवार भेगा पडतात असा (ओठ, हात, पाय, इ०). ४ मधून मधून ज्यांत खंड पडले आहेत असा (बांध, तट, कुंपण, इ०). ५ वरचें सोन्याचें आवरण झिजून गेल्यामुळें आंतील रेशीम दिसूं लागलें आहे अशी (कलावतू).

फुडचा, फुडला इ० मागें ' पुढचा ' इ०पहा.

फुडवट [**म०** फुडें=पुढें] **वि०** पहिलारू अशी (गाय, म्हैस, इ०).

फुणगी [**सं०** स्फुलिंग] **स्त्री०** १ विस्तवाची ठिणगी. २ (**लाक्षणिक**) दोन माणसांत भांडण उपस्थित करण्यासाठीं केलेलें विधान किं० सांगितलेली चहाडी (लावणें). ३ (**लाक्षणिक**) तापट स्वभावाची स्त्री किं० मुलगी.

फुण्णा, फुण्णेदार खालीं ' फुन्ना, ' ' फुन्नेदार 'पहा.

फुंद [**सं०** स्फुंद्] **पु०** १ रडण्याचा हुंदका (चालणें, निघणें, येणें, थांबणें, इ०). २ अभिमान; ताठा; तोरा (येणें, भरणें). **वि०** गर्वानें फुगलेला किं० ताठलेला.

फुंदणी [**सं०** स्फुंदन; **म०** फुंदणें] **स्त्री०** रडण्याचा हुंदका. [रडणें.

फुंदणें [**सं०** स्फुंद्] **अ० क्रि०** हुंदके देऊन

फुदना, फुदाना (**-णा**) , **फुदिना पु०** मागें ' पुदिना, ' ' पुदाणा ' पहा.

फुन्ना [**हिं०** फुना] **पु०** गोंडा; झुबका. ❀ **फुन्नेदार वि०** ज्याला गोंडा किं० गोंडे आहेत किं० लाविले आहेत असा.

फुंपणें अ० क्रि० १ (सर्पादिकानें)क्रोधाविष्ट होऊन फूं फूं असा आवाज करणें. २ (मनुष्यानें) दुःखाचे सुसकारे सोडणें.

फुपाटा, फुंपाटा, फुफाट पु०१ चूल,आगटी, इ०तलि तापलेली राख. २ सूर्यकिरणांनीं तापलेली वाळू किं० धूळ. ३ शुष्क म्ह० आर्द्रतारहित माती. ४ धूळ. ५ बढाया (करणें).

फुपावणें, फुफावणें अ० क्रि० कोणेकावर चरफडणें.

फुप्फुस [**स०**] **पु०, न०**शरीरांतील श्वासोछ्वासाच्या क्रियेचा अवयव.

फुफा स्त्री० संपत्ति, सामग्री, इ०ची उडविलेली धूळधाण किं० नासाडी.

फुयजी, फुयी [**हिं०** फूया] **स्त्री०** मागें ' फुइजी ' पहा.

फुरई मागें ' दंड ' मध्यें ' दंडफुरई ' पहा.

फुरकट, फुरकूट, फुरगूट पु०, न० रुसवा, घुस्सा (चढणें, येणे).

फुरकटणें, फुरकुटणें, फुरगुटणें अ० क्रि० १ गर्वानें फुगणें. २ रुसणें.

फुरकणें स० क्रि० १(पातळ पदार्थ)ओठांनीं तोंडांत ओढून घेणें. २ ओठ अर्धवट दाबून (थुंकी) बाहेर सोडणें किं० उडविणें.

फुरकी [**म०** फुरकणें] **स्त्री०** फुरकण्याची क्रिया. वर ' फुरकणें ' पहा.

फुरकूट, फुरगूट न०१द्वाडपणानें कोणेकाच्या कामांत केलेलें विघ्न, किं० हरकत(फोडणें).२भाषणांत केलेलें विषयांतर किं० बोलेलेलीं भलतीच गोष्ट.३ रुसवा, घुस्सा. ४ ताठा, गर्व.

फुरडी स्त्री०पाण्यांत होणारा एक कंदविशेष. याला ' कसर ' असेंही म्हणतात.

फुरडूक, फुरडुकें इ० मागें ' फरडूक ' इ० पहा.

फुरण [**सं**० स्फुरण] **न**० १ फुरफुरणें. २ कंप. ३ चमकणें. ४ विचार फुरणें म्ह० एकदम सुचणें किं० मनांत येणें किं० कांहीं गोष्ट एकदम आठवणें.

फुरणें [**सं**० स्फुर्] **अ० क्रि**० १ डोळा इ० एकदम कंपित होणें. २ (विचार, कल्पना, इ०) एकदम सुचणें किं० आठवणें. ३ मारणें, कुस्ती करणें, बोलणें, इ० क्रिया करावयाला (हात, दंड, जिव्हा, इ०) उत्सुक होणें.

फुरकुरी, फुरकुर स्त्री०, **फुरकुरें न**० हरभ-ण्याचें पीठ तळून करतात तें तोंडीलावणें.

फुरशीस मागें ' पुरशीस ' पहा.

फुरसत (–द), फुरसूत (–द) [**अ**० फुरसत्] **स्त्री**० रिकामा वेळ; विशिष्ट गोष्ट घडायाच्या अगोदरचा कालावधि; सवड.

फुरसें न० एक भयंकर जातीचा विषारी [सर्प.

फुरारणें अ०**क्रि**०फुरफुर असा आवाज करणें.

फुलकारी, फुलगोटा इ० पुढें ' फूल ' मध्यें पहा.

फुलकें [**म**० फूल] **न**० पोकळ दाणा [(धान्याचा).

फुलणें [**म**० फूल] **अ**० **क्रि**० १ (फुलाची कळी) विकसित होणें, विकास पावणें, उमलणें. २ (झाड, लता) फुलांनीं व्याप्त होणें. ३ (जोंधळा, बाजरी, इ०चे दाणे) अग्निसंयोगानें लाहीचें रूप पावणें. ४ लाकूड इ०मध्यें खिळा ठोकल्यावर(खिळ्याचें टोक)दुसऱ्या बाजूकडून विशिष्ट प्रकारें ठोकलें गेल्यानें पसरून रुंद होऊन (खिळा) पक्का होणें. ' खिळा फुलला ' किं० ' खिळ्याचें टोक फुललें ' असें प्रयोग होतात. ५ (मांजराची शेपटी, माणसाच्या नाकपुड्या) क्रोधावेशानें रुंद किं० पसरट होणें. ६ स्थळविशेष अनेक माणसांच्या दाटीनें युक्त झालेलें असणें. ७माती,धान्याचे दाणे,इ० भिजल्यामुळें आकारानें वाढणें किं० फुगणें. ८ अंगावर उठलेले (देवीचे फोड) टरटरून फुगणें. ९ आपली स्तुति ऐकून किं० इष्ट वस्तु मिळाल्यानें (चेहरा) टवटवीत होणें. १० (गाय,घोडा,इ०) पांढऱ्या ठिबक्यांनीं युक्त असणें. ११ वार्धक्यामुळें(डोकें,अंग, इ०च्या वरचे केश) पांढरे होणें. १२ विचरलेल्या केशांतील) जटा नाहींशा होणें. १३ (पक्ष्यांचीं पिसें) वाऱ्याच्या झोतानें पसरणें.१४(निखारे)वाऱ्याच्या प्रवाहामुळें प्रज्वलित होणें.

फुलपणें, फुलपैणें [**म**० फूल] **अ**० **क्रि**० धान्याचीं ताटें फुलांनीं युक्त होणें.

फुलफुलणें [**म**० ' फुलणें ' चें एक रूप] **अ**० **क्रि**० १ (डोळे, नाकपुड्या) रागानें किं० आनंदानें विस्तृत होणें. २ (चेहरा) टवटवीत होणें. ३ आपली स्तुति ऐकल्यानें किं० इष्ट वस्तु मिळाल्यानें (मनुष्य) आनंदित होणें.

फुलवरा [**म**० फूल] **पु**० १ फुलांची माळ. २ बाजरीच्या कणसाभोंवतीं असतो जो पुष्पसमुदाय तो. ३ धान्याच्या ताटांच्या अग्राला येतो तो पुष्पसमुदाय. ४ देवाच्या मूर्तीवर लोंबत सोडलेली फुलांची किं० फळांची माळ.

फुलविणें [**म**० ' फुलणें ' चें प्रयोजक] **स**० **क्रि**० १ (विस्तव) वारा घालून प्रदीप्त करणें. २ कोणेकाची स्तुति करून (त्याला)खूष करणें. ह्या अर्थी ' वेळवावर बसविणें,' ' खंडेराव करणें,' असेंही वाक्प्रचार आहेत. ३ लाकूड इ० मध्यें ठोकलेल्या खिळ्याचें दुसऱ्या बाजूकडून बाहेर पडलेलें (टोक) पसरट करणें. ४(ऋतुविशेषानें) वृक्षलतादिकांना पुष्पयुक्त करणें. ५ मांजर, किं० पक्षी, यांनीं (शेपटीचे केश किं० पिसें)उभारणें. ६ अग्नीनें (जोंधळे, बाजरी, ह्यांना) लाह्यांचें रूप देणें. ७ स्तुतीनें (कोणेकाच्या चेहऱ्यास) टवटवी आणणें.॥**कोणेकाला फुलवून त्याच्याकडून काम करवून घेणें** त्याची खुशामत करून किं० त्याला चढवून त्याच्या कडून आपलें काम करवून घेणें.

फुलार [**म**० फूल] **वि**० १ ढिसूळ.२पोकळ; विरळ. ३ वजनानें हलका. ४ नाजूक.

फुलारणें [**म**० फुलविणें] **स**० **क्रि**० १ विस्तृत करणें; पसरणें. २ पोकळपणानें (पदार्थ) रचणें. ३ खुषामत करून किं० लाड करून (कोणेकाला) प्रसन्न करणें किं० अनुकूल करून घेणें.

फुलारी [**म॰** फूल] **पु॰** १ फुलांच्या बागा करणारा किं॰ फुलें विकणारा. २ प्रत्यक्षरी 'फूल' ह्या शब्दाचा उच्चार करावा अशा संकेताची दोन माणसांनीं एकमेकांशीं बोलण्यासाठीं ठरविलेली भाषा; फुल्कारी भाषा.

फुली [**म॰** फूल] **स्त्री॰** १ फुलाची आकृति. २ पांच बंदांचा किं॰ तावांचा संच; पंचकडी. ꙮ **फुली घालणें** कोणेकाच्या कामांत विघ्न उपस्थित करणें किं॰ तें बंद पाडणें. **फुलीफाटा पु॰ ए॰ व॰** लेखांतील अक्षरें किं॰ शब्द खोडण्यासाठीं केलेली फुली किं॰ ओढलेली रेघ.

फुलेण,फुल्येण [**म॰** फूल+तण; **सं॰** तृण] **न॰** गुरांच्या खाण्याच्या उपयोगाचें नाजुक गवत. छपरावर घालतात तें खरखरीत गवत असतें.

फुलेल [**म॰** फूल+तेल] **न॰** तिळाचें तेल, –चमेली,मोगरा, इ॰च्या अर्कानें सुगंधित केलेलें.

फुलोरा पु॰ मागें 'फुलवरा' पहा.

फुल्लार [**म॰** फुलणें] **वि॰** विकसित, उमललेलें (फूल) **न॰** फूल.

फुलिंग [**सं॰** स्फुलिंग] **न॰** विस्तवाची [ठिणगी.

फुशारकी, फुशारी स्त्री॰ १ प्रौढी, बढाई (मारणें, मिरविणें). २ आपल्या पराक्रमाच्या किं॰ कर्तृत्वाच्या बाता (सांगणें). ꙮ **फुशारखोर वि॰** बढाईखोर. [किं॰ फुगणें.

फुशारणें अ॰ क्रि॰ शेफारणें; गर्वानें ताठणें

फुसकट न॰ भूस, कोंडा **वि॰** अशक्त; पोकळ; ढिसूळ. ꙮ **कोणेकाचे फुसकट पाडणें** त्याची रग जिरविणें; त्याला जेरीस आणणें.

फुसकणें अ॰ क्रि॰ १ तुटणें; मोडणें.२ हुकणें; चुकणें; (बाण) लक्ष्याला न लागणें. ३ फसगत होणें.

फुसका वि॰ पोकळ; निःसत्त्व; ढिसूळ.

फुसकारणें अ॰क्रि॰१ (सर्पानें) फूत्कार करणें; २ फरफरणें; खिसखिसणें.

फुसकी, फुसकुली स्त्री॰ १ मोठा आवाज न होतां बाहेर पडतो तो अपानवायु. २ कोणेकाविरुद्ध केलेलें कुत्सित किं॰ कुचकें भाषण किं॰ विधान.

फुसडी स्त्री॰ १ चाबकाची दोरी. २ लाकडाची धलपी. ३ वस्त्राची दशी.

फुसकुशीत वि॰ १ पोकळ (जमीन). २ ढिसूळ; अशक्त; लेचापेचा (माणूस, पदार्थ).

फुसफुसणें अ॰ क्रि॰ चरफडून तोंडांतल्या तोंडांत असंतुष्टपणाचे उद्गार काढणें.

फुसलावणी [**म॰** फूस+लावणें] **स्त्री॰** १ लालूच दाखवून कोणेकाला वश करून घेणें. २ दोन माणसांत लावून दिलेली कलागत.

फुसलावणें [**म॰** फूस+लावणें] **स॰ क्रि॰** कोणेकाला लालूच दाखवून स्ववश करून घेणें.

फू,फूं उ॰ वा॰अ॰ छेः ! छिः ! **वि॰** १ रागावलेला; घुस्सा चढलेला; उ॰ तो मजवर उगीचच फू झाला. २ मोडलेली (मैत्री); उ॰ राम्यानें सद्याची गडी फू केली. ꙮ **फू करणें** फुंकरासरशीं उडवून लावणें. **नदी फू होऊन चालली होती** नदी पाण्यानें तुडुंब भरून जोरानें वाहात होती.

फूग [**म॰** फुगणें] **स्त्री॰** १ फुगलेपणाची स्थिति. २ फुगवटा; फुगारा. ३ पाण्याचा प्रवाह तुंबविण्यासाठीं घातलेला बांध.

फूट [**म॰** फुटणें] **स्त्री॰** १फुटण्याची क्रिया. २ पदार्थ फुटल्यामुळें किं॰ फाटल्यामुळें पडते ती चीर किं॰ फट. २ संस्थेंतील माणसांत मतभेदामुळें होतो तो बेबनाव (पडणें). ३ गुप्त गोष्टीची परिस्फुटता. ४ तांदूळ इ॰ कांडतांना जे तांदूळ इ॰ फुटतात ते समुच्चयानें; फुटके तांदूळ इ॰ समुच्चयानें. ५ भात, हरीक, इ॰ भरडतांना त्यांचे फुटतात ते दाणे समुच्चयानें. ६ झाडांची नवी पालवी. ७ आंब्याची कैरी.**न॰**१ आंब्याची कैरी. २ कलिंगडाची एक जात. ꙮ **फूटतूट स्त्री॰** १ सामान, भांडीं, विटा, कौलें, इ॰ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं वाहून नेतांना होते ती नासाडी. २ फुटकें तुटकें सामान. **फूट अंमल पु॰** गांवाच्या कांहीं बाबती एकाच्या देखरेखीखालीं आणि दुसऱ्या कांहीं बाबती दुसऱ्याच्या देखरेखीखालीं असणें अशी शासनपद्धति किं॰ राज्यसरणी.

फूत्कार [**सं॰**] **पु॰** फुंकर; तोंडानें जोरानें घातलेला किं॰ सोडलेला वारा. २ फुसकारणें. ३ स्फुंदणें. ४ रागाचा किं॰ कुत्सितपणाचा उद्गार किं॰ विधान.

फूत्कारणें [म० फूत्कार] स० क्रि० रागाचा किं० कुत्सितपणाचा (उद्गार) काढणें.

फूल [सं० फुल्ल=फूल] न० १ झाड, वेली, इ० कांस पूर्ण वाढ झाल्यावर अत्यन्त सुंदर अवयव फुटतो तो,–ज्यांतून बहुधा फळ उत्पन्न होतें. २ ठिणगी. ३ फुलाच्या आकाराची कोणतीही वस्तु. ४ नळा, चंद्रजोत, इ०, उडत असतां ज्या सुंदर रंगीबेरंगी ठिणग्या निघतात त्या प्रत्येक. ४ फलाणी, कापसाचें वस्त्र, इ० वर जे मऊ केसर केश किं० तंतु असतात ते समुच्चयानें. ५ डोळ्याच्या बुबुळावर विकृतिविशेषानें पांढुरका उत्पन्न होतो तो ठिपका (पडणें). ६ दगड, लाकूड, इ० वर पावसाळ्यांत बुरशीसारखा उत्पन्न होतो तो पदार्थ. ७ उदाचा धूर मडक्यांत कोंडला असतां जो काळसर थर मडक्यावर साचतो तो. ८ एक जंगली झाड. ९ बायकांचें डोकींत घालावयाचें एक भूषणविशेष. १० अग्निसंयोगानें जस्ताचा लाहीसारखा होतो तो पदार्थ. ११ सुपारी बारीक कातरून जो हल्का चुरा करतात तो. १२ (**लक्षणेनें**) हलकें ओझें; उ० हें गांठोडें हल्कें फूल आहे, मी तें सहज विठ्ठलवाडीपर्यंत घेऊन जाईन. १३ घोडा, गाय, इ० च्या अंगावरचे पांढरे ठिपके प्रत्येक. १४ दिवा दिव्याच्या ज्योतींत धरला असतां खालीं पडतात जे बिब्ब्याच्या तेलाचे थेंब ते प्रत्येक. १५ स्त्रीच्या गर्भाशयाच्या ज्या भागांत प्रथम गर्भ उत्पन्न होतो तो भाग. ※ **फूलकारी स्त्री०** मागें ' फुलकारी ' पहा. **वि०** ज्यावर फुलाच्या आकृति आहेत असें (कापड,कागद,इ०). **फूलगोटा पु०** एक प्रकारची रवाळ साखर. **फूलचोचे पु० अ० व०** तुंबडी लावावयाच्या अगोदर तीक्ष्ण शस्त्रानें त्वचेवर करतात ते छेद (देणें, घेणें, मारणें). **फूलजी पु०** १ गर्वानें ताठलेला किं० फुगलेला माणूस. २ कोणी स्तुति केल्यानें वश होणारा माणूस. **फूलछडी स्त्री०** फुलें गुंफून हातीं धरावयाच्या छडीसारखी छडी करतात ती. **फूलझगरें न०** गोवऱ्या, काटक्या कुटक्या, इ० चा जळता ढीग. **फूलझडी स्त्री०** फुलबाजी,–आतषबाजीचा एक पदार्थ. **फूलझाड न०** १ फुलांसाठीं जें झाड लावतात तें; ज्याला वासाची किं० सुंदर फुलें असतात असें लहानसें झाड. **फूलपगडी स्त्री०** १ लहान, सुंदर, आणि भारी किंमतीचें पागोटें. २ दिसण्यांत भपकेदार पण अल्प किंमतीची वस्तु. **फूलपगर न०** स्त्रियांचें फुलाच्या आकाराचें शिरोभूषणविशेष. **फूलपत्री स्त्री०** देवाच्या पूजेसाठीं गोळा केलेलीं फुलें,पानें,इ०समुच्चयानें. **फूलपांखरूं न०** चित्रविचित्र पंखांचा फुलावर उडत असणारा बारीक प्राणी. **फूलपात्र न०** पाणी प्यावयाचें आकारविशेषाचें भांडें. **फूलफासण्या स्त्री० अ० व०** मागें ' फूलचोचे ' पहा. **फूलबरडा पु०** कृतिविशेषानें तयार केलेली सुपारी. **फूलबाग पु०** फुलांसाठीं केलेला बाग. **फूलबाजी स्त्री०**आतषबाजीसाठीं कागद इ० च्या नळींत दारू ठासून करतात तो पदार्थ. **फूलबासन, फूलवासन न०** उंची सणंगाचें रक्षण व्हावें म्हणून तें ज्या वस्त्रांत गुंडाळून ठेवतात तें वस्त्र. **फूलविसनी वि०** १नाजूक(माणूस). २ आपण नाजूक अशी ऐट करणारा छाकटा (माणूस).**फूलमाळी पु०**फुलझाडें लावून, फुलांचें हारतुरे, गजरे, इ० करून ते विकून चरितार्थ करतो तो. **फूलमेंगा पु०** षंढ; नपुंसक. **फूलवात स्त्री०**निरांजनांत तूप घालून त्यांत देवापुढें जळत ठेवतात ती कापसाची आकारविशेषाची वात. **टीप,**–' फूल ' शब्द सामासिक शब्दांत पूर्वपद असतां तो विकल्पानें ' फुल ' असा होतो. तसेंच ' फूल 'शब्द विभक्तिप्रत्ययापूर्वीं आणि शब्दयोगी अव्ययापूर्वीं ' फुल ' हें रूप धरतो. **फुलांत घालून ठेवणें (राखणें** किं०**जपणें**) काळजीपूर्वक रक्षिणें. **फुलें विकलीं तेथें गोवऱ्या विकूं नयेत** जेथें वैभवानें आपण एकेकाळीं वसति केली तेथें विपन्न स्थितींत राहावयाला जाऊं नये. **स्त्रीचें फूल चळणें** तिचा गर्भाशय स्थानभ्रष्ट होणें. **दिव्याला फूल देणें** तो मालविणें. **फूल नाहीं फुलाची पाकळी देणें** भरपूर रक्कम देण्याची ऐपत नसल्याकारणानें त्या रकमेचा अत्यल्प अंश देणें. हा शालीनतेचा उद्गार आहे. **फूल बाहेर पडणें** (किं० **निघणें**) रहस्य बाहेर पडणें; गुप्त गोष्ट जाहीर होणें. **फूल वाहणें** आपली मुलगी लग्नाच्या विधीनें वरास देणें.

फूस स्त्री०१कोणाला कांहीं बदकर्म करावयाल

गुप्तपणें दिलेलें उत्तेजन (देणें). २ कोणाच्या बदकर्माकडे केलेला काणा डोळा (देणें). ३ दोन माणसांत कलहाचें बीज पेरणें (लावणें). ४ रिकामा किं० फुरसुतीचा वेळ (मिळणें, फावणें, इ०). ५ अनुकूल समय; संधी. **पु०, न०** रद्दी सामान; सटरफटर; अडगळ. **पु०** नासका नारळ, ताडगोळा, इ०. २ मोड आलेला नारळ किं० ताडगोळा यांच्या पोटांत जो फुसफुशीत अंश उत्पन्न होतो तो.

फूस वि० ढिसूळ; लेचापेचा; निःसत्त्व. ॐ **फूसफास वि०** रद्दी; टाकाऊ; भिकार. **फूसफास स्त्री०** १ पांचट भाषण; पोरचेष्टा (लावणें, मांडणें). २ असंतुष्टपणाची पिरपीर किं० चरफड.

फें, फेंफें उ०वा०अ० धिक्कार असो! उ०तुला फें आणि तुझ्या बापाला फें! ॐ **कोणेकाची फेंफें उडणें** त्याची धांदल होणें; त्याची फजिती होणें. **हें काम करतांना त्याची फेंफें उडाली** त्याचा जीव रडकुंडीस आला; त्याच्या नाकीं नव आले.

फेक [म० फेकणें **] स्त्री०** भाला इ० शस्त्र फेकण्याची क्रिया.

फेक क्रि० वि० अत्यंत (पांढरा).

फेकणें [हिं० फेंक्ना **] स० क्रि०** १ दूर झुगारून किं० उडवून देणें. २ (घोडा) जलद चालविणें. ३ (जासूद) जल्दीनें पिटाळणें किं० धाडणें किं० पाठविणें. ४ (पागोटें, मुंडासें) ऐटीनें डोकीवर घालणें किं० चढविणें.

फेंगडा वि० १ ज्या तंगड्या गुडघ्यापाशीं धनुष्याकार होऊन गुडघे दूरदूर झाले आहेत अशा (तंगड्या); फेंगडी **स्त्री०ए०व०**; फेंगड्या **स्त्री० अ० व०**. २ फेंगड्या तंगड्या असलेला. (माणूस). ३ फेंगड्या माणसाचें (चालणें). तो फेंगडा चालतो किं० त्याचें चालणें फेंगडें आहे असे प्रयोग होतात.

फेट पु० वस्त्राचा सोगा. ॐ **कोणेकाला फेट गळ्यांत घालून पकडणें** त्याला पक्केपणीं धरून ठेवणें. **कोणेकाचा फेट धरणें** त्याला पकडून धरणें.

फेट न० लाकडाची निमुळती पट्टी,–सांधा उखळावयासाठीं योजावयाची.

फेटा [हिं०] पु० १ लहान पागोटें. २ डोकीला बांधावयाचा पटका.

फेटाळ [म० फेट=सोगा **]वि०** १व्यभिचारी (पुरुष किं० स्त्री०). २ ज्याला किं० जिला अतिशय कामविकार आहे असा (पुरुष) किं० अशी (स्त्री).

फेड [म० फेडणें **] स्त्री०** १(कर्ज) देऊन टाकणें. २ (नवस) पुरा करणें. ३ दुसऱ्या कोणीं केलेल्या अपकाराबद्दल आपण त्याचा केलेला उलट अपकार. ४ जें कांहीं उलट केलें तें; उ० अपकाराची फेड उपकारानें साधुपुरुष करतात.

फेडणें [म० 'फिटणें' चें प्रयोजक **] स० क्रि०** १ (नेसलेलें वस्त्र, घातलेली चड्डी, विजार, लंगोटी, इ०) सैल करणें किं० अजीबात काढून टाकणें. २ (ऋण, उपकार, डाव, इ० चें ओझें) नाहींसें करणें किं० नाहींसें करून आपण मोकळें होणें. ३ कांहीं मनःकामना पूर्ण व्हावी म्हणून देवाला केलेला जो (नवस) त्यांत कबूल केलेल्या शर्ती ती मनःकामना पूर्ण झाल्यावर अमलांत आणणें. ४ (नाक) शिंकरणें. ५(भांडें, बारदान) आंतील पदार्थ काढून रिकामें करणें. ६ दूर करणें; निवारणें; (अडचणी, संकटें) निस्तरणें किं० पार पाडणें; उ० असतील बाळ तर फेडतील काळ (काळ=दैवगतीनें येणाऱ्या अडचणी). ७ समाधानकारक उत्तर देऊन (शंका) निवारणें.

फेडा पु० मृदंगादिकांचा जो पुडा तो.

फेण [सं० फेन **] पु०** पाणी इ०वरचा फेस.

फेणणें [म० फेण=फेस **] अ० क्रि०** फेसानें युक्त होणें.

फेणी [म० फेण **] स्त्री०** १ काहिलींत कढविला जात असलेला जो उसाचा रस त्याची काढलेली मळी. २ तारफेणी,–एक खाद्यविशेष. ३ तोंडीं लावावयाच्या उपयोगाचा पापडासारखा एक पदार्थविशेष. ४ मोठ्या आकाराचा बत्तासा.

फंद पु० १हिशेबांत किं० हकीगतींत आढळून आलेली तफावत किं० चुकी.२ छंद; नाद; फंद.

फेंदडणें स० क्रि० १ थापा मारून किं०फस-वून (कोणेकाला) त्याच्या मित्रापासून, धन्या-पासून, किं० आप्तापासून दूर करणें. २ (कोणे-काला) स्थानभ्रष्ट करणें.

फेंदडणें अ० क्रि० (नाक) चपटें किं० बसकें होणें. पुढें ' फेंदरणें ' पहा.

फेंदडणें, फेंदरणें, फेंदाडणें, फेंदारणें स० क्रि० रागानें किं० असंतुष्टपणानें (नाक) मुरडणें.

फेंदणें अ० क्रि० सावकाश किं० रेंगाळत चालणें. ' फेंदत चालणें, ' ' फेंदीखालीं चालणें ' असेही प्रयोग होतात.

फेंदरा वि० १ चपटें, बसकें (नाक). २ चपट्या किं० बसक्या नाकाचा (माणूस).

फेंदू वि० लठ्ठ आणि कमजोर; दिसण्यांत लठ्ठ पण शक्तिहीन.

फेंदू पु० १ मारून ठेचलेला विंचू, साप,इ०. ३ नासलेलें किं० सडलेलें फळ. ' मेंदू, ' ' वेंदू ' ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

फेन [**सं०**]**पु०** १ पाणी, दूध,इ०च्या वरचा फेस. २ समुद्रफेस. ३ गुळाचा राव. ❀ **फेनिल** [**सं०**] **वि०** फेसाळलेला; फेसानें युक्त.

फेपराई, फेपरआई स्त्री० तोतरें भाषण.

फेपरी, फेपडी स्त्री० १ तोतरें भाषण. २ वाग्जलपना; भाषण (तुच्छतेनें); उ० तुझी फेपरी (किं० फेपडी) बंद करावयाला मला किती वेळ लागेल ? ❀ **कोणेकाची फेपरी** (किं० **फेपडी**) **वळणें** तो बोलतांना घाबरणें; भयानें तो स्पष्ट बोलावयाला असमर्थ होणें.

फेपरें न० १अपस्मार वायु,–ज्यामुळें तोंडाला फेस येऊन मनुष्य निश्चेष्ट पडतो. २ पिशाचबाधेनें अशीच होते ती अवस्था. **टीप,**–दोन्ही अर्थी **क्रि०** येणें, लागणें. ❀ **फेपरेकरी वि०** ज्याला फेपरें येण्याची खोडी आहे असा (माणूस). **फेपऱ्यादेवी स्त्री० अ० व०** ज्या देवी आल्या असतां मनुष्याला फेपऱ्याचे झटके किं० लहरी येतात अशा देवी,–एक त्वग्रोग.

फेपाणा वि० चपट्या किं०बसक्या नाकाचा (मनुष्य).

फेफे,फेंफें स्त्री० १त्रेधा; तिरपीट (उडणें).२ दीनपणाची स्थिति (उडणें). ३ फजीती. मार्गे ' फें ' पहा,

फेर [**म०** ' फिरणें ' पासून] **पु०** १ चक्राकार गति; वाटोळें जाणें किं० चालणें किं०वळणें.२ तफावत; भिन्नता; वेगळेपणा. ३ अंतर; दूरपणा. ४ आजार, मनाची स्थिति किं० वृत्ति, **इ०** मध्यें पडलेला फरक. ५ रस्ता, नदीचा प्रवाह, इ०चें वळण किं० वाक. ६ गाणें, बोलणें, इ० मध्यें होतो किं० केला जातो तो चढ उतार; उ० त्याच्या कंठांत फेर चांगला आहे. ७ वर्तुळाचा परिघ. ८ वस्त्राचा सोगा; कपड्याचा घेर. ९ बायका नागपंचमीस गात गात फिरतात ज्या वाटोळ्या मार्गानें तो मार्ग किंवा प्रकार(धरणें).१० रस्त्याचा किं० प्रवाहाचा वळसा किं० वळण.११ काठी,दोरी,इ०ची नागमोडं. १२काठी इ०भोंवतीं दोरी इ०चा लपेटा. ❀ **फेर घेऊन मुतणें** कांहीं वाईट गाष्टींचा धडा घालून देणारा जो गुरु त्याच्या कृतींत किं० उपदेशांत वात्रटपणाची भर घालून वर्तन करणें. **टीप,**–कोणी उभ्यानें मुतावयास सांगितलें असतां वाटोळें फिरत फिरत मुतणें. ❀ **फेरकरवत पु०** इमारती लाकडाच्या मोठ्या आणि जाडी सोटाचे तक्ते पाडण्याची बहुधा चौकटींत बसविलेली आणि दोन माणसांनीं चालवावयाची करवत. **फेरगोष्ट स्त्री०** वरिष्ठाला उद्धटपणानें दिलेला जबाब; वरिष्ठाची चुकी दाखवून देणारा जबाब. **फेरघोडी स्त्री०** १एकदा पराजय झाला असतां प्रतिपक्ष्याशीं पुन्हा झुंजावयाला सिद्ध होणें (करणें). २ फेरगोष्ट (करणें). वर ' फेरगोष्ट ' पहा. **फेरपगडी, फेरबगडी स्त्री०** १ फेरगोष्ट. २ पहिल्यानें स्वीकारलेला पक्ष सोडून विरुद्ध पक्षास मिळणें. ३ कांहीं बदकर्मात दुसऱ्यावर सरशी मिळविणें. ४ वचनभंग करणें. **फेरघोडें न०** प्रत्यपकार; सूड.

फेर [**हिं०; म०** फेर] **क्रि० वि०** १ पुन्हा. २ परत. ३ उलट; उलटून. **फेरफटका पु०** चक्कर; फिरणें; पाय मोकळे करावयासाठीं हिंडणें. **फेरफार पु०** बदल; दुरस्ती.

फेरणी [**म०** फेरणें] **स्त्री०** फेरण्याची क्रिया. खालीं ' फेरणें ' पहा.

फेरणें [**म०** ' फिरणें ' चें प्रयोजक] **स०**

क्रि० १ (घोड्याला) मंडळांत किं० इतस्ततः चालविणें किं० फिरविणें. २ (पदार्थ)उलथापालथा करणें. ३ (तरवार इ०चे) हात करणें; परजणें.

फेरा [**म०** फेरणें] **पु०** १ चक्कर; वाटोळी गति; मंडळाकार चालणें किं० चालविणें.२ रस्ता. नदीचा प्रवाह इ०चें वळण. ३विनाकारण करावी लागलेली खेप किं० जाण्यायेण्याची यातायात. ४ पंचाइतीची स्थिति; पेच; घोटाळा (सापडणें, पडणें). ५ वळसा; परिघ; वेटोळें.

फेरिस्त, फेरीस्त [**फा०** फहूरिस्त] **न०** १ यादी; टिपण. २ महत्त्वाच्या कागदांचें कांहीं विशिष्ट क्रमानें केलेलें टाचण.

फेरी [**म०** फेरा] **स्त्री०** १ प्रदक्षिणा;चक्राकार गति. २ विशिष्ट स्थळाप्रत जाणें किं०जाऊन येणें. ३ वर्तुळ; मंडळ. ֍ **फेरीवाला, फेरेकरी पु०** १ बरोबर माल घेऊन ठिकठिकाणीं जाऊन तो माल विकणारा. २ दारोदार हिंडून भिक्षा मागणारा.

फेल न० उडीद, तूर, वाल, इ०चीं वांझोटी शेंग किं० हरभऱ्याचा वांझोटा घाटा.

फेलाव, फेलावणी पुढें ' फैलाव, ' ' फैलावणी, ' पहा. [फाक.

फेस स्त्री०भोपळा इ०चा तुकडा;फोड; काप;

फेस पु० पाणी, ताक, दूध,इ०ढवळलें असतां त्यांच्यावर जे असंख्य बारीक बारीक बुडबुडे येतात ते समुच्चयानें. ֍ **फेसट, फेसकट वि०** ज्यावर फेस आहे असें (पाणी, दूध, इ०).

फेसणी [**म०** फेसणें] **स्त्री०**पृष्ठभागावर फेस उत्पन्न होईल अशा प्रकारें कांहीं पातळ पदार्थ ढवळण्याची क्रिया.

फेसणी स्त्री० भोपळा इ०च्या फाकी किं० फोडी करण्याची क्रिया.

फेसणें स० क्रि० फेस उत्पन्न होईल अशा प्रकारें पदार्थ ढवळणें. **अ० क्रि०**फेसानें युक्त होणें.

फेसळणी [**म०** फेसळणें] **स्त्री०** फेसानें युक्त होणें किं० करणें.

फेसाटणी [**म०** फेसाटणें] **स्त्री०** फेसाटण्याची क्रिया. खालीं ' फेसाटणें ' पहा.

फेसाटणें स० क्रि० पेरलेल्या शेताच्या पृष्ठभागावर फेसाटी फिरविणें. खालीं 'फेसाटी' पहा.

फेसाटी स्त्री० १ काटक्याकुटक्यांचा भारा. २ पेरलेल्या शेताचा पृष्ठभाग सारखा करण्यासाठीं आणि पेरलेलीं बीजें मातीनें आच्छादण्यासाठीं काटक्याकुटक्यांचा भारा जो जमीनीवरून ओढीत नेतात तो. ֍ **गाडीची वाट फेसाटीनें मोडावी** सहजासहजीं हातीं येणाऱ्या साधनांनी इष्ट हेतु साधून घ्यावा.

फेसाळ वि० फेसानें युक्त.

फैल [**अ०** फअल्=कृत्य; कृति] **स्त्री०**छाकटेगिरीचीं कृत्यें; छचोरपणाच्या कृति.֍**फैलजामीन** बदमाष माणसापासून सरकारनें घेतलेला जामीन; जातमुचलका. **कोणेकाला फैलावर धरणें** (किं० **घेणें**) १ त्याला कामाखालीं जेरीस आणणें. २ त्याची कसून तपासणी करणें.

फैलाव, फैलावा, फैल [**हिं०**] **पु०** १ पसारा; विस्तार; पसरणें. २ वाढ.

फैलावणें [**हिं०** फैल्ना] **अ० क्रि०** पसरणें; वाढणें. [करणें; वाढविणें.

फैलाविणें [**हिं०** फैलाना] **स० क्रि०** विस्तृत

फैसल पु०, स्त्री०, फैसला, फैसला पु०१ निकाल; निवाडा. २ कर्जाची फेड. ֍ **फैसल नामा पु०**कागदावर सहीशिक्क्यानिशीं लिहिलेला निकाल किं०निवाडा. **फैसलपत्रक, फैसलेपत्रक न०**निकालांत काढलेल्या कामांचा तक्ता.

फोक पु० १ झाडाची बारीक सरळ फांदी किं० डहाळी. २ एक मासा. ֍ **तरणाफोक पु०** ऐन उमेदींत असलेला कोणीही माणूस; तारुण्याच्या पूर्ण सामर्थ्यानें युक्त असा माणूस.

फोक [**हिं०**] **पु०** जुलाब; रेच.

फोकणें स० क्रि० १ (धान्याचे दाणे, बीजें, इ०) हातातें उडवून जमीनींत पेरणें. २ (बातमी) सर्व लोकांत जाहीर करणें.

फोकलणें [**हिं०** फोक] **अ० क्रि०** पातळ हगणें; ढेंढळणें.

फोकलणें [**म०** फोक] **स० क्रि०** झाडाच्या बारीक फांदीनें मारणें.

फोकाटी [**म०** फोक] **स्त्री०** १ लहान फोक म्ह० झाडाची फांदी. २ सडपातळ माणूस.

फोकांडा पु०, फोकांडी स्त्री० गुदद्वारें

झालेलें पातळ मळाचें विसर्जन. ❀ **कोणेकाला फोकांडी लागणें** गुदद्वारें पातळ मळाचें विसर्जन होण्याच्या विकृतीनें तो जर्जर झालेला असणें.

फोगी स्त्री० गलवताच्या नाळीवर लावावयाचें त्रिकोणाकार शीड.

फोट [सं० स्फोट] पु० १ पायाच्या टाचेला कांहीं विकृतीमुळें पडलेली भेग. २ गळूं; फोड.

फोट [म० फोडणें] स्त्री० १ प्रकट करणें, उघडकीस आणणें. २ विभाग करणें. स्त्री०, न० फळें इ० ची फोड, फाक, किं० तुकडा.

फोड [सं० स्फोट] पु० १ खरूज इ० मुळें त्वचेवर उठते ती बुडबुड्यासारखी गोटी,–लसेनें भरलेली. २ तळलेल्या किं० भाजलेल्या पापड किं० पापडी इ०वर तसेंच जे वाटोळे लहान लहान गोटे उत्पन्न होतात ते. ३ उंबर इ० झाडांच्या पानांवर उत्पन्न होतात त्या गोट्या प्रत्येक. स्त्री० १ संदिग्ध विषयाचा उलगडा. २ आंबा, पेरु, इ० चा चिरून केलेला तुकडा. ३ दोन किं० अधिक माणसांची किं० गुरांची केलेली विभक्तता किं० पांगापांग; उ० हीं पोरें एकत्र राहूं देतां उपयोगाचीं नाहींत, त्यांची फोड केली पाहिजे. ४ कांहीं गोष्टींचें प्रकटीकरण किं० परिस्फुटता. ५ कुऱ्हाड, कोयता, इ० नीं लाकडें इ० फोडण्याची क्रिया. ६ मोठ्या जाडी लाकडाचे बारीक बारीक जे तुकडे ते प्रत्येक. ७ उलगडा; स्पष्टीकरण.

फोंड इ० मागें ' पोंड, ' ' पोंढ ' इ० पहा.

फोडणी [म० फोडणें] स्त्री० १ तेल, तूप, इ० तापवून त्यांत हिंग, मोहोऱ्या, इ० घालून भाजी, सांभारें, इ० कांस खमंग वास लागावा आणि विशेष रुचि यावी म्हणून तयार केलेलें तेल, तूप, इ० (करणें, देणें). २ भोजनानंतर लवंगा, केशर, कंकोळ, इ० द्रव्यें घालून खावयासाठीं तयार केलेला विडा किं० साधा विडा. ३ जाडी लाकूड फोडून त्याचे बारीक बारीक तुकडे करण्याची क्रिया.

फोडणें [सं० स्फुट्; म० ' फुटणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ संघटित किं० अखंड जो (पदार्थ) त्याचे जोरानें तुकडे करणें; छिन्नभिन्न करणें; उ० हांडा, रांजण, इ० फोडणें. २ बंद असलेला किं० बंद केलेला जो पदार्थ तो उकलणें आणि आंतला भाग उघडा करणें. ३ तोंड किं० वाट करून देणें. ४ लाच देऊन किं० फसवून कोणेकाला कटांतून किं० संस्थेतून बाहेर काढणें. ५ ढिसूळ किं० टणक पदार्थाचा जोराच्या आघातानें नाश करणें. ६ पदार्थाचे कांहीं भाग काढून टाकून त्याला विशिष्ट आकार किं० रूप देणें. ७ (कांहीं रहस्य) प्रकट करणें. ८(पाणी इ० ला) वाट करून देणें. **टीप**,–ह्या क्रियापदाच्या अर्थाच्या असंख्य छटा जोडीदार शब्दांच्या साहचर्यानें वेगळ्या वेगळ्या होतात. त्यांची कल्पना पुढील वाक्प्रचारांवरून होऊं शकेल. ❀ **भिंत फोडणें** आंत शिरण्यासाठीं भिंतींत भोक किं० भगदाड पाडणें. **घर फोडणें** चोरी करण्यासाठीं कोठून तरी बेकायदेशीर रीतीनें वाट करून आंत शिरणें. **गळूं इ० फोडणें** सुई, चाकू, किं० अन्य साधन योजून त्यांना तोंड किं० भोक पाडून त्यांतून पू, नासकें रक्त, इ० वाहविणें. **कोणेकाचे डोळे फोडणें** त्याच्या डोळ्यांत सुरी इ० भोसकून त्याला अंध करणें. **डोळे फोडून पाहाणें** नीट लक्ष्य देऊन पाहाणें. **एकादी बातमी फोडणें** ती जाहीर करणें किं० प्रकटिणें. **कोणेकाचीं वर्में कर्में फोडणें** तीं चारचौघांत बोलून दाखविणें; ज्यांना तीं कळविणें योग्य नाहीं त्यांना तीं कळविणें. **दहीं फोडणें** तें रवी इ० साधनांनीं सारखें करणें; त्यांतील गुठळ्या मोडून टाकून तें पातळ करणें. **पाणी फोडणें** त्याला दुसरीकडून वहावयाला वाट करून देणें. **पाट फोडणें** बांध घालून किं० कोठें तरी वाट पाडून पाटाचें पाणी दुसऱ्या एका विशिष्ट दिशेनें वाहील असें करणें. **कोणेकाला एकाद्या कटांतून**(किं० **जुटींतून) फोडणें** त्याला त्यांतून बाहेर काढणें. **शत्रूची फळी फोडून पार जाणें** तींतून शौर्यानें वाट काढून निसटून जाणें.

फोंडवळी स्त्री० डोकीच्या केशांच्या समाप्तीस मानेच्या मध्यभागीं जी लहानशी खळगी असते ती.

फोडशी स्त्री० एक वन्य पालेभाजी.

फोडाळ, फोडेला [म० फोड] वि० ज्यावर फोड किं० फोडाचे वण किं० फोडांचीं चिन्हें

आहेत असा.

फोडाळणें [**म०** फोड] **न०** गुरांना होतो [तो एक रोग.

फोडाळणें [**म०** फोड] **अ० क्रि०** फोडांनीं (त्वचा) व्याप्त होणें.

फोडी [**म०** फोड] **स्त्री०** देवीचा किं० खरजेचा फोड. **फोड्या स्त्री० अ० व०** देवी.

फोंडी स्त्री० मागें ' पोंढी ' पहा.

फोडींव [**म०** फोडणें] **वि०** जाळण्यासाठीं उभें फोडलेलें (लाकूड).

फोडेला वि० वर ' फोडाळ ' पहा.

फोपय पु० मागें ' पपैया ' पहा.

फोपशा, फोपसा, फोपा वि० अंगानें लठ्ठ पण शक्तिहीन (माणूस, शरीर). **फोपसें न०. फोपशी स्त्री०.**

फोपा पु० १ थिलथिलीत,लठ्ठ शरीर,माणूस. २ ओबडधोबड किं०जाडी भाकरी, पोळी,इ०.

फोपाटा,फुपाटा पु०चुलींतील तापलेली राख.

फोपावणें, फोफावणें अ० क्रि० १ जोरानें वाढणें (माणूस, जनावर, गात्र, झाड). २ (सर्पानें) फुसफुसणें. ३(पावसाळ्यांत ओढा किं० नदी) फुगून पात्राबाहेर पसरून जोरानें वाहात असणें.

फोपेटा पु० १ चुलींतील तापलेली राख. २ खरचटून निघालेलें अंगाचें सालडें किं० तासून काढलेली वृक्षादींची साल.

फोपेटी स्त्री० एक वेली. **फोपेटें न०** तिचें फळ. मागें' कपाळ ' मध्यें ' कपाळफोडी ' पहा.

फोपेणें अ० क्रि० (त्वचा) पुरळानें किं० फोडांनीं व्याप्त होणें.

फोपेरें न० अळूं, सुरण, इ० चा देठ.

फोपै पु० पोपई.

फोफाटा, फोफेटी, फोफेटें वर ' फोपाटा, ' ' फोपेटी, ' ' फोफेटें,' 'फोपेटें' पहा.

फोफावणें वर ' फोपावणें 'पहा.

फोल न० १ धान्याचा पोकळ दाणा. २ धान्याच्या दाण्याचें टरफल किं० कोंडा. ३पोकळ किं० लबाडीचें वचन. ४ फुकट गेलेले श्रम,काम, उपदेश, इ०. ꕥ **फोलकट न०** ज्यांतील सत्त्वांश पोसला गेला नाहीं असा धान्याचा दाणा.

फोल स्त्री० कागदाचें एक पान; बंद; ताव.

फोलणें [**म०** फोल] **स० क्रि०** (धान्याचा दाणा) टरफल, शेंगा, इ० तून हळूंच नखांनीं किं० दांतांनीं बाहेर काडणें. ꕥ **फोलून फोलून खाणें** (मालकाची पेढी, सावकारी, किं०सत्ता) नोकरानें किं० पाहुण्यानें किं० आगंतुकानें शिताफीनें आणि लबाडीनें हिरावून घेणें किं०आपल्या मालकाची करणें.

फोलणें [**म०** फोल] **अ० क्रि०** (पडसें) हटणें किं० नाहींसें होणें.

फोस वि० अशक्त; निर्बल;सत्त्वहीन;फुसका.

फौज [**अ०**] **स्त्री०** सैन्य; सेना. ꕥ **फौजदार पु०** १ फौजेचा नायक किं० अधिकारी. २ मारामारी, फसवेगिरी, खून, इ०चे खटले चालविणारा अधिकारी. ३ हत्तींच्या सैन्याचा अधिकारी. ४ हत्तीचा महात. **फौजदारी स्त्री०**फौजदाराचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र. **वि०** मारामारी, खून, इ० संबंधाचा(खटला).याच्या व्यावर्तकत्वें ' दिवाणी '. **फौजफाटा पु०** फौज आणि फौजेच्या अंगभूत जो तोफखाना, दारूगोळा, तंबू राहुट्या, इ० सामान सुमान तें समुच्चयानें. **फौजबंद वि०**ज्याच्या जवळ फौज लढण्याच्या सर्व सामग्रीनिशीं सिद्ध आहे असा(राजा, सरदार). **फौजसरंजाम पु०** किल्ल्याच्या संरक्षणार्थ सैन्य सतत तयार ठेवण्याबद्दल कोणा सरदारास करून दिलेली नेमणूक. याच्या व्यावर्तकत्वें 'जातसरंजाम' म्ह० लष्करी नोकरीबद्दल एकाद्या माणसाला करून दिलेली नेमणूक. मागें ' जात, ' ' जातसरंजाम ' पहा.

फ्या फ्या उ० वा० अ० मागें ' फें फें ' **उ० वा० अ०** पहा.

ब

ब मराठीवर्णमालेंतील तेवीसावें व्यंजन.

बई स्त्री० आई (मुलांच्या भाषेंत).

बईल इ० पुढें ' बैल 'इ० पहा.

बक [**सं०**] **पु०** १ बगळा. २ढोंगी माणूस. ꕥ **बकध्यान न०** साधेपणाचें ढोंग; प्रामाणिकपणाचा बाहाणा. **बकव्रत न०** लबाडीचें वर्तन;

बाहेरून साधेपणाचें आणि अंत:करणांत कपट लपवून केलेलें वर्तन किं० असें वर्तन करण्याची सरणी.

बकई स्त्री० ज्याचें पातें वस्तऱ्यासारखें असतें असा एक प्रकारचा चाकू.

बकणी स्त्री०, बकणा पु० लाहीपीठ, लाह्या, पोहे, इ०चा तोंडांत टाकलेला घास (मारणें).

बकणी [**म०** बकणें] **स्त्री०** बडबड; मूर्खपणाचें भाषण.

बकणें [**हिं०** बकना] **अ० क्रि०** मूर्खासारखें बोलणें; बडबडणें.

बकतर [**फा०**] **न०** पोलादाच्या कड्या एकांत एक गुंतवून केलेलें चिल्खत.

बकंदी, बुकांडी स्त्री० हाताचीं बोटें मिटून मारलेला ठुसा किं० ठोसा.

बकबक [**हिं०**] **स्त्री०** वाचालपणा; बडबड.

बकबकां, बकांबकां क्रि० वि० मोठे मोठे घास घेऊन किं० अधाशाप्रमाणें (खाणें, जेवणें).

बकमार (–ल) स्त्री० मोठ्या तोंडाची लहान बंदूक.

बकरा [**सं०** बर्कर; वर्कर] **पु०** एक चतुष्पाद पशु; बोकड. **बकरी स्त्री०, बकरें न०.** ꙮ **बकरकसाई पु०** बकरीं मारणारा खाटीक. **बकरकुदाई** [**म०** बकरा+**हिं०** कुदना (उडी मारणें)] **स्त्री०** १ बकऱ्याप्रमाणें टुणटुणू उड्या मारणें. २ बकऱ्यास बुक्क्या मारून ठार मारतात तसें कोणेकास बुक्क्या मारून जर्जर करणें. **बकरकुदी स्त्री०** १ पट्टयाच्या खेळाचा एक प्रकार. २ पाण्यांत उडी मारण्याचा एक प्रकार. ३ प्रथम किंचित् मागें हटून अवसान घेऊन प्रतिपक्ष्यावर हल्ला करण्याचा प्रकार. **बकरकुदीवर येणें** मारामारीस सिद्ध होणें. **बकरखाद स्त्री०** बकऱ्यांनीं मळा, शेत, इ० मध्यें खाऊन केलेली नासाडी. **बकरसट(–ठ) स्त्री०** पौष महिन्याच्या शुक्ल पक्षांतील षष्ठी ही तिथि. ह्या दिवशीं खंडोबाला बकरा देतात. **बकरतान स्त्री०** वाईट गवयानें बकऱ्याच्या बेंबें अशा आवाजासारख्या घेतलेल्या ताना प्रत्येक.

बकलणें, बुकलणें [**म०** बुक्की] **स० क्रि०** बुक्क्या मारून (कोणेकाला) जर्जर करणें.

बंकवरी स्त्री० एक तृणधान्यविशेष.

बकवा [**हिं०**] **पु०** १ मूर्खपणाची बडबड. २ विनाकारण उत्पन्न केलेला घोटाळा (माजविणें). ह्या अर्थी ' बकवाद ' असाही शब्द आहे. **बकवादी पु०** मूर्खपणाची बडबड करणारा माणूस.

बकस [**फा०** वर् अकस्] **स्त्री०** द्वेष; वैरभाव; खुनशी वृत्ति. ' बरकस ' ह्याच अर्थी योजतात. **क्रि०** बांधणें, धरणें, बाळगणें.

बंका पु० राजा, बडा अंमलदार, किल्ला, इ०च्या सभोंवतीं असते ती पहारेकऱ्यांची रांग किं० वर्तुळ. ह्या अर्थी ' बंकाईत ' असाही शब्द आहे.

बकाट न० खांद्याजवळचें बाहूचें हाड; खवाटा.

बकाण, बकाणा [**हिं०** बकाइन्] **पु०** एक प्रकारच्या लिंबाचें झाड.

बकाणा पु० तोंडांत भरलेला पोहे, चुरमुरे, इ० चा मोठा घास (भरणें, मारणें).

बकांदा पु०, बकांदी स्त्री० हाताच्या मुठीनें मारलेला रट्टा किं० तडाखा; गुद्दा.

बकांबक, बकबकां क्रि० वि० आधाशीपणानें आणि मोठमोठे घास घेऊन (कांहीं खाद्य तोंडांत भरणें किं० खाणें).

बकार [**हिं०** ' बरतर्फ ' चें पहिलें अक्षर ब] **पु०** हकालपट्टी; बरतरफी; (देणें). **बकारी स्त्री०** हाकलपट्टी (होणें, करणें).

बकाल [**अ०** बक़्क़ाल] **पु०** १ दुकानदार. २ धान्य, कापड, इ०चा व्यापारी. ꙮ **बकालवाणी पु०** वर ' बकाल ' चे दोन्ही अर्थ पहा. **बकालवस्ती स्त्री०** हलकट, बदमाष, चोर, इ०च्या राहाण्याचा गांवांतलि भाग किं० तेथलि लोक. **बकाली वि०** १ दुकानदारासंबंधाचा. २ हलकट लोकांसंबंधाचा. ३ अव्यवस्थित.

बकालणें, बुकलणें [**म०** बुक्की] **स० क्रि०** (कोणेकाला) बुक्क्या मारून जर्जर करणें.

बकासर [**सं०**] **पु०** १ बक ह्या नांवाचा राक्षस. २ अति मोठा ज्याचा आहार असा माणूस.

बकाळी स्त्री० एक जंगली फुलझाड.

बकुल [**सं०**] **पु०** एक सुवासिक फुलांचा वृक्ष. **न०** त्याचें फूल. **बकुळी स्त्री०** बकुल वृक्ष.

बक्काल वर ' बकाल ' पहा.

बक्कवार, बक्तवारी खालीं ' बखत ' मध्यें [पहा.

बक्शी वि० अत्यन्त उंची (गहूं).

बख पु० स्त्री० शरीराची कूस किं० बाजू.

बखत, वक्त, बख्त[**अ०**वकत्=वेळ; नशीब] **पु०** १ वेळ; संधी. २ उशीर; दिरंगाई. ꣸ **वक्तशीर क्रि० वि०** योग्य वेळीं; ऐनवेळीं. **बखतवार, वक्तवारी वि०** सुदैवी; वैभवशाली. **बखतवारी, वक्तवारी स्त्री०** सुदैव; वैभव; उत्कर्ष; भरभराटीची स्थिति. **कमबखती स्त्री०** विपन्नावस्था; मार बसण्याची, खेटरें खाण्याची,शिव्या ऐकून घेण्याची वेळ किं० शक्यता किं० संभवनीयता किं०स्थिति (येणें, भरणें, निघणें, काढणें).

बखतर, बक्तर [**फा०** बक्तर्] **न०**पोलादी कड्या एकांत एक गुंतवून केलेलें चिलखत. **बखतऱ्या, बक्तऱ्या वि०** अशा चिलखतानें सज्ज झालेला (शिपाई, माणूस, इ०).

बखंदणें, बखांदणें स० क्रि० (कोणेकाला) खांद्यानें धक्के देणें.

बखंदी स्त्री० खांद्यानें कोणेकाला धक्के मारणें.

बखया स्त्री० गांवांतील किं० घराभोंवतालची रिकामी किं० ओसाड जागा.

बखर स्त्री०१राजा, थोर पुरुष, लढाई, इ० ची हकीगत. २ गांवांत खून, चोरी, दरवडा,इ० प्रकार झाला असतां वरिष्ठाला पाटील इ० कळवितात जी हकीगत ती.

बखल, भकल, छकल [**सं०** शकल] **न०** १ फोडलेल्या नारळाचें अर्धुक. २ फुटलेल्या मडक्याचें किं० कोणत्याही पात्राचें अर्धुक. ३ फुटकें भांडें. ४ तुकडा; धलपी; उडालेला टवका.

बखलणें स० क्रि० (कोणेकाला) बुक्क्यांनीं मारणें.

बखला पु० निघालेला कळपा किं० तुकडा.

बखळ स्त्री० १ गांवांतील ओसाड किं० घरें नसलेला भाग. २ जेथील घर मोडून पडलें आहे अशी जागा. ३ घर बांधावयाच्या उपयोगाची गांवांतलि जागा. ४ ओसाड मैदान. ५ घरांतील रिकामी पडलेली जागा. **क्रि० वि०** अघळपघळ; मोठ्या प्रमाणांत; पुष्कळ.

बखा [**अ०** बका=किंमत] **स्त्री०** किंमत; कोणेकाला दिलेलें महत्त्व; परवा; प्रतिष्ठा. अकरणरूपी प्रयोग. उ० मी यमाला भिणार नाहीं, मग तुझी काय बखा ? उ० मला कोणाची बखा नाहीं.

बखाडी, बखाटी स्त्री०कूस;बाजू(पोटाची). ꣸ **पोट बखाटीस जाणें** फार वेळ पोटांत अन्न न गेल्यामुळें पोट खोल झालेलें असणें. मागें ' पोट ' मध्यें हा वाक्प्रचार पहा.

बखांदणें स० क्रि० (कोणेकाला) दंडाचे रट्टे मारून जर्जर करणें.

बखांदी स्त्री० दंडानें मारलेला रट्टा.

बखेडा [**हिं०**] **पु०** १ तंटा; भांडण. २ बेबनाव. ३ गुंतागुंत; घोटाळा; अव्यवस्था; गोंधळ (माजणें, माजविणें).

बख्षी (–षी) [**फा०**] **पु०** सेनापति. ꣸ **बख्शीगिरी स्त्री०** सेनापतीचा हुद्दा किं० दर्जा.

बखशी (–षी) [**हिं०**] **वि०** उत्तम प्रकारचा (गहूं).

बख्शी(–षी)स [**फा०**] **न०** कोणेकाला दिलेलें पारितोषक. **बख्शिशी स्त्री०** ह्याच अर्थी योजतात. **बख्शी(–षी–)स वि०** माफ केलेला (करणें, देणें).

बग स्त्री० बाजू; तरफ; बगल. ꣸ **ह्या बगेस क्रि० वि०** ह्या बाजूस; इकडे.

बग वि० पंख अद्यापि न फुटलेला (पक्षी).

बगड स्त्री० तांदुळाची करड; ज्याचें केवळ टरफल काढण्यांत आलें आहे असा तांदूळ;सडावयाच्या अगोदरचा तांदूळ.

बगड न०, बगडा पु० पाठीचा कमरेजवळचा भाग. ꣸ **कोणेकाचा बगडा मोडणें** (किं० **मोकळा करणें** किं० **ढिला करणें**) १ त्याला कामाखालीं जेरीस आणणें. २ त्याचा नक्षा उतरणें.

बगडा वि० १ सुंदर; देखणा. २ सुरकुतलेलें किं० सुकलेलें (गात्र).

बगर [**फा०** बगैर] **श० यो० अ०** खेरीज, शिवाय, वांचून; उ०हें काम केल्याबगर तुझी सुटका होणार नाहीं. ꣸ **बगरहुकूम क्रि० वि०** हुकमाशिवाय; हुकूम नसतां. **बगरपरवानगी क्रि० वि०** परवानगीशिवाय.

बगर, बगरा वर ' बगड, ' ' बगडा ' पहा.

बगल [**फा०** बग्ल्] **स्त्री०** १ खाक; खांद्या-खालचा भाग. २ आंगरखा, बंडी इ० च्या बाहीला जो चौकोनी तुकडा शिवलेला असतो तो. बायकांच्या चोळीच्या बाहीला जो असाच त्रिकोणी तुकडा असतो त्याला ' कोर ' **स्त्री०** असा शब्द आहे. ३ लंगड्या मनुष्याची कुबडी. ४ वस्तूची बाजू किं० कूस. ॐ **एकादी वस्तु बगलेंत घालून चतुःसमुद्रांचें स्नान करून येणें** ती वस्तु आपल्या खिजगणतींत नाहीं असें धरून वागणें. **एकादी वस्तु बगलेंत मारणें** ती खाकोटीला मारणें; अभिलापबुद्धीनें घेणें; पळविणें; उपटणें. **एकाद्याच्या बगलेंत असणें** त्याच्या संरक्षण खालीं असणें; त्याच्या वशील्याचा अ त्याचा अंकित असणें. **तें काम** ड. **बगलेंतलें आहे** तें त्याला सहज करत मोठे जोगें आहे; तें तो केव्हांच करून टाकी वणें). (किं० **बगला) वर करणें** १ आपणाज लहान नाहीं किं० कोणी शोधीत असलेली विं आपणाजवळ नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं त- हु वर करून दाखविणें.२ आपणाजवळ कांहीं नाहीं असें म्हणणें. **एकादी गोष्ट बगलेंतून काढणें** एकादी गोष्ट किं० बातमी बनवून किं०कल्पून ती खरी म्हणून सांगणें; बात झोकणें. **कोणेकाला बगलेंत धरणें** त्याला आपल्या आश्रयाखालीं घेणें. **कोणेकाचा बगलबच्चा पु०** सर्वस्वीं त्याच्या अंकित असलेला माणूस; त्याचें हित करणारा; त्याचा थुंकीचाट्या; त्यानें कितीही ओंगळ काम सांगितलें तरी तें करणारा. **बगलबिल्ली स्त्री०** १ ज्याचे फार फार लाड करण्यांत येतात असें मूल. २ खाकमांजरी,-खाकेंत झालेलें गळूं. **बगलबंद** खाकेशीं बांधावयाचा अंगरख्याला असतो तो बंद. **बगलभावार्थी** खालीं स्वतंत्र शब्द पहा.

बगलभावार्थी [**हिं०** बग्ल=लबाडी, ढोंग; **म०** भावार्थी=साधा, प्रामाणिक] **वि०** दिसण्यांत साधा पण अंतःकरणांत कपटी.

बगला पु० एक प्रकारची अरबस्तानांत बनलेली होडी.

बंगला [**हिं०**]लहानसें टुमदार घर,-भोंवतालीं मोकळी जागा असलेलें.

बगलांट (-ठ) न० १ कोणेकावर घातलेली किं० आलेली तोहमत; आळ; वृथारोप; कुभांड. २ भरकटलेला विचार किं० कल्पना. ॐ **बगलाट्या (-ठ्या) वि०** भरकट्या.

बगलविणें [**म०** बगल] **स०** **क्रि०** चोरलेली वस्तु बगलेंत लपविणें.

बगली [**फा०**] **स्त्री०** १ पायाचे घासण्यानें उंटास एक रोग होत असतो तो. २ मुद्गल फिरवि... चा एक प्रकार.

बगल्या [**म०** बगल] **वि०** १ कोणेकाचा ...स्तक. २ वकिलाला खटले मिळवून देणारा त्याचा हस्तक. ३ मदतनीस. ॐ **बगल्याचोर, पु०** १संधी मिळतांच वस्तु चोरून बगलेंत मारून पळून जाणारा चोर. २ संभावितप्रमाणें वागून चोरी करणारा प्रतिष्ठित चोर.

बगवें न० दागिने इ० मूल्यवान पदार्थ ठेवण्याची लहानशी पेटी.

बगळा [**सं०** बक] **पु०** एक पक्षी. मागें ' बक ' पहा. **बगळी स्त्री०**.

बगाड न०देवद्वारापुढें टोकाला गळ असलेली दोरी ज्या चौकटीवरून लोंबत सोडलेली असते ती चौकट. मागें ' गळ ' अर्थ ५ पहा. ' बघाट ' असेंही ह्या शब्दाचें अन्य रूप आहे.

बगार, बघार पु०, बगारणी, बघारणी स्त्री० [**हिं०** बघार्] मसाल्याचीं द्रव्यें घालून तयार केलेलें तूप किं० तेल भाजी इ० खाद्य पदार्थांना चव येण्यासाठीं घालतात तें.

बंगाली [**म०** बंगाल; **सं०** वंग] **पु०** बंगाल देशचा रहिवासी. **वि०** बंगाल देशांतील किं० बंगालसंबंधाचा.

बंगालें न० १ मोठें वांगें; ह्याला कांटे नसतात. लहान आणि कांटेरी वांगें तें 'डोरलें वांगें.' २ नवरानवरीच्या मिरवणुकींत काठ्यांच्या टोकांना लोंबत सोडलेल्या कागदांच्या माळा प्रत्येक; नक्षत्रमाळा.

बंगाळी स्त्री० शूद्रांच्या लग्नांत काठीच्या टोकावर आडकावलेलें मुंडासें किं० पागोटें मिरवितात तें.

बंगी [**हिं०** बहंगी] **स्त्री०** काठीच्या दोन

टोकांस दोन पाट्या (ज्यांत फुलें, फळें, इ० भरलीं आहेत त्या) लोंबत सोडून ती काठी खांद्यावर घेऊन वाहून नेतात ती; कावड.

बगीचा [**फा०** बागीचाह्] **पु०** लहानशी बाग.

बगुणें न०, बगुणी स्त्री० आकारविशेषाचें धातूचें भांडें.

बगोटा [**सं०** भुज+वाटी] **पु०** बाहूचा खांद्याशीं होतो तो संधी.

बगोटी स्त्री० १ नरडें. २ मानगुटी.

बगोटें न० १ नरडें. २ टाळकें; बोडकें. ३ बाहूचा खांद्याशीं असतो तो संधी.

बघणें स० क्रि० पाहाणें; अवलोकिणें; निरीक्षिणें. [पहा.

बघार, बघारणी मागें ' बगार, ' ' बगारणी '

बचक, बचकण स्त्री०, बचका पुं० राशींतून धान्य, लाह्या, इ० घेण्यासाठीं बोटें ताणून पाल्था केलेला हात, किं० अशा हातानें घेतलेलें पदार्थाचें परिमाण. ☸ **बचकेंत पाणी धरूं पाहाणें** कांहीं गोष्ट,—जी होणें शक्य नाहीं असें उघड उघड दिसत आहे, ती करावयाला प्रवृत्त होणें; असाध्य गोष्टीबद्दल प्रयत्न करणें.

बचकणा, बचकणी [**हिं०** बच्‌काना] **वि०** लहान आकाराचा; चिमुकला.

बचकणी [**हिं०** बच्‌काना] **स्त्री०** १ लहान आकाराचा धोतरजोडा,—मुलांच्या उपयोगाचा. २ दारूचा शिसा.

बचकपट्टी स्त्री० पदार्थविशेषाचें जरूर जें परिमाण त्यांत थोडीशी तूट आल्यास ती भरून काढण्यासाठीं प्रत्येकावर बसविलेली वर्गणी.

बचका वर ' बचक ' पहा.

बचडा पु० पशु,पक्षी, इ० चें पिल्लूं,—प्रेमाचा शब्द. **बचडी स्त्री०, बचडें न०.**

बचनाग (**—क**) [**हिं०**] **पु०** एक विषारी कंद किं० त्याचें झाड. ☸ **बचनागाची कांडी स्त्री०** पदोपदीं उपद्रव देणारा माणूस.

बचबच , बचमंगळ, बजबज, बजबजपुरी स्त्री० अव्यवस्था; गोंधळ;घोटाळा; अंदाधुंदी.

बचबचीत वि० पातळ किं० गिळगिळीत (भात, भाजी, फळ, इ०).

बचाव [**हिं०**] **पु०** संकटांतून किं० अडचणींतून सुटका.

बचाविणें [**म०** बचाव] **स० क्रि०** (कोणेकाला) संकटांतून किं० अडचणींतून सोडविणें किं० उद्धरणें.

बचेरी स्त्री० फजीती; बोऱ्या (करणें, होणें, उडणें). [जवडा.

बचेळी, बचाळी, बचळी स्त्री० पशूचा

बच्चा [**फा०** बचाह्] **पु०** १ मनुष्य, जनावर,पक्षी,इ०चें लहान वयाचें अपत्य; मूल; पिल्लूं. २ जमीनींत खळी करून कवड्या, पैसे, इ० नीं खेळतात त्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. ३ गाड्याच्या चाकाचें भोक मोठें झालें असतां त्यांत ठोकळा मारतात तो; ह्या ठोकळ्यांत गाडच्या आसासाठीं मधोमध भोक पाडलेलें असतें. ४ पागोट्याचा आकार मोठा करण्यासाठीं किं० डोक्याच्या घामानें पागोटें खराब होऊं नये म्हणून पागोटें बांधतांना आंतल्या बाजूस घालतात तें वस्त्र; बनाणा. ५ अंगरख्याची कळी लहान होत असल्यास त्या कळीला देतात तो जोड. ☸ **बच्चाजी, बच्चाराम पु०** राजश्री,—कोणेकाशीं रागानें बोलत असतां त्याला संबोधून हा शब्द योजतात. **बच्चेबाजी स्त्री०** गुदमैथुन.

बच्छान, बदछान [**हिं०** बद्‌शान्] **स्त्री०** १ दुर्लौकिक. २ नासाडी.

बछडा [**हिं०**] **पु०** लहान पिल्लूं; पोर; मूल; वासरूं. **बछडी स्त्री०. बछडें न०.**

बछेरी, बछरी, बचेरी स्त्री० फजीती; बोऱ्या (उडणें, उडविणें, करणें).

बंजर वि० रानटी (झाडें झुडपें).

बजरंगबली [**सं०** वज्रांगबली] **पु०** मारुति; हनुमान्.

बजरबट्टू पु० १ एक वृक्षविशेष किं० त्याचें फळ. ह्या फळांच्या जपमाळा करतात. २ तल्लख, चुणचुणीत, किं० लुडबुड्या पोरगा. ३ मारुति.

बजरा [**हिं०**] **पु०** एक प्रकारची होडी.

बजवय्या [**हिं०** बाज्‌वइया] **पु०** वाद्य वाजविणारा.

बजां, बजाहां [**अ०** बजाताह्] **क्रि०वि०** स्वतः; जातीनें; उ० सरदारांचे हातून काम रेटत

नाहीं असें पाहून बजाहां महाराज गेले आणि तें काम तीन दिवसांत पार पाडून आले.

बजाख (-ग) [**हिं०** बजाक; **सं०** वज्रांग= सर्प] **पु०** रागीट आणि तामसी माणूस.

बजाज [**अ०**] **पु०** कापडाचा व्यापारी. ॐ **बजाजी स्त्री०** कापडाचा व्यापार. **वि०** भिकार; भपकेदार; दिखाऊ.

बजावणी [**म०** बजाविणें] **स्त्री०** १ (कोणे-काला) तटकारण्याची क्रिया. मागें ' तटकारणें ' पहा. पुढें ' बजाविणें ' पहा. २ पथकरलेलें काम सिद्धीस नेणें; अंगीकारलेलें काम शेवटास नेणें.

बजावर्द [**फा०** बजा आवुरदाह्] मुसलमान लोक पत्राच्या अल्काबांत (म्ह० आरंभीं) हा शब्द योजतात. त्याचा अर्थ 'आपला हुकूम ज्यानें पाळला आहे असा आपला सेवक ' (आपणाला अर्ज करीत आहे कीं इ०).

बजाविणें [**हिं०** बजाना] **स० क्रि०** १ (आपलें कर्तव्य किं० आपणास कोणीं सांगितलेलें कांहीं काम) करणें किं० शेवटास लावणें. २ (कोणेकाला) कांहीं कामीं सख्त ताकीद देणें; निक्षून सांगणें. ३ (वाद्य) वाजविणें. ४ (न्याया-धीशाचा हुकूम) अमलांत आणणें; हुकमाप्रमाणें करणें. ५ (न्यायाधीशाची इच्छा किं० हुकूम) विशिष्ट माणसाला कळविणें. ६ (कोणेकाची चुकी) त्याच्या नजरेस आणून देणें.

बजाहां [**अ०**] **क्रि० वि०** जातीनें; स्वता. ॐ **बजाहां सावकार** (किं० **धनी**)नोकर किं० गुमास्ता न नेमतां काम आपलें स्वताच्या हिमतीवर करणारा सावकार(किं० धनी).वर ' बजां ' पहा.

बजिन्नस, बजिनस [**फा०** बजिन्स्] **क्रि० वि०** १ धडधडीत; प्रत्यक्ष; उ० तूं चाकू हातांत घेतलास तें मी बजिन्नस पाहिलें आणि तूं नाहीं घेतला म्हणतोस तें मी कसें ऐकेन ? २ हटकून; न चुकतां; मुद्दाम; दाटून; उ० त्या राम्याची संगत करूं नको म्हणून मी तुला बजावतों आणि तूं तर बजिन्नस त्याची संगत केली आहेस. ३ धाडसानें; संकोच न बाळगतां. **वि०** १ खरा; चोख (सही, पावती, दस्तऐवज). २ अट्टल, पक्का, (सोदा, ठग).

बजीत (-द) [**फा०** बह्‌जिद्] **वि०** आग्र-हाचें. ॐ **बजीत (-द) होणें** आग्रहपूर्वक सांगितलें जात आहे. **टीप,**-हे शब्द दरबारी पत्रांतच येतात. [हनुमान्.

बज्रंगबळी [**सं०** वज्रांगवली] **पु०** मारुति;

बट पु० १ ठेंगणा आणि जल्द चालीचा असा घोडा; तट्टू. २ मोठा बैदूल किं० खेळण्याची गोटी. **न०** लोखंडाची एक जात. **स्त्री०** १ अंबाडी, ताग, इ० च्या शेपन्नास तंतूंची जुडी. २ डोक्याच्या केशांची जटा. **न०** पाथर-वटाच्या सुतकीचा पोलादी अणी. **वि०** लठ्ठ आणि ठेंगणा. [पाती.

बटई [**हिं०**] **स्त्री०** शेतकी व्यवहारांतील

बटकरूं, बट्टकुरूं, बटकूर, बटकुरें न०, बटकुली स्त्री० बटीक (तुच्छतेनें). खालीं ' बटीक पहा.

बटक्या, बटकुऱ्या (-रा) पु० दासीशीं जारकर्म करणारा.

बटछपाई, बटछपाणी [**हिं०** बट्टछपाई] **स्त्री०** १ व्यापारी लोकांचीं वजनें आणि मापें निरखाप्रमाणें आहेत असा तीं तपासणाऱ्या अमल्दारानें त्यांचेवर छाप मारण्याची क्रिया. २ अशी तपासणी आणि छाप मारणें ह्याबद्दल त्याला द्यावें लागतें तें देय.

बटणावळ [**हिं०** बट्टा] **स्त्री०** एका देशांत चालणाऱ्या नाण्यांबद्दल दुसऱ्या देशांत चालणारीं नाणीं बदलून घ्यावयाची असतां जें देय सरा-फाला द्यावें लागतें तें.

बटणें [**म०** बटविणें] **अ० क्रि०** एका देशांत चालणारीं नाणीं दुसऱ्या देशांत चालणाऱ्या नाण्यांच्या रूपांत बदललीं जाणें.

बटमोगरा पु०एक फूल किं०त्या फुलांचें झाड.

बटमोगरी, बटमोगर स्त्री० सुगंधयुक्त फुलांचे एक फुलझाड.

बटमोगरें, बटमोगर न० एक सुगंधयुक्त फूल.

बटली [**म०** बट्टा; **हिं०** बटा] **वि०** खोटें किं० ऐब असलेलें (नाणें).

बटवट [**म०** बटवटणें] **स्त्री०** मूर्खासारखें भाषण; पांचट आणि नीरस भाषण.

बटवटणें अ० क्रि० पांचटपणाचें भाषण करणें; शुष्क आणि नीरस भाषण करणें.

बटवडा [**हिं०** वांटूना] **पु०** लोकांचे पगार किं०मजूरीचे पैसे त्यांना देण्याची क्रिया.॥ **बटवडे-पत्रक न०** नोकर लोकांचीं नांवें आणि त्यांना द्यावयाच्या पैशांच्या रकमा ज्यावर मांडल्या आहेत असा कागद किं० तक्ता.

बटवणी [**हिं०** बटाना] **स्त्री०**एका जातीच्या नाण्यांचें दुसऱ्या जातीच्या नाण्यांत रूपांतर.

बटवा पु०, बटवी स्त्री० अनेक कप्पे किं० पुडें जींत आहेत अशी आकारविशेषाची पिशवी.

बटविणें [**हिं०**] **स० क्रि०** एका जातीचीं नाणीं दुसऱ्या जातीच्या नाण्यांच्या रूपांत बद-लून देणें किं० बदलून घेणें.

बटवेणी [**म०** बट+वणी] **स्त्री०** कान-शिलांजवळच्या केशांच्या घातलेल्या दोन वेण्यां प्रत्येक.

बटाई [**हिं०**] **स्त्री०** १ बटाव; बटणावळ; नाण्यांच्या अदलाबदलीचा दर किं० भाव. २ शेताच्या मालकास ऐनजिनशी द्यावयाचा सारा.

बटांगा पु० सोनें, चांदी, इ० धातूंचे मणि करावयाचे असतां ठशांत पत्रा दाबून सोनार प्रथम दोन निमगोल करून घेतात ते प्रत्येक. हे निमगोल नंतर जोडण्यांत येतात.

बटाव [**हिं०**] **पु०** एका जातीचीं नाणीं दुसऱ्या जातीच्या नाण्यांच्या रूपांत बदलणें किं० अशा बदलण्याबद्दल द्यावें लागतें जें सराफाला देय तें.

बटाव, बटाऊ वि० १ विषयी; परस्त्रीलंपट (पुरुष) किं० परपुरुषलंपट (स्त्री). २ लुच्चा; सोदा.

बटावणी, बटाविणें मागें ' बटवणी, ' ' बट-विणें ' पहा.

बटीक स्त्री० १ विकत घेतलेली दासी. २ वेश्या. ३ रखेली. ॥ **बटीकधंदा पु०, बटीक-काम न०** १ हलकें काम. २ वेश्येचा धंदा. **बटीकपुरा पु०** १ वेश्यांच्या वसतीचा गांवाचा भाग. २ हलकट स्त्रियांचा जमाव किं० समुदाय. **बटीकपोर न०** रखेलीचें किं० वेश्येचें अपत्य.

बटु [**सं०**] **पु०** १ मुलगा; छोकरा. २ ब्रह्म-चारी. ३ मुंज झाल्यापासून तारुण्यावस्था प्राप्त होईपर्यंतच्या वयाचा मुलगा. ॥ **बटुभोजन न०** मुंजीच्या दिवशीं आठ बटूंस देतात तें भोजन. ह्या बटूंना ' अष्टवर्गे, ' म्हणतात. मागें ' अष्ट' मध्यें ' अष्टवर्ग, ' ' अष्टवर्ग्या ' पहा. **बटूकरण न०** मुंज हा विधि. **बटुवस्त्र न०** मुंजीमध्यें बटूला म्ह० मुंजा मुलाला नेसावयाला देतात तें वस्त्र. **टीप,**—बटुवामन **पु०** असाही मुंजा मुलाला शब्द आहे.

बटुवा वर ' बटवा ' पहा.

बट्टा [**हिं०**] **पु०** १ एका प्रांतांत प्रचलित असलेलीं नाणीं दुसऱ्या प्रांतांत प्रचलित असलेल्या नाण्यांच्या रूपांत बदलावयाचीं असतां हा मोबदला योग्य करण्यासाठीं तफावतीचा जो अंश देण्यांत किं० घेण्यांत येतो तो; बटाव; वटाव; वर्तावळा. २ कलंक; काळिमा; उ० त्या बदमाष पोरानें आमच्या लौकिकास बट्टा लावला. ३ माणिक, मोतीं, रत्नें, इ० बांधावयाचें लहानसें फडकें. ॥ **बट्टाई स्त्री०** नाणीं बटविण्याबद्दल द्यावें लागतें तें देय. **बट्टाखाऊ वि०** जें नाणें बदलतांना बट्टा द्यावा लागतो तें; हलक्या दर्जाचें (नाणें). **बट्टासट्टा पु०** बट्टा देऊन किं० घेऊन नाणीं बदलण्याचा धंदा. **बट्टेखोर वि०** १बट्टा आहे ज्यास असें (कुटुंब). २ जें बदलतांना वर्तावळा द्यावा लागतो असें (नाणें); कमी दर्जाचें (नाणें). **बट्टेबाज वि०** १ बट्टेखोर. २ लुच्चा; सोदा. ३ गुदमैथुनी. ४ विषयी; कामी प्रकृतीचा.

बट्टाविणें [**म०** बट्टा] **स० क्रि०** नाणीं वेगळ्या प्रकारचीं करून देणें किं० घेणें.

बट्टी [**हिं०**] **स्त्री०** १ वडी, थापटी, (गूळ, इ० ची). २ नारळाची वाटी. ३ चांदीची चीप. ४ लहानशी वाटी.

बठ्ठ वि० जड; मंद; सुस्त.

बठ्ठा [**हिं०**] **पु०** हट्ट; आग्रह; तगादा (घेणें, घेऊन बसणें).

बंड [**फा०** बंद] **न०** १ राजाविरुद्ध खटपट; चालू राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न. २ अशा खटपटींत किं०प्रयत्नांत सामील असलेले लोक समु-च्चयानें.३एकाद्या संस्थेविरुद्ध किं०रूढीविरुद्ध खट-पट.४दरवडेखोरांची टोळी.५साधुपणाचें ढोंग. **पु०** १दरोडेखोर. २ उपद्रवी माणूस. ३ तोतया. ४ द्वाड पोर. ५ बंडखोर माणूस. **न०** स्तोम; खूळ (माजणें).

बडका पु० कफ, शेंबूड, इ० चा गोळा.

बडखुळा पु० अंमलदाराच्या खालीं जो केवळ शोभेसाठीं नेमलेला असतो तो मदतनीस.

बडगा पु० सोटा; मोठी लठ्ठ काठी. ※ **बडगा दाखविणें** स्वकार्य साधून दुसऱ्यास फसविणें. **तेथें काय बडगा आहे ?** तेथें कांहीं नाहीं.

बडती, बढती [**म०** वाढणें; **सं०** वृद्धि] **स्त्री०** १ वैभव; भरभराट. २ पगारांत वरिष्ठानें केलेली वाढ.

बडदा पु० एक खाण्यांत येणारा कंद.

बंडफरोशी, बंडेफरोशी [**म०** बंड] **स्त्री०** १ बंडखोर. २ उपद्रवी; व्रात्य.

बडबड स्त्री० वटवट; वायफळ किं० नीरस भाषण.

बडबडणें अ० क्रि० १ नीरस किं० पांचट भाषण करणें. २ बेशुद्धींत किं० झोपेंत बोलणें; वरळणें.

बडबडींत वि० पीठ फार घातलें गेल्यामुळें बेचव (भाजी, कढी, सांभारें, इ०).

बडबीज न० १ एक प्रकारच्या कमलाचें बीज. २ अफाट वाढलेलें कुटुंब, संस्था, कारभार, किं० देवघेव. ३ शिवराळ माणूस.

बडम न० चार पांच पालेभाज्या एकत्र शिजवून करतात ती भाजी.

बडमी, बडंमी स्त्री० गवत, कडबा, इ० ची लहानशी गंजी.

बडवणें, बडविणें स० क्रि० १ मारणें; ठोकणें; चोप देणें. २ (बैल, घोडा, इ० चें वृषण) ठेचणें. [घेतलेली काठी.

बडवणें [**म०** बडवणें] **न०** ठोकण्यासाठीं

बडवण्या [**म०** वडवणें] **स्त्री० अ० व०** मूळमहानक्षत्रांत पडतो तो पाऊस (शेतकऱ्यांचा शब्द).

बड्वार, बडिवार पु० १ वैभव; उत्कर्ष. २ वैभवाची किं० पराक्रमाची बढाई (सांगणें).

बडवा, बडव्या [**म०** बडविणें] **पु०** पंढरपूरच्या देवाच्या सेवेचा एक अधिकारी. देवाच्या मूर्तीभोंवतीं विनाकारण दाटी करणाऱ्या लोकांना बडवून बाहेर घालवून देणें हें एक काम ह्यांचेकडे असतें.

बडस पु० कफाचा गोळा.

बडा [**हिं०**] **वि०** मोठा. ※**बडेलोक पु० अ० व०** १ मोठ्या दर्जाचे अधिकारी किं० श्रीमंत लोक. **बडा घर पोकळ वांसा** १ दिसण्यांत मोठा पण किंमतीनें अत्यल्प. २ गरीबीस आलेला संस्थानिक, जागीरदार, इ०. **बड्या बाजेचा ढेकूण पु०** बाजीरावाचा नातू,—उपहासांत.

बंडा पु० १ एक प्रकारचा अळवाचा कंद. २ विटकरीचा किं० कौलाचा टोला.

बंडाई स्त्री० १ राजाविरुद्ध प्रयत्न. २ बंडखोरपणा.

बंडाळ (—ळी) [**म०** बंड] **स्त्री०** १ पुंडावा; राजाविरुद्ध खटपट; राज्य उलथून पाडण्याचा प्रयत्न. २ अव्यवस्था; घोटाळा; गोंधळ.

बडिवार मागें ' बडवार ' पहा.

बडी स्त्री० झाडावरचीं फुलें, फळें, इ० पाडविण्याची टोकाला आंकडा असलेली लांब काठी.

बंडी स्त्री० १ कमरेपर्यंतच येणारा अंगरखा. बंडीला बांधावयाचे बारा बंद असतात, यावरून ह्या कपड्याला ' बाराबंदी ' **स्त्री०** असाही शब्द आहे. २ एक प्रकारची लांब गाडी. ह्या अर्थी ' लहानगड ' असाही शब्द आहे.

बडीशेप, बडीशोप [**हिं०** बडीसोंफ्] **स्त्री०** एक औषधी बीजविशेष.

बडेजाव [**हिं०**] **पु०, स्त्री०** संपत्ति, पराक्रम, इ० गुणांमुळें कोणेकाची होते ती मानमान्यता. **उ० वा० अ०** राजा किं० कोणी बडा अंमलदार चालला असतां चोपदार हा शब्द उच्चारतात; त्याचा अर्थ ' महाराजांचा जयजयकार असो ! ' ' उत्कर्ष होवो ! '

बंडेफरोशी मागें ' बंडफरोशी ' पहा.

बडेल, वडेल [**म०** वडा+तेल] **न०** ज्यांत वडे तळून काढले आहेत तें तेल.

बढई पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक सुतारकीचा धंदा करतात.

बढती [**हिं०**] **स्त्री०** १ अभिवृद्धि; चढती कळा; उत्कर्ष. २ पगारांत किं० दर्जांत वाढ.

बढर पु० एक झाड. **न०** त्याचें फळ.

बढाइकी, बढाई स्त्री०, बढाव पु० प्रौढी; फुशारकी (मारणें, भोगणें). ※ **बढाईखोर,**

बढायखोर पु० आपली प्रौढी मिरविण्याची ज्याला खोडी आहे तो.

बढेल, बढ्येल [**म०** वडा+तेल]**न०**ज्यांत वडे तळले आहेत तें तेल. [कांड.

बढ्या पु० १ लठ्ठ सोटा.२एरंड, इ० झाडांचें

बणगी स्त्री० १ सजगुऱ्यांची लुंगी. २ लहानशी गंजी.

बतक स्त्री० एक प्रकारचें भांडें.

बतक, बतका, बतखल पुढें ' बदक ' ' बदका, ' ' बदखल ' पहा.

बतणें अ० क्रि० (गोट्यांच्या खेळांत)एका गोटीपासून दुसरी गोटी ठराविक अंतरापेक्षा कमी अंतरावर येणें,–जेणें करून ती खेळांत निरुपयोगी होते. गोट्यांचें बतणें वीत, पाऊल, चौंगा, इतक्यांच्या अंतरावर होतें.

बता, बत्ता, बत्या पु० १ खलांत औषधादि घालून तें ठेंचायासाठीं दगड, लोखंड, पितळ, इ०चा योजतात तो दंड. २ गोटी बतली किं० नाहीं हें पाहाण्यासाठीं दोन गोट्यामध्यें किं० एक गोटी आणि कोंड यांच्यामध्यें पाऊल, वीत, किं० चौंगा घालतात तो. ३ मोठें तपेलें.

बताणा, बताडा वि० खूप मोठा;अवाढव्य.

बताणा,बताना,बताडा पु० पागोट्याचा घेर वाढविण्यासाठीं किं० डोक्याच्या घामानें पागोटें खराब होऊं नये म्हणून जो वस्त्राचा तुकडा आंत घालतात तो. मागें ' बद्या ' पहा.

बतावणी [**म०** बताविणें] **स्त्री०** १ धारण केलेल्या सोंगाचें यथायोग्य प्रदर्शन करण्यासाठीं सोंगाड्या जें भाषण किं० वर्तन करतो तें. ५ ढोंग; मारलेली थाप. ३ भपकेदार रीतीनें किं० पदरची भर घालून कांहीं हकीगत सांगणें. ४ देणें, घेणें किती आहे हें पाहाण्यासाठीं कांदींवरून पक्की खतावणी करावयाच्या अगोदर कच्ची खतावणी करतात तीं.

बतावण्या [**म०** बताविणें] **वि०** बतावणी करणारा. वर ' बतावणी ' आणि खालीं ' बताविणें ' पहा.

बताविणें [**हिं०** बताना] **स० क्रि०** १ (घेतलेलें सोंग किं० स्वीकारलेली भूमिका)अनुरूप भाषण किं० हावभाव यांचे योगानें वठविणें. २ तिखटमीठ लावून म्हणजे पदरची भर घालून (कांहीं गोष्ट किं० वृत्तान्त) वर्णिणें.

बतासफेणी (–**नी**) [**हिं०**] **स्त्री०** मिठाईचा एक प्रकार.

बतासा, बत्तासा [**हिं०**] **पु०** साखरेचा पाक फेसाळून करतात तो एक मिठाईचा प्रकार.

बती पुढें ' बत्ती ' पहा.

बतेला [**पोर्च्युगीझ्** ब्याटिला] **पु०** सुमारें पांचशे खंडी वाहून नेण्याला योग्य असें गलबत.

बत्ता, बत्त्या मागें सर्व अर्थीं ' बता ' पहा.

बत्तिशी, बत्तीशी [**म०** बत्तीस=३२]**स्त्री०** १ मनुष्याच्या तोंडांतलि बत्तीस दांत समुच्चयानें. २ कोणत्याही एकजातीय किं० भिन्नजातीय बत्तीस वस्तूंचा समुच्चय. ३ बत्तीस वर्षें हें वयोमान. ४ बत्तीस हात लांबीचें वस्त्रविशेष. ५ बायकांचें एक व्रतविशेष. ६ (कोणेकाच्या शुभ किं० अशुभ भाषणाची प्रतीति सांगावयाची असतां) भाषण; वदलेलें भविष्य; उ० तुम्हाला श्रावणामध्यें बढती मिळेल असें तो म्हणाला होता त्याप्रमाणें मला बढती मिळाली, तस्मात् त्याची बत्तीशीं चांगली आहे. ꣸ **बत्तीशीचें ओझें न०** जें ओझें उचलावयाला बत्तीस(किं०पुष्कळ)माणसें जरूर आहेत असें ओझें. **बत्तीशी दाखविणें** वात्रटपणानें किं० निर्लज्जपणानें हसणें. **कोणेकाची बत्तीशी लवणें** त्याणें कांहीं अशुभ भाकीत करणें. **कोणेकाची बत्तीशी वठणें** त्याणें केलेलें अशुभ भाकीत प्रत्ययास येणें म्ह० खरें होणें. **कोणेकाची बत्तीशी पाडणें** (किं० **हालविणें**) त्याच्या थोबाडींत मारणें. **कोणेकानें बत्तीशी हालविणें** किं० **कोणेकाची बत्तीशी हालणें** त्याणें कांहीं अशुभ भाकीत करणें (रागाचा उद्गार). **कोणेकाची बत्तीशी रंगविणें** त्याच्या दांतांतून रक्त निघेल आणि त्या रक्तानें त्याचे बत्तीसचे बत्तीस दांत रंगतील इतक्या जोरानें त्याच्या थोबाडींत मारणें (धमकीचा उद्गार). **कोणेकाची बत्तीशी पाडणें** त्याच्या थोबाडींत मारून त्याचें बत्तीसचे बत्तीस दांत पाडणें (धमकीचा उद्गार). (**कोणेकानें**) **बत्तीशी रंगविणें** विडा खाऊन तोंड तांबडें लाल करून घेणें; उ० अरे सद्या, बत्तीशी रंगवून बापा-

पुढें यावयाला तुला लाज कशी नाहीं वाटत ? **तेहत्तीशी करीत नाहीं ते बत्तीशी करते** तेहेत्तीस कोटी देव जें करूं शकत नाहींत तें बत्तीस दांत (मनुष्याचें भाषण) करूं शकतात. भाषणाचें सामर्थ्य इतकें मोठें आहे. **टीप**,–ह्या वाक्प्रचाराचा उपयोग चांगल्या किं०वाईट प्रसंगीं करतां येतो. **बत्तीशी मसाला पु०** बत्तीस द्रव्यें एकत्र करून बनविलेलें औषध (घोडा, उंट, इ० ना देतात तें).**टीप**,–ह्या अर्थी ' बत्तीसा 'पु०असाही शब्द आहे. **बत्तीस पु०** १ बाळंतिणींना बत्तीस द्रव्यांचें देतात ते औषध. वर 'बत्तीशी मसाला' पहा.**बत्तीस लक्षणी, बत्तीस गुणी वि०**स्त्रिया आणि पुरुष, ह्यांचीं शास्त्रांत जीं बत्तीस उत्तम लक्षणें सांगितलीं आहेत त्या बत्तीसच्या बत्तीस लक्षणांनीं युक्त (पुरुष किं० स्त्री).

बत्ती [हिं०] स्त्री० १ दिव्याची वात. २ दिवा. ३ फटाकडा, बाण, सुरुंग,इ० पेटवावयाची दारू भरलेली दोरी किं० नळी. ४ एक पागोटें उभें चिरून दोन जीं अरुंद पागोटीं करतात तीं प्रत्येक. ५ मुद्दाम अरुंद विणलेलें पागोटें. ६ घरावर घालण्याचें गवती छप्पर करणारे तीन इसम समुच्चयानें. ७ जखम किं० घेतलेला पोत भरून येऊं नये म्हणून जी चिंधी आंत भरतात ती. मागें ' पोत ' पहा. ८ डोक्यावर टोपी घालून तिच्यावर लपेटलेलें अरुंद वस्त्र; उ० झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेबांची स्वारी पुरुषवेषानें जेव्हां घोड्यावर बसत असे, त्या वेळीं त्यांच्या झिरझिरीत सुंदर बत्तीचा भरजरी पदर पाठीवर लोळत असे, तो फार मनोहर दिसे. ꙮ **बत्ती लावणें** पेटविणें; आग लावणें. **तिच्या पाटीं पाठीं बत्ती लागो** तिचा कुलक्षय होओ. शापवाक्य. **सतीला मिळेना बत्ती आणि शिंनळीच्या दारीं हत्ती** नीतिमान् माणसें कोपऱ्यांत पडून राहातात आणि दारिद्र्यांत दिवस कंठितात, आणि बदमाष, खोटीं दिवाळीं काढणारे, देशद्रोही, चहाडखोर, बढाईखोर, विश्वासघात करणारे लोक श्रीमंत होतात, मान्यतेस चढतात, किं० वैभवशाली होतात.

बत्तीस [हिं० बे+तीस] वि० तीस आणि दोन मिळून होतात त्या संख्येइतका.

बत्या मागें ' बत्ता, ' ' बता ' पहा.

बथवा पु० एक खाण्यांत येणारा कंदविशेष.

बद [हिं०] न०, पु० गर्मी ह्या रोगानें होतें तें उठाणूं किं० गळूं. २ बैदूल किं० गोट्या ह्या खेळांत पाडतात ती खळी.

बंद [फा०] पु० १ पदार्थाचे दोन किं० अनेक भाग बांधावयाची दोरी,चिंधी,पट्टी,इ०.२सुर्पणांच्या लाकडाचा,किं०गवताचा, भारा बांधावयाची दोरी किं०ह्या दोरीचा वळसा.३अंगरखा,पालखीचा पडदा, इ० कांस लाविलेला असतो जो कसा तो. ४ अडवणूक; नियंत्रण. ५ वर्तनसरणीचा कोणेकाला लावून दिसेला नियम. ६ कारागृहांत कोणेकाला घालण्याची क्रिया. ७ कागदाचा ताव. ८ सांधा; पेर. ९ (पत्त्यांच्या खेळांत) अगदीं खालचा हुकूम. ꙮ **बंदाखालीं क्रि० वि०** कडक नियंत्रणेंत.**भरल्या बंदांत**,किं०**बंदाखालीं क्रि० वि०** छपराखालीं, घरांत, नांदत्या घरांत, पवित्र स्थळीं,–जेथें खोटें बोलणें, बोंबलणें, रडणें, वचनभंग करणें, इ० गोष्टी निषिद्ध आहेत; उ० मी भरल्या बंदांत (किं० बंदाखालीं) तुम्हाला शंभर रुपये देईन असें कबूल केलें आहे त्याप्रमाणें देईन; उ० भरल्या बंदांत तूं रडतोस हें तुला शोभतें काय ?

बंद [फा०] वि० रोधिलेला; झाकलेला; आडकावलेला; थांबविलेला;उ० खिडकी बंद कर; उ० तुझी कटकट बंद कर; उ० वाफेचा रूळ चालत आहे म्हणून रस्ता बंद केला आहे.ꙮ **बंदखलास, बंदखुलास वि०** १ कैदेंतून सुटलेला. २ मोकळा झालेला. **बंदखाना पु०** तुरुंग.

बद, बद्द, बद्दू [फा० बद्=वाईट] वि० वाईट; निंद्य; सदोष; ऐवट; खोटा; उ० बदकर्म, बदअंमल (व्यभिचार);बदख्याल (व्यभिचारी; विषयी); बदनकशा(फजिती, वोऱ्या); बदफैल (व्यभिचारी); बदबोय (दुर्गंधी); बदनामी (दुर्लौकिक); बदमामला (अव्यवस्था, गोंधळ); बदरंग (बेआबरू, फजीती) इ०.

बद, बद्द क्रि० वि० पूर्णपणें; पूर्णत्वानें.

बदक [अ० बत्, बतक्] पु० पाण्यावर पोहून मासे खाणारा एक पक्षी; पाणकोंबडा. ꙮ **बदकमुख वि०** बदकासारखें लांबट तोंड

असलेला (घोडा). हें घोड्याचें सुलक्षण समजलें जातें. **बदकशाम वि०** आखूड कान आणि रुंद जबडा ज्याचा असा (घोडा). हें घोड्याचें सुलक्षण समजलें जातें.

बदका पु० १ रट्टा, ठोसा (मुठीनें मारलेला). २ रट्टा, थप्पड. ३ शेण, चिखल, इ० चा गोळा.

बद्खल न० १ थबकडें भांडें. २ मध्यें खोलगट असलेली जमीन. **वि०** १ मध्यें खोलगट (भांडें, जमीन, मनुष्याचे गाल, इ०). २ वसकट, ठेंगणें (घर). [गुलामगिरी.

बंदगी [फा०] स्त्री०१ नमस्कार; सलाम.२

बद्गें न० १ धान्यांतील केरकचरा, कोंडा, फळांचीं किं०शेंगांचीं सालें,इ०.२रद्दी पदार्थ,–जेवण्याच्या ताटांतील खरकटें,जखमेंतील पू किं०रक्त, पाण्यांतील गाळ, इ०.

बद्मस्त वि० उन्मत्त; गर्वानें धुंद.

बदर [सं०] न० बोर. **बदरी स्त्री०** बोराचें झाड.

बंदर [फा०] न० जहाजें नांगरावयाचें समुद्रकांठचें स्थळ किं० अशा स्थळावरचें गांव. ॐ **बंदर करणें** बंदरांत गलबत नांगरणें,–वायु प्रतिकूल असल्याकारणानें किं० प्रवाशांना स्वयंपाक करून जेवण्यासाठीं किं० अन्य कारणांसाठीं. **बंदर वाहणें** बंदरांतील गलबतांची वाहतूक सुरू होणें. **बारा बंदरचें पाणी प्यालेला** पुष्कळ देश हिंडलेला आणि चतुर आणि व्यवहारज्ञ झालेला; न फसणारा; अट्टल सोदा. **बंदरसई (–सही) वि०** बंदरांत आलेला (माल). **बंदरी जिन्नस पु०** मासळीचा कुट्टा.

बदरा [हिं० बज्रा] पु० एक प्रकारची होडी.

बदरा पु०, बदरी स्त्री० १ घोड्यावर सामान भरावयाची खोगिराला बांधलेली पिशवी. २ सराफ लोकांची पिशवी.

बदरी [सं०] स्त्री० बोरीचें झाड. ॐ **बदरीकेदार पु०, न०** स्वयंभू ज्योतिर्लिंगांच्या बारा स्थानांपैकीं एक. मागें ' ज्योति ' शब्दांत ' ज्योतिर्लिंग ' पहा.

बदल [अ०] स्त्री०१ फेर; फरक; वेगळेपणा; तफावत. २ मोबदला. ॐ **बदल खाणें** केलेला संकल्प किं० विचार सोडणें.

बद्दल [अ०] श० यो० अ० १ मोबदल्यादाखल;० साठीं; ०करितां; उ० पागोट्याबद्दल मी तुम्हाला हा शेला देतों. २ कारणामुळें; उ० खुनाबद्दल सटवाजी फाशीं गेला.३ ऐवजीं;० च्या जागीं; उ० एकादशी तात्यांना होईना म्हणून त्याबद्दल त्यांनीं एक गोप्रदान केलें.ॐ**बदलखातर श० यो० अ०** १ मुळें;० साठीं;० च्या कारणास्तव. २ कोणेकाची मर्जी संतुष्ट राहावी म्हणून (जाणें, येणें, देणें, इ०). **बदलमुशारा [अ० बद्ल मुषाहराह] पु०** राज्याचीं वेगळीं वेगळीं खातीं किं० संस्थांचे नोकर यांना नोकरीबद्दल देतात तो मोबदला,–तो द्रव्याच्या, जमीनीच्या, किं० धान्याच्या रूपाचा जसा ठरविलेला असेल तसा असतो. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' खेरीज मुशाहिरा ' म्ह० ठराविक पगारापेक्षां अधिक जें दिलें जातें तें.मागें ' खेरीज ' मध्यें ' खेरीज मुशाहिरा ' पहा.

बदलणें [हिं० बद्लना] अ० क्रि० १भिन्न रूपाचा, स्वरूपाचा,रंगाचा, किं०वृत्तीचा होणें.२ एकाच्या जागीं दुसरें येणें. ३ दिलेल्या वचनापासून किं० केलेल्या प्रतिज्ञेपासून च्युत होणें किं० हटणें. **स० क्रि०** १ वेगळ्या प्रकारचा किं० रूपाचा करणें. २ भिन्न ठिकाणीं किं० भिन्न कामावर (नोकराला) नेमणें.

बदला [अ० बद्ल] श० यो० अ० १ ऐवजीं;० च्या जागीं किं० स्थानीं. **पु०** आपण दुसऱ्यास दिलेल्या रकमेंतील जीं नाणीं घेणारा नाकारील तीं घेऊन त्या किमतीचीं दिलेलीं दुसरीं नाणीं.ॐ **बदलामुबादला [अ०] पु०** नाण्यांची अदलाबदल; एक प्रकारचीं नाणीं देऊन दुसऱ्या प्रकारचीं घेणें,–सराफाचा धंदा.

बदलाई [स० बदलणें] स्त्री० बदलण्याची क्रिया.ॐ **बदलाई करणें, बदलाईस येणें**१ वचनापासून च्युत होणें; प्रतिज्ञेंत हार खाणें. २ कबूल केलेली गोष्ट नाकबूल करणें.

बदलाम [फा० बद्नाम्] वि० दुर्वर्तनानें प्रसिद्धीस आलेला. ॐ **बदलामी स्त्री०,बदलाम न०** १दुष्कीर्ति;बदलौकिक;(येणें,आणणें,ठेवणें).२ आपण मुळींच अपराध केला नसतां किं०आपल्या हातून नजरचुकीनें अपराध घडलेला असतां

विनाकारण होते ती आपली दुष्कीर्ति. **बदलामीस येणें** कोणेकाची मागणी योग्य असतां ती न पुरविणें किं०ती मान्य न करणें.

बदलावण [**अ०** बद्‌ल; **म०** बदल] **न०** १ आपण आपली मुलगी दुसऱ्याच्या घरीं द्यावी आणि त्याची मुलगी आपण आपल्या घरीं करून घ्यावी असा लग्नाचा प्रकार. २ आपण आपली मुलगी दुसऱ्याच्या घरीं द्यावी, त्याणें त्याची मुलगी दुसऱ्या कुटुंबांत द्यावी, आणि त्या दुसऱ्या कुटुंबांतील मुलगी आपण आपल्या घरीं करून घ्यावी असा लग्नाचा प्रकार.

बदली [**हिं०** बदली; **अ०** बद्‌ल] **स्त्री०** १ एकाच्या जागीं कांहीं कालापुरता किं० कायम म्हणून आलेला दुसरा माणूस. २ रजेवर जातांना नोकर आपण परत येईपर्यंत आपलें काम करावयाला देतो तो दुसरा इसम. ह्या अर्थी 'बदल्या' असाही शब्द आहे. ३ एका कामावरून दुसऱ्या कामावर करण्यांत आलेली कोणेकाची नेमणूक (होणें, करणें).

बंदलेख पु० कायदे, नियम, इ०च्या संग्रहाचें पुस्तक किं० तक्ता. [बेआबरू.

बदवकर [**फा०**] **पु०** दुर्लौकिक; बदनामी;

बदसूर [**फा०** बद् (वाईट)+**सं०** स्वर; **म०** सूर] **वि०** कानाला कर्कश लागणारें (वाद्य, आवाज).

बदसूरत [**फा०**] **वि०**कुरूप चेहेऱ्याचा.

बंदा [**फा०** बन्दाह्] **पु०**१आपल्या दासीचा मुलगा. २ उपकाराखालीं दबलेला; कृतज्ञतेच्या ओझ्यानें दडपलेला.

बंदा [**फा०** बंद] **वि०** १ लहान नाण्यांच्या रूपांत नसलेला(रुपाया, नोट, इ०).२ठराविक (नोकरी, पगार, इ०).

बंदाटी [**कानडी**] **स्त्री०**एक झाड;माशांना दिसूं नये म्हणून पाणी ह्या झाडाच्या फांद्यांनीं गढूळ करतात.

बदाडणें, बदडणें स० क्रि० काठी, बुक्या, इ०नीं मारणें किं० ठोकणें.

बदाडणें [**म०** बदाडणें] **न०** पदार्थ ठोकण्याचें साधन, काठी, इ०.

बदाफळ न० लठ्ठ आणि थिलथिलीत अंगाचा (माणूस, पशु).

बदाबदी स्त्री० चेंडूचा एक खेळ.

बदाम [**फा०** बादाम्] **स्त्री०** एक झाड. **न०** त्याचें फळ. ❀ **बदामगोळा पु०** बदामाची वडी. **बदामचिनी स्त्री०** एक वनस्पती. **बदामी वि०** १ बदामासंबंधाचा.२बदामाच्या आकाराचा. ३बदामाच्या रंगाचा.

बदामी, बदाम स्त्री० बदामाचें झाड.

बंदिस्त [**फा०**] **वि०** १ भिंती, कूड, इ०च्या योगानें निवाऱ्याची किं० सुरक्षित अशी (जागा). २ ज्याच्या बाजू, भिंती, धक्के, इ० बांधून बळकट केल्या आहेत असें (तळें, विहीर, खड्डा, इ०). ३ नियंत्रित; सुरक्षित जागेंत ठेविलेला; बंदोबस्तानें ठेविलेला;कैदेंत घातलेला. ४ व्यवस्थित (राज्य, संस्था, इ०). ५ सुरळीतपणें चालत असलेलें (काम, राज्य, इ०). **स्त्री०** १ बांधून काढलेली जागा, घर, पटांगण, इ०. २ इमारत, रचना. ३ व्यवस्थित सरणी, रचना, मांडणी.ह्या तीन्ही अर्थीं'बंदिस्ती'हाही शब्द आहे. ४ कागद, पत्रें, इ० वर क्रमाचे अंक घालणें. **न०** ठराविक पगार किं० मुशाहिरा. **बंदिस्ती वि०** १ भक्कम; मजबूत; आटोपशीर (घर, जागा). २ व्यवस्थित; सुरळीत. **बंदिस्त, बंदिस्थ वि०** कैदेंत किं० नियंत्रणेंत घातलेला किं० ठेविलेला.

बंदी [**फा०**] **स्त्री०** १ प्रतिबंध; हरकत; मनाई; निषेध. २ काम, चाल, वहिवाट, इ० रद्द होणें किं० बंद पडणें. ❀ **बंदीखाना पु०, बंदीशाळा स्त्री०** तुरुंग. **बंदीवान् पु०** कैदी. **बंदीमुदत स्त्री०** कर्ज फेडण्याची ठरलेली मुदत. याच्या उलट ' कच्ची, ' किं० ' खुली ' मुदत.

बंदी [**सं०** बंदिन्] **पु०** १ कैदी. २ स्तुतिपाठक. ❀**बंदिजन पु०**राजाचे किं०थोर पुरुषाचे स्तुतिपाठक.

बंदि, बंदी [**सं०**] **स्त्री०** बंधन; कैद.

बदू पु० बैदूल किं० गोट्यांच्या खेळांतील खळी.

बंदूक (–ख) [**तुर्की**] **स्त्री०** शत्रूवर गोळी फेकण्याचें एक साधनविशेष. ❀ **बंदूक डांभणें**

(किं० डागणें) विशिष्ट लक्ष्यावर बंदुकीची गोळी जाईल अशा रीतीनें बंदूक स्थापणें.

बंदेज, बंधेज न० संभोगसमयीं वीर्य लवकर न पडूं देणारें औषध. **वि०** १ वीर्य उगीचच्या उगीच न पडूं देणारें (औषध). २ स्त्रीसंभोग न करणारा किं० करण्यांत मित किं० नियमित.

बंदोबस्त पु०, बंदोबस्ती स्त्री०[फा०] १ व्यवस्था; तजवीज; सुरळीतपणें काम चालण्यासाठीं केलेली तजवीज. २ कामाची व्यवस्थित सरणी किं० शिस्त. ३ शिष्टाचाराप्रमाणें वागण्याची कोणेकाची सरणी. ४ टापटीप.

बद्द [**सं०** बद्ध] **क्रि० वि०** पूर्णपणें; पक्केपणीं; उ० पाषाणगांव पुण्यापासून बद्द तीन कोश आहे; उ० ह्या कुड्यांना बद्द चारशे रुपये तुम्हाला पडतील.

बद्दल इ० मागें ' बदल ' इ० पहा.

बद्द [**फा०** बद्=वाईट] **वि०** १ खोटें(नाणें, रुपाया, इ०). २ दुर्लौकिकाचा; उ० ह्या गांवांत त्याचें नांव बद्दू झालें आहे. ३ धाकांत असलेला; दबकलेला; भिणारा; उ० मी सद्याच्या संगतीस लागून तात्यासाहेबांचा मात्र बद्दू झालों.

बद्ध [**सं०**] **वि०** १ बांधलेला; कोंडलेला; निग्रहणेंत घातलेला. २ आसक्त. ३ उपकाराच्या ओझ्याखालीं दडपलेला. ❀ **बद्धमुष्टि वि०** कृपण; लोभी; चिक्कू. **बद्धमूल वि०** १ पक्केपणीं दृढ झालेली (चाल, रीति). २ विशिष्ट स्थानावर किं० अधिकारावर पक्केपणीं बसलेला. ३ पूर्णपणें जडलेली (खोडी, व्यसन). **बद्धशिख वि०** ज्याचें चौलकर्म झालेलें नाहीं असा (मुलगा). **बद्धकोष्ठ न०** पोटामध्यें अजीर्णादि विकृतीनें शौचास साफ आणि नियमितपणें न होण्याची विकृति. ह्या विकृतीला ' बद्धक ' **न०** असाही शब्द आहे. **बद्धकुष्ठ** हें ' बद्धकोष्ठ ' चें अपभ्रष्ट रूप. **बद्धकटाक्ष न०** १ टक लावून पाहाणें. २ विशिष्ट ध्येयाबद्दल प्रयत्न. ३ परस्परांचें परम वैर; उ० त्याचें माझ्याशीं बद्धकटाक्ष आज दोन वर्षें आहे. **वि०** १ परमवैरी. २ टक लावून पाहाणारा. **बद्धवैर वि०** शत्रुत्व करणारा. **बद्धांजलि वि०** हात जोडून उभा असलेला; नम्रभावानें उभा राहिलेला. **बद्धान्न न०** पचवावयास कठिण(गहूं, उडीद, इ०).

बद्धक [**सं०**] **न०** अजीर्णादि कारणांमुळें शौचास साफ न होण्याची विकृति.

बंध [**सं०**] **पु०** बांधणें. २ कांहीं पदार्थ बांधावयाला साधनभूत दोरा, दोरी, इ०. ३ पदार्थाभोंवतीं दोरी इ० चें वेष्टन, वळसा, इ०. ४ अटकाव; निरोध. ५ कैद. ६ जखम इ०वर बांधावयाची पट्टी. ७ संसार, काम, कारभार, इ० मध्यें मनुष्याचा जखडलेपणा. ८ प्रीति, माया, कर्तव्य, इ० मध्यें किं० इ०नीं मनुष्य गुंतण्याची स्थिति. ९ नियम; कायदा; वर्तनाची समाजानें घालून दिलेली सरणी. १० नियंत्रणा,–जी पाळणें जरूर आहे. ११ वाक्य, श्लोक, इ० चीं कमल, खड्ग, चक्र, इ० रूप जी रचना ती; उ० छत्रबंध, कमलबंध, खड्गबंध, चक्रबंध, इ०.

बंधक [**सं०**] **वि०** १ बांधणारा. २ नियामक. ३ नियंत्रणा घालणारा. ४ आडविणारा. **पु०** १ बांध; धरण. २ ठेव; गहाण. ३ अदलाबदल. **बंधकी स्त्री०** १ व्यभिचारिणी. २ वेश्या. ३ पांच पुरुषांनीं भोगिलेली स्त्री.

बधणें अ० क्रि० १ कोणी मनुष्य कोणेकाला वश किं० अनुकूल होणें किं० त्याच्या सांगण्याप्रमाणें वागावयास तयार होणें. २ जुळणें; जमणें; शक्य होणें; उ० हें लग्न बधेल तसें बधवून ये. ३ वळणें; प्रवृत्त होणें; उ० ह्या व्यापारांत भांडवल घालावयाला शंकरराव बधणार नाहीं.

बंधन [**सं०**] **न०** १ बांधणें. २ पदार्थ बांधावयाचें साधन दोरी, सूत, इ०. ३ मिठी; आलिंगन. ४ अटक; कैद; नियंत्रणा. ५ बेडी. ६ तुरुंग; कैदखाना. ७ पान, फूल, इ० चा देठ. ८ गुरांना बांधावयाचें दावें. ९ रचना; उभारणी. १० संसारांत गुंतावयास कारण जें मोह, प्रीति, इ० तें. ❀ **आठबंधन, दसबंधन, सोळबंधन, मासबंधन न०** लग्नानंतर वधूवरांचें एकत्र स्नान करण्याचा विधि. मागें ' आठ ' मध्यें ' आठनहाण ' ' दशनहाण, ' ' सोळनहाण, ' ' मासनहाण, ' हे शब्द पहा.

बधविणें [**म०** ' बधणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (कोणेकाला) अनुकूल किं० वश करून

वण. २ (कांहीं कार्य) घडवून किं० जुळवून आणणें.

बंधाटी [**म०** बंध] **स्त्री०** १ काटक्याकुटक्या, गवताचा भारा, इ० बांधावयाची दोरी इ०. २ पावसाचे शितोडे घरांत येऊं नयेत म्हणून दारापुढें किं० खिडकीपुढें जी झावळ्या इ० ची ताटी बांधतात ती.

बंधारण [**म०** बंध] **न०** नियम; कायदा; अमुक प्रसंगीं अमुक प्रकारें वर्तावें अशी राजा, समाज, धर्म, इ० नीं घालून दिलेली सरणी.

बंधारा [**म०** बंध] **पु०** १ बांध; धरण. २ नियंत्रणा; शिस्त.

बधिर [**सं०**] **वि०** १ बहिरा. २ संवेदनाशून्य; स्पर्शज्ञान ज्याचें नष्ट झालें आहे असें (गात्र, त्वचा).

बंधु [**सं०**] **पु०** १ भाऊ. २ नातलग. ३ मित्र; सोबती. ४ भावाप्रमाणें कोणेकावर प्रेम करणारा; उ० दीनबंधु, अनाथबंधु. ५ एका धंद्यांत, एका शाळेंत, किं०एका व्यवसायांत असलेले जे लोक ते परस्परांचे; समान सुखदुःखाच्या स्थितींत असलेले जे लोक ते परस्परांचे; एकाच जातीचे, एकाच देशाचे, एकाच धर्माचे, एकाच मार्गानें जाणारे जे लोक ते परस्परांचे; उ० धर्मबंधु, देशबंधु, विश्वबंधु, गुरुबंधु, ब्रह्मबंधु, इ०. ꕥ **बंधुता स्त्री०** १ बंधुसमूह. २ सर्व नातेवाईक समुच्चयानें. ३ नातें. **बंधुजन पु०** १ बंधु. २ बंधुसमूह. **बंधुत्व न०** पराकाष्ठेचें सख्य. **बंधुराज पु० अ० व०** भाऊ (प्रेमांत किं० निंदेंत). **बंधुत्रय न०** भाऊसभाऊ, मामेभाऊ, आणि आतेभाऊ, असे तीन प्रकारचे नातलग. **बंधुवर्ग पु०** १ आप्त;नातलग; नात्याचीं माणसें. २ भाऊ (निंदेंत). **बंधुवा पु०** भाऊ; भावाच्या नात्याचा (स्त्रियांचा शब्द).

बंधेज मागें ' बंदेज ' पहा.

बन [**सं०** वन] **न०** १ एकाच जातीच्या झाडांचा समुदाय; उ० केतकीचें बन, केवड्याचें बन, कमळांचें बन, इ०.२झाडी; जंगल. ꕥ **बनकर पु०** माळी. **बनकरी पु०** १ लाकूडतोड्या. २ जंगलांत राहणारा. **बनकेळ स्त्री०** जंगली केळीचें झाड. **बनतगर स्त्री०** तगरी फुलझाडाची एक जात. **बनबनकी लकडी स्त्री०** भिन्न भिन्न सरणींनीं एकच ध्येय गाठूं पहाणारे लोक.

बन पु० दशविध गोसाव्यांचा एक वर्ग किं० भेद.

बनगी स्त्री० मागें ' बणगी ' पहा.

बनजर [**हिं०** बन्जर] **न०** १ जंगल. २ झाडेंझुडपें वाढलेली जागा. ३ माळजमीन.

बनजार, बनजारी, बनजारा [**हिं०** बन्जारा] **पु०** बैलांच्या पाठीवर धान्य, मीठ, इ० लादून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन विकणाऱ्या लोकांची जाति किं० त्या जातीचा इसम.

बनणें [**हिं०** बन्ना] **अ० क्रि०** १ होणें; घडून येणें; अस्तित्वांत येणें. २ शरीरानें गुबगुबीत किं० लठ्ठ होणें. ३ कायमचें रूप पावणें. ४ पटणें; मित्रत्वाच्या संबंधानें जुळण्याजोगें असणें; पटणें; उ० कुळवाड्याच्या पोरांशीं ह्या सद्याचें फार बनतें; उ० अत्रिगोत्राचें सर्वांशीं बनतें. ५ थाटमाटाच्या पोषाखानें किं० दागिन्यांनीं सज्ज होणें. ६ जथणें; व्यवस्थित रूपांत येणें; मार्गाला लागणें; उ० त्याचा संसार (किं० दुकान, व्यापार, इ०) आतां चांगला बनला. ७ (पालखी, मेणा, इ० च्या भोयांनीं) खांदा बदलणें. ८ सुरूं होणें;चालू होणें;उ०त्याची आणि आमची लढाई बनली. **भावकर्तरी क्रि०** फावणें; उ० मला तुझें काम करावयाला बनणार नाहीं. **बनीं बनणें** अंगावर झोकदार पोशाक घालून सिद्ध होणें. **बनून ठनून चालणें** झोकदार पोशाख धारण करून ऐटींत चालणें.

बनविणें [**म०** ' बनणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (कांहीं पदार्थ) संकल्पपूर्वक करणें, घडविणें, किं० अस्तित्वांत आणणें. २ (सामान्यतः) करणें; घडविणें; सिद्ध करणें.२ थापबाजीनें किं० गोड गोड बोलून कोणेकाला वश करून घेणें किं० चढविणें किं० त्याला फसविणें.

बनशिळी स्त्री० वाचाळ स्त्री.

बना [**हिं०**] **स्त्री०** एक प्रकारचें लोकरीचें कापड.

बनाव [**हिं०**] **पु०** १ साहचर्य;मित्रत्वाचा संबंध.२एकमेकांची शोभा वाढविण्याजोगी पदार्थ, माणसें, इ०ची जुळणी. ३ परस्परांस साहाय्य करणाऱ्या माणसांचा मिलाफ किं० संयोग. ४ उठावदार किं० झोकदार देखावा, मांडणी, किं० रचना.५परस्परांतील भेदभाव, तेढ, मतवैचित्र्य, इ० नाहींसें होऊन जमून आलेला संयोग किं० घडून आलेली एकवाक्यता. ✽ **बेबनाव पु०**मतभिन्नता; भांडण; विरोध; वैर.

बनावट वि० १ खोटा; लबाडीचा.२विशिष्ट कृतीनें बनविलेलें. **बनावट स्त्री०** रचना; घटना; मांडणी.

बनाविणें, बनविणें [**हिं**०बनाना] **स० क्रि०** १ (कांहीं पदार्थ) संकल्पपूर्वक करणें, घडविणें, किं० अस्तित्वांत आणणें. २ नटविणें; शोभायुक्त करणें. ३ (कांहीं हकिगत) पदरचा मजकूर भरतीला घालून चटकदार करणें. ४ करणें, घडविणें (सामान्यतः).

बनींव [**म०** बनविणें] **वि०** वर ' बनावट' [पहा.

बनेळ [**म०** बन; **सं०** वन;**म**०केळ;कदली] **स्त्री०** जंगली केळ.

बनोट [**म०** बनावट] १ वर ' बनावट ' पहा. २ध्रुपद, ख्याल, इ० चा रचनाप्रकार.

बंब [**पोर्च्युगीज्** पांपा] **पु०** पाणी वर चढविण्याचें किं० जोरानें उडविण्याचें एक प्रकारचें यंत्र.

बंब पु० १ संबळ नांवाचा वाद्युवाद्याचा एक अवयव. दुसऱ्याला ' झलि ' म्हणतात. २ मोठा; प्रचंड; अवाढव्य; लठ्ठ; उ० त्याचें केवढें हो बंब शरीर हें ! उ० चार बारीक बारीक वांसे घालण्यापेक्षां एकच मोठा बंब वांसा घातला म्हणजे झालें.[**म०** बोंब] **पु०** फजीती; अपकीर्ति;पराभव; बोऱ्या; उ० परीक्षेंत त्याचा बंब वाजला (म्ह० तो नापास झाला).

बंब क्रि० वि० कांठोकांठ; तुडुंब; आकंठ; उ० एकोणीस जिलब्या खाऊन माझें पोट बंब भरलें.

बंब, बम्म [**सं०** ब्रम्हमहादेव] **उ० वा० अ०** गोसावी लोक भिक्षा मागतांना हा शब्द उच्चारतात. **वि०** लठ्ठ; फोफशा; अगडबंब. ✽ **बंबमहादेव** वर 'बंब'उ० **वा० अ०**पहा. **वि०** अगडबंब शरीराचा किं० बांध्याचा किं० आकाराचा.

बबब उ० वा० अ० अबब ! ओहो !

बंबाळ, बंभाळ पु० प्रचंड लोट, झोत, किं० प्रवाह (आगीचा, तेजाचा, पाण्याचा, रक्ताचा, वासाचा). **वि०** अतिशय; खूप मोठा; उ०बंबाळ जाळ उठला; उ०ही आमटी बंबाळ तिखट झाली आहे. **बंबाळी स्त्री०** १ विशालता. २ उधळपट्टी.

बंब्या वि० खूप मोठा; लठ्ठ; बोजड.

बभरा,बभ्रा पु०१प्रसिद्धि (चांगल्या किं० वाईट बाबतींत). २ बोभाटा; रहस्य प्रकट होणें किं० करणें.

बमुजीब,बमोजीब[**अ०**]**श०यो०अ**०प्रमाणें; अन्वयें; अनुसारेंकरून; अगदीं मूळाबरहुकूम; **उ०** ही अस्सल बमुजीब नक्कल आहे.

बयतें, बयत्या ' बलुतें, '' बलुत्या ' पहा.

बयला, बयली पुढें ' बैला, '' बैली 'पहा.

बया पु० एक पक्षी.

बया [**म०**बाई] **स्त्री०** १ बाई (निंदेंत किं० उपहासांत). २स्त्रीचें ठेविलेलें नांव. ३स्त्री(बहुमानाचा शब्द).

बयाणा, बयाना [अ० बइआनाह्]**पु०**१कांहीं पदार्थ विकत घेऊं इच्छिणारा मनुष्य तो विकत देणाऱ्याला अगोदर विश्वासार्थ किंमतीचा जो अंश देतो तो.२ दोन माणसांत कांहीं व्यवहार ठरला म्हणजे एक मनुष्य दुसऱ्याला जो विश्वासार्थ पैसा देतो तो. ३ हकीगतीचें निवेदन. ४ लांबलचक कंटाळवाणी हकीगत. ५ खोट्या सबबींची मालिका (लावणें, वाचणें, सांगणें). ६ दुसऱ्यापाशीं सांगावयाची कांहीं महत्त्वाची गोष्ट. ७ राजा, बडा गृहस्थ, इ० पुढें चोपदार इ० म्हणतात तीं वाक्यें प्रत्येक. ✽ **बयाणा (–ना) बांधणें** दागिना, सणंग, इ० पदार्थ विकत घेऊं इच्छिणारा मनुष्य सौदा पक्का करावयाच्या पूर्वीं त्या पदार्थाला बांधतो ती चिठ्ठी,—आपणाला विचारल्याशिवाय तो पदार्थ दुसऱ्या कोणाला विकूं नये म्हणून.

बयाद (–ज) पु०, स्त्री०, बयावल न० [**अ०** बयाज्] तपशील;बारकाईनें केलेलें वर्णन.

⊛ **बयाद स्त्री०** खोटी सबब; नसती अडचण. **बयादी लावणें** (किं० **सांगणें**) विनाकारण हरकती काढीत बसणें; शुष्क सबबी सांगत बसणें,—काम टाळण्यासाठीं. **बयादवार, बयाजवार क्रि० वि०** तपशिलासह.

बयावल न० वर ' बयाद ' पहा.

बर स्त्री०, न० रक्तमिश्रित पू.

बरईक [**म०** बरा] **स्त्री०** लौकिक; चांगलें नांव; प्रतिष्ठा.

बरकडी स्त्री० पुढें ' बरगडी ' पहा.

बरकणी [**पोर्च्युगीझ्** बरकिन्हा] **स्त्री०** एक प्रकारची होडी.

बरकत [**अ०**] **स्त्री०** १ कार्याची सफलता; फलद्रूपता. २ अपेक्षित लाभापेक्षां अधिकाची प्राप्ति. ३ वाढावा. ४ दुकानदार लोक धान्य मोजतांना लाभ, बरकत, तीन, चार, असे शब्द उच्चारून मापें टाकण्यास सुरवात करतात. लाभ म्ह० एक; बरकत म्ह० दोन.

बरकता [**पोर्च्युगीझ्** बरकेता] **स्त्री०** एक प्रकारची होडी. ' बरकीण ' हाही ह्याच अर्थाचा शब्द आहे.

बरकत्या पु० कापलेलें भात बांधावयासाठीं भातेणाची करतात ती दोरी.

बरकनदाज [**फा०** बर्क् (वीज)+अंदाज् =फेकणारा; अंदाख्तन्=फेकणें] **पु०** बंदुक मारणारा शिपाई. **बरकनदाजी स्त्री०** १नेमबंद बंदूक मारण्याचें कौशल्य. २ बरकनदाजाचा धंदा किं० कौशल्य.

बरकशी, बरकस [**फा०** बर् अक्स्] १ स्पर्धा; चढाओढ. २ वैर; शत्रुत्व; आकस (धरणें, बाळगणें).

बरका वि० १ मऊ असून चिवट आणि गिळगिळीत असा(फणसाचा गरा किं०अशा गऱ्याच्या फणसाचें झाड). २ पिठें चिभूड (फळ).

बरकाळी स्त्री० चिंधी; बाभाडा.

बरकीण [**पोर्च्युगीझ्** बरकिन्हा] आकारविशेषाची लहानशी होडी.

बरखत वर ' बरकत ' पहा.

बरखत्या, बरखटया वर ' बरकत्या ' पहा.

बरखास, बरखास्त[**फा०** बर्ख़ास्त]**वि०**संपलेली (सभा); काम संपून बंद झालेली (सभा).

बरग पु० १ ज्वार, बाजरी, नाचणा, इ० धान्याचे दाणे व्यक्तिशः. २ गुरांना होतो तो एक रोग.

बरगडी स्त्री० पाठीच्या कण्यापासून छातीपर्यंत येणारीं जीं हाडें तीं प्रत्येक; फासळी. ⊛ **कोणेकाच्या बरगड्या मोडणें** १ त्याला कुबलणें. २ त्याच्याकडून फार काम करून घेणें. ३ त्याच्या गर्वाचा परिहार करणें; त्याचा नकशा उतरणें. [वीण, इ०).

बरगळ,बरंगळ वि० विरळ (दांत, वस्त्राची

बरगळणें, बरंगळणें अ० क्रि० १ (दांत, वस्त्राचे तंतु, चटईच्या पाती, इ०) विरळ विरळ मांडणीच्या किं० ठासणीच्या किं० रचनेच्या असणें. २ मूर्खासारखें किं० वेड्यासारखें बोलणें. ३ अधीर किं० उतावळें होणें. ⊛ **बरगळ भूत, बरगळलें भूत,बरगळेल भूत,बरगेळ भूत न०** १ भुकेनें व्याकुळ झालेला आणि खावयास मागत सुटलेला. २ फाजील उत्कंठेनें पीडित (निंदेंत). **बरगळेल वि०** अति उत्सुक किं० उत्कंठित (निंदेंत).

बरगा [**हिं०**]**पु०** १ पाटणी करतांना दोहों तुळयांवर आडवीं बसवितात तीं लाकडें प्रत्येक. २ वांसा; सोट.

बरगोण, बरंग्येण न० ज्वार, बाजरी,इ० चीं ताटें समुच्चयानें. [शस्त्र.

बरची, बरछी[**हिं०**] **स्त्री०** भाल्यासारखें एक

बरज वर ' बरग ' पहा.

बरटी स्त्री० एक तृणधान्यविशेष.

बरड पु० १ हरभरा, तूर, इ० धान्यांत उत्पन्न होऊन तीं खाणारा एक क्षुद्र जंतु.२लाकडाची नासाडी करणारा एक क्षुद्र कीट.

बरड स्त्री० जमीन भाजून भाताचें तेथें केलेलें आवण उपटून त्या स्थळीं लावणी न करतां दुसऱ्या वर्षीं आवण करण्यासाठीं रिकामें ठेविलेलें शेत. **वि०** १ जेथें चांगलें शेत होत नाहीं अशी (जमीन).२ ज्यावर देवीचे वण आहेत असें(गात्र). ⊛**बरडखरड वि०** ह्याच प्रतीकांतील ' बरड ' **वि०**चे दोन्ही अर्थ पहा.

बरडणें [**म ०** बरड] **अ० क्रि** १ कीटांनीं

खाऊन (धान्य, लाकूड, इ०) फोल झालेलें असणें. २ देवींच्या व्रणांनीं (गात्र) विरूप झालेलें असणें.

बरडा पु० जून पोफळें सोलून शिजवून केलेली सुपारी. ह्याच अर्थी ' बरडी सुपारी ' असाही शब्द आहे.

बरडा पु० खडकाळ जमीन; मुरमाची जमीन. **वि०** निकस(जमीन).

बरडेल न० वडे तळून कढईंत शिल्लक राहिलेलें तेल. [भांडें.

बरणी स्त्री० चिनीमातीचें आकारविशेषाचें

बरतरफ [फा०] वि० कामावरून काढून टाकलेला (नोकर). **बरतरफी स्त्री०** कामावरून किं० अधिकारावरून काढून टाकणें.

बरदार [फा०] वि० (फारशी समासांत) धारण करणारा, वाहाणारा; उ० बेलेबरदार, शिकेबरदार, इ०.

बरदास्त [फा० बर्दाश्त **] स्त्री०** १ आपल्या घरीं आलेले पाहुणे, प्रतिष्ठित गृहस्थ, इ० ची योग्य व्यवस्था (करणें, राखणें, ठेवणें). २ मुलें, जनावरें, पदार्थ, इ० जपून वागविणें, त्यांची काळजी घेणें, किं० जोपासना करणें.

बरफ, बर्फ [फा०] न० १ निसर्गात गोठलेलें किं० कृतीनें गोठविलेलें पाणी. २ धुकें. ३ देवी, मधुरा, इ० चा त्वचेवर उद्रेक. ४ गवत, केश, रानझाडें, इ० चा पुंजका.

बरफी, बर्फी [फा०] स्त्री० साखरेच्या पाकांत नारळाचा चहूं, खवा, इ० घालून तें मिश्रण थापून वड्या पाडून करतात तें खाद्य.

बरबट पु०, न० आंबा, चिंच, आमसुलें, इ० ताकांत किं० पाण्यांत कोळून केलेलें तोंडीलावणें.

बरबटणें [म० बरबट **] अ० क्रि०** चिखल, शेण, इ० नीं लडबडलेलें होणें किं० असणें.

बरबडा पु० एक तृणधान्यविशेष.

बरबरीत वि० पातळ (शेण, चिखल, फोडांतील पू, जखमेंतील रक्त, इ०).

बरबाडी स्त्री०, बरबडा पु० एक तृणधान्यविशेष. [नासलेला.

बरबाद [फा०] वि० नष्ट झालेला;

बरमदंडा [सं०ब्रम्हदंड **] पु०** एक कांटेरी झाड.

बरमा, बरम्हा पु०१ सुताराचें भोक पाडावयाचें हत्यार; सामता. २ आतिषबाजीच्या नळ्यांत दारू ठासल्यावर त्याला बारीक छिद्र पाडतात तें. [गोजिरवाणा.

बरवटा, बरवंटा, बरंवटा वि० सुंदर,

बरवा वि० चांगला; सुंदर; नीटनेटका.

बरवा पु०,स्त्री० (संगीतांत) एक रागिणी.

बरशी स्त्री० मागें ' बरची ' पहा.

बरसन न० शैत्य, पडसें, किं० त्यामुळें नाकांतून गळतें तें पाणी.

बरसात [हिं०] स्त्री० १ घोड्यांना होतो तो एक रोग. २ पावसाळा. ३ पाऊस.

बरसाती [हिं०] स्त्री० १ घोड्याचा एक रोग. २ चिलटें, माशा, इ० चा घोड्याला उपद्रव होऊं नये ह्मणून त्याच्या डोळ्यांवर लोंबत्या चिंधोट्या ज्याला कापल्या आहेत असें चामडें बांधतात तें.

बरहक, बरहक्क [फा०] वि० हक्काप्रमाणें असलेलें; यथायोग्य; शिस्तीचा.

बरहुकूम [फा० बर् हुक्म् **] क्रि० वि०** हुकमाप्रमाणें; नमुन्याप्रमाणें; आज्ञा, सूचना, ताकीद असेल त्याप्रमाणें.

बरळ [म० बरळणें **] स्त्री०** असंबद्ध भाषण (तापांतील, झोपेंतील, दारूच्या निशेंतील) **वि०** मूर्खासारखें किं० असंबद्ध भाषण करणारा.

बरळ [सं० विरळ **] वि०** १ सइल विणीचें (वस्त्र). २ जाडेंभरडें (पीठ, धान्य, डाळ, इ०).

बरळणें अ० क्रि० मूर्खासारखें बोलणें, असंबद्ध भाषण करणें (झोपेंत, ज्वरांत, दारूच्या कैफांत).

बरा [सं० वरम् **] वि०** १ चांगला; नीटनेटका; मध्यम प्रतीचा; काम भागविणारा. २ निरोगी;ज्याला आजार नाहीं असा.३आजारांतून उठलेला. ४ विकृति किं० नादुरुस्ती नाहींशी होऊन पूर्व स्थितीवर आलेला. ५ अगदींच थोडा किं० कमी किं० अपुरता नसलेला. ६ खूप; पुष्कळ. **क्रि० वि०** योग्य वेळीं; ऐन समयीं; उ०

तूं बरा आलास. ॐ कोणेकाला बरें घेणें १त्याला झोडपणें. २ त्याची खरडपट्टी काढणें. ३ त्याला कांहीं कष्टाच्या कामाला जुंपणें. कोणेकाच्या बऱ्यावर असणें त्याचें कल्याण करावयास तत्पर असणें. **बरी गत** स्त्री० सुस्थिति; आशा करण्याला जागा; उ० त्या रोग्याची बरी गत दिसत नाहीं.

बराडी वि० खादाड; अधाशी; आशाळभूत; खाण्यासाठीं अधीर झालेला.

बरात [फा०] पु० चंगकांचन गंजिफांतील तिसरा रंग. स्त्री० १ खजिन्यांत पैशाची मागणी. २ विवाहविधीनंतर नवरानवरी यांची नवऱ्याच्या घराकडे मिरवणूक. टीप,–ह्या दोन्ही अर्थीं 'वरात' हा शब्द अधिक प्रचलित आहे.

बराबर, बरोबर [फा० बराबर्=छातीस छाती लावून] वि० १सारखा; समान; त्याच गुणाचा किं० परिमाणाचा. २ बिनचूक, निर्दोष; यथास्थित; सत्याशीं संवादी किं० जुळणारा. ३ यथायोग्य; असावें तसें. ४ साफ, नितळ. क्रि० वि० १ सहवर्तमान; संगतींत. २ त्याच वेळीं; त्याच खेपेस; त्याच कामांत.

बराबरी, बरोबरी [फा० बराबर्+ई (प्रत्यय) स्त्री० १ समानता; सारखेपणा; तुल्यता; समसमान असण्याची स्थिति. २ एका बाबतींतलि कमीपणा दुसऱ्या बाबतींतील अधिकपणानें भरून निघणें; फिटंफाट. ॐ **बराबरीचा** वि० गुणानें, योग्यतेनें, वयानें, किं० अशाच प्रकारें सारखा किं० समान.

बरामत स्त्री० पुढें 'बलामत' पहा.

बरावर्द [फा० बर् आवुर्द] स्त्री० १ अंकगणिताच्या सरणीनें बेरीज, वजाबाकी, त्रिराशिकें, इ० कार्यें करणें किं० हीं कार्यें प्रत्येक. २ कचेरींतील कारकून इ०च्या पगारांचा तक्ता. ३ सरासरी, कमीजास्तीपणाची तुल्यता. **बरावर्दी** स्त्री० हें रूपही वरील सर्व अर्थांनीं योजण्यांत येतें.

बरी स्त्री० ज्या अनेक तुकड्यांचा अंगरखा शिवलेला असतो त्यांपैकीं 'पेसकळी' नांवाचा तुकडा.

बरीक [म० बरा] क्रि० वि० १ मात्र; केवळ; उ० सगळ्या शाळेंतील मुलें अशक्त आहेत; गोविंदा बरीक निकोप प्रकृतीचा आहे. २ निदान; उ० कोणी आलें नाहींत, मी बरीक आलों.

बरू, बोरू पु० ज्याच्या कांडाच्या लेखण्या करतात असें एक तृणविशेष.

बरें [म० बरा] न० कल्याण; हित. २ फायदा; लाभ. उ० वा० अ० होय; ठीक; कबूल; असो. टीप,–हा शब्द वाक्यांत केवळ शोभेसाठींही योजतात; उ० तूं कां बरें त्याच्या वाटेस गेलास ? उ० असा कां बरें उगाच हट्ट करतोस ?

बरोबर, बरोबरी वर 'बराबर,' 'बराबरी' पहा.

बर्दार, बर्सात, बर्फ, इ० वर 'बरदार,' 'बरसात, "बर्फ,' इ० पहा.

बर्बर [सं०] पु० एका विशिष्ट जातीचे म्लेंच्छ लोक.

बल [सं०] न० १ शक्ति; सामर्थ्य; ताकद; जोर. २ पराक्रम; कर्तृत्व. ३ जबरी; बलात्कार. ४ सैन्य; फौज. ५ ग्रह, नक्षत्र, इ० ची कार्यविशेषाला अनुकूलता; उ० ताराबल, चंद्रबल, इ०. ६ द्रव्य, मदतनीस, समय, इ० ची कार्यविशेपाला अनुकूलता; उ० द्रव्यबल, मनुष्यबल, इ०. पु० बलराम. ॐ **बलानुज** पु० श्रीकृष्ण. **बलोत्कट** वि० १ अतिबलिष्ठ. २ सामर्थ्यानें उन्मत्त. **बलदेव** पु० १ वायु. २ बलराम. **बलभद्र** पु० १ अनंत नाग. २ बलराम. **बलवान्** वि० १ सामर्थ्यवान्. २आतिशय. **बलशाली** वि० बलाढ्य. **बलारि** पु० इंद्र. **बलिष्ठ** वि० समर्थ; शिरजोर.

बलक, बल्क पु० १ पदार्थांतील मऊ आणि पातळ अंश. २ चिंच, आमसुलें, इ० पाणी, इ० मध्यें कोळून जो चोथा टाकून देतात तो, किं० तें पाणी, इ०.

बलक क्रि० वि० पक्केपणीं, पूर्णपणें; उ० बलक पांच कोश, बलक मजल, इ०.

बलक, बलकी [अ० बल्काह्] उभयान्वयी अ० इतकेंच नव्हे तर; उ० त्यानें नुसत्या शिव्या दिल्या नाहींत, बलकी मारामारी केली. क्रि० वि० शेवटच्या पक्षीं; पराकाष्टेच्या परिमाणांत; उ० तीनशे रुपये पडोत, बलकी साडे तीनशे पडोत, हा घोडा मी विकत घेणारच.

बलकी स्त्री० खांबावरचा कोरलेला पन्हळ किं० खोदलेली खोबण.

बलकुबल [**म०** बल (सामर्थ्य)+कुबल (अशक्तपणा)] **स्त्री०** संकटसमय; आकस्मिक घाला किं० पंचाईत; उ० जवळ हत्यार असावें, बलकुबल पडली असतां कामाला येतें. **क्रि० वि०** संकटसमयीं; अडचणीच्या प्रसंगीं.

बलंगी स्त्री० १बाजरीच्या फुलाचा बाहेरचा कोश म्ह० पाकळ्यांचें आवरण. २ कुस्ती खेळ-ण्यांतील एक पेच (भरणें).

बलछडा पु० १ साग इ० झाडाचा सोट; लाकडाचा लांबट तुकडा; लठ्ठ वांसा. २ भाल्याचा दांडा. ३ भाला.

बलठा [**सं०**बलिष्ठ] **वि०** १ मजबूत;भक्कम. २ जाडी आणि बळकट.

बलब पु० मांगें ' वलक ' पहा.

बलबल स्त्री० अव्यवस्था· गोंधळ. ꠰꠰ **बल-बलपुरी स्त्री०** जेथें फार अव्यवस्था, गाधळ, अंधाधुंदी आहे अशी जागा, असा कारभार, किं०अशा ठिकाणचे लोक समुच्चयानें. **बलब-लीत, बिलबिलीत वि०** मऊ; टणक नव्हे असा (पदार्थ,–फळ, इ०).

बलम, बल्लम पु० आखूड दांड्याचा भाला.

बलवत्तर [**सं०**] **वि०** १ अधिक बलवान किं० समर्थ. २ अत्यन्त बलवान किं० समर्थ. ३ ज्यावर आपली नियंत्रणा चालूं शकत नाहीं असें (दैव, नशीब, काळ, परिस्थिति, इ०).

बलवा [**हिं०**] **पु०** १ आरडाओरडा. २ गोंधळ; अव्यवस्था; घोटाळा. ३ बेआबरू; बदलौ-किक.

बलवान, बलवंत [**सं०** बलवत्] **वि०** बळकट; समर्थ; जोरदार; शिरजोर.

बलवार पु० घरांचीं छपरें करणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

बलाई, बलाय स्त्री० १ इडापीडा; संकट; आपत्ति; उ० बलाई गेली तूं नाहीं आलास तर. २ उपद्रवकारक माणूस, प्रसंग, किं० स्थिति. ३ खोटा आरोप किं० तोहमत. ꠰꠰ **अलाईबलाई स्त्री०** वरचे पहिले दोन अर्थ पहा. **शहाण्याची बलाई दूर** शहाणा मनुष्य संकटांत सापडला तरी तो चातुर्यानें मार्ग काढून सुटतो.

बलायबत्तर, बलाईबत्तर [**हिं०** बलाईबग़ माह] **न०** १ लहानसहान पदार्थ; सटरफटर सामान. २ दुसऱ्याच्या कारभारांत खाल्लेले पैसे.

बलाणी स्त्री० देवळाच्या गाभाऱ्याच्या किं० सभामंडपाच्या भिंतीला लागून असलेला ओटा.

बलावणें, बोलावणें स० क्रि० पाचारणें; आमंत्रिणें.

बलावणें, बोलावणें न० आमंत्रण;पाचारण. ꠰꠰ **बलावणेकरी, बोलावणेकरी पु०** लोकांच्या लग्न, मुंज, इ० कार्याचीं लोकांना आमंत्रणें करून चरितार्थ चालवितो तो मनुष्य.

बलि [**सं०**] **पु०** १ देवता, पिशाच,इ०ना अर्पिलेला पदार्थ. २ रोजच्या भोजनाचा घास जो सर्व भूतांना अर्पितात तो.ह्या घासाला 'भूत-यज्ञ'म्हणतात. गृहस्थानें नित्य करावयाच्या पांच यज्ञांपैकीं हा एक आहे. ३ पूजा; अर्चा. ४ जेव-णानंतर ताटांत राहिलेलें उष्टें.५ देवाला अर्पिलेला बकरा,कोंबडा, इ०.६ राजानें प्रजेकडून घेतलेला कर.७चंवरीची मूठ. **पु०** प्रल्हादाचा पुत्र जो विरोचन त्याचा पुत्र. ꠰꠰ **बलिदान,बलिप्रदान न०** देवतादिकांस बलि देण्याचा विधि. ꠰꠰ **बलि प्रतिपदा स्त्री०**कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा दिवस. **बलिहरण न०** १ भूतयज्ञ. २ पुस्तकाच्या समा-सावर चारी बाजूंनी लिहिलेला मजकूर.

बलिष्ठ, बलाढ्य [**सं०**]**वि०**समर्थ;शक्तिमान.

बली [**सं०** बलिन्] **वि०** समर्थ; शक्ति-युक्त.

बलीवर्द [**सं०**] **पु०** बैल.

बलुतें न० १ गांवचे बारा वतनदार जे उपाध्या, जोशी, न्हावी, परीट, सुतार, कुंभार, इ० त्यांस चाकरीबद्दल द्यावें लागतें शेतांतील धान्य तें. २ हीं जीं बारा वतनें तीं प्रत्येक. ꠰꠰ **बलुतेदार, बलुता,बलुत्या** बलुतें घेणारे जोशी इ० ते प्रत्येक.

बलोतें न० वर ' बलुतें ' पहा.

बलोतेदार, बलोता, बलोत्या वर ' बलु-तेदार ' पहा.

बल्यांव न० एक प्रकारची होडी.

बल्लम [**हिं०** बलम्] **पु०** आखुड भाल्या-सारखें एक शस्त्र.

बल्लव [**सं०**] **पु०** १ गवळी. २ आचारी.

बळी स्त्री० उथळ पाण्यांत होडी पुढें ढकलावयाची लांब काठी.

बल्हाणी स्त्री० मागें ' वलाणी ' पहा.

बव न० अकरा जों करणें त्यांतील पहिलें.

बशर्त [**फा०** बशर्त=पैज मारून] **स्त्री०** मोठा प्रयत्न; पराकाष्ठेची खटपट; उ० त्यानें गोपाळाला बशर्तीनें वांचवून नदीच्या कांठाला आणून सोडलें. **क्रि० वि०** मोठ्या कष्टानें; पराकाष्ठेचा प्रयत्न करून. २ करारीपणानें; नेटानें; निग्रहानें. ३ निःसंशय; अट्टल; पूर्णपणें; उ० तो बशर्त हरामी आहे.

बशा [**म०** बसणें] **पु०** मालक हजर नसतां घर, शेत, इ० चें रक्षण करावयाला बसविलेला महार.

बस [**फा०** बस्] **वि०** पुरें; पुरण्याइतकें; उ० इतके तांदूळ आपणा तिघांस एका महिन्याला बस झाले. **उ० वा० अ०** अधिकाची जरूर नाहीं. **स्त्री०** १पुरण्याइतकें पदार्थाचें परिमाण. २ शिकस्त; पराकाष्ठा; उ० त्याणें गाण्याची बस करून दिली. ꣸ **बस करणें** बंद करणें; अधिक न करणें; उ०आमचीं पोटें भरलीं, आतां जिलब्यांचा आग्रह बस करा. **बस होणें** पुरें होणें;अधिकाची जरूरी नसणें.

बस [**म०** बसणें] **पु०** कायमची व्यवस्था; योग्य प्रकारची किं० समाधानकारक कांहीं कामाची किं० व्यवहाराची जमलेली सरणी किं० परिपाठी.

बसक [**म०** बसणें] **वि०** सखल किं० खोलगट (जमीन, आजाऱ्याचे गाल, इ०).

बसक [**म०** बसणें] **स्त्री०** १ बसावयासाठीं पसरलेली सतरंजी, जाजम,इ०.२ पात्राची पडघी, अडणी, बूड. ह्या अर्थीं ' बसकी ' **स्त्री०** हेंही रूप आहे. ३ ज्यावर कांहीं पदार्थ ठेवावयाचा तो आधार,–तिवई, घडवंची, इ०. ४ बाजारांत दुकानदाराची बसावयाची जी जागा तिच्यावरचा सरकारी कर किं० भाडें.ह्या अर्थी 'बसकी' **स्त्री०** हाही शब्द आहे. ५ जमीनीचा खोलगट म्ह० द्रोणासारखा भाग. ꣸ **बसकीची जमीन स्त्री०** १ सपाट जमीन. २ सखल प्रदेशांतील जमीन. **माणसानें किं० जनावरानें बसकी घेणें** दमल्यामुळें किं०घेरी आल्यामुळें किं० इच्छा नसल्यामुळें त्यानें काम न करतां स्वस्थ बसणें.

बसकीचा वि० ज्याला बैठक, पडघी, चहुतरा, ओटा, इ०आहे असा(पेला, तुळशीवृंदावन, इ०).

बसकट [**म०** बसणें] **वि०** चपटा; चपट्या किं० ठेंगण्या आकाराचा; उ० बसकट नाक, बसकट भांडें, घर,मांडव, इ०.

बसकण [**म०** बसणें] **न०**१ बसावयासाठीं घातलेलें जाजम,सतरंजी,इ०. २पदार्थाची पडघी. ३पदार्थाचें बूड किं०तळ किं०खालचा भाग.४जमीनीवर बसणें किं० बैठक मारणें (घेणें,मारणें). ꣸ **बसकण मारणें** पुढें काम न चालवितां स्तब्ध राहाणें.

बसकर [**म०** बसणें] **स्त्री०, न०** बसावायासाठीं आंथरलेलें जाजम, सतरंजी, इ०.

बसकल [**म०** बसणें] **स्त्री०, न०** बसावयाला किं० विश्रांति घ्यावयाला मिळालेली फुरसत किं० संधी; उ० तो सारा दिवस फिरतो, त्याला क्षणभर बसकल सांपडत नाहीं. **वि०** १ बसका किं० चपट्या आकाराचा (पदार्थ,–नाक, पेला, घर, इ०.) २ सखल (जमीन). ३ ठेंगणा (माणूस, पदार्थ).

बसका [**म०** बसणें] **स्त्री०** १ बैठक;पडघी. २ पदार्थाचें बूड. **वि०** चपट्या किं० ठेंगण्या आकाराचा, घडणीचा, मांडणीचा, किं०रचनेचा.

बसकार [**म०** बसणें] **पु०** बसावयासाठीं आंथरलेली सतरंजी, जाजम, इ०.

बसकी [**म०** बसणें] **स्त्री०** १विटीदांडूच्या खेळांतील एक शब्द. २ पदार्थाचें बूड; बैठक; चहुथरा. ३ कांहीं पदार्थ ठेवावयाचा ओटा; घडवंची; तिवई, इ०. ꣸ **बसकीचा वि०** १ ज्याला बैठक किं० पडघी आहे असें (भांडें, तुळशीवृंदावन, इ०). २ स्वारी वहावयाला शिकवून तयार केलेला (घोडा, बैल, इ०).

बसकूर [**म०** बसणें] **न०, स्त्री०** बसावयासाठीं आंथरलेली सतरंजी, जाजम, इ०.

बसणी [**म०** बसणें] **स्त्री०** १ बसण्याची क्रिया. २ बसणें; न हालतां किं० न उठतां कांहीं काम करण्यासाठीं बसणें; उ० एका बसणीस मी पंचवीस ताव लिहिले. **एका बसणीं क्रि० वि०**

एका बैठकीस; न हालतां बसून एका दमांत.

बसणें [**सं०** वस्] **अ० क्रि०** १ स्थलविशेषीं अधिष्ठित होणें; उ० कावेरी झोपाळ्यावर बसली. २ योग्य किं० इष्ट ठिकाणीं जडणें किं० जुळणें; यथास्थित किं० यथायोग्य होणें किं० ठरणें; उ० पेटीला कुलूप बसणें; उ० दाराला कडी बसली. ३ निघणार नाहीं किं० सुटणार नाहीं अशा प्रकारें एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं संयुक्त होणें; उ० ही गांठ फार घट्ट बसली आहे, ती मला सुटत नाहीं. ३ उद्योग न करतां किं० उद्योग सोडून रिकामें राहणें. ४ जडणें; उ० ह्या सणंगावर भारी धूळ बसली. ५ (कंठ, आवाज) घोगरा होणें. ६ (अमल, सरणी, मांडणी, व्यवस्था) दृढ होणें किं० बद्धमूल होणें. ७ भारभूत झालेलें असणें. ८ (शस्त्राची धार) मंद होणें. ९ स्थिरावणें. १० जडणें; खिळणें. ११ ऱ्हास पावणें. **टीप,**–ह्या क्रियापदाचे मुख्य मुख्य अर्थ मात्र आम्ही वर दिले आहेत. ‌ **त्याला मार बसला** त्याणें मार खाल्ला; मारणें ह्या क्रियेला तो पात्र झाला. **हें उदाहरण मला बसलें** तें मला चांगलें समजलें. **हा श्लोक मला बसला** तो मला चांगला पाठ झाला. **गळूं बसणें** तें दबणें; तें जिरणें; तें चेपणें. **वैभव बसणें** वैभवानें अपकर्ष पावणें किं० कमी होणें. **तोटा** (किं० **ठोकर**) **बसणें** नुकसान लागणें. **दुकान** (**धंदा, व्यापार,** इ०) **बसणें** नीट न चालणें; बिन किफायतीचा होणें. **त्या स्मारकाची वर्गणी माझ्या डोक्यावर बसली** मला ती द्यावी लागली; ती देणें मला भाग पडलें. **हा सदरा माझ्या अंगाला, बसत नाहीं** तो मला ठीक होत नाहीं म्ह० तो मला फार अडस किं० सैल होतो. **हात बसणें** एकादी विशिष्ट क्रिया करण्याची हाताला सफाई प्राप्त होणें. **अक्षराचें वळण बसणें** तें पक्कें होणें. **लिहीत, रडत, वाचीत बसणें** एकसारखें लिहीत, रडत, वाचीत राहणें. **जेवावयाला बसावयाचें** जेवणाला सुरवात करावयाची. **तूं दिलेल्या पैशांत आला तसला माल मीं आणला मीं पदरचे पैसे घालायला थोडच बसलों आहें** पदरचे पैसे भरीस घालण्याचा उपद्व्याप मी केला नाहीं. **उलट्या अंबारीत बसणें** हातांत झोळी घेऊन भिक्षा मागत हिंडणें. **टीप,**–भिक्षेची झोळी उलट्या अंबारीसारखी दिसते. अंबारी=हत्तीवरची बैठक. उलटी अंबारी म्ह० भिक्षेची झोळी. **माझें मन त्या मुलावर बसलें आहे** तो मुलगा मला आवडता झाला आहे; त्याच्यावर माझें प्रेम जडलें आहे. **पांचावर धारण बसणें** गर्भगळित होणें; काय करावें तें सुचेनासें होणें; हताश होणें. **घरीं बसणें** उद्योग, धंदा, नोकरी, इ० न करतां रिकामें बसणें; उ० मला हा रोग जडल्यापासून मी आज तीन वर्षें घरीं बसलों आहे. **एकाद्या स्त्रीनें एकाद्या स्त्रीच्या घरीं बसावयास जाणें** तिनें तिच्या घरीं तिच्या भेटीला किं० तिच्याशीं गप्पा मारावयाला जाणें. **टीप,**–हा वाक्प्रचार बायकांच्या वापरण्यांतला आहे. **बसूं जाणें त्याला ऊठ कोण म्हणे?** केव्हां, कुठें, आणि कसें बसावें हें ज्याला चांगलें समजतें त्याला तसें करण्यापासून कोण निवृत्त करूं शकेल? कोणी नाहीं.

बसणें [**म०** बसणें] **न०** बसावयासाठीं घातलेली किं० घालावयाची सतरंजी, जाजम, इ०.

बसंत [**हिं०**] **पु०** एक राग (संगीतांत).

बसंत [**सं०** वसंत] **पु०** पहिला ऋतु,–चैत्र आणि वैशाख हा काळ.

बसता [**म०** बसणें] **वि०** बसावयाच्या उपयोगाचा किं० स्वारी वहावयाला शिकवून तयार केलेला (घोडा, बैल, इ०). २ नीट बसतो आहे असा (कडी, लगाम, इ० पदार्थ).

बसंती [**हिं०**] **वि०** केशरी रंगाचा; केशरी शिडकाव ज्यावर आहे असा.

बसफुगडी [**म०** बसणें+फुगडी] **स्त्री०** मुली बसून खेळतात तो फुगडी नांवाचा खेळ.

बसभाई [**हिं०** बस् (पुरें) + भाई (मित्रा)] **उ० वा० अ०** अरे मित्रा, पुरें कर! **स्त्री०** जितकें पाहिजे तितकें प्रमाण; उ० लाखोलीच्या फुलांची बसभाई झाली, आतां जास्ती फुलें नकोत.

बसला, बसलेला [**म०** बसणें] **वि०** बरेच दिवस घडी न मोडतां आणि न वापरतां राहिलेली (घडी) किं० तसल्या घडीचें (सणंग).

याच्या उल्ट ' नव्या घडीचा ' किं० ' नव्या ताण्याचा. ' ꙮ **बसल्या महिना पु०** महिनाभर काम न करतां मिळालेला किं० मिळणारा महिन्याचा पगार.

बसवण्णा [**कानडी** बसवा+आण्णा] **पु०** जंगमाच्या देवळांतील देवतारूप नंदी असतो तो.

बसवा [**सं०** वसु] **पु०** शंकराच्या देवळांत शंकरापुढचा नंदी.

बसविणें [**म०** ' बसणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ बसे असा करणें. २ बसावयास लावणें; बसावयास भाग पाडणें. ३ पक्का करणें; खिळविणें; (पदार्थ) योग्य किं० इष्ट ठिकाणीं ठेवणें किं० शिरकावणें. ४ (वर्गणी, काम, इ०) कोणेकावर लादणें. ५ (अमल, नियंत्रणा, शासनपद्धति, दाब, दरारा, इ०) दृढ करणें किं० सुरूं करणें किं० पाळला जाईल असें करणें.

बसवी [**म०** वसणें] **स्त्री०** १ कसबीण. २ वेश्या. ३ निर्लज्ज स्त्री. ꙮ **बाजारबसवी स्त्री०** १ वेश्या. २ निर्लज्ज स्त्री.

बसी, बशी [**पोर्च्युगीझ्** बसिया] **स्त्री०** लहान, पसरट, आणि उथळ भांडें.

बसुला पु०, बसुली स्त्री० सुताराचें एक हत्यार; वाकस.

बस्त [**सं०**] **पु०** बोकड.

बस्तन, बस्तान [**फा०** बस्तन्=बांधणें] **न०** १ मांडणी; व्यवस्था. २ मेळ; जुळणी. ३ टापटीप.

बस्ता [**फा०** वस्ताह्=बांधलेलें] **पु०** गठ्ठा; गांठोडें; दोरीनें बांधलेलें सामान.

बस्तान [**सं०** स्वस्थान=आपली जागा] **न०** १ पूर्वस्थिति; योग्य ठिकाण. २ असावी तशी स्थिति; उ० माझी प्रकृति बस्तानावर आली नाहीं; उ० कचेरींत माझें वस्तान आतां चांगलें बसलें. ꙮ **बस्तान बिघडणें** बिघाड होणें; अव्यवस्थित होणें.

बस्तानी स्त्री० टोकाला दोरी बांधलेली काठी,–विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचें एक साधनविशेष.

बस्ति [**सं०**] **पु०, स्त्री०** १ मूत्राशय. २ गुदावाटें पिचकारीनें पाणी इ० कोठ्यांत घालून मलविसर्जन करणें (घेणें, देणें). ३ ओटीपोट.

बस्ती स्त्री० जैनांचें मंदिर.

बहकणी [**म०** बहकणें] **स्त्री०** बरळणें; बडबड; असंबद्ध भाषण.

बहकणें [**हिं०** बहकना] **अ० क्रि०** १ बरळणें; असंबद्ध भाषण करणें. २ बोलण्यांत मुद्दा सोडून वहावत जाणें. ३ सन्मार्ग सोडून असन्मार्गाला लागणें. ४ (बाजारभाव) अतोनात चढणें किं० कडाडणें. ५ (वास) आसमंतांत पसरणें. ६ धावरलेला किं० बुझलेला (माणूस, घोडा, इ०) भलत्याच मार्गानें धांवत सुटणें. ७ भ्रमांत पडणें.

बहंगी [**हिं०**] **स्त्री०** सामान खांद्यावरून वाहून न्यावयासाठीं काठीच्या दोन टोकांस दोन शिंकीं इ० बांधून करतात ती रचना किं० तसें वाहून नेलेलें सामान.

बहर, भर [**फा०** बहार=वसंत ऋतु] **पु०** १ प्रगल्भावस्था; पूर्णत्व; कळस; उ० ज्वानीचा बहर. २ नृत्य, गायन, इ० मध्यें चढलेला रंग. ꙮ **बहर मारणें** चैन करणें; रंगेलपणांत काळ काढणें. **बहरी, बहरी ससाणा** पुढें ' बहिरी ' 'बहिरी ससाणा' पहा.

बहरी पुढें ' बहारी ' पहा.

बहवस [**सं०** बहु+वसणें] **वि०** अव्यवस्थित; स्वच्छंदी; स्वैर.

बहळ [**सं०** बहुल=पुष्कळ] **वि०** विपुल; पुष्कळ; विस्तीर्ण; अघळपघळ.

बहाड न० समुद्रकांठची खारी जमीन.

बहाण स्त्री० गलबतांच्या बाजूंचा माथा,–जेथून शत्रूवर तोफा रोखण्यांत येतात.

बहाणा [**फा०** बहानाह्] **पु०** मिष; ढोंग; बतावणी.

बहाणें, बाहणें स०क्रि० हाक मारणें; बोलावणें.

बहात्तर [**म०** बे+सत्तर] **वि०** सत्तरांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ꙮ **बहात्तर खोड्या स्त्री० अ० व०** घोड्याचीं बहात्तर अशुभ लक्षणें. **बहात्तर जुलूम पु० ए० व०** राजानें प्रजेवर केलेला पराकाष्ठेचा जुलूम. **बहात्तर रोग** बहात्तर प्रकारचे जे रोग मनुष्याला होऊं शकतात ते.

बहादर, बहादूर बहाद्दर [**फा०** बहाद्दर्]

वि० १ शूर; धैर्यवान्. २ पराक्रमी. ३ कोणत्याही कामांत पटाईत. ꙮ **बहादूरखानी कागद पु०** दौलताबाद येथें केलेला एक प्रकारचा कागद. **बहादुरी स्त्री०** १ पराक्रम; शौर्याचें कृत्य. २ कांहीं अचाट कृत्य करून मिळविलेली प्रशंसा किं० तारीफ. ३ स्त्रियांचें एक भूषणविशेष.

बहादरी, बहादारी, बाहीदारी [सं० बाहु; म० बाही; हिं० बांहाह; फा० दाश्तन्=ठेवणें +ई (प्रत्यय)] **स्त्री०** १ दंडाला दंड लावून कोणेकाला केलेली मदत किं० दिलेला आश्रय. २ जामीनकी.

बहानक्त [**फा०**बहानक्द] **न०** धान्याच्या रूपांत सरकारांत आलेला सारा; तसर आणि फरोक्त कापून गेल्यानंतर जो उरतो त्याची बाजारांत होते ती किंमत;वसुली गल्ल्याची किंमत.

बहार पु० (**संगीतांत**) एक राग.

बहारी [**म०** बहर] **वि०** चैनींत काळ घालविणारा.

बहाल न० १ घराची तुळई. २ अवेल आणि चूल यांच्यामधला चुलीचा भाग.

बहाल [**फा०**] **वि०** १ कोणेकावर कृपावंत झालेली किं० खूष झालेली (मर्जी, मन). २ अधिकारावर स्थापिलेला. ३ अधिकारावर पुन्हा स्थापण्यांत आलेला. ४ क्षमिलेला; माफ केलेला; सोडलेला; (सारा, कर, दंड, इ०). ꙮ **बहाल करणें** १ माफ करणें; सोडणें. २ बक्षीस देणें. ३ बहुमान करून कोणेकाला मामलत, सनद, इ० देणें. [इ० पहा.

बहाला,बहावा,इ० पुढें ' बाहला,'*बाहवा,'

बहाली [**फा०**] **स्त्री०** १ प्रसन्नता;कृपादृष्टि; अनुकूलता. २ अधिकाराच्या स्थानीं कोणेकाची स्थापना. ३माफी; क्षमा. ४ सारा, कर, इ० ची सूट. ꙮ **तगेरी बहाली स्त्री०** पूर्वीच्या अधिकाराच्या जागीं कोणेकाची स्थापना.

बहाळ, बहाळणें पुढें ' बाहळ,' 'वाहळणें' पहा.

बहिः [**सं०** बहिस्] **क्रि० वि०** १ बाहेर. २ बाहेरून. ३ पृथक्. ꙮ **बहिरंग पु०** बाहेरची बाजू; बाह्य देखावा.**बहिष्करण न०, बहिष्कार पु०** १ जातीबाहेर टाकणें; वाळींत टाकणें. २ हद्दपारी. **बहिश्चर वि०** बाहेरचा; उ० माझा हा म्हातारपणीं झालेला पुत्र माझा बहिश्चर प्राण आहे. **बहिर्देश पु०** १ परदेश. २ हद्द. ३ निर्जन प्रदेश. **बहिर्दिशा स्त्री०** बाहेरची बाजू; परसूं; उ०बहिर्दिशेस जाणें म्ह० परसाकडे किं० शौचास जाणें. **बहिःप्राण पु०** १ वित्त, द्रव्य. २ अत्यन्त प्रिय वस्तु. **बहिर्भूत वि०** १ बहिष्कृत. २ हाकलून दिलेला. **बहिर्मुख वि०** १ उदासीन. २ विषयासक्त. **बहिर्विकार पु०** गरमी. **बहिर्द्वार न०** १ व्यभिचार; रांडबाजी. २ गांवची वेस. **बहिर्व्यसन पु०** बाहेरख्यालीपणा. **बहिरवसा, बाहिरवसा पु०** भूतबाधा (लागणें, होणें). **बहिरानीं** [**म०** बाहेर+रानीं] **क्रि० वि०** मोकळ्या मैदानांत; उघड्यावर (भटकणें, हिंडणें). **बहिरायामवात पु०** धनुर्वाताचा एक प्रकार. ह्यांत छाती पुढें येऊन डोकें आणि पाय मागें ताणले जातात. धनुर्वाताचा दुसरा प्रकार अंतरायामवात,–यांत शरीर वरच्याच्या उलट रीतीनें वाकतें. **बहिर्लापिका स्त्री०** ज्याच्या अर्थपूरणासाठीं बाहेरचें पद इ० घ्यावें लागतें अशी कूट कविता; ज्या कूटाचें उत्तर कूटाच्या शब्दांत नसतें असें कूट. मागें ' अंतः' मध्यें 'अंतर्लापिका' पहा.

बहिरक, बैरक स्त्री० १ निशाण; ध्वज. २ सैन्याची तुकडी. ३ अरबी शिपायांची तुकडी.

बहिरट [**म०** बहिरा] **वि०** १ किंचित् बहिरा. २ बधिर म्ह० संवेदनाशून्य(अंग, त्वचा).

बहिणवळा [**म०** बहीण] **पु०** १ अनेक बहिणी समुच्चयानें. २ ज्यांत मुली पुष्कळ आहेत असें कुटुंब.

बहिणीस [**म०** बहिण] **स्त्री०** बहीण. त्याचप्रमाणें ' आईस ' म्ह० आई. 'बापूस' म्ह० बाप.

बहिदा [**म०** बैदा] **पु०** १ (कामाचा) गोंधळ, घोटाळा, किं० पसारा. २ तंटाबखेडा. ३ बंड; चक्रान्त.

बहिरव पु० (**संगीतांत**) एक राग. **बहिरवी स्त्री०** बहिरव रागाची देवता. [पक्षी.

बहिरससाणा पु० बहिरीससाणा या नांवाचा

बहिरा [**सं०** बधिर] **वि०** १ ऐकण्याची

शक्ति ज्याला नाहीं असा (कान किं० माणूस). ३ बधिर (त्वचा, गात्र, इ०). ꕥ **बहिरापिसा वि०** बहिरा आणि वेडा; अजागळ.

बहिरावणें [**म०** बहिरा] **अ० क्रि०** १ बहिरा होणें. २ बधिर होणें.

बहिरी [**हिं०** बहिरी] **स्त्री०** एक पक्षी. ꕥ **बहिरीबोका पु०** हुशार आणि कावेबाज माणूस; अट्टल सोदा. **बहिरी ससाणा पु०** १ एक पक्षी. २ (**लाक्षणिक**) अट्टल सोदा.

बहिर्बुणगें [**हिं०**] **न०** सैन्यांतील बाजार बुणगे लोक.

बहीण [**सं०** भगिनी] **स्त्री०** १ आपल्याच आईबापांची कन्या. २ (**लाक्षणिक**) तेच वाईट गुण अधिक प्रमाणांत जिच्या अंगीं आहेत अशी स्त्री. ꕥ **बहीणतीज स्त्री०** भाऊबिजेच्या पुढचा दिवस. ह्या दिवशीं भाऊ आपल्या बहिणीस आपल्या घरीं जेवावयास बोलावून तिला लुगडें इ० देतो. हा दिवस कार्तिक शुद्ध तृतीया. **बहीणभावा पु०** बहीणरूप किं० भाऊरूप जो कोणी सोदर तो. **बहीणभावंडें न० अ० व०** बहीणी, भाऊ, ह्या नात्याचीं माणसें. ‘ बाहिणवळा , ’ ‘ बहिणीस ’ वर यथास्थानीं पहा.

बहु [**सं०**] **वि०** १ पुष्कळ. २ मोठा. ꕥ **बहुऋणी वि०**फार आहे कर्ज ज्याला असा. **बहुमत वि०** सर्व लोकांस संमान्य असा(माणूस इ०). **न०** एकाद्या वादग्रस्त विषयासंबंधानें निम्याहून अधिक लोकांचें जें मत तें. **बहुव्रीहि पु०** एक समास. सामासिक शब्दाच्या दोन पदांहून भिन्न अर्थ दाखविणारा समास; उ० चक्रपाणि म्ह० विष्णु. **बहुश्रुत वि०** १ विद्वान. २ पुष्कळ गोष्टी ज्याणें पाहिलेल्या, ऐकिलेल्या, किं० वाचिलेल्या आहेत असा. **बहुभाष्य न०** व्यर्थ बडबड. **बहुदृष्ट, बहुदर्शी वि०** धूर्त, शहाणा. **बहुभाष, बहुभाषी वि०** १ पुष्कळ भाषा जाणणारा. २ वटवट्या; बडबड करणारा. **बहुरंगी वि०** १ रंगी बेरंगी; अनेक रंगांचा; चित्रविचित्र. २ प्रसंग पडेल तसा वागणारा. ३ ३ अनेक गुण ज्याचे ठायीं आहेत असा(माणूस). **बहुरूपी पु०**नाना प्रकारचीं सोंगें घेऊन लोकांचें रंजन करून चरितार्थ करणारा. **बहुवचन न०** (**व्याकरण**) अनेकवचन; उ० ‘ घोडा ’ याचें ‘ घोडे ’ हें बहुवचन. **बहुचक वि०**पुष्कळ बोलणारा; वटवट्या; वाचाळ. **बहुधा, बहुशः क्रि० वि०** बहुतकरून. **बहुविध वि०** नाना प्रकारचा. **बहुवार, बहुवाडें क्रि० वि०** अनेक वेळां. **बहुसाल (–ळ) वि०** पुष्कळ; नानाप्रकारचा; अनेक. **बहुरत्ना वसुंधरा** पृथ्वीवर अनेक प्रकारचीं रत्नें आहेत.

बहुडा [**गुजराथी**] **पु०** सरकारच्या तिजोरींतून खोटीं म्हणून परत करण्यांत आलेलीं नाणीं समुच्चयानें. ‘परत बहुडा’ ह्याच अर्थाचा शब्द आहे.

बहुत [**सं०** बहु; **हिं०** बहुत] **वि०** संख्येनें किं० परिमाणानें पुष्कळ. ꕥ **बहुतकरून क्रि० वि०** प्रायः; प्रायशः; बहुतेक प्रसंगीं; अगदीं थोडे अपवाद वगळले असतां. **बहुतावें** [**म०** बहुत] **न०** पुष्कळ लोकांचीं कांहीं कामांत लुडबूड; उ० बहुतावें झालें म्हणजे एकट्याचा कांहीं इलाज चालत नाहीं. **बहुतेक वि०** अगदीं थोडे अपवाद खेरीज करून सगळे.

बहुल [**सं०**] **वि०** हिंदू महिन्याचा कृष्णपक्ष.

बहुलें, बोहोलें न० लग्न, मुंज, इ० कार्यांचे प्रसंगीं मुंज्या मुलासाठीं किं० वधूवरांसाठीं करतात तो ओटा.

बहुवस स्त्री० १ वेश्या. २ बोभाटा (करणें). **वि०** १ पुष्कळ. २ बोलका; वटवट्या.

बहेदा पु० १ बंड. २ गोंधळ; घोटाळा.

बव्हस मागें ‘ बहुवस ’ पहा.

बव्हाशी [**सं०** बहु(पुष्कळ)+अश्(खाणें)] **वि०** खादाड; अधाशी.

बळ [**सं०** बलि] **स्त्री०** १ देवाला अर्पिलेली वस्तु (वाहणें, अर्पिणें, लोटणें).

बळ [**सं०** बल=शक्ति] **न०** १ सामर्थ्य; जोर; पराक्रम. २ सैन्य. ꕥ **बळास येणें** हट्ट किं० हेका धरून बसणें; हार जावयाला कबूल नसणें. **बळ करणें** कांहीं कामावर सर्व शक्ति किं० सामर्थ्य खर्चणें. **बळ धरणें, बळ बांधणें** १ कांहीं कामासाठीं सर्व शक्ति एकवटणें. २वाद,

मारामारी इ० ला सिद्ध होऊन राहणें.
बळाचा वि० १ बळकट; समर्थ; जोरदार; जोमदार. २ (बुद्धिबळांच्या खेळांत) दुसऱ्या मोहोऱ्याचा ज्याला जोर आहे असें (मोहोरें).
बळकट वि० समर्थ; जोरदार; दृढ; घट्ट; मजबूत; पक्का. **बळकटी** स्त्री० मजबूतपणा; जोर; दृढता; समर्थन. **बळमोड** स्त्री० पिछेहाट; कमजोरी.

बळकटणें [म० बळकट] अ० क्रि० दृढ, समर्थ, जोरदार, किं० पक्का होणें. ❀ **बळकटून** क्रि० वि० जोरानें; पक्केपणीं.

बळकाविणें, बळकाविणें [म० बळ] स० क्रि० हक्क नसतां घेणें, ठेवून घेणें, किं० दाबून ठेवणें; लुबाडणें; लाटणें.

बळकावणें [म० बळ] अ० क्रि० बळकट, समर्थ, दृढ, किं० जोरदार होणें.

बळकुबळ मागें ' वलकुवल ' पहा.

बळगी स्त्री० जाडेंभरडें आणि हलक्या किमतीचें लुगडें.

बळजोरी, बळजबरी [म० बळ; फा० जोर; अ० जब्र्] स्त्री० बलात्कार; जुलूम.

बळताड पु० ताड ह्या जातीचें नर झाड.

बळद, बळत न० धान्य, सध्यां ज्यांची जरूरी नाहीं असे पदार्थ, दागिने, इ० सुरक्षितपणें ठेवण्याची जमीनच्या किं० भिंतीच्या गर्भांत बांधून काढलेली जागा, खोली, इ०.

बळलोटणें न० गांवांत आलेली देवी, पटकी, इ० ची साथ गांवाबाहेर घालविण्याचा अशिक्षितांचा एक विधि.

बळस पु०, **बळसें** न० १ मनुष्य पशु, इ० जन्मतात तेव्हां त्यांच्या तोंडांतून जो मळरूप बुळबुळीत द्रव पदार्थ बाहेर पडतो तो. २ नाकांतोंडांतून निघणारा फेस, मळ, इ०. ❀ **बळसट** न० १ वर ' बळस ' चे दोन्ही अर्थ पहा. २ तोंडांतून टाकलेला खाकरा किं० ह्या खाकऱ्याची ओठापर्यंत जी तार लोंबत असते ती.

बळावणें [म० बळ] अ० क्रि० १ जोरदार, समर्थ, किं० बळकट होणें; शक्तीनें वाढणें. २ शिरजोर किं० अनावर होणें.

बळिया [म० बळ] वि० समर्थ; जोरदार; अनिवार्य.

बळी [सं० वलिन्] वि० १ बळकट; समर्थ; जोरदार. २ (बुद्धिबळांत) जोराजोरीचा (डाव). ❀ **बळी तो कान पिळी** समर्थ जो आहे तो आपलें खोटें, अन्याय, पक्षपात, लबाडी, इ० सत्य, न्याय, निःपक्षपात, सचोटी इ० आहे असें सिद्ध करूं शकतो किं० लोकांकडून कबूल करून घेऊं शकतो.

बक्षिशी (-सी) [फा० बख्शिस्] स्त्री० १ दिलेलें इनाम; खुषीनें जें दिलें जातें तें. २ माफी; क्षमा.

बक्षीस [फा० बख्शिस] न० १ इनाम; देणगी. २ माफी; क्षमा (करणें, देणें); उ० तुझा गुन्हा आम्ही बक्षीस करतों, जा, पुन्हा असें करूं नको.

बा पु० १ बाप. २ विशेषनामांपुढें ' बा ' हा शब्द बहुमानार्थी लावितात; उ० विठोबा, लखोबा, इ०. ३ थट्टेंत हा शब्द सामान्य नामांपुढेंही योजतात; उ० वाघोबा, बैलोबा, इ०. उ० **बा** अ० अरे; उ० बा देवा, आतां माझा अंत पाहूं नको. ❀ **बा आगळा** वि०(बापापेक्षाही अधिक) मोठ्या योग्यतेचा, किं० किमतीचा (पदार्थ इ०); उ० इरकली लुगडें पुण्यास मिळेल काय म्हणून काय विचारतोस ? त्याचा बा आगळा मिळेल.

बाइक्या, बाइल्या [म० बायको, बाईल] वि० १ बायकांत लुडबुडणारा (पुरुष); रांड्याराघोजी. २ बायकोच्या तंत्रानें चालणारा (निंदेंत). ३ असमर्थ; षंढ; नपुंसक. **बाइलीचें पान** न० एक प्रकारचें विड्याचें पान.

बाई स्त्री० १ प्रौढ स्त्री. २ स्त्रियांच्या नांवापुढें योजावयाचा हा बहुमानाचा शब्द आहे; उ० सगुणाबाई, शारदाबाई. ३ वडील जाऊ म्ह० दिराची पत्नी. **बाया** स्त्री० अ० व० देवी. हा त्वप्रोग (येणें). ❀ **बायाबापड्या** स्त्री० अ० व० अनाथ, अबला, गरीब स्त्रिया.

बाईल स्त्री० स्त्री (तुच्छतेनें). **बाईलकाम** न० स्त्रियांचे घरांतील म्ह० संसाराचें काम. **बाईलकाम्या** वि० बायकी कामें करणारा (पुरुष). **बाईलखाट्या** वि० स्त्री० १ लंपट; ज्याला कामविकार फार आहे असा. २ परस्त्री-

लंपट. ३ ज्याच्या अनेक बायका मेल्या आहेत असा. ह्या अर्थी 'बाईलखाद्या' असाही शब्द आहे. **बाईलगांठ स्त्री०** (दोरीची) साधी गांठ. **बाईल बाईलपिसा, बाईलवेडा वि०** स्त्रीलंपट. **बाईल बडगा पु०, बाईलभिडंग न०** बायको, मुलें, गुरें-ढोरें, सामानसुमान, इ० समुच्चयानें. **बाईल-बंदा, बाईलबांध्या वि०** बायकोच्या तंत्रानें वागणारा नवरा. **बाईलबुद्धि स्त्री०** १ स्त्रीचा विचार,–जो पोक्त नसतो. २ बायकी बेत, युक्ति, योजना, इ०. **बाईलबुध्या वि०** बायकोच्या आज्ञेंत वागणारा (नवरा). **बाईलभुला वि०** बायकोला फाजील महत्व देणारा. **बाईलमाणूस न०** १ स्त्री,–जी अनाथ, अबल असते. २ स्त्रीच्या आज्ञेंत वागणारा नवरा.

बाउला पु० पुतळा. **बाउली स्त्री०** पुतळी.

बाऊ पु० भय वाटविणारी वस्तु. २ मुलांना भय दाखवतांना कोणत्याही वस्तूला ' बाऊ ' म्हणतात. ३ (मुलांच्या भाषेंत) फोड, गळूं, इ०. ॐ **बाऊ दाखविणें** भीति दाखविणें. **बाऊ करणें** (किं० **करून सांगणें** किं० **दाखविणें**) क्षुल्लक गोष्टीला नसतें महत्व देऊन ती भयंकर अशी भासविणें.

बाऊट स्त्री० सावली; छाया.

बाऊल पु० १ मांजराच्या जातीचा एक जंगली प्राणी. २ मागें सर्व अर्थी ' बाऊ ' पहा.

बाऊस [**सं०** बाहू] **न०** खांदा; भुजवटा.

बाऊळ स्त्री० खडकावरची पण ओली आणि भातशेताच्या उपयोगाची जमीन. **न०** नदीकांठची शेताच्या किं० भाजीपाल्याच्या उपयोगाची जमीन.

बांक, बाक [**हिं०** बांक] **पु०** १ वळण; वळसा. २ डोंगरावरील नागमोडीची वाट. ३ वेबनाव, विमनस्कता. **स्त्री०** एक प्रकारची कट्यार.

बांक [**पोर्च्युगीझ** बाँको] **पु०, न०** बसा-वयाच्या उपयोगाची चार किं० सहा पाय अस-लेली फळी.

बांकडा [**हिं०** बांका] **वि०** १ धाडसी. २ आडदांड. ३ उर्मट.

बाकणें [**सं०** वक्र] **अ० क्रि०** नमणें; लवणें; पोकदार होणें; खचणें; उ० तुळई दोन बोटें बाकली.

बाक्त्रूक न०, स्त्री० येऊन ठेपलेल्या संकट, पंचाईत, इ० मुळें अंतःकरणांत वाटतें ती अस्वस्थता.

बाकस [**हिं०** बे+कस (सत्त्व)] **वि०** १योग्य तो सत्वांश ज्यांत नाहीं असा. २ बेचव; पचप-चीत. ३ वीर्यरहित. ४ अशक्त; कमजोर.

बांका, बाका [**हिं०** बांका] **वि०** १दांड-गेश्वर; अडदांड. २ धाडसी; साहसी. ३ कुशल; चतुर; हुशार. ॐ **बाका किल्ला पु०** जिंकून घेण्यास कठिण असा किल्ला; अजिंक्य किल्ला. **बाका बोलणारा वि०** बोलण्यांत पटाईत; बोलतांना न कचरणारा. **बाका वैदिक पु०** दशग्रंथी वैदिक किं० भिक्षुक. **बाका शिपायी पु०** शूर आणि धाडशी शिपायी. **बाकी वाट स्त्री०** धोक्याचा रस्ता.

बांका पु० एक प्रकारचें फुंकून वाजवावयाचें वाद्य; कर्णा. ॐ **बांकेकरी पु०** देवापुढें किं० थोर-माणसापुढें बांका वाजवितो तो.

बाकाळी, बाकाळ स्त्री० एक वन्य फुलझाड. ' बाकाळ ' असाही शब्द आहे.

बाकी [**अ०**] **स्त्री०** शेष; अवशेष; शिल्लक राहिलेला अंश. ॐ**बाकी ठेवणें** योग्य मर्यादा न उल्लंघिणें. **बाकी न ठेवणें** १ भीड न धरतां किं० मुरवत न राखतां मनांत असेल तें बोलून सोडणें. २ योग्य महत्त्व किं० मान न देणें. **बाकी पूज्य करणें** देणें असेल तें देऊन आणि घेणें असेल तें घेऊन हिशेब चुकता करणें. **बाकीसाकी स्त्री०** बाकी इत्यादि; बाकीबिकी.

बांकी [**म०** ' बाका ' चें लघुत्वरूप] **स्त्री०** लहान आकाराचा कर्णा (वायुवाद्य).

बांकुटणें अ० क्रि० कोमेजणें; वाळणें.

बाकूस मागें ' बाकस ' पहा.

बाकेराव पु० १ बढाईखोर माणूस. २मिजा-सखोर माणूस.

बाखर पु० करंज्या, साटोऱ्या, इ० च्या पोटांत घालावयाचें सारण.

: **बाग** [**फा०**] **स्त्री०, पु०** बगीचा; उपवन;

फुलझाडें, केळीचीं झाडें, इ० जेथें व्यवस्थेनें किं० उद्देशपूर्वक लाविलीं आहेत अशी जागा. ॐ **बागबगीचा पु० ए० व०** बागबीग; बाग इ०.

बागवान [**फा०** बागबान्] **पु०** १ बागेंतील झाडांची जोपासना करणारा. २ उक्ती किं० राशीच्या रूपांत फळें, भाज्या, इ० विकत घेणारा किं० देणारा किं० तीं विकत घेऊन तीं किरकोळीनें विकणारा. **बागशाई स्त्री०** घराशेजारीं लाविलेलीं फळझाडें किं० फुलझाडें समुच्चयानें किं० तीं जेथें लाविलीं आहेत ती जागा. **बागाईत** खालीं स्वतंत्र शब्द पहा.

बाग न० वळण; वळसा; वाकडा भाग.

बाग स्त्री०,बागदोर पु० [**हिं०**]घोड्याला चालवीत नेतांना त्याला बांधतात ती दोरी; काढणी.

बांग [**फा०**] **स्त्री०** १ कोंबड्याचा शब्द,– विशेषतः पहाटेच्या वेळचा (देणें). २ निमाज पढण्यासाठीं मोठ्यानें सर्वांस केलेलें बोलावणें (देणें). ३ धनगर, गुराखी, इ० च्या पोरांचा एक खेळ.

बागट [**म०** बाग] **वि०** किंचित् लवलेली (तुळई इ०).

बागट न० तरवार (तुच्छतेंत).

बांगडखार खालीं ' बांगडी ' मध्यें पहा.

बागडणें अ० क्रि० स्वच्छंदानें हिंडणें,फिरणें, उड्या मारणें, खेळणें, इ०.

बांगडा पु० खाऱ्या पाण्यातील एक मासा.

बागडा [**म०** बागडणें] **वि०** खेळकर, खेळाडू. ह्या अर्थी 'बागडी' सुद्धां.

बागडी [**म०** बागडणें] **स्त्री०** चेष्टा; खेळ; पोरकट चाळे. **पु०** माकडांचे खेळ दाखविणारा.

बांगडी वि० खेळाडू, खेळकर (मूल).

बांगडी स्त्री० १ स्त्रिया मनगटांत घालतात जीं काचेचीं,धातूचीं, किं०हस्तिदंताचीं वलयें तीं प्रत्येक; चुडा (भरणें, घालणें). २ मळसूत्राचा वेढा.ॐ **बांगड्या भरणें** नामर्दपणा किं०बुळगटपणा दाखविणें. **बांगडखार पु०** काच करणें किं० बांगड्या करणें ह्या कामीं उपयोगी पडणारा एक खार.**बांगराळें न०** बांगड्यांना वाटोळा आकार ज्या खुंट्यावर देतात तो खुंटा.

बागणें अ० क्रि० वाकणें; लवणें; वाकदार [होणें.

बागबूक स्त्री० मागें ' बाकबूक ' पहा.

बांगर पु० १ आंडील बैल किं० टोणगा. २ (**लक्षणेनें**) अशिक्षित किं० अडाणी माणूस.

बागाईत [**फा०** बागात] **न०** १ नारळी, पोफळी, अंजीर, केळीं, पेरू, खपला, रताळीं, वांगीं, इ० जित्रब जें विहिरीच्या किं० पाटाच्या पाण्यानें करतात तें. २ असें जित्रब करावयाच्या सोईचें स्थळ. ॐ **बागाईती वि०** १ बागाईत करावयाच्या सोईची (जागा). २ बागाईताच्या उपयोगाची जमीन ज्याच्या भोंवतीं पुष्कळ आहे असा (गांव, प्रदेश, इ०). ३ बागाईत जमीनींत उत्पन्न झालेलें (पोफळी, बांगी, मिरच्या, इ० जित्रब).

बागी वि० बंडखोर.

बागोंव [**म०** बागणें] **वि०**थोडेसें वाकलेलें, लवलेलें, किं० कललेलें.

बागुरडा पु० झुरळ नांवाचा क्षुद्र किडा.

बागूल, बाऊल पु० मांजराच्या वर्गांतील एक जंगली प्राणी. ॐ **बागूल, बागूलबोवा पु०** १ मुलांना भीति दाखवावयासाठीं कल्पिलेला एक भयंकर प्राणी. २ मुलांना भिवविण्यासाठीं घेतात तें सोंग. ३ कोणाही माणसाला भिवविण्यासाठीं किं० खचविण्यासाठीं त्याच्यापुढें आणतात ती अडचण किं० पंचाईत (दाखविणें).

बागेसरी [**सं०** व्याघ्रेश्वरी] **स्त्री०** १ कानडानामक रागाचा एक प्रकार. २ सोनाराची शेगडी. ॐ **कोणेकाला बागेसरी धारजिणी असणें** फारसे कष्ट केल्याशिवाय त्याला पैसा मिळत असणें किं० तो दिवसेंदिवस श्रीमंत होत चाललेला असणें.

बाच, बांच पु० १ अंगीकृत कार्यापासून कोणेकाला निवृत्त करणारी कांहीं गोष्ट; भयाचें कारण; कचर वाटविणारी कांहीं गोष्ट(खाणें). उ० मी जातों मी जातों म्हणून म्हणत होतास मग आतां कां बाच खातोस ? २ साधु पुरुष , मोठा योद्धा, नामांकित मुत्सुद्दी, इ०ना पाहून वाटते ती आदरयुक्त भीति (खाणें, घेणें);

बाचकणी [**म०** बाचकणें] **स्त्री०** कचर: भीति; धडकी.

बाचकणें अ० क्रि० कचरणें; दबकणें; भीतीनें मागें हटणें; संकोचानें युक्त होणें.

बाचकुटणें अ० क्रि० १ (फळें, दूध, भाजी, इ०) नासण्याच्या पंथास लागणें. २ (ताप, जखम, इ०) कुपथ्य इ० मुळें विकोपास जाणें. ३ (कोणतेंही गात्र किं० इंद्रिय) ह्यांना झालेली कांहीं विकृति वाढत जाऊं लागणें.

बाचट, बाचटणें पुढें ' बाचोट, ' ' बाचोटणें ' पहा.

बाचटणें मागें ' बाचकणें ' पहा.

बाचडा पुढें ' बासडा ' पहा.

बाचणूक, बाचणी [**म०** बाचणें] **स्त्री०** १ कज्जा करणें; भांडणें; कलकल करणें. २ वरळणें.

बाचरट (–ठ) [**म०** बाचरा] **वि०** बडबड्या; वाचाळ.

बाचरा [**सं०** वाच्=भाषण] **वि०** बडबड्या.

बाचळणें, बाचलणें, बावचळणें अ० क्रि० १ भ्रांतिष्टासारखें वागणें; भ्रांत होणें; काय करावें हें सुचत नाहीं अशा स्थितींत पडणें. २ सन्मार्ग सोडून असन्मार्गाला लागणें; व्यसनासक्त होणें. ३ झोपेंत किं० रागाच्या लहरींत बडबडणें.

बाचाबाच, बाचाबाची [**सं०** वाच्=भाषण] **स्त्री०** एकमेकांची वर्में कर्में काढून केलेला कज्जा किं० भांडण; बोलाचाली (होणें, करणें).

बाचुकणी, बाचुकणें मागें ' बाचकणी, ' ' बाचकणें ' पहा.

बाचुटणें, बाचोटणें मागें' बाचकुटणें ' पहा.

बाचोट, बाचूट न० १ (आजारांत) कुपथ्य किं० अपथ्य, किं० तेणेंकरून वाढलेला आजार. २ धुरामुळें डोळ्यांना येते ती अंधारी किं० होते ती विकृति. **वि०** पाणचट, बेचव, पचपचीत, किं० नीरस (खाद्य किं० पेय).

बाज स्त्री० (निजावयाची) खाट किं० पलंगडी.

बाज पु० भीति, धडकी, कचर (खाणें).

बाज पु० फळें, फुलें,इ० चा बहर किं० बहराचा काळ.

बाज [**फा०** बाज्=खेळणारा] **वि०** कांहीं विशिष्ट व्यसनाला आसक्त झालेला; उ० दारूबाज, अफूबाज, रांडबाज, इ०.

बाजट [**म०** बाज] **न०** १ लहान बाज. २ बाज (तुच्छतेनें).

बाजणें [**म०** बाज] **अ० क्रि०** १ फळें, फुलें, इ० च्या बहरानें (झाड) युक्त होणें. २ (फळें) झाडावर उत्पन्न होणें; उ० यंदा आंबे पुष्कळ बाजले.

बाजत, बाजद[**अ०** बअद् अझ्] **क्रि०वि०** १ शिवाय; ज्यास्ती; अधिक; उ० आम्हीं पांचशें रुपये हुंडा देऊं, बाजत करणी विरणी कांहीं करणार नाहीं; उ० नेसलेलीं धोतरें तेवढीं चोरांनीं ठेविलीं, बाजद सारें लुटून नेलें. २ नंतर; यापुढें. **टीप,**–ह्या अर्थी हा शब्द पुढें दिल्याप्रमाणें योजण्यांत येतो. सलाम बाजद सलाम म्ह० सलामा मागून सलाम; म्ह० अनेक सलाम. पत्रांत याचा उपयोग होतो.

बाजरी स्त्री० एक धान्य,–ज्याच्या भाकरी करतात.

बाजलें [**म०** बाज] **न०** बाज; पलंगडी.

बाजवट [**म०** बाज] **न०** १ बाज, पलंगडी. २ बाज विणावयाची दोरी. ३ बाजेची वीण. ४ बाजूबंद नांवाचा दागिना. **पु०** चौरंग.

बाजवट [**म०** बाज] **वि०** पुष्कळ फुलें किं० फळें ज्याला येतात असा (वृक्ष).

बाजा [**हिं०**] **पु०** १ एक वायुवाद्य. २ अनेक वाद्यांचा गजर. ३ वाजंत्री. ४ फजीती; बोऱ्या (उडणें, होणें, वाजणें). ॐ **बाजा करणें** १ रडणें. २ वाजंत्री वाजविणें. **बाजा वाजणें** १ बोऱ्या उडणें; फजीती होणें. २ परीक्षेंत नापास होणें.

बाजांगूळ, बांडगूळ स्त्री० वृक्षावर उगवून त्यांतील सत्त्व शोषून घेऊन वाढणारें झाड.

बाजार [**फा०**] **पु०** १ क्रय, विक्रय, इ० जेथें मोठ्या प्रमाणावर होतात ती जागा; हाट; पेठ. २ या जागीं क्रयविक्रयार्थ जमलेले लोक. ३ प्रसिद्धि; बोभाटा. ४ अव्यवस्था; गोंधळ. ५ क्रयविक्रय व्यवहार. ॐ **बाजार करणें** बाजारांत जाऊन जिनसा खरेदी करणें. **बाजारगप्प स्त्री०** चिलमी खबर; गटारयंत्रावरच्या बातम्या.

बाजारबुणगें [**फा०** बाजार+बुण्गाह्] **न०** १ सैन्याबरोबरचे व्यापारी लोक. २ ज्यांना कांहीं किमत नाहीं अशा माणसांचा समुदाय. **बाजारी वि०**ऐकींव;फारसें विश्वसनीय नव्हे असें(वर्तमान). **बाजार मांडणें** अनेक पदार्थ अव्यवस्थितपणें इतस्ततः पसरणें. **बाजार भरविणें** अनेक माणसें (ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं किं० ज्यांच्या योगें घोटाळा मात्र होतो अशीं माणसें) एके ठिकाणीं गोळा करणें. **गेला बाजार तरी** बाजाराची घडामोडीची वेळ सरल्यावर देखील; पुष्कळ गिऱ्हाईक नसतांना सुद्धां; किमान पक्षीं; निदान; उ० ह्या घड्याळाची मला गेला बाजार तरी सतरा रुपये किंमत येईल. **टीप,**–येथें 'तरी' हा शब्द गाळला तरी चालतो. **बाजारच्या भाकरी भाजणें** दुसऱ्याच्या कामांत लुडबुडणें किं० मन घालणें; आपलीं कामें करण्याचें सोडून लोकांच्या कामांच्या उठाठेवी करणें. **मूर्खांचा बाजार पु०** एके ठिकाणीं जमलेले मूर्ख लोक. **वेड्यांचा बाजार पु०**एकत्र गोळा झालेले लोक,-जे वेड्यासारखें वर्तन करीत आहेत;वेड्यांचा समुदाय.**उभ्या बाजारांत क्रि० वि०** १ जाहीर रीतीनें. २वाजाराच्या एका टोकापासून तों दुसऱ्या टोकापर्यंत. **बाजार अफवा, बाजार अवई स्त्री०** वदंता; फारशी विश्वसनीय नव्हे अशी बातमी. **बाजार चलन न०** बाजारांत चालणारें नाणें. **बाजारची खाट स्त्री०** वेश्या. **बाजारनिरख पु०** बाजारांत चालू असलेला दर; बाजारचा भाव. **वि०** सर्वप्रसिद्ध; सर्वांस ठाऊक असा; उ० तो बाजारनिरख सौदा आहे. **क्रि० वि०** जाहीरपणें; सर्वांसमक्ष; उ० त्याची बाजारनिरख फजिती झाली. **कोणेकाच्या दुष्कृत्याचा बाजारनिरख करणें** तें सर्वांस सांगून तें सिद्ध करून देणें. **बाजारबसवी, बाजारबसणी स्त्री०** वेश्या. **बाजारबसव्या वि०** भांडखोर किं० कुटाळ माणूस. **बाजारबैठक स्त्री०** दुकानांवर बसविलेला कर किं० पट्टी. **बाजारभरणा पु०,बाजारभरती स्त्री०** १निरुपयोगी वस्तूंचा जमाव. २ निरुपयोगी माणुस; रिकामटेकडा. **बाजारमहशूर वि०** सर्वांस ठाऊक. **बाजारवाडा पु०**१ बाजार भरविण्यासाठीं नेमण्यांत आलेली जागा. २ अव्यवस्थित कुटुंब.३ बेजबाबदार माणसांचा समुदाय. **बाजारी वि०** १ बाजारांतील; बाजारासंबंधींचा. २ हल्कट; अधम; नीच. ३ हलक्या किमतीचा (पदार्थ). **बाजारीण स्त्री०** वेश्या.

बाजिंदा [**फा०** बाजंदाह्] **वि०** १ हुशार; चतुर. २ लबाड; फसव्या; लुच्चा; सोदा. ३वाद्य वाजविणारा.

बाजी [**फा०** बाझी] **स्त्री०** १ गंजिफा, सोंगट्या, इ० खेळ; क्रीडा. २ रचिलेला व्यूह; ध्येयासाठीं केलेली मांडणी किं० काहीं कार्यार्थ केलेली हिकमत; उ० एक वेळ बाजी विसकटली म्हणून पराक्रमी पुरुष स्वस्थ बसत नाहींत. ३ गंजिफांतील प्रत्येक रंगाचे बारा बारा पानांचे जे समुदाय ते प्रत्येक. ४ गंजिफांच्या खेळांत एकेकाच्या वाटणीस येतात तीं पानें समुच्चयानें. ५ प्रतिष्ठा; थोरवी; इभ्रत; मान; वैभव; उ० बुंदेलची बाजी जात आहे, त्याची लाज राखा. ६ (सोंगट्यांच्या खेळांत) जिंकिलेला डाव. ॐ **बाजीचाल स्त्री०** घोड्याची एक चाल (धरणें, चालणें, येणें, जाणें). **बाजीगर, बाजीगार पु०** गारोडी; नजरबंदीचे खेळ करणारा. **बाजीगरी (–गारी,–गिरी), बाजेगिरी स्त्री०**१ नजरबंदी किं० नजरबंदीचे खेळ. २ सोंगट्याचा खेळ. **अंगावर बाजी येणें** हरणें;पराभव पावणें;हुकणें. **कोणेकावर बाजी देणें** १ त्याला फसविणें. २ त्याचा पराभव करणें.

बाजीकार पु० उत्पादक.

बाजीराई [**म०** बाजीराव पेशवा] **स्त्री०** पेशव्यांचें राज्य; पेशवाई.

बाजू [**फा०** बाझू] **स्त्री०** १ बाहु; भुज. २ पक्ष; तर्फ. ३ कड; कांठ; मर्यादा. ४ पार्श्वभाग. ५ सतरंजीचें एक पट्टें; सतरंजी; खूप मोठी सतरंजी. ६ मदतनीस; साहाय्यकर्ता; आश्रयदाता. ७ गंजिफांच्या खेळांतील जे दोन पक्ष ते प्रत्येक किं० प्रत्येक पक्षाकडे आलेलीं पानें समुच्चयानें. ह्या अर्थीं 'बाजी' सुद्धां. ८चढाओढीच्या सामन्यांतील एक एक पक्ष. ९ गाडीच्या साठ्याचीं म्ह० चौकटीचीं उजवी कडचीं आणि डावीकडचीं जा दोन लांब लाकडें तीं प्रत्येक.त्यांना जोडणारा जीं

दोन पुढचीं आणि मागचीं आखूड लांकडें त्यांना ' कराळें ' म्हणतात. १० पेंच; अडचणीचा प्रसंग. ꠸ **बाजूबंद पु०** दण्डाला बांधण्याचें स्त्रियांचें भूषणविशेष. **बाजू मारणें** (किं० **राखणें**) आपण स्वीकारलेला पक्ष यशस्वी करणें; तो विजयी करणें.

बाजे [**फा०** बअझे] **वि०** कांहीं; अवांतर; इतर; उ० वाजे खर्च, बाजे लोक. ꠸ **बाजेगिरी वि०** १ टाकाऊ; पोकळ; रिकामा; कुचकिमतीचा. २ लबाड, लुच्चा (माणूस). ३ खोटें, नकली (लुगडें, खण, इ० सणंग).

बाझ पु० फळें, फुलें, इ०चा बहर; उ० यंदा या माडास चांगला बाझ आला. ꠸ **बाझवट वि०** पुष्कळ फुलें, फळें, इ० देणारा (वृक्ष).

बाझणें [**म०** बाझ] **अ० क्रि०** पुष्कळ फुलें, फळें, इ० नीं (वृक्ष) समृद्ध होणें.

बाट [**म०** बट्टा; **हिं०** बटा] **पु०** १ विटाळ; अपवित्रपणा; कलंक (लागणें, पडणें). २ न्यून; कमीपणा; उणेपणा. ꠸ **बाटनाट पु०**दोष; उणेपणा; न्यूनता.

बाट वि० १ लुचा; कावेबाज; लबाड. २ भ्रष्ट झालेला; बाटलेला. ३ दांडगा; उर्मट; उत्संखळ.

बाटगा, बाडगा [**म०** बाटणें] **वि०** १ स्वधर्म सोडून परधर्मांत गेलेला; भ्रष्ट झालेला; विटाळलेला. २ लुचा; लबाड; ठग; लफंगा. ३ हलकट; पाजी. **टीप**,–' बाडगेला, ' ' बाटगेला ' ह्याच अर्थीं योजतात.

बाटणें [**म०** बाट; **हिं०** बटा] **अ० क्रि०** १ भ्रष्ट होणें. २ स्वधर्म सोडून परधर्मांत जाणें. ३ व्यभिचारामुळें पतित होणें.

बाटवडा, बाटोडा, बाटाबाट [**म०**बाटणें] **पु०** भ्रष्टाकार; विटाळ.

बाटविणें [**म०** ' बाटणें 'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ भ्रष्ट, अपवित्र, किं० कलंकित करणें. २ कोणेकाला त्याच्या धर्मांतून काढून आपल्या धर्मांत ओढून घेणें.

बाटूक न० जोंधळ्याचीं ओलीं तोडलेलीं ताटें प्रत्येक किं० समुच्चयानें.

बाट्या [**म०** बाटणें] **वि०** स्वधर्म सोडून परधर्मांत गेलेला.

बाठ, बांठ स्त्री० आंब्याची कोय.

बांठ स्त्री० आंब्याची कोय. **पु०** (खलाशांचा शब्द) पाण्याचा रांजण.

बाठळ, बाठाळ, बाठ्याळ [**म०** बाठ] **वि०** ज्यांतील बांठ म्ह० कोय निबर किं० टणक झाली आहे असा (आंबा).

बाठळणें, बाठाळणें [**म०** बाठ] **अ० क्रि०** (आंबा) जून कोय ज्यांत झाली आहे असा होणें; (आंबा) निबर कोय आंत उत्पन्न होण्याइतका जून झालेला असणें.

बाठा [**म०** बाठ] **पु०** १ आंब्याची कोय. २ तडाखा लागल्यानें अंगावर उठतें तें टेंगूळ. ३ गुंतागुंत झालेले केश, सुतें, इ० समुच्चयानें.

बाठी [**म०** बाठ] **स्त्री०** आंब्याची कोय.

बाठूक न० ठेंगणा आणि बळकट माणूस किं० पशु.

बाड [**अ०** बयाझ्] १ अनेक विषयांचीं टांचणें, टिप्पणें, माहिती, इ० जींत लिहिलेलीं आहेत अशी वही; विविध विषयांचीं स्मरणार्थ टिपणें जींत लिहिलीं आहेत अशी चोपडी. २ कनाथ; तंबू. ꠸ **बाडबिशात स्त्री०** डेरे, राहुट्या, इ० सामान. **बाडबिछाईत स्त्री०**हंथरूण पांघरूण इ०. **बाडबिछाना पु०** सामान सुमान. **बाडी वि०** १ बाडांतील म्ह० टांचण वहींतील. २ बाडें वाचून झालेला (वैद्य, फलज्योतिषी, इ०).

बांड पु० १ हलक्या किमतीचें जाडेंभरडें लुगडें. २कांदा, नागदवणा,इ०झाडांच्या तुऱ्यांचा दांडा. ३ ज्यावर रोग पडला आहे आणि कणसें चांगलीं पोसलीं नाहींत असें जोंधळा, बाजरी, इ० चें ताट. ४ फोल कणीस. **स्त्री०, न०** ज्यावर रोग पडला आहे असें जोंधळा, बाजरी, इ० चें शेत. ꠸ **तरणाबांड पु०** ऐन तारुण्याच्या भरांत असलेला पुरुष.

बाड [**हिं०** बाझाड्] **स्त्री०** १ हत्याराचा धारेच्या बाजूचा पातळ भाग (देणें, चिरणें). २ निसण्यावर हत्यार घासून केलेली तीक्ष्ण धार (लावणें,देणें). **स्त्री०, न०** १ शेर, निवडुंग, कनाथ, इ० चें तंबूभोवतीं केलेलें आवरण. २ कुंपण. **स्त्री०, पु०** कोणेकाला बदकर्म कराव-

याला दिलेलें उत्तेजन (देणें). **न०** तरवार इ० च्या म्यानाचीं दोन उभीं अर्धुकें. **बाडा स्त्री० अ० व०** बाता, गप्पा (मारणें, झोकणें).

बाडगा वि० १ अडदांड; दांडगेश्वर. २ बाटगा; भ्रष्ट.

बांडगा पु०, बांडगें न० खोगिराचा शेपटीकडचा बंध. उराटी हा पोटाखालचा बंध.

बाडगी स्त्री० १ आकारविशेषाचें मृत्तिकापात्र. २ तोंड (निंदेंत).

बांडगूळ न० दुसऱ्या वृक्षावर उगवून त्याचें सत्त्व शोषून त्यावर वाढणारें एक झाड.

बाडगेला वर ' बाडगा ' पहा.

बांडफरीद [**म०** बांडा+**अ०**फरीद् (एकटा)] **पु०** १ सडासोट; एकटा; ज्याला बायको नाहीं असा. २ लुच्चा; लबाड; सोदा; ठग.

बाडबिछाद, बाडबिशाद मागें ' बाड '**न०** मध्यें पहा.

बांडा वि०१ज्याचें सर्वांग एका रंगाचें आणि त्यावर पट्टे किं० ठिपके वेगळ्या रंगाचे आहेत असा (बैल, गाय, कुत्रा, इ० पशु). २ अशाच तऱ्हेचें (वस्त्र). ꙮ **बांडा भुरका वि०** किंचित् बांडा.

बाडी [**हिं०**] **स्त्री०** १ वई; कुंपण. २ मर्यादेचा गडगा, भिंत, इ०.

बांडी [**म०** बांड] **स्त्री०** पिकाची नासाडी किं० नुकसानी.

बाढ [**सं०**] **वि०** १ बळकट. २ पुष्कळ. **क्रि० वि०** खात्रीनें; खरेंच. **उ० वा० अ०** बरें आहे ! ठीक आहे ! होय !

बाढचीर [**म०** बाड (धार)+चिरणें] **स्त्री०** एक प्रकारची तरवार.

बाण [**सं०**] **पु०**१धनुष्यानें मारावयाचा तीर. २ लोखंडाच्या नळींत दारू ठासून त्याला काठी बांधून केलेलें असतें तें एक प्रकारचें आयुध. ३आतिषबाजीचा एक पदार्थ; कागदाची किं० बांबूची नळी,–जींत दारू ठासून भरलेली असते आणि जिला अग्नि लाविला असतां उडते ती. ४ सडेसोट माणूस; ज्याला बायको मुलें इ० संसाराचा व्याप नाहीं असा मनुष्य. ५ नर्मदेंतील पाषाण,–जो शिवाचे ठायीं पूजिला जातो. ६ गलबताची वरची कड. ꙮ **बाणगुसी स्त्री०** १ लढाऊ पोशाख. २ लढवय्याचा धंदा. **बाणाईत, बाणदार पु०** तीरंदाज.

बाणणें [**म०** बाण] **अ० क्रि०** १ (मनांत) ठसणें किं० बिंबणें. २ खोल शिरणें किं० घुसणें. ३ शोभणें; शोभादायक होणें.

बाणफरीद पु० मागें ' बांडफरीद ' पहा.

बाणा [**हिं०** बाना] **पु०** १ कांहीं शास्त्र, कला, कसब, इ० मध्यें प्रावीण्यासंबंधाचा जो कोणेकाचा अभिमान तो (बाळगणें). २ वर्तनसरणी, भाषणसरणी, पोशाख, इ० बाबतींत जो कोणेकाचा परिपाठ किं० नियम तो. ३ एक प्रकारचा बाण (आतिषबाजींतील). ४ विणलेल्या वस्त्राचे आडवे तंतु. उभ्या तंतूंना ' ताणा ' **ए० व०**, ' ताणे ' **अ० व०** म्हणतात. ५ पट्ट्याच्या जातीचें एक आयुध. ꙮ **बाणाईत, बाणेदार वि०** १ शास्त्र, कला, कसब, विशिष्ट वर्तनसरणी, इ० बाबतींत बाणा बाळगणारा. २ अंगीकृत पक्ष किं० वर्तनसरणी किं० मत अडचणीच्या प्रसंगींही न सोडणारा; तडफदार; अभिमानी.

बाणी [**सं०** वाणी] **स्त्री०** १ तऱ्हा, सरणी (वाचन, गायन, इ० ची). २ पद, श्लोक, इ० म्हणण्याच्या किं० गाण्याच्या ज्या अनेक तऱ्हा त्या प्रत्येक. ३ कांठ; कड; परमावधीची मर्यादा. ४ गलबताचा धक्का. ५ आपल्या अंगच्या कांहीं गुणाबद्दल जो कोणेकाला अभिमान वाटतो तो; बाणा (बाळगणें). ६ कठिण प्रसंग. ७ जन्मजात स्वभाव. ꙮ **कोणेकाची बाणी संभाळणें** त्याला कठिण प्रसंगांतून सोडविणें. **बाणीवर येणें** भांडणास उद्युक्त होणें; हमरीतुमरीवर येणें; निकरावर येणें. **बाणीचा वि०**१गायन, पठन, इ० मध्यें घटलेला किं० निर्ढावलेला; पट्टीचा; निष्णात. २ बढाईखोर; विशिष्ट विषय, शास्त्र, कला, इ० मध्यें आपण प्रवीण आहों असा अभिमान बाळगणारा. **बाणीदार वि०** शास्त्रशुद्ध गायन, पठन, इ० मध्यें निष्णात. **बाणीदार, बाणेदार वि०** शास्त्र, कला, इ० मध्यें आपण प्रवीण आहों असा अभिमान बाळगणारा.

बात [**हिं०**] **स्त्री०** १ गप्पा; शुष्क भाषण;

थापा. २ निराधार बातमी (झोकणें). ꙮ **बातखबाल्या (–त्या),बातकुट्या,बाताखबाल्या, बातखोर वि०** १ खोट्या बातम्या उठविणारा किं० पिकविणारा किं० पसरणारा.२ थापबाज. **बात्या, बाताड्या, बात्येरा वि०** खोट्या बातम्या उठविणारा; गप्पा झोकणारा.

बातमी, बातनी स्त्री० खबर; वार्ता; वदंता. ꙮ **बातमी फुटणें** कांहीं गुप्त खबर जाहीर होणें. **बातमी राखणें** कांहीं विशिष्ट गोष्टीची बातमी मिळण्यासाठीं टपून बसणें किं० तजवीज करून ठेवणें. **बातमीदार, बातनीस, बातनवीस पु०** १ बातमी देणारा. २ वर्तमानपत्रांना खबरा कळविणारा पगारी किं० हौशी माणूस.

बातल, बातील [अ० बातिल्] **वि०** १ निराधार, खोटी (बातमी). २ खोट्या वार्ता प्रचलित करणारा. ३ ऐकिलेल्या बातमींत पदरची भर घालून ती चटकदार करणारा. ꙮ **रद्दबात (–ती–) ल वि०** खोटा, पोकळ (खत, खरेदी, इ०)

बाद [अ० बअद्] **क्रि० वि०** १ नंतर; उ० बाद अज चंद रोज म्ह० कांहीं दिवसांनी. २ वजा. ꙮ **बाद करणें** १ वजा करणें; वगळणें. २ रद्द पाडणें. ३ विशिष्ट समुदायांतून काढून टाकणें. ४ पटावरून किं० यादींतून खोडून टाकणें. **बादबाकी स्त्री०** १ वजाबाकी. २ बाकी, अवशेष. ३ कर्जे, तंटे, इ० चा निकाल (करणें).

बांद, बांध [**म०** बांधणें] **पु०** धक्का; बंधारा; शेत इ० च्या सिमेवरचा लांबट उंचवटा. ꙮ **बांदबंदस्ती, बांधबंदस्ती स्त्री०** शेताला बांधबंधारे घालणें इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें.

बादखासा वि० १ मध्यम प्रतीचा; ज्यांत वेलदोडा, केशर, बदाम, इ० पदार्थ घातलेले नाहींत असा (विडा, पट्टी). २ गजरलेलें विड्याचें (पान); अगदीं पक्क नव्हे आणि अगदीं कच्चें नव्हे असें (विड्याचें पान).

बांदगूळ न० मागें ‘ बांडगूळ ’ पहा.

बादज [**फा०** बाद् अज्] **क्रि० वि०, श० यो० अ०** नंतर; ० च्या नंतर; उ० बादज ईद पेशावरास येणार म्ह० ईद ह्या सणानंतर; बादज बरसात (म्ह० पावसाळा संपल्यावर); उ० बादज सलाम (म्ह०सलाम केल्यानंतर).

बादणें [**म०** बाद; **अ०** बअद्] **स० क्रि०** वजा करणें; वगळणें.

बादणें, बाजणें [**म०** बाज] **अ० क्रि०** १ (झाड) फळांनीं किं० फुलांनीं समृद्ध होणें. २ झाडाला (फळें किं० पुष्पें) येणें.

बांदन न० ओटी पोट.

बादरखा, बादरस, बादरख[अ०बादरीषाह्] **स्त्री०** १ तंबूच्या खांबाच्या डोक्यावर जी लाकडाची वाटोळी तबकडी असते ती. २ तंबूच्या कापडाला ह्या तबकडी जवळ असतें तें भोक किं० ह्या भोकाला मजबुती साठीं शिवलेला असतो तो कातड्याचा तुकडा.

बांदरी [**म०** बांधणें+रेषा] **स्त्री०** १ क्षितिजाची वर्तुळाकार रेषा. २ सह्याद्रीच्या पायथ्यालगतचा प्रदेश.

बांदरी [**फा०** बानहाद् दारी] **स्त्री०** जामीनकी किं० जामीन (देणें).

बादला [**हिं०**]**पु०** कलावतू करण्यासाठीं किं० विणण्यासाठीं जी सोन्याची किं० चांदीची तार काढतात ती. ꙮ **बादल्याचा तुरा पु०** जुन्या कलावतूच्या तुकड्यांचा शोभेसाठीं केलेला तुरा.

बादला [**हिं०**] **पु०** पखालीचें एक अर्धुक.

बांदवडी, बंदिवाडी [**म०** बांधणें] **स्त्री०** १ बंदीखाना. २ पराधीनता. **वि०** पराधीन; उ० मी काय कुणाचा बांदवडी आहे ?

बांदवडी स्त्री० शेताचा न नांगरलेला भाग. खालीं ‘ बांदाड ’ पहा.

बादशाहा [**फा०** बादशाह्] **पु०** १ परदेशचा हिंदुस्थानावर राज्य करणारा राजा. २ कोणीही अहिंदू राजा. ꙮ **बादशाही स्त्री०** बादशहाचा अमल किं० राज्य. **वि०** १ बादशहानें दिलेली (सनद इ०).२ थाटमाटाचा; वैभवशाली. ३ जुलमी. ४ बेजबाबदार.

बादा, बंदा [**फा०**] **वि०** कोणेकाच्या अंकित; पराधीन. **पु०** गुलाम.

बांदागूळ स्त्री० मागें ‘ बांडगूळ ’ पहा.

बांदाड न० १ शेताचा न नांगरतां ठेविलेला भाग किं० पट्टा . २ अशा जागेवर उगव-

-लेलें गवत. ३ शेताच्या कडेनें किं० मधून ठेवि-लेली जाण्यायेण्यासाठीं वाट.

बादाबुदी, बादाबादी [**अ०** बअद] **स्त्री०** १ वजावाकी; वजावाट. २ हिशेबाच्या निका-लाचा आंकडा.

बादाम [**फा०**] **स्त्री०**बदामाचें झाड. **पु०, न०** बदाम हें फळ. ❀ **बादामगोळा पु०** ह्या फळांतील बी. **बादामचिनी स्त्री०** एक वनस्पति. **बादामी वि०** बदामी रंगाचा. **बादामी स्त्री०** बदामाचें झाड.

बांदारी वर ' बांदरी ' पहा.

बादिमाख [**फा०** बाह्+दिमाग] **वि०** १ ऐटदार; तोऱ्याचा; डौलदार. २ उंची; मूल्यवान; श्रेष्ठ.

बादियान पु० एक झाड किं० त्याचें फूल. ह्या फुलाचा मसाल्यांत उपयोग केला जातो.

बांदी [**हिं०**] **स्त्री०** स्त्री गुलाम; लवंडी; दासी. ❀ **बांदीचा वि०** गुलाम स्त्रीचें (अपत्य)

बादूळ, बांदें न० वर ' बांडगूळ ' पहा.

बांध [**म०** बांधणें]**पु०** १ पाण्याचा प्रवाह आडविण्यासाठीं किं० शेत इ० ची मर्यादा दाखविण्यासाठी जी भिंत, गडगा, दरड, इ० रचना करतात ती. २ शेतांतून किं० शेताच्या कडेनें जाण्यायेण्यासाठीं ठेवलेली पाऊलवाट. ३ बांधण्याची क्रिया; बंधन. ४ बांधावया-च्या उपयोगाची दोरी, नाडी, इ०. **बांधबां-धोळी स्त्री० ए० व०** बांध, बंधारे, इ० रूप बंदिस्ती.

बाध [**म०** बाधणें; **सं०** बाध] **पु०** १ हर-कत; प्रत्यवाय; प्रतिबंध. २ टपका; कमीपणा. ३ आक्षेप; अडवणूक. ४ विरोध. ५ खंडन; निषेध.

बाधक [**सं०**] **वि०** १ अडाविणारें; प्रति-बंधक. २ अपायकारक. ३ अपवादरूप. **न०** अपवाद; प्रतिबंध.

बांधटणें [**म०** बांधणें] **अ० क्रि०** टणक कोईनें (आंबा) युक्त होणें; (आंबा) जून किं० पक्क होणें.

बांधण [**म०** बांधणें] **न०** १ ओढा, डोंग-राचें खोरें, इ० स्थळीं पाणी अडवून केलेलें शेत. २ पर्जन्यानें शेताची माती धुपून जाऊं नये म्हणून घालतात ती भिंत. ह्या अर्थीं **स्त्री०** सुद्धा. ३ बांधणें. ४ पाणी अडविण्यासाठीं घातलेली भिंत (करणें, घालणें). ५ बंधन; बंद. ❀ **बांधणावळ स्त्री०** भिंत इ० बांधण्याची क्रिया, तऱ्हा, किं० त्या बद्दलची मजूरी. ह्या अर्थीं ' बांधावळ ' **स्त्री०** हाही शब्द आहे.

बांधणी [**म०** बांधणें] **स्त्री०** १ घर, भिंत, पागोटें, गठ्ठा, इ० बांधण्याची क्रिया किं० तऱ्हा. २ बांध; बांधारा. ३ नियम; नियं-त्रणा; शिस्त. ४ शेतांच्या कडेनें किं० मधून जाण्यायेण्याची वाट. **वि०** बांधणासंबंधाची (जमीन, शेत, इ०).

बांधणें [**सं०** बंध्] **स० क्रि०** १ अनेक पदार्थ एकत्र जुळवून ते वियुक्त न होतील अशा प्रकारें दोरी, सूत, इ० साधनांनीं ते एकाशीं एक संयुक्त करणें; उ० लाकडें, कागद, चिरगुटें, इ० बांधणें. २ एकच पदार्थ दोरी, सूत, इ० साध-नांनीं वेष्टून तो सईल न पडेल असें करणें.३ (घर, गलबत, भिंत, पूल, विहीर, इ० रचनाविशेष) दगड, फळ्या, विटा, इ०साधनांनीं निर्माण करणें. ४ चिरगुट, कागद, इ० मध्यें (अनेक पदार्थ किं० एकच पदार्थ) वेष्टून किं०लपेटून सुराक्षत राहील असा करणें. ५ (नियम, कायदा, शिस्त, इ०) उत्पन्न करून काम, कारभार, इ० सुरळीतपणें चालेल असें करणें. ६ दस्तऐवज, वचन, इ०नीं (कोणेकाला) कांहीं व्यवहारांत किं० कामांत अडकाविणें. ७ (ताप, भूत, इ०) मंत्र, औषधें, इ०च्या योगानें उपद्रवकारक न होईल असें करणें. ८ नियंत्रिणें; अडविणें; दृढमूळ करणें; रोधणें. ९ (वैर, शत्रुत्व, इ० भावना) मनांत ठेवणें. **टीप,**– ' बांधणें ' ह्या क्रियापदाचे वाक्प्रचार कांहीं पुढें देतों. पागोटें बांधणें म्ह० पागोट्याच्या वस्त्राला विशिष्ट रचनेनें विशिष्ट आकार देणें. अटकळ, तर्क, इ० बांधणें म्ह० अटकळ, तर्क, इ० करणें. कोणेकाला पागोटें बांधणें म्ह० सन्मानार्थ किं० आहेर म्हणून त्याला पागोटें बक्षिस देणें. व्यूह, संधान, वशीला, इ० बांधणें म्ह० रचिणें, जुळ-विणें, निर्मिणें, किं० स्थापिणें. दिशा बांधणें म्ह० मंत्रप्रयोगानें त्या भारणें. डोळे बांधणें म्ह० डोळ्यांना कांहीं न दिसेल अशा प्रकारें डोळ्यां-

वर फडकें इ० लपेटणें. कोणेकाची दृष्टि बांधणें म्ह० त्याच्यावर मंत्रप्रयोग करून त्याला भलतें दिसावें असें करणें. पूजा बांधणें म्ह० फुलें, दुर्वा, इ०च्या रचनाविशेषानें देवाची मूर्ति सजविणें किं० सुशोभित करणें. ताड, माड, इ० बांधणें म्हणजे त्यापासून मद्य निघेल अशा प्रकारें त्यांची पोयं लपेटून ठेवणें. घोड्याला नाल बांधणें म्ह० त्याच्या खुराच्या तळाला खिळ्यांनीं नाल जोडणें. तो त्याचा बांधला आहे म्ह० तो त्याच्या मिंधेगिरींत आहे किं० त्यानें केलेल्या उपकाराखालीं दडपलेला आहे; तो त्याचा ओशाळा आहे. बांधल्या कमरेचा म्ह० काम करावयाला सज्ज झालेला किं० सिद्ध असलेला. बांधली गांठ म्ह० अडचणीच्या वेळीं उपयोगास यावी म्हणून मुद्दाम बाजूस काढून चिरगुटांत बांधून ठेविलेली पैशाची रकम. शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी फार वेळ पुरत नाहीं म्ह० एका विशिष्ट पेचांतून कसें सुटावें हें जरी कोणी दुसऱ्याला विचारून घेतलें तरी त्या पेचांतून सुटण्याच्या खटपटींत जे नवे पेच उत्पन्न होतील त्यांतून त्याला सुटतां येणार नाहीं; तसेंच बांधून ठेविलेली शिदोरी एकच वेळ पुरेल,प्रत्येक जेवणाला पुरणार नाहीं.मूर्खाला मूर्खपणाचें आणि गरीबाला गरीबीचे परिणाम सदैव भोगावे लागतात. त्याला झाडाला बांधलें तरी तो झाड घेऊन पळेल म्ह० तो अत्यन्त भितरा आहे.

बांधणें [म० बांधणें] १ न० १ पाण्याचा प्रवाह अडविण्यासाठीं किं० शेताची मर्यादा दाखविण्यासाठीं किं० जमिनीचें शेत करण्यासाठीं घातलेला बंधारा. २अशा बंधाऱ्याच्या रचनेला लागणारी दगड, विटा, इ० सामग्री. २ पाण्याच्या पाटांत जागोजाग पाणी वळवून घेण्यासाठीं जीं द्वारें ठेविलेलीं असतात तीं प्रत्येक. ३ अशीं द्वारें बंद करण्यासाठीं फडकीं, गवताचा किं० पानांचा चोंभा,इ०जीं बुचें केलेलीं असतात तीं प्रत्येक. ॐ **शेवटच्या बांधण्यास पाणी मोडणें** प्रतिपक्ष्याचें बोलणें, सबबी,रदबदली, इ० न ऐकून घेण्याच्या निश्चयानें केलेलें शेवटचें किं० निकराचें भाषण.

बाधणें [सं० बाध] अ० क्रि० अपायकारक होणें; उ०कालची उसळ मला बाधली;उ०गोंदोबाचा शाप मला बाधला; उ० मी मोकळ्या मनानें आपला बेत त्याला सांगितला तो मला बाधला.

बांधप [म० बांधणें] न० १ बांधण्याची क्रिया. २ दोरी इ० बांधण्याचें साधन.

बांधव [सं०] पु० १ आप्त; नातेवाईक. २ मित्र. ३ भाऊ. ४ भाऊ, चुलता, इ० स्वगोत्रीय किं० मामा, मामेभाऊ, सासरा, इ० परगोत्रीय असा कोणीही माणूस. ॐ **बांधवजन** पु० आप्त, सोयरे, नातलग, इ० माणसें.

बांधा, बंदा [फा० बंदाह्] वि० १ न मोडलेला (रुपाया,अधेली, पावली, इ० नाणें). २ ठरवून टाकलेला, नक्की केलेला (पगार,वेतन, काम, नोकरी, इ०).

बांधा [म० बांधणें] पु० १ आकार; ठेवण. २ शरीराची घटना किं० काठी किं० ठेवण.

बाधा [सं०] स्त्री० उपद्रव; पीडा.

बांधाटणें अ० क्रि० (आंबा) टणक कोयीनें युक्त झालेला असणें.

बांधाटी, बंधाटी [म० बांधणें] स्त्री० १ ओंबणाच्या आडव्या काठ्यांना बळकटीसाठीं अंतरा अंतरावर उभ्या काठ्या बांधलेल्या असतात त्या प्रत्येक.२दोरी इ०बांधण्याचें साधन.३शेताच्या कडेनें किं० मधून असते ती पाऊलवाट. ह्या अर्थीं 'बांध' सुद्धां.

बांधाबांध, बांधाबांधी [म०बांधणें] स्त्री० ओझीं पाझीं, गांठोडीं, इ० बांधण्याची क्रिया; आवरा आवर.

बांधारा [म० बांधणें] पु० १ पाण्याचा प्रवाह आडविण्यासाठीं किं० वळविण्यासाठीं घातलेली भिंत. २ शेताची मर्यादा दाखविण्यासाठीं घातलेली भिंत किं० दरड.

बांधावळ [म० बांधणें] स्त्री० ग्रंथ, घर, किल्ला, देवाची पूजा, इ०ची रचना, मांढणी,इ०.

बाधित [सं०]वि० १अडविलेलें; खंडिलेलें; ज्यांत अडथळा आला आहे किं० खंड पडला आहे असा; ज्याला अपवाद आला आहे असा. २ ज्याला अपकार, उपद्रव, पीडा, झाली आहे असा.

बांधील [**म०** बांधणें] **स्त्री०** कापलेल्या भाताची बांधलेली पेंढी. **वि०** उपकार, करार, वचन, नोकरी, इ०नीं जो दुसऱ्याचा अंकित किं० मिंधा तो.

बांधींव [**म०** बांधणें] **वि०** १ मुद्दाम बांधलेला किं० बांधविलेला किं० घडविलेला (जोडा, पागोटें, इ०). २ बांधून काढलेली (विहीर).३ मुद्दाम बांधविलेल्या जोडा इ० सारखा दिसणारा (जोडा इ०). ४ पोटांत कमी दर्जाचा धातु घालून घडविलेला (दागिना,–गोठ, पाटल्या, अंगठी, इ०).

बांधें न० ज्या जमीनीला कोणी मालक नाहीं आणि म्हणून जी शेजारच्या गांवांत गणिली जाते अशी जमीन.

बांधें,बांधाळें न० बांडगूळ.मागें 'बांडगूळ' पहा.

बाधेकरी पु० १ गावांत शेत, जमीन, घर, इ० कांहीं नसतांना तेथें रहाणारा जो उपरी मनुष्य तो. २ एका गांवाचा रहिवासी असून दुसऱ्या गांवची जमीन कसतो तो.

बांधेरा [**म०** बांध] **पु०** मागें 'बांधारा' पहा.

बांधेशुद्ध, बांधेसूद [**म०** बांधा+शुद्ध (निर्दोष)] **वि०** ज्याचीं गात्रें प्रमाणशुद्ध आहेत असा (मनुष्य, जनावर, इ०); शास्त्रशुद्ध घटनेचा किं० रचनेचा. ह्या जातीचे इतर समास पायाशुद्ध, साळसूद (शाळाशुद्ध), वळणशुद्ध (अक्षर, वर्तन).

बांधोळी स्त्री० लहान बांध किं० बंधारा.

बाध्य [**सं०**] **वि०** अडविण्याला किं० रोधावयाला जो योग्य तो; हरकत घ्यावयाला किं० प्रतिबंध करावयाला लायक असा.

बाना, बाणा पु० विणलेल्या वस्त्राचे आडवे तंतु. उभ्या तंतूंना 'ताणा' म्हणतात.

बानात, बानाती मागें 'बनात,' 'बनाती' पहा.

बाप पु० १ ज्याच्या वीर्यापासून जें अपत्य उत्पन्न झालें त्या अपत्याचा तो; पिता; जनक. २ कोणीही वडील माणूस. ३ दत्तक घेतलेला जो मुलगा त्याचा दत्तक घेणारा. ❀ **बाप होऊं लागणें, बाप म्हणविणें, बाप होणें** नसता अधिकार किं० महत्व किं० मोठेपणा आपणाकडे ओढून घेणें; अरेरावी करणें. **कोणेकाला बापावरून पावणें** त्याला बापावरून शिव्या देणें. **तो बापाला बाप म्हणावयाचा नाहीं** खऱ्या हिशोबांत तो कोणाची भीड धरणारा मनुष्य नाहीं; बापाचें म्ह० कोणाही वरिष्ठाचें कांहीं विधान चुकीचें आहे असें सांगावयाला न कचरणारा; कोणाची मुरवत न धरणारा. **बापाला बाप म्हणेना तो चुलत्याला काका कसा म्हणेल?** जवळच्या नातलगाला जो ओळखीत नाहीं तो दूरच्याला काय ओळखणार? अत्यन्त संमाननीय मनुष्याला जो मान देत नाहीं तो साधारणपणें संमाननीय अशा मनुष्याला मान देणार नाहीं हें उघड आहे. **बाणजन्मीं, बापजन्मांत क्रि०वि०** सबंध आयुष्यांत. **टीप,**–स्वतांच्या आयुर्मर्यादेंत बापाची आयुर्मर्यादा भरतीला घातली तरीं त्या दीर्घ कालावधींत सुद्धां; कितीहि दीर्घकाळपर्यंत वाट पाहिली तरी. ह्या वाक्प्रचाराचा उपयोग बहुधा अकरणरूपी होतो; उ० अगे चंद्रे, तुला बापजन्मीं तरी असली पैठणी नेसावयास मिळेल काय ?(म्ह० कधींही मिळावयाची नाहीं). **बापशेटची पेंड स्त्री०** हाव्या त्या माणसानें हावी तितकी न्यावी अशी वस्तु. **बाप तसा बेटा** जे बापाच्या अंगचे गुण किं० दोष तेच मुलाच्या अंगीं असावयाचे. **बापजादे, बापदादे** [**म०** बाप (किं० **फा०** बाब् (पिता) + जद्द (आजा)] **पु० अ० व०** पूर्वज; वाडवडील; उ० दिल्ली यांच्या बापजाद्यांची नाहीं, जो सामर्थ्यवान् होईल त्याची दौलत असें आहे. **बापपोरका वि०** ज्याचा बाप मेला आहे असा. **बापदेव पु०** अडाण्यांचा एक देव. **बापभाऊ पु०** वडिलोपार्जित द्रव्यावर ज्याचा आपल्या बरोबरचा हक्क आहे असा आपला दायाद. **बापभावकी स्त्री०** १ आप्तपणाचें नातें. २ दृढ मैत्री. ३ भाऊबंधकी. **बाप माय स्त्री०** आई आणि बाप. 'आईबाप' 'मायबाप' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत. **बापया, बाप्या पु०** मूलपणा संपून मोठा झालेला मुलगा. **बापा पु०** १ (मुलांच्या

भाषेत) बाप. २ वर 'बापदेव' पहा.

बापरोटी स्त्री० वडिलोपार्जित जिंदगी.

बापडा, बापुडा, बापडीक [म० बाप] **वि०** १ गरीब; हतभाग्य; दीन; उ० खरा चोर पळाला आणि ह्या बापड्याला विनाकारण यातायात. २ ज्याला बाप नाहीं असा; बापपोरका. **क्रि० वि०** (लिंगवचनाप्रमाणें फिरणारें) तुमची मर्जी असल्यास; तुम्हाला बरें वाटल्यास; उ० करणार तर करा बापडे, मी आडवा येत नाहीं. **बापुडवाणा(–णी)** [म० बापडा+वाणी (सारखा)] **वि०** दीन; अनाथ; विचारा.

बापळी स्त्री० १ रानची एक भाजी. २ तिचें बीज.

बापा, बापदेव पु० वर 'बाप' मध्यें पहा.

बापुडा, बापुडीक वर 'बाप' मध्यें 'बापडा' पहा.

बापू [म० बाप] **पु०** १ बाप. २ पुरुषाचें ठेविलेलें नांव. ३ संमानाचें टोपण नांव; उ० सखारामबापू इ०.

बापूस [म० बाप] **पु०** बाप. आईस म्ह० आई. बहिणीस म्ह० बहीण.

बापोती [म० बाप] **स्त्री०** वडिलोपार्जीत जिंदगी.

बाप्या [म० बाप] **पु०** वयांत आलेला मुलगा. ꕥ **बाप्या माणूस पु०**प्रौढ किं० वयांत आलेला माणूस. बाईल माणुस म्ह० वयांत आलेली किं० पोक्त स्त्री.

बाफळी स्त्री० एक रानभाजी किं० तिचें बीज.

बाब [अ० बाब्] **स्त्री०** १ वस्तु; जिन्नस. २ विषय; कलम; प्रकरण. ३ गोष्ट. ४ जकात; कर; पट्टी. ५ रकम.

बांब स्त्री० एक औषधाच्या उपयोगाची वनस्पति.

बांबट स्त्री०पावसाळी हवा; बारीक पाऊस, थंड वारा, ढगाळ आकाश, अशी दिनचर्या (पडणें).

बाबडा [म० बाबा] **पु०** १ मूल (प्रेमाचा शब्द). २ बाप (तिरस्कारांत). ३ बापडा.

बाबत, बाबद [फा० बाबत्] **स्त्री०** १ वस्तु; कलम; प्रकरण; गोष्ट. २ सबब; बयाद (लावणें, सांगणें). ३ तपशीलवार हकीगत. ४ खर्चाचा कच्चा हिशोब. **श० यो० अ०** साठीं; मुळें; कारणास्तव; उ० उशीरां कचेरींत हजर होण्याबाबत त्याला दोन रुपये दंड झाला.

बाबती [फा० बाबत्] **स्त्री०** १ सरकारच्या जमेचें एक प्रकरण. २ कांहीं जिनसेवर बसविलेली जादा पट्टी. **बाबती स्त्री० अ० व०** देशमुख, देशपांड्या, इ० चे मुलखावर जे हक्क असतात ते.

बांबर, बाबर न० दलदल; जेथें सदा ओल किं० चिखल असतो अशी जमीन.

बाबर १ **वि०** अपूर्ण पोसलेली शेंग; पूर्णपणें पोसला नाहीं असा (द्विदळ धान्याचा दाणा). २ अस्ताव्यस्त (केश). **न०, स्त्री०** द्विदळ धान्याचे पूर्ण पोसले नाहींत असे दाणे प्रत्येक किं० समुच्चयानें. **स्त्री०** अशा अपूर्ण पोसलेल्या दाण्यांची रास. ꕥ **बाबरझोंटी स्त्री० अ० व०** अस्ताव्यस्त केश किं० बटा. **बाबर ओठ्या वि०** जाडी आहेत ओठ ज्याचे असा;उ० शितारामपंत आणि त्यांचे सर्व भाऊ बाबरओठ्ये होते.

बाबरणें [म० बाबर] **अ० क्रि०** (शेंगा) शुष्क दाण्यांनीं भरलेल्या होणें.

बाबरी [म० बाबर] **स्त्री०** डोक्यावरच्या केशांची मोकळी सुटलेली बट.

बाबलणें अ० क्रि० (झाड) पानांनीं समृद्ध होणें.

बाबला (–ल्या), बाबुल्या [म० बाबा] **पु०** १ मुलगा. २ मुलगा (प्रेमानें). ३ मुलाचें ठेविलेलें लाडकें नांव.

बाबशेटीची पेंड मागें 'बाप' मध्यें 'बापशेटीची पेंड' पहा.

बाबा पु० १ बाप. २ बापाला त्याचीं मुलें देतात तें नांव किं० ती बहुमानाची पदवी. ३ कोणीही संमान्य माणूस. ꕥ **कोणेकाला दादाबाबा** (किं० **दादापुता**) **करणें** त्याचीं आर्जवें करणें. **बाबावाक्यं प्रमाणम्** बाबांचें वाक्य जें तें खरें; आमचे बाबा असें म्हणतात म्हणून हें असेंच. **टीप,**–ज्याला स्वताचा विचार म्हणून कांहींच नाहीं आणि जो दुसऱ्याच्या विचाराला

फाजील महत्त्व देतो त्याच्या उपहासार्थ ह्या वाक्याचा उपयोग केला जातो. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० ६४० पहा.

बाबी [**म०** बाबा] **स्त्री०** १ पोक्त किं० वयोवृद्ध स्त्रीला योजावयाचा बहुमानाचा शब्द. २ मुलीचें ठेविलेलें नांव.

बांबुटणें **अ० क्रि०** (आंबा इ० फळें) न पिकतां पिवळीं होऊन नासणें.

बाबुना [**फा०** बाबूनाह्] **पुं०** एक औषधोपयोगी झाड.

बाबू [**म०** बाबा] **पु०** १ सांसारिक लोकांना बैरागी, गोसावी, इ० हा शब्द लावितात. २ लहान मुलगा (प्रेमानें). ३ मुलाचें ठेविलेलें नांव. ३ बंगाली माणूस.

बांबू पु० वेळूची एक जात.

बांबूट स्त्री० पिवळें होऊन नासलेलें आंबा इ० फळ.

बाबे [**अ०** बाब्] **श० यो० अ०** मुळें; ० च्या कारणानें; ० साठीं ० च्या सदरांत.

बांबोट [**पोर्च्युगीझ्**] **स्त्री०** उथळ पाण्यांत चालणारी नौका.

बाब्या [**म०** बाबा] **पु०** मुलगा (प्रेमानें).

बांभुरडा [**म०** ब्राह्मण] **पु०** ब्राह्मण (तुच्छतेनें).

बाभूळ, बाभळी, बाभळ स्त्री० एक कांटेरी वृक्षविशेष. याच्या साली, शेंगा, इ० चा काळा रंग होतो आणि ह्या झाडाच्या चिकापासून डींक होतो. ֍ **कोणेकाची बाभूळ बुडणें** त्याचें नुकसान होणें; त्याचें गांठोडें बुडणें; उ० मी चोरी केली, मी शिक्षा भोगली यांत तुझी काय बाभूळ बुडाली. **टीप,**–दुसऱ्याच्या कारभारांत लुडबूड करून प्रतिष्ठा मिळवूं पाहणाऱ्याचा उपहास करतांना ह्या संप्रदायाचा उपयोग केला जातो. **बाभळीस कांटा लावणें** वाइटाला वाईट म्हणणें; सर्व लोक ज्याला बदमाष म्हणतात त्याला बदमाष म्हणणें (ह्यांत काय दोष ?). **बाभळीचा कांटा पु०** आरंभशूर; प्रथम मोठें अवसान दाखवून नंतर मागें हटणारा किं० कचर खाणारा. **ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी** एकाच बैठकींतील किं० पुढ्यांतील किं० व्यसनांतील किं० धंद्यांतील लोक एकमेकांचीं वर्मेंकर्में चांगलीं जाणत असतात.

बाभ्रव्य [**सं०** बाभ्रवी=दुर्गा] **पुं०** ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा इसम. ह्या ब्राह्मणांची कोंकणांत वसति आहे.

बाम स्त्री० १ एक मासा. २ एक झाड.

बामण [**सं०** ब्राह्मण] **पु०** ब्राह्मण. **टीप,**–बामणी, बामणजन, इ० पुढें ' ब्राह्मण' मध्यें पहा.

बामुरडा पु० ब्राह्मण (तुच्छतेनें).

बायक (–ख) पु० (गंजिफांचे खेळांत) हुकूम पान.

बायकी [**म०** बायको] **वि०** १ बायकांना शोभेल असा. २ बायकांच्या उपयोगाचा. ३ बायकांत प्रचलित. ४ भितरेपणाचा; नामर्दपणाचा.

बायको स्त्री० १ मानवजातीय स्त्री. २ पत्नी; भार्या. ३ (**लक्षणेनें**) भित्रा किं० पुचाट माणूस; नामर्द. ֍ **बायको करणें** लग्न करून पत्नी मिळविणें. **नवरा करणें** लग्न करून नवरा मिळविणें. **टीप,**–हे दोन्हीं प्रयोग अशिक्षितांत वापरले जातात. **बायको माणूस न०** स्त्री,–अनाथ, दुर्बल, नाजूक, ह्या दृष्टीनें. **बायकांचें शास्त्र, बायकी शास्त्र न०** पुरुषांना संमत नसून बायकांना संमत असे जे विधि, निषेध, आचार, इ० ते समुच्चयानें. **बायको झाड न०** कित्येक झाडांच्या एका जातीच्या फुलांत फक्त स्त्रींद्रियें असतात आणि त्या झाडाच्या दुसऱ्या जातीच्या फुलांत फक्त पुंकेसर असतात. हे पुंकेसर वाऱ्यानें उडून स्त्रींद्रियांशीं संलग्न होऊन त्यावर फळें उत्पन्न होतात. स्त्रींद्रियें ज्यावर असतात तें बायको झाड आणि पुंकेसर ज्यावर असतात तें पुरुष झाड. पोपईचें बायको झाड वेगळें असतें आणि पुरुष झाड वेगळें असतें. **बायकोवेल्हाळ वि०** १ बायकोचा नादी; बाईलवेडा; बायकोवांचून ज्याला चैन पडत नाहीं असा. **बायक्या वि०** १ बायकांत मिसळणारा. २ दळण, कांडण, इ० कामें करणारा. ३ कर्तृत्वशून्य.

बायल्या [**म०** बाईल] **वि०** १ बायकोच्या तंत्रानें चालणारा. २ भितरा. ३ कर्तृत्वशून्य. ४ बायकांचीं कामें करणारा.

बाया, बाह्या पु० तवल्याच्या ज्या भागास शाई लाविलेली असते तो भाग.

बाया पु० पानांला पानें शिवून आपलें घरटें करणारा पक्षिविशेष.

बाया स्त्री० १ आई. २ कोणाही सामान्य स्त्री.

बायो स्त्री० वर 'बाया' पहा.

बार [**सं०** वारम्=वेळा; **हिं०** वार्] **क्रि० वि०** (गणती करतांना) वेळां; उ० एक वार, दोन वार, इ०.

बार [**हिं०**] **पु०** १ बंदुकींत ठासलेली दारू. २ ह्या दारूचा स्फोट. ३ ह्या स्फोटाचा आवाज. ४ चढाओढीनें श्लोक म्हणण्याची मुलांची करमणूक. ५ फळें, पुष्पें, इ० चा बहर. ६ फुलांचें अत्तर काढण्यांत जे अनेक संस्कार ते प्रत्येक. ७ बंदूकवाला शिपाई. ❀ **बार करणें** (कागद) नोंदणें. **बार भरणें** १ बंदुकींत दारू ठासून ती उडवावयाला तयार करून ठेवणें. २ कांहीं हेतु साधण्यासाठीं सर्व संधानें किं० वशीले गुप्तपणें बांधून ठेवणें. ३ अमुक प्रश्नाला अमुक उत्तर दे असें कोणेकाला पढवून ठेवणें. **बार देणें** मान्य करणें; कबूल करणें; उ० तुझ्या बोलण्याला मी बार देत नाहीं. **तुझ्या योजनेला मीं बार आहें** तुझी योजना मला मान्य किं०कबूल आहे. **बार उडविणें** अगोदर गुप्तपणें संधानें बांधून नंतर कार्य एकदम सिद्ध करून लोकांना चकित करणें.

बार [**सं०** भार] **पु०** १ ओझें. २ भार, जडपणा. **न०** १ तुळई; वहाल. २ विटीदांडूच्या खेळांतील दांडू.

बारकश (**–स**) [**फा०** बार्कश्] **न०** व्यापारी मालाचें जहाज. ❀ **बारकशी वि०** मालाची वाहतूक करणारें(गलबत).

बारकस [**म०** बारीक] **वि०** अगदीं बारीक कण ज्याचे असें (पीठ, साखर, इ०).

बारका [**म०** बारीक] **वि०** बारीक; लहान; किडकिडीत. ❀ **बारकाई, बारकी स्त्री०, बारकावा पु०** १ बारीकपणा. २ तपशील किं० क्षुल्लक बाबी तपासण्याकडे कल (बुद्धि, भाषण, इ० चा). ३ चिक्कूपणा; कंजूषपणा (खर्च करण्यांत). [इ०).

बारकावर वि० मध्यम बारीक (सूत, धान्य, इ०).

बारकावणें [**म०** बारीक] **अ० क्रि०** (शरीर, पाऊस, इ०) बारीक, किडकिडीत, किं० कमजोर होणें.

बारकी स्त्री० वर 'बारका' मध्यें पहा.

बारकें [**म०** बारा] **न०** बारा बांबूंचा भारा.

बारंगपाटी स्त्री० आट्यापाट्यांच्या खेळांतील मधली पाटी किं० सुरपाटी.

बारगळ वि० १ स्वच्छंदी; उनाड. २ मूर्खपणाचा. ३ अव्यवस्थित.

बारगळणें [**म०** बारगळ] **अ० क्रि०** १ स्वच्छंदी किं० अव्यवस्थित होणें; वेडे वेडे चाळे करूं लागणें; बिघडणें. २ उपयोगांतून किं०कामांतून जाणें.

बारगा वि० वर 'बारगळ' पहा.

बारगीर [**फा०** बारा (घोडा)+गीर् (गिरफ्तन् घेणें)] **पु०** धन्यानें दिलेला घोडा ठेवणारा स्वार शिपाई. ❀ **बारगिरी स्त्री०** बारगिराचा धंदा किं० नोकरी. **वि०** बारगीराला शोभेल असा (पोशाक, हत्यार, इ०).

बारजिभ्या [**म०** बारा+जीभ] **वि०** विसंगतपणें बोलणारा; एकदा एक आणि एकदा एक असें सांगणारा; ज्याच्या बोलण्यांत मेळ नाहीं असा.

बारटी, बरटी स्त्री० एक तृणधान्यविशेष.

बारडी स्त्री० घुसळखांबाची दोरी.

बारणें स० क्रि० (सामान, ओझें, काम, जबाबदारी) पशु, माणूस, इ० वर लादणें.

बारदान [**फा०**] **न०** १ पदार्थविशेष ठेवणें, साठविणें, भरणें इ० च्या उपयोगाचें भांडें, पोतें, इ०. २ गलबतावरील माल, माणसें, इ०. ❀ **अकलेचें बारदान न०** मूर्ख माणूस.

बारदार [**फा०**] **वि०** १ ज्याला फळें येतात असें (झाड). २ वाहतुकीचें (गलबत, जनावर, गाडी, इ०). ३ बंदुकवाला (शिपाई). ह्या अर्थीं 'बरदार' असाही अधिकरूढ शब्द आहे.

बारदार [**हिं०** बारी (पाळी)+दारी(प्रत्यय 'दाष्तन्' पासून)] **पु०** ज्या महाराकडे विशिष्ट काळीं महारकीचें काम आलें आहे तो.

बारदेश [**म०** बारा+देश] **पु०** गोवा प्रांत किं० तेथें रहिवासी झालेले अनेक ठिकाणचे लोक समुच्चयानें.

बारनायकी [**म०** बारा+नायक] **वि०** अनेक लोकांची ज्यांत ढवळाढवळ आहे असें (काम, कारभार). **स्त्री०** अनेक माणसांची लुडबूड; गोंधळ; अव्यवस्था; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति.

बारनिशी (–सी) [**फा०** बार् नवीसी] **स्त्री०** १ बारनिसाचें काम. २ बारनीस ज्या चोपडींत कागद नोंदतो ती. खालीं ' बारनीस ' पहा.

बारनीस [**फा०** बार्नवीस्] **पु०** सरकारी कागदांच्या नोंदी करणारा कारकून.

बारबंडा (–ड्या) **वि०** अव्यवस्थित; अनियंत्रित; स्वछंदी. वर ' बारगळ ' पहा.

बारभाई [**म०** बारा+भाई] **स्त्री०** भिन्न भिन्न मतांच्या आणि स्वभावांच्या माणसांचा एकाद्या विशिष्ट कामीं झालेला संयोग किं० अशा संयोगापासून उत्पन्न झालेला घोटाळा किं० गोंधळ किं० अव्यवस्था. ꣸ **बारभाईचें कारस्थान न०** भिन्न भिन्न मतांच्या आणि पक्षांच्या माणसांची कांहीं एका विशिष्ट ध्येयासाठीं झालेली जूट किं० त्यांनीं रचिलेला व्यूह. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक **ले०** १२२३ पहा.

बारमहा, बारमास, बारमाही [**म०** बारा +**फा०** माह (महिना); **म०** मास] **क्रि० वि०** बारा महिनेभर; सबंध वर्षभर.

बारमाशी [**म०** बारा+मास (महिना)] **वि०** बारा महिने होणारा, येणारा, फुलें, फळें, देणारा, टिकणारा (माणूस, आंबा, फणस, इ०).

बारव स्त्री० चौकोनी विहीर.

बारवरशी सोळवरशी, बारवर्षे सोळवर्षे **पु० अ०व०** तरुण आणि अननुभविक माणसें.

बारशी, बारस [**म०** बारा] **स्त्री०** हिंदू महिन्याची बारावी तिथि,–शुक्लपक्षांतील किं० कृष्ण पक्षांतील; द्वादशी; उ० वसुबारस (आश्विन कृष्ण द्वादशी).

बारसख (–क–)डी,बाराखडी [**म०** बारा+ अक्षरें इ०] **स्त्री०** अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं, आणि अः हे स्वर क, ख, ग, इ० व्यंजनांस जोडून क, का, कि, की, इ० जी पंक्ति होते ती.

बारसें न०, बारसा पु० [**म०** बारा] मूल जन्मल्यावर त्याच्या बाराव्या दिवशीं त्याचा नांव ठेवण्याचा विधि करतात तो. ꣸ **मी तुझ्या बारशास जेवलों आहें** किं० **मी तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्ल्या आहेत** मी तुझ्यापेक्षां वयानें मोठा आहे; तुझ्याहून मला अक्कल जास्ती आहे; तुझ्या डावपेचांनीं फसणारा मी नाहीं; मी तुझ्याहून सातसवाई आहे. घुगऱ्या म्ह० हरभऱ्यांची उसळ; ही बारशाला खाद्य म्हणून करतात.

बारा वि० दहांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ꣸ **केशा जाणें बारा नाऱ्या जाणें तेरा** एका ठकाला ठकविणारा दुसरा त्याहून वस्ताद ठक असा तो आहे. **बारा** (किं०**बाराचें) करणें** (किं० **म्हणणें**), **बाराचा पाढा वाचणें, बाराचे लेख वाचणें** पळून जाणें; पोबारा करणें; दुसऱ्याची नजर चुकवून यःपलाय करणें. **बारा गोष्टी** (किं० **कथा करणें** किं० **सांगणें**) भरमसाटपणें बोलणें; ताळमेळाशिवाय बोलणें; खोट्या सबबी सांगणें; बयादी लावणें. **बारा पंधरा करणें** (किं० **सांगणें**) १ ताळतंत्र सोडून बोलणें. २ खोट्या सबबी सांगणें. ३ चुकवाचुकवीचीं बोलणीं बोलणें.**बारा बत्तीशा लावणें** मूर्खासारखें बोलणें; भरमसाटपणें बोलणें; बरळणें. **बारा महिने तेरा काळ क्रि० वि०** सदासर्वदा. **बारा वर्षें तप केलें आणि गुवानें पारणें फेडलें** अत्यन्त प्रामाणिकपणें आणि इमानानें श्रम करून फळ वाईट मिळालें किं० परिणाम नुकसानीचा झाला. **बारा वर्षें वागविलें तरी म्हणे आस्ते उतार** त्याला लहानपणापासून मीं प्रेमानें जपलें आणि त्याचें संगोपन केलें असून तो म्हणतो कीं मला काळजीपूर्वक संभाळ,–कृतघ्नाचें वर्णन. **त्याला बारावें वर्ष लागलें** (किं० **पालटलें**) तो इतका म्हातारा असून स्त्रीलंपट आहे किं० पोरचेष्टा करतो,–म्हाताऱ्याच्या निंदेंत हें वाक्य योजलें जातें. **पदार्थाच्या बारा वाटा करणें** तो खर्चून, उध-

ळून, किं० संपवून टाकणें. **बारा वाटा मोकळ्या** होवें तिकडे जाण्याला किं० हावें तें करण्याला मोकळीक; अनियंत्रितपणा; स्वच्छंदीपणा. **पैसा, सैन्य, सामग्री, इ० च्या बारा वाटा होणें** (पैसा इ०) संपणें, उधळून टाकलें जाणें, खर्चिलें जाणें, त्याची वाताहत होणें. **बारा वाजणें** उतरत्या पंथास लागणें; विध्वस्त होणें, पराभूत होणें; संपणें. **बारा वाजविणें** संपविणें; खर्चून टाकणें; विध्वंसिणें; फजीत करणें; पराभविणें. **टीप,**—दुपारचे बारा वाजले म्हणजे दिवसाला उतरती कळा लागते आणि रात्रीचे बारा वाजले म्हणजे रात्रीला उतरती कला लागते, यावरून हे दोन्ही वाक्प्रचार रूढ झाले आहेत. **पळणारास एक वाट शोधणारास बारा वाटा** लबाडी करणें सोपें असतें पण ती हुडकून काढणें कठिण असतें. **बारा घरचे बारा** अनेक ठिकाणचे अनेक; परस्परांशीं कोणत्याही नात्यानें संबद्ध नाहींत असे. **बारा बंदरचें पाणी प्यालेला वि०** चवचाल माणूस; अनुभविक. **बारा पिंपळांवरचा मुंजा पु०** एके ठिकाणीं स्थिर न बसणारा म्ह० सदा हिंडत असणारा मनुष्य. **बारा आदित्य पु० अ० व०** हिंदूंच्या बारा महिन्यांतील सूर्याचीं बारा रूपें. **बारा कारू पु० अ० व०** बारा बलुतेदार. **बारागणी स्त्री०** साठ विघे हें जमीनीचें माप. **बारा जन्म न०अ० व०** बारा आयुष्यें. अकरणरूपी प्रयोग; उ० तुला बारा जन्मांत गायन येणार नाहीं. **बाराजिभ्या वि०** १ बटबट्या; वाचाळ. २ खोटें बोलणारा. ३ असंबद्ध बोलणारा. **बारा ज्योतिर्लिंगें न०अ० व०** शिवाचे बारा अवतार. मागें ' ज्योति ' शब्दांत ' ज्योतिर्लिंग पहा. **बाराद्वारी, बारादारी स्त्री०** १ बारा दारें ज्याला आहेत असा लताकुंज किं० लतामंडप, अशी विहीर, इ०. २ काम, कारभार, इ० मध्यें झालेली अव्यवस्था किं० गोंधळ. **बारा बलुती न० अ० व०** गांवचे वतनदार जे उपाध्या, जोशी, न्हावी, परीट, कुंभार, सुतार, इ० त्यांना चाकरीबद्दल शेतावर द्यावीं लागतात जीं धान्यादि देयें तीं. **बारा बाबू, बारा बापू, बारा घरचे बारा** एका कार्यासाठीं जुळलेले अनेक ठिकाणचे अनेक मतांचे लोक. **बाराबाविशा स्त्री० अ० व०** ग्रामाधिकाऱ्यांचे हक्क. **बाराभाईची खेती स्त्री०** अव्यवस्थितपणाचा कारभार; अनेक भिन्न भिन्न मतांच्या माणसांनीं चालविलेलें कांहीं काम.

बारा पु० १ कुंभाराच्या भट्टीचें खालचें तोंड. २ समुद्रकांठचें बंदर, किल्ला, गांव, इ० च्या लगतचा समुद्राचा भाग; उ० मी मुंबईहून सकाळीं निघालों तों दोनप्रहरीं सुरतच्या बाऱ्यावर आलों.

बारावा [**म०** बारा] **वि०** पहिला, दुसरा, इ० क्रमानें अकराव्याच्या पुढचा. ꠰꠰ **त्याचा माझ्याशीं बारावा बृहस्पति आहे** त्याचें माझ्याशीं वैर आहे; त्याचें माझ्याशीं पटत नाहीं. **टीप,**—जन्मराशीपासून बाराव्या राशींत बृहस्पति (म्ह० गुरु) असल्यास तो त्या माणसास फार दुःख देणारा असतो असें फलज्योतिषांत सांगितलेलें आहे.

बारी स्त्री० १ दोन डोंगरांमधील धोक्याची खिंड. २ रानांतील धोक्याची वाट. ३ कुंपणांतून केलेली अडचणीची वाट. ꠰꠰ **चोरांची बारी स्त्री०** चोरांच्या उपद्रवाची वाट.

बारी [**हिं०**] **स्त्री०** १ वेळ; खेप; पाळी. २ खिडकी; गवाक्ष. ३ (सोंगट्यांच्या खेळांत) एक डाव.

बारिक [**फा०**] **वि०** १ सूक्ष्म, लहान (आकार). २ किडकिडीत (शरीर); ज्याची जाडी लहान असा(खांब,तुळई). ३ लहान आकाराचा (डोळा, नाक, इ०). ४ खोल पहाणारी (दृष्टि, नजर). ५ लहान आहेत कण जिचे अशी (साखर, पीठ, वाळू, इ०). ६ गुप्त (बातमी). ७ एकदम लक्षांत न येणारा(भेद, अर्थ, इ०). ꠰꠰ **बारिक कातणें** १ हिशेब, वर्तन, इ० मध्यें फाजील चोखपणा करणें. २ रोड किं० किडकिडीत होणें. **एकाद्यावर बारीक कातणें** गोड गोड बोलून त्याचा नाश करणें किं० त्याला फसविणें. **बारीक पाहाणें** १ फाजील चिक्कूपणा करणें. २ फाजील सचोटीचा किं० खरेपणाचा आव आणणें. **बारीक कुटाळ वि०** सभ्यपणाचा आव आणून निंदा करणारा. **बारिक रडणें** घुमसत, चरफडत,

आणि मोठा आवाज न करतां रडणें. **बारीकराव पु०** किडकिडीत मनुष्य; सडपातळ अंगाचा मनुष्य (थट्टेंत). **बारीक हसणें** फारसा मोठा आवाज न करतां हसणें.

बारुला, बारुली, बारोला, बारोली, बारोळा [**म०** बारा] **वि०** बारा पायल्यांचा (मण, माप, खंडी).

बारें [**म०** बारी] **न०** १ पाटाच्या पाण्यासाठीं कुंपणांतून काढलेली वाट. २ पाटाच्या पाण्याला मध्यें पाडलेलें तोंड. ३ वारा, पाणी, इ० वाहाण्यासाठीं केलेलें भोक. ॐ **दरबारांत** (किं० **दरबारचें**) **बारें बांधणें** आपणाला प्रतिकूळ असें असें कांहीं दरबारांत होऊं नये म्हणून दरबारच्या लोकांना लाच देऊन ठेवणें किं० वशीले बांधून ठेवणें.

बारोत्रा [**म०** बारा+उत्तर] **पु०** १ दरसाल दरशेकडा बारा रुपये असा व्याजाचा दर. २ हिशेबानें जें व्याज होईल त्याचा बारावा अंश (व्याजांत सूट घालतांना).

बारोली [**म०** बारा+पायली] **स्त्री०** बारा पायल्यांचा मण.

बार्हस्पत्य [**सं०**] **न०** १ (**ज्योतिष**) पुष्य नक्षत्र. २ नीतिशास्त्र. **पु०** १ नास्तिक. २ बृहस्पतिशिष्य उद्धव.

बाल [**सं०**] **वि०** १ लहान. २ नवा; कोंवळा. ३ तरुण; नुकताच उगवलेला किं० उत्पन्न झालेला. ४ अज्ञ; अडाणी. ५ मूर्ख. ६ शास्त्र, विद्या, कला, इ० मध्यें ज्याची गति झालेली नाहीं असा. **पु०** १ मूल; बालक. २ पांचपासून सोळा वर्षें वयापर्यंतचा मुलगा. ३ शेपूट; पुच्छ. ४ केश. ॐ **बालारुण पु०** १ नुकताच उगवलेला सूर्य. २ सकाळ. **बालोपवीत न०** लंगोटी. **बालखिल्य पु०** अंगुष्ठप्रमाण ऋषिविशेष. **बालगोपाल पु०** श्रीकृष्ण. **बालगोपाल पु०अ० व०** लहान किं० खेळकर मुलगे. **बालग्रह पु०** मुलांना पीडिणारी पूतना, सठवी, इ०. **बालचर्य पु०** कार्तिकेय. **बालधि, बालभार, बालहस्त पु०** केसाळ शेपटी. **बालबाल, बालंबाल क्रि० वि०** पूर्णपणें; पक्का; उ० माझी बालंबाल खात्री झाली. **बालबाल बोलणें, बालंबाल बोलणें** दुसऱ्याला भुरळ पडले अशा प्रकारें बोलणें; दुसऱ्याला बोलण्याला अवसर न देतां बोलत सुटणें; पुष्कळ बोलणें; ताळतंत्र सोडून बोलणें. **बालंबाल खूष होणें** अति संतुष्ट होणें. **बालगुंडा पु०** शारीरिक शक्ति वाढविण्यासाठीं किं० आजमावण्यासाठीं जो तालमीमध्यें दगडाचा गोटा हातांनीं उचलावयासाठीं ठेविलेला असतो तो. **बालचीप स्त्री०** १ नाण्याला पडलेली बारीक चीर. २ दगडाची शिळा किं० लांबलचक पट्टी. **बालचंद्र पु०** शुद्ध द्वितीयेपासून षष्ठीपर्यंतचा चंद्र. **बालधोंड स्त्री०** १ मोठा धोंडा किं० फत्तर. २ सांसारिक अडचण. ३ आपत्ति. **बालपेच, बालंपेच पु०** पागोटें झोकदार दिसावें म्हणून पागोट्याला देतात तो एक प्रकारचा पेच. **बालफुटका वि०** बारीक केसासारखी फूट ज्याला आहे असें (रुपाया इ० नाणें). **बालबीज न०** मुद्रा, कांसली, किं० कंगा,ह्या झाडाचें बीज. **बालबोध वि०** १ मुलांना समजण्याजोगें. २ देवनागरी (लिपि). **बालब्रह्मचारी पु०** ज्याला स्त्रीसंग मुळींच घडला नाहीं आणि ज्याचें लग्नही झालेलें नाहीं असा पुरुष. **बालपरवरषी** [**सं०** बाल; **फा०** पर्वरीष् (संगोपन)] **स्त्री०** लढाईंत मेलेल्यांच्या मुलांच्या संगोपनार्थ नेमणूक. **बालभाषा स्त्री०** संस्कृताचा अपभ्रंश होऊन झालेली भाषा; प्राकृत भाषा. नाटकांतलि स्त्रिया आणि हलकीं पात्रें यांच्या तोंडीं ही घातलेली असते. **बालमित्र पु०** लहानपणापासूनचा मित्र किं० सोबती. **बालरंडा स्त्री०** ऋतुदर्शनाच्या पूर्वीं जिचा नवरा मेला आहे अशी स्त्री. **बालवाचा स्त्री०** मुलांची भाषा,—पापा म्ह० भाकरी, हम्मा म्ह० गाय, इ०. **बालविधवा स्त्री०** लहानपणीं जिचा नवरा मेला अशी स्त्री. **बालसरस्वती स्त्री०** लहानपणापासून जो अत्यन्त बुद्धिमान असा. **बालहत्या स्त्री०** मूल मारणें. **बालहत्यारा वि०** बालहत्या करणारा; मुलांना ठार मारणारा. **बालाग्र क्रि० वि०** अगदीं थोड्या प्रमाणांत. **बालाभ्यास पु०** लहानपणापासूनची सवय किं० परिपाठ.

बालक [**सं०**] **न०, पु०** मूल; अर्भक.

बालच्या पु० तोफेच्या गाडीला असतें तें पाण्याचें बारदान.

बालंट, बालट, बालांट न० खोटा आरोप, आळ, किं० तोहमत. ॐ**बालंटास येणें** किं० **बालंटावर येणें** १ नाकबूल जाणें. २ वचनभंग करणें. **बालंटखोर वि०** दुसऱ्यावर कुभांड रचणारा.

बालंड वर ' बालंट ' पहा.

बालदी स्त्री० गलबतांत शिरलेलें पाणी उपसावयाचा कातड्याचा पोहोरा.

बालमखिरा [हिं०] पु० एक प्रकारची काकडी.

बाला पु० नाण्यावर ठोकलेला ठसा. ॐ **बाला देणें** (किं० **मारणें** किं० **हाकणें**) कोणेकाला फसवून पळून जाणें. खालीं ' बाल्या ' पहा.

बाला, बालिका [सं०] स्त्री० १ मुलगी. २ तरुण स्त्री; अप्रौढ स्त्री.

बलाईयाफ्त [फा०] स्त्री० खूष होऊन ठराविक वेतनाहून अधिक दिलेली देणगी.

बालागणित [**सं०** बाल (केश)+ गणति] **क्रि० वि०** केसाकेसांत; पदोपदीं; सदासर्वदा (शिव्या देणें, खोटें बोलणें, इ०); उ० त्याच्या अंगांत बालागणित चेष्टा भरल्या आहेत.

बालातंगी [फा०] स्त्री० घोड्याच्या पाठीवर खोगीर आवळावयाचा पट्टा.

बालायेश [**फा०** बालाईष्] **स्त्री०** उंचावणी; सर्फराजी.

बालिश [**सं०**] **वि०** १ पोरकट. २ मूर्ख; अज्ञ.

बालेकिल्ला [**फा०** बाला (उंच किं० माथा); बालाय किलाह्] **पु०** शत्रूच्या हालचालींवर टेहाळणी करण्याठी डोंगरी किल्ल्यावर जें उंच बांधकाम चार पांच माणसांना उभें रहातां येईल इतक्या विस्ताराचें केलेलें असतें तें; डोंगरी किल्ल्याचा माथा. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक ले० १३४८ पहा.

बालेघांट [**फा०** बाला (उंच)+**म०**घांट] **पु०** घांटमाथा; घांटावरील प्रदेश.

बाल्य [**सं०**] **न०** १ बालपण; बाल्यावस्था. २ अज्ञान; अडाणपिणा.

बाल्या पु० कोणेकाला फसवून त्याला दिलेली झुकांडी किं० केलेला पोबारा (हाकणें, देणें, मारणें). ' सूं बाल्या हाकणें ' ह्याच अर्थाचा वाक्प्रचार आहे.

बाव स्त्री० विहीर. ॐ **बाव उपसणें, बाव उसपणें न०** विहिरींतील गाळ उपसून काढण्याचा बांबूचा पोहोरा.

बावखंड, बावखड, बावकट (–ड) **न०** १ बाहुमूलाचा संधिप्रदेश. २ गाड्यावरील साठीच्या चौकटींचीं जीं चार लांकडें त्यांतील लांबीचीं जीं दोन लाकडें तीं प्रत्येक. ३ होडीच्या उलडीस दोहों बाजूस असतात तीं दोन लाकडें प्रत्येक.

बावखैराती वि० उधळपट्टीचा; बेतालपणाचा. **क्रि० वि०** उधळेपणानें; स्वैरपणानें.

बावखोल पु० ओहोरलेली म्ह० भरून आलेली बाव म्ह० विहीर.

बावचळ पु० भ्रमिष्टपणा.

बावचळणें अ०क्रि० १ भ्रमिष्ट होणें; भ्रमिष्टासारखें वर्तन करणें. २ स्वैरवर्तनी किं० स्वच्छंदी होणें. ३ घोटाळ्यांत किं० भ्रमांत पडणें.

बावचा, बावंचा, बावचळा पु० शंका; अंदेशा (वाटणें, पडणें).

बांवची, बावची [**सं०** बाकुची] **स्त्री०** १ एक झाड किं० त्याचें बीज. २ गोवारी किं० तिची शेंग.

बावटा, बाहुटा [**हिं०**] **पु०** १ ध्वज; निषाण. २ बाहुमूलापासून कोपरापर्यंतचा भाग. २ स्त्रियांचें एक बाहुभूषण.

बांवट्या स्त्री० अ० व० टाळाटाळीचीं उत्तरें (लावणें).

बावडा वि० वर ' बापडा ' पहा.

बावडी [**हिं०**] **स्त्री०** मोठी विहीर.

बावणें अ० क्रि० कोमेजणें; सुकणें.

बावन्न, बावन वि० पन्नासांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ॐ **बावनवीर पु०** अत्यंत शूर आणि धाडसी माणूस; अत्यंत हुशार माणूस. **बावनकशी वि०** १ ज्यांत मुळींच हीण नाहीं असें (सोनें). २ अत्यंत शुद्ध किं० पवित्र किं० साधुवृत्तीचा (माणूस). **एक ठेच खाई तो**

बावनवीर, बावन ठेचा खाई तो गद्धा साऱ्या जन्मांत जो एकदाच फसतो तोच खरा शहाणा; जो सदोदित फसतो तो मूर्ख. **बावनचंदन न०** मलयगिरीवरचें चंदन म्ह०अत्यंत सुवासिक चंदन.

बाराबाविशा, बाराबत्तीशा स्त्री० अ० व० ग्रामाधिकाऱ्यांचे हक्क.

बावबंदी क्रि० वि० स्वच्छंदानें; अनियंत्रितपणें. **स्त्री०** स्वच्छंदीपणा; बेतालपणा.

बावर [**फा०**] **पु०** १ अनिष्टाची शंका. २ विचार; कल्पना.

बावरणें अ० क्रि० भ्रांतिष्ट होणें; गोंधळणें.

बावरा [**म०** बावरणें] **वि०** गोंधळलेला; भ्रमिष्ट.

बावला इ० पुढें 'बाहुला' इ० पहा.

बावसा पु० १ भीति, धडकी, घाबरगुंडी (पडणें). २ शंका; अंदेशा; बावचा.

बावळा, बाव्हळा [**हिं०**] **वि०** अजागळ, मूर्ख. ꕥ **बावळी मुद्रा देवळीं निद्रा** दिसण्यांत अजागळ पण असण्यांत पक्का वस्ताद. **टीप,–** देवळांत म्ह०बिनभाड्याच्या घरांत जो निजण्याची सोय करून घेतो तो. **टीप,–**ह्या संप्रदायाचा अर्थ 'अजागळ' इतकाच बहुधा घेण्यांत येतो.

बावळें न० छाया; सावली.

बावा पु० बाहवा नांवाचें झाड.

बावा पु० खालीं 'बावाजी' पहा.

बावांचे पु० अ० व० धरसोडीचीं उत्तरें; गुळमुळीत उत्तरें (फोडणें, लावणें, घेणें).

बावाजी पु० गोसावी, बैरागी, इ० ना बहुमानाचा शब्द.

बावी स्त्री० विहीर,–विशेषतः शेतांतील; उ० एकवीस आले पाहुणे, बावीस गेले स्नानाला, स्नान करून तेवीस परत आले,आणि जेवून वीस निघोन गेले. [संख्येइतका.

बावीस वि० विसांत दोन मिळवून होणाऱ्या

बावीळ स्त्री० खडकाळ प्रदेशांतील सखल जमीनीचा टापू.

बावें न० गलबताच्या सुकाणूंचा हातीं धरावयाचा दांडा. ꕥ **बावेकरी पु०** सुकाणूंवाला.

बाव्हला, बाव्हली इ० 'बाहुला,' 'बाहुली,' इ० पहा.

बाव्हळा [**सं०**बाहु] **पु०** बाहूचा मूलप्रदेश.

बाशा पु० १ भीति; धडकी; दहशत. २ अंदेशा; संशय. **पु०,स्त्री०** प्रकृतींत थोडीशी नादुरुस्ती.

बाशिंग [**सं०** भाल+शृंग (शिंग)] **न०** १ कुणबी लोकांच्या लग्नाच्या विधींत नवरानवरींच्या कपाळांवर बांधतात तीं कागदाचीं भूषणें प्रत्येक. २ कधीं कधीं दग पांच सुतें गव्हाच्या चिकींत भिजवून नवरानवरींच्या कपाळांवर बांधतात त्यांनाही 'बांशिंग' म्हणतात. ३ कांहीं घोड्यांच्या कपाळावर तीन भोंवरें असतात ते समुच्चयानें. ४ बाशिंगी झाडाचें पान. ꕥ **कोणेक कामाचें कोणेकाच्या कपाळीं बाशिंग बाधलेलें असणें** तें काम त्याणेंच करावें किं० त्या कामाला तोच लायक आहे असें ठरलेलें किं० ठरविलेलें असणें. **ज्याच्या कपाळीं बाशिंग तो नवरा** कपाळावर बाशिंग बांधलें जाईतोंपर्यंत कोणीही आपलें लग्न होणार ह्या विचारानें हुरळून जाऊं नये. **उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग** फाजील उतावळेपणा आपण केल्यास आपल्या हातून हास्यास्पद प्रकार घडतात. **बाशिंगबळ न०** कोणेकाचें लग्न व्हावयाला दैवाची जी अनुकूलता ती. **बाशिंगाकार वि०** बाशिंगाच्या आकाराचें (शेत इ०). **बाशिंगा वि०** ज्याच्या कपाळावर बाशिंगाचें चिन्ह आहे असा (घोडा).

बाशिंगा वि० देवाहून प्रकृति श्रेष्ठ अशा मताचा आणि कलगी लावणी म्हणणारा शाहीर.

बाशिंगी स्त्री० आंबा इ० झाडावर उगवणारें एक प्रकारचें औषधी बांडगूळ. मागें 'बांडगूळ' पहा. [उथळ पात्र.

बाशी(–**सी**) [**पोर्च्यूगीझ्** बाझिया] **स्त्री०**

बाशी बावन न० अजीर्णामुळें होते ती वांति म्ह० ओकारी.

बाष्कळ [**म०** बासा=शिळा] **वि०** ताळतंत्र सोडून असलेलें (भाषण, वर्तन, किं० तसें भाषण किं० वर्तन करणारा मनुष्य) ; पाणचट (भाषण, मनुष्य). ꕥ **बाष्कळ जमा आणि पुष्कळ खर्च** खोटे किं०पोंकळ असे जमेचे आंकडे आणि खर्च मात्र खरा आणि पुष्कळ,अशी नुक-

सानीची व्यवस्था किं० कारभार.

बाष्कळणें [**म०** बाष्कळ] **अ० क्रि०** ताळतंत्र सोडून भाषण किं० वर्तन करण्याकडे कललेलें असणें.

बाष्प [**सं०**] **पु०, न०** १ अश्रु; डोळ्यांतून गळणारे पाण्याचे थेंब. २ पाण्याची वाफ. ꣵ **बाष्पानयन न०** दुःखिताचें सांत्वन.

बांस [**सं०** वंश; **हिं०** बांस्] **पु०** डोली, मंडप, पाटणी, इ० कांस लावावयासाठीं योग्य परिमाणाचा तोडून ठेविलेला कळक किं० वांबू.

बासट, बासूट [**म०** बासा=शिळा] **वि०** १ शिळेपणामुळें ज्याला घाण येत आहे असा (खाद्य किं० पेय पदार्थ). २ पाणचट (भाषण). **न०** १ अपायकारक; वावडें; अप्रिय; उ० पुरणाचे पोळीवर ताक बासट आहे. २ कुपथ्य किं० अपथ्य झाल्यामुळें आजाराचा होतो तो विकोप.

बासटणें अ० क्रि० १ फाजिल पक्व झाल्यामुळें (फळें) नासणें. २(अन्न, दूध, दहीं, इ०). शिळेपणामुळें नासणें. ३ (रोग) विकोपास जाणें. ४ उन्ह, वारा, इ० मुळें (डोळे) पिचपिचीत होणें. मागें ' बाचकुटणें ' पहा.

बांसडा [**सं०** वंश; **म०** बांस] **पु०** १ बांबू; वेळू; कळक. २ भाला; वर्ची.

बासन [**सं०** वासन=वेष्टन] **न०** १ आंत वस्त्रें बांधून सुरक्षित ठेवण्यासाठीं केलेला असतो जो खारवें इ० चा चौकोनी तुकडा तो. २ त्यांत वस्त्रें बांधल्यावर होतें तें गांठोडें. ३ (**लक्षणेनें**) प्रचंड, अवाढव्य, विस्तीर्ण, असा किल्ला, शहर, तोफ, खातें, कारखाना, इ०. ४ (**लक्षणेनें**) प्रतिष्ठित माणूस; दुढ्ढाचारी.

बासन [**हिं०**] **न०** थाळा; पसरट तोंडाचें भांडें.

बांसरी [**हिं०**] **स्त्री०** नळीच्या रूपाचें एक वाद्युवाद्यविशेष.

बासष्ट [**म०** बे; **सं०** द्वि; **सं०** षष्टि; **म०** साठ] **वि०** साठांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

बासा [**हिं०**] **वि०**शिळा;ज्याला घाण येऊं लागली आहे असा.ꣵ**बासी उलटी स्त्री०,बासी**

बावन न० अजीर्णानें सकाळीं झालेली वांति किं० ओकारी.

बासिंग न० वर ' बाशिंग 'पहा.

बासुंदी, बासोंदी,बासुदी स्त्री० दूध आटवून त्यांत साखर, वेलदोडे, इ० मसाला घालून केलेलें पक्वान्नविशेष.

बांसुरी, बांसरी [**हिं०**] **स्त्री०** नळीच्या रूपाचें एक वायुवाद्यविशेष.

बासूट वर ' बासट ' पहा.

बाहणें स० क्रि० १ बोलावणें; हाक मारणें. २ आमंत्रिणें; पाचारणें. **अ० क्रि०** (पक्ष्यानें) गायन करणें.

बाहत्तर मागें ' बहात्तर ' पहा.

बाहदार, बाहदारी पुढें ' बाहीदार, ' 'बाहीदारी' पहा. [पहा.

बाहरी मागें ' बहर, ' ' बहरी, ' ' बहारी '

बाहलकंचन वि० ज्याच्या मानेवर दोन्ही बाजूंस केश लोंबतात असा (घोडा).

बाहला पु० गाय, म्हैस, इ० चें दूध काढतेवेळीं त्यांनीं लाथ मारूं नये म्हणून त्यांच्या पायांना बांधतात ती दोरी (घालणें, बांधणें, लावणें).

बाहवा पु० एक वृक्षविशेष. याची शेंग औषधाच्या उपयोगाची आहे.ꣵ **बाहवा (-वे-) पंचक न०** काढ्याच्या उपयोगाचीं बाहवा इ० जीं पांच द्रव्यें तीं समुच्चयानें.

बाहळ, बाहाळ [**सं०** बाहु] **स्त्री०** १ अंगावर उपरणें, पासोडी, इ० डाव्या खांद्यावरून आणि उजव्या खाकेखालून अंगाभोंवतीं वेष्टून घेण्याचा प्रकार (घालणें, टाकणें, घेणें). २ उपरणें, पासोडी,इ० अंगाभोंवती पांघरण्याचा प्रकार (घेणें, टाकणें) .

बाहळ, बाहाळ वि० अग्निसंयोगानें पातळ केलेलें (तूप, मध, काकवी, इ०).खालीं ' बाहळणें ' पहा.

बाहळणें,बाहाळणें[**म०** बाहळ,बाहाळ]**अ० क्रि०** अग्निसंयोगानें (मध, तूप, इ०)पातळ होणें.

बाहळा वि० सर्व अंग पांढरें, काळें, किं० तांबडें असून त्यावर वेगळ्या रंगाचे पट्टे किं० ठिबके असलेला (बैल, कुत्रा, इ०).

बाहाड, बाहाणा इ० ‘ बहाड, ’ ‘बहाणा,’ इ० पहा.

बाही [**सं०** बाहु; **हिं०** बांही]**स्त्री०** १खांद्यापासून मनगटापर्यंतचा शरीराचा भाग.२अंगरखा, बंडी, सदरा, इ० चा बाहूला झाकणारा भाग; अस्तनी. २ दार, खिडकी, इ० च्या चौकटीचे उजवीकडचे आणि डावीकडचे दोन उभे अवयव. ※ **बाही धरल्याची लाज धरणें** आश्रयास आलेल्याचें धर्मबुद्धीनें रक्षण करणें. **बाह्या थापटणें** (किं० **पिटणें** किं० **मारणें**) मारामारीस सज्ज होणें किं० उत्सुक असणें. **कोणेकाच्या बाह्या** (किं० **बाही**) **फुरफुरणें** (किं० **फुरारणें** किं० **उसासणें** किं० **उडणें**) तो मारामारीला उत्सुक झालेला असणें. **बाहीचा वसूल पु०** गांवचें पैशाच्या रूपानें सरकारांत येतें त्या उत्पन्नाशिवाय जो वसूल होतो तो;या वसूलांतून पाटील आणि कुळकर्णी यांचीं वेतनें पूर्वी दिलीं जात असत. पुढें ‘ बाहेजमा ’ पहा. **बाहीदार पु०** १ खांद्याचा नेट देऊन मदत करतो तो. २ कोणीही मदतनीस; आपला वाली. ३ जामीन राहिलेला मनुष्य. **बाहीदारी स्त्री०** १ मदत. २ जामीनकी. **बाहीदुट्टा पु०** १ चोळीचे बाहु झांकणारे भाग. २ चोळीच्या बाह्या करण्याच्या उपयोगाचा खण इ० चा तुकडा. **बाहीबळ न०** कपटनीतीचा उपयोग न करतां केवळ शरीरसामर्थ्यानें प्रतिपक्ष्याला जिंकण्याची ताकद.

बाहीर, बाहिर, पुढें ‘ बाहेर ’ पहा.

बाहु [**सं०**] **पु०** १ खांद्यापासून बोटांच्या टोकापर्यंत (किं० मणगटार्यंत) जो शरीराचा भाग तो; भुज. २ त्रिकोणाची बाजू. ३(**वैद्यक**) देहाचा ऊर्ध्वभाग. ४ काटकोन त्रिकोणाचा पाया. ५ सरळ रेषांनीं बनलेल्या कोणत्याही आकृतीची एक बाजू. ※ **बाहुयुद्ध न०** कुस्ती. **बाहुदंड पु०** १ बाहु; हात. २ जाडी आणि पिळदार हात. **बाहुबळ न०** कपट, मंत्र,फितुरी, इ० चा उपयोग न करतां केवळ शरीराच्या शक्तीनें प्रतिपक्ष्याला जिंकण्याची ताकद. **बाहुमूळ न०** खाक; काख. **बाहुटा पु०** १ बाहुमूलापासून कोपरापर्यंतचा शरीराचा भाग. २ स्त्रियांचें एक बाहुभूषणविशेष.

बाहुटा [**हिं०**] **पु०** झेंडा; निशाण.

बाहुला पु० लाकूड, माती, दगड, चिंध्या, इ० ची मनुष्य, देव, इ० ची केलेली प्रतिकृति. २ बाहु हा शरीराचा भाग. ३ स्त्रियांचें बाहुभूषणविशेष.

बाहुली स्त्री० १ लाकूड, माती, इ० ची स्त्रीची प्रतिकृति. २ लहान बाहुला. ३ नेत्रांत पदार्थांची आकृति ज्या भागावर उमटते तो भाग. ४ विहिरीच्या चाकदांड्याच्या आधाराचीं दोन उभीं लाकडें प्रत्येक; बुटली. ※ **कोणेकाला बाहुली** देणें त्याला कांहीं दुष्कर्म करावयाला चिथावणें.

बाहुलें न०१वस्त्र, लाकूड,माती,इ०ची केलेली प्रतिकृति. २ विहिरींतून पाणी काढण्याची दोरी ज्या चाकावरून फिरते त्या चाकाच्या आधाराचीं दोन लाकडें प्रत्येक. ※ **बाहुलेभोरपी पुं०** बाहुल्यांचे खेळ दाखविणारा तमासगीर. **बाहुलेभोरीप न०** बाहुल्यांचा खेळ.

बाहुल्य [**सं०**] **न०** १ विपुलपणा; वैपुल्य; समृद्धि. २ विविधता.

बाहुळा पु० बाहुमूलप्रदेश.

बाहेजमा [**सं०** बाह्य+**अ०** जमअ] **पु०** मागें ‘बाही’ मध्यें ‘ बाहीचा वसूल ’ पहा.

बाहेर [**सं०** बहिस्] **क्रि० वि०, श० यो० अ०** १ आंतल्या बाजूहून भिन्न किं० वेगळ्या ठिकाणीं; उ० घराच्या बाहेर, घराबाहेर. २ विशिष्ट देश किं० काळ किं० नियंत्रणा उल्लंघून; उ० माझ्या आज्ञेबाहेर, एका महिन्याच्या बाहेर, इ०. ३ (**स्त्रियांच्या भाषेंत**) पति, पतींना, इ०; उ० बाहेर कळवा म्ह० पतींना कळवा, इ०. ※ **बाहेर करणें** देऊन किं० विकून टाकणें; फेकून देणें; वाटेस लावणें. **बाहेर जाणें** शौचास किं० लघवीस जाणें. **बाहेर निघणें** (किं० **पडणें**) स्त्रीनें नवऱ्याच्या घरांतून उठून परपुरुषाशीं सहवास करूं लागणें. **बाहेर पडणें** १ उद्योगधंद्यासाठीं परगांवीं जाणें. २ हवा खाण्यासाठीं मोकळ्या हवेंत जाणें.३(कांहीं गुप्त गोष्ट)जाहीर होणें. **बाहेरचा पु०** महार, मांग, इ०. **बाहेरची स्त्री०** विटाळशी स्त्री. **बाहेरची पीडा स्त्री०** फिरंगी रोग; गरमी. **बाहेरची बाधा स्त्री०**

पिशाचाची बाधा (लागणें, होणें, असणें). **बाहेरकोट** पु० १ किल्ल्याच्या बाहेरचा प्रदेश. २ किल्ल्याच्या किं० गांवाच्या आंतल्या तटाबाहेरचा तट, किं० आंतल्या आणि बाहेरच्या तटांच्या दरम्यानचा प्रदेश. **बाहेरख्याल** पु० रांडबाजी. **बाहेरख्याली** वि० रांडबाज. **बाहेरगांव** न० मोठ्या शहराला लागून असलेला लहानसा गांव; वाडी;पाडा. **बाहेरचार** पु०रांडबाजी इ० घराबाहेरचे नाद किं० व्यसनें. **बाहेरबट्टा** पु० एका देशचीं नाणीं दुसऱ्या देशाच्या नाण्यांच्या रूपांत बदलतांना जें अधिक द्यावें लागतें तें. **बाहेरबाधा** स्त्री० पिशाचाची पीडा. **बाहेर भीतर** क्रि० वि० कोठें तरी; आंत किं० बाहेर; आसपास; आजूबाजूला; उ० तो घोडा कोठें बाहेरभीतर असेल त्याला शोधून आण. **बाहेरला, बाहेरचा, बाहेरील** वि० बाह्य प्रदेशींचा. **बाहेररव,बाहेरव ,बाहेरवसा, बाहेरवासा** पु० पिशाचाची बाधा. **बाहेरवार** न० घर, आवार, तट, इ० च्या बाहेरचा प्रदेश. **बाहेरवारा** क्रि० वि० घर, आवार, तट, इ० च्या बाहेरच्या बाजूस; बाहेर. **बाहेरील** वि० बाहेरच्या बाजूस असलेला. **बाहेरून** क्रि० वि० परठिकाणाहून.

बाह्य [सं०] वि० १ बाहेरचा. २ परका. ३ प्रतिलोम विवाहापासून जन्मलेला. ४ हलक्या जातीचा (महार, मांग, इ०). न० बाहेरचा प्रदेश. ❀ **बाह्यात्कारीं** क्रि० वि० बाहेरून; वरवर पाहून; दिसण्यांत (माल); उ० त्या दोघांची बाह्यात्कारीं मैत्री आहे पण अंतःकरणांत ते एकमेकांचा द्वेष करतात; उ० हे आंबे बाह्यात्कारीं पिकलेले दिसतात पण आंतून ते सडलेले आहेत. [अवयव.

बाह्या पु० तबल्याचा धूम वाजवावयाचा

बाव्हा पु० बाहवा हें झाड.

बाळ, बाळक मागें ' बाल, ' 'बालक' पहा. ❀ **बाळकडू** न० १लहान मुलांना घालावयाच्या औषधांची घुटी. २ लहानपणापासूनची सवय. ३ उपजतची गोडी, प्रवृत्ति, किं० गुण. **बाळखुंट** पु० केळीचा लहान खुंट. **बाळगळा** पु० लहान मुलांचा कंठ फुटावयाच्या अगोदरचा स्वर. **बाळगुंडा** पु० शक्ति वाढविण्यासाठीं किं० आजमावण्यासाठीं तालमींत जो वाटोळा धोंडा असतो तो. **बाळगोपाळ** पु० अ० व० १ गुराख्यांची पोरें.२ लहान मुलें.३दीन आणि आश्रयाला योग्य अशीं माणसें. **बाळटोळ** पु० लहान आकाराचा आणि हिरव्या रंगाचा टोळ किं० नाकतोडा. **बाळढोक** न० एक पक्षी; बगळा. **बाळदांत** पु० अ० व० मुलाला अगदीं प्रथम येतात जे दांत ते. **बाळदृष्टि** स्त्री० मुलांची दृष्टि,—जी दूरचा पदार्थ स्पष्ट पाहूं किं० निरखूं शकते. **बाळपणचें लोणी** न० प्रथमच व्यालेल्या म्हशीच्या दुधापासून काढलेलें लोणी. **बाळपरवेशी, बाळपरवरशी** स्त्री० १ लढाईंत मेलेल्या लोकांच्या मुलांच्या संगोपनार्थ सरकारनें करून दिलेली नेमणूक. २ बाळपणासूनचा मित्र, नोकर, आश्रित, इ० चा जो आपणाशीं संबंध तो. ३ त्या संबंधाचा जो मित्र, नोकर, आश्रित, इ० तो. **बाळपाठ** पु० लहानपणीं मिळालेलें किं० मिळविलेलें ज्ञान किं० माहिती. **बाळफूट** न० लहान आणि कोंवळें आंब्याचें फळ. **बाळफोक** पु० तरुण मुलगा; बच्च्या; लहान वयाचा किं० अप्रौढ मुलगा. **बाळबद, बाळबोध** वि० १ मागें 'बालबोध' पहा. २ सरळ वर्तनाचा; ज्याला छाकटेगिरी ठाऊक नाहीं असा.३साधें; ज्यांत डावपेच नाहींत असें (भाषण, वर्तन). ४ ज्यांत आलीकडचे ढंग शिरले नाहींत असें (कुटुंब, घर, घराणें). **बाळबेल** न० बेलाचें कोंवळें फळ; कोंवळें बेलफळ. **बाळब्रह्मचारी, बाळभाषा, बाळमित्र** मागें 'बाल'मध्यें पहा. **बाळभिकारी** पु० जन्मदरिद्री; जन्मापासून जो दरिद्री तो. ह्याच्या उलट ' गर्भश्रीमंत. ' **बाळभूक** स्त्री० घटके घटकेस खाण्याची इच्छा व्हावी अशी जी मुलांना भूक असते ती. **बाळभोग** पु० १प्रातःकाळीं देवांची पूजा करून जो अल्प पदार्थांचा नैवेद्य दाखवितात तो.२लहान मुलांना सकाळीं खावयास देणें हा परिपाठ किं० जें दिलें तें. २ घाईघाईनें केलेला थोडासा फराळ (करणें). **बाळमायणी** स्त्री० गाडीच्या चाकाच्या तुंब्याची आंतल्या बाजूची विडी. **बाळमुकी** स्त्री० चिवडा इ० खातांना वानगी

म्हणून जो एकादा घास राखून ठेवितात व जो न ठेवल्यास दंड म्हणून सहल घावी लागते तो घास. **बाळमुंजा पु०** ज्याचें लग्नाचें वय उलटून गेलें असून ज्याचें लग्न झालें नाहीं आणि जो ब्रह्मचारी स्थितींतच आहे असा ब्राह्मण. **बाळरंडा, बाळरांड, बाळविधवा स्त्री०** ऋतुप्राप्तीच्या पूर्वी जिचा नवरा मेला आहे अशी स्त्री. **बाळराजा पु०** चंचळ मुलगा (प्रेमाचा शब्द). **बाळवतें न० १** तान्ह्या मुलाला ज्या वस्त्रांत लपेटतात तीं वस्त्रें. २ मुलाचीं अंगडीं टोपडीं इ० समुच्चयानें. ३ बाळंतिणीचीं चिरगुटें. **बाळवांगी स्त्री०** वेल्वांगी. **बाळवाटी स्त्री०** १ भोजनाला उशीर व्हावयाचा असतां जो अल्प उपहार करतात तो. २ कोणत्याही वेळचा अल्प उपाहार (झोकणें, खाणें). **बाळशिरें न०** गरिब स्थितींतील स्त्री बाळंत झाली असतां तिच्या तान्ह्याला धर्मार्थ दूध नियमानें घालण्याचा रतीब आणि ह्या दुधासाठीं दिलेली वाटी. **बाळसंतोष पु०** भिकाऱ्यांचा एक वर्ग किं० त्या वर्गातील एक भिकारी. **उघडाबोडका बाळसंतोष पु०**दरिद्री असून ज्याला कोणी मागचीं आणि पुढचीं नातलग माणसें नाहींत असा मनुष्य. **बाळसरस्वती स्त्री०** लहानपणापासूनच ज्याला प्रौढ वयांत येणारी बुद्धि आहे असा मुलगा. **बाळसवत स्त्री०** स्त्री (रागांत किं० निंदेंत). **बाळस्वार पु०** लहानपणापासून ज्याला घोड्यावर बसण्याची सवय आहे असा. **बाळहिरडा, बाळहरडा पु०, बाळहरडी, बाळहिरडी स्त्री०** हिरड्याची एक जात. **चांभार हिरडा पु०** ही दुसरी जात. **बाळांबा पु०** कोंवळा आंबा.

बाळका [**म०** बाळगणें] **पु०** गोसाव्यानें आपल्या जवळ बाळगून तयार केलेला शिष्य.

बाळगणा [**म०** बाळगणें] **पु०** मुलें, गुरेंढोरें, ह्यांच्यावर देखरेख करणारा. ❀ **बाळगणावळ स्त्री०** अशी देखरेख किं० अशा देखरेखीबद्दलचें वेतन.

बाळगणें स० क्रि० १ (मूल, पशु, इ०)खाऊं पिऊं घालून पोसणें किं० संभाळणें. २ आपल्या संग्रहास ठेवणें; आपल्या वैभवार्थ किं० आवडीखातर किं०प्रेमानें आपल्या जवळ ठेवणें;उ०त्यानें मोटार बाळगिली आहे; उ० त्याणें दहा अनाथ पोरें बाळगिलीं आहेत.३ (गर्व, अभिमान,ताठा, इ० मनोविकार) अंतःकरणांत असूं देणें किं० राहूं देणें किं० ठेवणें किं० त्यांचा विषय होऊन राहणें; उ० तूं इतका अभिमान कां बाळगतोस? ४ ज्ञानाचा किं० अध्ययनाचा किं० परिपाठाचा विषय करणें; उ० तो विद्या बाळगून आहे.

बाळगील[**म०**बाळगणें] **स्त्री०**१ मुलें,गुरें, इ० संभाळण्याचें काम, किं० कष्ट.२ज्यांना संभाळावयाची जबाबदारी आपणावर आहे अशीं गुरें, मुलें,इ० समुच्चयानें.

बाळणें स० क्रि० (गिऱ्हाइकानें विकत घेतलेली जिन्नस) दुकानदारानें त्या गिऱ्हाइकाच्या हवालीं करणें.

बाळंत [**सं०** बालवती] **स्त्री०** नूतन प्रसूत झालेली स्त्री. ❀ **बाळंत होणें** (स्त्री) प्रसूत होणें. **बाळंत काढा पु०** बाळंतिणीस वैद्यकांत द्यावयाला सांगितलेला काढा. **बाळंत खोली स्त्री०** जींत बाळंतपणाच्या सोयी मुद्दाम केल्या आहेत अशी खोली. **बाळंतचुडा पु०** बाळंतिणीस प्रथम ज्या बांगड्या भरतात त्या. **बाळंतघर पु०** १ ज्या घरांत स्त्री प्रसूत झाली आहे तें घर,–सोहेर फिटेपर्यंत. २ बाळंतिणीची खोली. **बाळंतनिंब पु०** कडूलिंब. **बाळंतपण न०** १ बाळंतिणीची शुश्रूषा. २ बाळंतीण असण्याची स्थिति.३ घरांत प्रसूत स्त्री हिंडूं फिरूं लागण्याच्या अगोदरचा काळ.४ कोणत्याही कामाचा बखेडा, गुंतागुंत, खटपट, इ०. **बाळंतबोळ पु०** काळा बोळ. **बाळंतरोग पु०** कांहीं बाळंतिणींस जडतो तो क्षय रोग.**बाळंतविडा पु०**प्रसूत झालेल्या स्त्रीस तिच्या मैत्रिणी किं० नातलग चोळी,लुगडें, मुलास अंगडें, टोपडें, दागिने, इ० चा बाराव्या दिवशीं किं० त्यानंतर सोयीच्या वेळीं देतात तो नजराणा. **बाळंतशोप, बाळंतशेप स्त्री०**शोपेची एक जात. **बाळंतीण स्त्री०** प्रसूत झालेली स्त्री. **बाळतें, बाळवतें न०** बाळंत झालेल्या स्त्रीचें किं० तिच्या अर्भकाचे कपडे, आंथरूण पांघरूण, इ० समुच्चयानें.

बाळंदा (–धा) [**म०** बाळ] **पु०** १ मुलें, गुरेढोरें, इ० च्या संगोपनाची खटपट, किं० ह्या

खटपटींची जबाबदारी. २ मुलें बाळें, गुरेंढोरें,– ज्यांच्या जोपासनेची जबाबदारी आपल्या शिरावर आहे,–तीं समुच्चयानें. ३ मुलांचे दागिने समुच्चयानें.

बाळदी वि० गाय किं० बैल यांच्या कातड्याचा केलेला (पदार्थ,–जोडा, इ०). म्हसरी म्ह० म्हैस किं० रेडा यांच्या कातड्याचा केलेला.

बाळभोंक पु० बगळा हा पक्षी.

बाळसणें, बाळसावणें [**म०** बाळ] **अ० क्रि०** (मूल) लठ्ठ आणि गुटगुटीत होणें.

बाळसणें [**म०** बाळ] **अ० क्रि०** १ लेकुरवाळी होणें.२प्रथमच बाळंत होऊन माता झालेली स्त्री; उ० गोदे, तूं आतां बाळसलीस, तुला हा पोरकटपणा शोभत नाहीं. २ पोरकटपणा करणें. ३ (मूल) लठ्ठ आणि गुटगुटीत होणें.

बाळसें [**म०** बाळ] **न०**१मुलाच्या अंगाचा गुटगुटीतपणा (येणें, धरणें, घेणें). २ मुलाचें गुटगुटीत अंग. ३ लहानपणचा तजेला.

बाळा [**सं०** बाला] **स्त्री०** मुलगी.

बाळा वि० मागें ' बाहळा ' पहा.

बाळिंगा पु० १ लहान एडका.२ टक्कर मारावयाला शिकविलेला एडका. ३ लठ्ठ,जाडी,प्रचंड, खूप मोठा मुळा, धोंडा, तुळई, इ० पदार्थ.

बाळी स्त्री० १ स्त्रियांचें एक कर्णभूषणविशेष. २ मुलगी (कवितेंत). ॐ **बाळीबुगडी स्त्री० ए० व०** स्त्रियांचे दागिने समुच्चयानें.

बाळें [**म०** बाळ] **न०** म्हातारचळ.

बाळेणें अ० क्रि० १ म्हातारचळ ही विकृति पावणें. २ खत, पाणी, इ० फार किं० अतिशय मिळाल्यामुळें(वांगें,मिरची,इ०)फूल,फळ,धरण्यास नालायक किं०असमर्थ होणें.

बाळेभोंक न० बगळा हा पक्षी; बाळभोंक.

बाळ्या पु० पलायन, झुकांडी (देणें,हाकणें).

बिकट, बिगट [**सं०** विकट=क्रूर, भयंकर] **वि०** अवघड, कठिण, त्रासदायक,दुर्बोध,अजिंक्य (रस्ता, श्लोक, किल्ला, काम, प्रश्न, उदाहरण, स्थिति, प्रसंग, इ०).

बिकलम [**फा०** बद् (०नें)+कलम(लेखणी)] **न०** कारकुनाकडून लिहविलेल्या पत्रावर यजमान स्वताच्या हातानें जी चार अक्षरें लिहितो तीं किं० त्याची सही. **क्रि० वि०** दस्तूर खुद; माझ्या स्वताच्याच हातानें. २ कलमवार; तपशीलवार.

बिंग [**सं०** व्यंग] **न०** १ रहस्य. २ कोणेकाचा कांहीं बाबतींत जो उणेपणा तो;दोष;न्यून.

बिगट वर ' बिकट ' पहा.

बिगटणें अ० क्रि० चिकटणें; बिलगणें;अगदीं जवळ येणें; भिडणें.

बिगटी पुढें ' बिटकी ' पहा.

बिगट्या [**म०** बिगट] **वि०** हेकट; माथेफिरू.

बिगर [**फा०** वगैर्] **श० यो०अ०** शिवाय; वांचून. **टीप**,–याचा उपयोग शब्दापूर्वी होतो; उ० बिगरपरवाना म्ह० परवाना नसतां; उ० बिगर हुकूम म्ह० हुकमाशिवाय. [उणा.

बिंगा [**सं०** व्यंग] **वि०** सदोष; अपूर्ण;

बिगार [**हिं०** बेगार्] **स्त्री०** १ मोबदला किं० मजूरी न देतां सरकारनें किं० सरकारी अधिकाऱ्यानें करवून घेतलेलें काम किं० वाहवून घेतलेलें ओझें. २ असें फुकट काम करवून घेण्याचा परिपाठ किं० सरणी. २ कसेंबसें केलेलें काम;इच्छा नसतां केलेलें काम.ॐ**बिगारखातें न०** बिगारीनें करविलेल्या कामांचें सरकारचें खातें. **बिगारी पु०** १ वेठीला धरलेला माणूस. २ ओझें वाहाणारा.३मजूरीनें काम करणारा.**बैठेसे बिगार भली** रिकामें बसण्यापेक्षा दुसऱ्याचें काम केलेलें बरें. **बिगारीच्या घोड्याला तरवडाचा फोक** दुसऱ्याची वस्तु कोणीही काळजीपूर्वक वापरीत नाहीं.

बिंगें [**सं०** व्यंग] **न०** १ दोष; उणेपणा; ऐब; न्यून. २ कोणेकाचें कांहीं रहस्य. ३ प्रकट न करावयाची खुबी किं०युक्ति.

बिघड [**म०** बिघडणें] **पु०** नासाडी; व्हावें तसें न होणें; न व्हावें तसें होणें; सदोष होणें.

बिघडणें [**सं०** वि+घट्ट] **अ० क्रि०** १ नासणें. २ (कांहीं काम किं० कारागिरीचा पदार्थ इ०) व्हावा तसा न होणें किं० त्यांत कांहीं उणेपणा राहाणें किं० होणें. २ वैमनस्य किं०बबनाव उत्पन्न होणें. **टीप**,–ह्या अर्थीं भाव-

कर्तरि प्रयोग होतो; उ० त्याचें माझें बिघडलें आहे; उ० तुझें कोठें बिघडलें सांग. ३ (प्रकृति) नादुरुस्त होणें. **स० क्रि०** १ नासविणें. २ नादुरुस्त करणें. **टीप**,–ह्या दोन्ही अर्थी 'बिघडविणें' हाही शब्द योजण्यांत येतो.

बिघा [**सं०** विग्रह=पोटभाग] **पु०** जमीनीच्या मोजणीचें एक माप; वीस पांड किं० चारशें चौरस काठ्या इतकें क्षेत्रफळ. हें माप भिन्न प्रांतीं भिन्न आहे. ॐ **बिघाबिघोटी स्त्री०** एक बिघा; केवळ एक बिघा.

बिघावणी स्त्री० १ विघ्याच्या परिमाणांत जमीनीची मापणी. २ दर बिघ्याला अमुक सारा असा आकारलेला सारा.

बिचकटणें स० क्रि० १ (जमीन) वरवर उकरणें किं० खणणें. २ (पदार्थ) उकलणें किं० त्याचे भाग विसकळीत करणें.

बिचकणें अ० क्रि० १ अद्‌भुत किं० अनपेक्षित असें कांहीं अकस्मात् पाहिल्यानें किं० ऐकिल्यानें मन संभ्रांत होणें किं० क्षणमात्र कर्तव्यमूढ होणें; दचकणें. २ एकदम भयभीत होऊन स्तब्ध होणें. ३ भयानें कुंठित किं० स्तब्ध होणें.

बिचका, बिचक्या [**म०** बिचकणें] **वि०** बिचकण्याची खोडी आहे ज्याला असें (माणूस, जनावर).

बिचबा, बिचवा वि० तल्लख, हुशार, तरतरीत (मूल); चपळ आणि तुरतुर धावणारें (घोडें); जलद (लिहिणें, लिहिणारा, लेखणी).

बिचल [**हिं०; सं०** वि+चल्] **स्त्री०, पु०** १ माघार (खाणें); भयानें आलेला कुंठितपणा. २ बदल; फेरफार. ३ बिघाड. ४ अस्थिरपणा. **टीप**,–'चलबिचल' हा शब्द ह्या शेवटच्या तीन अर्थी अधिक प्रचलित आहे.

बिचलणें [**सं०** वि+चल्; **हिं०** बिचलना] **अ० क्रि०** १योग्य, सरळ, किं०सभ्य सरणी सोडून त्याच्या विरुद्ध सरणीस लागणें; बिघडणें. २ वचनभंग करणें; करार सोडून मागें हटणें. ३ चंचळ किं० भ्रमिष्ट होणें; भरकटणें.

बिचवा [**हिं०**] **पु०** १ एक प्रकारची कट्यार. २चरचर किं०भरभर चालणारी लेखणी(मुलांचा शब्द). ३ तल्लख आणि तरतरीत माणूस. ४ पायाच्या बोटांत घालावयाचें वळें.

बिचवा, बिचोबा [**फा०** बे (नाहीं)+चोबाह (खांब)] **पु०** ज्याला मध्यें खांब नाहीं असा डेरा किं० तंबू.

बिचवा वि० तल्लख, हुशार.

बिचारा [**फा०** बे (नाहीं)+चाराह् (इलाज)] **वि०** दीन; अनाथ; हतभाग्य; क्षीणोपाय; गरीब; बापडा.

बिछात, बिछाद [**हिं०** बिसात्] **स्त्री०** पुढें 'बिशात, "बिशाद' पहा.

बिछाइती, बिछायत, बिछायती [**हिं०** बिसाती] **वि०** ज्याचें दुकान नाहीं आणि जो चालतां चालतां किं० रस्त्यावरच बसून किरकोळ माल विकतो असा (व्यापारी) किं० त्याचा असा विकावयाचा (माल).

बिछाईत, बिछायत [**अ०** बिसात्] **स्त्री०** १बसावयासाठीं आंथरलेलें जाजम, सतरंजी, इ०. २ मालमत्ता.

बिछाना, बिछोना [**हिं०** बिछाना] **पु०** आंथरूण; निजावयासाठीं पसरलेली गादी, रुजामा, इ०.

बिछावणें [**हिं०** बिछाना] **स० क्रि०** १ (सतरंजी, जाजम, इ०)जमीनिवर पसरणें किं० आंथरणें. २ संपवून टाकणें. ३ चीत करणें; जमीनदोस्त करणें; पाडणें; पराभविणें.

बिजन [**फा०** बे (शिवाय)+जान्(प्राण)] **स्त्री०** कत्तल (करणें). **वि०** ठार; उ० इकडे गोरे लोक चोहों दरवाजांतून आंत शिरले ते बिजन करीत चालले. जितका पांच वर्षांवर व ऐंशीं वर्षांचे आंत पुरुष दिसत होता तितका गोळीनें अगर तरवारीनें मारीत चालले. ह्याप्रमाणें तनि दिवस बिजन झाली; उ० आपल्या सात बायकांस एक एकीस खोलींत बोलावून आणून तरवारीनें छाटून बिजन केल्या.

बिजली [**हिं०** बिज्‌ली; **सं०** विद्युत्] **स्त्री०** १ विद्युत. २ अकुटें दुकुटें हा जो पोरांचा खेळ त्यांतील एक पारिभाषिक शब्द. ३ लंगडशाई खेळांत घेतात जी चीप किं० खापरी ती किं० घेतात तो लाकडाचा तुकडा.

बिजवट [**सं०** बीज] **न०** १ पुरुषाचा प्रजोत्पादक धातु. २ उत्पत्तिकारण; उगम. ३ घोडा, बैल, इ०ची अवलाद.

बिजवड [**सं०** बीज] **न०** ज्याच्या बीजापासून जो झाला तो त्याचा बिजवड (आंबा, लता, इ० संबंधानें); उ० हा आंबा बनछोडाचा बिजवड आहे. **पु०** शेताची पुन्हा पेरणी; एक पीक कापून घेतल्यावर पुन्हा तेथेंच केलेलें शेत. **पु०**, **न०** पहिल्या पेरणीचा दुसऱ्या पेरणीस जो साधक किं० बाधक परिणाम होतो तो; उ० तागाचा बिजवड सर्वदा चांगला.

बिजवर [**म०** बिजा (दुसऱ्या खेपेस)+वर (नवरा मुलगा)] **पु०** दुसऱ्यांदा ज्याचें लग्न होत आहे तो.

बिजवरा, बिजोरा पु० मुलें आणि बायका यांचा डोकीस घालण्याचा एक दागिना.

बिजाईत [**म०** बिजा (दुसऱ्या खेपेस)] **वि०** दुसऱ्या खेपेस व्यालेली किं० दोन वेळां व्यालेली (गाय, म्हैस इ०). ‘ दुजाईत’ असाही ह्याच अर्थी शब्द आहे.

बिजागरी स्त्री०, बिजागर, बिजागरें न० दार, पेटी, इ० चें झांकण उघडतां लावतां येईल अशा रीतीनें तें जोडण्याची पट्टी.

बिजाळ [**सं०** बीज] **वि०** बीज पेरून केलेलें (झाड).

बिजेंबारें [**म०** बिजा+बारा] **न०** १ वधू आणि वर यांच्या राशींत संबंध बारा राशींचें अंतर असणें; द्विर्द्वादशक. २ हाडवैर; उभा दावा.

बिजोरा पु० वर ‘ बिजवरा ’ पहा.

बिट, बिट्टा [**सं०** विष्ठा=गू] **पु०** मलविसर्जनाची इच्छा नसतां किं० प्रयत्न केला नसतां गुदावाटें भीति, अतिकष्ट, इ० कारणामुळें बाहेर पडलेला मळ; उ० हें काम करतां करतां तुझा बिट्टा बाहेर पडेल, समजलास.

बिटका वि० अगदीं लहान आकाराचा (आंबा, पेरु, कणीस, इ०).

बिटका पु० वायुविकृतीमुळें हात, पाय, इ० मध्यें येतो तो पेटका किं० गोळा.

बिटकी [**सं०**विष्ठा] **स्त्री०** १ गू, शेण, इ० ची विसर्जिलेली लहानशी गोटी. २ लहान आंबा, पेरु, इ० फळ. ३ लहान कणीस. ४ (**लक्षणेनें**) ठेंगणा मनुष्य.

बिटारणें [**म०** बिटी; **सं०** विष्ठा] **अ० क्रि०** १ खोडकर किं० व्रात्य होणें (मुलें, गुरें). २ नासणें; बिघडणें; अव्यवस्थित होणें (जमीन, शेत, कारभार, इ०).

बिटी स्त्री० १ ‘ बिटकी ’ चे सर्व अर्थ पहा. २ सागरगोट्यांच्या खेळांत एक सागरगोटा वर उडवून जमीनीवरून एकदम उचलून घेतलेल्या दोन सागरगोट्यांची जोडी. ३ कागदाची दारू भरलेली सुरनळी. ४ [**नंदंभापंत**] शंभर.

बिटोरी स्त्री० १ जोंधळा, बाजरी, इ० चें अतिलहान किं० कोंवळें कणीस. २ दारूचा लहान तोटा किं० बाण. ३ लहान विटी (विटीदांडूच्या खेळांतील). ४ लहान किं० तोकडा पदार्थ. ५ गुदावाटे विसर्जिलेल्या मळाची गोटी.

बिट्टा पु० वर ‘ बिट ’ पहा.

बिट्टी स्त्री० वर ‘ बिटी ’ पहा.

बिंड पु०, स्त्री०, न० गवती छपराच्या कोपऱ्यांना गवताचा असतो तो जाडी थर (बांधणें).

बिंडकें [**म०** बिंडा] **न०** गवत, उपटलेलीं लहान लहान झाडें, काड्या, इ० चें जुडगें.

बिडतीं स्त्री० पंचाईतीची, पेचाची, किं० अडचणीची स्थिति; उ० पुढें वाघ, मागें अस्वल, अशा बिडतींत मी सांपडलों होतों.

बिडलवण, बिडलोण [**सं०** बिड+लवण] **न०** एक क्षारविशेष.

बिंडा पु० १ दोरी, सूत, इ०चें वेटोळें. २ गवत, काटक्या, इ०चा भारा. ३ खडक, जमिन, इ०वरचा उंचवटा. ४ डोंगराचा सुळका.

बिडार, बिढार न० पुढें ‘ बिऱ्हाड ’ पहा.

बिडी [**म०** बीड] **वि०** बिडाचा बनविलेला. पुढें ‘ बीड ’ पहा.

बिडी [**हिं०** बीडी] **स्त्री०** १ कैद्याच्या पायांत अडकावावयाची शृंखळा. २ गतीला प्रतिबंध करणारी अडचण; कोणत्याही प्रकारची अडचण किं० विघ्न.

बिडी स्त्री० तंबाखू भरलेली धूम्रपानार्थ केलेली टेंभुरणी इ०च्या पानांची नळी.

बिंडी स्त्री० मागें ‘ बिंड ’ पहा.

बिणणी, बिणणें पुढें ' वेणणी, ' ' वेणणें ' पहा.

बितणें [**हिं०** बेतना] **अ० क्रि०** १ जवळ येऊन ठेपणें; उ०लग्न उद्यावर बितलें आणि साहित्याला तर ठिकाण नाहीं, पंचाईत आली. २ (संकट, धोका, पेच, इ०) कोसळणें; उ० तो प्राणावर बितलें तरी खोटें बोलणार नाहीं. हा भावकर्तरि प्रयोग. ३ (लढाई, मारामारी, वाद) सुरूं होणें. ४ बिंबणें; उ० ह्या गुरूचा उपदेश शिष्यांच्या मनांत चांगला बिंततो.

बितपशील, बितफशील [**फा०** बह(सह) +तफ़शील (विस्तार)] **क्रि० वि०** तपशीलासह; बारीक सारीक बाबतींसह; सविस्तर; तपशीलवार.

बितैन, वितानबीत स्त्री०बंदाचे चार रकाने पाडून जी आडवी रेघ पहिल्या रकान्याच्या मध्यापासून तों थेट चवथ्या रकान्याच्या मध्यापर्यंत ओढलेली असते ती (कारकुनी शब्द).

बित्तम, बित्ताम [**सं०** इत्थंभूत; इत्थम्= ह्या प्रकारें] **वि०**१ तपशीलवार,साद्यंत(बातमी). २ अगदीं आणि खरी विश्वसनीय (बातमी). ३ गुप्त, रहस्यांतील (बातमी).

बिथर वि०चंचलपणाचें किं० धरसोडीचें किं० भरमसाट (भाषण, वर्तन).

बिथरणी [**म०** बिथरणें] **स्त्री०** १ अस्थिर किं० चंचल होणें. २ प्रतिपक्षाला मिळणें. ३ उलट जाणें.

बिथरणें [**हिं०** बिथरना] **अ० क्रि०** १ उलट पक्षाला जाऊन मिळणें. २ धरसोड करणें; चंचलपणा दाखविणें. ३ प्रतिकूल होणें. ४ वाईट फंदास लागणें. **स० क्रि०** १ बिघडविणें. २ भलत्याच नादास लावणें. ३ प्रतिपक्षाकडे खेचणें.

बिंद [**सं०** बिंदु] **पु०** १ थेंब.२पुरुषाचें वीर्य किं० वीर्याचा एक थेंब.

बिंदडी, बिंदली [**म०** बिंडा] **स्त्री०** १लहानसा गठ्ठा किं० गांठोडी.२गवत, काटक्या,इ०चा भारा किं० मोळी.

बिंदलें [**म०** बिंदु] **न०** १ लहान मुलांच्या हातांत घालावयाचा एक दागिना. २ लहान बिंदु. ३ अनुस्वाराचें किं० विसर्गाचें टिंब.

बिदवा पुं० १ कुंभाराच्या भट्टींतील विटा, कौलें, इ०ची धूळ. २ कोठलीही धूळ किं० माती.

बिदा [**अ०** विदाअ] **वि०** १ जावयाला परवानगी ज्याला देण्यांत आली आहे असा. २ घालविलेला(करणें).

बिदाई, बिदागी, बिदायकी, बिदा[**अ०** विदाअ] **स्त्री०** १ रवानगी, पाठविणें(करणें). २ कोणेकाची रवानगी करतांना त्याला देतात तें पारितोषिक. ३ हरदास, शास्त्री, पंडित, गवई, इ०ना देतात ती कामाबद्दलची बक्षिशी किं० पारितोषिक.

बिदी, बीद स्त्री० १ दोन समान्तर अशा कुंपणांतून असलेली अरुंद पायवाट. २अरुंद पायवाट (सामान्यतः).

बिंदी स्त्री० स्त्रियांचा एक कपाळावर घालावयाचा दागिना.

बिंदु [**सं०**] **पु०** १ थेंब; ठिपका. २ खूण; चिन्ह. ३ शून्य. ४ अक्षराच्या डोक्यावर देतात तो अनुस्वार. ५ (**भूमितींत**) ज्याला केवळ अस्तित्व आहे पण परिमाण नाहीं अशी वस्तु. ६ केंद्र. ७ (**नाटकांत**) गौण प्रसंगाचा आकस्मिक विकास. ꙮ **बिंदुवासर पु०**गर्भधारणाचा दिवस. **बिंदुकली स्त्री०, बिंदुकळें न०** १लहान बिंदु. २ लहान वर्तुळ किं० कुंडली. **बिंदुकलें न०** एका जातीचें बांडगूळ. **बिंदूचा सिंधु करणें** १ कांहीं हकीगत फुगवून सांगणें. २ अत्यल्प किं० क्षुल्लक गोष्टीला मोठें किं०भयंकर रूप देणें; राईचा पर्वत करणें.

बिंदें [**सं०** बिंदु] **न०** पुरुषाचें वीर्य किं० वीर्याचा थेंब.

बिंधी स्त्री० वर ' बिदी ' पहा.

बिन [**सं०** विना] **श० यो० अ०**(शब्दारंभीं किं० मागून येणारें) शिवाय, वांचून; नसतां; उ०तो बिन अपराध शिक्षेला पात्र झाला; उ० मी रुपये घेतल्या बिन येथून हालणार नाहीं. **टीप,**–हा शब्द पूर्वपद असून जे सामासिक शब्द होतात ते विशेषणांच्या, क्रियाविशेषणांच्या, किं० नामांच्याही कोटींत पडतात. असे कांहीं सामासिक शब्द ह्याच प्रतीकांत आम्ही खालीं दिले आहेत.**बिनधोक,बिनघोर वि०**काळजी नसलेला;

निश्चित. **बिनतोड** वि० १ ज्यावर उपाय किं० इलाज चालत नाहीं असा. २ ज्यावर उत्तर देतां येत नाहीं असें (विधान, प्रमाण). ३ सर्वोत्कृष्ट. **बिनधोक, बिनघोर** क्रि० वि० भीति, शंका, किं० कचर न बाळगतां. **बिनदिक्कत** क्रि० वि० १ न कचरतां. २ मुरवत न ठेवतां. **बिनआफत** क्रि० वि० कांहीं अडचण किं० हरकत न आल्यास. **बिनकदली, बिनकदेली** स्त्री० दुफाशी खेळांत जुगल्यानंतर कदली पडावी ती न पडल्यानें झालेला पराजय. मागें ' कदली ' पहा. वि० ज्याला कदली पडली नाहीं असा (खेळणारा). **बिनकलीवर येणें** तिरगीमिरगीवर येणें; भांडणास उद्युक्त होणें; चिरडीस जाणें. **बिनतकरार** क्रि० वि० तकरार न करतां; मुकाट्यानें. **बिनमोजवी** वि० १ बेजबाबदार. २ ज्याला मेळ नाहीं असा. ३ सरकारांत न नोंदलेलें (घर, शेत). **बिनखर्च** क्रि० वि० अंगावर खर्च न पडतां. वि० फुकट. **बिनचूक** वि० ज्यांत चुकी नाहीं असा. क्रि० वि० निश्चितपणें. **बिनपोटीं** क्रि० वि० पोटाला न मिळतां (नोकरी करणें). **बिनमजुरी** वि० १ साधी (कैद). २ पगार न घेतां केलेली (नोकरी, काम). **बिनभाड्याचें घर** न० तुरुंग; कैदखाना.

बिन [अ० इब्न्=पुत्र] पु० (अमक्याचा) पुत्र; उ० अनंतभट्ट बिन यज्ञेश्वरभट्ट पाळंदे म्ह० यज्ञेश्वरभट्टाचा पुत्र अनंतभट्ट.

बिनगा पु० तांबें इ० धातूंची आकारविशेषाची कळशी.

बिनसणें, बिनासणें [सं० वि+नश्] अ० क्रि० १ नासणें; बिघडणें; खराब होणें (माणूस, पशु, योजना, पदार्थ, स्थिति). २ दुर्वर्तनी होणें. ३ वेबनाव होणें; उ० त्याचें माझ्याशीं बिनसलें आहे; उ० तुझें कोठें बिनसलें तें मला कळत नाहीं. हे भावकर्तरि प्रयोग समजावयाला हरकत नाहीं. ३ निष्फळ होणें किं० ठरणें; व्यर्थ होणें.

बिनहुली स्त्री० फाशांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

बिना पु० प्रकरणाचा मथाळा.

बिनाखी [फा० बीनायी] स्त्री० १ काळजीपूर्वक आणि खोल तपासणी; सर्व बाजूंनीं केलेली चौकशी (करणें). २ शंका न राहील अशी एकाद्या विषयाची परीक्षा (करणें). ३ किंमत, खर्च, इ० चा केलेला आजमास किं० अंदाज.

बिनी [फा० बीनी=नाक] स्त्री० १ सैन्याची आघाडी. २ पागोट्याचा पुढचा भाग,—केळें. ३ दार, खिडकी, इ० च्या छावणीचा पुढें आलेला भाग. ४ दार, खिडकी, इ० च्या दोन पानांतील फट बुझविण्यासाठीं एका पानाला जी उभी पट्टी ठोकतात ती. ५ लेखाचा विषय,—कागदाच्या समासावर लिहिलेला. ॐ **बिनीचा** वि० १ आघाडीचा. २ म्होरक्या. ३ सर्वांत श्रेष्ठ. ४ अट्टल (सोदा, भामटा, चोर). **बिनीदार** वि० झोकदार किं० उत्तम आहे बिनी ज्याची असें (पागोटें). **बिनीवाला** पु० सैन्याच्या आघाडीवरचा अधिकारी किं० अमलदार.

बिफरणें [हिं० बिफरना] अ० क्रि० मागें ' बिथरणें ' पहा.

बिफळ [हिं० भेफल्] न० एक फळ.

बिंब [सं०] न० १ सूर्य, चंद्र, इ० चा वर्तुळाकार किं० त्यांचें मंडल. २ प्रतिबिंब. ३ मूर्ति; प्रतिमा. ४ तोंडलें हें फळ; उ० बिंबोष्ठी म्ह० तोंडल्या सारख्या ओठाची स्त्री. ५ आरसा, पाणी, इ० च्या पृष्टभागावर ज्याचें रूप दिसतें तो पदार्थ; आणि तें दिसलेलें रूप तें प्रतिबिंब. ६ (**साहित्य**) कोणताही पदार्थ,—त्याच्या प्रतिकृतीच्या अपेक्षेनें. प्रतिकृतीला ' प्रतिबिंब ' म्हणतात; उ० दृष्टान्त हा अलंकार बिंबप्रतिबिंबभावावर आधारलेला असतो. ७ कांहीं विशिष्ट काम करण्याची योग्यता किं० लायकी नसतां किं० विशिष्ट शास्त्रादि विषय अवगत नसतां जो मनुष्य त्या कामीं किं० त्या विषयाच्या वादाच्या प्रसंगीं केवळ शोभेसाठीं पुढाऱ्याच्या पदीं स्थापिला जातो तो; उ० सरदार लोक जाऊन लढाई देतील पण राजाचा पुत्र उगीच बिंब म्हणून बरोबर असावा. ८ भातशेतांत आणि दलदलीच्या जागीं उगवणारें एक प्रकारचें त्रिधारी गवत. स्त्री० नागरमोथा.

बिबट [म० बिब्बा] न० १ बिब्बा ह्या फळाचा देठ. २· बिब्ब्याच्या आकाराचा आणि वर्णाचा ठिपका (बिबळ्या वाघाच्या अंगावरील).

ॐ **बिबटा** वि० असे ठिपके ज्याच्या अंगावर आहेत असा (वाघ इ० प्राणी). **बिबटें** न० १ बिब्ब्याचें बीज.२बिब्ब्याच्या आकाराचा ठिपका.

बिंबणें [सं० बिंब] अ० क्रि० १ (कांहीं गोष्ट) मनांत ठसणें. २ भिनणें. [फळ.

बिंबला स्त्री० एक झाड. **बिंबलें** न० त्याचें

बिबवा, बिब्बा [सं० भल्लातक] पु० एक फळ. ह्याचें तेल अंगाला लागलें असतां फोड किं० पुरळ उठतो. ह्या तेलानें चिरगुटावरें परीट खुणा करतात. ॐ **कांहीं कामांत बिब्बा घालणें** त्याला हरकत आणणें; तें कुंठित करणें. **बिबवी** स्त्री० बिब्ब्याचें झाड. **बिब्बेल** न० बिब्ब्याचें तेल.

बिबळा [म० बिब्बा] वि० बिब्ब्याच्या आकाराचा (ठिपका).ॐ **बिबळा वाघ,बिब्ळयावाघ,बिब्ळ्यावाघ** पु०काळे ठिपके ज्याच्या अंगावर आहेत असा एका जातीचा वाघ.

बिंबित [सं०] वि० बिंबलेलें; ठसलेलें.

बिबी, बिब्बी स्त्री० बिब्ब्याचें झाड.

बिबी [हिं० बीबी] स्त्री० मुसलमान जातीची मोठ्या दर्जाची स्त्री. [तेल.

बिबेल [म० बिब्बा+तेल] न० बिब्ब्याचें

बिबोटी [म० बिब्बा] स्त्री० बिब्याच्या फळाचा वाळविलेला देठ. [पहा.

बिब्भा, बिब्भी वर ' बिब्बा, '' बिब्बी '

बिभास पु० (संगीतांत) एक रागविशेष.

बिभीतक [सं०] पु० बिब्बा किं० त्याचें झाड. [भस्म.

बिभूत [सं० विभूति] स्त्री० राख; रक्षा;

बिमा, बिमेदार पुढें ' विमा, '' विमेदार' पहा. [सापाची जात.

बिमुखी [सं० द्वि+मुख] स्त्री० दुतोंड्या

बियंबी [म० बी+आंबा] स्त्री० कोंवळ्या आंब्याच्या कैऱ्या काढून त्या खारवून ठेविलेल्या असतात त्या प्रत्येक. ' बेहंबी ' असाही शब्द आहे.

बियवणी [म० बी+पाणी] न० पिकलेले रातांबे फोडून त्यांतील गिराचें करतात तें सार.

बियांचा, ब्यांचा [म० बी] वि० १ पेरावयासाठीं मुद्दाम चांगलीं म्हणून बाजूस काढून ठेविलेलीं (बीजें). २ शुद्ध; निकोप; निर्दोष. ३ इरसाल, पक्का, अट्टल (चोर, भामटा).

बियाणें न०, **बियावळ** स्त्री०[म०बी]मुद्दाम चांगली म्हणून पेरावयासाठीं बाजूस ठेविलेलीं बीजें.ॐ**बियाण्यास नसणें** मुळींच उरलेला नसणें, संपून गेलेला असणें (कांहीं पदार्थ).

बिरकांडी स्त्री० कोष्टयाचा धोटा.

बिरकुंड (-डें), बिरखुंड (-डें) न० बोरू, जोंधळ्याचें ताट, इ० चें जें भेंड तें.

बिरकूल न०१वांबूच्या पातीचें लहान तोंडाचें आणि मोठ्या पोटाचें बनविलेलें पात्र.२ताठ किं० उभे केश, तंतु, किं० केसरें ह्यांचा समूह. पुढें ' बुरकूल ' पहा.

बिरखंड (-डें) न०,बिरखंडा पु०, बिरकंड (-डें), बिरखुंड (-डें) न० १ जोंधळा,बाजरी, बोरू, इ० चें भेंड. २ दाणे काढून घेतल्यावर राहातें तें मका इ० चें कणीस.

बिरखडणें स० क्रि० १ रेघोट्या ओढून भिंत, कागद, इ०)चिताड करणें. २ अस्पष्ट किं० वेड्या वाकड्या अक्षरांनीं (कागदावर) लिहिणें.

बिरखडी, बिरखुडी स्त्री० कागद, (भिंत, इ० वर निष्काळजीपणानें लिहिलेला लेख, काढलेले चित्र, इ०.

बिरखुंड (-डें) वर ' बिरखंड ' पहा.

बिरजुमाल क्रि० वि० समाइकींत (असलेलें शेत, जमीन, वस्त्रपात्र, इ०).

बिरजुमाली वि० समाइकीचें (शेत, वस्त्रपात्र, इ०).

बिरडी (-ढी) स्त्री० पाण्यांत भिजत घातल्यानें ज्यांना मोड आले आहेत असे पावटा इ० द्विदल धान्यांचे दाणे जे ते प्रत्येक.

बिरडें (-ढें) न० १ अंगरखा, सदरा, इ० अंगाशीं यथास्थित बसविण्यासाठीं जी गुंडी वळशांत घालण्यासाठीं असते ती. २ हा वळसा. ३ गुंडी आणि वळसा ही जोडी. ४ मोड आलेले जे पावटे इ० त्यांची उसळ.

बिरद, बिरदाईत, बिरदावळी वर 'बिरुद' मध्यें पहा.

बिरबल पु० १ अकबराचा एक मंत्री. २ कोणीही धूर्त, हुशार, आणि बुद्धिवान माणूस.

बिरबिटी स्त्री० ज्याचा गोळा करतां येत नाहीं पण जें साधरणपणें घट्ट आहे असें शेण, लोणी, कालविलेलें पीठ,इ०.

बिराबिरीत वि० ज्याचा गोळा बनवितां येण्याजोगा नाहीं असें (शेण, लोणी, इ०).

बिरंबुटा, बिरंबोटा, बिरमुटा, बिरमोटा पु० ज्याचे दाणे काढून घेतले आहेत असें मक्याचें कणीस. [कांदा.

बिरंबोळा पु० एक वन्य वेल किं० त्याचा

बिरवण स्त्री० कशीदा, लाकूड, दगड,भांडें, इ० वरचें कोरकाम किं० नक्षीकाम.

बिरविणें स० क्रि० कशीदानें (वस्त्र), कोरकामानें (लाकूड, भांडें, इ०) शोभायुक्त करणें.

बिरसुडणें स० क्रि० (फांदीचीं) पानें तोडून किं० ओरवाडून काढणें.

बिराणा पु० बंदुकीची दारू इ० चा कण.

बिराणा [हिं०] वि० परकी; आपला नव्हे तो; आपल्या देशाचा किं० गांवचा नव्हे असा.

बिरादर [फा०] पु० भाऊ (सनदा, रोखे, इ० मध्यें). ꠸ **बिरादरभाऊ पु०** जातभाई; नातलग; भाऊबंद; सगा सोयरा.

बिरामत [फा० बिरामद्] **स्त्री०** खोटा आरोप किं० तोहमत किं० आळ (घालणें, येणें, आणणें).

बिरी स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण.

बिरुद, बिरीद [सं० बिरुद=स्तुतिस्तोत्र] **न०** १ अंगीं असलेल्या विद्या,कला,इ०च्या बाबतींत जो कोणी बाणा बाळगतो तो त्याचें ज्ञापक म्हणून हात,दंड, इ० ला बांधितो तो दोरा. २ बाणा; अंगीं असलेल्या गुण, विद्या, इ० बद्दल जो त्या माणसाला अभिमान वाटतो तो (बाळगणें). ꠸ **बिरुदावली स्त्री०** १ प्रथमार्थाच्या बिरुदांची माळ. २ कोणेकाच्या स्तुतीचीं गाणीं किं० पदें किं० पद्यें. ३ कोणी थुंकीचाट्यानें कोणा समर्थाची केलेली अवास्तव स्तुति (निंदेंत). **बिरुदास जागणें, बिरुद पाळणें** (किं० **राखणें**) एकाद्या चांगल्या गुणावरून मिळालेलें जें यश तें न जाऊं देणें किं०त्या संबंधाची आपली लायखी शाबूत ठेवणें. **बिरुद पाळणें** (किं० **राखणें** किं० **सत्य करणें**) संपादिलेलें यश अहित आहे असें कृतीनें किं० वर्तनानें सिद्ध करून दाखविणें. **टीप,**–१ ‘ ब्रीद ’ हा ‘बिरुद’ याचा अपभ्रंश आहे. वरील सर्व वाक्प्रचारांत ‘ ब्रीद ’ हाही शब्द योजण्यांत येतो. **टीप,**–२ अशिक्षित लोक बिरद, बिरीद, बिरदावली, अशीं रूपें योजतात. **बिरदाईत वि०** १ विशिष्ट विद्या, गुण, इ० मध्यें श्रेष्ठ (माणूस). २ कांहीं श्रेष्ठ विद्यादि गुणांबद्दल जो कोणी कांहीं चिन्ह अंगावर धारण करतो तो.

बिरोबा [सं० भैरव] **पु०** भैरव; खंडोबा.

बिऱ्हाड न० १ भाड्यानें राहाणें (करणें). २ रहावयासाठीं भाड्यानें घेतलेली जागा(घेणें). ३ अल्पकाळ स्थलविशेषीं राहाणें (करणें). ४ अल्पकाळ राहाण्यासाठीं भाड्यानें किं० फुकट घेतलेली जागा. ५ वसति; वास्तव्य. ६ बिऱ्हाडांतील सामानसुमान. ७ संभाषणांत मुद्दाम गुप्त ठेविलेली कांहीं गोष्ट (राखणें,ठेवणें).꠸**बिऱ्हाडानें राहाणें** भाड्याचें घर घेऊन राहाणें. **बिऱ्हाडकरी (–रू), बिऱ्हाडू पु०** जो एकाद्या घराचा मालक नाहीं पण मालकाला भाडें देऊन तेथें राहातो तो. **बिऱ्हाड करणें** बायकोमुलें, सामानसुमान, इ० जुळवून जेवणखाण, निजणें, बसणें, इ० स्थळविशेषीं करणें. २ मुक्काम किं० वसति करणें. ३ एकाद्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्या घरीं किं० त्याच्या शरीरांत ठाणें करून राहाणें; उ० कफानें मोरोपंताच्या छातींत बिऱ्हाड केलें आहे; उ० हा कांटा माझ्या पायांत बिऱ्हाड करणार असें दिसतें. **बिऱ्हाड आटोपणें** १ निघून जाणें. २ मरणें. **बिऱ्हाड संगातींच असणें, विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर** मागें कांहीं लटांबर नसणें; सडेसोट असणें.

बिल [सं०]न० भोक; उंदीर, घूस, इ० चें राहाण्याचें घर. ꠸ **बिलेशय पु०** १ उंदीर. २ सर्प.

बिलकूल [अ०] क्रि० वि० १ सर्वथैव; पूर्णपणें; अगदीं. २ मुळींच (नाहीं). **टीप,**– ‘ बिलकूल ’ हा शब्द मराठींत दुसऱ्या अर्थानेंच योजतात. आमचें ‘ मराठी भाषेचें वाक्प्रचार, म्हणी इ० ’ हें पुस्तक ले० १० पहा.

बिलग [**सं०** विलग्न; **हिं०** बिलग] **वि०** १ वेगळा; पृथक असलेला. २ ज्यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं असें (शब्द,वाक्य, इ०).

बिलगणी [**म०** बिलगणें] **स्त्री०** १ चिकटणें; भिडणें. २ कामांत चिकाटी. ३ मारामारीसाठीं कोणेकाच्या अंगाला भिडणें.

बिलगणें [**हिं०**बिलगना] **अ० क्रि०** चिकटणें; अगदीं जवळ जाणें; भिडणें; मारामारीसाठीं कोणेकाच्या अंगाला झोंबणें; कोणेकाच्या अगदीं जवळ बसणें.

बिलंद, बिलंदर, बिलंदी [**फा०** बुलंद= उंच] **वि०** १ उंच. २ श्रेष्ठ; अग्रगण्य. ३ अट्टल; पक्का (लुच्चा, भामटा, चोर). **टीप,**–दुसऱ्या अर्थीं मराठींत प्रयोग आहे. बखरींत उंच, श्रेष्ठ, अशा अर्थानें हा शब्द योजला जातो;उ० अशीरगड किल्ला बिलंद आहे; उ० या जागीं बिलंदी किल्ला बांधून वसवावा ; उ० कोट बिलंद गची रुंद; उ० किल्ला फार बिलंदर आहे.

बिलंदी [**फा०**]**स्त्री०** गाण्यांतील ताल.

बिलबिला, बिलबिलीत वि० १ फार पिकल्यामुळें अति मऊ असा (आंबा, गर्क, इ०). २ कष्टाच्या कामामुळें निर्वीर्य झालेलें किं०दमलेलें (माणूस, जनावर).

बिलंबी स्त्री० एक वृक्षविशेष.

बिलवर, बिलवरी पुढें ' बिलोर,' 'बिलोरी' पहा. [झाड.

बिलवा, भिलावा पु०बिब्बा किं०बिब्ब्याचें

बिल मत स्त्री० खोटा आरोप; आळ; तोहमत (आणणें, येणें, घालणें).

बिलायत, बिलायती पुढें ' विलायत,' ' विलायती ' पहा. [एक राग.

बिलावर, बिलावल पु,स्त्री० (**संगीतांत**)

बिलिंद, बिलिंदी, बिलिंदर मागें ' बिलंद ' ' बिलंदी,' ' बिलंदर ' पहा.

बिलोर, बिलवर [**फा०**] **न०** उंची काच. ॐ **बिलोरी, बिलवरी वि०** उंची काचेचा (पदार्थ,–हंडी, झुंबर, बांगडी, इ०).

बिलोरी धोतरा पु० धोतऱ्याची एक जात.

बिल्याण पु० पैलूदार आणि जाडी हिरा.

बिल्व [**सं०**] **पु०** बेलाचें झाड,–जें शिवाला प्रिय आहे. **न०** ह्या झाडाचें फळ; बिल्वफळ.

बिवड [**म०** बी] **पु०** १ अमक्याच्या बीजापासून किं० रोप्यापासून किं० वीर्यापासून उत्पन्न झालेला माणूस, प्राणी, झाड,इ०. २ पूर्वीं विशिष्ट ठिकाणीं केलेलें पीक; उ० तागाचा बिवड सर्व मालास चांगला. **स्त्री०** पूर्वीच्या सालचें पीक.

बिवलकर पु० मोडी साधें आणि गोंडस वळण रूढ करणारा एक गृहस्थ. ॐ **बिवलकरी वि०** १बिवलकरानें रूढ केलेलें(अक्षर,वळण,किंवा त्या वळणाचा कित्ता).२ साधी, सरळ प्रकारची (वर्तणूक, आचार, इ०).

बिंवळा पु० १ एक जंगली वृक्ष. २ केळ इ०चा वाढावयासाठीं पुरलेला खुंट किं० खुंटा. ३ नागवेलीचें वेटोळें,–रुजावयासाठीं जमीनींत पुरलेलें. ४ वियाण्यासाठीं राखून ठेविलेल्या बीजांची भातेण इ० मध्यें बांधलेली मुठी. ॐ **कोणेकाचा बिवळा उतरणें** त्याचें फुगलेलें पोट ओसरणें किं० दबणें.

बिशात (–द), बिसात (–द) [**हिं०**] **स्त्री०** १ संपत्ति; जिंदगी; मालमत्ता; उ० वडिलांच्या वेळची जी काय बिसात होती ती आम्ही पांच भावांनीं वाटून घेतली. २ किंमत; महत्त्व; उ० एका काचेच्या गोटीची ती काय बिशाद आणि तिच्यासाठीं तुम्हीं मारामारी करतां ? धिक् तुम्हाला ! उ० पन्नास रुपड्यांच्या नोकरीची काय बिशाद ? मी ती हावी तेव्हां मिळवीन ! ३ सामर्थ्य; पराक्रम; उ० त्याची काय बिशाद मला शिव्या देण्याला ?

बिशी स्त्री० १ होईल तो खर्च सर्वांनीं सारखा वाटून घ्यावा अशा शर्तीवर एकत्र भोजन करणाऱ्यांची मंडळी. २ खाणावळ. ३ वर्गणी जमविणें किं० वर्गणीची रक्कम (करणें).

बिस [**सं०**] **न०** १ कमलतंतु; भिसें. २ कमळाचा देठ. ॐ **बिसिनी स्त्री०** कमळाची वेली. [वनस्पती.

बिसखपरा [**हिं०**] **पु०** एक औषधी

बिसनी [**सं०** व्यसन; **म०** व्यसनी] **पु०** १ वेश्येकडे उपभागोर्थ गेलेला किं० आलेला जो पुरुष तो त्या वेळचा बिसनी. २ व्यभिचारी; परस्त्रीलंपट. ३ लोकांच्या पैशानें चहा, तंबाखू, दारू, विडी, इ० व्यसनें भागविणारा निर्लज्ज

माणूस; अशा माणसाला 'बिसर्नबिखर्ची' हाही शब्द लाविला जातो.

बिसात (-द्) वर ' बिशात (-द) ' पहा.

बिस्तरवार [**सं०** बृहस्पतिवार] **पु०** आठवड्याचा गुरुवार हा दिवस.

बिस्तरा [**फा०** बिस्तर्] **पु०** आंथरावयाचा पदार्थ,-सतरंजी, गादी, इ०.

बिहाग पु० (**संगीतांत**) एक राग.

बिहांबा पु०, बिहांबी स्त्री० [**म०** बी+आंबा] कोंवळ्या आंब्याच्या कैऱ्या काढून खारांत घालून ठेवितात त्या प्रत्येक; ह्या लोणच्याप्रमाणें तोंडीं लावावयाला घेतात.

बीं [**हिं०** भी] **क्रि० वि०** सुद्धां; देखील. अशिक्षितांचा हा शब्द आहे.

बी [**सं०** बीज] **स्त्री०** १ बीज; फळाच्या आंतील जो कठिनांश तो. २ अंडकोशांतील ज्या दोन गोट्या त्या प्रत्येक. ३ गहूं इ० चा कठिण किं० टणक भाग. ४ लसणीची पाकळी. ❀ **बियांचा, ब्यांचा वि०** १ पेरावयासाठीं किं० रुजत घालावयासाठीं बाजूस काढून ठेविलेल्या (बिया किं० बीजें). २ उत्तम बीजाचा किं० वीर्याचा किं० अवलादीचा. ३ अट्टल, पक्का (चोर, भामटा). ४ ज्यांत बिया फार आहेत असा (पेरू इ०). **बी मोडणें** समूळ उच्छेदणें. **बी रुजणें** परिणामकारक होणें; यशस्वी होणें; फलद्रूप होण्याच्या पंथास लागणें किं० लागलेलें असणें.

बीं [**सं०** बीज] **न०** १ बीज. २ बीजें समुच्चयानें. ३ लावावयासाठीं किं० पेरावयासाठीं योजावयाचीं बीजें, कंद, शाखा, मुळी, पान, इ०. ४ राजगिरा, माठ, तुळस, इ० च्या कणसांस किं० मंजुळ्यांस येतो तो बीजसमुदाय. ❀ **बींबियाणें, बींवेणें, बींब्याणें, बींभरण न०, बींबिवळा, बींभरणा पु०, बींबिरवण स्त्री०, न०** पेरण्यासाठीं किं० रोपें लावण्यासाठीं राखून ठेविलेलीं बीजें, मूळें, कांदे, इ० समुच्चयानें. **बींबूड न०, स्त्री०** १ पीक मुळींच न येणें; पिकाचा समूळ उच्छेद. २ वंश, कुटुंब, जात, इ० चा समूळ उच्छेद.

बीज [**सं०** द्वितीय] **स्त्री०** हिंदू महिन्याच्या शुद्ध किं० कृष्ण पक्षांतील दुसरी तिथि; उ० भाऊबीज.

बीज [**सं०**] **न०** १ बी. २ धान्य. ३ पुरुष, पशु, पक्षी, इ०चें रेत,-जें स्त्रीच्या गर्भात जाऊन नवीन तज्जातीय प्राणी उत्पन्न होतो. ४ कोणत्याही पदार्थाचें किं० कार्याचें मूळ किं० आदिकारण. ५ नाटक इ० ची मूलभूत कथा,-जीवर कवि रचना करतो. ६ भाषणाचा उद्देश, धोरण, किं० ध्येय; उ० तुम्हीं ही शर्त पाळतां तिचें बीज काय ? ७ (**गणित**) संख्या किं० परिमाणें ह्याबद्दल अक्षरें योजून करावयाचें गणित; बीजगणित. ८ सत्य; तथ्य. ९ स्थान; आधार. १० मंत्रांतील भाग. ११ तत्त्व. ❀ **बीजाक्षर न०** मंत्राचें आद्याक्षर. **बीजकोश पु०** बियांचा कांदा. **बीजकोशी, बीजगुप्ति स्त्री०** शेंग (वाटाणा, तूर, चवळी, इ० ची). **बीजगणित न०** वर्णाक्षरें घेऊन करावयाचें गणित. **बीजपेशिका स्त्री०** १ वृषण; अंडकोश. **बीजबेंदूर पु०** शेतकऱ्यांचे विधि, उत्सव, चाली, संप्रदाय, इ० समुच्चयानें (करणें). २ शेंदूर, गूळ, बैलांचीं चित्रें, फुलांच्या माळा, इ० चे नजराणे शेतकरी लोक पाटील, कुलकरणी, गांवकामगार, इ०ना देतात ते. पुढें ' बेंदूर ' पहा. **बीजमार वि०** पेरलेल्या बीजांइतकें सुद्धा धान्य जी देत नाहीं अशी नादान (जमीन). **बीजांकुरन्याय पु०** परस्परांत असलेला कार्यकारणसंबंध; जसें बीजापासून अंकुराची उत्पत्ति आणि अंकुरापासून बीजाची उत्पत्ति. **बीजारोप पु०, बीजारोपण न०** १ बीज पेरणें. २ कोणत्याही कार्याचें किं० परिणामाचें मूळ घालून ठेवणें. **बीजाक्षर न०** मूळाक्षर; मंत्राक्षर; मंत्राचें आद्याक्षर.

बीजक न० कापड, रेशीम, इ०च्या गठ्ठ्यांत घालतात किं० गठ्ठ्यावर लावितात जी किंमत वजन, जात, इ० च्या तपशीलाची चिठ्ठी ती.

बीड न० १ अशोधित लोखंड. २ लोखंडाची एक जात. ३ तांबें इ० धातूंचे पत्रे ज्यावर घडवितात ती ऐरण. ४ गाडीवर गठ्ठे आवळावयाचा जाडी दोर. ह्या अर्थी **स्त्री०** सुद्धां. ५ बीडलोण,- एक क्षार.

बीड, वीड न० १ नमुना; माप; जात. २

सोनें, इ० धातूची बांगडी घडवावयाची असतां मणगटाच्या जाडीचें जें माप घेतात तें. ३ कांठ, पोत, सूत, इ० संबंधानें विणलेल्या वस्त्राची तऱ्हा इ०.

बीत स्त्री० कागदाचा बंद इ० कांवर दोहों बाजूस थोडथोडी जागा सोडून लेखनमर्यादेसाठीं रेघ ओढलेली असते ती.

बीत [अ०] स्त्री० मुलगी (अमक्याची); उ० लालबिबी बीत सैयद अहमद सुभेदार म्ह० सैयद अहमद सुभेदाराची कन्या जी लालबिबी ती. [रस्ता.

बींद, बींध स्त्री० गांवांतील रुंद किं० अरुंद

बीन स्त्री० लेखाचा सारांश किं० मथळा,– जो कागदाच्या एका बाजूस लिहिलेला असतो तो.

बीन [सं० वीणा; **हिं०** बीन् **] पु०** एक तंतुवाद्य,– ज्याला दोही बाजूंस भोपळे असतात.

बीभत्स [सं०] वि० १ ओंगळ; किळसवाणें. २ दुष्ट; क्रूर. ३ गर्हणीय; निंद्य. **पु०** (**साहित्य**) रसविशेष; शृंगार, वीर, इ० जे नऊ रस त्यांतील एक. मागें ' अद्भुत ' पहा.

बीर [सं० वीर; **हिं०** बीर **] पु०** मुसलमान लोकांचें एका जातीचें कल्पित पिशाच. ॐ **कोणेकाला बीर भरणें** (किं० **देणें**) त्याला कलहास उत्तेजन देणें किं० चेतावणें किं० उठविणें. **कोणेकाला बीर भरणें** त्याच्या अंगांत भुताचा संचार कराविणें.

बील पु० १ अंड्यांच्या कवचाच्या आंतील गिलगिलीत भाग. २ नासलेल्या किं० कुजलेल्या फळांतील गिळगिळीत भाग.

बीळ [सं० बिल **] न०** १ उंदीर, घूस, साप, इ०चें रहावयाचें भोंक. २ वाघ, सिंह, इ० ची रहावयाची गुहा किं० झाडाची जाळी. ३ टोपली, शिफ्तर, इ० करावयासाठीं काढलेल्या बांबूच्या पाती प्रत्येक. ॐ **बीळ पाडणें** कांहीं हेतु साधण्यासाठीं दरबार इ० मध्यें युक्तीनें द्वार करून ठेवणें किं० वशीला लावून ठेवणें किं० संधान जुळवून ठेवणें. **बीळ उघडणें** मुंग्या इ० कीटांचें पेव फुटणें. [दिकांचें चूर्ण.

बुकटी, बुकणी स्त्री०, बुकणा पु० औषधा-

बुकण न० बाजरीच्या कणसांतील दाण्याच्या भोंवतालचें तूस.

बुकणा पु० ढुंगण.

बुकणा, बुकाणा पु० तोंड भरून जाईल इतका मोठा घास. ॐ **बुकाणा** किं० **बुकणाहत्ती** १ सोंडेच्या दोन बाजूंचे दोन दांत ज्याला नाहींत असा हत्ती. २ ठेंगणा आणि लठ्ठ ढुंगणाचा पुरुष किं० स्त्री. [अबीर हें सुगंधी द्रव्य.

बुकणी [हिं० बूकनी **] स्त्री०** १ पूड; चूर्ण. २

बुकलणें, बुकालणें, बुकणें [म० बुकी **] स० क्रि०** बुक्क्यांनीं (कोणेकाला) जर्जर करणें.

बुका, बुक्का पु० एक सुगंधी चूर्ण. ॐ **कोणेकाला बुक्का लावणें** १ त्याला रजा देणें; त्याला रुखसत देणें किं० निरोप देणें. २ त्याला हाकलून देणें.

बुका, बुक्का, बुकांदा, बुकांडा पु०, बुकी, बुक्की स्त्री० मुठीनें मारलेला रट्टा किं० तडाखा.

बुकाणा पु० वर ' बुकणा ' पहा.

बुकी, भुकी स्त्री० चूर्ण.

बुगडी स्त्री० १ स्त्रियांचें एक कर्णभूषण. २ तांदुळाची एक जात. ३ मिरचीची एक जात.

बुचकणें स० क्रि० १ (धान्याची रास)वरचेवर आंत हात घालून ढवळणें किं० विसकळीत करणें. २ (कोणेकाला) लुटणें किं० बुचाडणें. ३ (कोणेकाचें अंग) ओरबाडणें. [भिणें.

बुचकणें अ० क्रि० दचकणें; आकस्मिक कारणानें

बुचकरणें, बुचकुरणें स० क्रि० हाताचीं नखें इ०नीं ओरबाडणें.

बुचकरा, बुचकुरा पु० ओरबडण्याची क्रिया किं० ह्या क्रियेनें झालेली जखम.

बुचकली स्त्री० पुढ ' बुचका ' पहा.

बुचकळणें, बुचकुळणें स० क्रि० १(पदार्थविशेष) पाणी इ० मध्यें बुडवून काढणें. २ शास्त्र इ० मध्यें (कोणेकाचा) प्रवेश करून देणें. **अ० क्रि०** साशंक होणें.

बुचकळा, बुचकुळा [म० बुचक (–कु–) ळणें **] पु०** १ पाण्यांत बुडवून काढणें. २ पाण्यांत बुचकळून काढलें तें (वस्त्र इ०). ३ शंकितपणाची वृत्ति; साशंकता. ॐ **बुचकळ्यांत पडणें** काय करावें हें न सुचल्यामुळें कुंठित होणें; साशंक होणें; पेचांत पडणें.

बुचकळी [**म०** बुचकळणें] **स्त्री०** पाण्यांत मारलेली बुडी. ॐ **बुचकळ्या खाणें** १ पाण्यांत (बुडणाऱ्या माणसानें) धडपडत असणें. २ साशंक होणें; हें करूं कीं तें करूं अशा संशयांत पडणें.

बुचका पु० केश, गवत, सूतें, इ० चा झुबका (उपटून काढलेला किं० निघालेला).

बुचका पु०, बुचकली, बुचकुली, बुचकी, बुचकोली, बुचुकली स्त्री०१राशींत हात घालून मुठींत घेतलेला पदार्थ. २ मुलाचा हात. ३ मांजराचा पंजा.

बुचकुरणें, बुचकुरा मागें ' बुचकरणें, ' ' बुचकरा ' पहा.

बुचटणें [**म०** बूच] **स० क्रि०** गुडदी मारून बंद करणें.

बुचडा पु० १ डोकीच्या केशांचा रचनाविशेष. २ तृणें, भाताच्या काड्या, इ० अग्राशीं दोरी इ० नीं बांधून होते ती पेंडी.

बुचडी स्त्री० कांबळें इ०एका बाजूकडे चुणून त्या चुण्यांना दोरी बांधून पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घेण्यासाठीं करतात ती खोळ.

बुचबुचणें, बुजबुजणें अ० क्रि० १ (ढेकूण, पिसवा, इ०) वस्त्रादींत दाटींत वळवळत असणें. २ ढेकूण, पिसवा, इ० नीं (वस्त्रादि) भरलेलें किं० व्यापिलेलें असणें.

बुचबुचावणें स० क्रि० (वस्त्र, भांडें) थोडेंसें म्ह० फारशी मेहेनत न घेतां धुणें, घासणें, किं० विसळणें.

बुचा, बुच्चा [**हिं०** बूचा] **वि०** १ जेथें जो पदार्थ,–माणूस, दागिना, इ० असावयास पाहिजे किं० नेहेमीं असतो तो तेथें नसल्यामुळें जी विरूपता येते ती; उ० नथ घातली नसतां नाक बुच्चें, बुगड्या नसतां कान बुच्चे, बांगड्या नसतां हात बुच्चे, इ०. २ एकाद्या कामांत आपला कांहीं संबंध नसतां किं० आपणास कोणी बोलाविलें नसतां आपण तें केलेलें (काम) किं० असें काम करणारा (माणूस).

बुचाड न० कणसांसकट धान्याचीं ताटें समुच्चयानें.

बुचाडणें, बुचाटणें [**म०** बुचा] **स० क्रि०** १ (कोणेकास) लुटणें किं० नागविणें. २ कोणेकापासून (कांहीं पदार्थ) लुटणें किं० हिरावून घेणें. ३ (फांदीचीं पानें, पक्ष्याचीं पिसें, इ०) ओरबाडून काढणें. ४ योग्य स्थानापासून(कांहीं पदार्थ) ओढून काढणें. ॐ **बुचाडणें गोबाडणें** लुटणें; हिरावून घेणें.

बुचुकळी स्त्री० वर ' बुचका पहा.

बुचू, बुज, बुजू पु० बारदान, शिशी, इ०चें तोंड बंद करण्यासाठीं घातलेली किं० घालावयाची गुड्दी.

बुजकणें, बुजग (–गा–) वणें [**म०** बुजणें] **न०** १ पशु, पक्षी, माणसें, इ० ना भीति दाखविण्यासाठीं उभें केलेलें बाहुलें, किं० कोणत्याही प्रकारची योजना किं० युक्ति. २ करडा अमल चालविणारा माणूस. ३ अत्यन्त कुरूप आणि भीति वाटविणारा माणूस.

बुजट, बुझट, बुजरा, बुझरा, बुजीर, बुजार [**म०** बुजणें, बुझणें] **वि०** कारणाशिवाय किं० फारसें कारण नसतां भितो किं० घाबरतो असा.

बुजणें, बुझणें अ० क्रि० १ आकस्मिक भयानें दबकणें किं० हटणें. २ भोक, द्वार, फट, इ० बंद होणें.

बुजरा, बुजीर वर ' बुजट ' पहा.

बुजविणें, बुझविणें स० क्रि० (भोक, वाट, इ०) बंद करणें. २ (माणूस, पशु, पक्षी, इ० ना) घाबरविणें किं० भिवविणें. ३ (खड्डा, विहीर, इ०) भरून काढणें.

बुजविणें, बुझविणें, बुजाविणें, बुझाविणें [**हिं०** बूझाना] **स० क्रि०** समजूत पाडून सांगणें किं० शिकविणें.

बुजुर्ग पुढें ' बुद्रुक ' पहा.

बुजू वर ' बुज ' पहा.

बुझणें [**हिं०** बुझ्ना] **स० क्रि०** जाणणें; समजणें; शिकणें; ओळखणें.

बुझविणें, बुझाविणें [**म०** ' बुझणें ' चे प्रयोजक] **स० क्रि०** १(भोक, तोंड, इ०) बंद करणें किं० बंद पाडणें. २ (विहीर इ०) भरून काढणें.

बुटएटक, बुटखील पुढें ' बुटेएटक ' ' बुटेखीळ' पहा.

बुटकणा वि० लठ्ठ आणि ठेंगणा (माणूस, पशु, पदार्थ).

बुटका वि० १ ठेंगणा आणि लठ्ठ. २ ज्याचें टोंक मोडलें आहे असा (सुई, लेखणी, इ० पदार्थ)-

बुटकुळी स्त्री० पाण्यांत मारलेली बुडी(मारणें). ꙮ **बुटकुळ्या खाणें** पाण्यांत बुडत असलेल्या माणसानें अनेक वेळां आंत जाणें आणि पुन्हां वर येणें.

बुटंगणा, बुटंगा वि० ठेंगणा आणि लठ्ठ (माणूस, पशु, पदार्थ).

बुटटकी स्त्री० बढाई; रिकामी ऐट किं० तोरा (मिरविणें, मांडणें, इ०).

बुटणें न० नळी, भांडें, शिसा, इ० चें तोंड बंद करावयाची गुडदी.

बुटबुटीत वि० चांगला न शिजल्यामुळें टणक राहिलेला (पदार्थ,–डाळ, तांदूळ, इ०); टचटचीत.

बुटबैंगग न० फारच लठ्ठ आणि फारच ठेंगणा असा (माणूस, पशु, पदार्थ).

बुटली स्त्री० १ तांबली; लहान भांडें (धातु, कातडें, इ० चें). २ विहिरीचें चाक किं० चरक्याची सळई ज्या दोन आधारांवर फिरते ते आधार प्रत्येक. [पान, इ०.

बुटा [**हिं०**] **पु०** नक्षी कामांतील फूल,

बुटारणा वि० विरूप दिसण्या इतका ठेंगणा (माणूस, पशु, पदार्थ).

बुटी [**हिं०** बूटी] **स्त्री०** १ औषधी वनस्पति; मूळ, कंद, इ०. २ नक्षीकाम, कोरकाम, कशीद्याचें काम, इ० तील फूल, पान, वेल, इ०. ३ कोणेकाजवळ एकाद्या रोगावर जें रामबाण औषध, मंत्र, तोडगा, इ० कांहीं असतें,–जें तो कोणास कळवीत नाहीं, तें. ४ जरूरीच्या प्रसंगीं बाहेर काढावयाचें द्रव्य किं० बोलावयाची कोटी किं० योजावयाची शकल. ४ भांगेचा घोटा. ꙮ **बुटीदार, बुट्टीदार, बुटे (–ट्टे–) दार वि०** ज्यावर नक्षी काढलेली आहे असा.

बुटी, बुट्टी [**कानडी**] टोपली.

बुटुकणा, बुटकणा वि० लठ्ठ आणि ठेंगणा.

बुटुकला पु०, बुटुकली स्त्री०, बुटुकलें, बुडकुलें न० सुमारें शेराच्या मापाचें भांडें,–मातीचें किं० धातूचें.

बुटुंगणा, बुटुंगा वि० लठ्ठ आणि ठेंगणा (माणुस, पशु, पदार्थ).

बुटें न० गाड्याच्या कण्यावर बसविलेलें असतें तें लांकूड. ꙮ **बुटें काढून ठेवणें** कांहीं कामांत जरूर असें जें साधन तें काढून घेणें किं० नाहींसें करणें आणि कामांत खोळंबा करणें. **बुटें गहाण ठेवणें** आपणास अत्यन्त जरूर अशी वस्तु दुसऱ्याच्या हवालीं करणें.

बुटेंएटक न० गाडीचें बुटें न हालावें म्हणून बांधावयाची दोरी किं० ठोकलेला खिळा.

बुटेखीळ स्त्री०, बुटेखिळा पु० गाडीचें बुटें आणि कणा यांना जोडणारा खिळा.

बुटेदार वर ' बुटी ' मध्यें ' बुटीदार ' पहा.

बुट्टा वि० लठ्ठ आणि ठेंगणा (माणूस, पशु, पदार्थ).

बुट्टा, बुट्टी इ० वर ' बुटा, ' बुटी ' इ० पहा.

बुंठा वि० १ ज्याचें केवळ खोड अवशिष्ट राहिलें आहे असें (झाड). २ ज्याचें अग्र तुटलें आहे असा (हात, पाय, बोट, इ०).

बुडकणें [**म०** ' बुडणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** पाण्यांत डुंबणें.

बुडकी स्त्री० १ पाण्यांत मारलेली बुडी. २ नदीच्या वाळवंटांत पाण्यासाठीं खणलेला खळगा.

बुडकुला पु० १ सुमारें शेराच्या मापाचें मातीचें किं० धातूचें भांडें. २ कोणताही मुलांच्या खेळांतील लहान पदार्थ,–घर, सूप, बाज, इ० .**टीप,**–ह्या सर्व अर्थीं ' बुडकुली ' **स्त्री०** आणि ' बुडकुलें ' **न०** हेही शब्द रूढ आहेत.

बुडखा [**म०** बूड] **पु०** १ शाखांखेरीज जो झाडाचा भाग तो; बुंधा. २ अग्र तुटून गेल्यावर जो पदार्थाचा अवशेष तो. ३ पदार्थाचा उगमाकडचा किं० आरंभाकडचा जो भाग तो; ह्याचा उलट 'अग्र.' ४ कांहीं काम, कारभार, व्यापार, इ० चा पाया, आधार, किं० मुख्य बाबत.

बुडचा [**म०** बूड] **वि०** १ बुडाकडचा (भाग, अवयव, इ०). २ आंतील; खालचा; तळाचा.

बुडण [**म०** बुडणें] **स्त्री०** १ बुडण्याची जागा. २ जेथें ठोकर बसण्याचा संभव आहे अशी व्यापार, कारभार, नोकरी, इ० तील बाबत. ३

व्यापारांत आलेली बूड किं० बसलेली ठोकर किं० झालेली हानि.

बुडणूक [म० बुडणें] **स्त्री०** १ बुडण्याची क्रिया. २ व्यापारादिकांत झालेली हानि किं० बसलेली ठोकर.

बुडणें अ० क्रि० १ जलादिकांत खोल जाऊन न दिसेसा होणें. २ काम, दुःख, कर्ज, काळजी, इ० मध्यें गढून जाणें किं० निमग्न होणे किं० त्यामुळें जर्जर होणें. ३ पैसा, पीक, गांव, व्यवहार, इ० नष्ट होणें किं० नाश पावणें. ४ निरुपयोगी होणें; प्रचारांतून किं० अमलांतून जाणें. ५ न मिळणें. ६ दिवस संपणें किं० निघून जाणें. ७ फळ न देतां किं० उपयोग न होतां व्यर्थ होणें किं० फुकट जाणें. ८ (सूर्य इ०) क्षितिजाखालीं जाणें. ९ अन्तर्धान पावणें; अदृश्य होणें. ॐ**बुडतठाव पु०** मनुष्य, पशु, इ० बुडून जाण्याइतकें नदी, विहीर, इ० तील पाणी किं० पाण्याचें परिमाण. याच सरणीनें ' कमरठाव ' म्ह० कमरेइतकी, ' छातीठाव म्ह० छातीइतकी पाण्याची खोली. **चढेल तो पडेल पोहेल तो बुडेल** मागें ' चढणें ' मध्यें पहा.

बुडता [म० ' बुडणें ' पासून] **वि०** १ बुडणारा. २ अपकर्षास लागलेला. ३ संपत आलेला. ४ पदार्थविशेष आंत घातला असतां तो बुडून जाईल इतका खोल प्रवाही पदार्थ; उ० हें वाटाणे बुडत्या पाण्यांत घाल;उ०ह्या खारका बुडत्या तुपांत घाल. ॐ**बुडता काळ पु०**अपकर्ष होत जाण्याचा काळ;नुकसानीचा काल.**बुडत्याचा पाय खोलांत** १ विपत्ति यावयाची असली म्हणजे **माणसाची** वाईट गोष्टीकडे प्रवृत्ति होते. २ अवनति होऊं लागली म्हणजे ती हजार बाजूंनीं होते. ३ ज्या काळीं मनुष्यानें कांहींही केलें तरी त्याचें नुकसानच होतें किं० यश येतच नाहीं असा काळ. **बुडता पाया पु०** अपकर्षाचा आरंभ; ऱ्हासदशेची सुरवात.

बुडबुडा [सं० बुद्बुद] **पु०** १ पाणी, दूध, इ० मध्यें वारा गेल्यानें जो वाटोळा आकार उत्पन्न होतो तो.२भाजलेल्या त्वचेवर जो फोड येतो तो.

बुडला [म० बूड] **वि०** तळाचा; खालचा.

बुडवणा (-ण्या), **बुडव्या** [म० बुडविणें] **वि०** १ जो हानीस, नाशास, किं० अपकर्षास कारण होतो असा (माणूस, पशु, पदार्थ). २ आपण बुडून दुसऱ्यास बुडविणारा.

बुडवणी [म० बुडविणें] **वि०** भांड्याला दोरी न लावतां हातानेंच भांडें बुडवून भरून घेतां येईल इतकें खोल(पाणी,विहीर,टांकें,इ०).

बुडवणी, बुडवणूक [म० बुडविणें] **स्त्री०** १ बुडविण्याची क्रिया किं० बुडविलें गेल्याची स्थिति. २ हानि; नुकसान. ३ फसवणूक.

बुडविणें [म० ' बुडणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ पाणी इ० मध्यें (पदार्थ) खोल घालून न दिसेसा करणें. २ दुसऱ्याचा उसना घेतलेला किं० दुसऱ्यास दिला पाहिजे असा पैसा न देणें. ३ नष्ट करणें; घालविणें. ४ बंद करणें,बंद पाडणें.

बुडव्या वर ' बुडवणा ' पहा.

बुडस्थळ [म० बुडणें+स्थळ] **न०** १ ज्यांत बूड येण्याचा किं० नुकसान होण्याचा विशेष संभव आहे असा धंदा, व्यापार, इ०. २ नाश, हानि, नुकसान. ३ नुकसानीचें परिमाण.

बुडालेला [म० बुडणें] **वि०** नष्ट झालेला; लोपलेला; जो मिळण्याची आशा नाहीं असा (पैसा, कर्ज, इ०). ॐ **बुडालेल्या घरचा मोड पु०** सर्व माणसें मरून जाऊन कुटुंबांत एकच मनुष्य जो शिल्लक राहिला आहे तो.

बुडी [म० बूड] **स्त्री०** भाला, बर्ची,इ० चा दांडा.

बुडी [म० बुडणें] **स्त्री०** १ उदकादिकांत बुद्धिपुरःसर शिरणें (मारणें). २ उदकांत कांहीं काळ राहणें; उ० गोविंदा दोन मिनिटें बुडी मारतो. ॐ**बुडी देणें** (किं० **मारणें**) १ पाण्यांत जाणें किं० जाऊन कांहीं काळ तेथें राहणें. २ पळून जाऊन दडून बसणें. ३ कांहीं साध्यास्तव प्रयत्न करणें. **साधली तर उडी नाहीं तर बुडी** झाल्यास पूर्ण लाभ होईल नाहीं तर सर्वथैव नुकसान होईल.

बुडीत [म० बुडणें] **वि०** १ ज्यापासून लाभ व्हावयाचा नाहीं असा(खर्च)किं० मोबदला मिळण्याची आशा किं०इच्छा न बाळगतां केलेला (खर्च)किं० दिलेला (पैसा).२व्यापार,दुकान,इ० सुरूं करण्याच्या वेळेचा मांडामांडीचा (खर्च).

विकावयाच्या जिनसांवर केलेला जो खर्च तो 'तरता खर्च'.३ जें परत मिळण्याची आशा नाहीं असें (कर्ज). **न०** १ बूड; हानि; नुकसान. २ बुडालेलें भांडवल. ꙮ **बुडीत कूळ न०** सावकाराचें घेतलेलें कर्ज देऊं शकत नाहीं असें कूळ. **बुडीत खत न०** ज्यांत नमूद केलेलें कर्ज परत मिळण्याची आशा नाहीं कसा कर्जरोखा. **बुडीत खातें न०** बुडीत कुळांच्या नोंदणीची यादी.

बुडीद [**म०** बुडणें] **पु०** पाण्याची खोली मापण्याचा ओळंबा.

बुडूख न०, बुडखा पु० [**म०** बूड]१ वृक्ष, केरसुणी, इ० च्या शाखा, फांद्या,इ० गळून किं० तुटून गेल्यावर राहिलेला अवशेष.२कांहीं कामाचा केवळ आरंभ किं० सुरवात.

बुढी स्त्री० भाला, बर्ची, इ० चा दांडा.

बुणगा वि० लठ्ठ आणि ठेंगणा (माणूस, पशु).

बुणगी स्त्री० सजगुऱ्याच्या दाण्यावर असतें तें टोपण.

बुणगें [**फा०** बुन्गाह्] **न०** सैन्यांतील न लढणारीं माणसें स्मुच्चयानें.

बुंत, बुंथी स्त्री०, पु०, बुंथड न० अंगावर डोक्यावरून आच्छादनार्थ घेतलेलें वस्त्र; घुंगट.

बुतका पु० बुक्की.

बुतारा पु०, बुतारी स्त्री० केरसुणी.

बुंथ पु०, स्त्री०, बुंथी स्त्री० वर' बुंत 'पहा.

बुंद न० पदार्थाचें बूड किं० तळ. ꙮ **भांड्याचें बुंद घेणें** चुलीवर ठेवावयाच्या भांड्याला फारशी मशेरी लागूं नये म्हणून त्याच्या तळाला राख, माती,इ०चा लेप करणें.

बुंद [**सं०** बिंदु] **पु०** थेंब; ठिपका.

बुंद [**हिं०**] **पु०** काफी नांवाच्या झाडाचें फळ. ꙮ **बुंदाचा चहा पु०** ह्या फळाचें केलेलें पेय.

बुंद वि० गोंडस; सुंदर; उ० हें अक्षर कसें बुंद आहे. **क्रि० वि०** (पुढें येणारें) पूर्णपणें; पक्केपणीं; अतिशय; परमावधीचें; उ० ह्या पागोट्याचा रंग लाल बुंद आहे. ꙮ**बुंदकडा,बुंदखडा वि०** गोंडस आणि सुंदर.

बुदकणें [**म०** बुदका] **स० क्रि०** (कोणेकाला) बुक्क्या मारणें.

बुदका पु० बुक्की.

बुंदका वि० लठ्ठ आणि ठेंगणा.मागें'बुणगा' [पहा.

बुंदकी [**म०** बुंद] **स्त्री०** कागद, कापड, इ० वरचे ठिपके प्रत्येक.

बुंदखडा वर 'बुंद' **वि०**मध्यें 'बुंदकडा ' पहा.

बुंदगा, बुंदगुला वि० ठेंगणा.

बुंदगुलें न० लहान आणि आकारविशेषाचें धातूचें भांडें.

बुंदडा [**म०** बुंद] **पु०** सुंदर आणि भपकेदार वस्तु, माणूस, इ०.

बुदबळ [**सं०** बुद्धिबल] **न०** राजा, वजीर, हत्ती, उंट, इ० नांवांच्या बत्तीस तुकड्यांनीं खेळावयाचा जो एक खेळ आहे त्यांतील जे बत्तीस तुकडे ते प्रत्येक. ' बुदबळें खेळणें ' किं० ' बुदबळांनीं खेळणें ' असें प्रयोग होतात.

बुंदेला पुढें ' बुंधेला ' पहा.

बुद्बुद [**सं०**] **पु०** १ पाणी इ० चा बुडबुडा. २ गर्भाचें पांचव्या दिवसाचें स्वरूप. **स्त्री०** खाद्य पदार्थ नासल्यामुळें त्याला बुडबुडे येऊं लागण्याची स्थिति (सुटणें).

बुद्बुदणें [**म०** बुद्बुद] **अ० क्रि०** (जखम, गळूं, इ०) कृमींनीं व्याप्त होणें.

बुदला, बुदली, बुदलें पुढें ' बुधला, ' ' बुधली, ' ' बुधलें ' पहा.

बुंदी [**सं०** बिंदु] **स्त्री०** हरभऱ्याचें पीठ पातळ करून तें झाऱ्यांतून तळणींत पाडवून पडलेले थेंब तळून काढतात ते प्रत्येक. ह्या थेंबांना ' कळ्या ' असेंही म्हणतात. ह्या कळ्यांचे लाडू करतात त्यांना 'बुंदीचे लाडू' म्हणतात.

बुद्दा पु०अतिकष्टामुळें किं० अन्य कांहीं कारणानें होतो तो शक्तिपात; परमावधीचा अशक्तपणा (पाडणें, पडणें, होणें).

बुद्ध [**सं०**] **वि०** जाणलेलें; ज्ञात; अनुभविलेलें. **पु०** १ विद्वान्. २ गौतमबुद्ध (बौद्धमतस्थापक).

बुद्ध क्रि० वि० (शेळ्या किं० मेंढ्या यांच्या गणतींत) प्राणी; उ० शेळी बुद्ध एक; उ० मेंढी बुद्ध पांच. **टीप,**–वीसाच्या पुढें ' माच ' हा शब्द योजला जातो; उ० शेळी माच तेवीस.

टीप,–घोड्यांच्या परिगणनांत ‘ रास, ’ गायी, बैल, आणि रेडे, ह्यांच्या परिगणनांत ‘ सर, ’ हत्तींच्या परिगणनांत ‘ नग, ’ आणि उंटांच्या परिगणनांत ‘ नफर ’ हे शब्द अशाच प्रकारें योजले जातात; उ० घोडे रास दहा (म्ह० दहा घोडे); उ० बैल (किं० गाय) सर नऊ (म्ह० नऊ बैल किं० नऊ गायी); उंट नफर बारा (म्ह० बारा उंट); हत्ती नग तेरा (म्ह० तेरा हत्ती). मागें ‘ नग, ’ ‘ नफर ’ हे शब्द पहा.

बुदबृहस्पति पुढें ‘ बुधबृहस्पति ’ पहा.

बुद्धि [**सं०**] **स्त्री०** १ ज्ञान; आकलन; जाणीव. २ पदार्थाच्या स्वरूपाचें ज्ञान करून देणारी शक्ति. ३ सारासार विचार करण्याची शक्ति. ४ माहिती. ५ मत; समजूत; अमुक वस्तु अमुक आहे किं० अमुक रूपाची किं० गुणाची आहे असा ग्रह. ६ विचार; निश्चय. ७ बेशुद्ध स्थितींतून देहभानावर येणें. ८ (**सांख्य**) सांख्यांच्या पंचवीस तत्त्वांपैकीं दुसरें. ९ अमुक गोष्ट करावी किं० करूं नये इ० रूप जी मनाची प्रवृत्ति ती. १० संकल्प; बेत. ॐ **बुध्यतीत वि०** बुद्धीला न समजेल असें. **बुद्धिगम्य, बुद्धिग्राह्य वि०** बुद्धीलाच समजेल असें; बुद्धीनेंच जें आकलन करतां येईल असें. **बुद्धिपूर्व, बुद्धिपूर्वक, बुद्धिपुरःसर क्रि० वि०** जाणून बुझून; मुद्दाम. **बुद्धिबल न०** मागें ‘ बुदबळ ’ पहा. **बुद्धिभेद पु०** १ वेगळा विचार. २ निश्चयांत झालेला बदल. ३ उलट प्रमाणें दाखवून कोणेकाचा ग्रह बदलणें. **बुद्धिभ्रंश पु०** १ काम करण्यास बुद्धि नालायक होणें. २ कोणेकास भलतेंच कांहीं सांगून त्याचा विचार बदलणें. **बुद्धिवाद पु०** कोणेकास अमुक कर किं० करूं नको इ० रूप केलेला उपदेश; सल्ला. **बुद्धीचा खंदक, बुद्धीचा नवसागर पु०** मूर्ख माणस. **बुद्धीचा खोटा वि०** दुष्ट; दुसऱ्याचें आहेत करूं इच्छिणारा. **बुद्धीशीं वैर करणें** अमुक गोष्ट चांगली असें कळत असतां ती न करणें; अमुक गोष्ट वाईट हें कळत असतां ती करणें. **कोणेकाच्या बुद्धीस लागणें** त्याच्या तंत्रानें चालणें; त्याच्या अनुमतानें वागणें. **ज्यास बुद्धि नाहीं त्यास भांडवल नाहीं** बुद्धि हें एक प्रकारचें भांडवल आहे. ज्याला बुद्धि नाहीं त्याला कोणतीही गोष्ट करण्याला जें मुख्य साधन तेंच नाहीं. **शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी फार वेळ पुरत नाहीं** मागें ‘ बांधणें ’ मध्यें पहा. **बुद्धीसारखें फळ** इच्छा चांगली किं० वाईट असेल त्याप्रमाणें फळ चांगलें किं० वाईट असें मिळणें किं० भोगास येणें.

बुद्बुद [**सं०**] **पु०** बुडबुडा.

बुद्रुख (**–क,–ग**), **बुजुर्ग, बुज्रुक** (**–ख–, –ग**) [**फा०** बुजुरग्] **वि०** १ थोर; मोठा. २ वयोवृद्ध. ३ एकाच नांवाच्या दोन गांवांपैकीं मोठा; उ० हिंगणेंबुद्रुक. ॐ **बुजुर्गी स्त्री०** थोरवी; मोठेपणा.

बुध [**सं०**] **पु०** विद्वान्; शहाणा. २ इंद्र, चंद्र, इ० देव. ३ बुध हा ग्रह,–जो सूर्याच्या अगदीं संनिध राहून सूर्याभोंवतीं फिरतो. ॐ **बुधबृहस्पति पु० अ० व०** १ श्रावण महिन्यांतील दर बुधवारीं आणि गुरुवारीं बायका पूजितात त्या बुध आणि बृहस्पति यांच्या आकृति. २ मामा आणि भाचा हे दोघे,–ते एकत्र असतांच किं० त्या दोघांच्याही संबंधानें बोलावयाचें असतांच. **बुधाष्टमी स्त्री०** शुक्लपक्षीं बुधवारीं आलेली अष्टमी ही तिथि. **बुधवार** [**सं०**] **पु०** आठवड्याचे जे सात दिवस त्यांतील मंगळवाराच्या पुढचा आणि गुरुवाराच्या मागचा दिवस.

बुंध न०, बुंधा पु० झाडाचें खोड; झाडाच्या शाखा सोडून बाकीचा भाग.

बुधला पु० १ तेल, तूप, इ० पदार्थ ठेवण्यासाठीं केलेलें जें लहान तोंडाचें चर्मपात्र तें. हें पात्र लहान असल्यास त्याला ‘ बुधली ’ म्हणतात. त्यांत मसाल्याचीं तेलें, अत्तरें, इ० ठेवतात. बुधलें हें असेंच चर्मपात्र असून तें बुधल्याहून लहान असतें. २ लठ्ठ आणि फोपशा माणूस. ॐ **बुधली उताणी पडणें** किं० **बुधली भोंवतीं येणें** आपण केलेली लबाडी उघडकीस येणें.

बुधली स्त्री० वर ‘ बुधला ’ मध्यें पहा.

बुधवारणें अ० क्रि० बुधवारीं (म्हैस) विणें.

बुंधा, बुंधारा [**म०** बुंध] **पु०** १ शाखा वर्ज करून वृक्षाचा जो बाकीचा भाग तो. २ कोणत्याही पदार्थाचें बूड किं० तळ. ३ उगम; उत्पत्तीचें कारण.

बुंधाड न० बुडखा. वर ' बुंधा ' पहा.

बुंधारणें अ० क्रि० केरसुणीच्या बुडख्यानें मारणें.

बुधाष्टमी स्त्री० मागें ' बुध ' मध्यें पहा.

बुंधेला पु० १ बुंदेलखंडाचा रहिवासी. २ मूर्ख किं० अडाणी माणूस. ३ रेंगाळत काम करणारा. ४ रेंगाळत पडलेलें कोणतेंही काम. ५ बुधला हें चर्मपात्र करणारा. [पहा.

बुनगा, बुनगुला वि० ठेंगणा.वर ' बुणगा '

बुनगुलें न० धातूचें लहान भांडें.

बुनणें [**हिं०** बुनना] **स० क्रि०** विणणें.

बुनावट [**हिं०**] **स्त्री०** वस्त्राची वीण.

बुनियाद, बुन्याद बुनाद [**फा०** बुनियाद=आधार, पाया] **स्त्री०** १ जोर; सामर्थ्य; पराक्रम. २ वजन; वजनदारपणा; महत्व; थोरवी. ३ भांडवल; कोणत्याही कामांत लागणारी जरूर ती सामग्री. ४ताकद;ऐपत;उ० ह्याची काय बुनियाद आहे कीं हा रामभाऊ आपल्या मुलीच्या लग्नाला हजार रुपये खर्च करील?५स्वभाव;शील. **वि०** १जुनाट; फारच मागच्या काळचा.२ फार प्राचीन काळापासून चालत आलेला. ❀ **बुनियादी, बुनादी, बुन्यादी वि०** जुना; मागपासून चालत आलेला. **स्त्री०** मूळापासूनची सर्व हकीगत.

बुबळ खालीं ' डुबूळ ' पहा.

बुबू स्त्री० मोठ्या दर्जाची मुसलमान स्त्री.

बुबूळ, बुबळ न० १ नेत्रांतील मांसगोलक. २ नेत्रांतील काळा आणि पांढरा असे जे दोन विभाग ते प्रत्येक. ३ नेत्रांतील काळा भाग.

बुभुक्षा [**सं**] **स्त्री०** खाण्याची इच्छा;भूक.

बुभुक्षित [**सं०**] **वि०** १ ज्याला भूक लागली आहे असा; भुकेला. २ खाद्य पदार्थ मिळविण्यासाठीं टपून बसलेला.३ (**लाक्षणिक**) लाच मिळावा अशी इच्छा करणारा. ४(**लाक्षणिक**) नोकरी इ० साठीं खटपट करणारे (जे लोक ते). ५ (**लाक्षणिक**) कोणा समर्थापासून आपला कांहीं लाभ होईल अशा इच्छेनें त्याच्याकडे जाणारे (जे लोक ते).

बुरकणें अ० क्रि० १ (म्हैस, डुकर) ओरडणें. २ मूर्खपणानें किं० गैरसावधपणानें कांहीं रहस्य किं० कांहीं भलतीच गोष्ट बोलून जाणें.

बुरका, बुरखा [**अ०** बुर्कआह्] **पु०** १ मुसलमान स्त्रिया आणि मराठे स्त्रिया तोंडावरून घेतात तें आच्छादनवस्त्र (घालणें, घेणें). २ हत्तीची झूल. ३ गाडी किं० पालखी यांच्यावरचें आच्छादनवस्त्र.

बुरकूल न० १ वस्त्रावरचें फूल. २ डोक्यावरचे पिंजारलेलें केश. ३ दोरी, सूत, इ० चीं केसरें. ४ वाळलेला दोडका, घोसाळें, इ० च्या पोटांतलि जाळें.

बुरखी, भुरकी स्त्री० १ घोड्याच्या अंगावर घालावयाची झूल. २ गाडी,पालखी, अंबारी, इ० वरचें आच्छादनवस्त्र. ३ गाडीवर तट्टयाच्या आधाराला बांबूच्या काठ्यांची जी रचना करतात ती किं० ह्या रचनेसकट जें तट्टयाचें आच्छादन तें.

बुरखुंड न० मका, जोंधळा, इ० चे दाणे काढून घेतल्यावरचें अवशिष्ट कणीस.

बुरग न० शाहीर लोकांचें एक वाद्यविशेष.

बुरंगट, बुरंगूट, बुरंगळ, बुरंगूळ, बुरंगें न० अत्यन्त बारीक आणि दाट थेंबांच्या रूपानें पडणारा पाऊस.

बुरंगळणें, बुरंगाळणें अ० क्रि० १ स्वच्छंदानें किं० ताळतंत्र सोडून वागणें. २ (म्हैस, रेडा) ओरडणें. ३ (दांतांची रचना, वस्त्राची वीण) विरळ विरळ असणें. ४ बरळणें.

बुरगुंडा पु० (वैदू, कैकाडी, इ० च्या भाषेंत) मुलगा. **बुरगुंडी स्त्री०** मुलगी. **बुरगुंडें न०** पोर; मूल. भुरगुंडा, भुरगुंडी, भुरगुंडें, अशींही रूपें आहेत.

बुरजी [**फा०** बुर्दाह्=नेलेला; बुर्दन्=नेणें] **स्त्री०** (बुद्धिबळांच्या खेळांत) राजाशिवाय सर्व मोहरीं मरून किं० राजा आणि एकादें दुसरें प्यादें शिल्लक राहून जो एका पक्षावर डाव लागतो तो.

बुरंजी स्त्री० बाजरीचा चांगला न पोसलेला दाणा; खुरटलेला दाणा. पूर्णपणें पोसलेल्या कणसाच्या दाण्यांना लाटण्यासारखे दाणे म्हणतात.

बुरजी वि० कुत्र्याची एक विशिष्ट जात.

बुरजी वि० तुऱ्याचा एक आकारविशेष. मागें ' तुरा ' पहा.

बुरट, बुरंट वि० १ दाट, गहन (झाडी, जंगल). २ खुरटलेलें (झाड). ३ अत्यल्प दूध देणारी वाईट अवलादीची (गाय किं० म्हैस). ४ बुरसलेला (पदार्थ).

बुरट, बुरंट, बुरटें न० दाट गवत किं० झाडें झुडपें जेथें माजलीं आहेत असें स्थळ.

बुरटणें [म० बुरा] अ० क्रि० बुरसणें; बुरशीनें आच्छादला जाणें.

बुरटा, भुरटा पु० खुरटलेलें फळ किं० झाड. ꙮ **बुरटा चोर, भुरटा चोर** पु० उचल्या; किरकोळ पदार्थ चोरणारा. **बुरटी चोरी, भुरटी चोरी** स्त्री० १ किरकोळ किं० क्षुल्लक पदार्थाची चोरी. २ भुरट्या चोरानें केलेली चोरी.

बुरड, बुरूड पु० बांबूच्या पातींचीं टोपलीं, रोवळ्या, इ० पदार्थ करणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ꙮ **बुरडी, बुरडींव** वि० बुरुडानें केलेला (पदार्थ); बांबूंच्या पातींचा बनविलेला(पदार्थ).

बुरडणें अ० क्रि० बुरसणें. मागें ' बुरटणें ' [पहा.

बुरणूस, बुरणस पु० मेंढरूं इ० चे केश न विणतां केवळ खळीनें माखून आणि दाबाखालीं ठेवून करतात तें वस्त्र.

बुरंबट, बुरंबी वि० तांबड्या ढिसूळ दगडाची (जमीन).

बुरबुर स्त्री० १ तोंडांतल्या तोंडांत बोलणें; पिरपिर. २ बारीक पाऊस.

बुरबुरणें अ० क्रि० १ हलक्या आवाजांत बोलणें. २ असंतुष्टपणानें पिरपीर चालविणें. ३ बारीक बारीक थेंबांच्या रूपांत (पाऊस) पडत असणें. ४ (दांत) कीटानें व्याप्त झालेले असणें. ५ (भांडें, अंग, इ०) धुळीनें मळलेलें असणें.

बुरबुरा पु० जखम, गळूं, इ० तील रक्तमिश्रित पू बाहेर पडून वाळलेला.

बुरम पु० एक झाड. ह्याला फुलें येतात.

बुरशी (-सी), बुरखुरी स्त्री०, **बुरसा** पु० १ दमट जागेंत असलेल्या पदार्थावर होते जी अत्यन्त सूक्ष्म वनस्पतिरूप वाढ ती; केनशी; केनी; भुरी (येणें, चढणें). २ दांत काळजीपूर्वक न घासल्यामुळें त्यांचेवर जमतें तें कीट (येणें, चढणें).

बुरशेणें पुढें ' बुरसणें ' पहा.

बुरशेल (-ला) [म० बुरसणें] वि० १ ज्याला बुरशी आली आहे असा. २ मळकट (माणूस, अंग). ३ ज्यावर कीट चढलें आहे असे (दांत).

बुरसणें, बुरसटणें, बुरशेणें, बुरसावणें[म० बुरशी] अ० क्रि० १ बुरशीनें युक्त झालेलें असणें. २ साका चढल्यामुळें जीभ किं० कीट चढल्यामुळें दांत अस्वच्छ झालेले असणें.

बुरसा [म० बुरशी] पु० १ दमट हवेनें पदार्थावर सूक्ष्म वनस्पती उत्पन्न होते ती. २ दांतांवरील कीट. ३ जिभेवरील कीट. वि० १ ज्यावर बुरशी चढली आहे असा (पदार्थ). २ ज्यांवर कीट चढलें आहे असे (दांत). ३ ज्यावर साका जमला अशी (जीभ). ४मळामुळें अस्वच्छ (अंग, पदार्थ).५अव्यवस्थित, अर्धवट (कारभार, काम).

बुरसाविणें [म० बुरशी] स० क्रि० मळ, बुरशी, कीट, साका, इ० नीं(अंग, भांडें, जीभ, दांत, इ०)युक्त करणें.

बुरा [हिं०] पु० मळ; कीट; साका; बुरशी (चढणें). ꙮ**बुरासाखर** स्त्री० साखरेची एक जात.

बुरा वि० वाईट (सर्व अर्थांनीं). ꙮ **बुराई** स्त्री० वाईटपणा. **भलाबुरा** वि० चांगला वाईट; असेल तसा. **भलाईबुराई** स्त्री० चांगलेपणा किं० वाईटपणा; अंगीं असतील ते गुण समुच्चयानें. **बुरेहाल** पु० अ० व० दैना; परमावधीचे हाल किं० कष्ट.

बुराख [फा०] पु० १ भोक, छिद्र, वेज (मोतें, हिरा, भांडें, इ०चें). २ अपकीर्ति; बदनामी (होणें, उडणें).

बुरांट, बुरूंट वि० दाट, गहन (झाडी). २ खुरटलेला (माणूस, पशु,झाड). न० दाट झाडी किं० गवत. मागें ' बुरट ' पहा.

बुरांड [सं० बृहत् (मोठें)+अंड] पु० अंडवृद्धि (एक रोग). ꙮ **बुरांड्या** वि० बुरांड ह्या रोगानें ग्रस्त.

बुरींचें जाळें न० होड्या किं० तराफे यांवर पसरलेलें मासे पकडावयाचें जाळें. ह्या जाळ्याचा

जो दगडाच्या रूपाचा नांगर असतो त्याला ' पिरगा ' म्हणतात. ह्या जाळ्याला ' बिलाची जाळें ' असेंही दुसरें नांव आहे.

बुरुंगट, बुरुंगूट, बुरुंगळ, बुरुंगूळ न० बारीक आणि दाट थेंबाच्या रूपानें पडणारा पाऊस (येणें, पडणें, लागणें).

बुरुंजी स्त्री० बाजरीचें पूर्ण न पोसलेले दाणे किं० खुरटलेले दाणे व्यक्तिशः किं० समुच्चयानें. मागें ' बुरंजी ' पहा.

बुरूज [फा० बुर्ज्] पु० १ गांव, किल्ला, इ०च्या तटबंदींत तोफा ठेवण्यासाठीं किं०माणसें उभीं राहण्यासाठीं किं० तटाच्या मजबुतीसाठीं बहुधा वर्तुळाकार केलेली बंदिस्ती; हुडा. २ बुरजाच्या आकाराची लढाऊ शिपायांची मांडणी कि० रचना. ३ पगड डावामध्यें ज्या एकानें एका रंगाच्या सोंगट्या जिंकिल्या त्या समुच्चयानें किं० तसा डाव.

बुरूड पु० बांबूच्या पातींच्या टोपल्या, रोवळ्या, इ० पदार्थ करणाराची जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. ' बुरडी ' हें विशेषण; उ०बुरडी रोवळी इ०.

बुरूस, बुरुंब, मुरूम पु० १ घट्ट पिंडीभूत झालेला मृत्तिकाविशेष. २ तारुण्यावस्था प्राप्त झालेल्या पुरुषाच्या तोंडावर ज्या बारीक बारीक पुळ्या उत्पन्न होतात त्या समुच्चयानें. **न०** अशा पुळ्या प्रत्येक.

बुरूस पु० डोळ्यांतील गू किं० पू.

बुऱ्हा पु० वर ' बुरा ' **पु०** पहा.

बुलबुल क्रि० वि० निरुपद्रवीपणानें आणि साधेपणानें एकसारखें (बोलणें,—मुलांचें). **क्रि०** बोलणें. **स्त्री०** असें बोलणें(करणें, मांडणें, चालविणें).

बुलबुल [फा०] पु० १एक प्रसिद्ध गाणारा पक्षी. ※ **बुलबुल चष्मी [फा० बुलबुल्+** चष्माह् (डोळा)] **वि०** एका विशिष्ट प्रकारचे कांठ ज्याला आहेत असें (वस्त्र, —लुगडें, धोतर, इ०).

बुलाक (-ख) पु० दोन नाकपुड्यांच्या मधल्या पडदीला भोक पाडून त्यांत घालावयाचा एक दागिना. सोन्यांच्या तारेंत ओंविलेलें एक मोती अशा रूपाचा हा दागिना असतो.

बुवा, बोवा पु० कोणीही पुरुष,—सन्मानानें; उ० सांगलीकरबोवा इ०.

बुळक स्त्री० पुढें ' बुळकी ' पहा.

बुळकट वि० १ तेल, तूप, इ० चोपडलें गेल्यामुळे बुळबुळीत (भांडें, अंग,इ०). २ वेंडसर, अजागळ. ३ नपुंसक. ४ कर्तृत्वशून्य (माणूस).

बुळकंडी स्त्री० खालीं ' बुळकांडी ' पहा.

बुळकणें अ० क्रि० १अतिसार इ० विकृतीमुळें गुदद्वाराचा बंध शिथिल होऊन (कोणेकानें)पातळ मळकट पाणी बाहेर विसर्जिणें.२ (फळ) नासणें आणि चोथापाणी बाहेर पडणें. ३ (जखम, गळूं, क्षत) वाहात असणें किं० वाहूं लागणें. ४ (सांधा, गांठ, इ०) सैल पडणें किं० सुटणें किं० निखळणें.

बुळका वि० १ सैल किं० ढिला किं०खिळखिळीत झालेला (गांठ, सांधा, किं० मांडणी). २ निष्काळजीपणानें केलेलें (काम, भाषण,किं० तें करणारा माणूस).

बुळका पु० एक जलचर प्राणी.

बुळका पु०,बुळकांडी, बुळकंडी, बुळकुंडी, बुळकी स्त्री० गुदद्वाराचें बंधन शिथिल झाल्यामुळें आपोआप बाहेर पडलेला पातळ मळ. २ फुटलेल्या किं०फाटलेल्या बारदानांतून बाहेर पडत असलेल्या पदार्थाची धार.

बुळबूळ स्त्री० १ तेलकटपणा, ओषटपणा. २ निसरडेपणा.

बुळबुळणें अ० क्रि० केश, क्षत, उकिरडा, इ० मध्यें (उवा, कृमि, इ०) वळवळत असणें.

बुळबुळावणें स० क्रि० १ चिखल, तेल, तूप, इ० नीं बुळबुळीत किं० निसरडा करणें. २ (भांडें, वस्त्र, अंग) कसेंबसें घासणें, धुणें, किं० विसळणें.

बुळबुळी स्त्री० एक वनस्पति.

बुळबुळीत वि० १ निसरडा. २ चिकट. ३ निसःत्त्व. ४ पाणचट, बेचव (खाद्य, पेय).

बुळा त्रि० १ षंढ; नपुंसक. २ नामर्द; कर्तृत्वशून्य (माणूस). ३ भितरा, गांडू (माणूस). ४ वर ' बुळका ' **वि०** पहा.

बुळी स्त्री० गंजिफांतील जी नादार तीं.

बुळीद, बुळीन पु० पाण्याची खोली पाहण्याचा ओळंबा. मागें ' बुडीद ' पहा.

बू पु० १लहान मुलांस भीति दाखविण्यासाठीं हा शब्द ' बोवा, '' बाऊ 'ह्या अर्थीं योजतात.२ (मुलांच्या भाषेंत) दूर. ३ अरेरावीपणाचें भाषण. ४ पोकळ बढाई.

बूज, बोज [**हिं०** बूझाह्] **स्त्री०** १कोणेकाच्या अंगीं असलेल्या कांहीं गुणामुळें त्याची होते ती मानमान्यता (राहणें). २ कोणेकाला योग्य तो आदर दाखविणें (राखणें). ३ कांहीं अलौकिक गुण अंगीं असल्यामुळें कोणेकाची समाजांत होते ती चहा किं० वाढते ती प्रतिष्ठा; उ० भल्या माणसाची या राज्यांत बूज राहिली नाहीं. ४ गंजिफांच्या खेळांत लागतात तीं पानें. **पु०** बूच; गुडदी. ह्या अर्थीं फक्त ' बूज ' हा शब्द आहे.

बूज, बूच पु० भांडें, शिसा, इ० चें तोंड बंद करावयाची गुडदी.

बूट [**हिं०** बूट,बुटा] **पु०** भांगेचा पुष्पगुच्छ किं० फुलवरा. २ वस्त्र, कागद, इ० कांवर पानें, फुलें, इ० च्या रंगीत आकृति शाई, रेशीम, इ० नीं काढतात त्या समुच्चयानें किं० प्रत्येक. ३ अपूर्व किं० चमत्कारिक अशी कांहीं कल्पना, टूम, युक्ति, किं० खुबी. ४ जाड डोक्याचा एक जलचर प्राणी. ❀ **कोणेकावर** (किं० **कोणेकाविषयीं**) **बूट कातरणें** त्याच्या विरुद्ध कांहीं खलबत किं० चक्रान्त करणें. **कोणेकाचा बूट बाहेर पडणें** त्याचें रहस्य किं० गुप्त योजना फुटणें किं० बाहेर पडणें.

बूटबैंगण, बुटबैंगण [**हिं०** = जारठलेलें वांगें] **पु०, न०** अति ठेंगणा किं० जारठलेला मनुष्य किं० प्राणी.

बूड [**म०** बुडणें] **स्त्री०** व्यापार किं० व्यवहार यांत बसलेली ठोकर (येणें, लागणें, होणें).

बूड[**म०**बुडणें]**न०**१पदार्थाचा तळ.२मनुष्याचें ढुंगण.बूड टेकणें म्ह०बसणें.३चुलीवर ठेवावयाच्या भांड्याच्या खालच्या बाजूस राख, माती, इ० चा करतात तो लेप. ' ह्या भांड्याचें राखेनें बूड घे ' असा प्रयोग होतो. ४ कुटुंबाचा मूळ पुरुष किं० एका मूळ पुरुषापासून उत्पन्न झालेलीं कुटुंबें प्रत्येक; उ० वाल्हे गांवीं दीडमिशांचीं तीन बुडें आहेत. ५ गांवकीच्या वतनाचीं जीं भागीदार कुटुंबें तीं प्रत्येक; उ० ह्या गांवांत पाटिलकीचीं मुख्य चार; बुडें आहेत. ❀ **बूडजड, जड बुडाचा वि०** १ गांवांतील प्रतिष्ठित किं० वजनदार माणूस. २ श्रीमंत; समृद्ध.

बूथ स्त्री० मागें ' बुंथ, '' बुंथी ' पहा.

बूंद मागें ' बुंद ' पहा.

बूर [**हिं०** बूर=कोंडा, टरफल] **पु०** अतिकष्टाच्या कामामुळें येतो तो थकवा (निघणें, पडणें, काढणें).

बृहण बृंहित, [**सं०**] **न०** १ पोषण. २ हत्तीची गर्जना. **बृहण न०** (**वैद्यकांत**) पोषण, पौष्टिक द्रव्यें, इ० नीं शरीर लठ्ठ करणें. **कर्शन न०** उपवास, लंघन, इ० नीं शरीर कृश करणें.

बृहत् [**सं०**]**वि०** १ मोठा; विशाल; विस्तृत. २ पुष्कळ. ३ बलिष्ठ. ❀ **बृहन्नाल पु०, बृहन्नालिका स्त्री०, बृहद्यंत्र न०** तोफ. **बृहद्भानु पु०** सूर्य.

बृहती [**सं०**] **स्त्री०** १ रिंगणी. २ डोरली. (**मराठींत**) गुदद्वार किं० ढुगण.

बृहस्पति [**सं०**] **पु०** १ देवांचा गुरु. २ गुरु ह्या नांवाचा ग्रह; मंगळ आणि शनि ह्यांच्या मध्यें हा आहे. ३ वाणीची देवता. ४ (**लाक्षणिक**) बुद्धिमान् आणि उत्कृष्ट वक्ता. ❀ **बृहस्पतिवार पु०** गुरुवार; बुधवार आणि शुक्रवार ह्यांच्या मधला आठवड्याचा वार.

बें न० शेळीचें ओरडणें. ❀ **बें बें करणें** पराभव होऊन हताश होणें.

बे [**सं०** द्वि; **हिं०** बे] **वि०** दोन; उ० बेचाळीस, बेवीस.

बे [**फा०** बे] **उपसर्ग** वांचून; शिवाय; नसतां. **टीप,**–हा उपसर्ग शब्दारंभीं येऊन घटित जे शब्द ते खालीं वर्णक्रमानें दिले आहेत.

बेअदबी [**फा०** अदब=शिस्त, मान] **स्त्री०** १ अपमान. २ बेशिस्त वर्तन. ३ हरामखोरी.

बेअकली वि० मूर्ख; अजागळ; बेवकूब.

बेअदाई स्त्री० १ विरोध. २ कपट. ३ स्वामिद्रोह.

बेअबस क्रि० वि० व्यर्थ; विनाकारण.

बेआब स्त्री०, पु० अपमान; फजीती. **वि०** अपमान ज्याचा झाला तो.

बेआबरू स्त्री० फजिती; दुर्लौकिक. **वि०** ज्याची फजिती किं० मानखंडना झाली आहे असा.

बेआराम पु०, बेआरामी स्त्री० अस्वास्थ्य. **वि०** अस्वस्थ; हवालदील.

बेइज्जत स्त्री० अप्रतिष्ठा.

बेइतबार पु० गैरभरंवसा. **बेइतबारी वि०** भरंवशाला पात्र नव्हे असा.

बेइतला वि० गैरमाहीत.

बेइनसाफ पु०, बेइनसाफी स्त्री० अन्याय. **वि०** अन्यायाचा; न्यायाला सोडून असलेला किं० केलेला किं० ठरविलेला.

बेइमान, बेइमानी वि० कृतघ्न; हरामखोर; लबाड. **बेइमान न०, बेइमानी, बेइमानकी स्त्री०** हरामखोरी; कपट; कृतघ्नपणा; विश्वासास अपात्रता. [विनतोड.

बेइलाज वि० ज्याला उपाय नाहीं असा;

बेउजूर क्रि० वि० १ न कचरतां; शंका न धरतां. २ बिनतकरार; कांहीं सबब न सांगतां. ३ कोणाची वाट पाहतां.

बेक [म० बे=दोन; भलतेंच] **न०** भलतीच गोष्ट; दुसरेंच कांहीं तरी; उ० मी एक म्हटलें तर तो बेक म्हणणार, तो माझ्या आज्ञेंत कसा वागेल? उ० मी सांगितलें एक आणि तूं समजलास बेक, त्याला मी काय करूं?

बेकटा पु० जोंधळा, गहूं, इ० चा टरफल काढलेला दाणा.

बेकदर क्रि० वि० निर्धास्तपणें; न कचरतां.

बेकमोकास्त क्रि० वि० साद्यंत; कांहीं कमी न करतां.

बेकरारी स्त्री०१अनिश्चितपणा. २ तहमोड.

बेकस वि० १सत्त्वरहित; गुणहीन.२ कर्तृत्वशून्य.

बेकानू, बेकानून क्रि० वि० कायद्याला सोडून; अन्यायानें. **स्त्री०** अन्याय; जुलूम.

बेकायदा, बेकायदेशीर वि० अन्यायाचें. **क्रि० वि०** कायद्याला सोडून.

बेकार वि० ज्याला उद्योग किं० धंदा नाहीं किं० मिळत नाहीं असा. **बेकारी स्त्री०** उद्योग किं० धंदा नाहीं किं० मिळत नाहीं अशी स्थिति.

बेकिलाफ[अ०खिलाफ्=वैर] **पु०** १ सख्य. २ संशयनिवारण.

बेकी[म०बे=दोन]**स्त्री०** १दोन वस्तूंची जोडी. २ विरोध; भांडण. ह्या दोन्ही अर्थी ' एकी ' हा उलट अर्थाचा शब्द. एकी म्ह० सख्य किं० एकत्व. शाळेंतील मुलांच्या परिभाषेंत एकी म्ह० लघवी आणि बेकी म्ह० परसाकडे जाणें.

बेकूब, बेवकूब [फा० बे+वकूफ्] **वि०** मूर्ख; गाढव.

बेकुबी, बेवकूबी [फा० बेवकूफी] **स्त्री०** मूर्खपणा; गाढवपणा. [२ पूर्णपणें.

बेकुसूर क्रि० वि०१न चुकतां; हमखासशीनें.

बेकैद, बेकैदी स्त्री० शिस्तीचा अभाव; स्वच्छंदीपणा; अव्यवस्थित वर्तन. **वि०** बेशिस्त; स्वच्छंदी; अव्यवस्थित.

बेकौली वि० ज्याच्या संबंधानें कौल नाहीं असा; विगर कौलाचा. [कचरतां.

बेखत्रे क्रि० वि० निःशंकपणें; न भितां; न

बेखबर, बेखबर्दार वि० गैरसावध; गाफील.

बेखर्च,बेखर्ची वि० १ ज्याच्याजवळ खर्चावयास पैसा नाहीं असा; निर्धन; कंगाल. २ कंजूष; कृपण; चिक्कू.

बेग [हिं० बाग्] **स्त्री०** १ कोणेकाला आपल्या नियंत्रणेंत किं०ताब्यांत ठेवण्याचें आपलें सामर्थ्य; उ० रामभाऊंची बेग काशिनाथपंताच्या हातीं आहे. २ बिजागरी (सोनारांचा शब्द.).

बेग [तुर्की] पु० सरदार. **बेगम स्त्री०** १ मोठ्या दर्जाची स्त्री. २ राणी. ३ वयांत आलेली कुंवारीण.

बेगड न०, स्त्री० पिवळा, तांबडा, इ० रंगाचा धूर दिलेला कथलाचा पत्रा. **बेगडी वि०** १अशा पत्र्यानें सुशोभित केलेला.२(**लाक्षणिक**) १ दिखाऊ. २ कुचकिमतीचा; पोकळ.३न्यायाचें रूप दिलेला (अन्याय किं० खुलासा).

बेगमी [हिं० बे (नाहीं)+गम् (भीति; शंका)] **स्त्री०** १ जरूर अशा पदार्थांचा भरपूर पुरवठा किं० संचय; संसारांत किं० कांहीं कामांत विशिष्ट काळाला पुरण्याइतका पदार्थ-

विशेषाचा पुरवठा. २ विशिष्ट माप किं० अवधि भरून काढण्याइतकें परिमाण; उ० हा गोंधा एकदा निजला कीं चार तासांची बेगमी.

बेगार, बेगारी मागें 'बिगार,' 'बिगारी' पहा.

बेगी, बेगमी, बेगीनें, बेगून, बेगें, बिगी, बिगीबिगी [**सं०** वेग=जलदी, त्वरा] **क्रि० वि०** त्वरेनें; झटपट (अशिक्षितांचा शब्द).

बेगुन्हा [**फा०** बे (नाहीं)+गुनाह (अपराध)] **वि०** निरपराधी. **क्रि० वि०** गुन्हा नसतां. **पु०** गुन्हा केला नाहीं अशी स्थिति; गुन्हा नसणें.

बेगुमान [**फा०** बे+गुमान् (शंका)] **वि०** बेपरवा; गर्विष्ट; उन्मत्त.

बेचक न०, स्त्री०, बेचकुळी, बेचकळी स्त्री०, बेचका (-कु-) ळें, बेचकूल (-ळ) न० १ एका बिंदूपासून फुटलेल्या दोन शाखांमधील किं० फाट्यांमधील अंतर किं० जागा किं० प्रदेश. २ हाताचीं किं० पायाचीं जीं दोन शेजारचीं शेजारचीं बोटें त्यांच्यामधील अंतर. ꙮ **बेचकुळींत सापडणें** (किं० **अडकणें**) पंचाइतींत किं० अडचणींत पडणें.

बेचण (-न-) [**हिं०** बेचना=विकणें] **न०** विकणें. ꙮ **बेचण (-न-) पत्र न०** विक्रीचा किं० खरेदीचा कागद.

बेचरक क्रि० वि० न कचरतां; धाडसानें; निःशंकपणें.

बेचरणें अ० क्रि० १ नायटा, खरूज, गजकर्ण, इ० चरत जाणें किं० अधिक जागेवर पसरणें. २ डोक्यावर केश पसरलेले असणें.

बेचव [**फा०** बे (नाहीं)+चव (रुचि)] **वि०** पचपचीत; पानचट; रुचिहीन.

बेचांगळें न० वर 'बेचक' पहा.

बेचाड [**फा०** बे(नाहीं)+चाड (मुरवत)] **वि०** निर्लज्ज; ज्याला किं० ज्यांत भीडभाड नाहीं असें (माणूस, भाषण).

बेचावण (-न), बेचन [**हिं०** बेचना=विकणें] **स्त्री०** शिस्तीला किं० नियमाला धरून केलेल्या खरेदीविक्रींचा लेख,-हुंडी, करारनामा, मक्तेपत्र किं० खत यांवर नमूद करतात तो.

बेचा (-ता-) ळ, बेचा (-ता-) ळीस [**म०** बे (दोन)+चाळीस] **वि०** चाळिसांत दोन मिळवून होण्याऱ्या संख्येइतका. ꙮ **कोणेकाचे बेचाळीस उद्धरणें** (किं० **नरकांत घालणें** किं० **बुडविणें**) किं० **कोणेकावर बेचाळिसाचा अंक घालणें** त्याला त्याच्या आईबापांवरून शिव्या देणें. **बेचाळीस स्मरून बोलणें** आपल्या कुटुंबांतील पूर्वजांना स्मरून खरें असेल तेंच सांगणें. **टीप,**–१ पित्याचे एकवीस पूर्वज आणि मातेचे एकवीस पूर्वज मिळून बेचाळीस ही संख्या. **टीप,**–२ मृत्यूची खबर द्यावयाची असतां लखोट्यावर ४२ हा आंकडा घातलेला असतो. **टीप,**–३ लखोट्यावर ज्याचें नांव असेल त्याणेंच तो उघडून वाचावा हें दर्शविण्यासाठीं लखोट्यावर ४२ हा आंकडा घालण्याची पूर्वी चाल असे.

बेचाळी स्त्री०, बेचाळ (-ळें) न० १ चर्वण करण्याचे मुखाचे जे दोन भाग त्यांपैकीं खालचा जो भाग तो; उ० उणा शब्द बोललास तर तुझी बेचाळी फोडून टाकीन. हा शब्द बहुधा जनावरांच्या मुखासंबंधानें योजतात आणि माणसाच्या मुखासंबंधानें रागानें किं० तुच्छतेनें योजतात. २ मनुष्याची हनुवटी आणि खालचा ओठ ह्यांच्या दरम्यानच्या खळगा.

बेचाळीस वर 'बेचाळ' पहा.

बेचिराक (-ख-,-ग) [**फा०** बे (नाहीं) +चिराग (दिवा)] **वि०** जेथील वसति नाहीशी झाल्यामुळें जेथें दिवा लाविला जात नाहीं असा (गांव, देश); उद्ध्वस्त; ओसाड; उ० पेंढारी जयपूरवाल्याच्या प्रांतांत कजाकी करून मुलूख बेचिराग करतात.

बेचोवा [**फा०** बे (नाहीं)+चोब् (खांब, काठी)] **पु०** लहान बिनखांबी तंबू.

बेजबाब [**फा०** बे (भलताच)+ जवाब (उत्तर)] **पु०** असभ्यपणाचें उत्तर. **क्रि० वि०** उद्धटपणानें; उर्मटपणानें; आडदांडपणें. **बेजबाबी वि०** उद्धट; उर्मट (माणूस, भाषण). **बेजबाबदार वि०** आपणावरची जबाबदारी किं० जोखीम न ओळखून वागणारा.

बेजमी वर ' बेगमी ' पहा.

बेजरब [**फा०** बे (नाहीं)+जर्ब (धाक)] **क्रि० वि०** धिटाईनें; धाडसानें; न कचरतां.

बेजहा, बेजा [**फा०** बे (नाहीं)+ज्या (जागा)] **वि०** १ फाजील उधळपट्टीचा; अमर्याद. २ अनाठायीं असलेला. ३ अनुचित; अयोग्य. ४ अस्वस्थ.

बेजात [**म०** बे (नाहीं)+जात] **वि०** हलक्या जातीचा.

बेजार [**फा०**] **वि०** १ जर्जर झालेला;त्रस्त; विपन्न; त्रासलेला. २आजारी. ॐ **बेजारी स्त्री०**१ उपद्रव; त्रास. २ आजार.

बेट न० १ सर्व बाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेला भूप्रदेश. २ झाडांझुडपांचा समूह. ३ केळ, बांबू, इ० चे कोंवळे अंकुर समुच्चयानें. ४ कुटुंबांतील माणसें समुच्चयानें; कुटुंबाचा पसारा किं० विस्तार. ॐ **बेटीं लागणें**१ उथळ पाण्यांत येणें. २ पोहोणारा पाण्याच्या तळापर्यंत पोचणें. ३ (कांहीं काम, पदार्थ, इ०) समाप्तीच्या पथांस लागणें किं० रंगारूपास येऊं लागणें किं०सुरळीत-पणें चालूं लागणें.

बेटका पु० मळलेला गहूं किं० जोंधळा.

बेटकुळी स्त्री० १ लहान बेडूक. २ दंड, पोटरी, इ० वर आघात केला असतां तेथें उठतो तो मांसाचा गोटा (काढणें, उठणें).

बेटणी स्त्री० सोनाराची आवटी किं० ठसा, –ज्यावर सोनें, चांदी, इ०चा पत्रा ठेवून त्याचे-वर घाव मारून त्या पत्र्यावर त्या ठशाची नक्षी उठविली जाते. २ अशी नक्षी उठविण्याची क्रिया.

बेटणें स० क्रि० बेटणी किं० आवटी यांचेवर (सोनें, चांदी, इ० चा पत्रा) हातोडीनें ठोकून त्याचेवर आकृति उठविणें. **अ० क्रि०** वरील क्रियेनें (पत्रा) विशिष्टआकृतियुक्त होणें.

बेटणें न०, बेटमोरा पु० वर ' बेटणी ' पहा.

बेटा [**हिं०**] **पु०** १ पुत्र. २ मुलगा. ३ कोणतीही वस्तु (प्रेमांत); उ० ही बेटी लेखणी काय कामाची ? उ० हा बेटा कागद फुटतो; उ० तो बेटा सभेंत बोलतो.

बेटाड [**म०** बेट] **न०** १ मोठें बेट. २ बेट (तुच्छतेनें). ३ हरळीच्या तंतूंचा गठ्ठा किं० जुंबाड किं० जाळें. ४ मैदान, शेत, इ० तील उंचवटा. ५ ज्याच्या पुष्कळ शाखा झाल्या आहेत असें कुटुंब किं० जात. ६ टोळी, जूट. ७ दाटीनें बसलेल्या किं० उभें राहिलेला लोकांचा जमाव.

बेटी [**हिं०**] **स्त्री०** १ आपली कन्या किं० मुलगी. २ कोणीही मुलगी.

बेटांव [**म०** बेटणें] **वि०** १ सोनाराच्या बेटण्यावर वठविलेली (आकृति). २ बेटण्या-वरून ठोकून काढलेला (पत्रा).

बेंड न० १ गळूं; उठाणूं .२ उंच आलेली बेंबी. ३ काजूच्या बीच्या मागचा लठ्ठ देठ. ४ बेंडभोवऱ्याचा मूळचा देठ. ॐ **बेंड फुटणें** (किं० **बाहेर पडणें**) १ रहस्य प्रकट होणें; खुबी बाहेर पडणें. २ एकाद्यानें गुप्त ठेंविलेल्या गोष्टीचा हास्यास्पद किं० निंद्य भाग किं० प्रकार उघडकीस येणें.

बेडका, बडका पु० थुंकी किं० कफ यांचा तोंडांतून बाहेर टाकलेला गठ्ठा किं० गोटा.

बेडकी [**म०** बेडूक] **स्त्री०** १लहान बेडूक. २ मनुष्याचा दंड, पोटरी, इ० वर आघात केला असतां तेथें उठतो तो. उंचवटा. ३ तालीमबाज लोकांचे दंड, पोटऱ्या, इ० वर कायमचा उत्पन्न झालेला असतो तो गोळा.४ घोड्याच्या खुराच्या तळाच्या खळग्यांत जो किंचित लांबट उंचवटा असतो तो. ॐ **बेडकीचें कुलूप न०** साधारणपणें वाटोळें किं० चौकोनी कुलूप. ह्याच्या व्यावर्त-कत्वें ' नळकंड्याचें कुलूप ',–जें दुकानांच्या फळ्यांना लावितात.

बेडकुळी, बेंडकुळी, बेडकोळी, बटकोळी, बेट्कुळी [**म०** बेडूक] **स्त्री०** लहान बेडूक. वर ' बेडकी 'पहा.

बेंडभोवरी स्त्री० एक वेली. **बेंडभोंवरा पु०** ह्या वेलीचें फळ.

बेडा पु० पूर्ण वाढलेल्या पोफळाची केलेली सुपारी; रोठा.

बेडा पु०, बेडें न०गाई,म्हशी,इ०चा गोठा.

बेडा [**हिं०**] **पु०** पाण्यावर चालवावयाचा तराफा. ॐ **कोणेकाचा बेडा पार जाणें(होणें,**

असणें) त्यानें आपलें ध्येय मिळविलेलें असणें; त्याची कामना तृप्त झालेली असणें.

बेडा पु० बांधकामांत दगडाला दिलेला जोड.

बेंडा [म० बेंड] वि० ज्याची बेंबी वर आली आहे असा.

बेंडा पु० प्रतिष्ठित तांडेलास मोठेपणाची पदवी देतात ती.

बेंडागुळी स्त्री०, बांडगूळ न० दुसऱ्या वृक्षावर वाढून त्याच्या वर पुष्ट होणारें झाड.

बेंडाळणें [म० बेंड] अ० क्रि० बेंड उठणें; फुगणें; फुगीर होणें.

बेडी, बिडी [हिं०] स्त्री० १ कैद्याच्या पायांत घालावयाची शृंखळा. २ (**लाक्षणिक**) कामाची गति बंद करणारी कोणचीही गोष्ट; मनुष्याला एके ठिकाणीं आडकाविणारी कांहीं गोष्ट; शुष्ककाष्ठ. ३ एक भूषणविशेष.

बेंडू वि० ठेंगणा आणि लठ्ठ (माणूस, पशु).

बेडूक [सं०मंडूक]पु० एक जलस्थलचर प्राणिविशेष.

बेडें न० १ गायी, म्हशी, इ० साठीं बांधलेली जागा. २ माणसांसच जातां यावें, गुरांस जातां येऊं नये, अशी जी वाग इ० च्या वाटेंत केलेली असते ती योजना. ह्या अर्थी 'बेळें' असाही शब्द आहे.

बेडौल [हिं०] वि० बेढब; बेघाट.

बेंड्या [म० बेंड] वि० ज्याची बेंबी पुढें आलेली आहे असा (मनुष्य).

बेढंग पु० भलभलते नाद, चाली, सवयी, इ०. ॐ **बेढंगी, बेढंग वि०** भलत्या नादास लागलेला; दुर्वर्तनी; वेश्यागमन, जुगार, इ० फंदांत पडलेला.

बेढब [हिं०] वि० ज्याचा आकार, रचना, मांडणी, इ० चांगली नाहीं असा (माणूस, पदार्थ).

बेणका पु० दोरीनें विहीरीचें पाणी काढण्याचें जें चाक तें ज्या दोन उभ्या लाकडांत फिरतें त्यांच्या मध्यें घातलेलें काटूक किं० लाकडाचा तुकडा. ह्या दोन उभ्या लाकडांना 'बुटल्या' किं० 'बाहुल्या' म्हणतात. 'बुटली' 'बाहुली' हें ए० व०.

बेणणी [म० बेणणें] स्त्री० शेतांतील गवत उपटून काढणें.

बेणणें स० क्रि० (शेत, आवार, इ० तील) रद्दी झाडें झुडपें उपटून (तें) स्वच्छ करणें.

बेणा [फा० बीना=पाहाणें] वि० १ वरचें आवरण किं० आच्छादन नाहींसें झाल्यामुळें दिसेसा झालेला; उ० पाणी ओहोटलें म्हणजे खडक बेणा होतो. २ (**लाक्षणिक**) बेणावला इ० न दिसेसा झाला जो तो. खालीं 'बेणावणें' पहा.

बेणावणें [म० बेणा=उघडा, दृश्य] अ० क्रि० अदृश्य झालेला किं० लपलेला जो (मनुष्य, पशु, पदार्थ) तो दिसूं लागणें किं० दृश्य होणें; उ० संध्याकाळीं परत येतों म्हणून जो गेला तो पंधरा दिवसांनीं आज बेणावला; उ० ढग दूर झाल्यावर सूर्य बेणावेल.

बेणावणें [म० बेणणें] अ० क्रि० वाईट चालीरीति नाहींशा होऊन (कोणी मनुष्य) सुधारणें; उ० त्यानें घोडजुगारी सोडल्यापासून तो चांगला बेणावला.

बेणें, बियाणें [म० बीं] न० पेरावयासाठीं काढून ठेविलेलीं बीजें किं० बिया समुच्चयानें.

बेत [हिं०] पु० १ संकल्प; उद्देश. २ आराखडा; नमुना. ३ भोजनांत खाद्यें, पेयें, इ० अमुक अमुक करावयाची अशी योजना. ॐ **बेताचा, बेताबाताचा वि०** १ व्यवस्थित; यथाशास्त्र; नियमाला अनुसरून असलेला. २ मध्यम प्रतीचा; जसा पाहिजे तसा. ३ कमी नाहीं किं० अधिक नाहीं असा किं० इतका; उ०शेराच्या जिलब्या बेताच्या होतील. **बेतावर असणें** १ कृत संकल्पाला चिकटून असणें. २ आटोक्यांत असणें; अतिरेकाला गेलेला नसणें; उ० त्याची गांजेकशी बेतावर आहे. **बेतावर येणें** योग्य मर्यादेंत येणें.

बेतऊस पु० एक प्रकारचा ऊस.

बेतक (-ख-) शीर (-सीर) [फा० बे (नाहीं)+तक्सीर् (गुन्हा)] **वि०** निरपराध; ज्यानें चुकी केलेली नाहीं असा. **स्त्री०** बेगुन्हाई; निरपराधीपणा.

बेतणी [म० बेतणें] स्त्री० बेतण्याची क्रिया. खालीं 'बेतणें' पहा. **बेतणीचा वि०** विवक्षित

आकाराचा किं० मापाचा.

बेतणें [म० बेत] **स० क्रि०** १ (अंगरखा, चोळी, सदरा, इ० ल्यावयाचें कपडे) शिवावयाचे असतां मोठ्या वस्त्रांतून विवक्षित आकाराचे तुकडे कापून काढणें. २ (**लाक्षणिक**) कोणेकाच्या गालफडांत (चपराक) लगावणें.

बेतणें, बितणें [हिं० बेतना] **अ० क्रि०** १ जवळ येऊन ठेपणें. २ (प्रसंग, पंचाईत) अंगावर कोसळणें. ह्या अर्थी भावकर्तरि प्रयोगही होतो; उ० त्याच्यावर मोठा अनर्थ बेतला (किं० बितला) होता पण त्यांतून तो बचावला; उ० प्राणावर बेतलें (किं० बितलें) तरी तो खोटें बोलणार नाहीं. मागें 'बितणें' यथास्थानीं पहा.

बेतमा [फा० बे तमअ] **वि०** १ अलोभी.२ बेपरवा; फिकीर न करणारा. **बेतमा स्त्री०** अलोभ; निर्लोभी वृत्ति. २ बेपरवा; उदासीनपणा; बेफिकीरपणा.

बेतरतद [फा०] **स्त्री०** १ तजवाजीची अभाव. २ अव्यवस्था.

बेतऱ्हा [फा० बे (नाहीं)+तरह् (रूप)] **वि०** १ विलक्षण; बेडौल; बेढब.२ फार मोठा.

बेतविणें [म० 'बेतणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** शिंप्याकडून (ल्यावयाच्या कपड्याचीं) मापें घेवविणें; चांभाराकडून (जोडा, बूट, इ० चीं) मापें घेवविणें. ३ कोणेकाच्या तोंडावर (चपराक) मारणें; उ० त्याच्या तोंडावर जेव्हां दोन बेतविल्या तेव्हां तो कबूल झाला. **टीप,**–' चपराक ' हें कर्म न योजलें तरी चालतें.

बेताब [फा० बे (नाहीं)+ताब् (सामर्थ्य)] **वि०** असमर्थ; अशक्त; हतधैर्य.

बेताल (–ळ) [हिं० बेताल] **वि०** १ (**संगीतांत**) तालाशीं न जुळणारें (गायन किं० वादन किं० तसें गायन किं० वादन करणारा मनुष्य किं० तसे स्वर काढणारें वाद्य). २ उत्संखळ; शिस्तीला सोडून असलेलें (वर्तन किं० तसें वर्तन करणारा मनुष्य). ३ बेफाम (माणूस, गुरूं, इ०).

बेताळ, बेताळीस मागें ' बेचाळीस ' पहा.

बेती स्त्री० दुफाशी सोंगट्याच्या खेळांत दोन फाशांवर तीन तीन पडलें असतां होतो तो डाव.

बेतींव [म० बेतणें] **वि०** १ मुद्दाम बेतून शिवविलेला (अंगरखा, सदरा, चोळी, इ०). २ पूर्वी योजना करून केलेलें (काम).

बेत्या [म० बेत] **वि०** नेहेमीं कांहीं तरी योजना, किं० कल्पना काढीत बसणारा.

बेथूड वि० कुरूप; बेघाट; बेडौल.

बेंद स्त्री० चिखलट किं० दलदलीची जमीन.

बेदखल [फा०] **वि०** अधिकारावरून भ्रष्ट.

बेदडा पु० रानटी लोकांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

बेदम [फा० बे (नाहीं)+दम् (श्वास)] **वि०** १ मार देऊन अर्धमेला केलेला. २ अर्धमेला होण्याइतका (मार देणें). ३ फार धावल्यामुळें किं० काम केल्यामुळें जेजर झालेला (माणूस, पशु). [गवत.

बेदर, बेदरी स्त्री० एक प्रकारचें झुपकेदार

बेदरद (–दी) [फा०] **वि०** १ क्रूर; निर्घृण. २ बेफिकीर. ३ बेगुमान.

बेदरी स्त्री० एक वृक्षविशेष.

बेंदरी स्त्री० जोत्याच्या रचाईत जे तीन थर असतात त्यांपैकीं अगदीं खालचा थर. मधल्या थराला, ' पेटी, ' आणि अगदीं वरच्या थराला ' पाटथर ' किं० ' पाटथरा ' म्हणतात. मागें ' पेटी ' पहा. [टपणा.

बेंदाड स्त्री० १ चिखलट जमीन. २ चिखल-

बेंदाड न० गवताच्या किं० चरत जाणाऱ्या बारक्या बारक्या वनस्पतींच्या मूळांचा झुबका. **वि०** गवत इ०च्या मूळांनीं व्यापिलेलें (शेत,रान, इ०).

बेदाणा (–ना) [फा० बेदाना] **पु०** एक प्रकारचें द्राक्ष.हें लहान,वाटोळें,आणि बहुधा बीजरहित असतें. ® **बेदाणा डाळिंब न०** ज्या डाळिंबाच्या दाण्यांत बी नाहीं तें डाळिंब.

बेदाद [फा० बे (नाहीं)+दाद(न्याय)] **स्त्री०** १ न्यायाचा अभाव. २ अन्याय.३ जुलूम. ४ बेबंदशाही. **स्त्री०** राज्यांत किं०संस्थेंत अन्याय, पक्षपात, अपकार, इ०बद्दल तकरार केली असतां तिकडे लक्ष्य दिलें जात नाहीं अशी स्थिति.

बेदार [**फा०**] **वि०** जागृत; उ० नवाब बेदार झाले.

बेदावा [**फा०**] **वि०** सोडचिठ्ठी; हक्क [सोडून देणें.

बेदिक्कत, बेदिकत, बिनादिकत, बिनदिक्कत [**फा०** बे, बिन्(नाहीं)+दिक्कत(शंका)] **क्रि० वि०** न कचरतां; निःशंकपणें; बेलाशक. **स्त्री०** निःशंक वृत्ति.

बेदिल [**फा०** बे (नाहीं)+दिल् (अंतःकरण)] **वि०** दुःखी; खिन्न; कष्टी; असंतुष्ट. **बेदिली स्त्री०** १ असंतुष्टपणा; रुष्टपणा. २औदासीन्य; खेद; विषाद.

बेदुवा [**फा०**] **पु०** १ शाप. २ अवकृपा.

बेंद [**म०** मेंदू] **पु०** १ प्राण्याच्या डोक्यांत असतो तो एक पदार्थ,–हा जितका जड असेल तितका तो प्राणी बुद्धिमान असतो. २ मगज, गीर (फळादींतील). ३ नासलेल्या फळांतील गीर. ४ जखमेंचें उघडें पडलेलें मांस.

बेंदूर पु० १ बैलांना शृंगारून त्यांना गांवांतून हिंडवितात ती पौर्णिमा. प्रान्तपरत्वें ही पौर्णिमा आषाढ, श्रावण, किं० भाद्रपद, ह्या महिन्यांत पाळली जाते. २ ही पौर्णिमा पाळण्याचा विधि.

बेधडक [**हिं०**] **क्रि० वि०** शंका न बाळगतां; न कचरता; न अडतां.

बेनवा [**फा०**] **वि०** १ निर्धन. २असहाय. ३ अधीर.

बेनाहक्क [**फा०** बे, ना (नाहीं)+हक्] **क्रि० वि०** १ हक्क नसतां. २ विनाकारण.

बेनिसबत [**फा०**] **क्रि० वि०** १बेलाशक; न कचरतां. २ भीड मुरवत न ठेवतां. ३ उत्संखलपणानें; स्वैरपणानें.

बेपडदा [**फा०** बे (नाहीं)+पर्दाह् (आवरण)] **वि०**अनाच्छादित;उघडें.**पु०** उघडेपणा; जाहीरपणा.

बेपरवा [**फा०**] **वि०** १ कोणाला न भिणारा किं० न कचरणारा; उत्संखळ. २निष्काळजी.

बेपरवा पु०डोकींत घालावयाचा एक दागिना.

बेपार [**सं०** व्यापार; **हिं०** बेपार] **पु०** व्यापार; खरेदीविकरीचा व्यवहार. **बेपारी पु०** व्यापारी.

बेफंदी वि० १ अव्यवस्थित; दुराचरणी; भलत्याच नादास लागलेला. २ उत्संखळ, व्रात्य (पोर).

बेफाम [**म०** बेफहम्] **वि०** १ गैरसावध. २ अनियंत्रित; बेपरवा. **क्रि० वि०** अतोनात (रागावणें, मारणें, इ०).

बेफिकीर [**फा०** बे (नाहीं)+फिक्र (काळजी)] **वि०** १ निष्काळजी; ज्याला काळजीकांटा, चिंता,किं०विवंचना नाहीं असा.२ स्वस्थ; शांत. **बेफिकीरी स्त्री०** बेफिकीरपणा.

बेंबट [**म०** बेंबी] **न०** १ बेंबी. २ मोठी किं० बेडौल बेंबी. ३ बेंबी (तुच्छतेनें).

बेंबटणें अ० क्रि० (शेळीनें)ओरडणें; बें बें करणें.

बेबंद [**फा०**] **वि०** अव्यस्थित; बेशिस्त. **पु०** शिस्त, व्यवस्था,सुरळीतपणा,इ०चा अभाव. ꕥ **बेबंदशाही (–ई)स्त्री०**अनायकी;अव्यवस्था; गोंधळ.

बेबली स्त्री० एक झाड. **बेबलें न०** त्याचें [फळ.

बेबहा [**फा०**] **वि०** मूल्यवान्; भारी किमतीचें.

बेबहार वि० अत्यंत विपुल.

बेबळ (**म०** बे(नाहीं)+बळ]**वि०**अशक्त; असमर्थ.

बेबा पु० एक फुलपाखरूं.

बेबाक (–ग) [**फा०** बे (नाहीं)+बाकी (शिलक)] **स्त्री०** ऋणमुक्तता. **क्रि०वि०**बाकी न राहूं देतां.

बेंबारा पु० रहस्याचा स्फोट किं० उघडकी.

बेबारा, बेवारा [**हिं०** बेवारा] **पु०** १ कर्जापासून मुक्तता.२कामाचा निकाल;कामाची समाप्ति. ३ सामग्रीचा (फडशा करणें, होणें).

बेंबावणें अ० क्रि० (शेळी,मेंढरू)ओरडणें.

बेंबी स्त्री० पोटावर जो ग्रंथि असतो,–जेथें मातेच्या उदराशीं नाळ संबद्ध असतें, तो. ꕥ **बेंबीचा देठ पिळणें, बेंबीचा देठ पिळून दुखूं लागणें** परमावधीच्या कळवळ्यानें आक्रान्त होणें. **बेंबीच्या देंठापासून क्रि० वि०** अगदीं

मनापासून; अंत:करणपूर्वक; अगदीं खरेंपणानें. **बेंबींचें उखळ होणें** सुग्रास आणि चमचमीत खावें आणि पेयें मिळत असल्याकारणानें लठ्ठ आणि दोंदील होणें. **बेंबीच्या देठापासून जोर करून बोलणें** अंगीं असेल तितकी सर्व शक्ति खर्च करून बोलणें.

बेबूद, नाबूद [**फा०** नाबूद=नबूद=झाला नाहीं; झाला नव्हता] **पु०** अभाव. **वि०**नव्हतें असें; नष्ट; विध्वस्त. ꙮ **नेस्तनाबूद करणें** समूळ विध्वंसून किं० उच्छेदून टाकणें.

बेभरोशी [**म०** बे (नाहीं)+भरंवसा] **वि०** ज्यावर विश्वास ठेवितां येत नाहीं असा. **बेभरोशीं क्रि० वि०** जिच्चेविषयीं भरंवसा आहे ती गोष्ट न घडून आल्यामुळें पंचाइतींत (पडणें, पाडणें). **बेभरोसा पु०** खात्रीचा अभाव;अनिश्चितपणा; साशंकता; संशय.

बेमरामत [**फा०**] **स्त्री०** नादुरुस्ती. **वि०** दुरुस्त करावयाला पाहिजे असा.

बेमान, बेमानी मागें ' बेइमान, ' ' बेइमानी ' पहा.

बेमार [**फा०**] **वि०** १ आजारी. २ अति दमलेला. ३ नादुरुस्त स्थितींत असलेलें (घर,पदार्थ, इ०) **बेमारी स्त्री०**१आजार.२ श्रांतपणा; थकवा.

बेमार [**फा०** बे (नाहीं)+**म०** मारणें]**वि०** १ ज्याचेवर बंदुका, तोफा, इ०चा मारा होऊं शकत नाहीं असा (किल्ला इ०); अजिंक्य. २ अतोनात; उ० बेमार पाऊस, धूर, वारा, इ०.

बेमालूम [**फा०** बे (नाहीं)+**अ०**मअलूम् **वि०** न दिसेल असा;उघडकीस न आलेला किं० न येईल असा. [भलतेंच.

बेमुनासब (-सीब) [**फा०**]**वि०**अयोग्य:

बेमुरवत [**फा०**] **क्रि० वि०** भीडभाड न धरतां; संकोच न बाळगतां. **बेमुरवती वि०** धिटाईचा; संकोचरहित; असभ्य.

बेमोर्यीन, बेमोहीन, बेमोईन [**फा०** बे (नाहीं)+**अ०**मुअय्यन्=ठराव] **वि०** अगणित, अमर्याद.

बेमोहीम [**फा०**] **वि०** उद्योग किं०धंदा न करणारा किं० न पाहाणारा आळशी माणूस.

बेर पु० एक प्रकारचें गवत.

बेर, बेरणी [**म०** बेरणें] **स्त्री०** एकदा एका दिशेनें नांगरलेली जमीन पुन्हां काटकोनाच्या दिशेनें नांगरण्याची क्रिया.

बेरकट [**म०** बेरी] **वि०** बेरीनें मिश्रित आणि दाट चिखलासारखें झालेलें (तेल, तूप, इ०). खालीं ' बेरी ' पहा. **न०** असें दाट तेल, तूप, इ०.

बेरकट वि० किंचित् बहिरा.

बेरकटणें [**म०**बेरी] **अ० क्रि०** (भांडें,समई, लामणदिवा, इ०) बेरीनें ओंगळ होणें.

बेरकी [**कानडी**] **वि०** लुच्चा; लबाड; कपटी.

बेरकी स्त्री० एक प्रकारचें गवत.

बेरकूट, बेरकुटणें वर ' बेरकट, ' ' बेरकटणें पहा.

बेरंग [**म०** बे+रंग] **पु०** १ रंगाचा भंग; उत्साह, सुख, आनंद, करमणूकीचा खेळ, इ० मध्यें कांहीं कारणानें होतो तो बिघाड; मौजेचा भंग; विरसपणा. २ खराबी.

बेरट [**म०** बेरी] **वि०** बेरीनें युक्त असें (तेल, तूप). **न०** बेरीनें युक्त तेल,तूप, इ०.

बेरड पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा कोणी इसम. ' रामोशी ' हा पर्याय शब्द. ꙮ **बेरडाई, बेरडगिरी स्त्री०, बेरडांव, बेरडांवें न०**बेरडांनीं हल्ला करून केलेली लुटालूट.

बेरड स्त्री० १ मिश्रण. २ सटरफटर सामान समुच्चयानें. [होणें).

बेरड स्त्री० उवांचीं अंडीं प्रत्येक (पडणें,

बेरणी [**म०** बेरणें]**स्त्री०** उभें नांगरलेलें शेत पुन्हां आडवें नांगरणें.

बेरणें स० क्रि० (उभें नांगरलेलें शेत)पुन्हां आडवें नांगरण्याची क्रिया.

बेरी स्त्री० १ तेल, तूप, इ० तील गाळ किं० गदळ. २ काहिलींत कढत असलेल्या उसाच्या रसाची किं० साखर इ० ची मळी.

बेरीज [**फा०**] **स्त्री०** १ मिळवणी. २ अनेक संख्या एकवटण्याची क्रिया किं०ही क्रिया करून आलेला आंकडा. ꙮ **बेरीजभरती स्त्री०** ज्या पदार्थाचें जें परिमाण इष्ट आहे तितकें भरत नसल्यास तें भरून दाखविण्यासाठीं लबाडीनें आंत

घातलेली खोटी भर. मागें 'खोगीरभरती' पहा.

बेरोख पु० १ प्रेमाचा अभाव. २ दुसऱ्या दिशेस लागणें.

बेरोजगार (-री) [**फा०**] **वि०** ज्याला उद्योगधंदा नाहीं असा; रिकामा.

बेरोजा [**फा०** गुंदाह् फेरोजाह्] रंगाच्या उपयोगाची एक वनस्पती.

बेल [**सं०** बिल्व] **पु०** १ एक झाड,-याचीं त्रिदळ पानें शिवास वाहातात. २त्याचेंपान. **न०** त्याचें फळ. ॐ **बेलकाचरी स्त्री०** बेलफळाच्या वाळविलेल्या चकत्या. **बेलपत्र न०** बेल नांवाच्या झाडाचें पान. **एकाद्या वस्तूवर बेलपत्र ठेवणें** तिच्यावरचा आपला सर्व हक्क सोडणें. **बेलपत्री रुपाया पु०** प्राचीन काळीं प्रचलित असा एक प्रकारचा रुपाया. **बेल-भंडार** [**म०** बेल (बेलाचीं पानें) + भंडार (हळद)] **पु०** देवाच्या मूर्तीला वाहिलेलीं बेलाचीं पानें आणि हळद. प्रतिज्ञेचा किं० विधानाचा खरेपणा स्थापावयाचा असतां ही देवाला वाहिलेलीं पानें उचलण्याची क्रिया केली जाते. **बेलभंडार करणें** अशा क्रियेसहित कांहीं प्रतिज्ञा किं० विधान करणें. **बेलवात स्त्री०** देवापुढें स्त्रिया लावतात ती एक प्रकारची कापसाची वात.

बेलकडें न० एक जलाश्रित प्राणी,-खेकड्याच्या जातीचा.

बेलका पु०, बेलें, बेलकें न० नारळांतील खोबरें खरवडून काढून केलेलें बारदान.

बेलगाम (-मी) [**फा०**] **वि०** १ ज्याला नियंत्रणा नाहीं किं० घातलेली नाहीं असा; आडदांड; उत्संखळ. २ दुसऱ्या जागेंत किं० दुसऱ्याच्या हातांत ज्याचा कांहीं भाग आहे जसें (घर, कारभार, नोकरी, इ०). **क्रि० वि०** आडवळणाला; गैरसोयीच्या ठिकाणीं.

बेलटी स्त्री० डोकें (तुच्छतेनें); उ० तूं लबाड्या करतोस पण तुझी बेलटी फोडून काढीन तेव्हां तुला समजेल !

बेलटें न० १ डोकें (तुच्छतेंत). २ नारळ (तुच्छतेंत).

बेलदार [**फा०**] **पु०** खाणींतून दगड काढून [विकणारा.

बेला पु० १ नारळाचें पात्र. २ पाणी उपसणें इ० साठीं दांडा लाविलेलें नारळाचें पात्र.

बेलाकसूर [**अ०**] **वि०** १ निःशंक. २ फाजील धीट. **क्रि० वि०** १ निःशंकपणें; न कचरतां. २ धाडसानें; साहसपूर्वक.

बेलाग [**फा०** बे (नाहीं)+**म०** लागणें] **वि०** ज्याचेवर कोणत्याही प्रकारचा लाग,इलाज, नियंत्रणा, किं० उपाय चालत नाहीं असा(किल्ला, आजार, पेच, स्थिति). **क्रि०वि०**१निरुपायानें; नाइलाजानें; हताश होऊन. २ कारण नसतां; उगीचच्या उगीच. ३ ताबडतोब; झटक्यासरशीं. **पु०** नाइलाजाची स्थिति; उ० माझा बेलाग झाला.

बेलाशक [**अ०**] **क्रि० वि०** न कचरतां; न भितां; निःशंकपणें. **वि०** शंका न धरणारा; न कचरणारा.

बेलिया [**हिं०** बेला] **पु०** १ मोगऱ्याची एक जात. २ ह्या जातीच्या मोगऱ्याचें फूल. ३ ह्या मोगऱ्याच्या फुलांचें काढतात तें तेल किं० अत्तर.

बेली स्त्री० १ नारळाचें पोखरलेलें अर्धुक,-ज्याचें बारदान करतात.२तांबड्या आणि काळ्या सुतांचें चौकटी असलेलें लुगडें.

बेलें न० १ रस्त्यांतून चालतांना राजे किं० श्रीमंत लोक जीं नाणीं उधळतात तीं किं० त्या नाण्यांची थैली. ॐ **बेलेंबरदार, बेलेंबारदार पु०** ही थैली वाहाणारा कारकून.

बेल्ही स्त्री० शेतांतील नको तें गवत, झाडें-झुडपें, इ० काढून टाकण्याचें एक आउत.

बेल्हें न० नांगरानें पाडलेले खोल चर,-पाणी सांचविण्यासाठीं (घालणें).

बेवकूब (-फ), बेकूब (-फ) वि० मूर्ख; अजागळ.

बेवड स्त्री० १ बीजांची भेसळ. २ दुसऱ्या म्ह० गहूं, जोंधळा, इ० धान्यांबरोबर पेरलेलीं कमी महत्त्वाचीं बीजें.

बेवरा पु० पुढें ' बेवारा ' पहा.

बेवसवसा [**फा०** बे+वस्वसाह्] **वि०** निर्भय; निश्चिंत; निःशंक.

बेवाडें न० घराचा मजला,-विशेषतः दुसरा.

बेवारशी, बेवारशीक, बेवारीस [**फा०**] जें कोणी हक्कानें मागणारा इसम नाहीं तें; ज्यावर कोणाचा हक्क किं० वारसा नाहीं असें (शेत, घर, इ०).

बेवारसा [**फा०**] **पु०** कांहीं पदार्थावर कोणेकाचा हक्क नसणें किं०असलेला हक्क नाहींसा होणें.

बेवारा [**हिं०**] **पु०** १ कर्जाची फेड; कर्जापासून मुक्तता. २ कामाची विल्हेवाट. ३ सामग्री किं० वेगमी संपल्याची स्थिति.

बेवीस [**म०** बे+वीस] **वि०** विसांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका; बावीस.

बेश [**फा०**] **वि०** योग्य ; चांगलें; उत्तम. **क्रि० वि०** योग्य प्रकारें. ॐ **बेशखासा वि०** फार उत्तम; सर्वोत्कृष्ट.

बेशक [**फा०**] **वि०** १ धाडसी; न कचरणारा. २ ज्यांत संशय नाहीं असा. ३ निर्लज्ज. **क्रि० वि०** भय न धरतां.

बेशमी [**फा०** बाह्+इस्म् (नांव)] **क्रि० वि०** ०च्या नांवानें सरकार इ०ना कतबा लिहून द्यावयाचा असतां मालकाच्या नांवामागें ह्या शब्दाचा उपयोग करतात; उ० दस्तक बेशमी गोविंदा पाटील.

बेशरम [**फा०**] **वि०** निर्लज्य.

बेशाक [**हिं०** साकाह् बेसाकाह्] **स्त्री०** १ एखाद्या हकीकतीचा, कामाचा, किं० लेखाचा खरेपणा किं० खोटेपणा; विश्वसनीयता किं० अविश्वसनीयता. २ निकाल; निर्णय; संशयनिवृत्ति; उ० तुम्हीं सांगतां त्याची बेशाक काढली (किं० केली किं० पाहिली) पाहिजे. **टीप**,–वरील सर्व अर्थी ' शाक बेशाक ' हाही शब्द योजला जातो.

बेशिस्त [**फा०**] **वि०** नियमाला, शिस्तीला, किं० योग्य क्रमाला सोडून असलेला.

बेशुद्ध [**फा०** बे+शुद्धि] **वि०** देहभान ज्याचें लुप्त झालें आहे असा.

बेश्रम वर ' बेशरम ' पहा.

बेष, बेषक, बेषखासा वर ' बेश, ' 'बेशक' ' बेशखासा ' पहा.

बेसन [**हिं०**] **न०** १ हरभऱ्याचें पीठ. २ पिठलें. ३ हरभऱ्याचें पीठ तुपावर तळून साखर घालून करतात तें पक्वान्न.

बेसनेकड न० बैलरहाटाच्या सुळकुंब्यास जें आडवें लाकूड मारलेलें असतें तें.

बेसावध [**फा०** बे (नाहीं) +सावध] **वि०** १ ज्याची शुद्धि लुप्त झाली आहे असा; देहभानावर नसलेला. २ ज्याचें लक्ष्य कांहीं विशिष्ट गोष्टीकडे नाहीं असा; जो लक्ष्य देऊन नाहीं असा.

बेसुमार [**फा०**बे+सुमार] **वि०** अमर्याद; अतोनात; खूप.

बेसूर [**फा०** बे+**म०** सूर(आवाज)]**वि०** ज्याचा आवाज गोड नाहीं किं० शास्त्रशुद्ध नाहीं असा (गाणारा, वाजविणारा, गायन, किं० वादन किं० कंठ किं० वाद्य).

बेहडणें अ० क्रि० (धान्याचीं कणसें, किं० झाडांचीं फळें) परिपक्व होऊन तोडण्याच्या स्थितीस आलेलीं असणें.

बेहडा, बेहेडा, बेहाडा [**हिं०**]**पु०**एक औषधी फळ किं० त्याचें झाड.

बेहडा, बेहाडा [**हिं०**] **पु०**ठरलेला वसूल, खात्यांचा ठरलेला खर्च, वार्षिक देणग्या, इ० च्या तपशिलाचें पत्रक,–मामलेदाराच्या माहितीसाठीं तयार केलेलें. ॐ **बेहडा पार होणें** (किं० **करणें**) पथकरलेलें काम कसेंही करून शेवटास लावणें किं० निस्तरणें.

बेहतनमाल [**अ०** बेत् अल्माल्] **पु०** बिनवारशी म्हणून सरकारकडे गेलेलें शेत, माल, संपत्ति, इ०.

बेहतनमावाशी [**अ०**] **स्त्री०** बेहतनमाल आणि बट छपाई ह्या संबंधांच्या कामाचें खातें.

बेहद, बेहद्द [**फा०**] **वि०** अमर्याद; अतोनात. **क्रि० वि०** अमर्यादपणें; मर्यादेपलीकडे. **स्त्री०** अमर्यादपणा.

बेहंबी [**म०** बी+आंबा] **स्त्री०** आंब्याच्या कोंवळ्या कैऱ्या काढून तोंडीलावण्यासाठीं खारांत घालून ठेविलेल्या असतात त्या प्रत्येक.

बेहबुदी, बेहबुंदी [**फा०** बेहबुदी] **स्त्री०** १ निगा; संगोपन; सुस्थिति (मुलें, जनावरें, इ० ची).२भरभराट; वैभव. ३ काम, कारभार, इ० ची सुव्यवस्था.

बेहया [**फा०**] **वि०** निर्लज्ज; असभ्य.

बेहळा पु० गवत, काटक्या कुटक्या, इ०चा ढीग. २ कांदे, लसूण, इ०चें जुडगें. ३ एक जंगली झाड; भेळा.

बेहाडणें अ० क्रि० वर ' बेहडणें ' पहा.

बेहाडा वि० ' खालीं ' व्याहडा ' पहा.

बेहाडा पु० वर ' बेहडा ' पहा.

बेहांबी स्त्री० वर ' बेहंबी ' पहा.

बेहाळ वि०१ शिव्या देण्याची सवय ज्याला आहे असा; शिवराळ. २ हिडिस्स. ३ असभ्य; ग्राम्य.

बेहुजूर [**फा०** बेहुजूर]**क्रि०वि०** ०च्या गैर हजेरींत. [**फा०** बाह् हुजूर] **क्रि० वि०** ०च्या समक्ष.

बेहुरमत [**फा०**] **वि०** ज्याची पत किं० आबरू गमावली आहे असा (मनुष्य).

बेहेड न० पाण्याच्या सततच्या प्रवाहानें पडलेला चर.

बेहेडा पु० वर ' बेहडा ' पहा.

बेहेडा वि० खालीं ' व्याहडा ' पहा.

बेहेदा, बैदा पु० १बंड. २गोंधळ; अव्यवस्था.

बेहोष (–ष) [**फा०** बेहोष्] **वि०** १ बेशुद्धीच्या स्थितींत असलेला;बेशुद्ध.२फार आजारी. **क्रि० वि०** परमावधीचा; फार;अतोनात.

बेळ न० १ आर्धा आण्याचें नाणें. २बांबूच्या टोपल्या विणण्यासाठीं काढलेल्या पाती प्रत्येक.

बेळकें न० १ झाडाच्या एका बिंदूपासून निघालेल्या दोन फांद्यांतील कोन किं० कोपरा. २ वांसा, कांठी, इ०चें दुबेळकें.

बेळा पु० तांदुळाची एक जात.

बेळें न० १अंगणांत किं०पटांगणांत मनुष्यांनाच जातां येतां यावें, गायी म्हशींना जातां येऊं नये, अशा साठीं पुरलेला असतो जो बेळक्याचा वांसा,खांब, इ०तो किं० आडवी काठीं बांधलेली असते ती. २ लेखांत कांहीं अक्षरें लिहावयाचीं राहिलेलीं असल्यास तीं अन्यत्र लिहून त्यांच्या आरंभीं आणि शेवटीं करतात त्या फुल्या प्रत्येक. ३ असे भरतीचे शब्द जेथें घालावयाचे तेथें करतात तें काकपद ^ असें चिन्ह.४(कोष्टयाच्या मागांत) ताण्याच्या खालीं असतो जो अड्सर त्याला आधारभूत जीं दोन लाकडें तीं प्रत्येक.

बेळेबोळें [**कानडी**] **न० ए० व०** लिंगाईत लोकांच्या मेजवानीच्या प्रसंगीं पानावर प्रथम वाढतात तो गूळ आणि भात.

बैंगणी (–नी) [**हिं०**] **वि०** काळ्या तुकतुकीत वांग्यांच्या रंगाचें (पागोटें, लुगडें, इ०).

बैठक [**हिं०**] **स्त्री०** १ बसण्याची क्रिया.२ ढुंगण टेकून बसणें. ३ पक्षी, पशु, इ० नीं न उड्डान करतां किं०न हालतां एकेठिकाणीं बसणें. ४ बसावयासाठीं पसरलेली सतरंजी, जाजम, इ०.५पेला इ० पात्राची पडघी. ६पात्राचें आधारावर टेकणारें बूड किं० तळ. ६ देवाची मूर्ति ठेवण्याचें धातूचें किं० रेशमाचें आसन. ७ बसण्याची विशिष्ट तऱ्हा. ८ गमनामध्यें कांहीं कारणानें पडलेला खंड किं० झालेला मुक्काम. ९ कांहीं कामासाठीं अन्य कामें सोडून एके ठिकाणीं केलेली अवस्थिति; उ० हें काम उभ्या उभ्यानीं व्हावयाजोगें नाहीं;तुमची आमची चार घटका बैठक झाली पाहिजे. १० गायन, वादन, इ० साठीं अनेक माणसांचें एके ठिकाणीं जमणें. ११ उठाबशा हा जो व्यायामाचा एक प्रकार त्यांतील बसणें ही क्रिया किं० बसणें आणि उठणें मिळून जी क्रिया ती.१२विद्यार्थ्याला शिक्षा म्हणून बसावयाला आणि उठावयाला लावितात ती शिक्षा; उ० तूं मस्ती केलीस म्हणून पांच बैठका (किं० उठाबशा)काढ. १३ सभा. १४करमणुकीसाठीं अनेकांनीं जुळणें किं० जुळण्याची जागा. १५ बाजारांत बसणाऱ्या दुकानदारांवरचा कर. ❀ **एका बैठकीस क्रि० वि०** कांहीं कामासाठीं एके ठिकाणीं बसून आणि न उठतां; उ० एका बैठकीस ह्या गोष्टीचा आपण निकाल करून टाकूं.

बैठा [**हिं०** बैठना] **वि०** १ बसलेला. २ बसून करावयाचा(उद्योग, नोकरी, धंदा, इ०). ३ बसक्या घडणीचा. ४ ज्याला नोकरी नाहीं किं०मिळालेली नाहीं असा;बेकार. **बैठा गुणाकार पु०** गुणकांतील प्रत्येक अंकानें गुण्याला गुणून येणारे गुणाकार एकाखालीं एक असे मांडून त्यांची बेरीज न करतां तोंडचि गुणून तोंडीच बेरीज घेऊन केलेला गुणाकार. **बैठी ठेप** (किं० **कैद**) **स्त्री०** सक्तमजुरी जींत

करावी लागत नाहीं अशी कैद; साधी कैद. **बैठा पगार** पु० काम न करतां मिळतो तो पगार. **बैठा पहारा** पु० एके ठिकाणीं बसून करावयाचा पहारा. याच्या उलट ' टेहळता पहारा ' म्ह० फेऱ्या करून करावयाचा पहारा. **बैठा भागाकार** पु० लहान मुलांना शिकवितात तसा तपशीलवार भागाकार न करतां मनांतल्या मनांत गुणाकार आणि वजावाक्या करून काढलेला भागाकाराचा आंकडा. **बैठा रोजगार** पु० ज्यासाठीं घर किं० गांव सोडावें लागत नाहीं असा उद्योगधंदा. **बैठा भात** पु० ज्यांतील सर्व पाणी शितांतच मुरलें आहे असा शिजविलेला भात; पेज न काढतां आणि पाणी न उरूं देतां शिजविलेला भात. **बैठ्या घडीचा** वि० मागें ' बसल्या घडीचा ' पहा.

बैत, बयत [अ० बयत्] **स्त्री०** फारशी भाषेंतील दोन ओळींचें पद्यविशेष.

बैतनमावाशी, बैतनमाल मागें ' बेहतन-मावाशी,' 'बेहतन माल' पहा.

बैते, बैत्या, इ० मागें ' बलुतें, ' ' बलुत्या ' इ० पहा.

बैदर स्त्री० एक कंद. **न०** त्याचें मूळ.

बैदा [हिं०] **पु०** १ बंड; बखेडा. २ गोंधळ; अव्यवस्था.

बैरक [अ०] **स्त्री०** १ निशाण; ध्वज. २ शिपायांची टोळी,–विशेषतः अरबी शिपायांची.

बैरागडा [म० बैरागी]**पु०** बैरागी(तुच्छतेनें).

बैरागी [**सं०** विराग=निरिच्छता+**म०** ई] सर्व मायापाश सोडून विष्णूची भक्ति करणारा.

बैल [स०बलीवर्द] **पु०** १गायीच्या जातींतील पुरुष,–कामाला उपयोगीं पडण्याच्या वयाचा. २ ठोंब्या, मूर्ख माणूस. ꕥ **बैलका (–क्या)** **पु०** बैल हाकणारा किं० चरावयास नेणारा. **बैलखांदा पु०, बैलखांदें न०** एका विशिष्ट स्थळापासून सारख्या अंतरावर दोन गांवें किं० दोन पदार्थ यांचें असणें; उ० येथून चिंचवड आणि खडकाळें बैलखांद्यावर आहेत. **टीप,–**बैलाच्या वेसणींना बांधलेल्या दोऱ्या हाकणाराच्या हातांत असतात त्या सारख्या लांबीच्या असतात ह्यारून वरील वाक्प्रचार रूढ झाला. **बैलखांद्या** बैलाच्या प्रमाणें ज्याचीं मान आणि खांदे आहेत असा रेडा,–म्हणजे अशक्त आणि किडकिडीत. **बैलघाट** पु०ज्या डोंगरी चढणीच्या वाटेनें पाठीवर लादलेलें ओझें घेऊन बैल जाऊं शकतील असा घाट म्ह० फार कठिण चढणीचा नव्हे असा. **बैलट न०** बैल (तुच्छतेंत). **बैलरहाट पु०** बैल,रेडा,इ०नीं फिरवावयाचा तुंबें लावून केलेला रहाट. **बैलपाडा पु०ए०व०**बैल,वासरें,इ० समुच्चयानें. **बैलपाळणा पु०**त्रासदायक आणि कंटाळवाणें काम. **बैलबांडा पु० ए० व०** बैल इ०वाहतुकीचीं जनावरें: उ० त्या रस्त्यानें बैलबांडा अद्यापि वाहूं लागला नाहीं.

बैलमाऱ्या पु० गुरु हा ग्रह.

बैला पु०१एक अणीदार लाकूड घेऊन त्याला मध्यें ओझें सावरावयाजोगें कांहीं आडकावण संबद्ध करून गवत, काठ्या, इ० कांचें ओझें वहावयासाठीं करतात तें साधन. २ तिफणीची दोरी. ह्या अर्थी ' बैली ' सुद्धां. ३ खळ लाविलेलीं ताण्याचीं सुतें ताणलेल्या स्थितींत ठेवण्याचे जे दोन घोडे ते प्रत्येक. हे घोडे मध्याशीं मिळणाऱ्या दोन काठ्यांचे असतात. ह्या अर्थी 'बैली' हाही शब्द आहे.

बैसक, बैसकार [**म०** बैसणें] १ बसावयासाठीं आंथरलेली सतरंजी, जाजम, इ०. २ बसण्याचें संस्थान; बसणें; बैठक. **टीप,–**हे दोन्ही शब्द कवितेंतच येतात. **बैसकासन** [**म०** बैसणें+आसन] **न०** घोड्याच्या पाठीवरच्या स्वाराची बैठक. **टीप,–**कवितेंतच रूढि.

बैसणें अ० क्रि० १ बसणें (कवितेंतच). २ व्यवहारांत द्वितीय पुरुषीं आज्ञार्थक एकवचनीं क्रियापद ह्या धातूवरून होतें ' बैस ' असें.

बैहबुदी स्त्री० मागें ' बेहबुदी ' पहा.

बोई, बोय स्त्री० १ लसणीची पाकळी. २ लिंबाची फोड. ३ दह्याची कवडी.

बोकचा पु०, बोकचें न० बोचका; बोचकें.

बोकड पु० बकरा. ꕥ **बोकडखाडी स्त्री०** धिंगामस्ती, टवाळकीच्या चेष्टा, आरडाओरडा हीं जेथें चालतात अशी जागा. ꕥ **बोकडदाढी स्त्री०** १ फक्त हनुवटीवरच येते अशी दाढी. २

फार वाढलेली दाढी. **बोकडबीज** पु० भावांब-हिणींना आईवरून शिव्या देणारा.

बोकडणें अ० क्रि० १ फोफाट्यानें (मुलें) वाढणें. २ फाजिल खत पडल्यामुळें पीक देण्याला (शेत) असमर्थ होणें.

बोकणा (–ना) पु०, **बोकणी** स्त्री० १पोहे, चुरमुरे, इ०चा किं० कोणत्याही खाद्याचा एक-दम घेतलेला मोठा घास. २ तोंडांत खुपसलेला घास, बोळा, इ०. ३ गुडदी; बूच.

बोकंदळ न० धिंगाणा; धुडगूस. **वि०** अंगानें अगडबंब असा (माणूस, पशु, पदार्थ).

बोकलणें, बोकळणें, बोकाळणें अ० क्रि० १ धुडगूस घालणें; धिंगामस्ती करणें; आनंदानें उड्या मारणें. २ पदार्थविशेष, चाल, तऱ्हा, व्याख्यानें, पुराणें, इ० खूप मोठ्या प्रमाणांत एकाद्या स्थळीं येणें, माजणें, किं० होऊं लागणें.

बोकशी स्त्री० बांबूच्या पातीचें मासे धरण्या-साठीं करतात तें साधन. [गठ्ठा.

बोकसा पु०, **बोकसें** न० गांठोडें, ओझें,

बोकळ स्त्री० ‘ बकुळ ’ पहा.

बोका पु० १नर मांजर. २लठ्ठ वाढलेला माणूस किं०पशु. ॐ**बोकेजुंज, बोकेझुंज** [म०बोका+झुंज] स्त्री०, न० १ दोन मांजरांचें भांडण. २ मुलांचें भांडण. **बोकेफोड** [म०बोका+फोडणें] स्त्री० १ रिकामी उरस्फोड; निष्फळ उपदेश. २ कोणे-काच्या पुढें कांहीं मागणी करून त्याला सतावणें (करणें). **बोकेसंन्यास** पु० संभावितपणाचें पांघरूण किं० सोंग घेऊन आपले कपटविचार झाकीत राहाण्याचा परिपाठ किं० वर्तनसरणी. **बोकेसंन्यासी** पु० असें वर्तन करणारा.

बोकाडा, बोकेडा पु० एक वृक्ष.

बोकांडी स्त्री०, **बोकांडें** न०मान; मानगुटी. ॐ **कोणेकाची बोकांडी धरणें** त्याला आडकावून ठेवणें; त्याला हालचाल करूं न देणें. **कोणेकाच्या बोकांडीस बसणें** कांहीं गोष्ट त्याणें केल्याशि-वांय त्याला न सोडणें; त्याचा पिच्छा पुरविणें.

बोकाणा, बोकांदा पु० मोठा घेतलेला घास किं० घोट.

बोकांदणें [म० बोकांदा] स० क्रि० १ मोठे घास घेऊन (खाद्य) खाणें; मोठे घोट घेऊन (पेय) पिणें. २ खाणें, पिणें (निर्देत).

बोकांदलें वि०अगडबंब; विरूप दिसण्याइतका मोठा (माणूस, पशु, पदार्थ). न० खिदळणें; धिंगामस्ती.

बोकाफोड स्त्री० मागें ‘ बोकेफोड ’ पहा.

बोकाळणें अ० क्रि० मागें ‘ बोकळणें ’ पहा.

बोकूड पु० बोकड.

बोकेडा पु० उंबराच्या जातीचें एक झाड.

बोखडणें [म० बोंखा] अ० क्रि० फाजील खत पडल्यामुळें (झाडें) खुरटणें.

बोखडणें, बोंखाडणें [म० बोंखा] स० क्रि० (तुळस इ० झाडांचे शेंडे) खुडणें किं० तोडणें.

बोंखा पु०, **बोंखरी, बोंखी** स्त्री० झाडांचा कोंवळा अंकुर,–पानें, फुलें, इ० चा.

बोखाडा, बोखेडा पु० उंबराच्या वर्गातील एक वृक्षविशेष. [दाड.

बोखार, बोखारें न० डोंगर इ० तील भग-

बोखारा पु० १ डोकें आणि तोंड झांकलें जाईल अशा रीतीनें पासोडी, शेला, इ०चें घेत-लेलें आच्छादन; २ हत्ती, गाडी, इ० चें आच्छादन; बुरखा. ३ धान्य साठविण्या-साठीं माजघर इ० च्या कोपऱ्यांत दोन भिंती घालून केलेलें बारदान.

बोंखी स्त्री० झाडाचा कोंवळा अंकुर.

बोंगडा पु० अर्धवट उमललेली पान, फूल, इ०ची कळी किं० अंकुर.

बोगदा [फा० बगार]पु०१भिंतींतील भग-दाड; खिंडार. २ जमीनींत केलेलें तळघर. ३ डोंगर फोडून आरपार केलेली वाट. ४ डोंगर इ० तील मोठ्या आकाराची पोकळी.

बोंगा पु० १ नेसलेलें धोतर, लुगडें, इ० चा पोटापाशीं विशोभित दिसण्याइतका आलेला उंचवटा. २ पुढें आलेली बेंबी. ३ पोटाचें ढेरकें. ॐ **अंगापेक्षां बोंगा मोठा** मुख्य भाग थोडा आणि विशोभित दिसण्याइतकें त्याचें अवडंबर.

बोंगा, बोंगाडा [म० बोंगा] वि० १ विशोभित किं० बेढब दिसण्याइतका मोठा (अंगरखा, मनुष्य, पदार्थ). २ बथ्थड डोक्याचा (मनुष्य).

बोगार पु० कासारांची एक पोटजात किं० त्या जातीचा कोणी इसम.

बोगाळा, बोगाळणें मागें ' बोकाणा, ' ' बोकांदणें ' पहा.

बोगोटी, बोगोटें मागें' बगोटी, ' ' बगोटें ' [पहा.

बोगोणी, बोगणी, बोघणी, बोघोणी स्त्री०, बोगणें, बोगोणें न० आकारविशेषाचें धातूचें भांडें.

बोंचं [म० बोंचणें] न० कांटा इ० लागून निघालेला ओरखडा. **स्त्री०** कांटा, लाकडाचें धस, इ० चें अणकुचीदार टोंक.

बोचक [सं० बहुवाचक] वि०१ फार फार बोलणारा. २ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुडणारा.

बोचकडणें, बोचकणें, बोचकरणें, बोचकुरणें, बोचकाडणें, बोचकारणें स० क्रि० नखें इ० नीं (अंग इ० चीं त्वचा किं० पृष्ठभाग) खरडणें किं० ओरबाडणें.

बोचकडा, बोचकरा, बोचकुरा, बोचकाडा, बोचकारा [म० बोचकडणें इ०] पु०नखादींनीं त्वचेवर काढलेली खोल रेघ.

बोचकणें [म०' बोचणें 'चें एक रूप] स० क्रि० १ खरवडणें. २ खुपसणें.

बोचका पु० खाद्य पदार्थांतून दांतांनीं किं० बोटांनीं तोडून काढलेला लचका.

बोचका पु०, बोचकें न० गांठोडें; गठ्ठा. ꙮ **बोचक्यांतला उंदीर पु०** कोण्या माणसाचीं, कुटुंबाचीं, किं० संस्थेचीं सर्व वर्मे कर्मे ज्याला ठाऊक आहेत असा मनुष्य.

बोचखिंड, बोथरखिंड स्त्री० दंतपक्तींत असलेली किं० पडलेली खिंड किं० फट.

बोचणी [म० बोचणें] स्त्री० १ टोंचण्याची क्रिया. २ कोणेकाला कांहीं कामाबद्दल केलेला तगादा. ३ टोमणे मारण्याची क्रिया.

बोचणें स० क्रि० १ (अणकुचीदार पदार्थ) अंगांत किं० पदार्थाच्या पृष्ठभागांत जोरानें खुपसणें किं० जोरानें दाबणें. २ (शब्दानीं कोणेकाला) टोमणा मारणें. **अ० क्रि०** (अणकुचीदार पदार्थ)त्वचा, पृष्ठभाग, इ० ना जोरानें टेकणें किं० त्यांत शिरणें.

बोचरखिंड स्त्री० पुढें ' बोथरखिंड ' पहा.

बोचरडा वि० ज्याचे कांहीं दांत पडल्यामुळें दंतपक्तींत खिंड पडली आहे किं० खिंडी पडल्या आहेत असा (मनुष्य).

बोचरडें न० एक पक्षिविशेष.

बोचरणें स० क्रि० १ नखादींनीं (अंग, पदार्थाचा पृष्ठभाग) ओरखडणें. २ (वृक्षाच्या टिक्षा) तोडून काढणें.

बोचलणें [म० बोचणें] स० क्रि० वर ' बोचणें ' पहा. २ (शरीर, फळ, इ०) चोंचावणें म्ह० त्यांना भोंकें पाडणें.३कुदळ इ० नीं (जमीन) मध्यें मध्यें खणणें.

बोचा पु० ढुंगण. ꙮ **बोचाळू पु०** गुदमैथुनार्थ बाळगलेला पोऱ्या.

बोचू [म० बोचा] पु० गुदमैथुनार्थ बाळगलेला पोऱ्या. **वि०** मूर्खपणाचा, अव्यवस्थित, घोटाळ्याचा (कारभार, धंदा, व्यापार, इ०).

बोचे बुलबुल पु० मागें ' बुलबुल बोचा ' पहा.

बोचेरा, बोचरा [म० बोचणें] वि० बोचणारा (धाबळी, शालजोडी, इ० पदार्थ).

बोज [हिं० बोझाह्] पु० अंगच्या कांहीं गुणांमुळें कोणेकाचें समाजांत असतें तें वजन, महत्त्व, किं० प्रतिष्ठा. ꙮ **कोणेकाचा बोज राखणें** त्याला योग्य तो मान देणें; त्याच्या दर्जाला योग्य अशा रीतीनें त्याच्याशीं वागणें.

बोजड वि० १ अवजड (शरीर इ०). २ बेढब किं०बेडौल दिसण्याइतका मोठा;प्रमाणाहून अधिक मोठा (पदार्थ, गात्र, इ०).३ सुडसुडीत किं० आटोपशीर नव्हे असें (गाठोडें, कारागिरीचा पदार्थ, इ०). ४ जाडी (त्वचा, साल, इ०.).

बोजवार पु० हळद, हिंग, जिरे, मिरे, इ० द्रव्यांचा भाजी इ० मध्यें घालावयासाठीं करून ठेविलेला मसाला. [विणें).

बोजवारा पु० फजीती, बोऱ्या (उडणें, उडविणें).

बोजा, बोझा [हिं०] पु० १ ओझें. २ (**लाक्षणिक**) कांहीं कामाची कोणेकावर असते ती जोखीम किं० ती जबाबदारी.

बोजा [फा० बोजाह्] पु० एक अमली पेय

बोट न० १ हाताची किं० पायाची अंगुलि. २ बोटाच्या लांबीचें (किं० रुंदीचें) परिमाण; उ० ही भाकरी बोटभर जाडी आहे. ३ बोटाला लागून येईल इतकें पदार्थाचें परिमाण; उ० मधाचें बोट, तुपाचें बोट, इ०.❀**बोट करणें, बोट दाखविणें** बोटानें एकाद्या पदार्थाचा निर्देश करणें. **बोटें मोडणें** १ बोटांच्या पेरांचे सांधे सईल करणें. २ निर्भर्त्सिणें; शापणें. **कोणेकावर बोटें मोडणें** त्याला निंदिणें; त्याच्यावर कांहीं काम विघडविल्याचा आरोप ठेवणें किं० त्याच्यावर टपका ठेवणें.**बोट शिरकणें** एकाद्या कामांत प्रवेश मिळणें,—पुढें मोठा हेतु साधून घेण्याच्या दृष्टीनें. **कोणेकाला बोटांवर नाचविणें** त्याला पूर्णपणें आपल्या ताब्यांत ठेवून आपण सांगूं तें करावयाला लावणें. **ज्याचीं बोटें त्याच्या डोळ्यांत घालणें** त्याच्याच युक्तीनें त्याला पकडणें; त्याची हिकमत त्याच्याच विरुद्ध योजणें किं० लागूं करणें. **एकाद्याला दीड बोट** (किं० **दोन बोटें**) **स्वर्ग उरणें** तो गर्वानें फुगून गेलेला असणें. **पांचीं बोटें सारखीं नसतात** १ एकाच आईबापांचीं सगळीं मुलें सारखीं बुद्धिमान किं० सारखीं नीतिमान् असतात असें नाहीं. २ एकाच झाडाचीं सगळीं फळें समान गुणांचीं असतात असें होत नाहीं. **तोंडांत बोट घालणें** आश्चर्यानें चकित होणें. **टीप**,—'बोट'चे सामासिक शब्द खालीं वर्णक्रमें पहा.

बोटका वि० १ अणकुचीदार अग्र नसलेला. २ बोथट. ❀ **बोटुक चिंच, बोटकी चिंच** स्त्री० आखूड शेंगा जिला येतात अशी चिंच.

बोटकाम न० क्षुल्लक काम; सहजासहजीं होण्याजोगें घरगुती काम.

बोटखत न० १ एका कागदावर केलेलें अनेक खात्यांचें टांचण. २ ज्यावर असें टांचण केलें आहे असा कागद.

बोट घेवडी स्त्री० घेवड्याची एक जात.

बोटचेपा वि० १ बोटानें चेपला असतां सहज चेपतां येईल असा (शिजलेला भात, पिकलेलें फळ, भाजीच्या फोडा, इ०). २अगदीं थोडक्या श्रमानें शेवटास जाईल इतक्या पल्ल्यापर्यंत आणून ठेविलेलें (काम, व्यवहार, इ०).

बोटधरणी वि०धान्यादि मोजतांना मापाच्या कांठावर डाव्या हाताचें बोट आडवें ठेवून केलेलें (माप). इतर प्रकारचीं मापें ' हात धरणीचें माप ' आणि ' रास्ती माप '.

बोटधारी वि०कडेला थोडीशी माया सोडून मागें बोटाच्या रुंदीचा सुती किं० रेशमी कांठ असलेलें (धोतर इ०).

बोटवा पु० खिरीसाठीं गव्हाच्या रव्याचे करतात जे तांदुळाच्या आकाराचे तुकडे ते प्रत्येक.

बोटवात स्त्री० कापूस बोटावर वळून देवापुढें लावावयासाठीं करतात ती वात.

बोटळणें, बोटलणें, बोटाळणें स० क्रि० १ (पदार्थविशेष) कितपत मऊ किं० टणक आहे हें बोटांनीं चेपून पाहाणें. २ (पदार्थविशेष) अनेक वेळां बोटांनीं चेपून बिघडविणें.

बोटी स्त्री० १ बोटवे किं० शेवया करावयासाठीं केलेला जो रवा त्याचा लहानसा गोळा. २ सूत काढावयासाठीं केलेली कापसाची पेळव. ३ खारवून वाळविलेला मासा. ५ कोंबडा इ० पक्ष्यांचें खावयासाठीं शिजविलें मांस.

बोटूक न० १ चिंचेची आखूड शेंग. २ एकच चिंचोका ज्यांत आहे असा चिंचेच्या शेंगेचा तोडून काढलेला तुकडा. ३ केरसुणी, खराटा, लेखणी, दोरी, दिव्याची वात, इ०चा झिजून किं० जळून अवशिष्ट राहिलेला बुडखा.

बोंठण, बोंठूक, बुंठण न० हात, पाय, झाडाची फांदी, इ०चें टोक तुटून बुडखा शरीर, झाड, इ०ला चिकटलेला राहिलेला असतो तो; थोंट; थोंटण.

बोंठा, बुंठा वि० १ केवळ खुंट उरला आहे ज्याचा असें (झाड). २ केवळ मागचा भाग अवशिष्ट राहिला आहे ज्याचा असा (हात, पाय, केरसुणी, लेखणी, इ०).

बोड न० डोकें (तुच्छतेनें). ❀ **कोणेकाचें बोड करणें** त्याला नम्र करणें;त्याचा बोऱ्या उडविणें.**बोडविसुळणी** स्त्री० कोणकाची खरडपट्टी.

बोंड न० १ कापूस, अफू, इ० झाडाचें फळ. २ बिब्बा, काजू, इ०च्या फळामागें असतो जो

जाडी देठ तो. ३ वरील आकाराचें हरभरा इ० च्या पिठाचें तळून खावयासाठीं करतात तें खाद्य. ४ भजें. ५ वरील आकाराचा समई, पळी, इ०चा असतो तो अवयव. ६ केळफूल.७ मक्याचें कणीस.८ शिश्नाची किं० स्तनाची बोंडी म्ह०टोक. ꣸ बोंडें बोचणें केलेला अपराध कबूल करतांना लज्जेनें किं० भीतीनें तोतरें बोलणें.

बोडका पु० १ ज्याच्या डोक्यावर पागोटें, मुंडासें, टोपी, इ० नाहीं असा (माणूस, मूल, इ०). २ शिंगें असावीं तितकीं लांब नसलेला (बैल इ०); शिरोभागीं कळस असावयाचा तो नाहीं असा (पदार्थ);टिक्षा नाहींत अशी(फांदी); छपर ज्याला नाहीं असें (घर, झोपडी, इ०); केश ज्यावर नाहींत असें (डोकें किं० अशा डोक्याचा माणूस); जविर झाडें नाहींत अशी (टेकडी). ३ ज्याची बायको मेली आहे असा (पुरुष). ꣸ **बोडकी स्त्री०** जिचें वपन झालें अशी (विधवा). **बोडकादेवी स्त्री०** जिच्या केशांचें वपन झालें आहे अशी विधवा. **बोडकें भात न०** कोथिंबिरें भात.

बोडकाविणें [**म०** बोडका] **स० क्रि०** १ पानें, फुलें, इ० तोडून (झाड) उघडें करणें. २ द्रव्यादि हरण करून (कोणेकाला) दरिद्री किं० निर्धन करणें.

बोडकूल, बोडकें [**म०** बोड] **न०** १ डोकें (तुच्छतेंत किं० रागांत). २ विधवा स्त्री. ह्या अर्थीं फक्त ' बोडकूल '.

बोडखा, बोडखाविणें,बोडखी वर' बोडका' ' बोडकाविणें, ' ' बोडकी ' पहा. [झाड.

बोंडग, बोंडगी स्त्री०, बोंडगा पु० एक

बोंडचोळी स्त्री० एक लहान झुडूप.

बोडण न० १ महालक्ष्मीच्या किं० कुलदेवतेच्या प्रीत्यर्थ पांच सुवासिनी आणि एक कोंवारीण यांना एकेठिकाणीं बसवून परातींत वडे, दहीं, दूध, कढी, इ० एकत्र कालवितात तो विधि (भरणें). २ कोणत्याही पदार्थाची डिवचाडिवच **स्त्री०, न०** म्हशी डुंबावयाचें डबकें.

बोडणी [**म०**बोडणें]**स्त्री०**१भादरपट्टी; हजामत.२कोणेकाची काढलेली खरडपट्टी किं०भोसडपट्टी.

बोडणें [**म०** बोड] **स० क्रि०** १ भादरणें (तुच्छतेंत). २(कोणेकाला)लुबाडणें किं० लुटणें. ३(कोणेकावर) ताशेरा झाडणें; त्याची भोसडपट्टी काढणें.

बोडंती [**म०** बोडणें] **स्त्री०** १ हजामत (तिरस्कारांत). २ खरडपट्टी (करणें,काढणें).

बोडद [**इंग्रजी** बोर्ड्] **न०**गलबताची बाजू. **उजवें बोडद न०** गलबत चालतें त्या दिशे तोंड करून उभें राहिलें असतां उजवी बाजू आणि डावें बोडद म्ह० डावी बाजू.

बोंडफळ [**म०** बोंड +फळ] **न०** १ (सोंगट्यांच्या खेळांत) मारलेली सोंगटी (तुच्छतेंत). २ नारळ (तुच्छतेंत). विवाहादिकांत लुगडें इ०च्या बद्दल नुसता नारळ दिला असतां प्रयोग; उ०एका बोंडफळावर माझी समजूत कशी व्हावी? ꣸ **तुझ्या हातास काय बोंडफळ लागणार आहे तें दिसतेंच आहे** तुला कांहीं लाभ व्हावयाचा नाहीं.

बोंडबाहुलें न० (मुलाला उद्देशून प्रेमानें) बाहुली किं० बाहुलें (मुलगा किं० मुलगी).

बोंडलें न० मुलांला दूध पाजावयाचें आकारविशेषाचें चमच्यासारखें धातूचें साधन.

बोडसा पु०, बोडसें न० झाडांचे शेंडे इ० तोडावयाचें एक हत्यार.

बोडसें [**म०** बोड] **न०** डोकें(तुच्छतेंत)

बोंडा पु० पाण्यांत मारलेली बुडी (मारणें, देणें).

बोंडी, बोंडशी (-सी) स्त्री०, बोंडूस, बोंडुक न० [**हिं०** बोंडी] १ नाक, थान,बोट, शिश्न, इ०चें वाटोळें टोक किं० अग्र. २ तत्सदृश मोदक इ० चें टोक. ३ मागच्या पाऱ्या झडून झडून पुढें लहान राहिलेलें केळफूल. ४ कोणत्याही लांबट पदार्थाचें वाटोळें टोक.

बोंडू पु०काजूच्या फळाच्या मागचा जाडी भाग किं० देठ.

बोडेफकीर पु० १ निर्धन मनुष्य (तुच्छतेंत); भुकेकंगाल. २ ज्याच्या मागें बायको, मुलें, इ० पसारा नाहीं असा मनुष्य (निंदेंत).

बोड्या पु० मुलगा (कोंकणांत).

बोढण न० वर ' बोडण ' पहा.

बोणें न० पुढें ' बोनें ' पहा.

बोंथ स्त्री० १ सर्व अंगाभोंवतीं गुंडाळून घेतात तें वस्त्राचें प्रावरण (घेणें, मारणें). २ चितार्‍याचें रंग भरावयाचें कलम (टोकाला कापूस गुंडाळलेली काडी, पीस, इ०).

बोंथट [म० बोंथा] वि० मंद झालेली (धार किं० अशा धारेची तरवार, सुरी, इ०).

बोंथटणें, बोंथणें [म० बोंथा] अ० क्रि० मंद धारेचें होणें (खुरपें, चाकू, तरवार, इ०).

बोथरखिंड (–खंड) स्त्री० दंतपंक्तींतील फट.

बोथरखंड (–डा), बोथरखिड्या, बोथरा [म० बोथरा+खंड, खिंड] वि० ज्याच्या दंतपंक्तींत फट किं० खिंड आहे असा.

बोथळें न० सासरीं जावयाला निघालेल्या मुलीबरोबर परकर, लाडू, इ० पदार्थांचें गांठोडें जें देतात तें.

बोंथाविणें [म० ' बोंथणें ' चें प्रयोजक] (चाकू, सुरी,तरवार, इ०)बोथट किं०मंद करणें.

बोंथा वि० मंद धारेची (सुरी,कोयती, इ०).

बोथाटी स्त्री० बड्या माणसाच्या स्वारी पुढें चालवावयासाठीं किं० खेळावयासाठीं दोन्हीं टोकांस वस्त्रादींचा चेंडूसारखा गोटा बांधून करतात ती काठी. ❀ **बोथाटी बरदार, बोथाटी बारदार पु०** मिरवणुकींत बोथाटी हातांत घेऊन चालतो तो मनुष्य.

बोंथारणें अ० क्रि० बोंथानें गुरफटलेलें होणें किं० असणें. मागें ' बोंथ ' पहा.

बोंथारा पु०, बोंथारी स्त्री० मागें ' बोंथ ' पहा.

बोंथी स्त्री० १ टोक; अग्र; अणी. २ रंगाऱ्याची कुंचली. ३ फडक्याचा बोळा. ४ नारळाच्या काथ्यांचा बोळा. ५ बोंथ.

बोथीकेळ स्त्री० केळीची एक जात.

बोद स्त्री० आठ कांबळीं किं० घोंगड्या समुच्चयानें.

बोद वि० बदबदीत आवाजाचा (रुपाया इ० नाणें, किं० पखवाज, वीणा, इ० वाद्य).

बोंद न० जुगाराच्या खेळांत कवड्या, हस्तिदंताचे तुकडे, इ० पैसे दाखविण्यासाठीं घेतलेले असतात ते प्रत्येक.

बोदड वि० मागें ' बोजड ' पहा.

बोदय पु० खाऱ्या पाण्यांतील तांबूस वर्णाचा लहान आकाराचा एक मासा.

बोंदर न० जुनें चिरगूट, कपडा, लुगडें, इ०.

बोंदरा वि० अव्यवस्थित, गचाळ, धंदरा (माणूस). [पिशवी.

बोदरी स्त्री० १ तरटाचा तुकडा. २ तरटाची

बोद्धा [सं० बोध्दृ] पु० ज्ञाता; जाणता; पंडित.

बोध [सं०] पु० १ ज्ञान. २ जाणीव. ३ विचार. ४ बुद्धि. ५ जागृति. ६ फुलाचें उमलणें. ७ उपदेश. ८ जागें करणें. ❀ **बोधकर पु०**प्रातःकाळीं स्तुतिपाठ म्हणून राजाला जागें करणारा; वैतालिक. **बोधवासर पु०**कार्तिक शुद्ध एकादशी ही तिथि. खालीं ' बोधिनी ' पहा.

बोधक [सं०] वि० कळविणारा; ज्ञापक; सूचक. **पु०** १ गुरु. २ हेर. ३ वैतालिक. वर ' बोध ' मध्यें ' बोधकर ' पहा.

बोधगें न० मूग, उडीद, मटकी, यांचा कोंडा किं० टरफल.

बोधणें [सं० बुध] स० क्रि० कळविणें; सांगणें; शिकविणें; (कांहीं गोष्ट) कोणेकाच्या मनांत ठसविणें. **अ० क्रि०** जाणणें; उमगणें; तर्किणें.

बोधन [सं] न० १ शिकविणें. २ दर्शविणें. ३ ज्ञान. ४ जागें करणें. ५ उद्दीपन. ६ धूप जाळणें. **पु०** बुध हा ग्रह.

बोधला [म० बुधला] पु० लठ्ठ आणि थिलथिलीत अंगाचा ठेंगणा माणूस. ❀ **बोधलेबोवा पु०** वर ' बोधला ' पहा.

बोधविणें [म० ' बोधणें 'चें प्रयोजक] स० क्रि० सांगणें; कळविणें; कोणेकाच्या लक्ष्यांत (कांहीं गोष्ट) आणून देणें.

बोधित [सं०] वि० १ शिकविलेलें. २ सांगितलेलें. ३ जाणलेलें. ४ जाणविलेलें. ५ जागा झालेला. ६ जागा केलेला.

बोधिनी[सं०]स्त्री०कार्तिक शुद्ध एकादशी,– ह्या दिवशीं श्रीविष्णु जागा होतो. वर ' बोध ' मध्यें ' बोधवासर ' पहा.

बोनें न० १ नैवेद्य (दाखविणें). २ खाद्य

पदार्थांचो मंगळागौरीपुढें करतात ती रास,-जी दुसऱ्या दिवशी मुली खातात. ३ मृदंगाला लावतात तो कणकेचा गोळा. ४ (कवितेंत) शिजविलेलें अन्न. ५ भोजनाच्या पानांत उरलेलें उष्टें.

बोंब स्त्री० १ तोंडावर हात मारून केलेला ध्वनि (मारणें, ठोकणें). असा ध्वनि शिमग्यांत कि० संकटाच्या प्रसंगीं केला जातो. २ (**लाक्षणिक**) पराजय;उ०परीक्षेंत त्याची बोंब झाली.३ तुटवडा; दुर्भिक्ष; उ० यंदा पाण्याची फार बोंब उडाली.***बोंब करणें** आरडा ओरडा करणें.**बोंब लागणें** शरीरांत शिणका उत्पन्न होणें. **तुला सोन्यांत काय बोंब कळतें** ? तुला सोन्याच्या बाबतींत कांहीं कळत नाहीं.**गणिताच्या परीक्षेंत सगळ्या विद्यार्थ्यांची बोंब झाली** सगळे नापास झाले.

बोबकणें स० क्रि० १ खाद्य पदार्थ तोंडांत कोंबणें. २ खाणें (तिरस्कारांत).

बोबका [**म०** बोबकणें] **पु०** मोठा घास (निंदेंत).**क्रि०** भरणें, घेणें, मारणें.

बोबडा पु० एक प्रकारचें गवत.

बोबडा वि० १ अस्पष्टपणें शब्दोच्चार करणारा माणूस किं० त्याचें बोलणें. २ कांहीं व्यंजनें उच्चारावयाला असमर्थ. ३ चांगला न शिजलेला (भात,डाळ,इ०).***बोबडकांदा पु** बोबडें बोलणारा माणूस.

बोबडी स्त्री० भीतीमुळें स्पष्टपणें शब्द न उच्चारतां येतील अशी स्थिति (वळणें).

बोबडा पु० बुडबुडा.

बोंबणें स० क्रि० १ माती, राख, इ० नीं (चुलीवर ठेवावयाचें भांडें) लेपटणें किं० माखणें. २ शेण, माती, इ० नीं (भोंक) बुजविणें किं० बंद करणें. ३ (वांगें, घोसाळें, इ० चे काप) हरभऱ्याचे पिठांत बुडवून काढणें,-तळून भजीं करण्यासाठीं.

बोंबलणें [**म०** बोंब] **अ० क्रि०** १ बोंब मारणें. २(कांहीं काम) शेवटास न जातां मध्येंच फसणें. ३ (इष्ट हेतु) निष्फळ होणें. ४ बंद पडणें; उ० त्याचें लग्न झाल्यापासून त्याचे अभ्यास बोंबलले.***बोंबलपट्टी स्त्री०**१एकसारखें बोंबलणें. २फसगत.३ अतिरिक्त आत्मश्लाघा.४मोठी ओरड. **बोंबलबाराखडी स्त्री०**अंगीं मुळींच विद्वत्ता नसून पांडित्याची ऐट दाखविणें. **बोंबलभिक्या वि०** कपाळकरंटा.**बोंबल्यागणेश पु०** १बोंबलणारा. २ खोटी आरडाओरड करणारा. ३ भद्रकपाळी.४गुप्त गोष्ट प्रकट करण्याच्या स्वभावाचा. **बोंबाबोंब स्त्री०** १ भयंकर हाकाटी; ओरडा. २ बोभाटा.

बोंबळ न० बुबूळ.

बोंबाडा पु० बुडबुडा.

बोंबाळ पु० १ गोंधळ; गडबड; धावाधाव.

बोंबाळ, बोंबाळी वर ' बंबाळ ' ' बंबाळी ' पहा.

बोंबाळणें [**म०** बोंबाळ] **अ० क्रि०** घोटाळ्यांत किं० गोंधळांत पडलेलें असणें.

बोंबी स्त्री० मागें ' बेंबी ' पहा.

बोंबील [**पोर्च्युगीझ्** बॉमेल्] **पु०** खारवून वाळविलेला मासा.

बोंब्या [**म०** बोंब] **पुं०** १ गया येथलि एक अधिकारी,-जो यात्रेकरूंच्या मंडळीपुढें बोंबलत चालतो. २ यत्किंचित् इजा किं० हानि झाली तरी जो बोंबलत सुटतो किं० मोठा कांगाव करतो तो.

बोभाइणें स०क्रि० मोठ्यानें ओरडून (कोणेकाला) बोलाविणें किं० हाक मारणें. **अ० क्रि०** मोठमोठ्यानें बोलणें.

बोभाट, बोभाटा पु० १ सर्वांस विदित होणें. २ गुप्त गोष्टीची किं० बदकर्मांची लोकांत प्रसिद्धि. ३ मोठी ओरड. ४ लाच खाणाऱ्या अधिकाऱ्याचा बदलौकिक. ५ अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार किं० कागाळी.

बोभाटणें [**म०** बोभाटा] **अ० क्रि०** लोकांत जाहीर होणें.

बोभाणें, बोभाइणें स० क्रि० मोठ्यानें ओरडून (कोणेकाला) बोलाविणें.

बोंभावणें अ० क्रि० १ मोठ्यानें ओरडणें. २ (घुबडानें किं० कोल्ह्यानें) ओरडणें. **स० क्रि०** (कोणेकाला) मोठ्यानें ओरडून हाक मारणें.

बोम पु० पोत्यांतील किं० मुद्यांतील तांदूळ इ० चा नमुना बाहेर काढण्याचें एक आउत. हें लांब अणकुचीदार असून मध्यें पन्हळासारखें असतें.

बोय [**फा०** बो=वास] **स्त्री०** १ वास; गंध. २ (**लाक्षणिक**) झाक; छटा; उ० याच्या बोलण्यांत कर्णाटकाची बोय मारते ; उ० या गवयाच्या गाण्यांत उत्तर हिंदुस्तानी गाण्याची बोय मारते.

बोय स्त्री० १ दह्यांतील घट्ट भाग: दह्याची कवडी. २ लसणीची वी.

बोयरा [**इंग्रेजी** बॉय्] **पु०** पाण्यांतील खडक किं० धोक्याची जागा दाखविण्यासाठीं त्या स्थळीं सांखळीनें बांधून तरंगत ठेवलेला पदार्थ.

बोर न०, स्त्री० एक प्रकारचें गवत.

बोर [**सं०** बदरी] **स्त्री०** एक झाड. **न०** १ त्याचें फळ. २ स्त्रियांचा डोक्यांत घालण्याचा एक दागिना.**पु०** घोड्याचा एक रंग.**वि०** ह्या रंगाचा (घोडा).ꕥ **बोरांतली कीड**(किं० **आळी**)**स्त्री०**१ नाजूक स्त्री. २ नाजूकपणाची ऐट करणारा लठ्ठ पोटाचा माणूस. **बोरीस बोरें आणणें** १(द्वाड आणि भटक्या पोराला) झाडाला बांधून ठेवणें. २ (घडवून आणावयाला कठिण किं० अशक्य म्हणून समजण्यांत आलेली गोष्ट) शक्य कोटींतील आहे असें सिद्ध करून दाखविणें;उ०रामड्या पैसे देत नाहीं म्हणतां ? ठीक आहे, मी बोरीस बोरें आणीन (म्ह० त्याच्यापासून पैसे वसूल करीन). **बोरकूट न०** बोरें वाळवून सार इ०ना चव येण्यासाठीं करून ठेविलेली पूड. **बोरखडा पु०** मुलींच्या सागरगोट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

बोरपी, बोरीप पु०बहुरूपी,–भिक्षा मागणाऱ्यांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

बोरशी (–सी) स्त्री० मागें ' बुरशी ' पहा.

बोरा पु० हिरवें, कच्चें, आणि टणक फळ.

बोरी [**हिं०**] **पु०** १ पोतीं शिवणें, बिछायत करणें, इ०च्या उपयोगाचें एक वस्त्र.२बोहरा.

बोरी स्त्री० सराफ लोकांची पैसे ठेवण्याची लांब पिशवी.

बोरी [**सं०** बदरी] **स्त्री०** बोरी हें झाड.

बोरू, बरू पु० लेखण्या करण्याच्या उपयोगाचें लठ्ठ कांडाचें तृणविशेष.

बोऱ्या [**फा०** बोऱ्या] **पु०**१ शिंदी,नारळी,इ०च्या पातींची चटई किं० बारदान. २ फजीती. ꕥ **कोणेकाचा बोऱ्या उडणें** (**होणें** किं० **वाजणें**) त्याची फजीती होणें; त्याची अप्रतिष्ठा होणें.

बोऱ्या वि० १ हीन, दीन, अनाथ (माणूस). २ हलक्या किंमतीचा, भिकार (पदार्थ). ꕥ **बोऱ्याभाई पु०** हीनदीन माणूस.

बोल [**म०** बोलणें] **पु०** १ भाषणाचे अवयवभूत जे शब्द ते किं० जीं वाक्यें तीं. २ अमुक गोष्ट घडेल असें कोणी केलेलें भविष्य. ३ बोलून दाखविलेलें मनोगत. ३ कोणेकावर दोष ठेवणें किं०दोषारोप करणें. ४दोष;टपका; निंदा(लावणें). ꕥ**बोल बोलणें** आपलें म्हणणें काय आहे तें स्पष्टपणें सांगणें. **कोणेकाच्या बोलांत बोल नसणें** १त्यानें असंबद्धपणानें बोलणें; विसंगतपणें बोलणें. २ एकदा कबूल केलेली गोष्ट नंतर नाकबूल करणें. **बोलाकुलास गांठ पडणें** सहज म्हणून बोललेली गोष्ट काकतालीय न्यायानें घडून येणें. **बोल बोलूं न देणें** कोणेकाला एक अक्षरही बोलूं न देणें; त्याच्या उत्तरावर लगेच असभ्यपणानें प्रत्युत्तर देणें.

बोलका [**म०** बोलणें] **वि०** १ बोलणारा. २फार फार बोलणारा;वटवट करणारा; गलागला बोलणारा. ३ बोलण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगीं आहे किं०आलें आहे असा (मुलगा,पोपट).४संभाषणांत भाग घेणारा; घुम्यासारखा न बसणारा. **बोलकें वि०** बोलूं आणि चालूं शकणारें (मूल). **बोलगडा, बोलगाडा वि०** गाडाभर बोलणारा म्ह० वाचाळ; ज्याची टकळी सदा चाललेली असते असा. **बोलघेवडा पु०, बोलघेवडी स्त्री०** फार फार बोलणारा माणूस किं० बोलणारी स्त्री.

बोलणें अ० क्रि० १ शब्द उच्चारून मनोगत कळविणें. २ (पोपटानें)कानीं पडलेले किं० शिकाविलेले शब्द उच्चारणें. ३ (वाद्यानें) ध्वनि उत्पन्न करणें. ४ कोणेकाला रागें भरणें. ५म्हणणें. ६ सांगणें. ꕥ **त्याचें बोलणें म्हणजे भाजीपाला** त्याच्या भाषणांत कांहीं अर्थ नसतो; तो शुद्ध भरकट्या आहे; तो नुसती बडबड करणारा आहे. **बोलून घेणें** कोणी रागें भरेल असें वर्तन करणें; लोकांच्या रागास पात्र होणें. **बोलून**

सुघड वि० बोलणें, वर्तन,इ० मध्यें चांगला किं० सरळ. उत्तर बोलणें, उत्तर करणें उत्तर देणें. बोलणें चालणें न० ए० व० भाषण, वर्तन, इ० समुच्चयानें; लोकांशीं वागण्याची तऱ्हा किं० सरणी. बोलून चालून क्रि० वि० १ लोकांशीं वागण्याच्या बाबतींत.२ उघड उघड; धडधडीत. ३ मुद्दाम. ४ सर्वथैव.

बोलता [म० बोलणें] वि० १ बोलणारा. २ रागें भरणारा. ३ नियंत्रणा घालणारा; शास्ता.

बोलपुतळी, बोलमाणकी स्त्री० फार फार बोलणारी स्त्री; वटवट करणारी स्त्री.

बोलबाला पु० उत्कर्ष; वैभव; भरभराट.

बोलभांड [म० बोलणें+भांडणें] वि० १ यत्किंचित् कारणावरून भांडावयास सिद्ध होणारा. २ आवेशानें आणि भांडखोर वृत्तीनें बोलण्याच्या स्वभावाचा.

बोलविणें, बोलाविणें स० क्रि० आमंत्रिणें; पाचारणें.

बोलावणें [म० बोलावणें] न० १ आमंत्रण. २ हाक मारणें.

बोलवा पु०, स्त्री०, **बोलवाय** स्त्री० [म० बोलणें] वदंता; चारचौघांत प्रसृत झालेली बातमी.

बोलाचाली, बोलाबोली [म० बोलणें+चालणें] स्त्री० १ संभाषण. २ रागारागाचें संभाषण; भांडण; बाचाबाची. ❀ **बोलाचालीवर येणें** भांडूं लागणें; चिरडीस जाऊन बोलणें.

बोली [म० बोलणें] स्त्री० १ विशिष्ट प्रांतांतील भाषा किं० बोलण्याची तऱ्हा. २ ठराव; करार. ३ दिलेलें वचन. ४ शक्यता; (बहुधा निषेधीं प्रयोग); उ० असल्या पावसांत फिरावयास जाण्याची बोलीच नाहीं. ❀ **बोलीचाली** स्त्री० १ केलेल्या कराराचे बाबतींत वाटाघाट. २ संदिग्ध बाबतींचा निकाल लावण्याच्या उद्देशानें केलेली वाटाघाट.

बोवण, बोहण, बोहाण न० मृदंगाच्या धुमाच्या पुडास कणकेचा किं० मऊ भाताचा करतात थर किं० लेप.

बोंवा पु० लसणीची पाकळी.

बोवा पु० १ पंत, राव, इ० प्रमाणें नांवापुढें लावावयाचा बहुमानार्थक शब्द; विठ्ठलबोवा, गोविंदबोवा, इ० २ हरिदास, पुराणिक, गाणें बजावणें इ० शिकविणारा माणूस, ह्यांच्या नांवापुढें लावावयाचा शब्द. ३ (मुलांना भीति दाखवितांना) बाऊ; उ० हं ! तिकडे जाऊं नको ! तिथें एक बोवा बसला आहे तो तुला धरील.

बोवाळ पु० विवाहादि कार्यामुळें घरांत असते ती गडबड किं० धांदल. मागें ' बोंबाळ ' पहा.

बोंवाळणें [म० बोंबाळ] अ० क्रि० गडबडींत किं० कामाच्या घाईत असणें. स० क्रि० उपद्रविणें; छळणें, मागें ' बोंबाळणें' पहा.

बोस पु० राग; घुस्सा; मनांत बाळगलेला आकस (धरणें, करणें).

बोसका पु०, **बोसकें** न० सामानासुमानाचें कसें कसें बांधलेलें गांठोडें.

बोह्चक [सं० बहुवाचक] वि० १वाचाळ; वटवट्या. २ दुसऱ्याच्या कामांत लुडबुडण्याच्या स्वभावाचा.

बोहण वर ' बोवण ' पहा.

बोहणी (–नी) [सं० भवानी] स्त्री० दुकानदारानें सकाळीं दुकान उघडल्यावर जी पाहिली विक्री होते ती,–जिला त्या दिवशीं होणाऱ्या विक्रीचें आदीचें मंगल तो दुकानदार समजतो. ❀ **बोहणीचे प्रहरीं** (किं० **पाहरीं** किं० **पारीं**) क्रि० वि० सकाळीं,–जेव्हां खोटें बोलणें अगदीं अयोग्य असतें.

बोहरपी, बोहोरपी, बोहरीप, बोहरूप बोहोरीप पु० भिकाऱ्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा इसम. ह्यांना ' भोरपी 'ही म्हणतात.

बोहरा, बोहरी, बोहारी पु० मुसलमानांतील एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक किरकोळ जिनसा विकतात.

बोहला पु०, **बोहलें, बोहुलें** न० लग्न, मुंज, इ० विधींत वधूवर किं०मुंजा मुलगा ज्या ओट्यावर बसतात तो ओटा. मागें ' बहुलें ' पहा.

बोहोगणी स्त्री०, **बोहोगुणें** न० आकारविशेषाचें धातूचें भांडें.

बोळ पु० गांवांतील अरुंद रस्ता.

बोळ पु० १ कांहीं झाडांचे जे औषधाच्या उपयोगाचे चीक किं० डीक ते प्रत्येक. २ दाट झालेलें दहीं, शाई, रंग, इ०. ३ धान्य, फळें, इ०तील रद्दी किं० टाकाऊ भाग. ॐ **बोळ घालणें** (किं० **घालीत बसणें**) फार फार बोलून किं० हुजत घालून छाती दुखवून घेणें (आणि छातीवर बोळ घालण्याचा प्रसंग येणें). **कांहीं कामांत बोळ घालणें** (किं०**पाजणें** किं०**पाडणें** किं० **देणें**) तें विघडविणें.

बोळक पु० कुंपण, वई, गडगा, इ०तील वाट, मार्ग, किं० खिंडार.

बोळकूल, बोळकें न० मुलांचें खेळण्याचें भांडें,–धातूचें, मातीचें, किं०लाकडाचें. ॐ**कोणे-काच्या तोंडाचें बोळकें होणें** त्याचे सगळे दांत पडून गेलेले असणें.

बोळखिळा पु०, बोळखीळ स्त्री० शिवाळ म्हणून जो गाडीचा भाग असतो त्याला बाहे-रच्या बाजूस जी खुंटी असते ती. दुसरीला 'पोट-खीळ ' असा शब्द आहे.

बोळणें अ० क्रि० १ दहीं, रंग, शाई, इ० पदार्थ कांहीं विकृतीमुळें बेतापेक्षां घट्ट आणि बुळबुळीत होणें. २ (गहूं, बाजरी, हरभरा, इ०तील सत्त्वांश) पूर्ण पोसलेला असणें. ३ (ओळख, माहिति, मैत्री) विसरली जाणें किं० मंद होणें. ४ (शस्त्र) बोथट होणें. ५ पाभर नांवाच्या आउतांतून (बीजें) खालीं जमीनींत पडणें. **स० क्रि०** १ तेल, तूप, इ०नीं (कांहीं पदार्थ–भाकरी, बोटें,) माखणें. २ शाईमध्यें (लेखणी), दहीं, दूध, इ०मध्यें (इ०भाकरी) बुचकळणें किं०बुडविणें. ३ भोकामध्यें खुंटी, खिळा, इ० घालून वाटोळा फिरवून (भोक) मोठें करणें.

बोळंबोळ क्रि० वि० कांठोकांठ; अगदीं कांठापर्यंत (भांडें किं० माप) भरणें.

बोळवण [**म०** बोळविणें] **स्त्री०** १ नववधूचें भर्त्याच्या घरीं थाटामाटाचें प्रथम गमन. २ विवाहानंतर वरपक्ष्याच्या मंडळीची सत्कारपूर्वक करून दिलेली रवानगी. ३ गांवांत आलेल्या भुतांना अन्नादि बळी देऊन गांवकरी त्यांची गांवाबाहेर हकालपट्टी करतात ती.

बोळवणी [**म०** बोळविणें] **स्त्री०** आपल्या घरीं आलेला जो शिष्ट किं० पाहुणा त्यांची रवानगी करून देणें,–आपण त्याच्या बरोबर कांहीं वाट जाऊन.

बोळविणें स० क्रि० १ (आपल्याकडे आलेल्या माणसाची) रवानगी करून देणें. २ (मित्र, विद्या, आप्त, इ० ना) विसरून जाणें (थट्टेंत प्रयोग); उ० त्याणें विद्या बोळविली; उ० त्याणें आपली आई बोळविली आणि स्वस्थ बसला. ३ नथ, सुंकळें, भिकबाळी, इ० दागिन्यांचा (फासा) घट्ट बसवून तो दागिना गळून न पडेल असा करणें.

बोळा पु० १ चुना देणें, भिंत सारविणें, इ० साठीं फडकें इ० चा घट्ट गोळा करतात तो. २ कागद इ० वर शाई इ० चा पडतो तो ठिपका. ३ व्यवस्थित रीतीनें ज्याची घडी केलेली नाहीं म्ह० वाकडा तिकडा ज्याचा गोळा केला आहे असें वस्त्र, कागद, झाडाचें पान, इ०. ॐ **पदार्था-वर बोळा फिरविणें** १ तो पुसून स्वच्छ करणें. २ त्याचें पूर्वींचें रूप बदलून टाकणें. ३ तो नाहींसा करणें.

बोळावा [**म०** बोळविणें] **पु०** १ कोणेकाची करून दिलेली रवानगी. वर ' बोळविणें ' पहा. २ परगांवीं जावयाला निघालेल्या माणसाबरोबर सोबतीसाठीं देतात तो माणूस.

बोळीहोण (–न०) पु० होनासारखें प्राचीन काळचें एक नाणें.

बोळूं न० भाकरी, पोळी, थालीपीठ, इ० खातांना तूप, लोणी, दहीं, इ० जें घेतात तें.

बौ पु० मुलांना भीति दाखवावयासाठीं उच्चारावयाचा हा शब्द आहे. मागें ' बाऊ' पहा.

बौद्ध [**सं०**] **पु०** १ ज्ञानी पुरुष. २ बौद्ध धर्माचा अनुयायी. ३ गौतम बुद्धानें स्थापिलेला धर्मविशेष. ४ विष्णूच्या दहा अवतारांपैकीं दहावा. ॐ**कोणेकानें बौद्धावतार धरणें** (किं० **घेणें**) कोणी कितीही रागें भरलें तरी कांहीं हालचाल न करतां, न रागावतां, न चरफडतां शांतपणें बसून राहाणें.

ब्यहाग [**हिं०** बिहाग्] **पु०** (**संगीतांत**) [एक राग.

ब्या स्त्री० १ असमर्थपणानें किं०हीनदीनपणानें केलेली आरोळी (करणें). २ फजीती, बोऱ्या, पराभव (होणें).

ब्यांचा वि० मागें ' बियांचा ' पहा.

ब्याणा (–ना) पु० मागें ' बयाणा ' पहा.

ब्याणें न० पेरावयाचें बी; ऊस,वांगें, मिरची, रताळें, इ० चें लावितात जें वाढ, रोप, इ० तें.

ब्याण्णव, ब्याण्णौ [म० बे(दोन)+नव्वद] **वि०** नव्वदांत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

ब्याध, ब्याद [सं० व्याधि] **स्त्री०** १ आजार; रोग. २ त्रास; उपद्रव; शुक्काष्ठ.

ब्यायशी, ब्यांयशी, ब्यांशी [म० बे+ ऐंशी] **वि०** ऐंशींत दोन मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

ब्याहडा, ब्याहाडा, ब्याडही वि०१ झाडावर पक्क झालेला (आंबा इ०). २ फारच कठोर किं० निबर किं० टणक (हुरडा इ०).

ब्याहडा, ब्याहाडा, बेहडा पु० एक औषधाच्या उपयोगाचें फळ.

ब्याळ पु० आर्धा आणा हें नाणें.

ब्याळ बेहाळ वि० शिवराळ, असभ्य, (भाषण, माणूस).

ब्र पु० चकारशब्द; एक शब्दसुद्धां;एक अक्षर (काढणें, निघणें). **टीप**,–निषेधीं प्रयोग.

ब्रह्म [सं० ब्रह्मन्] **न०** १ ईश्वर; परमात्मा. २ वेद. ३ ओंकार. ४ ब्राह्मणत्व. ५ ब्राह्मणजाति. ६ ब्रह्मतेज. ७ तप. ८ मोक्ष. ९ अध्यात्मज्ञान. १० उपनिषद्. ११ गायत्री मंत्र. १२ ज्ञान. १३ तत्त्व. **ब्रह्मा** [सं० ब्रह्मन्] **पु०** १ ब्रह्मदेव. २ ब्राह्मण. ३ यज्ञांतील ऋत्विग्विशेष. ४ ब्रह्मज्ञानी; तपस्वी. ५ बृहस्पति हा ग्रह. ६ ब्रह्मलोक. **ब्रम्ह न०** ह्या शब्दाचे मराठींत झाले आहेत ते अर्थ. १ महत्त्वाचा भाग; अलौकिक किं० अद्‌भुत अंश; उ० गोविंदबोवाच्या गायनांत तुला काय ब्रह्म वाटतें न कळे, असे गाणारे शेकडो आहेत. २ सोंवळें, ओंवळें, इ०चा विधिनिषेध नसणें किं० परमावधीचा गोंधळ किं० गोलंकार असणें. ॐ **ब्रह्माण्ड न०** विश्व. **ब्रह्मासन न०** ध्यानयोगाचें आसन. **ब्रह्माश्रम पु०** ब्रह्मचर्य हा आश्रम. मागें ' आश्रम ' आणि ' गृह ' मध्यें ' गृहस्थाश्रम ' पहा. **ब्रह्मर्षि पु०** ब्राह्मण असून ऋषि (वसिष्ठ इ० प्रमाणें). **ब्रह्मघोष पु०** वेदपठन. **ब्रह्मचारी**[सं०ब्रह्मचारिन्]**पु०**ज्याचें अद्यापि लग्न झालेलें नाहीं असा पुरुष. **ब्रह्मज्ञान न०, ब्रह्मविद्या स्त्री०** ब्रह्म आणि विश्व यांच्या ऐक्याचें ज्ञान. **ब्रह्मत्व न०** मोक्ष; मुक्ति. **ब्रह्मदंड न०** १ ब्रह्मास्त्र. २ ब्राह्मणानें दिलेला शाप. ३ जारण, मारण, अभिचार. **ब्रह्मनाभ पु०** विष्णु. **ब्रह्मपरायण न०** पूर्ण वेदाभ्यास. **ब्रह्मबंधु पु०** जातीनें मात्र ब्राह्मण; नांवाचा ब्राह्मण. **ब्रह्मभूत वि०** ईश्वराशीं तादात्म्य पावलेला. **ब्रह्ममीमांसा स्त्री०** वेदान्त. **ब्रह्मयज्ञ पु०** वेद शिकणें आणि शिकविणें (पंचमहायज्ञांपैकीं एक). **ब्रह्मरंध्र न०** टाळूचा मध्यभाग. मरतांना यांतून योग्याचा आत्मा जातो. **ब्रह्मराक्षस पु०** मरणानंतर पिशाच झालेला ब्राह्मण. **ब्रह्मलिखित न०, ब्रह्मरेखा, ब्रह्मलेखा स्त्री०** दैव; नशीब. **ब्रह्मवर्चस न०** अध्ययनानें येणारें तेज. **ब्रह्मवादी** [सं०ब्रह्मवादिन्] **पु०**वेदपारंगत;वेदवेत्ता. **ब्रह्मवादिनी स्त्री०** गायत्री मंत्र. **ब्रह्मवित् पु०** वेदान्ती. **ब्रह्मवृक्ष पु०** १ पळस. २ उंबर. **ब्रह्मवेद पु०** १ ब्रह्माचें ज्ञान. २ वेदज्ञान. ३ अथर्ववेद. **ब्रह्मव्रत न०**ब्रह्मचर्य. **ब्रह्मसावर्णि पु०** दहावा मनु. **ब्रह्मसूत्र न०** १ जानवें. २शारीरसूत्रें म्ह०वेदान्तसूत्रें समुच्चयानें. **ब्रह्मवृंद पु०** १ कांहीं विशिष्ट गोष्टीचा निर्णय लावण्यासाठीं जमलेले ब्राह्मण समुच्चयानें. २ सर्व ब्राह्मण समुच्चयानें. **ब्रह्मकपट, ब्रह्मकपाट न०** उपद्रव; शुक्काष्ठ; लचांड. **ब्रह्मकर्म न०** ब्राह्मणानें अवश्य केलें पाहिजे असें जें स्नान, संध्या, इ० कर्म तें. **ब्रह्मगांठ स्त्री०**१ जानव्याला असते ती गांठ. २ब्रह्मदेवानें स्त्रीपुरुषांची करून ठेवलेली जुळणी. **ब्रह्मग्रह, ब्रह्मगिरा पु०** मेल्यावर पिशाच झालेला ब्राह्मण. **ब्रह्मघोळ पु०** १ परमावधीचा घोटाळा,गोंधळ, किं०अव्यवस्था.२आचारविचार, सोंवळें ओंवळें, इ० बाबतींत अव्यवस्था. **ब्रह्मचोटली स्त्री०** फारच लहान असें पात्र, डबी, गिंडी, दागिना, इ०. **ब्रह्मदिन न०**१ ब्रह्मदेवाचा दिवस. २ वर्षप्रतिपदेचा दिवस किं०त्या दिवशीं श्रवण करतात ती हकीगत,–आजपर्यंत अमुक मनु झाले आणि पुढें अमुक होणार आहेत इ०कथा. **ब्रह्मपुरी स्त्री०**विद्वान् , तपस्वी,इ०ची वसति जेथें

विशेष आहे असा गांव, गांवाचा भाग, इ०. **ब्रह्मपुरुष पु०** ब्रह्मराक्षस. **ब्रह्मप्रलय पु०** ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षे झालीं म्हणजे ब्रह्मदेवासुद्धां सर्व विश्वाचा प्रलय होतो तो. **ब्रह्मबीज न०** ब्राह्मणाच्या वीर्यापासून उत्पन्न झाला तो. **ब्रह्मरस पु०** कथा, पुराण, इ० श्रवण केल्यानें अंतःकरणांत होतो तो आनंद. **ब्रह्मस्व न०** १ कर्ज. २ ब्राह्मणाच्या मालकीचा पदार्थ. ३ ब्राह्मणापासून घेतलेलें कर्ज. **ब्रह्महत्यारा वि०** ज्याणें ब्राह्मणांची हत्या केली आहे असा.

ब्रह्मी स्त्री० एक वनस्पति. ह्रिच्या पाल्याचा रस मेंदूच्या विकृतींवर गुणावह आहे.

ब्राह्म [सं०] वि० १ ब्रह्मदेवासंबंधाचें. २ ब्राह्मणासंबंधाचें. ३ वेदाचें. **पु०** विद्वान् वरास सालंकृत कन्या दान करणें हा विवाहविधि. ꙮ **ब्राह्मणमुहूर्त पु०** रात्रीचा शेवटचा प्रहर.

ब्राह्मण [सं०] पु० १ ब्राह्मण,–हिंदूंच्या मुख्य चार जातींपैकीं पहिली. क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या बाकीच्या तीन. २ उपाध्याय. ३ (**ज्योतिष**) अभिजित् नक्षत्र. **न०** १ ब्राह्मणसमूह. २ मंत्रांचा विनियोग सांगणारा वेदाचा भाग. ꙮ **ब्राह्मणचांडाल पु०** शूद्र पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांचा पुत्र. **ब्राह्मणब्रुव, ब्राह्मणक पु०** नांवाचा ब्राह्मण. **ब्राह्मणायन पु०** द्विजश्रेष्ठ. **ब्राह्मणजन पु०** दुसऱ्याच्या घरीं पाणी भरणें, धोतरें धुणें,इ०कामें करून चरितार्थ चालवितो तो ब्राह्मण. **ब्राह्मणजनकी स्त्री०** ब्राह्मणजनाचा धंदा. **ब्राह्मणजाई वि०** ब्राह्मणापासून शूद्रीस झालेला (मुलगा, मुलगी). **ब्राह्मणदेव पु०** ज्याचा पुजारी ब्राह्मण असतो असा एक ग्रामदेव. **ब्राह्मणभोजन, ब्राह्मणसंतर्पण न०** धर्मार्थ जें ब्राह्मणांना भोजन घालतात तें. **ब्राह्मणदोक वि०** ब्राह्मणानें स्पर्शिलेलें (पाणी, भांडें, वस्त्र, इ०).

ब्राह्मणी [सं०] स्त्री० १ ब्राह्मण जातीची स्त्री. २ कोणा ब्राह्मणाची पत्नी.

ब्राह्मण्य [सं०]न० १ब्राह्मणपणा.२ब्राह्मणांचा समूह.

ब्राह्मी [सं०] स्त्री० १ ब्रह्मशक्ति. २ सरस्वती. ३ भाषण, वाणी. ४ वेदोक्त विधि. ५ ब्राह्म विवाह जिचा झाला आहे अशी स्त्री. ६ सप्त मातृकांपैकीं एक. [पहा.

ब्रीद [सं० बिरुद किं० विरुद] मागें बिरीद' **ब्वा पु०** मागें ' बुवा, ' ' बोवा ' पहा.

भ

भ मराठी व्यंजनमालेंतील चोविसावें व्यंजन.

भ [सं०] पु० १ शुक्र. २ चोवीस ही संख्या. **न०** १ तारा. २ ग्रह. ३ नक्षत्र. ४ मेष, वृषभ, इ० बारा राशि प्रत्येक. ꙮ **भसूचक पु०** ज्योतिषी.

भक [सं० भक्ष्य] पु०,न० १ खावयाचें अन्न. २ पिशाच, ग्रामदेवता, इ० ना अर्पिलेलें अन्न; उ० देवाला कोंबडें भक दिलें तेव्हां माझा ताप हटला. ३ कोणा प्राण्याचें खाद्य; उ० शेळी हें वाघाचें भक आहे.

भकणें मागें ' बहकणें ' पहा.

भकभक, भगभग स्त्री० १ विस्तव, उन्ह, इ० चीं रखरख. २ तिखट पदार्थ खाल्ल्यानें मुखादींचीं होते ती आग. ३ कामाची काळजी किं० विवंचना.

भकाट न० भकाटी, भकाळी स्त्री०, उपासामुळें पोटाला पडते ती खळगी (बसणें, पडणें, पाडणें, जाणें). मागें ' बखाटी ' पहा.

भकांडा पु०, भकांडी स्त्री० तोल जाणें; झोकांडा.

भकारी [म० भाकरी आणि भांग यांचें आद्याक्षर] **स्त्री०** १ (संकेतानें) भाकरी. २ (संकेतानें) भांग.

भकाविणें [हिं० भकाना] स०क्रि० भलतीकडे नेणें; चुकीच्या मार्गास लावणें.

भकास वि० उजाड, उदास (गांव इ०, वसति नसल्यामुळें).

भकाळणें [म० भकाळी] अ०क्रि० १ (पोट) उपास इ० मुळें खोल जाणें. २ (मनुष्यानें) उपास इ० मुळें पोट खोल गेलें आहे अशा अवस्थेस पोचणें.

भकाळी वर ' भकाटी ' पहा.

भकूट न० वधूवरांच्या जन्मसमयींच्या राशी, –ज्यांवरून त्यांचें लग्न ठरविण्यांत येतें.

भक्कम वि० १ मजबूत; बळकट. २ जड (ओझें). ३ विपुल; मनमुराद (पाणी, जेवण, इ०).

भक्त [सं०] वि० १ जो ज्या देवाची किं० साधूची पूजा, अर्चा, भक्ति, इ० करतो तो त्या देवाचा किं० त्या साधूचा भक्त; निष्ठावंत; उपासक. २ चाहाणारा; उ० शिवरामपंत खादीचे भक्त आहेत. **न०** अन्न; भात. ॐ **भक्तवत्सल वि०** आपणाला भजणारे जे त्यांच्याविषयीं कनवाळू असा.

भक्ति [सं०] स्त्री० १ विभागणें; चिरणें. २ देव, साधु, इ० ची उपासना, अर्चा, इ०. ३ सेवा. ४ श्रद्धा. ॐ **भक्तियोग पु०** उपासना. **भक्तिमार्ग पु०** ईश्वरभक्तीनें ईश्वरप्राप्ति करून घेण्याचा मार्ग. दुसरा मार्ग ‘ ज्ञानमार्ग. ’

भक्तीण [म० ‘ भक्त ’ चें स्त्री०] स्त्री० १ देवाची किं० साधूची सेवा करणारी स्त्री. २ देवी, भैरोबा, इ० चीं देवळें झाडणारी स्त्री. ३ नर्तकी स्त्री.

भक्त्या [म० भक्ति+या (प्रत्यय)] पु० देव, पिशाच, इ० चीं सेवा करणारा.

भग [सं०] पु० १ बारा आदित्यांपैकीं एक (विवाहाची देवता). **न०** १ सुदैव; कल्याण; वैभव. २ बढती; उन्नति. ३ सौन्दर्य. ४ स्त्रीची योनि. ५ उपदंशादि कारणानें शरीराला पडतें जें छिद्र तें. ॐ **भगवान् पु०** १ परमेश्वर. २ वैभवशाली माणूस. ३ समर्थ माणूस. **भगवती स्त्री०** १ देवी. २ पार्वती. ३ (**मराठींत**) तांबड्या मिरच्यांची भुकटी. **भगवंत पु०** १ देव. २ साधुपुरुष. ह्या अर्थीं ‘ भगवती आई ’ असाही शब्द आहे. ३ समर्थ. ४ वैभवशाली. **भगभाग्य न०** १ श्रीमंतांशीं रतून स्त्रीनें मिळविलेलें द्रव्य. २ आपली बहीण, कन्या, मुलगी, इ० आपल्या वरीष्ठाकडे किं० कोणा समर्थाकडे जारकर्मार्थ पाठवून मिळविलेलें द्रव्य, बढती, अधिकार, इ०.

भंग [सं०] पु० १ फाडणें; मोडणें; फोडणें; चिरणें. २ फट; चीर; तडा. ३ तुकडा. ४ नाश. ५ पराभव. ६ (**मराठींत**) नादुरस्त होण्याची शक्यता किं० संभव. ॐ **भंगास जाणें** मोडणें; समूळ विध्वस्त होणें; नाश पावणें. **एक मण ओझें वहावयाला तुला काय भंग झाला ?** तुला तें सहज वाहून नेतां येईल. **ह्या धोतरजोड्याला सहा महिने भंग नाहीं** तो सहा महिने सहज टिकेल. **दगडी कामाला भंग नाहीं** तें फार टिकाऊ असतें.

भंग [सं० भंगा] स्त्री० भांग; गांजा.

भंगट (–ड) [म० भंग=भांग; गांजा] वि० १ भांग पिणें, ओढणें, इ० चें व्यसन ज्याला आहे तो. २ अमली पदार्थाच्या सेवनानें झिंगलेला. ३ अजागळ.

भंगणें [सं० भंग] अ० क्रि० फुटणें; मोडणें; तुटणें. **स० क्रि०** तोडणें; फोडणें.

भगत [सं० भक्त] पु० १ देवाची भक्ति फार फार करणारा. २ भूत, पिशाच, इ० ना बोलावून आणणारा किं० हाकलून देणारा. ॐ **भगतकी स्त्री०** भुतें, पिशाचें, इ० ना बोलावणें, इ० कामें करणारा. **भगतवाडा पु०** देवळांतील पुजाऱ्याची रहावयाची जागा.

भगदड, भगदाड, भगदळ [म० भंग] न० मोठें खिंडार; खिंड.

भगंदर [सं०] पु० गुद आणि वृषण ह्यांच्या दरम्यान शरीराला क्षत होतें असा एक रोग.

भगभग स्त्री० १ विस्तव, ऊन्ह, इ० चा ताप किं० खरखरन्न. २ मिरच्या, मिरें, लवंगा, इ० खाल्ल्यानें तोंड, घसा, इ० मध्यें होते ती आग. ३ ज्वराची आग. ४ चिंता; विवंचना.

भगर [म० भुगा] स्त्री० वरी, सावा, इ० धान्यें भरड दळून होतें तें जाडी पीठ.

भगरा पु० १ आर्द्रता किं० स्निग्धता ज्यांत नाहीं म्हणून ज्याचा गोळा करतां येत नाहीं असा पदार्थ,–भाकरी, भाजी, इ०. २ जाडी जाडी कण्यांच्या रूपांत असलेला कोणताही पदार्थ,– भाजी इ०. ३ चुरा; तुकडे. ४ जाडी दळलेलें पीठ इ०. ह्या अर्थीं ‘भगराळा’ **पु०** असाही शब्द आहे.

भगल [हिं० भग्ल्=] स्त्री०, न० लोकांना फसवावयासाठीं केलेलें ढोंग. ॐ **कोणेकाची भगल उडणें** त्याचें ढोंग किं० लबाडी लोकांत प्रकट होऊन त्याची बेआबरू होणें. **भगल-**

भगार्थी वि० पोटांत लबाडी असून बाहेर साधुपणाचें ढोंग दाखवितो तो. **भगली, भगल्या वि०** ढोंगी; लुच्चा.

भगवत् [**सं०**] **पु०** परमेश्वर,–समासांत; उ० भगवत्कृपा, भगवत्सेवा, इ०.

भगवंत [**सं०** भगवत् १ ईश्वर. २ साधुपुरुष. मागें ' भग ' मध्यें हा शब्द पहा.

भगवती [**सं०**] **स्त्री०** १ देवी. २ पार्वती. ३ तांबड्या मिरच्यांची पूड. ह्या अर्थी ' भगवती आई ' सुद्धां. मागें ' भग ' मध्यें हा शब्द पहा.

भगवा वि० काविच्या रंगाचा (वस्त्र इ०). ꕥ **भगवा झेंडा पु०** मराठ्यांच्या सैन्याचें निशाण. **कोणकानें भगवें होणें** त्याणें संन्यास घेणें.

भगवृत्ति [**सं०** भग (योनि)+वृत्ति] **स्त्री०** देहविक्रय करणारी स्त्री.

भंगसाळ स्त्री० १ ओसाड घर; भयाण वाडा. २ गाभारा आणि सभामंडप ह्यांच्या दरम्यानचा देवळाचा भाग. ३ भगदाड; खिंड; मोठी फट किं० चीर.

भंगसाळी पु० गुजराथी वाण्यांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

भगळ, भगळी, भगाड स्त्री० चीर, भेग (जमीन, भिंत, इ० तील).

भगाळ स्त्री०, भगाड, भगास न० १ भिंत, कुंपण, शेताचा बांध, इ० मध्यें पडलेलें खिंडार. २ बंदुकीची गोळी, गोळा, इ० शरीरास लागल्यामुळें पडतें तें भोक.

भगाड वि० ओसाड, भयाण, रिकामें (घर, वाडा, गांव, इ०).

भगिनी [**सं०**] **स्त्री०** बहीण.

भंगी पु० शेतखाने स्वच्छ करणारांची जात किं० त्या जातीचा इसम.

भंगी [**म०** भंग] **वि०**भांग ओढण्याच्या किं० पिण्याच्या व्यसनाला लागलेला. ꕥ **भंगीचंगी, चंगीभंगी वि०** व्यसनी, रंगेल, लफंगा.

भंगी [**सं०**] **स्त्री०** १ रचना; मांडणी. २ वक्रता. ३ वक्रोक्ति. ४ जिना, शिडी, इ० ची पाहिरी. ५ आकृति.

भगीरथ [**सं०**] **पु०** सगर राजाचा निपणतू. यार्णे तप करून आपले पितर जे साठ सहस्र सगरपुत्र कपिलऋषीच्या शापानें भस्मसात् झाले होते त्यांना उद्धरण्यासाठीं असंख्य कष्ट सोसून स्वर्गातून पृथ्वीवर आणि नंतर पातळांत गंगा आणली म्हणून तिला ' भागीरथी 'हें नांव पडलें आणि ' भगीरथ प्रयत्न ' हा शब्द रूढ झाला. **भगीरथप्रयत्न पु०** अतिनेटाचा प्रयत्न; असंख्य विघ्नें आली तरी न मंदावणारा प्रयत्न;दीर्घोद्योग.

भंगुर [**सं०**] **वि०** १ सहज भंग पावणारा किं० मोडणारा; ढिसूळ. २ क्षणिक; नश्वर;अशाश्वत. ३ चंचळ. ꕥ **क्षणभंगुर वि०** अल्पकाळ टिकणारें (वैभव, जीवित, इ०).

भगेंद्र [**सं०** भगंदर] **न०** भगंदर इ० रोगामुळें शरीरास पडतें तें भोक. वर ' भगंदर 'पहा.

भंगेरा, भंगेरी [**म०** भंग=भांग] **पु०**भांग करणें किं० विकणें हा धंदा करणारा.

भगेल स्त्री० थट्टा; टवाळकी; उपहास. मागें ' भगल ' पहा.

भग्न [**सं०**] **वि०** १ फुटलेला; मोडलेला; तुटलेला. २ युद्धांत ज्याचा पराजय झाला तो; पराजित. ꕥ **भग्ननेत्र वि०** नजरेला मंदता आणणारा (संनिपात इ० रोग).

भंग्या [**म०** भंग=भांग] **वि०** भांगेच्या व्यसनाला लागलेला.

भचक्र [**सं०** भ=तारा, नक्षत्र; चक्र=मंडळ] **न०** १ नक्षत्रमंडल.२राशिमंडल.

भंजक [**सं०**] **वि०** मोडणारा; फोडणारा; तोडणारा.

भजणें [**सं०** भज्=पूजिणें] **स० क्रि०** १ पूजिणें; अर्चिणें; सेविणें;उ० गुरूसी भजावें प्रेमभावें. २ संमान देणें. ३ ग्रहण करणें. ४ आश्रय करणें.

भजन [**सं०**] **न०** १ इष्ट देवतेच्या नांवाचा घोष किं० त्या प्रसंगीं म्हणावयाचीं पदें, अभंग, इ०. २ (**गणितांत**) भागाकार.ꕥ**कोणकाच्या भजनीं लागणें** त्याच्या सेवेंत तत्पर असणें;त्याचा प्रेमपूर्वक आश्रय किं० अवलंब करणें;त्याच्या मागें कुत्र्यासारखें हिंडणें.

भंजन [**सं०**] **न०** १ मोडणें;तोडणें;फोडणें. २ विध्वंस; उच्छेद; नाश. ३ पराभव. ४ पदार्थ-विशेषांतील अपायकारक अंश किं० गुण नाहींसा करणारा कांहीं पदार्थ; उ०कडव्या सुरणास गोडा करण्यास भंजन राख; उ० अळवास भंजन चिंच; उ० कोयनेलास भंजन लिंबू.

भजनी [**म०** भजन+ई (प्रत्यय)] **वि०** १ ईश्वराच्या नांवाचा घोष करणें, त्याचीं स्तोत्रें गाणें,इ०संबंधाचा,किं०इ०मध्यें ज्याला गोडी वाटते किं० जो सदा आसक्त असतो असा. २कोणी कामि-यांगार, साधु, मांत्रिक,इ० पाहिला असतां त्याच्या नादीं लागण्याचा ज्याचा स्वभाव आहे असा.

भंजाळ [**सं०** भवजाल] **न०** १ पंचाइ-तीची स्थिति; अडचण. २ विघ्न.

भजें [**सं०** भर्जित] **न०** हरभऱ्याचें पीठ इ० पाण्यांत कालवून त्याचे गोळे तेल, तूप, इ० मध्यें तळून करतात तें तोंडीलावणें.

भट [**सं०**भट=योद्धा]**पु०**योद्धा.२(**मराठींत**) कांहीं धार्मिक विधीच्या प्रसंगीं जेवावयास आमं-त्रिलेला ब्राह्मण. ३ भिक्षुकीवर चारितार्थ करणारा ब्राह्मण. ४(ब्राह्मणेतरांत) श्राद्ध,पूजा, इ० धार्मिक कृत्यांचा संकल्प सांगणारा ब्राह्मण किं० ब्राह्मण जातीचा कोणहि मनुष्य. **टीप**,—संस्कृतांतील ' भट्ट ' शब्दाचा अपभ्रंश मराठींत ' भट ' असा होतो. ' भट्ट ' खालीं यथास्थानीं पहा. ❀ **भटाला दिली ओसरी भट हात पाय पसरी** मागऱ्या माणसाला किं० आशाळभूत माणसाला कांहींही वस्तु दिली तरी त्याची तृप्ति न होतां तो जास्तीच मागत सुटतो. **तुझ्या कामांत भट पडो** तुझें काम बिघडो. **टीप**,—येथें ' भट 'म्हणजे ब्राह्मण. **भटाचा उभा दांडा आडवा दांडा** शब्दांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणें करून घेऊन आपला हेतु साधून घेण्यांत भट (म्ह० ब्राह्मण) पटाईत असतो. **भटगोसावी** [**म०** भट+गोसावी (गोस्वामी)] **पु०** संसाराचा त्याग करून ईश्वराच्या सेवेस लागलेला ब्राह्मण. **भटजी** [**म०** भट] **पु०** १ ब्राह्मण. २ वैदिक ब्राह्मण. ३ ब्राह्मण(गौरवानें). ❀ **भटजीबोवा पु०** ब्राह्मण (गौरवानें). **भटभाई** [**म०** भट+**हिं०** भाई] **पु०** ब्राह्मण (तुच्छतेंत किं० निंदेंत).

भटकणी [**म०** भटकणें] **स्त्री०** भटकण्याची क्रिया. खालीं ' भटकणें ' पहा.

भटकणें [**हिं०**भटकना] **अ०क्रि०** १ हिंडणें. २ रिकामें हिंडणें. ३ खरा मार्ग सोडून भलत्याच मार्गानें जाणें. ❀ **भटकभवानी स्त्री०** कर्तव्य न करतां हिंडत राहाणारी स्त्री. **भटकभैरव पु०** कर्तव्य न करतां भटकत राहाणारा पुरुष.

भटकळ, भडंगळ वि० उदास; भयाण; ओसाडपणामुळें भयंकर (घर, गांव).

भटक्या स्त्री० अ० व०, भटके पु०अ०व० [**म०** भटकणें] १ हिंडणें; भ्रमणें (मारणें). २ निरुद्योगीपणानें हिंडणें (मारणें). ३ एकाद्या ठिकाणीं व्यर्थ जाणें किं० येणें (मारणें).

भटक्या [**म०** भटकणें] **वि०** १ निरुद्यो-पणांत भटकत राहाण्याच्या स्वभावाचा(माणूस). २ कळपाला सोडून भटकत राहाणारें (गुरूं).

भटमोगरा पु० बटमोगरा नांवाचें एक सुगंधी फुलांचें झाड.

भटारखाना [**हिं०** भठियारखानाह्] **पु०** १ जेथें सोंवळें ओंवळें, शिष्ट अशिष्ट, इ० बाबतींत मिश्रण असतें किं० इ० बाबतींत फारसा भेद लक्ष्यांत घेतला जात नाहीं, असा जेवणाखाणाचा किं० इतर प्रकारचा समारंभ. २ अनेक हलकट किं० अव्यवस्थित माणसांचा समुदाय.३मुसल्मान लोकांची खाणावळ.ह्या खाणावळीचा जो मालक त्याला ' भटारी ' किं० ' भटियारी ' म्हणतात.

भटी पुढें ' भट्टी ' पहा.

भटूर, भटोर न० तांबें, जस्त, इ० धातूंच्या मिश्रणाचा एक धातु. ह्या धातूच्या पात्राला ' भटोरें ' **न०** म्हणतात.

भट्ट [**सं०**] **पु०** १ धनी. २ विद्वान् (एक पदवी). ३ श्रेष्ठ किं० विद्वान् ब्राह्मण किं० वैदिक; उ० भट्ट गोविंद. ४ भाट (क्षत्रिय पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांचें अपत्य).

भट्टा [**हिं०**] **पु०** मातीची शेगडी.

भट्टी, भटी [**हिं०** भठा] **स्त्री०** १ पदार्थ भाजणें, शिजविणें, रसायन तयार करणें, धातु आटविणें, इ० कामीं आच किं० उष्णता देण्या-साठीं जी माती, दगड, इ०ची रचना

करतात ती. ही रचना भिन्न कामां भिन्न असते. भडभुंजा, कुंभार, लोणारी, सोनार, भटारी, परीट, इ० च्या भट्ट्या वेगळ्या वेगळ्या प्रकारच्या असतात. २ चूल. ३ रसायन करण्याची समग्र कृति. ४ कोणतेंही काम करण्याची हातोटी किं० सफाई किं० कौशल्य. ५ विड्याचीं पानें, केळीं, इ० पिकविण्यासाठीं गवत इ० मध्यें तीं घालून ठेवण्याचा प्रकार. ६ चूल, शेगडी. ❀ **भट्टी भाजणारा पु०** आपल्या धंद्याचे पदार्थ भट्टींत तयार करणारा; उ० लोणारी, कुंभार, भडभुंजा, इ०. **भट्टींकुंभार पु०** कुंभारावर बसविलेला कर. **भट्टीखुमार न०** पिण्याची दारू तयार करणारांवर बसविलेला कर.

भट्ट [**म०** भट] **पु०** भट, ब्राह्मण (विनोदांत). ❀ **भाद्व्यांत भट्ट आणि आश्विनांत तट्टू लठ्ठ होतात** पितृपक्षांत यथेच्छ पक्वान्नें खाऊन भट आणि आश्विनांत यथेच्छ नवें गवत खाऊन घोडे पुष्ट होतात.

भट्यारखाना पु० वर ' भटारखाना ' पहा.

भट्यारी [**हिं०** भठीयारी] **पु०** भटारखान्याचा मालक.

भड स्त्री० जळतांना तुडतुड वाजणारें काटक्याकुटक्यांचें सर्पण.

भंड वि० १ भांडखोर. २ थट्टेखोर. ३ लबाड. **न०** कोणाचें कांहीं दुष्कर्म उघडकीस आल्यामुळें त्याची होते ती फजीती.

भंड न० कोणेकाविरुद्ध आणलेली कांहीं तोहमत किं० आळ. ❀ **तोंडाचें भंड करणें** शिव्या देत सुटणें.

भडक क्रि० वि० अत्यंत (तांबडा); उ० लालभडक, तांबडाभडक. **वि०** १ डोळ्यांत भरणारा, चटकदार, तेजस्वी (रंग, पोशाक, वस्त्र, इ०). २ जलाल (मिरची, तिखट, इ०). **स्त्री०** रंगित वस्त्र इ० ची चकाकी किं० चटकदारी (मारणें). ❀ **भडक आग स्त्री०** कांहीं संस्कार न करतां प्रेताला दिलेला अग्नि; भडाग्नि. **भडक जर पु०** वस्त्राचा बहुतेक भाग झाकणारी जरीची वेलबुट्टी.

भडकणें अ० क्रि० १ (अग्नि, जळतें लांकूड, गवत, इ० नीं) जोरानें जळूं लागणें. २ (क्रोध, पित्त, मत्सर, इ०) जोरानें किं० तीव्रतेनें उद्दीप्त होणें किं० उसळणें किं० उद्भवणें. ३ (सूर्यादीचें तेज) पुष्कळ प्रदेश व्यापण्याइतकें वाढणें. ४ (घोडा, उनाड माणूस, इ०) उत्सृंखलपणानें वागूं लागणें. ५ (वास) सोसाट्यानें वाहूं लागणें. ६ (सैन्य) दाणादाण होऊन दशदिशा पळूं लागणें. ७ नियंत्रणेंतून सुटून (घोडा, बैल) पळूं लागणें. ८ भटकणें.

भडकतेल न० खरजेवर लावावयाचें तेल.

भडकविणें, भडकाविणें [**म०** ' भडकणें 'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (चपराक) लगावणें किं० मारणें. **टीप,**–ह्या अर्थीं ' चपराक ' हें कर्म वाक्यांत न घातलें तरी चालतें; उ० त्याच्या मुसकटांत दोन भडकावल्या तेव्हां तो कबूल झाला. किं० दोन चपराका भडकावल्या तेव्हां इ०. २ कोणेकाला व्यर्थ हेलपाटे घालावयास लावणें (टवाळकी करण्यासाठीं).

भडकी [**म०** भडकणें] **स्त्री०** १ चेतविणें, कोणेकाची उठावणी करणें (देणें). २ लिलावांत किंमत बोलणें (देणें, करणें).

भडकींव [**म०** भडकणें] **वि०** १ वारंवार बुझणारें किं० भिणारें(जनावर,–घोडा, बैल, इ०). २ भ्यालेला, बुझलेला (घोडा इ०).

भडक्या [**म०** भडकणें] **स्त्री० अ० व०** भटक्या (मारणें).

भडंग [**हिं०**] **वि०** १ उदार; खर्चिक. २ उधळ्या; पैसा, इ० ची उधळपट्टी करणारा. ❀ **भडंगभिकार न०, भडंगभिकारी पु०** भिकारी; अकिंचन. **भडंगाभिकार, भणंगाभिकार न०** सर्व प्रकारचे भिकारी समुच्चयानें.

भडंगळ वि० ओसाड, भयाण (घर, गांव).

भडगा मागें ' भडका ' पहा.

भंडपुराण न० लांबलचक किं० कंटाळवाणी हकीगत.

भडभड्या (–डा) वि० मनांतील विचार मोकळेपणानें बोलणारा.

भडभुंज्या [**हिं०**] **पु०** चुरमुरे, पोहे, लाह्या, फुटाणे, इ० जिन्नस भाजणारा.

भंडमा, भंडवा स्त्री०, भंडवडा, भंडवाडा पु० कोणेकाची चार चौघांत झालेली किं० कर-

ण्यांत आलेली फजिती किं० अप्रतिष्ठा (करणें, उडणें, मांडणें).

भडमार,भडीमार पु०१ किल्ला इ०वर केलेला धोंडे, बंदुकांचे किं० तोफांचे गोळे, इ० चा मारा किं० वर्षाव. २ शिव्यांचा कोणेकावर केलेला वर्षाव.

भडवळ स्त्री० जमीन फाटल्यानें किं० खणल्यानें पडलेली मोठी चीर.

भडवा [**हिं०**] **पु०** १ नर्तकी स्त्रीचा मृदंग इ० वाजविणारा तिचा साजिंदा म्ह० मदतनीस. २ लाळघोटेपणानें कोणा समर्थाचीं हलकीं कामें करणारा; समर्थाचा बगलबच्चा. ३ कुटण्या.

भंडवा, भंडवाडा वर ' भंडमा ' पहा.

भडस, भडसें न० वैभव; उत्कर्ष; नशीबाची चढती कमान.

भडस स्त्री० १ शेत भाजावयासाठीं त्याच्यावर ज्या काटक्या कुटक्या पसरतात त्या समुच्चयानें. २ भडभुंजाच्या भट्टींत घालतात त्या काटक्या कुटक्या समुच्चयानें.

भडसाळ स्त्री० तांदुळाची एक जात.

भंडाई स्त्री० १ भांडणतंटे; कज्जेदलाली. २ अपकीर्ति.

भडाका पु० १ अग्नीचा झोत; आगीचा डोम. २ रागाची किं० पित्ताची उसळी.

भडाग [**म०**भड+आग; भडाग्नि] **स्त्री०** १ कांहीं धार्मिक संस्कार न करतां प्रेताचें दहन (देणें). २ तिखट पदार्थ खाल्ल्यानें होते ती आग किं० जळजळ (होणें, उठणें).

भडाग्न [**म०** भडाग्नि] **स्त्री०** वर ' भडाग ' अर्थ १ पहा.

भडाड पु० १ आगीचा डोम किं० झोत. २ बंदुका, तोफा, इ० ची गर्जना.३ कोणताही मोठा गलबला.

भडाडणें अ० क्रि० १ (अग्नि) जोरानें पेटणें. २ (तोफा, बंदुका, इ० ची गर्जना किं० कडकडाट) चालू लागणें. ३ जखमेंतून (रक्त) जोरानें बाहेर पडणें.

भंडार [**स०** भांडार] **न०**खजिना, समृद्धि; उ० भंडार भरपूर कालकंटक दूर ! **भंडार पु०** हळदीचें चूर्ण,–खंडोबा, देवी,इ०ना वाहावयाचें. ❀ **बेलभंडार उचलणें** (**किं० करणें**) बेलाचीं पानें आणि हळद,–जीं देवाच्या मूर्तीवर वाहिलेलीं असतात तीं,–तीं काढून हातांत घेणें (आणि कांहीं विधान करणें); शपथ घेतेवेळीं असें करण्याची चाल आहे; उ० मी बेलभंडार उचलून असें म्हणेन की माझ्या मनांत यत्किंचित् कपट नाहीं.मागें' बेल 'मध्यें हा वाक्प्रचार पहा.

भंडारखाना [**म०** भंडार+**फा०** खानाह्] **पु०** १ कोशागार; खजिना. २जेथें सोंवळें ओंवळें, शिष्ट अशिष्ट, इ० चा फारसा भेद पाहाण्यांत येत नाहीं असा कोणेक स्थळीं किं० समारंभांत किं० जेवणाच्या प्रसंगीं असतो तो गोंधळ. ह्या अर्थीं ' भंडारा ' असाही शब्द आहे.

भंडार भरपूर न० वैभव; भरभराट; उत्कर्ष. गोसावी इ० ना पैसा, चिरगूट, इ० दिलें असतां ते हा शब्द उच्चारून आशीर्वाद देतात.

भंडारा पु० १ गोसावी किं० बैरागी ह्यांना दिलेलें भोजन. २ भंडारखाना. **भंडारी** [**म०** भंडार] **पु०** खजिनदार. **भंडारी स्त्री०** १ फडताळ. २ खंडोबाचे भक्त जींत हळद ठेवितात ती पिशवी.

भंडारी पु० ताड, माड, इ० ची दारू काढणाऱ्यांची जात किं०त्या जातीचा कोणी इसम.❀ **भंडारवाडा पु०,भंडारथळ न०**गांवांतील भंडारी लोकांच्या वसतीचा भाग. **भंडारमाड पु०** मद्य काढण्यासाठीं राखून ठेविलेला माड.फळांसाठीं राखून ठेविलेला जो माड तो'नारळमाड.'

भंडारडा पु० भंडारी (तुच्छतेनें).

भंडाडा पु०, भंडाळी स्त्री० [**म०** भंड] फजीती, बोऱ्या (उडणें, करणें).

भंडाविणें स० क्रि० कोणेकाला सताविणें; उपद्रविणें; सळों कां पळों करणें.

भडिमार, भडेमार पु० वर 'भडमार' पहा.

भंडी स्त्री० अंत्याक्षरी ह्या नांवाचा मुलांचा खेळ (खेळणें, लावणें). एका मुलानें म्हटलेल्या श्लोकाचें जें अंत्य व्यंजन त्यानें आरंभणारा श्लोक दुसऱ्या बाजूच्या मुलानें म्हणावयाचा अशा रूपाचा हा खेळ असतो.

भडुवा वर ' भडवा ' पहा.

भडेराक्षस [हिं०वडा,भडा+म०राक्षस] **पु०** राक्षसापेक्षां उग्र, तामसी, तापट, असा माणूस.

भंडोडा [**म०** भं ड] **पु०** कोणेकाचा केलेला किं० उडविलेला फजिती किं० बोऱ्या.

भडोळ, भडवळ स्त्री० जमीन फाटून पडलेलें भगदाड किं० खिंडार.

भणका पु० १ मुंग्या, माशा, इ० चा थवा किं० समूह. २ गुणगुणाट; कलकलाट.

भणक्या स्त्री० अ० व० रिकामें किं० निरुद्योगीपणानें हिंडणें (मारणें).

भणंग [**हिं०** भडंग] **पु०** अतिदरिद्री; अकिंचन; भिकारी. **न०, स्त्री०** ओसाड आणि भयाण गांव, घर, इ०.

भणंगभिकार न०, भणंगभिकारी पु० वर ' भडंग ' मध्यें ' भडंगभिकार ' पहा.

भणदें न० १ डोक्यावर खापरांत घेतलेला विस्तव; पोत; मशाल. खालीं ' भदें ' पहा.

भणभण स्त्री० १ सोसाट्याचा वारा किं० अशा वाऱ्याचा आवाज. २ उन्ह, दिवा, इ०चा लखलखाट. ३ ओसाडपणा. ४माशा,चिलटें,डांस, इ० चा शब्द किं० गुणगुणाट.

भणभणणें अ० क्रि० १ (कपाळ) उठणें किं० दुखणें. २ भणभण असा आवाज होणें. ३ उजाडणें.

भणभणीत वि० १ ओसाड. २ प्रकाशित. ꕥ **भणभणीत दुपार स्त्री०** ऐन दुपारचा समय.

भणाटा, भणाण, भणाणा पु० १ गोंगाट; कलकलाट. २ सैन्यांतील शिपाई, गुरें, माणसें, इ०ची दाणादाण किं० धावपळ.३काम,कारभार, इ० तील गोंधळ किं० अव्यवस्था.

भणित [**सं०**] **न०** १ भाषण; वाणी. २ जें बोललें तें. ३ वाक्य; वचन. ४ आहणा; म्हण.

भतका पु० १ शेण, माती, चिखल, इ०चा गोळा. २ गुद्दा; रट्टा.

भत्ता [**हिं०**] **पु०** १ सरकारचें किं० कोणा व्यापाऱ्याचें काम करण्यासाठीं जी पगाराशिवाय ज्यादा रक्कम देण्यांत येते ती. २ कैदी इ० ना देतात ती पोटगी. ३ साक्षीसाठीं कोर्टांत गेलेल्या माणसाला गाडीभाडें इ० साठीं देण्यांत येतो तो पैसा. ꕥ **भत्तेकरी पु०** ज्याला भत्ता देण्यांत येत आहे असा.

भंद न० १ खालीं ' भदें ' पहा. २ उपद्रवी पोर. [चढविणें).

भदका पु० रट्टा, तडाखा (मारणें, देणें,

भदरणें पुढें ' भादरणें ' पहा.

भदाड न० मोठी चीर; भगदाड; खिंडार.

भदाडें [**म०** भदें] **न०** ज्याचा वरचा कांठ फुटला आहे असें मडकें.

भदुला वि० लठ्ठ, अगडबंब.

भदें न० १ गोंधळी, गोसावी, इ० लोक आंत अग्नि पेटवून हातावर घेतात तें खापर. २ ज्याचे कांहीं भाग झिजलेले, मोडलेले, किं० पोचललेले आहेत असें भांडें. ३ बदबदति आवाजाचें कोणतेंही वाद्य. ४ प्रकृति ढासळल्यामुळें बिघडलेलें शरीर, किं० मोठी ठोकर लागल्यामुळें बसलेला व्यापार, किं० खर बसल्यामुळें घोंघरा कंठ.ꕥ**तोंडाचें भदें करणें** शिव्या देत सुटणें.**भदें घेणें** शेत, गांव, इ० ची मर्यादा ठरविण्यासाठीं पहिल्या अर्थाचें खापर हातांत घेऊन दिव्य करणें.

भद्र [**सं०**] **वि०** १ सुखी. २ शुभ; उ० भद्रमुख. ३ अनुकूल; चांगला. ४ सुंदर. ५ सुखकर. **न०** सुख; मंगल; कल्याण. ꕥ **भद्रांग पु०** बलराम. **भद्रपीठ, भद्रासन न०** सिंहासन. **भद्रकाली स्त्री०** दुर्गादेवी. **भद्रकुंभ पु०** १ पाण्यानें भरलेली घागर. २ राज्याभिषेकार्थ तीर्थोदकानें भरलेला कुंभ. **भद्रंकरण न०** १मौंजीबंधन हा विधि. २(**लाक्षणिक**) कोणेकावर केलेला शिव्यांचा वर्षाव. **भद्रमोथा, भद्रमुस्ता स्त्री०, भद्रमुस्तक पु०** नागरमोथा. **भद्राक्ष पु०** एक वृक्ष; ह्याच्या फळांच्या माळा इ० करतात. **भद्या, भद्रकपाळ्या वि०** १ दुर्दैवी. २ ज्याचें भाषण किं० दर्शन अशुभ आणतें असा (मनुष्य). ३ कपाळकरंटा.

भद्रा [**सं०**] **स्त्री०** १ गंगा. २ गाय. ३ द्वितीया, सप्तमी, आणि द्वादशी, ह्या तिथि. ४ करणांतील सातवें करण. ह्या अर्थीं प्रयोग **अ० व०**. ꕥ **कोणेकाच्या कपाळीं भद्रा असणें** तो दुर्दैवी असणें.लाभाची संभावना असतां लाभ झाला

नाहीं तर म्हणतात ' त्याच्या कपाळीं भद्रा आहेत.'

भप,भप्प क्रि० वि० जोरानें, अतोनात; उ० त्याचा भप्प हात सुजला आहे, भप्प वारा आला, भप्प उजेड पडला, भप्प घाण आली,इ०.

भपका, भबका पु० १ थाटमाट; ऐट; झोक. २ अत्तरें काढण्याच्या यंत्राची नळी.

भपका, भबका, भपकारा, भबकारा पु० १ वारा, वास, जाळ, इ० चा एकदम उठतो तो वेगाचा प्रवाह किं० दरवळ किं० सोसाटा. २ मिरच्यांच्या चूर्णाचें उधळणें.

भपुरा पु० १ गात्राची सूज किं० फुगवटा. २ फुगलेलें किं० सुजलेलें गाल. ३ पुरुषाचें शिश्न. **क्रि० वि०** जोरानें, रटाटून (सुजणें, फुगणें).

भबकणें अ० क्रि० (विस्तवाची आग, घाण, वास, वदंता, इ०) जोरानें उठणें किं० पसरणें. २ (वारा) सोसाट्यानें वाहाणें. ३ रागानें (मनुष्य, वाघ) उसळणें. [पहा.

भबका, भबकारा वर ' भपका,' 'भपकारा'

भबकी स्त्री० १ आगीचा डोंब. २ वाऱ्याचा सोसाटा. ३ मिरच्यांचा खाट. ४ तळण्याची घाण. ५ समाजांत उठलेली किं० पसरलेली अफवा किं० वदंता. ६ चेतवणी, भर, उठावणी (देणें). ७ लिलावांत किंमत चढविणें. ८ धमकावणी. [इ०ची).

भंबाडा,भंभाडा पु०उधळपट्टी (पैसा,धान्य,

भंबाळ वि०खूप मोठा,अवाढव्य असा(कोणतांही पदार्थ). मागें ' बंबाळ ' पहा.

भबूक वि० चटकदार, भपकेदार,उठावदार. लाल भूबक, तांबडा भूबक म्ह० उठावदार किं० भळभळीत तांबडा. [उडविणें).

भंबेरी स्त्री० फजीती; बोऱ्या (उडणें,

भंबो, भंब्या, बंब्या वि० अवाढव्य; खूप मोठा (माणूस, पदार्थ). ॐ **भंबोनाथ पु०** मूर्ख; टोणपा; बैलोबा.

भंभाळ, भंभेरी, भंभ्या वर ' भंबाळ ' ' भंबेरी, ' ' भंब्या ' पहा.

भय [सं०] न० १ भीति.२ संकट. ३ नादुरुस्त होण्याचा संभव किं० शक्यता; उ० तुम्ही घराला सागवानी लाकूड वापरा म्हणजे शंभर वर्षें भय नाहीं.ॐ **भय घेणें** एकाद्या पदार्थाची धास्ती घेणें. **भयंकर वि०** १ भीति वाटविणारा. २ अतिशय; परमावधीचा; उ० भयंकर गोरा, भयंकर सुंदर, भयंकर बुद्धिमान्. हा उपयोग अर्वाचीन आहे. **भयाकुल, भयकातर, भयचकित, भयाक्रान्त, भयातुर, भयार्त, भयान्वित वि०**फार भ्यालेला;अत्यंत भ्यालेला;घाबरलेला. **भयावह वि०** भीति वाटविणारा; ज्याची आपणास भीति वाटते असा (माणूस, जनावर, पदार्थ). **भयानक** वि० भयंकर. **पु०** नवरसांतील एक. मागें ' अद्भुत ' पहा. **भयाभंगास जाणें** समूळ नष्ट होणें. **भयाण(-न)वि०**ओसाडपणामुळें भयंकर (गांव, घर).

भयांभयां क्रि० वि० विपन्न किं० हताश स्थितींत (हिंडणें). ॐ **कोणेकाची भयांभयां होणें** तो अत्यन्त हीन,दीन, किं० विपन्न स्थितीस येणें किं० आलेला असणें.

भयाळू [म० भय] वि० भित्रा.

भय्या [हिं०] पु० १ भाऊ. २ पुरभय्या.

भय्यन पु० परदेशी; पुरभय्या.

भर [फा० बहार = प्रगल्भावस्था, पूर्णत्व, कळस] **पु०** १ पूर्णता; विपुलता; विकासाचा कळस; उ० ज्वानीचा, तारुण्याचा,ज्वराचा भर. २ ओढा; अवलंब; आधार; उ० ह्या मुलाचा अभ्यासापेक्षां खेळण्याकडे भर ज्यास्ती आहे; उ० सांगलकिरबोवा हरदासाचा विशेष भर ज्ञानेश्वरीकडे आहे.३ गोमहिष्यादिकांस प्राप्त होते ती कामुकावस्था. ॐ **आपल्या भरानें चालणें** स्वच्छंदानें किं० स्वैरवृत्तीनें वागणें.

भर [सं० भृ=भरणें] **स्त्री०** १ भरतां, ठासतां,किं०कोंबतां येईल इतकें कोणत्याही पदार्थाचें परिमाण; सोसतां येईल इतकें ओझें; करतां येईल इतकें काम; उ०आतां गाडीची भर झाली, तींत ज्यास्ती सामान राहाणार नाहीं; उ० तुला आणखी दोन श्लोक समजावून सांगतों म्हणजे उद्याच्या धड्याची भर झाली.२खळगा किं०खोलगटपणा भरून काढण्यासाठीं जें घालतात तें; उ० ह्या अंगणांत दहा गाड्या मातीची भर घालावी तेव्हां तें अंगण पडवीच्या सपाटीला येईल. ॐ **भर करणें** न्यूनता भरून काढणें.

कोणेकाची भर करणें आपण न भोगतां त्याला देऊन टाकणें. **भर घेणें** घेतां येईल तितकें पूर्णपणें घेणें. **भर देणें** उत्तेजन देणें; चेतविणें; चिथावणें. **भर पडणें** जोड मिळणें. **भरीस घालणें** न्यूनता नाहींशी करण्यासाठीं कमी असेल तें घालणें. **एकाद्या गोष्टीच्या भरीस पडणें** ती पथकरून मग ती पार पाडण्याच्या खटाटोपांत पडणें; तिच्या नादीं लागणें. **त्याची सर्व संपत्ति रांडांच्या भरीस पडली** म्हणजे रांडांच्या भक्ष्यस्थानीं पडली किं० ती त्याच्यापासून रांडांनीं लुबाडून किं० हिरावून घेतली. **भरीं भरणें** १ एकाद्या वस्तूचा अतोनात नाद घेऊन तीच एकसारखी करीत सुटणें. २ आपण कोण, आपली योग्यता काय, हें विसरून जाऊन एकाद्या वस्तूच्या नादीं लागणें. **भरउभर स्त्री० ए० व०** १ करणें आणि तपासणें. २ कमी होणें आणि ज्यास्ती होणें; उत्कर्ष आणि अपकर्ष.३ दुसऱ्यावर आपली छाप बसविणें.

भर [**सं०** भृ] **वि०** किं० **श० यो० अ०** सर्वदा; सर्वत्र; पूर्णपणें; विशिष्ट परिमाण होण्या इतकें; ऐन जोराच्या समयांचा; उ० तो दिवसभर खेळत असतो; त्याची गांवभर निंदा झाली; शेरभर कणीक; मणभर सर्पण; भर तारुण्य; भर दुपार; इ०. **टीप**,–भर हा शब्द आरंभीं येऊन जे जोड शब्द रूढ झाले आहेत त्यांपैकीं कांहीं ह्या प्रतीकांत देऊन बाकीचे पुढें स्वतंत्रपणें ह्या कोशांत आम्ही देऊं. ❀ **भर अमली वि०** सर्वथैव सरकारच्या अमलाखालीं असलेला (गांव, तालुका, जिल्हा). **भरजवानी, भरज्वानी, भरजानी स्त्री०** ऐन उमेदीचें वय; पूर्ण तारुण्यावस्था. **भरडाव पु०** ऐन रंगांत आलेला डाव.

भरकटणें, भरकडणें, भरकांडणें स० क्रि० घाईघाईनें किं०कसें बसें(कांहीं काम)करून टाकणें.

भरकंडणें स० क्रि० घाईघाईनें (कांहीं लेख) लिहून टाकणें. [प्रत्येक.

भरकडा, भरकंडा पु० लिहिण्यांतील फराटे

भरकन, भरदिनीं, भरदिशीं क्रि० वि० अल्प काळांत; झपाट्यानें.

भरकाड, भरकांड न० १ रद्दी पदार्थ; सटरफटर सामान. २ हल्कें किं० भरांभरां जळणारें सर्पण. **वि०** कमी कसाची (जमीन).

भरकांडा पु० १ वाटोळी किं० चक्राकार गति. २ चक्कर; जाऊन येणें; हेलपाटा (मारणें). ३ गुंतागुंतीची किं० पेचाची स्थिति (पडणें, पाडणें, सापडणें). ४ कोणेकाला कर्ज, मागणी, इ० बद्दल केलेला तगादा. ५ (पाण्याचा)प्रवाह. ६(वाऱ्याचा) सोसाटा.७ (कोणत्याही कामांत) झपाटा किं० त्वरा.

भरकुंब, भरकूम, भरखूम वि०पोरकटपणानें हसणें, खिदळणें, उड्या मारणें, लोळणें,इ०क्रिया न करणारा (माणूस); गंभीर;सभ्य;पोक्त;भारदस्त.**भरखमी स्त्री०** गंभीरपणा; भारदस्तपणा.

भरकोंडा पु० तूस; टरफल.

भरगच्च क्रि० वि० पूर्णपणें; सर्वभागीं.

भरगच्ची वि० कलाबतूचे आणि सुताचे तंतु एकांत एक घालून विणलेलें(वस्त्र). ❀**भरगच्ची जेवण न०** भरपूर खाद्यें खाऊन आणि पेयें पिऊन झोडलेलें जेवण.

भरगत, भरगी स्त्री०, न० गाडी, गल्बत, पात्र, पोट,इ० मध्यें भरतां येईल तितकें सामान, पदार्थ, खाद्य, इ०चें परिमाण किं० अशा प्रकारें जें भरलें तें.

भरगांव पु०, न० दाट वसतीचा गांव किं० गांवाचा भाग.

भरगोणी स्त्री०पूर्ण भरलेली गोणी,–जिच्यावर भरपूर जकात द्यावी लागते.

भरगोळी स्त्री० तोफेचा गोळा किं०बंदुकीची गोळी जाऊन पडेल इतकें अंतर. **क्रि० वि०** तितक्या अंतरावर.**भरघोसानें क्रि० वि०** १ ऐन वैभवांत; प्रतिष्ठेनें; मानमान्यतेच्या स्थितींत (मरणें, कांहीं काम किं० नोकरी सोडणें, धंदा बंद करणें). २ चढ्याघोड्यानिशीं.

भरचक्का वि० मनमुराद,येथेच्छ,तृप्ति होण्याइतकें, परमावधीचें, परिपूर्ण (जेवण, पोशाख, पाऊस, उन्ह, पीक, हंगाम, इ०).

भरचंदी स्त्री०१घोड्याला द्यावयाचा तितका भरपूर दाणा. २ कोणत्याही पदार्थाचें इष्ट तितकें भरपूर परिमाण.

भरचौक स्त्री० घोड्याची अत्यंत जलदीची

चाल; उ० मी भरचौकीवर घोडा काढला म्हणून येथें मी ऐन वेळीं येऊन पोचलों.

भरजमा स्त्री० १ बुडीत, पड, गयाळ, मयत, इ० वजा न पडतां पूर्ण वसूल येऊन होते जी गांव, देश, इ० संबंधाची जमा ती. २ वेगवेगळ्या खात्यांवर खर्च करावयाच्या रकमा बाजूस काढण्याच्या पूर्वींचा गांव इ०चा वसूल.

भरजमीन स्त्री० जिच्यावर पूर्ण सारा दिला किं० घेतला जात आहे अशी जमीन.

भरज्यहा, भरज्याहा, भरझ्याहा, भरझ्याल क्रि० वि० परमावधीच्या वेगानें (घोडा, गाडी, इ० हाकणें किं० चालणें). पुढें ' भरदवड 'पहा.

भरड वि० नेहेमींपेक्षां ज्याचे कण किं० तंतु जाडी आहेत असे (दळलेलें पीठ किं० कुटलेला चुना इ० पदार्थ) किं० काढलेलें (सूत) किं० जाडी सुताचें विणलेलें (वस्त्र). **पु०** १ पीठ इ० पदार्थांतील जाडी कण समुच्चयानें. २ द्विदळ धान्य डाळ करावयासाठीं एकवार भरडलें असतां होतो जो डोळ तो. **न०** ज्यांत वृक्ष, तृण, शेत, इ० चांगलें होत नाहीं असा जो लहानसा माळ तो. **स्त्री०** दोरी बांधून पदार्थ जमीनविरून ओढीत नेणें किं० ही ओढावयाची दोरी.

भरड स्त्री० सैन्य, यात्रेकरू, इ० ची वर्दळ किं० पायरव.

भरडण [**म०** भरडणें] **न०** १ जाडें जाडें दळण्यासाठीं घेतलेलें धान्य. २ जाडें पीठ होईल अशा प्रकारें दळणें.

भरडणें [**म०** भरड] **स० क्रि०** जाडे कण निघतील अशा प्रकारें (धान्यादि) दळणें.

भरडा [**म०** भरडणें] **पु०** १ जाड्या कणांच्या रूपांत दळलेलें धान्य. २ वडे, उंडे, इ० करण्यासाठीं तांदूळ, डाळ,इ०एकत्र करून भरड दळलेलें पीठ.

भरडाव पु० १ वजीर इ० मूल्यवान बुद्धिबळें अद्यापि मारलीं गेलीं नाहींत असा डाव. २ ऐन रंगांत आलेला डाव.३उंची हुकमाचीं पानें अद्यापि टाकण्यांत आलीं नाहींत अशा स्थितींतील पत्ते, गंजीफा, इ०चा डाव.

भरडी [**म०** भरडणें] **वि०** जाडी दळलेली किं० कुटलेली (डाळ, धान्य, मसाला, सुंठ,इ०). किं० अशांचा केलेला(पदार्थ).

भरण [**म०** भरणें] **न०** १ दिव्यांत वात जळण्यासाठीं किं० कढईत वडे तळण्यासाठीं एकदा घातलेलें तेल. २ अन्नवस्त्र इ० देऊन कोणेकांचें केलेलें पोषण किं० संगोपन. ३ धान्यादि आंत घालून पात्रादि भरणें. ४ वृक्षाच्या बुडाशीं घातलेली माती. ५ पूर्णपणें भरलें जाण्याची पात्रादींची स्थिति. ६ करंज्या, मोदक, इ०च्या पोटांत घालतात तें पुरण इ०. **स्त्री०** विशिष्ट संख्या किं० परिमाण किं० अवकाश भरून निघण्यासाठीं घातलेली भरती किं० अशी भरती घालण्याची क्रिया. **भरदाज वि०** १ पूर्णपणें पोसलेला (दाणा, कापूस). २ ठासून बांधलेली (पेंडी, भारा, इ०). ३ खाऊन पिऊन सुखी (माणूस).

भरण [**म०** भरणी] **न०** भरणी हें नक्षत्र. ஃ **भरणचौथ स्त्री०** भाद्रपद वद्यांतील ज्या तिथीला भरणी नक्षत्रांत चंद्र असतो ती किं०त्या दिवशीं पितरांसाठीं केलेलें श्राद्ध. मागें ' चौथ ' मध्यें ' चौथभरणी ' पहा.

भरणा [**म०** भरणें] **पु०** १ भरण्याची क्रिया.२विशिष्ट माप,परिमाण,संख्या,इ०पूर्ण करण्याची क्रिया किं० पूर्ण करण्यासाठीं जें घातलें जातें तें. ३ पैशाचा किं० धान्यादींचा विशिष्ट समयीं द्यावयाचा ठरलेला हप्ता. ४ पूर्णता; भरपाई. ५ बराचसा जमाव किं० वसति किं०साठा; उ० ह्या गांवांत पांचकळशांचा भरणा मोठा आहे; उ० त्या हरदासाजवळ अभंगांचा भरणा फारच मोठा आहे. ६ साऱ्याचें पूर्ण परिमाण; उ० ह्या शेताचा भरणा सातव्या वर्षी होईल. ஃ **भरणेकरी** [**म०** भरणा+करणें] **पु०** सरकार, सावकार, पेढी, इ० कडे पैसे भरणारा. **भरणेवाईक पु०**१ ज्याचेपाशीं विवक्षित वस्तूंचा भरणा पुष्कळ आहे असा मनुष्य. २ पैसा,कोड्या, नकला, दाखले, चुटके, इ० चा संग्रह प्रसंगीं उपयोगाचा ज्याच्या स्मरणांत पुष्कळ आहे असा मनुष्य. **भरण्याचा वि०** १ भरतीचा. २ आपणास उपयोगी पडण्याजोग्या वस्तूंचा संग्रह ज्याचेपाशीं पुष्कळ आहे असा (मनुष्य).

भरणी [**सं०** भृ] **स्त्री०** विवक्षित सपाटी-

पर्यंत किं० मापापर्यंत कांहीं वस्तु येण्यासाठीं घातलेली भर; उ० ह्या पडवीला पांच गाड्या मातीची भरणी घातली तर पडवी ओटीच्या सपाटीला येईल.

भरणी [सं०] **स्त्री०** सत्तावीस नक्षत्रांतील दुसरें. ꙮ **भरणीश्राद्ध न०** मनुष्य मेल्यावर पहिल्या वर्षांतील भाद्रपद वद्यांतील ज्या तिथीला भरणी नक्षत्रांत चंद्र असतो त्या तिथीला मृतासाठीं करतात तें श्राद्ध.

भरणें [**सं०** भृ] **न०** खांबाचा माथा आणि पिढें ह्यांच्यामध्यें घालतात तो ठोकळा.

भरणें [**सं०** भृ] **स० क्रि०** १(विशिष्ट माप, परिमाण, संख्या, मुदत, इ०) पूर्ण करणें; उ० मी नोकरीची मुदत भरणार आहें; उ० आधीं व्याजाची रक्कम भर. २(कमी असेल तितकें पदार्थाचें परिमाण) पूर्ण करणें. ३ पात्रादींत (पदार्थविशेष) ओतणें, घालणें, किं० प्रविष्ठ करणें; उ० दौतींत शाई भर; उ० हे तांदूळ ह्या पोत्यांत भर; उ० हीं भांडीं त्या वळदांत त्याणें भरलीं. ४ माती, चिखल, इ० नीं (अंग इ०) लेपणें किं० माखणें. ५ चित्रादींत (रंग इ०) किं० कोष्टकांत (रकमा इ०) यथास्थानीं निविष्ट करणें. ६ गात्रविशेष (भूषणविशेषानें) युक्त करणें; उ० आज गोदीनें बांगड्या भरल्या. ७(द्यावयाचें देय) देणें; उ० सरकारांत सदोबानें पंचवीस रुपये दंड भरला. ꙮ **देवानें भरलें धरणें** १ विचारलेल्या प्रश्नाला होय किं० नाहीं असें कांहींच उत्तर न देतां चिकटाविलेलीं फुलें इ० देवानें न सोडणें. २ देवऋष्यानें विचारलेल्या प्रश्नाला अंगांत आलेल्या भुतानें कांहींच जबाब न देणें. **भरून देणें** १ ठरावाप्रमाणें जें करावयाचें किं० द्यावयाचें तें पूर्ण करणें किं० पूर्णपणें देऊन टाकणें. २ आपण दुसऱ्याचें केलेलें जें नुकसान त्याच्या मोबदला द्रव्यादि त्याला देणें. **भरून पावणें** मिळावयाचें तितकें पूर्ण प्रमाणांत मिळविणें.

भरणें [**सं०** भृ] **अ० क्रि०** १ विवक्षित मापाचा, संख्येचा, किं० परिमाणाचा असणें, होणें, किं० आढळून येणें; उ० हे तांदूळ चार पायल्या भरतील; उ० काल्चे न[illegible]त्तीस भरले; उ० माझ्या नोकरीची [illegible] रळ सर्द; सटर-[illegible] २ हल्लें [illegible] मुदत सहा महि-[illegible]न्यांनीं भरेल. २ (शरीर, कणीस, इ०) पूर्णपणें वाढणें किं० पुष्ट होणें; उ० जोडीचे शंभर हात रोज कर म्हणजे तुझे दंड चांगले भरतील. ३ फार चालण्यानें किं० फार काम करण्यानें (मांड्या, पोटऱ्या, दंड, कंबर, इ०गात्रें) हालचाल करावयाला असमर्थ होणें. ४ (जखम, क्षत, इ०) बरें होऊन त्वचा पूर्वीप्रमाणें होणें. ह्या अर्थी 'भरून येणें' असाही प्रचार आहे. ५ (कांटा, सुई, इ०) अंग इ० मध्यें शिरणें; उ० माझ्या अंगांत किं० धोतरांत सराटे भरले. ६ (बाजारांतील दुकानें) उघडलीं जाणें. ८ (शस्त्राची धार) बोथट किं० मंद होणें.

भरत [**सं०**] **पु०** १ नट. २ पगारी शिपायी. ३ दशरथाचा एक पुत्र. ४ नाट्य आणि संगीत ह्या शास्त्रांचा प्रवर्तक. ५ दुष्यन्त आणि शकुंतला ह्यांचा पुत्र. हा पुढें चक्रवर्ती झाला. ६ ऋषभ देवाचा ज्येष्ठ पुत्र. ह्याच्यावरूनच अजनाभवर्षाचें 'भरतवर्ष' हें नांव पडलें. ꙮ **भरतपुत्र पु०** नट. **भरतवाक्य न०** नाटकाच्या शेवटीं असतें तें आशीर्वादात्मक वाक्य. **भरतखंड, भरतवर्ष न०** हिंदुस्थान देश. **भरतशास्त्र न०** नाटक आणि संगीत ह्यांच्यासंबंधाचें शास्त्र.

भरत न० तांबें, जस्त, इ० च्या मिश्रणाचा एक धातु. ꙮ **भरताचें भांडें न०** भरत धातूचें भांडें. **भरिताचें भांडें** न० [**म०** भरीत +भांडें] **न०** विशिष्ट मापाचें किं० परिमाणाचें भांडें. **भरती वि०** भरत ह्या धातूचें केलेलें (भांडें इ०).

भरत, भरीत [**म०** भरणें] **न०** १ बारदान पूर्णपणें भरलेलें किं० साठलेलें असण्याची स्थिति. २ सामान; ओझें; कोणेकास वाहून नेतां येईल इतक्या परिमाणाचें ओझें; उ० हें सामान दोन बैलांचें भरत आहे. ३ कोणेकानें वाहून नेलेलें किं० आणलेलें सामान.

भरतक [**म०** भरणें] **न०** १ विशिष्ट संख्या, परिमाण, माप, जागा, इ० भरून काढण्याला पुरेसा पदार्थ. २ गलबत, गाडी, इ० वर लादलेलें किं० लादतां येईल इतकें सामान. ३ गलबत, गाडी, इ०ची पूर्ण भरलेपणाची स्थिति.

भरताड [**म०** भरणें] **न०** १ सामान वाह-

णाऱ्या गलबतें, गाड्या, बैल, इ० चा जमाव किं० खेप किं० त्यांनीं वाहून आणलेलें सामान. २ गलबत, गाडी, इ०ना वाहून नेतां येईल इतकें सामान; उ० हें पोतें गाडीवर घातलेंस म्हणजे गाडीचें भरताड झालें. ३ रहाटाच्या माळेचे पाण्यानें भरून वर चाललेले लोटे समुच्चयानें. रिकामे होऊन खालीं तोंड करून उतरत असलेल्या लोट्यांना 'रिताड' न० असा शब्द आहे.

भरती [म० भरणें] **स्त्री०** १ चंद्राच्या उदयास्तांच्या समयीं समुद्राच्या पाण्याची होते ती वृद्धि. याच्या उलट 'ओहोट,' किं० 'सुकती.' २ कांहीं संख्या, परिमाण, माप, बारदान, इ० ची पूर्णपणें भरलेपणाची स्थिति. ४ संपत्ति, आजार, दारिद्र्य, इ० मध्यें झालेला किं० होत चाललेला चढ किं० वृद्धि. ❀ **भरतीचा वि०** १ पूर्णपणें कांहीं संख्या, माप, इ० भरावयास जरूर तितका (पदार्थ, ओझें, इ०). २ केवळ संख्या किं० माप भरून काढण्याच्याच उपयोगाचा; खोगीरभरतीचा. **भरतीसुकती स्त्री० ए० व०** चढउतार; उत्कर्षापकर्ष.

भरतीन्हीसांज [म० भर (ऐन)+तीन+सांज (संध्याकाळ)] **स्त्री०** ऐन संध्याकाळ.

भरतीर [म० भर+तीर (बाण)] **पु०** सोडलेला बाण जितक्या अंतरावर जाईल तितकें अंतर किं० तितका पल्ला. **क्रि० वि०** सोडलेला बाण जेथें जाऊन पडेल तेथें किं० तेथपर्यंत.

भरतूक [म० भरणें] **न०** गलबत, गाडी, इ० वरचें ओझें किं० त्या ओझ्यावरची जकात.

भरतें [म० भरणें] **न०** १ पूर्णता; कळस. २ आजार, वाईट छंद, पापाचरण, इ० ची पूर्ण वाढ किं० विकोपास गेल्याची स्थिति. ३ आनंद, दुःख, वात्रटपणा, इ० चा कळस किं० परमावधि (येणें). ४थंडी, वारा, पाऊस, इ०ना एकदम येते तो उसळी किं० त्यांत एकदम होतो तो चढ. ५ समुद्राच्या पाण्याची चंद्राच्या योगानें होते ती वृद्धि (येणें).

भरतोंडली स्त्री०, भरतोंडलें न० [म० भरणें+तोंडलें] सुट्या फाकी न करतां त्या एकमेकांना चिकटलेल्या राहतील अशा प्रकारें तोंडलीं चिरून त्यांत मसाला भरून करतात तें तोंडीलावणें.

भरदवड, भरदौड, भरधाव [म० भर (पूर्ण)+दवड, दौड, धाव] **स्त्री०**घोडा, माणूस, इ० चें परमावधीच्या वेगानें चालणें, धावणें, इ०.

भरदार वि० १ पूर्ण भरल्यामुळें शोभिवंत (शरीर). २ झोकदार, ऐटदार (पोशाख, चेहेरा). [ऐन दुपार.

भरदोनप्रहर [म० भर+दोन+प्रहर] **पु०**

भरदौलत [म० भर (पूर्ण) + दौलत (संपत्ति)] दौलत किं० वैभव यांचा कळस.

भरद्वाज [सं०] **पु०** कुकुडकुंभा हा पक्षी.

भरधाव, भरधूम क्रि० वि० पूर्ण वेगानें.

भरनक्शी, भरनक्षी वि० १ भरपूर जर ज्यांत विणला आहे असा वस्त्राचा (कांठ)किं० अशा कांठाचें (वस्त्र). २ सर्वांगीं नक्षीनें शोभविलेला (स्तंभ, छत, महिरप, इ०).

भरनवती [म० भर+नवती (नवीनपणा)] **स्त्री०** ऐन तारुण्यावस्थेचा समय; भरजवानी.

भरपल्ला पु० माणूस, जनावर, इ० चा पूर्णवेग किं० परमावधीच्या वेगाची चाल.

भरपाई (-यी) [हिं०] **स्त्री०** १ पूर्ण भरणा. २ पावती; पोंच. ३ हुंडी इ०चा पैसा घेऊन त्याच हुंडी इ०वर 'भरून पावलों' असा लिहितात तो लेख. ४ माझ्या नशीबीं जितका ताप सोसावयाचा म्हणून लिहिला होता तितक्या तापाचें भरपूर परिमाण किं० माप (होणें, लिहून देणें). वैतागानें भरपाई झाली,' किं०'भरपायीं लिहून देतों 'असा उद्गार काढला जातो.

भरपावलीं क्रि० वि० शक्य तितक्या वेगानें किं० जलदीनें पावलें टाकून (चालणें, धावणें, इ०).

भरपूड न० फुटलेला फोड उघडा राहिल्यामुळें त्याच्यावर उत्पन्न होते ती पातळ त्वचा किं० उत्पन्न होतो तो पापुदरा.

भरपूर [म० भरणें+पुरणें] **वि०** १ पूर्णपणें भरलेला. २ खणखणीत(आवाज).३पुष्कळ; हावा तितका; मुबलक. **क्रि० वि०** १ पूर्णपणें. २

तृप्ति होण्याइतक्या परिमाणांत. ३ कांहीं बाकी किं० कसर न ठेवितां.

भरपोट [म० भर+पोट] **क्रि० वि०** १ पोट पूर्ण भरलेलें असतां. २ पोट पूर्ण भरेल इतक्या प्रमाणांत.

भरबादली [म० भर+बादली (जर)] भरपूर जर वाळून विणलेला किं० केलेला.

भरभक्कम [म० भर+भक्कम] **वि०** विपुल; पूर्ण; परमावधीचें. [आवाज करून.

भरभर क्रि० वि० १ वेगानें. २भरभर असा

भरभरणें अ० क्रि० १ (नशीब) अनुकूल होणें किं० असणें. २ (संपत्ति, वैभव) वाढूं किं० चढूं लागणें. **भावकर्तरि प्रयोग**; उ० त्याचें आलीकडे फार भरभरलें आहे (म्ह० तो वैभवास चढत आहे).

भरभरीत वि० भरड (पीठ); खरखरीत (वस्त्र, सूत, अंग). [संशय; शंका.

भरम [सं० भ्रम] **पु०** १ चुकीचा ग्रह. २

भरमजल [म० भर+मजल] **स्त्री०** त्या त्या माणसाच्या किं० जनावराच्या किं० वहानाच्या परमावधीच्या शक्य वेगानें आक्रमिलेलें अंतर; उ० बैलगाडीची दररोज दहा कोशांची भरमजल असते. **क्रि० वि०**परमावधीच्या वेगानें.

भरमजलस, भरमजालस [म० भर+अ० मजल्स् (सभा)] **स्त्री०** भरकचेरी; जींत सर्व शिष्ट हजर आहेत अशी कचेरी, दरबार, दिवाण, इ०.

भरमजला [म० भर (उंच)+मजला (माडी)] **पु०** तळमजल्याइतका उंच असलेला वरचा मजला किं० अशा मजल्याचें घर.

भरमभोपळा, भरमाचा भोपळा, इ० पुढें ' भ्रम ' मध्यें ' भ्रमाचा भोपळा ' पहा.

भररट्टा क्रि० वि० पूर्ण, भरपूर (कोस, मजल, पल्ला,काम,इ०). मागें ' भरचक्का ' पहा.

भररस्ता वि० वाहता रस्ता; रहदारीचा मार्ग.

भररास स्त्री० १ शेताचें एकंदर उत्पन्न(बलुतेदार इ०ना त्यांचे त्यांचे हिस्से द्यावयाच्या पूर्वींचें). २ कोणत्याही पदार्थाची रास.

भरल पु० माडाचा बुंधा पोखरून केलेलें बारदान.

भरला पु० नारळ इ० झाडांचा बुंधा पोखरून केलेलें मीठ इ०साठीं बारदान.

भरला [म० भरणें] **वि०** भरलेला; व्यापलेला. ꙮ **भरला भरळा वि०** १ संपत्ति, मुलेंबाळें,मित्र,किं० लौकिक यांनीं संपन्न किं० समृद्ध असा (मनुष्य). २ सुखी आणि श्रीमंत रयत ज्यांत आहे असा (देश).**भरला भारला वि०** १ पतीचा, आबरूदार, लौकिकवान् (व्यापारी, सावकार, गृहस्थ,इ०).२किफायतशीर किं०भरभराटीचा (व्यापार, धंदा). **भरलें घर न०** ज्यांत मुलें बाळें, नोकर, आश्रित, इ० पुष्कळ आहेत, ज्यांत अडचण, दुःख, इ० फारसें नाहीं असें घर. **भरले पायांचा,भरल्या पायांचा वि०** परगांवाहून किं० बाजारांतून आल्यावर पाय न धुतलेला (मनुष्य);उ० तूं भरल्या पायांचा बाळंतिणीच्या खोलींत जाऊं नको. **भरल्या पायांचा वि०**ज्याचे पाय धूळ,चिखल,इ०नीं मळलेले आहेत असा.**भरल्या पायीं क्रि०वि०**पाय न धुतां.**टीप,**– ' पायीं भरलें ' असाही वाक्प्रचार ह्याच अर्थी आहे. **भरल्या पोटीं क्रि० वि०** जेवणानंतर पोट भरलेलें असतां.**भरल्या गाड्यास सूप जड नाहीं** मोठ्या कामांत एकादें बारीक काम सहज करून टाकतां येतें किं०उरकून घेतां येतें.**भरल्या नांदांत क्रि० वि०** नांदत्या घरांत. **भरली मूठ सव्वा लक्षाची** प्रकट न झालेली स्थिति वैभवाची असते.**भरलावणें न०** आगरामध्यें माड, पोफळी, इ० झाडें लावावयाच्या पूर्ण मर्यादेइतकी झाडें लावणें.

भरवण [म० भरणें] **न०**१ समयींत जळावयासाठीं एकदा घातलेलें तेल. २ कढईत भजीं, इ० तळण्यासाठीं एकदा घातलेलें तेल. ३ एका ज्योतिवर एका खेपेस धरलेलें काजळ. ४ अंगांत आलेल्या माणसावरून ओवाळून टाकतात तें कोंबडें, भात, इ०. ५ मोदक, भजीं, इ०चा एक घाणा.

भरवणी [म० भरवणें] **स्त्री०** १भरविण्याची क्रिया. २ मुलाला प्रथम अन्न खाऊं घालण्याचा विधि किं० संस्कार. ३ मूल,आजारी माणूस, इ० ना जेवूं घालण्याची क्रिया.

भरवयाचा वि० पूर्णपणें वयांत आलेला (माणूस, जनावर).

भरंवसा [हिं०] **पु०** खात्री; विश्वास; निश्चितपणा. ֍ **भरंवशाचें कूळ न०** खात्रीचा मनुष्य. **भरंवशाच्या म्हशीस टोणगा** ज्याच्यावर आपला भरंवसा त्याच्याचकडून फसगत होणें. **भरंवशाचा वि०** विश्वासास पात्र. **भरंवशाची मोट स्त्री०** ज्यावर आपण भरंवसा ठेविला तो माणूस किं० पदार्थ.

भरवसूल पु० गांव, प्रांत, इ०चा पूर्ण वसूल.

भरवांगें न० ए० व०, भरवांगीं न० अ० व० डेखाकडे सलग ठेवून केलेल्या वांग्याच्या फोडींत मसाला भरून करतात तें तोंडीलावणें.

भरविणें [म० ' भरणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (आजारी माणूस, मूल, इ०ना,) एक एक घास खावयास त्यांच्या तोंडांत घालणें. २ आजारी माणूस, मूल, इ०च्या तोंडांत (एक एक घास) खावयासाठीं घालणें. ३ कोणेकाचा (कांहीं ग्रह) करून देणें; उ० हें वेड तुझ्या डोक्यांत कोणीं भरविलें असेल तें असो. ४ मूर्ख विद्यार्थ्याला (थोडा थोडा ग्रंथभाग) पढविणें.

भरशाई [म० भर+शाई] **स्त्री०** पखवाज भरपूर वाजावा म्हणून त्याच्या कातड्यावर करतात तो शाईचा जाड थर. पातळ थरास ' पाणशाई ' म्हणतात.

भरहाक स्त्री० मोठ्या आवाजानें मारलेली हाक ऐकूं जाईल इतकें अंतर. **क्रि० वि०** अशा अंतरावर.

भरळ पु० मागें ' भरल ' पहा.

भरा पु० धान्याचें एक माप; एकशें साठ पायल्यांचें परिमाण.

भराई [म० भरणें] **स्त्री०** भरण्याबद्दलची [मजूरी.

भराका पु० १ झपाटा. २ फडफडाट. ३ एक दम किं० एक नेट; उ० घोड्यावर मी बसलों आणि भराक्यासरसाच पुण्यास दाखल झालों. ४ पिशाच इ० चा हल्ला. ५ राग, मत्सर, इ० ची उसळी. ६ धोंडे, इ०चा वर्षाव. ७ अपानवायु.

भराटणें [म० भराटा] **स० क्रि०** वेगानें, त्वरेनें, किं० झपाट्यानें, करणें, उरकणें, संपविणें, इ०.

भराटा पु० १ झपाटा. २ वैपुल्य; समृद्धि (पीक, धान्य, आंबे, इ० ची). ३ वैभवाचा कळस. **वि०** विपुल (पीक, पाऊस).

भराड न० डौर वाजवून नाचत नाचत भराड्यानें केलेलें भजन किं० कीर्तन.

भराडी, भराडा पु० डौर वाजवून कीर्तन करणारा गोसावी.

भरापुरा वि० १ समृद्ध; पूर्ण भरलेला (गांव, विहीर, तळें, मळा). २ विद्वान्, पंडित.

भराभर [म० भरणें] **स्त्री०** अनेक बारदानांत भिन्न भिन्न पदार्थ भरण्याची क्रिया.

भराभर, भरांभर क्रि० वि० वेगानें; जल्दीनें.

भरारणें अ० क्रि० १ (दैव, व्यापार, धंदा, इ०) उत्कर्ष पावणें. २ झपाट्यानें वाढणें. ३ (पक्ष्यानें) भर्रदिशीं उडून जाणें. ४ (गवत इ०) जोरानें पेटणें. ५ (वारा) सोसाट्यानें वाहूं लागणें. ६ एकाद्या गोष्टीविषयीं हुरळणें.

भरारी स्त्री० जोराचें किं० जल्दीचें उड्डाण (मारणें).

भराव [म० भरणें] **पु०** खड्डा भरून काढण्यासाठीं घातलेली माती, दगड, इ०.

भरावण, भरावळ [म० भरणें] **स्त्री०** जमीन भाजण्यासाठीं पसरलेल्या काटक्याकुटक्या, गवत, इ० समुच्चयानें.

भरावणें पुढें ' भारावणें ' पहा.

भरित [सं०] **वि०** भरलेला; उ० रसभरित (भाषण).

भरिभार पु० कोणेकावर ठेविलेला पूर्ण भरंवसा (ठेवणें).

भरीचा [म० भर] **वि०** विवक्षित माप किं० परिमाण भरण्यासाठीं त्यांत घातलेला (कांहीं पदार्थ).

भरीत [म० भरणें] **न०** १ बारदान, गलबत, इ० भरण्याइतकें सामान इ०. २ ओझें. ३ वांगीं भाजून तीं ठेचून त्यांत दहीं, तिखट, मीठ, इ० घालून करतात तें तोंडीलावणें. ४ (**लाक्षणिक**) पदार्थ ठेचून किं० कुसकरून किं० हाताळून त्याची केलेली नासाडी.

भरींव [म० भरणें] **वि०** १ भरलेला. २ पोकळ नव्हे असा (विद्या, विद्वान, ज्ञान, बांबू).

भरेकरी [म० भरणें+करणें] **पु०** पेठांपेठांनें कापड इ० माल मोठ्या प्रमाणांत विकत

घेऊन तो गांवच्या दुकानदारांस विकत देणारा.

भरोभर मागें ' भरउभर ' पहा.

भरोभरीं, भरोभरीनें क्रि० वि० मापानें सारख्या परिमाणांत (देणें, घेणें, उतरणें); उ० पायलीभर जोंधळे घेतले आणि त्यांच्या भरोभरीनें बाजरी दिली (म्ह० पायलीभर बाजरी दिली). **भरोभरीनें क्रि० वि०** दुसऱ्या खेपेस (धान्यादि) मापून तपासण्याच्या मापानें.

भरोभरी [**म०** भरणें] **स्त्री०** भरती; पूर्णता.

भरोसा पु० मागें ' भरंवसा ' पहा.

भर्जन [**सं०**] **न०** १ भाजणें. २ जाळणें. ३ पदार्थ भाजण्याचें तवा, कढई, इ० भांडें.

भर्जित [**सं०**] **वि०** १ भाजलेलें. २ जाळलेलें.

भर्ता [**सं०** भर्तृ] **पु०** १ पति; नवरा. **टीप,**– ह्या अर्थीं ' भर्तार, ' ' भ्रतार ' अशीं रूपेंही मराठींत रूढ आहेत. २ धनी; मालक; यजमान. ३ नायक; पुढारी. ४ पालन पोषण करणारा. ꣸ **भर्तृदारक पु०** राजपुत्र. **भर्तृदारिका स्त्री०** राजकन्या.

[३ धिक्कार.

भर्त्सन [**सं०**] **न०** १ धमकी. २ निंदा.

भऱ्याचा [**म०** भरणें] **वि०** विशिष्ट मापाचा किं० मुदतीचा; उ० महिना (–ऱ्या–) भराचा माझा पगार तुमच्याकडे आहे (म्ह० महिन्याचा); उ० मी दिवसभऱ्याचा उपोषित आहे (म्ह० सबंध दिवसांत मी कांहीं खालेलें नाहीं); उ० रुपायाभऱ्याचें लोणी आम्हाला आठवडाभर पुरतें.

भऱ्याभरीं क्रि० वि० मागें 'भरोभरीं ' पहा.

भल [**सं०** भल्ल] **न०** बाण, भाला, इ० चें टोक किं० अग्र.

भल [**म०** भला] **वि०** उत्कृष्ट; भरपूर; उमदा; उ० भलघोडा; उ० भलजेवण. **क्रि० वि०** अट्टल, पक्का; उ० भलभामटा, भलसोदा.

भलमाणसाई [**म०** भला+माणूस+आई (प्रत्यय)] **स्त्री०** सभ्यपणा; माणुसकी; शिष्टपणा.

भलतसला, भलतसा [**म०** भलता+असला, असा] **वि०** १ भलत्या प्रकारचा. २ वाटेल तसला, हावा तसला.

भलता वि० १ कोणीही; कांहींही; कोणताही. २ तिऱ्हाईत. ३ विशिष्ट समयीं किं० स्थळीं ज्याचा संबंध नाहीं असा (पदार्थ, मनुष्य). ४ चुकीचा. ५ अविवक्षित; नको तो. **टीप,**–भलतेव्हां, भलतिकडे, भलकोठें, इ० रूपें अशिक्षितांत रूढ आहेत. त्यांचे अर्थ भलत्या वेळीं, ठिकाणीं, प्रकारें, असे होतात. ꣸ **भलतासलता वि०** १ दुसरा कोणी. २ नको तो किं० अयोग्य (माणूस, पदार्थ, इ०). **भलभलता वि०** अगदीं अयोग्य किं० चुकीचा.

भला वि० १ चांगला; बरा. २ प्रामाणिक; पतीचा; विश्वासाला पात्र. **क्रि० वि०** (लिंगवचनाप्रमाणें फिरणारें) पूर्णपणें; पक्केपणीं; पुष्कळ प्रमाणांत; उ० मी त्याला भलें चोपलें; उ० आज भला पाऊस पडला. ꣸ **भले लोक उ० अ० व०** राजे, सरदार, इ० चे पाशीं असतात जे मानकरी, शिपाई, इ० ते. **भलाइकी, भलाई, भलायकी स्त्री०** १ चांगलेपणा; थोरपणा; सभ्यपणा. २ चांगला लौकिक; आबरू; पत. **भला बुरा वि०** चांगला वाईट; जसा असेल तसा. **भलाइ बुराई स्त्री०** चांगलेपणा किं० वाईटपणा. **भले भले बाप उ० वा० अ०** ठीक ! शाबास ! उत्तम. ! **भलीभलाई स्त्री०** १ परोपकार, देशहित, इ० केल्यामुळें जो लौकिक होतो तो किं० प्रतिष्ठा मिळते ती. २ कुशल वर्तमान; खुशाली; उ० पूर्णगडच्या फडक्यांची भलीभलाई सांगा पाहूं. **भलीभलाय स्त्री०** कुशल वर्तमान; खुशाली. **भलेरी स्त्री०** १ कांहीं कष्टाचें काम करतांना कामकरी लोक एकमेकांना उत्तेजन देण्यासाठीं ' भले रे दादा ' हे किं० ह्या अर्थाचे इतर जे शब्द उच्चारतात ते. २ कष्टाच्या कामांत लावलेला नेट किं० जोर. ३ अवास्तव स्तुति किं० प्रशंसा. **भलोबा पु०** चांगला माणूस (प्रेमाचा शब्द).

भलांडें न० गोंधळी, गोसावी, इ० लोक ज्या खापरांत निखारे घेऊन गाणीं गात गात नाचतात तें खापर.

भलावण [**म०** भला; **गुजराथी** भलामण] **स्त्री०** १ शिफारशीचें पत्र किं० चिट्टी. २ कोणेक कार्याची कोणेकावर असते ती मदार किं० भिस्त

३ कोणेकाला कोणेकाचा असतो तो आश्रय, टेका, किं० पाठिंबा.

भल्ल [**सं०**] **पु०** १ एक प्रकारचा बाण. २ बाणाचें पातें. ३ आस्वल. ४ बिब्बा. भल्लातक **पु०**, भल्ली **स्त्री०**, हेही शब्द बिब्बा ह्या अर्थाचे आहेत.

भल्ला वि० भला. **क्रि० वि०** खूप; जोरानें; मागें ' भला ' पहा.

भल्लातक [**सं०**] **पु०** बिब्बा किं० बिब्ब्याचें झाड.

भल्लुक, भल्लूक [**सं०**] **पु०** आस्वल.

भव [**सं०**] **वि०** ० पासून उत्पन्न झालेला किं० होणारा; उ० प्रेमभव, मायाभव, इ०. **पु०** १ अस्तित्व. २ उत्पत्ति; जन्म. ३ संसार; जन्म-मरणरूप जी सरणी ती; उ० भवताप, भवचक्र, इ०. ४ कल्याण; उत्कर्ष. ꕥ **भवचक्र न०** जन्म-मरणरूप राहाटगाडगें. **मनोभव पु०** मदन; मन्मथ.

भवई पु० तमाशा, नाच, इ० करून उप-जीविका करणारी गुजराथी लोकांची एक जात किं०त्या जातीचा कोणी इसम.

भवई,भंवई,भिवई,भिंवई,भोवई,भोंवई [**सं०** भ्रू;**हिं०**भवई] **स्त्री०** कपाळाच्या अधोभागीं डोळ्यांच्या वर असतात ज्या दोन केशपंक्ति त्या प्रत्येक. ꕥ **भिवया चढविणें, भिवयांस गांठी देणें** रागाची किं० असंतुष्टपणाची मुद्रा धारण करणें. **भिवयांस गांठी आणि तोंडास मिठी** रागाची मुद्रा धारण करून हिरवटपणानें घुम्या-सारखें बसणें.

भंवंड, भंवंडी, भोंवड[**सं०** भ्रमण] **स्त्री०** पित्तादि विकृतीमुळें येते ती घेरी.ꕥ **कोणेकाची भोंवळ जिरणें** सरकार, समाज, इ० कडून शिक्षा झाल्यामुळें त्याचा अभिमान, ताठा,उन्म-त्तपणा, इ० नाहींसा होणें.

भंवडणें, भंवणें पुढें ' भोंवंडणें,' ' भोंवणें ' [पहा.

भंवता, भंवतालीं इ० पुढें ' भोंवतीं,' " भोंवतालीं, ' इ० पहा.

भवति, भवती [**सं०** भवति=आहे, शक्य आहे] **स्त्री०** १ आहे. २ शक्य आहे. ३ असतें. °प,–हे अर्थ मराठींत नाहींत. ꕥ **भवति न भवति स्त्री०** वाटाघाट; वादविवाद; चर्चा.

भवति [**सं०** भवति=हे बाई !] **स्त्री०** हे बाई ! ꕥ **भवति भिक्षां देहि** हे बाई, मला भिक्षा घाल. २ भीक; भिक्षा (करणें); उ० ह्या वयांत विद्या केली नाहींस तर पुढें भवति भिक्षां देहि तुला करावी लागेल. [सभोंवार.

भंवतीं, भंवतें क्रि० वि०, श० यो० अ०

भवन [**सं०**] **न०** १ घर. २ राहाण्याचें घर. ३ असणें; राहणें. ४ होणें.

भवलें न० मागें ' बहुलें ' पहा.

भवानी [**सं०**] **स्त्री०** १ शंकराची पत्नी पार्वती. २ मागें ' बोहनी ' पहा. ꕥ **भवानी कवडी स्त्री०** एक प्रकारची कवडी. कवडीच्या इतर जाति 'दही कवडी,' आणि'सगुणी कवडी.'

भवितव्य [**सं०**] **न०** भविष्य; पुढें होणारें ꕥ **भवितव्यता स्त्री०** नशीब; दैव.

भविष्य [**सं०**] **वि०** पुढें होणारें किं० घडणारें. **न०** १ पुढे होणारी गोष्ट.२ भाकित.ꕥ **भविष्य काळ पु०(व्याकरणांत)**पुढें व्हावयाच्या गोष्टींचा काळ; उ० जाईल, करीन, बोलाल, इ०. **भविष्यवादी, भविष्यद्वक्ता पु०** भाकितें सांग-णारा. **भविष्यसूचक वि०**पुढें अमुक गोष्ट होईल असें सुचविणारी गोष्ट (डोळा लवणें,बाहु स्फुरणें, इ० रूप).**भविष्योत्तर वि०**एक पुराण.**न०(मरा-ठींत)** पुढें होणाऱ्या गोष्टींचें पूर्व कथन; भाकीत. **भविष्या वि०** कांहीं काम आज करतों, उद्या करीन, असें म्हणून काम लांबणीवर ढकलणारा किं० मुळींच न करणारा.

भव्य [**सं०**] **वि०** १ असणारा; होणारा.२ व्हावयाला शक्य. ३ संभाव्य. ४ मोठें आणि सुंदर. ५ अतिशय मोठें. **न०** १ अस्तित्व. २ भविष्यकाळ. ३ परिणाम. ४ कल्याण.

भसकचाटू, भसक्या वि० दांडगेश्वर; आड-दांड; नाजुकपणानें ज्याला कांहीं काम करतां येत नाहीं असा (मनुष्य).

भसकटणें अ० क्रि० १ भलतीकडें जाणें. २ गहाळ होणें; हरवणें.

भसकणें स० क्रि०खुपसणें,जोरानें भोसकणें.

भसका पु० १ भगदाड; खिंडार (भिंत,

जर्मीन, इ० तलि). २ कागद, वस्त्र, इ०मध्यें पडलेलें भोक. ३ दांडगेपणानें कांहीं पदार्थ खुपसल्यानें पडलेलें भोक.

भसकापुरी स्त्री० १ जाडी तपकीर. २ तांबड्या मिरच्यांचें तिखट. ३ जाडें भरडें पीठ, धान्य, वस्त्र, इ०.

भसकाविणें सं० क्रि० खुपसणें.

भसक्या वर ' भसकचाट्ट ' पहा.

भसभशीत वि० १ कोरडें; शुष्क. २ जाडें; भरभरीत. ३ ढिसूळ.

भसभोंगळ वि० १ सईल, ढिलें (गांठोडें, नेसलेलें धोतर, लुगडें, इ०). २ अव्यवस्थित (कारभार).

भसरा पु० १ प्राणायामाचा एक प्रकार. २ जोराचा रेच. ह्या अर्थी ' भसरें ' **न०** सुद्धां.

भसरें न० १ संग्रहिणी इ० विकृतीमुळें मुलें इ०ना अपक्व मल पडतो तो. २ गळसूत्रांत फोड येणें, तोंडाच्या आंतील त्वचा कुजणें, इ० रूप विकृति उष्णतेमुळें होते ती.

भसाडा वि० जाडी, खूप मोठें (अक्षर, दागिना, लेखणी, सूत, इ०). [बेढब.

भसाळ वि० ऐवट आणि मोठा; फार स्थूळ;

भस्त्रका, भस्त्रा, भस्त्री [सं०] स्त्री० १ लोहार, सोनार, इ०चा वारा फुंकण्याचा भाता. २ कातड्याची पिशवी.

भस्म [**सं०** भस्मन्] **न०** १ राख; विभूति. २ चूर्ण. ३ तांबें, लोह, इ० धातूंवर वैद्य लोक कांहीं संस्कार करून त्यांना देतात तें रूप; उ० ताम्रभस्म इ०. ꙮ **भस्मसात् करणें** (किं० **होणें**). १ पदार्थाची राखरांगोळी करणें (किं० होणें). २ जाळणें (किं० जळणें). **भस्मकोथळा पु०** १ मिळेल तसलें अन्न खाणाऱ्या खादाडाचें लठ्ठ झालेलें पोट. २ हावें तें गपागप आणि पुष्कळ खाणारा अधाशी माणूस. **भस्मरंग, भस्मवर्णी, भस्मरंगी वि०** राखेच्या रंगाचें (वस्त्र इ०). **भस्मरोग पु०** कितीही खाल्लें तरी भूक ज्यांत शमत नाहीं असा रोग. **भस्मस्नान न०** पाण्याच्या दुर्मिळतेमुळें किं० ज्वरादि कारणांमुळें स्नान करणें अशक्य असल्यास शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अंगाला भस्मलेपन करणें. **भस्मासुर पु०** १ एक दैत्य. २(**लाक्षणिक**) अचाट खाणारा किं० अचरटपणाचीं कृत्यें करणारा माणूस. **भस्मी वि०** १ राखेच्या वर्णाचा. २ सोन्याच्या वर्खाची वेलबुट्टी ज्यावर केली आहे असें (पागोटें, लुगडें, इ०). **भस्म्या वि०** ज्याला कितीही पौष्टिक खाद्यें खाऊं घातलीं तरी लठ्ठ होत नाहीं असा (मनुष्य).

भस्त्रा [**स०** भस्त्र] **पु०** १ प्राणायामाचा एक प्रकार. २ लोहार, सोनार, इ०चा भाता. **भस्त्री स्त्री०** लहान भाता.

भळ स्त्री० भेग, चीर, फट.

भळंद, भळंदें न० ज्यांत पेटलेले निखारे घातले आहेत असें खापर. असलें खापर गोसावी, गोंधळी, इ० लोक हातांत घेऊन नाचतात. ह्या विधीला ' भदें घेणें ' किं० ' भळंद्याचा गोंधळ घालणें किं० करणें ' म्हणतात. ꙮ **भदें घेणें** असें खापर घेऊन नाचणें. **टीप**,–शेत इ०च्या मर्यादेसंबंधानें वाद असल्यास असलें खापर घेऊन पूर्वी दिव्य केलें जात असे. मागें ' भदें ' पहा.

भळभळ (– ळां) क्रि० वि० जोरानें आणि विपुलपणें (जखमेंतून रक्त, डोळ्यांतून अश्रु, भांड्यांतून पाणी, तेल, इ० गळणें, वाहणें, इ०).

भळभळणें अ० क्रि० १ जोरानें वाहणें, गळणें, इ०. २ (दैव) अनुकूल होणें. **टीप**,–ह्या अर्थी भावकर्तरि प्रयोगही होतो; उ० स्वारीचें दैव भळभळलें ! किं० स्वारीचें भळभळलें !

भळभळीत वि० १ पूर्ण किं० भरपूर (प्रकाश, उजेड). २ ठसठशीत रंगाचा (वस्त्रादींचा कांठ).

भळाळणें अ० क्रि० वर ' भळभळणें ' पहा.

भळू वि० १ अजागळ; मूर्ख. २ कमकुवत; पराक्रमशून्य. ३ भितरा. ४ षंढ.

भक्ष [**सं०**] **पु०** १ खाणें; खाण्याची क्रिया. २ अन्न; खाद्य. ३ पथ्याचें अन्न. ꙮ **भक्षस्थानीं पडणें** खाऊन, हिरावून, लूटून, किं० लुबाडून घेतलें जाणें. याचा लाक्षणिक प्रयोगही होतो; उ० किब्यांचा वाडा अग्निनारायणाच्या भक्षस्थानीं पडला (म्ह० जळून गेला).

भक्षक [**सं०**] **वि०** १ खाणारा; उ० मांसभक्षक, तृणभक्षक. २ खादाड; अधाशी.

भक्षण [**सं०**] **न०** १ खाणें. २ खाद्य; खावयाजोगा किं० खावयाचा पदार्थ.

भक्षणें, भाक्षिणें [**सं०** भक्ष्] **स० क्रि०** खाणें; खाऊन टाकणें.

भक्षित [**सं०**] **वि०** खाल्लेलें; खाऊन [टाकलेलें.

भक्ष्य [**सं०**] **न०** १ अन्न. २ तळलेला पदार्थ. **वि०** १ खाण्याजोगा. २ खाण्यास योग्य. ꠰ **भक्ष्यभोज्य न०** खावयास किं० प्यावयास योग्य अशा पदार्थांचा समुच्चय.

भाई [**हिं०** भाई; **सं०** भ्रातृ] **पु०**१ भाऊ. २ (जात, उद्योग, स्वभाव, धंदा, इ० चें वैशिष्ट्य सांगतांना) कोणीही माणूस; उ० ब्राह्मणभाई, सोनारभाई, लफंगेभाई, कारकूनभाई. ꠰ **भाई-चारा, भाईपणा पु०, भाईदारी, भाईबंदकी, भाईब्रंदी स्त्री०** सलोख्याचा किं० मित्रत्वाचा संबंध. **भाईपणा पु०, भाईबंदी, भाईबंदकी स्त्री०** भावाचें किं० भाऊपणाचें नातें. **भाईराज, भाईराय पु०** भाऊ (गौरवानें). **भाईबंद पु० अ० व०** १ नातलग. २ एका संस्थेंतील किं० व्यवसायांतील माणसें. **भाईबंदीनें क्रि० वि०** मित्रत्वाच्या किं० सलोख्याच्या नात्यानें; साध्या वृत्तीनें (सांगणें, विचारणें, इ०).

भाईभाई क्रि० वि० भयां भयां (हिंडणें).

भाऊ [**सं०** भ्रातृ] **पु०** १ त्याच माता-पितरांचा पुत्र. २ (गौरवानें) कोणीही माणूस. ३ एकाच धंद्यांतील, व्यवसायांतील, किं० संस्थें-तील माणसें परस्परांचे. ४ बहुमानाचा शब्द; उ० हरिभाऊ, रामभाऊ, इ०. ५ पतीचा भाऊ; दीर. ह्या अर्थी ' भाऊजी, ' 'भावोजी' सुद्धां. ꠰ **आतेभाऊ पु०** आतेचा मुलगा. **मामेभाऊ पु०** मामाचा मुलगा. **चुलत भाऊ पु०** चुलत्याचा मुलगा. ह्या अर्थी ' काकभाऊ ' सुद्धां. **साडू भाऊ पु०** साडू; दोन बहिणींचे पति परस्परांचे. **मामेभाऊ पु०** मामाचा मुलगा. **भाऊगर्दी स्त्री०** माणसांची अतोनात दाटी किं० खेचाखेच. **टीप**,–सदाशिव भाऊ पेशवे पानपतच्या युद्धाला गेले असतां समरभूमीवर झाली होती तशी गर्दी. **भाऊपणा पु०** बंधुत्व. **भाऊबंधकी स्त्री०**दाया-संबंधींचा तंटा, मारामारी, इ०. **भाऊबंद पु०** १ कोणीही दायाद. २ कोणीही दूरचा नातलग (बापाच्या बाजूकडून). **भाऊबीज स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वितीया,–ज्या दिवशीं भाऊ आपल्या बहिणीस वस्त्रालंकारादि पारितोषिक देतो. **भाऊ-वळ स्त्री०** भाऊबंदाच्या क्रमानें आपणास हक्क, वतन, पुजारीपणा, इ० चा मिळतो तो वाटा. **भाओ, भाओजी** वर ' भाऊ ' अर्थ ५ पहा.

भाक [**सं०** भाषा] **स्त्री०** १ भाषण. २ उक्ति. ३ कांहीं कामासाठीं दिलेलें वचन किं० भोगिलेली प्रतिज्ञा. ४ आपल्या प्रश्नास देवानें दिलेलें उत्तर. ५ केलेल्या नवसाची फेड आपल्या हातून होईतोंपर्यंत आपण देवापाशीं अनामत ठेविलेला पदार्थ. ꠰ **भाकेस उतरणें** प्रतिज्ञेप्रमाणें कोणेकाच्या हातून कृति घडणें. **भाक सत्य करणें** प्रतिज्ञेप्रमाणें कृति करणें. **भाकेस गुंतलेलें असणें** वचनानें गुंतलेलें असणें.

भाकड वि० १ दूध देईनाशी झालेली (गाय, म्हैस, इ०). २ वयोमानाप्रमाणें म्हणजे म्हातार-पणामुळें जिचें दूध आटलें अशी (गाय, म्हैस, इ०) किं० अशा गायीम्हशींचा (स्तन). ३ ज्या दिवशीं कांहीं धार्मिक इ० विधि नाहीं असा (दिवस). ४ पीक देण्याजोगी नाहीं अशी (जमीन). ५ ज्यांत कांहीं लाभ नाहीं असा (दिवस, धंदा, इ०). ६ सत्त्वहीन (अन्न इ०). ꠰ **भाकडकथा स्त्री०** निरुपयोगी भाषण; लांब-लचक, नीरस, कंटाळवाणी (हकीगत, गोष्ट, इ०).

भाकणूक [**म०** भाक+णूक (प्रत्यय)] **स्त्री०** देवाकडून आपल्या प्रश्नास मिळालेलें उत्तर.

भाकणें [**सं०** भाष्] **स० क्रि०** १ (भवि-ष्याचें कथन) करणें. २ आपण नवस फेडूं अशा खात्रीसाठीं देवाजवळ (कांहीं वस्तु) ठेवणें. ꠰ **कोणेकाची करुणा भाकणें** त्याला दीनपणानें प्रार्थिणें किं० साहाय्यार्थ बोलावणें. **भाकबाहण स्त्री०** १ देवाला दिलेलें वचन; देवापुढें स्वताला लावून घेतलेली नियंत्रणा. २ आपण नवस फेडी-पर्यंत देवाजवळ अनामत ठेविलेला पदार्थ.

भाकर, भाकरी स्त्री० जोंधळा, बाजरी, इ० धान्याच्या पिठाचा चपटा आणि वाटोळा भाजून

केलेला खाद्य पदार्थ. **टीप**,–' भाकरी ' ह्या शब्दाचें **ए० व०** ' भाकरी ' पासून होतें आणि ' भाकरी ' हें **अ० व०** ' भाकर ' पासून होतें म्हणून एक भाकरी, दोन भाकरी, असे शब्द रूढ आहेत. ' भाकर, ' ' भाकऱ्या, ' हे शब्द हलक्या लोकांच्या भाषणांत येतात. ॐ **भाकरतुकडा पु०** १ भाकरी. २ जेवण; अन्न. **भाकरखाऊ वि०** प्राय: भाकरी खाणारा, म्ह० शेतकरी, कुणबी, इ०. याच्या व्यावर्तकत्वें ' भातखाऊ ' म्हणजे पांढरपेशा. **भाकरवड्या पु०** १ दुसऱ्याच्या घरीं भाकऱ्या भाजून देऊन चरितार्थ चालविणारा. २ दुसऱ्याच्या घरीं स्वयंपाकाचें काम करणारा. **टीप**,–दोन्ही अर्थी निंदेंत प्रयोग. **भाकरमोड्या वि०** कांहीं काम न करतां निरुद्योगीपणानें केवळ जेवून काळ काढणारा; कुटुंबांतील निरुद्योगी माणूस,–उद्योगधंदा करण्याच्या वयाचा असून जो कांहीं करीत नाहीं असा. **भाकरीचा खेळ, पाणभाकऱ्यांचा खेळ पु०** पाण्याच्या पृष्ठभागाला तीन चार वेळां स्पर्श करून पुढें जाईल अशा प्रकारें खापऱ्या किं० चपटे दगड पाण्यावर खुबीनें फेकण्याचा मुलांचा खेळ. **भाकरीचा पिंड पु०** प्राय: भाकरी हें अन्न खाऊन वाढलेला मनुष्य,–जो बहुधा बळकट असतो. ह्याच्या व्यावर्तकत्वें 'भाताचा पिंड.' **भाकऱ्या निवडुंग पु०** फताड्या निवडुंग.

भाकस पु० खाऱ्या पाण्यांतील एक लहान काळा मासा.

भाकित, भाकीत [**म०** भाकणें] **न०** केलेलें भविष्यकथन.

भाख स्त्री० वर ' भाक ' पहा.

भाग [**सं०**] **पु०** १ अंश; तुकडा. २ कोणेकाच्या वाट्यास आलेला पदार्थ; वाटा; वाटणी; हिस्सा. ३ चवथा हिस्सा. ४ दैव; भाग्य. ५ (**गणित**) अपूर्णांकाचा रेषेच्या वरचा आंकडा. खालच्या आंकड्याला ' छेद ' म्हणतात. ६ (**ज्योतिष**) कालमानविशेष; राशीचा एक तीसांश; वर्तुळाचा तीनशेसाठांश. ७ ठरलेली जागा. ८ कोणेकाचें ठरलेलें काम किं० कर्तव्य; त्याच्याकडे सोपविलेलें काम. ९ भाषणाचा मुद्दा; बोलण्याचें धोरण. १० जरूर असें जें कर्तव्य तें; जें करणें प्राप्त आहे किं० केलें पाहिजे तें; उ० तूं शिव्या दिल्यास म्हणून तुझ्या थोबाडांत मारणें भाग आहे. ११ भागाकाराचें फळ. १२ विभागणी किं० विभागणीनें कोणेकाच्या वाट्यास जें येतें तें. १३ (**गणित**) भागाकार करतांना भाजकाची अमुक पट भाज्यांतून किं० बाकींतून अमुक वेळां जाईल म्हणून ठरविलेला आंकडा. 'भाग लागणें' असा प्रयोग होतो. ॐ **प्रभाग पु०** भागाचा भाग. **भागानुबंध पु०** अपूर्णांक मिळविलेली पूर्णांक संख्या; पूर्णांक आणि अपूर्णांक हे दोन्ही जींत आहेत अशी संख्या; उ० $2\frac{3}{4}$. **भागजाति अपूर्णांक पु०** ज्या पूर्णांकाचा एक (परिमाण) पूर्णांक असतो तो; उ० $\frac{3}{5}$, $\frac{3}{8}$, $\frac{7}{4}$ इ०. **प्रभागजाति अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा एक अपूर्णांक (म्ह० भाग) असतो त्याला प्रभाग जाति (म्ह० भागाचे भाग ह्या जातीचा) अपूर्णांक म्हणतात म्हणजे अपूर्णांकाचा अपूर्णांक म्हणतात; उ० $\frac{3}{5}$ चे $\frac{4}{5}$. **प्रमितिभागजाति अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा अंश आणि छेद हे दोन्ही अपूर्णांक असतात तो. **भागापवाह पु०** अपूर्णांक वजा केलेली पूर्णांक संख्या. **भाग येणें (किं० पडणें), भाग होणें, भाग असणें** आवश्यक होणें किं० असणें; उ० तूं सर्व विषयांत नापास झालास म्हणून खालच्या वर्गांत तुला ठेवणें भाग आहे.

भांग [**सं०** भंग] **पु०** १ स्त्रिया इ० मस्तकावरचे केश दोहोंकडे सारखे करून मधोमध करतात ती रेषा. ही रेषा करण्याच्या सळईला ' भांगसळई ' म्हणतात. २ समुद्रास उधानाचे दिवस जाऊन कमी पाणी भरण्याची जी अवस्था प्राप्त होते ती. ३ मोडलें, तुटलें, किं० फाटलें जाण्याची शक्यता किं० संभव. बहुधा निषेधीं प्रयोग; उ० लाकडी कामापेक्षां दगडी काम बरें, दगडी कामाला भांग नाहीं. ॐ **भांगपट्टी स्त्री०, भांगटिळा पु०** वेणीफणी, काजळ कुंकू, इ० स्त्रियांचा प्रसाधनविधि.

भांग [**सं०** भंगा=भांग, गांजा] **स्त्री०** १ एक मादक औषधी. २ ह्या औषधीचें प्यावयासाठीं तयार केलेलें पेय. ॐ **भांगट (–ड), भंगट वि०** १ भांगेच्या व्यसनाला

आसक्त झालेला. २ कैफी (माणूस). ३ कैफी माणसारखें मूर्ख वर्तन करणारा किं० मूर्खाप्रमाणें बोलणारा. **भांगभुरका पु०** १ भांग, गांजा, तंबाखू, मेवामिठाई, इ० निवळ चैनीचे पदार्थ समुच्चयानें किं० अशा निवळ चैनीच्या पदार्थांवर केलेलेला खर्च. २ संसारांतलि किं०कोणत्याही कामांतील अल्प महत्त्वाच्या बाबती किं० अशा बाबतींसंबंधाचा खर्च. ३ उधळपट्टी; नासाडी;उ० त्याचा बाप मरून आठ महिने होतात न होतात तोंच त्यानें लाखाच्या संपत्तीचा भांगभुरका केला (किं० लाखाची संपात्ति भांगभुरक्याखालीं उडविली). **भांगेंत तुळस स्त्री०** वाईट आईबापांच्या पोटीं झालेलें चांगलें अपत्य. **भांग्या** [**म०** भांग] **वि०** भांगेच्या व्यसनाला आसक्त.

भांगणी [**म०** भांगणें] **स्त्री०** १ उधानाचे दिवस जाऊन कमी पाणी भरण्याच्या अवस्थेस समुद्र येणें किं० पोचणें. २ जाण्यायेण्यासाठीं शेतांत राखतात ती पायवाट किं० अशी पायवाट राखणें.

भांगणें [**म०** भांग] **अ० क्रि०** उधानाचे दिवस जाऊन कमी पाणी भरण्याच्या स्थितीस (समुद्र) येणें किं० पोचणें.

भांगणें [**म०** भांग] **स० क्रि०** १ विभागणें (पायवाटेसाठीं शेत). २ शेतांत (पायवाट) करणें किं० राखणें. ३ होडी, गलबत, इ० नीं (समुद्र, नदी, इ० चें पाणी) आपल्या गतीनें दुभागणें. ४ उभ्या पिकांतील (गवत इ०) कापून टाकणें किं० (उभें पीक) गवत इ० कापून टाकून स्वच्छ करणें.

भागणें [**सं०** भज्] **स०क्रि०** (एका संख्येंतून) दुसरी संख्या किती वेळां वजा जाईल हें संक्षिप्त रीतीनें पाहाणें किं० जितके वेळां वजा जाईल तितके वेळां संक्षिप्त रीतीनें वजा करणें. ह्या संक्षिप्त रीतीनें काढलेला जो वेळांचा दर्शक आंकडा त्याला ' भागाकार ' असें नांव आहे. ❀ **भागक** [**सं०**] **पु०** (**गणितांत**) भाजक.

भागणें [**सं०** भंज्=मोडणें] **अ० क्रि०** १ दमणें; श्रांत होणें. २ तुळई, भिंत, इ० खचणें किं० दबणें किं० वाकणें. ३ म्हातारपणामुळें किं० आजारामुळें शक्तिहीन होणें. ४चालणें; पुरें होणें; पुरें पडणें; निर्वाहित होणें; उ० माझा संसार माझ्या पगारांत चांगला भागतो. ५ शक्य होणें; उ० घरच्या लोण्यावर अन्नशुद्धि भागते; उ० ह्या धंद्यांत व्याज मात्र भागतें, नफा मिळत नाहीं. ❀ **भागतीं भुगतीं स्त्री०** दैवानुसार प्राप्त झालेलें भोग्य; दैवगति.

भागभूक स्त्री० भीतीचा धक्का किं० उसळी (होणें, उठणें,सुटणें). मागें 'बाकबूक'पहा.

भांगलणी [**म०** भांगलणें]**स्त्री०**१शेत वेणणें. २ शेतांतील धान्यांच्या ताटांत व्यवस्था लावणें.

भांगलणें ['भांगणें'चें एक रूप] **स० क्रि०**१ शेतांत(वाट किं०पायवाट) पाडणें. २(शेत)वेणणें.

भागवटा पु०, भागलीक स्त्री० [**म०** भागणें] दमलेपणाची स्थिति.

भागवणी [**म०** भागविणें] **स्त्री०** भागविण्याची क्रिया. खालीं ' भागविणें ' पहा. ❀ **भागवणीची गोष्ट स्त्री०** अत्यन्त कठिण काम कोणेकाला करावयास सांगून त्याला गांजणें किं० त्याला असें सांगितलेलें काम.

भागवत [**सं०**] **पु०** १ विष्णुभक्त; भगवद्भक्त. २ पवित्र. **वि०**विष्णूची भक्ति करण्याचा (धर्म, संप्रदाय). **न०** अठरा पुराणांपैकीं एक.

भांगवळ [**म०** भांग+**सं०** आवलि (पंक्ति)] **स्त्री०** स्त्रियांचे कानाजवळचे केश (वेणी घालते वेळीं प्रयोग).

भागविणें [**म०** ' भागणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ दमविणें; कष्टाच्या कामानें जर्जर करणें. २ (संसार इ०) निर्वाहित करणें किं० चालविणें; उ० मी अठरा रुपयांत आपला प्रपंच भागवितों.

भांगळ [**म०** भांग] **वि०** भांगेच्या व्यसनाला आसक्त झालेला (मनुष्य).

भागळकवडी पु० कुचकामाचा मनुष्य; निरुपयोगी किं० कर्तृत्वहीन मनुष्य; नादान माणूस. पुढें ' भोंगळ ' पहा.

भांगा पु० १ लहान शेत. २ शेताचा एक [तुकडा.

भागाकार [**म०** ' भागणें ' पासून किं० भाग+आकार] **पु०** वजाबाकीच्या संक्षेपाचा एक प्रकार; एका संख्येंत दुसरी संख्या किती

वेळां वजा जाईल हें काढावयाची रीति. भागाकारांत ज्या संख्येस भागावयाचें तिला 'भाज्य' म्हणतात. जिनें भागावयाचें तिला 'भाजक' म्हणतात, आणि भागून जी संख्या येईल तिला 'भागाकार' म्हणतात. भागण्याची क्रिया आणि ह्या क्रियेचें फळ ह्या दोहोंसहीं 'भागाकार' म्हणतात.

भागाळी [म० भाग] **स्त्री०** मोठा पदार्थ (घर, शेत, इ०) विभागून एकेकाच्या वाट्यास आलेला भाग.

भागिनेय [सं०] **पु०** बहिणीचा मुलगा; भाचा. ❀ **भागिनेयी स्त्री०** बहिणीची मुलगी; भाची.

भागी [म० भाग] **स्त्री०** सरकत;अनेकांनीं समाइकीचा केलेला व्यवहार किं० अशा व्यवहारांतील एकेकाचा भाग; उ० त्या व्यापारांत माझी एक आण्याची भागी आहे. ❀ **भागी, भागीदार, भागीलदार भागीन, भागेला** [म०भाग]**पु०**ज्या व्यवहारांत कोणेकाची भागी म्ह० वाटणी आहे तो त्या व्यवहारांतील किं० ते परस्परांचे.

भागीरथी [सं०] **स्त्री०** १ गंगानदी. २ गंगानदीचें जल. ३ कोणतेंही पवित्र जल.

भागूबाई [हिं० भागू+म० बाई] **स्त्री०** १ भित्रा माणूस. २ पुचाट माणूस.

भागेली [म० भांग] **पु०** १ शेताचें अर्धें उत्पन्न मालकाला देण्याच्या शर्तीवर शेत कसणारा. २ समाइकीच्या व्यवहांत ज्याचा कांहीं ठराविक भाग आहे तो. [निघणें).

भांगोरें [सं० भंग] **न०** दिवाळें (वाजणें,

भांगोळी [म० भांग+ओळ; सं० भंग + आवलि] **स्त्री०** १ दोन्ही कानशिलांजवळच्या स्त्रियांच्या केशांचे भाग प्रत्येक. २ स्त्रियांच्या कानशिलांवरच्या केशांची पंक्ति.

भाग्य [सं०] **न०** १ दैव; नशीब. २सुदैव. ३ वैभव; ऐश्वर्य. **वि०** वाटे करावयास योग्य. ❀ **भाग्यपुरुष पु०** खाऊन पिऊन सुखी, सौम्य भाषण करणारा, पद्महस्ती, आणि धर्मकृत्यें करण्याकडे ज्याची प्रवृत्ति असते असा पुरुष. **भाग्यवान्,भाग्यवंत,भाग्यशाली वि०** सुदैवी. **भाग्यहीन वि०** दुर्दैवी. **भाग्याचा भोपळा पु०** (विपरीत लक्षणेनें) दुर्दैवी माणूस. **भाग्योदय पु०** उत्कर्ष. **भाग्यलक्षण न०** उत्कर्षाचा काळ.

भाचरूं [म० भाचा] **न०** भाचा किं० भाची. खालीं 'भाचा,' 'भाची' पहा.

भाचा पु० १ (पुरुषास) बहिणीचा मुलगा. २ (स्त्रीस) भावाचा मुलगा किं० नणंदेचा मुलगा किं० बहिणीचा मुलगा.

भाची स्त्री० ज्यांचा पुत्र आपला भाचा होतो त्यांची कन्या. वर 'भाचा' पहा. ❀ **भाचे जांवई पु०** भाचीचा नवरा. **भाचेसून स्त्री०** भाच्याची बायको.

भाज, भाजा [सं० भार्या] **स्त्री०** पत्नी, बायको (कवितेंत).

भाजक [सं०] **पु०** भागणारी संख्या;जिनें भाज्याला भागावयाचें आहे ती संख्या.

भाजकट, भाजट [म० भाजणें] **वि०** १ किंचित् भाजलेला. २ भाजल्याचा वास ज्याला येत आहे असा.

भाजका [म० भाजणें] **वि०** भाजलेल (तांदूळ, जमीन, पोहे, इ० पदार्थ).

भांजण [म० भाजणें] **न०** १ भाजणें किं० भाजण्याची क्रिया. २ भाजावयासाठीं खापरांत जें धान्यादि घातलें तें. ३ खापरांत भाजावयासाठीं एक एक वार घातलेलें धान्य इ०.

भाजणी [म० भाजणें] **स्त्री०** १ चार पांच धान्यें भाजून मग तीं दळून त्यांचें करतात तें पीठ. भाजणीचीं कडबोळीं, थालीपीठ, इ० खाद्यें करतात. २ पेरणीच्या अगोदर जमीन भाजण्याची क्रिया.

भांजणी [सं० भंजन] **स्त्री०** १ एका अंकराशींतून दुसरा वजा करण्याचा एक संक्षिप्त प्रकार. जे अंक वजा करावयाचे ते वर मांडून तिसरी पंगत न मांडतां तेथच्या तेथेंच वजा करून बाकी मांडावी ही सरणी. २ एका परिमाणाच्या संख्येस दुसऱ्या परिमाणाचें रूप देणें; उ० पांच रुपयांचे पैसे आणे करणें किं० पसतीसशे वीस यार्डांस दोन मैलांचें रूप देणें.

वरच्या परिमाणास चढविणें ही 'चढती भांजणी' आणि खालच्या परिमाणास उतरविणें ही 'उतरती भांजणी.' ३ काम अनेकांकडे वाटून किं० विभागून देण्याची क्रिया. ४ कोणेकाचें कांहीं काम बिघडविणें किं० बंद पाडणें (मारणें).

भांजणें [**सं०** भाजन] **स० क्रि०** १ वाटणी करणें. २ एका परिमाणांतून (कांहीं रकम) दुसऱ्या परिमाणांत अंकगणितांच्या क्रियेनें नेणें.

भाजणें [**सं०** भर्ज्] **स० क्रि०** १ शेकणें; होरपळून काढणें; पोळणें. २ अग्नीवर तवा, खापर, इ० ठेवून त्यांत(पीठ इ०पदार्थ)घालून पक्व करणें. ३ (कोणेकाला) गांजणें किं० सतावणें. ॐ **भाजपोळ स्त्री०** १ जाळणें, पोळणें, इ० विध्वंसक क्रिया समुच्चयानें; उ० त्या गांवांत पेंढाऱ्यांनीं फार भाजपोळ केली. २ शेतकीसाठीं जमिन भाजणें ह्या संबंधाचीं कामें समुच्चयानें.

भाजणें, भाजप न० वर 'भाजण' पहा.

भाजन [**सं०**] **न०** १ विभागणें. २ भागाकार. ३ स्थान; आधार. ४ पात्र; भांडें. ५योग्य स्थान;उ०महात्मा सर्वांच्या आदरास भाजन होतो.

भाजपी [**म०** भाजणें] **वि०** भाजणारा किं० भाजण्याचा धंदा करणारा. 'भाजपीण' हें **स्त्री०**.

भाजवट [**म०** भाजणें] **स्त्री०** बी पेरण्यापूर्वीं जमिन भाजण्याची क्रिया. **वि०** भाजलेली किं० भाजावयास पाहिजे अशी (जमीन).

भाजा [**सं०** भार्या] **स्त्री०** पत्नी; बायको.

भाजाणा [**म०** भाजणें] **पु०** भाजलेला दाणा.

भाजावळ [**म०** भाजणें] **स्त्री०** १ भाजलेली जमीन.

भाजी स्त्री० १ तोंडीं लावण्यासाठीं शिजवून तयार केलेलें खाद्य किं० त्या खाद्यासाठीं पाला, फळें, फुलें, कंद, इ० योजण्यांत येतात ते पदार्थ प्रत्येक. २ विटीदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. ३ पदार्थाचा केलेला चोळाबोळा. ॐ **भाजीपाला पु० ए० व०** १ तोंडीं लावण्याची भाजी इ० व्यंजनें. २ भाजी करण्याच्या उपयोगाचीं फळें, पाले, देठ, कंद, इ० समुच्चयानें. ३ (**लाक्षणिक**) फोल, निरर्थक; उ० त्याचें बोलणें भाजीपाला आहे. **भाजी-**

भाकर स्त्री० ए० व० १ भोजन. २ गरीबाऊ जेवण. ३ चरितार्थाचें कांहींही साधन.

भाज्य [**सं०**] **न०** भाजकानें ज्याला भागावयाचें ती संख्या. **वि०** ज्याचे वाटे करावयाचे आहेत किं० करणें योग्य आहे असें.

भाट [**हिं०**] **पु०** १ राजे, संस्थानिक, इ० चीं स्तुतिस्तोत्रें गाणारांची जात. २ दुसऱ्याची तरफदारी करणारा.३ गलागला पुष्कळ बोलणारा माणूस.

भाट [**स्त्री०**] **न०** १ शेतजमीनीच्या आसपास जी उंचवट्याची सपाट जमीन असते, आणि जेथें पाणी ठरत नाहीं आणि शेतही चांगलें होऊं शकत नाहीं अशी जमीन. २ नदी, समुद्र, इ० मधील उंचवट्याचा भूप्रदेश,–जो बहुधा कोरडा असतो. ३ शेतांतील उंचवट्याचा भाग,– जेथें बहुधा हल्कीं धान्यें केलीं जातात. ह्या अर्थी 'भाटलें' असें **न०** रूपही आहे. **स्त्री०** १ उसासाठीं तयार केलेली जमिन. २ उसाची लागवड.ॐ**भाटवळ**[**म०**भाट] **वि०** ज्या जमीनींत भाटें पुष्कळ आहेत अशी (जमीन).

भाट, भाटक [**सं०**] **न०** मजूरी; पगार.

भाटी स्त्री० १ नदी, समुद्र, इ० मध्यें असते ती उंचवट्याची आणि बहुधा कोरडी जमिन. २ खाडीचा किं० नदीचा कांठ यावर असते ती कसदार आणि दमदार जमिन,–जेथें ऊंस इ० जित्रब चांगलें होतें. ३ मांजराची स्त्री.

भाटया पु० गुजराथ्यांची एक जात किं० त्या जातीचा इसम.

भाड [**सं०** भाट, भाटी, भाटक] **स्त्री०** आपली रखेली, बायको, बहीण, इ० लोकांस उपभोगार्थ देऊन मिळविलेला पैसा. ॐ**भाडखाऊ** [**म०** भाड+खाणें] **वि०** आपली रखेली, बायको, बहीण, मुलगी,इ० दुसऱ्याला उपभोगार्थ देऊन पैसे मिळविणारा.

भाड न० १ भडभुंज्याची भट्टी. २ ह्या भट्टी खालीं सर्पण घालणें किं० घातलेलें सर्पण. ह्या अर्थी 'भड' आणि 'भडस' **स्त्री०** हेही शब्द आहेत. **क्रि०** झोकणें, भोकणें.

भांड [**सं०** भांड=थट्टा, मस्करी] **पु०** १ नकला, पशुपक्ष्यांच्या शब्दांचें अनुकरण, माणसांच्या भाषणाचें, हसण्याचें, किं० चालण्याचें अनुकरण इ० करून चरितार्थ करणारांची जात. २ गमतीखातर अशा नकला इ० करणारा. ३ कज्जेदलाल.

भांड [**सं०**] **न०** १ भांडें; पात्र. २ धोकटी (न्हाव्याची). ३ द्रव्य. ४ उपकरण; सामग्री. ५ व्यापारी माल. ६ (**लाक्षणिक**) १ खजिना. २ भांडवल. ❀ **भांड प्रतिभांडक पु०** मोबदला; अदलाबदल. **भांडवल न०**१ व्यापारांत घातलेलें द्रव्य. २ साठा (द्रव्य, बुद्धि, अक्कल, इ० चा). **भांडागार, भांडार, भांडारगृह न०, भांडारखाना पु०** १ खजिन्याची जागा. २ कोठी (धान्यादि पदार्थ ठेवण्याची). **भांडागारिक पु०** १ खजिनदार. २ कोठावळा.

भांड, भांडखोर, भांडगा, भांडरा [**म०** भांडणें] **वि०** भांडणें करण्यांत ज्याला आनंद वाटतो किं० क्षुल्लक कारणावरून जो भांडावयास प्रवृत्त होतो तो. **भांडकुदळ** [**म०** भांडणें]**वि०** भांडखोर.

भांडकोडबोळें, भांडकोंडोळें [**म०** भांडें+ कोडबोळें, कोंडोळें (वर्तुळ)]**न०** थालीपीठ.

भांडण [**म०** भांडणें] **न०** कज्जा; तंटा.

भांडणें[**सं०** भंडन=युद्ध] **स० क्रि०** कलह, तंटा, किं० कज्जा करणें.

भांडवल वर 'भांड'मध्यें पहा.

भाडळी स्त्री० एक झाड,-ह्याच्या काड्या प्रकाशासाठीं पेटवितात.

भाडळी स्त्री० सहदेव नांवाच्या शेतकऱ्याच्या बायकोचें नांव. सहदेव आणि भाडळी ह्या दोघांनीं शेतकऱ्यांच्या उपयोगाच्या अनेक म्हणी रूढ केल्या आहेत. आमचें ' म्हणींविषयीं चार शब्द 'ह्या पुस्तकाचें परिशिष्ट पहा. **भाडळी मत न०**भाडळीनें रूढ केलेले शेतकीसंबंधाचे आडाखे.

भांडार [**सं०**] **न०** १ कोठार. २ (**लाक्षणिक**)कोट्या, दाखले, नकला, इ० चा कोणेकाचा संभाषणांत योजावयाचा साठा.

भांडें [**सं०** भांड]**न०**१ पात्र,-पातेलें, तपेली, इ०. २ तोफ; बंदूक. ३ नदीचें पात्र. ४ कांहीं विकृतीमुळें योनिद्वारें मांसगोलक बाहेर येतो तो. ❀ **भांड्यास भांडें लागतेंच** शेजाऱ्यांत किं० एका कुटुंबांतील किं० संस्थेंतील माणसांत तंटे, मतभेद, इ० होणें साहजिक असतें; (तें कोणी मनावर घेऊं नये अशा अर्थानें).

भाडें [**सं०** भाट, भाटक] **न०** एकाचा कांहीं पदार्थ (घर इ०) दुसऱ्यानें वापरावयास घेतला असतां मालकाला द्यावें लागतें तें देय. ❀ **भाडेकरी पु०** दुसऱ्याची जागा भाडें देऊन वापरणारा. **भाडोत्री पु०** १ भाडें देऊन मालकाच्या घरांत राहातो तो. २ पैसे घेऊन काम करणारा. ३ कामांत लक्ष्य न घालतां केवळ पैशासाठीं दुसऱ्याचें काम करणारा. ४ बेपरवाईनें किं० निष्काळजीपणानें दुसऱ्याचें काम करणारा.

भाण [**सं०**] **पु०** एक प्रकारचें एकांकी आणि एकपात्री नाटक.

भाणवशी स्त्री० दुभत्याचीं भांडीं ठेवावयाची घडवंची.

भाणवसा, भाणोसा पु०, भाणवस स्त्री० मागें ' भाणवशी ' पहा. पुढें ' भानवस ' पहा.

भाणस पु० १ कांहीं जातींत लग्नाच्या विधींत नवरीच्या बापाकडून नवऱ्याच्या घरीं पंचवीस मडकीं पाठविण्यांत येतात तीं समुच्चयानें. २ सुमारें दीड दोन शेराचा मातीचा रांजण किं० डेरा. [२ ताट.

भाणें न० १ (**कवितेंत**) जेवणें किं० जेवण.

भांत [**हिं०**] **स्त्री०** चाल; रीति; तऱ्हा; ढब. ❀ **भांती भांतीचा वि०** नानाप्रकारचा. **भांती भांतींनीं क्रि० वि०** नानाप्रकारांनीं, परोपरीनें (बोलणें, छळणें).

भांत स्त्री० दाट उगवलेलें आणि कुसळांचें गवत (तें जेथें रुजलेलें असतें तेथेंच उभें असतांच प्रयोग होतो).

भात [**सं०** भक्त] **पु०** १ खाण्यासाठीं तांदूळ शिजवून करतात तें खाद्य. याचे साधा भात, साखरभात, वांगीभात, असे अनेक प्रकार करण्यांत येतात. २ (**लाक्षणिक**) फळाची नासलेपणाची स्थिति. ३ (**लाक्षणिक**) सडत चाललेली जखम. ४ जोंधळ्याच्या कण्या शिज-

वून करतात तें खाद्य. न० टरफलासह तांदूळ. ः भातकण पु० साळीचा एक दाणा; टरफलासह असलेला तांदुळाचा दाणा. भातकरी पु०भाताचें शेत करणारा. भातकुली,भातुकली स्त्री० मुली संसाराचें करतात तें चिमुकलें अनुकरण किं०ह्या प्रसंगींचीं खाद्यें समुच्चयानें. भातकुलें,भातकूल न० १ मुलांना देतात तो खाऊ. २ मुलींच्या भातुकलींत खावयाचे पदार्थ समुच्चयानें. ३ कोणताही लहानसा खाद्य पदार्थ. भातकें, भातुकें, भातूक न० १ कांहीं चमचमीत खाद्य,फोडणीचे पोहे, इ०.२अल्प उपाहार. भातखाऊ, भातभरू, भातभेंाकण्या, भातबोकण्या,भातबोक्या वि०१प्रायः भाकरी खाणारे लोक (म्ह० कुणबी इ०) प्रायः भात खाणाऱ्या लोकांना (म्ह० पांढरपेशांना) हा शब्द उपहासांत योजतात. २ कांहीं उद्योग किं० कामधंदा न करतां असलेला कुटुंबांतील माणूस. भातगोटा पु० टरफलें काढून टाकलेल्या तांदुळांत एकाद दुसरा राहतो जो टरफलासहित दाणा तो. भातण, भातेण न०भाताचीं ताटें समुच्चयानें.भातळ वि०ज्यांत बरेच भातगोटे राहिले आहेत असे तांदूळ. वर ' भातगोटा ' पहा. भाताचा पिंड पु० प्रायः भातच खाणाराचें शरीर (शक्तीच्या दृष्टीनें). भातकांडे तांदूळ पु० भात कांडून सध्याच्या उपयोगासाठीं केलेले तांदूळ.

भातकें, भातुकें, भातूक [म०भात] न० १ कांहीं चमचमीत अल्प खाद्य. २अल्प उपाहार.

भातड न०, भातडा पु० बाणांचा भाता.

भातडी [म० भाता] स्त्री० सोनार इ० चा अग्नि प्रज्वलित करण्याचा लहानसा भाता.

भाता [सं० भस्त्र] पु० १ अग्नि प्रज्वलित करण्याचें कातड्याचें साधनविशेष. २ बाण ठेवण्याची पिशवी. ३ प्रवासांत भांडींकुंडी इ० ठेवण्याची शिपायांची किं० इतर मुशाफरांची पिशवी. ४ शरीर भाजल्यामुळें जें कातडें गळून जातें तें.

भांतीं भांतीं, मांतीं भांतीं [म० भांत] क्रि० वि० नानाप्रकारें; अनेक युक्त्यांनीं.

भातुकें, भातूक न० मागें ' भातकें ' पहा.

भातें [हिं० भाता] न० १ ठरावीक पगारापेक्षां अधिक पैसा जो नोकरास मालक वाटखर्ची, भाडेंतोडें, इ० साठीं देतो तो.२सावकार, सरकार, इ० कांकडून आपणाकडे कामासाठीं आलेल्या मनुष्यास आपण जें खोळंबा इ०च्या भरपाईसाठीं त्याला देतों तें देय.

भातें न० १ वाकेरी इ० औषधींचा कंद. २ उरीं फुटलेल्या माणसास किं० जनावरास पाजतात तें एक औषध.

भातेण, भात्येण [म० भात+तृण] न० भाताचीं ताटें समुच्चयानें.

भांतींभांतीं क्रि० वि० वर ' भातीं भांतीं ' [पहा.

भात्या, भातोटा पु० वर ' भाता ' पहा.

भादरणें [सं० भद्राकरण] स० क्रि० १ वस्त्र्यानें केश तासणें (तुच्छतेंत). टीप,–माणूस, जनावर, गात्रविशेष, किं० केश, ह्या क्रियापदाचें कर्म होऊं शकतात. २ (कोणेकाची) भोसडपट्टी काढणें. ः भादरपट्टी स्त्री० १ केश तासणें. २ भोसडपट्टी.

भादली स्त्री० एक धान्यविशेष.

भादवा [सं० भाद्रपद] पु० हिंदू पंचांगांतील सहावा महिना. ः भादवड स्त्री० भाद्रपद महिना. भादवी तीळ पु० भाद्रपदांत पिकणारा तीळ. भादवी वि० भाद्रपद महिन्यासंबंधाचा. भादवी वि०१ भाद्रपदांतील (तिथि इ०).

भादा, भाद्या वि० ज्याचें अंड बडविलें आहे असा (बैल इ०).

भादी स्त्री० पूर्वीं दोन तीन वेळां प्रसूत झालेली (गाय, म्हैस, इ०).

भाद्रपद [सं०] पु० हिंदू पंचांगांतील सहावा महिना. ः भाद्रपदी स्त्री० भाद्रपद महिन्यांतील पौर्णिमा.

भान [सं०] न० १ चैतन्य. २ पदार्थाच्या स्वरूपाचें ज्ञान. ३ शुद्धि; सावधपणा. ४ अंतःकरणाची जागृत स्थिति.५ स्मरण; आठवण; उ० बोलण्याच्या नादांत मला जेवावयास उठण्याचें भान राहिलें नाहीं. ६ त्या त्या विषयाकडे लक्ष्य देऊन असण्याची स्थिति. ७ प्रतीति; उ० नगाऱ्याच्या शब्दावरून राजाची स्वारी चालली आहे असें मला भान झालें.

भानगड [हिं० भांजना] **स्त्री०** १ गुंतागुंत; घोटाळा; अव्यवस्था. २ तंट्याचें कारण. ३ तंटा; वाद. ४ विघ्न,हरकत.

भानगडणें [म० भानगड] **स० क्रि०** अव्यवस्थित करणें; घोटाळ्यांत पाडणें; गुंतागुंत करणें; मिश्रित करणें.

भानवस स्त्री०,भानवसा पु० १ चुलीच्या मागें माती, दगड,चुना,इ०चा करतात तो ओटा. २ भांडें डळमळूं नये म्हणून जमीनीवर मध्यें खोल्गट अशी मातीची करतात ती वाटोळी रचना. खालीं ' भानोसा ' पहा.

भाना पु० घराच्या भिंतींत गुप्तपणें पुरलेलें पैशाचें भांडें.

भानामती [सं० भानुमती=दुर्योधनाची पत्नी] **स्त्री०** १ जादूगारी; हातचलाखीचे खेळ. २ स्त्री जादूगार. ३ कपटी स्त्री. ꕥ **भानामत्या पु०** जादूगार.

भानु [सं०] **पु०** १ किरण. २ सूर्य. ३ दिवस. ꕥ **भानुवासर, भानुवार पु०** आदित्यवार हा आठवड्याचा दिवस. **भानुसप्तमी स्त्री०** आदित्यवारीं आलेली सप्तमी ही तिथि.

भानोसा पु०, भानोस स्त्री० वर ' भानवसा ' पहा. ꕥ **ससा भानोशीं येणें** जी वस्तु आपणाला प्रिय म्हणून पाहिजे आहे ती ऐन वेळीं आपणास बसल्याजागीं प्रयत्नावांचून मिळणें.

भांब स्त्री० मोठी विहीर. पुढें ' भाम ' पहा.

भांबटा (–ट्या) **पु०** पुढें ' भामटा ' पहा.

भांबडभूत न० अजागळ, मूर्ख, किं० गैबती माणूस.

भाबडा वि० कपटरहित; साधा; मोकळ्या [मनाचा.

भांबवणें, भांबावणें, भांभावणें [सं० भ्रान्त] **अ० क्रि०** भय, हर्ष, कांहीं आकस्मिक घडलेली गोष्ट, यांमुळें भ्रांत होणें आणि काय करावें हें सुचत नाहीं अशा स्थितीप्रत पावणें; चकित होणें.

भांबुरडी स्त्री० खरखरीत पानांची एक औषधोपयोगी वनस्पति.

भांब्या [म० भांबावणें] **वि०** १ क्षुल्लक कारणांवरून भांबावून जातो तो. २ अजागळ. ३ विसराळू. ' भांभळ, ' ' भांभळ्या ' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

भाभापाडळी स्त्री० नपुंसक पुरुष.

भाम स्त्री० जीवर चार मोटा चालूं शकतील इतक्या पाण्याच्या संचयाची मोठी विहीर.

भाम [म० भान] **स्त्री०** आठवण; स्मृति.

भामटा (–ट्या) **पु०** १ चोरीवरच चरितार्थ चालविणारी हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. २ लफंगेगिरी करून दुसऱ्यास लुबाडणारा किं० सभ्यपणाच्या पांघरुणाखालीं चोरी करणारा.

भामसाळें न० (गुजराथी लोकांत) नवरदेवाची लग्नाच्या विधींतील रात्रीची मिरवणूक.

भाम्या पु० यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण (निंदेंत).

भाय, भायटी स्त्री० झाडाची फांदी.

भायताड पु० ताडाची एक जात.

भार [सं०] **पु०** १ वजन. २ ओझें. ३ कांहींही जड पदार्थ; दडपण. ३ समुदाय; कळप; उ० अश्वभार, गजभार, इ०. ४ जबाबदारी. ५ कोणी आपणावर केलेल्या उपकाराचें आपणास वाटतें तें ओझें. ६ शैत्यादि कारणामुळें डोक्यांत वाटतो तो जडपणा.७ एक तोळा हें वजन; उ०ही चांदीची वाटी चवदा भार आहे. ८ विशिष्ट वजन; उ० पैसाभार (म्ह०एका पैशाचें वजन). ह्या अर्थी ' पैसाभार ' इ० शब्द **वि०** मानिलीं तरी चालेल. ९ मंत्राचा प्रयोग (टाकणें, लागू होणें, इ०). ꕥ **भारवाहक वि०** १ ओझें वाहणारा (माणूस, पशु). २ अंगीं असलेल्या विद्येचा द्रव्य मिळविणें इ० कामीं उपयोग न करणारा (माणूस).

भारकस [फा० बारकष्] **पु०, न०** १ गाड्यावर किं० उंट, हत्ती, इ० च्या पाठीवर सामान आवळून घट्ट बांधावयाचा दोर. २ बादलांत तंबू डळमळूं नये म्हणून त्याच्यावरून टाकून जमीनीस खिळविलेली दोरी.

भारंग, भारंगी [सं० भारंगी] **स्त्री०** एक [वनस्पति.

भारणशुद्ध, भारणसूद (–त), **भाराणसूद** (–त) **वि०** १ वजनदार, संमान्य, पूज्य, सभ्य चालीचा (माणूस, वर्तन, पोशाख). २ जबाबदारीचें काम करण्यास लायक (माणूस). ३ परिमित लादलेलें ओझें वहावयास समर्थ(जनावर).

भारणी [म० भारणें] **स्त्री०** मंत्रप्रयोग किं० मंत्र.

भारणें [म० भार] **स० क्रि०** १ शाबरादि मंत्रानें (अक्षता, पाणी, शस्त्र, इ० मध्यें) अचाट सामर्थ्य उत्पन्न करणें. २ मंत्रानें (माणूस, पशु) स्ववश करून घेणें. ३ भुलथापांनीं (कोणेकास) स्ववश करून घेणें.

भारत [सं०] **पु०** १ भरताच्या वंशांत उत्पन्न झालेला कोणीही पुरुष. २ हिंदुस्थानचा रहिवासी. ३ नट. **न०** १ हिंदुस्थान देश; भारत वर्ष. २ व्यासप्रणीत एक पुराण. ३ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत. ४ जिकीरीचें आणि लवकर न संपणारें काम. ※ **भारती वीर पु०** लढाईत पाठ न दाखविणारा योद्धा.

भारती [सं०] **स्त्री०** १ भाषण. २ सरस्वती. ३ (**साहित्य**) ग्रंथरचनाविशेष. **पु०** दशविध गोसाव्यांचा एक पंथ.

भारतुळव पु० खटारा गाडीच्या कण्याशीं खिळविलेला एक लाकडाचा तुकडा.

भारदस्त (–स्ती), **भारदास्त** [म० भार फा० दस्त्], **भारदार** [म० भार+फा० दार्] **वि०** १ वजनदार (माणूस, विचार, वर्तन, इ०) २ मूल्यवान्.

भारंदाज [फा० बार+अंदाज्] **वि०** १ वजनदार (माणूस). २ फायदेशीर (धंदा, व्यापार).

भारदार [हिं०] **वि०** महत्त्वाचें काम करावयाला लायक किं० समर्थ (माणूस).

भारद्वाज [सं०] **पु०** १ द्रोणाचार्य. २ अगस्ति. ३ कुकुडकुंभा पक्षी. ४ कोंकणांतील ब्राह्मणांची एक जात.

भारंभार [म० भार आणि भार] **वि०** वजनानें सारखा; उ० हे शंभर रुपये घ्या आणि आम्हांला भारंभार चांदी द्या.

भारशिंग न० सांबराचें शिंग.

भारा [म० भार] **पु०** गवत, कडबा, पानें, इ० चा गठ्ठा. ※ **भारेभात न०** दर भाऱ्यास झोडपल्यावर अमुक भात उतरावें असा जो आजमास असतो त्याला अनुसरून उतरलेलें भात (उतरणें, होणें). [पहा.

भाराणसूद (–त) **वि०** मागें ' भारणशुद्ध '

भारावणें [म० भार] **अ० क्रि०** १ जड होणें. २ पूर्वीपेक्षां अधिक जड होणें. ३ शैत्यामुळें किं० एकाच संस्थानांत शरीर किं० गात्र फार वेळ राहिल्याकारणानें हालचाल करण्यास तें कांहीं काळ असमर्थ होणें. ४ फार काम केल्यामुळें हात किं० बोटें ताठणें; फार चालल्यामुळें पाय लटके पडणें.

भारी [म० भार] **वि०** १ जड; वजनदार. २ फार किमतीचा, महत्त्वाचा, किं० योग्यतेचा. ३ फार मोठ्या परिमाणाचा किं० जोराचा. ४ सहज जिंकितां, आक्रमितां, शिकतां, किं० निवारितां न येईल असा.

भारी [म० भारा] **स्त्री०** लहान भारा; लांकडें, पेंढ्या, काटक्या, इ० चा बांधलेला गठ्ठा.

भारूड [म० ' भारत ' पासून] **न०** १ लांबच लांब, गुंतागुंतीची, किं० कंटाळवाणी अशी हकीगत किं० वृत्तान्त (लावणें). २ पंचाईत. ३ गुंतागुंतीचा वाद. ४ कुभांड; तोहमत.

भारोभार [म० भार आणि भार] वर ' भारंभार ' पहा.

भार्गव [सं०] **पु०** १ शुक्र हा ग्रह. २ शुक्राचार्य. ३ परशुराम. ४ मार्कंडेय ऋषि. ५ गुजराथी ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

भार्या [सं०] **स्त्री०** पत्नी, बायको.

भाल [सं० भल्ल] **स्त्री०** भाला, बर्ची, इ० चें पोलादी पातें.

भाल स्त्री० विटीदांडूच्या खेळांत दुसऱ्यानें मारलेली विटी वरचेवरच दांडूनें टोला मारून परतविणें.

भाल [सं०] **न०** कपाळ. ※ **भाललिखित न०** नशीब,–जें प्राण्याच्या जन्मसमयीं कपाळावर लिहिलेलें असतें. **भालचंद्र पु०** शंकर,–ज्याच्या मस्तकावर चंद्र आहे.

भालगांजा पु० एक वनस्पति.

भालदोरी स्त्री० पिशाचाचा उपद्रव निवारण्यासाठीं हातांत मंतरलेला दोरा बांधतात तो.

भाला [सं० भल्ल] **पु०** १ लांब काठीच्या टोकाला पोलादी पातें संबद्ध करून करतात तें शस्त्र. २ गायीचें दूध काढतेसमयीं तिचे पाय

उचलूं नये म्हणून जी दोरी तिच्या पायांना बांधतात ती (घालगें). ३ भडभुंज्याच्या पोहे कुटण्याच्या लाटेला लाविलेला तुकडा (ज्याला कोळंबें बसविलेलें असतें तो). ❀ **भालदार, भालेकरी पु०** बड्या मनुष्याच्या स्वारींत पुढें चालतो किं० त्याचे निरोप इ० पोंचवितो तो. **भालेराव पु०** १ भाला मारण्यांत पटाईत. २ दुष्टाचारी (उपहासांत). ३ पुंड किं० अडदांड माणूस. **भालेराई** [**म०** भालेराव] **स्त्री०** १ पुंडाई; शिरजोरपणा. २ अंदाधुंदीचा कारभार.

भाळू, भाळूक [**सं०** भल्लुक, भल्लूक] **स्त्री०** १ आस्वल. २ म्हातारी कोल्ही. ३ मानवी जातींची हिडिस्स रूपाची म्हातारी. ❀ **भाळूसारखा वि०** रोड; किडकिडीत.

भाव [**सं०**] **पु०** १ अस्तित्व; असणें. २ घडणें; घडणारी किं० घडलेली गोष्ट. ३ स्थिति; दशा; अवस्था. ४ स्वरूप. ५ स्वभाव. ६ मनोविकार; मनोवृत्ति. ७ मन; अंतःकरण. ८ प्रेम; आसक्ति. ९ निष्ठा; भावना; भक्ति; श्रद्धा. १० खात्री. ११ आशय; अभिप्राय; अर्थ. १२ धर्म; गुण; उ० भाववाचक नाम. १३ चेष्टा; लीला; हावभाव. १४ कल्पना; समजूत. १५ वासना; संस्कार. १६ (**सांख्य**) धर्म, अधर्म, ज्ञान, अज्ञान, वैराग्य, अवैराग्य, ऐश्वर्य, अनैश्वर्य, हीं आठ. १७ (**साहित्य**) स्वेद, रोमांच, इ० शृंगारादि रसांचें लक्षण. १८ (**नाट्यशास्त्र**) विद्वान्; पूज्य. १९ (**ज्योतिष**) कुंडलींतील द्वादशस्थानांपैकीं प्रत्येक. २० संबंध; उ० कार्यकारणभाव, बिंबप्रतिबिंबभाव, इ०. २१ पदार्थमात्राच्या ज्या उत्पत्ति, स्थिति, वृद्धि, क्षय, इ० अवस्था त्या प्रत्येक. ❀ **भावार्थ पु०** १ सारांश, तात्पर्यार्थ. २ श्रद्धा; विश्वास. ३ अंतःकरणाची निष्कपट वृत्ति. **भावार्थी वि०** निष्कपट आणि सरळ स्वभावाचा; दुसऱ्याच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय न घेणारा. **भावकुंडली स्त्री०** तनु, धन, इ० चीं स्थानें दाखविण्यासाठीं बारा राशींचीं बारा घरें ज्यावर दाखविलीं आहेत असें वर्तुळ. **भावचलित वि०** तनु इ० स्थानीं असून अंशें करून चलित झालेला भानु इ० ग्रह. **भावगर्भ, भावगर्भित वि०** ज्यांतील अर्थ किं० आशय स्पष्टपणें किं० पूर्णपणें लोकांच्या लक्ष्यांत येऊं शकत नाहीं असें (वाक्य, भाषण, इ०). **भाववाचक नाम न०** गुण किं० धर्म दाखविणारें नाम; उ० ‘ चांगला ’ याचेपासून ‘ चांगलेपणा ’ हें भाववाचक नाम होतें. **भावकर्तरि क्रियापद न०** ज्या क्रियापदाचा कर्ता वाक्यांत नसतो आणि भाव हाच कर्ता व्यावयाचा असतो असें क्रियापद; उ० मळमळणें, सांजावणें, इ०. **भावाभास पु०** १ खोटें प्रेम. २ प्रेमाचें खोटें किं० विपरीत वर्णन. **भावसंकर पु०** मनोविकारांचें मिश्रण. **मनोभावानें क्रि० वि०** अंतःकरणपूर्वक; प्रामाणिकपणानें; इमानानें; श्रद्धापूर्वक. **भावभगत स्त्री०** १ वैभवाचा किं० भरभराटीचा काल (अस्थिरता वर्णावयाची असतां प्रयोग). २ बाजारांतील दरदाम इ० संबंधाची हकीगत. ३ कोणेकाच्या संसारांतील घडामोडींच्या संबंधाचें वर्तमान. ४ कोणेकासंबंधानें वाटतें तें आदरपूर्वक प्रेम. याच्या उलट ‘ भयभक्ति. ’ ५ विपुलतेचा काळ; उ० अजून पंधरा दिवस आंब्याची भावभगत आहे. **भावभक्ति स्त्री०** वर ‘ भावभगत ’ अर्थ ४ पहा. **भावशबल न०** अंतःकरणांत एकच रस पूर्णता न पावतां अनेक शृंगारादि रसांचा होतो तो मिश्रीभाव. **भावसंधि पु०** अंतःकरणांत शृंगारादिरसांचा पूर्ण विकास व्हावयाच्या पूर्वी अन्य रस उद्भवणें हा प्रकार. **भाव भाजणें** १ दुष्ट हेतु तडीस लावणें. २ कोणी केलेलें दुष्ट भाकित प्रत्ययास येणें. **भाव सोडणें** पछाडलेल्या माणसाला भुतानें सोडणें. **भाविक वि०** श्रद्धावान्.

भावई स्त्री० १ ज्येष्ठ महिन्यांतील अमावास्या. २ एक वनस्पतिविशेष.

भावका, भावकादेवी स्त्री० शूद्रांचीं एक [देवता.

भावजई (–य) [**सं०** भ्रातृजाया] **स्त्री०** भावाची बायको.

भावंड [**म०** भाऊ] **न०** १ आपल्या आईबापांचें अपत्य (मुलगा किं० मुलगी); भाऊ किं० बहीण. २ सावत्र आईचा मुलगा किं० मुलगी.

भावणें [**म०** भाव] **स० क्रि०** १ मानणें;

समजणें. २ इच्छिणें. अ० क्रि० (हवा, पाणी, अन्न, उपदेश, इ०) मानवणें, मान्य होणें, पसंत पडणें, सुखावह वाटणें, किं० हितकर होणें.

भावना [सं०] स्त्री० १ कल्पना. २मनाचा ग्रह.३वात,पित्त,इ०च्या अधिक किं०कमी जोरामुळें शरीरप्रकृतीस ज्या वेगळ्या वेगळ्या अवस्था प्राप्त होतात त्या प्रत्येक. ४ श्रद्धा; निष्ठा; पूज्यभाव. ५ रसायनादिकांस रसाचीं पुटें देणें, अग्निताप, इ० जे संस्कार करतात ते प्रत्येक. ६वस्तूचा जातिस्वभाव; उ० ह्या आंब्याची भावना अशी आहे कीं तो कोयीपाशीं आंबट असतो. ७प्रत्यक्ष ज्ञान. ८निश्चय; निकाल. ९पुरावा; सिद्धता. १० (**वैद्यकांत**) भिजवून आणि खलून एकजीव करणें (औषधावरील एक संस्कार). ११ गुणण्याचा एक प्रकार. १२ (**न्याय**) अनुभवजन्य व स्मृतिहेतु असा संस्कार. १३ (**न्याय**) कृति; प्रयत्न. १४ (**व्याकरण**) धात्वर्थ; क्रिया.

भावला पु०, **भावली** स्त्री०, **भावलें** न० मागें ' बाहुला, ' ' बाहुली, ' ' बाहुलें ' पहा.

भावळ पु० भाऊ (अ० व० प्रयोग); उ० पांची भावळ रोजगारी आहेत.

भावा [म० भाऊ] पु० नवऱ्याचा भाऊ; दीर (विशेषतः नवऱ्याहून वडील).

भावास्त्रे पु० अ० व० धरसोडीचीं उत्तरें; खोट्या किं० पोकळ सबबी; भाषणांत फोडलेले फांदाडे (लावणें, घेणें, फोडणें).

भावित [सं०] वि० १ कल्पित; कल्पिलेलें. २ चिंतिलेलें; ध्यायिलेलें. ३ प्रकटिलेलें. ४ मान्य किं० संमत असलेलें. ५ ध्यानानें शुद्ध झालेलें (मन). ६ आविष्कृत किं० प्रकट केलेलें. ७ (**वैद्यकांत**) भिजवून आणि खलून एकजीव केलेलें (औषध).

भावी [सं० भाविन्] वि० १ पुढें होणारें; भविष्य काळासंबंधाचें. २ (**संस्कृत** भावे प्रयोगः) ज्यांत कर्त्यावरून किं० कर्मावरून क्रियापद फिरत नाहीं पण नित्य नपुंसकलिंगी एकवचनीं असतें असा प्रयोग; उ० रामानें रावणास मारिलें. ३ भावी स्त्री० भविष्य; भाकित.

भावीक मागें ' भाव ' मध्यें ' भाविक ' पहा.

भाविण [म० भाव+ईण (प्रत्यय) स्त्री० देवीच्या सेवेला स्वतास जिणें वाहून घेतलें आहे अशी स्त्री. ॐ**भाविणीचा कासोटा** पु०मालकाची परवानगी आहे किं० नाहीं ह्याचा विचार न करतां हावी त्यानें उपभोगावी अशी कोणतीही वस्तु.

भावुक [सं०] न० कल्याण; हित; क्षेम. पु० बहिणीचा पति. **भावूक** (मराठी रूप). वि० श्रद्धावान्; विश्वास ठेवणारा.

भावेंचाड [म० भाव+चाड (आस्था)] स्त्री० अंतःकरणपूर्वक प्रेम; आस्था; श्रद्धा.

भावेस पु० पतीचा भाऊ; दीर.

भाव्य [सं०] वि० १ होण्यास किं० असण्यास योग्य. २ पुढें व्हावयाचें किं० होईल असें. न० १ भविष्य. २ विधिलिखित.

भाव्या पु० गोव्यास होते अशी आंब्याची एक जात.

भाष [सं० भाषा] स्त्री० १ वचन; आश्वासन. २ एकमेकांनीं एकमेकांस दिलेलें वचन. ॐ **भाष खरी** (किं० **सत्य**) **करणें** कबूल केल्याप्रमाणें वर्तन करणें; दिलेलें वचन खरें करून दाखविणें; प्रतिज्ञा निस्तरणें.

भाषण [सं०] न० १ बोलणें.२सभादिकांत केलेलें व्याख्यान किं० विवेचन.

भाषा [सं०] स्त्री० १ बोलणें; भाषण. २ करार; प्रतिज्ञा.३एकमेकांनीं एकमेकांस विचार कळविण्याचें शब्दरूप साधन. विशिष्ट प्रांतांत किं०समाजांत चालणारी जी भाषा तिला'बोली ' म्हणतात. ४ कांहीं विशिष्ट विषयासंबंधाचा उल्लेख. ५ कोणेकाची विशिष्ट प्रकारची लेखनाची किं० भाषणाची शैली. ॐ **भाषांतर** न० एका भाषेंतील ग्रंथ, वाक्य,इ०चा दुसऱ्या भाषेंत केलेला अर्थ किं०तो दुसऱ्या भाषेंत नेणें;तजुरमा. **भाषांतरित** वि०दुसऱ्या भाषेंत सांगितलेला किं० घातलेला (ग्रंथ,वाक्य, इ०). [उद्गार.

भाषित [सं०] वि० बोललेलें. न० भाषण;

भाषी [सं० भाषिन्] वि० बोलणारा (फक्त संस्कृतसमासान्तीं); उ० मधुरभाषी, सत्यभाषी, मितभाषी, इ०.

भाघ्राण [म० भाजणें+घाण] स्त्री० भाजलेल्या किं० जळालेल्या पदार्थास येते ती घाण.

भाष्य [**सं०**] **न०** १ बोलणें. २ सूत्रग्रंथावरील विस्तृत टीका किं० सूत्रांचें विवरण. ३ विवरण (सामान्यतः).ꣳ **भाष्यकार पु०** भाष्य करणारा; ग्रंथावर टीका करणारा.

भास [**सं०**] **पु०**१ तेज; कांति. २ देखावा. ३ अस्पष्ट ऐकिलेला शब्द किं० पाहिलेलें रूप यांवरून मनावर होतो तो संदिग्ध ग्रह; उ० गोविंदा बोलल्याचा मला भास झाला. **स्त्री०** शैली; सरणी.

भांस स्त्री० भात भरडलें असतां त्याचा कांहीं कणांश आणि कांहीं कोंडा यांचें बाहेर पडतें तें मिश्रण.

भांसकटणें, भांसकणें अ०क्रि० गहाळ होणें; भलतीकडे पडणें किं० टाकलें जाणें.

भासणें [**सं०** भास्] **अ० क्रि०** १ प्रतीत होणें; दिसणें; वाटणें. २ संदिग्धरूपें प्रतीत होणें.

भासभूस स्त्री० भिकार वस्तु; सटरफटर.

भासमान [**सं०**] **वि०** १ दिसणारा. २ प्रकाशत असलेला. ३ बाह्यरूपावरून अमुक पदार्थ अमुक असावा असा वाटणारा.

भांसळ [**म०** भांस] **वि०** ज्यांत भरडलेल्या भाताचे कण, कोंडा, चुरा,इ० आहे किं० फार आहे असें (भात).

भांसळणें [**म०** भांसळ] **अ० क्रि०** करड, तांदूळ, इ० भांसळ होणें. वर ' भांसळ ' पहा.

भांसळणें [**म०** ' भिसळणें ' चें एक रूप] **स० क्रि०** मिश्रित करणें. **अ० क्रि०** मिश्रित होणें.

भास्कर [**सं०**] **पु०** सूर्य. **वि०** तेजस्वी.

भास्करी स्त्री० भाकरी (विनोदांत आणि वाटोळेपणावरून आणि वर्णसाम्यावरून).

भाळ [**सं०** भाल] **न०** कपाळ.

भाळणें [**नंदभाषा**] **स० क्रि०** विकणें.

भाळणें अ० क्रि० भुलणें; मोहित होणें; आकृष्ट होणें.

भाळवण मागें ' भलावण ' पहा.

भाळाभोळा [**म०** भोळा] **वि०** निष्कपट, साधा (माणूस, व्यवहार).

भाळी स्त्री० १ बांबूच्या कामट्यांची चौकट (धोतरें इ० पदार्थ ठेवण्यासाठीं टांगलेली). २ बांबूची कामटी. ३ भातेण इ० चा गठ्ठा किं० भारा. ३ देवाच्या मूर्तीवर माळा इ० साठीं टांगलेली बांबूच्या पातींची चौकट.

भिकट, भिकड [**म०** भिणें] **वि०** भितरा; भ्याड.

भिकटणें, भिकुटणें स० क्रि० १ वृक्षाच्या फांदीचीं (पानें) ओरबाडून तोडून काढणें. २ (वृक्षाची फांदी) ओरबाडून पर्णरहित करणें.

भिकणी [**म०** भिकूण=ढेकूण] **स्त्री०** ढेकूण बसावयासाठीं पुष्कळ भोकें पाडलेलें लांकूड. हें लाकूड गादीच्या शेजारीं रात्रीं ठेवतात आणि दुसऱ्या दिवशीं अंगणांत ठोकून त्यांतील ढेकूण बाहेर पाडून मारतात. ' ढेकणी ' **स्त्री०** ह्याच अर्थाचा अधिक प्रचलित शब्द आहे.

भिकणें [**म०** भीक] **न०** १ भीक मागून मिळविलेलें धान्य, पैसा, चिरगूट, इ०. २ जोशी, संत, भिक्षुक, इ० ना श्रीमंत मनुष्य जो स्वयंप्रेरणेनें धर्मादाय करतो तो,–जो सक्तीनें मागतां येत नाहीं. ३ बलुतेदारास दिलें जातें तें धान्य. ४दारिद्र्य;उ०तूं गवत कां नाहीं विकत घेत?लोकांजवळ कां मागतोस ? तुला काय भिकणें लागलें आहे ? ५ जकातीच्या उत्पन्नांतून पतवयाला दिला जातो तो अंश.

भिकबाळी [**म०** भीक+बाळी] **स्त्री०** १ भीक मागून पैसे मिळवून आपल्या मुलाच्या कानांत घातलेलें एक कर्णभूषण. हें पूर्वीं एक नवस म्हणून केलें जात असे. २ पुरुष कानांत असेंच भूषण (स्वताच्या पैशानें) घालतात तें.

भिकार [**म०** भीक] **न०** भिक्षा मागणाऱ्या माणसांचा समुदाय. **वि०** हलक्या दर्जाचा. ꣳ **भिकारखाना, भिकारवाडा पु०** १ गरीबाऊ घर. २ जेथील वसति गरीब लोकांची आहे असा गांवाचा भाग. **भिकारचेष्टा स्त्री०** १ मोठ्या माणसाला न शोभणारे पोरकट चाळे. २ नुकसानकारक धंदा, काम, उद्योग, इ०. **भिकारटोकार न०** भिकारी किं० गरीब लोक समुच्चयानें.**भिकारडा पु०** भिक्षा मागणारा(तुच्छतेनें). **वि०**अल्प किमतीचा(कांहींही पदार्थ,माणूस,पशु). **भिकारचाळा पु०,भिकारखोड स्त्री०**उपद्रवकारक किं०हानिकारक किं० छांदिष्टपणाची कृति, सवय,

किं० सरगी. **भिकारचोट** वि०क्षुद्र;क्षुल्लक;हलक्या किंमतीचा किं० दर्जाचा. **भिकारदासावर हुंडी** स्त्री० बोलून चालून जो दरिद्री त्याच्याजवळ आपल्या अडचणीचे वेळीं पैसे किं० मदत मागणें. **भिकारभोपळा** पु० दरिद्री किं० हतभाग्य माणूस. **भिकार लक्षण** न० दारिद्र्य आणणारें वर्तन. **भिकारलाड** पु० मुलाचे फाजील लाड; जे लाड केले असतां माणूस शेफारेल आणि बिघडेल असे लाड. **भिकाबंद** [म० भिकार+बंद (कागद)] पु० हलक्या दर्जाचा कागद,-पूर्वींच्या काळीं वापरण्यांत असलेला.

भिकारणें [म० भिकारी] अ० क्रि० दरिद्रावस्थेस येणें किं० पोंचणें.

भिकारी [म० भीक] पु० १ भिक्षा मागून चरितार्थ करणारा. २ अगदीं गरीब माणूस. ३ कांहींही क्षुद्र वस्तु.

भिकाळ, भिखाळ, भिक्षाळ, भिक्षावळ [सं०भिक्षा; म० भीक] स्त्री० १मुंजीमध्यें मुंजा-मुलगा ' भवति भिक्षां देहि 'असें वाक्य उच्चारतो आणि त्याला लाडू, फळें,द्रव्य, इ० रूप जी घालतात भिक्षा ती. २ मुंजा मुलाला भिक्षा घालण्याचा विधि किं० समारंभ. ३ मुंज्या मुलाचा पोशाख पालखींत घालून वाजत गाजत देवाला नेण्याची मिरवणूक (नेणें, काढणें)-

भिकुटणें स० क्रि० झाड, फांदी, इ० चीं पानें ओरबाडून काढणें. **टीप,**-झाड, फांदी,ह्यांस कमंता किं० पानांस कमंता.

भिकूट [म० भिणें] वि० भित्रा; भ्याड.

भिकूण पु० ढेकूण.

भिंग न० १ काच. २ तावदान. ३ खाऱ्या पाण्यांतील एक पांढरा मासा.

भिंगरी, भिंगोरी स्त्री०१मध्यांत खुपसलेल्या काडी भोंवतीं गरगर फिरणारी चकती,-मुलांचे खेळणें. २ सूत काढावयाची चाती. ३ कोणतीही चपटी वाटोळी वस्तु. ४ एक वनस्पति,-भोंवरी. ५ह्या वनस्पतींचें फळ. ꣸ **कोणेकाच्या पायावर** (किं० **पायाला**) **भिंगरी असणें** सदा भटकत राहावें अशा स्वभावाचा तो असणें.

भिंगरूट स्त्री०एक क्षुद्र प्राणी. [वणें.

भिंगारणें स० क्रि० दूर फेकून देणें;भिरका-

भिंगारा पु० १ वाटोळी गति; चक्राकार फिरणें; आसाभोंवतीं फिरणें. **भिंगारे, गाडेभिंगारे** पु० अ० व० १ स्वताभोंवतीं वाटोळें फिरण्याचा मुलांचा एक खेळ. २ मोठी भिंगरी. मागें ' भिंगरी ' पहा.

भिंगोरी स्त्री० मागें ' भिंगरी ' पहा.

भिंगोळ न० शाडूसारखी एक प्रकारची माती. ती भाजून पांढरा रंग करतात.

भिजका, भिजकट भिजट [म० भिजणें] वि० किंचित् भिजलेला.

भिजण [म० भिजणें, भिजविणें] स्त्री० भिजत घातलेली डाळ, हरभरे, पावटे, इ०,-उसळीसाठीं,भाजींत घालण्यासाठीं,किं०तळण्यासाठीं.

भिजणें अ० क्रि० १ पाणीं, दूध, ताक, इ० पातळ पदार्थांनीं वस्त्र, भाकरी, कागद, इ०ओला होणें. २ भक्कम पायावर धंदा, काम, व्यापार, इ० स्थापित होऊन फायदेशीर होण्याच्या पंथास लागणें. ꣸ **भिजत कांबळें** (किं०**घोंगडें**) न० फार दिवस निकालास न लागलेली किं० लाविलेली काहीं गोष्ट, काम, वाद, इ० (पडणें, टाकणें).

भिजपाऊस [म०भिजणें, भिजविणें+पाऊस] पु० विपुल पाऊस. याच्या व्यावर्तकत्वें ' फटकाऱ्याचा पाऊस. '

भिजवण [म० भिजविणें] न० १ खरकटीं भांडीं इ० ना चिकटलेलीं शितें इ०.लवकर आणि सुलभ रीतीनें खरडून टाकतां यावीं म्हणून त्यांचेवर कांहीं वेळ राख, मांती, इ०चा थर लावितात तो. २ भाकरी इ० टणक किं० कोरडा पदार्थ सुलभ रीतीनें खातां यावा म्हणून ताक, दूध, इ० जें त्याचे बरोबर खावयाला घेतात तें. ३ कोणताही पदार्थ ज्यांत भिजविला जातो तो पदार्थ.

भिजविणें [म० ' भिजणें ' चे प्रयोजक] स० क्रि० पाणी, ताक, दूध, इ० मध्यें (वस्त्र, खाद्य, इ०)ओलें करणें.꣸**कोणेकाचा हात भिजविणें** त्याला लाच देणें.

भिजाणा [म० भिजणें+दाणा] पु० उसळ

इ० साठीं पाण्यांत घालून मऊ केलेले पावटे, मटक्या, इ० प्रत्येक. प्रयोग अ० व०.

भिटीमिटी क्रि० वि० टक लावून (पाहणें).

भिंड न० टोळी; थवा; समुदाय.

भिंडग मागें ' भडंग ' पहा.

भिडण न० लाकडें किं० कडबा यांचा आर्धा भारा; अर्धे कवाड.

भिडणें [हिं०] अ० क्रि० १ चिकटणें; लगटणें. २ जवळ येऊन ठेपणें (समय, दिवस, विधि). ३ कुस्ती, मारामारी, इ० साठीं अवसानांत पुढें सरणें. ४पोशाख इ०नीं सज्ज होणें. **स०क्रि०**१शेजारीं ठेवणें किं०मांडणें.२(एक पदार्थ) दुसऱ्यांत शिरकावणें किं०खुपसणें. ३ धारण करणें (तरवार, पट्टा, पोशाख). ४ घोडा, बैल, माणूस, इ०ना)विशिष्ट कामाला खोगीर इ० सरंजामानें युक्त करणें.

भिडती, भिडलू, भिडू, भिडत्या पु० पुढें ' भेडती ' पहा.

भिडन न० १ बैल इ० च्या पाठीवर लादलेल्या ओझ्याची उजवीकडची किं० डावीकडची बाजू किं० बाजूवर लादलेलें ओझें. २ खोगीर, मूठ, इ०पशूच्या पाठीवर आवळावयाच्या दोरीखालीं ज्या रद्दी चिरगुटांच्या घड्या घालतात त्या समुच्चयानें.

भिडविणें मागें ' भिडणें ' **स० क्रि०** पहा.

भिडसुडणें, भिरसुडणें, विरसुडणें स०क्रि० झाडाच्या फांदीचीं पानें ओरबाडून काढणें. फांदी किं० पानें ह्यांच्याकडे कर्मत्व.

भिडस्त, भिडिस्त, भिडसरू, भिडसारू (-ळू) [म० भीड]वि० १ संकोच बाळगणारा; लोकांचें मन न दुखवावें म्हणून त्यांच्या मतांना मान देऊन त्यांच्या मताप्रमाणें वागणारा. २ लाजणारा; लाजाळू; भिडस्त.

भिडावणें [म० भीड] अ० क्रि० दुसऱ्याचें मन न मोडावें किं० न दुखवावें अशा इच्छेनें प्रेरित होणें.

भिंडी [सं० भिंदपाल, भिंदिपाल =गोफण] स्त्री० गोफण,-दगड दूर फेकावयाचें दोरीचें केलेलें साधन. **भिंडीपाल पु०** गोफणींतून फेकावयाचा दगड. **भिंडीमाळ स्त्री०** ह्याच अर्थी.

भिणें [सं० भी] अ० क्रि० भयानें व्याकुळ होणें; भयानें कचरणें; डरणें.‌ॐ**भित्यापाठीं ब्रह्मराक्षस** भित्र्या माणसाला पदोपदीं भयाचीं कारणें आढळतात. **भिणें भिणें क्रि० वि०** भीत भीत.

भिंत [सं० भित्ति] स्त्री० १ जागेचे दोन भाग करण्यासाठीं किं० रक्षणार्थ जी दगड, विटा, इ० ची रचना करतात ती. २ (**लाक्षणिक**) डोळ्यांस कांहीं कारणामुळें येतें तें अंधत्व. ॐ **भिंतीवरचें लिहिणें न०** घराच्या भिंतीवर स्त्रिया गंध, हळद, कुंकू, इ० नीं काढतात त्या गोपुर इ० च्या आकृति.

भितर, भितरीं, भीतरीं [सं० अभ्यंतर] क्रि० वि० आंत; आंतल्या बाजूस; मध्यें. ह्याचा उपयोग कवितेंतच.

भितरणें [म० भितरा] अ० क्रि० भयानें आक्रान्त होणें; भिणें; दबकणें.

भितरसवाई स्त्री० नफा होईल अशी अपेक्षा असतां नफा न होतां उलटा झालेला तोटा.

भितरा, भित्रा [म० भिणें] वि० भ्याड; भीतीनें मागें हटणारा; दबकणारा.

भिंतळा, भिंताळा पु० सर्पणाचें जाडी लाकूड,-मोठ्या ओंडक्यांतून फोडून काढलेलें.

भिंताड [म० भिंत] न० १ जिच्या माथ्यावर आच्छादन नाहीं अशी भिंत. २ जाडी आणि लांब भिंत. ३ भिंत (तुच्छतेनें).

भिनणें, भिनरणें, भिनारणें, भिंदणें [सं० भिद्] अ० क्रि० १ तेल, पाणी, रंग, शाई, इ० लाकूड, वस्त्र, कागद, इ० मध्यें खोल शिरणें किं० शिरून तेथें पक्केपणीं राहाणें. २(**लाक्षणिक**) उपदेश, स्पष्टीकरण, इ० मनांत ठसणें. ३ औषध, विष, इ० शरीरांत प्रविष्ट होणें किं० संचरणें.

भिन्न [सं०] वि० १ फुटलेला; मोडलेला; तुटलेला; फाटलेला. २ वेगळा; निराळा. ३ दूर असलेला; अलग. ४ उमललेलें (फूल). **पु०** रत्नांतील ऐब किं० दोष. **न०** १ तुकडा; खंड. २ अपूर्णांक.ॐ**भिन्नगुणन न०**अपूर्णांकांचा गुणाकार. **भिन्नघन पु०**अपूर्णांकांचा घन. **भिन्नपरिकर्म न०** अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी, इ० क्रिया. **भिन्नव्यवकलित न०** अपूर्णांकांची वजाबाकी.

भिन्नसंकलन, भिन्नसंकलित न० अपूर्णांकांची बेरीज. **भिन्नभाव पु०** १ मी आणि तूं असा भेद. २ दुजाभाव; परकीपणाची भावना. **भिन्नोदर वि०** आपल्या सावत्र आईचा मुलगा.

भिन्न वि० परमावधीचा; ऐन; गहन; उ० भिन्न काळोख, भिन्न दुपार.

भिंबिरटें, भिंभिरकटें, भिंभिरडें न० सकाळीं उजाडूं लागलें म्हणजे होतें जें झुंजुकमुंजुक तें; प्रातःकाळचा अर्धवट उजेड.

भिभिस्त, भिभीस्त [**म०** भिणें] **वि०** भितरा; भ्याड.

भिमथडी, भिमथड [**म०** भीमा+थड (कांठ)] **स्त्री०** भीमा नदीच्या कांठचा प्रदेश.

भिमावळ [**म०** भीमा + आवलि] **पु०** भीमा नदीच्या कांठचा रहिवासी.

भिरकंडा, भिरकांडा पु०, भिरकंडी, भिरकांडी स्त्री० १ झोकांडी; तोल जाणें. २ चक्कर; व्यर्थ हेलपाटा. ३ सापाचें सरपटत जाणें, कांहीं पदार्थ जमीनीवरून ओढीत नेणें, इ० मुळें जमीनीवर उमटतो तो मार्ग.

भिरकणें, भिरकावणें स० क्रि० जोरानें दूर झुगारून किं० फेकून देणें.

भिरकांडें न० रागाच्या आवेशामुळें आलेलें चक्कर; डोळे फिरणें.

भिरकावणें स० क्रि० वर ' भिरकणें ' पहा.

भिरकुटी स्त्री० लिहिण्यांतील फराटा.

भिरकुडें, भिरकूट न० जोंधळा, बोरू, इ०च्या ताटांतील मऊ भाग.

भिरकें न० १ एक प्रकारची जलद चालूं शकेल अशी हल्की आणि लहान गाडी. २ रागाचा झटका. ३ भोंवळ. ४ भुतानें केलेली पछाडणुक.

भिरगोरें न० १ मुलांचें एक भोंवऱ्यासारखें खेळणें. २ तगादेदार, मूल, इ० चा उपद्रव. ३ त्रासाची स्थिति.

भिरड, भिरंड स्त्री० १ रागाची लहर किं० उसळी. २ वृक्षांस लागते ती कीड.

भिरड, भिरडणें पुढें ' भेरूड, ' ' भेरुडणें ' पहा.

भिरंड स्त्री० एक झाड. **न०** त्याचें फळ.

भिरडी स्त्री० १ रागाची लहर (येणें). २ कोणेकाची भोसंडपट्टी (काढणें, निघणें). ३ रातंबीचें बी. ❀ **भिरंडेल न०** रातांब्यांच्या बियांचें तेल.

भिरभिरी स्त्री० १ भोंवंड; चक्कर; घेरी. २ रागाची लहर.

भिरभिरें न० वाऱ्यानें फिरणारें कागदाचें चक्र,-मुलांचें खेळणें. [उडविणें).

भिररेवडी स्त्री० फजीती; बोऱ्या (उडणें,

भिरसुडणें स० क्रि० १ (झाड) ओरबाडून पर्णरहित करणें. २ झाडाचीं (पानें) ओरबाडून काढणें.

भिराका पु० झपाटा.

भिराडी, भिरिरी स्त्री० रागाचा झटका.

भिलकवडें न० एक पक्षी,-जो जनावराच्या पाठीवरून उडाला असतां त्या जनावराची पाठ मोडते असें अडाणी लोक समजतात.

भिलवडा पु० भिल्ल (तुच्छतेनें).

भिलाण, भिलांव (-वें) पुढें ' भिल्लाण ' ' भिलांव (-वें) ' पहा.

भिलावा, भिल्लावा [**सं०** भल्लातक] **पु०** बिब्बा हें झाड किं० फळ. ❀ **भिलावा** (किं० **भिल्लावा) घालणें** दुसऱ्याच्या कामांत विघ्न उपस्थित करणें.

भिल्ल [**सं०**] **पु०** रानटी लोकांची एक जात किं० त्या जातीचा कोणी मनुष्य. ❀ **भिल्लटी, भिल्लणी, भिल्लिणी, भिल्लीण स्त्री०** भिल्ल जातीची स्त्री. **भिल्लाची हट्टी स्त्री०, भिल्लाण न०** भिल्ल लोकांच्या वसतीचा गांव. **भिल्लांव (-वें) न०** १ भिल्लांनीं केलेली जाळपोळ किं० लुटालूट. २ भिल्लांची टोळी किं० जमाव.

भिंवई मागें ' भंवई ' पहा.

भिवविणें [**म०** ' भिणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** कोणेकाला भीति दाखविणें.

भिंवरथडी [**म०** भीमा + थड] **स्त्री०** भिंवरा, भिमा, किं० भीमा ह्या नदीच्या कांठाच्या संनिधीचा प्रदेश. **वि०** ह्या प्रदेशांतील (घोडा इ०).

भिशी स्त्री० खाणावळ.

भिसटी [म० भांस] **स्त्री०** केशांची बट किं० जटा.

भिसळ, भसळ[सं०मिश्रण] **स्त्री०**१मिश्रण.२ मिसळलेपणाची स्थिति. ३ पदार्थाच्या भरतीला ज्यास्ती जें घातलें तें.४मंडळींची जूट किं०आड्डा.

भिसळणें [म०भिसळ] **स० क्रि०**मिश्र करणें. **अ० क्रि०** मिश्र होणें.

भिसाळ, भिसाळ [**म०** भांस]**वि०**केसाळ.

भिसें न० कमळाची देठी.

भिस्त स्त्री० १ पाठिंबा; आधार. २ टेका; भरंवसा; मदार.

भिस्ती [**फा०** बेहेष्ती] **पु०** पखाल किं० मसक ह्यांत पाणी वाहून नेऊन चरितार्थ करणारा.

भिस्मिल्ला [**अ०**बिस्मिल्लाहिर्रह्मान् इर्रहीम् =दयाळू आणि कनवाळू अल्लाच्या नांवानें] **पु०** १ मुसलमान लोकांत मुलाच्या आणि मुलीच्या वयाच्या पांचव्या वर्षी घोड्यावरून मिरवणूक काढून मशीदींत नेऊन 'बिस्मिल्ला' शब्दानें सुरू होणारीं कलमें त्यांना पढवितात तो विधि. २ (**मराठींत**) मंत्र म्हणून विधिपूर्वक हत्या करणें. ३ एकंकार; गोंधळ; गुंतागुंत; अव्यवस्था. ❀ **कांदा चिरायला भिस्मिल्ला कशाला ?** सहज करतां येईल अशा गोष्टीबद्दल व्यर्थ खटाटोप किं० अवडंबर माजवूं नये.

भिहूड [**म०** भिणें] **वि०** भितरा; भ्याड.

भिक्षा [**सं०**] **स्त्री०** १ आपला हक्क नसतां आपण दुसऱ्या जवळ कांहीं मागणें, किं० आपण मागितलेली वस्तु,किं०दुसऱ्यानें आपणास दिलेली वस्तु (मागणें, देणें).२काकुळतीनें दुसऱ्याजवळ केलेली प्रार्थना किं० मागणी. ३स्वामी, संन्यासी, इ० कास दिलेलें भोजन. ❀ **भिक्षावृत्ति स्त्री०** भिक्षा मागून राहाणें. **भिक्षावळ, भिक्षाळ स्त्री०** १ मुंजीमध्यें मुंजा मुलगा 'भवति भिक्षां देहि' हें वाक्य म्हणतो आणि नंतर त्याला लाडू करंज्या, इ० जें देतात तें. २ ह्या विधीच्या संबंधाची मिरवणूक. **भिक्षेश्वरी स्त्री०** भिक्षा मागून राहणें. **भिक्षेकरी पु०** भिकारी.

भिक्षु [**सं०**] **पु०** १ भिकारी. २ संन्यासी.

भिक्षुक [**सं०**] **पु०** श्राद्ध, पक्ष, श्रावणी, पूजा, इ०चा संकल्प सांगून चरितार्थ करणारा ब्राह्मण. ह्याच्या व्यावकर्तकत्वें 'गृहस्थ'. ❀ **भिक्षुकांची धाम स्त्री०**भिक्षुक मंडळी. **भिक्षुकी स्त्री०** भिक्षुकाची वृत्ति.

भीक [**सं०** भिक्षा] **स्त्री०** १ दुसऱ्यावर आपला कांहीं हक्क नसतां जें मागणें तें; भिक्षा; याचना. २ उणीव; टंचाई; कमीपणा; उ० आमच्या येथें सर्वच गोष्टींची भीक आहे. ❀ **भीक काढणें** १ विपन्न किं० दरिद्री स्थितींत आयुष्य कंठिणें. २ उपवासाच्या यातना सोसणें. एकादी वस्तु न मिळाल्याकारणानें अडचण किं० गैरसोय सोसणें. **भीक न घालणें** १ न वचकणें; न दबकणें. २ कोणेकाची विनंती मान्य न करणें. **कोणेकाला भीक लागणें** त्याला कमताई असणें. **भिकेचे डोहाळे पु० अ० व०** दारिद्र्य आणणाऱ्या गोष्टी किं०त्यांचेकडे प्रवृत्ति. **भिकेची हंडी शिंक्यास चढत नाहीं** जो मनुष्य भिकेच्या अन्नावर पोट भरतो, त्याच्या जवळ अन्न शिंक्यावर झाकून ठेवण्याइतकें विपुल असावयाचें नाहीं. त्याला थोडेंच मिळणार आणि त्याला जें मिळणार तें सारेंच तो खाणार; तेव्हां अन्न शिलकीस कसें पडणार ? **भीक नको पण कुत्रा आटोप** मजवर उपकार करावयाचें तुझ्या मनांत नसलें तर करूं नको, पण निदान अपकार तरी करूं नको. **भीक असून दारिद्र्य कां ?** भीक मागण्याचा मार्ग मोकळा असतां अडचण कां सोसावी ? दहा घरीं भिक्षा मागून पुरेसें अन्न मिळालें नाहीं तर बेलाशक पंचवीस घरीं भिक्षा मागावी, त्याला काय हरकत आहे ? **सदा पीक सदा भीक** एकापेक्षां अधिक वेळां कांहीं जमीनींतून पीक काढीत असतात, पण तें पीक तुटपुंजें असल्याकारणानें मालकास नेहमीं अडचण सोसावी लागते. **तुला काय भीक लागली आहे ?** तूं पूर्णपणें समर्थ आहेसच; तुला कमतरता नाहीं. **पदार्थाला भीक लागणें** तो दुर्मिळ होणें किं० असणें. **भिकेची भाकरी आणि ह्मणे शिळी कां ?** भिक्षा मागून जें मिळालें असेल त्यांत दोष काढणें हा निर्लज्जपणा होय. भीक मागावयाची आणि दात्यानें दिलेली वस्तु चांगली नाहीं म्हणून त्याला दोष द्यावयाचा हें निंद्य

होय. **भीक मागत्याला दहा घरें** एका दात्यानें भिक्षा घातली नाहीं तर भिकाऱ्याला काय अडचण ? त्याला दहा घरें हिंडून इष्ट वस्तु मागतां येतेच येते. **भिक्षेवर कोठें श्राद्ध होतें ?** अपुऱ्या साधनसामग्रीवर मोठें कार्य होऊं शकत नाहीं. **भीकदुःख** न०, **भीकवरी** स्त्री० भिक्षा मागण्याचा धंदा. **भीकबाळी** मागें 'भिकबाळी' पहा.

भीज [म० भिजणें] स्त्री० उसळीसाठीं भिजत घातलेले सजगुरे.

भीड [म० भिणें] स्त्री० १ दुसऱ्याच्या इच्छेच्या उलट आपण वागलों असतां त्याला तें आवडणार नाहीं अशा भावनेमुळें आपल्या मनावर पडतें तें दडपण; संकोच. २ भिडस्तपणा. ३ भीति. ४ आग्रह. ५वशीला. ६वचक.ꕥ **मला भीड तुटत नाहीं** कोणी मला विनंती केली असतां ती अमान्य करणें माझ्या जिवावर येतें. **कोणेकाची भीड तोडणें** त्याणे केलेली विनंती अमान्य करणें. **भीड घालणें,भिडस घालणें** आग्रहपूर्वक विनंती करणें; गळ घालणें;त्याला अनुकूल करून घेण्यासाठीं त्याची विनवणी करणें. **भीड खर्चणें** आपल्या विषयीं दुसऱ्याच्या मनांत जो आदर आहे त्याच्या जोरावर त्याला कांहीं विनंती करणें. **भिडेला गुंतणें** दुसऱ्याची विनंती अमान्य करावयाला भिणें; संकोच बाळगणें; कचरणें. **एकाद्याची भीड राखणें** त्याचा मान ठेवणें; त्याच्याशीं उर्मटपणानें न वागणें. **भीड भिकेची बहीण** भिडेला गुंतून जर आपण एकाद्याची भलतीच विनंती मान्य केली तर तेणें करून आपलें मोठें नुकसान होतें किं० आपणास फार अडचणी सोसाव्या लागतात.**भीड धरणें** लाजणें; भिऊन असणें; वचकून असणें. **भीड चेपणें** परिचयाच्या योगानें भीति किं० दरारा नाहींसा होणें किं० कमी होणें. **भीडकर, भीडकरी, भीडसर, भीडसारू, भिडस्त, भीडसरू, भीडसाळू, भीडशीळ** वि० दुसऱ्याची भीड धरणारा; लाजाळू; मर्यादशील; संकोच बाळगणारा. **भीडभाड, भीडमुरवत, भीडमर्यादा, भीडभीक** स्त्री० भिड; भीति; संकोच; दरारा.

भीत [सं०] वि० भ्यालेला; कचरणारा. ꕥ **दिवाभीत** पु० घुबड.

भीम [सं०] वि० भयंकर. पु० १ पांच पांडवांपैकीं दुसरा. २ भयंकर माणूस. ३ ज्याचा आहार फार मोठा असा माणूस. ꕥ**भीमपाक** पु० तेलकट आणि तिखट खाद्यें समुच्चयानें. **भीमसेन** पु० पांच पांडवांपैकीं धर्मराजाच्या खालचा. **भीमसेनी एकादशी** स्त्री० माघ शुद्ध एकादशी हा दिवस. **भीमसेनी ऊद** पु० तांबूस वर्णाचा ऊद. **भीमसेनी कापूर** पु० कापराची एक जात.

भीरु [सं] वि० १ भिणारा; उ० पापभीरु. २ भितरा. स्त्री० १ भितरी स्त्री. २ स्त्री,–जी जात्या भितरी असते.

भील [सं० भिल्ल] पु० मागें 'भिल्ल'

भीषण [सं०] वि० भयंकर. पु० भयानक रस.

भीष्म [सं०] वि० भयंकर. पु० १ चंद्रवंशीय शंतनुराजास गंगेपासून झालेला पुत्र. यानें लहानपणीं पित्याच्या इच्छेसाठीं राज्यावर न बसण्याची शपथ वाहिली आणि तो आमरण ब्रह्मचारी राहिला. यावरून भीष्मप्रतिज्ञा म्हणजे कधीं भंग न पावणारी प्रतिज्ञा असा अर्थ रूढ झाला. २ (**साहित्य**) भयानक रस. ꕥ **भीष्माष्टमी** स्त्री० माघ शुद्ध अष्टमी हा दिवस.

भीस स्त्री० १ कुत्रा, बोकड, इ० चे लांब केश. २ (**लाक्षणिक**) लांब वाढलेले डोईचे केश किं० दाढी (निंदेंत).

भूई [सं० भूमि] स्त्री० १ जमीन; पृथ्वीचा पृष्ठभाग. २ घरांतील चोपून केलेली जमीन. ३ शरीराचा बांधा. ꕥ **भूईकोट** पु० सपाट जमीनीवर बांधलेला किल्ला. गड म्ह० डोंगरावर बांधलेला किल्ला. जंजिरा म्ह० समुद्रांत किं० समुद्राशेजारीं बांधलेला किल्ला. **भूईघर** न० १ तळघर. २ घराचा तळमजला. **भूईचार** स्त्री० गुरांच्या उपयोगाचें गवत. **भूईचा लहान** वि० ठेंगणा (माणूस, पशु).**भूईठाकूर** पु० ठेंगणा माणूस (निंदेंत). **भूईदेणें** न० जमीनीचें भाडें. **भूईनळा** पु० आतिषबाजीचा एक पदार्थ,–हा पेटविला असतां यांतून रंगीबेरंगी दारूचीं फुलें उडतात.

भूईपारणें न० जमीनीवर खायें मांडून केलेलें भोजन. हें एक व्रत आहे. **भुईमूग** पु० जमीनीच्या पोटांत ज्याला शेंगा येतात असें एक झाड. **भूईभाटलें** न० वरकस पिकें जींतून बहुधा काढलीं जातात अशी जमीन. **भूईभाडें** न० दुसऱ्याच्या मालकीच्या जमीनीवर घर इ० बांधलें असतां मालकाला द्यावें लागतें तें भाडें. **भूईमाडा** पु० आपल्या आपण रुजलेला माडा. **भूईचांफा** पु० पानें फुटावयाच्या आधीं जमीनींतूनच ज्याला फुलें येतात असें एक फुलझाड. **भूईसरपट** वि० जमीनीला पूर्णपणें किं० अर्धवट किं० मधून मधून लागलेला. **भूईसांड** क्रि० वि० जमीनीपासून थोडेसें वर. **भूईसर** न० घराची जमीन. **भूईसर** क्रि० वि० जमीनीवर. **भूईभाग** पु० प्रत्यक्ष पैशाच्या बद्दल उत्पन्नाचा सरकार इ०नीं घेतलेला भाग. **भूई उकरणें** लज्जेनें पायाच्या बोटांनीं जमीनीवर रेघा काढणें. **भूईचा सावरणें** कठिण आजारांतून बरें होऊन उठणें. **भूईंत जाणें** १ आजार, खाण्यापिण्याची आबाळ, इ० मुळें खचत किं० खंगत जाणें. २ खुरटणें; खुजट होणें. **भूई बोंब देऊन उठते** गुन्हा कितीही गुप्तपणें केलेला असला तरी तो उघडकीस येतोच येतो.

भुक् [सं० भुज्=खाणें] वि० खाणारा. संस्कृत समासांतीं; उ० वायुभुक् म्ह० सर्प;आखुभुक् म्ह० मांजर किं० साप; इ०.

भुकटा पु०,**भुकटी**,**भुकी**,**भुकणी** स्त्री०चूर्ण.

भुकड, भुक्कड [म० भूक] वि० १ भुकेला आणि विपन्न. २ टाकाऊ; कुचकामाचा.

भुंकणें, भोंकणें [सं० बुक्कन=कुत्र्याचें ओरडणें] अ० क्रि० (कुत्र्याचें) ओरडणें.

भुकंदा, भुकांदा, बुकांदा पु०बुक्कीचा रट्टा.

भुका, भुकेला, भुकाळ [म० भूक] वि० ज्याला भूक लागली आहे असा.

भुका, बुका, बुक्का पु० नागरमोथा, वाळा, कचोरा, इ० द्रव्यांचें सुगंधी चूर्ण.

भुकाळू [म० भूक] वि० ज्याला सदा भूक लागलेली असते आणि जो खात असतो असा.

भुकिस्त [म० भूक] वि० १ फार भूक लागली आहे ज्याला असा. २ गरजू; ज्याला पदार्थविशेषाची फार जरूरी आहे असा. ३ कमी पीक देणारी (जमीन). ४ जेथें किं०ज्यांत नफा, मिळकत, नोकरी, इ० मिळण्याचा संभव नाहीं असा (गांव, धंदा,खटपट,इ०). ५ टाकाऊ, कुच किमतीचा (माणूस, पदार्थ).

भुकी स्त्री० चूर्ण.

भुकी [म० भूक] वि० दोन घास कमी खाऊन जेवण जेवतो असा; उ० भुकी तो सुखी.

भुकेकंगाल, भूकेबंगाल [म०भूक+कंकाल (अस्थिपंजर)] वि० १ पोटभर ज्याला खावयास मिळत नाहीं म्हणून जो रोड झाला आहे असा. २ अत्यन्त दरिद्री;अकिंचन.

भुकेजणें [म० भूक] अ० क्रि० १ क्षुधेनें जर्जर होणें; खाण्याला अधीर झालेलें असणें. २ पदार्थविशेष उत्कंठेनें इच्छिणें. ' भुकेणें ' ह्याच दोन्ही अर्थीं कवितेंत येतें.

भुकेला, भुकेजला [म० भूक] वि० १ ज्याला भूक लागली आहे असा; क्षुधित. २ जी वस्तु ज्याला अति आवडते तो तिच्यासंबंधानें; उत्सुक; उत्कंठित.

भुक्कड मागें ' भुकड ' पहा.

भुक्त [सं०] वि० १ खाल्लेलें. २ उपभोगिलेलें; वापरलेलें. ३ ग्रह इ० आकाशस्थ गोलानें आक्रमिलेला(मार्ग).

भुक्ति [सं०] स्त्री० १ खाणें. २ उपभोग. ३ शेत, घर, इ० चा उपभोग किं० ताबा. ४ अन्न. ५ ग्रहाची रोजची गति. ॐ **अगोदर भुक्ति मग भक्ति** आधीं जेवून घ्यावें मग स्वस्थपणें देवाची भक्ति करावी.

भुगती भागती स्त्री० मागें ' भागती भुगती ' पहा.

भुगा पु०, **भुगी** स्त्री० चूर्ण; पूड.ॐ **भुगाभागा** पु० १ चुरा. २ वस्तूचा चुरगळा. ॐ **भुगराळा** [म० भुगा] पु० १ चुरा; चूर्ण; पीठ. २ कागद, वस्त्र, इ० पदार्थांचा चोळामोळा. ३ अतिकष्टामुळें शरीराची झालेली दुर्दशा.

भुंगा [सं० भृंग] पु० १ एक प्रकारचा काळा उडणारा किडा; भ्रमर. २ स्त्रियांचें ह्या

किड्याच्या आकाराचें एक शिरोभूषण. **कोणे-काच्या मागें भुंगा लावणें** कांहीं कामाबद्दल त्याच्या मागें तगादा लावणें.

भुगी स्त्री० चूर्ण; पूड.

भुज [सं०] पु० १ बाहु. २ हात. ३ त्रिकोण इ० भौमितिक आकृतींची एक बाजू. ४ काट-कोण त्रिकोणाचा पाया म्ह० खालची बाजू. दुसऱ्या दोन बाजूंस ' कर्ण ' आणि ' कोटि ' अशीं नांवें आहेत. ५ वाकण; वाक; वक्रता. ६ राशिचक्रामध्यें नव्वद अंशाहून कमी किं० परा-काष्ठा नव्वद अंश हें प्रमाण. ॐ **भुजांतर न०** छाती. **भुजप्रतिभुज पु०** चौकोनाच्या समोरा-समोरच्या दोन बाजू. **भुजबल न०** शरीर-सामर्थ्य (युक्ति, कावा, इ० च्या व्यावर्तकत्वें). **भुजभोंवरी स्त्री०** घोड्याच्या खांद्याजवळचा केशांचा भोंवरा.

भुजंग [सं०] पु० १ सर्प. २ नाग. ३ जार, विट. ४ (**ज्योतिष**) आश्लेषा. ५ रखेली किं० रांड ज्याणें बाळगिली आहे असा. ६ उग्र आणि तामसी प्रकृतीचा माणूस.

भुजपत्र, भुजिपत्र [सं० भूर्जपत्र] **न०** १ भूर्ज नांवाच्या झाडाची अंतरसाल. २ (**लक्ष-णेनें**) अत्यन्त जीर्ण वस्त्र, कागद, इ०.

भुजरी स्त्री० भात, गहूं, इ० चे अंकुर. ॐ **भुजऱ्या स्त्री० अ० व०** श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस लहान भांड्यांत लाविलेलें गहूं, भात, इ० चें शेत डोक्यावर घेऊन मिरविणें हा पर-देशांचा उत्सव.

भुजवट न०, पु०, भुजवटा पु० [सं०भुज] १ खांद्याचा सांधा. २ पाटणीच्या दोन कड्यांचीं टोकें जोडणाऱ्या दोन फळ्या प्रत्येक.

भुजा [सं०] स्त्री०खांद्यापासून पंजापर्यंतचा हात; बाहु.

भुंजारी, भुजारी, भुजारा पु० लाह्या, पोहे, चुरमुरे, इ० पदार्थ करणारा.

भुजिपत्र न० मागें ' भुजपत्र ' पहा.

भुजोटा, भुजवटा [सं०भुज] **पु०** खांद्याचा सांधा. वर ' भुजवट ' पहा.

भुटा, भुट्टा [हिं०] पु० मक्याचें कणीस. ॐ **भुटाचोर, भुट्टेचोर पु०** १ क्षुल्लक, हलक्या, किं० किरकोळ वस्तु चोरणारा चोर; भामट्या. २ समर्थाची लाळ घोटून क्षुल्लक वस्तु मिळवि-णारा स्वाभिमानशून्य माणूस.

भुडकी स्त्री०नदीच्या कांठीं पाणी सांचवून शेतांत पाणी नेण्यासाठीं केलेला खड्डा.

भुडभुड गंगा स्त्री०१ घाईघाईनें किं०थोड्या पाण्यानें केलेलें स्नान.२अंघोळ(मुलांच्या भाषेंत).

भुंडा वि० १ मागें वळलीं आहेत शिंगें ज्याचीं असा (पशु,-गाय, म्हैस, बैल, इ०). २ जेथें जें असावयास पाहिजे तेथें तें नाहीं असा (बांग-ड्यांवांचून हात, नथेवांचून नाक, शेंडीवांचून डोकें, सामानाशिवाय घर, इ०). ॐ **भुंडा शेर, पायली,** इ० एकही दाणा ज्यास्ती नाहीं असा धान्यादींचा शेर, पायली, इ०. **भुंडीगाय स्त्री०** १ शिंगें नसलेली गाय. २जिचीं शिंगें मागें वळलीं आहेत अशी गाय. ३(**लक्षणेनें**) गरीब, निरुपद्रवी माणूस.

भुतंडा, भुतांडा [म० भूत] **पु०** यजमान, तगादेदार, इ० नीं लाविलेला तगादा.

भुता, भुत्या पु० भवानी देवीचा भक्त.

भुताटकी [म० भूत] **स्त्री०** १ कोणेक स्थळीं भुतांचा संचार. २ आश्चर्यकारक प्रकार; जादुगिरीचा प्रकार; ज्याचा उलगडा करतां येत नाहीं असा कांहीं प्रकार. ३ भुताला संचार करावयास लावणें. **वि०** भुतांना खेळविणारा. ह्या अर्थीं ' भुताटक्या ' सुद्धां.

भुताटणें [म० भूत] **अ० क्रि०** १ भुताचा अंगांत संचार झाल्यामुळें वेड्यासारखें वागणें. २ हट्टीपणानें किं० हेकटपणानें वर्तणें.

भुतांडा मागें ' भुतंडा ' पहा.

भुतारा [म० भूत] **पु०** भुताला खेळवि-णारा; कोणेकाच्या अंगांत शिरलेलें भूत काढ-णारा; कोणेकाविरुद्ध भुताला उठविणारा.

भुतारी स्त्री० १ काटक्याकुटक्या, शिंदीच्या किं० माडाच्या पाती इ० ची केरसुणी. २ मुठी-पर्यंत झिजलेली केरसुणी.

भुतावळ, भुताळ स्त्री०, भुताळें न० [म० भूत+आवलि (पंक्ति)] १ भुतांची टोळी. २ हलकट, पाजी, चोर, लुटारू, इ० ची टोळी.

भुतावळ [म० भूत] **स्त्री०** १ नळे, चंद्र-

ज्योती, फटाकडे, इ० आतिषबाजीचे पदार्थ एकदम पेटवून होणारा देखावा. २ वर 'भुतावळ' चे दोन्ही अर्थ पहा.

भुतावें [**पोर्तुगीझ** बुताम्] **न०**बंडी, कोट, इ० बांधावयाचें बिरडें किं० गुळखी.

भुताळा (**–ळ्या**)**पु०** भुतांना खेळविणारा.

भुतेरा पु० वर 'भुतारा' पहा.

भुतोंडी [**म०** भूत+ उंडी] **स्त्री०** पंचमहाभूतांना द्यावयाचा बळी.

भुत्या [**म०** भूत] **पु०** भवानी देवीचा भक्त. ❀ **भुत्याचें झाड न०** एक प्रकारचें झाड. ह्याचें लाकूड भुरुं भुरुं जळतें,–जणों काय त्याच्या अंगांत भूत संचरलें आहे.

भुदगा पु० १ करपलेलें अन्न (भात,भाकरी, इ०). २ पदार्थांची जीर्ण स्थिति (वापरून किं० कृमिकीटांना खाऊन).

भुपकार पु० १ माकडें, वानर, इ० ची गर्जना. २ आवई, अफवा, वदंता (उठणें).

भुपाळी स्त्री० १एक रागिणी.२ह्या रागिणींत रचलेलें प्रातःकाळीं म्हणावयाचें पद.

भुभुःकार पु० माकडें, वानर, इ०च्या किंचाळ्या. [इच्छा; भूक.

भुभुक्षा [**सं०** बुभुक्षा] **स्त्री०** खाण्याची

भुभुक्षित [**सं०**बुभुक्षित] **वि०**ज्याला भूक लागली आहे असा; भुकेनें व्याकुळ झालेला.

भुमकणें [**म०** भुमका] **अ० क्रि०** १ गर्जना करणें. २ (बातमी) पसरणें. [अफवा.

भुमका, भुमकी [**सं०** भूमि] **स्त्री०** बातमी;

भुमका [**सं०**भूमि] **स्त्री०** विशिष्ट स्थलाची अभिमानी देवता.

भुमखान न० टोळ, मुंग्या, पिसवा, यांचा उपद्रवकारक उद्रेक.

भुम्या [**सं०** भूमि] **पु०** १ एकाद्या ठिकाणचा पिढ्यानपिढ्याचा रहिवासी. २ एकाद्या व्यवहारांत पूर्ण मुरलेला किं० माहितगार.

भुयार [**सं०** भू (जमीन)+अगार (घर)] **न०** जमीनींत केलेलें किं० निसर्गांत असलेलें विवर.

भुरकट [**म०** भुरका] **वि०** पांढुरक्या रंगाचा. **क्रि० वि०** अस्पष्टपणें (दिसणें).

भुरकड (**–ट**) **वि०** नापीक (जमीन).

भुरकणें स० क्रि० (पातळ पदार्थ) जोरानें आणि आवाज करून तोंडांत ओढून घेणें. **अ० क्रि०** (वाघानें) गर्जणें.

भुरकणें न० कोंवळा नारळ; शहाळें.

भुरका पु० १ कढी, सार, इ०चा तोंडांत आवाज करून शोषून घेतलेला घोट. २ गुरगुडी, चिलीम, इ०तून तोंडानें एकेवेळीं ओढून घेतलेला धूर किं० ही धूर ओढून घेण्याची क्रिया (मारणें, घेणें). ३ तांबड्या मिरच्यांचें चूर्ण. ४ (भिक्षुकांच्या भाषेंत) एक रुपाया. ५ 'बुरखा' चा अपभ्रंश.

भुरका वि० मळकट पांढरा किं० पिवळा.

भुरकाड न० १ जल्द जळणारें सर्पण (गवत, पानें, वाळलेल्या काटक्या, इ०). २ जेथें पाणी टिकत नाहीं अशी माळ जमीन किं० अशा जमीनीवरचें पीक. [कुटक्या.

भुरकाडी (**–ळी**) **स्त्री०**वाळलेल्या काटक्या-

भुरकी स्त्री० १ घोड्याचें सर्व अंग झाकावयासाठीं शिवून तयार केलेलें आच्छादन. २ गाडी, पालखी, मेणा, अंबारी, इ० चें आच्छादनवस्त्र. ३ रथादिकांचा घुमट.

भुरकूट न० वाळलेली आणि हलकी काठी, लाकूड, इ०.

भुरकूल न० मागें 'बुरकूल' पहा.

भुरंगुली स्त्री०, भुरंगुलें न० भात, जोंधळा, इ०ची लाही.

भुरडी, भोरडी स्त्री० एक पक्षी.

भुरदंड [**सं०** भूरि (पुष्कळ) +दंड] **पु०** विनाकारण दुसऱ्यास द्यावा लागतो तो पैसा; आपला कांहीं अपराध नसतां खर्चावा लागतो किं० द्यावा किं० भरावा लागतो तो पैसा,(पडणें, होणें, बसणें,इ०).**टीप**,–'भूर्दंड'हें अधिक प्रचालित रूप.

भुरभुसा पु० १ लाकूड करवतण्यानें पडतें तें पीठ.२वाळव्यांनी लाकूड खाल्ल्यानें उत्पन्न होतें तें पीठ. [इ०).

भुरली स्त्री० एक पक्षी.

भुरली स्त्री० फजीती, बोऱ्या (उडणें,करणें,

भुरलें न० फार जुन्या तांदुळांत किं० भातांत उत्पन्न होतो तो पंखाचा कीट.

भुरवणी स्त्री॰ जमीन चोपावयाचें लहान चोपणें. **भुरवणें न॰** जमीन चोपावयाचें मोठें चोपणें.

भुरशी स्त्री॰ मागें ' बुरशी ' पहा.

भुरळ स्त्री॰, भुरळें न॰ कोणी आपणावर मंत्रप्रयोग केला असतां किं॰ कोणी आपणाशीं गोड गोड भाषण केलें असतां आपणाला पडतो तो मोह (पडणें, पाडणें).

भुरळ न॰ पातळ ढग (येणें,जमणें).

भुरळणें अ॰ क्रि॰ १ दुसऱ्याच्या गोड भाषणानें मोहित होणें. २ ढग वाऱ्यानें नाहींसे होणें. **स॰ क्रि॰** १ भोकांत खिळा, खुंटी, इ॰ घालून वाटोळें फिरवून (भोक) मोठें करणें. २ (अक्षर, रेघा, इ॰)लेखणी, कलम, इ॰ नीं गिरवून बोजड किं॰ जाडी करणें.

भुरळणें न॰ भोक मोठें करावयासाठीं भोकांत घालून फिरविलेलें खिळा,खुंटा,इ॰साधन.

भुरळें न॰ मागें ' भुरळ ' **स्त्री॰** पहा.

भुरा पु॰१करवतानें पडलेला कीस.२किड्यांनीं लाकूड खाल्ल्यानें पडतो तो भुसा. ३ बुरशी.

भुरा [हिं॰] वि॰ तांबूस किं॰ पांढरवट.

भुराडा, भुराटा पु॰ १ गवत जळणें, पुष्कळ पक्षी एकदम उडणें, इ॰ चा आवाज. २ पुष्कळ पक्ष्यांचें एकदम उड्डाण. ३ संपत्तीचा भराभर होऊं लागलेला नाश. ४ कामाची घाई किं॰ गडबड.

भुरी स्त्री॰ १ लाकूड, गोवरी, इ॰ ची पांढरी राख. २ बुरशी. ३ डोळ्यांवर जमतो तो साका.

भुरुंभुरुं क्रि॰ वि॰ वेगानें (गवत, कागद, इ॰) जळणें, पुष्कळ पक्षी एकदम उडून जाणें, डोकीचे केश वाऱ्यावर उडणें, जमलेलीं माणसें निघून जाणें इ॰).

भुरेरें न॰ कोणाच्या गोड भाषणानें किं॰ प्रेमळ वर्तनानें कोणेकाला पडतो तो मोह (घालणें, पडणें).

भुऱ्यावणें अ॰ क्रि॰ अति उत्कंठेनें किं॰ फाजील घाईनें आक्रान्त किं॰ जर्जर होणें.

भुलणें [हिं॰ भूलना] अ॰ क्रि॰ १ मोहित होणें. २ फसणें. ३ दारू इ॰ च्या निशेनें मूढ होणें. ४ संपत्ति, अधिकार, इ॰ मुळें कर्तव्य विसरून भलत्याच मार्गाकडे वळणें. ५ विसरणें.

भुलथाप [म॰ भूल + थाप] स्त्री॰ कोणी कोणेकाला फसविण्याच्या उद्देशानें दिलेलें खोटें आश्वासन, किं॰ सांगितलेली खोटी बातमी किं॰ खबर.

भुलवण [म॰ भुलविणें] स्त्री॰मोह पाडणें; फसविणें; खोटें आश्वासन (घालणें, पडणें).

भुलविणें [' भुलणें ' चें प्रयोजक] स॰ क्रि॰ खोटी बातमी सांगून किं॰ खोटें आश्वासन देऊन किं॰ गोड गोड बोलून (कोणेकाला) फसविणें किं॰ वश करून घेणें किं॰ मोह पाडणें.

भुलाई [म॰ भुलणें; भूल] स्त्री॰ फसवणूक.

भुलाभटका [म॰भुलणें+भटकणें]वि॰ रस्ता चुकून भटकत राहिलेला (माणूस, पोर, गुरूं, इ॰).

भुली [म॰ भुलणें] स्त्री॰ संभ्रांतपणाची स्थिति; मोह; भुरळ. ꕥ **भुलीचें झाड न॰** मोह पाडणारा पिशाचाचा झटका (भेटणें).

भुलोबा [म॰ भुलविणें] पु॰ पाखरें, गुरें, इ॰ ना भीति वाटण्यासाठीं शेत इ॰ मध्यें उभें करतात तें माणसाच्या रूपाचें बाहुलें; बुजगावणें.

भुंवई स्त्री॰ डोळ्याच्या वर आणि कपाळाच्या अधोभागीं असते ती केशपंक्ति.

भुवन [सं॰] न॰ १ जग; लोक. २ देवांनीं किं॰ माणसांनीं व्यापिलेला प्रदेश.

भुंशी, भुशी स्त्री॰ धान्याचा कोंडा किं॰ टरफल.

भुसकट [म॰भूस]वि॰१ ज्यांत कोंडा फार आहे असें (धान्य, तांदुळ, इ॰). २ किटांनीं खाल्ल्यामुळें ज्यांतून पीठ पडत आहे असें (लाकूड). ३ भिकार, टाकाऊ, अल्प किमतीचा (पदार्थ). **भसकट, भुसकुट न॰, भुसकटा पु॰ [म॰ भूस]** १ धान्यादींचा कोंडा, तूस, टरफल, इ॰. २ कीटकांनीं खाल्लेल्या लांकडांतून पडतें तें पीठ. ꕥ **काणेकाचें भुसकट (किं॰ भुसकूट किं॰ भुसकटा) पाडणें (किं॰ काढणें)** त्याला कामाखालीं जेरीस आणणें किं॰ जर्जर करणें.

भुसका वि॰ वर ' भुसकट ' **वि॰** पहा.

भुसकापुरी स्त्री॰ मागें ' भसकापुरी ' पहा.

भुसकुरा [म० भूस पु० १ लाकूड करवतून पडतें तें पीठ. २ किड्यांनीं लाकूड खाल्लें असतां पडतें तें पीठ.

भुसडा, भुसंडा पु० १ फार वापर पडल्यामुळें वस्त्र, पदार्थ, इ० चीं होते ती दुर्दशा. २ फार कष्टामुळें मनुष्य, जनावर, इ० ची दुर्दशा. ॐ **भुसडा खेळ, भुसंडा खेळ पु०** अतिश्रमामुळें किं० फार वापर पडल्यामुळें पशु, माणूस, पदार्थ, इ० ची होते ती दुर्दशा.

भुसभुशीत [म० भूस]. **वि०** जोंत चिकटपणा किं० आर्द्रता नाहीं अशी (माती); ढिसूळ (दगड इ०); टणक नाहीं अशी (जमीन, खाद्य, इ०).

भुसा [**हिं०** भुसा; **सं०** बुस, बुष] **पु०** कोंडा; भुगा; चूर्ण. ॐ **कोणेकाचा भुसा पडणें** (किं० **पाडणें**) तो कष्टामुळें जर्जर होणें (किं० त्याला जर्जर करणें).

भुसाडा पु० वर ' भुसडा ' पहा.

भुसार [म० भूस] **न०** १ खरेदीविक्रीचा धान्य, गवत, इ० रूप माल. २ वरील प्रकारचा माल विकणारे लोक. ह्या अर्थीं ' भुसारी ' सुद्धां. ॐ **भुसारपेठ स्त्री०** जेथें धान्यें, गवत, इ० मालाची खरेदी विक्री होते असा गांवाचा भाग किं० मोहल्ला. **भुसारमाप न०** लवाडीचें माप. **भुसारमाफी स्त्री०** भुसार मालावरची सरकारी जकात इ० ची सूट. **भुसारी पु०** धान्यें विकणारा. **भुसारें न०** कोंड्याचा ढीग,—कडब्याच्या पेंढ्यांनीं आच्छादिलेला.

भुसी [म० भूस] **स्त्री०** धान्याचा कोंडा. वर ' भुशी ' पहा.

भुसें [म० भूस] **न०** १ धुकें. २ झिरझिर पडणारा पाऊस.

भुळकंडी, भुळकांडी, भुळकुंडी स्त्री० मागें ' बुळकांडी ' पहा.

भुळभुळणें अ० क्रि० (रक्त, पाणी, इ०) संथ प्रवाहानें गळणें किं० वाहणें.

भू [**सं०**] **वि०** (समासान्तीं) असणारा; होणारा; जन्मणारा; उ० मनोभू म्ह० कामविकार. पद्मभू किं० स्वयंभू म्ह० ब्रह्मदेव; इ०. **स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. ३ स्थळ. ॐ **भूपति पु०** राजा. **भूकंप पु०** जमीनीच्या पोटांतील गंधक इ० ज्वालाग्राही पदार्थांच्या पेटण्याच्या धक्क्यानें पृथ्वीचें हालणें किं० हादरणें. **भूगोल पु०** पृथ्वीचा गोल. **भूचंपक पु०** एक प्रकारचें चांफ्याचें झाड. **भूचर वि०** जमीनीवर वावरणारे (प्राणी,—मनुष्य, गाय, इ०). मासे हे जलचर प्राणी. **भूतल न०** पृथ्वीचा पृष्ठभाग. **भूदेव, भूसुर पु०** ब्राह्मण. **भूदेवी स्त्री०** ग्रामदेवता. **भूधर पु०** पर्वत. **भूप, भूपति पु०** राजा. **भूमंडल न०** पृथ्वीचा विस्तार. **भूभार पु०** पातकी लोकांचा पृथ्वीला झालेला भार. **भूरुह पु०** वृक्ष. **भूमिति स्त्री०** १ जमीनीची मापणी. २ जमीन मापणीचें शास्त्र. **भूमितिश्रेढी स्त्री०** गणितांतील एक प्रकारची अंकांची पंक्ति. **भूशलाका स्त्री०** समुद्रांत घुसलेला जमीनीचा अरुंद किं० चिंचोळा भाग.

भूक [**सं०** बुभुक्षा] **स्त्री०** १ खाण्याची इच्छा; क्षुधा. २ लाच मिळावा अशी इच्छा. ३ कोणत्याही वस्तूची इच्छा. ॐ **भूकलाडू पु०** फराळाचे पदार्थ,—प्रवासांत बरोबर घेतात ते. **भूकमोड स्त्री०** १ अत्यल्प मिळालेलें जेवण किं० फराळ. २ जेवावयास उशीर झाल्यामुळें भूक आपल्या आपण शमणें किं० खाण्याची इच्छाच नाहींशी होणें. ३ जेवल्यानें होते ती क्षुधाशांति. ४ भोजन किं० खाणें पुरे व्हावयाच्या अगोदर कांहीं विघ्न येऊन भोजन किं० खाणें बंद पडणें. **भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा** सडकून भूक लागलेली असली म्हणजे कोंड्यासारखा निःसत्त्व पदार्थही रुचकर लागतो; तसेंच झोप येण्याजोगी शरीराची आणि मनाची स्थिति असली म्हणजे धोंड्यावरही मऊ गादीवर निजल्यापेक्षां चांगली झोंप लागते. **भूक धरणें** भूक शमणें; उ० मूठभर चुरमुऱ्यांवर माझी भूक काशी धरेल? मला दोन लाडू दे. **टीप,**—ह्या वाक्प्रचारांत ' धरणें ' अ० **क्रि०**. **भूक धरणें** पुरतेपणीं न जेवणें. **टीप,**—येथें ' धरणें ' **स० क्रि०**. **भूक मारणें** भूक शमेतोंपर्यंत न खाणें; भूक नियंत्रित करणें; भूक आवरून धरणें. **भुकें मरणें** उपाशीं असणें किं० राहाणें.

भूचरी [**सं०**] **स्त्री०** चार योगमुद्रांपैकीं एक; योग्याचें एक संस्थान.

भूत [**सं०**] **वि०** १ झालेला;होऊन गेलेला; गेला जो काळ त्याच्या संबंधाचा. २ सिद्धीस गेलेलें. ३ खरें; सत्य;वास्तविक.भूतार्थ म्ह०खरोखरीं जें घडलें तें.**भूत न०,पु०** पिशाच.**भूत न०** स्थूल पंचमहाभूतें प्रत्येक; पृथ्वी, अप्, तेज,वायु, आणि आकाश, हीं प्रत्येक. २ सत्य गोष्ट. ३ भूत काळ. ४ मृत मनुष्याचा पृथ्वीवर संचरणारा आत्मा. ५ (सोंगट्यांच्या खेळांत) एकदा मरून जिवंत झालेली सोंगटी. ꙳ **एकाद्या घरांत भुतें नाचत असणें** तें ओसाड असणें; तें निर्जन असणें. **भुतें खेतें न० अ० व०** सर्व प्रकारचीं भुतें; उ० त्या घरांत दिवसाढवळ्या भुतेंखेतें नाचत असतात, तेथें कोण रहावयाला जाणार ? **भूतकोलीत न०** स्मशानांत दिसतो तो प्रकाश. **भूतखान न०** पिसकरलेल्या केशांचा पोरगा, पोरगी, किं० स्त्री. **भूतखाना पु०** १ भुतांखेतांच्या संचाराची जागा किं० त्यांनीं चालविलेला गोंधळ; भूतचेष्टा. २ टवाळ आणि खोडकर पोरांची टोळी. ३ ओंगळ किं० केरकचरा जेथें फार आहे अशी जागा. **भूतग्राम पु०** पंचमहाभूतें समुच्चयानें.**भूतचेष्टा स्त्री०**भुतांच्या खोड्या. **भूतदया स्त्री०** प्राणिमात्राशीं दयार्द्रता. **भूतपीडा, भूतबाधा स्त्री०**भुतांनीं दिलेला उपद्रव; भूतानें कोणेकाला पछाडणें. **भूतयज्ञ पु०** भूतमात्रास अन्नांश देणें. हा पंचमहायज्ञांपैकीं एक आहे. **भूतवेळ स्त्री०** ऐन दुपारचा किं० संध्याकाळचा किं० मध्यरात्रीचा समय. **भूतवैद्य पु०** भुतांना खेळविणारा माणूस; अंगांत संचरलेलें भूत काढणारा. **भूतशुद्धि स्त्री०** कोणतेंही धार्मिक किं० मंगल कृत्य सुरू करावयाच्या पूर्वीं देहाच्या शुद्धीसाठीं केला जातो तो विधि.**भूतसंचार पु०** अंगांत भूत येणें. **भूतसृष्टि स्त्री०** १ अकस्मात् नाहींसा होणारा कोणताही देखावा. २ ईश्वरानें उत्पन्न केलेलीं पंचमहाभूतें समुच्चयानें. ३ घरांत ढेकूण, पिसवा, गोचिड्या, इ० प्राण्यांचा एकदम झालेला उद्रेक किं० त्यांचें अकस्मात् नाहींसें होणें.**भूतात्मा पु०**१जीवात्मा. २ ब्रह्मा, विष्णु, महेश. ३ शरीर. ४ परमात्मा. **भूतार्त, भूताविष्ट वि०** ज्याच्या अंगांत भूत संचरलें आहे असा.

भूति [**सं०**] **स्त्री०** १ आस्तित्व. २ जन्म; उत्पत्ति. ३ कल्याण. ४ ऐश्वर्य; समृद्धि; संपात्ति. ५ वैभव; उत्कर्ष; महिमा. ६ अणिमा, महिमा, इ० अष्ट सिद्धि. ७ भस्म; राख.

भूपाळी स्त्री० एक रागिणी किं० ह्या रागिणींत रचलेलीं प्रातःकाळीं म्हणावयाचीं जीं पदें तीं प्रत्येक.

भूभा [**सं**] **स्त्री०** चंद्रग्रहणांत चंद्रावर पडते ती भूमीची छाया.

भूम [**म०** भूमि] **न०** १ मुंग्यांचें वारूळ. २ सोनार लोक लोकांचे दागिने घडवितांना चोरलेल्या सोन्याच्या वजनाचें लोहकिट्ट जें दागिन्यांत भरतात तें.

भूमि [**सं०**] **स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. ३ स्थान; जागा. ४ घराचा मजला. ५ पाया. ६ (नाटकांत घेतलेलें) सोंग. ' भूमिका ' ह्याच अर्थीं. ꙳ **जन्मभूमि स्त्री०** कोणी मनुष्य जेथें जन्मला ती त्याची जन्मभूमि. **भूमिज पु०**मंगळ हा ग्रह. **भूमिधर पु०** पर्वत. **भूमिपाल पु०** राजा. **भूमिकंप पु०** मागें 'भू'मध्यें भूकंप पहा.

भूय मागें ' भूई ' पहा.

भूयसी [**सं०**] **स्त्री०** १ पुण्याहवाचन इ० धर्मकृत्याच्या ससाप्तीस सांगतार्थ एकदाच उत्सर्ग करून अनेक ब्राह्मणांस वाटतात ती दक्षिणा. २ दुष्काळादि प्रसंगीं कोणी धनाढ्य माणूस विपन्न आणि दरिद्री माणसांनीं वाटतात तें धान्य,भोजन, इ०.

[२ पांढरी बुरशी.

भूर स्त्री०१नेत्राच्या बुबुळावर येतो तो सारा.

भूर्ज [**सं०**] **पु०** एक वृक्ष. ꙳ **भूर्जपत्र न०** १ भूर्जवृक्षाची कागदासारखी पातळ साल. २ (**लाक्षणिक**) जीर्ण वस्त्र,कागद, इ०.

भूल [**हिं०**]**स्त्री०**१ अमली पदार्थाच्या सेवनानें आलेली बेशुद्धि. २ विस्मृति. ३प्रसंगविशेषीं बुद्धीवर आलेलें मांद्य.꙳**भूलथाप,भुलथाप स्त्री०** कोणेकाला फसविण्यासाठीं सांगितलेली खोटी बातमी किं० खोटा विचार (देणें).

भूषण [**सं०**] **न०**१शोभविणें. २दागिना.३ (**लाक्षणिक**)श्रेयस्कर गुण;स्तुतीलापात्र असा गुण, वर्तन, कृति, इ०. याच्या व्यावर्तकत्वें ' दूषण '

हा शब्द योजण्यांत येतो. ꕥ **भूषणावह वि०** श्रेयस्कर; स्तुत्य.

भूषविणें [**सं०** भूष्] **स० क्रि०** शोभविणें; शोभायुक्त करणें.

भूषा [**सं०**] **स्त्री०** १ शोभा.२ अलंकार.

भूषित [**सं०**] **वि०** १ शोभित. २ अलंकृत. ꕥ **विद्याविभूषित वि०**विद्येनें शोभणारा; विद्वान.

भूस [**सं०** बुस] **न०** १ धान्याचा कोंडा. २ कीटांनीं खाल्लेल्या लाकडांतून पडतें तें पीठ.३ तांदूळ, डाळ, गवत, इ० पदार्थ. ४ (**लाक्षणिक**) नाश (उडणें). ५ (**लाक्षणिक**) सत्त्वहीन भाषण, लेख, इ०. ६ (**लाक्षणिक**)निष्फळ, निरुपयोगी कृति, प्रयत्न, इ०. ꕥ **भुसानें अंग भरलेलें असणें** १ श्रमित असणें. २खाऊन पिऊन सुखी असणें. ३ श्रमितीनें गर्विष्ट झालेलें असणें. **कोणेकाला भूस भरणें** त्याला चोप देणें.

भृकुटि (–टी) [**सं०**] **स्त्री०** भिवई. ꕥ **भृकुटिभंग पु०** १ रागिटपणाची मुद्रा. २ टवकारून पाहाणें; भिवया चढवून दृष्टि वळविणें.

भृंग [**सं०**] **पु०** १ भुंगा. २ कुंभारिण माशी. ३ जार. **भृंगी स्त्री०** भांग. **भृंगराज पु०** माका.

भृगु [**सं०**] **पु०** १ शुक्र; उ० भृगुवार म्ह० शुक्रवार. २ पर्वताचा कडा; उ० भृगुपात म्ह० पर्वताच्या कड्यावरून स्वतास लोटून घेऊन आत्महत्या करणें.

भृति [**सं०**] **स्त्री०** १ आश्रय. २ धारण करणें. ३ पोषण. ४ अन्न. ५ वेतन; पगार. ६ भरण्याची क्रिया.

भृत्य [**सं०**] **पु०** १ चाकर; नोकर. २ आश्रित. **भृत्या स्त्री०** १ पोषण; संगोपन. २ अन्न. ३ पगार; वैतन. ४ सेवा; शुश्रूषा.

भृष्ट [**सं०**] **वि०**भाजलेलें. **भृष्टान्न न०**चुरमुरे,पोहे,लाह्या,इ०.

भें, भेंणें [**सं०** भय] **न०** १ भय; भीति. [२ भयाचें कारण.

भेक न० १ फळादींची फोड किं० फाक. २ पदार्थाची लांब चिंधोटी किं० पट्टी.

भेक [**सं०**] **पु०** १ बेडूक.२ भित्रा माणूस.

भेकड वि० भित्रा. भेकट, भेकाड, हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

भेकणा वि० १ कुरूप. २ भेसूर.

भेकणें [म० भेक]**स० क्रि०** चिरणें; (पदार्थाचा) फाळ काढणें.

भेकणें अ० क्रि० रडून आकांत करणें.

भेंकर, भेंकरें न० एक मृगविशेष; हरिणाची लहान आकाराची जात.

भेंकाड, भोंकाड न०१ वासलेलें तोंड. २ तोंड (निंदेंत).

भेग, भेगर न०, भेगळी स्त्री० फट; चीर.

भेगलणें [**म०**भेग] **अ० क्रि०** (भूमि,हात,पाय, इ० ना) चिरा किं० भेगा पडणें.

भेंजूड, भेंझूड [**म०** भें=भीति] **वि०** १ भित्रा. २ लाजाळू.

भेट [**हिं०**] **स्त्री०** १ दोन पदार्थ शेजारीं येणें किं० एकमेकांना चिकटणें. २ माणसांचीं दृष्टादृष्ट किं० संयोग. ३ मुद्दाम कोणेकानें कोणेकाकडे कांहीं कामासाठा जाणें (येणें)४ मुलाखत.५ आलिंगन; मिठी. ६ नजराणा म्हणून प्रेमपूर्वक कोणेकानें कोणेकाला पुकट किं० बक्षीस दिलेली वस्तु.

भेटणें [**हिं०** भेटना] **अ० क्रि०** १ कोणेकाकडे मुद्दाम कांहीं कारणासाठीं जाणें. २ यदृच्छेनें कोणी कोणाला दिसणें. ३ व्यवहारांत आढळून येणें; कोणेकाशीं कोणेकाचा संबंध येणें, होणें, किं० घडणें. ꕥ **भेटबकरा पु०, भेटबकरें न०** १ कोणी सरकारी अंमलदार आपल्या गांवीं आला असतां त्याला गांवकामगार जें द्रव्य, शिधा, भाजीपाला, इ० देतात तें. २ लग्नांत वधूची आई वराच्या आईला रासन्हाणीच्या वेळीं देते तो नजराणा. **भेटाभेट स्त्री०** भेट.

भेटविणें [**म०** ' भेटणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ एका माणसाला दुसऱ्या माणसाकडे भेटीसाठीं किं० मुलाखतीसाठीं घेऊन जाणें; दोन माणसांची गांठ घालून देणें. २ दोन माणसें किं० पदार्थ यांचा संयोग करून देणें.

भेटी [**म०** भेटणें] **स्त्री०** वर ' भेट ' पहा.

भेड [**म०** भिणें] **वि०** भितरा; भ्याड.

भेंड न०, पु० १बोरू, जोंधळा, इ०चें जें ताट त्यांच्या गर्भांतील भुसभुशीत अंश. २ (**लक्षणेनें**) अशक्त आणि निःसत्त्व पदार्थ.३(**लक्षणेनें**)वजनानें

हलका पदार्थ. ४ पाण्यांत तरंगणारा एक पदार्थ-विशेष. ५ भुरुंभुरुं जळणारें कोणतेंही हलकें लाकूड. ६ डोळ्यांतील गू,–जो डोळ्याच्या कोपऱ्यांत जमतो. न० मासे धरणाऱ्या कोळ्याच्या जाळ्याच्या कांठाला तरंणारें ज लाकूड इ० चे तुकडे बांधलेले असतात ते प्रत्येक. पु० कानाच्या पाळींत दागिना घालण्यासाठीं पाडलेलें भोक मोठें करण्यासाठीं त्यांत घालून ठेवितात तो बोरू इ० चा तुकडा.

भेडणें अ० क्रि० आट्यापाट्या, विटीदांडू, इ० खेळांत खेळाडूंची वाटणी करते समयीं दोन दोन खेळाडूंनीं भेडतूकडे जाऊन भेटणें,–तो करील ती वाटणी स्वीकारण्यासाठीं.

भेडतू, भेडती, भेडू पु० आट्यापाट्या, विटीदांडू, इ० खेळांतील दोन बाजूंचे जे दोन नायक ते प्रत्येक.

भेडसर, भेडसारू, भेडसार वि० भितरा; भ्याड.

भेडसावणें [म० भेडसावणें] न० १ पक्षी, पशु, इ० ना शेत इ० मधून हाकलून लावण्यासाठीं जें मनुष्याच्या आकाराचें बाहुलें उभें करतात तें; बुजगावणें. २ कोणत्याही प्रकारची भीति वाटविणारी वस्तु.

भेडू पु० वर ‘ भेडतू ’ पहा.

भेडसावणें,भेडाविणें; भडविणें [म०भेड] स० क्रि० १ (कोणेकाला) भय दाखविणें किं० भिवविणें. २ (कोणेकाला) धमकी देणें.

भेंडा पु० १ मातीची न भाजलेली वीट; कच्ची वीट. २ मातीचें डेखूळ. ३ कर्ज, व्याज, इ० चो तुंबून फुगलेली रकम. ४ साचत गेलेलें काम. ५ घोड्याच्या गुडघ्यावर उत्पन्न होते ती गांठ. ६ एक कीटविशेष. ७ एक वनस्पतिविशेष.

भेंडावणें अ० क्रि० भेंडा नांवाच्या कीटानें (झाड, लाकूड) खाल्लेलें असणें. वर ‘ भेंडा ’ अर्थ ६ पहा.

भेडाविणें स० क्रि० वर ‘ भेडसावणें ’ पहा.

भेंडाळणें अ० क्रि० (गात्र, शरीर) लठ्ठ आणि थिलथिलीत होणें किंo अशक्त आणि कमजोर होणें.

भेंडाळा पु०,भेंडाळें न०वस्त्र, कागद, इ०ची गुंडाळी, सुरळी, किं० वळकटी. पुढें ‘भेंडोळा,’ ‘ भेंडोळें ’ पहा.

भेंडी स्त्री० १एक फळभाजी. २ ज्याचें लाकूड तांबूस रंगाचें असतें असा एक वृक्षविशेष. ꣸

भेंडीबीज न० भाजीच्या उपयोगाची जी भेंडी तिचें बीच किं० तिचा दाणा.

भेंडोळा पु०, भेंडोळें न० कागद, वस्त्र,इ०ची सुरळी, वळकटी, किं० गुंडाळी.

भेणें क्रि० वि० भयानें. **अ० क्रि०** भिणें.

भेत न०. स्त्री० फळ, लाकूड, इ० च्या उभ्या चिंधोट्या, चिरफळ्या, किं०फोडी प्रत्येक.

भेतणें [म० भेत] स० क्रि० (पदार्थाच्या) उभ्या चिरफळ्या किं० फाकी करणें.

भेतलणें अ० क्रि० उभें फाटणें किं० चिरणें किं० भेगळणें.

भेतळ, भेतळा, भेताळा, भितळा पु० सर्पणाचें लाकूड; लाकडाचा जाडी लांब तुकडा.

भेताळा पु० भेग; चीर; फट.

भेतूक न० वर ‘ भेत ’ पहा.

भेद [सं०] पु० १ फोडणें, चिरणें, इ० क्रिया किं० अशा क्रियांचा परिणाम; उ० योग्याचा प्राण मस्तकाचा भेद करून जातो. २ वेगळेपणा; पृथक्पणा;तफावत; भिन्नता; उ०सदोबानें कालचें बोलणें आणि आजचें बोलणें यांत बराच भेद आहे. ३ वर्ग; जाति; प्रकार; उ० गोसाव्यांत दहा भेद आहेत. ४ मनुष्याच्या मनाच्या कलांत झालेला पालट किं० बदल; उ० तो आपली मुलगी माझ्या मुलाला द्यावयाला कबूल होता पण तुम्हीं त्याला भलभलत्या गोष्टी सांगून त्याचा भेद केला म्हणून तो आतां मुलगी द्यावयाला कबूल नाहीं. ५ राज्य, संस्था, इ० तील गुप्त वर्तमान किं० कांहीं रहस्य; उ० गणवंत गडाकडचा भेद मंघानें काढून आणला. ६ मतभिन्नतेमुळें झालेला बेबनाव. ७ मित्रांमिलांत फाटाफूट. ८ (**व्याकरण**) कर्ता कांहीं क्रिया स्वता करतो किं० दुसऱ्याकडून करवितो किं० ती क्रिया करण्याचें कर्त्याला सामर्थ्य आहे हे अर्थ दाखविणारी जी क्रियापदाच्या रूपांत भिन्नता केली जाते ती; उ० रामा लिहितो (मूळरूप

भेद); रामा कारकुनाकडून पत्र लिहवितो (प्रयोजक भेद); रामाला पत्र लिहवतें (शक्य भेद). ❀ **भेदभाव पु०** १ भिन्नता. २ परकेपणाची भावना. ३ परमात्मा आणि जीवात्मा हे वेगळे आहेत असा ग्रह. ह्या अर्थी ' भेदबुद्धि ' सुद्धां.

भेदक [**सं०**] **वि०** १ फोडणारा. २ नाश करणारा. ३ विभक्त किं० पृथक् करणारा. ४ व्याख्या देणारा. ५ (**वैद्यक**) सारक. ६ चुगलखोर.

भेदड वि० भितरा; भ्याड.

भेदणें [**सं०** भिद्] **स० क्रि०** १ फोडणें. २ विभक्त करणें. ३ (कोणेकाचा बुद्धिभेद करून त्याला) आपल्या पक्षाकडे वळविणें; उ० किल्ल्याचा रखवाल्दार आम्ही भेदला त्यामुळें आम्हाला किल्ला सर करतां आला.

भेदन [**सं०**] **न०** फोडणें. २ विभागणें. ३ पृथक् करणें. ४ लावालावी. ५ फूट; भांडण. ६ (**व्याकरणांत**) विशेषण.

भेदरणें अ० क्रि० भिणें; घाबरणें.

भेदरा, भेदारा पु० भीति; दहशत (बसणें, घेणें).

भेदारणें अ० क्रि० भिणें; घाबरणें.

भेदारा पु० वर ' भेदरा ' पहा.

भेदी, भेद्या [**म०** भेद]**पु०** १शत्रूचीं रहस्यें अवलोकून येण्यास पाठविलेला माणूस. २ दोन माणसांत फूट पाडणारा माणूस.

भेदीक [**म०** भेद] **वि०** हृदयापर्यंत खोल जाऊन पोंचणारें (गाणें, भाषण, पोवाडा, इ०).

भेभिस्त, भेभीस्त [**म०** भय]**वि०**भितरा; भ्याड.

भेर [**सं०** भेरी] **स्त्री०** १ मोठा नगारा; नौबत. २ (**लक्षणेनें**) फुगीर पोट.

भेर स्त्री० १ भेग; चीर. २ ढेरपोट.

भेरकट वि० थोडासा बहिरा; बहिरट.

भेरगा, भेलगा पु० वृषण सुजणें हा विकार (बसणें, उतरणें, ओसरणें).

भेरंड, भिरंड स्त्री०एक वृक्ष. **न०**त्याचें फळ. ❀ **भेरंडेल, भिरंडेल न०** भेरंडाच्या फळाचें तेल.

भेरड न० डोळ्यांतील गू.

भेरड न०, पु० वृक्षांना लागणारा एक कीट. पुढें ' भेरूड ' पहा.

भेरडणें [**म०** भेरड] **अ० क्रि०** भेरड नांवाच्या किड्यांनीं (वृक्ष) जीर्ण होणें किं० पोखरला जाणें.

भेरडा पु० बेहेडा हें झाड किं० त्याचें फळ.

भेरला माड, भेरली माड, भेरळ, भेरळी माड पु० सुरमाड हा वृक्ष.

भेरी [**सं०**] **स्त्री०** नगारा.

भेरुडणें वर ' भेरडणें ' पहा.

भेरुता स्त्री०, भेरुवात पु० दोंद वाढविणारा अंगांत शिरलेला वात.

भेरूड पु०, न० १ झाडें किं० फळें पोखरून नासाडी करणारा एक किडा (लागणें). २शरीर ज्यांत झिजत जातें असा कोणताही रोग. ३ (**लाक्षणिक**) सावकार इ०चा पैशासाठीं लागलेला तगादा (लागणें).

भेल स्त्री० १ मिश्रण; मिसळ. २ भरतीला जें घातलें तें. ३ गुळाची थापून केलेली वडी.

भेलकंड, भेलकंडा पु०, भेलकंडी स्त्री० चालतांना जाते ती झोकांडी.

भेलगा [**म०** भेला=गोळा] **पु०** वृषण सुजणें, किं०वृषण फुगून ओथंबणें,हा विकार(उतरणें, बसणें, ओसरणें).

भेलण न० मिसळ; मिश्रण.

भेलणें स० क्रि० मिसळणें.

भेला पु० १ गवत, कडबा, इ०चा भारा. २ भेलगा. ३ लोणी, गूळ, तूप,चिंच,इ०चा गोळा.

भेली स्त्री० गुळाचा गोळा किं० थापटी.

भेल्लामाड पु० माडाची एक जात.

भेव, भेंव [**म०** भें] **न०** भय; भीति.

भेश, भेस, भेष [**सं०** वेष; **हिं०** भेस]**पु०** पोशाख किं० पोशाखाची तऱ्हा.

भेषज [**सं०**] **न०** औषध. ❀ **भेषजी पु०** काष्ठौषधि विकणारा दुकानदार; पसारी.

भेसर [**म०** भें=भीति] **वि०**भितरा;भ्याड.

भेसळ स्त्री० मिसळ; भरतीला हलक्या दर्जाचा घातलेला पदार्थ.

भेसूर, भेंसूर [**म०** भें] **वि०** भितरा.

भेसूर, भेंसूड [म० भें] **वि०** भयंकर; अकराळ विकराळ.

भेळ स्त्री० १ मिश्रण. २ भरतसाठीं घातलेला हलक्या दर्जाचा पदार्थ.

भेळणें, भेलणें स० क्रि० मिसळणें; (हलक्या दर्जाचा पदार्थ) भरतीला घालणें.

भेळा पु० १ कडबा, गवत, इ०ची पेंडी; भारा. २ एक जंगली वृक्ष.

भैम [सं० भमि] **वि०** १ भीमासंबंधाचें.२ भयंकर. **भैमी स्त्री०** १ दमयंती. २ माघ शुद्ध एकादशी.

भैरव [सं०] **वि०** भयंकर.**पु०** १ शंकराचा अवतारविशेष. २ भय. ६ (**साहित्य**) काव्यांतील नवरसांपैकीं एक; भयानक रस. ४ स्त्रियांचें एक कर्णभूषण.५ गायनांतील एक राग. ꕥ **कोणेकाला भैरवाची सेवा असणें** तो बहिरा असणें. **टीप,**– ' बहिरा ' चें ' भैरव ' शीं वर्णसादृश्य असल्यावरून भैरव=बहिरेपणाचा देव. **भैरवाष्टमी स्त्री०** कृष्णपक्षांतील अष्टमी. **भैरवजोगी पु०** कानफाट्या गोसावी. **भैरवी स्त्री०** १ एक रागिणी. २ दुर्गादेवी. **भैरवी यातना स्त्री०** काशीमध्यें जो मेला त्याच्या पदरीं जें पाप असतें त्याच्या निरसनार्थ रुद्रपिशाचयोनीपासून जी यातना सोसावी लागते ती.

भैरी [म० भैरव] **पु०** १ भैरव हा देव. २ (वर्णसाम्यावरून) बहिरा माणूस. [पक्षी.

भैरी [म० बहिरी] **पु०** बहिरा ससाणा हा

भैरोबा [म० भैरव=शंकराचा एक अवतार] १ भैरव हा देव. २ (वर्णसाम्यावरून) बहिरा माणूस.

भैषज्य [सं०] **न०** १ औषधाची योजना. २ औषध.

भैक्ष [सं०]**वि०** भिक्षा मागून मिळालेलें अन्न. **न०** १ भिक्षा मागण्याची वृत्ति. २ भिक्षेचें अन्न. ꕥ **भैक्षाश्रम पु०** १ संन्यास. २ ब्रह्मचर्य. **भैक्षचरण न०** भिक्षावृत्ति.

भैक्ष्य [सं०] **न०** भिक्षा मागून मिळालेलें अन्न, इ० ꕥ **भैक्ष्यजीविका, भैक्ष्यचर्या स्त्री०** भिक्षा मागून चरितार्थ करणें.

भोई [हिं०] **पु०** १ पालख्या, मेणे,डोल्या, इ० वाहाणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. २ घोडेपाळण्याच्या आधाराचे जे चार पाय ते प्रत्येक.३ मुलांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. ꕥ **भोईराज पु०** भोई (गौरवानें).

भोई मागें ' भूई ' पहा.

भोक [सं० भूक=छिद्र, भोक] **न०** १ छिद्र; वेजें. २ (**लाक्षणिक**)पोकळपणाची किं० पोखरलेपणाची स्थिति; उ० त्याची सावकारी (किं० पेढी) दिसते टोलेजंग आणि भपकेदार पण आंत भोक आहे. ३ (**लाक्षणिक**) दरबार, संस्था, इ० मध्यें प्रवेश; संधान; वशीला; उ० कासोबानें त्या खात्यांत कसें भोक पाडलें नकळे, त्याला हावी होती ती नोकरी त्याला मिळाली.

भोंक [म० भोंकणें; सं० बुक्=कुत्रा आरडणें] **स्त्री०,न०** १ कुत्र्याचें ओरडणें भोकणें.२ कुत्र्याचें भोकणें जितक्या अंतरावर ऐकूं जाईल तितकें अंतर; उ० पाषाण गांव येथून कुत्र्याच्या भोंकभर आहे. ३ रडण्याचा एकदम आलेला आवेग किं० हुंदका; उ० ह्या पोरानें आईला पाहतांच भोंक फोडली.

भोकणें [म० भोंक] **स० क्रि०** (पदार्थाला) सुई, कट्यार, इ० नीं भोक पाडणें.

भोकणें [सं० बुक्]**अ० क्रि०**(कुत्र्यानें)ओरडणें.

भोकर स्त्री० एक झाड. **न०** १ त्याचें फळ. २ स्त्रियांचें एक भूषण. ꕥ **भोकरडोळ्या वि०** बटबटीत डोळ्यांचा.

भोकसणें, भोसकणें स० क्रि०(सुई,चाकू, इ०) खुपसणें.

भोकसा पु०, भोकसें न० [म० भोक] १ मोठें भोक. २ व्यापारांत ठोकर (निघणें).

भोका, बोका पु० नर मांजर. ꕥ **भोकेसंन्यासी पु०** साधुपणाचा बहाणा करणारा;लुच्चा.

भोकाड, भोकार [म० भोक] **न०** १वासलेलें तोंड. २ रडतांना उघडलेलें तोंड. ३ तोंड (तुच्छतेनें).

भोकू [म० भोक] **पु०** १ भोक. २ वई, कुंपण, भिंत, इ० मध्यें पडलेलें किं० पाडलेलें भोक, खिंडार, वाट, इ०.

भोक्तव्य [सं०] **वि०** १ भोगास आलेलें. २ जें भोगावयाचें (तें). **न०** नशीब; दैव.

भोक्ता [सं० भोक्तृ] **पु०** १ कोणेक विषयाचा भोग घेण्याची ज्याला उत्कट आवड आणि इच्छा आहे तो; उ० रामभाऊ गाण्याचा भोक्ता आहे; सदोवा पक्वान्नांचा भोक्ता आहे. २ कोणेक पदार्थाचा किं०विषयाचा जो मर्मज्ञ किं० दर्दी तो. ३ राजा. ४ पति. ५ जार. ꙮ**भोक्तृत्व न०** १दैव; नशीब. २ जें भोगलें पाहिजे असें आपल्या नशीबीं ठरलेलें आहे तें.

भोग [सं०] **पु०** १ आत्मा अनुभवितो तें सुख किं० दुःख; उ० श्रीमंतांचे आश्रयास राहून आह्मी आजपर्यंत अनेक भोग भोगिले. २ पदार्थाचा उपयोग किं० वापर; उ० या वतनाचा मी पन्नास वर्षें भोग घेत आहे; उ० मी ह्या सदऱ्याचा आठ महिने भोग घेतला (म्ह० तो अंगांत घालून वापरला). ३ दैवगतीनें प्राप्त झालेलें सुख किं० दुःख तें किं०त्या सुखाचा किं० दुःखाचा अनुभव; उ० भोग असेल तितका भोगून सारला पाहिजे.४सूर्यादींनीं विशिष्ट प्रदेश आक्रमणें किं० ह्या आक्रमणास लागणारा काळ किं० ह्या आक्रमणाचा प्रदेश. ५ मैथुनजन्य सुख किं०ह्या सुखाचा अनुभव.६नागाची फणा.७सर्पाचें शरीर.८आकाशांतील रेखांश.ꙮ**भोगावली स्त्री०** भाटांनें केलेली स्तुति. **भोगदेह पु०** लिंगशरीर. **भोगधर पु०** साप. **भोगपति पु०** पदार्थ ज्याच्या ताब्यांत आहे आणि जो त्याचा उपभोग घेत आहे तो. **भोगभूमि स्त्री०** १ स्वर्ग. २ भारतेतर वर्ष. **भोगभोगवटा पु०** पदार्थाचा उपभोग, अनुभव, किं० वापर. **भोगमूर्ति स्त्री०** १ सामान्य उत्सवांत मिरवावयाची देवाची मूर्ति. २ एकाद्या संस्थेंत प्रत्यक्ष काम करणारा मालक. **भोगलाभ पु०** आपल्याकडे गहाण म्हणून असलेल्या वस्तूचा उपभोग. **भोगवटा पु०** क्षेत्र, ग्राम, वतन, पुजारीपण, इ०ची कोणेकाकडे चालत आलेली अखंड किं० कांहीं कालमर्यादित जी वहिवाट ती. **भोगवती, भोगावती स्त्री०** पाताळांतील गंगा. **भोगविडा पु०** १ नऊ पानें, नऊ सुपाऱ्या, नऊ वेलदोडे, इ० पदार्थांचे नऊ संच करून नऊ ब्राह्मणांस किं० नऊ सुवासिनींस मकरसंक्रान्तीचे दिवशीं स्त्रिया देतात ते प्रत्येक. २ उंची मसाले घालून बनविलेला विडा,—जो मकरसंक्रान्तीचे दिवशीं स्त्रिया ब्राम्हणाला किं० सुवासिनीला देतात तो. **भोगविलास पु०** चैनबाजी किं० चैनबाजीचे प्रकार.

भोंगळ, भोंगळा वि० १ सैल नेसलेलें (धोतर, लुगडें);सईल आवळलेला किं०बांधलेला (गठ्ठा, गांठोडें, इ०).२असें सईल धोतर नेसणारा (पुरुष) किं० सईल लुगडें नेसणारी (स्त्री). ३ अव्यवस्थित (काम) किं० अव्यवस्थित कारभार करणारा (मनुष्य). ४ ज्याला ताळतंत्र नाहीं असा (हिशेब, जमाखर्च, इ०.)५ ज्यावर चांगली देखरेख नाहीं असें(काम,मांडणी, इ०). ५ अशक्त, कमजोर, लेचापेचा (लाकूड, घर,इ०).६हलकी कवडी. ꙮ**भोंगळकवडी स्त्री०** अजागळ किं० गयवती माणूस; वेडसर माणूस. **भोंगळी स्त्री०**अजागळ स्त्री.

ꙮ**भोंगळणें** [म० भोंगळ]**अ० क्रि०**सईल होणें (गांठोडें),अव्यवस्थित होणें(नेसणें,पोशाख,इ०).

भोंगळी [म० भोंगळ] **स्त्री०** १ नळी; नळकांडें. २ पाणी वहावयासाठीं पोखरलेला माड इ० झाडाचा बुंधा. ꙮ **भोंगळीचें कुलूप न०** दुकानांना लावतात तें हातभर लांबीचें नळीच्या आकाराचें कुलूप.

भोगावती [सं० भोगवती] **स्त्री०** पाताळांत भगीरथानें नेलेली गंगानदी. मागें ' भोग ' मध्यें ' भोगवती ' पहा.

भोगी [म० भोग] **वि०** १ भोगणारा. २ विषयलंपट. ३ सुखदुःखादि अनुभवितो तो. ४ विलासी; रंगेल.

भोगी [म० भोग] **स्त्री०** १ मकरसंक्रान्ति किं० कर्कसंक्रान्ति ह्यांच्या आधला दिवस. २ नरकचतुर्दशीच्या आधला दिवस.

भोग्य [सं०] **वि०** १ भोगावयास किं० सोसावयास योग्य किं० जरूर असें. २ आपल्या भोगास आलेलें (सुख किं० दुःख). ३ उपयोगाची वस्तु. **न०** १ भोगाला योग्य असें द्रव्य, घर, स्त्री, इ०. २ उपभोग; वहिवाट; वापर. ३ ग्रहादिकांचा आक्रमावयाचा राहिलेला मार्ग. **भोग्या स्त्री०** वेश्या.

भोग्या [म० भोग] **पु०** १ आंधळी कोशिं-बीर, लपंडाव, इरगी मिरगी, इ० खेळांमध्यें सर्वांनीं येऊन त्यास शिवावें, असा जो मनुष्य, दगड, खांब, इ० तो; किं० या खेळांत दुसऱ्याचे डोळे झाकणारा. २ वेश्येचा विशिष्ट रात्रीचा भोक्ता. ꙮ **भोग्या भोंवरा पु०** निर्लज्जपणें रांडांच्या नादीं लागलेला पुरुष.

भोज, भोजपत्र मागें ' भूर्ज, ' ' भूर्जपत्र ' [पहा.

भोजन [सं०] **न०** १ जेवण; जेवणें. २ अन्न. ३ भोगणें; भोग. ꙮ **भोजनदक्षिणा स्त्री०** ब्राह्मणाला जेवूं घालून त्याला दिलेली दक्षिणा. **भोजनभाऊ, भोजनप्रिय, भोजन्या पु०** घरांत कांहीं काम न करतां केवळ जेवणारा आळशी आणि निरुद्योगी माणूस.

भोजनीय [सं०] **वि०** १ खाण्यास योग्य. २ भोगण्यास योग्य. ३ खाऊंपिऊं घालून पोसण्यास योग्य (मातापितरें, मुलें, इ०). **न०** अन्न.

भोजी [सं० भोजिन्] **वि०**खाणारा, भोगणारा. याचा उपयोग संस्कृत उपपद तत्पुरुष समासांत होतो; उ० मितभोजी म्ह० खाण्यापिण्यांत नियमित; परान्नभोजी म्ह० दुसऱ्याच्या घरीं जेवीत राहाणारा; अल्पभोजी म्ह० ज्याचा आहार थोडा आहे असा.

भोज्य [सं०] **वि०** १ भोगण्यास योग्य किं० आवश्यक. २जें भोगावयाचें तें. **न०** १ अन्न. २ खाद्य पदार्थ. ३ भोजन. ४ पितरांना देण्याचें अन्न.

भोज्या वर ' भोग्या ' पहा.

भोंड न० जोंधळा, बाजरी, गहूं, इ० च्या दाण्याचें टरफल. **भोंडें न० अ० व०** कोंडा; टरफल.

भोंड पुढें ' भोंवड ' पहा.

भोंडगा, भोंड्या पु० भंडारी (तुच्छतेनें).

भोंडला पु० आश्वीन महिन्यांत मुली भिंतीवर शेणाचीं देवळें किं० देवाच्या मूर्ती इ० काढतात त्या समुच्चयानें किं० त्यांच्या पुढें गाणीं गातात तीं समुच्चयानें.

भोंडा वि० १ म्हातारा (तुच्छतेंत). २ भुंडा; ओका. मागें ' भुंडा ' पहा.

भोंडार वि० म्हातारा (तुच्छतेंत).

भोंड भारूड न० पेच; पंचाईत; अडचण (येणें, येऊन पडणें).

भोत पु० १ धान्य साठवावयाचा गोणपाट इ०चा मोठा थैला. २भाजल्यामुळें किं०पोळल्यामुळें शरीरावरील निघून जाते ती त्वचा. ३ केतकीचें दोर करावयाजोगें मूळ. ४चिंध्याचा लांबलचक पीळ घालून वळलेला काकडा,-जो भोप्ये आपल्या अंगावर मारून घेतात. ५मच्छरदाणी. ꙮ **कोणेकाला मारून भोत करणें** त्याला खूप मारणें,-त्याचें अंग मोठ्या थैल्यासारखें सुजेपर्यंत. ह्या अर्थी ' मारता भोत करणें ' असाही वाक्प्रचार आहे. **भोत सुजणें किं० भोत होणें** खूप मार खाल्ल्यामुळें अंग सुजून गोणपाटाच्या थैल्याप्रमाणें लठ्ठ होणें.

भोंता इ० पुढें ' भोंवता ' इ० पहा.

भोंदगिऱ्हा (-रा) पु० १ कोणेकाच्या पाठीस लागलेलें भूत; समंध. २ कोणेकाच्या मागें लागलेलें लचांड, अनिवार्य आणि कंटाळवाणें काम, उपद्रवकारक तगादा, इ०.

भोंदणें स० क्रि० कोणेकाला भुलथापा देऊन किं० गोड गोड बोलून वळविणें किं० वश करून घेणें किं० फसविणें.

भोंदू [म० भोंदणें] **वि०** दांभिक; ढोंगी; साधुत्वाची बतावणी करणारा लुच्चा आणि लबाड (माणूस).

भोपळा पु०१भाजीच्या उपयोगाचें एक फळ. ह्याच्या दोन जाति आहेत; पांढरा भोपळा किं० दुध्या भोपळा आणि तांबडा भोपळा. ह्या दोहोंच्याही वेलीस ' भोपळी ' **स्त्री०** हा शब्द आहे. २ (**लक्षणेनें**) लठ्ठ आणि अशक्त माणूस. ३ (**लक्षणेनें**) अविद्य किं० निरक्षर माणूस. ४ (**लक्षणेनें**) शून्य; पूज्य; उ० करव्याला गणिताच्या परिक्षेंत भोपळा मिळाला. ५ वीणा इ०चा डेरा. ꙮ **हातीं भोपळा येणें** भिक्षेसाठीं भोपळ्याचें पोखरून केलेलें पात्र हातांत घेऊन हिंडण्याच्या स्थितीप्रत येणें म्ह० दरिद्री होणें. **भोपळदेवता स्त्री०** लहान पोरीसारख्या चेष्टा किं० खोड्या करणारी मोठ्या वयाची स्त्री.

भोपळसुती वि० अव्यवस्थित किं० निष्काळजीपणानें चाललेलें (काम, खर्च) किं० तसें काम, खर्च, इ० करणारा (माणूस). **भोपळ्या रोग पु०** अंगांत मेद फार उत्पन्न करणारा रोग (थट्टेंत). **कोणेकाला भोपळ्या-रोग होणें**(थट्टेंत)तो फार लठ्ठ आणि थिलथिलीत अंगाचा असणें.**भोपळी खरबुज न०**एक प्रकारचें खरबुज.**भोपळ्या येवढें शून्य न०** (वस्तूचा) अत्यन्त अभाव. **भ्रमाचा भोपळा फुटणें** जिच्या संबंधानें फार मोठी आशा किं० उमेद बाळगण्यांत आलेली होती ती परिणामीं निष्फळ किं० निरुपयोगी ठरणें. **भोपळी स्त्री०** भोपळ्याचा वेल.

भोंबा पु० मुलांना भीति दाखविण्यासाठीं कल्पिलेलें एक भूत; बाऊ; बोवा. ❀ **एखाद्या गोष्टीचा भोंबा करणें** (किं० **करून सांगणें**) १ तिला नसतें महत्व देणें. २ ती भयंकर नसतां तिला भयंकरपणाचें रूप देणें.

भोंबा, भोभा पु० १ कोंवळा किं० अपक्व भोपळा. २ उंडीण, मोगली एरंड, इ० चें कच्चें, हिरवें, किं० अपक्व फळ.

भोंबारा पु० १ खरज सुराचें एक वाद्य. २ बोभाटा; प्रसिद्धि; चव्हाट्यावर येणें (होणें, वाजणें).

भोंबारी स्त्री० एक वाद्यविशेष.

भोंबी स्त्री० धणा (कोथिंबिरीचें बीज). शूद्रांत ह्या शब्दाचा प्रचार आहे.

भोंबूल पु० भुंगा. मागें ' भुंगा ' पहा.

भोभा मागें ' भोबा ' पहा.

भोभो स्त्री० १ कुत्र्याचें भोंकणें. २ कोणेकावर केलेला शिव्यांचा वर्षाव.

भोम न० १ मुंग्यांचें वारूळ. २ सोनारानें घडवावयाच्या दागिन्यांतून चोरलेल्या सोन्याच्या भारंभार घालून दिलेलें लोहकिट्ट. मागें ' भूम ' पहा.

भोम पु० लग्नाच्या समारंभांतील मेजवानी (करणें).

भोमणें मागें ' बोंबणें ' पहा.

भोमवार [**म०** भौमवार ' चा अपभ्रंश] **पु०** मंगळवार हा आठवड्याचा दिवस.

भोमा पु० एक जंगली झाड.

भोमाड [**म०** भोम] **न०**मुंग्यांचें खूप मोठें वारूळ. मागें ' भोम ' **न०** पहा.

भोय, भोयार मागें ' भुई, ' ' भुयार ' पहा.

भोर वि० अत्यन्त (काळा).

भोंरकडी, भोंरगांव पुढें ' भोंवरा ' मध्यें ' भोंवरकडी, ' ' भोंवरगांव ' इ० पहा.

भोरडी स्त्री० क्रौंच पक्षी.

भोरडी स्त्री० जिच्या वलयाभोंवतीं तार गुंडाळलेली आहे अशी आंगठी.

भोरपी पु० बहुरूपी; डोंबारी.

भोरंबी स्त्री० ज्याच्या लांकडाचा इमारत-कामाकडे उपयोग केला जातो असा एक वृक्ष.

भोरा [**हिं०**] **वि०** पांढुरका. **पु०**भोंवरा,-मुलांचा खेळावयाचा.

भोरीप, भोरूप [**सं०** बहुरूप]**पु०** दोरीवर चालणें,नानाप्रकारच्या उड्या मारणें,चित्रें दाखविणें,दशावतार दाखविणें,इ०वर चरितार्थ करणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

भोंवई स्त्री० डोळ्याच्या वर आणि कपाळाच्या खालीं असते ती केशपंक्ति. मागें' भवई ' पहा.

भोंवई पु० गुजराथी लोकांची एक जात किं० त्या जातीचा इसम. मागें ' भवई 'पहा.

भोंवंड (-डी) [**सं०** भ्रमि=भोंवळ, मूर्च्छा] **स्त्री०** चक्कर, घेरी (येणें). ❀ **कोणेकाची भोंवंड जिरविणें** त्याची रग किं० खैरी जिरविणें; त्याचा नक्षा उतरणें.

भोवडणें, भोंवडणें [**सं०** भ्रम्] **स० क्रि०** १ कोणेकाला चालण्याचे किं० धावण्याचे कष्ट करावयास भाग पाडणें. २ फेकून देणें. ३ (गुरें) हाकलून देणें किं० उधळून लावणें.

भोंवणें [**सं०** भ्रम्=वाटोळें फिरणें] **अ० क्रि०** १ मंडलाकार गतीनें फिरणें; वाटोळें फिरणें. २ (डोळे) उंचावरून खालीं नजर केल्यामुळें किं० पित्तादि कारणांमुळें घेरी आल्याच्या भावनेनें युक्त होणें; उ० ह्या पर्वतावरून खालीं पाहिलें असतां डोळे भोंवतात-

टीप,–ह्या अर्थी भावकर्तरि प्रयोगही होतो; उ० आज सारा दिवसभर मला भोंवत आहे. ३ उपद्रवकारक होणें; उ० काल खाल्लेलें कांद्याचें पिठलें मला अजून भोंवत आहे. ४ कोणेकामागें कांहीं मागणी करून धिरट्या घालीत राहाणें म्ह० त्याला एकसारखा तगादा करून उपद्रविणें.

भोंवता, भोंवतें, भोंवताला, भोंवतालीं, भोंवतां क्रि० वि० सभोंवार; सर्व बाजूंनीं. ꙮ **भोंवतालचा वि०** सर्व बाजूंचा; उ० ह्या डोंगरावरून भोंवतालचा सर्व प्रदेश स्पष्ट दिसतो. **भोंवती स्त्री०** देवाच्या मूर्तीला प्रदक्षिणा करण्याची गाभाऱ्याला चिकटून असलेली वाट.

भोंवर [**सं०** भ्रमर] **पु०** १ भुंगा. २ भुंग्याच्या आकाराचें स्त्रियांचें एक शिरोभूषण.

भोंवरकडी, भोंवरगांव, भोंवरजाळी खालीं 'भोंवरा' मध्यें पहा.

भोंवरा [**सं०** भ्रमि=भोंदरा, घेरी, मूर्च्छा, चक्र] **पु०** १ मुलांचा दोरी गुंडाळून फेकण्याचा आणि लाकडाची आगी बसविलेला लांबोडा एक वाटोळा पदार्थ. २ वाटोळ्या गतीनें फिरणारें पाणी. ३ घोडा इ० त्या अंगांवर केशांची एका बिंदूभोंवतीं असते ती केशपंक्ति. ४ गाय, म्हैस, इ० च्या अंगाला गवताची काडी इ० चा स्पर्श झाला असतां तेथें उत्पन्न होतें जें वर्तुळाकार स्फुरण तें. ५ मातीमध्यें वर मोठी आणि खालीं निमुळती होत गेलेली खळी करून त्यांत राहाणारा आणि मुंग्या इ० खाणारा एक क्षुद्र कीट किं० त्याची खळी. ६ भोंवरी म्हणून जी वेल आहे तिचें फळ. ७ शेंडीच्या भोंवतीं शोभेसाठीं राखतात तें केशवलय; संजाप; घेरा. ८ भ्रमर; भुंगा. ꙮ **भोंवरकडी** [**म०** भोंवरा+कडी] **स्त्री०** जी कडी हावी तशी वाटोळी फिरविली तरी खिळींतून न निसटतां वाटोळी फिरवितां येते अशी कडी. अशी कडी गुरांच्या दांव्याला असते. **भोंवरगांव पु०** विशिष्ट गांवाच्या सभोंवरचे जे गांव ते प्रत्येक. **भोंवरजाळी स्त्री०** भोंवरा फिरवावयाची दोरी. **एकाद्याच्या पायांवर भोंवरा** (किं० **भिंगरी**) **असणें** किं० **भोंवरा पडलेला असणें** तो सदासर्वदा भटकत असणें; तो घरांत मुळींच ठरत नसणें. **भोंवऱ्यांत सापडणें** संकटांत किं० पेचांत किं० पंचायतींत अडकलेलें असणें.

भोंवरी [**सं०** भ्रमि] **स्त्री०** १ वेली. २ पायांत कांटा रुतून जी वाटोळी गांठ तेथें उत्पन्न होते ती. ३ त्वचेवर सदोदित घर्षण होत असल्यामुळें तेथें जी टणक गांठ उत्पन्न होते ती. ४ कणेकडाचीं टोंकें रुखावर ज्या दोन स्थळीं टेकतात तीं प्रत्येक. ५ खेळे इ० नृत्य करीत असतां मंडलाकार करतात तें भ्रमण (घेणें, मारणें). ६ मोहोरी हें बीज (अशिक्षितांत).

भोंवळ [**सं०** भ्रम्; भ्रमि=घेरी] **स्त्री०** पित्तादि विकृतीमुळें येते ती घेरी; चक्कर. ꙮ **कोणेकाची भोंवळ जिरणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याच्या गर्वाचा परिहार होणें.

भोंवांडा, भोंवाडा [**म०**भोंवणें] **पु०** १ चक्कर; फेरा. २ सार्वजनिक रीत्या झालेला कोणेकाचा अपमान किं० फजिता (निघणें, काढणें). ३ पदार्थ फार फार डिवचला गेल्यामुळें होते ती नासाडी; कालवाकालव. ४ होळीच्या प्रसंगीं देवीच्या सोंगाची मिरवणूक (मिरवणें, काढणें, निघणें). ꙮ **दैवाचा, कर्माचा किं० नशीबाचा भोंवांडा पु०** दुर्दैवानें प्राप्त झालेलें संकट किं० आपत्ति.

भोंवार [**सं०** भ्रम्; भ्रमि] **स्त्री०** पाणरहाट, तेल्याचा घाणा, इ० च्या भोंवतीं बैल इ० फिरण्याची वर्तुळाकार वाट.

भोंवारगांव पु०, न० वर 'भोंवरा' मध्यें 'भोंवरगांव' पहा.

भोंशा ऊस पु० उसाची एक जात.

भोंस पु० १ बोरूसारखें एक तृण. २ उसाची एक जात; भोंशा ऊस.

भोसकट(–टें) न०, भोसकू पु० [**म०** भोक] खिंड; खिंडार; भगदाड; ओबडधोबड भोक.

भोसकणें, भोसकाविणें स० क्रि० तरवार, सुई, बोट, इ० दुसऱ्या पदार्थांत जोरानें खुपसणें किं० दांडगाईनें शिरकावणें. [भगदाड.

भोसका पु०, भोसकें न० भोक; खिंडार;

भोसडणें स० क्रि० (कोणेकाला) शिव्या देणें. ꙮ **भोसडपट्टी स्त्री०** कोणेकावर शिव्यांचा वर्षाव किं० त्याची खरडपट्टी (करणें, काढणें, निघणें).

भोसणें वर 'भोसकणें' पहा.

भोसा, भोसा ऊस पु० वर ' भोशा ऊस ' पहा.

भोळवट, भोळसर, भोळानाथ, इ० खालीं ' भोळा ' मध्यें पहा.

भोळसावणें [म० भोळा] स० क्रि० फसविणें; ठकविणें.

भोळा वि० १ साध्या वृत्तीचा, कपट न करणारा आणि दुसऱ्याच्या ठायीं कपटाची शंका न घेणारा. २ सहज ज्याला फसवितां येईल असा; अजागळ. टीप,–' भोळाभाळा ' वरील दोन्हीं अर्थीं योजण्यांत येतो. ❀ **भोळवट, भोळसर** वि० १ साधा; निष्कपट. २ अजागळ. **भोळानाथ, भोळाशंकर** पु० १ शंकर. २ (लक्षणेनें) अजागळ; साधा; निष्कपट. **भोळा भाव, भोळा भावार्थ** पु०साधी आणि निष्कपट वृत्ति. **भोळें भाग्य** न० अजागळ मनुष्यास श्रीमंत करणारें दैव. **भोळे भाविक** पु० अ०व० श्रद्धाळू लोक. **भोळें राज्य** न० अजागळपणाचा किं० मूर्खपणाचा कारभार; अंदाधुंदी. **भोळाभावीं** वि० निष्कपट वृत्तीचा किं० स्वभावाचा. **भोळाराजा** पु० अजागळ; साधा; निष्कपट. **भोळाभासा** पु०१चूक; चूकभूल.२ निष्काळजीपणामुळें झालेलें गैरवर्तन. **भोळीव** स्त्री० साधेपणा.

भोळाविणें वर ' भोळसावणें ' पहा.

भोळीव [म० भोळा] स्त्री० साधेपणा; निष्कपट वृत्ति.

भोळें [म० भोळा] न० १ चूक; नजरचूक. २ दुसऱ्याच्या नजरचुकीमुळें झालेला आपला लाभ. ३ भ्रम; भ्रांति; भुरळ (घालणें, पडणें).

भोक्तप्रमाण [सं०] वि० जें भोगणें किं० सोसणें अनिवार्य आहे तें.

भौतिक [सं०] वि० १ प्राण्यासंबंधाचें. २ पंचभूतात्मक. ३ हवा, पाणी, वीज, भूगर्भ, इ० संबंधाचें (शास्त्र, उपद्रव, उद्रेक, वैभव, इ०). ' आध्यात्मिक ' ह्याच्या व्यावर्तकत्वें.

भौम [सं०] वि० १ पृथ्वीसंबंधाचा; भूमीसंबंधाचा. २ इहलोकचें. ३ मातीचें किं० मातीपासून होणारें. पु० मंगळ हा ग्रह. २ नरकासुर. ❀ **भौमवासर** पु० मंगळवार हा आठवड्याचा दिवस. **भौमरत्न** न० पोवळें (दागिने,जपमाळा, इ० मध्यें योजतात तें).

भौस न० सोनाराकडे दागिना करावयासाठीं दिलेल्या सोन्यांतून तो कांहीं सोनें चोरून त्याच्या वजनाचा हीण धातु जो त्यांत घुसडून देतो तो.

भ्याट, भ्याड [म० भे] वि० भितरा; पुचाट.

भ्रतार [सं० भर्तृ]पु० नवरा; पति.

भ्रम [सं०] पु० १ पाण्याचा किं० वेशांचा भोंवरा. २ कुंभार;शिकलगार,इ० च्या चाकाचा फेरा. ३भ्रमण; हिंडणें.४ भोंवळ; घेरी.५डोक्यांत होतो तो विचारांचा घोटाळा; हे किं० तें अशा संबंधानें साशंकता; संदेह. ६ योग्य मार्गापासून च्युत होणें किं० दूर जाणें. ७ खोटा समज; चुकीचा ग्रह. ८ विचाराची अनिश्चितता. **भ्रमाचा भोपळा** पु० जें खरोखरीं चांगलें नाहीं तें चांगलें आहे असा कोणेकाचा झालेला खोटा ग्रह. ह्या खोट्या ग्रहाचें कांहीं प्रसंगानें निरसन झालें असतां ' भ्रमाचा भोपळा फुटला ' असा प्रयोग केला जातो. अशिक्षितांत ' भरम भोपळा ' असा शब्द रूढ आहे. **भ्रमिष्ट, भ्रमी** वि० १ घोटाळ्यांत पडलेला. २ अमुक पदार्थ हा कीं तो अशी ज्याला शंका पडली आहे तो. ३ ज्याचे विचार सदा घोटाळलेले असतात असा; सदा साशंक.

भ्रमी [सं० भ्रमिन्] वि० १ सदा शंकित. २ ज्याला घेऱ्या येण्याची विकृति आहे असा. ३ भटक्या.

भ्रमण [सं०] न० १ फिरणें; भटकणें. २ भोंवळ; घेरी. ३ एकादा विचार डोक्यांत घोळत राहणें. ४ वाटोळ्या गतीनें फिरणें किं०फिरविणें. ५ एक कुमुहूर्तविशेष. ❀ **भ्रमणचक्र** न० इहलोक हा सत्यस्वरूप आहे असा मनाचा (खोटा) ग्रह; माया सत्यरूप आहे असा (खोटा) समज.

भ्रमर [सं०] पु० १ भुंगा. २ जार. न० भोंवळ, घेरी. ❀ **भ्रमरकीट** पु० कुंभारीण माशी. मागें ' कुंभार ' मध्यें ' कुंभारीण ' पहा.

भ्रंश [सं०] पु० १ पडणें; गळणें;च्युत होणें. २ ऱ्हास; अपकर्ष. ३ नाश; विध्वंस. ❀**बुद्धिभ्रंश** पु० १ चळ; सदा साशंक वृत्ति. २ खोट्या मता-

कडे कल होण्याची मनाची वृत्ति; कोणेकाला कांहीं खोटेंनाटें सांगून त्याच्या विचारांत घडवून आणलेली चलबिचल. **स्मृतिभ्रंश पु०** बोलतांना शब्द, नांवें, इ० न आठवण्याचा विकार.

भ्रंशणें [**सं०** भ्रंश्] **अ० क्रि०** १ घोटाळ्यांत पडणें. २ स्वस्थानावरून च्युत होणें. ३ अपकर्ष पावणें. ४ ढासळणें. ५ कमजोर होणें. ६ चुकीच्या मार्गास लागणें. ७(स्त्री)भ्रष्ट होणें. **स०क्रि०** १ घोटाळ्यांत पाडणें. २ कोणेकाला त्याच्या स्थानावरून पाडणें. ३ कमजोर करणें. ४ (स्त्रीचें पातिव्रत्य) हरण करणें.

भ्रष्ट [**सं०** भ्रस्ज्=भाजणें, पीडणें] **वि०** भाजलेला (पोहा, चुरमुरा, इ०).

भ्रष्ट [**सं०** भ्रंश्=पडणें] **वि०** १ पतित; स्थानापासून गळलेला किं० पडलेला.२ पावित्र्यापासून ढळलेला. ३ आचारापासून ढळलेला. ४ स्वजातीला अयोग्य असें कांहीं कृत्य केल्यामुळें जातीला मुकलेला. ५ परपुरुषसंगामुळें अपवित्र झालेली(स्त्री).६घोटाळ्यांत पडलेला.꙳**भ्रष्टाकार पु०** विटाळशीचा विटाळ इ० चे, किं० सोंवळें ओंवळें इ० चें, किं० सोयर सुतक इ०चे, किं० विशिष्ट जातीचे आचार इ० चे निर्बंध न पाळल्यामुळें कुटुंब, जात, इ० मध्यें होते ती अव्यवस्था किं० तो अधर्म. **भ्रष्टाचार पु०** शास्त्रांविरूद्ध जें वर्तन तें. **भ्रष्टाभ्रष्ट स्त्री०** वर ' भ्रष्टाकार ' पहा. **भ्रष्ट्या वि०** बाटलेला.

भ्रष्टविणें [**म०** भ्रष्ट] **स० क्रि०** १ परस्त्रीशीं संभोग करून (तिला) अपवित्र करणें. २ जुलमानें गोमांस तोंडांत घालून किं० इतर प्रकारांनीं (कोणेकाला) त्याच्या धर्मातून बाहेर काढणें.

भ्रांत [**सं०**] **वि०** १ चुकलेला. २ घोटाळ्यांत पडलेला. ३बहकलेला.४ गोंधळांत पडलेला; बावचळलेला. ५ साशंक झालेला. **टीप**,– वरील सर्व अर्थीं ' भ्रांत्या ' असा अशिक्षितांत शब्द आहे.

भ्रांत [**म०** ' भ्रांति ' चा अपभ्रंश] **स्त्री०** खालीं 'भ्रांति' पहा.

भ्राता [**सं०** भ्रातृ] **पु०** १ भाऊ; २ जिवलग मित्र. ३ कोणीही आप्त.꙳ **भ्रातृगंधी** [**सं०** भ्रातृगंधिन्] **पु०** नांवाचा भाऊ. **भ्रातृजाया स्त्री०** भावजय; भावाची बायको. **भ्रातृद्वितीया स्त्री०** भाऊबिज; कार्तिक शुद्ध द्वितीया. मागें ' भाऊबीज ' पहा. **भ्रातृव्य पु०** १ पुतण्या. २ शत्रु.

भ्रांति [**सं०**] **स्त्री०** १ फिरणें. २ चक्राकार गति. ३ मिथ्या ज्ञान. ४ साशंक वृत्ति. ५ चूक; भूल. ६ गोंधळ; घोटाळा. ७ संशय. ꙳ **भ्रांतिमान् पु०** (**साहित्य**) एकादी वस्तु पाहली असतां तत्सदृश अशा दुसऱ्या एकाद्या वस्तूचा भ्रम झाला असें वर्णन असल्यास होतो तो अलंकार. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

भ्रामक [**सं०**] **वि०** १ घोटाळ्यांत पाडणारा. २ खोटा ग्रह करणारा; फसविणारा दिसण्यांत योग्य किं०खरा पण असण्यांत अयोग्य किं० खोटा (उपदेश,मत,इ०).**पु०**१ठक.२कोल्हा.

भ्रुकुटी [**सं०** भ्रुकुटि] **स्त्री०** वर ' भिंवई ' पहा. ꙳ **भ्रुकुटी चढविणें** उग्र मुद्रा धारण करणें. **भ्रुकुटिभग पु०** रागामुळें झालेला भिंवईचा वाकडेपणा.

भ्रू [**सं०**] **स्त्री०** भिंवई. मागें ' भिंवई ' पहा. ꙳ **भ्रूलता स्त्री०** लतेसारखी भिंवई. **भ्रूमध्य पु०** दोन भिंवयां या मधील जागा. **भ्रूसंकेत पु०** भिंवई वाकडी करून कोणेकाला केलेली इशारत किं० सूचना.

भ्रूण [**सं०**] **पु०** १ गर्भ. २ बाल . ꙳ **भ्रूणहत्या स्त्री०** १ बालहत्या. २ गर्भ पाडणें. **भ्रूणहत्यारा वि०** गर्भ पाडविणारा (उपाय, औषध, वैद्य, इ०).

म

म मराठी वर्णमालेंतील पंचविसावें व्यंजन.

मऊ [**सं०** मृदु] **वि०** १ दाबला असतां दबतो तो पदार्थ (उशी, गादी, इ०). २ न बोचणारा, न खुपणारा (जोडा इ०). ३ सौम्य (भाषण किं० असें भाषण करणारा मनुष्य). ४ हावें तसें वाकवितां किं० वळवितां येईल असें. ५ दुसऱ्याचें सांगणें निमूटपणीं ऐकून घेणारा; तकरार न करणारा (मनुष्य). ॐ **मऊ पायांचा वि०** नपुंसक; षंढ. **मऊ रेशमि न०** (लक्षणेनें) अत्यन्त मऊ (पोळी, तान्ह्या मुलाचें अंग, इ०). **मऊसर वि०** साधारणपणें मऊ; थोडासा मऊ.

मकडी [**म०** माकड; **सं०** मर्कट] **स्त्री०** १ माकड जातीची स्त्री. २ माकड (तुच्छतेंत). ॐ **लकडीवांचून मकडी वठणीस येत नाहीं** दुष्ट आणि व्रात्य माणसाला ताळ्यावर आणण्यास कठोर उपाय करावे लागतात.

मकण, मकाण न० धान्याचीं ताटें.

मकतल [**म०** मकतल] **वि०** नारायण पेठजवळचा मकतल नांवाचा जो एक गांव तेथील (वस्त्र,–जें कच्च्या रंगाचें आणि विरळ विणीचें आणि अशक्त असतें).'मकतल'च्या उलट'अणखर'.

मकतूल, मखतूल पु० पीळदार रेशीम.

मकर [**सं०**] **पु०** १ सुसर; मगर. २ मकर ही रास.३सैन्याची मकराच्या आकाराची रचना. ॐ **मकरकुंडल न०**मकराच्या आकाराचें कुंडल. **मकरसंक्रमण न०, मकरसंक्रान्ति स्त्री०** सूर्याचें मकर राशींत जाणें किं० त्याच्या जाण्याचा दिवस. **मकरध्वज पु०** मदन; कामदेव; मन्मथ.

मकर [**अ०** मक्र्] **न०** १ लबाडी; कपट. २ ढोंग. ॐ **मकरी वि०** लुच्चा; लबाड; कपटी.

मकरंद [**सं०**] **पु०** फुलांतील मध.

मकळी स्त्री० जोंधळा, बाजरी, इ० धान्यांवर पडणारा एक रोग.

मका पु० मकई नांवाचें धान्य. ॐ **मकाण न०** मक्याचीं ताटें. **पु० मकाणा** १ मक्याच्या दाण्यांच्या लाह्यांचा एक एक दाणा.२एक कमलबीज,–ज्याच्या भाजून लाह्या करतात.

मकाण, मकान [**अ०** मकान्] **न०** १ वास्तव्याची जागा; घर. २ मुक्कामाची जागा. ३ आपलें ठिकाण. ४ भाषण, लेख, इ०चा रोख किं० धोरण. ५ बुद्धीचा पल्ला.

मकारपंचक [**सं०** पांच मकार] **न०** शाक्त लोक म अक्षरानें सुरू होणाऱ्या पांच गोष्टी मोठ्या समारंभानें करतात त्या समुच्चयानें. त्या पांच ह्या:–मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, आणि मैथुन.

मकुड्याचा खिळा पु० खूप रुंद डोक्याचा खिळा.

मकोडा वि० सुंदर, देखणा.

मक्तसर पु० जुना वतनदार,–ज्याच्याकडे कांहीं सरकारी काम नाहीं.

मक्ता [**अ०** मक्तअ] **पु०** कोणेकाकडे ठरवून दिलेलें कांहीं काम. ॐ **मक्तेदार, मक्तेकरी, मक्तेवाला पु०** ज्याणें कांहीं कामाचा कांहीं शर्तींवर कोणेकापाशीं ठराव केला आहे तो मनुष्य. **मक्त्याची मामलत स्त्री०** मक्त्यानें कोणेकाला दिलेला मामलतीचा अधिकार.ह्याच्या व्यावर्तकत्वें ' कच्ची मामलत '.

मख, मख्ख वि० ज्याचे विचार लपविलेले असतात किं० जो आपले गुप्त विचार किं० बेत यांचा सुगावा लागूं देत नाहीं असा; आंतल्या गांठीचा (मनुष्य). [इ०.

मख [**सं०**] **पु०** यज्ञ; उ० हयमख, मखयज्ञ,

मख, मोख पु० गाभा; सत्त्वांश.

मखतूल पु० पिळाचें रेशीम; रेशमाची कांकरी.

मखदूर [**अ०** मक्दूर्] **पु०** १ ताकद; जोर; शक्ति. २ कसदारपणा.

मखमल, मखमाल [**अ०** मख्मल्] **न०** १ अतिशय मऊ असें एक वस्त्रविशेष. २ एक फुलझाड. **न०** त्याचें फूल. **मखमली किडा पु०** अनेक पायांचा एक कीटविशेष.

मखर न० १ जाळ्या, उंचीं वस्त्रें, इ० सभोंवतीं लावून देवाच्या मूर्ति, संमाननीय पुरुष, इ० साठीं प्रसंगविशेषीं करतात तें सुशोभित स्थळ. २ जाळ्यांची ताटी.

मखलाशी [**फा०** मख्लसी] **स्त्री०** १ सरकारनें कांहीं ठराव केल्याची किं० ठराव मान्य केल्याची जी त्याच कागदावर निशाणी केलेली असते ती. २ वादाचा निकाल. ३ सनद, नेमणूक, मक्ता, भाडेपट्टा, इ० च्या कागदावर जो सरकारचा शिक्का असतो तो किं० अधिकाऱ्याची सही असते ती. ४ टीका; भाष्य. ५ साफसुफी; शोभादायक रचना. ६ बहुत देणें घेणें असतां थोड्या द्रव्यानें करून घेतलेली तोड.

मखी, मख्खी [**सं०** मक्षिका; **हिं०** मखी] **स्त्री०** १ खुबी; मर्म. २ धाटणी. ❀ **कोणेकाची मख्खी उतरणें** त्याचें पूर्ण अनुकरण करणें.

मख्ख वि० आपले विचार कोणाला न कळूं देणारा. वर ' मख ' पहा.

मखूखम वि० १ मजबूत; वळकट. २ जड; अवाढव्य (ओझें इ०).

मख्ता उ० वर ' मक्ता ' इ० पहा.

मग क्रि० वि० १ नंतर; मागून. २ असें आहे त्या अर्थी. ३ बरें? पुढें काय ?

मगज [**फा०**] **पु०** १ गर; गाभा. २ शेंग, भाकरी, फळ, इ० तील मऊ भाग.

मगजी [**फा०**] **स्त्री०** कोर; कंगोरा; कांठ; संजाप.

मगदूर [**अ०** मक्दूर]**पु०** १सामर्थ्य; ताकद; जोर. २ सत्त्वांश, कस (जमीन इ० चा).

मगन [**सं०** ' मग्न ' चा गांवढळ अपभ्रंश] **वि०** १ कांहीं विचारांत गुंतलेला किं० गर्क झालेला; तल्लीन. २ परम संतुष्ट.

मगनमस्त, मगरमस्त [**अ०** मग्रूर (उन्मत्त)+**फा०** मस्त् (उन्मत्त)] **वि०** सामर्थ्य, पैसा, अधिकार, इ० मुळें उन्मत्त, गर्विष्ठ, किं० बेफाम झालेला.

मगर [**सं०** मकर] **पु०** सुसर; नक्र. ' मगर मासा ' ह्याच अर्थी. ❀ **मगरमिठी स्त्री०** १ कोणेकाला बाहुपाशांत घट्ट पकडून ठेवणें. २ कोणेकाला एके ठिकाणीं घट्ट खिळवून किं० अडकावून ठेवणें; त्याला न हालूं देणें; त्याला पक्केपणीं धरून किं० पकडून ठेवणें (लाक्षणिक अर्थानें सुद्धां).

मगरी स्त्री० १ छपराच्या माथ्याची कड (बांधणें). २ बागेंतील झाडांची हारी किं० ओळ. ३ पन्हळाच्या दोन बाजूंच्या दोन उंच कडा प्रत्येक.

मगरूर [**अ०**] **वि०**उन्मत्तपणा; परमावधीस पोचलेला गर्व. ❀ **मगरूरी स्त्री०** गर्विष्ठपणा; उन्मत्तपणा.

मंगल [**सं०**] **वि०** शुभ, सुलक्षणी; उ० मंगल दिन. **न०** १ सुदैव. २ कल्याण. ३ शुभ शकुन. ४ विवाह इ० शुभकार्य. ५ शुभकार्याच्या आरंभीं म्हणतात ते ईश्वरस्तुतिपर श्लोक इ०. ६ ग्रंथाच्या किं० कोणत्याही कार्याच्या आरंभीं करतात तें ईश्वरचिंतन किं० ईश्वराच्या स्तुतिपर भजन, पठन, इ०. **पु०** मंगळ हा ग्रह. सूर्याभोंवतीं फिरणारे जे ग्रह त्यांत मंगळ हा पृथ्वीच्या बाहेर आणि गुरूच्या आंत फिरणारा आहे. **टीप,**–' मंगल 'हा शब्द मराठींत 'मंगळ'असाही लिहिण्यांत येतो.❀**मंगलाचरण न०** १ कार्यारंभींची ईश्वराची स्तुति.२आशीर्वाद. **मंगलाचरण करणें** कार्याला आरंभ करणें. **मंगलपाठक पु०** भाट. **मंगलसूत्र न०** विवाहविधीमध्यें नवरीच्या गळ्यामध्यें भाणि ओंविलेलें सूत्र जें सौभाग्यचिन्ह म्हणून नवरा बांधतो तें.**मंगळवार पु०** आठवड्याचा एक वार,–सोमवाराच्या पुढचा आणि बुधवाराच्या मागचा. **मंगलमूर्ति पु०**गणपति हा देव. **मंगलकार्य न०**लग्न, मुंज, इ० शुभ विधि.**मंगलजननी स्त्री०** पृथ्वी. **मंगलभवानी स्त्री०** अचरट आणि मूर्ख पोरगी. **मंगलवाद्य न०** शुभ प्रसंगीं वाजवितात तीं वाद्यें प्रत्येक. **मंगलस्नान न०** अंगाला तेलें लावून केलेलें स्नान. **मंगलगौरी, मंगलागौर स्त्री०**१ पार्वतीदेवी. २ लग्नानंतरचीं पहिलीं पांच वर्षें मुलगी श्रावण महिन्यांतील मंगळवारीं देवीची पूजा करते ती, किं० त्या पूजेचा विधि, किं० त्या पूजेचें व्रत. **मंगलाष्टक न० ए० व०** लग्न, मुंज, इ० प्रसंगीं उपाध्या म्हणतो तीं पदें प्रत्येक. **मंगलाष्टक गात बसणें** चरफडत,तरफडत,रडत बसणें. **मंगलाष्टकें न० अ० व०** लग्न, मुंज, इ० प्रसंगीं उपाध्या म्हणतो जीं आठ पदें तीं. **मंगलाक्षता स्त्री० अ० व०** मंगल प्रसंगीं आशी-

वांद देतांना अंगावर टाकतात ते कुंकुममिश्रित तांदूळ,–**टीप** वरील सर्व शब्दांत ' मंगल ' बद्दल ' मंगळ ' घेतला तरी चालतो. खालीं ' मंगळ ' पहा.

मंगळ [**सं०** मंगळ] **वि०, पु०, न०** सर्व अर्थी वर ' मंगल ' पहा. ❀ **मंगळधाम न०** १ देव. २ साधुपुरुष. ३ वैभवशाली पुरुष. **मंगळभगिनी स्त्री०** (लग्नाच्या सोहाळ्यांत) करवली. **मंगळभारणी स्त्री०** एकाचे पाय दुसऱ्याच्या पायांत दाबून पाय चेपण्याचा प्रकार. **मंगळमाद्या नि०** मूर्ख; अडाणी. **टीप,**–इतर वाक्प्रचार वर ' मंगल ' मध्यें पहा.

मंगी [**नंदभाषेंत**] **वि०** आठ ही संख्या.

मंगी, मंगू स्त्री० मांजरी (प्रेमाचा शब्द).

मंगूस, मंगूसवेल पुढें ' मुंगूस, ' ' मुंगूसवेल' पहा.

मंगोडें न० मांजर (मुलांच्या भाषेंत).

मग्न [**सं०**] **वि०** १ पाणी इ० मध्यें बुडालेला. २ कांहीं कार्यात तल्लीन किं० एकाग्र झालेला.

मघई स्त्री० विड्याच्या पानाची एक उत्तम जात; उ० मघईचें पान.

मघा [**सं०**] **स्त्री०** १ सत्त वीस नक्षत्रांतील दहावें. २ ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस. **टीप,**– ह्या शब्दाचा उपयोग बहुधा **अ० व०** मध्यें होतो.

मघां, मघांशां क्रि० वि० अल्पकालामागें; [नुकतेंच.

मंच,मंचक [**सं०**] **पु०** पलंग; माचा.

मचणें [**हिं०** मच्ना] **अ० क्रि०** (दांडगाई, धिंगामस्ती, खिदळणीं, इ०) अनियंत्रितपणें चालणें किं० बोकाळणें.

मचवा पु० एक प्रकारचें लहान गलबत.

मचविणें [**सं०** ' मचणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (कांहीं भलती गोष्ट) अनियंत्रितपणें चालविणें. २ तंटा, भांडण, इ० उपस्थित करणें किं० चेतविणें.

मंची [**सं०** मंच] **स्त्री०** माती, विटा, कौलें, इ० इकडून तिकडे वाहून न्यावयाची फळी, पेटी, इ० साधन. पुढें ' मंजी' पहा.

मचूळ वि० पूर्णपणें खारट नव्हे आणि गोड नव्हे असें (पाणी); बेचव, नीरस (फळ इ०).

मॅच्छ [**सं०** मत्स्य] **पु०** १ मासा,–एक जलचर प्राणी. २ पाण्याचा जोराचा प्रवाह कापून पाण्याचा जोर कमी करणारा जो भिंत, पूल, इ० च्या रचनेंतील कुऱ्हाडीच्या टोकासारखा भाग तो. ❀ **मच्छयंत्र न०** खलाशाचें दिशा दाखविणारें यंत्र; होकायंत्र.

मच्छर [**सं०** मत्सर=डांस; मार्शा] **पु०** एक सपक्ष क्षुद्र प्राणी. ❀ **मच्छरदाणी (–नी) स्त्री०** मच्छरांपासून निवारण करणारा एक प्रकारचा तंबु.

मजकूर [**अ०**] **वि०** १ पूर्वी सांगितलेला; पूर्वी लिहिलेला; उपरिनिर्दिष्ट. २ चालू; उ० साल मजकुरीं चांगला पाऊस पडला; उ० साहेब मजकूर म्ह० हे साहेब किं० वर सांगितलेले साहेब. **पु०** १ निवेदन; हकीगत. २ गोष्ट. ३ युक्ति; मसलत. ४ महत्त्व; किंमत; सामर्थ्य; उ० इराणीचा मजकूर किती ? मारून धुडकाऊन देऊं. ५ संदर्भ; भाषणाचा विषय.

मंजन [**सं०** मंज्=घासून आणि पुसून स्वच्छ करणें] **न०** १ दांत, हिरड्या, इ० घासण्याच्या उपयोगाचें कोणतेंही चूर्ण किं० साधन किं० तेणें करून केलेली घासण्याची क्रिया. २ पदार्थ घासून स्वच्छ करण्याचें कांहींहीं साधन किं० क्रिया. ❀ **दंतमंजन न०** दांत घासून स्वच्छ करण्याची पूड; उ० पोरवालचें दंतमंजन उत्तम म्हणून गणलें जातें.

मजबूत (–द) [**अ०** मझ्बूत] **वि०** कायमः दृढ; बळकट; भक्कम. ❀ **मजबुती स्त्री०** दृढपणा; भक्कमपणा. **मजबूतमिजाज वि०** पक्की आहे प्रतिज्ञा ज्याची असा; करारी; दृढनिश्चयी; उ० आं साहेब दूरंदेश व मजबूतमिजाज आहेत.

मजमू, मजमू [**अ०** मज् मूअ, मजमूअ] **स्त्री०** १ मजमूदाराचें कर्तव्य किं० हुद्दा. २ वसूलीचें काम; वसूली. ❀ **मजमूदार पु०** १ वसूली कारकून. २ वसूलाचा हिशेब तपासणारा अधिकारी.

मजमून [**अ०**] **पु०, न०** १ मजकूर; सारांश; पत्रांतील वृत्तान्त. २ लेख, वाद, तंटा, इ० चा विषय.

मजरा [**अ०** मज्रअ] **पु०** १ शेतकीच्या सोई-

साठीं शेताच्या संनिध आणि गांवापासून अलग राहिलेल्या शेतकऱ्यांची दहा पंधरा झोपड्यांची वसाहत. २ ' मुजरा 'चा अपभ्रंश.

मंजरी, मंजिरी [**सं०** मंजरि, मंजरी] **स्त्री०** १ अनेक फुलें एका पुढें एक ज्याला लागलीं आहेत आणि जो टोकाकडे निमुळता होत गेला आहे असा तुळस, सबजा, इ०चा दांडा. २ वाजवावयाचा लहान टाळ,—एक वाद्य.

मजल [**अ०** मंझिल्] **स्त्री०** १ न थांबतां एका विशिष्ट अवधांत आक्रमिलेलें अंतर. २मुक्कामाची किं० विसाव्याची जागा; टप्पा; पेणें. ३ कोणत्याणही कामाचा पार पाडलेला भाग;पल्ला. ४ (कामाचा) शेवट, अंत, किं० पर्यवसान. ५ प्रवासाचा शेवट. ꙳ **मजल दरमजल क्रि० वि०** मध्यें न थांबतां (चालणें, प्रवास करणें).

मजलस [अ०मज.लस्]**स्त्री०** १ सभा;बैठक; उ० मवाळांची मजलस. २ गाण्याबजावण्यासाठीं जमलेल्या लोकांचा समूह. पुढें ' मजालस ' पहा.

मजला [**हिं०**] **पु०** १ घराचा भूप्रदेश;उ० घराचा खालचा मजला, दुसरा मजला, इ०. २ वस्त्राचा कांठ,किं०लाकूड किं०दगड इ०वरचें नक्षीकाम,ह्यांच्या एकापुढें एक अशा ज्या पंक्ति असतात त्या प्रत्येक. ꙳**सातव्या मजल्यावर बसणें** १उच्चपदावर स्थित असणें. २ दिमाखांत राहाणें.

मजा [**फा०** मजाह्] **स्त्री०** १ रुचि; चव; आस्वाद. २ गंमत. ꙳ **मजेदार वि०** गमतीचा; खूप करणारा.

मंजा पु०स्त्रीचीं आर्जवें पुरुष करीत आहे अशा मजकुराची लावणी. अशा लावण्या गाणाऱ्या शाहिराला ' मंजेवाला ' म्हणतात. पुरुषाचीं आर्जवें स्त्री करीत आहे अशा मजकुराच्या लावणीला ' पंजा ' किं० ' कलगी लावणी' म्हणतात. पंजा आणि मंजा हे शृंगारिक लावण्यांचे दोन प्रकार आहेत.मागें ' कलगी ' आणि ' पंजा ' हे शब्द पहा. ꙳ **कोणेकाचा मंजा उतरणें** १ त्याच्या तोंडावरून खालीं हात फिरविणें किं० सरकावणें.२त्याच्या गर्वाचा परिहार करणें; त्याचा नक्षा उतरणें.

मजाख [**अ०** मजाज्] **स्त्री०** थट्टामस्करी; गंमत; विनोद.

मजाल [**अ०**]**स्त्री०**सामर्थ्य; ताकद;बिशाद. उ०गोंदोबाची काय मजाल आहे माझ्याशीं कुस्ती करण्याची ?

मजालस [**अ०** ' मज्लस् ' चें **अ० व०**] **स्त्री०**१ दरबार; राजसभा. २ गाण्याबजावण्यासाठीं जमलेली मंडळी. ३ कोणत्याही कार्यासाठीं जमलेले लोक.

मंजिरी मागें ' मंजरी ' पहा.

मंजिष्ठ [**सं०**] **वि०** लालभडक. ꙳**मंजिष्ठमेह पु०** तांबडी लघवी होणें हा विकार.

मंजिष्ठा [**सं०**] **स्त्री०** एक वनस्पती.

मंजो स्त्री० विटा,कौलें,इ०वाहून न्यावयाची कुंभार इ०ची पाटी,फळी,इ०.वर 'मंची ' पहा.

मजीत [**हिं०**] **वि०** १ मळलेला, विटलेला, फिका पडलेला (रंग, शोभा, तजेला).२ (**लाक्षणिक**) चांगली उपस्थित नाही किं० विसरली आहे अशी (विद्या,कला, इ०).

मंजु [**सं०**] **वि०** मोहक; रमणीय; मधुर. ꙳ **मंजुघोष पु०** खबूतर; होला पारवा. **मंजुमणि पु०** पुष्कराज. [इ० पहा.

मजुमदार इ०मागें' मजभू'मध्यें पहा.मजमूदार'

मजुरा, मुजरा [**अ०** मुज्रा] **पु०** १सलाम. २गवई इ० लोक यजमानापुढें म्हणतात तें गाणें.३ लक्ष्यावर नेम धरणें. ४ बाद करणें. ꙳ **मुजरादास्त स्त्री०** शेत, वाडी, इ० संबंधाचें जे सरकारला द्रव्य द्यावयाचें त्या द्रव्यांतून सरकारला प्रत्यक्ष दिलेल्या मालाच्या किंमतीची वजा केलेली रकम किं०ही रकम वजा करणें.

मजूर [**फा०** मझ्दूर] **पु०** दिवसास अमूक पैसे देऊं अशा करारानें कामाला लाविलेला गडी. ꙳**मजूरी स्त्री०**अशा गड्याला कामाबद्दल दिलेला पैसा. **मजूरदार पु०** १ मजूर. २ भाडोत्री काम करणारा; केवळ पैशावर नजर देऊन काम करणारा.

मंजुल, मंजूळ [**सं०** मंजुल] **वि०** कानाला गोड लागणारा; सुश्राव्य. [असलेलें.

मंजूर [**अ०**] **वि०** मान्य; कबूल; पसंत

मज्जन [**सं०**] **न०** १ स्नान. २ बुडी मारणें. ३ बुडवून टाकणें. ४ (कांही कामांत किं० विषयांत) गढणें, तल्लीन होणें, किं० प्रवीण होणें.

मज्जा [**सं०**] **स्त्री०** १ मेंदू; मगज. २ सत्त्व; गरि. ॐ **मज्जारस पु०** वीर्य; रेत. **मज्जामेह पु०** मूत्रांतून शरीरांतील सत्त्व निघून जाणें हा रोग.

मज्जाव, मज्जाव [**हिं०**] **पु०** जाण्यायेण्याला प्रतिबंध किं० मनाई; आडकाठी.

मंज्या पु० मुलांची खेळण्याची गोटी; वेंदुल.

मटकणें, मटकावणें स० क्रि० १ एकदम खाऊन टाकणें. २ कांहीं व्यवहारांत (पैसे) खाणें. ३ (कांहीं पदार्थ) एकदम आणि घाईघाईनें खाऊन टाकणें.

मटकी [**सं०** मट्टक] **स्त्री०** एक धान्यविशेष.

मटगा वि० लांडा; तोकडा; आखूड.

मटगोळा पु० एका दमांत किं० एका बैठकीस खालेला कांहीं खाद्य पदार्थ. ॐ **मटगोळा करणें** कांहीं खाद्य पदार्थ घाईघाईनें खाणें किं० खाऊन संपविणें.

मट्ट क्रि० वि० कांहीं न बोलतां आणि एकदम (उभ्या संस्थांनातून खालीं बसणें). ॐ **मट्टकन क्रि० वि०** वर 'मट्ट' चा अर्थ पहा. **मट्टयास येणें** फार काम केल्यामुळें किं० अंगांत ताकद नसल्यामुळें पुढें काम चालू ठेवण्यास असमर्थ होणें; कामाखालीं जेरीस येणें.

मठ [**सं०**] **पु०** १ यति, गोसावी, ब्रह्मचारी, इ० च्या राहाण्याची जागा. २ पाठशाला. ३ देऊळ. ॐ **मठभिक्षा स्त्री०** भिक्षा मागण्यासाठीं दारोदार न हिंडतां मठांतच कोणी धार्मिक माणसानें आणून घातलेली भिक्षा.

मठ [**सं०** मट्टक] **पु०** एक कडधान्य.

मठरणें, मठारणें, मठाळणें स० क्रि० १ (नव्या भांड्याचे ठोके) हातोडीनें ठोकून साफ करणें. २ कांहीं कामाला प्रवृत्त होण्याला (कोणेकाचें मन) वळविणें. [येणें.

मठरणें, मठारणें अ० क्रि० (जखम) भरत

मठा पुढें 'मठ्ठा' पहा.

मठारणें [**म०** मठारणें] **न०** भांड्याचे पोचे किं० ठोके साफ किं० गुळगुळीत करण्याचें तांबट इ० चें एक हत्यार.

मठिका, मठी [**सं०**] **स्त्री०** १ लहान मठ. २ लहान घर. ३ गप्पा मारणें, सोंगट्या खेळणें, इ० चा कांहीं ठराविक मंडळींचा अड्डा.

मठ्ठ, मठ्या वि० १ अतिमंद किं० संथ (बैल, टोणगा). २ बुद्धिहीन (माणूस, डोकें). ३ संवेदनाशून्य (गात्र, त्वचा).

मठ्ठा, मठा पु० १ लोणी न काढतां साधारणपणें ढवळून पातळ केलेलें दहीं. २ दाट ताक.

मंड [**सं०**] **पु०** १ अलंकार; दागिना. २ साय; निवळी; फेस; तवंग. ३ भाताची पेज. ४ मद्याचा सत्त्वांश. ५ कांजी. ६ सार; सत्त्व. ७ आजाऱ्याला देण्यासाठीं भाताच्या लाह्या शिजवून त्यांचें काढलेलें पाणी.

मड [**म०** मढें=प्रेत] **न०** १ उपद्रवी माणूस; शुष्ककाष्ठ. २ कामांत विघ्न उपस्थित करणारा माणूस.

मंडई [**हिं०**] **स्त्री०** भाजीपाल्याची जेथें खरेदी आणि विक्री होते असें ठिकाण.

मंडक [**सं०**] **पु०** मांडा हें पक्वान्न.

मडकी [**सं०** मणिक=डेरा] **स्त्री०** १ डेरा; माठ. **मडकें न०** मृत्तिकेचें पात्र. **मडकूल न०** मडकें (तुच्छतेनें).

मंडण, मंडन [**सं०** मंडन] **न०** १ भूषण; अलंकार. २ मंडळी; मनुष्यांचा समुदाय. ३ एखाद्या विषयाचें समर्थन.

मंडप [**सं०**] **पु०** १ लग्न, मुंज, इ० प्रसंगीं जमीनींत उभे खांब पुरून त्यांवर आडवे वांसे टाकून घर इ० पुढें सूर्याचें उन्ह इ० पासून निवारण करावयासाठीं वस्त्रादिकांनीं आच्छादित करतात ती रचना; मांडव. २ लतांचा कुंज. ३ मेघांचें आकाशांत गोळा झालेलें पटल; उ० पावसानें किं० ढगांनीं आज सारा दिवस मंडप घातला आहे. ॐ**सभामंडप पु०** देवळापुढें दगड, विटा, इ० चें बांधकाम श्रोते, भाविक लोक, इ० ना बसावयासाठीं केलेलें असतें तें. **मंडपदेवता स्त्री०** लग्न इ० प्रसंगीं घातलेल्या मंडपाची अधिष्ठात्री देवता पूजिली जाते ती. **मंडपप्रतिष्ठा स्त्री०** ह्या मंडपदेवतेची यथाविधि केलेली स्थापना. **मंडपशोभा स्त्री०** विवाहादि प्रसंग उठून दिसावा म्हणून शोभेसाठीं जीं हंड्या, झुंबरें, झालर, इ० लाविलेलीं असतात, किं० सुंदर वस्त्रें किं०

दाग्नि धारण केलेले असतात त्यांचा समुच्चय. **मंडपोद्वासन न०** लग्न इ० प्रसंगीं घातलेल्या मंडपांत आवाहन करून स्थापिलेली जी देवता तिचें त्या प्रसंगाच्या समाप्तीस विसर्जन किं० उत्थापन.

मडमडणें अ० क्रि० येणाऱ्या ताप इ०आजाराची पूर्व चिन्हें (शरीरांत) दिसूं लागणें.

मंडल [सं०] वि० वाटोळें; वर्तुळाकार. **पु०** सैन्य इ०ची चक्राकार रचना. **न०** १ घेर; परिघ. २ वर्तुळ; वलय. ३ चंद्र, सूर्य, इ०चें बिंब. ४ मंडलाकार गति. ५ मनुष्यें, पशु, इ०चा समुदाय. ६ मंतरलेली जागा. ७ ग्रहाच्या गतीची कक्षा म्ह० त्याचा फिरण्याचा मार्ग. ८ घोडा फिरवावयाचा वाटोळा मार्ग.९ देश; राष्ट्र. १० आसपासचे राजे समुच्चयानें. ११ ऋग्वेद-खंडविशेष. १२ गजकर्ण; नायटा. १३ सूर्य, चंद्र, इ०च्या भोंवतीं पडतें तें खळें; परिघ. १४ जेवतांना ताटाखालीं काढतात ती पाण्याची आकृति. १५ वेचाळीस दिवस (वैद्यक). **मंडलाग्र पु०** तरवार. **मंडलाधिप, मंडलेश्वर पु०** १ राजा. २ मांडलिक राजा. **मंडलवर्ती** [**सं०** मंडलवर्तिन्] **पु०** मांडलिक राजा. **मंडली** [**सं०** मंडलिन्] **पु०** १ वाटोळ्या गतीनें फिरणारा वारा. २ महासर्पविशेष. **मंडलीक पु०** मांडलिक राजा. **मंडलवत् वि०** वाटोळा.**क्रि०वि०**वर्तुळाप्रमाणें; वाटोळ्या गतीनें. **मंडली स्त्री०** स्पर्श केल्याबरोबर वेटोळें करून बसणारा अनेक पायांचा एक किडा. ह्या अर्थी ' मंडाळी ' सुद्धा. **मंडलवत [सं०**मंडल+पत्र]**न०** अनेक पानें चोयांनीं टाचून जेवणासाठीं केलेलें पान; पत्रावळ. **घोड्याला मंडल वर धरणें** आपण मध्यें उभें राहून घोड्याला दोरी बांधून वाटोळें धावावयास लावणें; आपण घोड्यावर आरूढ होऊन त्याला चक्रावर पिटाळणें.**टीप,**–' मंडल ' बद्दल ' मंडळ ' हेंही रूप सर्व शब्दांत योजलें जातें.

मंडवळी स्त्री० पुढें ' मुंडावळ ' पहा.

मंडळ [**सं०** मंडल] **न०** वर ' मंडल 'पहा.

मंडाई स्त्री०, मंडावण न० [**हिं०**] सावकारापासून पैसा उसना घेतला असतां त्याच्या संतोषार्थ योग्य व्याजापेक्षां अधिक जें द्रव्य ऋणको त्याला देतो तें.

मंडाण, मंडान [**सं०** मंडल] **न०** १ढगांची अंधेरी. २ मेघांचा समुदाय. ३ पावसाच्या आरंभीं होते ती मेघांनीं व्याप्त अशी आकाशाची स्थिति. **पावसान मंडाण घालणें** पाऊस पडूं लागण्याचीं चिन्हें आकाशांत दिसूं लागणें.

मंडावळ, मंडावळी स्त्री० पुढें ' मुंडावळी ' पहा.

मंडाळी [**सं०** मंडल] **स्त्री०** एक अनेक पायांचा किडा,–ज्याला स्पर्श केला असतां जो वेटोळें करून स्तब्ध राहातो. वर 'मंडल ' मध्यें ' मंडली ' **स्त्री०** पहा.

मंडित [**स०**] **वि०** शोभविलेला; अलंकृत; **वज्रचूडेमंडित वि०** सुवासिनीच्या नांवामागें हा शब्द पत्रांत योजण्यांत येतो; उ० वज्रचूडेमंडित भागीरथीबाई.

मंडूक [**सं०**] **पु०** बेडूक. **मंडूकप्लुति स्त्री०** मध्यें कांहीं शब्द किं० मजकूर टाकून पुढें जाणें.

मंडूर [**सं०**] **न०** १ लोखंडाचा कीट. २ एक रसायनविशेष.

मडें, मढें [**सं०** मृत] **न०** प्रेत; मुडदा. **मढ्याच्या टाळूवरचें लोणी चाटणारा पु०** निंद्य आणि हिडिस्स प्रकारची काटकसर करणारा. **केश उपटल्यानें मढें हलकें होत नाहीं** क्षुल्लक बाबतींत काटकसर केल्यानें बरकत येत नाहीं. **मेलें मडें आगीला भीत नाहीं** ज्याची एकदा पूर्ण फजीती झाली आहे त्याची पुन्हा फजीती झाली तर त्याची त्याला परवा नसते. **मढ्यावर पाय देऊन जाणें** मृत किं०मरणोन्मुख माणसाकडे दुर्लक्ष्य करून कांहीं जरुरीच्या कामानिमित्त दुसरीकडे किं० परगांवीं निघून जाणें. **मढेकळा, प्रेतकळा स्त्री०** आजाऱ्याची किं० अपराध्याची उतरलेली मुखचर्या. **मडेपंचक न०** वैशाख महिन्यांत धनिष्ठादि नक्षत्रें येतात तीं समुच्चयानें.ह्या अवधींत माणसें फार मरतात

मढणें, मढविणें [**हिं०** मढ्ना] **स० क्रि०** कातडें, वस्त्र, कागद, इ० नीं पदार्थविशेषाच्या आंतल्या बाजू किं० बाहेरच्या बाजू आच्छादित करणें; उ० ही वेताची पेटारी कातड्यानें मढविण्याला मला तीन रुपये खर्च आला.

मढविणें वर ' मढणें ' पहा.

मढी [म० मठी] **स्त्री०** १ साधु, वैरागी, गोसावी, इ० चीं लहानशी झोपडी. २ डोंगराच्या पायथ्याशीं स्वच्छ पाण्यासाठीं खणलेली खळी.

मढें वर 'मडें' पहा.

मण [**सं०** मान] **पु०** १ एक वजनी किं० मापी परिमाण किं० तितक्या परिमाणाचा पदार्थ. २ सहा बिघे क्षेत्रफळ. ❀ **मणखाण पु०** सुमारें एक मण इतकें परिमाण.

मणका [**म०** मण] **पु०** एका मणाच्या परिमाणाचें माप किं० वजन.

मणका [**सं०** मणि] **पु०** १ मोठा मणि. २ पाठीच्या कण्याच्या हाडावरचे जे जाडी जाडी भाग ते प्रत्येक. ३ मनुष्याच्या गळ्याचें पुढें आलेलें जें हाड तें. ४ घोड्याच्या किं० माणसाच्या गळ्यांत बांधतात तें एक भूषण. ५ छत्रीच्या ज्या भागांत काड्या बसविलेल्या असतात तो चक्राकार अवयव. ❀ **कोणेकाच्या पाठीचे मणके ढिले करणें** त्याला खूप मार देणें. **मणकी स्त्री०** मणाच्या वजनाचा धोंडा इ०. **मणखुरा पु०** सोनें, चांदी, इ०चें मणि करावयाचें सोनाराचें एक साधनविशेष.

मणगट, मनगट [**सं०** मणि] **न०** १ मनुष्याच्या कोपरापासून पंजापर्यंतचा बाहूचा भाग. २ मनुष्याच्या हाताचा पंजा आणि बाहु यांचा संधि. ३ घोड्याच्या पायाचा अशाच स्थानचा संधी. ❀ **मनगट वेणें** बोंबलणें. **कोणेकाचें मनगट धरणें** त्याला कांहीं अपराधांत पकडणें; त्याच्यावर कांहीं आरोप ठेवणें. **मणगटांत जोर असणें** पैसा, अधिकार, शारीरिक शक्ति, विद्या इ० बाबतींत बळकट किं० समर्थ असणें. **ज्याच्या मनगटांत जोर तो बळी** सत्य, न्याय, साधुवृत्ति, इ० चा ह्या जगांत कांहीं उपयोग होत नाहीं; पाशवी सामर्थ्यावरच सर्व व्यवहार चालतात. **कोणेकाच्या मनगटावर गोणी देणें** त्याच्यावर कांहीं कष्टाचें किं० जबाबदारीचें काम लादणें. **त्याच्या मनगटावर तेल घातलें पाहिजे** तो मूर्ख किं० अडाणी आहे. **मनगटावर तेल (किं० तेल चुना) घालणें** बोंबलत सुटणें. **मनटासारखें मनगट पाहून कन्या द्यावी** शरीर, पैसा, परिस्थिति, इ० बाबतींत कन्येशीं जुळणारा वर पहावा. **कोणेकाच्या मनगटाशीं मनगट घासणें** १ त्याच्याशीं स्पर्धा करणें. २ त्याच्याशीं कार्यविशेषीं सहकारिता करणें. **मनगटी स्त्री०** मनगटांत घालावयाचें मुलांचें भूषणविशेष.

मणदोरा [**म०** मणि+दोरा] **पु०** १ बटवा, पिशवी, इ० चें तोंड उघडावयाच्या किं० मिटवावयाच्या दोऱ्या प्रत्येक. २ लोंबत सोडलेला पडदा ज्या दोरीवरून उजवीकडे किं० डावीकडे सरकाविला जातो ती दोरी. ३ गाडीवर ओझें बांधून आवळावयाची दोरी,–जी एका लाकडी ठोकळ्यांतून ओवून खेचावयाची असते. ४ ती दोरी आणि तिचा ठोकळा जोडीनें. ५ नदीच्या पात्रावर ताणून बांधलेल्या दोरावरून सरकत जाणारा ठोकळा आणि त्याला बांधलेली दोरी हीं जोडीनें. ही दोरी नावाडी हातांत धरून ठेवतो,–नाव योग्य मार्गानेंच चालावी म्हणून. ६ मागावर विणलें जात असलेल्या वस्त्राच्या शेवटीं जे वाण्याचे कांहीं जाडी जाडी धागे ठासलेले असतात ते समुच्चयानें. ७ मंतरलेला दोरा,–जो स्त्रिया कंबरेला बांधतात.

मणा, मणी पु० धान्याचे निकण पाखडून निघतात ते चिबट दाणे.

मणि [**सं०**] **पु०** १ हिरा, माणिक, इ० रत्न. २ मोती. ३ स्फटिक. ४ पाण्याचें मडकें. ५ लोहचुंबक. ६ शेळीच्या गळ्याखालीं लोंबणारे दोन अवयव प्रत्येक. ७ शिश्नाचें लाल टोक. ८ काच, तुळशीचें लाकूड, इ० चा बाटोळा सच्छिद्र पदार्थ. ९ कोणत्याही गुणानें श्रेष्ठ असा मनुष्य. १० निकणांतून पाखडून निघालेले हलके दाणे. ११ पुरुषाचें रेत. १२ गाडीवरचें ओझें बांधावयाच्या दोरीच्या एका टोकाला असलेला लाकडाचा ठोकळा,–ज्याच्या भोंकांतून दोरी ओवून खेचतात,–तो ठोकळा. १३ नदी ओलांडतांना नाव इकडे तिकडे वाहवत जाऊं नये म्हणून नदीच्या दोन्ही कांठांवर पुरलेल्या दोन खांबांना बांधलेल्या दोरीवरून सरकणारा लाकडाचा ठोकळा,–ज्याला नावेची दोरी बांधलेली असते.

❀ **मणीघोळणी स्त्री०** मणि करण्याचें सोनाराचें साधन. **मणीन्द्र, मणिराज पु०** हिरा. **माणिकणिका स्त्री०** माणे गुंफून केलेला एक कर्णभूषणविशेष. **मणिकार पु०** जवाहिऱ्या. **मणिबंध पु०** मनगट. **सुतासाठीं मणि फोडणें** अत्यल्प लाभासाठीं अत्यन्त मोठी हानि करून घेणें किं०करून घ्यावयास सिद्ध होणें (हा मूर्खपणा होय) . **हाडाचे मणि करणें** कांहीं कामीं विविध कष्ट सोसून देह जर्जर करून घेणें. **एका माळेचे मणि** सारखेच घाईट, द्वाड, किं० दुर्वर्तनी.

मणेर, मणेरी, मण्यार [सं० मणिकार] पु० १ बांगड्या, माणि, इ० करणारा. २ जवाहिऱ्या.

मणेर, मण्यार पु०, स्त्री० विषारी सापाची [एक जात.

मत् [सं०] **वि०** (शब्दान्तीं) युक्त. याचें मराठींत ' मंत ' असें रूप होतें; उ०बुद्धिमंत इ०.

मत् [सं०] **वि०** (संस्कृत समासांत) माझा, माझी,माझें,इ०;उ० मद्गृह म्ह०माझें घर.

मत [सं०] **वि०** १ मान्य किं० कबूल असलेला. २ मानलेला. ३ मानास पात्र.४ अभिप्रेत. ५ ज्याचा संमान करण्यांत आला आहे असा. **न०** १ अभिप्राय; मनांतील विचार. २ पंथ. ३ पसंती. ४ उद्देश; हेतु. ५ वादांतलि एक पक्ष किं० बाजू. ❀ **मतांतर न०** दुसरें किं० उलट मत. **मतमतांतरें न० अ० व०** अनेक भिन्न भिन्न मतें. **मतवादी पु०**हेकटपणानें आपलें मतें धरून बसणारा.

मतकापड [**म०** माती+कापड] **न०** औषधी द्रव्यें फडक्यांत घट्ट गुंडाळून त्यावर मातीचा लेप करणें,-तीं द्रव्यें भट्टींत भाजण्यासाठीं.

मतणें, मथणें अ० क्रि० मतें, विचार, इ० बाबतींत जुळणें किं० जुळतें असणें.

मंतरणें [सं० मंत्र] **स० क्रि०** १ (ताईत, तांदूळ, इ०) मंत्रानें वीर्ययुक्त,गुणयुक्त, किं०समर्थ करणें. २ (कोणेकाला) गोड बोलण्यानें वश करून घेणें.

मतलई स्त्री० जमीनीवरून समुद्राकडे वाहा[णारा वारा.

मतलब [अ०] **पु०** १ आशय; सारांश. २स्वार्थ साधण्याकडे निंद्य प्रवृत्ति.❀**मतलबदार, मतलबी वि०** कपटी; भोंदू; लुच्चा. **मतलबी यार पु०** पक्षपाती किं० हितचिंतक मित्र.

मतवाला [**हिं०**] **वि०** तल्लख; हुशार; आवेशी (शाहिरांच्या लावण्यांत येणारा शब्द).

मतवादी मागें ' मत ' मध्यें पहा.

मंतव्य [**सं०**] **वि०** चिंतण्यास योग्य.

मति [**सं०**] **स्त्री०** १ बुद्धि. २ मन; अंतःकरण. ३ मत; विचार; ग्रह. ४ उद्देश; हेतु. ५ इच्छा; अभिलाष. ६ सल्लामसलत. ७ मननशक्ति. ८ मनोवृत्ति. ❀ **मतिभ्रम पु०** बुद्धिभ्रंश; मोह. **मतिविभ्रम पु०** गोंधळ; घोटाळा. **मतिपूर्वक क्रि० वि०** जाणून बुझून; बुद्धिपुरःसर. **मतिमंद वि०** बुद्धीनें कमी. **मतिमान् वि०** शाहाणा, बुद्धिवान.

मतेली स्त्री०डोलकाठीला बांधलेली काठी,-जीवर अवजार बांधतात.

मत्कुण [**सं०**] **पु०** १ ढेकूण. २ सुळा नसलेला हत्ती. ३ दाढी मिशा नसलेला पुरुष.

मत्त [**सं०**] **वि०** १ दारू इ० अमली पदार्थांच्या सेवनानें झिंगलेला. २ उन्मत्त; गर्विष्ठ. ३ वेडा ४ मदयुक्त (हत्ती). ❀ **मत्तमयूरी** [**सं०**] **स्त्री०** एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत म, त, य, स, हे गण असून शेवटीं एक गुरु असतो.

मत्ता [अ० मताअ] **स्त्री०** द्रव्य; संपत्ति. ❀ **काडीची सत्ता व लाखाची मत्ता यांची बरोबरी होत नाही** हातीं असलेल्या क्षुद्रक अधिकारानें हावें तें काम करवितां येतें परंतु तें काम अफाट संपत्ति खर्चून देखील होऊं शकत नाहीं.

मंत्र [**सं०**] **पु०** १ वेदसंहिता; वेदभागविशेष. २ मांत्रिक, गारोडी, इ० जीं वाक्यें म्हणून कांहीं कृति, उपचार, विष उतरणें, इ० करतात तीं समुच्चयानें किं० प्रत्येक. ३ देवस्तुतिपर वाक्य. ४ सल्लामसलत. ५ खलबत. ६ युक्ति; उपाय. ७ गुप्त गोष्ट. ❀ **मंत्रचळ पु०** १ मंत्र म्हणण्यांत कांहीं चुकी झाल्यानें होतो तो बुद्धिभ्रंश. २ मनाची अनिश्चितपणाची स्थिति;

मनाची शंकाखोर वृत्ति (होणें, भरणें, लागणें). **मंत्रचळया** वि० ज्याचें मन सदा दोन गोष्टीकडे हेलकावत असतें असा. **मंत्रजागर** पु० अनेक ब्राह्मण एकत्र जमून चढाओढीनें मंत्र म्हणतात तो प्रकार. **मंत्रतंत्र** पु० ए० व० जादूटोणा; तोडगा; जपजाप्य. **मंत्रपुष्पांजलि** स्त्री०, पु० १ पूजेनंतर ओंजळींत फुलें घेऊन तीं देवाच्या मूर्तीवर वाहाणें. २ शिव्यांचा वर्षाव; शिव्यांचा कोणेकावर केलेली लाखोली. **मंत्रमुख** पु० आपल्या उपयोगापुरतेच ज्यास मंत्र येतात असा ब्राह्मण. **मंत्रसाधन** न० मंत्र सिद्ध व्हावा ह्मणून जें पुरश्चरणादिक कर्म करतात तें. **मंत्रस्नान** न० प्रत्यक्ष अंघोळ न करतां कांहीं मंत्र म्हणून जो स्नानाचा मोबदला ह्मणून विधि अडचणीच्या प्रसंगीं करतात तो. **मंत्राग्नि** पु० प्रेताचें यथाशास्त्र दहन (देणें). याच्या व्यावर्तकत्वें ' प्रेताला भडाग्नि देणें. ' **मंत्राक्षता** स्त्री० अ० व० १ मंत्रानें पवित्र केलेले तांदूळ जे देवावर वाहातात ते. २ कोणेकावर केलेला शिव्यागाळींचा वर्षाव.

मंत्रणें [सं० मंत्र्] स० क्रि० मागें 'मंतरणें' [पहा.

मंत्री [सं० मंत्रिन्] पु० १ प्रधान; अमात्य. २ न्यायाधीश. ३ राजाचे जे सल्लागार ते प्रत्येक.

मत्सर [सं०] पु० हेवा; स्पर्धा; परोत्कर्षासहिष्णुता.

मत्सर [सं०] पु० १ डांस; मच्छर. २ माशी. ह्या शब्दाचें ' मच्छर ' हें मराठी रूप मागें पहा.

मत्स्य [सं०] पु० १ मासा. २ विष्णूच्या दशावतारांतील पहिला. ३ एकमेकांना छेदणाऱ्या दोन वर्तुळांना समान असा भाग. ४ मनुष्याच्या तळहातावर किं० तळपायावर रेषांच्या रूपांच्या कांहीं विशिष्ट आकृति असतात त्या प्रत्येक ५ मनुष्याच्या अंगावरील जन्मजात असा विशिष्ट आकृतीचा लहानसा काळा डाग. ❀ **मत्स्यजयंती** स्त्री० विष्णूनें मत्स्यावतार धारण केला ती चैत्रमहिन्यांतील तिथि. **मत्स्यावतार** पु० विष्णूच्या दहा अवतारांपैकीं पहिला. **मत्स्यी** स्त्री० माशाची मादी. **मत्स्योदरी** स्त्री० काशी येथील भैरवाच्या देवळापर्यंत आलेला गंगा नदीचा पूर.

मंथणी (–नी) स्त्री० १ मणि बनवावयाचें सोनाराचें एक साधन. २ ताक करावयाची रवी.

मथणें, मंथणें [सं० मथ्] स० क्रि० १ (दही इ०) रवी इ० साधनांनीं घुसळणें. २ (एकाद्या विषयाचें) विवेचन किं० निरूपण किं० वाटाघाट करणें. ३ मनांत एकाद्या विषयाची (साधकबाधक प्रमाणें) परीक्षिणें. ४(कोणेकाला) आपल्या पक्षास वळवून घेणें; (त्याला) अनुकूल किं० वश करून घेणे. ५ (कोणेकाला) चिरडून टाकणें किं० ठार मारणें.

मथणें अ० क्रि० संगनमत करून एक होणें किं० जुळणें; उ० ते दोघे मथले आणि त्यांनीं आमचें घर फोडलें.

मथन, मंथन [सं० मथन] न० १ दहीं इ० घुसळणें किं० घुसळण्याची क्रिया. २ नाश; चिरडणें. ३ वाटाघाट; चर्चा; ऊहापोह. ❀ **मथनसार** पु० १ चंद्र,–जो समुद्र घुसळून देवांनीं काढला. २ लोणी. **मथनसाराचें बीज** न० कांहीं अशक्य किं० अविद्यमान वस्तु,–शशशृंगाप्रमाणें.

मंथनी स्त्री० मागें ' मंथणी ' पहा.

मंथरी [सं० मथि] स्त्री० घुसळण्याच्या रवीला लपेटिलेली दोरी,–जिचीं दोन टोकें दोन हातांनीं ओढतात.

मंथा पु० १ मडक्यांना चकाकी आणावयाचा कुंभार लोकांचा काचेचा मणि. २ रवीचा पैलूदार अवयव.

मथाळा, मथळा [म० माथा; सं० मस्तक] पु० १ डोकें; कोणत्याही पदार्थाचा माथा. २ लेखाचें नांव,–जें लेखाच्या माथ्यावर लिहिलेलें असतें तें. ३ ग्रंथ इ०च्या पानांतील मजकुराचा द्योतक शब्द,–पानाच्या माथ्यावर लिहिलेला असतो तो. ४ पत्राच्या श्रीकाराखालीं हुंडी देणारा सही करतो ती.

माथित [सं०] न० १ पाणी न घालतां केलेलें ताक; मठ्ठा. २ वाटाघाट; वाटाघाट केलेला विषय किं० वाटाघाटीचा निकाल किं० निर्णय. वि० १ घुसळलेलें (दहीं इ०). २ ज्याची वाटाघाट करण्यांत आली आहे असा (विषय). ❀

मथितार्थ पु०१ वाटाघाट करून ठरलेला निर्णय. २ सारांश.

मथित स्त्री० कोष्टयाचें एक साधन. मागें ' जिभई ' पहा.

मंद [सं०] वि० १ ज्याला फारसा वेग नाहीं असा. २ ज्याची बुद्धि तीव्र नाहीं असा (मनुष्य). ३ जी तल्लख नाहीं अशी (बुद्धि). ४ कमी वेगाचा, जोराचा, परिमाणाचा, किं० गुणाचा. ५ सौम्य (आंच, प्रकाश). ६प्रतिकूल (भाग्य, नशीब). ७असमर्थ, कमजोर,अस्वच्छ, अस्पष्ट(दृष्टि, कान,स्पर्श,इ०).पु०शनि हा ग्रह. ❀ **मंदोष्ण** वि० कोंवट (पाणी, इ०). **मंदग** पु० शनि हा ग्रह. **मंद पडणें** १ कमजोर होणें (पटका; ताप, काम,इ०). २ संथपणानें (काम) चालणें. **मंदवार, मंदवासर** पु० शनिवार. **मंदवेळ, मंदवेळा** स्त्री० ज्या समयीं आरंभिलेलें काम लवकर संपत नाहीं तो समय. **मंदाक्रांता** स्त्री० एक समवृत्त. ह्याच्या प्रत्येक चरणांत म, भ, न, त, त, हे गण असून शेवटीं दोन गुरु अक्षरें असतात. **मंदाग** [म० मंद+आग (अग्नि)] स्त्री० विस्तवाची सौम्य आंच; प्रखर नव्हे असा अग्नि. **मंदागीं** क्रि० वि० सौम्य अग्नीवर (भाजणें, शिजावेगें). **मंदाग्नि** [सं०मंद+अग्नि] पु०सौम्य जठराग्नि.वि०सौम्य आहे जठराग्नि ज्याचा असा (मनुष्य).**मंदा, मंदी, मंदाई** [म० मंद]स्त्री०१ सुस्तपणा; स्वस्थपणा; धीमेपणा. २ कमजोरपणा (.आजाराचा). ३ व्यापार, घडामोड, व्यवहार, इ० मध्यें सावकाशी किं० धिमेपणा.

मद [सं०] पु० १ धुंदी; कैफ. २ वेड; उन्माद. ३ अहंकार; ताठा; अभिमान. ४ उन्मत्तपणा; वेफामपणा; उत्संखळपणा. ५ उत्कट कामेच्छा. ६ हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणारें पाणी. ७ कस्तूरी. ८ फुलांतील मध.

मदड, मंदट [म० मंद] वि०सुस्त; फाजील धिमा ।किं० संथ.

मदत, मदद [अ०मदद] स्त्री० १साहाय्य. २ साहाय्य करणारा; जोडीदार. ❀ **मदतगार, मदतनीस** वि० जोडीदार; साहाय्य करणारा.

मदन [सं०] पु० १ कामदेव. २ कामेच्छा. ३ वसंतऋतु. ❀ **मदनांकुश** पु० शिश्न.**मदनांतक** पु० शंकर. **मदनोत्सव** पु० होलिकोत्सव. **मदनचतुर्दशी** स्त्री० चैत्र शुद्ध चतुर्दशी. **मदनाचा पुतळा** पु०, **मदनाची मूर्ति** स्त्री० सुंदर माणूस. **मदनबाण** पु० मोगरा ह्या फुलाची एक जात. **मदनमस्त** वि० कामविकारानें बेफाम किं० उन्मत्त झालेला.

मदन [सं० मर्दन] न० बैलांनीं कणसें एकदा तुडवून निघतें तें धान्य. ह्याला ' पाहिलें मदन ' असेंही नांव आहे. **टीप,**–दुसऱ्यांदा बैलांनीं तुडवून निघतें जें धान्य त्याला ' दुसरें मदन ' किं० ' आकणाचें मदन ' म्हणतात. तिसऱ्या तुडविण्याच्या धान्याला ' तिसरें मदन' किं० ' विकणाचें मदन ' म्हणतात.

मदनायक [सं० मध्यनायक] पु० माळ, हार, इ० तील मधला माणि.

मंदर [सं०] पु० समुद्राचें मंथन देवदानवांनीं केलें त्या प्रसंगीं रवी केलेला पर्वत; मंदराचल.

मदलस मागें ' मजलस ' पहा.

मदलसा पु० मांडव, छत, इ०चा मध्यभाग.

मंदाकिनी [सं०] स्त्री० १ गंगानदी. २ स्वर्गातील गंगा.

मंदार [सं०] पु० १ स्वर्गातील पांच वृक्षांपैकीं एक. मंदार, पारिजातक, संतान, कल्प, आणि हरिचंदन, हे ते पांच वृक्ष. २ रुई, मांदार. **मंदारमाला** स्त्री० एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत सात तगण आणि शेवटीं एक गुरु अक्षर असतें.ह्या वृत्ताला 'अश्वधाटी'असेंही नांव आहे.

मदार [अ०] स्त्री० १ उंटाच्या पाठीच्या कण्यावर जो एक उंचवटा असतो तो. २ भिस्त; आधाराला किं० भरंवशाला स्थान; उ० माझी सर्व मदार तुमच्यावर आहे. ३ महत्त्व; मुद्याची बाबत.

मदारी पु० १ डोंबारी. २ जादूगार.

मंदावणें [म० मंद] अ० क्रि० (काम, धंदा, व्यापार, रपेट, अभ्यास, इ०) पूर्वीपेक्षां कमी गतीनें, कमी वेगानें, कमी जोरानें, किं० कमी उत्साहानें चालूं लागणें; मंद होणें; रेंगाळणें; आळसावणें.

मंदावा [म० मंदावणें] **पु०** मंदपणा; सुस्ताई; आळस.

मंदाळणी [**म०** मंद+लवण] **वि०** ज्यांत मीठ कमी घातलें आहे असें (सार, आमटी, इ०).

मंदिर [**सं०**] **न०** १ घर. २ मोठें किंवा सुंदर घर; टोलेजंग घर. ३ हवेली. ४ वासस्थान.

मंदिरा [**सं०**] **स्त्री०** मद्य; दारू. ꙮ **मंदिराक्षी स्त्री०** सुंदर आणि मोहक डोळ्यांची स्त्री. **मंदिरागृह न०** दारूचा पिठा.

मंदी, मंदाई [**म०** मंद] **स्त्री०** १ मंदपणा; सुस्तपणा. २ व्यापार, व्यवहार, काम, इ० मध्यें कमजोरपणा किंवा तेजीचा अभाव.

मदीय [**सं०**] **वि०** माझा.

मंदील पु० जरीचा आणि बारीक सुताचा कापसाचा किंवा रेशमाचा डोकीवर घालण्याचा रुमाल.

मंदोरा पु० मागें ' मणदोरा ' पाह.

मंदोसा पु० दाराच्या दुहेरी चवकटीच्या सांध्याशीं बसविलेला लाकडाचा चौरस तुकडा.

मद्य [**सं०**] **न०** पिण्याची दारू. ꙮ **मद्यप, मद्यपी पु०** दारूच्या व्यसनाला आसक्त; दारूड्या. **मद्यपान न०** १ दारू पिणें. २ दारू पिण्याचें व्यसन.

मध [**सं०** मधु] **पु०, स्त्री०, न०** १ फुलांतील गोड द्रव,– जो मधमाशा गोळा करतात. २ फणसांतील गोड द्रव. ꙮ **मधपोळें न०** मधमाशांचें पोळें. **मधाळ वि०** मध किंवा साखर किंवा गोडपणा ज्यांत फार असा (खजूर, फणस, इ०). **मधवणी न०** १ गोड पाणी. २ ज्यांत मध घातला आहे असें पाणी. **कोणेकाला मधाचें बोट लावणें** (किंवा **लावून ठेवणें** किंवा **दाखविणें**)त्याला कांहीं गोष्टी संबंधानें आशा लावून ठेवणें.

मधकांडें [**म०** मध्य+कांडें] **न०** उसाचा मधला भाग,– बुडखा आणि माथा सोडून.

मधगर्भ [**म०** मध्य+गर्भ] **पु०, मधगर्भी स्त्री०** मधला भाग; आंतील भाग; अंतर्भूत प्रदेश.

मधघडी [**म०** मध्यम+घडी] **वि०** फार उंची नव्हे किंवा फार हलका नव्हे असा दौलताबादचा (कागद). उत्तम जातीच्या कागदाला ' बहादुरखानी ' म्हणत असत.

मधघर [**म०** मध्य+घर] **न०** माझघर; घराचा मधला भाग किंवा दालन.

मधचा, मधला [**म०** मध्य] **वि०** दोन विवक्षित भाग, अवयव, आवरणें, इ० च्या मध्यें असलेला. ꙮ **मधच्या मधें, मधच्या मधें क्रि० वि०** १ उगीचच्या उगीच; कारण नसतां; विनाकारण; फुकटफाकट. २ ज्या दोन माणसांत कांहीं व्यवहार होत असतो त्यांना न कळूं देतां (पैसे खाणें इ०).

मंधट [**म०** मंद] **वि०** सुस्त; संथ; [आळशी.

मधपुळी, मधरा खालीं ' मधुपुळी, ' ' मधुरा ' पहा.

मधपेरें [**म०** मध्य+पेरें] **न०** शेंडा आणि बुडखा सोडून उसाचा बाकीचा भाग.

मधभाग [**म०** मध्य+भाग] **पु०** मधला भाग.

मधलंड [**म०** मध्य] **वि०** १ मध्येंच लोंबत राहिलेला; इकडेही नाहीं आणि तिकडेही नाहीं असा; अर्धवट इकडचा आणि अर्धवट तिकडचा. २ मध्यम प्रतीचा. ३ ज्याला कोणताच पक्ष, बाजू, किंवा मत नाहीं असा.

मधला [**म०** मध्य] **वि०** मागें 'मधचा' पहा.

मधलाटी (–ठी) [**म०** मध्य+ठाय] **स्त्री०** १ देश आणि कोंकण ह्यांच्या मधला भूप्रदेश. २ सह्याद्रीच्या पायथ्याला चिकटून असलेला जमीनीचा पट्टा (वलाटी) आणि समुद्र कांठाला चिकटून असलेला जमीनीचा पट्टा (खालाटी) ह्या दोहोंच्या मधील जमीनीचा पट्टा. मागें ' खालाट, ' ' खालाटी ' पहा.

मधवा, मधवेला, माधवेला [**म०** मध्य] **वि०** तीन भावांपैकीं मधला जो भाऊ तो; तीन भावंडांपैकीं मधलें भावंड.' मधवी, ' ' मधवेली, ' ' माधवली ' हीं **स्त्री०** रूपें.

मधीं [**सं०** मध्य] **क्रि० वि०,श० यो० अ०** (कवितेंत) मध्यें; आंत. ꙮ **मधील वि०** आंतला.

मधु [सं० मधु] न० १ फुलें, फणस, इ० तील गोड द्रव. मागें ' मध ' पहा. २ मोहाचें किं० द्राक्षाचें मद्य. वि० गोड. ॐ **मधूच्छिष्ट** न० मेण. **मधुकर** पु० १ भ्रमर. २ प्रियकर. ३ मधमाशी. **मधुकरी, माधुकरी** स्त्री० शिजविलेल्या अन्नाची भिक्षा. पु० ती मागणारा ब्राह्मण. **मधुकरी वृत्ति** स्त्री० प्रत्येक ठिकाणाहून उपयुक्त अंश गोळा करणें. **मधुकोश (-ष)** पु० मधाचें पोळें. **मधुत्रय** न०(वैद्यक) साखर, मध, आणि तूप, हीं तीन समुच्चयानें. **मधुनारिकेल** पु० मोहाचा नारळ. **मधुपर्क** पु० नवरामुलगा, ऋत्विज, शिष्ट, साधु, इ० चा आतिथ्यविधि किं० पूजा. **मधुप्रिय** पु० बलराम. **मधुमक्षिका** स्त्री० मधमाशी; भ्रमर. **मधुमाध्वी** स्त्री० १ मोहाची दारू. २ द्राक्षामद्य. ३ एक रागिणी. **मधुमाध्वीक** न० मोहाची दारू. **मधुमेह** पु० लघवींतून साखर जाणें हा रोग. **मधुव्रत** पु० भ्रमर. **मधुकुल्या** स्त्री० अ० व० १ (शब्दशः) १ मधाचे पाट. २ साखरेचीं पक्वान्नें. मागें ' घृत ' मध्यें ' घृतकुल्या मधुकुल्या ' पहा. **मधुपुळी** स्त्री० पाठीवर होणारी पुळी, जी बहुतेक असाध्य असते. **मधुयष्टि, मधुयष्टिका** स्त्री० ऊस.

मधुर [सं०] वि० १ मधुयुक्त. २ गोड; मोहक; रम्य; चित्ताकर्षक. ३ प्रिय; आवडता.

मधुरा पु० एक प्रकारचा ज्वर.

मधुरिमा [सं० मधुरमन्] पु० गोडपणा.

मधून [म० मध्य+ऊन (प्रत्यय)] क्रि० वि०, श० यो० अ० १ मध्यापासून; आंतून. २ समुदायांतील व्यक्तींतून किं० अवयवांतून. ॐ त्या दोघांमधून विस्तव जात नाहीं त्यांच्यांत वैर आहे.

मधें [म० मध्य] क्रि० वि०, श० यो० अ० मध्यें; आंत; अंतर्यामीं. ॐ **मधोमध** क्रि० वि० मध्यावर; मध्यभागीं.

मध्य [सं०] वि० १ मध्यभागचा; मधला. २ मध्यम प्रतीचा; सामान्य. ३ तिऱ्हाईत. पु०, न० १ मधला भाग. २ कंबर. ३ गाभा. न० एकं, दहं, शतं, इ० श्रेणींतील सतराव्या स्थानची संख्या. ॐ **मध्यान्ह** पु० दुपार. **मध्यदेश** पु० १ कंबर. २ (ज्योतिष) क्रांतिवृत्त. ३ हिंदुस्थानचा हिमालय आणि विंध्यपर्वत ह्यांच्यामधील प्रदेश; आर्यावर्त; पुण्यभूमि. **मध्यरेखा** स्त्री० (ज्योतिष) मुख्य याम्योत्तर रेषा. **मध्यलग्न** (ज्योतिष) क्रांतिवृत्त आणि मुख्य याम्योत्तर वृत्त ह्यांचा छेदबिंदु. **मध्यलोक** पु० मृत्युलोक;स्वर्ग आणि पाताल ह्यांच्या मधील लोक.**मध्यवर्ती** [सं० मध्यवर्तिन्] पु०पंच;लवाद. **मध्यस्थ** वि० १ तिऱ्हाईत किं० निष्पक्षपाती (मनुष्य). २ तटस्थ; उदासीन. ३ नपुंसक. **मध्यंदिन** वि० दुपारचा. न० १ दिवसाच्या पांच विभागांपैकीं तिसरा. २ दिवसाच्या सोळा ते वीस घटका हा काळ. **मध्यंदिन** पु० यजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखेचा अनुयायी. ' माध्यंदिन, ' ' माध्यंजन, ' हीं ह्या शब्दांचीं अपभ्रष्ट रूपें. **मध्यनाडी** स्त्री० (फलज्योतिष) चंद्राच्या मार्गांत जे तीन नक्षत्रपुंज आहेत त्यांना आदिनाडी, मध्यनाडी, आणि अंत्यनाडी, अशीं नांवें आहेत. ह्या तीन नाड्यांपैकीं मधली नाडी. वधूवरांच्या पत्रिकासंमेलनांत ह्या शब्दांचा उपयोग जोशी लोक करतात. **मध्यांक** पु० त्रिराशिकांतील मधली म्हणजे दुसरी रास. **मध्यान्ह** पु० दुपारचा समय. **मध्यान्हरात्र** स्त्री० रात्रीच्या बारा वाजण्याचा समय. **मध्यगृह** न० माजघर.

मध्यम [सं०] वि० १ मधला. २ सामान्य किं० मधल्या प्रतीचा किं० दर्जाचा.३ निःपक्षपाती. ४ (संगीत) सप्तस्वरांपैकीं चवथा. ५ (व्याकरण) तूं, तुम्ही, ह्या शब्दाचा पुरुष. पु०, न० १ मध्यभाग. २ कंबर. **मध्यमा** स्त्री० १ न्हाण आलेली मुलगी. २ हाताच्या पांच बोटांपैकीं एका बाजूस अंगठा आणि तर्जनी सोडून, आणि दुसऱ्या बाजूस करंगळी आणि अनामिका सोडून राहिलेलें बोट; ३ मधलें बोट. हृदयस्थ वाणीभेद; परा, पश्यन्ती, मध्यमा, आणि वैखरी, हे जे वाणीचे चार भेद त्यांतील तिसरा. **मध्यमा** स्त्री० (साहित्य) एक प्रकारची नायिका. ॐ **मध्यमपदलोपी समास** पु० (व्याकरण) ज्या समासाचा विग्रह करतांना समासांतील दोन पदांच्या मध्यें बाहेरचें पद घ्यावें लागतें असा

समास; उ० साखरभात म्ह० साखरेनें युक्त भात. **मध्यमलोक पु०** स्वर्ग आणि पाताल ह्यांच्या मधला लोक म्ह० पृथ्वी किं०भूलोक. **मध्यमिका स्त्री०** मनुष्याच्या हाताच्या पांच बोटांपैकीं मधलें बोट. वर ' मध्यमा ' पहा.

मध्यें [सं० मध्य **] क्रि० वि०, श० यो० अ०** आंत; गर्भांत. ꣸ **मध्येंच क्रि० वि०** १ चालू विषयाशीं संबंध नसतां. २ पूर्वापर सरणी सोडून. **मध्यें मध्यें क्रि० वि०** मधून मधून; चालू सरणींत अनेक खंड पाडून;अखंडित क्रमाला बाध येईल अशा प्रकारें.

मध्रा स्त्री० अ० व० भाजलेल्या जागेवर तुंबडी लाविल्यानें उत्पन्न होतात ते फोड.

मध्व [सं० मध्व एक आचार्य **] पु०** १ एक धर्मसंप्रदाय प्रचलित करणारा आचार्य. २ ह्या आचार्याचा अनुयायी.

मन [सं० मनस् **] न०** १ सुखदुःखादिकांचें ज्ञान ज्याचें योगानें होतें तें इंद्रिय. २ सदसद्विवेक बुद्धि. ३ कल्पना; विचार. ४ (**वेदान्त**) संकल्पविकल्पात्मक अंतःकरणाची वृत्ति. ५ हेतु; उद्देश. ६ इच्छा. ७ स्वभाव. ८ मनशीळ. ꣸ **मनोनुग वि०** मनासारखें; प्रिय; आल्हादकारक. **मनोभिनिवेश पु०** एकाग्रता. **मनःकल्पित वि०** काल्पनिक. **मनःपूत वि०** मनाला जें शुद्ध वाटतें तें. **मनःक्षेप पु०** व्यग्रता. **मनोगत वि०** १ मनांतील. २ गुप्त; अंतस्थ. ३ इच्छिलेला. **न०** १ इच्छा. २ अभिप्राय; मत. **मनोज, मनसिज, मनोजन्मा पु०** १ मदन; मन्मथ. २ कामेच्छा. ३ चंद्र. **मनोजव वि०** अतिवेगवान्. **मनोज्ञ वि०** सुंदर; रम्य; रमणीय. **मनोदय पु०** १ इच्छा; बेत. २ अभिप्राय; मत. **मनोधारण न०** मनधरणी. **मनोमय वि०** कल्पित. **मनोमय कोश (–ष) पु०** (**वेदान्त**) आत्म्याच्या पंच कोशांपैकीं तिसरा. हे पांच कोश (१) अन्नमय कोश; (२) प्राणमय कोश; (३) मनोमय कोश; (४) विज्ञानमय कोश; आणि (५) आनंदमय कोश. मागें ' अन्न ' शब्दांत ही माहिती पहा. **मनोरंजन न०** करमणूक. **मनोरंजक वि०** करमणुक करणारें. **मनोरथ पु०** १ इच्छा. २ इष्ट वस्तु. **मनोरथसृष्टि स्त्री०** मनोराज्य. **मनोराज्य न०** उत्कटतेनें इच्छिलेली पण अद्यापि प्राप्त न झालेली अशा वस्तूसंबंधानें मनांत उद्भवणारे कल्पनातरंग समुच्चयानें. **मनोवहा स्त्री०** हृदयाजवळील नाडीविशेष. **मनोवृत्ति स्त्री०** १ मनाचा व्यापार. २ मनाची स्थिति किं०लहर. ३ इच्छा. ४ स्वभाव. **मनःशिल न०** पर्वतांत सांपडणारा एक धातु. **मनोहर वि०** रमणीय; सुंदर; आल्हादकारक. **ज्याचें मन त्याला ग्वाही देतें** आपण केलेलें कोणतेंही कृत्य योग्य, न्याय्य, खरें आहे किं० अयोग्य, अन्याय्य, खोटें आहे ह्या संबंधाची खातरी प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामाला झालेली असते, मग तो मनुष्य बाह्यात्कारीं कांहींकां बोलेना किंवा लोक त्याच्याबद्दल कांहींकां बोलेनात. **मनाएवढा ग्वाही त्रिभुवनांत नाहीं** १ आपल्या संबंधानें जें कांहीं खरें असेल तें आपल्या मनाला समजतच असतें; आपण केलेल्या कांहीं सत्कृत्याबद्दल आपलें मन आपणाला जी शाबासकी देतें तिच्या इतकी मूल्यवान् शाबासकी दुसरी कोणचीच नाहीं. २ खरें सांगणारें जगांत कोणी असलें तर तें आपलें मनच ! **मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत** आपणास मिळालेल्या संमानाबद्दल आपण लोकांत बढाई मारावी; पण आपला झालेला अपमान मनांतच ठेवावा, त्याची वाच्यता करूं नये. **मन घालणें (देणें किं० लावणें)** मन एकाग्र करून तें एकाद्या वस्तूवर किं० कार्यावर आसक्त करणें किं० त्यांत व्यापृत करणें किं०गुंतविणें. **एकाद्या पदार्थावरून (किं० माणसावरून) मन उडणें (किं० उतरणें)** तो आवडेनासा होणें; त्याचेपासून मन निवृत्त किं० पराङ्मुख होणें; त्याचा मनाला वीट येणें. **मन तुटणें** मन पराङ्मुख होणें; मनांत अप्रीति किं० कंटाळा येणें. **फुटलें मोतीं तुटलें मन सांधूं न शके विधाता** उत्तम वस्तूंत कांहीं बिघाड झाल्यास तो भरून काढून ती वस्तु पूर्वीं प्रमाणें कधींच करतां येत नाहीं; तसेंच कांहीं पदार्थासंबंधानें किं० माणसासंबंधानें मनाला खंती आल्यावर ती खंती कांहीं केल्या नाहाशीं करतां येत नाहीं. **एकाद्याचें मन पाहाणें** त्याच्या मनाचा कल कोणीकडे आहे

हें त्याच्या भाषणवर्तनादिकांवरून ठरविणें; त्याचे विचार काय आहेत हें आजमावणें. **एकाद्या पदार्थावर (किं० माणसावर) मन बसणें** तो आवडीचा किं० प्रेमाचा होणें; त्याचेवर मन आसक्त होणें; तो प्रिय वाटूं लागणें. **मन लागणें** मन आसक्त किं० व्यापृत होणें. **एकाद्याचें मन मनावणें** त्याचें मन आपणाकडे ओढून घेणें; त्याला अनुकूल करून घेणें. **मन मानेल तसें करणें** आपल्या इच्छेला येईल तसें करणें; स्वैर वर्तन करणें; स्वच्छंदानें म्हणजे उच्छृंखलपणानें वागणें. **मन मोठें करणें** उदारपणाची सरणी अवलंबिणें. **एकाद्याचें मन मोडणें** त्याच्या इच्छेच्या किं० मर्जीच्या उलट जाणें; त्याची आशा विफल करणें. **मनांत गांठ ठेवणें** अंतर्यामीं वैरभाव, द्वेषबुद्धि, किं० सूड घेण्याची इच्छा जागृत ठेवणें. **मनांत गांठ घालणें (किं० बांधणें), मनांत गांठ घालून (किं० बांधून)ठेवणें** नीट ध्यानांत धरून ठेवणें;पक्कें लक्ष्यांत बाळगून असणें. **मनांत नव मण जळणें** मनांत अतोनात क्रुद्ध किं०संतप्त होणें किं० असणें; मनामध्यें द्वेष जागृत ठेवणें किं० सूड घेण्याची इच्छा धरून असणें. **मनांत मांडे खाणें** मनोराज्य करणें; आशा करण्याला फारशी जागा नसतां आशा सफळ होईल असें गृहीत धरून पुढचे बेत करीत बसणें. **मनांत म्हणणें** आपल्याशींच म्हणणें. **एकादें काम मनावर घेणें** त्याच्यासाठीं कळकळीनें किं० आस्थेनें झटणें किं० प्रयत्न करणें; उ० माझ्या दुकानाला गिऱ्हाईक मिळवून देण्याचें त्याणें मनावर घेतलें आहे. **एकादी गोष्ट मनावर घेणें** ती महत्त्वाची समजणें; तिला किंमत देणें; तिचेकडे लक्ष्य देणें; उ० तो वेडा आहे, त्याचें बोलणें तूं मनावर घेऊं नको; उ० मी रागाच्या सपाट्यांत तुम्हाला जे कठोर शब्द बोललों ते मनावर घेऊं नका (म्ह० ते विसरून जा). **मनास येणें** आवडणें. **मनांत कालवणें** अंतःकरणांत अतिकष्टी होणें; तीव्र दुःख पावणें. **मनां धरणें** (किं० वागावेणें) लक्ष्यांत बाळगणें.**एकादी गोष्ट मनीं मानसा नसणें** ती अगदीं मनांत देखील आलेली नसणें; ती स्वप्नींही नसणें. **मनानें घेणें** मनाचा ग्रह होणें; मत ठरलेलें असणें. **दोघांचीं मनें मिळणें** दोघांच्या मनाच्या आवडी निवडी वगैरे अगदीं सारख्या असणें किं०जमणाऱ्या होणें; उ०पतिपत्नींचीं मनें मिळालीं नाहींत तर त्यांचा संसार सुखावह होऊं शकत नाहीं. **मनांतल्या मनांत जळणें** आंतल्या आंत जळफळणें किं०चरफडणें; मनांतील विचार शब्दांनीं प्रकट न करतां धुमसत बसणें. **मनाला द्रव येणें** हृदयांत प्रेम, दया, किं० कळवळा, ह्या भावनांचा प्रादुर्भाव होणें.**मनच्या मना** आपलें म्हणणें काय आहे तें न सांगतां;आपली इच्छा किं० मागणी किं० तकरार न कळवितां;उ०तूं मनच्या मनीं नऊ मण जळलास तर तुझी समजूत कोण पाडावयाला येईल ? **मन मोकळें करून** उघड्या मनानें; संकोच, भीति, लाज, इ० सोडून देऊन. **मनापासून** अगदीं खरोखरीं; अगदीं बेंबीच्या देठापासून.**मन जाणे पापा** १ आपण केलेलें दुष्कर्म दुसऱ्याला कळलें नाहीं तरी ज्याचें त्याला तें कळतेंच कळतें; आपण पाप केलें आहे कीं नाहीं हें ज्याचें मन त्याला सांगतच असतें. २ ज्याणें गुन्हा केलेला नाहीं तो मनुष्य मानवी कायद्यानें गुन्हेगार ठरूं शकतो आणि ज्याणें गुन्हा केलेला आहे तो मनुष्य मानवी कायद्यानें बेगुन्हा ठरूं शकतो, पण आपण गुन्हा केलेला आहे किंवा नाहीं हें ज्याचें त्याला निःसंशय ठाऊक असतें. **मन राजा मन प्रजा** हुकूम करणारें आपलें मन आणि तो हुकूम पाळणारेंही आपलें मनच असतें; म्हणजे बरें किं० वाईट करणें हें आपल्या इच्छेवरच अवलंबून असतें. **मनास मानेल तोच सवदा** आपणाला आवडत असेल तोच सवदा करावा; सवद्याबद्दल लोकांची नापसंती असली तरी तिकडे लक्ष्य देऊं नये. **मनीं असे तें स्वप्नीं दिसे** ज्या गोष्टीचा आपणाला निदिध्यास लागलेला असतो ती गोष्ट आपणाला प्रत्येक व्यवहारांत दिसते. **मनपाकुळका, मनाची पाकुळका, मनपिंगळी स्त्री०,मनपिंगळा पु०**१ मनोदेवता; मन ही देवता. २ चांगल्या किं० वाईट गोष्टी करण्याची प्रेरणा करतें तें मन हीच कोणी देवता. मागें ' पाकुळकी, ' ' पिंगळा ' पहा. **मनःपूतं समाचरेत्** १ आपल्या मनाला जें

योग्य वाटेल तें करावें. २ स्वैर, स्वच्छंदी, बेतालपणाचें, किं० अव्यवस्थितपणाचें असें वर्तन. ह्या वाक्याच्या संबंधानें ' आमचें ' म्हणींविषयीं चार शब्द ' पान ६८ पहा. **मनमान्य** वि० स्वच्छंदी; स्वैर. **मनमिळाऊ** वि० गोड स्वभावाचा. याच्या उलट ' तुसडा . **मनमुक्ता** क्रि० वि० यथेच्छ; अमर्यादपणें. **मनमुराद** [म० मन+अ० मुराद्] वि० १ मनोहर; आल्हादकारक. २ विपुल; पुष्कळ. ३ मनाची तृप्ति होण्याइतकें किं० तृप्ति होईल असे. **मनमेळ** वि० १ आवडतें; प्रिय; मनोहर. २ सोयीचें. **मनमेळ लग्न** न० मुहूर्त, शास्त्रें, रूढि, इ०चा फारसा विचार न करतां केवळ आपल्या आवडीस्तव जमविलेलें लग्न. **मनमोहन** वि० मनाला खूष करणारें; आवडतें; प्रिय. **मनमौज** स्त्री० १ गमतीचा विचार किं० कल्पना. २लहर; नाद; छंद.**मनमौजी** वि० लहरी; छांदिष्ट;हौसी. **मनमौजा करणें** रंगेलपणानें हौसा मौजा करणें. **मनलज्जा** स्त्री० स्वताच्या मनोदेवतेची लाज. **मनसमजावणी, मनसमजावशी** स्त्री० १ दुःखताचें सांत्वन.२ रागावलेल्या माणसाची पाडलेली समजूत किं०त्याच्या रागाचें केलेलें निरसन.**मनसमजूत** स्त्री० कोणेकाचा कांहीं विषयासंबंधानें झालेला कांहीं ग्रह किं० झालेलें कांहीं मत.**मनसोक्त** [सं०मनसा+उक्त=मनानें सांगितलेलें] क्रि० वि० १ विपुल प्रमाणांत; पुष्कळ; सढळ हातानें. २ स्वैरपणानें; ताळतंत्र सोडून; मर्यादा न राखतां. **मनाचा उथळ** वि० १ साधा; छक्केपंजे न जाणणारा किं० न करणारा.२ मनांत येतील ते विचार बोलून जाणारा. ३ ज्याच्या पोटांत गुप्त गोष्ट राहात नाहीं असा. **मनाची गांठ, मनांतली गांठ** स्त्री० १ हटवादीपणा. २ हट्टवादीपणाचें मत,ग्रह, किं० निश्चय. **मनाजोगंत** पु० अ० व० मन (विनोदांत).

मनगट, मनगटी वर ' मणगट ,' ' मणगटी ' पहा.

मनन [सं०] न० चिंतन; सर्व बाजूंनीं विचार करणें.

मनखुरा पु० सोन्याच्या बांगड्या, सल्ले, इ० ना पैलू पाडण्याचें सोनाराचें हत्यार.

मनशील [सं० मनःशिल] पु० न० एक तांबूस धातु.

मनसब [अ०] पु० १ (मुसलमानी राज्यांत) घोडेस्वारांच्या फौजेंतील एक अमलदार. २ अमुक इतके लोक नोकरीस ठेवावें असा राजानें कोणेकास दिलेला परवाना किं० हक्क किं० अधिकार. ॐ **मनसबदार** पु० वरील अर्थ २ चा मनसब ज्याला देण्यांत आला आहे तो. [इच्छा.

मनसा, मनस्या [सं० मनीषा] स्त्री०

मनसबा, मनसुबा, मनसोबा [अ० मन्सुबाह्] पु० १ विचार; उद्देश; हेतु. २ युक्ति; हिकमत. ३ अंगीकृत कार्य. ४ मोहीम. ॐ **मनसुबी** स्त्री० १ खटल्यांचा निकाल किं० फैसला; पंचाईत. २ विचार; बेत; उद्देश. **मनसुबेबाज** वि०युक्तिवान्;हिकमत करण्यांत पटाईत;मुत्सुद्दी.

मनस्या वर ' मनसा ' पहा.

मनस्वी [सं० मनस्विन्] वि०१ शाहाणा; चतुर. २ सावध आहे चित्त ज्याचें असा. ३ बाणेदार; तेजस्वी. ४ उदार मनाचा. ५ निश्चयी. ६ (मराठींत) अतोनात; फारच; विपुल.

मना [अ० मनअ] स्त्री० निषेध; प्रतिबंध. वि० १ निषिद्ध; ज्याला प्रतिबंध करण्यांत आला आहे असा. २ जप्त केलेला. ॐ **मनाई** स्त्री० प्रतिबंध; बंदी, निषेध. **मनाचिठी** स्त्री० पूर्वींचा हुकुम रद्द केला आहे अशा अर्थाची चिठी; उलट हुकमाची चिठी; इतःपर कुळाला तगादा करूं नको अशा मजकुराची चिठी. **मनामोबदला** पु० देणें, घेणें, इ० संबंधाचें संकट टाळण्यासाठीं केलेल्या युक्त्या किं० डावपेंच समुच्चयानें (करणें). **मनामोबदला होणें** युक्त्या, डावपेच, इ० योगानें (देणें घेणें इ० संबंधाचें संकट) टळणें.

मनावणी [म०मनाविणें] स्त्री० आर्जव; मन वळविणें किं० अनुकूल करून घेणें.

मनाविणें [म० मन] स०क्रि० १ कोणेकाला) आपल्या पक्षाकडे वळवून घेणें; (कोणेकाला) अनुकूल करून घेणें. २ (कोणेकाची) समजूत पाडणें. ॐ **कोणेकाचें मन मनाविणें** त्याला अनुकूल करून घेणें; त्याला आपल्या पक्षाकडे वळवून घेणें.

मनी स्त्री० मांजराचें ठेविलेलें नांव.

मनीषा [सं०] स्त्री० १ इच्छा. २ बुद्धि. ३ चातुर्य. ४ कल्पना.

मनीषित [सं०] वि० इच्छिलेली (वस्तु). **न०** १ प्रिय किं० इष्ट वस्तु. २ इच्छा; आशय; बेत; उद्देश.

मनु [सं०] पु० १ ब्रह्मदेवाच्या दिवसांत चवदा जे अधिकारी होतात ते प्रत्येक. २ कोणत्याही गोष्टीचा विशिष्ट जो काळ तो; अनुकूल काळ; सिद्धीचा किं० सद्दीचा काळ. **टीप,**– जगाच्या उत्पत्तीपासून दुसऱ्या उत्पत्तीपर्यंतचा जो काळ त्याला ' कल्प ' ह्मणतात. प्रत्येक कल्पांत चवदा भाग असून दर एका भागावर आधिपत्य करणारा एक एक मनु असतो. ꕥ **मन्वन्तर न०** १ दुसरा मनु. २ एका मनूचें आधिपत्य संपून दुसऱ्या मनूचें आधिपत्य सुरू होई पर्यंतचा काळ. ३ कोणेकाच्या उत्कर्षाचा किं० वैभवाचा काळ. **मनु पालटणें** परिस्थिति बदलणें.

मनुका [अ० मनुका] स्त्री०अ० व० काळीं द्राक्षें. ' मनूक ' **स्त्री० ए० व०.**

मनुज [सं०] पु० मनुष्य. ꕥ **मनुजाधिप, मनुजेंद्र पु०** राजा.

मनुरी स्त्री० चोरून खाणारा मांजराएवढा [एक प्राणी.

मनुष्य [सं०] पु० १ मानव जातीचा इसम. २ कर्तबगार, समर्थ, पराक्रमी, असा माणूस. ꕥ **मनुष्यदेव, मनुष्येंद्र पु०** राजा. **मनुष्यधर्मा [सं० मनुष्यधर्मन्] पु०** कुबेर. **मनुष्ययज्ञ पु०** आतिथ्य,–पंचमहायज्ञांपैकीं एक. मागें ' पंच ' मध्यें ' पचमहायज्ञ ' पहा. **मनुष्यांतून उठणें** १ लोकरीति, शिष्टाचार, किं० सर्वसंमत सरणी सोडून वागूं लागणें; स्वच्छंदीपणाचें किं० स्वैर वर्तन करूं लागणें. २ अत्यन्त हीन, दीन, आणि विपन्न दशेप्रत येणें. ३ आतां मरतो कां घटकेनें मरतो अशा स्थितिप्रत (आजारी मनुष्य)पोंचणें. **मनुष्यऋण न०**प्रत्येक मनुष्यानें आपल्या समाजासंबंधाचें जें कर्तव्य करणें जरूर आहे तें.आपल्या देशसंबंधानें आपलें जें कर्तव्य(देश ऋण) त्याला बाधक न होतां मनुष्य ऋण फेडावयाचें असतें. देवऋण यज्ञादि करून, ऋषि ऋण हें विद्योपार्जन करून, आणि पितृऋण हें संतति उत्पन्न करून फेडावयाचें असतें. ह्या शेवटच्या तीन ऋणांना ' ऋणत्रय ' म्हणतात. त्यांत देशऋण घालून ' ऋणचतुष्टय ' होतें. **मनुष्यकळा स्त्री०** १ मनुष्याचें कौशल्य किं०चातुर्य. २ आपल्याला ईश्वरी साक्षात्कार झाला आहे किं०आपण ईश्वराचे अंश आहों अशी मारलेली खोटी बढाई. ३ चेहेऱ्याची टवटवी (आजाऱ्याच्या संबंधानें बोलतांना). **मनुष्यगण पु०** १ मानवी जाति. २ पूर्वात्रय, उत्तरात्रय, रोहिणी, भरणी, आणि आर्द्रा, ह्या नऊ नक्षत्रांवर जन्मलेल्या मनुष्याचा वर्ग. असे वर्ग ' देवगण, ' ' मनुष्यगण, ' ' आणि' राक्षसगण ' असे तीन आहे. वधूवरांच्या पत्रिकासंमेलनांत हे गण पाहाण्यांत येतात. **मनुष्यपण न०, मनुष्यपणा पु०**माणसानें माणसाशीं किं०समाजांत योग्य प्रकारें वागण्याचा जो स्वभाव तो. **मनुष्यबल न०** अनेक माणसांची मदत.

मनेर, मनेरी, मन्यार मागें ' मणेर, ' ' मणेरी, ' ' मण्यार ' पहा.

मनोगत मागें ' मन ' मध्यें पहा.

मनोती मागें ' मंडाई ' पहा.

मनोदय पु० मागें ' मन ' मध्यें पहा.

मनोरा [अ० मीनार्] पु० १ दिपमाळ. २ दीपस्तंभ. ३ पोटांत वेटोळ्याच्या आकाराच्या पायऱ्या ठेवून केलेलें उंच पोकळ बांधकाम.

मन्मथ [सं०] पु० १ मदन. २ कामविकार. ꕥ **मन्मथयुद्ध न०** मैथुन.

मन्या [सं०] स्त्री० १मानेची मागची शीर. २ ज्ञान. ꕥ **मन्यास्तंभ पु०** मान इकडे तिकडे जोंत वळवितां येत नाहीं अशी विकृति.

मफलिस, मुफलिस [अ० मुफ्लिस्] वि० १ गरीब; दरिद्री. २ भिकारी. ꕥ **सडा मफलिस वि०** सडेसोट; ज्याला बायका मुलें, घरदार, शेतवाडी, इ० नाहीं असा (मनुष्य).

मंब्रेज [फा०] पु० घोड्याला जलद चालण्याची इशारत करावयाचें कांटेरी चाक,–जें स्वाराच्या जोड्याच्या टाचेला बसविलेलें असतें तें.

मम [सं० ' अस्मत् ' च्या षष्ठीचें ए० व०; माझा] वि० माझा; माझी; माझें; इ०. ꕥ **मम म्हणणें** १ होय म्हणणें; मान्य किं० कबूल करणें;

स्वीकारणें. २ आपला म्हणणें; आत्मीयतेच्या भावनेनें एकाद्या माणसाकडे पाहाणें. **ममता स्त्री०** १ आपलेपणाची किं० आत्मीयतेची भावना. २ प्रेम; प्रीति. ३ हें माझें, हें लोकाचें, अशी भेदबुद्धि. **ममता लावणें, ममता लावून घेणें** कोणी मनुष्य आपणावर प्रेम करील अशा प्रकारें त्याच्याशीं वागणें. **ममताग्रह पु०** १ आपलेपणाची भावना. २ प्रेम; प्रीति. **ममतास्पद न०** प्रेमाला पात्र; प्रीतीचा विषय. **ममताळू वि०** प्रेमळ; प्रेमी. **ममत्व न०** १ आपलेपणाची भावना. २ प्रेम; प्रीति. ३ हा मी, हें माझें, इ० रूप ऐहिक पदार्थांवर आसक्ति; अहंकार.

मम उ० वा० अ० गाडी, नांगर, इ० हाकणाऱ्याच्या डाव्या हाताकडच्या बैलास जलद चालण्याची इशारत करावयाचा हा शब्द आहे. उजव्या हाताकडच्या बैलासंबंधानें 'पप' हा शब्द योजला जातो.

मय [सं०] वि० संस्कृत शब्दांना हा प्रत्यय लागून पुढील अर्थ होतात. जलमय म्ह० पाण्यानें भरलेला किं० व्याप्त; जिकडे तिकडे पाणीच पाणी जेथें झालें आहे असा. सुवर्णमय म्ह० सोन्याचा बनविलेला (दागिना). तन्मय म्ह० तद्रूप झालेला; त्यांत गढलेला.

मय [सं०] पु० मयासुर,–देवांचा शिल्पी.

मयत, मैयत [अ० मय्यित्=मेलेला] वि० १ मेलेला; मृत. २ समूळ नष्ट, लुप्त, किं० विध्वस्त झालेलें. (कुटुंब, वंश, पीक, इ०). ❀ **मयत कयास पु०** मृत मनुष्य कशानें मेला, कोणत्या प्रकारें मेला, इ० संबंधाची सरकारकडून करण्यांत आलेली चौकशी किं० ह्या चौकशींत जें ठरलें तें. ह्या अर्थी 'मयत चौकशी,' 'मयत पंचनामा,' 'मयत तपासणी,' हेही शब्द आहेत.

मयूख [सं०] पु० १ किरण. २ तेज.

मयूर [सं०] पु० १ मोर हा पक्षी. २ मोरशेंडा ह्या नांवाची वनस्पति. ❀ **मयूरी स्त्री०** स्त्रीमोर; लांडोर.

मर [म० मरणें] स्त्री०, न० १ झाड, फांदी, तुळई, लाकूड, चिरगूट, दगड, इ० चा मेलेला, सडलेला, किडलेला, किं० कोळपलेला भाग. २ अगदीं जळून गेलेलें पीक. **न०** कुंभार इ० च्या भट्टींतील जळून राख झालेलें जळवण. करळ हें जाळावयाच्या कामीं येणारें सर्पण.

मर [म० मरणें] स्त्री० १ मरण्याची स्थिति. २ मरणोन्मुखता; आसन्नमरणाची अवस्था. ह्या दोन्ही अर्थी **क्रि०** येणें, लागणें, मरीस येणें, मरीस जाणें. ❀ **मरीं जाणें** मरणाच्या पंथास लागलेलें असणें. **मरीं मरणें** कांहीं कामांत पराकाष्ठेचे कष्ट सोसणें. **मरकळ, मरकुळी स्त्री०** वर 'मर' चे दोन्ही अर्थ पहा.

मरकाड्या [म० मरणें] वि० खाण्यापिण्याची अनास्था झाल्यामुळें जो केवळ अस्थिपंजररूप झाला आहे असा (प्राणी, मनुष्य, पशु).

मरगण, मरगत, मरगळ म० मरणें] स्त्री० १ कष्टामुळें धर्मेलेपणाची स्थिति. २ अंगी काम करण्याची ताकत असून दमल्याचें केलेलें ढोंग (घेणें). **मरगळी येणें** १ फार कष्टामुळें दमून जाऊन अधिक काम करण्यास असमर्थ होणें,– खरोखरीं किं० ढोंगानें. **मरगळ, मरकळ वि०** अगदीं दमल्याचा बहाणा करून बैठक मारून बसलेला (घोडा, माणूस, इ०). **मरगी, मरकी स्त्री०** १ पटकी इ० ची साथ. २ भोंवळ; चक्कर; घेरी. ३ फेपरें. **मरगूत स्त्री०** मरण.

मरण [सं०] न० १ मृत्यु; प्राणनाश. २ हानि, तोटा, किं० नुकसान; किं० हानि, तोटा, किं० नुकसान होण्याची शक्यता किं० संभव; उ० ह्या व्यापारांत बेलाशक पैसे घाला, दरमहा शंभर रुपयांना मरण नाहीं. ३ धोका; संकट; धोका किं० संकट गुदरण्याची शक्यता किं० संभव; उ० ह्या वाटेनें रात्रीं जाण्यांत मरण आहे. ४ अप्रिय किं० नापसंत गोष्ट; उ० लोकांच्या घरीं जेवावयास जाणें हें मला मरण वाटतें. ❀ **आजचें मरण उद्यावर लोटणें** सध्याचा कठिण प्रसंग लांबणीवर ढकलणें. **आपल्या मरणानें मरणें** १ निसर्गाच्या नियमानें मरणें म्ह० रोग, विषसेवन, विहिरींत पडणें, सर्पदंश, इ० रूप कांहीं कारण न घडतां; उ० रामभाऊ म्हातारा आपल्या मरणानें मेला. २ केलेल्या दुष्कर्म, दुराचार, इ० च्याच योगानें मरणें

उद्याचें मरण आज आणणें कालांतरानें गुदरणारा अनिष्ट प्रसंग आपल्याच मूर्खपणानें आतांच डोक्यावर ओढवून घेणें. **मरणाच्या दारीं बसणें, मरणाच्या पंथास लागणें** अगदीं आसन्नमरण अशा स्थितींत असणें. **मरणादारीं कीं तोरणादारीं** कोणत्याही प्रसंगीं,–मग तो शुभ असो कीं अशुभ असो, आप्त, मित्र, इ० च्या घरीं जाणें हें आपलें कर्तव्य आहे; आप्त, मित्र, इ० ना मदत करणें किं० त्यांच्या समाचारास जाणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. **मरणामाथा येणें, मरणामाथेस येणें** केलेल्या कष्टाच्या कामामुळें अगदीं दमून आणि थकून गेलेलें असणें. **मरणाला** (किं० **कोणत्याही अनिष्ट प्रसंगाला**) **रात्र आडवी करणें** औषधें, मात्रा, इ० योजून आजारी मनुष्य निदान उद्या सकाळ पर्यंत जिवंत राहील अशी तजवीज करणें (किं०युक्त्या,थापबाजी, इ० योजून कठिण प्रसंग एक दिवस तरी लांबणीवर ढकलणें). **एकाद्याच्या मरणीं मरणें** १त्याला वाचवावयाच्या प्रयत्नांत आपणच बुडणें किं०संकटांत पडणें.२त्याला वाचविण्यासाठीं आपण स्वताला संकटांत लोटून घेणें.३त्याच्या सेवेंत तत्पर असणें; त्याचे जोडे चाटावयास सिद्ध असणें. **मरणकळा** स्त्री० आजार, काळजी, इ० मुळें चेहेऱ्यावर किं० अंगावर येतो तो फिक्केपणा; निस्तेजस्कता. **मरणदशा** स्त्री० कठिण प्रसंग; जिवावरचें संकट. **मरणपंथास लागणें** १ जिवंत राहाण्याची आशा उरलेली नसणें. २ उत्तरोत्तर क्षीण होत चाललेलें असणें. **मरणमूळ** न० येऊं घातलेला किं० लवकरच कोसळणारा कांहीं कठिण प्रसंग किं० संकट. **मरणानें जिंकलेला** मरणाला न भिणारा, धाडसी, किं० साहसी (मनुष्य). **मरण तरण ईश्वराचे स्वाधीन** आपल्या प्रयत्नानें मरण टळणें शक्य नाहीं; आपल्या खटपटीनें आपण बचावूं अशीही खात्री नाहीं; मारणें किं० तारणें करणारा ईश्वर. **मरणा** वि० मरूं घातलेला; जो वाचण्याची आशा नाहीं असा; ज्वरादि कारणांनीं अत्यन्त क्षीण झालेला. **मरणप्राय** वि० मरणाइतकें कठिण किं० दुःसह किं०दुःखकारक. **मरणोन्मुख** वि० आसन्नमरण; मरणाच्या पंथास लागलेला.

मरणें [सं० मृ=मरणें] अ० क्रि० १ मरण पावणें. २(झाड)शुष्क होणें; कोमेजणें; त्याची वाढ कुंठित होणें. ३ दिलेलें कर्ज किं० व्यापारांत घातलेलें भांडवल परत न येण्याच्या किं० फायदेशीर न होण्याच्या स्थितीस पावलेलें असणें. ४ (खेळणारा इसम) खेळांत निरुपयोगी होणें. ॐ **झाड** (किं० **रोप**) **मरणें** त्याची वाढ कुंठित होणें. **खेळाडू मरणें** तो खेळणाऱ्यांच्या संख्येंतून गळणें किं० कमी होणें. **मी थंडीनें मरतों आहें** मी थंडीनें अतिशय जर्जर किं० बेजार झालों आहें. **पारा मरणें** पाऱ्याची अस्थिरता किं० चंचलता नाहींशी होणें. **अंगाचें रक्त मरणें** अंग मदड म्ह० संवेदनाशून्य होणें;त्वगिंद्रिय बधिर होणें. **भूक मरणें** भूक नाहींशी होणें; भुकेची भावना लोपून जाणें. **तहान मरणें, इच्छा मरणें,महत्वाकांक्षा मरणें** ती लुप्त होणें. **पाणी मरणें** पाणी बेचव होणें. **मेलेलें पाणी**(किं० **दूध** इ०)ज्यांतील पुष्टिकारक किं० उपयुक्त किं० रुचिकर अंश नाहींसा झाला आहे असें पाणी (किं० दूध इ०). **आजारानें मरत पडणें** आजारानें झिजत असणें; आजारानें दिवसेंदिवस क्षीण होत जाणें. **कोणी मनुष्य एकाद्या रकमेला मरणें** त्याची तितकी रकम बुडणें; त्याचें तितकें नुकसान होणें. **कामाखालीं मरणें** कामामुळें बेजार होणें. **खाद्यासाठीं मरणें** तें मागत सुटणें; त्याचे बद्दल फाजिल उत्कंठित किं० उत्सुक होणें. **मरण्याजिण्यास कामास येणें** ऐन अडचणीच्या प्रसंगीं उपयोगास येणें. **रस,रक्त,पाणी,इ०मरणें** तें आटून जाणें. **मरूं घालणें** (मनुष्य,पशु)मरणारच असें समजून त्याच्या संबंधानें बेफिकीर राहाणें; त्याच्या संबंधानें कांहीं तजवीज न करणें. **मरून पडणें** उत्कंठेनें इच्छिणें. **मरूं मरूं करणें** लवकरच प्राण जाईल असा रंग दिसणें. **कोणेकाला मरोंमरोंसें करणें** त्याला भारी सतावणें. **मेला जसा** अति शरमिंदा किं० लज्जित; मेल्यासारखा. **मरीं मरणें** जिवाची परवा न करतां राबणें किं० कष्ट करणें. **पैसा मरणें** १पैसा निरुपयोगी होणें. २ व्याज किं० फायदा मिळणें बाजूलाच राहून तो पैसा देखील परत येण्याची किं० वसूल होण्याची शक्यता नसणें. **दृष्टि** (किं० **नजर**)

मरणें तीच गोष्ट पुनःपुनः पाहात असल्याकारणानें तिच्यावद्दल आश्चर्य, भीति, किळस, इ० वाटेनाशी होणें. **मरतां मरतां हातपाय झाडणें** सर्व शक्ति क्षीण झाली तरी शेवटीं एकदा पुनः पराकाष्ठेचा प्रयत्न करणें. **चंदा आंबे मरून पडले आहेत** आंबे खूपच खूप झाडावर धरले आहेत किं० लागले आहेत म्ह० विपुल पिकले आहेत. **कोणेकाला मरीं पुरेंसें होणें** भीड, ओशाळगत, इ० भावनांनीं तो फारच दडपून गेलेला असणें.

मरतडणें [**म**०मरणें]**अ०क्रि०**१मरत पडणें.२ आतां मरतों कीं घटकेनें मरतो अशा स्थितीप्रत पोंचलेलें असणें.

मरतबा [**अ**० मर्तबाह्=दर्जा] **पु**० दर्जा; पदवी; योग्यता.

मरता [**म**० मरणें] **वि**० मरणारा; मरू घातलेला; मरणोन्मुख; मरावयास टेकलेला. ॐ **मरतमडें (–ढें) न**० अशक्त किं० निस्त्राण असा (मनुष्य, पशु). **मरतवड स्त्री**०,**मरतवडा पु**० मरणाची साथ,–पटकी इ०. **क्रि**० येणें.**मरतवांझ स्त्री**० जिचीं पोरें बालवयांतच मरतात अशी स्त्री. **मरतसंभाळ पु**० १ मरत पडलेल्या माणूस, पशु, इ० ची शुश्रूषा. २ प्रेमपूर्वक शुश्रूषा किं० संगोपन (घेणें). ३ खाणें, पिणें, खेळणें, लिहिणें, बोलणें, झोपणें, इ० मध्यें अतिरेक. **मरता आहार पु**० मरणोन्मुख माणसाचें शेवटचें खाणें किं० जेवण. **मरतीक न**० १ मृत मनुष्य; मुडदा. २ मरण. ३ मृताची और्ध्वदैहिक क्रिया. **मरती कळा स्त्री**० १ आजाऱ्यासारखा देखावा किं० चर्या. २ मरण अगदीं जवळ येऊन ठेपलें आहे अशा समयींची मुद्रा.**मरती भावना स्त्री**० मरण जवळ येऊन ठेपलें आहे असें ज्यावरून ताडतां येतें अशी मुद्रा इ०. **मरती रात्र स्त्री**० ऐन रात्रीचा समय; उ० मरत्या रात्रीं मी खोटें बोलेन असें तुला वाटलें तरी कसें ?

मरतुकडा,**मरतुंगडा**, **मरतंगडा** [**म**०मरणें] **वि**०अगदीं अशक्त, निस्त्राण, निर्वीर्य, लेचापेचा, किं० निरुपयोगी (माणूस, पशु, पदार्थ).

मरद, **मरदणें** पुढें ' मर्द, '' मर्दणें ' पहा.

मरफा पु० एक चर्मवाद्यविशेष.

मरमर [**म**० मरणें+मरणें] **स्त्री**० १ फाजील धाडसी किं० साहसी वृत्ति (येणें, लागणें, घेणें). २ उपहास; टवाळकी; उ०आपली हानि आणि जनाची मरमर. ३ चरफड; तरफड. ४ अशक्तपणा; क्षीणता. ॐ **मरमर घेणें** अगदीं क्षीण किं० निर्वीर्य होणें.

मरमरा, मरवडा [**म**० मरणें] **पु**० पराकाष्ठेचा अशक्तपणा (निंदेंत); उ० तूं कां नाहीं जात ? तुला काय मरवडा आला आहे ?

मरवड[**म**०मरणें] **स्त्री**० १ अशक्तपणा (येणें, भरणें). २ पटकी इ० ची साथ.

मरवा [**सं**०मरुत्तक] **पु**०एक सुगंधी झुडूप.

मरशा [**अ**० मर्सीयाह्] **पु**० १ (मुसलमानांतील) शोकगीत. २ मोहरमांत हस्न् आणि हुस्न् ह्यांच्या मरणासंबंधाचें गीत मुसलमान गातात तें. [मासा.

मरळ पु०, **स्त्री**० गोड्या पाण्यांतील एक

मरळ स्त्री० १ मरगळ; अशक्तपणा. २ ज्वरापूर्वीचा अशक्तपणा; अंग मोडून येणें.

मराठा [**सं**० मरहट्ट; महारठ्ठ; महाराष्ट्र] **पु**० १ महाराष्ट्रांतील हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. २ महाराष्ट्रांतील कोणीही मराठी बोलणारा हिंदू रहिवासी. ॐ **मराठी वि**० १ महाराष्ट्रासंबंधाचा. २ मराठे लोकांसंबंधाचा. **स्त्री**० महाराष्ट्रांतील प्रचलित भाषा. **मराठभोळा, मराठमोळा पु**० १मराठे लोकांचे आचारविचार समुच्चयानें. २ उच्च दर्जाच्या मराठ्यांच्या स्त्रिया तोंडावर बुरखा घेतात ती चाल.

मरातब [**अ**०] **पु**०, **स्त्री**० १ उच्च दर्जा. २ मानाची कोणेकास दिलेली पदवी. ॐ **मानमरातब पु**० **ए**० **व**० कोणेकाची करण्यांत आलेली संभावना, गौरव, किं० प्रसंसा.

मरांदा पु० नारळ, ताड, इ०चीं झाडें नीट रुझलीं नाहींत म्हणजे त्यांची होते ती स्थिति.

मराभत, मरम्मत [**अ**० मरम्मत्] **स्त्री**० १ दागदुजी, दुरुस्ती (करणें, राखणें). २ कांहीं पदार्थ तयार करावयाचा किं० बनवावयाचा असतां त्याच्या घटक द्रव्यांवर जे पूर्व संस्कार

करावे लागतात ते समुच्चयानें. ३ करामत; खुबी.

मरामर [म० मरणें+मरणें] स्त्री० माणसें, जनावरें, इ० चें एकदम किं० एकामागून दुसऱ्याचें, दुसऱ्यामागून तिसऱ्याचें, आजारी पडणें किं० मरणें (पटकी इ०च्या साथींत). क्रि० लागणें, चालणें, होणें.

मराल, मराळ [सं० मराल] वि० मऊ; स्निग्ध; चिकट. पु० हंस. ❀ **मरालिका, मराळिका** स्त्री० १ हंस स्त्री. २ कोणीही सुंदर आणि नाजूक स्त्री. [साथ.

मरी [सं० मरक=साथ] स्त्री० पटकी इ०ची

मरी [म० मरणें] स्त्री० आसन्नमरण अशी स्थिति; अत्यन्त आजारीपणाची अवस्था; उ० त्याची आई मरीस आली आहे.

मरीच [सं० मरिच, मरीच] न० १ मिरची. २ मिरीं,–एक काळा तिखट पदार्थ.

मरु [सं० पु० १ निर्जल प्रदेश. २ पाणी न पितां राहाणें हा तपश्चर्येचा प्रकार. ३ मरवा,–एक सुगंधी झुडूप. ४ पर्वत. ५ रेताड प्रदेश.

मरुत् [सं०] पु० १ वायु; वारा. २ वायूची देवता. ३ कोणीही देव. ४ पांढरा मरवा. ❀ **मरुत्पथ** पु० आकाश. **मरुत्सख** पु० १ इंद्र. २ अग्नि. **मरुत्सुत** पु० १ भीम,–धर्माचा धाकटा भाऊ. २ मारुति; हनुमान्.

मरुळ [सं० मरु] वि० रेताड (जमीन, शेत, प्रदेश).

मरोड, मरवड [म० मरणें] स्त्री० १ अत्यंत आजारीपणाची स्थिति. २ एकामागून एक अशीं अनेक माणसें किं० गुरें आजारी पडणें किं० मरणें असा काळ.

मरोडा [हिं०] पु० १ आमांशामुळें पोटांत मुरडणें. २ गुरांवर कोसळलेली कोणतीही साथ.

मर्कट [सं०] पु० १ वानर. २ माकड. ❀ **मर्कटचेष्टा, माकडचेष्टा** स्त्री० अ० व० १ पोरकट चाळे किं० खोड्या. २ मोठ्या माणसास न शोभणाऱ्या पोरकट गोष्टी,–ओरडणें, नाचणें, इ०.

मर्जी [अ०] स्त्री० १ इच्छा; मनाचा कल. २ पसंती; संमति. ३ स्वभाव. ४ मनाची प्रसन्नता. ❀ **कोणेकाची मर्जी राखणें**(किं० संभाळणें) तो नाखूष न होईल अशा प्रकारें वागणें. **कोणेकाची मर्जी मोडणें** त्याला अप्रिय असें कांहीं करणें. **कोणेकाची मर्जी संपादणें** त्याला प्रिय अशा प्रकारें वागून त्याचा लोभ आपणावर जडेल अशा प्रकारें वागणें. **मर्जीस उतरणें** आवडणें. **मर्जीतून उतरणें** आवडेनासा होणें.

मर्त्य [सं०] वि० मरणशील; मरणारा. पु० १ मनुष्य. २ मनुष्यलोक. ❀ **मर्त्यलोक** पु० मृत्युलोक; इहलोक.

मर्द [फा०] पु० १ मनुष्य. २ पुरुष. ३ हिंमतदार, शूर, पराक्रमी असा पुरुष. ❀ **मर्दगाजी, मर्दमाणूस** पु० १ शूर गडी. २ कर्तबगार माणूस. **मर्दाई** स्त्री० धीटपणा; शौर्य. **मर्दाची मिशी** स्त्री० मी शूर पुरुष (बढाई मारतांना).

मर्दणें [सं० मृद्=चोळणें] स० क्रि० १ चोळणें. २ चेपणें. ३ रगडणें. ४ कुसकरणें; चोळवटणें.

मर्दन [सं०] न० चोळणें, चेपणें, रगडणें, किं० कुसकरणें ही क्रिया. ❀ **मर्दनं गुणवर्धनं** १ औषधी द्रव्यें जों जों अधिक खलावीं तों तों त्यांच्या अंगचें वीर्य किं० हितावह गुण अधिक जोरदार होतो. २ विद्यार्थ्याला छडी मारल्यानें त्याची बुद्धि अधिक तल्लख होते किं० तो झटून अभ्यास करतो. [धाडसी.

मर्दा, मर्दाना [फा०] वि० धीट; साहसी;

मर्दानी, मर्दाणी [फा० मर्दानाह्] वि० १ पुरुषास योग्य किं० साजेसें (वर्तन, पोशाख). २ पुरुषाचें (गाणें इ०). ३ प्रौढ पुरुषाचा (आवाज). **जनानी** वि० स्त्रियांस योग्य किं० शोभेसा; स्त्रियांचा; स्त्रियांसंबंधांचा.

मर्दामर्दी [म० मर्दणें] स्त्री० १ शौर्य. २ धाडसी वर्तन. ३ दांडगाई. क्रि० वि० १ धाडसानें. २ करारीपणानें; नेटानें. २ मोठ्या शौर्यानें.

मर्दित [सं०] वि० कुसकरलेलें; चोळलेलें; चोळवटलेलें; चेपलेलें; तिंबलेलें; ढवळलेलें.

मर्दी, मर्दुमकी, मर्दुमी [फा०] स्त्री० १ धैर्य, साहस, पराक्रम. २ धैर्याचें, साहसाचें, किं० पराक्रमाचें कांहीं कृत्य.

मर्म [सं० मर्मन्] न० १ नाजुक भाग;

जिव्हाळी. २ अंतःकरणाचा संवेदना ग्रहण करणारा किं० जाणणारा भाग. ३ कोणेकाच्या अंगचा कांहीं उणेपणा किं० व्यंग. ४ गूढार्थ; खुबी. ५ गुप्त गोष्ट. ६ पदार्थमात्राचे ठायीं असतो तो त्याचा धर्म.७कोणेक पदार्थ किं०माणूस ह्यांच्यापासून कोणेकाला कांहीं अपाय होऊं नये म्हणून त्या पदार्थावर किं० माणसावर नियंत्रणा घालणारें जें कांहीं योजलें जातें तें; पदार्थ, माणूस, इ० ना आपल्या आटोक्यांत ठेवण्याची कोणतीही युक्ति किं० तजवीज किं० योजना. ॐ **मर्मस्थान**, **मर्मस्थळ** न० नाजुक भाग; जिव्हाळा. **मर्मज्ञ** वि० खुबी जाणणारा.

मऱ्या [म० मरणें] वि० मरत पडलेला.

मर्यादा [सं०] स्त्री० १ सीमा. २ शेवट. ३ तीर; तट. ४ नियम; व्यवस्था; योग्य सरणी. ५ शिष्टाचार; वर्तनाचा योग्यपणा. ६ शर्त; बंधन. ॐ **कोणेकाची मर्यादा राखणें** त्याच्या दर्जाला शोभेल असें त्याच्याशीं वर्तन करणें; त्याच्याशीं नम्रपणानें किं० सभ्यपणानें किं० शिष्टाचाराप्रमाणें वागणें. **मर्यादशील** वि० सभ्यपणानें वागणारा; शिष्टाचार न उल्लंघिणारा.

मऱ्हाठा, **मऱ्हाटी** मागें ' मराठा,*मराठी' पहा.

मल, **मळ** [सं० मल] पु० १ घाण. २गाळ; रेंदा. ३ धातूवरचा गंज, कीट,किं०तांब. ४विष्ठा; मूत; शेंबूड;घाम. ५ पाप; पातक. ॐ **मलावरोध** पु० शौचास साफ न होणें किं० मुळींच न होणें. **मलमास** पु० अधिक महिना. **मलद्वार** न० गुद. ' मल ' ह्या शब्दाचें ' मळ ' हें मराठी रूप होऊन जे सामासिक शब्द झाले आहेत ते पुढें ' मळ ' ह्या शब्दांत पहा. **मलपृष्ट** पु० पुस्तकाच्या किं० पोथीच्या रक्षणार्थ जें पहिलें आणि शेवटचें कोरें पान घातलेलें असतें तें. **मलवस्त्र** न० १ देवाच्या मूर्ति, उंची सणंगें, सोन्याचांदीचे दागिने किं० पदार्थ, यांचेवर धुळीपासून रक्षण करण्यासाठीं जें वस्त्र टाकतात तें. २ नाक, तोंड, डोळे, इ० पुसण्यासाठीं जें वस्त्र जवळ बाळगतात तें.

मलई [हिं०] स्त्री० १ दुधाची साय. २ (लाक्षणिक)पदार्थाचा उत्कृष्ट किं०सारभूत अंश. ३ पुढें ' मळई 'सर्व अर्थीं पहा. [पहा.

मलई [सं०मल]स्त्री० पुढें 'मल'मध्यें' मलई '

मलंग [हिं०] पु० फकिरांचा एक पंथ.

मलपणें अ० क्रि० डुलत किं० झुलत चालणें.

मलम [फा० मर्हम्] न० जखम, खरूज, सूज, इ०वर लावण्याचें औषध. ॐ **मलमपट्टी** स्त्री०१ असें मलम ज्यावर पसरून दरदावर चिकटावितात तें वस्त्र,पान,कागद, इ०. २(**लाक्षणिक**) कोणेकाचा राग घालविण्यासाठीं मागितलेली माफी, केलेलें सांत्वन, इ० (लावणें).

मलमल,**मलमली** स्त्री० नाजूक आणि तलम सुताचें एक वस्त्रविशेष.

मलमा पु० पडक्या घराचें अस्ताव्यस्त पडलेलें सामान,–दगड, विटा, कौलें, इ०.

मलय [सं०] पु० १ हिंदुस्थानच्या पश्चिम दिशेकडचीं आणि अरबी समुद्राला समान्तर अशी आहे ती एक पर्वताची रांग.२ह्या पर्वताच्या लगतचा जमीनीचा पट्टा.३मलाका हें द्वीपकल्प.ॐ **मलयज**, **मलयागर**, **मलायागीर** पु० चंदनाची एक उंची जात. **मलयी** वि० मलाका द्वीपकल्पासंबंधाचा.

मलयी, **मलाई** वर ' मलई ' [हिं०] पहा.

मलाड न० मावळ नांवाचा प्रदेश.

मलिदा [फा० मालीदाह्] पु० १ खाद्य पदार्थ करण्यासाठीं खूप ठेचून आणि तिंबून तयार केलेली कणीक. २ दूध, साखर, लोणी, इ०पदार्थ कणकेमध्यें घालून भाजून मुसलमान पीर,फकीर, इ० ना द्यावयासाठीं केलेला रोट.३ (**लाक्षणिक**) दुसऱ्याच्या खर्चानें नित्य मिळणारीं उंचीं उंचीं खाद्यें. ४ पौष्टिक खाद्याचा खुराक. ॐ **धन्याला धत्तूरा आणि चाकराला मलिदा** मुख्याला कोणी विचारीत नाहीं आणि त्याच्या नोकराची वडेजावी चालते (अशी अंदाधुंदीची व्यवस्था). **मलिदा करणें** गुधडणें;कुसकरणें; चुरगळणें; दांडगाईनें वागविणें किं०भोगणें.

मलिन, **मळीण** [सं० मालिन] वि० १ घाणेरडा; मळलेला; मळकट. २ अपवित्र; पापी.३ अधम; नीच. ४ निस्तेज. पु० महिन्याचा कृष्णपक्ष. न० १ मळकट वस्त्र. २ पाप; दोष.

मलूल, मलूर [अ० मलूल] **वि०** १आजार, दुःख, इ० मुळें हालचाल न करतां असलेला. २ खिन्न. ३ निस्तेज. ४ निर्वीर्य. ५ विशविशीत (चिरगूट).

मल्ल [सं०] **वि०**१सशक्त; बलवान्. २उंची; वरच्या दर्जाचा. **पु०** पहिलवान्. ❀ **मल्लक्रीडा स्त्री०**,**मल्लयुद्ध न०**कुस्ती.**मल्लशाला स्त्री०**तालीमखाना.**मल्लखांब,मलखांब पु०**नाना प्रकारच्या उड्या ज्यावर मारतात असा तालीमखान्यांतील खांब,–जमीनींत उभा पुरलेला किं० वरून लोंबत सोडलेला. **मल्लभू स्त्री०** १ कुस्त्या, कसरती, इ०चा अड्डा किं०इ०च्या सोयीची जागा.२ युद्धभूमि. **मल्लई, मलई स्त्री०** १ दांडगाई;धिंगामस्ती. २ गोंधळ; अव्यवस्था. ३ भटारखाना.

मल्लारि, मल्हारी [सं० मल्ल (एक राक्षस) +अरि (शत्रु)] **पु०** खंडोबा हें दैवत. 'खंडेराव' असेंही ह्या दैवताला म्हणतात.

मल्लिक [सं०] **पु०** १ पाय आणि चोंच ज्याची पिंगट आहे असा हंस.(**मल्लिका स्त्री०**).२ माघमास. ३ कोष्टयाचा धोटा. **मल्लिका स्त्री०** पांढरी जाई; मोगरा. ❀ **मल्लिकार्जुन पु०** बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक; मागें ' ज्योति ' मध्यें ' ज्योतिर्लिंग ' पहा.

मल्हार [सं०] **पु०** गायनांतील एक राग.

मवा पु० धान्यावर पडणारा एक रोग.

मवाग [म० मऊ+आग] **स्त्री०** मंद अग्नि; सौम्य आच. **मवागी स्त्री०** मंद अग्नि. **मवागींत वि०** सौम्य, मंद (विस्तव, आच). **मवागींत, मवागीं क्रि० वि०** सौम्य शेकांत किं० अग्नीषर.

मवागी [म० मऊ] **स्त्री०** स्निग्ध पदार्थ,– तेल, तूप, खसखस, रातांबेल, इ०.

मवारी [म० मऊ] **स्त्री०**१लोणी इ० स्निग्ध पदार्थ. २ कातडें कमावण्याच्या क्रियेंत लावतात तीं हर्डी, ताक, हळद, इ० द्रव्यें समुच्चयानें.

मवाशी (–सी) खालीं ' मवास ' मध्यें पहा.

मवास [अ० मवाषी] **पु०** १ लुटारूंच्या टोळीचा नायक. २ लुटारू (सामान्यतः). ३ लुटारूंची टोळी.४स्वच्छंदानें भटकणारीं गुरेंढोरें, बदमाष लोक, इ० समुच्चयानें.❀**मवाशी(–षी,–सी) स्त्री०**लुटारू किं०बदमाष लोकांचा जो नायक त्याची सरणी किं० राहाणी. **पु०** लुटारू; बदमाष.

मवाळ [म०मऊ] **वि०** १लोणी, तेल,रातांबेल, इ० लावल्यानें नरम पडलेलें (अंग). २ सौम्य प्रकृतीचा किं० स्वभावाचा (मनुष्य). ३ सरकारजवळ नम्रपणानें न्याय किं०दाद मागणारा.
❀ **मवाळी स्त्री०** १ लोणी, रातांबेल, तेल, इ० त्वचा मऊ करणारा पदार्थ.२ह्या पदार्थांनीं त्वचेला प्राप्त झालेला मऊपणा. ३ स्वभावाचा सौम्यपणा.

मशक [सं०] **पु०** १ चिलट; डांस. २ गांधीलमाशी. ३ बारीक पुरळ. ४ पखाल.**टीप,**– ' मश्क् ' ह्या आरबी शब्दाचा अर्थ पखाल असा आहे. एका वाद्याचेंही नांव आहे. ❀ **मशकहरी स्त्री०**मच्छरदाणी.

मशरू [अ० मश्रूअ] **स्त्री०** गजनी नांवाचें गर्भरेशमी कापड. **टीप,**–हें निमाज पढतांना निषिद्ध मानलें जात नाहीं. [पहा.

मशरूल अनाम खालीं ' मश्रूल अनाम '

मशागत [अ० मशक्कत्] **स्त्री०** १ श्रम; परिश्रम; उ० शेताची मशागत करावी तसें पीक येतें. २ सेवा; चाकरी; निगा; संगोपन.३केलेल्या नोकरीबद्दलचें वेतन, पगार, किं० बक्षीशी. ❀ **मशागती वि०** १ नोकरी किं० कष्टाचीं कामें करून चरितार्थ करणारा. २ कामसू; उद्योगी.

मशारनिले, मशारनिल्हे [अ० मशारा अलीयाह्] **वि०** वर सांगितलेला; उपरिनिर्दिष्ट (सनदा, दफतरी पत्रें, इ० मध्यें).

मशाल [अ० मष्अलाह्] **स्त्री०** चिंध्या एकावर एक गुंडाळून केलेली दोन तीन हात लांब आणि मणगटा इतकी जाडी आणि घट्ट गुंडाळी,– तेल घालून पेटवून प्रकाशासाठीं केलेली. ❀ **मशालजी (–ची) पु०** प्रकाशार्थ मशाल पेटवून ती हातांत धरणारा मनुष्य. **मशाल पाजळणें** किं० **दिवसा मशाल लावणें** बदमाषपणाच्या कृत्यांनीं प्रसिद्धि पावणें.

मशी, मषी, मसी [सं०] **स्त्री०** १ शाई. २ काजळ.३चुलीवर ठेविलेल्या भांड्याच्या बुडावर जमतो तो काळा थर.ह्या अर्थी' मशेरी ' **स्त्री०** असाही शब्द आहे. ४ जळून गेलेल्या चिरगूट, कागद, इ० ची राख.

मशीद, मसीद [अ० मस्जिद्] **स्त्री०** १

मुसलमानांची प्रार्थनेची जागा. २ (**लक्षणनें**) मोठें आणि भयाण घर.

मशेरी वर ' मशी ' मध्यें पहा.

मश्रूल अनाम [अ० मश्रीर् उल्नाम्] पु० संमानाची पदवी,-जी नांवांमागें योजतात; उ० मश्रूल अनाम रामचंद्र देशमुख.

मषी वर ' मशी ' पहा.

मस [सं० मसी] पु०, स्त्री० १ शरीरावरचा ल्हान काळा ठिपका;तीळ.२रक्त गोठून किं०अन्य कारणानें शरीरावर उत्पन्न होतो तो गोळा. ३ काजळ. ४ चुलीवर ठेवावयाच्या भांड्याच्या बुडाला जमतो तो काळा थर.५ (**लक्षणेनें**) कलंक; डाग. ॐ **मसकूट, काळामसकूट, काळामिचकूट** वि० अत्यन्त काळा(निंदेंत).

मसक वर ' मशक ' आणि त्यांतील **टीप** पहा. ॐ **मशक भिस्ती** पु० खांद्यावरून पखाल वाहणारा भिस्ती. याच्या व्यावर्तकत्वें ' बैल भिस्ती. '

मसकणें अ० क्रि० ढिसूळपणामुळें (भाकरी, लाडू, इ० नीं) तुकड्यांचें रूप पावणें.

मसका [हिं०] पु० १ लोणी. २स्निग्ध पदार्थ. ॐ **कोणेकाला मसका लावणें** त्याची हिडिस आणि ओंगळ खुशामत करणें.

मसकूट वर ' मस ' मध्यें पहा.

मसण [सं० श्मशान] न० प्रेतें जाळण्याची किं० पुरण्याची जागा. ॐ**मसणखाई** स्त्री० १प्रेतें पुरण्याची किं० जाळण्याची सखल अशी जमीन. २ खूप मोठें आणि भयाण आणि भणभणीत घर किं० वाडा.**मसणखुंट** पु०ज्याच्या मागें बायको-मुलें, उद्योगधंदा, इ० कांहीं व्याप नाहीं असा अगडबंब, रिकामटेकडा, आणि निरक्षर माणूस. **मसणवट** (-टी) स्त्री०, **मसणवाटा** पु० [सं० श्मशान+वाट, वाटिका, वाटी] प्रेतें जाळण्याची किं० पुरण्याची जागा. **मसणा, मसण्या, मसणागौरा** [सं० श्मशान] पु० १ कोणीतरी माणूस,-त्याची तुला काय पंचाईत? २ गधडा; उ० अरे मसण्या, तुला शंभर वेळां सांगितलें तरी तूं त्या राम्याची संगत सोडीत नाहींस ! **अचाट खाणें मसणांत जाणें** मर्यादेबाहेर खाल्यानें प्रकृति नादुरुस्त होते आणि शेवटीं मरण्याची वेळ येते. **मसण जागविणें** श्मशानभूमींतलि पिशाचांना उठवून आपल्यासाठीं कांहीं अद्भुत रीतीनें आपल्या दावेदारास उपद्रव करावयास चेतविणें. **मसण माजणें** झाडेंझुडपें इ० निरुपयोगी झाडांची वाढ एकाद्या ठिकाणीं उपद्रवकारक होणें.**कोणेकाच्या गोवऱ्या** (किं० **लाकडें** किं० **हाडें**) **मसणांत गेलेल्या** (किं० **गेलेलीं**) **असणें** १ तो फार म्हातारा झालेला असणें (अनुकंपेंत). २ तो इतका म्हातारा झालेला असून त्याचे पोरचाळे अझून सुटत नाहींत (निंदेंत). **मसणांत दिवा लावणें** उच्छृंखळपणानें वागत सुटणें; बदमाष-पणाचीं कृत्यें करण्याचा क्रम चालू करणें. **मसणांत देखील कावळ्यांचा उपद्रव** ह्या जगांत शांत स्थल मला कोठेंही मिळत नाहीं (वैतागांत). **मसणांतून ओढून काढणें** माला देऊन किं०अनेक उपाय करून कोणा अगदीं मरणोन्मुख माणसाला बरें करणें.**मसणांतून ओढून काढलेला** अत्यन्त रोड आणि किडकिडीत माणूस.

मसंदणें, मसंदळणें [हिं० मसंदना] स० क्रि० १ फार फार हाताळून आणि कुसकरून (वस्त्र, फुलें, इ०) बिघडविणें किं० त्यांची नासाडी किं० खराबी करणें. २ (पीठ,कणीक) फाजील तिंबणें.

मसनद [फा०] स्त्री० १ गादी, रुजामा, सतरंजी, इ० (बड्या गृहस्थाच्या महालांत आंथ-रलेली). २ तख्त; सिंहासन. ॐ **मसनदनशीन** वि० तख्तावर असलेला (राजा). **मसनदनशी** स्त्री० १ सिंहासनारोहण. २ राजधानी.

मसमू [अ० मस्मुम्] वि० पक्का, कायम किं० स्थिर केलेला (शब्दशः किं० लाक्षणिक).

मसरूर [अ०] वि० आनंदित; संतोष पावलेला.

मसलत, मसलहत [अ० मस्लहत्] स्त्री० १ (अडचणीच्या प्रसंगीं) केलेला किं० ठरविलेला विचार, युक्ति, किं० तजवीज. २ युक्ति; हिकमत; कावा. ॐ **मसलत पडणें** १ तजवीज किं० युक्ति किं० इलाज केलाच पाहिजे असा प्रसंग प्राप्त होणें. २ पंचाईत पडणें. ३ पेचांत

सापडणें. **मसलतदार पु०१** पंचाइतींच्या समयीं युक्ति सुचविणारा. २ सल्ला देणारा; सल्लागार; मंत्री. **मसलतबाज,मसलती** वि० धूर्त; चतुर; धोरणी.

मसलंद स्त्री० अंबारीचा मध्यभाग.

मसाद [अ० मसाहत्] **स्त्री०** जमीनीची मोजणी. ❀ **मसादी वि०**जमीनीच्या मापणीचा (खरडा, हिंशेब, बेरीज, अंदाज).

मसाला [अ० मसालिह्] **पु०** १ कांहीं खाद्य किं०पेय पदार्थ रुचिकर किं०स्वादिष्ट करण्यासाठीं त्यांत घालतात ते पदार्थ समुच्चयानें; साखरभाताला वेलदोडे, लवंगा,केशर, इ०मसाला घालतात; सनल्याच्या चुन्यांत अंबाडी, कात, इ० मसाला घालतात; वांगीभाताला मिरे,लवंगा, इ० मसाला घालतात. २ गुन्हेगार जबानीसाठीं सरकारनें बोलावून आणणें असतां त्याच्यापासून त्याच्या घरींच सरकार घेतें तो पैसा. ३ घोडे इ० ना पुष्ट करण्यासाठीं गूळ, मैदा, भांग, इ०चें मिश्रण खाऊं घालतात तें. ४ सरकारी वसूल करावयास गेलेल्या शिपायाला जें देय द्यावें लागतें तें. ५ दंड किं० दंडाची रकम. ६ पानतंबाखूसाठीं खुषीनें जें कोणास द्रव्य दिलें जातें तें; चेरीमेरी. ❀**मसालेदार वि०** मसाला घालून स्वादिष्ट केलेला (खाद्य, पेय, इ० पदार्थ).

मसुदरेघ [**हिं०** मस्तर+**म०** रेघ] **स्त्री०** शूद्र किं० मुसलमान यांस लिहिलेल्या पत्राच्या चार रकान्यांपैकीं पाहिल्या तीन रकान्यांत ओढतात ती रेघ.

मसुदा, मसोदा [**अ०** मसूदाह्] **पु०** पत्र, खत, इ०चा कच्चा खरडा.

मसुरा पु० धान्य साठविण्यासाठीं भिंत बांधतेसमयीं भिंतींत ठेविलेली पोवळ जागा.

मसूर[**सं०**]**स्त्री०** एक डाळ,–ही तांबडी असते.

मसूरिका [**सं०**] **स्त्री०** देवीसारखा एक त्वग्रोग. ह्या अर्थीं मसूरी, मसुऱ्यादेवी, हेही शब्द रूढ आहेत.

मस्करी [**अ०** मसखराह=विदूषक] **स्त्री०** थट्टा; विनोद. ❀ **मस्करीची होते कुस्करी** असभ्यपणाचा विनोद केला असतां त्याचें मारामारींत पर्यवसान होतें.

मस्त [**फा०**] **वि०** १ उन्मत्त; गर्विष्ठ. २ अमली पदार्थाच्या सेवनानें तर्र झालेला. ३ (अशिक्षितांत) विपुल; खूप;उ० पडेल हस्त तर पिकेल मस्त (म्ह० हस्त नक्षत्रांत पाऊस पडला तर धान्याचें पीक पुष्कळ येईल). **मस्तवाल** [**फा०** मस्त+**हिं०** वाला] **वि०** उन्मत्त; माजलेला; माजोरी. **मस्ता, मस्त्या** [**फा०** मस्त] **वि०** १ झिंगलेला. २ उन्मत्त; उर्मट. ३ उधळलेला (घोडा). **मस्ती** [**फा०**] **स्त्री०** १ अमल; कैफ; झिंगलेपणाची स्थिति. २ दांडगाईचे खेळ(पोराचे). ३ हत्ती, उंट, इ० ना येतो तो उन्माद. ४ कामविकारानें बेफाम झाल्याची स्थिति.

मस्तक[**सं०**] **पु०, न०** १ डोकें. २ कोणत्याही पदार्थाचा वरचा भाग; शिरोभाग. ❀ **मस्तक ठेंगणें करणें** नम्रपणानें वागणें;गर्व,ताठा, किं० अभिमान सोडून देणें. **मस्तकपट्टी स्त्री०** दाराची किं० खिडकीची जी चौकट तिचें वरचें लाकूड. **दोन हस्तक आणि तिसरें मस्तक** विचारपूर्वक आणि नेटानें कोणतेंही काम करणें. **मस्तकावघ्राण न०** डोक्याचा वास घेणें (प्रेमाचें लक्षण).

मस्तावणें [**म०** मस्त; मस्ती] **अ० क्रि०** उन्मत्त होणें; उद्धट होणें.

महकुब, महकूब [**अ०** मौकूफ्] **वि०**रहित केलेलें; बंद पाडलेलें; रद्द केलेलें (कांहीं काळापुरतें किं० कायमचें). ❀ **महकुबी स्त्री०** तात्पुरती किं० कायमची थांबवणूक किं० रद्द करणें.

महजर [**अ०** महज़र] **पु०** १ बादशहानें ेणेकाला दिलेली सनद. २ हुकूमनामा;निवाडापत्रक. **टीप**,–वरील दोन्ही अर्थीं ' महजरनामा ' असाही शब्द आहे.

महत् [**सं०**] **वि०** १ मोठा;विस्तृत.२ वरच्या दर्जाचा; उत्कृष्ट. ३ अतिशयित. **पु०** (**सांख्य**) महत्त्व; बुद्धि. **न०** परमात्मा.❀**महत्तर पु०**वडील माणूस; श्रेष्ठ पुरुष. ❀ **महत्त्व न०** १ मोठेपणा; योग्यता; किंमत. २ कांहीं गोष्ट विचारांत घेण्याची तिची लायकी. ३ विस्तार. **टीप**,– ' महत् ' हा शब्द कर्मधारय आणि बहुव्रीहि

समासांत ' महा ' होतो आणि तत्पुरुष समासांत तसाच राहातो. महादेव म्ह० मोठा देव म्ह० शंकर. महाबाहु म्ह० मोठा बाहु किं० मोठा आहे बाहु ज्याचा असा (पुरुष). महदाख्यायिका म्ह० थोर पुरुषासंबंधाची कांहीं गोष्ट किं० कथा. ‡‡ ' महत् ' शब्दघटित सामासिक शब्द ह्याच प्रतीकांत पुढें देतों. **महानस पु०, न०** स्वयंपाक घर. **महानिल पु०** वावटळ. **महानुभाव वि०** १ उदार; श्रेष्ठ; महात्मा. २ सद्गुणी. **महार्घ वि०** १ मूल्यवान्. २ महाग.' महार्घ'चें मराठी रूप 'महाग.' **महार्ह वि०** १ मौल्यवान्. २ अमूल्य. **महाष्टमी स्त्री०** आश्विन शुद्ध अष्टमी ही तिथि. **महात्मा [सं० महात्मन्] वि०** १ थोर मनाचा; उदार अंतःकरणाचा. २ वलिष्ठ. **पु०** परमात्मा. **महानंद पु०** मुक्ति. **महालय पु०** १ देऊळ. २ धर्मशाळा. ३ तीर्थस्नान. ४ ब्रह्मलोक. ५ परमात्मा. ६ भाद्रपद वद्यांतील पितरांप्रीत्यर्थ केलेलें श्राद्ध. ७ आश्रयाची सुरक्षित जागा. **महाशय पु०** महात्मा; थोर मनाचा; उदार अंतःकरणाचा. **महेच्छ वि०** १ उदार मनाचा. २ महत्त्वाकांक्षी. **महेन्द्र पु०** इंद्र,—देवांचा अधिपति. **महेष्वास पु०** मोठा वीर. **महेश पु०** शंकर. **महोक्ष पु०** १ मोठा बैल. २ नंदी बैल (शंकराचा). **महोदधि पु०** महासागर. **महोदयपर्व न०** माघ किं० पौष महिन्यांत सोमवारीं सूर्योदयीं अमावास्यारंभ, श्रवण नक्षत्राचा मध्य, आणि व्यतिपाताचा शेवट, यांचा योग. **महोपाध्याय पु०** विद्वानाला देतात ती एक पदवी. **महौषधि (-धी) स्त्री०** १ दूर्वा. २ ब्राह्मी. **महाकल्प पु०** ब्रह्मदेवाचें आयुष्य,—त्याचीं शंभर वर्षें. **महाकाल पु०** प्रलयकाळचा शंकराचा अवतार. **महाकाली स्त्री०** पार्वती. **महाकाव्य न०** अठरापेक्षा अधिक सर्ग ज्यांत आहेत असें काव्य; उ० रघुवंश, नैषध, किरातार्जुनीय, इ०. **महाकुल वि०** कुलीन. ह्या अर्थी ' महाकुलीन ' सुद्धां. **महाजन पु०** १ जनसमूह; लोक; जग. २ थोर पुरुष; सज्जन. खालीं ' महाजन ' स्वतंत्र प्रतीकांत पहा. **महातल न०** सात पातालांपैकीं पांचवें पाताल (नाग आणि असुर यांचें स्थान).

महादेव पु० शंकर. **महादेवाचें देणें** कंटाळवाणें काम. **महानवमी** आश्विन शुद्ध नवमी. **महानाद पु०** १ शंख. २ गर्जना करणारा मेघ. **महानिद्रा स्त्री०** मरण. **महानिशा स्त्री०** मध्यरात्र. **महापद्म पु०** १ एकं, दहं, शतं, ह्या श्रेणींतील तेराव्या स्थानची संख्या. २ कुबेराचा एक निधि. **महापातक न०** ब्रह्महत्या, दारू पिणें, चोरी, गुरूच्या पत्नीशीं संभोग, हीं चार पातकें आणि हीं पातकें करणाराशीं मैत्री, अशीं एकंदर पांच पातकें प्रत्येक. **महाप्रलय पु०** ब्रह्मदेवाचीं शंभर वर्षे भरल्यावर व्हावयाचा जो सर्व जगाचा नाश तो. **महाप्रस्थान न०** १ मरणें. २ मरणाची दीक्षा घेऊन उत्तरेस हिमालयाकडे जाणें. **महाप्राण पु०** १ जोराचा उच्चार. २ जोरानें उच्चारण्याचे वर्ण,—ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ, श, ष, स, आणि ह, हे चौदा. **महाब्राह्मण पु०** १ और्ध्वदेहिक कर्माचा संकल्प सांगणारा ब्राह्मण; कारटा. २ निंद्य आचार करणारा कोणीहीं ब्राह्मण. **महाभाग वि०** १ भाग्यवान्. २ सद्वर्तनी; सद्गुणी. ३ श्रेष्ठ. **महाभारत न०** हिंदूंचा एक राष्ट्रीय ग्रंथ. **महाभूत न०** पृथिवी, जल, आकाश, वायु आणि तेज, हीं पांच प्रत्येक. **महामहोपाध्याय पु०** मोठ्या पंडिताला देतात ती एक पदवी. **महामात्र वि०** उत्कृष्ट; श्रेष्ठ. **पु०** १ मुख्य प्रधान. २ हत्ती हाकणारा महात. ३ हस्तिशालेचा अध्यक्ष; मुख्य महात. **महामाया स्त्री०** पार्वती. **महामारी स्त्री०** पटकीची साथ. **महामुनि पु०** व्यास, अगस्ति, तुंबुरु, इ० मोठे ऋषि प्रत्येक. **महामूल्य वि०** १ मूल्यवान्. २ महाग. **महायज्ञ पु०** पंच महायज्ञांतील प्रत्येक. **महायात्रा स्त्री०** काशीयात्रा. **महायुग न०** चार युगांचा काळ. **महारथ पु०** १ शस्त्रशास्त्रप्रवीण आणि दहा हजार वीरांशीं लढणारा योद्धा. २ (**लाक्षणिक**) अत्यन्त शूर पुरुष किं० मोठा वक्ता किं० कर्तबगार माणूस. ह्या दोन्ही अर्थी 'महारथी' सुद्धां. **महाराज पु०** १ सार्वभौम राजा. २ श्रेष्ठ माणूस. **महारात्रि स्त्री०** १ मध्यरात्र. २ महाप्रलय. ३ आश्विन शुद्ध अष्टमीची रात्र. **महाराष्ट्री स्त्री०** संस्कृत भाषेपासून झालेली अपभ्रष्ट रूपाची

एक प्राकृत भाषा. **महाराष्ट्र पु०** विंध्य आणि म्हैसूर ह्यांच्या दरम्यानचा प्रदेश. **महारोग पु०** रक्तपीति. **महालक्ष्मी स्त्री०** १ दुर्गा ही देवी. २ आश्विन शुद्ध अष्टमीस तिची पूजा इ० उत्सव. **महाविषुव न०** (ज्योतिष) मेष संक्रांत. **महावीर पु०** १ योद्धा.२ शूर पुरुष. **महाशिवरात्रि स्त्री०** माघ कृष्ण चतुर्दशी. **महावस्त्र न०** शालजोडी, पितांबर, इ० उंची वस्त्र. **महाशब्द पु०** बोंब (करणें, होणें).

महंत [**सं०** महत्] **पु०** १ गोसावी किं० बैरागी यांचा गुरु. २ कोणत्याही गुणानें किं० विद्येनें श्रेष्ठ माणूस. ॐ **महंती स्त्री०** १ महंताचा दर्जा किं० अधिकार. २ प्रौढी; वैभव; थोरवी.

महंता [**सं०** महत् + ता (प्रत्यय)] **स्त्री०** १ मोठेपणा. २ वैभव; थोरवी; प्रौढी.

महताब [**फा०**] **स्त्री०** १ चंद्रज्योत,– आतिषबाजीचा एक पदार्थ. २ सुंदर स्त्री.

महत्त्व [**सं०**] **न०** वर ' महत् ' मध्यें पहा.

महदंतर [**सं०** महत्+अंतर] **न०** फार मोठें अंतर किं० तफावत किं० वेगळेपणा.

महदर स्त्री० कागदाला पाडलेल्या चार रकान्यांपैकीं पहिल्या तीन रकान्यांतून काढलेली रेघ,–कारकुनाचा शब्द. ह्या रेघेला ' महदररेघ ' किं०'महदर ओळ ' असेंही म्हणतात.मागें 'मसुदरेघ 'पहा.

महदूद [**अ०**] **वि०** १ ज्याच्या हद्दी किं० मर्यादा ठरविण्यांत आल्या आहेत असें (गांव इ०). २ पक्की, निश्चित (मर्यादा).

महंमाय [**सं०** महामाया] **स्त्री०** १ दुर्गादेवी. २ भ्रम; अज्ञान; अविद्या.

महमुदी [**फा०**] **स्त्री०** १ एक फुलझाड. २ एक प्रकारचें वस्त्र.

महर्लोक [**सं०**] **पु०** पृथ्वीच्या वरच्या सप्त लोकांपैकीं एक. हे सप्तलोकः—भूर्, भुवर्, स्वर्, महर्, जनर्, तपर्, आणि सत्य.

महला [**अ०** महल्लाह्] **पु०** १ शहराचा एक भाग,–पेठ, इ०. २ घोडा इ० ना देतात तो एक मसाला.

महशूर, मषहूर [**अ०**मष्हूर] **वि०** सर्वांस ठाऊक असलेला (चांगल्या किं० वाईट अर्थी).

महसूल [**अ०**] **पु०** देश, गांव, इ० कांकडून सरकारांत येतो तो वसूल. **महसुली वि०** ह्या वसूलासंबंधाचा.

महा [**सं०**महत्]**वि०** १मोठा;मोठ्या दर्जाचा. २ पटाईत. **क्रि० वि०** अत्यन्त; पराकाष्ठेचा. **टीप**,–निंदा कर्तव्य असतां' महा 'च्या पुढचा शब्द बहुधा गाळण्यांत येतो; उ० गोविंदराव हे एक महा आहेत (म्ह० महा नीच, अर्कट, वस्ताद, इ०). ॐ **महा एकादशी स्त्री०** १ आषाढ शुद्ध एकादशी. २ कार्तिक शुद्ध एकादशी.

महाग [**सं०** महार्घ] **वि०** ज्याला वाजवीपेक्षां अधिक किंमत पडत आहे असा बाजारांतील विक्रीचा पदार्थ.ॐ**कोणी मनुष्य अन्नास महाग होणें** त्याला पोटाला पुरेसें अन्न मिळत नसणें; दारिद्र्यामुळें त्याची खाण्यापिण्याची दैना असणें. **कोणी मनुष्य वस्त्रास महाग असणें**(किं०**होणें**) दारिद्र्यामुळें त्याला वस्त्रें मिळत नसणें. **कोणी मनुष्य महाग होणें** तो क्वचित् प्रसंगीं दृष्टीस पडूं लागणें; उ० गोविंदराव तुम्ही आलीकडे इतके महाग कशामुळें झालां आहांत ? **महागरा वि०** महाग दरानें आपले जिन्नस विकणारा (निंदेंत). **महागाई स्त्री०** बाजारांत जिनसा नेहेमीपेक्षां अधिक किंमतीनें विकल्या जात असण्याची स्थिति; उ० गेल्या वर्षीं पाऊस पडावा तसा पडला नाहीं म्हणून यंदा महागाई झाली.

महागिरी स्त्री० सुमारें तीनशें खंडींच्या वाहतुकीचें गलबत.

महाजन [**सं०** महत्+जन] **पु०** १ कांहीं गुण, विद्या, इ० मुळें थोर किं० श्रेष्ठ माणूस. २ व्यापारी. ३ गांव, कसबा, इ० तील व्यापाराला नियम किं० शिस्त घालून देणारा सरकारी अधिकारी. ह्या अर्थीं ' महाजनी ' असाही शब्द आहे. ह्या अधिकाऱ्याच्या दर्जाला ' महाजनी ' **स्त्री०** असा शब्द आहे.

महाडी स्त्री० भाताची एक जात.

महांडूळ न० सापाची एक जात.

महात (–द) [**सं०** महामात्र] **पु०** १ हत्तीला हाकणारा. २ हत्तीची चाकरी करणारा नोकर.

महातल [**सं०**] **न०** पृथ्वीच्या खालीं जे सात लोक आहेत त्यांपैकीं एक.ते लोक असेः-(१) अतल,(२)वितल, (३)सुतल,(४)रसातल,(५) तलातल, (६) महातल, आणि (७) पाताल.

महान् [**सं०** महत्] **वि०** मोठा.

महानुभाव पु० १ मागें 'महत्' मध्यें 'महानुभाव' पहा. २ कृष्णाच्या उपासकांचा एक पंथ. 'मानभाव' हा रूढ शब्द.

महापा [**फा०** महाफाह्] **पु०** एक प्रकारचें वाहन.

महाबमहा [**फा०** माह् बह् माह्] **क्रि० वि०** दर महिन्यास.

महामुदी [**फा०** मह्मूदी] **स्त्री०** एक प्रकारचें कापसाचें नाजूक वस्त्र.

महामूर [**अ०** मअमूर] **वि०** १ विपुल; पुष्कळ. २ बंद केलेलें किं० झाकलेलें (दार, खिडकी). ३ पूर्णत्वास आलेलें (शेत). ४ गाढ (झोप). **स्त्री०** वैपुल्य; अतिरेक. **क्रि० वि०** पुष्कळ प्रमाणांत (जेवणें,निजणें, इ०). ❀ **महामुरी स्त्री०** १ वैपुल्य. २ (दार, खिडकी, इ० चीं) बंदपणाची किं०झाकलें असण्याची स्थिति.

महार पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा कोणी इसम. ❀ **महारकचका पु०, महारगजाल स्त्री०** जोराजोराचें आणि आरडून ओरडून चालविलेलें भांडण. **महारकावळा पु०** डोमकावळा. **महारकी स्त्री०** महाराचें वतन किं० गांवच्या वतनदारीचा हक्क. **महारडा पु०** महार (निंदेंत). **महारपुंज पु०** शेतकऱ्याकडून आलेल्या धान्यांतील जो भाग गांवच्या महाराला हक्क म्हणून द्यावयाचा तो. **महारपोर पु०, न०** गांवांतील हलक्या जातींचें लोक.**महारवडा, महारवाडा पु०** गांवाचा महारांच्या वसतीचा भाग. **महारवी वि०** महारानें केलेला(पदार्थ,-टोपली,केरसुणी,सूत,इ०). **महार शिसोळा पु०,महार हराटी,महार हडकी स्त्री०** जनावरांचीं प्रेतें जेथें महार लोक फाडतात ती जागा.

महाल [**अ०** महल्] **पु०** १ तालुक्याचा एक पोटभाग. २ ह्या पोटभागाच्या संबंधाचीं कामें किं० हीं कामें करावयाची जागा. ३ घरांतील स्त्रियांची वसण्याउठण्याची जागा. ४ मोठा दिवाणखाना. ५ मोठा आणि भव्य वाडा. ६ सावकार, पेढीवाला, इ०च्या कामाचा व्याप, विस्तार, किं० पसारा. ७ खंडोबा, जोतिबा ,इ० च्या भेटीला पाल इ० गांवांहून जेजुरीकडे जावयाला निघालेली पालखी, काठी, इ०ची मिरवणूक. ८ बेगमांच्या नांवांपुढें लावावयाचा बहुमानार्थक शब्द; उ० नूरमहाल,झिनातमहाल,इ०. ❀ **महालकरी, महालदार पु०** महालासंबंधाची जमाबंदी, बंदोबस्त, इ० कामें पाहाणारा सरकारी अधिकारी.**महालपेटा पु०** महालाचा पोटभाग,-जो सुभेदार किं०मामलेदार ह्यांच्या देखरेखीखालीं सोपविलेला असतो. **महालशिबंदी स्त्री०** महालकऱ्याच्या हाताखालचे शिपायी समुच्चयानें.

महाला, महालया, महाली महाल्या पु० न्हाव्याच्या नांवांपुढें योजावयाची पदवी; उ० कृष्णा महाला.

महावत [**हिं०** महावथाह्] **पु०** हत्ती हाकणारा किं० हत्तीची नोकरी करणारा माणूस; महात.

महावार [**फा०** माह=महिना] **क्रि० वि०** महिन्याच्या महिन्यास.❀ **महावारी स्त्री०** महिन्याच्या महिन्यास अमुक द्यावें किं० अमुक करावें असा ठराव.

महाळ [**सं०** महालय] **पु०** १ भाद्रपद महिन्याच्या वद्यांत पितरांप्रीत्यर्थ केलेलें श्राद्ध.२ भाद्रपद वद्य पक्ष. ह्या अर्थीं 'महाळवसा,' 'महाळवस' हेही शब्द ह्याच अर्थीं आहेत. अशिक्षितांत ह्या सर्व शब्दांची रूढि आहे.

महाळुंग [**सं०** मातुलुंग] **न०** लिंबाच्या जातीचें एक फळ. **स्त्री०**ह्या फळाचें झाड.

महाळू पु० मृदंगाला लाविलेली वर्तुळाकार पट्टी किं० धाव.

महाळा बाबजी पु० कोणी तरी माणूस,-ज्याचें नांव तुम्हाला सांगण्याची जरूरी नाहीं; गोमाजी कापशा.

महिना [**फा०** महीना] **पु०** १ सुमारें तीस दिवसांचा अवधि,-जो तारखेपासून तारखेपर्यंत किं० तिथीपासून तिथीपर्यंत मोजतात. २ ह्या अवधीचें वेतन किं० पगार. ❀ **महिन्याच्या**

काठीं क्रि० वि० महिना भरल्यावर; महिनाभर काम किं० नोकरी केल्यावर. **महिनेकरू, महिनेदार, महिनदार पु०** दर महिन्याला अमुक पगार अशा ठरावानें काम करणारा किं० कामाला लाविलेला गडी किं० नोकर. **महिनेभरू पु०** कामाकडे लक्ष्य न देतां माझा महिना भरतो केव्हां आणि मला पगार मिळतो केव्हां अशा बुद्धीनें काम करणारा म्ह० भाडोत्री नोकर. **महिनेमाल, महिनेमहाल, महिनमाल वि०** महिन्यावर ठरविलेला (नोकर) किं० ठरविलेलें (काम). **महिनेमाह, महिनमाह क्रि० वि०** महिन्याच्या बोलीनें (ठरविलेलें काम, नोकर, इ०). **महिनेवाला पु०** देवळाच्या उत्पन्नांतून ज्याला दर महिन्यास ठराविक धर्मादाय मिळतो तो मनुष्य.

महिमा [सं० महिमन्] **पु०** १ मोठेपणा; थोरवी; वैभव. २ सामर्थ्य; प्रभाव. **टीप,**–ह्या दोन्ही अर्थीं ' महिमान ' हेंही अपभ्रष्ट रूप रूढ आहे. ३ अष्टसिद्धींपैकीं एक,–हावें तितकें मोठें होण्याचें सामर्थ्य. मागें ' अणिमा ' पहा. ४ अश्वमेधांतील पात्रविशेष.

महिमान, मेहमान [**फा०** मेह्मान्] **पु०** १ अतिथि; पाहुणा. २ तिऱ्हाईत. ३ फिरस्ता शेतकरी.

महिरप (–ब), **मेहराप** (–ब), **महिराप** (–ब) [**अ०** मिह्राब्] **स्त्री०** १ कमान. २ मशीदींत पश्चिम दिशेस असणारी पवित्र देवळी; हिच्या शेजारीं मिम्बर म्ह० व्यासपीठ असतें.

महिला [सं०] **स्त्री०** १ स्त्री. २ उन्मत्त स्त्री.

महिष [सं०] **पु०** रेडा; टोणगा. **महिषी स्त्री०** १ म्हैस. २ पट्टराणी. ३ राणी. ४ स्त्री, मादी (पशूंत). ॐ **महिषवाहन पु०** यम.

मही [सं०] **स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन; भुई. ३ प्रदेश. ४ माती,–दगड, विटा, इ० रूप. ॐ **महीश्वर पु०** राजा. **महीदुर्ग पु०** भुईकोट किल्ला. **महीधर पु०** शेष सर्प. **महीधर, महीध्र, महीभृत् पु०** पर्वत. **महीपतन न०** साष्टांग नमस्कार. **महीरुह पु०** वृक्ष; झाड. **महीपुत्र, महीसूनु पु०** मंगल हा ग्रह. **महीसूर पु०** ब्राह्मण.

महींग [सं० मही+गम्] **न०** नांगरलेली जमीन साफ करण्याचें आउत.

महुडा [सं०] **पु०** ढग, मेघ (कवितेंत).

महेंद्र पु० पृथ्वीवरील सात मोठ्या पर्वतांपैकीं एक. मागें ' कुल ' मध्यें ' कुलपर्वत ' पहा.

महोदय मागें ' महत् ' मध्यें पहा.

मळ [सं० मल] **पु०** १ केरकचरा; रेंदा; घाण. २ गंज; कीट. ३ विष्ठा; मूत्र, घाम, इ०. ४ अशुद्धता. ५ पाप. ६ अंगावरच्या मळाची लहान वळी; मळी. **टीप,**–मागें 'मल' पहा. ॐ **मळका, मळकट वि०** मळलेला; घाण झालेला. **मळकोरा वि०** कोरा पण थोडासा मळलेला पदार्थ,– नाणें, दागिना, कपडा, इ०. **मळघाऊ, मळखाव, मळखाऊ वि०** १ जें मळलें असतां मळलेंसें दिसत नाहीं असें (वस्त्र). २ कष्ट, आजार, इ० न चरफडतां सोसणारा. ३ बाहेरून सुंदर किं० चटकदार पण आंतून घाणेरडा (मनुष्य, पदार्थ).

मळई [**म०** मळ] **स्त्री०** १ नदी, ओढा, इ० च्या प्रवाहावरोबर वाहात आलेली माती, पानें, इ० कचरा. २ अशी माती, केरकचरा, इ० वर केलेलें शेत, बाग, इ०. ह्या दोन्हीं अर्थीं ' मलई ' असाही शब्द आहे. ३ मासे धरण्याचें जाळें. ४ दूध इ० वरची साय. मागें ' मलई ' पहा.

मळकटणें [**म०** मळकट] **वि०** मलिन किं० घाण होणें; बराच मळणें.

मळकी स्त्री० वर ' मळई 'चे पहिले दोन अर्थ [पहा.

मळगावणें, मळघावणें [**म०** मळणें] **अ० क्रि०** १ फार रहदारीमुळें (रस्ता, मैदान) गुळगुळीत होणें. २ फार वापरल्यामुळें (दागिना, पेटी, पाट) गुळगुळीत किं० चकचकीत होणें. ३ कांहीं कृति, धंदा, इ० मध्यें (मनुष्य) अनुभविक झालेला असणें किं० त्याला सफाई प्राप्त झालेली असणें. **स० क्रि०** वस्त्रादिक मळविणें किं० मळीण करणें.

मळगी, मळघी स्त्री० बाजारांतील कायमची बांधलेलीं दुकानें समुच्चयानें. जत्रा इ० प्रसंगीं पालें देऊन मांडलेलीं जीं दुकानें तीं मळगी किं० मळघी नव्हत. त्यांना ' मेन बाजार ' म्हणतात.

मळण न० १ उसाचा रस कढवून गूळ करणें. २ असा गूळ करण्याचें पटांगण.

मळणी [**म०** मळणें] **स्त्री०** १ कणसें झोडपून किं० बैलांकडून तुडवून धान्य काढणें. २ उसाचा रस काढणें ही क्रिया. ३ कणसांतून धान्यें काढण्याचा किं० उसाचा रस काढण्याचा समय. ॐ **मळणकर पु०** शेताची मळणी करण्यासाठीं बोलाविलेलीं माणसें प्रत्येक. **मळणतळण न० ए० व०** स्वयंपाकाचीं विविध कामें समुच्चयानें,—कणीक तिंबणें, पापड, सांडगे तळणें, चटण्या कोशिंबिरी करणें, इ०. **मळणी घालणें** मुलांनीं धिंगामस्ती, मारामारी, धावाधाव, इ० दांडगाईचे खेळ खेळणें. **मळणीवर येणें** पदार्थ सिद्ध करावयाच्या वेळीं न येतां सिद्ध झाल्यावर येणें.

मळणें [**सं०** मर्द्] **स० क्रि०** १ (धान्य) कणसांतून झोडपून काढणें. २ (ऊस) चरकांत घालून त्यांतून रस काढणें. ३ चेपणें, रगडणें, चोळणें (पाय, पाठ, हात, इ०). ४ (कणीक) तिंबणें. ५ (घोड्याला) खरारा करणें. ५ रहदारीनें (वाट) पाडणें. ६ (मलम इ०) त्वचेवर चोळणें.

मळणें [**सं०** मल; **म०** मळ] **अ० क्रि०** मलिन किं० घाण होणें (वस्त्र, पदार्थ).

मळभ न० आकाशाची ढगाळ स्थिति. २ ढगांची आकाशांत दाटी. **टीप**,—ह्या दोन्ही अर्थीं ' मळभी ' **स्त्री०** असाही शब्द आहे. ॐ **मळभीभर क्रि० वि०** पुष्कळ (बोलणें, खाणें).

मळमळ स्त्री० १ पित्तामुळें किं० कळकट पदार्थ खाण्यांत आल्यामुळें वांति होईल अशी वाटते ती भावना. २ कांहीं संशय मनांत आल्यामुळें वाटते ती अस्वस्थता; उ० माझ्या घराचा तुम्ही झाडा घ्या म्हणजे तुमच्या मनाची मळमळ फिटेल. ३ अमुक कर्तव्य करावयाचें राहिलें म्हणून मनाला लागते ती हुरहूर. ४ अमुक प्रसंगीं अमुक उत्तर सुचलें नाहीं, अमुक हौस भागली नाहीं, अमुक शंका फिटली नाहीं, किं० अमुक उदाहरण सोपें असून मला सुटलें नाहीं, अशा विचारानें मनाला वाटते ती अस्वस्थता.

मळमळणें भावकर्तरि क्रि० वांति होईल अशा भावनेनें युक्त होणें; उ० मला सकाळपासून मळमळत आहे पण वांति होत नाहीं.

मळमळीत वि० १ योग्य प्रमाणापेक्षां कमी मालमसाला ज्यांत घालण्यांत आला आहे असा (कांहीं खाद्य किं० पेय पदार्थ). २ खतें, साक्षीदार, इ० बंधनें ज्यांत नाहींत, किं० स्पष्ट भाषा ज्यांत झाली नाहीं असा (व्यवहार). ३ ज्यांत विनोद, चटकदारपणा, आवेश, इ० वक्तृत्वाचे गुण नाहींत असें (भाषण). ४ ज्याच्यांत कर्तबगारी, धमकदारी, इ० गुण नाहींत असा (माणूस). ५ सुख, समाधान, सोयी, हौसा, इ० ज्यांत नाहींत असा (आयुष्यक्रम). ६ फाजील सौम्य किं० बेचाट(मनुष्य, पशु, पदार्थ).

मळवट पु० स्त्रियांनीं कपाळभर लाविलेलें कुंकूं किं० पुरुषांनीं कपाळभर लाविलेलें गंध इ० (भरणें). **न०** भट्टींत घालून भाजून काढावयाच्या अगोदरचीं मातीचीं भांडीं समुच्चयानें किं० व्यक्तिशः.

मळवटी स्त्री० अंगावरच्या मळाची वळकटी.

मळविणें [**म०** ' मळणें ' चें प्रयोजक] मळानें युक्त करणें.

मळसूत्र न० फिरकीचा खिळा. ॐ **मळसूत्री वि०** मळसूत्रानें बसवावयाचा (दागिना इ०). **मळसूत्री प्रदक्षिणा स्त्री०** शंकराच्या मूर्तीभोंवतीं जी विशिष्ट प्रकारची प्रदक्षिणा घालतात ती. तिला ' सोमसूत्री प्रदक्षिणा ' असेंही म्हणतात.

मळा पु० १ भाज्या, फळें, इ० ची लागवड किं० ह्या लागवडीच्या उपयोगाची जागा. २ दुपिकी शेत. ३ तिळाची एक जात.

मळी [**सं०** मल; **म०** मळ] **स्त्री०** १ अंगाचा मळ चोळला असतां मळाची जी लांबोडी वळकटी निघते ती. २ साखर, गूळ, इ० शुद्ध करतांना निघतो तो मळ. ३ पावसानें वाहून नेलेली माती, केरकचरा, इ० सखल प्रदेशांत जमतो तो. ४ अशा सखल प्रदेशांत केलेलें शेत, मळा, इ०. ५ मोठ्या शेतांत मध्यें मध्यें बांध घालून जे लहान लहान विभाग पाडतात ते प्रत्येक.

मळीण [**सं०** मलिन] **वि०** १ मळलेला. २ घाणेरडा; ओंगळ. ३ पापानें मळलेला म्ह० पापी. ४ गंजलेला (धातु इ० चा पदार्थ). ५ विसर-

लेली (विद्या, कला). ॐ मलीण ममतां स्त्री० १ आपपर हा निंद्य भेदभाव. २ माया किं० अविद्या ह्यांनीं मनावर घातलेला मोह.

मळ्या वि० काळसर तांबड्या रंगाचा (बैल, गाय, इ० पशु).

माक्षिका [सं०] स्त्री० माशी. २ मधमाशी. ॐ मक्षिकामल न० मेण. मक्षिकापात पु० कांहीं कार्यांत आलेलें विघ्न, हरकत, किं० अडचण (विशेषः सुरवातीस). प्रथमग्रासे मक्षिकापातः पहिल्याच घासाला माशी लागणें; इष्ट वस्तु अगदीं साध्य व्हावयाच्या वेळीं किं०एकाद्या गोष्टीला प्रारंभ करावयाच्या वेळीं कांहीं हरकत आली तर हा उद्गार काढतात.

मा [सं० मा=१ लक्ष्मी. २ आई] स्त्री० १ माता; आई. २ लक्ष्मी,–विष्णूची पत्नी. ३संपत्ति किं० संपत्तीची देवता.

माई [सं० मातृ; म० माय] स्त्री० १ आई. २ कोणीही वयोवृद्ध स्त्री किं० संमानाला पात्र अशी स्त्री. ३ कोणीही स्त्री. ४ सावत्र आईला मुलें ' माई ' म्हणतात.

माईण, माईन माइणी, माइनी स्त्री० पुढें ' माथणी ' पहा.

माईण (–न) स्त्री० एक झुडूप.

माउली [म० माय] स्त्री० १ आई.२पवित्र आणि सदाचारसंपन्न स्त्री. ३ पूज्य स्त्री. ॐ माऊलपण न० १ आईचें प्रेम. २ प्रेमाचा आचार.

मांऊं स्त्री०, न० १ मांजर(मुलांच्या भाषेंत). न० आईचा स्तन (मुलांच्या भाषेंत).

माऊ स्त्री० जखम किं० फोड वरा झाल्यावर त्याचा त्वचेवर उत्पन्न होतो तो चट्टा किं० वण.

माऊत (–द) पु० मागें ' महात ' पहा.

माऊन न० एक रेचक वनस्पति.

माऊस [म० मावशी] वि० मावशीची मुलगी किं० मावशीचा मुलगा ह्या नात्याचा (भाऊ) किं० ह्या नात्याची (बहीण). ॐ माऊस भाऊ पु० मावशीचा मुलगा.माऊस बहीण स्त्री० मावशीचा मुलगी.

माकड [सं० मर्कट] पु०, न० खूप लांब शेपटीचा आणि उंच आणि लांब उड्या मारणारा एक चतुष्पाद प्राणी.ॐमाकडचेष्टा स्त्री० अ०व० पोरकट चाळे; पोरांच्या खोड्या. माकडनिंबू न०माकड निंबोणीचें फळ.माकडनिंबोणी स्त्री० एक कांटेरी वृक्ष. माकडमिठी स्त्री० माकडाच्या पोराचें पोट आईच्या पोटास घट्ट बिलगतें,त्याप्रमाणें कोणेकाला बाहूंत धरून ठेवणें.माकडमेवा पु० पोहे, चुरमुरे, फुटाणें, इ० खाद्य,–भुकेला अपुरें ह्या दृष्टीनें. माकडवस्ती स्त्री० रानटी लोकांची वसति किं० ह्या वसतीची प्रदेश. माकडशिंगी स्त्री० एक औषधोपयोगी झाड. माकडहाड न० पाठीच्या कण्याचें जें हाड त्याचा शेवट,–जो गुदद्वाराच्या जवळ असतो.माकडाची जखम स्त्री० १ मित्रांच्या मूर्खपणाच्या अनुकंपेमुळें अधिक दुःखदायक झालेला कठिण प्रसंग. २अनेक लोकांच्या लुडबुडण्यामुळें बिघडलेलें कार्य. माकडाचें घर न०संकटाचा समय निघून जातांच विसरलेला सुनिश्चय.

माकडी स्त्री० एक वनस्पति किं० तिची शेंग. ' माकडीला '' कुइरी ' असेंही म्हणतात.

माकण, माखण स्त्री० लांबचें पाणी आणावयाचें असतां घोडा,बैल,इ०च्या पाठीवर घागरी ठेवण्यासाठीं लाकडाची किं० लोखंडाची सांगड्याच्या रूपाची जी रचना करतात ती.ॐ माकण्या वि० माकण वाहणारा (घोडा, बैल) किं० माकणीचें जनावर हांकणारा (माणूस) किं० माकणींनीं लोकांच्या घरीं पाणी पुरवून चरितार्थ करणारा (माणूस).

माकता, माकतेकरी [म० मागता, मागणेकरी] पु० भिकारी; भिक्षा मागणारा.

माका [सं० मार्कव] पु० एक झाड.

माकुलवाणा, माकुला वि० चिमुकला आणि गोजिरवाणा.

माकूल [अ० मअकूल्] वि० १ शहाणा; जाणता. २ खूप; जोरदार. ३ मानास पात्र.

माक्त्यान (–नीं,–नें),मात्क्यान क्रि०वि० १ पुन्हा. २ मागाहून. ३ नंतर.

माखटणी, माखटणें पुढें' माखणी,' ' माखणें' [पहा.

माखण वर ' माकण ' पहा.

माखण, माखटण [**सं०** मक्ष=चोपडणें] **न०** १भाकरी इ०कांस चोपडतात तें लोणी, तूप, इ०, किं० हीं चोपडण्याची क्रिया. २ अंगाला तेल, खसखस, इ० स्निग्ध पदार्थ चोपडतात ते.

माखणी स्त्री० माखऱ्याची क्रिया. खालीं ' माखणें ' पहा.

माखणें [**सं०** मक्ष्=चोपडणें] **स० क्रि०** १ (स्निग्ध पदार्थ,–तेल, खसखस,इ०) अंगाला लावणें किं० स्निग्ध पदार्थ (अंगाला) लावणें. २ (तूप, लोणी, इ०.) भाकरी, थालीपीठ, इ० ना चोपडणें, ३ तूप, लोणी, इ० नीं (भाकरी, थालीपीठ, इ०) चोपडणें.

माग पु० १ वस्त्रें विणण्याचें कोष्ट्याचें यंत्र. २ विणतांना कोष्टी ज्या खळग्यांत पाय सोडतो तो खळगा.

माग [**सं०** मार्ग] **पु०** १क्रमाक्रमानें केलेला किं० चालविलेला तपास किं० शोध किं० काढलेला पत्ता (लावणें, काढणें). २ असा तपास किं० शोध ज्यांवर आधारलेला असतो तीं चिन्हें समुच्चयानें. ३ कोणेकाच्या भाषणवर्तनादिकांवरून त्याचा कळून येतो तो आशय किं० बेत. ४ झाडांना पाणी लावण्यासाठीं जो दांडा योजतात तो किं० ह्या दांड्यानें पाणी लाविलें असतां शिंपला जातो तो प्रदेश, किं० ह्या दांड्यानें लाविलेलें पाणी वाहतें ज्या पाटानें तो पाट. ꙮ **मागमूस, मागमुद्दा पु०** पत्ता, तपास, किं० पत्ता लावण्याचीं साधनें समुच्चयानें (लागणें, लावणें, काढणें, इ०).

माग स्त्री० मासे पकडावयाचें एक प्रकारचें मोठें जाळें.

मांग [**सं०** मातंग] **पु०** हिंदूची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. **कोणेकाच्या अंगांत मांग शिरणें** १ आडमुठेपणाचें वर्तन करण्याची त्याला प्रवृत्ति होणें. २ तो क्रोधाविष्ट होणें, किं० रागानें बेफाम होणें. **मांगगारोडी स्त्री०** मुठींत धान्य घेऊन मंत्र म्हणून तें धान्य एकाद्या पदार्थावर टाकून कांहीं अद्भुत परिणाम घडवून आणणारा मांग जातीचा गारोडी. **मांगटा, मांगडा पु०** मांग (निंदेंत).

मांगणी, मांगीण स्त्री० मांग जातीची स्त्री. **मांगणीची पत्री स्त्री०** अमावास्या, पर्वकाळ, इ० चे दिवशीं मांगिणीला तेल, धान्य, मीठ, इ०चें जें दान देतात तें.हें दान तिला ज्या पात्रांत घालतात त्याला ' मांगणीचें पत्तर ' म्हणतात. मागें ' पत्तर ' पहा.

मागचा, मागला [**म०** मागें] **वि०** पिछाडीचा; पाठीमागें असलेला किं०पाठीमागून घडणारा किं० होणारा किं० येणारा.

मागणी [**म०** मागणें] **स्त्री०** १ मागण्याची क्रिया (करणें). २ लग्नासाठीं कोणेकाची कन्या मागण्याचा विधि (घालणें). ३ गंजिफाच्या डावांत पान मागणें.

मागणें [**सं०** मार्ग=शोधणें] **स० क्रि०** १ दुसऱ्याचे जवळ असलेला पदार्थ ' मला दे ' इ० अर्थाचे शब्द बोलून तो आपल्याला दिला जावा अशी इच्छा प्रकट करणें; (एकादा पदार्थ) कोणी आपणास द्यावा अशी त्याला आपली इच्छा दर्शविणें. २ (एकाद्या वस्तूला) जरूर असणें; उ० ही इस्लामपूरी तंबाखू पाणी फार मागते. ३ इच्छिणें. ꙮ **कोणेकाला पाणी मागूं न देणें** मागें ' पाणी ' मध्यें पहा.

मागणें [**म०** मागणें] **न०** कांहीं वस्तूबद्दल कोणेकाकडून आलेला तगादा किं० याचना किं० विनंती. ꙮ **मागणेकरी पु०** १ कांहीं पदार्थ मागावयाला आलेला मनुष्य. २ भिकारी.

मागता [**म०** मागणें] **पु०** मागणारा; उ० भीक मागत्याला दहा घरें.

मागतीं क्रि० वि० मागाहून; पुन्हा; माक्त्यान (अशिक्षितांचा शब्द).

मागध [**सं०**] **वि०** मगध देशाचें. **पु०** १ क्षत्रिय स्त्री आणि वैश्य पुरुष ह्यांच्या संयोगापासून जन्मलेला. २ भाट.

मागधी स्त्री० एक प्राकृत भाषा.

मागर पु० १ ओबडधोबड आणि फारसें मजबूत नव्हे असें छपर किं० असा सोपा. २ शेती कामाच्या वेळेपुरती शेतांत काम करणाऱ्यांना राहावयासाठीं बांधतात ती झोपडी. ह्या अर्थी ' मागरघर ' असाही शब्द आहे.

मागरा [**म०** मागणें] **पु०** १ दिसेल ती

वस्तु मालकाजवळ मागण्याची खोडी ज्याला आहे तो माणूस. २ दुसऱ्या जवळ मला अमुक द्या,तमुक द्या,असें म्हणून उपद्रव देणारा माणूस.

मागलट [म० मागें + लोटणें] **स्त्री०** १ कांहीं काम लांबणीवर पडणें किं० लांबणीवर टाकणें किं० लांबणीवर पडल्याची किं० टाकल्याची स्थिति. ' मागलटीवर पडणें किं० टाकणें' असे प्रयोग होतात. २ पिछेहाट; माघार (घेणें). ३ दिरंगाई. ४ पत्ता; शोध; तपास.

मागलटणें [म० मागलट] अ० **क्रि०** मागें पडणें; दिरंगाईवर पडणें. स्थिति.

मागला वि०मागें ' मागचा ' पहा. **पु०** पूर्व-

मांगलिक [**सं०**] **वि०** १ शुभ; मंगलकारक. २ दैववान्. **न०** १ उत्साह. २ मंगल कार्य. ❀ **मांगलिक स्नान न०** मंगलकार्याच्या सुरवातीस करतात तें स्नान.

मांगल्य [**सं०**] **वि०** शुभ. **न०** १ मंगल कार्य. २ वृद्धि; उत्कर्ष. ३ आशीर्वाद. ४ उत्सव. ❀ **मांगल्य तंतु पु०** मंगळसूत्र.

मागस [म० मागें] **वि०** मागें पडलेला; उशीरा झालेला. ह्याच्या उलट ' आगस. '

मागसणें [म० मागस]अ० **क्रि०** १ उशीरां होणें. २ मागें पडणें; मागें राहाणें. ३ कमी महत्त्वाचा होणें किं० समजला जाणें. ४ अपकर्षाची स्थिति पावणें. **टीप**,–ह्या शब्दाच्या उलट ' आगसणें ' सर्व अर्थी.

मागसाडणें, मागसावणें [म० मागें] **अ० क्रि०** मागें पडणें.

मागांत [म० मागें] **क्रि० वि०** मागें; उशीरां; दिरंगाईवर. ह्याच्या उलट ' आगांत. '

मागिलवट स्त्री० मागें ' मागलट ' पहा.

मागी [म० मागणें] **स्त्री०** लग्नासाठीं कन्येची कोणेकापाशीं केलेली मागणी.

मागील [म० मागें] **वि०** मागचा;पूर्वींचा; उशीराचा; अगोदरचा. ❀ **मागील ओढण स्त्री०, न०** पूर्वीपासून चालत आलेली रीति, वहिवाट, किं० चाल.

मांगुली स्त्री० वासरूं (प्रेमानें).

मागून, मागाहून [**म०** मागें] **क्रि० वि०** किंवा **श० यो० अ०** नंतर; मागोमाग.

मागें क्रि० वि० किंवा **श० यो० अ०** १ पूर्वकाळीं; गतकाळीं. २ पाठीशीं; पिछाडीस. ३ परोक्ष. ४ उलट दिशेनें. ५पाठोपाठ.❀ **माझ्या मागें शंभर कामें आहेत** मीच केलीं पाहिजेत किं० मलाच करावयास पाहिजेत अशीं शंभर कामें आहेत. **माझ्या मागें मुलांचें कसें होईल अशी मला चिंता लागली आहे** माझ्या मागें म्ह० मी मेल्यावर. **माझ्या मागें** मी घरांत नसतां. **कोणेकाच्या मागें लागणें** त्याला तगादा लावणें. **मागें पुढें क्रि० वि०** १ मागून किं० पुढून. २ ह्या बाजूस किं०त्या बाजूस;इकडे आणि तिकडे.३ आतां किं० नंतर; आतां किं० पूर्वी. ४ पुढें किं० पुन्हां केव्हां तरी. **मागें पुढें पाहून काय करणें तें करावें** साधकबाधक गोष्टी विचारांत घेऊन किं० दूरवर विचार करून जें करणें तें करावें. **तूं हरभऱ्याची डाळ फार खातोस ती मागें पुढें तुला जाचक होईल** ती केव्हांना केव्हां तरी,किं०लवकरच तुला बाधेल.**ही पोथी मागेंपुढें झाली आहे** तिचीं पानें भलत्याच क्रमानें लागलीं आहेत किं० अस्ताव्यस्त झालीं आहेत. **मी सांगितल्याप्रमाणें हें औषध कर, कांहीं मागेंपुढें केलेंस तर औषध बिघडेल** मागें पुढें म्ह० योग्य क्रम किं० सरणी चुकली तर. **मागें पुढें करणें** कचरणें; साशंक होणें; माघार खाण्याकडे कलणें. **त्याला मागें पुढें कोणी नाहीं** त्याला आईबाप इ० वडील माणसें किं० मुलेंबाळें इ० लहान माणसें कोणी नाहींत; ज्यांची जबाबदारी त्याच्यावर असावयाची अशीं कोणी माणसें त्याला नाहींत. **मागें पुढें पाहून वागणें** सारासार विचार करून किं० दूरवर दृष्टि फेकून वर्तन करणें.

मागेला (–ल्या) [**म०**माग=मासे धरण्याचें जाळें] **पु०**मासे धरणारांची कोंकणची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

मागोटा (–ठा) पु०, मागोटी (–ठी) स्त्री० घोड्याच्या पाठीवरचें खोगीर पुढें सरकूं नये म्हणून खोगिराला लाविलेला असतो तो पट्टा,– जो घोड्याच्या शेपटीखालून घातलेला असतो.

मागोमाग [**म०** मागें+मागें] **वि० क्रि०**

पाठोपाठ; तावडतोब; अगदीं उशीर न लावतां.

मांगोळी [म० मांग+म० ओळ] **स्त्री०** देवाच्या दिवाळीच्या दिवशीं मोळ नांवाच्या गवताची दोरी वळून तिचें वेटोळें कोतवालाच्या वरापुढें किं० चावडीपुढें ठेवतात तें.

मागृत्यान (-नीं,-नें) क्रि० वि० मागून; नंतर; पुन्हा.

माग्या, मागरा [म० मागणें] **पु०** फार फार वेळां लोकांच्यापाशीं पदार्थ मागण्याची ज्याला खोडी आहे तो; जें पाहील तें हावरेपणानें मागत सुटणारा.

माघ [सं०] **पु०** हिंदूंचा अकरावा महिना. **माघस्नान** ॐ **माघी स्त्री०** माघ शुद्ध पौर्णिमा. **माघस्नान न०, माघवटा, माघोटा पु०** पौष शुद्ध पौर्णिमेपासून माघ शुद्ध पौर्णिमेपर्यंत सूर्योदयापूर्वीं रोज स्नान करण्याचा नियम. **माघा, माघी वि०** माघ महिन्यांतील. **माघोटी स्त्री०** १ माघ महिन्यांत पडलेला पाऊस. २ माघस्नान. वर 'माघस्नान' पहा.

माघार [म० मागें] **स्त्री०** मागें हटणें, कचर खाणें, हातीं घेतलेलें काम सोडणें; प्रतिज्ञा सोडणें (**क्रि०** खाणें).

माघारणें [म० माघारा] **अ० क्रि०** १मागें हटणें; परत वळणें; परत जाणें किं० येणें; पूर्वस्थितीवर येणें. २पहिल्या वाईट क्रमावर परत येणें. ३(आजार)उलटणें. **स० क्रि०** १मागें टाकणें किं० हटविणें. २परत लावणें किं० परत फिरविणें.

माघारा [म० मागें] **वि०** परत वळलेला किं० आलेला किं० फिरलेला. **माघारी स्त्री०. माघारें न०. माघारी पु०**लहान मुलगी, मुलगा, इ०ना सासरीं, सासुरवाडीं, आजोळीं, किं०नातलगाच्या घरीं न्यावयाला जो गडी येतो तो. **माघारिण स्त्री०**सासराहून माहेरास किं०माहेराहून सासरास जावयाला निघालेली किं०नुकतीच गेलेली मुलगी. **माघारपण न०**नवीन लग्न झालेल्या मुलीचें सासराहून माहेरीं किं०माहेराहून सासरीं जाणें किं० येणें.

माघारां, माघारीं, माघारें [म० मागें] **क्रि० वि०** पुन्हा; परत; उलट्या दिशेस; परतून.

माघोटा, माघवटा वर 'माघ' मध्यें 'माघवटा' पहा.

माघोटा पु० वर 'मागोटा' पहा.

माघोटी वर 'माघ' मध्यें पहा.

माच [सं० मंच] **पु०** १ गवत, पेंढा, इ० सुरक्षित ठेवण्यासाठीं जो ओट्यासारखा रचनाविशेष करतात तो. २ शेताची राखण करण्यासाठीं उंच झाडावर लाकडें बांधून करतात ती बैठक. ३ वेली चढविण्यासाठीं करतात तो मांडव.

माच पु० १ भिंत बांधतांना दोन बाजूंच्या मध्यें जे रोडे इ० घालतात ते समुच्चयानें. २ खळगा भरून काढण्यासाठीं घालतात ती भरणी.

माच क्रि० वि० शेळ्या किं० मेंढ्या गणतेसमयीं वीसाच्या पुढें योजतात तो शब्द; इ० शेळी माच तेवीस; उ० मेंढी माच पंचवीस. मागें 'बुद्द' पहा.

माचण स्त्री० खळगा इ० मध्यें घातलेली [भरणी.

माचण स्त्री० गलबताचें शीड फिरविण्याचा एक प्रकार (घेणें).

माचणें स० क्रि० १ (दगड, रोडे, इ०) घालून खळगा इ० भरून काढणें. २ (खड्डा इ०) दगड, रोडे, इ० घालून भरून काढणें.

माचा, माचवा[सं० मंच] **पु०**पलंग; पलंगडी.

माचाण न० शेत राखणाऱ्याला बसावयासाठीं उंचावर जो आधार करतात तो.

माची स्त्री० १ डोंगराचा शिरोभाग टाकून त्याचे खालीं सपाट भूमि असते ती. २ वासरें, शेळ्या, इ० साठीं उंचावर तक्ते घालून करतात ती निवाऱ्याची जागा. ३ धान्य इ० उन्हांत वाळत घालण्यासाठीं चार खांबांवर तक्ते घालून केलेली असते ती रचना.

माचूळ वि० मचूळ, वेचव (पाणी इ०).

माचोंडा पु० भात, नाचणी, राळा, वरी, सावा, इ०च्या ताटांची मोळी किं० पेंडी.

माचोळी, माचुली [म०माच] **स्त्री०** १घडवंची. २लहान माच. वर 'माच' तिन्ही अर्थीं पहा.

माज [सं० मद] **पु०** १ गायी, म्हशी, इ० ना बैल, रेडा, इ० च्या संगमाची होते ती इच्छा (करणें, माजास येणें). २ अतिरेकास

पोंचलेला गर्व, अभिमान, ताठा, इ०; उ० त्याला भारी माज आला आहे; उ० त्याला माज चढला आहे. ३ फुलें, फळें, झाडें, इ० ची जोराची वाढ. ४ अफू, भांग, इ० अमली पदार्थांनीं आलेला कैफ. **कोणेकाचा माज मोडणें** (किं० **जिरविणें**) त्याचा नक्षा उतरणें; त्याचा वेऱ्या उडविणें.

माज पु० कोष्ट्याच्या मागाच्या बैलीची दोरी.

माज पु० (**संगीतांत**) एक राग.

माज [**सं०** मध्य] पु० १ कंबर. २ डोंगर, टेकडी, इ० चा मधला भाग. ३ घराचा मध्य भाग. ❀ **माजघर** न०, पु० घराचा ओटीच्या आंतील भाग.

माज [म० माजण] पु० चुलीवर ठवावयाच्या भांड्यांच्या बुडांना लाविलेला माती, राख, इ० चा थर.

माजण, मांजण [**सं०** मार्ज्] न० १ देवाच्या मूर्तीला लावितात तें तेल, शेंदूर, इ०, किं० तें लाविण्याची क्रिया. २ चुलीवर ठेवावयाच्या भांड्यांच्या बुडांना राख, माती, इ० चा केलेला लेप किं० हा लेप करण्याची क्रिया.

माजणें, मांजणें [**सं०** मार्ज्] **स० क्रि०** १ (देवाच्या मूर्तीला) तेल, शेंदूर, इ० लावणें. २ (चुलीवर ठेवावयाच्या भांड्याच्या बुडांना) राख, माती, इ० चा लेप करणें.

माजणें [**सं०** मद्] **अ० क्रि०** १ (गाय, म्हैस, इ० नीं) बैल, रेडा, इ० शीं संगमेच्छेनें युक्त होणें. २ अफू, दारू, इ० पदार्थांच्या सेवनानें धुंद होणें. ३ उन्मत्त, उद्धट, किं० मगरूरपणाच्या वर्तनाकडे कलणें. ४ यथेच्छ खाणेंपिणें, खत, पाणी, इ० मिळत असल्याकारणानें (मनुष्य, पशु, झाडें, इ०) लठ्ठ होणें किं० फोफावणें किं० जोमदार होणें. ५ (बातमी, आजार, कथा, व्याख्यानें, कांहीं नाद, इ०) लोकांत फैलावणें. ६ व्यापार, देवघेव, इ० जोरांत चालणें किं० खूप मोठ्या प्रमाणांत चालणें. ७ कोणतीही गोष्ट किं० कोणताही प्रकार विस्तृत प्रमाणावर चालणें किं० चालूं लागणें. ८ कांहीं वाईट गोष्ट करावयाला एकादें गात्र किं० इंद्रिय सवकणें किं० सोकावणें,—मारावयाला हात, शिव्या द्यावयाला जीभ, स्वैर भटकण्याला पाय, इ०.

मांजर, माजर, मांजरूं [**सं०** मार्जार] **न०** उंदीर, चिमण्या, राघू, इ० प्राणी खाणारें एक माणसाळलेलें जनावर. **मांजरी, माजरी स्त्री०. बोका पु०** नर मांजर. **भाटी स्त्री०** मांजराच्या जातीची मादी. ❀ **मांजरखुतवणी न०** कोंबट पाणी (स्नानाच्या संबंधानें बोलतांना). **माझ्या घरांत मांजरी व्याली आहे काय ?** माझ्या घरीं आतांशा तुम्ही कां येईनासे झालां आहांत? **मांजर वेल स्त्री०** भाताची एक जात. **मांजरडोळ्या वि०** घारे किं० हिरवे आहेत डोळे ज्याचे असा (माणूस). **मांजरझाक स्त्री०** सायंकाळचा समय. **मांजराची मावशी स्त्री०** एक अतिदुर्गंधियुक्त वायु सोडणारा प्राणी. **कुत्र्याचे पाय मांजरावर आणि मांजराचे पाय कुत्र्यावर घालणें** मागें ' कुत्रें ' ह्या शब्दांत हा संप्रदाय पहा. **उंदराला मांजर साक्ष** मागें ' उंदीर ' शब्दांत पहा. **मांजराचे पाय पु० अ० व०** वेडौल आणि गिचमीड अशीं पत्रांतलि अक्षरें. **एकाद्याच्या पायांवर कुत्रीं मांजरें घालणें** मागें 'पाय ' मध्यें पहा. **मांजराच्या गुवाप्रमाणें क्रि० वि०** अत्यन्त काळजीपूर्वक झाकून आणि लपवून (कांहीं वस्तु ठेवणें). ह्याचा प्रयोग थट्टेंत किं० निंदेंत होतो.

मांजरपाट, माजरपाट, मादरपाट न० कापसाच्या जाडीं सुताचें एक प्रकारचें कापड.

माजरा [**म०** माज] **वि०** जो खाल्ला असतां घशाला, जिभेला, किं० गालाला रिवरिवतो असा (अळूं, सुरण, हरीक, नाचणा, इ० पदार्थ).

मांजरी [**म०** मांजर] **स्त्री०** १ खाकेंत झालेलें गळूं,—ज्यावर चोपडलेलें लोणी मांजरानें चाटलें असतां तें गळू बरें होतें अशी समजूत आहे. २ घुसळखांब्याच्या दोन दोऱ्या,—ज्यांतून रवी फिरते, त्या प्रत्येक. ३ मांजराच्या जातीची स्त्री. ४ एक झुडूप,—ज्याचीं पानें मांजरास आवडतात. ५ खोबरें इ० किसावयाची किसणी. ६ शिंदी इ०च्या पातीची चटई.

मांजरूं [**सं०** मार्जार] **न०** मांजर,—लिंगाच्या विवक्षेशिवाय.

माजरें [**म०** माजरा] **न०** माजरा पदार्थ भक्षिला असतां घसा, जीभ, किं० गाल, ह्यांना सुटते ती रिवरीव. वर ' माजरा ' **वि०** पहा.

मांजऱ्या [**म०** मांजरी] **स्त्री० अ० व०**

अनुराधा नक्षत्र किं०ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस मागें ' उंदऱ्या ' पहा.

माजवणें [अ० क्रि०] वर ' माजणें ' सर्व अर्थी पहा.

माजविणें [स० ' माजणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ (धूळपाटीवर) शाडू इ०चा लेप करणें. २(चुलीवर ठेवावयाच्या भांड्यांच्या बुडां-वर)राख, माती इं० चा लेप करणें. २ चुलीवर ठेवावयाच्या भांड्याच्या बुडांवर (राख, माती, इ०)लेपणें. ३ (देवाच्या मूर्तीला) शेंदूर, तेल, इ० लेपणें.

माजवी स्त्री० टेकडीच्या उतरणीवर केलेली [सपाट भूमि.

माजा [फा० माज्] पु० मायफळ.

माजा [म० माझा] वि०(कवितेंत) मद्वि-षयक; मदीय; माझा. माजी स्त्री०. माजें न०.

मांजा [हिं० मांझ्या] पु० मेण,तेल,अंड्यां-तील पांढरा बल्क,काचेची भुकटी,इ०चें मिश्रण,-जें पतंगाच्या दोऱ्याला लावितात.

माजाड [म०माज;सं० मध्य] न० १ कंबर (निंदेंत).२पाठीचा कणा आणि कंबर यांचासांधि.

माजी [अ०] वि० १ मागचा;गतकालचा; पूर्वीचा; अगोदरचा (अमल्दार, चाल, वाहिवाट). २ रद्द पडलेला.

माजीं [सं० मध्य] श० यो० अ० (कवि-तेंत) आंत, मध्यें; उ० घरामाजीं.

माजुरकी, माजुरी [म० माजुरा] स्त्री० उन्मत्तपणा; गर्व; ताठा.

माजुरी, माजोरी [म०माजणें]वि०उन्मत्त; ताठेदार; गर्विष्ठ.खालीं ' माजोरा ' पहा.

माजूफळ [म०माजा+फळ]न० मायफळ.

माजूम [अ० मअजून]स्त्री० भांगेचा रांधा करून त्यांत जायफळ इ० अनेक पदार्थ घालून बर्फीसारख्या करतात त्या वड्या.

माजूर [अ० मअजूर]वि०१ कळलेलें;ठाऊक असलेलें. २ जगजाहीर.

माजोरा, माजोरी, माजुरी [म०माज] वि० १ उन्मत्त; गर्विष्ठ; मस्तवाल.२ खाद्य किं० भोग्य वस्तु अव्हेरणारा.

मांज्या पु० पतंगाच्या दोऱ्याला लावतात ती खळ किं० तें मिश्रण. मागें ' मांजा ' पहा.

माझा वि० ' मी ' ह्या सर्वनामानें निर्दिष्ट जो कोणी त्याचा. माझी स्त्री०. माझें न०.

माझारी [सं० मध्य; म० माज] श० यो० अ० (कवितेंत) आंत; मध्यें; उ० लंकेमाझारी.

माटकुला वि० लहान; चिमुकला.

माटमुट स्त्री० भयामुळें वाटते ती अस्वस्थता; उ० माझ्या पोटांत माटमुट होत आहे. ॰ जीव माटमुट करणें भयामुळें जीव अस्वस्थ होणें.

माठ पु० ज्याच्या पानांची भाजी करतात असें एक झाड.

माठ पु० मातीचा मोठा डेरा. वि० १ ठेंगणें आणि बहुतेक सपाट (छप्पर). ह्याच्या उलट ' खर ' किं० ' पाणढळ. ' २ ठेंगणा आणि लठ्ठ (मनुष्य, पशु). ३ बसकट घडणीचा (पदार्थ).

माठणें स० क्रि० १ हत्यारानें (पदार्थ) साफ करणें. २ (दागिना, भांडें) ठोकून आणि घासून साफ आणि गुळगुळीत करणें. ३ (कोणे-काला) मार देऊन किं० रागें भरून ताळ्यावर आणणें.

माठरणें स० क्रि० १ (पदार्थाला) विशिष्ट आकार देणें. २ आपल्या सोईप्रमाणें किं० इच्छे-प्रमाणें (माणूस, पशु, पदार्थ) वश किं० अनु-कूळ, किं० सोयीचा करून घेणें. अ० क्रि० १ मंदावणें; सौम्य किं० निर्वीर्य किं० निःसत्त्व होणें. २ (झाड, फूल) कोमेजणें किं० सुकणें. ३ (जखम) भरून येणें. ह्या अर्थी'मठारणें' सुद्धां.

माठलें न० १ पळीचा किं० चमच्याचा खोलगट भाग. २ समई, लामणदिवा, इ० चें टवळें म्ह० तेल भरावयाचा खोलगट भाग. ३ रवीचा जाड पैलूदार भाग. ४ मुलांचा मनगटांत घालावयाचा एक दागिना.

माठवण [म० माठणें] न० १ जखम भरून यावयासाठीं लावतात तें मलम इ०. २ बरें होत चाललेलें गळूं, जखम, इ०.

माठळणें [म० माठणें] अ० क्रि० १ (जखम, गळूं, इ०) बरें होणें किं० होऊं लागणें. २ (मन, बुद्धि) आळसटणें किं० काम करावयाला असमर्थ होणे.३(माणूस किं०पशु) आळसा-वणें किं० सुस्तावणें. ४ (झाड)खुरटणें किं०वाढा-यचें बंद होणें.

माठळणें, माठाळणें स० क्रि० १ (भांडें) गडविणें. २ (मातीच्या ओल्या भांड्याला) आकारविशेष देणें. ३ (भांडें इ० पदार्थ) ठोकून किं० घासून साफ आणि गुळगुळीत करणें. ४ (जमीन करायाची असतां तींतील खडे, दगड, इ० वर) हात फिरवून सपाटींत आणणें. ५ (माणूस, पशु) मार देऊन किं० रागें भरून वश किं० अनुकूल करून घेणें.

माठा, माठ्या [म० माठ=डेरा] वि० अडाणी; मंद बुद्धीचा; धड्ड.

माठांव [म० माठणें] वि० माठळण्याच्या क्रियेनें साफ आणि गुळगुळीत केलेला (दगड).

माठें न० १ जेथें प्रेत जाळण्यांत आलें आहे किं० संन्यासी पुरण्यांत आला आहे तेथें बांधलेलें तुळशीवृंदावन, देऊळ, इ०. २ शेतांत बांधलेला सोपा. ३ दारापुढें किं० खिडकीपुढें केलेलें दुपाखी छपर.

माड पु० नारळाचें झाड. ॐ **माडपीर** पु० माडीच्या व्यसनाला आसक्त.

मांड [म० मांडी] स्त्री०१ मांडीला होणारा एक रोग. २ घोड्यावर स्वाराचें किं० लिहितांना लेखकाचें संस्थान (जमणें, बसणें, साधणें). ३ घोडेस्वारांच्या टोळीनें केलेला हल्ला. ॐ **मांडपत्र** न० दत्तकपुत्र घेतल्याचा दाखला. **मांडपुत्र** पु० दत्तक घेतलेला मुलगा.

मांड [म० मांडणें] पु० १ कार्यारंभीं पदार्थाची यथायोग्य मांडणी. २ कार्यविशेषाला लागणारें सामानसुमान, माणसें, जनावरें, इ० चा संच किं० सामग्री. ३ होळीच्या आधल्या दिवशीं होळीसंबंधाचा विचार करावयास जमलेले गांवकरी समुच्चयानें. ४ संसारांत लागणाऱ्या भांड्याकुंड्यांची किं० सामानासुमानाची जुळवाजुळव किं० सिद्धता (मांडणें, बसणें, इ०).

मांड न० भाजी इ० ठेवण्याचें किं० भरण्याचें लाकडाचें पात्र.

मांड स्त्री० एक शाकभाजी.

मांडणी [म० मांडणें] स्त्री० मांडण्याची क्रिया. खालीं ' मांडणें ' पहा.

मांडणें [सं० मंड्] स० क्रि० १ (पदार्थ) एकाद्या ठिकाणीं कांहीं विशिष्ट सरणीनें किं० उद्देशानें ठेवणें. २ दुकान, फिर्याद, भांडण, इ० स्थापणें किं० सुरूं करणें किं० चालविणें. आमचें 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' हें पुस्तक लें० १३५० पहा. ३ पुस्तक, चोपडी,इ० मध्यें नमूद करणें किं०लिहून ठेवणें. अ० क्रि०१ सुरूं होणें; उ० अंधारी रात्र आली म्हणजे चोरांचें मांडतें. येथें ' कृत्य ' शब्द अध्याहृत घ्यावा कि० भा० व० क्रि० समजावें. २ उत्पन्न होणें; उ० बाजरीच्या कणसांत अझून दाणा मांडला नाहीं.

मांडलिक [सं०] पु० सार्वभौम राजाचें स्वामित्व कबूल करणारा राजा.

मांडव [सं० मंडप] पु० जमीनींत खांब पुरून त्यांचेंवर आडवीं लांकडें घालून तात्पुरती रचना केलेली असते ती,–लोक बसावयासाठीं, वेली चढवावयासाठीं, किं०छायेसाठीं,किं० अन्य उद्देशानें. ॐ **मांडवखंडणी मांडवखण्णी** स्त्री० लग्न इ०प्रसंगीं शुद्र लोक जोशी आणि उपाध्या यांना देतात ती दक्षिणा किं० बिदागी. **मांडवशोभा,मांडवदेवता, मांडवप्रतिष्ठा** स्त्री० मागें 'मंडप'मध्यें पहा.**मांडवपरतणें** न०, **मांडवपरतणी** स्त्री० लग्नाच्या समारंभाच्या अखेरीस वधूच्या पक्षाकडून वराच्या पक्षाला दिली जाते ती मेजवानी. **मांडवमेड (–ढ)**स्त्री०१मांडव उभारतांना पहिला जो खांब पुरतात तो. २ टोकाला दुबेळकें असलेला वांसा किं०काठी.**एकाद्या कामाची मांडवमेड रोवणें** तें काम नेटानें किं० जोरांत सुरूं करून चालविलें.

मांडवी [म० मांडव] स्त्री० १ देवांच्या मूर्तींवर फुलांच्या माळा इ० लोंबत सोडण्यासाठीं बांबूच्या कांठ्याची चौकट टांगलेली असते ती. २ समुद्राच्या कांठीं येणारा आणि जाणारा माल साठविण्यासाठीं घर किं० छपर केलेलें असतें तें.

मांडळ [सं० मंडल] स्त्री० मुसळ, काठी, इ०च्या टोकाला जी धातूची वसवी किं० विंडी बसविलेली असते ती.

माडा पु० एके ठिकाणीं लाविलेलें झाड उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावावयाला योग्य झालेलें झाड.

मांडा [**सं**०मंडक] **पु**०गव्हाचें एक अत्यन्त पातळ पत्र्याच्या रूपाचें पकान्न. ⁂ **कोंड्याचा मांडा करून खावा** वाईट परिस्थितींतून शक्य तितका लभ्यांश मिळवावा; जें असह्य असेल तें शक्य तितकें सह्य करून घ्यावें. **सुग्रण झाली म्हणून कांहीं हाताचे मांडे करीत नाहीं** साधनसामग्रीच्या अभावीं कर्तृत्ववान् माणूस असून कांहीं करूं शकत नाही; नेता कितीही थोर आणि प्रामाणिक असला तरी अनुयायांनीं त्याचें ऐकिलें नाहीं तर तो कांहींही करूं शकत नाहीं. **तोंडाचे मांडे पु० अ० व०** थापवाजा; क्रियेवीण वाचाळता.

माडा वि०खरीपाच्या समयीं नांगरून आणि खत घालून पेरणीला तयार केलेल्या शेतांत पेरणी न करतां तसेंच राहूं दिलेलें(शेत),–रबीची पेरणी जोमानें वाढण्यासाठीं.

माडागूण, मांडागूल (–ळ) पु०, न०माड इ०ची पोय.

माडी [**म**० माड]**स्त्री**०माडाच्या झाडाच्या पोयीपासून काढतात तें पेय.

माडी स्त्री० घराचा वरचा मजला.

माडी स्त्री० आळवाच्या कांद्याचीं लांब मुळें किं० मुळ्या प्रत्येक. आखूड मुळ्यांना ' मुडली ' म्हणतात.

मांडी स्त्री० १ कंबरेपासून गुडघ्यापर्यंतचा जो तंगडीचा भाग तो. २ घोड्याच्या पाठीवरचें स्वाराचें संस्थान. ३ लगामाच्या दोन बाजूंस ज्या दोन सळया असतात त्या प्रत्येक. ४ लिहिणाऱ्या माणसाचें संस्थान,–ज्यांत डावी मांडी उताणी असून उजवी पालथी असते. ⁂**कोणेकाला मांडी देणें** त्याच्या प्राणोत्क्रमणाच्या समयीं त्याचें डोकें आपल्या मांडीवर ठेवून घेणें किं० टेकविणें; त्याच्या डोक्याखालीं आपली मांडी उशी सारखी ठेवणें.**मी रामभाऊंच्या मांडीचें उसें केलें आहे** किं० **मी रामभाऊंच्या मांडीवर मान ठेविली आहे** मी त्यांच्यावर भिस्त ठेवून बसलों आहें.**मांडी ठोकून उभे राहाणें** युद्धाला किं०कुस्तीला तयार असणें किं० सिद्ध होऊन राहाणें. **मांडी ठोकून बसणें** लिहिणें, गाणें म्हणणें, इ०ला सिद्ध होणें. **मांडीवर घेणें** दुसऱ्याचा मुलगा आपण दत्तक घेणें.**मांडीवर देणें** आपला मुलगा दुसऱ्याला दत्तक देणें. **मांडीवर मांडी घालून** (किं० **टाळून**,किं० **टाकून**) **बसणें** स्वस्थपणें आळसांत बसणें.**कोणेकाच्या मांडीस मांडी लावून** (किं० **टेकून**) **बसणें** बरोबरीच्या नात्यानें किं० समान दर्जाच्या बुद्धिभावनेनें त्याच्या शेजारीं बसणें. **मांडीचेपणें न**० नवऱ्या मुलाच्या आईला सुनमुखाचे वेळीं द्यावें लागतें तें लुगडें.

माडू पु० एक हत्यार; हें दोन्ही टोकांकडून शत्रूंच्या टोळीवर चालवावयाचें असतें.

माडूळ, माढूळ न० १ एक प्रकारचा साप. २ दुतोंडें.

माडें न० हुलग्याच्या पिठांत तिखटमीठ इ० घालून केलेलें एक तोंडीलावणें.

माढण, माढाण [**म**० माड] **न**० ताड, माड, इ० च्या बुंध्याचा तुकडा पोखरून मीठ, तेल, इ०ठेवण्यासाठीं करतात तें बारदान. खालीं ' माणगें ' अर्थ २ पहा.

माढा मागें ' माडा ' **वि**० पहा.

माण [**म**० मान] **स्त्री**० १ मनुष्य, वासरूं, इ०च्या मानेस येते ती सूज.२एक प्रकारची जमीन किं० माती. ३ पाणी साठविण्याचें रुंद तोंडाचें बारदान,–मातीचें किं० धातूचें. ४ जात्याच्या भोकांत बसविलेली असते ती विडी किं० माडणी. ५ चरकांत पिळलेल्या उसाचा रस ज्या भांड्यांत गळतो तें भांडें. ६ बांबूची एक जात; ताज. ७ माती, खडक, इ० चा थर.

माणकी [**म**०माणीक] **स्त्री**०लहान आकाराचें माणीक हें रत्न.

माणकुला वि० लहान; चिमुकला.

माणगा, माणगारा, माणा [**म**० माण] **पु**० लांब बांबूची एक जात.

माणगें [**म**० माण] **न**० १ मानेला येते ती सूज. २ लाकडाचें बारदान. वर ' माढण ' पहा. ३ गुरांना होतो तो एक रोग.

माणसळणें, माणसाळणें, माणसावणें [**म**० माणूस] **अ० क्रि**० १ माणसाच्या सवयीचा होणें. २ एकलकोंड्या स्वभावाचा(**माणूस**) मंडळींत मिसळूं लागणें. ३ (वाघ, इ०हिंस्र प्राणी ह्यांना) माणसें खाण्याची चटक लागणें.

माणा पु० वर ' माणगा ' पहा.

माणिक्य [सं०] न० माणिक हें रत्न.

माणी स्त्री० १ जात्याच्या तळीत बसवितात ती विडी. २ काठीच्या बुडाला बसवितात ती शेंबी.

माणीक [सं० माणिक्य **] न०**लाल हें रत्न. ※ **माशानें गिळलेलें माणीक** चोरीस गेलेला पदार्थ कोणी चोरला हें पक्कें ठाऊक असून तो पदार्थ आपणास परत मिळण्याची शक्यता नाहीं असा पदार्थ. **माणिकचौक पु०** श्रीमंत लोकांच्या घरापुढचें बंदिस्त पटांगण,–जेथें त्यांचे नोकर-चाकर, भेटावयास येणारे लोक, इ० जमतात. **माणकि चौकडी स्त्री०** भिंतीवर स्त्रिया हळद, कुंकूं, इ० ची एक प्रकारची काढतात ती आकृति. **माणिकवात स्त्री०** पांच वाती एकत्र वळून केलेली समईत घालावयाची वात.

माणुसकी खालीं ' माणूस ' मध्यें पहा.

माणूस [सं० मनुष्य, मानुष **] न०** मानव जातीची एक व्यक्ति,–लिंग विचारांत न घेतां.**पु०** मानवजातीची पुरुष व्यक्ति. ※ **माणूसकी स्त्री०** १ दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याचा स्वभाव किं० प्रवृत्ति. २ शिष्टाचार. ३ मनुष्याला शोभणाऱ्या गुणांचा समुच्चय. **माणसाचा अवतार, माणसाचा कांदा, माणसाचा लेक पु०** १ मूर्ख किं० अडाणी माणूस. २ मनुष्यजातीला योग्य असे गुण ज्याच्या अंगीं नाहींत असा मनुष्य; रानवट चालीरीतींचा मनुष्य. **माणूसघाण्या, माणूसगंधारा, माणूसगंध्या, माणूसकंटाळ्या, माणूसघाणा,मेणघुणा वि०** माणसांत मिसळण्याचा ज्याला कंटाळा आहे असा मनुष्य; एकलकोंड्या स्वभावाचा. **मेणघुणा वि०** मारलेल्या तोंडाचा. **माणूसबळ न०** विशिष्ट कार्यास जितकीं माणसें पाहिजेत तितक्यांची अनुकूलता किं० तितकीं असणें. **माणूसपणा पु०** १ सभ्याचार. २ दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचा स्वभाव किं० प्रवृत्ति. वर 'माणूसकी' पहा.

माणें [हिं०] अ० क्रि० मावणें; विशिष्ट बारदानांत राहूं शकणें; समावणें.

माण्या पु० बांबूची एक जात.

मात [फा०] स्त्री० १ बुद्धिबळांच्या डावांत प्रतिपक्ष्याच्या राजाला अडविणें. २ बुद्धीचें किं० कुशलतेचें कांहीं अचाट कृत्य करून प्रतिपक्ष्याला जिंकणें. ३ कांहीं अघटित, अप्रतिम, विचित्र, किं०लोकोत्तर असें केलेलें कृत्य.४कोणेकावर कोणत्याही बाबतींत वर्चस्व स्थापित करणें किं० सरशी मिळविणें किं० असें स्थापिलेलें वर्चस्व किं० मिळविलेली सरशी. ५कोणत्याही बाबतींत झालेला किं० केलेला परमावधि. ६ वैपुल्य;वहर. ७कांहीं अद्भुत किं०चमत्कारिक गोष्ट किं०कृत्य.

मात स्त्री० १ गोष्ट; बाबत. २ कांहीं बोललेली किं० सांगितलेली गोष्ट किं० खबर.

मातफ्यान क्रि० वि० पुन्हा; उलट; मागाहून; नंतर.

मातंग [सं०] पु० १ हत्ती. २ चंडाळ. ३ वनचर. ४ श्रेष्ठ.या अर्थी संस्कृत शब्दांपुढें योजतात; उ० बलाहकमातंग म्ह० श्रेष्ठ बलाहक.

मातगा [सं० मातणें **] वि०** १ उन्मत्त झालेला; माजलेला. २गर्विष्ठ. ३खाद्य पदार्थ टाकणारा किं० अव्हेरणारा. ४ अवसानांत किं० उमेदींत आलेला (घोडा).

मातण स्त्री० खळगा इ०मध्यें घातलेली भर. मागें ' माचण ' पहा.

मातणें [सं० मद**] अ० क्रि०** १ गर्विष्ठ किं० उन्मत्त होणें. २ यथेच्छ खाणेंपिणें मिळत असल्याकारणानें माजास चढणें किं० धुंद किं० मस्ताळ होणें.३विपुलपणें किं०जोरानें(झाड,रान) वाढणें. ४(नदी,ओढा) फुगून कांठांबाहेर पसरणें. ५ कामविकारानें आक्रान्त होणें. ※ **मातलेलें मोहोरें न०** कर्तव्य न करतां, वडिलांना न वचकतां, स्वच्छंदानें वागणारें माणूस.

मातबर, मातब्बर [अ० मुअतब्र **] वि०** १ संमानास किं० आदरास पात्र. २ थोर; श्रीमंत; प्रतिष्ठित. ※ **मातबरी, मातब्बरी स्त्री०** पत; महत्त्व; थोरवी; प्रतिष्ठा.

मातम न०, मातमी स्त्री०[अ० मअतम् **]** शोक; दुखवटा. ※ **मातमपुर्शी स्त्री०** दुखवट्याची विचारपूस.

माता [सं० मातृ **] स्त्री०** आई; जन्म देणारी. ※ **मातापितरें न० अ० व०** आईबाप.

मातामह [सं०] पु० आईचा बाप.**माता-महीं** स्त्री० आईची आई.

माती [सं० मृत्तिका] स्त्री० १ दगडावांचून पृथ्वीचा भाग; धूळ. २ नासाडी; दुर्दशा;विध्वंस; उ०गांज्याच्या पायीं त्यानें आपल्या जन्माची माती करून घेतली. ह्या अर्थीं 'मातेरें'न०सुद्धां.॥**अति त्यांत माती** कोणतीही गोष्ट अतिरेकास गेल्यानें नुकसान होतें. **मातीच्या मोलानें विकणें** अगदीं थोडी किंमत घेऊन किं० नुकसान सोसून कांहीं पदार्थ विकणें. **मातीआड करणें** (किं० **घालणें, ठेवणें**, किं० **टाकणें**) १ पुरून टाकणें. २ विसरून जाणें.३पुन्हा त्या गोष्टीचा उच्चार किं० उल्लेख न करणें. **तोंडांत माती पडणें** मिळावयाचा लाभ, पैसा, इ० न मिळणें. **काशानें माझ्या अन्नांत माती कालविली** त्याणें माझ्या उपजीविकेचीं साधनें बुडविलीं. **माती जड होणें** आसन्नमरण झालेल्या माणसाचें शरीर जड होणें. **जित्या रोटी मेल्या माती** आईबाप किं० आपणावर अवलंबून असलेल्या माणसांना खाऊं घालणें आणि तीं मेल्यावर त्याचें योग्य प्रकारें और्ध्वदैहिक करणें (हें आपलें कर्तव्य आहे). **माती देणें** प्रेताला मूठमाती देणें; प्रेत पुरणें. **मातकण** न० ज्यांत धूळ पडली आहे असें धान्य.**मातकरी** पु०शेत भाजावयाचें असतां पसरलेल्या काटक्या कुटक्यांवर मातीचा थर घालणारा मजूर. **मातकापड** न० औषधी द्रव्यें, फळ, इ० फडक्यांत लपेटून त्यांवर चिखलाचा थर करून वैद्यलोक तो भाजून काढतात ही क्रिया (करणें).**मातकाम** न० मातीचीं मडकीं,मूर्ति,इ० करण्याचें काम. **मातखण, मातखाण** स्त्री० तांबडी, पांढरी, इ० माती जेथून काढतात तो खड्डा.**मातट, मातड, मातळ,मातमळ** वि० १ ज्यांत माती पडली आहे किं० मिसळली आहे असें (धान्य, साखर, पीठ, इ०). २ मातीच्या चवीचा (खाद्य पदार्थ). **मातीचा मेराळ** पु० लठ्ठ आणि फोफशा माणूस.**मातीचे कुळे** पु०अ०व० नात्याचा संबंध नसतां ज्यांवर आपण नातलगांवर प्रेम करावें तसें करीत असतों परंतु अडचणीचे वेळीं जीं उपयोगास येण्याचा संभव नसतो अशीं माणसें (लावणें, चिकटावणें); उ०मातीचे कुळे लावल्यानें लागत नसतात. (म्ह० परक्याला आपला असें नुसतें म्हणून तो आपला होत नाहीं; खरें प्रेम त्याच्या पोटांत असलें तरच तो आपलासा होतो). **मातीचें तेल** न० खडकांत असतें तें ज्वालाग्राही तेल; घासलेट; राकाईल. **मातमिठ** न० खारटणांतून काढलेलें मीठ. **खारीमाती** स्त्री० मागें ' खारा ' मध्यें पहा. पुढें ' माळ ' मध्यें ' माळावरचा धोंडा ' पहा.

मातुल [सं०] पु० आईचा भाऊ; मामा.

मातुलिंग, मातुलुंग [सं०] पु० महाळुंग हें फळ किं० त्याचें झाड.

मातुश्री [सं० मातृश्री, मातुःश्री] स्त्री० आई (गौरवानें).

मातृ [सं०] स्त्री० आई. ॥ **मातृभोजन** न० मुंजीच्या दिवशीं मुलाचें आईबरोबर एका ताटांत भोजन.**मातृगमन** न०आईशीं व्यभिचार. **मातृगया** [सं०] स्त्री० गया येथें आईसाठीं केलेलें श्राद्ध. **मातृगामी, मातृगमनी** वि० आईशीं व्यभिचार करणारा. **मातृश्री** स्त्री० आई. **मातुश्री, मातोश्री** स्त्री० आई.

मातृका [सं०] स्त्री० १ आई. २ आईची आई. ३ दायी. ४ अ, आ, इ० पासून क्ष, ज्ञ, पर्यंत जा अक्षरें तीं प्रत्येक. ५ विवाहादि प्रसंगीं ज्यांची पूजा करतात त्या ब्राह्मी, माहेश्वरी, इ० देवता. ॥ **मातृकान्यास वर्णन्यास** पु० दक्षिणाचार पूजेसंबंधाचे विधि.

मातेरा पु०, **मातेरें** न०, **मातेराकोतेरा** पु० [सं० माती] मातींत मिसळलेला पदार्थ;-धान्य, साखर, इ० किं० अशा पदार्थांतून काढलेली माती किं० केरकचरा. **मातेरें** न० पदार्थाची दुर्दशा किं० नासाडी.

मातश्यान् (–**नीं**,–**नें**) क्रि० वि० मागून; नंतर; पुन्हा; मागाहून.

मात्र [सं०] न० १ प्रत्येक व्यक्ति;उ०मनुष्यमात्र चुकीला पात्र आहे.२काल,माप,इ०चें परिमाण;उ०ह्या मुलाला क्षणमात्र विलंब नको.**टीप**;-ह्या दोन्हीं अर्थीं शब्दाच्या पुढें ' मात्र ' येतें. ३ सूक्ष्म महाभूतांपैकीं प्रत्येक. ४ एक क्षण.

मात्रा [सं०] स्त्री० १ माप; परिमाण; प्रमाण. २ इयत्ता; मर्यादा. ३ पदार्थांचा लहान

किं० सूक्ष्म भाग. ४ ऱ्हस्व स्वर उच्चारण्याला लागणारा काळ. दीर्घ स्वराच्या दोन मात्रा असतात. ५ महत्त्वाची किं० हिशेबांत घ्यावयाच्या योग्यतेची वस्तु किं० परिमाण; उ० ह्या अफाट विश्वामध्यें मनुष्य ही क्षुल्लक मात्रा आहे. ६ अक्षराच्या डोक्यावर जी एक प्रकारची तिरकस रेघ असते ती; उ० क च्या डोक्यावर एक मात्रा दिली असतां के हें अक्षर होतें आणि दोन मात्रा दिल्यानें कै हें अक्षर होतें. ६ धातु वगैरे खनिज द्रव्यांचें वैद्यक शास्त्राप्रमाणें तयार केलेलें औषध; उ० सूतशेखराची मात्रा, हेमगर्भाची मात्रा,इ०. ७ पैसा; ऐवज; संपत्ति; उ० ह्या सावकाराजवळ आतां फारशी मात्रा उरली नाहीं. ꣸ **मात्रा न चालणें** इलाज न चालणें; सामर्थ्याची प्रौढी कुचकामाची ठरणें. **मात्रा लागूं पडणें** इलाज फलद्रूप होणें. **माझी मात्रा वर आहे** मी वरचढ आहें; माझें सामर्थ्य, अधिकार,इ० अधिक आहे; उ० अरे जा: ! शिवराम काय माझें वाकडें करूं शकेल ? माझी मात्रा वर आहे !

मात्रागमनी वि० वर ‘ मातृ ’ मध्यें ‘ मातृगमनी ’ पहा.

मांत्रिक [**सं०**] **वि०** १ मंत्र जाणणारा. २ जादूगार.

मात्सर्य [**सं०**] **न०** हेवा; मत्सर; परोत्कर्ष न बघवण्याचा स्वभाव.

माथण, माथणी [**सं०** मंथ] **स्त्री०** रुंद तोंडाचा ताक घुसळण्याचा किं०पाणी भरण्याचा मातीचा डेरा.

माथवट स्त्री०, न०, माथवटी स्त्री० पुढें ‘ माथोट ’ पहा.

माथळा, माथला [**म०**माथा] **पु०** १ पळी, चमचा, इ० चें टवळें किं० परडें. २ रवीचा पैलूदार भाग.

माथा [**सं०** मस्तक] **पु०** १ डोकें. २ कोणत्याही पदार्थाचें वरचें टोक किं० वरचा भाग. ३ रवीचा पैलूदार भाग. ४ कोणत्याही पदार्थाचें जाडी टोक. ५ टेकडीचा अत्यन्त उंच भाग. ꣸ **कांहीं काम कोणेकाच्या माथां** (किं० **माथीं**) **मारणें** तें त्याच्याकडे सोपविणें. **माथ्यावरचा पदर उतरणें** कोण्या स्त्रीनें निर्लज्यपणानें व्यभिचार करूं लागणें. **माथेकूट, माथाकूट न०** स्त्री० १ अडाणी माणसाला कांहीं विषय शिकविण्याचे किं० समजावून देण्याचे कष्ट. २ कोणेकाच्या मागें लाविलेला तगादा किं० उपद्रव. **माथाफोड, माथेफोड स्त्री०** मूर्खाला शिकविण्याचे कष्ट. **वि०** ज्यांत डोक्याला फार त्रास होतो असें (काम). **माथेशूळ, माथाशूळ पु०** डोकें दुखणें हा आजार. **माथेकळी स्त्री०** उसाच्या चरकांतील नवरा आणि नवरी ह्यांचीं कुसवें ज्या वरच्या फळींत फिरतात ती फळी. मागें ‘ नवरा ’‘ नवरी’ पहा.

माथाटी स्त्री० पुढें ‘ माथोटी ’ पहा.

माथोट स्त्री०, न०, माथोटी स्त्री० [**म०** माथा+अट] १ बैलाच्या डोक्याचा शिंगाजवळचा भाग किं० ह्या जागेला शिंगाभोंवताळून बांधलेली दोरी,-जिच्याशीं कासरा बांधलेला असतो. २ शिंगांना गोंडे ज्या कामट्यांच्या रचनेवर बांधलेले असतात ती रचना.

माथ्या [**म०** माथा] **पु०** १ रवीचें खवलेदार जाडी टोक,-जें दहीं, ताक, इ० मध्यें फिरतें.२कोणत्याही काठी, सोटा,इ०लांब पदार्थाचें जाडी टोक.

मांद [**सं०** मद] **पु०** गर्व, आनंद, इ० ची उसळी किं० उद्रेक.

मांद स्त्री० १ भाताची मळणी काढतेवेळीं खळ्याच्या मधोमध जी रास गोळा होते ती. २ गंगाळासारखें मातीचें रुंद तोंडाचें पात्रविशेष.

मादक [**सं०**] **वि०** कैफ उत्पन्न करणारा पदार्थ (अफू, दारू, इ०).

मादगा [**सं०** मद] **वि०** गर्व, पैसा, अधिकार,इ० नीं गर्विष्ठ झालेला.

मांदगी [**फा०**] **स्त्री०** थकवा; शक्तिपात.

मांदण न०, स्त्री० रुंद तोंडाचें मातीचें पात्र.

मांदणें [**सं०** मर्द्=चोपडणें] **स० क्रि०** चुलीवर ठेवावयाच्या भांड्यांच्या (बुडांना) माती, राख, इ०चा लेप करणें. वर ‘ माजणें ’ पहा.

मादरवान [**फा०**] **स्त्री०** उंची अवलादीची आणि मजबूत बांध्याची घोडी.

मांदरी स्त्री० शिंदी, मोळ, इ०ची चटई.

मादव स्त्री० गाय, म्हैस, इ०नीं कास आकुंचित करणें(करणें).

मांदळ (–ळा) [सं० मंडल] पु० १मोठ्या आकाराचा मृदंग. २ चाकाचा तुंबा.

मांदळवारें न० अत्यन्त थकवा; शक्तिपात (येणें, भरणें, लागणें).

मांदळी [सं० मंडल] स्त्री० डफ किं० डफाचें कडें.

मादा, मादी [फा० मादाह्] स्त्री० पक्षी इ०ची स्त्री व्यक्ति. खालीं ' मादी ' पहा.

मांदा [फा० मांदाह्] वि० १दमलेला;थकलेला. २ आजारी.

मांदाग्नीं [सं० मंद+अग्नि; म० आग] क्रि० वि० सौम्य किं० मंद निखाऱ्यांवर(भाजणें, कढविणें).

मांदाण न०, स्त्री० वर ' मांदण ' पहा.

मांदार [सं० मंदार] पु० एक फुलझाड,–पांढरी रुई.

मांदिरें न० घुसळखांब्याच्या ज्या दोन दोऱ्यांत रवी फिरते त्या प्रत्येक. वर ' मांजरी ' पहा.

मांदी स्त्री० १ (कवितेंत)कडें, वर्तुळ;टोळी; थवा; समुदाय. २ पेटी; संदुक.

मादी [फा० मादाह्] स्त्री० १ पशु, पक्षी, इ० जातीची स्त्री. ह्याच्या उलट ' नर '. २ दोन अवयवांच्या रूपांतील जो पदार्थ त्याच्या दोन अवयवांपैकीं जो लहान तो किं० ज्यांत दुसरा अवयव शिरतो तो.

मांदूस स्त्री० मोठी पेटी; संदूक.

मांदें [सं० मेदस्] न० जनावरांची चरबी.

मांद्य [सं०] न० १ मंदपणा, सौम्यपणा (बुद्धि, अग्नि, इ०चा). २ आळस. ३ कोणत्याही इंद्रियाची कमजोरी किं० निर्बलता.

माधव [सं०] पु० १ श्रीकृष्ण; विष्णु. २ वसंत ऋतु. ३ वैशाख हा महिना.

माधवी स्त्री० १ कस्तूर मोगरा. २ मोहाची दारू. **माधवी पु०** दशावतारांच्या खेळांत हास्यरस उत्पन्न करणारा नट.

माधुकरी [सं०] स्त्री० १ अनेक ठिकाणीं मिळविलेली भिक्षा. २ शिजविलेल्या अन्नाची भिक्षा. **पु०** शिजविलेल्या अन्नाची भिक्षा मागणारा ब्राह्मण.

माधुर्य [सं०] न० १ गोडी. २ गोडपणा. ३ (**साहित्य**)कानाला गोड वाटेल असा भाषाशैलीचा गुण. दुसरे दोन गुण ओज आणि प्रसाद.

माध्यंजन [सं० माध्यंदिन] पु०ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा इसम. **न०** शुक्लयजुर्वेदाची एक शाखा.

माध्यम, माध्यमक, माध्यमिक [सं०] वि० १ मधलं. २ मध्यम प्रतीचा किं०दर्जाचा. **पुं०**मध्यस्थ.**न०**१ कोणताही विषय ज्या भाषेच्या द्वारें शिकवावयाचा ती. २ भिन्न भिन्न भाषा-बोलणाऱ्या दोन पक्षांतील किं०राष्ट्रांतील माणसांचे विचार एकमेकांना कळण्यासाठीं दोघांनाही समजेल अशी भाषा जी बोलतात ती. **माध्यमिक पु०** बौद्धमताचा अनुयायी.

माध्यस्थ [सं० मध्यस्थ] वि० १ मधला.२ मध्यभागचा. ३ तिऱ्हाईत. ४ निःपक्षपाती. ५ उदासीन; तटस्थ. ६ नपुंसक. ७ सामान्य प्रतीचा.**पु०**दोन भांडणाऱ्या पक्षांना जो निकाल देतो तो. **माध्यस्थ्य न०** १ निःपक्षपातीपणा. २ रदबदली करणें. ३ औदासीन्य; तटस्थपणा. ह्या तिन्ही अर्थीं ' माध्यस्थी, "माध्यस्थगिरी ' हेही शब्द मराठींत प्रचलित आहेत.

माध्यान्हिक [सं०] वि० मध्यान्हसमयीं करावयाचें (भोजन इ०).

माध्व [सं०] वि० मधुर. **पु०** वैष्णवांचा गुरु जो मध्वाचार्य त्याचा अनुयायी.

माध्वी स्त्री० १ मोहाची दारू. २ एक प्रकारच्या खजूराचें झाड.

माध्वीक [सं०] १मोहाची दारू.२द्राक्षांचे मद्य. ३ मध. ४ द्राक्ष. ❀ **माध्वीकफल न०** मोहाचा नारळ.

मान [सं०] पु० १ आदर; गौरव; संमान. २ अभिमान; स्वाभिमान. ३ गर्व; ताठा; मगरूरी. ४ विशिष्ट प्रसंगीं कोणेकाला जो आदर दाखवावयाचा तो किं० त्या आदराला जी त्या मनुष्याची पात्रता ती किं० त्या आदरानें त्याला

दिलेला पदार्थ; उ० ह्या मुंजींत वाजंत्र्याचा मान काढून ठेवण्याला विसरूं नका; उ० लग्नामध्यें उपाध्यायाचा पागोटें घेण्याचा मान आहे. ५ कांहीं गोष्ट करण्याचा कोणेकाचा जो अधिकार तो; उ० नाहीं होय म्हणण्याचा मान सासूबाईकडे आहे. **न०** १ मोजणें; मापणें. २प्रमाण.३ लांबीचें माप. ४ आजमास; अटकळ; उ० पावसाचें मान आज कांहीं सांगतां येत नाहीं. ५ शक्यता; सोय; उ०राजानें शेतसारा दुप्पट केला आतां गान्हाणें कोणाकडे करण्याचें मान नाहीं. ६ माप; प्रमाण; उ० जें मान रामाच्या बुद्धीस तूं लावशील तेंच मान सदूच्या बुद्धीस कसें लागेल? ७ कांहीं गोष्ट होण्याची किं० करण्याची सरणी; उ० वाऱ्याचें मान फिरतांच अवजारें वेगळ्या रीतीनें बांधावीं लागतात. ❀ **मानकरी पु०** १ ज्यांचा मान करावा लागतो अशीं लग्नामध्यें व्याही, विहीण, इ० माणसें, किं० ग्रामव्यवस्थेंत पाटील, कुलकरणी, खोत,महाजन,इ० माणसें किं० दरबार इ०मध्यें सरदार इ० माणसें प्रत्येक.**मानखंडना, मानहानि स्त्री०,मानभंग पु०**कोणेकाचा केलेला किं० झालेला अपमान. **मानमान्यता स्त्री० ए० व०** सभ्य, थोर, विद्वान्, वडील, इ० ना दाखविला जातो तो आदर. **मानवती स्त्री०** (**साहित्य**) आपल्या प्रियकरावर रुसलेली स्त्री. **मानधन न०** मान हेंच धन. **पु०** मानी पुरुष; अपमान यत्किंचित् न सहन करणारा माणूस. **मानपान न०ए०व०** विशिष्ट प्रसंगीं ज्या कोणाला जें अवश्य दिलें पाहिजे तें किं० ज्याचा जो आदरसत्कार केला पाहिजे तो. **मानिनी स्त्री०** मानी स्त्री. **मानमर्यादा स्त्री० ए० व०** कोणेकाशीं जी योग्य वर्तनसरणी ठेवावयाची ती. **मानाचें पान न०** संमानपूर्वक किं० प्रेमानें जें कोणास कांहीं द्यावयाचें तें किं० जें दिलें जातें तें. **मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत** आपला झालेला संमान लोकांस सांगावा आणि अपमान झालेला असेल तो मनांतल्या मनांतच ठेवावा म्ह० त्याची वाच्यता करूं नये. **मानेच्छु, मानेप्सी** आपणाला योग्य तो मान दिला पाहिजे असा हेका धरणारा.

मान [**सं०** मन्या=मानेची मागची शीर] **स्त्री०** १ गळ्याची मागची बाजू. २ ह्या बाजूला होतो तो एक रोग.❀**खालच्या मानेनें चालणें** (किं० **पाहाणें**) १ नम्रपणानें किं० मर्यादशीलपणानें चालणें किं० वागणें. २ लाजेनें खालीं तोंड करून चालणें. **कोणेकाची मान कांट्यावर नसणें** तो अति गर्विष्ठ, उद्दाम, किं० मगरूर असणें.**कोणेकाची मान कापणें** त्याला फसविणें; त्याचा विश्वासघात करणें. **मान हालविणें** (किं० **डोलविणें** किं० **तुकविणें**) आनंदानें किं० कौतुकानें मान डोलविणें; प्रसंशापूर्वक मान डोलविणें.**माझी मान धरली आहे** माझ्या मानेला कांहीं विकृति झाल्यामुळें मला मान इकडे वळवितां येत नाहीं (येथें ' धरणें ' **अ० क्रि०**). **राम्यानें माझी मान** (किं० **मानगुटी**) **धरली** ऐन वेळीं त्याणें माझ्या कामांत हरकत आणिली किं० विघ्न उपस्थित केलें आणि काम बंद पाडलें. (येथें ' धरणें ' **स० क्रि०**). **कोणेकाची मान** (किं० **मुंडी**) **मुरगळणें** त्याचा नाश करणें; त्याचें नुकसान करणें. **एकाद्या रकमेची मान** (किं० **मुंडी**) **मुरगाळणें** १ नाइलाजास्तव किं०नाखुषीनें ती रकम खर्चणें;उ० बाळोबानें पांचशें रुपयांची मान मोडली तेव्हां एकदाचें त्याचें लग्न झालें. २ थोडक्या खर्चासाठीं मोठ्या नाण्याला हात लावणें; उ० पैशाच्या काबलीसाठीं मला रुपायाची मान मोडावी लागली. **मान वर करणें** १ हीन स्थितींतून वैभवास चढणें. २ आजारांतून उठणें. ३ दिमाखानें वागणें. **मान खालीं करणें** किं० **मान वर न करणें** लज्जेनें किं० नम्रपणानें किं०शालीनतेनें मान लववून भूमीकडे दृष्टि लावणें. **मान वाकडी करणें** संमति किं० पसंती दर्शविण्यासाठीं एका खांद्यावर मान वळविणें. **टीप,**—नापसंती दर्शविण्यासाठीं सुद्धां मान वाकडी केली जाते पण वेगळ्या रीतीनें. **कोणेकाची मान सोडविणें** त्याला अडचणींतून मुक्त करणें. **कोणेकाची मान अडकणें** तो पेचांत पडणें; तो संकटांत सांपडणें. **टीप,**—जुवाला बैलाची मान जखडलेली असते. त्याच्या मानेवरचें जूं उतरलें म्हणजे तो मोकळा होतो. ह्या वस्तुस्थितीवर हा

आणि वरचा वाक्प्रचार आधारलेला आहे. **एखाद्याच्या मानेवर सुरी ठेवणें** त्याला धमकी देणें; त्याचा नाश करावयाला उठणें. **टीप,**– खाद्य मांसासाठीं जनावराला कापतांना खाटीक प्रथम सुरीनें त्याची मान कापून डोकें आणि धड विलग करतो ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. **कोणेकाच्या मानेस (किं० मानगुटीस) बसणें** १त्याला कांहीं कामानिमित्त आग्रह करणें किं० आतिशय गळ घालणें; त्याला सक्तीनें कांहीं काम करावयास लावणें. २ भूत, पिशाच, इ० नीं त्याला पछाडणें. ३ केलेंच पाहिजे असें होणें; केल्याशिवाय गत्यन्तर नाहीं असें होणें; उ० तें पत्र टपालांत टाकणें माझ्या मानेस (किं० मानगुटीस) बसलें म्ह० मला तें काम टाळतां येईना. **मानखुंट न०, मानखोडा पु०** ओढाळ पशूची मान आणि पुढचा एक पाय ज्या दोरीनें सैलसर बांधतात ती दोरी. **मानगुटी, मानगोटी स्त्री०** मान (तुच्छतेंत). **मानमोड स्त्री०** १ मान मोडणें. २ लिहिणें, शिवणें, धान्य निवडणें, इ० कामें,–ज्यांत मान वाकवावी लागते. ३ कोणेकाचा केलेला अपमान किं० उतरलेला नक्षा. ४ कठिण चढण. **मानमोडी स्त्री०** कठिण चढण. **वि०** मुळक्याची किं० चढणीची (वाट). **मानमोडें न०** सुरू झालेल्या किं० सुरू केलेल्या कामांत अकस्मात् उत्पन्न झालेलें कांहीं विघ्न. **मानेचा कांटा पु०** पाठीच्या कण्याचें मानेजवळचें टोक (ढळणें, सावरणें); उ० मानेचा कांटा त्याला सावरतां येत नाहीं इतका तो अशक्त झाला आहे. **टीप,**–आजारी किं० अशक्त किं० आसन्नमरण अशा माणसासंबंधानें ह्या वाक्प्रचाराचा उपयोग केला जातो. **मानेचा कळस पु०** डोकें (सावरणें, वाकडा पडणें). ह्याचा उपयोग वरच्या वाक्प्रचाराप्रमाणेंच. **मानेचा खाखोटा पु०** गळ्याचें पुढचें हाड. **मानेची पन्हळी स्त्री०** मानेच्या लगतचा डोक्याचा लांबोडा खळगा. **मानेवर खडा ठेवून क्रि० वि०** बिलकूल न हालतां एका ठिकाणीं बसून(लिंहिणें, घोकणें, इ०).

मान, माण स्त्री० चिकण माती.

मानई [**सं०** मानव] **पु०** १ वयस्कर पुरुष. २ बाप्या.

मानट न० जीवर केवळ गवत उगवतें, धान्य उगवत नाहीं, अशी जमीन. ꣸ **मानटी वि०** १ धान्याला नालायक अशी (जमीन); जीवर फक्त गवत उगवतें अशी (जमीन). २ अशा जमीनीवर उत्पन्न केलेलें (धान्य).

मानणूक [**म०**मानणें] **स्त्री०**देवाला केलेला नवस.

मानणें [**सं०** मन्] **स० क्रि०** १ समजणें; लेखणें; गणणें; उ० तो सुतकाचा विटाळ मानीत नाहीं. २ अमुक गोष्ट अशी आहे किं० अशी नाहीं असा (कोणेकाचा)ग्रह किं० मत असणें; उ०शिव आणि विष्णु हे निराळे असें मी मानीत नाहीं. ३ (कोणेकाला) मान देणें किं० आदरणीय समजणें; उ० ज्याणें वचनभंग केला त्याला कोणी मानित नाहीं. ४ कांहीं गोष्ट करण्याचें किं० देण्याचें कबूल करणें. ५ (कांहीं वस्तु, मत, इ०) कोणेकास ग्राह्य, संमत, सुखावह, आदरणीय वाटणें, होणें, किं० असणें; उ० खारी हवा मला मानत नाहीं. **टीप,**–ह्या अर्थी ' मानवणें ' सुद्धां.

मानता [**म०** मानणें] **स्त्री०** देवानें आपलें अभीष्ट पुरवावें म्हणून करतात तो नवस.

माननीय [**सं०**] **वि०** १ संमानास पात्र; पूज्य. २ ज्याची आज्ञा पाळणें आपलें कर्तव्य आहे असा. ह्या दोन्हीं अर्थी ' मान्य ' सुद्धां.

मानभाव [**सं०** महानुभाव] **पु०** हिंदूंचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी माणूस. हे लोक भिक्षेवर निर्वाह करतात आणि काळीं वस्त्रें परिधान करतात. २ बोलण्याचालण्यांत गोड पण गळेकापू. ꣸ **करणी कसाबाची आणि बोलणी मानभावाची** बाहेरून प्रेम दाखविणें आणि गुप्तपणें नाशाच्या खटपटी करणें. **मानभावाची बायको आणि गाढवाचें जिन्नब हीं बिन खर्चाचीं** मागें'जिन्नब'मध्यें पहा. **मानभावी वि०** ज्याचें वर्तन सभ्य आणि संभावितपणाचें पण अंतःकरण कपटी असा (मनुष्य). **मानभावाची ऊ स्त्री०** पंचाइतींत पडलेला मनुष्य; इकडे आड आणि तिकडे विहीर अशा पेचांत

सापडलेला मनुष्य. **टीप,**–मानभावाला ऊ साप-डली तर तो ति॰ा सोडूनही देत नाहीं आणि मारूनही टाकीत नाहीं. **मानभावाची बायको** स्त्री॰ ज्यापासून आपला फायदा होतो आणि सोय होते पण ज्यासाठीं आपणास कांहींच खर्च करावा लागत नाहीं असा पदार्थ, माणूस, किं॰ जनावर.

मानम्हातारी [म॰ महान् म्हातारी]**स्त्री॰** पोक्त स्त्रीची ऐट आणणारी किं॰ दुढ्ढाचारीपणा करणारी मुलगी.

मानया [सं॰ मानव] **पु॰** मूलपणाचें ज्याचें वय संपलें आहे असा माणूस; बाप्या. वर ' मानई ' पहा.

मानव [सं॰] **पु॰** मनुष्य; मनुष्यप्राणी. ꣸ **मानवेंद्र पु॰** राजा.

मानवणें [सं॰ मन्] **अ॰ क्रि॰** (कांहीं खाद्य, पेय, हवा, पाणी, दुसऱ्याचें भाषण किं॰ वर्तन)ग्राह्य,संमत,सुखावह, प्रिय,किं॰लाभदायक होणें, असणें, किं॰ वाटणें; उ॰ कोंकणची हवा मला मानवत नाहीं.

मानवळा पु॰, मानवळी स्त्री॰ [म॰ मान +वळ] मानेवरील केश. **टीप,**–प्रयोग बहुधा अ॰ व॰ ' मानवळे, ' ' मानवळ्या 'ह्या रूपांत.

मानाविणें, मानवणें [म॰ ' मानणें ' चें प्रयोजक] **स॰ क्रि॰** १ कांहीं गोष्टीकडे कोणे-काचें (मन) वळविणें किं॰ अनुकूळ करून घेणें. २ कांहीं गोष्ट (कोणेकास) आवडणें किं॰ पसंत पडणें. **टीप,**–ह्या अर्थी ' मानवणें ' **अ॰ क्रि॰** मानल्यास चालेल.

मानवणि [म॰ मानणें] **स्त्री॰** श्राद्धविधि, अविधवानवमी, इ॰ प्रसंगीं कोणा मृत सुवासि-नीच्या नांवानें जेवूं घालतात ती सुवासिनी.

मानवेल स्त्री॰ लवचीक बांबू,–धनुष्याच्या उपयोगाचा.

मानस [सं॰] **न॰** १ मन.२कांहीं विशिष्ट गोष्ट करण्याची इच्छा. ३ मनांतील विचार. **टीप,**–ह्या दोन्हीं अर्थीं मराठींत **पु॰** सुद्धां. ४ गर्भित किं॰ ध्वनित संमति. ५ हिमालयांतील एक सरोवरविशेष. **वि॰** १ मनासंबंधाचें. २ मनापासून उत्पन्न झालेलें. ३ काल्पनिक. ४ गर्भित; ध्वनित. ꣸ **मानसपूजा स्त्री॰**गंध, फुलें, इ॰ पूजासाहित्याशिवाय मनानेंच ते ते पदार्थ कल्पून केलेली पूजा.

मानसिक [सं॰ मानस] **वि॰** १ मनासंबं-धाचा. २ केवळ कल्पनेंतील; उ॰ स्वप्न हा मान-सिक प्रपंच होय.३ अनिश्चित;अशाश्वत; संदिग्ध; उ॰ असल्या पावसांत त्याचें येण्याचें मान-सिकच दिसतें. **न॰** १ अगदीं थोडकें प्रमाण किं॰ परिमाण; उ॰मरु देशांत पाण्याचें मानसिकच. २ देवाला केलेला नवस.

माना, मायना [अ॰ मअनी] **पु॰** १ अर्थ; मतलब; उद्देश.२ज्याला पत्र लिहावयाचें त्याच्या दर्जाला अनुरूप असे मानाचे शब्द जे त्याच्या नांवामागें घालतात ते; उ॰रावसाहेब,रावबहादूर, दिवाणबहादूर, वेदशास्त्रसंपन्न, राजमान्य राजश्री, (दामोदर राव, गदाधर भट्ट, इ॰). ३ पत्राचा अलकाब म्ह॰ सुरवातीचीं वाक्यें.४शक्यता;सोय; उ॰ तुझ्या पुढें बोलण्याचा आतां माना राहिला नाहीं. ५ वस्तुस्थिति; घडलेली हकीगत; वृत्तान्त. ६ पत्रादिकांत लिहिलेला मजकूर.

मानाविणें [म॰' मानणें 'चें एक रूप] **स॰ क्रि॰** १ (कोणेकास) पूज्य लेखणें किं॰ **गणणें.** २ (कोणेकाला) मान किं॰ महत्त्व देणें.

मानी [म॰मान]**स्त्री॰**१जातें, घिरट, इ॰च्या वरच्या पेढास पाटी बसवावयासाठीं जी खाचणी पाडलेली असते ती.२जांत्याच्या वरच्या तळांच्या भोकांत लोखंडाची विडी बसवितात ती.

मानुष [सं॰] **पु॰** माणूस. **मानुषी स्त्री॰** मनुष्य जातीची स्त्री.

मानुष वि॰ मानव जातीचा.

मान्य [सं॰] **वि॰** १ पूज्य; मानाला पात्र. २कबूल; संमत; पसंत. **मान्यता स्त्री॰** १ मानाला पात्रता. २कबूली;पसंती; रुकार.३ सत्कार;आदर.

मान्या, माण्या पु॰ लहान जातीचा बांबू.

माप, मोप न॰ मातीची वीट,–उन्हांत वाळ-विलेली.

माप [सं॰ मा=मोजणें; मापन] **न॰** १ देश, काल, लांबी, इ॰ ची इयत्ता किं॰ ठरीव-ण्यांत आलेल्या परिमाणानें जी मोजदाद आली ती.२ संख्या;वजन;परिगणन.३मोजणें किं॰मापणें

किं०तोलणें ही क्रिया किं०ह्या क्रियेनें जें ठरलें तें. ४तोलणें आणि मोजणें ह्या क्रियांना साधनभूत जें पात्र किं० वारदान किं० वजन तें. ५ तोलून किं० मोजून घेतलेलें पदार्थाचें परिमाण. ६ जमीनीचा मोजून काढलेला पट्टा. ७ चार पायल्या किं० बारा डोळे हें खानदेशांत रूढ असलेलें परिमाण. ॐ **कोणेकाच्या पदरांत माप घालणें** त्याच्या गैरवर्तनाला पुरावे दाखवून त्याला तें गैरवर्तन कबूल करावयास लावणें. **मापी वि०** वारदानीं मापानें मोजून घेतलेला किं० घ्यावयाचा (पदार्थ). ह्याच्या व्यावकर्तकत्वें ' वजनी. '

मापटें [**म०** माप] **न०** अर्धा शेर किं० पायलीचा अष्टमांश.

मापणें [**म०** माप; **सं०** मा=मोजणें] **स० क्रि०** परिमाण, लांबी, रुंदी, वजन, इ० बाबतींत (पदार्थविशेषाची) इयत्ता ठरविणें.

मापारा,मापाऱ्या[**म०** मापणें] **पु०** १बाजारांत विकावयास आलेल्या मालाची मोजणी किं०मापणी करणारा.२मोजदाद किं०गणती करणारा कोणीही मनुष्य. **मापारी स्त्री०** फरा हें धान्याचें माप.

मापींव [**म०** मापणें] **वि०**बारदानी मापानें मोजून घेतलेला किं० घ्यावयाचा (पदार्थ).ह्याच्या व्यावर्तकत्वें ' तोलींव ' किं० ' वजनी. '

माफ [**अ०** मआफ्] **वि०** १ क्षमिलेला (माणूस किं०गुन्हा). २ सोडलेला; घ्यावयाचा हक्क असतां न घेतलेला (कर्ज, सारा, वसूल, किंमत). ॐ **माफी स्त्री०** १ क्षमा. २ दिलेली सूट. **माफी साल न०** ज्या वर्षाबद्दल सरकारनें सारा घेतला नाहीं तें.

माफक, मुवाफीक [**अ०** मुवाफिक्] **वि०** १ मध्यम प्रतीचा. २ फार नव्हे किं० थोडाही नव्हे असा. ३ नेमस्त; फार सौम्य नव्हे किं० फार कडक नव्हे असा.

माफा [**अ०** महाफाह्]**पु०** स्त्रियांच्या प्रवासाला योग्य असें वाहन.

माबजत,माफजत[**अ०** मुहाफिजाह्, मुहाफजत् = संभाळणें] **स्त्री०** संरक्षण; सांभाळणी; बंदोबस्त; निगा; काळजी.

माभळभट पु० अंगावर अव्यवस्थितपणें कपडे धारण करणारा; सईलसर किं० अजागळासारखें धोतर नेसलेला पुरुष.

माम पु० १ आईचा स्तन(मुलांच्या भाषेंत). २ जेवण (मुलांच्या भाषेंत).ह्या अर्थी **न०**सुद्धां.

मामंजी, मामाजी [**म०** मामा] **पु०** नवऱ्याचा बाप; सासरा.

मामदी स्त्री०, मामदें, मामधें न० पुढें ' मावंदें ' पहा.

मामरमुंडा (-डा) पु० हिजड्याच्या बरोबर असतो तो त्याचा रक्षक.

मामलत [**अ०** मुआमलत्, मुआमलाह्] **स्त्री०** १ कार्य; गोष्ट. २ महत्त्वाचें कार्य. ३ तालुक्याच्या वसुलाचें काम. ४ जमाबंदीची कामें जी सरकारनें नेमिलेला अधिकारी करतो तीं. ५ महत्त्वाची किं० हिशेबांत किं० विचारांत घ्यावयाच्या लायकीची कांहीं वस्तु किं० बाबत; उ० पतंगाची ती काय मामलत आणि त्या पतंगासाठीं तूं त्याला आईबापांवरून शिव्या देतोस ? थुः ! ॐ **मामलतदार पु०** जमाबंदीच्या कामावर सरकारनें नेमिलेला अधिकारी. **मामलतदारी स्त्री०** मामलतदाराचा हुद्दा किं० अधिकार किं० कार्यक्षेत्र. **मामला, मामलेदार पु०** वर ' मामलत, ' ' मामलतदार ' पहा.

मामलूत स्त्री० १ क्षमा; माफी (करणें). २ अपराध पोटांत घालण्याची प्रवृत्ति (करणें).

मामा [**सं०** माम, मामक] **पु०** १ आईचा भाऊ. २ नवऱ्याचा बाप. ३ बायकोचा बाप. ४ निरक्षर आणि अडाणी माणूस. **मामी स्त्री०** १ मामाची पत्नी. २ बायकोची आई. खालीं ' माईस ' पहा. **मामेबहीण स्त्री०** मामाची मुलगी. **मामेभाऊ पु०** मामाचा मुलगा. **मामेसासरा पु०** नवऱ्याचा किं० बायकोचा मामा. **मामेसासू स्त्री०** नवऱ्याची किं० बायकोची मामी.

मामीस [**म०** मामी] **स्त्री०** मामी. आईस म्ह० आई; बापूस म्ह० बाप; बहिणीस म्ह० बहीण.

मामुलती,मामलूत स्त्री० १ दीनपणें केलेली विनंती किं०प्रार्थना.२कोणेकाला दाखविलेली दया किं० सहानुभूति. ३ कोणेकाला केलेली क्षमा किं० माफी.

मामुरी [**फा०** मअमूरी] **स्त्री०** आबादी; संपन्नता; समृद्धि; वैपुल्य.

मामू पु० आईचें थान (मुलांच्या भाषेंत).

मामूल [**अ०** मअमूल] **पु०** रूढि; परिपाठ; आचाराची सरणी. **वि०** पूर्वीपासून चालूं असलेली (सरणी, शिरस्ता, वहिवाट, इ०). ह्या अर्थी ' मामुली ' सुद्धां.

माय [**सं०** मा=आई] **स्त्री०** आई. ꠸ **मायअंग न०** १ शरीराचा किं० पदार्थाचा अत्यन्त नाजूक भाग. २ गुदद्वारें किं० योनिद्वारें बाहेर पडलेला शरीराचा भाग. ३ स्त्रीची योनि. **मायआजा पु०** आईचा आजा. **मायगोसाविण स्त्री०** देवीच्या संबंधाचे जे कुळधर्म त्यांत सुवासिनी-प्रमाणें जिचा सत्कार केला जातो अशी विधवा. ह्या देवीला ह्या प्रसंगीं ' राजरा 'म्ह० राजेश्वरी) असें नांव आहे. **मायचा पूत, मायेचा पूत पु०** आईचा मुलगा; म्हणजे आई ज्याला प्रसवली असा मुलगा म्ह० अर्थात् कोणीहि माणूस. अत्यन्त असंभवनीय अशी गोष्ट घडण्याच्या शक्यते संबंधानें मत बनवावयाचें असतां 'मायेचा पूत' ह्याचा पुढें दिल्याप्रमानें उपयोग होतो; उ० आजूबाजूस कोणी पाहाणारें माणूस नसतां ओसाड ठिकाणीं सोन्याचा दागिना दिसला तर कोण मायेचा पूत तो उचलल्याशिवाय राहील? **मायस्थळ, मायथळ न०** जन्मभूमि,–जेथील सर्व लोक आपल्या विरुद्ध असण्याचा संभव असतो. आपल्या गांवीं खटल्याचा निकाल आपल्याविरुद्ध झाला असतां फिर्यादी म्हणतो ' मायथळीं न्याय कधीं मिळत नाहीं, परथळ बरें. ' **मायपोट न०** १ जेथें सर्वांचा समावेश समबुद्धीनें केला जातो अशीं जागा, जात, धर्म, संस्था, इ०; उ० मुसलमानी जात सर्वांचें मायपोट आहे, जो येईल तो समावतो. २ जो दयाळूपणानें सर्व अपराध क्षमितो असा परमेश्वर, राजा, इ०. **मायबहीण स्त्री०** पूज्य किं० सन्मान्य स्त्री. **मायबाप पु० अ० व०** आई आणि बाप. **मायमावली स्त्री०** १ आई,–जी आपणास अत्यन्त पूज्य असते. २ कोणीहि पूज्य स्त्री. **मायमावशी स्त्री०** आई-प्रमाणें आणि मावशीप्रमाणें पूज्य अशी कोणीही स्त्री,–जिच्याकडे पापी नजरेनें कोणी पाहणार नाहीं. **मायमाहेर न०** माहेर; आईचें घर. **मायराणी स्त्री०** १ अडाण्यांची एक देवता. २ करंजी हें पक्वान्न (निंदेंत किं० विनोदांत). **मायराणीचे दिवे पु० अ० व०** आषाढ महिन्यांत कणकेचे दिवे तेल, वात, घालून पेटवून मायराणीला अर्पण करतात ते. **मायवत् न०** सर्व स्पृश्य जाति किं० त्या जातींतील कोणीहि इसम,–महाराच्या भाषणांत.

मायणी स्त्री० १ मुसळ, काठी, इ०च्या टोंकास बसवितात ती विडी. २ जांत्याच्या पाळ्यांत बसविलेली असते ती विडी.

मायंदळ (–ळा) **वि०** विपुल, पुष्कळ (अशिक्षितांत रूढि).

मायना [**अ०** मअनी] **पु०** अर्थ; मतलब. मागें ' माना ' पहा.

मायनी स्त्री० मागें 'मायणी ' पहा.

मायपत्री स्त्री० हलक्या प्रतीची जायपत्री. ' रामपत्री 'असेंही ' मायपत्री ' ला म्हणतात.

मायफळ [**हिं०** माजूफल] **न०** एक औषधी फळ.

माया [**सं०**] **स्त्री०** १ कपट. २ नाटक; जादू; चलाखी; गौडबंगाल. ३ दंभ; ढोंग. ४ अविद्या; असत्याला सत्य मानणें. ५ (**वेदान्त**) अघटित घटना करण्याची ईश्वराची शक्ति. ६दया; प्रेम; लळा. ७दुर्गा ही देवी. ꠸ **मायाचक्र, मायाजाल न०** इहलोकचा पसारा,–जो वेदान्त्याच्या दृष्टीनें भ्रमरूप आहे. **मायाजाल न०, मायापाश पु०** प्रेमाचें बंधन; प्रेमानें उत्पन्न केलेलें जखडणूक. **मायातीत वि०** मायारूपी अज्ञानानें न बांधलेला (देव, साधु). **मायापटल न०** (**वेदान्त**) अविद्येनें उत्पन्न केलेला जग हें सत्य आहे असा खोटा ग्रह. **मायापुर न०** (**वेदान्तांत**) मानवी शरीर. **मायाब्रह्म न०** डोंगर, नद्या, इ०,–जीं वस्तुतः ब्रह्मानेंच घेतलेलीं भिन्न भिन्न रूपें होत. **मायाममता स्त्री० ए० व०** प्रेम; लळा. **मायामय वि०** १कपटी. २भ्रम उत्पन्न करणारें. ३खोटें; मायेनें म्ह० अविद्येनें उत्पन्न केलेलें. **मायारूपी वि०** लुच्चा; लबाड; कपटी. **मायालाघव न०** अवस्तूचे ठायीं वस्तुत्व-बुद्धि उत्पन्न करण्याचें जें मायेचें (म्ह० अवि-

घेचें) सामर्थ्य किं० कौशल्य तें. **मायावंत वि०** १ मायाळू. २ मायामय. **मायावी** [सं० मायाविन्] वि० कपटी; लबाड . पु० १ राक्षस. २ गारुडी. **मायाकार पु०** जादूगार. **मायिक** पु० १ जादूगार. २ ठक; लुच्चा. वि० मायेनें उत्पन्न केलेले; खोटें. **मायेचा अवतार पु०** मत्स्य,कूर्म,वराह,इ०जे विष्णूनें घेतलेले दहा अवतार ते प्रत्येक. **मायेचा गोंधळ पु०** प्रपंच;संसार. **मायेचा पदर पु०** भाऊ, बाप, आई, इ० माणसें,– जीं आपणावर मायेनें संरक्षण,संगोपन, इ० रूप पांघरूण घालतात तीं प्रत्येक. **मायेचें माणूस न०** आपणावर प्रेम करणारें कोणीही माणूस,–ज्याला आपल्या सुखानें सुख आणि दुःखानें दुःख होतें.

माया [फा० मायाह्] स्त्री० १ द्रव्य; निधि; पुंजी; संपात्ति. २ मापानें कापून घेतलेले वस्त्राचे तुकडे शिवून कपडा करतांना ह्या तुकड्यांच्या कडांना शिवणीच्या बाहेर जी रिकामी जागा सोडलेली असते ती. ३ सोयीसाठीं, सुरक्षितपणासाठीं, अडचणीच्या प्रसंगाच्या निवारणासाठीं पदार्थ, रकम,काळ,इ०चा उपयोगांत न आणतां मुद्दाम रिकामा सोडलेला भाग किं०राखून ठेविलेला भाग किं० अंश; उ०मुलीच्या लग्नासाठीं हजार रुपये मजजवळ आहेत पण मी शंभर रुपयांची माया राखून नऊशे खर्चणार आहें; उ० हें चित्र कागदाच्या कडेपर्यंत भिडवूं नको, बोटभर माया राखून रेघा ओढ. ३ ताकत; मजबुती; उ० ही फळी अगदीं पातळ आहे, तिच्या अंगीं माया कमी.

मार [म० मारणें] पु० १ काठी, हात, इ० चे तडाखे किं० रट्टे देऊन कोणेकाचें केलेलें पारिपत्य किं० केलेली शिक्षा (देणें). २ बंदुका, तोफा, दगड, इ० नीं केलेला हल्ला. ह्या अर्थी ' मारा ' सुद्धां. क्रि० करणें, चालविणें. ३ शब्दादींनीं कोणेकावर केलेला प्रहार. ४ पदार्थाचें वैपुल्य; उ० यंदा आंब्याचा मार झाला आहे. ५ जोराची, आवेशाची, मोठ्या प्रमाणावर किं० अखंडित अशी कांहीं कृति; उ० ह्या विहिरींवर साऱ्या गांवाचा मार पडला म्हणून दोन महिने आगोदर आटली. टीप,–संभाषणांत जोर येण्यासाठीं ' मार ' क्रि० वि० प्रमाणें योजण्यांत येतें त्याचे अनेक अर्थ प्रसंगानुरूप करतां येतात. खूप, ऐटीनें,आवेशानें,उत्साहानें,इ०.☆**मारहाण स्त्री०** ए०व०मारणें आणि हाणणें ही क्रिया; कोणेकाला कुचलणें. **मारकूट स्त्री०** मारणें आणि कुटणें.

मार पु० जमीन मापणीचें एक माप; उ० विठ्ठलपंती मार; रायरी मार; सुलतानी मार.

मार [सं०] पु० १ मदन; मन्मथ. २ कामविकार.

मारई स्त्री० मारवी नांवाच्या माशाचें वर-

मारक [सं०] वि० १ हिंसक. २ प्रतिबंधक; उ० कोकमसाल हें घृताचें मारक आहे. पु० साथीचा कोणताही रोग,–ज्यांत प्राणी एके काळीं फार मरतात.

मारकट, मारका [म० मारणें] वि० मारण्याची खोडी ज्याला आहे असा (माणूस,जनावर).**मारका पु०** १कामाचा जोर किं०आवेश; कामाची गर्दी, नेट, सपाटा. २ एक प्रकारचें पिशाच. [वला.

मारका [अ० मआरिका] पु० युद्ध; मुका-

मारकूट [म० मारणें + कुटणें] स्त्री० १ धक्काबुक्की. २ जोरानें रट्टे मारणें.

मारग [सं० मार्ग] पु० रस्ता, वाट (अशिक्षितांत रूढि).

मारगिरी [म० मारणें+फा० गिरी (गिरफ्तन्)] स्त्री० बंदुका, तोफा, बाण, इ० नीं किल्ला, गांव, शत्रूचें सैन्य, इ० वर केलेला हल्ला.

मारंडी [म० मारणें] स्त्री० जींत माणसें किं० जनावरें फार फार मरतात अशी एखाद्या गांवांत आलेली रोगाची साथ.

मारण [सं०] न० १ मारणें; हिंसा; हत्या. २ शत्रूच्या नाशासाठीं मंत्र इ० चा प्रयोग.

मारणी [म० मारणें] स्त्री० मारण्याची क्रिया.

मारणें [सं० मृ] स०क्रि०१ ०चा प्राण घेणें; ठार मारणें. २ (काठी, छडी, इ०) एखाद्या पदार्थावर आपटणें किं०त्यांनीं प्रहार करणें.टीप,– ' मारणें ' चे अर्थ दुसऱ्या शब्दाच्या साहचर्यानें भिन्न भिन्न होतात ते पुढील वाक्प्रचारांवरून वाचकांना कळून येतील. पारा, जस्त, इ० धातु

मारणें म्ह० ते कांहीं विशिष्ट संस्कारांनीं दोषरहित करून आपल्या कामास येतील असें करणें. वाट मारणें, गांव मारणें म्ह० वाटेंतील किं० गांवांतील माणसांवर हल्ला करून त्यांना लुटणें. तहान किं० भूक मारणें म्ह० ती तृप्त न करणें किं० तिची व्यथा सोशीत राहाणें. काम, क्रोध, इ० मारणें म्ह० ते नियंत्रणेंत किं० दाबांत ठेवणें. खिळा, खुंटी, इ० भिंत इ० मध्यें मारणें म्ह० ठोकून शिरकावणें. बंदूक मारणें म्ह० ती उडवणें. लढाई मारणें म्ह० ती जिंकणें. तंबू मारणें म्ह० तो विशिष्ट ठिकाणीं उभारणें; लाट मारणें म्ह० नफा मिळविणें किं० हौस भागवून घेणें; पैसे मारणें म्ह० लोकांच्या पैशाचा विनियोग करणें हें काम आपणाकडे आलें असतां अप्रामाणिकपणानें त्यांत कांहीं पैसे खाणें; मजा मारणें म्ह० करमणूकींत किं० चैनींत काळ घालविणें. कांहीं काम एकाद्याच्या माथीं मारणें म्ह० ते त्याच्याकडे सोपविणें. कांहीं दोष एकाद्याच्या माथीं मारणें म्ह० तो त्याच्यावर लादणें किं० त्या दोषाबद्दल त्याला जबाबदार धरणें.

मारणें [सं० मृ] अ० क्रि० १ उपद्रवकारक किं० असह्य किं० बाधक होणें; उ० आमच्या घराला (किं० भिंतीला) भारी ओल मारते; उ० ह्या ओटींवर त्या शेतखान्याची घाण मारते. २ दृष्टोत्पत्तीस येणें; निदर्शनास येणें; आढळून येणें; उ० ह्या लुगड्यांत थोडीशी हिरव्या रंगाची झाक (किं० छटा) मारते. ३ पीडादायक होणें; उ० ह्या दिवाणखान्यांत उन्हाच्या झळया भारी मारतात; उ० ओटीवर उन्हाची तिरिप मारते. ४ एकदम उसळणें; उ० माझें डोकें इतकें दुखत आहे कीं मी ह्या कुशीचा त्या कुशीला वळलों तरी मोठी शिणीक मारते; उ० मी ठेच लागून पडलों तेव्हांपासून ह्या गुडघ्यांत थोडीशी चमक मारते. ❀ **बोंब मारणें** बोंबलणें. **धाव मारणें** धावणें. **कुलूप मारणें** किल्लीनें कुलूप बंद करणें. **मांडी मारणें** मांडी आकुंचित किं० लहान करणें. **ह्या घराचा कोपरा म्युनिसिपालिटी च्या नियमाप्रमाणें मला मारावा लागला** कोपऱ्याची जागा रस्त्यासाठीं रिकामी ठेवूवाकींच्या भागांत घर बांधावें लागलें. **कोणेकाला हाक मारणें** त्याला मोठ्यानें शब्दोच्चार करून जवळ येण्यास सांगणें. **एकदा प्रसंग मारणें** त्या प्रसंगीं आपल्याकडे कमीपणा येणार नाहीं अशा प्रकारें वागणें किं० कृति करणें. **कांहीं गोष्ट, आरोप, इ० मारून नेणें** उडवाउडवीचीं किं० संदिग्ध किं० गुळमुळीत उत्तरें देऊन किं० विधानें करून आपणांवर कांहीं टपका किं० खोटेपणा न येईल अशा रीतीनें वागणें.

मारता [स० मारणें] **वि०** मारणारा; मारावयास उठलेला. ❀ **मारतापीर पु०** १ कोणेकाशीं बरोबरीच्या नात्यानें झगडावयाला समर्थ; कोणेकाला [सातसवाई; उ० मजपुढें त्याला येऊं द्या, त्याचा मारता पीर मी आहे. २ औषध किं० खाद्य ह्यांच्या मध्यें असलेल्या अपायकारक गुणाला आळा घालणारा कांहीं पदार्थ; रोगावर रामबाण औषध.

मारद स्त्री० खारटांत वाढणारें एक कांटेरी झाड.

मारंदा पु० नासलेला ताडगोळा, नारळ, इ० मध्यें उत्पन्न होतो तो भुसभुशीत अंश.

मारपेच [हिं०] **पु०** कावा; लबाडीची हिकमत; व्यूह.

मारफत [अ० मुआरिफत] **स्त्री०** १ देणें, घेणें, सौदा ठरविणें, युक्ति लढविणें, इ० बाबतीत कोणेकाची मध्यस्थी, ओळख, किं० साक्ष. २ वशिला; रदबदली; शिफारस; उ० ह्या कचेरींत गोविंदपंतांच्या मारफतीनें माझा प्रवेश झाला.

मारवा [हिं०] **पु०** (**संगीतांत**) एक राग.

मारवाडी [सं० मरु+वाट] **पु०** १ मारवाड देशचा रहिवासी. २ पैसा मिळविण्यांत दक्ष किं० तत्पर.

मारवी स्त्री० एक प्रकारचा जलचर प्राणी. त्याच्या घराला ' मारई ' म्हणतात.

मारवेल [सं० मर्यादा+वेल] **पु०, स्त्री०** समुद्राच्या वाळवंटांत पसरणारा एक वेल.

मारवेल स्त्री० एक प्रकारचें गवत.

मारसा वि० मारकट; मारका.

मारा [स० मारणें] **पु०** १ किल्ला, गांव, शत्रु, इ० वर सतत आणि नेटाचा केलेला किं० चालवि-

लेला हल्ला, किं॰अशा हल्ल्याची सरणी किं॰दिशा २ असा हल्ला करावयाला सोयीचें स्थळ. ३ कोण-त्याही आजारावर किं॰उपद्रवावर औषधें, इलाज, तजविजी, इ॰ची अखंड योजना.४हल्ला करून जें मिळविलें तें; उ॰ यंदा पटकीनें आमच्या घरचे दोन मारे घेतले.५ बंदूक, बाण,इ॰चा टप्पा किं॰ पल्ला. ६ जाच;उपद्रव;पीडा.७चांगल्या किं॰वाईट अशा पदार्थविशेषाचें वैपुल्य किं॰ समृद्धि. ॐ **माराकुटी** स्त्री॰ १ जोराचा प्रयत्न.२पराकाष्ठेची खटपट.

मारामार [म॰ मारणें+मारणें] स्त्री॰ १ एकमेकांनीं एकमेकांस मारणें ही क्रिया.ह्या अर्थी ' मारामारी ' अधिक प्रचालित आहे. २ पंचा-ईत; कठिण प्रसंग;अडचण; उ॰ त्या नाटकगृहांत प्रवेश मिळवावयाला मला मोठी मारामार पडली. ३ कष्ट; उ॰ दिवसभर मारामार करावी तेव्हां तीन आणे संध्याकाळीं माझ्या हातांत पडतात. **मारामारी** स्त्री॰ दोन किं॰ अधिक माणसांनीं एकमेकांवर हल्ला करणें इ॰ रूप क्रिया.

मारुत [सं॰] पु॰ वायु;वारा. ॐ **मारुता-त्मज** पु॰ १ भीमसेन. २ हनुमान्.

मारुति [सं॰] पु॰ १ हनुमान्.२भीमसेन. ३ (**लाक्षणिक**) लग्नाचें वय होऊन गेलेलें असतां ज्याचें लग्न झालेलें नाहीं असा पुरुष. ॐ **मारुतीचें शेपूट** न॰ लांबच लांब काम, भाषण, वाद, इ॰.

मारू [म॰ मारणें] वि॰ १ छानदार;नख-रेवाज, उंची दर्जाचा. २ झोंबरें (भाषण).

मारूमिती स्त्री॰ मारवाडी लोकांच्या जमा-खर्चाचा महिना,–पौर्णिमेपासून पौर्णिमेपर्यंत.

मारूज [अ॰ मअरूझ] वि॰ सादर,प्रविष्ट, किं॰ दाखल केलेला (अर्ज, विनंती, तकरार, इ॰). **टीप,**–पत्राच्या आलकावांत म्ह॰ सुरवा-तीच्या वाक्यांत ह्याचा उपयोग होतो. **मारूज मी दारद** कळविण्यांत किं॰ सादर करण्यांत येत आहे (कीं, इ॰).

मारून [म॰ मारणें] क्रि॰ वि॰ जोरानें; आवेशानें; नेटानें; उत्साहपूर्वक; मोठ्या कष्टानें. ॐ **मारूनमुटकून, मारूनधुमकून, मारून-कुटून** क्रि॰ वि॰ १ जबरदस्तीनें; कोणेकाच्या इच्छेविरुद्ध. २ कसेंबसें;मोठ्या कष्टानें.

मारे [म॰ मारणें] क्रि॰ वि॰ वाक्यालं-कारार्थी योजण्याचें अव्यय; उ॰ तो मारे तावा-तावानें भांडावयास आला पण मी त्याला एका क्षणांत गप केलें ! तो मारे मोटरींत बसून हिंडत असतो !

मारेकरी [म॰ मारणें] पु॰ दुसऱ्याला मारावयाला पाठविलेला माणूस.

मार्कंडेय [सं॰] पु॰ १ एक ऋषि. याणें शंकराच्या पिंडीस विळखा घालून यमाच्या दूतांस परतविलें तेव्हां शंकरानें संतुष्ट होऊन याला उदण्ड आयुष्य दिलें. २ (**लाक्षणिक**) कोणीही अतिवृद्ध माणूस.

मार्ग [सं॰] पु॰ १ रस्ता; वाट. २ कांहीं गोष्ट करण्याची सरणी. ३ तोड; उपाय; इलाज. ४ बाहेर पडावयाची किं॰ आंत शिरावयाची वाट. ५ मोक्ष मिळविण्याचा प्रकार; उ॰ कर्म-मार्ग, उपासनामार्ग, ज्ञानमार्ग, इ॰. ६ रूढि; परिपाठ; सरणी. ७ पंथ; संप्रदाय. ८ कोणेकाचा वर्तनक्रम. ९ ग्रहाची कक्षा. १० गुदद्वार. ११ (**ज्योतिष**) मृग. १२ मार्गशीर्ष. ॐ **जलमार्ग** पु॰ समुद्र, नदी, खाडी, इ॰ वरून होडी, गल-बत, इ॰ साधनांनीं जाण्याची वाट. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' स्थलमार्ग ' किं॰ 'खुषकीचा मार्ग.' **मार्गक्रमण** न॰ वाट चालणें; प्रवास करणें ही क्रिया. **मार्गघ्न** [सं॰] पु॰ वाटमाऱ्या; रस्त्यांत मुशाफरांवर हल्ला करून त्यांना लुटणारा. **मार्ग-त्रय** न॰ कर्ममार्ग, उपासनामार्ग, आणि ज्ञान-मार्ग. **मार्गप्रतीक्षा** स्त्री॰ कोणी मनुष्य येण्याची किं॰ कांहीं गोष्ट घडण्याची वाट पाहात राहाणें. **मार्गशीर्ष** पु॰ हिंदूंचा नववा महिना,–कार्ति-काच्या पुढचा आणि पौषाच्या आधींचा.'मार्गेश्वर' हें याचें अपभ्रष्ट रूप.**मार्गस्थ** वि॰ १ प्रवासांत असलेला.**मार्गस्थ होणें** १वाट चालूं लागणें;प्रवा-सास निघणें.२विशिष्ट स्थानापासून निघून जाणें. **मार्ग धरणें** १ कांहीं विशिष्ट सरणी अवलंबिणें. २ कांहीं गोष्ट सुरळीतपणें चालूं लागणें. ३ कोणी मनुष्यानें कार्यविशेषार्थ एकादी सरणी

स्वीकारणें. **मार्गास लागणें** १ कांहीं काम किं० धंदा सुरू होऊन सुरळीतपणें चालूं लागणें. २ कोणेकाला नोकरी लागून किं० त्यानें कांहीं धंदा सुरू करून ती नोकरी किं० तो धंदा त्यानें चालविणें.

मार्जन [सं०] न० १ धुणें; धुवून टाकणें. २ पुसून टाकणें. ३ जलादींनीं पदार्थांवर केलेलें सिंचन; शिंपडणें. ४ दर्भादींनीं अंगावर पाणी शिंपडून घेणें. **मार्जनी** स्त्री० केरसुणी.

मार्जार [सं०] पु० मांजर हा चतुष्पाद प्राणी. ॐ **मार्जारलिंगी** [सं० मार्जारलिंगिन्] पु० बोकेसंन्यासी; ढोंगी किं० कपटी माणूस. **मार्जारमैथुन** न० कधींही कोणासही न दिसणारी पण शक्य कोटींतील कांहीं गोष्ट.

मार्तंड [सं०] पु० १ सूर्य. २ खंडोबा.

मार्दव [सं०] न० मृदुपणा; मऊपणा; कोमलपणा.

मार्मिक [सं०] वि० १ मर्म भेदणारें. २ मर्मासंबंधाचें. ३ विषयाचें सूक्ष्मपणें निरीक्षण करणारी (टीका). ४ विषयाचें रहस्य जाणून घेणारी (बुद्धि). **मार्मिक** पु० रसज्ञ; अंतर्मुख होऊन वस्तु किं० विषय पाहाणारा.

माल [अ०] पु० १ खरेदी विक्रीचा पदार्थ. २ (किंमतीच्या दृष्टीनें) कोणताही पदार्थ किं० जिन्नस. ॐ **मालचा माल, मालके माल** पु० ज्यावर अनेक संस्कार किं० घडामोडी होऊन जो पूर्वस्थितींतच राहिला आहे असा कोणताही पदार्थ. **मालपिसा** वि० संपत्तीच्या नाशामुळें ज्याला वेड लागलें आहे असा. **मालकाटणी, मालकाटी** स्त्री० शेताची कापणी किं० ह्या कापणसाठीं सरकारी परवानगीबद्दल दिलेली रकम. **मालगुजार** पु० जमीनदार; सरकारचा वसूल करून देणारा. **मालचाटी** (-ट्या) पु० शाळेच्या पंतोजीचा मदतनीस. **मालखत** वि० जें आज फुटकें, तुटकें, किं० झिजलेलें असलें तरी जें बनवितांना शुद्ध धातूचें होतें असें (मोहोर, रुपाया, इ० नाणें). **मालजामीन** पु० पैसा किं० माल ह्यांबद्दल जो जामीन राहिला आहे तो मनुष्य. **मालबंदी** वि० १ किंमतीचा (कांहीं पदार्थ),- ज्याला कांहीं किंमत किं० उपयोग आहे असा. २ भक्कम; मजबूद (बांधकाम, घडकाम). **मालमालीयत, मालमत्ता, मालबिसात** स्त्री० पैसा, धान्य, शेतें, गुरेंढोरें, इ०रूप कोणेकाची संपत्ति किं० जिंदगी. **मालमसाला** पु०ए० व० एकादा मिश्रणरूप किं०संयुक्त पदार्थ बनवावयाचा असतां मुख्य पदार्थांच्या जोडीला जे किरकोळ पदार्थ घालावे लागतात ते;उ०साखरभातांत केशर,वेलदोडे इ०;पेटी करतांना कड्या,कोयंडे,बिजागऱ्या, इ०.**मालमिळकत** स्त्री० ए० व० कोणेकाची सर्व स्थावर आणि जंगम संपत्ति.**मालमुद्दल** न०ए०व० एकाद्या व्यापारांत घातलेलें सर्व भांडवल किं०त्या भांडवलाच्या किंमतीचा ऐवज.**क्रि० वि०** नफा न घेतां किं० न मिळतां मूळ किंमतच मिळून.**मालमोल** वि०पदार्थाची ऐन किंमतच घेऊन किं० देऊन विकलेला किं० विकत घेतलेला (कांहीं पदार्थ). **क्रि० वि०** पदार्थाची ऐन किंमत देऊन किं०घेऊन **मालमोल किंमत** स्त्री० पदार्थाची योग्य किं० वाजवी किंमत. **मालमस्त** वि० श्रीमंतीनें मदांध झालेला (मनुष्य). **मालहराऊ** वि० नुकसान करणारा (नोकर, जनावर, व्यापार, इ०). **मालावरचा नाग** पु० १ आपण न भोगतां आपली संपत्ति जतन करणारा; कृपण; चिक्कू. २ कष्ट न करतां ज्यास संपत्ति मिळाली आहे तो. **माली मामला** पु० १ किंमतीचा माल; जो विकला असतां पैसा उत्पन्न होईल असा माल. २ जकातीच्या वसुलाचें काम. **मालीव** वि० १ किंमतीचा (माल). २ जो विकला असतां पैसा उत्पन्न होईल असा (माल).**मालोमाल** वि० मूळ किंमतीस विकलेला किं० विकत घेतलेला (माल).

मालक [अ०] पु०१ज्या कोणाचा हक्क ज्या पदार्थावर तो त्या पदार्थाचा; स्वामी;धनी.२यजमान.ॐ **मालकी** स्त्री०स्वामित्व;धनीपणा; ताबा.

मालकंस [सं० माल्कौश] पु० गायनांतील एक राग.

मालकुडई स्त्री० भाताची एक जात.

मालकांगोणी, मालकांगुणी स्त्री० १ एक वेल. २ त्या वेलाचें बीज.

मालजादी [फा० मालज़ियादाह्] स्त्री० वेश्या; रांड.

मालण [**मं०** मालिनी] **स्त्री०** अत्यन्त सुंदर स्त्री,–मानवी किं० पशुवर्गांतलि.

मालणें [**म०** माळ] **स०** **क्रि०** शाडूनें (धूळपाटी) माखणें. माळ=शाडू.

मालती [**सं०**] **स्त्री०** १ एक वेल. २ ह्या वेलाचें फूल.३ खीर करण्यासाठीं गव्हाच्या सपीटाचे आकारविशेषाचे करतात ते तुकडे प्रत्येक.

मालन मागें 'मालण' पहा.

मालपवा, मालपुवा, मालपुहा, मालपोहा [**हिं०**] **पु०** एक पकान्न.

मालयत, मालीयत, मालत [अ० मालियत] **स्त्री०** जिंदगी; मालमत्ता.

मालव पु० (**संगीतांत**) एक राग. ह्याला ' मारवा ' असाही शब्द आहे.

मालवणें अ० क्रि० १ (दिवा) विझणें. २ (विस्तव) कोळपणें. ३ (**लाक्षणिक**) लुप्त होणें. ४ (**लाक्षणिक**) (कोणेकाचें वैभव, उत्कर्ष, कीर्ति, मान, इ०) नष्ट होणें. ५ (**लाक्षणिक**) मरणें.

मालविणें स० क्रि० १ (दिवा, मशाल, काकडा, इ०) विझविणें. २ (कोण्या माणसाचें किं० पदार्थाचें वैभव, महत्व, उत्कर्ष इ०) कमी करणें किं० हाणून पाडणें; उ० सांगलीकर बोवांनीं पुण्याच्या सर्व हरिदासांना मालविलें.

माला पु० धूळपाटीवर चोपडावयासाठीं केलेला खडू इ० चा गोळा.

माला [**सं०**] **स्त्री०** १ फुलें, मणि, मोतीं, इ० सूत्रांत ओवून करतात ती गुंफणी किं० रचना; माळ. २ ओळ; पंक्ति; रांग. ❀ **मालिक पु०** माळी.

मालिनी [**सं०**] **स्त्री०** १ माळीण. २ स्वर्गंगा. ३ हिंदुस्तामांतील एक नदी. ४ एक समवृत्तविशेष. याच्या प्रत्येक चरणांत न, न, म, य, य, हे गण असून आठव्या अक्षरावर आणि पादान्तीं यति असतो. ❀ **मालिनीवसंत पु०** एक औषधी मात्रा.

मालिन्य [**सं०**] **न०** १ मळकटपणा. २ (**लाक्षणिक**) विद्या, शास्त्र, कला, इ० चा परिपाठ बंद पडल्यामुळें उत्पन्न होते ती विस्मृति.

मालिस्त स्त्री० लागवडीस आणलेली माळजमीन,–दुसऱ्या वर्षासंबंधानें प्रयोग.

माली, महाला, महाली पु० न्हाव्याच्या नांवास जोडावयाचा बहुमानाचा शब्द; उ० हरिमाली, अनंता माली, इ०.

मालीक मागें ' मालक ' पहा.

मालीतुळस स्त्री० रानतुळस.

मालीम [**अ०** मअल्लिम्] **पु०** १ गलबताचा मुख्य किं० व्यवस्थापक. २ सुकाणु धरणारा.

मालीयात [**अ०**] **स्त्री०** १ उत्पन्न; वसूल. २ जिंदगी.

मालीश (–**स**) [**फा०**मालिश्] **स्त्री०**(घोडा,इ० च्या अंगाचें) मर्दन किं० चोळणें.

मालुंड पु०, न० दुतोंड्या साप.

मालुमती वि० खोटा, बनावट (खत, दस्तऐवज).

मालू स्त्री०, मालें न० १ धूळपाटीवर जिचा लेप करतात अशी पांढरी माती; शाडू. २ कणीक, खवा, लोणी, इ० चा गोळा. ३ करंजी, पुरणपोळी,इ०च्या पोटांत घालतात तें पुरण इ०.

मालूम [**अ०** मअलूम्] **वि०** ज्ञात किं० ठाऊक असलेला. ❀ **मालूमात, मालूमाती, मालूमत स्त्री०** एकाद्या गोष्टीची साद्यन्त किं० तपशीलवार हकीगत. **मालूमदानद, मालूममीदानद** कळविण्यांत येत आहे कीं (दरबारी भाषेंत).

मालें न० वतन गेल्यामुळें किं० कोणी भाऊबंद कैदेंत पडल्यामुळें त्यांची सुटका करण्यासाठीं गळ्यांत लाकडाचा लहानसा नांगर बांधून मागतात ती भिक्षा (मागणें). ❀ **मालेकरी पु०** अशा प्रकारें भिक्षा मागणारा मनुष्य.

मालें न० मागें ' मालू ' पहा.

माल्य [**सं०**] **न०** १ फूल. २ माळ.

माव [**सं०** माया] **स्त्री०** १ लबाडी; कपट. २ गौडबंगाल; जादू; इंद्रजाल. ३ पदार्थाची क्षणभंगुरता किं० असत्त्व. ४ क्षत, जखम, फोड, इ० बरें झाल्यावर राहातो तो वण. ❀ **माविक वि०** लबाडीचा; असत्य; भ्रमरूप. **मावेचा मृग पु०** दिसण्यांत भपकेदार किं० टुमदार पण वस्तुतः पोकळ, निःसत्त्व, किं०अशक्त. **मावेचें मंथन न०** १ बढाया. २ पोकळ आश्वासन. ३ ढोंग.

मावडें स्त्री० काहिलींत कढत असलेला ऊसाचा रस ढवळण्याचा लाकडाचा पळा.

मावणें अ० क्रि० बारदानांत साठविला जाणें किं० भरला जाणें किं० राहूं शकणें.

मावंदें, मावंधें न० याला संपवून घरीं परत आल्यावर करतात तो उत्सव.

मावली [**म०** माय] **स्त्री०** पवित्र किं० मानार्ह स्त्री.

मावशी (–सी) स्त्री० आईची बहीण. ❀ **मावसा पु०** मावशीचा पति. **मावसभाऊ पु०** मावशीचा मुलगा. **मावसबहीण स्त्री०** मावशीची मुलगी.

मावसाळें [**म०** माणूस] **न०** नवरा मुलगा, देवाची दिंडी, इ० ची मिरणूक किं० मिरवणुकींतील लोक समुच्चयानें.

मावळ [**म०** मावळणें] **न०** सह्याद्रींच्या लगतचा भूप्रदेश. हा सुमारें चाळीस मैल पूर्वेकडे रुंद असून त्याच्यापुढें मुऱ्हें हा भूप्रदेश आहे. ❀ **मावळी वि०** १मावळांत राहाणारा(माणूस). २ मावळांत पिकलेला (तांदूळ). ३ मावळांतील (आचार,शिरस्ता,इ०).४मावळी लोकांचा(मेळा).

मावळंग [**सं०** मातुलंग] **स्त्री०** महाळुंगाचें झाड.

मावळण [**सं०** मातुलानी=मामी] **स्त्री०** १ बापाची बहीण; आत.२ मामाची बायको;मामी.

मावळण [**म०** मावळणें] **स्त्री०** पश्चिमदिशेचा वारा.

मावळणें अ० क्रि० १ (सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रें, इ०) क्षितिजाखालीं जाणें. २ अदृश्य होणें; न दिसेसा होणें;नजरेच्या टप्प्याच्या पलीकडे जाणें. ३ (देवी, कांजिण्या, इ०) बऱ्या होणें किं० बऱ्या होण्याच्या पंथास लागणें. ४ (माणसाचा किं०वस्तूचा उत्कर्ष किं० वैभव)कमी होणें. ५ लोपणें; नष्ट होणें. ६ फूल, पान, इ० मिटणें.

मावळत (–तीं) [**म०** मावळणें] **स्त्री०** पश्चिम दिशा,–जिकडे सूर्य, चंद्र, इ० मावळतात. **मावळत क्रि० वि०** पश्चिमेकडे तोंड करून.

मावळा [**सं०** मातुल] **पु०** आईचा भाऊ; मामा.

मावळी [**म०** मावळ] **पु०** मावळचा राहिवासी. **वि०** मावळांतील. वर ' मावळ'मध्यें पहा.

मावा [**हिं०**] **पु०** (दुधाचा) खवा.

मावा वि० हिरवट आणि पिवळट रंगाचा.

माविक, मावीक वर ' मायिक ' पहा.

माशी[**सं०** मक्षिका] **स्त्री०** १ एक क्षुद्र आणि उडणारा कीट; मक्षिका. २ बंदुकीच्या टोकाला नेम धरण्यास उपयोगी असें असतें तें चिन्ह. ह्या अर्थी ' मासकी ' **स्त्री०** सुद्धां. **मास स्त्री०, न०** माशांचा थवा; एके ठिकाणीं जमलेल्या माशा समुच्चयानें. ❀ **माशा मारीत बसणें** निरुद्योगी बसणें;करावयाला कांहीं काम नसल्यामुळें रिकामें बसणें. **माशी शिंकणें** विघ्न येणें; हरकत येणें; माशीच्या शिंकण्यामुळें कांहीं कामांत हरकत येणें; करावयाचें काम ज्याणें केलें नाहीं त्याच्या उपहासार्थ हा वाक्यप्रचार योजतात;उ०तूं तांदूळ आणावयाला म्हणून गेलास आणि आणले नाहींस, वाटेंत जातां जातां माशी शिंकली काय ? **दागिन्याला माशी लागणें** त्याच्या वरचा सोनें, चांदी, इ०चा पत्रा किं० मुलामा झिजून जाऊन आंतील लाख किं० खालचा वेगळा हीन धातु मधून मधून उघडा होणें. **जेवणाराला माशी लागणें** खाद्यांत माशी गेल्याकारणानें त्याला मळमळूं लागणें किं० वान्ति होणें. **माशा खाणें** (किं० **गिळणें**) उत्तर देतां येत नाहीं म्हणून, वादांत पराभव झाला म्हणून, किं०अंगावर बाज् कोसळली म्हणून कोणी मनुष्यानें खेटरें मारल्यासारखें उतरलेली मुद्रा करून बसणें. **माशी स्त्री०, माशीचें झाड न०** एक झाड,– ज्याचीं पानें फोड उत्पन्न करण्यासाठीं विशिष्ट त्वचेवर बांधतात. ह्या झाडाचें फूल लहान असून माशीसारखें असतें.

माशूक, माषूक [**अ०** मअषूक] **वि०** रमणीय; उंची; सुंदर. **स्त्री०** रंडी; रखेली. **पु०**स्त्रीनें बाळगिलेला जार. ❀ **आषूक माषूकें न० अ० व०** जार आणि जारिणी; कामविकारानें प्रेरित होऊन प्रेमचेष्टा करणारी स्त्री आणि पुरुष.

माष [**सं०**] **पु०** १ उडीद. २ मासा,–पांच किं० आठ गुंजा हें वजन. ❀ **माषान्न न०** उडदाचें खाद्य,–वडा इ०.

मास [**सं०**] **पु०** महिना. ❀ **मासपक्ष**

पु० ए० व० सुमारें महिन्याचा अवधि. **मासनहाण** (**–न्हाण, न्हाणें**) **न०** लग्नानंतर वधूवरांचें एके ठिकाणीं बसून न्हाण्याचा विधि. मागें ' आठ ' मध्यें पहा. **मासवंदन न०** मासन्हाण. **मासान्त पु०** त्रयोदशीपासून प्रतिपदेपर्यंत जे चांद्रमासाचे दिवस ते प्रत्येक. **मासिक वि०** १ दरमहिन्याचें. २ दरमहिन्यास करावयाचें. **न०** १ मृत मनुष्यासाठीं वर्षभर जें प्रतिमासीं करतात तें श्राद्ध. २ महिन्याचें वेतन. ३ दरमहिन्यास एक एक अंक छापून प्रसिद्ध करावयाच्या संकल्पानें चालवलेलें पुस्तक.

मास [**म०** माशी] **न०** वर ' माशी ' मध्यें पहा.

मांस [**सं०**] **न०** प्राण्याच्या शरीरांत हाडांच्या वर आणि कातडीच्या खालीं असतें तें मऊ आवरण. ꙮ **मांसओटी स्त्री०** गाय, म्हैस, इ० ची दिसण्यांत मोठी पण आंत दूध थोडें अशी ओटी. **मासकंड, मांसकण, मांसगण न०** १ मांस (निर्देत). २ जखमेंतून बाहेर लोंबणारें मांस. **मांसभरू वि०** गीरदार किं० लठ्ठ फळ (आंबा इ०). **मांसमत्सर, मांसमच्छर न०** मासे, मांस, इ० भक्ष्य पदार्थ; उ० मांसमच्छर खाणाऱ्यांच्या शेजाराला ब्राह्मणाचें घर नसतें. **मांसल न०** १ मांसमय. २ स्नायुयुक्त. ३ लठ्ठ (प्राणी, गाल). ४ पुष्ट; चांगला पोसलेला आणि लठ्ठ. ५ गंभीर (ध्वनि). ६ पुष्कळ गिराचें (फळ). **मांसाळ वि०** मांसमय; लठ्ठ; ज्याच्या पासून पुष्कळ मांस मिळूं शकतें असा (बकरा इ० लठ्ठ प्राणी). **मांसुरडा, मासोरडा पु०, मांसुरडें, मांसोरडें न०** मांस (तुच्छतेंत).

मासकी मागें ' माशी ' अर्थ २ पहा.

मासडभात न० तांबूस रंगाचें भात.

मासनहाण न० ' मास ' मध्यें पहा.

मासला [**अ०** मिस्लाह्] **पु०** १ पदार्थाचा नमुना. २ पदार्थाचा लहानसा अंश,–ज्यावरून त्याचें रूप, स्वाद, रुचि, इ० ठरविली जाते. ꙮ **मासलेदार, मासलेवाईक वि०** १ नमुना म्हणून घ्यावयाजोगा. २ उंची दर्जाचा. ३ विचित्र नऱ्हेचा.

मासवंदन मागें ' दस ' मध्यें हा शब्द पहा.

मासळी [**म०** मासा] **स्त्री०** १ विकण्यासाठीं धरलेले मासे समुच्चयानें. २ हरएक प्रकारचे मासे समुच्चयानें. ꙮ **मासळी बाजार पु०** १ मासे जेथें विकले जातात तो बाजार. २ (**लाक्षणिक**) अतोनात कलकल जेथें चालते असें ठिकाण.

मासा [**सं०** मत्स्य; **हिं०** मच्छी] **पु०** जलांत राहणारा एक प्राणी. ꙮ **जळांत राहून माशांशीं वैर करूं नये** परिस्थिति असेल तशी पथकरावी; तिच्याबद्दल चरफडूं नये. **माशाच्या पोराला पोहावयाला शिकवावयास नको** माशाला पोहोणें उपजतच येत असतें. **माशानें गिळलेलें माणिक** आपल्या खास मालकीची परंतु पुन्हां परत कधींही न मिळणारी संभावित चोराच्या हातीं गेलेली वस्तु. **माशाचें जाळें न०** अत्यन्त विरळ विणीचें वस्त्र; अति झिरझिरीत वस्त्र. **मासेगाळणा वि०** अत्यन्त विरळ विणीचें (वस्त्र). **मासेगाळणें न०** अत्यन्त झिरझिरीत वस्त्र. **मासोळीबाळी, मासेबाळी स्त्री०** माशाच्या आकाराचें स्त्रियांचें एक कर्णभूषण. **मासोळी स्त्री०** माशाच्या आकाराचें स्त्रियांचें पायाच्या बोटांत घालवयाचें भूषण. **मासेवळण न०** १ गमनामध्यें एकदम दिशा बदलणें (पाण्यांत फिरणाऱ्या माशाप्रमाणें). २ त्रेधा; घाबरगुंडी. ३ भीतीनें तकटधूम पळणें. **मासोळी स्त्री०** १ मासा. २ मासे समुच्चयानें. ३ गायीम्हशींची लठ्ठ कास.

मासूक [**म०** माशी] **न०** माशी (तुच्छतेनें). ꙮ **मासूकमारा वि०** १ अत्यन्त तल्लख (तंबाखू, भांग, तपकीर, इ०). २ अपशकुनी दृष्टीचा (माणूस इ०).

मासोळी [**म०** मासा] **स्त्री०** १ मासा. २ स्त्रियांचें पायाच्या बोटांत घालण्याचें भूषण. ३ गायी म्हशींची लठ्ठ कास. ꙮ **मासोळी बाजार पु०** १ मासे विकण्याचें ठिकाण. २ (**लाक्षणिक**) जेथें फार कलकल चालते असें ठिकाण.

माह [**फा०** माह्] **पु०** महिना. ꙮ **माहबमाह क्रि० वि०** महिन्याच्या महिन्यास; दर महिन्यास. **माहवारी, माहेवारी स्त्री०** महिन्याचा ठरलेला पगार.

माहाग इ० मागें ' महाग ' इ० पहा.

माहात्म्य [**सं०**] **न०** १ प्रताप; वैभव; महत्त्व. २ मनाचा मोठेपणा; औदार्य. ३ विशालपणा. ४ देव, साधुपुरुष, इ० चें वैभव किं० त्यांच्या वैभवाचा ग्रंथ; उ० देवीमाहात्म्य. ५ तेज; महिमा.

माहतानी [अ०] **क्रि० वि०** ताब्यांत.

माहदतअसारी [**फा०** मवदूतआसार] **वि०** स्नेहांकित (दरबारी भाषेत).

माहबलमक्सूद, माहबलमराम [**फा०** मुहब्बालीमक्सूद; मराम्] **स्त्री०** विनंती.

माहिती, माहितगार खालीं ' माहीत ' मध्यें पहा.

माहिष [सं०] वि० म्हैस किं० रेडा ह्यांचें पासून मिळालेलें.

माही [**सं०** माघ] **वि०** माघ महिन्यांतील. **पु०, स्त्री०** माघ हा महिना (बायकी शब्द).

माहीत [**अ०** माहीयत] **स्त्री०** ज्ञान; जाणीव. **वि०** परिचयाचें; ज्ञात; ठाऊक असलेलें. ॐ **माहितगार वि०** ज्याला एकाद्या विषयाची किं० प्रसंगाची तपशीलवार माहिती आहे असा; अनुभविक. **माहिती स्त्री०** परिचय; ज्ञान.

माहीमरातब, माहीमुरातब [**फा०** माहीमरातिब्] **पु०** राजा किं० मोठे सरदार ह्यांना पूर्वी देण्यांत येत असें तें बहुमानाचें चिन्ह,-जें मिरवणुकींच्या प्रसंगीं त्यांच्या पुढें चालविलें जात असे. हें चिन्ह सोन्याचा एक मासा, दोन गोल किं० दोन मुखवटे आणि दोन आबदागिरी ह्या रूपाचें असे.

माहुटी स्त्री० घराच्या छपराचे वांसे एका रेषेंत छाटून त्यांच्या अग्रांना बसविलेली असते ती फळी. ह्या फळीला 'पानपट्टी,' 'माहुटीचें पान' असेही शब्द आहेत.

माहुरा, माहुरी वि० माहूरदेशचा (म्हैस, रेडा, इ०).

माहुरें न० अ० व० विकावयाचे मासे.

माहुली स्त्री० एक झाड.

माहुळुंग मागें ' महाळुंग ' पहा.

माहुत [**हिं०**] **पु०** हत्तीला हाकणारा; हात.

माहे [**फा०** माह=महिना] **पु०** महिना. महिन्याच्या नांवामागें हा शब्द घालतात; उ० माहे रमझान्, माहे चैत्र, इ०. ॐ **माहे गुदस्त पु०** मागला महिना. **क्रि० वि०**गेल्या महिन्यांत. ह्या अर्थी ' माहे गुदस्तां ' सुद्धां. **माहेवार क्रि० वि०** महिन्याच्या महिन्यास; दर महिन्यास. **माहेवारी स्त्री०, माहेवार न०** दर महिन्यास अमुक पगार इ० द्यावयाचा ठराव.

माहेर, माहेरघर [**म०** माय+घर; **सं०**मातृ+गृह] **न०** १ आईचें घर. २ वैभवाचें किं० भरभराटीचें स्थान; उ० एके काळीं पैठण शहर व्यापार आणि कलाकौशल्य ह्यांचें माहेरघर बनलें होतें. ३ उत्पत्तीचें स्थान; उ० पोपई हें खरजेचें माहेर आहे. ॐ **माहेरवाट स्त्री०**मुलीची उजव्या कानशिलावरची बारीक वेणी. ' सासुरवाट ' म्ह० अशीच डाव्या कानशिलावरची वेणी.

माहेरवाशीण, माहेरवासी, माहेरकरीण स्त्री० लग्न झालेली मुलगी ही तिच्या आईबापांच्या घरची माहेरवाशीण आणि नवऱ्याच्या बापाच्या घरची सासुरवाशीण.

माहो [**सं०**माघ]**पु०** माघ महिना(अडाण्यांत प्रयोग). ॐ **माहो आणि हिंवाचा लाहो** माघ महिन्यांत हिंवतापाची साथ येते.

माळ [**सं०** माल=जंगल, मोठें पठार] **पु०** १ खडकाळ आणि विस्तीर्ण प्रदेश. २ जेथें चांगलेंसें शेत होत नाहीं अशी जमीन. ३केवळ तक्ते किं० बांबूच्या कामट्या आंथरून आणि माती न घालतां जिचा पृष्ठभाग केला आहे अशी माडी. ॐ **माळमुरूड, माळमुरडाण न०** ओढ्याच्या कांठचा प्रदेश; उ० यंदा काळी पिकली नाहीं पण माळमुरूड चांगलें पिकलें. **माळचा धोंडा, माळावरचा धोंडा पु०** माळावरील धोंडा कारागिराच्या कौशल्यानें किं० तो उचलणाऱ्याच्या सुदैवानें किं० दुर्दैवानें कुरूप किं० सुंदर रूप धारण करूं शकतो. ह्यावरून विकलेल्या मालासंबंधानें दुकानदार गिऱ्हाइकाशीं बोलतांना ' माळचा धोंडा ' किं० ' माळावरचा धोंडा ' असें म्हणतो. त्याचा अर्थ असा.' हा पदार्थ मी तुम्हाला विकला, तो आतां तुमचा झाला. तो तुमच्या नशीबानें चांगला ठरेल किं० वाईट

ठरेल; त्याची जबाबदारी माझ्याकडे नाहीं. 'मागें 'खारा' मध्यें 'खारी माती' पहा. **माळजमीन स्त्री०, माळरान न०** उंचवट्यावर असलेला खडकाळ किं० धोंडाळ प्रदेश. **माळवट वि०** खडकाळ (प्रदेश).

माळ [सं० माला] **स्त्री०** १फुलें,मणि,रुद्राक्ष, इ० सूत्रांत ओंवून हात, गळा, इ०मध्यें घालण्यासाठीं करतात ती रचना. २ फुलाच्या पाकळ्यांचा घेर; उ०हें जास्वंदीचें फूल एकमाळ (किं० दुमाळ किं० तिमाळ) आहे. ३ जप करण्यासाठीं मणि इ० सूत्रांत ओंवून करतात ती रचना. ४ राहाटाचे लोटे दोरीला बांधून करतात ती रचना. ही रचना इकडे तिकडे सरकूं नये म्हणून ज्या दोन काठ्या माळेच्या दोन्ही बाजूंस ठेवितात त्यांना 'माळकाठ्या' म्हणतात. ५ एकापुढें एक असे पशु, माणसें, पदार्थ, इ० यांची रांग. ६ नवरात्रांत देवीवर दररोज लोंबत सोडतात तो फुलें ओंविलेला दोरा. ७ (वरील क्रमाला अनुलक्षून) नवरात्राच्या सुरवातीपासून मोजलेला दिवस; उ० आजची पांचवी माळ आहे (म्ह०नवरात्र सुरू होऊन आजचा पांचवा दिवस). ८ सूत काढण्याच्या चरक्याच्या मोठ्या चाकाची गति चातीला किं०सळईला देणारा दोऱ्याचा बंध. ९ लग्नाच्या विधीमध्यें वधू आणि वर एकमेकांच्या गळ्यांत घालतात त्या माळा प्रत्येक. ह्या माळा वधूवरांनीं एकमेकांचा केलेला स्वीकार दर्शविणाऱ्या असतात. ह्यावरून 'कोणेकाला कांहीं कामाची माळ घालणें' म्ह० तें काम त्याच्याकडे सोपविणें किं० तें काम त्याणें करावें असें ठरविणें.'कोणेकाच्या गळ्यांत कांहीं कामाची माळ पडणें' म्ह० तें काम त्याच्याकडे सोपविलें जाणें. **माळखंड न०** पायराहाटाची खूप मोठी माळ किं०तिचा एक तुकडा. **कांहीं कामाचें माळखंड कोणेकाच्या गळ्यांत पडणें** त्या कामाचा भार किं जबाबदारी सर्वथैव त्याच्यावर येणें किं० त्याच्यावर टाकली जाणें.

माळका,मालिका [सं० मालिका] **स्त्री०** १ माळ. २कंठी.३ हार. ४ रांग. ५ एकामागून एक असा कोणत्याही गोष्टीचा किं० व्यक्तींचा अखंड क्रम किं० सरणी.

माळकाठा स्त्री० वर 'माळ' मध्यें अर्थ४पहा.

माळवंचा पुढें 'माळोंचा' पहा.

माळवद,माळोद [म०माळा] **न०**घराच्या माथ्यावर कौलें न घालतां मातीचा जाडी थर आंथरून करतात तें ऊन्ह, पाऊस, इ० पासून निवारण; धाबें. **वि०**असें निवारण असलेलें(घर). **माळवदी वि०**धाब्याचें(घर). [असें घर.

माळवद [म० माळ]**वि०**ज्याला माळा आहे

माळवें [म० मळा] **न०** मळ्यांत उत्पन्न केलेली भाजी, फळें, इ०. ॐ **माळसात स्त्री०** १ मळ्यांत उत्पन्न केलेल्या भाज्या, फळें, इ०चा बाजार किं० बाजाराचा भाग. २ बाजारांत माळवें विकणाऱ्या दुकानांची ओळ. ३ माळवें पिकविणारे किं० विकणारे लोक समुच्चयानें. **माळहट पु०** माळवें विकण्याचा बाजार.

माळा पु० १ घराच्या तुळयांवर आडवे वांसे घालून त्यावर कामट्या बांधून छपराखालीं काढलेली ठेंगणी माडी. २ शेताची राखण करणाऱ्यासाठीं चार खांब उभे पुरून उंचावर तात्पुरती करतात ती जागा. ३ घर बांधावयास लावलेले गवंडी, सुतार, इ० ना उंचावर उभें राहाण्यासाठीं करतात ती रचना; पहाड; परांची.

माळी [सं० मालिक] **पु०** बागा लावणारे किं० बागेंतील फुलें, भाज्या, फळें, इ० विकणारे जे लोक, त्यांची किं० फुलें, हार, तुरे, इ० करून विकणारे जे लोक त्यांची जात किं०त्या जातीचा इसम. **माळिण स्त्री०**१ माळी जातीची स्त्री किं० माळ्याची पत्नी. २ नाकांत होतो तो फोड. हा फोड सुवासिक फुलें हुंगलीं असतां बरा होतो अशी समजूत आहे. ॐ **माळिणीसारखी चोळी स्त्री०** लांब बाह्यांची चोळी (ब्राह्मणी बायकांत ह्या शब्दाची रूढि आहे).

माळू पु० मृदंगाच्या पुडास जें कातड्याचें कडें बसविलेलें असतें तें किं० तें कडें ताणावयाची वादी.

माळोंचा पु० १ शेत राखणारासाठीं चार खांबांवर किं० झाडाच्या फांद्यांवर उंच करतात ती रचना. २ घरांत पदार्थ ठेवण्यासाठीं चार खांबांवर खोली, माजघर, इ०च्या कोपऱ्यांत करतात ती रचना. ३ घराचा माळा हा भाग.

माळोंचें [**म०** माळा] **न०**माळ्यांत शिरावयाचें भोक.

माळोद मागें ' माळवद ' पहा.

माक्षिक [**सं०**] **न०** १ मध.२ एक खनिज पदार्थ. ह्याचे सुवर्णमाक्षिक आणि रौप्यमाक्षिक असे दोन प्रकार आहेत.

मिचकट वि० घाण; ओंगळ; मळलेला. ॐ **काळा मिचकट वि०**काळा आणि ओंगळ(पदार्थ).

मिचकटणें [**म०** मिचकट] **अ०क्रि०**ओंगळ, घाणेरडा, मळलेला, कळकट, किं० गलीछ होणें.

मिचकणें, मिचकावणें स० क्रि० वेगानें (डोळे) उघडणें आणि मिटणें.

मिचका, मिचमिचा वि० वेगानें डोळ्यांची उघड झाप करण्याची खोडी असलेला (मनुष्य) किं० वेगानें उघडणारे आणि मिटणारे (डोळे).

मिचकूट, मिचकुटणें मागें ' मिचकट, ' ' मिचकटणें ' पहा.

मिजागरें न०, मिजागरी स्त्री० मागें' बिजागरें, ' ' बिजागरी ' पहा.

मिजाज, मिजास [**अ०** मिझाज्] **स्त्री०** १ प्रकृति; तब्यत; तब्येत.२चोखंदळेपणा; चिकित्सेखोरपणा (निंदेंत). ३ ऐट; तोरा; नखरा (निंदेंत). ॐ **कोणेकाची मिजास ठेवणें**(किं० **राखणें**)त्याच्या मर्जीचा कल पाहून त्याच्याशीं वागणें; त्याला आवडेल तें बुद्धिपुरस्सर करणें. **मिजाज (-स-) खोर, मिजासी वि०** १ चोखंदळा . २ ऐट करणारा.

मिटका पु० १ चिकटणें;चिकटलेपणाची किं० मिटलेपणाची स्थिति (बसणें). २ घट्ट घातलेली मिठी.

मिटकावणें स० क्रि० (डोळे,ओठ,हाताची बोटें, इ०) घट्ट मिटून ठेवणें.

मिटकी स्त्री० आवडता खाद्य किं० पेय पदार्थ तोंडांत गेल्यावर समाधानाचा आवाज जो तोंडांतून बाहेर पडतो तो (मारणें). ॐ **मिटक्या मारीत बसणें** १ पुढें मिळणाऱ्या सुखाबद्दल किं० उपभोगाबद्दल अगोदरच आनंद मानीत बसणें. २ ज्या पदार्थावर मन गेलें आहे त्याचेबद्दल मनोराज्य करीत बसणें.

मिटणें स० क्रि० १ (वाद, भांडण, इ०)बंद करणें, थांबविणें, किं०संपविणें.२(दार, खिडकी) झाकणें. **अ० क्रि०** १ (दार, खिडकी इ०) बंद होणें किं० झाकलें जाणें. २ (वाद, तंटा, इ०) संपणें. ३फुलाच्या पाकळ्या, पानें, इ०) आकुंचित दशेतें पावणें.

मिठण न० गर्दी, दाटी, खेचाखेच (घालणें, पडणें, होणें).

मिठपाणा, मिठाणा पु० भाजलेले वाल इ० द्विदल धान्य मीठ इ० घालून शिजवून करतात तें खाद्य.

मिठवणी [**म०** मीठ+पाणी] **न०** खारट पाणी; ज्यांत मीठ आहे किं० घातलें आहे असें पाणी. **मिठवणी** [**म०** मीठ] **स्त्री०** स्वयंपाक घरांत रोजच्या उपयोगासाठीं लागणारें मीठ भरून ठेवण्याचें लहान बारदान.

मिठविणें [**म०** मीठ] **स० क्रि०** वाल इ०-ना मिठाचें पाणी लावणें (भाजण्याचे पूर्वी).

मिठा, मिठ्ठा [**सं०** मिष्ट; **हिं०**मीठा] **वि०** १ गोड. २ रुचकर; स्वादिष्ट. ॐ **मिठाई स्त्री०** पेढे, बरफी, इ० गोड खाद्य. **मिठाठक पु०** गोड गोड बोलून लोकांना फसवितो तो. **मिठाबार पु०**फळांचा पहिला बार. दुसऱ्या बाराला'खट्टाबार ' म्हणतात.

मिठागर [**म०** मीठ+आगर] **न०** मीठ पिकविण्याची जागा; समुद्रकांठीं किं० खाडीकांठीं खारें पाणी सूर्याच्या उन्हानें आटवून जेथें मीठ तयार केलें जातें तो प्रदेश. अशा प्रकारें मीठ तयार करणाऱ्या लोकांना ' मिठागरी ' म्हणतात.

मिठाण न० वर ' मिठण ' पहा.

मिठाणा पु० वर ' मिठपाणा ' पहा.

मिठाणें [**म०**मीठ] **न०** मिठाचें भांडें.

मिठास [**म०** मीठ किं० **सं०** मिष्ट] **स्त्री०** गोडी. **वि०** गोड; रुचकर.

मिठी स्त्री० १ गोड पदार्थ फार खाल्ल्यानें येते ती शिसारी किं०येतो तो वीट (बसणें).२घट्ट आलिंगन (मारणें, घालणें). ॐ **एकाद्या पदार्थावर मिठ्या पडणें** तो मिळविण्यासाठीं अनेक

कांचे एकदम प्रयत्न चालणें; उ०यंदा आंब्या-वर मिथ्या पडल्या.

मिथ्या, मुथ्या पु० रोमणीच्या माथ्यावरचा दांडा.

मिडकणें [तेलगू] **अ० क्रि०** आशेनें एकाद्या पदार्थाबद्दल उत्सुक होऊन बसणें.

मिणमिणा (–ण्या), मिणमिणीत वि० अंधक (प्रकाश); अंधक प्रकाश देणारा (दिवा).

मित [**सं०**] **वि०** १ मोजलेलें; मापलेलें. २ मर्यादित. ३ अल्प. ४ बेताचा; अधिक नाहीं आणि कमी नाहीं असा; असावा तितका किं० तेवढा; उ० मिताहार, मितभाषण, मितव्यय, इ०.॥ **मिताक्षरी स्त्री०** एक सांकेतिक भाषा. ह्या भाषेंत एका वर्णाबद्दल दुसरा वर्ण योजण्यांत येतो आणि ज्यांना हा संकेत ठाऊक आहे त्यांनाच एकमेकांचें बोलणें किं० लिहिणें समजतें.

मिती [**सं०** मिति] **स्त्री०** १ मोजणी; मापणी. २ मर्यादा; मोजमाप. ३ इयत्ता; परिमाण. ४ वजन. ५ प्रमाण; पुरावा. ६(**मराठींत**) मराठी महिन्याची तिथि; उ० आजची मिती आश्विन शुद्ध प्रतिपदा. ७ (**मराठींत**) व्याज किं० व्याजाचा दर; उ० आम्हाला शेकडा दीड रुपया मिती आहे.

मित्र [**सं०**] **पु०** १ सूर्य. २ दोस्त;सोबती.

मिथः [**सं०**] **क्रि० वि०** १ परस्परांशीं. २ गुप्तपणें; एकांतांत.

मिथणें अ० क्रि० १ संघटित होणें; एकमेकांशीं जुळणें किं० एकमताचे होणें.

मिथुन [**सं०**] **न०** १ एकजातीय अशा दोन वस्तूंची जोडी. २ स्त्रीपुरुष, नरमादी, इ० जोडी. ३ जोडपें; युग्म. ४ ऐक्य; एकी. ५ जुळें. ६ मैथुन. ७ (**ज्योतिष**) बारा राशींपैकीं तिसरी. मागें ' तुला ' मध्यें ह्या बारा राशींचीं नांवें पहा.

मिथ्या [**सं०**] **क्रि० वि०** १ खोटेपणानें; गैरशिस्त रीतीनें. २ विनाकारण; व्यर्थ. **वि०** (**मराठींत**) खोटा; निराधार; भ्रममूलक. ॥ **मिथ्यात्व न०** खोटेपणा; असत्य; भ्रम. **मिथ्यादृष्टि स्त्री०, मिथ्यादर्शन न०** नास्तिकपणा; पाखंड मत. **मिथ्यामति स्त्री०** भ्रम; भ्रान्ति. **मिथ्यापवाद पु०** खोटा आळ.

मिंधा वि० १ उपकाराखालीं दबलेला किं० ओशाळा असलेला; उ० मी नाहीं करीत तुझें काम, मी कांहीं तुझा मिंधा नाहीं. २ पूर्वीच्या प्रसूतीनंतर विटाळशी न होतां गरोदर झालेल्या स्त्रीचें (अपत्य)–मिंधा मुलगा, मिंधी मुलगी, मिंधें मूल. अशा गरोदर स्त्रीस ' मिंधी गर्भार ' म्हणतात; आणि अशी गरोदर होऊन प्रसूत झालेल्या स्त्रीस ' मिंधी बाळंतीण ' म्हणतात. मिंध्या मुलांस विजेपासून भीति असते अशी समजूत आहे.

मिनणें अ० क्रि० संलग्न होणें; मिळणें;जुळणें.

मिनत, मिन्नत [**अ०** मिन्नत=कृपा, उपकार] **स्त्री०** मनधरणी; प्रार्थना. ॥ **मिनतवारी, मिनती स्त्री०, मिनतमाना पु०** कोणेकाची केलेली मनधरणी, प्रार्थना, किं० आर्जवें. **मिनतीनें, मिनतवारीनें क्रि० वि०** मोठ्या प्रयासानें; भारी कष्टानें; फार भीड घालून.

मिनमेख क्रि०वि० अगदीं विनशर्त (हुकूमनामा, फैसला, तोड, उत्तर, बोलणें).

मिनला [**म०** मिनणें] **वि०** १ संलग्न झालेला. २ भेटलेला. ३ (कोणेकाशीं) एकरूप झालेला किं० तादात्म्य पावलेला.

मिनहू [**अ०**] **वि०** त्याच महिन्यांतील (तारीख).

मिना [**फा०**मीना] **पु०** एक प्रकारचा हिरवा दगड,–ज्याचा रांधा करून त्याचा पातळ थर चांदीच्या भांड्यावर करतात.॥ **मिनेगार, मिनागार पु०** मिन्याचें काम करणारा कारागीर. **मिनेगार, मिनागार वि०** मिन्यानें शोभित केलेला (अत्तरदाणी, गुलाबदाणी, इ० पदार्थ). **मिनाबाजार पु०** ज्या बाजारांत दुकानें चालविणाऱ्या बायकाच असतात आणि खरेदी करणाऱ्या बायकाच असतात आणि जो आनंदाच्या किं० उत्सवाच्या प्रसंगीं थोडक्याच दिवसांपुरता भरविलेला असतो तो. अशा बाजारांत बहुधा स्त्रियांच्याच उपयोगाचे जिन्नस विक्रीकरतां ठेविलेले असतात. असले बाजार अकबरानें रूढ केले असें म्हणतात. [बोंडी.

मिनी स्त्री० स्त्रीचा स्तन किं० स्तनाची

मिन्नत, मिन्नतवार इ० मागें ' मिनत ' ' मिनतवार ' इ० पहा.

मिरका पु० शेळ्या आणि मेंढ्या पाळणारा. ह्याच अर्थी ' मिरका धनगर ' हा शब्द आहे. **खिलारी धनगर** पु० गायी म्हशी आणि शेळ्या मेंढ्या असें दोन्हीं प्रकारचे प्राणी पाळणारा. मागें ' खिलारी ' मध्यें 'खिलारी धनगर' पहा.

मिरकुट,सुरकूट न० एक क्षुद्र उडणारा जंतु.

मिरागेटाण स्त्री० तेलकट पदार्थ, किं० तेल, तूप, लोणी, इ० जळत असतां सुटते ती घाण.

मिरगी स्त्री० १ फेपऱ्याची वेशुद्धि. २ पित्तादिकांनीं येते ती घेरी. ॐ **मिरगीवर येणें** रागानें बेफाम होणें. मागें ' तिरगी मिरगी ' मध्यें पहा.

मिरची [सं० मरीच, मरिच '] स्त्री० एक तिखट फळ किं० त्याचें झाड. खाद्य पदार्थाला तिखटपणाची चव येण्यासाठीं ह्याचें चूर्ण त्यांत घालतात.

मिरधा [हिं०] पु० १ राजा, वडेलोक, इ० च्या स्वारी पुढें चालणाऱ्या भालदार इ० चा नायक. २ जासूद, हरकारे, इ० चा नायक. ३ गांवचा चौघुला हा अधिकारी.

मिरमिटा वि० शोपांचा वास किं० रुचि ज्यास आहे असा (आंबा इ० फळ).

मिरमिर स्त्री० अक्कलकारा, पिंपळी, इ० पदार्थांनीं तोंडांत उत्पन्न होते ती भावना.

मिरमिट न० एक काळ्या रंगाचा क्षुद्र उडणारा कीट.

मिरमुटणें, मिरपुटण अ० क्रि० १ (झाड, मनुष्य, पशु, इ०) खुरटणें किं० वाढेनासें होणें. २ (कांहीं काम, धंदा, योजना) कुंठित होणें किं० बंद पडणें. ३ रागानें निवून जाणें.

मिरवण, मिरवणूक, मिरवणी [म० मिरवणें] स्त्री० अनेक लोकांनीं लग्न, सार्वजनिक कार्य, इ० प्रसंगीं सावकाश गांवाच्या रस्त्यांतून एकाद्या विशिष्ट स्थळास चालत जाणें.

मिरवणें अ० क्रि० १ थाटमाट करून ऐटीनें हिंडणें किं० फिरणें. २ (अनेक लोकांनीं) लग्न इ० समारंभाच्या प्रसंगीं सावकाश पावलें टाकीत चालत जाणें. ३ शोभिवंत होणें किं० दिसणें. ४ ऐटींत आणि दिमाखांत चालत जाणें. **मिरवीणें** स०क्रि० (देवाची पालखी, रथ, दिंडी, साधु, इ०) थाटमाटानें गांवांतून हिंडविणें. २(ज्ञान, विद्वत्ता, शरीरसामर्थ्य, इ० ची) ऐट दाखविणें. ॐ **मिरवा मिराविणें** डौलानें हिंडणें.

मिरा पु०, **मिरें, मिरूं** न० [सं० मरिच, मरीच] जोंधळ्या एवढें एक तिखट, काळें, आणि कांटेरी फळ. ॐ **मिरकाढा** पु० मिऱ्यांचा काढा. **मिरकूट** न० मिऱ्यांचें चूर्ण. **मिरगोंड** न० मिऱ्यांचा झाडावरचा घोस. **मिरगोंड, मिरबोंड** न०, **मिरघाटा** पु० उडीद इ० च्या पिठांत मिरे घालून तळून तोंडीलावणें करतात तें. **मिरपूड** स्त्री० मिऱ्यांचें चूर्ण. **मिरबोंडी मिरची** स्त्री० लहान आणि कोंवळी मिरची. **मिरवणी** न० मिऱ्याच्या काढ्याचें पाणी. **मिऱ्याएवढा** वि० अत्यंत लहान (उपहासांत). **तीन मिऱ्यांची उतरंड** स्त्री० लहान मूल (थट्टेंत). **अन्नसत्रां जेवणें आणि मिरपूड मागणें** दुसऱ्याच्या उपकारशीलतेनें फुकट मिळालेल्या वस्तूंत समाधान न मानतां ती वस्तु अधिक चांगली करून द्या असें त्याला ह्मणणें (हा निर्लज्जपणा होय). **निर्मारा** (-ऱ्या) वि० झोंबरें किं० कुचकें (भाषण किं० तसें भाषण करणारा मनुष्य).

मिराशी, मिरासदार खालीं ' मिरास ' मध्यें पहा.

मिरास [अ०] स्त्री० १ गांवकीचें वंशपरंपरेनें चालणारें कांहीं काम. २ जमीनीचा सारा. ॐ**मिराशी** पु० १ गांवच्या महारकीच्या उत्पन्नाचा अंश ज्याला मिळतो असा महार. २ कोणत्याही वंशपरंपरेनें चालणाऱ्या वतनाचा किं० त्या वतनाच्या अंशाचा उपभोग घेणारा माणूस. ३ कोणीही महार.

मिरी [फा०] पु० १ पैसे, कवड्या, इ० च्या खेळांत पहिल्यानें खेळण्याचा अधिकारी. २ वर तोंड करून पडलेली कवडी.

मिरी स्त्री० धोतर, साडी, इ० ची निरी.

मिरीतल्फ [फा०] पु० (पत्यांच्या खेळांत) राजांचें पान टाकणें.

मिलाफ [अ०] पु० संयोग; जुळणी. ॐ

मिलाफी पु० कोणेकाचा कांहीं कामांतील साथिदार किं० मदतनीस.

मिलांव न० पोलाद.

मिलिंद [सं०] पु० भ्रमर; भुंगा.

मिल्हा पु० १ बगळ्याच्या जातीचा एक पक्षी. २ ढोंगी माणूस; पवित्रपणाचा किं० साधुत्वाचा डौल मिरविणारा.

मिशाळ [म० मिशा] वि० ज्याच्या मिशा लांब लांब किं० झोकदार आहेत असा.

मिशी [स० श्मश्रु] स्त्री० पुरुषांच्या वरच्या ओठावर उगवतात त्या केशांची एका बाजूची पंक्ति. **मिशा स्त्री० अ० व०** १ पुरुषांच्या वरच्या ओठावरील केशाच्या दोन्ही बाजूंच्या पंक्ति. २ मांजर, वाघ, इ० च्या मुखाजवळचे लांब लांब केश. ३ झुरळ इ० च्या मुखाजवळील दोन अथवा अधिक जे लांब लांब केश असतात ते. ꣸ **कोणेकाच्या मिशा खालावणें** १ त्याची फजिती होणें. २ कांहीं कार्यांत त्याला मागें हटावें लागणें. ३ त्याची बढाई अस्थानीं आहे असें ठरणें. **कोणकाच्या मिशा (किं० मिशी) भादरणें (किं० उतरणें)** त्याची अप्रतिष्ठा करणें; त्याचा अपमान करणें. **मिशीवर (किं० मिशांवर) ताव देणें, मिशा पाजविणें किं० मिशांना पीळ भरणें** तिरस्कारानें, किं० सूड घेण्याच्या इराद्यानें, किं०रागानें मिशा वळविणें; समाचार घेईन, उट्टें काढीन, अशी प्रतिज्ञा करून मिशा वळाविणें किं० पिळवटणें. **मिशांना तूप लावणें** डामडौल करणें; नसत्या श्रीमंतीचा आविर्भाव करणें. **मिशी उतरून देईन** एकादी गोष्ट ठासून सांगावयाची असतां म्हणतात ' मी म्हणतों तें खोटें ठरलें तर मिशी उतरून देईन.' **मिशांवर (किं० मिशीवर) शीत ठेवणें** जवळ द्रव्य मुळींच नसतां श्रीमंतीची ऐट करणें किं० दाखविणें. **मिसरूड न०** नुकती फुटूं लागलेली मिशी.

मिशी [हिं० मिसी; म० मसी] स्त्री० १ वेश्येच्या धंद्यांत शिरूं इच्छिणाऱ्या स्त्रीच्या संबंधानें जो गाणेंवजावणें इ० रूप समारंभ करतात तो. पुढें ' मिस्सी 'पहा.२एक प्रकारचें दंतमंजन.

मिश्र [सं०] वि० १ मिसळलेलें. २ मिसळीचें किं० भेसळीचें. ३ विविध प्रकारचें. ४ एका जातीचा पति आणि दुसऱ्या जातीची स्त्री ह्यांचा (विवाह). ५ मुख्य; श्रेष्ठ. ६ संमान्य; पूज्य; उ० आर्यमिश्र, मंडनमिश्र, इ०. ७ ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीच्या वसतीचा देश किं० त्या जातीचा कोणी इसम. ꣸ **मिश्र-गणित न०**भिन्न भिन्न दरांच्या अनेक जातींच्या पदार्थांच्या मिश्रणाचा एक दर ठरविण्याची अंकगणिताची रीति. **मिश्र अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा अंश, छेद, किं० हे दोन्ही अपूर्णांक असतात त्याला ' मिश्र अपूर्णांक ' म्हणतात.

मिश्रण [सं०] न० १ मिसळण्याची क्रिया. २ भिन्न जातींचे पदार्थ मिसळून होते ती मिसळ.

मिश्री [अ० मिसर] स्त्री० खडीसाखर.

मिष [सं०] न० १ सबब; निमित्त.२ सोंग; कपट; ढोंग.

मिष्ट [सं०] वि० १ मधुर. २ रुचकर. **न०** १ मिठाई. २ पक्वान्न. ꣸ **मिष्टान्न न०** १ सुग्रास असें किं० साखर घालून केलेलें अन्न; पक्वान्न.

मिसकीन, मिसकीळ [अ० मिस्कीन्= गरीब, दरिद्री **] वि०** १ गरीब; अकिंचन. २ लुच्चा; लबाड; धूर्त. ꣸ **मिसकीन बगळा, मिसकीन मात्रागमनी, मिसकीन मादरचोद, मिसकीन मारवाडी पु०** दिसण्यांत किं० बोलण्याचालण्यांत साधा आणि सरळ पण खरोखर कपटी किं० लबाड. [(काळा).

मिसकूट [सं० मसीकूट] क्रि० वि०अत्यन्त

मिसमिशीत, मिशमिशीत वि० १निर्वीर्य; निर्बल; अशक्त; कर्तृत्वशून्य. २ स्पर्शेंद्रियाला मृदु म्ह०ताठर किं०टणक नव्हे असा;विशविशीत.

मिसरी [अ० मिसर्] स्त्री० खडीसाखर.

मिसरूड न० मागें ' मिशी ' मध्यें पहा.

मिसल [अ० मिस्ल्]स्त्री०सभा,दरबार,इ० मध्यें कोणेकाचें जें त्याच्या दर्जाप्रमाणें स्थान तें; याच अर्थानें ' मिसल बाजू.'

मिसळ स्त्री०, मिसळा पु० [म० मिसळणें; सं० मिश्रण] १ अनेक पदार्थांचें मिश्रण म्ह० एकत्रिक करणें किं० मिसळणें किं० ह्या मिसळण्याच्या क्रियेनें बनलेला नवा पदार्थ. २ अनेक जातींच्या किं० दर्जांच्या किं० मतांच्या लोकांचा जमाव.

मिसळण [**म०** मिसळणें] **न०** १ धने, मोहोऱ्या, जिरे, इ०चें मिश्रण,—जें फोडणीच्या तेलांत घालतात तें. २ एका पदार्थांत भरतीला घातलेला दुसरा पदार्थ. **स्त्री०** अनेक पदार्थ मिसळण्याची क्रिया.

मिसळणें [सं० मिश्र] **स० क्रि०** १ (अनेक पदार्थ)एकत्रित करणें.**अ०क्रि०** १(अनेक पदार्थ किं० माणसें) एकत्रित होणें. २ (एका जातीचा एक पदार्थ) दुसऱ्या जातीच्या पदार्थांत एकरूप किं० एकजीव होणें किं० पूर्णपणें अंतर्भूत होऊन जाणें. ३(पतित मनुष्य)पावनविधीनें जातींत परत घेतला जाणें. ४ (एका पोटजातीचा मनुष्य)दुसऱ्या पोट-जातींत समाविष्ट करून घेतला जाणें.

मिसळणें [**म०** मिसळणें] **न०** वर ' मिसळण ' पहा.

मिसळा पु० वर ' मिसळ ' पहा.

मिस्र न० वर ' मिशी ' मध्यें ' मिसरूड ' पहा.

मिस्सी [**सं०** मसी; **हिं०** मिसी] **स्त्री०** हिरडा, मायफळ, लोहचूर्ण, इ० द्रव्यांचें मिश्रण दांतांस लावावयासाठीं करतात तें; दांतवण. ॐ **कोण्या स्त्रीला मिस्सी लावणें**१ तिच्या दांतांस दांतवण लावून वेश्येचा धंदा करावयाची तिला दीक्षा देणें.२तिच्या दांतांस दांतवण लावून आपली रखेली म्हणून बाळगणें.

मिळकत, मिळखत, मिळगत [**म०** मिळणें] **स्त्री०** पगार, सावकारी, धंदा, इ०पासून कोणे-काला द्रव्य, धान्य, इ० जें मिळतें तें; कोणेकाची प्राप्ति.

मिळण [**म०** मिळणें] **न०** पातळ खाद्य घट्ट करण्यासाठीं पीठ, तवकील, इ० जें घालतात तें; उ०बासुंदीच्या दुधांत खवा,ताकांत पेज,इ०.**स्त्री०** जूट, टोळी; उ० हीं सगळीं माणसें एका मिळ-णीचीं आहेत. ॐ **मिळणी, मिळणें** खालीं ' मिळणी पहा.

मिळणी [**म०** मिळणें] **स्त्री०**१ मिळण्याची क्रिया. २ जुळण्याची क्रिया. ३ संयोग. ४ जूट; एकी; एकोपा. ५ मिश्रण. ॐ **कोणी मनुष्य कोणेकाच्या मिळणीं मिळणें**, (किं०**मिळणींत** किं० **मिळणीस**) **असणें** १ तो त्याच्या तंत्रानें किं० लहरीप्रमाणें वागणें. २ तो त्याचा धुंकीझेल्या होणें; तो त्याचा बगलबच्चा असणें किं० होणें.

मिळणें [मील] **अ० क्रि०** १ (द्रव्य,लाभ, नोकरी, पदवी, इ०) कोणेकाला प्राप्त होणें किं० हस्तगत होणें. २(दोन किं० अधिक पदार्थ किं० माणसें)एकत्रित होणें.३एकरूप किं०एकजीव किं०एकमत होणें.४अनुरूप किं० अनुकूल होणें.५ (कोणी मनुष्य) एखाद्या विशिष्ट पक्षाचा किं० मताचा किं० धोरणाचा होणें. ६ भेटणें; भिडणें; टेकणें; संयुक्त होणें. ७ सापडणें; आढळणें; दृष्टोपत्तीस येणें; दिसणें. ८ पकडींत येणें. ९ शक्य होणें किं० असणें; उ० हें कुलूप भलत्याला उघडावयाला मिळणार नाहीं.ॐ**मिळून मिसळून वागणें** मित्रत्वाच्या किं० घरोब्याच्या किं० समतेच्या नात्यानें वागणें.अशा स्वभावाच्या माणसास 'मिळताऊ' म्हणतात.

मिळता [**म०** मिळणें] **वि०** मिळणारा; जुळणारा; अनुरूप. २ मिळण्याजोगा.ॐ**मिळता काळ पु०** उत्कर्षाचा किं० लाभाचा काळ; भर-भराटीचा काल.

मिळता [**म०** मिळणें] **पु०** लाभ; प्राप्ति; मिळकत.

मिळमिळीत वि० १ वेचव; पाणचट.२ कम-कुवत; निर्वीर्य; पराक्रमशून्य. ३ लाभरहित; सुखरहित.

मिळवण [**म०** मिळविणें] **न०** १ मिश्रण.२ कढी इ० पातळ पदार्थांना घट्टपणा आणण्यासाठीं पीठ इ० लावितात तें. ३ गायी, म्हशी, इ०ना पेंड इ० खाऊं घालतात ती.

मिळवणी [**म०** मिळविणें] **स्त्री०** १ दोन किं० अधिक पदार्थ मिसळण्याची क्रिया किं० मिसळून होतो तो नवा पदार्थ. २दोन किं०अधिक रकमा एकांत एक मिळवून होतो तो आंकडा किं० हा आंकडा काढण्याची गणिताची रीति. ३ दोन किं० अधिक पदार्थांची किं० माणसांची किं० पशूंची जुळणी किं० सलोख्याचें साहचर्य. ४ मिलाफ; संयोग.

मिळविणें [**म०** ' मिळणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ दोन किं० अधिक पदार्थ एकाशीं

एक जुळणीनें किं० एकांत एक घालणें किं० मिसळणें. २ दोन किं० अधिक माणसें किं० पशु कांहीं कामासाठीं जुळविणें किं०त्याचें सलोख्याचें साहचर्य घडवून आणणें. ३ दोन किं०अधिक संख्यांच्या बरोबरीची एक संख्या काढणें. ४ संपादन करणें; प्राप्त करून घेणें. ५ उद्दिष्ट हेतु, साध्य, नफा, इ० हस्तगत करून घेणें. ६ कोणा माणसाला गोड बोलून, धमकी देऊन, लांच देऊन, बढतीची आशा दाखवून, किं० अन्य उपायांनीं आपल्या पक्षांत ओढून घेणें किं० आपल्याला अनुकूल करून घेणें. ७ (दोन पदार्थ इ०) परस्परांशेजारीं मांडून त्यांची तुलना करणें. ८ (कोणा माणसाला) गांठणें किं० त्याच्या बरोबरीस येणें.

मिळून [म० मिळणें] **क्रि० वि०** १ एकंदरींत. २ सारांश असा कीं; त्याचा अर्थ किं० निष्कर्ष असा कीं.

मी सर्वनाम (**व्याकरणांत**) बोलणारा जो स्वतः त्याचा वाचक हा शब्द आहे. ॐ **मी म्हणणें** जोरांत असणें; उ० मी त्या वेळीं कसचा घराच्या बाहेर पडतों, तेव्हां पाऊस मी म्हणत होता. **माझा मी** मी एकटा; दुसऱ्याची मदत न घेतां; मीच एकटा; ह्याच सरणीनें 'तुझा तूं,' 'तुमचे तुम्ही' इ०. **मी मी म्हणणें** स्वताच्या पराक्रमाची किं० कर्तृत्वाची बढाई मारणें किं० ऐट मिरविणें; उ० मी मी म्हणणारे सारे पहिलवान काशीकर पहिलवानाशीं कुस्ती करावयास कचरले. **मी तूं करणें, मीतूं वर येणें** भांडणावर येणें; हमरी तुमरी करूं लागणें. **मीचें वर खालीं** बढाया मारणाऱ्याची फजीती होते. **मीपणा पु०** १ अहंपणा; गर्व; अभिमान. २ अहंकार; मी कोणी आहे अशी भावना.

मीट [म० मिटणें] **स्त्री०** मिटलेपणाची स्थिति,–डोळे, फुलें, पानें, इ० चीं.

मीठ [**सं०** मिष्ट=मधुर, रुचकर] **न०** खाद्य पदार्थाला रुचि आणणारा एक पदार्थ; क्षार; लवण. ॐ **पिठांत मीठ घालणारा** कांहीं कार्याला जरूर जी कोणेकाजवळ सामग्री कांहीं लहानशी बाबत खेरीज करून भरपूर आहे तिच्यांत ती लहानशी बाबत त्याला देऊन त्याचें कार्य चालू करून देणारा; उ० शिशाच्या पेणसली करण्याच्या कारखान्याला लागणारें भांडवल, लाकूड, कारागीर, शिसें, इ० मजजवळ तयार आहे, पण कारखाना उभारावयाला जागा नाहीं, ती कोणी दिली तर पिठांत मीठ घातल्यासारखें होऊन माझा धंदा सुरू होईल; उ० आधीं पीठ मिळवा मग त्यांत मीठ घालणारा कोणी सहज तुम्हाला भेटेल. **पिठांत मीठ न०** भाषण, खाद्य, किं० कोणेक पदार्थ सुंदर आणि चटकदार आणि सुखकर करणारी कोणतीही वस्तु, गुण, इ०. **याला कोणी मीठ घालीत नाहीं** त्याला कोणी जुमानीत नाहीं; त्याच्या शब्दाला कोणी मान देत नाहीं. **कोणेकाचें मीठ मोठें खारट असणें** लोकांशीं वागण्यांत तो करड्या, तापट, किं० कठोर स्वभावाचा असणें. **कोणेकाचें मीठ तोडणें** त्याच्या चरितार्थाचें, सुखाचें, किं० सुस्थितीचें कांहीं महत्त्वाचें अंग किं० साधन नाहींसें करणें किं० हिरावून घेणें. **कोणेकाच्या अंगास कांहीं गोष्टीमुळें मीठ मोहाऱ्या लागणें** तो तीमुळें रागावणें; त्याला ती झोंबणें किं० अत्यन्त अप्रिय वाटणें. **मिठकणी स्त्री०** भूतबाधेच्या निरसनार्थ मूल इ० वरून ओवाळून टाकतात तें. **मीठभाकर स्त्री० ए० व०, मीठभात पु० ए० व०** गरिबाऊ जेवण. **मीठमसाला पु० ए० व०** पदार्थ रुचकर करण्यासाठीं जे पदार्थ ते समुच्चयानें.

मीन [**सं०**] **पु०** १ मासा; मत्स्य. २ (**ज्योतिष**) मेष, वृषभ, इ० ज्या बारा राशि त्यांतील बारावी रास. त्या राशि ह्या:–मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, आणि मीन. ॐ **मीनकेतन, मीनध्वज पु०** मदन; मन्मथ; कामदेव.

मीमांसा [**सं०**] **स्त्री०** १ शोध; विचारपूर्वक तत्त्वाचा निर्णय. २ कार्यकारणसंबंध. ३ चिकित्सा; परीक्षण. ४ हिंदूंचीं जीं सहा दर्शनें त्यांतील एक. हीं सहा दर्शनें येणेंप्रमाणें,–सांख्य, योग्य, न्याय, वैशेषिक, मीमांसा, आणि वेदान्त. शेवटच्या दोन दर्शनांस पूर्व मीमांसा, आणि उत्तर मीमांसा, अशींही नांवें आहेत. पूर्वमीमांसेंत धार्मिक कर्मांची वेदावरून ठरणारी सरणी सांगि-

तली आहे. उत्तरमीमांसेंत ब्रह्माचा विचार सांगितला आहे.

मीर [**फा०**] **पु०** १ गंजिफांतील प्रत्येक रंगाचा राजा. २ अमीर; वडा गृहस्थ; सरदार.

मीलन [**सं०**] **न०** १ डोळे मिटणें; डोळे मिचकावणें. २ फुलाच्या पाकळ्या किं० झाडाचीं पानें मिटणें. पुढें ' मेलन ' पहा. ३ मिश्रण. ४ भेट. ५ खग्रास ग्रहण.

मीलित [**सं०**] **वि०** १ न फुललेलें;न उमललेलें (फूल). २ संकुचित. **न०** (**साहित्य**) जेव्हां दोन वस्तु ओळखण्याचीं चिन्हें सारखीं सारखींच असतात, आणि या कारणामुळें एक वस्तु ओळखणें दुसऱ्या वस्तुमुळें अशक्य होतें,तेव्हां त्या अलंकाराला 'मीलित' म्हणतात. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. [लबाडी;

मीस [**सं०** मिष] **न०** ढोंग; कपट;लबाडी;

मीळ [**म०** मिळणें] **स्त्री०** लाभ; प्राप्ति; मिळकत.

मुकटा, मुगटा पु० स्त्रिया आणि पुरुष यांचें सोंवळ्यांत नेसण्याचें रेशमी वस्त्र.

मुकण [**म०**मुका+दाणा] **न०**१ धान्याचा चांगला न पोसलेला दाणा; चिंबलेला दाणा; किं० असे दाणे समुच्चयानें. २ भिजत घातले असतां किं० शिजवले असतां जे मऊ होत नाहींत असे दाणे व्यक्तिशः किं० समुच्चयानें. ह्या अर्थी ' मुकणा ' **पु०** हाही शब्द आहे.

मुकणा [**म०**मुका+दाणा]**वि०** १लाह्या किं० पोहे करावयासाठीं भात,जोंधळे,इ० भिजत घातले असतां जे मऊ होत नाहींत असे (दाणे) २ हिरवट; घुम्या (माणूस).

मुकणा हत्ती [**हिं०** मुखना हथी] **पु०** १ दर्शनी दोन दांत ज्याला नाहींत असा हत्ती. २ ठेंगणा आणि लठ्ठ पोटाचा माणूस.

मुकणें [**सं०** मुच्; मुक्त] **अ० क्रि०**अंतरणें; आंचवणें; गमावून घेणें;कांहीं हानीस पात्र होणें; उ० गोविंदराव मोटारखालीं सापडून प्राणास मुकला; उ० प्रजाजनांची सोय किं० इच्छा विचारांत घेत नाहींत ते राजे राज्यास मुकतात.

मुकदमा, मुकद्दमा, मोकादमा, मोकद्दमा [**अ०** मुकद्दमाह्] **पु०** प्रकरण; खटला; काम.

मुकद्दम, मुकादम, मोकादम [**अ०** मुकद्दम्] **पु०** १ पुढारी; म्होरक्या; नायक. २ मजूर इ० कामकऱ्यांवर देखरेख करणारा. ३एक ग्रामाधिकारी. ४ जातीचा किं० व्यवहाराचा अग्रणी म्हणून गणला गेलेला माणूस.

मुकद्दर [**अ०**] **वि०** कांहीं कामावर नेमिलेला किं० स्थापिलेला (माणूस).

मुकरर, मुक्रर, मुकर्रर [**अ०**] **वि०** पक्का केलेला; निश्चित केलेला; कायम स्थापिलेला. **क्रि० वि०** खातरीपूर्वक; निश्चयानें; न चुकतां.

मुकशी स्त्री० टोक; अग्र; अणी.

मुका वि० १ बोलण्याचे जे मुखांतील भाग ते असावे तसे नसल्याकारणानें जो वर्णात्मक शब्द उच्चारूं शकत नाहीं असा (मनुष्य). २ जो हट्टानें किं० रागानें बोलत नाहीं असा किं० मौन धारण केलेला (मनुष्य). ❀ **कोण्या स्त्रीला मुका मुलगा होणें** तिला प्रथमचें रजोदर्शन होणें. **मुकें यंत्र न०** जें चाललें असतां ज्याचा आवाज किं० फारसा मोठा आवाज होत नाहीं असें यंत्र; उ०मुका चरक, चरका, राहाट,घाणा, इ०; मुकें गुऱ्हाळ इ०.**मुकी अर्जी स्त्री**०कोणेकाची नालस्ती करण्यासाठीं बिनसहीचा किं० खोट्या सहीचा अर्ज;अंगीं नीतिधैर्य नसल्याकारणानें वरील प्रकारें केलेला अर्ज. **मुकी भण्यार स्त्री०** हिरवटपणानें घुम्यासारखा बसणारा माणूस;न बोलतां दुष्टपणाचें कृत्य करणारा माणूस. **मुकें जनावर न०** ज्याला मारलें असतां ओरडून जें आपलें दुःख प्रकट करूं शकत नाहीं असें जनावर.**टीप,**—जनावराची हीन दीन स्थिति जोरदार रीतीनें दाखविण्यासाठीं ' मुकें ' हें विशेषण योजण्यांत येते. **मुका नारळ पु०** ज्यांत खोबरें . आणि पाणी हीं दोन्हीं अद्यापि उत्पन्न झालेलीं नसल्याकारणानें जो हालविला असतां वाजत नाहीं असा नारळ. **मुकें गळूं न०** ज्याला अद्यापि तोंड पडलें नाहीं असें गळूं. याचें सरणीनें मुका नारू, फोड, इ० चे अर्थ जाणावे. **मुका गोवर पु०** ज्यांत पुरळ येत नाहीं असा गोवर. **मुक्या देवी स्त्री० अ०** व०फोड न फुटतां आलेल्या देवी हा त्वरोग.**मुकी**

कळी स्त्री० ज्याच्या पाकळ्या अद्यापि कळीच्या रूपांतच आहेत, उघडलेल्या नाहींत, असें फूल; कळीच्या रूपांत असलेलें फूल. **मुके दाणे** भिजत घालून किं० शिजवून जे मऊ होत नाहींत असे हरबरा, पावटा, इ० चे दाणे. **मुक्याचा जाण कोण होतो** ? जो कोणी इंद्रियाच्या विकलतेमुळें बोलूं शकत नाहीं किं० जो हिरवटपणानें किं० लबाड म्हणून बोलत नाहीं, त्याच्या मनांत काय आहे हें कोण सांगूं शकेल? कोणी नाहीं. **मुक्याचे मनीं मंगळवार** हिरवटपणानें जो बोलत नाहीं त्याची निंदा करतांना हें वाक्य योजिलें जातें. **मुका मार (किं० मारा) पु०** १ ज्याचा आवाज होत नाहीं असा कोणेकाला दिलेला मार किं० केलेली शिक्षा,—चिमटे घेणें, ओरबाडणें, कान पिळणें, इ० रूप. २ तिऱ्हाइताला साधें बोलणें वाटावें, पण विशिष्ट माणसाला तें लागावें किं० झोंबावें अशा प्रकारचें भाषण. **मुका मैन्द, मुका म्हसोबा पु०, मुकी मण्यार स्त्री०** कांहीं न बोलतां हिरवटपणानें किं० धुश्शानें स्तब्ध बसलेला माणूस. **मुकें दंद न०, मुका दंद पु०** [म० मुका + सं० द्वंद्व (वैर)] शब्दांत किं० कृतींत प्रकट न केलें गेलेलें आणि मनांतल्या मनांत धुमसत असलेलें वैर किं० शत्रुत्व. **मुका दावा पु०** ह्याच अर्थी.

मुका पु० चुंबन (घेणें).

मुकाट्यां, मुकाट्यानें [म० मुका] **क्रि० वि०** १ न बोलता. २ कोणाला न कळूं देतां; गुप्तपणें; बोभाटा न करतां; गुपचुप.

मुकाणा [म० मुका + दाणा] **पु०** १ जो पाण्यांत भिजत घातला असतां मऊ होत नाहीं असा धान्याचा दाणा. २ जो पाण्यांत मऊ होत नाहीं किं० फुलत नाहीं असा जोंधळा इ०.

मुकादम वर ' मुकद्दम ' पहा.

मुकाबला, मुकाबिला [अ०] **पु०** १ कोणेकाशीं केलेला सामना किं० लढाई किं० झटापट. २ गमनाचा रोख किं० धोरण. ३ गुप्तपणें केलेला शोध किं० तपास. ४ तुलना; रुजवात; पडताळा.

मुकाम, मुक्काम [अ० मुकाम्] **पु०** १ कांहीं काळापुरती स्थलविशेषीं केलेली वसति. २ गमनांत, गतींत, किं० चाललेल्या कामांत झालेली थांबणूक किं० पडलेला खंड. ३ कांहीं काम कांहीं काळ थांबविणें. ४ कोणेकाचें वास्तव्य किं० राहाण्याचें ठिकाण; बिऱ्हाड; वसति. ॐ **मुकामात, मुक्कामात** [अ० मुकामत्] **स्त्री०** वसति; राहाणें; थांबणूक; अल्प काळापुरती एकाद्या ठिकाणीं केलेली वसति किं० ठेविलेलें बिऱ्हाड.

मुकुट [सं०] **पु०** राजे इ० चा डोक्यावर घालावयाचा अधिकाराचा दर्शक किरीट. **टीप**,—संस्कृतात हा शब्द **न०**. ॐ **मुकुटमणि पु०** संस्था, मंडळी, इ० मध्यें जो अग्रगण्य किं० पुढारी तो (चांगल्या किं० वाईट अर्थानें).

मुकुर [सं०] **पु०** १ आरसा. २ फूल किं० पान यांची कळी. ३ कुंभाराचा चाक फिरविण्याचा दांडा. ४ मोगरीचें फूल. ५ बकुळी.

मुकुल [सं०] **पु०, न०** किंचित् उमललेली कळी. ॐ **मुकुलित वि०** १ अर्धवट मिटलेलें (फूल). २ संकुचित.

मुकेस [फा० मुकय्यस्] **वि०** १ जरतारी; भरजरी. २ सोन्याचा किं० रुप्याचा जो वर्ख किं० जराचा अंश त्याचा चुरा.

मुकर्र [अ० मुकर्रर] **क्रि० वि०** खचित; निश्चयपूर्वक; न चुकतां.

मुक्त [सं०] **वि०** १ मोकळा झालेला. २ मोक्ष ज्याला मिळाला आहे असा; जन्ममरणांच्या फेऱ्यांतून सुटलेला किं० मोकळा झालेला. ३ सोडलेला, फेकलेला (बाण). **मुक्तकर वि०** उदार; दाता. **मुक्तांबर पु०** दिगंबर जैन. ॐ **मुक्तद्वार न०** १ जाण्याला किं० येण्याला पूर्ण मोकळीक किं० अशी मोकळीक जेथें आहे असें ठिकाण. २ जेथें आमंत्रण नसतांही जेवावयास जाण्याला हरकत नाहीं असा भोजनसमारंभ. **मुक्त कंठानें क्रि० वि०** मोठमोठ्यानें ओरडून; आम्हाला ऐकूं आलें नाहीं अशी सबब कोणालाही न राहील अशा रीतीनें.

मुक्ता [सं०] **स्त्री०** मोती. **मुक्ताफल (–ळ) न०** १ मोती २ कापूर. ३ शिताफळ. ॐ **मुक्ताजाल न०** १ मोत्यांचा हार. २ स्त्रियांचा डोकींत घालण्याचा एक दागिना. ३ मोत्यांचा झुबका; मोत्याचें पेंडकें. **मुक्ताफळें न० अ० व०** १ मोती. २ (विपरीत लक्षणेनें)

मूर्खासारखे बोललेले शब्द किं० केलेलें विधानें. ३ सुंदर आणि गोंडस अशीं लिहिलेलीं अक्षरें. ‌‌॥ मुक्ताभरण [म०' अमुक्ता भरण' चा संक्षेप] न० भाद्रपद शुद्ध सप्तमीला करतात तो देवीच्या पूजेचा विधि. मागें ' अमुक्त ' मध्यें ' अमुक्ताभरण' पहा.

मुक्ति [सं०] स्त्री० १ मोकळें करणें;सोडून देणें; सोडणें. २ जन्मरणापासून सुटका; मोक्ष.३ सुटण्याचें साधन. ४ सायुज्यता, सलोकता,समीपता,आणि सरूपता,ह्या चार अवस्था व्यक्तिशः. ॥ मुक्तिपद व० मोक्ष ही स्थिति. मुक्तिमार्ग पु० मुक्ति किं० मोक्ष मिळविण्याचा मार्ग.

मुक्तसर पु० गांवांतलि अत्यन्त जुने जे वतनदार जे आज हक्कदार किं० गांवकामगार नाहींत ते व्यक्तिशः. मागें ' मक्तसर 'पहा.

मुक्त्यार, मुक्त्यारी पुढें ' मुखत्यार, ' पहा.

मुख [सं०] न० १ मनुष्य, पशु, इ० चें तोंड. २ पक्ष्याची चोंच. ३ चेहेरा; चर्या.४ अग्र; अग्र भाग; टोक. ५नळी,पिचकारी,इ०चें भोक. ६ द्वार. ७ आरंभ; प्रादुर्भाव; सुरवात. ८ आपले विचार प्रकट करण्याचें एकाद्या संस्थेचें वर्तमानपत्र, मासिक इ०. ९ प्रस्तावना. १० साधन; उपाय. ११ प्रसंग; कारण. १२ श्रेढींतलि पहिलें पद. १३ अनेक माणसांच्या वतीनें बोलणारा माणूस. ॥ मुखपाक पु० जिभेला तिखट न चालणें हा रोग. मुखशुद्धि स्त्री० विडा, सुपारी, इ०. मुखस्राव पु० १ लाळ. २ बालरोगविशेष. मुखदुर्बळ वि० भाषण किं० संभाषण ज्याला करतां येत नाहीं, आपले विचार ज्याला बोलून दाखवितां येत नाहींत, असा (माणूस). मुखमार्जन न० १ तोंड धुणें, दांत घासणें, नाक, डोळे, गाल, कपाळ, इ० धुऊन स्वच्छ करणें ही क्रिया. २गोड बोलून कोणेकाचा राग शांत करणें. मुखस्तंभ [म० मूक+स्तंभ (खांब)] वि० धैर्य नसल्यामुळें किं० हिरवटपणानें जो कांहींच बोलत नाहीं असा. मुखोद्गत वि० तोंडपाठ; चांगलें पाठ झालेलें असल्यामुळें जें हावें तेव्हां म्हणून किं० बोलून दाखवितां येईल असें. मुखचर्या, मुखकळा, मुखावरची चर्या स्त्री० तोंडावरचा तजेला किं० टवटवी. मुखटोप पु० शिरस्त्राणाचा तोंड झाकणारा भाग. मुखदाक्षिण्य न० १ वक्तृत्वाचा गुण किं० कला; बोलण्याचें चातुर्य. २ कोणेकाच्या साक्षांत कोणेकाला वाटतो संकोच किं० दबकलेपणा किं० भीड. मुखदूषिका स्त्री० १ तोंडावरची पुळी.२ स्त्री किं० पुरुष ही वयांत आलीं असतां त्यांच्या तोंडावर ज्या पुळ्या येतात त्या समुच्चयानें. ह्याला ' मुरूम 'असेंहीं म्हणतात. मुखपट्टा पु० १ घोड्याला ताडावर जो उभा पांढरा पट्टा असतो तो. २ घोडा स्वारीसाठीं सज्ज केला असतां त्याच्या तोंडावर जो कातडें इ०चा पट्टा येतो तो. मुखप्रिय वि० १ जें कितीही खाल्लें तरी पोट भरत नाहीं पण जें रुचिकर म्हणून खावेंसें वाटतें असें (खाद्य,–फोडणीचे पोहे, इ०). २ ज्याचा वीट येत नाहीं असें (खाद्य,–भात, भाकरी,इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें जिलबी,श्रीखंड, बासुंदी, इ० खाद्य. मुखभंजन न० कोणेकाचा नक्षा उतरणें किं० त्याला लाजविणें; त्याची नकटी ठेचणें. मुखमाधुर्य न० (वैद्यकांत) कफरोग. मुखवस्त्र न० १ पूजा, नैवेद्य, इ० आटोपल्यावर देव वामकुक्षी करतात तेव्हां त्यांच्या मूर्तीच्या तोंडावर घालतात तें वस्त्र.२पुस्तक, पोथी, इ०च्या रक्षणार्थ वर गुंडाळला असतो तो कागद, वस्त्र, इ० चा तुकडा.३ तोंड पुसावयाचें फडकें. ४खतें, पत्रें,इ० मूल्यवान कागदांच्या पुडक्यावर आंतील विषयाचें नांव लिहून गुंडाळतात तो कागद. मुखवाद्य न० अलगूज, पिपाणी, सनई, मुरली, इ० तोंडानें फुंकून वाजवावयाचें वाद्य. मुखवास पु० विडा, वेलदोडा, लवंग, इ० तोंड सुगंधित करण्याचें साधन. मुखविलास पु० एक पक्वान्नविशेष. मुखश्री स्त्री०१ तोंड. २तोंडावरचा तजेला. ३ थोबाड; उ० ह्या चोराच्या मुखश्रींच्या दोन लगावल्याशिवाय तो कबूल होणार नाहीं. मुखसंकोच पु०कोणेकाच्या समक्ष कोणेकाला वाटतो तो संकोच किं० दबकलेपणा. मुखडा पु०(लावणींत)मुख, तोंड. मुखवटा,मुखोटापु०१तोंडाची घडण;तोंडवळा.२तोंडावर घालण्याची कागद,इ० ची बनविलेली प्रतिकृति. मुखवासन न०विडा; वेलदोडा, लवंग,इ० तोंड सुगंधित करणारा कांहीं पदार्थ मुखानें, मुखें, मुख करून क्रि० वि०

विशिष्ट सरणीनें किं० स्थानें. **मुखमस्तीति वक्तव्यं** तुला तोंड आहे म्हणून तूं असें मूखासारखें बोलत आहेत, कारण तुला तोंडाचा सदुपयोग करणें ठाऊक नाहीं. **दूतमुखें क्रि० वि०** दूताकडून (कोणेकाला आपला विचार कळविणें).

मुखई वि० मोखा बंदराहून आलेलें (डाळिंब इ० पदार्थ).

मुखंड [**म०** मुख] **वि०** मुख्य; पुढचा; अग्रगण्य.

मुखत्यार, मुखतार [**अ०** मुख्तार] **वि०** नियोजित; अधिकृत. **पु०** सर्वाधिकारी; प्रतिनिधि. ॐ **मुखत्यारनामा पु०** कोणेकाच्या नांवानें केलेलें अधिकारपत्र; आपल्या वतीनें किं० तर्फेनें त्यानें काम करावें किं० चालवावें म्हणून त्याला करून दिलेलें खत. **मुखत्यारी स्त्री०** आपल्या वतीनें काम करण्याचा कोणेकाला दिलेला संपूर्ण अधिकार.

मुखर [**सं०**] **वि०** १ बडबड्या; गलगला बोलणारा, वाचाळ (माणूस). २वाजणारें(पैंजण, वाळा, तोरड्या, इ०). **मुखरी स्त्री०** लगाम. ॐ **मुखरता स्त्री०** वाचाळपणा.

मुखरण, मुखरीण [**म०** मुख] **पु०** १ पुढारी; अग्रणी; म्होरक्या. २ कांहीं कामाला जो योग्य म्हणून ठरला तो मनुष्य.

मुखरी [**म०** मुख] **स्त्री०** पोतें, भांडें, इ० ना पडलेलें बारीक भोंक.

मुखा [**म०** मुख] **पु०** हातोड्याचें जाडें टोक. दुसऱ्या टोकाला ' पिसा ' **पु०** असा शब्द आहे.

मुख्य[**सं०**]**वि०** श्रेष्ठ, उत्कृष्ट. **पु०** पुढारी; अग्रणी. **न०**१मुख्य किं०महत्त्वाचें कृत्य. २ वेदांचें अध्ययन आणि अध्यापन. ३ अमावास्येपासून अमावास्येपर्यंत मोजलेला महिना. ॐ **मुख्यार्थ पु०** शब्दाचा रूढ म्हणजे प्रचारांतील अर्थ. ह्याच्या व्यावर्तकत्वें गौणार्थ. **मुख्यत्वें, मुख्यशः, मुख्यत्वें करून क्रि० वि०** १ केवळ महत्त्वाचे भाग किं० अंगें विचारांत घेऊन.२ विशेष प्रमाणांत. ३ वैपुल्यानें.

मुगट [**म०** मूग] **वि०** १ मुगाच्या वासाचा किं० चवीचा. २ दमट हवेंत किं० पेवांत ठेविलेल्या धान्याला येतो जो मुगासारखा वास त्या वासानें युक्त (धान्यादि).

मुगटा, मुकटा पु० सोंवळ्यांत नेसण्याचें स्त्रिया किं० पुरुष यांचें रेशमी वस्त्र.

मुगडा पु० १ केश, पानें, गुंतवळ, इ०चा झुबका. २ केरसुणी, रंगाऱ्याचा कुंचली, इ०चा बुडखा म्ह० मूठ.

मुगडी स्त्री० कानांत घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना. बुगडी ' हा अधिक रूढ शब्द आहे.

मुगण, मुगाण [म०मूग+दाणा]**न०** जोंधळा किं० बाजरी, ह्यांच्या शेतांत पेरतात तीं मूग इ० कमी महत्त्वाचीं धान्यें प्रत्येक.

मुगदमी, मुगदुमी वि० भरड (साखर).

मुगदल, मुद्गल [**सं०** मुद्गर] **पु०** दंड भरण्यासाठीं आणि बळकट होण्यासाठीं नाना प्रकारें फिरवावयाचे जे लाकडांचे जाड, लांबट, आणि वाटोळे तुकडे ते प्रत्येक.

मुगदळ म० [मूग+दळा] **स्त्री०** मूग पेरण्याच्या उपयोगाची जमीन.

मुगदळ [**म०** मूग+दळणें] **न०** मुगाचें पीठ किं० ह्या पिठाचे लाडू.

मुगवण (-न) [**म०** मूग] **न०** मुगाचें गुळीं म्ह० मुगाच्या झाडांचीं तांटें समुच्चयानें

मुगवा [**म०** मूग]**वि०** मुगाच्या दाण्याएवढ्या लहान लहान चौकटी ज्याच्या विणींत आहेत असें (लुगडें इ०).

मुगवा पु० दुध्या भोपला किं० पांढरा भोपळा.

मुंगस, मुंगसवेल पुढें ' मुंगुस, ' ' मुंगुसवेल ' पहा.

मुगळ स्त्री० भातशेतांत उगवतें तें एक प्रकारचें गवत.

मुगळ पु० गवती छपराचें आढें.

मुंगळा पु० मुंगीच्या आकाराचा पण मोठा असा कीट; डोंगळा. ॐ **कोणेकाला एकाद्या कामाचा मुंगळा लागणें** त्याला कांहीं कामाची घाई झालेली किं० घाई लागलेली असणें; त्याला

त्या कामाची उतावळी झालेली असणें. **कोणे-काला मुंगळा** (किं० **मुंगळे**) **लागणें** (कांहीं गोष्ट) त्याला झोंबणें.

मुंगा [**हिं०** मूंगा] **पु०** पोंवळें,–रत्नविशेष.

मुंगा [**म०** मुंगी] **पु०** १ घोड्याला होतो तो एक रोगविशेष. २ घोड्यानें मस्ती करूं नये म्हणून त्याचा वरचा ओंठा बोटांत धरणें किं० धरून पिळवटणें (घालणें, दाबणें, धरणें). ३ अशा कामीं कांहीं प्रसंगीं योजतात ती दोरी. ४ गर्विष्ठपणा; रग; ताठा (करणें, मोडणें, जिरणें, इ०). ५ कांहीं कामासंबंधानें कोणेकास एकदम उत्पन्न होते ती तीव्र उत्सुकता किं० लागते ती घाई (येणें, लागणें). ६ मोठी मुंगी. **मुंगा** **पु०** नागपंचमीच्या दिवशीं गाणीं गात गात बायका धरतात तो फेर (घालणें).

मुगा वर ' मुगवा ' पहा. ❀ **मुगा घेवडा** **पु०** घेवड्याची एक जात. **मुगा भोपळा पु०** दुध्या भोपळा.

मुगाण मागें ' मुगण ' पहा.

मुगाणा, मुकाणा [**म०** मूग] **पु०** १ पाण्यांत भिजत घातला असतां जो मऊ होत नाहीं असा धान्याचा दाणा. २ भरड दळलेले मूग कोंड्यासकट.

मुगारा पु० १ झाडाचे कोंवळे अंकुर समुच्चयानें. २ धान्य, वृक्ष, इ० कांस फुटतो तो अंकुर.

मुगारी, मुंगारी [**कानडी**] **स्त्री०** खरीपाचें पीक. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' हिंगारी ' म्ह० रब्बीचें पीक.

मुगाळ स्त्री० १ गवत, झाडें, इ० चे कोंवळे अंकुर (निघणें, फुटणें, इ०). २ मुलांच्या तोंडावर असते ती कोंवळी लव.

मुगी [**म०**मूग] **स्त्री०**१ मूग ह्या धान्याची एक जात. २ मुगा एवढ्या लहान चौकटी वस्त्रावर विणलेल्या असतात त्या प्रत्येक. ३ अशा चौकटींचें लुगडें.

मुंगी स्त्री० १ एक क्षुद्र कीटविशेष. **मुंग्या स्त्री० अ० व०** वाताच्या विकृतीमुळें हात, पाय, इ०गात्रांत जी रिवरीव होते ती. हाताला, पायाला मुंग्या येणें असा **अ० व०** प्रयोग होतो. २ अक्कारा, पिंपळी, कांहीं जातीचें अळूं किं० सुरण, इ० पदार्थांनीं जिभ, गाल, इ० मध्यें उत्पन्न होते ती चुरचूर. ३ कांहीं वस्तूसंबंधानें एकदम होते ती उत्कंठा (येणें, आणणें). ४ पुरुषाचे ठायीं उसळतो तो कामविकार (येणें). ❀ **मुंगीस पक्ष** (किं० **पंख**) **फुटणें** मरण किं० विनाश जवळ येत आहे असें सुचविणारें कांहीं चिन्ह दिसूं लागणें. **मुंगीला मुताचा पूर** जो पैशानें, शक्तीनें, किं० सामर्थ्यानें कमी दर्जाचा माणूस आहे त्याला थोडकासा जरी खर्च आला, किं० आजार आला, किं० कांहीं गोता, धोका, इ० आला, तरी तो त्याला असह्य होतो. **टीप,**– मुताचें पाणी अगदीं थोडें असतें पण तें मुंगीला वाहवून नेण्याला पुरेसें असतें. **मुंगी होऊन साखर खावी, हत्ती होऊन लाकडें फोडूं नयेत** नम्रता धारण करून आपला फायदा करून घ्यावा; ताठ्यानें वागून दुःखें भोगीत बसूं नये. **मुंगीच्या पावलानें क्रि० वि०** अत्यन्त सावकाश; दिरंगाईनें.

मुगूट, मुगूटमणि मागें ' मुकुट, ' ' मुकुटमणि ' पहा.

मुंगूस न०, पु० सर्पाला मारणारें सुमारें दीड हात लांबीचें एक केसाळ जनावर. ❀ **मुंगुसकांदा पु०** एक कंदविशेष. **मुंगूसतोंडा** (–ड्या) **वि०** १ रागाच्या उद्भवामुळें भयंकर किं० विरूप झाला आहे चेहेरा ज्याचा असा (मनुष्य). २ ज्याची हनवटी चिंबलेली आहे आणि ओठ जाडी आहेत असा (मनुष्य). ३ लाजाळू आणि भितरा (माणूस).

मुग्ध [**सं०**] **वि०** १ घोटाळलेला; गोंधळलेला. २ मूर्ख. ३ भोळा; भोळसर. ४ तरुण आणि सुंदर. ५ रमणीय; मोहक. ६ साधेपणामुळें मनोहर. ७ (**मराठींत**) संदिग्ध; अस्पष्ट; ज्याचा निर्णय झाला नाहीं असा; ज्याच्या संबंधानें उलट सुलट रीतीनें बोलतां येईल असा (विषय). **मुग्धा स्त्री०** १ (**साहित्य**) एक प्रकारची नायिका. २ तारुण्यावस्था प्राप्त झाली आहे जिला अशी स्त्री. ❀ **मुग्धमा, मुग्धम्मा वि०** १ अडमुठा, हेंगाडा, आणि मूर्ख (माणूस,–पुरुष किं०

स्त्री).२अंगानें अगडवंब असून कमी बोलण्याच्या स्वभावाचा (पुरुष किं० स्त्री).

मुग्याण [म० मूग+दाणा] न० १ तुडवावयासाठीं तोडलेलीं मुगाचीं झाडें समुच्चयानें. २तुडवून मूग काढून घेतल्यानंतरचीं मुगाचीं ताटें समुच्चयानें.

मुचलका [तुर्की;हिं०] पु० १अमुक तऱ्हेनें मी वागेन अशा संबंधाचा कोणेकाकडून सरकार लिहून घेतें तो करार. २ पंचाईत करणारे लोक लिहून देतात तो करार. ३ वचनपत्र; हमीपत्र; कराररनामा ; कतबा.

मुचकुंद, मुचुकुंद[सं०] पु० २ एक सुगंधी वृक्षविशेष. २ इक्ष्वाकुवंशीय मांधात्याचा कनिष्ठ पुत्र.

मुंज [सं० मुंज; मुंजा] पु० १ मोळ ह्या नांवाचें तृण.२ ब्रम्हचाऱ्याची मोळाची मेखला. ३ (मराठींत) स्त्री० उपनयन हा संस्कार किं० ह्या संस्काराच्या प्रसंगीं मुलाच्या कमरेस बांधतात ती मुंजतृणाची दोरी.॥ **मुंजबंधन,मौंजीबंधन** न० उपनयन हा संस्कार. **सोडमुंज** स्त्री० मुंज्या मुलाच्या कमरेस बांधलेली मुंजतृणाची दोरी सोडण्याचा संस्कार.

मुजमू, मुजमूदार मागें ' मजमू ', ' मजमूदार ' पहा.

मुजरत, मुजरद [अ० मुजर्रद्] क्रि० वि० न चुकतां; मुद्दाम; उद्देशपूर्वक; ह्याच हेतूनें.

मुजरा [अ०] पु० १ सलाम; वंदन. २ यजमानापुढें आल्यावर किं० त्याचा निरोप घेतांना गवई म्हणतात तें गाणें. ३ बंदूक, बाण, इ० नीं नेम धरणें (धरणें). ४ वजा किं० बाद (करणें).

मुजरादास्त मागें ' मजुरादास्त ' पहा.

मुजाईम, मुजाईक, मुजाहीम [अ०] वि० १ अडथळा, प्रतिबंध,किं०हरकत करणारा. २ कांहीं कार्यास प्रतिबंधक अशी कांहीं गोष्ट.

मुजाख, मुजाखा [अ० मुजायकाह्]पु०, स्त्री० परवा; प्रतिष्ठा; किमत (निषेधीं प्रयोग).

मुजाफत [फा० मुजाफाह्] पु० कोणेकाला सरकारांतून जी बक्षिशी किं० देणगी दिली जाते ती. त्यासंबंधाचा जो खर्च त्याला ' मुजाफत खर्च ' किं० ' मुजाफती खर्च ' म्हणतात.

मुजाफा [फा०] पु० घोड्याच्या पाया बरोबर जो पायबंद बांधण्यासाठीं कातड्याचा पट्टा घालतात तो.

मुजारत, मुदारत [अ०]स्त्री० १ कोणेकाने केलेला सत्कार किं० बरदास्त (ठेवणें,राखणें). २ कांहीं गोष्ट किं० वस्तु बाजूस राखून ठेवणें.

मुजावर [अ०] पु० मशीद झाडणें इ० कामें करणारा नोकर. ॥ **मुजावरी** स्त्री० मुजावराचें काम, धंदा,किं० नोकरी.

मुजाहीम मागें ' मुजाईम ' पहा.

मुंजी स्त्री० मागें ' मुंज ' पहा.

मुजुमदार मागें ' मजमूदार ' पहा.

मुंज्या [म० मुंज] पु० १ मुंजीला योग्य अशा वयाचा मुलगा. २ ज्याची मुंज झाली आहे पण सोडमुंज अझून झाली झाली नाहीं असा मुलगा. ३ सोडमुंज व्हावयाच्या अगोदर मेलेला आणि पिशाच्च झालेला मुलगा. ४ पिंपळाचें झाड. ॥**बारा पिंपळांवरचा मुंज्या** पु० एके ठिकाणीं स्थिर नसणारा आणि सदा भटकत असणारा मनुष्य.

मुटकणें [म० मूठ] स० क्रि० १ (ठणकत असलेल्या हात, पाय, पाठ, इ० गात्रांना) आराम वाटण्यासाठीं मुठीनें ठोकणें,दाबणें, किं० चेपणें.

मुटकळणें [म० मूठ+आकळणें] स० क्रि० १ (हाताच्या मापानें वस्त्र मोजतांना वस्त्राचा कांहीं भाग) मुठींत धरणें (ज्यास्त लांबी मोजणींत यावी म्हणून). २ (भात इ० खातांना त्याचे) बारीक बारीक गोळे करून तोंडांत घालणें. ३ (ठणकत असलेलें गात्र) मुठीनीं चेपणें.

मुटकळा पु०, **मुटकळें** न० मुठींत मावण्या इतका पीठ इ० चा गोळा (घेणें).

मुटका [म० मूठ] पु० १ मुठीनें मारलेला ठोसा (मारामारींत किं० ठणकत असलेल्या गात्राला आराम वाटण्यासाठीं). २ वातविकारानें गात्रविशेष आखडलें जाणें (वळणें). ३ नांगर इ०चा हातांत धरावयाचा दांडा.

मुटकाविणें [म० मुटका] **स० क्रि०** (ठणकत असलेले गाल) मुठींनीं चेपणें.

मुठळी [म० मूठ] **स्त्री०** १ मुठींत धरून हालविण्याची क्रिया. २ मूठ.

मुठा पु० १ पखालींत पाणी भरण्याचें तोंड. २ विस्तव जिवंत राहावा म्हणून चूल, शेगडी, इ०च्या तळाशीं ओल्या शेणाचा गोळा ठेवितात तो. ३ वातविकारामुळें किं० भयामुळें पोटांत उठतो तो गोळा. ४ रेशीम, सूत, इ० चा गोळा किं० लड.

मुठाण [म० मूठ] **न०** वात्रट किं० आड-मुठ्या माणसांची टोळी; चांडाळचौकडी.

मुठाळा, मुठाळी, मुठेळी [म० मूठ] **वि०** एका विशिष्ट जातीची (केळ) किं० ह्या जातीच्या केळीचें (केळें).

मुठेल [म० मूठ+तेल] **न०** नारळाचा चहूं शिजवून नंतर तो मुठींत चेपून पिळून काढतात तें तेल.

मुठेल स्त्री० केळीची एक विशिष्ट जात. ह्या केळीला येतें त्या केळ्याचें टोंक वाटोळें असतें.

मुट्ठा [म० मूठ] **पु०** रेशीम, कलावतू, इ० चा विडा.

मुठ्या पु० एक प्रकारचा खेकडा.

मुठ्या [म० मूठ] **पु०** रोमणी, पाभर, इ० च्या दांड्याचा जो भाग हाकणारा माणूस मुठींत धरतो तो.

मुंड [सं० मुंड=डोकें] **वि०** १ क्षौर केलेला. २ नीच. **पु०** १ क्षौर केलेला मनुष्य. २ केशहीन डोकें. ३ शाखाविहीन वृक्ष. ४ न्हावी. **न०** १ डोकें. २ (**मराठींत**) चार पांच हात लांबीचें वस्त्र,—जें डोक्याला गुंडाळतात तें. पुढें ' मुंडासें ' पहा.

मुंड [**तेलगू** मुंड=तीन] **वि०** १ विटी-दांडूच्या खेळांत दांडूनें मोजते समयीं तीन ही संख्या. २ मुठीवर विटी ठेवून तिला दांडूनें मारतात तो टोला.

मुंड न०, मुंडकी स्त्री०, मुंडकें न० [सं० मुंड=डोकें] डोकें. ॐ **कोणेकानें कांहीं कामा-विषयीं मुंड मुंडाविणें** तें काम करण्याचा त्याणें पथकर घेणें किं० घेतलेला असणें; उ० तुझे निरोप तुझ्या भावाला कळविण्याला मी कांहीं मुंड मुंडावून बसलों नाहीं.

मुंड पु०, न० जमीनीबद्दल किं० जनावरा-बद्दल, किं० कर्जाऊ घेतलेल्या रकमेबद्दल मालकास दिलेला पैसा किं० धान्य.

मुंड [सं० मुंड] **वि०** जीवर व्याज द्यावें लागत नाहीं अशी कर्जाची रकम.

मुडगा, मुंडगा पु० एक प्रकारचें भात.

मुडगा [म० मूठ] **पु०** १ तांदूळ, डाळ, इ० ची मूठ (म्ह० मूठभर तांदूळ, डाळ, इ०).२ विजारीचा किं० चोळण्याचा पुढचा भाग. ३ केरसुणीचा बुडखा,—म्ह० मुठींत धरावयाचा भाग.

मुडगुशी [म० मुंड+बुसणें] **स्त्री०** हात-पाय पोटाशीं आखडून त्यांवर डोकें टेकून केलेलें शरीराचें संस्थान (मारणें). ' गुरगुशी ' हा ह्याच अर्थाचा शब्द आहे. मागें ' गुरगुशी ' पहा.

मुंडगें न० भाताची एक जात.

मुंडण, मुंडन [सं० मुंडन] **न०** १ हजामत (संन्यास घेते वेळीं किं० मुंजीच्या प्रसंगीं किं० शेंडी राखण्याच्या प्रसंगीं). २हजा-मत (थट्टेंत). २ (**लाक्षणिक**) कोणेकाची काढलेली खरडपट्टी. ॐ **मुंडनपर्वणी स्त्री०** १ हजामतीचा कोणेकाचा ठरलेला दिवस.२सुट्टीचा दिवस.

मुंडणें [सं० मुंड्=मुंडन करणें] **स० क्रि०** १ (डोकें) भादरणें. २ (कोणतेंहीं **गात्र**) वस्त्रा इ० नीं केशरहित करणें. ३ (कोणेकाला) एकाद्या संस्थेंत, संप्रदायांत, तालमींत, किं० पक्ष इ०त प्रविष्ट करून घेणें. ४ (कोणेकाला) लुबाडणें.५ कोणेकाचें (द्रव्यादि) फसवून मिळविणें किं० लाटणें.

मुंडंती[सं०मुंडन] **स्त्री०** १ वपन; हजामत.२ कोणेकाची खरडपट्टी; बोडंती.मागें'बोडंती'पहा.

मुडदा, मुरदा [फा० मुरदाह्=मेलेला] **पु०** प्रेत. ॐ **मुडदेफरास, मुरदेफरास पु०** १ प्रेत-वाहक, प्रेताला खांदा देणारा(निंदेंत किं० थट्टेंत). २ प्रेताच्या दहनाला लाकडें, गोवऱ्या, इ० विक-णारा दुकानदार.

मुरदार, मुरदाड [फा० मुर्दार्] **वि०** १ यथाशास्त्र न मारलेला (पशु,–जो खाणें निषिद्ध आहे); उ० मुलानानें फात्या न दिला तर बकरें मुरदाड राहतें (म्ह० तें हलाल होत नाहीं). २ कुजत किं० सडत असलेला (मेलेला प्राणी). ३ अपवित्र. ४ निंद्य; ओंगळ; घाण. ५ समई इ०तील(तेल,–दीपुष्टेल).६न मारतां मेलेल्या पशूचें (मांस). ७ अडाणी; मूर्ख;बेवकूब(माणूस). ८ वाढण्याची क्रिया ज्याची बंद पडली आहे असें(नख,झाड,इ०).७ज्याची संवेदना नष्ट झाली आहे असें (गात्र). ॐ**मुरदार (–ड)शेंग(–शिंग) न०** एक औषधी.

मुंडन वर ' मुंडण ' पहा.

मुंडप पु०, न० मुकुट; शिरताज; पागोटें; मुंडासें. ॐ **मुडपघसणी स्त्री०** डोक्यांला डोकीं किं० पागोटयांना पागोटीं भिडण्याइतकी माणसांची कोणेक ठिकाणीं झालेली किं० असलेली दाटी,गर्दी, किं० खेचाखेच.

मुडपा पु०, मुडपी स्त्री० [म० मुडपणें] वस्त्रादींची घडी किं० दुमड.

मुंडबंदी स्त्री० मागें ' कास' मध्यें 'कासबंदी' पहा.

मुंडलावा पु० भिंतीची मुंडेरी किं० माथा.

मुंडवण [म० मुंडणें] **स्त्री०** १ कोणेकाची केलेली लुबाडणूक. २ मोहित किं० हतवीर्य झाल्याची स्थिति. ३ (**लाक्षणिक**) भोसडपट्टी.

मुडळी स्त्री० आळवाचा किं० कासाळूचा कांदा.

मुडा पु० १ गवत, भातेण, पानें, इ० लपेटून आणि दोरीनें बांधून धान्यादींचा केलेला गठ्ठा. २ढेपींतून फोडून काढलेला गुळाचा खडा. ॐ **मुडा घालून बसणें** गुडघ्यांत डोकें खुपसून बसणें (दुःखानें किं० आळसानें).

मुडा वि० ज्याचा गळा फुटला आहे असें (मडकें किं० धातूचें पात्र).

मुंडा, मुंढा पु० हिजड्याबरोबर हिंडून हिजड्यासाठीं भीक मागणारा. खरखरमुंडा, मामरमुंडा, हे शब्द ह्याच अर्थाचे आहेत.

मुंडा पु० १ पाणी साठविण्याचें मोठें बारदान डेऱ्यासारखें. २ पखालीचें तोंड (खालचें किं० वरचें).

मुंडा, मुंडाहात पुढें ' मुंढा ' मध्यें पहा.

मुंडारणें [म० मुंड] **अ० क्रि०**परत फिरणें.

मुंडावळ (–ळी) [**म०** मुंड+आळ; **सं०** मुंड+आवलि] १ मुंज्या मुलाच्या किं० नवरदेवाच्या किं०वधूच्या डोकीला लोंबत सोडतात त्या फुलांच्या माळा प्रत्येक. २ फुलांच्या माळा सामान्यतः.

मुंडाविणें [**म०** मुंड] **स० क्रि०** (डोक्याचे केश किं० दाढी) तासणें किं० भादरणें.

मुंडासें [**म०** मुंड] **न०** मराठे लोकांचें पागोटें.

मुडी स्त्री० लहान आकाराचा भातेण इ० मध्यें बांधलेला धान्याचा गठ्ठा. वर' मुडा 'पहा. ॐ **मुडी मारून बसणें** गात्रें पोटाशीं संकुचित करून बसणें.

मुंडी [**सं०** मुंड] **स्त्री०**डोकें (तिरस्कारांत). **पु०** संन्याशी, वैरागी. ॐ **कोणेकाची मुंडी मुरगळणें (पिळणें, पिरगळणें)** त्याचा सर्वतोपरी नाश करणें. **मुंडी हालविणें** (किं० **डोलविणें**) डोकें हालविणें; अमुक मनुष्य असें म्हणत आहे एवढ्याच कारणावरून आपणही स्वतः विचार न करतां होय म्हणणें. **मुंडी फिरविणें** डोकें वळवून नापसंती किं० विरोध किं० प्रतिकूल मत व्यक्त करणें. **कोणेकाला चारी मुंड्या चीत करणें** त्याचा पूर्णपणें पराभव करणें; संशयाला जागा न राहील अशा रीतीनें त्याच्यावर जय किं० सरशी मिळविणें. **टीप,**–' मुंडा, ' ' मुंढा, ' ह्या **पु०** शब्दांचीं **अ० व०** रूपें ' मुंडे, ' ' मुंढे ' सुद्धां ह्या वाक्प्रचारांत ह्याच अर्थानें योजण्यांत येतात. **टीप,**– कुस्तिमध्यें एका गड्यानें दुसऱ्या गड्याच्या पाठीचे चारी कोपरे जमिनीला लागतील अशा रीतीनें उताणें पाडलें म्हणजे तो पडलेला गडी चारी मुंडे (किं० मुंढे) चीत झाला असें म्हणतात. खांद्या जवळचे पाठीचे दोन कोपरे आणि माकडहाडाच्या दोन बाजूंचे दोन कोपरे, मिळून एकंदर जे चार कोपरे ते चार मुंडे (किं० मुंढे). ह्यावरून एकाद्याला चारी मुंडे (किं०

मुंडें) चीत करणें म्हणजे त्याचा पूर्ण पराभव करणें.

मुंडें न० कोळसे, तांदूळ, इ० पदार्थ ठेवण्याचें बांबूच्या कामट्यांचें बारदान.

मुंडेरी, मुंढेरी, मुंडरी, मुंढरी, मुंडारी, मुंढारी [सं० मुंड; हिं० मुंढेरी] स्त्री० पावसाचें पाणी भिंतींत मुरूं नये ह्यासाठीं उतरता केलेला भिंतीचा माथा.

मुंढरा, मुंढा [सं० मुंड] वि० ज्याचीं शिंगें आंत किं० मागें वळलेलीं आहेत असा (बैल, गाय, रेडा, म्हैस, इ० पशु). २ शिंगें असावयाचीं तीं ज्याला मुळींच नाहींत असें (जनावर).

मुंढा पु० मागें ' मुडा ' पहा.

मुंढा [सं० मुंड] वि० १ ज्याचा कांठ फुटला आहे असें (भांडें).२पदार्थांच्या गणनेंत केवळ ठरावाच्या आंकड्याइतकी (मोजदाद); उ०मुंढा शेकडा म्हणजे बरोबर शंभर (म्ह०एकही अधिक नसलला शेकडा). ३ ज्याला शेंडी नाहीं असा (नारळ किं० माणसाचें डोकें); ज्याला शिखर नाहीं असें (देऊळ): ज्यांचें पुढचें पेर तुटलें आहे असें (बोट); ज्याचा पंजा तुटला आहे असा (हात); ज्याच्या फांद्या तोडल्या आहेत असें (झाड). ४ ज्या ठिकाणीं जो पदार्थ असावयाचा तो जेथें नाहीं असें (ठिकाण); ओका; उ० नथेशिवाय नाक मुंढें, बांगड्यांशिवाय स्त्रियांचें मणगट मुंढें,इ०.५वस्त्रादींची लांबी हातानें मोजतांना ज्याचीं बोटें तळहातावर टेकलीं आहेत असा (हात).

मुंढा [सं० मुंड] पु० १ खांदा. २ पखालीचें पाणी बाहेर सोडण्याचें खालचें तोंड. ३ पखालीचें पाणी भरण्याचें वरचें तोंड. ४ हिजड्याचा साथीदार. ‌॥ **कोणेकाचें मुंढे फिरणें** तालमीच्या कामांनीं त्याचे खांदे भरणें किं० भरदार होणें.

मुंढारणें [सं० मुंड; म० मुंढ, मुंड] अ० क्रि० मागें वळणें. **स०क्रि०** परतविणें; मागें वळविणें.

मुंढारी, मुंढेरी मागें ' मुंडेरी ' पहा.

मुंढावळ स्त्री० १ कमळ, पोशेरें, इ० चे अंकुर. **टीप,–' मुंढावळी ' स्त्री० अ० व०** अशा रूपांत उपयोग.

मुंढासें, मुंढासा मागें ' मुंडासें, ' 'मुंडासा' पहा.

मुंढी मागें ' मुंडी ' पहा.

मुढोजी मुका पु० उर्मट आणि बढाईखोर माणूस.

मुतगा पु० तांदुळाची एक जात.

मुतट [म० मूत] वि०मूताची घाण ज्याला येत आहे असें (चिरगूट, स्थळ, इ०).

मुतणें [सं० मूत्र=मुतणें] अ० क्रि० मूत्र विसर्जिणें. ॥ **उभ्यानें मुतणें** किं० **फेर घेऊन मुतणें** निर्लज्जपणाचीं कृत्यें करणें.

मुतपाक, मुतबक, तबख, मुतपाक [अ० मतबखू] पु० स्वयंपाक घर.' खाना 'हा शब्दही जोडण्यांत येतो.

मुतरा [म० मुतणें] वि० १ ज्याला वारंवार लघवीस जावें लागतें असा (मनुष्य). २ मुतानें भिजलेला किं० मुताच्या घाणीचा (कपडा).

मुतरी [म० मुतणें] स्त्री० १ लघवीची मोरी किं० जागा. २ लहान ओहोळ.

मुतवणी [म० मूत+पाणी] न० १ मुताचें पाणी. २ मुताच्या पाण्याइतकें कढत पाणी.

मुतसद्दी, मुत्सद्दी, मुत्सुद्दी [अ०] पु० १ राजाचे कारभारी प्रत्येक. २ धूर्त, धोरणी,आणि युक्ति लढविण्यांत पटाईत पुरुष; राजकारणांत डावपेच करण्यांत चतुर. ॥ **मुत्सद्देगिरी स्त्री०** राजकारणांत चातुर्य किं० धूर्तता. **मुत्सद्दी असून शिपाई** लढण्याचें चातुर्य अंगीं असून शिवाय दफतरी कामांत पटाईत असा माणूस.

मुताट [म० मूत+ठाय] स्त्री० पागेमध्यें घोड्याच्या मुताचें पाणी साठण्यासाठीं केलेला खड्डा.

मुताटणें [म० मूत+ताठणें] अ० क्रि० लघवीच्या समयीं कळ निघणें किं० मूत कोंडणें ह्या रोगानें व्यथित झालेलें असणें.

मुताबीक [अ०] अ० क्रि० अनुसरून; प्रमाणें; उ० शिवराम महादेव परांजपे सपटेंबर

तारीख २७ इ० स० १९२९ मुताबीक भाद्रपद कृष्ण नवमी शके १८५१ रोजीं मरण पावले.

मुतारी, मुतरडी [म० मुतणें] **स्त्री०** सार्वजनीक रस्त्यावर किं० अन्यत्र माणसांना लघवी करण्यासाठीं बांधलेली अडोशाची जागा.

मुतालका पु०,मुतालकी स्त्री०मुतालिकाचा हुद्दा. खालीं ' मुतालीक ' पहा.

मुतालीक [अ० मुतअल्लिक़्] **पु०** आठ दरकदारांपैकीं एक.

मुती [म० मूत] **स्त्री०** लघवी (मुलांचा शब्द).

मुतीर [म० मुतणें] **वि०** वारंवार लघवी करण्याच्या रोगानें व्यथित झालेला.

मुदगल, मुद्गल [सं० मुद्गर] **पु०** जाडी, लांब, आणि हाताच्या मुठींत धरण्याच्या सोयीचे तालीमखान्यांतलि दांडे प्रत्येक.

मुदण, मुदणी पुढें ' मुदन, ' ' मुदनी ' पहा.

मुंदणें, मुंधणें स० क्रि० (भोक किं० तोंड) बंद करणें. **अ० क्रि०**(भोक किं० तोंड) बंद होणें.

मुदत पुढें ' मुद्दत ' पहा.

मुदन न०, स्त्री०, मुदनी स्त्री० १ अंगरखा, जाकीट, इ०ची गुंडी, बटण, इ० घालावयाचें विरडें किं० गुळखी. २ सलिता, गोणी, इ० चें तोंड बंद करावयाच्या भागाला बसविलेल्या असतात ज्या गुळख्यांच्या रांगा त्या,–त्यांतून दोरी ओवावयाची असते. ३ पेटी, डबी, इ० चें झाकण बंद करावयाचा खटका. ४ घोड्याच्या पायबंदाचें बिरडें. ५ खिरीसाठीं केलेले रव्याचे तुकडे प्रत्येक. ६ बटव्याची कडी. ७ चाकाच्या कण्याचें टोक,–ज्यांत खिटी बसवितात.

मुदपाक (–ख), मुदपाकी (–खी) खालीं ' मुदबख ', ' मुदबखी ' पहा.

मुदबग (–ख) [अ० मुतबख़्] **पु०** स्वयंपाक घर. ❀ **मुदबकखाना पु०** स्वयंपाक घर. **मुदबखी पु०** स्वयंपाकी.

मुदल, मुद्दल [सं० मूल] **न०** कर्जाऊ दिलेली किं० घेतलेली रकम,– व्याजाच्या संबंधानें.**मुदलीं क्रि०वि०** १ प्रथमारंभीं; मूळांतच; उ० मुदलीं त्याच्या जवळ पोटाला नाहीं तो ह्या धंद्यांत भांडवल कसें घालणार ? २ अगदींच (निषेधीं प्रयोग); उ० त्या गोष्टीला तो मुदलीं कबूल नाहीं. **मुदलावर येणें** मूळच्या किं० पहिल्या वाईट वर्तनक्रमावर येणें. **मुदलांत मुरकुंडी बसणें** नफा मिळण्याचें बाजूस राहून मूळ भांडवलच क्रमाक्रमानें प्रपंचांत खर्च करण्याच्या स्थितीस कोणी व्यापाऱ्यानें येणें.**मुदलामुद्दलें(–लीं) क्रि० वि०** व्याज किं० नफा न घेतां; मूळच्याच किमतीस.

मुंदविणें, मुंदाविणें स० क्रि० (भोक, छिद्र, तोंड, किं० द्वार) बंद करणें.

मुदा, मुदाई खालीं ' मुद्दा ', ' मुद्दई ' पहा.

मुदाई [अ०] **पु०** दावेदार; शत्रु.

मुदाईम [अ० मुद्दई] **पु०** खटला, वाद, इ० मध्यें प्रमाणें किं० पुरावे गोळा करणारा.

मुंदावणें अ० क्रि० (भोक, तोंड, द्वार) बंद होणें किं० बंद पडणें.

मुंदाविणें स० क्रि० (भोक, तोंड, वाट, इ०) बंद करणें किं० बंद पाडणें.

मुदाळें [म० मूद+आलय]**न०** ओगराळें,–ज्यांत भात चेपून मुदा पाडतात.

मुदित [सं०] **वि०** आनंदित; संतुष्ट.

मुदी [सं० मुद्रिका] **स्त्री०** बोट, नाक, कान, इ० मध्यें घालावयाची आंगठी, सुंकलें, वळें, इ०.

मुद्ग [सं०] **पु०** १ मूग हें धान्य. २ आच्छादन.

मुद्गर [सं०] **पु०**१हातोडा. २मुद्गल नांवाचें शस्त्र किं०हत्यार. ३ जमीन चोपण्याचा मोगर.

मुद्दई [अ०] **पु०** १ हक्क सांगणारा. २ दावेदार. ३ साक्षीदार. ४ गुप्तपणें सरकारांत बातम्या कळविणारा.**टीप**,–ह्या सर्व अर्थीं 'मुद्दईदार ' सुद्धां.

मुद्दत, मुदत [अ० मुद्दत] **स्त्री०** कालमर्यादा; ठरविण्यांत आलेला कालावधि.

मुद्दल [सं० मूळ] **न०** १ कर्जाऊ दिलेली किं० घेतलेली रकम (व्याजाच्या अपेक्षेनें). २ व्यापारांत घातलेलें भांडवल. ३ मूळ; आधार; पाया; उ० त्याचें म्हणण मुदलांतच खोटें आहे.

मुद्दा [**अ०** मुद्दआ] **पु०** १ कांहीं विधान, गोष्ट, इ० स्थापित करण्याला आधारभूत जें प्रमाण तें; पुरावा. २ बाब; बाबत. ३ मतलब; तात्पर्य. ४ ज्यावर भाषण करावयाचें किं० लिहावयाचें तो विषय. ५ बोलण्याचा किं० लिहिण्याचा रोख किं० धोरण. ꣸ **मुद्दापत्ता पु० ए० व०** थांग; शोध; मागमूस; तपास; पुरावा. **मुद्देसूद वि०** मुद्याला धरून असलेलें (भाषण, लेखन).

मुद्दाम [**अ०** मुदाम्] **क्रि० वि०** १ हेतु-पुरःसर. २ ह्याच कामासाठीं किं० कारणासाठीं. ३ जाणून बुझून. ꣸ **मुद्दाम बेगारी पु०** अगदीं शेवटच्या पल्ल्यापर्यंत ओझें, पत्र, इ० पोंच-विण्यासाठीं योजलेला हेलकरी.

मुधाळ [**म०** मुदी] **वि०** नागमोडी किं० कुरळे (डोईचे केश).

मुद्रा [**सं०**] **स्त्री०** १ रुपाया, पैसा, इ० नाण्यांवर जें चिन्ह असतें तें किं० असें चिन्ह आहे ज्यावर असें रुपाया, पैसा, इ०नाणें. २शंख, पद्म, गदा, इ० च्या आकृति गंधानें ठोकून घेण्याच्या ज्या वैष्णव इ० लोकांच्या धातूच्या आकृति असतात त्या प्रत्येक. ३ पदार्थ ओळ-खतां यावा म्हणून त्याचेवर जें चिन्ह करतात तें. ४ चेहेऱ्याची ठेवण; चर्या. ५ छाप; शिक्का. ६ शंख, धेनु, इ० रूप हाताच्या बोटांची रचना (पूजेंत करतात ती). ७ आपल्या नांवाची अंगठी. ८(भिक्षुकांच्या भाषेंत)रुपाया हें नाणें. ९ रूप, आकार (कर्तृत्वाच्या दृष्टीनें); उ० ह्या मुलाची मुद्रा लहान आहे पण मोठ्या पुरुषाला जें होणार नाहीं तें काम आज ह्यानें केलें. १० कासली नांवाच्या झाडाचें फळ,–जें मुद्रेसारखें असतें. ११ वैरागी,गोसावी,इ० कानांत घालतात तें वळें. ꣸ **मुद्रामार्ग पु०** (टाळूंतील) ब्रह्मरंध्र. **मुद्राधारी पु०** १ कोणीही वैष्णव. २ कोणीही कोणताही अधिकार, पदवी, इ० चें चिन्ह धारण करतो तो. **कोणेकाची मुद्रा उत-रणें** लज्जा, आजार, भय, इ० कारणांमुळें त्याचा चेहेरा निस्तेज किं० खिन्न होणें. **मुद्राहीन वि०** १ ज्याचा चेहेरा पाहून कोणाला त्याच्या विषयीं आदर किं० दरारा वाटत नाहीं असा. २ ज्याचा चेहेरा टवटवीत दिसत नाहीं असा.

मुद्रिका [**सं०**] **स्त्री०** १ आंगठी. २ छाप; ठसा. ३ आपल्या नांवाच्या अक्षरांनीं चिन्हित अशी अंगठी. ४ नाणें,–सामान्यतः.

मुद्रित [**सं०**] **वि०** १ ज्यावर कांहीं शिक्का मारलेला किं० ठसा उमटविलेला आहे असा (दागिना,अंगठी,लेख,इ०).२मिटलेलें(फूल, डोळा, इ०). **न०** छापखान्यांतील दुरुस्त करावयासाठीं छापलेला कागद किं०कच्चा खरडा.

मुंध, मुंधा, मुंधरा, मुंधारा मागें ' बुंध,' ' बुंधा, ' इ० पहा.

मुंधणें, मुंधविणें, मुंधाविणें स० क्रि० (तोंड, द्वार, भोक, फट, इ०) बंद करणें.

मुंधणें अ० क्रि०(तोंड, द्वार, भोक, इ०) **बंद** होणें किं० बुझणें.

मुधाळ, मुध्याळ [**म०** मुदी] **वि०** कुरळे (केश).

मुनवा पु० केळीच्या झाडाला फुटलेलें नवें पिलूं.

मुनशी [**फा०** मुन्शी] **पु०** १ फारशी भाषेंत पत्रव्यवहार करण्याच्या कामावरचा कार-कून; पारसनीस. २ फारशी भाषा शिकविण्याचा धंदा करतो तो. ३अरबी,फारशी,किं० हिंदुस्तानी भाषा शिकविण्याचा धंदा करतो तो,–विशेषतः मुसलमान. ꣸ **मुनशीगिरी स्त्री०** मुनशीचा धंदा किं० व्यवसाय.

मुनक्का [**अ०** मुनक्का] **पु०**फैसला;निवाडा.

मुनसफ (–ब), मुनसीफ (–ब) [**अ०** मुन्सिफ्] **पु०** न्यायाधीश. **मुनसफी (–बी) स्त्री०** १ मुनसबाचा हुद्दा, अधिकार, किं० कार्य-क्षेत्र. २ न्यायनिवाडा.

मुना [**अ०** मुआयना] **पु०** १ नजरानजर. २ मुकाबला.

मुनादी [**अ०**] **स्त्री०** दवंडी(देणें, पिटणें).

मुनाफा [**अ०**मुनाफआ]**पु०** नफा;फायदा.

मुनासब [**अ०** मुनासिब्] **वि०** योग्य; उचित; रास्त.

मुनि [**सं०**] **पु०** १ मौनव्रत ज्यानें धारण केलें आहे असा मनुष्य. २ वानप्रस्थ आश्रम स्वीकारला आहे ज्याणें तो. ३ तपस्वी. ४ व्यास,

अगस्त्य, पाणिनि, गौतमबुद्ध, इ०थोर किं०अधिकारी पुरुष. ५ अगस्याचें झाड. ॐ **मुनीन्द्र पु०** गौतमबुद्ध. **मुनित्रय न०** पाणिनि, कात्यायन, आणि पतंजलि, हे तीन व्याकरणशास्त्राचे प्रणेते. **मुनिव्रत न०**१तप,–चांद्रायणादि रूप. २ मौन; न बोलण्याचा नियम. **मुनिखिचडी स्त्री०** उंची मसाला घालून केलेली खिचडी. **मुनिश्राद्ध न०** ज्यांत कष्ट फार आणि लाभ थोडा असें कोणतेंही काम.

मुनीम [अ० मुनीब्]पु०गुमास्ता;व्यापारी, सावकार, इ० चा प्रतिनिधि.

मुफत, मोफत [फा० मुफ्त] **वि०** किंमत ज्याबदल दिली नाहीं असा; फुकट (मिळालेला पदार्थ). **क्रि० वि०** १ किंमतीशिवाय. २उगीचच्या उगीच; कारणाशिवाय; विनाकारण. ॐ **मुफतचा वि०** फुकटचा. **क्रि० वि०**विनाकारण; उगीचच्या उगीच.**टीप**,–लिंगवचनांप्रमाणें फिरणारें हें **क्रि० वि०** आहे.

मुफती [अ०] **पु०** फतवा देणारा; बडा काजी. फतवा म्ह० कुराणांतील संदिग्ध वाक्यांसंबंधाचा निकाल किं० निर्णय.

मुंब पु० १ आकारविशेषाचें मातीचें पात्र. २एक प्रकारचें मोठें गलबत.

मुंबई [हिंदूंची देवी ' मुंबा '] **स्त्री०** १ हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक शहर. ह्या शहराची अधिष्ठात्री देवी मुंबा ही आहे. २ माणस, पशु, किं० पदार्थ, यांचें बेपत्ता होणें (होणें, करणें). ३ सत्यानाश; पूर्ण विध्वंस (होणें, करणें). **टीप**,–अव्वल आंग्लाईमध्यें इंग्रज जेत्यांचा दरारा जित हिंदूंवर बसविण्यासाठीं सैन्यांतील इंग्रज शिपायांनीं वरिष्ट अधिकाऱ्यांच्या हुकमांवरून हजारों हिंदी लोकांना फसवून किं० जबरीनें पकडून नेऊन त्यांचा निकाल लावीत असत आणि त्यांची वाट काय झाली किं० ते कोठें गेले ह्याचा मागमूस त्यांच्या नातलगांस लागत नसे. ह्यावरून वरचे दोन अर्थ भाषेमध्यें रूढ झाले. वरील समजूत सुमारें साठ वर्षांमागें म्हाताऱ्या लोकांची होती. ॐ **त्याची मुंबई झाली** १ तो बेपत्ता झाला.२ तो व्यापारादिकांत ठार बुडाला. **पदार्थांची मुंबई होणें** (किं० **करणें**) त्याची नासाडी होणें (किं० करणें).**पैशाची मुंबई करणें** चैनीत पैसा उधळणें. (आलीकडे रूढ झालेला वाक्प्रचार).

मुबदला, मुबादला, मोबदला, मोबादला [अ० मुबादला] **क्रि० वि०, श० यो०** अ० ०च्या बदला; ०च्या ऐवजीं; उ० देव्हाऱ्याच्या मोबदला त्याला मी चवरंग दिला. **पु०** १ अदलाबदल; विनिमय. २ एका वस्तूबदल दिलेली दुसरी वस्तु; उ० अपकाराचा मोबदला उपकारानें करावा असें साधुलोक सांगतात.

मुंबर, मुमर, मुमीर, मुमूर न०, पु० १ तापलेली राख. २ फुपाटा.

मुबलक, मुबलख, मुबलग [अ० मुब्लघ्] **वि०** पुष्कळ; अघळपघळ; मनमुराद.

मुबा, मुभा [अ० मुबाह्] **स्त्री०** परवानगी; विनशर्त कांहींही करण्याची कोणेकाला असलेली किं० दिलेली परवानगी किं० मोकळीक.

मुमडा पु० आकारविशेषाचें मोठें गलबत.

मुमुक्षा [सं०] **स्त्री०** मोक्ष मिळविण्याची इच्छा.

मुमुक्षु [सं०]**पु०**मोक्ष मिळविण्याची इच्छा [करणारा.

मुमूर्षा [सं०] **स्त्री०** १ मरण्याची इच्छा. २ मरण जवळ येऊन ठेपलें आहे अशी कोणेकाची झालेली अवस्था.

मुमूर्षु [सं०] **वि०** १ मरूं इच्छिणारा. २ मरणाच्या द्वारीं पोंचलेला; ज्याचें मरण जवळ येऊन ठेपलें आहे असा; आसन्नमरण.

मुयदंड पु० (आट्यापाट्यांच्या खेळांत) सर्व पाट्यांतून मधोमध काटकोनांत पाडलेली रेघ. ॐ **मुयदंड्या पु०** मुयदंड नांवाच्या रेघेवर उभा राहिलेला गडी.

मुयधोंडा पु० गांवाची सीमा दाखविण्यासाठीं पुरलेला धोंडा.

मुरकट, मुरकूट न० १ चिलट,–एक क्षुद्र उडता प्राणी. २ (**लाक्षणिक**) कोणीही क्षुद्र माणूस,–ज्याला आपण हावें तेंव्हा चिरडूं शकूं. **मुरकुटी माशी स्त्री०** मध जमविणारी एक प्रकारची लहान माशी. **मुरकुटयें न०** ह्या माशीचें पोवळें.

मुरकणें [हिं० मुरकना]**स० क्रि०**१ (तोंड)

एकदम वळावण किं० फिरविणें. २ (मुशींतील सोनें, चांदी, इ० नीं) रंग बदलणें.

मुरका [**म०** मुरकणें] **पु०** एकदम तोंड वळविणें किं० फिरविणें ही क्रिया (मारणें).

मुरकी स्त्री० गोसावी, बैरागी, वाणी, परदेशी, इ० कानांत घालतात तें वल्य किं० वळें.

मुरकुंडी, मुरकुंड [**म०** मुरडणें] **स्त्री०** १ उत्सुकता, फार हसणें, थंडी असह्य होणें, ताप, अशक्तपणा, भीति, आनंद, इ० कारणांमुळें होते ती शरीराची संकुचित स्थिति (वळणें); उ० भोंडे यांच्या नकला ऐकून माझी मुरकुंडी वळली; उ० वाघ पाहातांच सदोबाची मुरकुंडी वळली. २ भीड, दाटी, खेचाखेच; उ० अनंतफंदीच्या लावण्यांवर हजारों माणसांच्या मुरकुंड्या पडत; उ० पेशवाईंत गोंधळांवर मराठे लोकांच्या मुरकुंड्या पडत. ३ पायाच्या पोटऱ्या खांद्यावर टाकून बसणें हें शरीराचें संस्थान (घेणें).

मुरकूट मागें ' मुरकट ' पहा.

मुरगळणें, मुरगाळणें **स० क्रि०** वळविणें; पिळवटणें. ॐ **कोणेकाची मुंडी मुरगळणें** (किं० **पिरगळणें** किं० **पिळणें**) त्याचा सर्वतोपरीं नाश करणें.

मुरगाळा [**म०** मुरगाळणें] **पु०**पीळ घालून किं० पिरगळून किं० वळवून पदार्थाचा केलेला चोळाबोळा किं० दुर्दशा.

मुरट [**म०** मुरटणें] **न०** मुरडून वाकडें झालेलें पान, फळ, इ०.

मुरटणें [**म०** मुरडणें] **अ० क्रि०** १ झाडावर रोग पडल्यामुळें पान, फूल, इ० सुरकुतणें किं० वाकडें होणें. २ एकदम वळणें किं० वळसा घेणें. **स० क्रि०** पिळवटणें; वळविणें.

मुरटा [**म०** मुरटणें] **वि०** रोगानें वाकडें झालेलें (पान, काकडी, इ०).

मुरटी स्त्री० झाडांवर पडतो तो एक रोग,– ज्याच्या योगानें त्यांचीं पानें, फळें, इ० मुरडून वाकडीं होतात.

मुरड [**म०** मुरडणें] **स्त्री०** १ वस्त्र, कागद, इ०ची वळलेली किं० वळविलेली कड. २ नदी, रस्ता, इ० चें वळण. ३ दोरी, शरीर, गात्र, इ०चा वळसा. ४ पदार्थाचा घाट. ५ वस्त्राची वीण. ६ मिशीला लाविलेलें अकडबाज वळण. ७ भिवईची वक्र रेषा. ८ करंजी, कानवला, इ० चे कांठ जोडून वळवून घालतात ती घडी किं० त्यांच्या सांध्याच्या रेषेवर करतात ती नक्षी. ९ वस्त्राला घालतात ती एक प्रकारची शिवण.

मुरडकानवला (–कोन्होला) खाणें १ परगांवाहून मुलानें किं० मुलीनें परत आपल्या गांवीं येणें. २(**लाक्षणिक**) नोकरानें बदलीच्या जागेवरून परत आपल्या पहिल्या नोकरीच्या जागेवर रुजूं होणें. **टीप**,–मुलगा किं० मुलगी परगांवास निघाली असतां त्यांना मुरडकानवला त्यांनीं परत लवकर यावें म्हणून खावयास देण्याची पूर्वीं चाल असे, ह्यावरून वरील वाक्प्रचार रूढ झाले.

मुरडणी [**म०** मुरडणें] **स्त्री०** मुरडण्याची क्रिया.

मुरडणें [**हिं०** मुरूडना] **अ० क्रि०** १ मागें वळणें. २परतणें. ३ (वस्त्र,कागद,इ०) सुरकुतणें. ४ डोकें वळविणें. **स० क्रि०** १ मागें वळविणें. २ (करंजी, कानवला, इ० चा कांठ) वळविणें किं० त्याला नक्षी करणें. ३ (वस्त्र, कागद, इ० ना) निऱ्या किं० चुण्या पाडणें. ४ (कागदाला) घड्या घालून रकाने पाडणें. ॐ **नाक** (किं० **तोंड**) **मुरडणें** नाक (किं० तोंड) वाकडें करून नापसंती दर्शविणें. **मुरडून पाहाणें** पूर्वीची स्थिति काय होती हें पाहाणें. **मुरडशेंग, मुरूडशेंग स्त्री०** १ एक वेल. २ ह्या वेलीची शेंग.

मुरडा [**म०** मुरडणें] **पु०** १ पीळ, वळ. २ आमांशादि विकृतींमुळें पोटांतील आंतड्यांस पीळ पडल्यासारखी भावना होते ती किं० तिची व्यथा. ३ झाडाची पानें, फुलें, इ० ना कांहीं रोगामुळें सुरकुत्या पडतात त्या समुच्चयानें (पडणें).

मुरडाण (**–न**)[**म०** मुरडणें] **न०** १सरळ रेषेंत नसलेलें शेत किं० जमीनीचा पट्टा. २ ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत आणि परत त्या टोकापासून ह्या टोकापर्यंत केलेली नांगराची दुहेरी फेरी किं० अशा दुहेरी फेरीनें नांगरलेला भाग.

मुरडींव [**व०** मुरडणें] **वि०** १ वळविलेला;दुमडलेला.२सुरकुतलेला किं०मागें वळलेला. ३ घड्या पाडलेला (वस्त्रांदींचा कांठ).

मुरडुगा [म० मुरडणें] वि० नखरेबाजीनें नाक, तोंड, इ० मुरडणारा किं० मुरडण्याची संवय असलेला (पोऱ्या). **मुरडुगी** हें स्त्रीलिंग.

मुरणें अ० क्रि० (पाणी, दूध, तेल, तूप, रंग, इ० पातळ पदार्थ) वस्त्र, भाकरी, लाकूड, जमीन, इ० मध्यें शिरून त्यांत निविष्ट होऊन राहाणें. २ शोषून घेतला जाणें. ३ (लोणचें, मोरंबा, मोरआंवळा, इ० नीं) क्षार, साखरेचा पाक, इ० ना आपल्या ठायीं पूर्णपणें निविष्ट करून घेणें. **टीप**,—क्षार, पाक, इ० वर सुद्धां कर्मता येते; उ० हें लोणचें अझून चांगलें मुरलें नाहीं; उ० त्या मोरआंवळ्यांत पाक मुरल्यावर रोज एक एक आंवळा खात जा. ४ (फळ, बीज, विड्याचें पान, इ०) इष्ट रसानें किं० गुणानें युक्त होणें; उ० हें बीज दोन दिवस मुरलें तर तें पेरावयास योग्य होईल. ५(लाकूड इ०) कायमच्या रूपाप्रत किं० स्थितीप्रत येणें आणि विशिष्ट कामीं योजण्याला लायक होणें; उ० ह्या अरकसून पाडलेल्या तुळया चार महिने मुरल्याशिवाय त्या घर बांधण्याच्या कामीं योजतां येणार नाहींत. ६ (कोणी मनुष्य कांहीं काम करण्यांत) अनुभविक होणें किं० (त्याला)त्या कामांतील खुब्या कळूं लागणें; उ० तूं ह्या कामांत चांगला मुरल्याशिवाय तुला मी बढती देणार नाहीं. ७ घाम न येतां(ताप) शमणें. ८(गळूं)परिपक्व होऊन फुटावें आणि निचरावें आणि बरें व्हावें त्याच्या ऐवजीं (तें) अंगांत दबून जाणें. ९ (कांहीं इच्छा) सफळ न झाल्यामुळें ती अजीबात लुप्त होणें. १० (राग, द्वेष, मत्सर, इ०) कालें करून शमणें. ११ वाचन, लेखन, विचार, इ० मध्यें (कोणी मनुष्य) गढून जाणें. १२ प्रसंगविशेषीं किं० अडचणीला योजावयासाठीं बाजूस काढून ठेविलेले (पैसे, धान्य, इ०) नेहेमींच्या कामांतच योजले जाऊन संपणें; उ० बाळंतिणीसाठीं कासंडीभर राखून ठेविलेलें तूप भाद्रपद महिन्याच्या धर्मकृत्यांत मुरलें. ॐ **मुरून बसणें** अंगाचीं गात्रें पोटाजवळ घेऊन बसणें किं० निजणें; गुरगुशी मारून बसणें.

मुरदंग, मुरदुंग [सं० मृदंग] पु० एक वाद्यवाद्य; पखवाज. ॐ **मुरदुंगाला दोहींकडून थपडा** मध्यस्थाला दोन्ही पक्ष दोष देतात. **मुरदुंग पाटी** स्त्री० आट्यापाट्यांच्या खेळांतील मधली मोठी उभी रेघ. **मुरदंग्या, मुरदुंग्या** पु०मुरदुंगपाटीवर फिरत राहून दोन्ही बाजूंच्या विरुद्ध पक्षांच्या गड्यांना मारण्याचा प्रयत्न करणारा खेळाडू.

मुरदंड, मुरदंड्या मागें ' मुयदंड, ' ' मुयदंड्या ' पहा.

मुरदा, मुरदाड मागें ' मुडदा, ' ' मुडदार ' [पहा.

मुरदाडणें [म० ' मुरडणें 'चें एक रूप] स० क्रि० १ वृक्षादिकांच्या (फांद्या, पानें, फुलें, इ०)पिळून किं० तुडवून त्यांची नासाडी करणें; उ० म्हशीनें गुलछबूचीं झाडें एका क्षणांत मुरदाडलीं. २ (**लाक्षणिक**) छळणें; गांजणें;सतावणें. ३ (**लाक्षणिक**) (कोणेकावर) शिव्यांचा वर्षाव करणें किं० (त्याची) खरडपट्टी काढणें.

मुरदाड शिंग न० एक वेल किं० तिची शेंग. मागें ' मुरडणें ' मध्यें ' मुरड शेंग ' पहा.

मुरदुंग, मुरदुंग्या मागें ' मुरदंग, ' ' मुरदंग्या ' पहा.

मुरब्बा, मुरंबा, मोरंबा [अ० मुरब्बा] पु० पाकांत घालून ठेविलेले आंबे.

मुरब्बी [अ०] पु० १ आश्रयदाता; वाली; कैवारी. २ कांहीं कामांत अनुभविक किं० वहिवाटलेला. ३ कांहीं कामाचा व्यवस्थापक. ४ कांहीं कामाची जबाबदारी शिरावर घेऊन तें पार पाडणारा.

मुरमाड [म० मुरूम] वि० मुरूम जींत फार अशी (जमीन). पुढें ' मुरूम ' पहा.

मुरमुरा [म० मुरमुर हा आवाज] पु० मागें ' चुरमुरा ' पहा.

मुरमुशी १ मागें 'गुरगुशी' पहा. २ तापाच्या अगोदर किं० मागून येतो तो थकवा(**येणें**).

मुरमुसणें अ० क्रि० १ गात्रें पोटाशीं घेऊन निजणें किं० बसणें. २ अंगांत ताप भरावयाच्या पूर्वीं येते त्या निरंगळीनें व्यथित होणें.

मुरली [सं०] स्त्री० १ पांवा. २ अल्गूज. ॐ **मुरलीधर** पु० कृष्ण.

मुरली, मोरली, मोरवळी स्त्री० भाज्या चिरण्याचें एक साधन,–ज्याला ' विळी ' असें पुण्याकडे म्हणतात.

मुरवण [म० मुरविणें] **न०, स्त्री०** १ दूध विरजण्यासाठीं त्यांत घालतात तें ताक इ०; विरजण. २ कोणेकाच्या गर्वाचा परिहार करणारी कांहीं गोष्ट. ३ दुसऱ्याचा पैसा लाटण्यासाठीं पुढें केलेली कांहीं तरी खोटी सबब. ४ जींत पैसे खातां येतील अशी पैशाची मोठी उलाढाल. ५ आपला गमावलेला किं० लोकांचा गिळंकृत केलेला पैसा. ६ रोग पडून खराब झालेलें धान्य किं० पीक. ७ आंबे, केळीं, इ० पिकविण्यासाठीं केलेलें गवताचे थर समुच्चयानें किं० असें आंथरलेलें गवत. ८ तंबाखूचीं पानें दोषरहित करण्याचें कांहीं द्रव्य किं० संस्कार.

मुरवणें [म० मुरवणें] **न०** वर 'मुरवण'चे पहिले पांच अर्थ पहा.

मुरवत [अ०] **स्त्री०** १ परवा; भीड; कोणेकाला योग्य तो आदर दाखविणें (ठेवणें, धरणें, बाळगणें). २ माणुसकी; सभ्यपणाचें वर्तन; आवरूदारी.

मुरवा पु० १ भाजीच्या उपयोगाचीं बागेंत लाविलेलीं झाडें (कोंवळ्या स्थितींतील). २ मागें ' मरवा ' पहा.

मुरविणें [म० ' मुरणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** (पैसा इ०) लाटणें, खाणें, किं० मारणें. २ खोटे खर्च दाखवून (दुसऱ्याचे पैसे) मारणें.

मुरसंड, मुरसंडी स्त्री० मूर्च्छा; घेरी (येणें).

मुरळी स्त्री० १ खंडोबाला वाहिलेली मुलगी. २ भाज्या चिरावयासाठीं पोलादी पातें लाकडाच्या फळींत बसवून केलेलें साधन; विळी.

मुरा, मुरामासा पु० गोड्या पाण्यांतील एक मासा.

मुराण [म० मुरणें] **न०** कोंवळ्या स्थितींतच रोगानें जळलेलें शेत. बांड म्हणजे बरेच वाढल्यावर रोगानें खुरटलेलीं बाजरी, जोंधळा, इ० चीं ताटें. मागें ' बांड ' पहा.

मुराद [अ०] **स्त्री०** इच्छा. **वि०** यथेच्छ; विपुल; पुष्कळ. ꙮ **मनमुराद वि०** मनाची पूर्णपणें तृप्त होईल इतकें किं० इतक्या प्रमाणांत असलेलें; उ० येथें मनमुराद पाणी आहे; उ० दिवाळीच्या सुट्टींत मी मनमुराद खेळलों.

मुरांबा वर ' मुरब्बा ' पहा.

मुरास पु० सह्याद्रीच्या लगतचा पूर्वदिशेकडील दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश.

मुरी [म० मुरणें] **स्त्री०** शरीराचीं गात्रें पोटाशीं आणून केलेलें संस्थान (मारणें, घालणें, बसणें). ꙮ **मुरी मारणें** सरकारच्या किं० सावकाराच्या शिपायांना चुकविण्यासाठीं कोठें तरी लपून बसणें किं० पळून जाणें.

मुरीद [अ० मुरीद्] **पु०** मुसलमानी धर्माच्या विशिष्ट पंथाचा चेला किं० शिष्य.

मुरुडणें, मुरूड, मुरूडशेंग मागें ' मुरडणें, ' ' मुरड, ' ' मुरडशेंग ' पहा.

मुरुवत, मुरोवत, मुरोत स्त्री० मागें ' मुरवत ' पहा.

मुरूम पु० ढिसूळ दगडाचे खडे समुच्चयानें.

मुरूम पु०, न० वयांत आलेला मुलगा किं० मुलगी यांच्या तोंडावर येतात त्या पुळ्या समुच्चयानें. **मुरमाची पुळी स्त्री०** अशी एक एक पुळी व्यक्तिशः.

मुरेली, मुरेळी स्त्री० लाकडाच्या फळींत बसविलेलें पोलादाचें धारेचें पातें,–भाज्या, फळें, इ० चिरण्याचें साधनविशेष; विळी.

मुऱ्हाळी पु०, स्त्री० नवरा मुलगा किं० नवरी मुलगी ह्यांना सासुरवाडीस, सासरीं, किं० बापाच्या घरीं पोंचविणारा किं० बोलवावयास आलेला कोणी माणूस (पुरुष किं० स्त्री). **पु०** (लग्नाच्या विधींत) नवऱ्या मुलीचा भाऊ किं० कोणीही त्याच्या जागीं आलेला माणूस. **स्त्री०** पाचारण, आमंत्रण. ꙮ **मुऱ्हाळीमान पु०** वधूच्या भावास किं० त्याच्या स्थानीं असलेल्या मुलग्यास वस्त्रादींची देतात ती देणगी.

मुऱ्हें न० १ धुकें. २ सह्याद्रीच्या रांगेच्या माथ्यापासून तो पायथ्याच्या पूर्वेकडचा पांच सहा मैल रुंदीच्या पट्टा. ह्या मुऱ्ह्याच्या पट्ट्यापासून पुढें मावळाचा पट्टा सुरू होतो. हा पट्टा पावसाळ्यांत प्रथमार्धाच्या मुऱ्ह्यानें (म्ह० धुक्यानें) आच्छादित असतो.

मुलकणें अ० क्रि० गालांतल्या गालांत हसणें.

मुलकी, मुलखी [अ० मुल्क्=देश] **वि०** १ आपल्याच गांवचा किं० देशचा; परकी नव्हे असा. २ जमाबंदीच्या कामासंबंधाचा. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' चिटनिशी. ' ३ सामाजिक (घडामोडी, चालीरीती, इ०).

मुलगा पु० १ सुमारें बारा पंधरा वर्षांच्या वयापर्यंतचा पुरुष. २ (कोणेकाचा) पुत्र; लेक. **मुलगा पु०; मुलगी स्त्री० ; मुलगें न०; मुलें न० अ० व०** मुलगे आणि मुली,–लिंगभेद मनांत न घेतां. ' त्याला पांच मुलें आहेत ' हें वाक्य वय आणि लिंग ह्यांचा निर्देश न करतां योजतां येतें. **मुलेंबाळें, मुलेंलेकरें न० अ० व०** कोणेकाचीं लहान मुलें (लिंगें मनांत न घेतां).

मुलतानी वि० मुलतान शहरचा. **मुलातानी स्त्री०** एक रागिणी.

मुलना, मुलाणा [अ० मुल्ला] **पु०** १ मुसलमान जातीचा धर्मगुरु किं० शास्त्रवेत्ता. २ मुसलमान पंतोजी. ३ बारा बलुतेदारांपैकीं एक.

मुलाईम, मुलायम [अ० मुलायिम्] **वि०** १ नाजूक, मऊ (गात्र, पदार्थ). २ मनोहर, उमदा, सर्वोत्कृष्ट, उत्तम (चेहरा, भाषण, तरवार, दागिना, स्वभाव, इ०).

मुलाकात, मुलाखत, मुलाकत [अ० मुलाकात] **स्त्री०** (कोणेकाची) गांठ किं० भेट.

मुलाजा, मुलाइजा, मुलाहिजा [अ० मुलाहझाह्] **पु०** १ (कोणेकाची) परवा; (कोणेकाला दाखविलेला) योग्य आदर(ठेवणें, राखणें). २ क्षमा; अपराधाची उपेक्षा.

मुलामा, मुलाम्मा [अ० मुलम्मअ] **पु०** धातूच्या वस्तूवर चढविलेलें सोनें, रुपें, इ० चें पाणी. ꙮ **मुलामी, मुलाम्मी वि०** दिखाऊ; दिसण्यांत मात्र खरा, चांगला, किं० उंची.

मुलायीन, मुलायम, मुलाम वर ' मुलाईम ' पहा.

मुलूक, मुलूख [अ० मुल्क] **पु०** १ देश. २ आपला देश. ꙮ **मुलखास** (किं० **मुलखांत**) **जाणें** स्वदेशास जाणें. **मुलखांत दिवा लावणें** ओसाड प्रदेशांत मानवी वसति करणें; निर्जन प्रदेश वसविणें. **मुलुखगिरी स्त्री०** १ परदेश पादाक्रान्त करणें किं० जिंकणें. २ सैन्याचें कूच. ३ वसूल करावयास सरकारनें पाठविलेल्या शिपायांच्या टोळीचा प्रवास. ४ व्यापारी, यात्रेकरू, इ०चा प्रवास. **मुलूखमैदान** [अ० मालिक–इ–मैदान् =देशाचा राजा] **स्त्री०** विजापुरची तोफ. हिच्या तोंडाचा घेर चार फूट नऊ इंच असून गर्भाचा व्यास दोन फूट चार इंच आहे. ह्या तोफेचें नांव ' मुलूख मैदान ' हें 'मालिक–इ– मैदान'चें अपभ्रष्ट रूप होय. **टीप**,– मोठमोठ्यानें बोलणारी किं० भांडणारी जी स्त्री तिला 'मुलूखमैदान ' असें लक्षणेनें म्हणतात. **मुलूखमैदान न०** अतिविस्तीर्ण आणि ओसाड प्रदेश.

मुल्ला पु० मागें ' मुलना ' पहा.

मुशकील, मुसकील [अ० मुष्किल्] **वि०** कठिण; दुर्घट. **स्त्री०** अडचण; पंचाईत. ꙮ **मुशकिली स्त्री०** अडचण; पेचाची स्थिति.

मुशाफर [अ० मुसाफिर] **पु०** प्रवासी; वाटसरू. ꙮ **मुशाफरी स्त्री०** प्रवास.

मुशारा, मुशाहिरा [अ० मुषाहराह्] **पु०** १ मासिक पगार. २ वेतन. ꙮ **मुशारखार पु०** पगाराच्या ठरावानें नोकरीस ठेविलेला मनुष्य.

मुशी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष. ह्याच्या बारा जाति आहेत.

मुष्टि [सं०] **स्त्री०, पु०** १ हाताचीं बोटें तळहातावर वळविलीं असतां होते ती रचना. २ मूठभर पदार्थ; उ० धान्यमुष्टि, इ०. ३ शस्त्रादींचा हातांत धरण्याचा भाग. ꙮ **मुष्टिका स्त्री०** १ ' मुष्टि ' चे तिन्ही अर्थ पहा. २ लहान मूठ. **मुष्टिघात, मुष्टिप्रहार पु०** मुठीनें मारलेला रट्टा. **मुष्टिप्रयोग पु०** १ मुठीनें मारलेला रट्टा. २ कोणेकावर मंतरलेले तांदूळ, उडीद, इ० चे दाणे मुठीनें टाकणें,–त्याचा नाश करण्यासाठीं. **मुष्टिमात्र न०** १ मूठभर पदार्थ. २ फक्त एकच मूठभर पदार्थ. ३ पदार्थाचें अत्यल्प प्रमाण. **मुष्टिमोदक पु०** (विनोदांत) मुठीचा रट्टा (देणें).

मुसकट (–ड), मुसकल, मुसकाड, मुसकूट न०, मुसकाडी स्त्री० १ जनावराचें तोंड किं० डोक्यापासून तोंडापर्यंतचा भाग. २ मनुष्याचें तोंड किं० गाल. ꙮ **मुसकटदाबी स्त्री०** कोणेकाचें तोंड दाबणें,—त्याला बोलूं किं०

खाऊं न देण्यासाठीं. २ विचारस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य यांना सरकारच्या कायद्यानें झालेली बंदी. **मुसकटदाबीचा कायदा पु०** लोकांचें लेखनाचें आणि भाषणाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारा सरकारचा कायदा.

मुसकटणें, मुसकुटणें, मुसकाटणें [म० मुसक्कट] **स० क्रि०१** (कोणेकाच्या) थोबाडींत मारणें. २ वस्त्रानें (तोंड) झाकणें.

मुसकंडी, मुसकांडी पुढें ' मुसंडी, ' ' मुसांडी ' पहा.

मुसकणें [मं० मुसकट] **स० क्रि०** वस्त्रादींनीं(तोंड इ०)झाकणें किं० आच्छादणें.**अ०क्रि०** रागानें किं० तिरस्कारानें (तोंड) एकदम वळणें.

मुसकील, मुशकील [अ०] **वि०** कठिण; दुर्घट; दुष्कर. **स्त्री०** अडचण; संकट; कष्ट.

मुसकें न० १ खाण्यास प्रतिबंध करावयासाठीं जनावरांच्या तोंडाला बांधतात ती जाळी. २ जनावरांचें तोंड. ३ मनुष्यांचें तोंड (तिरस्कारांत).

मुसक्या स्त्री० अ० व० कोणेकाचे हात पाठीकडे वळवून ते बांधण्याची क्रिया(बांधणें). ' मुसकी ' हें **ए० व०** योजण्यांत येत नाहीं.

मुसज्जर [अ०] **पु०** एक प्रकारचें रेशमी वस्त्र.

मुसंडा पु० १ पाण्याचा जोराचा लोंढा. २ गर्दींतून जोरानें घुसणें. २ डोक्यानें मारलेला रट्टा (मारणें, देणें).

मुसंडा पु० मुसलमान माणूस (तुच्छतेंत).

मुसंडी स्त्री० १ डोकें पुढें वळवून दाटींत घुसणें. २ डोक्यानें दिलेला रट्टा.

मुसनमान ' मुसलमान'चा अपभ्रंश. पुढें ' मुसलमान ' पहा.

मुसमारणें अ० क्रि० गुडघे पोटाशीं घेऊन आणि अंगावरून पांघरूण घेऊन तापामुळें किं० थंडीमुळें निजणें किं० पडून राहाणें.

मुसमुशी, मुसमूस स्त्री० तारुण्यानें किं० तालिमबाजीनें अंगांत संचरते ती रग किं० शक्ति.

मुसमुसणें अ० क्रि० (तारुण्य, क्रोध, किं० मस्ती) अंगांत जोरानें संचरणें किंवा संचरत असणें. २ तारुण्याच्या मदानें (मनुष्य) बेफाम होणें.

मुसल [सं०] **न०** कांडण्याचें आउत; कांडण्याच्या उपयोगाचा टोकाला विडी बसविलेला लाकडाचा दांडा. पुढें ' मुसळ ' पहा. ※ **मुसलायुध पु०** बलराम.

मुसलमान [अ०] **पु०** इसलामी धर्माचा अनुयायी. ※ **कोणेकाला मारून मुटकून** (किं० **हाणून**) **मुसलमान करणें** त्याची इच्छा नसतां त्याला कांहीं कृत्याकडे वळविणें किं० संमति देण्याला भाग पाडणें. **टीप,—** हिंदूंना मुसलमान लोक मुसल्मानी धर्मांत जबरदस्तीनें प्रविष्ट करून घेतात ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला. ※ **मुसलमानी स्त्री०** मुसलमान राजांची शासनपद्धति किं०राज्य.**वि०** मुसलमानांसंबंधाचा (अंगरखा, धर्म, अंमल,इ०).

मुसळ [सं०मुसल] **न०** १ तांदूळ इ०उखळ इ० मध्यें कांडण्याचें किं० सडण्याचें आउत,–जें टोकाला विडी बसविलेल्या लाकडाच्या दांड्याच्या रूपाचें असतें.२गदा ह्या नांवाचें लढण्याचें हत्यार. **मुसळी स्त्री०**एक औषधी झाड किं०त्याची मुळी. **मुसळ न०** उसाच्या चरकांतील नवरा किं० नवरी. ※ **मुसळ नेसणें** किं० **मुसळ पांघरणें** किं०**मुसळ डोकयाला बांधणें** निलज्यपणाचें किं० असभ्यपणाचें वर्तन करणें. **मुसळाला अंकुर फुटणें** १ शक्य कोटींतील पण अत्यन्त असंभवनीय अशी कांहीं गोष्ट घडून येणें. २ कठिण आजार, वेड, इ० तून बरें होऊन पूर्वीप्रमाणें मनुष्यानें व्यवहार करण्याच्या स्थितीस येणें. **मुसळाचें धनुष्य न०** नव्व्याण्णव हिश्शांनीं अशक्य आणि एका हिश्शानें शक्य अशी कांहीं गोष्ट. **मुसळा मुसळांची गांठ बांधतां येत नाहीं** दोन सारख्याच आडदांड, हट्टी, आणि हेकट माणसांत सलोखा किं० ऐकमत्य घडवून आणतां येत नाहीं.**सगळेंच मुसळ केरांत** अत्यन्त महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य होणें किं० तिचें स्मरण न होणें. **मुसळकंद पु०** १ एक कंदाविशेष.२ धटिंगण. ३ मूर्ख; टोणपा; बैलोबा; **मुसळकांड (–डा,–ड्या),मुसळसडा वि०** मुसळानें कांडलेला किं० सडलेला (तांदूळ). **मुसळझुड्या, मुसळझोंब्या**

वि० मुसळानें काडतांना न फुटणारा तांदूळ. याच्या व्यावर्तकत्वें 'पिठूळ'. **मुसळदेवता स्त्री०** दांडगी स्त्री. **मुसळधार स्त्री०, मुसळधार पाऊस पु०** मुसळा इतक्या जाडीच्या धारा ज्याच्या आहेत असा पाऊस (ह्म०खूप जोराचा पाऊस). **क्रि०** लागणें, पडणें. **मुसळवादा पु०** हगवण किं० आमांश यांची जोराची साथ. **मुसळसळ, मुसळसळई स्त्री०** मुसळ करावयाला योग्य असा लाकडाचा दांडा. **मुसळस्नान न०** पुरुषसूक्त इ०मंत्र न म्हणतां केलेलें स्नान; नुसतें अंग धुणें ही क्रिया. **मुसळा, मुसळ्या वि० १** दणगट; मजबूत. २ कांडतांना न फुटणारा (तांदूळ). वर ' मुसळ झुझ्या' पहा. **मुसळी स्त्री०** गर्दीत किं० दाटींत घुसणें (मारणें, देणें). **मुसळी स्त्री०** लहान मुसळ.

मुसळणें अ० क्रि० १ (फळें) सडणें किं० नासणें. २ कष्टाच्या कामानें अत्यन्त थकणें.

मुसांडा, मुसांडी वर 'मुसंडा', 'मुसंडी' पहा.

मुसाफर [अ०] **पु०** प्रवासी; वाटसरू.

मुसावणें [**म०** मूस] **अ० क्रि० १** वाढणें; फुगणें. २ जोरानें वाहणें,—जखमेंतून रक्त, कारंज्यांतून पाणी, इ०. ३ व्यापणें; आंत पूर्णपणें भिनणें. ४ मुशीमध्यें घातला जाणें. ५ मूर्तरूप दिसणें. ६ निमग्न होणें; रमणें.

मुसाहेब [अ० मुसाहिब्] **पु०** सोबती; स्नेही; जोडीदार.

मुसूम [अ० मुसमुम्] **वि०** पक्का केलेला; निश्चित.

मुसूम [अ० मूसम्] **स्त्री०** फलादिकांच्या बहराचा समय. ह्या अर्थी **पु०** सुद्धां. **न०** टेकडीचें टोक.

मुसेजर, मुसज्जर पु० एक प्रकारचें रेशमी कापड.

मुस्तकीम [अ०] **वि० १** कायम; निश्चित; पूर्णपणें स्थापिलेलें. २ भक्कम, मजबूत (माणूस, पशु, यंत्र, घर).

मस्तमीक [अ०] **स्त्री०** सुधारणा, मशागत; **उ०** जशी तुम्ही शेताची मुस्तमीक कराल तसा तुम्हाला शेताचा कौल मिळेल.

मुस्ता [**सं०**] **स्त्री०** एक प्रकारचें सुगंधी गवत. ह्याला मोथा किं० नागरमोथा म्हणतात.

मुस्ता पु० कापूस विंचरण्याचें एक साधन.

मुस्तेद [अ० मुस्तइद] **वि० १** सिद्ध; तयार. २ भक्कम; पक्का केलेला.

मुहुः [**सं०**] **क्रि० वि०** पुनः पुनः. **॥ मुहुर्मुहुः क्रि० वि०** वारंवार; पुन्हा पुन्हा.

मुहूर्त [**सं०**] **पु० १** क्षण; अल्प काळ. २ समय; ठरलेला वेळ. ३ दोन घटका इतका काळ. ४ शुभ किं० योग्य समय. ५ कोणत्याही कार्याचा आरंभ. ६ (**मराठींत**) पाटाचें लग्न (शूद्रांत). ' म्होतुर ' हा अपभ्रंश अधिक प्रचलित आहे. **॥ मुहूर्तपूजन न०, मुहूर्तपूजा स्त्री०**(लग्नादिविधींत)पत्रिकापूजन. **मुहूर्तमणि पु०** लग्नामध्यें वधूच्या गळ्यांत बांधतात तें मंगळसूत्र. **मुहूर्तमेढ स्त्री० १** लग्नादि कार्यार्थ मंडप उभारतांना पहिला खांब जो शुभ समयीं पुरतात तो. २ घर बांधतांना पहिला खांब सुमुहूर्तावर स्थापितात तो. **एकाद्या कामाची मुहूर्त मेढ रोवणें** तें सुरू करणें.

मुहूर्त ' मूर्ति' चा अपभ्रंश. पुढें ' मूर्ति 'पहा.

मुळकंड, मुळकुंडी [**म०** मूळ + कांडी] **स्त्री०** झाडाच्या मुळाची एक शाखा किं० एका शाखेचा एक तुकडा. 'मुळखंड' हाही वरील अर्थाचाच शब्द आहे.

मुळका पु० १ कोणेकाला कांहीं कामीं घाई करणें किं० तगादा लावणें (लावणें). २ कांहीं कामासंबंधानें घाई किं० उत्सुकता (लागणें). ३ कामाची निकड (सुटणें).

मुळंबा पु० केळीच्या झाडाला फुटलेला नवा अंकुर किं० कोंब; पिलूं.

मुळमुळ स्त्री० १ अस्पष्ट बोलणें. २ थांबत थांबत बोलणें,—जें ऐकतांना लोकांना त्रास होतो. ३ झिम झिम पाऊस; जोराचा नव्हे असा आणि बारीक बारीक थेंबांच्या रूपानें पडणारा पाऊस. ४ भिक्षेकऱ्यानें भिक्षेसाठीं लाविलेली पिरपीर. ५ कामाची घाई किं० निकड (लागणें, लावणें).

मुळमुळ, मुळमुळा क्रि० वि० १ बारीक थेंबांच्या रूपानें (पाऊस पडणें). २ स्फुंदून स्फुंदून (रडणें).

मुळमुळणें अ० क्रि० १ अस्पष्टपणें किं० तोंडांतल्या तोंडांत बोलणें. २ बारीक थेंबांच्या रूपानें

(पाऊस) पडणें. ३ पिरपिरणें; कण्हणें; कुथणें.

मुळमुळीत वि० १ वेचव (खाद्य, पेय).२ संदिग्ध (विधान, जबाब). ३ श्रोत्याच्या मनावर परिणाम न करणारें(भाषण).

मुळवणी स्त्री० वोळवण.

मुळवशी स्त्री० शेत, गांव, बाग, मळा, इ० चा खालचा भाग किं० सखल प्रदेश.

मुळवा [**सं०** मूल]**पु०** (झाड, पशु,मूळ, पुरुष, इ० ची) संतति किं० पुढची वाढ. २ वृक्षाच्या मुळाची मुख्य किं० मोठी किं० पहिली शाखा. ३वृक्षाचीं मुळें समुच्चयानें.४ मळा, शेत, बाग, इ० मध्यें पूर्वीच्या वर्षी केलेलें पीक,–दुसऱ्या वर्षीच्या पिकावर चांगला किं० वाईट परिणाम होण्याच्या दृष्टीनें.

मुळव्याध, मुळव्याधि [**सं०** मूलव्याधि] **स्त्री०** गुदाला होतो तो एक रोग.

मुळा [**सं०** मूलक] **पु०** एक शाकभाजी.

मुळा मुहूर्तीं, मुळामुहूर्तानें,मुळीं मुहूर्तीं [**स०** मूल+मुहूर्त] **क्रि० वि०** सुरवातीला; आरंभीं.

मुळारंभ [**सं०** मूल+आरंभ] **पु०** अगदीं सुरवात किं० सुरवातीचा समय. ꣸ **मुळारंभीं क्रि० वि०** अगदीं पहिल्यानें; अगदीं सुरवातीलाच.

मुळारी, मुळ्हारी, मुळ्हारी मान मागें ' मुऱ्हाळी, ' ' मुऱ्हाळी मान ' पहा.

मुळावणें [**म०** मूळ] **अ० क्रि०** (एके ठिकाणाहून उपटून दुसऱ्या ठिकाणीं लाविलेल्या झाडानें किं० रोप्यानें) मूळ धरणें;(झाड, रोप, इ० नीं) मूळ जमीनींत खुपसणें.

मुळी [**सं०** मूल; **म०** मूळ] **स्त्री०** झाडाचें मूळ किं० मुळाचा तुकडा. ꣸ **त्याच्या मुळ्या पाताळीं गाढल्या (किं० गेल्या) आहेत** (तो, तें, इ०) एकाद्या स्थळीं, समाजांत,जमीनींत,किं० स्वभावांत पक्केंपणें किं० दृढपणें निविष्ट होणें.

मुळीं [**सं०** मूल; **म०** मूळ] **क्रि०वि०**१अगदीं देखील (निषेधीं प्रयोग). २ प्रथम; आरंभीं.

मुळू [**नंदभाषेंत**] **वि०** पांच ही संख्या.

मुळें [**म०** ' मूळ ' ची तृतीया] **श० यो०** **अ०** कारणानें, योगानें; उ० आळसामुळें त्यांचा कज्जा बुडाला.

मुळेमाठ [**म०** मुळा+माठ] **पु०** माठ नांवाच्या शाकभाजीची एक जात.

मुळ्या [**म०** मूळ, मुळी] **पु०** १ काष्ठौषधी विकणारा. २ ग्राम जोशी. ३ वतन, हक्क, अधिकार, इ० चा पहिला किं० मूळचा भोक्ता. ४ एकाद्या ठिकाणचा अत्यन्त वयोवृद्ध किं० मागच्या पिढीचा माणूस. ५ मूळ नक्षत्रावर जन्मलेला. ६ खोडकर, उपद्रवी, किं० द्वाड माणूस.

मुक्षद, मुक्षुद (–ध)[**सं०** मुख+शुद्धि]**स्त्री०** जेवण झाल्यानंतर तोंड साफ करण्यासाठीं खातात ती सुपारी, विडा, लवंगा, इ०.

मूक [**सं०**] **वि०** १ शब्दोच्चारणाचें इंद्रिय निसर्गतः व्यंग असल्याकारणानें ज्याला बोलतां येत नाहीं असा. २ कांहीं कारणामुळें जो मुद्दाम बोलत नाहीं असा. ३ जो वाजत नाहीं किं० ज्याचें वाजणें बंद करण्यांत आलें आहे असें (वाद्य, तोफ,यंत्र,इ०).꣸**मूकगायन न०** अविद्यमान वस्तु,–वंध्यापुत्र, खपुष्प, शशशृंग, इ० प्रमाणें.

मूग [**सं०** मुद्ग] **पु०** एक द्विदल धान्य. ꣸ **मूग गिळणें, मूग गिळून बसणें** न बोलतां स्वस्थपणें मुकाट्यानें बसणें; आपण उत्तर द्यावयाला असमर्थ असल्यामुळें किं० उत्तर दिल्यास कांहीं अनर्थ होईल अशी आपली खातरी असल्याकारणानें गप्प बसणें; नाइलाजानें गप्प बसणें; ह्या अर्थीं ' मुगाचें करणें ' असाही वाक्प्रचार आहे.

मूठ [**सं०**मुष्टि] **स्त्री०**१हाताचीं बोटें तळहातावर वळविलीं असतां पंज्याचा होतो तो आकारविशेष किं० त्यांत राहील तितकें पदार्थाचें परिमाण. २ मंत्रानें भारलेलें उडीद इ० धान्य,–जें माणूस, पदार्थ, इ० च्या नाशासाठीं त्यांच्यावर टाकण्यांत येतात. ३ 'हत्ती, घोडा, इ० च्या रोजच्या खाण्याच्या दाण्यांतून म्ह० चंदींतून महातास किं० मोतदारास जे मूठभर दाणे पगाराहून अधिक दिले जातात ते.४ दुसरीकडे लावण्यासाठीं उपटलेलीं भाताचीं रोपें समुच्चयानें.५ मुठींत धरलेल्या भाताच्या रोपांचें जुडगें,–जें

दुसरीकडे रोवतात तें(पेरणें,टाकणें). ६कोणत्याही शस्त्राचा मुठींत धरावयाचा भाग.७ बैल इ०च्या पाठीवर लादावयाच्या गोणी इ०च्या खालीं खोगिरासारखा जो पदार्थ ठेविलेला असतो तो. ८घोड्याच्या पायाच्या खुराला लागून जो सांधा असतो तो. ह्या सांध्याशीं घोड्याचा पाय लहान घेराचा असल्याकारणानें येथें बांधलेली दोरी खालीं किं० वर सरकत नाहीं. ❀ **एका मुठीचीं माणसें** एकाच कायद्याखालीं किं० हुकमतीखालीं येणारीं माणसें. **एका मुठीनें** एकदम किं० एकाच हप्त्यानें (पैशाची रक्कम देणें इ०). **झाकल्या मुठीनें** गुप्तपणें; आपणासंबंधानें कोणास कांहीं मागमूस न लागूं देतां. **मूठ आवळणें** चिकूपणा करणें किं० करूं लागणें. **कोणकाची मूठ दाबणें** (किं० **चेपणें** किं० **गार करणें**) लाचाची रक्कम त्याच्या मुठींत किं० हातांत देणें; त्याला लाच देणें. **कोणी मनुष्य कोणेकाच्या मुठींत असणें** तो पूर्णपणें किं० सर्वथैव त्याच्या कह्यांत किं० ताब्यांत असणें किं० त्याच्या तंत्रानें चालणारा असणें. **मृत मनुष्याला मूठमाती देणें** त्याला जमीनांत पुरून त्याचा अंत्यविधि करणें.**झाकली मूठ सव्वा लाखाची, उघडली मूठ फुकाची** आपलें ज्ञान, संपत्ति, इ० बद्दल आपण मुळींच कांहीं बोललों नाहीं तर आपलें ज्ञान, संपत्ति, इ० हीं खरोखरीं आहेत त्याच्यापेक्षां अधिक आहेत असें लोकांना वाटेल; आपण बढाई मारूं लागल्यास तीं खरोखरीं आहेत त्याहून कमी आहेत असा लोकांचा ग्रह होईल; आपण होऊन आपली स्थिति उघडी करून दाखविणें बरोबर नाहीं. मागें ‘ झाकणें ’मध्यें पहा. **मूठपसा पु०** मागें ‘ पसा ’माध्यें ‘ मूठपसा ’ पहा.**मूठमदाई स्त्री०** १ अन्यायानें, जबरदस्तीनें, किं० पाशवी सामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्याचा पैसा, जमीन, इ० हिरावून घेणें. २ चोर, भामटे इ०नीं एका जुटीनें कोणेकावर हल्ला करून त्याला लुबाडणें. **मुठीचा खेळ पु०** मंत्रानें भारलेले धान्याचे दाणे मुठींत घेऊन ते पदार्थविशेषावर टाकून केलेला जादूचा खेळ. मागें ‘ मांग गारुड ’ पहा.

मूढ [सं०] **वि०** १ मूर्च्छित झालेला. २ गोंधळलेला; संभ्रान्त झालेला; काय करावें हें ज्याला सुचेनासें झालें आहे असा. ३ मूर्ख; फतरोवा. ❀ **मूढगर्भ पु०** १ मेलेला गर्भ. २ जन्माच्या वेळीं यावें तसें बाहेर न आलेलें मूल. **मूढमति वि०** १ मूर्ख. २ संभ्रान्त; गोंधळलेला.

मूत [सं० मूत्र] **न०** प्राण्याच्या जननेंद्रियाच्या द्वारें जें खारट पाणी बाहेर पडतें तें; लघवी. ❀ **मुतांत माशा** (किं० **मासोळ्या**) **मारणें** निरुद्योगपिणांत काळ घालविणें. **मुतानें दिवा पाजळणें** (किं० **लावणें**) कठोरपणानें कोणेकाशीं वागणें. **कोणेकाला मूत आणणें** १ त्याला भिवविणें. २ त्याला कष्टाच्या कामाखालीं बेजार करणें.**कोणेकाला मूत येणें**१तो फार फार घाबरणें. २ कष्टाखालीं तो जर्जर होणें. **मूतखडा पु०**लघवीला अडथळा ज्यांत होतो असा एक रोग.

मूत्र [सं०] **न०** जननेंद्रियातून खारट पाणी विसर्जिलें जातें ते; मूत; लघवी. ❀ **मूत्रकृच्छ्र न०** लघवीचा एक रोगविशेष,–वेदना होऊन वारंवार आणि थोडथोडी लघवी होणें ह्या रूपाचा. **मूत्रखडा पु०** मागें ‘मूतखडा’ पहा. **मूत्रघात पु०** लघवी कोंडणें हा रोग.

मूद स्त्री० १ भात ओगराळ्यांत चेपून भरून त्या भाताला जो विशिष्ट आकार देण्यांत येतो तो किं० त्या आकारांत असलेला तो भात. २ स्त्रियांचे डोकींत घालण्याचें एक भूषणविशेष.३ देवळावर जी कलशाकार रचाइ असते ती. ४हत्ती इ० च्या अंगावर घातलेली झूल ज्या तंगानें बांधली जाते तिच्या खालीं घातलेला असतो तो कातड्याचा किं० वस्त्राचा तुकडा.५ खोगिराच्या मध्याला जें बिरडें किं०बेळकें लाविलेलें असतें तें.

मूय पु० आट्यापाट्यांच्या खेळांत सर्व पाट्यांना काटकोनांत मधोमध छेदणारी रेषा. ह्या रेषेला ‘ मुयदंड ’ असेंही म्हणतात. ह्या रेषेवर उभा असलेला जो गडी तो ‘ मुयदंड्या.’ मागें ‘ मुयदंड ’ पहा.

मूर [**म०** मुरणें] **स्त्री०** १ बांध, धरण, इ० मध्यें जीं भोकें किं० छिद्रें पडतात तीं,– ज्यांतून पाणी झिरपून बाहेर पडतें.२ जमीनीची सच्छि-

द्रता किं० पोकळ घटना. ३ पाणी इ०चा पाझर; पाझरून गेलेलें पाणी इ०. ४ पाझरणीमुळें गळून गेलेला अंश किं० त्यामुळें झालेलें नुकसान.५लोणी, रातांबेल, इ० कढविलें असतां बुडाशीं बसतो तो गाळ किं० ती जळ; बेरी. ६ धंदा, व्यापार, इ० मध्यें प्रथम करावा लागतो तो बुडीत खर्च. ७ व्यापार, धंदा, इ० मध्यें आलेली बूड. ८ पात्र-विशेषांत पदार्थ भरण्याला अवकाश; उ० कण-गींत खंडीभर धान्याची मूर आहे. ९ लाकूड, धोंडा, इ० तील फट, चीर, गांठ, भोक, इ० रूप ऐब किं० दोष.

मूर न० दहिंवर.

मूर्ख [सं०] वि० मठ्ठ डोक्याचा; अडाणी; अजागळ. **पु०** रान मूग.

मूर्च्छना, मूर्च्छा स्त्री०,मूर्च्छन न० [सं०] बेशुद्धि; देहभान नष्ट होणें. **मूर्च्छना स्त्री०** १ **(संगीतांत)**गाण्यांतील जे सप्त स्वर त्यांमध्यें प्रथम स्वरापासून द्वितीय स्वर होईपर्यंत जे सूक्ष्म तीन स्वरांश होतात ते प्रत्येक.२स्वराचा चढउतार. ॐ **मूर्च्छित, मूर्च्छागत वि०** ज्याला मूर्च्छा ह्म० बेशुद्धिची स्थिति आली आहे असा.

मूर्त [सं०]वि० साकार देहानें युक्त;मूर्तिमंत; उ० महात्मा गांधी हे मूर्त देशाभिमान होत.

मूर्ति [सं०] स्त्री०१आकारयुक्त म्ह० साकार वस्तु; स्थूल पदार्थ. २ आकृति. ३ अवतार. ४ पुतळा; प्रतिमा; देवादीची केलेली प्रतिकृति. ५ देह.ॐ **मूर्तिधर, मूर्तिमंत, मूर्तिमान् वि०** खराखुरा; प्रत्यक्ष; अगदीं खरा; उ० ह्याम्हशी-बद्दल मी तुला मूर्तिमंत पासष्ट रुपये मोजले आहेत आणि आतां नाकबूल जातोस ? धिक्कार असो तुला !

मूर्धन्य [सं०] वि०खालीं'मूर्धा'मध्यें पहा.

मूर्धा [सं० मूर्धन्] पु०१ डोकें.२अग्रभाग; वरचा भाग. ३ पुढारी; अग्रणी. ४ अघाडी. ॐ **मूर्धाभिषिक्त वि०** १ ज्याला राज्याभिषेक झाला आहे असा.२मुख्य,प्रधान,ठराविक, प्रचा-रांत नेहेमीं योजला जाणारा (दाखला, उदाहण, दृष्टान्त)**पु०** १राजा.२क्षत्रिय.३प्रधान.**मूर्धाभिषेक पु०**सिंहासनावर बसवून कोणेकावर मंत्रोच्चारपूर्वक अभिषेक करणें.ॐ **मूर्धग वि०** श्रेष्ठ. **मूर्धज पु०** डोक्याचे केश. **मूर्धन्य वि०**१मस्तकांतील.२ श्रेष्ठ; अग्रगण्य.३ऋ, ॠ, ट, ठ, ड, ढ, ण, र, ष, ळ, हे वर्ण प्रत्येक.

मूल, मूळ [सं० मूल] न० १ झाडाचा जो भाग जमीनींत घुसलेला असतो आणि ज्याच्या योगानें झाड जमीनीशीं संबद्ध होतें तो भाग. २ बुंधा. ३ वीणा इ० चा खालचा भाग.४ आरंभ; आदिकारण. ५ पाया; आधार. ६ डोंगर, पर्वत, इ० चा पायथा म्ह० सपाट जमीनीला टेकलेला भाग. ७ ग्रंथाचा मुख्य भाग,–टीका, भाष्य, इ० च्या व्यावर्तकत्वें.८ व्यापारांत घातलेलें भांडवल. ९ उसनी रक्कम,–व्याजाच्या व्यावर्तकत्वें. १० **(गणित)** ज्या संख्येस तिणेंच गुणिलें असतां विशिष्ट गुणाकार येतो त्या गुणाकाराचें ती संख्या मूळ. ११ अश्विनी, भरणी, कृत्तिका, इ० नक्षत्रांतील एकोणिसावें. १२ कुटुंबाचा स्थापक पुरुष.ॐ**मूलद्रव्य, मूलधन न०** मुद्दल; भांडवल. **मूलप्रकृति स्त्री० (सांख्य)** प्रधान. **मूलभृत्य पु०** पिढीजाद नोकर. **मूल विद्या स्त्री०**'ओं नमो भगवते वासुदेवाय'हा द्वादशाक्षरी मंत्र. **टीप**,–पुढें 'मूळ' आणि ॐ ह्या चिन्हापुढचे वाक्प्रचार पहा.

मूल न० अपत्य,–लिंग मनांत न आणतां.

मूलक [सं०] वि० (समासांतीं) त्यामुळें झालेलें, केलेलें, आलेलें;उ० भ्रांतिमूलक, अज्ञानमू-लक. **पु०, न०**मुळा,–ज्याची भाजी, कोशिंबीर, इ० खातें करतात.

मूल्य [सं०] न० किंमत, मोल. ॐ **मूल्य-वान्, मूल्यवंत वि०** भारी किंमतीचा.

मूष, मूषिक, मूषक [सं०] पु० उंदीर.ॐ **मूषककर्णी स्त्री०** मुसाकर्णी ही वनस्पति. **मूषकवाहन पु०** गणपति.

मूस [स० मूष] स्त्री०१ सोनें,चांदी,इ० चा अग्निसंयोगानें रस करण्याचें पात्र.२ओतींव पदार्थ करण्यासाठीं धातु पातळ करून ज्या आकारवि-शेषाच्या पात्रांत ओतितात तें पात्र. ३ यंत्राची घटना किं० रचना; शरीराचा बांधा; कामाची सरणी; युक्ति, मसलत, हिकमत, इ० चा आरा-खडा. ॐ **मूसमारग पु०** मागमूस; थांग; पत्ता.

मूस [**सं०** मूष=झरोका] **स्त्री०** नको तें पाणी बाहेर काढून लावण्याची वाट.

मूळ [**सं०** मूल] **न०**१वर 'मूल, मूळ,' चे सर्व अर्थ पहा. २ सासर, माहेर, सासुरवाडी, आजोळ, इ० कडून मुलगा, मुलगी, नवरा मुलगा, नवरी मुलगी, यांना येतें किं० जातें तें बोलावणें. ३ नवऱ्या मुलाच्या घराकडून जें नवऱ्या मुलीच्या घरीं तिला समारंभानें आणण्यासाठीं बोलावणें जातें तें (येणें, जाणें, पाठविणें). हीं मुलगी आणण्याची जी मिरवणूक तिला 'वरात' म्हणतात. ॐ **एकाद्याच्या मूळावर येणें** त्याच्या नाशास कारण होणें. **टीप**,–दिवस नक्षत्र मूळ हें असतां जर एकाद्या मुलाचा जन्म झाला तर तें मूल फलज्योतिषाप्रमाणें कोणातरी नातलगाचा नाश सुचवितें, ह्या वरून वरील वाक्प्रचाराची उत्पत्ति. **मुळाहून, मुळाधरून, मुळापासून क्रि० वि०** आरंभापासून. **मूळ खणून काढणें** समूळ नाश करणें; बीजच नाहींसें करणें. **मूळ अक्षरें, मुळाक्षरें न० अ० व०** मुलाला शिकवितात तीं वर्णमालेचीं अक्षरें. **मूळकर्म न० (गणित)** विशिष्ट संख्या जिचा विशिष्ट घात असेल ती काढण्याची क्रिया. **मूळखंड न०** झाडाच्या मुळाचा तुकडा. **मूळग्रंथ पु०** १ मुख्य ग्रंथ,–टीका, भाष्य, इ० च्या व्यावर्तकत्वें. २पूर्वींची हकीगत; पूर्वपीठिका. **मूळचिठ्ठी स्त्री०** कुंकुमपत्रिका; कांहीं मंगल कार्याचें आमंत्रण जीवर लिहिलें असतें आणि जीवर कुंकुमाचा शिडकाव केलेला असतो ती चिठ्ठी. **मूळद्रव्य, मूळधन न०** १ मुद्दल,–व्याजाच्या व्यावर्तकत्वें. २ व्यापारांत घातलेलें भांडवल,–नफ्याच्या व्यावर्तकत्वें. **मूळपत्र न०** अस्सल पत्र किं० दस्तऐवज,–त्याच्या नकलेच्या व्यावर्तकत्वें. **मूळपीठ न०**एकादें कुटुंब, संस्था, संप्रदाय, इ० हीं प्रथम जेथें उत्पन्न झालीं किं० स्थापिलीं गेलीं तें स्थळ किं०स्थान,–पुढें त्यांच्या भिन्न शाखा भिन्न ठिकाणीं गेल्यावर त्या ठिकाणांच्या व्यावर्तकत्वें. **मूळपीठिका स्त्री०**१ कांहीं काम, व्यवहार, वाद, भांडण, इ० ची उत्पत्ति, पूर्वींचीं स्थित्यन्तरें, कारणें, इ० संबंधाची क्रमानुसार माहिती. २ एकाद्या कर्माचीं अंगें आणि उपांगें ह्यांच्या संबंधाचीं मंत्रतंत्रांसहित माहिती. **मूळपुरुष पु०** कुटुंबाचा संस्थापक; वंशविस्तारास कारणीभूत जो विवक्षित प्रथम पुरुष तो. **मूळप्रकृति स्त्री०**सृष्टीचें पूर्वींचें रूप. **मूळबांध, मूळबंद पु०** शेतांत पाणी ठरून राहाण्यासाठीं घातलेला बांध. **मूळमुहूर्तें क्रि० वि०** आरंभीं. **मूळवास पु०** १गांव, शेत, बाग, इ० चा सखल भाग. २गांव, वाडी, इ० चा अगदीं पिछाडीकडचा भाग. **मूळव्याध, मूळव्याधि स्त्री०** गुदाला होतो तो एक रोग. **मूळस्तंभ पु०** मांडव, घर, इ० चा पहिला खांब. **मूळ स्वभाव पु०**मनुष्याचा जन्मजात स्वभाव.

मृग [**सं०**] **पु०** १ पशु; श्वापद. २ हरिण. ३ (**ज्योतिष**) अश्विनी, भरणी, इ० जीं नक्षत्रें त्यांतील पांचवें. ४ ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस. **मृगांक, मृगलांछन पु०** चंद्र. **मृगांडजा स्त्री०** कस्तुरी. **मृगाधिप, मृगेंद्र, मृगाधिराज पु०** सिंह. **मृगजल न०, मृगतृष्णा, मृगतृष्णिका स्त्री०** सूर्याच्या प्रखर किरणांनीं वाळूचा विस्तीर्ण प्रदेश तापून जळाची भ्रांति उत्पन्न करणारा देखावा उत्पन्न होतो तो. **मृगजळस्नान न०** अशक्य किं० अविद्यमान गोष्ट,–वंध्यापुत्र, खपुष्प, इ० प्रमाणें. **मृगनेत्रा, मृगनाभि स्त्री०, मृगमद पु०** १ कस्तुरी. २ कस्तुरीमृग. **मृगशिर न०** पांचवें नक्षत्र. **मृगशीतळाई, मृगशीतळी स्त्री०** मृगांचा पाऊस पडल्यानंतर जो हवेंत थंडावा उत्पन्न होतो तो. **मृगसाल न०** शेतकरी लोकांचें साल किं० वर्ष. हें ज्येष्ठ महिन्यांत सुरूं होतें. 'दिवाळीचें साल,' 'पाडव्याचें साल,' हीं इतर प्रकारचीं सालें. **मृगासन न०** १ देवडीच्या दोन बाजूंस जे दोन ओटे असतात ते प्रत्येक. २ बसावयासाठीं कमाविलेलें हरिणाचें कातडें. **मृगी स्त्री०** मृगाची स्त्री.

मृणाल [**सं०**] **पु०,न०** कमलाचा देठ किं० तंतु. **मृणालिका स्त्री०** वर ' मृणाल ' पहा

मृत [**सं०**] **वि०** १ मेलेलें; ज्यांत प्राण नाहीं किं० जीवनशक्ति नाहीं असा (प्राणी, वृक्ष). २ निष्फळ. ३ (**वैद्यक**) भस्म केलेला धातु. ॐ **मृताशौच न०** सुतकाचा विटाळ. **मृतक पु०,न०** प्रेत. **न०**१ और्ध्वदेहिक क्रिया. २

मृत माणसासंबंधाचें सुतक. **मृतगोदान, मृत्युगोदान** न० १ अत्यन्त जीर्ण किं० मरतुकडा माणूस किं० पशु. २ अजागळ आणि पराक्रमशून्य माणूस. **मृततिथि** पु० १ स्त्री० कोणेकाच्या मरणाची तिथि. **मृतदिन, मृतादिवस** पु० मृत मनुष्य ज्या महिन्याच्या ज्या तिथीस मेला असेल त्या महिन्याची पुढच्या वर्षाची ती तिथि. **मृतपत्र** न० आपल्या मागें आपल्या जिंदगीची अमुक प्रकारें व्यवस्था करावी असें ज्या कागदावर लिहिलेलें असतें तो कागद; मृत्युपत्र. **मृतप्राय** वि० मेल्यासारखा; बहुतेक मेलेला,–भीति, लाज, इ० कारणांमुळें. **मृतलेख** पु० वर ' मृतपत्र' पहा. **मृतवत्सा** स्त्री० जिचीं अपत्यें लहानपणींच मरतात अशी (गाय, म्हैस, मानवी स्त्री, इ०). **मृतवंध्या, मरतवांझ** स्त्री० जिला पोरें होतात पण लहानपणींच मरतात अशी स्त्री. **मृतशय्या** स्त्री० मृत मनुष्यासंबंधानें ब्राह्मणाला देतात ती शय्या म्हणजे गादी इ० निजण्याचा सरंजाम. **मृतसंजीविनी** स्त्री० मेलेल्यास पुन्हा जिवंत करावयाचा मंत्र इ०. **मृतस्नान** न० प्रेत वाहून नेण्यानें किं० प्रेताला शिवल्यानें जो विटाळ होतो तो घालविण्यासाठीं केलेलें स्नान. हें स्नान करून शुद्ध झालेला जो त्याला ' मृतस्नात ' म्हणतात.

मृताह [सं०] पु० वर ' मृतदिन ' पहा.

मृति [सं०] स्त्री० मरण; मृत्यु.

मृत्तिका [सं०] स्त्री० माती. ॐ **कोणेकाची मृत्तिका होणें** त्याचा पूर्ण विध्वंस होणें. **मृत्तिकाबुद्धि** स्त्री० कोणेकाला मातीसमान गणणें; त्याला तुच्छ मानणें.

मृत्यंग [सं० 'मृत्यु+अंग' ह्याचा अपभ्रंश] न० शरीराचा अत्यंत नाजूक भाग,–ज्याला कांहीं इजा झाली असतां तत्काळ मृत्यु येतो; मर्मस्थान.

मृत्यु [सं०] पु० १ मरण. २ यमराज; यम. ॐ **मृत्युंजय** पु० शंकर. **मृत्युलोक** पु० पृथ्वी,–स्वर्ग आणि पाताळ यांच्या व्यावर्तकत्वें. **मृत्युकळा** स्त्री० निस्तेजपणा,–आजाऱ्याच्या किं० भ्यालेल्या मनुष्याच्या तोंडावर दिसतो तो किं० ज्याचें मरण जवळ येऊन ठेपलें आहे त्याच्या तोंडावर दिसतो तो. **मृत्युगंडांत** पु०, न० ज्यांत मृत्यु येण्याचा संभव असतो असें कांहीं भयंकर संकट, स्थिति, किं० पेच. **मृत्युगोदान** न० १ रोगादिकारणांनीं अत्यन्त अशक्त किं० निर्वीर्य झालेला मनुष्य, पशु, इ०. २ कर्तृत्वशून्य माणूस; बुळगट किं० पुचाट माणूस. **मृत्युचिन्ह** न० मरण जवळ येऊन ठेपलें आहे किं० प्राणी मरण पावला आहे असें ज्यावरून ठरवितां येतें असें कांहीं चिन्ह किं० लक्षण. **मृत्युपंचक** न० मृत्यु किं० मोठें संकट सुचविणाऱ्या पांच ग्रहांची सापेक्ष स्थिति. **मृत्युपत्र** न० मागें ' मृत ' मध्यें ' मृतपत्र ' पहा. **मृत्युपंथ** पु० १ मृत्यूकडे जावयाचा रस्ता; मरणाची वाट; उ० रामभाऊ मृत्युपंथास लागला आहे (म्ह० तो दिवसें दिवस झिजत चालला आहे; तो लवकरच मरेल); उ० सर्व माणसें मृत्युपंथानें गेलीं. **मृत्युमुखीं पडणें** मरणें. **मृत्युयोग** पु० आदित्यवारीं अनुराधा नक्षत्र येणें. **मृत्युवेळ, मृत्युवेळा** स्त्री० कोणेकाला कोणेक दिवशीं जो अशुभ समय असतो तो. ह्या समयाला ' काळवेळ ' असेंही म्हणतात.

मृद् [सं०] स्त्री० माती. पुढील सामासिक शब्द मराठींत रूढ आहेत. **मृण्मय** वि० मातीचा बनविलेला (डेरा, परळ, इ०). **मृत्कर** पु० कुंभार. **मृत्पिंड** पु० मातीचा गोळा.

मृदंग [सं०] पु० एक वाद्युवाद्य; पखवाज. ॐ **मृदंगी, मृदंग्या** पु० मृदंग वाजविण्याचा धंदा करणारा; पखवाजजी. **मृदंगास दोहोंकडून थपडा** १ कोणत्याच पक्षाला प्रामाणिकपणें चिकटून न राहणाऱ्या माणसाला दोन्ही पक्ष निंदितात. २ दोन विरुद्ध पक्षांशीं सलोखा राखूं पाहणारा जो मनुष्य त्याच्या संबंधानें दोन्ही पक्ष साशंक असतात. ३ दोन पक्षांत मध्यस्थी करून सलोखा घडवूं पाहाणाऱ्याला दोन्ही पक्षांची निंदा ऐकून घ्यावी लागते.

मृदु [सं०] वि० १ मऊ; कोंवळें; कोमल. २ सौम्य स्वभावाचा. ३ क्षमाशील; कृपाळू. ३ दुर्बळ. ४ बोथट (शस्त्र).

मृदुल [सं०] वि० मऊ; कोमळ.

मृद्वी, मृद्वीका [सं०] स्त्री० १ द्राक्ष. २ बेदाणा.

मृषा [**सं०**] **क्रि० वि०**खोटें (समासारंभीं). ❀ **मृषोक्त न०, मृषोक्ति स्त्री०** खोटें भाषण किं० विधान.

मेकड, मेकूड न० नाकांतील शेंबडाचा टणक झालेला खडा.

मेकण न० कानांतील मळ.

मेकाड न०, मेकडा पु० शिरीष इ०भाजीपाल्यावर जो रोगरूप क्षुद्र जंतु उत्पन्न होत असतो तो.

मेकी स्त्री० एक वेल. **मेकी स्त्री०, मेकें न०** ह्या वेलाचीं फळें.हीं चिरून मीठ लावून वाळवून तळून खातात किं० ह्या फळांचें लोणचें करतात.

मेकूड वर ' मेकाड ' पहा.

मेकें न० वर ' मेकी ' मध्यें ' पहा.

मेख स्त्री०१तंबू, डेरा, राहुटी, इ०च्या दोऱ्या बांधावयाच्या ज्या लाकडी किं० लोखंडी खुंट्या त्या प्रत्येक. २घोडा, बैल, इ०चीं दावीं,काढण्या, इ०जमीनीस खिळविण्यासाठीं ज्या लाकडी किं० लोखंडी खुंट्या जमीनींत पुरतात त्या प्रत्येक. ३ लोखंड इ० धातूचा जाडी आणि लांब खिळा. ४ दांताला शोभेसाठीं बसवितात जी सोन्याची चूक ती. ५ धिप्पाड आणि मजबूत माणूस किं० जनावर. ❀ **सोन्याची मेख आणि तमाशा देख**१सोन्याच्या(म्ह०द्रव्याच्या) योगानें अत्यन्त विचित्र कार्यें घडवून आणतां येतात. २ अत्यल्प द्रव्यासाठीं भयंकर तंटे बखेडे होतात किं० राज्यें उलथून पाडलीं जातात. **सद्गुरूची मेख** किं०**तुकाराम बोवांची मेख** निरुत्तर करणारी कोटी किं० विधान. **त्या कामाला मेख बसली** तें बंद पडलें किं० कुंठित झालें. **कोणेक कामाला मेख मारणें** तें बंद पाडणें. **मेख सोसणें** (किं० **हातावर घेणें**) कांहीं दुष्कर्म करण्यांत खंबीर असणें किं० दुष्कर्माचा परिणाम सोसण्याची ताकद वाटणें असणें. **कोणेकाच्या मेखा उपटणें** (किं०**उचलणें** किं० **उपटून खांद्यावर देणें**) त्याला स्थानभ्रष्ट करणें; त्याचें उच्चाटन करणें; त्याला हाकलून देणें. **मेखा घेणें** १ कोणेकाकडून जबरदस्तीनें आपलें कांहीं काम करून घेणें. २ त्याच्यावर सूड घेणें. ३ त्याणें आपलें केलेलें नुकसान भरून घेणें.

मेखचू, मेखसू [**हिं०**] **पु०** १ मोठी मेख. २ तंबू इ० च्या मेखा ठोकण्याचा मोगर किं० लाकडी हातोडा.

मेखलणें [**म०** मेख] **स० क्रि०** १ जनावराला मेखेशीं बांधणें. २ कांहीं काम कुंठित करणें किं० बंद पाडणें.

मेखला [**सं०**] **स्त्री०** १ कंबरपट्टा. २ करगोटा. ३ यज्ञांतील किं० मुंजींतील कटिसूत्र. ४ पर्वताची बाजू. ५ नर्मदा नदी. ह्या अर्थीं ' मेखलकन्यका ' सुद्धां.३ तरवारीच्या मुठीची दोरी. ७बाह्यांशिवाय पायघोळ डगला,-कफनीसारखा.

मेखसू पु० वर ' मेखचू ' पहा.

मेखाटणी, मेखाटी [**म०** मेख] **स्त्री०** १ मेख. २ पिच्छा (फक्त पुढील वाक्प्रचारांत). **कोणेकाच्या मेखाटणीस** (किं० **मेखाटीस**) **बसणें** त्याचा पिच्छा पुरविणें; त्याला कांहीं कामासाठीं तगादा लावून सतावणें.

मेखाटणें [**म०** मेख, मेखाटी] **स० क्रि०** १ (कोणेकाला) कांहीं कामाला जुंपणें; त्याची इच्छा नसतां (त्याला) काम करावयाला भाग पाडणें.२(कोणेकाला)मारणें, छळणें, गांजणें, सतावणें, किं० रागें भरणें.

मेख्या, मेखाट्या[**म०** मेख, मेखाटी]**वि०** १ कोणेकाची पिच्छा पुरविणारा माणूस; आपण कोणेकापाशीं मागितलेली वस्तु तो आपणास देई तों पर्यंत त्याला तगादा लावणारा. २ मजबूत हाडापेरांचा आणि शक्तिमान् (माणूस, पशु).

मेंग स्त्री० सापाची कात. ❀ **मेंग्या, मेंगा, मेंगचट, मेंगचोट** ज्याच्या स्वभावांत खंबीरपणा, धाडस, निर्धार, किं० आत्मविश्वास नाहीं असा; मूर्ख; अजागळ. [मीठ.

मेंगळमीठ न० क्षार जमीनीतून काढलेलें

मेंगावणें, मेंगणें [**म०** मेंग] **अ० क्रि०** १ (सापानें) कात टाकणें किं० कात टाकण्याच्या अवस्थेस आलेलें असणें. २ कचरणें; मागें हटणें; दबकणें.

मेंगें [**म०** मेंग] **न०** पुचाट किं० कमकुवत माणूस. ❀ **मेंग्या मारवाडी पु०** दिसण्यांत अजागळ पण असण्यांत पक्का वस्ताद किं० कावेबाज.

मेघ [**सं०**] **पु०** ढग; अभ्र. ꙳ **मेघडंबर न०** १ मेघांचें आकाशांत जमतें तें पटल. **मेघाडंबर न०** १ मेघांचें पटल. २ पाऊस पडेल असा ढगांचा देखावा. ३ पोकळ धमक्या. **मेघडंबरी स्त्री०** देवाच्या मूर्तीच्या वर जो शोभेसाठीं घुमट केलेला असतो तो. **वि०** ज्याला घुमट आहे असा देव्हारा, डोला, इ०. **मेघनाद पु०** १ मेघांची गर्जना. २ रावणाचा मुलगा इंद्रजित्. **मेघमंडल न०** १ आकाश. २ मेघांचा समुदाय. **मेघवाहन पु०** इंद्र. **मेघमल्हार पु०** (**संगीतांत**) एक रागविशेष. **मेघमाळ स्त्री०** रंगीबेरंगी कागदांचे अनेक आकारांचे कातरलेले तुकडे अंतरा अंतरावर दोरीला बांधून मांडव, रस्ता, इ० शोभविण्यासाठीं केलेली माळ. **मेघमाळा स्त्री०** १ ढगांचा समुदाय. २ ढगांच्या आकारांवरून आणि देखाव्यांवरून भाकितें करण्याच्या आडाख्यांचा एक ग्रंथविशेष. ३ राहाटगाडग्याची पाण्याच्या लोट्यांची माळ. **मेघवितान न०** मेघरूपी छत. **मेघोडा, मेघौडा पु०, मेघौडें न०** ढगांचा समुदाय.

मेचक [**सं०**] **वि०** काळा. **पु०** १ काळा रंग. २ मोराच्या पिसावरचा डोळा.

मेचका पुढें ' मेजका ' पहा.

मेचकू, मेखचू [**म०** मेख] **पु०** तंबूच्या दोऱ्या बांधण्याच्या मेखा किं० खुंटे प्रत्येक किं० त्या किं० ते ठोकण्याचा हातोडा. वर ' मेखचू ' पहा.

मेचट, मेंचट पुढें ' मेणचट ' पहा.

मेचणें [**म०** मेजणें, मोजणें] **स० क्रि०** १ मापणें; मोजणें. २ लक्ष्यांत किं० हिशेबांत घेणें. ३ महत्त्वाचा समजणें, मानणें, किं० गणणें; उ० मी गोंधाला मेचणारा मनुष्य नाहीं; उ० जो बापाला मेचीत नाहीं तो चुलत्याला काय मेचणार ? **अ० क्रि०** कचरणें; माघार खाणें; हटणें.

मेचला वि० भितरा; लाजरा; लाजाळू.

मेज [**फा०**] **न०** चार पाय असलेला सपाट तक्ता,–ज्याचा पदार्थ ठेवणें, लिहिणें, इ० कामीं उपयोग केला जातो.

मेज, मोज [**म०** मेजणें, मोजणें] **पु०** १ मापणें किं० मोजणें ही क्रिया. २ मापून किं० मोजून निघालेलें परिमाण.

मेजणी, मोजणी [**म०** मेजणें, मोजणें] **स्त्री०** मोजण्याची किं० मापण्याची क्रिया किं० ह्या क्रियेनें ठरलेलें परिमाण. ꙳ **मोजणीदार पु०** जमिन मोजणारा.

मेजणें, मोजणें स० क्रि० १ (कांहीं पदार्थांचें परिमाण) ठरविणें,–गज, पायली, तोळा, शेर, कोश, इ० साधनांनीं. २ कोणेकाची योग्यता मान्य करणें किं० त्या योग्यतेला किमत देणें; हिशेबांत घेणें; उ० तुझ्या इतराजीला मी मेजीत (किं० मोजीत) नाहीं.

मेजदाद(–त,–स्त), मोजदाद(–त,–स्त) [**म०**मेजणें, मोजणें] **स्त्री०** गणना, गणती, परिगणन,मापणी,ह्या क्रिया किं०ह्या क्रियांचें फल म्ह० ठरलेलं परिमाणाचा आंकडा.

मेजबान, मेजमान, मेजवान [**फा०**] **पु०** १ भोजनास बोलावलेला माणूस. २ घरांत कांहीं काम न करतां किं० कोणत्याही कामाची जबाबदारी न वाहतां राहाणारा माणूस. ३ खाणावळीचा मालक. ꙳ **मेजबानी, मेजवानी, मेजवानगी (-की) स्त्री०** १ थोर मनुष्यास दिलेलें थाटाचें जेवण; जाफत. २ कोणेकाचा केलेला आदरसत्कार.

मेजला, मोजला,मेजींव,मोजींव[**म०**मेजणें, मोजणें] **वि०** परिगणिलेला; हिशेबांत घेतलेला; मापाबरहुकूम असलेला; ठराविक; ठरवून नक्की केलेला.

मेजोटी [**म०** मेज, मेजणें] **स्त्री०** गोठ, गोफ, बांगडी, मणि,इ०चें माप किं०वीड घेण्याचें सोनाराचें एक साधनविशेष.

मेट वि० गडद, गहन. **टीप**,–' काळोखमेट ' ह्याच शब्दांत प्रयोग.

मेट [**म०**मिटणें] **न०**१ घोड्याचा गुडघ्याचा सांधा. प्रयोग बहुधा **अ०व०** चेपणें,रगडणें, थकणें, मोडणें,इ० क्रियापदाच्या साहचर्यानें;उ०घोड्याला आज वीस मैलांची मजल पडली म्हणून त्याचीं मेटें मोडून गेलीं, किं० त्याचीं मेटें रगडलीं पाहिजेत, किं० त्याचीं मेटें दुखत आहेत. २ मनुष्य किं० जनावर ह्यांनीं कांहीं कामाच्या आरंभीं

घेतलेलें अवसानाचें संस्थान. ३ लग्नाच्या समारंभांत गृहप्रवेशाच्या समयीं नवऱ्या मुलाच्या बहिणीनें दार आडविणें हा विधि.मेट धरणें म्ह० दार आडविणें. बहिणीच्या मुलाला आपली मुलगी देण्याचें भावानें वचन दिल्यावर बहीण दारांतून भावाला घरांत जाण्याला मोकळीक देते. हा विधि हिंदूंच्या कांहीं जातींत रूढ आहे. ४ डोंगरी किल्ल्याकडे जाण्याच्या रस्त्यावर वळणा वळणाला जी रखवाली करणाऱ्या महारांचीं नाकीं असतात तीं प्रत्येक.**कोणेकाचा मेटें बसणें** तो वार्धक्यानें किं० अतिकष्टामुळें थकणें किं० निर्वीर्य होणें.**मेट मारणें, मेट मारून बसणें**(बैल)चालतांना फार दमल्यामुळें आणि पुढें एक पाऊलही टाकण्याला असमर्थ झाल्यामुळें जमीनीवर आपटणें.

मेटका पु० १ हात, पाय, इ० मध्यें वायूच्या विकृतीनें उठतो तो गोळा; वायगोळा. २ तालमीच्या कामांनीं दंड, पोटऱ्या, मांड्या, इ० मजबूत होऊन जे गोटे किं०टणक भाग उत्पन्न होतात ते प्रत्येक.

मेटणें स० क्रि० (दगडाला) टांकीं देऊन बांधकाम इ० साठीं (तो) योग्य करणें.

मेटींव [**म०** मेटणें=दगडाला टांकी देणें] **वि०** टांकी दिलेला (धोंडा, चिरा, इ०).

मेड, मेढ स्त्री०, मेडका पु० जमीनींत उभारावयासाठीं पुरलेला वांसा.

मेंड [**हिं०**] **पु०** शेताचा बांध.

मेंडका पु०, मेंडकी स्त्री० व्यायामानें किं० नित्याच्या कामामुळें दंड, मांड्या, इ० गात्रांत उत्पन्न होतात ते गोळे किं० टणक भाग प्रत्येक (जमणें, निघणें, फुगणें). २ दंड, पोटरी,इ० वर बुक्की इ० चा आघात झाला असतां कांहीं काळ उठतो तो गोळा (उठणें, काढणें, निघणें). ३ वायगोळा; वायुविकृतीनें दंड इ० मध्यें उत्पन्न होतो तो गोळा.

मेंडका, मेंडक्या, मेंढका, मेंढक्या [**म०** मेंढरूं] **पु०** मेंढ्या, शेळ्या, इ० पाळणारा धनगर.

मेंडगूळ न० दुसऱ्या वृक्षावर उगवून त्यांतून पुष्टि शोषून घेऊन वाढणारें एक झाड,-जें आंबा इ० वृक्षावर उगवतें. मागें ' वांडगूळ ' पहा.

मेंडजोगी पु० १ एक प्रकारचा शूद्र बैरागी. हा भिक्षेसाठीं हट्ट घेऊन बसतो. २ खणपटीस बसणारा कोणीही माणूस.

मेंडपाळ, मेंढपाळ [**सं०**मेढ्रपाल; **म०** मेंढरूं +पाल (रक्षक)] **पु०** मेंढरें पाळणारा किं० पोसणारा; धनगर.

मेंडूकमुख [**सं०** मंडूक (बेडूक)+मुख (तोंड)] **न०** बेडकासारखें (घोड्याचें) तोंड.हें घोड्याचें एक अशुभ लक्षण मानलें जातें.

मेढ [**सं०** मेढी=पशु बांधावयाचा खांब] **स्त्री०** १ लांब आणि लठ्ठ वांसा,-मांडवाच्या उपयोगाचा आणि एका टोकास दुबेळकें असलेला. २ पुरावयाच्या उपयोगाचा लठ्ठ वांसा ३ ध्रुवाचा तारा,-जो पुरलेल्या मेढ्याप्रमाणें स्थिर असतो.**मेढे जोशी, मेढ जोशी पु०** मेढी जमीनींत पुरून त्यांच्या साहाय्यानें तिथि इ० ची गणती करणारा जोशी. **पु०** १ खेडेगांवचा जोशी,-जो गांवकऱ्यांना तिथि, वार, प्रदोष, एकादशी, इ० सांगतो तो. २ ग्रहादींच्या स्थितीवरून भाकितें करणारा. ३ ग्रामजोशी. **मेढेदाई, मेढदाई, मेढेदाईक पु०** शेजाऱ्याच्या आवारापासून आपलें आवार पृथक् करण्यासाठीं आपल्या हद्दीवर आपलें कुंपण उभारणारा. **मेढेमत, मेढेगमत न०** ध्रुवाच्या ताऱ्याच्या अपेक्षेनें इतर ताऱ्यांच्या सापेक्ष स्थितीवरून शेतकऱ्यांत रूढ झालेले आडाखे प्रत्येक.

मेंढका (-क्या) [**सं०** मेढ्र;**म०** मेंढा]**पु०** वर ' मेंढपाळ ' पहा.

मेढकी स्त्री०,मेढकें न० [**सं०** मेढ्र] पुरावयाच्या उपयोगाचा लहानसा वांसा,-विशेषतः दुबेळकें असलेला.

मेढंगमत, मेढजोशी, मेढदाई, मेढग्त वर ' मेढ ' मध्यें ' मेढेमत, ' ' मेढे जोशी, ' ' मेढेदाई, ' पहा.

मेंढपा [**सं०** मेढ्रप] **पु०** मेंढ्या पाळणारा.

मेंढरपाळ [**म०** मेंढरूं+पाळ (रक्षक)]**पु०** मेंढरें पाळणारा मनुष्य; धनगर.

मेंढरी स्त्री०, मेंधला पु० [**सं०**मेंढि, मेढि] दाराच्या दुहेरी चौकटीच्या दोन्ही चौकटींत

वरच्या बाजूंस जोडणारीं आडवीं दोन लाकडें प्रत्येक. अशा खालच्या बाजूंच्या दोन लाकडां-पैकीं प्रत्येकाला ' छिली ' म्हणतात.

मेंढरूं [**म०** मेंढा; **सं०** मेढ्र] **न०** मेंढीचें पिलूं. ॐ **मेलें मेंढरूं(किं० मढें)आगीला भीत नाहीं** ज्याची आबरू कांहीं बदकर्मानें गेली आहे त्याला आणखीं दुष्कर्मे करावयाला कचर वाटत नाहीं.

मेंढवाडा [**म०** मेंढा+वाडा] **पु०** मेंढरें कोंडावयाची जागा किं० तेथें कोंडलेलीं मेंढरें.

मेंढशिंगी [**सं०** मेढ्रशृंगी] **स्त्री०** ज्याला मेंढ्याच्या शिंगांसारखीं फळें येतात असें एक कांटेरी आणि दुधासारख्या चिकाचें झाड. ह्याला ' काकडशिंगी ' असेंही म्हणतात.

मेंढसर पु० मनगटांत घालावयाचें एक प्रकारचें वलय.

मेंढा [**सं०** मेढ्र] **पु०**१ एक चतुष्पाद प्राणी. २ काठी, शिंग, इ० चें दुबेळकें किं० दुबेळकें असलेली काठी, शिंग, इ०. ३ दोरीला फार पीळ पडलेला असल्यास अशा दोरीला मध्यें मध्यें पडतात ज्या दुमडी त्या प्रत्येक. ह्या अर्थी' मेढा' सुद्धां. फार पीळ असलेल्या सुतास पडतात त्या दुमडींना ' पिंपळ्या ' म्हणतात. मागें पिंपळी ' अर्थ ४ पहा.

मेढा [**सं०** मेंठि] **पु०**१ दुबेळक्याचा खांब. २ साधा पुरावयाचा खांब. ३ अशा खांबांच्या ओळीनें केलेलें कुंपण किं०कठडा;मेढेकोट.३(**लाक्षणिक**) पाठिराख्या; मदतनीस;वाली. ४ दोरीला फार पीळ पडला असतां मधून मधून ज्या वळ्या होतात किं० बारके बारके पीळ पडतात ते प्रत्येक.ॐ **मेढेकरी, मेढ्या पु०** एकाद्या संस्थेचा आधारभूत माणूस.

मेढाविणें [**म०** मेढा] **स० क्रि०** मेढे रांगेनें पुरून (जागा) बंदिस्त करणें.

मेढिंगमत इ० वर ' मेढ ' मध्यें ' मेढेमत ' इ० पहा.

मेढी [**सं०**] **स्त्री०** पुरावयाचा लहान खांब,–विशेषतः दुबेळकें असलेला.

मेंढी [**सं०** मेंढ] **स्त्री०** मेंढ्याची स्त्री. **मेंढा पु०**, **मेंढें न०**. मेंढा,–लिंग मनांत न घेतां. ॐ **मेंढी गव्हार** पुढें ' मेंधी गव्हार' पहा.

मेढेकरी, मेढ्या पु० वर ' मेढा ' मध्यें पहा.

मेढेजोशी पु० वर ' मेढ ' मध्यें पहा.

मेढया पु० वर ' मेढा ' मध्यें पहा.

मेण न० १ मध साठविण्यासाठीं मधमाशा ज्या चिकट पदार्थाची रचना करतात तो पदार्थ. २(**लाक्षणिक**)फार शिजल्यामुळें चिकट झालेला भात. ॐ **कोणेकाचें मेण काढणें** त्याला खूप चोप देणें,–तो मेणासारखा मऊ होई तोंपर्यंत. **कोणेकाचें मेण स्वस्थ होणें** तो लठ्ठ आणि थिलथिलित अंगाचा होणें. **कोणेकाचें मेण होणें** तो शांत आणि स्वस्थ होणें. **मेणकट वि०** तेल, तूप,इ० वर धूळ बसल्यानें चिकट थरानें आच्छादलेला (समई, लामणदिवा, इ०). **न०** असा तेल, तूप, इ०वर धूळ बसल्यानें उत्पन्न होतो तो मळ किं० अशा मळाची घाण. **मेणकापड न०**मेणाचा थर ज्यावर चढविला आहे असें कापड. **मेणगट, मेणकुटला वि०** फार शिजल्यामुळें अत्यन्त मऊ झालेला (भात इ०). **मेणगट, मेणगुटलें न०** फार शिजलेला भात इ० पदार्थ. **मेणगोळी स्त्री०** १ मेणाची गोळी. २ फाजील सौम्य आणि शांत माणूस. **मेणघुणा (–ण्या) वि०** कमी बोलणारा, दिसण्यांत सौम्य पण अंतःकरणांत दुष्ट आणि कपटी असा (माणूस). **मेणचट वि०** १ ज्यांत कण्या पडलेल्या नाहींत असें (तूप).२ फाजिल शिजलेला (भात इ० खाद्य पदार्थ). ३ निर्वीर्य किं० कर्तृत्वशून्य असा (माणूस); ज्याच्या अंगीं तरतरी किं० उत्साह नाहीं असा (माणूस). ४ चिक्कू किं० कंजूष (माणूस). **मेणचोट (–ट्या) वि०** १ षंढ; नपुंसक. २ निर्वीर्य, निःसत्त्व, किं० कर्तृत्वशून्य (माणूस).**मेणबत्ती, मेणवात स्त्री०** मेणाच्या दाट थरानें मढविलेली कापूस इ० ची वात,–जी प्रकाशासाठीं पेटवितात. **मेणबाहुली स्त्री०** १ तल्लख आणि चुणचुणीत मुलगी किं० स्त्री. २ फाजिल सौम्य स्वभावाची किं० भितरी मुलगी.**मेण्या, मेणा वि०** चिंध्याची राख तेलांत मिसळून सारविलेलें(सूप,टोपलें,इ०बुरडी सामान). **मेणाचा, शेणामेणाचा वि०** १ कर्तृत्वशून्य

(माणूस).२अशक्त किं० लेचापेचा(माणूस).३तिरस्कारास पात्र असा (माणूस). **मेणी स्त्री०** तेल, तूप, इ० नीं मळलेला.**मेणी मोडशी स्त्री०** इगवणाचा एक प्रकार.**मेणे डोळे,शेणे डोळे पु० अ० व०** ज्या डोळे येण्याच्या विकृतींत गुवानें लडबडतात असे डोळे. यांच्या व्यावर्तकत्वें 'काठे डोळे.' **मेण्या वि०** अशक्त; कमजोर, उत्साहरहित (माणूस, पशु). **मेण्या मारवाडी पु०** दिसण्यांत साधा पण असण्यांत लुच्चा आणि काविबाज असा माणूस. **मेण्यासाप पु०** १ एक प्रकारचा साप. २ दिसण्यांत साधा पण अंतर्यामीं कपटी आणि खुनशी असा माणूस. **मेणी स्त्री०** तेल, तूप, इ० ची वेरी किं० गाळ.

मेण, म्यान [**फा०** मियान्] **न०** तरवार ठेवण्याचा कोश किं० घर.꠶ **मेण करणें, म्यान करणें** म्यानांत घालणें. **एका म्यानांत दोन सुऱ्या राहूं शकत नाहींत** विद्वत्ता, सामर्थ्य, इ० गुणांनीं समान अशीं दोन माणसें गुण्यागोविंदानें एकत्र राहूं शकत नाहींत; त्यांच्यांत मत्सर, तेढ, स्पर्धा, इ० उत्पन्न होणारच.

मेणकटणें [**म०** मेण, मेणकट] **अ० क्रि०** तेल, तूप इ० च्या मळानें किं० गाळानें (समई, भांडें, इ०) मळणें किं० लडबडलेलें असणें.

मेणबाजार पु० पुढें ' मेणा ' मध्यें पहा.

मेणवला, मेणोला [**म०** मेणविणें] **वि०** तेल आणि चिंध्यांची राख यांच्या मिश्रणानें सारवून टणक केलेला (कोणताही बुरडी पदार्थ, –सूप, टोपली, इ०).

मेणविणें [**म०** मेण] **स० क्रि०** चिंध्यांची राख आणि तेल ह्यांच्या मिश्रणानें(सूप,टोपलें,इ०) सारवून टणक करणें.

मेणा [**फा०** मियानाह्] **पु०** माणसें ज्यांत बसतात आणि जें डोलसिारखें खांद्यावरून भोईलोक वाहून नेतात असें एक प्रकारचें वाहन.꠶ **मेणबाजार पु०** रोजच्या रोज दुकानासाठीं पाल लावावयाचें आणि विक्रीचे पदार्थ त्यांत मांडून ते विकावयाचे आणि संध्याकाळीं पाल आणि ते पदार्थ आवरावयाचे अशा पद्धतीचा बाजार. **मेणबाजारी पु०** १ मेणबाजारांत मांडून माल विकणारा माणूस. २ लफंगा माणूस. **मेणेकरी पु०** मेणा वाहाणारा भोई.

मेणें [**म०** मेण] **न०** मासे पकडण्याला सुलभ पडावें म्हणून पाण्यांत जो मेण इ० च्या मिश्रणाचा पदार्थ माशांना अंध करण्यासाठीं टाकतात तो.

मेणेंवावर न० रब्बीचीं पिकें काढण्यासाठीं तयार करून ठेवलेलें शेत. वावर म्ह० जमीनीचा मोठा लांब रुंद पट्टा.

मेणोला वि० वर' मेण'मध्यें **'मेणा' वि०** पहा.

मेतकूट, मेथकूट [**म०** मेथी+कूट] **न०** मोहोऱ्या, मेथ्या,तांदूळ,आणि कांहीं डाळी एकत्र दळून केलेलें एक तोंडीलावणें. ꠶**कोणेकाचें कोणेकाशा मेतकूट जमणें** त्याचें त्याच्याशीं परम सख्य जमलेलें असणें.

मेथवणी [**म०** मेथी+पाणी]**न०**भाजीच्या मेथीचें पाणी,–तोंडीं लावण्यासाठीं मीठ, तिखट, इ० घालून तयार केलेलें.

मेथा पु० मेथीची एक जात.

मेथी स्त्री० एक शाकभाजी. ह्या झाडाची बीजें उपधान्यांत गणलीं जातात. **मेथ्या स्त्री० अ० व०** मेथीचीं बीजें.

मेथोडा [**म०** मेथ्या] **पु०** मेथ्यांचे लाडू बाळंतिणीस खाण्यासाठी करतात ते.

मेद [**सं०** मेदस्] **पु०** चरबी. ꠶ **मेदस्वी वि०** लठ्ठ पोटाचा आणि ढुंगणाचा (माणूस). **मेंदगी स्त्री०**अंगाचा लठ्ठपणा.**मेंदवात,मेदोवात वि०** अंगांत लठ्ठपणा उत्पन्न करणारा वात हा विकार.

मेंदगिरी स्त्री० मेंढ्यांच्या लेंड्यांनीं भिंत [सारविणें.

मेंदगी, मेदगी स्त्री० शेळ्या आणि मेंढ्या यांच्या लेंड्यांचें पातळ पाणी,–भिंत सारवावयासाठीं तयार केलेलें.

मेंदट वि० ज्यांत कण्या पडल्या नाहीं असें (तूप); विसविशीत (तूप).

मेंदा खालीं ' मेंदी ' मध्यें पहा.

मेदिनी [**सं०**] **स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. ꠶ **मेदिनीश, मेदिनीपति पु०** राजा. **मेदिनीवसन न०** समुद्र,–जो पृथ्वीला लुगड्याप्रमाणें वेष्टितो.

मेंदी स्त्री० एक झाड. ह्याच्या पानांत कात, चुना,इ० द्रव्यें घालून कुटून त्या चोथ्यानें मुली हात,पाय, नखें,इ० तांबडीं रंगवितात. ꙮ **मेंदा पु०** मेंदीच्या जातीचें नर झाड.

मेंदू पु० डोक्यांत असतो तो मगज. हा जितका जड तितकी त्या माणसाची बुद्धिमत्ता अधिक असते.२ ठेचा;ठेचलेल्या गोंची स्थिति.३गळूं इ० तून बाहेर पडतो तो रक्तमिश्रित पू. ꙮ **कोणकाचा मेंदू निघणें** (किं० **वासणें** किं० **बाहेर पडणें**) तो कष्टाच्या कामाखालीं बेजार झालेला असणें. [अश्वमेध.

मेघ [**सं०**] **पु०** १ यज्ञ. २ पशुयज्ञ; उ०

मेंघला पु० मागें ' मेंढरी ' पहा.

मेधा [**सं०**]**स्त्री०** १ बुद्धि. २ धारणाशक्ति. ३ ध्यान. ४ (**मराठींत**) प्रेम; आवड; उ० त्या मुलावर गोविंदरावांची मेधा आहे तितकी याच्यावर नाहीं. ꙮ **मेधावी** [**सं०** मेधाविन्] **वि०** विद्वान्; बुद्धिमान्. **मेधाविनी स्त्री०** ब्रह्मदेवाची पत्नी.

मेंधी वर ' मेंदी ' पहा.

मेध्य [**सं०**] **वि०** १ यज्ञास योग्य. २ यज्ञासंबंधीं. ३ पवित्र. **पु०** १बोकड. २ खेर हें झाड.

मेना मागें ' मेणा ' पहा.

मेमटमाऱ्या, मेमणचोट्या,मेमटा(-ट्या), ममटमाऱ्या, मेमुटमाऱ्या, मेंबटा (-ट्या) वि० दिसण्यांत सौम्य पण असण्यांत कावेबाज; उ० मेमटा घेतो चिमटा आणि भडभड्याचा होतो बोभाटा.

मेमण पु० मुसलमान कोष्टी.

मेमुळगाडा, मेमलतोंडा (-ड्या)[**म०**मेमे (शेळीचें ओरडणें)+गाडा, तोंड] **वि०** निर्वीर्य, पिसापेशीत, अजागळ (माणूस).

मेर [**सं०** मर्यादा] **स्त्री०** डोंगर, शेत, इ० ची कडा किं० कांठ.

मेरु [**सं०**] **पु०** १ एक पर्वत. ह्याला'सुमेरु,' 'हेमाद्रि, " रत्नसानु, '' सुरालय ' अशीं इतर नांवें आहेत. २ माळेचा मधला मणि. ह्याला ' मेरुस्थान ' असेंही म्हणतात. ३ गुरगुडीचा उभा दांडा. ꙮ **मेरुपृष्ठ न०** १ आकाश. २स्वर्ग. **मेरुयंत्र न०** जानवें इ० साठीं सूत काढण्याची चाती.

मेलतोंड्या [**म०** मेला+तोंड] **वि०** बावळट; अजागळ.

मेला [**सं०**] **पु०** पुढें ' मेळा ' पहा.

मेला, मेलेला [**म०** मरणें] **वि०**१ज्याच्या शरीरांतून प्राण निघून गेला आहे असा (प्राणी); मृत; जिवंत ह्याच्या उलट. २ ज्याची जीवनक्रिया आणि वर्धनक्रिया बंद झाली आहे असें (झाड). ३ ज्याचें वीर्य (म्ह० विरी) नष्ट झालें आहे असा (चुना, डांक, इ०). ४(बायकांच्या भाषेंत) द्वाड; दुष्ट.याचा उपयोग शिवीमध्यें केला जातो;उ०काय मेला सागरगोटा तरी? तो हातांतच सापडत नाहीं. **टीप,**-ह्या अर्थी ' मेला ' हाच शब्द योजला जातो. ꙮ **मेली भाकर स्त्री०**ज्याच्या अंगीं पोट भरण्याची धमक नाहीं आणि जो दुसऱ्यावर भारभूत होऊन राहातो तो जें अन्न खातो त्याला ' मेलें ' किं० ' मेलेलें ' अन्न किं० ' मेली किं० मेलेली ' भाकरी ' म्हणतात. **मेलेलें काम न०** निरुत्साहानें केलेलें किं० चालविलेलें काम. **मेलेलें तेल न०** समई, लामणदिवा, इ० मालविल्यावर जें अवशिष्ट तेल तें; दीपुष्टेल. **मेलेलें पाणी न०** आधण आणून नंतर पिण्यासाठीं गार केलेलें पाणी. **मेललें रक्त न०**१ म्हातारपणामुळें अंगांतील रक्त कमजोर होतें तें. २ त्वचेला सुई इ० बोचून ज्याला वेदना होत नाहीं त्याचें रक्त. **मेलेलें हत्यार न०** निरुपयोगी हत्यार. **मेलेल्या आईचें दूध प्यालेला वि०** कर्तृत्वशून्य; उ० मला कशाला भीति घालतोस? मी कांहीं मेलेल्या आईचें दूध प्यालेला नाहीं ! तूं एक रट्टा चढविलास तर मी दहा चढवीन ! **मेल्या म्हशीला मणभर दूध** मनुष्य जिवंत आहे तों पर्यंत त्याच्या गुणांचें चीज केलें जात नाहीं; तो मेला म्हणजे त्याच्या गुणांचें चीज केलें जातें, इतकेंच नव्हें तर ते गुण वाढवून प्रशंसिले जातात. **मेलें मढें आगीला भीत नाहीं** ज्याची आबरू कांहीं कारणानें गेली आहे तो अधिक बेआबरूला मुळींच भीत नाहीं. **मेल्यापेक्षा मेला होणें** १ अत्यन्त शरमिंदें होणें. २ फार घाबरणें.

मेवणा, मेवणी इ० पुढें 'मेहुणा , '' मेहुणी' इ० पहा.

मेवा [**फा०** मेवाह्] **पु०** १ फळें; फळफळावळ. २ गोड आणि रुचकर असें कांहींही खाद्य. ॐ **मेवामिठाई स्त्री०** फळफळावळ, बर्फी, पेढे, इ० खाद्यें समुच्चयानें.

मेवाती [**हिं०**] **पु०** १ मेवात येथील राहाणारा. २ लुटारू.

मेशपात्र, मेशीपात्र, मेषपात्र पुढें ' मेष ' [मध्यें पहा.

मेष [**सं०**] **पु०** १ मेंढा. २ (ज्योतिष) बारा राशींतील पहिली रास. मागें ' तूळ ' मध्यें ह्या बारा राशींचीं नांवें पहा. ॐ **मेषसंपात पु०** मेषराशींत सूर्याचा प्रवेश. **मेषी स्त्री०** मेंढी. **मेषपात्र वि०** अजागळ; खुळचट; कर्तृत्वशून्य. ' मेशपात्र, ' ' मेशीपात्र, ' हीं अशुद्ध रूपें. **मेषा वि०** अजागळ.

मेष [**सं०** मिष्=डोळे उघडणें] **पु०** डोळे उघडणें ही क्रिया. ॐ **मेषोन्मेष पु०** डोळ्यांची उघडझाक.

मेसादेवी स्त्री० चोरांची देवता.

मेस्तक [**हिं०**] **न०** ज्यांत कोष्टकें, तोंडच्या हिशेवांच्या चाली, तोंडानें गुणाकार, भागाकार, वजाबाक्या, बेरजा, इ० करण्याच्या रीति, इ०चा संग्रह असतो असें पुस्तक.

मेस्तर न० गिलावा घोटण्याचें गवंड्याचें एक करणीसारखें आउत.

मेस्तरी, मेस्त [**पोर्च्युगीझ्**] **पु०** कांहीं कामावर नेमलेल्या गवंडी, सुतार, शिकलगार, लोहार, इ० कांच्या कामावर देखरेख करणारा अमलदार किं० मुकादम. २ यूरोपी लोकांचा स्वयंपाकी.

मेह [**सं०**] **पु०** १ मुतणें. २ मूत. ३ मूत्ररोगविशेष. ह्याचे एकवीस प्रकार आर्य वैद्यकांत सांगितले आहेत.

मेहतर, म्हेतर [**फा०** मिहतर] **वि०** १ श्रेष्ठ. २ झाडू. ३ भंगी. ॐ **मेहतरी, म्हेतरी, मेहतरी स्त्री०** साफसुफीचें काम.

मेहंदळ, मायंदळ वि० पुष्कळ; बहुत; विपुल.

मेहंदी [**हिं०**] **स्त्री०** मागें ' मेंदी ' पहा.

मेहन [**सं०**] **न०** १ मुतणें. २ मूत. ३ शिश्न.

मेहनत, मेहेनत [**अ०**] **स्त्री०** कष्ट; श्रम; परिश्रम; दीर्घोद्योग. ॐ **मेहनती, मेहनत्या, मेहनतीखपती वि०** कष्टाळू. **मेहनत मजूरी स्त्री०** पैशानें करविलेलें किं० पैशासाठीं केलेलें देहकष्टाचें काम किं० अशा कामाबद्दल कोणेकाला दिलेली किं० मिळालेली मजूरी. **मेहनत मशागत स्त्री० ए० व०** शेत, घर, इ० संबंधाची काळजी वाहून तत्संबंधाचीं केलेलीं सर्व प्रकारचीं कामें समुच्चयानें. **मेहनताना पु०** श्रमाचा मोबदला; पगार; मजूरी; वेतन.

मेहमन, मेहमान, मेहेमन, मेहेमान [**फा०** मिह्मान्] **पु०** १ पाहुणा; अतिथि. २ संमानपूर्वक भोजनार्थ आमंत्रिलेला गृहस्थ. ३ गांवचा रहिवासी नसून गांवचीं शेतकी करणारा उपरी. ४ सरकारनें मेहेरबानीनें खाऊंपिऊं घालून पोसलेला निरुद्योगी माणूस किं० कांहीं अल्प काम त्याच्याकडून करवून घेऊन भरपूर पगार देऊन बाळगिलेला माणूस. ॐ **मेहमनकी, मेहमानकी स्त्री०** अर्थ ४ च्या मेहमानाचा दर्जा किं० स्थिति. **मेहमानी, मेहमानगी स्त्री०** आदरसत्कार; पाहुणचार.

मेहर, मेहेर [**फा०** मिह्] **पु०** सूर्य.

मेहर, मेहेर [**फा०** मिह्‌र्] **स्त्री०** कृपा; दया; कींव. **पु०** विधवेशीं लग्न करणारानें तिला करून दिलेली नेमणूक. ॐ **मेह (–हे–) र नजर स्त्री०** दयार्द्र दृष्टि; कृपा. **मेह (–हे–) रबान वि०** १ कृपावंत; दयाळू. २ सरकारनें कोणेकाला दिलेली किं० पत्रांत योजावयाची पदवी. **मेह (–हे–) रबानी, मेह (–हे–) रवानी, मेह (–हे–) रबा- (–वा–) नगी स्त्री०** कृपा; दया.

मेहरणें [**म०** मेहरी] **अ०क्रि०** गात्र किं० त्वचा बधिरपणानें युक्त होणें म्ह० संवेदनाशून्य होणें.

मेहराब (–प), मेहरब (–प), महिरब (–प) [**फा०** मिह्‌राब] **स्त्री०** १ कमान,—साधी किं० नक्षदार. २ मशीदींत पश्चिम दिशेस असते ती पवित्र देवळी. हिच्याच शेजारीं मिंबर म्ह० व्यासपीठ असतें.

मेहरी स्त्री० गात्राला येतो तो बधिरपणा; संवेदना न होणें ही गात्राला होते ती विकृति.

मेहुडा, मेहू [**सं०** मेघ] **पु०** मेघ; ढग.

मेहुणा पु० १ बायकोचा भाऊ. २ बहिणीचा नवरा. ॐ **मेहुणी स्त्री०** बायकोची बहीण. **मेहु-**

णचार पु० मेहुण्याला दिलेली मेजवानी किं० मेहुण्याचा केलेला आदरसत्कार.

मेहूण [**सं०** मिथुन] **न०** पतिपत्नींची जोडी भोजनास बोलाविलेली.

मेहेतर इ० मागें ' मेहतर ' इ० पहा.

मेळ [**म०** मिळणें; **सं०** मिल्=एकत्र होणें] **पु०** १ वाजंत्र्यांचा ताफा. २ मैथुनार्थ जुळलेलें सर्पमिथुन. ३ दोन किं० अधिक पदार्थांची अनुरूप घटना किं० संयोग.४हिशेबांत ताळा जमणें. ५ दोन विधानांचें अनुवादित्व; दोन हकीगतींची अविरुद्धता. ६ मिलाफ; जुळणी. ७ कळक, वेळू, इ० च्या फुलांचा समुदाय. [पहा.

मेळवण, मेळवणी मागें ' मिळवण ' इ०

मेळा [**सं०** मेला=संयोग; जूट] **पु०** १ जूट; टोळी. २ विशिष्ट कार्यासाठीं एकत्र जुळलेली मंडळी. ३ जत्रा, उत्सव, इ० प्रसंगीं जमलेलीं माणसें समुच्चयानें. ४ सार्वजनिक रीत्या प्रार्थना, व्याख्यान, उपदेश, भजन, व्यापारी वाटाघाट, इ०कार्यासाठीं शिस्तीनें आणि जुटीनें काम करणारीं माणसें समुच्चयानें. ५ लवाद किं० लवादनिवाडा. ❀ **मेळयास मिळणें** एखाद्या संस्थेंत किं० पक्षांत किं० पंथांत सामिल होणें. **मेळापाक पु०** १ भांडणानंतर पुन्हा झालेलें सख्य. २ बहुत काळानंतर दोन माणसांची पडलेली गांठ. ३ गायन, वादन, वैद्यकी क्रिया, पोहे कांडणें, इ० कामीं जरूर अशा साधनसामग्रीची जुळवा जुळव. **मेळावा पु०** समुदाय; जूट. **मेळेदार पु०** लवादांपैकीं एक एक इसम; लवाद. **मेळेकरी पु०** गांवचा एक पिढीजाद कामगार.

मैत वि० मयत; मेलेला. मागें ' मयत ' पहा.

मैत्र [**सं०**] **वि०**१ मित्रतुल्य; मित्रासारखा; स्नेहयुक्त. २ सूर्योपासक. **पु०** १ सत्पात्र ब्राह्मण. २ सूर्योदयापासून तिसरा मुहूर्त. ३ मित्र. **मैत्री स्त्री०** १ सख्य. २संबंध;संसर्ग. **मैत्र्य न०** १ सख्य. २ सूर्योपासन. ३ अनुराधा हें नक्षत्र. ❀ **मैत्रकी, मैत्री स्त्री०** सख्य.

मैत्रीण, मैत्रणी स्त्री० स्त्रीमित्र. **मैत्रेय वि०** मित्रासंबंधाचा. [एक जात.

मैत्रायणी, मैत्राणी [**सं०**] **पु०** ब्राह्मणांची

मैथिल [**सं०**] **पु०** मिथिलेचा राजा,—जनक.

मैथिली स्त्री० सीता. [३ संयोग.

मैथुन [**सं०**] **न०** १ रतिसंभोग.२ मिलाफ.

मैंद पु०१कुळव हें शेतकीचें आउत.२ हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ❀ **मैंदावें, मैंदाव न०** मैंद लोकांची लूट, दरवडा, इ० साठीं निघालेली टोळी.

मैदा [**हिं०**] **पु०** गव्हाचें बारीक पीठ; सपीट.

मैदान [**फा०**] **न०** १ उघडी, सपाट, आणि विस्तीर्ण अशी जागा; पटांगण. २ अंगरखा,बंडी, इ०चा मोठा तुकडा,—कळ्या, बाह्या, इ० विरहित. ❀ **मैदान बसणें** मलविसर्जनार्थ उघड्या जागेंत बसणें.

मैदालकडी स्त्री० एक काष्ठौषधी.

मैना [**हिं०**] **स्त्री०** साळुंखीची एक जात.

मैयत [**अ०**] **वि०** १ बुडालेलें (पीक). २ निर्वंश झालेलें (कुटुंब, संस्था). ३ मृत; मेलेला (माणूस, जनावर). ❀ **मैयतअर्जी स्त्री०** मृत मनुष्याच्या बाबतींत केलेला अर्ज. **मैयत कयास पु०, मैयतचौकशी, मैयततपासणी स्त्री०** मृत मनुष्याच्या मरणाचें कारण, चिन्हें, प्रकार, इ० संबंधाचा तपास.

मैया [**अ०** मियाह्] **वि०**शंभर ही संख्या. ❀ **मैयातैन वि०** दोनशे ही संख्या. **टीप,**— ' मैया ' आणि ' मैयातैन ' हे शब्द मुसलमानी सालें सांगतांना योजतात.

मैरालभाऊ पु०दणगट आणि भक्कम बांध्याचा माणूस.

मैल [**हिं०**; **सं०** मल] **पु०, स्त्री०** घाण; मळ. ❀ **मैलखोर वि०** ज्यांत मळ खपतो म्ह० फारसा स्पष्टपणें कळून येत नाहीं असा (रंग, कपडा).

मैलागर,मैलागिरी चंदन [**सं०** मलयगिरी; चंदन] **न०** चंदनाची एक जात.

मोईन [**अ०** मुय्यन्] **स्त्री०** १ निश्चितपणाची किं०पक्केपणाची स्थिति.२नक्की संख्या किं० परिमाण. ३ठरविण्यांत आलेला पगार, तनखा, सरंजाम. इ०. ४ वार्षिक पगार किं० तनखा,— ' दरमहा ' च्या व्यावर्तकत्वें. ❀**मोईन जाबता**

पु० १ नोकर लोकांच्या पगाराचा तक्ता. २ ठरावाच्या तपशिलाचा कागद. ३ वाटणीपत्रक. **मोईनदार पु०** सरकारांतून ज्याला दरमहा किं० दरसाल कांहीं ठराविक पगार किं० तनखा मिळतो तो इसम. **मोईनमाप न०** ठरविण्यांत आलेलें माप, परिमाण, किं० संख्या. **क्रि० वि०** निश्चितपणें; पक्केपणीं.

मोक, मोख पु० फळ, गड्डे, कांहीं खाद्य पदार्थ, इ०च्या आंतील मऊ भाग.

मोकडी स्त्री० एक वृक्षविशेष.

मोकदम, मोकदमी मागें ' मुकदम, ' 'मुकद्दमी ' पहा.

मोकलणें [**म०** मोकळा करणें; **सं०** मुक्त] **स० क्रि०** १ स्वच्छंदानें हिंडूं किं० फिरूं देणें. २ मोकळा सोडणें. ३ (धाय, आरोळी, इ०) उच्चारणें किं० तोंडाबाहेर काढणें.

मोकळ [**म०** मोकळा] **स्त्री०** १ मोकळेपणाची स्थिति; कडवा, गवत, फुलें, काटक्या, इ०ची पेंड्या, हार, भारा, इ०रूपानें बंदिस्त नसण्याची स्थिति. २ कर्ज इ०ची फेड. ३ गठ्ठा, भारा, गांठोडें, मोळी, इ० सुटा करण्याची क्रिया. ४ मोकळेपणा; कांहीं करण्याची कोणेकाला असलेली मुभा. **क्रि० वि०** १ मोकळेपणानें, स्वच्छंदानें (हिंडणें, फिरणें). २ पक्कें किं० बंदिस्त किं० निश्चित न केलेल्या स्थितींत (असलेलें पत्र, हिशेब, इ०). **मोकळचरणी वि०** १ स्वच्छंदी; स्वेच्छाचारी. २ पक्का न केलेला, ठरविण्यांत न आलेला, निश्चित नव्हे असा (नफा, मिळकत, इ०). **मोकळचरणें क्रि० वि०** स्वच्छंदानें; मोकळेपणानें. **मोकळचिट्टी स्त्री०** रुखसत,–कोणेकाला कांहीं बंधनापासून किं० करारापासून दिलेली. **मोकळलेख पु०** सुट्या कागदावर लिहिलेला लेख. याच्या उलट ' बंदिस्त लेख'. **मोकळवट क्रि० वि०** १ स्वच्छंदानें; मोकळेपणानें (हिंडणें, भटकणें). २ बंदिस्त न केलेल्या स्थितींत (गवत, पदार्थ, शेत, पटांगण, इ०असणें).

मोकळणें वर ' मोकलणें ' पहा.

मोकळा [**सं०** मुक्त] **वि०** १ न बांधलेला; न जखडलेला (प्राणी, डोईचे केश, जिनसा, इ०). २ कडी, कुलूप, अडसर, इ० नीं बंद न केलेलें (दार, पेटी, घर, इ०). ३ जेथें वसति, बिऱ्हाड, माणसें, इ० नाहींत असा (वाडा, घर, खोली, इ०). ४ मुलें, आजार, तगादेदार, इ० च्या त्रासापासून मुक्त झालेला. ५ ज्याच्यावर दाब किं० नियंत्रणा नाहीं असा (माणूस, पशु). ६ शंका किं० भीति न बाळगणारा; संकोच न धरणारा; आडपडदा न ठेवणारा. ॰ **तोंड मोकळें सोडणें** १ यथेच्छ बोलणें, शिव्या देत सुटणें. २ मनास येईल तितकें खाणें. **हात मोकळा सोडणें** १ औदार्य दाखविणें. २ अनियंत्रितपणें वागणें. **कंठ मोकळा करणें** १ मोठा आवाज काढणें. २ गायनाच्या पूर्वीं खाकरून घसा स्वच्छ करणें. **मोकळाचाकळा वि०** अनियंत्रित; सुटा; बंदिस्त नसलेला; न बांधलेला. **मोकळाढाकळा वि०** १ उघडा; बंदिस्त नसलेला; जेथें कोणाला कोणत्याही प्रकारची बंदी नाहीं असा (नदी, विहीर, तळें). २ अघळपघळ (घर, बंडी, अंगरखा). **मोकळा भात पु०** ज्याचीं शितें एकाला एक चिकटून गोळा झालेलीं नाहींत असा भात. **मोकळी भाजी स्त्री०** भगरा भाजी. **मोकळें रान, मोकळें मैदान** हावें तें करण्याला पूर्ण मुभा (मिळणें, सांपडणें).

मोकळीक [**म०** मोकळा] **स्त्री०** १ सुटका. २ परवानगी; मुभा.

मोकादम, मोकादमी मागें ' मुकदम, ' ' मुकद्दमी ' पहा.

मोकार, मोकाट [**सं०** मुक्त] **क्रि० वि०** १ स्वच्छंदानें. २ सढळ हातानें; औदार्यानें; विपुलपणें.

मोकार क्रि० वि० ऐन किमतीस; मूळ किमतीला. **न०** मूळची किंमत; ऐन किंमत; उ० तुम्ही हा घोडा पन्नास रुपायांना मागतां, मोकार पाऊणशे रुपये आहे, नफा बाजूला सारला तरी मोकार तरी सुटलें पाहिजे.

मोकाशी (–सी), मोकासदार खालीं ' मोकासा ' मध्यें पहा.

मोकासा[अ०मुख्सस]**पु०**१ जरूरीच्या प्रसंगीं सरकारास सैन्य पुरविण्याच्या आणि नोकरी

करण्याच्या शर्तीवर सरकारनें कोणेकाला बक्षीस देलेला गांव किं०अधिकार.२अशा बक्षीस दिलेल्या गांवांत जो सरकारचा कांहीं बाबतींत अमल असतो किं० सान्याचा भाग असतो तो. ३ राजबाबती बाद केल्यावर उरलेली चौथ. ४ मुशाफर लोकांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याबद्दल कोणेकाला दिलेला इनाम गांव. ꣸ **मोकाशी,मोकासदार पु०** मोकासा ज्याला देण्यांत आला आहे तो. **मोकासबाब स्त्री०** मोकाशाचा जमाबंदीचा वाटा किं० हिस्सा.

मोकाळ [म० मोकळा] **वि०** स्वच्छंदी; अनियंत्रित; उत्सृंखळ. **क्रि० वि०** स्वच्छंदानें (हिंडणें, फिरणें, वागणें).

मोख पु० १कोंवळा नारळ इ०च्या शेंड्यास जो खावयाजोगा अंश असतो तो. २ धान्यादिकांचा आंत जो बजिभूत अंश असतो तो. ३गाभा. ४सुपारी इ० च्या पोटांत जो मऊ भाग असतो तो. ५ एरंडाच्या बीजांतला मगज. ६ गळवांतील विलविलीत किं० मऊ भाग. ८ कोणत्याही फळ इ० चा मऊ भाग.

मोखर, मोखार [म० मोख] **वि०** १ ढिसूळ (धोंडा). २ वयाच्या मानानें अधिक बळकट किं० बुद्धिमान (मूल).

मोखा पु० १ झाडाची नुकतीच तोडलेली फांदी, कांठी, इ०.२वांसा, खांब,–पुरावयासाठीं योजावयाचा.

मोग पु० कोंब; अंकुर.

मोगड, मोगण, मोगणा, मोगणी,मोगणें पुढें 'मोघड,' ' मोघण, ''मोघणा,' ' मोघणी, ' ' मोघणें 'पहा.

मोगर [**सं०** मुद्गर] **पु०** १ हातोडा. २ सोनें, चांदी, इ० च्या तारेच्या एका टोकाला असते ती बारिक गोटी,–मोती, इ० तारेंतून ओघळूं नये म्हणून.

मोगरा [**सं०** मुद्गर] **पु०** १ हातोडा. २ शस्त्रविशेष. ३ जमीन चोपण्याचें एक साधन; चोपणें. ४ एक सुवासिक फुलाचें झाड. ५ घुम्यासारखा बसणारा माणूस. ६ आडकित्याच्या पायांची गोटच्या आकाराचीं टोकें प्रत्येक. ७ कंबरपट्ट्यांत तरवारीचें म्यान आडकावण्यासाठीं मुठीच्या शेजारीं जी वाटोळी गोटी असते ती. ८ दिव्याच्या वातीचा कोळी,–जळून मुरदाड झालेला.

मोगरी [म० मोगरा] **स्त्री०** १ मोगऱ्याचें झाड. २ लहान हातोडा. ३ मुळ्याची शेंग; डिंगरी. ꣸ **मोगरीमार पु०** १ कपडे धुतांना ते दांडक्यानें बडविणें ही क्रिया.२कोणेकाला दिलेला चोप.

मोगरें [म० मोगरा] **न०** मोगऱ्याचें फूल. ꣸ **मोगरेल न०** मोगऱ्याच्या फुलांच्या वासाचें तेल; मोगऱ्याच्या फुलांचें तेल.

मोगल पु० काजूच्या फळाचा लठ्ठ देठ.

मोगल, मोंगल [**फा०** मुगल्] **पु०** तार्तरी देशचा मुसलमान. ꣸ **मोगलाई स्त्री०** १ मोगलांचा मुलूख. २ मोगलांची राज्यपद्धति. ३ अंदाधुंधीची राज्यपद्धति किं० व्यवस्था; जुलमी आणि अन्यायी सरणी. **मोगलाण न०** १ मोगलांचा देश. २ मोगलांची राज्यपद्धति. ३ मोगल लोकांनीं केलेलें बंड किं० मांडलेला धुमाकूळ. **मोगली बाजार पु०** धिंगामस्ती(मांडणें, माजविणें). **मोगली एरंड पु०** एक प्रकारचा एरंड. **मोगली बेदाणा पु०** एक औषधोपयोगी पदार्थ. **मोगली मिरची स्त्री०** वांग्यासारखी लठ्ठ मिरचीची एक जात.

मोगा पु० १ नारळाचा सुयरा किं० पोगी. २ कित्येक नारळांच्या पोटांत वाढतो तो भुसभुशीत कोंब.

मोगारा पु० कोंब, अंकुर (येणें, फुटणें).

मोघ [**सं०**] **वि०** १ व्यर्थ; निष्फळ. २ निरुपयोगी. ꣸ **मोघपुष्पा स्त्री०** वांझ स्त्री.

मोघड पु०, स्त्री०, न०, मोघण न०, स्त्री० १ गहूं आणि हरभरा (किं० अन्य द्विदळ धान्य) जमीनींत पेरावयाचें दोन नळ्यांचें एक शेतकीचें आउत.२ ह्या आउतानें पेरलेला रब्बीचा हरभरा किं० कांहीं डाळ.

मोघणा पु० पाभरांतून पेरावयाचें धान्य ज्या नळींतून गळतें ती नळी किं० ह्या नळींतून पेरलेली ओळ.

मोघणी स्त्री० जोंधळा, बाजरी, इ० मध्यें

तूर, हरभरा, इ० ची पेरणी किं० ही पेरणी ज्या नळीच्या द्वारें केली जाते ती.

मोघणें स०क्रि० मोघणानें (तूर इ०)पेरणें.

मोघम, मोहगम [अ० मुबहम्] **वि०** १ संदिग्ध; अनिश्चित. २ दुटप्पी.

मोघा पु० अरुंद गळ्याचें उभट आणि डेरे-दार पात्रविशेष.

मोघें न० जोंधळा, बाजरी, किं० गहूं, यांच्यांत मोघण्यानें पेरलेली तूर किं० हरभरा.

मोच पु०, मोचा स्त्री० [सं०] १ केळ. २ शेवगा. ३ सांवरी. ४ साळई. ঌ **मोचरस पु०** सावरीचा चीक.

मोचा [हिं०] **पु०** १ जोडा,–पायांत घाल-ण्याचा. २ खेटर. ঌ **मोचामोची स्त्री०** एक-मेकांना खेटरांनीं मारून केलेली मारामारी; खेटराखेटरी. **मोची पु०** चांभार.

मोच्छाव, मोच्छाह [सं० 'महोत्सव' चा गांवढळ अपभ्रंश] **पु०** कोणताही उत्सव किं० उत्सवाचा प्रसंग.

मोच स्त्री० एक शाकभाजी.

मोचक [सं०] **वि०** १ सोडणारा. २ सोडविणारा; मोकळीक देणारा.

मोचन [सं०]**न०**१सोडण्याची किं० सोडवि-ण्याची क्रिया. २ सुटका; मोकळें करणें. ३ कर्ज फेडणें. ४ अस्त्र फेकणें.

मोज न० १ मापण्याची क्रिया किं० ह्या क्रियेचें फळ (घेणें); पदार्थांची लांबी, रुंदी, इ० चें माप. २ मापण्याचें साधन.

मोजका [म० मोजणें] **वि०** १ मोजलेला. २ बरोबर मोजून दिलेला किं० घेतलेला,–यत्किं-चित् सुद्धां अधिक नसलेला. ३ परिमित,– अधिकही नाहीं आणि कमीही नाहीं असा.

मोजणी [म० मोजणें] **स्त्री०** १ मोज-ण्याची क्रिया किं० ह्या क्रियेचें फळ. २ जमी-नीची मापणी,–लांबीरुंदीची गणति. ঌ**मोजणी-दार पु०** जमीनींचीं मापें घेण्याच्या कामावर नेमलेला अंमलदार.

मोजणें स० क्रि० १ मापणें; गणतीनें (पदार्थांची) लांबी, रुंदी, परिमाण, इ० ठरविणें; गणणें. २ महत्त्वाचा समजणें; मानास किं० आदरास पात्र समजणें.

मोजदाद (–त,–स्त) [अ०] **स्त्री०** (माणसें, पशु, घरें, सामान, पदार्थ, इ० ची)गणती.

मोजप [म० मोजणें] **न०** १ गणति. २ मोजून ठरलेली संख्या, परिमाण, किं० माप.

मोजबा, मोजबेदार पुढें 'मोसबा,' 'मोसबेदार' पहा.

मोजला [म० मोजणें] **वि०** १ मोजलेला. २ अगदीं बरोबर मोजून दिलेला किं० घेतलेला,– बिलकूल अधिक नाहीं आणि कमी असा; उ० मोजल्या रुपायांनीं कधीं संसार होत नाहीं.

मोजवटी स्त्री० सोनाराचें नक्षी किं० विशिष्ट आकृति पत्र्यावर उठविण्याचें एक साधनविशेष; सोनाराचा ठसा.

मोजा [फा० मूझाह्] **पु०** विणलेलें हस्तत्राण किं० पादत्राण; उ० हातमोजा, पायमोजा.

मोजीव [फा० बेमोजीब] **क्रि० वि०, श० यो० अ०** प्रमाणें; मापानें.

मोजींव [म० मोजणें] **वि०** मोजलेला; अगदीं मापाबरहुकूम असलेला किं० केलेला. ह्याच अर्थी 'मोजींव मापींव.'

मोट स्त्री० १ विहिरींतून पाणी काढण्याची आणि बैलांनीं ओढावयाची आकारविशेषाची कातड्याची पिशवी. २ धान्य, केरकचरा, गोवऱ्या, फळें, इ० चें गाठोडें. ३ प्रसूतिसमयीं पशू इ० चीं जी पिशवी बाहेर येते ती. हिला 'पाणमोटली' असा शब्द आहे. ४ माणूस, पशु, इ० ची गात्रें आखडल्यानें त्यांचें संकुचित झालेलें शरीर (होणें, करणें). ५ पिशाच्याच्या झटक्यानें मनुष्याचें गांठोड्यासारखें झालेलें शरीर. ঌ **कोणाची मोट बांधणें** त्याची इच्छा नसतां त्याला एकादें काम करावयाला भाग पाडणें; त्याच्या इच्छेविरुद्ध त्याच्यावर कांहीं काम लादणें.**मोटकरी पु०** मोट हाकणारा माणूस. **मोटस्थळ न०, मोटस्थळ जमीन स्त्री०** मोटेच्या पाण्यानें जेथें शेत केलें जातें अशी जागा किं० जमीन.**मोट्या पु०** ओझीं वाहाणारा हमाल, गडी, किं० नोकर.

मोटकळी स्त्री०, **मोटकुळें** न० **मोटला** (-ळा) पु०, **मोटली** (-ळी) स्त्री०, **मोटलें** (-ळें) न० सईलसर बांधलेलें गांठोडें. **मोटकुळी उडी** स्त्री० गात्रें आखडून पाण्यांत मारलेली पोहोणाऱ्याची उडी. गात्रें ताणून मारलेल्या उडीस ' चुबकती उडी ' म्हणतात.

मोटन [सं० मोटन; सं० मुट्=चूर्ण करणें] न० १ वाटणें; मोडणें; दळणें. २ मागें ' बोडण' चे दोन्ही अर्थ पहा.

मोटवी स्त्री० मिरचीची एक जात. हिला ' मोटवी मिरची ' असेंही म्हणतात. ही आखूड आणि जाडी असते.

मोटसुती [म० मोठें, मोटें + सूत] वि० जाड्या भरड्या सुताचें (वस्त्र).

मोटा, मोटाई, मोटाड, मोटाधाटा [म० मोठा] पुढें ' मोठा ' इ० पहा.

मोटाळा, मोटाळी, मोटाळें ' मोटला, ' ' मोटली, ' ' मोटलें ' पहा.

मोठा,मोटा [हिं०]वि० १ आकारानें किं० विस्तारानें, किं० परिमाणानें, किं० किमतीनें अधिक. क्रि० वि० खूप; अतोनात; बेसुमार; अतिशय. ॐ **मोठाई, मोटाई** स्त्री० मोठेपणा. थोरवी. **मोठाड, मोटाड** वि० फारच मोठा किं० अवाढव्य. **मोठाड** [म०मोठें+हाड वि० हाडपेरानें धिप्पाड (बैल, घोडा, माणूस, इ०). **मोठाधाटा, मोटाधाठा** वि०खूप मोठा; अवाढव्य; जाडजूड; किरटा नव्हे असा. **मोठा बुवा** पु० नाग,-सापाच्या व्यावर्तकत्वें. **मोठी घोळ** स्त्री० एक शाकभाजी.**मोठें पोट** न० दया; अपराधाची क्षमा.

मोड [म० मोडणें] पु० १ पराजय(लढाई, वाद, इ० मध्यें). २ झाडाला फुटतो तो अंकुर (फुटणें येणें). ३ उसळ इ० साठीं भिजत घातलेल्या पावटे, मटक्या, इ० ना येतात ते अंकुर (फुटणें,येणें) ४ मुळव्याध ह्या रोगामध्यें गुदाबाटें जो मांसपिंड बाहेर येतो तो.

मोड [म० मोडणें] स्त्री० १ फुटकीं तुटकीं धातूचीं भांडीं किं० सोन्यारूप्याचे पदार्थ इ० समुच्चयानें. २ कागद, वस्त्र, इ० ला घडी घातल्यानें तेथें जी रेषा उत्पन्न होते ती; दुमड. ३ मोडी लिपि,-जी हेमाडपंतानें लंकेतून आणून रूढ केली असें म्हणतात. ४ पदार्थाचे दोन भाग करणारी रेषा,-डोकींतील भांग,शेतांतून पाडलेली पाऊलवाट. ५ रस्ता, वाट,इ०तील वळण.६ सरणी, पद्धति, शिस्त, रीति.७ बोलणें, चालणें,हसणें,कपडे पेहेरणें,इ०संबंधाची कोणेकाची जात इ०संबंधा ची विशिष्ट चाल किं०सरणी.८ लेखन, भाषण, इ० बाबतींत जी कोणोकाची शैली किं०तऱ्हा ती.८कोणतीही क्रिया करण्याची धाटणी किं०रीति.९पावसाची जमिनीवरून पाणी वाहून जाण्याइतकी मोठी सर. १० मोठ्या नाण्याच्या मोबदला जीं त्या किमतीचीं लहान नाणीं तीं समुच्चयानें. ११ कांहीं मोठें ओझें वाहिल्यानें गात्रविशेष ताठणें (येणें). ह्या अर्थी स्त्री० सुद्धां

मोडक पु० एक प्रकारचा काळा मुंगळा.

मोडकळ [म० मोडणें+कळा (स्थिति)] स्त्री० १ फुटलेपणाची, मोडलेपणाचीं, किं० विशकलितपणाची स्थिति. २ अपकर्ष; ऱ्हास; उतरती कळा. ॐ **मोडकळीस येणें** कुटुंब, व्यापार, कारखाना, इ० अपकर्षाच्या किं० ऱ्हासाच्या स्थितीप्रत येणें.

मोडका [म० मोडणें] वि० १ मोडल्यामुळें निरुपयोगी झालेला (पलंग, घर, पेटी, इ०). २ लहान प्रमाणांत व्यापार करणारा (वाणी, दुकानदार,सावकार, इ०).ॐ**मोडकी काठी** स्त्री० १ अधिकाराच्या पदावरून च्युत झालेला मनुष्य. २ समाजांत ज्याची बेअबरू झाली आहे असा माणूस. **मोडका तोडका, मोडका तुटका** वि० १ भग्न झाल्यामुळें निरुपयोगी झालेला. २ छिन्न भिन्न. ३ मोडकळीस आलेला.

मोडकी., मोडकळ [म० मोडणें] स्त्री० १ भग्नपणाची स्थिति; छिन्नभिन्न झाल्याची स्थिति. २ कांहीं बेत, विचार, योजना, इ० मध्यें आलेलें किं० उपस्थित झालेलें विघ्न, हरकत, किं० अडथळा. ४ पराभव; दाणादाण. ५ अव्यवस्था; घोटाळा; अव्यवस्थितपणाची स्थिति किं० दशा. ५ विधानाचें खंडन.

मोड जोहार [म० मोडणें+ जोर] स्त्री०

पु० समुद्राची परमावधीची ओहोटी.

मोडणी [म० मोडणें] स्त्री० १ मोडण्याची क्रिया. २ मोडलेपणाची स्थिति. ३ पिकलेल्या शेतांतलि धान्याचीं कणसें मळणीसाठीं मोडून किं० खुडून काढण्याची क्रिया. ४ कांहीं कामाची सरणी, रीति, पद्धति, अनुक्रम, किं० शैली.

मोडणें [सं० मुट्=चूर्ण करणें, ठार मारणें] स० क्रि० (पदार्थांच्या) रूपांत किं० स्थितींत बदल करणें, रूपांचा किं० स्थितीचा नाश करणें, (एकादी सरणी किं० क्रम)बंद पाडणें किं० विध्वंसिणें,किं०न अनुसरणें.**टीप**,–लाक्षणिक अर्थ सुद्धां ह्याच सरणीनें होतात; उ० घर, झोप, दुकान, सभा, बंड, नियम, कायदा, क्रम, बाजार, संस्था, शाळा, रुपाया, गांव, चलनी नोट, गांव, वस्ती, शिरस्ता, दागिना, वाद, मातीचें चित्र, चाल, रीति, इ० मोडणें; उ० मन, मर्जी, वेळ, दिवस, वचन, व्यसन, मतभेद, वाद, भय, इ० मोडणें. ॐ **घर मोडणें** कुटुंबांतील माणसांची पांगापांग करणें. **कोणेकाचा झोप मोडणें** हाका मारून किं० कटकट करून त्याला जागें करणें **दुकान मोडणें** दुकानदाराचा धंदा सोडून देणें किं० बंद करणें; **सभा मोडणें** ती बरखास्त करणें किं० उधळून लावणें. **बंड मोडणें** तें चिरडून टाकणें किं० नाहींसें करणें.**नियम,कायदा, शिस्त**, इ० **मोडणें** नियम इ० न पाळणें किं० उल्लंघिणें. **बाजार, संस्था, शाळा, वाचनालय** इ० **मोडणें** बंद करणें. **रुपाया मोडणें** व्यक्तिशः कमी किंमतीचीं पण समुच्चयानें त्याच किंमतीचीं नाणीं घेणें. **प्रामिसरी नोट मोडणें** ती बाजारभावानें विकून मोबदल्याचें पैसे घेणें. **एकाद्याचें मन** किं० **मर्जी मोडणें** त्याच्या इच्छेप्रमाणें न चालणें. **वेळ** किं० **दिवस मोडणें** तो खर्च करणें (सकारण किं० निष्कारण). **व्यसन मोडणें** स्वतावर निर्यंत्रणा घालून तें नाहींसें करणें. **वाद, मतभेद**, इ० **मोडणें** उभय पक्षांची समजूत घालून विरोध किं० दुफळी नाहींशी करणें. **पागोटें मोडणें** त्याची रचना विस्कळींत करणें. **दागिना मोडणें** तो विकणें किं० त्याचें रूपान्तर करणें. **भय मोडणें** भय घालविणें किं० निरस्त करणें; भीति वाटेनाशी करणें. **मांडणी मोडणें** ती बदलणें किं० रद्द करणें. **चालरीत मोडणें** ती सोडून देणें; ती न पाळणें. **एकादशी, व्रत**, इ० **मोडणें** त्या दिवशीं जें खातां कामा नये तें खाल्ल्याकारणानें किं० यथासांग नियम न पाळल्या कारणानें त्याचें पुण्य गमावून घेणें.**मातीचें चित्र मोडणें** तें छिन्न भिन्न करणें.

मोडणें[सं०मुट्=चूर्ण करणें;ठार मारणें]अ० क्रि०१ भग्न होणें;छिन्न विच्छिन्न होणें; विस्कळित होणें.२ ऱ्हास पावणें; अपकर्ष पावणें;कमी होणें; निरस्त होणें. ३ उद्ध्वस्त होणें. ४ बंद पडणें. ५ बरखास्त होणें. ६ (दिवस, वेळ) खर्च होणें किं० खर्चिला जाणें. ७ (एकादशी इ०)निष्फळ होणें; पुण्यरहित होणें. ८ अंतर्भूत होणें; समाविष्ट होणें; उ० पुणें शहरांत भाबुर्डा मोडतो; हिंदुस्तानांत लंका मोडते. **टीप**,– ह्या क्रियापदाचे कांहीं वाक्प्रचार पुढें देतो. ॐ **अंग मोडून येणें** अंगांत तापाची वस्वस उत्पन्न होणें. **हात पाय मोडून येणें** त्यांचे व्यापार करण्याचें त्याचें सामर्थ्य नाहींसें होणें. **मोडता काळ** पु० अपकर्षाचा किं०मंदाईचा काळ.

मोडतोड [म० मोडणें+तोडणें] स्त्री० पदार्थ मोडणें, तोडणें, किं० तुटणें,फुटणें, इ०मुळें झालेली नासाडी किं० ह्या नासाडीची दुरुस्ती.

मोडभांग [म० मोडणें+भांग] पु० भांग आणि जोरगत ह्याच्या दरम्यानची समुद्राची स्थिति. मागें ' माडे जाहार ' पहा मोडणें अ० क्रि० **मोडल्या दलाचा सारथि** पु० अनाथाचा वाली.

मोडवाक [म० मोडणें वाक] स्त्री० बाहूंत घालण्याचा स्त्रियांचा दागिना.

मोडविळी [म० मोडणें+विळी]स्त्री० जिचें पातें उघडतां आणि मिटतां येतें अशी विळी,– भाज्या चिरण्याचें एक साधन.

मोडशी, मोडवशी [म० मोडणें] स्त्री० अजीर्ण;अपचन.ॐ**कोणेकाची मोडशी जिरविणें** त्याची खोडकी जिरविणें; त्याच्या गर्वाचा परिहार करणें.

मोडसुरा [म० मोडणें+सुरा] पु० ज्याचें

घातें मिटवितां येतें असा सुरा.

मोडता पु०, **मोडती** स्त्री० [म० मोडणें] हरकत; विघ्न; अडचण (येणें, घालणें). ॐ **मोडता घेणें** माघार खाणें; हटणें.

मोडवणें पुढें ' मोडावणें ' पहा.

मोडा [म० मोडणें] पु० १ हरकत; विघ्न; अडथळा. २ खोळंबा. ३ घडवंची.

मोडावणें [म० मोडणें] अ० क्रि० (धान्यांदिकांना) मोड येणें किं० अंकुर फुटणें. २ श्रम, आजार, इ० मुळें अशक्त, म्लान, निरुत्साह, किं० निर्वीर्य होणें.

मोडी [म० मोडणें] स्त्री० जल्दीनें मराठी भाषा लिहिण्याचा एक लिपिविशेष.

मोडांव [म० मोडणें] वि० १ घडी करतां येण्याजोगा; आटोपसर आकारांत ठेवतां येण्याजोगा; ज्याचे अवयव विसकळीत करतां येतात आणि पुन्हां जोडतां येतात असा (पलंग,टेबल,इ० पदार्थ). २ मोडतोड झाल्याकारणानें विकून टाकलें पाहिजे असें(सामान,–दागिने,भांडीं इ०). ३फुटकीं तुटकीं भांडीं, दागिने, इ० आटवून किं० पुन्हा जोडून नवीन केलेलीं(भांडीं,दागिने, इ०). ४ नादुरुस्त, फुटका, मोडका (कांहींही पदार्थ).

मोड्या [म० मोडणें] वि० १ मोडतोड, नाश, विध्वंस, किं० नासाडी करणारा किं० करण्याच्या स्वभावाचा किं० करण्याच्या प्रवृत्तीचा. २ अडथळा, हरकत,किं० विघ्न आणणारा. ३ कांहीं अवयव, भाग, किं० गात्र मोडलें आहे ज्याचें असा; उ० पायमोड्या म्ह० ज्याचा पाय मोडला आहे असा (माणूस, पशु, इ०). ह्याच सरणीनें हातमोड्या इ०.

मोढ, मोड [म० मोडणें] पु०झाड इ०ला अंकुर फुटणें ही क्रिया किं० फुटलेला अंकुर.

मोढा पु० १ नदींत घुसलेला आणि पाण्यानें बहुतेक वेष्टिलेला जमीनीचा पट्टा. २ खोल ओढा (पाणी असलेला किं०नसलेला).

मोत [अ० मौत] स्त्री० १ मरण (येणें).२ मोठें संकट. ॐ **कुत्र्याच्या मोतीनें मरणें** हाल होऊन किं० समाजाच्या अनास्थेंत मरणें.

मोतद्दार, मोताददार [अ० मुतअहिहद] पु० घोड्याला खरारा करणारा, आणि त्याला दाणा पाणी इ० देणारा नोकर; साईस.

मोताद [अ०मुअताद] स्त्री०१ठरावीक किं० परिमित प्रमाण किं०परिमाण(अन्न,औषध,पैसा,इ०चें). २ अगदीं तुटपुंजा पदार्थ. ३ प्रमाण;इयत्ता. ॐ **अन्नास** (किं०**वस्त्रास** किं०**पैशास**)**मोताद** वि० ज्याला पुरेंसें अन्न (किं० वस्त्र किं० पैसा) मिळत नाहीं असा (माणूस). **मोतादी** स्त्री० १ माजेकपेणा; मर्यादितपणा. २ परिमितपणा. ३ मध्यमपणा.

मोताळा पु० गुजराथी ब्राम्हणांची एक जात किं० त्या जातींचा कोणी इसम.

मोतिया पु० मोगरा ह्या फुलझाडाची एक [जात.

मोतीं [सं० मौक्तिक] न० १ समुद्रांत शिंपीच्या डब्यांत जें तेजस्वी रत्न उत्पन्न होतें तें. २ वरील पदार्थासारखा कृत्रिम पदार्थ करतात तो. ३ सोन्याच्या तारेंत मोतीं ओवून करतात तो नाकांत घालावयाचा एक दागिना. ४ डोळ्यांत एक विकृति होते ती.ह्या अर्थी'मोतीबिंदु'सुद्धां. ॐ **मोतींदाणा** पु० सुंदर पुरुष किं० अक्षर.**मोतीचूर** [हिं०] पु० बारीक कळ्यांची बुंदी.**मोत्यांची ओळ** स्त्री० सुंदर अक्षरांत लिहिलेली ओळ. **मोतींशिंप** स्त्री० ज्या शिंपीच्या पोटांत मोतीं असतें ती शिंप. **नाकापेक्षां मोतीं जड** १ यजमानापेक्षां नोकराची मिजास ज्यास्त (असणें हा हास्यास्पद प्रकार होय). २. खऱ्या योग्यतेपेक्षां अधिक असा कोणाला मिळालेला मान किं० सत्कार.

मोथ स्त्री०, **मोथा** पु० [सं० मुस्त,मुस्तक] एक सुगंधी गवत,–नागरमोथा.

मोथळा, मोदळा, मोधळा क्रि० वि० अत्यन्त (काळा).

मोद [सं०] पु० १ आनंद. २ सुवास.

मोदक [सं०] वि० सुखदायक; आनंददायक. पु०, न० मिठाई. पु० एक पकान्न,– जें गणेश चतुर्थीच्या दिवशी नैवेद्यास करतात तें. ॐ **मोदक विडा** पु०एका विशिष्टआकाराचा नागवेलीच्या पानाचा विडा.

मोदणें [सं० मुद्] अ० क्रि० आनंदित [होणें.

मोदळा पु०१पाटाचें किं० चिवताचें सूत ज्या चार काठ्यांच्या भोंवतीं गुंडाळतात त्या काठ्या बसवावयाचे मातीचे जे गोळे ते प्रत्येक. २ सईल बांधलेला गवत, काटक्या, इ०चा भारा. ह्या अर्थी ' मोधळा ' सुद्धां. ३ अगडबंब माणूस, पशु, किं० पदार्थ. ४ मातीचा गोळा.

मोदळा, मोधळा क्रि० वि० अत्यन्त (काळा); उ० काळा मोदळा.

मोदित [सं०] वि० आनंदविलेला.

मोदी [हिं०] पु० १कोठावळा.२धान्याचा दुकानदार. ॐ **मोदीखाना पु०** लष्कर, सैन्य, इ०ची धान्यादिसामग्री ठेवण्याची जागा किं० ह्या संबंधाचें खातें.

मोधळा पु० १ घरावरचीं कौलें घसरूं नयेत म्हणून छपराच्या कडेला जी गवत इ० ची जुडी घट्ट बांधलेली असते ती. २ सईलसर बांधलेला गवत इ०चा भारा. ३ अगडबंब आणि बेढब माणूस, पशु, किं० पदार्थ. [पहा.

मोधळा वि० अत्यन्त (काळा).वर' मोदळा '

मोधागोळा पु० १ गालांच्या क्षणितेमुळें जो वाकलेला आहे आणि जो सदा जुडी करून बसतो असा परस्वाधीन झालेला आजारी किं० म्हातारा माणूस. [पहा.

मोधी, मोधीखाना वर'मोदी' 'मोदीखाना'

मोनई [म०मोना] स्त्री०केळीच्या पानाचा शेंड्याकडचा भाग. ह्या अर्थी ' मोनवत ' सुद्धां.

मोनवा, मोना पु० १ केळीच्या झाडाच्या किं० ताड, माड, इ०च्या मध्यांतून जें नवीन पान उत्पन्न होतें तें. ह्या अर्थी ' मुनवा ' असेंही रूप आहे. २ केळीच्या झाडाच्या मुळाला जो नवीन कोंब फुटतो तो किं० असा कोंब तेथून काढून दुसरीकडे लाविलेला असतो तो.

मोना [सं० मौन] वि० १शब्दोच्चारणाच्या इंद्रियांत कांहीं व्यंग असल्या कारणानें ज्याला बोलतां किं०स्पष्ट येत नाहीं असा.२ जो राग, असं तोष,इ०.कारणांमुळें मुद्दाम बोलत नाहीं असा.

मोप न० उन्हांत वाळविलेली मातीची वीट.

मोपें न० अशी उन्हांत वाळविलेली मोठी वीट.

मोपाळें न० अशा विटा करण्याची लाकडाची चौकट.

मोप वि० पुष्कळ;बहुत; विपुल. अशिक्षितांत ह्या शब्दाची रूढि आहे. ह्या शब्दाचीं अन्य रूपें ' उमोप, ' ' उमाप, " म्वाप ' अशीं आहेत.

मोप, मोपाड, मोपर, मोपार न० १ डोंगराचें शिखर. २ जमीनीचें पाण्यांत घुसलेलें टोक; भूशिर. ३ तुळईच्या अग्राकडचा भाग.

मोबत, मोबद, मोहबत [अ० महब्बत **] स्त्री०** १ कृपा; प्रेम. २ मुरवत.

मोबदला, मोबादला, मुबादला [अ० मुबादला **] पु०** १ एका वस्तूच्या ऐवजीं दुसरी वस्तु देणें किं० घेणें; अदलाबदल. २ एका सदरांतून किं० खात्यांतून दुसऱ्या सदरांत किं० खात्यांत घालणें. **क्रि० वि०** ०च्या ऐवजीं किं० बद्दल.

मोबलक (-ख,-ग) वि० पुष्कळ; विपुल. मागें ' मुबलक ' पहा.

मोमनाऊ, मोमनी, मोमिनी वि० मोमीन ह्या नांवाचे जे मुसलमान कोष्टी त्यांच्या संबंधाचें किं० त्यांनीं केलेलें, विणलेलें, इ०.

मोमीन [अ० मूमिन्] पु०मुसलमान कोष्टी किं० विणकर.

मोयीन, मोयीनजाबता, मोयीनदार मागें ' मोईन ' इ० पहा.

मोर [सं० मयूर] पु०, न० एक अत्यन्त सुंदर पिसाऱ्याचा पक्षी.मोराच्या स्त्रीस 'लांडोर' म्हणतात. ॐ **मोर नाचतो म्हणून लांडोरही नाचते** मोराला नाचतांना पाहून लांडोरही जर नाचूं लागली तर तें हास्यास्पद होतें; कारण तिला पिसारा नसतो म्हणून तिचें नाचणें शोभिवंत होऊं शकत नाहीं. एकाची जी कृति शोभिवंत किं० प्रशंसनीय ठरते ती दुसऱ्यानें केली असतां तशीच ठरेल असें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. **एका पिसानें मोर होतां येत नाहीं** कोणा थोर माणसाचा एकादा गुण आपल्या अंगीं असल्यानें आपण त्या माणसाच्या योग्यतेस चढूं शकत नाहीं. **एका पिसानें मोर होणें** लोकांनीं आपली थोडीशी स्तुति केली असतां फारच हरळून जाणें.**मोरविडा पु०** मोराच्या आकाराने विड्याचें पान कातरून ज्यावर उभें बसविलेलें असतें असा विडा. **मोरचेल, मोरचल न०,**

पु०, मोरकुंचा पु० [हिं० मोरछल; म० मोर] मोराच्या पिसांची चंवरी. देवाच्या मूर्ति, राजेलोक, इ० च्या डोक्यावर अशा चंवऱ्या वारतात.

मोरई स्त्री० ज्याचें पोट पांढरें आणि पाठ काळी असतें असा एक खाऱ्या पाण्यांतील मोठा मासा.

मोरकी, मोहोरकी, मोहरकी, म्होरकी स्त्री० घोडा, बैल, इ० च्या तोंडांना बांधावयाची एक प्रकारची फास असलेली दोरी.

मोरघार स्त्री० एक प्रकारचा गरुडासारखा लहान आकाराचा पक्षी.

मोरचंग [हिं०] पु० दांतांत धरून वाजविण्याचें एक वाद्यविशेष.

मोरचा पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य- [विशेष.

मोरचा, मोरचाल [फा० मोरचाल्] पु० १ तोफ ठेवण्यासाठीं केलेली मातीची किं० लाकडाची उंच रचना. २ अनेक तोफांची अशा प्रकारें केलेली मांडणी. ३ तोफांचा मारा. ४ तरवार इ० वर चढतो तो जंग किं० कलंक. ५ आरशाचा पारा मधून मधून निघून गेल्यामुळें उघडीं पडलेलीं स्थळें प्रत्येक (पडणें, निघणें, बसणें). ※ **मोरचा फिरविणें** १ गमनाची दिशा बदलणें. २ कार्याची दिशा बदलणें. **मोरचेबंदी** स्त्री० स्थलविशेष सुरक्षित करण्यासाठीं किं० शत्रूवर तोफांचा मारा करण्यासाठीं वर अर्थ १ मध्यें सांगितल्याप्रमाणें तोफांची मांडणी करणें किं० अशी केलेली मांडणी.

मोरचूत (–द) [हिं० मोरथूथिया] पु०, न० तांबें आणि गंधक ह्यांचें पृथ्वीच्या पोटांत मिश्रण होऊन उत्पन्न होतो पदार्थ.

मोरचेल पु०, न० वर'मोर'मध्यें 'मोरचेल' पहा.

मोरचेला [म० 'मोरचा' चा अर्थ ५] वि० देवी इ० चे वण ज्यावर आहेत असा (चेहेरा, माणूस).

मोरणी स्त्री० स्त्रियांचे नाकांत घालण्याचें [एक भूषणविशेष.

मोरंबा, मोरांबा पु० मागें 'मुरब्बा' पहा.

मोरली स्त्री० शाकभाज्या, फळें, इ० चिरण्याचें पोलादी पातें लाकडाच्या फळींत बसवून केलेलें एक साधनविशेष; विळी.

मोरवई स्त्री० एक वेल.

मोरवसा पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष.

मोरवा पु० १ पाणरहाटाच्या माळेचा मातीचा मोघा. २ कोणत्याही उपयोगाचा मातीचा किं० धातूचा मोघा. मागें 'मोघा' पहा. ३ घराच्या माळ्याच्या छपराच्या आधाराला जे उभे ठेंगणे खांब बसविलेले असतात ते प्रत्येक. ४ कोणत्याही उपयोगाचा ठेंगणा खांब. ५ छपराच्या आधाराच्या खांबांच्या तळाला किं० माथ्याला जे लाकडाचे ठोकळे असतात ते प्रत्येक; ह्या ठोकळ्यांना 'घोडनट' म्हणतात.

मोरळी स्त्री० विळी. वर 'मोरली' पहा.

मोरांबा म० वर 'मुरब्बा' पहा.

मोरा वि० काळसर तांबड्या अंगावर पांढरें ठिपके असलेला(पशु). ※ **मोऱ्याची टिकली** स्त्री० मोऱ्या बैलाचें अपत्य मोरें नसलें तरी त्याच्या अंगावर एक तरी पांढरा ठिपका असणारच;त्या प्रमाणें कोणा विद्वानाचा मुलगा बापाइतका विद्वान नसला तरी थोडी तरी विद्वत्ता त्याच्या अंगीं असतेच.

मोराबा म० 'मोरवा' चा अर्थ ३ मध्यें वर्णिलेले खांब किं० त्यांच्या खालचे किं० वरचे ठोकळे प्रत्येक.

मोरी स्त्री० १ सांडपाणी वाहून जावयासाठीं बांधून काढलेला पाट किं० पन्हळ. २ स्नान, लघवी, इ० च्या उपयोगासाठीं फरशा, चुना, इ० द्रव्यांनीं बांधून काढलेली जागा. ३ पाण्याचीं भांडीं ठेवण्यासाठीं केलेली जागा. ४ एक प्रकारचा काळा मासा. ५ पाकोळी.

मोरूं न० शेतांतील फाजील पाणी वाहून जाण्यासाठीं केलेली योजना.

मोर्तब, मोरतब [अ० मुरत्तब्] वि० १ तयार; सुव्यवस्थित. २ पत्रावर ठोकलेला सरकारी पसंतीचा शिक्का. ※ **मोर्तबसुद** [अ० मुरत्तब् (शिक्का)+फा० सुद् (झाला)] सरकारच्या संमतीचा किं०मंजुरीचा छाप ठोकण्यांत आला आहे असा मजकूर किं० अशा मजकूराचा छाप किं०असा छाप ठोकणें. **मोरतबबरदार** पु० शिक्कामोरतब संभाळणारा.

मोऱ्हांटा पु० जनावरांच्या पाठच्या कण्याचें मानेकडचें टोक.

मोल [सं० मूल्य] **न०** १ किंमत. २ बिदागी; कोणी केलेल्या कामाबद्दल त्याला दिलेली मजूरी. ः **मोलकरी, मोलारी पु०** मजूर; कामकरी; पैसे घेऊन लोकांचीं कामें करणारा माणूस. **मोलकरीण, मोलारीण स्त्री०** पैसे घेऊन लोकांचीं कामें करणारी स्त्री. **मोलमजूरी स्त्री० ए० व०** मजूरी घेऊन केलेलीं लोकांचीं कामें समुच्चयानें किं० अशीं कामें करून मिळविलेलें द्रव्य. **मोला आगळा वि०** १ ज्याची किंमत करतां येत नाहीं असा म्ह० अत्यन्त मूल्यवान किं० भारी योग्यतेचा. २ फारच महाग. **मोलामहागाचा वि०** फारच महाग. **मोलानें धुणीं धुणें** लोकांची निंदा करणें. **मोलानें विकणें** नफा न घेतां म्हणजे मूळ किमतीस(पदार्थ)विकणें. **मोल तोल पु० ए० व०** दर,दाम,इ० ची चौकशी. **पाण्यांत म्हैस आणि कांठावर मोल** जो पदार्थ आपणास मिळेलच अशी खातरी नाहीं, किं० ज्या पदार्थाची आपण परीक्षा करून केली नाहीं त्या पदार्थाची किंमत ठरवीत बसणें (हा मूर्खपणा होय).

मोलावणें [**म०** मोल] **अ० क्रि०** महाग होणें.

मोलाविणें [**म०** मोल] **स० क्रि०** १ (पदार्थ) महाग करणें. २(पदार्थाची)किंमत करणें किं० ठरविणें.

मोवई स्त्री० केळ, माड, इ० च्या पोटांतून निघतो तो फळांचा घड.

मोवट पु०, न०, मोवई स्त्री० सर्पणाच्या उपयोगाचा एक वृक्ष.

मोवा पु० धान्यें,भाजीपाल्यांचीं झाडें, इ०ची नासाडी करणारा एक कीटविशेष.

मोवागी, मोवागीत, मोवारी मागें 'मवागी' ' मवागीत ' पहा.

मोवाळ, मोवाळी मागें ' मवाळ, "मवाळी' [पहा.

मोवाळें न० वासराला भलत्याच वेळीं मातेचें दूध पितां येऊं नये म्हणून त्याच्या तोंडाला घालतात तें जाळें.

मोस, मूस स० थांग, पत्ता, शोध (लावणें, काढणें, इ०).

मोसबा [अ० महासबाह्) **पु०** १ हिशेब. २ हिशेबाच्या तपाशिलाचें पत्रक. ३ कर्ज इ० ची फेड. ः **मोसबाफारक (-ख,-ग).** १ मंजूर केलेले (हिशेब,तपशील, इ०). २ ज्याचे हिशेब मंजूर करण्यांत आले आहेत असा. **मोसबेकरी, मोसबेदार पु०** हिशेब करणारा किं० तपासणारा.

मोसंबी [**मोझांबिक्**] **स्त्री०** नारिंगाच्या जातीचें एक फळ.

मोसम [अ० मौसिम्] **पु०, न०** कांहीं गोष्टीचा योग्य किं० अनुरूप काळ किं० समय किं० ऋतु.

मोह [**सं०**] **पु०** १ मूर्च्छा; बेशुद्धि. २ घोटाळा; मतिभ्रम. २ अज्ञान; मूर्खपणा. ४ चूक. ५ देहाला आत्मा समजणें. ६ प्रेमाचें वेड; प्रेमाचा अतिरेक.

मोह, मोहो [**सं०** मधु] **पु०** एक वृक्ष,- ज्याच्या फुलापासून दारू काढतात. २ मधमाशांचें पोवळें. ह्या अर्थी ' मोहो ' **न०** सुद्धां. ३ साखर. ः **मोहाचा नारळ, सुपारी**, इ० गोड नारळ, सुपारी, इ०.

मोहक [**सं०**] **वि०** १ भुरळ पाडणारें. २ आकर्षक; रमविणारें; चित्त हरण करणारें.

मोहगम मागें ' मोघम ' पहा.

मोहचळ, मोहचूळ वि० १ उबट; किंचित् उष्ण. २ खारट. ३ मचूळ, बेचव (पाणी इ०).

मोहजबा, मोहजबेदार मागें ' मोसबा, ' 'मोसबेदार' पहा.

मोहकम [अ० मुहकम्] **वि०** भक्कम; दृढ; पक्का; निश्चित.

मोहटळ न० गुरांना चरण्याचें कुरण.

मोहटी स्त्री० छपराची कड. ः **मोहटीचें पान न०** छपराच्या वांशांच्या कडेला ठोकलेली असते ती फळी.

मोहटी स्त्री० मोह नांवाच्या वृक्षाचें फळ. ः **मोहटेल न०** ह्या फळाचें तेल.

मोहणें, मोहविणें [**सं०** मुह्] **स० क्रि०** १ आकार्षणें. २(चित्त)वेधणें किं० गुंतविणें;(चिताला) भुरळ पाडणें.

मोहतर, मोहतूर [**सं०** मुहूर्त] **पु०** शूद्र जातीच्या स्त्रीचें दुसरें लग्न; पाट (लावणें).

मोहतरफा [अ० मुहृतरिफा] **पु०** गांवच्या दुकानदार आणि कारागीर लोकांवर बसविलेला कर. ꣸ **मोहतरफी पु०** हा कर देणारा मनुष्य.

मोहतसीब [अ० मुहतसिब्] **पु०** निषिद्ध कर्मांची चौकशी आणि निवाडा करणारा मुसलमान अधिकारी.

मोहन [**सं०**] **वि०** मोहविणारें. २ भ्रामक. **पु०** धोत्रा,–वनस्पती. २ मदनाचा एक बाणविशेष. **न०** १ मुरळ. २ मूर्च्छा. ३ भ्रम, चूक. ४ गुंगी किं० निद्रा आणणारें (औषध).५ कणीक इ० च्या पोळ्या इ० करणें असतां त्यांत तेल, तूप, इ० घालतात तें. ꣸ **मोहनभूत न०** एक प्रकारचें भूत किं० पिशाच. **मोहनभोग पु०** १ तांदूळाची एक जात. २ आंब्याचा रस आटवून करतात तें एक खाद्यविशेष. **मोहनमाळ स्त्री०** सोन्याच्या मण्यांची बेंबीपर्यंत लोंबणारी गळ्यांत घालावयाची माळ. **मोहनास्त्र न०** जें शत्रूवर सोडिलें असतां त्याला मूर्च्छा येते असें एक अस्त्र.

मोहबत (–द) [अ० महब्बत्] **स्त्री०** प्रेम; कृपा; मेहेरबानी; भिड.

मोहमदी स्त्री० कापसाचें वस्त्रविशेष.

मोहर, मोहोर [**फा०** मुहर] **स्त्री०** एक सोन्याचें नाणें. २ शिक्का. ३ आपल्या नांवाचा अक्षरांकित ठसा. ४ नाण्यावरची आकृति. ꣸ **मोहोरबंद वि०** १ ज्यावर मोहर केली आहे असा. २ ठसा उठवून बंद केलेला (लखोटा, पत्र, पिशवी, इ०).

मोहर, मोहोर पु० १ आंबा इ० झाडांना येतात तीं फुलें समुच्चयानें.२आम्रवृक्षाची मंजरी.

मोहर स्त्री० १अग्रभाग.२पुढचा भाग; पुढचें स्थान. ३ पुढें असलेले किं०गेलेले लोक.४पुढारीपणा. ५ बोलणें, चालणें, कांहीं काम करणें, इ० ची परिपाटी. ६ गमनाची दिशा; गंतव्य स्थान (धरणें). ꣸ **मोहरकाढ्या, मोहरक्या, मोहरकडा (–डी), मोहरपी (–प्या), म्होरक्या पु०** पुढारी; अग्रणी; अग्रेसर. **मोहरकी स्त्री०** बैल, घोडा, इ०च्या तोंडास बांधतात ती एक प्रकारची दोरी. **मोहरचा (–ला) वि०**पुढचा; अग्रभागीं असलेला; पुढच्या स्थानचा; पुढच्या काळचा. ' म्होरला ' ह्याच अर्थी.

मोहरणें [**म०** मोहर=पुष्पमंजरी] **अ० क्रि०** १ (आंबा इ०झाडें) पुष्पयुक्त होणें. २(शेत इ०)परिपक्व दशेस येणें. ३ (लोणी, उसाचा रस, इ०)कढविण्याची क्रिया पूर्ण होणें.४(गुरें, मेंढरें, इ०नी)कळपाच्या पुढें चालत असणें.५पुढें असणें किं० जाणें; पुढारणें. ६ (चंद्र) उगवण्याच्या बेतांत असणें; चंद्रोदय जवळ येऊन ठेपलेला असणें. **स० क्रि०** (पोवा) वाजविणें.

मोहरम [अ० मुहरंम्] **पु०** १ मुसलमानी वर्षाचा पहिला महिना. २ ताबुतांचा किं० डोल्यांचा सण.

मोहरम [अ० महरूम्] **वि०** पराभूत; जिंकलेला. **पु०** १ पराभव. २ विध्वंस; नासाडी; फडशा.**टीप,**–'नामोहम' सुद्धां ह्या दोन्ही अर्थी.

मोहरवणी [**म०** मोहरी+पाणी] **न०** तोंडीं लावण्यासाठीं आंब्याच्या कैऱ्यांच्या फोडी, हिंग, मोहोऱ्या, मीठ, इ० चें मिश्रण केलेलें असतें तें.

मोहरा [**फा०** मुहृरा] **पु०** १ सर्पाच्या डोक्यांतील कल्पित मणि. २ बुद्धिबळांच्या खेळांत राजा आणि प्यादा खेरीज बाकीचीं बुद्धिबळें प्रत्येक. ३ अग्रणी; पुढारी; म्होरक्या. ४ मृगंद वाजविण्याचा एक प्रकार. ५ चेहेरा; चेहेरेपट्टी; मुखाची रूपरेषा.६ज्याचा चेहेरा दिसण्यांत इभ्रतदार आणि सुंदर आहे असा मनुष्य. ७कोणहि कोणत्याही गुणानें उत्कृष्ट असा मनुष्य. ८कागद, दागिना, सोनें,चांदी, इ० चें पाल,इ०गुळगुळीत आणि चकचकीत करण्यासाठीं तो सोनें,चांदी,इ० चें घाटावयाचा मार्ण किं०दगड इ०चा खडा किं० अशा घोटण्यानें आलेली चकाकी किं० नजेला किं० गुळगुळीतपणा. ९आघाडी, अग्रभाग. १० कागदावर मधोमध जी आकृति घातलेली असते ती. ꣸ **मोहरेदार वि०** घोटून गुळगुळीत आणि चकचकीत केलेला (कागद).

मोहरिरी [अ० मुहरिर्] **स्त्री०** मोहरीराचे कर्तव्य, अधिकार, किं० पगार. खालीं ' मोहरीर ' पहा.

मोहरी स्त्री०फोडणींत घालतात तीं वाटोळी बीजें व्यक्तिशः किं० समुच्चयानें.

मोहरी स्त्री० पुंगी; मुरली.

मोहरी [**हिं**०] **स्त्री**० १ स्नान, लघवी, इ०साठीं दगड, चुना, इ०नीं बांधून काढलेली जागा. २ चुन्याच्या भट्टीचें तोंड.

मोहरीर [**अ**० मुहर्रिर्] **पु**० लेखक,–देशपांड्याचा गुमास्ता.

मोहरें [**फा**० मुह्रा] **न**० मागें ' मोहरा ' अर्थ २ पहा.

मोहरें [**फा**० मुहरा] **क्रि**० **वि**०, **श**० **यो**० **अ**० पुढें; नंतर; समोर; अग्रभागीं. ꕥ **मोहरील, मोहरचा वि**० पुढचा; नंतरचा; येणारा; पुढें यावयाचा. **मोहरून क्रि**० **वि**० पुढून; मागाहून; नंतर.

मोहल्ला [**अ**० महल्ला] **पु**० १ शहराचा भाग, पेठ, रस्ता, किं० तेथील रहिवासी समुच्चयानें. २ लढाई. ३ सैन्याची रचना,–लढाईच्या प्रसंगाची.

मोहसवा, मोहसबेदार मागें ' मोसबा, ' ' मोसबेदार ' पहा.

मोहसली [**अ**० मुहस्सिल्] **पु**० महसूल करणारा शिपायी.

मोहळ, मोहोळ न० मधमाशांचें पोळें. ꕥ **मोहळमाशी स्त्री**०हें पोळें करणारी माशी.

मोहळ, मोहाळें न० बैलाच्या अंगावर घालतात ती झूल.

मोहळ, मोहळें न०,**मोहळा, मोहाळा पु**० वासराच्या तोंडाला दोरीचें जाळें घालतात तें,–त्याला मातेचें दूध पितां येऊं नये म्हणून.

मोहा [**सं**० मधु]**पु**०१ एक वृक्ष,–ज्याच्या फुलांची दारू करतात. २ गोडी; माधुर्य.३भुरळ. **वि**० मनोहर; रमणीय. ꕥ **मोहाचा वि**० गोड, साखरेच्या चवीचा (नारळ, सुपारी, इ०).

मोहाथिणें [**सं**० मोह] **स**० **क्रि**० आकर्षिणें; ओढणें; (कोणेकाला) भुरळ किं० मोह पाडणें.

मोहाळा पु०, **मोहाळ, मोहळें न**० वासराच्या तोंडाला घालतात तें जाळें. वर 'मोहळ,' ' मोहाळें ' **न**० पहा.

मोहाळें न० बैलाची झूल. वर ' मोहळ, ' ' मोहाळें ' पहा.

मोहित [**सं**०] **वि**० १ ज्याला मोह पडला आहे असा; आकृष्ट. २ सौंदर्य, वक्तृत्व, इ० दुसऱ्याच्या अंगच्या कांहीं गुणानें ज्याचें चित्त ओढलें गेलें आहे असा.

मोहिनी [**सं**०] **स्त्री**० १ समुद्राच्या मंथनाच्या वेळीं विष्णूनें धारण केलेलें स्त्रीरूप. २ भांग. ३ मद्य. ४ कोणेकाला पाडलेली किं० पडलेली भुरळ. ५ मंत्र; जादूटोणा.

मोहीब [**अ**० मुहिब्ब्] **पु**० आपण,–पत्रांत तुम्ही ह्या अर्थी योजावयाचा शब्द. ꕥ **मोहीबानपन्हा पु**०स्नेहितांना आश्रय देणारा.

मोहीम [**अ**० मुहिम्म्] **स्त्री**० १ महत्त्वाचें कार्य; अंगीकारलेलें कांहीं काम. २ सैन्याची स्वारी किं० चाल.३दौड; धावणी.४गोसाव्यांच्या टोळीची चाल.

मोहुरणें मागें ' मोहरणें ' पहा.

मोहूर मागें ' मोहर ' पहा.

मोहूळ न०, **मोहो न**०, **पु**० मधमाशांचें रहावयाचें आणि मध साठवावयाचें घर.

मोहोटी, मोहोटेल इ० मागें ' मोहटी ' ' मोहटेल ' इ० पहा.

मोळ म० १ घराच्या छपराचें पाखें. २ छपराचा भिंतीच्या पुढें आलेला भाग.

मोळ न० लहान मुलांच्या पोटरीवर होतो तो एक रोग. **मोळ पु**०,**न**०एक प्रकारचें गवत,–ज्याच्या केरसुण्या, कुंचे, इ० करतात.

मोळा पु० १ चाल; रीति; परिपाटी; वर्तनाची सरणी.२खिळा;मोठी चूक;लहान मेख. ३ वासराच्या तोंडाला घालतात तें जाळें.

मोळी स्त्री० १ ऊस, काड्या, इ० चें जुडगें. २ मनुष्याचें शरीर,–तुच्छतेंत. ꕥ **मोळी बुचकळणें** स्नान करणें (वैतागांत). **मोळी टाकणें** दमलेलें शरीर जमीनीवर टाकून पडणें,–विश्रांतीसाठीं किं० निजण्यासाठीं (वैतागांत).

मोळें न० वासराच्या तोंडाला बांधतात तें जाळें.

मोक्ष [**सं**०] **पु**० १ मोकळें करणें; मुक्तता;

सुटका. २ सोडविणें. ३ जन्ममरणापासून सुटका. ४ कर्ज फेडणें.

मौक्तिक [**सं०**] **न०** मोती,—समुद्रांत शिंपीच्या पोटीं सापडतें तें.

मौज [**अ०** मूज़ाह्] **स्त्री०** मजा; गंमत; चैन. ❀ **मौजा वि०** रंगेलपणांत काळ घालविणारा. **मौजाळा वि०** रंगेल; खेळकर; चैनी.

मौज स्त्री०,मौजा पु० [अ०मूज्]तरंग; लाट.

मौज [**अ०** मौजअ] **न०** खेडें, गांव,—जमाबंदीच्या व्यवहारांत. **मौजें न०** ह्याच अर्थी.

मौंज [**सं०**] **वि०** मोळ नांवाच्या गवताचें; मुंज तृणाचें. ❀ **मौंजी स्त्री०** ब्रह्मचाऱ्याचा मुंजतृणाचा करगोटा. **मौंजीबंधन, मौंजी निबंधन न०** मुंज किं० उपनयन हा विधि किं० संस्कार. [अज्ञान.

मौढ्य [**सं०**] **न०** १ मूढपणा; मूर्खपणा. २

मौत [**अ०**] **न०** १ मरण; मृत्यु. २ कोणतेंही भयंकर संकट. ❀ **विकत मौत न०** मूर्खपणानें किं० हेकटपणानें अंगावर ओढून घेतलेलें संकट.

मौन [**सं०**] **न०** गप्प किं० स्तब्ध बसणें; न बोलणें.❀**मौनं सर्वार्थसाधनं** गप्प म्ह०कांहीं न बोलतां बसल्यानें आपले हेतु आपोआप सफळ होतात. **मौनव्रत न०** कांहीं काळ न बोलतां बसणें हा स्वताला लावून घेतलेला नियम(धरणें). ❀ **मौनमुद्रा स्त्री०** न बोलतां स्वस्थ बसलेल्या माणसाची मुखचर्या किं० त्याच्या शरीराचें संस्थान.

मौनावणें [**म०** मौन] **अ० क्रि०** स्वस्थ किं० स्तब्ध होणें किं० राहाणें.

मौनी [**सं०** मौन] **वि०** १ जो बोलत नाहीं तो. २ न बोलण्याचें ज्याणें व्रत धरलें आहे असा. ३ तपस्वी; यति.

मौर्ख्य [**सं०**] **न०** मूर्खपणा; अडाणीपणा.

मौलवी [**अ०** मब्लवी] **पु०** इसलामी धर्माचा कायदेपंडित किं० शास्त्री.

मौल [**सं०**] **वि०** १ मूळचा(रहिवासी). २ जुनें.३कुलीन.४पिढीजाद(नोकर,प्रधान,इ०).

मौलि [**सं०**] **पु०** १ डोकें. २ अग्र; टोक. **पु०, स्त्री०** १ मुकुट. २ शेंडी; केश. ३ बुचडा.४ वेणी. [श्रेष्ठ.

मौलिक [**सं०**] **वि०** १ मूळचा. २ मुख्य;

मौल्य [**सं०**] **न०** किंमत.

म्यान [**फा०** मियान्] **न०** तरवार,कट्यार, इ०चें कवच. ❀ **म्यान करणें** गप्प बसणें; कांहीं न बोलतां स्तब्ध राहाणें.

म्याना [**फा०** मियानाह्] **पु०** पालखी सारखें मनुष्यांनीं खांद्यावरून वहावयाचें वाहनविशेष.

म्यौ स्त्री० १ मांजराचें ओरडणें. २ मांजर.

म्लान [**सं०**] **वि०** १ कोमेजलेलें (फूल, चेहेरा). २ थकलेला.३खिन्न; विषण्ण दिसणारा.

म्लानि [**सं०**] **स्त्री०** कोमजलेपणाची किं० खिन्नपणाची स्थिति.

म्लेच्छ, म्लेंच्छ [**सं०** म्लेच्छ] **पु०**१अनार्य. २ मुसलमान. ३ अनार्य.

म्हण [**म०** म्हणणें; **सं०**भण्=बोलणें] **स्त्री०** १ जें वारंवार किं० सर्व लोकांकडून म्हटलें जातें तें; उ० अठराशे अठ्ठयाहत्तर सालच्या दुष्काळांत एक लक्ष माणूस मेलें अशी म्हण आहे. २ वाक्प्रचार; उ० अंगाचें कातडें काढून जोडा शिवणें अशी म्हण आहे. ३ विशेष प्रसंगीं योजावयाचा म्हणून ठरलेला विशेष दाखला किं० उदाहरण; उ० हा सूर्य आणि हा जयद्रथ ही म्हण ज्या दोन गोष्टींच्या साहचर्याची जरूरी आहे त्यांची उपस्थिति अचानक रीतीनें घडून आल्यास योजतात. ४ ठराविक प्रसंगीं योजावयाची ठराविक उपमा, दाखला, रूपक, इ० ; उ० दीर्घोद्योगाला भगीरथप्रयत्न अशी म्हण आहे; उ० काळेपणाचा परमावधि वर्णावयाचा असतां कोळशासारखा काळा ही म्हण योजतात. ५ ज्या वचनांत बोध, ज्ञान, किं० माहिती आहे, जें चटकदार असून अल्प शब्दात्मक आहे, आणि जें लोक वारंवार भाषणादिकांत योजतात असें वचन; उ० बळी तो कान पिळी. **टीप,**—आमचें ' म्हणींविषयीं चार शब्द ' प्रकरण १ पहा.

म्हणजे [**म०** म्हणिजे=म्हटलें जातें] **उभयान्वयी अ०** १ त्याचा अर्थ हा कीं; अन्य शब्दांनीं तेंच सांगावयाचें तर; किंवा; अथवा.

उ० गमन म्हणजे जाणें. २ त्याच्या योगानें; तेणेंकरून; त्याचा परिणाम असा होतो कीं; उ० पाऊस वेळेवर पडला म्हणजे शेतें चांगलीं पिकतात.

म्हणजेल [म० म्हणिजेल=म्हटलें जाईल] उभयान्वयी अ० वर ' म्हणजे ' पहा.

म्हणणी [म० म्हणणें; सं० भण्] स्त्री० १ म्हणणें. २ म्हणण्याची तऱ्हा किं० धाटणी. ३ जें म्हटलें जातें तें. मागें सर्व अर्थी ' म्हण ' पहा.

म्हणणें [सं० भण्] स० क्रि० १ बोलणें. २ उच्चारणें. ३ पढणें. ४ घोकणें. ५ वेद, मंत्र, इ० शिकणें.

म्हणविणें [म० ' म्हणणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ कोणेकाला कांहीं बोलावयास किं० म्हणावयास लावणें किं० भाग पाडणें; उ० शिवाजीनें आपणास इ० १६८० मध्यें राजा म्हणविलें. २ कांहीं गुणाची प्रौढी मिरविणें; उ० तूं आपणास धीट म्हणवितोस मग साप पाहातांच कां पळून गेलास ?

म्हणून, म्हणोन, म्हणऊन [म० म्हणणें] उभयान्वयी अ० १ त्यामुळें; त्या कारणास्तव. २असें; उ०मी लवकरच येईन म्हणून तो वजावून गेला. वि० म्हटलें जातें तें; या नांवाचें; उ० आंबा म्हणून एक मधुर फळ आहे. ३ अर्थशून्य पादपूरक; जोर देतांना हा शब्द योजतात; उ० कोठें म्हणून म्ह० कोठें ? ॐ**म्हणूनसाठीं** क्रि०वि०त्यां कारणामुळें. **कोठें म्हणून?**' कोठें ? **कोण म्हणून?** कोण ?

म्हशा [सं० महिष] पु० १ रेडा, टोणगा (तुच्छतेंत). २ (**लाक्षणिक**) सुस्त; संथ माणूस (निंदेंत). ३ एक प्रकारची बाजरी.

म्हस, म्हसरूड खालीं ' म्हैस ' मध्यें पहा.

म्हसक [म० मसक] स्त्री० खांद्यावरून वाहून न्यावयाची भिस्त्याची कातड्याची पाणी भरावयाची पिशवी.

म्हसर खालीं ' म्हैस ' मध्यें पहा.

म्हसोबा पु० अशिक्षितांचा एक देव.

म्हातारा [सं० महत्तर] वि० वयोवृद्ध. २ पुनर्वसु हें नक्षत्र (शेतकऱ्यांचा शब्द). तरणा म्ह० पुष्यनक्षत्र. ॐ **म्हातारा कोतारा** वि० वृद्ध, जीर्ण, अशक्त (माणूस, पशु) **म्हात्रूड, म्हातारडा** वि० वृद्ध. (तुच्छतेंत). **म्हातारडूक, म्हातारखेड** न० म्हातारा माणूस किं० पशु (तुच्छतेंत). **म्हातारचळ** पु० म्हातारपणीं होतो तो बुद्धिभ्रंश. **म्हातारी** स्त्री० १ वृद्ध स्त्री. २ कापूस, पसि, इ० हवेंत उडत असतें तें. ३ फार वेळ पाण्यांत किं० ओल्यांत हात असल्यानें हाताला पडतात त्या सुरकुत्या प्रत्येक. **कोणेकाला म्हातारी मेलीसें होणें** त्याचा जीव अति व्याकुळ होणें.

म्हार, म्हारवडा इ० मागें ' महार,' ' महारवडा ' इ० पहा.

म्हावरें न० मासे समुच्चयानें,–विकावयाचे, विकत घेतलेलें, खारवून वाळविलेले, इ०.

म्हाळसा, म्हाळसादेवी स्त्री० १ खंडोबाची पत्नी. २ मोठें कुंकूं जिणें कपाळावर लाविलेलें आहे अशी कोणीहि अगडबंब स्त्री.

म्हाळोबा पु० खंडोबा हा देव.' ह्याळसाकांत' पु० ह्याच अर्थीं.

म्हेतर पु० १ मागें ' मेहतर ' पहा. २ एक वतनदार. ३ चांभाराच्या नांवापुढें 'म्हेतर'हा शब्द संमानाचा म्हणून लावतात; उ० विठू म्हेतर. ॐ **म्हेतरकी** स्त्री० म्हेतराचें काम, हुद्दा, अधिकार, इ०. **म्हेतराणी, म्हेत्राणी** स्त्री० म्हेतराची पत्नी. **म्हेतऱ्या** पु० १ वतनदार महार. २ कारागिरांचा मुकादम.

म्हैस [सं० महिषी] स्त्री० दूध देणारा एक चतुष्पाद स्त्री प्राणी. **टीप**,–सुशिक्षितांत ' म्हैस ' हें ए० व०;' म्हशी ' हें अ० व०. आशीक्षितांत ' म्हस, ' हें ए० व० आणि ' म्हैशी ' हें अ० व०. ॐ **म्हस** स्त्री० म्हैस. **म्हसक्या** पु० म्हशी चरावयास नेणारा. **म्हसर, म्हसरूड** न० म्हैस (तुच्छतेंत). **म्हसासुर** पु० अशिक्षितांचा एक देव. **म्हैसभादऱ्या** पु० अकुशळ न्हावी.

म्होतरफा, म्होतरफी मागें ' मोहतरफा, ' ' मोहतरफी ' पहा.

य

य मराठी व्यंजनमालेंतलि सव्वीसावें व्यंजन.

य [' ही ' चा अपभ्रंश] **श० यो० अ०** सुद्धां; देखील; उ० तोय आला म्ह० तो सुद्धां आला.

यकसखुनीपणा [**फा०** यक् (एक)+सखुन् (शब्द)+**म०** पणा (प्रत्यय)] **पु०** एक वचनीपणा; वचन किं० करार न मोडणें हा गुण.

यःकश्चन, यःकश्चित् [**सं०**] **पु०** कोणी तरी सामान्य माणूस.

यकीन [**अ०**] **वि०** निश्चित; खात्रीचा.

यकृत् [**सं०**] **न०** पित्ताशय किं० त्याचें फुगणें हा रोग.

यगानगत [**फा०**] **स्त्री०** सख्य; ऐक्य.

यच्चयावत् [**सं०**यत्+च+यावत्=जें आणि जितकें] **वि०** सर्व; दरोबस्त.

यजणें [**सं०** यज्] **स० क्रि०** (यज्ञ इ० विधि) करणें. [भूमि.

यजन [**सं०**] **न०** १ हवन. २ यज्ञ. ३यज्ञ-

यजमान [**सं०**] **पु०** १ ऋत्विजांकरवीं यज्ञ करविणारा. २ (**मराठींत**)धनी; मालक;स्वामी. ३ (**मराठींत**) कोणा स्त्रीचा पति; उ०तुमच्या यजमानांना उद्या सुट्टी असली तर मी त्यांना भेटावयास येणार आहें. ४ ज्याच्या घरीं लग्न, मुंज, श्राद्ध, श्रावणी, पूजा, इ० चा संकल्प सांगावयाला कोणी ठरलेला भिक्षुक, उपाध्या, इ० जातो तो त्याचा यजमान. ॐ **यजमानघर न०** ज्याच्या घरीं जोशी, उपाध्या,इ०अर्थ ४ चीं कृत्यें करतो त्याचें तें यजमानघर. **यजमानकृत्य न०** ठरलेल्या यजमानाचें ठरलेला उपाध्या जें धर्मकृत्य करतो तें. **यजमानीण, यजमानिनी, यजमान पत्नी स्त्री०** १ आपल्या यजमानाची बायको. २ आपली धनीण; आपण जिचे नोकर ती आपली यजमानीण. **यजमानी स्त्री०** (**शूद्रांत**)जिच्या तंत्रानें किं०हुकमतीनें किं० सूचनांप्रमाणें कुटुंबांत जेवणावळ इ० कृत्यें केलीं जातात ती स्त्री.

यजित [**सं०** 'अजित' (न जिंकलेला)]**वि०**न जिंकलेला. **न०** पराभव. ॐ**यजितपत्र न०** अजिक्यपत्र; ह्या इसमान अमुक विद्येत,कलेंत, वादांत, किं० कुस्तींत जय मिळविला आहे अशा अर्थाची सनद, पत्र,इ०. हा शब्द अशिक्षितांत रूढ आहे. **यजित जाणें** आपण पराभव पावलों असें कबूल करणें. **टीप**,–अकरणरूपी किं०अकरणार्थी प्रयोग; उ० मी कोणाला कशाला यजित जाईन ? उ० मी तुझ्यासारख्या लुंग्यासुंग्याला यजित जाणारा माणूस नाहीं.

यजीद (–त–) **खत** [**फा०** आझाद्=मुक्त; खत्=कागद] **न०** सोडचिट्टी.

यजुस् [**सं०**] **न०** १ यज्ञमंत्र. २ अध्वर्यु. ३ यजुर्वेद. ॐ **यजुर्वेद पु०** चार वेदांपैकीं दुसरा. **यजुर्वेदी, यजुःशाखी पु०** यजुर्वेदाचें अध्ययन करणारा ब्राह्मण.

यजू, यज्जु [**सं०** यजुस] **पु०** यजुःशाखी. **टीप**,–' झझ्झू ' म्ह० यजुःशाखी ब्राह्मण (टवाळकीत).

यज्वा [**सं०** यज्वन्] **पु०** १ यथाविधि यज्ञ करणारा. २ यजमान.

यंता [**सं०** यन्तृ] **पु०** नियामक; आवरणारा. २ रथाचा सारथि. ३ हत्तीचा महात.

यति [**सं०**] **पु०** तपस्वी; संन्यासी; जितेन्द्रिय. **स्त्री०** १ थांबणूक;अडथळा.२ नियंत्रणा.३ गाण्यांत किं०श्लोकांत थांबण्याची किं०विरामाची जागा; उ० मंदाक्रान्ता वृत्तांत चवथ्या अक्षरावर, आणि नंतर पुढच्या सहाव्या अक्षरावर, आणि पादान्तीं यति असते.

यत्किंचित्[**सं०**]**वि०**अगदीं थोडा;अत्यल्प. **क्रि० वि०** अगदीं थोड्या प्रमाणांत.

यत्न [**सं०**] **पु०** १ कांहीं फलासाठीं खटपट किं० मेहनत. २ कष्ट; श्रम. ॐ **यत्नतः क्रि० वि०** प्रयत्नानें; खटपटीनें; प्रयत्न केला असतां. **यत्नसाध्य वि०** प्रयत्नानें मिळण्याजोगें. **यत्नवाद पु०** यत्नानें सर्व कांहीं प्राप्त होतें असें मत. याच्या व्यावर्तकत्वें ' दैववाद '. **यत्नवादी पु०** प्रयत्न केल्यानें मनोरथ सफळ होतात अशा मताचा मनुष्य. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' दैववादी ' **यत्नवान् वि०** यत्न करणारा; झटणारा; दीर्घोद्योगी. **यत्नसिद्ध** वि० प्रयत्नानें प्राप्त झालेला.

यंत्र [सं०] न० १ कांहीं पदार्थ बनविण्यासाठीं किं० कांहीं कार्य घडवून आणण्यासाठीं अनेक अवयवांच्या यथायोग्य संयोगानें जो पदार्थ साधन म्हणून रचिलेला असतो तो; उ० सिंगरचें शिवण्याचें यन्त्र सर्वोत्कृष्ट म्हणून गणलें जातें. २ धातूचा पत्रा,—ज्यावर देवतेची आकृति किं० मंत्राक्षरें कोरलेलीं असतात आणि जो कांहीं इष्ट हेतु साधण्यासाठीं पूजिला जातो किं० गळ्यांत किं०मणगटांत बांधला जातो तो. ३ ग्रहणादिकांचे काल ठरविण्यासाठीं ज्योतिष इ० विषयाचीं कोष्टकें रचिलेलीं असतात तीं प्रत्येक. ꙮ **यंत्रमंत्र, यंत्रतंत्र** न० ए० व० कांहीं इष्ट गोष्ट घडवून आणण्यासाठीं केलेल्या युक्त्या, हिकमती, खलबतें, इ० समुच्चयानें (रचणें, चालविणें, इ०). **यंत्री** वि० यंत्रानें बनविलेला. **यांत्रिक** वि० १ यंत्रें करणारा. २ यंत्रानें केलेला. **यंत्रशास्त्र** न० यंत्रें करणें, तीं दुरुस्त करणें, पदार्थांच्या स्थितिगतिसंबंधाचे तीं नियम ठरविणें, इ० विषयाचें शास्त्र.

यत्र [सं०] क्रि० वि० जेथें; ज्या स्थळीं. ꙮ **यत्रयत्र** क्रि० वि० जेथें जेथें. **यत्रकुत्राचित्, यत्रकुत्रापि** [सं०] क्रि० वि० कोठें तरी; कोठें ना कोठें तरी.

यंत्रित [सं०] वि० जखडलेला; बांधलेला; दावांत ठेविलेला.

यथा [सं०] क्रि० वि० १ ज्याप्रमाणें;जसें; ज्या रीतीनें. **यथायथा** क्रि० वि० बेतास बात; अत्यल्प; कसेंबसें. **यथानुपूर्वक** क्रि० वि० क्रमानुसार;क्रमाप्रमाणें. **यथार्थ** वि० खरें;सत्याला धरून असलेलें;बरोबर;योग्य. **यथार्ह** वि० योग्यतेप्रमाणें असलेलें. **यथावकाश** क्रि० वि० १ सवडीप्रमाणें; जागा किं०वेळ असेल त्याप्रमाणें.२योग्य स्थलीं किं० काळीं. **यथेच्छ, यथेष्ट** क्रि०वि० १इच्छेप्रमाणें;हावें तितकें; मनमुराद; खूप; पुष्कळ. २ स्वच्छंदानें; अनियंत्रितपणें. **यथोक्त** वि० पूर्वीं सांगितलेलें. क्रि० वि० योग्य क्रम अनुसरून. **यथाकथंचित्** कसें तरी;भारी कष्टानें.वि०(**मराठींत**)कसाबसा; कामचलाऊ. **यथाकाम** क्रि० वि० १ मर्जीप्रमाणें; इच्छेप्रमाणें. २ तृप्ति होण्या इतक्या परिमाणांत. **यथाकाल, यथाकाळीं** क्रि० वि० योग्य समयीं. **यथाक्रम** (–में,–क्रमानें) क्रि० वि० योग्य क्रमाप्रमाणें. **यथातथ्य** न० खरें; जसें आहे तसें. **यथातथा** क्रि०वि० १ कोणेत्या तरी रीतीनें; जमेल तसें. २ बेतावातानें. **यथान्याय** क्रि० वि० न्यायाला अनुसरून; शिस्तीप्रमाणें. **यथाबुद्धि, यथामति** क्रि० वि० आपल्या अकलेप्रमाणें; आपली बुद्धि किं० मति खर्चून. **यथाभाग, यथाभागशः** क्रि० वि० १ आपआपल्या हिश्शाप्रमाणें; नेमिल्याप्रमाणें; ठरवून ठेविल्याप्रमाणें. २ योग्य ठिकाणीं. **यथावत्, यथायुक्त** वि० योग्य; नियमाला धरून असलेलें. **यथाविधि** क्रि० वि० योग्य सरणीला धरून. **यथाशक्ति** क्रि० वि० पूर्ण शक्ति खर्चून.क्रि०वि०१ योग्य रीतीनें.२नियमानुसार. ३बिनचूक.**यथाश्रुत,यथाश्रुति** क्रि० वि० वेदोक्त रीतीनें.**यथासंख्य** न० (**साहित्य**)कांहीं एका जातीच्या कांहीं वस्तु कांहीं क्रमानें घेऊन त्या वस्तूंशीं दुसऱ्या एका जातीच्या तितक्याच वस्तूंचा त्याच क्रमानें अन्वय केलेला असल्यास म्हणजे संबंध जोडून दाखविलेला असल्यास होतो तो अलंकार; उ० जटा, वल्क,धनू त्याच्या शिरीं, देहीं, करीं असे (रा० प०सर्ग १०; श्लोक ११); येथें जटा शिरीं, वल्क देहीं,आणि धनू करीं,असा अन्वय. विशेष तपशील आमचे ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **यथास्थित** क्रि० वि० जसें होतें तसें. वि० पूर्वींप्रमाणें असलेलें; योग्य प्रकारचें. **यथासांग** क्रि० वि० अंगें किं० उपांगें न सोडतां; पूर्णत्वानें; शास्त्रोक्त रीतीनें. **यथास्थानीं** क्रि० वि० योग्य ठिकाणीं; ज्याचें जें स्थळ त्या स्थळीं. **यथाकथा** क्रि० वि० मोठ्या शिकस्तीनें; पराकाष्ठेनें. **यथाजात** वि० जसा जन्मला तसा अज्ञान म्ह० मूर्ख. **यथासंभव** क्रि० वि० १शक्य असेल त्याप्रमाणें. २ कदाचित्. ३ आपल्या शक्तीप्रमाणें.

यद् [सं०] **सर्वनाम** जो, जी, जें, इ०.ꙮ **यच्चयावत्, यच्चावत्** वि० जे आणि जितके ते आणि तितके; दरोबस्त; सर्व; झाडून सर्व. **यद्भविष्य** वि० जें व्हावयाचें असेल तें होओ, मी कांहीं करणार नाहीं, असें म्हणून स्वस्थ बसणारा; इष्ट मिळविण्यासाठीं किं० अनिष्ट निवा-

रण्यासाठीं मी कांहीं खटपट करणार नाहीं असें म्हणून हातपाय न हालवितां स्वस्थ बसणारा; दैववादी. **यदपि उभयान्वयी अ०** जरी. **यदर्थ, यदर्थीं उभयान्वयी अ०** ज्या अर्थीं. **यत्किंचित् वि०** १ क्षुल्लक. २ अत्यल्प. **यद्वा उभयान्वयी अ०** किंवा. **यःपलाय न०** पळून जाणें; पोबारा करणें.

यंदा क्रि० वि० चालू सालीं. **यंदाच्या वर्षीं (किं० सालीं)** चालू वर्षांत.

यदा [सं०] क्रि० वि० १ जेव्हां; ज्या काळीं. २ ज्या अर्थीं. ‍ **यदाकदाचित् क्रि० वि०** जर प्रसंगानुसार; जर कदाचित्.

यदि [सं०] उ० अ० जर. ‍ **यद्यपि, यद्यपिचेत् उ० अ०** जरी.

यदीय [सं०] वि० ज्याचा, ज्याची, इ०.

यदृच्छा [सं०] स्त्री० १ स्वच्छंदीपणा. २ सहजपणा. ३ दैवयोग. ‍ **यदृच्छाशब्द पु०** विशेषनाम (व्याकरणांत). **यदृच्छालाभ पु०** अनायासें किं० आकस्मिक रीतीनें झालेला लाभ.

यब्धा [सं० यब्धृ] पु० मैथुनांत गुंतलेला.

यम [सं०] पु० १ आवरणें. २ तावा. ३ आत्मसंयमन करणारा. ४ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि, हे जे योगाचे आठ प्रकार त्यांतील पहिला,—ज्यांत अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह, हीं पांच येतात. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टविधसमाधि ' पहा. ४ शरीरसाधनापेक्ष नित्यकर्म. ५ मृत्यूची देवता. ६ प्राण्यांस दुष्कर्माबद्दल यातना देणारी देवता. ७ कठोर हृदयाचा माणूस. ८ (**ज्योतिष**) शनि. **यम पु० अ० व०** १ आवळे जावळे. २ अश्विनीकुमार. ३ नकुळ आणि सहदेव,—पांच पांडवांपैकीं कनिष्ठ दोन. ‍ **यमराज, यमाजीपंत, यमाजीभास्कर, यमाजीबाजी** यम,—मृत्यूची देवता. **यमभगिनी, यमस्वसा, यमानुजा स्त्री०** यमुना नदी. **यमदंष्ट्रा स्त्री० अ० व०** रोगाचे दिवस,—आश्विन वद्य अष्टमी ते कार्तिक वद्य अमावास्येपर्यंतचा काळ. **यमाच्या दाढेंत क्रि० वि०** मोठ्या संकटांत. **यमदिशा स्त्री०** दक्षिण दिशा. **यमदूत पु०** कावळा. **पु० अ० व०** माणसांना ओढून आणावयासाठीं यमानें भूलोकीं पाठविलेले दूत. **यमद्वितीया स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वितीया; भाऊबीज हा दिवस. **यमपट पु०, यमपट्टिका स्त्री०** यमपुरीच्या देखाव्यांचा पडदा किं० चित्रपट. **यमवाहन न०** रेडा. **यमाचा पाहुणा पु०** महापातकी. **यमव्रत न०** निष्पक्षपातीपणा. **यमकुंड न०** तुरुंग; कैदखाना.

यमक [सं०] न० १ मल्लयुद्धांतील एक पवित्रा. २ दोन चरणांच्या शेवटीं तेंच अक्षर आलें असतां किं० तींच अक्षरें त्याच क्रमानें आणि भिन्न अर्थानीं आलीं असतां अंत्ययमक होतें. यमकाचें वर्गीकरण आणि उदाहरणें आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ‍ **यमकाला यमक न०** जशास तसें; फिटंफाट.

यमन [सं०] न० १ दाब; नियंत्रणा. २ थांबविणें. ३ विश्रांति. ४ व्यवस्था. **पु०** १ **यम**,—मृत्यूची देवता. २ (**संगीतांत**) कल्याण रागाचा एक प्रकार. **यमनबिलावर, यमनीबिलावर पु० (संगीतांत)** बिलावर रागाचा एक प्रकार.

यमल [सं०] पु० आवळ्या जावळ्यां मुलांपैकीं एक.

यमुनी [सं० यमुना] स्त्री० अंगठीवर कोंदणांत बसवावयाचा काळा खडा,—ज्यावर सोनेरी अक्षरें काढतात तो. हा यमुनेमध्यें सापडतो. ' यमुनेचा खडा ' ह्याच अर्थीं.

यल्लम्मा [कानडी] स्त्री० रेणुका,—परशुरामाची आई किं० तिची उपासक स्त्री.

यव [सं०] पु० १ जव; सातू. २ जवाइतकें वजन,—सहा मोहोऱ्या. ३ बोटावरील यवाची आकृति. ४ इंद्रजव. ‍ **यवमध्य न०** चांद्रायण प्रायश्चित्ताचा एक प्रकार. **यवक्षार पु०** जवखार. **यवोदक न०** श्राद्धविधींत करतात तें यव घातलेलें पाणी. दुसरें जें पाणी तें ' तिलोदक. '

यवन [सं०] पु० १ ग्रीसचा रहिवासी. २ कोणीही अनार्य,—मुसलमान इ०. **यवनाचार्य पु०** रमल विद्या शिकण्यासाठीं जो बाटून मुसलमान झाला तो ब्राह्मण. **यवनानी स्त्री०** देवनागरी लिपीहून कोणतीही भिन्न लिपि.

यश [सं० यशस्] न० १ कीर्ति. २ कार्यसिद्धि; कार्याची सफलता. ३ स्तुति. ४ सुदैव.

❀ **यशालाभास येणें** आपण पोसलेला माणूस, जनावर, इ० किं० आपण ज्याबद्दल फार झीज सोशिली आहे किं० कष्ट केले आहेत असा धंदा इ० रंगारूपास येऊन फलद्रूप किं० लाभदायक होऊं लागणें. **यशअपयश न० ए० व०** कार्यसिद्धि किं० कार्यनाश; चांगला किंवा वाईट शेवट; उ० आपण इमानानें कर्तव्य करावें, यशअपयश येणें हें ईश्वरेच्छेवर. **यशस्कर वि०** यश देणारें. **यशस्वान् वि०** ज्याची कीर्ति झाली आहे असा. **यशस्वी [सं० यशस्विन्] वि०** ज्याचें कार्य सफल झालें आहे असा; ज्याचा इष्ट हेतु साध्य झाला आहे असा; परीक्षेंत जो उतरला आहे असा; ज्याचा प्रयत्न सफल झाला असा; ज्याचें पर्यवसान इच्छिल्याप्रमाणें झालें आहे असें (काम, खटपट, इ०). **यशोधन न०** यश हेंच कोणी धन. **पु०** यश हेंच आहे धन ज्याचें असा (मनुष्य). **कोणे-काच्या हाताला यश असणें** त्याणें अंगावर घेतलेलें प्रत्येक काम किं० केलेला प्रत्येक प्रयत्न सदैव सिद्धीस जात असणें. **तो तुम्हाला यश देणार नाहीं** तो तुमच्याशीं हम-खाशीनें कृतघ्न होईल; तो तुमच्याशीं निमक-हरामी करील; तो तुमच्याशीं भांडून किं० तुम्हाला शिव्या देऊन जाईल.

यष्टि, यष्टिका [सं०] स्त्री० १ काठी; छडी. २ गदा. ३ हार. ❀ **यष्टिमधु, यष्टिमधुक न०** ज्येष्ठ मध.

यहतियात [अ० इहतियात] स्त्री० काळजी; तजवीज; बंदोबस्त.

यहसान [अ० इहसान] न० कृपा; उपकार. ❀ **यहसानभंद वि०** कृतघ्न.

यक्ष [सं०] पु० १ देवयोनिविशेष. २ पिशाचभेद. ३ कुबेर. ❀ **यक्षावास, यक्षतरु पु०** वटवृक्ष. **यक्षाधिप पु०** कुबेर. **यक्षकर्दम पु०** केशर, अगरु, कापूर, आणि कस्तूरी, यांचें समभाग मिश्रण,–अंगाला लावण्यासाठीं करतात तें. **यक्षधूप पु०** १ राळ,–एक ज्वालाग्राही पदार्थ. २ टर्पिण तेल. **यक्षराज पु०** कुबेर. **यक्ष-रात्रि स्त्री०** दिवाळी. **यक्षवित्त वि०** कृपण. **यक्षिणी स्त्री०** १ यक्ष जातीची स्त्री. २ यक्षाची पत्नी. ३ कुबेराची पत्नी. ४ पिशाची. ५ अद्भुत परिणाम घडवून आणणारी देवता. **यक्षिणीची कांडी स्त्री०** १ जी कांडी (काठी) हातांत धरून यक्षिणी फिरविते आणि कांहीं अद्भुत प्रकार घडवून आणते ती (फिरणें). यक्षिणीनें कांडी फिरविणें, यक्षिणीची कांडी फिरणें, असे प्रयोग होतात. २ अद्भुत चमत्कार घडवून आणणारी आणि लोकांच्या निदर्शनास न आलेली कांहीं युक्ति, हिकमत, इ० (फिरणें). **यक्षिणीनें कांडी फिरविणें, किं० यक्षिणीची कांडी फिरणें** आपणाला ठाऊक नाहीं अशी कांहीं तरी युक्ति योजण्यांत आलेली असणें.

यक्ष्मा [सं० यक्ष्म, यक्ष्मन्) पु० क्षयरोग.

यज्ञ [सं०] पु० १ होम; अग्नींत आहुति देणें. २ पूजा; धर्मकृत्य. ❀ **यज्ञांग पु०** १ उंबर; खैर. २ यज्ञाचा भाग. **यज्ञोपवीत न०** जानवें. **यज्ञकाल पु०** पौर्णिमा आणि अमावस्या. **यज्ञपुरुष पु०** विष्णु. **यज्ञवराह पु०** विष्णूचा आदिवराह हा अवतार. **यज्ञवल्ली स्त्री०** सोमलता. **यज्ञसूत्र न०** जानवें. **यज्ञसेन पु०** द्रुपद राजा. **यज्ञपशु पु०** यज्ञांत बळी म्हणून मारावयाचा पशु. **यज्ञकुंड न०** यज्ञांत आहुति टाकण्यासाठीं केलेला खळगा. **यज्ञनारायण पु०** अग्निदेवता. **यज्ञमुख पु०** अग्नि. **यज्ञशाला स्त्री०** यज्ञ करावयाची ठरलेली जागा. **यज्ञवृक्ष पु०** समिधा इ० च्या द्वारें यज्ञो-पयोगी जे पिंपळ, पळस, औदुंबर, रुई, शमी, खैर, आणि आघाडा, ते वृक्ष.

यज्ञिय [सं०] वि० १ यज्ञासंबंधी. २ यज्ञास योग्य. ३ पवित्र. ४ पूज्य. **पु०** १ देव. २ द्वापर युग. ३ उंबर. **न०** यज्ञोपयोगी सामग्री.

या [फा०] उभयान्वयी अ० अथवा; किंवा; किंवा दुसऱ्या पक्षीं. **उद्गारवाचक अ०** हे ! अरे ! उ० या खुदा (अरे देवा).

याकुती [हिं०] स्त्री० भांगेचा रांधा करून एक मादक द्रव्य करतात तें.

याकूत [अ०] पु० एक तांबड्या रंगाचें रत्न.

याग [सं०] पु० यज्ञ; होम. ❀ **यागी पु०** होम किं० यज्ञ करणारा.

याचक [सं०] पु० १ भिक्षेकरी; भिकारी. २ नम्रपणानें कांहीं वस्तु मागणारा किं० कांहीं वस्तूबद्दल प्रार्थना करणारा. [विनाविणें.

याचणें [सं० याच्] स० क्रि० मागणें; प्रार्थिणें;

याचन न०, **याचना** स्त्री० [सं०]१ प्रार्थना; विनंती. २ भीक मागणें.

यांचा [सं०] स्त्री० १ प्रार्थना; विनंती. २ भीक.

याचित [सं०] वि० १प्रार्थिलेला (माणूस, पदार्थ). २ मागितलेली (वस्तु).

याचिता [सं० याचितृ] पु० १ मागणारा; प्रार्थिणारा. २ भिकारी.

याजक [सं०] पु० १ धनादिलाभार्थ यज्ञ चालविणारा उपाध्याय. २ ऋत्विज.

याजन [सं०] न० धनादिलाभांसाठीं दुसऱ्याकरतां यज्ञ चालविणें.

याजुष [सं०] वि० यजुःशाखी (ब्राह्मण).

यात, याति [सं० जाति] स्त्री० ब्राह्मण, मराठा, इ० ज्या जाति त्या प्रत्येक. ॐ **याता-याती** स्त्री० जात, गोत, इ० चा विचार.

यात [सं०] वि० १ गेलेला. २ अतिक्रान्त (काळ, देश). ॐ **यातायात** स्त्री० १ येरझारा; हेलपाटे. २ कष्ट; श्रम.

यातन [सं०] न० १ फेड; प्रतिकार. २ सूड.

यातना [सं०] स्त्री० १ तीव्र दुःख; असह्य वेदना. २ नरकांत सोसावी लागते ती पीडा.

यात्रा [सं०] स्त्री० १ प्रवास. २ फिरणें. ३ मोहीम; स्वारी. ४ तीर्थाटन; पुण्यक्षेत्रांस जाणें किं० येथें धर्मविधि (करणें). ५ यात्रेकरूंचा समुदाय. ६ नियमित समयीं होणारा उत्सव. ७ जत्रा. ८ एकाद्या पवित्र म्हणून गणलेल्या स्थानाप्रत जाणें, तेथील धार्मिक किं० लौकिक विधि करणें, आणि तेथून परत आपल्या गांवाला येणें, या सर्व गोष्टींचा समुच्चय. टीप,– एकाद्या गांवीं प्रसंगविशेषीं किं० वर्षांतील कांहीं विशिष्ट दिवशीं कांहीं विशिष्ट उद्देशानें जो बाजार भरतो त्याला 'जत्रा' म्हणतात. ९ मिरवणूक. १० चारितार्थ;निर्वाह.११व्यर्थ हेलपटा.१२ग्रामान्तरास जाणें.ॐ **यात्राडब्बी** स्त्री० यात्रेकऱ्यानें दिलेल्या देणग्या ज्यांत घालावयाच्या ती पेटी, पात्र, इ०. **यात्रेकरू, यात्रेकरी** पु० यात्रेसाठीं निघालेला किं० आलेला किं० गेलेला माणूस.

याथाकाम्य [सं०] न० स्वैर वर्तन.

याथातथ्य [सं०] न० १ सत्य.२योग्यमार्ग.

याथात्म्य [सं०] न० तत्त्व; स्वरूप; वस्तु-स्थिति.

याथार्थ्य [सं०] न० १ सत्य.२ उचितपणा; योग्यपणा; औचित्य. ॐ **याथार्थिक** वि० १ खरा. २ न्यायी; निःपक्षपाती. ३ जुळणारा; संवादी; अनुरूप.

याद, यादी [फा०] स्त्री० १ स्मरण; आठवण. २स्मरणार्थ केलेलें टिपण. ॐ**यादगिरी, यादगारी** स्त्री० १ स्मरण.२स्मरण किं० आठवण करून देणारी वस्तु.टीप,–चिट्ठी, यादी, एकाद्या माणसाची स्वदस्तूरची सही किं० दुसरा कोण-ताही पदार्थ,–जो पाहिला असतां एकाद्या वस्तूची किं० माणसाची आठवण होते त्या पदार्थाला 'यादगिरी' म्हणतात.**यादबूद** स्त्री० स्मरण करून देणारी कांहीं वस्तु, चिट्ठी, टांचण, टिपण, इ०. **यादवान** न० कोणा माणसाच्या जन्माचा समय, ग्रहांची स्थिति, इ० चें टिपण.**याददास्त, यादब्रस्त, यादहस्त** स्त्री० सूची;टिपण. **यादबूद** स्त्री० निश्चित यादी; ठराव.

यादव [सं०] पु० १ यदूचा वंशज.२ कृष्ण.

यादवी [सं०] स्त्री०१ कुंती. २ सुभद्रा. ३ दुर्गा. ४ (**मराठींत**) १ भाऊबंधकीचा तंटा. २ मारामारी.

यादी वर ' याद ' पहा.

यादृच्छिक [सं०] वि० १ स्वेच्छेचें. २ स्वेच्छाचारी. ३ सहजगत्या होणारें किं० झालेलें. ४ केवळ दैवयोगानें घडलेलें.

यादृश [सं०] वि० जसा; जसला; ज्या प्रकारचा.

यान [सं०] न० १ जाणें. २ प्रवास. ३ चाल करून किं० स्वारी करून जाणें; मोहीम; चढा-वाचें धोरण. ४ मिरवणूक. ५गाडी,रथ, पालखी, मेणा, इ० वाहन.

यापन [सं०] न० १ घालविणें (काल, समय). २ हाकलून देणें. ३ रोग बरा करणें. ४ विलंब. ॐ **कालयापन** न० १ वेळ घालविणें. २ उशीर करणें. ३ व्यर्थ काळ दवडणें.

याबू [फा०] पु० लहान घोड्याची एक जात.

याम [**सं०**] **पु०** १ दाब; नियंत्रणा; निग्रह. २ प्रहर हा कालावधि. ॐ **यामघोष पु०** १तास; घड्याळ. २ कोंबडा. **यामद्वय न०** १ दोन प्रहरांचा अवधि. २ सूर्योदयानंतरचा दोन प्रहरांचा अवधि. **यामार्ध न०** एक अशुभ समयविशेष; वारपरत्वें नित्य एक अर्धाप्रहरपर्यंत दुर्मुहूर्त पडत असतो तो.

यामिका, यामिनी स्त्री० रात्र. ॐ **यामिनीपति पु०** चंद्र. **यामिनीचर पु०** १ घुबड. २ राक्षस.

याम्य [**सं०**] **वि०** १ यमाचें. २ दक्षिणदिशेकडचें. ॐ **याम्या स्त्री०** दक्षिण दिशा. **याम्योत्तरवृत्त न०** विपुवाच्या लंबवृत्तांना 'याम्योत्तरवृत्त' म्हणतात, आणि क्रांतिवृत्ताच्या लंबवृत्तांना 'शरवृत्तें' म्हणतात. हें कोणतेंही वृत्त ज्या खस्थ पदार्थातून जातें त्याला त्या खस्थाचें 'याम्योत्तरवृत्त' किं० 'शरवृत्त' म्हणतात. याम्योत्तराचा जो विषुवाशीं पात होतो त्याला 'याम्योत्तरवृत्तपात' म्हणतात आणि शरवृत्ताचा जो क्रांतिवृत्तांशीं पात होतो त्याला 'शरपात' म्हणतात. ज्या गमनमार्गांतून वार्षिक गतीनें भूगोल सूर्याभोंवती फिरतो किं० सूर्य भूगोलाभोंवतीं समोरच्या राशींतून फिरतो असें दिसतें, त्या गमनमार्गाला 'क्रांतिवृत्त' म्हणतात. क्रांतिवृत्ताच्या पातळीला विषुवाची पातळी ज्या रेषेंत छेदिते ती 'संपातरेषा' होय. संपातरेषेच्या दोन टोकांना 'संपात' किं० 'संपातबिंदु' म्हणतात. क्रांतिवृत्तांतून फिरणारा सूर्य ज्या संपातांतून विषुवाच्या उत्तरेस जातो तो 'उत्तरायणपात' किं० 'वसंतारंभपात' होय. आणि ज्या संपातांतून विषुवाच्या दक्षिणेस जातो तो 'दक्षिणायनपात' किं० 'शरदारंभपात' होय. गोलाच्या अक्षाशीं काटकोन करणारें जें वृत्त तें 'लंबवृत्त.' ज्या महावृत्ताची पातळी भूगोलाच्या अक्षाशीं लंबरूप असते त्याला 'विषुव' किं० 'नाडी वृत्त' म्हणतात. गोलाला मध्यांतून जाणाऱ्या सरळ पातळीनें कापिलें तर तेथें गोलाच्या एवढ्याच त्रिज्येचें वर्तुळ होतें. ह्या वर्तुळाला गोलाचें 'महावृत्त' म्हणतात. गोलाला मध्याखेरीज इतर ठिकाणीं सरळ पातळीनें कापिलें तर तेथें गोलाच्या पेक्षां लहान त्रिज्येचें वर्तुळ होतें, ह्या वर्तुळाला गोलाचें 'लघुवृत्त' म्हणतात.

यायी [**सं०** यायिन्] **वि०** १ जाणारा (**समासान्तीं**); उ० ग्रामयायी म्ह० गांवास जाणारा; गांवाला जावयास निघालेला. २ (**मराठींत**) प्रवासी वाटसरू. ३ (**मराठींत**) जो एकाद्या गांवीं कारणपरत्वें आला आहे आणि जो तेथें कायमचा राहाणारा नव्हे तो. ४ (**मराठींत**) प्रसंगानें घडलेली कांहीं गोष्ट; मध्येंच उपस्थित झालेली कांहीं गोष्ट.

यार [**फा०**] **पु०** १ दोस्त; स्नेही. २ जार. ३ हत्तीबरोबर चालणारा भालाईत. ॐ **यारी स्त्री०** १ दोस्ती. २ मदत (देणें). ३ गलबतावरील अवजारें चढविण्याच्या दोऱ्या समुच्चयानें. ४ ओझें उचलण्याचें यंत्रविशेष.

यारदा, यारदी वि० १ लहान आकाराचा (घोडा); तट्टू. २ निरुपयोगी किं० कुचकामाचा (माणूस, जनावर). ३ ठेंगणा असून बळकट (घोडा); बट.

यारदी पु० १देशपांड्याचा गुमास्ता. २देशपांड्याचा मदतनीस. ३ वतनांची देखरेख करणारा. ॐ **यारदी स्त्री०** देशपांड्याच्या गुमास्त्याचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र.

यारी वर 'यार' मध्यें पहा.

यावत् [**सं०**] **वि०** १ जितकें, जेवढें; उ० तुम्ही पुण्यास गेलां तर यावत् अपेक्षित तावत् द्रव्य तुम्हाला श्रीमंत देतील. **२** सर्व; उ० आज ह्या गांवांतील यावत् माणसें पाटलाच्या घरीं जेवावयास आलीं होतीं; उ० यावज्जन्म किं० यावजिव म्ह० जन्मभर किं० सर्वजन्म. **अ०** मध्यंतरीं; पर्यंत; जों पावेतों; उ० अद्ययावत् (आजपर्यंत); उ० त्याची माझी यावत् मैत्री आहे तावत् माझें काम करून घेतलें पाहिजे; उ० यावत् नदी लागे तावत् मी तुम्हास पोंचवावयास येईन. **टीप,**— 'यावत्' चा जबाबदार सर्व अर्थीं 'तावद्' हा आहे. ॐ**यावदर्थ वि०** जरूर तितकेंच द्रव्य घेणारा किं० मागणारा. **यावत्तावत् वि०** जितकें पाहिजे तितकेंच; कमी नाहीं आणि अधिक नाहीं इतकें.

क्रि० वि० १ वेताबातानें; काटकसरीनें.२ चिक्कूपणानें.

यावनाल[**सं०**]**पु०**जोंधळा,–ज्याच्या भाकरी करतात. ❀ **यावनालकण देखील क्रि० वि०** अत्यल्प परिमाण सुद्धां; उ० मजपासून तुला यावनालकण देखील मदत होणार नाहीं. **टीप**,– नेहमीं अकरणरूपी प्रयोग.

यावनी [**सं०**] **वि०**यवनासंबंधीं;यवनांचा; उ० न वदेद्यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि. मागें ' यवन 'पहा.

याज्ञिक [**सं०**] **वि०** यज्ञासंबंधाचा. **पु०** १ यज्ञ करणारा. २ याजक. ३ अग्निहोत्री. ४ लांब पात्याचा दर्भ. ४ पिंपळ,पलाश,खैर. ❀**याज्ञिकी स्त्री०** १ याज्ञिकांचें कर्तव्य. २ लग्न, मुंज, इ० धर्मविधींचा संकल्प सांगण्याचें काम किं० धंदा. या अर्थी ' याज्ञिक्य ' **न०** सुद्धां.

यिव स्त्री० मारलेल्या बोकड इ० जनावराचा मानेकडचा भाग.कुकडी हा जनावराच्या ढुंगणाकडचा भाग. ❀ **यिवकुकडी स्त्री० ए० व०** मारलेल्या बोकडाचा मानेकडचा भाग आणि ढुंगणाकडचा भाग,–जो पूर्वींच्या काळीं महारांच्या मेहतरास हक्क म्हणून द्यावा लागत असे.

युक्त [**स०**] **वि०** १ जोडलेलें; सांधलेलें; सहित. २ सज्ज, सिद्ध (धनुष्य इ०).३ योग्य; वाजवी; न्याय्य; उचित. ४ व्रतस्थ; कांहीं नियम पाळणारा. ५ योगाभ्यासी. **पु०** योगी. ❀ **युक्तमना** [**सं०**युक्तमनस्] **वि०** एकाग्र आहे चित्त ज्याचें असा. **युक्तरूप वि०** १ फार योग्य. २ अनुरूप. ३ लायक. **युक्ताहारविहार वि०**,खाणें, पिणें, करमणूक, इ० बागतींत योग्य मर्यादा पाळणारा.

युक्ति [**सं०**] **स्त्री०** १ एकीकरण; बेरीज.२ उचितपणा; योग्यपणा. ३ योजना;उपाय; इलाज. ४ खुबी; हिकमत. ❀ **युक्तिप्रयुक्ति स्त्री०ए०व०** नाना प्रकारच्या युक्त्या समुच्चयानें; कोणची नाहीं कोणची तरी युक्ति; हरप्रयत्न. **युक्तिवान्, युक्तिबाज वि०** युक्त्या योजण्यांत किं० लढविण्यांत पटाईत. **युक्त्या वि०** लबाड; लुच्चा.

युग [**सं०**] **पु०, न०** जूं; जाकेड **न०** १ जोडी. २ कृत, त्रेता, द्वापर, आणि कलि, हे चार कालावधि प्रत्येक. ❀ **युगधर्म पु०**,**युगमाहात्म्य न०**त्या त्या काळाचा प्रभाव.**युगान्त**,**युगावधि पु०**जगाचा अंतः;प्रलय. **युगबाहु वि०** लांब लांब आहेत बाहु ज्याचे असा (माणूस). **युगपत् क्रि०वि०** एकदम; एके काळीं. **युगानुयुग क्रि० वि०** अनेक युगांमागून अनेक युगांच्या अवधींत.

युगत, युगूत, जुगत [**सं०** युक्ति] **स्त्री०** युक्ति. वर ' युक्ति ' पहा. ह्या शब्दांचा उपयोग विनोदांत केला जातो.

युगल, युगलक [**सं०**] **न०** जोडी (दोन पदार्थांची). ' युगुल, ' ' युगूळ ' हीं मराठींतील अपभ्रष्ट रूपें.

युग्म [**सं०**] **न०** १ जोडी; दोन. २ संयोग. ३ नद्यांचा संगम. ४ जोडणें; पतिपत्नींची जोडी. ५ (**ज्योतिष**) मिथुन रास.

युत [**सं०**] **वि०** १ जोडलेलें. २ युक्त; सहित. ३ चार हात ही लांबी.

युति [**सं०**] **स्त्री०** १ एकी. २ जोडण्याची क्रिया.३(**ज्योतिष**)ग्रहांचें एका दक्षिणोत्तर रेषेंत येणें. ४ (**गणित**) बेरीज.

युद्ध [**सं०**] **न०** शत्रूशीं किं० प्रतिपक्ष्याशीं झगडा,–ज्याच्या पोटांत अनेक लढाया, वेढे, खंड, तहाचीं बोलणीं, इ० असतात. लढाई ही एकाच प्रसंगाची झटापट. संस्कृत शब्दांत ' **युद्ध** ' चा अर्थ लढाई किं० झटापट असा असतो; उ० मल्लयुद्ध, कुक्कुटयुद्ध, मेषयुद्ध, गदायुद्ध, मन्मथयुद्ध ,इ०. [धर्म.

युधिष्ठिर [**सं०**] **पु०**पांच पांडवांतील ज्येष्ठ;

युयु उद्गारवाचक अ० कुत्र्याला जवळ बोलावण्याचा शब्द.

युवति, युवती [**सं०**] **स्त्री०** १ तरुण स्त्री. २ मादी. ३ (**ज्योतिष**) कन्यारास.

युवराज खालीं ' युवा ' मध्यें पहा.

युवा [**सं०** युवन्] **पु०** तरुण मनुष्य. ❀ **युवराज पु०** राजाचा ज्येष्ठ पुत्र,–जो पुढें राज्याचा अधिकारी व्हावयाचा असतो.

युष्मद् [**सं०**] **सर्वनाम** द्वितीय म्हणजे मध्यम पुरुषाच्या सर्वनामाचें हें मूळ रूप. ❀

युष्मदीय वि० तुमचें. **युष्मादृश** वि० तुमच्यासारखें. **युष्मादिक** [सं० युष्मदादिक] तुम्ही (उपहासांत).

यू वर ' युयु ' पहा.

यूथ [सं०] पु० सजातीय प्राण्यांचा समुदाय किं० कळप. ॐ **यूथनाथ, यूथप** पु० १ म्होरक्या; अग्रणी. २ हत्तींच्या कळपाचा पुढारी.

यूथिका [सं०] स्त्री० जुई. ह्या अर्थी ' यूथी ' सुद्धां. २ एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत र, न, भ, र, हे गण येतात.

यूप [सं०] पु० १ यज्ञाचा पशु बांधण्याचा खांब. २ जयस्तंभ.

येऊन जाऊन [म० येणें + जाणें] क्रि० वि० १ राहातां राहातां; सरते शेवटीं; अखेरीस; फक्त; उ० सारा जंगम माल गेला आतां येऊन जाऊन घर राहिलें आहे; तें गेलें म्हणजे तो तुकोबा पुरता कंगाल होईल. २ मधून मधून येत; उ० मी येथें नेहेमीं राहात नाहीं, येऊन जाऊन असतों.

येक [सं० एक] वि० एक (अशिक्षितांत प्रयोग). मागें ' एक ' पहा.

येकजहती स्त्री० स्नेह; मैत्री.

येखलास, येखलासनामा, येखलासी मागें ' इखलास, ' ' इखलासनामा, ' ' इखलासी ' पहा.

येजा [म० येणें+जाणें] स्त्री० १ येण्याजाण्याची क्रिया; वेरझारा. २ रिकामे हेलपाटे. ' जाये ' ह्याच अर्थी. मागें ' जाये ' पहा.

येडें न० लिंगाईत लोक जंगम गुरूला देतात तो खाद्यांचा नजराणा.

येणी [म० येणें] स्त्री० १ गंजिफांच्या खेळांत राजाचें पान ज्याच्या जवळ असतें त्याचा हक्क. २ दुसऱ्याकडून यावयाची जी तलफ ती.

येणें अ० क्रि० १ दूरच्या काळापासून किं० स्थळापासून जवळच्या काळीं किं० स्थळीं प्राप्त होणें; ठेपणें. २ दृग्गोचर होणें; दृश्य होणें; दिसूं लागणें. ३ उपस्थित किं० विद्यमान होणें. ४ कांहीं क्रिया कोणेकाला करणें शक्य असणें किं० करणें भाग पडणें. ५ कांहीं प्रसंग किं० स्थिति कोणेकावर पडणें किं० गुदरणें. ६ उद्भूत होणें; उगवणें; उत्पन्न होणें. ७ एकादी वस्तु वजनांत, मापांत, किं० किमतींत भरणें किं० ठरणें; उ० हा तांब्या शेरभर येईल; उ० तो गांव येथून तीन कोश येईल. ८ सिद्ध होणें; परिणत होणें; केलें जाणें; उ० आजची वेणी चांगली आली नाहीं. ९ अवगत किं० ज्ञात किं० परिचित असणें; उ० मला तामील भाषा येंत नाहीं. **टीप,**–'येणें' ह्या क्रियापदाचे अर्थ ' तां, ' ' ईत, ' ' आवयास ' ह्या प्रत्ययान्त धातूंपुढें कसे होतात तें पुढील वाक्प्रचारांवरून कळून येईल. वडील सावकारी करीत आले तशीच आम्ही करीत आहों म्ह० वडिलांचा सावकारी करण्याचा जो क्रम किं० परिपाठ होता त्याप्रमाणें आम्ही सावकारी करीत आहों. हें काम मला करतां येईल म्ह० तें माझ्या आटोक्यांतलें आहे; तें मला शक्य आहे; तें मी करूं शकेन. तें पत्र मागाहून लिहितां येईल म्ह० तें मागाहून लिहिलें तरी चालेल; तें मागाहून लिहूं. ॐ **वळणीस येणें** एकाद्याच्या कबज्यांत जाऊन त्याची आज्ञा पाळावयास सिद्ध किं० तत्पर असणें किं० होणें. **ताळ्यावर येणें** चुकीचा मार्ग सोडून पुन्हा योग्य मार्ग धरणें. **वठणीस येणें** १ पुन्हा आज्ञाधारक होणें. २ पुन्हा योग्य मार्गानें चालूं लागणें. **गुणास येणें** फलद्रूप होणें. **डोळ्याला पाणी येणें** अश्रूंनीं डोळे भरणें; रडें येणें. **हुकी येणें** अनावर इच्छा उत्पन्न होणें. **पणांत येणें** वयांत येणें; प्रौढ दशेला येऊन पोचणें. **संपुष्टांत येणें** संक्षिप्त होणें; अल्पतर होणें; संपत येणें; संपण्याच्या पंथास लागलेलें असणें. **कोणेकाला कोणेकाची सर येणें** त्याला त्याची योग्यता प्राप्त होणें; तो त्याच्या बरोबरीचा होणें; त्याला त्याचें महत्त्व किं० योग्यता प्राप्त होणें. **मी येतों** मी तुमचा निरोप घेतों; मला जावयाला परवानगी द्या. **येणें जाणें** न० ए० व० १ जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा. २ पैशाचे व्हवहार,–पैसे देणें, पैसे घेणें, इ० रूप व्यवहार. **येतां जातां** क्रि० वि० १ मधून मधून. २ सर्व काळ. ३ वारंवार येत आणि जात असल्यानें; वारंवार गांठी भेटी घडल्यानें. **येताजाता** पु० ए० व० जो कोणी या

रस्त्यानें येईल किं० जाईल तो,–वाटसरू इ०. **येतापाया** पु० वैभवाचा काळ,–ज्यांत आपल्याला पैसे, नफा, इ० विपुल प्रमाणांत मिळत असतात. **येतेकरी पु०** १ कोणिही येणारा माणूस. २ ज्याला कोणतीही विद्या, कला, इ० लवकर येते म्ह० साध्य होते असा मनुष्य.

येथें,येथचा,येथला,येथपर्यंत,येथवर,येथपावेतों,इ० मागें ' एथें, ' एथचा, ' इ० पहा.

येणें [**म०** येणें] **न०** लोकांकडून आपणास यावयाची रक्कम किं० पैसा किं० कांहीं पदार्थ.

येर, येरू सर्वनाम दुसरा; तो. **येरी स्त्री०. येरें न०.** ❀ **येरयेर वि०** परस्पर; एकमेक. **येरयेरां क्रि० वि०** एकमेकांत;एकमेकांशीं;आपसांत.

येरजार, येरझार,येरधार,वेरझार[**म०**येरे+जारे] **स्त्री०** १ जाण्यायेण्याची खेप. २ रिकामा हेलपाटा. ३ वारंवार जाणें आणि येणें. **येरजांवई पु०**जांवयाचा भाऊ (थट्टेंत). मागें ' पाणी ' मध्यें ' पाणजांवई ' पहा.

येरंड, येलदाडा इ० मागें ' ए ' अक्षरांत ' एरंड, " एलदोडा, ' इ० पहा.

येरवाळीं [**म०** वेळेवारीं] **क्रि० वि०**योग्य वेळीं; लवकरच; फार उशीर न होतां किं० न करतां (अक्षितांत रूढ).

येवंतणें स० क्रि० छळणें; सतावणें; गांजणें.

येवा [**म०** येणें] **पु०** १ येणें. २ आपणाकडे यावयाची म्ह० आपणास मिळावयाची रकम किं० रकमा समुच्चयानें. ३ नफा; मिळकत; प्राप्ति. ४ बरोबरी; सर; उ० उदंड खाल्ला मेवा तरी येईना अर्ध भाकरीचा येवा. ५ शरीराचा बांधेसूदपणा;चेहेऱ्याचा उठावदारपणा; गोंडस आकृति. ६ अनुरूपता; उ० काळ्या माणसाला मोत्याच्या दागिन्यांचा येवा असतो. ❀ **येवाजावा** [**म०** येणें+जाणें] **पु०** कोणेकाच्या घरीं वारंवार जाणेंयेणें किं० जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा. **येवादेवा** [**म०** येणें+देणें] **स्त्री०** देण्याघेण्याचा व्यवहार.

येसान, येहसान [**अ०** इहसान्] **न०**कृपा; उपकार; मेहेरबानीची कांहीं गोष्ट किं० कृति.

योग [**सं०**] **पु०** १ जुळणी; जोडणें;मिलाफ. २ संयोग; संबंध; सांनिध्य. ३ स्पर्श. ४ कांहीं पदार्थ कांहीं कामीं लावणें किं० वापरणें किं० योजणें. ५ कांहीं कामाची रीति, पद्धति, किं० सरणी;क्रम .६ उपाय, साधन; युक्ति.७ जारणमारण; जादूटोणा. ८ व्यासंग. ९ सज्ज होणें किं० सज्ज करणें. १० घोडा, बैल, इ० गाडी इ०स जोडणें किं० जुंपणें. ११ अभ्यास; ध्यान; ध्यानाभ्यास. १२ समाधि; चित्तवृत्तीचा निरोध. १३ ईश्वरप्राप्तीचा उपाय; उ० कर्मयोग, ज्ञानयोग भक्तियोग. १४ निष्ठा; एकाग्रता; उपासना. १५ ईश्वरी सामर्थ्य. १६ ईश्वरी संकल्प. १७ दैवाची योजना; उ० तिला ऋतु प्राप्त व्हावा आणि तिचा पति मरावा हा मोठा दुःसह योग होय. १८ समाधिशास्त्र. १९ जीवात्मा आणि परमात्मा ह्यांचें ऐक्य. २० कार्यकुशलता. २१ तत्त्वज्ञान. २२ व्युत्पत्ति; व्युत्पत्तिमूलक अर्थ.२३सूत्र; नियम; कायदा. २४ (**गणित**) बेरीज. २५ (**ज्योतिष**) विशिष्ट ग्रह, तिथि, वार, इ० एकत्र येणें. २६ ग्रहांचें एका दक्षिणोत्तर रेषेंत येणें; युति. २७ नक्षत्रांतील मुख्य तारा. २८ संधी; प्रसंग. २९ अनुष्ठान; आचरणें. ३० परस्परावलंबित्व. ३१ नवीन द्रव्यादि मिळविणें. मिळविलेल्याचें रक्षण करणें ह्याला ' क्षेम ' म्हणतात. ३२अनुरूपता.❀ **योगेश्वर पु०** १ श्रेष्ठ योगी. २जादूगार. ३वेताळ. ४ शंकर. **योगक्षेम पु० ए० व०, न० ए० व०** १ योग किं० म्ह० इष्ट वस्तु मिळविणें. क्षेम म्ह० मिळविलेल्या वस्तूचें रक्षण करणें.कोणेकाचें योगक्षेम चालविणें म्ह०त्याला पाहिजे असेल तें त्याला मिळवून देणें आणि नंतर त्याच्या रक्षणाची काळजी वाहाणें; त्याच्या संबंधाची सर्व प्रकारची जबाबदारी आपल्याकडे घेणें. **क्रि०** वाहाणें, पाहाणें, चालविणें, इ०. २ चरितार्थ. **योगचक्षु** [**सं०** योगचक्षुस्] **पु०** ब्राह्मण. **योगतारा पु०, स्त्री०** नक्षत्रांतील मुख्य तारा. **योगनिद्रा स्त्री०** १अर्धवट निद्रा आणि अर्धवट जागृति अशी स्थिति. २ युगाच्या अंतीं विष्णूची झोंप. **योगनिद्रा, योगमाया स्त्री०** ईश्वराची मायाशक्ति. **योगरूढ वि०** व्युत्पत्तीनें आणि रूढीनें जो अर्थाचा वाचक असा(शब्द);उ० पंकज म्ह०(चिखलांत जन्मलेलें) कमळ. **योगबल न०** १ अलौकिक शक्ति. २ जादूची शक्ति. **योगराज पु०** १ योगांत निष्णात

मनुष्य. २ एक औषधी कृति. **योगवासिष्ठ न०** योगाच्या ध्यानानें मोक्ष मिळविण्याच्या साधनांचा विचार ज्यांत केला आहे असा एक ग्रंथ. **योगसमाधि पु०** ध्यानांत आत्म्याचा लय. **योगसार पु०** सर्व रोगांवर लागू पडणारें औषध. **योगसूत्र न०** पतंजलीचीं योगसाधनासंबंधाचीं सूत्रें प्रत्येक. **योगसेवा स्त्री०** ध्यानस्थ बसणें. **योगायोग पु०** १ दैवगति; अनपेक्षित अशी घडलेली कांहीं गोष्ट. २ अनुकूल काळ आणि प्रतिकूल काळ. **योगिनी स्त्री०** १ जोगीण. २ डाकीण. **योगी पु०** योगसाधन करणारा. २ प्राणनिरोधादिकांच्या द्वारानें ज्याला योग साध्य झाला असा.

योग्य [**सं०**] **वि०** १ उचित; साजेसें. २ पात्र; समर्थ; लायक. ३ उपयुक्त. ॐ **योग्यता स्त्री०** १ अनुरूपता. २ दर्जा; मोठेपणा. ३ लायकी. ४ हुशारी.

योजक [**सं०**] **वि०** १ जोडणारा. २ उपयोग करणारा. ३ व्यवस्था करणारा.

योजणूक [**म०** योजणें] **स्त्री०** योजणें; योजण्याची क्रिया;योजना.पुढें ' योजना ' पहा.

योजणें [**सं०** युज्] **स० क्रि०** १ (कोणेकाला) कोणेक कामीं नेमणें किं० स्थापिणें. २ कांहीं कामीं उपयोगांत आणणें. ३ (घोडा, बैल, इ०) गाडी, नांगर,इ०ना जुंपणें.४(कांहीं पदार्थ) कोणेक पदार्थाशीं कांहीं कामासाठीं जोडणें किं० संबद्ध करणें. ५ ठरविणें; निश्चित करणें. ६ (युक्ति, इलाज) शोधून काढून कांहीं कार्यार्थ लावणें.

योजन [**सं०**] **न०** १ जोडणें. २ कामास लावणें. ३ उपयोगांत आणणें. ४ अर्थ लावणें. ह्या चारी अर्थीं ' योजना ' सुद्धां. ५ चार कोश हें अंतर.

योजना [**सं०**] **स्त्री०** १ वर ' योजन ' चे पहिले चार अर्थ पहा. २ युक्ति; हिकमत. ३ मांडणी.

योजित [**सं०**] **वि०** १ योजलेला; ठरविलेला; उपयोगांत आणलेला. २ मनानें ठरविलेला. ३ जोडलेला.

योज्य [**सं०**] **वि०** १ योजण्यास योग्य. २ जींत कांहीं रक्कम मिळवावयाची अशी (संख्या).

योद्धा [**सं०**योद्धृ] **पु०**लढाई करणारा;वीर.

योनि [**सं०**] **स्त्री०** १स्त्रियांचें जननेंद्रिय.२ उत्पत्तिस्थान. ३ कारण; आदिकारण. ४प्राण्याची जात किं० प्राण्याचा वर्ग; उ० मनुष्ययोनि, व्याघ्रयोनि, इ०. ॐ **योनिसंकर पु०** व्यभिचारानें जातींत होते ती भेसळ. **योनिसंबंध पु०** विवाहद्वारा दोन माणसें किं० कुटुंबें यांचा परस्परसंबंध. ह्या अर्थीं ' यौनसंबंध ' सुद्धां.**योनिचतुष्टय न०** जरायुज,अंडज, स्वेदज, आणि उद्भिज्ज, असे जे उत्पत्तिस्थानावरून प्राणी आणि वृक्ष ह्या पदार्थांचे चार वर्ग ते.

योषा [**सं०**] **स्त्री०** १ तरुण स्त्री. २ स्त्री.

यौगपद्य [**सं०**] **वि०** एकाच समयीं असणें किं० होणें किं० घडणें; समकालीनता.

यौगिक [**सं०**] **वि०**१उपयुक्त. २ योग्य. ३ नेहेमांचें. ४ (**व्याकरण**) व्युत्पत्तीवरून निघणारा किं० ठरलेला (अर्थ). ५ योगासंबंधाचें.

यौवन [**सं०**] **न०** तारुण्य; ऐन उमेदीचें वय. ॐ **यौवनकंटक पु०** मुरमाची पुळी.

यौवराज्य [**सं०**] **न०** युवराजाची पदवी किं० कारभार. मागें ' युवराज ' पहा.



र

र मराठी व्यंजनमालेंतील सत्तावीसावें व्यंजन.

र [**म०** ' रडणें ' चें पहिलें अक्षर] **स्त्री०** रडणें; रोदन.॰**र करणें** रडणें. **रचा पाडा गाणें, रचें गाणें करणें, रचें गाणें लावणें**,इ० रडणें.

रंक [**सं०**] **वि०** १ कंजूष. २ मतिमंद. ३ मूर्ख. **पु०** १ भणंग; भिकारी; क्षुद्र. २समाजांतील अगदीं हलक्या दर्जाचा माणूस. [तेंत).

रकटा पु० चिंधी. **रकटें न०** वस्त्र (तुच्छ-

रकत, रगत, रघत पुढें ' रक्त ' पहा.

रक्बा [**अ०** रक्‌बह्] **पु०** गांवाखालची जमीन; गांवकीचा प्रदेश किं० टापू.

रकम, रक्कम [**अ०** रक्म्] **स्त्री०** १ कांहीं कार्याकडे नियोजित जें द्रव्याचें परिमाण तें. २ हिशेबाची एक बाब किं० एक कलम. ३ कांहीं कामाकडे योजावयाचें कोणत्याही पदार्थाचें परिमाण. ४ लेख; पत्रिका. ॰**रकमेस येणें** १ कोणी मनुष्य सुरळीतपणें किं० व्यवस्थित रीतीनें वागूं लागणें किं० व्यवहार करूं लागणें. २ पूर्वींची उच्छृंखल वृत्ति सोडून चांगल्या प्रकारें(मनुष्य, पशु) वागूं लागणें. ३आटोक्यांत किं० नियंत्रणेंत येणें; व्यवस्थित होणें; नियमबद्ध होणें; मार्गास लागणें; सुरळीतपणें चालूं लागणें. **रकमेस आणणें** व्यवस्थित, सुरळीत, किं० नियमबद्ध करणें. **रकमबंद,रकमवार वि०** कलमवार. **रकमाला पु०**तपशिलवार यादी किं०मोजदाद.**रकमी वि०**निश्चित;ठराविक(जमीनीचा सारा इ०).

रकाना [**फा०** रकानाह्] **पु०**लिहावयाच्या कागदाचे लिहिण्याच्या सोयीसाठीं पाडलेले उभे विभाग प्रत्येक; पुस्तक, वर्तमानपत्र, इ० च्या पानाचे उभे विभाग प्रत्येक. ॰ **रकान्यास येणें** कागदावर नमूद करण्याच्या लायकीचा किं० महत्त्वाचा होणें किं० असणें. **रकान्यास आणणें** महत्त्वास, योग्यतेस, किं० रंगारूपास आणणें.

रकार [**म०** ' रडणें ' चें पहिलें अक्षर] **पु०** १ रडणें; रडगाणें; पिरपीर. २ कांहीं कार्याचा नाश;कामाची नासाडी किं०बिघाड(करणें,होणें).

रक्त [**सं०**] **वि०** १ रंगविलेलें. २ तांबडा. ३ आसक्त; प्रेमबद्ध. **न०**प्राण्याच्या अंगांतील तांबडें पाणी;रुधिर. ॰**रक्त पाडणें** मंत्रादि योगानें कोणेकाच्या अंगांतून रक्त वहावयास लावणें. **अंगाला रक्त लावून घायाळांत शिरणें** ल्ढाईंत शौर्याचीं कृत्यें न करतां मागें राहणें आणि आपण पराक्रमाचीं कृत्यें केलीं आणि आपणास जखमा झाल्या हें दाखविण्यासाठीं अंगाला रक्त फासणें; कुचराईनें काम करून झटून काम केल्याची बढाई मारणें.**रक्ताचें पाणी करणें** कांहीं कामीं पराकाष्ठेचे कष्ट सोसणें. **रक्तओढ स्त्री०** रक्तमिश्रित मल (गुदावाटें पडलेला). **रक्तकंठ पु०** कोकिळ पक्षी. **रक्तचंचु स्त्री०** साळुंकी. **रक्तचंदन न०** ज्याचें लाकूड तांबडें असतें असा वृक्षविशेष. **रक्तप्रमेह पु०** शिश्नद्वारा रक्त पडणें हा रोग. **रक्तपात पु०** मारामारींत एकमेकांना जखमा करून रक्त वाहाविणें किं० वाहविलेलें रक्त. **रक्तपीति, रक्तपिति स्त्री०** एक कुष्टरोगविशेष. **रक्तपित्त न०** नाक, तोंड, गुद, इ० द्वारा रक्त पडून ज्वर इ० येणें हा रोग. **रक्तबीज पु०** ढेकूण. **रक्तबंबाळ, रक्तबोंबाळ वि०** १ रक्तानें माखलेला किं०लडबडलेला. २ ज्यांतून रक्त वाहात आहे असा. **रक्तवान् पु०** १ शाई करून विकणारा. २ मोठ्या कुटुंबांत पत्रावळी करून जेवणारांसाठीं मांडणारा. **रक्तस्राव पु०**१रक्त वाहणें. २वाहलेलें रक्त.**रक्तांबर वि०**१भगवीं वस्त्रें नेसलेला(यति).२रक्तानें भरलेला किं०माखलेला. **रक्तांबील (–ळ), रक्तभोंबळा, रक्तबोंबाळ, रक्तबंबाळ वि०** रक्तानें माखलेला किं० लडबडलेला.

रक्तावणें, रक्ताळणें [**म०** रक्त] **अ० क्रि०** १ (जखम, गळूं, पोत, इ० तून) रक्त वाहात असणें किं० वाहूं लागणें. २ रक्तानें माखलेला असणें (कपडा, अंग, इ०). [तांबडा रंग.

रक्तिमा [**सं०** रक्तिमन्] **पु०** तांबूसपणा;

रखडणें अ० क्रि० १(कांहीं कार्य)सुरळीतपणें न चालतां त्यांत मधून मधून विघ्नें येत राहाणें. २(कोणी मनुष्य) कांहीं ध्येय गांठूं पहात असतां मधून मधून त्याला विघ्नें येऊन तो कुंठित होणें. ३ (कोणी मनुष्य) प्रगति न होतां एके ठिकाणीं आडकून राहाणें. ४ कष्टांत दिवस

काढणें. ५ खितपत पडणें. ६ रेंगाळत राहाणें.

रखमंडळ [म० राख+सं०मंडल] न० जेथें राख पसरलेली आहे अशी जागा; राखेचें थारळें.

रखरख स्त्री० १ विस्तव, सूर्य, दिवा, इ० ची आच. २ भूक, तहान, इ० ची वेदना, किं० इ०नीं लागलेला शोष.

रखरखणें अ०क्रि०१(प्राण्यानें)तान्हेलें होणें.२ (ऊन्ह, आग्नि) तीव्र ताप देणारें होणें किं०असणें.

रखरखाट [म० रखरख] पु० परमावधीस पोंचलेली रखरख. वर ' रखरख ' पहा.

रखरखीत वि० १ अति तीव्र (ऊन्ह, विस्तव, तिखट खाद्य किं० पेय). २ शुष्क (जमीन). ३ ३ वाळलेलें (झाड, जंगल). [करी.

रखवालदार [सं० रक्षग; हिं०]पु० पहारे-

रखवाली [सं० रक्षग; हिं०] स्त्री० रक्षण करणें; निगा राखणें; राखण; पाहारा.

रखा, रख्वा [सं० रक्षा] स्त्री० राख (विस्तवाची).

रखाकणें अ० क्रि० वर ' रखरखणें ' पहा.

रखेली [म० राखणें] स्त्री० विषयवासनेच्या शमनासाठीं पगार देऊन किं० फुकट ठेवलेली स्त्री; राख.

रग [फा० रग्=धमनी] स्त्री० १ धमनी; स्नायु. २ अंगचें खरें किं० कल्पित शारीरिक किं० बौद्धिक जें सामर्थ्य त्याच्या योगानें उत्पन्न होतो तो गर्व, ताठा, उन्माद, किं० मस्ती (येणें, बाळगणें). ३ शारीरिक किं० मानसिक कष्ट सहन करण्याची कोणेकाची ताकद. ४ गळूं, फोड, इ० चा ठणका(शमणें,लागणें). ५एकाच संस्थानांत गात्र किं० शरीर फार वेळ असल्यानें स्नायूंना बसतो तो ताण किं० लागतो तो ठणका (लागणें). ६ सावकार, सरकार, इ० नीं केलेला तगादा. ७ (कामाची) घाई, नेट. ८ (पाऊस, वावटळ, ऊन्ह, इ० चा) जोर. ❀ **कोणेकाची रग जिरविणें** त्याची खोडकी मोडणें; त्याच्या उद्दामपणाला प्रतिबंध करणें; त्याला शासन करून त्याचा ताठा नाहींसा करणें; त्याचा नक्षा उतरणें.

रंग [सं० रंग; हिं० रंग्; फा० रंग्] पु०१ केवळ चक्षुरिन्द्रियानें जाणतां येतो असा पदार्थांच्या ठायीं असतो जो पांढरेपणा, तांबडेपणा, इ० धर्म तो; वर्ण (तांबडा, पिवळा, हिरवा, इ०). २ पदार्थाला तांबडा, काळा, इ० वर्ण देण्याचें कोणतेंही द्रव्य. ३ विवाह, शिमगा, इ० प्रसंगीं एकमेकांच्या अंगावर केशर इ० चें रंगित पाणी टाकतात तें किं० तें टाकण्याचा समारंभ.३सभागृह; सभामंडप. ४ नृत्यस्थान. ५ नाटकगृह. ६ तालीमबाजांचा आखाडा. ७ प्रेक्षकांचा किं० श्रोत्यांचा समुदाय. ८रणभूमि.९खेळ; क्रीडा; नृत्य. १० गाणें, वजावणें, नृत्य, कसरत, कुस्ती, कथा, इ० मध्यें असलेला चित्त एकाग्र किं० तल्लीन करणारा गुण किं० त्या गुणामुळें उत्पन्न होणारा आनंद, मजा, गंमत, किं० शोभा (येणें, भरणें, चढणें). ११ उत्कर्ष; वैभवाची स्थिति; उ० संसार रंगास येणें; उ० सदोबाची बाग रंगास येत चालली आहे. १२ संभव; शक्यता; उ० आज पाऊस पडण्याचा रंग दिसत नाहीं; उ० रामभाऊ दुखण्यांतून बरा होण्याचा रंग दिसूं लागला आहे. १३ स्वरूप; वस्तुस्थिति; एकंदर देखावा; उ० ब्याहीबोवांचा रंग दिसेल त्याप्रमाणें बोलणें करा. १४ खेळावयाच्या सोंगट्यांतील जे चार रंग त्यांतील प्रत्येक रंगाच्या चार चार सोंगट्या समुच्चयानें. १५ संधी; योग्य समय; उ० त्याच्या घरांत तीन माणसें आजारी आहेत, जलशाची गोष्ट काढण्याचा रंग हा नव्हे. ❀ **टीप,**–' रंग ' शब्दघटित संस्कृतांतील, फारशींतील, हिंदुस्तानींतील, आणि मराठींतील वाक्प्रचार पुढें देतों. **रंग राखणें** सभ्यपणाचें अतिक्रमण न करणें किं० न होऊं देणें. **रंगास चढणें, रंगास येणें** १ (कांहीं रंगित पदार्थ) दिवा, प्रकाश, धुणें, घासणें, इ० च्या योगानें अधिक सुंदर किं० चटकदार दिसणें. २ अधिक चित्ताकर्षक, मोहक, किं० मनोहर होणें. **रंगास येणें** १ शक्य किं० संभवनीय होणें. २ कांहीं चिन्ह, लक्षण, किं० देखावा यावरून आजमावलेली स्थिति; उ० हा रोगी राम म्हणावयाच्या रंगास आला आहे; उ० हा खोडकर पोरगा मार खाण्याच्या रंगास आला आहे. **रंगारूपास** (किं० **रंगास**) **येणें** (किं० **चढणें**) उत्कर्षाची स्थिति पावणें; वैभवास चढणें; खुलून दिसणें; विकास पावणें. **रंगाची मोट बांधणें** (किं० **रंग राखणें**)वैभवानें

हुरळून न जातां सभ्य आणि सौम्य वर्तन कायम ठेवणें. आपल्या प्रतिपक्ष्यावर वादांत किं० कांहीं कामांत आपण सरशी मिळविली असतां आपण दिल्दारीनें त्याच्याशीं वागणें, त्या सरशीच्या जोरावर त्याच्याशीं कठोरपणा न करणें किं० त्याला न हिणविणें, किं० त्याला अधिक पेचांत ढकलण्याचा प्रयत्न न करणें. **रंगाच्या मोटा बांधूं नयेत** प्रतिपक्ष्याला अत्यन्त निर्दयपणें नामोहोरम करूं नये; उ० त्याणें मी चुकलों असें कबूल केलें तें बस झालें, आतां रंगाच्या मोटा बांधीत बसूं नका. **कोणकानें रंगांत येणें** त्याणें एकाद्या विषयसुखाच्या आस्वादनांत तल्लीन होऊन इतर विषयाचेकडे त्याचें भान न राहाणें. **रंगाचा भंग करणें** आनंदाचा विरस करणें. **रंगडाव पु०, रंगबाजी स्त्री०** गंजिफा खेळण्याचा एक प्रकार. **रंगदार वि०** १ मनोहर आहे रंग ज्याचा असा (पदार्थ,-फूल, वस्त्र, इ०). २ रंगेल (माणूस). ३ रंगित. **रंगदेवता स्त्री०** गाणेंबजावणें, कथा, पुराण, प्रवचन, व्याख्यान, इ० कांस जिच्या प्रसादानें रंग येतो म्हणजे आनंददायकपणा येतो अशी एक कल्पित देवता. **रंगपंचमी स्त्री०** फाल्गुन वद्य पंचमी,–ज्या दिवशीं पुरुष एकमेकांच्या अंगावर केशर इ० चे रंगित पाणी उडवितात. **रंगबहार पु०** १ थाटमाट किं० थाटमाटाचा देखावा. २ नाना प्रकारच्या करमणूकी किं० त्या जेथें चालतात तें ठिकाण. **रंगभूमि स्त्री०** १ नाटकगृह. २ कुस्त्या इ० करण्याच्या आणि पाहाण्याच्या सोयीचें ठिकाण. **रंगमंडप पु०** कुस्त्या, गाणेंबजावणें, कथा, पुराण, इ० साठीं मांडव घालून तात्पुरती जी निवाऱ्याची जागा करतात ती. **रंगमाळ स्त्री०** रंगित कागदांच्या तुकड्यांच्या किं० बेगडीच्या तुकड्यांच्या माळा मिरवणुकांत उंच बांबूंवरून लोंबत सोडलेल्या असतात त्या प्रत्येक. **रंगमहाल पु०** विलासासाठीं श्रीमंत लोकांच्या वाड्यांत जे दालन सामानसुमानांनीं शृंग रलेलें असतें तें. **रंगमूर्ति स्त्री०** १ कीर्तन, गायन, इ० कांत रंग उत्पन्न होतो ज्या दर्दी श्रोते किं० प्रेक्षक यांच्यामुळें ते प्रत्येक.२ भिन्न भिन्न संस्थानांतील कृष्णाच्या ज्या मूर्ति त्या प्रत्येक. **रंगलूट स्त्री०**गंजिफांच्या डावांत सर्वच खेळाडूंचीं पानें एकाच रंगाचीं पडलीं तर तो हुकूम फुकट जातो आणि पानें सर्वांनीं लुटून घ्यावी असा जो प्रकार तो. **रंगमोड पु०** आनंदांत विरजण पाडणारी कोणतीही गोष्ट. **रंगराग, रागरंग पु०** कांहीं चिन्हें किं० लक्षणें इ० कांवरून कांहीं गोष्टीची स्थिति किं० माणसाची वृत्ति जी अटकळींत येते ती; उ० पावसाचा रंगराग पाहून घराच्या बाहेर पडा; उ० त्या सरदाराचा रागरंग पाहून माझ्या बढतीची गोष्ट काढा. **रंगरूप न०** चालूं झालेल्या कामाची विशिष्ट समयीची स्थिति. **रंगारूपास येणें** चालूं झालेलें काम बऱ्याच समाधानकारक पल्ल्यास येणे किं०त्याची बरीचशी प्रगति झालेली दृष्टोत्पत्तीस येणें. **रंगरेज पु०** वस्त्रांस रंग देण्याचा धंदा करणारा; रंगारी. **रंगलाल पु०** विलासी आणि रंगेल माणूस. **रंगवल्ली स्त्री०** कुंकू,हळद, इ० रंगाच्या चूर्णांनीं जमीनिवर देव,झाडें, पशु, पक्षि, इ० चे केलेले देखावे. **रांगोळी** [सं० रंगवल्ली] **स्त्री०** १ शिरगोळ्याचें चूर्ण,–ज्याणें जमीनिवर नानाप्रकारच्या आकृति काढतात. २ ह्या चूर्णानें काढलेल्या आकृति समुच्चयानें. जेवणाच्या पंक्तांत ज्या साधनानें ह्या चूर्णाचे पट्टे काढतात त्याला ' रांगोळें ' **न०** असा शब्द आहे. **रंगशाला स्त्री०** १ नाटकगृह. २ नाटकांत वेगळ्या वेगळ्या भूमिका करणारे लोक जेथें अंगांस रंग लावणें,वस्त्रें पेहेरणें,इ०रूप तयारी करतात ती जागा. **रंगांगण न०, रंगसभा स्त्री०** नाच, तमाशे, कुस्त्या, गाणेंबजावणें, इ० करमणुकी जेथें होतात तें स्थळ. **रंगशिला, रंगशीळ स्त्री०** पंढरपूरच्या विठोबाच्या देवळांतील मोठी शिळा,–जीवर भक्त नाचतात. **रंगाई स्त्री०** वस्त्रें रंगविणें, भिंतींवर चित्रें काढणें, इ० बद्दल कारागिरास दिलेली मजूरी. **रंगारी पु०** वस्त्रें रंगवून उपजीविका करणारा. **रंगारी हिरडा पु०** हिरड्याची एक जात. यालाच ' जंगली हिरडा, ' 'चांभार हिरडा' अशीं अन्य नांवें आहेत. बाळाहिरडा, सुरवारी हिरडा, ह्या हिरड्याच्या अन्य जाति. **रंगिला,रंगेल,रंगेला,**

रंगेली, रंगी वि० हौसी, रसिक, आनंदी; नाच, तमाशे, गाणेंबजावणें, इ० चा शोकीन. **रंगाची तालीम स्त्री०** सभागृहांत नाटक इ० प्रयोग करावयाच्या पूर्वी नटलोक खाजगी स्वरूपाचें जें नाटक करून थोड्याशा मित्रमंडळीस दाखवितात तें किं० तो प्रयोग. **रंगडी, रंगडीढंगडी, रंगडीधंगडी स्त्री०** लटपटीखटपटी, डावपेच, कावे. **रंगढंग पु०** १ लटपट; कावा (करणें, मांडणें). २ वस्तूचें रूप किं० दखावा. ३ स्वच्छंदी आंचरण. **रंगनाथ पु०** भिन्न भिन्न संस्थानांतील कृष्णाच्या ज्या धातूंच्या मूर्ति त्या प्रत्येक. मागें ' रंगमूर्ति ' अर्थ २ पहा. **श्रीरंग पु०** कृष्ण. **रंगामेज पु०** १ चितारी. २ ठग; लुच्चा. **रंगामेजी स्त्री०** १ चित्रकला. २ दांभिकपणा. **वि०** लुच्चा; कपटी; कुटिल. **रंगी, रंगीत वि०**रंगविलेला.

रगटा पु०, रगटें न०मागें 'रकटा,' 'रकटें' पहा.

रगड[म० रगडणें]वि० विपुल; पुष्कळ; जितकें हावें तितकें, किंबहुना त्याहून अधिक. **स्त्री०**चंगळ; वैपुल्य; हावें तितकें किंबहुना त्याहूनही अधिक परिमाण.

रगडणी [म० रगडणें] स्त्री० १ रगडण्याची क्रिया. खाली ' रगडणें ' पहा. २ मागावर विणलें जात असलेल्या वस्त्राचा जो भाग विणून झाला आहे तो जीवर गुंडाळला जातो ती तुळई.

रगडणें [हिं०] स० क्रि० १ (कांहीं पदार्थ) चेपणें; दडपणें; जोरानें चोळणें. २ (दुखत किं० ठणकत असलेलें अंग किं० गात्र) आराम वाटण्यासाठीं चोळणें किं० चेपणें. ३ (खाद्य पदार्थ) खाऊन गट्ट करून टाकणें. ४(दुसऱ्याचा पदार्थ) दांडगाईनें किं० जबरदस्तीनें घेऊन जाणें ❀ **रगडपट्टी स्त्री०** १ दांडग्या हातानें कांहीं काम करणें किं० केलेलें काम. २ वैपुल्य; पुष्कळ परिमाण **रगडमल्ल पु०** दांडगेश्वर; अवाढव्य; बेढब (माणूस, पदार्थ). **रगडून क्रि० वि०** १ विपुल प्रमाणांत; खूप; पुष्कळ. २ जोरानें; सर्व बळ खर्चून. **रगड्या वि०** दांडगाईनें काम करणारा. **रगडमल्ली स्त्री०**१ दांडगाईनें केलेलें काम. २ आडमुठेपणाचें, असभ्यपणाचें, किं० वात्रटपणाचें दुसऱ्याशा केलेलं वर्तन.

रगडा [म० रगडणें] पु० १ दाटी; गर्दी. २ असह्य किं० भारभूत काम; कामाचा भार; कामाची जोखमीची जबाबदारी. ❀**रगडाझगडा पु०** वर 'रगडा' सर्व अर्थी पहा.

रंगण [सं० रणांगण] न० १ मंडल; वर्तुलाकार वाट किं०प्रदेश. २ खेळाची जागा. ३भोंवरा खेळतांना करून घेतात तें वर्तुळ. ❀ **रंगणांत येणें** प्रतिपक्षाशीं लढावयाला सिद्ध होणें. **रंगणटोला पु०** रंगणांत भोंवऱ्यानें मारलेला तडाका.

रंगणें [म० रंग] अ० क्रि० १कांहीं आनंद, करमणूक, उद्योग, स्वार, इ० मध्यें गढून जाणें किं० तल्लीन होणें. २ (वस्त्र इ०) रंगानें युक्त होणें; रंगीत होणें; विशिष्ट रंगाचें होणें.

रगत [म० रक्त;सं० रक्त]न०मागें'रक्त'पहा. ❀ **रगतरोटी स्त्री०**१सैन्यांतील नोकरी. २ लढाईंत शौर्याचीं कृत्यें केल्याबद्दल राजाकडून जी जमीन वीराला दिली जाते ती.

रगबा पु० गांवाखालची जमीन. मागें 'रकबा' पहा.

रंगरेज [फा०] पु० रंगारी.

रंगवणें[म०रंगणें'चें प्रयोजक]स०क्रि०विशिष्ट रंगानें (वस्त्रादि) युक्त करणें; उ० हें पागोटें विटलें तें रंगवून आणलें पाहिजे. २ चपराक मारून (कोणेकाचा गाल) तांबडा करणें; उ० दोन थोबाडींत मारून तुझा गाल रंगविला पाहिजे म्हणजे तूं ताळ्यावर येशील. ३ (कोणेकाच्या गालावर चपराक) मारणें; उ० तुझ्या मुस्कटांत दोन चपराका रंगविल्याशिवाय तूं कबूल होणार नाहीस. **टीप**.—येथें ' चपराक ' हें कर्म अध्याहृत ठेविलें तरी चालतें.

रगाटणी स्त्री० फणींतून ओविलेले ताण्याचे तंतु ज्या काठीला बांधतात ती.

रगाडा पु०, रगाडी स्त्री० १ गर्दी; दाटी. २ कामाचा भार; कामांचा नेट. ३ वैपुल्य; पुष्कळ परिमाण. ४ उसाचा रस काढण्याचा चरक ५ पाट्यावर वरवंट्यानें मारलेला घसरा.

रंगामेजी [फा०] स्त्री० रंगरेघोटीं, आरसे, झुंबरें, हांड्या, तसबिरा, इ० नीं दिवाणखाना सुशोभित करणें.

रग्या [म० रग] वि० १ उद्दाम, आडदांड. २ आवेशी; हिम्मतदार.

रघत न० 'रक्त'चें अपभ्रष्ट रूप. मागें ' रक्त ' पहा.

रघस स्त्री० शेत नांगरल्यानंतर ढिखळें फोडावयाचें आउत.

रंघळणें स० क्रि० १ फरपटावीत नेणें; फरां फरां ओढणें. २ (धोतर इ०) वापरून गुधडणें; उ० हें धोतर दोन दिवस रंघळून नंतर परटाकडे द्या म्हणजे पांढरें शुभ्र होऊन येईल.

रंघळणें अ० क्रि० रेंगाळणें; मागें पडणें.

रच [म० रचणें] पु० रचना; रचाई. २ रचण्याची क्रिया. ३ जें रचलें तें. ४ रचून केलेला ढीग किं० केलेली रास.

रचणें [सं० रच्] अ० क्रि० १ मांडणें; व्यवस्थित रूपांत ठेवणें. २ (पदार्थ) एकावर एक ठेवणें किं० पदार्थांच्या एका थरावर दुसरा, दुसऱ्या थरावर तिसरा, अशा प्रकारें त्यांची रास करणें. ३ उभें करणें. ४ शब्दांची आणि विचारांची योग्य प्रकारें मांडणी करून (ग्रंथ, श्लोक, इ०) निर्माण करणें. ४ (कादंबरी, गोष्ट, बनावट हकीगत, इ०) आपल्या कल्पनेनें नवीन बनावणें.

रचना [सं०] स्त्री० १ मांडणी. २ बनविणें ३ घर, मांडव, भिंत, गवताची गंजी, इ० ची उभारणी. ४ कल्पनेनें निर्माण केलेली कांहीं वस्तु, गोष्ट, इ०. ५ ग्रंथ, श्लोक, मसलत, कुभांड, इ० चा संगति प्रकारची जुळणी. ६ घटना; जुळणी; उ० शरीराची रचना सर्व शस्त्रवैद्यांस ठाऊक असावी लागते. ७ हार, दागिना, यंत्र, इ०चे अवयव विशिष्ट प्रकारें जुळवून त्यांची कांहीं विशिष्ट प्रकारें केलेली जुळणी. ८ मांडणें, बनविणें, उभारणें, निर्मिणें, जुळविणें, घडविणें, गुंफणें, इ० क्रियानीं झालेला किं० अस्तित्वांत आलेला पदार्थ.

रचाई [म० रचणें] स्त्री० रचण्याची क्रिया किं० सरणी किं० तेणेंकरून सिद्ध झालेला पदार्थ किं० ह्या सिद्धतेसाठीं द्यावें लागलेलें द्रव्य.

रचित [सं०] वि० रचिलेलें.

रज [सं० रजस्] न० १ धुळीचा कण. २ फुलांतील परागाचा कण. ३ सोनें इ०चा एकएक बारीक कण. ४ मनुष्याचे जे तीन गुण त्यांतील दुसरा. ते तीन गुण सत्त्व, रजस्, आणि तमस्. ५ स्त्रियांचा मासिक विटाळ. **टीप,**—मराठींत ' रज ' शब्द बहुधा **पु०** योजला जातो. ꣸ **रजोदर्शन न०** १ मुलीला न्हाण येणें (होणें). २ स्त्रीचें विटाळशी बसणें. **रजाचा गज करणें** १ कांहीं हकीगत फुगवून किं० अतिशयोक्ति करून सांगणें. २ एकाद्या गोष्टीला नसतें महत्त्व देणें. **रजोगुण पु०** ' रज 'शब्दाचा अर्थ ४ मध्यें सांगितलेला जो गुण तो. ह्या गुणानें विशिष्ट जो मनुष्य तो रजोगुणी. **रजस्वला स्त्री** विटाळशी स्त्री.

रजई, रजाई [फा० रझाई] स्त्री० कापडाच्या खोळींत कापसाचा पातळ थर घालून टांके मारून जो थंडीच्या निवारणार्थ पांघरावयास करतात तो पदार्थ; दुलई; लेप.

रजक [सं०] पु० १ परीट. २ चितारी.

रंजक [सं०] वि० १ रंगविणारा. २ करमणूक करणारा. **पु०** १ रंगारी. २ चितारी. ३ उत्तेजक पदार्थ. ꣸ **मनोरंजक वि०** मन रंजविणारा; चित्तवेधक.

रंजक, रंजूक [हिं०] स्त्री० १ बंदुकीच्या कान्यावर घालतात ती दारू (भरणें, देणें). २ फटाकडा, चिचुंदरी, इ० ची वात. ३ सुरुंग पेटविण्यासाठीं जी दारूची ओळ करतात ती. ꣸ **रंजक पिणें** बंदुकीच्या कान्यावरची दारू बार न होतां जळून जाणें. **कोणाकाला रंजक देणें** (किं० **पाजणें** किं० **भरणें**) १ त्याला कांहीं काम करा-करावयाला भर देणें किं० उठविणें किं० चेतविणें. २ त्याची कोणा माणसांशीं कलागत लावून देणें. **रंजक उडणें** (किं० **झडणें**) कज्जा किं० भांडण एकदम आणि जोरानें सुरू होणें. **रंजकदान न०, रंजकदानी स्त्री०** बंदुकीच्या कान्यावर ठेवावयाच्या दारूचें बारदान.

रंजगंज [म० गंज] पु० १ कीट; मळ; तांब; गंज; बुरशी. २ विपत्ति; त्रास.

रंजणें [सं० रंज] अ० क्रि० कांहीं वस्तूच्या किं० विषयाच्या अवलोकनांत, मननांत, वाचनांत, श्रवणांत, किं० आस्वादनांत तल्लीन किं० आनंदित होणें. **रंजणें गंजणें [म० रंजगंज] अ० क्रि०** रंजगंजानें युक्त होणें. मागें ' रंजगंज ' पहा. ꣸ **रंजलागंजला वि०** पीडिलेला; त्रासलेला विपन्न; हतभाग्य.

रजत [सं०] न० चांदी किं० रुपें हा धातु. ꣸ **रजताद्रि पु०** कैलास हा पर्वत.

रंजन [सं०] न० १ करमणूक; मौज. २

रंगविणें. ३ सुखविणें; खूष किं० आनंदित करणें

रजनी, रजानि [सं०] **स्त्री०** रात्र. ❀ **रजनीचर पु०** राक्षस. **रजनीनाथ पु०** चंद्र. **रजनीमुख न०** सायंकाळ; प्रदोषकाल.

रजपज [स० रज] **स्त्री०** मोजकेपणा; मितपणा; मितता; फारही नाहीं आणि अल्पही नाहीं असें पदार्थांचें परिमाण. ❀ **रजपजचा, रजापजाचा वि०** बेताबाताचा ;फारही नाहीं आणि थोडाही नाहीं असा किं० इतका.

रजपूत [सं० राजपुत्र] **पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

रजब, रज्जब [अ०] **पु०**मुसलमानी वर्षाचा सातवा महिना.

रजबली (**-ली**), **रदबदली स्त्री०** कोणेकाबद्दल कोणेकापाशीं केलेली विनंती, प्रार्थना, किं० भाकणूक (करणें).

रजा [अ० रिझा] **स्त्री०** १ परवानगी; अनुज्ञा; मोकळीक. २ कांहीं काळ नोकराला नोकरीवर न येण्याची यजमानानें दिलेली परवानगी किं० मुभा (देणें). ३ नियमित सरणीनें चालेल्या कामांत विश्रांतीसाठीं किं० करमणुकीसाठीं किं० अन्य उद्देशानें काम बंद ठेवणें किं० हा बंद ठेवण्याचा काळ. ४ हाकालपट्टी; घालवून लावणें; काढून टाकणें (देणें). ❀ **रजाचिट्टी** (**-ट्ठी**) **स्त्री०** अनुज्ञा, परवानगी, किं० हाकालपट्टी ज्या कागदावर लिहिलेली किं० नोंदलेली असते तो कागद. **रजातलब** [अ० रिझा+तलब् (बोलावणें)] **स्त्री०** १ यजमानाच्या हुकमाप्रमाणें नोकरानें वागणें किं० वागण्याची कबूली किं० वागण्यांत तत्परता. **कोणेकाच्या रजातलबेंत राहाणें** पूर्णपणें त्याच्या आज्ञेत राहाणे. **रजावंती** (**-दी-**) **नें क्रि० वि०** परवानगीनें; संमतीनें; अनुज्ञेनें; मर्जीप्रमाणें. **रजावंद, रजामंद वि०** कबूल; खूष; संतुष्ट. **रजावंती** (**-दी**), **रजामंदी स्त्री०** १ संमती; खुषी; कबूली; मान्यता. २समजूत.

रंजित [सं० रज्] **वि०**१ ज्याचें रंजन झालें तो; आनंदित; ज्याची करमणूक झाली आहे तो. २ रंगलेला किं०रंगविलेला (कपडा इ० पदार्थ).

रजी [सं० रजस्] **स्त्री०** धूळ; मळ; कीट; गंज. [त्रास.

रंजी [फा० रंजिष्] **स्त्री०** वैताग; कंटाळा;

रंजी [फा० रंजिष] **स्त्री०** त्रास; कंटाळा; वैताग. **रंजीस वि०** त्रस्त; जर्जर; त्रासलेला; विपन्न (येणें); उ० ह्या कारट्याच्या पायीं मी भारी रंजीस आलों आहें.

रंजूक स्त्री० मागें ' रंजक ' [हिं०] पहा.

रजोगुण, रजोगुणी, रजोदर्शन मागें ' रज ' [सं०] मध्यें पहा.

रज्जब मागें ' रजब ' पहा.

रज्जु [सं०] **स्त्री०** १ दोर; दोरी; राजू. २ केशांची वेणी. ३ लगाम.

रंझणें मागें ' रंजणें ' [सं०] पहा.

रझळणें अ० क्रि० सुरळीतपणें काम न होतां मध्यें मध्यें खोळंबा होऊन तें काम रखडत चालल्यामुळें तें (करणारा) जर्जर होणें किं० त्रस्त होणें.

रट वि० पुढें ' रठ ' पहा.

रटणें [सं० रट] **अ० क्रि०** १ (बेडूक) ओरडणें. २ (मूल) एकदम किंचाळून रडणें. ३ बडबड करणें.

रटांरट, रटांरटां क्रि० वि० बुडबुडे येऊन आणि आवाज करून (भात, पाणी, इ०) कढणें.

रटाळ्या, रटेल वि० १ जाडी, ओबडधोबड, अगडबंब (माणूस, पशु, पदार्थ). १ दांडगेपणानें काम करणारा.

रट्ट, रठ पु० दाटी; गर्दी. २ जाडी भाकरी किं० पोळी. ३ कोणताही जाडी, लठ्ठ, ओबडधोबड, किं० बेढब, माणूस, पशु, किं० पदार्थ. ४ राकट किं० कणखर माणूस.

रट्टा, रट्ट्या पु० १ तडाखा; प्रहार (मारणें, लगावणें). २ (कामाचा) नेट किं० ओझें (पडणें, बसणें). ३ गर्दीत घुसणें (मारणें). **वि०** ओबडधोबड, जाडी, बेढब (माणूस, पशु, पदार्थ).

रठ, रंठ वि० १ ठणक (लाकूड, सुपारी, पेरू, इ० फळ, किं०जमीन इ०). २वर्णोच्चार सुलभपणें जिला करतां येत नाहीं अशी (जीभ). ३ कणखर किं० कष्टाळू (मनुष्य, पशु, गात्र). ४ खरखरीत (सूत, त्वचा, पान, कागद, इ०).

रट्ट पु० महाराष्ट्रांतील प्राचीन काळची एक जाति किं० त्या जातीचा कोणी माणूस.

रड [म० रडणें] **स्त्री०** १ एकसारखें रडत राहाण्याची क्रिया; उ० ह्या मुलाला सकाळ-पासून रड लागली आहे. २ तकरार, पिरपीर (लावणें, चालविणें). ३ कमतरता; उणेपणा; असमाधानकारक स्थिति (पाऊस, अभ्यास, परीक्षा, इ० मध्यें). ॐ **रडकथा, रडकहाणी स्त्री०, रडगाणें न०** १ विपत्तीची हकीगत. २ कंटाळवाणी आणि लांबलचक हकीगत (किं० वृत्तान्त. ३ पिरपीर; तकरार. **रडीस येणें** (किं० **जाणें**) खेळ इ० मध्यें पराभव झाल्याकारणानें चिडून रडण्याच्या बेतांत असणें. **रडकुंडा (–डी) वि०** रडण्याच्या बेतांत असलेला. **रडकुंडी स्त्री०** रडण्याची मनाची स्थिति. **रडकुंडीस येणें** रड-ण्याच्या बेतांत असणें (काम, पराभव, दुःख, इ० मुळें).

रडका [**म०** रडणें] **वि०** १ सदा रडत असणारें (मूल). २ सदा तकरार करणारा. ३ ज्याच्या हातून कोणतेंच काम चांगलें होत नाहीं किं० तडीस जात नाहीं असा. ४ रडतांना होतो तसा (आवाज,चर्या).५टवटवीत,उत्साहयुक्त,किं० प्रसन्न नाहा चेहेरा, भाषण, काम, इ० ज्याचें असा.६ कंटाळवाणें (भाषण इ०). रडका **स्त्री०,** रडकें **न०**. ॐ **रडकी सूरत स्त्री०** प्रेक्षकाला जी पाहून आनंद वाटत नाहीं अशी मुद्रा.

रंडका [**सं०** रंडा] **वि०** १ ज्याची बायको मेली आहे असा (पुरुष). जिचा नवरा मेला आहे अशा स्त्रीस ' रंडकी ' असा शब्द आहे. २ जेथें जें असावयास पाहिजे तें तेथें ज्याला किं० ज्यांत किं०ज्यावर नाहीं असें; ओकें.३लाभरहित (धंदा). ४ निरुपयोगी. ॐ **रंडका अमल पु०** नामर्दपणाची शासनपद्धति; ज्यांत चोर, लुटारू, बदमाष, इ० ना भीति वाटत नाहीं असें राज्य. **रंडकीमुंडकी स्त्री०** १ जिचें वपन झालेलें आहे अशी विधवा. २ दुर्वर्तनी स्त्री; व्यभिचारिणी (शिवी देतांना). **रंडगोलक पु०** विधवेच्या जारकर्मापासून उत्पन्न झालेल्या जातीचा माणूस. **टीप,**–पति जिवंत असतां जारकर्मापासून स्त्रीस झालेला पुत्र ' कुंड; ' विधवेचा पुत्र ' गोलक ' किं० ' गोळक ' किं० ' रंडगोलक. '

रडकुंडी वर ' रड ' मध्यें पहा.

रडखडणें, रखडणें अ० क्रि० धडपडत चालणें; कंटाळ्यानें, कष्टानें, किं० त्रासानें चालणें.

रडणें [**सं०** रुद]**अ० क्रि०** १शोक करणें;रोदन करणें. २ नष्ट होणें;बंद पडणें;अनादरानें बाजूला ढकलला जाणें; उ० चार दिवस पाटीलबोवांचा आश्रय होता तोही रडला, आतां गोदोबाला भाकच मागितली पाहिजे;उ० बक्षिशी रडो,रुजू पगार तर द्याल कीं नाहीं ? नुकसान होणें; उ० तूं नोकरी सोडलास तर त्यांत माझें काय रडतें ? ४ असणें, होणें (बेतागांत किं० निंदेत); उ० दोन वर्षे मामलत रडत होती तेव्हां आमच्या मुलानें आम्हाला काय दिलें तें तुम्हां पाहिलें-तच, आतां मामलत गेली, आतां काय देणार फतऱ्या ? ५ निंदणें, निर्भर्त्सिणें; उ० मी त्याला नाहीं दोष देत,मी आपल्या दैवाला रडतों. **स० क्रि०** चालविणें, करणें (निंदेत); उ० दोन वर्षे तूं दुकान रडलास तेवढें बस्स झालें.ॐ**रडतखडत, रडतरडत, रडतपडत, रडतकसत क्रि० वि०** मोठ्या कष्टानें; निरुत्साहीपणानें; इच्छेविरुद्ध. **कोणेकाचें रडतगोत्र असणें** तो नेभळा, बिनक-र्तबगारीचा, किं० उत्साहरहित असणें. **रडत घोडें न०, रडताराऊत पु०, रडतराव पु०** लोकांच्या सक्तीनें आणि स्वताची इच्छा नसतां कांहीं काम करणारा. **रडतलक्ष्मी, रडतपार्वती स्त्री०** जी कोणतेंही काम मनापासून करीत नाहीं आणि दुसऱ्याच्या सक्तीनें करीत असते अशी स्त्री. **रडतोंडा (–ड्या) पु०** १ रडक्या तोंडाचा माणूस. २ उत्साहानें कोणतेंही काम न करणारा माणूस. **रडपंचक न०** आपला अशक्तपणा, कर्तृ-त्वशून्यता, इ० च्या सबबी समुच्चयानें किं० अशा सबबी सांगून कांहीं काम अंगाबाहेर लोटणें किं० लोटण्याचा प्रयत्न. **रडवा वि०** १ कोणतेंही काम करण्याची ज्याच्या अंगीं धमक नाहीं असा. २ खिन्न, उदासीन. ३ रड-ण्याची चर्या ज्याच्या तोंडावर आहे असा. **रडा-रोई स्त्री०** रडण्याचा आक्रोश.

रडविणें [म० ' रडणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ रडावयास लावणें. २ कोणेकाला रडावयास येईल इतकें त्यास छळणें, गांजणें, किं० उपद्रविणें. ३ दुःखकारक प्रसंगाच्या वर्णनानें किं० देखाव्यानें कोणेकाला डोळ्यांतून अश्रु गाळावयास लावणें. ४ आनंदाचा प्रसंग, पाऊस, वारा, रोग, थंडी, ऊन्ह, इ० नीं (शेत, रचनाविशेष, इ०) विध्वंसिणें किं० (त्यांच्या रंगाचा) भंग करणें.

रंडा [**सं०**] **स्त्री०** १ विधवा. २ स्त्रीला शिवी म्हणून तिला 'रंडा' म्हणतात. ॐ **रंडागीत न०** बदसूर गायन, पठन, भाषण, किं० वाचन. **रंडापंडित पु०** दांडगी आणि शिवराळ स्त्री. **रंडापति पु०** १ रांड किं० रखेली ज्याणें बाळगिली आहे असा पुरुष. २ रांडबाज पुरुष. ३ कुटण्या. ४ पुचाट, कर्तृत्वशून्य, किं० लेचापेचा असा मनुष्य.

रडी, रड्डी, रंडी स्त्री० खोटें खेळणें; लबाडीचा खेळ (घेणें, खाणें). ॐ **रड्डीस येणें, रंडीस येणें** आपल्यावर डाव लागल्यामुळें चिरडीस जाणें. **रंडीखोर, रडीवाल, रंडीवाल, रड्डीखोर, रड्डीवाल वि०** खेळामध्यें खोटें खेळण्याकडे प्रवृत्त किं० चिरडीस जाण्याच्या स्वभावाचा.

रंडी [**सं०** रंडा] **स्त्री०** १ वेश्या. २ नर्तकी. ३ गंजिफांतील जी नादार ती. ॐ **रंडीबाज वि०** रांडांच्या नादीं लागलेला. **रंडुला पु०** १ बायकांचा नादी. २ कर्तृत्वशून्य.

रडुरडु [**म०** रडणें] **न०, स्त्री०** रडण्याची पिरपिर.

रडें, रडूं [**म०** रडणें] **न०** १ रडण्याची क्रिया. २ रडण्याचा आवेग (येणें, कोसळणें).

रंडेय [**म०** रंडा] **पु०** रांडेच्या पोटचा मुलगा.

रड्डी [**म०** रडणें] **स्त्री०** खोटा किं० लबाडीचा खेळ. वर ' रडी ' सर्व अर्थीं पहा.

रड्या [**म०** रडणें] **वि०** १ सर्वदा रडणारा किं० चिडणारा माणूस. २ कर्तृत्वशून्य आणि उत्साहरहित माणूस; मंद; कामाला संथ, सुस्त, किं० आळशी.

रण [**सं०**] **न०** १ लढाई. २ युद्धाची किं० लढाईची जागा. ३ तंटा; आवेशाचें भांडण; जोराजोराचा वादविवाद. ॐ **रणशिर न०, रणधुरा स्त्री०** लढाईची अघाडी. **रणपाडंनि पु०** योद्धा. **रणकंदन (–ळ) न०, रणखंदाळी स्त्री०** १ तुमुल युद्ध. २ दाणादाण; नाश. **रणकुदळ वि०** १ भांडरा; भांडकुदळ. २ अगडबंब आणि बेघाट शरीराचा माणूस. **रणखुंदळ स्त्री०, रणखुंदळा पु०** १ लढाईच्या वेळची गडबड, आवेश, किं० गर्दी. २ कोणत्याही प्रसंगाची गडबड, घाई, किं० गोंधळ. **रणधीर, रणगंभीर वि०** युद्धात न डगमगणारा. **रणघाई स्त्री०** १ जोराचा किं० नेटाचा प्रयत्न. २ परमावधीची घाई. **रणघाल्या वि०** कामांत चिकित्सा करीत बसणारा; कामात हरकती आणीत बसणारा; कामात उरक न पाडतां काम गोंधळविणारा. **रणझुंबळ न०** घनघोर लढाई. **रणतुरा पु०** युद्धात विजयी झाल्याचें चिन्ह म्हणून पागोट्यात खोवितात तो तुरा. **रणधुमाळी स्त्री०** युद्धाची गडबड; लढाईच्या प्रसंगाची गर्दी, गडबड, घाई, किं० धांदल. **रणनवरा पु०** १ लढाईत शत्रूवर जय मिळविल्याकारणानें ज्याला कोणत्याही प्रसंगी रस्त्यांतून चालतांना पुढें वाद्यांचा ताफा वाजवण्याचा हक्क प्राप्त झाला आहे असा वीर. २ शूर आणि उत्साही वीर. ३ उत्साही पुढारी किं० म्होरक्या. ४ कामांत चलाख आणि तल्लख माणूस. **रणबहिरी** [**सं०** रणभेरी] **वि०** रणांत शूर; मोठा लढवय्या. **रणबावरा वि०** १ लढण्यास उत्सुक. २ मारामारीस सदा सिद्ध. ३ कोणत्याही कामीं फाजील उत्सुक. **रणफंदी पु०** लढवय्या. **रणभूमि स्त्री०** युद्धभूमि. **रणबोका पु०** अगडबंब माणूस, पशु, तुळई, इ०. **रणभेरी स्त्री०** युद्धांत वाजवितात ती नौबत. **रणमंडल न०** १ एक प्रकारचा व्यूह. २ लढाईची भूमि. **रणमोहरें न०** रणांत वाजवावयाचीं वाद्यें प्रत्येक. **रणरंग पु०** १ युद्धाचा भयंकर देखावा. २ युद्धाच्या वेळची गडबड किं० गोंधळ. **रणांगण, रणक्षेत्र न०** लढाईचें मैदान. **रणरंगधीर वि०** युद्धभूमीवर शौर्याचे आणि साहसाचे पराक्रम करणारा. **रणहलकी (–गी) स्त्री०** लढाईत वाजवितात तें एक वाद्यविशेष. **रणगाडा पु०** तोफ इ० जड ओझें वाहून नेण्याचा मोठा गाडा.

रणरण स्त्री० १ ऊन्ह, विस्तव, मशाल, इ० चा असह्य प्रकाश किं० ताप. २ मध्यान्हीच्या

सूर्याचा ताप. ꕤ **रणरणं करणें** (विस्तव, सूर्य, किं० ज्वरांत अंग, इ०) अति ऊन किं० कढत झालेलें असणें किं०त्यांची प्रखर उष्णता असह्य होणें.

रणरणणें अ० क्रि० (सूर्य किं० हवा किं० आकाश) तप्त होऊन असह्य वाटणें; उ० आज हवा भारी रणरणते आहे. ह्या क्रियापदाचा भावकर्तरी प्रयोगही होतो; उ० आज फार रणरणत आहे.

रणरणीत वि० अति कडक किं०प्रखर (सूर्य, ऊन्ह, अग्नि, दुपार, इ०). ꕤ**रणरणीत उन्हाळा पु०** उन्हाळ्याचा मध्य,–जेव्हां हवेंत अति असह्य उष्मा असतो. **रणरणीत दुपार स्त्री०** ऐन दुपार; भर दुपार किं० मध्यान्ह समय.

रत [सं०] वि० १ आनंदित. २ तल्लीन; निमग्न; तत्पर. **न०** १ करमणूक. २ मैथुन.

रतणें [सं० रम्; रत; **म०** रत] **अ० क्रि०** १ रमणें; आनंदित होणें. २मैथुनांत आसक्त होणें.

रतन [सं० रत्न] **न०**रत्न, हिरा, माणिक, इ०. ꕤ **रतनकुंड न०,रतनकूप पु०, न०** उत्तम पोसलेला, पिकलेला,आणि तेजस्वी आंबा,पेरु,इ० फळ.**रतनजोत स्त्री०** १ डोळ्यांस थंडावा आणणारें एक औषध. २ अट्टल लुच्चा. ३ वैदूंची कांडी.**रतनपारखी पु०**रत्नांची परीक्षा करणारा. **रतनबाव स्त्री०** पाण्याचा प्रवाह वळवून पाणी साचविण्यासाठीं बाग इ० मध्यें केलेला खळगा.

रतल, रत्तल [अ० रत्ल्] **पु०**एक वजनाचें परिमाण; अर्धा शेर.

रताळी [सं० रक्तालु] **स्त्री०** उपवासाचे दिवशीं खावयाचा जो एक कंद आहे त्याची वेली. **रताळें, रताळूं न०** ह्या वेलीचा कंद.

रति [सं०] स्त्री० १ आनंद; सुख. २ आसक्ति; नाद; छंद. ३ प्रीति; प्रेम. ४ विषयसुख. ५ मैथुन. ६ मन्मथाची पत्नी. ७ शृंगाररसाचा स्थायिभाव. ꕤ **रतिपति पु०** मदन.

रती [सं० रक्तिका=गुंज] **स्त्री०** गुंज,–हिरे, मोतीं, इ० वजन करण्याचें एक बीज. ꕤ **रतीमात्र क्रि० वि०** यत्किंचित् सुद्धां. **दैवाची रती स्त्री०** सुदैव.

रतीब [अ० रातिब्] **पु०** १ पौष्टिक अन्न, खाद्य, इ०,–जें घोडे, हत्ती, इ० ना देतात तें किं० त्याचें एका वेळेचें परिमाण. २ दूध, शेण, इ० रोज पुरविण्याबद्दलचा नियम किं० अशा नियमानें पुरविलेलें त्या त्या पदार्थाचें परिमाण; उ० तुम्ही दुधाचा तीन पावशेर रतीब लावा. ३ खाद्यपेय इ० चें नियमानें ठरविलेलें परिमाण.

रत्तल मागें ' रतल ' पहा.

रत्न [सं०] न० १ हिरा, माणीक, पाचू, इ० मूल्यवान् पदार्थ. २ कोणेक जातींतील, समुदायांतील, किं०वर्गांतील रत्नाप्रमाणें उत्तम व्यक्ति; उ०पुत्ररत्न, कन्यारत्न, अश्वरत्न; उ० हा मुलगा माझ्या वर्गांत रत्न आहे. ३ समुद्राचें मंथन करून त्यांतून देवदानवांनीं काढले ते चवदा पदार्थ प्रत्येक. मागें ' चौदा ' मध्यें पहा. **रत्नखचित, रत्नजडित वि०** जडावाचें हिरे, माणकें, इ० कोंदणांत बसवून सुशोभित केलेलें (सिंहासन इ०). **रत्नाकर, रत्ननिधि पु०** समुद्र. **रत्नाकर पु०** रामेश्वरापासून आलीकडील पश्चिमेच्या अंगचा समुद्र.**रत्नकंदल पु०** पोवळें. **रत्नगर्भा स्त्री०** पृथ्वी. **रत्नसानु पु०** मेरु पर्वत. **रत्नसू स्त्री०** पृथ्वी. **रत्नदीप पु०** प्रकाश देणारें एक रत्न,–जें पाताळांत असतें अशी समजूत आहे. **रत्नपारखी पु०** मोतीं, हिरे, इ० ची परीक्षा करणें किं० त्यांच्या किमती ठरावेणें इ० कामीं निष्णात माणूस.**रत्नाकर आळविणें** काम न पार पडल्यामुळें हिरमुष्ट होऊन बसणें. **टीप,**– समुद्रावर सेतु बांधतांना राम समुद्रास आळवित बसला यावरून या वाक्प्रचाराची उत्पत्ति.

रत्नी [म० रत्न] **स्त्री०** माकडाच्या खेळांत माकडीला दिलेली असते ती पदवी. **वि०** नाचणी ह्या धान्याची एक जात.

रथ [सं०] पु० राजा, देवाची मूर्ति,इ०ची मिरवणूक ज्या गाडींत निघते ती गाडी. ꕤ**रथांग न०** १ चाक. २विष्णूचें सुदर्शन चक्र.**पु०**चक्रवाक पक्षी. **रथकार पु०** सुतार.**रथगुप्ति स्त्री०** रथाचें चिलखत. **रथयात्रा स्त्री०**देवाच्या मूर्तींची रथांतून मिरवणूक. **रथसप्तमी स्त्री०** माघ शुद्ध सप्तमी ही तिथि. **रथी [सं०** रथिन्] **पु०** रथांत बसून लढणारा योद्धा. **रथोद्धता स्त्री०** एक समवृत्त.

ह्याच्या प्रत्येक चरणांत र, न, र, हे गण असून पुढें एक लघु आणि एक गुरु अक्षर असतें.

रथी, रथिक [**सं०** रथिन्, रथिक] **पु०** १ रथाचा मालक. २ रथांत बसून लढणारा वीर. ३ चक्रवाक पक्षी.

रथ्य [**सं०**] **पु०** गाडीचा घोडा.

रथ्या [**सं०**] **स्त्री०** १ राजमार्ग. २ रस्ता. ३ रथांचा समूह. ४ चवाठा.

रंद पु०, स्त्री० गळूं, फोड, इ० तून निघतो तो रक्तमिश्रित पू.

रद [**सं०**] **पु०** दांत. ꕥ **रदायुध पु०** रानडुकर. **रदच्छद पु०** ओठ.

रद, रद्द [**अ०** रद्द] **स्त्री०** १ परतविणें. २ फेड (कर्जाची). **वि०** १ नामंजूर. २ खोडलेलें. ꕥ**रद्दकर्ज न०**कर्जाची फेड; फेडून टाकलेलें कर्ज.

रदन [**सं०**] **पु०** दांत. ꕥ **रदनच्छद पु०** ओठ.

रदबदल, रदबदली [**फा०** रद् बदल्] **स्त्री०** कोणेकानें दुसऱ्याबद्दल कोणेकाला घातलेली भीड किंवा खर्चिलेलें वजन (करणें).

रंदा, रंदागोल पु० पुढें 'रंधा,' 'रंधागोल' पहा.

रदाल्या, रदाळ्या मागें ' रटाल्या ' पहा.

रद्द मागें ' रद, ' ' रद्द ' पहा.

रद्दी [**फा०** रद्दी] **वि०** त्याज्य;कवडीमोल; टाकाऊ. **स्त्री०** टाकाऊ किं० निरुपयोगी कागद.

रंध पु०, स्त्री० रक्तमिश्रित पू.

रंधणें [**म०** रंधा; **सं०** रध्] **स० क्रि०** रंधा नांवाचें जें सुताराचें हत्यार त्यानें (लाकूड) तासून गुळगुळीत किं० साफ करणें.

रंधन [**सं०**] **न०** १ नाश; पीडा. २ रांधणें किं० शिजविणें ही क्रिया.

रंधप, रांधप [**म०** रांधणें; **सं०** रंध्] **न०** शिजवून तयार करणें किं० जे तयार केलें ते. ꕥ **रंधपी, रांधपी पु०** स्वयंपाकी.

रधवणें,रधविणें पुढें ' रुधवणें, ' ' रुधविणें ' पहा.

रंधा [**फा०** रंदाह्] **पु०** लाकूड साफ आणि गुळगुळीत करण्याचें सुताराचें एक हत्यार. ꕥ **रंधागोल पु०** लाकडाच्या फळीच्या कडांना विशिष्ट आकार देण्याचे सुताराचें एक हत्यार. **रंधागोलची स्त्री०** लाकडाच्या फळी, गज, रिपा, इ० च्या कडांना विशिष्ट आकार देणें ही क्रिया (करणें).

रंध्र [**सं०**] **न०** १ भेग; चीर. २ भगदाड. २ डोंगरांतील गुहा. ३ व्यंग; उणीव. ४ (**लाक्षणिक**) नाजूक भाग; मर्म; वर्म. ꕥ **रंध्रान्वेषण न०** कोणेकाचे दोष हुडकून काढणें.

रप, रपका, रपाटा पु० आवाज होईल अशा प्रकारें मारलेला तडाका.

रपटा पु० गूळ, चिंच, इ० पदार्थ ज्यांत कोळला किं० कुसकरला आहे असें पाणी.

रपाटखान पु० बेढब आणि फार मोठा असा पदार्थ, माणूस, किं० पशु.

रपाटणें, रपटणें स० क्रि० घाईनें, जोरानें, दांडगाईनें, किं० आवेशानें (कोणतीही क्रिया) करणें किं० उरकून घेणें.

रपाटा पु० १ रट्टा; तडाखा. २ फार मोठा आणि बेढब असा कोणताही पदार्थ. ३ घाईनें किं० आवेशानें केलेलें काम (मारणें).

रपाटून [**म०** रपाटणें] **क्रि०वि०** १जोरानें; आवेशानें. २ पूर्णपणें; बाकी न ठेवतां.

रपाट्या [**म०** रपाटणें] **पु०** घाईनें,जोरानें, आवेशानें, किं० दांडग्या हातानें कोणतेंही काम करणारा.

रपेट [**हिं०**] **स्त्री०** १ नियमितपणें व्यायामासाठीं चालणें किं० घोड्यावर बसून जाणें; सहल. २ अशा प्रकारें आक्रमिलेला किं० आक्रमावयाचा प्रदेश.

रफक [**अ०** रुफ्क्] **पु०** स्नेह; मेहेरबानगी; [दोस्ती.

रफत [**फा०** रफतन्=जाणें; रफ्त=चाल] १ चाल; परिपाठ; शिरस्ता. २ जाण्यायेण्याचा परिपाठ; घरोबा; दळणवळण. ३ व्यासंग; सवय.

रफरफ स्त्री० पूर्ण विध्वंस किं० नासाडी (काम, धंदा, संसार, इ० ची).

रफा [**अ०** रफाअ] **पु०** १ विचका;बिघाड; चिवडा; डिवचाडिवड; उ० काय भाताचा अगदीं रफा करून टाकलास तरी ! २ निराकरण. ꕥ **रफातफा, रफादफा पु०** अव्यवस्था;

खिचडी; घालमेल;नासाडी.**रफातफा, रफादफा, रफेद्फे** [अ० रफअद्फअ] **स्त्री०** १ कर्जाची फेड. २ कामाचा निकाल किंवा उरक किं० सुरळीत मांडणी; व्यवस्था; विल्हेवाट. **वि०** व्यवस्थित केलेलें; निकालांत काढलेलें. **रफेख-लश** [अ० रफ्ईखलिष] **पु०** वैराचें निराकरण. **रफेशर** [अ० रफ् इ शर्र्; शर्र्=वाईटपणा] **पु०** वैराचें निराकरण.

रफाकत, रफीकत [अ० रिफाकत्] **स्त्री०** स्नेह; सख्य; मैत्री.

रफायत, रफाहियत [अ० रफाहत्; रफाहीयत्] **स्त्री०** वैभवदशा; उत्कर्ष; भरभराट.

रफीअलकदर [अ० रफीउल्क़द्र] **वि०** उच्च दर्जाचा.

रफीक [अ०] **पु०** स्नेही; दोस्त.

रफू [फा०] **पु०, स्त्री०** १ वस्त्राचें भोक बुझविण्यासाठीं त्यांत सूत, रेशीम, लोकर, इ० चे तंतु तुणणें किं० असा तुणलेला वस्त्राचा भाग. २ नवें गवत घालून गवती छपराची केलेली दागदुजी. ॐ **रफूकरी, रफूगार पु०** वस्त्र रफू करणारा.

रबक [फा० रबाब्] **न०** एक तंतुवाद्य.

रबका पु० १ रट्टा; तडाका. २ कोणताही अवाढव्य आणि बेढब पदार्थ.

रबडगा पु० १ कामाची धांई. २ कामाचा पुष्कळपणा.

रबडणें अ० क्रि० कामाने कष्ट करणें किं० सोसणें.

रबडा पु० चिकट आणि दाट पदार्थ,—चिखल, भात, गूळ, इ०. [पदार्थ.

रबर न० निःसत्त्व आणि भरभरित खाद्य

रबर [इं०] **न०** एका झाडचा चीक,—ज्याच्या अंगीं स्थितिस्थापकपणाचा गुण असतो.

रबाब [फा०] **न०** एक प्रकारचें तंतुवाद्य.

रबाब, रुबाब [अ० रुअब्] **पु०** १ धाक; दरारा. २ प्रेक्षकाच्या मनांत भीतियुक्त आदर उत्पन्न करण्याचा कोणेकाच्या चेहेऱ्यांत असतो तो गुण.ॐ **रुबाबदार वि०** १ प्रेक्षकाच्या मनांत आदर आणि भीति उत्पन्न करणारा (चेहेरा). २ चेहेऱ्याचा डौल्दारपणा.

रबिता मागें ' राबता ' पहा.

रबिलाखर [अ० रबी उल् आखिर्] मुसलमानी वर्षाचा चवथा महिना.

रबिलावल, रबीलोवल [अ० रबी उल् अव्वल] **पु०** मुसलमानी वर्षाचा तिसरा महिना.

रबी, रब्बी [अ० रबीई=वसंत ऋतु] **स्त्री०** गहूं, शाळू, इ० पिकें,—जीं पावसाळ्याच्या अखेरीस पेरून वसंत ऋतूंत कापतात. मागें ' खरीफ ' पहा.

रबुका पु० मागें ' रबका ' पहा.

रबूक वि० १ खूप मोठा, प्रचंड (माणूस, पशु, घर, पदार्थ). २ अत्यन्त विपुल (पाणी, पीक, आंबे, इ०).

रबेत, रबेद, रबेता, रबेदा [अ० रबत्] **पु०** १ जोराचा रट्टा किं० तडाका. २ परिपाठ; सवय; राबता. ३ परिपाठामुळें प्राप्त झालेली सफाई; पूर्ण परिचय.

रबेत, रबेद वि० खूप मोठा; प्रचंड.

रंभा [सं०] **स्त्री०** केळीचें झाड. २ एक अप्सरा. ३ पार्वती. ४ वेश्या. ५ हंबरडा. ६ कोणीही स्थूल, कुरूप, किं० अव्यवस्थितपणें लुगडें नेसलेली आणि पिंजारलेल्या केशांची स्त्री किं० विशेषतः मुलगी. ॐ **रंभातृतीया स्त्री०** मार्गशीर्ष शुद्ध तृतीया किं० त्या तिथीचें व्रतविशेष. **रंभापुतळी स्त्री०** खुरपें हें हत्यार.

रमजान [अ० रम्झान्] **पु०** मुसलमानी वर्षाचा नववा महिना. या महिन्यांत मुसलमान दिवसा रोजा म्ह० उपवास करतात.

रमढोल वि० बेडौल आणि मोठें.

रमण [सं०] **वि०** १ सुखविणारा; प्रिय. २ मोहक;सुंदर. **पु०** १ नवरा. २ जार. ३ मन्मथ. **रमणी स्त्री०** १ तरुण सुंदर स्त्री. २ पत्नी. ३ स्त्री. **रमण न०** १ खेळणें. २ विषयविलास. ३ कामकेली; कामक्रीडा; मैथुन.

रमणा [म० रमणें] १ लोकांना फिरावयासाठीं किं० आरामांत बसावयासाठीं केलेली बाग,—खाजगी किं० सार्वजनिक. २ दक्षिणा घ्यावयाला आलेल्या ब्राह्मणांना व्यवस्थित रीतीनें बसावयासाठीं केलेलें पटांगण. पेशव्यांचा

रमणा पर्वताच्या पायथ्यास होता तेथें आज रान माजलें आहे. ३ ब्राह्मणांना दक्षिणा वाटणें किं० तदर्थ खर्चलेली पैशाची रकम. ४ अनेक मंडळींनीं गोंधळ किं० गोंगाट (माजविणें). [इ०).

रमणीक [म० रमण] **वि०** रमणीय (स्थल

रमणीय [सं०] **वि०** मनोहर; सुंदर, सुखावह.

रमणूक [म० रमणें] **स्त्री०** १ चैनीखातर चालणें किं० हिंडणें किं० भटकणें. २ कोणत्याही प्रकारची करमणूक.

रमणें [सं० रम्] **अ० क्रि०** १ कांहीं आनंदायक किं० सुखावह विषयांत तल्लीन होणें. २ रिकामपणांत वेळ गमावणें. ३ रेंगाळत चालणें किं० जाणें. ४ कर्तव्य टाकून मधून मधून रिकामें बसणें. ४ कोणा माणसाशीं सुखदायक संभाषणांत किं० खेळण्यांत वेळ घालविणें. ५ पुरुषानें स्त्रीशीं किं० स्त्रीनें पुरुषाशीं मैथुनार्थ जुळणें. **रमतरमत, रमतेरमते क्रि० वि०** स्वस्थपणें, घाई न करतां विशेष तसदी न घेतां किं० कष्ट न करतां (काम करणें, इ०). **रमताराम पु०** भटक्या,– विशेषतः तीर्थें पहात पहात हिंडणारा गोसावी.

रममान, रममाण [सं०] **वि०** रमलेला; तल्लीन; आनंदित.

रमराट [म० राम+राष्ट्र] **पु०** ओंगळ, किं० घाणेरड्या पदार्थाची रास.

रमल [अ० रम्ल्] **न०** वाळूवर (किं० कागदावर) रेघा काढून भविष्य वर्तविण्याची विद्या. ही जिब्रईलनें दानियलला शिकविली. ॐ **रमली पु०** ही विद्या जाणणारा किं० ह्या विद्येनें भाकितें सांगणारा माणूस.

रमाविणें [म० ' रमणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ सुखविणें; आनंदविणें. २ (कोणेकाचें) मनोरंजन करणें. ३ (कोणेकाची) कांहीं गोष्टींत चित्तवृत्ति आसक्त करणें. ४ (मुलाला) खेळविणें.

रमा [सं०] **स्त्री०** १ पत्नी. २ लक्ष्मी,– विष्णूची पत्नी. ३ संपत्ति किं० संपत्तीची देवता. ४ शोभा; कांति. ॐ**रमापति, रमाकांत पु०** विष्णु.

रमारम, रमारमी स्त्री० १ खर्च आणि आदा यांची बरोबरी; नफा नाहीं आणि नुकसान नाहीं अशी स्थिति. २ जितकें पाहिजे तितकेंच (खाद्य, पेय, कापड, पैसा, इ० चें) परिमाण; कमी न व्हावें आणि अधिकही न व्हावें इतकें परिमाण; उ० पांच शेरांच्या लाडवांत रमारमी होईल.

रमूज [अ० रमुझ्] **स्त्री०** करमणूक; गमत; मौज; खेळ; क्रीडा.

रम्य [सं०] **वि०** सुखकर; मनोहर; आनंददायक.

रयत, रय्यत [अ० रईयत्] **स्त्री०** १ प्रजाजन,–राजाच्या संबधांत. २ जमीनीच्या मालकाचें शेत करणारा. ॐ **रयत भाग पु०** जमीन करणाऱ्याला मिळतो तो उत्पन्नाचा भाग. **रयतवारी स्त्री०** प्रत्येक कुळाशीं सरकारनें स्वतंत्रपणें साऱ्याचा ठराव करण्याची पद्धति. **रयतानी, रयानी स्त्री०** मालकाच्या शेतावर काम करणारे गडी समुच्चयानें. **रयतावा पु०** १ शेतावर काम करणारे गडी समुच्चयानें किं० त्यांचीं कामें, स्थिति, इ०, किं० त्यांचेंवर बसविलेला सारा.

रया [अ० ' रईयत ' चें अ० व० रआया] **स्त्री०** प्रजा; शेतकरी वर्ग.

रया स्त्री० १ किंमत; योग्यता; मान; उ० गवताला जी रया तीही तुला नाहीं. २ तेज; कांति; चटकदारी; शोभा; उ० ह्या लुगड्याची रया गेली, आतां तें बोहारणीला देऊन टाक; उ० त्या दुखणेकऱ्याच्या तोंडावर कांहीं रया राहिली नाहीं.

रया, रयात, रयायत [अ० रिआयत्] **स्त्री०** १ कींव; क्षमा; माफी; सूट. २ अदब; भीड; मुरवत.

रयानी वर ' रयत ' मध्यें ' रयतानी ' पहा.

रर [म० ' रडणें ' चें ' र ' हें प्रथमाक्षर] **स्त्री०** १ रडणें; पिरपीर; रडगाणें (करणें). २ कांहीं काम करण्यांत मंदपणा किं० मंदगति (करणें); उ० आमचा मुलगा रर करीत म्याट्रिक्युलेशन तर पास झाला.

रव [सं०] **पु०** आवाज; ध्वनि; गुणगुणाट. गोंगाट.

रव स्त्री०, रवण स्त्री०, न० [फा० रफ़्तन्=जाणें; रव=रस्ता] १ रस्ता. २ परिपाठ;

शिरस्ता; चाल; रूढि. ३ अनुक्रम. ४ मुंग्यांची एका दिशेनें चाललेली ओळ.

रबका [**म०** रवा] **पु०** गोटा, गोळा (गूळ, चिखल, इ०चा).

रवखंदळ [**म०** रवणें+खंदळणें] **स्त्री०,न०** १ पराभव; बोऱ्या (होणें, उडणें,). २ धक्का-बुक्की; मारामारी. ३ सैन्याची शत्रूनें केलेली कत्तल.

रंवखळ, रंवखळा, रंवखाळा, रंवखळणें पुढें ' रंवदळ, ' ' रंवदळणें ' पहा.

रवखांब [**म०** रवी+खांब] **पु०** मजल्याची उंची वाढविण्यासाठीं किं० छपर उंच करण्यासाठीं भिंतीच्या गर्भात जे खांब बसवितात ते प्रत्येक. पुढें ' रवी ' पहा.

रंवटळ, रंवटळा, रंवटळणें इ० पुढें 'रंवदळ ' ' रंवदळणें ' पहा.

रवण स्त्री०, न० वर ' रव ' **स्त्री०**, ' रवण ' **स्त्री०, न०** पहा. [पहा

रवणदिवली इ० पुढें ' रोवणदिवली ' इ०

रंवथ, रवंथ [**सं०** रोमंथ] **पु०, न०** आपलें खाद्य प्रथम अर्धवट चावून तें गिळून पोटांत घालून नंतर तें सोयीच्या वेळीं पुन्हा तोंडांत आणून पूर्ण-पणें चावण्याची गायी,म्हशी,इ०ची क्रिया(करणें).

रंवथणें, रवंथणें [**सं०** रोमंथ] **अ० क्रि०** पशूंचे रंवथ करणें. वर ' रवंथ ' पहा.

रंवदळ स्त्री०, रंवदळा, रंवदाळा पु०[**म०** रंवदळणें] पाणी, चिखल, गवत, इ० तुडावणें, डिवचणें, किं०कुसकरणें ही क्रिया,किं०ह्या क्रियेनें झालेली पदार्थाचीअव्यवस्था, नासाडी,किं०दुर्दशा (घालणें, करणें, पडणें, होणें).

रंवदळणें, रंवदाळणें स० क्रि० तुडविणें, डिवचणें, कुसकरणें, ढवळणें (नासाडी होईल अशा प्रकारें).

रंवधें [**सं०** रोमंथ; **म०** रंवथ] **न०** उष्टें खरकटें, भाज्यांचीं डेखें, केळ्यांच्या साली, इ० मनुष्यास उपयोगी न पडणारे जे उच्छिष्ट भाग गायी. म्हशी, इ० ना खाऊं घालतात ते समुच्च-यानें.

रवरव [**सं०** ' रौरव' (एक नरक)चा अप-भ्रंश]रौरव नरक. ॐ **रवरवनरकवास पु०**अत्यंत असह्य स्थिति किं० परिस्थिति.

रवरव क्रि० वि० खूप प्रमाणांत (नासक्या अन्नांत किडे पडणें).

रवरव, रिवरिव स्त्री० अक्कलकारा पिंपळी, इ० पदार्थ तोंडांत गेल्यानें जी जिभ, गाल, इ० नावेदना होते ती (सुटणें). २ विंचू, गांधिलमाशी, इ०च्या दंशाची ठुसठुस.

रवरवणें अ० क्रि०(अक्कलकारा, पिंपळी, इ० पदार्थ) गाल, जीभ, यांना झोंबणें.

रवरवी स्त्री० एक झाड,–ज्याचें फूल तोंडांत घातलें असतां जीभ, गाल, यांना असंख्य ठिकाणीं झोंबतें. [ठसा.

रवळणें न० सोनाराचा कांहीं एका कामाचा

रवळनाथाचें कूळ [**म०** रवळनाथ (शूद्रांचा एक देव)+कूळ(ऋणको किं०नोकर शेतकरी)]**न०** आज मिळवावें आणि आज खावें, शिलकीस कांहीं न पडावें, इतका गरीब माणूस.

रवळा, रवळी पुढें ' रोवळा ,' ' रोवळी ' पहा.

रवा [**हिं०**] **पु०** वाळू, बंदुकीची दारू, साखर, इ० चा कण. २ मध किं० कढविलेलें तूप इ० न डिवचतां ठेवून दिलें असतां त्यांत उत्पन्न होतात ज्या जाडी जाडी गोळ्या त्या प्रत्येक किं० समुच्चयानें. ३ गुळाचा खडा. ४ गुळाची ढेप. ५ सोनें चांदी,इ०चा बारीक रज, कण,किं०तुकडा. ६ कणेकडाच्या किं० चाकाच्या मादळ्याला किं० तुंब्याला आणि परिघाला जोडणाऱ्या रिपा प्रत्येक. ह्या रिपांना ' रवेकड ' असेंही म्हणतात ७ रंग-विलेलें हळकुंड,–गंध, कुंकू, इ० साठीं. ८ गूळ, साखर, इ० चा खडा किं० गोळा. ९सोनाराच्या ' पेरांची आवटी ’नांवाच्या ठसांतील खळगा,– ज्यांत सोनें, चांदी, इ०चा पातळ पत्रा ठोकला असतां त्यांत निमगोल फुगा उत्पन्न होतो. १० कणीक, तांदुळाचें पीठ, इ० तील बारीक अंश काढून घेतला असतां जो जाडी अंश राहातो तो. ॐ **रवा काढणें** वर पांचव्या अर्थाचा रवा तापलेल्या तेलांतून हातानें बाहेर काढणें हा दिव्याचा प्रकार-**रवेकड** [**म०** रवा+काष्ट] **न०** वर ' रवा ' अर्थ ६ पहा.

रवानगी, रवानगीचिठ्ठी पुढें ' रवाना' मध्यें पहा.

रवाना [फा० रफ्तन्=जाणें; रवानाह्]**वि०** १ गेलेला. २ जावयास निघालेला(करणें, होणें). ❀**रवानगी** [**फा०**] **स्त्री०** १ पाठविणें; पाठवणूक; निरोप देणें (करणें). २ हाकलून देणें; हाकालपट्टी.३ बाहेर पाठविलेला माल.**रवानगी चिठ्ठी स्त्री०, रवाना पु०** परवाना; परवानगी.

रवांरास्त [**फा०** रवान् +रास्त] **वि०** चालू, वहिवाट, शिरस्ता, किं० कायदा यांना धरून असलेला (कागद, नाणें, इ०).

रवांसुदगी [**फा०** रवान् (चालू) पुद् (झाला)+गी (प्रत्यय)] **स्त्री०** १ सरकारशीं झालेले रोखे, करार, सरकारी हुकूम किं० दिलेले परवाने ज्या कागदावर नोंदले जातात तो कागद. २ पावती.

रवाळ स्त्री०, रवाळणें न० सोनाराचा एका विशिष्ट कामाचा ठसा.

रवाळ [**म०** रवा] **वि०** जाड्या कणांच्या रूपांत असलेलें,म्ह०कणदार(तूप,मध,साखर,इ०).

रवि [**सं०**] **पु०** सूर्य. ❀ **रविकांत,रविग्रावा**[**सं०**ग्रावन्=धोंडा]**पु०**ज्यांत सूर्याचें किरण एका बिंदूंत केंद्रीभूत होऊन विस्तव पडतो असा एक दगड. **रविमंडल न०** सूर्याचें बिंब. **रवितनय, रविपुत्र पु०** १ शनि हा ग्रह. २ यम. ३ सुग्रीव. ४ कर्ण. ५ वैवस्वत मनु. **रवितनया, रविकन्या स्त्री०** यमुना नदी. **रविवार, रविवासर पु०** आठवड्याचा एक दिवस,–शनिवाराच्या पुढचा आणि सोमवाराच्या आधींचा. **रविसंक्रमण न०** १ सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें. २ सूर्याचें मकर राशींत जाणें. ह्या दिवशीं तीळ आणि साखर (किं० गूळ) ह्यांचें मिश्रण एकमेकांस देऊन ‘ तीळगूळ घ्या आणि गोड बोला ’ असें म्हणतात.

रवी स्त्री० १ दहीं इ० घुसळण्याचें एक साधन. २ घराचा मजला किं० छपर उंच करावयाचें असतां भिंतीच्या पोटांत जे लहान लहान खांब घालतात ते प्रत्येक (देणें). ३ घराच्या तुळयांवरच इंद्रकट दिलें असतां मांडाचळ ठेंगणी होते म्हणून त्या तुळयांवर जे दीड दोन हात उंचीचे खांब देऊन उंचीकडचा भाग वाढवितात ते प्रत्येक. मागें ‘ इंद्र ’ मध्यें ‘ इंद्रकट ’ पहा. ४ पखालींत वरून पाणी भरतांना तोंड उघडें राहावें म्हणून बांबूच्या काड्या एकमेकांस बांधून जें नळकांडें केलेलें असतें तें.

रवेस, रवेश [**फा०** रविष्] **पु०, स्त्री०** चाल; रीती; परिपाठ.

रवैया पु० पखालींत पाणी भरण्यासाठीं जें वर तोंड केलेलें असतें तें पाणी भरतांना उघडें राहावें म्हणून कामट्यांची जी लांबोडी रचना केलेली असते ती (घालणें). वर ‘ रवी ’ चा अर्थ ४ पहा.

रसना, रशना [**सं०**] **स्त्री०** १ दोरी. २ लगाम. ३ कंबरपट्टा. ४ तोंडांतील जीभ.

रश्मि [**सं०**] **पु०** १ दोरी. २ लगाम. ३ किरण. ❀ **रश्मिमान्, रश्मिमाली** [**सं०** रश्मिमालिन्] **पु०** सूर्य.

रस [**सं०**] **पु०** १ जिव्हेनें खारट, तुरट, गोड, इ० जो पदार्थांचा धर्म समजतो तो; चव; रुचि. हे धर्म सहा आहेत. २ पान, फूल, फळ, इ० तील पातळ अंश. ३ पाणी. ४ ऊस चरकांत घालून पिळून काढला असतां जें गोड पाणी त्यांतून निघतें तें. ५ आवड; इच्छा. ६ प्रीति; प्रेम; अनुराग. ७ शृंगार. ८ आनंद; सुख. ९ (**साहित्य**) अंतःकरणाच्या वृत्तीचें कांहीं कारणानें उद्दीपन होतें आणि ह्या उद्दीपित झालेल्या वृत्तीच्या अनुभवानें किं० अवलोकनानें अनुरूप विचार प्रकट करण्याची प्रेरणा होते तिला रस म्हणतात. रस नऊ आहेत. शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, आणि शांत. १०पदार्थाचें सत्त्व किं० सार. ११ शरीरांतील रक्त इ० द्रव पदार्थ. १२ अन्नाचें रक्त व्हावयाच्या पूर्वीचें रूपांतर. १३ पुरुषाचें वीर्य किं० रेत.१४ पारा. १५ दूध. १६ झाडाचा चीक. १७ गंधक. १८ भाषण, कथा, इ० तील गोडी किं० आकर्षण करण्याचा गुण. १९ व्यवहार, व्यापार, इ० तील मोहकपणा. २० सोनें, चांदी, इ० ची अग्निसंयोगानें झालेली द्रवरूप स्थिति. ❀ **रसायन** [**सं०** रस+अयन] **न०** पारा, गंधक, इ० चा रांधा इ० करून जो मात्रा इ० पदार्थ वैद्यलोक करतात तो. **रसायनी औषध न०** खनिज औषध. **रसायनशास्त्र न०**

पदार्थांचे गुणधर्म ठरविणें, भिन्नभिन्न पदार्थांच्या संयोगापासून नवनि पदार्थ काय होतात हें पाहाणें, त्याचा उपयोग काय होईल हें पाहाणें,इ०संबंधाचें शास्त्र. **रसात्मक वि०** १ चवदार. २ रुचकर. ३ सदभिरुचिसंबंधाचा. ४ ज्यानें अंतःकरणाच्या वृत्तींचें उद्दीपन होऊन श्रोत्याला आनंद होतो असें (काव्य). **रसाव्ह पु०** टरपिन तेल. **रसाभास पु०** काव्य, नाटक, भाषण, इ० चे ठायीं प्रवर्तमान जो शृंगारादि रस असतो तो पुरता व्हावयाच्या अगोदर वेगळ्या रसाचें त्यांत संक्रमण झाल्याकारणानें होते जी रसाची दुर्दशा ती. **रसायनाकर्षण न०** दोन किं० अधिक मूलतत्त्वांस एकत्र करून नवा पदार्थ उत्पन्न करणारी शक्ति. **रसेंद्र पु०** १ पारा.२ परीस.**रसोन,रसोनक पु०** लसूण.**रसकर्पूर, रसकापूर पु०**एक औषधोपयोगी पदार्थ. **रसज्ञ वि०** दर्दी; मार्मिक; वस्तूची खुबी जाणणारा. **रसज्ञता स्त्री०, रसज्ञतावात, रसज्ञानवात पु०** वात, पित्त, आणि कफ, ह्या तीहांपैकीं वातामध्यें बिघाड होऊन चव किं० रुचि ह्यांच्या ज्ञानाशिवाय इतर ज्ञान लोपतें ही विकृति. **रसज्ञता स्त्री०** मार्मिकपणा; दर्दीपणा. **रसांजन** १ जस्ताचें फूल. २ अंजनविशेष; पितळ तापवितांना निघणारें किटण. ३ दारू हळदीचा अष्टमांश काढा आणि समभाग शेळीचें दूध हीं एकत्र आटवून केलेलें अंजन.**रसप्रबंध पु०**काव्य, नाटक, इ० रचना. **रसशास्त्र न०** १ किमया. २ रसायनशास्त्र (वर पहा).**रससिंदूर, रसशेंदूर न०** पारा,गंधक,आणि नवसागर, यांचें रसायनविशेष. **रसभंग पु०**१ वर अर्थ९ च्या रसाचा अपकर्षकरणारी कांहीही गोष्ट.२सुखाच्या प्रसंगीं कांहीं दुःखकारक गोष्ट घडून आल्यानें होतो तो हिरमोड किं० निराशा. **रसभरित वि०** १ रसाळ (आंबा इ०). २ चटकदार,आनंददायक, रंगेल (भाषण). **रसभरू वि०** ज्यांत पुष्कळ रस आहे असा (आंबा, ऊस, इ०). **रसभोजन न०** आंब्यांचा रस ज्यांत मुख्य खाद्य आहे अशीं ब्राह्मण किं० मित्रमंडळी यांना दिलेली मेजवानी. **रसरंग [सं० रस+रंग] पु०** मकरसंक्रांतीच्या दिवशीं गूळ आणि कुंकूं हीं द्रव्यें दोन पात्रांत घालून सुवासिनी एकमेकींना किं० ब्राह्मणाला देतात तें दान. **रसरशीत वि०** पुष्कळ रस ज्यांत आहे असा (आंबा इ०). खालीं ' रसरशीत ' स्वतंत्र शब्द पहा. **रसवंती[सं०रसवती] स्त्री०** १ भाषण.२वक्तृत्व.३जिभ.४ एक वनस्पती.**रसविक्रय पु०**तेल,लोणी,दहीं, मसाला,साखर,मीठ, इ० पदार्थांची विक्री. **रससिद्धि स्त्री०** किमया. **रासिक वि०** १ मर्मज्ञ; दर्दी. २ थट्टा, विनोद, इ० करून आपलें आणि लोकांचें रंजन करण्याच्या स्वभावाचा (मनुष्य).

रसकणें [**म०** रस] **अ० क्रि०** मन रंजविणाऱ्या उद्योगांत गुंतलेले असणें.

रसकस [**म०** रस+कस] **पु०** कौमार्याचा बहर (येणें, जाणें).

रसकस स्त्री० १ बोलाचाली; भांडण (चालविणें). २ ताप येण्याच्या पूर्वीं अंग मोडून येणें, (येणें, वाटणें). ३ अंगावर येतात ते शहारे.

रसकसणें अ० क्रि० १ तापाच्या पूर्वीं (अंग) मोडून येणें. २ भांडणें; एकेरीवर येणें.

रसखुंटणा पु० सोनें, चांदी,इ०चे तुकडे पाडण्याची छन्नी.

रसघस स्त्री० घासाघीस; जिकीर; फिरफिर. (लावणें, मांडणें, करणें).

रसद, रस्त, रसूद [फा० रसद् **] स्त्री०** १ मामलतदारानें एकादा परगणा मक्त्यानें किं० खंडानें घेतला असतां त्याला सरकारांत जी रकम आगाऊ भरावी लागते ती. २ गांवचा किं० प्रांताचा कमाविसदार, महालकरी, इ० अधिकारी रयतेपासून पैसा घेऊन सरकारांत भरतात तो. ३ सैन्याच्या उपयोगासाठीं साठविलेलें किं० पाठविलेलें धान्य, दारूगोळा, तंबू, जनावरें, इ० सामान वगैरे. ४ बाहेर लढावयाला पाठविलेल्या सैन्याबरोबरचा खजीना. ५ पेढीवाल्यानें आपला गुमास्ता, मुनीन, किं० पातीदार यांचे कडे पाठविलेला पैसा.६सैन्याबरोबर जाणारें सामानसुमान, जनावरें, बाजारबुणगें, इ०. ७ माणसें, जनावरें, इ० चा चाललेला तांडा. ❀ **रसदभरणा पु०** १ मामलती संबंधानें सरकारांत जी रसद भरली जाते ती. २ सैन्याच्या उपयोगासाठीं दारूगोळा, धान्य, कपडे, जनावरें,इ०जी सामग्री तिचा पुरवठा किं०ती पुरविणें.

रसदी वि० सरकारास अमुक रक्कम द्यावी अशा शर्तीवर मक्त्यानें घेतलेला (गांव इ०).

रसना [सं०] स्त्री० १ जीभ. २ लगाम. ३ दोरी. ४ कंबरपट्टा. ५ करगोटा. ह्या सर्व अर्थी ' रशना ' सुद्धां. मागें ' रशना ' पहा. ॐ **रसनेंद्रिय न०** जिभ,–चव घेण्याचा आणि बोलण्याचा मुखांतील अवयव. [ओझें.

रसपें न० धान्य इ० चें गाढवावर लादलेलें

रसबाळी,रसबेळी, रसबेळ स्त्री०एक प्रकारची केळ. **रसबाळें, रसबेळें** तिचें फळ.

रसरशीत, रसरसीत वि० १ रसानें भरलेला (आंबा इ० फळ). २ ऐन ज्वानींत आलेला (पुरुष इ०). ३ जळजळीत (निखारा, अग्नि).

रसरसणें अ० क्रि० १ रसानें (फळ) भरलेलें असणें. २(अग्नि) प्रज्वलित झालेला असणे. ३ (डोळे, अंग) तापलेलें असणें ४ तारुण्याच्या उमेदीनें आणि सामर्थ्यानें (मनुष्य, पशु) युक्त झालेला असणें. ४ (देठी, गळूं, इ० ची) पूर्ण वाढ झालेली असणें. ५ ऋतुविशेषांत (फळें, शेंगा, इ०) वैपुल्यानें उत्पन्न होणें.

रसवडी स्त्री० हरभऱ्याच्या पिठांत तिखटमीठ इ० घालून केलेलें एक खाद्य.

रसवंती, रसवती [सं० रसवती] स्त्री० १ वक्तृत्व. २ जिभ. ३ एक झुडूप. ४ स्वयंपाक करण्याचें कौशल्य किं० खुबी. मागें ' रस ' मध्यें ' रसवंती ' पहा.

रसा [सं०रस] स्त्री० मसाले घालून तोंडीं लावावयाला केलेलें पाणी.

रसा [सं०] स्त्री० १ पृथ्वी. २ जिभ. ३ वाणी; भाषण. ॐ **रसातल न०** सात पातालांपैकीं एक. खालीं ' रसातल ' स्वतंत्रपणें पहा.

रसांजन न० मागें 'रस' मध्यें'रसांजन'पहा.

रसाणें न० प्रज्वलित निखारे किं० अग्नि.

रसातल [सं०] न० सप्त पातालांपैकीं एक. मागें ' रसा ' मध्यें पहा. ॐ **रसातलास जाणें** अ० क्रि० नाश पावणें; विध्वस्त होणें; नामशेष होणें. **रसातलास पोचविणें** स०क्रि० विध्वस्त करून टाकणें; बुडवून टाकणें; नामशेष करणें.

रसानगी स्त्री० दुसऱ्याच्या मुखानें किं० चिठ्ठीनें दिलेली परवानगी.

रसाल,रसाळ [सं० रसाल] पु० आंब्याचें झाड. **रसाल, रसाळ** वि० १ रसभरित (आंबा इ०). २ आनंदविणारें, रंगेलपणाचें,किं० विनोदी (भाषण, वाणी). **रसाळ** वि० ज्यांत रस पुष्कळ आहे अशी (शिजविलेली भाजी).

रसासणें अ० क्रि० १(अग्नि) प्रज्वलित होणें. २ तापांत (अंग) अति तापलेलें असणें.

रसाळ वर ' रसाल ' पहा.

रसाळी स्त्री० उसाचा रस काढण्याच्या चरकाचे नवरा आणि नवरी हे अवयव ज्या दोन तक्त्यांत फिरतात त्यांपैकीं खालचा तक्ता.

रसिक [सं०] वि० १ चवदार; रुचकर. २ काव्य, नाटक, भाषण, इ० तलि मर्म जाणणारा; मर्मज्ञ; दर्दी. ३ रंगेल; कामुक.

रसीद [फा०] स्त्री० पावती; पोच.

रसुली स्त्री० घोड्याच्या पायावर खुराजवळ उत्पन्न होतात तीं टेंगळें किं० गळवें प्रत्येक.

रसूम [अ० रस्म् ए० व० चाल; रसूम अ० व० चाली] पु० जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना हक्क म्हणून जें द्यावयाचें तें.

रस्त स्त्री० मागें ' रसद ' पहा.

रस्ता [फा० रस्ताह्] पु० मार्ग; वाट. ॐ **रस्तेबंदी स्त्री०**रस्ते नवीन करणें किं० जुने रस्ते दुरुस्त करणें किं० त्या संबंधाचें कोणतेंही काम. **रस्तोंरस्तीं** क्रि० वि० प्रत्येक रस्त्यांत किं० रस्त्यावर. [खंड; जाडी दोर.

रस्सा [हिं० रसा; सं० रश्मि] पु० दोर-

रस्सी [हिं०रसी;सं०रश्मि]स्त्री०दोरी;सुतळी.

रह, रहा [फा० राह्=रस्ता] स्त्री० १ वाट; रस्ता. २ तऱ्हा; रीत. ३ चाल; परिपाठ. ४ कोणेकाचा वर्तनक्रम. ॐ **रहादार** पु० १ वाटसरू; मुसाफर.२मालाची वाहतूक करणारा. ३ मार्गरक्षक,–मांग, रामोशी, इ०.**रहदारी स्त्री०** कोणेका रस्त्यानें जाण्यायेण्याची वहिवाट किं० रस्त्यानें जाणारे येणारे लोक, जनावरें, गाड्या, इ० समुच्चयानें. **रहदारीची जकात** स्त्री० विशिष्ट रस्त्यानें जाणाऱ्या गाड्या,जनावरें, माल, इ०वर सरकारनें बसविलेला कर. **रहगुजरी** पु० १ वाटसरू; फिरस्ता. २ वाटसरूंची वर्दळ.

रहारीत स्त्री० चालरीती. **रहारास्त** वि० सरळ, यथायोग्य, उचित, सभ्याचारास अनुसरून असलेलें (भाषण, वर्तन, काम, इ०). **रहाळ** स्त्री०, पु०, **रहाळी** स्त्री० १ दृढ परिचय; घरोवा; दळणवळण. २ कांहीं कामाची सरणी किं० परिपाटी. ३ जाणाऱ्या येणाऱ्या माणसें, गाड्या, जनावरें, इ० ची वर्दळ. **रहासाळी, रहसाळी** स्त्री० प्रेमाचा घरोवा किं० दळणवळण किं० परिचय. [(कवितेत).

रहंवर [सं० रथवर] पु० उत्तम रथ

रहवास [म० राहाणें+वास] पु० १ परिपाठ किं० सवय किं० यांच्या योगानें प्राप्त झालेली सफाई. २ कोणेक स्थळीं कोणेकाचें राहाणें किं० वसति. ह्या अर्थी 'रहिवास' सुद्धां. ३ दळणवळण; व्यवहार. ४ रिवाज; परिपाठ. ※ **रहवासी, रहिवासी** पु० कोणेक स्थळीं कायमचा राहाणारा.

रहसाळी [सं० रहस्य] स्त्री० प्रेमाचा घरोवा; मैत्रीचा संबंध; दृढ मैत्री.

रहस्य [सं०] न० १ गुप्त गोष्ट; मर्म. २ अंतस्थ बातमी. ३ गुरुमुखानेंच मिळणारी विद्या किं० कला. ४ उपनिषद्. ५ लोकांच्या लक्ष्यांत सहज न येणारी वस्तूच्या ठायींची कांहीं खुबी. ६ दोन माणसांचा एकमेकांनीं एकमेकांना आपल्या गुप्त गोष्टी सांगण्याइतक्या पल्ल्यापर्यंतचा स्नेहसंबंध. ७ भाषणांतील खुबी, गूढ अर्थ, किं० मुद्दा; भाषणाचा कटाक्ष किं० धोरण. ८ फायदेशीरपणा; आकर्षक गुण; उ० तंबाखूच्या धंद्यांत आतां कांहीं रहस्य राहिलें नाहीं. ※ **रहस्यस्थान, रहःस्थल** [सं०रहस्+स्थल] न० गुप्त जागा किं० ठिकाण.

रहा वर ' रह ' पहा.

रहाकळ, राहकळ न०, स्त्री० १ भ्यालेल्या किं० घाबरलेल्या गुरांढोरांचें सैरावैरा पळत सुटणें. २ भांडणाऱ्या किं० मारामारी करणाऱ्यांची दंगल.

रहाट, राहाट [सं० अर (चाकाच्या आऱ्या) + घट्ट (रचना); हिं० रहट्] पु० विहिरींतून पाणी काढणें, कापूस, लोंकर, इ० चें सूत काढणें, दोरी वळणें, इ० कामें करण्याचीं जीं चाकाच्या वर्तुलाकार गतीनें फिरणारीं यंत्रें तीं प्रत्येक. हीं यंत्रें भिन्न कामीं भिन्न प्रकारचीं असतात. ※ **रहाट गाडगें** न० १ विहीर, तळें, नदी, इ० तून पाणी उंचावर नेण्याचें मातीचे किं० धातूचें मोघे यांची माळ ज्यावरून लोंबत सोडलेली असते असें माणसानें किं० जनावरानें फिरवावयाचें यंत्र. **रहाटवड** स्त्री० ह्या यंत्राला लागणारे वांसे, कामट्या, दोऱ्या, मोघे, इ०. **रहाटगाडगें** न० (लाक्षणिक)उत्कर्ष अपकर्ष, चढ उतार, जन्ममरण, हानि लाभ,यांची परंपरा जी आजार, जीवनयात्रा,इ०मध्यें चाललेली असते ती. **रहाटपाळणा** पु० जत्रेमध्यें मुलांना बसावयासाठीं चार पाळणें अनेक वेळां उंचावर जाऊन खालीं उतरून पुन्हा वर जाणारे ज्या रचनेंत केलेले असतात ती.**रहाटवर्णी** [म०रहाट+पाणी] न० राहाटगाडग्यानें शेंदून काढलेलें पाणी,-नदीचें वाहून आणलेलें पाणी याच्या व्यावर्तकत्वें. **रहाटागर**[म०रहाट+अगार(घर,जागा)] रहाटगाडग्याच्या पाण्यावर केलेला मळा,शेत,बाग, इ०. **रहाट्या** पु० १ रहाटगाडगें फिरविणारा मनुष्य किं० पशु. २ सोंगट्या इ० मध्यें दोन्ही बाजूस खेळणारा गडी. ३सामाजिक किं० धार्मिक बाबत, इ० मध्यें एकदा एक पक्ष, नंतर दुसरा पक्ष, नंतर तिसरा पक्ष, अशा प्रकारें राजकारणं स्वीकारणारा चंचल बुद्धीचा माणूस;दोहों मांडवाचा वऱ्हाडी. ४ संस्था, पेढी, इ० चा चालक. ५ विवाहादि प्रसंगीं कांहीं द्रव्य न घेतां खटपट करणारा माणूस. ६ वेठबेगारीसाठीं पकडलेला माणूस. **रहाटी** स्त्री० लहान पायरहाट. खालीं ' रहाटी ' स्वतंत्र प्रतीक पहा.

रहाटणें [म० रहाट] अ० क्रि० अभ्यास, सवय, किं०परिपाठ, यांच्यामुळें (कोणी माणूस) कांहीं कामांत परिचित होणें किं०रुळणें किं० तें काम करण्याची त्याला हातोटी साधणें किं० त्याला सफाई प्राप्त होणें.

रहाटी [म० रहाट] स्त्री० १ माणसानें पायांनीं चालवावयाचें रहाटगाडगें. २ पूर्वीपासून चालत आलेला प्रघात, रूढि, किं० परिपाठ. ३ कोणेकाची दररोजच्या कर्तव्यांची सरणी. ४ कोणेकाचा वर्तनक्रम. ५ संस्था, पेढी, कारखाना.

इ० तील कामकाजाची सरणी. ६ आंबा, बाभळी, सुरमाड, इ० झाडांची निबिड राई. ७ चिखल; चिखलाचें डबकें.

रहाड, रहाडी स्त्री० १ होळीच्या उत्सवांत ज्या चिखल, राख, इ० च्या खळग्यांत पोरें नाचतात तो. २ जमीन, रस्ता, इ० वरचा चिखल,–ज्यावरून चालतांना पाय निसरतो. ३ चिखल (सामान्यत:). ४ गूळ, कुजकीं फळें किं० भाज्या, यांचा ढीग.

रहाडी स्त्री० कळकाची एक पातळ जात.

रहाण न० १ कोण्या माणसाला वश करून आपल्या बाजूस आणण्यासाठीं भुताला त्याचेकडे पाठविणें हा समारंभ (घालणें, माजविणें). २ मृत मनुष्याबद्दल विलाप करण्याचा कलकलाट.

रहाणी, राहणी, राहाणी [म०रहाणें, राहणें, राहाणें] **स्त्री०** कोणेकाचा राहाण्याचा प्रकार, परिपाठ, शिरस्ता, इ०.

रहाणें, राहणें, राहाणें अ० क्रि० १ मनुष्य, पशु, पदार्थ, इ० नीं विशिष्ट स्थळीं, विशिष्ट स्थितींत, किं०विशिष्ट सरणींत स्थिर होणें किं० असणें;उ०मी हल्लीं पुण्यास राहातों;उ०तो कंजूषपणानें राहातो; उ० गोविंदराव एका वेळच्या जेवणावर राहातात. २ समावणें; समाविष्ट होणें; मावणें; उ० ह्या भांड्यांत शेरभर तूप राहाणार नाहीं.३थांबणें;बंद होणें;बंद पडणें;उ०पाऊस आतां राहिला; उ० माझ्या गळवाचा ठणका राहिला. ४ रहित होणें; तहकूब केलें जाणें; उ० यंदा रामूचें लग्न व्हावयाचें होतें पण तें राहिलें. ५ अपूर्ण किं० अर्धवट स्थितींत टाकलें किं० सोडलें जाणें; उ० तो आल्यामुळें तांदूळ निवडण्याचें माझें काम राहिलें. ६ शिलक किं० शिलकीस पडणें; खर्च न होतां उरणें; उ० पंक्तींत लाडू वाढून पन्नास राहिले; उ० प्रपंच भागवून ठ्यांकेंत घालावयाला या महिन्यास माझ्या पगारांतून बत्तीस रुपये राहिले. ७ कांहीं करण्यापासून निवृत्त किं० पराङ्मुख होणें; उ० तूं त्याला शिवी दिलीस तर तो तुझ्या मुसकटांत चार लगावल्याशिवाय राहाणार नाहीं. ८ कांहीं काम करावयासाठीं नोकर, मदतनीस, किं० सालगार, ह्या नात्यानें कोणेक स्थळीं किं० कोणेकापाशीं असणें; उ० सीताबाई कालपासून आमच्या येथें स्वयंपाकाला राहिल्या. **टीप:–** ' राहाणें ' ह्या क्रियापदाचें कांहीं वाक्प्रचार खाली देतों. **राहून राहून क्रि० वि०** वारंवार; पुन: पुन:;मधून मधून; उ० विसूला राहून राहून वेडाचे झटके येतात; उ० शारदाबाईच्या डोळ्यांना मृत पुत्राबद्दल राहून राहून पाणी येतें; उ०वनभोजनाच्या प्रसंगीं आम्हाला राहून राहून तुमची आठवण होत होती.**टीप–'राहिल'** ह्याचा उद्गारवाचक अव्ययाप्रमाणें संभाषणांत उपयोग केला जातो. त्याचा अर्थ ' बरें तें असो ! ' 'माझें म्हणणें मी परत घेतों ' ' तें आपण सोडून देऊं !' इ०. **राहातां राहाणें** अनेक कामीं खर्च होऊन कांहीं बाकी उरणें. **राहतें घर न०** ज्या घरांत कोणेकाचें वास्तव्य असतें तें,–गांवांतील त्याच्या मालकीचीं असलेलीं जीं इतर घरें त्यांच्या व्यावर्तकत्वें.

रहाळ स्त्री० विशिष्ट प्रांत, परगणा, टापू, मुलूख इ०; उ० पुणें रहाळ, नाशीक रहाळ, रत्नागिरी रहाळ, इ०.

रहाळणें [**म०** रहा, रहाळ] **अ० क्रि०** १ परिचित होणें; घरोब्याच्या संबंधानें कोणेकाशीं जुळणें. २ कांहीं कामांत सफाई मिळविणें किं० वहिवाटणें.

रहाळसाळ, रहाळसहाळ [**म०** रहाळणें +शाळ (शाला)] **वि०** १ चारचौघांत मिसळणें, मोकळ्या मनानें बोलणें, थट्टामस्करी करणें, इ० ज्याला आवडतें असा. २ मोकळ्या मनानें केलेलें (भाषण, संभाषण, वाद, इ०). ३ सभ्य, संभावितपणाचें (वर्तन).

रहित [**सं०**] **वि०** १ सोडलेला; वर्जिलेला; किं० उ० गुणरहित म्ह० गुणांनीं सोडलेला किं० ज्याच्या अंगीं कांहीं गुण नाहींत असा; ह्याच सरणीनें सत्त्वरहित, धैर्यरहित, इ०.२ बंद केलेला; थांबविलेला किं० रद्द केलेला. पुढें ' रहीत ' पहा.

रहिवास [**म०**राहणें+वास] **पु०** वास्तव्य; राहाणें; वसति. ॐ **रहिवासी वि०** कोणेक स्थळीं वसति करून राहणारा.

रहिवासणें[**म०** राहणें+वसणें] **अ० क्रि०** राहाणें;कोणेक स्थळीं वसति;वसति करून असणें.

रहिवासी वि० वर ' रहिवास ' मध्यें पहा.

रहीं [**फा०** राह्=रस्ता] **स्त्री०** मुंग्या इ०ची चालत असलेली रांग; रव; ओळ.

रहीत [**सं०** रहित] **वि०** १ बंद केलेला; थांबविलेला; रद्द केलेला. २ शिल्लक राहिलेला; मागचा पुढें ओढलेला (खर्च, हिशेब, रक्कम,इ०).

रहू पु० पेरण्यासाठीं भिजवून मोड आणलेलें धान्य. पुढें ' रोह ' पहा.

रहोपहो पु० पुढें ' रोहोपोहो ' पहा.

रळफळ स्त्री० १ अव्यवस्था; गोंधळ;घोटाळा; गुंतागुंत. २ अस्वस्थपणा; अशांतता. ३ कुरबुर; तंटाबखेडा; पिरपिर.

रळी स्त्री० १ खेळांत लबाडी किं० खोटेपणा. २ खेळांत चिरडीस जाणें (खाणें, जाणें, घेणें, खेळणें).

रळी स्त्री० १ प्रेमानें किं० लडिवाळपणानें मुलानें किं० कोण्या माणसानें आईबापांशीं किं० दुसऱ्या कोणापाशीं केलेली आग्रहाची विनंती किं० मागणी (घेणे); उ० माझ्या नातीनें जिनगरी बाहुली बद्दल कालपासून रळी घेतली आहे; उ० आईबाप मुलांची रळी पुरवितात; उ० माझ्या पुढें तुझी रळी चालणार नाहीं. २ कुचकें भाषण, वक्रोक्ति, व्याजोक्ति,इ०चा कोणेकावर भडिमार.

रक्षक [**सं०**] **वि०** १ रक्षण करणारा. २ पालक. ३ पहारेकरी. [ठेवणें.

रक्षण [**सं०**] **न०** संभाळणें; संगोपन; जपून

रक्षणें, रक्षिणें [**सं०** रक्ष्] **स० क्रि०** जतन करून ठेवणें; राखणें; शाबूत ठेवणें. ॐ **कोणे-काला रक्षरक्ष होणें** मला बचावा, मला बचावा, असें म्हणण्याइतक्या विपन्नावस्थेस त्याणें येणें.

रक्षा [**सं०**] **स्त्री०** १ रक्षण; जोपासना. २ सुरक्षितपणा. ३ मंत्राचा ताईत. ४ श्रावणी पौर्णिमेला हातांत बांधतात ती राखी. ५ राख; भस्म. ६ लाख. ७ भुतांखेतांच्या निवारणासाठीं मणगटांत बांधतात तो मंतरलेला दोरा किं० ताईत. ८ प्रसूत स्त्री आणि तिचें मूल यांच्या गळ्यांत ईडापीडा टाळण्यासाठीं सहाव्या दिवशीं सटीची पुजा करून तिला वाहून बांधतात ते दोरे. ९ राख; रखेली; ठेविलेली रांड. ॐ **रक्षा-गृह न०** बाळंतिणीची खोली. **रक्षाबंधन न०** श्रावणी पौर्णिमेस हातांत राखी बांधणें हा विधि.

रक्षिक [**सं०**] **पु०** १ पालक. २ पहारेकरी.

रक्षिका स्त्री० १मंत्राचा ताईत.२ रक्षिणारी स्त्री.

रक्षित [**सं०**] **वि०** रक्षिलेलें; संभाळून ठेविलेलें.

रक्षी [**सं०** रक्षिन्] **पु०** १ संरक्षक; पालक. २ पहारेकरी; रखवालदार.

रक्ष्य [**सं०**] **वि०** १ रक्षिण्यास योग्य. २ जें जतन करणें जरूर आहे असें.

राई [**सं०** राजिका=काळी मोहोरी] **स्त्री०** मोहोरी हे बीज,–फोडणी, पोटीस, इ० च्या उपयोगाचें. ॐ **राईचा पर्वत करणें** लहान काम, प्रकरण, गोष्ट, इ० ला मोठें रूप देऊन सांगणें; फुगवून किं० अतिशयोक्ति करून सांगणें.

राई [**सं०** राजि=ओळ] **स्त्री०** आंबे इ० च्या झाडांचा निबिड समुदाय; उ० आंबराई.

राईभोग, रायभोग पु०तांदुळाची एक जात.

राउटी,राहुटी,रावटी स्त्री०प्रवासांत जें तात्पुरतें राहाण्यासाठीं कापडाचें घर उभारतात तें.

राऊत [**स०** राव+दूत] **पु०** १ घोडेस्वार. २ मांग जातीच्या इसमास देतात ती बहुमानाची पदवी; उ० विठू राऊत.

राऊळ [**म०** राव+कुळ] **न०** १ राजवाडा. २ मोठा वाडा. ३ देऊळ. ॐ **देऊळ राऊळ न०** देऊळ इ० पावित्र स्थळ.

राऊळ पु० भैरोबाची सेवा करणारी शूद्रांची एक जाति किं० त्या जातीचा कोणीही इसम. कोष्टयांच्या मागासाठीं ते फण्या, कुंचे, इ० पदार्थ करतात.

राकट, रांकट [**म०** रानवट] **वि०** मजबूत असून कष्ट सोसावयाला समर्थ (माणूस, पशु). ॐ **राकटाई स्त्री०** कष्ट सोसण्याची ताकद.

राख [**सं०** रक्षा] **स्त्री०** गोवरी, लाकूड, कोळसा,इ० जळून गेल्यावर अवशिष्ट राहातो तो त्यांचा पांढुरका अवशेष; भस्म; राखुंडी.राखेच्या गोळ्याला ' ढेपसा ' म्हणतात. ॐ **राखमंडल, राखमंडल न०** १ राखेचा ढिगारा. २ राख इतस्ततः पसलेली असल्यामुळें विशोभित झालेली जागा. **राखरांगोळी स्त्री० ए० व०** नासाडी; पूर्ण विध्वंस; सत्यानाश. **राखवड, राखाड,**

राखाडी स्त्री० १ राखेचा ढीग. २ राखेमुळें विशोभित झालेली जागा. **राखाडी स्त्री०** राख. **राखांदुळी स्त्री०** भुतांखेतांनीं बाळंतिणीच्या खोलींत न यावें म्हणून तिच्या खोलीच्या बाहेर दाराशीं राखेचें भांडें ठेविलेलें असतें तें.

राख [**म०** राखणें] **स्त्री०** पैसे देऊन किं० फुकट कोणेकानें स्वताच्याच उपभोगार्थ ठेविलेली रांड.

राखडी स्त्री० स्त्रियांचा डोकींत घालावयाचा एक दागिना.

राखण [**सं०** रक्ष्; **म०** राखणें] **स्त्री०** १ रक्षण; जतन करण्याची क्रिया; हरएक प्रकारच्या उपद्रवांपासून कांहीं वस्तु, मनुष्य, जनावर, इ० चें संरक्षण करण्याची क्रिया. २ पहारा करावयासाठीं ठेविलेला गडी. ह्या अर्थी **पु०,स्त्री०**.३ पहाऱ्यासाठीं ठेविलेल्या माणसास देतात तो पगार. ४ गांवच्या भुतांखेतांनीं आपणास उपद्रव देऊं नये म्हणून दर महिन्यास किं० दर वर्षास त्यांना नारळ इ० जें अर्पण करतात तें. ५ टोळधाड, पटकी, उंदीर, रोग, इ० कांपासून माणसें, जनावरें, शेतें, इ० ना उपद्रव होऊं नये म्हणून मंत्र, तंत्र, नवस, इ० उपायांनीं बंदोबस्त करतात तो (लावणें, करणें, लागणें). ६ संसारांत अवश्य लागणारे जे पैसे, तांदूळ, इ० पदार्थ त्यांचें थोडथोडे परिमाण,–जें अत्यन्त अडचणीच्या वेळीं मात्र उपयोगांत आणावयाचें म्हणून बाजूस काढून ठेविलेलें असतें तें; उ० माझ्या पेटींत मी राखण म्हणून तीन रुपये ठेवीत असतों; उ० साळूबाई ताह्मणकर हिच्या घरांत पावशेर तूप राखण ठेविलेलें असावयाचेंच; उ०सगळे दाणे खर्चूं नका, घरास राखण म्हणून दोन पायल्या तरी ठेवून द्या. ६ अत्यंत कुरूप म्हातारी,–जिच्या अंगीं घरांतील मुली आणि बायका ह्यांचें भुतांखेतांपासून निवारण करण्याचें सामर्थ्य असतें अशी अडाण्यांची समजूत असते. ❀ **राखण लागणें** लांबणीवर पडणें; उ० तूं आपले सदरे तुकाराम शिंप्याकडे शिवावयास दिले आहेस ना ? आतां सहा महिन्यांची राखण लागली (ह्या० सहा महिने तो तुला सदरे शिवून देणार नाहीं). **राखणकरी, राखणदार, राखणा, राखणेकरी, राखणाईत पु०** १ पहारा करावयास ठेविलेली गडी. २ गुरें राखणारा; गुराखी. **राखणावळ, राखावळ स्त्री०** १ संभाळणें; जतन करणें. २ घर इ० वर देखरेख किं० ह्या देखरेखीबद्दल गड्याला दिलेला पैसा. ३ गुरें ढोरें राखणें किं० ह्या बद्दल दिलेला पैसा. **राखणी स्त्री०** राखणें, संभाळणें, किं० जतन करणें हें काम किं० ह्या कामाबद्दल दिलेला पैसा.

राखणें [**सं०** रक्ष्] **स० क्रि०** १ रक्षिणें; संरक्षिणें; जतन करून ठेवणें. २ न खर्चितां ठेवणें; पूर्णपणें उपयोगांत न आणणें; शिलक ठेवणें; राहूं देणें; उरविणें. ३ अंगांतील शक्ति किं० वादांत आपल्या बाजूचे मुद्दे सगळे एकदम प्रतिपक्ष्याविरुद्ध न योजतां शक्ति आणि कांहीं कांहीं मुद्दे शिल्लक राहूं देणें. ४मारणें,खाणें,चालणें,पिणें,इ० मध्यें अतिरेक न करणें; उ० हात राखून मुलाला मारावें. ५ हौसेसाठीं (कल्ले, मिशा, शेंडी, मुलांचीं झुलपें,घेरा,इ०)विशिष्ट आकारांत ठेवणें. ६संभाळणें;जोपासणें;उ०राखील त्याचें घर आणि खपेल त्याचें शेत. ७ (रखेली किं० जार) पैसे देऊन किं० फुकट उपभोगार्थ ठेवणें. ८ संकल्पांत, योजनेंत, किं० बेतांत समाविष्ट करणें; उ० ही भिंत इतकी रुंद राखण्याचें कांहीं कारण नव्हतें; उ० हा अंगरखा तूं घेरांत फार राखलास म्हणून बाह्या तोकड्या झाल्या. ❀ **राखणावळ,राखणेकरी** इ० मागें ' राखण ' मध्यें पहा.

राखले [**म०** राखणें; **गुजराथी** राखले] **स्त्री०** हुंडी विकत घेणाराची पत, ऐपत, स्थिति, लौकिक, इ०; उ० त्या हुंडीमध्यें माझी राखले घातली होती.

राखी [**सं०** रक्षा] **स्त्री०** श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं हातांत बांधतात दोरा. मागें ' रक्षा ' पहा. ❀ **राखीपाडवा पु०, राखी प्रतिपदा स्त्री०** श्रावणी पौर्णिमेच्या पुढची तिथि. **राखी पुनव, राखी पौर्णिमा स्त्री०** श्रावण महिन्यांतील पौर्णिमा.

राखील [**म०** राखणें] **वि०** १ ठेविलेलें किं० बाळगलेलें (माकड, राघू, कुत्रा, इ०); बाळगलेला २ बाळगिलेली (रांड, रखेली);

(चार). स्त्री० गुरें चारण्याबद्दल गुराख्यास दिलेलें द्रव्य.

राखीसमुख [**सं०** राक्षस+संमुख] **स्त्री०, न०** राक्षसाची दिशा,–म्हणजे दक्षिण दिशा (अशिक्षितांत). **क्रि० वि०** दक्षिणेकडे (अशि-तांत). ह्याच अर्थी ' राखेस मोहरा ' हा शब्द अशिक्षितांत आहे. गंगामोहरा (–री),गंगामोहरा (–री) **क्रि० वि०** गोदावरीकडे **म्ह०** उत्तर दिशेस. गोदावरी आणि कृष्णा ह्या नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशांत ह्या सर्व शब्दांची रूढि अशिक्षितांत आहे. **राखेसमोहरा** (–री) **क्रि० वि०** दक्षिण दिशेकडे.

राखुंडा, राखोंडा [**म०** राख+उंडा(गोळा)] **पु०** १ राखेचा ढीग. २राख टाकावयाचा खळगा.

राखुंडा वि० १ जन्मतः ज्याचा वरचा ओठ चिरलेला आहे असा (माणूस). २ मिशा यावयाचें वय झालेलें असून ज्याला मिशा आलेल्या नाहींत असा (पुरुष).

राखुंडी, राखोंडी [**सं०** रक्षा; **म०** राख+उंडी] **स्त्री०** १ गोवरी जळून तांबडी लाल झाली असतां तीं पाण्यानें विझविली म्हणजे जो गोटा किं० खडा होतो तो. हिचें चूर्ण दांत घासावयास घेतात. २ (**लाक्षणिक**) जळून काळा झालेला भात, भाकरी, इ० खाद्य.

राखूळ [**म०**राखणें] **स्त्री०** गुरें चरणीसाठीं गुराख्याकडे पाठविणें किं० त्याबद्दल द्यावयाचा पैसा.

राखोंडा पु० वर ' राखुंडा ' पहा.

राखोंडा, राखोडा [**म०** राख] **वि०** राखे-सारखी किं० रूक्ष, दिसूळ (जमीन, मुरूम, इ०).

राखोंडा, रावखंडा वि० जेथें जो भाग, अवयव, पदार्थ, किं० संस्कार असावयास किं० व्हावयास पाहिजे तेथें तो नसल्यानें किं० न केला गेल्याकारणानें येते ती विरूपता किं० येतो विशोभितपणा; बांगड्यावांचून स्त्रियांचें मणगट, कौलावांचून छप्पर, मिशांवाचून ओठ, इ०.

राखोंडी स्त्री० वर ' राखुंडी ' पहा.

राखांडें, रावखंडें न० १ जन्मतः विदीर्ण असा ओठ. २ जेथें जो पदार्थ असावयाचा तेथें तो सर्व भागीं नसल्याकारणानें होतो तो विशोभितपणा; उ० सारें माजघर सारवून शेण पुरलें नाहीं म्हणून हा कोपरा तसाच राहूं दिला त्यामुळें रावखंडें दिसतें; उ० सारें कौलारूं शाकारून कौलें कमी आलीं म्हणून चार रांगा शाकारणी न होतां तशाच राहिल्या म्हणून राखोंडें दिसतें.

राखोळ, राखोळी [**म०** राखणें] **स्त्री०** चरावयास गुरें पाठविणें किं० ह्या कामाबद्दल गुराख्याला जें देय देतात तें. वर ' राखूळ ' पहा.

राखोळा [**म०** राखणें] **पु०** पाठराखणीस पाठविलेला मनुष्य. मागें ' पाठ ' मध्यें ' पाठ-राखणा ' पहा.

राखोळा वि० ज्याच्या ओठांत जन्मापासून कांहीं ऐब आहे असा.

राख्या [**म०** राखणें] **पु०** स्त्रीनें विषय-वासनेच्या तृप्तीसाठीं बाळगलेला पुरुष.

राग [**सं०**] **पु०** १ रंग देणें. २ रंग; पदा-र्थास तांबडा, पिवळा, इ० रंग देण्याचें कांहीं द्रव्य,–केशर, हळकुंड, इ०. ३ अंगावर केशर इ० ची उटी. ४ तांबडा रंग. ५ तांबडेपणा. ६ आसक्ति; प्रेम; अनुराग. ७ क्रोध; कोप. ८ मत्सर. ९ सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांपैकीं रज हा गुण. १० (**संगीत**) षड्ज, ऋषभ, गंधार,मल्हार,पंचम,धैवत,आणि निषाद,हे जे सप्त स्वर त्यांची परस्परांच्या सापेक्षत्वानें कर्णमधुर रचना. ॐ **रागास येणें** (किं० **चढणें, भरणें, पेटणें**) रागावणें; क्रोधाविष्ट होणें. **एकाद्याला राग आणणें** त्याला कोपविणें; त्याला खिन्न-विणें. **राग गिळणें** अतिशय राग आलेला असतां तो प्रयत्नानें आवरून धरणें. **एकाद्याचा राग करणें** तो दृष्टीस पडला किं० त्याची गोष्ट निघाली म्हणजे रागावणें; त्याच्या संबंधानें कंटाळा दाखविणें. **कोणेकाच्या नाकावर राग असणें** (किं० **ठेविलेला असणें**) क्षुल्लक कार-णावरून रागावण्याकडे त्याची प्रवृत्ति असणें; जरा कांहीं कारण झालें कीं तो रागावत असणें. **कोणेकाचा कोणेकाला राग येणें** कांहीं कार-णावरून तो त्याच्यावर रागावणें. **कोणेकाला रागें भरणें** कठोर शब्दांनीं त्याला ताडन करणें,–त्याच्या कांहीं कृत्याबद्दल आपली

नापसंती दर्शविण्यासाठीं. **रागें भरून घेणें** १ दुसऱ्याला आपला राग येईल असें कांहीं करणें. २ कोणेकाविरुद्ध आपला राग येथेच्छ प्रकट करून सोडणें. **रागाच्या हातीं देणे** रागाच्या लहरींत कांहीं वस्तु अनादरणें किं० टाकून देणें. **कोणकाचा राग मानणे** त्याच्यावर रागावणें. **रागानें कोणेकानें हिरवें पिवळें होणें** परमावधीच्या रागाची मुद्रा त्याच्या तोंडावर दिसणें. **अति रागा भिक मागा** ज्याला अतिशय राग येतो त्याला भिक्षा मागण्याची पाळी येते; फार रागिटपणानें आपलें नुकसान होतें. **राग खाई आपणास आणि संतोष खाई दुसऱ्यास** रागानें आपलें नुकसान होतें आणि आपल्या शांतवृत्तीनें दुसरा मनुष्य आपणावर प्रेम करतो (किं० आपणाला अनुकूल किं० वश होतो).

रागमाला, रागमालिका, रागमाळा, रागमाळिका स्त्री० १ अनेक रागांचे थोडथोडे अंश घेऊन केलेला असतो जो गीतविशेष तो. २ असलें गाणें ज्याला किल्ली दिल्यानें किं०जें फिरविल्यानें ऐकाविलें जातें असें एक यंत्र. **रागरंग पु० ए० व०** मागें ' रंग ' मध्यें पहा. **रागिणी स्त्री०** १ (**संगीतांत**) रागाचा गौणभेद; गायनांतील मिश्ररांग किं० पोटराग. २ अनुरक्त जारिणी. **रागिष्ट, रागीट वि०** १ क्षुल्लक कारणांवरून फार कोपणारा. २ अत्यंत तीव्र कोप ज्याला येतो असा. **रागी [स०रागिन्] वि०**१ रंगलेलें. २ रागद्वेषांनीं युक्त. ३ आसक्त. ४ कामुक. ५ रांडबाज. **रागीसांडी वि०** विषयासक्त.

रांग स्त्री० पंक्ति; ओळ; मालिका; हारी.

रांगडा [हिं०] पु० १ गुजराथ आणि मेवाड ह्यांच्या दरम्यानचा देश किं० तेथील रहिवासी. २ (**लाक्षणिक**) रासवट, असभ्य, किं० अडाणी चालीरीतींचा मनुष्य.

रांगण न० कुंभाराच्या भट्टींतील राख.

रांगणी स्त्री० जीवर मध्यापासून कडेपर्यंत खोल खोल रेघा आहेत अशी निमगोल शिंप. वसंतपूजेच्या प्रसंगीं ब्राह्मणांच्या हातांवर गंध चोपडून ह्या शिंपीनें रेघा करतात.

रांगणें [सं० रिंग्=रांगणें] अ०क्रि०(लहान मुलानें) गुडघे आणि हात यांवर भार घालून सरकत जाणें.

रागवणें, रागावणें [म० राग] अ० क्रि० कोपणें; संतापणें; ०ला राग येणें.

रांगसारांगृस [म० रांगणें] स्त्री० एकादें चिरकाळच्या परिचयानें प्रिय असलेलें स्थळ सोडून जाण्याचा प्रसंग आला असतां खोट्या सबबी पुढें करून मनुष्यानें तेथेंच रेंगाळत किं० घोटाळत राहाणें.

रांगा पु० समुद्राच्या ज्या प्रदेशांत विशिष्ट समयीं कोणत्याच दिशेकडून वारा वाहात नाहीं तें.

रागी स्त्री० नाचणा किं० नाचणी ज्याला म्हणतात तें धान्य.

रागेणें, रागेजणें [म० राग] अ० क्रि० रागावणें; संतापणें; चरफडणें.

रांगोळी [सं० रंग+वल्ली (किं० आवलि)] स्त्री० १ शिरगोळ्याचें किं० कुपा दगडाचें चूर्ण. २ ह्या चूर्णानें जमीनीवर काढलेले पट्टे किं० आकृति समुच्चयानें. ३ भाताचीं टरफलें जाळून पांढरी पूड अर्थ २ च्या आकृति काढण्यासाठीं योजतात ती.‡ **रांगोळें न०** अर्थ १ आणि ३ चें चूर्ण छिद्रांतून गळण्यासाठीं ज्या नळकांड्यांत जमीनीवर पट्टे ओढतांना भरतात तें नळकांडें.

राघव [सं०] पु० १ एक महामत्स्यविशेष. राघव आणि तिमिंगिल हे दोन मासे एकमेकांना पकडण्यासाठीं एकमेकांच्या पाठीस लागलेले असून सर्व पृथ्वी भोंवतीं ते फेऱ्या करीत असतात आणि त्यांची गांठ पडेल तेव्हां ही पृथ्वी उलथून तिचा नाश व्हावयाचा आहे अशी अडाण्यांची समजूत आहे. २ सूर्यवंशाच्या रघूच्या कुळांतील कोणीही पुरुष,–विशेषतः रामचंद्र. ३ समुद्र,–ज्याला रघुवंशीय राजांनीं एवढें विस्तीर्ण रूप दिलें.

रांघळणें स० क्रि० (कांहीं पदार्थ) ओढीत किं०फरपटीत नेणें.

राघावळ स्त्री० १ निळीची एक जात. २ एक प्रकारचें तांबड्या रंगाचें लुगडें. ह्या अर्थी ' राजावळ ' सुद्धां. ‡ **राघावळी वि०** १ राघा-

वळ ह्या जातीच्या निळीनें रंगविलेलें (लुगडें, इ० वस्त्र). २ राघावळ ह्या रंगाचें.

राघावळी स्त्री० घोड्याच्या पाठीवर घालतात ती जाळीदार झालर.

राघू, राघो पु० १ पोपट हा पक्षी. २ हदग्याच्या फुलांतील हिरव्या रंगाचा केशर. ३ (शृंगारी लावणींत) नायक; प्रियकर.

रांघोडा पु० कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर पैसा किं० पैशाच्या रूपानें व्याज न देतां त्या पैशाच्या किमतीचा ऊस, धान्य, म्हशींचें दूध, इ० देणें किं० ही देण्याची चाल; उ० बाजरी राघोडा कबूल करून मी सावकाराचे पंचवीस रुपये घेतले आहेत. मागें ' काढा ' पहा.

राजअंबीर [**म०** राजा+**अ०** अंबीर, अमीर (थोर सरदार)] **पु०** १ गंभीर स्वभावाचा नायक (लावणी, पोवाडा, इ० तील शब्द). २ भव्य, विशाल, झोकदार (माणूस, देश, वर्तन, पोशाख, इ०).

राजकडी स्त्री० एक प्रकारचें कर्णभूषण.

राजकारण [**सं०** राजन्+कारण] **न०** पुढें ' राजन् ' मध्यें पहा.

राजकी [**सं०**राजन्] **वि०** १ राजासंबंधाचें किं० राज्यासंबंधाचें. २ जुलमी. देवकी म्ह० प्रजेचें हित करण्याच्या बुद्धीनें केलेला किं० चालविलेला.

राजकीय [**सं०** राजन्] **वि०** १ राजासंबंधाचा. २ राज्यसरणीसंबंधाचा;राज्यव्यवस्थेंतील.

राजकेळ (–ळी) स्त्री० एक प्रकारची केळ. राजकेळें **न०** ह्या केळीचें फळ किं० केळें.

राजगादी [**स०** राजन्+**म०**गादी] **स्त्री०** राजाचें सिंहासन. [वांज.

राजगिरा पु० एक तृणविशेष किं० त्याचें

राजगोंड स्त्री० शहरांतील किं० गांवांतील मोठा रस्ता.

राजगोंडा पु० पालखीच्या दांड्याला लोंबत सोडलेला आणि बसणाऱ्यानें हातांत धरावयाचा गोंडा.

राजघोस स्त्री० देवी इ० त्वग्रोगावर ज्याच्या पानांचा काढा देतात असा एक वेल.

राजघोळ स्त्री०घोळ नांवाच्या शाकभाजीची एक जात.

राजटिटवी स्त्री० पिवळ्या रंगाची एका जातीची टिटवी. [पात्र.

रांजण पु० मातीचें उभ्या आकाराचें एक

राजण, रांजण (–णी) [**सं०** राजादन] **स्त्री०**पियाल,चार,किं०खिरणी ह्या नांवाचें झाड.

राजण, रांजण (–णी) स्त्री० निल्याचे ओयऱ्याचे तांदूळ ज्या मडक्यांत ठेविलेले असतात तें मडकें. ओयरा काढणें, भरणे इ० प्रयोगांत मात्र ह्याचा उपयोग होतो. मागें ' ओयरा ' पहा.

रांजणवाडी, रांङ्गणवाडी स्त्री० उष्णानें डोळ्याच्या पापणीस येते ती पुटकुळी.

रांजणी [**म०** रांजण] **स्त्री०** १ आकारविशेषाचा मातीचा डेरा. २ रोजच्या उपयोगासाठीं घ्यावयाचे तांदूळ ठेवण्याचा डेरा. मागें ' रांजण, ' ' रांजणी ' पहा.

राजणें [**सं०** राज्] **अ० क्रि०** शोभणें; सुंदर, भव्य, किं० थाटदार दिसणे (कवितेंत).

राजतुरा पु० एक फुलझाड.

राजदरबार [**सं०** राजन्+ **फा०** दरबार] **पु०** न्याय, अन्याय, खंडदंड, इ० चा विचार करण्याची राजा आणि त्याचे सल्लागार यांची जागा.

राजन्य [**सं०**] **पु०** १ क्षत्रिय. २ राजपुत्र.

:**राजपसंत (–द)** [**सं०** राजन्; **म०** राजा; **फा०** पसंत] **वि०** राजाला आवडेल असें म्ह० अत्युत्तम, सर्वोत्कृष्ट, किं० श्रेष्ठ दर्जाचें.

राजपिंडा (–बिंडा) [**सं०** राजन्+पिंड] **वि०** सुंदर, देखणा (माणूस).

राजबनसी [**सं०**राजन्+वंश+ई (प्रत्यय); राजवंशी] **वि०** १ राजाच्या वंशांतील.२वरिष्ठ दर्जाचा किं० योग्यतेचा.

राजबाबती [**सं०** राजन्; **म०** राजा; **अ०** बाब्] **स्त्री०** चौथ ह्या कराचा राजाचा भाग.

राजबीध [**सं०** राजन्+वीथि (रस्ता)] **स्त्री०** शहरांतील मोठा रस्ता.

राजमोहरा [**सं०** राजन्; **म०** राजा; **फा०** मुहरा] **पु०** १ फार शाहाणा, धूर्त, शूर, किं० विद्वान् माणूस. २ अप्रतिम सुंदर आणि गोंडस माणूस.

राजरा [म० राजेश्वरी]**स्त्री०अ०व०**देवीच्या ज्या सात मूर्ति एका तबकांत घालून देवीच्या संबंधाचा विधि करतात त्या.

राजरुशी, राजरोशी खालीं 'राजरोस'मध्यें पहा.

राजरूस, राजरोस, राजरोश (-ष) [फा० रोज़इ रोशन्] **क्रि० वि०** उघडपणें; संकोच किं० भीति न धरतां. ॐ **राजरुशी, राजरोशी (-षी) स्त्री०** उघडपणा; अनियंत्रितपणा; मोकळीक.

राजलव्हा पु० उथळ पाण्यांत चालून भक्ष्य मिळविणारा एक पक्षी.

राजवटा पु०, राजवट (-टी) स्त्री० [म० राज्य + वाट] **स्त्री०** १ कोणेकाचा अमल, व्यवस्था, किं० कारकीर्द. २ कोणेकाच्या वैभवाचा काल. ३ चाल; रीति; परिपाठ; क्रम.

राजवटा [म० राजा+वाट] **पु०** राजमार्ग; रहदारीचा रस्ता.

राजस [**सं०**] **वि०** १ रजोगुणानें युक्त; रजोगुण ज्यांत फार असा. २ विषयासक्त. ३ सुकुमार असून सुंदर. ॐ **राजसवाणा वि०** सुंदर आणि गोंडस.

राजसी [म० राजा + सा, असा] **वि०** भव्य; डौलदार. ॐ **राजसी उपचार पु०** सौम्य औषध.

राजहंबीर मागें ' राजअंबीर ' पहा.

राजा [**सं०**राजन्] **पु०** १ एकाद्या देशाचा अधिपति किं०सत्ताधारी. २ एका विशिष्ट गुणानें श्रेष्ठ असा माणूस किं० पदार्थ; उ० आम्हाला जो नोकर मिळतो तो आळशांचा राजा मिळतो. ३ ज्याला कोणी बोलणारा, नियंत्रिणारा, किं० जबाबदार धरणारा नाहीं असा माणूस; उ० मी हालांत दिवस काढतों, तूं राजा आहेस. ४ ज्या ग्रहाचे वारीं संवत्सर प्रतिपदा पडते तो ग्रह त्या संवत्सराचा. ५ एकाद्या संस्थेचीं सूत्रें ज्याच्या हातीं असतात तो त्या संस्थेचा राजा; कोणत्याही कारभाराचा मुख्य चालक. ६ एकाद्या घटनेंतील महत्त्वाचा अवयव किं० अंश. **टीप,**– ' राजा ' हा शब्द संस्कृत समासांत पूर्व पद किं० अन्त्य पद असतां तो ' राज ' हें रूप धारण करतो. असे सामासिक शब्द जे मराठींत संस्कृतांतून आले आहेत ते पुढें देतों. ॐ**राजाधिराज, राजेंद्र पु०** सार्वभौम राजा. **राजाधिष्ठान न०** राजाची राजधानी. **राजाहि पु०** दुतोंडें. **राजर्षि पु०** तपस्वी क्षत्रिय. **राजकार्य न०** राज्याचा कारभार. **राजकुल न०** १ राजघराणें. २ राजाचा दरबार. ३ न्यायमंदिर. ४ राजवाडा. **राजगुह्य न०** अत्यन्त श्रेष्ठ गुह्य किं० रहस्य. **राजचिन्ह न०** १ राजाचें छत्र, चामर, इ०. २ चलनी नाण्यावरील शिक्का. **राजदंत पु०** वरच्या कवळींतील पुढचे दोन दांत प्रत्येक. **राजदूत पु०** राजाचा वकील. **राजदेय न०** राजाला उत्पन्नांतील द्यावयाचा हिस्सा;कर.**राजदौवारिक पु०** १द्वारपाल.२ राजदूत. **राजधान,राजधानक न० राजधानी, राजधानिका स्त्री०** राजाचें राज्यकारभार पहावयाचें किं० राहावयाचें शहर. **राजधान्य न०** राजभोग; सावा. **राजधुरा स्त्री०** १ राज्यकारभार. २ राज्याची जबाबदारी. **राजनीति स्त्री०**राजव्यवहाराचें शास्त्र.**राजनील न०** पाचमणि. **राजपत्नी स्त्री०** राणी. **राजपथ पु०** १ राजमार्ग. २ हमरस्ता; रहदारीचा रस्ता. ३जी सरणी साधी किं०ज्या सरणीनें वागलें असतां किं० कांहीं काम केलें असतां कोणी आपणास रागें भरणार नाहीं किं० आपणास कांहीं अडथळे येणार नाहींत अशी सरणी. **राजपुत्र पु०** १ राजाचा मुलगा. २ क्षत्रिय. ३ (**ज्योतिष**) बुध हा ग्रह. **राजपुत्री स्त्री०** राजाची मुलगी. **राजभृत्य, राजसेवक, राजपुरुष पु०** राजानें कांहीं कामीं अधिकार ज्याला दिला आहे असा. **राजमार्ग पु०** १ चाळीस हात रुंदीचा रस्ता.२सोपा मार्ग. ३ज्यांत कांहीं अडचण नाहीं किं०जो अनुसरला असतां कोणी आपणास निंदिणार नाहीं अशी सरणी,उपाय, वर्तन,इ०. वर'राजपथ' पहा. **राजयक्ष्मा** [**सं०** राजयक्ष्मन्] **पु०**क्षयरोग. **राजयोग पु०** (**ज्योतिष**) १ राज्यपद मिळवून देणारा पत्रिकेंतील ग्रहयोग. २ ईश्वरध्यानाचा एक प्रकार. **राजराज पु०** १ कुबेर. २ सार्वभौम राजा. **राजशास्त्र न०** राजनीति; राजकारण. **राजश्री स्त्री०** १ राजाचें वैभव. २ राजाच्या वैभवानें युक्त असा पुरुष.३ विचित्र, तऱ्हेवाईक, किं० छांदिष्ट माणूस (सलगीनें). ४ कोणीही

पुरुष, मुलगा, किं० गृहस्थ (थट्टेंत किं० उपहासांत). **राजश्रिया विराजित**[**सं०**]**वि०** राजाच्या वैभवानें संपन्न,–पत्राच्या सुरवातीस लिहावयाच्या मायन्यांत हे शब्द योजतात. **राजसूय पु०** सार्वभौम राजानें करावयाचा यज्ञ. **राजहंस पु०** अंग शुभ्र असून चोंच आणि पाय तांबडे ज्याचे असा हंस. **तीर्थराज पु०** श्रेष्ठ तीर्थ. **मृगराज पु०** सिंह. **राजांगण न०**१श्रीमंत लोकांच्या घरापुढें जें मोठें आणि मोकळें पटांगण असतें तें. २ चौसोपी घरांत मधोमध असतें तें अंगण. ह्या अर्थी 'राजांगणें' सुद्धां. **राजाभिषेक पु०** राजाला राजपदीं बसविण्याचा विधि. **राजाज्ञा स्त्री०** १ राजानें चालू केलेला हुकूम. २ राजानें कोणेकास केलेला हुकूम. ३ (**लाक्षणिक**) अनुल्लंघनीय असें जें विधिवचन तें. **पु०** राजाच्या अष्ट प्रधानांव्यतिरिक्त जो प्रधान तो. **राजावर्त पु०** हलक्या जातीचा हिरा. **राजतेज न०** चेहऱ्याचा भव्यपणा किं० तेजस्वीपणा. **राजत्व न०** राजाचा अधिकार, वैभव, किं० स्थिति. **राजपंचक न०** पांच अशुभ मुहूर्तांपैकीं एक. चौरपंचक, अग्निपंचक, मृत्युपंचक, राजपंचक, आणि हानिपंचक, हे पांच अशुभ मुहूर्त फलज्योतिषांत सांगितले आहेत. यांत अनुक्रमें चोरांपासून, अग्नीपासून, मृत्यूपासून, राजापासून, आणि पाऊस, टोळ, कोल्हे, इ० प्राण्यांपासून हानि होते. मागें ' चौरपंचक ' पहा. **राजेरजवाडे पु० अ० व०** राजे, सरदार, संस्थानिक, इ०.

राजाळू न० अळवाची एक जात.

राजि, राजी [**सं०**]**स्त्री०** पंक्ति; ओळ; रांग; हारी.

राजी [**अ०** राझी] **वि०** १ कबूल; मान्य; पसंत. २ खूष; आनंदित. **राजीबिराजी स्त्री०** १ सुखदुःखाची स्थिति. २ संकट. **राजीनामा पु०** १ कबुलायत; कैफीयत. २ वेत करारपत्र. ३ आपल्या खुषीनें नोकरी सोडणें (देणें, गुदरणें). **राजीरजावंतीनें, राजीखुषीनें क्रि० वि०** पूर्ण संमतीनें; आपल्या स्वताच्या ईच्छेनें; दुसऱ्याची सक्ती नसतां (खतें, दस्तऐवज, इ० त येणारा ह्या शब्द आहे).

राजीक [**म०** राजा] **न०** १ राजानें रयतेवर केलेला जुलूम, अन्याय, इ०. देवीक **न०** देवांच्या अवकृपेपासून झालेली हानि. २ परचक्रापासून झालेली हानि. ३ राजाची शासनपद्धति.

राजील, राजिल[**सं०**] **पु०**सर्पविशेष; दुतोंडें.

राजीव [**सं०**] **पु०, न०** १ मत्स्यविशेष. २ सारस पक्षी. **न०** कमळ. ॐ **राजीवनयना स्त्री०** कमळासारखे डोळे आहेत जिचे अशी स्त्री.

राजू [**सं०** रज्जु] **स्त्री०** दोरी, चऱ्हाट.

राजेळ, राजेळी स्त्री० केळीची एक जात. **राजेळें न०** ह्या केळीचें फळ किं० केळें.

राज्य [**सं०**] **न०** १ शासनपद्धति. २ विशिष्ट लोकसमाजाला नियंत्रणांत ठेवण्याची सरणी; उ० प्रजासत्ताक राज्य, एका राजाचें राज्य,इ०.३ आपल्याच देशाच्या लोकांच्या अनुमतीनें, मुख्यत्वें आपल्याच देशाच्या लोकांच्या कल्याणासाठीं स्थापण्यांत आलेली शासनपद्धति. अशा शासनपद्धतीला ' स्वराज्य ' म्हणतात; उ० स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. ४ देश. ५ वर्चस्व; स्वामित्व; कोणेकाचा वैभवकाल. ६ कांहीं प्रचार, चाल, इ० ची अबाधित रहाटी. ॐ **राज्यक्रान्ति स्त्री०** एक शासनसरणी एकदम उलटून तिच्या जागीं दुसरी स्थापित होणें. **राज्यांग न०** राजा, प्रधान, मित्र, खजिना, देश, किल्ला, आणि सैन्य, ह्या सात गोष्टी प्रत्येक. **राज्यतंत्र न०, राज्यधुरा स्त्री०** राज्य चालविण्याची जबाबदारी; राज्यकारभार. **राज्याभिषेक पु०** सिंहासनावर राजाला केलेला अभिषेक. **राज्यासन न०** सिंहासन. **राज्योपचार पु०** सरकारी अधिकाऱ्याचें कृत्य.

रांझण न० आकारविशेषाचें मातीचें भांडें.

रांझण, रांझणवाडी, रांझणी स्त्री० उष्ण विकृतिमुळें डोळ्याच्या पापणीवर येते ती पुटकुळी.

राट मागें ' रहाट ' पहा.

राठ वि० टणक; कणखर; स्पर्शेंद्रियाला खरखरीत. मृदु, कोंमल, नाजूक, मऊ, याच्या उलट.

राड स्त्री० १ चिखल. २ होळीच्या उत्सवांत चिखलाची खळी करतात ती. ३ गढूळ म्ह० केरकचरा ज्यांत पडला आहे असें (पाणी).

रांड [सं० रंडा] **स्त्री०** १ विधवा (ग्राम्यांच्या भाषेंत). २ पैसे मिळविण्यासाठा देहविक्रय करणारी स्त्री; वेश्या. ३स्त्री(शिवी देतांना).४(**लाक्षणिक**) पुचाट किं०कर्तृत्वशून्य असा माणूस. ५ दासी. ६ नासलेला, कुजलेला, किं० सडलेला कोणताही पदार्थ; उ० यंदा शेतें चांगलीं पिकलीं होतीं पण बांध फुटल्यामुळें आंत पाणी शिरून सारी राड झाली. ॰**रांडेहून रांड स्त्री०** १अत्यन्त पुचाट किं० नेभळा माणूस. २ अत्यंत भितरा माणूस. **रांडकारभार पु०, रांडअमल न०** १ घरांत किं० संसारांत पुरुषाला कोणी विचारीत नाहीं आणि स्त्रियांच्याच इच्छेने सर्व गोष्टी चालतात अशी सरणी. २ नांवाचा राजा असून पुढारलेले लोक किं० मंत्री यांच्याच तंत्रानें चाललेली शासनपद्धति. **रांडक वि०** वैधव्य पावलेली(स्त्री). **रांडका पु०**ज्याची बायको मेली असा पुरुष; विधुर, (अशिक्षितांत रूढि). **रांडकी, रंडकी स्त्री०** विधवा (तुच्छतेनें किं०अनुकंपेनें). **रांडखांड स्त्री०** भांडतांना अडाणी स्त्रिया एकमेकांना हा शब्द शिवी म्हणून योजतात. **रांडगळा पु०** पुरुषाचा बायकी आवाज. **रांडगा वि०**रांडबाज(पुरुष). **रांडगांठ स्त्री०** मागें 'पुरुष' मध्यें 'पुरुषगांठ,' 'बाईलगांठ,' 'रांडगांठ,' हे शब्द पहा. **रांडगाणें, रांडगाऱ्हाणें न०** नामर्दपणाची पिरपिर किं० तकरार (गाणें, सांगणें). **रांडतगादा पु०** सौम्यपणाचा तगादा (कुणब्यांच्या भाषेंत). असा तगादा करणाऱ्या शिपायाला कुणबी लोक 'पिठ्या शिपायी' म्हणतात. लाथाबुक्या मारून तगादा करणाराला ते 'कणक्या शिपायी' म्हणतात. **रांडपाटा पु०** वैधव्य (कपाळीं येणें,मिळणें, भोगणें, इ०).**रांडपिसा,रांडबाज वि०** रांडांच्या नादीं लागलेला. **रांडपिसें न०** रांडबाजी. **रांडपोर न० ए० व०** १ गांवांतलि दरोबस्त लोक,–पुरुष, स्त्रिया, पोरें; उ०ह्या दिंडींत गांवांतील रांडपोर सामील झालें होतें. २ आपली बायको आणि मुलें ह्यांचा समुच्चय; उ० मी एकटा कोठेंही राहीन पण माझ्या मागें रांडपोरांचें लचांड आहे. ३ रांडेचें किं० विधवेचें अपत्य. ४ आपल्या रखेलीचें अपत्य. **रांडभांड स्त्री०** विधवा (अशिक्षितांत). **रांडभांडण न०** १ बायकाबायकांचें भांडण. २ भिकार, क्षुल्लक, किं० नुकसानीची बाबत किं० काम. **रांडभाषण न०** नामर्दपणाचें भाषण. **रांडमस्ती स्त्री०** १ पति मेल्यानंतर नियंत्रणेंत ठेवणारें मनुष्य कोणी नसल्यानें स्त्रीस येते ती धमकदारी, काटकपणा, अरेरावी, किं० मगरूरी. २ नियंता कोणी नसल्यानें मुलांच्या अंगांत येतो तो उमटपणा, किं० असभ्यपणा. **रांडमाणूस न०** स्त्री,–जी दुर्बल असते (अनुकंपेंत). २ कर्तृत्वहीन माणूस. **रांडमामी स्त्री०** विधवा (अनुकंपेंत). **रांडमांस न०** कांहीं काम न करतां बसून राहिल्याकारणानें किं० जबाबदारी न वाहावी लागल्याकारणानें अंगावर जो लट्ठपणा येतो तो. **रांडमुंड स्त्री०** वपन झालेली विधवा (शिवी देतांना किं० अनुकंपेत).**रांडरंडी स्त्री०** १ विधवा.२ गांवांतलि पुरुष, स्त्रिया, पोरें, समुच्चयानें; गांवांतील कोणीही माणूस न वगळतां सर्व. **रांडरागोळी स्त्री०** रांडबाजी. **रांडरूं न०** १ रांड (तुच्छतेंत).२ विधवा (तुच्छतेंत). ३ कोणीही स्त्री (शिवी देतांना). **रांडरोट (–टा) पु०** स्त्रीस वैधव्य आलें असतां तिच्या चरितार्थासाठीं जे पैसे तिच्या नांवानें ठेविलेले असतात ते.**रांडलेक पु०** कोणीही पुरुष (शिवीत). **रांडव वि०** १ वैधव्य पावलेली (स्त्री). २ज्याची बायको मेली आहे असा (पुरुष). **रांडवडा पु०** १ ज्या घरांत बायकांचें प्राबल्य असतें असें घर (निंदेंत). २ रांड्या, रांडा, इ० शिव्या भरपूर देऊन चालविलेलें भांडण. **रांडवला पु०** वर 'रांडवडा' द्वितीयार्थी पहा. **रांडवाटा पु०** वैधव्य हा प्राप्त झालेला भोग (येणें). **रांडव्यसन न०** रांडांच्या नादीं लागणें हा दुर्गुण. **रांडसांड स्त्री०** विधवा (तुच्छतेंत किं० अनुकंपेंत). **रांडसांध स्त्री०** विधवा स्त्री घरांत एकीकडे ज्या सांधींत म्ह० कोपऱ्यांत बसते तो कोपरा. **रांडसांधीस बसणें** पुरुषाला योग्य जीं कर्तव्यें (व्यापार, शेतकी, विद्या, इ०) तीं न करतां बायकांप्रमाणें घरांत बसून काळ घालविणाऱ्या पुरुषाला ह्या वाक्प्रचारानें निर्भर्त्सितात. **रांडापोरें न० अ० व०** १ समाजांतील हीन,

दनि, दुबळीं अशीं माणसें. २ पैसा न मिळविणारीं माणसें,—ज्यांची काळजी कर्त्या पुरुषानें करावयाची असते. **रांडारोंटा पु०** अनाथ स्त्रिया किं० विधवा ह्यांना दळण कांडण, धुणीं, पाणी भरणें, इ० करावीं लागतात तीं घरांतील हलकीं कामें समुच्चयानें. **रांडोळी स्त्री०** विधवा (अनुकंपेंत). **रांड्या वि० १** बायकांत मिसळणारा पुरुष. २ स्त्रीलंपट. ३ नामर्द (पुरुष). ४स्वस्त्रीलंपट; जो आपल्या बायकोच्या तंत्रानें चालतो असा (पुरुष). **रांड्याराघोजी पु०** वर ' रांड्या ' अर्थ १ पहा. **रांड्यारावजी आणि बोडक्या भावजी, रांडेराघोजी आणि बोडके भावजी पु०** बायकांत मिसळून त्यांच्याशीं गप्पा मारणारा पुरुष. **रांढरूं** वर ' रांडरूं ' पहा. **रांडीरांड स्त्री०** १ अत्यन्त हीन, दीन, दरिद्री आणि अनाथ अशी विधवा. २ नामर्द किं० कर्तृत्वशून्य पुरुष (निंदेंत). ३ अत्यन्त अनाथ आणि दरिद्री माणूस.

रांडवणें [म० रांड] **अ० क्रि०** विधवा होणें; वैधव्य पावणें.

राडा पु० १ माणसांची अतोनात दाटी किं० गर्दी (घालणें, पडणें). २ पाणी सांडल्यामुळें रस्त्यांत किं० घरांत झालेला चिखल. ३ मनुष्य मेलें असतां घरांतील माणसांचा होतो तो आक्रोश (होणें, पडणें).

रांडावणें [म० रांड] **अ० क्रि०** १ वैधव्य पावणें. २ (काम, धंदा, व्यापार,सावकारी,इ०) अपकर्षाच्या स्थितीप्रत पावणें; ढासळणें; बसणें.

राण [म० रान] **न०** रान, जंगल (अडाण्यांचा शब्द). पुढें ' रान ' पहा.

राणवसा, राणिवसा, राणीवसा [म० राणी +वास] **पु०** राजाचा किं० बड्या माणसाचा जनानखाना.

राणा [**हिं०**] **पु०** १ राजा. २ संमानानें कोणा पुरुषास हा शब्द लावितात. ३ लहान मूल (प्रेमांत).

राणी [**सं०** राज्ञी; **हिं०**] **स्त्री०** १ राजाची स्त्री किं० पत्नी. २ राज्य चालविणारी स्त्री (सधवा किं० विधवा). ꙮ **राणीराऊत पु०, राणीराउताणी, राणीरावताणी स्त्री०** थोर दर्ज्याच्या स्त्रिया समुच्चयानें किं० थोर दर्जाचे पुरुष समुच्चयानें; उ० तो भारी उन्मत्त आणि मगरूर आहे, जणों काय त्याच्या घरीं राणी राऊत पाणी भरतो (किं० राणीरावताणी पाणी भरते). [राज्यसुख.

राणीव [म० राणा] **स्त्री०** १ राज्य. २

रात [**सं०** रात्रि;**म०** रात्र] **स्त्री०** सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ; रात्र. ꙮ **रातकिडा, रात्रकिडा पु०** रात्रीं किर्र असा आवाज करणारा एक किडा. **रातबिरात स्त्री०** १ रात्रीचा समय,—ज्यांत साप, धोका, दरोडा, इ० चा विशेष संभव असतो. २ (**लाक्षणिक**) कठिण समय; अडचणीची स्थिति; उ० रातबिरात आहे, चार पैसे बाळगून ठेविलेले असावेत; उ० धान्य साठवून ठेवा, रातींबिरातीं उपयोगीं पडेल. ' रातबिरात ' ह्याचा **क्रि० वि०** प्रमाणेंही उपयोग केला जातो. रातबिरात म्ह० अडचणीच्या प्रसंगीं.

रात [**सं०** रक्त=तांबडा] **पु०** डोळ्यांचा तांबडेपणा ही विकृति.

रातंजन, रातांजन पु०, न० एक वृक्ष.

रातड [**सं०** रक्त=तांबडा] **वि०** तांबूस वर्णाचा (तांदूळ, जोंधळा, फळ, इ०).

रातडी [**सं०** रक्त=तांबडा] **स्त्री०** तांबूस वर्णाच्या जोंधळ्याची एक जात.

रातणें [**सं०** रत, रक्त] **अ० क्रि०** १ रममाण होणें. २ कामक्रीडेमध्यें (स्त्रीनें)पुरुषाशीं किं० (पुरुषानें) स्त्रीशीं गुंतलेलें असणें.

रातनबाव, रतनबाव स्त्री० नदी, पाट, ओढा, इ० वाहत्या पाण्याच्या प्रवाहांतील पाणी वाटेंत साठविण्यासाठीं केलेला खळगा.

रातब पु० मागें ' रतीब ' पहा.

रातंबा, रातांबा [**सं०** रक्त=तांबडा] **पु०** रातंबी ह्या झाडाचें फळ. ह्या फळाच्या सालींना 'आमसोल' किं० 'आमसूल' म्हणतात. ह्याच्या बीयांच्या तेलाला 'रातांबेल' म्हणतात. ꙮ **रातंबे पिकणें** उन्हांत धावणें, चालणें, खेळणें, इ० मुळें गाल तांबडे होणें.

रातंबी, रातांबी [**सं०** रक्त=तांबडा] **स्त्री०**

एक झाड. ह्याचीं फळें तांबडीं असतात. वर ' रातंबा ' पहा.

रातंबेल, रातांबेल [म० रातंबा, रातांबा] न० रातांब्याचें तेल. वर 'रातंबा' मध्यें पहा.

रातवा[म०रात]पु०१रात्रीचा समय;रात्रीचा अवधि;रात्रीचा प्रादुर्भाव (पडणें,होणें).३ रात्रीं पडलेला पाऊस. ४ रात्रीची घोड्याकडून करविलेली रपेट;घोड्याला रात्रीं फिरवावयास नेणें; उ०घोड्याला रातवा देत जा म्हणजे तो थुझेनासा होईल. ꠰ **आलीकडे सात दिवस पावसानें रातवा धरला आहे** तो सात दिवस रात्रीं पडूं लागला आहे. **मी रातवा घेऊन चिंचवडास निघालों** रात्र संपावयाच्या अगोदर म्ह० सूर्योदयापूर्वीं मी निघालों. **रातव्याचा रुपाया** पु० नवरीच्या घरीं आलेला नवरामुलगा लग्नाच्या दिवशीं उपाध्याला देतो तो रुपाया.

राता [सं० रक्त] वि० १ काळसर तांबडा (तांदूळ, फळ, कंद, इ०). २ लालसर (डोळे). पु० एका जातीचा तांदूळ.

रातांजन पु०, न० एक झाड.

रातांधळा [म० रात (रात्र) + अंधळा] वि० रात्रीं ज्याला दिसत नाहीं किं० स्पष्ट दिसत नाहीं असा (मनुष्य इ०). **रातांधळें** न० रात्रीं न दिसणें किं० स्पष्ट न दिसणें ही विकृति.

रातांबा, रातांबी, रातांबें, रातांबेल मागें ' रातंबा, ' ' रातंबी, ' ' रातंबें, ' ' रातंबेल, ' पहा.

रातावणें [म०रात; सं० रात्रि]**भावकर्तरि क्रि**०रात्र पडूं लागणें; रात्र सुरूं होऊं लागणें;उ० रातावण्याच्या अगोदर तुम्ही प्रवास सुरूं करा.

राताळी, रताळी [सं० रक्तालु] स्त्री० उपासाला खातात त्या कंदविशेषाचा वेल. **राताळूं, राताळें** न० ह्या वेलाचा कंद.

रातिवळा [म०रात]पु०गुरांना रात्रीं खावयाला त्यांच्यापुढें टाकिलेली वैरण.

राती [सं० रात्रि] स्त्री० रात्र (कवितेंत).

रातोत्पल [सं० रक्तोत्पल] न० तांबडें कमल.

रातोरात [म० रात+रात] क्रि० वि० १ रात्रींच; रात्र असतां सुद्धां; रात्र मनांत न आणतां त्वरेनें; सबंध रातभर; उ० मी हें व्याख्यान रातोरात जागून लिहून काढलें. २ रात्र सरावयाच्या अगोदर; उ० आतांच नीघ म्हणजे रातोरात तूं आळंदीस पोंचशील. ꠰ **रातोरातीं क्रि**० वि० ऐन रात्रीच्या समयीं.

रात्र [सं० रात्रि] स्त्री० सूर्य मावळल्यापासून पुन्हा सूर्य उगवेपर्यंतचा काळ. ꠰ **रात्रभर** क्रि० वि० सर्व रात्रीच्या वेळीं. **रात्र ओरडणें** १ रात्रकिड्याचें ओरडणें सुरूं होणें किं० सुरूं झालेलें असणें. २ रात्र सुरूं झालेली असणें. **कोणेकाला रात्र वैऱ्याची जाणें** रात्र अत्यन्त दुःखांत किं० चिंतेंत जाणें. **भरती रात्र** स्त्री० ऐन रात्रीचा समय,–जेव्हां शपथ खरीच आणि प्रामाणिकपणाचीच घेतली जाते; उ० मी भरत्या रात्रीस तुला शपथ घेऊन सांगतों कीं ते पैसे मी घेतले नाहींत. **रात्रकिडा** पु० रात्रीं अत्यन्त कर्कश ओरडणारा एक क्षुद्र कीट,–ज्याला 'राळ' म्हणतात. **रात्रंदिवस, रात्रंदीस** क्रि० वि० रात्रीं आणि दिवसां; सर्व काळ. **रात्रांध** वि० ज्याला रात्रीं दिसत नाहीं किं० स्पष्ट दिसत नाहीं असा.

रात्रि [सं०] स्त्री० सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ. ꠰ **रात्रिबितीं** क्रि०वि०रात्रीच्या समयीं. **रात्रौ** [सं०' रात्रि 'च्या सप्तमीचें ए०व०] रात्रीं; रात्रीच्या समयीं. **रात्र्यंध** न० रात्रीं न दिसणें; रातांधळें. **रात्रिचर, रात्रिंचर** पु० १ चोर. २ पिशाच. ३ राक्षस. ४ गस्तवाला. **रात्रिजागर** पु० १ कुत्रा. २ डांस; चिलट.

राद्धान्त [सं०] पु० सिद्धान्त; निर्णय.

रांधण (-न), रान्ह, रान्हें [सं० रंधन= रांधणें=शिजविणें] न० १ शिजविणें; भाजणें. २ भाकरी, पोळ्या, इ० भाजावयाचा मातीचा तवा.

रांधणें [सं० रध्=शिजविणें] स० क्रि० भाजणें किं० शिजविणें. अ० क्रि० स्वयंपाक करणें. ꠰ **नाचतां येईना अंगण वाकडें,रांधतां येईना ओला लाकडें** मागें 'नाचणें' मध्यें पहा. **सारी रात्र जागली आणि शेंगावांगीं** (किं० **शेणवांगीं**) **रांधलीं** खूप वेळ खर्चून कांहीं

निरुपयोगी पदार्थ निर्माण करणाराची टवाळकी करतांना हें वाक्य योजतात. **रांधतें घर न०** स्वयंपाक घर. **रांधा, वाढा, उष्टीं काढा** रांधणें, वाढणें, आणि उष्टीं काढणें, ह्या क्रियांची अनेक वेळां किं० एकसारखी आवृत्ति (खाणावळ, लग्नघर, इ० च्या वर्णनांत).

रांधप [म०रांधणें] **न०** १ रांधण्याची क्रिया.२ रांधून सिद्ध केलेला पदार्थ किं०सिद्ध केलेले पदार्थ समुच्चयानें. **रांधपी पु०** रांधणारा. **रांधपीण स्त्री०** स्वयंपाक करणारी स्त्री. **रांधवणी** [**म०** रांधणें+पाणी] **न०** ज्यांत खरकटी भांडा किं० खरकटे हात धुतले आहेत असें पाणी.

रांधा [**म०** रांधणें] **पु०** १ शिजवून किं० भाजून केलेलें मिश्रण.२शिजवून भाजून काढण्यासाठीं केलेलें मिश्रण. ३ वैद्य लोकांचें भट्टींत घालून भाजणें किं० शिजविणें ह्या साठीं तयार केलेलें मिश्रण किं० भट्टींत तयार झालेला पदार्थ. ३ स्वयंपाक.

राधा [**सं०**] **स्त्री०** १ कर्णाची पालक माता,–अधिरथाची पत्नी. २ कृष्णाची आवडती स्त्री. ३ तमाशांत स्त्रीचें सोंग घेतलेला पोऱ्या; नाच्यापोऱ्या. ॐ **राधाई मावशी स्त्री०** गारोडी लोक वाजवितात त्या पुंगीच्या टोकावर हालत असते ती लाकडी किं०चिंध्यांची बाहुली. **राधाष्टमी स्त्री०** आश्विन महिन्याच्या कृष्णपक्षांतील अष्टमी. हा राधेच्या जन्माचा दिवस. **राधेय पु०** राधेचा पुत्र कर्ण.

रान [**सं०** अरण्य] **न०** १ स्वच्छंदानें किं० आपोआप उगवलेल्या झाडांनीं व्यापिलेला प्रदेश; जंगल. २ मळा, शेत, बाग, इ० मध्यें नको तें गवत, झुडपें,इ० जीं उगवलेलीं असतात तीं समुच्चयानें. ३ मनुष्यानें मुद्दाम लाविलेलीं जीं नारळी, पोफळी, इ० झाडें त्यांचा समुदाय; उ० समुद्रकांठीं नारळीचें रान असतें.४कोणताही पदार्थ विपुल प्रमाणांत जेथें होतो, असतो, पिकतो,किं० आढळतो तो प्रदेश त्या पदार्थासंबंधानें; उ० बाळूचें रान, विंचवांचें रान, सापांचें रान, इ०. ५ देश, प्रदेश,–प्राण्यांचे वसतीस योग्य किं० अयोग्य ह्या दृष्टीनें; उ०घाटी माणसास कोंकणचें रान मानवत नाहीं; उ० कोंकणच्या रानच्या माणसांचे डोळे घारे आणि पिचके असावयाचेच. ६ (भूमीच्या वरच्या थराची घटना किं० रचना सांगावयाची असतां मागल्या शब्दाच्या साहचर्यानें) प्रदेश; उ० माळरान, खडकरान, काळें रान, चिकण रान, दगडरान, इ०. **टीप,**–'रान' शब्द कांहीं शब्दांच्या पूर्वी आला असतां तो पुढील विशेषणरूप अर्थ दाखवितो:रानांतील, रानांत आढळणारें, नागरिक नव्हे असें,विचित्र, तऱ्हेवाईक, छांदिष्ट, इ०; उ० रानडुकर, रानमांजर, रानकेळ, रानमाणूस, रानपडवळ, रानमूग, रानआंबा, इ०. ह्या जातीचे कांहीं शब्द ह्याच प्रतीकांत शेवटीं आम्ही देऊं. ॐ **रान काढणें** १ रानाचा प्रदेश झाडें तोडून लागवडीच्या उपयोगांत आणणें. २ कलकलाट करून वन्य पशूंना त्यांच्या वसतिस्थानांतून उठवून भीतीनें सैरावैरा पळावयास लावणें,–शिकारी माणसांच्या सोयीसाठीं. ३ रानांत हिंडून कोठें काय आहे हें पाहाणें. **रान खवळणें अ० क्रि०** वन्य पशु भयानें सैरावैरा पळूं लागणें. **कोणकाचें रान खवळणें** भूक, राग,कामविकार, इ० भावनांनीं तो बेकाम होणें किं० पीडित होणें. **रान घेणें** १ (गुरांनीं) रानांत चरावयास किं० भटकावयास जाणें.२ अव्यवस्थितपणें किं० स्वच्छंदानें वागूं लागणें. ३ वादांत विषयांतर करणें. **कोणेकानें रान बदलणें** (किं० **रान सोडणें** किं० **रान पारखें करणें**)१ त्यानें पहिलें ध्येय, उद्देश, किं० वेत सोडून देणें. २ त्यानें वादाचा मुद्दा बदलणें. **रान मारणें** आपणाला अनुकूल परिस्थिति लाच भरून करून घेणें. **रान हाकणें** वर ' रान काढणें ' अर्थ २ पहा. **रानांत शिरणें** (किं० **आडरानांत शिरणें**) मुद्दाम वाकड्या मार्गानें जाऊं लागणें (वादांत किं०संभाषणांत); भलत्याच सरणीनें संभाषण किं० वाद चालविणें. **आडरानांत पडणें** मित्र, हितचिंतक, इ० पासून वियुक्त होणें; असहाय स्थितींत पडणें. **रिकाम्या रानीं** व्यर्थ; कांहीं लाभ किं० लाभाची आशा नसतां (काम करणें, राहाणें, बसणें, इ०).

रानकट वि० असभ्य किं० ग्राम्य चालीरीतींचा (माणूस). **रानकरी पु०** जगलांत राहाणारा. **रानकाढ्या पु०**आपआपल्या निवास-

स्थानीं लपून वसलेल्या वन्य पशूंना पारध्याच्या
सोयीसाठीं उठवून सैरावैरा पळावयास लावण्या-
साठीं योजलेला माणूस. **रानकापशी स्त्री०** काप-
शींची एक जात. इतर जाति देवकापशी इ०.
रानखरडा पु० जमीनीची मोजणी, मापणी,
इ० संबंधाचा त्याचें जमीनीवर बसून केलेला
आराखडा म्हणजे कच्चा खरडा. **रानगट वि०** १
भाषण, वर्तन, इ०कांत असभ्य. २ रानांत
होणारा, उगवणारा, स्वैर वाढणारा, इ०.
रानगोवरी स्त्री० रानांत पडलेलें शेण,–
माणसानें गोवरीच्या रूपांत न थापलेलें. **रानचा
राजा पु०** भिल्ल किं० कातकरी जातीचा इसम.
रानजेवण न० झाडाखालीं गमतीखातर
स्वयंपाक करून किं० गांवांतून खाद्यें नेऊन रानांत
जेवलेलें जेवण; वनभोजन. **रानटी वि०** १
असभ्य. २ रानांत उगवणारें किं० आढळणारें.
रानदांडगा वि० अत्यन्त असभ्य, धीट, किं०
अडदांड. **रानदांडगे पु० अ० व०** चोर, दर-
वडेखोर, वाघ, इ० ना पळवून लावण्यासाठीं
काठ्या, कोयते, खुरपीं, इ० आयुधें घेऊन निघालेले
शेतकरी इ०. **रानपाळ वि०** भातशेताला
फारशी चांगली नव्हे अशी (जमीन.) **रान
पिंपळ पु०** पारोसा पिंपळ ह्या नांवाचा एक
वृक्ष. **रानभरू, रानभरी वि०** १ जंगलांत पळून
गेलेलें (माणूस, जनावर). २ बायकोमुळें सोडून
वैनींत भटकणारा माणूस. **रानभरी (-रू)
होणें** १ रस्ता चुकणें; भलत्याच मार्गानें जाणें.
२ भांबावणें; घाबरणें. **रानमाणूस न०** १ एका
जातीचें माकड. २ असभ्य चालीरींतीचा माणूस.
रानरावताण न०, रानरावताणी स्त्री० [**म०**
रान+राऊत] घोड्यावर बसून एकाद्या गांवांवर
चाल करून जाऊन लुटालूट करणारे दरवडेखोर,
भामटे, इ० नीं केलेली लुटालूट, नासाडी,
जाळपोळ, इ०. पुढें 'रावताण' पहा. **रानवट
वि०** १ लागवडींत न आणिली गेलेली
(जमीन). २ आपोआप रुजलेलीं किं० वाढलेलीं
(झाडें). ३ असभ्य चालीरींतींचा (माणूस).
रानवत [**म०** रान+पत्र (पान)] **न०**
कुडा, कैंजळ, इ० झाडाचें पान; (केळीचें पान,
पळसाचें पान, इ० जीं नेहेमच्या उपयोगांतलीं
पानें त्याच्या व्यावर्तकत्वें). **रानवन** [**म०** रान
+वन] **न० ए० व०** मनुष्यें, गुरेंढोरें, इ० जेथें
बहुधा जात नाहींत असें जंगल किं० असा जंगली
प्रदेश. **रानवा पु०** ओसाड प्रदेश. **कोणेकाला
रानवाळूक चारणें** (किं० **खाऊं घालणें**)
त्याला धोंडें मारणें. **रानवाळूक न०** धोंडा
(थट्टेंत). **रानशेणी स्त्री०** गुरांचें रानांत पडलेलें
शेण,–जें जागच्या जागीं वाळतें आणि ज्याचा
सरपण म्हणून उपयोग केला जातो. **त्याला रान-
शेणीचें पीठ समजतें** त्याला कांहीं समजत
नाहीं. **रानसठवी स्त्री०** सठवी देवी. **रानाळूं
न०** एक प्रकारचें अळूं. **रानोमाळ क्रि० वि०**
इतस्ततः किं० अव्यवस्थित रीतीनें (पसरणें, टाकणें,
धावत सुटणें, निघून जाणें, इ०). **रान्या वि०** १
रानवट; रानांत होणारा, राहणारा किं० वाढणारा.
२ असभ्य चालीरींतींचा (माणूस).

रान्ह, रान्हें न० एक प्रकारचा अनेक छिद्रें
असलेला मातीचा तवा,–रोठ, भाकरी, इ०
भाजावयाच्या कामाचा.

राप, रांप पु० १ केळफूल, केळ, केळीचें पान,
केळें, बाभळ, इ० फुलें, फळें, लाकूड, इ०च्या
अंगच्या द्रवांत जो तुरटपणा असतो तो;–
ज्याचें वस्त्र, कातडें, इ० वर काळे डाग पडतात.
२ पोफळें ज्यांत शिजविलीं आहेत असें पाणी,–
जें कोकणांत लाकडी सामानास शोभेसाठीं फास-
तात. **स्त्री०** १ पावसाळी हवा. २ सतत पडत
असलेला पाऊस. ह्या अर्थी 'रापेचा पाऊस'
पु० सुद्धां.

रापणें, रांपणें [**म०** राप, रांप] **अ० क्रि०**
१ तुरट फळ, पान, झाडाची साल, लोखंड, इ०
च्या संसर्गानें (पदार्थ) काळा होणें किं०
(त्याचेवर) काळे डाग उत्पन्न होणें. २ (लोणचें
इ०) खारांत चांगलें मुरणें किं० (आंब्याच्या
फोडी इ० मध्यें) खाराचें पाणी भिनणें किं०
शिरणें. ३ (आंबे, केळीं, इ० फळें) आढीमध्यें
उबेनें पिकणें किं० पिकूं लागणें. ४ (क्षार, रंग,
इ०) पदार्थविशेषांत शिरणें किं० भिनणें. ५
(ताप, गरमीचें किं० अन्य रोगाचें विष) अंगांत
भिनणें. ६ (बातमी) गांवांत सर्वांस कळणें
किं० जगजाहीर होणें. ७ (आजारांतून नुकताच

उठलेला मनुष्य) टवटवीत किं० सतेज दिसूं लागणें. ८ सैन्य, दरवडेखोर लोक, इ० नीं (मुलूख) व्यापून कबज्यांत ठेवणें. ९ शेत इ० मध्यें (गवत, रान, इ०) उगवून त्यांत फैलावणें. १० शास्त्र, कला, विद्या, इ० मध्यें (कोणी मनुष्यानें) परिचित, अभ्यस्त, किं० वहिवाटलेलें होणें.

रांपणें स० **क्रि०** १ (पोट, गळूं, आंबा,इ० फळ)चेपून आणि चाचपून पाहणें किं०तपासणें. २ (आट्यापाट्यांच्या खेळांत) मुयदंड ही रेषा खेळाडूंना न ओलांडून देण्यासाठीं(तिच्यावर) एका गड्यानें उभें राहून पहारा करीत असणें.

रांपणें अ० **क्रि०** अंधेरांत चांचपडत चालणें.

रांपणें न०, रांपा पु० पोफळें इ० फळांचीं कवचें सोलून काढण्याचें एक हत्यार.

रांपी [**हिं०**] **स्त्री०** १ कातडें कमावणाऱ्यांचें एक साधनविशेष. २ पोफळें इ० सोलण्याचें एक साधन.

रांफ, राफेचा पाऊस वर ' रांप '' रापेचा पाऊस ' पहा.

राब स्त्री० १ काकवीपेक्षां किंचित् दाट जो उसाचा रांधा करतात तो. २ कोणेक स्थळीं किं० वाटेनें किं० सरणीनें जाण्यायेण्याचा, बसण्याउठण्याचा,किं० कांहीं काम करण्याचा जो परिपाठ, चाल, किं० क्रम तो (घालणें, पडणें). ३ वर्दळ; दळणवळण. ४ केरकचरा, गवत, कडबा, काटक्याकुटक्या, इ० चा ढीग किं० पसारा. ५ साखर, पीठ, इ०पाण्यांत घालून केलेलें तोंडीं-लावणें. ६ आजारी माणसासाठीं केलेलें विशेषप्रकारचें पेय. ७ केरकचरा, काटक्याकुटक्या, इ० पृष्ठभागावर पसरून भाजलेली जमीन किं० अशा भाजलेल्या शेतजमीनिवर केलेलें पीक. ८ तूप, तेल, इ० ची बेरी किं० गाळ. **राबाचें पाणी न०** १ पारोसें पाणी.२ फारच डिचमळलेलें किं० ढवळलेलें पाणी.

राबड [**म०** राबणें] **स्त्री०** १ काम किं० कष्टाचें काम. २ चिखल; चिखलट जमीन.

राबडणें [**म०** ' राबणें ' चें एक रूप] **अ०** **क्रि०** कांहीं कष्टाच्या कामांत गुंतलेलें असणें.

रांबड, रांबडा, रांबडकी पुढें ' रांबाड ' ' **रांबाडकी** ' पहा.

राबडी [**म०** राब] **स्त्री०** १ दूध तापवून आणि आटवून त्यांत साखर, वेलदोडे,इ० घालून करतात तें खाद्य. २ दाट चिखल. ३ गुळाची थिरबिटी; पातळ झालेला गूळ.

राबणी, राबणूक [**म०** राबणें] **स्त्री०** १ जमीनीची हरएक प्रकारें केलेली मशागत. २ जाण्यायेण्याची रहदारी; वर्दळ. ३ कांहीं कामाचा परिचय किं० वहिवाट.

राबणें,रांबणें अ०क्रि० १कांहीं कामांत गुंतलेलें राहून त्या कामावर मेहेनत घेणें;कांहीं कामीं कष्ट सोसणें; खपणें; उ० पंचवीस माणसें महिनाभर राबलीं तेव्हां हा बांध रंगारूपास आला. २ कोणेक रस्त्यानें किं० कोणेक स्थळीं (मनुष्यें, गुरें, इ० नीं) जाण्यायेण्याचा परिपाठ ठेवणें किं० वसति करणें किं० राहाणें; उ० त्या भुताटकीच्या घरांत हल्लीं कोणी राबत नाहीं. ३ विशिष्ट प्रकारची वर्तनसरणी अवलंबिणें. ४ एकाद्या कामीं परिचित होणें. ५ (गुरूं, माणूस, विद्यार्थी, इ०) कळप, भोंवतालचीं माणसें, शाळा, इ० मध्यें परिचित होणें.६(रस्ता)वर्दळीनें किं० रहदारीनें मळणें किं० साफ होणें. **स०** **क्रि०** (शेताची) मशागत करणें; उ० आम्ही घरींच दहा बिघे शेत राबतों. ꣸ **राबेल तो चाबेल** कष्ट करील त्याला खावयाला मिळेल. **राव राबतात तेथें देव कांपतात** राजांच्या किं० समर्थांच्या करणीला देव सुद्धां घाबरतात.

रांबणावळ [**म०** रांबणें] **स्त्री०** नवीन विकत घेतलेली गाय, म्हैस, इ० ना कळपांत जाऊन चरावयाची संवय करण्यासाठीं गुराख्याला देतात तो पैसा.

राबता [**म०** राबणें] **पु०**१वर्दळ; रहदारी. २ कांहीं कामाचा किं० वडामोडीचा परिपाठ. ३ महार इ० वर लादलेली वेठबिगार किं० ह्या वेठबगारीच्या मोबदला दिलेला किं०घेतलेला पैसा.

राबता, राबत्या पु० वेठबिगारीसाठीं कामाला लाविलेला महार.

राबरी स्त्री० पुरता न कढविलेला उसाचा रस; काकवी.

राबस, राभस वि० १ भरभरीत किं० खरखरीत किं० निःसत्त्व (नागली, कांग, कुळीथ, राळे, सावा, इ० धान्यें). २ फारसें रुचकर नव्हे असें (कांहीं खाद्य). ३ ओंगळ, अव्यवस्थित, किळसवाणें (खाणें किं० जेवणें).

रांबाड,रांवड[म०रावणें,रांवणें]वि०स्वच्छंदीपणानें वागणारा किं० भटकणारा; स्वैरवर्तनी. **रांबाडकी स्त्री०** स्वच्छंदी वर्तन.

राभस वर ' राबस ' पहा.

राम [सं०] पु० १ पति; रमण. २ दशरथाचा पुत्र. परशुराम, दाशरथि राम, आणि बलराम, असे तीन राम पुराणांत सांगितलेले आहेत. ३ (भिक्षुकांच्या भाषेंत) एक रुपाया; रुपायाचें नाणें. ४ (वरील अर्थावरून साहजिकपणें) ठसठशीतपणा; सामर्थ्य; ताकद; जोर; उ० ह्या उपरण्यांत आतां कांहीं राम राहिला नाहीं(म्ह०वापर सहन करण्याची ताकद राहिली नाहीं).मागें 'चकार,' 'चकारी,''पकार',हे शब्द पहा. 'राम ' हा शब्द पूर्वपदीं येऊन जे साधित शब्द होतात त्यांत ' राम 'चा अर्थ जोराचा, खूप मोठा, आवेशाचा, असा होतो; उ० रामरट्टा, रामरगाडा, रामटोला, इ०. अशा शब्दांपैकीं कांहीं ह्या प्रतीकांत आम्ही देणार आहों. **राम म्हणणें**१मरणें.२ मोडणें, तुटणें, फाटणें;उ० त्या पेटीनें राम म्हटला. **टीप**,–मरणसमयीं'राम' हें नांव उच्चारलें असतां उत्तम गति प्राप्त होते अशा समजुतीवरून राम म्हणणें म्ह० मरणें असा अर्थ झाला. नंतर पुढें मोडणें, तुटणें, फाटणें, विध्वस्त होणें,असें अर्थ झाले. **राम होणें** मरणें. **रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति** रामाचें कल्याण होओ किं०रावणाचेंही कल्याण होओ !आम्हाला दोन्ही गोष्टी सारख्याच. कांहीं गोष्टींविषयीं बेपर्वाई किं० तिऱ्हाईतपणा किं०तटस्थपणा वरील वाक्यानें दाखविला जातो.**रामकली(-ळी)स्त्री०** एक रागिणी. **रामकाटी,रामकाठी स्त्री०** बाभळीची एक जात. हिला 'पुळाटी ' 'रामबाभळ' अशींही नावें आहेत.**रामकांठी वि०**पांढरी रेशमी किनारी ज्याला आहे असें (धोतर, लुगडें, इ०). **रामकुंड न०** गोदावरींत किं० दुसऱ्या कोणत्याही नदींत मृताच्या अस्थि टाकणें किं० स्नान करणें इ० च्या उपयोगाचें कुंड किं० टांकें. **रामगोळा पु०** ताकांत कालविलेल्या लाहीपिठाचा गोळा. रामनवमीच्या उपासाला असला गोळा खाण्याची चाल आहे. **रामचंद्र पु०** १ दशरथाचा पुत्र राम.२विष्णूच्या दशावतारांपैकीं एक.**रामाचें नांव न०** बिलकूल कांहीं नाहीं; उ० आमच्या आपत्काळीं पाषाणकर मंडळींनीं आम्हाला मदत केली अशी तुमची समजूत आहे काय ? छेः! रामाचें नांव ! (म्ह० त्यांनीं मुळींच मदत केली नाहीं). **रामबाण औषध न०** हटकून गुण करणारें औषध. **टीप**,–रामाचा बाण कधीं फुकट जात नसे आणि तो लक्ष्याचा वेध करावयाला चुकत नसे, ह्यावरून वरील शब्दाची उत्पत्ति. **रामराज्य न०** १ अत्यन्त सुखाचें राज्य. २ कोणतीही गोष्ट करण्याची पूर्ण मोकळीक; आपण काहींही केलें तरी आपणाला रागें भरणारें कोणी माणूस नाहीं अशी स्थिति किं० परिस्थिति; उ० तीन दिवस आई आणि बाबा गांवाला गेले होते तेव्हां मुलांनीं रामराज्य चालविलें होतें. **रामचर्चा स्त्री०** मुळींच, अगदीं देखील, बिलकूल(अकरणरूपी प्रयोगांत बोलणें, सांगणें, इ० क्रियापदांच्या साहचर्यें);उ०तो तुम्हाला कितीही सांगो पण मी त्याला रामचर्चा एक अक्षरही बोललों नाहीं.**रामचर्चा करूं नको** एक अक्षर सुद्धां बोलूं नको; ब्र काढूं नको; चकार शब्द काढूं नको. **रामजन्म न०** रामाचा जन्म किं० ह्या जन्माचा दिवस (चैत्र शुद्ध नवमी) किं० ह्या प्रसंगाचा दरवर्षी करतात तो उत्सव. **रामनवमी, रामजयन्ती स्त्री०** चैत्र शुद्ध नवमीस रामाच्या जन्माचा करतात तो उत्सव. **रामटोला पु०** १ दांडूनें विटीला मारलेला पहिला तडाखा. २ काठी, बुक्की, इ० नीं मारलेला रट्टा. ३ खूप जाडी भाकरी किं० पोळी. ४ कोणताही बेढब आणि नेहेमीपेक्षां मोठा पदार्थ. **रामदास पु०** १ एक साधुपुरुष,–ज्याणें दासबोध हा ग्रंथ लिहिला. २ (भिक्षुकांच्या भाषेंत) एक आणा. **रामदासी वि०** रामदासानें स्थापिलेल्या पंथाचा. **रामदूत पु०** १ माकड. २ वानर. **रामनगरी राघू पु०** पंखांवर तांबडे ठिपके अस-

लेला एका जातीचा राघू. **रामनांवी** वि०'राम' हा शब्द जीवर कोरलेला किं० वठविलेला आहे अशी (आंगठी इ०). **रामपत्री** स्त्री० मायपत्री. **रामटेकी** वि० रामटेकगांवचें (विड्याचें पान). **रामपहारा, रामपाहरा, रामपाहारा** पु० सूर्योदयानंतरचे पहिले तीन तास हा अवधि,–खोटें बोलण्याला अत्यन्त निषिद्ध. **रामपात्र** न० पाणी प्यावयाचें धातूचें आकारविशेषाचें लहान पात्र. **रामप्रतिज्ञा** स्त्री० निश्चित वचन. **रामफळ, रामफळी** स्त्री० शिताफळीच्या जातीचें एक झाड. **रामफळ** न०ह्या झाडाचें फळ.**रामरगडा, रामरगाडा** पु० माणसें, कामें, चिंता, इ० चा असह्य अतिरेक किं० पसारा किं० पुष्कळपणा. **रामरट्टा** पु० १ खूप जोराचा रट्टा किं० तडाखा (देणें, दाखविणें).२धंद्याची किं०कामाची असह्य जोखीम किं० जबाबदारी. ३ दाटी; गर्दी; निबिडपणा. **रामरक्षा** स्त्री० १ दाशरथि रामाचें एक स्तोत्रविशेष. २ ह्या स्तोत्रानें मंतरून समर्थ केलेली राख. ३ (थट्टेंत) लाह्यांचें पीठ. ४ बाळंतलिंबाच्या पानांचा भारा. **रामराम** पु० मराठे लोक एकमेकांना करतात तो नमस्कार. **रामरामी** स्त्री० १ (मराठ्यांत) एकमेकांनीं एकमेकांस केलेले रामराम. २ केवळ तोंडओळख म्ह० नुसता रामराम करण्याइतकीच ओळख किं० घसड. **रामवचन** न० खरें भाषण; सत्य भाक. **रामाचें नांव** न० मागें' रामचर्चा ' पहा. **रामाचें राज्य** न० वर ' रामराज्य ' पहा. **रामानुज** पु० विष्णुभक्तांचा एक पंथ स्थापिणारा आचार्य किं० ह्या आचार्याचा अनुयायी. **रामायण** न० दाशरथी रामाचें चरित्र ज्यांत गायिलें आहे असा वाल्मीकि ऋषीनें रचिलेला ग्रंथ. २ दाशरथी रामाचा इतिहास किं० चरित्र. ३ कोणतीही लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत. ४ अव्यवस्था; घालमेल; गोंधळ; उ० ह्या पोरानें चिरगुटांचे रामायण करून टाकलें. **ताकापुरतें रामायण** न० मागें ' ताक ' मध्यें पहा. **रामेश्वर** पु० शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. मागें ' ज्योति ' मध्यें ' ज्योतिर्लिंग ' पहा.

रामणें अ० क्रि० मागें ' रांबणें ' पहा.

रामा [सं०] स्त्री० १ स्त्री. २ सुंदर स्त्री.

रामाटा (–ट्या),**रामेठा** पु०, **रामेटी** स्त्री० एक जंगली झाड. त्याचें फूल पिवळें असतें.

रामोसी, रामोशी पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

राय, राया [सं० राजन्; न० राजा] पु० १ राजा. २ पुरुषाच्या नांवापुढें जोडावयाचा प्रेमाचा किं० आदराचा शब्द; उ० गोविंदराय. ॐ **रायभुलावण** स्त्री० बड्या लोकांनाही भुलविणारी स्त्री; सुंदरी; परी. **रायराजेंद्र** पु० (लावण्यांत) कोणीही वडा माणूस. **रायविनोदी** पु० बहुरूपी; खुषमस्कऱ्या.

राय [हिं०] स्त्री० १ मत; निर्णय. २ उपदेश; सल्ला.

रायत [अ० रआयत] स्त्री० कृपा; मेहेरबानी.

रायतें न० मोहोरी, मीठ,इ० पदार्थांचें तोंडीं लावण्यासाठी केलेलें मिश्रण.

रायभोग पु० तांदुळाची एक जात.

रायवळ [म० राई + आवली] वि० १ साग, शिसू, खैर, फणस, ह्या झाडांशिवाय इतर झाडांचें (लाकूड,–इमारत, लाकडी सामान, इ० च्या रचनेसंबंधांत बोलतांना). २ जंगली(आंबा, आंवळा, इ० फळासंबंधानें बोलतांना).

रायात [अ० रआयत] स्त्री० कृपा; मेहेरबानी.

राव [सं० राजन्; म० राय] पु० १ राजा. २ पुरुषाच्या नांवापुढें योजावयाचा बहुमानाचा हा शब्द आहे; उ० गोविंदराव, मल्हारराव, इ०. ३ एकाद्या संस्थेचा किं० पेढीचा मालक किं० मुख्य व्यवस्थापक. ४ मराठ्यांची एक पोट जात किं० त्या जातीचा कोणी इसम. ५ (थट्टेंत किं० उपहासांत) कोणीही मनुष्य; उ० आम्ही सर्व लोक वनभोजनाला जमलों पण हें राव येईन म्हणून आले नाहींत. ६ दांडगा, उद्धट, किं० बढाईखोर माणूस. ॐ **रावकी** स्त्री० १ रावाचा हुद्दा, दर्जा, किं० मोठेपणा. २मोठेपणा; वैभव. **राव नेणें सुकाळ दुकाळ** श्रीमंताला सर्व काळ खावयास प्यावयास मुबलक मिळतें म्हणून त्यांना गरीब लोकांची दुःस्थिति ही काय वस्तु आहे हें कळूं शकत नाहीं. **राव करीत नाहीं तें गांव करतो** अनेक लोकांच्या

एकोप्थानें जें काम होऊं शकतें तें पैसा, अधिकार, इ० च्या जोरानें देखील होऊं शकत नाहीं. **रावाचा रंक होणें** वैभवाच्या स्थानापासून च्युत होऊन सामान्य माणसाच्या दर्ज्यास पोंचणें (दैवाच्या विलसितासंबंधानें बोलतांना). **राव खालीं आले** रावसाहेब घोड्यावरून पडले. **टीप,**–श्रीमंत माणसासंबंधानें किं० अधिकाऱ्यांसंबंधानें बोलतांना लोक भयानें सौम्य भाषा वापरतात आणि हलक्या किं० सामान्य माणसासंबंधानें बोलतांना कर्कश भाषा वापरतात. **राव घोड्याखालीं आले** राव मेला. **रावरंक पु०** श्रीमंत माणूस आणि गरीब माणूस; उ० साधूला रावरंक सारखेच.

रावखंडा मागें ' राखुंडा ' पहा.

रावटी[**हिं०**]**स्त्री०** प्रवासांत तात्पुरत्या वसतीसाठीं जें वस्त्राचें घर उभारतात तें; लहान तंबू.

रावण [**सं०**] **पु०** १ शत्रूस रडावयास लावणारा. २ लंकेचा राजा,–ज्याला रामानें युद्धांत मारिलें. ३ कोणीही बेढब आणि अगडबंब शरीराचा माणूस, पशु, बोका, इ०. ❀ **रावणराज्य न०** राज्य, सभा, संस्था, इ० तील अंदाधुंदी, अव्यवस्था, अन्यायी कारभार, इ०. **रावणवेला स्त्री०** स्वारीवर, प्रवासास, किं० युद्धासाठीं बाहेर पडण्यास शुभ समय. **रावणाचा लेक पु०** उद्धट, मारकट, किं० असभ्य माणूस. **रावणाची लंका जळणें** कानांचीं भोकें बोटांनीं बंद केलीं असतां भासतो तो आवाज सुरू होणें. **रावण माजणें** (किं० **मातणें** किं० **होणें**) उद्धट वर्तन करणें. **रावणाची वाजंत्री स्त्री०** डांसांची गुणगुण. **रावणाची खाई स्त्री०** जेथें कितीही मोठ्या प्रमाणांत पदार्थ आणले तरी कमताईच भासते असा (संसार, व्यापार, खादाडाचें पोट, इ०).

रावणी [**म०** रावणें] **स्त्री०** कातडें कमावण्याच्या उपयोगाचा खळगा.

रावणी[**म०**राव]**स्त्री०** विनवणी; प्रार्थना. प्रयोग नेहेमीं **अ० व०** ❀ **कोणेकाच्या रावण्या करणें** त्याचीं आर्जवें करणें; त्याला प्रार्थिणें किं० विनविणें.

रावताण न०, रावताणी स्त्री० [**म०** राऊत] मागें ' रान ' मध्यें ' रानरावताण ' ' रानरावताणी, ' हे शब्द पहा.

रावरंक [**म०** राव+रंक] **पु०** मागें ' राव ' मध्यें ' रावरंक ' पहा.

रावस, रांवस पु० खाऱ्या पाण्यांतील एक तांबूस वर्णाचा मासा.

रावा पु० दळलेली हळद.

रावा पु० पोपट किं० राघू हा पक्षी. ❀ **रावामुख न०** पोपटासारखें तोंड,–घोड्याचें एक अशुभ लक्षण.

रावा [**म०** रावखंडा] **वि०** मागें ' रावखंडा ' पहा. [शेष.

रांवेरी, रावेरी स्त्री० तांबड्या रंगाचें वस्त्रवि-

राव्हटी स्त्री० मागें ' रावटी ' पहा.

राशा [**म०** रास=ढीग] **वि०** १ मध्यम प्रतीचा; साधारण दर्जाचा. २ षंढ; नपुंसक. नामर्द; कमकुवत; कर्तृत्वशून्य (माणूस).

राशि, रास [**सं०**] **स्त्री०** १ ढीग; समूह. २ तारात्रचक्राचे मेष, वृषभ, इ० जे बारा भाग ते प्रत्येक. ३ (**गणितांत**) त्रैराशिक, पंचराशिक, इ० तील जीं परिमाणें तीं प्रत्येक. ४ (**गणितांत**) संख्या; परिमाण; गुण्य, गुणक, भाज्य, भाजक, मिळवणीची रकम, इ०. ५ संचय; साठा; उ० पापराशि, पुण्यराशि, तपोराशि, इ०. पुण्यराशि म्ह० मूर्तिमंत पुण्य म्ह० अत्यन्त पुण्यवान् माणूस. ६ पदार्थाची मध्यम प्रत किं० कनिष्ठ प्रत; उत्तम प्रतीचा नव्हे असा पदार्थ; उ० हे राशींतले तांदूळ आहेत, ते तुम्हाला चालणार नाहींत. ७ वट्ट परिमाण; एकंदर आंकडा, रकम, किं० बेरीज. ८ निवडणें, पाखडणें, इ० संस्कार करावयाच्या अगोदरच्या स्थितींतील धान्य. ९ चांगला वाईट अशी निवड न करतां केलेला ढीग किं० समूह. १० बैलांनीं एकदा कणसें तुडवून निघतें तें धान्य. ह्याला ' पहिलें मदन ' असेंही म्हणतात. मागें ' मदन ' पहा. ❀ **राशिपुंजीस येणें** निवळ नफा उरून तो भांडवलांत भरतीस पडणें किं० शिल्कीस पडणें. **राशीवर क्रि० वि०** कणसें झोडपण्याच्या खळ्यावर. **एकाद्याच्या राशीस बसणें** (किं० **लागणें**) त्याची पिच्छा पुरविणें; त्याच्या पाठीस लागणें; त्याला छळणें किं० सतावून सोडणें. **राशिकूट, रासकूट न०** वधूवरांच्या

जन्मसमयींच्या राशि जोडीनें किं० त्या जोडीवरून निघणारें वधूवरांचें सख्य किं० वैर.**राशिघटित,रासघटीत न**०वधूवरांच्या जन्मराशींवरून निघणारें सख्यरूपी किं०वैररूपी फळ.**राशिचक्र न**०मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर,कुंभ, आणि मनि, ह्या बारा राशींचें चक्र. **राशिनाम, रासनाम, रासनांव** न० [illegible] रास पाहून मुलाचें ठेवितात तें नांव. **राशिभोग पु०** ग्रहाचा एका राशींतील गमनकाल. **राशी वि**०१ राशींतलि,म्हणजे निवडणें, पाखडणें,सडणें, इ० अगोदरच्या स्थितींतील (धान्य, इ०). २ फार उंची नव्हे किं० निंची नव्हे असा म्ह० मध्यम प्रतीचा किं० योग्यतेचा. ३ पंढ; नपुंसक.**रासपुजा, रासभरणें,रासमाथां (–माथ्यास)**खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

राष्ट्र [**सं**०] **न**० १ राज्य. २ एका विवक्षित सरणीनें ज्यावर अमल चालला आहे किं० जेथें विवक्षित शासनपद्धति सुरू आहे असा खूप मोठा जनसमूह किं० देश. ३ प्रांत; देश. ४ एकाद्या देशांतील लोक समुच्चयानें. ५ एके ठिकाणीं जमलेलीं पुष्कळ माणसें, मुंग्या, माशा,इ० समुच्चयानें. **राष्ट्रीय, राष्ट्रिय वि**० १ राष्ट्रासंबंधाचा. २ ज्यांत राष्ट्राचें हित आहे असें. ३ ज्यांत किं० जेणें करून आपलें राष्ट्र किं० आपला देश ह्यांना यत्किंचित् बाधक न होतां लोकांच्या उच्च मनोवृत्तींना पूर्ण अवसर मिळतो असें (शिक्षण,शाळा,निशाण, ग्रंथ,इ०). ४राष्ट्रांतील सर्व लोकांना ज्याचा अभिमान वाटतो असा(पुरुष, निशाण, रामायणभारतादि ग्रंथ).**राष्ट्रिय सभा स्त्री**० हिंदुस्तानच्या सर्व जनतेच्या प्रतिनिधींची इ० स० १८८५ सालीं स्थापण्यांत आलेली सभा.

राष्ट्राण, राष्टाण [**सं**०राष्ट्र;**म**० राष्ट्र] **न**० १ अव्यवस्थितपणें इतस्ततः पसरलेले पदार्थ समुच्चयानें. २ सामानासुमानाचा, चिरगुटांचा, किं० कांहीं कामांत जरूर अशा साधनसामग्रीचा पसारा (पडणें, घालणें).

राष्णा, रास्ना [**सं**० रास्ना] **स्त्री**०, **पु**० कोलिंदण; मुंगुस वेल.

रास [**सं**० राशि] **स्त्री**० मागें ' राशि ' पहा.

रास [**अ**० रास्= डोकें] **पु**० (घोड्याची गणती करतांना) व्यक्ति; उ० घोडे रास दहा (म्ह० दहा घोडे). याच सरणीनें गायी, बैल, म्हशी, रेडे सर दहा(म्ह० दहा गायी इ०). उंट नफर पंधरा (म्ह० पंधरा उंट). हत्ती नग बारा (म्ह० बारा हत्ती).

रास [**सं**०] **पु**० १ गलबला. २ आवाज; ध्वनि. ३ गवळ्यांचें वर्तुळाकार म्ह० फेर धरून नृत्य. ४ उत्सव. ꠶ **रासक्रीडा स्त्री**० कृष्ण आणि गोपी यांचें नृत्य. **रासनाहणें, रासन्हाणें न**०, **रासन्हाणी स्त्री**०[**सं**० रास+स्नान] लग्नाच्या समारंभांत वरपक्षाकडील स्त्रियांना वधूपक्षाकडून स्नानें घालणें, बांगड्या भरणें, इ० चा केला जातो तो सत्कार.

रास [**फा**० रास्त=सरळ, खरें] **वि**० सरळ, वाकडें नव्हे असें (कपडा शिवावयासाठीं कापडाचे तुकडे पाडतांना शिंपी लोकांत प्रयोग).

रासकरदन [**अ**० रास्=डोकें+**फा**०कर्दन् =करणें] **न**० एकादा दागिना, भांडें, इ० मोडून नवा दागिना, भांडें, इ० घडविलें असतां जुना पदार्थ खर्चांत दाखविणें आणि नवा पदार्थ जमेंत दाखविणें हा जमाखर्च लिहिण्याचा प्रकार.

रासकूट, रासघटित, रासनाम (–नांव) मागें ' राशि ' मध्यें पहा.

रासणी [**म**० रास] **स्त्री**० बैलांच्या जोतांतील म्होरक्या बैल.

रासना [**सं**० रास्ना] **स्त्री**० एक औषधोपयोगी झाड किं० त्याचें मूळ. मागें ' राष्णा ' पहा.

रासनी स्त्री० बी पेरल्यावर तें झाकून टाकण्याचें शेतकामांतलि एक आउत.꠶**रासन्या पु**० हें आऊत चालविणारा गडी.

रासपुजा [**म**० रास+ **सं**० पूजा] **स्त्री**० झोडपून काढलेल्या धान्याची पूजा.

रासभ [**सं**०] **पुं**०गाढव हा चतुष्पाद प्राणी. **रासभी स्त्री**० गाढवी.

रासभरणें [**म**० रास+भरणें] **न**० झोडपलेलें धान्य खळ्यांवर रास करून ठेवणें.

रासमाथां, रासमाथ्यास [**म**० रास +

माथा (डोकें)] क्रि० वि० धान्य झोडपून त्याची रास केल्यावर (सावकाराशीं शेतकरी उसने पैसे मी कधीं फेडीन हें सांगतांना); उ० मला तुम्ही आज पंचवीस रुपये द्या,हरभऱ्याच्या रासमाथां(किं०रासमाथ्यास) मी ते सव्याज फेडीन.

रासवट [म० रास] वि० मध्यम प्रतीचा; बोजड; फारसा उंची, सुंदर, किं० मोहक नव्हे असा (माणूस, पदार्थ).

रासवटा, रासोटा [म० रास+ठाय] पु० खळ्यांतून धान्य घरीं आणल्यावर खळ्यांत जें उरलें सुरलें धान्य असतें तें,–जें महाराला हक म्हणून द्यावयाचें असतें.

रासोत्सव [सं० रास+उत्सव] पु० मागें ' रास ' मध्यें ' रासक्रीडा ' पहा.

रास्त, रास्ती [फा० रास्त्] वि० १ खरा. २ न्याय्य; वाजवी.३ प्रामाणिक(भाषण, माणूस, वर्तन,इ०). ४ चोख;तंतोतंत (वजन, माप).❀ **रास्तकौली** स्त्री० खरेपणा; खरें बोलण्याचा गुण; सत्यवक्तेपणा. **रास्तगो** [फा० रास्त् (खरें) +गुफ्तन् (बोलणें)] वि० खरें बोलणारा. **रास्तगोई** स्त्री० खरें भाषण. **रास्तमामलगी** स्त्री० न्याय्य वर्तन; सचोटीची वर्तणूक. **रास्तरवी** [फा० रास्त् (सरळ)+रफ्तन् (जाणें)] स्त्री० सरळपणा; सरळपणाचें वर्तन. **रास्ती माप** न० खरें माप,–बोटधरणी माप, हातधरणी माप, इ० च्या व्यावर्तकत्वें. मागें ' बोटधरणी ' पहा.

रास्ता पु० लुगड्यांचा एक प्रकार.

रास्ना [सं०] स्त्री० कोलिंद्रण; मुंगुसवेल.

राहकळ स्त्री०, न० १ गुरें, माणसें, इ० चीं भयामुळें झालेली दाणादाण किं० धावपळ. २ माणसांचें हमरीतुमरीवर येऊन भांडण.

राहटणें इ०मागें ' रहाटणें ' इ० पहा.

राह, रहा [फा० राह्] स्त्री० मार्ग; रस्ता. मागें ' रहा ' पहा. ❀ **राहदार** पु० १मार्गदर्शक. २ नाकेवाला.

राहणें मागें ' रहाणें ' पहा.

राहळ मागें ' रहाळ ' पहा.

राहित्य [सं०] न०शून्यपणा;नसणें; अभाव; उ० द्रव्यराहित्य इ०.

राहु [सं०] पु० (ज्योतिष) नवग्रहांतील आठवा. ❀ **राहुग्रसन** न० ग्रहण. **राहुरत्न** न० गोमेद हा मणि. **राहूसारखें कोणेकाच्या मागें लागणें, कोणेकाची राहुकेतु प्रमाणें पाठ घेणें** त्याचा पिच्छा पुरविणें; त्याचा नाश करण्याची संधी मिळण्यासाठीं टपून बसणें. टीप,–राहु आणि केतु ह्या नांवाचे दोन दैत्य असून ते सूर्य आणि चंद्र यांना संधी साधतांच ग्रासतात म्हणजे खाऊन टाकतात; तेणेंकरून सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण हे प्रकार होतात अशी समजूत असे.

राहुटी, राहोटी, रावटी स्त्री० वस्त्राचें बनविलेलें तात्पुरतें वसतिगृह.

राळ [सं० राल] स्त्री० १ सालईचा चीक किं० डीक; हा त्वरित पेट घेतो. २ फजीती; बोऱ्या (उडणें). ❀ **पदार्थाची राळ होणें** त्याची नासाडी, दुर्दशा, किं० विध्वंस होणें.

राळ स्त्री० एक क्षुद्र कीट,–जो रात्रीं किर्र असा ओरडतो.

राळवण खालीं ' राळा ' मध्यें पहा.

राळसाळ खालीं ' राळा ' मध्यें पहा.

राळा पु० एक धान्य. ❀ **राळवण** (–न) न० राळा ह्या धान्याचीं ताटें समुच्चयानें. न०, स्त्री० १ नासाडी; दुर्दशा. २ कष्टाच्या कामानें आलेला थकवा किं० शीण. ❀ **कोणेकाच्या जिवाचें राळवण होणें** तो कामानें मेटाकुटीस येणें; तो कामामुळें जर्जर होणें. **राळसाळ** वि० गदळ किं० टाकाऊ भाग.

राक्षसी वि० खालीं ' राक्षस ' मध्यें पहा.

राक्षस [सं०] पु०१ देव, मनुष्य, यांची स्पर्धा करणारी तामस प्रकृतीची एक प्राण्यांची आहे तींतील एक व्यक्ति. २ कोणीही उग्र स्वभावाचा किं० तापट माणूस. ३ फार खादाड. ❀ **राक्षसगण** पु० भरणी, कृत्तिका, आश्लेषा, मघा,चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, मूळ, आणि शततारका, ह्या नऊ नक्षत्रांवर जो जन्मला त्याचा गण. मागें ' देव ' मध्यें ' देवगण ' पहा. **राक्षसमुखी** वि० दक्षिणेकडे तोंड करून असलेला. **राक्षसमोहरा, राक्षसमोरा, राक्षस**

मोहरीं क्रि० वि० दक्षिणेकडे तोंड करून. **राखेस मोहरा क्रि० वि०** दक्षिणेकडे तोंड करून. **गंगमोहरा (–रीं), गंगामोहरा (–रीं)** उत्तरेकडे. मागें ' राखेसमोहरा ' पहा. **राक्षसविवाह पु०** जबरदस्तीनें कन्या पळवून नेऊन तिच्याशीं केलेला विवाह. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टविवाहविधि ' पहा. **राक्षसवेळ स्त्री०** सूर्यास्त आणि रात्र यांचा दरम्यानचा काळ; तिन्हीसांजांची वेळ. **राक्षसान्न न०** बाजरी, उडीद, मसूर, राळा, मिरची, इ० चें तामस अन्न. **राक्षसी, राक्षसीण स्त्री०** राक्षस जातीची स्त्री. **त्या घरांत राक्षसणी पीठ कांडतात** तें घर ओसाड आणि भयाण आहे. **राक्षसी, राक्षशी वि०** १ राक्षसाच्या संबंधाचा. २ राक्षसालाच शोभेल असें. ३ भयंकर; क्रूर; कठोर. **राक्षसी अवतार, राक्षसाचा अवतार पु०** अत्यंत क्रूर किंवा भयंकर माणूस. **राक्षसी उपाय (किं० उपचार) पु०** क्रूर, कठोर, किं० अघोरी इलाज. **राक्षसी झोंप स्त्री०** फारच दीर्घ काळपर्यंत घेतलेली झोंप. **राक्षसी धान्य न०** बाजरी हें धान्य,–जें हेमाडपंतानें लंकेंतून आणलें असें समजलें जातें. **राक्षसी मुलूख पु०** नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश. उत्तरेकडच्या मुलखाला ' देवमुलूख ' म्हणतात. **राक्षसी संपत्ति स्त्री०** मागें ' आसुर ' मध्यें ' आसुरी संपत् ' पहा.

रिकब, रिकबी, रिकाबी [अ० रिकाब्] **स्त्री०** घोड्यावर चढतांना पायाला आधार म्हणून आणि वर बसल्यावर पाय टेकावा म्हणून दोन बाजूंस ज्या दोन कड्या लोंबत सोडलेल्या असतात त्या प्रत्येक. पुढें ' रिकिबी ' पहा.

रिकाविणें [सं० रिच्] **स० क्रि०** १ (भांडें इ०) रिकामें करणें. २ बारदानांत (पदार्थ) कोंबून कोंबून भरणें.

रिकांडी स्त्री० कोष्टयाच्या धोट्यांतील सूत गुंडाळलेली कांडी. [पहा.

रिकामका इ० खालीं ' रिकामा ' मध्यें

रिकामा [सं० रिक्त] **वि०** १ ज्यांत कांहीं नाहीं असें (बारदान, घर, खोली, इ०). २ पुराव्यानें, प्रमाणानें, उदाहरणानें, वगैरे ज्याची सत्यता किं० यथार्थता सिद्ध करण्यांत आलेली नाहीं किं० सिद्ध करून देतां येत नाहीं असा म्ह० निराधार (वाद, विधान, हकीगत, इ०). ३ ज्यांत तथ्यांश नाहीं असा. ४ ज्या जागेवरचा अधिकारी किं० काम करणारा गैरहजर आहे किं० अद्यापि नेमण्यांत आलेला नाहीं किं० रजेवर गेलेला आहे अशी (अमल्दार, अधिकारी, इ० ची जागा). ५ निरर्थक; निष्फळ; निष्प्रयोजन (दगदग, पायपिटी, चौकशी, बोलणें, ढंग, इ०). ६ ज्याला कांहीं नोकरी, उद्योग, धंदा, इ० नाहीं असा; उ० रिकामा न्हावी भिंतीला (किं० कुडाला) तुंबड्या लावी. ७ एकटा; उ० मी तुला घेऊन जाणार, मी रिकामा जाणार नाहीं. ८ कोणाच्याही मालकीचा नसलेला (देश, मुलूख); उ० आर्यांना दंडकारण्याचा प्रदेश रिकामा सापडला. ॐ **रिकामटेकडा, रिकामटवळा, रिकामचोट वि०** निरुद्योगी; निष्फळ (निंदेंत). **रिकामा वेळ पु०** फुरसुतीचा काळ; उ० मी रिकाम्या वेळांत सूत काढतों. **रिकाम्या रानीं क्रि० वि०** विनाकारण; फळाची आशा किं० संभव नसतां. **रिकाम्या हातानें** जरूर अशी वस्तु बरोबर न घेतां; आणावयाची वस्तु न आणतां; न्यावयाची वस्तु न नेतां. **रिकाम्या चेष्टा स्त्री०** निष्फळ खटपट. **रिकामका वि०** रिकामा; निरुद्योगी; व्यर्थ. **रिकामटी, रिकामणूक स्त्री०** फुरसूत; रिकामा वेळ. **रिकामपण न०, रिकामपणा पु०** फुरसत; कांहीं विशेष कामानें गुंतलेला नाहीं असा कोणेकाचा वेळ. **रिकाम चावडी स्त्री०** निरुद्योगी माणसांची बसावयाची किं० गप्पा मारावयास जमण्याची जागा किं० आड्डा. **रिकामा ताठा पु०** पोकळ डौल किं० बढाई; उ० नाकीं नाहीं कांटा आणि रिकामा ताठा.

रिकिबी, रिकीब, रिकेबी [अ० रिकाब्] **स्त्री०** घोड्यावर चढतांना किं० घोड्यावर बसलें असतां पायाला आधार म्हणून ज्या दोन कड्या खोगिराच्या दोन बाजूंस लोंबत सोडिलेल्या असतात त्या प्रत्येक. मागें ' रिकबी ' पहा. ॐ **दररिकेबीस क्रि० वि०** १ पुनः पुनः; वारंवार (कांहीं वाईट गोष्ट करणें). २ प्रत्येक स्वारींत किं० मोहिमेंत किं० खेपेंत. **रिकीबदाल पु०** तंगास रिकीबी बांधावयाच्या दोन दोऱ्या प्रत्येक.

रिक्त [सं०] **वि०** १ रिकामा. २ हीन;

दीन; दरिद्री. ❀ **रिक्तहस्त, रिक्तपाणि** वि० राजा, साधु, देव, बाळंतीण, इ०च्या भेटीस जावयाचें असतां कांहीं तरी नजराणा (फळें, विड्याचीं पानें इ० पदार्थ)ज्याणें बरोबर घेतला नाहीं असा. **रिक्त भाषण** न० पोकळ बढाईचें, निराधार, किं० निष्फळ असें बोलणें. **रिक्ता** स्त्री० चतुर्थी, नवमी, आणि चतुर्दशी, ह्या तिथि प्रत्येक. **रिक्तकोष्ठ** न० आंतील अन्नांश किं० मलांश नाहींसा झाल्यामुळें रिकामा झालेला पोटाचा कोठा.

१रिंगण [**सं०**] **न०** १ मुलांचें रांगणें. २ घसरणें. ३ धर्म, जात, इ० पासून च्युत होणें.

रिंगणा स्त्री० खांबाच्या माथ्यावर आणि तातऱ्याच्या खालीं असते ती तुळई किं० कडी.

रिंगणी [**हिं०** रींगनी] **स्त्री०** वांग्याच्या वर्गांतील एक कांटेरी वनस्पति. **रिंगणें** न० १ह्या वनस्पतीचें फळ. २ मुलांचें एक आकारविशेषाचें खेळणें.

रिगणें, रिघणें अ० क्रि० १ प्रविष्ट होणें; शिरणें. २ जावयाला निघणें; प्रस्थित होणें. ३ (झाडाच्या मुळांनीं) जमीनींत घुसणें.

रिगाव खालीं ' रिघाव ' पहा.

१रिंगी स्त्री० रिठ्याचें झाड.

रिघणें वर ' रिगणें ' पहा.

रिघाव (-वा), रिगाव (-वा) [**म०** रिगणें, रिघणें] **पु०** प्रवेश, शिरकाव (बळानें किं० युक्तीनें). [दमादमानें.

रिचे रिचे क्रि० वि० हळूं हळूं; संथपणें;

रिचवणें, रिचावणें [**सं०** रिच्] **अ० क्रि०** १ ढासळून पडणें; उ० उतरंड नीट रच, नाहीं तर सारीं भांडीं रिचवतील. २ जोरानें किं० वेगानें (पाऊस, झाडांचीं पानें किं० फळें, पोत्यांतील धान्य, जखमेंतून रक्त, इ०) गळणें, बाहेर पडणें, वाहाणें, किं० उसळणें. ३ मनुष्याच्या तोंडांतून किं० गुदांतून (पोटांतील) अजीर्णांश जोरानें बाहेर पडणें. ४ (मनुष्याला) जोराचा रेच किं० वांति होणें. ५ (मनुष्य) घोड्यावरून पडणें (विनोदांत).

रिचविणें [**सं०** रिच्] **स० क्रि०** १(कांहीं पदार्थ) बारदानांत कोंबून कोंबून किं० ठासून भरणें. २ (पदार्थ) काळजीपूर्वक रचून किं० मांडून ठेवणें. ३ (पदार्थ) बाजूस सारणें किं० फेकून देणें किं० नजरेआड करणें. ४ आंतील पदार्थ बाहेर टाकून किं० ओतून (बारदान) रिकामें करणें. [पहा.

रिजणें, रिजाऊ पुढें ' रिझणें, ' ' रिझाऊ '

रिजाला [अ० रिजालाह्] **वि०** नीच; हलकट; पाजी; अधम.

रिझक पुढें ' रिझाक ' पहा.

रिझणें [**हिं०** रीझना; **सं०** रंज्] **अ० क्रि०** संतुष्ट किं० आनंदित होणें; कांहीं करमणुकीच्या वाचनादि व्यापारांत निमग्न होणें.

रिझविणें [**म०** ' रिझणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ करमणुकीच्या विषयांत (कोणेकाला) गुंतवून त्याला आनंदित करणें. २ (मन) करमणुकींत गुंतविणें. ३ रमविणें; रंजविणें. ४ मन औदासीन्यविरहित करणें.

रिझाऊ [**म०** रिझविणें] **वि०** मनोहर; मोहक; सुंदर (भाषण, रूप, गाणें, मनुष्य,इ०).

रिझाक [**हिं०**] **वि०** प्रिय, लाडका (लावण्या, पोवाडे, इ० तील शब्द).

रिझाला वर 'रिजाला' पहा.

रिठा पु०, रिंठी स्त्री० [**सं०** रिष्ट] एक झाड किं० त्याचें फळ. ह्या फळाला फेस असून अंग, वस्त्र, इ० स्वच्छ करण्याकडे साबणाप्रमाणें ह्याचा उपयोग केला जातो. ❀ **रिंठें** न० वरील झाडाचें फळ.

रिणकर, रिणकरी मागें ' ऋण ' मध्यें ' ऋणकरी ' पहा. **रिणको** [**सं०** ऋण] **पु०** कर्ज घेणारा.

रिता [**सं०** रिक्त] **वि०** रिकामा; पोकळ; जेथें जें असावयास पाहिजे किं०जेथें जें होतें तेथें तें नसलेला; ओका; उ० आंतील पाणी ओतून टाकून हें भांडें रितें कर; उ० बांगड्यावांचून मनगट रितें दिसतें; उ० येथें सामान उतरून घेऊन मी खटारा रिता परत पाठविला. ❀ **रिताभरला** क्रि० वि० कांहीं झालें तरी; ह्या प्रकारें किं० त्या प्रकारें; कोणत्याही प्रकारें किं० बाजूनें; उ० मी तुला काम सांगितलें होतें त्याचा रिता भरला जाब मला तूं कांहीं तरी द्यावयाला

पाहिजे होता. हें **क्रि० वि०** लिंगवचनाप्रमाणें फिरतें.

रिताड [**म०** रिता] **स्त्री०** १ दुसऱ्या ठिकाणाहून वाहून आणलेला माल एकाद्या ठिकाणीं टाकून परत रिकाम्या चाललेल्या (गाड्या, गलबतें, किं०बैल, इ० जनावरें).२ वर पाण्याच्या राहाटाचें पाणी ओतून खालीं पाणी भरावयासाठीं उतरत असलेले लोटे समुच्चयानें. याच्या उलट 'भरताड.' ३ अन्नाच्या अभावीं झालेला पोटाचा रिकामेपणा.

रिद्धि मागें 'ऋद्धि' पहा.

रिपरिप स्त्री० पिरपीर; चरफड; लहान लहान थेंबांच्या रूपानें सावकाश पडणारा पाऊस.

रिपार, रिपाड [**म०** रीप] **पु०, न०** छपराचें ओंबण.

रिपु [**सं०**] **पु०** शत्रु. ❀ **रिपुंजय वि०** त्रूवर ज्याणें जय मिळविला आहे असा किं० जय मिळविण्याच्या सामर्थ्याचा. **षड्रिपु पु०** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे सहा मनोविकार.

रियासत (–द) [**हिं०**] **स्त्री०** १ राज्य. २ राज्यसरणी; शासनपद्धति. ३ कोणेक राजघराण्याचा किं० देशाचा कोणेक देशावर जो अमल तो किं० ह्या अमलाचा कालावधि.

रिवरिवणें अ० क्रि० (अक्कलकारा, अळू, सुरण, इ० पदार्थ) जीभ, गाल, घसा, इ० ना झोंबत किं० बोचत असणें.

रिवाज [**अ०**] **पु०** चाल; रीति; सरणी; परिपाठ; वहिवाट.

रिसालदार इ० खालीं 'रिसाला' मध्यें पहा.

रिसाला [**अ०** रिसाला] **पु०** १ घोडदळ. २ घोडदळाची तुकडी. ३ युद्धाच्या उपयोगाचीं हत्यारें इ० ची सामग्री. ❀ **रिसालदार पु०** घोडदळावरील अधिकारी किं० अमलदार. **रिसालदारी स्त्री०** रिसालदाराचें कर्तव्य, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र.

री स्त्री० १ गवयाच्या गाण्याचा सूर,–जो त्याचा मदतनीस लांबवितो तो (देणें, धरणें, ओढणें). २ गांयनांतील सप्त स्वरांपैकीं दुसरा. ते स्वर सा, री, ग, म, प, ध, आणि नी, हे होत. ❀ **कोणेकाची री ओढणें** कोणा समर्थानें केलेल्या कांहीं विधानाचें समर्थन करणें,–तें विधान शहाण्यासारखें आहे किं० मूर्खासारखें आहे ह्याचा विचार न करतां.

रीग, रीघ [**म०**रिगणें, रिघणें] **स्त्री०** १प्रवेश करण्याची किं० घुसण्याची सोय किं० शक्यता (असणें,नसणें,मिळणें,होणें). २ वाव, अवकाश.

रीज, रीझ [**हिं०** रीझाह्; **सं०** रंज्] **स्त्री०** १ करमणूक; आनंद; दुःखमय विचारांपासून व्यावर्तन. २. आवड; अभिरुचि. ❀ **रीजबूज, रीझबूझ स्त्री०** आवड; करमणूक.

रीण [**सं०** ऋण] **न०** मागें 'ऋण' पहा.

रीत [**सं०** रीति] **स्त्री०** पुढें 'रीति' पहा.

रीति [**सं०** रीति] **स्त्री०** १ पद्धति; प्रकार; सरणी; वहिवाट. २ चाल; शिस्त; शिरस्ता. ३ सभ्यपणाची मर्यादा किं० शिस्त. ४ (**साहित्य**) भाषेची शैली. वैदर्भी, पांचाली,लाटी,गौडी, इ० भाषाशैलीचे प्रकार प्राचीन आलंकारिकांनीं केलेले होते. ❀ **रीतिस्थिति स्त्री०ए० व०** चाली रीति; वर्तनाची एकंदर सरणी. **टीप,**–'रीत' हेंही रूप व्यवहारांत आहे. **रीतभात स्त्री०** वर्तनाची सरणी. **रीतरवेस** [**म०** रीत+**फा०** रवस्] **स्त्री०** १ वर्तनाची पद्धति. २ सभ्यपणाची वर्तणूक; चारचौघांत वागण्याची कोणेकाची सभ्य सरणी.

रीप स्त्री० १ लाकडाची पातळ पट्टी. २ २ ओंबणासाठीं लाकडाच्या ज्या पातळ पट्ट्या करवतून केलेल्या असतात त्या प्रत्येक.

रीस, रींस [**सं०** ऋक्ष] **पु०, न०** १आस्वल हा जंगली पशु. २ असभ्य चालीरीतींचा मनुष्य. ३ गलिच्छ, मळकट, किं० अव्यवस्थितपणें अंगावर कपडे धारण करणारा मनुष्य.

रीस [**सं०** रोष; **हिं०** रीस] **स्त्री०** १ घुस्सा; राग; चीड. २ वीट.

रुइटी, रुई [**हिं०** रुवी] **स्त्री०** एक झाड. ह्याच्या बोंडांतील बीजांना बारकि, नाजूक, आणि हलके तंतु असतात ते वाऱ्यावर उडत उडत खूप उंच आणि लांब जातात. मुलें त्यांना 'म्हातऱ्या' म्हणतात. ❀ **रुई फुली वि०** रुईच्या फुलासाररखी नक्षी ज्यांत विणली आहे असा

(लुगडें, धोतर, इ० चा कांठ).

रुई, [**हिं०**] **स्त्री०** पिंजलेला कापूस.

रुई, रुही, रोही स्त्री० नीलगाय हा प्राणी.

रुई [**फा०** रुय्, रव्] **स्त्री०** १ वर्तनाची सरणी. २ योग्य वर्तन. ꕥ **रुईचा वि०** १क्रमानें किं० ओघानें प्राप्त झालेली(गोष्ट, प्रकार इ०). २सभ्यपणाचें (वर्तन). **रुईस येणें** क्रमानें किं० न्यायानें किं० ओघानें(कांहीं गोष्ट)करणें जरूर होणें किं०प्राप्त होणें.

रुकशांग स्त्री० आंब्याच्या झाडावर उगवणारें एक प्रकारचें बांडगूळ.

रुकसत पुढें ' रुखसत ' पहा.

रुका, रुक्का पु० १ आण्याचा बारावा भाग. २ जमीनीच्या विस्ताराचें एक परिमाण .हें भिन्न प्रांतांत भिन्न आहे.

रुकार पु० १ संमति; अनुमोदन (देणें,मिळणें). २ कागद तपासून घेतल्याची निशाणी ' रु ' हें अक्षर जें कागदावर तपासणारा मनुष्य लिहितो तें.

रुकारणें [**म०** रुकार] **स० क्रि०** (कांहीं गोष्ट) मान्य करणें; (कांहीं गोष्टीला) संमति देणें किं० दर्शविणें; स्वीकारणें; पथकरणें.

रुक्का मागें ' रुका ' पहा.

रुख [**सं०** वृक्ष] **पु०** वृक्ष; झाड.

रुखय [**सं०** वृक्ष; **म०**रुख(झाड)] **स्त्री०**बहुधा झाडावर वसति करून राहाणारा एक प्रकारचा साप.

रुखरुख स्त्री० वादामध्यें योग्य वेळीं योग्य उत्तर देणें शक्य असतां तें न सुचल्यामुळें आपला पराभव झाला असतां वाटतो विषाद किं०मनाला लागते ती चुटपूट; आपल्या हातून कर्तव्य योग्य प्रकारें न बजावलें गेल्यामुळें मनाला वाटतें तें दुःख; कुस्तीमध्यें प्रतिपक्ष्यावर अमुक पेच घातला असता तर त्याला चित करतां आलें असतें ह्या विचारानें वाटतो तो खेद.

रुखवत [**सं०** वृक्ष+पत्र] **न०** नवरामुलगा वधूच्या घराकडे यावयास निघतो तेव्हां वधूपक्षाकडून त्याला समारंभपूर्वक जें भोजन येतें तें.

रुखसत [**अ०**] **स्त्री०** १ जाण्यास दिलेली परवानगी;निरोप (देणें). २ हाकलपट्टी (देणें). **वि०**१ निरोप ज्याला देण्यांत आला आहे असा. २ हाकलून दिलेला.

रुखाडी (-ड्या), रुख्या, रुखी [**सं०**वृक्ष; **म०** रुख] **वि०** झाडावर चढण्यांत पटाईत किं० वहिवाटलेली.

रुखाडूं [**म०** रुख; **सं०** वृक्ष] **न०**ताडाच्या झाडावर चढणारा इसम पायांना जो पट्टा आडकावितो तो पट्टा.

रुखाळूं [**म०** रुख (झाड)+अळूं]**न०** वृक्षावर उगवणारें अळवा सारखें एक झाड.

रुगरदा, रुगर्दा [**हिं०**; **म०** रू=कापूस] कापूस आंत भरून केलेली (उशी,गिरदी, इ०).

रुंगळणें अ० क्रि० रोड किं० किडकिडीत होणें; वाळणें.

रुंगाळा पु० किडकिडीतपणा; रोडपणा; कृशता. **वि०** किडकिडीत; रोड; कृश.

रुचक [**सं०** रुचक=दांत] **न०**दांताचें हाड.

रुचकर [**म०** रुचि; **सं०** रुचि] **वि०** चवेला चांगलें किं० मिष्ट (खाद्य, पेय).

रुचणें [**सं०** रुच्] **अ० क्रि०** १ आवडणें. २ मान्य किं० संमत असणें; पटणें.

रुचि [**सं०**] **स्त्री०** १ तेज; कांति. २ शोभा; सौन्दर्य. ३ दिवा, सूर्य, इ० चें किरण. ४ चव. ५ इच्छा; आवड. ६ भूक; क्षुधा. ꕥ **रुचिकर, रुचकर वि०** १ चवदार, मिष्ट (खाद्य, पेय). २ क्षुधा उत्पन्न करणारें (हिंगाष्टक इ० औषध). **रुचीक वि०**१ गोड; स्वादिष्ट;मिष्ट. २ मनोरंजक.

रुचिर [**सं०**] **वि०** १ सुंदर. २ तेजस्वी. ३ चवदार; स्वादिष्ट; मधुर.

रुचीक [**म०** रुई+चीक] **पु०** रुईच्या झाडाचा चीक.

रुच्य [**सं०**] **वि०** १ मिष्ट; स्वादिष्ट; रुचकर. २ मनोरंजक; रमविणारें. **न०** पाचक पदार्थ (हिंगाष्टक इ०).

रुजणें [**सं०**रुह्] **अ० क्रि०** १ वृक्ष, बी, इ० जमीनींत जीव धरून वाढीस लागणें; (वृक्ष,बीज, इ०ना) अंकुर फुटणें. २ (**लाक्षणिक**) दुसऱ्यानें केलेला बोध, उपदेश, इ०) मनांत ठसणें किं० फलद्रूप होणें.

रुजवट [**म०** रुजणें] **वि०** रुजलेलें, अंकुर फुटलेलें (झाड, बीज).

रुजवण [**म०** रुजणें] **न०** पेरलेलें बीज;फुट-लेला अंकुर.

रुजामा [**फा०** रुवी+जामाह्] **पु०** १ज्यांत कापसाचा पातळ थर भरलेला आहे असा अंग-रखा. २ कापसाचा पातळ थर घालून केलेली बिछाईत.

रुंजी स्त्री० १ फुलें, फळें, इ०च्या भोंवतीं माशांचा गुणगुणाट. २ खबुतरें, पारवे, इ० पक्ष्यांचें घुमणें किं० कूकू असें ओरडणें.

रुजुवात, रुजवात [अ० रुज़अत्, रुजअ] **स्त्री०** १ ताडून पाहाणें;दोन कागद,दोन नकला; दोन विधानें,इ० परस्परांशीं मिळतीं आहेत किं० नाहींत हें तुलना करून पाहाणें किं० ठरविणें (करणें, पाहाणें, घेणें).२ यादी बरहुकूम पदार्थ, नांवें, इ० आहेत किं० नाहींत हें तपासणें. (घेणें). ३ प्रत्यय; अनुभव; समक्षता (येणें).

रुजू [अ० रुजूअ] **वि०** १ तयार; सिद्ध; सज्ज. २ हजर असलेला; हजर झालेला; कामावर स्थापिलेला. ३ कबूल केलेला किं०झालेला; मान्य; संमत. ४ खरा, योग्य किं० बाजवी म्हणून पथ-करलेला किं० मान्य केलेला.ꣳ **रुजू घेणें** ताडून पाहाणें.**रुजुगुदस्त,रुजूगुदस्त वि०**१चालू सालीं मान्य किं० कबूल केलेला किं० संमत अस-लेला. २ गुदस्त वहिवाटीस रुजू असलेला (व्यव-हार). **रुजूसु (-मो-) काबला पु०** दोन माण-सांचीं विधानें किं० हकीगती ताडून पाहाण्या-साठीं किं० त्यांतील खरेखोटेपणाचा निर्णय कर-ण्यासाठीं त्या दोघांना एके ठिकाणीं आणणें किं० उभें करणें किं० त्यांचीं समक्षता घडवून आणणें.

रुझणें, रुझवण वर ' रुजणें, ' 'रुजवण'पहा.

रुंझी स्त्री० वर ' रुंजी ' पहा.

रुटका पु० विध्यापेक्षां लहान असें एक जमी-नीच्या मापणीचें परिमाण. ꣳ **रुटकेबंदी स्त्री०** रुटका ह्या मापानें जमीन मोजून ठरविलेला सारा.

रुटुखुटु, रुटुगुटु, रुटुखटु, रुटुघुटु, रुटुघुट क्रि० वि० मंद गतीनें; संथपणें; क्रमाक्रमानें. ꣳ **रुटुखुटु करणें** किरकोळ कामें करणें;उ० मी रुटु-खुटु करून प्रपंच भागवितों.

रुंड [**सं०**] **न०** ज्याचें मुंडकें म्ह० डोकें तोडण्यांत आलें आहे असें शरीर.

रुंढ, रुंढी स्त्री० उचला. मागें 'उचला' पहा.

रुढणें [**सं०** रूढ; **म०** होणें] **अ० क्रि०** (बातमी, वदंता) लोकांत पसरणें.

रुणा पु० चिंता; हुरहुर; झुरणी (घेणें, लागणें).

रुतण (-न) [**म०** रुतणें] **स्त्री०** जेथें चाल-तांना पाय, गाडीचीं चाकें, इ० रुतून बसतात अशी जागा.

रुतणें अ० क्रि० १ कांटा, खडा, इ० बोचणें किं० आंत शिरून बसणें. २ चिखल, दलदल, इ० मध्यें (गाडी, पाय, इ०) खोल जाऊन आडकणें; रुपून बसणें.

रुतु मागें ' ऋतु ' पहा.

रुतबा [अ० रुतबाह] **पु०** दर्जा; पदवी; अधिकाराचें स्थान; मरतबा.

रुंद वि० १ कांहीं क्षेत्रफळाचीं परस्परांशीं काटकोनांत घेतलेलीं विस्ताराचीं जीं दोन परि-माणें त्यांपैकीं लहान जें परिमाण तें; उ० हें दालन पंचवसि हात लांब आणि बारा हात रुंद आहे. २पदार्थाच्या दोन परिमाणांपैकीं आखूड जें परिमाण तें नेहेमीं पेक्षां मोठें आहे ज्याचें असा (पदार्थ); उ० तुझें पाऊल चिंवळ आहे, माझें पाऊल रुंद आहे. ꣳ **रुंदट (-ड) वि०** जरासें रुंद; किंचित् रुंद. **रुंदी स्त्री०** क्षेत्राचीं जीं दोन परिमाणें त्यांपैकीं जें आखूड तें किं० ह्या आखूड परिमाणानें ठरलेली जी मोजदाद ती.**रुंदावा पु०** रुंदपणा. **रुंदेला, रुंदाट (-ड)वि०** रुंद घडणीचा किं० आकाराचा. [रुंद करणें.

रुंदावणें [**म०**रुंद]**अ०क्रि०**रुंद होणें.**स०क्रि०**

रुदित [**सं०**] **न०** रडणें; विलाप; आक्रोश.

रुद्ध [**सं०**] **वि०** १ आडविलेलें;बंद केलेलें. बंद पाडलेलें. २थांबविलेलें.३वेष्टिलेलें; गराडलेलें.

रुद्र [**सं**] **पु०** १ शंकर. २ शंकराच्या अकरा अवतारांपैकीं एक. ३ अकरा ही संख्या. ४ तापट माणूस. ꣳ **रुद्रगांठ स्त्री०** लुगडें, दोरवा, इ० वस्त्रें विणतांना चौकडी सारखीं चिन्हें जीं विण-लेलीं असतात तीं प्रत्येक. **रुद्रगांठी वि०** रुद्र-

गांठी ज्याच्या विणींत आहेत असें (लुगडें इ०). **रुद्रपिशाच पु०** १ काशींत मेलेला प्राणी काशींत केलेल्या पापाबद्दल जो पिशाचदेह धारण करतो तो. २ तापट स्वभावाचा माणूस. **रुद्रभूमि स्त्री०** स्मशान; मसणवटी. **रुद्रवात स्त्री०** अकरा सुतांची करतात ती वात,–देवापुढें जाळण्यासाठीं. **रुद्रवीणा पु०** वीणा म्हणून जें तंतुवाद्य आहे त्यांतील एक प्रकार. **रुद्रावतार** फार क्रोध आल्यानें भयंकर झालेलें कोणेंकाचें जें रूप तें किं० क्रोधामुळें भयंकर दिसणारा माणूस. **रुद्राक्ष पु०** एक वृक्षविशेष किं० त्याचें फळ. ह्या फळाच्या जपमाळा इ० करतात.

रुधणें, रुंधणें [सं० रुध्] अ० क्रि० १ थांबणें; अडकून पडणें; थांबविलें जाणें. २(रस्ता, वाट, इ०) माणसें, गाड्या, इ० च्या दाटीमुळें अडणें किं० त्यांतून जाणें कठिण किं० अशक्य होणें. ३ (घर, खोली, इ०) सामानानें भरगच्च भरलेलें असणें. स० क्रि० १ आडविणें; बंद पाडणें; थांबविणें. २ व्यापून टाकणें; भरून काढणें.

रुधणें मागें ' रुजणें ' पहा.

रुधिर [सं०] वि० तांबडा. पु० मंगळ हा ग्रह. न० प्राण्याच्या शरीरांतलि रक्त. ꕥ **रुधिराशन पु०** राक्षस. **रुधिरोद्गारी पु०**साठ संवत्सरांतील सत्तावन्नावा संवत्सर.

रुपटका, रुपडा पु०, रुपडी, रुपटकी स्त्री० रुपाया (तिरस्कारांत).

रुपडें, रूपडें [सं० रूप] न० रूप (प्रेमांत किं० तिरस्कारांत).

रुपण, रुतण [म० रुपणें, रुतणें] न० भुसभुशीत जागा; दलदलीची जागा.

रुपणें, रुतणें अ० क्रि० १ दलदलींत किं० भुसभुशीत जागेंत खचणें किं० खोल जाणें. २ बोचणें; खुपणें.

रुपया, रुपाया, रुपा [म० रुपें] पु० सोळा आणे किमतीचें चांदीचें नाणें. भिक्षुकांच्या भाषेंत राम=रुपाया; सीता=आधेली; लक्ष्मण=पावली; भरत=चवली; रामदास=आणा. ꕥ **रुपायाची मान मोडणें** १ रुपायाचें नाणें देऊन त्या किमतीचीं चवल्या, पावल्या, इ० लहान नाणीं घेणें. २ कांहीं क्षुल्लक पदार्थ विकत घ्यावयासाठीं रुपाया हें मोठें नाणें देऊन चवल्या, पावल्या इ० बारकीं नाणीं बाकीच्या पैशाबद्दल घेणें.

रुपा वि० अंग पांढरें असून त्यावर काळे किं० तांबडे ठिपके असलेला (बैल, गाय, इ० पशु). पु० रुपाया हें नाणें.

रुपुस्त [फा० रू (तोंड)+पुश्त(पाठ)] स्त्री० गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.

रुपें [सं० रौप्य] न० चांदी हा धातु. ꕥ **रुप्याचे डोळे पु० अ० व०** निस्तेज डोळे (आजाऱ्यांचे किं० मरणोन्मुख माणसाचे). **रुपेरी वि०** रुपें ह्या धातूचा बनविलेला किं० बनविल्यासारखा दिसणारा किं० चांदीचा मुलामा दिलेला (दागिना इ० पदार्थ). **रुपेरी कांटा पु०** बाभळीचा कांटा. **रुपेशाई लोखंड न०** एक प्रकारचें लोखंड. हें शिकेशाई लोखंडाहून कमी दर्जाचें असतें. **रुपेरी बिडी स्त्री०** दिसण्यांत वैभवशाली पण वस्तुतः गुलामगिरीची स्थिति. **राजसेवेची रुपेरी बिडी स्त्री०** सरकारी नोकरी,–जी कितीही मोठ्या अधिकाराची असली तरी वस्तुतः दास्यरूपच असते.

रुबकार [फा० रू (तोंड)+बह (पुढें) +कार] क्रि० वि० समक्ष; समोर; पुढें. २ सलक्ष्य; तन्मयतेनें. ३ काळजीपूर्वक. स्त्री० समक्षता; प्रत्यक्ष गांठ (करणें.)

रुबरु, रुबरु, रुबेरूब [फा० रूबरू=तोंडासमोर तोंड] क्रि० वि० समोरासमोर तोंडें करून. वि० लवकरच येणारा किं० होणारा किं० जवळ येऊन ठेपलेला.

रुमणी, रुम्हणी स्त्री०, रुमणें, रुम्हणें न० नांगर इ० आउत हाकतेसमयीं नांगर इ० चा हातांत धरतात तो अवयव. ꕥ **रुमणबाक पु०** शेतांतलि बाक किं० कोस.

रुमाल [फा० रू (तोंड)+मालिदन् (पुसणें)] पु० १ तोंड पुसण्याचें लहानसें फडकें. २ कोणत्याही कामाचें चौकोनी वस्त्र,–कागदपत्रें बांधणें, अंग पुसणें, हात पुसणें, इ०. ३ डोकीला बांधावयाचें मोठें चौकोनी वस्त्र. ४ कागदपत्रांचें दफतर. ५ राजा इ० बड्या गृहस्थावर वारावयाचें रेशमी वस्त्र (फिरविणें, उडविणें). ६ शत्रूला आपण शरण येत आहों असें कळवि-

ण्यासाठीं वाऱ्यावर उडवितात तें वस्त्र. ७ देशपांड्या किं० कुलकरणी यांना बक्षीस दिलेली जमीन (जमीन देतांना सरकारी दफतर किं० कागदपत्रांचा रुमाल त्यांचे हवालीं करतात ह्या चालीवरून). ꙮ **रुमाली स्त्री०** १ तालमींतील मुद्गल किं० जोडी डोकीभोंवतीं फिरविण्याचा एक प्रकार. २ एक प्रकारचें खबूतर. **रुमाली गज पु०** कापड इ० मोजावयाचा चवदा तसूंचा गज. जमीन मापणीचा गज सोळा तसूंचा असून त्याला ' रेशमी गज ' म्हणतात. **रुमाली घडी स्त्री०** खणाची तिकोनी घडी. **रुमाली पाटी स्त्री०** दोन तीन पायल्या धान्य जींत राहूं शकेल अशी बांबूची पाटी किं० हारा.

रुमामस्तकी, रुमेमस्तकी स्त्री० एक औषधोपयोगी चीक.

रुरयात [**फा०** रू (तोंड) + रिआयत् (आदर)] **स्त्री०**कोणेकाला दाखविलेला आदर, संमान, किं० पूज्यभाव.

रुशवत, रिशवत [**फा०** रुष्वत्=लाच] **स्त्री०** लाच;लाचलुचपत.

रुष्ट [**सं०**] **वि०** रागावलेला; रुसलेला; नाखूष झालेला.

रुसकत, रुस्कत मागें ' रुकसत, ' ' रुखसत ' पहा.

रुसकां [**म०** रुसणें]**वि०** वारंवार रुसणारा; क्षुल्लक कारणावरून रुसून बसण्याच्या स्वभावाचा (मनुष्य).

रुसणें [**सं०** रुष्] **अ० क्रि०**कोणेकानें कांहीं गोष्ट केली ती आपणास न आवडल्यामुळें (आपण) रागावणें किं० (आपणास) घुस्सा येणें. ꙮ **रुसणें फुगणें अ० क्रि०** रागावणें आणि चरफडणें किं० घुम्यासारखें बसणें; उ० विहीणींच्या रुसण्याफुगण्याबद्दल आम्हाला हुंड्याशिवाय आणखी शंभर रुपये द्यावे लागले. **रुसवा पु०** घुस्सा; रुसण्याची क्रिया. **रुसवा फुगवा पु० ए० व०** रुसणें आणि घुम्यासारखें बसणें.

रुसविणें [**म०** ' रुसणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** (कोणेकाला न आवडणारी अशी कांहीं गोष्ट करून त्याला) राग किं० घुस्सा आणणें.

रुसूम [**अ०** ' रस्म् ' (चाल, रीति) चें **अ० व०** रसूम् (चाली, रीति)] **पु०** १ देशमुख आणि देशपांड्या ह्यांना जमीनीच्या उत्पन्नापैकीं द्यावयाचा भाग. २ हक्क म्हणून कोणेकाला जें कांहीं द्यावयाचें तें देय.

रुस्तुम [**फा०** रुस्तुम् हा ' शाहनामा ' नांवाच्या काव्यांतील एक वीरपुरुष होता] **पु०** शूर पुरुष. ꙮ **रुस्तुमी स्त्री०** शौर्य; अचाट पराक्रमाचें कांहीं कृत्य.

रुह [**सं०** रुह्=वाढणें, रुजणें] **वि०** उत्पन्न होणारा, वाढणारा, उगवणारा. ह्याचा उपयोग संस्कृत उपपद तत्पुरुष समासांत उत्तरपदीं होतो. उ० कररुह=नख; शिरोरुह=केश; महीरुह=झाड.

रुही, रोही स्त्री० नीलगाय हा प्राणी.

रुळणें अ० क्रि० १ अंगावर (धारण केलेला हार, माळ, इ०) झोकांत किं० वैभवानें हालत असणें. २ डोकीवर (केश) वाऱ्यानें भुरुभुरुं हालत असणें. ३ एकाद्या कामांत किं० नोकरीवर किं० कांहीं मंडळींत (कोणेकानें) अभ्यस्त किं० परिचित होणें. ४(वस्त्र, दागिना, इ०)वापरण्यानें चोळवटणें. ५ एकाद्या विषयांत, शास्त्रांत किं० कलेंत (कोणेकाला) सराव किं० सफाई प्राप्त होऊन त्याची त्यांत प्रगति होणें किं० होऊं लागणें.

रुळलेला[**म०**रुळलें] **वि०**वहिवाटलेला; परिचित; वापरल्यानें सोयीचा किं० सुखकारक झालेला; ज्याच्या अंगवळणीं कांहीं गोष्ट पडली आहे असा; एकाद्या शास्त्रांत किं० कलेंत किं० कामांत वहिवाटलेला.

रुळें न० स्त्रियांच्या पायाच्या घोट्यावर घालावयाचा एक दागिना. पुढें ' रूळ ' पहा.

रू [**हिं०** रुवी, रुई] **पु०** पिंजलेला कापूस.

रू [**फा०**] **न०**१ तोंड. २ गंजीफीची दर्शनी बाजू. ꙮ **रूबरू, रोबरो क्रि०वि०** समोर; पुढें; समक्षांत. **रूबरू, उरूबरू स्त्री०** भांडण; बोलाचाली; बाचाबाची.

रूं न० डोक्यांतला फोड; खवडा. **रुवें न० अ० व०** खवडे.

रूख [**सं०** वृक्ष] **पु०** १ झाड, वृक्ष. २ पाण्याच्या रहाटाच्या कणेकडाचीं टोकें ज्या दोन आडव्या लाकडांवर टेकलेलीं असतात तीं

लाकडें प्रत्येक. ३ शाखारहित झाड. ४ झाडाचा बुंधा. ५ पुढें ' रोख ' पहा.

रूढ [**सं०**] **वि०** १ उगवलेला; उत्पन्न झालेला. २ वृद्धिंगत. ३ प्रचारांत किं० चालू असलेला. ४ समाजांत चालू असलेला. ५ जाहीर असलेला. ६ शब्दाचा सर्व लोकांनीं पथकरलेला (अर्थ). व्युत्पत्तीवरून ठरलेला आणि सर्व लोकांनीं पथकरलेला जो अर्थ तो योगरूढ अर्थ. व्युत्पत्तीवरून निघणारा जो अर्थ तो यौगिक अर्थ.

रूढविणें [**म०** रूढ] **स० क्रि०** १ जाहीर करणें. २ प्रचारांत आणणें.

रूढि [**सं०**] **स्त्री०** १ वाढ. २ उत्पत्ति. ३ प्रसार; फैलाव; प्रसिद्धि. ४ चाल; वहिवाट; शिरस्ता; संप्रदाय. ५ कीर्ति. ६ (**साहित्य**) केवळ लोकांच्या संकेतावरून ठरलेला अर्थ.

रूदार [**हिं०**] **वि०** पिंजलेल्या कापसाचा पातळ थर ज्यांत भरला असा आहे अंगरखा, दुलई, इ०.

रूप [**सं०**] **न०** १ आकार; आकृति. २ बाह्य देखावा. ३ चेहेरा; मुद्रा. ४ (**न्याय**) नेत्रानें दिसणारे पदार्थांचे जे रंग आणि आकार हे धर्म ते. ५ पदार्थाचा आरसा, पाणी, इ० मध्यें दिसणारा देखावा. ६ (**व्याकरण**) प्रत्यय लावल्यावर धातु, नामें, इ० च्या पासून नवीन सिद्ध होतो तो शब्द; उ० ' राम ' ह्याचें तृतीयेच्या एकवचनाचें रूप ' रामानें ' असें होतें. ७ (**गणित**)एक परिमाण दुसऱ्या परिमाणांत नेलें असतां त्याचा होतो बदल;उ०आडीच रुपायांचें आण्यांचें रूप चाळीस आणे. ८ सौन्दर्य; शोभादायक गुण; उ० विनय हें स्त्रीचें रूप होय. ९ कांहीं कामाचा श्रेयस्कर किं०प्रशंसनीय परिणाम; उ० कृतघ्नाची नोकरी करण्याचें रूप होत नाहीं. १० पदार्थाचा मूळ धर्म. ११ (**मराठी व्याकरणांत**) क्रियेचा मूळचा अर्थ किं० त्या मूळच्या अर्थाच्या उलट अर्थ दाखविण्यासाठीं जो फेरफार केला जातो तो; उ० तो करील हें करणरूप; तो करणार नाहीं हें अकरण रूप. १२ तादात्म्य. १३ (**गणित**) एक ह्या संख्येची संज्ञा. १४ अव्यक्त गणितांत व्यक्त संख्येची संज्ञा.१५(**वैद्यक**) निदानाचा दुसरा प्रकार.१६ चंगकांचन गंजिफांतील सातवा रंग. ह्या अर्थी **पु०**. ॐ **रूपरंग पु०** ए० व० बाह्य देखावा; सामान्य स्वरूप. **रूपी वि०** रूप घेतलेला; उ० राज्यरूपी वृक्ष म्ह० राज्याचें रूप घेतलेला वृक्ष किं० राज्य हाच वृक्ष.**रंगारूपास येणें** फलद्रूप, वैभवशाली,सुखावह, सर्वांग सुंदर, किं० परिपूर्ण होणें: उ० माझा कारखाना रंगारूपास यावयाला आणखीं सहा महिने पाहिजेत. **रूपरेषा स्त्री०** १ पदार्थाचा आराखडा. २ बाह्य देखावा. ३ थाट; अंगलट; घटना; बांधा. **रूपवान् वि०** सुंदर. **रूपस वि०** सुंदर; नटिनेटकें. **न०** सौंदर्य. **रूपावलि स्त्री०** नामें, सर्वनामें, इ० च्या सर्व विभक्तींचीं सर्व रूपें ज्यांत दिलीं आहेत असें पुस्तक. **रूपान्तर न०** १ दुसरें रूप. २ कादंबरी, नाटक, इ० मध्यें कांहीं फेरफार करून नवीन बनविलेली कादंबरी,नाटक, इ०. **रूपरत्नपरीक्षा स्त्री०** हिरे, मोतीं, नाणीं, इ० ची पराक्षा,–चौसष्ट कलांपैकीं एक. **रूपाजीवा स्त्री०** वेश्या.

रूपक [**सं०**] **न०** (**साहित्य**) प्रकृत आणि अप्रकृत, म्हणजे उपमेय आणि उपमान, ह्यांच्यांत अभेद किं० एकत्व आहे जसें गृहीत धरून जें विधान केलेलें असतें त्याला रूपक म्हणतात; उ० कोपाग्नि म्ह० कोपरूपी अग्नि.येथें कोपावर अग्नित्वाचा आरोप केला आहे.रूपकाचे विविध प्रकार, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

रूप्य [**सं०**] **न०** रुपें हा धातु; चांदी.

रूबरू, रूबुरू [**फा०**] **स्त्री०** प्रत्यक्ष भेट; गांठ. **क्रि० वि०** समोरासमोर; समक्षासमक्ष.

रूभरी [**हिं०** रू (कापूस)+भरणें] **वि०** ज्यांत कापसाचा पिंजलेला पातळ थर भरला आहे असा (अंगरखा, लेप, इ०).

रूय, रूई स्त्री० १ पिंजलेला कापूस. २ एक झुडूप. ह्याच्या बोंडांत कापसासारखे असंख्य तंतु असतात.

रूळ पु० स्त्रियाचें पायांत घालण्याचें एक भूषण. मागें ' रुळें ' पहा.

रूळ [इ० रुलर्] **पु०** कागदावर सरळ रेघा

आखावयाचा दंडगोल असा लाकूड इ० चा तुकडा.

रूळ [इ० रोलर्] **पु०** रस्त्यावरची खडी चेपून रस्ता सपाट करण्याचें साधन किं० यंत्र.

रूक्ष [**सं०**] **वि०** १ कठिण; टणक. २ खर बडीत; खरखरीत. ३ आर्द्रता किं० स्निग्धता ज्याला किं० ज्यांत नाहीं असा. ४ निर्दय, कठोर, किं० प्रेमरहित (वर्तन, भाषण). ५ कोरडी (हवा, वारा). ६ रखरखीत किं० कडक (ऊन्ह).

रे [**सं०**] उ० **वा०अ०** हे ! उ० रे मुला, ती खिडकी झाक. ह्या शब्दाचा उपयोग **पु० ए० व०** होतो.

रेकणें अ० **क्रि०** १ (म्हैस, रेडा, इ० नीं) ओरडणें. २ घोगऱ्या आवाजानें बोलणें. ३ चरफडणें; पिरपिरणें; असंतुष्टपणानें ओरडणें.

रेकला [**हिं०** रहकुला] **पु०** १ एक प्रकारची गाडी. २ पेरलेलें बी झाकून टाकण्याचें शेतकऱ्याचें एक आउत. ३ सुरंग लावून खडक फोडण्याचें एक साधन.

रेख्ता [**फा०** रेखूताह्]**पु०** हिंदुस्तानी भाषेंतील एक प्रकारचें गीत.

रेटखणें,रेखाटणें[म० 'रेखणें'चें एक रूप]**स० क्रि०**१(कागद,भिंत,इ०वर) कांहीं चित्र,आकृति, शब्द इ० काढणें. २ (कागद, भिंत, इ० वर) अव्यवस्थितपणें रेघा काढणें किं० रेघा काढून विरूप करणें.

रेखणें [**म०** रेखा] **स० क्रि०** (कागद, भिंत, जमीन, इ० वर) रेघा किं० रेघोट्या काढणें. २ (चित्र, कांहीं आकृति) भिंत, कागद, इ० वर रेघांच्या रूपानें काढणें. ३ घासून (भिंत, दगड, इ०) गुळगुळीत करणें. ४ मनांत (देव, साधु, इ० ची प्रतिमा किं० मूर्ति) ठसवून घेणें किं० कल्पिणें. ५ अंग, कपाळ, इ० वर (गंध इ०) रेघांच्या रूपानें चिन्हित करणें. ६ वस्त्राच्या (चुण्या किं० डोईच्या केशांच्या पट्टया) चापून चोपून बसविणें. ॐ **रेखला वि०** नटिनेटका प्रमाणबद्ध.

रेखा [**सं०**] **स्त्री०** १ रेघ; रेषा. २ काढलेलें चित्र किं० आकृति. ३ लंका आणि मेरू यांना जोडणारी दक्षिणोत्तर रेषा. ४ रांग; पंक्ति; ओळ. ५ हात, बोटें, इ० वर जन्मजात चिन्हें असतात तीं. ॐ **रेखांश पु०** स्थलविशेषाचें ठराविक बिंदूच्या पूर्वेस किं० पश्चिमेस जें अंतर तें. **रेखांतर न०** अर्थ ३ च्या रेखेपासून पूर्वपश्चिम अंतर. **रेखागणित** भूमिति क्षेत्रमापनाचें शास्त्र.

रेंगडी स्त्री० गात्राला येतो तो पेटका (वळणें).

रेंगणें [**सं०** रिंख्, रिंग्] **अ० क्रि०** १ (मुलानें) रांगणें. २ आळसानें किं० मंद गतीनें किं० अनुत्साहानें कांहीं काम करीत राहाणें.

रेंगळ स्त्री० वैपुल्य; समृद्धि.

रेंगळणें, रेंगाळणें [**म०** रेंगणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** १ मागें राहाणें किं० मागें पडणें. २ आळसानें किं० मंदगतीनें काम करीत राहाणें. ३ अति दमणें किं० श्रांत होणें.

रेघ [**सं०** रेखा] **स्त्री०** १ रेषा; ओळ. २ कांहीं आकृतीची मर्यादा. ३ कपाळावरील केश न्हाव्याकडून चिमट्यानें उपटवून महिरपीच्या आकाराची जी आकृति हौसी लोक कपाळावर करवितात ती. ॐ **कोणेकाला रेघ ओढून देणें** त्याच्या वर्तनाला शिस्त लावून देणें; त्याला वर्तनाचे नियम घालून देणें. **रेघेरूपास आणणें** कांहीं धंदा किं० काम किं० कोणी मनुष्य ह्यांना उत्कर्षाच्या स्थितीस पोंचविणें किं० त्यांना वैभवशाली करणें. **रेघरूप न० ए० व०** १ पदार्थाची गटना किं० आकारमान. २ पदार्थाचें स्वरूप. ३ कामधंदा इ० ची वैभवाची स्थिति.

रेंघळणें अ० क्रि० १ आळसानें किं० मंदगतीनें (काम, धंदा, माणूस, इ०) चालणें किं० चालत राहाणें. २ मागें पडणें. ३ आजारांत खितपत पडणें. ४ घसरत चालणें. ५ नाना प्रकारचीं विघ्नें येऊन (कांहीं काम) आडखळत चालणें.

रेघाळणें [**म०** रेघ] मागें ' रेखाटणें ' पहा.

रेघोटी [**म०** रेघ] **स्त्री०** रेघ; रेषा.

रेघोतळी स्त्री० दागिना किं० भांडें यांच्या नक्षीच्या नाजूक रेघा उमटविण्याचें किं० ओरखडून काढण्याचें सोनाराचें एक हत्यार. अशा रेघेला ' छटकारा ' किं० ' गुजरणी ' म्हणतात.

मागें ' छटकारा ' आणि ' गुजरणी ' हे शब्द पहा.

रेच [**सं०** रिच्=रिकामें करणें, देऊन टाकणें] **पु०** १ मनुष्य जेवावयाला बसलेला असतां कोणी भरल्या पायांचा मनुष्य तेथें आला किं० त्या जेवणाराला कोणाची दृष्टि लागली तर त्याची अन्नावर एकदम अरुचि उत्पन्न व्हावी, मळमळ लागावें किं० वांति व्हावी असा जो प्रकार होतो तो (भरणें, उतरणें, लागणें, करणें). २ कोणेकाला आलेला किं० झालेला गर्व; ताठा; अभिमान (उतरणें, मोडणें, जिरविणें, ह्याच क्रियापदांच्या साहचर्यानें). ३ कोणेकाच्या पाठींत किं० एकाद्या गात्रांत शैत्यादि कारणांनीं उत्पन्न होतो तो ताठपणा (मोडणें, उतरणें, भरणें). ४ गुदद्वारें झालेलें जोराचें मलविसर्जन (होणें). ॐ **कोणकाचा रेच मोडणें** (किं०**उतरणें**) १ त्याची खोड मोडणें; त्याच्या गर्वाचा परिहार करणें. २ चेपून, रगडून, चोळून, किं० बुक्क्या मारून त्याच्या गात्राचा ताठपणा नाहीसा करणें. **रेचक न०**गुदद्वारें जोरानें मलविसर्जन करणारें कांहीं औषध (घेणें, लागू पडणें).

रेचन [**सं०**] **न०** जोराचें गुदद्वारें मलविसर्जन.

रेचित [**सं**] **वि०** रिकामें केलेलें.

रेज [**सं०** रजस्; **म०** रज्] **पु०** सोनें, चांदी, इ० धातूचा कण. ॐ **रेजगण, रेजगाण पु०, न०** दागिने, नाणीं, भांडीं, इ० चे तुकडे, कण, इ० समुच्चयानें; चोळी, अंगरखा, इ० कपडे बेतल्यावर जे कापडाचे निरुपयोगी तुकडे राहातात ते समुच्चयानें.

रेजगी [**फा०** रेझ्गी] **स्त्री०**१फोडलेल्या किं० तासलेल्या लाकडाचे तुकडे, खंड, धलप्या, इ० समुच्चयानें.२ किरकोळ नाणीं समुच्चयानें;मोड.

रेंजणें स० क्रि० आदरबुद्धीनें किं० पूज्यभावानें लेखणें किं० गणणें किं० मानणें (निषेधीं प्रयोग); उ० जो बापाला रेंजीत नाहीं तो चुलत्याला काय रेंजणार ?

रेजा [**फा०** रेजाह्=कापडाचा तुकडा] **पु०** १ कापडाचा तुकडा. २ तुळई इ० चा तुकडा; खंड;धलपी. ३ खेळावयाच्या फाशांवरील पगडा.

ॐ **रेजाबाकी स्त्री०** वस्त्र, बेगमीचें धान्य, इ० चा तुकडा किं० अवशेष.

रेजीम[**पोर्च्युगीझ्**] **न०** कागदाच्या पांचशे बंदांचा गठ्ठा.

रेट [**म०** रेटणें] **न०** जाडी भाकरी.

रेट [**म०** रेटणें] **स्त्री०, पु०** १ गर्दी; दाटी; खेचाखेच (करणें, बसणें, होणें). २ पदार्थ पुढें सरकावण्यासाठीं त्याला मागून लाविलेला जोर किं० नेट (लावणें, देणें.)

रेटणी [**म०** रेटणें] **स्त्री०** रेटण्याची क्रिया. पुढें ' रेटणें ' पहा.

रेटणें स० क्रि०१ (पदार्थाला) पुढें जाण्याची गति देणें.२मागून दाब घालणें.३खुपसणें;ढकलणें. ४ (कांहीं अनिष्ट) प्रतिकार करून थांबविणें. ५ (कठिण काम) नेटानें पार पाडणें. ६ (धंदा, नोकरी,काम,इ०) विघ्नें न जुमानतां चालविणें.७ (खाद्य) अधाशीपणानें खाऊन टाकणें.८ संकटाच्या स्थितींत (दिवस, काळ) काढणें किं० कंठिणें. ॐ **रेटून जाबसाल करणें** कोणाची भीडमुरवत न ठेवतां आपलें म्हणणें स्पष्टपणें सांगणें. **रेटून क्रि० वि०** १ जोरानें; आवेशानें; २ मोठ्या प्रमाणांत.

रेटणें अ० क्रि० १ सरकणें; स्थानभ्रष्ट होणें. २ (धान्यें, पाणी, इ०) विपुल होणें किं० पिकणें.

रेटा [**म०** रेटणें] **पु०** धक्का; नेट; जोर.

रेटाई [**म०** रेटणें] **स्त्री०** १ रेटण्याची किं० ढकलण्याची क्रिया (करणें). २ संकटें, विघ्नें, इ० कडे दुर्लक्ष्य करून किं० त्यांना न जुमानतां काम चालू ठेवण्याची क्रिया.

रेटूक [**म०** रेटणें] **न०**जाडी भाकरी,पोळी, पापड, इ० (तुच्छतेंत).

रेड [**हिं०** रेल्] **स्त्री०** आंबे, फणस, धान्यें, इ० चें वैपुल्य; समृद्धि (होणें, पडणें).

रेडका [**म०** रेडा] **पु०** १ रेडा; टोणगा. २ तडकणीसाठीं गोणी, पोतें, इ० वर घातलेला दोरीचा फास. ३ एक प्रकारची गाडी.

रेडकूं, रेडूक [**म०** रेडा] **न०** १ म्हशीचें अपत्य. २ म्हैस (तुच्छतेनें).

रेडा पु० १ म्हैस ह्या चतुष्पाद पशूच्या

जातीचा पुरुष. २ बटवा नांवाची पिशवी उघडण्याच्या ज्या दोन दोऱ्या त्या प्रत्येक. ॐ **रेड्यापाड्यांची झुंज आणि झाडांचें मरण** दोन समर्थांच्या भांडणांत गरीबगुरीबांचा विनाकारण चुराडा होतो.

रेडी स्त्री० म्हैस हा दूध देणारा पशु.

रेड्डू पु० एक प्रकारची गाडी; रेडका.

रेड्डूक न० वर ' रेडकूं ' पहा.

रेणवी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

रेणु [सं०] पु०, स्त्री० १ धूळ. २ फुलांतील पराग.

रेणें न० गवत, कडबा, इ० जें अद्यापि खाऊं लागलें नाहीं, जें केवळ मातेच्याच दुधावर आहे अशा वासरूं, रेडकूं, इ० अपत्यांची विष्ठा. **रेणणें अ० क्रि०** (अशी विष्ठा रेडकूं, वासरूं, इ० नीं) विसर्जिणें. [धातु.

रेत [सं० रेत, रेतस्] न० पुरुषाचें वीर्य;

रेत, रती [सं० रेत=वाळू, रेती] स्त्री०वाळू, रेती. ॐ **रेतदाणी(-नी)स्त्री०**लिहिलेल्या कागदावर घालावयाची वाळू ज्या आकारविशेषाच्या भांड्यांत ठेविलेली असते तें भांडें; वाळूदाणी.

रेती स्त्री० वर, 'रेत', ' रेती ' पहा.

रेंद स्त्री०, रेंदा पु० १ घर, गुरांचा गोठा, इ० तील केरकचरा किं० गदळ. २ चिखल. ३ तेल, तूप, इ० च्या बारदानांतील गाळ. ४ जखम, गळू, इ० तील दाट पू, रक्त, इ०. ५ शेणाची रास. **रेंद पु०** पिण्याच्या दारूची भट्टी. ह्या अर्थीं ' **रेंदसरा** ' **पु०** सुद्धां. **रेंद न०, पु०** मक्ता. ॐ **कोणेकाचा रेंदा काढणें** त्याला झोडपून काढणें. **रेंदकरी पु०** मक्तेदार. **रेंदवणी न०** गदळ पाणी. **रेंद वि०** आळशी; सुस्त.

रेंदावणें [म० रेंदा] अ० क्रि० १ (पाणी इ०) गढूळ होणें. २ (गळूं इ० मध्यें पू) सांचणें किं० (तें) पुवानें डबडबणें. **रेंदाविणें स० क्रि०** (पाणी इ०) गढूळ करणें.

रेप स्त्री० तापांत अंगांत उठते ती शिणिक. **रेपा स्त्री० अ० व०** १ तापांत अंगांत उठतात त्या शिणका किं० कळा (येणें). २ आमांशामुळें पोटांत उठतात त्या वेदना.

रेप स्त्री० १ मोठा दगड. २ अगडबंब माणूस, पशु, फळ, इ०. **स्त्री०, पु०** दाट चिखल. ॐ **रेपांवर रेप घालणें** (किं० **बसविणें**)आधाशीपणानें खाद्य पोटांत घालणें (म्ह० खाणें).

रेपणें [म० रेप=चिखल] अ० क्रि० कांहीं हालचाल न करतां सुस्तपणानें बसणें.

रेफ [सं०] पु० १ र हें अक्षर. २ अक्षराच्या डोक्यावरचें ' र ' चें अर्धवर्तुळाकृति चिन्ह; उ० अर्क. ॐ **द्विरेफ पु०** भ्रमर; भुंगा.

रेब स्त्री० १ चिखल. २ समुद्र खवळला म्हणजे कांठावर जो लोण्यासारखा मृदु गाळ येतो तो.

रेंबट स्त्री० रमत गमत किं० सुस्तपणें कांहीं काम करणें. ॐ **रेंबट कहाणी स्त्री०** कंटाळवाणी हकीगत (लावणें, मांडणें, इ०). ॐ **रेंबट्या पु०** मंदपणें किं० सुस्तपणें काम करणारा.

रेबटणें स० क्रि० (पदार्थाला) तेल, तूप, चिखल, इ० चोपडणें.

रेंबटणें, रोंबटणें स० क्रि० १ खुपसणें; शिरकावणें. २ चेपणें.

रेबटी स्त्री० खालीं 'रेबडी ' पहा.

रेबड स्त्री० १ चिखल, शेण, गू, ओला केरकचरा, इ० चा कोणेक स्थळीं असलेला ढीग किं० पसारा. २ रक्तमिश्रित पू.

रेबडणें अ० क्रि० चिखल, शेण, गू, शेंबूड, रक्त, इ० नीं (जमीन, अंग, नाक, इ०) बरबटलेलें असणें किं० होणें. **स० क्रि०** (रस्ता, जमीन, अंग, इ०) चिखल, शेण, गू, इ० नीं बरबटविणें किं० माखणें.

रेबडी, रेबटी स्त्री० १ पातळ गूळ; थेंबां थेंबांनीं ठिपकत असलेला गूळ. २ फार पिकलेला फणस, आंबा, इ० तील थिलथिलीत गीर.

रेभ स्त्री० भिंत, जमीन, इ० तील भेग, फट, किं० चीर.

रेंभट इ० वर ' रेंबट ' इ० पहा.

रेमटणें, रोंबटणें स० क्रि० १ चेपणें; दाबणें. २ खुपसणें; शिरकावणें.

रेम्या, रेमेडोक्या वि० १ मदड; मूर्ख; बुद्धिहीन. २ संथपणानें काम करणारा.

रे रे स्त्री० १ पिरपीर; रड. २ अति संथपणानें किं० मंदगतीनें कांहीं काम करण्याचा प्रकार.

रे रे स्त्री० कोणेकाला दरडावणें (करणें). **उ० वा० अ०** हाय हाय ! अरेरे !

रेल [हिं०] स्त्री० १ वैपुल्य; समृद्धि. २ ओढ्याच्या पाण्याचा एकदम आलेला लोंढा (येणें). ३ बारीक वाळू किं० रेती. ❀ **रेलचेल स्त्री०** अघळपघळ पुरण्याइतकें कोणेक पदार्थाचें वैपुल्य; समृद्धि.

रेलणें अ० क्रि० १ (भिंत, खांब, इ०) योग्य रचना, मांडणी, उभारणी, इ० पासून सरकणें, कलणें, किं० झुकणें. २ ढासळणें; घसरणें.३ गडून पडणें.

रेव स्त्री० १ बारीक वाळू किं० रेती.२ साखर, दळलेलें पीठ, इ० तील कचकच. **न०** आकाशांत लांबलचक पांढऱ्या ढगाचे पट्टे वधी वधी पसरलेले दिसतात ते समुच्चयानें किं० तशा पट्टयांनीं व्याप्त असें आकाश (निघणें, पसरणें, चढणें, इ०).❀**रेवट, रेवठील वि०**वाळूची (जमीन);जेथें पुष्कळ खडे आहेत अशी (जमीन). **रेवटा, रेवडा पु०** वाळूचा ढीग किं० डोंगर. **रेवसळ वि०** वाळू किं० बारीक खडे इ० जींत फार अशी (जमीन); रेताड; रेताळ.

रेवचिनी इ० पुढें ' रेवाचिनी ' पहा.

रेवडा स्त्री० १ कांबळें, घोंगडें, इ० च्या दशांना पीळ भरून केलेल्या बारीक बारीक दोऱ्या दशांच्या समुच्चयानें. २ कांबळें, घोंगडें, इ०च्या दशांच्या मूल प्रदेशीं रंगीत सूत, रेशीम, इ० चा भरलेला एक दोन बोटें रुंदीचा पट्टा.

रेवडी [हिं०] स्त्री० १गुळाच्या किं०साखरेच्या पाकाच्या थापट्या करून त्यांवर तीळ चिकटावून करतात तो मुलांना द्यावयाचा खाऊ. २ कोणेकाचा उडविलेला बोऱ्या किं० फजिती.

रेवण, रेवणी [म०रेव] स्त्री० १ किल्ल्याच्या तटाच्या बाहेर किं० खंदकाच्या बाहेर करतात ती उतरती जमीन,-तोफेच्या गोळ्यापासून बचाव होण्यासाठीं. २ क्रमानें उतरती होत गेलेली जमीन. ३ चिखलट किं० रेताड जमीन,-जवरून चालणारी गाडी, माणूस, पशु, इ० आंत खचतात.

रेवणें अ० क्रि० १ (भिंत, खांब, इ०) कलणें किं० खचणें. २ ढासळणें. ३(विहीर, खड्डा, इ०) ओहोरणें किं० भरून येणें. ४ (कांहीं रोग, औषधाचा गुण, इ० नीं)कोणेकाच्या अंगीं मुरणें किं० भिनणें. ५ (भूत, पिशाच, इ० नीं) कोणेकाच्या अंगांत शिरून तेथें राहाणें. **स० क्रि०** (खड्डा, विहीर, र० मध्यें) माती इ० घालून भरून काढणें.

रेवती [सं०] स्त्री० १ सत्तावीसावें नक्षत्र. २ बलरामाची बायको. ३ एक फूल. ४ (भिक्षुकांच्या भाषेंत) अर्धा रुपाया; आधेली. ❀ **कांहा कामाला रेवती नक्षत्र लागणें** तें रेंगाळत चालणें; अनेक विघ्नें येऊन तें मंद गतीनें चालत राहाणें.

रेवस न०, रेवाचिनी स्त्री० [**फा०** रेवंदूचीनी] **न०** एका झाडाचा चीक. हा औषधाच्या उपयोगाचा असतो. हा चिकाचा दुधांत घालून रांधा करतात त्याला ' रेवाचिनीचा शिरा ' म्हणतात. ह्या रांध्याच्या कांड्या केलेल्या असतात. ह्या शिऱ्याला ' रेवंदसार ' असाही शब्द आहे.

रेवा पु० १ वाळू, रेती. २ धान्य, साखर, पीठ, इ० तील कचकच. ३ गाळ; रेंदा. ४ ढगांचा दाट समुदाय. ५ पांढऱ्या ढगांचे आकाशांत लांबच लांब पसरलेले पट्टे समुच्चयानें. ६ नर्मदा नदी.

रेवाज मागें ' रिवाज ' पहा.

रेवाळ, रेवाळें [म० रेव] न० १ वाळू; रेती. २ धान्य, पीठ, साखर, इ० तील कचकच. ३ आकाशांत जमलेल्या पांढऱ्या ढगांचे पट्टे समुच्चयानें (जमणें, धरणें, विरणें, इ०).

रेवाळ [म० रेव] वि० रेतीनें युक्त; ज्यांत कचकच फार आहे असें (पीठ, साखर, धान्य, इ०).

रेवापेवीं, रेवापेवां [म० रेव+पेंव] क्रि० वि० १ उधळणें, सांडणें, नासणें, कुजणें, इ० क्रियांमुळें (पदार्थांची नासधूस करणें, होणें, इ०). २ कांहीं खाद्य पदार्थांचा वीट आला असतां (तो ताटांत इकडे तिकडे सारणें).

रेशमी इ० खालीं ' रेशीम ' मध्यें पहा.

रेशीम [फा० रेशम्] न० एका जातीच्या किड्यानें आपल्या पोटांतून काढलेला तंतु. ❀

रेशमी वि० १ रेशीम नांवाच्या तंतूचा बनविलेला किं० त्या तंतूसारखा मऊ किं० गुळगुळीत. **रेशीमकांठी वि०** कांठाला रेशमाची वाडी किं० रेषा ज्याच्या विणींत आहे असें (लुगडें, धोतर, खण, इ०). **रेशमी गज पु०** जमीन मोजण्याचा गज. हा अठरा तसू लांबीचा असे. मागें ' रुमाली गज ' पहा. **रेशमी किडा, रेशमाचा किडा पु०** ज्या किड्याच्या पोटांतून रेशीम हा तंतु निघतो तो किडा. **रेशमी नारिंग न०** पातळ सालीचें नारिंग हें फळ. **रेशमाची गांठ स्त्री०** अभेद्य संबंध (लग्न, शत्रुत्व, मित्रत्व, इ०संबंधानें बोलतांना).

रेषा [**सं०**] **स्त्री०** १ रेघ; ओळ. २ आंबा इ० फळांतील तंतु. ॐ **कोणेकाला रेषा ओढून** (किं० **काढून**) **देणें** त्याच्या वर्तनाला शिस्त घालणें किं० लावणें. **कोणेकाची रेषा उमटणें** (किं० **उपटणें**)त्याचे दैव अकस्मात् अनुकूल होणें; कारण लक्ष्यांत न येतां त्याचा उत्कर्ष होऊं लागणें. **कोणेकाच्या गांडातील रेषा उपटणें** याचा अर्थ वरीलप्रमाणेंच.

रेस [**पोर्तुगीझ**] **पु०** आण्याचा पंचविसावा अंश. ॐ **रेसभर क्रि० वि०** यत्किंचित्, अगदीं सुद्धां (ढळणें, सरकणें). **टीप,**–प्रयोग बहुधा निषेधरूप.

रेहकला, रेहेकला पु० एक प्रकारची गाडी. मागें ' रेकला ' पहा.

रेळा [**म०** रेळणें] **पु०** पाणी, रंग, तेल, रक्त, पू, इ० चा ओघळ.

रैयत, रैयतावा मागें ' रयत, ' ' रयतावा ' [पहा.

रोक पुढें ' रोख ' पहा.

रोकड [**सं०** रोक=रोखीनें केलेली खरेदी] **स्त्री०**१ प्रत्यक्ष नाण्याच्या रूपांत असलेला पैसा. २ सोने, चांदी, हिरे, मोती, इ० प्रत्यक्ष किं० दागिन्यांच्या रूपांतील,–ज्यांच्या विक्रीपासून ताबडतोब नाण्याच्या रूपांत पैसा मिळूं शकतो.

रोकडा [**म०** रोकड] **वि०** १ नाण्याच्या रूपांत असलेला पैसा किं० असलेलें द्रव्य किं० संपत्ति. २ कोणेकाला ताबडतोब दिलेला (जबाब) किं० मारलेला (रट्टा) किं० केलेली (शिक्षा). ३ स्पष्ट, असंदिग्ध (ज्ञान, माहिती). ४ विषयाचें तत्काळ ग्रहण करणारी (बुद्धि). **क्रि० वि०** (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) तत्काळ, ताबडतोब, सबुरी न करतां; उ० त्याच्या वाटेस कोणी गेलें तर तो रोकडी चपराक त्याला लगावतो. ॐ **रोकडी हुंडी स्त्री०** दर्शनी हुंडी. मागें ' दर्शन ' मध्ये ' दर्शनी हुंडी ' पहा. **रोकडा मृत्यु पु०** तात्कालिक प्राप्त झालेलें आणि जिवंतपणाची लवमात्र धुगधुगी न राहातां आलेलें मरण. **रोकडोबा पु०** अशिक्षितांचा एक देव,–जो नवसाला ताबडतोब पावतो. **रोकड्या पु०** सराफाची किं० व्यापाऱ्याची पैशाची थैली वाहाणारा त्याचा नोकर.

रोकवणी न०विटाळाच्या निरसनासाठी केलेल्या स्नानाचा शेवटचा डोक्यावर ओतून घेतलेल्या तांब्या.

रोख [**सं०** रोक=जेव्हांच्या तेव्हांच किंमत देऊन केलेली खरेदी] **वि०** १ नाण्यांच्या रूपांत असलेली (कोणेकाची संपत्ति).२ विकत घेतलेल्या किं० दिलेल्या पदार्थाची जेव्हांच्या तेव्हांच दिलेली किं० घेतलेली (किंमत). ३ स्पष्ट शब्दांत किं० कोणाची भीडभाड न धरतां दिलेले (उत्तर) किं० सांगितलेलें (मत). **टीप,**–वरील तीन्ही अर्थीं ' रोखठोक ' हाही शब्द आहे. ॐ **रोख विक्री स्त्री०** १ विकलेल्या मालाबद्दल दुकानदाराला मिळालेली किंमत,–'उधार किंमत'याच्या व्यावर्तकत्वें; उ० आज दुकानावर पन्नास रुपये रोख विक्री आली. २ जेव्हांच्या तेव्हांच किंमत घेऊन माल विकणें ही तऱ्हा किं० हा शिरस्ता. **रोखारोखीं क्रि० वि०** ताबडतोब रोख किंमत देऊन. **रोखठोक वि०** स्पष्ट शब्दांत सांगितलेलें (मत), केलेली (शिक्षा), दिलेला (जबाब). **क्रि० वि०** १ स्पष्टपणें; असंदिग्ध रीतीनें. २ जेव्हांच्या तेव्हां.

रोख [**फा०** रुख्] **पु०** १ कल; झोक; गमनाची दिशा; धोरण. २ भाषणाचा स्पष्ट सांगितलेला किं० मुग्ध ठेविलेला मुद्दा किं०कटाक्ष.

रोखणी [**म०** रोखणें] **स्त्री०** १ सुताराचें एक हत्यार; रंधा. २ रोखण्याची क्रिया. खालीं ' रोखणें ' पहा.

रोखणें स० क्रि० १ (लाकूड इ०) रंधा मारून साफ किं० गुळगुळीत करणें. २(बंदूक, तोफ, दृष्टि, बाण, इ०) पदार्थविशेषाकडे नेम धरून वळविणें. ॐ **रोखून पाहाणें** टवकारून पाहाणें; पदार्थविशेषाकडे मुद्दाम नजर वळविणें. **रोखारोखी स्त्री०** समक्ष भेट.

रोखा [अ० रुक्आह्] **पु०** १ दस्तऐवज. २ हुकमाचें पत्र. ३ मागणीचें पत्र. ४ करारनामा.

रोखी [म० रोख] **स्त्री०** १ तावडतोब किमत देऊन किं० घेऊन केलेली खरेदी किं० विक्री. २ नाणें, पैसा, इ० समुच्चयानें.

रोग [सं०] **पु०** १ शरीरप्रकृतींत उत्पन्न झालेला कांहीं बिघाड. २ पदार्थांचा अपायकारक भाग किं० अंश. ३ अपायकारक कोणतीही वस्तु, माणूस, इ०. ॐ **रोगाड्या,रोगाळ्या वि०** कांहीं रोग जडल्यामुळें क्षीण झालेला (मनुष्य).**रोगट, रोगगेला, रोगिष्ट, रोगेला वि०** सदा आजारी. **रोगग्राम पु०** शरीर,–जें रोगाला सदैव पात्र असतें. **रोगमल्ल पु०** रोगांनीं सदा ग्रस्त मनुष्य (विनोदांत). **रोगराई स्त्री०** १ गांवांत रोगांचा प्रादुर्भाव, रोगांचे प्रकार,रोगांनीं लोकांची पछाडणूक, इ०, किं०इ० संबंधाची वार्ता.२पदार्थांतील अपायकारक अंश. **रोगवणी** [म० रोग+पाणी] **न०** १ बस्ती, पोथ, इ० उपायांनीं शरीराच्या मुखादिद्वारांतून रोगाला बरोबर घेऊन बाहेर पडतें तें पाणी किं० तो द्रवपदार्थ. २ शिजविणें. धुणें, इ० उपायांनीं पदार्थांतील अपायकारक द्रव बाहेर पडतो तो.३आश्लेषांतील पाऊस,–जो धान्याहि अपायकारक असतो. **रोगी वि०** १ रोगानें जर्जर. २ अपायकारक.

रोगटणें [म० रोग] **अ० क्रि०** रोगानें ग्रस्त [होणें.

रोगण [फा० रोघन्=तेल] **न०** लोखंड, लाकूड, इ० वर गंज न चढावा,कीड न लागावी, तकाकी यावी, इत्याद्यर्थ तेल, राळ, मेण, इ० चें लावितात तें मिश्रण.

रोगणें, रोघणें [म० रोग]**अ० क्रि०** १रोगानें ग्रस्त होणें. २ अंगांत शिरलेल्या कांहीं रोगानें दिवसें दिवस क्षीण होत जाणें.

रोगिण [म० रोग] **स्त्री०** देवीची भक्त स्त्री. (अशा स्त्रिया सदैव रोगानें ग्रस्त असतात).

रोगेणें [म० रोग] **अ० क्रि०** अंगीं मुरलेल्या कांहीं रोगामुळें दिवसें दिवस (मनुष्य) क्षीण होत जाणें.

रोचक [सं०] **वि०** १ चकचकीत करणारा. २ आवडतें; प्रिय; मनाजोगें. ३क्षुधावर्धक (हिंगाष्टक इ०). **न०** पादेलोण. **पु०** काचकाम किं० नकली दागिना करणारा कारागीर.

रोचणें स० क्रि० खुपसणें; बोचणें; आंत ढकलणें. **अ० क्रि०** आंत शिरणें; घुसणें.

रोचन [सं०] **पु०** १ पाचक पदार्थ (हिंगाष्टक, पादेलोण, इ०). २ 'गोरोचन' चा अपभ्रंश. **न०** आवड उत्पन्न करणें;सुखविणें. **रोचना स्त्री०** १ सुंदर स्त्री. २ गोरोचन. ३ वंशलोचन. ४ रमणीयता; सुखकरपणा.

रोचिस् [सं०] **न०** १ उजेड, प्रकाश. २ २ तेज. ॐ **रोचिष्णु वि०** १ तेजस्वी;कांतिमान्. २ क्षुधावर्धक.

रोज [फा०] **पु०** १ दिवस.२एका दिवसाची मजुरी. ३ तगादा करावयाला आलेला जो सरकारचा किं०सावकाराचा मनुष्य त्याला रोजच्या रोज द्यावा लागतो तो भत्ता. **क्रि० वि०** प्रत्येक दिवशीं.**रोज उठून क्रि०वि०**प्रत्येक दिवशीं;अखंड क्रमानें.**रोजकरी पु०**रोजावर ठरविलेला मजूर किं० गडी.**रोजकीर्द स्त्री०**१दररोज होणाऱ्या जमा आणि होणारे खर्च किं० त्यांच्या नोंदणीची चोपडी.२ आपला आणि आपल्या कुटुंबाचा नित्याचा जो खर्च तो. **रोजखरडा पु०** संसार, संस्था, व्यवहार, इ० संबंधाचा प्रति दिवसाचा कच्चा जमाखर्च इ० ज्यावर लिहितात तो कागद. **रोजगार पु०** कोणेकाचा उद्योग, धंदा, इ० रूप चरितार्थाचें साधन. **रोजगारी, रोजगारशीर वि०** ज्याला शेतकीच्या व्यतिरिक्त कांहीं उद्योग, धंदा,नोकरी, इ० चरितार्थाचें साधन आहे असा. **रोजगुजारा पु०** चरितार्थ. **रोजगुदस्त (–स्तां) क्रि० वि०** कालच्या दिवशीं.**रोजच्या रोज क्रि०वि०**दररोज; प्रति दिवशीं. **रोजदार पु०** रोजाच्या बोलीनें कामाला लाविलेला गडी. **रोजनामा पु०, रोजनिशी,रोजवारी स्त्री०**आजकाय काय कामें झालीं इ०हकीगत रोजच्या रोज जींत लिहितात ती वही. **रोजमरा, रोजमुरा, पु०** मजुरी; मुशा-

हिरा. **रोजवडा पु०** एका दिवसाचा हिशेब. **रोजिनदार पु०** रोजच्या कामाची मजुरी संध्याकाळीं देऊन टाकावयाची अशा बोलीनें कामावर नेमिलेला गडी. **रोजारोजी स्त्री०** आज मिळवावें आणि आज खावें अशी आयुष्यक्रमाची सरणी. **रोजिना क्रि० वि०** दररोज; प्रत्यहीं. **पु०** दिवसाचें वेतन किं० मजुरी. **रोजी स्त्री०** १ कुटुंबाचा किं० कोणा माणसाचा दररोजचा खर्च. २ एका दिवसाचें कोणेकाचें वेतन किं० मजुरी. ३ दूध, पैसा, शिधा, इ० जें कोणेकाला रोज नियमानें मिळतें तें. ४ मोहोरमांत फकीरांना देतात तो पैसा इ०.

रोजा [**फा०**] **पु०** रमझान महिन्यांत मुसल्मान लोक जो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत करतात तो उपास.

रोजा [**अ०** रोझा] **पु०** १ बाग. २ दर्गा; समाधिमंदिर.

रोट, रोटगा [**हिं०**] **पु०** कणकेची जाडी थापलेली भाकरी.

रोटा [**हिं०**] **पु०** १ पाव हें गव्हाचें खाद्य. २ अन्न; पोटापाण्याची तजवीज.

रोटी [**हिं०**] **स्त्री०** १ भाकरी. २ पोळी. ॐ **रोटीबेटी व्यवहार पु०** एकत्र बसून जेवणें, आणि एकमेकांत लग्नाचे संबंध करणें हा परिपाठ.

रोठा पु० १ पक्की झाल्यावर झाडावरून काढलेली सुपारी. २न शिजवितां केलेली सुपारी; उ० श्रीवर्धनी रोठा. **टीप**,–ह्या दोन्ही अर्थी ' रोठी सुपारी ' असाही शब्द आहे.

रोड, रोडका, रोडगा वि० १ अंगांत मांस थोडें असल्या कारणानें ज्याचीं हाडें बाहेर उठून दिसतात असा (मनुष्य, पशु); कृश; किडकिडीत. २ वाळून गेलेलें (झाड, पीक, इ०). **रोडा, रोडगेला, रोड्या, वि०** कृश; किडकिडीत. **रोडमल्ल पु०** कृश मनुष्य (विनोदांत).

रोडकी स्त्री० एक पक्षिविशेष.

रोडगा, रोटगा [**म०** रोट] **पु०** १ कणकेची जाडी भाकरी. २ जोंधळे, बाजरी, इ० च्या पिठाची खूप जाडी भाकरी (निंदेंत). ३ कोणताही जाडी आणि बेढब पदार्थ.

रोडणें, रोडावणें [**म०** रोड] **अ० क्रि०** कृश होणें. ' रोडेणें, ' ' रोडेजणें ' हीं रूपें ह्याच अर्थीं कवितेंत येतात.

रोडा [**हिं०**] **पु०** कौल, वीट, इ० चा [तुकडा.

रोडावणें [**म०** रोड] **अ० क्रि०** (मनुष्य, पशु) कृश किं० किडकिडीत होणें. २ (झाड, पीक) वाळणें किं० वठणें.

रोडी [**म०** रोडा] **स्त्री०** दगड, विटा, कौलें, इ० चे तुकडे समुच्चयानें.

रोणदिवी स्त्री० पुढें ' रोवणदिवी ' पहा.

रोंत, रोंतणें, रोंथ, रोंथणें पुढें ' रोवंथ, ' ' रोवंथणें ' पहा.

रोती [**हिं०**] **वि०** रडकी किं० रडवी (मुद्रा, चर्या).

रोदन [**सं०**] **न०** रडणें; विलाप करणें.

रोदा [**फा०**] **पु०** बकऱ्याच्या आंतड्याची तांत,–जी तंतुवाद्यांच्या कामीं योजली जाते.

रोध [**सं०**] **पु०** १ आडविणें; कोंडणें. २ हरकत; गतीचा कुंठितपणा. ३थांबणूक किं० थांबवणूक; प्रतिबंध; नियंत्रणा. ४धरण; बांध. ५वेढा.

रोधणें [**सं०** रुध्] **स० क्रि०** १ बंद पाडणें. २ विघ्नित करणें. ३ कुंठित करणें. ४ गराडणें; वेढणें.

रोप, रोपडें, रोपटें न०, रोपा, रोपटा पु० [**सं०** रोप] १ लहान झाड,–नुकतेंच उगवलेलें. २ एके ठिकाणाहून उपटून दुसरे ठिकाणीं लाविलेलें किं० लावावयाचें कोंवळें झाड. **रोपटा पु०** रोप लावण्याठीं भाजून तयार केलेली जमीन. ॐ **रोपदळ न०** १ नारळी, पोफळी, इ० च्या कोंवळ्या झाडांचा समुदाय. २नारळी, पोफळी, इ० चे रोपे प्रत्येक,–दुसरीकडे लावण्याला योग्य अशा दृष्टीनें.

रोप [**सं०**] **पु०** १ उभारणें. २ झाड एके ठिकाणाहून उपटून दुसरे ठिकाणीं लावणें किं० असें लाविलेलें झाड. ३लागवड. ४ बाण, तीर.

रोपण [**सं०**] **न०**१ स्थापणें. २ कोंवळें झाड जमीनींत लावणें (करणें). ३ जखम, व्रण, इ० बरा करणें. ४जखम, व्रण, इ० बरें करण्याचें मलम इ०.

रोपणें [**सं०** रुह्=उगवणें, **म०** रोप] **स० क्रि०** १ झाड इ० जमीनींत लावणें. २ कोणा

मनुष्याला अधिकार इ० वर नेमणें किं० स्थापिणें. ३ खुपसणें, भोसकणें.

रोपा पु० वर ' रोप ' पहा.

रोपीटोपी [**म०** टोपी] **वि०** लहान (मूल). (लडिवाळपणांत ह्याचा प्रयोग होतो).

रोब, रोआब [**अ०** रु अब्] **पु०** धाक, दरारा. [बोचणें.

रोंबटणें, रोमटणें स० क्रि० खुपसणें, ढकलणें,

रोबरो मागें ' रूबरू ' पहा.

रोंबें न०, रोंबी स्त्री० शरीरांतून नासकें रक्त काढून टाकण्यासाठीं लावितात ती तुंबडी (लावगें).

रोम [**सं०** रोमन्=केश] **न०** १शरीरावरील केश. २ पक्ष्याचें पीस किं० पर. ॐ**रोमांच पु०** हर्ष इ० मुळें शरीरावरील केश उभे राहाणें. **रोमाली, रोमावली, रोमराजी, रोमलता स्त्री०** मनुष्याच्या पोटापासून बेंबीपर्यंतचे केश. **रोमोद्गम, रोमोद्भेद, रोमविकार, रोमविभेद पु०**रोमांच. **रोमकूप पु०** रोमरंध्र. **रोमगुच्छ पु०** चंवरी. **रोमहर्ष पु०** रोमांच.**रोमहर्षण वि०** शरीरावरील केश जेणेंकरून ताठ होऊन उभे राहातात असा (देखावा, हकीगत, इ०). **न०** रोमांच.**रोमरंध्र न०**१शरीरावरचे केश ज्या खळग्यांतून उगवतात त्या खळग्या प्रत्येक. २ शरीराच्या त्वचेंतील सूक्ष्म छिद्रें,-ज्यांतून घाम बाहेर पडतो. **रोमरंध्रीं,रोमरोमीं, रोमागाणिक, रोमागणित क्रि० वि०** केशाकेशांत किं० हाडीं मासीं (कांहीं गुण,खोड,ज्ञान,मस्ती,इ०भिनलेली असणें).**रोमरक्षा स्त्री०,रोमरक्षा व्यतिपात पु०** अल्पस्वल्प लाभ, प्राप्ति, इ०. निषेधार्थी प्रयोग. उ० त्याचीं संगति तूं सोड, त्याच्या संगतीपासून तुला काय रोमरक्षा आहेत ? (म्हणजे त्याच्या संगतीपासून तुला कांहींही लाभ होणार नाहीं). 'रोमरक्षा'हा शब्द बहुधा **अ०व०**योजतात' रोमरक्षाव्यतिपात' हा **ए० व०** योजतात.

रोमणदिवा पुढें ' रोवणदिवा ' पहा.

रोमणबाक, रोमणी, इ० मागें ' रुमणबाक ' पहा.

रोमंथ [**सं०**] **पु०** सरासरी चावून गिळलेलें गवत इ० जें बैल, गायी, इ० पुन्हा तोंडांत ओढून घेऊन त्याचें स्वस्थपणें करतात तें चर्वण.

रोमें न० शरीरांतील नासकें रक्त काढून टाकण्यासाठीं लावितात ती तुंबडी.

रोम्हणबाक, रोम्हणी इ० मागें' रुमणबाक, ' ' रुमणी ' इ० पहा.

रोराण न० १ पशु, पक्षी, इ० चा कलकलाट. २ बुशींचा कर्कश शब्द. ३ पोरें, माणसें, इ० चें मोठमोठ्यानें बोलणें, ओरडणें,हसणें, भांडणें, इ० चा कलकलाट किं० गोंगाट.

रोरेणे अ० क्रि० (घूस) ओरडणें.

रोरों स्त्री० १ घुशींच्या ओरडण्याचा शब्द. २ वाऱ्यावर उडणाऱ्या झाडांच्या पानांचा किं० पक्ष्यांचा आवाज.

रोव [**सं०** रुह्] **पु०** १झाडाचा कोंब किं० अंकुर. २ बालदशेंतील झाड. ३ भिजत घातलेले पावटे, हरभरे, मटक्या, इ०ना फुटलेले मोड प्रत्येक किं०मोड फुटलेले पावटे प्रत्येक.

रोवणें [**म०** रोवणें] **स्त्री०** १ जमीनीच्या पृष्ठभागाचा भुसभुशीतपणा.२ ढासळलेला नदीचा धक्का, टेकडीची कड, बांधाची बाजू, इ०. ३ अनेक ठिकाणीं खुंटे, मेखा, इ० तंबू इ० साठीं ठोकून नंतर ते उपटून काढल्यावर सच्छिद्र झालेला भूपृष्ठ. ॐ **रोवणादिवली, रोवणादिवी स्त्री०, रोवणादिवा पु०**१ वर तेलवातीसाठी परडें असून खालीं ज्याला जमीनींत रोवून बसविण्यासाठीं निमुळतें लांब टोक असतें असा प्रकाशासाठीं केलेला संसारोपयोगी पदार्थ.२(**लाक्षणिक**) कांहीं काम न करतां खुंटासारखा उभा राहिलेला पुरुष (रोमणदिवा) किं० उभी राहिलेली स्त्री (रोमणदिवी किं० रोमणदिवली).

रोवणें [**सं०** रुह्] **स० क्रि०**१(खांब, झाड, मेख, इ०) जमीन, भिंत, मध्यें उभें पुरणें. २ खुपसणें; ढकलणें. **अ० क्रि०** (सुई, बोट, खिळा, कांटा, इ०) अंग, डोळा, जमीन, पाय, इ० मध्यें शिरणें किं० घुसणें.

रोवंथ [**सं०** रोमंथ] **पु०** मागें 'रंवथ' पहा.

रोवंथणें [**म०** रोवंथ] **स० क्रि०** गाय,बैल, इ० नीं पूर्वी अर्धवट चावून गिळलेलें (गवत इ०)

पुन्हा तोंडांत ओढून तें पूर्णपणें चावीत आणि चवळीत बसणें.

रोंवळणें [**म०** रोवळी] **स० क्रि०** (चिरलेली भाजी, शिजावयास घालावयाचे तांदूळ, इ०) रोंवळींत घालून धुणें. खालीं ' रोवळी ' पहा.

रोंवळा पु० केळी खंडीच्या पछांशाइतकें धान्यादींचें परिमाण. [पहा.

रोंवळा पु० मोठी रोवळी. खालीं ' रोवळी'

रोंवळी स्त्री० तांदूळ, भाजी, इ० पदार्थ धुवावयाचें जें बांबूच्या पातींचें किं० धातूंच्या पत्र्याचें सच्छिद्र भांडें केलेलें असतें तें.

रोशन [**फा०** रोषन्] **वि०** १ स्पष्ट;ज्याचा खुलासा झाला आहे असा. २ जाहीर; सर्वविश्रुत. ꙮ **रोशनाई, रोशनी स्त्री०** दिवे, बत्त्या, इ० ची कोणेक स्थळ प्रकाशित करण्यासाठीं केलेली मांडणी किं० रचना; दपीत्सव. २ दिव्यांच्या लखलखाट. ३ अनेक विद्वान माणसें, अनेक प्रकारच्या रंगीबेरंगी पोशाखाचीं माणसें, प्रांताप्रांतांच्या रिवाजांप्रमाणें पोशाख केलेलीं माणसें कांहीं प्रसंगानें एके ठिकाणीं जमल्यानें येते ती अपूर्व शोभा. ४ अनेक रंगांच्या फुलांनीं बाग इ० स येते ती शोभा. ५ कोणत्याहीं कारणानें स्थलविशेषास आलेली रमणीयता किं० शोभा. **रोशन नाईक पु०** प्रकाशासाठीं मशाल पेटवून ती हातांत धरून मिरवणूक किं० कोणी माणूस यांच्यापुढें चालतो तो मनुष्य; मशालजी.

रोशें न० एक प्रकारचें गवत.त्याच्या तेलाला ' रोशेल ' किं० ' रोहशेल ' म्हणतात.

रोष [**सं०**] **पु०** क्रोध; घुस्सा.ꙮ **रोषाविष्ट, रोषाक्रान्त वि०** रागावलेला; क्रुद्ध.

रोषण [**सं०**]**वि०**रागीट;तापट स्वभावाचा.

रोषणाई, रोसनाई वर ' रोशन ' मध्यें ' रोशनाई 'पहा.

रोह [**सं०**]**पु०** मोड फुटलेले हरभरे,वाटाणे, इ० प्रत्येक किं० त्यांना फुटलेले मोड प्रत्येक.

रोहक, रोहंक [**म०** रोख] **पु०** मनाची प्रवृत्ति; कल.

रोहकणें [**म०** ' रोखणें ' चें एक रूप] **स० क्रि०** १ रोधणें; थांबविणें; कुंठित करणें. २ कवेत्यांत घेऊन (घर, गांव, देश, इ०) व्यापून टाकणें.

रोहटी, रोहिटी [**सं०** रुह्; **म०** रोहं]**स्त्री०** धान्य पेरल्यानंतर प्रथमतः जे अंकुर दिसतात ते समुच्चयानें.

रोहशेल वर ' रोशें ' मध्यें पहा.

रोहिणी [**सं०**] **स्त्री०** १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं चवथें नक्षत्र. २ नऊ वर्षे वयाची कन्या. ३ गंडमाळा. ४ वीज. ५ तांबडी गाय. ६कोणत्याही रंगाची गाय. ꙮ **रोहिणीपति, रोहिणीरमण पु०**चंद्र. **रोहिणी शकट पु०**शटकाच्या आकाराचे जे रोहिणी नक्षत्राचे तारे ते किं०त्यांची मांडणी. **रोहिणीसुत पु०** बुध हा ग्रह.

रोहित [**सं०**] **वि०** तांबडा. **पु०** १ तांबडा रंग. २ एक मासा; रोही. **न०** १ रक्त. २ केशर. ꙮ **रोहिताश्व पु०** अग्नि.

रोही [**सं०** रोहित] **स्त्री०** १ एक मत्स्य किं० मासा. २ एक प्रकारचा हरिण; नीलगाय. ह्या अर्थी ' रोहें ' **न०** सुद्धां.

रोहोपोहो [**म०** राहणें+पोहणें] **पु०** १ दळणवळण; घरोब्याचा व्यवहार. २ परिचय.

रोळ पु० क्रम; वहिवाट; प्रचार; रूढि.

रौंदळणें, रौंदाळणें, रौंदळा मागें 'रंवदळणें,' ' रंवदळा ' पहा.

रौद्र [**सं०**] **वि०** १ भयंकर. २ उग्र. ३ तामसी; रागीट. ४ रुद्रासंबंधाचा. **पु०** १शिवाचा भक्त; शैव. २ क्रोध. ३ (**साहित्य**) भयानक हा रस.

रौप्य [**सं**] **न०** रुपें किं० चांदी हा धातु. ꙮ **रौप्यमुद्रा स्त्री०** १ चांदीचें नाणें. २ रुपाया हें नाणें.

रौरव [**सं०**] **पु०** एक नरकविशेष.

रौरव, रौरवी मागें ' रवरव, ' ' रवरवी ' पहा.

रौक्ष [**सं०**] **न०** रूक्षपणा. मागें ' रूक्ष ' पहा.

ऱ्याऱ्या स्त्री०, पु० मुलांची पिरपीर, चिरचीर, किं० तरफड.

ल

ल मराठी व्यंजनमालेंतील 'ल' हें अठ्ठाविसावें व्यंजन आहे.

लईलूट, लयलूट [म० लई (पुष्कळ)+ लूट] **स्त्री०** पदार्थांची समृद्धि किं० वैपुल्य.

लककन्, लककिनी, लकदिशीं क्रि० वि० १ एकदम प्रकाशाचें किरण पाडून. २ एका क्षणांत.

लकटणें, लगटणें [**सं०** लग्] **अ० क्रि०** १ चिकटणें; विलगणें; शेजारीं जाणें किं० असणें. २ झाडावर (फुलें, फळें, इ०) विपुल लागलेलीं किं० आलेलीं असणें. ३ (झाड) फळें, फुलें, पानें, इ०नीं समृद्ध झालेलें असणें. ४ (कांहीं गोष्ट, समय, इ०) जवळ येऊन ठेपणें. **स० क्रि०** १ (एक पदार्थ) दुसऱ्या पदार्थाशीं भिडाविणें किं० त्याच्या शेजारीं ठेवणें. २ मिसळणें; मिश्रित करणें. ३ रेटणें; ढकलणें; सारणें; सरकावणें.

लकड [**म०** लाकूड] **स्त्री०** १ अतिशय उंच वाढलेला माड, ताड, सुरमाड, पोफळी, इ० वृक्ष. २ किडकिडीत आणि उंच असा माणूस. ☸**लकडकोट, लकडीकोट पु०** लाकडाची तटबंदी; खांब, वांसे, तक्ते, इ० चा केलेला कठडा किं० बंदिस्ती. **लकडखाना पु०** सर्पणाची किं० इमारत कामाचीं लाकडें ठेवण्याची किं० साठविण्याची वखार. **लकडदिवी वि०** उंच आणि किडकिडीत मनुष्य. **लकडवाला पु०** सर्पणाचीं किं० इमारतीचीं लाकडें विकणारा व्यापारी. **लकडीपूल पु०** १ लाकडाचा पूल. २ पुणें शहरांत नारायण पेठेतून नदी ओलांडून भांबुरड्यास जावयाचा पेशव्यांनीं बांधलेला पूल. **लकडी पेंढी स्त्री०** शिमग्याच्या सणांतील होळींत जाळण्याकरितां मुलें घरोघर लाकडें, गोवऱ्या, इ० सर्पण मागतात तें.

लकडणें वर 'लकटणें' पहा.

लकडा [**हिं०**] **पु०** १ कांहीं कामाचा आपल्या मागें लागलेला तगादा किं० नेट. २ जरूर आणि नेमलेल्या वेळांत केलें पाहिजे असें जें कांहीं काम किं० कर्तव्य त्याचेबद्दल मनाला लागलेली असते ती चिंता. ३ मोठें लाकूड; सोट. ४ रोड झालेला माणूस; किं० रोडपणाची स्थिति; उ० तापानें त्याचा लकडा वळून गेला. ५ शुष्क लाकूड किं० झाडाचा बुंधा. ☸ **लकड्या वि०** उंच आणि किडकिडीत (मनुष्य).

लकडी [**हिं०**] **स्त्री०** १ गुळाचा अति टणक आणि चिकट असा पाक. २ काठी; लाकूड. ३ जोंधळ्याची एक जात. ☸ **लकडीवांचून मकडी वठत नाहीं** कडक उपाय योजल्याशिवाय आडदांड माणसाला ताळ्यावर आणतां येत नाहीं. मकडी **म्ह०** माकड.

लकतऱ्या [**फा०** लत्त्] **स्त्री० अ० व०** लुगडें, धोतर, बंडी, इ० वर फार वापरल्यामुळें त्याच्या चिंध्या होतात त्या किं० त्यांना जीर्णपणाची स्थिति प्राप्त होते ती (होणें, निघणें). **लकतर न०** १ फाटकें वस्त्र. २ चिंधी; वाभाडा.

लकपक, लखपक वि० नीटनेटका; घासून, पुसून, धुऊन स्वच्छ झालेला किं० स्वच्छ केलेला (मनुष्य, पदार्थ).

लकब [**अ०**] **स्त्री०** १ बोलणें, चालणें, हसणें, खोकणें, शिंकणें, इ० क्रिया करतांना जी कोणेकाची विशिष्ट तऱ्हा किं० चाल ती; बोलण्यांत एकादा विशिष्ट शब्द किं० रचना अनेकवार योजण्याची जी कोणेकाची चाल ती. २ कोणेकाला लागलेली कांहीं वाईट खोड किं० ढब.

लकलकणें अ० क्रि० चकचकणें; चमकणें.

लकलकाट पु० दिवे, वत्त्या, आरास, इ०च्या योगानें स्थलविशेषीं झालेला चकचकाट किं० भरपूर प्रकाश.

लकलकीत वि० १ चकचकीत; तेजस्वी; प्रकाशित. २ स्वच्छ; निर्मळ. ३ अंगावरचे दागदागिने, वस्त्रें, सामानसुमान, इ०च्या अभावामुळें उघडा, ओका, विरूप झालेला (मनुष्य, घर, गाल, इ०); उ० चोरांनीं आमचें घर लुटलें, आतां आम्ही लकलकीत झालों; उ० येथील झाडें तोडून ही जागा आम्ही लकलकीत केली.

लंका [**सं०**] **स्त्री०** १ रावणाची राजधानी. २ सिलोन हें बेट. ३ नळे, चंद्रज्योती, फुलबाज्या, इ० अतिषबाजीचे पदार्थ एकदम पेटविण्यासाठीं

त्यांची करतात ती रचना किं० मांडणी. ॐ **लंकेची पार्वती स्त्री०** १ जिच्या अंगावर एकही दागिना नाहीं अशी सवाशीण म्ह० सौभाग्यवती स्त्री. **टीप,**–लंकेंत सोन्याची समृद्धि आहे परंतु पार्वती (शंकराची स्त्री)लंकेंत गेली तरी तिला त्या सोन्याचे दागिने करून अंगावर धारण करतां येत नाहींत, कारण ती बैरागी देवाची पत्नी. २ (लक्षणेनें) खोगीर नसलेला आणि रोडका घोडा. **लंकेंत सोन्याच्या विटा स्त्री० अ० व०** १ आपणाला जिचा उपयोग होऊं शकत नाहीं अशी वस्तु विपुल असली किं० तुटपुंजी असली तरी आपणाला सारखीच. **एकाद्यानें लंका लुटणें** कांहीं धंदा, समर्थाचा आश्रय, इ० मुळें कोणेकानें खूप पैसा किं० संपत्ति मिळविणें. **लंकालूट स्त्री०** पैसा, धान्य, इ० ची कोणेकाला झालेली किं० मिळालेली समृद्धि. **लंकोदय पु०** ग्रह, रास, इ० चा लंकेंत उदय किं० उदयाचा समय. लंकेंतून पहिला रेखांश हिंदू ज्योतिष्यांनीं कल्पिलेला आहे.

लकाकणें अ० क्रि० चकचकणें; झळकणें.

लकार [म० ' ल ' हें अक्षर] **पु०** १ ल हें अक्षर. २ ल ह्या अक्षरानें सुरू होणारा शब्द (लबाड, लुच्च्या, लफंगा) ज्याचें वर्णन करतांना योजावा लागला असा माणूस. ॐ **लकार विल्हा पु०** लुच्चे, लबाड, लफंगे, अशा लोकांचा वर्ग; उ० तो गोविंदराव लकार विल्ह्यांतला आहे, त्याची संगति तूं धरूं नको. **लकारविल्हा, लकारविल्हे वि०** लबाड; लुचा. **लकारी स्त्री०** लबाडी; लुच्चेगिरी. **लबाडी लकारी स्त्री०** अनेक प्रकारची भामटेगिरी, लुच्चेगिरी, किं० लफंगेगिरी.

लकारी [म० लाख] **पु०** १ लाखेच्या बांगड्या कंगण्या, इ० करभूषणें करणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

लकिरी १ पुढें ' लकेरी ' पहा. २ लाखेचा रंग करणारा.

लकीर [हिं०] **स्त्री०** रेघ; ओळ; पट्टा.

लकालक वि० स्वच्छ; नीटनेटका.

लके, **लकेरी स्त्री०** १ तेज;चकाकी;तकाकी. २ प्रकाशाचे किरण. ३ गायनांतील तान. ४ एकाद्या वस्तूंत एकादा रंग, चव, झाक, स्वर, इ० चा अल्प प्रमाणांत अनुभवास येत असलेला प्रादुर्भाव (मारणें); झील; छटा; उ० ह्या लुगड्यांत निळ्या रंगाची लकेर मारते; उ० त्याच्या बोलण्यांत कानडी सुराची लकेर मारते. ५ लुगडें, धोतर, इ० च्या कांठांतील रेशीम, कलाबतू, इ० ची काडी किं० रेघ किं० धारी.

लकेरी पु० लाखेच्या बांगड्या, बिलवर, इ० करणारा किं० रंग करणारा. वर' लकारी 'पहा.

लक्कलख्ख न० १ आकस्मिक प्रकाशाचा किरण. २ अंगांत आकस्मिक उठलेली कळ. ३ मनाला एकाएकीं बसलेला धक्का. **वि०** १ स्वच्छ; चकचकीत; अगदीं निर्धूत किं० कफल्लक. **क्रि० वि०** स्पष्टपणें.

[पहा.

लक्कड, लक्कडकोट, इ० मागें ' लवड ' इ०

लखपचोतरी (–ऱ्या), लखपंचोत्तऱ्या [**म०** लाख(लक्ष)+पंच, पांच+उत्तर+ई (प्रत्यय)] **वि०** १ ज्याणें एक लाख गोष्टी सांगितल्या तरी त्यांतल्या फार तर पांच खऱ्या असावयाच्या असा (माणूस); अट्टल थापबाज. २ दिसण्यांत भपकेदार पण निःसत्त्व, निर्बल, किं० निर्वीर्य. **टीप,**– ह्या अर्थी ' लाख ' (रंग करावयाचें एक द्रव्य) असा अर्थ घेतला तरी चालेल.

लखपति [**सं०** लक्ष+पति] **पु०** लाख रुपये किं० लाख रुपायांचा ऐवज ज्याचेपाशीं आहे असा मनुष्य; अति श्रीमंत; लक्षाधीश.

लखलखणें अ० क्रि० चमकणें; चकचकणें.

लखलाभ [**म०** लख (लक्ष)+लाभ (फायदा)] **पु०** लाख रुपायांच्या किमतीचीं म्ह० अत्यंत मूल्यवान् अशी कांहीं वस्तु किं० गोष्ट किं० घडलेला प्रकार; उ० आपण आम्हाला प्रत्यक्ष कांहीं दिलें नाहीं तरी आपली भेट झाली हाच आम्ही लखलाभ समजतो. **टीप,**– गिऱ्हाइकानें कांहीं पदार्थ विकत घेतला असतां त्याचे हवालीं तो पदार्थ करतांना दुकानदार त्याला आपली सदिच्छा पुढील वाक्यानें दर्शवितो; ' हा कंठा (किं० शालजोडी किं० दागिना) मी तुम्हाला विकला तो तुम्हाला लखलाभ असो म्ह० तो तुम्हाला सुखकर (किं० शुभदायक) होवो !

लखलोट, लखलूट, लखालूट, लखालोट, [**म०** ल.ख+लुटणें, लोटणें] **वि०** विपुल;अघळ-पघळ. **क्रि० वि०** प्रशस्तपणें; वैपुल्यानें. **स्त्री०** वैपुल्य;समृद्धि. ह्या अर्थी'लखलोट' **पु०**सुद्धां आहे.

लखाकी(-खी) स्त्री०चकाकी; तेज; झगझग.

लखेरा [**म०** लाख; **हिं०** लखेरा] **पु०** लाखेच्या बांगड्या, रंग, इ० करणारा.

लखोटा, लाखोटा पु० बंद केलेलं पत्र. पुढें ' लाखोटा ' पहा.

लग [**म०** लागणें; **सं०** लग्] **स्त्री०** घराचें माजघर, पडवी, इ० च्या खांबांच्या रांगेच्या माथ्यावर जे लांब आडव चौरस लाकूड बसविलेलें असतें तें. **पु०, स्त्री०** मोडलेला किं० तुटलेला भाग, अवयव, किं० गात्र मुख्य पदार्थाला ज्या अयल्प तंत, स्नायु, इ० च्या आधारानें जुळलेल्या स्थितीत असतें किं० लोंबत राहातें तो तंतु, स्नायु, इ०; उ० ही फांदी वावटळीच्या जोरानें मोडली ती लगीनें लोंबत राहिली आहे. **स्त्री०** १ दोन भूभागांना जोडणारा जमीनीचा पट्टा; संयोगी भूमि. २ संबंध; घरोब्याचें नातें. ३ कांठ; कड; उ० डोंगराच्या लगीवरून चालूं नको, पडशील; उ० टेबलाच्या लगीशीं दिवा ठेवूं नको. ४ कागद, कापड, इ० च्या कडेशीं रिकामी सोडलेली जागा; उ० लगीला शिवण उसवूं नको; उ० लगीवर लिहूं नको. ꙮ **तो गोविंदरावाच्या लगीं आहे** तो त्याच्या तंत्रानें वागतो; तो त्याच्याशीं सख्य करून राहिला आहे.

लंग [**फा०**] **वि०** लंगडा; उ० तैमूरलंग.

लंग [**सं०** लंघ्] **वि०** उपवास; आजार, काळजी, इ० कारणानें अशक्त किं०रोड झालेला.

लग, लंग [**म०**लागणें;किं० लंग (लंगडा)] **पु०** अनेक रकान्यांच्या कोष्टकांत आंकडे भरावयाचे असतां ज्या सदरांत कांहीं वस्तूचें नांव नाहीं तेथें ' लग ' किं० ' लंग ' हा शब्द कारकून लोक लिहतात आणि पुढें रकान्यांत शून्य (०) लिहितात.

लगट [**सं०** लग्] **स्त्री०** १ पाठलाग. २ कोणेकाला लाविलेला जोराचा नेट किं०तगादा. ३ कोणाच्या अंगाशीं चिकटून बसणें. ४ दाट घरोबा. ५ नेटाचा प्रयत्न. ६ कांहीं कामावर केलेले अखंड परिश्रम. ७ कोणेकाला दृष्टीआड न होऊं देतां त्याच्या मागोमाग जाणें.

लगटणें [**सं०** लग्] **अ० क्रि०, स० क्रि०** मागें ' लकटणें ' पहा.

लगड स्त्री० १ सोनें, चांदी, इ० धातूंची कांब किं० वीट. २ जनावराच्या पाठीवर पाण्याचीं भांडीं ठेवण्याची लाकडाची किं० लोखंडाची रचना; माकण. [क्रिया.

लंगडणी [**म०** लंगडणें] **स्त्री०** लंगडण्याची

लंगडणें [**फा०** लंग् (लंगडा); **हिं०** लंगडना] **अ० क्रि०** पायांत निसर्गतः कांहीं व्यंग असल्याकारणानें किं० पायाला कांहीं दुखापत झालेली असल्यामुळें (मनुष्य, पशु, इ० नीं) वाकडें किं० वेढब प्रकारें चालणें.

लगडत (-थ-) गड स्त्री० १ सामग्री पुरेशी नसतांना किं० फुरसूत नसल्यामुळें कसेंबसें केलेलें कांहीं काम किं० तें काम करण्यांत केलेली लगबग किं० घाई; उ० पाऊसकाळ जवळ येऊन ठेपला होता म्हणून लगडतगड करून एकदाचें घर बांधून मी मोकळा झालों. २ कांहीं कामासाठीं योजलेल्या नाना प्रकारच्या युक्त्या,लटपटी. इ०. **क्रि० वि०** कसेंबसें; घाईघाईनें; फारशी काळजी न घेतां (कांहीं काम करणें).

लंगडा [**सं०** लंग=लंगडणें; **फा०** लंग्= लंगडा] **वि०** १ पायानें अधू किं० व्यंग (माणूस, पशु). २ कोणत्याही कारणानें व्यंग किं० सदोष असें (कोणतेंही गात्र). ३ कांहीं साधनसामग्री कमी असल्याकारणानें अर्धवट स्थितींत राहिलेलें (काम). ४ एक पाय मोडलेला असल्यामुळें उपयोगांत न आणतां येण्याजोगा (पलंग,तिवई, खुर्ची, इ०). ꙮ **लंगडशाई, लंगडशादी स्त्री०** १ लंगडत चालणें. २ मुलांचा एक खेळ. यांत एका पायावरच चालावयाचें असतें. ४ लंगडा मनुष्य. **लंगडुद्दीन, लंगडदीन पु०** लंगडा माणूस (थट्टेंत).

लंगणें वर ' लंगडणें ' पहा.

लंगणें [**सं०** लंघ्=अन्न न खाणें] **अ० क्रि०** आजार, उपोषण, कष्ट, चिंता, इ० कारणामुळें (कोणेकानें) अशक्त होणें.

लगत [म० लागणें] **क्रि० वि०,श०यो०अ०** १ शेजारीं; संनिधीस; जवळ;चिकटून;उ०पाषाण गांवालगत (किं० गांवाच्या लगत) नदी आहे. २ शेजारांस; शेजारीं; पाठोपाठ; एका मागून एक अशा क्रमानें; एकाला एक लागून; उ० एथून लगत तीन शेतें आमचीं आहेत; उ० गोपाळरावांना लगत तीन पत्रें पाठविलीं तेव्हां ते आले. **स्त्री०** १ सांनिध्य; शेजार; उ० ह्या गांवाला नदीची लगत आहे म्हणून येथें थंडी फार आहे. २ नात्यामुळें किं० मैत्रीमुळें जो जवळपणा किं० घरोबा किं० प्रेमभाव उत्पन्न झालेला असतो तो. ३ संगति; सहवास; उ० हा सरकारची हेर आहे; याच्याशी फारशी लगत ठेवणें धोक्याचें आहे. ꣸ **लगत मजकूर पु०** मध्यें खंड न पडतां म्हणजे मुख्य पत्राला जोडून जो ज्यादा मजकूर लिहिलेला असतो तो. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' तुटक मजकूर. ' **लगत लाखोटा पु०** १ हुंडीपत्र इ० चा मजकूर आंत लिहून त्याच हुंडीपत्र इ०स चिकटवून पाठवितात जो त्या कागदाचा लखोटा तो. २ पत्र ज्या कागदावर लिहिलेलें आहे त्याचाच कांहीं भाग वळवून आंतील मजकूर बाहेरून न दिसेल अशा प्रकारें त्या कागदाचा केलेला लखोटा. **लगत हुंडी स्त्री०** हुंडीच्या कागदालाच चिकटविलेलें हुंडीच्या सोबतचें पत्र.

लगता [म०लागणें] **पु०**१देश किं०पदार्थ यांचें एकमेकांस चिकटून असणें; शेजार. २एका देशास किं० गांवास चिकटून असलेला दुसरा देश किं० गांव.꣸**लगता जाब पु०**लगतलखोटा किं० त्याच लाखोट्यांत त्याच हुंडीसंबंधी लिहिलेला जाब. **लगता लाखोटा पु०** वर ' लगत ' मध्यें ' लगत लाखोटा'पह . **लगता लोळ पु०** १ नेसलेलें धोतर, लुगडें, अंगांत घातलेला डगला, इ० चा जमीन झाडणारा घोळ (लावणें, लागणें). २ लांबच लांब शेत, किं० शेतांची रांग, कुंपण, वई, झाडांची पंक्ति, इ०. ३ कोणेकाचे आश्रित, नोकर, इ० चा परिवार किं० घोळका. **लगताळ स्त्री०, पु०** लटांबर; माळका; घोळका (लागणें, लावणें). **लगताळा (–ळ्या) वि०** १ तगादा करीत बसणारा उपद्रवी (माणूस). २ चालतांना ज्याचें धोतर, अंगरखा, इ० जमीन झाडीत असते असा (माणूस).

लगती [म० लगत] **वि०** दोन कुटुंबांत लग्नाचा संबंध झाल्यानें इकडचा कोणी माणूस तिकडच्या कोणा माणसाचा संबंधी किं० आप्त होतो तो.

लगदन न मांस, पिठाचा गोळा, इ० तून हातांनीं किं० तोंडानें किं० सांडशीनें तोडून काढलेला गोळा (घेणें, तोडणें, काढणें).

लगदा पु० १ चुना, पीठ, चिखल, इ० चा गोळा २ चिकट झालल्या भाताचा किं० गूळ इ० चा गोळा. ३ सोनें, चांदी, इ० च्या माणि इ० च्या पोटांत घालतात ती किं० घातलेली लाख. ४ बांगड्यांवर चढवितात तें लाखेचें लुकण किं० अशा लुकणाची बांगडी. ५ कागद, केश, सुतें, इ० ची गुंतागुंत किं० अव्यवस्था.

लगधग स्त्री० लगबग; घाई(काम करण्यांत). ꣸ **लगधग्या वि०** कांहीं काम करण्यांत चटपटीत किं० चपळ किं० तल्लख; काम लवकर करून संपविणारा.

लगन ' लग्न ' चा अपभ्रंश. पुढें ' लग्न ' पहा.

लगपूज मागें ' लग ' ' लंग ' पहा.

लगफग क्रि० वि० फडफड असा आवाज करून (निशाण, धोतर, लुगडें, अंगरखा, इ० वाऱ्यानें हालणें).

लगबग स्त्री० १ घाई; त्वरा. २ काम करतांना धांदल किं० गोंधळ.

लगबगां क्रि० वि० घाईनें; त्वरेनें.

लगबगून क्रि० वि० घाईनें; त्वरेनें.

लंगर [**फा०**] **पु०** १ गलबताचा नांगर. २ लोखंडाचा सांखळदंड. ३ अवजड किं० अवाढव्य असा कोणताही पदार्थ (गोठ. सरी, सांखळी, खांब, तुळई,इ०). ४ चुना, पोहे, इ० कुटण्याचें साधन (टेकूवर फिरणाऱ्या जाडी लाकडाच्या तुळईच्या रूपांतील). ५ मोहोरम ह्या मुसलमानांच्या सणांत फकीरांना वाटतात तो शिधा इ०. ꣸ **लंगरखाना वि०** १ फारच मोठा (परिवार, सरजाम, कारभार, इ०). २ आडमुठ्या माणसांचा (जमाव).**लंगरदोर पु०** जाडी दोर. **लंगरहाडाचा वि०** मजबूत बांध्याचा

किं० हाडापेरांचा (माणूस, पशु, इ०). **लंगरी काम** न० (लक्षणेनें) मजबूत हाडापेरांचा माणूस किं० पशु

लगर स्त्री० मोतीं, फुलें, मणि, इ० चा सर किं० माळ. वि० आडदांड, आडमुठा (मनुष्य).

लगलग क्रि वि० घाईपाईनें; जल्दीनें; झपाट्यानें.

लगाविणें पुढें ' लगाविणें ' पहा.

लगा [म० लागणें] पु० १ टेका; आश्रय; आधार. २ संबंध (नातें, एक गांव, एक संस्था, इ० मुळें असलेला). ३ वशीला. ४ लाग. पुढें ' लाग ' पहा. ❀ **लगाबांधा** पु० १ कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला संबंध. २ आश्रय; टेका; पाठिंबा: वशिला. ३ दैव; नशीब; पूर्व जन्मींच्या कृत कर्मांचा परिणाम,—जो ह्या जन्मीं भोगास येतो; उ० लगाबांधा असतो तशतशा गोष्टा घडतात.

लगाम [फा० लिगाम्] पु०, स्त्री० १ घोड्याला ताब्यांत ठेवण्यासाठीं त्याच्या तोंडाच्या खालच्या आणि वरच्या जबड्यांच्या मध्यें घालावयाची सळई किं० कडी. २ ही कडी आणि तिला दोन बाजूंस लाविलेल्या वाद्या किं० दोऱ्या. ३ (लाक्षणिक) आटोका; नियंत्रणा; ताबा; उ० मी कोणाच्या लगामीं राहणारा मनुष्य नाहीं. ❀ **लगामी** वि० अधीन; परतंत्र.

लगाव [हिं०] पु० बंदूक, तोफ, गोफण, इ० चा मारा कोणेक पदार्थावर करण्याची सोय किं० शक्यता; नेम; उ० ह्या तोफेचा लगाव त्या बुरजावर आहे.

लगावणें,लगाविणें [म० ' लागणें ' चें एक प्रकारचें प्रयोजक] स० क्रि० (काठी, चपराक, तडाखा, इ०) कोणेकाला मारणें. ❀ **शिव्या लगावणें** शिव्यांचा कोणेकावर भडीमार करणें.

लगी [हिं०] स्त्री० १ बड्या माणसाच्या पुढें जरीच्या फडक्यांचीं निशाणें चालवितात तीं प्रत्येक. २ घर इ० च्या बांधणींत रांगेंत उभे केलेल्या खांबांच्या रांगेच्या माथ्यावर बसविलेलें लाकूड. मागें ' लग ' पहा.

लगीन [म० लग्न] न० लग्न, विवाह (अशिक्षितांत रूढि). पुढें ' लग्न ' पहा.

लंगूट पुढें ' लंगोटी ' पहा.

लगुंडा पुढें ' लगोंडा ' पहा.

लगे [म० लागणें] उ० वा० अ० भले खाशी ! शाबास ! (उत्तेजनार्थ योजावयाचा शब्द). ❀ **लगेढोल** [हिं० ढोलक्याला काठी लागतांच] क्रि० वि० त्वरेनें; घाईनें; एका दमांत; उत्साहानें; चपळतेनें. स्त्री० त्वरा; घाई; लगबग. **टीप**,—कोल्हाट्या उड्या मारणाऱ्या किं० कवाइतीचीं कामें करणाऱ्या पोरांना उत्तेजन देण्यासाठीं तमासगीर ' लगेढोल ' हा शब्द अनेक वेळां जल्दीनें उच्चारून आपलें ढोल्कें वडवीत असतो, यावरून वरीलप्रमाणें वाक्प्रचार उत्पन्न झाले आहेत. **लगेतगेकरून** क्रि० वि० घाईघाईनें; लगबगीनें. **लगेधूम** क्रि० वि० लगबगीनें; घाईनें; सर्व शक्ति वेचून. **लगेलगे** स्त्री० घाई; त्वरा. क्रि० वि० घाईनें; जल्दीनें; लगबगीनें. **लगे हात** क्रि० वि० १ त्याच दमांत; त्याच कामाबरोबर; उ० तुम्ही बाजारांत जातांच आहां, तसेच लगे हात पुढें चार पावलें जाऊन वंडोपतांना मला भेटून जाण्यास सांगा. २ ताबडतोब; विलंब न होऊं देतां; उ० तो चोर गांठोडें घेऊन पळून जात होता तोंच कोतवालाच्या शिपायानें त्याला लगे हात पकडलें.

लंगोट, लंगोटा पु० तालमीचीं कामें करतांना किं० कुस्त्या खेळतांना जें आकारविशेषाचें शिवलेलें फडकें गुह्येंद्रियें झाकण्यासाठीं मल्ल कमरेशीं बांधतात तें. **लंगोटी** स्त्री० १ मुंज झालेला मुलगा गुह्येंद्रियें झाकण्यासाठीं करगोट्याशीं नेसतो तो फडक्याचा तुकडा. २ लांबलचक फडकें, शेत, घर, इ०. ❀ **लंगोटपेच** पु० कुस्तींतील एक पेच. **लंगोटबंद** पु० नुसती लंगोटी नेसणारा कुळवाडी, कामकरी, इ०. २ स्त्रीसंग ज्याणें वर्ज केला आहे असा पुरुष. **लंगोटीयार** पु० लंगोटी नेसण्याच्या वयापासूनचा मित्र किं० सोबती; बाळमित्र.

लगोंडा पु० १ केश, पानें, इ० एकाला एक चिकटून किं० गुंतून होतो तो गोळा. २ गूळ, चिखल, डींक, रक्त,पीठ,इ० चा गोळा.

लगोरी स्त्री० १ लाकूड, दगड,इ० चे वाटोळे लहान लहान तुकडे ज्यांची उतरंड करून मुलें खेळतात ते प्रत्येक. २ वस्त्रालाच चिकटलेली

वस्त्राची लोंबती चिंधी. **लगोऱ्या** स्त्री० अ० व० अर्थ १ मधील खेळ (खेळणें).

लगोलग, लगोलाग [म० लागणें+लागणें] क्रि० वि० तावडतोब; विलंब न होऊं देतां; पाठोपाठ.

लग्न [सं०] वि० १ चिकटलेलें. २ आडकलेलें. ३ गुंतलेलें. ४ तल्लीन; तत्पर. ५ आसक्त; अनुरक्त; न० १ (ज्योतिष) राशीचा उदय. २ (ज्योतिष) राशीच्या उदयावरून ठरविलेला काळ. ३ (ज्योतिष) क्रान्तिवृत्त आणि क्षितिज यांचा छेदबिन्दु. ४ (मराठांत) विवाह (लागणें, होणें, मोडणें, ठरणें, इ०). टीप,–' लग्न ' बदल अशिक्षित लोक ' लगन, ' ' लगीन ' म्हणतात. ॐ **लग्नाची बायको** स्त्री० धर्माच्या विधीनें जी कोणेकाची पत्नी झाली ती. याच्या व्यावर्तकत्वें ' रांड, ' ' रखेली, ' इ०. **लग्नाचा नवरा** पु० धर्माच्या विधीनें जो कोण्या स्त्रीचा पति झाला तो. याच्या व्यावर्तकत्वें ' जार ' इ०. **लग्न नाहणें** लग्नाच्या समारंभांत विधिपूर्वक सोहळ्याचें स्नान करणें. **लग्नकुंडली** स्त्री० विवक्षित काळच्या लग्नाचा अंक पहिल्या कोष्टकांत मांडून तदनुरोधानें इतर राशींचे अंक जींत मांडलेले असतात अशी राशिचक्राची कुंडली; माणसाच्या जन्माच्या दिवशीं सूर्योदयापासून जन्मसमयापर्यंत जितक्या घटका झाल्या असतील त्यांच्या हिशेबानें जी राशि पूर्वेकडे उदय पावली असेल ती कोष्टकांत प्रथम स्थानीं मांडून पुढें बारा स्थानांत राशि आणि त्या त्या राशींचें ग्रह तेथें लिहून करतात तें कोष्टक. **लग्नगोष्टी** स्त्री० अ० व० १ कोणा मुलाचें किं० मुलीचें लग्न जुळविणें चाललेलें असतां त्या लग्नाला अनुकूलच अशा ज्या गोष्टी कोणी बोलतो त्या. टीप,–कोणाचें लग्न जुळत असतां सत्य अशा देखील गोष्टी बोलल्यानें जर हें लग्न मोडण्याचा संभव असला तर त्या बोलूं नयेत, अनुकूल असतील त्याच गोष्टी बोलाव्यात, अशी सर्वांचीच इच्छा असते. २ कोणाचें कल्याण होण्याचा समय प्राप्त झाला असतां त्याला प्रतिकूल गोष्टी न बोलतां अनुकूल तेवढ्याच ज्या कोणी गोष्टी बोलतो त्या. ३ खोट्या प्रेमाच्या गोष्टी. **लग्नघटका** स्त्री० १ लग्नाचा समय,–जोशानें काढलेला. २ हा समय मोजण्यासाठीं पाण्यांत तरंगत सोडतात तें सच्छिद्र पात्र. ३ कोणत्यांही कामांतील ऐन महत्त्वाचा किं० आणीबाणीचा समय,–ज्या समयीं कांहीं चूक होणें अत्यन्त अनिष्ट असतें. **लग्नचुडा** स्त्री० लग्नाच्या विधींत नवऱ्यामुलीला भरतात त्या नव्या बांगड्या. **लग्नटका, लग्नटक्का** पु० लग्नावर सरकारचा कर. **लग्नचिटी** स्त्री० लग्नाचें आमंत्रण करावयाचें पत्र. **लग्नटाप** स्त्री० लग्नाला योग्य अशा मुहूर्तांची यादी. **लग्नतीथ, लग्नतिथि** स्त्री० लग्नाला योग्य जी तिथि ती. **लग्नथर** पु०, न० लग्नासाठीं विकत घेतलेलें कापडचोपड. **लग्ननक्षत्र** न० लग्नाला योग्य जें दिवसनक्षत्र तें. **लग्नपत्रिका** स्त्री० लग्नाचा मुहूर्त ज्या कागदावर लिहून ठेविलेला असतो आणि ज्याची विवाहाच्या वेळीं पूजा करतात तो कागद. **लग्नमंडप** पु० लग्नाच्या सोहाळ्यासाठीं घातलेला मांडव. **लग्नमास** पु० लग्नाच्या विधीला विहित जे मार्गशीर्षादि महिने ते प्रत्येक. **लग्नमुहूर्त** पु० १ लग्नाला योग्य जो मुहूर्त तो. २ लग्न, मुंज, इ० शुभ कार्य. **लग्नशिष्टाई** स्त्री० लग्न जुळवून आणण्याचे कामीं जी खटपट, मध्यस्थी, किं० बोलणें कोणी मनुष्य करतो ती. **लग्नशुद्धि** स्त्री० कोणतेंही कार्य करावयाला ग्रहादींची जी अनुकूलता असावी लागते ती. **लग्नसराई** स्त्री० लग्नें करावयाला मार्गशीर्षापासून ज्येष्ठापर्यंत जो अवधि तो. **लग्नसाडा** पु० लग्नाचे वेळीं वधूपक्षाकडून वराच्या आईस देण्यांत येतें तें लुगडें. कित्येक प्रान्तांत वराकडून वधूस देण्यांत येतें त्या लुगड्यासहीं ' लग्नसाडा ' म्हणतात. **लग्नसोहळा** पु० लग्नाचा विधि, त्या विधीसंबंधाच्या मेजवान्या, उत्सव, इ० समुच्चयानें. **लग्नाऊ** वि० लग्नाच्या प्रसंगीं देणें, घेणें, नेसणें, पांघरणें, इ० ला योग्य असें (लुगडें, खण, शालजोडी, इ० वस्त्र.) **लग्नाक्षता** स्त्री० अ० व० लग्न लागतेसमयीं वधू आणि वर एकमेकांवर टाकतात त्या अक्षता,–कुंकुमामिश्रित तांदूळ. **लगिन्या बैल** [म० लगीन, लग्न + बैल] पु० उत्सर्ग करून मोकळा सोडलेला बैल.

लग्नक [सं०] पु० जामीन राहिलेला माणूस.

लग्या पु० जुगारांतील एक पारिभाषिक शब्द.

लंघणें [सं० लंघ] अ० क्रि० आजार, उपवास, चिंता, इ० मुळें थकणें किं० रोडावणें किं० अशक्त होणे. स० क्रि० १ (नियम, आज्ञा, सरणी, इ०) मोडून विरुद्ध आचरण करणें. २ (दिवस, काळ, इ०) घालविणें किं० अतिक्रान्त करणें. ॐ **लंघले लांपले** पु० अ० व० दमलेले आणि भागलेले लोक; आजारी लोक; म्हातारे कोतारे लोक.

लंघन [सं०] न० १ उडी मारणें. २ उडणें (पक्ष्यानें). ३ (समुद्र, नदी, मर्यादा) ओलांडणें. ४ (आज्ञा) मोडणें ५ उपेक्षा; अनादर; तिरस्कार. ६ उपोषण; मुळींच कांही न खाणें.७ (स्त्रीवर) बलात्कार.

लघळ, लघाळ वि० १ आपला दर्जा किं० पायरी मनात न आणता मोठ्या माणसाशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणारा असभ्य (माणूस). २ पुन्हा पुन्हा तिरस्कार केला तरी निर्लज्जपणानें बोलावयाला येतो तो; कोडगा. ३ अर्थहीन किं० बोलावयाला येतो तो; कोडगा. ३ अर्थहीन किं० फाजीलपणें आणि पुष्कळ बोलणारा. वरील तीन्ही प्रकारच्या गुणाच्या स्त्रीस'लघळ भवानी,' ' लघाळ बाई, '' लघाळ मावशी, ' असे शब्द आहेत. ॐ **लघाळकी** स्त्री० वाचळपणा; बडबड.

लघाळ स्त्री० १ चिरगुटें, माणसें, मुंग्या, इ० चीं रांग किं० पंक्ति किं० ओळ (लागणें, इ० चीं लावणें). २ भाषणांतील मुद्दे, विधानें, इ० चीं परंपरा (विशेषत: टाळाटाळीच्या प्रसंगाची). ३ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत.

लघिमा [सं० लघिमन्] पु० १वजनांत हलकेपणा.२मनाचा कोतेपणा;अनुदार स्वभाव. ३अष्टसिद्धीपैकीं तिसरी,-हावें तितकें हलकें होण्याचें सामर्थ्य. मागें ' आणमा ' मध्ये ह्या अष्ट सिद्धि पहा.

लघिष्ट [सं०] वि० अत्यन्त हलका.

लघु [सं०] वि० १ (वजनानें) हलका. २ (संख्येनें किं० परिमाणानें किं० योग्यतेनें) कमी; थोडें; अल्प. ३ संक्षिप्त; उ० लघुव्याकरण; लघुकौमुदी.४अधम;नीच;क्षुद्रक.५जलद;वेगवान्; चपळ. ६ (आकारानें) लहान. ७ सहज पचणारा (आहार). ८ रमणीय; सुंदर; उ० लघुदर्शन. ९ न्हस्व (स्वर). ॐ **लघुकोन** पु० काटकोनाहून म्ह० नव्वद अंशाहून लहान किं०कमी कोन. **लघुशंका** स्त्री०मुत्रविसर्जन;मुतणें. **लघवी, लघवी** स्त्री० मुतणें. **लघुलेखन** न० वक्त्याच्या मुखांतून निघालेलीं वाक्यें भाषणाच्याच वेगानें कांहीं विशिष्ट चिन्हांनीं लिहून घेणें.अशा लेखकांस ' लघुलेखक ' म्हणतात. **लघुत्व** न० कमीपणा; हलकेपणा. **लघुभोजन** न० थोडासा फराळ. **लघुमूत्र** न० आपोआप लघवी गळणे हा विकार.

लचक [हिं०] स्त्री० पाय, कंबर, इ० तील शिर स्थानापासून चळल्यामुळें होते जी विकृति ती (भरणें).

लचकणें [हिं० लचकना] अ० क्रि० १ एकाद्या गात्राच्या शिरा स्थानापासून चळून (तें गात्र) नेहमींसारखें चलनवलन करण्यास असमर्थ होणें. २ एकदम उसळून उठणें.

लचका पु० १मांस,पीठ,चिखल,इ०चा बोटांनीं किं० दातांनीं किं० सांडशीनें तोडून काढलेला गोळा.२ आवड; नाद; छंद (लागणें). ३ एकदम बसलेला ताण किं० धक्का(बसणें).

लचकुटा, लतकुटा [स० लाथ+कुटणें] निर्लज्ज, लोचट; कोडगा.

लचंड, लचांड न०, **लचंडी, लचांडी** स्त्री० भानगड; पेच; शुक्लकाष्ठ; आपणाला न टाळतां येण्याजोगें आपल्या पाठीस लागलेलें अप्रिय असें कांहीं काम,कोणी माणूस, किं०कांहीं जबाबदारी. ॐ**लचांडखोर,लचंडखोर लचंडी, लचांडी** वि० १ भलभलत्या भानगडी उपस्थित करण्याच्या स्वभावाचा. २ लुच्चा; भामटा.

लचणें अ० क्रि० १ खचणें; दबणें. २ हार जाणें. ॐ **लचला लवंगला** वि० १ दमला भागलेला; फार काम, कष्ट, जबाबदारी, आजार, इ० कारणांमुळे जो जर्जर किं० पीडित झाला आहे असा. २ व्यापार, सावकारी, धंदा,इ० पुढें चालू ठेवण्याला असमर्थ झालेला.

लचाड, लचाळ वि० १ वटवट करण्याच्या स्वभावाचा.२ इकडच्या गोष्टी तिकडे सांगणारा; चहाडखोर.

लजत, लज्जत [अ० लझ्झत्] **स्त्री०** १ रुचि; गोडी; आस्वाद. २ एकाद्या गोष्टीचा लागलेला नाद; चटक. ३ खुमारी; मर्म; खुबी. ४एका जातीचा रंग, रुचि, स्वर, भाषा, देखावा, इ० मध्यें दुसऱ्या जातीचा रंग, रुचि, स्वर, भाषा, देखावा, इ० ची जी अंधुक प्रतीति होते ती किंवा अनुभव येतो तो (मारणें); उ० त्याच्या बोलण्यांत कानडी स्वराची लजत मारते. ॐ **लजतदार, लज्जतदार** वि० रुचकर; स्वादिष्ट.

लजिती फजिती [म० फजिती] **स्त्री०** बोऱ्या; फजितवाडा; हुर्रेवडी (उडणें,उडविणें).

लज्जा [सं०] **स्त्री०** १ लाज; शरम. २ विनय; मर्यादशीलपणा. ॐ **लज्जावह, लज्जाकर** वि० लाजिरवाणी (कांहीं गोष्ट). **लज्जायमान** वि० लाजलेले;शरमलेला; लज्जित. **लज्जालु** पु०, **स्त्री०** लाजाळू नांवाची वनस्पति,—स्पर्श झाल्याबरोबर हिचीं पानें मिटतात. **लज्जाहोम** पु०' लाजाहोम' चें अशुद्ध रूप—विवाहांत होमांत लाह्यांची आहुति देण्याचा विधि.

लट स्त्री० केश, सूत, इ० चा गुंतागुंत. **पु०** काठी; सोटा.

लटक [हिं०] **स्त्री०** १ गाणें, बोलणें, चालणें, इ० मध्यें जी कोणेकाची तऱ्हा ती. २ कांहीं खोडी किंवा व्यसन किंवा दुर्वर्तनाचा कोणेकाचा प्रकार. **पु०** खोडसाळ किंवा दुष्ट मनुष्य.

लटकणें [हिं० लटकुना] **अ० क्रि०** १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या आधारानें लोंबत राहाणें. २ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाशीं संबद्ध होणें किंवा जुडून राहाणें. ॐ **लटकत चालणें** नखऱ्यानें ठमकत चालणें.

लटकविणें, लटकाविणें[म०'लटकणें'चें प्रयोजक] **स० क्रि०** १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थाच्या आधारावर लोंबत सोडणें. २ चिकटावणें; जोडणें; सबंद्धकरणें.

लटका, लटिका, लटकि वि० १ खोटा; असत्य; सत्याचा ज्याला आधार नाहीं असा (आरोप, विधान). २ लबाडीचा, अप्रामाणिक (माप, वजन, तराजू). ३ निष्फळ, व्यर्थ (दगदग, हेलपाटा). ४ विनाकारण; उगीच्याउगीच,उ० मी अपराध केला नसतां मला लटक्या शिव्या कां देतां ?. ५ संवेदना ज्यांत नाहीं असें (गाल); बधिर. ६ हालचाल करावयाला असमर्थ (पावलें, बोटें, हात, इ०).ॐ **लटीकवाद** पु०१खोटेपणा किंवा खोटेपणा केल्याचा आरोप.२ अमुक गोष्ट करतो असें वचन देऊन तो न करण्याचें पाप.**लटका ताठा** पु० पोकळ बडाई; उ०नाकांत नाहीं कांटा (म्ह०नथ,सुंकलें, इ०)आणि लटका ताठा **लटकाफटका, लटकालांडा** वि० खोटा; लबाडीचा; अप्रामाणिकपणाचा. **लटकुरा, लटकोरा** वि० लबाडीचा; लुच्चेगिरीचा.

लटकाविणें [म० ' लटकणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (कांहीं पदार्थ) कांहीं आधारावरून लोंबत सोडणें; (एक पदार्थ) दुसऱ्यापदार्थाशीं जोडणें किंवा संबद्ध करणें. २ (दागिना, वस्त्र, इ०) ऐटीनें धारण करणें. ३ (दुसऱ्याच्या मालकीचा पदार्थ) खाकोटीस मारून किंवा खिशांत घालून पळवून नेणें.

लटपट स्त्री० १ बोलाचाली; भांडण; तंटा. २घाबरेपणाची स्थिति; गोंधळणूक; घाबरगुंडी.३ आधार किंवा सांधा मोडल्यामुळें पदार्थाची होते ती दुर्दशा किंवाखिळखिळीतपणाची अवस्था. ४ तळखपणाची हालचाल. ५ युक्ति; हिकमत. कावा; उ० हा मक्ता मिळविण्यासाठीं मी काय काय लटपटी केल्या त्या माझ्या मलाच ठाऊक. ॐ **लटपटपंची स्त्री०** १ बढाई; उर्मटपणाचें किंवा बाष्कळ भाषण (करणें). २ घाबरगुंडी (उडणें). ३ पोपटाला शिकवितात त्या वाक्याचा हा पहिला शब्द आहे ह्या वरून तें वाक्य. तें वाक्य असें,—लटपटपंजी, चतुरिकि जान, पढा पार्वती श्री भगवान्.

लटपटणें [म० लटपट] **अ० क्रि०** १ आधार, आश्रय, किंवा सांधा कमजोर झाल्यामुळें किंवा ढासळल्यामुळें किंवा मोडल्यामुळें (खाब, खुंटी, इ०) हालूं लागणें. २ (काम, बेत, कारभार, युक्ति, वक्तृत्व, व्यूह, इ०) निष्फळ किंवा व्यर्थ होणें. ३ ढासळणें; कोसळून पडणें; स्थानभ्रष्ट होणें. ४दुसऱ्याची वरचढ शक्ति,विद्वत्ता,वक्तृत्व, मुत्सुद्देगिरी, इ० मुळें कोणेकानें दबणें, लाज्जत

होणें, किं० निरुत्साह होणें; उ० मी मी म्हणणारें पुणेंकर शास्त्री काशीकर शास्त्र्यापुढें लटपटले.

लटपटीत [म० लटपटणें] **वि०** १ खिळखिळा किं० पक्का न बसलेला (खिळा, खुंटी, इ०). २ अनिश्चित; संदिग्ध.३ अशक्त, कमजोर (मुद्दे, प्रमाणें). ४ अजून पक्का न ठरलेला(बेत, योजना). ५ हंगामी; कायमचा नव्हे असा.

लटंबर, लटांबर न० १ पुष्कळ माणसें, गाड्या, घोडे, इ० चा समुदाय जो कोणा बड्या माणसाच्या स्वारींत किं० प्रवासांत किं० कोठें जाण्यायेण्याच्या प्रसंगीं असतो तो. २ ज्यांचीं आपणास अडगळ वाटते अशा पदार्थ माणसें, इ० चा आपणाबरोबरचा पसारा. ३ नेसलेलें धोतर, लुगडें, अंगांत घातलेला अंगरखा, इ०चा घोळ,—ज्यापासून आपल्याला उपद्रव होतो तो. ४ परिवार; लवाजमा.

लटरफटर न० किरकोळ सामानसुमान,पदार्थ, इ० समुच्चयानें.

लटलटणें अ० क्रि० १ हालणें; हादरणें. २ वाऱ्यावर (वस्त्र इ०) फडफडणें.३ (पदार्थाचे भाग) नीट बसविलेले किं० सांधलेले नसल्याकारणानें ते हालत असणें. ४ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुडणें. ५ (मोती, हिरा, इ०) चकचकणें. ६ (चेहेरा, अंगकान्ति, इ०) तेजस्वी दिसणें किं० उठून दिसणें.

लटांबर (–ळ) वर ' लटंबर ' पहा.

लटारणा वि० विरूप किं० विशोभित दिसण्याइतका मोठा (पदार्थ, माणूस, पशु); अगडबंब.

लटिका, लटीका वर ' लटका ' पहा.

लटिंगा पु० सुमारें दोन आडीच हात लांब, जाडी, आणि वाटोळा असा सोटा.

लटुपटू, लटुफटु, लटुबटु इ० पुढें ' लुटुपुटु ' इ० पहा.

लटोरा वि० लठ्ठ, जाडा,(मनुष्य,पशु,पदार्थ). **पु०** १ खूप जाडी काठी; सोटा, सोडगा. २ लाकडाचा जाडी तुकडा किं० खंड. ३ एक प्रकारचा जोंधळा. ॐ **लटोरें पडवळ न०** पडवळाची एक जात.

लठुंगा, लठ्ठुंगा वि० लठ्ठ, जाडा, आणि मजबूत (माणूस, पशु, पदार्थ).

लठ्ठ [हिं० लठाह्] **पु०** १ सोटा; जाडी काठी. २ सर्पणाचें जाडी लाकूड. **वि०** विशोभित दिसण्याइतका जाडा (माणूस, पशु, पदार्थ, दागिना, इ०). **टीप,–लट्ठा, लठ, लठ्या** हे वरील तिन्ही अर्थाचेच शब्द आहेत.ॐ**लठ्ठनिरंजन पु०** खूप मोठ्या अंगाचा पण अशिक्षित असा पुरुष.**लठ्ठभारती,लठंभारती** वि०१ विरूप दिसण्याइतका मोठा (माणूस,पशु,पदार्थ).२अंगाने लठ्ठ पण कुचकामाचा माणूस. **लठ्ठाई स्त्री०** दांडगाई. **लठ्ठामिश्र , लठ्ठाश्रम, लठ्ठेश्वर, लठ्ठबगाड्या वि०** शरीरानं लठ्ठ पण निरक्षर आणि असभ्य माणूस. **लठ्ठालठ्ठी स्त्री०** मारामारी.

लठ्ठुंगा वर ' लठुंगा ' पहा.

लड स्त्री० १ पानांचा भारा. २ मोतीं, फुलें, इ०चा सर. ३ रेशीम, लोकर, सूत, कलाबतू,इ० ची गुंडाळी.

लंड [**फा०** लन्द्=पुरुषाचें शिश्न] **पु०** १ पुरुषाचें शिश्न. २ लुच्चा किं० लबाड किं० कावेबाज माणूस; ठक. ३ द्वाड किं० उपद्रवी माणूस किं० पोर.

लंड वि० लांडा; तोकडा. २ बोथट. ॐ **लंडपुच्छ वि०** ज्याचें शेपूट तुटली आहे किं० तोडली आहे असा (कुत्रा, गाय, बैल, इ०). **म्होरक्या पु०** मुलांच्या टोळीचा नायक किं० म्होरक्या (उपहासांत). **लंडभारती पु०** १ सर्वदा नग्न असतो तो गोसावी. २ सर्वदा नागवा असा मुलगा. ३नुसती लंगोटी घातलेला धिप्पाड कुणबी.

लडथड [म०लढणें] **स्त्री०** १ भानगड; गुंतागुंत. २ भानगडीचा किं० गुंतागुंतीचा व्यवहार. ३घोटाळा. ४ निकालास न लागलेली बाबत. ॐ **लडथड्या वि०** १ भानगडी उपस्थित करणारा (माणूस). २ भांडखोर. ३ व्यवहार, धंदा, इ० मध्यें पैशासाठीं नानाप्रकारच्या युक्त्या किं० कावे करणारा.

लडदू, लडधू वि० लठ्ठ,जाडा,आणि भक्कम.

लडबड, लडफड स्त्री० १पदार्थांच्या वेगळ्या वेगळ्या भागांचे सांधे कमजोर झाल्यामुळें किं० निखळल्यामुळें त्या भागांचा होतो जो शिथ-

लपणा किं० विसकळीतपणा तो. २ कपड्याच्या वेराचें किं० उपरणें, लुगडें, धोतर, इ० च्या सोग्यांचें वाऱ्यावर हालणें. ३ धांदल, गोंधळ. ४ गुंतागुंत; अव्यवस्थितपणा. ५ कोणेकानें दुसऱ्याच्या कामांत अगांतुकीनें शिरणें. **क्रि० वि०** अव्यवस्थितपणें; हेलकावे खाऊन. ॐ **लडबडलाळ्या वि०** दांडगेश्वर आणि उर्मट.

लडबडणें, लुडबुडणें अ० क्रि० १ दुसऱ्यानें आपणास बोलावलेलें नसतां त्याच्या कामांत पडणें. २ हेलकावे खाणें.

लडा पु० बोकड; एडका.

लंडा [म० लंड] **वि०** १ लुच्चा. २ उद्धट; उर्मट. ॐ **लंडाई पु०** १ लुच्चेगिरी. २ उद्धटपणा.

लडिवाळ [**म०** लाड] **पु०** १ कोणी कोणेकावर करतो तें प्रेम किं०ती ममता.२लाड. **वि०** १ आवडता; प्रिय. २ प्रेमाचें (भाषण).

लडी स्त्री० १ बकरी. २ मोतीं, फुलें, इ० चा सर.

लंडी स्त्री० १ भित्रा; पुचाट; नामर्द. २ खोटेंपणाचें खेळणें.

लड्डु, लड्डुक[**सं०**]**पु०** १ लाडू(एक पकान्न).२ (चिखल, शेण, इ० चा) गोळा.

लढ स्त्री०, पु०, लडी [**हिं०**] मोतीं, फुलें, इ० चा सर. **स्त्री०** १ समुद्राच्या लाटांनीं कांठावर टाकलेला गाळ किं० केरकचरा. २ नदीच्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला केरकचरा. **लढ स्त्री०** गुंतागुंत.

लढण [**हिं०** लढना] **अ० क्रि०** १ कोणेकाशीं झुंजणें किं० युद्ध किं० मारामारी करणें. २ कोणेकाशीं स्पर्धा करणें. ३ झाडांवर (फुलें, फळें, कणसें, इ०) एकमेकांना लगटून पुष्कळ प्रमाणांत आलेलीं असणें. ४ बरोबरीचा होणें किं० असणें किं० ठरणें; उ० हें पागोटें त्या पागोट्याशीं लढणार नाहीं. ॐ **एकाद्या वस्तूवर लढून पडणें** ती मिळविण्याचा उत्सुकतेनें प्रयत्न करणें; तिच्या नादीं लागणें.

लढत [**म०** लढणें] **स्त्री०** लढाई;मारामारी. २ चढाओढ.

लढवई, लढवाई [**हिं०**] **वि०** १ वीराला साजेसें. २ लढाईच्या कामीं उपयोगी पडणारें (हत्यार, घोडा, गाडी इ०).

लढवय्या [**हिं०**] **पु०** १ लढाईंत पटाईत माणूस; लढणारा शूर गडी.

लढविणें [**म०** ' लढणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (एका माणसास) दुसऱ्याशीं लढावयास लावणें. २ (दोन माणसांत) कलह किं० भांडण चेतविणें. ३ (एक वस्तु) दुसऱ्या वस्तूशीं ताडून पाहणें; उ० हें लुगडें त्या लुगड्याशीं लढवून पाहिलें पण लढत नाहीं. ४(कांहीं युक्ति,योजना, हिकमत, इ०) कांहीं कार्यार्थ योजणें किं० चालविणें. ५ (किल्ला, गांव, इ०) शत्रूच्या हल्ल्यापासून रक्षिण्याचा प्रयत्न करणें किं० शत्रूच्या ताब्यांत न जावें म्हणून खटपट करणें.

लढा [**म०** लढणें] **पु०** १ वाद; तंटा. २ वादाची किं० तंट्याची बाबद. ४ प्रतिबंध; हरकत; अडथळा. ५ गतीचा कुंठितपणा. ६ गति कुंठित करणारी कोणतीही गोष्ट (लागणें). ७ गुंतागुंत; घोटाळा. ८ गुंतागुंतीची स्थिति. ९ दारूगोळा इ० वाहून अन्यत्र न्यावयाचा खटारा.

लढाई [**हिं०; म०** लढणें] **स्त्री०** १ युद्धांतील एका समयाची झटापट. २ भांडण; तंटा. ३ वर्चस्व मिळविण्याच्या बाबतीत चढाओढ; स्पर्धा. ॐ **लढाई जिंकणें** वादांत, कुस्तींत, किं० भांडणांत यश मिळविणें; विजयी ठरणें. **लढाई मारणें** लढाईत यश मिळविणें.

लढाऊ [**म०** लढणें] **वि०** लढण्याच्या कामीं उपयुक्त; लढण्यांत योजावयाचें.

लढ्या [**म०**] **पु०** समुद्राच्या लाटांनीं किं० वाहात्या पाण्याच्या प्रवाहानें कांठावर आलेला जो गाळ किं० केरकचरा तो किं० त्याचा ढीग.

लत [**हिं०**] **स्त्री०** १ कांहीं वाईट खोड किं० लकब. २ बट्टा; कलंक; कालिमा; उ० मी आपल्या वर्चस्वास लत लागूं देणारा मनुष्य नाहीं.

लतकुटा, लतकुटार, लतकुठा, लतकोडगा, लतगाढव लतखोर, लतखोरा [**म०**लाथ+कुटणें, कोडगा, गाढव] **वि०** निर्लज्ज; बेशरम.

लतखोरा [**म०**लाथ,लात] **पु०**दाराच्या दुहेरी चौकटीच्या रचनेंतील आंतल्या चौकटीचें खालचें म्ह० जमीनीं सरपट असलेलें लाकूड.

लता [**सं०**] **स्त्री०** वेल; वेली. ॐ **लतागृह**

न०, लतामंडप पु० ज्याच्या सर्व बाजूंवर वेली चढवून आच्छादित केला आहे असा मांडव.

लताडणी, लताडणें खालीं ' लथाडणी,' ' लथाडणें ' पहा.

लतावणें, लटावणें [हिं० लत्=खोड] अ० क्रि० दुर्मार्गाला लागणें किं० लागलेले असणें.

लत्ता स्त्री०,लत्ता पु० [म० लगता=शेजार] शेजारचा प्रदेश.

लत्तरबाळ्या [फा० लत्र् =फाटकें वस्त्र; चिंधी] स्त्री० अ० व० १ अनेक जागीं फाटलेलें लुगडें, धोतर, अंगरखा, इ०. २ चिंध्या; फाटकें तुटकें कपडे किं० वस्त्रे.

लत्ता स्त्री० पायाच्या तळव्यानें केलेला प्रहार; लाथ.

लत्ती [फा० लत्र=फाटकें वस्त्र]स्त्री०१चिंधी. २फाटून लोंबत असलेला वस्त्राचा भाग.॥लत्त्या-बत्त्या स्त्री०अ०व०पेहेरलेल्या किं०पेहेरावयाच्या वस्त्राच्या किं०कपड्याच्या लोंबत असलेल्या चिंध्या.

लथडणी, लथाडणी, लाथाडणी [म० लात, लाथ] स्त्री० १ लाथेनें मारणें. २ लाथ मारून उडवून देणें. ३ झिडकारणी. ४ नापसंत म्हणून अव्हेरणें.

लथडणें, लथाडणें [हिं० लथड्ना] अ० क्रि० (चिखल,शेण,गू,इ०नीं) अंग,वस्त्र,भांडें, इ० लडबडलेलें किं० बरबटलेलें किं० माखलेलें असणें.

लथडणें, लथाडणें, लाथाडणें [म० लाथ] स० क्रि० १ लाथेनें मारणें किं० लाथ मारून उडवून देणें. २ झिडकारणें; अव्हेरणें; नापसंत म्हणून दूर लोटणें किं० टाकून देणें. ३ (काम, कारभार, मसलत, इ० चा) विचका किं० दुर्दशा करणें.

लदाव [हिं०] पु० १ कमान रचावयाची असतां घुमटाच्या आकाराचा जो पोकळ भाग असतो त्यावर विटा, दगड, इ० रचतां याव्यात म्हणून जी लाकडाची तात्पुरती कमान मांडतात ती. २ भिंत इ० तील कमानीखालीं पोकळ जागा न राखतां जी कायमचीच रचाई केलेली असते ती.

लद्दा पु० केश, सुतें, गुंतवळ , कागद, इ० चा गुंतागुंतीमुळें झालेला गोळा किं० गठ्ठा.

लपका, लबका पु०चिखल, शेण, पीठ, इ०चा गोळा.

लपंगा इ० पुढें ' लफंगा ' इ०पहा.

लंपट [सं०] वि० १ हावरा; अधाशी. २ आसक्त.३ कामविकारानें आसक्त झालेला (पुरुष) किं० आसक्त झालेली (स्त्री). ४ सैल किं० खिळखिळा झालेला (खिळा, खुंटी, इ०). ह्या अर्थी ' लापट ' हा शब्द अधिक प्रचलित आहे.

लपटणें पुढें ' लपेटणें ' पहा.

लपंडाव पु०, लपंडाई स्त्री० [म० लपणें + डाव] १ एकानें लपावें, दुसऱ्यानें त्यास शोधून काढावें, इ० रूप मुलांचा एक खेळ (खेळणें). २ सरकारचा, सावकाराचा, किं० दुसऱ्या कोणाचा तगादेदार आला असतां त्याचेपासून तोंड चुकवून लपून बसणें किं० पळून जाणें हें कृत्य (खेळणें, चालविणें).

लपण, लपणी [म० लपणें] स्त्री० १ लप-ण्याची किं० दडून बसण्याची क्रिया. २ लपून किं० दडून बसण्याच्या सोयीची जागा.

लपणें [सं० लुप्] अ० क्रि० १दडून बसणें. २ न दिसेसा होणें किं० असणें. ३ तुळई, खांब, जोतें, इ० खचणें, वाकणें, किं० दबणें. ह्या अर्थी ' लप खाणें ' असाही प्रयोग आहे. ॥ लपन-छपन,लप्पंछप्पं न० लपून किं० दडून बसणें ही क्रिया. लपूनछपून, लपतछपत क्रि० वि० १ लपत लपत. २ गुप्तपणानें.

लपविणें [म० ' लपणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ दडवून किं० झाकून ठेवणें. २ न दिसेल अशा प्रकारें ठेवणें. ३ (मनांतील विचार, बेत, इ०) प्रकट न होऊं देणें.

लपांगा (-ग्या) पुढें ' लफंगा ' पहा.

लपेट [हिं०] पु०, स्त्री० १ कापड, कातडें, कागद, इ० चें आवरण किं० आच्छादन. २ परिघ; मर्यादा. ३ उन्हाचा किं० थंडीचा झटका मनुष्यास बाधतो तो.४पटकी इ० साथीचा रोग. ५ भाषणांतील डावपेच किं० दुटप्पीपणा (मारणें). ॥ लपेटीखालीं नेणें भाषणांत खुबीदारपणानें कांही गोष्ट दुसऱ्याच्या लक्ष्यांत न येईल अशा प्रकारें लपवून ठेवणें किं० खोटी

गोष्ट खुबीनें खरी अशी भासविणें किं० आपल्यां-तील व्यंगें उघडकीस न येतील अशा सफाईनें बोलणें.

लपेटणें [हिं० लपेटना] **स० क्रि०** १ गुंडा-ळणें. २ डोकें, कंबर, इ० भोंवतीं (वस्त्र इ०) गुंडाळणें. ३ (डोकें, कंबर, इ०) वस्त्र इ० नीं गुंडाळणें किं० आच्छादणें. ॐ **लपेटून नेणें** वर ' लपेट ' मध्यें ' लपेटखालीं नेणें ' पहा.

लपेटा [**म०** लपेटणें] **पु०** १ पदार्थावर केलेलें कागद, कातडें, चिखल, इ० चें आवरण किं० आच्छादन. २ कलाबतूच्या तंतूनें किं० तारेनें मढविलेल्या बांगड्या.

लपेटी [हिं० लपेट] **स्त्री०** १आपला मतलब प्रकट न होऊं देतां वकील, मुत्सद्दी,इ० ची बोल-ण्याची खुबी. २ लबाडीचा व्यवहार.

लपोट (–ड–) शंख, लबोडशंख, लबोड-शिंग पु० बोलण्यांत अघळपघळ, धमकदारीचीं, आणि आवेशाचीं भाषणें करणारा पण ज्याच्या हातून कांहींच कार्य होत नाहीं असा मनुष्य; थापबाज; क्रियेविण वाचाळ.

लप्पं छप्पं [**म०** लपणें + छपणें] **न०** बढाईचें किं० अरेरावीचें भाषण. २ टाळाटाळीचें भाषण. ३ खोट्या सबबी. ४थापबाजी.

लप्फा [हिं० लपा] **पु०** १ शेला,पागोटें, इ० ना असतो तो मोठा जरीचा पदर.२ झाडाचें खोड चौरस करावयाचें असतां चारी बाजूंचे निमगोल तक्ते अरकसून काढतात ते प्रत्येक. ३ खांबाला किं० तुळईला मजबुतीसाठीं दिलेला ओड. ४ फळीला मजबुतीसाठीं ठोकलेलें आडवें लाकूड. ह्या अर्थी ' लफ्फा 'सुद्धां.५ स्त्रियांचें एक कंठभूषण. ॐ **लफ्फेदार वि०** ज्याला मोठा जरीचा पदर आहे असा (शेला, पागोटें, इ०).

लफंगा, लफंग्या, लफांगा, लफांग्या वि० थापबाजी करून लोकांजवळून पैसे उपटणारा, पैसे आज देतों उद्या देतों म्हणून लोकांना लांब-णीवर ढकलणारा, आबरूची चाड नसलेला, निर्लज्ज (माणूस).

लफंगें, लफांग, लफांगें, न० १ लचांड; शुक्लकाष्ठ; पेच.२ ज्यांत नुकसान होण्याचा संभव आहे असा धाडसानें कोणेकानें केलेला व्यवहार, व्यापार, धंदा, इ०.

लफडें न०,लफडा पु० १ लचांड; शुक्लकाष्ठ. २ शुष्क वाटाघाट. ३ कांहीं त्रासदायक काम.

लफणें वर ' लपणें ' पहा.

लफलफणें अ० क्रि० लठ्ठ गात्र, कास,पोट, इ० शिथिलपणामुळें हालत असणें किं० हेलकावे खात असणें.

लफा, लफेदार वर ' लप्फा, , ' लप्फेदार ' [पहा.

लब स्त्री० निरोप नेणें,आणणें,इ० रूप काम, किं० प्रसंगवशात् उपस्थित झालेलें काम किं० त्यासाठीं घातलेले हेलपाटे किं० केलेल्या येरझारा (करणें, मारणें). ॐ **लबेचा वि०** अशीं कामें करण्यासाठीं ठेविलेला (नोकर,कारकून, इ०). **लबेशाई, लबई स्त्री०** निरोप नेणें, आणणें, इ० रूप काम.

लब [**फा०**] **स्त्री०** १ ओठ. २ नदी,समुद्र, [इ० चा कांठ.

लब [**म०** लबणें] **स्त्री०** १ वाकणें; खचणें. २ खांब, तुळई इ० चा बाक;वाक; खच (खाणें).

लंब [**सं०**] **वि०** १ लोंबणारा. २ मोठें; विशाल; विस्तृत. ३ उंच; लांब. **पु०** १ लोंबणें; लोंबत राहाणें. २ आश्रय; आश्रयाचें स्थान; आधार. ३ (**भूमिति**) एका रेषेवर काटकोनांत उभी असलेली रेषा. ४ (**ज्योतिष**) खमध्य आणि पृथ्वी ह्यांच्यामधील अंतर.ॐ **लंबकर्ण पु०** गाढव. **लंबोदर पु०** १ गणपति. २ खादाड माणूस. ३ ढेरपोट्या. ४पुरुषाचें शिश्न आणि वृषण जोडीनें. **लंबासन न०** योगांतील एक आसन.

लबई स्त्री० निरोप नेणें, आणणें इ० रूप काम. वर ' लब ' मध्यें हा शब्द पहा.

लंबक [**सं०**] **वि०** लोंबणारा. **पु०** १ वर ' लंब ' चे अर्थ ३ आणि ४ पहा. २ गवंड्याचा ओळंबा.

लबक [**म०** लबणें] **स्त्री०** लांब ताणून बांध-लेली दोरी किं०लांब वांसा ह्यांना अंगच्या भारानें येतो तो बाक (येणें, खाणें).

लबक स्त्री० १ बोलणें, चालणें, हसणें, इ० मध्यें जी कोणेकाची कांहीं विशिष्ट तऱ्हा असते ती. मागें 'लकब' पहा.२ वाईट नाद किं० खोड. ३ तऱ्हा; पद्धति.

लबकणें अ० क्रि०१ भारामुळें दोरी, तुळई, इ० खालीं ओथंबणें. २ (उभा असलेला माणूस,

पदार्थ, इ०) पुढें कलणें किं० झुकणें किं० वाकणें.

लवका, लपका पु० चिखल, शेण, गू, मांस, इ० चा गोळा.

लंबच्यड, लंबचेड, लंबछोड वि० विरूप किं० बेढब दिसण्याइतका उंच किं० लांब (मनुष्य, खांब, झाड, तुळई, इ०).

लंब छडी स्त्री० लांब पल्ल्याची तोफ.

लंबण, लंबणभाऊ पुढें ' लंबाण ' 'लंबाण-भाऊ ' पहा.

लंबन [सं०] न० १ लोंबणें. २ (ज्योतिष) एकच ग्रह इ० दोन स्थलांपासून पाहिला असतां त्यांच्या दर्शनांत होतो भेद.

लंबमान [सं०] वि० लोंबत असलेला.

लंबायमान [सं०]वि०१लांबच लांब.२लोंबत असलेला.

लंबराण न० जड पोतें इ० माल जहाजांत लादतांना किं० लादलेला माल वर शेंदून काढ-तांना योजतात ती दोरी.

लबलब स्त्री० १ जिभेची जलदीची हाल-चाल.२ कोणत्याही गात्राची हेलकावे खाण्याची स्थिति.

लबलबीत वि०जें अर्धवट घट्ट आणि अर्धवट पातळ आहे असें (शेण, चिखल, पीठ, इ०).

लंबा [सं० लंब] वि० १ लांबवर पसरलेला. २ लांब आणि रुंद (कांहीं पदार्थ). ३ मूर्च्छा, मरण, इ० नीं ग्रासलेला. ४ मृत;नष्ट; उ० पटकीनें एका दिवसांत तीनशे माणूस ह्या एवढ्याशा गांवांत लंबे झाले. ५ हताश; निर्बल. ६ जमीनदोस्त झालेला. ७विध्वस्त.꠰ **कोणंकाची लंबेलंबे करणें** १ त्याला पूर्णपणें पराजित करणें. २ त्याचें पूर्णपणें पारिपत्य करणें.

लंबाटा (-ट्या) [म० लांब] वि० विशो-भित दिसण्या इतका लांब किं० उंच (माणूस, खांब, तुळई, इ०).

लंबाडा (-ड्या) [म० लांब] वि० विरूप दिसण्याइतका लांब किं० उंच(माणूस, पदार्थ).

लबाड वि० १ खोटा. २ खोटें बोलणारा. ३ अप्रामाणिक. ४ लुचा. ५ व्यभिचारिणी (बाय-कांचा शब्द) ꠰ **तो लबाडवांचून नव्हे** अझून सुद्धां तो लबाडच आहे. **लबाडी, लबाडकी** स्त्री० खोटेपणा; खोटेपणाचें कांहीं कृत्य..

लबाडलाताड (-ळ), लबाडलघाड वि० खोटा; लुचा; अप्रामाणिक. **लबाडी** स्त्री० १ ओझ्याला बांधलेली दोरी घट्ट करण्यासाठीं त्या दोरींत जें लाकूड घालून त्या दोरीला पीळ घालून दोरी घट्ट करतात तें लाकूड. २ दोरी ओढतांना त्या दोरीचें टोक ज्या लाकडाला दोन तीन वेळां गुंडाळलेलें असतें तें लाकूड. ३ ओंबण इ० च्या वांशांच्या टोकांत जें लाकूड बसविलेलें असतें तें.

लंबाण पु० एका प्रांतांतील धान्य, मीठ, इ० पदार्थ बैल इ० च्या पाठीवर लादून दुसऱ्या प्रांतांत विकावयासाठीं नेणाऱ्या लोकांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. न० लंबाणांचा तांडा किं० टोळी,-वाट चालत असलेली किं० वाटेंत मुक्कामाला उतरलेली. ꠰ **लंबाणभाऊ** पु०लंबाण जातीचा माणूस(आदरानें बोलावयाचें असतां).**लंबाणी** वि०लंबाणा संबंधाचा(पोशाख, तांडा, भाषा, इ०).

लंबाणभाऊ [म० लंब+भाऊ] पु० विरूप दिसण्याइतका उंच माणूस.

लंबी [सं० लंब; म० लांब] स्त्री० लांबी,-घर, शेत, रस्ता, इ० ची. ꠰ **लंबा ताणणें**(किं० **लावणें, लागणें,** इ०) आरामासाठीं किं० निजतांना किं० आळसानें हात पाय ताणून उताणें पडणें.

लबूद [म० लुब्ध] वि० एकाद्या विषयांत किं० व्यसनांत आसक्त झालेला (अशिक्षितांत रूढि).

लंबे [म० लांब; सं० लंब] वि० टीप,-पुढील दोन्ही अर्थीं ह्या विशेषणाचें रूप पालटत नाहीं १ लांब; खूपच लांब; लांबलचक. २ चीत; पराजित.स्त्री० फजीती; बोऱ्या (करणें, होणें).३ पराभव. ꠰ **कोणेकाची लंबेलंबे करणें** त्याचा पूर्ण पराभव करणें किं० फजिती उडविणें.

लबेद वि० १ लठ्ठ; फोपशा(माणूस, पशु). २ मजबूत; भक्कम.

लबेदा [हिं०] पु० १ कोणेकाचा परिवार किं० खटलें.२ कांहीं कामाच्या साधनसामग्रीचा

पसारा; अस्ताव्यस्त पसरलेलें सामानसुमान. ३ कोणेकाचा प्रवासांतलि बायकामुलें, नोकर, घोडीं, गाड्या, इ० रूप पसारा.

लबेशाई [म० लंब्] **स्त्री०** निरोप नेणें, आणणें, इ० रूप काम किं० नोकरी; उ० लबेशाईचा गडी, माणूस, इ०. वर ' लब ' पहा.

लबोड वर'लबाड' पहा. हा अशिक्षितांत रूढ शब्द आहे. ॐ **लबोडशंख, लबोडशिंग पु०** थापबाज माणूस; नुसत्या लंब्या लंब्या गोष्टी बोलणारा पण खरोखरीं कांहींही काम न करणारा;क्रियेविण वाचाळ.

लंबोदर वर ' लंब ' मध्यें पहा.

लब्ध [**सं०**] **वि०** १ मिळालेलें; प्राप्त झालेलें. २ लब्धप्रतिष्ठित. ह्याच प्रतीकांत पुढें ' लब्ध प्रतिष्ठित ' पहा. ह्या अर्थी ' लब्ध्या ' सुद्धां. ३ शब्द, वाक्य, इ० पासून निघालेला (अर्थ). ॐ **लब्धकाम वि०**ज्याचा मनोरथ सफल झाला आहे असा; जें पाहिजे होतें ते ज्याला मिळाले आहे असा.**लब्धानुज्ञ वि०**सोडमुंज ज्याची झाली आहे असा (मुलगा). **लब्धचेत** [**सं०** लब्ध+चेतस्] **वि०** शुद्धीवर आलेला;मूर्च्छेतून उठलेला. **लब्धवर्ण वि०** १ विद्वान्.२ प्रख्यात. **लब्धश्रुत वि०** बहुश्रुत (माणूस). **लब्धप्रतिष्ठ, लब्धप्रतिष्ठित वि०**आपण कोणी मोठे किं० विद्वान् किं०कर्तबगार आहों अशी स्वताची ज्याणें समजूत करून घेतली आहे असा मूर्ख (माणूस);वढाईखोर. **लब्धप्रतिष्ठा स्त्री०** प्रौढि; पोकळ गर्व.

लब्धि [**सं०**] **स्त्री०** १ प्राप्ति. २ नफा. ३ भागाकार.

लब्ध्या मागें ' लब्ध ' मध्यें ' लब्धप्रतिष्ठित ' [पहा.

लब्भेशाई, लब्भाशाई, लब्भूशाई स्त्री० १ खोटें,लबाडीचें, किं०अप्रामाणिकपणाचें काम, बोलणें, वर्तन. २ क्रियेविण वाचालता. **वि०** १ लबाड, लुच्चा. २ बाताड्या,थापबाज. ह्या दोन्ही अर्थी'लब्भेचाट्ट,' ' लब्भाचाट्ट ' सुद्धां.

लभ्य [**सं०**] **वि०** १ मिळण्याजोगा. २ योग्य; न्याय्य. ॐ **लभ्यांश पु०** फायदा; फायदेशीर बाबत.

लमाण, लमाणभाऊ,लमाणी वर'लंबाण,' ' लंबाणभाऊ, ' ' लंबाणी ' पहा.

लय [**सं०**] १ लपणें; नाहींसें होणें. २ नाश; विध्वंस.३ जगाच्या अंताचा समय;जगाचा अंतकाळ. ४ गायन, वादन, आणि नर्तन,यांच्यांतलि ऐक्य (समनकालीन विराम). ५ चित्ताची एकाद्या विषयाकडे एकाग्रता,–जी झाल्यामुळें अन्य गोष्टींवरून चित्ताचें व्यावर्तन होतें. ६ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थांत एकरूप होणें.७मृदंग,वीणा, इ० चें वादन थांबल्यावर कांहीं काळ जो बारीक नाद होत राहातो तो. ८ संगीतांतील विराम. ९ द्रव्यादि पदार्थ खर्चल्यामुळें त्याची होते ती निःशेषता.

लय, लई वि० पुष्कळ; विपुल. **क्रि० वि०** खूप; फार; उ० लई उंच, लई मोठा,इ०. हे शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.**लयलूट स्त्री०** वैपुल्य; पुरून उरण्याइतकें पदार्थांचें प्रमाण.

ललकारणी स्त्री० १ मोठ्यानें मारलेली हाक. २मोठ्या स्वरांतील गाणें.

ललकारणें अ० क्रि० मोठ्यानें बोलणें किं० हाक मारणें किं० गाणें. **स० क्रि०** १ (कोणेकाला) मोठ्यानें हाक मारून बोलावणें. २ (गति, पद, इ०) मोठ्यानें गाणें.

ललकारी स्त्री० १ आरोळी. २ कोणेकाला मारलेली हाक. ३ मोठ्या स्वरांत गायन.

ललत पु० मध्यरात्रीनंतर गावयाचा एक राग.

ललना [**सं०**] **स्त्री०** १ कोणीही स्त्री. २ विलासी स्त्री.

ललाट[**सं०**]**न०**१कपाळ.२दोन भिवयांमधील अंतर.ॐ**ललाटरेखा (–षा)स्त्री०, ललाटलिखित न०** नशीब, दैव;–जें मनुष्य जन्मतांच त्याच्या कपाळावर ब्रह्मदेव लिहून ठेवतो असें मानण्यांत येतें. **कोणेकाची ललाटरेषा उभी राहाणें** त्याला दैव अनुकूळ होणें. **टीप,–' ललाट '** बद्दल अशिक्षित लोक ' लल्हाट ' शब्द योजतात.

ललाम [**सं०**] **वि०** सुंदर. **पु०,न०** गंधाचा टिळा. **न०** १ दागिना; भूषण. २ (**लाक्षणिक**) श्रेष्ठ; उत्तम. ॐ **ललामभूत वि०** शोभादायक, अभिमानास योग्य (माणूस, गुण).

ललित [**सं०**] **वि०** १ विलासी; विलासयुक्त (स्त्रीचें बोलणें, चालणें, इ०). २ लहान

असून सुंदर; गोजिरवाणें. ३ मनोहर; आनंददायक. ४ कोमल; सुकुमार. न० १क्रीडा; विलास. २ (वृत्तशास्त्रांत) एक समवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत र, ज, स, हे गण असून अंतीं एक लघु आणि एक गुरु अक्षर असतें. पांचव्या अक्षरावर आणि पादान्तीं यति असतो. ॐ **ललितकला स्त्री०** गायन, वादन, चित्रकला, इ० ज्या कला त्या प्रत्येक.

ललिता [**सं०**] **स्त्री०** १ कोणीही स्त्री. २ विलासिनी स्त्री. ३ दुर्गादेवी. ४ कस्तूरी. ॐ **ललितापंचमी स्त्री०** आश्विन शुद्ध पंचमी ही तिथि. ह्या दिवशीं ललितेची (म्ह० पार्वतीची) पूजा करतात. **ललितासप्तमी स्त्री०** भाद्रपद शुद्ध सप्तमी ही तिथि.

लुलुपुतु, लुल्लुपतु, लुलपतु न०, स्त्री० १ आर्जव; लाडीगोडी. २ उत्तर देतां येत नसलें म्हणजे जे कोणी अर्धवट शब्द अडखळत अडखळत बोलतो ते समुच्चयानें (करणें).

ललेथोपे [**म०** लाड + थोपटणें] **स्त्री०** मुलाला लाडानें किं० प्रेमानें थोपटणें.

लल्ला पु० माणूस, पशु, मासे, इ० ना भूल किं० मोह पाडणारी कांहीं वस्तु.

लल्लाट, लल्हाट न० ' ललाट ' चा गांवढळ अपभ्रंश. वर ' ललाट ' पहा.

लव [**सं०**] **पु०** १ तुकडा; खंड. २ बिंदु. ३ अल्पांश; लेश. ४(**ज्योतिष**)अंश.५लावापक्षी. ६सूक्ष्म काळ. ७एक वृक्षविशेष किं०त्याचें फळ.८ प्राण्याच्या अंगावरील केश; लोकर.९अपूर्णांकाचा अंश म्ह०रेषेवरचा आंकडा.**स्त्री**०अंगावरचे बारीक कोमल केस. ह्या अर्थीं 'लंव' असेंही ह्या शब्दाचें रूप आहे. ॐ **कोणेकाची लव लव बोलणें** त्याच्या अंगावरचा प्रत्येक केस बोलत असणें म्ह० तो जलदीनें आणि पुष्कळ बोलणारा असणें.

लवकंड, लोळकंड, लोळपट [**म०** लोळणें] **स्त्री०** कुत्रीं, मांजरें, इ० चें एकमेकांच्या अंगावर चढणें किं० लोळणें (खेळतांना किं० भांडतांना).

लवकर क्रि० वि० १ उशीर न होऊं देतां; त्वरेनें; जलदीनें. २ नेहेमींच्या वेळेच्यापूर्वीं. **न०** ठरलेल्या किं० नेहेमींच्या वेळेच्या अगोदरचा समय; उ० अजून लवकर आहे, इतक्यांतच जाण्याचें कारण नाहीं.

लंवका, लवका, लबका पु० पीठ, चिखल, मांस, इ० चा बोटांनीं किं० दातांनीं तोडून किं० फाडून काढलेला भाग किं० तुकडा किं० गोळा.

लवका, लवकिरा, लवखर [**म०** लवणें] **वि०** लवणारा, वाकणारा.

लवखाद स्त्री० धाड; झडप; उडी (पडणें).

लवंग [**स्त्री०**] **स्त्री०** १ मसाला, विडा, इ० मध्यें घालावयाचें एक फूल किं० त्या फुलाचें झाड. २ ह्या फुलाच्या आकाराचें एक सोन्याचें भूषण,–नाक, कान, इ० ना भोंक पाडून त्यांत घालावयाचें. ॐ**लवंगकाचरी** (किं० **लवंगकचरी**) **सुपारी स्त्री०, लवंगचूर पु०, लवंगचुरी स्त्री०** पोफळाचे बारीक काप शिजवून केलेली सुपारी.**लवंग(लंवगी** किं०)**पिंपळी स्त्री०** लहान आकाराची पिंपळी. **लवंगी मिरची स्त्री०** १ अत्यंत लहान आकाराची पण अत्यंत तिखट अशी मिरचीची एक जात. २ (**लक्षणेनें**) तल्लखपणानें आणि प्रमाणशुद्ध रीतीनें ताबडतोब उत्तरास प्रत्युत्तर देणारी मुलगी (किं० प्रसंगविशेषीं मुलगा). **लवंगी फटाकडा पु०** १ बारीक आकाराचा आणि हमखास उडणारा एक प्रकारचा फटाकडा. २ (**लक्षणेनें**) चुणचुणीत मुलगा (किं० मुलगी). **लवंगेल न०** लवंगांचें तेल.

लवंगणें अ० क्रि० (एकादें गात्र) चाळणें, कांहीं काम करणें, इ० मध्यें कांहीं भलताच प्रकार झाल्यामुळें दुखावणें; लचकणें.

लवचीक [**म०** लवणें] **वि०** १ न मोडतां वाकणारा, वळणारा, किं० वळवितां येईल असा (पदार्थ,–दोरी, तार, वेत, इ०). २ (**लक्षणेनें**) ज्याचें मन सहज वळवितां येतें असा (माणूस). ह्याच्या उलट ' ताठर, ' किं० ' हेकट, ' किं० ' हट्टी. '

लवटी स्त्री० दोरीनें बांधलेला गठ्ठा घट्ट आवळतां यावा म्हणून दोरींत जे लाकूड घालून पिळवटतात तें.

लवंडणें अ० क्रि० १ आरामासाठीं आंथ-

रुणावर हातपाय ताणून आडवें पडणें. २ आधारावर ठेविलेला किं० स्थित जो पदार्थ त्याला धक्का लागल्यामुळें त्याचे गुरुत्वमध्य तळाच्या बाहेर जाऊन तो उलथून पडणें किं० ढासळणें; कलंडणें. **स० क्रि०** (पदार्थाला) धक्का देऊन (तो) एका बाजूनें कलवून पाडणें.

लवडसवडीं, लवडांसवडीं क्रि० वि० चपलतेनें; घाईघाईनें; तडखपणें. **लवडीसवडी स्त्री०** घाई; त्वरा; लगबग.

लवंडी [**हिं०**] **स्त्री०** दासी.

लवण [**सं०**] **न०** १ मीठ. २ सैंधव. ३ लोणार खार. **पु०** १ खारटपणा. २ क्षारसमुद्र. ॐ **लवणतृण न०** लोणा गवत. **लवणशाक, लवणशाख न०** लोणचें. **लवणजल पु०** क्षारसमुद्र. **लवणजल न०** खारट पाणी.

लवण न०, स्त्री०, लवणी स्त्री० [**म०** लवणें] १ जमीनीचा खोलगट भाग. २ खळगा. ३ सखल जमीन. ४ शरीराच्या सांध्यालगतचा खोलगट भाग; उ० पायाची लवण, गुडघ्याची लवण, इ०. ५ रस्ता, नदीचा प्रवाह, इ० तलि वाकण किं० वाकडा भाग किं० कोन.

लवणभंजन, लवनभंजन [**म०** लवणें+भजणें] **न० ए० व०** १ डोकें वाकवून लवून केलेला नमस्कार. २ नम्रपणाचें गोडगोड भाषण. ३ कोणेकाला दाखविलेला आदर; कोणेकाचा केलेला सत्कार.

लवणी वर ' लवण ' **न०, स्त्री०** पहा.

लवणें [**सं०** लू=तोडणें]**अ० क्रि०** १ वांबू, काठी, तुळई, इ० अंगच्या किं० वरच्या भारानें वाकणें. २ (वीज, डोळा) स्फुरणें किं० कंपयुक्त होणें. ३ (मनोदेवता, मन, मनपिंगळी, इ०) एका विषयाकडे वाहणें; उ० माझी मनोदेवता लवते कीं ह्या मुलाखतीपासून कांहींही निष्पन्न व्हावयाचें नाहीं. ४ वाकणें; नमस्कार करतांना शरीर किंचित् वाकविणें; उ० मामलेदारसाहेबांना लवून नमस्कार कर.

लंवथा पु० बोटांनीं पकडून ओढलेला दंड, मांडी, पोटरी, इ० मांसल गात्रांचा गोळा (घेणें, ओढणें).

लवधट वि० आडदांड; दांडगट.

लवनभंजन वर ' लवणभंजन ' पहा.

लवनी स्त्री० शिताफळाची एक जात.

लवलवणें [**म०** ' लवणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** १ बोलतांना किं० बोलण्याच्या उत्सुकतेनें किं० बोलण्याच्या प्रयत्न करतांना जीभ जलदीनें हालणें किं० हालत राहाणें. २ लवचीकपणामुळें (पदार्थ) हेलकावत राहाणें. ३ (सर्प, गांडूळ, आळी, इ०चें शरीर) स्फुरणें किं० वळवळणें.

लवलवीत वि० १ कोंवळें आणि मऊ (पडवळ, आंबा, इ०). २ चांगलें पिकून मऊ झालेलें (गळूं). ३ चांगली तिंबलेली (कणीक इ०). ४ चांगलें कुसकरलेलें (शेण, चिखल, इ०). ५फार घट्ट नव्हे असें (लोणी इ०).

लवलक्षण [**म०** लव+लक्षण] **न०** मनुष्य, पशु, इ०च्या दर्शनाचा किं०प्रेक्षकाचें मन ओढून घेण्याचा गुण.

लवला, लवलाहीं (–हें) **क्रि०वि०**तत्काळ; त्वरेनें; वेगानें.

लवली [**सं०**] **स्त्री०** रायआंवळी हें झाड.

लवलेश [**सं०** लव+लेश] **पु० ए० व०** अत्यल्प अंश; उ० कासंडींत तुपाचा लवलेश नाहीं; **टीप**,–बहुधा निषेधीं प्रयोग. उ० तुमच्या योजनेचा मला लवलेश ठाऊक नाहीं. **क्रि० वि०** मुळा सुद्धां. निषेधी प्रयोग; उ० सदोबा वाघाला लवलेश भीत नाहीं.

लवा, लव्हा [**सं०** लव]**पु०** १ लावा पक्षी. २ वाळा (एक तृण).

लवाजमा, लवाजिमा [**अ०** लवाजम्,लवाझिमात्] **पु०** १ कोणा बड्या माणसाचा परिवार. २ कोणेकाच्या घरांतील नोकरचाकर, आश्रित, इ० चा समुदाय.

लवाद [**अ०** लवाझ्=कैवारी] **पु०** दोन पक्षांच्या वादाचा निकाल करणारा दोहों पक्षांस मान्य असलेला तिऱ्हाईत माणूस. ॐ **लवादी वि०** लवादानें केलेला (निकाल). **लवादी स्त्री०**लवादाचा हुद्दा किं०अधिकार किं०कार्यक्षेत्र.

लव्हंगी खालीं ' लव्हांगी ' पहा.

लव्हा, लव्हाळा पु०, लव्ही स्त्री० पाण्याचे कांठीं उगवणारें एक प्रकारचें गवत.

लव्हांगी, लोहंगी, लोहांगी, लोहांगी काठी [**सं०** लोह (लोखंड)+**सं०** अंग; काठी] **स्त्री०** लोखंडाचे खिळे, वळी, इ० बसवून शत्रूवर प्रहार करण्यासाठीं तयार केलेली काठी किं० सोडगा.

लव्हाणा पु० गुजराथ्यांची एक जात किं० त्या जातीचा इसम.

लव्हाळा, लव्ही वर ' लव्हा ' पहा.

लशकर, लष्कर, लसकर [**फा०** लष्कर] **न० १** सैन्य; फौज. २ शिंदे सरकारचें सैन्य किं० मुलूख. **पु०** तोफखाना इ० कारखान्यांतील नोकर. ☙ **लशकरगिरी स्त्री०** लशकरांतील नोकरी. **लशकरी वि० १** फौजेसंबंधाचा. २ फौजेच्या उपयोगाचा. **लशकरच्या भाकरी भाजणें** १ ज्यांत आपला कांहीं फायदा नाहीं असें दुसऱ्याचें कष्टाचे काम पत्करणें. २ नसत्या उठाठेवी करीत बसणें.

लेशाकाड्या [**म०** लस+कोड+या(प्रत्यय)] **वि०** ज्याला कोड किं० रक्तपीति आहे आणि ज्याच्या अंगांतून लस, पू, इ० गळत आहे असा (मनुष्य).

लशी [**म०** लस] **वि०** ज्यांत पू असतो अशी (खरूज). व्यावर्तकत्वें 'कोरडी (खरूज).'

लशुन [**सं०**] **पु०, न०** कांदा, गुल्छबू, इ०च्या वर्गांतील एक अति उग्र वासाचा कंद. मराठींत 'लसुण' **स्त्री०**असें रूप वापरण्यांत येतें. **लसणीची बी स्त्री०** लसणाच्या कांद्यांतील एक एक पाकळी. **लसणी वि०** लसणीच्या बीच्या आकारासारख्या कड्या इ० करून त्या जोडून केलेला(जवा,तोडा इ०दागिना). **लसणा,लसण्या पु०** एक रत्न. **लसणी बिंब न०** तपकिरीच्या रंगाचें फूल ज्याला येतें अशी बोरूची एक लहान जात. **लसणी सालंमिश्री स्त्री०** एक प्रकारची सालंमिश्री. दुसरा प्रकार ' पंजाबी सालंमिश्री '

लस [**हिं०**] **स्त्री०** फोड, गळू, खरूज, इ० तून स्रवतो तो पातळ पदार्थ.

लसण न० स्त्री० वर 'लशुन' पहा.

लसलस (-सां) क्रि० वि० १ घाईघाईनें; त्वरेनें.

लसलसणें अ० क्रि० १ (तारुण्य, मस्ती, इ०) अंगांत जोरांत संचरत असणें. २ (अग्नि, दिवा, ऊन्ह, इ०) प्रखरपणें झळकत किं० तेवत असणें). [' लशुन ' पहा.

लसूण [**सं०** लशुन] **पु०, स्त्री०, न०** वर

लस्कर इ० वर ' लशकर ' इ० पहा.

लहंगा [**हिं०**] **पु०** गुजराथी बायका नेसतात तो परकर. [पळ.

लहज [**अ०** लहझाह] **पु०** एक क्षण किं०

लहणे न० १ अन्य पेठेंचे सावकार इ० वर हुंडी इ०देणें केलें असतां त्यांस जो मोबदला ऐवज, हुंडी, इ० पाठवितात तो. २ सलोख्याचा संबंध. ☙**लहणी हुंडी स्त्री०** अडत्या इ०कांकडे लहण्याबद्दल जी हुंडी पाठवितात ती. **गोविंदरावाचें मला लहणें नाहीं** किं० **गोविंदरावाचे आणि माझें लहणें नाहीं** त्यांचा आणि माझा फारसा सलोखा किं० सख्य नाहीं.

लहंबर, लहांबर, लाहंबर न० प्रवासांतील कोणेकाचा , परिवार,—नोकरचाकर, गाड्याघोडीं, सामानसुमान, इ० समुच्चयानें. २ भिकारी लोक किं० वात्रट आणि उनाड पोरें इ० जीं कोणेकाच्या पाठीस लागलेलीं आहेत तीं समुच्चयानें. ३ ज्यांचीं आपणास अडगळ वाटते असे पदार्थ समुच्चयानें. ४ अति खादाड माणूस. **टीप,**—पहिल्या तीन अर्थासंबंधानें मागें 'लटांबर' पहा.

लहम [**अ०** लम्हाह] **पु०, स्त्री०, न०** एक क्षण; अत्यल्प काळ.

लहर [**सं०** लहरि, लहरी] **स्त्री०** १ पाण्याची लाट. २ काम, क्रोध, इ० मनोविकारांचा मनांत एकदम झालेला उद्भव किं० उद्रेक. ३ अंगांत विष किं० अमली पदार्थ यांचा संचार झाला असतां मधून मधून ज्या तीव्र वेदना उत्पन्न होतात त्या प्रत्येक. ४ मरणसमयीं ज्या मधून मधून आणि एकदम गात्रांत उत्पन्न होतात त्या हालचाली प्रत्येक. ५ मलविसर्जनाच्या वेळीं मल गुदावाटे बाहेर पडण्याचा जो एक एक हप्ता तो. ६ (वाऱ्याची) मंद झुळूक;(वाऱ्याची)एक लाट. ७ कांहीं गोष्ट करण्याची मनांत आलेली जोराची इच्छा; हुकी. ८ छांदिष्टपणा; छांदिष्टपणाची इसळी. ९ सापाच्या गळ्याखालीं असतात त्या

रेषा. ह्या रेषा जितक्या असतात तितके वेळां त्या सापाच्या दंशाच्या विषानें मनुष्याला तीव्र वेदनेचे झटके येतात. ह्या वरून ' तो साप दोन लहरींचा (किं० तीन, चार, इ० लहरीचा) आहे' असे प्रयोग केले जातात. १० कांहीं गोष्ट करण्याची एकदम उत्पन्न होते ती इच्छा; उ० मला आतां गाण्याची लहर आली आहे. ११ प्रकाशाच्या कमीज्यास्तीपणामुळें वस्त्र, चित्र, इ० वर रंगाच्या ज्या भिन्न भिन्न छटा मारतात त्या प्रत्येक. १२ वस्त्राच्या विणींत विणलेले असतात ते रंगीत सुताचे पट्टे किं० त्या काड्या प्रत्येक. १३ वस्त्रावर छाप इ० नीं ठोकलेले असतात ते रंगाचे पट्टे किं० त्या रंगाच्या काड्या प्रत्येक. १४ परकर, झालर, पडदा, इ० च्या ज्या आडव्या किं० उभ्या घड्या त्या प्रत्येक. १५ झोप, ताप, मळमळणें, इ० चा एकदम जोराचा होतो तो प्रादुर्भाव; उ० त्या मुलाला झोपेची लहर आली म्हणजे तो दगडावर देखील निजतो. ❀ **कोणेकानें लहरा मारणें** त्याणें लांदिष्टपणाचीं कृत्यें करणें; त्याणें रंगेलपणाच्या गोष्टींत निमग्न होणें. **लहरदार, लहरीदार वि०** १ छांदिष्ट. २ झोकदार; छाकटेगिरीचा (पोशाख, भाषण, गायन, इ०). ३ रंगीत पट्टे ज्यांत आहेत असें (वस्त्र). **लहरबहर स्त्री० ए० व०** १ उमेद, वैभव, उत्कर्ष, इ०. २ उत्कर्षाचा किं० सद्दीचा किं० वैभवाचा काळ. **लहरा पु०** गायनाचा सूर किं० राग. **लहरी वि०** छांदिष्ट. **स्त्री०** १ वेदनेची उसळी. २ काम, क्रोध, इ० चा उद्रेक किं० झटका. लह. **लहरी बहरी वि०** छांदिष्ट.

लहा, लहालहा स्त्री० १ उन्हाचा तीव्र ताप (करणें). २ उन्हाच्या तापानें (पिकांची) सुकलेपणाची अवस्था (करणें). ३ स्पर्धा; चढाओढ (बांधणें); उ० रामभाऊशीं तूं लहा बांधूं गेलास तर फजिती पावशील.

लहांगड स्त्री० दोन चाकी लहानशी गाडी (कडबा, धान्य, इ० वाहून नेण्याच्या उपयोगाची)

लहांगी, लोहांगी मागें ' लव्हंगी ' पहा.

लहांचट (-ड,-र) वि० लोचट; हट्टी; हेकेखोर.

लहान [सं० लघु] **वि०** (आकारानें, वयानें, दर्जानें, उंचीनें, बुद्धीनें, किं० दुसऱ्या कांहीं गुणानें) उणा किं० कमी. ❀ **लहानखुरा, लहानगा, लहानसर वि०** साधारणपणें लहान. **लहान लहू (-लोहू,-लव), लहूलहान लहानाळ वि०** चिमुकला; लहान आणि सुंदर; गोजिरवाणा (मूल, वासरू, उ०). **लहानवी स्त्री०** १ लहानपणा. २ दर्जाचा कमीपणा किं० हलकेपणा. **लहानवी थोरवी स्त्री० ए० व०** वय, दर्जा, इ० बाबतींत अंतर किं० तफावत किं० फरक. **लहाना वि०** १ लहान. २ लहान (प्रेमाच्या भाषणांत).

लहानावणें, लहानावळणें [म० लहान] **अ० क्रि०** लहान किं० कमी होणें (आकार, विस्तार, गुण, दर्जा, इ० बाबतींत).

लहानाळणे [म० लहान] **स० क्रि०** आकार, विस्तार, गुण, दर्जा, इ० बाबतीत (माणूस, पदार्थ, प्रकाश, उष्णता, इ०) कमी करणें.

लहावर, लहांबर वि० लुब्रा; लोचट; लुडबुड्या; ज्यांत त्यांत नाक घालणारा.

लहांबर मागें ' लहंबर ' पहा.

लहाय मागें ' लहा ' पहा.

लहारी स्त्री० तीन आणे किं० तीन आणे ही किंमत.

लहीन [सं० लीन] **वि०** १ विनयशील; नम्र. २ मर्यादशील; सभ्य. ३ आपला दर्जा ओळखून वागणारा.

लहूलहान वि० मागें ' लहान ' मध्यें पहा.

लळत लोंबत [म० लोळणें+लोंबणें] **क्रि० वि०** चालण्याला नाखूष अशा माणसाला किं० पशूला त्याची धडपड सुरू असतां त्याला उचलून वाहून (नेणें); नीट न बांधलेलें ओझें जमीनीवरून अर्धवट ओढीत आणि अर्धवट उचलून (नेणें); कष्टानें कांहीं पदार्थ वाहून (नेणें).

लळलळणें अ० क्रि० तोंडांत लगाम असल्यामुळें किं० अशक्तपणामुळें (घोडा इ० ची जीभ), तोंडांतून बाहेर लोंबत राहाणें.

लळा [सं० लड=लाड करणें] **पु०** १ कोणा माणसाचा कोणकाकडे असतो तो ओढा किं० प्रेम (असणें, लावणें, लागणें). २ प्रेमानें कोणी

कोणेकापाशीं मागितलेली वस्तु (चालविणें, पुरविणें); उ० आईबाप मुलांचा लळा पुरवितात.

लळीत [**सं०** ललित=क्रीडा, विलास] **न०** १ नवरात्राच्या सप्तमीच्या रात्रीं करतात तें नाटक. २ ह्या प्रसंगींचीं पद्यें समुच्चयानें.३ राज्य, संसार, व्यवहार, इ० चा दुःखमय शेवट किं० परिसमाप्ति. ४ कथा, नाटक, ग्रंथ, इ० ची समाप्ति ज्या अभंग इ० नीं करतात तो अभंग इ०. ॐ **ललतावर येणें, ललितावर येणें** वादामध्यें कोणेकानें पराभव झाल्यामुळें चिरडीस जाणें किं० चरफडणें. **लळित्या, लळत्या वि०** लळीत चालविण्यांत कुशल (हरिदास इ०).

लक्ष [**सं०**] **पु०** १ एक ह्या अंकावर पांच शून्यें मांडिलीं असतां होते ती संख्या; एक लाख. **न०**१ ज्यावर बंदुकीची गोळी,धनुष्याचा तीर,इ० मारावयाचा तो पदार्थ. २ मन किं० चित्त ह्यांचें अनुसंधान किं० ध्यान (एकाद्या विषयाकडे लावणें ह्या दृष्टीनें). ३ नजर,विचार, इ० ज्याचेकडे लावावयाचें तो पदार्थ. ४ स्मरण, स्मृति; उ० माझा बोध तूं लक्षांत ठेविला नाहींस तर पश्चात्ताप पावशील. ५ विचार, चिंतन; उ० हा मुद्दा लक्षांत घेतला पाहिजे. ६ (**मराठींत**) एक लक्ष रुपये किंमतीच्या पदार्थाइतकी मूल्यवान् अशी कांहीं घडलेली गोष्ट; उ०वाटेंत आमचेवर चोरांनीं हल्ला केला आणि आमचें सर्वस्व लुटून नेलें परंतु आम्हीं जिवानिशीं सुरक्षित घरीं आलों एवढें आम्हीं लक्ष मोजितों. **टीप**,–वरील सातहीं अर्थी ' लक्ष्य ' असाही शब्द योजण्यांत येतो. खालीं ' लक्ष्य ' पहा. ॐ **लक्षदीप पु० अ० व०** आनंदाच्या प्रसंगीं किं० उत्सवांत लावितात ते असंख्य दिवे.**लक्षपूजा स्त्री०**१बेलाचीं पानें,तुळशीचीं पानें,फुलें,फळें,तीळ,तांदूळ,इ०चा एक एक लक्ष देवावर वाहावयाचा संकल्प करून तो तो लक्ष देवावर वाहून त्या देवाची केलेली पूजा. २ (**लक्षणेनें**) अशा पूजेसाठीं जमविलेली वरील प्रकारची सामग्री. **लक्षभोजन न०** एक लाख ब्राह्मणांना जेवूं घालावयाचें असा संकल्प करून लाख ब्राह्मणांना जेवूं घालणें ह्या रूपाचें धर्मकृत्य. **लक्षलाभ पु०** १ लाख रुपयांच्या किंमतीचा किं० योग्यतेचा लाभ.२ ह्या शब्दाचें ' लखलाभ ' हें अपभ्रष्ट रूप असून त्याचे अर्थ मागें ' लखलाभ ' मध्यें पहा. **लक्षाचा माणूस पु०** हरकामीं उपयोगीं पडणारा प्रामाणिक आणि कासू असा माणूस. **लक्षाधीश, लक्षापति, लक्षेश्वर पु०**एक लाख रुपये किं०अधिक ज्याच्या मालकीचे आहेत असा माणूस म्ह० फार श्रीमंत माणूस.**लक्षानु(–न–)लक्ष वि०**कैक लक्ष;असंख्य. **लक्षावधि वि०** असंख्य; उ० आकाशांत लक्षावधि तारे आहेत. **लक्षेश्वरा स्त्री०** कोणेकाजवळ असलेली पैशाची अफाट समृद्धि. **लक्षेश्वरी किंवा भिक्षेश्वरी स्त्री०** अत्यंत श्रीमंती किं० अत्यंत दारिद्र्‍ता (ह्याच दोन खरोखरीं सुखाच्या स्थिति होत). **लक्षापति किंवा भिक्षापति,लक्षाधीश किंवा कक्षाधीश** अत्यंत श्रीमंत किंवा अत्यंत दरिद्री मनुष्य (सुखी असतो).

लक्षक [**सं०**] **वि०** सुचविणारें; सूचक; बोधक.

लक्षण [**सं०**] **न०** १ पाहाणें; अवलोकिणें. २ जाणणें. ३ जाणण्याचें कांहीं साधन. ४ खूण; चिन्ह; निशाणी. ५ रोग ओळखावयाचें रोगाचें कांहीं चिन्ह; रोगाचें स्वरूप. ६ (**ज्योतिष**) शुभ किं० अशुभ सुचविणारी कांहीं गोष्ट. ७ शुभचिन्ह; सद्‍गुण. ८ अमुक वस्तु अमुक आहे किं० अमुक प्रकारची आहे हें ठरविण्याचें कांहीं चिन्ह; निर्णायक अशी कांहीं गोष्ट. ९ शास्त्र इ० तील शब्दाची व्याख्या; वस्तूच्या ठायीं असलेला कांहीं गुण किं० धर्म. १० (**न्याय**) अमुक वस्तु अमुक ठिकाणीं आहे असें सिद्ध करणारी कांहीं गोष्ट; उ० डोंगरावर धूर आहे म्हणून डोंगरावर अग्नि असला पाहिजे असा तर्क करतांना धूम हें लक्षण आणि अग्नि हें लक्ष्य. ११ मनुष्याच्या स्वभावाचा चांगलेपणा किं० वाईटपणा दाखविणारें त्याचें वर्तन किं० भाषण; उ० तूं फटदिशीं त्याला आईवरून शिवी दिलीस हें तुझें वाईट लक्षण होय. १२ (**मराठींत**) कोणेकाचा वर्तनक्रम किं० वागण्याची तऱ्हा; उ० अशा लक्षणांनीं तूं लवकरच भिकेस लागशील. १३ (**मराठींत**) सुंदरपणा; गोंडसपणा; मोहकपणा. ॐ **लक्षणसमन्वय पु०** कोणेक वस्तूची केलेली व्याख्या त्या वस्तूस लागूं करणें किं० लागू करून पाहाणें. **लक्षणहीन वि०** ज्याचे

ठायीं चांगलीं लक्षणें नाहींत असा (माणूस, पुरुष, स्त्री, घोडा, इ०).

लक्षणा [**सं०**] **स्त्री०** (**साहित्य**) वाक्यामध्यें योजलेल्या शब्दाचा वाच्यार्थ जर त्या वाक्याच्या अर्थाशीं जुळण्याजोगा नसला तर त्या शब्दाचा तेथें जुळेल असा अर्थ त्या वेळे पुरता आपण करून घेतों त्या अर्थाला 'लक्ष्यार्थ' असें म्हणतात आणि ह्या लक्ष्यार्थाची प्रतीति करून देणारी जी शक्ति तिला 'लक्षणाशक्ति' किं० 'लक्षणा' असें म्हणतात. आणि लक्ष्यार्थ दर्शविणाऱ्या शब्दाला त्या लक्ष्यार्थाच्या अपेक्षेनें ' लक्षक 'असें म्हणतात. गंगेवर गौळवाडा आहे ह्या वाक्यांत गंगा ह्या शब्दाचा अर्थ गंगेचा कांठ हा लक्षणेनें जाणला जातो. मागें ' अजहत्स्वार्थालक्षणा ' पहा.

लक्षिणें [**सं०** लक्ष्=पाहाणें] **स० क्रि०** १ पाहाणें. २ निरखून पाहाणें. ३ विचारांत घेणें. ४ तर्कानें जाणणें. ५ (कोणेकाच्या मार्गाकडे) लक्ष देऊन किं० दृष्टि वळवून बसणें; उ० मी एवढा वेळ तुझा मार्ग (किं० तुझी वाट) लक्षीत बसलों आहें. ६ (पदार्थ किं० अर्थ) कोणेकाच्या धोरणांत किं० संकल्पांत किं० मनांत असणें. ७ बाण, बंदूक, इ०नीं (पदार्थविशेष) वेधण्यासाठीं नेम धरणें.

लक्षित [**सं०**] **वि०** १ पाहिलेला. २ तर्कानें जाणलेला; चिन्हांवरून ओळखिलेला. ३ उद्दिष्ट.

लक्षेश्वर, ' **लक्षेश्वरी** ' ' लक्ष ' मध्यें पहा.

लक्ष्मी [**सं०**] **स्त्री०** १ संपत्ति; द्रव्य. २ सौंदर्य; शोभा. ४ तेज; कांति. ५ यश; सिद्धि. ६ संपत्ति, सौंदर्य, इ० ची देवता. ७ भगवान् विष्णूची पत्नी. ८ राजस लक्ष्मी ॐ **लक्ष्मीश**, **लक्ष्मीकांत** पु० विष्णु **लक्ष्मीपूजन** न०, **लक्ष्मीपूजा** **स्त्री०** १ आश्विन महिन्याच्या अमावास्येला प्रदोषकाळीं करतात ती लक्ष्मीची पूजा. २ वधूच्या गृहप्रवेशानंतर वधूवरें करतात ती लक्ष्मीची पूजा. **लक्ष्मीताल** पु० (**संगीतांत**) एक तालविशेष. **लक्ष्मीवान्**, **लक्ष्मीवंत** वि० १ श्रीमंत. २ सुंदर; शोभवंत. **लक्ष्मीराखण** न०, **स्त्री०** रोजच्या भोजनांतून लक्ष्मीसाठीं बाजूस काढून ठेविलेला घास,–तिचें आपल्या घरांतून निघून जाऊं नये म्हणून. **लक्ष्मीविलास** पु० एक औषध. **लक्ष्मीबाईची दया** **स्त्री०** कोणेकाचें भाग्य किं० समृद्धीचा काळ. याच्या व्यावर्तकतें ' अक्काबाईची दया ' म्ह० दारिद्र्याचा काळ. **कोणकाच्या घरांत लक्ष्मी अवतरणें** तो श्रीमंत असणें. **लक्ष्मीचा हारा** पु० कोणेकाचा आयुष्यांतील वैभवाचा किं० भरभराटीचा काळ. **लक्ष्मी येऊं लागली म्हणजे मोरीवाट सुद्धां येते** मनुष्याचा वैभवाचा काळ प्राप्त झाला असतां त्याला ओंगळ, हिडिस्स, त्याज्य, अपवित्र, असंभवनीय स्थानांपासून किं० द्वारांनीं सुद्धां पैसा मिळतो.

लक्ष्य [**सं०**] **वि०** १ दृश्य. २ अनुमान करण्याजोगें. ३ ज्ञेय; जाणतां येईल असें. ४ ज्याची व्याख्या किं० वर्णन करावयाचें आहे असा. ५ ज्यावर नेम धरावयाचा तो(पदार्थ). ६ पाहावयास किं० जाणावयास योग्य. ७ विचारांत किं० तर्कांत घ्यावयास योग्य. **न०** १ बाण, बंदूक, इ० चा नेम ज्यावर धरतात तो पदार्थ. २ विचारांत घ्यावयाची गोष्ट. ३ ज्याची व्याख्या करावयाची आहे तो पदार्थ. ४ चिन्ह. ५ (**साहित्य**) लक्षणेनें आलेला किं० प्राप्त झालेला अर्थ. मागें ' लक्षणा ' पहा. ६ लक्ष ही संख्या; लाख. ७ चित्त; अवधान. **लक्ष्यार्थ** **पु०** वर ' लक्ष्य ' अर्थ ५ पहा. मागें ' लक्षणा ' पहा.

लाइलाज [**अ०**] **वि०** निरुपाय; लाचार. ॐ **लाइलाजी** **स्त्री०** उपाय चालत नाहीं अशी स्थिति; कुंठितपणाची अवस्था.

लांक [**सं०** लंका] **पु०**, **स्त्री०** एक धान्यविशेष.

लांक, **लांकण**, **लांख** [**सं०** लंखनी=लगामाची कडी] **स्त्री०** १ दोन माणसें, पशु, किं० पदार्थ, यांची जुळणी करणें किं० सांगड (घालणें). २ दोन पदार्थ, माणसें, पशु, इ० च्या जोड्या जोड्या कांहीं कामाच्या सोयीसाठीं करणें किं० बांधणें; उ० तुमच्याजवळ आधल्या नसल्या तर दोघां दोघां ब्राह्मणांस एक एक रुपाया देऊन दोघां दोघांची एक एक लांख करून दक्षिणा वांटा. ३ दोन जनावरें ज्या सईलसर दोरीनें

एकत्र बांधतात ती दोरी. ह्या दोरीला ' लांकण दोर ' असेंही म्हणतात.

लांकड, लकड स्त्री० १ खूप उंच ताड किं० झाड. २ (**लक्षणेनें**) अति उंच मनुष्य.

लाकड, लाकडूं [**सं०** लकुट, लगुड] **न०** काष्ठ; झाडाचा तोडलेला खंड. **टीप**,-संयुक्त शब्द, वाक्प्रचार, इ० खालीं ' लाकूड ' मध्यें पहा.

लाकण, लाकन न० मोटेच्या तोंडाला जें मोठें लोखंडाचें कडें असतें तें चामड्याच्या थैल्याच्या कांठास किं० कड्यांस जोडणारे जे कातड्याचे वंध ते किं० ज्या वाद्या त्या प्रत्येक.

लांकण ' लांक, लांकण ' पहा. ❀ **लांकण-दोर पु०** ' लांक, लाकण ' मध्यें अर्थ ३ पहा.

लांकणें, लाखणें [**म०** लांक, लांकण; **सं०** लक्षनी] **स० क्रि०** १ (दोन पशु किं० माणसें) दोरीनें जुळविणें किं० सईलसर बांधणें. २ (जनावर किं० माणूस ह्यांना) खुंट्याला दोरीनें बांधणें. ३ (एक दोरी) दुसऱ्या दोरीशीं वळून किं० गांठ मारून, किं० बिरडें आणि गुळखी यांच्या योगानें जोडणें किं० जुळविणें. ४ (कोणा माणसाला किं० जनावराला) कोणा रक्षकाच्या हवालीं करणें. ५ (सामान्यतः) जोडणें; जुळविणें; संबद्ध करणें.

लाकणें, लाखणें [**म०** लाख] **स० क्रि०** (दागिना, बांगडी, इ० वर) लाखेचें पाणी चढविणें किं० लाखेनें आच्छादणें किं० मढविणें.

लाकूड [**सं०** लकुड; लगुड] **न०** १ काष्ठ; वृक्षाचा तोडलेला कोणताही फलपुष्पपर्णादिरहित भाग. २ (**लक्षणेनें**) ताठ, टणक, न लवणारा कोणताही पदार्थ; उ० शरीर, गात्र, शेंग, इ० कोणताही पदार्थ; उ० कढीमध्यें हीं लाकडें कशाला घातलीस ? (लाकडें =शेवग्याच्या शेंगांचे तुकडे). उ० म्हशीला शेतकऱ्यानें खाऊं घातलें नाहीं म्हणून ती लाकूड झाली. ❀ **लाकूडफाटा पु०, लाकूडफाटें न०** लाकडें, गोवऱ्या, इ० सर्पण. **इंजभंच लाकूड होणें** जीभ कोरडी झाल्यामुळें खाणें,बोलणें, इ० कामांना असमर्थ होणें. **लाकूड होणें** (किं० **वळणें**) १ शुष्क होणें; टणक किं० ताठ होणे. २आजारानें रोड होणें.**लाकडास माकड जोडणें** कसेंही करून वरास वधू मिळेसें करणें; लग्न करूं इच्छिणाऱ्या माणसाला नानाप्रकारच्या लटपटी खटपटी करून वधू मिळवून देणें.**लाकूड मदारी पु०** अत्यन्त किडकिडीत माणूस.

लाकेरी स्त्री० एक झाड.

लाख [**सं०** लाक्षा] **स्त्री०** १ बोर, पिंपळ, वड, इ० वृक्षांपासून चिकासारखा जो पदार्थ मिळतो आणि जो रंग इ० कामीं योजतात तो. २ एक प्रकारच्या किड्याचा देह मृत होऊन वाळून त्याचा होतो तो पदार्थ,-ज्याचा पत्रावर मोहोर करणें इ० कामीं उपयोग होतो.❀ **लाखट वि०** ज्याच्या पोटांत लाख भरली आहे असा (मणि, तोडे, इ० दागिना).**लाखट बेगड वि०** १पोटीं लाख भरून केलेला(दागिना).२ अशक्त, कमजोर (माणूस,पदार्थ). ३ दिखाऊ पण कुचकामीचा. **लाखदाणा पु०** चीन देशची उंची किमतीचा. **लाखपाड पु०** हिरा, पाच, लाल, इ० लाख. **लाखपाड पु०** हिरा, पाच, लाल, इ० रत्नें अंगठी इ० च्या कोंदणांत बसवितांना त्या कोंदणांत पूर्वीं लाख भरणें **लाख लोटणें,लाखलोटें, लाखलोटकें (-गें) न०, लाखलोटा पु०** लाखेच्या पाण्यानें आच्छादिलेलें मडकें,-ज्यांत लोणचें, मोरंबा, इ० ठेवितात. **लाखीशाई स्त्री०** लाख, काजळ, इ० च्या मिश्रणानें बनविलेली चकचकीत शाई. **लाखांडी** [**म०** लाख+ काडी] **स्त्री०** लाखेची केलेली कांडी. **लाखाळें न०** लाखेनें मढविलेलें भांडें किं० दागिना. **लाखी वि०** १ लाख भरलेला. २ लाखेनें मढविलेला. ३ लाखेच्या रंगाचा.

लाख [**सं०** लक्ष] **पु०** एक ह्या अंकावर पांच शून्यें देऊन होणारी संख्या. मागें ' लक्ष ' पहा.

लाखटणें [**म०**लाख] **अ०क्रि०** हिरवी मिरची, लसूण, किं० तेलकट पदार्थ खाण्यांत आल्यानें किं०अन्य कांहीं कारणानें(घसा)शब्दोच्चार किं० स्पष्ट शब्दोच्चार करण्याला करण्याला असमर्थ होणें.

लाखटणें [**म०** लाख] **स०क्रि०** (पदार्थावर) लाखेचे पाणी देणें.

लाखण, लाखणें वर ' लाकण, ' ' लाकणें ' पहा.

लाखणें वर ' लक्षिणें ' पहा.

लाखालेंप [म० लिंपणें] स्त्री० शेण, माती, इ० नीं भिंत, जमीन, इ० ची दागदुजी.

लांखळणें, लांखाळणें [म० लांख] स० क्रि० (कोणेकापासून) कांहीं लाभ मिळवावयाच्या इच्छेनें त्याचा पिच्छा पुरविणें किं० त्याच्या मागें लागणें.

लाखा पु० अळूं, पोकळा, इ० वर कृमिरूप रोग पडतो तो.

लाखाजोहर पुढें ' लाक्षाजोहर ' पहा.

लांखाळणें वर ' लांखळणें ' पहा.

लाखें [म० लाख] न० लाखेच्या रंगाचा शरीराच्या त्वचेवर पडलेला डाग किं० चट्टा.

लाखों [म० लाख] क्रि० वि० लक्षावधि.

लाखोटा [हिं०] पु० १ कागदाच्या पिशवींत घातलेलें पत्र. २ आंत पत्र घालून जिचें तोंड बंद केलें आहे अशी पिशवी. ३ पत्र आंत घालण्यासाठीं केलेली कागदाची पिशवी.

लाखोली [म० लाख; सं० लक्ष; आवलि (पंक्ति)] स्त्री० १ फुलें, फळें, तांदूळ, इ० चा देवाला अर्पण केलेला लाख म्ह० देवाला अर्पण केलेलीं एक लाख फुलें, फळें, इ० समुच्चयानें. २ (लाक्षणिक) शिव्यांचा एक लाख; उ० त्याणें मला शिव्यांची लाखोली वाहिली (म्ह० मला एक लाख शिव्या दिल्या).

लाख्यापंचोतरी (–**च्या**) मागें ' लखपचोतरी (–च्या) ' पहा.

लाग [म० लागणें] स्त्री० धान्यादींचा दुसरा बहर.

लाग [सं० लग्; म० लागणें] पु० १ संभव; शक्यता; उ० आज पाऊस पडण्याचा लाग आहे; उ० ह्या नोकरींत पैसे मिळण्याचा लाग आहे. उ० त्या गुळगुळीत फरशीवरून चालण्याचा लाग नाहीं, पाय हटकून निसरतील. २ स्थिति; अवस्था; उ० आंबे पिकावयाच्या लागास आल्यावर ते काढा. ३ (कांहीं कामासाठीं) संधान (बांधणें); खटपट (करणें); वशीला (लावणें); उ० नोकरीसाठीं मी पुष्कळ लाग केले पण नोकरी मिळाली नाहीं. ४ मनांत बाळगलेलें ध्येय किं० उद्दिष्ट (साधणें, फसणें); उ० हा लाग साधला तर मी लक्षाधीश होईन. ५ लाभाची संधी; उ० नोकरीचा लाग आला आहे. ६ कोणेकावर कोसळलेलें दुर्दैव; दुर्दैवाचा प्रसंग किं० हल्ला; उ० मी आजपर्यंत दोन तीन लागांतून निभावलों; उ० जिवावरचा लाग; उ० प्राणावरचा लाग. ७ झाड, शेत, इ० पासून फळें, धान्यें, इ० रूप प्राप्ति; उ० इरसाल झाडास लाग कमी असतो. ८ फलादि रूप उत्पन्न करण्याची वृक्षादींची स्थिति; उ० नारळमाड लावल्यापासून दहाव्या वर्षी तो लागास येतो. ९ गलबत, होडी, इ० चा तळ जेथें जमीनीस लागतो ती जागा. १० बायकांच्या चोळीच्या बाहीचा ढुशीखालचा तुकडा. ११ पत्ता; शोध; तपास. १२ आधार; पाया,–जड वस्तु वर ठेवण्याच्या संबंधानें; उ० ह्या खांबाला हा धोंडा लाग म्हणून पुरा. १३ तंबाखू इ० पदार्थांचा अमली गुण. १४ कांहीं कामाचा योग्य समय किं० हंगाम; उ० पेरणीचा लाग, कापणीचा लाग. १५ बंदूक, तोफ, इ० चा पल्ला म्ह० जेथपर्यंत तिचा मारा चालेल तेथपर्यंतचा प्रदेश. १६ विशिष्ट गात्र, इंद्रिय, इ० ची बिकृति. **लाग** स्त्री० उडी (मारणें, साधणें). **लाग चालविणें** ठरलेल्या क्रमानें किं० सरणीनें कांहीं काम चालू करणें. **लाग लावणें** संधान बांधणें; कांहीं कामानिमित्त प्रयत्न सुरू करणें. **कांहीं काम लागां लागणें** (किं० **लागावर येणें**) तें सुरळीतपणें सुरू होणें किं० चालू लागणें.

लागट [म० लागणें] वि० १ जी खाली असतां छातींत बांध बसतो अशी (सुपारी). २ जें खालें असतां कैफ किं० अमल येतो असें (हरीक इ० धान्य). ३ जें खालें असतां घसा, जीभ, गाल, इ० ना रिवरिव होतें असें (अळू, सुरण, इ०). ४ निर्लज्ज; लतकोडगा (मनुष्य). ५ ज्याला थोडीशी कीड लागली आहे असें (धान्य, लाकूड, इ०). ६ लोचट; झिडकारलें असतांही जो लगट करतो असा.

लागटा [म० लागणें] पु० परंपरा; माळका; ओळ (लावणें, करणें, होणें, इ०).

लागण [म० लागणें] स्त्री० १ नांगरणी.

२ सालोसाल नांगरली जाऊन जीतून पिकें
काढण्यांत येनात अशी जमीन; लागवडीखालची
जमीन. ३ लागवड. ४ पिशाचबाधा. ५ देवी,
आमांश, इ०नीं पछाडलेली माणसें किं० अशा
माणसाची संख्या. ❀ **लागणदार** पु० १
मिरासदार; ठिकाणदार. २ जमीन प्रथम लाग-
वडात आणणारा. ३ जमीन कसणारा मालक
किं० खंडकरी.

लागणें [**सं०** लग] **अ० वि०** ह्या क्रियाप-
दाचा संलग्न, संयुक्त, किं० संबद्ध होणें, जुळणें,
चिकटणें, किं० जडणे, असा वस्तुतः एकच अर्थ
आहे पण तो स्थिति, देश, काल, मरणां, पदार्थ,
इ० च्या भिन्नत्वामुळें भिन्नसा वाटतो. आम्हाला
ह्या क्रियापदाच्या अर्थांचे शास्त्रीय दृष्टया विन-
चूक असें वर्गीकरण करणें आणि उदाहरणे देणें
ह्या लहान कोशांत शक्य नसल्या कारणानें
आम्ही कांहीं मुख्य अर्थ पुढें देतों. १ स्पर्शणें;
उ० तूं त्याला लागूं नको, तुला विटाळ होईल.
२ (वृक्ष, रोप, शेत, बीज, इ०) रुजणें किं०
(त्यांनीं) भूमींत मुळें खुपसणें. ३ (शस्त्र,
काठी, बाण, इ० नीं) वेधणें किं० प्रहार करणें
किं० जखम करणें. ४ (डोळे, दार, झाकण, इ०)
मिटणें. ५(श्लोक, शब्द, भाषण, इ० तील अर्थ)
ध्यानांत येणें, समजणें, किं० बुद्धीनें ग्रहण केला
जाणें; उ० हा श्लोक (किं० नियम किं० सूत्र)
मला चांगला लागला. ६(कोणेकाचें कठोर भाषण,
शिव्या, इ०) अंतःकरणास बोचणें किं० दुःखदा-
यक होणें; उ० तुझें कुचकें भाषण त्याला लागलें.
७ (पदार्थांचे भाग किं० अवयव) एकमेकांस
योग्य प्रकारें जडणें; उ० ही त्रिजागरी झाकणाला
आतां नीट लागली. ८ अनुरूप किं० सोयीचा
किं० असावा तसा असणें. ९ चाल, रीत, इ०
प्रचारांत येणें. ९ (कांहा व्यसन,खोडी, लकब,
चटक, इ०) कोणेकास जडणें. १०(ताप,खोकला,
दमा, इ० रोग) औषधें इ० नीं बरा न होतां
कोणेकाच्या शरीरांत दृढपणें राहाण.११ (तहान,
भूक, इ०) कोणकास जाणवणें. १२ वाटेंत किं०
चालल्लेल्या क्रमांत दिसणें, आढळणें, येणें, किं०
प्रादुर्भूत किं० उपास्थत होणें; उ० येथून पाषाण
गांवास जातांना तुम्हाला वाकडी बाभळ लागेल;
उ० येथून सरळव्याजाचा उदाहरणें संपून चक्र
वाढव्याजाचीं उदाहरणें लागलीं. १३ (भांडण,
वाद, इ०) सुरूं होणें. १४ यदृच्छेनें असणें; उ०
ही काय मुंबई लागली आहे ? उ० हें काय सोपें
लागलें आहे ? १४ कांहा वस्तु कांहीं गुणांच्या
बाबतात अमुक प्रकारची आहे असें प्रतीत होणें
किं० आढळून येणें;उ०गोड लागणें,तिखट लागणें.
१५ (नोकरी इ०)मिळणें. १६ नात्याच्या संबंधानें
असणें; उ० तो माझा साडू लागतो. १७ (वृक्ष)
फलोत्पादनाच्या स्थितीस येणें; (वृक्षानें)
फळें देणें; उ० ह्या प्रांताचे माड लागूं लागले
म्हणजे असे लागतात कीं एका एका माडास
हजार हजार नारळ लागतात. १८ कीड,
बुरशी, इ० नीं (लाकूड इ०) खराब होणें.
१९ (सुपारी इ० नीं) कैफ किं० दुःखाची
भावना उत्पन्न करणें. २० कांहीं कार्यार्थ (पैसा
इ०) जरूर असणें किं० खर्चिला जाणें. २१
(वाद्य, कंठ, इ०) योग्य स्वर उत्पन्न करण्याच्या
स्थितीस येणें. २२ बोलतांना (माणूस, जीभ,
इ०) अडखळत चालणें. २३ योग्य प्रकारें किं०
सुरळीतपणें (यंत्र, इ०) काम करण्याच्या
स्थितीप्रत पोंचणें. २४ (चाकू, कातरी, इ०
हत्यार) आपआपलें काम करावयास समर्थ
होणें. २५ परिणाम किं० अंत ह्या नात्यानें
संबद्ध असणें; उ० उपजल्या प्राण्यास मरण हें
लागलेंच आहे. २६ (शस्त्र) सहाण, निसणा, इ०
वर घासले जाऊन तीक्ष्ण होणे.२७ (कोणी माणूस)
कांहा कामांत व्यापृत होणे किं० गुंतणें; उ०
मी आतां अभ्यासाला लागतों. २८ (पाऊस,
पावसाळा, उन्हाळा, इ०) सुरूं होणें. २९
जनावर, माणूस, इ०च्या पाठ, पाय, इ० गात्रांस
(खोगीर, जोडा, लगाम, इ० च्या घर्षणानें)
इजा होणें. ३० (पुरुष प्राण्यानें स्त्रीशीं मैथुनार्थ)
संगत होणें. ३१ (कांहीं काम) कोणेकाच्या
कर्तत्व, जबाबदारी, इ० वर सोंपावलें जाणें.
टीप,–ऊं, आवयास, इ० प्रत्यय क्रियापदांस
लागून त्यांचे पुढें ' लागणें ' हें क्रियापद आलें
असतां ती क्रिया सुरूं करणें असा अर्थ होतो;
उ० तो तें करूं किं० करावयास लागला. **टीप**–
'वें' ह्या प्रत्ययापुढें ' लागणें ' आलें तर ' जरूर
होणें ' ' अनिवार्य होणें ' असें अर्थ होतात;
उ० त्याला जावें लागलें. **टीप**,–'ऊं' प्रत्ययापुढें

'लागणें' आल्यास 'मदत करणें' असा अर्थ होतो; उ० हा धोंडा मला उचलूं लाग. **टीप,**– 'लागणें' ह्या क्रियापदाचे कांहीं वाक्प्रचार पुढें देतो. ⊛ **कोणेकाला शौचास लागणें** त्याला मलविसर्जनार्थ जाण्याची जरूरी भासणें. **मी काय तुझें चार चवल लागतों ?**(किं० **लागला गेलों आहे ?**) मी अल्प स्वल्प बाबतींतही तुझा मिंधा नाहीं; तुझें यत्किंचित् सुद्धां देणें मजकडे नाहीं. **कोणी मनुष्य कोणेकाशीं लागून असणें** त्याच्या तंत्रानें किं०मर्जीप्रमाणें वागणारा तो असणें. **लागत गुण पु०** संसर्ग किं० सहवास यांच्या योगानें कोणेकास जडतो तो गुण; उ० कोणाचा कोणास लागत गुण असतोच. **लागता गुण पु०** आपणाकडे संपत्ति, माणूस, मित्र, इ० ओढून घेण्याचा जो कोणेकाच्या अंगीं उपजत गुण असतो तो. **लागता जुगता वि०** योग्य सरणीनें सुरू झालेला किं० चालूं लागलेला. **लागपाठ, पाटलाग पु०** कोणेकाला धरण्यासाठीं त्याच्या मागें जाणें ही क्रिया. **मला ही भाजणी दळावयाला हात लाव** मदत कर. **त्याचा डोळा लागला** त्याला झोप आली.

लागभाग [**म०** लाग, लागणें + भाग] **पु०** १ संभव; उ० आज पाऊस पडेल असा लागभाग दिसत नाहीं. २ शक्यता; उ० वाघापुढें जाण्याचा त्याचा काय लागभाग आहे? ⊛ **लागीं भागीं, लागाभागास क्रि० वि०** १ जवळ; सन्निधींच्या प्रदेशांत. २ आटोक्यांत; संभवनीय अशा स्थितींत; शक्य कोटींत.

लागरा, लागीर वि० १ ज्याला लवकर कीड लागते असें (लाकूड, धान्य). २ ज्याला कीड लागली आहे असें (धान्य, लाकूड, इ०). ३ बोलतांना अडणारा (माणूस, जीभ).

लागलाव्या [**म०** लाग+लावणें] **वि०** धूर्त; हुशार; चतुर; स्वकार्यार्थ संधानें बांधण्यांत किं० वशीले लावण्यांत पटाईत.

लागलाच क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) तातडतोब; वेळ न दवडतां.

लागवड [**म०** लागणें] **स्त्री०** १ शेतकीच्या संबंधाचीं सर्व कामें (नांगरणें, पेरणें, बेणणें, इ०) समुच्चयानें. २ जमीन लागवडीत आणणें, गोठे, सोपे, इ० ची डागडुजी करणें, गांव वसविणें, इ० कामांसंबंधाचा खर्च. ३ शेतें, बागा, इ० मध्यें धान्यें, झाडें, इ० लावणें. ४ ज्यांत धान्यें, झाडें, इ० लाविलीं आहेत अशीं शेतें, बागा, इ०.

लागवण [म०लावणें] **स्त्री०** शेताची लावणी.

लागबांधा [**म०** लागणें+बांधणें] **पु०** संबंध; नातें.

लागवेग पु० त्वरा; घाई; लगबग.

लांगालुंगा [**म०** लुंगा] **वि०** १हलकें किं० पोकळ (धान्याचें कणीस). २ अशक्त, लेचापेचा (माणूस, पशु, पदार्थ).

लागावळ [**म०** लागणें+आवली (पंक्ति)] **स्त्री०** १ विटाळाचा किं० ओंवळ्याचा संबंध. २ सुरुंग इ०ची दारूची वात. ३ नात्याचा संबंध.

लागीं [**म०** लागणें] **श० यो० अ०** ला, प्रत, साठीं (कवितेंत); उ०तुजलागीं (=तुला), चरावयालागीं (चरावयासाठीं), इ०.

लागा [**म०** लागणें]**वि०** १ योग्य;साजेसा. २आटोक्यांतलि.३चिकटलेला;जडलेला;निगडित.

लागीर [**म०** लागणें] **वि०** १ किड्यांनीं खाल्लेलें किं० पोखरलेलें (धान्य, लाकूड). २ किडे खाऊन पोखरतील असें (धान्य, लाकूड). ३ दुःसंगतीनें बिघडण्याजोगा (मुलगा, माणूस). ४ भूत, पिशाच,इ०नीं पछाडलेला (माणूस).५ ५ कोणेकाशीं मित्रवादिसंबंधानें जुळलेला (माणूस). ६ अमल, कैफ, इ० गुण ज्यांत फार आहेत असा (गांजा, तंबाखू, सुरण, इ०). ७ दुसऱ्यांला आपल्या अंगच्या वाईट गुणांनीं बाधक किं० अपायकारक होणारा. ८ प्रेमानें दुसऱ्या माणसास आपणाकडे ओढणारा किं० दुसऱ्या माणसास चिकटणारा. ⊛ **लागीर होणें** भूतबाधेनें पछाडलें जाणें.

लागीर [**म०** लागणें] **स्त्री०, न०** १ भूतबाधा. २ भूत; पिशाच.

लागुनी, लागून श० यो० अ० (कवितेंत) कडे, ला, प्रत, इ०. मागें 'लागीं' पहा.

लागूं [**म०** लागणें] **वि०** १ पारणामकारक (पडणें, होणें); उ० मला एरंडेल अजून लागूं झालें (किं० पडलें) नाहीं. २ जुळणारा; जुळलेला; योग्य स्थानीं अधिष्ठित झालेला. ⊛**लागू-**

लागू वि० नातें, व्यवहार, धंदा, इ० संबंधानें जुळलेला.

लांगूल [सं०] न० शेपूट. ॐ **लांगूलचालन** न० १ लाडीगोडी (करणें). २ कांहीं स्वार्थ साधण्यासाठीं समर्थाची खुशामत (करणें).

लागोपाठ [म० लागणें+पाठ] क्रि० वि० एकामागून एक, एका मागून एक, अशा क्रमानें मध्यें खंड न पडतां किं० पडूं देतां; अखंडित क्रमानें.

लागो भागो दिवाळी [म० लागणें (ठोकर बसणें)+भागणें (दमणें)+दिवाळी (एक सण)] उ० वा० अ० लाभ किं० यश हें ध्येय (दिवाळी) डोळ्यापुढें ठेवून प्रयत्न चालवावा, हानि झाली (लागणें) तरी चिंता नाहीं, कष्टानें थकवा आला (भागणें) आला तरी चिंता नाहीं; उच्च ध्येय धरून काम करावें, फळ न आलें तरी खचूं नये.

लांगोर, लागोर [म० लागणें] स्त्री० भूत-बाधा (होणें).

लांगोरणें, लागोरणें [म० लांगोर, लागोर] अ० क्रि० (कोणी मनुष्यानें) भूतबाधेनें पछाडलें जाणें.

लाग्या [म०लागणें]पु० १ स्त्रीचा जार किं० यार. २ युक्त्या किं० हिकमती करण्यांत किं० संधानें बांधण्यांत चतुर किं० पटाईत.

लाघव [सं०] न० १ क्षुद्रपणा; हलकेपणा. २ तिरस्कार; अपमान; कमीपणा. ३ चलाखी; चपलपणा; चापल्य. ४ कौशल्य. ५ संक्षेप, संक्षिप्तपणा. ६ (**मराठींत**) आर्जव, लाडीगोडी, खुशामत. ७ (**मराठांत**) लबाडी; बतावणी. ८ (**मराठींत**) पाल्हाळ. ९ (**मराठात**) वात्रटपणा. ॐ **हस्तलाघव** न० हातचलाखी. **शब्दांचा लाघव** न० आपल्या भाषणांतील शब्दांचा पहिला अर्थ सोडून दुसरा अर्थ घेऊन आपलें म्हणणें खरें आहे असें सिद्ध करणें ह्या रूपाचा वात्रटपणा (करणें). **लाघवट** स्त्री० लघळपणा; फाजील सलगी. **लाघवी** वि०१कुशळ. २आर्जवी; लाडीगोडीनें आपलें काम दुसऱ्याकडून करून घेणारा. ३ मायावी; कपटी. ४ आश्चर्यजनक. पु० १नट; बहुरूपी. २ गारोडी.

लाघळ, लाघळकी, लाघळमावशी मागें ' लघाळ ' इ० पहा.

लागावळ [म० लागणें] स्त्री० १ ओळ, पंक्ति, अखंडित क्रम. २माग, पत्ता. ३वात्रट भाषण.

लाघाळ इ० मागें ' लघाळ ' इ० पहा.

लाच, लांच पु०, स्त्री० आपलें काम करून घेण्यासाठीं किं० आपल्या कामांत कोणी विघ्न आणूं नये म्हणून निषिद्ध प्रकारें त्याला गुप्तपणें दिलेलें द्रव्य इ० (देणें, भरणें). ॐ **लाचलुचपत** स्त्री० स्वकार्यासाठीं कोणेकास लाच देणें इ० रूप निंद्य कृत्यें. **लाचखाऊ, लाचखोर** वि० लाच घेऊन दुसऱ्याचा कामें करणारा. **लाचकोडगा** वि० निर्लज्ज.

लांचवणें [म० लांच] अ० क्रि० कांहीं वाईट गोष्ट करण्याला सवकलेलें असणें.

लाचार [फा०] वि० निरुपाय; हतधैर्य; दीन. ॐ **लाचारी** स्त्री०दीनपणाची स्थिति; दैन्य.

लांचाविणें [म० ' लांचावणें ' चें प्रयोजक] स० क्रि० (कोणेकाला) त्याची इष्ट वस्तु देऊन आकृष्ट किं० वश किं० अनुकूल करून घेणें.

लांच्छन [सं०] न० १ खूण; चिन्ह. २ नांव; अभिधान. ३ डाग; कलंक; बट्टा; दुर्लौकिक; बदनामी.

लांच्छित [सं०] वि० ज्याला डाग लागला आहे असा; कलंकित; निंद्य.

लाज [सं० लज्जा] स्त्री० १ शरम. २ भितरेपणा; संकोचवृत्ति; दबकलेपणाची भावना. ३ कोणेकाच्या योग्यतेला किं० दर्जाला अनुसरून जो त्याला मान द्यावयास पाहिजे तो (राखणें). ४, कलंक; काळिमा; बट्टा; उ० तूं आपल्या बापाच्या धवल कीर्तीला खचित लाज लावणारा (किं० आणणारा) पोरगा आहेस. ॐ **लाजेकाजेनें** क्रि० वि० लोक आपणास काय म्हणतील हें मनांत आणून. **लाजकोंबडा** पु०लाजरा माणूस. **लाजरा, लाजट** वि० लाजणारा. **लाजमर्यादा, लाजलज्जा** स्त्री० ए० व० सभ्यपणाची वर्तणूक करण्याकडे कल. **लाजलावणा (-ण्या), लाजलाव्या** वि० कुटुंब, संस्था, जात, इ० ना आपल्या दुष्कर्मांनीं कलंक लावणारा (माणूस, कृत्य, इ०). **लाजवट** वि०लाजणारा; शरमणारा. **लाजाळू, लाजरी** स्त्री०, **लाजरू** न० जिच्या पानांना हात इ० चा धक्का लाग-

जांना तीं मिटतात अशी एक वनस्पति. **लाजाळू, लाजरा** वि० १ लाजणारा. २ भिडस्त. **लाजिरवाणा** वि० १ लाज आणणारा; लाज लावणारा. २ लाजलेला; शरमिंदा. **लाजिरवाणें** न० कमीपणा आणणारी कांहीं गोष्ट.

लाजणें [म० लाज] अ० क्रि० १ शरमिंदें होणें. २ भिडस्तपणानें दबकणें किं० मागें हटणें. ३ (लाजाळू नावाच्या वनस्पतीनें) धक्का लागतांच पानें मिटणें.

लाजविणें [म०'लाजणें'चें प्रयोजक]**स०क्रि०** १ लाजत करणें.२पराभूत करणें.३०पेक्षा वरचढ ठरणें किं०असणें; उ० तुझें मुख चंद्रास लाजवितें.

लाजा[सं०] **स्त्री०** लाह्या.❀**लाजाहोम पु०**१ लग्नाच्या विधींत वधूवरांनीं अग्नांत लाह्यांची आहुति देणें.२अशा प्रकारें आहुति देऊन केलेला होम.

लाजिंदा [अ० लाझिम्] **वि०** १ (कांहीं कामीं) जो योग्य किं० लायक तो. २ (**मराठींत**) लाजलेला. ३ मिंधा; ओशाळलेला. ४ उपकाराखालीं दडपलेला. **लाजीम** वि० कांहीं कर्तव्यानें बांधलेला; कांहीं कर, वयाला बांधील. **पु०** १ हक्क. २ बांधीलपणा. ❀ **लाजिमदार** वि० १ लाजलेला; दबकलेला. २ कोणेकाच्या मिंधेगिरींत असलेला; उपकाराखालीं दडपलेला. **लाजिनदारी स्त्री०** ओशाळगत; मिंधेगिरी. **लाजिमा, लाजिम्मा, लांझा पु०** १ वादाची कांहीं गोष्ट; निकालांत न निघालेलें काम; संदिग्ध अशी कांहीं बाबत (तोडणें, निघणें, राहाणें). २ हक्काची कांहीं बाबत; हक्क. ३ कांहीं कामीं देण्याघेण्याचा संबंध. **लाजिमा, लाजमा** [अ० लाझिमा] **पु०**कर;हक्क.

लाट स्त्री० १ पाण्याचा तरंग; लहरी. २ बगाडाच्या चौकटीचें वरचें म्हणजे माथ्याचें लाकूड. मागें ' बगाड ' पहा. ३ चुना, पोहे, इ० कुटण्याची तुळई. ४ तेल्याच्या घाण्याचे आडवें तुळवट. ५ उसाच्या चरकाचें तुळवट,– जें बैल किं० माणूस वर्तुळाकार फिरवितो. ६ देवाच्या मूर्तीपुढें जें आडवें लाकूड असतें तें,– ज्याच्या आंत दर्शनार्थ आलेले लोक जाण्याला बंदी असते. ७ घराच्या बांधकामांत कड्यांखालीं असते ती तुळई. ८जमीन सपाट करावयासाठीं दगड,लोखंड, इ०चा दंडगोल फिरवितात तो.

लाटण [म० लाटणें] **न०** पोळी लाटतांना पोळी लाटण्याला चिकटूं नये म्हणून पसरून घालतात ती पिठी.

लाटणी [म० लाटणें] **स्त्री०** १ पोळी, पापड, इ० करण्याचें जें लाकूड तें; हें हातभर लांब आणि गुळगुळीत असून दोन टोकांकडे बारीक असतें. २ वरील साधनानें पोळीवर करतात तो संस्कार.

लाटणें न० वर ' लाटणी ' अर्थ १ पहा. ❀ **लाटण्यासारखी बाजरी भरणें, लाटण्यासारखें शेत भरणें** बाजरीचीं ताटें लठ्ठ होणें किं० कणसांतील दाणे धष्ट पुष्ट झालेले असणें.

लाटणें [म० लाटणें] **न०** वर ' लाटणी ' मध्यें अर्थ १ पहा.

लाटणें स० क्रि० १ (पोळी, पापड, इ०ची पिठाची गोटी) साधनविशेषानें चेपून फिरवून पातळ आणि वर्तुळाकार करणें.२ (राहाट गाडगें) वाटोळें फिरवून विहीर इ० तून पाणी वर काढणें. ' पाणी लाटणें ' अशी ' पाणी ' यावरही कर्मता येऊं शकते. ३ जेन, बुरणूस, इ० करणें असतां (खळ लाविलेल्या केशांवर) मागें पुढें हात फिरविणें. ४ (कोणेकाची कांहीं वस्तु) त्याच्या परवानगीशिवाय किं० इच्छेविरुद्ध बळकावणें. ५ दांडग्या हातानें (कांहीं काम) करणें.

लाटणें [म० लाटणें] **न०** पोळी, पापड, इ० करावयाचें साधनविशेष. ❀ **लाटण्या, लाटणेश्वर पु०** धिप्पाड बांध्याचा माणूस, पशु, किं० कांहीं पदार्थ.

लाटा [म० लाटणें] **पु०** १ पापड इ० कांच्या पिठाचा लाटावयाच्या सोयीचा लांबट जो गोळा करतात तो. २ भारेणाचा डोकीवर वहावयासाठीं केलेला भारा. ३ लाटणें. वर ' लाटणें ' **न०** पहा. ह्या अर्थीं ' लाटा ' **पु०** सुद्धां. ❀ **कोणत्याही कामावर लाटा (किं० लांठा) फिरविणें** तें कसेबसें करून टाकणें; तें निष्काळजीपणानें किं० दांडग्या हातानें करून टाकणें.

लाटालाटी, लाटालाट [म० लाटणें] **स्त्री०** १ काम करण्यांत अप्रामाणिकपणा किं० लबाडी.

२ दुसऱ्याची वस्तु बळकावून बसणें.

लाटानुप्रास [**सं०** लाट (एक देशविशेष + अनुप्रास] **पु०** जेव्हां तेच शब्द त्याच अर्थानें परंतु भिन्न रीतींनीं अन्वित होऊन वाक्यांत अनेक वेळां येतात तेव्हां जो अनुप्रास होतो तो लाटानुप्रास. ' चक्र चक्रपाणि पाणिमाजि तो तदा धरी ' ह्या वाक्यांत दोन वेळां लाटानुप्रास झाला आहे. आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत उपोद्घात पहा.

लाटी [**म०** लाटणें] **स्त्री०** १ पापड, करंज्या, इ० करण्यासाठीं पिठाच्या थापट्या करतात त्या प्रत्येक. २ लाकडाचा खांब किं० तुळई.

लाटींव [**म०** लाटणें] **वि०** लाटून केलेली (पोळी, पुरणूस, इ० पदार्थ).

लाटोरी [**म०** लाटणें] **स्त्री०** दोन पदरांची पोळी इ०

लाट्या [**म०** लाटणें] **पु०** १ भिजलेली डाळ उखळांत घालून घाटण्याच्या सोयीचा दगडाचा वरवंटा. २ पापड कराावयाच्या पिठाचे जे जाडी आणि लांबट आकार करतात ते प्रत्येक. ३ दांडगेश्वर; धटिंगण. **वि०** दुसऱ्याचे पदार्थ उपटण्याच्या स्वभावाचा (मनुष्य). ❀ **लाट्यागंगाजी, लाट्यागोमाजी पु०** दुसऱ्याचे पदार्थ उपटणारा.

लाठ स्त्री० विहिरींतून पाणी काढण्याची तीन बांशांवर आधारलेली एक रचना.

लांठ, लांठा वि० १ दांडगा; धटिंगण. २ धीट; साहसी. ३ विपुल (पाऊस, झाडी, धान्य, इ०). ❀ **लांठाई स्त्री०** दांडगाई; धिंगामस्ती.

लाडा पु० १ भातेणाची जुडी. २नाचणीच्या ताटांची जुडी. **वि०** वांझ (गाय, म्हैस, इ०). ह्या अर्थी ' लाढा ' सुद्धां. [लाटणें.

लाठा पु० पोळी, पापड, इ० लाटण्याचें साधन;

लाड [**सं०** लड्=बागडणें, खेळणें] **पु०** मूल इ० वर केलेलें प्रेम; मूल इ० चें केलेलें कौतुक; मूल इ० चें लालन. प्रयोग बहुधा **अ० व०**. ❀ **लाड चालविणें** (किं० **पुरविणें**) मूल इ० ना आवडती वस्तु देऊन त्यांना खूष करणें.

लाड पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक विड्यांचीं पानें, सुपारी, भांग, गांज्या, इ० पदार्थ विकतात. ❀ **लाडसोनार पु०** पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा.

लाड स्त्री० १शिमग्याच्या सणांत करतात तो चिखलाचा खळगा. २राड, चिखल. ❀ **लाडझगडा पु०, लाडझगडें न०** प्रेमाचें भांडण किं० वाद.

लाडकणें [**म०** लाड] **स० क्रि०** (मूल, कुत्रा, मांजर, इ० ना) प्रेमपूर्वक वागविणें किं० त्यांचे लाड पुरविणें.

लांडकतोड, लांडगतोड लांडगेतोड [**म०** लांडगा + तोडणें] **स्त्री०** १ लांडग्यांनीं शेत, शेळ्यामेंढ्यांचा कळप, इ० ची केलेली नासाडी. २ कापाकापी; कत्तल. ३ अनेकांनीं एकदम दिलेला उपद्रव. ४ शत्रूवर आवेशानें तुटून पडून त्यांचा उडविलेला विध्वंस.

लाडका [**म०** लाड] **वि०** १ प्रिय; आवडता. २ कोणेकाच्या विशेष प्रेमांतील. ३ प्रेम उत्पन्न करणारें (वर्तन, भाषण, हावभाव, इ०). ४सौम्य किं० मृदु प्रकृतीचा. 'कठोर' च्या उलट. ५ आवडीचा, पसंतीचा (धंदा, व्यापार, इ०).

लाडकाविणें [**म०** लाडका] **स० क्रि०** लाड करून (मूल, कुत्रा, इ० ना) बिघडविणें किं० शेफारून ठेविणें.

लांडगा पु० १ कुत्र्याच्या जातीचा एक वन्य पशु. २ एका तृणाचें बीं,—जें केश, वस्त्र इ० कांस लागलें असतां चिकटतें. २ आघाड्याचें बीं, किं० कड्या म्हणून एक औषधी आहे तिचें फळ. ❀ **लांडगी स्त्री०** १लांडगा ह्या वन्य पशूच्या वर्गांतील स्त्री. २ कोळपें हें जें शेतकीचें आउत त्याचें पातें.

लाडणें [**सं०** लड्=खेळणें, बागडणें] **अ० क्रि०** १ कोणेकाच्या प्रेमास पात्र झालेलें असणें. २फाजिल लाड केले गेल्यामुळें (मूल इ०)बिघडणें.

लाडन [**अ०** लादन्] **न०, स्त्री०** गूळ करावयाच्या काहिलीस उडदाचें पीठ इ० चें लुकण लावितात तें.

लांडरूं न० १ लांडोर (तुच्छतेंत). २ शिवीचा शब्द (बायकी भाषेंत). [जात.

लाडसोनार पु० सोनार लोकांची एक पोटजात.

लांडा वि० १ ज्याचें शेपूट तुटलें आहे किं० तोडण्यांत आलें आहे असा (कोणताही पशु). २ ज्याचा कांहीं अवयव किं०भाग छाटलेला आहे किं० असावा तितका लांब नाहीं असा (कोणताही पदार्थ,–हात, बोट, पाय, काठी, इ०). ३ कोणत्याही प्रमाणांत तोकडा. पु० कोणीही मुसलमान,–सुंता हा विधि मनांत घेऊन. ॐ **लांडा कारभार** पु० नसती उठाठेव; दुसऱ्याच्या कारभारांत केलेली लुडबूड; ज्यांत आपला संबंध नाहीं त्यांत नाक घालणें.

लाडाविणें [म० लाड] स० क्रि० लाड करून (मूल इ० ना) बिघडविणें.

लाडींगोडी [म० लाड+गोडी] स्त्री० आर्जव; गोड गोड बोलणें; गोंजारणें.

लांडी लबाडी, लांडी लटकी स्त्री० लबाडी; खोटेपणाची कांहीं गोष्ट.

लाडू [सं० लड्डु=लाडू] पु० १ एक पक्वान्नविशेष; हें अनेक पदार्थांचें असून त्याचा आकार चेंडूसारखा वाटोळा असतो. २ कोणताही चेंडूसारखा केलेला पदार्थ.

लांडूर स्त्री० लांडोर; मोराची स्त्री.

लाडेला मागें 'लाडका' पहा.

लाडोबा [म० लाड] पु० फाजील लाड केल्यामुळें बिघडलेला मुलगा.

लांडोर स्त्री०, न० मोराची स्त्री. ॐ **मोर नाचतो म्हणून लांडोर नाचते (पण तें शोभत नाहीं)** एकानें कांहीं गोष्ट केली आणि ती लोकांना आवडली म्हणून आपण ती गोष्ट केली तर ती लोकांना आवडेलच असें नाहीं; कदाचित् आपण उपहासास पात्र होऊं.

लाढण मागें 'लाडन' पहा.

लाढा पु० १ गुळाची किं० काकवीची चिकटी. २ घाम, मळ, इ० मुळें अंगाची झालेली ओंगळपणाची स्थिति. ३ वांझोटी गाय, म्हैस, इ०.

लाण, लाणी [सं० लवन] स्त्री० भात इ० चें शेत कापण्याची क्रिया. **लाणी** स्त्री० गवत इ० कापण्याची कोयती.

लात, लाथ [हिं०] स्त्री० पायाच्या तळव्यानें केलेला प्रहार (मारणे). ॐ **कांहीं पदार्थांवर लाथ मारणें** तो झिडकारणें; तो तुच्छ म्हणून त्याचा अनादर करणें. **तो लाथ मारील तेथें पाणी काढील** त्याच्या केवळ पायाचा तडाखा इतका जोरदार आहे कीं त्या तडाख्यानें जमीनींत खड्डा पडून तेथें विहीर होईल; तो अत्यन्त पराक्रमी आणि कर्तृत्ववान् माणूस आहे. **उठतां लाथ आणि बसतां बुक्की** चुकार किं० आडमुठ्या माणसाला दर चुकीबद्दल शिक्षा (केली पाहिजे).

लातडणें, लाथाडणें, लातवणें [म० लात, लाथ] स० क्रि० १ लाथांनीं (कोणेकाला) मार देणें. २ तुच्छ म्हणून झिडकारणें. ३ पायानें (कांहीं पदार्थ) दूर सारणें किं० उडवून देणें.

लाताड, लाताडी [म० लात] स्त्री० गाय, म्हैस, इ० च्या पायाचा तडाखा (मारणें, देणें, लागणें).

लाताड,लाथाड [म० लात,लाथ] वि० लाथा मारण्याची खोडा ज्याला आहे असा (माणूस, पशु).

लाताळ, लाताळें, लाथाळें [म० लात, लाथ] न० १ घोडे, गाढव, इ० नीं एकमेकांना लाथा मारून केलेलें भांडण. २ आवेशाचें भांडण. ३ अव्यवस्थित कारभार; कामाचा गोंधळ किं० घोटाळा. ४ दोन किं० अधिक माणसांचें सभ्याचार सोडून जें भांडण तें.

लादणी [म० लादणें] स्त्री० घोडे, उंट, बैल, गाडी, इ० वर कंठाळ, ओझें, इ० चढविण्याची क्रिया.

लादणें [हिं० लादना] स० क्रि० १ बैल, गाडी, होडी, इ० वर (सामान, ओझें, माणसें, इ०) चढविणें किं० ठेवणें. २ कोणेकाच्या इच्छेविरुद्ध त्याला (कांहीं काम) करावयास लावणें किं० त्याच्यावर (कांहीं जबाबदारी) टाकणें किं० त्याला (कांहीं कर, वर्गणी, इ०) द्यावयास भाग पाडणें किं० त्याला (कांहीं कायदा) पाळावयास लावणें. ३ (चुना, रंग, गिलावा, इ० चा थर) भिंत, चित्र, जमीन, किं० कोणताही पदार्थ यांच्यावर चढविणें.

लादा [हिं० लाद्मा] पु० १ पीठ, चिखल, चुना, इ० चा मळून किं० कमावून केलेला गोळा. २ ज्याला पाणी सुटलें आहे असा भात,

गूळ, इ० पदार्थ. ३ बांध रचण्यासाठीं जमिनींतून पळीव ह्या आउतानें खणून काढलेलें साधारण चौकोनी आकाराचें ढिखळें.

लादा [म० लादणें] **पु०** १ चिरगुटांचा अव्यवस्थित भारा किं० गठ्ठा. २ भात, गूळ, इ०चा मोठा गोळा किं० खंड. ३केश, कागद, सुतें, चिरगुटें, इ० ची गुंतागुंत किं० गुंतलेपणाची स्थिति. ४ गुंतागुंतीची किं० अव्यवस्थितपणाची स्थिति. ५ कागद, चिरगुट, इ० पदार्थांचा चोळाबोळा.

लादी [म० लादणें] **स्त्री०**साधारणपणें घडविलला दगड,–बांधकामीं योजावयाचा.

लाधण स्त्री०, न० मागें ' लाडन ' पहा.

लाधणें [सं० लभ्; लाभ]**अ० क्रि०** १ मिळणें; प्राप्त होणें; साध्य होणें. २ फलद्रूप किं० फायदेशीर होणें; उपयुक्त होणें किं० ठरणें. **स० क्रि०** (इष्ट वस्तु किं० मनोरथ) मिळविणें.

लांपट [सं० लंपट] **वि०** १ सईल, खिळखिळा (खिळा, कोयंडा, कडी, खुंटी, इ०). २ ज्याचे सांधे, अवयव, भाग, इ० सईल झाले आहेत असा (कोणताही पदार्थ). ३ ज्याला कितीही रागें भरलें किं० निषेधिलें तरी जो आपलें निंद्य वर्तन सोडीत नाहीं असा (मनुष्य); लतकोडगा; निर्लज्ज.

लापाण्णिका, लाफाण्णिका, लापटणिका लापनिका [सं० लप्=बडबडणें] **स्त्री०** १ लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत; चऱ्हाट. २ लबाडीची मसलत. ३ शब्दपांडित्य.

लापन [सं०] **न०** १ बडबड. २ श्लोक, कूट, वाक्य, इ० चा अर्थ काढणें, संदर्भ बसविणें, संगति जुळविणें, इ० रूप क्रिया.

लापनिका [सं०] **स्त्री०** १ श्लोक, वाक्य, कूट,इ०चा अर्थ लावणें किं० अर्थ काढणें.२वाक्य, श्लोक, इ० चा अर्थ समजून सांगण्याची कोणेकाची शैली किं० सरणी.

लापशी, लाफशी, लावशी स्त्री० साबूदाणे, शिंगाड्याचें, रताळ्याचें, किं० तांदुळाचें पीठ, इ० ताक, दूध, इ० मध्यें घालून किं० शिजवून उपासासाठीं किं० आजाऱ्याला देण्यासाठीं जें पेय करतात तें.

लांपळ, लांफळ वि० सईल, ल्टपटीत, किं० खिळखिळा. वर ' लांपट ' पहा.

लाफा स्त्री० फळीला बळकटीसाठीं खिळे इ० नीं ठोकलेली आडवी पट्टी.

लाफा [सं० लप्=बडबड करणें] **स्त्री० अ० व०** वढाया; बाता; गप्पा; बडबड (मारणें, झोकणें, लावणें).

लांफाळ [म० लांपट] **वि०** बदकर्माला आसक्त झालेला; व्यसनी.

लांब [सं० लंब] **वि०** १ दीर्घ; अखूड नव्हे असा. २ देश किं० काल ह्या बाबतींत दूर असलेला; उ० अझून दिवाळी लांब आहे; उ० सातारा गांव येथून फारसा लांब नाहीं. ३ अतिशय किं० कंटाळा येण्याइतका लांब. ❀ **लांबलेखा**[म० लांब+लेख] **पु०** शुष्क वाटाघाट;रिकामी पंचाईत;उ०ह्या गोष्टीबद्दल आपल्या आपल्यांत उगीच लांबलेखा कशाला ? मी आतांच्या आतां गंगाधररावांना भेटून निकाल करून येतों. **लांबसर वि०** बराच लांब; तोकडा नव्हे असा; अघळपघळ. **लांबून क्रि०वि०** दूरून; अंतरावरून. **लांबट वि०** १ फारच लांब. २ लांबोड्या घाटाचा किं० आकाराचा.**लांबलचक वि०** १ खूप लांब,अघळपघळ (चांगल्या अर्थानें). २ फाजील लांब (वाईट अर्थानें).

लांबण [म०लांब] **स्त्री०** १देश किं०काळ ह्या बाबतींत कंटाळा येण्याइतकें अंतर किं० दूरपणा. २ फाजील किं० कंटाळा येण्याइतका विस्तार. ३ लांबचलांब रस्ता, हकीगत, वर्णन, इ०.४ उशीर; विलंब; दिरंगाई. ५ सावकाशी; संथपणा. ❀ **लांबणीवर पडणें** (किं० **टाकणें**) दिरंगाईवर जाणें (किं० लोटणें); पुढच्या काळावर पडणें (किं० ढकलणें).

लांबणदिवा,लामणदिवा पु० दोरी,सांखळी, इ० कांस टांगून ठेवण्याचा समईचा लोखंडाचा किं० पितळेचा दिवा.

लांबणें [म० लांब] **अ० क्रि०** १लांब होणें. २ पुढच्या काळावर किं० दिरंगाईवर पडणें किं० ढकलणें जाणें. ३ पदार्थांत भरती घातल्यामुळें तो वाढणें, मोठा होणें, किं० दीर्घ काळ पुरण्याइतका किं० टिकण्याजोगा होणें. ४(बातमी,

गुप्त गोष्ट, किं० मसलत, इ०) अनेकांस ज्ञात किं० विदित होणें. ५ (काम, ग्रंथ, इ०) अंगें, उपांगें, इ० ची भरती पडल्यामुळें विस्तृत होणें. ६ (भाषण, ग्रंथ, इ०) कंटाळा येण्याइतकें किं० पूर्वीच्या अटकळीपेक्षां अधिक मोठें होणें.

लांबणें [म० लांब] **न०** १ एक प्रकारचा पोहोरा,–विहिर इ०तून पाणी काढण्याचा. २ लामणदिवा लोंबत सोडण्याची दोरी किं० सांखळी.

लांबर वि० १ दुसऱ्याच्या संभाषणांत उंब्रेपणानें बोलणारा. २ लुडबुड्या; लोचट.

लांबवालांबव [म० लांबविणें+लांबविणें] **स्त्री०** १ पदार्थ, सामानसुमान, गुरेंढोरें, माणसें, इ० ना चोर इ० पासून बचावासाठीं दूर प्रदेशीं नेऊन ठेवणें. २ दुसऱ्याचे पदार्थ हळूं हळूं गुप्तपणें चोरून नेऊन आपल्या घरांत ठेवणें.

लांबाविणें [म० ' लांबणें ' चें प्रयोजक] १ पुढच्या काळावर लोटणें; दिरिंगाईवर टाकणें. २ लांब करणें; वाढविणें. ३ पाणी, पेज, इ० घालून (ताक, आमटी, इ०), किं० दूध इ० घालून (बासुंदी इ०)अधिक करणें; पाल्हाळ किं० तपशील इ०नीं (हकीगत, व्याख्यान, इ०) लांब करणें. ४ (दुसऱ्याची वस्तु) मुकाट्यानें उचलून घेऊन जाणें; पळविणें.

लाबशी वर ' लापशी ' पहा.

लांब्रा पु० शेतांतील भात कापते समयीं गळालेलें किं० अन्य वेळीं शेतांत पडलेले जे भातगोटे त्यांचीं जमीनिच्या ओलाव्यानें किं० पावसाच्या पाण्यानें उगवतात जीं रोपें तीं व्यक्तिशः.

लांबी [म० लांब] **स्त्री०** १ लांबपणा; दीर्घता. २ क्षेत्राचीं जीं काटकोनांत असलेलीं दोन परिमाणें त्यांपैकीं जें मोठें परिमाण तें. ❀ **कांहीं गो० लांबीवर पडणें** (किं० **लांबणीवर पडणें**) ती दिरिगाईवर पडणें; ती पुढें म्हणजे कालांतरावर लोटली किं० ढकलली जाणें.

लांबी स्त्री० लाकूड, तक्ते, इ०च्या फटी, इ० बुझविण्यासाठीं किं० खिडकीची तावदानें न हालेशीं बसविण्यासाठीं भरतात तें लुकण.

लांबोडा (–ळा) [म० लांब] **वि०** बराच किं० किंचित् लांब आकाराचा(चांगल्या किं० वाईट अर्थानें). ' लांबुळा ' ह्याच अर्थीं योजतात.

लांबोरा [म० लांब] **वि०** १ लोचट; कोडगा. २ दुसऱ्याजवळ कांहीं पदार्थ मागून सतावणारा.

लाभ [सं०] **पु०** १ मिळणें; प्राप्ति. २ नफा; फायदा. ३ अकस्मात् निधि सांपडणें. ४ धान्य इ० मोजते समयीं पहिल्या मापाला लाभ, दुसऱ्याला बरकत, असें म्हणून पुढें तीन, चार, पांच, इ० अंक मोजण्याचा व्यापारी लोकांत परिपाठ आहे. लाभ म्ह० एक. ❀ **लाभकाळ पु०** ज्या काळांत नफा, फायदा, सोयीचे सौदे, इष्टसाफल्य, इ० कोणेकाला प्राप्त होतात तो त्याचा लाभकाळ. याच्या व्यावर्तकत्वें ' विनाशकाळ, ' ' ऱ्हासकाळ, ' ' आपत्काळ, ' इ०. **लाभगुण पु०** लाभ सामान्यतः. **लाभदृष्टि स्त्री०** आपल्या स्वताच्याच लाभाकडे जी दृष्टि ती. **वि०** स्वताच्याच लाभाकडे ज्याची दृष्टि आहे असा. **लाभलोभ, लाभलोभा, लाभालोभ पु०** नफा मिळविण्याची उत्कट इच्छा. **लाभलोभ पु०** १ नफा; फायदा. २ प्रेम किं० फायद्याची आशा,–दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याच्या संबंधांत; उ० लाभालोभावांचून कोणी कोणाचें काम करीत नाहीं. **लाभालोभाचा वि०** प्रेमानें किं० लाभ होण्याच्या संभवानें जो कोणाशीं जुळलेला किं० चिकटलेला तो मनुष्य; उ० लाभालोभाचीं चार माणसें जुळलीं तरच मोठें कार्य तडीस जाऊं शकतें. **लाभवेळ (–ळा) स्त्री०** ज्या समयीं कोणतेंही काम हातीं घेतलें असतां त्यांत सिद्धि मिळते असा समय. **लाभागोभा पु०** नफा; फायदा. **लाभालाभ** [सं० लाभ+अलाभ] १ नफा नुकसान; फायदा आणि तोटा. २ दैव; दैवगति.

लाभणें [म० लाभ] **अ० क्रि०** १ प्राप्त होणें; मिळणें. २ (कांहीं कार्याची) चांगली किं० वाईट परिणति होणें. ३(कांहीं पदार्थ, पशु, माणूस, इ०) कोणेकाला फायदेशीर किं० लाभदायक होणें. ४ (लग्न, मुंज, इ० कार्य) कोणेकाला विशिष्ट समयीं शुभप्रद असणें; उ० सदूला यंदा मुंज लाभत नाहीं. ५ (गुरु, चंद्र, इ०) कांहीं कार्याला शुभप्रद असणें; उ० यंदा मुंजीला गुरु लाभत नाहीं.

लामणदिवा, लाम्हणदिवा पु०, **लामणें, लाम्हणें** न० मागें ' लांवणदिवा, ' ' लांवणें ' पहा. [पहा.

लाय, लायलाय मागें ' लहा, ' ' लहालहा '

लायक [अ०] वि० योग्य; अनुरूप. ॐ **लायकी** स्त्री० योग्यता; अनुरूपता; पात्रता.

लाल [फा०] वि० तांबडा. पु० १ माणिक हें रत्न. २ एक पक्षी. ॐ **लालडी** स्त्री० हलक्या दर्जाचें किं० लहान आकाराचें माणिक. **तांबडा लाल** वि० खूप तांबडा. **हरीचा लाल, ईश्वराचा लाल** पु० देवाचा आवडता माणूस,–विचित्र, छांदिष्ट, मूर्ख, किं० दैववान् माणूस असा अर्थ वक्तव्य असतां. **लालझगडा** पु० प्रेमाचें किं० लुटुपुटीचें भांडण. पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **लाली** स्त्री० तांबडेपणा. **लालभडक, लाललाल भडक** वि० खूप तांबडा आणि चटकदार (रंग, वस्त्र इ०). **लालवट, लालसर,** वि० किंचित् तांबडा; साधारण तांबडा.

लालच, लालूच, लालची [सं० लालसा] स्त्री० १ लाभ. २ लाभाचा संभव. ३ कोणेकाला वश करून घेण्यासाठीं त्याला लावून ठेविलेली आशा. ॐ **लालचखोर, लालची, लालचेल, लालूचखोर** वि० लोभी; फायद्याच्या आशेनें आकृष्ट झालेला किं० कांहीं काम करणारा.

लालचणें, लालचावणें [न० लालच] अ० क्रि० लाभानें आकृष्ट होणें; आपला कांहीं लाभ होईल ह्या आशेला गुंतणें; पूर्वी लाभ झाला आहे तसा आतांही लाभ होईल अशा आशेला (कोणी मनुष्य) गुंतलेला असणें.

लालची स्त्री० वर ' लालच ' पहा.

लालझगडा [म० लाड+झगडा] पु० प्रेमकलह.

लालडी मागें ' लाल ' मध्यें पहा.

लालन [सं०] न० १ स्नेहपूर्वक कोणेकाचा केलेला सांभाळ; प्रेमपूर्वक पालन. **टीप,**–ह्या अर्थी ' लालनपालन ' सुद्धां. २ कोणेकाचे लाड करणें. ३ कोणेकाला गोंजरणें किं० आळविणें.

लालबुझक्कड, लालभुजःकड (–कण) [हिं०] पु० वस्तुतः मूर्ख, अडाणी, किं० ठोंब्या असून चातुर्य, विद्वत्ता, शहाणपणा, इ०ची ऐट मिरवितो तो.

लालस [सं०] वि० १ अति उत्सुक. २ तत्पर; तल्लीन; आसक्त. **लालसा** स्त्री० १ उत्कट इच्छा; औत्सुक्य; लोभ. २ विनंती; याचना. ३ कांहीं वस्तूचा लोभ.

लाला [सं०] स्त्री० थुंकी; लाळ. ॐ **लालाभक्ष** पु० २ नरकविशेष. २ वरिष्ठाची निंद्य खुशामत करणारा,–त्याची थुंकी पिणें, पाय चाटणें, इ० प्रकारची. **लालामेह** पु० पुवानें मिश्रित अशी लघवी किं० अशा लघवीची विकृति.

लालाभाईपुरमा [म० लालाभाई एक वैरागी] पु० १ सर्व वस्तूंची आणि माणसांची समृद्धि; हरएक प्रकारचें वैपुल्य. २ चैनबाजी; रंगेलपणाचें आयुष्यक्रमण.

लालित [सं०] वि० १ प्रेमपूर्वक रक्षिलेला किं० पोसलेला. २ ज्याचे लाड केले आहेत असा. ३ आवडता; प्रिय. न० १ सुख. २ प्रेम.

लालित्य [सं०] न० १ सौंदर्य; मोहकपणा. २ कान्ति. ३ उल्हास. ४ प्रेमाचे विलास. ५ भाषण, काव्य, इ० तील अर्थाचा किं० शब्दांचा मोहकपणा. [तांबडेपणा.

लाली [म० लाल+ई (प्रत्यय)] स्त्री०

लालुचणें [म० लालूच] अ० क्रि० मोहाला गुंतणें किं० गुंतलेलें असणें.

लालूच, लालूचखोर मागें ' लालच, ' ' लालचखोर ' पहा.

लांव स्त्री० १ एक राक्षसी. ही फळें, वस्त्रें, पक्ष्यांचीं पोरें, दूधदुभतें, इ० ना उपद्रव करते अशी अशिक्षितांची समजूत आहे. २ हिडिंबा स्त्री. ३ भांडखोर किं० कजाग स्त्री. ४ एक पक्षी. पुढें ' लावा ' पहा.

लावक [सं०] पु० १ कापणारा. २ फुलें इ० तोडणारा. ३ लावा नांवाचा पक्षी.

लावण, लावणिक [सं०] वि० १ खारट. २ क्षारयुक्त.

लावणी [म० लावणें] स्त्री० १ लावणें ही क्रिया. मागें ' लावणें ' हें क्रियापद पहा. २ शेत इ० ची लागवड. ३ भात इ० चे रोपे किं० वृक्षाच्या डाहाळ्या, उसाचीं कांडीं, इ० शेत, मळा, बाग, इ० मध्यें लावणें ही क्रिया. ३ कवितेचा

एक प्रकार; उ० रामजोशी याच्या लावण्या उत्कृष्ट म्हणून गणल्या जातात. ❀ **लावणीचा वि०** मुद्दाम लाविलेला जो वृक्षादि तो; आपल्या आपण उगवलेला किं० रुजलेला नव्हे असा. **लावणी अळपणी स्त्री० ए० व०** प्रारंभापासून अखेरपर्यंत जीं शेतकीचीं कामें तीं समुच्चयानें. अळपणी म्ह०भाताचे मुढे इ०घट्ट आवळून बांधणें. मागें' अळपणें ' पहा. **लावणी जुंपणी स्त्री०** १ शेतकीसंबंधाचें कोणतेंही काम व्यक्तिशः किं० सर्व कामें समुच्चयानें. २ कामाची योग्य लाविलेली किं० लावून दिलेली सरणी. **लावणी कमज्यास्ती टिपण न०** शेत जमिनींपैकीं कोणत्यांत लागवड झाली, कोणत्या पडीत टाकण्यांत आल्या,इ० तपशिलाचा कोणेक विशिष्ट कालाचा खरडा. **लावणी टुपणी स्त्री०** शेत इ० संबंधींची लावणी, वेणणी, इ० कामें समुचयानें. **लावणीपत्रक न०** लागवडींत आणलेल्या पडीत जमीनींच्या वर्णनाचा कागद. **लावणीबाज वि०** लावणी हा जो कवितेचा प्रकार त्याचा शोकीन.

लावणें [म० ' लागणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ एक पदार्थ दुसऱ्याशीं जुळविणें किं० जुळवून किं० चिकटून ठेवणें. २ पाठवून देणें; उ० मी त्याला घराकडे लावून दिला. ३ (पैशाच्या मागणीचें पत्र) कोणेकाकडे गुदरणें. ४ (गांव, घर, इ०) वसविणें. ५ (दुकान,इ०) मांडणें किं० सुरू करणें किं० स्थापिणें. ६ (गलबत इ०) थांबविणें किं० नांगरणें. ७ खंडकऱ्याकडे (शेत, जमीन, इ०) कसणें, लागवड करणें, इ० कामासाठीं देणें किं० सोंपविणें. ८ (पुस्तकें, चिरगुटें, इ०) व्यवस्थित रीतीनें मांडणें किं० रचणें.९(वशीला, चिट्ठी, पत्र, इ०) कोणेकावर लागू करणें. **टीप,**–' लागणें ' ह्या अकर्मक क्रियापदाचे बहुतेक सर्व अर्थ प्रयोजक भेदांत घातले असतां ' लागणें ' ह्या क्रियापदाचे बाकीचे अर्थ विद्यार्थ्याला जाणतां येतील. ❀ **लावून पहाणें** (एक पदार्थ) दुसऱ्या पदार्थाशीं ताडून पाहाणें आणि त्याची किंमत, योग्यता, इ० ठरविणें. **कोणेकाला लावून बोलणें** त्याला टोमणे मारणें; त्याला झोंबतील अशीं विधानें करणें.

लावणें [**म०** लावणें] **न०** वाडी, मळा, इ० मध्यें लाविलेलीं झाडें समुच्चयानें.

लावण्य [**सं०**] **न०** १ सौंदर्य.२खारटपणा.

लावतोड [**म०** लावणें + तोडणें] **स्त्री० ए० व०** १ अत्यन्त किं० पराकाष्ठेची घाई किं० लगबग.२घाईमुळें चित्ताला वाटते ती अस्वस्थता. ३ कामामध्यें केलेली किं० करावी लागलेली धावपळ किं० धडपड. ४ कडाक्याचें भांडण.

लांवसट [**म०**लांव]**स्त्री०** दूधदुभतें,पोरें, फळें, जनावरें,इ०ना उपद्रव करणारी एक राक्षसी. मागें ' लांव ' पहा.

लांवसटणें, लांवसरणें, लांवारणें [**म०** लांव, लांवसट] **अ० क्रि०** लावीच्या किं० लावसटीच्या उपद्रवामुळें (दूध, फळें, गुरें, इ०) बिघडणें किं० नासणें. नारळ, ताडफळ, इ० फळांसंबंधानें ' लांवसरणें ' हेंच क्रियापद बहुधा योजलें जातें.

लावा [**सं०** लाव] **पु०** एक पक्षी. ह्याला ' लावक ' असेंही नांव आहे. हा पक्षी भारी स्त्रीलंपट असतो.

लावा [**म०** लावणें] **पु०** १ भाषण, लेखन,इ० मध्यें रस उत्पन्न व्हावा म्हणून करतात ती अलंकारांची भरती. २ कोणताही पदार्थ शोभून दिसण्यासाठीं त्याच्यावर करतात तो संस्कार.

लांवारणें [**म०** लांव] वर 'लांवसटणें'पहा.

लावालाव, लावालावी [**म०** लावणें] **स्त्री०** १ पूर्वीं सिद्ध किं० समाप्त केलेल्या पदार्थास दिलेला जोड किं० त्यांत केलेली भरती किं० फिरवाफिरव. २ वर्णन चटकदार करण्यासाठीं घातलेला अलंकार किं० लाविलेलें तिखटमीठ. ३ दोन माणसांत कलह पेटविण्यासाठीं केलेल्या चुगल्या किं०चहाड्या. [पहा.

लांव्हः, लांव्हारणें वर ' लांव, '' लांवारणें '

लाव्हर स्त्री० एक वर्षाचें लहान कोकरूं.

लाशा [**म०** लास] **वि०** लास ज्याला आहे असा; लासानें विरूप झालेला. खालीं ' लास ' पहा.

लास पु० १ वायुविकृति किं० रोग इ० च्या निरसनार्थ त्वचा तापलेल्या लोखंडानें भाजणें (देणें, घेणें) किं० अशी त्वचा भाजून पडलेला

डाग किं० वण. २ जन्मापासून माणसाच्या तोंड इ० वर जो तांबडा, काळा, पिवळा, इ० रंगाचा डाग असतो तो. ३ आंबा इ० फळ अंशतः सड-ल्याचा जो डाग सालीवर उत्पन्न होतो तो. ४ वल्ह्याचें टोक जमीन इ० वर टेकून होडी मागें ढकलणें.

लांस स्त्री० १ एक राक्षसी. मागें 'लांव' पहा. २ कोल्ही. ३ भाजल्यानें त्वचेवर उत्पन्न होतो तो डाग. ह्या अर्थी ' लास ' सुद्धां. **लांस न०** ज्यावर केश आहेत असा शरीरावरील तीळ किं० वांग.

लासणी [**म०** लासणें] **स्त्री०** १ रोगादि निवा-रणासाठी किं० केवळ खूण म्हणून त्वचेवर लाल तापलेल्या लोखंडानें डाग देणें किं० असा दिलेला डाग. २ शाई, कोळसा, इ० नीं विणावयाच्या वस्त्राच्या ताण्यांवर केलेली खूण (लावणें). पुढें ' लासें ' अर्थ २ पहा.

लासणें [**म०** लास] **स० क्रि०** १ लाल तापलेल्या लोखंडानें रोगादि निवारणार्थ किं० खुणेसाठीं (त्वचा) भाजणें. २ कोणत्याही कार-णासाठीं (त्वचा किं० पृष्ठभाग) तापलेल्या लोखं-डानें चिन्हित करणें .३ पांजणानंतर (ताण्याला) लासें लावणें. खालीं 'लासें' अर्थ २पहा. **अ० क्रि०** (आंबा इ० फळ) नासण्याच्या क्रियेनें डागळणें.

लांसरू [**म०** लांस] **न०** १ लांस नांवाची राक्षसी (तुच्छतेंत). मागें ' लांस ' पहा. २ कोणीही दुष्ट स्त्री. ३ ज्यावर केश आहेत असा त्वचेवरील तीळ किं० वांग. ४ नाक आणि डोळे ह्यांना होतो तो एक रोग. मागें ' नासूर ' पहा.

लासा मागें ' लाशा ' पहा.

लासूर [**म०** ' नासूर ' चें अशुद्ध रूप] **पु०, न०** १ डोळे आणि नाक ह्यांना होतो तो एक रोग. २ मागें ' लांसरू ' अर्थ ३ पहा.

लासें [**म०** लांस] **न०** १ प्राण्याच्या शरीरावर किं० फळांवर कधीं कधीं असतो तो काळा डाग.२वस्त्र विणावयाच्या ताण्यांवर शाई, कोळसा, इ० नीं केलेली खूण (लावणें).

लाहकी स्त्री० ए० व०, लाहक्या स्त्री० अ० व० १ उन्हाची किं० उष्णतेची तिरीप (मारणें, देणें, टाकणें). २ ऊन्ह, शोक, इ० नीं अंगांत उत्पन्न होते ती अवस्थता; उ० अंगाची लाहकी आज फार होत आहे. ह्या अर्थी ' लाही ' सुद्धां. ३ कांहीं वस्तूसाठीं कोणी एकाद्याला केलेली प्रार्थना किं० घातलेली गळ किं० लाविलेला तगादा. ४ घाई, लगबग. ५ उत्कट इच्छा.

लाहडा पु० १ (ताप, देवी, गोवर, खरूज, इ० चा) जोर किं० आवेग किं० रखरख. २ चिखल, गूळ, इ० चा लगदा किं० थिरबिटी. ३ कागदपत्रें, पोथीचीं पानें, केश, इ० चीं गुंतागुंत किं० घालमेल किं० घोटाळलेपणाची स्थिति.

लाहडी [**म०** लाहो] **वि०** अत्यन्त आसक्त (चांगल्या किं० वाईट गोष्टीला).

लाहणी स्त्री० १ शेत इ० ची कापणी. २ दिवा, लामणदिवा किं० पणती ठेवण्याचा लाक-डाचा खांब किं० आधार.

लाहणें [**म०** लाभ; **सं०** लभ्] **स० क्रि०** १ कांहीं वस्तु (कोणेकाला) मिळणें किं० प्राप्त होणें. २ संपादणें; मिळविणें. ३ भोगणें.

लाहा पु० उत्कट इच्छा.

लाहाणा वि० शुभ; लाभदायक.

लाहाणी [**म०** लाहणें] **स्त्री०** प्राप्ति; लाभ.

लाहातें [**म०** लाभ] **न०** लाभ. **वि०** फायदेशीर; लाभदायक.

लाही [**सं०** लाज] **स्त्री०** १ भात, जोंधळे, बाजरी, इ० एकदळ धान्यें पाण्यांत भिजत घालून नंतर मडकें इ० पात्रांत घालून विस्तवा-वर ठेवून ढवळून त्यांचा केला जातो तो आकार किं० त्यांना प्राप्त होतें तें रूप; भाजून फुलविलेला धान्याचा दाणा. २ तुरटी इ० क्षार ह्यांना अग्निसंस्कारानें प्राप्त होतें तें रूप; उ० तुरटीची लाही इ०. ३ क्रोध, ऊन्ह, शेक, इ० मुळें अंगाचा होतो तो दाह किं० ताप. ४ बंदु-कांतून उडविलेल्या गोळ्या, सांथीनें मेलेले प्राणी, शिव्या, इ० चें वैपुल्य किं० इ० चा वर्षाव; उ० यंदा पटकीनें ह्या शहरांत लाही उडवून दिली. ❀ **बाजारांत कांहा मालाची लाही उडणें** तो हां हां म्हणतां विकला जाणें. **अंगाची लाही भाजणें** उष्णतेच्या योगानें अंग

भाजत असणें आणि अंगांतून घामाच्या धारा गळत असणें. **उन्हाची लाही भाजणें** उष्मा फार किं० असह्य होत असणें. **लाह्याचा मान पु०** लग्नांत लाजाहोमाचे प्रसंगीं वरपक्षाकडून वधू-पक्षाला पागोटें, नारळ, इ० ची देणगी दिली जाते ती. **लाहीपीठ न०** लाह्या दळून केलेलें पीठ. [पहा.

लाहूर न० पु० एक पक्षी. मागें 'लावक'

लाहो [**म०** लाभ] **पु०** १ लाभ. २ खूप मोठा आणि अकल्पित असा प्राप्त झालेला कांहीं लाभ. ३ लोभ. ४ अतृप्ति. ५ एकाद्या वस्तूबद्दल घेतलेला हव्यास. ६ छंद, नाद. ॐ **लाहोटा पु०** १ कांहीं वस्तूबद्दल उत्कट इच्छा. २ लोभ. ३ हव्यास.

लाळ [**सं०** लाला] **स्त्री०** १ तोंडांतून गळते ती चिकट आणि बुळबुळीत थुंकी. २ गुरांना होतो तो एक मुखाचा रोग,–ज्यांत त्यांच्या तोंडांतून लाळ गळते आणि खूर सुजतात (येणें, जाणें). ॐ **कोणाची कोणेकाशीं लाळ गळणें** त्याचें त्याच्याशीं परम सख्य असणें (निंदेंत प्रयोग). **लाळ घोटणें** १ कोणापासून कांहीं वस्तु मिळविण्यासाठीं त्याची खुशामत करणें (निंदेंत). २ एकाद्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं उत्कट इच्छा बाळगणें. **लाळेनें चणे भिजवून खाणें** ज्यांणीं आपणास मान दिला पाहिजे त्यांणीं तो न दिला तरी मुकाट्यानें तो अपमान सोसून बसणें.

लाळ स्त्री० १ कणसाचें किं० गवत इ० चें कुसळ. २ कांट्याचें टोक. ३ विंचवाच्या नांगीचें टोक.

लाळणें [**म०** लाळ] **अ० क्रि०** (माणूस, गुरूं, इ० च्या) तोंडांतून चिकट मुखरस गळणें.

लाळें [**म०** लाळ] **न०** घोड्याच्या सरोसरीस किं० म्होरकीस खालच्या बाजूस एक अवयव असतो,–ज्यास जेरबंद किं० दवासन बांधतात,–तो.

लाक्षणिक [**सं०**] **वि०** १ लक्षणा नामक शब्दशक्तीनें उत्पन्न झालेला (जो अर्थ तो लाक्षणिक अर्थ). मागें 'लक्षणा' पहा. गंगेवर गौळवाडा आहे ह्या वाक्यांत 'गंगा' शब्दाचा 'गंगेचा कांठ' हा जो अर्थ तो लाक्षणिक अर्थ. २ पारिभाषिक. ३ आलंकारिक (भाषा). ४ विशिष्ट गुण दाखविणारा. ५ गौण.

लाक्षण्य [**सं०**] **वि०** दर्शक; सूचक. २ चिन्हें किं० लक्षणें ह्यांवरून ओळखतां येण्याजोगा.

लाक्षा [**सं०**] **स्त्री०** लाख. ॐ **लाक्षातरु पु०** पळस. **लाक्षाजोहर न०** पांडवांना ज्या गृहांत जाळावयासाठीं कोंडण्यांत आलें होतें तें गृह. [किं० राहाणें.

लिकटणें अ० क्रि० चिकटणें; चिकटून बसणें

लिकंडाव [**म०** लिकणें (लपणें)+डाव (खेळ)] **पु०** एकानें लपावें आणि दुसऱ्यानें त्याला शोधून काढावें हा जो मुलांचा खेळ तो.

लिकडें, लिकडेंमिकडें पुढें 'लिखडें,' 'लिखडेंमिखडें' पहा.

लिकण [**म०** लिकणें=लपणें] **स्त्री०** किल्ला, डोंगर, इ०तील लपावयाची जागा.

लिकणें [**हिं०** लिकना] **अ० क्रि०** लपणें; लपून बसणें.

लिकालिकणें अ० क्रि० १ अंधुकपणें (दिवा, चांदणी, इ०) झळकत असणें. २ मंद-पणें (दिवा) प्रकाशत असणें.

लिकाचोरी, लिकीचोरी [**म०** लिकणें+चोरी] **स्त्री०** १ चोरटें काम;गुप्तपणें केलेलें कांहीं कृत्य; चोरटा कारभार. २ गौप्य; रहस्य.

लिकीर [**म०** लिकणें] **वि०** चोरटें कारभार करणारा; आपले बेत किं० हालचाली गुप्तपणें चालविणारा किं० करणारा.

लिखडें न० अल्प किमतीचा दागिना किं० कांहीं पदार्थ. ॐ **लिखडें मिखडें न०** बारीक सारीक आणि अल्प किमतीचे दागिने.

लिखणें [**सं०** लिख्] **स० क्रि०** लिहिणें (अशिक्षितांत रूढ).

लिखन [**सं०** लिख्] **न०** १ लिहिणें. २ लिहिलेला कागद, पत्र, खत, इ०.

लिखा [**सं०** लिख्=लिहिणें] **स्त्री०** १ लेख; दस्तऐवच. २ जें लिहिलें तें. ॐ **लिखापढा, लिखापुसा पु०** दस्तऐवज, कामकाजाचीं पत्रें, लेख, इ० समुच्चयानें.

लिखित [**सं०**] **वि०** १ लिहिलेलें(पत्र, पोथी, इ०). २ काढलेलें (चित्र, नकाशा, इ०). **न०** १ लेख. २ पोथी. ३ चित्र. ॐ **लिखितार्थ पु०**

पत्र, दस्तऐवज, इ० मध्यें लिहिलेला किं० नमूद केलेला मजकूर; पत्र इ० चा सारांश किं० मतलब. **ब्रह्मलिखित न०** अमुक वेळीं अमुक घडावयाचें असें ब्रह्मदेवानें पूर्वींच लिहून ठेविलेलें भाकित.

लिखी [म० लीख=केशांतील एक क्षुद्र कीटविशेष. **सं०** लिक्षा, लिख्या=लीख; उवेचें अंडें] **स्त्री०** डोक्यांतील केशांतील लिखा खरडून काढण्याच्या उपयोगाची बारीक दांत्यांची फणी.

लिख्या वि० बारीक (डोळा).

लिंग [**सं०**] **न०** १ खूण; चिन्ह; निशाणी. २ **(वैद्यक)** रोगाचें लक्षण. ३ पुरावा. ४ **(न्याय)** तर्क; अनुमान. ५ (**न्याय**) हेतु, किं० पक्षाचे ठायीं हेतु आहे अशा अर्थाचें विधान. ६ज्ञानसाधन; वाक्यांत योजलेल्या शब्दाचा अर्थ निश्चित करावयाला संयोग, वियोग, साहचर्य, इ० रूप जो संबंध असतो तो. ८ (**मीमांसा**) अर्थ-प्रकाशनसामर्थ्य. ९ मूर्ति किं० आकार. १० **(व्याकरण)** पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग, हा जो रूढीनें ठरलेला शब्दनिष्ठ विशेष तो. ११ प्राण्यांतील स्त्री आणि पुरुष किं०नर आणि मादी हा जो भेद तो.१२पुरुषाचें शिश्न. १३ शंकराच्या शाळुंकेंत मध्यभागीं असतो जो हस्तपादाद्यवयवरहित गोल तो. १४ (**वेदान्त**) सूक्ष्मदेह; जिवाचें सूक्ष्म स्वरूप. मागें ' देह ' मध्यें ' देहद्वय, ' 'देहत्रय ' पहा. १५ (**सांख्य**) प्रकृति किं० प्रधान. १६ लिंगायत लोक शिवमूर्ति म्हणून जो खडा अंगावर धारण करतात तो. १७ वर अर्थ १६तील खड्याचा जो आधारभूत डबा इ० तो. १८ लिंगायतांच्या नांवापुढें ' लिंग' हा आदर दाखविण्यासाठीं योजावयाचा शब्द आहे; उ० दादालिंग, सदालिंग, इ०. १९ (**मराठांत**) आपल्या कार्यास नडणारें जें कांहीं तें; शुष्ककाष्ठ; झेंगट; उ० हें काय लिंग माझ्या मागें तूं लावून ठेविलें आहेस ? ❀ **लिंगविभक्ति संभाळून बोलणें** आपल्या भाषणांत चूकीचा शब्द न बोलला जाईल अशी खबरदारी बाळगून बोलणें. **लिंगकार्य न०** शब्दाच्या लिंगाप्रमाणें विशेषण, क्रियापद, इ० फिरविणें. **लिंगडा पु०** शिवलिंगाची पूजा करणारा. **लिंगदेह पु०, लिंगशरीर न०** सूक्ष्म देह; देहाचें सूक्ष्म स्वरूप. **लिंगवंत पु०** लिंगायत. **लिंगाईत, लिंगायत पु०** शिवलिंगाची पूजा करणाऱ्या लोकांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. **लिंग्या पु०** लिंगाईत (तुच्छतेंत). **शेट सव्वाशेर आणि लिंग आडीच शेर** लिंगायत मुलगा लहान आणि त्याच्या गळ्यांत खूप जड आणि लठ्ठ लिंग(वर अर्थ१६,१७पहा)ही विषमता हास्यास्पद असते. यावरून एक अति मोठा आणि एक अति लहान माणूस, पदार्थ, इ० यांच्या जुळणीची टवाळकी करावयाची असतां हें वाक्य योजतात.

लिंगडणें [**म०** लिंग अर्थ १९] **अ० क्रि०** कोणेकाच्या मागें (कांहीं अडथळा, झेंगट, किं० शुष्ककाष्ठ) लागलेलें असणें.

लिंगशा वि० आळसानें किं० सुस्तपणानें चालणारा (पशु, माणूस) किं० काम करणारा (माणूस); चेंगट्या. ❀ **लिंगस्ताई, लिंगस्थाई लिंगिस्ताई, लिंगिस्थाई स्त्री०** सुस्तपणा, मंदपणा, फाजील धिमेपणा, चेंगटाई(काम करण्यांत).

लिंगाड [**म०** लिंग अर्थ १९] **न०** १ झेंगट; लचांड; शुष्ककाष्ठ. २ पंचाईत; पेच.३कोणेकाच्या नाशासाठीं रचिलेला व्यूह किं० कट किं० केलेली मसलत. ❀ **लिंगाडी वि०** पंचाइती करणारा; स्वतामागें किं० दुसऱ्याच्या मागें झेंगटें लावून घेण्याच्या किं०लावण्याचा स्वभावाचा (माणूस).

लिंगी स्त्री० एक औषधी वनस्पति.

लिंगोरची स्त्री० मागें ' लगोरी ' पहा.

लिचंड, लिचांड, लिचंडखोर मागें 'लचांड' इ० पहा.

लिचपिचीत वि० अशक्त, कमजोर (कोणताही माणूस, पशु, पदार्थ).

लिटकणें अ० क्रि० चिकटणें; चिकटून बसणें.

लिडबिडणें, लडबडणें अ० क्रि० अशक्तपणामुळें हालणें, हादरणें, किं० कंपित होणें; कच्ची जुळणी किं० रचना झाल्यामुळें(पदार्थाचे भाग किं० अवयव) हालत असणें.

लिडबिडणें अ० क्रि० बरबटलेलें असणें (गू, चिखल, शेण, इ० नीं).**स० क्रि०** गू, चिखल,

शेण, इ० नीं (पदार्थ, अंग, इ०) माखणें किं० लिप्त करणें.

लिड्या वि० अशक्त (मूल, पशु, इ०).

लिद्‌वळ [**म०** लीद] **वि०** १ घोड्याचें शेण खाणारी किं० खावयास सवकलेली (गाय, म्हैस, इ० गुरूं). २ लाचखाऊ (अधिकारी). ३ पैशासाठीं नीच, हलकीं, किं० देशद्रोहाचीं कामें करणारा.

लिदाड [**म०** लीद] **न०** गाईम्हशींचें शेण, घोड्याची लीद, इ० चा ढीग, किं० इ० नीं ओंगळ अशी जागा.

लिपंडाव पु० मागें ' लपंडाव ' पहा.

लिंपण [**म०** लिंपणें] **न०, स्त्री०** खालीं ' लिंपणें ' मध्यें पहा.

लिपण, लपण [**म०** लपणें] **स्त्री०** लपण्याची जागा.

लिंपणें[**सं०** लिप्]**स० क्रि०**(कणिंग,डेरा, रांजण, इ० बारदानांत) धान्य इ० पदार्थ भरून त्यावर गवत, पानें, इ० आंथरून त्यावर शेण, माती, इ० थापणें (पदार्थ सुरक्षित राहावा म्हणून). शेण, माती, इ० रूप ही जी बंदिस्ती तिला ' लिंपण ' (**न०, स्त्री०**) असें म्हणतात.

लिपणें मागें ' लपणें ' पहा.

लिपि [**सं०**] **स्त्री०** १ भिंत इ० लिंपणें किं० माखणें. २ लेखन. ३ मूळाक्षरें. ४ लेखनाची कला. ५ जें लिहिलें तें; लेख. ६ चित्र. ७ कोणेकाच्या लिहिण्याची तऱ्हा किं० वळण किं० धाटणी. ❀ **देवनागिरी लिपि स्त्री०** ज्या अक्षरांनीं हा कोश लिहिला आहे किं० छापला आहे त्या अक्षरांची धाटणी. **हेमाडपंती लिपि स्त्री०** मोडी अक्षरें लिहिण्याची रीति; मोडी लिपि. **लिपिमात्र पुस्तक न०** पुस्तकाचा उपयोग त्यांत जें लिहिलें आहे त्यावर अवलंबून असतो,– कागद, शाई, इ० वर नसतो.

लिप्त [**सं०**] **वि०** १ माखलेला; सारविलेला; चोपडलेला. २ दुष्कर्मांत गुंतलेला किं० आसक्त. ३ जें पुरें केल्याशिवाय आपली सुटका नाहीं अशा कामांत अडकलेला. ४ दुष्कर्मानें दूषित.

लिप्ताळणें [**म०** लिप्ताळा] **अ० क्रि०** १ दुष्कर्म, व्यसन, इ० मध्यें गुंतलेला किं० आसक्त झालेला असणें. २ दूषित होणें. ३ विटाळणें. ४ बाधा पावणें.

लिप्ताळा [**म०** लिप्त] **वि०** १ पाप, दुष्कर्म, किं० व्यसन, यामुळें दूषित किं० कलंकित झालेला. २ दुष्कर्मांत गोवलेला. ३ कोणेकाच्या ओशाळगतींत किं० मिंधगिरींत असलेला; कोणेकाच्या उपकाराखालीं दडपलेला; ओशाळा; मिंधा; उ० मी कां तुझे निरोप पोचवीन ? मी कांहीं तुझा लिप्ताळा नाहीं. मागें ' निपतळा ' ' निपताळा ' पहा.

लिप्सा [**सं०**] **स्त्री०** १ कांहीं वस्तु मिळविण्याची इच्छा. २ इच्छा (सामान्यतः). ३ हाव; लोभ.

लिप्सु [**सं०**] **वि०** कांहीं वस्तु मिळवूं इच्छिणारा.

लिफाप [**फा०** लिफाफह्] **पु०** पत्र घालावयाची थैली (कागद, कापड, इ० ची).

लिंब [**सं०** निंब] **पु०** कडू निंब, कढी निंब, वकाण निंब, हीं झाडें. मागें ' निंब ' पहा.

लिबलिबीत वि० फार मऊ; थिलथिलीत.

लिंबलोण इ० मागें ' निंबलोण ' इ० पहा.

लिबा वि० अशक्त; कमजोर.

लिभास, लिबास [**अ०** लिबास्] **पु०** १ पोशाख किं० पोशाखाची तऱ्हा. २ भव्य किं० भपकेदार सरंजाम किं० लवाजमा. ❀ **लिबासी, लिभासी वि०** कृत्रिम; तकलोबी; दिसण्यांत मात्र भपकेदार.

लिलाम, लिलांव [**पोर्च्युगीझ**] **पु०** १ विकावयाचा जो पदार्थ त्याची जाहीर रीतीनें गिऱ्हाईकांपैकीं जो कोणी सर्वांहून अधिक किंमत द्यावयास सिद्ध असेल त्याला तो पदार्थ विकणें हा विक्रीचा प्रकार. २ ह्या प्रकारानें विकलेला पदार्थ. ३ ह्या प्रकारच्या विक्रीची किंमत. ❀ **लिलामदार, लिलांवदार पु०** वरील प्रकारानें पदार्थ विकणारा किं० विकत घेणारा इसम.

लिवका, लवका [**म०** लवणें] **वि०** लवचीक; ताठ नव्हे असा.

लिवलिवीत वि० मऊ आणि थिलथिलीत असा (चिखल, लोणी, इ०).

लिहिणें[सं०लिख्]**स० क्रि०**१लेखणी इ०साध-
नानें कागद इ०वर(अक्षर) काढणें किं०(कांहीं
चिन्हें)करणे.२ मुलाचें शिकणें किं० विद्याभ्यास
(बायकांत रूढि).❀**लिहिणें पुसणें न०ए०व०** १
लिहिणें, वाचणें, हिशेब करणें, जमाखर्च मांडणें,
इ० रूप विद्या. २ लेख; लेखपत्र. **लिहिणें
वाचणें न० ए० व०** विद्या किं० विद्याभ्यास.
लिहिलें पुसलें न० ए० व० लेखपत्र.

लिक्षा [**सं०**] **स्त्री०** १ उवेचें अंडें. २ लीख
हा क्षुद्र प्राणी. ३ खसखस. ४ त्रसरेणु हें वजन.
मागें ‘ त्रस ’ मध्यें ‘ त्रसरेणु ’ पहा.

लीख [**सं०** लिक्षा=उवेचें अंडें; खसखस;
त्रसरेणु] **स्त्री०** १ उवेचें पूर्वरूप सूक्ष्म अंडाकार
असतें तें. २ गझनी किं० वस्त्राचा रेशमी कांठ
यांत रेशीम ठासून भरलें नसल्यास मध्यें मध्यें जो
सुताचा अंश दिसतो तो.

लीद [**हिं०**] **स्त्री०** १ हत्ती, उंट, घोडा,
गाढव, इ०ची विष्ठा. २ एक वेल.

लीन [**सं०**] **वि०**१नम्र झालेला. २ निमग्न.
३ मिळून गेलेला; एकरूप झालेला. ❀ **तल्लीन
वि०** कांहीं कार्यांत अगदीं गढून गेलेला.

लीप [**लं०** लिपि] **स्त्री०** मागें ‘ लिपि’ पहा.

लीला [**सं०**] **स्त्री०** १ खेळ; क्रीडा; करम-
णूक. २ कांहीं काम करण्याचें सौकर्य किं०
सुलभपणा. ३ विलास; कामचेष्टा. **टीप,**–‘लीला’
ह्या शब्दाची ‘ लिला, ’ ‘ लिळा ’ इ० हीं अशुद्ध
किं० अपभ्रष्ट रूपें. ❀ **लीलामनुष्य पु०** मनु-
ष्याचें रूप धारण केलेला देव, सिंह, इ०. **लीला-
नट पु०** नट झालेला मनुष्य; नाटक इ० मध्यें
सोंग घेतलेला मनुष्य. **लीलोद्यान न०** १ बड्या
माणसाची विलासार्थ केलेली बाग. २ देववन.
लीलाकलह पु० लटपुटीचें भांडण. **लीलावती
स्त्री०** १ सुंदर किं० विलासी स्त्री. २ भास्करा-
चार्यांचा एक गणितविषयक ग्रंथ. **लीलेनें क्रि०
वि०** अनायासें; खेळांत जणों काय. **लीलावतार
पु०** मत्स्य, कूर्म, वराह, इ० जे दहा अवतार
विष्णूनें धारण केले ते प्रत्येक.

लुकड,लुकड, लुकडा, लुकड्या वि० कृश;
किडकिडीत; रोडका.

लुकड, लुकण, लुंकण [**हिं०** लुक्] १
मारुति, म्हसोबा, इ० च्या अंगावर शेंदूर, तेल,
इ० द्रव्यांचें मिश्रण लावितात तें. २ दगड,
लाकूड,इ० च्या सांध्यांत भरतात जें चुना,राळ,
मेण, इ० चें मिश्रण तें ३ पदार्थाला चकाकी
आणणारा एक प्रकारचा लेप किं०त्या पदार्थावर
जें पाण्यासारखें पातळ मिश्रण लावितात तें.

लुकसान, लुकसानी मागें ‘ नुकसान, ’
‘ नुकसानी ’ पहा.

लुका, लुक्का [**अ०** लुक्का] **वि०** १ धूर्त;
कावेबाज. २ व्यवहारांत पक्का वस्ताद आणि न
फसणारा आणि साधल्यास दुसऱ्यास फसविणारा.
३ दुर्दैवी माणूस; दैवहतक; उ० समुद्रास गेला
लुका तों समुद्र झाला सुका.

लुक्कड वि० रोड; किडकिडीत; कृश.

लगट न० लुगडें.

लुगडें न० स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र.

लुंगणें,लंगणें,लंघणें अ०क्रि०आजार,उपवास,
किं० काळजी, इ० मुळें अशक्त किं०रोड होणें.

लुगदी, लुगधी स्त्री०, लुगदा पु० पीठ,
चिखल,भात,इ०चा गोळा; ठेचलेला पाला, चित्रें
किं० मडकीं करण्यासाठीं कमावलेली माती, इ०
चा गोळा. [एक झाड.

लुंगर स्त्री० वड, पिंपळ, इ० च्या वर्गांतील

लुगस न० १ बाजरी, जोंधळा, राळा, इ०
चें खुरटलेलें कणीस. २ घोंगडी, बुरणूस, शाल-
जोडी, इ०चें फूल म्ह० पृष्ठभागावरील सूक्ष्म तंतु.
३ कुंचली, केरसुणी, चवरी, इ० चीं टोकें समु-
च्चयानें.४लाकडाची धलपी किं० धलपीचें कुसळ.

लुंगा पु० १ राळा, नाचणा, राजगिरा, इ०
चें किडकिडीत कणीस. २ लहान घोडा, उंट,
गाढव, इ० प्राणी. ३ लहंगा. मागें ‘ लहंगा ’पहा.

लुंगा वि० सत्त्वहीन आणि किडकिडीत
(कणीस, धान्याचा दाणा, मनुष्य, पशु, इ०).

लुगारणें, लुंगारणें, लुंगाडणें स० क्रि०
१ (मनुष्य, प्रवासी, इ० ना) लुटणें किं०
लुबाडणें. २ (पैसा, वस्त्र, पात्र, इ०) कोणे-
कापासून हिरावून किं० लुबाडून घेणें. ❀
लुगारू, लुंगारू पु० लुटारू; वाटमाऱ्या.

लुंगी [**फा०**] **स्त्री०** १ मुसलमान लोक
नेसतात ते निळें, तांबडें, किं० काळें वस्त्र. २
हिंदू पुरुष नेसतात तो पंचा, गजा, इ०. ३

मुलांची लंगोटी. ४ बाजरीच्या दाण्याच्या खालीं असतें तें टरफल. ५ सजगुऱ्याच्या दाण्यावर जें बोंड असतें तें.

लुंगू न० बाजरी इ० चें खुरटलेलें किं० लहान कणांस. [पदार्थ).

लुंघणें अ० क्रि० लुबाडणें जाणें (माणूस,

लुंघणें [म० लंघणें] अ० क्रि० १ आजार, काळजी, उपास, इ० मुळें अशक्त आणि रोड होणें. २ कष्टानें थकणें.

लुंघविणें [म० लुंघणें] स० क्रि० लुटणें (माणूस,पदार्थ).

लुचणें, लुंचणें [सं० लुंच्] अ०क्रि० (तरुण पशूनें)मातेचें दूध पिणें. **स० क्रि०** १चिमटा इ० साधनानें दाढींचे किं० नाकांतील किं० डोक्यावरील (केश) उपटून काढणें. २ फाडणें; ओरबाडणें. [पैसा इ०.

लुचपत स्त्री० अप्रामाणिकपणानें मिळविलेला

लुचपणें अ० क्रि० लंगडणें; लंगडत चालणें.

लुचर स्त्री० आंबा इ० फळांतील रेषा समुच्चयानें किं० त्यांचा रेषाळपणा.

लुचलुचणें स० क्रि० नखांनीं (कांहीं पदार्थ) ओरखडणें किं०फाडणें किं०ओरबाडणें.

लुचाडणें स० क्रि० लुबाडणें; नागविणें.

लुचाबुचा, लुचाभुंडा, लुचामुंडा वि० जेथें जो पदार्थ असतो किं० असावयास पाहिजे तेथें तो पदार्थ ज्यांत किं० ज्यावर नाहीं असा; उ० बांगड्यावांचून हात, गंधावांचून कपाळ, इ० लुचेंबुचें.

लुच्चा [हिं०] वि० लबाड; अप्रामाणिक. ॐ **लुचाई, लुच्चेगिरी,लुच्चेशाई स्त्री०** लबाडी; अप्रामाणिकपणा.

लुटणें [सं० लुच्=साल काढणें] स० क्रि० लुबाडणें; हिरावणें; बलात्कारानें हरण करणें; नागविणें. **टीप,**–ज्याचा किं० जेथून किं० जो पदार्थ घेण्यांत आला त्याचेवर कर्मता असते; उ० पेंढाऱ्यांनीं गांव लुटला; उ० चोरांनीं सर्व रोकड लुटली; उ० वाटसरांना चोरांनीं लुटलें.

लुटविणें [म० 'लुटणें' चें प्रयोजक] स० क्रि० हावा त्यानें हावा तितका पदार्थविशेष घेऊन जाण्यास परवानगी देणें; उ० साळुंका बाईनें संक्रान्तीचे वेळीं कोबीचे गड्डे लुटविले.

लटारा, लुटारी, लुटारू,[म० लुटणें] वि० लुटणारा; जबरदस्तीनें दुसऱ्याचा पैसा हरण करणारा.

लटुपुटु, लुटुफुटु, लुटुबुटु वि० गमतीखातर खऱ्याचा देखावा ज्या खोट्याला दिला आहे असा (फराळ,इ०); कल्पित; कल्पनेचा; मुलाच्या खेळांतील हा शब्द आहे; उ० आम्ही लुटुपुटु फराळ केला. 'लुटुपुटीचा' ह्याच अर्थी.

लुंठन [सं०] न०जमीन इ०वर मनुष्य, पशु, इ०चें लोळणें.

लुडकणें, लुडगणें अ० क्रि० १ आडवें होणें. २ लवंडून पडणें; कोसळणें. २ कोणेकाकडे प्रेमानें ओढलें जाणें.

लुडगी स्त्री० १ सेवनार्थ केलेला भांगेचा एक प्रकार.२झोंकाडी (खाणें, जाणें).

लुडतें न० नकासगाराचें एक हत्यार.

लुडबा वि० १ बोबडा (माणूस, मूल). २ वर्णोच्चार करण्यास असमर्थ (जीभ, ओठ, कंठ, इ०). ३ लुडबुड्या (माणूस, मूल).

लुडबुड स्त्री० १ दुसऱ्यानें बोलावलेलें नसतां त्याच्या कामात पडणें. २ दुसऱ्याला मूल इ० नीं प्रेमपूर्वक केलेली किरकोळ मदत.

लुडबुडणें अ० क्रि० १ दुसऱ्याच्या कामांत आपण मदत करूं लागणें. २ इकडून तिकडे आणि तिकडून इकडे असे हेलपाटे घालणें किं० खाणें; उ० द्रविडो लुडबुडाम्यहम्.

लुडबुड्या [म० लुडबुडणें] वि० दुसऱ्यानें बोलाविलें नसतां त्याच्या कामांत त्याला मदत करूं लागण्याच्या स्वभावाचा (निंदेत प्रयोग).

लुडमा वि० १ आखूड, तोकडा (पाय, हात, बोट, इ०). २ ज्याचा एखादा अवयव किं० भाग तोकडा आहे असा (कोणताही पदार्थ). ३ लुडबुड्या.

लुंडा वि० १ तोकडा, आखूड. २ पंगू; लुला. ३ छिन्नभिन्न (पदार्थ, गात्र, अवयव).

लुडाखुडा वि० जीर्ण; थकलेला; मोडकळीस आलेला; अशक्त. [(वृक्ष).

लुडाबुचा वि० शाखा, पानें,इ०नीं विरहित

लुतकरी स्त्री० लुगडें, धोतर, वंडी, इ०
फाटून त्याची लोंवत असलेली चिंधी.
लुतरा वि १ लघळ; वडबड्या. २ चहाडखोर.
लुप्त [सं०] वि० १ लोपलेला. २ लपलेला;
अदृश्य झालेला. ३ रद्द पडलेला. ४ वहिवाटींतून
गेलेला. ५ लिहितांना किं० बोलतांना गळालेलें
(अक्षर) किं० गळालेला (मजकूर). ॐ **लुप्त-
प्राय वि०** बहुतेक लुप्त झालेला; लुप्त झाल्या-
सारखाच; उ० विधवांचें वपन हल्लीं लुप्तप्राय
झालें आहे. **लुप्तोपमा स्त्री०** उपमा ह्या अलं-
काराचीं उपमेय, उपमान, साधारण धर्म, आणि
उपमावाचक शब्द, अशीं जीं चार अंगें त्यांपैकीं
एक किं० अधिक अंगें ज्या उपमेंत अदृश्यमान
आहेत तिला 'लुप्तोपमा' म्हणतात. उदाहरणें इ०
आमचे ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत
पहा.

लुबकणें अ० क्रि० १ कांहीं पदार्थ मिळण्या-
साठीं टपून किं० वाट पहात बसणें; उ० उंदरा-
साठीं मांजर मघापासून येथें लुबकून बसलें
आहे. २ चिकटणें.

लबरा,लुब्रा [हिं०] वि०लोकांनीं आपणास
विचारलें नसतां त्यांना उपदेश करूं जाऊन किं०
आपलें मत सांगूं जाऊन उपद्रव देणारा; दोन
माणसें बोलत असतां त्यांच्या भाषणांत भाग
घेण्याचा अधिक प्रसंग करणारा.

लुबलुब स्त्री० मुलाचें भराभर बोलणें;मुलाची
बडबड.

लुबाडणें स० क्रि० दुसऱ्याची वस्तु त्याच्या
इच्छेविरुद्ध किं० त्याची परवानगी नसतां उपटणें;
लुटणें. **टीप,**–माणूस किं०वस्तु ह्यांवर कर्मता येऊं
शकते; उ० चोरांनीं त्या मुशाफराला लुबाडलें;
उ० एका पठाणानें माझ्या खिशांतून तीन रुपये
लुबाडले.

लुब्ध [सं०] वि० १ लोभावलेला. २ माणूस
किं० पदार्थ ह्यांवर आसक्त झालेला. ३ उत्कट-
तेनें कांहीं पदार्थ इच्छिणारा. **पु०** १ पारधी. २
रंडीबाज.

लुब्धक [सं०] पु० १ पारधी. २ लोभी. ३
रांडबाज; वेश्यालंपट. ४ गुदद्वार. ५ **(ज्योतिष)**
बृहल्लुब्धक ह्या तारकापुंजांतील ' क ' हा तारा.
ह्याला इंग्रेजींत सिरियस किं० डॉग्‌स्टार्‌ म्हणतात.
हा पहिल्या प्रतीचा तारा असून अत्यंत तेजस्वी
आहे. [' रुमणें ' पहा.

लुमणी स्त्री०, लुमणें न० मागें ' रुमणी, '

लुमणें न० १ उनाड गाय, बैल, इ० च्या
गळ्यांत बांधतात तें लाकूड. २ कोणत्याही
कामांत आलेली हरकत किं० विघ्न. ३ अवाढव्य
आणि अवजड अशी कोणतीही वस्तु. पुढें
' लोढणें ' पहा.

लुलपणें [सं० लोलुप] अ० क्रि० लोभानें
आकृष्ट होणें; एकाद्या वस्तूकडे प्रेमानें ओढलें
जाणें.

लुला [हिं०; सं० लोल=हलणारा] वि० १
जन्मतः किं० रोगादि कारणामुळें व्यंग किं०
अशक्त असा (हात, पाय, मनुष्य, प्राणी, इ०);
उ० हातानें, पायानें किं० जिभेनें तो लुला आहे;
उ० त्याचा हात, पाय, जीभ, इ० लुली आहे.
२ अशक्त; कमजोर; निर्जीव. ३ म्हातारपणामुळें
किं० अन्य कारणामुळें आपलें कर्तव्य करावयाला
असमर्थ. ४ अपूर्ण; सदोष. ५ यथास्थित न चाल-
णारा; उ० माझी बायको मेल्यापासून माझा
संसार लुला पडला; उ० महात्मा गांधी पुढें आले
नसते तर लोकमान्यांनीं सुरू केलेलें देशकार्य
लुलें पडलें असतें. ॐ **लुलापांगळा वि०** मनानें
किं० एकाद्या गात्रानें अशक्त, कमजोर, निर्वीर्य,
किं० निरुपयोगी.

लुलाय, लुलाप [सं०] पु० रेडा; टोणगा.
ॐ **लुलायवाहन पु०** यम.

लुलावणें [म० लुला] अ० क्रि० १ (हात,
पाय, इ० गात्र) अशक्त होणें किं० आपआपलें
कर्तव्य करावयाला असमर्थ होणें. २ अशक्त किं०
कमजोर होणें. ३ दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुड
करून त्याला उपद्रवकारक होणें.

लुलित [सं०] वि० १ खिळखिळें झालेलें;
२ चिरडलेलें; कुसकरलेलें. ३ कोमेजलेलें. ४ढवळलेलें.

लुलपत्, लुलपुत्, लुल्लुपू स्त्री० कोणे-
काला वश करून घेण्यासाठीं त्याला दादा बाबा
करणें किं० त्याचीं आर्जवें करणें.

लुल्ल वि०दारूनें झिंगलेला;कैफ इ०नीं बेहोष
झालेला; गुल्ल.

लुवलुवणें अ० क्रि० १ (मुलाच्या जिभेनें) बोलण्याचा प्रयत्न करणें. २ (ढेकूण, पिसवा, इ०) अंगावर चालणें किं० सरपटणें.

लुसकान, लुसकानी मागें 'लुकसान,' 'लुकसानी,' 'नुकसान,' 'नुकसानी' पहा.

लुसलुशीत वि० मऊ आणि टवटवीत; अतिशय कोंवळा.

लुसलुसणें अ० क्रि० १ एकाद्या वस्तूबद्दल अतिशय उत्कंठित होणें. २ तजेलेदार किं० टवटवीत असणें किं० दिसणें.

लुहंगी, लोहांगी, लोहांगीकाठी स्त्री० पुढें 'लोहंगी' पहा. मागें 'लव्हांगा' पहा.

लुळणें [सं० लुल्] अ० क्रि० लोळणें.

लुळा वि० मागें 'लुला' पहा. ❀ **लुळाखुडा** वि० म्हातारपणामुळें किं० अन्य कारणामुळें अशक्त,कमजोर,किं०निर्वीर्य झालेला(माणूस,पशु, पदार्थ). **लुळापांगळा** वि० मनानें आणि शरीरानें पंगू किं० अशक्त किं० निर्वीर्य.

लुळी, लोळी [म० लोळणें] स्त्री० श्रम, झोप,थकवा,इ० मुळें मूल,माणूस,पशु,यांना जमीन इ० वर लोळण्याची इच्छा (येणें).

लुळें न० १ बाजारबुणगे; वात्रट,टवाळ, किं० मवाली लोकांचा समुदाय, दाटी, किं० गर्दी. २ दुकानदार, गिऱ्हाईक, व्यापारीमंडळी, सट्टेबाज लोक,इ०ची गर्दी.३ तमाशा, मारामारी, भांडणें, इ० चाललेलीं असतां गोळा होतात ते लोक समुच्चयानें.

लू, लूक,लूख स्त्री० उन्हाचा तडाखा; उ० सूर्याच्या चंडकिरणांमुळें लुकानें पुष्कळ लोक बेशुद्ध होऊन पडूं लागले.

लूट [म० लुटणें] स्त्री० १ लुटण्याची क्रिया. २ लुटण्यानें मिळालेलें जें कांहीं तें;उ०मोगल दरदरवडेखोरांनीं हिंदुस्तानांतून पुष्कळ लूट नेली. ३ सढळपणानें केलेला खर्च, गरीबांना घातलेलें जेवण, दिलेलें दान, इ०. ४ आंबे, पेरू, तांदूळ, इ० पदार्थांची कोणेक स्थळीं किं०काळीं झालेली समृद्धि किं० विपुलता. **लूटलबाड** स्त्री० लूट किं० लुबाडणी.

लूत स्त्री० मनुष्य, कुत्रा, इ० प्राण्यांस होत असतो तो एक प्रकारचा त्वचेचा रोग. २ सुरणाच्या झाडासारखें एक औषधोपयोगी झाड. त्याच्या फुलाला 'शेवाळें' म्हणतात.

लेक पु० कोणेकाचा मुलगा किं० पुत्र. स्त्री० कोणेकाची मुलगी किं० कन्या. ❀ **लेकपूत** पु०, **लेकबाळ** पु०, न० मूलबाळ; मूलबाळ (लिंग मनांत न आणतां). **लेकवळा** पु० रांडेचा किं० रखेलीचा मुलगा. **लेकवळी** स्त्री० रांडेची किं० रखेलीची मुलगी.**लेकवळें** न०रांडेचें किं०रखेलीचें अपत्य,–लिंगाचा विचार न करतां.

लेकरूं न० मूल (प्रेमानें किं० अनुकंपेनें). ❀ **लेकरालेकरीं** क्रि० वि० वाडवडिलांपासून (चालत आलेलें वतन, हक्क, इ०). **लेकरेंबाळें** न० अ० व०, **लेकरूंबाळ** न० मुलेंबाळें; मुलें विलें. **लेकुरछंद** पु० १ मुलांत मिसळण्याची आवड; मुलांचा शोक. २ पोरकट नाद.

लेकुरवा वि० पोरकट. **लेकुरवाला (–ळा)** पु० ज्याला मुलेंबाळें आहेत असा पुरुष. **लेकुरवाली (–ळी)** स्त्री० जिला मुलेंबाळें आहेत अशी स्त्री.

लेख [सं०] पु० १ जें लिहिलें किं० लिहिण्यांत आलें आहे तें. २ दस्तऐवज; लिहिलेला कागद. ३ एक, दोन, इ० चे पाडे मुलें जे शिकतात ते प्रत्येक. ❀ **लेखपत्र** न०, **लेखपूस** पु० कांहीं करार, व्यवहार, इ० करतांना उभयपक्षांना किं० एकाच पक्षाला जो बंधनकारक ताकीदपत्र, दस्तऐवज, कर्जखत, सनद, इ० लेख केलेला असतो तो. **लेखापुढीं** क्रि० वि० लिहिण्यांत किं० नमूद करण्यांत (आलेला करार इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें 'तोंडातोंडीं,' 'तोंडावाटें,' 'तोंडोंतोंडी'

लेखक [सं०] पु० १ लिहिणारा. २ लिहिण्याचा धंदा करणारा. ३ दुसऱ्याच्या सांगीवरून लिहिणारा. ४ ग्रंथकर्त्यानें सांगितलेला मजकूर जेव्हांच्या तेव्हां आणि सांगितल्याबरहुकुम लिहिणारा कारकून.

लेखणी [सं०] स्त्री० शाईनें कागद इ० वर लिहिण्याचें बोरू, कांबटी इ० चें केलेलें साधन. 'लेखण,' 'लेखनी,' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.❀ **तो लेखणीचा बहाद्दर आहे. त्याची लेखणी खबरदार आहे, तो लेखणीचा पुरा** (किं०

थड) आहे, त्याच्या लेखणीस चंग बांधला आहे १.तो उत्कृष्ट लिहिणारा आहे. २ त्याच्या लिहिण्यांत चुकी होत नाहीं. २ त्याचें अक्षर उत्तम वळणदार आहे.

लेखणें [**सं०** लिख्] **स० क्रि०** १ मानणें; समजणें; गणणें. २ कोणेकाला त्याच्या योग्यते-प्रमाणें मान देणें. ३ आदरास पात्र समजणें. ४ लिहिणें.

लेखन [**सं०**] **न०** १ लिहिणें. २ जें लिहिलें तें. ३ लिहिण्याची तऱ्हा किं० शैली. ४ चित्र, नकाशा, इ० काढणें किं० रेखादींनी निर्मिणें. ॐ **लेखनाडंबर न०** १ पुष्कळ लिहिणें. २ लांब-लचक पत्र इ० लिहून वाचणाऱ्यास त्रास देणें किं० आपल्या लेखनपटुत्वाची ऐट मिरविणें. **टीप,**–पत्र इ०चा शेवट करतांना पुढीलप्रमाणें हा शब्द योज-तात; उ० कळावें ही विज्ञप्ति, लेखनाडंबर कशास पाहिजे ?

लेखनी [**सं०**] **स्त्री०** वर ' लेखणी ' पहा.

लेखा [**सं०** लेख] **स्त्री०** १ हिशेब; गणती. २ माणूस, पदार्थ, इ० चीं योग्यता किं० महत्त्व किं० परवा; उ० मला तुझ्या दहा रुपायांची चिर्ची लेखा ? ३ कोणत्याही व्यवहारासंबंधाचा आपलें म वर ' लेख ' मध्यें अर्थ ३ पहा.

माणसें बोलुशों मागें ' लेख ' मध्यें पहा.

घेण्याचा अ० क्रि० खचणें; दबणें; दबकणें.

लुबःपेचा वि० अशक्त; कमजोर; निर्वीर्य.

बद्दल**जीम** [**फा०**] **स्त्री०, न०** लाकडाच्या ड्याच्या दोन टोकांना सांखळी बसवून व्याया-मासाठीं केलेलें तालीमखान्यांतील एक साधन.

लेटणें [**हिं०** लेटना] **अ० क्रि०** विश्रांति इ० साठीं जमीनीवर आडवें अंग करणें.

लेंड [**सं०**] **न०** १ लेंडूक. २ मनुष्य, कुत्रा, मांजर, इ० च्या विष्ठेचा गोळा. ॐ **लेंडसुखास येणें** लहान मूल इ० चें प्रेम करतां करतां अत्यन्त तल्लीन होऊन देहभान विसरणें.

लेंडकी स्त्री० चरकांत घालून पिळून काढ-लेला ऊस. ॐ**लेंडक्या,लेंडकवळ्या,लेंडूकवळ्या पु०**चरकांत पिळून काढलेल्या उसांचा ताटें दुसऱ्या बाजूकडून ओढून घेणारा मनुष्य.

लेंडपेंड पु०, न० दागिने इ० नटण्याच्या उपयोगाचे पदार्थ समुच्चयानें.

लेंडी [**सं०** लेंड]**स्त्री०**१ घोडा, उंट, बकरी, घूस, उंदीर, इ० च्या विष्ठेची लहान गोळी. २ घोड्याचें खोगीर पुढें सरकूं नये म्हणून त्याला बांधतात जो शेपटीच्या खालून घातलेला पट्टा तो. ३ खोगिराच्या पुढच्या अंगास जो घोरबंध असतो तो. ४ वांझोट्या ताडाला शेंगेसारखा एक लांब अवयव येत असतो तो. ५ मखमलीचें एकेरी फूल. ॐ **लेंड्या गाळणें** (**किं० टाकणें किं० हगणें**) भयानें गर्भगळित होणें. **लेंडीच्याक स्त्री०** धनधान्यादींची समृद्धि (अशिक्षितांत रूढि). **लेंडी प्रसाद पु०** चाबूक किं० छडी मारतांच हगणारा घोडा (तुच्छतेत). **लेंड्याताड पु०** ज्यावर फळें येत नाहींत, फळांचें जागीं नुसत्या लेंड्याच येतात असा ताड; नरताड.

लेंडूक [**सं०** लेंड] **न०** मनुष्य, कुत्रा, इ० ची केळ्याच्या आकारासारखी पडलेली विष्ठा.

लेंडूकवळ्या मागें ' लेंड ' मध्यें 'लेंडकवळ्या' पहा.

लेंड्याताड मागें ' लेंडी ' मध्यें पहा.

लेणदेण [**हिं०** लेनादेना] **स्त्री०** देणें, घेणें, इ० रूप व्यवहार (व्यापाऱ्यांच्या भाषेंत).

लेणें स० क्रि० १ डोळ्यांत (काजळ) घालणें, कपाळावर (कुंकूं) लावणें, अंगावर यथास्थानीं (दागिने) घालणें. २ (लुगडें इ०) नेसणें. **टीप,**– भूत काळीं ह्या क्रियापदाचा कर्तरि प्रयोग होतो; उ० मालिनी खानम् लहंगा ल्याली.

लेणें न० १ शरीराला शोभा देणारा कोण-ताही पदार्थ,–दागिना, कुंकूं, काजळ, इ०. २ चैत्र महिन्यांत गौरीच्या उत्सवांत भिंतीवर गोपुर इ० चें चित्र काढतात तें. ३ डोंगर पोख-रून त्यांत कोरून करतात जो सभामंडप इ०तो. ह्यांना ' पांडवलेणें ' असेंही म्हणतात.

लेथडणें स० क्रि० शेण, माती, राख, खर-कटें, इ० नीं (भांडें, अंग, इ०) माखणें किं० लिप्त करणें.

लेप [**सं०**] **पु०** १ सारविणें; माखणें. २ अंगाला लावितात ती चंदन इ० ची उटी. ३ चुना, चिखल, इ० चा भिंत इ० वर केलेला गिलावा. ४ भात, भाजी, इ०चा हात,भांडें, इ०

ना चिकटून राहिलेला अंश. ५ दुखणारें किं० ठणकणारें गात्र इ० वर झाडाचीं पानें इ० चा ठेचा बांधतात तो. ❀ **लेपवणी न०** खरकटीं भांडीं ज्यांत धुतलीं आहेत असें पाणी. **लेपवळ स्त्री०** भोजनानंतर जमीनीवरची उष्टीं काढण्याच्या पूर्वीं ताटें, वाट्या, पत्रावळी, इ० राहिलेल्या असतात त्या समुच्चयानें. **लेपाटा पु०** भिंत इ० वर दांडगाईनें किं० ओबडधोबड रीतीनें केलेला चिखल इ० चा थर किं० गिलावा किं० सारवण.

लेप पु०, लेपडी स्त्री०, लेपडें न० वस्त्राच्या खोळांत कापूस इ० चा पातळ थर घालून टांके मारून बसण्यासाठीं किं० पांघरण्यासाठीं जो पदार्थ करतात तो; सुजनी.

लेपणें [**सं०** लिप्] **स० क्रि०** १ शेण, माती, गंध, रंग, इ० नीं (भिंत, अंग, जमीन, इ०) माखणें किं० सारविणें. २ (शेण, माती, रंग, इ० नीं) जमीन, अंग, भिंत, चित्र, इ० सारविणें किं० माखणें.

लेपन [**सं०**]**न०** १लेपण्याची क्रिया.२चुना,रंग, शेण,इ०जें फासावयाचें किं० लेपावयाचें द्रव्य तें.

लेपाळणें [**म०** ' लेपणें ' चें एक रूप]**स० क्रि०** माखणें; सारविणें. वर ' लेपणें ' पहा.

लेपाळा [**म०** लेपाळणें] **पु०** हात, भांडें, इ० ना लागलेलें किं० चिकटलेलें जें तेल, तूप, खरकटें, इ० त्यांचा थर (जमणें, बसणें, लागणें, इ०).

लेफडा पु० १ सारवणाचा पट्टा. २ कपाळावर गंध,कुंकू,इ०चा ओढलेला मोठा पट्टा किं०फराटा.

लेबडा, लेभळा मागें ' नेभळा ' पहा.

लेंभडणं, लेभणें अ० क्रि० आजार,अतिकष्ट, चिंता, अपुरें जेवण, इ० मुळें रोड होणें किं० थकणें.

लेभागू [**हिं०** लेना (घेणें) + भागना (पळून जाणें)] **पु०** दुसऱ्याचा पदार्थ उचलून घेऊन पळून जाणारा भामट्या, कुत्रा, इ०.

लेंभें न० लफडें; झेगट; भांडणाचें कारण; वादाचा विषय.

लेलाम, लेलांव मागें ' लिलाव ' पहा.

लेलिह [**सं०**] **पु०** १ पोटांतील जंत. २ सर्प. ❀ **लेलिहमुद्रा स्त्री०** तंत्राच्या चौसष्ट हजार मुद्रा किं० संस्थानें ह्यांपैकीं एक.

लेलेमजनू [**फा०** लैली+मज्‌नून] **पु०** गरीब, अनाथ, आणि हतभाग्य असा माणूस. **टीप,**–शिमग्याच्या सणांत लैली आणि मजनून ह्या आधुक माशुकांच्या हतभाग्य स्थितीचें एका फारशी काव्यांतील संविधानकावर बसविलेलें नाटक तमासगीर करतात किं० करीत असत त्यावरून ' लेलेमजनू ' चा वरील प्रमाणें अर्थ अडाण्यांत रूढ झाला. [चें जोडपें.

लेवट न० मैथुनार्थ जुळलेलें सर्प, कुत्रा, इ०

लेवट, लेवा, लेप पु० शेताची जमीन भाजण्यासाठीं पसरलेला काटक्याकुटक्या, गवत,पानें, इ० चा थर.

लेवट पु०, न० कापसाचें विणून बनविलेलें दडदडीत आणि जाडी वस्त्र.

लेवणू [**नंदभाषेंत**] **वि०** पाऊण हें परिमाण.

लेवणें स० क्रि० (भाजावयाच्या शेतजमीनिवर)काटक्याकुटक्या,गवत,पानें, माती, इ० चा थर करणें. **लेवणें न०** असा केलेला थर.

लेवा [**सं०** लेप] **पु०** चिखल, चुना, औषधींचा रस, काष्ठाचें उगाळलेलें गंध, इ० शरीर, भिंत, इ० कांवर सारवून झालेला किं० केलेला थर.

लेवाडा (**–ड्या**) **वि०** ज्याला गालें सफाईनें किं० जोरानें हालवितां येत नाहींत असा अशक्त, कमजोर (माणूस किं० त्याचें तसें गात्र). नेभळा.

लेवा देवा पु०, लेवदेव, लेवादेवी स्त्री० [**हिं०**]देणें घेणें इ० रूप कोणेकाचा कोणेकाशीं असलेला संबंध किं० व्यवहार.

लेश [**सं०**] **पु०** १ अल्पांश; अत्यन्त थोडें परिमाण. २ अल्पत्व. ३ दोन कला हा कालाचा अवधि. **टीप,**–अठरा निमेष म्ह० एक काष्ठा; दोन काष्ठा म्ह० एक लव; पंधरा लव म्ह० एक कला; दोन कला म्ह० एक लेश.

लेश. लेस [**हिं०**लेस] **वि०** सर्व अंगांनीं, उपांगांनीं, किं० सर्व बाजूंनीं सिद्ध किं० तयार झालेला किं० असलेला (माणूस, पदार्थ,काम).

लेशपंड, लेसपंड, लेसट न० १ अपूर्ण काम

किं० कारभार. २ लचांड; शुष्ककाष्ठ. ३ पंचाइतीची किं० पेचाची स्थिति.

लेसट [**सं०** लेश; **म०** लेश] **न०** १ तेल, तूप, जेवलेलें अन्न, इ०चा हात, भांडें, जमीन, इ० ना चिकटून राहिलेला अवशेष.२लेशपंड. मागें लेशपंड 'पहा. **वि०**अपूर्ण,अर्धवट,निकालांत न निघालेलें किं० न काढलेलें (काम, कारभार, वाद, इ०).

लेसाटा वि० किडकिडीत; रोड.

लेह [**सं०**] **पु०** १ चाटणें ही क्रिया. २ चाटून खावयाचा पदार्थ,–औषध, मेथकूट, रायतें, इ०. ३ ग्रहण लागण्याचा एक प्रकार.

लेहन [**सं०**] **न०** १ चाटण्याची क्रिया. २ जें चाटावयाचें तें,–मेथकूट, औषध, इ०.

लेह्य [**सं०**] **वि०** चाटावयाचें किं० चाटून खावयाचें (औषध, मेथकूट, इ०). **न०** चाटून खावयाचा कोणताही पदार्थ.

लै [**म०**लई, ल्य] **वि०** पुष्कळ, बहुत. ॥ **लैलूट स्त्री०** मागें ' लईलूट ' पहा.

लोइली,लोयली स्त्री० गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर,

लोक [**सं०**] **पु०** १ मानवी प्राणी समुच्चयानें. २ मानवी प्राणी एक एक(प्रयोग **अ०व०**); उ० लोक हसतील असें कांहीं करूं नये; उ० उ० चरक्याचें महत्त्व सर्व लोकांस पटलें आहे. ३ एका विशिष्ट देश, प्रांत, इ० तील व्यक्ति (प्रयोग **अ० व०**); उ० हिंदू लोक, चिनी लोक, इ०. ४ एकादा विशिष्ट पंथ, जात, संस्था, संप्रदाय, धंदा, इ० तील व्यक्ति; (प्रयोग **अ० व०**); उ० वैष्णव लोक, महानुभावी पंथाचे लोक, महार लोक, सोनार लोक, इ०. ५ मनुष्य, देव, दैत्य, गंधर्व, अप्सरा, इ० पैकीं प्रत्येकांचा समूह. ६ इंद्र,ब्रह्मदेव, विष्णु,इ०चें वसतिस्थान; उ० इंद्रलोक, ब्रह्मलोक, इ०. ६ वसतिस्थान (सामान्यतः); उ० अधोलोक, ऊर्ध्वलोक, स्वर्गलोक, भूलोक, इ०. ७ विशिष्ट काम, कारभार, इ० साठीं नियुक्त जीं माणसें तीं; (प्रयोग **अ० व०**). ८ परकीं माणसें (प्रयोग **अ० व०**); उ० माझी मसलत लोकांत कळूं देऊं नको. ९ प्रजाजन; रय्यत(प्रयोग **अ० व०**); उ० लोकांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष्य करणारा राजा मूर्तिमंत सैतान होय. ॥**लोकातिग, लोकाधिक वि०**अलौकिक, असामान्य. **लोकाधिप पु०** १राजा. २देव. **लोकांतर न०** परलोक. **लोकापवाद पु०** टपका; जननिंदा. **लोकालोक पु०** सप्त द्वीपात्मक पृथ्वीस तटबंदीसारखा आहे तो पर्वत. **लोकेश पु०** १ राजा. २ ब्रह्मदेव. **लोकोक्ति स्त्री०** १ म्हण. २ ज्यांचा रूढ अर्थच घ्यावयाचा,शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं, असे शब्द समुच्चयानें;उ० डोळ्यांत तेल घालून बसणें,डोळ्यांत राख घालणें, मूग गिळणें, इ०. ३ (**साहित्य**) ज्या वाक्यांत वरचा अर्थ २ चा वाक्प्रचार आहे म्हणून ज्या वाक्याला चारुता प्राप्त झाली आहे असें वाक्य;उ० हरिच्या पुन्हा पुन्हा कां काड्या नाकांत घालिशी शशका ? **लोकैषणा स्त्री०** १ लोकांनीं आपणास बरें म्हणावें, हसूं नये, अशी इच्छा. २ स्वर्गादि लोक आपणास मिळावा अशी इच्छा. **लोककंटक पु०** दुष्ट मनुष्य; कुकर्मी. **लोकचक्षु, लोकनेत्र, लोकलोचन पु०** सूर्य. **लोकजित् पु०** गौतमबुद्ध. **लोकत्रय न०, लोकत्रयी स्त्री०** स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ समुच्चयानें. **लोकपाल पु०** १ राजा. २ अष्ट दिशांचे स्वामी प्रत्येक. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टदिशा ' आणि 'अष्टदिक्पाल' पहा. **लोकप्रवाद पु०** वदंता; अफवा. **लोकबंधु, लोकबांधव पु०** सूर्य. **लोकबाह्य वि०**१ लोकांची रीति सोडून वागणारा. २ वाळींत टाकण्यांत आलेला; बहिष्कृत. **लोकयात्रा स्त्री०** १ जगाचा व्यवहार. २ लोकाचार. ३ इहलोकचें आयुष्य. **लोकविश्रुत वि०** १ सर्वांस ठाऊक असलेलें. २ जगांत प्रसिद्ध; विख्यात. **लोकसंग्रह पु०** १ लोककल्याण. २ जगाचें धारणपोषण. ३ सर्व लोकांस अनुकूल करून घेणें. **लोकसाक्षिक क्रि० वि०** सर्व लोकांच्या समक्ष. **लोकसिद्ध वि०** प्रघातांतील. **लोकस्थिति स्त्री०** जगाची सुव्यवस्था. **लोक आणि ओक** लोकांचें मत किं० टीका ओकीप्रमाणें त्याज्य होय. **लोकधार्जिणा वि०** १ लोकांच्या उपयोगीं पडण्याच्या स्वभावाचा. २ लोकांचीं कामें करून स्वतःचीं कामें न करणारा. **लोकमान्य वि०** लोकांना मान्य किं०आदरणीय(चाल,रीति,इ०).

पु०बाळ गंगाधर टिळक हे देशभक्त. **लोकभाषा** **स्त्री०**सामान्य जनांची भाषा,–ह्याच्या व्यावर्तकत्वें विद्वानांची भाषा. **लोकलज्जा स्त्री०**लोक आपणाला काय म्हणतील हा विचार. **लोकसंपादणी स्त्री०** लोकांची कृपा किं० आदर संपादणें. **लोकापवाद पु०** लोकांनीं केलेली निंदा. **लोकांलोकीं क्रि० वि०** १ तिऱ्हाइतांकडून; तिऱ्हाइतांमार्फत. २विशेष पुरावा नाहीं अशा प्रकारें;उ० ही खबर मी लोकांलोकीं ऐकिलेली आहे, तिच्या वर किती भरंवसा ठेवावयाचा हें तुमचें तुम्ही ठरवा. **लोकलोकपाळ पु० अ० व०** बडे सरदार, बडे लोक, अधिकारी पुरुष, त्यांचे नोकर चाकर आणि आश्रित, इ० लोक.

लोकर स्त्री० मेंढरें इ०च्या अंगांवरील केश समुच्चयानें.

लोखंड [**सं०** लोह] **न०** एक खनिज धातु; लोह. ह्या धातूचे तरवार, पहार, इ० असंख्य उपयुक्त पदार्थ करतात. ꙮ **लोखंड काम न०** १ पेटी, दार, यंत्र, इ० मध्यें जे लोखंडाचे भाग बिजागऱ्या, खिळे, इ० लागतात ते समुच्चयानें. २ लोहाराचें काम. **लोखंडा वि०** १ लोखंडाचा बनविलेला. २ लोखंडा संबंधाचा. ३ लोखंडासारखा टणक, मजबूत, कणखर, (प्रकृति, हाडपेर, लाकूड, इ०). ४ फार आग करणारा ज्वर. **लोखंडी स्त्री०** १ लोखंडाची कढई. २ एक वेली. **लोखंडी कडबा पु०** अरगडी जातीच्या जोंधळ्याचें ताट. **लोखंडी काव स्त्री०** काव ह्या नांवाची तांबडी माती. **लोखंडी चुना पु०** मजबूत आणि टिकाऊ चुना किं० अशा चुन्याची रचना किं० अशा चुन्यानें केलेलें कांहीं काम. **लोखंडी जर पु०** खोटा जर. **लोखंडी रस्ता पु०** आगगाडीसाठीं रूळ घालून केलेला मार्ग.

लोंग, लोंगी, लोंघ स्त्री० भात, गहूं, राळा, वरी, इ० धान्याचें कणीस.

लोंगर [**म०** लोंग] **न०, पु०** १ केळीच्या झाडाला येतो तो केळ्यांचा घड. २ मोठा लोंग ह्म० कणीस. वर ' लोंग ' पहा.

लोंघळाविणें स० क्रि० चिखल, राख, माती, इ० मध्यें (वस्त्र) लोळविणें.

लोचका, लचका पु० चिखल, पीठ, मांस, इ० चा तोडून काढलेला तुकडा. मागें 'लचका' पहा.

लोचट, लोचड [**म०** लवणें] **वि०** १ चिवट, लवकर फाडून किं० तोडून जिचा तुकडा काढतां येत नाहीं अशी (भाकरी, पोळी, जिलबी, इ०). २ कितीही झिडकारलें किं० रागें भरलें तरी जो लगट करावयास किं० बोलावयास येतो असा निर्लज्ज (मनुष्य).

लोचण स्त्री० न्हाव्याचा केश उपटण्याचा चिमटा.

लोचन [**सं०**] **न०** १ पाहाणें. २ निरेखणें. २ डोळा,–बघण्याचें इंद्रिय.

लोंचा पु० निकालांत न निघालेला वाद,तंटा, कर्ज, हिशेब, इ०.

लोंजारणें स० क्रि० (मूल, घोडा,इ० चे) लाड करणें किं० (त्यांना) गोंजारणें.

लोट [**म०** लोटणें] **पु०** १ पाणी, वारा, माणसें, गुरें, पक्षी, इ०चा एकदम आणि जोरानें आलेला मोठा प्रवाह, समुदाय, किं० टोळी. २ गतिमान पदार्थाच्या गतीचा किं० वेगाचा जोर. ३ गतिमान पदार्थानें दिलेला धक्का किं० ह्या धक्क्याचा जोर. ४हरएक प्रकारचीं कामें,काळज्या, जबाबदाऱ्या, इ० चें मनावर पडलेलें दडपण. ५ आंबे, फणस, इ०ची ऋतुविशेषांत झालेली समृद्धि किं० वैपुल्य. ꙮ **लोटगाडा पु०** आंत सामान भरून ढकलीत न्यावयाची हातगाडी.

लोटण [**हिं०**] **पु०** एक प्रकारचें खबूतर.

लोटणें [**सं०** लुट्] **स० क्रि०** (पदार्थ) जोरानें पुढें ढकलणें किं० सारणें. २ जमीनविरून (दगड, चाक, इ०)त्याच्या आसाभोंवतीं फिरवित ढकलणें किं० पुढें सारणें. ३ खिडकी, दार, झडप, इ० बंद करण्यासाठीं चौकटींत ढकलणें. ४ (दिवस, काळ) घालविणें किं०अतिक्रान्त करणें. ५ (खाद्य, पेय, औषध, इ०) घशाखालीं घालणें (नाखुषीनें किं० आधाशीपणानें). **अ० क्रि०** १ ढकललें जाणें. २ जोरानें येणें किं०घुसणें किं० वाहणें. ३ (काळ) अतिक्रान्त होणें.४ (माणसें, गुरें, बाजारांत माल, इ०) पुष्कळ संख्येंत किं० प्रमाणांत येणें, जाणें, किं० जमणें. ५ लोळणें. ६ (भिंत, घर, इ०) कोसळणें किं० ढासळणें किं०

उलथून पडणें. ७ डोळ्यांतून (अश्रु) जोरानें किंवा पुष्कळ गळणें.

लोटपोट [म० लोटणें] **स्त्री०** १ लोळण. २ बेसुमार मौज, आनंद, हशा, खिदळणें, इ० चाले किंवा क्रीडा. ३ पूर्ण तृप्ति किंवा समाधान. ४ कसें वसें केलेलें काम किंवा कसेंबसें काम रेटण्याची क्रिया. ५ वैपुल्य; चंगाळी. ६ नृत्य,गीत,वक्तृत्व, इ० पाहून किंवा ऐकून कोणेकाचीं होते ती तल्लीनता, करमणूक, किंवा एकाग्रता.

लोटा, लोट्या [हिं० लोटा] **पु०** आकारविशेषाचें मातीचें किंवा धातूचें पात्र. **लोटी स्त्री०** आकारविशेषाचें धातूचें पात्र. ꠰ **लोटाबाडगी स्त्री०,लोटावासन न०**१ स्वयंपाकास किंवा इतर हरएक कामास लागणारीं भांडीं समुच्चयानें. २ह्या भांड्यांची जुळवाजुळव इ० रूप स्वयंपाकाची पूर्व तयारी.

लोटांगण [म० लोटणें] **न०** १ देवापुढें किंवा साधु पुरुषापुढें किंवा राजा इ०पुढें नम्रपणानें लोळणें (घालणें) किंवा पालथें पडणें. २ मनुष्य, पशु,पदार्थ,इ० कोलमडून किंवा ढासळून पडणें.

लोटालाटी [म० लोटणें] **स्त्री०** १ एकमेकांनीं एकमेकांस लोटणें किंवा ढकलणें. २ एकमेकांवर कामाची कोलाकोली. ३ काम कसेंबसें करणें किंवा तें चालढकलीवर नेणें.

लोठा, लोठ्या, वि० लठ्ठ किंवा अगडबंब (माणूस, लाकूड, पशु, किंवा कोणताही पदार्थ). ꠰ **लोठाश्रम पु०** १ कोणीही अगडबंब माणूस; धटिंगण. २ ज्याच्या मागें बायको, मुलें, संसार, इ० कांहीं व्याप नाहीं असा माणूस.

लोड न०,पु०,लोढ पु०१टेकावयासाठीं केलेला लांब आणि वाटोळ्या आकाराचा पदार्थविशेष; लांबोडा तक्या. २ एक प्रकारची तुरपून घातलेली शिवण. ३ सुताराच्या सामत्याचा लाकडी भाग. **न०** पाभर, कुळव, इ० आउतांस एक अवयवभूत आडवें लाकूड असतें,—ज्यांत जुंवाचा दांडा अडकवितात, तें. [हत्यार.

लोडणें न० सुतार इ० चें कोरकामाचें एक

लोढणें स० क्रि० (कापसांतून) सरकी काढणें. ꠰ **लोढाई स्त्री०** कापसांतून सरकी काढणें किंवा ह्या कामाबद्दलची मजूरी.

लोढणें न०, लोढणा पु० १ नाठाळ गाय, म्हैस, इ० च्या गळ्यांत बांधतात तें लाकूड. २ आपणाला अप्रिय असें माणूस किंवा काम जें आपल्या पाठीस लागलेलें असतें तें. ३ बेढब आणि जड असा दागिना इ०.

लोंढा पु० १ एकदम जोरानें वाहात येणारा किंवा आलेला पाण्याचा प्रवाह; पूर. २ मोठी आणि जोराची पाण्याची लाट. ३ कोणत्याही धान्यें, फळें,इ०पदार्थांची बाजार, शेत, इ० मध्यें एकदम झालेली समृद्धि. ४ गांव, देश, इ० वर धाड घालावयासाठीं परगांवाहून किंवा परदेशांतून आलेली लुटारूंची टोळी. ५ यात्रा इ० प्रसंगानें एकाद्या स्थळीं एकदम गोळा झालेले पुष्कळ लोक. ꠰ **लोंढ्याबरोबर वाहात जावें लागतें** समाजांत रूढ असलेल्या किंवा होत चाललेल्या सरणीनें प्रत्येकाला वागावें लागतें,—स्वताची वैयक्तिक इच्छा किंवा मत हीं उलट असलीं तरी.

लोण [**सं०** लवण] **स्त्री०** १ खाऱ्या पाण्याच्या शेजाराला उगवणारें एक प्रकारचें गवत. २ जमीनींतील क्षाराचा अंश. ३ मीठ. ꠰ **लोणट न०**अर्थ १चें गवत जेथें विपुल उगवतें अशी जमीन.

लोण न० आट्यापाट्यांच्या खेळांत सगळ्या पाट्यांतून निघून जाऊन पलीकडची थोडीशी माती परत आणणें किंवा अशी परत आणलेली माती (आणणें, येणें, देणें). अशी माती आणली म्हणजे डाव जिंकला असें समजण्यांत येतें. ꠰ **लोण बारगळणें** एखादा नियम उल्लंघिल्या कारणानें निरुपयोगी होणें किंवा फुकट जाणें. **टीप**,—आट्यापाट्यांच्या खेळांत खालून वर येणारा गडी पाटीवाल्यापाशीं तोंड मागतो त्यावेळीं वरचे गडी खाली जातात. अशा रीतीनें खालून येणारे गडी आणि वरून येणारे गडी यांची एका चौकांत गांठ पडणें याचें नांव ' तोंड मिळणें ' किंवा ' लोण मिळणें. ' अशी गांठ न पडतां म्हणजे वरचा गडी (असल्यास तो) खालच्या गड्यास न मिळतां खालचा गडी किंवा वरचा गडी पुढें जाणें ह्याला ' लोण बारगळणें '

असें म्हणतात. असें झालें म्हणजे तो नियम मोडणारा गडी बारगळला असें म्हणतात. गडी बारगळला म्हणजे तो 'मरतो' म्हणजे खेळांत निरुपयोगी होतो आणि बाहेर पडतो; उ० असा आजपर्यंत कोणी राज्यकर्त्यानें किं० शास्त्रकारानें कायदा किं० कानू केलेला आठवत नाहीं कीं अमुक एका विषयास अमुक अमुकच पृष्टें ल.गावीं, ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं लोण बारगळलें (विष्णुशास्त्री चिपळूणकर). **लोणपाट्या स्त्री० अ० व०, लोणपट, लोणपाट न०**आट्यापाट्या हा मुलांचा खेळ. ह्याला 'मृदंगपाट्या' **स्त्री० अ० व०**,असेंही दुसरें नांव आहे. **लोणपट, लोणपाट न०** (आट्यापाट्यांच्या खेळांत) जय किं० सरशी.

लोणचें [**सं०** लवण] **न०** आंबे, लिंबें, इ० चिरून तीं मीठ, मोहरी, हिंग, इ० मध्यें घालून खारवून करतात तें तोंडीलावणें.

लोणट वर 'लोण' **स्त्री०** मध्यें पहा.

लोणट, लोणस खालीं 'लोणी' मध्यें पहा.

लोणा[**सं०** लवण]**पु०** १एक प्रकारचा तांदूळ. २ जमीन इ० तील क्षार अंश. ३ अंगकांति; चेहेऱ्याची टवटवी; जनावरांना यथेच्छ खाणें पिणें इ० मिळत असल्यानें त्याच्या अंगावर येतो तो तजेला (येणें, जाणें). ४ जमीन, भिंत, इ० च्या मातींत असलेला क्षारांश,-जो असल्या कारणानें तेथें निरंतर ओल असते; ती जागा कधींच खडखडीत वाळत नाहीं.

लोणांबा, लोणंबा पु०, लोणंबी, लोणांबी स्त्री०[**सं०** लवण+**म०**आंबा]आंब्याच्या कैऱ्या चिरून मीठ इ० मसाल्याच्या द्रव्यांत घालून खारवून केलेले तोंडीलावणें.

लोणारी स्त्री० लाकडें जाळून त्यांचे कोळसे करणें किं०चुनकळ्या करणें, हा धंदा करणाऱ्यांची किं०कोळसे किं० चुनकळ्या विकणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

लोणी [**सं०** नवनीत, नोनीत, नोनी] **न०** दूध, दहीं इ० घुसळलें असतां त्यांतून जो स्निग्धांश निघतो तो. ꣷ **लोण्याची रुवत न साहणें** सवत म्हटली कीं ती असह्य वाटणारच, -ती कितीही सौम्य स्वभावाची असली तरी. **लोण्याच्या पुऱ्या तुपांत तळून खा म्हणजे तुला जें पाहिजे आहे तें मिळेल** तुला जे पाहिजे आहे तें मिळणें अशक्य आहे. **लोण्यांत दांत फुटणें** अत्यन्त सौम्य स्वभावाचा माणूस प्रसंगानें कठोर स्वभावाचा होणें. **लोण्यास दांत फुटणें** आपण ज्याचें लालन, पालन, पोषण, किं० संगोपन केलें त्याणें आपणाशीं कृतघ्नपणें किं० अमर्यादपणें वागूं लागणें. **लोणकाप्या, लोणीकाप्या वि०** बिनधारेचा चाकू, सुरी, इ०. **लोणट** लोण्याच्या वासाचें किं० चवीचें. **लोणस वि०** १ सत्वस (दूध किं० दहीं,- ज्यांतून लोणी पुष्कळ निघतें). १ ज्याच्या दूध किं० दहीं यांपासून पुष्कळ लोणी मिळतें अशी (गाय, म्हैस इ०). **लोणकढी, लोणकढी थाप स्त्री०** गमतीखातर आणि गंभीर मुद्रेनें सांगितलेली खोटी खबर. **कोणेकाच्या अंडास लोणी लावणें** त्याला अनुकूल करून घेण्यासाठीं त्याचीं आजवें किं० खुशामत करणें.

लोथ [**हिं०** लोथाह्] **स्त्री०** १ मुडदा; प्रेत. २ अगडबंब माणूस किं० पशु. ३ खूप माजलेला म्ह०लठ्ठ भोपळा, फणस, चिबूड, इ०.३जमीनीवर निश्चेष्ट उताणा पडलेला माणूस. ꣷ **कोणेकाची लोथ पाडणें** त्याला खूप कुबलणें,-तो मृतप्राय होईपर्यंत. [विशेष).

लोद्या वि० एक प्रकारची (नाचणी,-धान्य

लोध, लोद [**सं०** लोध्र, लोध] **पु०** एक वृक्ष. **पु०, न०** ह्या वृक्षाची साल.

लोध, लोद [**हिं०** लोथाह्] **पु०, स्त्री०** १ प्रेत; मुडदा. २ खूप धिप्पाड माणूस, पशु, भोपळा, फणस. इ०.३ मोठा फत्तर किं० लाकूड. ꣷ **कोणेकाची लोध** (किं० **लोद**) **पाडणें** त्याला मारून किं० लुबकून त्याला मृतप्राय करणें. **शत्रुसैन्यांत लोधी** (किं० **लोदी**) **पाडणें** शत्रूच्या सैन्यांतील शिपायांची कत्तल करणें.

लोंधट वि० चिघळलेला किं० पातळ (गूळ, पीठ, साखर, इ०).

लोधडा, लोधा पु० अगडबंब किं० धिप्पाड माणूस किं० पशु.

लोधा [**म०** लोध] **पु०** १ प्रेत; मुडदा. २ प्राण्याचें तोडून किं० ओरबाडून काढलेलें मांस.

लोंधा वि० पातळ (गूळ, साखर, भात, भाजी, इ०).

लोध्र [सं०] पु० एक वृक्ष.

लोप [सं०] पु० १ गळणें; नाहींसें होणें. २ नाश; मोडून टाकणें; रद्द करणें किं० रद्द पाडणें. ३ प्रचारांतून जाणें. ४ अभाव. ५ बोलतांना किं०लिहितांना अक्षर,शब्द,इ०चें गळणें किं० गाळणें. ६ (व्याकरण) अक्षर, प्रत्यय, इ० चे शब्दांतून गळणें.

लोपणें [सं०लुप्] अ० क्रि० १ लुप्त होणें; नाहींसे होणें. २ प्रचारांतून नाहींसे होणें. ३ अदृश्य होणें. ४ (व्याकरण) शब्दाचा प्रत्यय इ० गळणें किं० सोडला जाणें.

लोंब स्त्री०,**लोंबट**,**लोंबर** न० [सं०लंब]भात, गहूं, राळा, राजगिरा, भादली, सावा, वरी, इ० चीं कणसें प्रत्येक.

लोंबकळणें, **लोंबकाळणें**, **लोम्कळणें** [म० ' लोंबणें 'चें एक रूप] अ० क्रि० १ वरच्या आधाराशीं संबध्द असा पदार्थ खालच्या भागाला आधार नसल्यामुळें अधांतरींच लटकत असणें; ओळंबणें.२झाडाची फांदी,खुंटी,घराची तुळई,इ० हातांनीं धरून पाय निराधार स्थितींत ठेवणें.३ कांहीं (काम, कारभार,इ०)शेवटास न जातां अपूर्ण स्थितींत पडणें किं० राहाणें; कोणी माणूस अनिश्चित अशा मनःस्थितींत असणें.

लोंबट, **लोंबड** स्त्री० १ नारळ, पोफळें, इ० फळांची रास. २ उपद्रव; त्रास; झेंगट; शुष्ककाष्ठ.

लोंबण [म० लोंबणें] स्त्री० फळें, फुलें, नेसलेलें लुगडें, धोतर, इ० चा लोंबत असलेला घड, घोस, किं० बोजा (लागणें).

लोंबणें [सं० लंब] अ० क्रि० १ वरच्या बाजूस आधार असून खालच्या बाजूस आधार नाहीं अशा स्थितींत (पदार्थ, माणूस, इ०) लटकलेला असणें; उ० फाशीं दिलेला माणूस, खुंटी, दांडी, इ० वरील पदार्थ, इ० लोंबत असतो. २ (कांहीं काम इ०) निकालांत न काढलेल्या स्थितींत राहाणें. ३ दिरिंगाईवर पडणें. ४ अनिश्चित स्थितींत असणें.

लोंबर न० मागें ' लोंब ' पहा.

लोंबरें न० गोवारीच्या शेंगांची पीठ पेरून केलेली भाजी.

लोबान, **लोभान** [हिं० लोबान] पु० एक सुगंधी द्रव्य; ऊद. ❀ **लोबानदाणी**, **लोभानदाणी** स्त्री० धुपाटणें.

लोंबी स्त्री० लोंबतें कणीस; लोंगी.

लोंबी झोंबी [म० लोंबणें+झोंबणें] स्त्री० अनेक तऱ्हेची खटपट;कांहीं कार्यार्थ सोसलेले कष्ट किं० केलेली धडपड.

लोभ [सं०] पु० १ कांहीं पदार्थाच्या प्राप्तीची उत्कट इच्छा. २ पैसा, धान्य, शेतें, इ० आपल्याला मिळावीं किं० आपल्या मालकीचीं असावीं अशी बेसुमार इच्छा. ३ चिक्कूपणा. ४ आपणाजवळ असलेला पदार्थ आपल्या हातून किं० आपल्या जवळून जाऊं नये अशी उत्कट इच्छा. ५ कोणा माणसाची कोणेकावर असते ती मेहेरबानी किं० कृपा किं० प्रीति. ❀ **लोभी**, **लोभिष्ट**, **लोभाळू** वि० १ कांहीं पदार्थ मिळण्याबद्दल किं० आपल्या जवळचा पैसा इ० खर्च न व्हावा म्हणून फाजील किं० निंद्य प्रमाणांत इच्छा करणारा. २ चिक्कू; कंजूष. **लोभमूलानि पापानि** [सं०] सर्व पातकें लोभापासूनच उत्पन्न होतात.

लोभणें, **लोभवणें**, **लोभावणें** [सं० लुभ्] अ० क्रि० १ कांहीं वस्तूनें आकृष्ट होणें. २ कोणा माणसाकडे प्रेमानें खेचलें जाणें.

लोभान वर ' लोबान ' पहा.

लोभी पु० मागें ' लब्धक ' अर्थ ५ पहा.

लोभें न० मागें ' लेभें ' पहा.

लोम [सं० लोमन्] न० १ शरीरावरील केश. २ शरीरावरील बारीक केश किं० लंव. ❀ **लोमश** वि० १ केसाळ (जनावर, गात्र). २ लोकरीचें (वस्त्र,–शालजोडी, बुरणूस, घोंगडी, इ०). **लोमश मार्जार** पु० जवादी मांजर.

लोमकळणें अ० क्रि० मागें 'लोंबकळणें'पहा.

लोयली स्त्री० गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर. पुढें 'लोली' पहा.मागें'लोईल'पहा.

लोल [सं०] वि० १ हलणारें. २ क्षुब्ध; अस्वस्थ. ३ अस्थिर; चंचल. ४ क्षणभंगुर. ५

एकाद्या विषयाकडे आसक्त किं० आकृष्ट झालेला. ६ अति उत्सुक.

लोलक [**सं०** लोल] **पु०** खालीं जाडी आणि वर बारीक असून लांबोळ्या आकाराचा जो काच, पाच, माणिक, इ० चा मणि इ० असतो आणि जो दागिना, झुंबर, इ० ना शोभेसाठीं लोंबत सोडलेला असतो तो.

लोला [**सं०** लोल] **वि०** १ निर्जीव होऊन लोंबत राहणारा (हात, ताड, माड, इ०चें पान, केळीचें सोपट किं० पान, इ०). २अशक्त, निर्जीव (माणूस, पशु). **पु०** १ अशक्त, निर्वीर्य माणूस. २ घंटेचा लोढणा,-जो घंटेच्या बाजूवर आपटून आवाज होतो. ३ घड्याळाचीं लंबक. ४ तोंडांतील घशांत लोंबत असते ती पडजीभ.

लोली स्त्री० गलबताचा लहान नांगर. मागें ' लोयली ' पहा.

लोलुप [**सं०**] **वि०** १ अति उत्सुक. २ अति लोभी. ३ आसक्त.

लोलो पु० शब्दांच्या उच्चाराचा शुद्धपणा, योग्य ठिकाणीं शब्दांवर आघात देणें, विराम करणें, इ० कडे लक्ष न देतां केलेलें घोकणें, भाषण, वाचन, वेदपठन, इ० (घालणें). ॐ **लोलो घालणें** १ वर वर्णिल्या प्रकारें वाचणें, घोकणें, इ०. २ भिकाऱ्यानें तगादा करून किं० लोचटपणानें भिक्षा मागणें.

लोंव [**सं०** लोमन्; **म०** लंव] **स्त्री०** १ अंगावरील केश. २ मेंढरूं इ०च्या अंगावरील केश म्ह० लोकर.

लोंवथा पु० मांस, पीठ, चिखल,गूळ,इ०चा तोडून किं० फाडून काढलेला तुकडा, खंड,किं० लचका.

लोष्ठ [**सं०**] **पु०, न०** मातीचें ढेकूळ. **न०** लोखंडाचें कीट किं० गंज. ॐ **लोष्ठाशौच न०** मलविसर्जनानंतर पाण्याच्या अभावीं मलद्वार ढेकळानें पुसून स्वच्छ करणें.

लोह [**सं०**] **वि०** १ तांबडें. २ लोखंडाचें बनविलेलें. **पु०, न०** १ लोखंड. २ पोलाद. ३ शस्त्र. ४ रक्त. ५ मासे पकडावयाचा गळ. **न०** १ कृष्णागरु. २ कांसें हा धातु. ॐ **लोहकांत, लोहचुंबक पु०** लोखंडाला आकर्षिणारा पदार्थविशेष. **लोहकांत पु०** १ लोखंडाची एक जाति. २ ह्या जातीच्या लोखंडाचें औषधार्थ भस्म करतात तें. ३ तिख्याचें औषधार्थ केलेलें भस्म. **लोहचुंबक पु०** १ लोखंडास आकर्षिणारा पदार्थविशेष.२आपली मागणी लोकांनीं पुरवावी म्हणून हट्ट घेणारा, अनेक युक्त्या करणारा, किं० धरणें धेऊन बसणारा माणूस. **लोहकार पु०** लोहार. **लोहकिट्ट न०** १ लोखंडाचा गंज. २ मंडूर हें औषधी द्रव्य. **लोहंगी, लोहांगी, ल्हांगी, लोहंगी काठी** [**सं०** लोह+अंग] **स्त्री०** लोखंडाचे खिळे आणि कड्या जागोजाग बसवून मारामारीसाठीं केलेला सोटा. **लोहचूर्ण न०** लोखंडाचा कीस. **लोहदंड** १ पातकी लोकांना मरणोत्तर यम ज्या सोट्यानें बडवितो तो. २ यम किं० शनि यांच्या प्रसादासाठीं ब्राह्मणाला देतात ती लोखंडाची काठी. **लोहपरिघ पु०** लोखंडाचा सोटा. **लोहभस्म न०, लोहमंडूर पु०** एक औषधी द्रव्य. **लोहमय वि०** लोखंडाचा बनविलेला (कोणताही पदार्थ). **लोहार** [**सं०** लोहकार] **पु०** लोखंडाचे खिळे, कोयते, इ० पदार्थ करणारा कारागीर. **लोहारसाळ स्त्री०** १ लोहाराची भट्टी. २ लोहार कामाचा कारखाना. **लोहलोखंड न०** लोखंडाचीं भांडीं, हत्यारें,इ०पदार्थ.

लोहकर मागें ' लोकर ' पहा.

लोहचट मागें ' लोचट ' पहा.

लोहट, लोहटी स्त्री० दगड, तुळया, इ० जड सामान वाहावयाचा भक्कम गाडा.

लोहडणें न० मागें ' लोढणें ' पहा.

लोहनाळी मोहनाळी [**म०** लोहो (लोभ), मोह (प्रेम), मवाळी] **स्त्री०** प्रेमाचें किं० मायेचें वर्तन किं० भाषण; मायाळूपणा; प्रेमळता.

लोहबंदी ऊद, लोहभान ऊद, लोहभानी ऊद मागें ' लोभान ' पहा.

लोहाळा मागें 'ल्व्हा' पहा.

लोहित [**सं०**] **वि०** तांबडें; लाल. **पु०** १ तांबडा रंग. २ (**ज्योतिष**) मंगळ हा ग्रह.३रोहें हरिण. ४ माणिक हें रत्न. ५ रताळें. **न०** रक्त; रुधिर. ॐ**लोहिताक्ष पु०** १ पारवा. २ कोकिळ.

३ ·विष्णु. **लोहितांग** पु० मंगळ हा ग्रह. **लोहिताश्व** पु० अग्नि. **लोहितमृत्तिका** स्त्री० गेरू; काव.

लोहितक [सं०] पु० १ माणिक. २ (ज्योतिष) मंगळ हा ग्रह. न० माणिक रत्न.

लोहितालु [सं०] पु० रताळें.

लोहुलहान [सं० लघु+म०लहान] वि० चिमुकला आणि गोंडस.

लोहो [सं० लोभ] पु० कोणा माणसाची कोणेकावर असते ती मेहेरबानी किं० कृपा. ॐ **देखला गोहो लागला लोहो** लग्न होतांच किं० नवऱ्याची गांठ पडतांच ती (अल्लड) मुलगी त्याच्यावर प्रेम करूं लागली (आणि आईबापांचा तिला विसर पडला).

लोहोकर, लोहोचट मागें ' लोकर,' 'लोचट' पहा.

लोहोडणें मागें ' लोढणें ' पहा.

लोहोनाळी मोहोनाळी मागें ' लोहनाळी मोहनाळी ' पहा.

लोळ पु० १ अग्नीच्या ज्वाळांचा भडका; आगीचा झोत. २ (मुंग्या, माशा, इ० चा)दाट थवा.

लोळ [म० लोळणें] पु० १ लोळण्याची क्रिया; लोळणें. २ हट्टी मूल इ० नीं जमीनीवर अस्ताव्यस्तपणें हातपाय आपटून गडबडा लोळत जाणें (घालणें). ३ (ताप, लोकांचा उपद्रव, इ० मुळें) कोणेकाची झालेली दुरवस्था किं० पीडितपणाची स्थिति. ४ अव्यवस्थितपणें बांधलेला गठ्ठा; अव्यवस्थित चिरगुटें किं० पदार्थ किं० पोथ्या इ० ची रास किं० ढीग. ५ लठ्ठ पोटाचें पोर. ६ अगडबंब माणूस, घूस, उंदीर, इ० प्राणी. ७ काम, कारभार, कारखाना, इ० चा पसारा. ॐ **लोळआक्रांत** [म० लोळणें+आक्रांत] पु० १ मोठमोठ्यानें रडणें, ओरडणें, किं० तरफडणें (करणें, मांडणें, लावणें, उठणें). २ पटकी, पाऊस, दरवडेखोर, माहागाईची धारण,इ० मुळें उत्पन्न झालेली असह्य स्थिति किं० परिस्थिति.

लोळकंड, लोळकण [म० लोळणें] स्त्री० १ हट्टी मूल इ० चें जमीनीवर रडत रडत लोळणें (घेणें, मारणें). २ कोणा माणसाला कोणी जबरदस्त माणूस त्याच्या उच्छेविरुद्ध ओढून नेत असतां तो जावयाला नाखूष असलेला माणूस जमीनीवर पडणें, लोळणें, धडपटणें, इ० क्रिया करतो त्या समुच्चयानें (घेणें, मारणें). ३ कुत्रीं, मांजरें, इ० आनंदानें वागडतांना किं० भांडतांना एकमेकांच्या अंगावर लोळणे, उड्या मारणें, इ० क्रिया करतात त्या समुच्चयानें.

लोळघोळ [म० लोळणें+घोळणे] पु० ए० व० १ कागद, चिरगुटें, खाद्यें, इ० ची कालवाकालव, डिवचाडिवच, कुरुकरणी,इ०. २ हिशेब, जमाखर्च, कारभार,इ० ची गुंतागुंत किं० अव्यवस्था. ३ मनाची अस्वस्थता किं० गोंधळलेपणाची स्थिति. ४ हट्टी किं० द्वाड पोर जमीनीवर लोळून आणि हातपाय आपटून करतें तो गोंधळ किं० ती धडपड.

लोळपट [म० लोळणें + पडणें] स्त्री० १ भांडणारीं मांजरें किं० कुत्रीं इ० यांची जोडी किं० सांगड. २ आजारामुळें कोणेकाची झालेली दुर्बलता किं० हीनदीनपणाची स्थिति (होणें, वळणें). ३ साथीच्या आजारांत अनेक माणसांची किं० गुरांढोरांची एकाच काळीं होते ती दुर्दशा किं० विपन्नावस्था (होणें, वळणें).

लोळकंबणें, लोळकुंबणें वर ' लोंबकळणें ' पहा.

लोळण (-णी) [म०लोळणें] स्त्री०१ हट्टी किं० द्वाड पोराचें जमीनीवर गडबडां लोळणें (घेणें, घालणें). २ लोटांगण. ३ जबरदस्तीनें ओढून नेलें जात असलेल्या माणसाचें जमीनीवर अव्यवस्थितपणें हातपाय आपटणें(घेणे).ॐ **लोळणघोळण** स्त्री०ए० व० 'लोळण' सर्व अर्थीं पहा.

लोळणें [सं० लुल्] अ०क्रि० १ जमीनीवर ह्या कुशीवरून त्या कुशीवर गडबडां लोळणें. २ आंथरुणावर निजलेल्या (माणसानें) निजलेल्या ठिकाणापासून अव्यवस्थितपणें कुशीवर वळून दूर जाणें. ३ (नेसलेल्या वस्त्राचे सोगे) जमीनीवर फरपटणें. ४ उपयोगी पडण्याच्या स्थितींत असून किं० अंगीं गुण असून(पदार्थ किं० माणूस) कांहीं उपयो न केला जात असल्या कारणानें किं० उद्योगधंदा न मिळाल्याकारणानें रिकामा राहाणें.

टीप,–ह्या अर्थी ' लोळत पडणें ' सुद्धां; उ० हा पहा तुझा चाकू येथें लोळत पडला आहे;उ०अनेक पदवधिर केवळ ब्राह्मण म्हणून लोळत आहेत. ꙮ **लोळणें घोळणें** (मुकद्दमा, कज्जा, गोष्ट, बेत, इ० चा) सर्व बाजूंनीं किं० साधक-बाधक प्रमाणें विचारांत घेऊन खल किं० वाटा-घाट करणें.

लोळवडी [म० लोळणें, लोळविणें+वडी] **स्त्री०** अनेक डाळींचीं पिठें मिसळून तीं कालवून त्यांत मीठ, तिखट, इ० द्रव्यें घालून त्याच्या वळकट्या करून त्यांचे काप काढून ते तळून तोंडीलावणें करतात तें.

लोळविणें, लोळाविणें [म० ' लोळणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (कोणेकास) जबर-दस्तीनें हातांनीं ढकलून लोळावयास लावणें. २ अंगावर चाल करून आलेल्या (चोर इ० ना) आपल्या अंगच्या सामर्थ्यावर ढकलून देऊन किं० चोप देऊन जमीनिवर आपटणें किं० लोळाव-यास लावणें. ३ खेळ, चढाओढीचा सामना, इ० मध्यें (प्रतिपक्षाला)चित करणें किं० परा-भविणें.

लोळसाविणें [म० ' लोळाविणें ' चें एक रूप] **स० क्रि०** वर ' लोळविणें ' सर्व अर्थी पहा.

लोळा [**सं०** लोल] **पु०** १ घड्याळ, घंटा, इ० चा लंबक. २ पडजीभ. ३ तोडून काढ-लेला पीठ, मांस, इ० चा तुकडा (काढणें, तोडणें). ꙮ **लोळा तोडणें** १ आईबापांनीं मुलीचें लग्न करून देऊन तिला दुसऱ्याच्या स्वाधीन करणें. २ (कृपणानें) पैसा खर्चणें.

लोळाविणें वर ' लोळविणें ' पहा.

लोळी [**म०** लोळ] **स्त्री०** १ घंटेच्या मध्य-भागीं लोंबत असतो तो धातु, लाकूड, इ० चा तुकडा,–जो घंटेच्या बाजूवर आपटून आवाज होतो. २ शेंबूड इ० चा जाडी, घट्ट, आणि लोंबता गोळा. ३ दागिन्याला किं० झुंबर इ० ना काच, पाच, हिरा, इ० चा लोंबता भाग असतो तो.४तोंडांतील पडजीभ.५बैल इ०च्या गळ्याखा-लचें पातळ आणि लोंबतें कातडें.६लांबोडा आणि सर्व बाजूनीं सारखा फणस. ७ गूळ, मेण, इ० कोणत्याही पदार्थाची लांबोडी गोळी.

लोळी [**म०** लोळणें] **स्त्री०** १ घोडा, गाढव,इ०चें जमीनिवर लोळणें किं०त्यांना लोळ-ण्याची येते ती हुक्की किं०लहर(येणें,मारणें,इ०).२ निजून किं० पडून राहाण्याची आळसामुळें माणसांना होते ती अनिवार इच्छा (येणें). ३ गलबतांचा लहान नांगर. ह्या अर्थी ' लोली ' सुद्धां.

लौकिक [**सं०**] **वि०** १ इहलोकासंबंधाचें; ऐहिक; अवैदिक; केवळ लोकप्रसिद्ध. २ सामान्य; नेहेमींचें. ३ रूढ; प्रचारांतील. ४ लोकाचा-राला अनुसरून असलेलें. ५ लोकाचारानें जें प्राप्त झालें तें किं० जें करावयास पाहिजे तें. **पु०** १ कीर्ति; कोणेकाच्या संबंधानें लोकांत रूढ असलेले मत; उ० रामभाऊंचा ह्या गांवांत चांगला लौकिक आहे. २ समाजांतील लोकांची व्यवहारांत वागण्याची सरणी; सामाजिक व्यव-हार. ३ कोणेक गोष्टीची वाच्यता किं० लोकांत जाहीर होणें. ꙮ **लौकिकांत येणें** मुलगा वयांत येऊन संसार करूं लागणें किं० कारभार इ० ची जबाबदारी वाहूं लागणें. **लौकिकावर येणें** वाद इ० मध्यें पराभव झाल्याकारणानें किं० अंगावर डाव लागल्याकारणानें चिरडीस जाऊन अद्वातद्वा बोलूं लागणें. **लौकिकाचार पु०** शिष्ट लोकांची वागण्याची सरणी. **लौकिकी वि०** १ लोकांत रूढ किं० सुरूं असलेली (चाल, रीति, इ०). २ पुष्कळ दिवसांपासून लोकांत प्रचलित असलेलें. ३ व्यवहारांत हुशार (माणूस).

लौंद, लोध स्त्री०, पु० लठ्ठ किं० फोपशा शरीराचा माणूस किं० प्राणी.

लौह [**सं०**] **वि०** लोखंडा संबंधाचा; लोखंडी.

ल्याख मागें ' लायक ' पहा.

ल्याणें स० क्रि० (दागिना,वस्त्र, इ०) अंगा-वर धारण करणें. मागें ' लेणें ' पहा.

ल्हावा पु० उन्हाळ्यांत पिकविलेली नाचणी किं० भात.

ल्होवी स्त्री० नाचणीची एक जात.

व

व मराठी व्यंजनमालेंतील एकुणतिसावें व्यंजन.

व [अ०] **उभयान्वयी अ०** आणि. **टीप,**– हा शब्द हल्लीं मराठींतून गळत चालला आहे.

वकट [तेलगू] **वि०** (विटीदांडूच्या खेळांत दांडूनें अंतर मोजतांना) एक. विटीदांडूच्या खेळांत पुढील सात शब्दांनीं अंतराची मोजदाद केली जाते. वकट (एक), लेंड (दोन), मुंड (तीन), नाल (चार), आर (पांच), वैद (सहा), आणि झक्कू (सात). हे सर्व शब्द तेलगू भाषेंतील आहेत.

वकटें न० १ संकट. २ धुवड.

वकत, वख्त, वखत, वख्त [अ० वक्‌त्] **पु०,स्त्री०** १ काळ; वेळ. २ कालावधि. ३ समय. ४ विलंब; उशीर. ५ खेप, वारी; उ० चार वकत म्ह० चारदां किं०चार वेळां. ६ संकटाचा काळ. ॐ **वखत गैरवखत क्रि० वि०**वेळीं अवेळीं,भलत्याच वेळीं. **वखतगुजराण स्त्री०** कालक्षेप. **वखतशीर वि०** वेळेवर येणारा, होणारा, किं० घडणारा. **क्रि० वि०**योग्य किं० ठरलेल्या समयीं. **वखताची वेळ स्त्री०** संकटसमय; अडचणीची वेळ; उ० वख्ताच्या वेळीं हें धान्य (किं० हा पैसा) उपयोगास येईल.

वंकनाल न० मातेनें खाल्लेल्या अन्नाचा रस गर्भाला जाण्याचा मार्ग.

वकफा [अ०] **पु०** थांबणूक; मुक्काम.

वकफीयत,वाकफीयत [अ०] **स्त्री०**माहिती.

वकर, वक्र [अ०] **पु०** १ कोणेकाच्या अधिकाराचा लोकांवर असतो तो दरारा किं० दबदबा किं० वचक. २ प्रतिष्ठा; लौकिक.

वकल [अ० वकल्=नायको, कुटुंब, रांड] **न०** १ काम, कारभार, इ० चा पसारा; उ० स्वयंपाकाचें वकल, सुतार कामाचें वकल. २ कचेरी, पेढी, इ० चें एक एक खातें. ३ रखेली; रांड.

वकसणें अ० क्रि० खरडलें जाणें; घासलें [जाणें.

वका, वका वि० १ उघडाबोडका. २ ओका.

वकायनिगार, वकायेनिगार [अ० वकाइअनिगार] **पु०** वृत्तान्त लिहिणारा; वाकनीस; अखबारनीस. [हकीगत.

वकाया [अ० वकाइअ] **स्त्री०** वृत्तान्त;

वकार पु० मोठेपणा; मान; प्रतिष्ठा.

वकील [अ०] **पु०** १ आपल्या तर्फेनें बोलण्यासाठीं किं० आपली बाजू स्पष्टपणें मांडण्यासाठीं न्यायमंदिरांत किं० राजाच्या दरबारांत आपल्या तर्फेनें पाठविलेला माणूस; मुखत्यार; प्रतिनिधि. २ देशमुखाचा वतनदार मदतनीस. ॐ **वकलातनामा, वकिलातनामा, वकीलनामा पु०, वकीलपत्र न०** वकीलाला आपल्या तर्फेनें बोलण्याबद्दल किं० आपली बाजू स्पष्टपणें मांडण्याबद्दल दिलेलें अधिकाराचें पत्र किं०सनद. **वकिली, वकीली स्त्री०** १ वकीलाचा धंदा. २ वकीलास दिलेली मजुरी. ३ दुसऱ्यासाठीं केलेली रदबदली (उपहासांत). **वकलात (–द), वकालत (–द), वकीलत (–द), वकिलात (–द) स्त्री०** वकिलाचा धंदा, कर्तव्य, किं० कार्यक्षेत्र, किं० कामकाजाचें ठिकाण. **वकीलत स्त्री०** १ वकीलाचा पेशा. २ शिष्टाई.

वकूब [अ० वुकूफ] **पु०** १ ज्ञान; अक्कल. २पराक्रम;कर्तृत्वशक्ति; सामर्थ्य.ॐ **वकूबदार वि०** १जाणता;सुज्ञ; काबिल. २ पराक्रमी. कर्तृत्ववान्.

वक्र [अ० वक्र्] **पु०, स्त्री०** संमान; प्रतिष्ठा; लौकिक.

वक्तव्य [सं०] **वि०** १ बोलण्याजोगें; बोलण्यास योग्य. २ जें बोललें पाहिजे तें. ३ निंद्य; दूषणार्ह. **न०** १ भाषण. २ निंदा.

वक्ता [सं० वक्तृ] **पु०** १ बोलणारा. २ सभेमध्यें श्रोत्यांचीं मनें आकर्षून बोलणारा. ३ बडबड्या, वाचाळ (निंदेंत). ॐ **वक्तृत्व न०** १ सभेंत श्रोत्यांचीं मनें आकर्षून आपल्या म्हणण्याचा ठसा श्रोत्यांच्या मनावर उठविण्याचा जो गुण तो किं० जी कला ती. ह्या गुणाला किं० कलेला ‘ वक्तृत्वशक्ति ’ असेंही म्हणतात. २ वरील गुणानें युक्त असें जें भाषण तें. ३ वात्रटपणाचें बोलणें. **शिमगा गेला वक्तृत्व राहिलें** शिमग्यामध्यें हावें तें बोलण्याला मुभा असते ती

शिमगा गेला त्याच्याबरोबर गेली परंतु त्या मुमेमुळें झालेली हानि टिकून राहिली आहे.

वक्त्र [**सं०**] **न०** तोंड; मुख; चेहरा.

वक्र [**सं०**] **वि०**वाकडा; सरळ नव्हे असा. २ कुटिल; संदिग्ध.३द्व्यर्थी (उक्ति). ४ लुचा; कपटी; अप्रामाणिक. ५ उलटी (गति). ॐ **वक्रोक्ति स्त्री०** (**साहित्य**) एका अभिप्रायानें उच्चारलेले शब्द दुसऱ्या अर्थी समजणें (घेणें); कोणी मनुष्य ' आज माझें पोट फार भरलें ' असें म्हणाला असतां ' भरलें असलें तर पाण्यानें धुऊन टाक ' असें दुसरा मनुष्य म्हणाला तर ती वक्रोक्ति होते. येथे ' भरणें ' यावर श्लेष आहे. 'खाद्यानें पूर्ण झालेलें असणें' आणि 'चिखल इ० नीं माखलेलें असणें' असे दोन अर्थ दोघांनीं घेतले आहेत. ही श्लेषमूलक वक्रोक्ति. **वक्रतुंड पु०**गणपति हा देव. **वक्रपुच्छ पु०** कुतरा. **वक्रगति** मंगल इ० ग्रहांची मेषाकडून वृषभाकडे न जातां मेषाकडून मीनाकडे जाण्याची गति. **वि०** अशा गतीनें विशिष्ट (भौमादि ग्रह). **वक्रदृष्टि स्त्री०** प्रतिकूल दृष्टि; गैरमर्जीची नजर; दुष्टपणाची दृष्टि. **वक्री वि०** १ मेषाकडून वृषभाकडे जात असावें अशी गति सोडून मेषाकडून मीनाकडे जात असलेला (भौमादि ग्रह). २ प्रतिकूल.**वक्रपुरशीस** [**सं०** वक्र + **फा०** पुरशीस् (विचारणें)] **स्त्री०** सत्य बाहेर काढण्यासाठीं कोणेकाला वाकडे तिकडे प्रश्न विचारणें,–न्यायमंदिर इ० ठिकाणीं. **वक्री होणें** कोणी मनुष्यानें कोणेकाला प्रतिकूल होणें किं०त्याच्याशीं दुष्टावा करणें.

वखत मागें ' वकत ' पहा.

वखर पु०, न०, वखरा पु०शेतांतील गवत किं० रान उपटून किं० खरडून काढून टाकण्याचें एक आउत.

वखद, वखसाद मागें ' औषध ' पहा.

वखरणें, वखारणें [**म०** वखर, वखरा] **स० क्रि०** १ वखर किं० वखार नांवाच्या आउतानें शेतांतील गवत किं० रान उपटून (शेत) साफ करणें. २ नांगरलेल्या शेतांतील ढिखळें फोडून (शेत) सपाट करणें.

वलवख स्त्री० १ खाण्याची अनिवार इच्छा (सुटणें). २ अधाशीपणा. ३ क्षुधा, पित्त, इ० मुळें घसा इ०त होते ती आग किं० जळजळ किं० अस्वस्थता.४पोरें,भिकारी,तगादेदार,इ०नीं मांडलेला उपद्रव. ५ अनेक कामांची एकदम लागलेली घाई.६कोणत्याही कारणानें झालेला असह्य उपद्रव; बेजारपणाची स्थिति (होणें).

वखा पु० रोजचें अन्न, दूध, खुराक, औषध, इ०चें ठरलेलें प्रमाण;रतीब (लावणें,घालणें,घेणें). लोकांचा धाकदपशा, इ० मुळें (कोणेकानें) नम्र होणें, शरण येणें, किं० दबकणें.

वखार [**हिं०** बखार] **स्त्री०** विकावयाचा माल साठवून ठेवण्याची व्यापाऱ्याची जागा. **वखारदार,वखारी पु०** १ज्याची स्वतःची वखार आहे असा व्यापारी. २ वखारीवर नेमलेला अधिकारी.

वखारणें वर ' वखरणें ' पहा.

वग स्त्री० कोणेकाचा कोणेकाशीं असलेला घरोबा किं० स्नेहसंबंध;वशीला किं०भीड घालण्याइतकी कोणेकाची कोणेकाशीं असते ती ओळख. ॐ **वगवशीला पु० ए० व०** आपल्याबद्दल खटपट करणाऱ्या कोणा माणसाची ओळख किं० मैत्री किं० कृपा.

वंग [**सं०**] **पु०** १ वांगें. २ बंगाल देश. **न०**१ कथील.२ शिसें. ॐ **वंगभंग पु०** बंगालची फाळणी,–जी करझननें इ० स० १९०५ मध्यें केली आणि जी पुढें इ० स० १९११ सालीं रद्द केली गेली.

वंगण न० गाडीचा कणा, यंत्राचे एकमेकांवर घासणारे भाग,इ०च्या गतीला मंदता आणणारें घर्षण तें शक्य तितकें कमी करण्यासाठीं घासणाऱ्या भागांत जें तेल इ० द्रव्य घालतात तें.

वंगणें [**म०** वंगण] **स० क्रि०** (यंत्राचे घासणारे भाग, चाकाचा आस, इ०मध्यें) तेल इ० घालणें. वर ' वंगण ' पहा. **अ० क्रि०**भीति, लोकांचा धाकदपटशा, इ०मुळें (कोणेकानें)नम्र होणें, शरण येणें, किं० दबकणें.

वगर स्त्री० म्हैस.

वगर, बगर श० यो० अ० शिवाय,खेरीज; उ० हे दोन श्लोक पाठ केल्यावगर मी येथून उठणार नाहीं.

वंगविणें [**म०** वंगण] **स० क्रि०** १(गाडीचें चाक इ० मध्यें) वंगण घालणें; वंगण घालून घर्षण कमी करणें. २ आपली इच्छा किं० मागणी पुरविण्याला आपल्याला अनुकूल होण्याला

(कोणेकाला) धाकदपटशानें किं० आमिष दाखवून वश करून घेणें; (कोणेक) ताब्यावर येईपर्यंत त्याला चोप देणें.

वंगळ, वंगाळ (अशिक्षितांत रूढ) मागें ' ओंगळ ' पहा.

वगळ [**म०** वगळणें] **स्त्री०** पदार्थांचा टाकाऊ अंश किं० टाकून दिलेला अंश; गाळसाळ. **वि०** रद्दी; टाकाऊ; त्याज्य.

वगळणें [**सं०** अव+गल्] **स० क्रि०** १ अग्राह्य म्हणून न घेणें, किं० समाविष्ट करून न घेणें; सोडून देणें. २ कांहीं पदार्थांतील कांहीं भाग स्वीकारून (कांहीं) न स्वीकारणें.

वगैरे [**फा०** वगैराह्] **सर्वनाम** आणि इतर; इत्यादि.

वघळ, वघळणें, इ० मागें 'ओघळ,' ' ओघळणें ' इ० पहा. हे दोन्ही शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

वच [सं० वचस्] **न०** १ भाषण. २ आज्ञा. ३ उपदेश. ४ कोणा थोर पुरुषाचें किं० साधूचें वचन.

वचक, वचका [**हिं०** भचक्] **पु०** १ कोणेकाला कोणेकाबद्दल वाटतो तो दरारा किं० भीति. २ आकस्मिक कारणानें वाटलेली भीति; दचका; दहशत. ३ कांहीं कारणावरून झालेला मनाचा ग्रह (जाणें); उ० चालण्याच्या ढबीवरून रघुनाथ जात असेल असा मला वचक बेला.

वंचक [**सं०**] **वि०** लुच्चा; फसव्या; ठग; लबाड. **पु०** १ कोल्हा. २ ठग; लुच्चा माणूस; सोदा.

वचकणें [**हिं०** भचकूना] **अ० क्रि०** १ (कोणेकाच्या) भीतिमुळें दबवणे किं० नियंत्रित होणें; उ० रामू एवढ्या आईला वचकतो दुसऱ्या कोणाला वचकत नाहीं. २ कांहीं गोष्ट करतांना कचरणें किं० माघार खाण्याकडे कलणें.

वचका मागें ' वचक ' पहा.

वचका वि० १ मूर्खासारखें बोलणारा; बडबड्या. २ लघळ; फाजील; छछोर.

वंचणें [**सं** वंच्] **अ० क्रि०** १ फसणें; फसविलें किं० लुबाडलें जाणें. २ (कांहीं लाभास) मुकणें किं० आंचवणें किं० अंतरणें. **स० क्रि०** १ (कोणेकाला) फसविणें. २ कोणेकाची (कांहीं वस्तु) लुबाडणें किं० हिरावून घेणें.

वचन [**सं०**] **न०** १ बोलणें. २ बोलण्याची धाटणी किं० तऱ्हा. ३ उच्चार; उच्चारण्याची क्रिया. ४ कोणा थोर पुरुषांचे म्हणणें किं० वाक्य. ५ शास्त्र, ऋषि, इ० नीं घालून दिलेला नियम किं० त्याचें आधारभूत वाक्य. ६ कोणेकानें कोणेकाला केलेली आज्ञा किं० दाखवून दिलेली शिस्त किं० सरणी. ७ (**व्याकरण**) एकत्व, द्वित्व, बहुत्व, दाखविणारें शब्दाचें रूप; उ० घोडा हें एकवचन; घोडे हें अनेकवचन; अश्वौ (दोन घोडे) हें संस्कृत द्विवचन. ॐ **वचनाचा खरा** १ कबूल केल्याप्रमाणें वागणारा; प्रतिज्ञा निरंतर पाळणारा. २ खोटी किंमत न सांगणारा किं० हिशेबांत न फसविणारा (व्यापारी किं० सावकार). **कोणेकाच्या वचनाच्या आज्ञेंत** (किं० **अध्यां वचनांत**) **असणें** (किं० **वागणें**) त्याच्याशीं अत्यन्त आज्ञाधारकपणें वागणें; त्याची आज्ञा बिलकूल न उल्लंघणें. **कोणेकाला वचनीं गोवणें** १ त्याला त्याच्या शब्दांत पकडणें. २ कांहीं गोष्ट करण्याबद्दल स्पष्ट शब्दांनीं त्याला बांधून घेणें. **वचनावचनी, वचनभाक स्त्री०** तोंडी करार किं० ठराव.

वंचन न०, वंचना स्त्री० [**सं०**] १ फसविणें; फसवणूक; प्रतारणा. २ कपट. ३ खोटा ग्रह.

वचनीय [**सं०**] **वि०** १ सांगण्याजोगें. २ निंद्य; दूषणार्ह. **न०** १ निंदा. २ टपका.

वचपा, वचवा, वजपा [**म०** वजा] **पु०** १ एकीकडे झालेली हानि किं० लागलेली ठोकर किं० आलेला कमीपणा दुसरीकडे झालेल्या लाभानें किं० मिळालेल्या नफ्यानें किं० आलेल्या वाढीनें भरून निघणें (काढणें, निघणें). २ सूड घेणें. ३ प्रतिक्रिया; बरोबरी होणे किं० करणें.

वंचित [**सं०**] **वि०** १ फसविलेला. २ फसवून मिळविलेला (पदार्थ).

वंजणें [**स०**] **क्रि०** तेल इ० नीं (पदार्थ) माखणें किं० घासणें.

वजणें [**म०** ओज्; **स०** ओजस्] **अ० क्रि०**

१ काळजीनें राखलें किं० ठेविलें जाणें. २ शुश्रूषा, संगोपन, निगा, इ० मुळें (शेत, माणूस, पशु)टवटवीत, सशक्त, किं० तेजस्वी होणें किं० उठून किं० खुलून दिसणें.

वजन [अ०] **न०** १ पदार्थाच्या अंगीं जो जडपणा असतो तो. २ हा जडपणा ठरविण्यासाठीं तराजूंत घालतात जो गुंज, रुपाया, वाल, इ० पदार्थ तो. ३ तोलण्याच्या क्रियेनें ठरलेली इयत्ता किं० ठरलेलें परिमाण. ४ समाजांत कोणेकाची असते ती प्रतिष्ठा; लोकांच्या मनांत कोणेकाविषयीं असतो तो आदर किं० पूज्यभाव; उ० देशकार्य करणाऱ्या माणसास सरकारनें कैदेंत घातलें असतां त्या माणसाचें वजन हालअपेष्टांनीं कमी झालें तरी समाजांत त्याचें वजन वाढतें. ॐ **वजनदार, वजनशीर वि०** १ जड. २ समाजांत पत असलेला; प्रतिष्ठित. **वजनपूर वि०** वजनांत मुळींच उणा नसलेला. **वजनी वि०** १ वजनानें ठरवावयाचा (शेर इ०). याच्या उलट ' मापी '. २ वजन करून द्यावयाचा किं० घ्यावयाचा (पदार्थ,-सर्पण, सोनें, इ०).

वजनजि [**म०** ओज; **सं०** ओजस्] **स्त्री०** काळजी; निगा; शश्रूषा.

वजपा मागें ' वचपा ' पहा.

वजा [अ० वजह=कमी करणें] **वि०** कमी; उणें; उ० दहांतून तीन वजा केले तर सात उरतात. **टीप**—' वजा ' हें विशेषण लिंगवचनांप्रमाणें न फिरणारें आहे. ॐ **वजाबाकी स्त्री०** १ एका संख्येंतून किं० परिमाणांतून दुसरी संख्या किं० परिमाण कमी करणें किं० काढून टाकणें. २ वरील प्रकारें कमी करण्यानें किं० काढून टाकण्यानें बाकी राहिलेली संख्या किं० किं० परिमाण. **वजाई स्त्री०** १ हिशेबांतून काढून टाकलेली किं० वजा घातलेली रकम. २ कोणेकाला वरच्या दर्जावरून खालच्या दर्जावर आणणें. **वजावाजवी (-बी), वजावाजब, वजावाजीब वि०** योग्य; यथायोग्य प्रकारचें; बरोबर. **वजावाट स्त्री०** १ वजा करावयाच्या रकमा वजा करून वाजवी आंकडा किं० परिमाण काढणें किं० ठरविणें. २ अशा कृत्यानें ठरलेला आंकडा किं० ठरलेलें परिमाण. ३ दोन माणसांचें एकमेकांकडे देणें किं० घेणें किती निघतें हें पाहून त्या देण्याघेण्याचा निकाल करणें किं० केलेला निकाल. ४ हातीं आलेल्या पैशाची विल्हेवाट करून टाकणें किं० तो खर्चून किं० उधळून टाकणें. ५ द्यावयाच्या रकमा ज्याच्या त्याला देऊन टाकणें.

वजा [**अ०** वजह्=तुल्य] **वि०** बहुतेक सारखा; एकंदरींत तोच किं० त्याच्या खालोखाल; उ० काडीवजा म्ह० काडीइतका बारीक; खांबवजा म्ह० खांब म्हणावयाला हरकत नाहीं असा. याच सरणीनें खडेंवजा, कुटुंबीवजा, इ० **स्त्री०** तऱ्हा; प्रकार; सरणी. ह्या अर्थी ' वजे **स्त्री०** सुद्धां.

वजा पु० सुतारकाम आणि लोहारकाम हीं दोन्हीं करणारा कारागीर.

वंजार, वंजारा (-री) इ० पुढें ' वणजार ' ' वणजारा (-री) ' इ० पहा. [पहा.

वजिरात, वजिरी खालीं ' वजीर ' मध्यें

वजीर [अ० वझीर] **पु०** १ राजाचा मुख्य प्रधान. २ बुद्धिबळांच्या डावांत राजाच्या खालोंखालचें एक मोहोरें. ॐ **वजिरात, वझारत** [**अ०** वझारत्] **स्त्री०** वजिराचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र. **वजिरी स्त्री०** १ वजिराचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र. २ गंजिफांच्या खेळांत वजिराला द्यावी लागते जी तलफ ती **वि०** वजिरा संबंधाचें.

वज्र [**सं०**] **वि०** १ अति टणक किं० कठिण. २ × अशा आकाराचा.**पु०,न०** १इंद्राचें आयुध. २ वीज, विद्युत. ३ कोणतेही घातुक शस्त्र. ४ हिरा हें रत्न. ५ रत्नाला भोंक पाडण्याचें एक हत्यार. **न०** १ पोलाद. २ काळा अभ्रक. ३ कातड्याची दोरी. **पु०** १ सत्तावीस योगांतील पंधरावा योग. २ विद्या, शौर्य, इ० कांहीं गुणानें दुसऱ्याचा पराभव करण्यास समर्थ असा माणूस. ॐ **वज्रांग पु०** सर्प. **वज्रघात, वज्रपात पु०** अकस्मात् कोसळलेला कांहीं भयंकर अनर्थ. **वज्रायुध, वज्रधर,वज्रपाणि पु०**इंद्र. **वज्रकंटक पु०**१मारुति.२निवडुंग. **वज्रकील पु०** वज्र.**वज्रक्षार पु०** १ नवसागर.२सज्जीखार.**वज्रगोप पु०** मृगकिडा. **वज्रचंचु पु०** गिधाड. **वज्रदंत पु०** रानडुकर. **वज्रनाभ पु०** सुदर्शन

चक्र. **वज्रनिर्घात, वज्रनिर्घोष, वज्रनिष्पेष** पु० विजांचा कडकडाट. **वज्रपात** पु० वीज पडणें. **वज्रपुट** न० औषधाचें पाचनपात्रविशेष. **वज्रमणि** पु० हिरा. **वज्रमय.** वि० निष्ठुर; कठोर. **वज्रलेप** पु० अत्यंत चिकट असें एक लुकण. **वज्रलोहक** पु० लोहचुंबक. **वज्रसार** वि० अत्यंत टणक किं० कठिण. **वज्रचुडेमंडित, वज्रचूडेमंडित** वि० पत्रांत सौभाग्यवती स्त्रियांच्या नांवामागें हें विशेषण योजतात; उ० वज्रचूडेमंडित सौभाग्यवती गोदूताई. **वज्रकीट** पु० खवल्या मांजर. **वज्रजिव्ह** वि० कठोर किं० मर्मभेदक भाषण करणारा. **वज्रटीक** स्त्री० ए० व०, **वज्रटिका** स्त्री० अ० व० स्त्रियांच्या एका कंठभूषणाचा सुवर्णाचा एक अवयव. **वज्रदेही** वि० काटक किं० कणखर शरीराचा किं० प्रकृतीचा (माणूस). पुं० मारुति. **वज्रद्रोह** पु० हाडवैर. **वज्रधार** वि० अत्यंत तीक्ष्ण (शस्त्र). **वज्रपथ्य** न० अत्यंत कठिण पथ्य. **वज्रपरीक्षा** स्त्री० कसून केलेली परीक्षा. **वज्रप्रयत्न** पु० नेटानें केलेला प्रयत्न; भगीरथप्रयत्न. **वज्रबट्टु** पु० एक वृक्षविशेष. न० त्याचें फळ. मागें 'वजरबट्टु' पहा. **वज्रमहाग** वि० अति महाग. **वज्रमुष्टि** पु० तालीमखान्यांतील मल्लांचें एक आयुध. स्त्री०, पु० जोरदार मुठीची पकड. पु० ज्याच्या हातून पैसा लवकर सुटत नाहीं असा कृपण किं० कंजूष माणूस. **वज्रमूठ** स्त्री० १ खाजरें आणि रानटी सुरण. २ कृपणाची घट्ट मूठ. २ तालिमबाजाची घट्ट आणि जोरदार मूठ. **वज्रलेप** पु० अत्यंत टणक आणि चिकट इमारती चुना, सनल्याचा अति बळकट चुना, किं० अशा चुन्यानें केलेली सांधजोड. वि० न निघणारा किं० न सुटणारा किं० न मोडला जाणारा (रंग, सांधा, जोड, प्रतिज्ञा, वैर, इ०). **वज्री** स्त्री० हात, पाय, इ० घासून स्वच्छ करण्याच्या उपयोगाचा असंख्य भोकांचा दगड. **वज्रहृदय** न० कठोर अंतःकरण. वि० कठोर अंतःकरणाचा (मनुष्य). पु० इंद्र. **वज्राधिकार** पु० एका कुटुंबांत अनेक पिढ्या चालत आलेला अधिकार. **वज्रांबट** वि० अत्यंत आंबट. **वज्राळें, वज्रावळ** न० एक वृक्षबीज, –जें मुलांच्या गळ्यांत बांधतात. **वज्रांगी** स्त्री० चिलखत; कवच.

वट [सं०] पु० वड हा वृक्ष. ॐ **वटपौर्णिमा** स्त्री० ज्येष्ठ महिन्याची पौर्णिमा हा तिथि. ह्या तिथीला बायका करतात त्या व्रताला 'वटव्रत,' 'वटसावित्रीचें व्रत' असें म्हणतात. **वटव्रत** [सं०] न० ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेस स्त्रिया वडाची पूजा करतात हें व्रत. **वटश्राद्ध** न० गया येथें यात्रेकरू करतात तें श्राद्ध.

वट स्त्री० कच्चें रेशीम धुतांना निघून जातो तो गाळमाळ.

वटक [सं०] पु० १ वडा, –एक खाद्य. २ गुदद्वारें विसर्जिलेला टणक मळ; खडा. ३ पोटांतील आम म्ह० न पचलेला अन्नांश. ४ मुलाची ओकारी, –जींत चोथा पाण्याच्या रूपांत दूध तोंडावाटें बाहेर पडतें.

वटकण (–न) न० १ अटक; खोडा. २ पाचर. २ टेकू. खालीं 'वटगण' पहा. ३ कोणेकाला ताब्यांत ठेवण्याचें साधन; उ० पोराचें वटकण पंतोजीच्या हातीं; उ० माकडाचें वटकन दरवेशाच्या हातीं.

वटका पु० रिकामी बडबड; वाचालता.

वटगण (–न), वडगण न० १ पदार्थ डळमळूं नये म्हणून खालीं घालतात ती पाचर. २ गाडी इ० चें चाक पुढें फिरूं नये म्हणून चाकापुढें लावितात तो धोंडा इ०.

वटणें स० क्रि० १ सरकी काढण्यासाठीं चरकांत (कापूस) घालणें. **वटणें** न० हा चरक. २ (गवत, दगड, इ०) राशीच्या रूपांत रचणें.

वटणें न० वर 'वटणें' स० क्रि० मध्यें पहा.

वटपूर्णिमा, वटपौर्णिमा [सं० वट + पूर्णिमा, पौर्णिमा] स्त्री० ज्येष्ठ महिन्यांतील पौर्णिमा. मागें 'वट' मध्यें हे शब्द पहा.

वंटभरण न०, **वंटभरणी** स्त्री० मागें 'ओटी' मध्यें पहा.

वटवट स्त्री० बडबड.

वटवटीत वि० विरूप दिसण्याइतके आणि उथळ (डोळे). ह्या अर्थी 'बटबटीत' सुद्धां रूढ आहे.

वटावणें, वटाविणें स० क्रि० १ एका रूपांतील (नाणें इ०) दुसऱ्या रूपांत बदलून घेणें.

२ (आजार, अडचण, पंचाईत, इ०) निस्तरणें, सोसणें किं० सोसून किं०टाळून त्यांतून पार पडणें.

वटश्राद्ध न० मागें ' वट ' मध्यें पहा.

वटसावित्री मागें ' वट ' मध्यें पहा.

वटहुकूम पु० सर्वत्र लागू पडणारा हुकूम.

वटांग स्त्री० लोहार, नालबंद, इ० ची एक प्रकारची ऐरण.

वटारणें स० क्रि० (डोळे) पूर्णपणें उघडणें (कोणेकाला भीति दाखविण्यासाठीं)

वटाव [हिं०] **पु०** रुपाया इ० नाणें मोडतांना जो वट्टा मिळतो किं० द्यावा लागतो तो; वटणावळ.

वटाविणें वर ' वटाविणें ' पहा.

वटाविणें, वाटाविणें [म० वाट] **स० क्रि०** प्रवासात (गांव, ओढा, घांटी, इ०) ओलांडून किं० उल्लंघून पुढें जाणें.

वटिका, वटी [सं०] **स्त्री०** १ बागेंतील झाडांचा वाफा किं० ताटवा. २ औषध इ० ची गोळी. ३ लोणी, गूळ, पीठ, इ० ची थापटी.

वटींव [म० वटणें] **वि०** १ रचून किं० रास करून ठेविलेले(गवत, दगड, पेंढ्या, इ०). २ सरकी काढण्यासाठीं चेपलेला (कापूस).

वटें पुढें ' वडें, ' ' वढें ' पहा.

वठण [म०वठणें] **स्त्री०** १ नम्रपणाची किं० आज्ञाधारकपणाची स्थिति. २ मऊ किं० नरम होणें. ३ रोडपणाची किं० किडकिडीतपणाची स्थिति. ॐ **वठणीस येणें अ० क्रि०** नम्र किं० आज्ञाधारक होणें. **वठणीस आणणें स० क्रि०** नम्र किं० आज्ञाधारक करणें; ताळ्यावर आणणें; सुधारणें.

वठणें [म० उठणें] **अ० क्रि०** १स्पष्ट होणें; स्पष्टपणें दिसणें किं० दिसूं लागणें. २ (रंग) तजेल्दार दिसूं लागणें. ३ (शाप) फलद्रूप होणें. ४ (माणूस, पशु, झाड) रोड होणें किं० वाळणें.

वठाण [सं० अवस्थान] **न०** १ कांहीं कामाकडे नेमस्त केलेली जागा. २ घर इ० तील खोली किं० दालन.

वठार पु० १ शहरांतील विशिष्ट धंद्याच्या लोकांची राहाण्याची पेठ;उ०तेली वठार.२शहर, गांव, इ०तलि मोहल्ला (सामान्यत:).

वठ्या, वठ्याबा वि० लठ्ठ; अगडबंब; अत्यन्त स्थूल. ॐ **वठ्याचें न०** जेवण (निंदेंत).

वड [सं० वट] **पु०** एक वृक्ष. ह्याची ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेस स्त्रिया पूजा करतात. ॐ **वडसावित्री, वडपौर्णिमा, वडश्राद्ध** मागें ' वड ' मध्यें ' वटसावित्री, ' ' वटपौर्णिमा, ' ' वटश्राद्ध ' पहा. **वडास आलीं वडफळें आणि कावळ्यास आलें रूं** (किं० **आला रोग**) ऐन उपभोगाच्या वेळीं उपभोगाचें सामर्थ्य नष्ट होणें (हें मोठें दुर्दैव होय). **वडाची साल पिंपळास लावणें** किं० **वडाची साल पिंपळास आणि पिंपळाची साल वडास लावणें** १ नसता संबंध जोडणें. २ खरें तें खोटें आणि खोटें तें खरें भासविणें. ३ न खपण्याइतकी अतिशयोक्ति करणें. ४ स्वकार्य साधण्यासाठीं लटपटी खटपटी करणें. **वड पिकणें** अनेक लोकांना कांहीं नवीन काम किं० योजना निघाल्यामुळें अनेक लोकांच्या चरितार्थाची एकदम सोय होणें.**वडजखीण स्त्री०**वडावर वास्तव्य करणारी जखीण किं० स्त्री पिशाच. **वडपिंपळ पु० ए० व०** अविवाहित पुरुष. **वडपुनव स्त्री०** ज्येष्ठी पौर्णिमा. मागें ' वट ' मध्यें ' वटपौर्णिमा ' पहा. **वडवत** मागें ' वट ' मध्यें ' वटव्रत ' पहा. **वडवत, वडवतें न०** नूतन विवाहित स्त्रिया वडपुनवेचे दिवशीं ब्राह्मणांना वायनें देण्याचा समारंभ करतात तो (देणें). **वडवाघूळ न०** एक पक्षिविशेष.

वंडकी स्त्री०, वंडकें न० मागें 'ओंडा 'पहा.

वडगण न० मागे ' वटकण ' पहा.

वडजा पु० अत्यन्त वाकड्या तिकड्या गात्रांचा माणूस; कुरूप माणूस.

वडलाई, वडलायकी, वडलांचा आडकित्ता, वडलांचा आहाणा, वडलावडली, वडलोपार्जित, वडलोवडलीं, वडलोबा खालीं ' वडील ' मध्यें पहा.

वडस स्त्री०, न० विहिरींतून दोरीनें पाणी काढण्याचें चाक ज्या तुळईवर बसविलेलें असतें ती तुळई.

वडवडणें अ० क्रि० मागें ' ओढवणें ' पहा.

वडवत न० मागें ' वट ' मध्यें ' वटव्रत, ' ' वडवतें ' पहा.

वडवा [सं०] स्त्री० १ घोडी;अश्व जातीची स्त्री. २ वेश्या. ३ (**ज्योतिष**) अश्विनी नक्षत्र.४ ब्राह्मण स्त्री. ⚘ **वडवाग्नि, वडवानल, वडवामुख** पु० समुद्रांतील अग्नि.

वडवा [म० वणवा] पु० जंगल, डोंगर, इ० वरील पेटलेला अग्नि; जंगलांतील आग.

वडवाघूळ मागें ' वड ' मध्यें पहा.

वडस पु० देवी इ०कारणानें नेत्रावर कवडीसारखा विकार होतो तो.

वडसावित्री ' वड ' मध्यें पहा.

वंढा [म० ओंडा] पु० १ लाकडाचा ओंडा. २ लाकडाची लांब आणि जाडी गंडेरी. ३ वांझ (मानवी स्त्री किं० पशुस्त्री).

वडा [सं० वटक] पु० उडीद इ०च्या पिठाची थापटी तळून तोंडीलावणें करतात तें. ⚘ **वड्याचें तेल वांग्यांवर काढणें** एका माणसाबद्दल आलेला राग दुसऱ्या माणसाला शिव्या देऊन किं० दुसऱ्या माणसाचें कांहीं नुकसान करून शमविणें; एकाच्या चुकीबद्दल दुसऱ्यास विनाकारण रागें भरणें.

वडांग स्त्री० कांटेरी कुंपण.

वडागर मीठ न०समुद्राच्या पाण्याचें मीठ,– जें मोठ्या खड्यांच्या रूपांत असतें.

वडांगळें न० वडाचें फळ.

वडाची पुनव, वडाची पौर्णिमा स्त्री० मागें ' वड ' मध्यें ' वडपुनव ' पहा.

वडारी हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

वडार न० १ वडारी लोकांची टोळी. २ वडारी जातीचा इसम.

वडिलकी पुढें ' वडील ' मध्यें पहा.

वडी [सं० वटी, वटिका] स्त्री० १ पीठ, चिखल, मेण, गूळ, शेण, इ०ची थापटी. २ शेत भाजण्यासाठीं पसरलेल्या काटक्याकुटक्यांचा थर. ३ सर्पणासाठीं वाळावयास पसरलेल्या काटक्याकुटक्यांचा थर.

वडील [सं० वृद्ध] वि० मानार्ह जीं माता, पिता, आजा, आजी, पणजा, पणजी, इ०माणसें तीं प्रत्येक. २ वयानें, गुणानें, किं० शहाणपणानें वरच्या दर्जाचा. ३ आपला पिता. ⚘ **कोणेकाचे वडाल उद्धरणें** त्याला बापांवरून आणि पितरांवरून शिव्या देणें. **वडील घराणें** न० १ **वडील घराणा** पु० कुटुंबाच्या वडील शाखेचें घर म्ह० वडील भावाचें किं० वडील भावाच्या संततीचें घर. **वडीलधारा** पु०, **वडीलधारें** न० कुटुंबांत शिस्त राखण्याचा अधिकार ज्याचेवडे आहे असें माणूस. **वडीलपरंपरा** स्त्री० कुटुंबांत मागपासून चालत आलेली सरणी किं० चाल. **वडीलपरंपरागत** वि० वाडवडिलांपासून चालत आलेलें (वतन, मान, हक्क,अधिकार, इ०).**वडीलमान** न० पिढ्यानपिढ्या चालत आलेला कांहीं हक्क. **वडलाई, वडलायकी** स्त्री० १ वडीलपणाचा दर्जा किं० मोठेपणा. २ वडीलपणाची कोणेकाची जबाबदारी. **वडलाई, वडलाबाई** [म० वडील +आई किं० बाई] स्त्री० पोक्त किं० प्रौढ स्त्रीप्रमाणें वागणारी मुलगी (निंदेंत). **वडलांचा आडकित्ता** पु० सुपारी फोडावयासाठीं योजलेले दोन दगड जोडीनें(विनोदांत).**वडलांचा आहणा** पु० मागपासून चालत आलेले वृद्धवचन; म्हण. **वडलावडली** वि० १ कुटुंबांत मागपासून चालत आलेलें. २ वडील माणसासंबंधाचें. **वडलोवडलीं** क्रि० वि० कुटुंबांत मागपासून चालत (आलेली रूढि, वतन, इ०). **वडलोबा** पु० धाकट्या बहीणभावांशीं अरेरावीपणाचें वर्तन करणारा किं० त्यांच्यावर अधिकार चालवूं पाहणारा पोरगा (उपहासांत). **वडिलकी** स्त्री० १ वडीलपणा. २ घरचा कारभार पाहाण्याचा अधिकार किं० मान.

वढें पुढें ' वढें ' पहा.

वढील मागें ' वडील ' पहा.

वढें, वंढें न० सूड; उट्टें (घेणें, उगवणें, काढणें).

वण [सं० व्रण] पु०, न० १ जखम; क्षत. २ जखम, देवी, गळूं, इ० बरें झाल्यावर त्याचा त्वचेवर उठतो किं० राहातो तो डाग. ३ वेताळ, म्हसोबा, इ०ना बळी देतात तो पशु.४म्हैस किं०

'म्हशी' ह्या शब्दांच्या मागें चराईच्या बाबतींत योजतात तो शब्द; उ० वण म्हशी चौदा, पैकीं मयत तीन, बाकी जमा अकरा.

वण [**सं०** वन] **स्त्री०** चराईबद्दल द्यावें लागतें तें धन.

वणज [**सं०** वाणिज्य] **स्त्री०** आपला माल खपविणें किं० परठिकाणचा माल खरेदी करणें इ० कामांसाठीं व्यापारी किं० दुकानदार करतो तो प्रवास.

वणजार, वणजारा खालीं 'वणजारा' पहा.

वणजारा (-री) [**सं०** वाणिज्य=व्यापार. वाणिज्=व्यापारी, वाणी] **पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. हे लोक धान्य, मीठ, इ० ची वाहतूक करतात. ® **वणजार न०, वणजारा पु०** वणजारी लोकांची टोळी किं० तळ; वणजारी लोक समुच्चयानें.

वणवण [**सं०** वनात् वनं=एका रानांतून दुसऱ्या रानांत] **स्त्री०** उन्हांत, थंडींत, किं० वाऱ्यांत आणि कष्ट सोशीत भटकणें (करणें). **क्रि० वि०** उन्हांत, थंडींत, वाऱ्यांत, आणि अनेक कष्ट सोशीत (हिंडणें, भटकणें). ह्या अर्थी 'वणांवणां' सुद्धां.

वणवणें [**सं०** अव+नम्] **अ० क्रि०** ओणवें होणें (अशिक्षितांत रूढ).

वणवा [**सं०** अव+नम्] **वि०** पुढें वाकलेला किं० कललेला; ओणवा (अशिक्षितांत रूढ).

वणवा [**सं०** वनानल] **पु०** १ पेटलेलें जंगल किं० रान. २ कांहीं भयंकर जाळपोळ (लुटारूंनीं केलेली). ३ गांवभर पसरलेली कांहीं रोगाची साथ, भयंकर बातमी, प्रचार, इ०. ४ क्रोध इ० कारणानें अंगाची होते ती आग किं० लाही.

वणिज, वणीक् [**सं०** वणिज=व्यापारी] **पु०** १ व्यापारी; वाणी. २ **(ज्योतिष)** तूळ रास. ® **वणिज्य न०, वणिज्या स्त्री०** व्यापार. **स्त्री०** व्यापार.

वणी [**म०** पाणी] **न०** (मराठी समासाच्या शेवटीं) पाणी; उ० चिंचवणी, गुळवणी, मिठवणी, इ०.

वणीक, वाणिज वर 'वणिज' पहा.

वत् [**सं०**] १ हा प्रत्यय संस्कृत शब्दांस लागून विशेषणें किं० क्रियाविशेषणें होतात; उ० ब्राह्मणवत् ह्म० ब्राह्मणाप्रमाणें; ह्याच सरणीनें वृक्षवत्, मूर्खवत्, इ०. 'वत्' हा प्रत्यय संस्कृत शब्दांस लागून 'संपन्न' हा अर्थ दाखविणारीं विशेषणें होतात; उ० धनवत् **म्ह०** धनानें संपन्न; विद्यावत् ह्म० विद्येनें युक्त ह्म० विद्वान्. ह्या प्रत्ययाचें मराठींत 'वान्,' किं० 'वंत' रूपान्तर होतें; उ० द्रव्यवान् किं० द्रव्यवंत; धनवान् किं० धनवंत; विद्यावान् किं० विद्यावंत, इ०.

वत, वती स्त्री० तरफ, बाजू, पक्ष. ह्या शब्दाचीं प्रथमेचीं रूपें अप्रचलित आहेत. 'वतीं,' 'वतीनें' ही क्रियाविशेषणार्थक रूपें मात्र रूढ आहेत. ® **वतीं, वतीनें क्रि० वि०** (कोणेकाच्या) तर्फेनें, बाजूनें, किं० पक्षानें; (कोणेकाच्या) बद्दल; (कोणेकाचा) पक्ष धरून.

वंत स्थावर, जंगम, किं० द्रव्यरूप जी कोणेकाची संपत्ति असते तींत भागीदारांचे अनेक असतात जे अंश ते प्रत्येक. ® **वंतदार पु०** अशा संपत्तीवर ज्या ज्या लोकांचे हक्क असतात ते प्रत्येक.

वतणी [**म०** ओतणें] **स्त्री०** ओतण्याची क्रिया. मागें 'ओतणें' पहा (अशिक्षितांत रूढ).

वतणें [**म०** उतणें] **अ० क्रि०** उतणें (अशिक्षितांतच रूढ). मागें 'उतणें' पहा

वतणें [**म०** ओतणें] **स० क्रि०** ओतणें (अशिक्षितांत).

वतन [**अ०** वतन्=जन्मभूमि] **न०** १ जन्मभूमि. २ वंशपरंपरागत चालणारा हक्क, शेत, मिळकत, धंदा, अधिकार, मान, किं० उत्पन्न. ® **वतनदार पु०** १ वतनाचा भोक्ता. २ कोणेक गांवचा पिढ्यानपिढ्या स्थायिक रहिवासी. **वतनी वि०** १ जेथें कोणेकाचा जन्म झाला तेथील किं० त्या ठिकाणासंबंधाचा. २ वंशपरंपरेनें प्राप्त झालेला. ३ वतनासंबंधाचा (कागद, दस्तऐवज, इ०). ४ प्रतिग्रहानें किं० विकत घेतल्यामुळें जें आपलें झालें तें. **कोणेकाचें कोणेक ठिकाणीं वतन गाडलेलें असणें** तो तेथील हक्कानें राहणारा असणें. निषेधीं किं० निषेधार्थी प्रयोग; उ० तूं येथें कशाला येत असतोस ? येथें तुझें वतन गाडलें

आहे की काय ? **वतनगाडलें न०** वंशपरंपरागत चालत आलेल्या हक्कानें प्राप्त झालेला स्थिरपणा किं० कायमपणा; उ० ह्या जागेवर वंशपरंपरा नांदून येथें माझें वतनगाडलें आहे तें मी कधींही सोडावयास तयार होणार नाहीं. **वतनजप्ती स्त्री०** वतनाची सरकारनें केलेली जप्ती किं० ह्या जप्तीनें सरकारास मिळालेला पैसा. **वतनदार हिजडा पु०** गांवकऱ्यांपासून हक्कानें भिक मागत हिंडणारा हिजडा ह्या० षंढ किं० नपुंसक. **वतनबंधु, वतनभाऊ पु०** एकाच वतनाचे जे भोक्ते ते परस्परांचे वतनबंधु किं० वतनभाऊ. **वतनवाडी स्त्री०** कोणेकाची स्थावरजंगम संपत्ति.

वतरणें [**म०** अवतरणें] १ मागें ' अवतरणें 'पहा (अशिक्षितांत रूढि). २ (पिशाचादिकानें) कोणेकाच्या शरीरांत संचार करणें. ३ पिशाचादिकांच्या संचारानें (कोणेकानें) उपद्रव पावणें.

वतवत स्त्री० १ निरुद्योगीपणांत भटकणें; भ्रमंती; भटकंती. २ बडबड; चारगटपणाचें भाषण. **वतवत, वतवतां क्रि० वि०** अचरटपणानें किं० मूर्खपणानें (बोलणें). २ चोखंदळेपणानें (जेवणें, खाणें).

वतवतणें अ० क्रि० १ बडबडणें; अचरटपणानें बोलणें. २ तिसरटपणानें किं० त्रासिकपणानें बोलणें.

वंतसें, वनसें [**म०** वहिनी+असा] **न० अ० व०, स्त्री० अ० व०** नवऱ्याची बहीण.

वतारणें वर ' वतरणें ' पहा.

वतीं, वतीनें क्रि० वि० वर ' वत, वती ' पहा.

वत्स [**सं०**] **पु०** गायीम्हशींचें वांसरूं किं० पिलूं. २ मानव जातीचा मुलगा किं० मूल. ३ मुलगा (प्रेमानें). ४ कोंकणांतील ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा इसम. ॐ **वत्सतर पु०** पाडा; गोऱ्हा. **वत्सतरी स्त्री०** कालवड. **वत्सनाभ पु०** बचनाग. **वत्सपाल पु०** १ गुराखी. २ श्रीकृष्ण. **वत्सद्वादशी स्त्री०** आश्वीन महिन्याच्या कृष्णपक्षांतील द्वादशी,–ज्या तिथीला गाय आणि वासरूं ह्यांची पूजा करतात. ह्या दिवसाला ' वसुबारस ' असेही नांव रूढ आहे. **वत्सक पु०** वांसरूं.

वत्सर [**सं०**] **पु०** वर्ष.

वत्सल [**सं०**] **वि०** मायाळू; प्रेमळ; उ० भक्तवत्सल, पुत्रवत्सल, इ०. ॐ **कुटुंबवत्सल वि०** ज्याला बायको, मुलें, इ० परिवार आहे असा. [किं० हिस्सा.

वंथ पु० वडिलोपार्जित संपत्ति इ० चा वाटा

वथणें [**म०** वदणें; **सं०** वद्] **स० क्रि०** १ बोलणें. २ मूर्खपणानें बोलणें. ३ (जें बोलणें योग्य नाहीं तें) बोलून जाणें. **अ० क्रि०** बडबड करणें; वटवट करणें

वंदक [**सं०**] **वि०** नमस्कार करणारा.

वंदण मागें ' ओंदण ' पहा.

वदणूक [**म०** वदणें; **सं०** वद्] **स्त्री०** १ सांगणें; कथन; निवेदन. २ कोणेकानें कोणेकाला केलेला बोध किं० उपदेश किं० घालून दिलेली सरणी.

वदणें [**सं०** वद्] **स० क्रि०** १ बोलणें. २ भाषणद्वारा (कांहीं गोष्ट) प्रकट करणें. ३ कबूल करणें. ४ स्पष्ट शब्दांनीं (कांहीं गोष्ट) बोलणें, सांगणें, कबूल करणें, किं० उच्चारून सांगणें. ५ पाठ केलें जें तें म्हणून दाखविणें. ६ परिगणन करणें. ॐ **वदतो व्याघातः पु०** असंबद्ध भाषण; अशक्य गोष्टीचें कथन.

वंदणें [**सं०** वंद्] **स० क्रि०** १ नमस्कारणें. २ (तीर्थ, देवळापुढील माती, इ०) भक्तिभावानें मस्तकीं धारण करणें.

वदंता [**सं०** वद्] **स्त्री०** बातमी; अफवा.

वदंती [**सं०** वद्] **स्त्री०** भाषण; बोलणें.

वदन [**सं०**] **न०** १ मुख; तोंड. २ श्रेणीचें पहिलें पद.

वंदन [**सं०**] **न०** १ नमस्कार. २ स्तुति. ॐ **वंदनमाला स्त्री०** दारावरील तोरण. **वंदनशील वि०** १ पूज्यांना योग्य तो मान देणारा. २ बोलण्याचालण्यांत सभ्य.

वंदनीय, वंद्य [**सं०**] **वि०** १ नमस्कारार्ह; नमस्कार ज्याला करावयास पाहिजे असा; पूज्य.

वदळ [**सं०** अवदलन] **स्त्री०** १ जाणें, येणें, इ० रूप रस्त्यांवरील रहदारी. २ भांडींकुंडीं किं० कोणताही पदार्थ, ह्यांचा

वारंवार उपयोग केरण्यानें होणारी झीज किं० मोडतोड. ३ कोणत्याही प्रकारचा वापर किं० वापरामुळें झालेली झीज किं० मोडतोड.

वदळ [**सं०** अवदलन] **पु०** समुद्राच्या लाटा एकसारख्या वाळवंटावर आपटत असल्या कारणानें तेथें जे चर किं० ओहोळ पडतात ते प्रत्येक.

वदान्य [**सं०**] **वि०** १ बोलणारा. २ गोड भाषण करणारा. ३ उदार; दानशूर.

वद्य [**सं०**] **वि०** १ (समासान्तीं) सांगण्या जोगें; बोलण्याजोगें. २ महिन्याचा कृष्ण (पक्ष). ३ महिन्याच्या कृष्णपक्षांतील (द्वितीया,तृतीया, इ० तिथि). ❀ **वद्यपक्ष पु०** महिन्याचा कृष्ण-पक्ष म्ह० दुसरा पंधरवडा. **अवद्य वि०** निंद्य;दोषी पापी. **अनवद्य वि०** निर्दोष.

वध [**सं०**] **पु०** १ ठार मारणें. २ तडाखा; आघात; इजा. ३ (**गणित**) गुणाकार. ❀ **वधस्तंभ पु०** फाशीं देण्याचा सुळ.

वधणें [**सं०** वध्] **स० क्रि०** ठार मारणें.

वधू [**सं०**] **स्त्री०** १ नवरी मुलगी. २ पत्नी. ३ सून. ४ कोणीही स्त्री. ५ (पशुपक्ष्या-दींत) मादी. ❀ **वधूटिका स्त्री०** १ अल्पवयी स्त्री. २ सून. **वधूप्रवेश पु०** लग्नाच्या सोहाळ्यांत वधूचें नवऱ्याच्या घरीं जाणें हा विधि. **वधूमाय स्त्री०** (लग्नाच्या सोहाळ्यांत) नवऱ्या मुलीची आई. **वधूवरें न० अ० व०** नूतन लग्न झालेली नवरानवरी. **वधूवस्त्र न०** लग्न लागतें समयीं वधूला जें पिवळें वस्त्र नेसावयास देतात तें.

वध्य [**सं०**] **वि०** ठार मारण्यास योग्य.

वंध्य [**सं०**] **वि०** १ वांझ किं० वांझोटी (स्त्री). २ निष्फल (झाड, खटपट, प्रयत्न). ❀ **वंध्यफळ वि०** १ ज्याला फळें येत नाहींत असा (वृक्ष). ३ व्यर्थ किं० निरर्थक (प्रयत्न). **वंध्या स्त्री०** वांझोटी स्त्री. **वंध्यापुत्र, वंध्यासुत पु०** अविद्यमान वस्तु,–खपुष्प, शशशृंग, मृगजल, इ० प्रमाणें. **वंध्यामैथुन न०** निष्फळ प्रयत्न, खटपट, किं० यातायात.

वन [**सं०**] **न०** १ अरण्य; जंगल. २ बागें-तील झाडांचा ताटवा. ह्या अर्थीं ' वन ' सुद्धां. इ० केळींचें, पोफळीचें वन (किं०वन). ३ ओसाड प्रदेश. ४ समासांत पूर्वपद असतां ' वन ' चा विशेषणात्मक अर्थ रानटी किं०जंगली असा होतो; उ० वनकुक्कट. ❀ **वनौका** [**सं०** वनौकस्] **पु०** १ अरण्यवासी. २ तपस्वी. ३ वानर. ४ वन्य किं० जंगली पशु. **वनगहन न०** निबिड अरण्य. **वनगो स्त्री०** गवा हा पशु. **वनचर,वनेचर पु०** १ अरण्यवासी; वानप्रस्थ. २वन्य पशु. ३ भिल्ल. ४ राक्षस. **वनचराई स्त्री०** रानांत गुरें चरावयास नेण्याबद्दल सरकारास जें द्रव्य द्यावें लागतें तें. **वनधेनु स्त्री०** वनगाय. **वनभोजन न०** कार्तिक इ० मासीं किं० अन्य वेळीं झाडाखालीं किं० बाग इ० स्थळीं मित्रमंडळीसह गमतीखातर केलेलें जेवण. **वनमाला स्त्री०** गुडघ्यापर्यंत लोंबणारी माळ. **वनमाली** [**सं०** वनमालिन्] **पु०** १ श्रीकृष्ण; विष्णु. २ बलराम. **वनराज पु०** सिंह. **वनवास पु०** १ वनांत म्ह० अरण्यांत राहणें किं० वसति करणें; उ० पांडवांनीं अनेक वर्षें वनवासांत काढलीं. २ कष्टमय किं० दुःखमय स्थिति. ३ रानांवनांत भटकत राहून केलेलें आयुष्यक्रमण. **कोणेकाला वनवास आणणें** त्याला अतोनात सतावणें किं० उपद्रविणें. **वनदेवता स्त्री०** अरण्याची अधिष्ठात्री देवता.

वन [**सं०**] **पु०** पाणी.

वनवन मागें ' वणवण ' पहा.

वनवा मागें ' वणवा ' पहा.

वनसं, वन्सें [**म०** वहिनी+असा] **न० अ० व०, स्त्री० अ० व०** नवऱ्याची बहीण. मागें ' वंतसें ' पहा.

वनस्पति [**सं०**] **स्त्री०** १ फुलें न येतां ज्याला फळें येतात असा वृक्ष (वड, पिंपळ, इ०). २ वृक्ष (सामान्यतः). ❀ **वनस्पतिशास्त्र न०** वृक्ष, लता, त्यांच्या जाति, त्यांचे प्रकार, इ० संबंधाचें शास्त्र.

वनिता [**सं०**] **स्त्री०** १ स्त्री,–सामान्यतः. २ पत्नी; भार्या. ३ मादी (पशुपक्ष्यादींत). ४ कामुक स्त्री. ❀ **वनिताश्रम पु०** स्त्रियांच्या राहाण्याची आणि शिक्षणाची जेथें मुद्दाम सोय केलेली असते अशी संस्था.

वनेचर वर ' वन ' मध्यें पहा.

वनेर पु० एक कांडेचोरासारखा प्राणी.

वन्य [**सं०**] वि० वनासंबंधाचा; जंगली; रानटी. ❀ **वन्याश्रम पु०** वानप्रस्थाश्रम. **वन्य-वृक्ष पु०** पिंपळ.

वपणी [**म०**ओपणी] **स्त्री०** धातूच्या पदार्थांना चकाकी किं० झिलई आणावयाचें एक हत्यार.

वपणी [**म०** ओपणी; **सं०** अर्प्] **स्त्री०** १ पेरण्याची क्रिया; देणें. २ देऊन टाकणें.

वपणें [**सं०** अर्प; **म०** ओपणें] **स० क्रि०** १ देणें; देऊन टाकणें. २ कोणेकाच्या स्वाधीन करणें. ३ विकणें; विकून टाकणें.

वपन [**सं०**] **न०** १ बीं पेरणें. २ (वस्त्र) विणणें. ३ हजामत करणें. ४ हजामत; केश कापणें किं० वस्त्र्यानें तासणें. ५ पुरुषाचें वीर्य किं० शुक्र. **वपनी स्त्री०** १ हजामाचें दुकान. २ कोष्टयाचा माग.

वपाविणें मागें ' ओपाविणें ' पहा.

वपा [**सं०**] **स्त्री०**१ चरबी. २ छिद्र;भोक. ३ काळजांतील केळीच्या कोंवळ्या पानासारखा पापुदरा.

वपांव मागें ' ओपींव ' पहा.

वपु [**सं०** वपुस्] **न०** १ शरीर. २ मूर्ति; आकार. ३ स्वभाव; स्वरूप. ४ रमणीय आकार.

वप्ता [**सं०** वप्तृ] **पु०** १ पेरणारा; शेत-करी. २ बाप. ३ हजाम.

वप्र [**सं०**] **पु०, न०** १ शेत. २ टेकाड; उंचवटा. ३ टेकडीची बाजू किं० माथा. ४ डोंगरावरील पठार. ५ नदी, समुद्र, इ० चा कांठ किं० किनारा. ६ वेस. ७ प्राकार; तट. ❀ **वप्रक्रीडा, वप्रक्रिया स्त्री०** बैल, हत्ती, इ० च्या टेकाडावर टक्कर देणें, शिंगांनीं माती उकरणें, इ० रूप क्रिया.

वमणें [**सं०** वम्] **स० क्रि०** १ ओकणें. २ (**लाक्षणिक**)गुप्त गोष्ट किं० मनांतील रहस्य बोलून टाकणें. **अ०क्रि०**ओकणें; (कोणेकाला)वांति होणें.

वमन [**सं०**] **न०** १ ओकणें.२(**लाक्षणिक**) मनांतील बेत प्रकट करणें. ३ कांहीं गोष्टींची परिस्फुटता.

वय [**सं०** वयस्] **न०** १ जन्म झाल्यापासून विशिष्ट समया पर्यंतचा कालावधि; उ० पांडूचें वय पंधरा वर्षें आहे. वय. २ आयुष्य ३ तारुण्याचा किं० ऐन उमेदीचा काळ. ❀ **वयोतिग, वयोतीत, वयोगत** [**सं०**] **वि०** म्हातारा. **वयांत येणें** १ प्रौढ होणें; तारुण्याच्या भरांत येणें.२बाळपण जाऊन संसाराची जबाबदारी वहावयाला योग्य अशा वयाचें होणें. ३ (काय-द्याच्या दृष्टीनें) मुलगा वीस आणि मुलगी अठरा वर्षांची होणें,—ज्या वयानंतर त्यांचे गुन्हे क्षम्य मानिले जात नाहींत. **वयांत होणें** प्रौढ होणें. **वयोधर्मानें क्रि० वि०** वय जें गेलें त्याचे परिणाम विचारांत घेतां(अशक्त होणें,किं० प्रौढ बुद्धीचें होणें). **वयोवृद्ध, वयस्क, वयस्कर वि०** १ प्रौढ. २म्हातारा. **समवयस्क वि०** सार-ख्याच वयाचीं (माणसें, जनावरें, इ०). **वया-तीत** [**सं०** ' वयोतीत ' चें अपभ्रष्ट रूप] **वि०** फार म्हातारा. **वयोवस्था स्त्री०** बाल्य, तारुण्य, आणि वार्द्धक्य, ह्या तीन स्थिति प्रत्येक.

वय मागें ' वई ' पहा.

वयकळ पुढें ' वायकळ ' पहा.

वयवाडा पु० शेत इ० च्या भोंवतालचें कुंपण इ०.

वयस्क वर ' वय ' मध्यें ' वयस्कर ' पहा.

वर [**सं०**] **वि०** १ उत्तम; श्रेष्ठ. २ ज्यास्त चांगला. **पु०** १ पसंती. २ कोणेकानें कोणेका-पाशीं मागितलेलें अभीष्ट (मागणें). ३ कोणे-कानें कोणेकाचें पुरविलेलें अभीष्ट (देणें, पुर-विणें). ४ देणगी. ५ नियोजित पति. ६ जांवई. ❀ **वरद वि०** भक्ताचें मनोरथ पुरविणारा (साधू, देव, हस्त, इ०). **वरदचतुर्थी, वरद-चौथ स्त्री०** भाद्रपद महिन्याची शुद्ध चतुर्थी. हिला ' गणेश चतुर्थी ' असें व्यवहारांत म्हणतात. **वरदहस्त पु०** देव, साधुपुरुष, इ० चा भक्ताचें अभीष्ट पुरविणारा हात,—जो भक्ताचे डोकीवर ठेविला जातो. **कोणेकाचे डोकीवर वरदहस्त ठेवणें** १ त्याचेवर कृपा करणें. २ तूं माझ्याच सारखा हो असा त्याला आशीर्वाद देणें. ३ त्याला आपल्या गुणांचा करणें (चांगल्या किं० वाईट अर्थानें). **वरदाक्षिणा स्त्री०** १ नवऱ्या मुलाला कन्यादानविधीचे वेळीं देतात ती दक्षिणा. २ चोरीस गेलेल्या पदार्थाच्या शोधा-साठीं जो पैसा खर्चिला जातो तो निष्फळ

झाला असतां त्या पैशाला ' वरदक्षिणा ' म्हणतात (वैतागांत किं० थट्टेनें). **वरदान न०** १अर्थ ३चा वर देण्याचा विधि(करणें)किं०अशा प्रकारें जें दिलें तें. २ कोणेकाला कांहीं वाईट गोष्ट करण्याचा हक्क (निंदेंत); उ० पोरांना येथें चिखल करण्याचें जणों वरदान दिलें आहे. **वरांग न०** १ मस्तक. २ जननेंद्रिय. **वरांगना स्त्री०** सुंदर स्त्री. **वरान्न न०** उत्तम किं० श्रेष्ठ अन्न. **वरदानी, वरदी वि०** ज्याला अर्थ ३ चा वर देण्यांत आला आहे असा (वंश, कुटुंब, किं० माणूस). **वरनिश्चय पु०** कन्येसाठीं नवरा ठरविणें किं० नवरा निश्चित करणें. **वरपक्ष पु०** नवऱ्या मुलाच्या बाजूचे लोक समुच्चयानें. **वरपक्षीय वि०** वरपक्षासंबंधाचा. **वरप्रस्थान न०** लग्नाच्या विधीसाठीं वराचें वधूच्या घराकडे समारंभानें जाणें किं० ह्या प्रसंगाची मिरवणूक. **वरमाई, वरमाय स्त्री०** (लग्नाच्या सोहाळ्यांत) वराची आई. **वरबाप पु०** (लग्नाच्या सोहाळ्यांत) वराचा बाप. **वरमूठ स्त्री०** लग्नाच्या सोहाळ्यांत वधूवरांच्या पदरांना बांधलेली गांठ सोडण्याबद्दल वधूच्या बहिणीला दिली जाते ती देणगी. **वरमुठीचा, वरमूठ वि०** मागें ' वरपंगी ' पहा. **वरोरु स्त्री०** सुंदर स्त्री. **वरतनु स्त्री०** सुंदर स्त्री; सुंदर आहे देह जीचा अशी स्त्री.

वर [**सं०** उपरि] **क्रि० वि०, श० यो० अ०** १ ऊर्ध्वभागीं; उ० घडवंचीवर (किं० घडवंचीच्या वर) पोतें ठेव. २ पेक्षां अधिक; उ० गणू कैदेंत गेल्याला तीन वर्षांवर(किं० वर्षांच्या वर) दिवस झाले. **क्रि० वि०** १ पर्यंत; उ० आजवर. २ आणखी; पुन्हा; शिवाय; उ० त्याणें मला शिव्या दिल्या आणि वर मारलेंही. **टीप,**–'वर' शब्दाचे कांहीं वाक्प्रचार पुढें देतों. रामू मेल्यावर म्ह० मेल्यानंतर. तेथें शंभरावर लोक होते म्ह० शंभराहून अधिक. त्याच्या भाषणावर कोणी आक्षेप घेतले नाहींत म्ह० त्यांतील विधानें कोणी खोडून काढलीं नाहींत; कचेरींत माझ्यावर कोणी नाहीं म्ह० माझ्यापेक्षां उंच दर्जाचा. दारावर भाजी स्वस्त पडते म्ह० फेरीवाल्या बाईनें आणलेली भाजी. चोरावर मोर म्ह० एका चोराला फसविणारा त्याच्याहून अट्टल चोर. दिरंगाईवर टाकणें म्ह० आज करूं, उद्या करूं, असें म्हणून पुढें ढकलणें. धर्मावर सोमवार सोडणें म्ह० लोकांच्या परोपकारबुद्धीनें मिळालेल्या पदार्थावर सोमवारच्या उपासाचें पारणें फेडणें म्ह० सबंध दिवसाचें अन्न वाचविणें. ह्या लोणच्यावर माझें जेवण झालें म्ह० हें लोणचें तोंडीं लावून. ओठावर किं० जिभेवर असणें म्ह० तावडतोब उच्चारून सोडण्याइतकें स्मरणांत खिळलेलें असणें (पण आतां मात्र आठवत नसणें). पांच मैलांवर म्ह० पांच मैल भरतात किं० संपतात तेथें. ꠸ **वर येणें** रागानें बेफाम होणें. **वरच्यावर क्रि० वि०** १ वारंवार. २ खालीं न पडूं देतां. **वर वर क्रि० वि०** १ फारसें खोल परीक्षण किं० अवलोकन न करतां;साधारण नजर फिरवून. २केवळ देखाव्यासाठीं.

वर स्त्री० स्त्रीची प्रसूतिसमयींची वार.

वरई स्त्री०१एक धान्य.२एक सोन्याचें नाणें.

वरकड, वरकट [**म०** वर+कड] **वि०** इतर; बाकीचें.

वरकरणी [**म०** वर+करणें] **वि०** बाह्यात्कारीं मात्र असलेला; ढोंगीपणाचा; दिखाऊ.

वरकर्मी [**म०** वर+कर्म] **वि०** १ केवळ बाहेरच्या बाजूसच फलद्रूप होणारा किं०परिणाम दाखविणारा (उपाय, औषध, इलाज). २ वरच्या; केवळ दिखाऊ. ३ अंतःकरणपूर्वक नव्हे असा. ꠸ **वरकर्मी आदर पु०** बाहेरून सभ्यपणाचा किं० केवळ औपचारिक आदर.

वरकल पु०, स्त्री०, न० सोन्याचा कस पाहाण्याचा दगड,–लाकडाच्या किं० पितळेच्या खोडांत बसविलेला. अशा कस पाहाण्याच्या साध्या दगडाला ' कसोटी ' म्हणतात.

वरकशी, वरकशील खालीं ' वरकस ' मध्यें पहा.

वरकस, वर्कस [**हिं०** बिगर (शिवाय)+कस (सत्त्व)] **वि०** १ तांदूळ, गहूं, बाजरी, जोंधळा, हीं एकदल धान्यें, आणि तूर, हरभरा, वाटाणा, मूग, आणि मटकी, हीं द्विदल धान्यें,हीं खेरीज करून बाकीचीं म्ह० हलक्या दर्जाचीं (धान्यें,–नागली, वरी, हरीक, इ०).२ वरक-

सार्चीं धान्येंच पिकविण्याच्या मगदुराची(जमीन). ❀ **वरकसल, वरकशील स्त्री०** वरकस धान्यें,– नागली, वरी, हरीक, इ०. **वरकशी, वर्कशी वि०** वरकस धान्येंच जेथें पिकतात अशी (जमीन). **वरकस पु०, न०** नागली, वरी, हरीक, इ० हलकें धान्य.

वरकस [म० वर (उंचीं)+कस (सत्त्व)] **वि०** १ उत्तम म्ह० निर्मळ (सोनें). २ उंची; उत्कृष्ट दर्जाचा; श्रेष्ठ (माणूस, पशु, शास्ता). ३ शास्ता; अमल चालविणारा; नियंत्रिणारा; देखरेख करणारा. पु० १ दरारा, अधिकार, वर्चस्व, श्रेष्ठपणा, अमल, वचक (बसविणें, चालविणें, चढविणें, मिळविणें). २ अधिकार, सामर्थ्य, इ० गुणानें श्रेष्ठ माणूस, पशु, किं० पदार्थ; उ० सर्व पशूंचा वरकस सिंह; पक्ष्यांचा वरकस बहिरी ससाणा; मुलांचा वरकस पंतोजी; उंदराचा वरकस मांजर. ❀**वरकसदार वरकोसदार वि०**ह्याच प्रतीकांत 'वरकस' **वि०**अर्थ३पहा.

वरकांती, वरकांतीचा [म० वर+कांति] **वि०** १ बाहेरून मात्र सुंदर दिसणारा; केवळ दिखाऊ. २ औपचारिक. ३ अप्रामाणिक; फसवणुकीचा; ढोंगीपणाचा. [३ पहा.

वरकोस, वरकोसदार ' वरकस ' **वि०** अर्थ

वरख, वर्ख, वरक [अ० वर्क्=पान]**पु०** १ पुस्तकाचें पान. २ सोनें इ० धातूचा अत्यन्त पातळ पत्रा. ३ कागदाचा अर्धा बंद. पाव बंदाला 'चवर्खा'म्हणतात.❀**वरखी,वर्खी,वरकी, वर्की वि०** अर्थ २ च्या वरकानें आच्छादिलेला.

वरखडणें,वरखडा मागें 'ओरखडणें', 'ओरखडा' पहा. हे दोन्ही शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

वरखर्च [म० वर (वरचा)+**फा०** खर्च] **पु०** मुख्य कार्याला लागलेल्या खर्चाशिवाय जो अवांतर किं० किरकोळ झालेला खर्च तो.

वरखल पु०, स्त्री० मागें ' वरकल ' पहा.

वरखशी, वरखस, वरखशील, वरखसल मागें ' वरकस ' इ० पहा.

वरखाल [म० वर+खालीं] **क्रि० वि०** १खालीं आणि वर; दोन्ही बाजूंस.२सर्व बाजूंस.

वरंग पु० एक वृक्षविशेष.

वरंगल (–ळ), **वरगल** (–ळ) **पु०** तांदूळाची एक जात.

वरंगळ, वरंघळ स्त्री० उतरण; उतार; उतरता पृष्ठभाग (रस्ता, टेकडी, इ० चा).

वरंगळणें, वरंघळणें, वरगळणें, वरघळणें अ० क्रि० १ घसरत खालीं येणें. २ ढासळून किं० कोसळून पडणें. ३ (पाण्याचा प्रवाह) जोरानें वाहात येणें. ४ (कोणताही पदार्थ) बारदान, आधार, पिशवी, पोतें, इ० तून एकदम बाहेर पडणें किं० दूर सरकणें.

वरघडी [म० वर (वरची)+घडी] **स्त्री०** दुकानदारानें किं० कोष्ट्यानें लुगडें, धोतर, कापडाचें ठाण, इ० ची घडी केल्यावर बाहेर जो भाग येतो किं० दिसतो तो,–जो इतर भागांपेक्षा मुद्दाम अधिक तजेलेदार आणि नाजूक विणलेला असतो. ❀ **वरघडीचा वि०** १ केवळ दिखाऊ किं० भपकेदार. २ ढोंगीपणाचा, खोटा.

वरघाट [म० वर (बाहेरचा)+घाट (डौल)] **पु०** पदार्थाचा बाहेरून दिसणारा घाट किं० डौल; बाह्य देखावा.

वरघाट [म० वर+घाट] **पु०** सह्याद्रि नांवाच्या पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेश.

वरघोडा [म० वर(नवरा मुलगा)+घोडा]१ नवरा मुलगा आणि नवरी मुलगी यांची लग्नाच्या समारंभांतील घोड्यावरून किं० पालखींतून काढलेली मिरवणूक. २ लग्नाच्या विधीसाठीं नवरा मुलगा नवऱ्यामुलीच्या घरीं ज्या मिरवणूकीनें जातो ती. ३ मुंज्या मुलाची मिरवणूक.

वरचढ [म० वर+चढणें] **वि०** १ कोणत्याही बाबतींत श्रेष्ठ दर्जाचा किं० सामर्थ्याचा.

वरचष्मा [म० वर किं० **फा०** बर्+**फा०** चष्माह् (डोळा)] **पु०** १ वरचढपणा; वर्चस्व. २ कोणेकावर नियंत्रणा घालण्याचा किं० ताबा चालविण्याचा जो कोणेकाचा अधिकार किं० हक्क तो.

वरचा, वरला [म० वर] **वि०** १ ऊर्ध्वभागचा. २ पश्चिमेकडील.

वरचील [म० वर] **वि०** बाकीचे; इतर.

वरजाळी स्त्री० भोंवऱ्याच्या खेळांत भोंवरा

फेकण्याची एक रीति.

वरंट पुढें ' वरवंट ' पहा.

वरंटा पुढें ' वरवंटा ' पहा.

वरंड [**सं०**] **पु०** १ समूह; जमाव. २ मुरमाची पुटकुळी. ३ माशाच्या गळाची दोरी. स्त्री० गवताचा भारा.

वरंड, वरंडी स्त्री०, वरंडा, वरांडा पु० १ कठड्याची किं० हद्दीची भिंत. २ दोन सलग शेतें किं० पटांगणें ह्यांच्या हद्दीवरची भिंत किं० दरड. ३ मातीच्या विटा विटाळ्यानें कापून काढावयासाठीं चिखल किं० गारा ह्यांचा सारख्या जाडीचा केलेला विस्तीर्ण थर.

वरंड,वरंडी [**सं०** वरंडक=ओटा] **स्त्री०** १ भिंतीचा दोन्ही बाजूंनीं उतरता माथा. २ धान्याच्या ताटांची जुडी. ३ छपराचा कुंद म्हणून जो भाग त्याचा माथा. [रास.

वरंडा [**सं०** वरंडक=टेकाड) **पु०** दगडांची

वरढाण स्त्री० मागें ' ओरट, ' ' ओरड ' मध्यें ' ओरढाण ' पहा.

वरढेल न० वडे, भर्जी, इ० तळून काढल्यावर कढई इ० मध्यें उरलेलें तेल.

वरढोक, वरढोंक पु० एक पक्षिविशेष.

वरण [**सं०** वरान्न] **न०** तूर, इ० डाळी शिजवून केलेलें पातळ खाद्यविशेष. **गोड वरण न०** भात कालवितांना घेतात तें वरण. ह्या वरणाला 'गोडें वरण' असेंही म्हणतात. फोडणीचें वरण, आंबट वरण, हे वरणाचे इतर प्रकार. ॐ **वरणभात पु० ए० व०**नवऱ्यापेक्षा बायको मोठी, सशक्त, किं० हिंमतदार अशी पतिपत्नींची जोडी किं० त्यांची ही विषमता.

वरण [**सं०**] **न०** १ पसंत करणें. २ आच्छादन. ३ वेढणें; वेष्टन. ४ तट; कुंपण. ५ मागणें; याचिणें. ६ वरणें; विवाह. ७ अनुष्ठानादि प्रसंगीं ऋत्विज ठरविणें हा विधि.

वरणा [**म०** वरण; **सं०** वर्णा=तूर] **पु०** पावटा हें द्विदल धान्य.

वरणी [**सं०** वरण] **स्त्री०** १ देवावर अभिषेक किं० देवाची पूजा इ० करण्यासाठीं किं० देवाचें उत्पन्न घेण्यासंबंधी जो कोणेकाला अवाध ठरवून दिलेला असतो तो (मिळणें,देणें,लागणें).२ लग्नाचे वेळीं वधू नेसते तें वस्त्र,—जें नंतर उपाध्याला दिलें जातें. ३ कोणेकाला कांहीं लाभ किं० अभीष्ट मिळण्याची संधी येणें किं० पाळी मिळणें. ह्या अर्थी ' वर्णी ' सुद्धां (लागणें).

वरणीय [**सं०**] **वि०** पसंत करण्यास किं० स्वीकारण्यास योग्य.

वरणें [**सं०** वृ] **स० क्रि०** पसंत करणें किं० पसंत करून स्वीकारणें.

वरतवळा, वरतावळा, वरताळा [**म०** वर + ताळा]**पु०** १ भिन्न जातींच्या नाण्यांची अदलाबदल करतांना जें अधिक किं० कमी द्रव्य द्यावें लागतें तें. २ विवक्षित मापानें धान्यादि मोजून वर जो वाढावा येतो तो. ३ देणें, घेणें, इ० व्यवहारांत वजावाट झाल्यावर राहातो जो नफा तो किं० तोटा आला असतां जें पदरचें द्रव्य द्यावें लागतें तें.

वरतां, वरतीं, वरतें [**म०** वर] **क्रि० वि०** शिवाय; आणखी. मागें ' वर' पहा. ॐ**घोड्यानें वरतां येणें** त्याणें मागें हटणें किं० मागल्या पायांवर उभें राहाणें.

वरताणा पु० सोनारांचा बांगड्या, वळी, इ० ना वाटोळा आकार देण्याचा एका टोकाला बारीक होत गेलेला खुंटा. मागें ' कांकणा, ' ' काकता, ' हे शब्द पहा.

वरत्रा [**सं०** वरत्रा=दोरी किं० चामड्याची वादी] **स्त्री०** कातड्याची दोरी किं० वादी. यांचें अपभ्रष्ट रूप ' वरात ' हें कोंकणांत 'जाडी दोरी ' ह्या अर्थी रूढ आहे.

वरद, वरदचतुर्थी मागें 'वर' मध्यें पहा.

वरदळ [**म०** वर+दाल] **न०** १ भाजीमध्यें घालतात ती डाळ. २ घराच्या छपरावर कौलांच्या खालीं जे वांसे, कामट्या, रिपा, इ०पसरतात त्या समुच्चयानें.

वरदळ [**सं०** अव+दलन] **स्त्री०** रस्ता, घराची जमीन, इ० वर चालणें, रहदारी, किं० जाणें येणें, इ० मुळें होते ती झीज किं० मोडतोड. २ त्रास, उपद्रव (चोर, लुटारू, इ० नीं दिलेला). ३ नित्याच्या उपयोगाचीं संसारांतील भांडीकुंडीं समुच्चयानें. ४ स्त्री०, न० व्यापार इ० तील नफा. ॐ **वरदळ खर्च पु०** अवांतर खर्च.

वरदळ जिंदगी, वरदळ दौलत स्त्री० जंगम संपत्ति. **वरदळसामान न०** १ संसारांतील जंगम वस्तु. २ प्रसंगविशेषींच ज्याची संसारांत जरूरी असते असें सामन,-मोदकपात्र, जिलबीपात्र, इ०. **वरदळीस येणें, वरदळीवर येणें** हमरातुमरीचें भांडण सुरू करणें. **वरदळीचा वि०** वहिवाटीतील किं० नित्याच्या उपयोगाचा.

वरदळणें [म० वरदळ] **अ० क्रि०** कोणे-कावर रागानें तोंड सोडणें; भांडण्यास सिद्ध होणें.

वरदावरद स्त्री० ए० व० पुढें 'वरावर्द' पहा.

वरदावळ मागें ' वरदळ ' **स्त्री०** पहा.

वरदूध [म० वर+दुध] **न०** मातेच्या दुधाहून अन्य दूध गाय, म्हैस, इ० चें तान्ह्या मुलाला घातलें जातें तें.

वरधणी पु०, न० चुलीवर भाजी इ० शिजत ठेवलेल्या पात्रावर जें झाकण ठेवतात तें.

वरधावा पु० १ नवऱ्यामुलाला बोलावून आणण्याकरितां नवऱ्यामुलीच्या घराहून नवऱ्या मुलीचा भाऊ किं० त्याच्याबद्दल दुसरा कोणी मनुष्य ज्या मिरवणूकीनें जातो ती. २ अशा प्रकारें बोलावून आणिलेला नवरा मुलगा.

वरधाविणें स० क्रि० (कोणेकाला) गोड गोड बोलून किं० (त्याची) खुशामत करून सुखविणें किं० वश करून घेणें.

वरपंकाचा, वरपंगीचा, वरपांगीचा, वरपंकीचा, वरपंकी (-गी,-की), वरपांगी वि० बाह्य; दिखाऊ; बाह्यात्कारी; खोटा.

वरपंग न० बाह्य किं० बाहेरचा देखावा.

वरपट्टी [म० वर+पट्टी] **स्त्री०** कोष्टयाच्या मागांतील एक अवयव.

वरपणें मागें ' ओरपणें ' पहा.

वरपिका [म० वर+पिकणें] **वि०** झाडा-वर पिकलेला (आंबा, केळें, इ० फळ).

वरबट्टा [म० वर+बट्टा] **पु०** एका जातीचें नाणें दुसऱ्या जातीच्या नाण्याच्या रूपानें बदलून घेतेसमयीं जें द्यावें लागतें तें द्रव्य.

वरंबा पु० १ शेत, कालवा, पाण्याचा पाट, इ०ना घातलेला बांध (घालणें, फुटणें, इ०). २ पाण्याचा पाट. ३ कपाळ इ०वर तडाखा बसल्यानें तेथें उठतें तें टेंगूळ. ४ मागें 'वरंड, वरंडी' पहा.

वरबुजारत क्रि० वि० बाहेरून, बाह्यात्कारी.

वरभा, वरंभा पु० मागें ' वरंबा ' पहा.

वरमणें [म० वर्म; स० वर्मन्] **अ० क्रि०** १ आपलें वर्म किं० पाप प्रकट झाल्यामुळें (कोणे-कानें) शरमणें किं० लज्जित होणें. २ (गळूं, फोड, इ०) आपल्या आपण किं० औषधोपचारा-मुळें दबणें किं० बसणें.

वरमूठ मागें ' वर ' मध्यें ' वरमूठ ' पहा.

वरला [म० वर] **वि०** वरचा; वर असलेला.
❀ **वरलाकडे क्रि० वि०** पश्चिम दिशेच्या बाजूस. **वरलाशीं न० अ० व०** स्त्रीचे स्तन.

वरव [म० उरणें] **स्त्री०** १ समृद्धि; पुरवठा; वैपुल्य; भरपूर परिमाण. २ कांहीं कामीं योजा-वयासाठीं आणलेला पदार्थ त्या कामीं योजला जाऊन त्याचा उरतो तो अवशेष (येणें). ३ कांहीं पदार्थ अंदाजापेक्षा कमी खर्चावा लाग-ल्यामुळें त्या पदार्थाला येते ती बरकत किं० त्याची पडते ती शिल्लक.

वरवंचाई [म० वर+वंचन (फसवणूक)] **स्त्री०** आंतून सत्त्वहीन, पोकळ, किं० खोटा, आणि वरून भपकेदार आणि सत्त्वस-दिसण्याचा गुण, किं० ह्या गुणामुळें झालेली फसवणूक. ❀ **वरवंचाईचा वि०** १ बाहेरून मात्र चांगला, दिखाऊ, किं० भपकेदार(आणि आंत वाईट, निकस, किं० पोकळ). २ खोटेपणाचा, ढोंगीपणाचा (आजार, प्रेम, भाषण); बताव-णीचा.

वरवंट पु० लहान मुली साडी नेसतात तेव्हां पोटावर निऱ्यांचा केळ्याच्या सारखा आकार कर-तात तो. ह्याला ' वरवंटाचें नेसणें ' म्हणतात.

वरवंटा [म० वर+वाटणें] **पु०** १ पाट्यावर चटणी इ० वाटण्यासाठीं योजतात तो दंडगो-लाकृति दगड. २ मोटेची सोंड ज्या दंडगोल लाकडावरून वळून किं० सरकून हौदांत येऊन रिती होते तें लाकूड. ३ वायु इ० च्या बाधेनें पोट, पाय, इ० मध्यें येतो तो पेटका. ❀ **पाटावरवंटा फिरणें** क्रि०

वरवंटा फिरणें १ पूर्ण नासाडी होणें;उ० काशीनाथाला वाईट संगति लागली म्हणून त्याच्या विद्येवर वरवंटा फिरला. २ जरब, कडक शासनपद्धति,किं० शिरजोरपणाची वागवणूक कोणेकाला भोगावी लागणें.

वरवड स्त्री० टोकाला गांठी दिलेल्या वस्त्राच्या दशा; घोंगडी इ०स घालतात ती रेवड.

वरवंड, वरवंडी स्त्री० मागें 'वरंड,' 'वरंडी' पहा.

वरवणी] **म०** वर (आकाशांतील)+पाणी] **न०** संटवणीचा पाऊस. [पहा.

वरवा पु० गलबताचा नांगर.मागें ' ओरवा '

वरशिका, वरशीक [**सं०** वर्ष, वार्षिक] एक प्रकारचा माठ,-ज्याला वर्षाच्या आंत वीं येत नाहीं.

वरशीं, वरचीं [**म०** ' वरचें ' चें **अ० व०**] **न० अ० व०** स्त्रीचे स्तन.'वरला'मध्यें 'वरलाशीं'

वरसणें अ० क्रि०वर्षणें. ꙮ **वरसून चालणें** (**किं० जाणें**) **अ० क्रि०** (नदी, तळें, ओढा, इ०)तुडुंब भरून कांठांवरून त्याचें पाणी बाहेर पडून वाहाणें.

वरसल, वर्षल, वर्षली [**सं०** वर्ष] **स्त्री०** पुजारीपण, शेत, वतन, कांहीं उत्पन्न, इ० चा पाळीपाळीनें कोणेकाकडे येतो तो उपभोग.

वरसाडा, वसाडा [**सं०** वर्ष्] **पु०** पाउस, कारंजें, इ० च्या पाण्याच्या थेंबाचा वर्षाव किं० तुषार (उडणें). मागें ' ओसाडा ' पहा.

वरसोस [**म०** वर+श्वास] **पु०** जोराचा श्वासोच्छ्वास (लागणें). [पहा.

वरळा, वरळी मागें ' रोंवळा,' ' रोंवळी '

वरळें न० तिसऱ्या खेपेचें खळ्यावर स्वच्छ केलेलें धान्य,-ज्यांत सालपटें आणि दाणे यांचें मिश्रण असतें आणि जें महाराला हक्क म्हणून द्यावें लागतें.

वरळें न० पुढें ' वरुळें ' पहा.

वरा पु० मागें ' ओरा ' पहा.

वराई स्त्री० १ सोन्याचें प्राचीन कांळचें एक नाणें.२एक धान्यविशेष,-ज्याला 'वरी' म्हणतात.

वराक [**सं०**] **वि०** १ बापडा; बिचारा. २ दुर्दैवी; हतभाग्य. ३ नीच; क्षुद्र.

वराट [**सं०**] **पु०** १ दोरी. २ कवडी.

वराटक [**सं०**] **पु०, न०** १ कवडी. २ कमळाच्या बीजांचा कांदा; बीजकोष. ३ दोरी.

वरांडा पु० मागें ' वरंड, ' ' वरंडा ' पहा.

वरात [**सं०** व्रात=लग्नाचें वऱ्हाड] **स्त्री०** लग्नानंतर वधूसह वराचें आपल्या घरीं परत येण्याची मिरवणूक. ꙮ **वरातीमागून घोडें** कांहीं काम करण्याला जरूर अशी सामग्री तें काम कसेंबसें होऊन गेल्याबर आपल्याला मिळणें.

वरात्या, वराती वि० १ केवळ वरातीच्या मिरवणुकींत शोभेसाठीं शृंगारून चालवावयाच्या लायकीचा पण कामाला निरुपयोगी असा(घोडा, माणूस, इ०). २ नादान, कुच किमतीचा (माणूस, जासूद, पदार्थ, इ०).

वरात [**फा०**] **स्त्री०** मामलतदार इ०कांकडे यावयाचा जो पैशाचा भरणा त्याबद्दल त्यांचेवर सरकारांतून करतात ती चिठ्ठी. २ पैसे देण्याबद्दल कोणा अधिकाऱ्याकडे पाठविलेली चिठ्ठी. ꙮ **वरातदार पु०** १ सरकारची वरात घेऊन मामलतदार इ० कांकडे वसूलाकरतां येतो जो शिपाई, स्वार, इ० तो. २ मामलतदार, खोत, इ० कांकडून कुळाकडे येतो जो तगाददार तो. **वाऱ्यावर वरात** जो मनुष्य व्यवस्थितपणें काम करील अशी आपली खात्री नाहीं त्याचेकडे काम सोपविणें (हा मूर्खपणा होय).

वरात [**सं०** वरत्रा=दोरी] **स्त्री०** १ दोरी. २ पाळणा, झोपाळा, इ० टांगण्याची जाडी दोरी किं० सांखळी, गज, इ०. ३ किल्ला, गड, इ० वर चढावयासाठीं प्राचीन काळीं टोकाला आंकडा असलेल्या ज्या जाडी दोऱ्या तटावर दूरून फेकीत असत त्या प्रत्येक (टाकणें). ४ चामड्याची दोरी. ५ हत्तीचा वि० घोड्याचा तंग.

वरान्न [**सं०**] **न०** १ उत्तम अन्न. वरण,— भातावर घेण्याचें किं० तोंडीं लावण्याचें.

वराम न० गलबताचा मागला भाग.

वराय, वरायी स्त्री० मागें ' वराई ' पहा.

वरावर [**सं०** वर+वर] **स्त्री०** लग्न जुळविणें, ठरविणें, इ० कामें समुच्चयानें.

वरावर [**म०** वर+वर] **क्रि०वि०** १ पाठोपाठ; ताबडतोब. २ झपाट्यानें.

वरावर्द, वरावर्दी [फा० बर्आवर्द्=वर आणलेलें] स्त्री० १ (गणितांत) गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी, त्रिराशिक, इ० करण्याची रीति, सरणी, किं० पद्धति. २ कमाविसदार इ० च्या खात्यांतील नोकरांचे दरमहाचे पगार, किरकोळ खर्च, इ० च्या हिशेबाचें पत्रक; मासिक हिशेबपत्रक. ३ अंदाज. ४ सरासरी. ५ गणती,—सामान्यतः.

वराह [सं०] पु० १ रानडुकर. २ डुकर सामान्यतः. ३ विष्णूच्या दहा अवतारांपैकीं तिसरा. ॐ**वराहक्रांता** स्त्री० लाजाळू ही वनस्पति. **वराहद्वादशी** स्त्री० माघ शुद्ध द्वादशी ही तिथि.

वराळी स्त्री० एक औषधोपयोगी पदार्थ.

वरिष्ठ [सं०] वि० श्रेष्ठ; उत्तम दर्जाचा किं० गुणाचा. पु० कचेरींतील किं० संस्थेंतील वरचा अधिकारी.

वरी स्त्री० एक तृणधान्यविशेष.

वरी क्रि० वि०,श० यो० अ० वर(कवितेंत).

वरां, वर [सं० पर्यन्त] श० यो० अ० पर्यंत; उ० आजवर, उद्यावर, खंडीवर.

वरीयान् [सं० वरीयस्’ च्या षष्ठीचें पुल्लिंगी ए० व०] वि० अधिक वयाचा, योग्यतेचा, गुणाचा, किं० दर्जाचा. पु० सत्तावीस योगांतील अठरावा. [तलेला.

वरील [म० वर] वि० वरचा; वर सांगि-

वरीस (–ष) [सं० वर्ष] न० वर्ष; साल (बायकी रूढि). ॐ **वरीस** (–ष) **खंड्या** पु० शेतकी इ० कामासाठीं वर्षाच्या ठरावानें किं० बोलीनें लाविलेला गडी किं० नोकर.

वरुण [सं०] पु० १ जलचरांचा राजा. २ जलाचा अधिपति देव. हाच पश्चिम दिशेचा अधिष्ठाता. ॐ **वरुणात्मज** पु० जमदग्नि. **वरुणा** स्त्री० मद्य. **वरुणालय** पु० समुद्र. **वरुणानी** स्त्री० जलाचा अधिपति जो वरुण त्याची पत्नी.

वरुता, वरुतें क्रि० वि०, श० यो० अ० (कवितेंत) वर.

वरुळें न० तिसऱ्या खेपेचें खळ्यावर स्वच्छ केलेलें धान्य. मागें ‘ वरळें ’ पहा.

वरू [म० वर] स्त्री० १ उंची आणि रुचकर खाद्य. २ श्रेष्ठता. ३ बेगमी; वैपुल्य; बरकत. ४ मागें ‘ वरव ’ सर्व अर्थीं पहा.

वरूथ [सं०] पु०, न० १ रथाचें कवच. २ चिलखत. ३ ढाल. ४ समूह. ५ सेना. ॐ **वरूथिनी** स्त्री० १ जमाव. २ सैन्य.

वरून [म० वर+ऊन (प्रत्यय)] श० यो० अ० १ ऊर्ध्व भागापासून; उ० झाडावरून आंबा पडला. २ साधनानें, द्वारानें, प्रमाणानें; उ० मी तुला शब्दावरून ओळखिलें. ३ अनुसरून,आधारानें; उ० तूं सांगितल्यावरून मी त्याला भेटलों. ४ शेजारानें;शेजारून; लगत्यानें; उ० ती झेंड्याची मिरवणूक माझ्या दारावरून किं० घरावरून गेली. ५ विशिष्ट स्थान, हुद्दा,अधिकार, दर्जा,इ० पासून किं० नंतर; उ० त्यानें मामलतदारीवरून पेनशन घेतलें. ६ पृष्ठभागाच्या सांनिध्यानें किं० आधारानें; उ० पाण्यावरून तें लाकूड तरंगत तरंगत येऊन कांठाला लागलें. ७अनेक आधारांवर अनेक ह्या क्रमानें; उ० पाटावरून जेवणारे बसले; उ० सर्व पानांवरून मी कोशिंबिरी आणि चटण्या वाढल्या.

वरेकज [म० वर+काज (कार्य)] स्त्री० लग्न जुळविणें किं० ह्या संबंधाची खटपट. ॐ **वरेकज्या** पु०लग्न जुळविण्याची खटपट करणारा; लगीनदलाल.

वरेण [म० वरी+तण (तृण)] न० वरी ह्या धान्याचीं ताटें समुच्चयानें. [श्रेष्ठ.

वरेण्य [सं०] वि० १वरण्यास योग्य.२उत्तम;

वरोटा पु० विहिरी जवळचा पाण्याचा हौद.

वरोंटा [म० वरवंटा] पु० चटणी, पुरण, इ० पाट्यावर वाटण्याचा लांबोडा दगड. मागें ‘ वरवंटा ’ पहा.

वरोळा, वरोळी मागें‘ वरळा, ’‘ वरळी ’पहा. मागें ‘ रोवळा, ’‘ रोवळी ’पहा. [बांध.

वरोळी[म०रोवळी] स्त्री० शेताच्या हद्दीचा

वरोळें न० मागें ‘ वरळें, ’ ‘ वरुळें ’ पहा.

वर्कर [सं०] पु० १ कोंकरूं. २ बोकड; बकरा. ३ पिलूं; तरुण पशु.

वर्कस मागें ‘ वरकस ’ पहा.

वर्ग [सं०] पु० १ समुदाय, समुह. २ सजातीय वस्तूंचा समूह; उ० प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग. ४ एक विशिष्ट विषय शिकणारे, एका

विशिष्ट इयत्तेंत असणारे, एका विशिष्ट दर्जाचे जे विद्यार्थी ते समुच्चयानें. ५ कोणत्याही विशिष्ट तत्त्वावर केलेले जे समूह ते प्रत्येक. ६ग्रंथभाग. ७ (**गणित**) दोन समान संख्यांचा गुणाकार; उ० बाराचा वर्ग एकशे चव्वेचाळीस. ८ (**व्याकरण**) उत्पत्तिस्थानावरून अक्षरांचे केलेले समूह किं० गट जे ते प्रत्येक; उ० क वर्ग, च वर्ग, ट वर्ग, इ०. ঞ **वर्गपद, वर्गमूल न०** ज्या संख्येला तिनेंच गुणिलें असतां विशिष्ट संख्या येते ती संख्या; उ०पंचवीसाचें वर्गमूळ पांच. **वर्गघन न०** विशिष्ट संख्येच्या वर्गाला त्याच विशिष्टसंख्येच्या घनानें गुणून येतो तो गुणाकार; षड्घात. **वर्गा-वर्गी स्त्री०** १ कोणेकाला कोणेक ठिकाणावरून काढून दुसऱ्या ठिकाणीं नेमणें, त्याच्या रिकाम्या झालेल्या ठिकाणीं दुसऱ्यास नेमणें,ह्या दुसऱ्याच्या रिकाम्या झालेल्या ठिकाणीं तिसऱ्यास नेमणें, अशा प्रकारची जी नेमणुकांची परंपरा ती. २ पदार्थ, माणसें, इ० चे कांहीं विशिष्ट तत्त्वावर वेगळे वेगळे वर्ग किं०समुदाय ठरविणें. **वर्गीय वि०** विशिष्ट वर्गाचा; विशिष्ट समूहांतील;ज्याचा दर्जा ठरविण्यांत आला आहे असा. **वर्गित वि०** ज्या संख्येला त्याच संख्येनें गुणिलें आहे ती; उ०पांच ही संख्या वर्गित केली असतां पंचवीस ही संख्या उत्पन्न होते. **वर्गसमीकरण न०** ज्या समीकरणांत संख्येचा वर्ग समाविष्ट असतो असें समीकरण. **वर्ग आमद** [**म०** वर्ग (सदर)+**फा०** आमद् (आला)] **वि०** ह्या सदरांत आलेली किं० घातलेली कांहीं बाबत, रकम, इ०. **वर्ग रफत** [**म०** वर्ग (सदर) + रफ्त् (गेली)] **वि०** दुसऱ्या सदरांत घातलेली कांहीं बाबत इ०. **वर्गी** [**सं०** वर्गिन्] **पु०** टोळीचा मुख्य किं० नायक.**वर्गीय, वर्गीण, वर्ग्य** [**सं०**]**वि०** (समासांतीं) त्यांच वर्गांतील किं० समूहांतील; सहाध्यायी; जोडीदार; उ०एकवर्गीय,भिन्नवर्गीण,इ०.

वर्गणी, वरगत [**म०**वर्ग]**स्त्री०** १समुदायावर जें देणें किं० घेणें बसतें त्याचा त्या समुदायांतील प्रत्येक व्यक्तीवर बसलेला अंश. २ वर्तमान पत्रें, नियत कालिकें, संस्था, इ० बद्दल जे ठराविक हप्त्यांनीं किं० एकदम देय द्यावें लागतें तें. **वर्गणीदार पु०** अर्थ १ ची वर्गणी ज्याचेवर बसली आहे तो. २ वर्तमानपत्र, मासिक, संस्था, इ०ना कांहीं ठराविक हप्त्यांनीं किं० एकदम कांहीं देय द्यावयाला जो बांधील झाला आहे तो.

वर्चस, वर्चस्व न०, वर्चस्वता स्त्री० [**सं०** वर्चस्=तेज, कांति] १ महत्त्व; श्रेष्ठपणा. २ अमल; अधिकार. ३ वरचढपणा. ঞ **वर्चस्वी वि०** वरचढ; श्रेष्ठ; करडा अमल चालविणारा.

वर्ज [**सं०**] **वि०** सोडलेला; त्यागिलेला; वगळलेला; नापसंत ठरविलेला; उ० खोकला आला असतां तेल्कट पदार्थ वर्ज करावे. **पु०** त्याग; वगळणें.ঞ**वर्जादिवस, वर्जवार पु०**प्रवास इ० महत्त्वाच्या किं० जोखमीच्या किं० मंगल कृत्यास जो निषिद्ध दिवस तो.

वर्जन[**सं०**]**न०**टाकणें;सोडणें;वगळणें; टाळणें.

वर्जनीय, वर्ज्य [**सं०**] **वि०** टाळण्यास किं० वगळण्यास योग्य किं० जरूर असा.

वर्जिणें, वर्जणें [**सं०** वर्ज्=सोडणें] **स० क्रि०** टाळणें; सोडून देणें; वगळणें.

वर्जित [**सं०**] **वि०**१ सोडलेला; वगळलेला; टाकलेला.२ रहित; उ०गुणवर्जित म्ह०गुणरहित.

वर्ण [**सं०**] **पु०** १ रंग. २ कांति; सौंदर्य; रूप. ३ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, हे हिंदूंचे जे विभाग ते प्रत्येक. ४ जात; प्रकार. ५ अ, आ, इ० स्वर, आणि क, ख, इ० व्यंजनें, हीं अक्षरें प्रत्येक. ६ शब्द. ७ कीर्ति. ८ आकृति. ९ गीतक्रम; गाण्यांतील राग. १० (**गणित**) अव्यक्त राशि; उ० एकवर्णसमीकरण. ११ अंगाला लावतात तें उटणें. १२ तालविशेष. १३ कसोटीच्या दगडावर सोन्याची रेषा,-जीवरून त्या सोन्याचा दर्जा ठरविला जातो. १४ (**गणित**) गुणक संख्या. १५ व्रण (अशिक्षितांत). ঞ **वर्णचतुष्टय न०** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या चार जाति समुच्चयानें. **वर्णक्रम पु०** अ, आ, इ० अक्षरांचा अनुक्रम. **वर्णधर्म पु०** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या चार समूहांस स्मृतिकारांनीं लावून दिलेली त्या त्या समूहाचीं कर्तव्यें समुच्चयानें. **वर्णमाला स्त्री०** अ, आ, इ० स्वर आणि क, ख, इ० व्यंजनें, ह्या अक्षरांचा समुच्चय; मुळाक्षरें. **वर्णापेत**

वि० बहिष्कृत; जातींतून काढून टाकिलेला (मनुष्य). **वर्णसंकर पु०** १ जातींचें मिश्रण; सबगोलंकार. २ तांबडा, हिरवा, इ० रंगाचें मिश्रण (चित्रें, इ०मध्यें). **वर्णसंघात पु०** मुळाक्षरें. **वर्णाश्रम पु०** १ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या हिंदूंच्या ज्या चार जाति त्यांपैकीं प्रत्येकाची स्मृतिकारांनीं लावून लावून दिलेली सरणी किं० राहाणी. २ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, ह्या ज्या चार अवस्था त्या प्रत्येक. **वर्णोच्चार पु०** वर्णांचा स्पष्ट उच्चार. **वर्णविपर्यास पु०** शब्दांतील एका अक्षराबद्दल दुसरें घालणें. **वर्णवृत्त, अक्षरवृत्त न०** ऱ्हस्व, दीर्घ, इ० अक्षरांच्या विशिष्ट संख्येनें आणि क्रमानें नियंत्रित असें वृत्त (शार्दूलविक्रीडित इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें आर्या, साकी, इ० मात्रावृत्त.

वर्णणें, वर्णिणें [सं० वर्ण्] स० क्रि० १ (पदार्थ इ० ची) माहिती सांगणें; निरूपिणें; निवेदिणें. २प्रशंसिणें; स्तविणें. ❀ **वर्णणूक स्त्री०** नावाजणी; स्तुति; प्रशंसा.

वर्णन न०, वर्णना स्त्री० [सं०] १ निवेदन; कथन; हकीगत. २ प्रसंशा; स्तुति; तारीफ.

वर्णनीय, वर्ण्य [सं०] वि०१वर्णावयास योग्य किं० जरूर. २ स्तुत्य; प्रशंसनीय. ३ वर्णन ज्याचें करावयाचें असा (पदार्थ, विषय).

वर्णषष्ठी, वर्णसट (-ठ) [सं० वर्णा=तूर;+षष्ठी;+म० सट, सठ (षष्ठी)] स्त्री० श्रावण महिन्यांतील शुक्ल पक्षाची षष्ठी ही तिथि. ह्या तिथीस बायका ब्राह्मणाला तुरीची डाळ दान देतात.

वर्णित [सं०] वि० १ वर्णिलेला; सांगितलेला; निवेदिलेला. २ प्रशंसिलेला; स्तविलेला.

वर्णिनी स्त्री० १ स्त्री. २ ब्राम्हण, वैश्य, इ० जातीची स्त्री. ३ हळद.

वर्णी [सं०वर्णिन्] पु०१ चितारी. २लेखक. ३ ब्रह्मचारी. ❀ **वर्णिलिंगी** [सं० वर्णिन्+लिंगिन्]पु०ब्रम्हचाऱ्याच सोंग घेतलेला माणूस.

वर्णीक [म० वर्ण] वि० ज्याचा रंग शुद्ध जातीचा नाहीं असें (रत्न).

वर्तक पु० १ गांवाचा एक वतनदार अधिकारी. २ हिंदूंचें एक आडनांव किं० त्या आडनांवाचा कोणीही माणूस. ❀ **वर्तकी स्त्री०** वर्तक ह्या गांवकामगाराचा हुद्दा, अधिकार, किं०कार्यक्षेत्र. **वर्तकी तपकीर स्त्री०** वर्तक ह्या आडनांवाच्या पुण्याच्या एका गृहस्थानें केलेली एक प्रकारची तपकीर.

वर्तणूक [म० वर्तणें] स्त्री० १ कोणेकाची वागण्याची तऱ्हा किं० सरणी. २नांदणें;राहाणें; निभावणूक; उ० त्या दुष्ट मामलतदाराच्या कारकीर्दींत ह्या गांवीं आमची वर्तणूक कठिण दिसते.

वर्तणें [सं० वृत्] अ० क्रि० १ वागणें. २ राहाणें. ३ विशिष्ट सरणीनें कोणेकानें वागणें किं० राहाणें. ४ घडून येणें; होणें; उ० त्या आश्रमांत काय वर्तलें तें मी विवेदितों, सावधान चित्तें श्रवण करा. ५(कायदा, नियम, सरणी) अमलांत किं० रूढ असणें; चालूं असणें.

वर्तन [सं०] न० १ जगणें; असणें; राहाणें. २ कोणेकाची वागण्याची तऱ्हा किं० सरणी किं० त्याणें जें केलें तें. ३ उदरनिर्वाह. ४ चरितार्थाचें साधन; धंदा; उद्योग.

वर्तमान [सं०] वि० १ असणारा. २ जिवंत, रूढ, किं० चालूं असलेला किं० घडत असलेला. ३ हल्लींचा (काळ). न० बातमी; खबर. ❀ **वर्तमान काळ पु०** हल्लीं चालूं असलेला काळ. **वर्तमानपत्र न०** ठिकठिकाणीं किं० विशिष्ट ठिकाणीं घडत असलेल्या गोष्टीचें नियमित किं० ठराविक दिवशीं निवेदन करण्यासाठीं छापिलेला कागद.

वर्तवळा इ० मागें ' वरतवळा ' इ० पहा.

वर्तावणें [म० 'वर्तणें'चें प्रयोजक] स० क्रि० १ ग्रहादींच्या स्थितींवरून आणि गमनकाळावरून गणित करून (ग्रहणें, संक्रांति, व्यतिपात, इ० ज्योतिषविषयक गोष्टी अगोदर) ठरविणें किं० ठरवून सांगणें. २ (कोणत्याही गोष्टीचा काय परिणाम) होईल तो तर्कानें ठरविणें किं० ठरवून सांगणें.

वर्ति, वर्ती, वर्तिका [सं०] स्त्री० १

दिव्याची वात. २ जखमेंतील रक्त, पू, इ० शोषून घेण्यासाठीं आंत घातलेली चिंधी, कापसाची वळकटी, इ०. ३ रंगारी किं० चितारी यांचा कुंचा. ४ डोळ्यांत घालावयाचें जें अंजन तें, किं०तें अंजन घालण्याची काडी किं० सळई.

वर्तुल, वर्तुळ [**सं०** वर्तुल] **वि०** वाटोळें. **न०** ज्या आकृतीची मर्यादारेषा एकाच वक्रदिशेची असते आणि ह्या वक्ररेषेवरील कोणताही बिंदु मध्यबिंदूपासून सारख्याच अंतरावर असतो ती आकृति. ॐ **वर्तुलपाद पु० न०** वर्तुळाचा चवथा भाग. **वर्तुलाकार वि०** वाटोळा; गोल. **पु०** १ नासधूस; विध्वंस; नासाडी; सत्यानास. २ अत्यन्त हीन,दीन, किं० दरिद्रीपणाची स्थिति.

वर्तोळा पु० मागें ' वरताळा ' पहा.

वर्त्म [**सं०** वर्त्मन्] **न०** १ रस्ता. २ वर्तनाची सरणी. ३ डोळ्याची पापणी. ॐ **वर्त्मावबंध पु०** डोळ्याच्या पापण्या सहज मिटतां न येणें ही विकृति.

वर्दावर्द, वर्दावर्दी [**फा०** बर् आवर्द्] **स्त्री०** १ अंदाज; हिशेब; गणना. मागें ' वरावर्द ' पहा. २ देणें, घेणें, जमा, खर्च, नफा, तोटा, इ० ची बरोबरी म्ह० जितक्यास तितका पदार्थ, व्यवहार, इ०. ३ आज मिळवावें आणि आज खावें अशा सरणीचा चरितार्थ, संसार,किं० प्रपंच. ४ज्याचें त्यास देणें, जिकडचें तिकडे पोचविणें,इ० रूप कामाची विल्हेवाट किं० निरवानिरव.

वर्धक [**सं०**] **वि०** वृद्धिकारक; वाढविणारा; उ० केशवर्धक तेल.

वर्धकी [**सं०**] **स्त्री०** वेश्या; जारिणी.

वर्धणें [**सं०** वृध्] **अ० क्रि०** १ वाढणें. २ भरभराटीस येणें; वैभवास चढणें.

वर्धन [**सं०**] **न०** १ वाढ; वाढण्याची क्रिया. २ भरभराट; अभ्युदय; वैभव. ३ वाढविणें. ४ पौष्टिक औषध. ५ समृद्धि; वैपुल्य.

वर्धनी [**सं०**] **स्त्री०** केरसुणी. कोकणांत केरसुणीला ' वाढवण ' म्हणतात.

वर्धनीय [**सं०**] **वि०** १ वाढवितां येण्याजोगा; वाढण्याची पात्रता ज्याच्या अंगीं आहे (सोनें, इ० धातु, झाड, प्राणी, इ०). २ वैभवास चढण्याची लायकी ज्याचे अंगीं आहे असा (माणूस इ०).

वर्धमान [**सं०**] **वि०** वाढता; वाढणारा; उत्तरोत्तर वाढत जात असलेला. ॐ **वर्धमान पिंपळी स्त्री०** पहिल्या दिवशीं एक भाग, दुसऱ्या दिवशीं दोन भाग, तिसऱ्या दिवशीं तीन भाग, अशा प्रकारें कांहीं दिवस चढवून तशाच क्रमानें उतरीत आणावी अशी औषधरूपें सेवितात ती पिंपळी.

वर्धमानक [**सं०**] **पु०** हात, डोकें, इ० वर समई, भांडें इ० घेऊन नाचणारा.

वर्धापन [**सं०**] **न०** १ कापणें ही क्रिया. २ नाळ कापणें हा संस्कार. ३ वाढदिवस.

वर्धावणें [**सं०** वर्धापन] **स० क्रि०** कांहीं कार्यार्थ (पोरें इ० कांस) खुलविणें.

वर्धावा पु० १ नवऱ्या मुलीचा भाऊ किं० त्याच्या बदलीं जो दुसरा कोणी माणूस घोड्यावर बसून समारंभपूर्वक वरास आणावयास जातो तो. २ नवरा मुलगा. मागें ' वरधावा ' पहा.

वर्धित [**सं०**] **वि०** वाढलेला; वाढविलेला.

वर्धिष्णु [**सं०**] **वि०** वाढणारा; वाढीस लागलेला; उ० हिंदूंच्या वर्धिष्णु आकांक्षांना पूर्ण अवसर देणारीच शासनपद्धति हिंदूंना पटेल.

वर्म [**सं०** वर्मन्] **न०** १ चिलखत. २ आश्रय; चिलखताप्रमाणें रक्षिणारा माणूस. ३ क्षत्रियाच्या नांवापुढें बहुमानार्थक लावावयाचा शब्द; उ० रविवर्मा, प्रहारवर्मा, इ०. ॐ **कोणेकाचीं वर्मेंचर्में छेदणें** त्याच्या नाजुक भागीं क्लेश होण्याइतकें त्याला शस्त्रांनीं बोचणें किं० शब्दांनीं ताडन करणें.

वर्म [**अ०**] **न०** १ दुखरा किं० नाजूक भाग,–जेथ यत्किंचित् इजा झाली असतां परम वेदना होते. २ शरीर, मन, यंत्र, संस्था, इ० चा नाजूक भाग,–ज्यावर प्रहार झाला असतां किं० ज्यांत कांहीं बिघाड झाला असतां तो त्या सर्व वस्तूस अपायकारक किं० दुःखदायक होतो. ३ कोणेकाचें रहस्य,–जें उघडकीस आलें असतां तो शरमतो किं० खजिल होतो किं० हतबल होतो. ॐ **वर्मी वि०** १ वर्मास म्ह० नाजूक

भागास बोचणारा किं० वेधणारा किं० दुःख देणारा (शब्द, घाव, इ०). २ कोणेकाची वर्मे किं० रहस्यें किं० लाजिरवाणीं कृत्यें किं० दुर्गुण जाणत असलेला (माणूस). ३ कोणतीही कला, शास्त्र, यंत्र, इ० ची रहस्ये किं० खुब्या ज्याला ठाऊक आहेत असा. ४ ग्रंथ, भाषण, इ०चा गूढार्थ जाणणारा किं० हुडकून काढणारा. ५ ज्यांचे ठायीं कोणत्याही प्रकारचा उणेपणा आहे किं० लाजिरवाणे गुण आहेत असा. **वर्मेंकर्मे न० अ० व०** नाजूक भाग; लाजिरवाण्या गोष्टी.

वर्मणें मागें ' वरमणें ' पहा.

वर्य [सं०] वि० उत्तम; श्रेष्ठ; प्रधान; उ० गुरुवर्य, मुनिवर्य.

वर्ष [सं०] न०, पु० १ पाऊस. २ वर्षाव; वृष्टि. ३ शिंपडणें. ४ बारा महिन्यांचा अवधि. **टीप,**–मराठींत अर्थ ४ हा **न०**शब्द म्हणून योजण्यांत येतो. ५ द्वीपाचा पोटविभाग. ६ जंबुद्वीप. ॐ **वर्षोपल पु०**पावसांत पडतात त्या पाण्याच्या गोळ्या प्रत्येक; गार. **वर्षकाल पु०** पावसाळा. **वर्षधर, वर्षवर पु०** खोजा; नपुंसक. **वर्षपर्वत पु०** खंडाच्या सीमेवरचा पर्वत. हे सात आहेत. हिमवान्, हेमकूट, निषद, शृंगवान्, नील, माल्यवान्, आणि गंधमादन. **वर्षवृद्धि स्त्री०** वाढदिवस. **वर्षगांठ स्त्री०** वाढदिवस. **वर्षघात, वर्षधात स्त्री०** १ कोणत्याही विशिष्ट कामाला मंगल किं० शुभ जो समय तो (संभाळणें, जपणें). २ इष्ट किं० अनिष्ट ह्या रूपाचें फळ देणारी जी वर्षरूप कालाची गति ती. **वर्षप्रतिपदा स्त्री०** चैत्र शुद्ध प्रतिपदा; गुढीचा पाडवा. **वर्षफल न०** टोळधाड, अतिवृष्टि, अनावृष्टि, सुभिक्ष, दुर्भिक्ष, राजभय, अग्निभय, चोरभय, इ० त्या वर्षी घडतील असें ज्योतिषी जें गणितावरून भाकीत करून गुढीपाडव्याच्या दिवशीं सांगतो तें. **वर्षर्तु पु०** पावसाळा,–श्रावण आणि भाद्रपद ह्या दोन महिन्यांचा अवधि. **वर्षल स्त्री०**वतन इ० च्या उपभोगानें कोणेकाकडे पाळीनें येतें तें वर्ष. **वर्षवीण वि०** वर्षानें विणारी (गाय किं० म्हैस. **वर्षवृद्धि स्त्री०** गुरु हा ग्रह एकाच राशींत ज्या वर्षी असतो तें वर्ष. **वर्षसण पु०** लग्नानंतर एका वर्षानें जांवयाला जें भोजन, पागोटें, इ० देतात तें देण्याचा समारंभ. **वर्षाचा दिवस पु०** १ वाढदिवस. २ सणाचा दिवस,–जो वर्षांतून एकदाच येतो. **वर्षादिसाचा दिवस पु०** वाढदिवस. **वर्षानवर्ष, वर्षानुवर्ष क्रि० वि०** १ दर वर्षी; प्रत्येक वर्षी. २ अनेक वर्षेपर्यंत सतत किं० अखंड; अनेक वर्षेपर्यंत. **वर्षासन [सं०**वर्ष+अशन (खाणें)] **न०** कोणेकाला वर्षभर खावयाला किं० भोगावयाला पुरेल इतकी राजादिकांनीं कोणेकास करून दिलेली द्रव्य, धान्य, इ० ची नेमणूक.– जी दर वर्षी अखंड क्रमानें द्यावयाचें ठरलेलें असतें'वर्षासन' हा मराठी अपभ्रंश. **वर्षोगणती क्रि०वि०**अनेक वर्षांच्या अवधीनें मोजण्याइतक्या काळपर्यंत. **स्त्री०** अनेक वर्षांची गणती. **वर्षोवर्ष क्रि० वि०** १ सतत किं० अनेक वर्षांच्या अवधीनें मोजण्याइतक्या परिमाणांत किं० परिमाणानें; सतत अनेक वर्षेपर्यंत.२दरवर्षी.

वर्षण [सं०] न० १ वृष्टि; वर्षाव.२पाऊस.

वर्षणें [सं० वृष्=वृष्टि करणें] **अ० क्रि०** (ढगांतून किं० आकाशांतून पाणी) धारांच्या रूपानें पडणें; (पाऊस) पडणें. **स० क्रि०** कोणेकावर (बाण, अग्नि, देणग्या, शिव्या, इ० ची) वृष्टि करणें.

वर्षा [सं०] स्त्री० १ पावसाळा. ॐ **वर्षाभू पु०** बेडूक. **वर्षाऋतु पु०** पावसाळा.

वर्षाव [सं० वृष्] **पु०** १ वृष्टि. २ (**लाक्षणिक**) देणग्या, शिव्या, पदव्या, इ० वैपुल्यानें किं० पुष्कळ प्रमाणांत देणें.

वर्षित [सं०] न० पाऊस. **वि०** वर्षलेला (पाऊस); दिलेली (देणगी).

वर्सल मागें ' वर्ष ' मध्यें ' वर्षल ' पहा.

वऱ्हा पु० उसाचा रस निववण्यासाठीं ज्यांत ओतितात तो खळगा.

वऱ्हाड न० १ लग्नाची मिरवणूक. २ लग्नाच्या समारंभांत वधू, वर, त्यांच्या पक्षांची बायका पुरुष, स्नेही, इ० मंडळी समुच्चयानें. ३ मुंग्यांची रांग. ४ गायी, म्हशी, इ० नीं सकाळीं माणसांची विष्ठा, उष्टें, इ० खाण्यासाठीं भटकणें (करणें) किं० त्यांचें हें भक्षण. मागें 'इरड' पहा. ५ बदमाषपणाची भटकणी; विषयासक्तीची कालक्रमणा;

❀ **वऱ्हाडगोष्टी स्त्री० अ० व०** १ कोणेका मुलाचें लग्न जुळविण्यासाठीं मुलीच्या बापाजवळ जी वाटाघाट केली जाते ती; मुलाला अनुकूल अशा गोष्टी ज्या मुलीच्या बापाला सांगितल्या जातात त्या,-त्याणें आपली मुलगी द्यावयास कबूल व्हावें म्हणून. २ पोकळ बढाई किं० प्रौढी. **वऱ्हाडघर न०** ज्या घरांत लग्न व्हावयाचें आहे किं० होत आहे तें घर. **वऱ्हाडीण स्त्री०** लग्नासाठीं जमलेल्या ज्या स्त्रिया त्या प्रत्येक. **वऱ्हाडणी स्त्री० अ० व०** लग्नासाठीं जमा झालेल्या स्त्रिया. **वऱ्हाडी वि०** १ लग्नासाठीं आलेला (मनुष्य), किं० आणलेलें (कापड). २ लग्नाच्या समारंभांत साजेसा (दागिना, वस्त्र, इ०). २ विष्टा खाण्यासाठीं सकाळीं भटकणारी (गाय, म्हैस, इ०).

वऱ्हाडणें [म० वऱ्हाड] अ० क्रि० १ (वधू आणि वर यांचें) लग्न होणें; (वरानें वधूशीं किं० वधूनें वराशीं) लग्नाच्या विधीनें जुळणें किं० संबध्द होणें. २ कोणत्याही करमणुकींत किं० कामांत गढून जाणें किं० निमग्न होणें.

वलखरणें अ० क्रि० (डोईचे केश, सामानसुमान, इ०) अस्ताव्यस्तपणें पसरलेलें असणें.

वलद, वल्लद [अ० वलद=पुत्र] पु० (कोणेकाचा) पुत्र. **टीप**,-कोणा माणसाचें नांव सांगून पुढें 'वलद,' 'वल्लद,' हा शब्द घालून पुढें बापाचें नांव सांगतात; उ० सूरज वल्लद बापू जोशी ह्म० बापू जोशाचा पुत्र सूरज.

वलन [सं०] न० १ वळणें; बाजूस सरणें. २ कांपणें; हालणें. ३ चित्तक्षोभ.

वलभि, वलभी [सं०] स्त्री० १ छपर; पाखें. २ घराची गच्ची; सज्जा. ३ ओंवण. ४ वांसा.

वलय [सं०] पु०, न० १ कडें; पोंची; वळें. २ वर्तुळ. ३ कंबरपट्टा. ❀ **वलयित वि०** वेष्टिलेलें. **समुद्रवलयांकित वि०** समुद्ररूपीं कंबरपट्ट्यानें वेष्टिलेली (पृथ्वी).

वलवणें, वलावणें, वल्हवणें [म० वल्हें] स० क्रि० १ वल्ह्यांनीं (होडी, गलबत, इ०) पाण्यांतून चालविणें. २ (काम, कारभार संस्था, कुटुंब,)रेटणें किं०चालविणें.

वलाट न०, वलाटी (-ठी) स्त्री० [म० वर+ठाय] समुद्राच्या किनाऱ्यापासून सह्याद्रीपर्यंतचा चढता जमीनीचा पट्टा.

वलावा पु० कोणेकाचा लवाजमा किं० त्याच्या संबंधाचा खर्च.

वली, वल्ली [अ० वली] पु० १ साधुपुरुष. २ वेडसर किं० विक्षिप्त माणूस; वेडापीर.

वलें, वल्हें न० होडी, गलबत, इ० पाण्यांतून चालविण्याचें साधनविशेष. ❀ **वल्हेकरी, वलेंकरी पु०** वल्हें मारणारा माणूस.

वल्कल [सं०] पु०, न० झाडाची साल किं० सालीचें केलेलें वस्त्र.

वल्गा पु०, वल्गा स्त्री० घोड्याच्या तोंडांत घालतात तो लगाम.

वल्गना [सं०] स्त्री० बढाई; बडबड.

वल्गु [सं०] वि० मोहक; सुंदर.

वल्मिक, वाल्मीक [सं०] पु० मुंग्यांचें वारूळ.

वल्मीक पु०, न० मान, खाक, सांधा, इ० ठिकाणीं गांठी येणें हा रोग.

वल्लकी [सं०] स्त्री० वीणा हें वाद्य.

वल्लद मागें ' वलद ' पहा.

वल्लभ [सं०] वि०प्रिय; आवडता;लाडका. **पु०** १ नवरा. २ जार. ३ प्रिय माणूस. **वल्लभा स्त्री०** १ पत्नी. २ कोणीही प्रिय किं० आवडती स्त्री.

वल्ली [सं०] स्त्री० वेली; वेल.

वल्हविणें [म० वल्हें] स० क्रि० वल्हें ह्या साधनानें (होडी, गलबत, इ०) पाण्यांतून चालविणें.

वल्हा पु०, वल्हें न० गलबत, होडी, इ० पाण्यांतून चालविण्याचें आकारविशेषाचें साधन.

वल्हा,वल्हे,वल्ले,वल्हेवल्हे [कानडी] उ० वा० अ० शाबास ! भलेखाशी ! बेश !

वल्ही [अ०] पु० साधुपुरुष. मागें ' वली ' पहा.

ववंडा, ववंडेकरी, वंवणें, वंवर, वंवरा,इ०

मागें ' ओवंडा, ' ' ओवंडेकरी, ' ' ओंवणें, ' ' ओंवर, ' ' ओंवरा, ' इ० पहा.

ववर [**सं०** वधूवर] **न०** नूतन विवाहित वधूवरें; वधू आणि वर हें जोडपें. मागें ' ओवर ' पहा.

ववाळणें, ववाळणी मागें ' ओवाळणें, ' ' ओवाळणी ' पहा.

वश [**सं०**] **वि०** १ ताब्यांतला. २ आज्ञाधारक. ३ नम्र. ४ कोणत्याही गोष्टीनें आकृष्ट झालेला; मोहित. ५ ग्रस्त; पीडिलेला; उपद्रुत; उ० शोकग्रस्त, दुःखग्रस्त, व्याधिग्रस्त. **पु०, न०** ताबा; अमल; कबजा; उ० दैववश. ॐ **वशी वि०** ज्याणें मनोविकार ताब्यांत ठेविले आहेत असा. **वशंवद वि०** आज्ञाधारक; नम्र. **दैववशात्** [**सं०**] **क्रि० वि०** दैवानें; दैवगतीनें; कर्मधर्मसंयोगानें. **वशक्रिया स्त्री०** मंत्रतंत्र, जादू, इ० नीं कोणेकाला आपल्या ताब्यांत आणणें.

वंश [**सं०**] **पु०** १ चिवा; वांबू; कळक. २ पांवा; मुरली. ३ कुळ; कुटुंब. ४ वर्ग; समूह. ५ घराचें आढें. ६ पाठीचा कणा. ७ वंशलोचन. ८ संतति. ॐ **वंशावळ स्त्री०** कुळांत जन्मलेल्यांची यादी. **वंशानुक्रम पु०** वंशावळ. **वंशागत वि०** वडिलोपार्जित. **वंशज वि०** कुळांत उत्पन्न झालेला. **वंशच्छेद पु०** १ कुळाचा नाश; वंश खुंटणें. २ बांबूंची तोड. **वंशपरंपरायात, वंशपरंपरागत वि०** वंशाच्या मागल्या प्रत्येक पिढींत चालून आपणापर्यंत आलेलें (घर, वतन, हक्क, वृत्ति, इ०). **वंशलोचन, वंशक्षीर, न०, वंशरोचना, वंशक्षीरी स्त्री०** बांबूच्या पोटांत उत्पन्न होतो तो एक पांढरा पदार्थ. हा पदार्थ औषधाच्या उपयोगाचा असतो. **वंशपात्र न०** बांबूंच्या पाती विणून केलेलें पात्र, –रोवळी, टोपली, कणिंग, हारा, इ०. **वंशीक वि०** वंशपरंपरेनें चालत आलेलें (वतन, हक्क, इ०). **वंशीय, वंशी वि०** विशिष्ट वंशांतील (समासांत); उ० सूर्यवंशी, चंद्रवंशी. **सूर्यवंशी वि०** सूर्य उगवल्यानंतर निजून उठणारा. **वंशी वि०** बांबूचें केलेलें.

वशट वि० मागें ' ओशट ' पहा. **न०** मांसाचें खाद्य.

वशा [**सं०** वंश] **पु०** आपल्या शेताची नांगरणी, मशागत, लावणी, कापणी, इ० शेतकीचीं कामें करावयासाठीं नेमलेला जो प्रत्यक्ष शेत करणारा त्याच्यावर देखरेख करावयासाठीं नेमिलेला मनुष्य.

वशारणें न० विणावयासाठीं मागावर घातलेले धागे समुच्चयानें; ताणा.

वशिंड (–ढ) [**सं०** वृषस्कंध] **न०** बैलाच्या पाठीवर मानेजवळ असतो तो मांसाचा उंचवटा.

वशिता स्त्री०, वशित्व न० [**सं०**] १ ताबा. २ मोहित करणें. ३ अणिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, महिमा, ईशिता, वशिता, कामावसायिता, ह्या ज्या अष्टसिद्धि त्यांपैकीं एक. वशिता ह्या सिद्धीनें हव्या त्या माणसाला वश करून घेतां येतें.

वशिला [**अ०** वसीलाह्] **पु०** आपल्यासाठीं जो आपल्या संबंधानें तरफदारी करील, आपलें काम पुढें रेटील, आपल्याबद्दल भीड खर्च करील, असा मनुष्य; वग; आधार; टेका.

वशिष्ठ, वसिष्ठ [**सं०**] **पु०** १ एक तपस्वी. हा सूर्यवंशींच्या राजांचा कुलगुरु होता. २ (**लाक्षणिक**) धर्मकर्मे यथासांग आणि शास्त्रोक्त रीतीनें करणारा (माणूस, उपाध्या). ॐ**वशिष्ठवामदेव पु० ए० व०** विचारवंत आणि व्यवहारज्ञ असा माणूस.

वशें, वशेंड न० बैलाच्या मानेजवळ पाठीवर असतो तो मांसाचा उंचवटा; वशिंढ.

वशेळी [**म०** वसा=व्रत, नेम] **स्त्री०** कांहीं व्रत किं० नियम जिणें धरला आहे अशी स्त्री. खालीं ' वसा ' मध्यें पहा.

वश्य [**सं०**] **वि०** १ वश होण्याजोगें. २ वश केलेलें; स्वाधीन. **पु०** सेवक; नोकर.

वसकणें अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर एकदम रागानें ओरडणें; उ० तो माझ्या अंगावर उगीचच्या उगीच वसकला.

वसंड [**सं०** वृषस्कंध] **न०** बैलाचें वाशिंड. मागें ' वशिंड ' पहा.

वसण न० १ पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला गाळ किं० केरकचरा. २ बैलाच्या नाकांत असते ती वेसण. पुढें ' वेसण ' पहा

वसगत्रणें, वसणात्रणें, वसणणें अ० क्रि० झोपेंत किं० तापाच्या लहरींत वडबडणें.

वसणें [सं० वस्] अ० क्रि० १ कोणेक स्थळीं राहाणें किं० वास करणें किं० असणें. २ (शहर, गांव, किं० भूमीचा प्रदेश) माणसांच्या वसतीनें व्यापला जाणें किं० गजबजलेला असणें.

वसणें [म० वसा=व्रत] स० क्रि० (व्रत, नियम) आचरणें; उ० मुलींना मंगळागौर लग्नानंतर पांच वर्षें वसावयाची असते.

वसंत [सं०] पु० १ चैत्र आणि वैशाख ह्या दोन महिन्यांचा अवधि; किं० मीन आणि मेष ह्या दोन संक्रांति मिळून जो दोन महिन्यांचा अवधि तो. २ (**संगीत**) एक राग. ३ (**वैद्यक**) मालिनी-वसंत हें औषध. ꠰ **वसंतोत्सव** पु० होळीचा उत्सव. **वसंतपंचमी** माघ शुद्ध पंचमी ही तिथि. **वसंतपूजा** स्त्री० वसंतऋतूंत ब्राह्मणांना आपल्या घरीं बोलावून त्यांच्याकडून मंत्र म्हणवून घेऊन त्यांना आंब्याचा रस, पन्हें, इ० प्यावयास देतात, त्यांना चंदनाची उटी लावितात, पंखे बक्षीस देतात, दक्षिणा देतात, हा जो समारंभ तो. **वसंतमाधव** पु० श्रीविष्णु,–वसंतऋतूची देवता. **वसंताचें बोलणें** न० १ टाळाटाळीचें उत्तर. २ कोणेकाला वश करून घेण्यासाठीं त्याच्याशीं केलेलें गोड गोड भाषण. **वसंततिलका** स्त्री० एक अक्षरगणवृत्त. याच्या प्रत्येक चरणांत त, भ, ज, ज, हे गण असून शेवटीं दोन गुरु अक्षरें असतात.

वसतकरू [म० वसति+करणें] पु० कांहीं काळापुरता कोणेक स्थळीं राहावयाला आलेला किं० राहिलेला मनुष्य.

वसंतरा [सं० वंश] स्त्री० वंश, संतति (अशिक्षितांत).

वसता [म० वसणें] वि० व्यापिलेला; ज्यांत वसति करण्यांत आली आहे असा (देश, गांव, इ०). पु० १ वाटसरू. २ रहदारीचा रस्ता.

वसति, वसती [सं०] स्त्री० १ राहाणें; निवास करणें. २ वासस्थान; घर. ३ आधार; आश्रयाची जागा. ४ सैन्य, यात्रेकरू, इ० चा तळ किं० मुक्काम किं० मुक्कामाची जागा.

वसति [सं० वस्=राहाणें] स्त्री० १ राहाणें. २ एकाद्या ठिकाणीं राहिलेले लोक समुच्चयानें; उ० येथें सारी शेतकऱ्यांची वसति आहे. ३ राहाण्याचें ठिकाण. ꠰ **वसतिगृह** न० जेथें प्रवासी, सडे लोक, इ० ची पैसे घेऊन भोजनाची आणि रात्रीच्या निजण्याची सोय केली जाते असें घर.

वसन [सं० वस्=राहाणें] न० १ राहाणें; वसति करणें. २ घर. [सं० वस्=पेहेरणें] न० १ पोशाख; कपडे धारण करणें. २ वस्त्र,–धोतर, लुगडें, इ०.

वसला पु० १ जमीनीची मोजणी करतेसमयीं सोयीसाठीं जमीनीचे जे तुकडे करतात किं० कल्पितात ते प्रत्येक. २ कोणत्याही क्षेत्राचे तुकडे प्रत्येक. ३ वस्त्राचे फाटून निघालेले किं० फाडून काढलेले तुकडे प्रत्येक. ह्या अर्थी प्रयोग बहुधा अ० व० होतो. ꠰ **कोणेकाचे वसले काढणें** त्याची भोसडपट्टी किं० खरडपट्टी काढणें. **एकाद्या सूचनेचे वसले काढणें** ती मूर्खपणाची आहे असें सिद्ध करून देणें; तिच्यावर हरएक प्रकारचे आक्षेप काढणें.

वसलात (–द) [अ० वसूल] स्त्री० एकाद्या कुटुंबांत वंशपरंपरेनें चालत आलेला जो गुण, धर्म, स्वभाव, रोग, इ० तो.

वसली, वसल्या [म० वसूल] वि० १ वसूल करण्याच्या कामावर नेमिलेला (कारकून, नोकर, इ०). २ वसूलासंबंधाचा (खर्डा, कागद, हिशेब, इ०).

वसवटा [म० वसणें] पु० १ वास्तव्य. २ वसतीची जागा किं० घर.

वसवस, वसवसां क्रि० वि० ओरडून किं० चरफडून (बोलणें, रागें भरणें, इ०).

वसवसणें अ० क्रि० कोणेकाच्या अंगावर रागानें ओरडणें, चरफडणें, किं० तोंड टाकणें.

वसवसा, वस्वास, वस्वसा [अ० वस्वास्, वसवसाह्] पु० १ कोणेकाविषयीं कोणेकाला वाटते ती भीति; धाक; दरारा. २ कांहीं कारणामुळें मनाला लागते ती टोचणी; हुरहुर; काळजी. ३ कल्पना; तर्क. ४ शंका; संशय; अंदेशा. ꠰ **वस्वासी, वस्वसी, वसवशी** वि० संशयी; शंकाखोर.

वसवा पु० १ सावली; छाया. २ अंधेर;

काळोख. ३ जिच्यापासून लिहिणें, वाचणें, इ० कामाला हरकत होते अशी परिस्थिति.

वसविणें [म० ' वसणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** लोकांना (एकाद्या स्थळीं) घरें बांधून रहावयास सांगणें; उ० येथें पूर्वी रान होतें, पेशव्यांनीं हा प्रदेश वसविला; उ० रास्त्यांनीं ही पेठ वसविली.

वसवी स्त्री०, वसवें न० जांत्याचा खुंटा, कोयत्याची मूठ, मुसळ, इ० च्या टोकाला जें लोखंडाचें वळें बसवितात तें.

वसहत, वसहात, वसात, वसाद, वसाहत [अ० वस् अत्] **स्त्री०** कोणेक ठिकाणीं जुटीनें किं० शेजारपणानें राहिलेले लोक (किं० प्राणी) समुच्चयानें किं० तें ठिकाण.

वंसा, वसा पु० स्त्रीनें केलेलें किं० करावयाचें म्हणून ठरविलेलें कांहीं व्रत, नियम, इ०(घेणें, पार पडणें). ꙮ **वसाळी, वशेळी स्त्री०** कांहीं व्रत आचरीत असलेली स्त्री.

वसा [सं०] **स्त्री०** १ चरबी. २ मगज; मेंदू.

वसाडा पु० मागें ' ओसाडा ' पहा.

वसात (–द्) वर ' वसहत ' पहा.

वसार मागें दोन्ही अर्थी ' ओसर ' पहा.

वसाहत मागें ' वसहत ' पहा.

वसाळी मागें ' वंसा ' मध्यें पहा.

वसु [सं०] **पु०** देवताविशेष. आप, ध्रुव, सोम, धर (किं० धव), अनिल, अनल, प्रत्यूष, आणि प्रभास, हे आठ वसु गणिलेले आहेत. **न०** द्रव्य; संपत्ति. ꙮ **वसुदा स्त्री०** पृथ्वी. **वसुदेवता स्त्री० (ज्योतिष)** धनिष्ठा. **वसुधा, वसुंधरा स्त्री०** १ पृथ्वी. २ जमीन. **वसुमती स्त्री०** पृथ्वी. **वसुश्रेष्ठ न०** १ सोनें. २ रुपें. **वसुबारस स्त्री०** आश्विन वद्य द्वादशी. ह्या दिवशीं गाय आणि वासरूं यांची पूजा बायका करतात.

वसुजणें [म० अव+सुजणें] **अ० क्रि०** (गळूं, सूज, इ०) ओसरणें, दबणें, किं० बसणें.

वसुली [म० वसूल] **वि०** १ वसुलासंबंधाचें. २ पुष्कळ नफा, उत्पन्न, किं० लाभ देणारा (गांव, शेत, धंदा, इ०). ३ वसूल करावयाच्या कामावर नेमिलेला (गडी, कारकून, इ०). ꙮ **वसुली गल्ला पु०** धान्याच्या रूपांत आलेला सारा किं० शेताचा वसूल. **वसुली जमा स्त्री०** प्रत्यक्ष मिळालेला किं० वसूल झालेला शेतसारा (' आकारजमा ' च्या व्यावर्तकत्वें). **वसुली बेरीज स्त्री०** वाद करावयाचे भाग वाद केल्यावर जी प्रत्यक्ष जमा होते ती.

वसुसर्ग [सं० वृषोत्सर्ग] **पु०** मृत माणसाची प्रेतावस्थेंतून मुक्तता व्हावी म्हणून त्याच्या पहिल्या श्राद्धाच्या दिवशीं पोळ किं० सवत्स धेनु यांचा उत्सर्ग (म्ह० सोडून देणें) हा विधि.

वसू [सं० वृष=बैल] **पु०** ढुंगणावर तापलेल्या लोखंडानें डाग देऊन देवाच्या नांवानें मोकळा सोडलेला बैल. वर ' वसुसर्ग ' पहा.

वसू पु०, स्त्री०, वसूं न० मुसळ, जांत्याचा खुंटा, इ० च्या टोकाला बसवितात तें लोखंडाचें कडें किं० वळें. [पहा.

वसूबारस मागें ' वसु ' मध्यें ' वसुबारस '

वसूल [अ०] **पु०** कोणेकाकडून सरकार, सावकार, इ० ना द्यावयाचें जें द्रव्य, धान्य, इ० तें. २ कोणेकाकडून कोणेकाला मिळावयाचें जें द्रव्यादि तें. ꙮ **वसूलदार पु०** मालकासाठीं द्रव्य, धान्य, इ० कुळें इ० कांकडून गोळा करणारा कारकून, शिपायी, इ० माणूस. **वसूलबाकी स्त्री०** १ वसूल घेणें, वसूलाची बाकी काढणें, इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें. २ वसूलाचा अद्यापि मिळावयाचा भाग. **वसूलवासलात स्त्री०** वसूलाचा हिशेब. **वसूलवासूल पु०** वसूल करणें आणि ह्या संबंधाचीं इतर कामें समुच्चयानें.

वसें न० जांत्याचा खुंटा, काठी, मुसळ, इ० च्या टोकांना बसवितात तें लोखंडाचें कडें.

वस्त [सं०] **पु०** बोकड; बकरा.

वस्त [सं० वस्तु] **स्त्री०** १ सोनें, रुपें, इ० धातूंचा दागिना. २ कोणताही पदार्थ. ꙮ **वस्तभाव, वस्तवानी स्त्री०** १ दागिने, खेळणीं, अत्तरदाणी, इ० सुंदर पदार्थ समुच्चयानें. २ संसारांतील भांडींकुंडीं इ० सामानसुमान. ३ प्रवासांत जरूर असें सामानसुमान.

वस्तरा, वस्तारा, वस्त्रा [फा०] **पु०** अंगा-

वरील केश तासून काढण्याचें एक पोलादी हत्यार.

वस्ताद [**फा०** उस्ताद्] **पु०** १ गुरूजी; शिक्षक. २ गाणें, नाचणें, वाद्यें वाजविणें, तालमींतील उड्या, कुस्त्या, इ० कामें शिकविणारा गुरु. ३ कोणत्याही विद्येत किं० कलेंत जो प्रवीण तो. ४ कांहीं गुणानें दुसऱ्यापेक्षां वरचढ जो माणूस तो.५प्रतिपक्ष्यानें आपणाविरुद्ध योजलेल्या युक्त्या किं० कृत्या हाणून पाण्याचें कोणेकाच्या अंगचें सामर्थ्य. ५ पक्का निष्णात; वाकबगार; हार न जाणारा. ६ शिरजोर माणूस. ❀ **वस्तादगिरी स्त्री०** १ वस्तादाचा धंदा. २ कोणतीही कला, शास्त्र, इ० मध्यें जो कोणेकाचा निष्णातपणा तो. ३ चातुर्य. ४ लढविलेली युक्ति किं०हिकमत. **वस्तादी वि०** गुरूपासून शिकून घेतलेलें (ज्ञान, कला, इ०); स्वताच्या मेहेनतीनें संपादन केलेलें नव्हे असें (ज्ञान, कला, इ०).

वस्तारा वर ' वस्तरा ' पहा.

वस्ति [**सं०**] **पु०, स्त्री०** १ वसति; राहाणें. २ ओटी पोट. ३ मूत्राशय. ४ पिचकारी. ❀ **वस्तिशोधन न०** लघवी किं० लघवी करविणारें औषध.

वस्ती [**सं०** वस्ति] **स्त्री०** १ कोणेक ठिकाणीं राहाणें किं० वास करणें. २ कोणेक ठिकाणीं राहिलेले लोक समुच्चयानें; उ० ह्या गांवांत सगळी मऱ्हाठ्यांची वस्ती आहे, इतर जातींचें एकही घर नाहीं. ❀ **वस्तीस राहाणें** (किं०**उतरणें**) एकाद्या ठिकाणीं अल्पकाल मुक्काम करणें. **वस्तीकरू पु०** १ कोणेक स्थळीं अल्प काळ वसतीसाठीं राहिलेला माणूस.मागें'वसतकरू'पहा. २ प्रवासी; मुसाफर. **वस्तीवाडी स्त्री०** १ गांव, शहर, इ० मध्यें लोकांची वसति.२संतति.

वस्तु [**सं०**] हा शब्द संस्कृतांत **न०** आणि मराठींत **स्त्री०** आहे. मराठींत कधीं कधीं **न०** योजतात. १सृष्टींतील यच्चयावत् पदार्थ प्रत्येक. २ सत्य पदार्थ किं० गोष्ट; सत्य स्वरूपाशीं जुळणारें कांहींहीं; उ० वस्तूचे ठायीं अवस्तूचा आरोप भ्रमानें केला जातो.३ दौलत; जिंदगी.४पदार्थाचा धर्म; स्वभाव. ५ सार; सत्त्वांश. ६ नाटक, कादंबरी, गोष्ट, इ० चें संविधानक. ❀ **वस्तूत्थापन न०** जादूनें पदार्थाचा फेरफार करणें. **वस्तुतः क्रि० वि०** १ खरोखरीं; खरें पाहिलें असतां; वास्तविक रीत्या. २ स्वभावतः. ३ अर्थात. **वस्तुमात्र न०** प्रत्येक वस्तु; उ० ह्या सृष्टींतील वस्तुमात्र नाशवंत आहे. **वस्तुशक्ति स्त्री०**, **वस्तुस्वभाव पु०** पदार्थाचें तत्त्व;पदार्थाचा धर्म. **वस्तुस्थिति स्त्री०**खरोखरी घडलेला प्रकार;खरी गोष्ट; खरी हकीगत;खऱ्याचा जो भाग किं० अंश तो. **वस्तुगत्या क्रि० वि०** खरा विचार करून पाहातां; परमार्थानें. **वस्तुकथन न०** कांहीं एका अर्थाच्या वास्तविक स्वरूपाचें जें कथन तें.

वस्तूक [**सं०** वस्तु] **स्त्री०** मुलाला मुलीवविण्यासाठीं किं० रमविण्यासाठीं त्याला खाऊं, खेळणें, इ० देतात तें.

वस्त्र [**सं०**] **न०** १ कपडा; चिरगुट. २ पोशाख. ३ आच्छादन. ❀ **वस्त्रग्रंथि पु०, स्त्री०** नेसलेल्या वस्त्राची कमरेवरची गांठ. **वस्त्रपुत्रिका स्त्री०** चिंध्यांची बाहुली; जिनगरी बाहुली. **वस्त्रगाळ, वस्त्रगाळीव वि०** वस्त्रांतून गाळून घेतलेलें (औषध, पीठ,माती, इ०). **वस्त्रपात्र न० ए० व०** संसारांत जरूर अशीं भांडीं, चिरगुटें, सामान, इ० समुच्चयानें. **वस्त्रप्रावरण न० ए० व०** वापरावयाचीं, पांघरावयाचीं, अंगांत घालावयाचीं, आणि नेसावयाचीं चिरगुटें समुच्चयानें. **वस्त्रलोचन** [**सं०** वस्त्र+लुंचन (लुबाडणें)] **न०** कोणेकाचीं वस्त्रें, कपडे, आणि इतर चिरगुटें, इ० चें हरण किं० लुबाडणूक. **वस्त्राचा ताणा पु०** नक्षत्रमाळेप्रमाणें दोरीवर टाकलेलीं चिरगुटें समुच्चयानें,—वाळावयासाठीं किं०अव्यवस्थितपणानें.**वस्त्राहरण न०** कोणेकाचीं वस्त्रें हिरावून घेणें. **वस्त्रहरण न०** कोणेकाचीं नेसलेलीं वस्त्रें काढून घेऊन त्याला नग्न करणें; उ० द्रौपदीचें वस्त्रहरण.

वस्त्रा [**फा०** उस्तरा] **पु०** १ अंगावरील केस तासून टाकण्याचें एक पोलादी आणि तीक्ष्ण धारेचें साधन. २ (**लाक्षणिक**) प्रतिपक्ष्याच्या विधानाला चोख आणि तडफदारपणें उत्तर देणारा मनुष्य. ३ तडफदार आणि झोंबरें भाषण. मागें ' वस्तरा ' पहा.

वस्मरणें, वस्मारणें [**सं०** उत् (वर)+स्मृ] **अ० क्रि०** मागें ' उस्मरणें ' पहा. ॐ **उस्मरा, उस्मारा, वस्मरा पु०** उस्मरण्याची क्रिया.

वस्वी [**म०** वसूं] **स्त्री०**काठी,खुंटा,इ० च्या टोकाला बसविलेली लोखंडाची विटी.

वहणें पुढें ' वाहणें ' पहा.

वहन, वाहन [**सं०**] **न०** १ वाहून नेणें. २ जलाचें वाहणें. ३ प्रवासाचें साधन,–गाडी, घोडा, मेणा, पालखी,इ०.

वहमा, वाहिमा, वहीम [**अ०** वह्म्] **पु०** १ कोणेकाच्या कांहीं दुष्कृत्याबद्दल त्याच्यावर असलेला लोकांचा संशय; उ० रानड्यांच्या घरीं चोरी केल्याच्या वहिमावरून शिपायांनीं खंड्या सुताराला पकडलें. २ कांहीं गोष्टीसंबंधानें कोणेकाचा तर्क, संशय, किं० आदमास.

वहाटळ, वहाटूळ, वाहुटळ [**सं०** वातल= वायु] **स्त्री०** १ जोराचा वारा; सोसाट्याचा वारा. २ चक्राकार गतीनें वाहाणारा वारा.

वहाडणें पुढें ' वाढणें ' पहा.

वहाण [**म०** वाहणें] **स्त्री०** १ पाण्याचा प्रवाह. २ वाहलेलें पाणी. ३ पायाच्या रक्षणार्थ चालतांना घालतात तो कातड्याचा पदार्थ. ॐ **पायींची वहाण पायींच बरी** हलकट माणसाला मोठेपणा देऊन चढवून ठेवूं नये.

वहाणी, वहाणें, इ० पुढें ' वाहणी, ' ' वाहणें, ' इ० पहा.

वहावट पुढें ' वहिवाट ' पहा.

वहावट [**म०** वाहणें] **न०** नदी इ० च्या प्रवाहानें ज्यांतील माती धुपून गेली आहे असें शेत किं० अशी जमिन.

वहाळ मागें ' ओहळ ' पहा.

वहिनी [**सं०** भगिनी] **स्त्री०** १ भावाची बायको. २ पोक्त स्त्री(आदराचा शब्द).

वहिमा पु० मागें ' वहमा ' पहा.

वाहिला वि० १ (कवितेंत) पृथक; वियुक्त; निराळा. २ श्रेष्ठ. ३ सुंदर. **क्रि० वि०** १ तह्लखपणें; तडकाफडकीं. २ निश्चितपणें; खात्रीपूर्वक.

वहिवट, वहिवटणें पुढें ' वहिवाट, ' 'वहिवाटणें ' पहा.

वहिवाट [**म०** वाहणें] **स्त्री०** १ कांहीं काम, कारभार, संस्था, इ० सुरळीतपणें आणि जबाबदारी शिरावर घेऊन चालविणें किं० चालविण्याची सरणी, शिरस्ता, किं० परिपाठ. २ कांहीं काम जल्द आणि सफाईनें करण्याची कोणेकाची हातोटी किं० कुशलता किं० खुबी. ३ कोणा अमल्दाराची कारकीर्द किं० अमल चालविण्याची सरणी. ४ वतन, शेत, घर, इ०चा भोगवटा. ५ वापर; उपयोगांत आणणें. ६ जाणें, येणें, बोलणें, देणें, घेणें, इ० बाबतींत कोणेकाशीं कोणेकाचा असतो तो घरोबा किं० परिपाठ किं० क्रम. ७ सलगीचा किं० मित्रत्वाचा संबंध. ॐ **वहिवाटदार पु०** १ गांव, तालुका, इ०मध्यें बंदोबस्त ठेवणें, तेथील वसूल करणें, इ० कामावर सरकारनें नेमलेला अधिकारी. २ शेत, वतन, हक्क, इ० चा प्रत्यक्ष जो भोक्ता तो. ३ कांहीं काम, धंदा, इ० मालकाच्या सांगण्यावरून जो चालवितो तो त्याचा गुमास्ता किं० मुनीम.

वहिवाटणें [**म०** वहिवाट] **अ० क्रि०** १ कांहीं कामीं (कोणेकाला) अनुभव मिळणें; कांहीं कामीं (कोणेकानें) परिचित होणें. २ (कोणेकाचा)कोणेकाशीं कांहीं कामीं संबंध येणें किं० होणें. ३ वापरण्यांत किं० उपयोगांत (पदार्थ) असणें. ४ परिस्थितीशीं परिचित होणें; रुळणें. ५ टिकून राहाणें. ६ (संकट, अडचण, इ०) पार पडणें किं०निस्तरलें जाणें.**स० क्रि०** १(काम, धंदा, नोकरी, इ०) चालविणें, चालू ठेवणें,किं० करीत राहाणें. २ (शेत, वतन, हक्क, इ०) भोगणें किं० उपभोगणें. ३ कांहीं कामीं (कोणेक माणूस, पशु, पदार्थ, सरणी, औषध, इ०) योजणें,वापरणें,उपयोगांत आणणें,किं०ठेवणें; उ० हा घोडा मी लढाईंत वहिवाटला आहे; उ० हें औषध मी आमांशांत सदैव वहिवाटींत असतों. ४ (संकट, अडचण, पेंच, इ० तून) निभावून बाहेर पडणें. ५ कोणेकानें (कोणेक स्त्री) एकदां किं० अनेक वेळां मैथुनानें भोगलेली असणें.

वही [**हिं०** वही] **स्त्री०** १ व्यापाऱ्याची हिशेब, जमाखर्च, इ० साठीं केलेली चोपडी. २ टिपणें, शब्द, अर्थ, उदाहरणें, इ० लिहिण्यासाठीं विद्यार्थी करतो ती चोपडी.

वही स्त्री० ताण्याचीं सुतें कांड्या ज्या फणी-

तून ओवितो ती फणी.

वही, वय, वई स्त्री० शेत, घर, इ० भोंवतीं घालतात तें कुंपण.※ **वहीवाडा पु०** घराल्गतचे कुंपण घातलेलें पटांगण.

वही स्त्री० लग्नासाठीं घातलेल्या बहुल्याच्या चार कोपऱ्यांस चार उतरंडी रचावयासाठीं ठेवतात ती मडकीं प्रत्येक.उतरंडींत पांच पांच मडकीं असतात. ह्यांपैकीं दोन उतरंडी लग्नानंतर वधूकडे आणि दोन वराकडे ठेवल्या जातात.※**वहीवरून आंबट होणें** क्षुल्लक कारणावरून असंतुष्ट होणें किं० भांडणें.

वहीत वि० लागवडीस आणलेली (जमीन).

वहीम मागें 'वहमा' पहा.

वहू [**सं०** वधू; **हिं०** वहू] **स्त्री०** सून. ※ **वहू नाहला** (किं० **वर नाहला**) **आणि वाफा शिंपला** एकच गोष्ट किं० कृत्य करून दोन अर्थ किं० उद्देश साधणें किं० सफल होणें. ※**वहूसाय स्त्री०** (लग्नांत) नवऱ्या मुलीची आई.

वह्नि [**सं०**] **पु०**१ अग्नि; विस्तव. २ ज्याचे योगानें खाल्लेलें अन्न पचतें ती शक्ति; जाठराग्नि. ※ **वह्निगर्भ पु०** १ बांबू. २ शमी.

वह्वर [**सं०** वधू+वर] **न०** १ लग्नानंतर वधू आणि वर यांचें देवदर्शनास जावयाला निघालेलें जोडपें. २ नवरामुलगा आणि नवरी मुलगी यांचें जोडपें. ※ **वह्वरजत्रा, वाह्वरभरणी स्त्री०, वह्वरभरणें न०** लग्नानंतर वधूवरांचें देवदर्शनास जाणें हा विधि (भरणें, करणें).

वळ पु० १ मांडी, खाक, कान, यांचे संधिप्रदेशीं उत्पन्न होतें तें लांबट उठाणूं. २ दोरी किं० सूत यांना फाजील पीळ पडलेला असल्यास जागोजाग गांठी उत्पन्न होतात त्या प्रत्येक; मेंढा; पिंपळी. **पु०, स्त्री०** १ काठी, चाबूक, चापट, इ० चा तडाखा शरीरावर झाला असतां त्याचें इ० चा चिन्ह त्वचेवर उमटतें तें. २ वायूच्या आकाराचें चिन्ह त्वचेवर उमटतें तें. २ वायूच्या विकारामुळें हात, पाय, इ० मध्यें उत्पन्न होते ती वायूची व्यथा; पेटका. **पु०** परमावधीची उत्सुकता किं० उत्कंठा; खाज.

वळ [**सं०** आवलि; **म०** ओळ] **स्त्री०** १ ओळ, रेघ. २ वर्तनाची सरणी.**टीप**,—'वळ' हा शब्द ह्या दोन्ही अर्थीं अशिक्षितांतच रूढ आहे.

वळई [**सं०** वलय] **स्त्री०** १ भूस, गुळी, इ० गुरांचे खाद्य पदार्थ आदबशीर रीतीनें ठेवण्यासाठीं जी चारी बाजूंनीं कठडा घातलेली जागा करतात ती.२कडब्याच्या पेंढ्यांनीं सुरक्षित केलेली भुसाची रास. ३ कडबा, गवत, इ० ची रास किं० गंजी. ४ गव्हाच्या ताटांची पेंढी.

वळकटी, वळकुटी, वळकोटी [**म०** वळणें] **स्त्री०** १ सतरंजी,गालिच्या,गादी, इ०ची दंडगोल केलेली गुंडाळी. २ घडी; सुरळी. ३ सुरकुती. ※ **वळकुट्या सुरकुट्या स्त्री० अ० व०** चिरगुटांचा किं० कागदांचा चोळामोळा.

वळकंबणें इ० मागें 'ओळकंबणें' इ० पहा.

वळका [**म०** वळणें=पीळ घालणें] **पुं०** १ किडे, गांडुळें, इ० ची वळवळ. २ मुंग्या, माशा, ढेकूण, इ० चा कोणेक स्थळीं झालेला बुजबुजाट. ३ बोलणें, लिहिणें, हसणें, इ० मध्यें कोणेकानें केलेला फाजिल किं० निंद्य अतिरेक. ※ **खरजेचा वळका पु०** खरजेमुळें खाजविण्याची एकदम आणि जोराची इच्छा होते ती (येणें).

वळखर [**म०** वळणें] **वि०** घट्ट पीळ जिला घातला आहे अशी (दोरी, सूत, इ०); वळींव.

वळगणें, वळंगणें, वळघणें, वळंघणें स० **क्रि०** १ जोरानें किं० आवेशानें पकडणें, धरणें, किं० रोधणें. २ चढते समयीं (झाड, फांदी, इ०) घट्ट धरणें. ३ (वृक्ष, टेकडी, इ० वर)चढणें. ४ (एकाद्या गांवांत) कांहींही प्रसंग आला तरी तेथें करारीपणानें वसति करून राहाणें;(गांव,देश,इ०) न सोडतां तेथेंच अडचणी सोसून राहणें. ※**वळघ घेणें, वळघून जाणें** (झाड, टेकडी, इ० वर) धडपडत चढणें.

वळघ [**म०** वळघणें] **स्त्री०** पक्कड (बोटें, बाहु, इ०ची,आणि मारणें,घालणें,इ०च्या योगीं); उ० मी माडाला वळघा घालीत घालीत अर्ध्यापर्यंत चढलों पण पुढें चढवेना.

वळचण स्त्री० १ घर इ० च्या छपराची अगदीं खालची कड; पाख्याची खालची कड. २ ह्या ठिकाणीं शाकारण्यासाठीं घातलेलें गवत. ३ घराच्या छपरा लगतची आडोशाची किं० निवा-

त्याची जागा. ४ छपराच्या पागोळ्या जमीनी-वर जेथें लंब रूपांत पडतात तेथपर्यंतची आणि भिंतीलगतची जागा. ॐ **भुकेलेलें गुरूं वळचण ओढतें** १ भुकेनें व्याकुळ झालेला मनुष्य चांगल्या आणि वाईट अन्नाची निवड करीत बसत नाहीं; तो मिळेल तें गपांगपां खातो. २ गरजवंताला पापपुण्याची क्षिति नसते. **वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं** मोठ्या दर्जाच्या माण-सानें हलक्या दर्जाच्या माणसाला फाजिल मान देणें शोभत नाहीं. **वळचणीचा वांसा पु०** पदोंपदीं नडणारा माणूस; ज्याची आपणाला नेहेमीं ठोकर बसण्याचा संभव असतो असा मनुष्य, शेजारी, किं० त्याच तालमीतील किं० संस्थेतील माणूस (अशांशीं आपण वैर करणें टाळावें अशा अर्थानें). **वळचणीची पाल स्त्री०** दुसऱ्यांचीं गुप्त बोलणीं आडून ऐकणारा माणूस.

वळण [**सं०** वल्] **न०** १ अक्षराची आकृति काढण्याची धाटणी; उ० विवलकरी मोडी वळण. २ पदार्थ, चेहेरा, इ० ची ढब किं० तऱ्हा. ३ रस्ता, नदी, इ० चा वाक किं० दिशेचा बदल. ४ वर्तनाची, बोलण्याची, किं० शिकविण्याची कोणेकाची धाटणी. ५ वशीला; अनुकूल परिस्थिति; उ० सरकारांत तुम्ही वळण बांधल्याशिवाय तुमचा खटला लवकर विचारा-साठीं घेतला जाणार नाहीं. ६ कोणेकाचा गाणें, बजावणें, तालीम, इ० कडे असतो तो मनाचा कल; विशिष्ट विषयाची कोणेकाला असते ती आवड. ७ पाण्याचा प्रवाह अडविण्यासाठीं किं० वळविण्यासाठीं घातलेला बंधारा. ॐ**पाण्या-आधीं वळण बांधावें** पुढें येणाऱ्या अडचणीची अगोदर पासून तजवीज करून ठेवावी. **कोणी माणूस कोणेकाच्या वळणावर जाणें** तो दिस-ण्यांत, बोलण्यांत, किं० वागण्यांत त्याच्या सारखा असणें. **वळणावर जाणें** मागपासून चालत आलेली वाईट सरणी कोणेकानें चालूं ठेवणें. **वळणावळणानें नाव हाकली पाहिजे** खडक, उथळ पाणी, इ० टाळून नाव चालवावी लागते; ज्या अडचणी येण्याचा संभव असेल त्या चुकवून काम, व्यवहार, किं० धंदा चालवावा लागतो. **वळणदार वि०** सुंदर सरणीचें किं० धाटणीचें (अक्षर इ०). **वळणशुद्ध वि०** १ योग्य प्रमाणांत ज्याचे अवयव, अंगें, किं० भाग आहेत असा (चेहेरा, अक्षर, चित्र, इ०). २ शिस्तवार(वर्तन). **वळ-णाचें पाणी वळणानेंच जाईल** कुटुंबाची शिस्त मागपासून चालत आलेली असेल त्या शिस्तीनें मुलें वागतील. **मुलांना वळणांत ठेवणें** त्यांना योग्य सरणी लावणें; त्यांना योग्य नियंत्रणांत ठेवणें.

वळणी [**म०** वळणें] **स्त्री०** वळण्याची क्रिया किं० दिशा किं० रोख. ॐ **वळणीस (किं० वळणीं) आणणें** आपणास सोयिच्या किं० अनुकूल अशा स्थितीस (पदार्थ, माणूस, पशु, इ०) सौम्य किं० कडक उपायांनीं आणणें किं० वळविणें किं० पाहिजे तसा करून घेणें.

वळणें [**सं०** वल्] **अ० क्रि०** १ विशिष्ट मार्ग, दिशा, रूप, मनःस्थिति, इ० कडे(माणूस, पशु, काम, इ०) कलणें; उ० ही नदी विपटी गांवापाशीं उत्तरेस वळली आहे; उ० रामू जर वळला तर तो तुम्हाला हजार रुपये देईल; उ० मडकें ओलें असे तोंपर्यंत त्याचा कांठ वळेल; उ० साखरेचा पाक थोडासा घट्ट झाला म्हणजे लाडू वळतील. २ (अक्षर, चित्र, आकृति, इ० नीं) विशिष्ट आकार धारण करणें; उ० तुझें अक्षर वळावयाला आणखी सहा महिने लागतील. ३ कांहीं काम करण्यांत(हात, बोटें, इ०) परिचित किं० अभ्यस्त होणें किं० (त्यांना) सफाई प्राप्त होणें. ४ (माणूस, पशु, पदार्थ, इ० नीं) विशिष्ट आकार धारण करणें किं० धारण करण्याच्या स्थितींत येणें किं० असणें. ५ (गाय, म्हैस, इ० नीं) पुन्हा दूध देऊं लागण्याच्या दशेस येणें. ६ (दोरी, तार, इ०ना) पीळ घालणें शक्य होणें; उ० हें गवत फारच ढिसूळ आहे, त्याची दोरी वळत नाहीं.

वळणें [**सं०** वल्] **स० क्रि०** १ फिरविणें. २ बदलणें. ३ वेगळ्या दिशेस लावणें. ४ (शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, इ०) चरत असतां किं० चरावयास जात असतां त्यांच्यावर देखरेख करणें. ५ (तंतु, काड्या, गवत, इ०ना) पीळ घालून त्यांना दोरीचें रूप देणें. ६ तंतु, काड्या, गवत, इ० ना विशिष्ट प्रकारें पीळ भरून त्यांची (दोरी)

करणें. ७ दुधांत भिजविलेलें रव्याचें पीठ(गव्हले, बोटवे, मालत्या इ०च्या रूपांत) घालणें.

वळता [म० वळणें] **वि०** वळविलेला; परत केलेला, वजा केलेला, देऊन टाकलेला(पैसा, कर्ज, किंमत, इ०): उ० ह्या गायीची किंमत शंभर रुपये, त्यांत तीस रुपये वळते करून घेऊन बाकीचे सत्तर रुपये तुम्ही मला द्या. ॐ **वळता देणें** उसना घतलेला पदार्थ ज्याचा त्याला देऊन टाकणें.

वळती [म० वळणें] **स्त्री०** १ चरावयास गेलेलीं गुरें परत आणण्याची क्रिया किं० त्यांचें परत येणें. २ गुरांचें चरावयाला जाणें. ३ कोणे-काचें कोणेक स्थानाकडे आकास्मिक जाणें किं० तेथून परत येणें; फेरी; उ० ह्या करंज्या येथें ठेवूं नको, मांजरांची जर कोणीकडून वळती आली तर तें साऱ्या करंज्या खाऊन टाकील. ४ जाणारे किं० येणारे लोक, गुरें, इ० चा जमाव, रांग, वरव, किं० प्रवाह; उ० गुरें गांवाकडे येत होतीं, आतां वळती रानाकडे चालली. ५ रानांत गुरें चरावयास नेणें किं० संध्याकाळीं त्यांना परत गांवांत आणणें ही क्रिया. ६ गुराख्यांचीं पोरें खेळत असतां ज्याच्यावर डाव लागेल त्यानें गुरें गांवांत परत जातांना वळावीं अशा संकेतानें जी कोणेकावर गुरें वळण्याची पाळी येते ती; उ० राम्या हरला, त्याच्याकडे आज वळती जाणार. ७ जुगारांत लाविलेलें द्रव्य. ८ छपराचा खालचा भाग (बांधणें).

वळंबणें मागें ' ओळंबणें ' पहा.

वळंबा मागें ' ओळंगा ' पहा.

वळया, वळया पु० मळसूत्राच्या आकाराचा शंख. हा वळ नांवाच्या सुजेवर घासल्यानें वळ बरा होतो अशी लोकांची समजूत आहे.

वळंव न० ओबडधोबड मोठा धोंडा,—जो शेताचा बांध, घराचा पाया, इ०च्या रचाईंत योजतात.

वळवंजी स्त्री० गोम ह्या किड्यासारखा एक किडा. याच्या अंगाचा शेंबडासारखा मळ जमी-नीस लागलेला असला तर तो रात्रीं चकाकतो.

वळवट [म० वळणें] **न०** खिरीसाठीं वळ-लेले जे गव्हले, मालत्या, बोटवे, इ०त्यांचा समुच्चय.

वळवटा, वळवट [म० वळणें, वाटणें] **पु०** १ चाल; तऱ्हा; परिपाठ. २ जाण्यायेण्याचा परिपाठ किं० घरोब्याचा संबंध.

वळवटी, वळवंटी [म० वळणें] **स्त्री०** गुंडाळी; गुंडाळलेला पदार्थ (गादी, सतरंजी, जाजम, इ०).

वळवणी [म० वळवा+पाणी] **न०** वळ-वाचा पाऊस किं० ह्या पावसाचें पाणी.

वळवळ, वळवळी स्त्री०, वळवळा पु० [म० वळणें+वळणें] १ साप, गांडुळें, आळ्या, इ०च्या शरीराचें जलदीनें चालतांना किं०कांहीं दुखापत झाली असतां वाकडे तिकडे होऊन चल-नवलन. २अस्वस्थपणाची स्थिति किं० ह्या स्थितींत जी अंगाची हालचाल ती. ३अत्युकंठा(सुटणें, येणें).

वळवळणें [म० वळणें+वळणें] **अ० क्रि०** ताप, आजार, वदना, चिंता, उत्कंठा, इ०च्या अतिरेकांत शरीराचा पिळवटणें, मुरडणें, इ०रूप जो व्यापार तो. २ उत्युत्कंठेनें किं०अस्वस्थपणानें जर्जर किं० पीडित होणें.

वळवा [म० वळणें] **स्त्री० अ० व०** १ पूर्वा नक्षत्राच्या पुढचीं जीं पावसाचीं नक्षत्रें तीं (लागणें). २ ह्या नक्षत्रांत पडलेला पाऊस (पडणें, लागणें). ॐ **वळवांचा पाऊस पु०** १ उत्तरा, हस्त, चित्रा, आणि स्वाति, ह्या नक्ष-त्रांत पडतो तो पाऊस. २ कोणच्या दिशेकडे वळेल, कोणचा पक्ष स्वीकारील, औदार्य दाख-वील कीं०चिक्कूपणा करील, इ० गोष्टी ज्याच्या संबंधानें तर्कितां येत नाहींत असा माणूस; लहरी माणूस.

वळशेण न०, वळशेणी, वळशिणी स्त्री० शेण कालवून आणि तुडवून त्या शेणाची सर्पणासाठीं थापलेली गोवरी,—भाकरीच्या किं० वरवंट्याच्या आकाराची. याच्या व्यावर्तकत्वें रानशेण **न०** किं० रानशेणी **स्त्री०**.

वळसणें [म० वळसा]**अ० क्रि०** १(पदार्था-भोंवतीं) फेरा करणें किं० वळसा घालणें. २ (स्थळविशेष) मागें टाकून पुढें जाणें.

वळसा [म० वळणें] **पु०** १ पदार्थाभों-वतीं घातलेली वाटोळी फेरी; प्रदक्षिणा. २ इक-डून तिकडे जाणें आणि तिकडून इकडे येणें. ३

दोरी इ० चा गांठोडें इ० भोंवतीं घातलेला फेरा. ४ चालण्याचा व्यर्थ हेलपाटा. ५ रवा, हळकुंड, मात्रा, इ० सहाणेवर वासणें.

वळसाविणें स० क्रि० (नवें मडकें) वापरून टणक करणें.

वळही, वळहीं स्त्री० मागें ' वळई ' पहा.

वळापिळा [**म०** वळणें+पिळणें] **पु०** साप, माणूस, गांडूळ, इ० च्या शरीराचें पिळवटणें.

वाळिंबा पु० मागें ' ओळंबा ' पहा.

वळी [**म०** वळणें] **स्त्री०** १ घोडा, बैल, इ० च्या पाठीवर खोगीर घट्ट बसावें आणि त्यांच्या पाठीला खोगीर बोचूं नये म्हणून शेजारीं मांडून जोडलेल्या दोन उशांच्या रूपाचा पदार्थ ठेवितात तो. २ वळकटी; गुंडाळी. ३ दोन दोरे किं० दोऱ्या टोकांशीं एकमेकांत गुंतवून केलेला सांधा किं० जोड. ४ कोष्ट्याच्या विणकामांतील एक पारिभाषिक शब्द. पुढें ' सांधणी ' पहा. ꙮ **वळीमूठ पु०** १ वळी अर्थ १ चा पदार्थ आणि खोगीर जोडीनें (कसणें, बांधणें). २ चोळखण आणि लुगडें,-वरपक्षाकडून वधूच्या आईस लग्नाच्या सोहाळ्यांत देण्यांत येतें तें. ३ निरक्षर माणूस.

वळी [**सं०** आवली] **स्त्री०** १ पंक्ति; ओळ. २ लेखणी, कोळसा, खडू, इ० नीं काढलेली किं० ओढलेली रेघ. ३ वर्तन, कांहीं काम करणें, बोलणें, चालणें, हसणें, इ० ची कोणेकाची सरणी. ४ लठ्ठ आणि थिलथिलीत माणसाच्या पोटाला पडतात त्या निऱ्या प्रत्येक.

वळींव [**म०** वळणें] **वि०** १ अनेक दोरे किं० सुतें एकत्र वळून तयार केलेला घट्ट (दोरा, सूत, रेशीम, इ०). २ ज्यास विशेष पीळ आहे असा (दोरा, दोरी, इ०). ३ तालमीच्या कामांनीं कसलेलें किं० वळकट झालेलें (शरीर). ꙮ **वळींव पाऊस पु०** पावसाळ्याच्या अखेरच्या दिवसांत पडतो तो पाऊस. **वळींव गोवरी** (किं० **गवरी**) **स्त्री०** शेण तुडवून आणि मळून थापून केलेली गोवरी.

वळू, वव्हू, वळहो पु० घोडी पासून अपत्यें उत्पन्न करण्यासाठीं अंड न बडवितां आणि दुसऱ्या कामास न लावतां ठेविलेला घोडा.

वळें [**सं०** वलय] **न०** १ बोटांत घालावयाचें सोनें, चांदी, इ० चें एकेरी किं० दुहेरी वेढें. २ कोणत्याही धातूचें कोणत्याही उपयोगाचें वतुळाकार कडें. [प्राणी.

वळोंची, वळोंजी स्त्री० गोम किं० घोण हा

वळ्या पु० मलसूत्राच्या आकाराचा समुद्रांत सापडणारा शंख,-हा वळ ह्या नांवाच्या सुजेवर घासल्यानें सूज ओसरते अशी समजूत आहे.

वक्ष [**सं०** वक्षस्] **न०** ऊर; छाती. ꙮ **वक्षोज, वक्षोरुह् पु०** स्त्रीचा स्तन. **वक्षस्स्थल, वक्षःस्थळ न०** छाती; ऊर. [आहे तें.

वक्ष्यमाण [**सं०**] **वि०** जें बोलावयाचें

वा [**सं०**] **उ० अ०** अथवा; किंवा.

वाइसा, वाइच वि० थोडका, अत्यल्प (अशिक्षितांत रूढ).

वाई [**सं०** वायु] **स्त्री०** संधिवात.

वाईट वि० जें चांगलें नाहीं तें. ꙮ **कोणेकाच्या वाइटावर असणें** त्याचें नुकसान करावयाला टपून बसलेलें असणें. **कोणेकाचें वाईट करणें** त्याचें नुकसान करणें. **वाईटबरा वि०** १ असेल तसा,-मग तो चांगला असो किं० वाईट असो; उ० बायकोनें वाईटबरा नवरा पथकरला पाहिजे. २ मध्यम प्रतीचा. **वाईटसाईट वि०** वाईट; गाळगदळ ह्या रूपाचा; टाकाऊ. **वाईटवाणा वि०** वाईट; हलक्या दर्जाचा. **वाइटाविठ्ठल वि०** १ वाईट; टाकाऊ. २ कुरूप.

वाइण, वाइन न० १ दगडाचें उखळ. २ दगडाची किं० लाकडाची पोहे कांडण्याची उखळी. ꙮ **वाईनसळ न०** उसाचा रस काढण्याच्या चरकाचे नवरानवरी हे भाग ज्या दोन आडव्या तक्त्यांत फिरतात त्यांतील खालचा तक्ता. ह्या तक्त्याला ' काठवट ' असेंही म्हणतात.

वाईल, वईल [**म०** वायला=वेगळा] **पु०**, **न०** चुलीचा अवेल. मागें 'अवेल' पहा. ꙮ **वाईल चूल स्त्री०** जिला वईल आहे अशी चूल. वईल नसलेल्या चुलीला ' चुला ' **पु०** म्हणतात.

वाउगा, वावगा वि० भलताच; बेशिस्त; असावा तसा नसलेला.

वाक् [**सं०** वाच्] **स्त्री०** १ शब्द. २ भाषण. ३ भाषा. ४ वचन; करार. **टीप**,–' वाक् ' हा शब्द **सं०**' वाच् ' असा आहे. समासांत तो पूर्वपद असतां कठोर व्यंजनापूर्वी 'वाक्' आणि स्वर आणि मृदुव्यंजन ह्यांच्या पूर्वी 'वाग्' आणि न, म, यांच्या-पूर्वी ङ असें रूप धारण करतो. ॐ**वागीश, वाक्पति** पु० १ वक्ता. २ बृहस्पति. ३ ब्रह्मदेव. **वाक्चापल्य** न० १ वडबड. **वाक्छल** पु० १ बोलण्यांतील धरसोड. २ शब्दांचे वेगळे अर्थ घेऊन वाक्याचा वेगळा अर्थ करणें हा वाक्ट-पणाचा प्रकार. **वाक्चातुर्य** न० वक्तृत्वाची कला. **वाक्चापल्य** न० बडबड; वटवट. **वाक्-पटु** वि० बोलण्यांत चतुर; वक्तृत्वगुण ज्याच्या अंगीं आहे तो. **वाग्डंबर** पु०, **वाग्जाल** न० पोकळ आणि भपकेदार भाषण. **वाग्डंबर** पु० वक्तृत्व. **वाग्दंड** पु० १ शब्दांनीं कोणेकावर केलेला सडीमार. २ वाणीचा निग्रह; मित भाषण; मौन. **वाग्दान** न० १ वाणीनें देणें. २ विवाहांतील ' वाङ्निश्चय ' हा विधि. **वाग्दोष** पु० १ निंदा. २ अप्रिय भाषण. ३ अशुद्ध भाषण. **वाङ्निश्चय** पु० मी आपली मुलगी तुमच्या मुलास पत्नी म्हणून द्यावयाला कबूल आहे अशा अर्थाचा विधि लग्नाचे पूर्वी करतात तो. **वाक्-पंडित** पु० बोलण्यांत चतुर. **वाक्पांडित्य** न० वक्तृत्वाचा गुण. **वाक्पारुष्य** न० भाषणाचा कठोरपणा. **वाङ्मय** वि० १ शब्द, वाणी, इ० संबंधाचें. २ शब्दमय; शब्दरूप. **न०** १ भाषा. २ वक्तृत्व. ३ कोणत्याही भाषेंतील ग्रंथ समुच्च-यानें. **वाङ्मुख** न० प्रस्तावना; उपोद्घात. **वाक्शस्त्र** न० शाप. **वाक्चतुष्टय** न० परा, पश्यंती, मध्यमा, आणि वैखरी, ह्या शब्दो-च्चारणाच्या ज्या चार अवस्था त्या समुच्चयानें. **वाक्सिद्धि** स्त्री० मुखांतून जें वाक्य उच्चारलें जाईल त्याला अनुसरून परिणाम व्हावा असें जें कोणा साधु इ० चे सामर्थ्य असतें तें. **वाक्स्तंभ** पु० गहिंवर, घसा लाखटणें, इ० कारणांनीं शब्दोच्चार करण्याचें सामर्थ्य नाहींसें होणें. **वाचिक** वि० १ शब्दांनीं व्यक्त केलेलें. २ बोल-ण्यानें घडलेलें (पाप). **न०** १ निरोप. २ (**मराठींत**) हकीगत; घडलेल्या गोष्टीचें निवेदन किं० कथन. **वाग्देवी, वाग्वल्लरी, वाग्वल्ली, वाग्विला-सिनी** स्त्री० भाषेची देवता सरस्वती. **वाग्मी** [**सं०** वाग्मिन्] **पु०** १ मोठा वक्ता. २ फार बोलणारा. ३ बृहस्पति. ४ नैयायिक.

वाक पु० एक पक्षी.

वांक, वाक [**सं०** वंक=नदीचें वांकण; खोगिराचें पुढचें टोंक] **स्त्री०** स्त्रियाचें कोपरा-वर घालण्याचें एक भूषणविशेष. **न०** १ रहा-टाचें किं० गाडीचें जें चाक त्याचा परीघ ज्या सहा (किं० अधिक) तुकड्यांचा बनविलेला असतो ते तुकडे प्रत्येक. २ होडी करतांना जे तक्ते पुढच्या टोंकापासून तों मागच्या टोंका-पर्यंत बसविलेले असतात ते प्रत्येक. **पु०, न०** वाकडेपणा; वक्रता (पदार्थ, भाषण, इ० चा). **पु०** कोणेकाचें कोणेकाशीं असतें ते वैमनस्य किं० असतो तो विरुद्धपणा.

वाक पु० घायाळ, अंबाडी, ताग, इ० चे तंतु,–जे वळून दोऱ्या इ० पदार्थ करतात.

वाकचवडा (–डे) पुढें 'वाघ' मध्यें 'वाघचवडा (–डे) ' पहा.

वांकड, वांकडी स्त्री० संतत वृष्टि; पावसाची झड.

वांकडणें [**स०** वांकडा होणें] अ० क्रि० १ थंडी इ० मुळें शरीर वांकडें होणें. २ वांकडें होणें (सामान्यतः).

वांकडा [**सं०** वंक=नदीचें वांकण] **वि०** १ नागमोडी रूपाचा. २ सरळ नव्हे असा. ३ प्रतिकूल. ४ नीतिमार्गाला सोडून असलेला. ५ दुष्ट; वैर करणारा. ६ हट्टी; हेकट. **वांकडें** **न०** १ वैर. २ प्रतिकूळ ग्रह, मत, किं० समजूत. ३ अनीतिचें वर्तन. ॐ **कोणेकाचें कोणेकाशीं वांकडें असणें** (किं० **पडणें**) त्यांच्यांत वैम-नस्य किं० शत्रुत्व असणें (किं० उत्पन्न होणें)' **वांकडें पाऊल** न० परदारागमन किं० परपुरुष गमन इ० रूप पातक. **कोणेकाला वांकडें दाखविणें** त्याला खिजविण्यासाठीं त्याच्या पुढें वांकडीं तोंडें करणें. **वांकडें घेणें** १ वाटोळें फिरत राहाणें; घिरट्या घालणें. २ कोणेकाचें बोलणें आपल्या उलट आहे असा स्वताचा खोटा ग्रह करून घेणें. **वांकडकोका, वांक-डमुसका, वांकडातिकडा, वांकडातिडका, वांकडादेहुडा** वि० १ बेढब आणि कुरूप दिस-

ण्याजोगा आणि अनेक ठिकाणीं आणि अनेक प्रकारें वांकडा असा (माणूस, पशु, बांधलेलें घर, इ०). २ गैरसोयीची (योजना, सरणी, बेत, इ०). ३ दुसऱ्याला फसविण्यासाठीं अवलंबिलेली लबाडीची किं० लुच्चेगिरीची (सरणी, भाषणपद्धति, कोटिक्रम, इ०). **वांकडी दृष्टि (किं० नजर) स्त्री०, वांकडा डोळा पु०** गैरमर्जी. **वांकडी पगडी करणें** (किं० **ठेवणें**) १ नखरेबाजीनें वागणें. २ उर्मटपणानें वागणें; दुसऱ्यास तुच्छ लेखणें. **वांकडी म्हैस स्त्री०** १ वांकड्या शिंगांची म्हैस. २ चिंचेचें झाड. **वांकडी समजूत स्त्री०** १ अडाणीपणाचा ग्रह किं० मत; दुराग्रह. २ वैरभाव; वैमनस्य.

वांकडा [**सं०** वंक] **पु०** मुलांच्या दंडांत घालवयाचा एक सोन्याचा किं० चांदीचा दागिना.

वांकडी पुढें ' वाखंडी ' पहा.

वांकडी [**म०** वांकडा] **स्त्री०** अतिशय कडक थंडी,–जिच्यामुळें हातपाय वांकडे होतात.

वांकण [**सं०** वंक] **न०** १ वांकडेपणा (सामान्यतः). २ रस्ता, नदीचा प्रवाह, गमनाची सरणी, झाडाची फांदी, इ० मध्यें एकदम झालेला दिशेचा बदल. ३ जमिनींत घुसलेला पाण्याचा प्रवाह,–उपसागर इ० रूप. ४ वांकलेला भाग.

वांकणें [**सं०** वंक] **अ० क्रि०** १ वक्र होणें; वांकडें होणें. २ ओणवें होणें. ३ नम्र होणें; शरण जाणें; ताठा सोडणें; आज्ञाधारक होणें.

वांकती [**म०** वांकणें] **स्त्री०** पदार्थ आंत भरण्यासाठीं किं० घेण्यासाठीं धोतर, उपरणें, इ० वस्त्राचा खोलगट केलेला भाग.

वाकदोर, वाखदोर [**म०** वाक, वाख+दोर] **पु०** वाखाचा बारीक तंतु किं० अशा तंतूंची वळलेली दोरी.

वाकन (–नि–) विशी, वाकनिशी (–सी) खालीं ' वाकनिवीस ' मध्यें पहा.

वाकनिवीस, वाकनीस [**फा०** वाकि आह् नवीस्] **पु०** १ बड्या गृहस्थाच्या कुटुंबांत खाजगी हिशेब, कागदपत्रें, तैनात, भोजनाची व्यवस्था, इ० संबंधाची कामें पाहाणारा नोकर. २ बड्या कुटुंबांत घडणाऱ्या गोष्टींचा इतिहास ठेवणें ह्या कामगिरीवर नेमिलेला अधिकारी. २ शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक.ह्याचें काम खाजगी पत्रें, जमाखर्च, दाणागोटा, पागा, इ० वर देखरेख करणें हें असे. ॐ **वाकानिविशी, वाकानिशी (–सी) स्त्री०** वाकनिसाचा हुद्दा किं० कार्यक्षेत्र.

वाकब [**अ०** वाकफ्] **वि०** कोणत्याही विशिष्ट शास्त्र, कला, इ० मध्यें पूर्ण माहीतगार किं० तरबेज. ॐ **वाकबदार, वाकबगार वि०** वर ' वाकब ' पहा. **वाकबदा (–गा–)री स्त्री०** निष्णातपणा.

वाकवट (–टी), वाखवट [**म०** वाक; वाख] **स्त्री०** वाखाच्या तंतूंचा गोळा किं० जुडगें.

वाकविणें [**म०** ' वाकणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ वक्र करणें. २ नम्र करणें. ३ अनुकूल करून घेणें. ४ आज्ञाधारक करणें. ५ (कोणेकाचा) नक्षा उतरण; (त्याला) जिरविणें. ६ अनीतीच्या मार्गाकडे (कोणेकाला) वळविणें.

वांकस, वाकस पु०, न० तुळया, वांसे, इ० तासण्याचें सुताराचें एक हत्यार.

वांकसणें, वाकसणें [**म०** वांकस,वाकस] **स० क्रि०** (तुळई, वांसा, इ०) वाकसानें तासणें किं० सोलणें.

वाकसल, वाकसाल स्त्री० तांदुळाची एक [जात.

वाकळ [**स०** वल्क, वल्कल] **स्त्री०** १ वस्त्राचे तुकडे एकावर एक शिवून केलेलें मऊ पांघरूण; गोधडी. २ फाटून गेलेलें आणि जीर्ण असें धोतर, लुगडें, इ० वस्त्र. ३ अव्यवस्थितपणें लुगडें, चोळी, इ० पेहरलेली मुलगी किं० स्त्री. ४ म्हातारी जख्ख अशी स्त्री.

वाका [**अ०** वाकिआ] **पु०** १ वर्तमान; हकीगत. २ घडलेली गोष्ट. ३ मरण; मृत्यु. ४ आपआपल्या हद्दींत किं० कार्यक्षेत्रांत काय काय गोष्टी विशिष्ट अवधींत घडल्या त्यांच्या संबंधाची हकीगत तो तो अधिकारी सरकारास कळवितो ती. ५ आपआपली बाजू प्रत्येक पक्ष पंचांना सांगतो ती.

वांकाड, वांकाण मागें ' वांकण ' पहा.

वांकाडी [म० वांकडा] **स्त्री०** नदी, रस्ता, झाडाची फांदी, इ० चें वळण.

वाकांडी, वाखंडी स्त्री० ताग, आंबाडी, घायाळ, इ० चे दोरीं इ० साठीं काढतात ते तंतु समुच्चयानें. [(नेसणें).

वाकांडी स्त्री० स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र

वांकारणें [म० वांकडा] **अ० क्रि०** १ विमनस्कतेनें किं० असंतुष्टतेनें किं० रागावून कोणेकापासून फटकून वागणें किं० दूर सरणें. २ कोणेकाशीं संबंध न यावा किं० न घडावा म्हणून दूर दूर असणें.

वांकाळा [म० वांक+आळा] **पु०** राहाटास वांकाची नपूर आली असतां किं० एकादा वाक गळून पडला असतां त्याच्या स्थानीं जो दोरीचा बंध घालतात तो.मागें'वांक,' ' वाक '**न०** अर्थ १ पहा.

वांकी, वांक [**सं०** वंक] **स्त्री०** स्त्रियांचा कोपरावर घालावयाचा एक दागिना.

वांकी म्हस स्त्री० मागें'वाकडा'मध्यें' वांकडी म्हैस 'पहा.

वांकांव [म० वांकविणें] **वि०** वाकविलेला; वाकडा केलेला;उ०पालखीची दांडी वांकीव असते.

वांकुडणें [म० वांकडा] **अ० क्रि०** १ वांकडा होणें. २ आखूड होणें.

वांकुडा मागें ' वांकडा ' पहा.

वांकुडी स्त्री० स्त्रियांचें नेण्याचें वस्त्र. मागें ' वाकांडी ' पहा.

वाकुदणें अ० क्रि० गमतीनें किं० रंगेलपणानें नाचणें, उड्या मारणें, किं० खिदळणें.

वांकुल्या, वांकोल्या [**म०** वांक+वळणें] **स्त्री० अ० व०** चेष्टेनें किं० टवाळकीनें किं० वात्रटपणानें वेडोंवाकडों केलेलीं तोंडें (दाखविणें).

वांकें [**सं०** वंक] **न०** १ रहाट, गाडी, इ० चें जें चाक त्याचा परिघ ज्या सहा (किं० अधिक) तुकड्यांचा बनविलेला असतो ते तुकडे प्रत्येक. मागें ' वांक, वाक ' **न०** अर्थ १ पहा. २ अंघोळीच्या वेळीं धोतर, अंगपुसणें, इ० ठेवण्यासाठीं जी दांडी मोरीजवळ आडवी टांगलेली असते ती. ३ सोनार, सुतार, इ० कारागीर लोकांचीं हत्यारें खुपसून ठेवण्याची भिंतीला ठोकलेली जी दुहेरी पट्टी असते ती. ४ खटारा गाडीच्या बाजूंच्या सहा लाकडांपैकीं प्रत्येक.

वांकेनिविशी इ०मागें'वाकनिविशी'**इ०** पहा.

वांकेरी स्त्री० एक वनस्पति. वांकेरांचें भातें औषधाच्या कामीं योजलें जातें.

वांकोरणें स० क्रि० वांकोरें नांवाच्या आउतानें (शेतांत) चर पाडणें.

वांकोरा पु० नखें, खिळा, इ० नीं अंग, जमीन, इ० वर ओढलेला ओरखडा किं० चरा.

वांकोरें न० १ दाराचें खालचें कुसं अंगचें न करतां लोखंडाचें करून बसविलेलें असतें तें. २ शेतांत लहान लहान चर पाडण्याचें एक आउत.

वांकोळ्या स्त्री० अ० व० मागें ' वांकुल्या ' पहा.

वाक्चतुष्टय, वाक्चातुर्य, वाक्चापल्य, वाक्छल, वाक्पटु, वाक्पंडित,वाक्पांडित्य, वाक्पाटव, वाक्पारुष्य मागें ' वाक् ' मध्यें हे शब्द पहा.

वाक्य [**सं०**] **न०** १ भाषण. २(**व्याकरण**) विचार पूर्णपणें व्यक्त करणारा आणि शिष्टांच्या रूढीप्रमाणें जुळविलेला शब्दसमुदाय. ३ आज्ञा. ४ नियम. ५ (**संस्कृत व्याकरण**) वार्तिक. ६ (**ज्योतिष**) सूर्याच्या गतीवरून केलेलें गणित. ७ धर्मशास्त्र इ० बाबतींत निर्णायक जें सूत्र तें किं० जो नियम तो. ꣸ **वाक्यखंडन न०** १ व्याकरणाच्या नियमाप्रमाणें वाक्याचे घटक वेगवेगळे करणें. २ प्रतिपक्ष्याच्या विधानाचें निराकरण. **वाक्यालंकार पु०** वाक्य कानाला गोड लागावें किं० वक्त्याला पुढचा शब्द आठवावयाला वेळ मिळावा ह्यासाठीं जो शब्द किं० जे शब्द योजतात ते; उ० ' रावण उताणा पडला ' ह्या वाक्याबद्दल ' रावण जो आहे तो उताणा पडला ' हें वाक्य पुराणिकानें उच्चारलें तर ' जो आहे तो ' हे शब्द वाक्यालंकाररूप होत.

वाख पु० ताग, अंबाडी, घायाळ, इ० झाडांचे तंतु. या तंतूंच्या दोऱ्या इ० करण्याकडे उपयोग होतो.

वाखंडी, वाखांडी स्त्री० १ एक औषधी लता. २ घायाळ, अननस, इ० चे तंतु.

वाखल स्त्री० उपास, आजार, इ० मुळें खोल गेलेलें पोट किं० पोटाचा खोलगटपणा.

वाखलणें [म० वाखा] **अ० क्रि०** (मनुष्य, जनावर, इ० नीं) वाख्यानें पीडित होणें किं० पीडित झालेलें असणें. खालीं 'वाखा' अर्थ ३पहा.

वाखळ [**सं०** वल्कल] **स्त्री०** गोधडी. मागें ' वाकळ ' पहा.

वाखा [**अ०** वाकिअ] **पु०** १ अनर्थ; घोर संकट. २ युद्धांतील संहार; मारामारी. ३हगवण, आमांश, पटकी, पोटशूळ, इ० रोगांमुळें मनुष्य, पशु, इ०ची होते ती दुर्दशा. ६ अशा रोगांचा कोणेक स्थळीं मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादुर्भाव.

वाखांडी मागें ' वाखंडी ' पहा.

वाखाण, वाखाणकी,(–णी) **वाखाणणूक** [**सं०**व्याख्यान]**स्त्री०** स्तुति; तारीफ; शिफारस.

वाखाणणें [**सं०** वि+आ+ख्या]**स०क्रि०** स्तविणें; प्रशंसिणें; ०चे गोडवे गाणें. ꣸ **वाखाणला गुरव देवळांत हगे** फाजिल स्तुति कोणेकाची केल्यास तो शेफारतो.

वाखाळणें वर ' वाखलणें ' पहा.

वांखोरणें [म० वांकोरें] **स०क्रि०**(शेतांत) वांकोरें ह्या आउतानें चर पाडणें. मागें ' वांकोरें पहा.

वाग [**म०**वागविणें] **पु०** पदार्थ वाहून नेला जाण्याची सोय किं० शक्यता; उ० आठकीची वाग म्ह० आठांनी वाहून नेलें पाहिजे इतकें पदार्थाचें परिमाण.

वाग [म० वागणें] **स्त्री०** वर्तनाची सरणी; वागणूक.

वांग पु० कोणेक गालावर एकसारखा ताण बराच वेळ पडला असतां त्या गालाचे ठायीं जो ताठपणा येतो तो किं० उठते ती कळ (येणें).

वांग [**सं०** व्यंग] **पु०** १ मनुष्याच्या मुख इ० कांवर जन्मजात किं० मागाहून उत्पन्न झालेले जे काळसर डाग ते प्रत्येक. २ सोनें, रुपें, इ० कांस मोरचूद, शिसें, इ०चा संबंध झाल्यानें त्यांजवर जो काळा डाग पडतो तो. ३ धातूचें पात्र घडवितांना त्यांचेवर जी हातोडीच्या ठोक्यांचीं चिन्हें उमटलेलीं असतात तीं प्रत्येक. ४ देवी, जखम, गळूं, इ० चीं चिन्हें जीं त्वचेवर राहातात तीं प्रत्येक.

वागटी स्त्री० १ एक प्रकारचा मासा. २ एक प्रकारचें जंगली मांजर.

वागणूक [**म०** वागणें] **स्त्री०** १ वर्तनाची सरणी. २ कोणत्याही व्यवहारांत कोणेकाची जी सरणी ती.

वागणें [**सं०** वृत्] **अ० क्रि०** १ वर्तन करणें· राहाणें. २ आपल्या स्थितीला अनुसरून वर्तन करीत असणें. ३आपल्या परिस्थितीला अनुसरून असणें किं० राहाणें. ४ (कांहीं बोध किं० वर्तनाची सरणी) मनांत जागृत असणें. ५ (हात पाय, मन, बुद्धि, इ०) स्वस्व व्यापार करावयाला समर्थ असणें; उ० आपले हातपाय यथास्थितपणें वागत आहेत तोंपर्यंत दुसऱ्यावर कोणी भार घालीत नाहींत. ६ कोणेकाशीं (कोणेकानें) व्यवहार करीत राहाणें. ७ (कांहीं मनोविकार) चित्तामध्यें कांहीं प्रेरणा करीत असणें; उ० जोंपर्यंत तुझ्या मनांत वैरभाव वागत आहे तोंपर्यंत त्या सदोबाविषयीं तूं साशंकच राहशील. ८ (चाल, रीति, सरणी, रूढि, लिपि, प्रचार, नाणें, इ०) विशिष्ट समाजांत किं० देशांत चालू असणें. ꣸ **आजारांतून उठून वागूं लागणें** घराबाहेर किं० घरांत तो पूर्वीप्रमाणें हिंडूं फिरूं लागणें.

वागदोर पु० घोड्याला चालवितांना त्याच्या गळ्याला बांधतात ती दोरी. मागें 'वाग' ' बागदोर ' पहा.

वागबारस [**सं०** वत्स+द्वादशी] **स्त्री०** कार्तिक शुद्ध द्वादशी (किं० कित्येक प्रांतांत आश्विन कृष्ण द्वादशी).ह्या दिवशीं गुराखी कोंकणांत उत्सव करतात. मागें' वसुबारस ' पहा.

वांगवांग [**सं०** व्यंग] **स्त्री०**अस्वस्थपणाची तरफड, धडपड, किं० चलनवलन; उ०माझें अंग वांगवांग करतें; उ० हें पोर आई देवाला गेल्यापासून वांगवांग करीत आहे.

वागविणें [**म०** ' वागणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ (उपदेश इ०)मनांत साठविणें किं० स्मरणांत ठेवणें; उ० माझा बोध तूं नीट मनांत वागीव. २ (कोणेकाशीं) चांगल्या किं० वाईट

रीतीनें वर्तन करणें; उ० तो गोविंदराव आपल्या बायकोला वाईट रीतीनें वागवितो. ३ (मुलेंबाळें, आश्रित, इ० चा भार) वाहून त्यांचें संगोपन, पालन, इ० करीत असणें. ४ (ओझें, काम, कारभार, जबाबदारी, इ०) यथायोग्य रीतीनें वाहणें, चालविणें, किं० संभाळणें. **कोणेकाला वागवून घेणें** त्याचे दोष किं० अपराध पोटांत घालून त्याच्याशीं प्रेमानें वर्तन करणें. **वागायचा** [म० वागवावयाचा] **वि०** नित्याच्या वहिवाटींतील; नित्य उपयोगांत येण्याचा (वस्त्र, पाल, इ० पदार्थ). या शब्दाचीं इतर रूपें 'वागाचा,' 'वाघाचा' अशीं आहेत. याच्या व्यावर्तकत्वें सणावाराचा, प्रसंगविशेषाचा, इ०

वागळ न०, स्त्री० पुढें 'वागूळ' पहा.

वागळी स्त्री० एक प्रकारचा मत्स्य.

वागाटी एक वनस्पती. पुढें 'वाघांटी' पहा.

वांगी [**सं०** वंग=वांगें] **स्त्री०** मिरची, तंबाखू, बटाटा, टोमाटो, इ० च्या वर्गांतील एक झाड. **वांगें न०** ह्या झाडाचें फळ. ह्या फळाचें भरीत, भाजी, भजीं, वांगीभात, इ० खाद्य करतात. ❀ **वांगेंसट स्त्री०** मार्गशीर्ष शुध्द षष्ठी ही तिथि. चातुर्मास्यांत जे कोणी वांगीं खात नाहींत ते ह्या तिथीपासून तीं खाऊं लागतात.

वागुरा [**सं०**] **स्त्री०** १ जाळें; फास. २ वाघांटी ही वनस्पति. ❀ **वागुऱ्या, वागोऱ्या स्त्री० अ० व०** वस्त्र अव्यवस्थितपणें किं० बहुत काळ वापरल्यामुळें वस्त्राच्या झालेल्या चिंध्या किं० लकतऱ्या; उ०एका महिन्यांत ह्या साडीच्या चिंगीनें वागुऱ्या करून टाकल्या. **टीप**,–वागुरी, वागोरी, हीं **ए० व०** चीं रूपें क्वचित् योजण्यांत येतात.

वागुळ स्त्री० गाय, म्हैस, इ० करतात तें [रंवथ (करणें).

वागूळ, वागळ, वाघूळ [**सं०** वल्गुल] **न०, स्त्री०** १ एक पक्षी,–जो पायांनीं झाडाची फांदी धरून खालीं डोकें लोंबत सोडून राहातो. ह्या पक्ष्याला 'वडवाघूळ' असेंही म्हणतात. २ पाकोळी (कोंकणांत प्रचार).

वांगेंसट वर 'वांगी' मध्यें पहा.

वागोऱ्या मागें 'वागुरा' मध्य'वागुऱ्या'पहा.

वाघ [**सं०** व्याघ्र] **पु०** १ अत्यन्त क्रूर असा एक अरण्यांतील प्राणी. २ एक क्षुद्र कीटविशेष. ३ (**लाक्षणिक**) विद्या, शौर्य, मुत्सद्देगिरी, इ० गुणांनीं जो श्रेष्ठ तो. ❀ **वाघ आणि बकरी यांनीं एकत्र पाणी पिणें** परस्परविरोधी अशा गुणांच्या दोन माणसांनीं एके ठिकाणीं गुण्यागोविंदानें राहाणें. ❀ **वाघचबका पु०** एक सुंदर फुलांचें झाड,–ज्याच्या पाकळ्यांना आणि पानांना वाघाच्या नखासारखे आंकडे असतात. **वाघचवडा पु०,वाघचवडें न०** उठाणूसारखी एक विकृति,–जी प्रायः तळहाताला होते ती. ही विकृति वाघाच्या मांसाचा स्पर्श केल्यास बरी होते अशी समजूत आहे. **वाघट न०** १ वाघ (तुच्छतेनें). २ वाघासारखा पण लहान असा एक जंगली प्राणी. **वाघनख न०** १ वाघाचें नख. २ वाघाचीं नखें कोंदणांत बसवून मुलांच्या गळ्यांत घालतात तो एक दागिना. ३ शत्रूचें अंग ओरबाडून फाडून काढण्याचें एक हत्यार. ह्या अर्थी 'वाघनखी' **स्त्री०** असाही शब्द आहे. **वाघमारी वि०** फार अमली (सुपारी, हरीक, इ०). **वाघमाऱ्या वि०** अत्यंत शूर आणि साहसी (माणूस).**वाघमेंढ्या,शेळ्यामेंढ्या स्त्री०अ०व०** मुलांचा एक खेळ. **वाघमुंगी स्त्री०** एका जातीची मुंगी,–जी चावली असतां फार वेळ आग होत राहाते. **वाघरूं न०** १ वाघ (प्रेमानें). २लहान वाघ. ३ वाघ (तुच्छतेनें). **वाघवें, वाघावें न०** वाघानें शेळ्या, मेंढ्या, गुरेंढोरें, इ० खाऊन टाकून एकाद्या गांवीं मांडलेला अनर्थ. **वाघाची जाळी स्त्री०** वाघाची लपून बसावयाची झाडाच्या गुंतागुंतींतील जागा. **वाघाची मावशी स्त्री०** मांजर. **वाघाचें कातडें न०** जो अधिकाराच्या स्थानावरून च्युत झालेला असला तरी लोकांना उपद्रव करीत असतो आणि म्हणून ज्याची लोकांना भीति वाटते असा मनुष्य. **वाघाड्या पु०** मंत्रातंत्राच्या योगानें मी तुमचा वाघापासून बचाव करीन अशा प्रवाशांना थापा मारून त्यांच्यापासून पैसे उपटणारा माणूस. **वाघी कवडी स्त्री०** एक प्रकारची कवडी,–जीवर वाघाच्या अंगावरी

पट्टयांसारखे बारीक बारीक पट्टे असतात. **वाघीण स्त्री०** वाघाच्या जातीची स्त्री. **वाघी तंबाखू, व्याघ्रांबरी तंबाखू स्त्री०** एक प्रकारची तंबाखू,–जिच्या पानावर वाघाच्या अंगावरील पट्टयांसारखे पट्टे असतात. ही तंबाखू फार कडक असते. **वाघी, वाघा, वाघ्या** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

वाघर, वाघरी [**सं०** वागुरा] **स्त्री०** हरिण इ० जनावरांना पकडावयासाठीं पसरतात तें जाळें(पसरणें,लावणें,ताणणें). ⊛**कोणेकाला वाघर (किं०वाघरी)करणें** त्याला (भिकारी, यजमान, सावकारानें पाठविलेले तगादेदार, पोरें इ० नीं) गांजणें, छळणें, किं० सळो की पळो करणें. **वाघरी पु०** जाळ्यांत पशु, पक्षी, इ० पकडणाऱ्या लोकांची जात किं० या जातीचा कोणी इसम.

वाघळ [**सं०** वल्गुल=वडवाघूळ] **स्त्री०, न०** एक पक्षी. वर ' वागूळ ' पहा.

वाघा, वाघ्या [**म०** वाघ] **पु०** खंडोबाचा भक्त. हा गळ्यांत वाघाच्या कातड्याची पिशवी (जिला ' वाघी ' म्हणतात ती) घालून तींत हळद किं० भंडार ठेवतो. खंडोबाच्या भक्त स्त्रीस ' मुरळी ' असें म्हणतात.

वाघी [**म०** वाघ] **स्त्री०** १ भंडार ठेवण्याची खंडोबाच्या भक्ताची वाघाच्या कातड्याची पिशवी. २ जिच्या पुढच्या टोकाला वाघाचा लाकडी मुखवटा असतो आणि जी जलद चालणारी असते अशी होडी. ३ घोड्याची झूल,–जीवर वाघाच्या अंगावरील पट्टयासारखे पट्टे असतात. ४ सुतार लोक लाकूड तासतांना तें ज्यावर ठेवितात तो ठोकळा. ५ दोन्ही टोकांकडे निमुळता खिळा; सुरसा.

वाङ्मुख न० मागें ' वाक् ' मध्यें पहा.

वाचक [**सं०**] **वि०** १ सांगणारा; बोलणारा. २ (अर्थाचा) बोधक (शब्द); कांहीं अर्थ, परिमाण, गुण, धर्म, संख्या, इ० दाखविणारा; उ० संख्यावाचक, कालवाचक, क्रियावाचक, इ०. **पु०** १ वक्ता. २ वाचणारा. ३ निरोप कळविणारा. ४ पुढें ' वाच्य ' पहा.

वाचणी [**म०** वाचणी] **स्त्री०** १ वाचण्याची क्रिया. २ कोणेकाला कांहीं धडा किं० पाठ इ० वाचावयास किं० म्हणावयास शिकविणें (देणें, घेणें); संथा (देणें, घेणें).

वाचणें [**सं०** वाच्य=बोलावयास लावणें] **स० क्रि०** कागद, पाटी, इ० वर लिहिलेलीं अक्षरें, वाक्यें, इ० वरून नजर फिरवून तीं मोठ्यानें उच्चारणें किं० तीं न उच्चारतां त्यांच्यावर नजर फिरवून त्याच्या अर्थाचें ग्रहण करणें. अंधळे लोक कांहीं विशेष प्रकारें लिहिलेले लेख स्पर्शेंद्रियानें वाचूं शकतात. ⊛ **कोणेकापुढें पाढा (किं० पाढा) वाचणें** १ त्याला तपशीलवार सूचना देणें. २ त्याला साद्यन्त हकीगत निवेदिणें.

वांचणें [**सं०** वच्, वंच्=फसविणें, चुकविणें] **अ० क्रि०** १ टिकून राहणें;बचावणें;कांहीं कठिण प्रसंगांतून निभावणें. २ जगणें; जिवंत राहणें; उ०माझे सगळे पूर्वज ऐंशीं वर्षांहून अधिक वांचले. ⊛ **वांचण्याच्या पंथास लागणें** आजारानें मरणोन्मुख असा माणूस बरा होण्याचा संभव दिसूं लागणें.

वाचन [**सं०**] **न०** १ ग्रंथ इ० वाचणें. २ पठन, म्हणणें, उच्चारणें; उ० पुण्याहवाचन.

वाचनक [**सं०**] **न०** उखाणा; कोडें.

वाचनिक [**सं०**] **वि०** १ शब्दांनीं व्यक्त केलेलें किं० सांगितलेलें. २ बोलण्यानें घडलेलें (पाप). याच्या व्यावर्तकत्वें ' मानसिक ' आणि ' कायिक '. **न०** निरोप.

वाचस्पति [**सं०**] **पु०** १ बृहस्पति. २ विद्वान्. ३ विष्णु. ⊛ **वाचस्पत्य न०** वक्तृत्व.

वाचा [**सं०** वाचा=वाणी; जिव्हा;सरस्वती] **स्त्री०** १ भाषण. २ बोलण्याची ताकद; उ० गायीला वाचा नाहीं. ३ कांहीं करीन अशा अर्थाचें वचन, प्रतिज्ञा, किं० करार. ४ ज्याचा उगम ठाऊक नाहीं अशी बातमी, बोध, सूचना, इ०. ५ अवसरणी. मागें ' अवसरणी ' पहा. ⊛ **बरी वाचे तुझें काय वेंचे ?** सभ्यपणानें तूं बोललास तर त्यांत तुझें काय नुकसान होईल ? कांहीं नाहीं. **वाचा उलटणें** (किं० **पालटणें**

किं० **फिरणें**) कांहीं काम आपल्या अंगावर आल्याकारणानें त्याची तरफदारी करणें अशक्य होणें म्ह० स्वस्थच बसणें जरूर होणें. **वाचा फुटणें** राघू, मूल, इ० बोलूं लागणें किं० त्यांना बोलतां येऊं लागणें. **कोणेकावर वाचा फोडणें** त्याचें अनिष्ट होईल किं० होओ, त्याचें निसंतान होईल किं० होओ, इ० रूप शाप उच्चारणें. **कोणेकाची वाचा लवणें** (किं० **वदणें**) घडलेल्या कांहीं प्रकारासंबंधानें आपलें मत बोलून दाखविणें त्याला जरूर वाटणें किं० बोलून दाखविण्याची त्याला उत्कट प्रेरणा होणें. **वाचा विटाळणें** १ नालायक माणसाची स्तुति करणें. २ शिव्या देणें. ३ दिलेलें वचन किं० केलेली प्रतिज्ञा न निस्तरणें. **तुझी वाचा साखरेनें भरो** चांगलें किं० शुभ बोलल्याबद्दल तुझ्या तोंडांत साखर पडो ! शाबास ! **वाचादत्त वि०** अमुक पदार्थ अमक्याला मी दिला अशा स्पष्ट शब्दांनीं दिलेला (जो पदार्थ तो).

वाचाट, वाचाल, वाचाळ[सं०]**वि०** बडबड्या; पुष्कळ बोलणारा. **वाचांश पु०** १ ब्र, अक्षर सुद्धां. निषेधीं प्रयोग; उ० त्याणें मजविरुद्ध इतकें अकांडतांडव केलें तरी मी कांहीं वाचांश काढला नाहीं (किं० केला नाहीं). २ एकाद्या विषयासंबंधाचें बोलणें (काढणें, निघणें); उ० तुमच्या संभाषणांत गोदीच्या लग्नासंबंधानें कांहीं वाचांश निघाला होता काय ? ३ कांहीं रहस्याचा कोणेकानें केलेला किं० त्याच्या हातून झालेला बोभाटा, परिस्फुटता, किं० प्रकटीकरण (करणें). ४ मी कांहीं करीन अशा अर्थाची प्रतिज्ञा (करणें). **वाचाशक्ति स्त्री०** १ वक्तृत्व; जोरदार भाषण करण्याची कोणेकाची शैली. २ न आडखळतां वाचण्याची कोणेकाची शक्ति किं० सामर्थ्य. **वाचाळपंचविशी स्त्री०, वाचाळपंचांग न०** वटवट, बडबड, टकळी (लावणें, करणें, चालविणें, इ०). **वाचाळवाणा (–णी) वि०** बडबड्या; गलागला बोलणारा.

वाचिक मागें ' वाच् ' मध्यें पहा.

वाची [**सं०** वाचिन्] **वि०** (उपपद समासांत उत्तरपदीं) सांगणारा, दर्शविणारा, बोधक; उ० कालवाची, धर्मवाची, इ०.

वांचून [**म०** वांचणें] **श० यो० अ०, क्रि० वि०** शिवाय, खेरीज; उ० हा श्लोक पाठ केल्यावांचून मी तुला पैधन हालूं देणार नाहीं; उ० रामभाऊवांचून सर्व लोक तेथें हजर होते.

वाच्य [**सं०**] **वि०** १ बोलण्यास किं० सांगण्यास योग्य किं० आवश्यक. २ निंद्य; गर्हणीय; दोषास पात्र. ३ शब्दांचा मूळचा (अर्थ), –लाक्षणिक अर्थ आणि व्यंग्यार्थ याच्या व्यावर्तकत्वें. **न०** १ निंदा; दूषण. २ मूळचा अर्थ. ३ प्रतिपादनाचा विषय; वर्णनाचा पदार्थ; उ० खुरांचा भग्नपणा, गळ्याखालीं सास्ना (पोळी) असणें, दूध देणें, इ० धर्मांनीं युक्त जो प्राणी तो वाच्य आणि ' गाय ' हा त्या प्राण्याचा वाचक. वाच्य आणि वाचक यांचा जो संबंध तो ' वाच्य वाचकसंबंध. ' ॐ **वाच्यता स्त्री०** १ दोष; निंदा. २ (**मराठींत**) रहस्याचें प्रकटीकरण; उ० ह्या आपल्या बेताची वाच्यता करूं नको.

वांच्छा [**सं०**] **स्त्री०** इच्छा; अभिलाष; मनोरथ.

वांच्छिणें [**सं०** वांच्छ्=इच्छिणें] **स० क्रि०** इच्छिणें.

वांच्छित [**सं०**] **वि०** जें इच्छिलें तें; इष्ट. **न०** मनोरथ; इच्छिलेला पदार्थ.

वांज, वांजट इ० पुढें ' वांझ, ' ' वांझट, ' इ० पहा.

वाजगस्त [**म०** वाजणें+**फा०** गष्तन्=फिरणें] **स्त्री०** घुंगरांची काठी ठोकीत ठोकीत आणि फिरत फिरत पहारेवाल्यानें केलेला पहारा. याच्या व्यावर्तकत्वें ' चोरगस्त. '

वाजट [**म०** वाजणें] **वि०** १ प्रख्यात, प्रसिद्ध, जगजाहीर (चांगल्या किं० वाईट अर्थी). २ ज्या विषयीं लोक बोलत आहेत असा (प्रकार, गोष्ट, इ०). ३ भरपूर आवाज ज्यांतून निघतो असें (वाद्य). **न०** १ प्रसिद्धि. २ बोभाटा. ३ कांहीं रहस्याची परिस्फुटता (करणें).

वाजणें [**सं०** ' वद् ' चें प्रयोजक] **अ० क्रि०** १ शब्द करणें; आवाज काढणें; **उ०** ही झांज किं० घंटा चांगली वाजत नाहीं. २ (कांहीं गोष्ट) प्रसिद्ध किं० जगजाहीर होणें. ३ (थंडी, हींव)

अनुभूत होणें; उ० मला थंडी वाजते. ४ थंडी, भीति, इ० मुळें (दांतांच्या दोन्ही कवळ्या) एकमेकांवर आपटणें. ५ (वारा) वाहाणें; उ० वारा वाजेल तशी पीठ ओढवावी. ६ (वांसा, तुळई, इ०) वरच्या भारामुळें न मोडतां कर-करणें किं० करकरत राहाणें. ❀ **बारा वाजणें** १ उतरती कळा लागणें; ऱ्हास पावणें. २ समाप्त होणें; नष्ट होणें. **बारा वाजविणें** १ उतरती कळा लागेल असें करणें. २ समाप्त, उध्वस्त, किं० नष्ट करणें; उ० तूं उधारीनें माल देत गेलास तर तुझ्या दुकानाचे लवकरच बारा वाजतील. **टीप,**–रात्रीचे बारा वाजले म्हणजे तो दिवस संपला इ० घड्याळाचे दाखले ह्या दोन्ही वाक्प्रचारांना आधारभूत आहेत. **वाजणें गाजणें** अ० क्रि० १ विजा लवून किं० कडकडून (पाऊस) पडणें. २ सर्व लोकांच्या संभाषणाचा (कांहीं खबर, गोष्ट) विषय होणें. **वाजत गाजत** क्रि० वि० वाद्यें वाजवीत, थाटमाट करून, प्रसिद्धपणें (येणें, जाणें, मिरवणें, इ०).

वाजता [म० वाजणें] वि० आवाज काढणारा; खळखळणारा. ❀ **वाजता नारळ** पु० जो नारळ हालविला असतां आंतील पाणी वाजतें असा नारळ. **वाजता पुडा** पु०, **वाजतें पूड** न० ज्यावर हाताचा आघात केला जातो तो पुडा. मागें ' धुमा ' अर्थ १ आणि ' पुडा ' अर्थ २ पहा. **वाजती घांट** स्त्री० कानीं पडलेली कांहीही गुप्त गोष्ट ज्याला त्याला सांगत सुटणारा माणूस.

वाजंत्र,वाजंत्रें [सं० वादित्र] न० १ वाद्य. २ वायुवाद्य. ३ सनई, संबळ, आणि सूर, ह्या तीन वाद्यांचा ताफा. ४ (**लाक्षणिक**) मुलाचें रडणें. ❀ **वाजंत्री** स्त्री० सनई,सूर, आणि संबळ, हीं वाद्यें वाजविणाऱ्यांचा ताफा.

वाजपुशी,वाजपूस [फा० बाझ्पुर्स्] स्त्री० चौकशी; विचारणा; वास्तपुस्त.

वाजपेय [सं०] पु०, न० यज्ञविशेष. ❀ **वाजपेयी** [सं० वाजपेयिन्] पु० वाजपेय यज्ञ करणारा किं० त्याचा कोणीही वंशज.

वाजव, वाजबी, वाजवी, वाजावाजवी [अ० वाजिब्] वि० योग्य; समंजसपणाचें; शिस्तवार; न्याय्य; रास्त.

वाजबमिती, वाजीबमिती [अ० वाजिब् +म० मिती] स्त्री० १ पूर्वी होऊन गेलेल्या व्यवहाराचा नंतर कांहीं दिवसांनीं कागद करावयाचा असतां त्या कागदांत पूर्वींची खरी तारीख किं० मिती नमूद करतात ती.२ पुढें व्हावयाच्या व्यवहाराचा अगोदर कागद करावयाचा असतां पुढची तारीख किं० मिति घालतात ती.

वाजबुल अर्ज [अ० वाजिब् उल् अर्ज्] स्त्री० लेखी आज्ञा किं० परवानगी.

वाजविणें [म० ' वाजणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ वाजावयास लावणें; वाजेल असें करणें. २ प्रसिद्ध करणें; जगजाहीर करणें. ❀ **कोणेकाचें बारा वाजविणें** त्याचा नाश किं० विध्वंस करणें;तें नष्ट करणें. मागें ' वाजणें ' मध्यें हा वाक्प्रचार पहा.

वाजावाजा, वाजागाजा, गाजावाजा पु०, **वाजी** स्त्री० [म० वाजणें, गाजणें] पु० १ बोभाटा; प्रसिद्धि; प्रख्याति (करणें, होणें). २ कीर्ति. ❀ **कोणेकाचा वाजावाजा(गाजावाजा** किं०**वाजा गाजा) करणें, कोणेकाचे वाजेवाजे करणें** १ त्याची फाजिल उधेउधे करणें; त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाणें.

वाजी [सं० वाजिन्] वि० १ चपळ; वेगरान्.२बलिष्ट. पु०१घोडा. २ बाण. ३ वाजसनेयी ब्राह्मण. ❀ **वाजिशाळा** स्त्री० घोड्यांची पागा. **वाजिमेध** पु० अश्वमेध. **वाजिनी** स्त्री० घोडी.

वाजीकर [सं०] वि० कामोत्पादक (औषध).

वाजीकरण न० वीर्याची वृद्धि करणारें एक औषधविशेष.

वाजीबमिती स्त्री० मागें ' वाजबमिती ' [पहा.

वांझ, वांझटोळी [सं० वंध्या] स्त्री० जिला अपत्यें होत नाहींत अशी स्त्री. वि० १ जी गर्भधारण करूं शकत नाहीं किं० अपत्यें प्रसवूं शकत नाहीं अशी (स्त्री). २ ज्याच्या वीर्यापासून स्त्रीचे ठायीं गर्भाचें आधान होऊं शकत नाहीं असा (पुरुष).३ज्याचे पासून नफा,वैभव,

समृद्धि, इ० मिळत नाहीं असा (धंदा, नोकरी इ०). ४ जीं फुलें पुंकेसरात्मकच असतात आणि म्हणून ज्यांचीं फलरूप परिणति होत नाहीं अशीं (फूलें). ५ ज्या झाडावर फळें धरत नाहींत किं० जें नर झाड आहे तें(झाड).६ ज्यांत असावा तितका गर नाहीं असें (फळ); जीत असावेत तितके दाणे नाहींत किं० मुळींच दाणे नाहींत अशी (शेंग). ७ ज्यांत गरे थोडे असा (फणस). **टीप,–वांझ, वांझा पु०, वांझ, वांझी स्त्री०, वांझटोळा पु०,वांझटोळी स्त्री०.** ❀ **वांझखडा** पु० गर्भ न राहावा म्हणून कांहीं स्त्रिया घेतात तें औषध. **वांझट** वि० थोडासा षंढ (पुरुष) किं० थोडीशी वांझ (स्त्री). **वांझोटी, वांझोळी** स्त्री० वांझ स्त्री (निंदेंत). **वांझतिथि, वांझतीथ,वांझीतिथि, वांझीतीथ** स्त्री० ज्या तिथीला कांहीं धर्मकृत्य, उपास, किं० मंगलकार्य, इ० विहित नाहीं ती तिथि. **वांझी पुनव, वांझी पौर्णिमा** स्त्री० पौष महिन्यांतील पौर्णिमा. पुष्कळ मुलें जिला आहेत अशा सुवासिनीस ह्या दिवशीं वांझ स्त्रिया जेवावयास बोलावतात,–तिच्या अशीर्वादानें आपणासही मुलें व्हावींत ह्या उद्देशानें. **वांझें ढग** न० ज्यापासून वृष्टि होत नाहीं असा मेघ.

वाट [सं० वाट=मार्ग] स्त्री० १ रस्ता; मार्ग; उ० मी रामभाऊकडे कोणच्या वाटेनें जाऊं ? २ वर्तनक्रम; सरणी; उ० काशीनाथपंतानें अन्यायाच्या वाटेनें पैसे मिळविले. ३ परिणाम; गति; निकाल; शेवट; पर्यवसान; उ० मी आपली तक्रार वरिष्ठापुढें मांडली आहे, तिची काय वाट होते ती पाहावी. ४ तऱ्हा; प्रकार; रीति; उ० ह्या वाटेनें तें उदाहरण सुटणार नाहीं.५ बेंबीच्या खालीं पोटांत वाटीच्या आकाराचा उंचवटा असतो तो. जड ओझें उचलल्यानें ही वाट सरून म्ह० स्थानभ्रष्ट होऊन पोट दुखूं लागतें किं० अन्य प्रकारें उपद्रव होतो. ६ संभव; शक्यता; उ० अहमदाबादेस भरलेल्या पुढाऱ्यांच्या परिषदेचा निकाल आज कळण्याची वाट आहे. ❀ **तिघांच्या तीन वाटा करणें, चौघांच्या चार वाटा करणें** त्यांच्यांतील ऐक्याचा किं० सलोख्याचा भंग करणें; त्यांची फाटाफूट किं०दाणादाण करणें; त्यांच्यांत मत्सर किं० विरोध पिकविणें.**त्याला तिवाटांची माती येत नाहीं(किं० समजत नाहीं)** तो अत्यन्त अडाणी आहे. **देखली वाट करणें (किं० पाहाणें)** ज्या वाटेनें कोणी आला असेल त्याच वाटेनें त्याणें परत जाणें; तो जसा आला तसा जाणें. **मधल्या वाटेस येणें** इष्ट वस्तु न मिळवितां येणें. **टीप,**– जाणें, नेणें, आणणें, हीं क्रियापदेंही याच सरणीनें योजतां येतात. **वाट करणें** १ रस्ता करणें किं० करून देणें; जाण्यायेण्याच्या वाटेंतलि अडचण नाहींशी करणें; उ० ह्या सतरंजीचा कोपरा दुमडून त्या सुताराला वाट करून दे. २ (लाक्षणिक) वर्तनक्रम ठरविणें किं० दाखवून देणें; अगोदरची व्यवस्था किं० मांडणी करणें. ३ दूर करणें; नाहींसा करणें. **एकाद्याची वाट धरणें** १ त्याच्या गतीला प्रतिबंध करणें. २ त्याच्या येण्याची किं० घडण्याची अपेक्षा करीत बसणें.**वाट पाहणें** १अपेक्षिणें.२उत्कंठेनें इच्छिणें. **वाट मारणें** रस्त्यांत लपून बसून मुशाफरांस लुटणें.**वाट लागणें** १ दूर होणें; नष्ट होणें;निरस्त होणें; निराकृत होणें. २ विल्हेस लागणें; निकालांत निघणें किं० काढलें जाणें. ३ समाप्त होणें; संपून जाणें; शिल्क न राहाणें. **वाट वावरणें** १ निरर्थक खेप घालणें; व्यर्थ हेलपाटा घालणें. २वाटेवर रहदारी असणें;मुशाफरांनीं किं० प्रवाशांनीं वाट गजबजलेली असणें. **वाट होणें** गत होणें; नष्ट होणें. **वाटेवर येणें** योग्य पद्धतीप्रमाणें किं० समंजसपणानें वोलूं किं०वागूं लागणें.**एकाद्याच्या वाटेस जाणें** त्याची खोडी करणें;त्याची कुरापत काढणें;त्याला राग येईल असें त्याच्याशीं वर्तन करणें; त्याला चिडविणें. **वाटेस लावणें** १हाकलून देणें;निरोप देणें.२कोणेकास योग्य मार्ग दाखवून देणें. ३ निकालांत काढणें. **वाटेवर पडणें** अल्प श्रमानें किं० मुळींच श्रम न करतां प्राप्त किं० साध्य होण्याजोगा असणें; उ० नोकऱ्या काय वाटेवर पडल्या आहेत ? **वाट लावणें** १ आपल्या वाटेंतून काढून टाकणें किं० दूर सारणें. २ विल्हेवाट करणें; उ० दहा प्रकरणांची मी तीन तासांत वाट लाविली.३ खाऊन टाकणें; संपवून टाकणें; मोडून तोडून टाकणें. **कोणे**-

काला चारी वाटा(किं०बारा वाटा) मोकळ्या असणें त्याला आवरणारा कोणी माणूस नसल्यामुळें त्याला हवें तिकडे जाण्याला मोकळीक असणें किं० स्वच्छंदानें वागण्याची मुभा असणें. त्याची काय वाट झाली?तो कोठे आहे? तो कोठे गेला?त्याला काय दैवगति प्राप्त झाली? तो दिसत कां नाही ? वाटेचा पाय(किं०वाटेचें धाऊल) आड वाटेस पडणें चांगल्या माणसानें प्रसंगविशेषीं अनीतीची कांहीं गोष्ट करणें किं० चुकीच्या मार्गाचा अवलंब करणें. वाटेवर येणें पुन्हा नीट वागूं लागणें; ताळ्यावर येणे. वाटकाढ्, वाटाड्या पु०प्रवाशाला वाट दाखविणारा. वाटखर्ची स्त्री० प्रवासांत खर्चावयासाठी घेतलेला पैसा. वाटचा चोर पु०कोणीही मनुष्य; उ० ह्या चांदीच्या पेल्याला वाटचा चोर दहा रुपये देईल. वाटचा वाटसरू पु० कोणीही तिऱ्हाईत.वाटतीट स्त्री०भलताच कधोवयाचा रस्ता; रस्ता(सामान्यतः); उ०वाटेतिटेनें संभाळून जा बरें कां. वाटपाड्या (-ड्या) पु०मुशाफरांना रस्त्यावर लुटणारा. वाटभेट स्त्री० सहजासहजीं रस्त्यांत कोणेकाची पडलेली गांठ किं० झालेली भेट. वाटमार स्त्री० रस्त्यांत कोणा बदमाषानें कोणेकावर केलेला हल्ला किं०त्याची केलेली लुबाडणूक.वाट मार्ग पु०रस्ता,वाट,सरणी. वाटमार्गी पु०प्रवासी; मुशाफर. वाटमाऱ्या पु० प्रवाशांवर रस्त्यांत हल्ला करून त्यांना लुबाडणारा चोर. वाटशेक क्रि० वि० १ रस्त्यावर (असलेलीं सावलीचीं झाडें, पाण्याची सोय, घरें, धर्मशाळा,दूध. इ०). २ सबंध रस्ताभर; वाटेनें. वाटसर, वाटसरू, वाटसारू, वाटसुरू,वाटसूर पु०प्रवासी; मुशाफर.वाटाडी,वाटाड्या पु० प्रवाशाला वाट दाखवणारा.वाटवणी [म० वाट+पाणी] न० लघ्वी; मूत्र. वाटवणी [म० वाटविणें] स्त्री० रस्त्यांत झाड,विहीर, इ० मागें टाकून प्रवाशानें पुढें जाणें.

वाटकोळ, वाटखोळ. वाटकूळ, वाठखूळ, वाढोळ, वाढूळ [सं०वाढ(पुष्कळ)+काळ]क्रि० वि०पुष्कळ वेळपर्यंत.पु०बहुत काळ; उशीर; अवकाश.टीप;–हें सर्व शब्द पवित्र जातकुळींचे असून आज आर्शिक्षितांतच त्यांना थारा उरला आहे.

वाटगा, वाडगा [म० वाटी] पु० पसरट आकाराचें मातीचें किं०धातूचें स्थळ पात्र.

वाटघाट [म० वाटणें+घाटणें] स्त्री० १ चटणी, औषधी द्रव्यें, इ० वाटणें,कुटणें, इ०क्रिया समुच्चयानें. २ कांहीं काम, कारभार, इ० संबंधाचें बोलणें, व्यवस्था, विचार, चर्चा, इ०.

वांटचा [म० वांटणें; सं० वंट्=विभागणें, वांटे पाडणें] वि० कोणेकाच्या बद्दल किं०ऐवजीं किं० स्थानीं असलेला किं० ठरविलेला; उ० मी आजारी आहें; माझ्या वांटचा तूंच पानसुपारीला जाऊन ये.

वांटण [म०वांटणें; सं० वंट्] न० जें वाटलें तें किं० जें वाटावयाचें तें (चटणी, पुरण, इ०)

वाटणा पुढें ' वाटाणा ' पहा.

वांटणी [म० वांटणें] स्त्री० १ विभागणी; विभागण्याची क्रिया. २ विभागण्याच्या क्रियेनें कोणेकाला मिळालेला अंश किं०भाग किं०हिस्सा; उ०माझ्या वाटणीस घराचे पांच खण आले आहेत. ३ पत्ते, गंजिफा, इ० चा भाग प्रत्येक खेळाडूला देणें किं० दिलेले पत्ते किं० गंजिफा समुच्चयानें.

वांटणीपत्र(-पत्रक)न०समाईक वस्तूचा कोणाला किती अंश द्यावयाचा किं० दिला हें ज्यांत नमूद केलें आहे तो कागद.

वांटणें [सं० वंट्=विभागणें] स० क्रि० १ (पदार्थाचे) कांहीं एका तत्त्वावर भाग पाडणें.२ (पदार्थाचे) कांहीं तत्त्वावर भाग पाडून ते त्या त्या माणसांकडे किं० त्या त्या स्थानीं ठेवणें, देणे,किं० स्थापिणें; उ० पन्नास रुपये दहा माणसांत वांटले तर प्रत्येकाला पांच पांच रुपये येतात.

वांटणें [सं० वंट्=विभागणे] स० क्रि० १ पाटा इ० वर (मिरच्या, कोथिंबीर, इ० पदार्थ) घालून वरवंटा इ० साधनांनीं (ते) चूर्णरूप करणें किं० अशा कृतीनें (पदार्थ विशेष)उत्पन्न करणें;उ० चटणी, कोथिंबीर, पुरण, तांदुळाच्या कण्या, इ० वांटणें. २ एकाद्या विषयाचा किं० प्रश्नाचा अनेकांनीं एकत्र बसून विचार करणें किं० एकानेच आपल्या मनाशीं विचार करणें. वांटून घाटून क्रि० वि० १ पूर्णपणें चूर्णरूप करून. २ पूर्णपणें विचारांत घेऊन;साधक बाधक गोष्टींचा पूर्णपणें विचार करून. कोणेकाला

वाटून घाटून पिणें (किं० **खाणें** किं० **गिळणें**) त्याच्यावर करडा अमल चालवून किं० त्याच्या-वर फाजील नियंत्रणा लादून त्याला सतावणें किं० गांजणें; त्याला अतिशय उपद्रविणें.

वाटणें अ० क्रि० १ कांहीं अर्थ, वस्तु, विषय, इ० कांहीं गुण, धर्म, स्वरूप, इ० संबंधानें प्रतीत होणें किं० भासमान होणें किं० विचारानें गृहीत होणें; दिसणें; भासणें; उ० आज पाऊस पडेल असें मला वाटतें; उ० ताराबाईला रानड्यांचें स्थळ उत्तम आहे असें मला वाटतें. २ तर्कांत येणें.३कांहीं गोष्ट, स्थिति, सरणी,इ० घेण्या जोगी किं०अवलंबिण्याजोगी आहे असें मनानें ठरविणें.

वांटप [म० वांटणें]न० भाऊबंध, व्यापारी-मंडळी, इ० च्या समायिक माल, पैसा, इ० ची वांटणी करणें ही क्रिया किं० ह्या क्रियेचें फळ किं० ह्या क्रियेनें जे ठरलें तें. ॐ **वांटपपत्र न०** वांटण्या ज्यावर नमूद करण्यांत आल्या आहेत तो कागद.

पाटपाडू, वाटमाऱ्या, वाटमारू, वाटशेक, वाटसरू इ० मागें ' वाट ' मध्यें पहा.

वाटपिठाचा [म० वाटणें+पीठ] वि० डाळ, तांदूळ, इ० भिजवून आणि नंतर वांटून तळून किं० शिजवून केलेला (वडा, डंडा, इ०).

वाटला [म० वाट=रस्ता] **क्रि० वि०** सभों-वार; सभोंवतालीं; उ० घरा वाटली धार फिरते. **टीप,**–१ हें क्रि०वि०लिंगवचनांप्रमाणें फिरणारें आहे.**टीप,**–२ हा शब्द रत्नागिरीकडे वापरतात.

वाटवणें [म० वाट=रस्ता] अ० क्रि० मुक्कामानंतर पुन्हा (प्रवाशानें) प्रवास सुरू करणें.

वाटवा [हिं०बटवा] **पु०**सराफ, प्रवासी,इ० ची पैसे,उपयुक्त पदार्थ,पान तंबाखू,इ० ठेवण्याची कप्याकप्यांची आणि दोऱ्या ओढल्यानें उघड-णारी किं० मिटणारी पिशवी. मागें ' बटवा, ' ' बटवी ' पहा.

वाटविणें [म० वाट=रस्ता] **स० क्रि०** १ प्रवासांत आणि चालतांना (स्थलविशेष) मागें टाकून किं० लंघून पुढें जाणें; उ० ही घांटी आपण वाटविली म्हणजे नेवरें गांव आपणाला दिसूं लागेल. २ (प्रसंग, काळ, अवधि, किं० समय) अतिक्रान्त करणें; उ० उद्या अमावास्या वाटविली तर ह्या रोग्याला उतार पडूं लागेल.

वांटा [म० वांटणें] **पु०** एका वस्तूचे केलेले जे अनेक विभाग ते प्रत्येक; हिस्सा; उ० देशका-र्याचा ज्याचा त्याणें वांटा उचलला म्हणजे हावें तें ध्येय हां हां म्हणतां साध्य केलें जातें. ॐ **वांटेकरी, वांटेदार, वांटेलदार, वांटेली पु०** कांहीं वस्तूंचा वांटा किं० हिस्सा ज्याला मिळाला आहे किं० मिळावयाचा आहे तो किं० त्या वांट्याला किं० हिशाला जो हक्कदार आहे तो.

वाटाघाट [म० वाटणें+घाटणें] **स्त्री०** संदिग्ध विषयाचा निर्णय ठरविण्यासाठीं केलेली चर्चा, खल, किं० वादविवाद. पु०, **स्त्री०** १ पराकाष्ठेचा प्रयत्न किं० खटपट किं० तेणेंकरून आलेला शीण किं० थकवा. २ तगादेदार, करडा यजमान, इ० नीं चालविलेली सतावणूक.

वाटाडी (-**ड्या**) [म० वाट] **पु०** १ वा-टाला वाट सांगणारा किं० दाखविणारा.

वाटाणा [हिं० बटाना] **पु०** एक द्विदळ धान्य. ॐ **काणेकाला वाटाण्याची अक्षत**(किं० **अक्षता**) **लावणें** त्याला नकारात्मक उत्तर देणें; त्याची विनंती अमान्य करणें.

वाटांदुळा, वाटांदूळ [म० वाटोळा+ तांदूळ] **पु०** सडीक तांदुळांत जी मोठी आणि जाडी कणी निघते ती किं० ज्या कण्या निघ-तात त्या समुच्चयानें.

वाटारणें स० क्रि० (डोळे ताणून) कोणे-काकडे नजर वळविणें; वटारणें.

वाटावणें, वाटाविणें मागें ' वाटवणें, ' ' वाट-विणें ' पहा.

वांटावांट [म० वांटणें+वांटणें] **स्त्री०** एका पदार्थाचे अनेकांत विभाग पाडणें; एक पदार्थ वांटून अनेकांस देणें. [पहा.

वाटावाट (-**टी**) **स्त्री०** मागें ' वाटाघाट '

वाटिका, वाटी [सं०] **स्त्री०** १ बाग. २ क्रीडावन. ३ मोकळें किं० भाज्या इ० लाविलेलें पटांगण.

वाटी स्त्री० बासुंदी, खीर, दूध, आमटी, इ० पातळ पदार्थ ठेवण्याचें, घालण्याचें, किं० घट्ट पदार्थ ठेवण्याचें पात्रविशेष.

वांटाव स्त्री० वादविवाद; विचार; वांटाघाट.

वाटींव [म० वाटणें] **वि०** पाटावरवंटा ह्या साधनानें चूर्णरूप केलेला.

वाटेचा, वाटचा [म० वाट=रस्ता] **श० यो० अ०** बद्दल; कोणेकाच्या जागीं किं० ऐवजीं.

वाटोणी [म० वाट+पाणी] **न०** लघवी; मूत्र किं० मूत्रविसर्जन.

वाटोळा [सं०वृत्त, वर्तुल] **वि०** मध्यबिंदू-पासून सारख्या अंतरावर ज्याचा परिघ आहे असा (धोंडा),आकृति, पटांगण,इ०).⁂**(कांहीं वस्तूंचें) वाटोळें होणें**(किं०**करणें**) १तो नष्ट किं०विध्वस्त होणें किं० नाहींसा होणें.(किं० करणें) २ त्याची नासाडी होणें (किं० करणें). **कोणेकाचें वाटोळें लांबोडें होणें**(किं० **करणें**) त्याचा पूर्णपणें विध्वंस किं०नाश होणें (किं०करणें).**वाटोळा खूर पु०** १खर्चास कारणीभूत आणि उपयोगास न येणारा किं० ज्याचा खर्च आपणास झेपत नाहीं असा घोडा (निंदेंत). **टीप**,–घोड्याचा खूर वाटोळा असतो ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. २ भामट्या; फसव्या. **वाटोळा गोटा** (किं० **गोळा** किं० **धोंडा**) **पु०** १ अट्टल सोदा. २ सर्वांशीं सारख्याच सभ्यपणानें वागणारा. ३ भाषण, व्यवहार, इ० मध्यें न सांपडणारा, न आडकणारा, किं० न फसणारा असा मनुष्य.

वाठ,वांठ[सं०वत्स]**स्त्री०**म्हशीचें स्त्री अपत्य; रेडी. ⁂ **वाठीचा पिता पु०** मूर्ख; अडाणी माणूस; बैलोबा. **वाठरूं न०** रेडकूं (प्रेमांत).

वाठणें, वाठरणें अ० क्रि० (हात, पाय, इ० गात्र) थंडी, लचक, उसण, इ० मुळें आखडणें किं० वांकडें होणें.

वांठरूं वर ' वाठ ' मध्यें पहा.

वाठार [सं० वाट] **न०,स्त्री०** १ गांवांतील अरुंद रस्ता; बोळ. २ गांवाचा मोहल्ला किं० पेठ किं० भाग.

वाठीं, वांठ्यें न० पोटांत धान्य इ० घालून वर तृण लपेटून बांधलेला गठ्ठा; मुढा.

वाड न० उसाचें पीक.

वाड स्त्री० १ रिकामी जागा किं० पटांगण. २ रिकामपण; फुरसूत.

वाड [सं० बाढ] **वि०** १ मोठा; विशाल; विस्तीर्ण; अमर्याद. २ समर्थ; जोरदार.

वाडकर, वाडकुलें, वाडगें पुढें ' वाडी ' मध्यें पहा.

वाडगा मागें ' वाटगा ' पहा.

वाडदिवस, वाडदीस पुढें 'वाढदिवस' पहा.

वाडप, वाडपी, वाड्या, वाडलें, वाडवण पुढें ' वाढप, ' ' वाढपी, ' ' वाढलें, ' ' वाढ-वण ' पहा.

वाडवळ [म० वाडी+वळणें] **पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

वाडवळ न० शेतकऱ्यांचा एक उत्सव. मागें ' डवरा ' अर्थ ३ पहा.

वाडवीस, वाडवेळ पुढें ' वाढवीस, ' ' वाढ-वेळ ' पहा.

वाडा [**सं०** वाट] **पु०** १ मोठें घर; विस्तीर्ण घर. २ गांवाचा एक भाग,पेठ, किं० मोहल्ला. ३ एका गांवाच्या हद्दींत, किं० अमलांत, किं० सरकारदेणें इ० बाबतींत, जे थोडे थोड्या घरांचे समूह असतात किं० मोडतात ते प्रत्येक. ४ मौजाचा एक विभाग. मागें ' मौज ' **न०** पहा. ५ बंदिस्त पटांगण. ६ गुरें, शेळ्या, मेंढ्या, इ० कोंडावयाची बंदिस्त जागा. ७ विशिष्ट धंद्याच्या लोकांच्या वसतीचा गांवाचा भाग. उ० चांभार-वाडा, महारवाडा, गऊळवाडा, इ०.

वाडाळणें स० क्रि० (धान्य इ०) पाखडणें किं० हसडणें.

वाडी [**म०** वाढणें] **स्त्री०** भुतांखेतांना दिलेला शिजविलेल्या अन्नाचा नैवेद्य.

वाडी [**सं०** वाटी] **स्त्री०** १ कुंपणानें मर्या-दित असलेली बागाईत जमीन. २ शेतकरी लोकांच्या वसतीचीं गांवाशेजारीं असलेलीं घरें समुच्चयानें किं० त्यांच्या वसतीचा टापू किं० प्रदेश. ३ अंतरा अंतरावर असलेले एकाच गांवाचे विभाग. ४ शहराचे वेगवेगळे विभाग. ⁂ **वाडीवतन न० ए० व०** कोणेकाची स्वताच्या मालकीची शेतें, घरें, इ० जिंदगी. **वाड्या पु०** वाडीचा मालक. **वाडकर पु०** वाडीचा वतनदार धनी किं० मालक. **वाडकरी पु०** १ वाडीचा मालक. २ वाडींत राहाणारा.

वाड्कुलें न० लहान वाडी. **वाडगें न०** कुंपण घातलेलें लहानसें पटांगण.

वांडें [**सं०** वाणिज्य] **न०** १ विक्रीचा माल. २ व्यापाऱ्याचा वखारींतील माल. ३ बाजारांत विक्रीसाठीं आलेला पर ठिकाणचा माल. ॐ **वाड्याचे वाडें न०** व्यापारांत घातलेलें कांणकाचें भांडवल.

वाडें, वाढें न० १ उसाचा पानांसकट शेंडा. २ खजुराचें एक ओझें.

वाडेंकोडें [**म०** कोड] **क्रि० वि०** १ प्रेमपूर्वक. २ नखरेबाजीनें. ३ कौतुकानें.

वाढ [**सं०** वृद्धि] **स्त्री०,पु०** १ मनुष्य,पशु, वृक्ष, इ० चीं जन्मापासून बाल्य, तारुण्य, इ० अवस्थांत शरीर, बुद्धि, आकार, उंची, इ० मध्यें होत जाते जी प्रगति किं० वृद्धि ती. २ वृद्धि; अधिकपणा; अधिक संपन्न होणें ही स्थिति; संख्या, विस्तार, उंची, लांबी, सामर्थ्य, इ० बाबतींत जो मोठेपणा तो किं० जें वैभव तें. ३ उसना आणलेला पदार्थ (मेतकूट, पीठ, बाजरी, दूध, इ०) परत देतांना त्यांत घालून देतात ती भर. **न०, स्त्री०** कोनफळ, बटाटा, ऊस, इ० च्या ज्या भागावर डोळा असतो तो भाग. मागें ' डोळा ' अर्थ ६ पहा. **न०** उसाचें पानांसकट टोक. ॐ **वाढीस लागणें** १ योग्य प्रमाणांत पोषक द्रव्य मिळूं लागून (गर्भ, संस्था, इ०) आकार, वैभव, इ० गुणांनीं मोठें होणें. २ कांहीं कारणानें कुंठित झालेली (गर्भ, संस्था, इ० ची) वाढण्याची क्रिया पुन्हा पूर्ववत् सुरू होणें.

वाढकर, वाढकरी मागें 'वाडी' मध्यें 'वाडकर ' ' वाडकरी ' पहा.

वाढण, वाढणें [**म०** वाढणें] **न०** १ जेवायास बसलेल्या माणसांस भात, पोळी, आमटी, इ० खाद्यें, किं० पेयें, किं० चोष्यें, किं० लेह्यें इ० जे वाढावयाचे पदार्थ ते. २ वाढणें ही क्रिया किं०जे वाढावयाचे पदार्थ ते. २ वाढणें ही क्रिया किंवा घरोब्याचीं म्हाणवलेला सोयरेधायरे किं० घरोब्याचीं माणसें जें खाद्यपेयांचे ताट पोंचवितात तें. ३ गडी, नोकर, इ० ना सणाचे दिवशीं किं० लग्न, मुंज, इ० प्रसंगीं जें खाद्यपेयें घालून ताट देतात तें.

वाढणी [**म०** वाढणें] **स्त्री०** जेवावयास बसलेल्या माणसांना वाढावयास पदार्थ ज्या आकारविशेषाच्या ताटांत घालून नेतात तें ताट.

वाढणी [**हिं०** बढणी] **स्त्री०** केरसुणी; वाढवण.

वाढणी [**म०** वाढणें] **स्त्री०** वृद्धिंगत होणें ही क्रिया. ॐ **वाढणीस लागणें** वाढूं लागणें; वैभवास चढूं लागणें.

वाढणें [**सं०** वृध्, वर्धू] **अ० क्रि०** १ आकार, परिमाण, उंची, वैभव, कौशल्य, इ० अधिक होणें. २ परिपक्व होणें. ३ दिवस, मुदत, इ० अधिक होणें किं० लांबणें. ४ (कुंकूं, बांगड्या, काजळ, इ०) संपणें किं० खलास होणें. ह्या अर्थी ' वाढवणें ' सुद्धां. ५ प्रतिपक्ष्यांवर चाल करून जाणें. ६ भूतपिशाचादिकांच्या बाधेनें हात, डोकें, पाय, इ० गात्रें हालूं लागणें किं० हालत असणें. ७ (भूत, पिशाच, इ० नीं) मनुष्याच्या हात,पाय,इ०गात्रांत प्रविष्ट होणें.**स० क्रि०** १भोजनास बसलेल्या माणसांच्या वाट्यांत, किं० ताटांत भात, भाजी, इ० पदार्थ घालणें. २ समई, लामणदिवा, निरांजन, इ० मध्यें (तेल, तूप, इ०)घालणें. ॐ **वाढून ठेवलेलें असणें** १ (आजार, संकट, पेच, इ०) माणसाला छळावयाला हजर किं० सिद्ध असणें (वैतागांत). २ (नोकरी, बढती, इ०) नोकरास द्यावयास यजमानानें तयार करून ठेविलेली असणें (उपहासांत). **वाढणें वर्तणें अ० क्रि०** कोणेकाच्या आश्रयानें लहानाचा मोठा होऊन संसार करूं लागून सुस्थितींत असणें; उ० मी तुमच्याच अन्नावर इतके दिवस वाढलों वर्तलों आहे, तो मी तुमच्या उलट साक्षी कशी देईन ?

वाढणें न० मागें ' वाढण ' पहा.

वाढता [**म०** वाढणें] **वि०** उत्तरोत्तर वाढत जाणारा किं० समर्थ, प्रगल्भ, किं० वैभवशाली होत जाणारा (संसार, व्यापार, व्याप, बुद्धि, पैसा, इ०). ॐ **वाढता चुडा पु०,वाढती बांगडी स्त्री०** कासाराकडून हातांत बांगड्या भरविल्या असतां ठरावापेक्षां अधिक जी एक बांगडी कासार भरतो ती बांगडी. **वाढत्या अंगाचा कपडा पु०** मुलगा अंगानें धष्टपुष्ट

होणार यासाठीं त्याच्या धष्टपुष्ट शरीराला कमी पडणार नाहीं अशा बेताने शिवविलेला कपडा (बंडी, सदरा, विजार, इ०). **वाढत्या अंगाचा** वि० शरीरानें उंच आणि जाडी होत जाण्याच्या वयाचा (मुलगा, मुलगी, वासरूं, इ०).

वाढती [म० वाढणें] स्त्री० मुलाला लागते ती उचकी,–जी मूल सुस्थितीत आहे असें सुचविते.

वाढदिवस, वाढदीस, वाढवीस[म०वाढणें +दिवस]पु०मूल ज्या वर्षाच्या ज्या महिन्याच्या ज्या पक्षांतील ज्या तिथीस जन्मलें असतें त्या वर्षाच्या पुढच्या वर्षाच्या त्या महिन्याच्या त्या पक्षांतील त्या तिथीस घुसळखांब्याची पूजा करून नंतर जो उत्सव करतात तो किं० तो उत्सवाचा दिवस. हा उत्सव मुलाच्या जन्मानंतर पहिले सहा महिने दर महिन्यास करतात नंतर पुढें दर वर्षी मात्र करतात.

वाढप [म० वाढणें] न० जेवणाऱ्या मंडळींना पदार्थ वाढणें किं० जें वाढलें तें. ꕥ **वाढपी** पु० भोजनाला बसलेल्यांना पदार्थ वाढतो तो किं० असा लग्न इ० प्रसंगीं वाढण्याचा धंदा करतो तो.

वाढया [सं० वर्धकि=सुतार; हिं० बढई] पु०१ सुतार.२ सुताराच्या नांवापुढें लावावयाचा बहुमानाचा हा शब्द आहे; उ० रूपावढाई. मागें ' बढई ' पहा.

वाढलें [म० वाढणें] न० मागें ' वाढण ' अर्थ २ आणि ३ पहा.

वाढवण [म० वाढविणें] स्त्री० १ अधिक करणें किं० अधिक करण्यासाठीं घातलेली भर. २ केरसुणी (कोंकणांत रूढ). ३ खराटा (नारळाच्या पातींच्या हिरांचा).४ वजन किं० माप ह्यांत आढळून आलेलें अधिक परिमाण.

वाढवा, वाढावा[म० वाढणें]पु०धान्य इ० च्या दुसऱ्या मोजणीच्या किं० मापणीच्या प्रसंगीं पहिल्या मोजदादीहून जो अधिकपणा कांहीं वेळां आणि कांहीं कारणांनीं दिसून येतो तो.

वाढविणें [म० ' वाढणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ अधिक करणें,–ताकांत पाणी किं० बासुंदींत दूध घालून किं० अन्य प्रकारें. २ (मूल, झाड, संस्था,इ०चें) संगोपन करून(त्यांना)प्रगल्भ दशेस आणणें. ३ नव्या बांगड्यासाठीं मनगटावर जागा करण्याकरितां कासारावरून (किं० स्वतः) जुन्या(बांगड्या)मुद्दाम फोडविणें(किं०फोडणें).ꕥ **भांडण वाढविणें** जें विधान करण्याची फारशी जरूरी नाहीं तें करून प्रतिपक्ष्याला चिडवून भांडण चालूं ठेवणें. **वाढविणें दर्तविणें** (कोणा माणसाचें) लालन, पालन, संगोपन, इ० करून (त्याला) स्वताच्या जबाबदारीवर संसार, धंदा, नोकरी, इ० करावयाला समर्थ करणें.

वाढवीस पु० मागें ' वाढदिवस ' पहा.

वाढवेळ [सं० वाढ+वेला] पु० पुष्कळ वेळ किं० कालावधि. क्रि० वि० दीर्घ कालपर्यंत.

वाढळ वि० खालीं ' वाढाळ ' पहा.

वाढा [म० वाढणें] पु० गाई,म्हशी, शेळ्या, मेंढ्या, इ० चा संततिरूप जो विस्तार तो. ꕥ **वाघांचा वाढा वाढत नाहीं** दुष्ट लोक बहुधा वैभवास चढत नाहींत.

वाढाळ, वाढळ, वाढाळू [म० वाढणें]वि० जें लवकर किं० भराभर वाढत जातें असें (मूल, झाड, इ०).

वाढावा [म० वाढणें] पु० मागें 'वाढवा ' पहा.

वाढी [म० वाढणें] स्त्री० उसनें आणलेलें धान्य परत देतेसमयीं त्यांत जें अधिक किं० भरतीचें परिमाण घालतात तें.अशा व्यवहाराला ' वाढीदिढी 'म्हणतात.

वाढी [म० वाढणें] स्त्री० पातळ पदार्थ जेवणाऱ्यांना वाढावयाचें आकारविशेषाचें आणि तोटी किं० पन्हळ असलेलें पात्रविशेष.

वाढें [म० वाढ] न० १ उसाचा माथ्याकडचा भाग. २ कोष्ट्याच्या मागावर घातलेले जे ताणे त्यांचीं न विणतां सोडलेलीं टोकें समुच्चयानें. ३ कोष्ट्याच्या मागावर चार पांच पंचे इ० एकदम विणावयासाठीं ताणे पसरलेले असतात त्यांत वेगळे वेगळे पंचे पृथक् दाखविण्यासाठीं जे भाग वाण्याचे तंतु न भरतां रिकामे सोडलेले असतात ते प्रत्येक.

वाढोळ पु० मागें ' वाढवेळ ' पहा.

वाण [सं० वर्ण] पु०, न० (शरीर, वस्त्र, इ० संबंधांत) रंग किं० वर्ण. २ वस्त्र, शरीर, इ० च्या रंगाचा नमुना, उंची, दर्जा, किं० अवकाद

दाखविण्याच्या बाबतींत) ३ रंग (सामान्यतः). ❀ ढवळ्या शेजारीं बांधला पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला मागें ' ढवळा ' मध्यें पहा. **वाण पालटणें** (किं० फिरणें किं० बदलणें) १ मनुष्य, झाड,इ० चीं जोराची वाढ किं०वाढीचा कुंठितपणा दाखविणारा त्यांचा रंग, वर्ण, किं० तजेला वेगळा दिसणें. २ सोनें, चांदी, इ० च्या दागिने इ० ची चकाकी, हिरे माणकें, इ० चा तजेला कमी किं० अधिक किं० वेगळ्या प्रकारचा होणें. **वाण मारणें** टवटवी, तजेला, हिंमत, इ० गुण कमी प्रमाणांत (माणूस , पशु, इ० नीं) प्रकटिणें: उ० आज घोडा वाण मारल्यासारखा दिसतो आहे. **वाणचोर** पु० स्वतःचें स्वरूप झाकणारा; लबाड. **वाणढाळ** वि० ज्याचा रंग, तजेला, किं० टवटवी कमी झाली आहे असें (फळ, कपडा, मोती, हिरा, किं० कोणताही पदार्थ); फिका; मजीत. **वाणमाऱ्या** वि० १ फिका; निस्तेज. २ उदासीन. किं० खिन्न दिसणारा.

वाण, वाणक [सं० वायन] न० बायका व्रत करतात तेव्हां नारळ, केळीं, इ० फळें, किं० कुंकू इ० सौभाग्य द्रव्यें बांबूच्या शिपतरांत घालून ब्राह्मणास किं० सुवासिनीस दान देतात तें दान. ❀ **वाणवसा, वाणवंसा** पु० बायका करतात तीं व्रतें, नेम, इ० समुच्चयानें.

वाण [म० उणा] स्त्री० कमताई; न्यूनता. ❀ **मिठाची केली वाण आणि लोणच्याला पडली घाण** कांहीं कामीं योग्य तो खर्च न केल्यास सर्वच काम बिघडतें आणि (एकंदरींत अधिक पैसा खर्चावा लागतो).

वाणका वि० मजबूत; दणगट; भक्कम.

वाणकूट, वाणगट, वाणगंड [म० वाणी= हिंग, जिरें, मिरें, इ० विकणारा] पु० वाणी (तुच्छतेंत).

वाणगी पुढें ' वानगी ' पहा.

वाणणें, वाणिणें [सं० वर्ण्] स० क्रि० स्तविणें; प्रशंसिणें.

वाणा [सं० वाणि=१ विणणें. २ माग]पु० मागावर वस्त्र विणतांना धोट्याच्या गतीनें जों आडवीं सुतें भरतात तीं समुच्चयानें. उभ्या सुतांस ' ताणा ' म्हणतात. ' ताणा ' चा अर्थ आम्ही मागें चूक दिला आहे. ❀ **वाणाताणा** पु० ए० व० वस्त्राची वीण.

वाणिज्य [सं०] न० व्यापार; उदीम.

वाणिणें मागें ' वाणणें ' पहा.

वाणी [सं० वाणिज=व्यापारी] पु० १ हिंग, जिरें, मिरें, धान्य,इ० विकणारा व्यापारी. २ हिंदूंची एक विशिष्ट जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. ३ एक कीटविशेष. ह्याला ' मंडळी, ' ' मंडाळी ' असेंही म्हणतात. ❀ **वाणी उदमी, वाणी बकाल** पु०अ०व० हरएक प्रकारच्या मालाची खरेदीविक्री करणारे व्यापारी. **वाणीजिन्नस** पु० वाणी विकतो ते हिंग, जिरें, इ० जिन्नस प्रत्येक. **वाणपसारा** पु० १ वाण्याचा धंदा. २ वाण्याचे विकावयाचे जिन्नस समुच्चयानें. ३ कोणत्याही कामाच्या उपकरणांचा व्याप किं० पसारा (घालणें, मांडणें, इ०). ४ अव्यवस्थित पसरलेलें सामानसुमान,–पुस्तकें, भांडीं,चिरगुटें, इ०. ५ (**लाक्षणिक**) प्रसूत होत असलेल्या स्त्रीची अडणूक (पडणें). **वाणसवदा, वाणसौदा** पु० वाणी विकतो ते जिन्नस.

वाणी [सं०] स्त्री० १ बोलणें. २ भाषा. ३ शब्दोच्चार. ४ भाषेची किं० शब्दोच्चाराची देवता;सरस्वती. ❀ **वाणीवाटें निघणें** कांहीं वाक्य किं० विचार बोलला जाणें(निंदेंत प्रयोग). **वाणी वदणें** मूर्खासारखें कोणी कांहीं बोलणें.

वाणीकिणीचा, वाणीतिणीचा, वाणीदेणीचा [म० वाण=उणीव] वि० दुर्मीळ किं० अपूर्व म्हणून मूल्यवान् म्हणून समजला जाणारा (पदार्थ).

वात[सं० वर्ति]स्त्री० १कापूस, सूत,चिंधी, इ०ची गुंडाळी,–जी समई इ० तील तेल आकर्षून घेते आणि जी पेटविली असतां प्रकाश देते. २ जखम इ० तील पू, रक्त,इ०शोषून घेण्यासाठीं आंत खुपसतात ती वस्त्राची चिंधी, कापसाची काडी, इ०. ३ बारीक पडवळ, शेंग, इ०.४ गलबताचें अवजार गुंडाळलें म्हणजे होते ती गुंडाळी. ५समई इ०तील पन्हळ,ज्यांत वात घातलेली असते तो. ६ देवळांत दिवा लावण्याच्या कामावरच्या

नोकराला चरितार्थासाठीं बक्षीस दिलेली जमीन

वात [**सं०**] **पु०** १ वायु; वारा. २ (**वैद्यक**) शरीरांतील धातुविशेष. ३ ह्या धातुविशेषाच्या बिघाडामुळें झालेला रोग; उ० वातातिसार, वातज्वर, इ०. ॐ **वातायन न०** खिडकी; गवाक्ष. **वातावरण न०** पृथ्वीभोंवती जें हवेचें आवरण आहे तें. **वाताहत स्त्री०** सैन्यांतील शिपायी, कुटुंबांतील माणसे, इ० ची दाणादाण किं० पांगापांग. **वातशूळ पु०** पोटदुखी. **वातकंटक पु०** पाय इ० गात्र वळणें ही विकृति. **वातगुल्म पु०** १ वादळ. २ एक गुल्मरोग. **वातचक्र न०** १ वावटळ. २ आकाश. ३ वातावरण. **वातदोरा पु०** गरोदर गायी, म्हशी, इ० च्या गर्भाशयांतून बाहेर पडते ती वार. **वातबद्ध वि०** वारंवार पोट फुगणें, शौचास साफ न होणें, पोट सुटणें, इ० रूप विकृति ज्यास आहे असें (माणूस) किं० असें (शरीर) किं० अशी (प्रकृति). **वातरक्त न०** १ संधिवात. २ रक्तपिती; महाव्याधि.

वांत [**सं०**] **वि०** जें ओकून पडतें तें. [**सं०** ' वान्ति ' चा अपभ्रंश] **स्त्री०** १ ओकारी, २ जें ओकून पडलें तें. ॐ **वान्ताद पु०** १ कुत्रा,—जो आपली ओक आपणच खातो. २ पूर्वी बोललेलें जो नंतर नाकबूल जातो, किं० एकदा केलेलें विधान मी केलें नाहीं असें म्हणतो, तो नीच माणूस.

वातट, वातड, वाताड, वाताट, वात्रट, वात्रड वि० १ चिवट; लोचट (खाद्य). २ लोचट (माणूस).

वातटणें, वातडणें [**म०** वातट, वातड] **अ० क्रि०** (भाकरी, पोळी, जिलबी, इ० खाद्य) चिवट किं० लोचट होणें म्ह० तिचा तुकडा लवकर न पडण्याजोगी होणें.

वाता, वाथा पु० दार, खिडकी, इ० च्या फळ्यांनीं कुसवें प्रत्येक.

वांति [**सं०**] **स्त्री०** १ ओकारी. २ जें ओकून पडलें तें.

वातुल, वातूल [**सं०**] **वि०** १ वातरोगानें पीडित. २ शरीरांत वात उत्पन्न करणारा (खाद्य पदार्थ).

वातेर, वातेरें [**म०** वाता] **न०** दार, खिडकी, इ० च्या माथ्यावरच्या छावणीच्या ज्या फळींतील भोकांत झडपांचीं कुसवें फिरतात ती फळी. 'वातेरपट्टी,'' वातेरफळी,'' 'वात्रटफळी'' **स्त्री०** ह्याच अर्थी.

वातेरें, वात्थेरें [**म०** वात] **न०** १ समयी इ० मध्यें जळावयासाठीं जी चिंधीची गुंडाळी किं० वळकटी करतात ती किं० तशा उपयोगाची चिंधी. २ जीर्ण झालेलें चिरगुट,—ज्याच्या चिंध्या लोंबत आहेत. ३ दार, खिडकी, इ० च्या झडपेचें कुसं.; वात्या.

वात्थेरें वर ' वातेरें ' पहा.

वात्या [**सं०**] **स्त्री०** वावटळ; सोसाट्याचा [वारा.

वात्रट, वात्रड मागें ' वातट ' पहा.

वात्रटफळी स्त्री० मागें 'वातेर,' 'वातेरें' पहा.

वात्सल्य [**सं०**] **न०** प्रेम; प्रीति.

वात्सी [**सं०**] **स्त्री०** ब्राह्मण आणि शूद्र स्त्री यांची कन्या.

वात्सी, वाथसी मागें ' वास्ति ' पहा.

वाथंग, वाथंग्या पुढें ' वाधंग, ' ' वाधंग्या ' पहा.

वाथा वर ' वाता, ' ' वाथा ' पहा.

वाथ्या स्त्री० अ० व०, पु० रिकामी किं० निरर्थक वाटाघाट (कुटणें, वडीवणें); उ० लोकांचा वरवंटा वेऊन आपला वाथ्या कुटावा ह्यांत काय फळ ?

वाथ्या मागें ' वस्ति ' पहा.

वाद [**सं०**] **पु०** १ बोलणें. २ भाषण. ३ कांहीं गोष्टीचें विधान; वाक्य. ४ वृत्तान्त. ५ वाटाघाट; स्वमताचें मंडन आणि प्रतिपक्ष्याच्या मताचें खंडन, इ० रूप जें दोन किं० अधिक माणसांत भाषण चालतें तें; वादविवाद; चर्चा. ६ तत्त्वज्ञानार्थ केलेली चर्चा. ७ स्पष्टीकरण. ८ मत; सिद्धान्त; उ० नास्तिकवाद, परमाणुवाद, अद्वैतवाद, इ०. ९ भाईबंद इ० मध्यें निकालांत न निघालेली बाबत. १० वदंता; बातमी; अफवा. ॐ **वादग्रस्त वि०** जिच्या संबंधानें कांहीं निकाल किं० निर्णय झाला नाहीं अशी कांहीं गोष्ट किं० बाबत. **वादप्रतिवाद पु० ए० व०** एकानें पूर्वपक्ष करावा, दुसऱ्यानें समाधान करावें, ह्या रूपाचा दोन माणसांत चाललेला वाद. **वादेली वि०**

१ भांडखोर. २ फिर्यादींतील एक पक्ष.

वाद, वादी [**सं०** वाध्री] **स्त्री०** १ वहाण इ० ला शिवलेली कातड्याची पट्टी किं० चिंधी. २ कातड्याची पट्टी किं० चिंधी (सामान्यतः).

वाद [**म०** वात] **पु०** गात्रविशेषाला आलेली बधिरता.

वादक [**सं०**] **पु०** १ वक्ता. २ वाद्य वाजविणारा; बजवय्या.

वादघाई पुढें ' वाद्य ' मध्यें पहा.

वादट (–ड) [**सं०** वात] **वि०** सर्द हवेनें बिघडलेला.

वादडणें, वादाडणें [**म०**वादी] **स० क्रि०** १ कातड्याच्या वादीनें मारणें किं० बांधणें. २ (कांहीं काम) झोकांत किं० ऐटींत करून टाकणें.

वादडा पु० थप्पड; थापटी; चपराक.

वादणा, वाधणा पु० मागें ' अवधणा ' पहा.

वादन [**सं०**] **न०** सतार, तबला, इ०वाद्य वाजविणें. **पु०** वाद्य वाजविणारा.

वांदर इ० पुढें ' वानर ' इ० पहा.

वादळ [**सं०** वातल] **न०** वाऱ्याचा खूप जोराचा आणि विध्वंसकारक आणि पुष्कळ वेळ चाललेला सोसाटा.

वादळणें, वादाळणें [**म०** वादळ] **अ० क्रि०** १ मोठमोठ्यानें आणि रागारागानें ओरडणें किं० बडबडणें. २(प्राणी, वृक्ष, इ० नीं)थंडी, वारा, इ० मुळें बाधा पावणें.

वादा पु०, वादें न० लाळ गळणें,खूर ठणकणें, इ०रूप जो गायी,म्हशी,इ०ना होतो तो एक रोग.

वादा पु० १ चाबकाची दोरी.२ कातड्याचा लांब आणि रुंद पट्टा.

वादांग, वादांग्या पुढें ' वाधंग, ' 'वाधंग्या' [पहा.

वादाडणें मागें ' वादडणें ' पहा.

वादाळणें मागें ' वादळणें ' पहा.

वादित [**सं०** वादय्=वाजविणें] **वि०** वाजविलेलें (सतार, वीणा, मृदंग, इ० वाद्य).

वादित्र [**सं०**] **न०** १ सतार, मृदंग, इ० वाद्य. २ वाद्य वाजविण्याची कला.

वादी [**सं०**वादिन्]**पु०** १वाद, तंटा,फिर्याद,इ० तील एका पक्षाचा माणूस किं०एक पक्ष.२फिर्याद करणारा.ज्याच्यावर फिर्याद केली आहे तो'प्रतिवादी.' ३ शत्रु; वैरी.**वि०**१भांडखोर स्वभावाचा. २ उत्तम प्रकारें वाद करणारा; कुशलपणें प्रतिपक्ष्याशीं बोलणारा. ३ विशिष्ट मत किं० सिद्धान्त प्रतिपादणारा किं०त्याचा अभिमान बाळगणारा; उ० अद्वैतवादी, कर्मवादी, दैववादी, इ०. **पु०** १ वक्ता. २ वाद करणारा. ३ एकादें विशिष्ट मत स्थापणारा. ४ फिर्यादी. ५ (**संगीत**) १ सूर. २ सूर खालीं वर करण्यासाठीं चर्मवाद्यांत ओविलेली दोरी.

वादी [**सं०** वाध्री] **स्त्री०** १ चामड्याची लांबलचक चिंधी किं० पट्टी. २ वहाणा, तबला, इ० ना लाविलेल्या असतात त्या कातड्याच्या पट्ट्या प्रत्येक.

वादें न० गायी, म्हशी, इ०ना होतो तो एक रोग. मागें ' वादा ' पहा.

वादेली वि० ' वाद ' मध्यें ' वादेली 'पहा.

वाद्य [**सं०**] **न०** मृदंग, वीणा, सनई, इ० मधुर स्वर काढण्याचें साधनविशेष. चर्मवाद्य, तंतुवाद्य, मुखवाद्य, मंगलवाद्य, रणवाद्य, इ० अनेक प्रकारचीं आणि भिन्न भिन्न प्रसंगीं वाजवावयाचीं वाद्यें असतात.ꕥ **वाद्यघाई, वादघाई स्त्री०** कोणतेंही वाद्य वाजवितांना केलेली घाई किं० दाखविलेला आवेश.

वाद्या [**म०** वाद]**पु०** १ फिर्यादी. २तक्रारी ३ भांडखोर. ४ वैरी; शत्रु.

वाधंग, वाधांग पु०, न० असंतुष्टपणाची चरफड; पिरपिर (लावणें, मांडणें).ꕥ **वाधंग्या, वाधांग्या वि०** असंतुष्टपणें सदा चरफडण्याच्या स्वभावाचा.

वाधणा पु० मागें ' अवधाणा ' पहा.

वांधा पु०, वांधें न० हिशेब, जमाखर्च, देणें घेणें, इ०मध्ये निकालांत न निघालेली बाबत.

वाधांग, वाधांग्या वर ' वाधंग, ''वाधंग्या' पहा.

वाधी स्त्री० कातड्याची लांब पट्टी किं० [चिंधी; वादी

वान् [**सं०**'वत्'**पु०प्र०ए०व०**]**पु०** अमुक गुण धर्म, किं० पदार्थ, ज्याचे जवळ.ज्याचे अंगीं, किं० ज्याचे ठायीं आहे तो; उ० धनवान्, भाग्यवान्.

दैववान्. टीप,–१ मराठींत हा प्रत्यय स्त्री०,न० सुद्धां योजला जातो. टीप,–२ 'वान्' याचेबद्दल 'वंत 'सुद्धां मराठींत सर्व लिंगीं योजतात.

वान [म० वाण; सं० वर्ण] पु० रंग.

वान न० १ औषध तयार करतांना त्यांत घालतात जीं द्रव्यें तीं प्रत्येक. २ भक्तानें देवाला अर्पण केलेला कांहीं पदार्थ.

वानगी [हिं० वान्‌गी] स्त्री० १ पदार्थाचा नमुना; उ० ह्या गुळाची वानगी मला दे. २ ऐकणें, पाहणें, हुंगणें, जिभेनें चव पाहणें, इ० क्रियांनीं कोणत्याही पदार्थाची योग्यता, किंमत, इ० ठरविण्यासाठीं त्या पदार्थाचा घतलेला किं० सेविलेला लहान अंश. ३ जकाती वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यास जकाती देऊन शिवाय ज्या मालावर जकात भरली आहे त्या मालाचा नमुना म्हणून अल्प अंश फुकट देतात तो. ४ लोकाचें शेत, मळा, इ० खंडानें करणारा मनुष्य ठरावाच्या पैशाव्यतिरिक्त जो उत्पन्न केलेल्या भाज्या, केळीं, इ०चा अल्प अंश मालकाला फुकट देतो तो.

वानणें स० क्रि० स्तविणें; प्रशंसिणें.

वानप्रस्थ [सं०] पु० १ स्मृतींत सांगितल्या प्रमाणें अरण्यवास करणारा. २ ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, आणि संन्यास, हे जे चार आश्रम त्यांतील तिसरा. ३ तपस्वी.

वानर [सं०] पु० झाडावर राहाणारा आणि लांब शेपटीचा आणि लांब लांब उड्या मारणारा काळ्या तोंडाचा एक वन्य पशु. ꣸ **वानर किंवण** स्त्री० वानरांचीं एका सजातीयाबद्दल कींव किं० अनुकंपा. टीप,–कोणा वानराला जखम झाली असता त्याचे मित्र, आप्त, सोयरेधायरे, इ० त्याच्या समाचारास येतात आणि जखम किती खोल आहे हें आंत बोट खुपसून पाहातात; असा अनेक माकडांनीं प्रेमानें समाचार घेतला असतां त्या जखमेच्या जागीं आरपार भोक पडतें आणि तें जखमी माकड मरतें. ह्या वरून 'वानर किंवण' चा अर्थ मूर्खपणाची अनुकंपा असा झाला. मागें 'माकड' मध्यें 'माकडाची जखम' पहा. 'वानरखट,' 'माकडाची जखम' हेही ह्याच अर्थाचे शब्द आहेत. **वानरखाद** स्त्री० बाग, मळा, इ० मध्ये फळें इ० खाऊन वानरांनीं केलेली नासाडी. **वानरचेष्टा** स्त्री०, **वानरथेर** न० पोरकट चाळे; पोरांच्या खोड्या. मागें 'माकड' मध्यें 'माकडचेष्टा' पहा. **वानरतेल** न० ज्या समर्थाचा किं० अधिकाऱ्याची आश्रय कोणा दुष्ट माणसाला मिळाला आहे त्याणें त्या आश्रयाच्या जोरावर दीन आणि अनाथ माणसांना छळिलें आणि पुढें दैववशात् तो आश्रय सुटून त्या दुष्ट माणसाला जी विपत्ति प्राप्त होते ती. कोणेकाचें वानरतेल काढणें म्ह० त्याचें पारिपत्य करणें; कोणेकाचें वानरतेल निघणें म्ह० त्याचें पारिपत्य होणें. **वानरदुःख** न० वर 'वानरखट' पहा. **वानरदृष्टि** स्त्री० बारकाईची नजर. **वानरभोजन** न० खाद्य पदार्थ बकांबकां तोंडांत कोंबून नंतर स्वस्थपणानें तो नीट चावून खाणें. **वानरलकडी** स्त्री० जाळ न होतां धुमसत राहाणारें सर्पण. टीप,–थंडींत शेकावयासाठीं सर्पण गोळा करून पेटवावें म्हणून वानर काटक्या सकाळीं गोळा करतात पण ऊन्ह पडलें म्हणजे थंडी नाहींशी होते आणि शेकण्याची गरज राहिली नाहीं म्हणजे त्या काटक्या ते वानर फेकून देतात. **वानरविचका** पु० कांहीं बेत, संकल्प, कारभार, इ० मध्यें अनेक लोकांनीं लुडबूड केल्यामुळें होतो तो कार्यनाश किं० बिघाड. 'वानर किंवण' च्या स्पष्टीकरणावरून ह्याची उत्पत्ति कळण्याजोगी आहे. **वानर विचकुल्या, वानर वेचकुल्या** स्त्री० अ० व० कोणेकापुढें वाकडीं तिकडीं तोंडें करणें (त्याला खिजविण्यासाठीं). **वानरशेक** पु०, **वानर शेकणी** स्त्री०, **वानर शेकणीचीं लाकडें** न० अ० व० ह्या वाक्प्रचारांचा अर्थ 'वानर लकडी' वरून विद्यार्थ्याला जाणतां येईल. **वानरक्षत** न० वर 'वानरखट' पहा. **वानरी** स्त्री० वानराच्या जातीची स्त्री. **वानऱ्या** वि० १ वानरासारखीं तोंडें करणारा पोरकट (माणूस). २ वानरासारखें तोंड ज्याचें आहे असा (माणूस).

वानवळा, वानोळा [म० वाना] पु० १ व्यापारी माल. २ शेतकरी, मळेवाले, इ० कांकडून त्यांच्या जमीनींत जिन्नस उत्पन्न झाल्यावरोबर त्या जिनसेचा नमुना म्हणून जो अंश (किं०

त्याची किंमत) देशमुख, पाटील, इ० गांवकामगार, सरकार, इ० घेतात तो. ३ पदार्थाचा नमुना. ४ विशिष्ट ऋतूंत जें वाटाण्याच्या शेंगा, हरभऱ्याचे सोले, अंजीर, इ० पदार्थ बाजारांत प्रथम विकावयास आलेले असतात ते. ५ कोणेकाला नजर केलेली कांहीं अपूर्व जिन्नस.

वानवा [सं० वा+न+वा] पु०, स्त्री० १ होय किं० नाहीं. असें किं० तसें, हें किं० ते, ह्या संबंधाची अनिश्चितता; शंका; संदिग्धपणाची स्थिति; अनिश्चितता; उ० रामच्या पटवर्धनाकडून माझे पैसे वसूल होण्याची वानवा आहे. २ संदिग्धपणाच्या स्थितीच्या वाटाघाटीनें ठरलेला निकाल किं० निर्णय; उ० तो येतो कीं नाहीं ह्याची वानवा करून या.

वानवा [म० वानणें=प्रशंसिणें] पु० स्तुति; तारीफ; प्रशंसा.

वाना पु० १ औषधाच्या घटनेंतील एक एक द्रव्य. २ व्यापारी माल. [पहा.

वानेर, वान्नेर, वान्नर, वान्येरूं मागें 'वानर'

वानोळा पु० वर ' वानवळा ' पहा.

वाप [सं०] पु० १ धान्यादि पेरणें. २ वस्त्र विणणें. ३ मुंडन; हजामत. ४ धान्य पेरल्यावर रुजलेली लहान कोंवळीं झाडें समुच्चयानें. ❀

वापदंड पु० कोष्ट्याचा धोटा.

वापर [सं० व्यापार] पु० पुस्तक, वस्त्र, भांडें, इ० चा उपयोग करण्याची क्रिया; वहिवाट; पदार्थाचा उपभोग (करणें, पडणें); उ० ह्या तपेलीवर फार वापर पडल्यामुळें ती लवकर फुटली.

वापरणें [सं० वि+आ+पृ] स० क्रि० (वस्तु) उपयोगांत किं०वहिवाटींत आणणें किं० कांहीं कामीं योजणें.अ० क्रि० १ वहिवाटींत किं० उपयोगांत (शस्त्र, वस्त्र, इ०) आलेलें असणें. २ समाजांत किं० कांहीं कामांत (मनुष्य,पशु, इ०) परिचित किं० अनुभविक किं० वहिवाटलेला झालेला असणें.

वापरणें [सं० वाप=पेरणें] अ० क्रि० १ पावसाळ्यांत कांहीं काळ उघाडी पडली असतां पेरे करावयाला योग्य अशी (जमीन) होणें. २ (गायी, म्हशी,इ० च्या वासरांनीं) दांवें सोडल्यावर तीं मोकळीं झालीं असतां त्यांनीं हुरळणें किं० बागडणें. ४ रागानें धुमसणें किं० मनांतल्या मनांत चरफडणें.

वापस [फा०] वि० परत (देणें. करणें); उ० तूं माझा चाकू कधीं वापस करणार ? ❀ **वापस करणें** १ कर्ज, पैसा, इ० परत करणें किं० फेडणें. २ वजा करणें.

वापसा [स० वाप=पेरणें] पु० कांहीं काळ पाऊस पडून नंतर पाऊस उघडला असतां धान्य पेरावयाला योग्य अशी जमीनीची स्थिति(होणें).

वापा, वापी पुढें ' वाफा ' पहा.

वापी [सं०] स्त्री० १ विहीर. २ तळें.

वाफ [सं० बाष्प] स्त्री० पाणी इ० द्रव पदार्थाचें अग्निसंयोगानें किं० हवेंतील उष्णतेनें जें वायुरूप होतें तें.

वाफ [म० वाप; सं० वाप=पेरणें] स्त्री० मागें ' वापसा ' पहा.

वाफ न० नांगर इ० चालविण्यासाठीं आपला बैल कोणा शेतकऱ्यास कांहीं काळापुरतां वापरावयास दिला असतां धान्य किं० द्रव्य इ० रूप जो मोबदला घेतात तो.

वाफणें [म० वाफ] स० क्रि० १ धान्य मुठींमुठानीं घेऊन (शेतांत) चहूंकडे उडवून पेरणें. २ पेरण्यासाठीं (धान्य) मुठींमुठींनीं उडवून शेतांत फेकणें.

वाफणें [म० वाफ] अ० क्रि० (कांहीं खाद्य पदार्थ किं० औषध) अंगच्या किं० बाहेरच्या पाण्याच्या वाफेनें पक्व होणें किं० शिजणें किं० उपयोगाला लायक होणें.

वाफणें [सं० वाप; म० वाफ] अ० क्रि० (पेरलेलें बी) रुजणें.

वाफरें न० थंडी, भूतबाधा, इ० मुळें अंगाला सुटतो तो कंप (भरणें, येणें).

वाफलणें [म० वाफ] अ० क्रि० १ (पदार्थाला) वाफ सुटणें. २ (पदार्थ) वाफेनें पक्व होणें.

वाफलणें [म०वाफ] स० क्रि० १ (पदार्थ) वाफेवर पक्व करणें. २ (पदार्थाला) वाफेवर धरणें.

वाफवा [म० अफवा] स्त्री० गांवांत पसर

लेली कांहीं खबर किं० बातमी.

वाफसा मागें 'वापसा' पहा. ॐ **वाफसांडा वि०** ज्यांतून वाफ निघणें बंद झालें आहे असा (खाद्य, औषध, इ० पदार्थ).

वाफा [**सं०**वाफ] **पु०**१बाग, मळा,इ० तील वांगीं, मिरच्या, तुळशी, इ० च्या वाढीसाठीं करतात ते लहान लहान चौक.ह्याच अर्थी'वापा' **पु०**आणि 'वापी'**स्त्री०**हेही शब्द आहेत.२काहिलींतून कढत उसाचा रस ढेपा करण्यासाठीं ज्या खळग्यांत ओतितात ते खळगे प्रत्येक.

वाफारा [**म०** वाफ] **पु०** दुखणारें गात्रविशेष इ० चा ठणका इ० बरा करण्यासाठी त्याचेवर औषधी द्रव्यें पाण्यांत घालून त्या पाण्याची किं० साध्या पाण्याची वाफ सोडतात ती (देणें,घेणें). २ पोट, गलांड, इ० चा फुगीरपणा किं० दब्बपणा (धरणें).

वांब स्त्री० नदीच्या कांठीं उगवणारी कडू अशी एक वनस्पति.

वांब पु०, स्त्री० गात्रविशेषाचा ठणका किं० बधिरपणा.

वांब [**हिं०** वाम्] **पु०** एक जलचर प्राणी.

वांब वि० अनेक वेळां व्यालेली (गाय, म्हैस, इ०). याच्या व्यावर्तकत्वें 'पहिलार'' पहिलारू.'

वांबणें मागें 'ओंबणें' पहा.

वांबळ,वांभळ,वामळ,व भांळ स्त्री०आकाशांत ढग येणें,स्वच्छ ऊन्ह न पडणें, हिवस वारा वाहाणें,इ०रूप जी एकाद्या दिवशीं हवा पडते ती किं०तशी दिवसाची स्थिति (पडणें, असणें,इ०).

वाभळ स्त्री० लवकर माजूनलवकर वाढल्याकारणानें दाण्यांशिवाय कणसें ज्या भाताला आलीं आहेत असें भात.

वाभळणें अ० क्रि० १ लवकर वाढून माजल्यामुळें (भातानें) शुष्क कणसें उत्पन्न करणें. २ (शेतांत) असें शुष्क कणसांचें भात उत्पन्न होणें.

वाभा, वाभारा, वाभाडा पु० १ वस्त्र फाटलें असतां त्याची निघते ती चिंधी किं० निघतो तो मोठा पट्टा.२वस्त्र,कागद,कातडें,फळ,इ०फाटून किं० फुटून लोंबत असलेला त्याचा भाग. ३ फाटणें, फुटणें, उंदरांनीं किं० कसरीनें खाणें, जळणें, सडणें, इ० कारणांनीं पडतें तें भोक, फट, चीर, किं० खळगा.

वांभेरें न० माणसाच्या हाताच्या बोटांसारखे खिळे ज्याला आहेत असें सापाला जमीनीशीं अडकावून ठेवण्याचें साधन.

वाम [**सं०**] **वि०** १ डावा (हात, पाय, बाजू, इ०). २ डाव्या बाजूचा. ३ उलटा. ४ प्रतिकूल. ५ द्वाड, वक्र, कुटिल, लबाडीचा (शील, स्वभाव, मार्ग, इ०).६ अति सुंदर,किं० मनोहर; उ० वामलोचना म्ह० सुंदर आहेत डोळे जिचे अशी स्त्री. ॐ **वामाचार पु०** १ वेदांच्या विरुद्ध वर्तन किं० आचरण. २ तंत्रांत सांगितलेलें डाव्या हातानें देवांची पूजा आणि मद्यमांसादींचें सेवन. **वामावर्त पु०** डावीकडे वळलेला शंख. **वामदेव पु०** महादेव; शंकर. **वामकुक्ष स्त्री०** दुपारच्या भोजनानंतर अल्पकाळ घेतलेली झोप,—जी डाव्या कुशीवर पडून घेतली असतां अन्नपचन चांगलें होतें असें वैद्यशास्त्राचें मत आहे (करणें). **वामकुक्षि होणें** डाव्या कुशिवर पडून झोप घेणें. **वामांग न०** डावी बाजू. **वामांगी स्त्री०** पत्नी; भार्या.

वामन [**सं०**]**वि०** १ ठेंगणा. २ लहान. ३ वाकलेला; नम्र. **पु०** १ श्रीविष्णूच्या दहा अवतारांपैकीं पांचवा. मागें 'अवतार' मध्यें ह्या अवतारांचीं नांवें पहा.२ दक्षिण दिशेचा दिग्गज. ३ वामनद्वादशीच्या दिवशीं जेवावयास बोलाविलेला बटु किं० मुंज झालेला ब्रह्मचारी. ॐ**वामनजयंती, वामनद्वादशी स्त्री०** भाद्रपद शुद्ध द्वादशी हा तिथि. **वामनमूर्ति स्त्री०** अतिशय ठेंगणा माणूस.

वामाळ वर 'वांभळ' पहा.

वामी [**सं०** वाम] **पु०** 'वामाचार' अर्थ२ पाळणारा.

वायआभाळ [**सं०** वायु+**म०** आभाळ] ज्यांतून वृष्टि होत नाहीं आणि जें पोकळ ढगांनीं व्याप्त आहे असें आकाश.

वायकरणी [**म०** वाया (निष्फळ) + करणी] **वि०** पोकळ; निःसत्त्व; निष्फळ;खोटा; दिखाऊ (भाषण, आदर).

वायकळ, वायफळ [म० वाया+फळ] वि० १ पोकळ, खोटा (भाषण,आदर, प्रेम). २ निरुपयोगी; निरर्थक.

वायकळणें [म० वायकळ] अ०क्रि० भलत्याच रीतीनें किं० सभ्य चालीरींती सोडून किं० उत्संखळपणें वागूं लागणें.

वायकळा [म० वायु+कळा] स्त्री० अ० व० सांधे दुखणें हा व्याधि.

वायंगणा पु०, वायंगणें न० [म० वायंगें= वांगें] उन्हाळ्यांत पिकावेलेलें भात.

वायगमन [सं० वायु+गमन] न० पोटांत धरतो तो वायु.

वायंगें इ० मागें ' वांगें ' इ० पहा.

वायगोळा [म० वायु+गोळा] पु० पोटाच्या रिकामेपणामुळें किं० अन्य कारणांमुळें पोटांत जो गोळा उठतो तो.

वायंबोय न० कळपांतील मेलेला बैल, गाय, रेडा, म्हैस, इ० गुरूं.

वायंचणें पुढें ' वैंचणें ' पहा.

वायचळ [म० वायु+चळ] पु० शरीरांत वायूचा क्षोभ झाल्यामुळें मनुष्य वेड्यासारखी बडबड करतो ती.

वायटळ, वायटूळ, वायटोळ, वावटळ [सं० वायु] स्त्री० जोराचा किं० सोसाट्याचा वारा.

वायंडा, वावंडा [म० वाया] वि० फळ किं० अर्थ न मिळतां किं० उद्दिष्ट सफळ न होतां गेलेला (काळ) किं० केलेली (खटपट); रिकामा; फुकट; निष्फळ; व्यर्थ झालेला.

वायण दगडाचें उखळ. मागें ' वाईन, ' ' वाईण ' पहा.

वायदा [अ०वअदाह्] पु०अमुक वेळीं अमुक करावयाचें किं० द्यावयाचें असा ठराव; वचन; मुदतीचा ठराव. ꕥ **वायदेबंदी स्त्री०** मुदतशीर कर्जाची फेड किं० पैसा देणें ह्या बाबतीचा ठराव. **वायदेचिट्टी स्त्री०,वायदेरोखा पु०** १ कर्जाच्या फेडीसंबंधाचा किं० कांहीं रकम कोणेकाळी देण्यासंबंधाचा पुनः किं० दुसऱ्यांदा कागदावर लिहिलेला ठराव. २ जो इलाज किं० औषध रोग विकोपास जाऊं देत नाहीं,पण कांहीं काळ रोगाचा जोर आवरून धरतो तो इलाज,किं०जें औषध तें.

वायदेशा वि० एके ठिकाणीं कायमचें वास्तव्य न करतां सदा स्थलांतर करीत फिरणारा (माणूस).

वायधळ[म० वाया]वि० रिकामा, पोकळ, निरर्थक (भाषण,व्यवहार, खटपट,इ०).

वायधूळ [म० वायु+धूळ] स्त्री० जोराचा वारा,–जो वाहात असतां धूळ उडते.

वायन [सं०] न० १ कांहीं व्रतानिमित्त ब्राम्हणास किं० सुवासिनीस देतात तीं फळें मिठाई, घारगे, इ० चीं देणगी. २ निरशनाचा खाद्य पदार्थ.

वायन न० दगडाचें उखळ.मागें 'वायण'पहा.

वायपोळ न० मरूं घातलेला पशु,–गाय, बैल, म्हैस, रेडकूं, इ०.

वायफट, वायफळ [म० वाया] वि० १ रिकामा; पोकळ; निरर्थक;पाणचट(वर्तन,भाषण). २ वात्रट, उत्संखळ, लहरी, टवाळ (पोर, माणूस). ꕥ **वायफळी वि०** फळें न देणारें (झाड).

वायफूल [म० वाया+फूल] न० ज्या फुलांतून फळ निघत नाहीं असें फूल; नरफूल.

वायबार [म० वाया+बार] पु० आंत गोळा इ० घालतां बंदुक, तोफ, इ० तून दारु पेटवून काढतात तो रिकामा वार किं० आवाज.

वायला वि० वेगळा (अशिक्षितांत रूढि).

वायवी खालीं ' वायव्य ' पहा.

वायव्य [सं०] वि० वायूसंबंधाचें. **वायव्या स्त्री०** वायव्य दिशा,–म्हणजे उत्तर आणि पश्चिम ह्या दोन मुख्य दिशांच्या मधली दिशा.

वायस [सं०] पु० कावळा. ꕥ **वायसपिंड पु०** मृताच्या उत्तर क्रियेंत दशपिंडाच्या दिवशीं कावळ्यांना खावयासाठीं जो भाताचा गोळा टाकतात तो.

वायसा वि० किंचित्; थोडा; जरासा (अशिक्षितांत रूढ).

वायां क्रि० वि० व्यर्थ; फुकट; उ० त्याचा खर्च वायां गेला.

वाया पु० सोनें किं० चांदी ह्या धातूचा पन्हळाच्या आकाराचा ठोकलेला पत्रा. ꕥ **वायाची आवटी स्त्री०** सोनें,चांदी,इ०चा पत्र

ठोकून वाट्या करावयाचें सोनाराचें एक साधन.

वायु [सं०] पु० १ वारा. २ वाऱ्याची देवता. ३ शरीरांतील प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, हे जे पांच प्राण ते प्रत्येक. ४ शरीरांत वाताचा बिघाड झाल्यानें होतो तो रोग. ५ अपानद्वारानें शरीरातून बाहेर पडतो तो वारा (सरणें). ☸ **वायुबद्ध वि०** स्थूल किं० लठ्ठ (शरीर वि० मनुष्य). **वायुबद्धक वि०** पोटांत वायु उत्पन्न करणारा (खाद्य पदार्थ,-पावटा इ०). **वायूची मोट बांधणें** जगांतील सर्व वारा गोळा करून त्याचा एक गठ्ठा बांधणें हा (मूर्खपणा होय किं० अशक्य गोष्ट होय).

वार [सं०] पु० १ दिवस. २ आठवड्याचे जे सात दिवस ते प्रत्येक; उ० सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, आणि आदित्यवार. ३ पाळी; खेप; वेळ; उ० एकवार, द्विवार, त्रिवार इ०. ४ संधि; अवसर; सोयीचा समय. ५ समुदाय; ढीग; जमाव. ६ द्वार; दार. ७ आच्छादन. ८ आठवड्याचा ठराविक दिवस,-जो गरीब मुलाला जेवावयास घालण्यासाठीं ठरविलेला असतो तो. ९ आठवड्याच्या एका वारापासून पुन्हा तो वार एकदा, दोनदां, तीनदा येईतोंपर्यंतचा कालावधि; उ० मी तीन वारांनीं परत येईन(म्ह० एकवीस दिवसांनीं). १० उशीर; दिवसगत; उ० वार लावूं नको. ☸ **वारांगना, वारयुवति, वारनारी, वारयोषिता स्त्री०** वेश्या; रांड. **वारवाण, वारबाण पु०, न०** १ चिलखत; कवच. २ अंगरखा. **वारविलासिनी स्त्री०** वेश्या. **वारानें जेवणें** आठवड्याच्या त्या त्या दिवशीं त्या त्या कुटुंबांत जेवावयास जाणें. **कोणा गरीब विद्यार्थ्याला वार देणें** त्याला आठवड्याच्या एका ठराविक दिवशीं जेवूं घालणें. **मला तीन वार कमी आहेत** आठवड्याच्या तीन वारीं माझी जेवणाची सोय झालेली नाहीं. **वारकरी पु०** आठवड्याच्या ठराविक दिवशीं लोकांच्या घरीं जेवावयास जाणारा गरीब विद्यार्थी. **माझ्या वारचा** लिंगवचनांप्रमाणें फिरणारें **क्रि० वि०** माझ्याबद्दल; माझ्या ऐवजीं.

वार [हिं०] पु० १ शस्त्र, धोंडा, इ० नीं झालेली जखम किं० इ० चा तडाखा. २ कांहीं कामाचा कोणेकावर आलेला टपका. ३ कांहीं कामाची कोणेकावर पडलेली जबाबदारी किं० आलेली जोखीम.

वार [हिं०] स्त्री० १ रिकामपण; फुरसत. २ रिकामा जागा.

वार [म० उरणें] स्त्री० तांदूळ सडल्यावर कोंड्यापेक्षां अधिक भरलेला तांदूळ.

वार स्त्री० जरायु म्हणून जें गर्भवेष्टन तें.

वार पु० पुढें ' वारसा ' पहा.

वार [फा०] क्रि० वि० प्रमाणें; अनुसरून; उ० तपशीलवार, क्रमवार, नांवनिशीवार, इ०. **किफायतवार क्रि० वि०** किफायत म्ह० नफा होईल अशा रीतीनें. **उमेदवार** मागें ' उमेद ' मध्यें ' उमेदवार ' पहा.

वारकरी [म० वार=आठवड्याचा ठराविक दिवस]पु० दुसऱ्याच्या घरीं प्रत्येक आठवड्याच्या एका ठराविक दिवशीं जेवावयास जातो तो. मागें ' वार ' मध्यें ' वारकरी ' पहा.

वारकरी [म० वारी] पु० १ पंढरपूर इ० ठिकाणीं वर्षाच्या ठराविक दिवशीं देवदर्शनास जातो तो. २ (**लाक्षणिक**) अनेक वेळां एका परीक्षेस बसून नापास होणारा उमेदवार.

वारकोंड [म० वारा+कोंडणें] वि० जेथें वाऱ्याचा प्रवाह मोकळेपणानें चालत नाहीं अशा (खोली, घर, इ०).

वारंग पु० विळी, कोयती, सुरी, इ० चें जें टोक लाकडाच्या मुठींत खुपसलेलें असतें तें.

वारगी पारगी मागें ' पारगी वारगी ' पहा.

वारंगुळा, वारगोळा पु०, वारगुळें, वारगोळें न० एक बैल किं० रेडा दुसऱ्या शेतकऱ्याकडून आपल्या शेताच्या नांगरणी इ० कामासाठीं आणून आपलें काम करून घेणें आणि त्या दुसऱ्या शेतकऱ्याच्या कामाच्या वेळीं आपला बैल किं० रेडा त्याला देणें ही जी एकमेकांना मदत करण्याची सरणी ती. नांगर, माणसें, इ० उसनीं देणें किं० घेणें ह्या सरणीलाही वारंगुळा इ० शब्द योजतात.

वारण [सं०] पु० १ हत्ती. २ चिलखत. ३ हत्तीची सोंड. न० १ निरोध; दूर सारणें. २ प्रति-

षेध; परतविणें. ३ (हत्तीला नियंत्रणारें) अंकुश. ४ संरक्षण. ॐ **वारणसाव्हय न०** हस्तिनापूर.

वारणें [**सं०** वृ] **स० क्रि०** १ (कोणेकाला) कांहीं कृत्य करण्यापासून निवृत्त करणें किं० पराङ्मुख करणें; आडविणें; थांबविणें. २ (कांहीं प्रसंग, संकट, इ०) टाळणें. ३ (माशा) हात इ० हालवून जवळ न येतील असें करणें. ४ (कर्ज) फेडणें किं० ज्याचें त्यास देऊन टाकणें. ५ देव, बडा माणूस, इ० च्या डोक्यावर (चंवरी, पंखा, इ०) हालविणें. **अ० क्रि०** १ मरणें. **टीप,**–ह्या अर्थी ' वारणें ' ह्या क्रियापदाचा फक्त भूतकाळींच प्रयोग होतो. २ टळणें. ३दूर सरणें. ४ (कर्ज) फेडलें जाणें. ५ (माशा) हाकलून दिल्या जाणें.

वारणें स० क्रि० (कोणेकाला) बोलावणें किं० हाका मारणें.

वारती [**सं०** वरत्रा] **स्त्री०** झोपाळा, पाळणा, इ० टांगावयाची दोरी, गज, सांखळी, इ०. [प्राप्त.

वारद, वारीद [अ०] **वि०** प्रविष्ट;दाखल;

वारयुवती [**सं०**] **स्त्री०** वेश्या. वर 'वार' मध्यें पहा.

वारलें न० लग्न, मुंज, इ० प्रसंगीं घालतात जें वहुलें त्याच्या चारी कोपऱ्यांस ज्या उतरंडी असतात त्यांतील जीं मडकीं तीं प्रत्येक.

वारवण, वारवणें न० शेळ्या, मेंढ्या, इ० ची चराई किं० त्यांच्या चराईबद्दलचें देय.

वारवणें,वारविणें,वारावणें,वाराविणें,वारसंडणें[**म०** वारा] **स०क्रि०**(धान्य इ०तील) केरकचरा उडवून लावण्यासाठीं (तें) सूप इ० मध्यें घालून वाऱ्याच्या प्रवाहांत उंचावरून खालीं हळूं हळूं ओतणें.

वारवधू [**सं०**] **स्त्री०** वेश्या. मागें ' वार ' मध्यें पहा. [करतात.

वारवा पु० वेवडा,–ह्याच्या शेंगांची भाजी

वारंवार[**सं०**] **क्रि० वि०** पुनःपुनः.

वारविलासिनी [**सं०**] **स्त्री०** वेश्या. वर ' वार ' मध्यें पहा.

वारस पु०, स्त्री०; न० एक झाड. ह्यापासून इमारती लाकूड मिळतें.

वारसंडणें [**म०**वार] **स० क्रि०** वर ' वारवणें ' पहा. **अ० क्रि०** वाऱ्याच्या योगानें (लाकूड, फळी, इ०) भेगळणें किं० तिरपणें.

वारस, वारीस [अ० वारिस्] **वि०** १ वडिलोपार्जित संपत्तीचा जो हक्कदार किं० मालक तो. २ वाली, कैवारी.

वारसा, वार्सा [अ० वर्सा] **पु०** १ वंशपरंपरागत संपत्ति. २ अशा संपत्तीवरील हक्क; मालकी. ॐ **वारसदार,वारिसदार, वारिशदार पु०** वडिलोपार्जित संपत्तीचा हक्कदार. **वारसान पु० अ० व०** वडिलोपार्जित संपत्तीचे जे हक्कदार ते. **वारसेदार पु०** वडिलोपार्जित संपत्तीवर ज्यांचे हक्क आहेत ते लोक प्रत्येक.

वारस्त्री [**सं०**] **स्त्री०** वेश्या; गणिका.

वारली, वाळी [**म०**] **स्त्री०** उत्तर कोंकणांतील एक रानटी जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

वारा पु० चलन पावलेली हवा. ॐ **वाजता वारा लागूं न देणें** कोणत्याही प्रकारचा त्रास किं० उपद्रव किं० तोशीस सोसावयास सिद्ध किं० कबूल नसणें आणि त्याचा प्रतिकार करावयास तत्पर असणें. **एखाद्याचा वारा न घेणें** (किं० **न पडूं देणें**) त्याच्या संसर्गास न राहाणें; त्याच्यापासून दूर किं० अलिप्त राहाणें. **वारा पडणें** वारा खळणें किं० वहावयाचा बंद होणें. **वारा पिणें** उदासीन किं० खिन्न होणें. **वारा वाहील तशी पाठ देणें** परिस्थिति बदलेल तिच्याप्रमाणें किं० तिला अनुसरून आपल्या ठायीं बदल करणें.**वाऱ्याचा उपद्रव पु०** पटकी; महामारी. **वाऱ्याचा बुंद पु०** यत्किंचितसुद्धां वारा (एकाद्या ठिकाणीं नसणें). **वाऱ्याचें घोडें न० (लाक्षणिक)** गलबत; होडी. **वाऱ्याची मोट बांधणें** १ जगांतील सारा वारा गोळा करून त्याचा एक गठ्ठा बांधणें (हें दुर्घट किं० अशक्य होय). २अनेक मतांचे,अनेक पक्षांचे,अनेक ध्येयांचे लोक कांहीं कार्यार्थ एकत्र जमविणें आणि त्यांच्या साहाय्यानें तें कार्य पार पाडणें (हें अति कठिण काम होय);उ० हिंदी लोकांनीं जुळून इंग्लंडला एकमुखी मागणी करणें हें वाऱ्याची मोट बांधणें होय. **वाऱ्याशीं भांडणें**

मांडावयाला कांहीं विशेषसें किं० महत्त्वाचें कारण नसतां मांडत सुटणें. **एकाद्याच्या वाऱ्यास उभें न राहणें** त्याच्याशीं यत्किंचित् संबंध ठेवणें. **वाऱ्यावर सरणें** मनुष्यादिकानें उत्संखळपणें वागूं लागणें किं० बेतालपणें बोलूं लागणें. **वासरूं इ० नीं वारा घेणें** (किं० **पिणें**) दाव्यांतून मोकळें झाल्याबरोबर त्यांनीं आनंदानें उड्या मारीत किं० धावत सुटणें. **वाऱ्यावर टाकणें** पदार्थ, मूल, जनावर, इ० च्या संरक्षणाची किं० जोपासनेची काळजी कोणाच्या माथीं न मारतां किं० आपण न स्वीकारतां त्यांना मोकळें सोडणें; त्यांच्या संबंधानें बेफिकीर राहणें. **वाऱ्यावर वरात आणि दर्यावर हवाला** बेजबाबदार माणसाकडे कांहीं काम सोपविणें (हा मूर्खपणा होय). **धान्य इ० वाऱ्यास देणें** तें वारविणें. वर 'वारविणें' पहा. **वारा घालणें** तोंडानें फुंकर घालणें किं० पंखा हालवून पदार्थावर वाऱ्याचा प्रवाह चालविणें. **वारा घेणें** उत्संखळपणें वर्तणें. **वारा पिणें** उदासीन किं० निरुत्साह होऊन बसणें. **वारा सोडणें** किं० **वारा मोकळा करणें**(किं०**सोडणें**) अपानद्वारें वारा बाहेर टाकणें. **वारा पाठीवर घ्यावा** परिस्थिति अनुकूळ करून घ्यावी; परिस्थितीचा फायदा करून घ्यावा. **वारापाणी करणें** १ झिडकारणें; मनावर न घेणें; उ० मी तुला जें सांगितलें त्याचें वारापाणी करूं नको. २ निरवानिरव; विल्हेवाट करणें; व्यवस्थित रूपांत घालणें किं० ठेवणें. **कर्जाचें वारापाणी करणें** तें फेडून मोकळें होणें. **वारापाणी खाणें** जबाबदारी नाहीं अशा स्थितींत कांहीं काळ घालविणें; मोकळेपणानें किं०निश्चिंतपणांत कांहीं काळ राहणें.**वाऱ्यावशीं, वाऱ्यासोईं क्रि०वि०** उघड्यावर; वाऱ्यांत.

वारांगना [**सं०**] **स्त्री०** वेश्या.

वारांगुळें न० धान्य, चिरगुटें, इ०ची अव्यवस्था, उडवाउडव.

वाराणशी [**सं०**] **स्त्री०** श्रीक्षेत्र काशी. ॐ **वाराणशीकर पु०** लुच्चा; सोदा.

वारावणें मागें ' वारवणें ' पहा.

वारावार,**वारासार**[**म०**वारणें+वारणें]**स्त्री०** विल्हेवाट ;निरवानिरव;ज्याचें त्याला देणें तें देणें आणि घेणें तें घेणें; नवस इ० ची फेड.

वाराविणें मागें ' वारविणें ' पहा.

वारासार [**म०** वारणें+सारणें] **स्त्री०** वर ' वारावार ' पहा.

वाराह [**सं०**] **वि०** डुकरासंबंधाचें. **पु०** १ डुकर. २ काळा गेळा. **वाराही स्त्री०** १ गोराडू; डुकरकंद. २ पृथ्वी. ३ मातृकाविशेष. **वाराहकल्प पु०** कालविशेष,–विष्णूनें वराह अवतार घेतला तो कल्प. **वाराही कंद पु०** गोराडू.

वारित [**सं०**] **वि०** परतविलेला; टाळलेला; चुकविलेला; निवारलेला.

वारिशदार इ० मागें ' वारस ' मध्यें पहा.

वारी स्त्री० वाटा; हिस्सा; उ० आज बाजारांत पुष्कळ आंबे आले होते पण माझ्या वारीला कांहींच आले नाहींत.

वारी [**म०** वार] **स्त्री०** १ क्षेत्राच्या ठिकाणीं नियमित समयीं किं० दिवशीं जाण्याचा कोणेकानें पथकरलेला नियम; उ० पंढरीची वारी इ०. २ एकाच परीक्षेला अनेक वेळां जाऊन येणें (नापास होण्याच्या दृष्टीनें).३ खंडोबा, भवानी, इ० चे भक्त मागतात ती भिक्षा. ४ (कवितेंत) अवकाश, जागा.

वारीं [**म०** वार] **क्रि०वि०** ० च्या साधनानें किं० उपायानें; उ० चोर आले तर आमच्या घरच्या बायका त्यांना केरसुण्या वारीं पिटाळून लावतील; उ० पंख्यावारीं वारा घ्यावा. २ प्रमाणें; तुल्यतेच्या दृष्टीनें; उ० मला तो तृणावारीं मोजतो; उ० अशा कामांना पाण्यावारीं पैसा खर्चावा लागतो; उ० त्यानें माझें बोलणें थट्टेवारीं नेलें; उ० पाटीभर आंबे प्रसादावारीं गेले. १ बदलीं; जागीं; मोबदल्यानें; उ० मी केवळ पोटावारीं हें काम करतों (म्ह० फक्त जेवण हा मोबदला घेऊन).

वारीक [**म०** वार] **पु०** न्हावी; हजाम.

वारीद, वारीत [**अ०** वारीद] **वि०** प्रविष्ट; दाखल; आलेला. २ फेडलेलें (कर्ज इ०).

वारीस [**अ०**] **पु०** वडलोपार्जित संपत्ति, शेत, इ०; किं० त्याच्या उपभोगाचा कोणेकाचा हक्क. ॐ **वारीसदार पु०** वडिलोपार्जित जें

कांहीं त्याचेवर ज्याचा हक्क आहे तो.

वारुणी[सं०] स्त्री० १ पश्चिम दिशा,- जिचा अधिपति वरुण आहे. २ मद्य.

वारू[सं०वारु] पु०१ युद्धांतील जरीपटक्याचा हत्ती. २ (मराठींत) लढाईच्या कामीं उपयुक्त घोडा. ३ (मराठींत) उत्तम घोडा.

वारूळ [म० वाळू+घर] न० १ भोम; मुंग्यांचें किं० किड्यांचें वसतीचें उंचवट्याच्या रूपाचें स्थान. २ एक व्रणरोग. ३ वाळा,- पाण्याला वास लागावा म्हणून त्यांत घालतात तें तृणविशेष.

वारें [म० वारा] न० १ वारा; चलन- चलनशील वारा; उ० आज फार हिंवस वारें सुटलें आहे. २ एखाद्या विशिष्ट ठिकाणाहून वाहात आल्याकारणानें तेथील गुणांनीं युक्त असा जो वायु तो किं० तेथील गुणांचा समुच्चय; उ० पटकीचें वारें,पडशाचें वारें;इ०.संपत्तीचें वारें किं० अधिकाराचें वारें म्हणजे संपत्ति किं० अधिकार प्राप्त झाल्यामुळें अंगीं येणारे दुर्गुण. ३ गुण- विशेषाची द्योतक अशी जी चेहऱ्याची ठेवण ती; उ० त्याच्या तोंडावर कारकुनीचें वारें दिसतें आहे. ४ एकादी गोष्ट करण्याकडे प्रसंगविशेषा- पुरता उत्पन्न झालेला जो कल तो; उ० ह्या पोराच्या अंगांत आतां वागडण्याचें वारें आलें आहेसें दिसतें. ५ सामर्थ्य; उत्साह; रंग; उ० तारुण्याचें वारें. ६ आविर्भाव; देखावा; उ० चोरांच्या पुढें शामूआण्णानें पहिलवानागिरीचें वारें अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. ७ स्थल, काल, परिस्थिति, इ० च्या योगानें सोय, नफा, लाभ, इ० होण्याची शक्यता; उ०पूर्वीं एका बिघ्यास पांच खंडी भात पिकत होतें तें वारें आतां उरलें नाहीं. ८ वर्त- नाची सरणी;उ०तें वारें आतां सोड. ॐ **एकाद्या गात्रावरून वारें जाणें** शरीरांतील कांहीं बिघाडामुळें तें विशिष्ट गात्र लुलें पडणें म्ह० लट्कें पडणें. **वारें फिरणें** अगदीं उलट प्रकारची वर्तणूक होणें; वस्तुस्थितींत बदल होणें किं० बिघाड होणें; उ० रामूला नोकरी लागल्या- पासून लक्ष्मीबाईचें वारें फिरलें (म्ह० तिची पूर्वीची साधेपणाची वर्तणूक पालटली).**वारें पाल- टणें** पूर्वीची स्थिति अगदीं बदलणें. **वारें लागणें** संसर्ग होणें; संगति लागणें; संबंध घडणें. **त्याला पुण्याचें वारें लागलें** पुण्याच्या लोकांच्या अंगचे दुर्गुण त्याला जडले. **आधींच तारें त्यांत शिरलें वारें** आधींच द्वाड आणि तशांत त्या द्वाडपणाला उत्तेजक परिस्थिति जमून आल्यामुळें तो त्याचा द्वाडपणा अधिक भयंकर किं० उपद्रव- कारक होणारच. **वारेघशीं** [म०वारा+घासणें] क्रि० वि० वाऱ्याच्या झोतांत; उघड्यावर. **वारेमाप** [म० वारा हेंच माप आहे ज्याला] न० १ वस्तुस्थितीपासून फारच दूर असा तर्क किं० अशी अटकळ; वस्तुस्थितीशीं फारच विसं- वादी कांहीं गोष्ट.२ भरमसाट भाषण. **वारेहळक** [म०वारा+हडकणें] वि०वाऱ्यांत ठेवून वाळ- विलेलें; वाऱ्यांत असल्यामुळें वाळलेलें.

वारेळं न० एक सुगंधी तृणविशेष; वाळा.

वार्ता [सं०] स्त्री० १ खबर; बातमी; अफवा. २ संभाषण (करणें). ॐ **ह्या गोष्टीची मला वार्ताही नाहीं** ही गोष्ट मला मुळींच ठाऊक नाहीं;ही गोष्ट माझ्या स्वप्नींही नाहीं. **ह्या पंचपाळयांत हिंगाची वार्ताही नाहीं** मुळींच हिंग नाहीं.**वार्ताहर, वार्तावह** पु०जासूद; दूत.

वार्तिक [सं०] पु० १ दूत; जासूद;निरोप, पत्रें, इ० नेणारा किं० आणणारा. २ वैश्य. न० न्यूनाधिक सांगणारा आणि स्पष्टीकरण करणारा नियम. ॐ **वार्तिककार** पु० कात्यायन ऋषि,- ज्याणें पाणिनीच्या सूत्रांवर वार्तिकें केलीं.

वार्द्धक, वार्द्धक्य [सं०] न० म्हातारपण.

वार्द्धुष,वार्द्धुषि,वार्द्धुषिक[सं०] पु० व्याज- बट्टा किं० वाढीदिढी करणारा सावकार. **वार्द्धुषी** [स०वार्द्धुषिन्]पु०वर 'वार्द्धुष' पहा. **वार्द्धुष्य** न० व्याजबट्टा करण्याचा धंदा.

वार्षिक [सं०] वि० १ वर्षाऋतूंतील; पावसाळ्यांतील. २ दर वर्षीं येणारा, होणारा, किं० घडणारा. ३ वर्षभर पुरण्याइतकें. न० दर वर्षीं येणारा किं० होणारा सण किं० उत्सव. २ वर्षाला कोणेकाला द्यावयाचा ठरलेला पगार. ॐ **वार्षिकी नदी** स्त्री० फक्त पावसाळ्यांतच जिला पाणी असतें अशी नदी.

वाल [सं० वल्ल] पु० १ एका वृक्षविशेषाचें

बीज,-जें बहुधा गुंजेसारखें तांबडें आणि गुळगुळींत असतें. हें सोनें इ० चें वजन करतांना घेतात. २ कडवा हें धान्य. ❀ **आटतां वाल, पिटतां वाल, वाल वाल निसंतान** सोनें इ० आटवितांना एक वाल चोरावयाचा, तें ऐरणीवर ठोकतांना एक वाल चोरावयाचा, अशा रीतीनें प्रत्येक संस्कारांत सोनार एक एक वाल चोरणार आणि शेवटीं मालकाचें मोठें नुकसान होणार. सोनार लोकांची चोरी बेमालूम असते.

वालई, वालय स्त्री० साळीची एक जाति.

वालखिल्य [**सं०**] **पु०** १ अंगठ्याएवढे लहान जे साठ हजार ऋषि ते प्रत्येक. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र. २ (**लाक्षणिक**) एकत्र जमलेलीं लहान लहान मुलें.प्रयोग **अ०व०**;उ०येथें हे इतके वालखिल्य कशासाठीं जमले आहेत ? ❀ **वालखिल्यस्वामी पु०** मुलांमध्यें मिसळून पोरकटपणा करणारा मोठ्या वयाचा माणूस.

वालथर [**म०** वाळू+थर] **वि०** अशक्त; सत्त्वहीन; निर्वीर्य; निकस; पानचट (भाषण, प्रयत्न, पदार्थ).

वालदाणी (-नी) म० [वाळू+**फा०** दानी (आधार)] **स्त्री०** शाईनें लिहिलेल्या कागदावर घालावयाची वाळू ज्या पेटी, डबी, इ०मध्यें ठेविलेली असते ती.

वालपापडी स्त्री० घेवड्याची एक जात.

वालवाल [**म०** वाल (केश) + वाल (केश)] **वि०** पूर्ण; पक्का; संदेहरहित. **क्रि० वि०** पूर्णपणें; सर्वथैव; अगदीं; पक्केपणीं. मागें ' बाल ' मध्यें ' बालंबाल ' पहा. पुढें ' वालोवाल ' पहा.

वाला [**हिं०**] **वि०** कोणेक अर्थ, क्रिया, नातें, गुण, धर्म, इ० नीं जुळलेला किं० संबंध पावलेला; उ० तांदूळवाला म्ह० तांदूळ विकणारा; कांग्रेसवाला म्ह० कान्ग्रेसचा सभासद, इ०. वाली हें **स्त्री०**, वालें हें **न०** इ०. ' वाला ' हा प्रत्यय लिंगवचनांप्रमाणें फिरतो.

वाला [**म०** वेगळा] **वि०** वेगळा; पृथक् (अशिक्षितांत रूढ). [पंचा.

वाला पु० १ दोरी; चऱ्हाट. २ नेसावयाचा

वाली, वाल्ही [**अ०** वली] **पु०** १ रक्षण करणारा. २ कैवारी. ❀ **वालीवारस पु०** धनी, हक्कदार, वारस.

वालीप, वालीफ वि० अत्यंत विरळ आणि अशक्त विणीचें (वस्त्र).

वालुका [**स०**] **स्त्री०** १वाळू;रेती.२वाळूक, काकडी. ❀ **वालुकातैल न०** अविद्यमान वस्तु; खपुष्प, वंध्यापुत्र, इ० प्रमाणें. **वालुकायंत्र न०** वाळूचें घड्याळ.

वालोवाल [**म०** बालंबाल] **वि०** पूर्ण; पक्का; निश्चित; संदेहरहित. ❀**वालोवाल निसंतान न०** पूर्ण नाश; द्रव्य, धान्य, नातलग, इ० ची अगदीं निःशेषता किं० समाप्ति.

वाल्मीकि [**सं०**] **पु०** रामायण रचणारा ऋषि.

वाल्ही वर ' वाली ' पहा.

वांव [**सं०** व्याम] **स्त्री०,न०** १ चार हात लांबी. २ शरीरास काटकोनांत दोन्हीं बाहु लांब केलें असतां लांबीचें जें प्रमाण होतें तें. ३ वरील प्रकारें दोन्ही बाहु ताणून जी बाहूंची पकड होते ती; उ० ह्या झाडाचें खोड माझ्या वांवेंत मावत नाहीं.

वांव [**हिं०** वाम्] **पु०** एक जलचर प्राणी.

वाव [**सं०** वायु] **पु०** वारा; हवा (अशिक्षितांत रूढि).

वाव पु०, स्त्री० १ पुरेशी जागा; अवकाश. २ फुरसत; रिकामपणा.३संधि;प्रसंग;योग्य समय. ४ समयोचितता. ५ जाण्यायेण्याला कोणेकाला मिळालेली किं० करून दिलेली वाट.

वाव न० निरुपयोगीं झाडेंझुडपें.

वाव [**म०** वाया] **वि०** निष्फळ; व्यर्थ.

वावकळ, वावकळणें मागें ' वायचळ, ' ' वायचळणें ' पहा.

वावगा वि० १ गैरशिस्त;अयोग्य.२ निष्कारण; निरर्थक.

वावझड (-डी) स्त्री० १ घरांत पावसाचे तुषार वाऱ्यानें येतात ते समुच्चयानें. २ थंडी, वारा, पाऊस, इ० मुळें अंगांत भरते ती हुडहुडी (येणें, भरणें, लागणें).

वावटळ, वावटूळ [**सं०** वात] **स्त्री०** १ वादळ; जोराचा वारा. २ मंडलाकार फिरणारा

वारा. वि० भरमसाट, उत्संखळ (भाषण, वर्तन).

वावड वि० भटक्या मारणारें, स्वच्छंदी (मूल, माणूस, गुरूं). ॐ **वावडकी स्त्री०** स्वस्छंदीपणाचें किं० उनाडपणाचें भटकणें.

वावडंग, वावडिंग [सं० विडंग] **स्त्री०** एक वन्य झाड. **न०** त्याचें फळ. वावडिंगें पोटांतील जंतांवर योजतात.

वावडणें अ० क्रि०(मुलें, गुरें,इ०नीं) स्वच्छंदानें भटकणें.

वावडणें स० क्रि० (हत्यार इ०) परजणें किं० पेलणें किं० उगारणें.

वावडा वि० १ वातुल (पदार्थ). २अपथ्यकर. रोगविशेषाचा जोर वाढविणारा; उ० खोकल्याला भजीं बावडीं होत. ३ अप्रिय; नापसंत; न आवडणारा. ४ बाधक;कमीपणा आणणारा;आक्षेपार्ह.

वावडा वि० १ रिकामा; सुना; फुकट. २ लाभरहित. ३ चालू क्रम, परिपाठ, इ० ना सोडून असलेला.

वावंडा, वावंडेकरी मागें ' ओवंडा , 'ओवंडेकरी ' पहा.

वावडिंग वर ' वावडंग ' पहा.

वावडी स्त्री० १ कागदाला कांहीं विशेष प्रकारें कापून जडवून हवेंत उडविण्यासाठीं करतात तो पदार्थ; पतंग (उडविणें). २ धान्यांतील केरकचरा वाऱ्यानें उडवून लावणाऱ्या माणसाला उंचावर उभें राहाण्यासाठीं जो आधार करतात तो. ॐ **कोणेकाची वावडी करणें** त्याची फजिती करणें; त्याची छुर्यो करणें.

वावडें न०१ सांधे दुखणें,सांधे धरणें,इ० रूप जी वातविकृति होते ती. २ शरीरास किं० प्रकृतीस विशेषप्रसंगीं जो अपायकारक पदार्थ खाद्यादि तो.

वावदळ न० मागें ' वादळ ' पहा.

वावदूक [**सं०**] **पु०**१ वक्ता. २ वाचाळपणें किं०वात्रटपणें बोलणारा.

वावदळ,वावधाण, वावधात न०, वावधूळ स्त्री० १ चक्राकार वाहणारा वारा. २ वादळ; वावटळ.

वावर न० (झाडें, शेतें, इ० लावण्याच्या बाबतींत किं० कसाच्या दृष्टीनें) जमीनीचा पट्टा किं० प्रदेश;उ०आमचें घर काळ्यावावरांत आहे.

वावर [**सं०** व्यवहार] **पु०** १ घरांतील किं० संस्थेतील किं० कारखान्यांतील माणसांचें जाणें, येणें, इ० रूप जी हालचाल ती. २ जाणें, येणें, धावणें, इ० रूप कोणतीही हालचाल; उ० घरांत रात्रीं दिवा मालविला म्हणजे उंदरांचा वावर चालतो.

वावरणें [**सं०** वि+अव+हृ] **अ० क्रि०** १ कामानिमित्त घर, कारखाना, गिरणी, इ० मध्यें माणसांनीं जाणें, येणें, इ०. २ स्वच्छंदानें हिंडणें; कोणेक स्थळीं राहाणें,नांदणें, किं०वसति करणें; उ०ह्या ओसाड वाड्यांत दिवसास देखील भुतें वावरतात. **स० क्रि०** चालविणें; वहिवाटणें; उ० मी शेत वावरतों माझी बायको घर वावरते.

वावरीचें जाळें न०मोठें जाळें,–मासे पकडावयाचें. हें जाळें होडीला बांधलेलें असून त्याला नांगर नसतो. मागें ' बुरीचें जाळें ' पहा.

वावशी स्त्री० १ डोळ्याची एक विकृति,– (धरणें). २ (डोळ्यांचा) फुगीरपणा (येणें).

वावसळणें अ० क्रि० उत्संखळपणें वागणें.

वावसा वि० अव्यवस्थित, उत्संखळ, अनियंत्रित (कारभार, भाषण, वर्तन).

वावसाव [**सं०** व्यवसाय] **पु०** उद्योगधंदा; कामकाज; कारभार.

वावसें न० वेड; वेडाची लहर (भरणें).

वांवसें [**म०** वांव; **सं०** व्याम] **न०** काथ्याच्या दोरीचे कोपर आणि पंजा यांना गुंडाळलेलें तीन फेऱ्यांचें वेटोळें; उ० चार वांवसें सुंभ असलें म्हणजे एक बाज विणून होते.

वावाची अवटी स्त्री०सोनार लोकांचा सोनें, चांदी, इ० च्या पत्र्याला पन्हळाचें रूप देण्याचा ठसा. मागें ' अवटी ' पहा. मागें ' पेरा ' मध्यें ' पेरांची आवटी ' पहा.

वावीर न० १ हलक्या दर्जाची भातजमीन. २ मोड फुटलेले भातदाणे,–पेरावयासाठीं केलेले. ३ निरुपयोगीं झाडेंझुडपें समुच्चयानें.

वाव्हणी स्त्री० खालीं ' वाहणी ' पहा.

वांशिक [**सं०**] **वि०** १ बांबूचें केलेलें. २ उत्तम कुळांतील.

वांशीक [म० वांसा; सं० वंश] न० घरावर वांसे घालून आणि बांधून करतात ती रचना; वांशांचें छपर; छपरासाठीं योजलेले वांसे समुच्चयानें.

वाशील [अ०] वि० वजा किं० कमी केलेलें (करणें, होणें, पडणें). ꙮ **वाशीलबाकी** स्त्री० हिशेबाची निरवानिरव; हिशेबाचा किं० जमाखर्चाचा निकाल.

वाशेळा, वाशेरा, वासट, वाशिळा, वासाळ [म० वास=दुर्गंधी] वि० शिळा झाल्यामुळें किं० नासल्यामुळें ज्याला दुर्गंधी येऊं लागली आहे असा (खाद्यादि पदार्थ).

वास [सं०] पु० १ सुगंध; सुवास. २ राहाणें. ३ राहाण्याची जागा,-घर इ०. ४ (**लक्षणेनें**) पदार्थाचा अत्यंत अल्प अंश; उ० विहिरींत पाण्याचा वास नाहीं. **टीप**,-अकरणरूपी प्रयोगांत 'वासवारा'सुद्धां ह्याच अर्थी योजतात; उ० त्याला गणिताचा वासवारा नाहीं. ५ हिंग (फोडणी इ० त चवेसाठीं घातलेला); उ० ह्या ताकाला वास लाव (म्ह० हिंग लाव). ६ (**लाक्षणिक**) पत्ता, तपास (लावणें, लागणें, काढणें); उ० आमच्या चोरीचा अद्यापि वास लागला नाहीं. ꙮ **वासकट, वासट** वि० ज्याला दुर्गंधी येत आहे असा. **वासाचें पोतें** न०१ पूर्वी श्रीमंत असून हल्लीं निकृष्टावस्थेस पोंचलेला माणूस. २ जो श्रीमंत असेल असा लोकांचा तर्क आहे असा मनुष्य.३जो खरोखरी श्रीमंत आहे असा माणूस. **वासित** वि० धूप इ०च्या वासानें सुगंधित झालेला किं० केलेला.

वास [सं० वासस्] न० १ वस्त्र. २ पडदा.

वांसकटी, वांसटी [म०] स्त्री० १ वांसा (तुच्छतेंत). २ अशक्त किं० लहान वांसा.

वासणें [सं० वि+अस्] स० क्रि०१(तोंड) उघडणें (निंदेंत). २ (डोळे) ताणणें; उ० डोळे वासून पहा म्हणजे दिसेल. अ० क्रि० १ (तोंड, डोळे, इ०) उघडले जाणें. २ (तंगड्या) ताणून निजणें.

वासंत [सं०] वि० १ वसंत ऋतूंतील. २ वसंतऋतूसंबंधाचें. **टीप**,- ह्या दोन्ही अर्थी 'वासंतिक' सुद्धां. **वासंती** स्त्री० १ पांढरी जाई. २ वसंतोत्सव. ३ कोकिळा.

वासन [सं०] न० १ वस्त्र इ० पदार्थ सुगंधित करण्याची क्रिया. २ घर, पेटी, इ० धुपविणें. ३ मूल्यवान वस्त्रें, पोथ्या, इ० बांधून सुरक्षित ठेवण्याचें वस्त्र. ४ कोणेक ठिकाणीं राहाणें. ५ वास्तव्याची जागा.६योगाचें एक आसन. ७ वस्त्रसमुदाय.

वासना [सं०] स्त्री० १ स्मरण; स्मृतिहेतु असा संस्कार. २ कर्मांचा मनावर राहाणारा संस्कार. ३ ज्ञान. ४ (**न्याय**) अज्ञान; मिथ्याज्ञानजन्य संस्कार. ५ इच्छा; आवड. ६ (**ज्योतिष**) ग्रह स्पष्ट करण्याचा एक संस्कार. ७ (**मराठींत**) मरणाऱ्या माणसाची शेवटची इच्छा; मरणारानें आग्रहपूर्वक दर्शविलेली इच्छा. ८ शास्त्र, कला, इ० चा परिचय,अभ्यास, किं० माहिती; उ० शास्त्राची थोडीशी वासना असली म्हणजे भाषण प्रौढ दिसतें. ꙮ **वासना फजीत करणें** अत्यल्प प्रमाणांत ती तृप्त करणें किं० पुरविणें. **वासना मोडणें** इच्छा नियंत्रित करणें किं० आटोक्यांत ठेवणें.

वासपूस [म० पुसणें=विचारणें] स्त्री० कांहीं काम, कोणी माणूस, कांहीं गोष्ट, इ०च्या संबंधाची चौकशी किं० तपास (करणें, घेणें). मागें ' पूस ' मध्यें ' पूसतपास ' पहा. पुढें ' वास्त ' मध्यें ' वास्तपुस्त ' पहा.

वासर [सं०] पु० १ दिवस. २ आठवड्याचा दिवस. ꙮ **वासरमणि** पु० सूर्य.

वासरूं [सं० वत्स] न० १ गाय, म्हैस, इ० चें अपत्य. २ (प्रेमांत) मूल, धाकटा भाऊ, इ०. ३ गलबताच्या अवजाराची एक दोरी. ꙮ **वासुरकरीण** स्त्री० जिचें वासरूं असून तें वासरूं जवळ असलें म्हणजेच दूध देते अशी गाय किं० म्हैस. आंबोण पुढें ठेविलें असतां जी दूध देते अशा गायीला किं० म्हशीला ' हातकरीण ' म्हणतात.

वासलात (-द) [अ० वासिलात्=एका बाबी खालच्या सर्व रकमा] स्त्री० १ जमा झालेल्या किं० भरणा झालेल्या रकमा किं० त्यांच्या संबंधाचा हिशेब किं० त्यांच्या खर्चाचा तपशील. २ जमाबंदीच्या बंदावर काढतात ती

एक विशेष प्रकारची रेघ. ३ घडलेल्या एकाद्या गोष्टीची किं० प्रकरणाची साद्यंत हकीगत. ४ एकादा खटला किं० गुंतागुंतीचें प्रकरण किं० बाबत ह्यांचा निकाल. ५ पैसा, सामग्री, इ० चा उधळपट्टी (वाईट अर्थानें); उ० बाप मेल्यावर तीन वर्षांच्या आंत त्याणें दोन लाखांच्या संपत्तीच्या वासलात लावली. ॐ **वासलात लावणें** ऐकणाराला कंटाळा येण्याइतक्या तपशीलासह कांहीं हकिकत सांगणें.

वासवारा [**म०** वास+वारा] **पु० ए०व०** अत्यल्प प्रमाणसुद्धां (नसणें). मागें ' वास ' मध्यें अर्थ ४ ची टीप पहा.

वासळणें [**म०** वास] **अ० क्रि०** पिकलेपणाच्या वासानें (आंबा, फणस, इ०) युक्त होणें.

वांसा [**सं०** वंश] **पु०** १ बांबू; चिवा; कळक. २ सागाच्या झाडाचे आढ्या पासून वळचणीपर्यंत ओंबणाखालीं घालतात ते सोट प्रत्येक. ३ नाकाचें हाड शेंड्यापर्यंतचें. ४ पाठीचा कणा. ५ (**लक्षणेनें**) जाडी लेखणी, बोरू, इ०. ॐ **खाल्ल्याघरचे वांसे मोजणें** कृतघ्नपणा करणें; आपल्या आश्रयदात्याचें नुकसान झालें किं० त्याला दारिद्र्य आलें तर आपला काय फायदा होईल हा विचार करीत बसणें.

वासाचें पोतें न० मागें ' वास ' मध्यें पहा.

वासाळ वर ' वाशेळा ' पहा.

वासित वि० वर ' वास ' मध्यें पहा.

वासी [**सं०** वस्=राहाणें] **वि०** राहणारा.हा शब्द स्थलवाचकांपुढें येऊन' त्या स्थळीं राहाणारा 'असा अर्थ होतो; उ० वंगवासी म्ह० बंगाल्यांत राहाणारा; महाराष्ट्रवासी म्हणजे महाराष्ट्रांत राहाणारा;वैकुंठवासी किं० स्वर्गवासी म्ह० मेलेला;वनवासी म्ह०वनांत राहाणारा, इ०.

वासुदेव [**सं०**] **पु०** १ श्रीकृष्ण; विष्णु. २ भिकाऱ्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी भिकारी. हे लोक मोराच्या पिसांचा टोप डोक्यावर धारण करून भिक्षा मागतात. [पहा.

वासुरकरीण स्त्री० मागें ' बासरू ' मध्यें

वासुरूं न० मागें ' वासरूं ' पहा.

वासेंबी [**सं०** वंशबीज] **न०** बांबूचें बीज.

वांसोंडी,वांसोळी [**सं०** वंश; **म०** वांसा] **स्त्री०** १ लहान किं० अशक्त वांसा. २ वांसा,-तुच्छतेंत.

वास्त, वास्ता [**हिं०** पूच्छाह्] **स्त्री०** १ काळजी; पर्वा; आस्था; (टाकणें, सोडणें); उ० रामूकडे माझे जे रुपये आहेत त्यांची मी वास्त सोडली. २ चौकशी; विचार (करणें); उ० मी दोन महिने आजारी होतों, तुम्ही कोणी एका शब्दानें तरी माझी वास्त केलीत काय ? उ० मी कोणाची वास्ता ठेवणारा मनुष्य नाहीं. ॐ **वास्तपुस्त** १ चौकशी. २ काळजी; पर्वा.

वास्तव, वास्तविक [**सं०**] **वि०** १ खरें; सत्य; सत्याला धरून असलेलें. २ निश्चित.

वास्तव्य [**सं०**] **न०** १ राहाणें; वसति. २ राहावयाचें घर; राहावयाला योग्य ठिकाण.

वास्तु [**सं०**]**पु०, न०** १घराची जागा. २घर; स्थान. ह्या दोन्ही अर्थीं मराठींत **स्त्री०** सुद्धा. ॐ **वास्तुकर्म** [**सं०** वास्तुकर्मन्] **न०** घर बांधणें. **वास्तुशांति स्त्री०** नवीन घरांत राहावयाला जाण्यापूर्वीं त्या घरांत करतात तो होम इ०रूपाचा विधि.**वास्तुपुरुष पु०,वास्तुदेवता स्त्री०**गृहाभिमानी देवताविशेष. **वास्तुप्रवेश पु०** नव्या बांधलेल्या घरांत राहावयास जाणें. **वास्तुविद्या स्त्री०** घर बांधण्याची कला,-चौसष्ट कलांपैकीं एक. [वाहाणारा पशु.

वाह [**सं०**] **पु०** १ घोडा. २ बैल. ३ ओझें

वाहक [**सं०**] **वि०** वाहून नेणारा. **पु०** १ हमाल. २ गाडीवान. ३ मोतदार.

वाहटळ, वाहटूळ, बाहटूळ स्त्री० १ चक्राकार गतीनें वाहाणारा वारा. २ जोराचा आणि सोसाट्याचा वारा; वादळ.

वाहणी, वाहण, वाहवणी, वाव्हणी स्त्री०, वाहणें न० [**म०** वाहाणें] १ पाणी इ० चा प्रवाह. २ कापलेल्या शेतांतलि धान्य इ० घरीं नेऊन साठाविणें.

वाहणें, वाहाणें [**सं०** वह्] **स० क्रि०** १ (पदार्थाचा भार) अंगावर घेऊन (तो पदार्थ) एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं नेणें; उ० पल्लाभर तांदूळ मी एकटा दाणेआळींतून घरापर्यंत वाहून नेईन. २ (पदार्थाचा भार) सोसणें किं० सहन करणें; उ० ही काठी इतका भार

वाहाणार नाहीं; उ० पृथ्वीचा भार शेष आपल्या मस्तकावर वाहतो. ३ गर्व, अभिमान, ताठा, इ० मनोविकार (कोणेकाचे ठायीं) असणें; उ० तूं कशाला तालिमबाजीचा इतका गर्व वाहातोस ? ४ जबाबदारी, कामाचा भार, किं० काळजी(कोणेकानें) पथकरलेली असणें;उ० तुमचा मुलगा परीक्षेत पास करून देण्याची जबाबदारी मीं वाहीन. ५ (चरितार्थाचें साधन ह्या दृष्टीनें दुकान, धंदा, कारभार, संसार, इ०) चालविणें. ६ पूजेच्या विधींत देवाला (फुलें,गंध, अक्षता,इ०) अर्पिणें. ७ (शपथ) करणें किं० उच्चारणें. ८ (पदार्थविशेष) मिळण्याची आशा सोडून देणें. ९ गमावून घेणें; उ० जामीन रहा आणि गांठचें वहा (ह्म० जामीन राहातो त्याला पदरचें भरावें लागतें). १० (धनुष्यास दोरी) चढविणें किं० लाविणें. ११ (लेखणी, शस्त्र, पागोटें, इ० चा) पुन्हा स्वीकार करावयाचा नाहीं असा निश्चय करणें. अ० क्रि० १ (वारा, पाणी, नदी, इ०) गतिमान् होणें किं० पुढें जाणें. २ (सैन्य, टोळ, चोर, यात्रेकरू, इ० ची)रहदारी सुरू होणें. ३ (रस्ता) गाड्या, प्रवासी, माणसें, इ० च्या जाण्यायेण्यानें गजबजलेला असणें.४ नाक, डोळे, जखम, फुटकें भांडें, इ० तून (पाणी, पू, रक्त, तेल, इ०) बाहेर पडत असणें. ५ (हत्यार, शस्त्र, यंत्र, इ०) काम करण्याच्या स्थितींत असणें. ६ (काळ) अतिक्रांन्त होणें किं० जाणें.७ (संस्था, समाज, जग, इ०) आपआपल्या सरणीनें चाललेलें असणें.८(तर्क, विचार, मन बुद्धि,इ०)चालणें. ॐ **वाहिली ती गंगा राहिलें तें तीर्थ** पाणी वाहून गेलें तर ती गंगा किं० पवित्र नदी होते, आणि पाणी तेथेंच सांचून राहिलें तर त्याला ' तीर्थ ' म्ह० पवित्र पाण्याचा संचय असें नांव प्राप्त होतें; सारांश, पाणी कोणत्याही स्थितींत असलें तरी पवित्रच. त्याप्रमाणें पैसा धर्मकृत्यांत खर्चिला तर पुण्य लागतें, आणि पैसा शिलकीस टाकला तरी आपल्या अडचणीच्या वेळीं तो कामास येतो. सारांश,पैसा हा सर्व प्रकारें उपयोगी किं० मूल्यवान् पदार्थ आहे.

वाहता [**म०** वाहणें] **वि०** १ वाहाणारा (रस्ता). २ रहदारीचा (रस्ता). ३ संचलनशील (वारा). ४ सतत चालणारा किं० वाहणारा (झरा, पाट, नदी, इ०). ५ कापणें, मारणें, इ० कामीं उपयुक्त (शस्त्र, तरवार, इ०). ६ विचार करण्याच्या स्थितींत असलेली (बुद्धि). ७ चालू स्थितींत किं० उपयोगांत असलेलें (यंत्र, चरक, चरका, तेलाचा घाणा, इ०). ॐ **वाहत झरा, वाहता झरा पु०, वाहात झरी स्त्री०** १ ज्याचें पाणी वाहावयाचें कधींच थांबत नाहीं असा विहीर, टांकें, तळें,इ०च्या पाण्याचा उगम. २ (**लाक्षणिक**) द्रव्यप्राप्तीचें अखंडित साधन; चरितार्थाचें सतत चालू राहणारें साधन. **वाहत वाटोळें न०** १ कांहीं काळापुरती केलेली तजवीज किं० तरतूद; कांहीं काळ मात्र टिकेल अशी कांहीं कामाची निरवानिरव किं० विल्हेवाट किं० निकाल; तात्पुरती तडजोड.२ विध्वंस;सत्यानास; नासाडी.**वाहती कूस स्त्री**०ज्या स्त्रीस पुष्कळ दिवसांत मूल झालेलें नाहीं तिच्या गर्भाशयांत एकदा गर्भधारणा झाली आणि तिला मूल झालें म्हणजे तिची जी कूस (म्ह० गर्भाशय) ती; उ० एकदा वाहती कूस झाली म्हणजे हावी तितकीं पोरें होऊं शकतील. **पावसाची वाहती कूस होणें** लांवणीवर पडलेल्या पावसाळ्याला एकदा पाऊस पडून सुरवात होणें. **वाहती गंगा स्त्री०** सुरवात होऊन सुरळीतपणें चालू लागलेलें काम, धंदा,किं०नोकरी.कोणेकाची वाहती गंगा होणें (किं० चालणें, किं० चालू होणें) असे प्रयोग होतात. **वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावे** अनुकूल परिस्थिति जमून आल्यामुळें जर आपलें सहजगत्या काम होण्याजोगें असलें तर तें ताबडतोब किं०अवश्य करून घ्यावें. **वाहती धार स्त्री०** १ उपयोगी पडण्याच्या स्थितींत असलेली शस्त्राची धार (म्ह० तीक्ष्ण धार). याच्या उलट ' पडती धार. ' २ सतत वाहणारा झरा, ओढा, जखम, गळूं, इ०. ३ ऐन रंगांत आलेला वाद,लढाई,इ०.**वाहाती वाट स्त्री०** ज्यावर सदैव रहदारी चालू असते अशी वाट म्ह० रस्ता. **वाहतें नांव न०**लोकांत प्रसिद्ध असें कोणेकाचें नांव;ज्या नांवानें लोक त्याला ओळखतात तें नांव.

वाहतीस [**म०** वाहणें] **पु०** चाल; रीति;

शिरस्ता; परिपाठ.

वाहतुक [**म०** वाहणें] **स्त्री०** १ रहदारी. २ सामान वाहून नेण्याआणण्याबद्दलचा खर्च.

वाहन न० दगडाचें उखळ,–विशेषतः जमीनींत पुरलेलें. हावें तेथें मांडावयाचें आणि पोहे इ०कांडावयाचें जें उखळ त्याला 'उखळी' **स्त्री०** असें म्हणतात.

वाहन [**सं०**] **न०** १ नेणें; वाहून नेणें. २ प्रवासाचें साधन,–गाडी, घोडा, पालखी, मेणा, इ०. ※ **गरुडवाहन पु०** श्रीविष्णु. **मूषकवाहन, आखुवाहन पु०** गणपति. **नरवाहन पु०** कुबेर.

वाहवट [**म०** वाहणें] **वि०** १ पाण्याच्या प्रवाहानें वाहवून नेलेलें (गवत, केरकचरा, इ०). २ पाण्याच्या प्रवाहानें उकरली गेलेली (माती इ०) किंवा झिजविलेला (प्रदेश). **स्त्री०** प्रवाह; ओढा. ह्या अर्थी 'वाहवटळ' **स्त्री०** सुद्धां.

वाहवटळ[**म०** वावटळ]**स्त्री०** १ सोसाट्याचा वारा; वादळ. २ प्रवाह; ओढा.

वाहवण [**म०** वाहणें] **स्त्री०** प्रवाह; वाहत जाणें. **वाहवणी न०** १ वाहाणारें पाणी; वाहात आलेलें पाणी. २ पावसाचें वाहणारें पाणी. याच्या उलट' जिरवणी 'म्ह० जमीनींत जिरणारें पाणी.

वाहवणें [**म०** 'वाहणें' चें एक रूप] **अ०क्रि०** १ पाण्याच्या प्रवाहाबरोबर (लाकूड इ०) वाहत जाणें. २ फुटलेल्या बारदानांतून (आंतील पदार्थ) बाहेर पडणें. ३ (**लाक्षणिक**) शिस्तीपासून चळणें किंवा च्युत होणें; उ० राम्याची संगत लागल्यापासून गोविंदा फारच वाहवला. ४ (**लाक्षणिक**) मुद्दा सोडून बोलणें किं०लिहिणें. ५ (**लाक्षणिक**) (बेत, योजना, संकल्प, इ०) फिसकटणें किं० विफळ होणें.

वाहवरा [**म०** वाहवणें] **वि०** १थिलथिलीत किं० पातळ (गूळ, लोणी, चिखल,इ०). २ लठ्ठ असून अशक्त(शरीर); थिलथिलीत(शरीर,पोट). ३ भरमसाट, मुद्याला सोडून असलेलें (भाषण).४ मुद्याला सोडून बोलणारा (माणूस).

वाहवा [**फा०** वाह्+वाह्] **उ० वा० अ०** उत्तम ! ठीक ! शाबास ! भले खाशी ! **स्त्री०** प्रशंसा; स्तुति; तारीफ.

वाहळी [**म०** वाहळ] **स्त्री०** १ लहानसा ओढा किं० पाण्याचा प्रवाह. २ तेरडा ह्या फुलझाडाची एक जात.

वाहाटळ, वाहाडणें इ० मागें 'वाहटळ,' 'वाहडणें' पहा.

वाहाण, वहाण [**म०** वाहणें] **स्त्री०**ओढा; झरा; झऱ्याचें पाणी.

वाहाण, वाहण, वहाण स्त्री० चालतांना खडे, कांटे, इ० पासून पायाच्या तळव्याचें रक्षण करणारा कातड्याचा पदार्थविशेष. [पहा.

वाहाळ, वाहाळी मागें 'वहाळ,' 'वहाळी'

वाहिनी खालीं 'वाही' मध्यें पहा.

वाहिला [**म०** वाहणें] **पु०** पोहणाराचें भोपळा इ० साधन.

वाही [**सं०** वाहिन्] **वि०** (उपपद समासांत) वाहणारा; उ० पूर्ववाही किं० पूर्ववाहिनी (नदी). **वाहिनी स्त्री०** १ नदी. २ सैन्य.

वाहीक [**म०** वाहणें] **वि०**१ओझें इ०वाहणारा. २ जबाबदारी वाहणारा.

वाहीत [**म०** वाहणें] **वि०**वहिवाटींत म्ह० लागवडींत असलेली (जमीन, मळा,इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें 'पडीत.'

वाहीम [**म०** वाहणें] **न०** गाडी, नांगर, रहाट, इ० ओढणारा किं० चालविणारा किं० फिरविणारा पशु,–बैल, रेडा, इ०.

वाहील, वाहेल [**म०** वाहणें] **स्त्री०** शेत इ० नांगरण्याची क्रिया. **न०** १ वांझा नारळ. २ पोहोणाऱ्याचा भोपळा इ०.

वाहुटळ, वाहुटूळ मागें 'वावटळ' पहा.

वाहोळ, वाहोळकी, वाहोळदारी [**म०** वाहणें] **स्त्री०** शेतकीचीं कामें समुच्चयानें (करणें, चालविणें).

वाहोळ [**म०** वाहणें] **वि०** लागवडींत असलेली (जमीन). ※ **वाहोळकर, वाहोळकरी, वाहोळदार पु०** शेतकीचीं कामें करणारा; शेत वाहाणारा किं० कसणारा.

वाह्य [**सं०**] **वि०** १ वाहून नेण्याजोगें; सोसतां येईल असें. २ वाहावयाचें; उ० मनुष्यवाह्य पालखी. **पु०** धर्माला सोडून वर्तन करणारा माणूस.

वाह्या, वाह्याची अवटी मागें 'वाया,' 'वायाची अवटी' पहा.

वाह्यात [**सं०** वाह्य] **वि०** १ धर्माला विरुद्ध असें वर्तन करणारा. २ शिष्टाचारास सोडून वागणारा (मनुष्य); लफंगा.

वाळ वि० १ फुटणें, झिजणें, इ० कारणांमुळें व्यवहारांतून गळालेलें (रुपाया इ० नाणें). २ जातींतून अधर्माचरणामुळें बाहेर टाकलेला (माणूस). ४ प्रचार, वहिवाट, अमल, इ० तून गळालेला किं० रद्द पडलेला (कायदा, नियम, चाल, इ०). **स्त्री०** १ फुटणें, झिजणें, इ० मुळें रुपाया इ० नाण्याला येते ती सदोषता किं० व्यवहारांत किं० किंमतींत येतो तो कमीपणा. २ चाल, रीति, कायदा, इ० प्रचारांतून जाणें. ३ जातींतून बाहेर टाकलें जाणें. **टीप,**–ह्या अर्थी फक्त सप्तम्यन्त प्रयोग होतो; उ० वाळींत काढणें, पडणें, टाकणें, किं० असणें.

वाळ [**म०** वाळणें] **स्त्री०** झाड,पान, फूल, इ० ची वाळलेपणाची स्थिति. ॐ **वाळका, वाळकुंजा, वाळकुंडा वि०** १ वाळलेलें; सुकलेलें.२ आजार, फार काम, काळजी,अपुरें जवेण, इ० मुळें रोड झालेला (माणूस, पशु).

वाळकी स्त्री० काकडीचें झाड. **वाळूक न०** त्याचें फळ.

वाळगणें अ०क्रि०(भात,भाजी, खीर, दूध, इ०ना) चुलीवर फार आच लागल्यामुळें करपणें किं०(त्यांना)करपट घाण येणें. ॐ **वाळगष्टाण स्त्री०** पदार्थ करपल्यामुळें त्याला येते ती घाण.

वाळणें अ० क्रि० १ (फळ, पान, फूल, इ०) शुष्क किं० रसरहित होणें.२(ओलें वस्त्र) कोरडें होणें. ३ आजार, जबाबदारी, कष्ट, इ० कारणांमुळें (मनुष्य, जनावर) रोड किं० किडकिडीत होणें.

वाळणें [**म०** वाळ] **अ० क्रि०** (कोणी मनुष्य) जातींतून बाहेर पडणें किं० बाहेर टाकला जाणें.

वाळंबा पु० १ चांचड म्हणून जो मुंगळ्यासारखा प्राणी तो. २ उधई किं० वाळवी हा प्राणी.

वाळवंट (–ठ),वाळवट (–ठ) [**म०** वाळू +ठाव, ठाय] **न०** वाळूनें व्यापलेला प्रदेश (समुद्र, नदी, इ० च्या कांठचा).

वाळवण [**म०** वाळविणें] **न०** १ पदार्थ वाळविण्यानें किं० वाळण्यानें कमी केलेला किं० झालेला अंश (जाणें). २वाळत घातलेलें धान्य, पापड, चिरगूट, इ०. **स्त्री०** वाळण्यानें झालेली स्थिति; सुकलेपणाची स्थिति.

वाळवत [**म०** वाळणें+पत्र] **न०, स्त्री०** वाळलेलें किं० वाळण्यानें रसहीन झालेलें केळीचें पान.

वाळविणें [**म०** 'वाळणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ शुष्क किं० रसहीन करणें. २ (पदार्थांतील) जलांश काढून टाकणें. ३(मनुष्य, पशु, इ० ना) आजार, उपवास, चिंता, इ० नीं रोड किं० किडकिडीत करणें.

वाळवी [**सं०** वल्मी=मुंगी] **स्त्री०** १ वस्त्र, कागद, काष्ट, इ० कांस खाऊन त्यांचा नाश करणारा एक कीटविशेष; उधई. २ ह्या कीटाच्या रूपाचा जो रोग लाकूड, वस्त्र, इ० ना लागतो तो (लागणें). ३ (**लाक्षणिक**) रोग, चिंता, भीति, इ० रूप जें शरीर, संस्था, राज्य, इ० च्या ऱ्हासास कारण तें (लागणें).

वाळवेणें [**म०** वाळवी] **अ० क्रि०** वाळवी ह्या कीटानें (वस्त्र, काष्ट, इ०) उपद्रव किं० बाधा पावणें किं० पोखरलें जाणें.

वाळसर [**म०** वाळू] **वि०** रेताड (जमीन); जींत वाळू फार अशी (जमीन).

वाळा [**सं०** वाल,वालक] **पु०**१ एक तृण,– ज्याचीं मुळें सुगंधी असतात.२ह्या तृणाच्या मुळ्या समुच्चयानें.

वाळा पु० १ पाय किं० हात ह्यांत घालावयाचें एक भूषण. २ कोणत्याही उपयोगाची वाटोळी कडी किं० वाटोळें कडें. ३ तांब्या, पेला, इ० च्या बुडाला असते ती पडघी. ४ एक प्रकारचा सर्प.५खोबऱ्याच्या वाटीची सगळी सलग कड कापली असतां जी चाकी निघते ती किं० अशा चाक्या समुच्चयानें. ६ कडें तापवून शरीरावर दिलेला वर्तुळाकार डाग. ७ जांघेंत किं० खाकेंत होतें तें गळूं.

वाळियेणें [म० वळणें] **स० क्रि०** (गलबत, होडी, इ०) वाऱ्याच्या दिशेनें चालविणें.

वाळी [म० वाळा] **स्त्री०** नाक किं० कान ह्यांत घालावयाचें सोन्याच्या किं० रुप्याच्या तारेचें लहानसें वलय; सुंकलें. [झाड.

वाळी [सं०वालुकी] **स्त्री०** वेलवोंडी नांवाचें

वाळींत [म०'वाळ' ची सप्तमी 'वाळींत']**न०** जातींतून काढून टाकणें; जातींतून कोणेकाची झालेली किं० केलेली हकालपट्टी. कोणेकावर वाळींत टाकणें, कोणेकाला वाळींत घालणें, कोणेकावर वाळींत पडणें, कोणेकाचें वाळींत निघणें, असें प्रयोग होतात. **टीप,**–' वाळींत ' ह्या शब्दांतील अनुस्वार उडून ' वाळीत ' असें रूप झालेलें आहे.

वाळू [सं० वालुका] **स्त्री०** १ रेती,–काग-दावर घालण्याच्या उपयोगाची. २ दगडाचे खडे,–रस्त्यावर पसरतात ते किं० चुना कुटतांना घालतात ते. ❀ **वाळूंत मुतून फेस ना पाणी** कृतघ्नावर उपकार केले असतां ते फुकट जातात. **वाळूंत मुतणें** १ कृतघ्नावर उपकार करणें. २ भलत्याच कामीं पैसा, सामग्री, इ० खर्चणें. ३ ज्याचें फळ मिळालें नाहीं असें कांहीं काम किं० यत्न करणें. **जांवयांस देणें आणि वाळूंत मुतणें** जांवई कृतघ्न असतात.

वाळूक [सं० वालुका, वालुकी] **न०** १ खिरा किं० काकडी हें फळ. २ अवाळूं,–एक रोग. ❀ **वाळकाची चोरी आणि बुक्क्यांचा मार** क्षुल्लक अपराधाबद्दल फारच कडक पारिपत्य करणें (हें योग्य नाहीं).

वि [सं०] **उपसर्ग** हा उपसर्ग पुढील अर्थ दाखवितो. १ क्रियेचा उलटपणा; उ० विक्रय, वियोग, विस्मरण, इ०. २ अभाव; उ० विधवा; व्यसु, विनिद्र. ३ पालट, बदल; उ० विकार. ४ पूर्णता, आधिक्य;उ०विध्वंस.५भेद; उ० विवेचन. **टीप,**–'वि'चे ह्याशिवाय इतर कांहीं अर्थ आहेत.

विकच [सं०] **वि०** १ उमललेलें, प्रफुल्लित (फूल). २ पसरलेलें, वासलेलें (तोंड).३ विखु-रलेले (केश). ३ स्पष्ट, प्रकट. ४ उज्ज्वल. **पु०** १ बौद्ध भिक्षु. २ (**ज्योतिष**) केतु हा ग्रह.

विकट [सं०] **वि०** १ कुरूप; हिडिस्स. २ भयंकर;विकराळ.३क्रूर.४विशाल;प्रचण्ड.५गर्विष्ठ; उद्धट. ❀ **विकटान्त अध्ययन, विकटोपर्यंत अध्ययन न०** सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गज-कर्णकः । लंबोदरश्च विकटो विघ्नराजो गणाधिपः॥ हा श्लोक सर्वांना पाठ येत असतो पण तोही ' विकट ' पर्यंतच ज्याला येतो म्हणजे पुरता येत नाहीं अशा माणसाचें अध्ययन म्ह० अपुरतें किं० अर्धवट अध्ययन. विपरीत लक्षणेनें प्रचंड विद्वत्ता म्ह० शून्य विद्वत्ता; उ० गोविंदाचें विकटोपर्यंत अध्ययन झालें आहे (म्ह०तो ढ किं० आशिक्षित आहे).**टीप,**–'अकटोपासून विकटोपर्यंत अध्ययन' ह्याचाही वरील प्रमाणेंच अर्थ आहे ' अकटोपासून ' हे शब्द केवळ यमका-साठींच आहेत. **विकटोपशास्त्री पु०** जाडा विद्वान म्ह० अगदीं निरक्षर.

विकण [म० वि(नाहीं)+कण]**वि०** ज्याच्या जवळ धान्याचा एकही कण नाहीं असा म्ह० अत्यन्त दरिद्री.

विकणें [सं० वि+क्री] **स० क्रि०** किंमत घेऊन कोणेकाला (पदार्थ) देणें. **अ० क्रि०** १ गिऱ्हाइकाकडून पदार्थाच्या मालकाला त्या पदार्थाची किंमत येऊन (तो पदार्थ) त्या गिऱ्हाईकाच्या मालकीचा होणें; विकला जाणें; उ० पुण्यांत खादी फारशी विकत नाहीं; उ० पिकेल तसें विकेल. २ चालणें; मान किं० आदर पावणें; फलद्रूप होणें; उ० येथें तुमचें शहाणपण विकणार नाहीं. ❀ **विकलेला वि०** अंकित. **मी गोविंदरावाचा विकलेला आहें** मी गोविं-दरावाच्या उपकारांखालीं दडपलेला आहें आणि मी त्याचें हावें तें काम करावयाला बांधील आहें.**विकणाऊ वि०**खालीं'विकाऊ'पहा.

विकत, विकता [म०विकणें] **वि०**विकत देणें किं०घेणें ह्या व्यवहारांत किं०व्यवहारानें दिलेला किं०घेतलेला.❀**विकत** (किं० **विकता**) **कज्जा** (किं० **कलागत**) आपल्याच हेकटपणामुळें अंगावर ओढून घेतलेलें भांडण. **विकत** (किं० **विकता**) **खोकला** (किं० **तंटा** इ०) आपल्या हेकटपणामुळें आपणावर आणून घेतलेलें कांहीं संकट, अनिष्ट, चिंता, कष्ट, खर्च, इ०. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करीत बसणें** आपल्या मूर्खपणानें स्वताला कांहीं त्रासास पात्र

करून घेणें. **विकतेकरी पु०** स्वतास लागणारे जिन्नस विकत घेऊन प्रपंच करणारा. याच्या व्यावर्तकत्वें स्वतास जरूर असे पदार्थ स्वताच निर्माण करणारा.

विकत्थन [**सं०**] **न०** बढाई; प्रौढी; शेखी.

विकंपित [**सं०**] **वि०** १ कांपरा (स्वर). २ हालणारे (केश, झाडाचीं पानें, इ०).

विकरण [**सं०**] **न०** १ बदल; विकार. २ (**व्याकरण**) गणचिन्ह; गणालाच लागणारा प्रत्यय.

विकरा पु०, विकरी स्त्री० [**सं०** वि+क्री= विकत देणें)] पदार्थ विकत देणें किं० विकत देऊन आलेली किंमत; उ० माझा आजचा विकरा पन्नास रुपयांचा झाला.

विकराळ [**सं०** विकराल] **वि०** फार भयंकर. मागें'अकराळ विकराळ' पहा. [बाण.

विकर्ष [**सं०**] **पु०** १ ओढण्याची क्रिया. २

विकर्षण [**सं०**] **न०** १ ओढण्याची क्रिया. २एकीकडे किं०बाजूला सारणें किं०करणें.३उपास.

विकल [**सं०**] **वि०** १ ज्यांत कांहीं न्यून किं० व्यंग आहे असा; अपूर्ण. २ निश्चेष्ट. ३ दीन. **विकला स्त्री०** एका कलेचा साठावा अंश. ॐ **विकलांग वि०** १ ज्याच्या शरीरांत कांहीं व्यंग आहे असा म्ह० लंगडा, थोटा, बोबडा, अंधळा, बहिरा, इ०. २ अर्धवट (असा कांहीं पदार्थ). **विकलेन्द्रिय वि०** ज्याचें एकादें इंद्रिय कामाला निरुपयोगी आहे असा.

विकलेला मागें ' विकणें ' मध्यें पहा.

विकल्प [**सं०**] **पु०** १ अमुक हें असें किं० तसें ह्या संबंधाचा संशय. २ मताची भिन्नता; वेगळें मत. ३ भ्रम; चूक. ४ असेंही होईल किं० तसेंही होईल अशी शक्यता किं० स्थिति; कोणताही पक्ष ग्राह्य असणें असा प्रकार. ५ कोणेकाच्या सद्धेतूबद्दल कोणेकाच्या मनांत येते ती शंका. ६ हें करूं किं० तें करूं, हें खरें किं० तें खरें, अशी मनाची अनिश्चित स्थिति. ७ कांहीं एका गोष्टीसंबंधानें मनांत उद्भवतात ते विचारतरंग.(**अ० व०** प्रयोग).ॐ**विकल्प घालणें** कांहीं शंका कि, अमुकानें शंका किं० अड चण प्रदर्शित करणें.

विकसणें [**सं०** वि+कस्] **अ० क्रि०** १ (फूल) प्रफुल्लित होणें किं० उमलणें. २ (**मन**, वृत्ति) प्रसन्न होणें. ३ विस्तार पावणें; वाढणें.

विकसन [**सं०**] **न०** प्रफुल्लित किं० प्रसन्न किं० विस्तीर्ण होणें.

विकसित [**सं०**] **वि०** १ उमललेलें (फूल). २ प्रसन्न (मन, वृत्ति). ३उघडलेलें (तोंड, इ०). ४ विस्तार पावलेलें. [इ० पहा.

विकळ, विकळा इ० वर 'विकल,' ' विकला'

विकळणें [**म०**विकळ]**अ०क्रि०** १बुद्धिभ्रंशानें (कोणेकानें)विकार पावणें; बुद्धिभ्रंश झाला आहे अशा स्थितीस (कोणेकानें) येणें; वृत्तिभ्रंशानें विकृत झालेलें असणें. २ (मूल, माणूस, इ० नीं) योग्य मार्ग सोडून अयोग्य मार्गानें जाऊं लागणें म्ह०(त्यांणीं)बिघडणें किं०उत्संखळ होणें. ३ कष्ट, चिंता, आजार, इ० नीं जर्जर होणें. ४ दूध, दही, इ० फुटणें म्ह० त्यांना चोथापाण्याची स्थिति प्राप्त होणें.

विकळा [**म०** वि (नाहीं) +कळा (तेज)] **वि०** निस्तेज, फिका, मंद (चेहेरा).

विकळ, विकळूत स्त्री० १ खंत, शिसारी, किळस (येणें). २ मळमळ, ओकारीची भावना (येणें).

विकाऊ,विकणाऊ[**म०**विकणें]**वि०**१विकावयास ठेविलेला; विकावयाचा.२ केवळ विकावयासाठीं बनविलेला किं०केलेला(म्ह०अशक्त पदार्थ).

विकार [**सं०**] **पु०** १ पदार्थांच्या रूपांत किं० प्रकृतींत झालेला बदल; पालट; बदललेली स्थिति; भिन्नता; उ०दहीं हा दुधाचा विकार;घट हा मृत्तिकेचा विकार; वाफ हा पाण्याचा विकार. २ शरीराच्या सुस्थितींत किं० सुरळितपणांत झालेला बिघाड. ३ मनाच्या नैसर्गिक किं० शांतपणाच्या स्थितींत होते ती चलबिचल; उ० काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे मनाचे सहा विकार होत. ॐ **विकारी वि०** १ कांहीं रोगानें पछाडलेला; रुग्ण. २ शरीरांत विकार उत्पन्न करणारें (पाणी,खाद्य, इ०). ३ ज्याला कांहीं शंका आली आहे किं०ज्यांत कांहीं किल्मिष उत्पन्न झालें आहे असें (मन). ४ बदलणारें; परिवर्तनशील. **पु०** तेहेत्तिसावा संवत्सर.

विकाश [सं०] **पु०** १ प्रसिद्धि. २ फुलाचें उमलणें किं० फुलणें. ३ प्रसार; विस्तार. ४ उल्हास; आनंद. ५ एकान्त.

विकास [सं०] **पु०** १ उमलणें. २ टवटवी. ३ विस्तार; प्रसार. ४ वाढ; वृद्धि; प्रगल्भदशा. ५ बुद्धि,ज्ञान,संपत्ति,अनुभव, इ० ची प्रगति किं० उत्कर्ष किं०प्रगल्भ दशा.

विकासणें [**म०** विकास] **अ० क्रि०** १ प्रफुल्लित होणें. २ विस्तार पावणें. ३ प्रकट होणें. ४ उघडणें.

विकासित [**म०** विकास] **वि०** विकास [पावलेलें.

विकिर [सं० विकिर] **पु०** १ विखुरणें; विखुरलेला चुरा; तुकडे. २ पक्षी. ३ विहीर; डोह. ४ विघ्नशांतीसाठीं फेकलेल्या पांढऱ्या मोहोऱ्या. ५ श्राद्धांत पिंडदानानंतर असोमप देवांना आणि असंस्कृत मृत इ० पितरांना देण्याचें पिंड न केलेलें अन्न. ह्या अर्थी ' विकीर पिंड, ' **पु०**, ' विकीर अन्न ' **न०** हेही शब्द रूढ आहेत.**टीप,**–ह्या पांचही अर्थी मराठींत 'विकीर' हें रूप रूढ आहे. ꙮ **विकीरपिंड पु०** कुरूप पोर.

विकिरणें [**सं०** वि+कृ] **अ० क्रि०** अस्ताव्यस्त पडणें; उधळणें. **स० क्रि०** उधळून टाकणें; फेकून पसरणें; उडवून देणें.

विकिरण, विकीरण [**सं०** विकिरण] **न०** उडविणें, उधळणें, फेकून पसरणें. मराठींत ' विकीरण ' हेंच रूप प्रचलित आहे.

विकिरवत [**सं०** विकिर+वत् (प्रत्यय)] **क्रि० वि०** तुच्छतेनें; तिरस्कार बुद्धीनें; हेटाळणी करून. वर' विकिर 'मध्यें अर्थ ५पहा.

विकीर्ण [**सं०**] **वि०** उधळलेला; उडवून पसरलेला.

विकृत [**सं०**] **वि०** १ बदललेला; पालटलेला. २ बदलल्यामुळें वाईट झालेला; बिघडलेला. ३ रूपांतर झालेला. ४ ज्यांत मुद्दाम बदल केल्यामुळें बिघाड झाला आहे असा. ५ जी मुद्दाम वेडी वाकडी करून सांगितली आहे अशी (हकीगत). ६ रोगी; आजारी.७शरीर किं०गात्र ह्यांत व्यंग असलेला. ८ विलक्षण; अस्वाभाविक. ९ गर्हिवरलेला. **न०** अपकार; नुकसान.

विकृति [**सं०**] **स्त्री०** १ बदल; पालट; रूपांतर. २ क्रोध; क्षोभ. ३ मनोविकार. ४ रोग; आजार. ५ स्वरविशेष.

विकोप [**सं०** वि (विशेष)+कोप (क्षोभ)] **पुं०** १ अतिरेक; जें वाईट तें अधिक वाईट होणें; ज्यास्ती बिघाड झाल्याची स्थिति; उ० त्याच्या अपथ्यामुळें त्याचा आजार विकोपास गेला; उ० त्यांचें भांडण विकोपास गेलें आणि पुढें त्यांची मारामारी जुंपली. २ बाजारांत पदार्थांच्या किमतींत एकदम फार महागाईचे दर होणें. ३ स्नेह, मैत्री, सलगी, इ० मध्यें शिस्तीचें उल्लंघन.

विक्या [**म०** विकणें] **वि०** विकणारा; उ० कोथिंबीरविक्या.

विक्रम [**सं०**] **पु०** १ गति; गमन; जाणें. २ पाऊल टाकणें; ढेंग. ३ चालतांना टाकलेलें पाऊल. ४ जिंकणें. ५ पराक्रम; शौर्य. ६ परमावधीचें सामर्थ्य. ७ एक शककर्ता राजा. ह्याचा शक नर्मदेच्या उत्तरेस चालतो. हा शक इ० स० पूर्वी छपन्न वर्षांपासून सुरू झाला. ह्या शकाच्या वर्षाला कार्तिक शुद्ध प्रतिपदेला सुरवात होते.

विक्रय [**सं०**] **पु०** १ विक्री. २ विक्रीचा दर. ꙮ **विक्रयिक पु०** विकणारा; वाणी. **विक्रयानुशय पु०** विक्री रद्द करणें.

विक्रयी, विक्रेता [**सं०** विक्रयिन्; विक्रेतृ] १ विकणारा. २ दुकानदार.

विक्राळ [**सं०** विकराल] **वि०** भयंकर.

विक्रा पु०, विक्री स्त्री० [**सं०**वि+क्री] १ विकणें; विकत देणें.२कांहीं पदार्थ विकून आलेली किंमत; उ० आज पंधरा रुपयांची माझी विक्री झाली. वर ' विकरा, ' 'विकरी' पहा.

विक्रीत [**सं०**] **वि०** विकलेला; विकत दिलेला. ' विक्रत ' हा ' विक्रीत ' चा अपभ्रंश.

विख [**सं०** विष] **न०** विष.

विखंड न०, विखण स्त्री०, न० [**सं०** विखंड] विळा, खोरें, कुदळ, इ० जातीचें आउत किं० हत्यार.

विखम [**स०** विषम] **वि०** विषम (अंक, १, ३, ५, ७, इ०).

विखरणें, विखुरणें [**सं०** वि+कृ] **स० क्रि०** इकडे तिकडे फेकणें; अस्ताव्यस्तपणें टाकणें.

अ० क्रि० १ (डोईवरचे केश) वाऱ्यानें अस्ताव्यस्त होणें. २ (झाडाचीं फुलें, पानें, इ०) इतस्ततः पसरलेलीं असणें. ३ (घरांतील पदार्थ, चिरगुटें, भांडीं, विद्यार्थ्यांचीं पुस्तकें, इ०) इकडे तिकडे पडलेलीं असणें.

विखरा [म० विखरणें] पु० पदार्थांची अस्ताव्यस्तपणाची स्थिति; गलद.

विखवणी [म० विख (विष)+पाणी)] न० पावसाळ्यांतील अगदीं पहिला पाऊस किं० अशा पावसाचें पाणी. हें पाणी झाडांना अपायकारक असतें म्हणून ह्या पावसानंतर विहिरीचें पाणी शेतकरी झाडांवर घालतात.

विखळणें मागें ' उखळणें ' पहा.

विखार [म० विषार] पु० १ विष. २ विषाचा शरीरावर झालेला परिणाम (होणें). ३ साप. ◊ **विखारा, विखारी** वि० १ विषयुक्त; विषारी. २अपायकारक.

विखारणें [म० विखार] अ० क्रि०१ विषयुक्त होणें. २ अपायकारक होणें. ३ सर्पादिचें विष अंगांत संचरल्यामुळें जर्जर होणें.

विखुरणें वर ' विखरणें ' पहा.

विखोप वर ' विकोप ' पहा.

विख्ख [म० विष] न० विष.अत्यन्त कडूपणा दाखवितांना पुढीलप्रमाणें ह्याचा उपयोग होतो; उ० हें औषध कडू कडू विख्ख आहे.

विख्यात [सं०] वि० प्रख्यात; प्रसिद्धीस आलेला; सर्वांस ठाऊक; कीर्तिमान्.

विख्याति [सं०] वि० प्रसिद्धि; नांवलौकिक; कीर्ति.

विख्यापन [सं०] न० १ जाहीर करणें; प्रसिद्ध करणें. २ स्पष्टीकरण; विवेचन; विवरण.

विगत [सं०] वि० गेलेला; नष्ट झालेला; मृत; विध्वस्त. ◊ **विगतधवा** स्त्री० मृत झाला आहे पति जिचा अशी स्त्री. **वितश्री, विगतश्रीक** वि० नष्ट झाली आहे संपत्ति किं० कांति ज्याची असा.

विगर्हण न०, **विगर्हणा** स्त्री० [सं०] निंदा; [निंदिणें.

विगर्हित [सं०] वि० १ निंदित; निंद्य; निंदिलेलें. २ दुष्ट; नीच. न० निंदा.

विगलित [सं०] वि० गळालेलें; नष्ट झालेलें; लोपलेलें.

विंगळ, विंगळी, विंगा, इ० मागें 'इंगळ,' ' इंगळी,' ' इंगा,' इ० पहा. हे शब्द अशिक्षितांतच रूढ आहेत.

विगान [सं०] न० १ निंदा; अपवाद. २ असंबद्धता; परस्परविरोध; विसंवाद.

विगाह [सं०] पु० १ स्नान. २ पाण्यांत बुडणें. ३ एकाद्या शास्त्र, विषय, इ० मध्यें प्रवेश.

विगीत [सं०] वि० १ प्रख्यात. २ वेदांनीं निंदिलेलें. ३ अनिष्टकारक; अपायकारक. ४ हलकट; नीच; अधम.

विगुण [सं०] वि० १ गुणरहित. २ वाईट; सदोष. ३ निष्फळ; निरर्थक.

विगृहीत [सं०] वि० १ आडविलेला. २ जिंकिलेला. ३ (**व्याकरण**) ज्याचा विग्रह करण्यांत आला असा (समास इ०).

विग्रह [सं०] पु० १ ताणणें. २ शरीर. ३ मूर्ति; आकार. ४ पृथक्करण. ५ पोटभाग. ६ विस्तार. ७ भांडण; तंटा; विरोध; वैर. ८ अवकृपा. पु०,न० लढाई. ◊ **विग्रहवान्** वि० मूर्तिमंत; देहधारी.

विघटणें खालीं 'विघडणें' पहा.

विघटन [सं०] न० विदारण; विध्वंस; मोडणें. मराठींत ' विघाटन ' ह्याच अर्थीं.

विघटिका [सं०] स्त्री० एका घटिकेचा साठावा भाग; एक पळ.

विघटित [सं०] वि० १ दूर केलेलें; वेगळें केलेलें. २ मोडलेलें; छिन्न भिन्न केलेलें; विध्वंसिलेलें.

विघड [सं० वि+घट्ट] पु० १ बेबनाव; विरोध; विभक्तपणाची स्थिति; विजोडपणा. २ यंत्र; संस्था, कुटुंब, इ० मध्यें झालेला कांहीं बिघाड. ३ मित्र, पतिपत्नी, सरकतदार, इ० त फूट (पडणें, पाडणें).

विघडणें, विघटणें, विघाटणें[सं० वि+घट्ट] स० क्रि० १ विध्वंसिणें. २ बिघडविणें; खराब करणे; अव्यवस्थित करणें. अ० क्रि० खराब होणें; नाश पावणें; अव्यवस्थित होणें. ◊ **विघडाविघड**

स्त्री० खराब करणें; संस्था, कुटुंब, इ० मध्यें झालेला बेबनाव किं० फूट.

विघरणें अ० क्रि० (तूप, गूळ, मीठ, साखर, कथील, इ० चें) अग्नि, पाणी, इ० च्या संयोगानें पातळ होणें.

विघाटणें वर ' विघडणें ' पहा.

विघात [सं०] पु० १ नाश. २ निवारण. ३ वध. ४ विघ्न: अडथळा; हरकत. ५ प्रहार; आघात; तडाखा. ६ निराकरण; निषेध.

विघातक [सं०] वि० नाशकारक; अपायकारक.

विघुरणें वर ' विघरणें ' पहा.

विघ्न [सं०] न० अडथळा; हरकत; कांहीं कामांत कुंठितपणा उत्पन्न करणारी कांहीं गोष्ट. ※ **विघ्ननाशन, विघ्नेश, विघ्ननायक, विघ्नराज, विघ्नहर** पु० गणपति हा देव. **विघ्नकर्ता** पु० कामांत हरकत किं० अडथळा आणणारा. **विघ्नसंतोषी** वि० १ दुसऱ्याच्या कामांत हरकत आणून जो आनंद पावतो तो. २ असंतोषी.

विघ्नित [सं०] वि० अडविलेलें; कुंठित.

विंच स्त्री० जमीन, तुळई, इ० तील फट, चीर, किं० भेग.

विचकट [सं० विकट] वि० १ बीभत्स (भाषण).२ बीभत्स भाषण करण्याच्या स्वभावाचा. मागें ' अचकट ' पहा.

विचकटणें, विचकडणें [म० ' विचकणें ' चें एक रूप] स० क्रि० (पदार्थाचें) सांधे उखळणें; (पदार्थ) उकलणें; (जखम, भोक, इ०) ताणून मोठें करणें.२ (पदार्थांत) डिवचाडिवच किं० चिवडाचिवड करणें.

विचकणें स० क्रि० [सं० वि+कुच् (संयोग पावणें)] स० क्रि० १ (तोंड) उघडणें किं० वासणें (निंदेंत).२ (जखम) दांडग्या हातानें ताणणें. ३ (कोणेकाचीं रहस्यें किं० दुष्कर्में) प्रकटिणें किं० चवाठ्यावर आणणें. ४ जें बिघडलेलें आहे तें ज्यास्त बिघडविणें. अ० क्रि० १ उघडलें जाणें; (पदार्थांत) फट पडणें; फाटणें. २ (जखम, तोंड) पसरणें. ३ (बेत, संकल्प) ढासळणें किं० बिघडणें. ※ **कोणेकापुढें तोंड (किं०दांत, बत्तीशी,किं०जबडा) विचकणें** १ त्याला वेडावून दाखविणें. २ त्याची हीनदीनपणें किं० नामुष्कीनें किं० अपमान पथकरून प्रार्थना करणें. **केश विचकणें** केश अस्ताव्यस्त होणें किं० करणें. **त्याचें विचकलें** १ त्याच्या कामांत किं० योजनेंत बिघाड झाला. २ त्याचा सर्वतोपरीं नाश झाला; तो धुळीस मिळाला.

विचका, विचकोपा [म० विचकणें] पु० नाश; बिघाड; डिवचाडिवच;दुर्दशा; अव्यवस्था.

विचका पु० १ एक वेल. २ गोफण.

विचकुरणें, विचखुरणें स० क्रि० १ नखें, खिळा, इ० नीं (अंग, त्वचा, किं० पृष्ठभाग) खरडणें किं० त्यांच्यावर ओरखडे काढणें. २ चिमटींत (त्वचा) धरून पिळवटणें किं० चेपणें.

विचकुरा, विचकोरा,विचखुरा, विचखोरा [म०विचकुरणें,विचखुरणें]पु०नखें इ०नीं जोरानें त्वचा इ० वर रेघा ओढणें किं० रेघा ओढून पडलेलें चिन्हें प्रत्येक.

विचकोपा मागें ' विचका,विचकोपा ' पहा.

विंचडा [म० विंचू] पु० १ विंचू (तुच्छतेंत). २ मोठा विंचू.

विंचणी [म० विंचू]स्त्री०धातूच्या भांड्याला पडलेलें बारीक भोक,–जें विंचवानें नांगी मारल्यामुळें पडतें असें समजतात.

विंचरणी [म० विंचरणें] स्त्री० १ विंचरण्याची क्रिया. २ फणी.

विंचरणें स० क्रि० फणीनें (केश)एकमेकांपासून सोडवून मोकळे करणें. **टीप**,–'डोकें ' वर सुद्धां कर्मता येऊं शकते.

विचरणें [सं० वि+चर्], अ० क्रि० भटकणें; स्वच्छंदानें हिंडणें.

विंचली [म० विंचू] स्त्री० १ विंचवाची मादी. ह्या अर्थी 'विंचवीण' सुद्धां. २ इसप,–एक त्वचेचा रोग. [मध्यें पहा.

विंचवाचें पेव, विंचाचें पेव न० पुढें 'विंचू'

विचक्षण [सं०] वि० १ निपुण; कुशल. २ विद्वान्. ३ दूरदर्शी. ४ बारकाईनें पदार्थ, शास्त्र, इ० चा विचार करणारा.

विचक्षणा [सं०] स्त्री० १ बारकानें पदार्थाची केलेली तपासणी. २ सर्व दृष्टींनीं किं० सर्व

बाजूनीं विषयाची परिक्षा. ३ वावटपणानें काढलेले तर्क किं० कुतर्क.

विचार [**सं०**] **पु०** १ मनाचा किं० बुद्धीचा व्यापार. २ चर्चा; खल; विवरण. ३ चौकशी; तपास. ४ चिंतन; मनन. ५साधकबाधक गोष्टींची चिकित्सा करून ठरविलेला सिद्धान्त किं० निर्णय. ६ विवेक; युक्तायुक्त विचार. ७ संशय. ८ दूरदर्शीपणा. ९ पंचाईत; पेच. ॐ **सारासार विचार पु०** १ अडचणीच्या प्रसंगीं दोन्ही बाजूंचा विचार करून नंतर सोयीचा मार्ग ठरविणें.२ग्राह्य आणि अग्राह्य ह्यांचा विवेक करणें. ३ कोणच्या समयीं काय करावें ह्याचा विचार. **सदसद्विचार पु०** चांगलें काय आणि वाईट काय हें ठरविणें (आणि चांगलें जें तें स्वीकारणें). **विचारस्वातंत्र्य न०** मनांतील विचार स्पष्टपणें जाहीर करण्याची परवानगी किं०मोकळीक. **विचारविनिमय पु०** एकमेकांनीं एकमेकांस आप आपले विचार कळविणें; संभाषण. **कांहा गोष्ट विचारांत घेणें** तिच्याबद्दल विचार करणें; तिला योग्य महत्त्व देणें; तिच्याकडे दुर्लक्ष्य न करणें. **विचारगम्य वि०** विचार केला असतां समजेल असें. **विचारवान्, विचारी, विचारवंत पु०** १ विचार करणारा. २विचार केल्याशिवाय कांहीं न करणारा.

विचारक [**सं०**] **पु०** १ पंच. २ तपासनीस; परिक्षक. ३ चौकस माणूस.

विचारण न० ,**विचारणा स्त्री०**[**सं०**]१विचार करणें. २ चौकशी; तपास. **विचारणा स्त्री०** अडचण; पंचाईत (येणें, येऊन पडणें).

विचारणीय, विचार्य [**सं०**] **वि०**१ विचारांत घेण्यास योग्य; जिच्याबद्दल विचार केला पाहिजे अशी (बाबत). ३ ज्याबद्दल कांहीं शंका आहे किं० निश्चय करणें कठिण आहे असें.

विचारणें [**सं०** वि०+चर्=शंका काढणें] **स० क्रि०** १ कोणेकाला (कांहीं गोष्टसिंबंधानें) पुसणें किं० त्याचें(मत) पुसणें. २ मानाला, आदराला, किं० प्रेमाला योग्य किं० लायक समजणें; महत्त्वाचा समजणें; उ० जेथें हापूसचे आंबे विपुल मिळतात तेथें ह्या रायवळ आंब्यांना कोण विचारणार ? उ० गुलामगिरीला आनंदानें कवटाळणाऱ्या राष्ट्राला कोणी विचारीत नाहीं. ३ (कोणेकाची) कांहीं बाबतींत सल्ला घेणें; उ०मी खादीचे कपडे वापरूं लागूं काय असें वडिलांना विचारलें. ४ कोणेकाला (कांहीं अडचणींत) मार्ग दाखवा, युक्ति सांगा, शंका निरसा,अशी विंनती करणें; उ० मी पंतोजीला हें उदाहरण विचारलें. ५ (कोणेकाचा) समाचार घेणें; (कोणेकाची) सुस्थितीसंबंधानें प्रेमपूर्वक चौकशी करणें; उ०मी त्याला विचारलेंआहे असें त्याला सांगा.**अ०क्रि०** चिंतिणें; मनन करणें; कांहीं गोष्ट किं० बेत ठरविणें. ॐ **विचारपूस स्त्री० ए० व०** कोणेकासंबंधानें केलेली चौकशी किं० तपास.

विचारित [**सं०**] **वि०** विचारांत घेतलेली (कांहीं बाबत); जिच्याबद्दल कांहीं निर्णय ठरविण्यांत आला आहे अशी (कांहीं गोष्ट).

विचार्य [**सं०**] **वि०** विचारांत घ्यावयास योग्य. वर ' विचारणीय ' पहा.

विचिकित्सा [**सं०**] **स्त्री०** १ संशय; अनिश्चितपणा. २ वाटाघाट;भवति न भवति.३साधकबाधक गोष्टी विचारांत घेणें. ४ तत्त्वनिर्णय.

विचित्र [**सं०**] **वि०** १ अनेक रंगांचें. २ विविध प्रकारचा; नाना तऱ्हांचा. ३ आश्चर्यकारक. ४ विलक्षण; सामान्य सरणीला सोडून असलेला; छांदिष्टपणाचा.

विंचीण [**म०** विंचू] **स्त्री०** १ विंचवाच्या जातींतील मादी. २ इसब हा त्वचेचा रोग.

विचुका, विचूक वि० भ्रांतिष्ट; असंबद्ध; भलतेंसलतें; बेताल (भाषण). **क्रि० वि०** असंबद्धपणें; भरमसाटपणानें.

विंचुरणी [**म०** विंचुरणें] **स्त्री०** १ फणी. २ फणीनें केश मोकळे करणें.

विंचुरणें स० क्रि०मागें' विंचरणें'**स०क्रि०**पहा.

विंचू [**सं०** वृश्चिक] **पु०** १ एक क्षुद्र प्राणी,–याला नांगी असून तींत विष असतें. २ कृत्तिका लक्षत्र,–ज्यांत सहा तारे असून त्यांची मांडणी विंचवाच्या आकाराची असते.३ पलंग, बाज, इ० दोरीनें विणते समयीं त्या दोरीचे पदर सरूं नयेत म्हणून अडकणासाठीं जो एक दोन गांठी देऊन वीत दीड वीत दोरीचा तुकडा घेतात तो. ॐ **विंचवाचें पेव,विंचाचें पेव न०**१जेथें विंचू पुष्कळ

राहातात असें भोक.२दुष्ट माणसांचा दुष्ट बेत किं० मसलती करण्याचा आड्डा. **विंचवीं, विंचवीण स्त्री०** विंचवाची मादी. **सांबाच्या पिंडीवरचा विंचू पु०** जोड्याचें सडकून काढला जाण्याची ज्याची लायकी आहे, पण ज्याला मोठ्याचा आश्रय मिळालेला असल्यामुळें हें सडकून काढणें शक्य नाहीं, असा नीच,अधम,किं०पाजी माणूस.

विचूक वि० भरमसाट, असंबद्ध (भाषण). **क्रि० वि०** असंबद्धपणें; छांदिष्टपणें (बोलणें).

विच्छिन्न [**सं०**] **वि०** फुटलेलें; तुटलेलें; मोडलेलें. २ भंगलेली (मूर्ति, आकृति, इ०). ३ मोडलेला (नियम, व्रत, इ०). ४ बंद पडलेलें (वतन, वर्षासन). ॐ **छिन्नविच्छिन्न वि०**पूर्णपणें मोडलेलें, भंगलेलें, विध्वंसिलेलें; उ० रणांगणावर लक्षावधि सैनिक छिन्नविच्छिन्न स्थितींत पडलेले होते.

विच्छेद [**सं०**] **पु०** १ कापणें; मोडणें. २ ताटातूट; वियोग. ३ लोप. ४ निषेध; अडथळा. ५भेद; प्रकार.६ग्रंथाचा भाग.७संतति नसल्यामुळें कुटुंब किं०वंश किं०वतन इ०चा लोप किं०नाश.

विंजणा, विंझणा, विंजना [**सं०** व्यंजन= वारा] **पु०** १ पंखा. २ पंख्यानें घेतलेला किं० घातलेला वारा. ' विंझणवारा, ' 'विंझुणवारा,, ' विंजणवारा, ' 'विंजुणवारा ' **पु०** ह्याच अर्थी.

विजन [**सं०**] **वि०** १ जनरहित; ओसाड; निर्जन. २ गुप्त; अंतस्थ. **न०** एकान्त; रहस्याची जागा; एकान्ताचें स्थान.

विजमायली मागें ' इजमायली ' पहा.

विजय [**सं०**] **पु०** १ मोड किं० पराभव. २ जिंकणें; जय. ३ अर्जुनाचें एक नांव. ४ (**ज्योतिष**) एक मुहूर्तविशेष. ५ सत्ताविसावा संवत्सर. ६ श्रीविष्णूचा एक द्वारपाल,–ज्याची मूर्ति देवाजवळ किं० देवद्वारीं स्थापितात. ॐ **विजया स्त्री०**१ पार्वती.२ पार्वतीची एक सखी. ३ **भांग**, नळि, दूर्वा, शमी, इ० वनस्पती. ४ पिण्यासाठीं तयार केलेली भांग. ५ महिन्याची तृतीया, अष्टमी, आणि त्रयोदशी, ह्या तिथि प्रत्येक. ६ आश्विन शुक्ल दशमी हीं तिथि. हिलाच ' विजयादशमी' म्हणतात. ह्या दसरा ह्या सणाचा दिवस.**विजयादशमी स्त्री०** आश्विन शुक्ल दशमी ही तिथि; दसरा. ह्या दिवशीं सीमोल्लंघन हा सार्वजनिक विधि करतात. **विजयाभिनंदन पु०** पुढें ह्या नांवाचा एक शककर्ता होणार आहे तो. **विजयी वि०** ज्याला जय मिळाला आहे असा.

विजवटा [**म०** वांज+**सं०** वत् (सारखा)] **वि०** खोडकर, मोडतोड करण्याच्या स्वभावाचा (पोरगा, माणूस).

विजवरा पु० कपाळावर घालावयाचा एक दागिना. ह्यालाच ' विजवरा, ' ' बिजोरा ' अशीं अन्य नांवें आहेत. मागें ' बिजवरा ' पहा.

विजळणें अ० क्रि० १(दूध) नासून चोथापाणी होणें. २ (आंबा इ० फळ) सडणें.

विजात [**सं०**] **वि०** १ संकरापासून उत्पन्न झालेला. २ (**मराठींत**) वेगळा; भिन्न; वेगळ्या जातीचा. ३ (**मराठींत**) द्वाड; खोडकर.

विजाति [**सं०**] **स्त्री०** भिन्न जाति. **वि०** विचित्र; छांदिष्ट; तऱ्हेवाईक.

विजातीय [**सं०**] **वि०** १ भिन्न जातीचा. २ विविध प्रकारचा. ३ (**मराठींत**) छांदिष्ट; तऱ्हेवाईक; विलक्षण. ४ (**मराठींत**) लोकोत्तर (कृति, माणूस, सामर्थ्य, कौशल्य, इ०).

विजायली [**अ०**] **वि०** सागवानाहून इतर लाकडाचा केलेला (पाट, चवरंग, इ० पदार्थ). मागें ' इजायली ' पहा.

विजार, विजारा मागें ' इजार, ' ' इजारा ' पहा.

विजिगीषु [**सं०**] **पु०** १ योद्धा. २ वैरी.

विजित [**सं०**] **वि०** १ जिंकिलेला; पराभविलेला. २ जुगारींत मिळविलेला (पैसा).**विजित जाणें** १ हार जाणें. २ आपण पराभव पावलों असें कबूल करणें;उ०मी कोणाला विजित जाणारा मनुष्य नाहीं.

विजू [**म०** वीज; **सं०** विद्युत्] **स्त्री०**१वीज.

विजोगत [**सं०** वियुक्त] **स्त्री०** दुर्दैवाची कांहीं गोष्ट. २ विघ्न; अडथळा. ३ कुंठितपणाची स्थिति (येणें, पडणें).

विजोड [**म०** वि (वेगळा)+जोड (जोडीदार)]**वि०**जोडीनें वापरावयाच्या दोन पदार्थांपैकीं

एक जर भिन्न जातीचा असला तर तो पदार्थ विजोड (बुगड्या, कुडीं, पायमोचे, जोडे, इ० संबंधानें वोलतांना).

विझण [**म०** विझणें] **न०** १ नाश; नासाडी. २ दिवा इ० चीं विझलेपणाची स्थिति. ॐ**विझण घालणें** मालविणें; विझविणें. **विझण पडणें** मालविला जाणें; विझणें.

विंझणवारा, विझणा मागें ' विंजणवारा, ' ' विंजणा ' पहा.

विझणें अ० क्रि० १ (पेटलेला अग्नि, जाळ, मशाल, दिवा, इ०) मालवणें, शांत होणें, किं० नष्ट होणें. २ (वाद, तंटा, भांडण, इ०) संपणें किं० मिटणें.

विझविणें [**म०** ' विझणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ मालविणें; शांत करणें. २ (भांडण, तंटा) मिटविणें किं० संपाविणें. [पंखा.

विंझणा, विझणा, विंझुणा[**सं०** व्यजन] **पु०**

विंझुणवारा मागें ' विंझणवारा ' पहा.

विट [**सं०**] **पु०** १ कामुक; जार. २ वेश्येचा आश्रित; ढवा. ३ युवराजाचा विलासी सखा. ४ ठक; धूर्त.

विटकणी स्त्री० टवाळकी; चेष्टा(दाखविणें).

विटकर [**म०** विटणें] **वि०** १ लवकर विटणारा (रंग, रंगित वस्त्र). २ विटलेलें (वस्त्र, रंग, इ०).

विटकर [**म०** वीट] **स्त्री०** १ विटांचा चुरा किं० धूळ. २ विटेचा तुकडा.

विटकरी [**म०** वीट] **वि०** विटेच्या रंगाचा (कपडा, इ०).

विटका [**म०** विटणें] **वि०** १ विटलेला; फिक्का पडलेला; मळलेला (रंग, वस्त्र, इ०). २ लवकर विटणारा (रंग, वस्त्र, इ०). ३ खिन्न, निर्विण्ण, उदास, प्रेमरहित झालेलें (मन).

विटकुली स्त्री० लहान विडी,—काठी इ०च्या टोकाला बसवितात ती.

विटकूर [**म०** वीट] **न०,स्त्री०** १ विटेचा तुकडा. २ विटांची धूळ.

विटणें अ० क्रि० १ (रंग, तजेला) फिक्का किं० कमी होणें. २ (वस्त्र) फिकें किं० मलिन होणें. ३ (पदार्थाची) टवटवी किं० तजेला नष्ट होणें. ४ (फूल, झाड) कोमेजणें किं० सुकणें. ५ (मन) कंटाळणें किं० प्रेमरहित होणें; (मनाला) कांहीं पदार्थाची किळस किं० चीड किं० शिसारी येणें. ६ (खाद्य पदार्थ) शिळेपणामुळें आंबणें.

विटप [**सं०**] **पु०** १ शाखा; फांदी. २ झाडाचा नवा अंकुर किं० पल्लव. ३ लता; वेली.

ॐ **विटपी** [**सं०** विटपिन्] **पु०** १ वृक्ष; झाड. २ वडाचें झाड.

विटंबणें,विटंबिणें[**सं०** वि+डंब्] **स० क्रि०** (कोणेकाला) वेडावून दाखविणें किं० त्याची टवाळकी करणें किं० त्याचें अनुकरण करणें.

विटंबन न०, विटंबना स्त्री० [**सं०** विडंबन, विडंबना] १ अनुकरण. २ वेडावणें. ३ टवाळकी; उपहास; फजीती उडविणें.

विटवणी [**म०** विटणें+पाणी] **न०** पावसाचें फाजील पाणी (बागेंतील झाडांना अपायकारक ह्या दृष्टीनें). हें पाणी माळी लोक विहिरीच्या पाण्यानें वाहवून किं० धुपवून टाकतात. **क्रि०** मोडणें, काढणें.

विटा पु० भाल्यासारखें एक शस्त्र.मागें 'इटा' पहा.

विटाळ पु० १ भोजन, पूजा, इ० कर्म करण्यास आलेला प्रत्यवाय किं० अडथळा. हा कुत्रा, गाढव, प्रेत, इ०चा स्पर्श झाल्यानें येतो.२स्त्रीचा मासिक रजःस्राव. अशा रजःस्रावाच्या स्थितींतील स्त्रीस' विटाळशी ' म्हणतात.३(**लाक्षणिक**) यत्किंचित् सुद्धां अंश; अत्यल्प प्रमाण; गंध देखील (अकरणरूपी प्रयोग);उ०त्याला सारासार विचाराचा विटाळ नाहीं(म्ह०त्याच्या ठायीं सारासार विचार मुळींच नाहीं).४(**लाक्षणिक**) त्याज्य वस्तु; जवळ न येऊं देण्याची वस्तु;टाळावयाची वस्तु; उ० मला पैशाचा विटाळ आहे (म्ह० मजजवळ मुळींच पैसा नाहीं). **टीप,**– अर्थ३आणि४हेःरागांत.आणि वैतागांत योजतात.ॐ **विटाळ कालविणें** संसर्गानें सुतक इ०चा विटाळ इतर माणसांत किं०पदार्थांत पसरणें.**त्या मुलीला हळकुंडाचा विटाळ झाला** तिच्या लग्नाचा विधि मात्र झाला (पण ती खरोखरीं कुमारीच आहे). लग्न होतांच जिचा पति मेला तिच्या संबंधानें अनुकंपेनें हा उद्गार काढला जातो

विटाळचंडाळ पु० ए० व० हरएक प्रकारचा विटाळ; विटाळविटाळ.

विटाळणें [म० विटाळ] अ० क्रि० विटाळ झाल्यामुळें (वस्त्र, अन्न, पाणी, इ०) अपवित्र होणें. स० क्रि० स्पर्श करून (माणूस, वस्त्र, पाणी, इ०) अपवित्र किं० अमंगळ करणें.

विटाळशी [म० विटाळ] स्त्री० मासिक रजःस्रावामुळें अपवित्र किं० अस्पृश्य झालेली स्त्री. ❀ **विटाळशी चंडाळशी** स्त्री० कोणत्याही कारणानें अपवित्र किं० अमंगळ किं० अस्पृश्य झालेली स्त्री.

विटाळें, विटी, विटेकरी इ० मागें 'इटाळें,' 'इटी,' 'इटेकरी,' इ० पहा.

विट्ट [म० विटणें] पु० १ वेआवरू; फजीती; वोऱ्या. २ पदार्थांची खंती, कंटाळा, किं० शिसारी.

विठाई, विठाबाई स्त्री० विठोबा हा देव (प्रेमांत). **विठोबा, विठो, विठू** पु० पंढरपुरचा किं० इतर ठिकाणचा विठ्ठल हा देव.

विठू बोका पु० नर मांजराचें लाडकें नांव.

विठ्ठल पु० हिंदूंचा एक देव. ह्याचें प्रसिद्ध स्थान पंढरपूर. येथें दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशींस मोठ्या यात्रा जमतात. ❀ **विठ्ठलपंती तांब्या** पु० आकारविशेषाचा तांब्या किं० गडवा. **विठ्ठल सवाशिण, विठ्ठलसवाष्ण** स्त्री० विधवा (वात्रटपणांत).

विडकुली [म० विडा] स्त्री० लहान विडा,—मुलांना खावयाला देतांना.

विडंबन न०, **विडंबना** स्त्री० मागें 'विटंबन,' 'विटंबना' पहा.

विडंबित मागें 'विटंबित' पहा.

विडवर [म० वीट] न० दुर्दशा; नासाडी. वि० नासलेला; घाण झालेला; हिडिस्स; ओंगळ.

विडा [सं० वीटिका] पु० नागवेलीच्या पानाला चुना लावून त्यांत सुपारी, कात, इ० द्रव्यें घालून मुखशुद्धीसाठीं खावयाला त्या पानाची आकारविशेषाची घडी करतात ती. ❀ **एकाद्या कामाचा विडा उचलणें** तें करण्याची प्रतिज्ञा भोगणें. **पैजेचा विडा उचलणें** एकादें दुर्घट कार्य करावयाचें असतां मंडळींचा जमाव करून त्यांच्यापुढें तबकांत एक विडा मांडावयाची पूर्वी चाल असे. जो कोणी तें कार्य करावयास सिद्ध असेल त्याणें तो विडा उचलावा आणि अमुक बक्षीस मिळवावें असें त्या वेळीं सांगण्यांत येत असे. जो कोणी मनुष्य तें कार्य करावयास सिद्ध असेल तो तो विडा उचली. त्याच्या हातून तें कार्य तडीस गेलें तर त्याला पूर्वी जाहीर करण्यांत आलेलें बक्षीस दिलें जात असे. **कोणेकाला कांहीं कामाचा विडा देणें** त्याच्याकडे तें काम सोपवून त्याला विडा देऊन त्याला तें काम करावयास सांगणें. **कोणेकाला विडा देणें** त्याला हाकलून देणें. मेजवानीचें जेवण झाल्यावर विडे देतात आणि जमलेली मंडळी घरोघर जातात या परिपाठावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे.

विडाल, विडालक [सं०] पु० मांजर.

विडी [सं० वीटि; हिं० बीडी] स्त्री० १ पेटवून ओढावयाची तंबाखू इ० ची टेंभुरणी इ० च्या पानाची केलेली सुरळी किं० गुंडाळी. २ लहान विडा,—नागवेलीच्या पानाचा. ३ लग्नांत नवरा मुलगा आणि नवरी मुलगी हीं एकमेकांनीं तोंडांत धरलेली विड्याच्या पानाची गुंडाळी दांतांनीं तोडतात ती. ४ मुसळ, जांत्याचा खुंटा, पटाशी, इ० च्या टोकास बसवितात तें लोखंडाचें वळें किं० ती शेंबी. ५ कोणत्याही कामीं योजावयाचें कडें.

विडुळणें, विडोळणें [म० विडूळ] अ० क्रि० १ (फळ) नासून किं० सडून बिलबिलीत होणें. २ (दहीं, दूध, भाजी, इ०) नासणें किं० आंबणें.

विडूळ, विडोळ वि० १ शिळेपणा, नासणें, कुजणें, आंबणें, इ० कारणामुळें बेचव झालेलें (पाणी, खाद्य, फळ, इ०). २ निस्तेज, फिका, (चेहरा, रंग, इ०). ३ नीरस, पाणचट (भाषण). ४ ओंगळ, हिडिस्स, अमंगळ, निंद्य (कृत्य).

विडोळ, विढूळ, विढोळ, विढोळणें वर 'विडूळ,' 'विडुळणें' पहा.

विणकर [म० विणणें] स्त्री० वस्त्र विणण्याची तऱ्हा (ठाशींव किं० विरळ ह्या दृष्टीनें). ❀ **विणकरी** पु० वस्त्रें विणणारा; कोष्टी.

विणची वेळ स्त्री० ऐन संध्याकाळचा समय. (लहान मुलांना ह्या वेळीं घराच्या बाहेर नेलें असतां त्यांना दृष्ट लागते किं० पिशाचबाधा होते ह्या संबंधानें बोलतांना).

विणणावळ, विणाई [म० विणणें] स्त्री०

१ वस्त्र, बाज, पलंग, इ० विणण्याबद्दलची मजुरी. २ वस्त्र, बाज, पलंग, इ० विणण्याची तऱ्हा किं० थाटणी.

विणणें [**सं०** व्ये=विणणें] **स० क्रि०** १ मागावर लांब तंतु ताणून घालून त्यांतून विशिष्ट प्रकारें धोट्यानें आडवे तंतु भरून (वस्त्रादि) निर्मिणें. २ वांबूच्या किं० शिंदी इ० च्या पाती एकमेकांत विशेष प्रकारें गुंतवून (चटई, तट्टया, इ०) निर्मिणें. ३ सुतें, रेशमाचें धागे, इ० एकमेकांत विशेष प्रकारें गुंतवून (गोफ, जाळें, इ०) निर्मिणें. वरील तीन्ही अर्थी सुतें, तंतु,पाती, इ० कांकडेही कर्मता येऊं शकते. ४ सुंभ, नवार, इ० चे पट्टे (बाज, पलंग, माचा, इ० च्या) चौकटीभोंवतीं विशेष प्रकारें गुंतवून बसावयाच्या किं० निजावयाच्या उपयोगासाठीं सिद्ध करणें.

विणती [**सं०** विनति=प्रार्थना] **स्त्री०** १ कांहीं प्रश्न देवाला विचारून त्याच्या मूर्तीला चिकटावितात ते तांदूळ, फूल, सुपारी, दगडाची गोटी, इ० (लावणें, ठेवणें). २ अशा प्रश्नाला देवानें विशेष प्रकारें सुपारी, तांदूळ, गोटी, इ० पाडवून दिलेलें उत्तर (देणें).

विणवणें [**सं०** वेदना; **म०** वेणा] **अ० क्रि०** आजार, शारीरिक वेदना, चिंता, इ० मुळें (कोणेकानें) कण्हणें.

विणा पुढें ' वीणा ' पहा.

विणा पुढें ' विना ' पहा.

विणाई मागें ' विणणावळ ' पहा.

विणी पुढें ' वेणी ' पहा.

विणें [**सं०** वी=गर्भधारणा करणें; उत्पन्न होणें] **स० क्रि०** १ गाय, म्हैस, शेळी, इ० नीं (अपत्याला) जन्म देणें. २ (कवितेंत किं० निंदेंत) मानवी स्त्रीनें (अपत्याला)जन्म देणें.३ उत्पन्न करणें (सामान्यतः). **अ० क्रि०** १ गाय, म्हैस, शेळी, इ० नीं अपत्याला जन्म देणें. २ केळ, चवई, इ० नीं केळीं इ० चा लोंगर उत्पन्न करणें; पसवणें.❀**व्यालीची वेदना व्यालीच जाणें** ज्याणें एकादें दुःख स्वता सोसलेलें असतें त्यालाच तें दुःख किती तीव्र असतें ह्याची कल्पना करतां येते, इतरांस येत नाहीं. **व्याली आणि चाटावयास विसरली** १ तिणें मुलाला जन्म दिला पण तिणें मुलाच्या मनांत नीतितत्त्वें बिंबविण्याची काळजी घेतली नाहीं. २ त्याणें काम सुरू केलें पण अर्धवटच टाकून दिलें.

विणें [**सं०** विना] **श० यो० अ०** शिवाय; खेरीज.

वितकळणें अ० क्रि० (दूध, दहीं, खीर, इ०) नासणें किं० त्यांना चोथापाण्याचें रूप प्राप्त होणें.

वितंडा [**सं०** वितण्डा] **स्त्री०** १ खोटा वादविवाद; पोरकट कोटी; श्लेष काढून किं० शब्दच्छल करून वात्रटपणें स्वपक्ष स्थापणें किं० प्रतिपक्ष हाणून पाडणें. २ चर्चा; वादविवाद. ❀ **वितंडवाद** [**सं०** वितंडावाद] **पु०** वात्रटपणाचा कोटिक्रम; आपला पक्ष खोटा आहे आणि प्रतिपक्ष खरा आहे असें जाणत असून जो कोणी मनुष्य वाद करतो तो वाद. [पहा.

वितणें अ० क्रि० वितुळणें. पुढें ' वितुळणें '

वितत [**सं०**] **वि०** १ विशाल; मोठें. २ लांब; दीर्घ. ३ दूर असलेलें. ४ ताणलेलें. ५ लांबवर पसरलेलें. **न०** १ पसारा; विस्तार. २ तंतुवाद्य.

वितंत म० [वि+तंत (तंतु)] **वि०** सुसंगत; सुरळीत; व्यवस्थित; नीटनेटकें. **क्रि० वि०**अगदीं पूर्णपणें किं०तंतोतंत रीतीनें.मागें'तंत' **वि०** पहा.

वितथ [**स०**] **वि०** १ असत्य; निष्फळ. २ न निस्तरलेली (प्रतिज्ञा, भाक, वचन, इ०).

वितरण [**स०**] **न०** १ तरून जाणें. २ देणगी; दान. ३ त्याग; सोडून देणें.

वितर्क [**स०**] **पु०** १ अनुमान; तर्क; अंदाज. २ कल्पना. ३ खोटी किं० विपरीत कल्पना. ४ संशय; शंका. ५ विचार; चर्चा. ६ ब्रह्मज्ञानाचा उपदेष्टा. ❀ **तर्कवितर्क पु० अ० व०** एकाद्या गोष्टीसंबंधानें अनेक प्रकारचे केलेले तर्क किं० केलेलीं अनुमानें.

वितल [**स०**] **न०** सात पातालांपैकीं दुसरें.

वितवितणें अ० क्रि० चरफडणें; पिरपिरणें; कोणेकाच्या अंगावर ओरडणें.

वितवितलें क्रि० वि० १ अजागळपणानें किं० अव्यवस्थितपणें (कांहीं काम करणें). २

चोखंदळेपणानें (खाणें, जेवणें). **टीप**,–लिंगवचनांप्रमाणे फिरणारें हें **क्रि० वि०** आहे.

वितस्ति [**सं०**] **पु०, स्त्री०** हाताची वीत किं० वीत हें अंतर; पंजाचा अंगठा आणि करंगळी ताणून होतो तो आकार किं० तें अंतर.

वितळणें, वितुळणें [**सं०** वि+द्रु] **अ० क्रि०** १ अग्निसंयोगानें (सोनें, चांदी, लोखंड, रातांबेल, इ०) पातळ होणें. २ साखर, मीठ, इ० पाणी, दूध, इ० मध्यें विरघळणें. ह्या अर्थी 'वितळणें,' 'वितुळणें' ह्यांचा उपयोग चुकीचा होय. ३ (रंग, ताकद, अवसान, इ०) मज्जित होणें किं० गळून जाणें किं० लोपणें. ३ (ढग, लोक, सैन्य, इ० ची)पांगापांग होणें.४(मगरूरी, केलेला निश्चय,प्रयत्न,इ०)जिरणें किं०लोपणें किं० विफल होणें. ६ दयेनें आर्द्र होणें; कळवळणें.

वितान [**सं०**] **पु०, न०** १ विस्तार. २ समुदाय; पटल. ३ घर, मांडव, इ० चें छत; चांदवा.

वितिपात पुढें 'व्यतिपात' पहा.

विती गाभती [**म०** विणें+गाभणें]**वि०स्त्री०** गाभण होणें, विणें, इ० क्रिया योग्य क्रमानें किं० सरणीनें जिच्या चालल्या आहेत अशी (गाय, म्हैस, इ०).

वितुष्ट [**सं०**] **वि०** नाखूष झालेला;असंतुष्ट. **न०** वैमनस्य; बेबनाव (येणें, पडणें).

वितुळणें वर ' वितळणें ' पहा.

वित्त [**सं०**] **न०** द्रव्य. **वि०** ज्ञात; जाणलेलें. ❀ **वित्तपति, वित्तपाल, वित्तप पु०** कुबेर. **वित्तपिसा वि०** द्रव्याचा अनिवार लोभ ज्याला झाला आहे असा.**वित्तपिसें न०** द्रव्याचा अनिवार लोभ. **वित्तविषय पु०** द्रव्य. घर, शेतें, गुरें, इ० रूप ऐहिक संपत्ति. **वित्तशाठ्य न०** १ जवळ द्रव्य असून दानधर्म इ० न करणें. २ चिक्कूपणा; कंजूषपणा. **वित्तेषणा स्त्री०** आपणाजवळ द्रव्य असावें, आपणाला द्रव्य मिळावें, अशी इच्छा; द्रव्यलोभ.

वित्पत्ति, वित्पन्न ' व्युत्पत्ति, ' ' व्युत्पन्न ' ह्यांचे अपभ्रंश.

वित्रस्त [**सं०**] **वि०** त्यालेला; घाबरलेला.

वित्रास [**सं०**] **पु०** भीति; दहशत.

विथर [**हिं०** बिथरना] **पु०** १ (काम, व्यापार, संसार, धंदा, इ० चा) विसकळीतपणा (होणें). **२** बिघाड; अव्यवस्थितपणा. **वि०** १ लंबरेषेंत नसलेले (खांब, भिंत, वांध, इ०). २ भिन्न जातींच्या किं० रंगांच्या तुकड्यांनीं शिवलेला (कपडा) किं० केलेला (देव्हारा, चवरंग, झोपाळा, इ० पदार्थ). ३ विसंवादी; न जुगणारें; विरोधी; असंबद्ध (भाषण, वर्तन, इ०).

विथरणें [**हिं०** बिथरना] **अ० क्रि०** अनियंत्रित होणें; दाब किं० नियंत्रणा झुगारून देणें; सन्मार्ग सोडून असन्मार्गास लागणें; चळणें.

विथानक,विथानीक [**सं०** व्यथा] **वि०**१ उपद्रवकारक, द्वाड (पोर, माणूस, पशु). २ दुःखानें गांजलेला किं० जर्जर. **टीप.**–हे शब्द आशिक्षितांत रूढ आहेत.

विथापाक [**सं०** व्यर्थ+पाक] **पु०** चालत असलेल्या कामांत झालेला किं०करण्यांत आलेला विघाड (अशिक्षितांत रूढि).

विदगुडणें अ० क्रि० (हात,पाय, इ०गात्र) मुरगळणें किं० लचकणें.

विदग्ध [**सं०**] **वि०** १ चतुर. २ कारस्थानी; मुत्सुद्देगिरीचा. ३सभ्य चालीरीतींचा. ४ सुंदर. ५ वरच्या दर्जाचें आणि सभ्य आणि करमणूक करणारें (वाङ्मय). ६ शिजविलेलें. ७ जळून खाक झालेला (पदार्थ,–भात, भाकरी, औषध, इ०). ८ कोठ्यांत पूर्णपणें न पचलेलें (अन्न). ९ अर्धवट शिजलेलें. १० यथायोग्य प्रकारें शिजविलेलें. **पु०** विद्वान्; पंडित. ❀ **विदग्धाजीर्ण न०** (**वैद्यक**) करपट ढेकरा येणें, घशांत जळजळ होणें,इ० रूप अजीर्णाचा प्रकार.

विंदरू [**सं०**वेध] **न०**बारीक भोक किं०छिद्र.

विदविदणें अ० क्रि० (फळ, गळू) अति पिकल्यामुळें मऊ होणें किं० बिलबिलीत होणें.

विदविदा वि०मऊ,बिलबिलीत (फळ,गळू).

विंदाण, विंदान न०, विंदाणी स्त्री० [**म०** विंधणें=भोक पाडणें] १ युक्ति; कावा; हिकमत. २ कौशल्य; चातुर्य. ३ दैवाची किं०परमेश्वराची घटना.

विदारक [**सं०**] **वि०** फाडणारा; चिरणारा; उ० हृदयविदारक देखावा (किं० हकी

गत).पु०१पाण्याचा प्रवाह दुभागणारा खडक. २ आटलेल्या नदींत पाण्यासाठीं खणलेला खळगा.

विदारण [**सं०**] **न०** १ युद्ध. २ फोडणें; फाडणें; चिरणें. ३ कत्तल.

विदारणा [**सं०**] **स्त्री०** फाडणें; चिरणें.

विदारणी [**म०** विदारणें] **स्त्री०** १ फाडणें; चिरणें; फोडणें. २ कोणेकाच्या दुष्कृत्याचा सार्वजनिक रीत्या केलेला किं० झालेला बोभाटा; बोऱ्या; फजीतवाडा.

विदारणें [**सं०** वि+दृ] **स० क्रि०** १ फाडणें; तोडणें; चिरणें. २ टरांटरां फाडणें. ३ (**लाक्षणिक**) (विषयाची) फोड करणें. **अ० क्रि०** उत्शृंखळ होणें. ꣸ **विदारून सांडणें** (गुरें,माशा,इ०)उधळून लावणें.**विदारण्या वि०** चाहाडखोर;चहाड्या सांगून कलागती लावणारा.

विदाह [**सं०**] **पु०** १ आग; उष्णता. २ तिखटपणा.

विदित [**सं०**] **वि०** १ ज्ञात; ठाऊक असलेला; जाणलेला. २ सांगितलेला. ꣸ **विदितात्मा** [**सं०** विदितात्मन्] **पु०** परमेश्वर.

विदिशा [**सं०**] **स्त्री०** दोन दिशांच्या मधली दिशा; उपदिशा; उ० आग्नेयी (पूर्व आणि दक्षिण ह्यांच्या मधली), नैर्ऋत्य (दक्षिण आणि पश्चिम ह्यांच्या मधली), वायव्य (दक्षिण आणि उत्तर ह्यांच्या मधील), ईशान्य (उत्तर आणि पूर्व यांच्या मधील) ह्या चार विदिशा किं० उपदिशा होत.

विदीर्ण [**सं०**] **वि०** (वाच्यार्थानें किं० लाक्षणिक अर्थानें) फाटलेला; उ० ती हकीगत ऐकून माझें हृदय विदीर्ण झालें; उ० हा मुकटा विदीर्ण झाला.

विदुर [**सं०**] **वि०** १ शाहाणा; चतुर. २ सभ्य चालीरीतींचा मनुष्य. **पु०** विचित्रवीर्याच्या अंबिका नामक भार्येच्या दासीला व्यासापासून झालेला पुत्र. हा नीतिमान्, निःपक्षपाती, न्यायी, आणि शाहाणा होता. हा भारतीय युद्धाच्या वेळीं तीर्थयात्रेस गेला होता.

विदेश [**सं०**] **पु०** १ दूरचा देश. २ परदेश. ꣸ **विदेशी वस्तु स्त्री०** आपल्या देशांत निर्माण न झालेली वस्तु. **विदेशी, विदेशीय वि०** परदेशचा (माणूस, पदार्थ).

विदेह [**सं०**] **वि०** १ देहहीन; देहरहित. २ निराकार. ३ देहबंधशून्य. **पु०** १ निमिराजा. २ जनक कुलांतील एक राजा. ꣸ **विदेही वि०** परमार्थदृष्टीनें ज्याचा देहाभिमान गळाला आहे असा. **विदेहस्थिति स्त्री०** देहाविषयीं आस्था नाहीं अशी ज्ञानी माणसाची निर्विकल्प स्थिति.

विंदोर पु० (कोष्ट्याच्या मागांत) ताणा आवळावयाची हातखुंट्याला बांधलेली दोरी.

विदोस, विधोस [**सं०** विध्वंस] **पु०**नाश; नासाडी(अशिक्षितांत रूढ).꣸**विदोशा,विधोशा वि०** विध्वंसक; नासाडी करणारा (अशिक्षितांत रूढि).

विद्ध [**सं०**] **वि०** १ छिन्न; भग्न. २ **भोक** पाडलेला. ३ शस्त्र, बाण, प्रहार, इ० लागला आहे ज्याला असा.

विद्यमान [**सं०**] **वि०** १ चालू; हल्लीं असलेला; सध्यांचा. २ अस्तित्वांत असलेला. **पु०** वर्तमान काळ.**स्त्री०,न०** (देवघेवीच्या व्यवहारांत) समक्षता; हजेरी; साक्षी; उ० गोविंदपंताच्या विद्यमानें मी त्याला शंभर रुपये दिले (गोविंदपंत जवळ असतां किं०पाहत असतां)꣸.**विद्यमानें क्रि० वि०** साक्षीदार ठेवून; ०च्या देखत किं० समक्ष.

विद्या [**सं०**] **स्त्री०** १ एकाद्या विषयाचें सांगोपांग ज्ञान किं० माहिती किं० त्या संबंधाचें शास्त्र. २ तत्त्वज्ञान; ब्रह्मज्ञान. ३ चित्रें काढणें, गाणें, सतार वाजविणें, इ०ज्या कला त्या प्रत्येक. ४ युक्ति; खुबी; हिकमत. ꣸ **विद्यागुरु पु०** १ एकादी विद्या जो आपणास शिकवितो तो. २ एकाद्या विद्येंत जो निष्णात तो.**विद्याधन न०**१ विद्यारूपी धन. २ विद्या शिकवून मिळविलेलें द्रव्य. **विद्यापीठ न०** १ विद्वान् लोक जेथें विद्यार्थ्यांना हरएक शास्त्रें,भाषा,तत्त्वज्ञान,इ०शिकवितात, किं० जेथें विद्वान् लोक एकाद्या विषयाची चर्चा करतात अशी संस्था.२जेथें हरएक विषयांत पारंगत लोक राहात आहेत असें स्थान; विद्येचें माहेर घर असा गांव, शहर, इ०. ३ जेथें विद्यार्थ्यांना विशिष्ट विषय शिकवून त्यांत त्यांच्या

परीक्षा घेतात अशी संस्था. **विद्याबंधु** पु० १ एकाच गुरूपाशीं अध्ययन करणारे जे विद्यार्थी ते परस्परांचे विद्याबंधु. २ एकच शास्त्र, कला, इ०चा अभ्यास करणारे जे ते परस्परांचे विद्याबंधु. **विद्याभ्यास** पु० अध्ययन; शिकणें. **विद्यार्थी** पु० १ शाळेंत जाऊन शिकणारा. २ श्रीमंताच्या आश्रयाला राहून त्याचीं किरकोळ कामें करून बाकीच्या वेळांत अध्ययन करणारा मुलगा. ३ एकाद्या विषयाचा अभ्यास करणारा. **विद्यावान्, विद्यावंत** पु० विद्वान् माणूस. **विद्यालय** न०शाळा;उ० नूतन मराठी विद्यालय.

विद्याधर [सं०] पु० उपदेवविशेष,–यक्ष, गंधर्व, किन्नर, इ० प्रमाणें.

विद्युत् [सं०] स्त्री० वीज. ※**विद्युत्वान्** पु० मेघ. **विद्युल्लता** स्त्री० नागमोडी आकाराची वीज. **विद्युल्लेखा** स्त्री० विजेची चमक. **विद्युत्पात** पु० १ वीज पडणें. २ (**लाक्षणिक**)कांहीं भयंकर अनर्थ. [असा फोड.

विद्रधि [सं०]पु० ज्यांतून पू स्रवत असतो

विद्रा [सं० विरूप] वि० १वाकडीं तिकडीं गात्रें असलेला किं० नाक, डोळे, इ० अवयवांनीं व्यंग असलेला (माणूस). २ दिसण्यांत बेंघाट, किं० बेडौल असा (पदार्थ). ३ कुरूप; वेडावाकडा. ※ **वेडाविद्रा** वि० कसाबसा असलेला; नीटनेटका नाहीं असा (माणूस, लेख, चित्र, घडविलेला पदार्थ, शिवलेला कपडा, भाषण, इ०). [गेलेला.

विद्रुत [सं०] वि० १ वितळलेलें. २ पळून

विद्रुम [सं०] पु०, न० पोंवळें,–एक रत्न.

विद्वान् [सं० 'विद्वस्' च्या प्रथमेचें पु०ए०व०] पु० १ जाणणारा; जाणता. २ पंडित. ३ शास्त्रवेत्ता. **विदुषी** स्त्री० जाणती स्त्री; पंडित स्त्री; शिकलेली स्त्री. **विद्वत्ता** स्त्री० पांडित्य. **विद्वज्जन** पु० विद्वानांचा समुदाय. **विद्वन्मान्य** वि० विद्वान् लोकांत ज्याला मान किं० आदर आहे असा. **विदुषंमन्य** वि०जो खरोखरी विद्वान् नाहीं परंतु जो स्वतास विद्वान् समजतो असा.

विद्विष् [सं०] पु० शत्रु.

विद्विष्ट [सं०] वि० १ द्वेषास पात्र. २ ज्याची खंती वाटते असा.

विद्वेष [सं०] पु० १ तिरस्कार. २ किल्मिष; खंती. ३ वैर; शत्रुत्व.

विद्वेषक, विद्वेषी, विद्वेष्टा [सं० विद्वेषिन्; विद्वेष्टृ] वि० १ द्वेष करणारा. २ शत्रु; वैरी.

विध [सं०] पु० १ प्रकार. २ वेध करणें ही क्रिया. ३ भोंक. खालीं ' विधा ' पहा.

विंध [सं०विद्र=छिद्र; चीर] न०भोंक; चीर; वेज. ※ **विंधकाम** न० मोतीं, रत्नें, इ०ना भोकें पाडण्याचें काम किं० कौशल्य.

विधणू स्त्री० गाय, म्हैस इ०च्या गर्भाशयांत अकालीं प्रसव झाल्यानें उत्पन्न होतो शुष्कपणा.

विंधणें [सं० विध्=भोंक पाडणें] स०क्रि० १ बाण, सुई, इ० नीं (पदार्थाला) आरपार भोंक पाडणें. २ कांहीं हत्यारानें(पदार्थावर) क्षत करणें.

विंधणें [सं० विध्=भोंक पाडणें] न० किंकरें हें सुताराचें हत्यार.

विंधरूं, विंधरूक [सं० विध्=भोंक पाडणें] न० भोंक; छिद्र; वेजें.

विधर्मी [सं० वि+धर्म] वि० १ परधर्माचा; आपल्या धर्माहून ज्याचा धर्म वेगळा आहे असा. २ धर्म जो मानीत नाहीं तो. ३ धर्माच्या उलट वर्तणारा.

विधवा [सं०] स्त्री० जिचा पति मेला आहे अशी स्त्री. ※**वैधव्य** न० विधवेची स्थिति.

विधवाट [सं० विविध+म०वाट (रस्ता)] स्त्री० १ उधळपट्टी; नासाडी (लागणें, लावणें, होणें, इ०). २ विध्वंस.

विधा [सं०विधा=रीति; प्रकार] स्त्री० रीति; पद्धति; प्रकार. विविध, बहुविध, अनेकविध,नानाविध,इ० समास होतात.

विधाता [सं० विधातृ] पु० १कर्ता;उत्पादक. २ ब्रह्मदेव.३ ध्रुवमत्स्य ह्या तारकापुंजांतील एक तारा.

विंधान [सं० विध्=भोंक पाडणें] न० बाण, दगड, इ०नीं धरलेला नेम; लक्ष्य (करणें, बांधणें).

विधान [सं०] न० १ करणें; आचरणें; अमलांत आणणें. २ उत्पन्न करणें.३ कृति;पद्धति; कांहीं करण्याची सरणी. ४ कृत्य; जें केलें तें. ५

व्यवस्था; तजवीज. ६ उपाय; इलाज. ७ हुकूम; आज्ञावाक्य; घालून दिलेला नियम. ८ अमुक करावें अशा अर्थाचें वाक्य.अमुक करूं नये अशा अर्थाच्या वाक्याला 'निषेधवाक्य' म्हणतात. ९ विशिष्ट मत किं० विचार व्यक्त करणारें वाक्य. १० (**व्याकरणांत**) शब्दाला उपसर्ग किं० प्रत्यय लावणें.

विधायक [**सं०**] **वि०** १ व्यवस्था लावणारा. २ करणारा; निर्मिणारा. ३ नियम घालणारा; नियम घालून देण्यासंबंधाचा. ४ हवालीं करणारा. ५ कोणकोणच्या गोष्टी कराव्या हें सांगणारी सरणी. ६ करावयाच्या ज्या गोष्टी त्या करण्यासंबंधाचा (क्रम); उ० विधायक कार्यक्रम अगोदर पार पाडा आणि नंतर कायदेभंग करा हें महात्मा गांधींनीं १९२२ सालीं राष्ट्राला सांगितलें.

विधि [**सं०**] **पु०** १ करणें. २ कृत्य; क्रिया. ३ पद्धति; प्रकार; योग्य सरणी. ४ आज्ञा. ५ अमुक करा अशा अर्थाचें वाक्य किं० वचन. ६ धर्मनियम. ७ धर्मकृत्य; अनुष्ठान. ८ दैव;प्राक्तन; नशीब. ९ ब्रह्मदेव. १० लग्न, मुंज, गर्भाधान, इ० जे संस्कार ते प्रत्येक. ११ कोणतीही विशिष्ट गोष्ट; उ० भोजनविधि, शौचविधि, स्नानविधि. ꣸ **विधिवत्, यथाविधि क्रि० वि०** योग्य सरणीला अनुसरून. **विधिदृष्ट, विधियुक्त, विध्युक्त वि०** शास्त्र, धर्म, किं० रूढि, ह्यांना अनुसरून असलेलें. **विधिनिषेध पु० ए० व०, पु० अ० व०** अमुक करावें, अमुक करूं नये, असे नियम व्यक्तिशः किं० समुच्चयानें. **विधिनिषेधातीत वि०** १ ब्रह्मज्ञान झाल्यामुळें शास्त्रोक्त विधिनिषेधाचे नियम जो पाळीत नाहीं किं० पाळण्याचें महत्त्व ज्याला वाटत नाहीं असा. २ उत्सृंखलपणामुळें जो विधिनिषेध पाळीत नाहीं असा. **विधिभंजक वि० (व्याकरण)** सामान्य नियमाच्या उलट असलेला; अपवादरूप. **विध्यर्थ पु०** अमुक गोष्ट करावी किं० अमुक गोष्ट संभवनीय आहे असें क्रियापदाच्या ज्या रूपावरून समजतें तें रूप; उ० खरें बोलावें, आज पाऊस पडावा. **विधिविशेषण न०** वाक्यांत विशेष्याच्या मागें विशेषण येतें तेव्हां त्याला ' अधिविशेषण ' म्हणतात आणि विशेष्याच्या पुढें विशेषण येतें तेव्हां त्याला ' विधिविशेषण ' म्हणतात. विधिविशेषण हें वाक्यांतील विधान पूर्ण करण्यास क्रियापदास साहाय्य करतें; उ० ' अरबी घोडा जलद चालतो ' या वाक्यांत ' अरबी ' हें अधिविशेषण; उ० ' कोंवळी मेथी रुचकर असते ' ह्या वाक्यांत ' रुचकर ' हें विधिविशेषण.

विंधी [**म०** विंधणें] **स्त्री०** १ कुसूं बसवावयाचें भोंक. २ कांहीं पदार्थ कुटण्याचा खल.

विधुर [**सं०**] **पु०** ज्याची बायको मेली आहे असा पुरुष. **वि०** १ पीडित; व्याकूळ; दुःखी. २ ज्याला वियोग झाला आहे असा. ३ रहित. ४ असमर्थ; दीन; विव्हल. ꣸ **विधुराग्नि पु०** विधुरानें गृहांत यथाविधि ठेवावयाचा अग्नि.

विधुळणी [**सं०** विधूलन] **स्त्री०** नासाडी; उधळपट्टी;विध्वंस. ꣸ **विधुळणीस पडणें** संपत्ति, व्यापार, इ०अपकर्षाच्या स्थितीस लागणें.

विधेय [**सं०**] **वि०** १ करण्यास योग्य; केलें पाहिजे असें. २ स्वाधीन; वश. ३ आज्ञाधारक; नम्र. ४ अनुकूल. **न०** १ कर्तव्यकर्म. २ वाक्यांत उद्देश्याबद्दल जें विधान केलेलें असतें म्ह० उद्देश्यासंबंधानें जें सांगितलें असतें त्याला ' विधेय ' म्हणतात; उ० ' गोदी पळाली ' ह्या वाक्यांत ' गोदी ' हें उद्देश्य आणि ' पळाली ' हें विधेय.

विंध्य [**सं०**] **पु०** आर्यावर्त आणि दक्षिण ह्या दोहोंच्या मध्यें आहे ती पर्वताची रांग.

विंध्रुका, विंध्रु, विंध्रुक [**म०** विंधणें] **पु०** वस्त्र, पर्ण, इ० स पडलेलें किं० पाडलेलें भोंक.

विध्वंस पु०, विध्वंसन [**सं०**] नाश; समूळ उत्च्छेद.

विध्वंसक [**सं०**] **वि०** नाशकारक.

विध्वंसिणें [**सं०** वि+ध्वंस्] **स० क्रि०** मोडणें, फोडणें, नष्ट करणें.

विध्वस्त, विध्वंसित [**सं०**] **वि०** नष्ट [केलेलें.

विनटणें [**सं०** वि+नट्] **अ० क्रि०** १ नाचणें. २ मौज करणें. ३ रमणें; तल्लीन होणें.

विनत [**सं०**] **वि०** १ वाकलेला. २ नम्र. ३ वाकडा.

विनति [**सं०**] **स्त्री०** १ वाकणें. २ नम्रता.

३ प्रार्थना. **टीप,**–मराठींत ह्या अर्थी ' विनंती ' हेंही रूप प्रचलित आहे.

विनंती वर '' विनांति ' पहा.

विनमोजबा (–बी), विनमोहजबा (–बी) मागें ' बिन ' श० यो० अ० मध्यें ' बिनमोजबी' पहा.

विनय [**सं०**] **पु०** १ शिक्षण; वळण. २ शिष्टाचार. ३ नम्रपणा. ४ हाताखालच्या लोकांशीं किं० गरीब लोकांशीं सौम्य आणि ममताळूपणाचें वर्तन.

विनवणी, विनवणूक [**म०** विनवणें] **स्त्री०** १ कोणेकाजवळ नम्रपणानें केलेली कांहीं प्रार्थना किं० त्याचें मन वळविणें ही क्रिया. २ कण्हणें.

विनवणें अ० **क्रि०** कण्हणें.

विनविणें [**स०** वि+नम्] **स० क्रि०** (कोणेकाला) प्रार्थिणें किं० दीनपणानें याचिणें.

विनष्ट [**सं०**] **वि०** १ लोपलेला; रद्द पडलेला. २ हरवलेला. ३ नाहींसा झालेला. ४ पतित (माणूस).

विना [**सं०**] **श० यो० अ०** शिवाय; खेरीज; वांचून; उ० रामाविना सर्व मुलें हजर होतीं; उ० हा श्लोक पाठ केल्याविना मी तुला येथून उठूं देणार नाहीं. **टीप,**–' विना ' पूर्वपदीं येऊन पुष्कळ उपयुक्त सामासिक शब्द होतात. विनाकारण म्ह० कारण नसतां; विनामूल्य म्ह० फुकट; विनापराध म्ह० गुन्हा घडलेला नसतां.

विनायक [**सं०**] **पु०** १ गणपति हा देव. २गरुड हा पक्षी. ॐ**विनायकी चतुर्थी स्त्री०**महिन्याच्या शुक्लपक्षांतील चतुर्थी ही तिथि. कृष्ण पक्षांतील चतुर्थीला ' संकष्टी चतुर्थी ' म्हणतात.

विनाश [**सं०**] **पु०** नासाडी; विध्वंस; लोप. ॐ**विनाशकाल पु०**कोणेकाची द्रव्य, आप्त, वैभव, इ० बाबतींत हानि ज्या काळीं होते तो त्याचा विनाशकाल. **विनाशकाले विपरीतबुद्धिः** कोणेकाचा विनाशकाल प्राप्त झाला असतां त्याला भलभलत्या गोष्टी करण्याची बुद्धि होते.

विनाशी वि० १ नाश पावणारें; क्षणभंगुर. २ नाश करणारें; विध्वंसक.

विनिगम [**सं०**] **पु०** शास्त्राचा सिद्धांत.

विनिमय [**सं०**] **पु०**१अदलाबदल. २गहाण.

विनिमेष [**सं०**] **पु०** १ डोळ्यांची उघडझाक. २ नेत्रसंकेत; डोळ्यांनीं केलेली इशारत.

विनियोग [**सं०**] **पु०** १ निराळें करणें; वियोग. २त्याग. ३ उपयोग. ४ नेमणूक; योजना. ५पदार्थविशेषाचा कार्यविशेषाकडे उपयोग करणें; उ० ह्या शिलकीच्या दहा रुपयांचा विनियोग त्याणें गरीब मुलांना खादीच्या टोप्या वाटण्यांत केला.

विनिर्णय [**सं०**] **पु०** १ पूर्ण निकाल. २ अखेरचा निर्णय. [नियंत्रणा.

विनिबंध [**सं०**] **पु०** कडक शिस्त; जरब

विनिर्मुक्त [**सं०**] **वि०** पूर्णपणें बंधांतून किं० नियंत्रणांतून सुटलेला.

विनिश्वास [**सं०**] **पु०** दीर्घ सुसकारा.

विनिहत [**सं०**] **वि०** १ पूर्णपणें ठार केलेला. २ जेरीस आणलेला. **पु०** १ दुश्चिन्ह. २ दैवी आपत्ति.

विनीत [**सं०**] **वि०** १ शिकवून तयार केलेला; शिकविलेला; शिक्षित. २ सभ्य; सदाचारसंपन्न. ३ नम्र; विनययुक्त. ४ जितेंद्रिय. **पु०** शिकवून तयार केलेला घोडा.

विनेता [**सं०** विनेतृ] **पु०** १ पुढारी; नायक; अग्रणी. २शिक्षक; गुरु. ३ नियंता; शास्ता.

विनोद [**सं०**] **पु०** १ घालविणें; परिहार; उ० श्रमविनोद. २ क्रीडा, मनोरंजन. ३ मनोरंजनाचें कांहीं साधन. ॐ **विनोदास्पद न०** १ करमणुकीचें साधन; मनोरंजन करणारी कांहीं गोष्ट. २ ज्याचे पासून करमणूक होऊं शकेल असें कांहींही. ३ थट्टेचा किं० उपहासाचा विषय. **विनोदी वि०** १ आनंदी (स्वभाव, माणूस). २ दुसऱ्याची करमणूक करणारा (मनुष्य). ३ थट्टेचें किं० गमतीचें (भाषण).

विन्मुख [सं० विमुख] वि० १ तोंड फिरविलेला; पराङ्मुख. २ विरुद्ध; प्रतिकूल. पुढें ' विमुख ' पहा. ॐ **कोणेकाच्या प्रार्थनेला विन्मुख होणें** त्याची विनंती अमान्य करणें; ती न पुरविणें.

विन्यस्त [**सं०**] **वि०** १ रचिलेलें. २ घातलेलें. ३ योग्य ठिकाणीं मांडलेलें.

विन्यास [**सं०**] **पु०** १ हवाली किं० स्वाधीन करणें. २ नीट मांडणें; व्यवस्थित रीतीची मांडणी. ३ दुसऱ्याचे जवळ रक्षणार्थ ठेविलेली वस्तु; ठेव. **टीप,**–मागें 'न्यास' सर्व अर्थी पहा.

विन्हणें, विंधणें [**म०** विंधणें] **न०** सुताराचें एक हत्यार.

विपचार [सं० 'व्युपचार' चा गांवढळ अपभ्रंश] **पु०** १ कोणेकाला वाईट रीतीनें किं० असभ्यपणें वागविणें; कोणेकाशीं केलेलें असभ्यपणाचें वर्तन; कोणेकाचा केलेला अनादर. २ दुर्दशा; विनाश; विध्वंस; उ० बायको शाहाणी असली तर संसार, नाहीं तर विपचार.

विपट [**म०** वि (नाहीं)+पडणें, पटणें] **स्त्री०, न०** दोन माणसांत बेबनाव, वैषम्य, किं० विमनस्कता; न पटणें.

विपत्तर वि० १ द्वाड, खोडकर, उपद्रवी (मूल, माणूस, जनावर. इ०). २ मूख; अजागळ. ३ कुरूप; विद्रूप.

विपत्ति [**सं०**] **स्त्री०** १ संकट; पंचाइतीची स्थिति. २ नाश; मृत्यु. ॐ **विपत्तिकाळ पु०** ज्या काळांत कोणेकावर अनेक दुर्वह संकटें कोसळतात तो त्याचा विपत्तिकाळ. **विपत्य पु० अ० ब०** हाल, कष्टमय स्थिति (अशिक्षितांत रूढि).

विपथ [**सं०**] **पु०, न०** निंद्य मार्ग; आडमार्ग; भलतीच वर्तनसरणी. ॐ **विपथगामी वि०** स्वैर वर्तन करणारा; उत्संखळ; निंद्य मार्गाचें आचरण करणारा.

विपद्, विपदा [**सं०**] **स्त्री०** १ संकट. २ हीनदीनपणाची स्थिति; उ० विपद्ग्रस्त (ह्या० संकटांत पडलेला); उ० विपत्काल, विपद्धर्म, इ०.

विपदा मागें 'विपद,' 'विपत्ति' पहा.

विपदात 'विपदा' चा गांवढळ अपभ्रंश. मागें 'विपदा' पहा.

विपन्न [**सं०**] **वि०** १ संकटांनीं ग्रस्त. २ दुर्दैवी. ३ हीन, दीन, अनाथ.

विपरिणमन न०, विपरिणाम पु० बदल; रूपान्तर.

विपरीत [**सं०**] **वि०** १ बदललेला; चळलेला. २ उलटा; विरुद्ध. ३ खोटें. ४ नियमाला सोडून असलेलें. ५ दुर्वर्तनी. ६ शास्त्र, रूढि, इ० शीं विरोधी. ७ प्रतिकूळ (काळ, दैव, परिस्थिति). ॐ **विपरीत लक्षणा स्त्री०** उलट्या किं० विरुद्ध अर्थानें जेथें वाक्यांतील शब्द घ्यावयाचे असतात किं० घ्यावे लागतात तेथें 'विपरीत लक्षणा' होते; उ० माझ्या शत्रूला माझ्या घरच्या गुप्त गोष्टी सांगून तूं त्याची बाजू बळकट करून दिलीस हे तुझे मजवर मोठे उपकार आहेत. ह्या वाक्यांत 'उपकार' चा अर्थ 'अपकार' असा घ्यावयाचा आहे. येथें विपरीत लक्षणा झाली आहे. आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' उपोद्घात पहा. **विपरीत भावना स्त्री०** १ उलटा ग्रह किं० मत. २ रोग इ० ची बदललेली स्थिति किं० परिस्थिति.

विपर्यय [**सं०**] **वि०** उलट; उलटा; विपरीत. **पु०** १ विरोध; विरुद्धपणा. २ बदल; पालट. ३ उलटापालट. ४ उलटी स्थिति. ५ आपत्ति. ६ उलटें किं० विपरीत वर्तन. ७ प्रलयकाळ. ८ भ्रम; गैरसमज. ९ चुकी.

विपर्यस्त [**सं०**] **वि०** १ उलट झालेला. २ बदललेला. ३ विपरीत. ४ उलथून टाकलेला. ५ भलत्याच प्रकारचा.

विपर्यास [**सं०**] **पु०** १ बदल; रूपान्तर. २ उलटपणा. ३ कोणेकानें बोललेल्या वाक्याचा भलताच अर्थ करणें किं० घेणें. ४ उलथापालथ; उलटापालट. ५ विरोध; प्रतिकूलता.

विपल, विपळ [**सं०** विपल] **न०** पळाचा साठावा अंश. पळ=घटिकेचा साठावा अंश.

विपलाप, विपळाप [**सं०** 'विलाप' चा गांवढळ अपभ्रंश] **पु०** रडणें; रोदनाचा आक्रोश. [रोदन करणें.

विपलापणें [**म०** विपलाप] **अ०क्रि०** रडणें;

विपसल, विपसला वि० खोडकर; द्वाड; व्रात्य. मागें 'उपसळा' पहा.

विपसळी पु० १ कुत्रीं, मांजरें, उंदीर, घुशी, इ० चा उपद्रव. २ खोडकर पोरांचा त्रास, उपद्रव, किं० कटकट. मागें 'उपसळी' पहा.

विपक्ष [**सं०**] **पु०** १ शत्रु; वैरी. २ प्रतिपक्षी. (**न्याय**) (१) पर्वतावर वह्नि आहे; (२)

कारण, पर्वतावर धूम आहे; (३) जेथें जेथें धूम असतो तेथें तेथें वह्नि असतो, जसें महानस; (४) ऱ्हदांत धूम नाहीं आणि वन्हीही नाहीं. ह्या चार वाक्यांपैकीं पहिल्या वाक्यांत ' पर्वत ' हा ' पक्ष, ' कारण त्याचेवर वन्हि आहे असें सिद्ध करावयाचें आहे. 'वह्नि' हें ' साध्य '. ज्याचेवरील साध्यरूपी धर्म निश्चित असतो त्याला ' सपक्ष ' म्हणतात. वरील उदाहरणांत'महानस' हा 'सपक्ष' होय. ज्याचेवरील साध्याचा अभाव निश्चित असतो त्याला ' विपक्ष ' म्हणतात. वरील उदाहणांत ' ऱ्हद ' हा 'विपक्ष' होय. **वि०** उलट बाजूचा किं० पक्षाचा.

विपाक [**सं०**] **पु०** पक्वपणा; पूर्ण वाढ. २ पचन. ३ जठराग्नि. ४ परिणाम; शेवट; पर्यवसान. ५ (**वेदान्त**) कर्माचें फळ.

विपारणें [**म०** विपारा] **अ० क्रि०** (मूल, माणूस, पशु) अव्यवस्थित किं० उत्संखल होणें.

विपारा [**सं०** विपरीत] **वि०** १ हेकट; चिरडखोर; हट्टी (मूल, जनावर). २ हेकटपणाचें किं० वात्रटपणाचें (भाषण, वर्तन). ३ कुरूप; विरूप. ४ मूर्ख; वेडा. ५ जन्मतांना ज्यांचे पाय अगोदर बाहेर पडले आहेत असें (मूल). ॐ **वेडाविपारा वि०** साधाभोळा; अजागळ.

विपाश [**सं०**] **वि०** बंधनांतून सुटलेला.

विपिन [**सं०**] **न०** अरण्य. ॐ **विपिनौकस पु०** वानर.

विपुल [**सं०**] **वि०** १ मोठें; विस्तृत. २ पुष्कळ; अवळपधळ.

विप्र [**सं०**] **पु०** ब्राह्मण,–हिंदूंच्या चातुर्वर्ण्यांतील पहिला वर्ण किं० त्या वर्णाचा कोणी इसम.

विप्रकर्ष [**सं०**] **पु०** १ ओढणें; ओढीत किं० फरपटीत नेणें. २ दूरपणा; अंतर. ह्याच्या उलट ' संनिकर्ष ' ह्म० सांनिध्य किं० जवळपणा.

विप्रकृष्ट [**सं०**] **वि०** दूरचा; अंतरावर असलेला.

विप्रतिपत्ति [**सं०**] **स्त्री०** १ मतभेद. २ भांडण; विरोध. ३ आक्षेप. ४ विरुद्ध किं० प्रतिकूल आचरण.

विप्रतिपन्न [**सं०**] **वि०** १ ज्याबद्दल संदेह आहे असें. २ घोटाळलेलें. ३ विरुद्ध बाजूचा. ४ आडविलेला.

विप्रतिषेध [**सं०**] **पु०** १ आवरण्याची क्रिया; विग्रह. २ विरोध; हरकत.

विप्रतिसार, विप्रतीसार [**सं०**] **पु०** पश्चात्ताप; अनुताप.

विप्रयुक्त [**सं०**] **वि०** १ ज्याला वियोग झाला आहे असा. २ पदार्थविशेष ज्याचे जवळ नाहीं असा.

विप्रयोग [**सं०**] **पु०** १ ताटातूट; वियोग. २ भांडण; विरोध. ३ फसविणें ही क्रिया.

विप्रलंभ [**सं०**] **पु०** १ फसवणूक. २ वियोग; विरह. ३ भांडण; कलह; विरोध. ४ (**साहित्य**) शृंगाराचा एक प्रकार,–ज्यांत नायक आणि नायिका यांची ताटातूट होऊन परस्परांस दुःख होत आहे असें वर्णन असतें.

विप्रलाप [**सं०**] **पु०** १ बडबड; अर्थहीन भाषण. २ भांडण; विरोध. ३ परस्परविरोधी भाषण; असंबद्ध बोलणें.

विप्रिय [**सं०**] **वि०**अप्रिय; न आवडणारें. **न०** १ अप्रिय गोष्ट. २ कोणेकाचा केलेला अपराध.

विप्रोषित [**सं०**] **वि०** १ प्रवासास गेलेला. २ हद्दपार केलेला. ३ रहित.

विप्लव [**स० वि०** अनन्वित; असंबद्ध; **पु०** १ तरंगणें. २ प्रसिद्धि; पसरणें. ३ प्रमाणराहित्य; गोंधळ; घोटाळा. ४ उध्वस्त करणें; लुटणें. ५ उपद्रव. ६ नाश; प्रलय. ७ संकट. ८ पाप; दुष्कर्म.

विफल [**स०**] **वि०** १ निरर्थक; व्यर्थ; निष्फळ. २ वांझ. ३ वृषणरहित.

विबुध [**सं०**] **वि०** शाहाणा; सुज्ञ. **पु०** १ ज्ञानी; पंडित. २ देव. ३ चंद्र.

विबोध [**सं०**] **पु०**१जागें होणें. २ जाणणें. ३ दक्षता; जागरूक असणें.

विभक्त [**सं०**] **वि०**१ पृथक् केलेला.२ वेगळा झालेला (भाऊ). ३ भिन्न; विविध. ॐ **विभक्तभाव पु०** आपआपले हिस्से घेऊन भाऊबंदांचें विभक्त होणें किं० विभक्त झाल्यांची स्थिति.

विभक्ति [**सं०**] **स्त्री०** १ विभाग. २ भाऊबंदांची फारकत किं० त्यांची विभक्तपणाची स्थिति. ३ हिस्सा. ४ (**व्याकरण**) कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, स्वामित्व, अधिकरण, इ० अर्थ किं० संबंध दाखविणारे प्रत्यय नामें इ० स लागून विकार होतो तो. वाक्यांत नामाचा आणि क्रियापदाचा जो संबंध असतो त्याला ' कारक ' म्हणतात. कारक दाखविण्यासाठीं नाम किं० सर्वनाम यांचें जें रूप करतात त्याला ' विभक्ति ' म्हणतात.

विभव [**सं०**] **पु०** १ संपत्ति; द्रव्य; धन. २ सामर्थ्य. ३ ऐश्वर्य; वैभव; उत्कर्ष. ४ मनाचा मोठेपणा; औदार्य. ५ पालन; संरक्षण.

विभा [**सं०**] **स्त्री०** १ प्रकाश; तेज. २ किरण. ३ कांति; शोभा. ॐ **विभाकर पु०** १ सूर्य. २ अग्नि. **विभावसु पु०** १ सूर्य. २ अग्नि.

विभाग [**सं०**] **पु०** १ वांटणी. २ हिस्सा; वांटा. ३ तुकडा. ४ पोटभाग.

विभागणें [**सं०** वि+भज्] **स० क्रि०** (कांहीं पदार्थांचे) तुकडे किं० भाग करणें किं० भाग पाडणें.

विभाज्य [**सं०**] **वि०** ज्याचे तुकडे करणें जरूर आहे असें; ज्याचे तुकडे करतां येतील असें.

विभाव [**सं०**] **पु०** (**साहित्य**) रसाला उद्दीपक अशी गोष्ट. प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत रति, हास्य, शोक, क्रोध, भय, उत्साह, जुगुप्सा किं० किळस, विस्मय, आणि निर्वेद किं० वीट, असे नऊ विकार बीजरूपानें सिद्ध असतात; त्या विकारांना 'स्थायिभाव' म्हणतात. रति, हास्य, इ० स्थायिभावांस जीं कारणें त्यांना ' विभाव ' म्हणतात. विभाव दोन प्रकारचे आहेत. आलंबनविभाव आणि उद्दीपनविभाव. हास्यरसास आलंबन (म्ह० आश्रय) विदूषक इ०; आणि उद्दीपन चित्रविचित्र वेष, भाषण, चेष्टा, इ०. रति, हास्य, शोक, भय, क्रोध, उत्साह, जुगुप्सा, विस्मय, आणि निर्वेद, ह्या रसांचीं जीं कार्यें ते 'अनुभाव' किं० 'सात्विक भाव'. स्थायिभावांच्या कार्यांच्या उत्पत्तीस साहाय्यभूत होणारे जे भाव त्यांस 'सहकारि किं० व्यभिचारिभाव' म्हणतात. ह्यांनाच 'संचारिभाव' असेंही नांव आहे.

विभावन न०, विभावना स्त्री० [**सं०**] १ भासणें. २ कल्पना; तर्क. ३ तत्त्वनिर्णय. ४ व्यक्त करणें, वाटाघाट. **विभावना स्त्री० (साहित्य)** कारण घडलेलें नसतां कार्य घडलें आहे अशा अर्थाचें जें विधान त्याला विभावना म्हणतात. विशेष विवरण, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

विभावित [**सं०**] **वि०** १ पाहिलेला. २ प्रकट केलेला. ३ जाणलेला.

विभाषा [**सं०**] **स्त्री०** विकल्प; करणें किं० न करणें. [रागविशेष.

विभास [**सं०**] **पु०** (**संगीत**ांतील) एक

विभिन्न [**सं०**] **वि०** १ विदीर्ण, फाटलेला. २ पालटलेला. ३ नाना प्रकारचा; विविध.

विभीतक [**सं०**] **पु०, न०** बेहडा,—एक फळ.

विभीषण [**सं०**] **वि०** भयंकर. ॐ **विभीषणकाल पु०, विभीषणवेला स्त्री० (फलज्योतिषांत**) एक समय किं० काल.

विभु [**सं०**] **वि०** १ बलिष्ठ. २ श्रेष्ठ. ३ समर्थ; सर्वशक्तिमान्. ४ स्थिर. ५ सर्वव्यापि; व्यापक. **पु०** १ धनी. २ राजा. ३ ईश्वर. ४ शंकर. ५ आत्मा. ॐ **विभुता स्त्री०** प्रभाव.

विभूत [**सं०** विभूति] **स्त्री०** गाईंच्या शेणाची राख,—जी कपाळावर लावितात. खालीं ' विभूति ' अर्थ ६, ७ पहा.

विभूति [**सं०**] **स्त्री०** १ संपत्ति; समृद्धि. २ कल्याण. ३ माहात्म्य; तेज; प्रभाव; शक्ति. ४ अष्टसिद्धि प्रत्येक. मागें ' अष्ट ' मध्यें ' अष्टसिद्धि ' पहा. ५ लक्ष्मी ही देवता. ६ गायीच्या शेणाची राख;—जी संध्यावंदन इ० प्रसंगीं कपाळावर लावितात; भस्म. ७ लिंगायत लोक कपाळावर लावितात ती पांढरी मृत्तिका. ८ (**लाक्षणिक**) विद्या, शौर्य, पराक्रम, इ० गुणांनीं लोकोत्तर पुरुष. ॐ **विभूतीचें मूळ रेड्याच्या गांडींत** ऐहिक वैभव (पुष्कळ प्रसंगीं) पापांवर अधिष्ठित किं० आधारलेलें असतें.

विभूषण [**सं०**] **न०** १ दागिना. २ शोभादायक पदार्थ; अलंकाररूप कोणताही पदार्थ.

विभूषा [**सं०**] **स्त्री०** १ दागिना; अलंकार. २ तेज; कान्ति. ३ सौंदर्य; शोभा.

विभूषित [**सं०**] **वि०** शोभविलेला.

विभेद [**सं०**] **पु०** भेद; पृथक्करण.

विभ्रम [**सं०**] **पु०** १ भ्रमण; भटकणें. २ चक्राकार गतीनें फिरणें. ३ मनाचा घोटाळा, गोंधळ, किं० खळबळ. ४ लगबग; त्वरा; घाई. ५ चूक; चुकी. ६ भ्रांति; विचारांचा गोंधळ किं० गुंतागुंत. ७ शृंगारमूलक चित्ताचा गोंधळ किं० घोटाळा.

विभ्रांत [**सं०**] **वि०** गोंधळलेला.

विमत [**सं०**] **वि०** १ अमान्य असलेलें. २ प्रतिकूल.

विमति [**सं०**] **स्त्री०** १ मतभेद. २नापसंती.

विमना, **विमनस्क** [**सं०** विमनस्+क (प्रत्यय)] **वि०**१खिन्न; खट्टू. २ ज्याला कांहीं सुचत नाहीं असा.३कोणेकावर रुसलेला; असंतुष्ट.

विमर्द [**स०**] **पु०** १ वाटणें; मळणें. २ चोळणें; घासणें.३घट्ट आवळणें; आलिंगन; मिठी. ४ कालवाकालव; कुसकरणी. ५ गर्दी; खेखाखेच; दाटी. ६ युद्ध. ७ भांडण. ८ (**मराठींत**) उशीर; विलंब (लागणें, लावणें).

विमर्दन [**सं०**] **न०** वर 'विमर्द' पहिले सात अर्थ पहा.

विमर्श [**सं०**] **पु०** १ विचार; वाटाघाट; चर्चा. २ संशय; शंका. ※ **विमर्शात्मक निबंध पु०** एकादा सद्गुण, दुर्गुण, चालरीत, उपदेशवाक्य, बोधवचन, म्हण, वाद, इ० संबंधानें विचार साधकबाधक प्रमाणें देऊन ज्यांत नमूद केलेले असतात असा निबंध. विशेष विवरण आमचें 'निबंधलेखन आणि अनुवाद' ह्या पुस्तकांत लेखांक ५ पहा.

विमर्ष [**सं**] **पु०** १ क्रोध. २ अवकृपा. ३ (**नाट्यशास्त्र**) विघ्न,-शाप इ० कारणांमुळें नायक आणि नायिका ह्यांच्या संयोगाला व्यत्यय आणणारी कांहीं गोष्ट.

विमल [**सं०**] **वि०** १ स्वच्छ; ज्यांत मळ, घाण, किं० गदळ नाहीं असा. २ पांढरा. ३पवित्र; पापरहित. ※ **विमलाद्रि पु०** गिरनार पर्वत.

विमा [**फा० बीमा**] **पु०** १ मी मरण पावेन तेव्हां माझ्या पत्नीस किं० पुत्रांस अमुक रक्कम तुम्ही द्यावी आणि मीं तुम्हांस माझ्या हयातींत अमुक हप्त्यांनीं अमुक रक्कम भरीत जाईन, असा कोणेक संस्थेशीं कोणेकानें केलेला ठराव (करणें, ठरविणें, इ०). २ आपल्या वराबद्दल किं० मालाबद्दल केलेला अशाच शर्तींचा ठराव. **टीप**,-विम्याचे शेंकडों प्रकार आहेत. ※ **विमेकरी**, **विमेदार पु०** विमा उतरणारा.

विमाता [**सं०** विमातृ] **स्त्री०** सावत्र आई. ※**विमातृज पु०** सावत्र भाऊ.

विमान [**सं०**] **वि०** ज्याचा अपमान झाला आहे किं० करण्यांत आला आहे असा. **पु०**, **न०** १ अपमान; मानखण्डना. २ आकाशयान. ह्या अर्थी मराठींत **न०** प्रयोग आहे. ३ सात मजली वाडा. ४ राजवाडा.

विमानन न०, **विमानना स्त्री०** [**सं०**] अपमान; तिरस्कार; तुच्छ लेखणें.

विमार्ग [**सं०**] **पु०** १ भलताच रस्ता; आडमार्ग; वाईट मार्ग. २ असत्पथ; नीतीला सोडून वर्तनाची सरणी. ३ दुर्वर्तन.※**विमार्गगा स्त्री०** व्यभिचारिणी स्त्री.

विमुक्त [**सं०**] **वि०** १ नियंत्रणेंतून मोकळा झालेला. २ सोडून दिलेला. [३ वियोग.

विमुक्ति [**सं०**] **स्त्री०** १ मोकळीक. २मोक्ष.

विमुख[**सं०**] **वि०**१तोंड फिरविलेला;पराङ्मुख. २ विरुद्ध; प्रतिकूल. **टीप**,-१ ह्या दोन्ही अर्थांच्या उलट अर्थाचा शब्द 'संमुख.' **टीप**,-२ 'विमुख' चें 'विन्मुख' हें अपभ्रष्ट रूप.

विमोचन न०, **विमोचना स्त्री०** [**सं०**] १ सुटका; मोकळीक. २मोक्ष.३त्याग; सोडून देणें.

विमोहन [**सं०**] **न०** मोह पाडणें; भारणें. **पु०**, **न०** एक नरकविशेष.

वियत् [**सं०**] **न०** आकाश. ※ **वियद्गंगा स्त्री०** मंदाकिनी,-स्वर्गांतील नदी. **वियन्मणि**, **वियन्मध्यहंस पु०** सूर्य.

वियुक्त [**सं०**] **वि०** १ विरहित; रहित. २ वेगळा किं० पृथक् झालेला.

वियोग [**सं०**] **पु०** १ पृथक्पणा; वेगळेपणा. २ ताटातूट; दूर जाणें किं० असणें किं० होणें. ३ (**गणित**) वजाबाकी.

वियोजक [**सं०**] **वि०** १ वजा करावयाची (संख्या). २ ताटातूट करणारा.

वियोज्य [**सं०**]**वि०** जांतून एकादी संख्या वजा करावयाची आहे ती (संख्या).

विरका [**म०** विरणें] **वि०** कांडतांना फुटणारें (भात किं० तांदूळ); भरडतांना फुटणारी (डाळ).

विरक्त [**सं०**] **वि०** १ फार तांबडा; लालभडक. २ असंतुष्ट. ३ प्रपंचांत आसक्त नसलेला. ४ उदासीन.

विरक्ति [**सं०**] **स्त्री०** १ असंतोष. २वैराग्य; प्रपंचाचा वीट. ३ औदासीन्य. ४ कोणेका वस्तूवरुन किं० माणसावरुन मन उडणें.

विरखंड [**म०** विरी+खंड] **न०** पोफळांच्या घोसांचें आवरण किं० कवच. पोथी, कागदपत्रें, इ० सुरक्षित ठेवण्यासाठीं विरखंडाचा उपयोग करतात.

विरंगुळणें अ० क्रि० कांहीं काम आळसानें किं० थांबत थांबत करणें.

विरंगुळा [**म०** विरंगुळणें] **पु०** १ काम करुन कंटाळा किं० थकवा आला असतां मन ज्यांत किं० ज्यानें रमतें असें कांहींही,–गाणें, वाजविणें, खेळणें, इ०. २दुःखी मनाला दुःखाचा विसर पाडणारें कांहींही,–मूल, उद्योग, वाचन, देवदर्शन, इ०.

विरघळणें अ० क्रि० १ सोनें, रूपें, इ० धातु अग्निसंयोगानें द्रवरूप होणें. **टीप,**–हा अर्थ चुकीनें रूढ झाला आहे. २ साखर, मीठ, इ० दूध, ताक, इ० मध्यें घातलें असतां तें द्रवरूप होणें. ३ अति जीर्ण झाल्यामुळें (वस्त्र, पोथीचीं पानें,इ०नीं) मध्यें मध्यें फाटण्याची स्थिति पावणें. ४ आपलें पातक उघडकीस आल्यामुळें लज्जित होणें किं० शरमणें. ५ दुसऱ्याचें दुःख, विपत्ति, संकट, इ० पाहून (अंतःकरण) द्रवणें किं० कळवळणें.

विरचणें मागें ' रचणें ' सर्व अर्थीं पहा.

विरचित [**सं०**] **वि०** रचिलेला; व्यवस्थित रीतीनें मांडलेला.

विरजण [**म०** विरजणें] **न०** १ दुधाचें दहीं व्हावें म्हणून त्यांत ताक इ० जो आंबट पदार्थ घालतात तो. २ ज्याला विरजण घातलें आहे असें दूध किं० असें दूध ज्यांत ठेविलें आहे असें भांडें. ३ कांहीं काम चालू असतां त्यांत कोणी उत्पन्न केलेलें कांहीं विघ्न. ४ कांहीं काम करणाराचा उत्साह खचविणारी कांहीं गोष्ट (पडणें, घालणें). ५ विद्वता, शौर्य, देशभक्ति, इ० कोणेकाच्या अंगच्या गुणाला कालिमा किं० कलंक लावणारा त्याच्या अंगचा कांहीं गुण,–वेश्यागमन, मद्यपान, इ०.

विरजणी स्त्री०, विरजणें न० [**म०** विरजणें] दुधाला ज्या भांड्यांत विरजण घालतात तें भांडें.

विरजणें अ० क्रि० १ ताक इ० च्या संयोगामुळें (दुधानें)दह्याचें रूप पावणें.२ भांडण मिटवून (दोन पक्षांनीं)पुन्हा सलोख्याच्या स्थितींत येणें. **स०क्रि०** ताक इ० पदार्थ आंत घालून(दुधाला) दह्याचें रूप आणणें.

विरजणें न० वर ' विरजणी ' पहा.

विरजाहोम पु० गोसावीपणाची किं० संन्यासाची दीक्षा घेतांना जो होम करतात तो.

विरजीक, विरज्या, विरड मागें 'इरजीक,' ' इरज्या, ' ' इरड ' पहा.

विरड स्त्री० पूर्वाह्ण आणि अपराह्ण हे जे दिवसाचे दोन भाग ते प्रत्येक; मध्यान्हापर्यंतचा आणि नंतरचा असे जे दिवसाचे दोन भाग ते प्रत्येक.

विरडणें अ० क्रि० खरूज, नायटा, इ०नीं (त्वचा)ग्रस्त झालेली असणें.

विरडा,विरढा पु०तुळस इ०चा कोंवळा रोपा.

विरडी स्त्री०, विरडें न० मागें 'विरडी(–ढी)' पहा. मागें ' विरडें (–ढें) ' ४ अर्थ पहा.

विरणा वि० सडतांना सहज फुटणारा म्ह० ढिसूळ (तांदूळ); दळतांना फुटणारी (डाळ).

विरणें अ० क्रि० १ विरघळणें; वितळणें. २ दया इ० भावनांनीं (अंतःकरण) द्रवणें. ३ जीर्ण झाल्यामुळें (वस्त्र,पोथीचें पान,इ०) अशक्त होऊन फाटूं लागणें किं० त्याला भोकें पडूं लागणें. ४ (तांदूळ, डाळ) कांडतेसमयीं ढिसूळपणामुळें फुटणें. ५ आकाशांत जमलेले ढग नाहीसे होणें.६ (शंका, अडचण, विघ्न, इच्छा, चिंता) निरस्त

होणें. ७ (तहान, भूक, कांहीं उत्कट इच्छा) तृप्त न होतां शमणें.

विरणें स० क्रि० (शेण, काटक्या. गवत, इ०) भाजावयाच्या शेतांत पसरणें.

विरत [सं०] **वि०** १ थांबलेलें; बंद पडलेलें. २ ऐहिक विषयांची गोडी ज्याची लोपली आहे असा (मनुष्य).

विरति [सं०] **स्त्री०** १ थांबणूक; बंद पडल्याची स्थिति. २ शेवट; लय; नाश. ३ वैराग्य; निरिच्छपणा; ऐहिक सुखोपभोगांपासून पराङ्मुखता किं० त्यांचा वीट.

विरथ [सं०] **वि०**१ रथांतून उतरलेला किं० पडलेला. २ रथांतून ओढून काढलेला.

विरधाळें [सं० वृद्धि+आलय] **न०** कुटुंबांत मुलाच्या जन्मामुळें कुटुंबांतील माणसांना आलेलें अशौच; सुवेर; सोयर.

विरपणी [म० विरपणें] **स्त्री०** शेतांतील गवत, काटक्या कुटक्या, झाडपाला, इ० उपटून जमीन स्वच्छ करण्याची क्रिया.

विरपणें स० क्रि० (शेतांतील) रद्दी गवत इ० उपटून (शेत) स्वच्छ करणें.

विरपल स्त्री० जमीन भाजल्यावर न जळतां राहिलेल्या ज्या काटक्याकुटक्या,गवत,इ०त्यांचा समुदाय.

विरंबणें अ० **क्रि०** १ शरमणें; लज्जित होणें. २ शिजलेला (भात) पचपचीत होणें किं०पाणचट होणें. [३ सूर्यास्त.

विरम [सं०] **पु०** १ थांबणें. २ विसावा.

विरमणें [स० वि+रम्] **अ० क्रि०** १ थांबणें; कांहीं क्रिया करण्यापासून निवृत्त किं० पराङ्मुख होणें. २ लज्जित किं० खजिल होणें.

विरल,विरळ[सं०]**वि०**१मध्यें मध्यें फटी किं० भेगा किं० अंतर असलेलें. २ क्वचित् आढळणारा किं० पाहाण्यांत येणारा; दुर्मिळ. ॐ **विरलागत वि०** क्वचित् होणारा, आढळणारा, किं० येणारा.

विरलणें,विरळणें [म०विरल]**अ०क्रि०**(वस्त्र) जुनेपणामुळें फाटण्याच्या स्थितीस आलेलें असणें.

विरली स्त्री०,विरलें न० मागें ' इरलें' पहा.

विरवड स्त्री० मागें ' इरड ' पहा. मागें ' इरळ ' पहा.

विरवदी (-धी,-ली) **स्त्री०** स्त्रियांच्या पायाच्या बोटांत घालावयाचें एक रुप्याचें भूषण.

विरविरणें मागें ' रिवरिवणें ' पहा.

विरविरी, विरविर स्त्री० रिवरिवण्याची क्रिया किं० ह्या क्रियेची जीभ इ०ना होणे ती भावना. मागें ' रिवरिवणें ' पहा.

विरविरीत वि० ज्याची मागावर कच्ची ठासणी झाली आहे किं० ज्याच्यावर फार वापर पडल्यामुळें ज्याचे तंतु विरळ झाले आहेत असें (वस्त्र).

विरस [सं०] **वि०** १ शुष्क, रसहीन, बेचव (आंबा, इ० फळ किं० कांहीं खाद्य).२ पांचट (भाषण). ३ खिन्न, उदास (मन).४ निरुत्साहाची (स्थिति,कृति).५आनंदरहित (अंतःकरण).

विरह [सं०]**पु०**१वियोग; ताटातूट.२ अभाव. ॐ **विरहज्वर पु०** प्रेमाचें माणूस जवळ नसल्यामुळें होतो तो ताप किं० वाटतें तें दुःख. **विरहाग्नि, विरहानळ पु०** विरहरूपी अग्नि. **विरहिणी स्त्री०** प्रियपतीच्या वियोगामुळें पीडित झालेली स्त्री. **विरही वि०** ज्याला विरह झाला आहे असा.

विरहित [सं०] **वि०** १ त्यक्त; सोडलेला. २ जें असावें तें नसलेला; उ० मुठीनें विरहित चाकू काय कामाचा ? उ० स्त्रीचें कुंकवानें विरहित कपाळ पाहून मला दुःख होतें. ३ कांहीं विशिष्ट गुण, धर्म, पदार्थ, इ०ज्यांत नाहीं असा; हीन; शून्य; उ० औदार्यरहित म्ह० ज्याचे ठायीं औदार्य नाहीं असा. ४ अवशिष्ट; शिलकीचा; उरलेला.

विरल, विरळणें, विरळागत मागें 'विरल,' ' विरलणें, ' ' विरलागत ' पहा.

विरळा [म० विरल] **वि०** क्वचित् येणारा, होणारा, आढळणारा, किं० घडणारा; उ० परदुःखानें दुःख पावणारा माणूस विरळा. **टीप,**— लिंगवचनांप्रमाणें न फिरणारें हें विशेषण आहे.

विराकत, विराखत स्त्री० १ लघ्वी; मूत. २लघ्वी करणें; मुतणें. मागें ' इराकत ' पहा.

विराग [सं०] **पु०** १ असंतोष; अप्रीति. २ उदासीनता. ३ निरिच्छता; वैराग्य. ॐ **विरागी पु०** ऐहिकसुखाचा ज्याला वीट आला आहे

असा; विरक्त. ' विरागी ' चा मराठींत अपभ्रंश ' वैरागी ' असा झाला आहे.

विराजणें [सं० वि+राज] अ० क्रि० १ शोभणें; खुलणें; उठून दिसणें. २ चकचकणें; झळकणें.

विराजमान [सं०] वि० शोभणारा; उठून दिसणारा; उ०अध्यक्षाच्या खुर्चीवर शिवरामपंत विराजमान होतांच सभेच्या कामास सुरवात झाली.

विराट् [सं०] पु० १ तेज; शोभा. २ क्षत्रिय. ३ ब्रह्मांडरूपी देह; ब्रह्मांड. ४ (**वेदान्त**) ब्रह्माण्डाभिमानी आदिपुरुष. ५ जगदाकाररूपी जो ईश्वराचा देह तो. ꙮ **विराट्पुरुष** पु० ब्रह्माण्डव्यापी सगुण ब्रह्म. **विराट्स्वरूप** न० ब्रह्माण्डव्यापी आत्मस्वरूप.

विराम [सं०] पु० १ थांबणें. २ विसावा. ३ अखेर; शेवट; नाश. ४ वाक्यांत किं० गाण्यांत किं० भाषणांत थांबण्याचें ठिकाण. ꙮ **विरामचिन्ह** न० प्रश्न, उद्गार, आश्चर्य, विसाव्याचें स्थान, इ० चिन्हें लिहिलेल्या वाक्यांत योजतात तीं प्रत्येक.

विराव [सं०] पु० शब्द; आवाज; ओरडणें.

विरी [सं० वीर्य] स्त्री० चुना, डिंक, खळ, पीठ, औषध, इ० च्या अंगचा जो सत्त्वांश तो (जाणें, असणें).

विरी स्त्री० पोफळाच्या घडाला वेष्टिणारें साल. मागें ' विरखंड ' पहा.

विरिंच, विरिंचि [सं०] पु० ब्रह्मदेव.

विरुद्ध [सं०] वि० १ आडविलेला; थांबविलेला. २प्रतिकूळ; उलट; विसंवादी. ३ अपायकारक. ४ असंबद्ध (भाषण इ०).

विरूप [सं०] वि० १ कुरूप; बेढब. २ न जुळणारा; विसंवादी. ꙮ **विरूपाक्ष** पु० शंकर.

विरूळ [म० विरळ] वि० विरळ. मागें ' विरळ ' पहा. हा शब्द अशिक्षितांत रूढ आहे.

विरें [म० विरी] न० विरीचा केलेला द्रोण (तूप, आमटी, इ० साठीं). मागें ' विरी ' पहा. [ढाळक.

विरेक [सं०] पु० १ ढाळ, जुलाब. २

विरेचन [सं०] न० १ ढाळ; रेच;जुलाब. २ ढाळ करणारें औषध.

विरोदी स्त्री० पायाच्या बोटांत बालवयाचें स्त्रियांचें भूषण. मागें ' विरवली ' पहा.

विरोध [सं०] पु० १ अडथळा; आटकाव. २ गराडा; वेढा. ३ नियंत्रणा; निग्रह; दाब. ४ असंबद्धता; विसंवादिता. ५ वैर; शत्रुत्व. ६ कलह; भांडण.७ पु० (**साहित्य**) दोन वस्तूंमध्यें खरोखरी विरोध नसतां त्यांच्यांत विरोध असल्याचें विधान केलें असतां ' विरोध ' हा अलंकार होतो.ह्याला 'विरोधाभास' असेंही म्हणतात.ह्या अलंकाराचीं उदाहरणें आमचें अर्थालंकारांचें निरूपण'ह्या पुस्तकांत पाहावीं. ꙮ**विरोधी** [सं० विरोधिन्] वि० १ विरोध करणारा. २ विसंगत (भाषण,वर्तन). पु० वैरी, शत्रु. **विरोधी भक्ति** स्त्री० देवाच्या हातून आपणाला मरण आल्यानें आपणाला मुक्ति मिळेल अशा भावनेनें त्याच्याशीं मुद्दाम शत्रुत्व करणें; अशा प्रकारची देवाची भक्ति करणारा जो तो ' विरोधी भक्त. '

विरोली स्त्री० विरवली. मागें ' विरोदी ' पहा. [सर्प.

विरोळा पु० जलांत राहाणारा एक निर्विष

विऱ्हा पु० ओढा; नाला; पर्‍हा.

विलग [सं० विलग्न] न० १ सुसंगतपणा किं० व्यवस्थितपणा किं० सुसंघटितपणा यांचा लोप किं० बिघाड; विसकळीतपणा; उ० बायको मेल्यामुळें संसाराचें विलग्न झालें.२विरोध;भांडण. वि०दूर असलेलें;दूर केलेलें;अंतरावर पडलेलें; उ० माझी चार शेतें आहेत आणि तीं एकमेकांपासून विलग आहेत.

विलग्न [सं०] वि० १ चिकटलेलें, २ कृश; बारीक. न० (**ज्योतिष**) उदय पावलेला राशि.

विलंघणें [सं० वि+लंघ्] स०क्रि० (देश, समय, प्रतिज्ञा, उपदेश, इ०) उल्लंघिणें किं० मोडणें किं० मागें टाकून पुढें जाणें; ०चें अतिक्रमण करणें.

विलंघन [सं०] न० उल्लंघन; अतिक्रमण.

विलज्ज [सं०] वि० निर्लज्ज; बेशरम.

विलपणें [सं० वि+लप्]अ०क्रि० १ बोलणें.

२ बडबड, ३ रडणें; शोक करणें.

विलपन [**सं०**] **न०** १ बोलणें. २ बडबड; असंबद्ध भाषण. ३ रडणें. ४ शोक.

विलंब [**सं०**] **पु०** १ खोळंबा; हरकत. २ उशीर.

विलंबिका [**सं०**] **स्त्री०** १ (वैद्यकांत) मलावरोध. २ विषूचिका, अलसिका, आणि विलंबिका, ह्या ज्या पटकीच्या रोगाच्या तीन अवस्था त्यांतील शेवटची. मागें ' अलसिका ' पहा.

विलंबित [**सं०**] **वि०** १ उशीर लावणारा; उशीर करणारा. २ मंद (गायन, वादन, इ०). ३ लांबणीवर टाकलेलें; रेंगाळत पडलेलें (काम इ०). **न०** उशीर; विलंब.

विलंबी [**सं०** विलंबिन्] **वि०** १ रेंगाळणारा. २ उशीर लावणारा; चेंगट. ३ रेंगाळत चाललेलें किं० चालविलेलें (काम). **पु०** साठ संवत्सरांतील विसावा संवत्सर.

विलय [**सं०**] **पु०** १ विरणें; मिळून जाणें. २ नाश. ३ प्रलय. ❀ **विलयास जाणें** नष्ट किं० विध्वस्त होणें; नाश पावणें.

विलसणें [**सं०** वि+लस्] **अ० क्रि०** १ प्रकाशणें; चकाकणें. २ दिसणें; प्रकट होणें. ३ खेळणें; क्रीडा करणें.

विलसन [**सं०**] **न०** १ शोभणें. २ क्रीडा.

विलसित [**सं०**] **वि०**१ शोभणारा; चकाकणारा. २ उत्पन्न झालेला; दृग्गोचर झालेला. **न०** १ शोभणें; चमकणें. २ प्रादुर्भाव; प्रकट होणें. ३ क्रीडा; खेळणें; लीला. ४ हावभाव.

विलक्षण [**सं०**] **वि०** १ भिन्न; वेगळा; निराळा. २ चमत्कारिक; तऱ्हेवाईक; विचित्र. ३ लोकोत्तर; अलौकिक. ४ अशुभलक्षणी.

विला [**फा०**] **स्त्री०** समय; प्रसंग; संबंध (फक्त दफ्तरी भाषेंत).❀**दर ई विला क्रि०वि०** ह्या संबंधांत किं० बाबतींत.

विलाचें जाळें न० मासे पकडण्याचें मोठें जाळें. मागें ' बुरीचें जाळें ' पहा.

विलाज [**अ०** इलाज] **पु०** इलाज; उपाय; उपचार; युक्ति. **टीप,**–हा शब्द अशिक्षितांतच रूढ आहे.

विलाप [**सं०**] **पु०** रडणें; शोक.

विलापणें [**अ००** वि+लप] **अ० क्रि०** रडणें; शोक करणें.

विलायत [**सं०** विलायत्] **स्त्री०** १ प्रांत. २ कोणताही परदेश. ३ इंग्लंड. ४ यूरोप. ५ फळझाड, प्राणी, इ० चें मूळचें उत्पत्तिस्थान. ❀ **विलायती वि०** १ परदेशी. २ अपरिचित. ३ विचित्र. **विलायती कावा पु०** फसविण्याची कांहीं युक्ति,–जी दिसण्यांत प्रामाणिक आणि असण्यांत लबाडीची असते.

विलास [**सं०**] **पु०** १ खेळ; क्रीडा. २ शृंगारचेष्टा. ३ हावभाव. ❀ **विलासी वि०**विषयासक्त; गुलहौसी;सुखांत सदा निमग्न असणारा. **विलासवती स्त्री०** १ विलास करणारी स्त्री. २ सुंदर स्त्री.

विलसिका [**सं०**] **स्त्री०** शृंगारमय आणि [एकांकी नाटक.

विलीन [**सं०**] **वि०** १ वितळलेला. २ विरघळलेला. ३ नष्ट; अदृश्य झालेला. ४ तल्लीन.

विलुलित [**सं०**] **वि०** १ विसकटलेला. २ अस्थिर; चंचल. ३ गळालेला. ४ चुरगळलेला; कुसकरलेला.

विलेप पु०, विलेपन न० [**सं०**] १ उटी लावणें. २ उटी लावण्याचें द्रव्य; उटणें. ३ लेप; गिलावा.

विलेपिका, विलेपी, विलेपिनी [**सं०**] **स्त्री०** चोपट पाणी घातलेली कण्हेरी; आटवल.

विलेपित [**सं०**] **वि०** उटी इ० नीं चोपडलेलें (अंग).२जें चोपडलें तें (द्रव्य,–उटी इ०).

विलोकणें [**सं०**वि+लोक्(पाहाणें)]**स०क्रि०** १ पाहाणें; बघणें. २ विचारांत घेणें. ३ (शास्त्रादींचें)अध्ययन किं०(अध्ययनाची) उजळणी करणें.

विलोकन [**सं०**] **न०** १ पाहाणें; बघणें. २ अध्ययन. ३ उजळणी.

विलोचन [**सं०**] **न०** १ पाहाणें; बघणें. २ डोळा. ❀ **त्रिलोचन, भाललोचन पु०** शंकर.

विलोप [**सं०**] **पु०** १ गळणें. २ लुटणें. ३ नाश; विध्वंस; ऱ्हास.

विलोभन [**सं०**] **न०** १ भुलविणें; फसविणें; मोह पाडणें. २ लालूच. ३ भेट; नजराणा. ४ मोहक वस्तु.

विलोम [**सं० वि०** १ विपरीत; उलटें. २

(**गणित**) व्यस्त.३ प्रतिकूळ. ४ उलट्या दिशेनें किं० सरणीनें कांहीं क्रिया करणें किं० केलेली क्रिया; उ० 'रामाला भाला मारा' हें वाक्य विलोम केलें तरी तसेंच होतें. ஃ **विलोमज, विलोमवर्ण, विलोमजात** वि० प्रतिलोम विवाहापासून झालेला. **विलोमजिह्व पु०** हत्ती. **अनुलोम विवाह पु०** वरच्या जातीचा पुरुष आणि खालच्या जातीची स्त्री यांचा विवाह. मागें 'अनुलोम' मध्यें हा शब्द पहा. **विलोमोत्पन्न, विलोमजात, विलोमवर्ण, प्रतिलोमज वि०** वरच्या वर्णाची स्त्री आणि खालच्या वर्णाचा पुरुष यांच्या संयोगापासून जन्मलेला. मागें 'प्रतिलोम' पहा.

विल्हय स्त्री०, विल्हाणा पु०, विल्हाणें न०[**अ०** विलाइयाह] १कुटुंब. २जात.३जातीचा विस्तार. ४ एका मूळपुरुषापासून आलेला जो वंशविस्तार तो.

विल्हय, विल्हेवाट [**अ०** विलाइयाह्+**म०** वाट]**स्त्री०** १ उधळपट्टी; संपलेपणाची स्थिति; उ० बाप मेल्यावर एका वर्षांत त्याणें लाखाच्या संपत्तीची विल्हेवाट (किं० विल्हय) लाविली. २ पदार्थ शिस्तीनें ठेवणें; जेथल्या तेथें ठेवणें; जिकडच्या तिकडे पोचविणें किं० देऊन टाकणें. ३ योग्य प्रकारची मांडणी किं० व्यवस्था.

विल्हा पु०,विल्हे स्त्री० [**अ०** विलाइयाह्] १ वर्ग; गट; समूह; कांहीं एका तत्त्वावर केलेले समूह; उ० सकाराचा विल्हा म्ह० श, ष, स, हीं अक्षरें; उ० पत्रांच्या विल्हे लाविलेल्या असल्या म्हणजे हावें तें पत्र तावडतोब पाहातां येतें. २ एक गांव, किल्ला, इ० च्या अमलाखालीं मोडणारा प्रदेश. ஃ **विल्हेस लावणें** (किं० **देणें** किं० **करणें**) हवालीं करणें देखरेखीस ठेवणें. **विल्हेस लावणें** यथास्थानीं ठेवणें; सदरवारीनें मांडणें. **विल्हेस लागणें** योग्य सरणीनें मांडला जाणें; व्यवस्थित रूपांत घातला जाणें. **विल्हेवार क्रि० वि०** योग्य क्रमानें. **विल्हेवारी स्त्री०** शिस्तवार मांडणी.

विल्हाळ, विल्हळ [**सं०** विह्वल] **पु०** १ आपल्या दुःस्थितीसंबंधाची खोटी ओरड किं० चरफड. २ अशुभ वाचा. ஃ **जिवाचे विल्हाळ करणें** आपली स्थिति दुःखमय आहे अशी पिरपिर करीत बसणें. **विल्हाळगौर स्त्री०** १ सदा चरफडण्याच्या स्वभावाची स्त्री. २ सदा अशुभ वाणी बोलणारी स्त्री. **विल्हाळ्या वि०** सदा चरफडणारा; पिरपिऱ्या.

विल्हाळणें, विल्हळणें [**सं०** विह्वल] **अ० क्रि०** १ विवळणें; चरफडणें. २ पिरपिरणें. ३ अशुभ वाणी बोलत राहाणें.

विवंचणें [**सं०** वि+वच् वंच्] **अ० क्रि०** काळजी करीत बसणें.

विवंचना [**सं०**] **स्त्री०** काळजी; चिंता.

विवर [**सं०**] **न०** १ छिद्र; बीळ; भोक. २ डोंगरांतील गुहा. ३ भूमीच्या आंतील पोकळ भाग.४वृक्षाची ढोली.५एकांत.६संधी; अवकाश. ७ पाताळ.८कोणेकाचें कांहीं व्यंग; उणें; दूषण.

विवरण [**सं०**] **न०** १ उघडणें. २ वर्णन.३ स्पष्टीकरण. ४ व्याख्या. ५ व्याख्याग्रंथ.

विवरणें[**सं०**वि+वृ (उघडें किं० स्पष्ट करणें)] **स० क्रि०** (कांहीं विषयाचें) स्पष्टीकरण करणें; विस्तारानें सांगणें किं० वर्णिणें; (कांहीं) विषयाचा साधकबाधक गोष्टी विचारांत घेऊन खल करणें.

विवर्जन, विवर्जित, विवर्जणें मागें 'वर्जन,' 'वर्जित,' 'वर्जणें' पहा.

विवर्ण [**सं०**] **वि०** १ निस्तेज; फिका. २ वाईट रंगाचा. ३ उदासीन; म्लान. **पु०** जातीतून बहिष्कृत.

विवर्त [**सं०**] **पु०** १ चक्राकार गति. २ परत वळणें. ३ (**वेदान्त**) आभास; भ्रम. ४ (**वेदान्त**) मायेचें कार्य; नश्वर वस्तु. ५ ढीग; समुदाय.

विवर्तन [**सं०**] **न०** १ वर 'विवर्त' अर्थ १ आणि २ पहा. २ परत फिरणें; उलटणें. ३ उलट वर्तन. ४ लोळणें. ५ कुशीवर वळणें. ६ बदल; पालट; रूपांतर.

विवर्धन [**सं०**] **न०** वाढ; वृद्धि.

विवश [**सं०**] **वि०** १ स्वतंत्र; दुसऱ्याच्या नियंत्रणाखालीं नसलेला. २ बेशुद्ध; निश्चेष्ट. ३ बेफाम. ४ घाबरलेला.

विवशी, विंवशी स्त्री० १ हाल, अपेष्टा, संकटें, चिंता, इ० मनुष्याच्या भोगास घालणारी

देवता; उ० त्याच्या घरांत विवशी शिरली आणि तो किमयाच्या नादास लागला आणि सर्वस्वीं बुडाला. २ वाईट पायगुणांची स्त्री किं० कोणीही माणूस किं० पशु.३एकाद्या माणसास किं० वंशास जडलेला जो व्याधि,–रक्तपीति,दमा,क्षय,इ०तो.

विवसा [**सं०** व्यवसाय] **पु०** उद्योग, धंदा (अशिक्षितांत रूढ). [कल.

विवसा स्त्री० (कवितेंत) इच्छा;नाद;मनाचा

विवळणें [**सं०** विह्वल] **अ० क्रि०** कण्हणें; दुःखानें पिरपिरणें; कांहीं काम बिघडल्यामुळें दुःखानें चरफडणें किं० अस्वस्थ होणें.

विवक्षा [**सं०**] **स्त्री०**१बोलण्याची इच्छा.२ अभिप्राय;हेतु;आशय.३ अपेक्षा. ४ संशय;पृच्छा.

विवक्षित[**सं०**]**वि०** १ उद्दिष्ट.२जें बोलावयाचें आहे किं०जें बोलावयाचें म्हणून योजलें किं०इच्छिलें आहे तें;अभिप्रेत. **न०** १हेतु.२अर्थ. ३अभिप्राय. **पु०** (**मराठांत**)गांव,राज्य,संस्था,इ०मध्यें चातुर्य, पराक्रम,इ०कांहीं गुणांमुळें अग्रगण्य जो माणूस तो.

विवाद [**सं०**] **पु०** १ वाद; भांडण. २ विरोध; विसंवाद. ३ फिर्याद; खटला.४ चर्चा.

विवाह [**सं०**] **पु०** १ स्त्री आणि पुरुष यांचा धर्माला अनुसरून घडवून आणलेला जो संबंध तो; लग्न. विवाह आठ प्रकारचे आपल्या शास्त्रकारांनीं सांगितले आहेत. मागें ' अष्ट ' मध्यें 'अष्ट विवाहविधि ' पहा. ❀ **विवाही, व्याही पु०** आपल्या पुत्राचा किं० कन्येचा सासरा. **विवाहदीक्षा स्त्री०** लग्नाचा संस्कार.

विवाहणें [**म०** विवाह] **स० क्रि०** १ पुरुषानें (स्त्रीला) विवाहाच्या धर्मविधीनें पत्नी करून घेणें. २ (कोणा कुमारिकेचें) लग्न कोणा वराशीं करून देणें. ३ (कोणा वराचें)कोणा कुमारिकेशीं लग्न करून देणें. **टीप**,–ह्या तिन्हि अर्थीं कवितेंतच रूढि.

विवाह्य [**सं०**] **वि०** १ज्याचें लग्न करावयाचें आहे असा. २ लग्नाला योग्य.**पु०** १ वर.२ जांवई.

विविक्त [**सं०**] **वि०** १ वेगळें केलेलें; भिन्न. २ निर्जन; ओसाड; एकांतांतील. ३ स्पष्टपणें ठरविलेलें. ४ शुद्ध; पवित्र. **न०** एकान्त स्थळ.

विविध [**सं०**] **वि०** नाना प्रकारचा; हरएक जातीचा. ❀ **विविध परिमाणें न० अ०** व० हीं चार प्रकारचीं आहेत. (१) रुपये, आणे, पै, इ० नाण्यांच्या रूपानें सांगितलेलीं परिमाणें. (२) शेर; तोळे, इ० भारवाचक शब्दांच्या रूपानें सांगितलेलीं परिमाणें. (३) वर्ष, दिवस, इ० काल दाखविणारीं परिमाणें; (४) महत्त्वदर्शक परिमाणें म्ह० लांबी, रुंदी, क्षेत्र, घनफळ, इ० दाखविणारीं परिमाणें.

विवृत [**सं०**] **वि०** १ उघडलेलें. २ स्पष्ट किं० जाहीर केलेलें किं० झालेलें. ३ खुलासेवार; स्पष्ट. ४ प्रफुल्लित (फूल इ०).५ पसरलेलें; विस्तृत.

विवृति [**सं०**] **स्त्री०** मागें ' विवरण ' पहा.

विवृत्त [**सं०**] **वि०** १ वळविलेलें. २ गरगर फिरविलेलें.

विवेक [**सं०**] **पु०** १ सारासार विचार. २ खल;वाटाघाट.३पृथक् करणें; दोन पदार्थांतील भेद दाखविणें.४(**मराठींत**)दुःखमय विचारांपासून मन निवृत्त करून तें शांत ठेवण्याचा प्रयत्न. ❀ **सदसद्विवेक पु०** चांगल काय आणि वाईट काय हें स्पष्टपणें ठरविणें. हें ठरविण्याला समर्थ अशी जी बुद्धि ती ' सदसद्विवेकबुद्धि '. **विवेकी वि०** विवेक अर्थ ४ करतो तो.

विवेचक [**सं०**] **वि०** विषयाचें बारकाईनें परीक्षण करणारा.

विवेचन [**सं०**] **न०** १ स्पष्टीकरण. २ एकाद्या विषयाचें सांगोपांग निरूपण; व्याख्यान.

विशंक [**सं०**] **वि०** १ ज्याला शंका नाहीं असा; निःशंक. २ बिनधोक.

विशंकट [**सं०**] **वि०** १ जोरदार.२ प्रचंड; मोठें; भयंकर.

विशकल [**सं०**] **वि०** १ फुटलेला; फोडलेला.२ज्याचे घटक भाग वेगळे केले आहेत असा.

विंशति [**सं०**] **स्त्री०** वीस ही संख्या.

विशद [**सं०**] **वि०** १ निर्मळ; स्वच्छ. २ पांढरें. ३ शोभिवंत. ४ स्पष्ट; उघड.५ महिन्याचा शुक्ल (पक्ष). ६ज्यांत कांहीं घोटाळा किं०गुंतागुंत नाहीं असा.

विशर पु०, विशरण न० [**सं०**] १ नाश; विध्वंस. २वध.

विशाख [**सं०**] **वि०** शाखारहित(वृक्ष). **पु०** कार्तिकस्वामी; कार्तिकेय.

विशाखा स्त्री० सोळावें नक्षत्र.

विशारद [सं०] वि० १ हुशार; प्रवीण; वाकबगार. २ विद्वान्; पंडित.

विशाल [सं०] वि० मोठा; विस्तीर्ण.

विशिख [सं०] पु० बाण. वि० ज्याला शेंडी नाहीं असा (मुसलमान, ख्रिस्तांव, इ०).

विशिष्ट [सं०] वि० १ निराळें. २ व्यक्तीचें; वैयक्तिक; असामान्य. ३ युक्त; सहित. ४ श्रेष्ठ. ५ अमुक प्रकारचा किं० गुणाचा. ६ कांहीं गुण, प्रकार, इ० वरून वेगळा केलेला. ॐ **विशिष्टाद्वैत** न० मायाविशिष्ट ब्रह्म हे जगाचें कारण असें मत. **विशिष्टगुरुत्व** न० एकादा पदार्थ आणि पाणी हीं सारख्याच आकाराचीं घेऊन त्यांचीं वजनें केलीं असतां त्या पदार्थाचें वजन पाण्याच्या जितकें पट भरतें तितकी पट. कांहीं आकारमानाचें कोणत्याही पदार्थाचें वजन हें तितक्याच आकारमानाच्या पाण्याच्या वजनाच्या किती पटीनें हलकें किं० जड असेल तितकी पट त्या पदार्थाचें विशिष्ट गुरुत्व; उ० सोन्याचें विशिष्ट गुरुत्व १९ आहे; लोखंडाचें $७\frac{१}{२}$ आहे.

विशी [म० वीस] स्त्री० १ वीस वर्षांचें वय. २ वीस वस्तूंचा समुदाय किं० समुच्चय. ॐ **विशीं विद्या तिशीं धन** (किं० **पराक्रम**) मागें 'तिशी' मध्यें पहा. **विशीबाविशी**, **विशीएकांणिशी** स्त्री० किंचित् फेरफार किं० बदल (आजार, हवा, इ० बाबतींत).

विशीर्ण [सं०] वि० १ फुटलेलें; तुकडे तुकडे ज्याचे झाले आहेत असें. २ जीर्ण, शुष्क (वृक्ष, पान, इ०). ३ चुरगळलेलें, कोमेजलेलें (फूल, पान).

विशुद्ध [सं०] वि० १ मलरहित; निर्मल. २ निष्पाप. ३ सद्गुणी. ४ बिनचूक.

विशुद्धि [सं०] स्त्री० १ शुद्ध करणें. २ शुद्धपणा; शुद्धता. ३ बिनचूकपणा; निर्दोषपणा. ४ प्रायश्चित्त. ५ शंकेचें निवारण.

विशूचिका पुढें 'विषूचिका' पहा.

विशृंखल [सं०] वि० ज्याला आडविणारें किं० थांबविणारें कोणी नाहीं किं० कांहीं नाहीं असा; उच्छृंखल; उत्संखळ.

विशेष [सं०] वि० १ असामान्य. २ विपुल. ३ अधिक. ४ वेगळ्या प्रकारचें किं० दर्जाचें. पु० १ अन्यत्र नसणारा पदार्थाचा कांहीं गुण; पदार्थाला सजातीयांपासून वेगळा किं० भिन्न करणारा त्याच्या अंगचा कांहीं गुण; गुणाधिक्य. २ कांहीं एका समुदायापैकीं एक व्यक्ति; उ० आंबा हा वृक्षविशेष आहे म्ह० वृक्षांच्या समुदायांत आंबा हा एक व्यक्ति आहे. ३ प्रकार; भेद. ४ फरक; भिन्नता; तफावत. ५ घर, गांव, यंत्र, बाजार, इ० तील प्रेक्षणीय गोष्टी किं० पदार्थ किं० भाग. ६ उत्तम व्यक्ति; उ० अतिथिविशेष म्ह० उत्तम किं० वंद्य अतिथि. ७ कपाळावरचा गंधाचा टिळा. ८ (**साहित्य**) एक अलंकार. (१) एकाद्या वस्तूचा लोकांत प्रसिद्ध असा जो आधार तो नसतांहीं ती वस्तु राहूं शकते असें वर्णन; (२) एकादी वस्तु आपल्या नेहमींच्या रूपांत एकाच वेळीं अनेक ठिकाणीं राहूं शकते असें वर्णन; (३) कोणी माणूस कांहीं गोष्ट करीत असतां दुसरीही कांहीं अशक्य अशी गोष्ट त्याच यत्नानें करतो असें वर्णन. विशेष खुलासा, उदाहरणे, इ० आमच्या 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. ॐ **विशेषज्ञ** वि० शहाणा. **विशेषविधि** पु० मुद्दाम सांगितलेला नियम. **विशेषनाम** न० (**व्याकरणांत**) ज्या नामानें एकाच व्यक्तीचा बोध होतो तें नाम; व्यक्तीचें जें नांव तें विशेषनाम; उ० गोदी, कृष्णराव, इ०. **विशेषोक्ति** स्त्री० (**साहित्य**) कारण उपस्थित असून कार्य घडलें नाहीं अशा अर्थाचें विधान. उदाहरणें इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **विशेषेंकरून** क्रि० वि० मुख्यत्वें करून; विशेषतः. **विशेषात्कार** पु० १ विशेषपणा; पदार्थाचें वैशिष्ट्य; पदार्थाला त्याच्या सजातीयांपासून भिन्न करणारा कांहीं गुण किं० धर्म. **विशेषात्कारें करून** क्रि० वि० विशेषें करून; विशेष गुण विचारांत घेतले असतां; विशेष स्थिति, समय, इ० विचारांत घेऊन.

विशेषक [सं०] पु०, न० १ विशेष गुण. २ कपाळावरील टिळा. ३ उटी इ०नीं शरीर इ० भूषविण्याची क्रिया. ३ एकत्र अन्वित असे तीन श्लोक समुच्चयानें; तीन श्लोकांचें बनविलेलें एक वाक्य.

विशेषण [सं०] न० १ भेद; फरक. २ वेगळेपणा; भेदकत्व. ३ (**व्याकरण**) पदार्थाचा गुण दाखविणारा शब्द. ४ विशिष्ट गुण; व्यावर्तक असा कांही धर्म.

विशेष्य [सं०] न० (**व्याकरण**) ज्या नामाचा गुण किं० धर्म विशेषण दाखवितें तें नाम; उ० ' चांगला मुलगा ' यांत ' चांगला ' हें विशेषण आणि ' मुलगा ' हे विशेष्य. ⁂ **विशेष्यानिघ्न** वि० विशेष्याच्या लिंगवचनादिकाप्रमाणे बदल पावणारें (विशेषण).

विशोक [सं०] पु० १ शोकाचा अभाव. २ अशोक वृक्ष. वि० शोकरहित.

विशोधन [सं०] न० १ साफसूफ करणें; मलरहित करणें; चुका किं० दोष काढून टाकणें; घाण काढून टाकणें. २ तपासणें. ३ प्रायश्चित.

विशोध्य [सं०] न० कर्ज.

विंशोपक [सं० विंशति] न० पदार्थाचा वीसावा भाग. पुढें ' विश्वा ' अर्थ १ पहा.

विशोभित [सं० वि (नाहीं) + शुभ् (शोभणें)] वि० ज्याच्या शोभेंत कांहीं कमीपणा आला आहे असा; शोभिवंत न दिसणारा; उ० तुझी जरीची टोपी विशोभित दिसते.

विश्रब्ध [सं०] वि० १ विश्वासणारा. २ निश्चिंत; निर्भय. ३ धमकदार; जोरदार. ४ शांत; निश्चल.

विश्रम [सं०] पु० १ थांबणें; कांहीं कामापासून निवृत्त होणें. २ विसावा. ३ विश्रांतिस्थान.

विश्रंभ [सं०] पु० १ विश्वास; खात्री; भरंवसा. २ गुप्त गोष्ट; रहस्य. ३ विश्रांति. ४ प्रेमकलह.

विश्रांत [सं०] वि० थांबलेला; बंद पडलेला.

विश्रांति [सं०] स्त्री० १ थांबणें. २ विसावा; अमरहार. ३ विश्रांति घेण्याची जागा ४ आराम किं० आनंद किं० शांति वाटविणारी कांहीं वस्तु किं० गोष्ट. ५ चालू क्रियेंत अडथळा किं० थांबणूक; उ० मी येथे लिहीत आहे, येथली दऊत तुम्ही घेऊन गेलांत तर येथें विश्रांति होणार. ६ चौकशीचें पर्यवसान किं० समाप्ति; उ० चोरी कोणी केली असावी म्हणून जी चौकशी मी चालविली तिची विश्रांति खंडोबावर झाली (म्ह० खंडोबानें चोरी केली असें माझ्या मतानें ठरलें). ७ रिकामपणा; फुरसूत; उ० मला आतां विश्रांति आहे, तुमच्या काशीयात्रेची हकीगत स्वस्थपणानें सांगा. ८ मदार; भिस्त; आधार; टेंका उ० मला नोकरी पाहिजे आहे; माझ्या आशेची विश्रांति तुमच्यावर आहे.

विश्राम [सं०] पु० १ विश्रांति; विसावा. २ विसाव्याचें स्थान. ३ आनंद वाटविणारी किं० मनाला शांत करणारी कांहीं गोष्ट. ४ परमेश्वर.

विश्रामणें [म० विश्राम] अ० क्रि० विसावा घेणें.

विश्रामा [म० विश्राम] पु० विसांवा.

विश्रुत [सं०] वि० प्रख्यात; प्रसिद्ध; उ० लोकविश्रुत म्ह० सर्व लोकांस ठाऊक असलेला.

विश्रुति [सं०] स्त्री० कीर्ति; यश; प्रख्याति.

विश्लथ [सं०] वि० सईल; ढिलें; विसकळित.

विश्लेष [सं०] पु० १ वेगळें करणें; पृथक् करणे. २ वियोग; ताटातूट. ३ (**गणित**) वजाबाकी.

विश्व [सं०] न० जग; दुनिया. वि० सर्व; दरोबस्त. पु० अ० व० विश्वेदेव. ⁂ **विश्वात्मा** [सं० विश्वात्मन्] पु० १ परमात्मा. २ शंकर. ३ विष्णु. **विश्वात्मना** क्रि० वि० पूर्णपणें; सर्वथैव; सर्वथा. **विश्वेश्वर** पु० शंकर. **विश्वकर्मा** [सं० विश्वकर्मन्] पु० १ देवांचा शिल्पी. २ सूर्य. ३ परमेश्वर. **विश्वकेतु** पु० १ अनिरुद्ध. २ मदन. **विश्वजनीन**, **विश्वजन्य** वि० सर्वांस उपयोगी. **विश्वजित्** पु० यज्ञविशेष. **विश्वतः** क्रि० वि० १ सर्वत्र. २ सर्व बाजूंनीं **विश्वंभर** पु० १ परमात्मा. २ विष्णु. **विश्वंभरा** स्त्री० पृथ्वी. **विश्वमूर्ति** पु० परमेश्वर. **विश्वरूप** पु० १ विष्णु. २ (**मराठात**) भयंकर देखावा; उग्र मुद्रा; उ० ह्या पोराला विश्वरूप दाखविलें तेव्हा त्याणें हट्ट सोडला. **विश्वसृज्** पु० १ ब्रम्हदेव. २ प्रजापति. ३ मयासुर. **विश्वसाक्षी** पु० १ सर्व जग पाहाणारा परमेश्वर. २ सूर्य. **विश्वकुटुंबी** पु० १ ईश्वर. २ (**लाक्षणिक**) जो सर्वांस सारख्या भावानें वागवितो आणि ज्याचे ठायां आपपर भाव नाहीं असा माणूस.

३ माझ्या संस्थेचा चालक. ४ ज्याच्या कुटुंबांत अनेक माणसें, आश्रित, नोकरचाकर, इ० आहेत तो. **विश्वजीवन पु०** परमेश्वर. **विश्वतोमुखीं क्रि० वि०** सर्व लोकांच्या संभाषणांत (असलेली कांहीं गोष्ट किं० खबर). **विश्वतोमुखी वि०** सर्व लोक जिच्याबद्दल बोलत आहेत अशी (कांहीं गोष्ट). **विश्वदुनिया** [**सं०** विश्व; **म०** विश्व; **फा०** दुनिया (जग)] **स्त्री०** सर्व जग; सर्व मानवजाति. **विश्वपाल पु०** परमेश्वर. **विश्वमंगल वि०** सर्वांस शुभ असा. **न०** सर्व जगाचें कल्याण. **विश्वाधाया पु०** परमेश्वर **विश्वामित्र पु०** १एक ऋषि. २छचीक माणूस. **विश्वामित्रसृष्टि स्त्री०** ब्रह्मदेवाच्या सृष्टींतील प्रत्येक पदार्थाच्या समान नवे पदार्थ जे विश्वामित्रानें निर्माण केले ते समुच्चयानें; उ०माड, सुरमाड; घोडा, गाढव; गाय, म्हैस, आणि वनगाय. **विश्वामित्री स्त्री०** म्हैस,–विश्वामित्रानें आपल्या प्रतिसृष्टींत गाईसारखा निर्मिलेला प्राणी.

विश्वसनीय [**सं०**] **वि०** १भरंवशाला पात्र; ज्यावर विश्वास ठेवतां येईल असा (माणूस, बातमी, इतिहास).

विश्वस्त [**सं०**] **वि०** १ज्याच्यावर विश्वास ठेविलेला आहे असा. २ विश्वासास पात्र. ३ज्यानें कोणेकावर विश्वास ठेविला आहे तो; निःशंक; निर्भय. ४ धीट.

विश्वा, विस्वा [**म०** वीस; वीसावा] **पु०** १ पदार्थाचा विसावा भाग. २ रती हें जें वजन त्याचा वीसावा भाग. ३ रुक्याचा वीसावा भाग. ꣸ **अठरा विस्वे** (किं० **विश्वे**) **दारिद्र्य न०** पराकाष्ठेचें दारिद्र्य.

विश्वामित्री स्त्री० म्हैस. मागें ‘ विश्व ’ मध्यें ‘ विश्वामित्री ’ पहा.

विश्वावसु [**सं०**] **पु०** १ एकुणचाळीसावा संवत्सर. २ एक गंधर्वविशेष.

विश्वास [**सं०**] **पु०** १ भरंवसा. २ श्रद्धा. ꣸ **विश्वासघात पु०** कोणी आपणावर भरंवसा टाकून बसला असतां त्याला फसविणें किं० त्याच्याशीं द्रोहाचें वर्तन करणें. **विश्वासघातक, विश्वासघातकी पु०** जो विश्वासघात करतो तो; उ० विश्वासघातकी तो महापातकी. **विश्वासजामीन, विश्वासप्रतिभू पु०** कोणेकाबद्दल जामीन राहिलेला मनुष्य. **विश्वासनिधि पु०** विश्वासाला पात्र असा माणूस. **विश्वासू, विश्वासूक वि०** विश्वासाला सर्वथैव लायक किं० पात्र. **विश्वासी वि०** १ विश्वासास पात्र. २ जो निःशंकपणें कोणेकावर भरंवसा टाकतो तो.

विष [**सं०**] **न०** जो पोटांत गेल्यानें मरण येतें असा कोणताही पदार्थ; उ० सोमल, बचनाग, इ०. २ शरीरांत जे भिनल्यानें मृत्यु येतो असा पदार्थ; उ०विंचवाच्या नांगींतील द्रव, सर्पदंतींतील द्रव, इ०. ३(**लाक्षणिक**) कोणत्याही कारणानें अपायकारक असा कोणताही पदार्थ, कोणतेंही खाद्य किं० पेय, कोणतीही कृति, इ०; उ०आमांशानें पीडित अशा माणसाला बासुंदी हें विष; उ० खोकल्यांत भजीं, वडे, हें विष. ४ कोणताही अत्यंत कडू असा पदार्थ. ꣸ **विष मानणें** अगदीं त्याज्य समजणें; उ० यति स्त्रीदर्शन विष मानतो. **विषाची परीक्षा घेऊं नये** (किं० **पाहूं नये**) ज्या कर्मात नाश होणें, अनर्थ कोसळणें, अपाय किं० हानि होणें, हें बहुतेक निश्चित असतें तें कर्म करून पाहूं नये. **विषघटी स्त्री० अ० व०** अश्विन्यादि नक्षत्रांपैकीं कांहींच्या पहिल्या, कांहींच्या मधल्या, आणि कांहींच्या शेवटल्या, अशा चार चार अशुभ घटका फलज्योतिषांत सांगितल्या आहेत त्या. **विषघ्न वि०** विषाचा प्रतिकार करणारें (कांहीं औषध). **विषवैद्य पु०** मंत्र, तंत्र, औषध, इ० उपायांनीं विषाची बाधा नाहींशी करणारा; जांगुलिक. **विषवल्ली स्त्री०** १ कोणतीही विषारी वनस्पति. २ दुष्ट आणि मत्सरी माणूस. **विषदृष्टि स्त्री०** माणूस, पशु, पदार्थ, इ० वर जी नजर पडली असतां अपाय करते ती नजर. **वि०** ज्याची नजर कोणेक माणूस, पशु, पदार्थ, इ० वर पडली असतां त्यांचा नाश होतो असा (माणूस) **विषप्रयोग पु०** कोणेकाला ठार मारण्यासाठीं त्याच्या खाद्यांत किं० पेयांत विष घालणें (करणें). **विषकंठ पु०** शंकर.

विषकट [**सं०** विशंकट] **वि०** १ मोठें; विशाल; अवाढव्य. २ जोरदार.

विषण्ण [**सं०**] **वि०** खिन्न; खट्टू; ज्याचा उत्साह नष्ट झाला आहे असा.

विषम [**सं०**] **वि०** १ उंचसखल; सपाट

नव्हे असा (प्रदेश). २ तुल्य म्ह० सारखें नव्हे असें. ३ (**गणित**) सम नव्हे अशी (संख्या); उ० १, ३, ५, ७, इ०. ४ वक्र, वाकडें. ५ गूढ; दुर्बोध. ६ अनियमित. ७ खरबडीत. ८ दुर्गम, दुष्प्रवेश्य (अरण्य, डोंगर, किल्ला, इ०). ९ दुःखपूर्ण (स्थिति, अवस्था). १० जोरदार. ११ भयंकर. १२ प्रतिकूळ; विपरीत; वैरभावाचें. १३ कठिण. **न०** १ बिकट प्रसंग कि० परिस्थिति. २ (**साहित्य**) (१) भिन्नधर्मीय वस्तूंचा संयोग घडल्याचें वर्णन; (२) इष्ट फळ प्राप्त न होतां अनर्थ कोसळल्याचें वर्णन; (३) कारण आणि कार्य याच्यांत साम्य असावयाचें तें नाहीं आणि कारण भिन्न आहे असें वर्णन; (४) कारणाहून कार्य भिन्न असल्याचें वर्णन; असे चार प्रकार विषम ह्या अलंकाराचे आहेत. तपशील, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ꣸ **विषम अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान नसतो त्याला विषम अपूर्णांक म्हणतात; उ० $\frac{३}{२}$, $\frac{६}{५}$, $\frac{४}{४}$, इ०. **विषम काळ पु०** प्रतिकूळ कि० अशुभ वेळ. **विषमचतुर्भुज, विषमचतुरस्र न०** ज्याच्या बाजू सारख्या लांबीच्या नाहींत आणि समांतरही नाहींत अशी चार बाजूंची आकृति. **विषमत्रिभुज न०** ज्याच्या कोणत्याही दोन बाजू सारख्या लांबीच्या नाहींत असा त्रिकोण; ज्याच्या तिन्ही बाजू भिन्न भिन्न लांबीच्या आहेत असा त्रिकोण. **विषमज्वर पु०** जो अंगांत भरण्याची कि० अंगातून निघण्याची वेळ नियमित नाहीं आणि जो सर्वदा सारखा असत नाहीं असा ताप. **विषमपाचन न०** १ विषमज्वरावर घेतात तो काढा. २ पदार्थांचा अपायकारक गुण नाहींसा करणारा कोणताही पदार्थ, औषध, इ०. **विषमभाव पु०** १ शत्रुत्वाची भावना. २ पक्षपात. ३ भिन्नपणा; सारखेपणाचा अभाव. **विषमभोजन, विषमाशन न०** १ नेहमींच्या वेळेपेक्षां अगोदर कि० नंतर जें जेवण तें. २ नेहमींपेक्षा कमी कि० अधिक जें जेवण तें. **विषमवासना स्त्री०** वेश्या कि० परस्त्री यांच्याशीं संभोगसुखाची इच्छा. **विषम साहस न०** अगदीं मूर्खपणाचें धाडस. **विषमस्थ वि०** संकटांत कि० अडचणींत पडलेला. **विषमान्न न०** नेहमींच्या अन्नाहून जें वेगळें तें अन्न,–जें अपायकारक होण्याचा संभव असतो.

विषय [**सं०**] **पु०** १ इंद्रियानें ग्राह्य कि० सेव्य जो पदार्थ तो; उ० गंध हा नासिकेचा विषय; उ० रुचि हा जिव्हेचा विषय. २ मनानें कि० बुद्धीनें जाणावयाचा पदार्थ; उ० गणित हा बुद्धीचा विषय. ३ डोळे, कान, जीभ, इ० जीं इंद्रियें त्यांचे व्यापार कि० त्या व्यापारांपासून प्राप्त होणारें सुख. ४ कोणताही पदार्थ; वस्तुमात्र. ५ ध्येय; लक्ष्य. ६ टप्पा; आटोका; पल्ला. ७ ज्याचें अध्ययन, परीक्षण, विवेचन, इ० करावयाचें तो पदार्थ. ८ बाब; बाबत. ९ स्थान; आश्रय; देश; उ० शरीर ऐन उमेदींत असतां कि० शरीर जों रोगविषय झालें नाहीं तों पथ्यापथ्याचा विचार कोणी करीत नाहीं. १० अनेक गांवांचा समुच्चय; प्रांत; जनपद. ११ खातें; प्रकरण. १२ काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, आणि लोभ, हे मनोविकार ज्या वस्तूंच्या संबंधानें मनांत उद्भवतात त्या वस्तु त्या त्या मनोविकारांचे विषय; उ० स्त्री हा कामवासनेचा विषय; दुष्ट माणूस हा क्रोधाचा विषय, इ०. १३ पैशाच्या रूपानें किंमत करावयाची असतां कोणताही पदार्थ कि० कोणतेही पदार्थ समुच्चयानें; उ० आमच्या उपाध्याला ह्या लग्नांत रोख पंचवीस रुपये आणि शिवाय दहा रुपयांचा विषय पोचला (नारळ, सुपाऱ्या, पंचे, भांडीं, इ०). १४ कर्तव्याचें क्षेत्र: उ० गुरें वळणें हा कलाशाचा विषय नव्हे; उ० गलबतें चालविणें हा गुराख्याचा विषय नव्हे. १५ उद्देश; हेतु; ध्येय; उ० तुम्ही हा जो पसारा मांडला आहे त्याचा विषय काय ? ꣸ **विषयपंचक न०** कान, डोळे, जिव्हा, नासिका, त्वचा, यांचे जे शब्द, रूप, रस, वास, आणि स्पर्श, हे पांच विषय ते समुच्चयानें. **विषयसुख न०** १ पंचेंद्रियांच्या उपभोगाचें सुख. २ स्त्रीसंभोगाचें सुख. **विषयी वि०** १ विषयसुखाला लंपट. २ जो विषय (गायनादि) ज्या (श्रुति इ०) इंद्रियाचा त्या इंद्रियाचा तो विषयी. **हा थट्टेचा विषय नाहीं** थट्टेवारी ही गोष्ट नेणें योग्य नव्हे; ह्या गोष्टीचा गंभीरपणें विचार केला

पाहिजे. **विषयीं श० यो०** अ० संबंधानें; बाबतींत; उ० मी अद्वैत मताविषयीं बोलत नाहीं. **विषयान्तर न०** प्रस्तुत विषय सोडून भलत्याच विषयासंबंधानें बोलणें किं० विवरण करणें.

विषाण [सं०] पु०, न० १ शिंग. २ हत्तीचा दांत. ३डुकराचा सुळा.

विषाद [सं०] पु० १ खेद; दुःख. २उत्साहभंग. ३ निराशा. ४ ग्लानि; गळाठा. ५ वीट; किळस.

विषानैनी [सं० विष+नयन+ई (प्रत्यय)] वि० तांबड्या डोळ्यांचा (घोडा). हें घोड्याचें अशुभ लक्षण समजलें जातें.

विषार [म० विष] पु० १ विष. २विषाची बाधा. ३ पदार्थांतील अपायकारक गुण किं०अंश.

विषारणें [म० विष] अ० क्रि० १विषाच्या बाधेनें उपद्रव पावलेलें असणें. २ कोणत्याही कारणानें अपायकारक झालेलें असणें.

विषालु. विषाळू [म०विष] वि० विषारी.

विषु 'विषुव' चा अपभ्रंश खालीं 'विषुव'पहा.

विषुव [सं०] न० दिवस आणि रात्र हीं एका वर्षांत दोन दिवस समान असतात. हे जे दोन दिवस ते प्रत्येक. ह्या दिवसांना 'विषुवदिन' असेंही म्हणतात.ह्या दोन दिवशीं सूर्य मेष राशींत आणि तुला राशींत प्रवेश करतो. ह्या प्रवेशांना 'मेषसंक्रान्ति' आणि 'तुलासंक्रान्ति' म्हणतात. ❀ **विषुववृत्त न०** मागें 'याम्य' मध्यें 'विषुववृत्त' पहा.

विषूचिका, विसूचिका [सं०] स्त्री० १ पटकी ही बाधा,–जींत पेटके येतात. मागें 'अलसिका' पहा. मागें 'विलंबिका' पहा.

विष्कंभ, विष्कंभक [सं०] पु० १ विघ्न.२ विस्तार. ३ (**गणित**) वर्तुळाचा व्यास. ४ (**नाटक**) दोन अंकांना जोडणारा प्रवेश. ५ (**योग**) आसनविशेष. ६ सत्तावीस योगांतील पहिला.

विष्टप [सं०] पु०, न० लोक; भुवन. ❀ **त्रिविष्टप न०** स्वर्ग.

विष्टंभ [सं०] पु० १ पक्कें बसविणें; खिळविणें. २ आधार. ३ प्रतिबंध; अडथळा.४खोळंबा. ५ मलमूत्रावरोध. ६ देह किं० गात्र बधिर होणें.

विष्टर [सं०] पु० १ आसन. २ दर्भासन.

❀ **विष्टरश्रवा** [सं० विष्टरश्रवस्] पु० विष्णु.

विष्टि [सं०] स्त्री० १ व्यापणें. २ फुकट काम; वेठ. ३ सातवें करण.

विष्टा [सं०] स्त्री० गुदद्वारें शरीराच्या बाहेर पडतो तो मळ.

विष्णु [सं०] पु० १ उत्पत्ति, स्थिति,आणि लय करणारे जे परमेश्वराचे तीन अवतार त्यांपैकीं स्थितीचा अधिकारी अवतार. २ अष्ट वसूंपैकीं एक. ३ आहवनीय अग्नि. ४ (**ज्योतिष**) श्रवण नक्षत्र. ६ द्वादश आदित्यांपैकीं एक. ❀ **विष्णुक्रान्ता स्त्री०** एक वनस्पतिविशेष. **विष्णुजन पु०** भक्त; संत. **विष्णुपद न०** १ आकाश. २ क्षीरसागर. ३ गया येथील विष्णूच्या पावलाची आकृति. **विष्णुपदी स्त्री०** १ गंगा नदी.२ द्वारका नगरी. **विष्णुप्रिया स्त्री०**१ तुळस. २ लक्ष्मी. **विष्णुरथ, विष्णुवाहन पु०** गरुड. **विष्णुवल्लभा स्त्री०** तुळस. **विष्णुबलि पु०**१सोळा संस्कारांपैकीं एक. २ संन्याशाच्या मरणानंतर तेराव्या दिवशीं करतात तो होम. **विष्णुवर्धन पु०** कोंकणांतील ब्राह्मणांची एक जाति किं० त्या जातीचा इसम. 'विष्णुवृद्ध' असाही ह्या अर्थी शब्द आहे.**विष्णुवात स्त्री०** चवदा फेरे करून बायका करतात ती देवापुढें लावावयाची वात.

विष्पंद [सं०] पु०१गात्राचें ठणकणें. २दूध आणि तांदूळ यांचे एक पक्वान्न.

विस्फार [सं०] पु० धनुष्याचा टणत्कार.

विस्फूर्जित [सं०] न० वायूचा सोसाटा.

विष्यंद [सं०] पु० प्रवाह; पाझर.

विसकटणें, विचकटणें, विसकणें [सं०वि+शकल]स०क्रि०(कागद,चिरगुटें,पोथीचीं पानें,इ०) अव्यवस्थित करणें किं० त्यांची मांडणी मोडणें. अ० क्रि०अव्यवस्थित होणें.❀**विसकटा विसकट स्त्री०** अव्यवस्था; घालमेल; मांडणीचा भंग;गल्लद.

विसकणें अ०क्रि०(गाय, म्हैस, इ०प्राण्यांनीं) दूध देईनासें होणें.

विसकळ [स० वि+शकल] वि० १ मोकळेपणानें म्ह० योग्य अंतरांवर स्थित किं० असलेलां (घरें, झाडें, माणसें, इ०). २दूर दूर असलेलीं (घरें, झाडें, इ०). ३ अघळपघळ;

अशस्त (घर, सभामंडप, इ०). ४ स्पष्ट, विनगुंतागुंतीचें (भाषण, निबंध, इ०). **स्त्री०** अव्यवस्था; गुंतागुंत; घोटाळा.

विसकळणें [**म०** विसकळ] **अ० क्रि०** विसकटणें; अव्यवस्थित होणें.

विसकळीत [**म०** विसकळणें] **वि०** ज्याची घडी, मांडणी, व्यवस्था, रचना, इ० बिघडला आहे किं० भग्न झाली आहे असा (पोथी, व्यापार, कार्य, बायकांची वेणी, इ०).

विसका [**म०** विकसणें] **वि०** दूर देईनाशी झालेला (गाय, म्हैस, इ०).

विसंगत [**सं०** वि+संगति] **वि०** पूर्वापर संगति किं० मेळ ज्यांत नाहीं असें; विसंवादी; पूर्वक्रमाला धरून नसलेलें (भाषण, लेख, इ०).

विसग [**सं०** वि+शमन] **न०** फार उष्ण पाणी वेतानें उष्ण करण्यासाठीं त्यांत घालतात तें थंड पाणी.

विसंधित [**सं०** वि (नाहीं) + संधि (सांधा)] **वि०** १ ज्याचे सांधे निखळले आहेत असा (पदार्थ). २ पूर्वापरसंबंधरहित (भाषण, लेख, वर्नन).

विसनखी [**म०**वीस+नख+ई(प्रत्यय)]**स्त्री०** देहविक्रय करणारी स्त्री; वेश्या. ॐ **विसनखीचा** **वि०** वेश्यासंभोगानें लागलेली (गरमी) किं० झालेला (उपद्रव). **विसनख्या** **वि०** वीस आहेत नखें ज्याला अशा एका जातीचा (कुत्रा इ० प्राणी).

विसप, विसव [**सं०** विसर्प] **पु०** मागें 'इसप,' 'इसव' अर्थ १ पहा.

विसपगोल, विसबगोल [**फा०** इस्पगोल्] **पु०** एक औषधी बीजविशेष. मागें 'इसपगोल' पहा.

विसंबणें, विसमणें[**सं०**वि+श्रम्]**अ० क्रि०** १रिकामें बसणें;रमणें;निश्चिंतपणें राहणें.२दुसऱ्या-वर भिस्त ठेवून असणें; उ० मी राम्यावर विसंबलों पण त्यानें मला फसविलें. **स० क्रि०** (ज्याची काळजी घेणें जरूर आहे तें) दृष्टाआड करणें, किं० दुसऱ्याच्या हवालीं करणें,किं०त्याचे बद्दल बेफकीर राहणें; उ० मी क्षणमात्र माझ्या मुलाला विसंबत नाहीं.

विसर [**म०** विसरणें;**सं०** वि+स्मृ]**पु०**१विसरलेपणा; विसरलेपणाची स्थिति;विस्मरण २ कांहीं गोष्ट सदैव डोळ्यापुढें नसल्यामुळें तिच्या संबंधानें स्मृतींत जो मंदपणा येतो तो किं०स्मृतींत येते ती अस्पष्टपणाची भासमानता. ॐ **एकाद्या गोष्टीचा विसर पडणें** ती विसरली जाणें; तिची तीव्रता किं०स्पष्टता मंद किं०कमी होणें.**विसराळ,विसराळू, विसरभोळा** **वि०**कोणतीही गोष्ट ज्याच्या लक्ष्यांत नीट किं० पूर्णपणें रहात नाहीं असा. **विसरभोळ्यां** **क्रि० वि०** विसराळूपणानें. **विसरसांड** **स्त्री०** कोणेकाच्या अपराधाकडे केलेलें दुर्लक्ष्य किं० केलेला काणाडोळा.

विसरणें [**सं०** वि+स्मृ] **स० क्रि०** १ स्मरणांतून घालविणें किं० लोपविणें. २ (पदार्थविशेषाकडे) दुर्लक्ष्य करणें किं० त्याच्या संबंधानें बेफिकीर राहणें.ॐ**ही गोष्ट करावयाला विसरूं नको** विसरूं नको म्ह०चुकूं नको.**विसरत बोलणें** पूर्व संगति सोडून बोलणें; पूर्वी जें बोलले त्याशीं विसंगत असें कांहीं बोलणें.

विसर्ग [**सं०**] **पु०** १ पाठविणें; पाठवून देणें. २ बाण, धोंडा, इ० फेकणें किं० सोडणें. ३ त्याग; परित्याग. ४ दान. ५ मुक्त करणें; मुक्तता. ६ मोक्ष. ७ गुदद्वारें मलविसर्जन. ८शब्द लिहितांना उभ्या दोन टिबांनीं जो उच्चार दर्शविला जातो तो;उ०कः पदार्थ,निःसंशय,छिः, इ०.

विसर्जणें, विसर्जिणें [**सं०** वि+सृज्]**स० क्रि०** १ सोडणें; सोडून देणें. २ बाहेर टाकणें. ३ दान देणें. ३ (पदार्थावरचा आपला हक्क किं० ताबा) सोडणें.

विसर्जन [**सं०**] **न०** १ देणें; दान.२त्याग; सोडणें. ३ सभा बरखास्त करणें. ४ निरोप देणें;समाप्त करणें; बंद पाडणें.ॐ **गणपति, देवी, इ०चें विसर्जन** **न०** त्यांची यथाविधि किं० यथाशास्त्र पाठवणी किं० बोळवणी करणें.

विसर्प [**सं०**] **पु०** १ सरपटत जाणें. २ पसरणें; प्रसार. ३ जखम, खरूज, नायटा, इ० चें चरत जाणें म्ह० अधिक अधिक त्वचा विकृत करीत जाणें.४ नायटा, इसब,गजकर्ण,इ० त्वग्रोग.

विसर्प **पु०**, **विसर्पिका** **स्त्री०** [**सं०**] नायटा, इसब, इ० त्वग्रोग.

विसवटा पु० पुढें ' विसावा ' पहा.

विसवणें [म० विसावा] अ० क्रि० १ थांबणें; खळणें. २ विश्रांति घेणें. ३ (हात, पाय, कंठ, बोटें,इ०एकादें गात्र किं०इंद्रिय) बरेच दिवस कामास न लाविल्याकारणानें त्याची सफाई किं० कुशलता नष्ट होणें;उ०बरेच दिवस गाण्याचा प्रसंग न आल्याकारणानें माझा घसा विसवला आहे. ३ आळसावणें; आळसटणें. ४ (भिंत, इमारत, इ०) खचणें.

विसवा [म० वीस] पु० १ रुपयाचा विसावा भाग. २ विशोपक. मागें ' विशोपक ' पहा.

विसवाट न० घराभोंवतालचें कुंपण.

विसंवाद [सं०] पु० परस्परविरोध; भिन्नता; मेळाचा अभाव. ❀ **विसंवादी** वि० १ मेळ नसलेलें; असंबद्ध; न जुळणारें. २ खोटें.

विसवाविसवी क्रि० वि० आळीपाळीनें; पारगीपारगीनें. मागें ' पारगीपारगी ' पहा.

विसविशीत वि० ताठर नव्हे असें; मृदु; पिशपिशीत.

विसळणें,विसुळणें[सं०वि+क्षल्, क्षाल्]स० क्रि०(पात्रांत किं०पात्रावर) पाणी घालून पात्राला चिकटलेल्या गवताच्या काड्या, माती, राख, इ० धुऊन तें स्वच्छ करणें. ❀ **विसळवणी** न० भांडीं ज्यांत विसळलीं आहेत असें पाणी; भांडीं विसळावयास घ्यावयाचें पाणी.

विसा [म० वीस] स्त्री० वीस वस्तूंचा समुच्चय.

विसाड न० १ नांगराचा दांडा. २ झाडाचा कांहीं बुंधा शाबूत ठेवून वरचा तोडून टाकून खालच्या बुंधावर त्याच जातीच्या झाडाचीं कलमें लावून नवीं झाडें करतात तो प्रत्येक. मागें ' इसाड, ' ' इसाडा ' पहा.

विसाण न० मागें ' विसण ' पहा.

विसाणणें [म०विसण,विसाण]स०क्रि०(अति कढत पाणी) थंड पाणी घालून बेताचें कढत करून घेणें. [पहा.

विसाप, विसाब वर ' विसप, ' ' विसब '

विसार, विसारा पु० मागें ' इसार, ' ' इसारा ' पहा.

विसावण न० मागें 'विसाण,' 'विसण' पहा.

विसावणें [म०] अ० क्रि० थांबणें. मागें ' विसवणें ' पहा.

विसावा, विसांवा [सं० वि+श्रम्] पु० १ विश्रांति; काम बंद ठेवून पुन्हां ताजेतवानें होणें (घेणें).२मनाला विश्रांति किं०हुशारी वाटविणारें कांहीं काम किं० करमणुकीचा विषय किं० पदार्थ. [पहा.

विसावणें स० क्रि० मागें ' विसाणणें '

विसाळ, विसाळा [सं० ईर्षा] पु० ईर्षा; ईर्षेचा उद्रेक. मागें ' इसाळ, ' ' इसाळा ' पहा.

विसुळणें, विसुळवणी मागें ' विसळणें, ' ' विसळवणी ' पहा.

विसूत्र [सं० वि+सूत्र] वि० १ सूत्रांतून गळालेला (मणि, फूल, इ०). २तुटलेला (हार, कंठा, माळ, इ०). ३ शिस्तीला किं० नियमाला सोडून असलेलें(भाषण, वर्तन, इ०).

विसृत [सं०] वि० १ पसरलेलें. २ विस्तीर्ण.

विस्कटणें इ० मागें ' विसकटणें ' इ० पहा.

विस्तर [सं०] पु० १ फैलाव. २ विस्तार. ३ बोलण्यांत किं० लिहिण्यांत फाजील तपशील. ❀ **सविस्तर** वि० तपशीलासह असलेली किं० सांगितलेली (हकीगत). क्रि० वि० तपशील देऊन; सांगोपांग रीतीनें.

विस्तरणें,विस्तारणें[सं०वि+स्तृ]स०क्रि०१ (कांहीं गोष्ट, कथा, इ०) तपशीलवार सांगणें किं० निवेदिणें. २ तपशील देऊन (हकीगत) लांबविणें.

विस्तव पु० अग्नि. ❀ **त्या दोघांमधून विस्तव जात नाहीं** त्यांचें एकमेकांशीं हाडवैर आहे.

विस्तवणें [म० विस्तव] स० क्रि० १ जाळणें. २ (दोन माणसांत) कलह पेटविणें.

विस्तार [सं०] पु० १ वाढ; फैलाव. २ विस्तीर्णपणा. ३ लांबी, रुंदी, आणि उंची (किं० खोली). हीं जीं पदार्थाचीं तीन परिमाणें, त्यांपैकीं दुसरें म्ह० रुंदी हें परिमाण. ४ तपशील. ५ (गणित) व्यास. ६ वृक्षाची शाखारूप वाढ. ७ ग्रंथ इ० मध्यें टीका, भाष्य, इ० रूप भरती.

विस्तारणें [म० विस्तार] **स० क्रि०** विस्तृत करणें; वाढविणें. मागें ' विस्तरणें ' पहा.

विस्तारित [सं०] **वि०** १ वाढविलेलें. २ सांगोपांग निरूपिलेलें किं० सांगितलेलें.

विस्तारी [म० विस्तार] **स्त्री०** पानांस पानें चोयींनें टांचून केलेलें ताट; पत्रावळ.

विस्तावा मागें ' इस्तावा ' पहा.

विस्तू, विस्तव, विस्तो, विस्तोव, विस्तेव पु० विस्तव.हीं सर्व रूपें अशिक्षितांत रूढ आहेत.

विस्तृत [सं०] **वि०** १ पसरलेलें; विस्तीर्ण. २ अघळपघळ; प्रशस्त (घर, जागा). ३ रुंद.

विस्पष्ट [सं०] **वि०** स्पष्ट उच्चारलेलें.

विस्फार [सं०] **पु०** १ धनुष्याचा टणत्कार. २ कंप; कांपणें.

विस्फारित [सं०] **वि०** १ विचकलेलें, वासलेलें (तोंड, डोळे, जखम,इ०).२ कांपणारें; हालणारें. ३ स्पष्ट. ४ विस्तीर्ण.

विस्फूर्जथु [सं०] **पु०** १ गर्जना;कडकडाट २ उसळणें; खळबळ. ३ क्षोभ; उद्रेक.

विस्फोट [सं०] **पु०** १ फोड. २ देवी. ३ गोवर. ४ कांजिण्या. ५ फुटणें.

विस्मय [सं०] **पु०** आश्चर्य.

विस्मरण न०, विस्मृति स्त्री०[सं०]विसरणें; विसर (होणें, पडणें).

विस्मापन, विस्मायन [सं०] **वि०** आश्चर्यकारक. **न०**१नजरबंदीचें कृत्य; गारुड.२गंधर्वनगर.

विस्मित [सं०] **वि०** आश्चर्य पावलेला; आश्चर्यचकित.

विस्मृत [सं०] **वि०** विसरलेलें.

विस्मृति [सं०] **स्त्री०** विसरण्याची क्रिया; विसर;विसराळूपणा;आठवण न होणें.꠶ **विस्मृतीखाला पडणें** १ पूर्णपणें परिचित होणें;अंगवळणी पडणें. २ विसरलें जाणें.

विस्र [सं०] **वि०** कच्च्या मांसाचा वास येत असलेलें. ꠶ **विस्रगंधी वि०** कुजकेपणाचा वास असलेलें.

विस्रब्ध [सं०] **वि०** १ विश्वासयुक्त. २ निःशंक: निर्भय.

विस्रम्भ [सं०] **पु०** १ विश्वास; भरंवसा. २ खातरी; प्रत्यय. ३ लटकें भांडण.

विस्रंस [सं०] **पु०** १ पडणें; गळणें. २ क्षीणता.

विस्रंसन [सं०] **न०** १ पडणें. २ पाझरणें. ३ (वैद्यक) रेचक. [अपसूर.

विस्वर [सं०] **वि०** बेसूर; बदसूर. **पु०**

विहग, विहंग [सं०] **वि०** आकाशांत संचरणारा. **पु०** पक्षी. ꠶ **विहगराज, विहंगराज पु०** गरुड. **विहंगदृष्टि स्त्री०** खालीं ' विहंगम ' मध्यें ' विहंगमदृष्टि ' पहा.

विहंगम [सं०] **वि०** आकाशांत संचरणारा. **पु०** १ पक्षी. २ सूर्य. ꠶ **विहंगदृष्टि, विहंगमदृष्टि स्त्री०** तपशिलांत न शिरता ठळक ठळक गोष्टी पाहाण्यासाठीं फेंकलेली दृष्टि किं० नजर; पदार्थाचा स्थूल देखावा मात्र अवलोकन करावयासाठीं टाकलेली नजर. आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी,इ०' हें पुस्तक लेखांक १२८४ पहा. **विहंगममार्ग पु०** १ (**योग**) समाधि त्वरित लावण्याची सरणी. २ त्वरित वैराग्य स्वीकारण्याचा मार्ग. ३ कोणतेंही कार्य त्वरित गतीनें उरकून घेण्याचा मार्ग.

विहत [सं०] **पु०** जैनांचें देऊळ. **वि०** १ ठार मारलेला. २ नष्ट केलेला; बंद पाडलेला.

विहनन [सं०] **न०** १ कापूस पिंजण्याची धनुकली. २ विघ्न; हरकत. २ वध; हिंसा.

विहर [सं०] **पु०** १ दूर घेऊन जाणें. २ क्रीडा; लीला.

विहरण [सं०] **न०** १ अपहार; घेऊन जाणें. २ सहल करणें. ३ विहार; क्रीडा.

विहरणें, विहारणें [सं० वि + हृ] **अ० क्रि०** १ भटकणें. २ खेळणें; क्रीडा करणें.

विहसन, विहसित न०, विहास पु० [सं०] मध्यम हास्य.

विहस्त [सं०] **वि०** १ ज्याला हात नाहीं असा;थोटा.२गोंधळलेला; व्याकुळ. ३असमर्थ. ४ विव्हळ.

विहार [सं०] **पु०** १ अपहार. २ हिंडणें; सहल करणें; भटकणें. ३ क्रीडा; खेळ. ४ क्रीडावन. ५ देऊळ. ६ बौद्धांचा मठ. ꠶ **विहारी वि०** १ खेळण्याकडे कल असलेला; रंगेल. २ विषयसुखांत रमणारा.

विहित [सं०] वि० १ केलेलें. २ निर्माण केलेलें. ३ ठेवलेलें. ४ ठरविलेलें. ५ योग्य; शास्त्रोक्त. ६ अनुरूप. ७ क्रमप्राप्त.

विहिरा [सं० विहीर] पु० नदीच्या वाळवंट इ० मध्यें पाण्यासाठीं खणलेला खळगा.

विहीण [सं० विवाह; म० विवाह; म० व्याही] स्त्री० आपल्या मुलाची किं० मुलीची जी सासू ती. खालीं ' व्याही ' पहा.

विहीत स्त्री० ' वीत ' चा अपभ्रंश. खालीं ' वीत ' स्त्री० पहा.

विहीन [सं०] वि० रहित, शून्य; उ० ज्ञानानें विहीन ते पशुसमान होत.

विहीर [हिं० बीर्] स्त्री० पाण्यासाठीं जमीनींत खूप खोल खणलेला आणि सर्व बाजूंनीं दगड, विटा, चुना, इ०नीं बांधून काढलेला खळगा; आड; बाव. ॐ **विहीर हुंडा** पु० विहिरीवर किं० विहिरीच्या पाण्यानें पिकविलेल्या बागा, शेतें, मळे, इ० वर सरकारनें बसविलेला कर.

विहू, विभू [सं० व्यूह] पु० १ सैन्याच्या रचनेचा एक प्रकार. २ समुदाय. ३ कांहीं कार्यासाठीं केलेली योजना किं० रचिलेला बेत. ४ मनोरथ; ध्येय; उद्दिष्ट. ५ एकाद्याला गोत्यांत घालण्यासाठीं केलेली मसलत (रचणें, उभारणें).

विह्वळ, विव्हळ[सं० विह्वल]वि० १व्याकुळ; दुःखानें जर्जर किं० कासावीस झालेला. २ कोणत्याही कारणानें अस्वस्थ किं० अशांत झालेला.३ गोंधळलेला. ॐ **विव्हळगौर** स्त्री० सदा फिरफिरणारी किं० चरफडणारी मुलगी किं० स्त्री.

विळखा, विळका पु० १ दोन बाहु ताणून आणि पसरून मनुष्य, वृक्ष, इ० च्या सभोंवतीं घातलेला वेढा; मिठी. २ सर्पानें मनुष्याच्या तंगडी, बाहु, इ० च्या भोंवतीं घातलेला वेढा किं० घातलेले वेढे (घालणें).

विळचण मागें ' विसण ' पहा.

विळवणें [म० विव्हळ] अ० क्रि० आजार, दुःख, वेदना, किं० निराशा, इ० मुळें कण्हणें.

विळावणें, वेळणें, वेळावणें स० क्रि० १ दांडगाईनें किं० जोरानें (पदार्थ) हालविणें किं० हासडणें. २ इकडून तिकडे किं० तिकडून इकडे (मान, डोकें) पसंती किं० नापसंती दाखविण्यासाठीं कलविणें किं० वळविणें. ३ (हात, पाय, इ०) लोंबत सोडणें.

विळविणें स० क्रि० माणसाच्या डोक्यावर किं० जनावरांच्या पाठीवर किं० घडवंची इ० आधारावर (पोतें इ०) ठेवणें किं० चढविणें.

विळविळणें अ० क्रि० सर्प, ढेकूण, पिसवा, इ० नीं माणूस, जनावराचें शरीर, इ० वर वेगानें सरपटत चालणें. [असा.

विळविळीत वि० ज्यांत ताठरपणा नाहीं

विळा, विळाखिळा, विळी मागें ' इळा, ' ' इळाखिळा, ' ' इळी ' पहा.

विक्षिप्त [सं०] वि० १ टाकलेलें; टाकून दिलेलें. २ अमान्य केलेलें; नाकारलेलें. ३ विसकटलेलें. ४ लोकरीती सोडून वर्तन करणारा; छांदिष्ट; तऱ्हेवाईक; लहरी (माणूस, वर्तन).

विक्षेप [सं०] पु० १ उडविणें; पसरणें. २ फेकणें; उधळून लावणें. ३ घोटाळा; व्यग्रता. ४ मनाची एकाग्रता खंडित करणारी कोणतीही गोष्ट. ५ भ्रमिष्टपणा. ६ (**ज्योतिष**) ग्रहाचें याम्योत्तर अंतर. ॐ **विक्षेपशक्ति** स्त्री० **(वेदान्त)** मायाशक्तिविशेष. [पंडित.

विज्ञ [सं०] वि० १ तज्ञ.प्रवीण. २ ज्ञानी;

विज्ञप्त [सं०] वि० कळविलेलें; विज्ञापित. न० विनंती.

विज्ञप्ति [सं०] स्त्री० १ विनंति. २ उपदेश.

विज्ञात [सं०] वि० १ ठाऊक असलेलें; जाणलेलें. २ प्रख्यात; सर्वांस ठाऊक असलेलें.

विज्ञाता[सं० विज्ञातृ] वि० जाणणारा; पंडित.

विज्ञान [सं०] न० १ ज्ञान. २ नैपुण्य; प्रावीण्य; विशेष ज्ञान. ३ शिल्प, कला, इ० संबंधाचें ज्ञान किं० माहिती. ४ अतींद्रिय विषयाचें ज्ञान. ५ ज्ञानेंद्रिय. ६ बुद्धि. ७ बातमी; माहिती. ८ (**वेदान्त**)आत्मैक्यज्ञान. ॐ **विज्ञानपाद** पु० व्यास ऋषि. **विज्ञानमय** वि० बुद्धि उपाध असलेला. पु० आत्म्याच्या पंच कोशांपैकीं चवथा. मागें ' आनंद ' मध्यें ' आनंदमय कोश ' पहा. **विज्ञानमातृक** पु० गौतमबुद्ध.

विज्ञापक [सं०] पु० गुरु; शिक्षक.

विज्ञापणें, विज्ञापिणें [सं० वि+ज्ञा]स० क्रि० नम्रपणें (कांहीं गोष्ट) वारंवार सांगणें.

विज्ञापन न०, विज्ञापना स्त्री० [सं०] १ विनंती २ उपदेश. ३ नम्रपणें वरिष्ठ,गुरु, राजा, इ० ना कांहीं गोष्ट किं० हकीगत किं० तकरार कळविणें. ४ वडील माणसांस पत्र लिहितांना मजकुराला सुरवात करतांना 'विज्ञापना'हा शब्द घालतात; उ० विज्ञापना ऐसी जे, विज्ञापना विशेष.

विज्ञापित [सं०] **वि०** १ नम्रपणें ज्यास कांहीं गोष्ट किं० हकीगत कळविली आहे असा (मनुष्य). २ नम्रपणें वरिष्ठास कळविलेली (हकीगत).

विज्ञाप्य [सं०] **वि०** १ ज्यास नम्रपणें कांही गोष्ट कळवावयाची आहे तो (राजा, गुरु, वरिष्ठ, इ०). २ वरिष्ठ,राजा,गुरु,इ०ना जें नम्रपणे कळवावयाचें तें.

वीख मागें ' विष ' पहा.

वीचि,वीची [सं०] **स्त्री०** पाण्याची लाट; तरंग. ꣸ **वीचिमाली** [सं०वीचिमालिन्] **पु०** समुद्र.

वीज [सं० विद्युत्] **स्त्री०** १ रासायनिक द्रव्यांच्या संयोगानें किं०घर्षणानें उत्पन्न होणारी एक शक्ति. २ ह्या शक्तीच्या उत्पत्तीच्या वेळीं उत्पन्न होतो तो प्रकाश किं० तो ध्वनि. ꣸ **वीज कडाडणें** आकाशांत गर्जना होऊन प्रकाशाची चमक लकाकणें. **वीजविहिरा पु०** डोंगरावर वीज पडून उत्पन्न होतें तें पाण्याचें टांकें.

वीट [म० विटणें] **पु०** १ किळस; खंत; शिसारी; अप्रीति; कंटाळा (येणें). २ नासाडी. ३ फजीती.

वीट [सं० इष्टका, इष्टिका] **स्त्री०** भिंत इ० बांधावयासाठीं जे मातीचे लांबोडे चतुष्कोण ठोकळे योजतात ते प्रत्येक.मागें'ईट'पहा.**वीटबंदी स्त्री०** मागें ' इट ' मध्यें ' ईटबंदी ' पहा.

वीटिका स्त्री० मागें ' विडा ' पहा.

वीड [म० विडी] **पु०, न०** १ मणगटाच्या घेराचें माप (पाटल्या, बांगड्या, गोठ,इ०साठीं घेतात तें). २ कोणत्याही कारणासाठीं घेतलेलें पदार्थाच्या घेराचें माप.

वीड मागें ' ईड ' **न०,स्त्री०** पहा.

वीण [म० विणें] **स्त्री०** १ पशु, पक्षी, क्षुद्र जंतु, यांचा अपत्यें समुच्चयानें. २ गाय, म्हैस, ह्यांचें विणें म्ह० अपत्यें प्रसवणें किं० ह्या प्रसवण्याचा काळ किं० प्रसवण्याची खेप.

वीण [म० विणणें] **स्त्री०** वस्त्र, चटई, तट्ट्या, इ० विणण्याची क्रिया किं० तऱ्हा.

वीण [सं० विना] **श० यो० अ०** शिवाय; खेरीज.

वीणा [सं०] **पु०** एक तंतुवाद्य. ꣸ **वीणाकाव्य न०** वीणेच्या सुराबरोबर गावयाचें लहान काव्य; रसानें परिप्लुत असें लहान पद.

वीत [सं० वितस्ति] **स्त्री०** हाताचा पंजा ताणून पसरला असतां अंगठ्याच्या टोकापासून करंगळीच्या टोकापर्यंत जें अंतर तें ꣸ **आपल्या पुरती वीत काढणें** किं० **आपल्या भोंवतीं वीत काढणें** १ सर्वांवर कोसळलेलें जें संकट त्यांतून इतरांची पर्वा न करतां आपली कशी तरी सुटका करून घेणें. २ आप्पलपोटेपणानें आपला स्वार्थ साधणें. **वीत काढणें** शेतकामासाठीं जमीन भाजावयाची असतां इतर भागांकडे आग न चरत जावी म्हणून सभोंवार वीतभर पट्टा गवत उपटून वेगळा करणें.

वीत [म० विणें] **न०** १ गायी, म्हशी, इ० चें विणें किं० विण्याची खेप २मांजरी,कुतरी, शेळी,इ०चें अपत्यें प्रसवणें किं०एका खेपेचीं अपत्यें समुच्चयानें.

वीत [सं०] **वि०** १ गेलेला; दूर झालेला; लोपलेला;नष्ट; उ० वीतचिंत म्ह० निश्चिंत; वीतशोक म्ह० शोकरहित; वीतकल्मष म्ह०निष्पाप; वीतराग किं० वीतरागी म्ह० विरक्त. २ धारण केलेला. ꣸ **वीतसूत्र न०** जानवें.

वीथ [सं० वितस्ति; म० वीत] **स्त्री०**मागें ' वीत ' **स्त्री०** पहा.

वीथि, वीथी [सं०] **स्त्री०**१रस्ता.२गांवांतील अरुंद बोळ; बिदी. ३ ओळ; पंक्ति. ४ जिना; पायऱ्या. ५ बाजार; दुकानांची पेठ. ६ एक प्रकारचें नाटक.

वीध [सं०विधि] **पु०**लग्नानंतर पहिल्या वर्षी नवऱ्यामुलाकडून नवऱ्यामुलीकडे किं० तिच्या-

कडून त्याच्याकडे ज्या हौसेच्या देणग्या दिल्या जातात त्या; आषाढपाटी, श्रावणपाटी, गाठ्या, आंबे, इ०.

वीप्सा [सं०] **स्त्री०** १ व्याप्ति; साकल्य; सर्वत्र पसार. २ पुनरुक्ति; आवृत्ति.

वीर [सं०] **वि०** १ शूर. २ बलिष्ठ. ३श्रेष्ठ. **पु०** १ योद्धा. २ (**साहित्य**) वीर रस. ३ज्याचा कोणी पूर्वज युद्धांत मरण पावलेला असतो तो फाल्गुन वद्य प्रतिपदेस शिपायाच्या वेषात आणि नागवी तरवार हातांत घेऊन देवाच्या दर्शनास समारंभपूर्वक जातो तो (त्या प्रसंगीच ' वीर ' याचा असा प्रयोग होतो). ४ एकाद्या कुळांतील किं०वंशांतील किं०जातींतील अत्यंत नामांकित जो पुरुष तो; उ० रघुवीर, यदुवीर, कुरुवीर, इ०. ५कोणत्याही कामांत धीटाईनें जो पुढाकार घेतो तो; उ० वीर वामनराव. ॐ **वीरकंकण न०** वीरत्वाचा अभिमान बाळगणारे लोक आकारविशेषाचें कडें हातांत घालतात तें. **वीरकन्या स्त्री०**१वीराची कन्या.२शूर मुलगी. **वीरभार्या, वीरपत्नी स्त्री०**वीराची बायको. **वीरगर्जना स्त्री०** युद्धभूमीवर योद्धे ज्या गर्जना करतात त्या प्रत्येक. २योद्ध्यांना उत्तेजन देण्यासाठीं त्यांच्या त्यांच्या पक्षांचे लोक करतात त्या गर्जना प्रत्येक. **वीरगुंटी स्त्री०**योद्धे किं०मल्ल डोक्यावरील केशांची मारतात ती गांठ किं० त्या केशाचा झुबका. **वीरघोषणा स्त्री०** १ वीरांना बोलावण्यासाठीं केलेली गर्जना किं० मारलेली हाक. २ वीरानें वीराला केलेलें आव्हान. **वीरजननी, वीरसू, वीरमाता स्त्री०** १वीर प्रसवणारी स्त्री.२ वीराची माता **वीरजयंतिका**. **वीरजयंती स्त्री०** १ युद्ध. २ युद्धांतील नृत्य.३ युद्धांत जय मिळवून आलेले लोक करतात तो उत्सव. **वीरपट्ट पु०** वीराच्या कपाळावर संमानार्थ बांधतात तो मुकुट. **वीरपाण, वीरपान न०** १ युद्धाच्या श्रमाच्या परिहारार्थ केलेलं पान. २ युद्धास जातांना योद्धे करतात तें पान. **वीरपीर पु०** दांडगेश्वर; धटिंगण (निंदेत). **वीरभगिनी स्त्री०** १ शूराची बहीण. २ शूर स्त्री. **वीरभद्र पु०** १ एक शिवगणविशेष. २ यज्ञाश्व. ३ वीरश्रेष्ठ. **वीररस पु०** काव्यांतील जे शृंगार, वीर, इ० नऊ रसत्यांपैकीं एक. देशासाठीं, धर्मासाठीं, समाजासाठीं, व्यक्तीसाठीं, परंपरागत संस्कृतीसाठीं, किं०सत्यासाठीं मनाच्या मोठेपणानें प्रेरित होऊन केलेले पराक्रम, सोशिलेले कष्ट, भोगलेल्या यातना, किं० अंगीकारलेला आत्मयज्ञ आणि स्वार्थत्याग, इ०च्या वर्णनात वीररस असतो. वीररसाचे अनेक प्रकार आहेत. शस्त्रास्त्रांनीं समरांगणावर लढाई करतांना जो उत्साह असतो त्याला 'युद्धवीर' म्हणतात. ईश्वराविषयीं भक्ति जर उत्साहाला कारण असली तर तो 'भक्तिवीर.' याच सरणीनें दानवीर, 'धर्मवीर,' दयावीर, इ०रस समजावे. **वीरवैष्णव पु०**वैष्णवाचे आचार कडकडीत पाळणाराचा पंथ किं० त्या पंथाचा इसम. **वीरश्री स्त्री०** शौर्याचे वारें; उत्कट उत्साह. **वीरासन न०** १ डावा गुडघा मोडून आणि उजवा उभा करून बसण्याचा प्रकार. २ (**योग**) आसनविशेष. **वीराशंसन न०**१पहारा. २ युद्धभूमीवरील अतिभयंकर भाग. **वीरमुद्रिका स्त्री०** हाताच्या मधल्या बोटांत घालावयाची अंगठी. **वीरशय्या स्त्री०**१वीरासन.२ तपस्व्याचें आसनविशेष.

वीर्य [सं०] **न०** १ पराक्रम; अत्युत्साह. २ शक्ति. ३ प्रभाव. ४ पुरुषाचा धातु. ॐ **वीर्यवान्, वीर्यशाली वि०** पराक्रमी; शूर.

वीस [सं०] **वि०** दहाच्या दुपटीइतका. ॐ**वीसनखीचा, वीसनख्या** मागें 'विसनखीचा' इ० पहा.

वीळ [सं० वेला] **स्त्री०** १ समुद्र, खाडी, यांस येते ती भरती. २ वेळ (अशिक्षितात रूढ).

वीक्षण [सं०] **न०** १ पाहाणें. २ डोळा.

वीक्षणें, वीक्षिण[सं० वि+ईक्ष्] **स०क्रि०** पाहाणें.

वीक्षित [सं०] **वि०** पाहिलेलें; अवलोकिलेलें. **न०** नजर; दृष्टि.

वृक [सं०] **पु०** १ लांडगा. २ कोल्हा. ॐ **वृकोदर पु०** भीम,–पांच पांडवांपैकीं मधला.

वृंत [सं०] **न०** १ फुलाचें किं० पानाचें देठ. २ स्तनाचें अग्र.

वृंताक [सं०] **पु०** वांगें. **वृंताकी स्त्री०** वांग्याचें झाड.

वृत्त [सं०] **वि०** १ घडलेलें; झालेलें. २

मेलेला. ३ वाटोळें; वर्तुळाकार. न० १ पूर्वीची गोष्ट. २ बातमी; हकीगत; खबर; घडलेली गोष्ट. ३ वर्तन; वर्तनाची सरणी. ४ शील. ५ वर्तुळ. ६ मंदाक्रान्ता, वसंततिलका, इ० पद्य; छंद. ७ इतिहास. ८ भूतकाळ. ९ (मराठींत) कोणेकाचा धंदा किं० चरितार्थाचें साधन. ❀ धृत्तान्त पु० १ हकीगत. २ इतिहास. ३ बातमी. ४ प्रकरण; विषय. धृत्तस्थ वि०सदाचार पाळणारा.

धृत्ति [सं०] स्त्री० १ असणें; अस्तित्व. २ राहाणें; वास्तव्य. ३ वर्तन; वागणूक. ४ व्यवसाय; धंदा. ५ जीवनयात्रा; निर्वाह; चरितार्थाचें साधन,–यजमानाच्या घरीं किं० क्षेत्राचें ठिकाणीं जोशीपणा किं० उपाध्येपणा इ०. ६ व्यवहार. ७ वेतन; मजुरी. ८ शब्दाची अर्थबोधक शक्ति. वाचकता, व्यंजकता, लक्षणा,इ० रूप जे शब्दांनें अर्थ बोधवावयाचे अनेक प्रकार ते प्रत्येक. ९ व्याख्यान; विवरण; स्पष्टीकरण. १० चक्राकार गति. ११ (गणित) परिघ. १२ मनाची स्थिति. १३ (व्याकरण) साधित शब्द (कृदंत, सामासिक, तद्धितान्त, इ०). ❀ धृत्तिच्छेद धृत्तीचा विचका पु०, धृत्तिच्छेदन न०वडिलोपार्जित जें चरितार्थाचें साधन त्याचें राजकोप, दुर्दैव, इ० मुळें बंद होणें किं० बंद पडणें. धृत्तिमंत, धृत्तिमान्, धृत्तिवंत, धृत्तिवान् पु० १ ज्याला कांहीं चरितार्थाचें साधन आहे तो. २ क्षेत्राच्या ठिकाणीं येणारे यात्रेकरू हे ज्याचे ठरलेले यजमान आहेत तो. धृत्यनुप्रास पु० अनुप्रासाची एक तऱ्हा. या अनुप्रासाचे तीन प्रकार आहेत. (१) एकच व्यंजन दोन वेळां किं० अधिक वेळां येणें; (२) अनेक व्यंजनें दोहोंहून अधिक वेळां त्याच क्रमानें येणें;(३) अनेक व्यंजनें दोनच वेळां कोणत्याही क्रमानें येणें. या प्रकारांची उदाहरणें इ० आमचे ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. धृत्यंशी पु० वाडिलोपार्जित वृत्तींचे जे भागीदार ते प्रत्येक.

धृत्र [सं०] पु० एक दैत्यविशेष. ❀ धृत्रारि पु० इंद्र.

धृथा [सं०] क्रि० वि० १ व्यर्थ;निष्कारण; उगीचच्या उगीच २ चुकीनें; विधिविरुद्ध. ३ मूर्खपणानें. ❀ धृथापुष्ट वि० कोणत्याही कामाच्या उपयोगीं न येणारा आणि केवळ खाऊन पुष्ट झालेला.

धृंद [सं०] न० १ समूह; समुदाय. २ केळींचा घड. ३ (मराठींत) विद्वत्तेनें, पैशानें, किं० कर्तबगारीनें जो एकाद्या गांवांत श्रेष्ठ मनुष्य तो.

धृंदा [सं०] स्त्री० तुळस. ❀ धृंदावन न० तुळस लावावयासाठीं दगड, विटा, माती, धातूचा पत्रा, इ० ची केलेली असते ती रचना.

धृंदारक [सं०] वि० १ पूज्य; श्रेष्ठ.२सुंदर. पु० देव.

धृद्ध [सं०] वि० १ म्हातारा. २ वाढलेला; वृद्धिंगत; परिपक्व. ३निष्णात. ४ उच्च दर्जास पोंचलेला; श्रेष्ठ;उ०ज्ञानवृद्ध,तपोवृद्ध, वयोवृद्ध,इ०. ❀ धृद्धकाक पु० १ डोमकावळा. २ (मराठात) जो म्हातारा असून सशक्त आणि निकोप प्रकृतीचा आहे असा मनुष्य. धृद्धप्रपितामह पु० बापाचा पणजा. धृद्धप्रमातामह पु० आईचा पणजा. धृद्धश्रवा [सं० वृद्धश्रवस्] पु० इंद्र. धृद्धत्व न० म्हातारपण; वार्द्धक्य. धृद्धपरंपरा स्त्री० १ पूर्वीच्या पिढ्यांचीं वृद्ध माणसें समुच्चयानें. २ मागपासून चालत आलेली रूढि किं० आचाराची सरणी. धृद्धाचार पु० कुटुंबांत मागपासून चालत आलेली रूढि. धृद्धापकाळ पु० म्हातारपणामुळें गात्रें जीर्ण झाल्याची स्थिति.

धृद्धि [सं०] स्त्री० १ वाढ; वाढलेपणाची स्थिति. २ अधिक होणें; उ० तिथिवृद्धि. ३ तिथि, नक्षत्र, योग, यांचें वारत्रयास स्पर्श व्हावयाजोगें जें आधिक्य तें. ४ कर्जाच्या पैशावरचें व्याज. ५ व्याजबट्टा. ६ वृषणवृद्धि. ७ (व्याकरण) आ, ऐ, आणि औ, हे वर्ण; उ० कठिन, काठिन्य; शीत, शैत्य; गुरु, गौरव, ह्या शब्दांतील आ, ऐ, औ, हीं वृद्धीचीं उदाहरणें.८ कुटुंबांत मुलाचा जन्म झाला असतां जो विटाळ येतो तो. पु० अकरावा योग. धृद्धिश्राद्ध न० नांदीश्राद्ध. धृद्धिंगत वि० उत्तरोत्तर वाढत गेलेला.धृद्धिजीविका स्त्री०सावकारी करून किं० कर्ज देऊन व्याज मिळवून जें द्रव्योपार्जन तें किं० त्यांचें चरितार्थ तो. धृद्ध्याजीव पु० सावकारीवर

चरितार्थ चालविणारा. **वृद्धिसूतक न०** वर ' वृद्धि ' अर्थ ८ पहा.

वृश्चिक [**सं०**] **पु०** १ विंचू. २ (ज्योतिष) मेष,वृषभ, इ०ज्या बारा राशि, त्यांतील आठवी रास.मागें'तूळ'मध्ये ह्या बारा राशींचीं नांवें पहा.

वृष [**सं०**] **पु०** १ बैल. २ वृषभ रास. ३ **(समासांत उत्तरपद)** श्रेष्ठ. ४ वृषण; अंड. ❀ **वृषांक, वृषध्वज पु०** शंकर. **वृषोत्सर्ग पु०** मृतप्रीत्यर्थ पोळ सोडणें. मागें ' वसुसर्ग ' पहा. **वृषस्कंध पु०** बैलाचें वाशिंड.

वृषण [**सं०**] **पु०** अंडकोष; अंड.

वृषभ [**सं०**] **पु०** वर ' वृष ' अर्थ १, २, ३ पहा. ❀ **वृषभकेतु, वृषभध्वज पु०** शंकर.

वृषल [**सं०**] **पु०** १ शुद्र. २ चंद्रगुप्त राजा. ३ बाहिष्कृत किं० अधार्मिक माणूस. **वृषली स्त्री०** १ शूद्र स्त्री. २ चांडाळीण. ३ लग्नापूर्वी रजोदर्शन झालेली मुलगी.

वृष्टि [**सं०**] **स्त्री०** १ पाऊस. २ वर्षाव. ३ (दगड, बाण, शिव्या, शपथा, इ० चा) प्रहार.

वृक्ष [**सं०**] **पु०** झाड. ❀ **वृक्षवाटिका स्त्री०** बाग; घराजवळची आरामार्थ केलेली बाग. **वंशवृक्ष पु०** एकाद्या कुटुंबातील स्त्रीपुरुषाची वृक्ष, शाखा, इ० रूपाची मांडणी. **वृक्षराज पु०** वड, पिंपळ, आपटा, शमी, इ० वृक्ष प्रत्येक.

वेंकावल्यां स्त्री० अ० व० टिवल्या बावल्या; बांकुल्या.

वेखंड [**सं०** वचा+खंड; वचा=वेखंड] **न०** एक झाड. याची मुळी औषधाच्या उपयोगीं पडते.

वेंग स्त्री० दोन्ही बाहु अंगापासून लांब करून त्यांच्यांत माणूस,वृक्ष,गाठोडें,इ०पकडावयासाठीं घातलेली मिठी; दोन्ही बाहूंचा कव (मारणें, घालणें). ❀ **मूल, घागर, इ० वेंगेवर घेणें** म्ह० कडेवर घेणें.

वेग [**सं०**] **पु०** १ त्वरा; घाई; गतीचा जोर. २ ताप, थंडी, इ० चा तीव्रता. ३ अंगांत भिनत असले ा विषाच्या लहरी किं० वेदनेच्या उसळ्या प्रत्येक; उ० आपण मारला तो साप तीन वेगांचा होता. ४ गुदद्वारें मलविसर्जन ज्या दोन, तीन, चार, इ० हप्त्यांनां होतें ते हप्ते प्रत्येक. ५ वायु, पर्जन्य, पाण्याचा प्रवाह, इ० चा जोर. ६ कांहीं काम करण्याची आकस्मिक इसळी. ❀ **वेगमान न०** पदार्थांचें वजन आणि त्याच्या गतीचा वेग ह्यांचें एकवटलेलें सामर्थ्य.

वेंगटणें [**सं०** वेंग] **स० क्रि०** (कांहीं पदार्थ, माणूस, इ०) वेंगेंत धरणें किं० पकडणें.

वेंगटणें, वेंगाटणें, वेंगडणें, वेंगाडणें [**म०** ' वेंगणें ' चें एक रूप] **स० क्रि०** दीनपणाची मुद्रा (तोंडावर) आणून किं० वठवून कोणे-कापाशीं कांहीं याचना करणें; उ० माझ्यापुढें तोंड कां वेंगाडतोस ? तुला नोकरी देणें माझ्या हातांत नाहीं.

वेंगडी [**म०** वेंगणें] **स्त्री०** १ वक्र गति. २ घाबरल्यामुळें गात्रें ताठ होणें किं० आखडणें. ह्या अर्थी प्रयोग **अ० व०**. हातापायांच्या, अंगाच्या,किं०बोटांच्या वेंगड्या वळणें,चढणें,उतरणें, असे प्रयोग होतात.

वेंगणें अ० क्रि० अतिकष्ट, चिंता, उपास, इ० मुळें थकणें किं० म्लान किं० निर्वीर्य होणें.

वेंगणें पुढें ' वेंघणें ' पहा.

वेंगलण [**म०** वेंग] **स्त्री०** पोटाशीं लहान पोर वागविणारी माकडी किं० वानरी.

वेगळ वि० १ पृथक् असलेला. २ भिन्न,विजातीय. ह्या दोन्ही अर्थी कवितेंत'वेगळा'बद्दल'वेगळ'येतो.

वेगळ श०यो०अ० शिवाय,वांचून (कवितेंत).

वेगळणें [**म०** वेगळा] **स० क्रि०** १(पदार्थ) वेगळे वेगळे करणें. २ वगळ ; काढून टाकणें. ह्या अर्थी ' वगळणें ' अधिक रूढ आहे. मागें ' वगळणें ' पहा.

वेगळा [**स०** विगलित] **वि०** १ विभक्त केलेला; अंतरावर सारलेला किं० ठेवलेला. २ भिन्न; अगदीं विधर्मीय; निराळा **श० यो० अ०** १ सोडून; शिवाय; वांचून; खेरीज; उ० मी रामा वेगळा राहणार नाहीं असें भरत म्हणाला. २ पलाकडे; उ० ज्ञानावेगळा माणूस पशु होय. २ पलाकडे; उ० दृष्टीवेगळा म्ह० नजरेच्या आटोक्या बाहेर; उ० दृष्टीवेगळा म्ह० नजरेच्या टप्प्याच्या पलीकडे.**टीप,**- ह्या दोन्ही अर्थी'वेगळा' लिंगवचनांप्रमाणें फिरतो. ❀ **वेगळीक स्त्री०** १ वेगळेपणाची स्थिति; पृथक्ता; भिन्नता.

समान दर्जाच्या माणसांना भिन्न प्रकारें वागविणें ह्या रूपाचा पक्षपात. ३ पदार्थांचें वर्गीकरण; उ० ह्या पिशवींतील रुपये, आधेल्या, पावल्या, आणि चवल्या, ह्यांची वेगळीक कर.

वेगळचार, वेगळेचार [म० वेगळे + आचार, विचार, इ०] पु० अ० व० १ मतें, सरणी, आचार, हिताहित, इ० बाबतींत वेगळेपणा किं० पृथक्‌पणा किं० भिन्नता. २ भावाभावांची विभक्तपणाची स्थिति.

वेगळेचार वर ' वेगळा ' मध्यें पहा.

वेंगाटणें, वेंगाडणें वर ' वेंगटणें, ' 'वेंगडणें' पहा.

वेंगाटी [म० वेंग] स्त्री० बाहूंनीं घातलेली किं० मारलेली मिठी; आलिंगन; कवटाळणी.

वेंगाळणें [म० वेंग] स० क्रि० वेंगेंत किं० वेगेने (माणूस, झाड, गठ्ठा, इ०) पकडणें.

वेंगलें, वेंगणें [म० वेंग] स० क्रि० १(पर्वत, झाड,जिना, इ० वर) चढणें. २ (फांदी हातांत धरून तिला लोंबकळून ती खालीं ओढणें वि.० तिला लोंबकळत राहाणें.

वेंवणें अ० क्रि० १ करूं कीं नको करूं ह्या विचारानें साशंक स्थितींत पडणें; कचरणें,शंकित होणें. २ आजार,कष्ट, चिंता, उपवास, इ० कारणांमुळें थकणें,म्लान होणें, वि० निरुत्साह होणें.

वेच [सं० व्यय] पु० खर्च; द्रव्य, सामग्री, इ०चा कांहीं कामाकडे विनियोग. ☸ **खर्चवेच, वेचखर्च** पु० ए० व० खर्च; व्यय.

वेचक, वेचका [म० वेचणें] वि० १ निवडून वेगळा काढलेला. २ उदार; खर्चिक.

वेचकुल्या स्त्री० अ० व० टिवल्या बावल्या; तोंडें वेडींवाकडीं करणें हा पोरकटपणाचा प्रकार.

वेचणें [सं० व्यय्=खर्च करणें;देणें] स० क्रि० खर्चणें;संपविणें;उ० तूं आपली सर्व शक्ति वेचलीस तरी हा धोंडा तुला सरकवितां येणार नाहीं.

वेचणें [सं० विच्=वेगळें करणें] स० क्रि० उचलून घेणें; वेगळें काढणें; निवडणें; उ० फुलें, तांदुळ, बोरें, इ० वेचणें.

वेचला [म० वेचणें] वि० १निवडून काढलेला; बाजूस काढून ठेविलेला; पसंत केलेला. २ विचारांत घेतलेला (विषय, मुद्दा, इ०).

वेंचवी, वेंचवीण स्त्री० त्वचेच्या रोगाचा एक प्रकार.

वेचा [म० वेचणें] पु० १ मोठें पुस्तक, ग्रंथ, लेख, भाषण, इ०तून कांहीं उद्देशानें निवडून काढलेला भाग.२सारांश.☸ **वेचे वेचे बोलणें** १ चोखंदळेपणानें शब्द निवडून आणि थांबत थांबत बोलणें. २मुखांतून वावगा शब्द बाहेर पडूं नये किं० भलतेंच विधान केलें जाऊं नये अशी काळजी घेऊन बोलणें(दोन्ही अर्थीं निंदेत प्रयोग).

वेचावण (–न) मागें ' वेचावण ' पहा.

वेंज, वेजे [सं० वेध] न० १ मोती, लाल, माणिक, इ० ना पाडिलेलें भोक. २ सुई,दाभण, इ०चा डोळा. ☸ **वेजों उतरणें** मोती, माणिक, इ०चें भोक,तार, रेशीम, इ०च्या सततच्या घर्षनानें मोठें होणें.

वेट, वेंट [सं० वेष्ट्] पु०, स्त्री० १ पेंढा, गवत, इ० वळून केलेला दोर. २ वायूचे विकृतीमुळें पोटांत दोरीसारखा उंचवटा उठतो तो. ३ प्रेमाच्या अतिरेकानें पोटांत पीळ पडल्याची भावना होते ती (उठणें, वळणें, इ०). ४ पदार्थाभोंवतीं घातलेला दोरीचा वळसा किं० वेढा. ५ अंबाडीची तीन पदरांची दोरी. ६ एक वेल किं० वल्ली. ☸ **लोकांचा वेट वळणें** त्यांणीं संघशक्तीनें कांहीं कार्य करणें. **माण.सें, गुरें,शिपायी,इ० चा कोणे.क स्थळीं वेट वळणें** त्यांणीं खेचाखेच करून एकत्रिक होणें; उ० त्या वादळांत गुरांचा वडाच्याझाडाखालीं वेट वळला.

वेटणें, वेटणे न०, **वेटली** (–ळी) स्त्री० [सं०वेष्ट] १ गवताला पीळ घालून वळलेली दोरी. २ गवत इ०ची पेंढी. ३ वेटोळें.

वेटणें [म० ' वेचणें ' चें एक रूप] स० क्रि० १ (कणसें, फुलें, दूर्वा, इ०)तोडून गोळा करणें. २ (गवताला) पीळ भरून त्याची दोरी वळणें. ३ (कापसावर) लाटणें फिरवून त्यांतून सरक्या काढून टाकणें.

वेटाविणें, वेटाविणें स० क्रि०कोणेकापुढें तोंडें वेडींवाकडीं करून किं० त्याच्या सारखें बोलून, हसून, किं० चालून त्याचा उपहास करणें.

वेटावण्या स्त्री० अ० व०, **वेटावणें** न०

कोणेकापुढें वात्रटपणानें वेडींवांकडीं तोंडें करणें (दाखविणें, करणें).

वेटाळणें [म० 'वेटणें' चें एक रूप] स० क्रि० १ (पदार्थ, माणूस, इ० च्या भोंवतीं) बाहु, दोरी, सैन्य, इ० चा वेढा घालणें; गराडणें. २ पिळणें; पिळवटणें. ३ एके ठिकाणीं करणें; गोळा करणें. ४ कवळणें.

वेटाळा पु०, **वेटोळें**, **वेटाळें** न० [म० वेटणें, वेटाळणें] गुंडाळी, वळकटी, पीळ, सुरळी (घालणें, पडणें). **वेटाळी** स्त्री० गवताची दोरीसारखी गुंडाळी किं० जुडी.

वेटी [म० वेटणें] स्त्री० गवताची दोरी.

वेठ [सं० विष्टि=फुकट काम] स्त्री० १ मजुरी न देतां कोणी अमलदार, समर्थ, इ०नीं करवून घेतलेलें काम किं० करविलेली ओझ्याची वाहतूक. २ पैसे न देतां खोत, सरकारी अमलदार, इ० नीं रयतेपासून अधिकाराच्या जोरावर उकळलेले पदार्थ. ३ जुनीं भांडीं मोडींत घालून नवीन भांडीं विकत घेतांना भांडीं घेणारा मनुष्य जो ज्यास्ती रोख पैसा देतो तो. ꠰ **कामाची वेठ करणें** (किं० **वळणें** किं० **काढणें**) तें कसेंबसें करून टाकणें; तें निष्काळजीपणानें करून टाकणें. **वेठीचें करणें** कसें बसें करणें. **कोणेकास वेठीस धरणें** आपलें काम करविण्यासाठीं त्याला धरणें किं० अडकावणें; त्याला आपलें काम करावयाला भाग पाडणें. **वेठकरी**, **वेठ्या** पु० वेठीस धरलेला माणूस. **वेठबिरळा** पु०, **वेठबिगार** स्त्री० ए० व० वेठीनें करविलेलें काम किं० असें काम करविण्याचा खोत इ० चा हक्क.

वेठ, **वेंठ** मागें 'वेट, वेंट' पहा.

वेठन [सं० वेष्टन] न० १ गाडी, नांगर, इ० चें टेरूं, लोड, इ० भाग बांधण्याची दोरी. २ कांहीं काम करण्याची कोणेकाची खुबी, सफाई, किं० चलाखी (शेतकऱ्यांचा शब्द).

वेठणें [सं० वेष्ट] स० क्रि० १ (गाडी, नांगर, इ० चें जूं, धुरी, इ० भाग) दोऱ्यांनीं बांधणें. २ (दोऱ्या, बंधन, इ०) यथास्थानीं बांधणें. ꠰ **आठला वेठला** वि० दोऱ्या बंध, इ० यथास्थानीं बांधून किं० गुंडाळून सिद्ध किं० सज्ज केलेला (नांगर, गाडा, इ०).

वेड स्त्री० गव्हाच्या जुड्यांची रास करून जुड्यांतील ताटांच्या मुळ्यांची वेणी घालतात ती,-चोरांना हीं ताटें उपसून काढतां येऊं नयेत म्हणून. न०, स्त्री० हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालतात तें वेढें किं० वळें.

वेड स्त्री० ईडलिंबाचें झाड. मागें 'ईड' पहा. न० ह्या झाडाचें फळ. हे शब्द अशिक्षितांत रूढ आहेत.

वेड [सं० विड्=किंचाळणें, चरफडणें] न० १ मेंदूमध्यें कांहीं बिघाड झाल्यामुळे बुद्धिभ्रंश इ० रूप होतो तो आजार. २ कोणताही मूर्खपणाचा विचार किं० कृति किं० यत्न. ३ एकाद्या पदार्थाबद्दल अत्युत्कट किं० फाजील इच्छा. ४ भूतबाधा, वायुप्रकोप, इ० मुळें कोणेकाला भलतें भलतें बोलणें, करणें, इ० ची येते ती लहर. ꠰ **वेड घेऊन पेडगांवास जाणें** वेड्याचें सोंग घेऊन आपला मतलब साधावयास झटणें. **वेड पांघरणें** मुद्दाम वेड्यासारखें बोलणें किं० वागणें (निंद्यत प्रयोग). **एकाद्याला वेड भरणें** त्याला वेड लागणें. **कोणेकाला एकाद्या वस्तूचें वेड लागणें** त्याला तिचा नाद लागणें; तीच वस्तु त्याच्या ध्यानीं मनीं सदैव घोळत असणें; तो एकसारखा तिच्या नादांत असणें. **एकाद्याला वेड लावणें** १ त्याला मोहित करणें; त्याचें मन आकृष्ट करणें. २ त्याला घोटाळ्यांत घालणें. ३ त्याला भारी उपद्रव करणें,-जेणेंकरून त्याला वेड लागण्याइतकी त्याची स्थिति व्हावी.

वेडा [म० वेड; सं० विड्=किंचाळणें] वि० १ मेंदूंत कांहीं बिघाड झाल्यामुळें जो भलभलतें बोलतो किं० करतो तो; ज्याला वेड लागलें आहे असा. २ मूर्ख; व्यवहारचातुर्य ज्याला नाहीं असा. ३ पूर्वापरसंबंधरहित (वर्तन, भाषण, इ०). ४ छांदिष्ट. ५ मोहित किं० आकृष्ट झालेला. ६ एकदम पुष्कळ कामें करावयाचीं असतां काय करावें, कसें करावें, अशी ज्याच्या मनाची भ्रांतिष्ट स्थिति झाली आहे असा; कर्तव्यमूढ झालेला; संभ्रांत झालेला. ꠰ **वेडसर**, **वेडदुल्ला**, **वेडपा**, **वेडाबुळा** वि० अर्धवट वेडा; वेड्या-

सारखें भाषण किं० कृति करणारा. **वेडापिसा** वि० वेडा; अर्धवट. **वेडापीर पु०** छांदिष्टपणें बोलणारा; छांदिष्टपणें वागणारा. **वेडाबागडा** वि०वेडावाकडा;बेडौल.**वेडामधुरा पु०**एक प्रकारचा ज्वर,–ज्यांत शीतोपचार झाला असतां तो ज्वर विकोपास जाऊन वायु होतो आणि वेड लागल्या सारखी प्रकृति होते. **वेडावाकडा वि०** १ वाकडा तिकडा. २ जें फारसें वाखाणण्याजोगेंही नाहीं आणि जें अगदीं टाकाऊही नाहीं असें (भाषण किं०चित्र इ०कांहीं पदार्थ). **वेडापिसा, वेडाखुळा वि०** अर्धवट वेडा. **वेडथर, वेडगळ, वेडगेला वेडका, वि०** वेडा; अर्धवट; मूर्ख. **वेडा ऊस पु०** १ जंगली ऊस.२हलक्या उसाची एक जात.**वेडाविद्रा,वेडाविपारा वि०**१वेडा आणि कुरूप. २कुरूप आणि बेघाट (माणूस,पदार्थ).**वेडाळया, वेडाळा वि०** वेडा; अर्धवट. **वेडे चार पु०अ० व०** मूर्खपणाचीं कृत्यें.**वेडी हळद स्त्री०** जिचें खोड जाडी आहे अशी हळद. **वेडें पीक न०** १ मशागती वांचून विपुल येणारें पीक. २ आलें तर विपुल, नाहीं तर मुळींच नाहीं, असें कित्येक झाडांना येतें तें पीक. ३ वळला तर हावें तें देईल, नाहीं तर मुळींच कांहीं देणार नाहीं असा छांदिष्ट किं० लहरी दाता.४क्षुल्लक कारणांवरून कधीं कधीं फार रागावणारा आणि मोठा उपद्रव त्याला कोणी केला तरी शांत राहणारा असा छांदिष्ट माणूस.५छांदिष्ट वर्तन किं०वृत्ति.**वेडें भाग्य न०** नादान आणि कर्तृत्वशून्य माणसाला एकदम प्राप्त झालेलें भाग्य. **वेडे वेडे चार पु० अ० व०** छांदिष्टपणाचीं कृत्यें. **वेड्यांचा बाजार पु०** मूर्ख माणसांचा जमाव,–कांहीं गोष्ट करावयाला प्रवृत्त झालेला (भरणें, जमणें).

वेडगळणें, वेडवणें [**म०** वेड, वेडा] **अ० क्रि०** १ वेडें होणें. २ छांदिष्टपणाचें वर्तन करणें किं० करूं लागणें.

वेडण [**म०** वेढणें] **न०** हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालावयाचें सोन्याचें किं० चांदीचें वळें.

वेडविणें [**म०** वेडा] **स०क्रि०** (कोणेकाला) वेड लागण्याइतकें छळणें, सतावणें, किं० गांजणें.

वेडावणें स०क्रि०(कोणेकापुढें)वाकडीं तिकडीं तोंडें करून (त्याला) खिजावणें.

वेडावणें, वेडाळणें [**म०** वेडा] **अ० क्रि०** १ वेडें होणें. २ कांहीं गोष्टींच्या नादानें फाजिल आकृष्ट होणें किं० तिच्या भरीं भरणें.

वेढ [**सं०** वेष्ट्] **न०, स्त्री०** हाताच्या किं० पायाच्या बोटांत घालावयाचें वळें. **पु०** किल्ला, घर, कंबर, छाती, इ०चा परिघ.

वेढणी स्त्री० उडदाच्या पिठांत तिखट, मीठ, इ० घालून धिरड्यासारखें करतात तें तोंडीं लावणें.

वेढणें [**सं०** वेष्ट्] **स० क्रि०** १ गराडणें. २ (पदार्थाभोंवतीं) दोरी, वस्त्र, इ० लपेटणें. ३ (किल्ला, घर, गांव, इ० भोंवतीं)वेढा देणें किं० गराडा घालणें. ४ कमरेभोंवतीं (लुगडें, धोतर, इ०) सरासरीं गुंडाळून घेणें किं०तें कसेंबसें नेसणें. ५(गांव,देश,इ०)लुटारू इ०नीं पादाक्रान्त करणें. **अ० क्रि०**१(कागद,भिंत,इ०)चित्रें,आकृति,अक्षरें, इ०नीं खरडला जाणें. २ कामाखालीं (कोणी मनुष्य) दडपून गेलेला असणें.

वेढा [**सं०** वेष्ट्] **पु०** १ गराडा. २ पदार्थाभोंवतीं दोरी इ०चा वळसा. ३ मळसूत्राचा स्वताच्या आसाभोंवतीं एक सबंध फेरा. ४मध्य बिंदूभोंवतीं कांहीं पदार्थ एक वेळां फिरला म्हणजे होतें तें वर्तुळ. ५ मात्रा इ० सहाणेवर उगाळतांना तिचा एक सबंध वळसा.§ **फिरत्या भोंवऱ्याचे वेढे मोजतां येत नाहींत** मनुष्य ऐन वैभवाच्या किं०उत्कर्षाच्या स्थितींत असतो तो पर्यंत त्याच्या बारीक सारीक हालचालींकडे लक्ष्य देतां येत नाहीं किं० त्याचे दोषही सांगतां येत नाहींत.

वेढें [**सं०** वेष्ट्] **न०** हाताच्या किं०पायाच्या बोटांत घालावयाचें सोनें, चांदी, तांबें,इ०धातूंचें वळें.

वेण, वेणा [**सं०** वेदना] **स्त्री०** १ प्रसूतिसमयीं स्त्रीस पोटांत येतात त्या कळा प्रत्येक. **टीप**,– ' वेणा ' असा **स्त्री० अ० व०** प्रयोग बहुधा होतो. **क्रि०** देणें, येणें, होणें. २ आमांश झाला असतां गुदद्वारें मलविसर्जनाचे समयीं पोटांत जो मुरडा होतो तो किं० कळ उठते ती. **वेण स्त्री०** स्त्रीच्या प्रसूतीचा प्रकार,–उशीर,सांव-

काशी, कळा निघणें, इ० विषयीं बोलतांना; उ० गोदूबाईची वेण हरिणीसारखी आहे. ॐ **वेणा (किं० वेण्या) देणें** कांहीं कार्यार्थ परमावधीचा प्रयत्न करणें किं० कष्ट सोसणें.

वेणटणें, वेणाटणें, वेणवणें [**म०** वेण, वेणा] **अ० क्रि०** प्रसूति होण्याच्या अगोदर (स्त्रीच्या) पोटांत कळा उठत असणें; उ० गोदूआक्का सकाळपासून वेणटती आहे पण अझून तिची सुटका झाली नाहीं (म्ह०ती प्रसूत झाली नाहीं). [(तांदूळ).

वेणा वि० विरटांत घालून भरडून काढलेला

वेणी [**सं०**] **स्त्री०** १ डोईचे केश, अंबाडी, इ०चे तीन किं०अधिक पेड एकांत एक विशिष्ट प्रकारें गुंतवून लांबलचक केलेला आकार (घालणें).२ पाण्याचा अरुंद ओहोळ.३ पंक्ति; रांग. ४नद्यांचा संगम; त्रिवेणीसंगम. ॐ **वेणीफणी स्त्री० ए०व०** केशांस तेल लावणें, केश विंचरणें, त्यांची वेणी घालणें, कुंकूं लावणें, काजळ घालणें, इ०रूप जो स्त्रियांचा प्रसाधनविधि तो (करणें, होणें).

वेणु [**सं०**] **पु०** १ वेळू; बांबू. २ पावा; मुरली. ॐ **वेणुबीज न०, वेणुयव पु०** वेळूचें बीं.

वेत, वेतस [**सं०**वेतस] **पु०**१वेत,–ज्याच्या तंतूंनीं खुर्चा, पलंग, इ० विणतात. २ वेताची छडी. ॐ **वेतसरी स्त्री०** वेताचा तंतु,–खुर्ची इ० विणावयासाठीं काढलेला. **वेतस वृत्ति, वैतसी वृत्ति स्त्री०** नम्रपणाची किं० लहानपणाची वर्तनसरणी. **वेतसी वि०** वेताचा बनविलेला (पदार्थ,– टोपलें, खुर्ची, इ०). **स्त्री०** वेत किं० वेताची काठी.**वेताटी** [**म०** वेत+काठी] **स्त्री०** वेताची काठी,–हातांत धरावयाची किं० मारामारींत वापरावयाची.

वेत [**म०** विणें] **न०** गायी, म्हशी,शेळ्या, इ० चीं एक एक प्रसूति किं० प्रसूतीची खेप किं० वेळ; उ० ही गाय तीन वेतांची आहे (म्ह०तीन वेळां व्यालेली आहे).

वेतन [**सं०**] **न०** १ पगार; मजूरी. २ निर्वाहाचें साधन.३ पुराणिक, हरिदास,फडणीस, इ०ना देतात ती बिदागी किं० बक्षिशी.ॐ**वेतनी** (**वि०** १ वेतन ठरवून कांहीं कामास लाविलेला गडी, मजूर, पुराणिक, इ०).२ कांहीं कामाबद्दल कोणेकाला रोख पैसे किं० पगार न देतां त्याच्या मोबदला बक्षीस दिलेला (गांव, हक्क, अधिकार, इ०). ३ वेतनासंबंधाचा (तंटा, हिशेब, इ०).

वेंतस, वेंतूस न० शरीरांतून रक्त काढावयाचें एक साधनविशेष; एक प्रकारची तुंबडी.

वेतस मागें ' वेत, वेतस ' पहा.

वेताळ [**सं०**] **पु०** पिशाचांचा राजा. २ भुतानें पछाडलेलें प्रेत. ॐ **वेताळ आहे तेथें भुतावळ आहेच** द्वाडपणाचें कांहीं कृत्य करावयाला कोणी मनुष्य सिद्ध झाला म्हणजे त्याच्या मदतीला द्वाड माणसें जुळतातच. **वेताळ पूर्व स्थळीं येणें** १उत्संखळ किं०द्वाड माणसाला केलेला उपदेश जुना झाला म्हणजे किं०त्याच्यावरचें नियंत्रण शिथिल झालें म्हणजे तो पूर्वीप्रमाणें दुर्वर्तनी होणें. २ पुनः पूर्वक्रम किं० सरणी अनुसरूं लागणें.

वेत्ता [**सं०** वेत्तृ] **पु०** ज्ञाता; एकाद्या विषयांत पारंगत मनुष्य.

वेत्र [**सं०**]**पु०**वेत,–ज्याच्या तंतूंनीं खुर्च्या, पलंग, इ० विणतात. **न०** काठी; सोटा.ॐ **वेत्रधर, वेत्रधारी पु०** द्वारपाळ; भालदार. **वेत्रलता स्त्री०** भालदाराची काठी. **वेत्री** [**सं०** वेत्रिन्] **पु०** द्वारपाळ.

वेद [**सं०**] **पु०** १ ज्ञान. २ धर्म, ब्रह्म, इ० चें कथन करणारा मंत्रब्राह्मणात्मक आणि हिंदूंना परमपूज्य असा ग्रंथ,–ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, आणि ब्राह्मण ग्रंथ, ह्यांचा समुच्चय किं० हीं प्रत्येक.ॐ**कोणेकाचे वेद हरणें** त्याच्या सर्व युक्त्या,बेत, इ० फसून तो कर्तव्यमूढ होणें. **वेदनिंदक पु०** बौद्ध किं० जैन माणूस. **वेदमुख वि०** ज्याला वेद पाठ आहेत असा. **वेदांग न०** शिक्षा, कल्प, व्याकरण, ज्योतिष, आणि निरुक्त, हीं प्रत्येक. **वेदान्त न०** ब्रह्मज्ञान; जग मिथ्या आहे हें तत्त्व किं०ह्या तत्त्वाचें निरूपण करणारा ग्रंथ.२ (**मराठांत**) प्रपंचाचें मिथ्यात्व आणि ब्रम्हाचें सत्यत्व प्रतिपादिणारी गोष्ट जी हरिदास सांगतात ती.**वेदोनारायण पु०** वेदविद्येंत पारंगत ब्राह्मण. **वेदोक्त, वेदोदित वि०** वेदांत कर्तव्य म्हणून सांगितलेलें (धर्मकृत्य).**वेदान्ती**[**सं०**वेदान्तिन्]**वि०**ब्रह्मज्ञानी.

वेदावभृथसंपन्न वि० वेदांत पारंगत. **वेदादिवर्ण** पु० ॐ हें अक्षर. **वेदोदय** पु० सूर्य. **वेदगर्भ** पु० १ ब्रह्मदेव. २ ब्राह्मण. **वेदत्रय** न० ऋक्,यजुस्,आणि साम, हे तीन वेद समुच्चयानें. **वेदवाचा** स्त्री० देवी सरस्वती. **वेदवदन** न० व्याकरण. **वेदवाद** पु० कर्मकांड. **वेदवास** पु० ब्राह्मण. **वेदविद्वान्** वि० वेद पढलेला. **वेदव्यास** पु०व्यास ऋषि.**वेदमूर्ति** स्त्री०मूर्तिमंत वेद. वेदविद्यासंपन्न आणि भिक्षुकवृत्तीनें राहाणाऱ्या ब्राह्मणाच्या नांवामागें कागदोंपत्रीं योजावयाचा हा शब्द आहे; उ० वेदमूर्ति अनंतभट्ट पावंदे. **वेदशास्त्रसंपन्न** वि० शास्त्रपुराणादि जाणणारा प्रतिष्ठित जो ब्राह्मण त्याच्या नांवामागें कागदोंपत्रीं ही पदवी योजतात.

वेदन [सं०] न० १ जाणणें. २ ज्ञान. ३ मनोविकार. ४ सुखदुःखादींचा अनुभव.

वेदना [सं०] स्त्री० १ तीव्र दुःख. २ शारीरिक दुःखाची तिडीक किं० कळ. ॐ **ह्या बोटाची वेदना त्या बोटास येत नाहीं** मित्र, नातलग,आप्त,हीं माणसें जरी अगदीं एक दिलाचीं असलीं तरी एकाचें दुःख पूर्णपणें दुसऱ्याच्या लक्ष्यांत किं० अनुभवास किं०प्रतीतीस येत नाहीं.

वेदि, वेदी [सं०] स्त्री० १ यज्ञार्थ सुसंस्कृत केलेली भूमि. २ यज्ञकुंड. ३ आसन; बैठक. ४ लग्न, मुंज, इ० विधींत घातलेलें बहुलें. ५ अंगुलीमुद्रा; नांवाची अंगठी.

वेदिका [सं०] स्त्री० १ यज्ञार्थ सुसंस्कृत केलेली भूमि. २ उंच आसन किं० बैठक. ३ ओटा. ४ मंडप.

वेदितव्य, वेद्य [सं०] वि० १ कळवावयाचें. २ जाणावयाचें. ३ जाणावयास योग्य.

वेध [सं०] पु० १ मोती, माणिक, इ० ना छिद्र किं० भोक पाडणें. २ पाडलेलें भोक किं० छिद्र. ३ खोलीचें किं० उंचीचें माप.४(**ज्योतिष**) ग्रहाचें स्थान, ग्रहण, तिथि, इ०चा निर्णय. ५ दृष्टि, बाण, बंदुकीची गोळी, इ० चा लक्ष्य पदार्थावर झालेला पात. ६ सूर्यग्रहणाच्या अगोदर चार प्रहर आणि चंद्रग्रहणाच्या अगोदर दोन प्रहर असा जो धर्मशास्त्रांत ग्रहणासंबंधाच्या दोषाचा अवधि सांगितलेला असतो तो,–ज्या अवधींत भोजन इ० निषिध समजलें जातें. ७ ज्या दिवशीं प्राधान्यें करून जें तिथिनक्षत्रादि असतें, त्यास त्याच दिवशीं प्रातःकाळीं किं० सायंकाळीं किं० अन्य समयीं असतो जो तिथिनक्षत्रादिकांचा अंश, त्याचा गुणदोषप्रयोजक असतो जो संबंध तो; उ० आज मंगळवारीं दशमी दोन घटिका आणि एकादशी सत्तावन्न घटिका तस्मात् ह्या एकादशीस दशमीचा वेध आहे. ८ सप्तशलाकादि चक्राचे ठायीं एकशलाकादिगत जीं नक्षत्रादिक असतात त्यांतून एकीकडचे नक्षत्रादिकांवर जो कोणी ग्रह असतो त्याचा दुसरेकडचे नक्षत्रादिकांवर जो दृष्टिपात असतो तो. ९ कांहीं कामाचा कोणेकावर जो भार असतो ज्याचेमुळें त्याला इतर गोष्टींकडे लक्ष्य लावितां येत नाहीं तो भार; उ० कुटुंबाचा वेध ज्याच्या पाठीशीं आहे त्याला नाच तमाशे कसे सुचणार? १० तळें, विहीर, इ० चा खोलपणा. ११ व्याक्षेप; चाललेल्या क्रमामध्यें झालेलें किं० आलेलें विघ्न किं० तेणेंकरून झालेला खोळंबा. १२ एकाद्या गोष्टीचा कोणेकाला लागलेला नाद किं० छंद (लागणें). ॐ **वेध घेणें** (किं० **करणें**) दुर्बीण इ० साधनांनीं खस्थ पदार्थाची स्थिति इ० मापणें किं० ठरविणें. **वेधशाला** स्त्री० ज्योतिष विषयक अवलोकन करण्याची जागा.

वेधक [सं०] पु० १ मोती, हिरे, इ० ना भोकें पाडण्याचा धंदा करणारा. २ रमविणारा; आकर्षिणारा; उ० मनोवेधक, चित्तवेधक.

वेधणें [सं० विध्, व्यध्=भोक पाडणें] स० क्रि० १ (पदार्थास) भोक पाडणें. २ (पदार्थावर) प्रहार करणें. ३ (लक्ष्य, मन) खेचणें किं० आकर्षिणें. अ० क्रि० १ (पदार्थावर) बाण, धोंडा, इ० चा प्रहार होणें. २(पदार्थाला) भोक पडणें. ३ (मन) आकृष्ट होणें किं० गुंतणें.

वेधन [सं०] न० १ सुई; दाभण. २ भोक पाडावयाचें सुतार इ० चें हत्यार. ३ भोक पाडणें ही क्रिया.

वेंधळा वि० अजागळ; गैबती; बावळट,गेंदी.

वेधा [सं० वेधस्] पु० १ ब्रह्मदेव. २ उत्पादक; स्रष्टा. ३ परमात्मा.

वेंधित [**सं०**] **वि०** १ ज्यांला भोक पाडलें आहे असें. २ वेध केलेलें.

वेपथु [**सं०**] **पु०** कंप; कांपणें.

वेपन [**सं०**] **न०** १ कंप. २ शरसंधान.

वेम, वेमा [**सं०** वेम, वेमन्] **पु०** १ कोष्टयाचा माग. २ आडवीं सुतें ठासण्याची कोष्टयाची फणी.

वेरजार, वेरझार, वेरघार [**म०** येरे+जा रे] **स्त्री०** १ रिकामा हेलपाटा. २ जाण्यायेण्याची खेप. मागें ' येरजार ' पहा.

वेरीं [**सं०** पर्यंत] **श० यो०** अ० पर्यंत; उ० आजवेरीं, एथवेरीं.

वेरूळचा निचाड्या वि० अत्यंत चिकू किं० कंजूष.

[योग्य वेळीं.

वेरेवाळीं, वेरवाळीं, वेळेवारीं क्रि० वि०

वेल [**सं०** वल्ली] **पु०, स्त्री०** १ लता; जिच्या कांडांत ताठपणा नसतो आणि जी जमीनीवरच पसरते किं० दुसऱ्या झाडाच्या आधारानें वर चढते अशी वनस्पति. २ विड्याच्या पानाचा वेल; नागवेली. ३ बुगडी, काप, कुडूक, इ० कर्णभूषणांस जी मोत्यांची सांखळी लावितात ती. ४ झाडाची लवचीक साल,—जी गठ्ठे, भारे, इ० बांधण्याकडे योजतात. ॐ **तुझा वेल मांडवीं जाओ** तुझ्या वंशाचा विस्तार होओ ! (आशीर्वाद देतांना हें वाक्य उच्चारतात). **वेल वाढणें** वंशाचा विस्तार होणें. **वेलीस दुःख नाहीं आणि वाळकास दुःख नाहीं अशा प्रकारें क्रि० वि०** अत्यन्त नाजूकपणानें. मागें ' डोळा ' मध्यें ' डोळा न फुटे आणि काडी न मोडे अशा रीतीनें ' हा वाक्प्रचार पहा. **वेलबूट, वेलबुट्टा पु०, वेलबुटी, वेलबुट्टी स्त्री०** वस्त्र, भिंत, इ० वर काढलेली वेलीच्या रूपाची नक्षी.

वेल स्त्री० घोड्यांना होतो तो क्षयरोग.

वेलची, वेलदोडा मागें ' एलची, ' ' एलदोडा ' पहा.

वेला [**सं०**] **स्त्री०** १ वेळ; समय. २ फुरसद; अवकाश; रिकामपण. ३ समुद्रकिनारा. ४ मर्यादा.

वेलाटी, वेलांटी, वेलांडी, वेल्हांटी, वेल्हांडी स्त्री० व्यंजनाला ऱ्हस्व किं० दीर्घ इकार जोडण्याचें चिन्ह; ि, ी.

वेली स्त्री० वर ' वेल ' पु०, स्त्री० पहा.

वेल्हाळ [**सं०** वेल्हल=व्यभिचारी; जारकर्मी] **वि०** १ परमप्रीतिपात्र जो भर्ता इ० तो. २ प्रियकर; लाडका. ३ सुंदर; मनोहर (भाषण, चेहरा, इ०). **पु०** तिखटमीठ लावून सांगितलेली हकीगत; पाल्हाळाची हकीगत (लावणें, मांडणें, करणें). अशी हकीगत सांगणाराला ' वेल्हाळ्या ' म्हणतात. **स्त्री०** १ प्रिय स्त्री,—पत्नी, रखेली, किं० कोणीही अन्य स्त्री. ह्या अर्थी ' वेल्हाळा, ' ' वेल्हाळी ' सुद्धां. २ वटवट करणारी स्त्री.

वेवतणें, वेवंतणें [**सं०**वि+वेष्ट्]**स०क्रि०** कांहीं वस्तु अनेक वेळां मागून मागून(कोणेकाला) सतावणें किं०गांजणें.ह्या अर्थी 'वेवतून घेणें,' 'वेतवेतून घेणें ' सुद्धां.

वेंवें न० भय, घाबरगुंडी, इ० मुळें कोणेकाला स्पष्ट शब्द उच्चारतां येत नाहीत अशी स्थिति; गाळण; (उडणें, होणें).

वेव्हार[**सं०**व्यवहार]**पु०**१परस्परांचें देणें,घेणें, कामकाज करणें,घरोबा ठेवणें,इ०रूप दळणवळण. २कोणेकाच्या कांहीं भाषणावर कुत्सितपणें दुसरा कोणी काढतो ती हरकत, शंका, इ०. ३ लोकरीति; जगाची राहाटी. ॐ पुढें ' व्यवहार ' पहा. **वेव्हारी वि०** १ व्यवहार करणारा; देणें, घेणें, इ० रूप सावकारीं किं० व्यापारीं कामें करणारा. २ हुजतखोर; दुसऱ्याच्या बोलण्यावर किं० सांगण्यावर कुत्सितपणें शंका काढणारा. पुढें ' व्यवहारी ' पहा.

वेश, वेष [**सं०**] **पु०** १ पोशाख; कपडे पेहरण्याची तऱ्हा. २ सोंग. ३ तंबू. ॐ **वेशधारी** [**सं०** वेशधारिन्] **पु०** १ नट. २ ढोंगी. **वेशवार पु०** मसाला; दोन तीन प्रकारच्या डाळी, धने, हळद, मिरच्या, मिरी, इ० पदार्थ तळून किं० भाजून त्यांचें चूर्ण भाजी इ० मध्यें घालण्यासाठीं करतात तें. **वेश (-स-) वाराचें लोणचें न०** मोहऱ्या, मेथ्या, हिंग, हळद, इ० द्रव्यांचें चूर्ण घालून आंब्यांचें लोणचें करतात तें.

वेश्या, वेश्या [**सं०**] **स्त्री०** १ रांड; देह-

विक्रय करून चरितार्थ चालविणारी.२नर्तकी. ꙮ **वेश्याचार्य पु०** १ नपुंसक. २ नर्तकी स्त्रियांचा गुमास्ता किं० दलाल. **वेश्यापुत्र पु०** रांडलेक (शिवी). **वेश्यालय न०** कुंटणवाडा.

वेष वर ' वेश ' पहा.

वेष्टक [**सं०**] **वि०** गराडणारा; गुंडाळणारा.

वेष्टण न० खालीं ' वेष्टन ' पहा.

वेष्टणें [**सं०** वेष्ट्] **स० क्रि०** १ (सूत्र, वस्त्र, इ०) एकाद्या पदार्थाभोंवतीं गुंडाळणें. २ (पदार्थाचे भोंवतीं) सूत्र, वस्त्र, कागद, इ० लपेटणें किं० गुंडाळणें. ३ (किल्ला, गांव, इ०) गराडणें किं० वेढणें. ४ (लुगडें, धोतर, इ०) अंगाभोंवतीं गुंडाळणें किं० नेसणें.

वेष्टन, वेष्टण [**सं०** वेष्टन] **न०** १ गुंडाळणें; आच्छादन; लपेटणें. २ पदार्थाभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र, कागद, इ०. ३ पोथी, उंची सणंग, इ० च्या संरक्षणार्थ त्याचे भोंवतीं गुंडाळावयाचें वस्त्र, कागद, इ०. ४ कुंपण; वई. ५ पागोटें; मुंडासें; रुमाल. ६ नाचणाऱ्याचें एक संस्थान.

वेस स्त्री० १ गांवाभोंवतालच्या भिंतीस जें दार असतें तें. २ घर, परसूं, इ० च्या भोंवतालच्या कुंपणास असतें तें दार किं० फाटक. ३ (**लाक्षणिक**) सरकारला द्यावयाचें देय,—जें देईपर्यंत गांवाची वेस सरकारकडून बंद करण्यांत येत असे. ꙮ **वेसकट (-ड) न०** कुंपणांतील लाहानसें दार किं० फाटक. **वेसकर (-री) पु०** गांवाच्या वेशीवरचा रखवालदार महार. **दुःख (किं० दुखणें) वेशीस बांधणें** आपली अडचण जाहीर करणें (जाहीर केली असतां कोणी तरी उपाय सुचवितो म्हणून). **वेसवाटी पु०** गृहादिकांचा अभिमानी सर्प,—जो घर इ० च्या दारापाशीं गुप्त रूपें बसून भुतें इ०ना घरांत येऊं देत नाहीं. त्या सर्पाच्या नांवानें ठरावीक वेळीं खाद्यपेयांचें वाढणें द्यावें लागतें.

वेसण(-न) स्त्री० १ बैल, रेडा, इ० ना नियंत्रणेंत ठेवण्यासाठीं त्यांच्या नाकाच्या पडद्याला भोंक पाडून त्यांत ओंविलेली असते ती दोरी. २ कोष्ट्याच्या मागांत रगडणीला असतो तो दोरीचा फास किं० वळसा. ३ (**लाक्षणिक**) कोणेकाला नियंत्रणेंत ठेवण्याचें कोणतेंही साधन.

वेसन, वेसनी पुढें 'व्यसन,' 'व्यसनी' पहा.

वेसवा [**सं०** वेश्या] **स्त्री०** १ गरत असून निर्लज्जपणें व्यभिचार करणारी स्त्री. २ स्त्रियांस द्यावयाची ही शिवी आहे.

वेसवार [**सं०**] **पु०** मसाला. मागें ' वेश ' मध्यें ' वेशवार ' पहा.

वेहळा पु० १ बेहेडा नांवाचा वृक्ष. २ त्याचें फळ. मागें ' ब्याहडा, ब्याहाडा, ' 'बेहडा' पहा.

वेळ [**सं०** वेला] **पु०, स्त्री०** १ काळ. २ अवधि; काळाचें विशिष्ट परिमाण. ३ समय. ४ अवकाश; कांहीं गोष्ट होईपर्यंतचा मधला अवधि. ५ कांहीं काम करण्याला असावी तितकी फुरसूत. ६ एक, दोन, तीन, इ० ज्या कामाच्या आवृत्त्या त्या प्रत्येक; उ० तो एका दिवसांत तीन वेळ जेवतो. या उपयोगांत ' वेळ ' शब्द **क्रि० वि०** आहे. एक वेळ म्ह० एकदा; दोन वेळ म्ह० दोनदा; इ०. ७ उशीर, विलंब, दिरिंगाई; उ० हा जमाखर्च पांच वाजेपर्यंत मांड, वेळ लावूं नको. ८ कांहीं काम करावयाला योग्य, अनुकूल, शुभ, किं० सोयीचा समय; उ० ह्या कामाला चांगली वेळ लागली नाहीं; उ० वात्रटपणाची ही वेळ नव्हे. ९ सूर्योदयापासून मध्यान्हापर्यंत आणि मध्यान्हापासून सूर्योस्तापर्यंत जे दिवसाचे दोन विभाग ते प्रत्येक. १० फलज्योतिषांत ठरलेले आणि फळाच्या संबंधांत जे आठ कालावधि ते प्रत्येक; अमृतवेळ, उद्योगवेळ, काळवेळ किं० मृत्युवेळ, चंचलवेळ किं० चोरवेळ, रोगवेळ, लाभवेळ, शुभवेळ, आणि स्थिरवेळ. ह्या आठ वेळांहून इतर तत्त्वांवर दुसऱ्याही वेळा मानण्यांत येतात. आंधळीवेळ, जातीवेळ, घातवेळ, इ०. ꙮ **वेळभर क्रि० वि०** १ संबंध अर्धा दिवस म्ह० सकाळपासून दुपारपर्यंत किं० दुपारपासून संध्याकाळपर्यंत. वर ' वेळ ' अर्थ९पहा. २ पुष्कळ वेळपर्यंत. **वेळ मारून नेणें** एकाद्या विशिष्ट समयीं किं० प्रसंगीं आपला कमीपणा प्रगट न होऊं देणें. **वेळ वाहणें, वाहती वेळ असणें** कांहीं कामाला वेळ सोयीचा किं० अनुकूल असणें. **वेळेचा गुण पु०** वेळेचें सामर्थ्य,— ज्याचें फळ यदृच्छेवर अवलंबून असतें; उ० काल मी ह्याच सरणीचा रांधा केला, कालचा रांधा

साधला, आजचा साधला नाहीं; दुसरें काय ? वेळेचा गुण;उ० काल मला पंधरा रुपये मिळाले, आज आठच आणे मिळाले, वेळेचा गुण ! **वेळ अवेळ स्त्री ए० व०** कांहीं कामाला विशिष्ट समय योग्य आहे किं० अयोग्य आहे (हें पाहाणें किं० विचारांत घेणें). **वेळीं अवेळीं क्रि० वि०** १ भलत्याच किं० अडचणीच्या समयीं. २ कोणत्याही वेळीं,—मग ती सोयीची असो किं० गैर सोयीची असो. **वेळाकाळाला कामास येणें** जरूरीच्या किं० अडचणीच्या वेळीं उपयोगीं पडण्याला सज्ज किं० सिद्ध असणें. **वेळणेवारचा, वेळणेवारीं क्रि० वि०** भलत्याच किं० अयोग्य समयीं; उ० वेळणेवारचा तूं बोंबलतोस तुला लाज कशी नाहीं वाटत? 'वेळणेवारचा' लिंगवचनांप्रमाणें फिरणारें **क्रि० वि०** आहे. **वेळवारीं, वेळेवारीं क्रि० वि०**योग्य वेळीं; सोयीच्या वेळीं. **वेळेनुसार क्रि० वि०** १ वेळ सोयीची किं० गैरसोयीची असेल त्याप्रमाणें. २कदाचित्. **वेळोंवेळां क्रि० वि०** पुनः पुन्हा; अनेक वेळां; वारंवार. **वेळकाळ पु० ए० व०** प्रसंग,—शुभ किं० अशुभ ह्या दृष्टीनें. **वेळनावारीं क्रि० वि०** भलत्याच वेळीं; अशुभ समयीं. **वेळप्रसंग पु०ए०व०**शुभ किं० अशुभ समय; सोयीचा किं० अडचणीचा समय. **वेळमाऱ्या वि०** प्रसंगविशेषीं आपला कमीपणा प्रकटन होऊं देणारा;वेळ साजरी करणारा. **वेळसाधू,वेळ साधणारा पु०**सोयीचा समय पाहून आपलें इष्ट साधून घेणारा. **वेळां क्रि० वि०** खेपांस. संख्यावाचकांपुढें 'वेळां' योजतात; उ० पांच वेळां, दहा वेळां. **वेळाईत पु०** संकटाचे वेळीं धावून येऊन मदत करणारा.

वेळ [**सं०** वेला] **स्त्री०** समुद्रकांठ.

वेळ स्त्री०१ कोपरावर घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना. २ एक वनस्पति.

वेळ अंवस [म० वेळू+अंवस (अमावास्या)] **स्त्री०** मार्गशीर्ष महिन्याची अमावास्या; इतर कांहीं ठिकाणीं कार्तिक महिन्याची अमावास्या. ह्या दिवशीं यात्रेकरू लोक पावा वाजविणाऱ्या श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करून बर्दोच्या कांठीं फराळ करतात.

वेळकट, वेळकूट [**म०** वेळू+काठी] **न०** वेळूची किं० चिव्याची काठी किं० तुकडा.

वेळकाठी स्त्री० वेळूची काठी; अखंड बांबू.

वेळणी स्त्री० १ भात वेळणें इ० कामीं योजतात तें मध्यें किंचित् खोलगट असें धातूचें ताट. २ घिरड्यासारखें एक तोंडीं लावणें.

वेळणें स० क्रि० (भात, भाजी, इ०) अर्धवट शिजलेली असतां त्यांतील ज्यादा पाणी हळूंच ओतून काढणें.

वेळणें,वेळविणें स० क्रि० (डोकें,हात,पाय, मान, इ०) हालविणें किं० वळविणें किं० हासडणें.

वेळवणी [**म०** वेळणें+पाणी] **न०** भात, भाजी, इ० अर्धवट शिजलीं असतां त्यांतून काढून टाकलेलें ज्यादा पाणी.

वेळवी [**म०** वेळू] **वि०** वेळूचा; बांबूचा.

वेळा [**सं०** एला] **स्त्री०** लठ्ठ वेलदोडा.

वेळां क्रि० वि० खेपांस. मागें'वेळ'मध्यें पहा.

वेळाईत ' वेळ ' मध्यें पहा.

वेळावणें [**म०** वेळ] **अ० क्रि०** (जनावरें, मुलें, पिकें) योग्य वेळीं काळजी न घेतल्याकारणानें बिघडणें किं० खराब होणें.

वेळू [**सं०** वेणु] **पु०** बांबू; चिवा. ❀ **कोणेक ठिकाणीं बारा हात वेळू फिरत असणें** तेथें पराकाष्ठेचें दारिद्र असणें.**टीप,**—बारा हात लांबीच्या वेळूच्या टोकाला बांधलेली केरसुणी घरांत सामानसुमान नसल्याकारणानें मोकळेपणानें भिंती इ० झाडूं शकते. **वेळवावर बसविणें** (किं० **चढविणें**) कोणा भित्र्या किं० पुचाट माणसास कांहीं काम करावयास चेतविणें किं० भर देऊन उठविणें.

वै मागें ' वही ' चार प्रतीकांत दिला आहे त्यांतील दुसरें, तिसरें, आणि चवथें, हीं तीन प्रतीकें पहा.

वैकल्पिक [**सं०**] **वि०** १ इच्छेवर अवलंबून असलेलें; ऐच्छिक. २अनिश्चित. ३ ज्याच्या संबंधानें मतभेद आहे असें.

वैकल्य [**सं०**] **न०** १ विकलत्व; अपूर्णत्व; उणें. २ अभाव; जें जेथें असावयास पाहिजे तें तेथें नसणें. ३ धांदल; गोंधळ; गडबड. ४ असमर्थपणा; कमकुवतपणा.

वैकळ मागें ' वायकळ ' पहा.

वैकाटी स्त्री० कोष्टयाच्या मागाच्या ओवीची पट्टी किं० पाचर.

वैकुंठ [**सं०**]१ विष्णु. २ इंद्र. **न०** विष्णूचा लोक. ह्या अर्थी ' वैकुंठभुवन ' **न०** सुद्धां. ॐ **वैकुंठचतुर्दशी स्त्री०** कार्तिक शुद्ध चतुर्दशी ही तिथि. **वैकुंठवासी पु०** मृत मनुष्याच्या नांवामागें हा शब्द योजतात,–विशेषतः वैष्णवसंप्रदायाचे लोक. **वैकुंठसमाराधना स्त्री०** नवऱ्या मुलीच्या घरीं नवऱ्या मुलाच्या घरच्या आणि पक्षाच्या लोकांना दिलेली मेजवानी.

वैकृत [**सं०**] **वि०** १ बदललेला. २ बिघडलेला. ३ विपरीत. ४ बीभत्स. ५ दोषयुक्त; व्यर्थ. ६ फक्त विशेष सांगितलेला (यज्ञ). **न०** १बदल; फेरफार; बिघाड. २ दुश्चिन्ह; अपशकुन.

वैक्रान्त [**सं०**] **न०** तुरमली नांवाचें रत्नविशेष.

वैक्लव, वैक्लव्य [**सं०**] **न०** १ गोंधळ. २ व्याकुळ होणें. ३ निरुत्साह; खेद.

वैखरी [**सं०**] **स्त्री०** १ स्पष्ट उमटणारी वाणी. २ भाषण; वाणी. मागें 'परा,' 'पश्यन्ती,' 'मध्यमा' हे शब्द पहा.

वैखानस [**सं०**] **पु०** वानप्रस्थ; तपस्वी.

वैगुण्य [**सं०**] **न०** १ गुणांचा अभाव. २ अपुरतेपणा; कमीपणा. ३ व्यंग. ४ गुणांचा भिन्नपणा.

वैचणें [**सं०** वि+विच्] **स० क्रि०** सुपांत घालून सुपाला विशेष प्रकारची गति देऊन (तांदूळ, कणी, कणीक, सांजा, इ०)पृथक् करणें. ॐ**वैचपाखड स्त्री०व०ए०**सुपांत घालून पाखडणें, कणी, कोंडा,इ०काढणें,इ० व्यापार समुच्चयानें.

वैचक्षण्य [**सं०**] **न०** १ नैपुण्य; शास्त्रादींशीं पूर्ण परिचय. २ हुशारी. ३ शोधकपणा.

वैचित्र्य [**सं०**] **न०** १ विविधता; भिन्नपणा. २ चमत्कृतिजनकत्व; विचित्रपणा.३आश्चर्य.

वैजयंती [**सं०**] **स्त्री०** १ पताका. २ विष्णूची माळ. ३ मोत्यांचा हार. ४ एक प्रकारची तुळस. [वैधर्म्य.

वैजात्य [**सं०**] **न०** १ विविधपणा.२ भेद;

वैडाल [**सं०**] **वि०** मांजरासंबंधाचा. ॐ **वैडालव्रतिक वि०** कपटी, लुच्चा, आणि दुष्ट असून बाहेर पवित्रपणाचें किं० साधुत्वाचें रूप दाखविणारा.

वैडूर्य [**सं०**] **न०** एक रत्नविशेष.

वैतरणी [**सं०**] **स्त्री०** १ यमलोकची नदी. २ मृताचा वैतरणी नदीवरून प्रवास सुखानें व्हावयासाठीं ब्राह्मणाला देतात ती गाय.

वैताग [**सं०** ' वित्याग ' चा अपभ्रंश] **पु०** १ उद्योग, धंदा, प्रपंच, इ०मध्यें एका मागून एक अशीं विघ्नें येत गेल्यामुळें किं० आप्तेष्टांच्या वियोगामुळें किं० मरणामुळें मनाला वाटते ती खंती किं० किळस.२ आकस्मिक आलेली रागाची लहर,–जी आली असतां मनुष्य हावी ती हानि पथकरावयास सिद्ध होतो.

वैतागणें [**म०** वैताग] **अ० क्रि०** नाना प्रकारच्या अडचणी, संकटें, दुःखें, इ० मुळें चिडून जाऊन खिन्न किं० खट्टू होऊन बसणें; कंटाळणें; विटणें; विरक्त होणें.

वैतालिक [**सं०**] **पु०** १ स्तुतिस्तोत्रें म्हणून प्रातःकाळीं राजाला जागें करणारा अधिकारी. २ जादूगार; वेताळानुचर.

वैदग्ध,वैदग्ध्य न०, वैदग्धी स्त्री० [**सं०**] १ चातुर्य; नैपुण्य; पारंगतता. २ धूर्तपणा.३वक्रोक्ति. मागें'वक्र' मध्यें 'वक्रोक्ति' पहा.४सौंदर्य; शोभा.

वैदर्भ [**सं०**] **न०** वक्रोक्ति. मागें 'वक्र' मध्यें 'वक्रोक्ति' पहा. **पु०** हिरड्या सुजणें ही विकृति. **वैदर्भी स्त्री०** (**साहित्य**) समास कमी असणें ही ग्रंथरचनेची सरणी किं० शैली.

वैदिक [**सं०**] **वि०** वेदविहित; वेदांत सांगितलेलें; वेदाला अनुसरून असलेलें. **न०** वेदवाक्य. **पु०** वेद पढलेला ब्राह्मण. ॐ **वैदिकी वि०** वैदिक ब्राह्मणासंबंधाचें. **स्त्री०** वैदिकाचा धंदा किं० दर्जा.

वैदू [**म०** वैद्य] **पु०** हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. हे लोक औषधी मुळ्या, माळा, औषधें, इ० विकून चरितार्थ चालवितात.

वैदूर्य [**सं०**] **न०** एक रत्नविशेष. 'वैडूर्य ' ह्याच अर्थी.

वैदेह [**सं०**] **पु०** १ विदेह देशाचा राजा. २ वैश्य पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांचा पुत्र. ३

वैश्य; वाणी. ४ अंतःपुराचा रखवालदार.

वैदेही स्त्री॰ जानकी,–रामाची पत्नी.

वैद्य [सं॰] पु॰ १ विद्वान्. २ औषधें देऊन रोग बरे करणें ह्या शास्त्रांत वाकबगार आणि हा धंदा करणारा.॰**वैद्यक न॰**वैद्यशास्त्र. **वैद्यकी स्त्री॰**वैद्याचा धंदा.**वैद्यराज पु॰**वैद्य(बहुमानांत).

वैद्यनाथ [म॰वैजनाथ **]पु॰** शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं वैजनाथ हें एक.मागें ' ज्योति ' मध्यें हीं बारा ज्योतिर्लिंगें पहा.

वैध [सं॰] वि॰ विधिविहित; यथाविधि असलेलें.

वैधर्म्य [सं॰] न॰ १ भेद; भिन्नता; गुण, धर्म, इ॰ बाबतींत वेगळेपणा. २ विरोध. ३ अन्याय. ४ पाखंडमत; धर्मविरुद्ध आचरण.

वैधव्य [सं॰] न॰ विधवेची स्थिति.

वैधुर्य [सं॰] न॰ १ वियोग. २ चित्तक्षोभ.

वैधृत न॰, वैधृति स्त्री॰ [सं॰] १ सत्ताविसावा योग. २ चंद्र आणि सूर्य यांची एक सापेक्ष स्थिति. ही अशुभ सुचविते. ३ पोटांत एक शूल उठतो तो.

वैनतेय [सं॰] पु॰ गरुड हा पक्षी.

वैनसें न॰ अ॰ व॰, स्त्री॰ अ॰ व॰ मागें ' वनसें ' पहा.

वैपरीत्य [सं॰] न॰ १ विपरीतपणा; उलटपणा. २ असंबद्धपणा.

वैपुल्य [सं॰] न॰ विपुलपणा; पदार्थांची [समृद्धि.

वैफल्य [सं॰] न॰ विफलपणा; निष्फलपणा; व्यर्थता.

वैभव [सं॰] न॰ १ ऐश्वर्य; समृद्धि. २ [सामर्थ्य.

वैमनस्य [सं॰] न॰ १ खेद; दुःख. २ वैर; बेबनाव. ३ खचलेपणाची स्थिति.

वैमात्र, वैमात्रेय, वैमातृक [सं॰] पु॰ सावत्र बंधु.

वैमुख [सं॰विमुख **]वि॰** मागें 'विमुख' पहा.

वैमुख्य [सं॰] न॰विमुखता; प्रतिकूलपणा.

वैयधिकरण्य [सं॰] न॰ भिन्न किं॰ वेगळ्या अधिकरणांत असणें. चक्रपाणि ह्या शब्दाचा विग्रह करतांना ' चक्र ' प्रथमा विभक्तींत आणि 'पाणि'सप्तमी विभक्तींत येतो म्हणून 'चक्र'आणि 'पाणि' ह्यांच्यांत वैयधिकरण्य आहे. अधिकरण म्ह॰ स्थान (सप्तमीचा अर्थ). मागें ' अधिकरण ' चा अर्थ ६ पहा.

वैयर्थ्य [सं॰] न॰ व्यर्थपणा; निष्फळता.

वैयाकरण [सं॰] वि॰ व्याकरण शिकलेला किं॰ शिकणारा. **वि॰** व्याकरणासंबंधाचा.

वैयात्य [सं॰] न॰ १ निर्लज्जपणा. २धीटपणा; न लाजणें हा गुण.

वैर [सं॰] न॰ शत्रुत्व; विरोध; द्वेष. ॰ **वैरशुद्धि, वैरप्रतिक्रिया स्त्री॰, वैरनिर्यातन न॰, वैरोद्धार पु॰**सूड घेणें; उट्टें काढणें. **वैर उगाविणें** सूड घेणें.

वैरक्त, वैरक्त्य [सं॰]न॰ १नावड; अप्रीति. २ संसार,व्यापार, इ॰मध्यें गोडी न वाटणें किं॰ मन न रमणें; खंती; किळस.

वैरंगिक [सं॰] वि॰जितेंद्रिय;वैराग्यशील.

वैरण [म॰ वैरणें **] स्त्री॰** १ गाय, म्हैस, घोडा, इ॰चें खावयाचें जें अन्न,–कडबा,गवत,इ॰ तें. २ गुराच्या पुढें गवत, कडबा, इ॰खाद्य अदवशीर रीतीनें घालतां यावें म्हणून जो उभ्या फळ्या इ॰ मांडून खळगा करतात तो; ओयरण; गव्हाणी. **न॰, स्त्री॰**दळते वेळीं जांत्याचे पाळींत किं॰ भाजते वेळीं कढईत एका खेपेला जें धान्य इ॰ घालतात तें. **स्त्री॰** नवरी मुलगी लग्नाच्या समारंभांत अंगावर घेते तीं चिरडी किं॰ साडी.

वैरणें स॰ क्रि॰ १ शिजवून भात करण्यासाठीं (तांदूळ) आधणांत ओतणें; दळावयासाठीं (धान्य) जांत्याच्या पाळींत थोडें थोडें घालणें. २ (नको तो पदार्थ) भलत्याच रीतीनें खर्चून किं॰संपवून टाकणें.३**(लाक्षणिक)**नादान, दुर्गुणी, किं॰ म्हाताऱ्या नवऱ्याशीं (लहान मुलगीचें) लग्न करून देणें. ४ **(लाक्षणिक)** (कांहीं गोष्टीचा टपका) भलत्याच माणसावर लोटून पाहणें.

वैरणें [म॰ वैरणें **]न॰**एका खेपेस दळावयासाठीं,भाजावयासाठीं,किं॰तळावयासाठीं घेतलेलें किं॰ काढलेलें धान्य इ॰.

वैरल्य [सं॰] न॰ विरळपणा.

वैरस्य [सं॰] न॰ १ नीरसपणा; शुष्कपणा. २ अप्रीति; खंती; नावड.

वैरा पु॰ मागें ' ओयरा ' अर्थ १ पहा. ॐ

कोणेकाच्या घरीं मणाचा वैरा (किं० ओयरा) असणें त्याच्या घरांत जेवणारीं माणसें पुष्कळ असणें. ['वैर' पहा.

वैराकार पु० शत्रुत्व; विरोध; द्वेष. मागें

वैरागर [सं० वज्राकर] पु० १ हिऱ्याची खाण. २ चिंतामणि हें रत्न.

वैरागी, वैरागिक [सं० वैरागिन्, वैरागिक] वि० विरक्त; प्रपंचाला कंटाळलेला; ज्याणें सर्व संगपरित्याग केला आहे असा.

वैराग्य [सं०] न० १ प्रपंचाबद्दल अप्रीति किं० अनासक्ति. २ असंतोष. ॐ **वैराग्यमाला** स्त्री० वैरागी लोक भिक्षा मागतांना हिंडतात तेव्हां ते गळ्यांत घालतात ती माळ. **वैराग्यमाला घेणें** किं० **वैराग्यमालेंत पडणें** संसार टाकून वैरागी होणें.

वैराट [सं०] वि० विराटा संबंधाचें. **वैराटि** पु० विराटाचा पुत्र उत्तर. **वैराटी** स्त्री० विराट राजाची कन्या उत्तरा.

वैराण, वैराळ पु० हिंदूंची एक जाति किं० त्या जातीचा इसम.

वैराण, वैरान [फा० वैरानाह] वि० उध्वस्त; पडीत; ओसाड. ॐ **वैराणी** स्त्री० १ ओसाडपणाची स्थिति. २ देशाची नासाडी किं० बेचिरागपणाची स्थिति.

वैरी [सं० वैरिन्] पु० १ शत्रु; दुष्मन. २ योद्धा. ३ प्रतिपक्षी.

वैरूप्य [सं०] न० विरूपपणा; कुरूपता.

वैल मागें ' वाईल ' पहा. ॐ **वैलचूल** स्त्री० जिला वैल आहे अशी चूल.

वैलंडी, वैलांडी मागें 'वेलाटी' 'वेलांटी' पहा.

वैलक्षण्य [सं०] न० १ विलक्षणपणा; तऱ्हेवाईकपणा. २ उलटेपणा. ३ वैशिष्ट्य. ४ भिन्नता.

वैलाटी (–ठी) स्त्री० मागें ' वलाटी ' पहा.

वैलोम्य [सं०] न० विपरीतपणा; उलटपणा; उलटेपणा.

वैवंथणें मागें ' वेवतणें, वेवंतणें ' पहा.

वैवर्ण्य [सं०] न० १ फिक्कटपणा; निस्तेजपणा. २ मलिनता. ३ फरक. ४ जातींतून बाहेर टाकलें जाणें.

वैवस्वत [सं०] पु० १ यम. २ शनि हा ग्रह. ३ सांप्रत चाललेल्या मन्वन्तराचा अधिकारी सातवा जो मनु तो.

वैवाडा [म० वई+वाडा] पु० घर इ०च्या भोंवतालचें पटांगण.

वैवाहिक [सं०] वि० १ विवाहासंबंधाचें; विवाहानें उत्पन्न झालेलें. २ विवाहाच्या उपयोगाची (सामग्री). पु० व्याही. न०, पु० लग्न; विवाह.

वैशद्य [सं०] न०, १ स्वच्छता. २ पांढरेपणा. ३ स्पष्टीकरण. ४ जागेची विपुलता; जागेचा अघळपघळपणा.

वैशाख [सं०] वि० विशाखा नक्षत्रानें युक्त. पु० हिंदूंच्या वर्षांतील दुसरा महिना. **वैशाखी** स्त्री० वैशाख महिन्याची पौर्णिमा. **वैशाखस्नान** न० वसंतमाधवाच्या प्रीत्यर्थ चैत्री पौर्णिमापासून वैशाखी पौर्णिमेपर्यंत सूर्योदयापूर्वी स्नान करणें किं० स्नान करण्याचा नियम.

वैशिष्ट ,वैशिष्ट्य [सं०] न० १ फरक. २ उत्कृष्टपणा. ३ सजातीय इतर वस्तूंहून कोणेक पदार्थाच्या अंगीं जो वेगळेपणा असतो तो.

वैशेषिक [सं०] वि० विशिष्ट; अतिशय. न० कणादाचें मत. पु० कणादाच्या तत्त्वज्ञानाचा अनुयायी. [भेद. २ श्रेष्ठत्व.

वैशेष्य [सं०] पु० १ विशिष्टपणा; भिन्नता;

वैश्य [सं०] पु० १ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, अशा हिंदूंच्या ज्या चातुर्वर्ण्यात्मक चार जाति त्यांपैकीं तिसरी. २ व्यापार आणि शेतकी करणारी जी हिंदूंची जाति ती किं० त्या जातीचा कोणी माणूस. वि० तेज, गुण, धर्म, वीर्य, इ० बाबतींत कमी दर्जाचा किं० हलक्या प्रतीचा (हिरा, भांग, इ०).

वैश्रवण [सं०] पु० कुबेर,–धनाचा अधिपति देव.

वैश्वदेव [सं०] पु० (**मराठींत**) गृहस्थाश्रमी माणसाचा आह्निक कर्मांपैकीं एक विधि,–अग्नीला खाद्यान्नाची आहुति देणें ह्या रूपाचा.

वैश्वानर [सं०] पु० १ अग्नि. २ पोटांतील अग्नि; जठराग्नि. ३ (**वेदान्त**) स्थूलदेहाभिमानी आत्मा. ४ (**वैद्यक**) पित्त. ५ (**वैद्यक**) एक औषधी पाकविशेष.

वैषम्य [**सं०**] **न०** १ विषमपणा; भिन्नता. २ कठिणपणा. ३ संकट; संकटकाळ. ४(**मराठींत**) अप्रिय अशी कांहीं गोष्ट. ५ (**मराठींत**)वितुष्ट; विमनस्कता. ६ (**मराठींत**) पक्षपात.

वैषयिक [**सं०**] **वि०** १ प्रपंचांत किं० संसारांत आसक्त. २ विषयसुखांत रमणारा.

वैष्णव [**सं०**] **वि०** श्रीविष्णूच्या संबंधाचें. **पु०** विष्णूचा भक्त. ꣸ **वैष्णवी वि०** विष्णुभक्तांसंबंधाचा; वैष्णवांत रूढ किं० प्रचलित(रीति, आचार, इ०).

वैससे, व्हणजे, व्हणसे [**म०** बहीण]**स्त्री०** नवऱ्याची बहीण (अशिक्षितांत रूढि).

वैसारिण [**सं०**] **पु०** मासा (जलांत राहणारा प्राणी).

वो [**म०** हो, अहो] **उ० वा० अ०** अहो !

वोपणें देणें. मागें ' ओपणें ' पहा.

वोमाय [**म०** वधू+माय] **स्त्री०** (लग्नाच्या समारंभांत) नवऱ्या मुलीची आई.

वोसंग [**सं०** उत्संग] **पु०** मागें ' ओसंग ' पहा.

वोसंडणें मागें ' ओसंडणें ' पहा.

वोसण मागें ' ओसण ' पहा.

वोसणणें मागें ' ओसणणें ' पहा.

वोहम मागें ' वहीम, ' ' वहिमा ' पहा.

वोळंगणें मागें 'ओळंगणें' पहा.

व्यंकटेश, व्यंकोबा [**म०** व्यंकट (एक डोंगर)+ईश, बा (प्रत्यय)] **पु०** कृष्णाचा एक अवतार. ꣸ **व्यंकोबाचा गिरि पु०** व्यंकटेश देवाचें स्थान ज्यावर आहे तो डोंगर. ह्या स्थानीं ह्याच्या त्या महिन्यांत लग्नें,मुंजी, इ० विधि करण्यास हिंदूधर्मांची मोकळीक आहे.

व्यक्त [**सं०**] **वि०** १ उघड केलेलें; स्पष्ट असलेलें; जाहीर. २ जें स्पष्टपणें इंद्रियगोचर झालें किं० होऊं शकतें तें.**न०** १ प्रकट होण्याची क्रिया. २ (**वेदान्त**) महत् हें तत्त्व. ꣸ **व्यक्त गणित न०** अंकगणित. **व्यक्तराशि पु०** अंकांनीं दर्शविलेली संख्या.

व्यक्ति [**सं०**] **स्त्री०** १ प्रकट करणें ही क्रिया; प्रकटीकरण; आविष्करण; प्रकट होणें. २ व्यक्त पदार्थ; व्यक्त रूपांत असलेली वस्तु. ३ स्पष्टपणा. ४ पृथक्करण; वेगळें करणें. ५ स्पष्ट उच्चारण; स्पष्ट श्रवण; स्पष्ट कथन; उ० ते बोलत होते पण मला शब्दांची व्यक्ति झाली नाहीं. ६ व्यंजक शब्दादिकांपासून व्यंग्यार्थाचा बोध. ७ समूहांतील एक एक वस्तु पृथक्पणें,–जातीच्या व्यावर्तकत्वें. ८ फरक; तफावत. ९ (कोणेकाचा कांहीं विशेष गुण सांगतांना) एक माणूस; उ० ही भारी भांडखोर व्यक्ति आहे. १० विचित्र किं० तऱ्हेवाईक माणूस; अत्यन्त खोडकर, टवाळ, वात्रट, किं० द्वाड माणूस. ꣸ **व्यक्तिस्वातन्त्र्य न०** आपल्या इच्छेस येईल तें बोलावयाला किं० करावयाला प्रत्येक माणसाला असते ती मोकळीक,–जर त्याचें तें बोलणें किं०करणें समाजाला अपायकारक नसलें तर. **व्यक्तिवाचक शब्द पु०** (**व्याकरणांत**) एक एकच व्यक्ति दाखविणारा शब्द,–जातिवाचक याच्या व्यावर्तकत्वें; उ० जवाहिरलाल, मोहनलाल, लंका, इ०.

व्यंग [**सं०**] **वि०** १ देहहीन; शरीररहित. २हात,पाय,इ० एकाद्या गात्रानें उणा.३लंगडा. ४ कोणत्याही भागानें किं० अवयवानें अपूर्ण(पदार्थ, माणूस). **न०** १ कमीपणाची किं० लाजिरवाणी अशी कोणेकाची कांहीं गोष्ट. २त्वचेवरचा तीळ.

व्यंगणें मागें ' वेंगणें ' पहा.

व्यंगुल [**सं०**] **न०** अंगुलाचा साठावा हिस्सा,–लांबीचें एक प्रमाण. **वि०** बोट किं० बोटें नसलेला (हात, पाय, माणूस).

व्यंग्य [**सं०**] **वि** १ स्पष्ट न सांगितलेला; केवळ सुचविलेला. २ (**साहित्य**) व्यंजना शक्तीनें कळविलेला (अर्थ). **न०** गर्भितार्थ. ꣸ **व्यंग्यार्थ पु०** वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ ह्यांची प्रतीति झाल्यावर देखील शब्दापासून आणखीही कधीं कधीं ज्यास्ती अर्थाची प्रतीति होते. हा जास्ती जो अर्थ तो व्यंग्यार्थ.हा व्यंग्यार्थ प्रतीतीस आणून देणारी जी शब्दशक्ति तिला'व्यंजना' म्हणतात आणि व्यंग्यार्थाच्या अपेक्षेनें त्या शब्दाला ' व्यंजक ' म्हणतात. 'गंगेवर गौळवाडा आहे ' ह्या वाक्यापासून शैत्य, पावनत्व, इ० धर्मांचें अस्तित्व हा जो अर्थ प्रतीत होतो तो ' गंगा 'ह्या शब्दाचा व्यंग्यार्थ.वाच्यार्थ,लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ, असे शब्दांचे तीन प्रकारचे अर्थ

असतात. मागें ‘ वाच्य’ मध्यें ‘ वाच्यार्थ ’ पहा. मागें ‘ लक्ष्य ’ मध्यें ‘ लक्ष्यार्थ ’ पहा. ज्यारती खुलाशासाठीं आमचें ‘ अर्थालंकारांचें निरूपण ’ पहा. **व्यंग्योक्ति, व्यंगोक्ति स्त्री०** व्यंगरूप अर्थ ज्यांत आहे असें भाषण किं०लेखन.

व्यग्र [**सं०**] **वि०** १ अनेक गोष्टींकडे ज्याचें चित्त किं० लक्ष्य गेलें आहे असा. २ गोंधळलेला. ३ भांबावलेला. ४ कांहीं वाचन, लेखन, मनन, किं० चिंतन, ह्यांत तल्लीन झालेला.

व्यंजक [**सं०**] **वि०** १ दर्शक. २ गर्भितार्थ-सूचक. **पु०** १ हावभाव. २ चिन्ह; निशाणी. ३ व्यंग्यार्थ.

व्यजन, व्यजनक [**सं०**] **न०** पंखा,–वारा घेण्याचें किं० घालण्याचें साधनविशेष.

व्यंजन [**सं०**] **न०** १ उघड करणें. २ खूण; चिह्न; निशाणी. ३चटणी, कोशिंबीर,भाजी,इ० कोणतेंही तोंडीं लावणें. ४मसाला. ५दाढी, मिशा, इ० यौवन दशेचें चिह्न.६ (**व्याकरण**) क, ख, ग, इ० जे वर्ण ते प्रत्येक.७(**साहित्य**)गर्भितार्थाचें सूचन. **व्यंजना स्त्री०** १ स्पष्ट उच्चार. २ गर्भितार्थ; सूचितार्थ. ३ व्याजोक्ति. मागें ‘ व्यंग ’ मध्यें ‘ व्यंजना ’ शब्दाचा खुलासा पहा.

व्यंजित मागें ‘ अजित ’ आणि ‘ अजित जाणें ’ पहा.

व्यतिकर [**सं०**] **पु०** १ मिश्रण. २ संयोग; संबंध. ३ दोन पदार्थ एकमेकांवर आपटणें; टक्कर. ४ अदलाबद्दल. ५ व्यत्यास;उलटेपणा. ६ चित्तांत झालेला क्षोभ.

व्यतिक्रम [**सं०**] **पु०** आज्ञा, नियम, इ०चें उल्लंघन. २ लोप; गळणें. ३ उद्दामपणा; मर्यादेचें उल्लंघन.४ अन्याय; दोष; अपराध. ५ उलटपणा; विपर्यय.

व्यतिरिक्त [**सं०**] **वि०** १ निराळें; भिन्न. २ दुसऱ्यावर सरशी मिळविणारा किं० ताण करणारा. ३ राहित; शून्य; **उ०** ज्ञानव्यतिरिक्त देह काष्टोपम समजावा.४ (**मराठींत**) शिवाय, खेरीज; उ० भूताला बलि दिल्या व्यतिरिक्त तुमचा आजार हटणार नाहीं. **टीप**,–ह्या अर्थी ‘ व्यातिरिक्त ’ हें **श० यो० अ०** प्रमाणें योजण्यांत येतें.

व्यतिरेक [**सं०**] **पु०** १ भेद; वेगळेपणा, २ वियोग. ३ वगळणें; गाळणें. ४ अपवाद. ५ ताण करणें; सरशी मिळविणें. ६ पृथग्भाग. ७ (**न्याय**) अभाव; अत्यन्ताभाव. साध्य आणि हेतु ह्या दोन्हींचा अभाव. पर्वतावर अग्नि आहे कारण पर्वतावर धूम आहे. येथें धूम हा अन्वयव्यतिरेकी हेतु आहे. कारण त्याचे ठायीं अन्वय व्याप्ति असून व्यतिरेक व्याप्ति आहे. मागें ‘ अन्वय ’ मध्यें ‘ अन्वय व्याप्ति, ’ ‘ व्यतिरेक व्याप्ति, ’ आणि ‘ अन्वय व्यतिरेकी ’ हे शब्द पहा. जेथें जेथें धूम असतो तेथें तेथें अग्नि असतो ही अन्वयव्याप्ति. जेथें जेथें अग्नि नसतो तेथें तेथें धूम नसतो ही व्यतिरेक व्याप्ति. ८ (**साहित्य**) एक अलंकार. उपमानापेक्षां उपमेयाच्या ठायीं कांहीं एका विशिष्ट गुणाचा अधिकपणा आहे असें सांगावयाचें असतां केलेलें जें विधान त्याला ‘ व्यतिरेक ’ म्हणतात. तसेंच उपमेयापेक्षां उपमानाचे ठायीं कांहीं एका गुणाचा कमीपणा आहे असें सांगावयासाठीं केलेलें जें विधान तेंही व्यतिरेकच होय. उदाहरणें इ० आमचें ‘ अर्थालंकारांचें निरूपण ’ ह्या पुस्तकांत पहा.

व्यतीत [**सं०**] **वि०** १ होऊन गेलेलें; गत; गतकाळचें. २ मृत.

व्यतीपात [**सं०**] **पु०** १ अगदीं जाणें. २ पूर्ण भ्रंश. ३ अपमान.४ महा संकट; उत्पात; उपद्रव. ५ (**ज्योतिष**) एक योगविशेष. विष्कंभ, प्रीति,आयुष्मान्,इ०फलज्योतिषांत सत्तावीस योग सांगितले आहेत त्यांत व्यतिपात हा सतरावा आहे.हा योग असतां संकटें प्राप्त होतात.यावरून चंचल, दुष्ट, आणि खोडकर पोरास ‘ व्यतिपात’ किं० ‘ वितिपात ’ म्हणण्याची रूढि बायकांत पडली आहे.

व्यत्यय [**सं०**] **पु०** १ अडथळा; चालू कामांत आलेली कांहीं हरकत किं० खोळंबा. २ विरोध; उलटपणा. ३ अदलाबदल; विपर्यास. ४ परस्परसंबंध.

व्यत्यस्त [**सं०**] **वि०** १ उलटें; विरुद्ध; विपर्यस्त. २ असंबद्ध. ३ एकावर एक असे टाकलेले (पाय, हात, इ०). ४ तिरबागडें किं० आडवे तिडवें पडलेलें किं० टाकलेलें.

व्यत्यास [सं०] पु० १ बदल. २ विरोध. ३ उलटपणा. ४ ह्याचेबद्दल तें आणि त्याचेंबद्दल हें अशी फिरवाफिरव किं०अदलाबदल; विपर्यास.

व्यथक [सं०] वि० १ दुःखदायक; पीडादायक. २ अति भयंकर.

व्यथा [सं०] स्त्री० १ दुःख; पीडा. २ रोग (आमांश, संग्रहिणी, इ०); आधिरूप किं० व्याधिरूप दुःख. ꙮ **व्यथानक, व्यथानीक** वि० १ द्वाड; त्रासदायक, उपद्रवकारक (पोर, माणूस). २ दुःखित. ३ रोगानें जर्जर. **व्यथिष्ट** वि० १ पुष्काळ दिवसांच्या आजारानें जर्जर झालेला. २ दमा, मूलव्याधि, इ०चिरस्थायी किं० पुष्कळ दिवस राहिलेल्या रोगानें जर्जर किं० पीडित. [दुःखित.

व्यथित [सं०] वि० त्रास पावलेला;

व्यधिकरण [सं०] वि० १ समान अधिकरण ज्यांत नाहीं असा (समास). २ वेगळ्या अधिकरणीं म्ह० स्थानीं असलेला. ३ विरोधी. ४ ज्यामध्यें सरळ युक्तिवाद नाहीं असें (भाषण, वाद); वितंडवादाच्या रूपाचा. ꙮ **व्यधिकरण बहुव्रीहि** पु० एक समास. ज्याचीं घटक दोन पदें एकाच विभक्तींत नाहींत असा बहुव्रीहीचा प्रकार; उ० खड्गहस्त म्ह० खड्ग आहे हस्तीं ज्याच्या असा (योद्धा).येथें 'खड्ग' प्रथमेंत असून 'हस्त' सप्तमींत आहे. हा व्यधिकरण बहुव्रीहि. 'नीलांबर' म्ह० निळें आहे अंबर म्ह० वस्त्र ज्याचें असा (बलराम). येथें 'नील'आणि'अंबर' हे दोन्ही शब्द प्रथमेंत आहेत. हा समानाधिकरण बहुव्रीहि समास.

व्यपदेश [सं०] पु० १ कळविणें; जाहीर करणें; माहिती. २ नांव देणें. ३ नांव;संज्ञा. ४ व्यवहार; शब्दप्रयोग. ५ लपविणें; वस्तूचें खरें रूप झाकणें. ६ सबब; मिष. ७ कपट.

व्यपेक्ष [सं०] वि० १ वाट पाहाणारा. २ उत्सुक. ३ उदासीन; निरपेक्ष. **व्यपेक्षा** स्त्री० १ इच्छा. २ लक्ष्य; काळजी; आदर. ३ जरूरी; गरज. ४ अन्योन्यसंबंध. ५ विनियोग.

व्यभिचरित [सं०] वि० उल्लंघिलेला किं० मोडलेला (नियम, क्रम); अपवादामुळें रद्द झालेला.

व्यभिचार, व्यभीचार [सं०] पु० १ उल्लंघन; योग्य किं० विशिष्ट सरणीचें अतिक्रमण. २ परस्त्रीगमन; परपुरुषगमन. ३ निंद्य आचार. ४ अपवाद. ५ चुकीचें किं० सदोष अनुमान. ६ (न्याय) कार्यकारणभावाचा भंग; हेतु असून साध्य नसणें. ७ नसणें; अभाव. ꙮ **व्यभिचारी** [सं० व्यभिचारिन्] वि० १ नियम किं०शिस्त उल्लंघिणारा किं० मोडणारा. २ दुर्मार्गगामी. ३ जारकर्मी. ४ अपवादक; अनियमित. ५ (न्याय) व्यभिचारयुक्त; हेतु असून साध्य नसणें ह्या रूपाचा. ६ अस्थिर, अशाश्वत (ऐहिक वैभव इ०). ७ खोटें. ꙮ **व्यभिचारिभाव** पु० (साहित्य) मागें 'विभाव' शब्दांत पहा. व्यभिचारिभाव एकंदर तेहेतीस आहेत.

व्यय [सं०] पु० १ नाश; विध्वंस. २ खर्च. ३ भलत्याच कामीं खर्च. ꙮ **व्ययी** वि० खर्चीक.

व्यर्थ [सं०] वि० १ निष्फळ. २ भलत्याच कामीं योजलेला किं० खर्चलेला. क्रि० वि० विनाकारण; उगीचच्या उगीच.

व्यलीक [सं०] वि० खोटें. न० १ अप्रिय भाषण किं० गोष्ट. २ लबाडी; फसवणूक.

व्यवकलन [सं०] न० १ पृथक्करण. २ वजा करणें. ३ वजाबाकी.

व्यवकलित [सं०] वि० वजा केलेलें.

व्यवक्रोशन [सं०] न० १ निंदा. २ शिवीगाळ.

व्यवच्छिन्न [सं०] वि० १ पृथक् केलेला. २ (न्याय) नक्की ठरविलेला; विशिष्ट रूपांत घातलेला; नियंत्रित.

व्यवच्छेद [सं०] पु० १ पृथक्करण. २ भेद; तफावत; भिन्नता. ३ निर्णय. विशेषत्वें कथन.

व्यवच्छेदक [सं०] वि० स्पष्ट करणारा; नियंत्रणा घालणारा.

व्यवधा [सं०] स्त्री० १ झाकण; आच्छादन. २ पडदा. ३ गुप्तपणा.

व्यवधान [सं०] न० १ आड येणें. २ अडथळा. ३ लपविणें; झाकणें. ४ आच्छादन; पडदा. ५ मधलें अंतर किं० जागा. ६ आड येणारा कोणताही पदार्थ. ७ खंड पडणें.

व्यवधायक [सं०] वि० १ आड येणारा

२ झाकणारा; लपविणारा. ३ खोळंबा करणारा.

व्यवसा, वेवसाव, वेवसाय, विवसा, वेवसा [सं० व्यवसाय] पु० खालीं 'व्यवसाय' पहा. हे सर्व शब्द ' व्यवसाय ' बद्दल आशिक्षितांत रूढ आहेत.

व्यवसाय [सं०] पु० १ उद्योग. २ धंदा; व्यापार. ३ निश्चय; निश्चितता. ४ कृत्य; वर्तन; अनुष्ठान. ५ नेटानें चालविलेलें कांहीं कृत्य. ◎ **व्यवसायी** [सं० व्यवसायिन्] वि० १ उद्योगी; तत्पर. २ दृढनिश्चयी.

व्यवसित [सं०] वि० १ केलेलें. २ ठरविलेलें; निश्चित केलेलें. ३ निश्चययुक्त. ४ कांहीं कार्याला उद्युक्त किंवा प्रवृत्त. न० १ कृत्य; उद्योग. २ व्यवसाय.

व्यवस्था [सं०] स्त्री० १ मांडणी; रचना. २ निश्चितपणा. ३ स्थैर्य. ४ स्थिति. ५ सापेक्ष स्थिति. ६ ठराव; निकाल. ७ करार. ८ शास्त्रमर्यादा.

व्यवस्थान [सं०] न० १ योग्य सरणीची मांडणी किंवा रचना. २स्वस्थता;स्वास्थ्य.३ स्थिरपणानें राहणें; चिकाटी; स्थैर्य. टीप,—ह्या तीन्ही अर्थी ' व्यवस्थिति ' स्त्री० सुद्धां.

व्यवस्थापक [सं०] वि० १ नियामक; व्यवस्था लावणारा. २ कारभारी;कांहीं कामाची जबाबदारी वाहणारा.

व्यवस्थित [सं०] वि० १ योग्य सरणीनें ठेविलेलें, मांडलेलें, किं०जुळविलेलें.२ योग्य क्रमानें चालत असलेलें. ३ निश्चित केलेलें. ४ ठरविण्यांत आलेलें. ५ नीटनेटका (सामान्यतः).

व्यवहर्ता [सं० व्यवहर्तृ] पु० १ व्यापारी. २ फिर्यादी; वादी. ३ न्यायाधीश. ४ कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणारा.

व्यवहार [सं०] पु० १ कृत्य; वर्तन.२कामकाज; कारभार. ३ कोणताही धंदा किं०उद्योग. ४ व्यापार; सावकारी. ५ न्याय देणें; न्यायाचा निर्णय करणें किं० ठरविणें. ६ खटल्याची चौकशी. ७ फिर्याद; खटला. ८ करार. ९ चालरीत; समाजाची शिस्त किं० सरणी. १० क्रयविक्रय, देवघेव, इ० रूप कामें.११ विशिष्ट सरणीनें चाललेली कोणतीही क्रिया. ◎ **व्यवहारी** [सं० व्यवहारिन्] पु०१ फिर्यादी.२ व्यापारी. ३देवघेव करणारा; सावकार. ४ धंदा करणारा.**व्यवहारी बस्तानी** स्त्री० बाजारांत पैशाची समृद्धि किं० तुटवडा किती आहे हें मनांत न आणतां रुपयाचे सोळा गंडे किं० सोळा आणे ह्या ठरावावर देणें, घेणें, इ० व्यवहार करण्याची रीति. **व्यवहारी** वि० कोणत्याही परिमाणाचे हावे तितके सारखे सारखे भाग पाडून त्या भागांपैकीं अमुक भाग घेतले हें दाखविण्यासाठीं घेतलेल्या भागांचा आंकडा रेषेच्या वर मांडणें आणि पाडलेल्या भागांचा आंकडा त्या रेषेखालीं मांडणें ह्या रूपानें सांगितलेलें जें परिमाण तें व्यवहारी (अपूर्णांक). ह्या रेषेच्या वर मांडलेला जो अंक त्याला ' अंश ' म्हणतात, रेषेच्या खालीं मांडलेला जो अंक त्याला ' छेद ' म्हणतात. मागें ' अंश ' आणि 'छेद ' हे शब्द पहा. व्यवहारी अपूर्णांकाचे सहा प्रकार करण्यांत आले आहेत;–सम,विषम,भागानुबंध,भागजाति,प्रभागजाति आणि मिश्र.ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षा लहान असतो त्याला 'सम अपूर्णांक' म्हणतात; उ० $\frac{३}{५}$.ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान नसतो तो ' विषम अपूर्णांक'; उ० $\frac{३}{२}$, $\frac{५}{५}$, $\frac{४}{४}$, इ०. 'भागानुबंध,' 'भागजाति,' 'प्रभागजाति' ह्यांच्या व्याख्या मागें ' भाग ' मध्यें पहा. मिश्र अपूर्णांकाची व्याख्या मागें ' मिश्र ' शब्दांत पहा. **व्यवहारासन** न० न्यायाधीशाचें स्थान,— ज्यावर बसून तो खटले, फिर्यादी, इ०ची चौकशी करतो. **व्यवहारज्ञ** वि० १ सोळा वर्षांहून ज्यास्त वयाचा (कायद्याच्या दृष्टीनें). २ज्याला समाजांत कसें वागावें, देणें, घेणें, बोलणें, चालणें, कसें करावें, व्यापार, उदीम, कसा करावा, इ० गोष्टी ज्याला चांगल्या समजतात तो; आणि ज्याला त्या समजत नाहींत त्याला ' व्यवहारशून्य ' म्हणतात.

व्यवहार्य [सं०]वि० १ प्रचारांतलें. २ एकत्र भोजन इ० संबंधास योग्य.३ आचरणांत आणतां येईल असें; शक्य कोटींतील. ४ समाजांत जें चालेल, किं० जें पथकरलें जाईल, किं० जें मान्य होईल असें (नाणें, वर्तन, मनुष्य, इ०).

व्यवहित [**सं०**] **वि०** १ वेगळें केलेलें. २ आच्छादित; झाकलेलें. ३ अडविलेलें. ४ पडदा, भिंत, इ० नीं दूर सारलेला किं० वेगळा केलेला. ५ ज्यांत मधून मधून आडथळे येत आहेत असें (काम, अभ्यास, हकीगत, इ०).

व्यवहृत [**सं०**] **वि०** कामीं लाविलेला किं० योजलेला; व्यवहारांत आणलेला किं० असलेला.

व्यवाय [**सं०**] **पु०** १ पृथक्करण. २आच्छादन. ३ पडदा. ४ अडथळा; हरकत; आड येणें. ५ मैथुन; स्त्रीसंभोग; रतिविलास.

व्यष्टि [**सं०**] **स्त्री०** १ वेगळेपणा. २ व्यक्ति. ३ (**वेदान्त**) जीव. ४ संघटित पदार्थांचे जे घटक भाग ते प्रत्येक; (अवयवीच्या अपेक्षेनें) अवयव. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' समष्टि '

व्यसन [**सं०**] **न०** १ अपाय; न्हास. २ संकट; विपत्ति; दुःख. ३ दुर्दैव. ४ (**ज्योतिष**) अस्त. ५ आसक्ति; छंद; नाद. ६ (**मराठींत**) दारू पिणें, रांडा, भांग, गांजा, तंबाखू, तपकीर, अफू, इ०च्या सेवनाची किं० उपभोगाची कोणेकाला जडलेली जी संवय ती. ॐ**व्यसनी वि०** १ ज्याला तंबाखू, दारू, रांडा, इ० चा नाद आहे असा. २आसक्त. ३ दुर्वर्तनी.

व्यसु [**सं०**] **वि०** ज्याच्या देहांतून प्राण निघून गेला आहे असा; मृत; मेलेला.

व्यस्त [**सं०**] **वि०** १ इतस्ततः फेकलेलें, पडलेलें, किं० उडविलेलें; पसरलेलें. २ भिन्न; वेगवेगळें. ३ अस्ताव्यस्त. ४ प्रतिकूल. ५ (**गणित**) उलट प्रमाणाचें. पांच माणसें जें काम करतात त्याच्या दुप्पट काम दहा माणसें करतील. येथें कामकरी आणि काम ह्यांच्यांत सम प्रमाण आहे. चार माणसांना कांहीं कामाला वीस दिवस लागतात तर आठ माणसांना दहा दिवस लागतील, येथें कामकरी आणि काल ह्यांच्यांत व्यस्त प्रमाण आहे. ॐ **व्यस्ताव्यस्त वि०** अस्ताव्यस्त. मागें ' अस्ताव्यस्त ' पहा.

व्यक्षर [**सं०**] **वि०**निरक्षर;अशिक्षित; ढ.

व्याकरण[**स०**] **न०**१पृथक्करण. २व्यक्त रूपांत आणणें किं०येणें;व्यक्त करणें किं०होणें.३(**वेदान्त**) नामरूपांनीं स्पष्ट अशी जगताची उत्पत्ति.४शब्दशास्त्र;शिष्टसंमत रीतीनें शब्दांची निवड करणें, त्यांचीं रूपें बनविणें, तीं वाक्यांत योग्य स्थानीं घालणें आणि अशा रीतीनें विचार व्यक्त करणें, ह्या संबंधाचें शास्त्र. **व्याकरणकार पु०** व्याकरणावर ग्रंथ लिहिला आहे ज्यानें तो; उ० पाणिनि हा एकच व्याकरणकार पहिल्या दर्जाचा होऊन गेला. **व्याकरणी वि०** व्याकरण शास्त्रांत निष्णात किं० पारंगत.

व्याकीर्ण [**सं०**] **वि०** अस्ताव्यस्त पडलेलें किं० टाकलेलें.

व्याकुल [**सं०**] **वि०** १ गोंधळलेला; काय करावें हें ज्याला सुचत नाहीं असा; कर्तव्यमूढ. २ विव्हल; ग्रस्त; जर्जर; कासावीस; उ० तहानेनें माझे प्राण व्याकुळ झाले आहेत; उ० शोकव्याकुल. ३ भयभीत. ४ विस्कटलेला. ५ कोणत्याही कामांत निमग्न झालेला किं० गढून गेलेला.

व्याकृति [**सं०**] **स्त्री०** १ रूपान्तर. २ पृथक्करण. ३ स्पष्टीकरण. ४व्याकरण. मागें 'व्याकरण सर्व अर्थी पहा.

व्याकोश, व्याकोष [**सं०**] **वि०** प्रफुल्लित; विकसित (फूल, कळी). [२विलाप.

व्याक्रोश [**सं०**] **पु०** १ आरडाओरडा.

व्याख्या [**सं०**] **स्त्री०** १ सांगणें. २ स्पष्टीकरण; विवरण. ३ पदार्थाचें शास्त्रशुद्ध लक्षण,— अव्याप्ति आणि अतिव्याप्ति ह्यांनीं अदूषित. ४ (**मराठींत**) गुप्त गोष्टीची परिस्फुटता किं० बोभाटा; कोणेकाच्या निंद्य गोष्टी जाहीर करणें.

व्याख्यात [**सं०**] **वि०** स्पष्ट करून सांगितलेलें; ज्याचें लक्षण करण्यांत आलें आहे तें; स्पष्टावलेलें; ज्याचें विववरण किं० विवेचन केलें आहे असें.

व्याख्याता [**सं०** व्याख्यातृ] **पु०** १एकाद्या विषयाचें किं०वाक्याचें स्पष्टिकरण करणारा किं० उलगडा करणारा.२सभादिकांत एकाद्या विषयाचें सांगोपांग विवरण किं० विवेचन करणारा. ३ टीका करणारा.

व्याख्यान [**सं०**] **न०** १ स्पष्टिकरण; विवेचन; निरूपण. २ सभेंत एकाद्या विषयाचें किं० मुद्याचें सांगोपांग आणि साधक बाधक गोष्टी विचारांत घेऊन केलेलें भाषण (करणें, देणें).

व्याघात [**सं०**] **पु०** १ तडाखा; प्रहार. २

विघ्न; प्रतिबंध; अडथळा. ३ खोळंबा. ४ क्षय; नाश. ५ विरोध. ६ असंबद्ध भाषण. ७ सत्तावीस योगांतलि तेरावा. ८ (**साहित्य**) ज्या साधनानें एक मनुष्य एकादें कार्य करतो त्याच साधनानें दुसरा मनुष्य त्या कार्याचा नाश करतो, किं० त्याच्या उलट कार्य करतो आणि वरचढ ठरतो, असें वर्णन केलेलें असते तेथें व्याघात हा अलंकार होतो. विशेष तपशील आणि उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

व्याघ्र [सं०] **पु०** १ वाघ,–एक जंगली पशु. २ (**समासांतीं**) श्रेष्ठ; उ० नरव्याघ्र, पुरुषव्याघ्र, इ०. **व्याघ्री स्त्री०** वाघीण. ० **व्याघ्रनख न०** १ वाघनख,–एक सुगंधी द्रव्य. २ निवडुंग. ३ वाघनख. मागें ' वाघ ' मध्यें ' वाघनख, ' सर्व अर्थीं पहा. **व्याघ्रमुख न०** १ आरंभीं फार कठिण आणि विद्यार्थ्यांना भिवविणारें असें कोणतेंही शास्त्र किं० कोणताही विषय. २ कठिण किं० दुर्बोध असा श्लोक, वाक्य, वचन, इ०. **व्याघ्रांबर न०** वाघाचें कातडें,–जें बसावयासाठीं वापरतात. **व्याघ्रांबरी तंबाखू स्त्री०** जिच्या पानांवर वाघाच्या अंगावरील पट्ट्यांसारखे पट्टे असतात अशी तंबाखूची जात. ही तंबाखू फार तह्‌ख आणि अमली असते. मागें ' वाघ ' मध्यें ' वाघी तंबाखू ' पहा.

व्याज [**सं०**] **न०** १ कपट. २ लपविणें. ३ निमित्त; मिष; ढोंग. ० **व्याजोक्ति स्त्री०** (**साहित्य**) विरुद्धार्थ ध्वनित करणारें भाषण. एकाद्या वस्तूचें गुप्त असलेलें स्वरूप कोणच्या तरी कारणामुळें प्रकट झालें असतां तें स्वरूप कोणच्या तरी सबबीवरून पुन्हा छपवून टाकण्यासाठीं केलेलें जें भाषण त्याला ' व्यजोक्ति ' म्हणतात. विशेष खुलासा आमचे 'अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **व्याजस्तुति स्त्री०** स्तुति करण्याच्या मिषानें निंदा केली असतां किं० निंदा करण्याच्या मिषानें स्तुति केली असतां ' व्याजस्तुति ' हा अलंकार होतो. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **टीप,**–ह्या प्रतीकांतील 'व्याज' शब्दांतील ' ज ' चा उच्चार तालव्य.

व्याज [सं० वृद्धि] **न०** कोणा सावकारापासून कांहीं रक्कम उसनी आणली असतां त्या रकमेचा वापर करण्याबद्दल त्या सावकाराला विशिष्ट ठरावाप्रमाणें मुदला बाहेर जें देय द्यावें लागतें तें. उसन्या रकमेला ' मुद्दल ' म्हतात. मागें 'मुद्दल' पहा. ० **व्याजकटावणी स्त्री०** कटमितीनें व्याजाचा आकार करण्याचा जो प्रकार तो. **व्याजखाऊ, व्याजखोर वि०** १ जीवर व्याज भरावें लागतें अशी (रक्कम). ह्याच्या उलट ' बिनव्याजी. ' २ जबर व्याज घेणारा (सावकार). **व्याजफैलावण (–णी), व्याजाची फैलावणी स्त्री०** जमेच्या रकमांचें व्याज वेगळें करावें, आणि नांवांकडील व्याज वेगळें करावें, आणि कमी असेल तें अधिकांतून वजा करून बाकी काढावी, असें व्यांज करण्याचा जो प्रकार तो. **व्याजबट्टा पु०** कर्जाऊ रकमा देणें किं० घेणें, व्याजें घेणें किं० देणें, इ० रूप धंदा किं० व्यवहार; सावकारी; सराफी. **व्याजभरी वि०** कर्जें ज्याला फार आहेत आणि ज्याची बहुतेक मिळकत किं० प्राप्ति व्याजें भरण्यांत खर्च होते असा (मनुष्य). **व्याजाऊ, व्याजाव, व्याजी, व्याजू वि०** जीवर व्याज द्यावें लागतें अशी (कर्जाची रकम). **टीप,**–ह्या प्रतीकांतील' व्याज ' ह्या शब्दांतील ' ज ' दन्ततालव्य.

व्याध [**सं०**] **पु०** १ पारधी; शिकारी. २ ' व्याधि ' शब्दाचा अपभ्रंश. खालीं ' व्याधि ' पहा.

व्याधि [**सं०**] **पु०** १ रोग; आजार. २ फार दिवस अंगांत मुरलेला कांहीं रोग. ३ रक्तपीति हा रोग. ४ (**मराठींत**) उपद्रव किं० उपद्रवी माणूस; शुष्ककाष्ठ. **टीप,**–' व्याधि ' हा शब्द मराठींत कधीं कधीं **स्त्री०** ही योजतात. ० **महाव्याधि पु०** रक्तपीति. **व्याधित, व्याधिष्ट, व्याधिग्रस्त वि०** रक्तपीति, क्षय, शूल, इ० मोठा व्याधि जडला आहे ज्याला असा (मनुष्य).

व्याधूत [**सं०**] **वि०** हालविलेलें (चामर, शेपूट, इ०).

व्यान [**सं०**] **पु०** सर्व शरीरांत फिरणारा वायु,–पंचप्राणांपैकीं एक. हे पंचप्राण,–प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान.

व्याप [**सं०** ' व्यापन ' चा **म०** अपभ्रंश] **पु०** १ देणें घेणें, संसाराची जबाबदारी, नोकरी, इ०रूप कोणेकाच्या कामांचा जो भार किं०पसारा तो; उ० माझ्या मागें अनेक व्याप आहेत, तुझ्या भाऊबंधकींत लक्ष्य घालण्यास मला फुरसत नाहीं. २ आपणा मागें जरूरी नसतां लावून घेतलेलें लचांड; उपद्व्याप. ❀ **व्याप तितका संताप** जरूर नसतां जितकीं कर्तव्यें किं० जबाबदाऱ्या पथकराव्या तितका त्रास अधिक.

व्यापक [**सं०**] **वि०** १ सर्वत्र पसरणारा किं० पसरलेला; उ० खालीं वर, पुढें मागें, इकडे तिकडे व्यापक असा हरीचा महिमा आहे. २ ज्यास्त विस्तृत; अधिक मोठा; अधिक मोठ्या विस्तारास लागूं होणारा (सिद्धान्त, नियम, इ०); उ० 'मनुष्य मर्त्य आहे'ह्या वाक्यांत मर्त्यत्व व्यापक आहे कारण तें गाय, म्हैस, इ० वरही असतें. याच्या व्यावर्तकत्वें ' संकुचित '. ३ (**न्याय**) नित्यसंबंधानें जुळलेला.

व्यापणें [**सं०** वि+आप्] **स० क्रि०** आच्छादणें; झाकणें. **अ० क्रि०** पसरणें; शिरणें; घुसणें; उ० विष जंव सर्वांगीं व्यापलें नाहीं तंव इलाज केला पाहिजे.

व्यापन्न [**सं०**] **वि०** १ संकटानें ग्रस्त. २ [मृत.

व्यापादन [**सं०**] **न०** १ नाश; वध; ठार मारणें. २ दुसऱ्याचें अनिष्ट चिंतिणें.

व्यापादित [**सं०**] **वि०** ठार मारलेला; विध्वस्त.

व्यापार [**स०**] **पु०** १ उद्योग; क्रिया. २ उपयोगांत आणणें; प्रयोग. ३ उपद्व्याप; खटपट. ४ (**मराठींत**) क्रयविक्रयरूप व्यवहार; जिनसा विकत घेणें आणि नफ्यानें विकणें ह्या रूपाचा धंदा. ❀ **व्यापारी** वर सांगितलेला अर्थ ४ चा धंदा करणारा.

व्यापारणें [**म०** व्यापार] **स०क्रि०** (शस्त्र, हत्यार, इ० साधन) उपयोगांत आणणें किं० चालविणें म्ह० त्या त्या कार्याकडे योजणें.

व्यापी [**सं०** व्यापिन्] **वि०** व्यापणारा; उ० परमेश्वर सर्वव्यापी आहे.

व्यापृत [**सं०**] **वि०** १ गुंतलेला; कांहीं कामांत गुंतलेला. २ कामीं लाविलेला; उपयोगांत आणलेला.

व्याप्त [**सं०**] **वि०** १ वेष्टिलेलें; झाकलेलें. २ व्यापलेलें; भरलेलें; उ०मेघांनीं त्या वेळीं आकाश व्याप्त होतें. ३ समाविष्ट झालेलें. ४ (**न्याय**) नित्यसंबद्ध.

व्याप्ति [**सं०**] **स्त्री०** १ व्यापणें ही क्रिया. २ सर्वव्यापित्व. ३ (**न्याय**) नित्य साहचर्य. धूम आणि अग्नि ह्यांच्यांतील संबंधाप्रमाणें जो स्वाभाविक संबंध, जो औपाधिक नव्हे, त्याला व्याप्ति म्हणतात.४सर्वसामान्य नियम.

व्याप्य [**सं०**] **वि०** १ व्यापलें जाणारें. २ कमी विस्तृत. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' व्यापक. ३ (**न्याय**) हेतु. ❀ **व्याप्यत्व न०** समाविष्ट होणें. **व्याप्यत्वासिद्ध पु०** (**न्याय**) हेत्वाभासविशेष. **व्याप्यकोटी स्त्री०** (विद्या, शौर्य, इ० रूप जें अधिक मोठें सामर्थ्य त्याच्या अपेक्षेनें) लहान सामर्थ्याच्या माणसांचा वर्ग; उ० पुढारीपण आम्हास कसें घेतां येईल ? आम्हीं व्याप्य कोटींतील माणसें. **व्याप्यकोटयन्तर्गत, व्याप्यकोटिप्रविष्ट वि०** व्याप्य कोटींत बसण्याच्या किं० पडण्याच्या दर्जाचा(माणूस); मध्यम किं० खालच्या दर्ज्याचा माणूस).

व्याम [**सं०**] **पु०** वांव ही लांबी. मागें ' वांव ' पहा.

व्यामर्ष [**सं०**] **पु०** १ उत्सुकता; घाई. २ घर्षण; घासून काढणें; खरडणें.

व्यामिश्र [**सं०**] **वि०** १ मिश्र; मिसळलेलें. २ संशयित; संदिग्ध. ३ कांहीं कामांत व्यग्र.

व्यामिश्रक [**सं०**] **न०** प्राकृतभाषामिश्रित रूपक विशेष. रूपक म्ह० एक प्रकारचें नाटक.

व्यामोह [**सं०**] **पु०** १ गोंधळ. २ भ्रम; अज्ञान; भ्रांतिष्ट स्थिति.

व्यायत [**सं०**] **वि०** लांब; दीर्घ. २ विस्तृत. ३ उद्योगी; व्यापृत. ४ जोरदार; बलिष्ठ.

व्यायाम [**सं०**] **पु०** १ ताणणें. २ ओढाताण. ३ गात्रें बळकट करण्यासाठीं केलेले श्रम,—जोर काढणें,जोडी फिरविणें,बैठक,धावणें,इ०. ४ युद्ध; झगडा. ५ वांव ही लांबी. मागें ' वांव '.

पहा. ꙮ **व्यायामशाला स्त्री॰** व्यायाम (अर्थ३) करावयाची जागा. **व्यायामिक पु॰** तालीमबाज.

व्यायोग [**सं॰**] **पु॰** वीररसात्मक एकांकी रूपक किं॰ नाटक.

व्याल [**सं॰**] **पु॰** १ सर्प. २ हत्ती. ३ हिंस्र पशु; श्वापद. ꙮ **व्यालग्राह पु॰** गारुडी.

व्याली [**म॰** विणें; व्यालेली] **वि॰** जी प्रसूत झाली आहे अशी (गाय, म्हैस, इ॰, किं॰ कचित मानवी स्त्री); उ॰ व्यालीची वेदना व्यालीच जाणें. [२ अस्ताव्यस्त.

व्यालोल [**सं॰**] **वि॰** १ चंचल; हालणारें.

व्यावर्तक [**सं॰**] **वि॰** वेगळें करणारें. ꙮ **व्यावर्तकत्व न॰** भिन्नपणा; विरोध.

व्यावर्तन [**सं॰**] **न॰** १ गरगर फिरविणें. २ वगळणें; वेगळें करणें. ३ एकाद्या पदार्थाचें केलेलें लक्षण त्याच पदार्थास लागतें, इतरांस लागत नाहीं, असें दाखविणें किं॰ सिद्ध करणें. ह्या अर्थी 'व्यावृत्ति' सुद्धां.

व्यावर्त्य [**सं॰**] **वि॰** कांहीं विशेष धर्म मनांत आणून जें वगळणें किं॰ बाजूस सारणें योग्य किं॰ जरूर आहे असें.

व्यावहारिक [**सं॰**] **वि॰** १ व्यवहारासंबंधाचें. २ प्रचारांतील; नेहमींचा. ꙮ **व्यावहारिक नांव न॰** सर्व लोक ज्या नांवानें कोणेकास ओळखतात तें नांव; चालतें किं॰ वाहतें नांव.

व्यावृत्त [**सं॰**] **वि॰** १ परत फिरलेलें; पराङ्मुख. २ वेगळें केलेलें; बाजूस सारलेलें; वगळलेलें.

व्यावृत्ति [**सं॰**] **स्त्री॰** १ आच्छादणें. २ गाळणें; वगळणें. ३ पृथक् करणें. ४ (**न्याय**) अभाव; अत्यन्ताभाव. ५ (**मराठींत**) पंचाइतीची स्थिति. ६ (**मराठींत**) त्रास, उपद्रव. ७ (**मराठींत**) शंका; कचर.

व्यास [**सं॰**] **पु॰** १ विस्तार. २ रचना. ३ व्यवस्था करणारा; व्यवस्थित रूपांत मांडणारा. ४ रुंदी. ५ (**गणित**) वर्तुळाच्या मध्यांतून जाणारी आणि परिघाला दोन्ही टोकांनीं स्पर्शिणारी सरळ रेषा. ६ पुराण सांगणारा. ७ वेद, पुराणें, इ॰ चीं व्यवस्थित मांडणी करणारा.

व्यासपीठ न॰ पुराण सांगतांना पुराणिक ज्या चवरंग इ॰ रूप आसनावर बसतो तें आसन किं॰ ह्या वेळीं तो पोथी ज्या लाकडी आधारविशेषावर ठेवितो तो आधारविशेष. **व्यासपूजा स्त्री॰** १ आषाढ शुद्ध पौर्णिमेस करतात ती गुरुपूजा. २ पुराणाच्या समाप्तीस करतात ती पुराणिकाची पूजा. ३ कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेस करतात तो पुराणिकाचा सत्कार. ४ आषाढी पौर्णिमेस आपल्या गुरूचा किं॰ कुटुंबांत होऊन गेलेल्या संन्याशाचा करतात तो सत्कार.

व्यासक्त [**सं॰**] **वि॰** १ कोणत्याही कामांत निमग्न किं॰ आसक्त. २ गोंधळलेला.

व्यासंग [**सं॰**] **पु॰** १ आसक्ति; एकाद्या विषयाचा नाद किं॰ त्या विषयावर मेहेनत करणें किं॰ त्याचा अभ्यास करणें. २ आदर; एकनिष्ठता. ३ वेगळेपणा. ꙮ **व्यासंगी वि॰** १ एकादा विषय, शास्त्र, कला, इ॰ चा मनःपूर्वक अभ्यास करणारा. २ नेहेमीं कांहीं तरी उद्योगांत गुंतलेला.

व्याहत [**सं॰**] **वि॰** १ विह्वल. २ नष्ट. हत. ३ कुंठित झालेलें. ४ परतविलेलें. ५ पराभविलेलें. ६ गोंधळलेला. ꙮ **व्याहतार्थता स्त्री॰** काव्यरचनेंतील एक दोषविशेष. एकाद्या वस्तूचा चांगलेपणा किं॰ वाईटपणा प्रथम सांगून नंतर लागलीच पहिल्या अर्थाच्या विरुद्ध अर्थाचें प्रतिपादन केल्यास हा दोष होतो. [आवाज.

व्याहार [**सं॰**] **पु॰** १ बोलणें; भाषण. २

व्याहाळ न॰ अरण्य; जंगल.

व्याही [**सं॰** विवाही; **हिं॰** बिवाही] **पु॰** आपल्या मुलाचा किं॰ मुलीचा सासरा. ꙮ **व्याहीभोज पु॰, व्याहीभोजन न॰** लग्नाच्या समारंभांत आपल्या व्याह्यास आपण दिलेली मेजवानी.

व्याहृत [**सं॰**] **वि॰** बोललेलें. **न॰** भाषण.

व्याहृति [**सं॰**] **स्त्री॰** १ उक्ति; भाषण. विधान. २ मंत्रविशेष; भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, आणि सत्यं, हे शब्द.

व्याळ मागें 'व्याल' पहा.

व्याक्षेप [**सं॰**] **पु॰** १ अस्वस्थता. २ अडथळा. ३ उशीर; विलंब. ४ फेकणें ही क्रिया.

व्याक्षोभ [**सं॰**] **पु॰** काम, क्रोध, दया,

इ० कारणांमुळें चित्तांत होते ती अस्वस्थता.

व्युत्क्रम [सं०] पु० १ अतिक्रमण; उल्लंघन. २ उलटा किं० विपरीत क्रम. ३ अव्यवस्था.

व्युत्थान [सं०] न० १ उभें करणें; उठविणें. २ स्वतंत्र वर्तन. ३ विरोध; अडथळा. ४ विरुद्ध आचरण; बंड. ५ समाधि उतरणें.

व्युत्थित [सं०] वि० शास्त्राविरुद्ध वागणारा.

व्युत्थिति [सं०] स्त्री० वर 'व्युत्थान' पहा.

व्युत्पत्ति [सं०] स्त्री० १ उगम; उत्पत्ति. २ शब्दाच्या घटक अवयवांपासून शब्दाची घटना किं०उत्पत्ति किं० ह्यासंबंधाचें शास्त्र. ३ विद्वत्ता; एकाद्या विषयांत प्रावीण्य; पांडित्य.

व्युत्पन्न [सं०] वि० १ (व्याकरण) साधित (शब्द). २ विद्वान्; पंडित. ३ प्रवीण. ४ उत्पन्न झालेला किं० केलेला (पदार्थ).

व्युत्पादक [सं०] वि० १ शास्त्रादिव्युत्पत्ति जेणें करून होतें असा (ग्रंथादि).२ उत्पन्न करणारा. ३ शब्दांची उत्पत्ति घटक अवयवांच्या रूपानें सांगणारा.

व्युदास [सं०] पु० १ निराकरण; नाकारणें; त्याग. २ वगळणें. ३ नाश; वध; भंग. ४ औदासीन्य.

व्युपदेश [सं०] पु० निमित्त; सबब.

व्युपरत [सं०] वि० थांबलेलें; बंद पडलेलें; मागें हटलेला.

व्युपरम [सं०] पु० १ थांबणें. २ विश्रांति.

व्युपशम [सं०] पु० १ शांतीचा अभाव.२ न थांबणें.

व्यूढ [सं०] वि० १ विशाल; रुंद. २ व्यवस्थितपणें रचलेलें. ३ विवाहित.

व्यूह [सं०] पु० १ सैन्यरचना; विहू. २ सैन्य. ३ समुदाय. ४ तर्कशास्त्र. ५ तर्क. ६ (**मराठींत**) एकाद्याला गोत्यांत आणण्यासाठीं केलेली मसलत. ७ (**मराठींत**) मनोरथ; आरंभिलेलें मोठें कार्य; बेत. मागें ' विभु ' पहा.

व्योम [सं० व्योमन्] न० आकाश. ❀ **व्योमकेश** पु० शंकर. **व्योमचारी** [सं० व्योमचारिन्] पु० १ पक्षी. २ देव. ३ आकाशस्थ ज्योति. **व्योमयान** न० विमान.

व्रज [सं०] पु० १ समुदाय. २ गोठा. ३ निवासस्थान. ४ गवळ्यांची वसति; गऊळवाडा. ❀ **व्रजांगना** स्त्री० गवळण. **व्रजकिशोर** पु० श्रीकृष्ण. [पर्यटन; भटकणें.

व्रज्या [सं०] स्त्री० १ भिक्षेसाठीं हिंडणें.२

व्रण [सं०] पु० १ जखम; क्षत. २ गळूं.३ फोड, गळूं, जखम, इ० बरें झाल्यावर त्वचेवर जें त्यांचें चिन्ह राहातें तें; वण.

व्रत [सं०] न० १ संकल्पपूर्वक अनुष्ठान; पुण्यकर्म;पुण्यप्राप्तीसाठीं पथकरलेलें कांहीं कृत्य,— जप, प्रदक्षिणा, दान, पठन, इ० रूप. २ कोणेकाची वर्तनाची ठरलेली सरणी; उ० लोकांच्या घरीं चहा न पिणें हें माझें व्रत आहे. ३दृढनिश्चयानें चालविलेली कांहीं वर्तनाची सरणी, किं० स्वीकारलेला कांहीं नियम; उ० ज्यांणीं खादीचें व्रत चालविलें आहे ते स्तुतीस पात्र होत.४वचन; उ० सत्यव्रत. ५ ब्रह्मचर्य. ❀ **व्रतादेश, व्रतबंध** पु० मुंज हा संस्कार. **व्रतचर्य** पु० ब्रह्मचारी. **व्रतचर्या** स्त्री० ब्रह्मचर्य. **व्रतभिक्षा** स्त्री० मुंज झाल्यानंतर भिक्षा मागणें.**व्रतस्थ** पु० ब्रह्मचारी. **व्रतस्नातक** पु० अध्ययन संपविण्याच्या पूर्वीं ब्रह्मचर्य व्रत ज्यानें संपविलें आहे असा. **व्रतवैकल्य** न० पथकरलेल्या व्रतांत झालेला भंग किं० खंड. **व्रती. व्रतिक** पु० ज्याणें कांहीं व्रत चालविलें आहे किं० स्वीकारलें आहे असा.

व्रतति, व्रतती [सं०] स्त्री० वेल; वल्ली.

व्रात [सं०] पु० १ समुदाय. २ लग्नाचें वऱ्हाड.

व्रात्य [सं०] पु० १ उपनयन न झाल्यामुळें बहिष्कृत झालेला ब्राह्मण. २ शूद्र पति आणि क्षत्रिय पत्नी ह्यांचा पुत्र. वि० (**मराठींत**) द्वाड; वात्रट; खोडकर. ❀ **व्रात्यस्तोम** पु० बहिष्कार घालविण्यासाठीं केलेला यज्ञ. [विनय.

व्रीडा [सं०] स्त्री० १ लज्जा; लाज. २

व्रीडित [सं०] वि० लाजलेला; शरमलेला.

व्रीहि [सं०] पु०, स्त्री० १ भात(धान्य). जोंधळा, वाटाणा, इ० धान्य. २ भातगोटा.

व्हन पु० एक सोन्याचें नाणें.

व्हाळ पु०, **व्हाळी** स्त्री० [म० ओहाळ] ओढा; नाला (अशिक्षितांत रूढ).

श

श मराठी व्यंजनमालेंतील तिसावें व्यंजन.

शक [**फा०**] **पु०** संशय; शंका. ‌‌ॐ **बेशक, बेलाशक क्रि० वि०** न भितां; न कचरतां; संकोच न बाळगतां.

शक [**सं०**] **पु०** १ एक अनार्य जाति किं० त्या जातीचा कोणी इसम. २ वर्षगणना,–विशेषतः शालिवाहन शक;उ०शालिवाहन शके१८५२ वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर टिळक महाविद्यालयाची पहिली तुकडी मिठाच्या सत्याग्रहासाठीं निघाली.३वर्चस्व;श्रेष्ठता;अधिकार; उ०तुझा शक माझ्यावर कसा चालेल ? ॐ **शक गाजविणें** १ प्रख्यातीस चढणें; नामांकित होणें. २ कोणेकावर आपलें वर्चस्व स्थापिणें.

शकट [**सं०**] **पु०, न०** १ गाडी. २ गाडीचा तळ.३छकडा.**पु०**१ पाचरीच्या आकाराची सैन्यरचना. २ रोहिणी हें नक्षत्र,–ज्याचे पांच तारे गाडीच्या रूपानें आहेत. ३ कामांत आडथळा आणणारी कांहीं गोष्ट किं०कोणी माणूस.ॐ**शकटभेद पु०** १ रोहिणी नक्षत्राच्या पांच ताऱ्यांमधून चंद्र किं० कोणताही ग्रह गेल्यानें त्या शकटाचा होतो तो भेद. २ सैन्याच्या शकटाकार रचनेची शत्रूनें केलेली दाणादाण. ३ शत्रूची किं० प्रतिपक्षाची हिकमत निष्फल करणें. **शकटभेद पु० अ० व०** युक्त्या; हिकमती;कावे. **शकटव्यूह पु०** पाचरीच्या आकाराची सैन्यरचना.

शकणें [**सं०** शक्] **अ० क्रि०** कांहीं गोष्ट करण्याला समर्थ असणें किं० होणें; उ० हें मी करूं शकेन. **टीप,**–पूर्वी ' शकणें ' हें उपयुक्त क्रियापद भाषणलेखनांत टाळलें जात असे. हल्लीं तें सरसहा योजण्यांत येतें.

शंकणें [**सं०** शंक्] **अ० क्रि०** १ कचरणें. २ साशंक होणें; शंकित होणें.

शंकनीय [**सं०**] **वि०** संशयित; शंकेला विषय असलेलें.

शंकर [**सं०**] **वि०** १ सुखकर. २ शुभ; मंगल. **पु०** कैलासनाथ पार्वतीपति. ॐ **शंकरावास पु०** कैलास.

शंकराचार्य पु० अद्वैत वेदान्ताचा संस्थापक किं० त्याच्या गादीवरचा कोणीही आचार्य.

शंकरकोरा पु० एक पक्षी.

शंकरपाळा [**फा०** शक्रपाराह्] **पु०** एक खाद्यविशेष.

शंकरा, शंकराभरण पु० एक रागविशेष.

शकल [**सं०**] **पु०, न०** १ तुकडा; खंड. २ मोठा ग्रंथ वागवावयाला गैरसोयीचा होतो म्हणून त्याचे जे लहान लहान दोन, तीन, इ० भाग वेगळे वेगळे बांधलेले असतात ते प्रत्येक; उ० महाराष्ट्र ज्ञानकोशाचे पंचवीस शकल आहेत. देवापुढें नारळ फोडला असतां जीं दोन अर्धुकें होतात तीं प्रत्येक.

शकल, शकल [अ० शक्ल] **स्त्री०**युक्ति; हिकमत; कुंठित झालेलें काम पुन्हा चालू करण्यासाठीं योजिलेली युक्ति किं० तोड. **स्त्री०, न०** काम, कारभार, इ० ची रूपरेषा किं० स्वरूप.

शकस्त, शकस पुढें ' शिकस्त ' पहा.

शंका [**सं०**] **स्त्री०** १ संशय. २ कांकूं करणें; कचर.३भीति. ४ भ्रम; भ्रांति. ५ (**न्याय**) हरकत; आक्षेप. ६ लघवी किं० शौचविधि ह्यांची भावना,–जी लोकांत स्पष्टपणें बोलून दाखविण्याला मनुष्य कचरतो. **लघुशंका स्त्री०** लघवी,–' दीर्घशंका ' च्या अपेक्षेनें. **दीर्घशंका स्त्री०** १ शौचविधि. येथें ' दीर्घ ' शब्द बहुधा गाळला जातो. २ मूर्खपणाची किं० कुत्सितपणाची शंका किं० संशय. **शंकाशील वि०** कचरण्याच्या स्वभावाचा; भितरा. **शंकित वि०** ज्याला कांहीं विषयांत शंका आहे असा.

शंकासूर, संकासूर पु० शेंगा ज्या झाडांना येतात त्यांच्या वर्गांतील एक झाड किं० त्या झाडाचें फूल.

शंकु [**सं०**] **पु०** १ भालाइतरची. २गुरगुजा नांवाचें शस्त्र.३बाणाचें टोक.४खिळा;मेख.५खांब. ६ भूमितींतील आकृतिविशेष. ७ (**ज्योतिष**)बारा

अंगुळें लांब असा अणकुचीदार खिळा,–छाये-वरून कालगणनेसाठीं योजतात तो.८ (गणित) दहा कोटि ही संख्या. ९ खालची बाजू वर्तुळ-रूप असून वर गायदुमाप्रमाणें निमुळती होत गेलेली आकृति. शंकुच्छाया स्त्री० शंकूची (अर्थ ७) छाया.

शकुन [सं०] पु० १ पक्षी. पु० १ शुभा-शुभसूचक चिन्ह. २ शुभ चिन्ह. ३ जोशाला विचारलेला पुढच्या गोष्टीसंबंधाचा प्रश्न किं० त्यावर जोशानें दिलेलें उत्तर. ❀ **शकुन-गांठ बांधणें** पुढें होणाऱ्या गोष्टीची अटकळ मनांत करून ठेवणें. **टीप**,–कोणी माणूस एकाद्या कार्याला निघाला असतां त्याला प्रथम जो शकुन होतो तो चांगला किं० वाईट असेल त्याप्रमाणें त्या कार्यांत त्याला यश किं० अपयश मिळेल अशी त्या माणसाला अटकळ बांधतां येते. त्या शकुनाची आठवण राहाण्यासाठीं तो पद-राला गांठ बांधतो तिला ' शकुनगांठ ' म्हण-तात. ही गांठ शुभाची किं० अशुभाची असते. ' शकुनगांठ ' याच्याबद्दल ' गांठ ' किं०'खूण-गांठ ' असेंही म्हणतात; उ० ह्या रामल्याची संगत तुझ्या नुकसानीस कारण होईल अशी मी दोन महिन्यांपूर्वी शकुनगांठ बांधून ठेविली होती (म्ह० अशी मी अटकळ करून ठेविली होती किं०अशी माझी खातरी होऊन चुकली होती). **शकुनवंती** स्त्री० शकुन पाहातांना जोशी लोक ज्या कोष्टकांवरून तर्क बसवितात त्या कोष्टकांची वही.

शकुनउंडा पु० एक पक्वान्नविशेष.

शकुनि [सं०] पु० १ पक्षी. २ गिधाड. ३ बवादिकरणांतील आठवें करण. ४ दुर्योधनाचा मामा.❀ **शकुनिमामा** पु० नुकसानीचा उपदेश करणारा कोणीही दुष्ट माणूस.

शकून [अ० सखुन्=शब्द] पु० शब्द; भाषण; कांहीं विधान. ❀ **कोणेकाच्या शकु-नांत असणें** (किं० **चालणें** किं० **वागणें**) त्याच्या इच्छेला सर्वथैव अनुसरून वागणें. **कोणे-काचा शकून घेणें** त्याची सल्लामसलत विचा-रणें. **कोणेकाचा शकून न घेणें** त्याच्या सल्ल-गतीत किं० संगतींत न राहणें.

शकृत [सं०] न० विष्ठा.

शके [सं० ' शक ' च्या सप्तमीचें ए०व०] क्रि० वि० शकाच्या वर्षी; उ० हा कोश शके १८४९ ह्या वर्षी सुरू झाला.

शंकेश्वर मागें ' शंकासूर ' पहा.

शक्त [सं०] वि० १ समर्थ;लायक. २शक्ति-युक्त, अर्थबोधक (शब्द).

शक्ति [सं०] स्त्री० १ बळ; ताकद;सामर्थ्य; लायकी. २ राजाचें सामर्थ्य,–प्रभाव, उत्साह, आणि मंत्र (म्ह० मसलत) ह्या रूपाचें. ३ कर्तृ-त्वशक्ति. ४ (**साहित्य**) शब्दाची अर्थबोधकता. वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ,हे जे शब्दांचे तीन प्रकारचे अर्थ असतात ते त्या शब्दांना ज्या सामर्थ्यानें प्राप्त होतात त्याला ' शब्दशक्ति ' किं० ' वृत्ति ' म्हणतात.५(**साहित्य**) मुख्य अर्थ. ६ ईश्वराची जी योगमाया ती,–जिचे पार्वती, लक्ष्मी, इ० हे अवतार आहेत. तिच्या उपास-कांना ' शक्ति ' म्हणतात. ७ युद्धांतील एक हत्यार किं० आयुध,–ज्याला 'सैंति' किं० 'कास' म्हणतात. ८ यज्ञादिकांच्या योगानें लढाईंत उप-योगी पडणारें जें समर्थ आयुध प्राप्त करून घेतां येतें तें; उ० इंद्रजितानें लक्ष्मणावर एक शक्ति फेकली तिच्या योगानें लक्ष्मण मूर्च्छित झाला. ८ चैतन्य. ९ स्त्रीपुरुष हें जें मिथुन त्यांतील स्त्री. ❀ **शक्तिधर** पु० कार्तिकेय,–देवांचा सेनापति. **शक्तिनाथ** पु० शंकर. **शक्तिग्रह** पु० १ शब्दा-चा अर्थ. २ अमुक शब्दाचा अर्थ अमुक आहे असें ठरविण्यास साधनभूत जी रूढि, कोश, व्याकरण, इ० त्यांच्या समुच्चयाचें सामर्थ्य. ३ (**मराठींत**) तर्क; समजूत; अनुमान;उ० त्याच्या वेषावरून तो साधु असावा असा माझा शक्ति-ग्रह झाला. ४ पदार्थमात्राच्या स्वरूपाचा बोध. **शक्तिग्राहक** वि० अमुक शब्दाचा अमुक अर्थ घ्यावयाचा असें ठरविण्यास साधनभूत (रूढि, कोश, व्याकरण, इ०). **शक्तिपात** पु० १ रोग, उपास, काळजी, इ० मुळें होतो तो शक्तीचा ऱ्हास. २ मंत्र इ० सामर्थ्य,–गुरूनें

शिष्यास दिलेलें. **शक्तिमंत, शक्तिमान्** **वि०** ज्याचे ठायीं शक्ति आहे असा; बळवान्; समर्थ. **शक्तिक्षीण, क्षीणशक्ति** **वि०** दुर्बल; ज्याची कांहीं कारणानें शक्ति लोपली आहे असा. **शक्त्यनुसार, शक्त्यनुरूप** **क्रि० वि०** शक्तीप्रमाणें. **शक्तिचक्र** **न०** (**वेदान्त**) जग,–जें मायारूप आहे; माया. **शक्तित्रय** **न०** प्रभुत्व, उत्साह, आणि मसलत, हीं तीन सामर्थ्यें समुच्चयानें. वर ' शक्ति ' अर्थ २ पहा. **शक्तिपूजा** **स्त्री०** देवीची उपासना. मागें ' शक्ति ' अर्थ ६ पहा. **यथाशक्ति** **क्रि० वि०** सर्व शक्ति वेचून; सामर्थ्याप्रमाणें; आपल्या शक्तिप्रमाणें.

शक्य [**सं०**] **वि०** १ करतां येण्याजोगें. २ संभवनीय. ३ जें घडूं शकेल असें. ४(**साहित्य**) मूळचा (अर्थ). ५ अमुक शब्दानें दर्शवितां येईल असा (अर्थ). ६ ज्या क्रियापदाच्या रूपांत कर्त्याच्या शक्तीचा अर्थ असतो तें शक्य (क्रियापद); उ० हें काम माझ्यानें करवतें. येथें ' करवतें ' हें शक्य क्रियापद होय.

शक्र [**सं०**] **पु०** १ इंद्र,–देवांचा अधिपति. ☸ **शक्राणी** **स्त्री०** इंद्राची पत्नी,–शची.

शंख [**सं०**] **पु०** १ समुद्रादिकांत राहाणारा एक जलजंतुविशेष. २ ह्या जलजंतूचें रहावयाचें घर,–हें शंकराची पूजा इ० प्रसंगीं वाजवितात. ३ ह्या द्वितीयार्थक शंखाच्या आकाराचें रेषारूप जें चिन्ह अंगुल्यादिकांवर असतें तें. ४ नवनिधींपैकीं एक. हें नवनिधि मागें ' निधि ' मध्यें पहा. ५ (**गणित**) दहा निखर्व ही संख्या. ६ कपाळाचें हाड. ७ कानशील. ८ (**लाक्षणिक**) मूर्ख किं० अडाणी माणूस. ९ (**लाक्षणिक**) अभाव; पूज्य; शून्य; उ० बुद्धीच्या नांवानें किं० अकलेच्या नांवानें शंख (म्ह० बुद्धिहीन, बेअकली). ☸ **शंख करणें** बोंवलणें; ओरडणें; विलाप करणें. **एकाद्या पदार्थाचा शंख वाजणें** त्याचा तोटा येणें; तो न पुरणें; तो संपणें (वात्रटपणांत). **कोणेकाचा शंख वाजणें** तो पराभूत होणें (वात्रटपणांत). **परीक्षेंत कोणेकाचा शंख वाजणें** तो परीक्षेंत न उतरणें (वात्रटपणांत). **एकाद्याच्या नांवानें शंख करणें** त्याला दोष देणें किं० निंदिणें; . . . टपका ठेवणें. **शंखासारखें** **वि०** स्वच्छ, निर्मल (पाणी). **शंखद्राव** **पु०** औषधासाठीं केलेला शंखाचा द्रव. **शंखध्मा** **पु०** १ पालखीपुढें, देवाच्या पूजेमध्यें, किं० युद्ध इ० प्रसंगीं मोठ्यानें शंख फुंकून ध्वनि काढणारा माणूस. २ शंखोबा; मूर्ख; बेअकली माणूस. **शंखध्वनि** **पु०** १ शंखांतून काढलेला ध्वनि. २ बोंवलण्याची क्रिया (करणें). **शंखमणि** **पु०** दिसण्यांत गोरा, गोमटा, सुंदर, पण विद्या, कला, इ० नीं विरहित असा माणूस. **शंखासुर** **पु०** एक दैत्यविशेष. **शंखिनी** **स्त्री०** १ कांहीं विशिष्ट लक्षणांनीं युक्त अशी स्त्री. केश लांब, बांधा उंच, प्रकृति तापट आणि कामी, अशा लक्षणांची स्त्री. २ अगदीं थोडें दूध देणारी गाय. ३ गोगलगाय. **शंखक्षीर** **न०** (**लाक्षणिक**) अशक्य गोष्ट,–वंध्यापुत्र, शशशृंग, खपुष्प, इ० प्रमाणें. **शंखवणी** **न०** १ देवावर अभिषेक करण्यासाठीं शंखांत घातलेलें पाणी. २ स्वच्छ, निर्मल पाणी. ३ फार पाणी घातल्यामुळें वेचव (ताक, दूध, इ०). **शंखाचें** **न०** बोंवलणें. **शंख्या** **वि०** १ मूर्ख. २ दुर्दैवी.

शंखळा पुढें ' शृंखला ' पहा.

शट्कर्णी पुढें ' षट्कर्णी ' पहा.

शठ [**सं०**] **पु०** १ ठग; धूर्त. २ (**साहित्य**) बाह्यात्कारी प्रेम दाखविणारा पुरुष. ☸ **शठे शाठ्यं समाचरेत्** लबाडाशीं लबाडी करावी; लबाडाला लबाडीनें जिंकावें. **शठाई** **स्त्री०** लबाडी, लुच्चेगिरी.

शंड, शंढ, षंड [**सं०**] **पु०** १ नपुंसक; ज्याचे ठायीं पुरुषत्व नाहीं असा. २ (**लाक्षणिक**) कर्तृत्वशून्य माणूस.

शण [**सं०**] न० ताग,–दोऱ्या करण्याकडे योजतात तो. ☸ **शणसूत्र** **न०** तागाचा दोरा किं० दोरी.

शत [**सं०**] **न०** शंभर. ☸ **शतांग** **पु०** रथ. **शतावरी** **स्त्री०** १ एक वनस्पति. २ इंद्रपत्नी. **शतकुंभ, शातकुंभ** **न०** सोनें हा धातु. **शतकोटि** **पु०** १ इंद्राचें वज्र. २ हिरा हें

रत्न. **शतक्रतु** पु० १ इंद्र. २ इंद्रपद प्राप्त होण्यासाठीं करावे लागतात ते शंभर यज्ञ (म्ह० यज्ञ). ३ (**मराठींत**) अचाट, दुर्घट, किं० मोठ्या पराक्रमाचें कांहीं कृत्य; उ० जन्मास आल्यापासून हें देऊळ मीं बांधले एवढा शतक्रतु केला; उ० घरचें काम होईना ते बाहेर जाऊन तुम्ही काय शतक्रतु करणार आहां? **शतगुण** वि० शंभरपट. **क्रि० वि०** शंभरपटीनें. **शतघृत** न० (**वैद्यक**) शंभर वेळां पाण्यानें धुवून काढलेलें घृत (म्ह० तूप). **शतघ्नी** स्त्री० एक शस्त्र,–लोखंडी कांटे लाविलेला सोटा. **शतचिंध्या** स्त्री० अ० व० शंभर म्ह० पुष्कळ ठिकाणीं फाटलेलें वस्त्र, धोतर, अंगरखा, इ०; उ० ह्या शतचिंध्या नेसून तुम्हीं सभेला जाणार काय? **शतचूर्ण** न० अगदीं फुटलेपणाची स्थिति. वि० अगदीं भग्न. **शततारका** स्त्री० चोविसावें नक्षत्र. **शतपत्र** न० कमळ. **शतपथ** पु० शुक्ल-यजुर्वेदाचें ब्राह्मण. **शतच्छंदी** वि० हरएक प्रकारच्या लबाड्या, लुच्चेगिऱ्या, किं० भामटे-गिऱ्या करण्यांत पटाईत. **शतंजीव** उ० वा० अ० (**शब्दशः**) शंभर वर्षे जग (म्ह० जिवंत रहा). कोणाला शिंक आली किं० येत असली म्हणजे ह्या शब्दानें त्याला आशीर्वाद देतात.'शतं जीव शरदः शतं' ह्या वाक्याचें 'शतंजीव' हें तोकडें रूप आहे. **शतधौत** वि० औषधार्थ शंभर वेळां पाण्यांत धुतलेलें (तूप). **शतपदी** स्त्री० गोम किं० घोण हा किडा. **शतपाक** न० (**वैद्यक**) तैलविशेष. **शतमख, शतमन्यु** पु० इंद्र. **शत-लोचन** पु० इंद्र. **शतशः** क्रि० वि० १ शेकडों. २ शंभर वेळां. **शतह्रदा** स्त्री० १ वीज. २ वज्र. **शतक** न० एक शेकडा; शंभरांचा समुदाय. **शती** [सं० शतिन्] वि० शंभराचा मालक. **शतकृत्य** न० मोठें पराक्रमाचें कृत्य. **शत-पावली** स्त्री० भोजनानंतर अन्नाचा परिपाक योग्य प्रकारें व्हावा म्हणून घरांतल्या घरांत थोड्याशा फेऱ्या करणें (शब्दशः, शंभर पावलें चालणें). **शतंभीष्म** पु० शंभर भीष्म म्ह० भीष्माहून शंभरपटीनें पराक्रमी पुरुष; उ० अरे जाः! तूं काय माझें वाकडें करणार आहेस? तुझ्यासारखें पुष्कळ शतंभीष्म मीं लोळविले आहेत! **शतमर्दी** स्त्री० पुढें 'शतमर्दी' पहा. **शतमान** वि० शंभर आहे मोजदाद ज्याची असें (आयुष्य, दक्षिणा, इ०); शंभर. **शतमारी** वि० १ शंभर रोगांवर लागू पडणारें (औषध). २ शंभर (म्ह० सर्व) रोग बरे करणारा वैद्य. ३ शंभर रोगी मारण्यांत पटाईत (वैद्य) म्ह० ज्याच्या हाताला यश नाहीं असा (वैद्य). **शतमूर्ख** वि० अत्यन्त मूर्ख किं० अडाणी (माणूस). **शतवार्षिक** वि० १ शंभर वर्षांनीं करावयाचा (विधि, उत्सव, इ०). २ शंभर वर्षे टिकणारा, जगणारा, किं० चालणारा. ३ दर शंभर वर्षांनीं करावयाचा, व्हावयाचा, किं० होणारा. ४ शंभर वर्षे जगलेला (माणूस). **शतशाख** वि० शंभर प्रकारचा; शंभर पोटभाग ज्याचे आहेत असा; नानाविध. **शताधीश** वि० १ शंभर लोकांच्या टोळीचा नायक. २ शंभर रुपये हीच ज्याची सर्व संपत्ति आहे असा (मनुष्य). **शतायु, शतायुषी** वि० शंभर वर्षे वयाचा मनुष्य. **शताळशी** वि० भारी आळशी (माणूस).

शतमी स्त्री० करार,–विशेषतः गलबतासंबं-धाचा. 'सतमी' स्त्री० ह्याच अर्थी.

शत्रु [सं०] पु० १ वैरी; दुष्मन्. २ प्रति-स्पर्धी राजा (शेजारी). ❀ **शत्रुंजय** पु० १ हत्ती. २ हिंदुस्तानांतील जैनांचे एक पवित्र स्थान. **शत्रुकात्रु** वि० नीच; हलकट; पाजी. **शत्रुपाचन** न० अन्नाचे वाईट आणि अपाय-कारक गुण नाहींसे करणारें (कांहीं औषध).

शनि [सं०] पु० १ सूर्याभोंवतीं फिरणारा एक ग्रह. ह्याची फिरण्याची कक्षा गुरु ह्या ग्रहाच्या बाहेर आहे. हिंदूंच्या नवग्रहांतील हा सातवा ग्रह आहे. शनीचा आकार भूमीच्या सातशे पट मोठा आहे. शनीला सूर्याभोंवतीं एक फेरा करावयाला सुमारें तीस वर्षें लागतात. हा काळ इतर ग्रहांच्या काळाहून अधिक आहे म्हणून शनीला 'शनैश्चर' (म्ह० सावकाश चालणारा) असेंही म्हणतात. हा ग्रह आपल्या राशीपासून द्वादश स्थानीं असल्यास तो फार पीडा देतो. ह्यावरून 'शनि,' किं० 'शनैश्चर' ह्याचा अर्थ

दुष्मान् किं० वाइटावर टपलेला किं० तगादेवार असा झाला आहे. २ नीलमणी हें रत्न. ३ उपद्रव देणारा जो सावकार इ०कांच्या कडील तगादेदार तो. ४ मंद बुद्धीचा, उद्योग न करणारा, अभ्यासांत टंगळमंगळ करणारा पोरगा. ❀ **कोणेकाच्या उदरीं शनि येणें** तो श्रीमंत किं० समृद्ध किं० वैभवशाली होण्याचीं सर्व साधनें किं० कारणें त्याला अनुकूल होणें. **टीप,**– जन्मराशीला शनि हा ग्रह आला असतां वैभव प्राप्त होतें असा फलज्योतिषाचा सिद्धान्त आहे. **शनिवार,शनिवासर** आठवड्याचा एक वार,– शुक्रवाराच्या पुढचा आणि आदित्यवाराच्या मागचा. **शनीश्वर, शनेश्वर, शनैश्वर** पु०१शनि हा ग्रह. २ कोणहि उपद्रवी माणूस किं० तगादेदार. **शनिप्रिय, शनि** पु० नीलमणि किं० नीळ हें रत्न. **शनिप्रदोष** पु० शनिवारीं त्रयोदशी असतां जो प्रदोष तो. **शनीचा फेरा** पु० कांहीं दुर्दैवाचा आघात किं० आघात;मोठें संकट.

शनैः, शनैः शनैः [**सं०**] **क्रि० वि०**सावकाश; मंदगतीनें; हळू हळू; धीमेधीमे. ❀ **शनैर्मेह** पु० लघ्वी सावकाश आणि वेदनेनें होणें हा रोग. **शनैश्वर** पु० मागें ' शनि ' मध्यें पहा.

शपणें [**सं०** शप्] **स०क्रि०** (कोणेकाला) शाप देणें.

शपथ [**सं०**]**पु०** (संस्कृतांत); **स्त्री०**(मराठींत) १ मी अमुक करीन किं० अमुक करणार नाहीं अशा अर्थाची प्रतिज्ञा करणें (घेणें, वाहणें,करणें, देणें); उ० मी अशी शपथ घेतों कीं आजपासून हातसुताची आणि हातमागाची खादी मी वापरीन. २ कोणेकावर अमुक कर किं० अमुक करूं नको अशा अर्थाची आग्रहाची नियंत्रणा घालणें किं० सक्ती करणें; उ० तूं दारू पिऊं नको अशी मी तुला शपथ घालतों; उ० तूं परदेशी कापड वापरलेंस तर तुला माझी शपथ आहे. ❀ **शपथपूर्वक, शपथेवर, शपथपुरःसर क्रि० वि०** शपथ घेऊन; उ० मी शपथ घेऊन सांगतों कीं तुला टोमणा मारावा असा माझा मुळींच उद्देश नव्हता. **शपथ वहाण्याला मोकळा होणें** (किं० **असणें**) १ मी जें म्हणतो तें खरें आहे असें कोणेकानें शपथ घेऊन सांगावयास सिद्ध असणें. २ आपण अमुक काम केलें नाहीं असा आपणावर कोणाला ठपका ठेवतां येऊं नये इतक्याच बेताचें तें काम करणें.**तुझ्या गळ्याची शपथ मी तें काम करीन** मी तें करीनच करीन. **टीप,**–जी वस्तु आपण अत्यन्त मूल्यवान्, प्रिय, किं० पूज्य समजतों त्या वस्तूचा उच्चार करून अशा प्रकारें शपथ घेतात.

शपन [**सं०**] **न०** १ शाप देण्याची क्रिया; शाप. २ शपथ. ३ निंदिणें.

शंपा [**सं०**] **स्त्री०** वीज.

शपित, शप्त [**सं०**] **वि०** ज्याला शाप दिला आहे असा.

शफ [**सं०**] **पु०, न०** पशूचा खूर; गेळें. उ० गाय, म्हैस, शेळी, इ० हे प्राणी द्विशफ किं० भग्नशफ आहेत; घोडा, गाढव, इ० हे प्राणी एकशफ किं० अभग्नशफ होत.

शफर पु०, शफरी स्त्री० [**सं०**] सहरी ह्या नांवाचा मासा.

शबर, शवर [**सं०**]**पु०**म्लेच्छांची एक जाति किं० त्या जातीचा कोणी माणूस.

शंबर [**सं०**] **पु०** १ सांबर हा प्राणी. २ एक दैत्यविशेष,–ह्याला मन्मथानें ठार मारिलें. **शंबरी स्त्री०** जादूगिरी; माया; हातचलाखी. **शंबर न०** एक बौद्धव्रतभेद. ❀ **शंबरारि पु०** मदन, मन्मथ.

शबल [**सं०**] **वि०** १ ठिपके असलेलें; ठिबकेदार; चित्रविचित्र रंगांचें. २ मिश्रणाचें; मिश्रित. **शबला, शबली स्त्री०** १ अनेक रंगांची गाय. २ कामधेनु. ❀ **शबलपृष्ठक पु०** मृगविशेष. **भावशबलता स्त्री०** (**साहित्य**) एकाचा उपमर्द करून दुसरा, दुसऱ्याचा उपमर्द करून तिसरा, असे एकामागून एक भाव उत्पन्न होऊन अन्याचे अंगभूत होतात तेथें भावशबलता होते.

शंबल न० संबळ नांवाचें वाजंत्र्यांचें एक वाद्य.

शबिना [**फा०** शबीनाह्] **पु०** १ मागें

' छबिना ' सर्व अर्थी पहा. [**फा०** षामियानाह्] मोठा डेरा किं० तंबू.

शब्द [**सं०**] **पु०** १ आवाज; ध्वनि; नाद; उ० पोपटाचा, गार्याचा, चालतांना पावलांचा शब्द. २ अर्थबोधक वर्णसमूह; एकाद्या वस्तूचा किं० कल्पनेचा दर्शक किं० व्यंजक जो अक्षर-समूह तो; उ० व्याकरणांत शब्दांविषयीं विचार केलेला असतो. ३ दोष, टपका(येणें,लागणें,ठेवणें); उ० आपणाला गुरूचा शब्द न लागेल असें वर्तन ठेवावें. ४ आज्ञा; हुकूम. ॐ **शब्दातीत वि०** वर्णन करण्यास अशक्य. **शब्दाधिष्ठान न०**. **शब्दग्रह पु०** कान; कर्णेन्द्रिय. **शब्दताडन न०** शब्दांनीं कोणेकावर प्रहार करणें;रागें भरणें. **शब्दपारुष्य न०** भाषणाचा कठोरपणा; शब्दांचा झोंबरेपणा. **शब्दभेद पु०** १ दुसरा शब्द. २ केवळ शब्दाचा भिन्नपणा. **शब्दयोगी अव्यय पु०** जीं अव्ययें दुसऱ्या शब्दांपुढें येऊन त्यांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं संबंध जोडतात तीं प्रत्येक; शब्दयोगी अव्ययांच्या योगानें मागल्या शब्दाचें सामान्य रूप होतें;उ० वरावर, कागदासाठीं,इ०.**शब्ददोष न०**वाक्याचा अर्थबोध होण्यापूर्वींच ज्यांचें ज्ञान होतें ते'शब्ददोष' होत. शब्दांचा किं० वाक्यांचा अर्थ समजल्या नंतर जे ध्यानांत येतात व ज्यांच्या योगानें रसाचा परंपरेनें अपकर्ष होतो ते ' अर्थदोष ' होत; आणि वाक्याचा संपूर्ण अर्थ समजल्यावर जे ध्यानांत येतात आणि ज्यांच्या योगानें रसाचा प्रत्यक्ष अपकर्ष होतो ते 'रसदोष' होत. शब्ददोष, अर्थदोष, रसदोष, त्यांचे विविध प्रकार, त्यांचीं उदाहरणें, इ० साठीं गणेश मोरेश्वर गोरे बी. ए, यांचें ' काव्यदोषदीपिका ' हें पुस्तक पहा. **शब्दालंकार पु०** शब्द, शब्दांतील वर्ण, शब्दांची मांडणी, यांवरच केवळ अवलंबून असलेला जो अलंकार तो शब्दालंकार. शब्दालंकारांचे अनुप्रास, यमक, श्लेष, आणि चित्र, असे मुख्य चार प्रकार आहेत. विशेष खुलासा आणि उदाहरणें आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **शब्दाशब्द पु०ए० व०** १ योग्य किं० अयोग्य शब्द; उ० त्याला कांहीं शब्दाशब्द बोलूं नको, माझा निरोप त्याला सांग आणि परत ये. २ भलतेच शब्द; बोलाचाली; असभ्य भाषण; उ० चारचौघांत शब्दाशब्द बोलूं नये, चांगलेंच बोलावें. **शब्दानुशासन न०** व्याकरण. **शब्दाडंबर पु०** पोकळ वक्तृत्व; शब्दपांडित्य; रिकामी वडवड.**शब्दपाती, शब्दवेधी** [**सं०** शब्दपातिन्; शब्दवेधिन्] **वि०**नुसत्या आवाजाच्या धोरणानें नेम मारणारा. **शब्दप्रमाण न०** तोंडी पुरावा. **शब्दब्रह्म**[**सं०** शब्दब्रह्मन्] **न०** वेद. **शब्दविद्या स्त्री०, शब्दशासन, शब्दशास्त्र न०** व्याकरण. **शब्दसंग्रह पु०** कोश. **शब्दसंहति स्त्री०** अमुक विचार व्यक्त करावयाचा असतां अमुक शब्दांच्या शेजारीं अमुकच शब्द अमुकच रूपानें आणि अमुकच क्रमानें आले पाहिजेत ही जी भाषेची रूढि (म्हणजे प्रचार) तिला ' वाक्प्रचार ' म्हणतात आणि अशा रीतीचा जो शब्दांचा समुदाय त्याला ' शब्दसंहति ' म्हणतात. **तुल्यकल्प शब्द पु० अ० व०** जे शब्द अर्थानें पुष्कळ अंशीं तुल्य किं० सम असतात आणि अगदीं अल्प अंशीं भिन्न असतात ते शब्द; उ० आकृति, आकार; ईश्वर, देव; इ०. विशेष खुलासा आमचे ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ह्या पुस्तकांत लें० १३२९ पहा. **समस्तकल्प शब्द पु०** जो शब्दांचा समूह व्याकरणांत सामासिक शब्द म्हणून गणला जात नाहीं, परंतु जो अर्थानें सामासिक शब्दाप्रमाणें योजला जातो तो शब्दांचा समूह; उ० कर नकरीच वसा, कुत्र्याचें शेपूट, अडणीवरचा शंख, पाप्याचें पितर, सतीचें वाण,इ०. विशेष खुलासा आमचें ' मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ० ' ह्या पुस्तकांत लेखांक ९२९ह्यांत पहा.**सिद्ध शब्द पु०** ज्या शब्दाची व्युत्पत्ति पंडितांच्या मतानें ठरलेली नाहीं किं० ज्या शब्दांच्या घटक अक्षरांची अर्थदृष्ट्या फोड करतां येत नाहीं तो शब्द; उ० लाकूड, धोंडा, इ०.**साधित शब्द पु०** जो शब्द दोन किं० अधिक शब्द किं० शब्दांश एकत्र होऊन घडला आहे तो; उ० मोडतोड, इ०. **सामासिक शब्द पु०** दोन किं० अधिक शब्द एकत्र येऊन त्यांचा मूळचा अर्थ व्यक्तिशः लुप्त होऊन त्यांच्या संयोगाला नवीन विशिष्ट अर्थ प्राप्त झाला असतां त्या संयोगानें उत्पन्न

झालेला शब्द; उ० अन्नवस्त्र, गंगातीर, साखरभात, चक्रपाणि, त्रिभुवन, पंचपाळें, यथाशक्ति, इ०. **कोणेकाला शब्द लावणें** त्याला दोष देणें; त्याच्यावर ठपका ठेवणें. **एकाद्याचा शब्द खालीं पडूं न देणें** १ त्याच्या प्रत्येक शब्दास उत्तर देणें; त्याचा शब्द खोडून काढणें; त्याच्या उत्तरास प्रत्युत्तर देणें; वादविवादांत किं० भांडणांत माघार न घेणें. २ कोणी कांहीं काम सांगतांच तें करावयास सिद्ध होणें. **कोणेकाचा शब्द खालीं पाडणें** त्याच्या सांगण्याप्रमाणें न करणें. **कोणेकाचा शब्द झेलणें** त्याची आज्ञा तत्काळ पुरी करणें; त्याची इच्छा पुरविण्यास तयार असणें; त्याची आज्ञा झाल्याबरोबर ती बजावण्यास पुढें सरसावणें; उ० समर्थाचा शब्द झेलावयास सारीं माणसें तत्पर असतात. **शब्दाचा मार** पु० कोणेकाला कठोर शब्दांनीं ताडन करणें किं० रागें भरणें; उ० शहाण्यास शब्दाचा मार, मूर्खास टोणप्याचा मार.

शब्दित [सं०] **वि०** बोलावलेला. **न०** आवाज; ध्वनि.

शंभर वि० शतसंख्याक; पन्नासाच्या दुप्पटी इतकें. **टीप,**–' शंभर ' च्या मागें एक, दोन, इ० विशेषणें लागलीं असतां एकशें, दोनशे, इ० शब्द योजण्यांत येतात. ❀ **शंभर बुड्या मारून अंग कोरडें दाखविणारा** जो अनेक प्रकारच्या लबाड्या करतो पण सापडत नाहीं असा; पक्का बिलंदर. **शंभर हातांत येऊं न देणें** प्रतिपक्ष्याला जवळ येऊं न देणें; प्रतिपक्ष्यापासून दूर असणें. **कोणेकाचीं शंभर वर्षें भरणें** त्याचा मरणकाळ किं० विनाशकाळ जवळ येऊन ठेपलेला असणें. **टीप,**–मनुष्याची आयुमर्यादा शंभर वर्षांची असें समजलें जातें. **शंभर नंबरी सोनें न०** १ बावनकशी म्ह० अगदीं चोख किं० निर्मळ किं० शुद्ध सोनें. २(**लक्षणेनें**) अत्यन्त शुद्ध, पवित्र, विश्वासू (माणूस).

शंभु [**सं०**] **वि०** सुखकर. **पु०** १ शंकर. २ साधु. ३ जिन साधु. ४ आत्मा. ५ (**लाक्षणिक**) साधाभोळा माणूस.

शम [**सं०**] **पु०** १ शान्ति; मनाची निर्विकार स्थिति. २ मनोजय; मनोनिग्रह. ३ विश्रांति. ४ निवारण; प्रतिकार. ५ मोक्ष. ❀ **शम विषम** [**सं०** सम+विषम; किं० **म०** शम+विशम] **न०** १ बाजार भावांत चढउतार. २ आजार, मनोविकार, वारा, पाऊस, थंडी, इ० मध्यें कमीअधिकपणा. ३ हिशेब, हकीगत, इ० मध्यें थोडीशी तफावत. ४ दोन माणसांत थोडासा वेबनाव किं० विमनस्कता.

शमणें [**सं०** शम्] **अ० क्रि०** शांत होणें; क्षोभरहित होणें; बंद पडणें; कमी जोराचा होणें.

शमन [**सं०**] **न०** यम; यमराज. **न०** १ १ शांत करणें; शांत होणें. २ दबणें; नाहींसें होणें; लोपणें. ३ यज्ञांतील पशुवध. ४ (**वैद्यक**) सप्तोपचारांपैकीं एक; आग, क्षोभ, जळजळ, इ० शमविणारा उपचार; उ० पित्ताचें शमन सुंठसाखर. पाचन, रेचन, छेदन, शमन, मोहन, स्तंभन, आणि वर्धन, हे सप्तोपचार. ❀ **शमनस्वसा** [**सं०** शमनस्वसृ] **स्त्री०** यमुना नदी.

शमल [**सं०**] **वि०** पातकी. **न०** १ विष्ठा. २ गाळ. ३ पाप; अपराध.

शमविषम मागें ' शम ' मध्यें पहा.

शमित [**सं०**] **वि०** १ शांत केलेला; शमविलेला. २ नष्ट किं० विध्वस्त केलेला. ३ कमी जोरदार केलेला; दाबून, चेपून, किं० चिरडून टाकलेला.

शमिना [**फा०** षामियानाह्] **पु०** डेरा; मोठा तंबू.

शमी [**सं०**] **स्त्री०** १ एक कांटेरी वृक्ष. दसऱ्याच्या दिवशीं ह्याची पूजा करतात. २ शेंग. ३ बावची. ❀ **शमीधान्य न०** द्विदल धान्य,– पावटा, तूर, वाटाणा, इ०. **शूकधान्य न०** जव इ० कुंस असलेलें धान्य.

शयन [**सं०**] **न०** १ निजणें. २ बिछाना. ३ मैथुन. ४ बसणें, निजणें, इ० च्या उपयोगाचा पलंग, माचा, इ० रचनाविशेष. ❀ **शयनी, शयनी एकादशी स्त्री०** आषाढ शुद्ध एकादशी. ह्या दिवशीं श्रीविष्णु निजतो.

शयनीय, शयनीक [**सं०**] **न०** १ शयनगृह. २ बिछाना. [लेला.

शयालु [**सं०**] **वि०** १ झोपाळू. २ निज-

शय्या [**सं०**] **स्त्री०** १ बिछाना. २ निजणें. ॐ **मृतशय्या स्त्री०** ज्या गादीवर कोणेकाचें प्राणोत्क्रमण झालें ती गादी. **शय्यादान न०** ब्राम्हणाला मृतशय्या देणें. **सुखशय्या स्त्री०** १ जीवर विश्रांति घ्यावयाची ती गादी. २ आरामांत निजणें. **शय्याद्रि** पुढें ' सह्याद्रि ' पहा.

शर [**सं०**] **पु०** १ बाण; तीर. २ काश नांवाचें गवत. ३ बोरू; देवनळ. ४ पांच ही संख्या (गणित, ज्योतिष, इ०च्या परिभाषेंत). ५ सरत नामक तारकापुंजांतील च, छ , घ ह्या तीन ताऱ्यांची रांग. ६ सूर्याधिष्ठित जो मार्ग त्यापासून चंद्रादि ग्रहांचें जें याम्योत्तर अंतर येतें तें. ॐ **शरवृत्त न०, शरपात पु०** मागें ' याम्य ' मध्यें हे शब्द पहा. **पंचशर, पंचबाण पु०** मदन, मन्मथ. **शराभ्यास पु०** तिरंदाजी. **शरासन न०** धनुष्य. **शरकाण्ड पु०, न०** १ बाणाचा दांडा. २ बोरूची छडी. **शरजन्मा** [**सं०** शरजन्मन्] **पु०** कार्तिकेय; कार्तिकस्वामी. **शरधि पु०** बाणांचा भाता. **शरपंजर पु०** कोणेकाच्या अंगास असंख्य बाण टोचले असतां बाणांच्या टोकांनीं जी आकृति होईल ती किंवा जें आवरण होईल तें. भारती वीर भीष्म हा शरपंजरीं पडला होता. यावरून ' कोणेकानें शरपंजरीं पडणें (किं० पडलेलें असणें)' म्हणजे त्याणें आजार, संकट, इ० मध्यें हताश स्थितींत पडणें (किं० पडलेलें असणें). **शरसंधान न०** बाणाचें लक्ष्य; बाणाचा नेम; बाण रोखणें ही क्रिया.

शरट [**सं०**] **पु०** १ सरडा,–एक सरपटणारा प्राणी. २ कुसुंबा.

शरण [**सं०**] **वि०** १ रक्षण करणारा. २ आश्रयास योग्य. **न०** १ रक्षण. २ आश्रय. ३ आश्रयस्थान. ४वाली; रक्षण करणारा. ५ स्थान; गृह; उ० अग्निशरण. ॐ **कोणेकाला शरण जाणें** (किं० **रिघणें**) त्याचें वर्चस्व कबूल करून त्याची दया भाकणें; त्याची क्षमा मागणें. **कोणी कोणेकाला शरण असणें** तो त्याचा वाली किं० रक्षणकर्ता असणें. **शरणैषी, शरणापन्न, शरणागत, शरणार्थी वि०** आश्रयार्थ आलेला (मनुष्य). **शरणागतवत्सल वि०** आश्रयार्थ आलेल्यास प्रेमपूर्वक आश्रय देणारा. **शरणार्थ पु०** लिंगायत लोक हा शब्द उच्चारून एकमेकांस नमस्कार करतात. **शरण आल्यास मरण देऊं नये** आश्रय मागावयास आलेल्या माणसास टाकूं नये; त्याचें रक्षण करावें.

शरण्य [**सं०**] **वि०** १ रक्षण करण्यास योग्य; रक्षणीय. २ अनाथ. ३ रक्षण करावयास समर्थ; शरण जाण्यास योग्य; संरक्षक. **न०** १ रक्षण. २ आश्रयाची जागा; आसरा.

शरद, शरदा [**सं०**] **स्त्री०** १ आश्विन आणि कार्तिक ह्या दोन महिन्यांच्या अवधीचा ऋतु.२ वर्ष; वर्ष हा कालावधि. ॐ **शरत्काल, शरदृतु पु०** आश्विन आणि कार्तिक ह्या दोन महिन्यांचा अवधि.

शरधि मागें ' शर ' मध्यें पहा.

शरबत, सरबत [**फा०** शरबत] **न०** लिंबाचा किं० चिंचेचा रस,–साखर इ० द्रव्यें घालून पिण्यासाठीं तयार केलेला. ॐ **शरबतखोरी स्त्री०** वाङ्निश्चयाचा फलाहार.

शरभ [**सं०**] **पु०** १ हत्तीचा छावा. २ उंट. ३ टोळ,–पिकांची नासाडी करणारा एक क्षुद्र पक्षी. ४ चित्ता. ५ सिंहापेक्षां बळकट आणि आठ पायांचा एक कविकल्पित प्राणी.

शरम [**फा०** शर्म] **स्त्री०** लाज; लज्जा.

शरमणें [**फा०** शर्म; **म०** शरम] **अ० क्रि०** लज्जित होणें; लाजणें; ओशाळें होणें.

शरमिंदा (–धा) [**फा०** शरमिंदाह्] **वि०** लज्जित; लाजलेला;ओशाळा.ॐ**शरमिंदगी स्त्री०** खजीलपणा.

शरयतपन्हा पु० इसलामी धर्मशास्त्रांत पंडित किं० वाकबगार.

शरा [**अ०** षरअ] **पु०** मुसलमानी धर्माचा कायदा; इसलामी धर्मशास्त्र किं० शास्त्रनिर्णय.

शराईत, सराईत [**सं०** स्राव (?)] **वि०** कांहीं काम किं० कृति करण्यांत पटाईत किं० अभ्यस्त किं० परिचित.

शराकत इ० पुढें ' सरकत ' इ० पहा.

शराब [**अ०** शराब्] **पु०** मद्य,दारू.

शरायती स्त्री० लिहितांना चुकून गळालेला

शब्द कोठें घालावयाचा हें दाखविणारी रेघ (कारकुनांचा शब्द).

शराव [**सं०**] **पु०** १ परळ; उथळ पात्र. २ कढई. ३ दोन कुडव हें धान्याचें माप.

शरावी [**सं०** शराव] **स्त्री०** परळ; उथळ भांडें.

शरीक [अ०] **पु०** १ वाटेकरी; पातीदार. २ साथीदार; दोस्त.

शरीर [**सं०**] **न०** १ देह; काया. २ घटक; अवयव. ३ देहाची शक्ति. ॐ **शरीरावरण न०** कातडें. **शरीरज पु०** १ रोग. २ मदन. ३ पुत्र. **शरीरदण्ड पु०** तप. **शरीरपतन न०** मृत्यु. **शरीरबद्ध वि०** मूर्तिमंत; देहधारी. **शरीरयष्टि स्त्री०** सडपातळ शरीर. **शरीरयात्रा स्त्री०** निर्वाह. **शरीरसंपत्ति स्त्री०** आरोग्य. **शरीरसंबंध पु०** लग्नाचा किं० विवाहाचा संबंध. **शरीरस्थिति स्त्री०** जगणें. **शरीरी** [**सं०** शरीरिन्] **वि०** १ मूर्तिमंत. २ जिवंत. **पु०** १ वस्तु. २ प्राणी. ३ मनुष्य. ४ जीवात्मा. **शरीरकळा, शरीरकांति स्त्री०** देहाची टवटवी; अंगकांति; नीरोगीपणाचा किं० भव्यपणाचा तजेला. **शरीरप्रकृति स्त्री०** आरोग्य. **शरीरभोग पु०** शरीरास होतात जे सुखाचे किं० दुःखाचे अनुभव ते प्रत्येक. **शरीराची दामटी वळणें** आजार, उपास, इ० मुळें शरीर थापटीसारखें होणें. **शरीराची ढगळ, शरीराची थलपी स्त्री०** हगवण, आमांश, इ० मुळें शरीरास आलेली कृशता. **शरीर वेचणें** परोपकाराच्या कृत्यांत देह कष्टविणें.

शर्करा [**सं०**] **स्त्री०** १ साखर. २ मुतखडा; लघ्वांतून साखर जाणें हा रोग. ह्यालाच ' शर्करामेह ' म्हणतात.

शर्त, शर्थ [अ० षर्त] **स्त्री०** १ अट; अमुक झाल्यास अमुक करावें अशा अर्थाचा ठराव. २ कसोशी; पराकाष्ठा; कमाल; उ० त्याचें मन वळविण्याची मी शर्त केली पण त्याचें मन वळलें नाहीं; उ० ह्या पोरांनीं दांडगाईची शर्त केली. ३ वैपुल्य; अतिशय. ४ शिरस्ता. ॐ **शर्तमर्दी, शर्तमर्दी स्त्री०** पराकाष्ठेचा प्रयत्न; प्रयत्नाची शिकस्त. **शर्तनामा पु०** तह; करारनामा. **शर्तबशर्त क्रि० वि०** पराकाष्ठेनें; शर्तीनें.

शर्म, शर्मणें इ० मार्गे ' शरम, ' ' शरमणें ' इ० पहा.

शर्म [**सं०** शर्मन्] **न०** सुख; कल्याण.

शर्मा [**सं०** शर्मन्] **पु०** ब्राह्मणाच्या नांवाला जोडावयाचा शब्द; उ० विष्णुशर्मा. क्षत्रियांच्या नांवापुढें ' वर्मा ' जोडतात; वैश्याच्या नांवापुढें ' गुप्त ' जोडतात; शूद्राच्या नांवापुढें ' पालित ' जोडतात.

शर्यत [अ० ' षर्त ' चें अ० व० षरायत] **स्त्री०** १ पैज. २ चुरशीची दौड; उ० घोड्यांची शर्यत, मुलांची शर्यत, इ०.

शलक, शलख [अ० षलख्] **स्त्री०** वर्षाव; वृष्टि.

शलगम [तुर्की] **पु०** मुळा, कोबी, इ० च्या वर्गांतील एक झाड. ह्याच्या पानांची भाजी करतात.

शलभ [**सं०**] **पु०** १ टोळ. २ दिव्यावर झडप घालणारा एक क्षुद्र कीट.

शलाका [**सं०**] **स्त्री०** १ काडी; लहान काठी. २ वैद्याचें अणकुचीदार शस्त्रविशेष. ३ बाण. ४ भाला. ५ रंगाऱ्याची कुंचली. ६ प्रकाशाचें बारीक किरण. ॐ **शलाकापरीक्षा स्त्री०** मिटलेल्या ग्रंथांत हावी तेथें काडी घालून त्या पानांत विद्यार्थ्याची तयारी कितपत आहे हें पाहाण्याची पद्धति. **शलाकाप्रश्न पु०** मिटलेल्या ग्रंथांत काडी घालून ती ज्या वाक्यावर टेकेल त्या वाक्यावरून आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळविणें हा प्रकार.

शल्य [**सं०**] **न०** १ भाला. २ बाण. ३ वेळूची काठी. ४ खिळा; खुंटी. ४ टोचणारें कांहींही,— कांटा, सुई, बाण, इ०. ६ शरीरांत सलणारी कांहींही वस्तु. ७ मनाला बोचणारी कोणतीही गोष्ट. ८ घर, देऊळ, इ० बांधतांना जमीन खणतांना हाड, कातडें, इ० जो अपवित्र पदार्थ सांपडतो आणि जो फेंकून देतात तो. ९ स्त्रियांचा गर्भ शमल्यास पोटांत राहातो जो त्याचा अवशेष तो; सल. १० दुसऱ्यानें आपला केलेला अपमान जो मनांत

सलत राहिलेला असतो तो. ◎ **शल्यचिकित्सा स्त्री०** जखमांवर उपचार. **शल्यमृग पु०** खवलें मांजर.

शव [**सं०**] **न०** प्रेत. ◎ **शवयान न०, शवरथ पु०** तिरडी.

शवळें न० पुढें ' शेवाळें ' पहा.

शश [**सं०**] **पु०** १ ससा. २ चंद्रावरील सशाच्या आकाराचें चिन्ह. ◎**शशांक, शशधर, शशलांच्छन पु०**चंद्र.**शशादन,शशाद पु०**बहिरी ससाणा. **शशविषाण,शशशृंग न०**निसर्गांत अविद्यमान अशी कोणतीही वस्तु. **शशी**[**सं०**शशिन्] **पु०** चंद्र. **शशिकांत, शशिमणि पु०** चंद्रकिरण ज्यावर पडले असतां ज्यांतून पाणी स्रवतें असा एक कविकल्पित मणि. **शशिशेखर पु०** शंकर. **शशिनी स्त्री०** चांदणी रात्र.

शष्प [**सं०**] **न०** १ कोंवळें गवत. २ दूर्वा विशेष. ३ (**मराठींत**) शिश्नावरील किं० योनीवरील केश.

शंसक, शंसन, शंसना, शंसा, शंसनीय इ० मागें ' प्रशंसक, ' ' प्रशंसन, ' इ० पहा.

शस्त्र [**सं०**] **न०** १ हत्यार. २ कांहीं कार्याचें उपकरण किं०साधन.३(**लाक्षणिक**)ज्या रोगादिकांचें नाशक जें औषध इ०तें त्या रोगाचें. ४दुसऱ्यास जिंकणें किं० त्याचा नक्षा उतरविणें इ० कामीं उपयोगी पडणारी कांहीं गोष्ट,रहस्य, इ०. ५ आपल्या उत्कर्षास किं० इष्ट हेतु साधण्यास उपयोगीं पडणारा आपल्या अंगचा जो कांहीं गुण (विद्या, शौर्य, वशीला, इ०) तो. ६ प्रतिवाद्याला निरुत्तर करण्याचें कांहीं साधन (खत, पत्र, साक्षीदार,वशीला, इ०). ◎ **शस्त्राजीव, शस्त्रवृत्ति पु०** योद्धा. **शस्त्रपूत वि०**युद्धांत मरण पावलेला. **शस्त्रभृत् पु०** शस्त्र धारण करणारा; हत्यारबंद. **शस्त्रमार्ज पु०** शिकलगार. **शस्त्रवैद्य पु०** शस्त्रानें रोग्याचें विशिष्ट गात्र कापून रक्त इ० काढून रोग बरा करणारा वैद्य. **शस्त्रक्रिया स्त्री०** गात्रविशेषांतील रोग काढून टाकण्यासाठीं शस्त्राचा उपयोग करणें. **कोणेकानें कोणकावर शस्त्र धरणें** (किं०उगारणें) त्याणें त्याला जरबेंत ठेवणें किं०त्याच्यावर करडा अमल चालविणें.

शह [**फा०**] **पु०** १ राजा. २ बुद्धिबळांच्या डावांत प्रतिपक्ष्याच्या राजाला अडचणीची स्थिति (देणें, येणें, उठणें, इ०). ३ पेच; पंचाइतीची किं० अडचणीची स्थिति (येणें, देणें). ४ (**विनोदांत**) कायमचा मनुष्य आपल्या जागेवर परत आला असतां बदली मनुष्यानें निघून जाणें (येणें,देणें,मिळणें). ५ शब्दाचा मार;रागें भरणें;उ०शहाण्यास शह मूर्खास दोणपा. ६शत्रु, किल्ला, गांव, इ० कावर रोख धरून चाल करून जाणें किं० केलेली चाल. ७ आपलें इष्ट साधण्यासाठीं लावून ठेवलेला वशीला किं०केलेलें संधान; उ० ती वसल मला पांच हजारास मिळण्यासाठीं मीं शह देऊन ठेविला आहे.◎**नाशह पु०**(बुद्धिबळांच्या खेळांत)अडचणीच्या स्थितींतून राजाची सुटका किं० बचाव (करणें). **शहानिशा करणें** चौकशी करणें;कांहीं गोष्टींत खऱ्याचा अंश किती आणि खोट्याचा अंश किती हें तपासून पाहाणें; एकाद्या गोष्टीची संदिग्धता नाहींशी करणें;भवति न भवति करणें. **शहानिशह पु०, स्त्री०** पूर्ण चौकशी; तपास;वाटाघाट;खऱ्याखोट्याचा निर्णय किं० निकाल. **कोणेकानें शहास गुंतणें** त्याणें परिस्थितीनें बांधलें गेलें असणें; बाहेर पडावयास मार्ग नाहीं अशा पेचांत तो अडकलेला असणें. **कोणेकाला शह देणें** त्याला हुसकावून लावणें.

शहर [**फा०**] **न०** मोठा गांव. ◎ **शहरगुंडा पु०** १ युक्त्या, लबाड्या, लुच्चेगिऱ्या, इ० मध्यें पूर्ण पटाईत आणि त्या ओळखणारा आणि त्या करणारा; अट्टल सोदा किं० भामटा. २ हुशार, धूर्त, आणि लटपट्या माणूस. **शहरपन्हा पु०** १ शहराचा तट; तटबंदी. २ शहराचे रखवालदार, चौक्या, पहारेकरी, गस्तवाले, इ० बंदोबस्ताचीं साधनें समुच्चयानें. **शहरबटाऊ पु०** अट्टल सोदा; पक्का विलंदर. **शहरबाजार पु०** मोठें शहर,–तेथें हावी ती जिन्नस बाजारांत हावी तेव्हां मिळूं शकते ह्या दृष्टीनें; उ० असली वस्तु शहरबाजारांत मिळेल, ह्या गांवखेड्यांत मिळणें शक्य नाहीं.

शहरा, शहारा पु०,शहारें न० भयादि कारणानें अंगावर केश उभे राहिले आहेत अशी स्थिति (येणें);रोमांच. ◎ **अंगावर शहार येणें**

भयादि कारणांमुळें अंगावरील केश ताठ उभे राहणें.

शहा उ० **वा०** अ० कान्होबा, भूत, पिशाच, इ० नीं पछाडलेला माणूस तोंडावाटें काढतो तो उद्गार.

शहा [**फा०** षाह्] **पु०** मुसलमान राजा किं० बडा गृहस्थ किं० त्याच्या नांवापुढें योजावयाचा बहुमानाचा शब्द. सावकार, श्रीमंत मनुष्य, पेढीवाला, जकातदार, पतीचा माणूस इ०कां संबंधानें पदवीप्रमाणें हा शब्द योजतात. ॐ **नेसेन तर शहाचें नाहीं तर नागवी बसेन** मी उंची वस्त्रें नेसणार; तीं नाहीं मिळालीं तर मी कांहींच नेसणार नाहीं. **शहाजादा पु०** मुसलमान राजपुत्र. **शहाजादी स्त्री०** मुसलमान राजकन्या. **शहाजोग वि०** १ प्रामाणिक माणूस; पतीचा मनुष्य,–जो कधीं खोटा व्यवहार करणार नाहीं. २ प्रामाणिक, चोख, सचोटीचा (व्यवहार). ३ खरें, उत्तम (नाणें). ४ ज्याबद्दल कोणी शंका काढणार नाहीं किं० तकरार करणार नाहीं असा (देणें, घेणें, इ० बाबतीचा व्यवहार); उ० मी तुमचे शहाजोग शंभर रुपये देणें आहे. **शहाजिरें न०** जिऱ्याची एक जात. **शहातूत स्त्री०** एक प्रकारची तुती. **न०** तिचें फळ. **शहाजोर पु०** १ खूप मोठा जोर; अचाट जोर किं० सामर्थ्य. २ उंची दर्जाचा; उत्तम; उत्कृष्ट; भव्य; टोलेजंग; अफाट. **शहामुसळी स्त्री०** काळी मुसळी ही वनस्पति. दुसरी जात सफेत मुसळी. **शहाजोग हुंडी स्त्री०** जी हुंडी दाखविल्याबरोबर ती दाखविणाऱ्याला तिचे पैसे ताबडतोब मिळतात अशी हुंडी.

शहाडा पु० १ डोंगराच्या ओळीची धार,– जिच्या दोन्हीं कडच्या बाजू उतरत गेलेल्या आहेत. २ डोंगराच्या धारेवरून उतरत गेलेली अरुंद नागमोडी पायवाट. ३ हालार लोकांचें डफासारखें एक वाद्य किं० तें वाजविण्याची तऱ्हा. ४ मोठा वृक्ष.

शहाडें न० अगदीं कोंवळा नारळ.

शहाणा, शाहणा, शाहाणा वि० १ हुशार; धूर्त; चतुर. २ समंजस; विचारी. ३ (मुलासंबंधानें बोलतांना) हट्ट न करणारा; सांगितलेलें ऐकणारा. ॐ **शहाणपण न०, शहाणपणा पु०, शहाणीव स्त्री०** १ चातुर्य; धूर्तपणा. २ समंजसपणा; समजूतदारपणा. **शहाणासुरता वि०** १ शहाणा आणि देखणा, चतुर असून सुंदर. २ ज्याच्या शहाणपणाबद्दल कोणासही शंका येण्याचें कारण नाहीं असा; ज्याचा शहाणपणा सर्वांस मान्य आहे असा. **दीड शहाणा वि०** मागें ' दीड ' मध्यें पहा. **अति शहाणा वि०** फाजील शहाणा म्ह० अत्यन्त मूर्ख. **अतिशहाणा त्याचा बैल रिकामा** मागें 'अतिशहाणा' मध्यें पहा. **शहाणा तुपाशीं, दीड शहाणा तुसाशीं, आणि अति शहाणा उपाशीं** शहाण्याचा लाभ होतो, बेअकली माणसास क्षुल्लक लाभ होतो, आणि फाजिल शहाणा जो असतो त्याचें सर्वस्वी नुकसान होतें. **शहाण्याची बलाई दूर** मागें' बलाई 'मध्यें पहा. **शहाण्याची खरवड स्त्री०** मूर्ख असून उपद्रवी.

शहात्तर [**म०** सहा+सत्तर] **वि०** सत्तरांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

शहानिशा चौकशी मागें ' शहा' मध्यें पहा.

शहामत [**अ०**] **स्त्री०** १ कर्तृत्व; करामत. २ धिटाई; पराक्रम; साहस.

शहामृग पु० एक पक्षी.

शहांयशी [**म०** सहा+ऐंशी] **वि०** ऐंशींत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका

शहारें पु० अ० व० मागें ' शहरा,' ' शहरें ' पहा.

शहाळ स्त्री० जोंधळ्याची एक जात.

शहाळें न० कोंवळा नारळ,–ज्यांतील पाण्याचें अद्यापि टणक खोबरें झालें नाहीं.

शळी स्त्री० १ सळई. २ साळईचें पीस.

शाइदी [**अ०** षाहद्] **पु०** साक्षीदार. **स्त्री०** पुरावा; साक्षी.

शाई [**फा०** सीयाही] **स्त्री०** १ लिहिण्यासाठीं केलेला काळ्या रंगाचा द्रव. २ लिहिण्याच्या उपयोगाचा कोणत्याही रंगाचा द्रव; उ० तांबडी शाई, हिरवी शाई, इ०. ३ मृदंग, तबला, इ० च्या कातड्यास लावतात तो लोखंडाच्या किटाचा काळा थर. ह्या काळ्या बाजूस ' शाईचा पुडा ' किं० ' शाईपुडी ' म्हणतात. ॐ **शाईदान न०, शाईदानी स्त्री०** दौत.

शाई,शाही [**फा**०षह्=राजा] **स्त्री**० टीप,–हा शब्द पुढील सर्व अर्थी दुसऱ्या शब्दापुढें प्रत्ययाप्रमाणें योजला जातो. १ कोणेक राजा किं० अमलदार यांची कारकीर्द किं० याच्या कारकीर्दीचा टापू किं० कालावधि किं० कारकीर्दीची तऱ्हा; उ० शिंदेशाई, होळकरशाई, इ०. २ तऱ्हा; सरणी; उ० सोदेशाई, शिनळशाई, इ०. ३ रचना, मांडणी; उ० बागशाई. ४ देश, प्रांत, इ० तील राज्य किं० शासनपद्धति. **वि**०तऱ्हेचा, पद्धतीचा, काळचा, ठिकाणचा; उ० पुणेशाई म्ह० पुण्याच्या सरणीचा. ❋ **शाईशिरस्ता पु**० एकाद्या ठिकाणची जी जनरीति ती किं० जो वर्तनक्रम तो.

शाऐंशी, शांयशी [**म**० सहा+ऐशी] **वि**० ऐंशीत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

शाक स्त्री० झाडावर पाडास आलेला किं० गजरलेला आंबा.

शाक [**सं**०] **पु**० १ सप्तद्वीपांपैकीं सहावें. २ कालगणना करण्यासाठीं सुरू केलेला शक.

शाक [**सं**०] **स्त्री**० भाजी. ❋ **शाकभाजी स्त्री**० पाल्याची भाजी,–मेथी, आंबाडी, इ०. ह्याच्या व्यावर्तकत्वें ‘ फळभाजी,–भोपळा, फणस, इ०. **शाकपाला पु**० भाजीच्या उपयोगाची झाडें किं० त्यांचीं पानें. **शाकाहार पु**० धान्यें, पानें, फळें, इ० चा आहार. याच्या व्यावर्तकत्वें ‘ मांसाहार.’ **शाकव्रत न**० १ चातुर्मास्यांत भाजी, दहीं, दूध, आणि द्विदल, हे चार पदार्थ अनुक्रमें करून प्रतिमासीं वर्ज करणें ह्या रूपाचें व्रत बायका करतात तें. ‘ शाकाव्रत ’ हें ‘ शाकव्रत ’ चें अपभ्रष्ट रूप. २ आषाढमासीं शाक न खाण्याचें व्रत.

शाकंब (–भ–) री [**सं**० शाकंभरी] **स्त्री**० १ दुर्गा. २ (**मराठींत**) दुर्गादेवीचे प्रीत्यर्थ पौषी पौर्णिमेचे दिवशी अनेक प्रकारच्या शाकांचें भक्षण करण्याचें व्रत.

शाकबेशाक, शकबेशक [**फा**०] **पु**० १ शंकाकुशंका.२ऊहापोह; चर्चा;वाटाघाट; खऱ्याखोट्याचा निर्णय (काढणें, करणें).३ तफावत; फरक.

शाकल [**सं**०] **पु**० १ यज्ञविशेष. २ ऋग्वेदशाखाविशेष. ३ एक ऋषि. ❋ **शाकलद्वीप पु**०, **न**० शाकल ऋषीचें बेट.

शाकार पु० ऊन्ह, पर्जन्य इ० च्या निवारणार्थ घरावर कौलें, झापा, गवत, इ० घालणें ही क्रिया. **शाकारणी स्त्री**० घरावर कौलें, गवत, इ० घालण्याची क्रिया.

शाकारणें स० **क्रि**० १ वारा, पाऊस, ऊन्ह, इ० च्या निवारणासाठीं (घराच्या) माथ्यावर कौलें, झापा, गवत, इ० पसरणें. २ (कौलें, गवत, झापा, इ०) घराच्या माथ्यावर पसरणें (पर्जन्य, ऊन्ह, वारा,इ० च्या निवारणासाठीं).

शाकिनी [**सं**०] **स्त्री**० १ भाजीचा मळा. २ दुर्गादेवीच्या दासींचा एक वर्ग. ३ पिशाची.

शाकुनिक [**सं**०] **पु**० पक्षी मारणारा पारधी. **न**० शकुन सांगण्याची विद्या; शकुन सांगणें. **वि**० १ शकुन सांगण्याची(विद्या,शास्त्र). २ भविष्यसूचक (चिन्ह).

शाक्त [**सं**०] **पु**० शक्ति देवीचा उपासक. **वि**० शक्ति देवीच्या उपासनेचा (विधि, संस्कार, इ०).

शाक्य, शाक्यमुनि, शाक्यसिंह [**सं**०] **पु**० गौतम बुद्ध.

शाख [**सं**०शाक] **स्त्री**०भाजी; भाजीपाला.

शाख स्त्री० पाडास आलेला आंबा.

शाखा [**सं**०] **स्त्री**० १ झाडाची फांदी. २ वेदाचा पोटभाग. ३ पोटभाग (सामान्यतः). ४ पक्ष; तट. ५ वड इ० ची पारंबी. ❋ **शाखाचंक्रमण न**० १ उडत उडत अध्ययन. २ भाषण, अध्ययन, इ० मध्यें एक मुद्दा, एक विषय, इ० सांगोपांग न शिकतां किं०न निरूपितां एकावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्यावर जाणें हा प्रकार: एका विषयाचा शेवट न करितां तो अर्धवट टाकून दुसरा हातीं घेणें, दुसरा अर्धवट टाकून तिसरा घेणें,अशी अध्ययन, भाषण,इ०ची तऱ्हा.**शाखानगर, शाखापुर न**०गांवाची वाडी. **शाखापित्त न**० हात, पाय, इ० ची आग किं० जळजळ. **शाखामृग पु**० वानर. **शाखाशिफा स्त्री**० वड इ० ची पारंबी. **शाखाचंद्रन्याय पु**० स्थूल दाखवून त्याच्या धोरणानें सूक्ष्माचें ज्ञान

करून देणें हा सरणी;चंद्र कोठें आहे हें सांगतांना ' त्या झाडाच्या शाखेवर चंद्र आहे ' असें सांगणें,–जरी त्या शाखेवर चंद्राचें अधिष्ठान नसलें तरी. **शाखापाठी पु०** वेदाची शाखा पठन करणारा. **शाखी [सं० शाखिन्]** १ वृक्ष. २ वेद. ३ वेदाच्या विशिष्ट शाखेचा अनुयायी; उ० शाकलशाखी इ०.

शाखोट [म० साख] वि० १ विश्वासू; पतीचा (माणूस). २ भरंवशास पात्र, खरी, विश्वसनीय (हकीगत, इतिहास).

शागिर्त, शागिर्द, शार्गीर्द [फा० शागिर्द्] पु० १ शिष्य; विद्यार्थी. २ गायन, वादन, नृत्य, इ० कला वस्तादजीजवळ शिकणारा. ३ देवपूजेची तयारी करणें, पाणी भरणें, भोजनाची पानें मांडणें, यजमानाचीं धोतरें धुणें, इ० कामें करणारा श्रीमंताच्या घरांतील नोकर. ४ श्रीमंत माणसानें फुकट जेवूं घालून बाळगलेला विद्यार्थी. **टीप,**–शाग्रींत, शागिर्त, इ० अपभ्रष्ट रूपें होत. ॐ **शागिर्दपेशा पु०** १ शागिर्द;–सर्व अर्थी. २ श्रीमंताच्या नोकरवर्गापैकीं कोणीही. **शागिर्दी स्त्री०** शागीर्दाचा धंदा, स्थिति, दर्जा, इ०.

शाट, शाटणें, शाटाशाट मागें ' छाट, ' ' छाटणें, ' ' छाटाछाट ' पहा.

शाट न०, शाटी स्त्री० [सं०] १ नेसण्याचें किं० पांधरण्याचें वस्त्र. २ (विशेषत:) संन्याशाचें नेसण्याचें किं० पांधरण्याचें वस्त्र. ह्या अर्थी ' छाटी ' असाही शब्द आहे.

शाठ्य [सं०] न० १ फसविणें. २ लुच्चेगिरी किं० लुच्चेगिरीचें कांहीं कृत्य. ॐ **शठंप्रति शाठ्यं [सं०] न०** लबाडांशीं लबाडी करणें हा वर्तनक्रम.

शाडवळ [सं०शाद्वल] पुढें ' शाद्वल ' पहा.

शांडिल्य [सं०] पु० १ अग्निविशेष. २ ऋषिविशेष. ३ रत्नागिरी प्रांतांतील ब्राह्मणांची एक जात.

शाडू स्त्री०,पु० एक प्रकारची पांढरी माती. ॐ **शाडवट वि०** शाडू जींत फार अशी (जमीन).

शाडूळ [सं० शाद्वल] वि० रानवट चालीचा; गांवढळ; असभ्य.

शाण [स०] वि० तागाचें बनविलेलें (वस्त्र, दोरी, इ०). **पु०** १ कसोटीचा धोंडा. शस्त्राला धार द्यावयाचा धोंडा; निसणा. ३ पाटा. ४ सहाण. ४ चार मासे हें वजन. **न०** तागाचें वस्त्र. ॐ **शाणाजीव पु०** हत्यारांना धार देण्याचा धंदा करणारा; शिकलगार.

शाण्णव [म० सहा+नव्वद] वि० नव्वदांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

शात [सं०] वि० १ धार लाविलेले. २ तीक्ष्ण.

शांत [सं०] वि० १ शमलेला; मूळच्या प्रकृतीवर परत आलेला (माणूस, पशु). २ विझलेला; मालवलेला (दिवा, अग्नि). ३ दूर सरलेला, थांबलेला (विरोध, हरकत, विघ्न, वाऱ्याचा सोसाटा). ४ मृत; मेलेला. ५ चलनवलनरहित; निष्क्रिय; निश्चेष्ट. ६ माणसाळलेलें (जनावर). ७ जेथें गडबड, कलकलाट, किं०गोंगाट नाहीं असें (स्थळ). ८ विकाररहित; शमयुक्त. **पु०** १ जितेन्द्रिय; यति. २ (**साहित्य**) एक रस. ॐ **शांतं पापं** उ० **वा० अ०** ईडापीडा टळो ! अनर्थ दूर सरो ! **शांतदांत वि०** शांत; सौम्य.

शातकुंभ [सं०] न० सोनें हा धातु.

शांतवन ' सांत्वन ' चा अपभ्रंश.

शांतविणें [म०] स० क्रि० शांत करणें.

शांति [सं०] स्त्री० १ चित्ताची स्वस्थता; चित्ताची निर्विकार स्थिति. २ काम, क्रोध, चिंता, इ० मनांत क्षोभ करणाऱ्या गोष्टींचा अभाव किं०इ०गोष्टींचें निरसन. ३ विकारशून्यता. ४ वैराचें प्रशमन. ५ विघ्न निवारणारें कोणतेंही धार्मिक किं० रूढीचें कृत्य; होम, जप, दान, इ०. ६ नवीन बांधलेलें घर सुखावह व्हावें म्हणून करतात तें कृत्य; वास्तुशांति. ७ आजाराचा जोर कमी होणें किं० आजाराला उतार पडणें किं० आजार अजीबात शमणें. ८ भूत, पिशाच, देवी, पटकी, इ० च्या निराकरणार्थ दिलेला बळी, इ०. ९ मरण. ॐ **शांतिक न०** अरिष्टाचें निवारण करावयासाठीं केलेलें कोणतेंही कर्म. **वि०** शमविणारें, आराम वाटविणारें औषध, खाद्य, खेळ, इ०; सौम्य इलाज, उपदेश, संभाषण इ०. **शांतिकपौष्टिक, शांतिकपुष्टिक न०** अरिष्ट निवारण किं० इष्टप्राप्ति यासाठीं जीं धर्मकृत्यें

केला जातात तो प्रत्येक. **शांतिपाठ पु०** १ प्रसूत स्त्रीला आणि तिच्या अर्भकाला भूतपिशाचांचा उपद्रव न व्हावा म्हणून म्हणतात, ते मंत्र. २ अडचणी किं० विघ्नें यांचें निवारण करण्याचें चातुर्य. ३ (विपरीत लक्षणेनें) कोणेकावर एकसारखें चरफडणें. **शांतिब्रह्म न०** १ शांत, गरीब, साधुवृत्तीचा मनुष्य. २ वरून शांतवृत्ति दाखवून अंतःकरणांत वैराचें विचार चालविणारा. **शांतिरस पु०** (**साहित्य**) नवरसांपैकीं एक; शांत रस. मागें ' रस ' पहा.

शाद स्त्री०, न० शेवाळ.

शाद [**फा०**] **वि०** आनंदित; खूष. ꙮ **शादमानी स्त्री०** १ आनंद. २ खुशालीची खबर; कुशल वृत्त.

शादियानें, शहाजणें [**फा०** शादयानाह] **न०** मंगलवाद्यांचा ताफा (वाजविणें).

शादी [**फा०**] **स्त्री०** (मुसलमानांत) लग्न, विवाह.

शादूल [**सं०** शाद्वल] **न०** कोंवळें गवत.

शाद्वल [**सं०**] **वि०** गवतानें व्यापिलेला (प्रदेश). **पु०** कुरण; गवताळ जमीन.

शान [**अ०** शान्] **स्त्री०** प्रतिष्ठा; डौल. ꙮ **शानशौकत स्त्री०, शानशोक पु०** प्रतिष्ठा; थोरवी; डामडौल; भपका. **शानगुमान पु०** डौल; ताठा; नक्षा. ꙮ **कोणेकाची शानगुमान नाहीशी करणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याला जिरविणें; त्याची फजीती करणें.

शानदार, शानदारी मागें ' छान, '' छानदारी ' पहा. ꙮ **शानशुकी, शानशोकी स्त्री०** छाकटेगिरी; नखरेबाजी; ऐट; तोरा. **वि०** झोकदार किं० अक्कडबाज (पुरुष किं० स्त्री).

शानिशा मागें 'शह'मध्यें 'शहानिशा' पहा.

शान,शाने,शांनी क्रि०वि०'ऊन' प्रत्ययान्त धातूपुढें केवळ जोर देण्यासाठीं हा शब्द अशिक्षित योजतात; उ० करून शान म्ह० करून.

शाप [**सं०**] **पु०** कोणेकाचें अनिष्ट होओ असा अथाच उच्चारलेलें वाक्य (देणें, जडणें, लागू होणें). ꙮ **शापगुण पु०** शाप; शापाचा परिणाम किं० प्रभाव; उ० वाघुळांनीं उलटें टांगून घ्यावें असा त्यांस शापगुण आहे. **शापादपि शरादपि क्रि० वि०** शापापासून आणि शरापासून; शापानें आणि शरानें; शाप देऊन आणि बाण मारून. हा मूळचा अर्थ **क्रि० वि०** आहे. हल्लीं ' शापादपि शरादपि ' ह्याचा अर्थ ' सर्व प्रकारें बलिष्ट किं० समर्थ ' असा घेण्यांत येतो; उ० त्रिविक्रमपंत आजकाल शापादपि शरादपि असा आहे.

शापित [**सं०**] **वि०** १ ज्याला शाप झाला असा. २ (कवितेंत) ज्याच्या कडून कांहीं प्रतिज्ञा करविण्यांत आली आहे असा.

शाबर [**सं०**] **वि०** १ रानटी. २ नीच. ३ पापी. ४ शबरस्वामिकृत. ५ शबर जाती संबंधाचें. ह्या अर्थी ' शाबरी ' सुद्धां. **न०** नजरबंदीची विद्या; गौडबंगाल.

शांबरी [**सं०**] **स्त्री०** १ इंद्रजाल; गारुड; गौडबंगाल. २ इंद्रजाल विद्येंत प्रवीण स्त्री.

शाबान [**अ०** षअबान्] **पु०** अरबी वर्षाचा आठवा महिना.

शाबास [**फा०** षाबाष्] **उ० वा० अ०** ठीक, उत्तम ! भले खाशी! वेष ! ꙮ **शाबासी, शाबासकी स्त्री०** स्तुति; प्रशंसा (देणें).

शाबीत [**अ०**'साबित] **वि०** सिद्ध करण्यांत आलेलें. खालीं ' शाबूत ' पहा.

शाबुडी स्त्री० साबणी ह्या नांवाचें मुलांचें एक खाद्य.

शाबूत(–द) [अ०साबूत, साबित]**वि०अभग्न:** न फुटलेलें; न मोडलेलें; न तुटलेलें. ' शाबीत ' आणि ' शाबूत ', हे दोन्ही शब्द एकाच अरबी शब्दापासून आलेले असून त्यांना आपण दोन अर्थ दिलें आहेत. शाबूत म्ह० धड म्ह० न फुटलेला. शाबीत म्ह० पुराव्यानें सिद्ध केलेला किं० सिद्ध झालेला; प्रस्थापित. हा भेद विद्यार्थ्यांनीं लक्ष्यांत ठेवावा. ꙮ **शाबिती स्त्री०** सिद्धता; प्रस्थापन. **शाबुती स्त्री०** सुरक्षितपणा; अभग्नपणा; धडपणा.

शाब्द, शाब्दिक [**सं०**] **वि०** १ तोंडी; केवळ तोंडातोंडीं झालेला; लेखी नव्हे असा. २ शब्दरूप; शब्दमय. ३ वरवरचा; अंतःकरणापासून नसलेला. ३ शब्दासंबंधाचा. ५ वस्तुतः एकच पण भिन्न शब्दांनीं दर्शविलेला किं०

सांगितलेंज्ञ; दिसण्यांतच वेगळा असा. पु० वैयाकरण; व्याकरणकार. ☸ शाब्दिक (किं०शाब्द) सृष्टि स्त्री० गद्यकृति किं० पद्यकृति (काव्य, नाटक, इ०).

शांभव [सं०] वि० शंकरासंबंधाचें. पु० शैव; शिवोपासक. **शांभवी** स्त्री० १ गंगा. २ पार्वती. ३ नील दूर्वा. ४ भांग,–अमली वनस्पतिविशेष.

शाम [सं०] पु० स्याम देश.

शाम, शामल इ० पुढें 'श्याम,' 'श्यामल' इ० पहा.

शामक [सं०] वि० शमविणारें, कमजोर करणारें (औषध, खाद्य, उपचार, इ०); उ० पित्तशामक.

शामत मागें 'शहामत' पहा.

शामदान [फा० षम्अदान्] न० मेणबत्ती बसवावयाची रचना; मेणबत्तीची ठाणवई.

शामाटें [म० शम] न० थातुरमातुर; कामचलाऊ किं० तात्पुरती मांडणी किं० व्यवस्था; कशीतरी करून टाकलेली तोडजोड.

शामाट्या वि० १ मूर्ख; अडाणी. २ आडमुठ्या.

शामाणा (–ना) [फा० शामीयानाह्] पु० तंबूपुढें उभारलेलें वस्त्र; छत.

शामील, सामील [अ० शामिल्] वि० समाविष्ट; अंतर्भूत.

शायदी, शाहिदी [फा०] स्त्री० पुरावा; साक्षी. ☸ **शायदीदार, शाहिदीदार, शाहीद** पु० साक्षीदार; पुरावा सांगणारा किं० देणारा.

शायी [सं० शायिन्] वि० निजणारा. उपपद तत्पुरुष समासांत अंत्यपदीं ह्याचा उपयोग होतो; उ० शेषशायी म्ह० शेषावर निजणारा म्ह० विष्णु. जलशायी, भूशायी, सुखशायी, इ०.

शारंग खालीं 'शार्ङ्ग' पहा.

शारंग, शारंगी पुढें 'सारंग,' 'सारंगी' पहा.

शारंगी, सारंगी [सं० शार्ङ्ग] स्त्री० एक तंतुवाद्य.

शारद [सं०] वि० १ शरदृतूसंबंधाचें; शरदृतूंत करावयाचें किं० व्हावयाचें. २ वार्षिक. पु० १ वर्ष. २ आश्विनमास. **शारदा** स्त्री० वागिन्द्रियाची अधिष्ठात्री देवता; सरस्वती. **शारदी** स्त्री० कोजागरी. **शारदाया** स्त्री० शरदृतूंतील दुर्गापूजा. **शारदिक** न० शरदृतूंतील श्राद्ध. पु० १ शरत्काळचा रोग. २ शरत्काळचें ऊन्ह. ☸ **शारद** (किं० **शारदीय**) **नवरात्र** न० आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नवमीपर्यंत जें नवरात्र तें.

शारि [सं०] पु० सोंगटी. स्त्री० मैना हा पक्षी. ☸ **शारिपट्ट** पु०, **शारिफल, शारिफलक** न० सोंगट्यांचा पट.

शारिका [सं०] स्त्री० १ मैना. २ तंतुवाद्य वाजविण्याची धनुकली. ३ द्यूत.

शारी स्त्री० सुताराचा सामता,–भोंक पाडण्याचें एक साधन.

शारीर [सं०] वि० १ शरीरासंबंधाचें. २ मूर्तिमंत. पु० जीवात्मा. न० १ शरीराच्या रचनेचें शास्त्र. २ विष्ठा.

शारीरक [सं०] वि० शरीरासंबंधाचें. न० १ आत्म्याच्या स्वरूपाचा विचार. २ ब्रह्मसूत्रभाष्य.

शारीर, शारीरक न० गातांना घेतात तो कंप किं० तो कंप घेण्याचें कौशल्य किं० तऱ्हा.

शारीरिक [सं०] वि० शरीरासंबंधाचें. ह्याच्या व्यावर्तकत्वें 'मानसिक,' 'आध्यात्मिक.'

शारे पु० अ० व० मागें 'शहारे' पहा.

शार्ङ्ग [सं०] वि० शिंगाचें बनविलेलें; शिंगासंबंधाचें. पु०, न० १ धनुष्य. २ विष्णूचें धनुष्य. ☸ **शार्ङ्गी** [सं० शार्ङ्गिन्] पु० १ तिरंदाज. २ विष्णु.

शार्दूल [सं०] पु० १ वाघ. २ चित्ता. ३ श्रेष्ठ; उ० नरशार्दूल, वीरशार्दूल, इ०.

शाल [फा० षाल्] स्त्री० लोकरीचें वस्त्रविशेष. ☸ **शालजोडी** स्त्री० शालीच्या दोन फर्दांची जोडी. **शालनामा** पु० बुटीदार शाल.

शाल [सं०] पु० १ एक वृक्ष. २ कुंपण; तट. ☸ **शालग्राम** पु० विष्णुमूर्तिविशेष; शालिग्राम. **शालनिर्यास** पु० राळ.

शालक पुढें 'श्यालक' पहा.

शालपर्णी स्त्री० सालवण वृक्ष.

शालभंजी, शालभंजिका[सं०] स्त्री० मुलींची खेळावयाची बाहुली.

शाला, शाळा [सं० शाला] स्त्री० १ स्थान;

गोठा; पागा; उ० अश्वशाला म्ह० घोड्यांचा तबेला; गोशाला म्ह० गोठा. २ घराचा भाग; खोली; उ० होमशाला इ०. ३ सभागृह. ४ वृक्षाची मुख्य खांदी. ५ स्वयंपाक, वस्त्रें विणणें, नृत्य, गायन, व्यायाम, सुतारकी, लोहारकी,इ० जीं हरएक प्रकारचीं कामें त्यांच्या सोयींचीं गृहें किं०जागा प्रत्येक. ६विद्यार्थ्यांना पैसे घेऊन किं० फुकट जेथें शास्त्र, वाङ्मय, गणित, ज्योतिष, वैद्यक,वगैरे विषयांचें शिक्षण दिलें जातें ती संस्था. ७विशिष्ट कुटुंब,संस्था,मंडळी,इ०मध्यें राहिल्यानें जी वर्तनसरणी कोणेकाला लागते ती. ८ एक विशिष्ट पंथ,संप्रदाय,मत,आचार,इ०, किं०त्यांची संस्था. ॐ **शालाशुद्ध,साळसूद,शाळसूद** वि०१ सभ्य चालीरीतींचा. २ साधा; ज्याला छक्केपंजे ठाऊक नाहींत असा; प्रामाणिक. ३ शास्त्राला धरून असलेलें (गायन, वादन). **शालाबंधु** पु०त्याच किं० एकाच शाळेंतील विद्यार्थी परस्परांचे. **शाळेंतील (किं० शाळेचें) शिंगरूं(किं० लेकरूं)** न० बदमाष बापाचा बदमाष पोरगा.

शालि [सं०] स्त्री० साळ; भात.ॐ**शालिहोत्र** पु० घोडा. **शाल्योदन** न० साळीच्या तांदुळाचा शिजवून केलेला भात.

शालिग्राम, शाळिग्राम [सं० शाल (एक नदी)+ग्रावन् (धोंडा)] पु० १ गंडकी नदींतील काळा धोंडा,-ज्याची विष्णु म्हणून पूजा करतात. २(विनोदांत) कांदा.

शालिवाहन [सं०] पु० एक मोठा शककर्ता. ह्याचा शक खिरस्ती शकामागून ७८ वर्षांनीं सुरू झाला; उ० हा कोश शालिवाहन शके १८४९मध्यें सुरू झाला तो शालिवाहन शके १८५२मध्यें समाप्त होईल.

शाली [सं० शालिन्=शोभणारा] वि० (उपपद समासांत उत्तरपदीं)शोभणारा;उ०विनयशाली, धैर्यशाली,इ०.**शालिनी** स्त्री० सुगृहिणी.

शालीन [सं०] वि० १ लाजरा. २ विनयशील; सभ्य चालीरीतींचा; नम्र.

शालू [हिं० सालू] पु० १ बायकांचें नेसण्याचें एक उंची वस्त्र. २ बैलाच्या मानेवर शोभेसाठीं लोंबत सोडतात तें वस्त्रविशेष.

शाल्मल पु०, **शाल्मली** स्त्री० [सं०] सांवरी हा वृक्ष.

शाव [सं०]पु०मूल;पिलूं;छावा. वि० प्रेतासंबंधी.ॐ**शावाशौच** न०१सुतकाचा विटाळ;सुतक. २ प्रेत वाहून नेल्यानें होतो तो विटाळ.

शावक [सं०] पु० छावा; पिलूं.

शाश्वत, शाश्वतिक [सं०] वि० कायमचें; टिकाऊ; क्षणभंगुर नव्हे तें. न० १ स्वर्ग. २ शाश्वत तत्त्व. ॐ **शाश्वती** स्त्री० १ टिकाऊपणा. २ भरंवसास पात्रता; खात्री.

शासक [सं०] वि० १अमल चालविणारा; नियंत्रणा लावणारा; नियमन करणारा. २ शिक्षा करणारा.

शासणें [सं० शास्] स० क्रि०१नियंत्रिणें; (कोणेकावर) अमल, हुकमत, किं० ताबा चालविणें किं० करणें. २ दण्डिणें;०चें पारिपत्य करणें.

शासन [सं०] न० १ शिकविणें. २अमल; ताबा;राज्य.३हुकूम;नियम; नियंत्रणा.४निवाडा. ५इनामपत्र. ६ करारपत्र. ७ शास्त्र.८दंड; शिक्षा; पारिपत्य. ॐ **शासनपट्ट** न० आज्ञापत्र; सनद.

शासनहर, शासनहारिन् पु० दूत; जासूद.

शासिता [सं० शासितृ] पु० १ राज्य करणारा; अमल चालविणारा. २ शिक्षा करणारा; नियंत्रणा घालून देणारा.

शास्ता [सं० शास्तृ] पु० १ राजा. २बाप. ३ गुरु. ४ गौतम बुद्ध.

शास्त्र [सं०] न० १ आज्ञा; हुकूम. २ धर्मनियम; धर्मग्रंथ. ३ ज्ञान. ४ विद्येची शाखा. ५ विशिष्ट सरणीनें एकाद्या विशिष्ट विषयाचा ऊहापोह किं०चर्चा; उ० वेदान्तशास्त्र, व्याकरणशास्त्र. ॐ **शास्त्रास असणें**, किं० **शास्त्रापुरता असणें**, किं० **शास्त्राचा असणें** आहे म्हणण्या पुरताच असणें; अगदीं थोड्या प्रमाणांत किं०थोड्या अंशानें असणें;उ०ह्या पंचपाळ्यांत शास्त्रापुरती हळद आहे. **शास्त्रास नसणें** शास्त्राची आज्ञा भागविण्याइतकाही नसणें;अगदीं थोडा देखील नसणें;उ०माझ्या घरांत शास्त्रास चिमूटभर सुद्धां साखर नाहीं,मग शेरभर कोठून देऊं ? **हा चाकू शास्त्राला चाकू आहे** ह्याला चाकू म्हणतां येईल हें खरें,पण चाकूचें काम ह्यानें होणार नाहीं असा आहे म्ह० ह्याला

धार मुळींच नाहीं. **शास्त्री** [**सं०** शास्त्रिन्] **पु०** शास्त्र जाणणारा; धर्म, व्याकरण, वेदान्त, किं० अन्य कांहीं शास्त्र जाणणारा. **शास्त्रार्थ पु०** १ संदिग्ध स्थितींत काढलेला मार्ग. २ अमुक करावें किं० अमुक करूं नये ह्या संबंधानें निर्णायक जें कांहीं ठरविण्यांत येतें तें. **कोणेक गोष्टीचा शास्त्रार्थ करणें** ती गोष्ट यथाकथंचित् केलीशी करणें; ती थोडक्याच प्रमाणांत करणें; ती नांवाला करणें; केली असें म्हणावयाला जितकें थोडें चालेल तितकेंच करणें. **शास्त्रार्थ करणें** कांहीं गोष्ट उगाच नांवालाच करणें. **शास्त्रतः क्रि० वि०** १ शास्त्राप्रमाणें; शास्त्राच्या अनुरोधानें. २ वस्तुतः; खरोखरी. **शास्त्रीय वि०** शास्त्राला अनुसरून असलेलें; शास्त्राला संमत किं० ग्राह्य होईल असें; शास्त्राच्या परिभाषेला किं० पद्धतीला धरून असलेलें.

शास्य [**सं०**] **वि०** १ आटोक्यांत ठेवतां येईल असा; नियंत्रणेंत ठेवावयास पाहिजे असा. २ दंडास पात्र. ३ ज्याचें शासन केलें पाहिजे असा.

शाह, शाहंगी, शाहजादा, इ० मागें 'शहा,' 'शहांगी,' 'शहाजादा,' इ० पहा.

शाहिदी [**फा०**] **स्त्री०** साक्ष; पुरावा. **शाहिदी, शाहिदीदार, शाहिद पु०** साक्षीदार.

शाहिरी वि० शाहिरासंबंधाचा. **स्त्री०** कवित्व. खालीं 'शाहिर' पहा.

शाहिरूखर्च पु० सरकारी जमाखर्चाचें खातें.

शाहीर [**फा०** शाइर्] **पु०** १ कवि. २ (**मराठींत**) समाजांत मोठ्यानें म्हणावयासाठीं लावण्या, पोवाडे, पदें, इ० रचणारा किं० स्वतां रचून स्वतां म्हणणारा किं० लोकांनीं रचलेलीं म्हणणारा. **॥ शाहिरी स्त्री०** शाहिराचा धंदा. **वि०** शाहिराचा धंदा, वेष, इ०च्या संबंधाचा.

शाळ मागें 'शाला, शाळा' पहा.

शाळक, शालक [**सं०** श्यालक] **पु०** बायकोचा भाऊ.

शाळंकृत पुढें 'सालंकृत' पहा.

शाळसूद मागें 'शाला' मध्यें पहा.

शाळा मागें 'शाला' पहा.

शाळुंका (-खा) **स्त्री०** महादेवाचें लिंग बसविण्यासाठीं पाषाणादिकांची योन्याकार करतात ती बैठक.

शाळुंकी, शाळुंखी स्त्री० एक पक्षी; साळुंकी.

शाळू पु० जोंधळ्याची एक जात. ह्या जातीचा जोंधळा हिवाळ्यांत पिकतो आणि हिंवाळ्याचे दिवस लहान असल्याकारणानें 'शाळू' ह्याचा अर्थ अल्प मुदतीचा किं० थोडा वेळ टिकणारा असा विशेषणात्मक होऊन कांहीं शब्दामागें 'शाळू' शब्द योजला जातो. शाळूसोबती म्ह० थोड्याच अवधिपुरता आपल्या जवळ किं० आपल्या सहवासांत राहाणारा. शाळूसोबत म्ह० थोड्या वेळाची मैत्री. शाळू दिवस म्ह० आखूड किं० लहान दिवस. ह्याच सरणीनें शाळू संपत्ति, शाळू आयुष्य, इ० चे अर्थ जाणावे. **शाळूगवत न०** १ एक नाजूक जातीचें गवत. २ पावसाळ्याच्या कांहीं महिन्यांतच उगवून लवकरच संपणारें गवत.

शाळें न० अगदीं कोंवळा नारळ; शहाळें.

शाळोत्री [**सं०** शालिहोत्र=घोडा] **पु०** घोड्याचा वैद्य.

शिऊळ, शिवळ स्त्री० १ जोकडाला बैल इ० ची मान अडकावण्यासाठीं जोकडाच्या कडेस भोकें पाडून त्यांत ज्या खुंट्या घालतात त्या प्रत्येक. २ ओठ दाबून तोंडानें वाजवितात ती शीळ.

शिंक [**सं०** छिक्का, छिक्कण] **स्त्री०** नाकांतून जोरानें सशब्द वायु निःसरतो तो.

शिककई, शिकेकायी [**कानडी**] **स्त्री०** एक झाड. याच्या शेंगा कढवून त्या काढ्यानें डोईचे केश धुऊन स्वच्छ करतात.

शिकंजी [**फा०** शिकंज्बीन्] **स्त्री०** गुलाबाच्या वासाचें सरबत.

शिकणाऊ, शिकाऊ [**म०** शिकणें] **वि०** १ गुरुजी किं० वस्तादजी यांचेपासून शिकून घेतलेली किं० घ्यावयाची (कला, विद्या, ज्ञान, इ०). २ कांहीं कला, विद्या, इ० जो शिकत आहे तो.

शिंकणी [**म०** शिंकणें] **स्त्री०** १ एक झाड. याच्या पानांचें चूर्ण नाकानें ओढलें असतां अनेक शिंका येतात. २ शिंकणें ही क्रिया.

शिंकणें [**सं०** छिक्का, छिक्कन] **अ० क्रि०**

आंत वायूचा अनावर क्षोभ झाल्यामुळें नाकावाटें जोरानें वायु बाहेर सोडणें. ꙮ **माशी शिंकणें** हरकत येणें; अडथळा होणें. थट्टेंत किं० उपहासांत ह्या वाक्प्रचाराचा उपयोग केला जातो; उ०तूं भाजी आणावयाला जाऊन आणली नाहींस, वाटेंत माशी शिंकली कीं काय ?

शिकंदर [अ० सिकंदर्] **पु०** १ म्यासिडोनियाचा एक मोठा पराक्रमी राजा. २ (**लाक्षणिक**) गांवचा पुंड; वात्रट किं० द्वाड माणूस. ꙮ **शिकंदर नशीब न०** मोठ्या संकटांतून निभावून किं० बचावून नेणारें कोणेकाचें दैव. **शिकंदराची दिवाल स्त्री०** चिरस्थायी वस्तु. याजूज आणि माजूज नांवांच्या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिकंदर बादशहानें एक अत्यन्त भक्कम आणि बेलाग अशी भिंत (दिवाल) बांधली अशी दन्तकथा आहे. यावरून वरील ' चिरस्थायी वस्तु ' असा लाक्षणिक अर्थ झाला आहे; उ० तुझें साम्राज्य तूं शिकंदराची दिवाल समजतोस काय ? छिः ! तूं मूर्ख आहेस ! तुझ्या सद्दीचा जोर संपला म्हणजे तें साम्राज्य वावटळींत भुसासारखें उधळलें जाईल ! **शिकंदर ताले पु० अ० व०**१ शिकंदर बादशहाप्रमाणें उच्चीचे ग्रह. २समृद्धीचे नानाविध प्रकार. मागें ' ताल ' पहा.

शिकरण [**सं०** शिखरिणी] **स्त्री०** १ पिकलेलीं केळीं कुसकरून त्यांत दूध, साखर, इ० घालून भाकरी, पोळी, इ० बरोबर खावयाला करतात तें पातळ खाद्य. २ खरबूज इ० चें असेंच करतात तें पातळ खाद्य.

शिकरणी [**सं०** शिक्य]**स्त्री०** उंचावर पदार्थ ठेवण्यासाठीं टांगतां येण्याजोगी दोऱ्यांची रचना करतात ती.

शिंकरणें [**म०** शिंक] **स० क्रि०** नाकपुड्या कांहीं विशेष प्रकारें बोटांनीं दाबून नाकावाटें जोरानें वायु बाहेर सोडण्याच्या क्रियेनें (शेंबूड इ०) बाहेर काढून लावणें. ' नाक ' ह्यावरही कर्मता येऊं शकते;उ०त्यानें नाक शिंकरलें.

शिकरा [**फा०** षिकराह्]**पु०** बहिरीससाणा.

शिकरी स्त्री०पाणरहाटाच्या माळेला लोटे बांधावयाचे जे दोरीचे लहान लहान तुकडे ते प्रत्येक.

शिकल [अ० सैकल] **स्त्री०** १ चकाकी; झिलई. २ हत्याराला दिलेली धार. ३ कोणेकाची आबरू किं० प्रतिष्ठा किं० मान (गमावणें, उडविणें, उतरणें). ꙮ **शिकलगार, शिकलकर पु०** हत्यारांना धार देणारा कारागीर.

शिकवण, शिकवणी [**म०** शिकविणें] **स्त्री०** १ शिकविण्याची तऱ्हा. २ कोणेकानें कोणेकाला केलेला बोध किं० लावून दिलेली वर्तनाची सरणी. ३ लहान मुलांना शिकविणें किं० शिकविण्याचा क्रम; उ० शाळेंतील काम संभाळून मी दररोज पांच शिकवण्या करीत असें.

शिकविणें [**म०** ' शिकणें ' चें प्रयोजक] **स०क्रि०**१(कोणेकाला)कांहीं विषय समजावून देणें किं० (त्याला) त्या विषयाचें ज्ञान करून देणें किं० (त्याला) तो विषय उलगडून सांगणें. **टीप**,–विषयावरही कर्मता येऊं शकते; उ० मी त्या जहागिरदाराचीं तीन मुलें शिकवितों; उ० मी नूतन मराठी विद्यालयांत साडे सहा वर्षें फ्रेंच शिकविलें. २ (कोणेकाला) कांहीं बदकर्माची दीक्षा देणें किं०त्याला कांहीं व्यसन लावून देणें.

शिकस्त [अ० षिकस्त] **स्त्री०** १ पराकाष्ठा.२ पराकाष्ठेची खटपट किं०प्रयत्न;उ०मी नोकरीसाठीं शिकस्त केली पण मला नोकरी मिळाली नाहीं.

शिकस्त [**फा०** षिकिस्ताह्=मोडलेला]**स्त्री०** मोड; पराभव (होणें, देणें). **वि०** १ मोडलेला; फुटलेला; भग्न. २ पराभूत.

शिका पुढें ' शिक्का ' पहा.

शिकाऊ मागें ' शिकणाऊ ' पहा.

शिकार [**फा०** षिकार्] **स्त्री०** १ मृगया; पारध. २ अकल्पित असा कांहीं लाभ. ३ ज्यावर आपला मुळींच हक्क नाहीं असा प्राप्त झालेला कांहीं फायदा किं० पदार्थ. ꙮ **शिकारखाना पु०** १ जेथें शिकार करावयासाठीं जनावरें ठेविलेलीं असतात अशी जागा.२ शिकारींत जरूर अशा हत्यारांची जागा. **शिकारी वि०** शिकार करण्याच्या वेळीं ज्याचा उपयोग होतो असा (कुत्रा,घोडा,बंदूक,भाला,इ०).**शिकारबाज पु०**१ शिकार करणारा; शिकार करण्याचें व्यसन किं० नाद ज्याला आहे असा. २ शिकार करण्यांत पटाईत माणूस.

शिंकारणी, शिंकरणी [**म०** शिंकें; **सं०** शिक्य] **स्त्री०** तीन किं० चार दोऱ्यांवर लोंबत सोडलेला आधार,–टोपली, परडें, इ०.

शिंकारणें [**म०** शिंकें] **स० क्रि०** शिंक्यांत (टोपली, भांडें, इ०)घालणें किं० ठेवणें.

शिकारोखा खालीं ' शिक्का ' मध्यें पहा.

शिंकाळणें [**म०** शिंके] **स० क्रि०** (भांडें इ०) सोयीनें हातांत घेऊन चालतां यावें म्हणून त्याच्या गळ्याला किं० कांठाला दोरीच्या दोन किं० तीन पदरांचें लोंबतें वेष्टन करणें. अशा रीतीनें लोंबतें सोडावयाचें जें भांडें त्याला 'शिंकाळणें ' **न०** असा शब्द आहे.

शिंकाळी, शिकाळी [**म०** शिंकें] **स्त्री०** चालत जातांना भांडें सोयीनें लोंबत नेतां यावें म्हणून त्याच्या गळ्याला दोरीच्या दोन किं० तीन सरांचें जें बंधन आडकावितात तें.

शिकी स्त्री० गलवताचें शीड गुंडाळून काठीस बांधावयाच्या उपयोगी शिडास संबद्ध केलेले असतात जे दोरीचे तुकडे ते प्रत्येक.

शिकील, शिकीलगार मागें ' शिकल, ' ' शिकलगार 'पहा.

शिंकें, शिकें [**सं०** शिक्य] **न०** उंचावर पदार्थ सुरक्षित ठेवतां यावा म्हणून खुंटी, तुळई, इ० वरून लोंबता दोरीचा जो आधार केलेला असतो तो.

शिकेकाई, शिकिकाई, शिकिकई, शिकिकै मागें ' शिककई ' पहा.

शिकेकटार इ० खालीं ' शिक्का ' मध्यें पहा.

शिकोरा पु० चुलीवर कांहीं पदार्थ शिजावयाला ठेविलेल्या भांड्यावर झाकण ठेवावयाचें मृत्तिकापात्र किं० परळ.

शिकोरी स्त्री० ज्यांत तेल आणि वात घालून प्रकाशासाठीं ती वात पेटवावयाची तें मातीचें पसरट पात्र; पणती.

शिक्कल, शिक्कलगार मागें ' शिकल, ' ' शिकलगार ' पहा.

शिक्का, सिक्का [**अ०** सिकाह्] **पु०** १ नाण्यावर आकृतिविशेष उमटविण्याचा ठसा. २ राजाच्या सहीचा किं० पसंतीचा कागद, सनद, दस्तऐवज, इ० वर शाई इ० नीं उमटविलेला ठसा. ३ छाप,–सामान्यतः. ४ कोणत्याही पदार्थावर कोणत्याही प्रकारची केलेली निशाणी किं० खूण. ५ देवी यावयासाठीं शरीरावर जो व्रण करून घेतात तो. ६ वैष्णव लोक शरीरावर घेतात ती तप्तमुद्रा किं० तिचें त्वचेवर उमटलेलें चिन्ह. ७ पोशेर नांवाच्या कमलाचा बीजकोश. ꣺ **शिक्केकट्यार, शिकेकट्यार स्त्री०** १ मुद्रा, कट्यार, छत्र, इ० राजचिन्हें उमटविण्याचा ठसा किं० ह्या ठशानें उमटविलेली आकृति; अधिकाराचीं चिन्हें. २ स्मशानांत जाळावयाला प्रेत तिरडीवर घालून नेतांना ज्या तिकट्यावर अग्नीचें मडकें ठेवून नेतात तें तिकटें. **शिक्केनीस पु०** पत्रें, सनदा, इ० वर राजाचा शिक्का ठोकणारा कारकून. **शिक्केबरदार पु०** राजाचे हरएक कामाचे शिक्के ज्याच्या स्वाधीन असतात तो अधिकारी. **शिक्केशाई स्त्री०** शिक्क्यासाठीं जी शाई वापरतात ती. **शिकारोखा पु०** हुकमत, शिरजोरपणा, वर्चस्व (मिरविणें, चालविणें, इ० [लोखंड.

शिक्केशाई लोखंड न० एक प्रकारचें उंची

शिक्थ [**सं०** शिक्थ, सिक्थ] **न०** मेण,–मधमाशांच्या पोवळ्याचें.

शिखंड, शिखंडक [**सं०**] **पु०** १ डोक्यावरील झुलूप. २ डोक्यावरील शेंडी. ३ मोराचें पीस. ४ शोभेसाठीं करतात तो तुरा. ꣺ **शिखंडी** [**सं०** शिखंडिन्] **पु०** १ मोर. २ कोंबडा. ३ बाण. ४ मोराचें पीस. **शिखंडिनी स्त्री०** लांडोर; मोराची स्त्री.

शिखंडी [**सं०** शिखंडिन्] **पु०** १ द्रुपदाचा पुत्र आणि भारतीय युद्धांतील एक राजा. हा मूळचा स्त्री असून पुढें पुरुष झाला होता. २ षढ; नपुंसक. ३ मोर हा पक्षी.

शिखणाऊ, शिखणें इ० मागें ' शिकणाऊ, ' ' शिकणें , इ० पहा.

शिखर [**सं०**]**न०** १ पर्वताचें टोक. २ वृक्षाचें अग्र. ३ तुरा. ४ टोक, अग्र(सामान्यतः). ꣺ **शिखरी** [**सं०** शिखरिन्] **वि०** टोकदार; अणकुचीदार; टोक असलेलें. **पु०** १ पर्वत. २ डोंगर. ३ किल्ला. **शिखरमणी, शिखरामणी पु०** कोणत्याही समुदायांत श्रेष्ठ किं० अग्रगण्य. **शिखरापुरीस जाणें** अत्यन्त मगरूर, गर्विष्ठ, किं० बेगुमान होणें किं० असणें. **शिखरिणी स्त्री०** १ सुंदर स्त्री. २ केळीं इ० दूध, इ० मध्यें कुसकरून त्यांत साखर इ० घालून

केलेलें अर्धवट पातळ असें खाद्य. ३ एक अक्षर वृत्त. याच्या प्रत्येक चरणांत य, म, न, स, भ, हे गण असून अंतीं एक लघु आणि एक गुरु अशीं एकंदर सतरा अक्षरें असतात. सहाव्या अक्षरावर आणि पादान्तीं यति. **शिखरास जाणें** परमावधीस पोचणें; पराकाष्ठेचें होणें. **शिखरीं काठ्या लागणें** आपलें उद्दिष्ट मिळविणें; ध्येय गांठणें. **टीप,**–खंडोबाचे भक्त खंडोबाच्या देवळाच्या शिखरास आपल्या काठ्या टेकतात ह्या परिपाठावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. **शिखरीं पोट लागणें** अधाशीपणानें फार जेवल्यामुळें पोट अगदीं कंठास लागणें.

शिखरण स्त्री० मागें ' शिखर ' मध्यें 'शिखरिणी ' अर्थ २ पहा.

शिखा [सं०] स्त्री० १ शेंडी. २ डोईचे केश. ३ तुरा. ४ मोराच्या डोक्यावरील पिसांचा झुबका. ५ वृक्षाचा शेंडा. ६ कोणत्याही पदार्थाचें वरचें टोक किं० अग्र. ७ लुगडें, धोतर, इ० वस्त्राचा पदर. ८ अग्नीची ज्वाळा. ९ झाडाची फांदी. १० झाडाची पारंबी. ॐ **शिखावल पु०** मोर. **शिखी [सं० शिखिन्] पु०** १ मोर. २ अग्नि. ३ वृक्ष. ४ पर्वत. ५ दिवा. **शिखाध्वज पु०** कार्तिकेय. **शिखानष्ट पु०** मुसलमान(निंदेंत). **शिखामणि पु०** १ मस्तकावर शोभेसाठीं धारण करावयाचा मणि. २ कोणत्याही भूषणांतील मुख्य हिरा इ० रत्न. ३ मुकुटमणि. **शिखासूत्र न०** शेंडी आणि जानवें,–द्विजत्वाचें लक्षण. **शिखासूत्रावर येणें** अत्यन्त रागावून शेंडी आणि जानवें तोडण्यास सिद्ध होणें.

शिंग [सं०] न० १ गाय, म्हैस, बैल, शेळी, इ० च्या डोक्यावर जे टणक अस्थिरूप अवयव असतात ते प्रत्येक. २ गाय, म्हैस, इ० च्या ह्या शिंगांच्या आकाराचें पितळेचें जें मुखवाद्य करतात तें. ॐ **शिंगट न०** १ शिंग (तुच्छतेंत). २ नळ्याप्रमाणें उडवावयासाठीं ज्यांत दारू ठासून भरली आहे असें शिंग. **शिंगडा पु०** बंदुकीची दारू ठेवावयाचें शिंग किं० शिंगाच्या आकाराची पितळ इ० ची नळी. शिकारी लोक शिंगडा कमरेस लटकावून जातात. **शिंगशिंगोटी स्त्री०** १ गाय, म्हैस, इ० चीं अस्ताव्यस्त पडलेलीं शिंगें समुच्चयानें. २ गाय, म्हैस, इ० गुरें समुच्चयानें. ३ गाय, म्हैस, इ० च्या खरेदीविक्रीवर सरकारचा कर. **शिंगाडी स्त्री०** १ गाडीच्या तबकडीला बसविलेलीं उभीं लाकडें प्रत्येक. २ चांभार लोक घट्ट जोडा सईल करावयासाठीं त्यांत खुपसतात तो ठोकळा,–जो मागें जाडी आणि पुढें बारीक असतो. **शिंगाळ वि०** शिंगांनीं मारण्याची ज्याला खोडी आहे असा (पशु,–गाय, बैल, इ०). **शिंगाळू वि०** १ ज्याला नुकतींच शिंगें फुटलीं आहेत असा (पाडा, पाडी, इ०). २ शिंगांनीं मारण्याची ज्याला खोडी आहे असा (बैल, गाय, इ०). ३ खूप लांब शिंगें असलेला (बैल, गाय, इ०). **शिंगाळें न०** बैलाच्या शिंगांना कपाळाजवळ त्यांना आवरण्यासाठीं बांधतात ती दोरी. **शिंगाळ्या वि०** ज्याला लांब लांब शिंगें आहेत असा(बैल इ०). **शिंगी स्त्री०** कानफाटे गोसावी इ० वाजवितात तें लहान शिंग. **शिंगोटी स्त्री०** १ शिंग. २ शिंगांचा पशु,–गाय, म्हैस, इ०; उ० आमच्या गोठ्यांत आज एकही शिंगोटी उरली नाहीं. ३ गाय, म्हैस, इ० पशु विकत घेणाऱ्यावर सरकारीं कर असतो. ४ बैलाच्या शिंगांच्या बुडाशीं बांधतात ती दोरी. मागें ' शिंगाळें ' पहा. ४ **म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत** आपलीं माणसें, आपला सरंजाम, इ० आपणास भारभूत होत नाहींत. **शिंगांवर घेणें** आलेल्या अडचणीला किं०° ' शिक्ल मदाईनें तोंड देणें म्ह० त्याचा प्रतिवमागें ' शिकण। सिद्ध होणें. **आलें अंगांवर तें घ्फा०** षिकार]१ त्याणें संकटाला धिटाईनें तोंड ःपत अ'तो डगमगला नाहीं. **शिंगें मोडून वासरांत शिरणें** १ जाणत्या माणसानें पोरकटपणा करणें. २ कांहीं गोष्ट ठाऊक असून ठाऊक नाहीं असें ढोंग करणें; मुद्दाम अडाणीपणाची बतावणी करणें. **शिंगें यावयाचीं असणें, शिंगें उरणें, आणखी शिंगें असणें, काय शिंगें असणें ?** विशेषसा काय उणेपणा किं० कमताई किं० न्यून आहे ? कांहीं नाहीं. **बाराला काय शिंगें उरलीं आहेत ? (किं० राहिलीं आहेत ?)** बारा वाजलेच म्हणायाचे, फार तर दोन तीन मिनिटें कमी असतील.

भिञ्याला आणखी काय शिंगें असतात? भित्रा माणूस तो हाच; भित्रा काय वेगळा असतो? **मिडवाईफला आणखी काय शिंगें असतात?** मिडवाइफचा डिप्लोमा (मला, तिला, इ०) मिळाला नाहीं इतकेंच काय तें; मिडवाइफचें सर्व ज्ञान इ० (मला, तिला, इ०) आहेच.

शिंगटणें, शिंगाटणें, शिंगाळणें [म० शिंग] **स०** **क्रि०** गाय, बैल, इ० नीं (कोणेकाला) शिंगांनीं प्रहार करणें किं० शिंगांनीं उडवून देणें.

शिंगडी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

शिंगडी स्त्री०, शिंगडें न० [म० शेंग] पावटा, तूर, इ० च्या वाळलेल्या शेंगांचा ढीग किं० रास.

शिंगडी स्त्री०, शिंगा पु० माडाच्या झावळीचा अग्रभाग.

शिंगर न० १ वेळूचा कांटा. २ पत्रावळ करण्यासाठीं बांबूच्या करतात त्या चोथा प्रत्येक.

शिंगरट [म० शिंगरूं] **न०** घोडीचें अपत्य (प्रेमानें किं० तुच्छतेनें).

शिंगरी स्त्री० पानांची कळी; बाल्य दशेंतील पान किं० पानाची फांदी.

शिंगरूं न०, शिंगा पु० घोडी, गाढवी, किं० खेचरी, ह्यांचें अपत्य. ॐ **शिंगरूप वि०** अगदीं लहान वयाचा (घोडा, गाढव, खेचर).

शिगलोट, शिगलोटा, शिगेलोट [म० शीग+लोटणें] **वि०** आंतील धान्यादिकांची शीग (म्ह० शिखर) लोटून म्ह० शिगेचें धान्यादि खालीं पाडवून सपाट केलेलें (जें शेर इ० चें माप तें).

शिंगळद्वीप, शिंगळद्वीप [सं० सिंहलद्वीप] **न०** लंका हें बेट (अशिक्षितांत रूढ).

शिंगा वर ' शिंगरूं ' पहा.

शिगा पु० मागें ' शिगडी ' पहा.

शिंगाटणें [म० शिंग] **स० क्रि०** १ मागें ' शिंगटणें ' पहा. २ (कोणेकाची) भोसडपट्टी काढणें. ३ (कोणेकाला) फसविणें किं० लुबाडणें.

शिंगाडा [सं० शृंगाट, शृंगाटक] **पु०** तळें इ० मध्यें वाढणारें एक झाड किं० त्याचें फळ. हें फळ उपासास पिठाच्या रूपें खातात.

शिंगाडा पु० गोड्या पाण्यांतील एक मत्स्यविशेष.

शिंगाडा, शिंगाड्या [म० शिंग] **वि०** १ मिरवणुकीपुढें शिंग वाजविणारा (माणूस). २ लांब शिंगें असलेला (बैल इ०).

शिंगाळ मागें ' शिंग ' मध्यें पहा.

शिंगाळणें मागें ' शिंगटणें, '' शिंगाटणें ' पहा.

शिंगाळा पु० खाऱ्या पाण्यांतील एक काळा मत्स्यविशेष.

शिंगाळी केळ स्त्री० एक प्रकारची केळ.
शिंगाळें केळें न० ह्या केळींचें फळ.

शिंगी ' शिंग ' मध्यें पहा.

शिगेलोट, वि० मागें ' शिगलोट ' पहा.

शिंगोटी ' शिंग ' मध्यें पहा.

शिग्रु [सं०] **पु०** शेवगा हें झाड.

शिजणें [सं० श्री, श्रा=शिजविणें] **अ० क्रि०** १ (पाण्यांत घातलेला पदार्थ तांदूळ, डाळ, इ०) अग्निसंयोगानें पक्व होणें. २ (कांहीं गोष्ट) घडण्याच्या मार्गांत असणें किं० आणली जात असणें किं० तिच्याबद्दल बेत चाललेला असणें; घाटत असणें; उ० रानड्यांची चिंगी मोडकांच्या रामूला द्यावी असें शिजत आहे. **भा० क० प्र०** असह्य उष्मा होत असणें; उकडत असणें; उ० आज जणों शिजतें आहे. ॐ **शिजे तों धीर धरवतो निवे तों धरवत नाहीं** उत्कंठेनें इच्छिलेला भोग्य पदार्थ तयार होईपर्यंत मनुष्य वाट पाहूं शकतो, पण तयार झाल्यावर त्याला तो तावडतोब भोगावासा वाटतो, त्याला विलंब सहवत नाहीं.

शिजवक [म० शिजणें] **न०** सर्वांचीं भोजनें होऊन शिल्लक राहिलेलें रांधलेलें अन्न,–भात, भाजी, भाकरी, इ०.

शिजवण [म० शिजविणें] **न०, स्त्री०** जें शिजविलें तें; शिजविलेलें अन्न.

शिजविणें [म० ' शिजणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** अग्निसंयोगानें (भात, भाजी, इ०) पक्व करणें किं० रांधणें.

शिजाळू [म० शिजणें] **वि०** त्याच जातीच्या इतर पदार्थांपेक्षां लवकर शिजणारी (डाळ, अळू, इ०).

शिझणें, शिझविणें, शिझाळू इ० वर शिजणें '' शिजविणें ' इ० पहा.

शिंट स्त्री० पाऊस, तोंडांतील थुंकी, कारंज्याच्या धारा, इ० चे उडतात ते बिंदु व्यक्तिशः किं०समुच्चयानें (उडणें, उडविणें, मारणें, इ०).

शिटणें अ० क्रि० १ (चिमणी इ० पक्ष्यानें) हगणें. २ (आजारी मुलानें) थोडथोडें हगणें.३ डीनें)बेफाम होऊन हाव्या त्या घोड्याकडून कामेच्छा तृप्त करून घेणें.

शिटवा [**म०** शिटणें] **पु०**वाघुळाची विष्ठा,–जिचें वांग्यांच्या झाडांना खत घालतात.

शिटवा [**म०** शिटणें] **वि०** १ जंगली घोड्यापासून घोडीला झालेल (अपत्य). २ बदमाष, लफंगा (माणसास शिवी देतांना).

शिटा पु० पाणी, थुंकी, इ० चा शिंतोडा.

शिटाऊ [**म०** शिटणें] **वि०** १ जंगली घोड्यापासून घोडीला झालेलें (अपत्य). ह्या अपत्याला ' शिटाचें शिंगरूं ' म्हणतात. २ बदमाष, लफंगा (माणूस). ३ वात्रट किं० मात्रागमनी किं० कावेबाज (पोर किं० माणूस) ꙮ**शिटाऊ बंदर न०**वात्रट,लफंगे, बदमाष अशा लोकांचा आड्डा.

शिटावणें [**म०** शिटाणें] **अ० क्रि०** वात्रट किं० बदमाष मार्गाला लागणें; उत्संखल होणें.

शिटी स्त्री० १ शीळ २ शीळ वाजविण्याचें साधन.

शिटी वि० १ चिटाचा चिटाचा २ केलेला (कपडा इ०).

शिडकणें, शिडकावणें स०क्रि०(पदार्थावर) पाणी, रंग, इ० चे शिंतोडे उडविणें.

शिडकाव, शिडकावा [**म०** शिडकणें,शिडकावणें] **पु०** पदार्थावर पाणी, रंग, इ० चे उडालेले किं० उडविलेले शिंतोडे समुच्चयानें.

शिडंब पु० एक जंगली वृक्ष.

शिडशिडणें अ० क्रि० जोरानें पण थोडका वेळच (पाऊस) पडणें.

शिडशिडी स्त्री० जोरदार पण अगदीं थोडा वेळ आलेली पावसाची सर.

शिडशिडीत वि० १ बारीक अंगाचा; सडपातळ. २ ज्याचीं शितें टणक आणि मोकळीं आहेत असा शिजलेला (भात).

शिडा वि० बायको, मुलें, इ० चा पसारा किं० परिवार ज्याच्या मागें नाहीं असा(माणूस). सडासांडा, सडासाठ, सडासोट, शिडासांटा, हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

शिडाईत न० आंबा इ० कांचे झाडावर दुसऱ्या आंबा इ० झाडाची ढाळी लावून करतात तें कलम.ꙮ**शिडाइती वि०**शिडाईत केल्यानें झालेलें (आंबा इ० झाड).

शिडी, शिढी [**हिं०**] **स्त्री०** १ दोन बाजूंस दोन वांसे किं० फळ्या यांना जोडणाऱ्या आडव्या फळ्या किं० लाकडें यांची उंचावर चढण्यासाठीं करतात ती रचना; चढणी;दादर. २ डोंगरावरची अरुंद आणि कठिण अशी चढण.

शिणक, शिणीक स्त्री० गात्रामध्यें वायूच्या उपद्रवामुळें एकदम उठते ती कळ.

शिणकणें [**म०** शिणक] **अ० क्रि०** (गात्रविशेषांत) एकदम कळ किं० तिडीक उठणें; अशा तिडकीनें(गात्रविशेष) जर्जर झालेलें असणें.

शिणगार, शिणगारणें ' शृंगार," शृंगारणें " चे गांवढळ अपभ्रंश.

शिणणें [**म०** शीण]**अ० क्रि०** अगदीं श्रांत होणें; दमणें; खचणें.

शिणवटा, शिणोटा [**म०** शिणणें]**पु०** श्रांतपणाची स्थिति;अगदीं दमलेपणाची स्थिति(येणें).

शिणशिणणें अ० क्रि० (दांत) आंबणें.

शिणारणें स० क्रि० जमीनींत खांब पक्का बसविण्यासाठीं त्याच्या भोंवतीं (दगड, माती, रोडे, इ०) ठासणें.

शिणीक, शिनीक स्त्री० गात्रांत एकदम उठलेली कळ.

शिणोटा वर ' शिणवटा ' पहा.

शिंतडणें, शिंतोडणें अ० क्रि०लहान लहान शिंतोड्यांच्या किं०थेंबांच्या रूपानें(पाऊस)पडणें.

शिंतडणें पुढें ' शिंपडणें ' पहा.

शिंतडा, शिंतोडा पु० पाणी, शेणखळा, इ० चा उडालेला थेंब (उडणें, उडविणें).

शितडी [**म०** शीत] **स्त्री०** १ दहीं नासलें असतां त्यांत भाताच्या शितांसारख्या बारीक बारीक गोळ्या होतात त्या प्रत्येक किं० समुच्चयानें. २ नासलेली कढी, दूध, रक्त, इ०च्या अशाच झालेल्या गोळ्या.

शितरणें मागें ' चितरणें, ' 'चितारणें' पहा.

शितरपाड वि० तल्लख; चुणचुणीत; हुशार. ॐ **शितरपाडी स्त्री०** तल्लखपणा; हुशारी; चुणचुणीतपणा.

शितरी स्त्री० लहान झोपडी; कोप; कोपी.

शितवड [म० शीत] स्त्री० १ जेवणाऱ्याचीं ताटाभोंवतीं उडालेलीं भाताचीं शितें समुच्चयानें. २ इकडे तिकडे उडालेलें किं० पसरलेलें खरकटें.

शितळ [सं० शीतल] वि० १ सौम्य; मंद; शांत (स्वभाव, माणूस, हालचाल). २ सौम्य (डोंगराची चढण). ॐ **शितळचंद पु०** १ सौम्य आणि शांत प्रकृतीचा माणूस. २ धीमा, चेंगट, किं० सुस्त माणूस. **शितळशिमगा पु०** १ रंगपंचमीचे दिवशीं किं० वर्षप्रतिपदेस लहान मुलांना शिटकावी अंगडींटोपडीं, साखरेच्या गांठ्या, इ० देण्याचा करतात जो समारंभ तो. २ फाल्गुन वद्य प्रतिपदा,–ह्या दिवशीं होळीवर पाणी ओतून किं० शिंपडून होळी विझवितात. **शितळाई स्त्री०** १ हवेचा थंडपणा. २ प्रकृतीचें शैत्य. **शितळादेवी, शीतलादेवी स्त्री०** अंगावर देवी आल्या असतां त्या शमण्यासाठीं ज्या देवीला नैवेद्य, बळी, इ० अर्पितात ती देवी.

शिता पु० स्त्रियांच्या डोईवरील केशांचा भांग.

शिताप, शितापी पुढें ' शिताब,' 'शिताबी' पहा.

शिताफळ, शिताफळी स्त्री० एक झाड. ह्याच्या फळास ' शिताफळ ' **न०** म्हणतात.

शिताब, शिताबी, शितापी [फा०] वि० १ त्वरित; घाईचा. २ तल्लख. ३ कुशळ. ४ सफाईदार. ५ उत्साही. **स्त्री०** त्वरा; चपळाई. २ कौशल्य; हिकमत. ३कामाची सफाई. ॐ**शितापी, शिताबी, शिताफी स्त्री०**१कामाची सफाई.२ खुबी; युक्ति;हिकमत. ३ तल्लखपणा. ४ काम करण्यांत उत्सुकता.

शितारणें मागें ' चितरणें ' पहा.

शितीं स्त्री० एका विटेच्या जाडीची भिंत; पडदी; कूड.

शितें न० १ स्त्रियांच्या डोईवरील केशांचा भांग. २ कोष्टयाच्या मागांत ताण्याची एकेरी सुतें वेगळीं ठेवणारी काठी.

शिता, सित्ता, सिता, शित्ता [अ० सित्त] वि० सहा ही संख्या.

शितैन, शित्तैन, सितैन, सित्तैन [अ० सित्तीन्] वि० साठ ही संख्या (फक्त मुसलमानी सनांत प्रयोग).

शिंतोडणें [म० शितोडा] अ०क्रि० बारीक बारीक थेंबांच्या रूपानें (पाऊस) पडणें.

शिंतोडा पु०१पाणी, थुंकी, इ०चा उडालेला थेंब किं० बिंदु. २ पावसाची लहान सर. ३ वांबूचे नवीन फुटलेले कोंब समुच्चयानें.

शिथड स्त्री० (कोष्टयाच्या मागांत)ओवीच्या बाहेर सांधीच्या कडांना असतात जे दोन तुकडे ते प्रत्येक.

शिथिल [सं०] वि० १ सैल; ढिलें. २ सोडलेलें; सैल केलेलें. ३बिलबिलीत (फळ इ०). ४ घट्ट न बांधलेलें (गांठोडें इ०). ५ अर्धवट सुटलेली (गांठ, बंधन, इ०). ६मंदपणानें चालविलेलें (काम). ७ थिलथिलीत (पोट).

शिंद [हिं०] स्त्री० १ खजुरीसारखें एक झाड. २ लाकडाच्या लहान लहान पट्ट्या जाळीसारख्या एकांत एक अडकावून करतात ती रचना (भरणें, घालणें). ह्या रचनेवर गिलावा करून अरुंद भिंत करतात. ३ अशा भिंतींसाठीं ज्या रिपा योजतात त्या समुच्चयानें.

शिंदळ, शिनळ वि० व्यभिचारी (पुरुष किं० स्त्री). ॐ **शिंदळकी, शिनळकी स्त्री०** जारकर्म; परपुरुषगमन (स्त्रीचें); परस्त्रीगमन (पुरुषाचें).**शिंदळचार, शिंदळचाळे.शिंदळटेव पु० अ० व०** शिंदळकीचीं कृत्यें. **शिंदळवाडा (–वडा), शिंनळवड़ा (–वाडा) पु०** व्यभिचारी स्त्रिया आणि पुरुष जेथें जमतात ती जागा. **शिंदळ सोंव पु० अ० व०** वात्रटपणा, लबाड्या, भोंदूगिरी, इ० प्रकारची वर्तनसरणी.

शिंदा [हिं०] पु० १ठेवलेली दासी,रखेली, किं० रांड, ह्यांच्या पोटीं जन्मलेलें अपत्य. २ अशा अपत्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

शिंदा पु० मुलांचें एक खेळणें.

शिदी, शिद्दी पु० हबसाण माणूस.

शिंदी, शिंधी स्त्री० जंगली खजुरीचें झाड किं० त्यापासून काढलेलें अमली पेय.

शिंदेशाई [म० शिंदा + फा० शाही] स्त्री० पेशव्यांचे एक शिंदे ह्या आडनांवाचे सरदार होते त्यांचा मुलूख किं० त्यांची राज्यसरणी. वि० शिंद्यांच्या मुलखांत प्रचलित अशी (चाल, रीति, दागिन्याची घडण, पोशाख, भाषाशैली, इ०).

शिदोरी, शिधोरी [सं० सिद्ध+म० दोरी] स्त्री० १ प्रवासांत खावयासाठीं दशम्या, लाडू, चटणी, भात, इ० पदार्थ फडक्यांत घालून दोरीनें बांधून केलेलें गांठोडें. २ चातुर्मास्यांत गरीब ब्राह्मणाला बायका दररोज शिजविलेल्या अन्नाचें ताट देतात तें.

शिधा [सं० सिद्ध] पु० १ भोजनाचे पदार्थ शिजवून, भाजून, उकडून, किं० तळून सिद्ध करावयासाठीं जमविलेली सामग्री किं० कोणा माणसास दिलेली सामग्री, किं० प्रवासांत बरोबर घेतलेली सामग्री. २ तांदूळ, डाळ, गूळ, भाजी, इ० घरीं नेऊन शिजवून खावयासाठीं कोणा गरीब माणसाला व्रत म्हणून दररोज दान करावयाची सामग्री. ॐ **शिधापाणी, शिधासामान** न० ए० व० रांधावयासाठीं घेतलेली तांदूळ, डाळ, पीठ, भाजी, इ०सामग्री.

शिंधी वर ' शिंदी ' स्त्री० पहा.

शिधोट वि० सरळ (रस्ता, नदीचा प्रवाह, पर्वताची रांग, इ०).

शिधोरी मागें ' शिदोरी ' पहा.

शिनगारणें [म० शृंगारणें] स० क्रि० शोभाविणें; भूषविणें.

शिनळ, शिनळकी, इ० मागें ' शिंदळ, ' शिंदळकी, 'इ० पहा.

शिना, शिनाना वि० वेगळा; भिन्न.

शिनिक मागें ' शिणीक ' पहा.

शिने मागें ' शाने ' पहा.

शिंप [हिं०] स्त्री० १ कांहीं जलजंतु स्वतास राहाण्यासाठीं करतात जें घर त्याचीं जीं दोन अर्धुकें तीं प्रत्येक. २ लेखणीच्या बोरू, काठी, इ० चें टोक तिरकस आणि अर्धे तासून करतात ती उतरण (मारणें, तोडणें, इ०). ३ शिंपीच्या आकाराचा जमीनीचा टापू.

शिपका पु० १ पाणी, दूध, ताक, इ० हातांत घेऊन त्यांचा भाजी, पीठ, इ० वर केलेला वर्षाव किं० केलेली शिंपणी. २ रस्त्यांतील धूळ किं० घरांतील केर दबण्यासाठीं त्यांच्यावर शिंपडलेलें पाणी. ३ मूर्च्छित माणसाच्या तोंडावर पाणी जोरानें शिंपडणें ही क्रिया.

शिंपट, शिंपटें न०, **शिंपटी** स्त्री० पोफळीच्या झाडाला येतें जी पोफळांची फांदी तिचा अंकुर किं० तिची बाल्यदशा.

शिपटी स्त्री० १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. २ पोफळीच्या झाडावरील पोफळांचा बाल्यदशेंतील घड. ह्या अर्थीं ' शिंपुट ' न० सुद्धां.

शिंपडणें [म० ' शिंपणें ' चें एक रूप] स० क्रि० १ (पाणी, दूध, ताक, इ०) झाडें, भाजी, तोंड, इ०वर टाकणें किं० जोरानें मारणें. २ पाणी, दूध, ताक, इ० (झाडें, भात, भाजी, इ० वर) फेकणें किं०मारणें.

शिंपण न०,**शिंपणी** स्त्री०[म०शिंपणें] पाणी इ० बिंदूरूपें पडेल अशा प्रकारें तें उडविणें. ॐ **शिंपण (–णे–) पंचमी** स्त्री० रंगपंचमी हा दिवस,–माघ महिन्याची पंचमी ही तिथि. **शिंपणीचा ऊस** पु० पाटाच्या पाण्यानें होणारा ऊस. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' पुरणीचा ' ऊस.

शिंपणें [सं० सिंच्] स० क्रि० १ थेंबांच्या रूपानें (पाणी, दूध, ताक, इ०) झाडें, जमीन, भात, भाजी, इ० वर जोरानें मारणें. २ (झाडें, जमीन, भाजी, इ० वर) पाणी मारणें.

शिंपणें [म० शिंपणें] न० १ (पाणी इ०) झाडें इ० वर थेंबांच्या रूपानें मारणें किं०टाकणें. २ (रंगाचें पाणी) रंगपंचमीच्या दिवशीं चिरगुटांवर टाकणें.

शिपतर, शिंपतर न० बांबूच्या पातींचें पसरट उथळ पात्र.

शिपला, शिंपला पु० मोठी 'शिंप'. मागें 'शिंप' [पहा.

शिपली, शिंपली स्त्री० १ लहान शिंप. मागें

'शिंप' पहा. २ लहान सूप; सुपली.

शिपा पु० माशांचें तेल.

शिंपा पु० १ मोठी शिंप. २ माडास नारळ यावयाच्या पोगींतून बाहेर येतो तो अवयव.

शिपाई [फा०सिपाही]पु०१सैन्यांतील लढणारे गडी प्रत्येक. २ शहरांत बंदोबस्त ठेवणारे सरकारी नोकर प्रत्येक.३घराच्या देवडीवर पहारा करणारा कोणेकाचा नोकर. ४ पत्रें, निरोप, इ० नेणारा किं० आणणारा नोकर.५ पालखी,डोली, मेणा, इ०च्या दांड्यांचे जे आधार ते प्रत्येक. ६ गाडीच्या जोकडाला टेकण देतात तीं लाकडें प्रत्येक. ७ दिवटी,मशाल, इ० ठेवण्यासाठीं दोन लाकडें फुलीच्या रूपानें जोडून केलेला आधार. ८ मुलीच्या परकराचा पुढचा उभा पट्टा,–कांठ,इ० रूपाचा. ९ एक पक्षी. ❀ **शिपाईगिरी, शिपाइकी** **स्त्री०** शिपायाचा धंदा. **वि०** शिपायासंबंधाचा. **शिपाईण्यादा, शिपाईराणा** **पु०** शिपाई, खिजमतगार, जासूद, इ० लोकांच्या धंद्याचा माणूस. **शिपाईबाणा पु०** १शिपायाचा धंदा. २ शिपायाची धमकदारी. ३ शिपायाचा पोशाख, हत्यारें, इ० सरंजाम. **शिपुरडा पु०** शिपाई (तुच्छतेंत).

शिपार, शिफार स्त्री० होड्या, गलबतें, इ० च्या तळाला राळ इ० चा करतात तो लेप.

शिपारशी, शिपारस पुढें 'शिफारशी,' 'शिफारस' पहा.

शिंपी पु० लोकांचे कपडे शिवून देऊन चरितार्थ करणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम. २ लोकांचे कपडे शिवून देऊन चरितार्थ करणारा कोणीही कोणत्याही जातीचा इसम. ३ शिंप,–जलजंतूचें रहावयाचें घर. वर 'शिंप' पहा. **स्त्री०** १ उराच्या मध्यभागीं पोटाकडे उतरत गेलेली जी खळगी ती. २ एक प्रकारचें मऊ आणि पौष्टिक गवत. ❀ **शिंपीला पोट लागणें** फार जेवण झाल्यामुळें पोट भरून ते शिंपीस टेंकणें. वर'शिंपी'**स्त्री०**अर्थ १ पहा.

शिंपुरडा [**म०शिंपी**] **पु०**शिंपी (तुच्छतेंत).

शिंपूट न० पोफळीच्या झाडास फळांचा घड येतो तो (बाल्दशेंतील).

शिफार वर 'शिपार' पहा.

शिफारस [**फा०** सिफारिष्] **स्त्री०** १ प्रशंसा; तारीफ. २ वशील्याचें पत्र. ३ प्रशंसा व्हावयाजोगें कोणी केलेलें कांहीं कृत्य. ❀ **शिफारशी वि०** समर्थाच्या कृपेनें किं० वशील्यानें मिळालेली (नोकरी, अधिकार, बढती, इ०). **शिफारशीचें तट्टू न०** सरकारी अधिकाऱ्यांची लाळ घोटून आणि अंगीं कांहीं गुण नसून आणि इतरांचे हक्क तुडवून मोठ्या पदावर चढलेला नादान माणूस.

शिबंदी [**अ०** सिहबंदी] **स्त्री०** १ वसुलीच्या कामासाठीं ठेविलेली फौज. २ किल्ला, शहर, इ० च्या रक्षणार्थ ठेविलेली फौज.

शिबंदी स्त्री० १ कागदाच्या दंदाचे अर्धुक. २ दौलताबादी कागदाचें अर्धुक.

शिबाड स्त्री० एक प्रकारचें गलबत.

शिबाळी स्त्री०, शिबाळें न० चुलीवर ठेविलेल्या उसाच्या रसाच्या काहिलींतील मळी काढावयासाठीं काठीला बांधलेली टोपली.

शिबिका [**स०**] **स्त्री०** १ पालखी. २ प्रेतवाहून न्यावयाची तिरडी.

शिबिर [**सं०**] **न०** १ सैन्याची छावणी; तळ. २ राजगृह. ३ शिबिरांत राहणारें सैन्य. ४ (**मराठींत**) तंबू.

शिबुटलें न० मागें 'शिपतर' पहा.

शिबें न० १ घोसाळें, दोडका, इ० फळें अति निबर झालीं असतां त्यांत जें तंतुमय जाळें उत्पन्न होतें तें. २ मनुष्याच्या अंगावर जे पांढरे किं० हिरवे डाग उत्पन्न होतात ते किं० त्याचीं चिन्हें. ३ काहिलींत कढत असलेल्या उसाच्या रसाची मळी काढण्यासाठीं काठीला जें शिपतर बांधलेलें असतें तें. ४ पसरट आणि मध्याशीं खोलगट असें पात्रविशेष; वेळणी.

शिबोळी, शिबोळें वर 'शिबाळी,' 'शिबाळें' पहा.

शिमगा पु० १ फाल्गुन महिना (बायकी शब्द). २ फाल्गुन महिन्यांतील होळी. ❀ **शिमगा करणें** बोंबलणें. **शिमग्याचा मंत्र पु०** बोंबलण्याची क्रिया; बोंब; (जपणें, म्हणणें, वाचणें). **शिमगा जाई पण कवित्व राही**

शिमग्याचा सण जातो, शिमग्यांत केलेला वात्रटपणाही संपतो, पण शिमग्यांत केलेल्या वात्रटपणाचे परिणाम मागाहून सदैव पीडा करीत असतात.

शिमटणें [म० चिमटी] **स० क्रि०** चिमटींत धरणें किं० धरून जोरानें दाबणें किं० चेपणें. मागें ' चिमटणें ' पहा.

शिमटी स्त्री० १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. मागें ' शिपटी ' पहा. २ एक झुडूप.

शिमधड्या, शिमशेजारी [म० शिव+शेजारी] **पु०** आपल्या गांवाच्या हद्दीला लागलेल्या गांवांतील जो रहिवाशी तो.

शिमरा वि० १ चपटें (नाक). २ चपट्या नाकाचा (मनुष्य).

शिमा, शींव [सं० सीमा] **स्त्री०** गांव, देश, इ० ची हद्द किं० मर्यादा.

शिया पु० एका मुसलमानी धर्मपंथाचें नांव.

शियारी स्त्री० शहारा; रोमांच.

शिर [सं० शिरस्; **फा०**सर] **न०** १डोकें.२ डोक्याची कवटी. ३कोणत्याही वस्तूचा माथा;उ० झाडाचें किं०डोंगराचें किं० घराचें शिर. ४ श्रेष्ठ; प्रधान. ५सैन्याची आघाडी.६(घोड्यांची गणती करतांना) व्यक्ति; उ० घोडा शिर चार (म्ह० चार घोडे). मागें ' रास, '' नफर, '' नग ' पहा. **टीप**,–पुढील वाक्प्रचारांत संस्कृत 'शिरस्', आणि फारशी ' सर् ' यांचे वाक्प्रचार आम्ही एकत्रित देणार आहों. ❀ **शिरोग्र न०** शेंडा, टोक. **शिरोऽस्थि न०** डोक्याची कवटी. **शिरोग्रह पु०**डोकेंदुखी हा आजार. **शिरोगृह न०**१माडी. २ सज्जा. **शिरस्त्राण, शिरस्त्र न०** १ टोप; डोक्याचें कवच. २ पागोटें; मुंडासें; टोपी. ३ डोक्याची कवटी. **शिरोधर पु०** मान; गळा. **शिरोमणि पु०** श्रेष्ठ. **शिरोरत्न न०** डोक्यावरील रत्न. **शिरोरुह पु०** डोक्याचे केश. **शिरोवर्ती, शिरःस्थ पु०** मुख्य; चालक; पुढारी; अग्रेसर. **शिरःशूल न०** डोकेंदुखी हा आजार. **शिरसिज पु०** डोक्यावरील केश. **शिरःकंप पु०, शिरःकंपन न०**१डोकें हालविणें(संमति किं० असंमति दर्शविण्यासाठीं). २ डोकें हालणें (म्हातारपणामुळें किं० अशक्तपणामुळें). **शिरखंड** [म० शिर (डोकें)+खंड (चंदनाचें खोड)]**न०** चंदनाचें पेटींत लाविलेलें गंध (अशिक्षितांत रूढ); उ० आज तुम्ही शिरखंड लावून बादशहांना भेटावयास जाणार आहां कीं काय? **शिरगीर स्त्री०** कोंबड्याच्या डोक्यावरील तुरा. **शिरगोमी वि०** गोमीच्या आकाराची केशपंक्ति ज्याच्या कपाळावर आहे असा(घोडा). हा अशुभ लक्षणी समजला जातो. **शिरचष्मा** [**फा०** सर (डोकें) चष्मा (डोळा)]**पु०** आवडीचा पुरुष किं० जार (लावणींतील शब्द). **शिरश्छेद** [**सं०** शिरस् (डोकें) + छेद (कापणें)] **पु०** डोकें तोडणें; डोकें छाटून ठार मारण्याची शिक्षा. **शिरजोर** [**फा०**] **वि०** डोईजड माणूस; वरचढ. **शिरटोप पु०** थंडीवाऱ्यापासून निवारण व्हावयासाठीं डोक्याला घालतात ती टोपी. **शिरताज** [**फा०**]**पु०**१डोक्यावर घालावयाचा एक दागिना. २ (**लाक्षणिक**) कुटुंब, संस्था, गांव, इ० ना भूषणभूत असा माणूस. **शिरदाळी स्त्री०** घोड्याच्या डोक्यावर जो लगामाचा पट्टा असतो तो. **शिरपेंच** [**फा०** सर् पेष] **पु०** पागोट्यावर खोवावयाचें जडावाचें एक भूषण. **शिरफाड्या वि०** भिक्षा न घातल्यास डोकें फोडून घेणारा भिकारी. **शिरसामान्य, शिरसावंद्य** [**सं०** शिरसा (डोक्यानें इ० नम्रपणानें)+मान्य, वंद्य] **वि०** अत्यन्त पूज्य. **शिरसाष्टांग नमस्कार** [**सं०**शिरसा (डोक्यानें) +अष्ट (आठ)+अंगें (गात्रें)+नमस्कार] **पु०** डोकें आणि आठ अंगें जमीनीला टेकून केलेला नमस्कार. पत्राच्या आरंभीं या शब्दाचा उपयोग केला जातो. **शिरोमणि पु०** १ मस्तकावर भूषण म्हणून धारण करावयाचा मणि म्ह० रत्न. २ कोणत्याही समूहांत श्रेष्ठ असा माणूस; उ० पंडितशिरोमणि, मूर्खशिरोमणि, निर्लज्जशिरोमणि,इ०. **शिर सुरी तुझ्या हातीं** मला मारणें किं० तारणें हें तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे; मी अपराध केला आहे खरा, आतां मला क्षमिणें किं० दंडिणें तुझ्याकडे आहे. **शिर हातावर घेणें** धाडसाचें कांहीं काम करावयास सिद्ध होणें. **कोणेकाचा शिरातुरा**

(किं० **शिरा तोरा**) **असणें** त्याच्यापेक्षां अधिक समर्थ अधिक चतुर किं० वाकबगार असणें; उ० चित्रकलेमध्यें रामू माझा शिरातोरा आहे. **शिरांतोरा** (किं० **शिरांतुरा**) **लावणें** (किं० **दाखविणें** किं० **मिराविणें**) आपलें वर्चस्व दाखविणें किं० स्थापणें किं० गाजविणें; उ० सदोबाला पाटिलकी मिळाल्यापासून तो भारी शिरांतोरा लावूं लागला आहे. **एकाद्याच्या शिरीं** (किं० **शिरावर**) **असणें** त्याचा रक्षक किं० त्राता किं० वाली ह्या नात्यानें त्याच्या जवळ असणें; उ० आपण शिरीं असल्यावर आम्हाला कोणाची भीति ? **कोणेकाच्या शिरावर जागें असणें** (किं० **राहाणें**) त्याच्या संरक्षणासाठीं किं० कल्याणासाठीं तत्पर असणें. **शिरीं क्रि० वि०** १ वेळीं किं० ऐन समयीं; उ० लग्नाच्या किं० कामाच्या किं० प्रसंगाच्या शिरीं. २ (रक्षक ह्या नात्यानें) जवळ किं० संनिधीस; उ० शिरीं असतां पंढरींनाथ चिंता किमपि न करावी. **शिर सलामत तर पगड्या पंचांयशी** आपण समर्थ किं० शाबूत असलों तर आपण हावें तें मिळवूं शकूं.

शिरकणें [**म०** ' शिरणें ' चें एक रूप] **अ० क्रि०** जोरानें किं० यत्नानें किं० नेटानें प्रविष्ट होणें किं० प्रवेश मिळविणें किं० शिरणें; घुसणें.

शिरकणें [**म०** शिरकी] **स० क्रि०** १ सरक्या काढून (कापूस) स्वच्छ करणें. २ (कापूस, लोकर, इ० तील) केरकचरा काढून स्वच्छ करणें.

शिरकाविणें, शिरकाविणें [**म०** ' शिरणें ' चें एक प्रयोजक रूप] **स० क्रि०** जोरानें आंत रेटणें किं० खुपसणें किं० ढकलणें.

शिरका, सिरका, शिर्का, सिर्का [**फा०** सिर्काह्] **पु०** आम्लासव. [नाश.

शिरकाण पु० १ शिरक्याचा मुलूख. २ सत्या-

शिरकाव [**म०** शिरणें, शिरकणें] **पु०** रिघाव; प्रवेश.

शिरकी, सरकी स्त्री० कापसाच्या बोंडांतील बिया व्यक्तिशः.

शिरकुटी स्त्री० झाडाची बारीक आणि लांब काठी किं० छडी.

शिरकें न० शिंक्याच्या तळावर ठेविलेलें भांडें हालूं नये म्हणून शिंक्याच्या दोऱ्यांत भांडें घट्ट आडकून बसावें म्हणून जो फास दोऱ्यांवरून खालीं सरकावितात तो.

शिरखंड [**सं०** श्रीखंड=चंदन] **न०** कपाळावर लाविलेलें चंदनाचें गंध (अडाण्यांत रूढ).

शिरगीर मागें ' शिर ' मध्यें पहा.

शिरगोळा पु० जो कुटून रांगोळी करतात तो दगड.

शिरटी स्त्री० १ झाडाची लांब आणि बारीक फांदी. २ पोफळीचा नुकताच बाहेर पडलेला पोफळांचा घोंस.

शिरड स्त्री० रागाची उसळी (येणें). ꕥ **शिरडखोर वि०** ज्याला लवकर राग येतो असा. मागें चिरड ' पहा.

शिरड स्त्री० झाडाच्या तोडलेल्या फांद्या,— ओंबणासाठीं योजावयाच्या.

शिरडाविणें [**म०** शिरड] **स० क्रि०** शिरडीनें (कोणेकास) बडविणें किं० मारणें. पुढें ' शिरडी ' पहा.

शिरडी स्त्री० १ झाडाची बारीक आणि लांब फांदी. २ एक प्रकारचा तांदूळ. ३ मुलीचें लहान लुगडें; चिरडी. मागें ' चिरडी ' पहा.

शिरडें न० कुंपण, वेलाचा मांडव, इ० साठीं झाडाच्या तोडलेल्या फांद्या.

शिरणें अ० वि० जोरानें किं० खुबीनें घुसणें किं० प्रविष्ट होणें.

शिरद, शिरदें न० पावशेराचें माप; चिपटें.

शिरपुटणें [**म०** शिरपुटी] **स० क्रि०** झाडाच्या बारीक आणि लांब फांदीनें (कोणेकाला) मारणें.

शिरपुटी स्त्री० झाडाची बारीक आणि लांब फांदी.

शिरःफळ [**सं०** श्रीफळ] **न०** १ गाडाचें झाड. २ नारळ.

शिरमिंदा (–**धा**) मागें ' शरमिंदा ' पहा.

शिरवळ पु०, स्त्री० पुढें ' शिरोळ, "शिळा वेळ ' पहा.

शिरविणें [**म०** ' शिरणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** खुपसणें; आंत सारणें. मागें ' शिरकविणें ' ' शिरकाविणें ' पहा.

शिराशिरणें [**म०** शिरशिरी] **अ० क्रि०** थंडी, वारा, ताप, इ० मुळें शरीर कंपित होणें.

शिराशिरी स्त्री० थंडी, ताप, इ०मुळें शरीराला सुटतो तो कंप.

शिरशी स्त्री० शिरसासारखें भाजीच्या उपयोगाचें एक झाड. ❀ **शिरशेल, शिरसेल न०** शिरसांचें तेल.

शिरस [**सं०** सर्षप] **पु०** एक प्रकारची मोहोरी.

शिरस्ता [**फा०** सररिश्ताह्] **पु०** वहिवाट; सरणी; नियम. ❀ **शिरस्तेदार पु०** मामलतदार, न्यायाधीश, इ० च्या कचेऱ्यांतील जे कारकून त्यांचा वरिष्ठ. **शिरस्तेवाईक वि०** शिरस्त्याला अनुसरून असलेला.

शिरळक स्त्री० १ लाकडाच्या धलपीचें कुसळ (पाय, हात, इ० त बोचणें, शिरणें). २ पत्रावळ लावण्यासाठीं बांबू, कडब्याचें ताट, इ०च्या करतात त्या चोया प्रत्येक. ३ शीळ (वाजविणें, घालणें). **शिरळका स्त्री० अ० व०** अंगांत उद्भवलेली कळ, तिडींक, किं० शिणीक (मारणें, भरणें).

शिरा [**सं०** शिरा=रक्तवाहिनी; शीर] **स्त्री०** १ रक्तवाहिनी शीर. २ झाडाच्या पानाच्या सांगाड्याचे तंतुरूप जे अवयव ते प्रत्येक. ❀ **शिरागत वि०** हाडींमासीं खिळलेला (रोग, वेदना, इ०). **शिराळ वि०** जाडी जाडी आणि उठून दिसण्याऱ्या शिरा ज्यांवर आहेत असा(हात, पाय, दोडका, इ०).

शिरा [**फा०** षीराह्] **पु०** १ गव्हाचा रवा तुपावर भाजून त्यांत साखर इ० घालून जें पक्वान्न करतात तें. २ रेवाचिनी, ज्येष्ठमध, इ० चा सत्त्वांश घेऊन त्यांचा औषधासाठीं रांधा करून ठेवितात तो. ३ खजुराच्या अंगचा जो द्रवांश साठविला असतो तो. ४ खडीसाखर करण्यासाठीं केलेल्या रांध्यांत खडीसाखर जमतां जमतां वेगळा द्रवांश निघतो तो. ५ झाडाचीं पानें, फळें, मुळें, इ० चा रस कढवून औषधासाठीं काढतात तो सत्त्वांश.

शिरा [**हिं०** सरा] **पु०** शेत, गांव, इ०ची हद्द.

शिरा [**अ०** सिराह्=उत्तम] **वि०** उत्तम; सर्वोत्कृष्ट. **टीप**,-हें विशेषण लिंगवचनांप्रमाणें फिरत नाहीं.

शिराजी [**फा०**] **स्त्री०** एक प्रकारचें खबूतर.

शिराटा, शिरांटा पु० झाडाच्या बारीक बारीक फांद्या एका टोकाशीं तात्पुरत्या बांधून पानें, गवत, केरकचरा, इ० झाडण्यासाठीं करतात ती केरसुणी.

शिरानी स्त्री० (कवितेंत) आनंद; आवड; गोडी; समाधान.

शिराणी [**फा०** षीरानी=गोडी, गोडपणा] **स्त्री०** १ अपूर्व वस्तु; मूल्यवान किंवा उत्कृष्ट पदार्थ. २ क्वचित् प्रसंगीं प्राप्त होणारी प्रिय, सोयीची, किं० आवडती कांहींही वस्तु, माणूस, संधी, इ०; कांहीं अपूर्व लाभ.

शिरावळ पु०, स्त्री० पुढें 'शिरोळ,' 'शिळा वेळ' पहा.

शिराळ वि० वर 'शिरा' **सं०** मध्यें पहा.

शिराळ न०, स्त्री० ढगांची अंधेरी (येणें, पडणें, जाणें).

शिराळ [**म०** शिरा] **वि०** जाडी धारांचा (दोडका).

शिराळशेट पु० १ एक लिंगायत वाणी. ह्यानें दुर्गादेवीच्या दुष्काळांत महाराष्ट्राला धान्य पुरविलें त्याच्या सन्मानार्थ श्रावण शुद्ध षष्ठीस मोठा उत्सव अद्यून करण्यांत येतो. ह्यानें औट घटका राज्य केलें. २ सुखवस्तु, रंगेल, आणि कशाचीही चिंता न करणारा माणूस. ❀ **शिराळशेटचें राज्य न०** अल्प काळ टिकणारें वैभव. **टीप**,-ह्या शिराळशेटासंबंधी माहिती आमचे 'मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इ०' ह्या पुस्तकांत पहा.

शिराळी स्त्री० १ दोडक्याचा वेल. २ एक जंगली वेल. **शिराळें न०** दोडका.

शिरिस्ता शिरिस्तेदार वर 'शिरस्ता,' 'शिरस्तेदार' पहा.

शिरी [**म०** शिर=डोकें] **स्त्री०** हत्तीच्या किं० घोड्याच्या डोक्यावर जें वेलबुट्टीदार कापड शोभेसाठीं घालतात तें.

शिरींद, शिरदें न० पावशेर हें माप; चिपटें.

शिरीम पु०, न० पांढऱ्या ठिपक्याच्या रूपाची सौम्य प्रकारची रक्तपीति (फुटणें, पसरणें).

शिरीस [**सं०** शिरीष] **पु०** शिरस,-एक झाड

याचें फूल अति नाजूक असतें.

शिरीस [सं० सर्षप] पु० मोहोरीची एक जात.

शिरें न० १ पांजरण, कुंपण, इ० साठीं किं० पडवळ, दोडका, इ० च्या मांडवांवर पसरण्या-साठीं धायटी, निगडी, इ० झाडांच्या तोड-लेल्या फांद्या किं० काटक्या प्रत्येक. २ शाई करण्यासाठीं नाचणी, बाजरी, इ० अर्धवट जाळून त्यांत पाणी घालून तयार करतात तो पातळ काढा.ह्या काढ्यांत काजळ घोटून काळी-भोर शाई करतात. ३ आहळिव, बोळ, नार-ळाचा रस,इ० द्रव्यांचा बाळंतिणीसाठीं करतात तो औषधी पदार्थ.

शिरोळ [म० शिळा+वेळ] पु०, स्त्री० तिसऱ्या प्रहरानंतर सायंकाळपर्यंतचा थंड वेळ किं० मध्यरात्रीच्या पुढचा पहाटेपर्यंतचा थंडा-[पहा. ईचा काळ.

शिरोळ, शिरोळें मागें ' शिराळी,"शिराळें '

शिल [सं०] पु०, न० १ कापणीनंतर शेतांत राहिलेलें धान्य. २ हें धान्य वेचणें ही तपस्व्याची वृत्ति. ❀ **शिलोंच्छ** पु० १ शेताची कापणी झाल्यानंतर शेतांत पडलेलें धान्य वेचून निर्वाह करणें. २ अशा रीतीनें निर्वाह करणारा माणूस, तपस्वी, इ०. ३ (**लाक्षणिक**) अल्प संग्रह. ४ अव्यवस्थित किं० उडाणटप्पू धंदा. **शिलोंच्छवृत्ति** स्त्री० शेताची कापणी झाल्यानंतर तेथें पडलेलें धान्य वेचून त्यावर केलेला चरितार्थ. पु० असा चरितार्थ करणारा साधु, तपस्वी, इ०,

शिलक, शिलख [अ० षिलख्] स्त्री० १ अनेक बंदुकांतून एकदम उडाविलेल्या गोळ्यांचा वर्षाव. २ सरबत्ती. ३ तोफांची डागणी.

शिलक, शिल्लक [अ० सिलूक] स्त्री० १ कांहीं खर्च होऊन किं० दुसरिकडे जाऊन किं० घर, बारदान, पेटी, पिशवी, इ० त भरून अवशिष्ट राहिलेलें धान्य, पैसा, जनावरें, माणसें, इ० समुच्चयानें. २ पत्रावळ करतांना पानांस पानें जोडावयासाठीं योजतात ती बांबूची किं० कडब्याची काडी; चोय. ३ वायूच्या उपद्रवामुळें किं० लचकल्यामुळें गात्रांत भरते ती उसण किं० उठते ती तिडीक. ❀ **शिलकझाडा** पु० १ जमा आणि खर्च यांचा ताळा पाहाण्यासाठीं शिलकीचा काढतात तो झाडा. २ सर्व खर्च होऊन शिलकीची जी निःशेषता ती. **शिलकबंद** पु० ज्या कागदावर जमेच्या आंकड्यांची बेरीज आणि खर्चाच्या आंक-ड्यांची बेरीज यांची वजावाट करून शिल-कीचा आंकडा काढलेला असतो तो कागद. **शिलकबाकी** स्त्री० शिलक; बाकी. **शिलक सांखळी** स्त्री० १ दर महिन्यास खर्च होऊन कमी कमी होत गेलेल्या शिलकीच्या आंकड्यांची सांखळी किं० परंपरा. २ रोजची जमा आणि रोजचा खर्च यांची वजावाट करून ठरलेला आंकडा. **शिलकी** वि० शिलक असलेला; बाकी उरलेला. **शिलकी डागिने** पु० अ० व० प्रसंग-विशेषींच वापरावयाचे म्हणून बाजूस ठेविलेले दागिने.

शिलकणें [हिं० सिलगना] अ० क्रि० (बंदु-कीचा तोडा, लाकडें, इ०) नीं पेटणें किं० प्रज्व-लित होणें.

शिलका वि० उत्कृष्ट; सर्वोत्तम; नामी.

शिलकावण (–णी) [म० शिलकाविणें] स्त्री० १ पेटवण; पेटाविणें. २ क्रोध चेतविणें किं० उद्दीप्त करणें. ३ कुळाकडून पैसे वसूल करण्या-साठीं सावकार किं० सरकार यांनीं पाठविलेला शिपायी स्वतासाठीं दर्शनीच घेतो जें द्रव्य तें (घेणें). ४ थकलेल्या बाकीबद्दल किं० हप्त्याब-द्दल रोजच्या रोज जो दंड कुळावर बसविला जातो तो. ५ सरकारचा किं० सावकाराचा खाल्लेला पैसा कोणी अमलदार फेडीपर्यंत त्याच्या-वर जो रोजच्या रोज दंड बसविला जातो तो.

शिलकाविणें [म० ' शिलकणें ' चें प्रयो-जक] स० क्रि० १ (लाकूड, बंदुकीचा तोडा, इ०)पेटाविणें. २ (कोणेकाला) रागास आणणें किं० (त्याला) चेतविणें.

शिलंगण [सं० सीमोल्लंघन] न० दसऱ्याचे दिवशीं गांवांतील लोक गांवाची सीमा उल्लंघून जाऊन शमीची पूजा करण्याचा समारंभ करतात तो. ❀ **शिलंगणाचें सोनें हावें त्यानें लुटावें** सार्वजनिक उपयोगासाठीं म्हणून ठरविलेली वस्तु हावी त्यानें हावी तितकी वापरण्याची

त्याला परवानगी असते.

शिलंगणें [हिं० सिलग्ना] अ० क्रि० पेटणें; जळूं लागणें; प्रज्वलित होणें.

शिलगावण (–णी), **शिलगाविणें** मागें ' शिलकावण (–णी), ' ' शिलकाविणें ' पहा.

शिलपट, शिळपट [म० शिळा+सं० वत् (सारखा)] वि० पुचाट; नामर्द; कमजोर; निरुत्साह; मरतुकडा.

शिळपुटी स्त्री० नीरस किं० वाळलेली फांदी किं० काठी.

शिलवंत मागें ' चिलवंत ' पहा.

शिलशिला (–ह्ला), **सिल्सिला** (–ह्ला) [अ० सिलूसिलाह्] पु० १ काम, व्यवहार, इ० ची मागपासून चालत आलेली सरणी किं० परंपरा. २ पंक्ति; ओळ; सरणी.

शिला, शिळा [सं० शिला] स्त्री० १दगड; मोठा फत्तर. २ सपाट पृष्ठभाग ज्याचा आहे असा दगड. ३ जातें. ४ पाटा,–चटणी, पुरण, इ० वाटावयाचा. ५ हत्याराला धार देण्याचा दगड; निसणा. ६ उंबरठा; दाराखालचें लाकूड. ꣸ **शिलोच्चय पु०** पर्वत. **शिलाजित् स्त्री०** एक औषधाच्या उपयोगाचें द्रव्य. **शिलाकुसुम, शिलाज, शिलापुष्प न०** दगडफूल,–मसाला इ० त घालावयाचें एक द्रव्य. **शिलाधातु पु०** १ खडू. २ काव. ३ शिलाजित्. **शिलापट्ट पु०** चटणी, पुरण, इ० वाटावयाचा पाटा. **शिलापुत्र, शिलापुत्रक पु०** १ पाटा. २ जमीन चेपून सपाट करण्याचा रूळ. ३ वरवंटा. ४ खलाचा बत्ता. **शिलारस पु०** चिकासारखा एक सुगंधी पदार्थ. **शिलावर्त पु०** घोड्याच्या गुडघ्याजवळील केशांचा भोवरा.

शिला [अ० सिलाह्=हत्यार] पु० कवच; चिलखत. ꣸ **शिलेखाना** [अ० सिलाह्+फा० खानाह्] पु० चिलखतें, हत्यारें, इ० लढाईच्या उपयोगाच्या वस्तु ठेवण्याची खोली. **शिलेटोप पु०** १ चिलखत. २ शिरस्त्राण. ३ भूल, घोडा, हत्ती, इ० च्या अंगावर दागिने, वस्त्रें, इ० घालून त्यांना शृंगारण्याची क्रिया (करणें). ' जिरेटोप ' ह्याच अर्थी. **शिलेदार** [अ० सिलाह्दार्] पु० स्वतःच्या खर्चानें स्वताचा घोडा बाळगून सरकारची लष्करी नोकरी करणारा राऊत. **शिलेदारी स्त्री०** शिलेदाराचा धंदा किं० दर्जा किं० हुद्दा. वि० उधळेपणाचा. २ डौली; भपकेदार. **शिलेजोर पु०** शस्त्रसामर्थ्य. **शिलेपोस** (–स्त) वि० १ चिलखती. २ हत्यारबंद. ३ सिद्ध; सज्ज; तयार; लढण्याला हत्यारांनीं सिद्ध असलेला (शिपाई); भरताड भरून समुद्रांत चालावयाला तयार (गलबत); पाठीवर सामान लादून प्रवासास सिद्ध केलेलें (घोडें, बैल, इ०). **शिलेभाले पु०** अ० व० लढाईचीं सर्व हत्यारें,–हत्त्येचीं किं० स्वसंरक्षणाचीं. **शिलेभाल्यानिशीं, शिल्याभाल्यांनिशीं क्रि० वि०** लढाईच्या सर्व हत्यारांनीं सिद्ध होऊन; लढण्याचीं सर्व हत्यारें घेऊन. **शिलेदारी ढंग पु०** १ भपका; थाटमाट. २ रंगेलपणाची किं० उधळपट्टीची राहाणी.

शिलाई स्त्री० अंगरखा, विजार, चोळी, इ० कपडे शिवण्याची तऱ्हा किं० शिवण्याबद्दलची मजुरी.

शिलाण न० चुलीवर शिजावयासाठीं चिरून आणि धुऊन ठेविलेली भाजी, शेंगा, इ०.

शिलाणें [सं० शील] न० स्वभाव; वृत्ति.

शिली [सं० शिला] स्त्री० दाराच्या दुहेरी चौकटीची जमीनीसरपट जीं दोन लाकडें असतात तीं प्रत्येक. अशा वरच्या लाकडांना 'घोडे' म्हणतात.

शिलीक, शिलीकसांखळी इ० वर 'शिलक' इ० पहा.

शिलेमान, शिलेमणि [अ० सिलीमान्] पु० अंगठी इ० च्या कोंदणांत बसवावयाचा एक प्रकारचा दगडाचा खडा. डोळे तळावले असतां हा खडा डोळ्यांत फिरवितात.

शिलोंच्छवृत्ति मागें ' शिल ' मध्यें पहा.

शिलोतरी, शिलोत्री पु० जमीनीच्या इजारदाराचा हक्क किं० त्याला हक्क म्हणून जें द्यावें लागतें तें (बिघ्याला एक मण ह्या प्रमाणांत). ꣸ **शिलोतरदारी पु०** शिलोतरी हा हक्क ज्याचा किं० ज्याच्याकडे आहे तो.

शिलोत्तरा पाटील पुढें ' शीळ ' मध्यें पहा.

शिल्प [सं०] **न०** १ कला; हुन्नर. २कौशल्य. ३ हातकाम; कळाकुसर. ॰ **शिल्पकार, शिल्पी** [सं० शिल्पिन्] **पु०** कारागीर. **शिल्पविद्या स्त्री०** हस्तकौशल्य. **शिल्पशाला स्त्री०** हस्तकौशल्याचीं कामें जेथें शिकविलीं जातात किं० केलीं जातात ती जागा किं० तो कारखाना. **शिल्पशास्त्र न०** घरें किं०पूल बांधणें,नावा किं० गलबतें बांधणें,नाना प्रकारचे कुशल कारागिरीचे पदार्थ करणें, इ० संबंधाचें शास्त्र.

शिंव, शींव [सं० सीमा] **स्त्री०** १ मर्यादा; हद्द. २ हद्दीची खूण. ३ किनारा. ४ परमावधि; पराकाष्ठा.५ मानेचा कांटा. ॰ **शिंवकरी, शिंवथडी (-ड्या), शिंवघडा, शिंवझडा, शिंवशेजारी, शिंवसोयरा पु०** आपल्या गांवाच्या हद्दीवर राहाणारा आपला शेजारी; आपल्या गांवाला लागून असलेल्या गांवचा रहिवासी. **शिंवधोंडा पु०** गांवाची हद्द दाखविण्यासाठीं पुरलेला धोंडा. **शींवपूजन न०** १ लग्नासाठीं आपल्या गांवीं येत असलेल्या वराचा गांवाच्या हद्दीवर किं० देवळांत केलेला सत्कार. २ ज्येष्ठी पौर्णिमेस बारा बलुते गांवाच्या सीमेवर जातात तो समारंभ.

शिव[**सं०**]**वि०** १कल्याणप्रद; शुभ. २ मंगलकारक; सुखदायक.**पु०**१ शंकर. २ (**ज्योतिष**) अमृतसिद्धियोग,-एक शुभ समय.३मोक्ष. ४सत्तावीस योगांतील विसावा.**न०** १ मंगल; क्षेम. कल्याण.२मोक्ष.**शिवा,शिवानी स्त्री०** पार्वती.॰ **शिवचतुर्दशी स्त्री०** महाशिवरात्र म्ह०माघ वद्य चतुर्दशी. **शिवरात्रि, शिवरात्र स्त्री०** १ प्रत्येक महिन्याच्या वद्य पक्षांतील चतुर्दशी ही तिथि. २ माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथि. **शिवदीक्षा स्त्री०** अंगाला भस्म लावणें, रुद्राक्षमाळा धारण करणें,इ० रूपें शिवाची आराधना. **शिवधातु पु०** १ पारा. २ स्फटिकविशेष. **शिवधार स्त्री०** जेवणारांना वाढलेलें अत्यल्प तूप (थट्टेंत प्रयोग). **शिवनिर्माल्य न०, पु०** शिवावर वाहिलेलीं फुलें,बेलाचीं पानें, इ० समुच्चयानें. **टीप,**-शिवाला अर्पिलेली वस्तु परत घेतली असतां किं० उपभोगिली असतां फार मोठें पातक लागतें. ह्यावरून ' शिवस्व ' किं० ' शिवनिर्माल्य' म्ह० जी घेतां किं० स्वीकारतां येत नाहीं अशी वस्तु; जिला स्पर्शदेखील करतां कामा नये अशी वस्तु; जी घेतल्यास ती घेणाऱ्याच्या डोक्यावर तें कर्ज म्हणून बोजा राहातो; उ० भाच्याची संपत्ति मी खाल्ली असें तूं म्हणतोस, मी ती शिवस्व (किं० शिवनिर्माल्य) मानतों. **टीप,**-शपथ घेतांना ' शिवस्व ' किं० ' शिवनिर्माल्य ' ह्यांचा उपयोग केला जातो;उ० मी शिवस्वाशपथ तुझ्या उलट गेलों नाहीं. **शिवपुरी स्त्री०** काशी हें क्षेत्र. **शिवमुहूर्त पु०** सूर्योदयीं ज्याला आरंभ होतो तो मुहूर्तविशेष. **शिवयोग पु०** (ज्योतिषांत) वीसावा योग. **शिवरस पु०** कालवणासाठीं तयार केलेली भाताची पेज इ०. **शिवलग्न पु०** (अडाण्यांत) सीमोल्लंघन (दसऱ्याच्या दिवशींचें). **शिवलिंग न०** शिवाचें लिंग(पूजेच्या दृष्टीनें).**शिवशरणार्थ पु०**लिंगायत लोक आणि शैव लोक कोणामाणसास नमस्कार करतांना हा शब्द योजतात.**शिवशितळ** [**सं०**शिव (शुभ)+शीतल (थंड,सौम्य)] **वि०** हुशारी वाटविणारी (हवा, वारा,जागा,घर,इ०); चढावयाला सोपी (घाटी, डोंगर); शांत म्ह० भूतें, पिशाचें, इ० चा उपद्रव जेथें नाहीं असें (स्थळ); जेथें रोगराई नाहीं असा (गांव); जेथें चोरांचा किं० वन्य पशूंचा उपद्रव नाहीं असा (रस्ता, वाट); सौम्य (स्वभाव, माणूस); ह्याच्या उलट ' खष्ट,' 'खडतर; ' सौम्य (दैवत, देव); जिच्या बद्दल भूतांखेतांना योग्य बळी देण्यांत आला आहे अशी (खळ्यावरील धान्याची रास); अक्षुब्ध, शांत (मन, वृत्ति). **शिवामूठ स्त्री०** लग्नानंतर पहिल्या पांच वर्षी श्रावण महिन्याच्या प्रत्येक सोमवारीं मुली शिवाला तांदुळाची मूठ अर्पितात ती, किं० ही मूठ अर्पण करण्याचें व्रत. **शिवालय न०** १शंकराचें देऊळ.२स्मशानभूमि.**शिवालिखित न०** दिनमानाचे आणि रात्रिमानाचे आठ भाग धरून केलेलें शुभाशुभ वेळांचें शिवा (म्ह० शंकरपत्नी) हिनें रचिलेलें कोष्टक. पावणेचार घटका हें मध्यम प्रमाण आहे म्हणून दिनमानाप्रमाणें ह्या भागांचा काळ कमी ज्यास्ती होतो.

शिव पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य.

शिवटणें स० **क्रि०** निसण्यावर घासून (सुरी, चाकू, तरवार, इ०) तीक्ष्ण करणें.

शिवडा पु० गोड्या पाण्यांतील एक मत्स्य.

शिवण [**म०** शिवणें; **सं०** सीवन] **स्त्री०** १ वस्त्र इ० चे दोन तुकडे जोडावयाचे असतां दोहोंस एकत्रित करण्यासाठीं सुईंत ओंविलेल्या दोऱ्याचे टांके एका पुढें एक असे घालून होते ती ओळ. २ वस्त्रादि शिवण्याची क्रिया किं० कला. ३ गुदद्वारापासून शिश्नाच्या अग्रापर्यंतच्या कातडीवर रेषाकार उंचवटा असतो तो. **न०** १ शिवावयासाठीं घेतलेलें कापड किं० कापडें समुच्चयानें. २ घर इ० च्या माथ्यावर घालण्यासाठीं घेतलेलें गवत इ०. **शिवणकाम न०** शिवण्याचें काम; शिवण्याची कला.

शिवण, शिवणी स्त्री० एक झाड. याचें लाकूड पांढरें असून हलकें असतें.

शिवणें [**सं०** सिव्=शिवणें, विणणें] **स०** **क्रि०** १(अंगरखा, बंडी, जोडा,इ० चे दोन भाग) सुईंत ओंविलेल्या दोऱ्याच्या टांच्यांनीं किं० अन्य प्रकारानें संबद्ध करणें. २ अशा प्रकारच्या क्रियेनें (अंगरखा, चोळी, जोडा, इ०) तयार करणें. ३ पर्जन्यादिकांच्या निवारणार्थ(घराच्या) माथ्यावर गवत, झांपा, इ० विशिष्ट प्रकारें आंथरणें. ४ स्पर्शिणें; उ० दूर हो, मला शिवूं नको, विटाळ होईल. ५ (पदार्थाला) हात लावणें; ० मीच ह्या खांबाला प्रथम शिवलों. **शिवशिव शिमगा** [**म०** शिवणें (स्पर्शिणें) +शिमगा (फाल्गुन कृष्ण प्रतिपदा)] **पु०** होळीच्या दिवसाच्या पुढचा दिवस,–ज्या दिवशीं ब्राह्मणांनीं चंडाळाला स्पर्श करुन स्नान करावयाचें असतें; शितळ शिमगा. **शिवूं-नयेशी स्त्री०** विटाळशी स्त्री; मासिक रजःस्रावामुळें अस्पृश्य स्त्री.

शिवरा [**म०** शिवी] **वि०** शिव्या देण्याची खोडी ज्याला आहे असा.

शिंवरा [**म०** शिंपडणें] **पु०** जमीन इ० कांवर पाणी इ० शिंपडणें किं० शिंपडण्याची क्रिया.

शिवराई [**म०** शिव (शिवाजी)+राय (राजा)] **पु०** शिवाजीनें पाडलेलें पैसा हें तांब्याचें नाणें.

शिवराभिवरा, शिवराभेवरा, शिवराबिवरा [**म०** शिना (एक नदी) + भीमा (एक नदी)] **पु०** १ शिना आणि भीमा ह्या नद्यांच्या कांठचीं शेतें किं० त्यांतील पिकें. २कोणत्याही नदीच्या कांठचीं शेतें किं०त्यांतील पिकें; उ० यंदा शिवराभिवरा म्हणण्यासारखा पिकला नाहीं म्हणून आम्हाला धान्याची टंचाई पडली आहे.

शिवशिवणें अ० क्रि० (दांत, कान, कांहीं गात्र, इ०) शैत्यादि कारणांमुळें ठणकणें,दुखणें, किं० ठुसठुसणें, किं० त्यांना कंड सुटणें.

शिंवसर [**म०** सिंह+सरणें] **पु०** सिंह राशींत सूर्य सरला असण्याचा (म्ह० प्रवेशला असण्याचा) काळ; सिंहसंक्रान्ति. ह्या काळांत गाय व्याली असतां ती मालकाचें अनिष्ट सुचवितें.

शिंवसरणें [**म०** शिंवसर] **अ० क्रि०** शिंवसर ह्या काळांत (गाय) विणें. वर ' शिंवसर ' पहा.

शिंवसुरणें, शिंवसूर वर ' शिंवसरणें, ' ' शिंवसर ' पहा.

शिवळ मागें ' शिऊळ ' पहा.

शिवळणें मागें ' शिवशिवणें ' पहा.

शिवळट, शिवळाटी स्त्री० गाडीला जुंपलेल्या बैलाच्या गळ्याला बांधलेला असतो तो पट्टा. [गोवा.

शिवळवट न०गव्हाच्या तिंबलेल्या कणकेचा

शिवाय, शिवाई[**फा०**सीवाय्] **श०यो०अ०** १ खेरीज; वांचून; उ० तूं मला रुपये दिल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं. २ आणखी ज्यास्ती; उ० रामाशिवाय पांच मुलगे तेथें होते (म्ह० एकंदर सहा). **टीप**,–समासांत पूर्वपदीं ' शिवाय ' आला असतां ' ज्यास्तीचा, ' ' अधिक, ' ' अवांतर ' असा विशेषणात्मक अर्थ होतो; उ० शिवायजमा, शिवायमिळकत, इ०. **शिवायच्या दोऱ्या स्त्री० अ० व०** तंबूच्या खांबाच्या माथ्याला बांधलेल्या चार दोऱ्या,– ज्यांचा तंबू ठोकतांना उपयोग होतो.

शिवार, शिंवार [**म०** शींव; **सं०** सीमा] **न०, पु०** १ गांवाच्या भोंवतालची आणि गांवाच्या हद्दींत मोडणारी जमीन. २ रद्दी

किं० निरुपयोगी झाडांचा प्रदेश.३ घर बांधण्यासाठीं गोळा केलेल्या तुळया,लाकडें,तक्ते,इ० समुच्चयानें.४सर्पण गोळा करण्यासाठीं रानांत केलेली फेरी.॥ **शिंवारपंडित पु०** ज्याला अत्यल्प विद्या आहे आणि त्या विद्येवर जो ऐट मिरवितो तो. **शिंवारपाहणी स्त्री०**गांवच्या जमिनींची पहाणी, —सान्याच्या दृष्टीनें सरकारनें केलेली. **शिंवार सैंपाक पु०** शेतांत बसून हुरडा, ओंब्या, इ० भाजून भोजनाच्या ऐवजीं खाणें हा समारंभ.

शिवाशीव [**म०** शिवणें+शिवणें] **स्त्री०** १ स्पर्शानें होतो तो विटाळ.२सुतकाचा विटाळ.

शिवाळ, शिवीळ स्त्री० वर ' शिवळ 'पहा.

शिवी स्त्री० कोणेकाला उद्देशून बोललेलें अपशब्द;अभद्र किं०अमंगळ शब्द,किं०त्यांचें उच्चारण (देणें). ॥ **शिवीगाळ** [**म०** शिवी + **सं०** गालि (शिवी)] **स्त्री० ए० व०** कोणेकाला शिव्या देणें; एकमेकांनीं एकमेकांस शिव्या देणें किं० दिलेल्या शिव्या(करणें). **शिवेरा,शिव्येरा वि०** लोकांना शिव्या देण्याची खोडी ज्याला आहे असा. मागें ' शिवरा ' पहा.

शिवूंनयेशी स्त्री० विटाळशी. मागें 'शिवणें' मध्यें पहा.

शिवूळ स्त्री० मागें ' शिवळ ' पहा.

शिवेरा,शिव्येरा[**म०**शिवी]**वि०**मागें 'शिवरा' पहा. वर ' शिवी ' मध्यें हे शब्द पहा.

शिंशपा [**सं०**] **स्त्री०** १ शिसवा (एक वृक्ष). २ अशोक (एक वृक्ष). ॥**शिंशपाचोद्य** [**सं०** शिंशपा (अशोक) + **सं०** चोद्य (प्रश्न किं० आक्षेप)] **न०** शिंशपा वृक्षासंबंधानें प्रश्न. रावणानें सीतेला शिंशपावृक्षाखालीं कां ठेविलें असा प्रश्न. जेव्हां एकादी गोष्ट करावयाचे अनेक अगदीं सारखे सारखे मार्ग असतात,आणि ती गोष्ट करावयाची असते,तेव्हां कोणच्या तरी मार्गाचा अवलंब करावा लागतो. अवलंबिलेल्या मार्गांत कांहीं विशेष हेतु असतो असें नव्हे.तेव्हां तूं अमूक मार्गानें ती गोष्ट कां केलीस असा प्रश्न विचारणें हा मूर्खपणा होय. यावरून ' शिंशपाचोद्य 'ह्याचा अर्थ रिकामटवळा प्रश्न; ज्याचें उत्तर कांहींही देण्यांत आलें तरी प्रश्न विचारणाऱ्याला कांहीं लाभ होत नाहीं असा प्रश्न.

शिशिर [**सं०**]**पु०, न०** दंव; बर्फ. **पु०** माघ आणि फाल्गुन ह्या दोन महिन्यांचा कालावधि. **वि०** १ थंड. २ ताप नाहींसा करणारा (उपचार इ०). ३ शिशिर ऋतूंतील. ॥ **शिशिरांशु पु०** चंद्र.**शिशिरापगम, शिशिरात्यय पु०**वसंत ऋतु.

शिशी [**फा०** षीषी] **स्त्री०** लहान शिसा; कुपी.

शिशी [**सं०** शिंशपा] **स्त्री०** एक वृक्ष. ह्याचें लाकूड काळें असतें. ॥ **शिशवी, शिसवी वि०** शिसूच्या लाकडाचा बनविलेला (पाट,चवरंग, देव्हारा, तुळई, इ०).

शिशु [**सं०**] **पु०**१सात महिन्यापासून वर्षापर्यंतचें मूल. २ पिलूं. ३आठ किं०सोळा वर्षांच्या आंतला मुलगा. ४ शिष्य. ॥ **शिशुगंधी स्त्री०** बटमोगरा. **शिशुचांद्रायण न०** एक व्रत. **शिशुमार पु०** एक जलचर प्राणी.

शिश्न [**सं०**] **पु०,न०** पुरुषाचें;जननेंद्रिय. ॥**शिश्नदेव पु०** विषयासक्त पुरुष. **शिश्नोदरपरायण वि०** मैथुन आणि मिष्टान्नें ह्यांची फाजिल आवड ज्याला आहे असा; आहार आणि मैथुन ह्यांत सदानिमग्न.

शिष्ट [**सं०**] **वि०** १शिलक;उरलेलें;राहिलेलें; उ० यज्ञशिष्ट, हुताशिष्ट, इ०. २ ज्याला शिकविण्यांत आलें आहे असा. ३ विद्वान्; सुशिक्षित. ४ श्रेष्ठ; सुसंस्कृत. ५ सभ्य चालरीतींचा. ॥ **शिष्टाचार पु०** १ सद्वर्तन. २ सभ्यपणाचें वर्तन. ३ लग्न, मुंज, इ० प्रसंगीं यजमानास करतात तो आहेर(करणें).४ज्याला शास्त्रांत आधार नाहीं पण जें रूढीनें चालत आलें आहे तें कर्म,—लग्नांत वधूवरांनीं विड्या तोडणें,पायघड्या,नांवें घेणें, इ० रूप. **शिष्टाचार करणें** १ रूढीप्रमाणें कांहीं कृत्य करणें किं० कांहीं आचार पाळणें. २ सभ्य चालीरीतींचा भंग न होईल एवढ्या पुरतेंच कांहीं कृत्य करणें; वरपांगीचें करणें; फारसें मनापासून कृत्यविशेष न करणें; केलें म्हणण्यापुरतेंच करणें.**यज्ञशिष्ट वि०** यज्ञ होऊन शिलक राहिलेलें द्रव्य (समिधा, तूप, इ०). **हुताशिष्ट वि०** हवन

होऊन शिलक राहिलेलें(द्रव्य). **शिष्टागमने अनध्यायः पु०** संभावित मनुष्य किं० श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य भेटीस आला असतां अध्ययन बंद ठेवावें आणि सुट्टी घ्यावी. **शिष्टकंटाळ स्त्री०** ज्या मनुष्याशीं आपणास सभ्याचाराप्रमाणें वागावें लागतें, पण जो आपणास मनांतून जवळ नसावा असें वाटतें, असा मनुष्य. **शिष्टसंप्रदाय पु०** समाजांतील संमान्य म्हणून गणिलेल्या माणसांची चालरीति किं० वर्तनसरणी. **शिष्टसंभावना स्त्री०** लग्न, मुंज, इ० प्रसंगीं आलेल्या लोकांपैकीं कांहींना दक्षिणा, वस्त्र,इ० जें कांहीं देतात तें किं० तें देऊन त्यांचा इतरांहून अधिक सत्कार करतात तो. **शिष्टाइकी, शिष्टाई स्त्री०** १ शिष्टपणाचें वर्तन. २ दोन पक्षांत सलोखा घडवून आणण्यासाठीं बोधाच्या गोष्टी ह्यांना आणि त्यांना सांगणें; मध्यस्थी.

शिष्टावणें [**म०** शिष्ट होणें] **अ० क्रि०** आपण शिष्ट म्ह०वड्या दर्जाचे आहों अशी आपली कल्पना करून घेऊन समाजांत वागणें; शिष्टांचा मान आपणास मिळावा अशी इच्छा करणें किं० अशी अपेक्षा बाळगणें (उपहासांत प्रयोग).

शिष्य [**सं०**] **वि०** शासन करण्यास किं० शिकविण्यास योग्य. **पु०** विद्यार्थी. **शिष्या पु०** १ शिष्य.२ श्रीमंताच्या घरीं असतात जे आश्रित ते प्रत्येक; शागीर्द. ३यजमानाचीं किरकोळ कामें करून फावल्या वेळांत विद्या करण्यास राहिलेला मनुष्य. **शिष्यशाखा स्त्री०** मूळच्या गुरूपासून उपदेश घेतलेला शिष्य, ह्या शिष्यापासून उपदेश घेतलेला दुसरा शिष्य, ह्या दुसऱ्या शिष्यापासून उपदेश घेतलेला तिसरा शिष्य,अशा प्रकारें चालत आलेली सांखळी. **शिष्य प्रशिष्य पु० अ० व०** शिष्य आणि शिष्यांचें शिष्य. **शिष्यशाखा स्त्री०** कोणा गुरूचे शिष्य, त्या शिष्यांचे शिष्य, इ० समुच्चयानें; एका गुरूनें घालून दिलेल्या सरणीनें चालणारे त्याचे शिष्य आणि त्या शिष्यांचे शिष्य समुच्चयानें(त्या गुरूचा संप्रदाय विवक्षित असतां). **शिष्यसंप्रदाय पु०** एका विशिष्ट गुरूनें रूढ किं० प्रचलित केलेला पंथ.

शिसकारी, शिसाटी स्त्री० १ एकाद्या खाद्याविषयीं किं० पेयाविषयीं वीट, किळस, किं० अप्रीति; शिसारी. २ मळमळ.

शिसव, शिंसव, शिसवा, शिंसवा पु०, शिसवी, शिंसवी स्त्री० [**सं०** शिंशपा] एक वृक्ष. ह्याचें लाकूड फार काळें असतें. ֍ **शिसवी, शिंसवी वि०** शिसवाच्या लाकडाचा केलेला(पाट, देव्हारा, इ०). **शिंसवेल न०** शिसवाच्या लाकडाचें तेल.

शिसळ [**सं०** शीर्ष; **म०** शीस] **न०** डोईचे केश चापून चोपून न बसविल्या कारणानें अस्ताव्यस्तपणें उडत असतात ते (एकत्वाच्या दृष्टीनें).

शिसा [**फा०** शीशह्] **पु०** १ काचेची बरणी इ० बारदान. २ मधमाशा ज्यांत मध साठवितात ती रचना; मोहोळ. ह्या अर्थी ' शिंसा ' सुद्धां.

शिसा [**सं०** शिंशपा] **पु०** एक वृक्षविशेष. ह्याचें लाकूड फार काळें असतें.

शिसाटी मागें ' शिसकारी ' पहा.

शिसाबासा, शिसाभासा, शिंसाबासा, शिंसाभासा [**म०** शिळा + बासा] **पु०** १ पदार्थांची मोडतोड किं० नासाडी. २ जनावरें, मनुष्यें, इ० ची दुखण्याबाण्याची स्थिति. ३भूत, पिशाच, इ० ची बाधा.

शिसारी, शिंसारी स्त्री० १ पदार्थाचा आलेला वीट; खंती; किळस. २ एरंडेल, बोळ, इ० च्या भक्षणानें किं० घाणीनें वांति होईल अशी भावना होणें किं० उमदळून येणें. ३ तापामध्यें थंडीची येते ती शिरशिरी (भरणें, बसणें).

शिसें [**सं०** शीस] **न०** कथलासारखा एक धातु.

शिस्त [**फा०**] **स्त्री०** १ बाण, धोंडा, इ० चा लक्ष्यावर नेम; निशाण; रोख (धरणें, बांधणें). २ गांवांतील घरवाल्यांची यादी (घरपट्टी इ० वसूल करण्याचें कामीं अनुसरावयाची). ३ योग्य क्रम किं० सरणी; उ० तूं शिस्तीनें वागलास तरच तुला माझ्या घरांत मी ठेवून घेईन. ४बंदोबस्त. **वि०** विवक्षित संप्रदायाला अनुसरून असलेला (व्यवहार, जाबसाल,इ०). ֍ **शिस्तवार वि०** पद्धतशीर; योग्य क्रमांत असलेला. **क्रि० वि०** योग्य क्रमानें किं० सरणीनें.

शिळई स्त्री० शीळ (वाजविणें, घालणें).

शिळक स्त्री० १ बांबूची किं० कडब्याच्या ताटाची बारीक काडी (पत्रावळी लावण्याच्या कामीं योजावयाची); चोय. २ शरीरांत एकदम उठलेली तिडीक; शिणीक. ह्या अर्थी ' शिळका ' असा **अ० व०** प्रयोग बहुधा होतो. **क्रि०** उठणें, भरणें, मारणें, इ०.

शिळकंबा, शिळकोपा [म० शिळा] **पु०** १ दिवसाचा थंड वेळ,–तिसऱ्या प्रहराच्या नंतरचा. २ हवेचा हिंवसपणा. पुढें ' शिळोपा 'पहा.

शिळट, शिळटी स्त्री० १ हवेचा हिंवसपणा (पडणें, लागणें). २ पाऊस पडून गेल्यानंतर जमीनीला मारतो तो दम (येणें);उ०जमीनीला शिळट येऊं द्या मग पेरा.

शिळटणें [म० शिळट] **अ० क्रि०** १ हवेच्या हिंवसपणामुळें (भात इ० चीं रोपें) बिघडणें किं० नासणें. २ (पाणी, खाद्य, इ०) शिळें होणें किं० नीरस किं० बेचव होणें.

शिळणधार, शिळंधार, शिळाधार [म० शिळा (धोंडा)+धार] **वि०** जोराचा आणि जाडी जाडी थेंबांच्या रूपें पडलेला (पाऊस).

शिळपट [म० शिळा(मंद)+सं०वत(प्रमाणें)] **वि०** १ शिळा (खाद्यादि पदार्थ). २ नीरस; निःसत्त्व (कोणताही पदार्थ). ३ निर्वीर्य; पुळपुळीत; बुळा; पराक्रमशून्य; कर्तृत्वहीन. ४ ज्याची धार मंद झाली आहे असें (हत्यार).५ ज्याचेवरील आकृति झिजली आहे असें (नाणें इ०). ६ धर्मिपणानें किं० सुस्ताईनें चाललेलें (काम, कारभार).

शिळबुडा वि० ज्याचा थंडपणा किं०गारपणा अग्न्यादिसंयोगानें किंचित् मोडला आहे असें (पाणी, खाद्य, इ०).

शिळवट स्त्री०, न०, शिळवटी स्त्री० [म० ' शिवळ ' चें एक रूप] १ जुंपलेल्या बैलाची मान आडकावण्याची चौकट.२बैलाच्या मानेच्या दोन बाजूंस जुंवांतून घालतात ज्या दोन खुंट्या त्या प्रत्येक.

शिळवड, शिळवंट, शिळःवट, शिळवण स्त्री०, शिळवरें न० [म० शिळा] शिळे म्ह० ताजे नव्हेत असे खाद्यपेयादि पदार्थ समुच्चयानें.

शिळविणें [म० शिळा] **स० क्रि०** (खाद्यें, पेयें, पाणी, वस्त्रें, इ०पदार्थ)उपयोगांत न आणतां तसेच ठेवून शिळे करणें.

शिळा वि० १ बासा; ताजा नव्हे तो; जो सिद्ध किं० तयार करून बराच काळ लोटला आहे असा (खाद्य, पेय, पाणी, इ० पदार्थ); जें काढल्याला पुष्कळ वेळ झाला आहे असें(दूध); जीं तोडल्याला पुष्कळ वेळ झाला आहे अशीं (फुलें, भाजी, पानें, इ०). २ संथ, धिमा (स्वभाव, माणूस, काम, इ०).॰ **शिळापाका वि०** शिळा; शिळा म्हणून त्याज्य किं० नीरस किं० विसाविशीत. **शिळा बाजार पु०** गांवचा आठवड्याचा बाजार ज्या दिवशीं भरतो त्याच्या दुसऱ्या दिवशीं जीं कांहीं थोडींशीं दुकानें निघून जावयाचीं राहिलेलीं असतात तीं समुच्चयानें. **शिळा बिब्बा पु०**आति सावकाश किं० मंद वेगानें किं० आळसटलेपणानें काम करणारा माणूस,गडी,इ०; मंद, धिमा,किं०चेंगट अधिकारी इ०. **शिळावट स्त्री०** शिळें खाद्य,–भात,आमटी, इ०. **शिळावळ स्त्री०** १शिळें अन्न. २ शिळें अन्न खाणें; शिळ्या अन्नाचें भोजन. ३ तिसऱ्या प्रहरानंतरचा हवेंत येणारा थंडावा;उन्हाची तिरीप मंदावल्यानंतर हवेंत येतो तो गारवा. ह्या अर्थीं ' शिळावेळ ' सुद्धां. **शिळा वेळ पु०,शिळावळ स्त्री०** १ तिसराप्रहरानंतरचा किं० मध्यरात्र उलटून गेल्यानंतरचा हवेंतील थंडपणा किं० गारवा. २ हवेंतील शीतळपणा (सामान्यतः). ह्या दोन्ही अर्थीं ' शिळोपा, ' ' शिळोप्याचा वेळ. ' **शिळोप्याच्या गप्पा स्त्री० अ० व०** दिवसाचीं सर्व कर्तव्यें संपल्यानंतर संध्याकाळीं मित्रमंडळीसह मोकळ्या मनानें चालविलेल्या सुखदुःखाच्या गोष्टी किं०मारलेल्या गप्पा.

शिळा [सं० शिला] **स्त्री०** १ धोंडा. २ टांकी देऊन सपाट आणि साफ केलेला धोंडा. ३ निसर्गात सपाट असलेला मोठा फत्तर.४पुरण, चटणी, इ० वाटावयाचा सपाट धोंडा; पाटा. ॰ **शिळाधार** मागें ' शिळणधार ' पहा. **शिळाधार, शिळाधारा** [म० शिळा (धोंडा) +धारा (पाण्याची धार)] **स्त्री०** मोठमोठ्या

थेंबांनीं आणि जोरानें पडणारा पाऊस (पडणें, लागणें). प्रयोग ए० व० किं० अ० व० होतो. उ० शिळाधार पडली, शिळाधारा पडल्या. **शिळा सप्तमी स्त्री०** श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि किं० ह्या तिथीस स्त्रिया पुत्रप्राप्त्यर्थ करतात तें व्रत. नदीच्या कांठीं एका शिळेवर (म्ह० दगडावर) स्त्रिया वाण ठेवितात. **शिळाश्वेत, शिळासेत** [सं० शिला (दगड) + सेतु (पूल)] पु० रामानें समुद्रावर बांधलेल्या सेतूप्रमाणें सुसंघटित, व्यवस्थित, भक्कम घडणीचा, आटोपसर असा कोणताही पदार्थ,–घर, यंत्र, व्यूह, मसलत, दागिना, भांडें, इ०. [एक पदार्थ.

शिळारस [सं० शिलारस] पु० राळे सारखा

शिळावर्त पु० घोड्याच्या गुडघ्याजवळचा केशांचा भोंवरा. मागें ' शिलावर्त ' पहा.

शिळी स्त्री० १ वाजविलेली शीळ. २ ज्यांत वारा घातल्यानें आवाज निघतो असा पदार्थ; शिटी.

शिळीक स्त्री० १ कडब्याच्या ताटाची किं० बांबूची काडी (पत्रावळ लावणें इ० च्या उपयोगाची); चोय. मागें ' शिळक ' पहा. २ शीळ, शिटी (वाजणें, वाजविणें, फुंकणें).

शिळोत्तरा पु० पुढें ' शीळ ' मध्यें पहा.

शिळोपा पु० मागें' शिळा' वि० मध्यें'शिळा वेळ ' पहा.

शिक्षक [सं०] पु० कोणतीही विद्या, कला, हुन्नर, इ० शिकविणारा किं० शिकविण्याचा धंदा करणारा.

शिक्षण [सं०] पु० १ शिकणें. २ विद्याभ्यास. ३ शिकविणें.

शिक्षणीय [सं०] वि० १ शिकविण्यास योग्य (विद्यार्थी इ०). २ दंड, पारिपत्य, किं० शिक्षा करण्यास पात्र.

शिक्षणें, शिक्षिणें [सं० शिक्ष्] स० क्रि० १ (कोणेकास) शिकविणें किं० पढविणें. २ (कांहीं विषय) कोणेकास शिकविणें. ३ (कोणेकाचें) पारिपत्य करणें.

शिक्षा [सं०] स्त्री० १ शिक्षण; अभ्यास. २ कोणेकास पढविणें किं० उपदेशिणें. ३ कोणेकास केलेला उपदेश. ४ नम्रता. ५ वर्णोच्चाराचें शास्त्र,–वेदाच्या सहा अंगांपैकीं एक. ६ कोणेकाचें केलेलें पारिपत्य.

शिक्षित [सं०] वि० १ शिकविलेला (विद्यार्थी).२ शिकविलेला(विषय). ३ शिकवून तयार केलेला (घोडा इ०). ४ ज्याचें पारिपत्य केलें आहे असा. ५ शिकलेला(विषय, शास्त्र, विद्या).

शी स्त्री० विष्टा (मुलांच्या भाषेंत).

शी,शीक क्रि०वि० हा प्रत्यय कालवाचकांस लागतो पण अर्थांत कांहीं फरक होत नाहीं. आतांशीं ह्म० आतां; मगशी ह्म० मग; मघाशीक म्ह० मघा.

शीक, शीख, पु० हिंदूचीं एक जात किं० त्या जातीचा इसम.

शींक [सं० छिका] **स्त्री०** नाकांतून एकदम बाहेर पडलेला सशब्द वायूचा प्रवाह; शिंक (येणें).

शींग स्त्री० १ धान्य, पीठ, माती, वाळू, इ० ची जमीन इ० वर रास केली असतां माथ्याशीं जो निमुळता आकार उत्पन्न होतो तो; राशीचें शिखर. २ धान्य इ० पदार्थ माप, पात्र, इ० त घातला असतां कांठाच्या वर जो चिंचोळा भाग उत्पन्न होतो तो. ३ अग्राकडे निमुळता होत गेलेला कोणताही उंचवटा (सामान्यत:). * **मापांतील धान्याची शींग मोडणें** मापाच्या कांठाबरोबर धान्य ठेवून बाकीचें धान्य खालीं लोटून देणें. **शिगलोट वि०** विपुल; उ० एके काळीं ह्या शेटजींच्या जवळ शिगलोट दौलत होती. **स्त्री०** वैपुल्य; रेलचेल; उ० यंदा आमच्या गांवीं आंब्याची शीगलोट झाली; उ० शीगलोट आमदानी. **क्रि० वि०** वैपुल्यानें; खूप मोठ्या प्रमाणांत; उ० पंक्तींत शीगलोट लाडू वाढले तरी पांचशें उरले. **शीगलोटा पु०** ज्याची शींग लोटून खालीं पाडविली आहे असें धान्यादींचें माप. **शीगवर क्रि० वि०** विपुल प्रमाणांत; वैपुल्यानें. **शीगवर माप देणें** थोडेसें अधिकच देणें पण यत्किंचित् सुद्धां कमी न देणें.

शीघ्र [सं०] **वि०** १ त्वरित; जलदीचा. २ वेगवान. ***शीघ्रचेतन पु०** कुत्रा. **शीघ्रवेधी**

[सं० शीघ्रवेधिन्] पु० उत्तम तिरंदाज. **शीघ्रकोपी वि०** ज्याला लवकर राग येतो किं० अत्यंत क्षुल्लक कारणावरून राग येतो असा (माणूस). **शीघ्रकवि पु०** सभेंतील लोकांनीं विनंती करतांच जागच्या जागीं कवन (पोवाडा इ०) करून म्हणून दाखविणारा. **शीघ्रबुद्धि स्त्री०** कांहीं एका विषयाचें तावडतोब आकलन करणारी बुद्धि. पु० तावडतोब आकलन करणाऱ्या बुद्धीचा माणूस.

शीट स्त्री० १ चिमणी, राघू, इ० पक्ष्याची विष्टा. २ छींट किं० चीट हें कापड; छापलेलें कापड. ३ पाऊस, कारजें, इ० चे तुषार (मारणें).

शीड न० १ गलबताचें अवजार. २ घोड्याच्या मानेचा झोकदार बाक. **शीडकाठी स्त्री०** अवजाराची काठी; डोलकाठी. **कोणेकाचें शीड उतरणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याची फजीती होणें. **कोणेकाचें शीड उभारणें** तो वैभवाच्या स्थितीस येऊं लागणें; त्याचा उत्कर्ष होत असणें. **कोणेकाचें शीड चढणें** त्याचा उत्कर्ष होणें; तो उन्नत पदावर चढणें.

शीण [सं० क्षीण] **पु०** १ थकवा; श्रांतपण; ग्लानि (येणें, वाटणें). २ खंती; दुःख; खेद; विषाद. ꙳ **शिणीचें दुखणें न०** फार काम केल्यामुळें आलेला ताप. **शीणभाग** [सं० शीण+भागणें] **पु०** फार कष्टामुळें अगदीं थकलेपणाची स्थिति; भोगवटा; (होणें, येणें).

शीण पु०, स्त्री० वय; उमर; उ० तुमचा रामू आणि आमचा गोपाळा हे दोघे एका शिणीचे आहेत. ꙳ **कोणेकाचा शीणभीण फिटणें** त्याच्या वडीलपणाबद्दल आपल्या मनांतील आदर किं० पूज्यभाव नाहींसा होणें.

शीत न० १ शिजलेल्या भाताचा एक एक दाणा. २ गांवच्या भूतांखेतांना दर वर्षी अन्न, बकरा, इ० चा देतात तो बळी. ३ धनुष्याची दोरी; मौर्वी; ज्या; शिंजिनी. ४ कोष्ट्याच्या मागांतील ताण्याच्या तंतूंच्या दोन रांगा पृथक् ठेवणाऱ्या ज्या काठ्या त्या प्रत्येक. ꙳ **असतील शितें तर मिळतील भुतें** आपल्या जवळ पैसा असला ह्मणजे आपणाला मित्रांची टंचाई नसते. **शितावरून भाताची परीक्षा** वस्तूच्या अत्यल्प भागावरून तिच्या समग्र स्वरूपाविषयीं अटकळ बांधतां येते. **शीतकण पु०** शिजलेल्या भाताचा एक एक दाणा.

शीत [सं०] **वि०** १ थंड (हवा, पाणी, खाद्य, इ०). २ मंद; आळशी. ३ मूर्ख. **पु०** १ हिंवाळा. २ कापूर. **न०** थंडी; गारवा. ꙳ **शीतांशु, शीतकर, शीतकिरण, शीतरश्मि पु०** चंद्र. **शीताद्रि पु०** हिमालय पर्वत. **शीताश्मा** [सं० शीताश्मन्] **पु०** चंद्रकान्त मणि. **शीतकृच्छ्र पु०** एक प्रायश्चित्त. तीन तीन दिवस अनुक्रमें पाणी, दूध, आणि तूप पिणें आणि नंतर तीन दिवस उपोषण. **शीतगंध न०** चंदन. **शीतकाळ पु०** हिंवाळा; हेमंत आणि शिशिर या ऋतूंचा काळ. **शीतज्वर पु०** हिंवताप.

शीत [अ० सित] **वि०** सहा,–अरबी साल सांगतांना.

शीतल, शीतळ [सं० शीतल] **वि०** १ थंड. २ पीडा न देणारें; सह्य. **शीतला(–ळा) स्त्री०** देवी ह्या त्वग्रोगाची देवता. ह्या देवतेस 'शीतळा देवी,' असेंही म्हणतात. **शीतळाषष्ठी स्त्री०** माघ शुद्ध षष्ठी ही तिथि. ह्या तिथीस शिळें अन्न खातात. **शीतळासप्तमी स्त्री०** श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि. **शीतळ शिमगा पु०** मागें 'शितळ शिमगा' पहा.

शीम [सं० सीमा] **स्त्री०** मर्यादा; हद्द. ꙳ **शीमधडा (–ड्या), शीमशेजारी, शीमसोयरा, शीमकरी पु०** आपल्या गांवाला चिकटून असलेल्या गांवांतील रहिवासी.

शीर [सं० शिरा=रक्तवाहिनी] **स्त्री०** १ शरीरांतील रक्तवाहिनी. २ वृक्षाचें पान इ० मध्यें पोषक रस पोंचविणारे तंतुरूप अवयव प्रत्येक. ३ दगड, लाकूड, इ० तील वेगळ्या रंगाची रेषा. ४ लाकडाची तुळई, घडविलेला चिरा, इ० ची रेषारूप कड किं० धार. ꙳ **शिरा (किं० शीर) काढणें, तोडणें,** इ० रोगनिवारणार्थ शरीरांतील शिरा (किं० शीर) शस्त्रानें कापून रक्त बाहेर वाहविणें. **कोणेकाच्या शिरा निघणें** तो रोड झाल्यामुळें त्याच्या शरीराच्या शिरा स्पष्टपणें दिसूं लागणें. **कोणेकानें शिरा फुगविणें** तो फार

रागावून ओरडूं किं० चरफडूं लागणें. **म्हैस, गाय, मानवी स्त्री इ० ना शिर फुटणें** त्यांच्या स्तनांतून दूध वाहूं लागणें. **घोड्याला (किं० पोराला) शिर फुटणें** तो जोरानें वाढूं लागणें. **घोड्याच्या शिरा मळणें** त्याचें अंग रगडून आणि चेपून त्याच्या शिरा सईल करणें,–त्याच्या श्रमाचा परिहार होण्यासाठीं.

शीर स्त्री०, न० नारळीची विणलेली अर्धी झावळी.

शीर [**सं०** सिरस्; **हिं०** शीर] **न०** डोकें. ꠶ **शीर सलामत तर पगड्या पंचाऐंशी** उपभोगण्याचें सामर्थ्य अंगीं असल्यावर उपभोगांचे पदार्थ हवे तितके मिळूं शकतील. **शीरदळ न०** १ रक्तवाहिन्यांचा समुच्चय. २ डोकें किं० रक्तवाहिन्यांचें कोणतेंही स्थान. **टीप,**–' शीर ' नें घटित शब्द, वाक्प्रचार, इ० मागें ' शिर ' मध्यें पहा.

शीर्ण [**सं०**] **वि०** १ फुटलेलें; फाटलेलें; मोडलेलें; भग्न. २ सुकलेलें; कृश; रोड; वठलेलें (गात्र, शरीर, झाड). ३ गळलेला.

शील [**अ०** खिलह्] **स्त्री०** १ हत्यार. २ चिलखत. मागें ' शिला ' [**अ०**] मध्यें सामासिक शब्द पहा.

शील [**सं०**] **न०** १ स्वभाव. २ वर्तणूक. चरित्र. ३ सुस्वभाव; सद्वर्तन. ꠶ **दयाशील वि०** दया आहे स्वभावांत ज्याच्या असा म्ह० दयाळू. **अध्ययनशील वि०** अभ्यासाकडे ओढा आहे ज्याचा असा; अभ्यासी. ꠶ **सुशील वि०** चांगल्या स्वभावाचा. याच सरणीनें दुःशील, कुशील, दानशील, इ० चें अर्थ जाणावे. **शीलवान्, शीलवंत वि०** १ सुस्वभावी (माणूस). २ चांगल्या म्ह० शुद्ध अवलादीचा (घोडा). खालीं 'शीळवंत ' पहा.

शींव [**सं०** सीमा] **स्त्री०** गांव, किल्ला, इ० ची हद्द. **शिंवाण स्त्री०** ह्याच अर्थी. ꠶ **कोणेकाला शिंवाणीं उभा न करणें** त्याच्या पासून दूर असणें; त्याचा संपर्क न होऊं देणें; त्याला टाळणें. **शींवपूजन न०** सीमान्तपूजन.

शीस [**सं०** शीर्ष] **न०** भोपळी, पडवळी, तोंडली, इ० च्या फुलाच्या मागें फळाचें जें अगदीं बालदशेंतील गोटीच्या आकाराचें रूप तें. ꠶ **शीसफूल न०** १ फुलाच्या मागें जें फळ धरतें तें. २ स्त्रियांचें एक शिरोभूषण. **शीसफुल, शीसफुली वि०** ज्याला फळें येतात असें झाड; उ० पोपईचें स्त्रीझाड. पोपईचें नरझाड शीसफुली नव्हे.

शीळ [**सं०** शिला] **स्त्री०** १ दगड; धोंडा. २ सपाट धोंडा,–पाटा, धुण्याचा धोंडा, स्नानाचा धोंडा, निसणा, इ०.

शीळ मागें ' शिऊळ ' पहा.

शीळ, शील [**सं०** शील] **न०** स्वभाव; वर्तनसरणी. मागें ' शील ' पहा.

शीळ न० समुद्र हटवून जमीन करावयाची असतां जो बांध घालतात त्याला ज्या प्रथम मध्यें खिंडी ठेविलेल्या असतात त्या प्रत्येक (बांधणें, भरणें, बुजविणें). ह्या खिंडी मागाहून बंद करण्यांत येतात. ह्या खिंडी बुजविण्याच्या आणि हा बांध अभग्न ठेवण्याच्या कामावर नेमलेल्या अधिकाऱ्याला ' शिळोत्तरा पाटील ' असें म्हणतात, आणि त्याचा जो हुद्दा, दर्जा, किं० अधिकार त्याला ' शिळोत्तरा पाटीलकी ' म्हणतात. ह्या बुजविलेल्या खिंडींच्या जागीं कांहीं विधि करून जो धोंडा पुरतात त्याला ' पाटील ' म्हणतात. नदीचें पाणी आडवून आसपासचा प्रदेश जलमय आणि सुपीक करण्यासाठ ी भिंत बांधतात त्या भिंतींत पांणी वाहाण्याला जो मार्ग ठेविलेला असतो त्यालाही ' शील ' असेंच म्हणतात.

शीळवंत पु० जंगम लोकांचा एक भेद.

शुक [**सं०**] **पु०** १ पोपट; राघू. २ व्यासाचा पुत्र. ३ (**लक्षणेनें**) कडकडीत ब्रह्मचर्य पाळणारा पुरुष. ꠶ **शुकनासिक वि०** राघूच्या चोंचीसारखें नाक आहे ज्याचें असा.

शुका, शुक्का [**अ०** पुकाह्] **पु०** लहान पत्र; चिठ्ठी.

शुकी, शुका [**अ०**] **पु०** राजाज्ञेचें पत्र; फर्मान.

शुकी [**सं०**] **स्त्री०** स्त्रीपोपट. **शुकनासिका स्त्री०** राघूच्या चोंचीसारखें नाक.

शुक उ० वा अ० मांजराला हाकून देतांना हा शब्द उच्चारतात.

शुक वि० निर्जन; ओसाड. **न०** ओसाडपणा; उ० त्या वाड्यांत आज शुक आहे. ꠶ **कोणेकाला शुक करणें** (किं० **म्हणणें**) त्याला स्थल-

विशेषीं येण्याला किं० संचरण्याला प्रतिबंध करणें; तूं कोण, कोठला, येथें कशाला येत आहेस, अशी त्याची चौकशी करणें. **तेथें तुला कोणी शुक्र करणार नाहीं** (किं० **म्हणणार नाहीं**) तुला तेथें जाण्याला किं० संचरण्याला कोणी अडथळा करणार नाहीं. **शुकशुकाट न०** निर्जनता; ओसाडपणा; उ० मला सर्व वाड्यांत शुकशुकाट दिसला.

शुक्ति, शुक्तिका [**सं०**] **स्त्री०** १ शिंप; शिंपला. २ मोत्याची शिंप. ३ शंख.

शुक्र, शुकर [अ० शुक्र्] **पु०** आभार मानणें. ॐ**शुक्र गुजार वि**०आभारी;कृतज्ञ. **शुक्र-गुजारी स्त्री** आभारप्रदर्शन (करणें).

शुक्र [**सं०**] **वि०** १ तेजस्वी. २ शुभ्र; निर्मळ. **पु०** १ शुक्राची चांदणी; सूर्यमालेंतील बुधाच्या बाहेर आणि भूमीच्या आंत फिरणारा ग्रह. २ शुक्राचार्य,–दैत्यांचा गुरु. **न०** पुरुषाचें वीर्य किं० रेत. **शुक्रशिष्य पु०** दैत्य. **शुक्रवार पु०** गुरुवारच्या पुढचा आणि शनिवारच्या मागचा आठवड्याचा दिवस. **शुक्राचार्य पु०** १ दैत्यांचा गुरु. २ ज्याला एकच डोळा आहे आणि दुसरा फुटला आहे असा माणूस किं० प्राणी. **शुक्री वि०** शुक्राच्या रंगाचें(मोती इ०).

शुक्ल [**सं०**] **वि०** १ पांढरें. २ शुद्ध; निर्दोष; निर्मळ.३महिन्याचा चंद्रप्रकाशयुक्त अर्धा भाग,–ज्यांत चंद्र दिवसें दिवस वाढत असतो.**पु०**१पांढरा रंग. २ महिन्याचा शुक्ल पक्ष. ३ केवळ ब्राह्मणापासूनच भिक्षा घेऊन चरितार्थ करणारा ब्राह्मण. अशा चरितार्थाला ‘ शुक्लवृत्ति ’ **स्त्री०** म्हणतात. ४ सत्तावीस योगांतील चोविसावा.**न०** डोळ्याचा एक रोग.ॐ**शुक्लकाष्ट न०** लचांड;झेंगट; त्रासदायक लटांबर. खालीं ‘ शुक्लकाष्ट ’ स्वतंत्र प्रतीकांत पहा. **शुक्लपक्ष पु०** १ ज्यांत चंद्र दिवसें दिवस वाढत असतो असा महिन्याचा अर्धा भाग. २ कोणेकाच्या वैभवाचा किं० उत्कर्षाचा काळ. ३एका जातींतील कोणी मनुष्य कांहीं पातक करतो तेव्हां त्याला प्रायश्चित्त देऊन पंक्तिपावन करून घ्यावें असें म्हणणारा जो पक्ष तो शुक्लपक्ष आणि त्याला पंक्तिपावन करणें शक्य नाहीं किं० पंक्तिपावन करून घेऊं नये असें म्हणणारा तो ‘ कृष्णपक्ष ’. **शुक्लाष्टमी स्त्री०** ज्येष्ठ महिन्याच्या शुक्लपक्षांतील अष्टमी ही तिथि. ह्या तिथीस शुक्लादेवीची पूजा केली जाते.

शुक्लकाष्ठ[**म**०शुष्क(सुकलेलें)+काष्ठ(लांकूड)] **न०** १ वाळलेलें लाकूड. २ पुरुषाचें जननेंद्रिय. ३ लचांड; झेंगट; त्रासदायक लटांबर; लोढणें. **टीप,**–कुटुंबांतील कांहीं लाजिरवाणी गोष्ट कोणा स्त्रीनें परक्यास सांगितली म्हणून तिच्या नवऱ्यानें तिला लाकडानें मारलें ह्या दंतकथेवरून हा वाक्प्रचार रूढ झाला. **टीप,**–‘ शुष्क ’ बद्दल ‘ शुक्ल ’ हा अपभ्रंश रूढ झाला आहे,

शुचा [**सं०**] **स्त्री०** १ दुःख. २ शोक.

शुचि [**सं०**] **वि०** १ निर्मळ. २ शुद्ध; निर्मळ. ३ पांढरें. ४ चकचकीत. ५ पवित्र. शुद्ध. ६ प्रामाणिक. ७ निर्दोष. **पु०** १ पांढरा रंग. २ ग्रीष्म ऋतु. **शुचिर्भूत वि०** १ स्नान करून शुद्ध किं० सोवळा झालेला. २ निष्पाप (माणूस); पवित्र आचरणाचा (माणूस). **शुचिष्मान्, शुचिस्मंत वि०** शुद्ध; निष्पाप; सदाचारसंपन्न.

शुंट, शुंठ वि० निरक्षर; ढ.

शुंठि, शुंठी स्त्री०,शुंठ्य न० [**सं०**] सुंठ,–एक तिखट वनस्पति.

शुंडा[**सं०**]**स्त्री०**हत्तीची सोंड. ॐ**शुंडादंड पु०** हत्तीची सोंड. **शुंडायंत्र न०** किमयागाराचें एक यंत्र.

शुतुरनाल [**फा०** शुत्रनाल्] **स्त्री०** उंटावरून न्यावयाची लहानशी तोफ.

शुदामद, शुदामत [**फा०**] **स्त्री०** चाल; वहिवाट; शिरस्ता.

शुद्ध [**सं०**]**वि०** १ निर्मळ, मलरहित. २ ज्यांत दुसऱ्या कशाचीही भेसळ नाहीं असा; उ० हें शुद्ध तूप आहे (ह्म० यांत चरबी इ० कांहीं विजातीय पदार्थ नाहीं).३पांढरें.४निर्दोष; निरपराध; उ० त्याचें वर्तन शुद्ध आहे अशी माझी खातरी आहे. ५ नीटनेटका; असावा तसा. ६ निष्पाप. ७ प्रामाणिक. ८ पवित्र झालेला किं० प्रवित्र केलेला; उ० तो प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झाला; उ० त्याला प्रायश्चित्त देऊन हिंदू संघटनेनें शुद्ध केलें. ९ एकटा; केवळ;फक्त; उ० तो शुद्ध वैदिक आहे (ह्म० तो नुसता भिक्षुकी आहे म्ह० त्याला व्याकरण,

मीमांसा, इ० कांहीं अवगत नाहीं); उ० तूं शुद्ध गाढव आहेस; उ० ही शुद्ध लबाडी होय. १० अमिश्र; विनमिसळीचा. ११ ज्यांतलि चुका काढून टाकल्या आहेत किं० दुरुस्त केल्या आहेत असा (लेख इ०); उ० माझा लेख त्यांनीं शुद्ध करून आपल्या मासिकांत छापिला. १२ अनिष्ट-रहित (मुहूर्त, समय). १३ जातीसंबंधाचा (उपजातीच्या व्यावर्तकत्वें); उ० चातुर्मास्यांत कांदा भक्षूं नये असा नियम केला म्हणजे तांबडा कांदा भक्षूं नये असें वेगळें सांगण्याचें कारण राहात नाहीं, कारण शुद्धाचा निषेध विशिष्टावर जातोच जातो. १४ महिन्याच्या ज्या पक्षांत (म्ह० अर्ध्यांत) चंद्राच्या कला वाढत जातात असा (पक्ष); उ०शुद्ध पक्ष.१५ विद्ध नव्हे अशी (तिथि).**टीप**--शुद्ध हा शब्द समासांत उत्तर पद असतां पुढील प्रमाणें संयुक्त शब्द होतात. प्रमाणशुद्ध म्ह० ज्याचे घटक भाग किं० अवयव योग्य प्रमाणांत आहेत असा (चेहेरा, अंगाचा बांधा, चित्र, इ०). पायाशुद्ध म्ह० ज्याची उभारणी किं० रचना भक्कम किं०निर्दोष आधारावर करण्यांत आली आहे अशी (मसलत, संस्था, इ०). शाळाशुद्ध किं० साळसूद म्ह० योग्य सरणीनें ज्याचें शील बनलें आहे असा; साधा; प्रामाणिक. संप्रदायशुद्ध म्ह० संप्रदायाला अनुसरून असलेला. याच सरणीनें आचारशुद्ध, वळणशुद्ध, बांधेसूद (बांधा+शुद्ध)इ० चे अर्थ जाणावे. ॐ **शुद्धाद्वैत न० (वेदान्त)**शुद्ध म्ह० मायाविरहित अशा जीवब्रह्मांचें ऐक्य आहे असें मत.**शुद्धान्त पु०** १अंत:पुर.२राजाची स्त्री.**शुद्धकोटि स्त्री०** काटकोन त्रिकोणाची बाजू. **शुद्ध कल्याण पु**०(संगीतांत) एक राग.**शुद्ध पक्ष पु**०महिन्याचा शुक्लपक्ष,–ज्यांत चंद्राच्या कला दिवसा दिवसानें वाढत जातात. **शुद्ध समाचार पु०** खालीं ' शुद्धि ' मध्यें पहा. **शुद्ध स्फटिक पु०** १ अत्यन्त निर्द्रव्य माणूस. २ अत्यन्त अशिक्षित किं० अडाणी माणूस. ३ राजा, चोर, इ० नीं पूर्णपणें नागविलेला माणूस. **शुद्धमुख वि०** ज्याणें कपाळावर गंध लाविलेलें नाहीं असा.

शुद्धि, शुद्ध [सं० शुद्धि] स्त्री० १ स्वच्छता. २ शुभ्रपणा. ३ पवित्रता. ४ पवित्र करणें. ५ (वैर) तृप्त करून घेणें; (सूड) घेणें ही क्रिया. ६ (कर्ज) वारणें किं० फेडणें. ७ शोध; तपास; हुडकणें; शोधण्याची क्रिया. ८ चैतन्य; देहभान; उ० त्याच्या डोक्यावर धोंडा पडतांच त्याची शुद्धि गेली. ९ ग्रंथ, भाषण, लेखन, इ० तील दोष, चुका, इ०काढून टाकणें. ॐ**शुद्धिपत्र न०, शुद्धिसूची स्त्री०** ग्रंथांतील अशुद्ध शब्द इ० ज्यांत शुद्ध करून दाखविलेले असतात ते पान. **कोणेकानें शुद्धीवर येणें** त्याणें बेशुद्ध स्थितींतून किं० मूर्च्छेतून मुक्त होऊन देहभानावर येणें. **कोणेकाला शुद्धीवर आणणें** तोंडावर पाणी मारून किं० कांदा हुंगावयास देणें इ० अन्य उपायांनीं मूर्च्छित माणसाला चैतन्य प्राप्त करून देणें. **शुद्धिसमाचार पु०** कोणेकाची प्रकृति, सुस्थिति, दिनचर्या, इ० संबंधाची वार्ता किं० हकीगत(कळणें, कळविणें). **शुद्धबुद्ध [सं० शुद्धि+बुद्धि] स्त्री० ए० व०** १ चैतन्य; देहभान.२ सावधपणा; वस्तुस्थितीची जाणीव; ज्ञान. [कुतरी.

शुन, शुनक [सं०] पु०कुतरा.**शुनी स्त्री०**

शुनासीर, शुनाशीर [सं०] पु० इंद्र,–देवांचा अधिपति.

शुन्य [सं०] वि० १ रिकामें. २ ओसाड. **न०** १ अभाव. २ अभावदर्शक चिन्ह ० हें.

शुपका पु० मागें ' शिपका ' पहा.

शुंभ [सं०] पु० १ दुर्गादेवीनें मारलेला एक दैत्य. २ (**मराठींत**) दगडोबा; बैलोबा; अडाणी माणूस.

शुभ [सं०] वि० १ तेजस्वी. २ सुंदर. ३ कल्याणकारक. **न०** १ सुख. २ कल्याण. ३ लग्न, मुंज, इ० मंगल कृत्य. **पु०** तेविसावा योग. **शुभा स्त्री०** १ पार्वती देवी. २ देवी हा त्वग्रोग. ३ सर्पणाची गोवरी. ॐ **शुभंकर वि०** मंगळ; कल्याणप्रद. **शुभकर्म, शुभकार्य न०** लग्न, मुंज, इ० मंगल कृत्य.**शुभकृत्य न०** मैथुन.**शुभचिन्ह, शुभलक्षण न०** मनुष्य, घोडा, इ० च्या अंगावर जन्मजात जीं चिन्हें (तीळ, भोंवरा, शिबें, इ०) असतात त्यांपैकीं कल्याण सुचविणारीं चिन्हें प्रत्येक.**शुभवार्ता स्त्री०**आनंदाची बातमी,

शुभ्र [**सं०**] **वि०** १ तेजस्वी; उज्ज्वळ. २ पांढरें. **शुभ्रा पु०** रुपाया हें नाणें (भिक्षुकांच्या भाषेंत). ꙮ **शुभ्रांशु पु०** चंद्र.

शुमार,सुमार [**फा०** शुमार्] **पु०** १ आजमास. २ मोजदाद. ३ मितपणा; परिमित प्रमाण. पुढें ' सुमार ' पहा. [प्रारंभ.

शुरवात,सुरवात [अ०शुरूअ] **स्त्री०** आरंभ;

शुरू, सुरू [अ० षरूअ] **वि०** आरंभिलेलें.

शुरू, सुरू [**फा०** सर्व्] **पु०** एक झाड. हें झाड सरळ, उंच, आणि सडपातळ असून माथ्याकडे निमुळतें होत जातें. हें सदा हिरवेंगार असतें. ꙮ **शुरूदार, सुरूदार वि०** सुरूच्या झाडाच्या आकाराचा म्ह०उभा,सरळ,आणि अग्राकडे निमुळता (पदार्थ,–समई, गुलाबदाणी, खांब, इ०).

शुरू, शुरूखुरू [**फा०** सुर्ख़ूरू=तांबड्या तोंडाचा म्ह० टवटवींत चेहेऱ्याचा] **वि०**निर्लज्य; बेशरम. पुढें ' सुरूखुरू ' पहा.

शुल्क [**सं०**] **पु०, न०** १ जकात.२ नफा. ३ किंमत. ४ बयाणा; सचकार. ५ मुलीबद्दल वराकडून घेतलेलें द्रव्य. ६ अहेर. ७ स्त्रीधन.

शुश्रूषक [**सं०**] **पु०** सेवक.

शुश्रूषण न०,शुश्रूषणा, शुश्रूषा स्त्री० [**सं०**] १ ऐकण्याची इच्छा. २ उपासना. ३ आजारी माणूस इ० ची सेवा किं० चाकरी.

शुषिर [**सं०**] **न०** १ विवर; भोक; खळगा. २ मुरली इ० वाद्य.

शुष्क [**सं०**] **वि०** १ सुकलेलें. २कृश; रोड. ३ पोकळ; खोटा; उ० शुष्क सबब. ४ निरर्थक, निष्फळ; लाभरहित; उ० शुष्क वाटाघाट, शुष्क वाद. ꙮ **शुष्क काष्ठ न०** १ वाळलेलें लाकूड. २ आपल्या पाठीस लागलेलें लचांड. मागें ' शुक्क ' मध्यें ' शुक्ककाष्ठ ' पहा. **शुष्काशुष्की क्रि० वि०** व्यर्थ; विनाकारण; उगीचच्या उगीच; लाभावांचून. **शुष्केष्टि** [**सं०** शुष्क+इष्टि(यजन)]**स्त्री०**१श्रावणी, लग्न,मुंज,इ० विधि आपल्याला करतां येतात किंवा नाहीं हें आजमावण्यासाठीं नवशिके भिक्षुक आपल्याच घरांत बसून ते विधि आणि त्यांचे मंत्र, तंत्र, इ० करून पाहातात तें कृत्य.२**टीप.**–मागें 'शून्य'पहा. आपल्या घरीं कोणी बडा माणूस यावयाचा असला तर नोकराचाकरांनीं कसें आणि कोठें उभें राहावें, कोणी कसे नमस्कार करावे, कसे पोशाख करावे, इ० लटुपुटीचा विधि पूर्वी करतात तो. ३ आगामी प्रसंगाची रंगाची तालीम (सामान्यतः). **शुष्कोपचार पु० अ० व०** १ अंतःकरणापासूनचा नव्हे असा सत्कार, भाषण,आश्वासन, आतिथ्य, इ०.

शूक [**सं०**] **पु०,न०** १ जव इ० चें कुसळ. २ कांटा. ३ नांगी. ४ टोक; अग्र; शेंडा. ꙮ **शूककीट पु०** १ विंचू. २ घुला, सुरवंट. **शूकधान्य न०** कुंस असलेलें जव इ० धान्य.

शूकर [**सं०**] **पु०** रानडुकर. **शूकरी स्त्री०** रानडुकरी.

शूद्र [**सं०**] **पु०** हिंदूंच्या ज्या चार मोठ्या जाति त्यांपैकीं चवथी जात किं० त्या जातीचा इसम. **शूद्रा स्त्री०** शूद्र जातीची कोणीही स्त्री. **शूद्री स्त्री०** कोणा शूद्र माणसाची पत्नी. **टीप,**– हिरा, मोती, भांग, सबजी, पिंपळ, इ० च्या जाति सांगावयाच्या असतां ' शूद्र ' शब्द काळसर जातीचा वाचक म्हणून योजला जातो. मागें 'वैश्य' पहा. ꙮ **शूद्रदोक** [**सं०**शूद्र+उदक; म्ह०शूद्राच्या स्पर्शानें विटाळलेलें पाणी] **न०** १ शूद्राच्या स्पर्शानें विटाळलेला कोणताही पदार्थ,– पाणी, वस्त्र, खाद्य, पात्र, इ०. २ शूद्र लोक समुच्चयानें, **शूद्रमुखी वि०** १ गंध न लाविलेला (ब्राह्मण). २ पाय पांढरें असून ज्याचें कपाळ तेजस्वी नाहीं असा (घोडा). **शूद्रलोक वि०** वर 'शूद्रदोक' दोन्ही अर्थी पहा.

शून्य [**सं०**] **वि०** १ रिकामें; ज्यांत कोणी किं० कांहीं नाहीं असें (बारदान, घर, इ०). २ निर्जन, ओसाड (गांव, देश, इ०). ३ खिन्न; निरुत्साह (मनुष्य, अंतःकरण). ४ रहित;हीन; उ० ज्ञानशून्य, विद्याशून्य. ५ ज्यांत अर्थ कांहीं नाहीं असें (भाषण). ६ अमंगळ. ७अविद्यमान; नसलेलें. **न०** १ पोकळी. २ आकाश. ३ अभाव. ४ (**गणित**) संख्या किं० रकम किं० परिमाण मांडतांना ज्या स्थानीं कांहीं नाहीं तें स्थान किं० त्या स्थानीं मांडतात तें चिन्ह ० हें; उ०

८०३ ह्या संख्येंत दशं हें स्थान किं०तेथें जें चिन्ह केलें आहे तें;उ०५रुपये, ०आणे,२पै.येथें आण्याचें स्थान किं० तेथील चिन्ह. ५ अनुस्वार,–अक्षराच्या डोक्यावरचा. ६ निर्जन किं० ओसाड स्थान. ॐशून्यहृदय वि० १ अमिष्ट. २ खिन्न; विषण्ण (मनुष्य).**शून्यमय** वि० निष्फळ,निरर्थक. **शून्यवाद** पु० १ शून्यापासून सृष्टि झाली अशा मताचा एक बौद्धांचा पंथ. अशा मताचा जो तो 'शून्यवादी '. २ कांहीं नाहीं म्ह० केवळ जो अभाव तेंच काय तें ब्रह्म असें मत. **शून्याकार** वि० रिकामा;ओका.**शून्य मनस्क** वि० चालू विषयाकडे ज्याचें लक्ष्य नाहीं असा; खिन्न; उद्विग्न; विषण्ण. **शून्या** स्त्री० वांझ स्त्री. **शून्यस्थानीं पडणें** निष्फळ होणें; फुकट जाणें.**शून्यलब्धि** स्त्री० भाज्यापेक्षां मोठ्या रकमेनें भागिलें असतां उत्तर शून्य येणें.

शूर [सं०] वि० १ धीट; लढाई, वाद, शिकार, इ०मध्यें न कचरणारा; लढण्यांत बाका. २ कोणतेंही काम धाडसानें, दृढनिश्चयानें, किं० नेटानें करणारा; कोणत्याही कामांत माघार न खाणारा. दानशूर म्ह० मोठा दाता. वादशूर म्ह० वादविवादांत पटाईत. रणशूर म्ह० समरांगणांवर पराक्रम करणारा. भोजनशूर म्ह० १ आपला आहार मोठा आहे अशी बढाई मारणारा. २मोठा खादाड. आरंभशूर म्ह० कामाला नुसती सुरवात करून काम टाकून देणारा. आरंभशूराः खलु दक्षिणात्याः म्ह० दक्षिणी लोक एकाद्या कामाला सुरवात करून ठेवण्यांत पटाईत असतात; तें काम शेवटास नेण्याची त्यांना धमक नसते; ते उत्साहानें काम आरंभतात पण पुढें ते कंटाळतात.

शूर्प [सं०] न० सूप,–पाखडण्याचें साधनविशेष. ॐ **शूर्पकर्ण** पु० १ हत्ती. २ गणपति. **शूर्पनखा, शूर्पणखा** स्त्री० १ रावणाची बहीण, –जिचें नाक आणि कान हीं रामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणानें कापिलीं. २ कोणीही हिडिंबा किं० भांडरी स्त्री.

शूल, शूळ [सं० शूल] पु०, न० १ अस्त्रविशेष; भाला इ० टोंकदार शस्त्र. २ शंकराचा त्रिशूळ. ३ लोखंडी खिळा. ४ वधासाठीं उभारलेला अणकुचीदार स्तंभ.५ वेदना;तिडीक. ६ मस्तक, इ० दुखणें कायमचा पोट, हा रोग; उ० पोटशूळ, मस्तकशूळ. ७ संधिवात. ८ मांस भाजावयाची सळई. ९ नववा योग. १० (लाक्षणिक) मत्सराचा उद्रेक; उ० मला बढती मिळाली म्हणून गोविंदरावाच्या पोटांत शूळ उठला. **टीप**,–मराठींत'शूळ'बहुधा पु०योजतात. **त्रिशूल** (–ळ) पु०, न० शंकराचें आयुध. **शूलधर, शूलपाणि, शूलभृत्** पु० शंकर.

शृंखला (–ळा) [सं० शृंखला] स्त्री० सांखळी.

शृंग [सं०] न० १ बैल, रेडा, गाय, इ० च्या डोक्यावर जे अस्थिरूप अवयव असतात ते प्रत्येक; शिंग. २ वाजवावयाचें शृंगाकार जें धातूचें साधन करतात तें. ३ पर्वत इ० चें अग्र किं० शिखर. ४ चंद्राची कोर. ५ कोणत्याही पदार्थाचें टोंक. ६ पिचकारी; कारंजें. ७ (लाक्षणिक) कुरापत; भांडणाचें मूळ. ॐ **शृंगऋषि** पु० एक ऋषि. अवर्षणाचे वर्षी ह्या ऋषीची मृत्तिकामय आकृति पाऊस पडावा म्हणून पूजितात.**शृंगवेर** न० गंगेच्या उत्तर तीरावरील एक गांव,–हल्लींचें मीरझापूर. राम वनवासास गेला तेव्हां तेथें गुह हा निषादाधिपति राज्य करीत होता. **शृंगग्राहिका** स्त्री० समुदायाचें समुदायत्वें करूनच ग्रहण न करतां समुदायगत व्यक्तींचें प्रत्येकीं पृथक् पृथक् ग्रहण करावें असा जो समुदायाच्या उपादानाचा प्रकार तो. **शृंगी** [सं० शृंगिन्] वि० शंगें ज्याला आहेत असा प्राणी (गाय, बैल, इ०). पु० १ पर्वत. २ बैल. ३ शंकराचा नंदी. ४ मेंढा. **शृंगिणी** स्त्री० गाय.

शृंगार [सं०] पु० (साहित्य)१ नवरसांपैकीं एक.'अद्भुत' मध्यें हे नऊ रस पहा. स्त्रीपुरुषाचें प्रेम,त्याचा संयोग,वियोग,इ०च्या वर्णनांत शृंगाररस असतो. २ स्त्रीनें नानाविध चेष्टांनीं केलेलें प्रेमाचें आविष्करण. ३ नटणें; सजणें. ४ मैथुन. ५ हत्तीची सोंड रंगविणें. ॐ **शृंगारगळेसरी** स्त्री० स्त्रियांचे गळ्यांत घालावयाचें एक भूषण. **शृंगार चेष्टा** स्त्री० कामविकाराच्या उत्प-

तीमुळें जे नानाविध हावभाव पुरुष किं० स्त्रिया एकमेकांपुढें करतात ते. **शृंगारपट्टी स्त्री०** घराच्या पुढच्या दाराच्या चौकटीच्या माथ्यावरील जी गणेशपट्टी तिच्यावरची नक्षीदार पट्टी. मागें ' गणेश ' मध्यें ' गणेश-पट्टी ' पहा. **शृंगारमरालिका, शृंगारमराळी स्त्री०** गोंडस आणि सुंदर स्त्री. **शृंगारलज्जा स्त्री०** स्त्रीनें पुरुषाच्या संनिधीस असतांना दाखविलेली ढोंगीपणाची लाज. **शृंगारी वि०** १ शृंगार रस वठविण्यांत किं०वर्णिण्यांत प्रवीण(शाहीर). २ शृंगाररस ज्याला फार आवडतो तो. ३ शृंगाररसानें परिप्लुत असें (काव्य, श्लोक, नाटक, इ०). ४ घराच्या बांधणीचा एक प्रकार आहे त्या प्रकारचें बांधलेलें (घर).

शृंगारणें [**म०** शृंगार] **स० क्रि०** सजाविणें; नटाविणें; सुशोभित करणें.

शृगाल [**सं०**] **पु०** १ कोल्हा. २ ठग; लबाड माणूस. **शृगाली स्त्री०** कोल्ह्याच्या जातीची स्त्री.

शें [**सं०** शत; **हिं०** से] **वि०** शंभर. याचा उपयोग संख्यावाचक विशेषणापुढें होतो; उ० एकशें, सव्वाशें, दीडशें, पाचशें, इ०. ॐ **शेंसवाशें वि०** सुमारें शंभर आणि सवाशें ह्यांच्या इतके. ह्याच सरणीनें ' शेदीडशे, ' शेदोनशें ' चे अर्थ जाणावे.

शेऊर स्त्री० एक झाड.

शेंएंशी वि० ' शांयशी ' चें गांवढळ रूप.

शेक [**हिं०**] **पु०** १ अग्नीची धग किं० उष्णता. २ दुखरें गात्र गरम पाण्यानें किं० तापलेल्या गोंड्यानें उबावणें. ३ थंडीच्या निवारणार्थ अग्नि, शेकोटी, इ० ची ऊब किं०उष्णता(घेणें). **न०** दुसऱ्याला आपलें जनावर नांगरणें इ० कामासाठीं उसनें दिलें असतां मोबदला जें द्रव्यादि घेतलें जातें तें. ॐ **शेकशेगडी स्त्री० ए० व०** बाळंतिणीला शेक देणें, तिचें अंग चोळणें, इ० उपचार समुच्चयानें.

शेकचिल्ली, शेखचिल्ली [**फा०** शेख्=साधु; चिल्ला=उपोषण आणि ध्यान] **पु०** १ तपस्वी; अवलिया. २ कोणाचा वचक न बाळगतां स्वताच्या लहरी प्रमाणें वागणारा माणूस.

शेकट, शेगट, शेवगा, शेगवा पु० एक झाड. याच्या शेंगांचे तुकडे कढी, पिठलें, इ० त घालतात. ॐ **शेक (-ग-) टवणी न०** शेवग्याच्या शेंगा किं० पाला यांचें करतात तें कालवण किं० सार.

शेकडा [**सं०** शत; **हिं०** सेकडा] **पु०** शंभरांचा समुच्चय. **क्रि० वि०** प्रत्येक शंभरास (अमुक किंमत, अमुक व्याज, इ०). ' दर शेकडा ' ह्याच अर्थी. ॐ **शेकडों, शेकडोंशें क्रि० वि०** कित्येक शेकड्यांनीं; अनेक शेकड्यांच्या रूपांत. **शेकडों, शेकडोंशें वि०** कित्येक किं० अनेक शेकड्यांनी मोजतां येण्याइतके.

शेकडु वि० किंचित् कडू(कारलें,औषध,इ०).

शेकणें [**म०** शेक; **हिं०** शेकना] **स०क्रि०** १ (पदार्थ, गात्र, इ०) सूर्याचें उन्ह, अग्नीची उष्णता, उन्ह पाण्यांत भिजविलेलें फडकें, इ० च्या योगानें कढत किं० उष्ण करणें. २ दुखरा डोळा, गात्र, गळूं, इ० पाण्याच्या वाफेनें किं० अन्य प्रकारें उबविणें किं० तप्त करणें,-आराम वाटण्यासाठीं. ३(व्यापार, धंदा, मसलत,उपदेश, इ० नीं) कोणेकाची हानि करणें किं० कोणेकाला चाट बसविणें; उ० ह्या साबणाच्या धंद्यानें मला शंभर रुपयांस शेकणें. ४ (तव्यावर भाजलेली भाकरी, चपाती, इ०) निखाऱ्याच्या प्रत्यक्ष उष्णतेनें पूर्णपणें भाजणें. **अ० क्रि०** १ तापणें; तप्त होणें. २ (डोळा किं० शरीराचा दुखरा भाग) वाफ, उन्ह पाण्यांत भिजविलेलें फडकें,इ०नीं योग्य तितक्या प्रमाणांत उबावला जाणें. ३ हानिकारक होणें. ॐ**कोणेकाच्या अंगावर**(किं० **डोक्यावर**)**एकाद्या कारभाराची समिध शेकणें** त्या कारभारामुळें त्याचें नुकसान होणें, किं० त्यामुळें त्याला चट्टा बसणें. **माझी मसलत माझ्याच अंगावर शेकली** तिच्यामुळें मला स्वतालाच चट्टा बसला किं० माझेंच नुकसान झालें. **रामूची संगत धरलीस तर ती तुझ्यावर शेकेल** त्याच्या संगतीमुळें तुझी मानखंडना होईल किं० अन्य कांहीं प्रकारें तुला त्रास होईल. **मी मधुकररावाला जामीन राहिलों पण ती जामिनकी मजवर शेकली** मला त्याचेंबद्दल सारे पैसे भरावे लागले. **लग्न-**

कार्यांत सोंवळ्या ओंवळ्याची समिधच शेकलेली असते त्या वेळीं सोंवळ्या ओंवळ्याकडे विशेषसें लक्ष्य देण्यांत येत नाहीं. टीप,–ज्या गृहस्थानें स्मार्ताग्नि ठेविला आहे त्याला त्यांत रोज यथाविधि आहुति द्याव्या लागतात. परंतु प्रवासादि कांहीं अडचण पुढें यावयाची असल्यास तो आपल्या स्मार्ताग्नीवर एक मंत्र म्हणून एक समिध शेकून ठेवतो. मग अडचण दूर झाल्यावर कोणत्याही अग्नीवर ही समिध मंत्रपूर्वक अर्पण करतो. याचे योगें त्याचा स्मार्ताग्नि पुन्हा सिद्ध होतो आणि ह्या स्मार्ताग्नींत त्याला नेहमींप्रमाणें आहुति देतां येतात. समिध स्मार्ताग्नीवर शेकून घेतली म्हणजे त्या अग्नीचें वीर्य आणि पावित्र्य त्या समिधेच्या ठायीं येतें. समिध शेकणें ह्या विधीमध्यें अग्नीचें वीर्य आणि पावित्र्य त्यांतून काढून घेतलें जातें इतकाच अर्थ वरील सर्व वाक्प्रचारांत आधारभूत झाला आहे. कांहींतून ' समिध ' हा शब्दही गळून गेला आहे.

शेकाटणें [**म०** ' शेकणें ' चें एक रूप] **स० क्रि०** शेगडी,चूल,इ०च्या जवळ किं०उन्हांत बसून (अंग) तापवून घेणें.

शेकाटा [**म०** शेकाटणें] **पु०** शेगडी, चूल, इ० च्या जवळ बसून किं० उन्हांत बसून अंग तापवून घेणें ही क्रिया किं० असा घेतलेला ताप (घेणें).

शेकाटा [**म०**शेकट] **पु०**१ शेकटाच्या शेंगा, अगस्त्याचीं फुलें,इ०पिवळटून तोडून काढण्याच्या उपयोगाचा आणि टोकाला लोखंडाचा आंकडा असलेला लांब बांबू. २ कोणत्याही कामासाठीं योजावयाचा लांब बांबू ह्याच अर्थीं ' शेकाटी ' **स्त्री०** असाही शब्द आहे.

शेकाटी [**म०** शेकणें] **स्त्री०** गवत, पानें, काटक्याकुटक्या, इ० ची शेकण्यासाठीं पेटविलेली रास.

शेकार पु० सूर्याचें उन्ह,वारा,पाऊस,इ० च्या निवारणार्थ घराच्या माथ्यावर घालावयाचें किं० घातलेलें गवत, झावळ्या, इ० समुच्चयानें.

शेकारणी [**म०** शेकारणें] **स्त्री०** पर्जन्य, सूर्याचें उन्ह, वारा, इ० च्या निवारणार्थ घरावर गवत, झावळ्या, इ० पसरण्याची क्रिया.

शेकारणें [**म०** शेकार] **स० क्रि०** सूर्याचें ऊन, वारा, पाऊस, इ० च्या निवारणार्थ (घरावर) गवत, झावळ्या, इ० पसरणें.

शेकावणें [**म०** शेकणें] **अ० क्रि०** १ होरपळलें जाणें; तापणें. २ हानि पावणें; नुकसानीस पात्र होणें; उ० त्या कारभारांत मी शंभर रुपयांस शेकावलों.

शेकुटी, शेकोटी [**म०** शेकणें] **स्त्री०** काटक्याकुटक्या, पानें, इ० पेटवून शेकावयासाठीं केलेली रास.

शेख [**अ०** शैख़्] **पु०** पीर; वृद्ध; साधू. ॐ **शेखी स्त्री०** बढाई; प्रौढी. **शेखी शोखी स्त्री०** गर्वाचें वर्तन. [प्रतिक पहा.

शेख चिल्ली पु० मागें ' शेकचिल्ली ' स्वतंत्र

शेखदार [**फा०**] **पु०** कमाविसदाराच्या हाताखालचा कारकून गांवावर नेमिलेला असतो तो. त्याचा जो हुद्दा किं० अधिकार त्याला ' शेखदारी ' म्हणतात.

शेखर [**सं०**] **पु०** १ तुरा. २ डोक्यावर शोभेसाठीं घालतात तो गजरा इ०. ३ पर्वतादिकांचा माथा किं० शिखर. ४ कोणत्याही समुदायांत श्रेष्ठ (माणूस, पदार्थ).

शेखी [**फा०** पैखी] **स्त्री०** बढाई, ऐट, श्रेष्ठपणाचा गर्व (मिरविणें, दाखविणें, करणें,इ०).

शेखीं [**म०** ' शिखरीं ' चें तोकडें रूप] **क्रि० वि०** अंतीं; शेवटीं; परिणामीं; अखेरीस.

शेंग स्त्री० तूर, शेवगा, अगस्ता, इ० झाडांचें लांबोड्या आकाराचें आणि आंत बीजें असलेलें फळ.

शेगट पु०, न० शेवगा किं० शेगवा नांवाचें झाड. मागें ' शेकट ' पहा. ' शेगटवणी ' मागें ' शेकट ' मध्यें ' शेकटवणी ' पहा.

शेगडी स्त्री० शेक घेण्याच्या उपयोगाचें किं० पदार्थ भाजणें, तापविणें, शिजविणें, इ० च्या उपयोगाचें पात्रविशेष.

शेंगाडा पु०, शेंगाडी स्त्री० लांब आणि जाडी वेळू; वांसा.

शेंगोळी स्त्री०,शेंगोळें न०डाळीच्या पिठाचा तोंडीं लावण्यासाठीं करतात तो पदार्थविशेष.

शेंघ वर ' शेंग ' पहा.

शेचाळ, शेताळ, शेचाळीस, शेताळीस, [**म०** सहा+चाळीस] **वि०** चाळिसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

शेज [**सं०** शय्या] **स्त्री०** १ निजावयासाठीं भूमि इ० वर करतात तें वस्त्रादींचें आस्तरण. २ मुंजा मुलगा, नवरा मुलगा, नवरी मुलगी, इ० च्या कपाळावर गंध किं० कालविलेली पिंजर इ० चा लेप अक्षता चिकटावण्यासाठीं करतात तो (करणें, लावणें). ३ मोहरमाच्या सणांत मुसलमान लोक मखराच्या आकाराची करतात ती रचना. **स्त्री०, न०** रांग; पंक्ति; अनुक्रम. ❀ **शेज आरती,शेजारती स्त्री०**रात्रीं देव निजण्यासाठीं शय्येवर आडवे झाले असें कल्पून भक्तजन करतात ती आरती. **घोड्यानें शेजेस येणें** त्यानें निजण्यासाठीं जमिनीवर आरामांत पडणें. **कांहीं काम शेजेस लागणें** तें सुरळीतपणें चालू लागणें. **माणसें इ० ची शेज लागणें** एकामागून दुसरा, दुसऱ्या मागून तिसरा, अशा रीतीनें त्यांनीं क्रमवार उभें राहणें किं० चालणें.

शेजरें न०१ बीजें पेरावयासाठीं बाजूस काढलेलीं कणसें बांधून ठेवण्यासाठीं केलेली गवताची लांबोडी गुंडाळी. २ खळ्यावर झोडपून काढलेल्या दाण्यांपैकीं बीजें म्हणून दाणे बाजूस काढण्यासाठीं केलेलें असतें जें लहान खळें तें.

शेजा [**म०** सज्जा] **पु०** दारावर किं० घराच्या माथ्यावर जी लहानशी खोली करतात ती.

शेजार [**म०** शेज=रांग] **पु०** सांनिध्य किं० संन्निधीचे लोक. ❀ **शेजारी पु०** संन्निधीस असलेला किं० राहाणारा. **शेजारीण, शेजी स्त्री०** शेजारी राहणारी स्त्री; संन्निधीस असलेली स्त्री. **शेजारपाजार पु० ए० व०**१शेजारचे लोक, घरें, इ० समुच्चयानें.

शेजुटणें [**म०**शेज] **न०**लग्नांत विड्या तोडणें, सुपाऱ्या लपविणें, नांवें घेणें, इ० पोरखेळ समुच्चयानें. [इ० पहा.

शेझार, शेझारी इ०वर ' शेजार, ''शेजारी'

शेट [**सं०** श्रेष्ठिन्=व्यापारी,कारागारि,इ०चा मुख्य] **पु०** १ सोनार, कासार, इ० जातीचा कोणीही पुरुष किं० त्यांच्या नांवापुढें योजावयाचा शब्द;उ० गोविंदशेट इ०.२पेढीवाला,सावकार.**शेटजी पु०**कोणी व्यापारी,कारागीर,इ०किं० त्यांच्या नांवापुढें बहुमानानें लावावयाचा शब्द; उ०दामू शेटजी. **शेटी पु०**कोणीही सावकार,पेढीवाला,इ०.**शेटशाई स्त्री०** डौल; मिजास (करणें, मिरविणें, लावणें, इ०). **शेटसावकार पु०अ०व०** श्रमितलोक, सावकार, पेढीवाले, व्यापारी, इ०. **शेटाई स्त्री०** शेटजीची मिजास (निंदेत किं० उपहासांत). **शेटाणी स्त्री०** शेटजीची पत्नी. **शेटशाई स्त्री०** एक प्रकारची मोहोर. **शेट्या पु०**पेठ, बंदर, इ० व्यापाराच्या ठिकाणीं वजनें, मापें, इ० तपासणारा अमलदार.

शेठ, शेठजी, शेठाणी, इ० वर ' शेट, ' ' शेटजी, ' ' शेटाणी, ' इ० पहा.

शेड स्त्री० १ भोपळा, कलिंगड, फणस, इ० मोठ्या फळाची फाक. २ माड, सुरमाड, इ० च्या खोडांत जे तंतु असतात ते प्रत्येक. ३ वेली इ० च्या खोडाची लांब लचक साल,–जी मोळ्या, भाऱ्या, इ० बांधण्यासाठीं योजतात.

शेडगांव पेडगांव न० वाद, तंटा, कलह, इ० च्या प्रसंगीं चार चौघांनीं एकत्र जमून तात्पुरता केलेला निकाल किं० उभय पक्षांत घडवून आणिलेला सलोखा.

शेंडफळ न० खालीं ' शेंडा ' मध्यें पहा.

शेडमाती स्त्री० एक प्रकारची पिवळसर माती. खालीं ' शेडू ' पहा.

शेडा पु० १ लांबलचक आणि मजबूत दोरी,–गलबत इ० तून जड सामान शेंदून वर घेणें किं० खालीं सोडणें इ० च्या उपयोगाची. २ कोणत्याही कामीं योजावयाची दोरी. ३ घड्याळ इ० कोट,जाकीट, इ० ला आडकावण्याची सोनें, चांदी, इ० धातूची सांखळी,गोफ, इ०. ४ गवत, लाकडें, इ० चा गठ्ठा बांधावयासाठीं काढलेली झाड, वेली, इ० ची साल.

शेडा पु० १ डुकर, रेडा, इ० चा काळसर पिवळट रंग. २ अंधक किं० अपुऱ्या प्रकाशामुळें किं० डोळ्याच्या अशक्तपणामुळें पदार्थांचें जें अस्पष्ट रूप दिसतें तें.

शेंडा [सं०शिखंड] पु०झाड, वांसा, वांबू, पान, इ०चें टोक.⊛**शेंडागोंडा पु० ए० व०** भाजीच्या उपयोगासाठीं तोडलेलीं पानें, फुलें, शेंगा, इ० समुच्चयानें; उ० तूं मळ्यांत गेला होतास तेथून कांहीं शेंडागोंडा कां नाहीं आणलास? **शेंड्या-गोंड्यास येणें** १ (जोंधळा, बाजरी, इ० च्या तांटांनीं) कणसें उत्पन्न करण्याच्या स्थितीस येणें. २(कोणत्याही कार्याची किं० प्रयत्नाची) फलनिष्पत्ति बहुतेक पूर्ण झालेली असणें. **शेंडाबुडखा, शेंडामुंधा, शेंडाबुंधा पु० ए० व०** १ गोष्ट, वृत्तान्त, इ० चा सुरवातीचा कांहीं भाग आणि कांहीं शेवटचा भाग; अर्धवट किं० अपूर्ण स्वरूपांत ऐकिलेली किं० पाहिलेली हकीगत, गोष्ट, इ०. २ कांहीं गोष्टीची इत्थंभूत किं० तपशीलवार हकीगत; उ० त्या भांडणाचा शेंडाबुडखा मला सगळा ठाऊक आहे. **शेंडा बुडखा करणें** तुळई इ० साठीं झाडाच्या खोडाचा किं० फांदीचा हावा असेल तितका भाग राखून पुढचा भाग तोडून टाकणें. **शेंडा मोरा पु०** मुलाच्या टाळूवरचे केश,—जे कपाळावर लोंबतात म्हणून त्यांची गांठ मारतात.शेंडा मोरा बांधणें म्ह०ह्या केशांस गांठ देणें. शेंडामोरा सुटणें म्ह०ही गांठ सुटून केश कपाळावर येणें.**शेंडफळ,शेंडेफळ** [**म०** शेंडा+फळ]**न०** १ भोपळा, काकडी, पडवळ, इ०चा वार सरल्यावर शेवटा खालीं येतात जीं फळें तीं प्रत्येक. २ ऋतु सरतां सरतां येतात तीं फळें प्रत्येक. ३ म्हातारपणचें अपत्य.४झाडाच्या अगदीं माथ्याकडचें फळ. **शेंड्यावर बसून झाड तोडणें** ज्यांत आपलें धडधडीत नुकसान होणार तें करणें. **शेंडे छाट** [**म०**शेंडा+छाटणें] **पु०** झाडांचे शेंडे किं० अग्रे तोडणें.**शेंडें धान्य** [**म०** शेंडा+धान्य] **न०** बाजरी इ० कित्येक धान्यांच्या रोपांना पहिलें पीक काढून घेतल्यानंतर पुनः जीं कणसें येतात त्यांतलि धान्य.

शेडी, शेडू स्त्री०एक प्रकारची पांढरी पिसळर माती; शाडू.

शेंडी [**स०** शिखंड] **स्त्री०** १ हिंदू लोक डोक्यावर मध्यभागीं ठेवितात ते केश समुच्चयानें. २ मोर, कोंबडा, इ० पक्ष्यांच्या डोक्यावरील तुरा. ३ शेंडेनक्षत्राचें शेपूट. ४ घोड्याच्या कपाळावरचे दोन कानांच्या मधले केश समुच्चयानें. ५ सोललेल्या नारळाच्या देठाकडच्या भागास जो काथ्याच्या तंतूचा समुदाय असतो तो. ६ तेल्याचा घाणा, उसाचा चरक, इ० च्या लाटावरील फळी किं० तक्ता. ⊛ **शेंडी फुटणें** १ एकाद्या कामांतून दुसरें एकादें बारीकसें नवीन काम निघणें. २ एकाद्या मोठ्या खर्चाबरोबर दुसरा एकादा लहानसा खर्च करण्याची जरूरी येणें. **एखाद्याची शेंडी सापडणें** (किं० **हातांत येणें**)त्याला आपल्या कह्यांत आणण्याचें साधन आपणाला मिळणें. **एखाद्याची शेंडी गुंतणें** तो आडकलेल्या स्थितींत असणें.**एखाद्याच्या शेंडीला फुलें बांधणें** त्याला नटवून, सजवून, किं० त्याची खुशामत करून त्यांचें मन आपल्याला अनुकूल करून घेणें. **शेंडी तुटो कीं पारंबी तुटो** कसलाही प्रसंग आला तरी; कितीही अडचणी किं० संकटें आलीं तरी.**खर्चास शेंडी फुटणें** पूर्वीच्या आजमासापेक्षां खर्चाच्या अधिक बाबी किं०कलमें उत्पन्न होणें.**शेंडीस गांठी देणें** आपला गुरु, वरिष्ठ, उपकारकर्ता किं० त्राता ह्याचेवर कृतघ्नपणानें उठणें. **शेंडेपालवी शेंडी पालवी स्त्री०** १ अंबाडी, मेथी, कोथिंबीर, इ० झाडाच्या माथ्याकडचीं पानें, पल्लव, इ० (येणें, तोडणें,फुटणें).२म्हातारपणचें अपत्य.**शेंडी पालवीचें बोलणें**(किं०**करणें**)वरवरचें,केवळ दिखाऊ, मनापासूनचें नव्हे असें बोलणें (किं० करणें). **शेंडीशंगी स्त्री०** घोड्याचें एक कुलक्षण,—घोड्याच्या कपाळावरील लांब केशांच्या खालचा भोंवरा. **वि०** असा भोंवरा ज्याच्या कपाळावर आहे असा(घोडा). **शेंडीधर्म पु०** हिंदूधर्म. **शेंडी शेपटी स्त्री० ए० व०** १ झाडाचा अगदीं वरचा भाग (फळें इ० तोडण्याच्या संबंधांत बोलतांना); उ० शेंडीं शपटीकडचे आंबे मला तोडतां आले नाहींत, ते तुम्ही तोडा. २ बहुतेक संपत आलेल्या कामाचा अद्याप न संपलेला भाग (राहणें). **शेंडेनक्षत्र** [**म०** शेंडी+नक्षत्र] **न०** धूमकेतु.

शेडू स्त्री०एक प्रकारची पिवळसर माती;शाडू.

शेंडें न० १ गवताची एक जात. २ भाताच्या

शेतावर पडतो तो एक रोग.

शेंडेसलाम पु० रस्त्यांत आढळलेल्या ओळखीच्या माणसाला नुसता केलेला म्ह० त्याची विचारपूस न करतां केलेला सलाम.

शेण न० १ गाय, म्हैस, बैल, इ० ची विष्ठा. २ (**लाक्षणिक**) फळ, पान, इ० चा कुजलेला किं० सडलेला भाग; कुजलेलें किं० सडलेलें फळ, पान, इ०. ३ (**लाक्षणिक**) कोणत्याही वस्तूची नासाडी किं० नासलेपणाची स्थिति. **स्त्री०** गोवरी. ☞ **शेण खाणें** चुकी करणें; जें करूं नये तें करणें किं० बोलणें. **शेणाचा दिवा लावणें** दिवाळें काढणें. **टीप,**–ज्याणें दिवाळें काढलें आहे तो खरोखरींच शेणाची पणती करून तींत तेलवात घालून बैठकीच्या जागीं दिवा लावतो. **शेण पडलें असतां माती घेऊन उठतें** १ आपल्यावर आलेला ठपका न्यायाधीशाच्या कचेरींत जरी पूर्णपणें नाशाबीत झाला, तरी कांहीं थोडी तरी बेआबरू होतेच होते. २ वाईट माणसाच्या संगतींत असतां आपण कितीही जपून वागलों तरी आपणास थोडा तरी चाट बसतोच बसतो. **शेणाचा पोहो पु०** १ गायी, म्हशी, इ० च्या शेणाची रास. २ (**लाक्षणिक**) सुस्त आणि आळशी माणूस; ज्याच्या अंगांत यत्किंचित् सुद्धां चपळाई किं० तल्लखपणा नाहीं असा माणूस. **शेणामेणाचा वि०** अशक्त, कमकुवत,–जणों काय शेणानें आणि मेणानें बनविलेला. **शेणकई, शेणकाई, शेणकी स्त्री०** १ गुरांचें शेण गोवऱ्यासाठीं साठवून ठेवण्याचा खळगा. २ गुरांच्या शेणाची रास किं० ढीग. **शेणकला, शेणखळा पु०** १ अंगणांत सडा टाकावयासाठीं पाण्यांत कालवून पातळ केलेलें शेण. २ अशा शेणाच्या पाण्याचा सडा. **शेणकुंडा पु०** गोठ्यांतील शेण काढणें, गोठा साफ करणें, दळणकांडण, इ० रूप जें घरगुती काम तें. **शेणकूर, शेणकूट, शेणखंड, शेणखुंड न०** वाळलेलें शेण. **शेणकोंडा पु०** शेण आणि भात इ० चीं टरफलें यांचें गोवऱ्या लावण्यासाठीं केलेलें मिश्रण. **शेणखळी, शेणखाई, शेणगाईर स्त्री०** शेण साठविण्यासाठीं केलेला खळगा. **शेणखुंडी स्त्री०** वाळलेलें शेण. **शेणगोठा पु०** गोठ्यांतील शेण काढून गोठा साफ करणें इ० रूप कामें समुच्चयानें (करणें). **शेणगोळा पु०** शेणाचा गोळा,–खरकट्या जागेवर फिरवायासाठीं घेतलेला. **शेणगोळे घालणें** अव्यवस्थितपणें केलेल्या कामांतील दोष काढून टाकून त्या कामाला नीटनेटकेपणा आणणें. **शेणथाप्या, शेण थापणारा पु०** १ कुचकामाचा माणूस. २ षंढ, नपुंसक. **शेणप पु०** १ शेणाचा सडा (घालणें). २ नासकीं कुचकीं फळें समुच्चयानें. **शेणपा, शेणपोह, शेणपोहो, शेणपोव** १ शेणाचा पोहो,–गाय, म्हैस, इ० नीं एका वेळीं विसर्जिलेला. २ आळशी, सुस्त, किं० कर्तृत्वशून्य माणूस. **शेणपाणी न०** गोठा झाडणें, घरांत झाडलोट करणें, सडा घालणें, इ० रूप घरांतील कामें समुच्चयानें (करणें). **शेणपूजा, शेणमार स्त्री०** कोणा माणसावर शेण मारून त्याची केलेली अप्रतिष्ठा (करणें). **शेणवड स्त्री०** होळीच्या दुसऱ्या दिवशीं शेणाच्या राशींत मुलें नाचतात ती रास. **शेणवणी न०** सडा घालण्यासाठीं पुष्कळ पाण्यांत थोडेंसें शेण कालवून तयार केलेलें पाणी. **शेणसडा पु०** १ शेण ज्यांत कालविलें आहे अशा पाण्याचा अंगण इ० वर केलेला सडा. २ (**लाक्षणिक**) कुजलेलीं फळें, फुलें, इ० चा समुदाय. ३ कोणा धनिकानें मंगल प्रसंगीं भिकाऱ्यांना औदार्यानें दिलेले पैसे, फळें, इ० ची खैरात. ४ युद्धभूमीवर जागोजाग मरून पडलेल्या वीरांचा खच. **शेणसाऊल, शेणसावूळ स्त्री०** पावसाळ्याच्या प्रारंभीं पोफळीच्या बुडाशीं घालतात तें शेणाचें खत. **शेणसूप न०** गोठ्यांतील शेण गोळा करण्याचें सूप किं० सुपाच्या आकाराचें पात्र. **शेणामेणाचा वि०** अशक्त; निर्वीर्य, लेचापेचा, कमकुवत (माणूस, पशु, पदार्थ). **शेणामेणालोखंडाचा वि०** प्रथम पोकळ आणि निष्फळ असा दिसणारा पण पुढें जड, जोखमीचा, आणि फायदेशीर असा (धंदा, व्यवहार इ०). २ कांहीं भागीं अशक्त आणि कांहीं भागीं मजबूत असें (घर, पदार्थ, इ०). **शेणारा पु०** शेण, माती, यांच्या मिश्रणाच्या थरानें सुरक्षित करून ठेविलेली गोवऱ्यांची रास. **शेणी स्त्री०** गोवरी. **शेण्या पु०** गाय, म्हैस, इ० ची एका वेळची विष्ठा. **शेण्या डोळा**

पु० ए० व०,शेणे डोळे पु०अ०व०डोळे येणें ह्या विकृतींत ज्यांतून पू आलेला आहे किं० पू येतो असा डोळा किं० असे डोळे. ह्या विकृतींत डोळ्यांना कंड सुटते. मागें ' काटे डोळे ' पहा.

शेणई पु० महाराष्ट्रीय ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.पुढें'शेणवी'पहा.

§ **शेणखुंड, शेणगंड पु०** शेणवी (तुच्छतेंत).

शेणगा, शेणगी पु० हवालदाराच्या हाताखालचा गांवकामगार.

शेणणी, शेणणें पुढें 'शेंदणी,' 'शेंदणें'पहा.

शेणणें [**म०** शेण] **अ० क्रि०** १ (गाय, म्हैस, बैल, किं० रेडा यांणीं) हगणें. २ (डोळ्यांतून) पू बाहेर येणें किं०आलेला असणें.

शेणय, शेणवई पुढें ' शेणवी ' पहा.

शेणवी पु० महाराष्ट्रीय ब्राह्मणांची एक जात किं०त्या जातीचा इसम.यांना अध्ययन,दान, आणि याजन, करण्याचे तीन अधिकार असून अध्यापन,प्रतिग्रह,आणि यजन हे तीन अधिकार नाहींत. यांना ' सारस्वत ' असेंही म्हणतात.

शेत [**सं०** क्षेत्र] **न०** १ ऊस, जोंधळा, भात, इ० चें पीक करावयाचा भूप्रदेश. २ ऊस, जोंधळा, बाजरी, इ० चें पीक. ३ शेतकीचीं कामें समुच्चयानें. ४ चैत्रांत गौरीपुढें शोभेसाठीं ठेवण्यासाठीं कुंडी इ०मध्यें तयार केलेला गहूं इ० च्या रोपांचा समुच्चय.५नोकरी,व्यापार,सावकारी, इ० रूप जें कोणेकाचें चरितार्थाचें साधन तें त्याचें शेत. § **शेतकरी पु०** १ शेताचा मालक. २ दुसऱ्याच्या शेतांत काम करून चरितार्थ करणारा. **शेत आडगरा पु०** नाचणीची एक जात. **शेतकामी (-म्या) वि०** १ शेतांत काम करणारा. २ शेताच्या कामाला लायक. **शेतकी स्त्री०** कृषिकर्म; शेतासंबंधाचीं हरएक प्रकारचीं कामें समुच्चयानें. **शेतखऱ्या पु०** १ केवळ शेतांतच काम करण्याची ज्याची लायकी आहे असा, म्ह० निरक्षर, अडाणी, किं० गांवढळ माणूस. २ ब्राह्मणाला विद्या, पठन, पूजा, इ० जीं योग्य कामें तीं न करतां शेतांत कामें करणारा ब्राह्मण.**शेतखाना पु०**१शेतांत कूड घालून शौचासाठीं केलेली आडोशाची जागा.२घरांतील शौचास जावयाची जागा;संडास;शौचकूप.**टीप,**- सिह्हतखाना=आरोग्यगृह अशी एका पंडितानें व्युत्पत्ति केली आहे. **शेतगणा पु०** १ शेतकी खालची जमीन. २ गांवचीं शेतें समुच्चयानें. **शेतघर न०** शेतांत खपणाऱ्या नोकरांवर देखरेख करणें इ० कामासाठीं मालकानें शेतांत राहावयासाठीं बांधलेलें घर. **शेतजमीन स्त्री०** शेताच्या उपयोगाची जमीन. **शेतपोत न०** १ शेतें, मळे, बागा, इ० रूप कोणेकाची संपत्ति. २ शेतासंबंधाचीं हरएक प्रकारचीं कामें समुच्चयानें. **शेतभात न०** १ शेतें,मळे, इ० चरितार्थाचें साधन. २ शेतें, मळे,इ० संबंधाचीं कामें समुच्चयानें. **शेतवाडी स्त्री०**शेते,बागा, इ०रूप संपत्ति. **शेतवारी स्त्री०, शेतवार पत्रक न०** एकाद्या गांवाचीं शेतें, बागा, मळे, इ० च्या तपशिलाचें कुळकर्ण्यानें तयार केलेलें पत्रक किं०केलेला तक्ता. **शेतसनदी वि०** सैन्यांतील किं० किल्ल्याच्या संबंधाची नोकरी करण्यासाठीं रोख पगार न देतां शेत बक्षीस देऊन सरकारनें ठेविलेला (शिपाई). **शेतसरी स्त्री०** १ गांवचीं शेतें समुच्चयानें. २ गांवच्या शेतांचें उत्पन्न; उ० यंदा शेतसरी चांगली पिकली: उ० शेतसरी आई हातीं धरील तर सर्व कांहीं होईल. **शेतसारा पु०** शेतावर सरकारनें बसविलेला सारा. **शेती, शेतीक स्त्री०** शेत नांगरणें, पेरणें, पिकविणें, धान्य गोळा करणें, इ० रूप धंदा किं० चरितार्थ; उ० उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी. **शेती पाऊस पु०** शेताच्या उपयोगाचा पाऊस. **शेतीभाती स्त्री०** शेतासंबंधाचीं कामें समुच्चयानें.**पु०** शेतांत काम करणारा; शेतकरी.**शेतवड स्त्री०**गांवांशेजारीं शेतें व्हावयाच्या उपयोगाचा भूमीचा प्रदेश.

शेतवड पु० एक झाड. याचीं फुलें शिवास [वाहातात.

शेतवडा, शेताड पु० एक झाड.

शेताळ, शेताळीस [**म०** सहा+चाळीस] **वि०** चाळीसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका (अशिक्षितांत रूढ); शेचाळीस.

शेंद स्त्री० १ नारळांतील खोबरें पोखरून काढून मीठ, मोहोऱ्या, इ० पदार्थ ठेवण्यासाठीं केलेलें बारदान. २ लांबोडा भोपळा इ० फळ.

शेंदड, शेंदाड, शेंदणी स्त्री० एक वेल.

शेंदड, शेंदाड, शेंदणें न० वरील वेलाचें फळ. हें फळ नारळाएवढें मोठें असून भारी दिसूळ असतें आणि त्याला जरा धक्का लागला कीं तें फुटतें. ह्यावरून 'शेंदाड शिपायी' म्ह० (१) प्रत्यक्ष मारामारींत रट्टे खाण्याची ज्याला ताकद नाहीं पण नुसती बढाई मारणारा असा शिपाई किं० माणूस. (२) भित्रा शिपायी किं० माणूस.

शेंदणी स्त्री० १ एक वेल. २ ह्या वेलीचें फळ.

शेंदणी [म० शेंदणें] स्त्री० विहिरींतून पाणी शेंदून काढण्याच्या पोहोऱ्याची दोरी.

शेंदणें स० क्रि० खालच्या मजला, गलबताचा तळ, खड्डा, विहीर, इ० तून (पेटी, पोतें, पोहोरा, धोंडा, इ० पदार्थ) वर ओढून घेणें. शेंदणें न० विहिरींतून पाणी वर शेंदून काढण्याचा दोरी लाविलेला पोहोरा.

शेंदणें [सं० छिद्]स० क्रि० कोयता इ०साधनानें (वृक्षाचें खोड इ०वर)टवके मारणें किं०वार करणें.

शेंदरा, शेंदऱ्या, शेंदरी वि० शेंदुराच्या रंगाचा (आंबा, वस्त्र, गुलबास, इ०).

शेंदरी स्त्री० १ एक प्रकारची आंथरी. २ एक प्रकारचा जोंधळा. वि० शेंदराच्या रंगाचा. ३ एक प्रकारचें लुगडें. ४ एक झाड.

शेंदव [म० सैंधव] पु० १ सैंधव नांवाचें मीठ. २ खारटपणाचा द्रवांश, जमीन, भिंत, इ० ची ओल, अंगांतून निघणारा घाम, इ०; उ० खाडीच्या पाण्याचा शेंदव येथपर्यंत मारतो म्हणून येथपर्यंतच्या विहिरींचें पाणी थोडेंसें खारट असतें.

शेंदवणी [मु० शेंदणें] स्त्री० पाणी इ०शेंदून काढण्याचा पोहोरा, घागर, इ०ला लाविलेली दोरी.

शेंदाड स्त्री० एक वेल. वर ' शेंदड ' पहा.

शेंदूर [सं० सिंदूर] पु० शिसें आणि आकसिजन यांच्या रासायनिक मिश्रणानें तयार होणारा एक जड आणि लालभडक पदार्थ. ❀ कोणेकानें कोणेकाचा शेंदूर उतरणें त्याणें त्याचा नक्षा उतरणें; त्याची फजीती करणें; त्याची मानखंडना करणें.

शेंदेलोण, शेंधेलोण, शेंदीलोण [सं० सैंधव+लवण (मीठ, क्षार)]न० सैंधव हें मीठ.

शेन, शेनी[सं० श्येन, श्येनी]पुढें 'श्येन' पहा.

शेन, शेनी क्रि० वि० ऊन प्रत्ययान्त धातूपुढें अशिक्षित लोक हा प्रत्यय लावितात; उ० करून शेन किं० करून शेनी म्ह० करून.

शेनिश्चय [म० सई+निश्चय] पु० वादग्रस्त विषयाचा निकाल किं० निर्णय.

शेन्नी स्त्री० १ एक वेल. २ ह्या वेलीचें फळ. वर ' शेंदणी ' पहा.

शेप [सं० शतपुष्पा; हिं० सोफ] स्त्री० ओव्यासारखें एक धान्य. ❀ शेपट वि० शेपाच्या वासाचा (आंबा इ० फळ).

शेप [सं० शेप=शेपूट] स्त्री० पुच्छ; शेपटी; शेपूट. ❀शेपकिडा पु० पोटानें सरपटत जाणारा आणि लांब शेपटीचा एक पांढऱ्या रंगाचा किडा. शेपखळी स्त्री० प्रसूति व्हावयाच्या अगोदर गाय, म्हैस, इ० च्या शेपटीच्या दोहो बाजूंस ज्या दोन खळ्या पडतात त्या प्रत्येक.

शेपट [म० शेप] स्त्री० गाय, म्हैस, इ० ना पळावयास लावून त्यांच्या पाठीमागून धावत जाऊन त्यांना दमविणें. ' गोविंदानें त्या गायीचें शेपट काढलें ' असा प्रयोग होतो.

शेपटणें [म० शेपट] स० क्रि० (गाय, म्हैस, इ० ना) धावडवून (त्यांना) दमविणें.

शेपटणें [म० शेपटी] स० क्रि० झाडाच्या बारीक आणि लवचीक फांदीनें मारणें.

शेपटा (-डा) [म० शेपूट] पु० १ लांब आणि मोठी शेपटी. २ मांजर, व्याघ्र, इ० चीं रागानें पिंजारलेली शेपटी. ३ स्त्रीची वेणी (विनोदांत).

शेपटी, शिपटी स्त्री० झाडाची बारीक आणि लवचीक फांदी.

शेपटी (-डी) स्त्री०, शेपूट न० [म० शेप] १ गाय, म्हैस, इ०चें पुच्छ. २ (लक्षणेनें) गाय, म्हैस, इ० प्राणी व्यक्तिशः; उ० गेल्या वर्षी गुरांवर रोग आला होता त्यानें माझ्या गोठ्यांत एक शेपूट राहिलें नाहीं (म्ह० माझी सगळीं गुरें मेलीं).

शेपरणें, शेपारणें, शेफरणें, शेफारणें अ० क्रि० १ कोणी आपली स्तुति केल्यानें अतिशय चढून जाणें (निंदेंत). २ योग्य वर्तनक्रम सोडून उत्संखळपणें वागूं लागणें.

शेपाटणें [म० शेपटी] स० क्रि० झाडाच्या बारीक आणि लवचीक फांदीनें (माणूस, गुरूं, यांना) मारणें.

शेपाळणें [**स०** शेप] **स० क्रि० १** बैल इ० ची शेपटी मुरगाळणें (त्यानें जलद चालावें म्हणून). २(कोणेकाला) मारणें किं० रागें भरणें.

शेपाळया [**सं०** शेप=पुरुषाचें शिश्न] **वि०** १ रांडबाज. २ फाजील स्त्रीलंपट (पुरुष).

शेपाळू वि० १कामी (स्त्री).२ परपुरुषलंपट(स्त्री).

शेपू [**सं०** शतपुष्पा=बाळंतशेप; बडीशेप] **स्त्री०** शेप धान्याचें झाड किं० त्याचें बीज.

शेपूट [**सं०** शेप=शेपूट] **न० १** घोडा, गाय, म्हैस, इ० चें पुच्छ. २ (**लक्षणेनें**) समाप्तीचा किं० शेवटाकडचा भाग. ३ (**लक्षणेनें**) मोठ्या कामांतून उत्पन्न झालेलें कांहीं लहानसें काम. ꣸ **शेपूट घालणें, गांडींत शेपूट घालणें** भीतीनें मागें हटणें; कचरणें, डरणें. (भ्यालेलें कुत्रें इ० मागल्या दोन पायांत शेपूट वळवितें ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे). **शेपूट अडकणें** बाहेर पडावयाला मार्ग नाहीं अशा पेचांत सापडणें; कांहीं हानि पत्करल्याशिवाय सुटका होणें शक्य नाहीं अशा अडचणींत पडणें. **शेपूट राहाणें** बहुतेक काम संपून अत्यल्प अंश करावयाचा राहिलेला असणें. **शेपूट ठेवणें** कांहीं कामाचा अत्यल्प अंश करावयाचा ठेवून देणें. **शेपूट लांबविणें** १ कांहीं काम विनाकारण लांबविणें. २ दाता उदार मनाचा भेटला असतां त्याच्या जवळ अधिक अधिक मागत सुटणें. **शेपूट हालविणें** स्त्रीनें कामचेष्टांनीं पुरुषाला संभोगार्थ चेतविणें. **शेपूट कल्याणी स्त्री०** परपुरुषलंपट स्त्री. **शेपूट मोड्या वि०** १ज्याची शेपटी मुरगळल्याशिवाय जो चालत नाहीं असा (बैल). २ कोणतेंही काम न करणारा किं० मनापासून न करणारा (माणूस); चुकारतट्टू.

शेफ [**सं०**] **पु०** पुरुष, घोडा, गाढव, इ० चें जननेंद्रिय. [रणें' पहा.

शेफरणें, शेफारणें मागें ' शेपरणें, ' ' शेपा-

शेंब, शेम स्त्री० नाकांतील दाट मळ, शेंबूड. २ आमांशाच्या विकृतींत गुदद्वारें बाहेर पडणारा पांढरा चिकट पदार्थ. ३ घोड्याच्या नाकाला होतो तो एक रोग.

शेंब,शेंबी स्त्री० बैलांच्या शिंगांच्या टोकांना, काठीच्या टोकाला, किं० छत्री इ० च्या दांड्याच्या माथ्याला बसवितात तें पितळ, लोखंड, इ० चें टोपण. २ लोहांगीला बसवितात त्या कड्या प्रत्येक. मागें ' लोहांगी ' पहा.

शेंबूड पु० नाकांतून गळणारा घट्ट श्लेष्मा किं० मळ. शेंबूड नाकांत किं० नाकाबाहेर वाळला असतां त्याला ' मेकूड ' म्हणतात. ꣸ **शेंबूड फेडणें** नाक शिंकरून शेंबूड बाहेर उडवून देणें. **शेंबडांत लोळणें** प्रपंचाच्या त्रासदायक उलाढालींत गुरफटलेलें असणें (परमार्थाकडे मुळींच लक्ष्य न देतां). **मी हसें लोकां शेंबूड माझ्या नाका** जो दुर्गुण आपल्या ठायीं आहे तो दुसऱ्याचे ठायीं असल्यास त्याला निंदिणें हा मूर्खपणा होय.

शेम वर ' शेंब, शेंबी ' पहा.

शेमला [**अ०** षम्लाह्] **पु०** पागोटें,कमरबंद, इ० चें टोंक. [होणें.

शेमेजणें अ० क्रि० घामानें (अंग) ओलें

शेम्न न० पुरुष, घोडा, इ० चें जननेंद्रिय.

शेर पु० एक झाड. याचा रस दुधासारखा पांढरा असतो.꣸**शेरताटी,शेरताट,शेरताड स्त्री०** शेराच्या झाडांचें कुंपण किं० लांबच लांब ओळ.

शेर [**हिं०** सेर] **पु०** १ एक वजनाचें परिमाण; एक मापाचें परिमाण. हें परिमाण भिन्न प्रांतांत भिन्न असतें. २ कोणेकाला कांहीं कामाबद्दल दिलेलें धान्य, पीठ, इ० रूपाचें वेतन. ३ चरितार्थाचें साधन,–नोकरी, दलाली,व्यापार, इ०. ४ कोणेकाचा कांहीं कामांत किं० व्यवहारांत किं० प्रपंचांत ठरलेला सुखदुःखादिरूप किं० हानिलाभादिरूप भाग. ५ अन्नोदकांचा संबंध. ꣸ **शेरास सव्वाशेर** प्रतिपक्ष्यापेक्षां वरच्या प्रतीचा प्रतिपक्षी; तो वस्ताद तर त्याच्याहून हा अधिक वस्ताद. **टका शेर भाजा टका शेर खाजा** घोडा आणि गाढव यांचा दर्जा सारखा समजणें हा प्रकार. **शेरका वि०** १ ज्यांत शेरभर धान्य, तूप,दूध, इ० मावेल असें (पात्र).२ शेर वजनाचा धोंडा,लोखंड(तराजूंत माप म्हणून घालावयाचा). **शेरपीठ न०, शेरशिधा पु०** कांहीं कामाबद्दल शिपाई, मजूर, इ० ना दिलेला शिधा. **शेरी स्त्री०** धान्याच्या रूपानें सरकारकडे आलेल्या साऱ्यांतून कमावीसदार किं० दुसरा

कोणी अंमलदार किं० अडशेरीचें माप देणारा इसम स्वताचा सुमारें दोन शेरांचा भाग काढून घेतो तो. **शेरी जमीन स्त्री०** गांवांतील उत्तम जमीन,–जी सरकार किं० कोणी अधिकारी स्वताच्या खाजगीकडे ठेवितात ती. ही जमीन करणारा तो ' शेरीकर (–री) ' आणि हिचें उत्पन्न ' शेरीवाब '

शेर स्त्री० कावळा, चिमणी, इ० ची विष्ठा.

शेर [**फा०** षेर्] **पु०** १ वाघ. २ (**लक्षणेनें**) धाडसी माणूस; कर्तबगार मनुष्य. ३ (**लक्षणेनें**) कोणीही शिरजोर माणूस. ❀ **शेरखोर वि०** पुंड; उन्मत्त. **शेरपणा पु०** जोरावरी; सामर्थ्य. **शेरबाजी, शेरबाजू स्त्री०** वर्चस्व; सरशी.

शेरडावणें, शेरंडावणें अ० क्रि० फाजिल ऐटीनें किं० तोऱ्यानें वागणें.

शेरडी, शेरडुकी स्त्री० शेळी. ❀ **शेरडुक्या** शेळ्या चराविणारा किं० त्यांना संभाळणारा. **शेरडूं न०** १ शेळी,–नर किं० मादी. २ लहान शेळी,–नर किं० मादी. **शेरडूक न०** शेळी,–नर किं० मादी (तुच्छतेंत).

शेरणी [**फा०** षीरीनी] **स्त्री०** १ देवाला केलेला नवस फलद्रूप झाला म्हणजे देवळांत साखर, खोबरें, इ० रूप प्रसाद वाटतात तो; खिरापत. २ गुऱ्हाळांत देवाला जो गुळाचा खडा नैवेद्य म्हणून अर्पितात तो. ३ गुऱ्हाळांतून जे गुळाचे खडे गांवकामगारांना वाटतात ते प्रत्येक.

शेरणी स्त्री० एक झुडूप. [हगणें.

शेरणें अ० क्रि० कावळा, चिमणी, इ० नीं

शेरा [अ० षर्ह्] **पु०** दर; सरासरीचें प्रमाण.

शेरा [अ० षर्अ] **पु०** १ कांहीं कामाची मागपासून ठरलेली सरणी; शिरस्ता. २ अर्जाला सरकारांतून देण्यांत आलेलें उत्तर. ३ कांहीं कामासंबंधाच्या सूचनांचें पत्रक. ४ अमुक काम चांगलें झालें, वाईट झालें, अमुक प्रकारें सुधारणा करणें जरूर आहे, इ० जें मत वरिष्ठ किं०यजमान देतो तें (मारणें,देणें). ५ अभिप्राय, टीका (सामान्यतः).

शेरा [**सं०** शिरस्] **पु०** १ शेवट. २ रस्ता, बोळ, इ० चा शेवट. ३ गांवाची हद्द.

शेरिया पु० दोन थोक किं० आठ कळ्या किं० चोवीस फाळा इतकें रेशीम. मागें 'थोक' पहा. मागें 'कळी' अर्थ ८ पहा. मागें ' फाळा ' अर्थ ४ पहा.

शेरी स्त्री० १ गांवांतील अरुंद बोळ. २ दोन कुंपणांमधील अरुंद वाट. [व्यक्ति).

शेलका वि० समुदायांतील निवडक(पदार्थ किं०

शेलणें, शेलनें, शेळणें न० १ ओढा, डबकें, इ० चें पाणी वर उडवून शेजारच्या बागा, मिरच्या, इ० च्या झाडांस द्यावयासाठीं लाकडाचें पाल करतात तें. २ माशाचें शेपूट.

शेलभेल स्त्री० मिश्रण; मिसळ.

शेला [**हिं०** सेला] **पु०** प्रतिष्ठितपणें समारंभाच्या प्रसंगीं किं० मिरवणूकींत पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं अंगावर घ्यावयाचें एक उंची वस्त्र. ❀ **शेलापागोटें न० ए० व०** कोणा मायसाला राजा इ० नीं संमानार्थ दिलेला शेला आणि पागोटें या रूपाचा नजराणा. **शेलापागोट्याचा प्रत्याहार पु०** कांहीं नाहीं; उ० त्या संस्थानिकाच्या लग्नांत आम्हांला कांहीं लाभ होईल ह्या आशेनें आम्ही दहा कोस जमीन तुडवून गेलों आणि आम्हाला मिळालें काय ? तर शेलापागोट्याचा प्रत्याहार ! मागें ' प्रत्याहार ' पहा. **शेलावाटी स्त्री० ए० व०** गांवांत लग्न झालें असतां पाटलाला शेला आणि वाटी ह्या रूपाचा देतात तो नजराणा.

शेलारी स्त्री० एक प्रकारचें उंची लुगडें.

शेलारें न० कोरफडीच्या झाडाला येतो तो तुरा.

शेली [**नंदभाषेंत**] **वि०** सहा ही संख्या.

शेलू स्त्री० एक झाड. **न०** त्याचें फळ.

शेलें न० १ गाडी इ० चें जू किं० जोकड. २ (**लाक्षणिक**) कामाचा भार किं० जबाबदारी. ३ युद्ध्यमान दोन पक्षांपैकीं एक; खेळाडूंची एक बाजू. [पहा.

शेलेभाल्यानिशीं मागें ' शिलेभाल्यानिशीं '

शेव स्त्री० एक झाड. **न०** त्याचें फळ.

शेव स्त्री० १ हरभरा इ० च्या पिठाच्या लाडू करण्यासाठीं तळलेल्या ज्या कळ्या त्या प्रत्येक. २ हरभऱ्याच्या पिठांत जिरें, तिखट, मीठ, इ० घालून झाऱ्यांतून त्या पिठाचे तंतु कढईत पाडून तळून करतात तें खाद्य. ३ माळवें विकणारे जे माळी इ० त्यांचेपासून हकीम, मोकाशी, इ० प्रतिदिवशीं थोडा थोडा भाजी-

पाला इ० रूपाचा हक्क म्हणून घेतात तो कर. ह्या कराला ' शेवसबजी ' असेंही म्हणतात.

शेव [**सं०** सीमा] **पु०** ताड, माड, इ० झाडांच्या पोगीच्या अग्राला मद्य काढण्यासाठीं जो छेद करतात तो (घालणें). **पु०** १ गांव, शेत, वस्त्र, इ० चा शेवट किं० शेवटाजवळचा किं० लगतचा प्रदेश. २ चोरी इ० चा माग किं० तपास करावयाचा असतां एका गोष्टीचा संबंध दुसऱ्या गोष्टीशीं जोडणारी कांहीं बाबत,-जेणें-करून पुराव्याची सांखळी अखंड बनवितां येते. ॐ **कोणेकाला शेव घालणें** लुगडें, उपरणें, इ० चे सोगे हालवून त्याला जवळ बोलावणें किं० कांहीं सूचना देणें किं० इशारत करणें. **आजाराला शेव घालणें** त्याचा जोर कमी करणें; तो हटविणें. **नदी, रोग, क्षुब्ध मनोविकार, इ० नीं शेव घेणें** त्यांनीं ओसरणें, दबणें, शमणें, किं० हटणें. **शेव देणें**(किं० **पोहोचविणें**)गाणाऱ्याच्या सुराची री ओढणें किं० त्याच्या जवळ बसून त्याच्या मागून सुरास सूर देणें.**कोणेकाला शेव लावणें** त्याच्या जवळ बसून त्याच्या कामांत त्याला मदत करणें;त्याला हात लावणें.

शेवई,शेवय स्त्री०गहूं,तांदूळ,इ०च्या पिठाचे लांब लांब तंतु खिरीसाठीं करतात ते प्रत्येक.

शेवखंड, शेवकंड, शेवकुंड न० हरभरा इ० च्या पिठाचें एक खाद्य.

शेवगा पु० १ एक झाड. याच्या शेंगा कढी, पिठलें, इ० मध्यें घालतात. २ शेवया, कुरडया, इ०करण्याचें एक सच्छिद्र पात्र.

शेवट [**म०** शेव] **पु०** १ समाप्ति;परिणाम; पर्यवसान. २ पदार्थाचें टोक किं० अग्र. ३ बंदूक इ० पेटविण्याचा तोंडा. ४ मरण; अंत. ५ वादाचा निकाल किं० निर्णय. ॐ **सरतेशेवटीं क्रि० वि०** १ शेवटीं; अंतीं. २ सर्व गोष्टी,उपाय, यत्न, इ० केल्यानंतर. **शेवट घेणें** संपविणें;समाप्त करणें. **शेवटच्या बांधण्यास पाणी मोडणें** अगदीं शेवटीं आपलें हेकटपणाचें मत सांगून वादाचा निकाल लावणें. **शेवटच्या आदित्यवारीं क्रि० वि०** कधींच नाहीं. मागें 'कड' मध्यें ' कडच्या रविवारीं'पहा.**शेवटील वि०** शेवटचा.

शेवटणें [**म०** शेवट] **स० क्रि०** १(कुऱ्हाड, कोयता, सुरी, दाभण, इ०) ठोकून किं० घासून त्यांना बारीक धार किं० टोक आणणें.२ (घोडा, बैल, इ० ना) जलद चालण्याची इशारत करण्यासाठीं चाबूक, इ० च्या टोकानें स्पर्श करणें. ३ (काम, वाद, व्यवहार, इ०) संपवून शेवटास नेणें.४लक्ष्यावर मारलेला(धोंडा,तीर,इ०नीं) लक्ष्य मध्यावर न वेधतां लक्ष्याच्या कडेला स्पर्श करून जाणें. **अ० क्रि०** शेवटीं येणें, घडणें, किं० होणें. ॐ **शेवटता क्रि० वि०** बाण, धोंडा, इ० लक्ष्याला मध्यावर न वेधतां कडेला स्पर्शून म्ह० चाटून (जाणें, लागणें). **टीप,–हें क्रि० वि०** लिंगवचनांप्रमाणें फिरतें.

शेवटा [**म०**शेवट]**पु०** कुंभाराच्या चाकाच्या आंसाचें खालचें टोक ज्यावर फिरतें तो टेकू.

शेवडा पु० १ गोसाव्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणी इसम. २ भाजीपाल्यांवरची जकात वसूल करणारा.

शेवडी स्त्री० नदी, नाला, इ० च्या वाळवंटांत खोदलेली विहीर किं० खळगा.

शेवती, शेवंती [**सं०** सेमन्ती] **स्त्री०** एक फुलझाड. **शेवतें न०** १ ह्या झाडाचें फूल. २ ह्या फुलाच्या आकाराचें स्त्रियांचें एक शिरोभूषण. ३ दिव्याच्या ज्योतींत बिब्बा धरला असतां त्यांतून गळणाऱ्या तेलाचा थेंब. ४ असा थेंब ज्यांत पाडविला आहे असें दूध,–औषधासाठीं तयार केलेलें.

शेवंती [**सं०** सीमान्त]**स्त्री०**१गांवाची हद्द. २ लग्नासाठीं आलेल्या वराचा गांवच्या हद्दीवर केलेला सत्कार (देणें).ह्या सत्काराला ' शेंवंती पूजन'किं०'शेंवती पूजन'**न०**असाही शब्द आहे.

शेवय मागें ' शेवई ' पहा.

शेवरा, शेवऱ्या पु० एक झाड.

शेवरी स्त्री० एक झाड. याच्या बोंडांतील कापूस (म्हाताऱ्या) मऊ असून तो उशा, गाद्या, गिरद्या, इ० मध्यें भरतात.

शेवल,शेवाल पु०,न०,शेवळ,शेवाळ स्त्री०, न० [**सं०** शैवाल] पाण्यांत उगवणारी एक बुळबुळीत आणि तंतुरूप वनस्पति.

शेवसबजी मागें ' शेव ' **स्त्री०** मध्यें पहा.

शेवसर, शेवसरणें मागें ' शिवसर ' 'शिवसरण ' पहा.

शेवाळणें [म० शेवाळ] अ० क्रि० १ शेवाळीनें व्याप्त होणें. २ (दांत) बुरसणें. ३ (गाय, बैल, घोडा, माणूस, इ० ना) पोटभर गवत, जेवण, इ० मिळत असल्या कारणानें त्यांनीं लठ्ठ आणि गुबगुबीत आणि तजेलेदार होणें.

शेष [सं०] वि० राहिलेलें;उरलेलें; अवशिष्ट. पु० अनंत हा सर्प; वासुकी.पु०, न० १ शिल्लक; बाकी. २ गाळलेला किं० वगळलेला भाग. पु० (मराठींत)शिल्लक; उ० शेषऋण, रोगशेष, इ०. न० उरलेलें अन्न;प्रसाद. ꠶ **शेषशायी** [सं०शेष-शायिन्] पु० श्रीविष्णु. **शेषपूरण** न०,**शेषपूर्ति** स्त्री०जें कमी असेल तें भरतीला घालून पूर्ण करणें.

शेस [सं० शीर्ष] स्त्री० दहीं आणि पिंजर ह्याचें मिश्रण,—जें मुंजा मुलगा, नवरा मुलगा, नवरी मुलगी,इ०च्या कपाळावर अक्षता चिकटावण्यासाठीं लावतात तें;शेज;(लावणें,भरणें). मागें ' शेज ' पहा. ꠶ **शेसपाट** पु० दहीं आणि पिंजर ह्याचें मिश्रण कपाळाला थापून त्यावर तांदूळ चिकटावून केलेला पट्टा. **शेसफूल** न० मागें ' शीसफूल ' पहा.

शेसगांठ, शेसरा पु० १ सरकफास,—जो घागर इ० च्या गळ्याला हावा तितका सैल किं० घट्ट करून बसवितां येतो. २ सुरगांठ.

शेसाळणें अ०क्रि० १(मनुष्य, पशु, इ० नीं) कांहीं काम करावयाला अति उत्सुक झालेलें असणें. २ (गात्रविशेष) कांहीं काम करावयाला अत्यन्त उत्सुक किं० उत्कंठित झालेलें असणें,—मारामारीला बाहु, धावावयाला पाय, गावयाला कंठ, इ०. ३ रागानें किं० उत्कंठेनें बेफाम होणें. ४(सर्प, मांजर, माणूस,इ० नीं)रागानें फुसफुसणें.

शेसाळा [म० शेसाळणें] पु० आवेश;जोर; खुमखुमी; इसळी; त्वेष; क्षोभ. [पहा.

शेसुर, शेसुरणें मागें 'शिवसूर,' 'शिवसुरणें'

शेळ स्त्री० १ शीळ घालणें किं० फुंकणें. २ सर्पादींचें फुसफुसणें.

शेळ स्त्री० जोंत सदैव आर्द्रता असते अशी भातजमीन किं०अशा जमीनिवर केलेले भाताचें रोपे,—उपटून दुसरीकडे लावावयासाठीं. ꠶ **शेळीचा तरवा** पु०भाताचीं रोपडीं करण्यासाठीं भाजून तयार केलेली शेळ जमीन किं० अशा जमीनीवर केलेलीं भाताचीं रोपडीं समुच्चयानें.

शेळक्या,शेळडूं मागें 'शेरडी ' मध्यें ' शेरडुक्या, ' ' शेरडूं ' पहा.

शेळणें न० मागें ' शेलणें ' पहा.

शेळभेळ स्त्री० मिश्रण; मिसळ.

शेळवंडी स्त्री० सासरीं किं० माहेरीं आलेल्या मुलीवरून तांदूळ ओवाळून टाकणें हा विधि किं० ओवाळून टाकलेले तांदूळ.

शेळसप्तमी स्त्री० श्रावण शुद्ध सप्तमी ही तिथि किं०ह्या तिथीचें व्रत. मागें 'शिळा सप्तमी' पहा.

शेळसभा स्त्री० भांडणाऱ्या दोन पक्षांमध्यें सलोखा घडवून आणण्यासाठीं किं० तंटा मिटविण्यासाठीं उभयपक्षांची भरते ती सभा.

शेळी स्त्री०बकरी.꠶ **शेळी जाते जिवानिशीं आणि खाणार म्हणतो वातड** नोकरानें कितीही जीव तोडून काम केलें तरी त्याच्यावर कृतघ्न धनी चरफडतोच ! [विणें).

शेळू स्त्री०, पु०शीन,शिऊळ (घालणें,वाज-

शेळोंदरा, शेळोंद्रा वि० काळाकुट्ट.

शैघ्य [सं०] न० शीघ्रपणा;त्वरा; जलदी.

शैत्य [सं०] न० १ थंडी; सर्दी. २ गारवा; गारठा. ३ थंडांमुळें शरीरांत झालेली विकृति,—पडसें इ० रूप. ꠶ **शैत्यपित्त** न० १ शैत्यामुळें शरीरांत झालेला पित्ताचा क्षोभ. २ शीत आणि उष्ण ह्या दोहोंचा प्रकृतींत एकदम झालेला क्षोभ.

शैथिल्य [सं०] न० १ सैलपणा; ढिलेपणा. २ दुर्लक्ष्य. २ बिलबिलीतपणा, मऊपणा. ४ आळस; दीर्घसूत्रीपणा; चेंगटपणा.

शैल [सं०] पु० पर्वत. न० दगडफूल.वि० दगडी;डोंगराळ;शिलामय; खडकाळ. ꠶ **शैलेन्द्र, शैलाधिप** पु० हिमालय पर्वत. **शैलज** न० दगडफूल.**शैलजा, शैलसुता, शैलकन्या** स्त्री०पार्वती. **शैलनिर्यास** पु० शिलाजित. **शैलसार** वि० पर्वताप्रमाणें घट्ट, टणक, आणि मजबूत. **शैलरंध्र** न० गुहा.

शैली [सं०] स्त्री० १ तऱ्हा; सरणी; पद्धति. २ टीका; व्याख्या. ३ कोणेकाची कांहीं काम करण्याची पद्धति किं० खुबी किं० कुशलता. ४ कोणेकाची लेखनाची किं० विषयाच्या प्रतिपादनाची तऱ्हा.

शैलूष [सं०] पु० १ नट; नर्तक. २ वाद्यें

वाजविणाऱ्यांचा मुख्य. ३ ताल धरणारा. ४ बजवय्या. ५ ठग; लुचा. **शैलूषी स्त्री०** नटीं; नायकीण.

शैल्य [सं० शल्य] **न०** हात, पाय, इ० मध्यें शिरलेलें कुसळ, कांटा, इ०.

शैव [सं०] **वि०** शंकरासंबंधाचें.**पु०** शिवाचा भक्त किं० उपासक.

शैवल, शैवाल [सं०] **पु०** शेवाळ.

शैशव [सं०] **न०** बालपण; बाल्य.

शैशिर [सं०] **वि०** शिशिर ऋतूंतील.

शोक [सं०] **पु०** १ दुःख; खेद. २ विलाप; रडणें. ꣸ **शोकाकुल, शोकग्रस्त वि०** दुःखानें व्याकुळ झालेला; दुःखी.

शोकणें [सं० शुष्] **अ० क्रि०** १ (पान, फूल, इ०) वाळणें किं० कोमेजणें. २ तहानेनें व्याकुळ झालेलें असणें. **स० क्रि०** (फुल, पान, वस्त्र, चिखल, इ०) उन्हानें किं० अग्निसंयोगानें वाळविणें किं० जलरहित करणें.

शोख, शोखी पुढें ' शौक, ' ' शौकी ' पहा.

शोचणें [सं० शुच्] **स० क्रि०** (नाश, हानि, प्रियजनाचा वियोग, पराभव, निराशा, इ० बद्दल) विलाप किं० दुःख करणें किं० रडणें.

शोचनीय, शोच्य [सं०] **वि०** ज्याचेबद्दल दुःख होत आहे असा; अनुकंपनीय; ज्याचे बद्दल दुःख होत आहे किं० होणें योग्य आहे असा.

शोणित [सं०] **वि०** तांबडा; तांबड्या रंगाचा. **न०** रक्त; रुधिर. ꣸ **रक्तामय पु०** तांबडी आंव; रक्तमिश्रित आंव. **रक्तोपल न०** माणिक हें रत्न. [तांबडा रंग.

शोणिमा [सं० शोणिमन्] **पु०** तांबडेपणा,

शोथ [सं०] **पु०** गात्राचीं सूज किं० सुजलेपणाची स्थिति. [पहा.

शोदा, शोदेगिरी, इ० पुढें ' सोदा ' इ०

शोध [सं०] **पुं०** १ तपास; चौकशी; हुडकण्याची क्रिया. २ वस्तूच्या आंत शिरून तिच्या स्वरूप, गुण, इ० संबंधानें माहिती मिळविणें; परीक्षा. ३ तपासाअंतीं मिळालेली माहिती. ४ अज्ञात वस्तूसंबंधाचें मिळालेलें किं० मिळविलेलें ज्ञान. ५ लिहिण्यांत झालेली जी चूक तिची दुरुस्ती. ६ शुद्ध किं० पवित्र करणें. ७ ऋणाची फेड. ८ सूड. ꣸ **शोध ठेवणें** कोणेक वस्तु किं० माणूस कोठें आहे, कोठें जाईल, केव्हां येईल, इ० माहिती मिळविणें किं० ती मिळविण्याचे उपाय चालविणें.

शोधक[सं०]**वि०** १ चौकस (माणूस). २ हुडकणारा; चौकशी करणारा. ३ दुरुस्ती करणारा. ४ चिकित्सक; अंतर्मुख; बुद्धिवान. **पु०** (**गणित**) वजा करावयाची संख्या.

शोधणें [सं० शुध्] **स० क्रि०** १ (हरवलेली वस्तु किं० अज्ञात वस्तु किं० विषय यांच्या संबंधाचा) तपास करणें किं० ज्ञान किं० माहिती मिळविणें. २ हुडकून काढणें. ३ जगांत असून लोकांना ठाऊक नसलेली वस्तु लोकांना माहीत करून देणें. ४ कांहीं वस्तूंची कांहीं विशेष प्रकारें संघटना करून कांहीं (नवीन पदार्थ यंत्रादि) निर्माण करणें. **टीप,**–३ आणि ४ ह्या अर्थी 'शोधून काढणें' सुद्धां. ५ (पदार्थांतील) मळ किं० त्याज्य भाग काढून टाकून (तो पदार्थ) पाहिजे तसा करून घेणें. ६ (लेख इ० तील चुका) दुरुस्त करून (तो) निर्दोष किं० बिनचूक करणें.

शोधणें [म० शोधणें] **न०** पदार्थ गाळून किं० चाळून तो स्वच्छ किं० निर्मळ करण्याचें वस्त्र इ० साधन.

शोधन [सं०] **न०** वर 'शोध'चे आठही अर्थ पहा. ९ दोषांचें निवारण. १० जखम धुणें. ११ प्रायश्चित. १२ (**गणित**) वजाबाकी. १३ (**वैद्यक**) ढाळक; रेच करणारें औषध. १४ धातूंतील मळ काढून टाकणें.

शोधित [म० शोधणें] **वि०** तपासलेलें; शोधलेलें; दुरुस्त किं० शुद्ध किं० निर्मळ केलेलें.

शोध्य [सं०] **पु०** १ आरोपी. २ (**गणित**) वजा करावयाची संख्या.

शोप [हिं०] **स्त्री०** ओव्यासारखें एक धान्य. ꣸ **शोपट वि०** शोपाचा वास किं० रुचि असलेला (आंबा इ०). ' शोपा ' ' शोप्या ' ह्याच अर्थी.

शोफ [सं०] **पु०** गात्राला येते ती सूज.

शोभणी, शोभनी [सं० शोभना] **स्त्री०** गौरी देवींचें नांव.

शोभणें [सं० शुभ्] **अ० क्रि०** १ सुंदर

किं० टवटवीत किं० तजेलेदार दिसणें; उठून दिसणें; खुलणें; उ० तुला खादीचा सदरा फार शोभतो. २ कांहीं वर्तन किं०भाषण कोणेकाच्या विद्वत्तेला, दर्जाला, किं० शीलाला अनुरूप किं० साजेसें किं० योग्य असणें; उ०धावत्या भावाच्या विवेकडे दुर्लक्ष्य करणें तुला शोभत नाहीं.

शोभन [सं०] वि० १ तेजस्वी. २ सुंदर. ३ मंगल; शुभ. पु० १ (ज्योतिष) ग्रह. २ शुभ कर्मांतील अग्निविशेष. ३ पांचवा योग. **शोभना** स्त्री० १ हळद. २ गोरोचन नांवाचा पिवळा रंग. ३ सुंदरी. **शोभन** न० १ सौन्दर्य. २ सजविणें; शोभायुक्त करणें; थाटमाट करणें. ३ लग्न, मुंज, इ० मंगल कार्य. ४ मैथुन; रतिसंभोग. **शोभनें** न० अ० व० १ लग्न, मुंज, इ० प्रसंगांत स्वयंपाकासाठीं आणलेलीं सर्पणाचीं लांकडें. ꕥ **फळशोभन** न० गर्भाधान हा संस्कार.

शोभनी [सं०] स्त्री० १ गौरी; पार्वती. २ एक प्रकारची रोवळी. ३ व्यभिचारिणी स्त्री.

शोभमान [सं०] वि० शोभणारा; सुंदर; चकचकीत. [दार; टवटवीत.

शोभवणा [म० शोभा] वि० सुंदर; तजेले-

शोभविणें [म० 'शोभणें' चें प्रयोजक] शृंगारणें; सुंदर दिसेसें करणें.

शोभा [सं०] स्त्री० १ कांति; तेज. २ सौन्दर्य. ३ शोभा देणारा पदार्थ,–दागिना इ०; उ० विद्या ही पुरुषाची शोभा आहे. ४ (विपरीत लक्षणेनें) बेआबरू; फजीती (करणें, होणें). ꕥ **शोभांजन** पु० शेवगा; ह्याच्या शेंगा कढी, पिठलें,इ०मध्यें घालतात. **शोभिवंत** वि० सुंदर. **शोभायमान** वि० वर 'शोभमान' पहा.

शोष [सं०] पु० १ वाळणें; सुकणें. २ आटणें, क्षयरोग. ३ ओल्या पदार्थांतून द्रवांश ओढून घेणें ही क्रिया किं० असा ओढून घेतलेला अंश. ४ विहीर, जमीन, इ० ची जलाभावानें झालेली शुष्कता किं० त्यांना आलेला कोरडेपणा किं० रखरखीतपणा. ५ अति तहान लागल्यामुळें घशाला आलेला कोरडेपणा; उ० मला शोष लागला आहे, अगोदर गार पाणी दे. ६ हवेंत जलांश नसल्यानें हवेंत येतो तो कोरडेपणा किं० रूक्षपणा.

शोषक [सं०] वि० शोषून घेणारा.

शोषण [सं०] न० १ सुकणें; वाळणें. २ शोषून घेणें. ३ कृश होणें. ४ कृश करणें. ५ मदनाचा एक बाण.

शोषणें [सं० शुष्] स० क्रि० (जल, रस इ०) ओढून किं० आकर्षून घेणें; उ० येथें पावसाचें पाणी पडलें होतें तें जमीनीनें तत्काळ शोषून घेतलें; उ० साखरेच्या गोळ्यावर घातलेलें दूध शोषिलें गेलें; उ० ओलें फडकें तेथें टाक म्हणजे तेथें सांडलेलें पाणी तें शोषून घेईल. २ खर्चणें; संपविणें; उ० ह्या लग्नानें माझी सर्व शिलक शोषिली. अ० क्रि० वाळणें; शुष्क किं० नीरस होणें, आटणें (जमीन, शरीर, फळ,पाणी,इ०).

शौक, शोक [अ० षौक्] पु० १ आवड; नाद; छंद. २ विषयलांपट्य. ३ प्रेम; प्रीति. ꕥ **शौकीन, शौकी,शोकी** वि०१रंगेल.२नादिष्ट. ३ गायन, वादन, इ० ची अभिरुचि ज्याला आहे असा. ४ विषयलंपट. ५ एकाद्या गोष्टीची किं० विषयाची विशेष गोडी ज्याला आहे तो त्या गोष्टीचा किं० विषयाचा.

शौच [सं०] न० १ स्वच्छता. २ पवित्रता. ३ धुणें. ४ शुद्ध करणें; प्रायश्चित्त. ५ सोयर, सुतक, विटाळ, इ० तून स्नानादिकांनीं आलेली शुद्धता. ६ गुदद्वारें मलविसर्जन. ꕥ **शौचकूप** पु० मलविसर्जनार्थ केलेली आडोशाची जागा किं० खोली. **शौचाविधि, शौचाचार** पु० गुदद्वारें मलविसर्जन.

शौंड [सं०] वि० १ मत्त; उन्मत्त. २ विख्यात. ३ दक्ष; निपुण; हुशार; उ० अक्षशौंड म्ह० फासे खेळण्यांत निपुण; दानशौंड म्ह० मोठा दाता, उदार.

शौंडिक[सं०]पु०मद्य करणारा किं०विकणारा.

शौद्र [सं०] वि० शूद्रजाती संबंधाचा. पु० शूद्र स्त्री आणि ब्राह्मण, क्षत्रिय, किं० वैश्य पुरुष ह्यांचा पुत्र.संपत्तीला वारस असे जे बारा प्रकारचे पुत्र धर्मशास्त्रांत सांगितले आहेत त्यांपैकीं बारावा. मागें 'द्वादश' मध्यें 'द्वादश पुत्र 'पहा.

शौनक [सं०] पु० एक ऋषि. यास सूतानें भारतादि इतिहास सांगितला.

शौनिक [सं०] पु० खाटिक; पशु मारून मांस विकण्याचा धंदा करणारा.

शौरसेनी [**सं०**] **स्त्री०** संस्कृतापासून उत्पन्न झालेली एक प्राकृत भाषा.

शौरि [**सं०**] **पु०** १ विष्णु. २ कृष्ण. ३ बलराम. ४ शनि हा ग्रह. [वीर्य.

शौर्य [**सं०**]**न०**१शूरपणा;धीटपणा.२ पराक्रम;

श्मशान [**सं०**] **न०** प्रेतें जाळण्याची किंवा पुरण्याची जागा; मसण. ꙮ **श्मशानकर्म न०**, **श्मशानक्रिया स्त्री०** और्ध्वदेहिक विधि. **श्मशाननिद्रा स्त्री०** मरण. **श्मशानभट पु०** और्ध्वदेहिक मंत्र सांगणारा ब्राह्मण; कारटा. **श्मशानवैराग्य न०** क्षणमात्र टिकलेलें किंवा टिकणारें वैराग्य किंवा संसाराविषयीं अप्रीति. **श्मशानसाधन न०** श्मशानांत बसून वेताळ इ० उग्र देवता वश करून घेण्यासाठीं केलेलें किंवा करावयाचें अनुष्ठान. **श्मशानरोदन न०** निरुपयोगी किंवा निष्फळ रोदन किंवा रडणें.

श्मश्रु [**सं०**] **स्त्री०** १ दाढी. २मिशी.ꙮ**श्मश्रु करविणें** न्हाव्याकडून हजामत करवून घेणें. **श्मश्रुल वि०** ज्याच्या मिशा, दाढी, कल्ले, इ० झुबकेदार किंवा फार वाढलेले आहेत असा(पुरुष).

श्याम [**सं०**] **वि०** १ काळा; काळसर; सांवळा. २ काळा आणि निळा(ढग).**पु०** १ढग.२ तमाल वृक्ष.३ प्रयागांतील एक विशिष्ट वड. ꙮ **श्यामकंठ पु०** १ शंकर. २ मोर. **श्यामकर्ण पु०** अश्वमेधांतील घोडा. **श्यामांग पु०** बुध हा ग्रह. **श्यामकल्याण पु०** कल्याण रागाचा एक भेद. **श्यामशबल पु० अ० व०** १ यमराजाचे दोन कुत्रे. २ वाईट कृत्यें एकमेकांच्या मदतीनें करणारे दोन हलकट मित्र.

श्यामक, श्यामाक[**सं**]**पु०**सांवा हें धान्य.

श्यामल [**सं०**] **वि०** काळा; काळासांवळा.

श्यामिका [**सं०**] **स्त्री०** १ काळेपणा; काळसरपणा. २ धातूचा हिणकसपणा.

श्याल, श्यालक [**सं०**] **पु०** बायकोचा भाऊ.

श्यालिका,श्याली स्त्री०बायकोची बहीण;मेहुणी.

श्येन [**सं०**] **पु०** ससाणा हा पक्षी. **श्येनी स्त्री०** ह्या पक्ष्याची स्त्री. ꙮ **श्येनकपोतीय न०** आकस्मिक संकट. **श्येनपात पु०** उंचावरून घातलेली झडप.

श्रद्धान [**सं०**] **वि०** श्रद्धावान्; श्रद्धालु.

श्रद्धा [**सं०**] **स्त्री०** १ विश्वास; भरंवसा. २ धर्मावर विश्वास; आस्तिक्य बुद्धि. ३ गुरुजनासंबंधानें आदर; वडील माणसें सांगतात तें सर्व खरें आहे किंवा कल्याण करणारें आहे अशी बुद्धि. ४ मत; समजूत. ५ (**मराठींत**) अपान वायु. ꙮ **श्रद्धाजाड्य न०** हेकटपणाचा भरंवसा; आपल्या मताच्या विरुद्ध कितीही बाध किंवा आक्षेप दिसत असले तरी आपलें मत न सोडणें किंवाआपलें मतच खरें आहे असा हटवादीपणा. **श्रद्धाभक्ति, श्रद्धापूर्वक भक्ति स्त्री०** ईश्वराच्या चांगुलपणाबद्दल पूर्ण खात्री असून जी ईश्वराची भक्ति कोणी मनुष्य करतो ती. **श्रद्धालु श्रद्धावान् वि०** १ विश्वास ठेवणारा. २ ईश्वरासंबंधानें पूर्ण श्रद्धा ज्याच्या मनांत आहे असा.

श्रद्धेय [**सं०**] **वि०** विश्वासाला पात्र.

श्रम [**सं०**] **पु०** १कष्ट; आयास. २ मेहेनत; व्यासंग. ३ थकवा. ४ शरीर बळकट व्हावें म्हणून करतात ती कसरत किंवा व्यायाम. ५ खेद; विषाद; दुःख. ꙮ **श्रम टाकणें** थकवा घालविणें; पुन्हा ताजेंतवानें होणें. **श्रमकर्म न०** कष्टाचें किंवा जिकीरीचें काम. **श्रमी** [**सं०** श्रमिन्] **वि०** १ उद्योगी. २ थकलेला; श्रांत. **श्रमपरिहार पु०** थकवा नाहीसा होणें किंवा होण्याचा उपाय.

श्रमणें [**सं०** श्रम्] **अ० क्रि०** दमणें; थकणें; फार कष्ट केल्यामुळें निर्वीर्य होणें किंवा गळणें.

श्रमण,श्रमणक[**सं०**]**पु०**१संन्यासी. २तपस्वी. ३ भिक्षु;गोसावी. **श्रमणा,श्रमणी स्त्री०**जोगीण.

श्रमविणें [**म०** 'श्रमणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** दमविणें; कष्टविणें.

श्रय पुढें ' श्रेय ' पहा.

श्रवण [**सं०**] **पु०, न०** कान; ऐकण्याचें इंद्रिय. **न०** ऐकणें; कर्णेन्द्रियानें जाणणें किंवा अनुभविणें. **पु०** बावीसावें नक्षत्र. ꙮ **श्रवणेंन्द्रिय न०** ऐकण्याचें इंद्रिय; कान. **श्रवणगोचर, श्रवणपथ, श्रवणविषय पु०** ऐकण्याचा टप्पा; ऐकण्याचा विषय. **श्रवणद्वादशी स्त्री०** श्रवण नक्षत्रानें युक्त जी भाद्रपद किंवा फाल्गुन शुक्ल द्वादशी ती. **श्रवणाचें श्रवण न०** कर्णेंद्रियाची ऐकण्याची शक्ति.

श्रवणीय [**सं०**] **वि०** ऐकण्याजोगें; ऐकण्याला योग्य किंवालायक; जें ऐकलेंच पाहिजे असें.

श्रविष्ठा[**सं०**]**स्त्री०** (**ज्योतिष**) धनिष्ठा नक्षत्र.

श्रांत [**सं०**] **न०** दमलेला; थकलेला. **पु०** १ तपस्वी. २ जितेन्द्रिय.

श्राद्ध [**सं०**] **न०** मृत पितरांचे उद्देशानें पुत्रादिकांनीं ब्राह्मणांस जेऊं घालणें, पिंडदान करणें, इ० जीं कर्मे तीं समुच्चयानें (करणें). ꣸ **वि०** श्रद्धायुक्त; श्रद्धालु. **श्राद्धदेव पु०** १ यम. २ विश्वेदेव. ३ पितर.

श्राप इ० मागें ' शाप ' इ० पहा.

श्रामक [**सं०**] **वि०** विद्या, द्रव्य, कला, इ० संपादन करण्याविषयीं मेहेनत करणारा.

श्राव पुढें ' स्राव ' पहा.

श्रावक [**सं०**] **पु०** १ श्रोता; ऐकणारा. २ शिष्य. ३ बुद्ध साधु. ४ बुद्ध भिक्षु. ५ पाखंडी.

श्रावडा पु०,श्रावड स्त्री०एक वीत दीडवीत उंचीचें झुडूप. ह्याचें पांढरें पान मंगळा गौरीला मुली वाहतात. **श्रावड न०** ह्या झाडाचें पान.

श्रावण [**सं०**] **पु०** हिंदूंच्या बारा महिन्यांपैकीं एक; आषाढाच्या पुढचा आणि भाद्रपदाच्या मागचा महिना. ꣸ **श्रावणपाटी स्त्री०** लग्न झाल्यानंतर पहिला जो श्रावण महिना येतो त्यांत नवऱ्याकडून नवरीकडे बाहुल्या, सागरगोटे, जांतीं, इ० मुलीच्या खेळण्याच्या वस्तु पाटींत भरून समारंभानें पाठविल्या जातात त्या समुच्चयानें किं० ती पाटी. आषाढ महिन्यांत नवरीकडून नवऱ्याकडे खेळणीं भरून जी पाटी पाठविली जाते तिला ' आषाढपाटी ' किं० ' आखाडपाटी ' म्हणतात. मागें ' आषाढ,' ' आखाड ' पहा. **श्रावणा,श्रावणी वि०** श्रावण महिन्यांतील. **श्रावणसर, श्रावणसरी, श्रावणपाहळी स्त्री०** श्रावण महिन्यांत येते ती थोडा वेळ टिकणारी पण जोराची पावसाची सर,–जी येऊन गेल्यानंतर लगेंच उन्ह पडतें. **श्रावणी स्त्री०**१श्रावण महिन्यांत नवीं जानवीं घालण्याचा विधि. २ श्रावण महिन्यांतील पौर्णिमा.

श्रावणें [**सं०** स्रु] **अ० क्रि०** पाझरणें.

श्राव्य [**सं०**] **वि०** १ ऐकावयाचें; ऐकण्याजोगें; ऐकूं येण्याजोगें; ऐकावयास योग्य. २ (**साहित्य**) काव्यभेद; उ० रघुवंश हें श्राव्य काव्य आहे.

श्री [**सं०**] **स्त्री**१संपत्ति; धनदौलत. २ लक्ष्मी देवी. ३ समृद्धि; वैभव; भरभराट. ४राजलक्ष्मी. ५ सौंदर्य; शोभा; कांति. ६ (समासांत) मंगलरूप; उ० श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीसीता, श्रीक्षेत्र काशी, इ०. ७ धर्म, अर्थ, आणि काम, ही त्रयी. ८ स्त्रीधन. ९ दैवीशक्ति. १० सरस्वती. ११ कीर्ति. १२ वेदत्रयी; ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद, हे तीन समुच्चयानें. १३ हत्तीच्या डोक्यावर शोभेसाठीं घालतात तें उंचीवस्त्र. ꣸ **श्रीकंठ पु०** १ शंकर. २ भवभूति हा संस्कृत कवि. **श्रीकर वि०** कल्याणकारक.**श्रीकरण न०** लेखणी.**श्रीधर, श्रीनिवास,श्रीकान्त, श्रीपति, श्रीरंग पु०** विष्णु; कृष्ण. **श्रीखंड पु०, न०** १ चंदन. २ **न०** (**मराठींत**) दह्याच्या चक्क्यांत केशर, इ० द्रव्यें घालून करतात तें पक्वान्न. ३ भांगेंत साखर, वेलदोडे, इ० घालून करतात तें पेय. **श्रीगदित न०** (**साहित्य**)एक प्रकारचें रूपक. **श्रीघन पु०** बुद्ध साधु. **श्रीद पु०** कुबेर. **श्रीवत्स पु०** १ विष्णु. २ विष्णूच्या छातीवरील पांढरा केशमय भोंवरा. ३ चोरानें भिंतीस पाडलेलें भोक. **श्रीमत्** (**–द्**) **वि०** मंगल, शुभ; उ० श्रीमद्भागवत, श्रीमद्रामायण, इ०. **श्रीवर्धन पु०** शंकर. **श्रीमान्, श्रीमंत पु०** १ ज्याच्याजवळ पुष्कळ द्रव्य आहे असा. २ दैववान्. ३ प्रख्यात. ४ कोणीही थोर माणूस. ५ पुण्याच्या पेशव्यांची पदवी.**श्रीफळ न०**नारळ.**कोणेकाला श्रीफळ देणें** १ त्याला निरोप देणें. २ हाकलून लावणें. **श्रीकार पु०** १ श्री हें अक्षर. २ पत्र, यादी, इ० च्या सुरवातीस लिहितात तें ' श्री ' हें अक्षर. ३ देणें, घेणें, इ० व्यवहार करण्यास योग्य आणि पतीचा असा मनुष्य. ४ कोणीही वैभवशाली माणूस. **वीरश्री स्त्री०** वीर्य;पराक्रम; उत्साह. **जयश्री स्त्री०** जयाची देवता. **गृहश्री स्त्री०** १ घराचें वैभव. २ पत्नी. **श्रीमुख न०** मुख (स्तुतींत किं० निंदेंत). **कोणेकाच्या श्रीमुखांत लगावणें, कोणेकाचें श्रीमुख रंगविणें** त्याच्या थोबाडींत मारणें. **श्रीमंतपूजन न०** मागें ' सीमा ' मध्यें पहा. **श्रीमंती, श्रीमंतकी स्त्री**०धनधान्यादींनीं कोणेकाची जी वैभवसंपन्न स्थिति ती. **श्रीमंती वि०** भपकेदार; थाटमाटाची (राहाणी, मेजवानी, इ०). **श्रीमुद्रा स्त्री०** वैष्णव लोक गोपीचंदनानें अंगावर वठवितात ज्या शंख, चक्र, पद्म, गदा, आणि रामनाम ह्या पांच मुद्रा त्या प्रत्येक. **श्रीराग पु०** (**संगीतांत**) एक रागविशेष. **श्रीवैष्णव पु०** विष्णुभक्तांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणीही इसम. **श्रीवर्धन न०** कोकणपट्टीचें एक शहर. पेशवे हे येथचे राहाणारे होते. येथील रोठ्यास ' श्रीवर्धनी रोठा किं० सुपारी ' म्हणतात.

श्रुत [**सं०**] **वि०** १ ऐकिलेलें. २ जाणलेलें. ३ प्रख्यात. ४ देईन म्हणून वचनानें दिलेलें; देऊं केलेलें. ५ वेदरूप; वेदांस मान्य. **न०** १ ऐकणें. २ ऐकिलेली गोष्ट. ३ विद्या, शास्त्र, इ० जें कोणेकानें संपादिलेलें आहे तें. ४ वेद. ❀ **श्रुतकीर्ति वि०** १ उदार. २ प्रख्यात. **श्रुतवान् वि०** १ विद्वान्. २ ज्यानें ऐकिलें आहे असा.

श्रुति [**सं०**] **स्त्री०** १ ऐकणें; ऐकण्याची क्रिया. २ कान; श्रवणेन्द्रिय. ३ बातमी; खबर; अफवा. ४ आवाज; ध्वनि. ५ कीर्ति; प्रख्याति. ६ वाणी; भाषण. ७ वेद; वेदाची संहिता. ९ वेदवाक्य. १० ब्रह्मप्रतिपादक वाक्य. ११ कोणेक कार्याचें फल. १२ (**ज्योतिष**) श्रवण नक्षत्र. १३ (**गणित**) कर्ण; काटकोन त्रिकोणांतील काटकोना समोरची बाजू. १४ (**मराठींत**) बातमीला आधार; कांहीं विधानाचा पुरावा. ❀ **श्रुत्यनुप्रास पु०** एक शब्दालंकारविशेष. कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्त्य, ओष्ठ्य, हीं जीं व्यंजनांची स्थानें आहेत त्यांपैकीं कोणत्याही एकाच स्थानची अनेक अक्षरें पुष्कळ वेळां आणि कोणत्याही क्रमानें आलीं असतां श्रुत्यनुप्रास होतो; उदाहरण आणि विशेष खुलासा आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत पहा. **श्रुतिकटु वि०** १ कानाला कर्कश वाटणारा (शब्द इ०). २ ऐकण्याला दुःखकारक (बातमी इ०). ३ (**साहित्य**) उच्चारावयास कठिण आणि ऐकण्यास कठोर अशा शब्दांचा कवितेंत उपयोग करण्यानें होणारा (दोष). विशेष माहिती गणेश मोरेश्वर गोरे ह्यांच्या काव्यदोषदीपिकेंत पहा. **श्रुतिपथ पु०** ऐकण्याचा टप्पा; उ० ही गोष्ट इतकी जुनी असून माझ्या श्रुतिपथावर कालच आली. **श्रुतिमान् वि०** वेदपारंगत. **श्रुतिविषय पु०** १ आवाज; ध्वनि. २ ऐकण्याचा टप्पा. **श्रुतिशिखर, श्रुतिशिर (श्रुतिशिरस्) न०** उपनिषद्, वेदांत.

श्रूयमाण [**सं०**]**वि०**जें ऐकिलें जात आहे तें.

श्रेढी [**सं०**] **स्त्री०** १ (**गणित**) कांहीं विशिष्ट नियमाला अनुसरून असलेली संख्यांची पंक्ति. २ कोणतीही पंक्ति; रांग; समुदाय. ❀ **श्रेढीफल न०** संख्यामालेची बेरीज.

श्रेणी [**सं०**] **स्त्री०** १ ओळ; रांग. ३ पंक्ति. २ समुदाय. ३ व्यापाऱ्यांची किं० कारागिरांची मंडळी किं० संस्था. ४ व्यूहरचना.

श्रेयी [**सं०**] **स्त्री०** १ पदार्थांची मालिका किं० परंपरा. २ (**गणित**) कांहीं नियमाप्रमाणें असलेली संख्यांची पंक्ति. ३ पर्यवसान.

श्रेय [**सं०** श्रेयस्] **वि०** १ अधिक चांगलें. २ उत्तम. ३ शुभ; कल्याणकारक. **न०** १ पुण्य. २ कल्याण. ३ शुभप्रसंग. ४ मोक्ष. ५ पुण्यसाधन. ६ वैभव; भरभराट; संपन्नपणाची स्थिति. ७ स्तुतिपात्रता; उ० मला औषध देऊन बरें केल्याचें श्रेय ह्या जोशी वैद्यांकडे आहे. ' श्रय ' हें अपभ्रष्ट रूप. ❀ **श्रेयस्कर वि०** १ मोक्षप्रद. २ स्तुत्य; अभिनंदनीय. ३वैभवदायक. **श्रेयःसंपादन न०** १ पुण्य संपादणें. २ स्तुतिपात्रता. ३ दुसऱ्याकडून कांहीं पुण्यकर्म आपण पैसे देऊन आपणासाठीं करविलें असतां जें पुण्य आपणास लागतें तें. ४ आपण केलेल्या कृत्याचें पुण्यरूप किं० पापरूप जें फळ आपणास मिळतें तें. 'श्रेयस्संपाद्य ' हें अपभ्रष्ट रूप. **श्रेयान्** [**सं०** 'श्रेयस्' च्या प्रथमेचें **पु० ए० व०**] **वि०**अत्यन्त उत्कृष्ट; सर्वोत्तम; उत्तमोत्तम. **श्रेयोर्थी पु०** १ आपला हितचिंतक. २ श्रेय मिळवूं पाहणारा. ३ पुण्यकर्में करून पुण्य संपादनार्थ झटणारा. **श्रेयोवान् वि०** वैभवशाली; संपन्न स्थितींत असलेला.

श्रेष्ठ [**सं०**] **वि०** अति उत्तम. ❀ **श्रेष्ठाश्रम पु०** गृहस्थाश्रम.

श्रेष्ठी [**सं०** श्रेष्ठिन्] **पु०** १ शेट; शेटजी. २व्यापारी किं० कारागीर यांच्या संस्थेचा मुख्य.

श्रैष्ठ्य [**सं०**] **न०** श्रेष्ठपणा.

श्रोणि, श्रोणी [**सं०**] **स्त्री०** १ रस्ता. २ कंबर. ३ ढुंगण. ❀**श्रोणीफलक न०**ढुंगणाचें फळें. **श्रोणीसूत्र न०**तरवार अडकविण्याचा कंबरपट्टा.

श्रोतव्य [**सं०**] **वि०** ऐकावयास पाहिजे असें; जें ऐकणें जरूर आहे तें; उ० अरे, आत्मा हा श्रोतव्य, मंतव्य, आणि निदिध्यासितव्य आहे.

श्रोता [**सं०** श्रोतृ] **पु०** १ ऐकणारा. २ शिष्य. **पु०** सभादिप्रसंगीं व्याख्यानादि ऐकावयास आलेला मनुष्य; उ० कालच्या सभेस वीस हजार श्रोते जमले होते.

श्रोत्र [**सं०**] **न०** कान; कर्णेन्द्रिय.

श्रोत्रिय [**सं०**] **पु०** १ वेदवेत्ता ब्राह्मण. २ अग्निहोत्री. **टीप**,–'श्रोतीय,' ' श्रोती,' 'श्रोत्री,' हीं अपभ्रष्ट रूपें होत.

श्रौत [**सं०**] **वि०** १ वेदासंबंधीं. २ यज्ञसंबंधी. ३ वेदांत करावें म्हणून सांगितलेलें(कर्म). **न०** १ वेदोक्त यज्ञादि कर्म. २ अग्निहोत्र. ३ करावयाचीं म्हणून वेदांत सांगितलेलीं जीं कर्में

त्यांच्या संबंधाचें शास्त्र किं० ग्रंथ. श्रौती म्हणजे श्रौतशास्त्रांत पारंगत.

श्लथ [सं०] वि० १सैल; ढिलें. २विसकटलेलें. अस्ताव्यस्त; विसकळीत. टीप,–ह्या दोन्ही अर्थी ' विश्लथ ' सुद्धां.

श्लाघणें [सं०श्लाघ्]**स०क्रि०**स्तविणें;प्रशंसिणें.

श्लाघनीय, श्लाघ्य [सं०] **वि०** स्तुत्य; प्रशंसनीय; स्तुतीस पात्र. [२ बढाई.

श्लाघा [सं०]**स्त्री०** १ स्तुति; प्रशंसा; तारीफ.

श्लिष्ट [सं०] **वि०** १ चिकटलेलें. २ आलिंगिलेला. ३ संयुक्त; संबद्ध; जुळलेला. ४ (**साहित्य**) अनेकार्थी (शब्द, वाक्य, इ०). ' चंद्रासि लागति कळा उपराग येतो ' इ० रघुनाथ पंडिताचा श्लोक पहा. ' तूं मलिन, कुटिल, नीरस, इ०,'ही मोरोपंतांची आर्या:यांत श्लिष्ट पदें आहेत पुढें ' श्लेष ' पहा.

श्लीपद [सं०] **न०** पाय सुजणें हा रोग.

श्लील [सं०] **वि०** १ दैवी. २ सुंदर. ३ सभ्य. **अश्लील न०** असभ्य.

श्लेष [सं०] **पु०** १ आलिंगन. ' आश्लेष ' ह्याच अर्थी. २ चिकटणें. ३ समागम; संयोग. ४ (**साहित्य**) वाक्यांत एका शब्दाचे दोन अर्थ घेऊन त्या वाक्याचा अर्थ विवक्षित असल्यास तो शब्द ' श्लिष्ट ' आहे असें म्हणतात. श्लिष्ट शब्दाच्या जागीं पर्याय शब्द योजल्यानें श्लेषाला क्षति होत असेल म्हणजे बाध येत असेल तर तो शब्दश्लेष आणि क्षति होत नसेल म्हणजे बाध येत नसेल तर तो अर्थश्लेष. जेव्हां एकाच वाक्याचे अनेक अर्थ होतात आणि संदर्भादिकांच्या अभावामुळें त्या अर्थांतून कोणताही अर्थ घेणें शक्य असतें तेव्हां श्लेष हा अर्थालंकार होतो; उ० ' तूं मलिन, कुटिल, नीरस, इ०' ही मोरोपंतांची प्रसिद्ध आर्या अर्थश्लेषाचें प्रसिद्ध उदाहरण आहे. 'मी मयूर शुकाप्रमाणें बोलूं इच्छितों' ह्या वाक्यांत ' मयूर ' आणि ' शुक ' हे शब्द श्लिष्ट आहेत. हें शब्दश्लेषाचें उदाहरण. येथें हेच शब्द योजल्यास श्लेष होतो. ह्याच अर्थाचे अन्य शब्द योजल्यास श्लेषाची क्षति होते. विशेष तपशील आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

श्लेष्मा [सं० श्लेष्मन्] **पु०** १ कफ. २ पू.

श्लोक[सं०]**पु०**१स्तुति;स्तोत्र.२पद्य,–मालिनी, स्रग्धरा, मंदाक्रांता, इ०. ३ कीर्ति; उ०पुण्यश्लोक.

श्व [सं० श्वन्=कुत्रा] **पु०** कुत्रा. समासांत पूर्व पदीं 'श्व'हें रूप येतें. पुढील सामासिक शब्द मराठींत रूढ आहेत. ❀ **श्ववृत्ति स्त्री०** दुसऱ्याची सेवा किं० चाकरी. **श्वपच, श्वपाक पु०** १ क्षत्रिय पुरुष आणि उग्रा स्त्री यांचें अपत्य. २ चंडाळ. **श्ववृत्ति स्त्री०** स्वाभिमानशून्य अशी वरिष्ठाची सेवा. ' श्वानवृत्ति ' ह्याच अर्थी. **टीप,**–' श्वान ' हें मराठी रूप. ' श्वान ' शब्द पुढें यथास्थान पहा.

श्वशुर [सं०] **पु०** सासरा; बायकोचा बाप किं० पत्नीचा बाप.

श्वश्रू [सं०] **स्त्री०** सासू; बायकोची आई किं० पतीची आई.

श्वसन [सं०] **पु०** वायु. **न०** १ श्वासोच्छ्वास. २ सुसकारा.

श्वान [सं०श्वन्] **पु०, न०** कुत्रा; कुत्रें. ❀ **श्वानचेष्टा स्त्री०अ० व०** निंद्य खुशामत (करणें). **श्वाननिद्रा स्त्री०** अगदीं थोडी इशारत किं० आवाज होतांच नाहींशी होणारी झोप. **श्वानपुच्छ न०** जो कोणत्याही उपायानें सरळ होत नाहीं, जो आपलें स्वैर वर्तन कितीही बोध केला तरी सोडीत नाहीं असा माणूस. **श्वानमैथुन न०** आरंभीं सुखदायक परंतु अंतीं दुःखदायक असें कोणतेंही कृत्य. **श्वानवैखरी स्त्री०** ज्याच्या त्याच्यावर तोंड टाकणें; शिव्यागाळीचें भाषण. **श्वानशूरत्व न०** भित्र्यापुढें शौर्य आणि शूरापुढें भित्रेपणा दाखविणें हा गुण. **श्वानस्वभाव पु०** तिरसटपणाची वृत्ति. **श्वानी** [**सं०** शुनी; **म०** श्वान=कुत्रा] **स्त्री०** कुत्री.

श्वापद[सं०]**पु०**१वाघ.२कोणताही हिंस्र पशु.

श्वास [सं०]**पु०** नाकानें किं० तोंडानें आंत बाहेर येत जात असतो जो प्राणवायु तो; श्वासोच्छ्वास. २सुसकारा. ३वारा;वायु.४(**वैद्यक**)दमा; कफादि रोगानें लागतो तो दम किं० लागते ती धाप. ५ कष्टाच्या कामामुळें किं० धावणें इ० मुळें नाकातोंडांतून वायु जोरानें आंत येणें आणि बाहेर जाणें ही क्रिया; दम (लागणें). ❀ **श्वासोच्छ्वास पु०ए०व०** नाकानें किं० तोंडानें प्राणवायु शरीरांत शिरणें किं० शरीरांतून बाहेर पडणें ही क्रिया. **श्वासकुठार पु०** एक वैद्यकी रसायन. **श्वासावरोध पु०** दमा.

श्वेत[सं०]**वि०**पांढरें;शुभ्र.**पु०**शुक्र हा ग्रह.**न०** रूपें हा धातु.❀**श्वेतांबर,श्वेतपट पु०** जैन साधूंचा एक पंथ. **श्वेताद्रि, श्वेतपर्वत पु०** कैलास. **श्वेताश्व, श्वेतवाह, श्वेतवाहन पु०** अर्जुन,–धर्माचा धाकटा भाऊ. **श्वेतद्वीप न०** १ वैकुंठ. २ इंग्लंड हा देश. **श्वेतकृष्ण होणें** मरणें. **श्वेतकुष्ठ न०** पांढरें कोड.

ष

ष मराठी व्यंजनमालेंतील एकतिसावें व्यंजन.

षट् [**सं०** षष्=सहा] **वि०** सहा. **टीप,**– स्वर आणि मृदु व्यंजनें यांच्या पूर्वीं ‘ षष् ’ चें ‘ षड् ’ असें रूप होतें आणि कठोर व्यंजनांपूर्वीं ‘षट्’असें रूप होतें,आणि अनुनासिकापूर्वीं ‘षण्’ असें रूप होतें.※**षट्क न०**सहा पदार्थांचा समुच्चय.

षडाष्टक न० वैर; शत्रुत्व. मागें ‘ खडाष्टक ’ पहा. **षडक्षर न०** ‘ कांहीं येत नाहीं ’ ह्या सहा अक्षरांच्या रूपाची विद्या म्ह० अज्ञान. त्याला षडक्षर येतें किं० तो षडक्षरी विद्वान आहे ह्म० तो अगदीं अशिक्षित किं० निरक्षर आहे. **षड्ऋतु पु०** वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमन्त, आणि शिशिर, हे सहा ऋतु. मागें ‘ ऋतु ’ मध्यें यांचे अवधि पहा. **षडंग न० ए० व०** १ दोन हात, दोन पाय, डोकें, आणि कंबर, हीं सहा अंगें किं० गात्रें समुच्चयानें (मंत्रन्यासांत). २ सहा वेदांगें,— शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष, आणि निरुक्त, हीं प्रत्येक किं० समुच्चयानें. **षट्पद, षडंघ्रि पु०** भुंगा. **षडभिज्ञ पु०** गौतमबुद्ध. **षडानन, षण्मुख पु०** कार्तिकेय; कार्तिकस्वामी. **षट्कर्ण पु०** सहा कान. **वि०** तिसऱ्यास कळलेलें; जाहीर झालेलें. **षट्कर्णी वि०** सहा कानांत शिरलेलें ह्म० अनेकांस कळलेलें; जगजाहीर. **षट्कर्णी क्रि० वि०** सहा कानांत म्ह० सर्व लोकांत. **टीप,**–एकाद्या गोष्टीचा विचार दोन माणसांनींच केल्यास तो गुप्त राहातो. तिसरा मनुष्य घेतला तर तो सर्व लोकांत प्रकट होतो. दोन कान म्ह० एक मनुष्य; चार कान म्ह० दोन मनुष्यें; षट्कर्ण म्ह० तीन मनुष्यें. **षटकर्णी करणें आणि घोटाळ्यांत पडणें** दोनच माणसांनीं कांहीं मसलत केली तर ती गुप्त राहाते. तीन माणसांनीं केलेली मसलत फुटते आणि काम बिनसतें. **षट्कर्मा** [**सं०** षट्कर्मन्] **पु०** ब्राह्मण. **षट्कर्में न० अ० व०** ब्राह्मणाचीं अध्ययन दान, याजन, अध्यापन, प्रतिग्रह, आणि यजन हीं सहा कर्में. **षट्कोण न०** १ वज्र. २ हिरा. ३ (**भूमिति**) सहा कोनांची आकृति. ह्या अर्थी ‘ षडस्र ’ सुद्धां.

षड्गुण पु० अ० व० राजव्यवहारांतील सहा गुण,— संधि, विग्रह, यान, आसन, संश्रय, आणि द्वैध. मागें ‘ गुण ’ अर्थ १६ पहा. **षट्चरण पु०** भुंगा; भ्रमर. **षड्ज पु० (संगीत)** सात स्वरांपैकीं एक; ते सात स्वर हे:-सा, री, ग, म, प, ध, नी. **षड्दर्शन न०** सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, आणि वेदान्त. ह्यांना सहा शास्त्रें म्हणतात आणि हीं सहा जाणणाऱ्याला ‘ षट् शास्त्री ’ म्हणतात. **षड्गुणैश्वर्यसंपन्न वि०** ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान, आणि वैराग्य, ह्या सहा गुणांनीं संपन्न (ईश्वर, साधु, किं० राजा). **षड्रस पु०** मधुर, आंबट, खारट, तिखट, तुरट, आणि कडू, हे खाद्यपेयांचे सहा रस.**षट्प्रज्ञ पु०**चार पुरुषार्थ, व्यवहार, आणि तत्त्वज्ञान, हीं सहा जाणणारा. **षग्रही स्त्री०** सहा ग्रह एका राशींत येणें. **षण्मासिक वि०** सहा महिन्यांनीं व्हावयाचा किं० करावयाचा. **षड्वर्ग पु०** सहा पदार्थांचा समुदाय. **षड्वर्ग, षडरि पु०** काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, हे मनुष्याच्या अंतःकरणांतील सहा शत्रु.

षंड, षंडक[**सं०**]**पु०** २ बैल. २पोळ.३नपुंसक. **पु०,न०** समूह; समुदाय; उ० तरुषंड म्ह० राई.

षंढ[**सं०**]**पु०**नपुंसक.**षंढतिळ पु०**पोचट तीळ.

षष्टि [**सं०**] **वि०** साठ; तीसाच्या दुपटी इतकें.※**षष्टिक पु०**साठ दिवसांनीं पिकणारें भात.

षष्ठ [**सं०**] **वि०** सहावा. ※ **षष्ठांश पु०** उत्पन्नांपैकीं राजाला द्यावयाचा सहावा भाग. **षष्ठी स्त्री०** १ सहावी तिथि. २ (**व्याकरण**) **स्त्री०** १ चा, ची, चें, इ०प्रत्यय लागून होणारी विभक्ति. २ देवताविशेष; सटवी. बाळंतिणीच्या प्रसूतिनंतर सहाव्या दिवशीं हिची पूजा करतात. ह्या पूजेला ‘ षष्ठीपूजन ’ **नें०**म्हणतात.

षाद, षादमान, षादमानी मागें ‘ शाद, ’ ‘ शादमान, ’ ‘ शादमानी ’ पहा.

षोक, षोकी मागें ‘ शौक, ’ ‘ शौकी ’ पहा.

षोडश [**सं०**] **वि०** सोळावा.

षोडश [**सं०** षोडशन्=सोळा] **वि०** सोळा. ※ **षोडशोपचार पु०** पूजेंतील आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा, आणि मंत्रपुष्प, हीं सोळा अंगें. **षोडश संस्कार पु०** पुढें ‘ सोळा ’ मध्यें ‘ सोळा संस्कार ’ पहा.

स

स मराठी व्यंजनमालेंतील बत्तीसावें व्यंजन.

स [**सं॰** सह, सम्, सम, तुल्य, एक, ह्या संस्कृत शब्दांच्या अर्थी समासारंभीं] **उपसर्ग** युक्त, सहित; उ॰ सपुत्र म्ह॰ पुत्रासह; सभार्य म्ह॰ भार्येसहित; सकुटुंब म्ह॰ कुटुंबासहवर्तमान; सतृष्ण म्ह॰ तहानेनें युक्त म्ह॰ तान्हेला; सतीर्थ म्ह॰ त्याच गुरूचा शिष्य; सोदर म्ह॰ त्याच उदरांतून जन्मलेला म्ह॰ भाऊ.असे 'स' लागून झालेले सर्व शब्द मराठींत विशेषणें असतात. [लुच्चा.

स [**म॰** ' सोदा ' चें आद्याक्षर] **पु॰** सोदा;

सइलावणें, सईल इ॰ पुढें ' सैलावणें, ' ' सैल, ' इ॰ पहा.

सई, सही [**अ॰** सहीह्=निर्दोष्] **उ॰वा॰ अ॰** १ होय, ठीक, कबूल, मान्य; उ॰ सई म्हणणें (किं॰ करणें) म्ह॰ कबूल करणें किं॰ मान्य करणें; संमति दर्शविणें; उ॰ हा करार मी सई करतो. **वि॰**१ जिंकलेला;कबज्यांत घेतलेला; पदरांत पाडून घेतलेला; गांठलेला; उ॰ तानाजीनें सिंहगड सई केला; उ॰ आपण संध्याकाळपर्यंत चिंचवड सई करूं. २ शेवटास नेलेलें. **वि॰** १ संमति दर्शविणारें कागदावर केलेलें काहीं चिन्ह,–नांव, तुळशीपत्र, नांगर, शिक्का, इ॰ रूप. ३ प्रयत्न; खटपट; उ॰ माझ्या कार्याविषयीं तुम्ही मध्यस्थापाशीं सही करावी. ४ बरकत; पुरवठा; वाढ; शिल्लक; उ॰ प्रत्येक ब्राह्मणास पावली पावली दक्षिणा देऊन सुद्धां तीन रुपयांची सई आली. ॐ **तूं त्याच्या घरीं जा तर सई कीं मी तुला कुटून काढीन** म्ह॰ गेलास तर मी तुला शिक्षा करीन. **अगोदर जा तर सही, मग बक्षीसाबद्दल बोल** आधीं जा तर खरा मग इ॰. **औषध घे तर सई मग गुणाविषयीं बोल** प्रथम औषध घे मग इ॰. **सईसाक्ष स्त्री॰ ए॰ व॰** रोखा, दस्तऐवज, करारपत्र, इ॰ कायदेशीर रीत्या पूर्ण व्हावयाला सह्या, साक्षी, इ॰ ज्या कांहीं जरूर गोष्टी त्यांचा समुच्चय; उ॰ ह्या कागदावर सईसाक्ष घालून घेतल्याशिवाय परत येऊं नको. **सईसुद** [**म॰** सई+शुद्ध] **वि॰** सही, साक्ष, इ॰ च्या योगानें कायदेशीर किं॰ बंधनकारक असा (करार, खत, इ॰).

सई, सय [**सं॰** स्मृति] **स्त्री॰** १ स्मृति; स्मरणें; आठवण; उ॰ मला सई कर; उ॰ त्याला सय झाली तर तो तें काम करील. २ प्रेमानें मुलाच्या डोक्यानें आपल्या डोक्यावर प्रहार करून घेणें (देणें). ॐ **सईसुमार, सयसुमार पु॰ ए॰ व॰** १ अंदाज; अटकळ. २ तारतम्य; विचार; विवेकबुद्धि; उ॰ रागाच्या भरांत तो भलतेंच बोलून जातो, त्याला सईसुमार राहात नाहीं.

सई [**सं॰** सखी] **स्त्री॰** सखी; मैत्रीण.

सईम वि॰ अखंड; सलग; मध्यें खंड नसलेलें; उ॰ येथून वडगांवपर्यंत पाटलाची सईम पांच शेतें आहेत.

सईल पुढें ' सैल ' पहा.

सउमार वि॰ पुढें ' सुकुमार ' पहा.

सऊळ, सौळ वि॰ किंचित् मचूळ (पाणी, इ॰).

सक [**सं॰** षष्=सहा] **पु॰, न॰** सहा (फाशांवरच्या चिन्हांसंबंधानें बोलतांना); उ॰ सकरेजा. **क्रि॰ वि॰** सहा पटीनें; उ॰ तीन सक आठरा;आठ सक आठ्ठे चाळीस.

संकट [**सं॰**] **न॰** १ दुःख; आपत्ति; अडचण. २अनिष्ट गोष्ट;अप्रिय गोष्ट. **वि॰**१अरुंद; संकुचित. २ दुर्गम. ३ गर्दी असलेला; पूर्णपणें व्यापिलेला. ॐ**संकटासमोर उभें राहाणें** येईल त्या संकटाला तोंड द्यावयाला छातीठोकपणें सिद्ध असणें. **संकटा स्त्री॰** १ योगिनी. २ दुर्दैव आणणारी देवता (येणें, गुदरणें, पडणें); उ॰ यंदा आम्हावर संकटा आली आहे.

सकट वि॰ १ सहित; उ॰ पोशाखासकट ह्या पाटावर जेवावयास बसा; उ॰ पुढान्यासकट ती टोळी पकडण्यांत आली. २ निवड किं॰ तारतम्य न करतां घेतलेला; दरोबस्त; उ॰ सकट घोडे बारा टक्के. ॐ **सकटाई स्त्री॰** सारखेपणा; भेद

अभेद न करणें. **सकटनिकट, सकटाखालीं, सकटांत, सकटामध्यें, सरसकट** **क्रि० वि०** चांगला वाईट असा भेद न करतां; निवड न करतां; एकंदरींत; उ० सकटांत पैशाला दहा केळ्या देईन, निवड करून घेणार असाल तर पैशाला पांच देईन. **सकट संक्रांत** **स्त्री०** गुन्हेगार, बेगुन्हेगार, इ० भेद न करतां सर्वांस सारखी केलेली शिक्षा (बसणें, बसविणें).

सकटमळ, सगळमळ **स्त्री०** कणसांसकट धान्याचीं ताटें तुडवून धान्य काढणें. नुसतीं कणसें तुडवून धान्य काढणें हा दुसरा प्रकार.

संकटा मागें ' संकट ' मध्यें पहा.

संकटीचतुर्थी, संकष्टी चतुर्थी, संकटी चौथ, संकष्टी चतुर्थी [**सं०** सकष्ट म्ह० देहाला कष्ट देऊन केलेले] **स्त्री०** प्रत्येक महिन्याच्या कृष्णपक्षांतील चतुर्थी ही तिथि (व्रताविषयीं बोलतांना). **विनायकी चतुर्थी** **स्त्री०** शुक्ल पक्षांतील चतुर्थी (व्रताविषयीं बोलतांना).

सकडा [**म०** सहा; **सं०** षट्क] **पु०** सहा फळांचा समुदाय.

सकण [**सं०** स+कण) **वि०** १ दाण्यांनीं ठासून भरलेलें (कणीस). २ कणसें ज्यांना आलीं आहेत अशीं (जोंधळा इ० चीं ताटें).

सकणें मागें ' शकणें ' पहा.

संकथन **न०**, **संकथा** **स्त्री०** [**सं०**] संभाषण.

संकर [**सं०**] **पु०** १ संयोग. २ मिश्रण; मिसळ; भेसळ. ३ जातींचें मिश्रण,–ब्राह्मण आणि अब्राह्मण इ०चीं लग्नें इ०रूप. ४(**साहित्य**) दोन किं० अधिक अलंकार एकाच पद्यांत असले तर संकर नामक अलंकार होतो. ह्याचे (१) अंगांगिभावसंकर किं० मुख्यगौणभावसंकर; (२) संदेहसंकर; आणि (३) एकप्रतिपाद्य संकर किं० एक वाचकानुप्रवेशरूप संकर असे तीन प्रकार मम्मटानें सांगितलें आहेत. विशेष खुलासा आणि उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

सकरकिडा [**म०** साखर + किडा] **पु०** साखरच खाऊन राहाणारा किडा. ' साखर किडा ' असेंही ह्या किड्याला म्हणतात.

संकरा, शंकरा **पु०** (**संगितांत**) एक राग.

सकराई, सकाराई [**हिं०**] **स्त्री०** हुंडी सत्कारण्याबद्दल पेढीवाला किं० सावकार यांस द्यावें लागतें तें देय.

सकरुण [**सं०**] **वि०** दयाळू; प्रेमी.

सकरेजा **पु०** दुफाशी खेळांत फाशांवर पडलेलें एक दान. मागें 'रेजा' पहा.

सकर्मक [**सं०**] **वि०** क्रियापदानें दर्शविलेली क्रिया करतो तो ' कर्ता. ' कर्त्याहून अन्य पदार्थावर ती क्रिया घडत असल्यास तो अन्य पदार्थ ' कर्म. ' ज्या क्रियापदाला असें कर्म असतें तें ' सकर्मक क्रियापद. ' रामा भगवद्गीता वाचतो ह्या वाक्यांत ' भगवद्गीता ' हें कर्म.

संकर्षण [**सं०**] **न०** १ एकीकरण. २ नांगरणें ही क्रिया. **पु०** १ बलराम २ शेष हा नाग. ३ जगाचा क्षय करणारा,–परमेश्वर.

सकल [**सं०**] **वि०** सर्व; संपूर्ण; दरोबस्त.

संकलन **न०**, **संकलना** **स्त्री०** [**सं०**] १ ढीग करणें; जमविणें; एकत्र जुळविणें. २ संचय. ३ संयोग; मिश्रण. ४ (**गणित**) बेरीज.

सकलात (–द), सखलात (–द) [**तुर्की** सखलात] **स्त्री०** एक प्रकारचें लोकरीचें उंची वस्त्र.

संकलित [**सं०**] **वि०** १ एकत्र केलेलें; मिश्रित; जुळविलेलें. २ थोडक्यांत सांगितलेलें; संक्षिप्त. ३ ज्यांची बेरीज केली आहे अशा (रकमा, संख्या, परिमाण).

संकल्प [**सं०**] **पु०** १ इच्छा. २ हेतु; उद्देश. ३ मनाचा व्यापार; विचार; कल्पना. ४ निश्चित ज्ञान; निश्चयात्मक ज्ञान. ५ अंतःकरण. ६ निश्चय. ७ बेत. ८ कांहीं धर्मकृत्य करावयाचें असतां उपाध्याय यजमानाला सांगतो ते मंत्र, तंत्र, इ० रूप कर्म. ॐ **संकल्पबद्ध** **वि०** कांहीं धार्मिक कृत्य करावयाचा निश्चय केल्याकारणानें त्या कृत्याच्या समाप्तीपर्यंत अडकलेला(मनुष्य).

संकल्पिणें [**सं०**] **स०** **क्रि०** १ योजणें; कांहीं करावयाचें म्हणून मनानें ठरविणें किं०बेत करणें. २ (**मराठींत**) (कांहीं काम किं० जबाबदारी) कोणेंकावर सोपविणें. ३(**मराठींत**) (माणूस.पशु,पदार्थ, इ०)कोणेकाचे हवालीं करणें.

संकल्पित [**सं०**] **वि०** इच्छिलेलें; योजलेलें; करावयाचें म्हणून ठरविलेलें.

सकल्या फणस पु० जो कापाही नव्हे आणि बरकाही नव्हे अशा जातीचा फणस. मागें ' कापा, ' ' बरका ' पहा.

सकवार [**म०** सकुमार] **पु०** मधुर वास ज्याला येतो असा एक प्रकारचा तांदूळ. **वि०** नाजूक; मनोहर; सुंदर.

संक्रष्ट [**सं०** संकट] **पु०, न०** अडचण; पेच. (अशिक्षितांत रूढ). मागें ' संकट ' पहा.

सकष्ट, सकष्टित [**सं०** स (सहित) + कष्ट] **वि०** १ कठिण, जिकीरीचें, पंचाइतीचें (काम). २ उद्योगी, मेहेनती (माणूस). ३ पंचाइतीची, अडचणीची (स्थिति). ॐ **संकष्टी चतुर्थी, संकष्टी स्त्री०** प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षांतील चतुर्थी ही तिथि (व्रताविषयीं बोलतांना). **विनायकी चतुर्थी स्त्री० शुक्ल** पक्षांतील चतुर्थी (व्रताविषयीं बोलतांना). ' संकष्ट ' हें ' सकष्ट ' चें अपभ्रष्ट रूप होय.

सकस [**सं०** स (सहित) + **म०** कस (वीर्य)] **वि०** मजबूत, कसदार, समर्थ, वीर्ययुक्त, सत्त्व असलेलें (धान्य, दूध, तूप, गहूं, शरीर, लाकूड, इ०). पोकळ, फोल, निःसत्त्व, पिसपिशीत, इ० च्या उलट.

सकळ, सकळीक मागें ' सकल ' पहा.

सकळ [**म०** ' सुकाळीं ' चा अपभ्रंश] **क्रि० वि०** १ सकाळीं. २ योग्य वेळीं; अगोदर. **सकळवेळीं क्रि० वि०**योग्य वेळीं;उ० तूं नोकरी सोडणार असलास तर मला सकळवेळीं सांग म्हणजे मी दुसरा नोकर पाहून ठेवीन.

सकळीक [**सं०** सकल] **वि०** सर्व.

संकळीत मागें ' संकलित ' पहा.

सकाम [**सं०**] **वि०** १ इच्छायुक्त; धन, पुत्र, वैभव, इ० ची ज्याला इच्छा आहे असा (मनुष्य). २ धन, पुत्र, वैभव, इ० च्या इच्छेनें प्रेरित होऊन केलेलें (व्रत, धर्मकृत्य). ३ कामविकारानें प्रेरित. ४ ज्याला प्रबळ कामविकार आहे असा (पुरुष किं० स्त्री).

सकार [**सं०** स्वीकार किं० सत्कार] **पु०** हुंडी पथकरणें किं० पथकरल्याची निशाणी.

सकार [**म०** 'स' हें अक्षर] **पु०** सोदा('स' ह्या अक्षरानें ' सोदा ' सुरू होतो यावरून). ॐ **सकारविल्हा पु०** सोद्यांचा वर्ग; उ० हा मनुष्य सकारविल्ह्यांतील आहे(म्ह०सोदा आहे).

सकारणें [**म०** सकार] **स० क्रि०** (हुंडी) पथकरणें किं० मान्य करणें

सकाराई मागें ' सकराई ' पहा.

संकासुर मागें ' शंकासुर ' पहा.

सकाळ [**म०** सुकाळ] **स्त्री०** सूर्योदयापासून एक प्रहर हा काळ;प्रातःकाळ. ॐ **सकाळवणीं, सकाळवाणीं क्रि० वि०** योग्य वेळीं; उशीर न करतां (अशिक्षितांत रूढ). **सकाळ, सकाळां, सकाळीं क्रि० वि०** प्रातःकाळीं; सूर्योदयानंतर प्रहराच्या आंत.

सकिरा, सकेरा [**सं०** शर्करा=लहान खडा] **पु०**१पक्षी इ० मारण्यासाठीं बंदुकींत घालतात जे दगडाचे खडे ते प्रत्येक किं० घालतात ज्या धातूच्या गोळ्या त्या प्रत्येक. २ बारीक गोळी किं० गोटी.

संकीर्ण [**सं०**] **वि०** १ मिश्रित; सळमिसळीचा. २ विसकटलेलें; इकडे तिकडे पसरलेलें. ३ जेथें माणसें, पशु, पदार्थ, यांची खेचाखेच झाली आहे असें (स्थान). ४ ज्यांत नानाविध पदार्थ एकत्र केले आहेत असें.५ अस्पष्ट (शब्द, देखावा). ६ वर्णसंकर ज्यांत झाला आहे असें म्ह० जातीचें किं०रंगाचें मिश्रण झालें आहे असें(चित्र, संतति, इ०). ७ व्याप्त. ८ आकुंचित केलेला. ९ नाशाच्या पंथास लागलेला; आसन्नमरण (दिवा, माणूस, अग्नि).

संकीर्तन न०, संकीर्तना स्त्री० [**सं०**] १ स्तुति; गौरव. २ ईश्वरनामाचें उच्चारण. ३ कोणा समर्थाची त्याच्या बगलबच्चानें केलेली स्तुति.

संकीर्तित [**सं०**] **वि०** स्तविलेला; प्रशंसिलेला.

संकुचित [**सं०**] **वि०** १ आकुंचित; अघळपघळ किं० प्रशस्त नव्हे अशी (जागा). २ आखूड, लांडा, किं० तोकडा असलेला किं० झालेला. ३ संक्षिप्त; सारांशरूपांत असलेला किं० केलेला. ४ मिटलेलें (फूल इ०). ५ लाजलेला; ओशाळलेला; दबकलेला. ६ शंकित; कचरणारा.

सकुटण (–न) **न०** पदार्थाचे सुरी इ० नीं तुकडे पाडावयाचे वेळीं त्या पदार्थाखालीं ठेविलेला ठोकळा, दगड, इ०.

सकुडी [**म०** स (सहित)+कुडी (देह)] **क्रि० वि०** देहासहवर्तमान (स्वर्गास जाणें); उ० तुकाराम महाराज विमानांत बसून सकुडी स्वर्गास गेले.

सकुमार, सुकुमार वि० नाजूक; कोमळ; मऊ (मूल, शरीर, गात्र, इ०). ॐ **सकुमाराची राशि स्त्री०** अत्यन्त नाजूक मूल, स्त्री, माणूस, इ०.

संकुल [**सं०**] **वि०** १ गोंधळलेला. २ पूर्णपणें व्याप्त. ३ मिसळीचें; मिसळलेलें; मिश्रित. ४ ठासून भरलेलें किं० व्यापिलेलें. ५ जेथें फार गर्दी किं० खेचाखेच झाली आहे असें (स्थळ). **न०** १ गर्दी; जमाव. २ हातघाईचें युद्ध. ३ असंबद्ध किं० विसंगत वाक्य; उ० मी मुका आहें;उ० मी वंध्येचा पुत्र आहें.

सकुल्य [**सं०**] **वि०** १ एकाच कुळांतील. २ लांबचा नातलग,–सात पिढ्यांच्या पलीकडचा.

सकृत् [**सं०**] **क्रि० वि०** १ एकदा; एक वेळां. २ एके काळीं; पूर्वी. ॐ **सकृद्ग्राही वि०** एकच वेळां पाहून किं० ऐकून ज्याला समजतें, पाठ होतें, किं० लक्ष्यांत राहातें असा. **सकृद्दर्शनीं क्रि० वि०** १ वरवर पाहिल्यास; बाह्य देखाव्यावरून; विषयांत खोल न शिरतां. २ पाहिल्याबरोबर; पाहातांक्षणीं; केवळ बाह्य देखाव्यावरून. ३ अगदीं आरंभींच; अगदीं सुरवातीसच.

संकेत [**सं०**] **पु०** १ खूण; सूचना; इशारा. २ करार; ठराव; बोली. ३ अट; शर्त. ४ प्रियकराच्या भेटीसाठीं ठरविलेला समय किं० ठरविलेली जागा. ५ (**न्याय**) ठराव; नियम. ६ अमुक खूण केली किं०अमुक पदार्थ दाखविला किं० अमुक शब्द उच्चारला म्हणजे अमुक मजकूर समजावा असा दोन माणसांनीं परस्परांत केलेला ठराव. ७ शब्दाची अर्थबोधक शक्ति. ॐ **संकेतार्थ पु०** अमुक केलें किं० झालें तर अमुक होईल असा क्रियापदाच्या विशिष्ट रूपावरून दाखविला जातो तो अर्थ; उ० पाऊस पडता तर जमीन भिजती. **संकेती वि०** ठरावाप्रमाणें वागणारा किं० चालणारा.

संकेतित [**सं०**] **वि०** दोन माणसांनीं ठराव करून नेमलेलें (स्थळ, काळ, इ०).

सकेरा पु० मागें ' साकिरा ' पहा.

सकेशा [**सं०**] **स्त्री०** जिचें वपन झालें नाहीं किं० करण्यांत आलें नाहीं अशी विधवा.

संकेश्वर मागें ' शंकासुर ' पहा.

संकोच [**सं०**] **पु०** १ आकुंचन; आखूड होणें. २ संक्षेप. ३ अटकाव; रोध; कोंडणें. ४ फुलाचें किं० पानाचें मिटणें. ५ भीड; भिडस्तपणा; लाजाळूपणा; भीति; दबकणें. ६ शालीनता. ७ जागेचा आकुंचितपणा. ८मनांत विचार दाबून ठेवणें किं० दाबून ठेवण्याची प्रवृत्ति. ॐ **संकोची वि०** संकोच बाळगणारा; भिडस्त; लाजाळू.

संकोचणें [**म०** संकोच] **अ० क्रि०** १ कचरणें; दबकणें; भिणें. २ आखूड होणें; आटणें. ३ लज्जित होणें.

संकोचन [**सं०**] **न०** १ आखूड होणें. २ दबकणें; कचर; भीति.

संकोचित [**सं०**] **वि०** वर ' संकुचित ' [पहा.

संकोटण (–न) **न०** वर ' सकुटण (–न) ' पहा.

सक्करनातें [**म०** साकर, साखर+नातें] **न०** १ प्रेमाचें बंधन; साखरेसारखें गोड नातें; गोडीचा संबंध. २ बायकोच्या माहेरच्या कोणा माणसाशीं असलेला प्रेमाचा संबंध किं० घरोबा (निंदेंत).

सक्कस [**अ०** सख्त्] **वि०** मजबूत, टणक (गात्र, लाकूड, इ०).

सक्त [**सं०**] **वि०** १ चिकटलेला; संलग्न. २ घट्ट; स्थिर. ३ आसक्त; अनुरक्त. ॐ **सक्ति स्त्री०** १ स्पर्श. २ संयोग; संलग्नता. ३ प्रेम; प्रीति; आसक्ति; अनुराग.

सक्त, सख्त [**अ०** सख्त्] **वि०** १ कठिण; टणक; मजबूत. २ कठोर; कर्कश; निर्दयपणाचा; जुलमी. ३ निक्षून म्ह० स्पष्ट किं० असंदिग्ध शब्दांनीं दिलेली (ताकीद)किं० घालून दिलेली (कामाची सरणी). ४ ठराविक काम ठराविक अवधींत झालें पाहिजे अशी ताकीद देऊन कोणेकाकडून

करवून घ्यावयाची(मजुरी,–कैद्यावर लादलेली). ॐ सक्तपाड्याळ पु०१ओझें वहावयाला ज्याची पाठ मजबूत आहे असा बैल किं०घोडा किं० मजूर. २ कामसू किं० कष्टाळू किं० मेहेनती बायको; उ० तुझ्या घरांत सक्तपाड्याळ बायको आहे म्हणून तुला वेळेवर भाकर मिळते. **सक्त भीड स्त्री०** कोणेकाला कांहीं कार्य करण्यासाठीं घातलेली आग्रहाची भीड किं० केलेला फार आग्रह (घालणें). **सक्त रदबदली स्त्री०** कोणेकाबद्दल कोणेकापाशीं केलेली मध्यस्थी (करणें). **सक्ती, सख्ती स्त्री०** १कोणेकावर कांहीं कामाबद्दल केलेला जोर किं० लाविलेला नेट किं० तगादा. २ कठोरपणा; शिरजोरपणा; जोर. **सक्त(किं०सख्त) मजुरीची शिक्षा स्त्री०** ज्या शिक्षेमध्यें कैद्याला ठराविक काम दिवसाच्या ठराविक वेळांत करावें लागतें अशी शिक्षा.

सक्तु [सं०] पु०, न० १ सातू. २ भाजलेल्या धान्याचें पीठ.

संक्रन्द [सं०] पु० १ युद्ध. २ कोलाहल; आरडाओरडा; कलकलाट.

संक्रन्दन [सं०] पु० इंद्र. न० १ आरडाओरडा; कल्कलाट. २ समरांगणावर केलेली कत्तल. ३ हाहाकार. ४ कोणेकाशीं निर्दयपणाची वागणूक.

संक्रम [सं०] पु० १ जाणें; गमन. २ प्रवास. ३ स्थलान्तर. ४ (ज्योतिष) संक्रान्ति. पु०, न० १ तात्पुरता पूल; साकव,–ओढ्यावर तक्ते, झाडांचे बुंधे, इ० घालून पावसाळ्यापुरता केलेला पूल. २ जाण्याचें साधन. २ जिना.

संक्रमण [सं०] न० १ कोणेकाबरोबर जाणें किं० चालणें. २ स्थलांतर. ३ प्रगति.४ (ज्योतिष) सूर्यादिकांचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें; संक्रान्ति; उ० मकरसंक्रमण (म्ह० सूर्याचें मकरराशींत शिरणें). ५ मार्ग. ६ पृथ्वीहून स्वर्गलोकीं जाणें म्ह० मरण; मृत्यु. ७ दायरूपानें बाप, नवरा, इ० पासून स्त्रीला मिळालेलें धन.

संक्रान्त [सं०] वि० १ एकांतून दुसऱ्यांत गेलेला. २ दुसऱ्याला दिलेलें. ३ प्रतिबिंबित. स्त्री० ' संक्रान्ति ' चा अपभ्रंश.खालीं 'संक्रान्ति' पहा.

संक्रान्ति [सं०] स्त्री० १ एका स्थितींतून किं० सरणींतून दुसऱ्या स्थितींत किं० सरणींत जाणें; बदल; पालट. २ सूर्यादीचें एका राशीतून दुसऱ्या राशींत जाणें. ३ (विशेषतः) सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें; उ० मकरसंक्रान्ति, कर्कसंक्रान्ति, इ०. ४ सूर्याचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जें गमन त्या गमनाची अधिदेवता. ही संक्रान्तिदेवता दरवर्षी ज्या कोणच्या वाहनावर बसून जात असेल त्या वाहनाचा नाश, ज्या कोणच्या दिशेस जात असेल त्या दिशेस नाश, ज्या कोणच्या पदार्थाकडे पाहात असेल त्या पदार्थाचा त्या वर्षी नाश फार होतो. यावरून 'कोणेकावर संक्रान्त बसणें' म्ह० त्याचा नाश होणें असा अर्थ होतो. ॐ **माझ्यावर तुझी कां संक्रान्त ?** तूं मला कां उपद्रव करतोस? **यंदा सावकार लोकांवर संक्रान्त बसली आहे** यंदा सावकार फार फार मरत किं० बुडत आहेत. **टीप,**–' संक्रान्ति' चा 'संक्रान्त' असा मराठींत अपभ्रंश झाला आहे.

सख [सं० षष्] मागें ' सक ' पहा.

सख [सं० सखि=मित्र] पु० (संस्कृत समासान्तीं) मित्र; उ० मरुत्सख=अग्नि; गोपसख=कृष्ण.

संखजिरें, संगजिरें न०, संगजिरा पु० [फा० संग्‌जिराहत] एक खनिज पदार्थ;हा मऊ आणि गुळगुळीत असतो.

सखत, सखती वर ' सक्त ' [अ०] आणि त्याच प्रतीकांत ' सक्ति ' पहा.

सखर निखर वि० उंचसखल;उखीर वाखीर; विषम (भूमीचा प्रदेश). [दान.

सखरेजा पु०दुफाशी खेळांत फाशावरचें एक

सखल वि० १ ठेंगणा; उंचीनें कमी. २ खोलगट, खोल गेलेला किं० असलेला (भूमीचा प्रदेश). न० खोलगट प्रदेश. ॐ **सखलवट वि०** १ किंचित् ठेंगणा. २ किंचित् खोल (खळगा, विहीर, इ०). न० खोलगट भूप्रदेश.

सखलात (–द) इ० वर ' सकलात (–द)' इ० पहा.

सखल्या फणस वर ' सकल्या फणस ' पहा.

सखा [सं० सखि=मित्र; प्र०चें ए०व०सखा]

पु० मित्र. टीप,–संस्कृत समासान्तीं ' सख ' असें रूप होतें; उ० गोपसख म्ह० गुराख्यांचा मित्र किं० सवंगडी. **सखी स्त्री**०१मैत्रीण. २ शिमग्यांत म्हणतात तीं बीभत्स गाणीं प्रत्येक.**सखित्व न**० दोस्ती;मैत्री.**सखासोयरा,सगासोयरा पु**० मित्र किं०नातलग. **सखीका लाल** पु०अत्यन्त उदार माणूस; मोठा दाता; दानशूर (बैरागी आणि गोसावी आशीर्वाद देतांना हा शब्द योजतात). **सख्खा वि**० प्रत्यक्ष किं० अत्यन्त जवळचा (भाऊ, बहीण,इ०); चुलत, माऊस,आते,मामे, इ० विशेषणांवांचून असलेला (भाऊ,बहीण, इ०).

सखोल [**म**० स+खोल] **वि**० १ गूढ, दुर्बोध (भाषण, ग्रंथ, विचार, अभिप्राय,इ०). २ सहसा हुरळून न जाणारा (मनुष्य); शांत, गंभीर (माणूस, प्रकृति).

सख्त, सख्ती वर ' सक्त, " सक्ति'**अ**०पहा.

सख्य [**सं**०] **न**० स्नेह; मैत्री; घरोबा. ॐ **समानशीलव्यसनेषु सख्यं** ज्यांचीं सुखें, दुःखें, चैनींचे प्रकार, स्वभाव, हीं अगदीं एकसारखीं आहेत अशा माणसांत मैत्रीचा किं० घरोब्याचा संबंध साहजिकपणेंच उत्पन्न होतो.

संख्य [**सं**०] **न**० युद्ध; लढाई; झटापट.

संख्या [**सं**०] **स्त्री**० १ मोजणें; गणणें (करणें).२मोजदाद; गणती. ३ (**गणित**) एक, दोन, तीन, इ० अंकांनीं दर्शविली जाणारी पदार्थांची मोजदाद. ४ परिमाण; इयत्ता. ॐ **संख्यावान् वि**० विद्वान्; पंडित. **संख्याविशेषण न**० संख्या दाखविणारें विशेषण; उ०पांच,दहा, तेरा, इ०. **असंख्य, संख्यातीत वि**० ज्याची गणती किं० मोजदाद करतां येत नाहीं असा.

संख्यात [**सं**०] **वि**० गणिलेलें; मोजलेलें.

संख्यान [**सं**०] **न**० १ मोजणें; परिगणन. २ पदार्थांची किंमत ठरविणें.३ परीक्षा; ज्ञान. ४ प्रादुर्भाव.

संख्येय [**सं**०] **वि**० मोजतां येईल असें; मोजण्याजोगें; हिशेबांत घेतलें पाहिजे असें; जें विचारांत घेतलें पाहिजे असें.

संग [**सं**०] **पु**०१एकत्र येणें;जुळणें.२संयोग; संबंध. ३ मैत्री; सख्य; दळणवळण. ४ आसक्ति. ५ विनयासक्ति. ६ मैथुनार्थ स्त्रीपुरुषांची जुळणी.

संगजिरें न०, **संगजिरा पु**० एक अतिगुळगुळीत आणि पिठूळ खनिज पदार्थ.

सगट, सगटनिगट, सगटाई मागें 'सकट,' ' सकटनिकट, '' सकटाई ' पहा.

सगडी मागें ' शेगडी ' पहा.

संगत [**सं**० संगति] **वि**० १ समोर आलेला. २ भेटलेला. ३ एकत्र जमलेलें किं० जुळलेलें. ४ मिसळलेलें. ५ योग्य; अनुरूप; उचित. ६ परस्परांशीं जुळणारें; क्रमाला किं० शिस्तीला धरून असलेलें. ७ युक्तीला धरून असलेलें. ८ मैथुनार्थ संलग्न किं० जुळलेला.

संगत, संगति [**सं**० संगति] **स्त्री**० १ संयोग. २ भेट; सहवास; साहचर्य; दोस्ती. ३ मैथुन. ४ योग्यपणा; अनुरूपता. ५ पूर्वापर संबंध; अविरोध. ॐ **संगतवार वि**० क्रमाला धरून असलेला; पूर्वापर संबंध अनुसरणारा. **संगतगुण पु**० कोणेकाच्या सहवासामुळें अंगीं येणारा (चांगला किं० वाईट) गुण. **संगतसोबत स्त्री**० **ए**० **व**० सहवास; बरोबर असणारीं किं० येणारीं माणसें समुच्चयानें. **संगतीं, संगतें श**० **यो**० **अ**० बरोबर; सह; संगतीनें; उ० मी कोणासंगतीं रानांत जाऊं ?

संगती [**सं**० संगत] **पु**० मित्र; दोस्त.

संगनमत [**सं**० संगत (जुळलेलें)+मत] **न**० दोन किं० अधिक माणसांनीं अगोदर ठरवून ठेविलेला अमुक प्रसंगीं अमुक करावयाचें किं० बोलावयाचें ह्या संबंधाचा बेत. अशा बेतांत सामील जे कोणी ते ' संगनमती. '

संगम [**सं**०] **पु**० १ संयोग; भेट. २ संगति. ३ दोन किं० अधिक जलप्रवाहांचा किं० रस्त्यांचा संयोग. ४ मैथुन.

संगमरवर [**फा**० संग्मर्मर्] **पु**० एक प्रकारचा दगड. ॐ **संगमरवरी वि**० ह्या दगडाचा केलेला किं० घडविलेला (पुतळा, खांब,इ०).

संगर [**सं**०] **पु**० १ युद्ध.२करार; ठराव. ३ केलेली प्रतिज्ञा; दिलेलें वचन.

संगर न० १ धोतर, पातळ, इ० च्या कांठास पुढील रेशमाच्या आणि तव्याच्या मध्यें वेगळ्या रंगाचा जो बारीक पट्टा असतो तो.२डोंगरावरची नागमोडी अरुंद पायवाट.

सगरकूप [**सं**० सगर+कूप] **पु**० श्रीक्षेत्र काशी येथील एक विहीर.

संगरणी (अडाण्यांत रूढ) पुढें'संग्रहणी'पहा.

सगर्भ [**सं०**] **वि०** १ गर्भयुक्त; गरोदर. २ हेतु दाखविण्यासाठीं योजलेलें (विशेषण). ३ गूढार्थ ज्यांत आहे असें (भाषण, वाक्य, इ०).

सगलंकृत, सगळंकृत[म० सगळें+गिळंकृत] **वि०** पूर्णपणें अपहार करून गिळलेलें म्ह० लाटलेलें (लोकांचें द्रव्य इ०). मागें ' गिळंकृत ' पहा.

संगव [**सं०**] **पु०** दिवसाचे ७ ते १२ घटका काळ (दूध काढण्याची वेळ); दिवसाच्या पांच विभागांपैकीं दुसरा.

संगवई, संगवयी [**म०** संग+वय+ई (प्रत्यय)] **पु०** १ लहानपणापासूनचे जे सोबती ते परस्परांचे. २ कांहीं काम करण्यांत जो जोडीदार किं० मदतनीस तो. ३ शरीरसंरक्षक किं० मार्गदर्शक ह्या नात्यानें बरोबर असतो तो माणूस.

संगसंगा [**म०** संग+संग] **पु०** १ दुसरा माणूस अमुक करीत नाहीं म्हणून मी तें करणार नाहीं, दुसरा अमुक करतो तर मी तें करणार, असा हेका धरून बसणें हा प्रकार किं० ही वर्तनसरणी. २ हटवादीपणा. **क्रि० वि०** मिळून; साहचर्यानें; सोबतीनें; साथीनें.

सगळमळ [**म०** सगळा+मळणें] **स्त्री०** कणसांसकट ताटें तुडवून धान्याचे दाणे काढणें हा प्रकार.

सगळा [**सं०** सकल] **वि०** सर्व; बाकी न राहूं देतां; समग्र.ꕥ **सगळाला वि०** सबंधचा सबंध; न कापलेला; न तोडलेला; न तुटलेला.

सगा [**म०** सखा] **पु०** आप्त; नातेवाईक. ꕥ **सगासोयरा पु०** नात्याच्या संबंधानें जो आपणाशीं जुळलेला आहे तो. **सगाई स्त्री०** नात्याचा संबंध; नातें.

संगाती, संगती [**सं०** संगत] **पु०** दोस्त; जोडीदार; साथीदार.

संगातीं (–तें), **संगीं** [**सं०** संगत, संग] **श० यो० अ०** सहवर्तमान; बरोबर; सह.

सगी, सवागी, सुहागी स्त्री० एक खनिज पदार्थ,-डाग लावणें इ० कामीं योजण्यांत येतो तो.

संगी [**फा०** संग्=दगड] **वि०** दगडाचा. खालीं ' संगीन ' पहा.

संगी [**सं०** संगिन्] **वि०** कोणेकाच्या सहवासांत असणारा किं० असलेला; उ० साधुसंगी, सत्संगी. इ०.

संगीं [**म०** संग] **श० यो० अ०** मागें ' संगातीं ' पहा.

संगीत [**सं०**] **न०** १ गायनकला किं० गायनशास्त्र. २ चांगलें गायन. ३ वाद्य, नृत्य, आणि गीत. ४ वीणा, मृदंग, इ० वाद्यें, सूर देणारें, इ० साहित्य किं० साहित्यानें युक्त जें गायन तें.

सगीन [**म०** स+घन] **वि०** जड, अवाढव्य, उचलावयास किं० सरकावयास कठिण (ओझें, गठ्ठा, दगड, इ०). ह्या शब्दाची अडाण्यांत रूढि आहे.

संगीन [**फा०**] **स्त्री०** बंदुकीच्या अग्रभागीं बसवितात तें कट्यारीसारखें शस्त्र.

संगीन, संगी [**फा०** संग्=दगड; संगीन्=दगडी] **वि०** १ दगडांनीं बांधून पक्का केलेला (किल्ला, भिंत, तट, हौद, इ०) २ मजबूत, भक्कम, दृढ बांधणीचें (घर इ०). ३ पूर्ण विचार करून, साधक बाधक प्रमाणें हिशेबांत घेऊन सर्वांगांनीं परिपूर्ण असा (विचार, बेत, ठराव, मसलत, इ०). इ० ४ ज्याचे सर्व भाग, अवयव, सांधे, इ० यथास्थित आहेत असा (पदार्थ, यंत्र); कोणत्याही अंगानें किं० उपांगानें उणा किं० कमी नाहीं असा.

सगुण [**सं०**] **वि०** १ गुणांनी युक्त. २ चांगल्या गुणांनीं युक्त. ३ संसारासंबंधाचा; सांसारिक; प्रापंचिक. ४ सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणांनीं युक्त. ५ ज्याला दोरी लावून सज्ज केलें आहे असें (धनुष्य).

संगू [**म०** संग] **पु०** सोंगट्या इ० च्या खेळांत एका बाजूचे जे गडी किं० खेळाडू ते एकमेकांचे. ' उलट पक्षाचे गडी ' याच्या व्यावर्तकत्वें. ꕥ **संगू मंगू पु० अ० व०** खेळाडू.

संगृहीत [**सं०**] **वि०** १ स्वीकारलेलें. २ संक्षिप्त रूपांत घातलेलें. ३ रास करून ठेविलेलें; गोळा केलेलें. ४ एकत्रित; समाविष्ट.

संगें [**म०** ' संग ' च्या तृतीयेचें **ए० व०**] **श० यो० अ०** सह; बरोबर. ꕥ **संगें मंगें**

क्रि० वि० एकमेकांच्या संगतींत किं० सहवा-सांत किं० बरोबर; मिळून; उ० आम्ही दोघेजण हें काम संगेंसंगे एका घटकेंत करून टाकूं.

सगोत्र [सं०] **वि०** एकाच गोत्राचे जे ते परस्परांचे; त्याच गोत्राचा.

संगोपन [सं०] **न०** काळजीपूर्वक मूल, पशु, इ० चें केलेलें रक्षण. ' संगोपान, ' ' संगोपंगन ' हीं अशिक्षितांत रूढ रूपें आहेत. **संगोपित वि०** काळजीपूर्वक ज्याचें संरक्षण केलें आहे असें (मूल, पशु, इ०).

संग्रह [सं०] **पु०** १ पकडणें; काबीज करणें. २ स्वीकार; अंगीकार; ग्रहण करणें. ३ साठा; करून ठेविलेला संचय. ४ धान्य, तेल, तूप, इ० चा कांहीं काळाला पुरेसा करून ठेविलेला साठा किं० बेगमी. ५ यादी. ६ समावेश; अंतर्भाव. ७ सारांश; निष्कर्ष; तात्पर्य. ८ संक्षेप. ९ संक्षिप्त ग्रंथ. १० नियंत्रण; नियमन; निग्रह. ﷼ **संग्रहीं असणें**१ पदरीं असणें.२ जवळ असणें.

संग्रहण [सं०] **न०** १ धरणें; पकडणें; कैदेंत किं० नियंत्रणेंत घालणें किं० ठेवणें. २ मैथुन. ३ व्यभिचार.

संग्रहणी [सं०] **स्त्री०** कांहीं दिवस शौचास मुळींच न होणें, कांहीं दिवस एकसारखे रेच होणें, हगवण लागणें, ह्या रूपाचा जो रोग तो.

संग्रही [म० संग्रह+ई (प्रत्यय)] **वि०** १ हरएक वस्तूंचा किं० चमत्कारिक वस्तूंचा संग्रह करून ठेवावा अशा स्वभावाचा माणूस. २ लोभी; चिक्कू.

संग्राम [सं०] **पु०** १ लढाई; मारामारी; युद्ध. २ वादविवाद. ३ वैरभाव.

संग्राह [सं०] **पु०** १ जबरीनें धरणें किं० पकडणें. २ मूठ. ३ मुठींत धरणें. ४ ढालीची मूठ. ५ घोड्याचें दुपायी येणें.

संग्राहक [सं०] **वि०** वर ' संग्रही ' पहा.

संग्राही [सं० संग्राहिन्] **वि०** १ संग्रह करणारा; संग्रह करण्याच्या स्वभावाचा. २ मलाचा अवष्टंभ करणारें (औषध इ०).

संग्राह्य [सं०] **वि०** जवळ बाळगून ठेवण्यास योग्य (माणूस, पशु, पदार्थ).

संघ [सं०] **पु०** १ समुदाय; ढीग. २ प्राण्यांचा समूह किं० कळप किं० जूट. ३ निकट संबंध. ४ विशिष्ट उद्देशानें काढलेली किं० स्थापिलेली संस्था किं० मंडळी. ﷼ **संघशः क्रि० वि०** जमाव करून; जुटीनें; समूहाच्या रूपानें.

संघजीवी [सं० संघजीविन्] **पु०** मजूर.

संघट्टणें [सं० सम्+घट्ट्] **अ० क्रि०** १ जुळणें; एकत्रित होणें. २ मोती, हिरा, इ० जडणें; कोंदणांत बसणें. ३ भेटणें.

संघट्ट [सं०] **पु०** १ घासणें; घर्षण. २ टक्कर; आघात; प्रहार. ३ गांठ. ४ लढाई. ५ आलिंगन.

संघट्टन न०, संघट्टना स्त्री० [सं०] १ एकावर एक घासणें; घर्षण. २ आघात; तडाखा; टक्कर. ३ जडणें ही क्रिया; संयोग. ४ मल्लांची गांठ पडणें. ५ पतिपत्नीचें प्रेमालिंगन.

संघष्टण [सं० संघट्टन] **न०** घरोबा; दाट परिचय; दळणवळण.

सघन [म० स+घन] **वि०** दाट, खेचाखेचीनें भरलेलें (वृक्ष, पानें, फुलें, ढग, इ०).

संघर्ष पु०, संघर्षण न० [सं०] १ घासणें; घर्षण. २ चढाओढ; स्पर्धा. ३ बोलाचाली; भांडण.

संघात [सं०] **पु०** १ संयोग; जुळणी. २ संस्था. ३ गर्दी; दाटी; जमाव; टोळी.४ विध्वंस; नासाडी; कत्तल. ५ शरीरांतील कफ, शेंबूड, इ०. ६ नरकांतील एक भाग. [हणी ' पहा.

संघ्राणी स्त्री० (अशिक्षितांत रूढ) वर 'संग्र-

संच [सं० संचय] **पु०** १ पदार्थाच्या सिद्धतेस जरूर अशा ज्या गोष्टी त्यांची जुळणी. २ एकजातीय किं० एककार्योपयोगी पदार्थांचा जमाव; उ० तबला, सतार, सारंगी, इ० उपकरणें हीं गायन, नर्तन, इं० चा संच होत. ३ एकांत एक बसणारीं ताटें, पातेलीं, वाट्या, चमचे, इ० चा समुदाय.

सच [सं० सत्य] **पु०** कोणेकाकडे सोपविलेल्या कामाबद्दल त्याला द्यावयाचें जें द्रव्यादि देय त्याचा अगोदर कांहीं भाग देतात तो; विसार. ﷼ **सचकार** [सं० सत्यकार] **पु०** वकीलाला आपल्या कामांत गुंतविण्यासाठीं त्याला आगाऊ देतात तें देय.

सचकित [म० चकित] वि० आश्चर्याच्या भावनेनें आक्रान्त किं० दडपलेला.

संचणी स्त्री० शेत, मळा, बाग, इ० ची पाहाणी करून त्यांचेवर सरकार जो सान्याचा ठराव आकारतें तो.

सचणी स्त्री० आपल्या कुळांना किं० शेत-कन्यांना पुढील सालीं झटून मेहेनत करण्या-साठीं खोत देतात ती बक्षीशी. पोस्त ही पाव-साळ्याच्या तोंडीं खोत देतो ती बक्षीस.

संचणें[सं० सम्+चि] अ० क्रि० १ गोळा होणें; जमणें. २ राहणें. स० क्रि० १ जुळविणें. २ साठविणें.

सचंत्र [म० स्वतंत्र] वि० स्वच्छंदी, अनि-यंत्रित(अडाण्यांत रूढि).

संचय [सं०] पु० १ सांठा;संग्रह. २ समूह; समुदाय. ॐ **संचयी** वि० १ पदार्थांचा संग्रह करून ठेवण्याच्या स्वभावाचा. २ चिकू; कंजूष.

संचयन [सं०] न० १ साठविणें. २ प्रेत-दहनानंतर अस्थि गोळा करणें.

संचरणें [सं० सम्+चर] अ० क्रि० १ इतस्ततः भटकणें;हिंडणें; फिरणें.२ पदार्थांत(तेल, पाणी, विष, इ०) शिरून त्यांत पसरणें; भिनणें. ३ (एकादी कल्पना, विचार, मत, चाल, तऱ्हा, इ० समाज, देश. इ० मध्यें) फैलावणें. ४ (भूत, पिशाच,इ०)कोणेकाचरा अंगांत शिरणें.५(अग्नि, वायु, पाण्याचा लोट, इ०) जोरानें वाढून इत-स्ततः पसरणें.

संचरित [सं०] वि० प्रविष्ट; भिनलेला; शिरलेला; ग्रासलेला.

सचवटी [म० सचोटी; हिं०सचाहट]स्त्री० प्रामाणिकपणा; खरेपणा; पत.

संचळ [सं० सौवर्चल]न०पादेलोण नांवाचें मीठ; संचळखार.

संचार [सं०] पु० १ जाणें; हिंडणें; भट-कणें. २ मार्ग; वाट. ३ प्रवेश (भूत, पिशाच, विष, वात, तेल, इ० चा). ४ एकादें मत, टूम, चाल, इ० चा समाजांत फैलाव. ५ शिरकाव; कांहीं कामांत केलेली प्रगति. ६ वेदादि पठनांत चुकी होऊन भलतेंच जें म्हटलें जातें तें. ' कोणे-काचा संचार जाणें ' असा प्रयोग होतो.

संचारक [सं०] पु० १ वाटाड्या; मार्ग-दर्शक. २ पुढारी; अग्रणी; नेता. ३ उत्तेजक; कांहीं कामीं भर देणारा किं० चिथावणारा.

संचारणें [म० ' संचरणें ' चें प्रयोजक; सं० सम्+चर्] स० क्रि० १ आंत ढकलणें; खुपसणें. २ आंत भिनविणें किं० प्रविष्ट करणें. अ० क्रि० मागें ' संचरणें पहा.

संचारिका स्त्री० १ दूती. २ कुंटीण.

संचारित [सं०] वि० १ खुपसलेला; शिर-काविलेला. २ फैलाविलेला; पसरविलेला.

संचिणें [सं० सम्+चि]स०क्रि० १ साठ-विणें; जमविणें.२ गोळा करणें; ढीग करून ठेवणें. ३ शिल्कीस टाकणें.

संचित [सं०] वि० १ गोळा केलेलें; साठ-विलेलें. २ पूर्ण; व्याप्त. ३गोळा झालेलें; साचलेलें; साठलेलें. ४ निबीड. ५शिल्कीस टाकलेलें. न० १ पूर्वजन्मीं केलेलें जें पापपुण्य त्याचा साठा,–ज्याचें फळ ह्या जन्मीं भोगास येते.२ कोणेक जन्मीं केलेलें पापपुण्यात्मक कर्म.

सचिंत [सं०] वि०१ ज्याला चिंता लागली आहे असा; चिंताग्रस्त.२ कांहीं विचारांत निमग्न झालेला.

सचित्र [सं० स+चित्र] वि० चित्रांनीं सुंदर किं० शोभिवंत केलेलें (पुस्तक).

सचिव [सं०] पु० १ मित्र; दोस्त. २ मद-तनीस; साहाय्यकर्ता. ३ राजाचा मंत्री.४शिवा-जीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक.

संची स्त्री० पिशवी. मागें ' चंची ' पहा.

सचेतन [सं०] वि० चेतनायुक्त; जिवंत.

सचेल, सचैल [सं०]वि०ज्याच्या अंगावर वस्त्रें आहेत असा. ॐ **सचेलस्नान, सचैलस्नान** न० मोठ्या विटाळाबदल डोक्यावरून आणि वस्त्रानिशीं केलेलें स्नान; उ० अंगावर पाल पडली असतां सचैल स्नान करावें; उ० घामानें मला सचेल स्नान होत आहे; उ० त्या देशद्रोह्याचें नांव कानीं पडतांच मी सचैलस्नान करतों.

सचेष्ट [सं०] वि० १ ज्याला चलनवलन आहे असा; हालचाल करणारा. २ जिवंत.

सचोटी [हिं०] स्त्री० प्रामाणिकपणा. मागें ' सचवटी ' पहा.

सच्चा [सं० सत्य; हिं० सच्चा] **वि०** खरा; प्रामाणिक; न्याय्य.

सच्चिद्, सच्चिदानंद, सज्जन पुढें ' सत् ' मध्यें पहा.

सज, साज पु० मागें ' संच ' सर्व अर्थीं पहा.

सजगणी, सजगाणी स्त्री० १ दोन पैसे समुच्चयानें. २ सहा रुके किं० तीस विघे हें जमीनीचें क्षेत्रप्रमाण.

सजगुरा पु० बाजरी हें धान्य.

सजण, सजणा [सं० सज्जन किं० सुजन] **पु०** मित्र, नायक(लावणी ह्या काव्यांत उपयोग). **सजणी स्त्री०** प्रियकरीण (लावणींत रूढि)

सजणी [सं० सज्ज] **स्त्री०** १ सजणें ही क्रिया. २ सिद्ध करणें. ३ शृंगारणें. ४ मृदंगादि वाद्य वाजवावयाला सिद्ध करणें.

सजणें [सं० सज्ज=सिद्ध, तयार] **अ० क्रि०** १ जरूर ती साधनसामग्री, हत्यारें, उपकरणें, कपडे, भूषणें, इ० च्या योगानें कांहीं कार्यार्थ तयार किं० सिद्ध होणें. २ कांहीं दस्तऐवज, अर्ज, विनंती, इ०चा कागद सर्व बाबी यथास्थानीं समाविष्ट केल्या जाऊन पूर्ण स्थितीस किं० दशेस येणें. ३ कांहीं पोशाख, रंग, वर्तन, भाषण, इ० कोणेकास अनुरूप किं० योग्य असणें किं० दिसणें; शोभणें; उ० काळें पागोटें तुम्हाला सजत नाहीं; उ० असला पोरकटपणा तुला सजत नाहीं. **स० क्रि०** १ साधनसामग्री, हत्यारें, कपडे, इ० नीं मनुष्य, पशु, किल्ला, मांडव, इ० कांहीं कार्यार्थ तयार करणें. २ दस्तऐवज, लेख, इ० सर्व बाबी यथास्थानीं घालून आणि चुका दुरुस्त करून तयार करणें.

सजल [अ० सज्ल्] **स्त्री०** १ सुव्यवस्था; योग्य रचना किं० मांडणी. २ युक्ति; तजवीज; हिकमत.

सजल [सं०] **वि०** पाण्यानें भरलेला, जलयुक्त (मेघ, विहीर, नदी, इ०).

सजविणें [म० ' सजणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** ' सजणें ' **स० क्रि०** पहा.

सजा [फा० सझा] **स्त्री०** शिक्षा; पारिपत्य.

संजाइती, संजाईत वि० १ पसंत पडल्यास किंमत देऊन विकत घेऊं, पसंत न पडल्यास परत करूं, अशा बोलीनें दुकानदारापासून आणलेला माल. २ खपेल तितका खपवूं आणि किंमत तुम्हाला देऊं, आणि न खपेल तो परत आणून देऊं अशा बोलीनें दुकानदारापासून कोणी फिरस्ता व्यापारी घेतो तो माल.

सजाति, सजातीय [सं०] **वि०** एकाच म्ह० त्याच जातीचा; उ० आम्ही सजातीयांशींच रोटीबेटी व्यवहार करतों.

संजाप, संजाफ, संजाब [फा० संजाफ्] **पु०** १ नक्षीदार किं० रंगी बेरंगी असा धोतर, लुगडें, इ०चा कांठ; किनार; मगजी. २ शेंडीच्या सभोंवतीं राखतात तो घेरा. ३ पुरणपोळीचा कांठ,–ज्यांत पुरण शिरलेलें नसतें. ॐ **संजाप (–फ–ब,–) दार वि०** ज्याला संजाप आहे असें (लुगडें, शेंडी, इ०). **संजाबी विडा पु०** मेजवानीचे प्रसंगीं किं० दरबारांत वाटावयासाठीं केशर, लवंग, इ० मसाले घालून केळीच्या पानांत वेष्टन करतात ते विडे प्रत्येक.

संजायत, संजायती, संजायीत वि० मागें ' संजाइती ' पहा.

संजखार, सज्जीखार पु० एक क्षार.

सजीव [सं०] **वि०** चेतनायुक्त; जिवंत.

संजीवन [सं०] **न०** १ पुनरुज्जीवन. २ चौसोपी घर. ३ नरकविशेष.

संजीवनी स्त्री० मृताला जिवंत करणारें औषध, किं० जिवंत करण्याचा मंत्र, विद्या, इ०.

संजुकता, संजुगता [सं० संयुक्त] **वि०** लहान आणि आटोपसर, व्यवस्थित (घर, संसार, संस्था, इ०).

संजोग [सं० संयोग] **पु०** १ साठा; संचय; सामग्री. २ एकाद्या कामाला जरूर अशी सर्व साधनसामग्री. ३ व्यवस्था; मांडणी; टापटीप.

संजोगणी [म० संजोग] **स्त्री०** कांहीं कामाला जरूर अशी जी साधनसामग्री तिची उपस्थिति म्ह० ती सिद्ध किं० तयार असणें; किं० तिच्यांत कांहीं न्यून राहिलेलें नसणें.

संजोगणें [म० संजोग] **स० क्रि०** योग्य साधनसामग्रीनें कांहीं कार्य सुरू होईल असें

करणें; सजविणें; मांड मांडणें; उभारणी करणें. **अ० क्रि०** साधनसामग्रीनें सिद्ध होणें किं०असणें; अनुरूप होणें किं० असणें; जुगणें; जुळणें.

संजोगी [**म०** संजोग] **पु०** अविवाहित राहाण्याचें व्रत न पाळणारा योगी.

सज्ज [**सं०**]**वि०**१तयार; सिद्ध.२शृंगारलेला.३ कवच घातलेला(वीर). ४लगाम,खोगीर,इ०घालून स्वारीसाठीं सिद्ध केलेला (घोडा). ५ घोडे जोडून सिद्ध केलेला (रथ). ६ दोरी ताणून तयार केलेलें (धनुष्य). ७ पोशाख घालून तयार झालेला (मनुष्य).

सज्जणें [**म०** सज्ज] **अ० क्रि०** कांहीं कामाला तयार किं० सिद्ध होणें किं० असणें.

सज्जन पुढें ' सत् ' मध्यें पहा.

सज्जन न०, सज्जना स्त्री० [**सं०**] १ बांधणें. २ कपडे घालून शोभविणें. ३ तयार किं० सिद्ध करणें.४शस्त्रास्त्रांनीं युक्त किं० सिद्ध करणें.५ शृंगारणें. ६ पोशाख; वेश. ७ हत्तीला सजविणें.

सज्जा पु० १ घराच्या गच्चीवर कठडा घालून आणि छत लावून तयार केलेली खोली किं० मांडव; चंद्रशाला. २ एकापुढें एक असलेल्या शेतांची रांग. ३ जकातीच्या बाबतींतील एक टापू; उ० पुणेंसज्जा, सातारासज्जा, नगरसज्जा, इ०.

सज्जाखार, सज्जीखार पु०एक क्षार.

सट, सटी, सठी [**सं०** षष्ठी] **स्त्री०** १ हिंदू महिन्याच्या शुक्लपक्षांतील किं० कृष्णपक्षांतील सहावी तिथि. २ षष्ठीची देवता. ३ मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशीं पूजितात ती देवता किं० तिची पूजा. ॐ **सटींसामाशीं, सठींसामाशीं क्रि० वि०** वर्षाच्या सहा महिन्यांत एकदा म्ह० क्वचित् प्रसंगीं.

सटकणें अ० क्रि० १ जोरानें आणि वेगानें एकाद्या ठिकाणापासून(कोणी माणसानें, पक्ष्यानें, किं० जनावरानें) निघून जाणें.२वचन किं०करार (कोणी मनुष्यानें) मोडणें.

सटका पु० मागें ' झटका, झटकारा ' पहा.

सटसट, सटसटां, सटांसटां क्रि० वि० पाण्याचे थेंब, खडे, झाडावरचीं फळें, इ०वेगानें एकामागून एक अशा रीतीनें (पडणें, लागणें, उडणें).

सटरफटर न० अनेकविध पदार्थांचा एके ठिकाणीं झालेला जमाव; हरएक चिजांचा समुच्चय; किरकोळ पदार्थांचा साठा.

सटल, सटल्ली, सटाली स्त्री० १ वचनभंग करणें (खाणें). २ झुकांडी देणें (खाणें). ३ हकीगत सांगतांना किं० देण्याघेण्याचा हिशेब करतांना कांहीं हकीगत किं०रकमा ह्यांचे वरून मुद्दाम उडी मारणें किं० गाळणें (मारणें).

सटवणी [**म०** सट (सहावा दिवस)+ पाणी] **न०** मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीस म्ह० चंपाषष्टीस किं० आलीकडे पलीकडे पडतो तो पाऊस.

सटवणें, सटावणें [**म०** सट म्ह० सहावा दिवस] **अ० क्रि०**(मूल)जन्मल्यानंतर तें सहाव्या दिवशीं मरणें किं० कांहीं बाधेनें विकृत होणें. हें सठी देवीच्या कोपामुळें होतें अशी अशिक्षितांची समजूत आहे.

सटवाई, सटवी, सठवी, सठवाई [**म०** सट; **सं०** षष्ठी] **स्त्री०** १ षष्ठीची देवता. २ मुलाच्या जन्माच्या सहाव्या दिवशीं पूजितात ती देवता. ३ स्त्रियांना शिवी म्हणून ' सटवी ' हा शब्द योजितात. ॐ **सट (-ठ-) वीचीं अक्षरें न० अ०व०, सट (-ठ-) वीचें लिखित न० ए० व०** कोणेकाचें नशीब,-जें षष्टी देवी प्रत्येक मुलाच्या कपाळावर लिहून ठेवितें असें समजण्यांत येतें. **खोटें बोलणें तुझ्या सठवीला पूजिलेलें आहे** तूं खोटें बोलणारा होशील असें तुझें नशीब षष्ठी देवीनें तुझ्या कपाळावर लिहिलेलें होतें म्ह० तूं अट्टल खोटें बोलणारा आहेस. **सटवीचें लिहिणें टळत नाहीं** नशीबीं असेल तसेंच घडतें. **सटवा** ['सटवी' चें पुल्लिंगी रूप] **पु०** अजागळ आणि मूर्ख माणूस. 'सटवा मल्हारी' ह्याच अर्थी. **सटवीपूजन न०** मूल जन्मल्यानंतर सहाव्या दिवशीं षष्ठी देवीची पूजा करतात ती.

सटसटीत वि० टणक (भाताचीं शितें, डाळ, इ०).

सटारणा, सटारा वि० बेढब दिसण्याइतका मोठा; अगडबंब. [निसटून जाणें.

सटालणें अ० क्रि० सुळुक्किनी पळून किं०

सटाळी मागें ' सटल ' पहा.

सटावणी, सटावणें मागें ' सटवणी, ' ' सटवणें ' पहा.

सटीक [**सं०**] **वि०**टीकेसहित ग्रंथ, वाक्य, इ०.

सटीप [**सं०** स+टीप (टीका)]**वि०** ज्यावर टीपा दिल्या आहेत असा (ग्रंथ, लेख, इ०).

सटींसामाशीं **क्रि० वि०** मागें ' सट ' मध्यें पहा. [वैर.

सटीसावत्र न० सवतींचें परस्परांत असतें तें

सटेंगोपाल पु० मात्रागमनी माणूस; अटल सोदा; लफंगा माणूस.

सट्टल, सट्टली, सट्टल्या मागें ' सटल, ' ' सटली ' पहा.

सट्टा [**हिं०**] **पु०** १ बाजारांत विशिष्ट वेळीं मालाचा दर किं० भाव कांहींही असला तरी अमक्यानें अमुक माल अमक्याला अमुक दरानें पुरवावा असा ठराव व्यापारी कोणेकाशीं करतो तो. २ धाडसाचा सौदा. ३ एका जातीची हुंडी किं० नाणें देऊन किं० घेऊन दुसऱ्या जातीची हुंडी किं०नाणें दुसऱ्या व्यापाऱ्यापासून घेणें किं० त्याला देणें ह्या रूपाचा व्यवहार. ❀ **सट्टा बट्टा पु० ए० व०** सट्ट्याचा व्यवहार

सठ, सठी [**सं०** षष्ठी] **स्त्री०** मागें ' सट ' पहा.

सठवणें इ० मागें ' सटवणें ' इ० पहा.

सठी [**सं०** सटि, सटी] **स्त्री०** आंबेहळद.

सठीसामाशीं **क्रि० वि०** मागें ' सट ' मध्यें पहा.

सड पु० १ गाय, म्हैस, इ० चा आंचोळ. २ जोंधळा, सजगुरा, ऊस, बोरू, किं० जाडी गवत इ० कापून घेतल्यावर खालीं भूईवर जे त्याचे बुडखे राहातात ते प्रत्येक. ३ बैल किं० रेडा ह्यांचें शिश्न. ४ डुकर इ० च्या अंगावरचे जाडी, आणि राठ जे केश ते प्रत्येक. ५ लांब, सरळ, आणि ताठ (काडी गवत इ० ची).

सड स्त्री० १ कांहीं कामाची मागपासून चालत आलेली सरणी; चाल; परिपाठ. २ वहिवाटी संबंधाचा दोन पक्षांत कांहीं वाद असतां लेख, पत्र, वृद्धांची दन्तकथा, इ०जें कांहीं पुरावा म्हणून पुढें आणलें जातें तें. ३ खाच, चर.

सड [**म०** सडणें] **स्त्री०** तांदूळ इ० उखळ इ० मध्यें मुसळ इ० नीं कांडण्याची क्रिया.

सडक स्त्री० १ गठ्ठा बांधणें, गाडीवर लादलेलें सामान आवळून बांधणें, इ० कामासाठीं योजतात ती जाडी आणि मजबूत दोरी. २ रस्ता, शेताची कड, इ० चा सरळपणा किं० वाकडेपणा पाहावयाचा असतां ताणतात ती दोरी. ३ घोड्याच्या खोगिरास लावितात ज्या दोऱ्या त्यांच्यावर सखलादीच्या तांबड्या किं० काळ्या पट्ट्या शोभेसाठीं गुंडाळलेल्या असतात त्या प्रत्येक किं०अशा दोऱ्या प्रत्येक.४ओझ्याच्या किं० बसावयाच्या गाड्या, माणसें, बैल, इ० च्या रहदारीसाठीं तयार केलेला असतो जो रस्ता तो. ५ सरळ पात्याची तरवार. ६ जो सरळ उभा चालतो म्ह० चालतांना ज्याची कंबर, पाठ, मान, गुडघे, इ० वाकलेले नसतात असा मनुष्य किं०अशा माणसाचें शरीर. ७ बिरीद ह्या नात्यानें तरवार, कट्यार, पागोटें, इ० वरून लोंबत सोडलेला असतो जो रेशमी दोरीला बांधलेला गोंडा तो. ८ घोड्याच्या डोक्यावर वनगाय इ० च्या केशांचा तुरा खोविलेला असतो तो. **वि०** १ रोखठोक; भीडमुरवत न धरतां दिलेला (जबाब). २ सरळ (केश, वांबू, रस्ता, शरीर). **क्रि० वि०** भीति न धरतां; न कचरतां; मनसोक्त; यथेच्छ (दारु पिणें, मारणें, शिव्या देणें, जुगार खेळणें, रांडबाजी करणें, इ०). ❀ **सडकपातळ, सडपातळ, सडंबला वि०** लठ्ठ किं० जाडी किं० थिलथिलीत नव्हे असें (शरीर) किं० अशा शरीराचा (मनुष्य). **साती सडका क्रि० वि०** सर्व अंगें उपांगें ह्या सहवर्तमान; पूर्णत्वानें (कांहीं काम करणें).

सडकणें स० क्रि० १ दोरी, काठी, हात, लाथा, इ० नीं (कोणी माणूस, पशु, पदार्थ, इ० वर) रट्टे मारणें; उ० तुला सडकून काढल्याशिवाय तूं खरें सांगणार नाहींस. २ चिरगुटें धुतांना (तीं) दगडावर आपटणें. ३ वाकस, पटाशी, इ० नीं (लाकूड) तासणें. ४ ऐरणीवर ठेवून (लोखंड इ० वर) घणाचे घाव मारणें. ५ (कोणत्याही पदार्थाला) कोणत्याही कारणानें

जोराचे हिसके देणें. ६ तांदूळ, डाळ, इ० तून केरकचरा वेगळा करण्यासाठीं ते सुपांत घालून विशिष्ट प्रकारें त्यांना हिसके देणें. अ० क्रि० वेगानें, झपाट्यानें किं० रागानें एकाद्या स्थळा-पासून निघून जाणें.

सडका [म० सडणें] वि० रोगानें सडलेलें (गात्र, फळ, पान, मनुष्य).

सडकांव [म० सडकणें] वि० ओबडधोबड रीतीनें केलेलें किं० घडविलेलें.

सडकून, सडकावून [म० सडकणें, सडकावणें] क्रि० वि० जोरानें; आवेशानें; तावा-तावानें; मोठ्या प्रमाणांत; अतिशय (जेवणें, धावणें, मारणें, अभ्यास करणें, खेळणें, इ०).

सडकोळा वि० किडकिडीत, रोड.

सडगा पु० सोडगा; जाडी काठी.

सडघाण [म० सडणें+घाण] स्त्री० (अन्न, काम, वेत, इ० ची) नासाडी, विचका, विघाड.

सडण [म० सडणें] न० १ कांडावयाचें काम. २ कांडावयासाठीं घेतलेली डाळ, तांदूळ, इ० जें कांहीं तें.

सडणावळ [म० सडणें] स्त्री० तांदूळ, डाळ, इ० सडण्याबद्दल दिलेली मजुरी.

सडणी [म० सडणें] स्त्री० कांडण्याची क्रिया किं० तऱ्हा.

सडणें स० क्रि० उखळ इ०मध्यें(तांदूळ,डाळ, राळा, वरी, इ०) घालून मुसळ इ०नीं कांडणें.

सडणें अ० क्रि०(फळ,पान,जखम,इ०)कुजणें.

सडधोपट वि० पुढें ' सरधोपट ' पहा.

सडपातळ, सडबला मागें' सडक 'मध्यें पहा.

सडसाक्ष, सडसाक्षी स्त्री० एकाद्या वादाच्या निर्णयासाठीं जरूर असे जे कागद, खतें, साक्षी-पत्रें, इ० त्याचा समुच्चय.

सडा वि० १ बायको, मुलें, प्रपंच, इ० चें लटांबर ज्याच्या मागें नाहीं असा. २ दुसऱ्या कोणाची जबाबदारी ज्याच्यावरून कांहीं काळ नाहींशी झाली आहे असा. ३ प्रवासांत कोणी मनुष्य सोबतीला ज्याणें घेतला नाहीं असा. वरील तीन्ही अर्थीं ' सडासोट ' ' सडेसोट ' असेही शब्द आहेत. ४ रिकामी म्ह० वाहातु-कीला सिद्ध अशी गाडी किं० असें घोडें, इ०. ५ पतंग उडवितांना त्याला लाविलेली असते ती दोरी. ६ शेणाचें पाणी अंगणांत शिंपडतात तें. ७ झाडावरचीं फुलें, फळें, युद्धभूमीवर मेलेल्या शिपायांचीं शरीरें, इ० जमीनीवर इतस्ततः पसरलेलीं असतात तीं समुच्चयानें. ८ सपाट अशी डोंगराळ जमीन; कातळ; माळ. ꠰꠰ **सडा-संमार्जन, सडासारवण** न० ए० व० अंगण किं० जमीन झाडणें, त्यावर शेणाचें पाणी शिंपणें, रांगोळी घालणें, इ० जीं प्रातःकाळचीं बायकांचीं कामें तीं समुच्चयानें (करणें). **सडा कारभार** पु० धोपटमार्गी काम; प्रामाणिकपणाचा व्यवहार. **सडाधस** पु० १ कोणाचीही आणि कशाचीही पर्वा न करणारा माणूस; दांडगेश्वर. २ प्रापंचिक लटांबर ज्याचे मागें नाहीं असा माणूस. ह्याच अर्थीं ' सडा-फटिंग, ' ' सडेलधू, ' ' सडेसांट ' सुद्धां. **सडा-फोक** पु० शरीरानें नटिनेटका आणि सुंदर असा माणूस. **सडामफर्लास** पु० बायकोमुलें ह्यांचें लटांबर ज्याचे मागें नाहीं असा आणि काबाडकष्ट करून पोट भरणारा माणूस. **सडी फौज** स्त्री० तोफा, बाजारबुणगे, इ० चें लटां-बर जिच्या बरोबर नाहीं अशी लहानशा काम-गिरीवर पाठविलेली फौज. **सडी सांड, सडी सांट** स्त्री० १ जिला मूल नाहीं अशी स्त्री. २ जिचीं मुलें मोठीं असल्यामुळें जिला त्यांची काळजी वहावी लागत नाहीं अशी स्त्री. **सडेल बोंबलि, सडेलमदार** पु० हाडका, रोडका, आणि कुरूप असा माणूस. **सडेल भात** पु० १ (**लक्षणेनें**) सडत चाललेली जखम किं० क्षत. २ (**लक्षणेनें**) कुजक्या किं० हिरवट स्वभावाचा मनुष्य. **सडेसांट** (-ठ) वि० ज्याच्या मागें बायको, मुलें, इ० प्रपंचाचा त्रास नाहीं असा. **सडेहुंपट, सडेहुप्या** पु० १ ज्यांत स्त्री नाहीं, ज्यांत सगळेच नरवानर आहेत अशा टोळींतील एक नर वानर. २ अविवाहित पुरुषांच्या समुदायापैकीं एक व्यक्ति. **टीप,**– ज्याचें लग्नाचें वय होऊन गेलेलें असून जो अद्यापि अविवाहित आहे त्याला ' मारुति ' ' हनुमान ' असें विनोदांत म्हणतात.

संडा वि० मजबूत आणि धिप्पाड (माणूस,पशु, पदार्थ).

सडाई [म० सडणें] **स्त्री०** तांदूळ इ० सड-ण्याबद्दलची मजुरी.

सडासांटा, सडासाटा, सडासाठ, सडा-सोट, सडेसोट वि० एकटा; ज्याच्या मागें बायको,मुलें,सामानसुमान,इ० कांहीं नाहीं असा.

सडाका पु० १ पाऊस, गारा, इ० चा सड्-सड्र असा आवाज होऊन होतो तो वर्षाव. २ वाऱ्याचा सोसाट्याचा प्रवाह. ३ दोरी, काठी, इ० नीं प्रहार.

संडास पु० शौचाची खोली; शेतखाना.

सडी [म० सडणें] **स्त्री०** १ मनुष्य, पशु, इ० चें शरीर सडत जाणें हा रोग. २ क्षत,फोड, इ० वर माशा बसल्यामुळें त्यांत होते ती कृमींची उत्पत्ति किं० त्यामुळें होणारी सडण्याची किं० कुजण्याची क्रिया. मागें ' असडी,असडी ' पहा.

सडी स्त्री० लेखी किं० तोंडी पुरावा. ह्या अर्थीं ' सड ' सुद्धां.

सडी स्त्री० अंगांत शिरलेलें लाकूड, गवत, इ० चें कुसळ किं० धस.

सडींव [म० सडणें] **वि०** कांडलेले (तांदूळ, सावा, जोंधळे, इ०).

सडीसाक्ष, सडीसाक्षी मागें ' सडसाक्ष,' ' सडसाक्षी ' पहा.

सडेतोड [म० सडणें+तोडणें] **वि०** झटपट केलेलें (काम), दिलेलें (उत्तर), भीडमुरवत न ठेवतां केलेला (हुकूम) किं० दिलेलें (मत).

सडेल [म० सडणें] **वि०** सडलेला; कुजलेला; सडत चाललेला.

सडेलधू, सडेसोट मागें 'सडा' मध्यें ' सडा-धस ' पहा.

सड्या [म० सडणें] **वि०** १ रोगानें झिजत चालला आहे असा(माणूस, पशु). २ चरत किं० सडत चाललेली (जखम).

सढळ वि० १ उदार; खर्चिक. २ अघळपघळ सामान पुरविणारा; उदारपणें वर्गणी देणारा किं० सार्वजनिक कृत्यांना देणग्या देणारा. ' सढळ हाताचा, '' हाताचा सढळ ' ह्या दोन्ही अर्थी.

संढाल पु० सरकारनें एखाद्या गांवाच्या गांव-कऱ्यांवर बसविलेल्या साऱ्याच्या किं० दंडाच्या रकमा जर गांवकऱ्यांच्या ऐपतीप्रमाणें नसल्या तर गांवकरी एकमेकांत गुण्यागोविंदानें नवीन आकारणी करून गांवावरचा सरकारी आंकडा भरून देतात ती पद्धति.

सण [सं० क्षण= आनंद, उत्सव, फुरसत] **पु०** १ उत्सव; उत्सवाचा दिवस,-दसरा,दिवाळी, गुढीपाडवा, गणेशचतुर्थी, इ०. २ कोणताही आनंदाचा दिवस. ३ अशा उत्सवाच्या प्रसंगींची पक्वान्नें, थाटमाट, रोषनाई, इ० समुच्चयानें. ४ भंगी, झाडूवाले, न्हावी, परीट, इ० ना अशा प्रसंगीं दिलेली वाढणी, शिधा, पोस्त, इ० (देणें). ५ अशा प्रसंगीं मित्र, नातलग, इ० एकमेकांस प्रेमपूर्वक देतात त्या देणग्या. **टीप,**-ह्या पांचही अर्थी ' सणवार ' हाही शब्द आहे. ❀ **ऋण काढून सण करणें** मागें 'ऋण' मध्यें पहा. **सणीं घुगऱ्या, अवदिशीं पुऱ्या** मागें 'अवदीस' मध्यें पहा.**सणकरी** गांवकऱ्याजवळ सणाचे दिवशीं पोस्त, शिधा, इ० मागत हिंडणारे कारू, बलुते-दार, इ० प्रत्येक. ह्या पोस्त शिधा, इ० ना ' सणवई ' म्हणतात.

सण [सं० शण] **पु०** ताग. हा शब्द संस्कृतांत **न०** आहे. ❀ **सणकाडी, सण-कांडी स्त्री०** १ सणाच्या ताटांचे तंतु सोलून काढल्यावर राहातात तीं भेंडें प्रत्येक. अंबाडी, भेंडी, इ० चे तंतु सोलून काढ-ल्यावर उरतात त्या भेंडांनाही 'सणकाड्या 'किं० 'सणकांड्या'च म्हणतात. २ सणाच्या काड्यांचे तुकडे गंधकांत बुडवून विस्तवावर टेकून ज्वाला उत्पन्न करण्यासाठीं योजतात ते प्रत्येक.

सणक स्त्री०,सणका पु० वायु इ० च्या विकृतीनें किं० मुंगी इ० च्या दंशानें शरीरांत एकदम उठते ती कळ किं० तिडीक.

सणकणें अ० क्रि० १ (वाऱ्यानें) सूं सूं असा आवाज करणें. २ (मुंगी इ०च्या दंशाची) तिडीक शरीरांत उठणें.

सणका पु० वायु, विंचु,इ०चा दंश, इ०मुळें शरीरांत एकदम उठते ती तिडीक किं० वेदना.

सणकाडी, सणकांडी मागें' सण 'मध्यें पहा.

सणंग, सनंग न० लुगडें, धोतर, इ० विकत घ्यावयाचें किं० घेतलेलें वस्त्र.

सणगर पु०कांबळीं विणणाऱ्यांची जात किं० त्या जातीचा इसम.

सणवार पु० मागें ' सण ' मध्यें पहा.

सणसणीत वि० १ अति कढत (पाणी,दूध, इ०). २ अति तिखट (कांहीं खाद्य). ३भक्कम, मजबूत (शरीर, रचना, लाकूड, इ०). ४ दडदडीत (वस्त्र). ५ भीड, मुरवत, संकोच न धरतां स्पष्ट शब्दांनीं दिलेलें (उत्तर, मत). ६ परीटघडीचा किं०कोरा असा चालतांना वाजणारा (पेहरलेला कपडा, धोतर, इ०). ७ नवें, कोरें, आणि भरपूर आवाज देणारें (नाणें,भांडें).

सणसर वि० १ भक्कम, मजबूत, बळकट. २ टणक, ताठर. ३ स्पष्ट; निर्भीडपणाचा. ४ धमकदारीचा; करारी; छातीठोक.

सण सुदी स्त्री०, **सण सुदीस**, **सणसूद** पु० [म० सण, सु, दीस (दिवस)] सणाचा दिवस.

सणाटा पुढें ' सनाटा ' पहा.

सणाणणें अ० क्रि० सणसण असा आवाज करणें.

सणी स्त्री० १ दोन पैसे ह्या किमतीचें नाणें. २ दोन पैसे ही किमत. ३ सहा रुके हें जमिनीचें माप.

सत् [सं०] वि० १ असणारें, होणारें. २ खरें. ३ चांगलें; योग्य; पूज्य; उ० सत्कुल,सदाचार, सज्जन, इ०. न० १ अस्तित्व. २ सत्यता.३ सत्यवस्तु; ब्रह्म. पु० साधुपुरुष. पुढें ' संत ' स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सती** स्त्री० साध्वी. खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा. ॐ**सदंजन** न०जस्ताचें फूल **सदाचार** पु०, **सदाचरण** न० शिष्टसंमत आचार किं० वर्तन. **सत्कर्म** न०, **सत्क्रिया** स्त्री० १ पुण्य. २प्रेताची क्रिया;और्ध्वदैहिक.३प्रायश्चित्त.४आतिथ्य.५शृंगारणें; भूषणादिकांनीं शरीर इ० शोभविणें. **सत्कार** पु० १ आतिथ्य. २ पूजन. ३ यथायोग्य मान देणें किं० सन्मान करणें. **सत्कार्यवाद** पु० १ (**वेदान्त**) विवर्तवाद. २ (**सांख्य**) परिणामवाद. **सचित्** न०परब्रह्म. **सच्चिदानंद** पु०अस्तित्व, चैतन्य, आणि आनंद, ह्यांचा समुच्चय म्ह० परब्रह्म. **सज्जन** पु० चांगल्या शीलाचा मनुष्य; नीतिमान् माणूस. **सद्गति** स्त्री० १ मोक्ष; मोक्षाची प्राप्ति. २ मराठींत) इलाज; उपाय; पेचांतून सुटका; उ० माफी मागितल्यावांचून मला सद्गति नाहीं. ह्याच अर्थी ' सद्गत ' हें अपभ्रष्ट रूपही योजण्यांत येते. **सत्तम** वि० अत्यन्त उत्तम. **सत्पथ** पु० १ चांगला मार्ग.२ चांगली वर्तनसरणी. **सत्प्रतिपक्ष** पु० (**न्याय**) एक हेत्वाभास. **सद्भाव** पु० १ अस्तित्व. २ भलेपणा. ३ वस्तुस्थिति. ४ प्राप्ति; मिळणें. **सद्वृत्त** वि० १सद्वर्तनी. २ पूर्ण वाटोळें.

सत [सं० सत्व] न० सद्गुण; सदाचरण; नीतीची सरणी; सन्मार्ग. खरेपणा; उ० सत सोडणें, सतास जागणें, इ०. ॐ **कोणेकाचें सत घेणें** त्याच्या चांगुलपणाचा पूर्ण फायदा करून घेणें; त्याच्यावर फार भार घालणें.**सतपत** स्त्री० साखी; पत; व्यापारांत किं० व्यवहारांत कोणेकाचा खरेपणा किं० सचोटी.

संत [सं० सत्=चांगला] पु० साधु; प्रापंचिक लाभावरून ज्याचें चित्त निवृत्त झालें आहे असा माणूस.ॐ**संतकी** स्त्री०साधु पुरुषाची राहाणी. **संतडा** पु० साधु (तुच्छेतेत). **संतमालिका** स्त्री०, **संताळें** न० १साधुपुरुषांचा समुदाय. २ भगवद्भक्तीचा उपदेश, आणि भगवन्नामाचा महिमा सामान्य जनांत पसरविणारे साधुपुरुष किं० कवि ह्यांची परंपरा किं० हे सर्व समुच्चयानें.

संत पुढें ' संथ ' पहा.

सतका पु० ओंवाळून टाकलेला पदार्थ.

सतंजय [सं० सत्य+जय] न० खरेपणा; प्रामाणिकपणा. वि० खरा; प्रामाणिक; साखीचा (माणूस). हा शब्द अशिक्षितांतच रूढ आहे.

सतत [सं०] वि० नेहेमींचें; अखंड. क्रि० वि० सदासर्वदा; एक सारखें; न खळतां किं० न थांबतां. ॐ **सततगति** पु० वायु.

संतत [सं०] वि० १ विस्तीर्ण. २ न खळणारा; न थांबणारा; निरंतर;उ० पावसाची काल संतत धार लागली होती. ॐ **संततज्वर** पु० अंगांतून न निघणारा ताप.**संततधार** स्त्री० १मध्यें खंड न पडूं देतां देवावर अभिषेकार्थ पाणी, दूध, इ०ची धार धरतात ती. २ पावसाची एकसारखी होत असते ती वृष्टि(होणें,पडणें, लागणें). ३ उन्हाळ्यांत उकाड्यानें अंगातून घामाच्या धारा चालतात त्या समुच्चयानें. ४अनेक पिढ्यां-

पासून चालत आलेली कोणतीही सरणी, चाल, किं० रूढि.

संतति [सं०] **स्त्री०** १ पसरणें. २ विस्तार. ३ परंपरा. ४ ओळ; रांग; पंक्ति. ५ कुळ; वंश. ६ कोणेकाची पुत्रपौत्रादि किं० कन्यादौहित्रादि वाढ. ७ समाजांत पुढें येणाऱ्या पिढ्यांतील माणसें समुच्चयानें.

सततीस, सदतीस [**म०** सात+तीस] **वि०** तीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्ये-इतका.

सतंत्र [**सं०** स्वतंत्र] **वि०** अनियंत्रित (अडाण्यांत रूढ).

सत ना गत [**म०** सत्य+ना (नाहीं)+ गति (मोक्ष, सुटका)] **स्त्री० ए० व०** पेचांतून किं० अडचणींतून मोकळीक किं० सुटका यांचा अभाव; उ० आम्हां बायकांना नवऱ्यांवांचून सत ना गत; उ० वरिष्ठ कितीही खाष्ट असला तरी आणखी सहा महिने नोकरी केल्याशिवाय सत ना गत.

सतपत मागें ' सत ' मध्यें पहा.

संतप्त [**सं०**] **वि०** १ तापलेलें. २ तापविलेलें. ३ पीडित;श्रांत. ४ रागानें बेफाम झालेला.

सतम [**फा०** सितम्=जुलूम] **पु०,स्त्री०, न०** १ जुलूम; कहर; अनर्थ. २ हल्ला. ३ जोर; आवेश. ४ पराकाष्ठा; अतिरेक. ५ वैपुल्य; अतिशयपणा; उ० दुष्ट अधिकाऱ्यानें (किं० ढेकूण, पिसवा, डांस, पर्जन्य, ओरडणें, चोऱ्या, दरवडे, महागाई, शिव्या देणें, इ० नीं) सतम केली आहे (किं० केला आहे किं० केलें आहे).

संतमस [सं०] **न०** १ सर्वव्यापी अंधार.२ २ महामोह.

सतमी मागें ' शतमी ' पहा.

सतरंग,सतरंज [**फा०** पतरंज्] **पु०** बुद्धिबळांचा खेळ.

सतरंजी, सत्रंजी [**फा०** पत्रंजी] **स्त्री०** रंगीबेरंगी पट्ट्यांची जाडी सुताची विणलेली बैठक. **टीप,**–' सतरंगी ' असाही ह्याच अर्थी शब्द योजण्यांत आहे.

सतरा [**स०** सप्तदशन्] **वि०** दहा आणि सात ह्यांच्या बेरजेइतका. ❀ **सतरा पंधरा गोष्टी सांगणें** भलभलत्या सबबी सांगणें; असंबद्ध भाषण करणें; टाळाटाळीचीं उत्तरें देणें.

संतर्पण [सं०] **न०** तृप्त करणें.

सतल, सतलें, सतेल, सतेलें न० उथळ, रुंद, आणि पसरट असें धातूचें भांडें,–परीट लोक ज्यांत कपडे शिजवितात तें.

सतवटी मागें ' सचोटी ' पहा.

सतवा [**म०** सातु; **सं०** सक्तु] **पु०** जोंधळे, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

सतशील [**स०** सत+शील] **वि०** खरा; साधु वृत्तीचा; प्रामाणीक.

सतलय क्रि० वि० हारीनें; अखंड रांगेनें; एकाला लागून एक अशा प्रकारें.

सतसल, सपसल, सपशेल क्रि० वि० १ शंका न राहील अशा प्रकारें; पूर्णपणें; आडपडदा किं० कांहीं शर्त न घालतां; पूर्णपणें हातपाय ताणून; उ० त्याणें सपशेल माफी मागितली; उ०तो जमीनीवर सपशेल पडला; उ० तो सपशेल खोटें बोलला. २ मध्यें खंड न पडूं देतां.

सताड वि० उभा सरळ, (माणूस, खांब, इ०). **क्रि० वि०** पूर्णपणें उघडें किं० उघडलेलें (दार, खिडकी).

संतान [सं०] **न०** १ विस्तार; वाढ. २ प्रवाह; परंपरा. ३ संतति; पुत्रकन्यादि अपत्य. ४ कुळ; वंश. ❀ **संतानगोपाल पु०** पुत्रप्राप्त्यर्थ जपावयाचा एक मंत्र.

संतान, संतानक [सं०] **पु०** स्वर्गीय वृक्षविशेष. मन्दार, पारिजातक, संतान, कल्प, आणि हरिचंदन, असे पांच स्वर्गीय वृक्ष आहेत.

सताप पु० खोकला इ० रोगावर ज्याच्या पानांचा उपयोग होतो असें एक झाड.

संताप [सं०] **पु०** १ दाह; आग. २ पेटणें. ३ वेदना; दुःख; क्लेश. ४ उद्वेग. ५ क्रोध, राग (येणें). ६ पश्चात्ताप; अनुताप. ❀ **संतापी वि०** रागीट; चिरडखोर.

संतापणें [**सं०** सम्+तप्] **अ० क्रि०** १ तापणें; तप्त होणें. २ रागावणें; क्रुद्ध होणें. ३ त्रस्त होणें; त्रासणें.

संतापन [सं०] **न०** १ जाळणें. २ संतप्त होणें; तापणें. ३ पीडणें. **पु०** मदनाचा एक बाण.

सतार [फा०] **स्त्री०** एक तंतुवाद्य.

सताळ, सताळें न० मागें ' सतल ' पहा.

सतावणें, सताविणें [हिं० सताना; म० संताप] स० क्रि० छळणें; उपद्रविणें; गांजणें.

संताविणें [म० संथ; सं० शांत] स० क्रि० शांत करणें; गोड गोड बोलून सांत्विणें.

संतावें, संताळें [म० संत] न० १ साधुपुरुषांचा जमाव; यात्रेस निघालेले साधु समुच्चयानें. २ कोणा साधूच्या भजनीं किं० नादीं लागणें; साधूची सेवा (निंदेंत). ३ जग मिथ्या आहे, खरें काय तें ब्रह्म आहे, असें मत किं० अशा मताचें विवरण.

संती [सं०] **स्त्री०** १ साध्वी स्त्री; पति हाच परमेश्वर म्हणून त्याची अनन्यभावें सेवा करणारी स्त्री. २ कोणीही सच्छील स्त्री. ३ मृत पतीच्या कलेवरासह स्वतास जाळून घेणारी त्याची पत्नी. सती जाणें असा प्रयोग होतो; उ० मोहित्यांची कन्या पुतळाबाई ही शिवाजीची तिसरी बायको होती, ती शिवाजीबरोबर सती गेली. ४ पार्वती,–शंकराची पत्नी. ❀ **सतीच्या द्वारीं बत्ती आणि शिंदळीच्या दारीं हत्ती** सत्पुरुष नेहेमीं हालअपेष्टा भोगतात आणि दुष्ट, देशद्रोही, चहाडखोर, विश्वासघातकी, थुंकीचाटे वैभवास चढतात. **सती जागाविणें** सती ज्या चितेवर स्वतास जाळून घेणार असेल त्या चितेंत ती पूर्णपणें जळून खाक होऊन जाईपर्यंत कोल्हींकुत्रीं यांचा उपद्रव तिच्या गात्रांस न होऊं द्यावा म्हणून रक्षणार्थ बसणें. **सतीचा लाल** उ० उत्कृष्ट मांणूस;मोठा दाता(गोसावी,आणि बैरागी आशीर्वादांत हा शब्द योजितात). **सतीचें वाण घेणें** न० येईल त्या संकटाला तोंड देऊन प्रतिज्ञा निस्तरणें. **टीप,**–फुलें, सुपाऱ्या, नारळ, हळदकुंकू, तांदूळ, फणी, इ० पदार्थ सती जाणारी स्त्री हातांत घेऊन पतीच्या चितेवर चढत असे. ह्या पदार्थांना 'सतीचें वाण' म्हणत. हें वाण हातांत घेईपर्यंत तिला निश्चय मोडण्याची परवानगी असे,पण वाण हातांत घेतल्यावर तिला चितेवर चढणें अपरिहार्य असे.

सतपत मागें ' सत ' न० पहा.

सतीर्थ, सतीर्थ्य [सं०] पु० गुरुबंधु; एकाच गुरूचे किं० आचार्यांचे जे अनेक शिष्य ते परस्परांचे.

सतुवा [सं० सक्तु] पु० जोंधळे, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

सतुष [सं०] वि० टरफलासकट (तांदूळ, गहूं, इ०).

संतुष्ट [सं०] वि० तृप्त; समाधान पावलेला.

सतूप [म० स+तूप] न० तोंडावर तकतकी दिसावी म्हणून नट, वेश्या, नखरेबाज स्त्रिया, इ० लावितात ती मवारी. मवारी म्ह० लोणी इ० स्निग्ध पदार्थ.

सतेल, सतेलें न० मागें ' सतल, सतलें ' [पहा.

सतोटी स्त्री० मागें ' सचोटी ' पहा.

सतोबा [म० सत्य+बोवा] पु० चिक्कू माणूस; कृपण; कंजूष.

संतोष [सं०] पु० १ तृप्ति; समाधान. २ सुख; आनंद. ❀ **संतोषी** वि० समाधानी वृत्तीचा; मिळेल त्यांत तृप्ति पावणारा; अधिकाबद्दल न चडफडणारा. **संतोषपट्टी** स्त्री० आनंदाच्या किं० उत्सवाच्या प्रसंगीं रयतेनें राजाला दिलेली देणगी किं० दिलेला नजराणा.

संतोषणें [सं० सम्+तुष्] अ० क्रि० १ तृप्त होणें.२आनंदित होणें; आनंद किं० समाधान पावणें.

संतोषविणें [म० 'संतोषणें' चें प्रयोजक] स० क्रि० १ तृप्त करणें. २ आनंदित करणें.

सत्कण्या [म० सात+कण्या] स्त्री० अ० व० भात किं० तांदूळ कांडून विरून त्यांच्या होतात त्या कण्या.

सत्कार [सं०] पु० १ आतिथ्य. २ पूजन. ३ कोणेकाची केलेली संभावना. मागें ' सत् ' मध्यें पहा.

सत्कारणें [म० सत्कार] स० क्रि० (कोणेकाला) योग्य तो मान देणें किं० त्याचा गौरव करणें.

सत्कृत [सं०] वि० ज्याचा सत्कार करण्यांत आला आहे असा; पूजित.

सत्तम [सं०] वि० श्रेष्ठ, उत्तम; उ० नृपसत्तम, मुनिसत्तम.

सत्तम पु०,स्त्री०,न० मागें ' सतम ' पहा.

सत्तर [**सं०** सप्तति] **वि०** साठांत दहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्ता [**सं०**] **स्त्री०** १ अस्तित्व. २ खरेपणा; चांगुलपणा. ३ (**न्याय**) व्यापक जाति. ४ (**मराठींत**) अधिकार; अमल. ५ (**मराठींत**) सामर्थ्य. ॐ **काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहीं** १ मोठ्या श्रीमंत आणि वजनदार माणसाचें सरकारच्या य:कश्चित शिपुरड्यापुढें कांहीं चालत नाहीं; सरकारी अधिकारानें उन्मत्त झालेला शिपाई थोर माणसाचा सुद्धां अपमान करूं शकतो. २ थोडक्याशा अधिकाराच्या जोरावर जें काम सहज होऊं शकतें तें पुष्कळ पैसे खर्चूनही होऊं शकत नाहीं. **सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं** ज्याच्या जवळ अधिकाराचें बल आहे त्याच्या पुढें शहाण्याचें कांहीं चालत नाहीं; दोन आणि दोन मिळून तीन होतात किं० पांच होतात असें कोणी अधिकारी म्हणाला तर तें खरें ठरतें आणि कोणी शहाणा दोन आणि दोन चार होतात असें म्हणाला तर तें त्याला गणिताची किं० प्रत्यक्षाची मदत घेऊनही सिद्ध करतां येत नाहीं. **सत्तेचें** वि० स्वताचें; स्वताच्या मालकीचें. **सत्तेचा क्रि० वि०** (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) आपला हक्कच आहे अशा समजुतीनें किं० असें गृहीत घेऊन; उ० हा कामाच्या वेळीं कधीं यावयाचा नाहीं पण जेवणाचे वेळीं तेवढा सत्तेचा येतो. **कोणेकावर सत्ता करणें** १ त्याच्यावर अमल किं० अधिकार गाजविणें किं० चालविणें. २ त्याच्यावर आपला हक्क सांगणें. **सत्ताधारी, सत्ताधिकारी, सत्ताधीश पु०** अधिकारी; अमलदार. **सत्तापुरुष पु०** १ मालक; धनी; स्वामी. २ अमलदार. **सत्तानिवृत्ति स्त्री०** कोणेक वस्तूवरचा आपला हक्क सोडून देणें. **सत्तामत्ता स्त्री० ए० व०** मालकीहक्क; पूर्ण स्वामित्व. **सत्तावान, सत्तावंत पु०** १ मालक; हक्कदार. २ अधिकारी पुरुष. **सत्तासाहेबी स्त्री०** मालकी; स्वामित्व; अधिकार. **सत्तेवाईक वि०** १ हक्कदार. २ आपल्या स्वताच्या पूर्ण मालकीचा.

सत्ता [**म०** सात] **पु०** फाशांच्या खेळांत फाशांवर पडलेला सात हा डाव.

सत्तावन [**म०**सात+पन्नास] **वि०** पन्नासांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्तीर्थ [**सं०**] **न०** १ अत्यन्त पवित्र ठिकाण किं० क्षेत्र. २ मानास किं० पूजनास पात्र अशी वस्तु, माणूस, स्थळ, इ०.

सत्तू [**सं०** सक्तु] **पु०** १ सातू किं० सातूचें पीठ. २ लाह्यांचें पीठ.

सत्तेचाळ, सत्तेचाळीस [**म०** सात+चाळीस] **वि०** चाळीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्तोबा, सत्तोपंत [**सं०** सत्य] **पु०**आपल्या खरेपणाची, प्रामाणिकपणाची, किं० सचोटीची बढाई मारणारा.

सत्पात्र [**सं०**] **न०** १ आपण दिलेलें दान घेण्याला योग्य असा माणूस. २ कोणेकाला कोणतीही क्रिया करण्याला योग्य असा विषय किं० पदार्थ; उ० घर्षणानें पैलू पाडावयाला हिरा सत्पात्र आहे, मातीचें ढिकूळ नाहीं; उ० हा मंत्र मी तुला शिकवितों, तूं सत्पात्र आहेस.

सत्पाळ वि० पुष्कळ दूध देणारी (गाय, म्हैस, इ०).

सत्य [**सं०**] **वि०** खरें; वस्तुस्थितीशीं जुळणारें. २ प्रामाणिक. **पु०** १ ब्रह्मदेव. २ ब्रह्मदेवाचा लोक; ब्रह्मलोक. **न०** १ खरेपणा; खरें. २ वचन; शपथ. ३ सिद्धान्त. ४ कृतयुग. ॐ **सत्याश्रम पु०** संन्यास. **सत्यानत न०** १ व्यापार; वाणिज्य. २ प्रपंचांतील हरएक कामें समुच्चयानें. **सत्यनारायण पु०** नारायणमूर्तिविशेष किं० ह्या मूर्तीची पूजा किं० ह्या पूजेचा विधि. **सत्यपुर न०** विष्णुलोक. **सत्यफल पु०** वेल. **सत्ययुग न०** कृतयुग; चार युगांपैकीं पहिलें. **सत्यवचन, सत्यप्रतिज्ञ, सत्यसंध वि०** बोलल्याप्रमाणें करणारा; वचन न मोडणारा. **सत्यसंध पु०** १ श्रीराम. २ भरत. ३ जनमेजय. **सत्यकार पु०** १ एकमेकांना आणाभाका देऊन कराराच्या शर्ती निश्चित करणें. २ केलेल्या कराराबद्दल दिलेला किं० घेतलेला सत-

कार; विसार. २ खरेपणा स्थापिणें; सिद्ध करणें; **सत्यनिष्ठ वि०** कांहींही संकट आलें तरी सत्य न सोडणारा. **सत्यसंकल्प पु०** १ प्रामाणिकपणाचा संकल्प करणारा. २ उच्च ध्येय डोळ्यापुढें ठेवून त्याचेसाठीं केलेला प्रयत्न. **सत्याग्रह पु०** १ आपल्या मतानें जें सत्य किं० योग्य किं० न्याय्य आहे त्याच्या सिद्धीसाठीं किं० प्राप्तीसाठीं किं० स्थापनेसाठीं धरलेला आग्रह. २ आत्मिक बळानें अन्यायाशीं झगडून आणि येतील तीं संकटें प्रतिक्रिया न करतां सोसून आपली सत्याची बाजू संभाळणें. **सत्यानास** [म० सत्य+नाश] **पु०** पूर्ण खराबी; पूर्ण विध्वंस; सर्वस्वाचा नाश. **सत्योत्तर न०** शपथपुरस्सर केलेलें कांहीं विधान. **क्रि० वि०** शपथपूर्वक; निश्चित रीतीनें; आणाभाका करून. ह्या अर्थी ' सत्योत्तरें ' सुद्धां.

सत्या [सं०] **स्त्री०** सत्यभामा.

सत्या [म० सात] **पु०** पत्त्याच्या खेळांतील सात ठिपक्यांचें पान.

सत्याऐंशीं, सत्यांयशी [म० सात+ऐंशी] **वि०** ऐंशींत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्याण्णव [म० सात+नव्वद] **वि०** नव्वदांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्याल, सत्त्येलें न० मागें ' सतेल ' पहा.

सत्याहत्तर [म० सात+सत्तर] **वि०** सत्तरांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्तेचाळ, सत्तेचाळीस, सत्तेताळ, सत्तेताळीस [म० सात+चाळिस] **वि०** चाळीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सत्र, सत्त्र [सं० सत्त्र] **न०** १ यज्ञ. २ अनेक दिवस चालणारा यज्ञविशेष. ३ दान; दानधर्म. ४ धर्मकृत्य. ५ अन्नसत्र; जेथें आल्यागेल्याला किं० प्रवाशाला फुकट जेऊं घालतात अशी संस्था. ६ देव, थोर पुरुष, इ० च्या पराक्रमाचें सार्वजनिक रीत्या जें निरूपण तें किं० निरूपण जेथें होतें अशी संस्था किं० गृह. ‡ **सत्रशाला स्त्री०** वर ' सत्र ' अर्थ ५ पहा.

सत्रंग, सत्रंज [फा० सत्‌रंज्] **पु०** बुद्धिबळांचा खेळ. [विणलेली बैठक.

सत्रंजी [फा०] **स्त्री०** खूप जाडी सूताची

सत्राण [सं० त्राण] **न०** १ म्हातारपणांत कोणेकाच्या अंगीं उरलेली ताकद, सामर्थ्य, किं० शक्ति. २ बहुत दिवस वापरलेल्या पदार्थाच्या अंगीं आणखीही कांहीं दिवस वापर सहन करण्याची जी ताकद अवशिष्ट राहिलेली असते ती. **सत्राण, सत्राणें क्रि० वि०** सर्व शक्ति वेचून; अंगीं असलेलें सामर्थ्य खर्चून; अतिशय जोरानें.

सत्त्व [सं०] **न०** १ सत्त्व, रजस्, आणि तमस्, हे जे मायेचे तीन गुण त्यांतील पहिला. ह्या गुणाच्या उत्कर्षानें शांति, क्षमा, दया, इ० गुणांची वृद्धि होते. २ अस्तित्व; उ० ब्रह्माचें सत्त्व दुर्ज्ञेय आहे. ३ पदार्थाचा कस म्ह० सारभूत अंश; गुण; गुणधर्म; उ० गव्हाचें सत्त्व पौष्टिक असतें; उ० गुळवेलीचें सत्त्व तापावर रामबाण आहे. ४ ज्या गुणावरून कोणेकाची प्रसिद्धि झालेली असते तो त्याच्या अंगाचा गुण; उ० हरिश्चंद्रानें अनेक दुखें सोशिलीं पण सत्त्व सोडिलें नाहीं. ५ मन; चित्त; बुद्धि. ६ चित्तस्थैर्य. ७ धैर्य. ८ जीवात्मा. ९ पंचमहाभूतें प्रत्येक; मूलतत्त्व. १० सद्गुण. ११ सत्य; खरेपणा. १२ बळ; हिम्मत; उत्साह. **पु०, न०** प्राणी. ‡ **सत्त्वात्मा पु०** लिंगदेह. **सत्त्वस्थ पु०** योगी पुरुष. **कोणेकाचें सत्त्व घेणें** (किं० **हरण करणें**) त्याचा बाणा किं० अभिमान सोडून द्यावयाला त्याला भाग पाडणें. **सत्त्वास जागणें** सत्त्व राखणें; अडचणीच्या प्रसंगींही सत्त्व न सोडणें. **कोणेकाचें सत्त्व पाहाणें** त्याची परीक्षा पाहाणें; तो परीक्षेंत कितपत टिकतो हें पाहाणें; उ० विश्वामित्रानें हरिश्चंद्राचें सत्त्व पाहाण्याचा भारी खटाटोप केला पण हरिश्चंद्रानें आपलें सत्त्व जाऊं दिलें नाहीं. **सत्त्वधीर वि०** धैर्यानें सत्त्वास जागणारा म्ह० सत्त्व न जाऊं देणारा. **सत्त्वरक्षण न०** आपलें सत्त्व न ढळूं देणारा. **सत्त्वस वि०** १ ज्यांत पौष्टिक अंश पुष्कळ आहे असें (अन्न). २ शक्तिमान्. ३ चिवट. ४ कसदार. **सत्त्वशील वि०** सदाचारी; सन्मार्गानें चालणारा किं० वागणारा. **सत्त्वहरण न०** कोणेकाला सत्त्व सोडावयास भाग पाडणें; कोणेकाला सत्त्वापासून भ्रष्ट करणें किं० करण्याचा प्रयत्न करणें. **सत्त्वाची चांगुणा स्त्री०** साध्वी स्त्री; अत्यन्त सदाचरणी स्त्री. **सत्त्वाची सावित्री स्त्री०** अत्यन्त पति-

निष्ठ स्त्री. **सत्त्वान्न न०** सत्त्वस अन्न; ज्यांत पुष्कळ पौष्टिक अंश आहे असें अन्न. **सत्त्वाशुंठी स्त्री०** १ बाळंतीणिसाठीं सुंठाचें एक औषध करतात तें. २ (**लाक्षणिक**) ज्याला सर्वदा कांहीं ना कांहीं तरी आजार येत असतात असें मूल किं० माणूस.

सत्वर [**सं०**] **वि०** त्वरायुक्त; जल्दीचा. **क्रि० वि०** जल्दीनें; तावडतोब;लवकर.'सत्वरीं,' ' सत्वर होऊन ' ह्याच अर्थी.

सत्शूद्र [**सं०** सत् (चांगला)+शूद्र] **पु०** १ धर्मशील किं० धार्मिक वृत्तीचा कोणीही शूद्र. २ गुराखी. ३ न्हावी.

सत्सष्ट [सप्त+षष्टि; **म०** सात+साठ] **वि०** साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

संथ [**सं०** शांत] **वि०** १ मंद; सावकाश. २ धीमेंधीमें काम करणारा. ३ खळबळ न करतां वाहणारें पाणी. ४ न ढवळलेलें; न हालविलेलें.

संथळ[**सं०** सम+स्थल] **न०** सपाट जमीन; जो उखीरवाखीर नाहीं असा भूमीचा पृष्ठभाग.

संथा [**सं०** संस्था] **स्त्री०** १ एका एका हप्त्याला बोकावयाचा वेदादींचा पाठ;–जो गुरुजी शिष्याला उच्चार, आघात,इ० सह म्हणावयाला शिकवितो. २ गायन, व्याख्यान, इ० चा भागविशेष कसा म्हणावा किं० गावा किं० उच्चारावा हें गुरुजी स्वता अभिनयादि करून विद्यार्थ्याला शिकवितो तो. ३ प्रत्यहीं किं० एका खेपेस शिकावयाचा जो धडा तो.

संथावणें [**म०** संथ] **अ० क्रि०** शांत होणें; मंद किं० सौम्य होणें.

संथाविणें [**म०** संथ] **स० क्रि०**१ कोणेकाला संथ करणें;सांत्विणें;शांत करणें.२ रडत्या मुलाला थोपटून, गाणें म्हणून, किं०गोंजारून उगें करणें. ३ (कोणेकाचा क्षोभ, राग, इ०) निरसिणें किं० कमजोर करणें.

संदूक [**अ०** संदूक] **स्त्री०** पेटी. ही बहुधा मोठी असून चाकांवर सरकाविण्याची असते.

सदका, सतका, सतगा [**अ०** सद्का] **पु०** १ कोणेकावरून ओवाळून टाकिलेला भात इ० पदार्थ; ओवाळणी; कुरवंडी. २ दानधर्म. ३ देवाला अर्पिलेला बळी. ꕥ **गाढवाचा सदगा पु०** अगदीं पाजी किं० नादान माणूस. **शाहाण्याचा सदका पु०** (विपरीत लक्षणेनें) अत्यंत मूर्ख माणूस. **टीप,**–१आजारी किं० भुतानें पछाडलेला माणूस बरा व्हावा म्हणून त्याच्यावरून कोंबडें, भात, बकरें, लिंबू, इ० ओवाळून टाकतात. त्या माणसाचा आजार किं० भूत हीं कोंबडा इ० मध्यें प्रविष्ट होतात अशी समजूत आहे. ह्यावरून वरील दोन्ही वाक्प्रचारांची उत्पत्ति स्पष्ट होण्यासारखी आहे.**टीप,**–२विशिष्ट समुदायांतील अतिश्रेष्ठ माणूस.ह्या अर्थी' सदका ' चा निंदेंत उपयोग केला जातो; उ० गवयाचा सदका म्ह० उत्तम गवई म्ह० गर्दभाप्रमाणें मंजुळ स्वर काढून गाणारा. धर्मशीलाचा सदका म्ह० अत्यंत कंजूष.

सदट, सधट वि० १ अखंड; अभग्न; सलग; लांबच लांब; उ० सदट किं० सधट वस्त्र, रस्ता, शेत, जंगल, इ०. २ थोपटमार्गी, सरळ, स्पष्ट, कोणाची भीडभाड न ठेवतां दिलेलें, केलेलें, बोललेलें, सांगितलेलें (मत, भाषण, युक्ति, सल्ला, उत्तर इ०).

सदतीस, सततीस [**म०** सात + तीस] तीसांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सदन [**सं०**] **न०** घर; वास्तव्याची जागा.

संदपड, संदपडीत, सनवातपडीत वि० कित्येक वर्षें पडीत राहिलेली (जमीन). पुढें ' सनवात पडीत ' पहा.

सदय [**सं०**] **वि०** दयाळु; अनुकंपायुक्त.

सदर [**अ०** सद्र] **स्त्री०** १ श्रेष्ठासन. २ राजसभा; मंडप. ३ वरिष्ठ न्यायाची कचेरी. ४ घराची देवडी. ५ घराची ओटी,–जेथें यजमान बसतो. **न०** १ व्याख्यान, निबंध, इ० चे विरहे किं० पोटभाग प्रत्येक. २ बट्टहुकूम. **वि०** १ मुख्य, वरिष्ठ (अमीन, हवालदार, नायक, जमादार, अमल). २ अपवादरहित; बिनशर्त; उ० सदर परवानगी. ꕥ **सदरबारगीर पु०** १ राजा इ० अधिकारी सदरेवर बसले असतां त्यांच्या रक्षणार्थ आजूबाजूस असतात जे शिपायी ते प्रत्येक. २ राजा इ० अधिकाऱ्याची सदर भरदार आणि शोभिवंत दिसावी म्हणून डौलदार पोशाख केलेलीं माणसें जीं सदरेवर बसविलेलीं असतात तीं प्रत्येक.

सदरमुखी वि० मागें ' शूद्र ' मध्यें ' शूद्र-मुखी ' पहा.

सदरहजारी पु० हजार शिपायांच्या टोळी-वरचा अधिकारी.

सदरहू [अ० सद्राहू] वि० वर सांगितलेला. क्रि० वि० वरच्याप्रमाणें.

संदर्भ [सं०] पु० १ गुंफणें; गुंफण्याची क्रिया. २ मिश्रण; एकीकरण. ३ सुसंगतपणा, पूर्वापरसंबंध. ४ ग्रंथ; प्रबंध; गोष्ट.

संदल न० आकारविशेषाचें धातूचें पात्र.

संदला, संधला, सनला [सं० संधि] पु० १ भिंतीच्या किं० फरसबंदीच्या दगड, विटा, इ० च्या दर्ज्यांत म्ह० सांध्यांत भरावयासाठीं विशेष प्रकारें कुटून केलेला चुना. २ अशा चुन्याचा भिंत, जमीन, इ० वर केलेला गिलावा.

सदलाबदल मागें ' अदलाबदल ' पहा.

सदसत् [सं० सत् (चांगलें) + असत् (वाईट)] वि० चांगलें आणि वाईट; उ० सदसताचा विवेक करून आपलें मत ठरवावें. ॐ **सदसद्विवेकबुद्धि** स्त्री० चांगलें काय आणि वाईट काय, खरें काय आणि खोटें काय, ह्यांचा फरक किं० भेद करूं शकणारी बुद्धि.

सदसष्ट [म० सात+साठ] वि० साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका. ' सदुसष्ट ' असेंही रूप ह्या शब्दाचें आहे.

सदस्य [सं०]पु०१सभासद. २ऋत्विग्विशेष (कांहीं धर्मकर्मांत सर्वांवर देखरेख करणारा).

सदा [सं०] क्रि० वि० नेहेमीं. ॐ **सदानंद** पु० १ शंकर. २ ब्रह्मदेव. **सदागति** पु० १ वायु,–जो कधीं स्थिर नसतो. २ सूर्य,–जो कधीं थांबत नाहीं. ३ मोक्ष. ४ परमात्मा. ५ स्वर्ग. **सदातन** वि० शाश्वत. पु० परमेश्वर. **सदाशिव** पु० शंकर. **सदाफुली** स्त्री० एक फुलझाड. **सदासर्वदा** क्रि० वि० अक्षयीं; सर्वकाळ; नेहेमीं. **सदाकदा, सदानकदा** क्रि०वि० नेहेमीं; सर्वकाळ. **सदागुलाब** पु० गुलाबाची एक जात.

सदाचरण, सदाचार मागें ' सत् ' मध्यें [पहा.

संदान [सं०] न० १ दोरी; दांवें. २ बेडी; बंधन. पु० हत्तीच्या गुडघ्याखालचा भाग.

संदान, सदान [फा०] स्त्री०, न० लोहाराची लहान ऐरण,–कव्या, कोयंडे, इ० घडवावयाची. मोठ्या ऐरणीला ' शिंगाडा ' म्हणतात.

सदावर्त न० जेथें आल्यागेल्यास रांधलेलें अन्न किं० कोरडा शिधा फुकट देण्यांत येतो अशी संस्था.

सदाशिव, सदासर्वदा वर ' सदा ' मध्यें [पहा.

संदाळणें स० क्रि० जमीनींत पुरलेला खांब, खुंटा, इ० च्या भोंवतीं दगड, रोडे, इ० ठासून (तो खांब,खुंटा,इ०) पक्का म्ह० न हालेसा करणें.

संदिग्ध [सं०] वि० १ संशययुक्त; घोटाळ्याचें; संशयित. २ अस्पष्ट.

संदिष्ट [सं०] पु० दूत; जासूद. न० निरोप; बातमी. वि० सांगितलेलें; सांगून किं० बजावून ठेविलेलें; दाखवून दिलेला.

संदिसा,संदेसा क्रि० वि० ह्याच क्षणीं; आतांच.

सदी, सद्दी [सं० सिद्धि] स्त्री० कोणेकाचा वैभवाचा, उत्कर्षाचा, किं० लाभाचा काळ. **टीप**,–अणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्या ज्या काळीं कोणेकाला अनुकूल असतात तो त्याचा सद्दीचा काळ. ह्या अष्टसिद्धि मागें ' अष्ट ' मध्यें पहा.

सदीं [सं० सदा] क्रि० वि० सर्वकाळ; नेहेमीं (अशिक्षितांतच रूढि).

सदीस [म० सर्व + दिवस] क्रि० वि० सारा दिवसभर(अशिक्षितांत).

सदुसष्ट [म० सात+साठ] वि० साठांत सात मिळवून होणाऱ्या संख्येइतका. मागें ' सतसष्ट ' पहा.

संदूक [अ०] स्त्री० मोठी पेटी,–जी सरकावण्यासाठीं खालीं बहुधा लहान लहान चाकें बसविलेलीं असतात.

सदृढ [सं० सु + दृढ] वि० १ भक्कम; मजबूत. २ सहसा न बिघडणारें (शरीर,प्रकृति).

सदृश [सं०] वि० १ सारखें; तुल्य; उ० आपण मला पित्यासदृश आहां.२ अनुरूप;योग्य.

संदेश [सं०] पु० १ बातमी. २ निरोप. ३ कोणेकाला केलेली आज्ञा. ॐ**संदेशहर** पु०दूत; जासूद.**संदेसा** पु० निरोप, बातमी(अशिक्षितांत).

संदेसा क्रि० वि० ह्याच क्षणीं; आतांच. मागें ' संदिसा ' पहा.

संदेह [**सं०**] **पु०** १ संशय; शंका. २ संकट; धोका. ३ (**साहित्य**) एक अलंकार. कांहीं सारखेपणावरून जेव्हां प्रकृत वस्तु (म्ह० उपमेय) कांहीं वेगळीच वस्तु (म्ह० उपमान) आहे कीं काय अशी शंका उत्पन्न झाल्याचें वर्णन असतें तेव्हां संदेह हा अलंकार होतो. ह्याला ' ससंदेह ' असेंही म्हणतात. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. ꙮ **संदेही वि०** ज्याला कांहीं शंका आहे असा; ज्याच्या मनांत कांहीं किंतू आला आहे असा.

सदैव [**सं०** स+दैव] **वि०** दैववान्; नशीबाचा. ꙮ **सदैवाची दशी आणि नरदेवाचा पालव लागावा** मागें ' दशा ' मध्यें ही म्हण पहा. मागें ' पालव ' अर्थ ४ पहा.

सदैव [**सं०** सदा+एव] **क्रि० वि०** सर्व काळ; नेहेमीं. ' सदोदित ' ह्याच अर्थी.

संदोली [**फा०**] **स्त्री०** पेटी.

सदोष [**सं०**] **वि०** दोषयुक्त; ज्यांत दोष आहे असा.

संदोह [**सं०**] **पु०** १ समुदाय. २ गाय, म्हैस, इ० चें दूध काढणें.

सद्गत, सद्गती [**सं०** सत् (चांगली) + गति] **स्त्री०** १ मोक्ष; मोक्षप्राप्ति. २ इलाज; उपाय. ३सुटका. मागें 'सत्' मध्यें 'सद्गति' पहा.

सद्गद, सद्गदित वि० प्रेम किं० दया ह्या मनोविकारांच्या तीव्रतेमुळें व्याकुळ (अंतःकरण) किं० कंपित (स्वर किं० भाषण).

सद्गुण [**सं०** सत् (चांगला) + गुण] **पु०** चांगला गुण.

सद्गुरु [**सं०** सत् (चांगला) + गुरु] **पु०** १ श्रेष्ठ दर्जाचा गुरु. २ ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवून देणारा. ꙮ **सद्गुरूची मेख स्त्री०** १ बिनतोड स्थिति; पेचाची स्थिति. २ प्रतिपक्षाला निरुत्तर करणारें कांहीं विधान किं० कोटी.

सद्‌जबाब पु० वादीचें किं० प्रतिवादीचें उत्तर.

सद्दा [**अ०** षदा] **पु०** मोहोरमाच्या उत्सवांत ताबुतांपुढें मुसलमान लोक मिरवितात तीं निशाणें प्रत्येक.

सद्दी, सदी [**फा०** सद्] **स्त्री०** शंभर; शतक. ꙮ **दरसदे क्रि० वि०** दर शेकड्यास.

सद्दी [**सं०** सिद्धि] **स्त्री०** कोणेकाचा वैभवाचा काळ. मागें ' सदी ' पहा.

सद्म [**सं०** सद्मन्] **न०** १गृह; घर.२ स्थान.

सद्यः [**सं०** सद्यस्] **क्रि० वि०** १ आतां; ह्या वेळेस. २ आतांच्या आतां; ताबडतोब. ३ आज. **वि०** ताजें (लोणी); साजूक (तूप). ꙮ **सद्यःकाल पु०** वर्तमान काळ. **सद्योजात पु०** १ शंकर. २ वांसरूं. **सद्यःपाती** [**सं०** सद्यःपातिन्] **वि०** क्षणभंगुर; नश्वर. **सद्यस्क वि०** १ नवीन; ताजें. २ आतांच आणलेला किं० तयार केलेला (पदार्थ). **सद्यःपक्ष पु०** १ वर्तमानकाळ; चालू काळ. ह्याच्या व्यावर्तकत्वें 'भविष्यकाळ' किं० ' आगामी काळ.'२अनेकअंगें ज्यांत आहेत असें एकादें धार्मिक कर्म करावयाचें असतां ह्या अंगांपैकीं एक एक अंग भिन्न भिन्न वेळीं करून मुख्य कर्माचा अवशिष्ट भाग योग्य काळीं करणें असा जो पक्ष तो एक पक्ष. आणि त्या धार्मिक कर्माचीं सर्व अंगें एकदम योग्य काळीं करावयाचीं हा दुसरा पक्ष. हा जो दुसरा पक्ष तो सद्यःपक्ष. ३ पुढें करावयाचें जें कांहीं कर्म तें आपल्या सोयीच्या वेळीं अगोदर करणें हा प्रकार.**सद्यःपक्ष वि०**ताजा;नवा;शिळा किं०जुना नव्हे तो. **सद्यःकाल, सद्यस्कालीन वि०** वर ' सद्यस्क 'दोन्ही अर्थी पहा.**सद्यस्तप्त, सद्यस्तब्द वि०** अगदीं ताजें; आतांच लोणी कढवून केलेलें (तूप); आतांच तोडून आणलेली (भाजी,फुलें, इ०); आतांच केलेला (चहा इ० पेय).

सद्यां, सध्यां [**सं०** सद्यस्] **क्रि० वि०** हल्लीं; ह्या काळीं; चालू काळीं.

संध [**सं०** संधि] **स्त्री०** १ मिलाफ; मिश्रण; २ सांधा. ३ शिवण. ४ फट; भेग; चीर. ५ मध्यंतरींचा कालावधि; अवकाश. ६ ऐन वेळ; अगदीं योग्य वेळ. ७ आणीबाणीची वेळ. ८ बेबनावानंतर पुन्हा झालेली मैत्री किं० सलोखा.

सघट [**म०** घड] **वि०** १ सबंध; अभग्न; अखंड; सलग; उ० त्याचें शेत येथून सघट टेंब-

लाईच्या देवळापर्यंत आहे. २ सरळ, प्रामाणिक, उघडें (वर्तन, भाषण, कारभार, इ०).दिखाऊ, दुटप्पी, धरसोडीचें, याच्या उलट. **क्रि० वि०** १ न कचरतां; भीडभाड न धरतां. २ उद्धटपणें; उत्संखळपणें.

संधन न० जिनगर लोकांची ऐरण. लोहारांच्या ऐरणीस ' वटांग, ' ' खुरा ' म्हणतात.

सधर्म [**सं०**] **वि०** त्याच धर्माचा; त्याच गुणाचा. ॐ **सधर्मचारिणी, सहचर्मचारिणी स्त्री०** आपली पत्नी,–जी धर्माचरणाच्या कृत्यांत आपल्या बरोबर असावी लागते.पुढें'सह'मध्यें पहा.

संघला मागें ' संदला ' पहा.

सधवा [**सं०**] **स्त्री०** जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. जिचा पति मेला आहे तिला ' विधवा ' म्हणतात.

संधा [**सं०**] **स्त्री०** १ संयोग; जोडणी; मिलाफ; ऐक्य. २ निकट संबंध. ३ करार, वचन, प्रतिज्ञा. ४ मर्यादा. ॐ **सत्यसंध वि०** वचनाचा खरा; केलेला करार किं० दिलेलें वचन पाळणारा.

संधान [**सं०**] **न०** १ जोडणें; संयोग. २ मिश्रण. ३ धनुष्याला बाण जोडणें. ४ लक्ष्यावर बाण रोखणें; नेम धरणें. ५ ऐक्य; मैत्री. ६ पदार्थाच्या दोन भागांचा सांधा. ७ योजलेली युक्ति किं० हिकमत. ८ बाणाचें लक्ष्य. ९ दारू गाळणें. १० सोमरस काढणें. ११ कांहीं इष्ट मिळविण्यासाठीं योजलेली हिकमत, लाविलेला वशीला, किं० घातलेली भीड. १२ कांहीं कामाच्या वेगवेगळ्या भागांची क्रमवार रचना. १३ लक्ष्य; अवधान; चाललेल्या विषयांचें किं० विवरणाचें मनानें अनुसरण. ॐ **संधानी, संधान्या, संधानलाव्या वि०** इष्ट हेतु साधण्यासाठीं वशीले बांधण्याच्या कामीं पटाईत.

संधि [**सं०**] **पु०** १ संयोग; जोडण्याची क्रिया. २ करार; ठराव. ३ मैत्री; सख्य; दोन माणसांत वेबनावानंतर झालेला सलोखा. ४ दोन राजांचा मैत्रीचा संबंध; तह. ५ शरीराचे जे वेगवेगळे भाग त्यांचा सांधा; उ० मांडीं आणि नळी ह्यांचा गुडघा हा संधि आहे. ६ योजना; रचना; मांडणी. ७ मधलें अंतर; दोन कर्मांच्या मधलें विश्रांतीचें स्थान. ८ ऐन वेळ; योग्य समय. ९ (**व्याकरण**) दोन स्वर, दोन व्यंजनें, किं० एक स्वर आणि एक व्यंजन, हीं शेजारीं शेजारीं आलीं असतां एकाचा लोप होणें, किं० दोहोंचा लोप होणें, किं० त्यांच्याबद्दल तिसरें येणें, हा जो फेरफार किं० बदल होतो तो; उ० वस्त्र+अन्न=वस्त्रान्न;गुरु+आज्ञा=गुर्वाज्ञा; ककुभ् +प्रांत=ककुप्+प्रांत; इ०. १० दोन युगांच्या मधला काळ. ११ धोरण; साध्यावर नजर. १२ चोरानें घराच्या भिंत, जमीन, इ० ला पाडलेलें भोंक. ॐ **संधिवेला स्त्री०** रात्र आणि दिवस ह्या दोहोंमधला काळ. **संधिहारक, संधिचौर पु०** घरफोड्या चोर. **संधिग, संधिगत वि०** शरीराच्या सांध्यांतील (रोग, बिघाड). **संधिवात, संधिवायु पु०** ज्याच्या योगानें आमांशादिकांमुळें मनुष्याचे हातपाय इ० अवयवांचे सांधे धरतात, किं० आखुडतात तो वायु. **संधिप्रकाश पु०** सूर्योदयाच्या अगोदरचा किं० सूर्यास्तानंतरचा जो प्रकाश म्ह० उजेड तो. **संधिविग्रह पु०** शांतता आणि युद्ध; मैत्री आणि भांडण. **संधिवेळा स्त्री०** सायंकाळ.

संधेवीं [**म०** संदेहीं] **क्रि० वि०** १ मनाच्या संदिग्ध स्थितींत; संशयांत. **संधेवीं**[**म०**सध्या] **क्रि० वि०** २ आतांच; ह्या क्षणींच (येणें,जाणें, करणें). (अशिक्षितांत).

संध्या [**सं०**] **स्त्री०** १ ऐक्य. २ सांधा. ३ संधिप्रकाश; सूर्योदयाच्या अगोदरचा आणि सूर्यास्तानंतरचा प्रकाश किं० उजेड. ४ रात्र आणि दिवस यांच्या मधला काळ.५सायंकाळाची देवता.६प्रातःकाळ,मध्यान्हकाळ,आणि सायंकाळ हे प्रत्येक. ७ सायंकाळ ८ युगापूर्वीचा संधिकाळ ९ वचन; करार. १० संध्योपासना,–ब्राह्मणांनीं प्रतिदिनीं त्रिकाळ आचरावयाचें एक कर्म. ह्या अर्थीं ' संध्यावंदन ' सुद्धां. ॐ **संध्याकाळ पु० स्त्री०** सूर्यास्ताच्या पूर्वीचा काळ. **संध्याकाळी स्त्री०** गुलबाशी हें फुलझाड. **संध्यापात्र न०** संध्या (अर्थ १०) करतांना पाणी सांडावयासाठीं घेतात तें पात्र; ताम्हण. **संध्या करणें संध्यावंदन न०, संध्योपासना, संध्योपस्ति स्त्री०** वर संध्या अर्थ १० मध्यें सांगितलेलें कर्म करणें.

सध्या, सध्यां [सं० सद्यः] **क्रि० वि०** आतां; हल्लींच्या काळीं.

सन [अ०] **पु०** खिरस्ती किं० मुसलमानी कालगणनेचें वर्ष.

सनई [फा० सर्ना, सर्नाई] **स्त्री०** वाजंत्र्याचें मुखानें वाजवावयाचें एक वाद्य.

सनकाडी, सनकांडी स्त्री० मागें ' सणकाडी ' पहा.

सनंग न० १ वस्त्र (क्रयविक्रयादि प्रसंगीं). २ घोडा, गाय, बैल, इ० (क्रयविक्रयाच्या प्रसंगीं). ३ समारंभाचे प्रसंगीं वापरावयाचें उंची वस्त्र (रुमाल, उपरणें, मंदील, इ०). ४ (वात्रटपणांत) रांड, रखेली. ५ (लग्न ठरवितांना) मुलगी. ६ हौसेनें वापरावयाचा (पदार्थ, पशु, इ०).

सनगर पु० बुरणूस करणारांची जाति किं० त्या जातीचा कोणी इसम.

संनत [**सं०**] **वि०** १ वाकलेला. २ नमलेला. ३ खिन्न; खचलेला. [ध्वनि.

संनति [**सं०**] **स्त्री०** १ नमन; नमस्कार. २

सनत्कुमार [**सं०**] **पु०** १ सनकाचा भाऊ. सनक हा ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांपैकीं एक होता. सनत्सुजात ब्रह्मदेवाचा एक मानसपुत्र. २ (**मराठींत**) लहान वयांतलि साधेपणा आणि निष्पाप वृत्ति ज्याची प्रौढ वयांतही कायम आहे असा माणूस.

सनद [**अ०**] **स्त्री०**कोणेकाला कांहीं अधिकार किं० हक्क दिल्याबद्दल सरकारांतून त्याला जें सहीशिक्क्यानिशी पत्र दिलें जातें तें; अधिकारपत्र; प्रमाणपत्र; राजपत्र.' सनदापत्र ' ह्याच अर्थी. ॐ **सनदी वि०** १ सनदशीर. २ ज्याचे संबंधानें सनद देण्यांत आली आहे असा (व्यवहार किं० हक्क) किं० असें(ठिकाण).३ ज्याला कांहीं विशिष्ट सवलती सनदेनें देण्यांत आल्या आहेत असा (नोकर, मक्तेदार,इ०).४पैशाच्या रूपानें मोबदला न देतां ज्याला सनदेनें जमीन इ० दिली आहे असा (शिपाई इ०). **सनद असनाद** [अ० सनद (ए० व०)+असनाद् (अ० व०)] **स्त्री० अ० व०** सनदा. **सनदी, सनदशीर वि०** कायद्याला धरून म्ह० कायदा पाळून चालविलेली (चळवळ, खटपट,इ०).**सनदी इनामदार पु०** नवीन सनद सरकारांतून मिळाल्यानें जो इनामदार झाला तो. ह्याच्या व्यावर्तकत्वें ' जारी इनामदार. '

संनद्ध [सं०] **वि०** १ बांधलेलें; संलग्न. २ कवच ज्याचे अंगावर आहे असा;सज्ज; सजलेला. ३ युक्त; सहित. ४ जवळचा; निकटवर्ती.

सनम्र वि० मागें ' नम्र ' पहा.

सनय, सनयी स्त्री० मागें ' सनई ' पहा.

सनला मागें ' संधला, ' ' संदला ' पहा.

सनवद् बाकी, सनवाद् बाकी, सनवातबाकी[अ०सन् ए०व०(वर्ष); सन्वात् अ० व० (वर्षें)+बाकी (उरलेलें)] **स्त्री०** अनेक वर्षें थकलेला वसूल किं० सारा.

सनवात(–द्–)पडीत, सनवद्पडीत [अ० सन्वात् (वर्षें) **+म०** पडीत (रद्द पडलेली)] **वि०** अनेक वर्षें लागवडींत नसलेली (जमीन).

सनाटा पु० १ झपाटा. २ तडाखा. ३ जोर. **वि०** १ जोरदार. २ आकारानें मोठा. ३ खूप, विपुल (लाभ, पीक, वारा, पाऊस, इ०).

सनाटून क्रि० वि० जोरानें; आवेशानें; विपुलपणें.

सनातन [**सं०**] **वि०** १ शाश्वत; अनादिसिद्ध. २ नेहेमींचा; चिरकाल टिकणारा. ३ निश्चल; अढळ. **पु०** १ ब्रह्मदेव.२ विष्णु. ३ शंकर. ४ पितरांचा अतिथि. ५ ब्रह्मदेवाचा पुत्रविशेष.

सनाथ [**सं०**] **वि०** १ ज्याला रक्षण करणारा आहे असा. २ सहित; युक्त. **सनाथा स्त्री०** सुवासिनी स्त्री.

सनाद [**सं०**] **वि०**१ ध्वनियुक्त. २ ज्याला खणखणीत आवाज आहे असा (रुपाया, भांडें, घंटा, इ०).

सनाभ [**सं०**] **वि०** १ मध्यें मूळ ग्रंथ आणि बाजूस टीका आहे असा (ग्रंथ). २सख्खा (भाऊ).

सनाभि [**सं०**] **वि०** १ नात्याचा. २ सारखा. ३ प्रेमळ. **पु०** १ सख्खा भाऊ. २सपिंड.

संनाह[**सं०**] **पु०** १ कवच घालणें. २युद्धास हत्यारांनीं सज्ज होणें. ३ कवच.

संनिकर्ष [**सं०**] **पु०** १ जवळ आणणें. २

सांनिध्य; शेजार. ३ निकट संबंध. **टीप**,–ह्या तीन्ही अर्थीं 'विप्रकर्ष'हा उलट अर्थाचा शब्द आहे.

संनिकर्षण [**सं०**] **न०** वर 'संनिकर्ष'पहा.

संनिकृष्ट [**सं०**] **वि०** जवळचें; शेजारचें 'विप्रकृष्ट' म्ह० दूरचें; अंतरावरचें. **न०** सांनिध्य; शेजार; जवळपणा.

सांनिध [**सं०**] **वि०** जवळचें; शेजारचें. **क्रि० वि०** (**मराठींत**) शेजारीं.

संनिधान [**सं०**] **न०** १ सांनिध्य.२शेजारीं ठेवणें ही क्रिया; जवळ असणें. ३ एकीकरण; मिश्रण. ४ ठेव. ५ आश्रय.

संनिधि [**सं०**] **पु०** १ ठेवणें;शेजारीं ठेवणें. २ सांनिध्य; शेजार. ३ समक्षता. ४ ठेव. ५ आश्रय.

संनिपात [**सं०**] **पु०** १ खालीं येणें किं० पडणें. २ जवळ येणें.३ सांनिध्य; जवळ असणें.४ भेट;गांठ; संगम.५ संयोग.६मिश्रण.७भिडणें;टक्कर. ८ युद्ध. ९ समुदाय. १० मैथुन. ११ (**वैद्यक**) तीन्ही दोषांचा एकदम प्रकोप किं० क्षय. १२ (**व्याकरण**) संबंध. १३ (**संगीत**) तालविशेष. १४ नाश. १५ मोह.

संनिबद्ध [**सं०**] **वि०** जोडलेलें; संबंध असलेलें.

संनिभ [**सं०**] **वि०** (समासान्तीं)सारखें: उ० मेघसंनिभ म्ह० मेघासारखें.

संनियोग [**सं०**] **पु०** १ मिलाफ; संयोग.२ नेमणूक.

संनिविष्ट [**सं०**] **वि०** १ गोळा केलेलें. २ स्थळविशेषीं राहणारा किं० राहिलेला. ३ जवळचा. ४ कांहीं कामांत किं० विचारांत गढून गेलेला. ५ कांहीं विद्येत किं० कलेंत पटाईत किं० अभ्यस्त किं० परिचित.

संनिवेश [**सं०**] **पु०** १ एकाग्रता; एकाग्रतेनें कांहीं विषयाचें मनन किं० चिंतन किं० अध्ययन. २ समुदाय; जमाव. ३ जुळणी; रचना; संयोग. ४ स्थान; राहाण्याची जागा.५ सांनिध्य. ६ बसविणें; स्थापिणें; ठेवणें. ७ सैन्य इ० चा तळ किं० छावणी; मुक्काम किं० मुक्कामाची जागा. ८ समावेश करणें. ९ नगराबाहेरचें मैदान किं० पटांगण. १० झोपडी.

संनिहित [**सं०**] **वि०** १ जवळचें. २ ठेविलेलें. ३ हजर; उपस्थित. ꣸ **संनिहितापाय वि०** क्षणभंगुर; नाशवंत.

सन्मान, सन्मानणें, सन्मानित इ० पुढें 'संमान,' 'संमानणें,' 'संमानित' इ० पहा.

सन्मार्ग [**सं०**] **पु०** १ चांगला मार्ग; चांगली वाट. २ चांगली वर्तनाची किं० आचरणाची सरणी.

सन्मुख पुढें 'संमुख' पहा.

संन्यसन [**सं०**] **न०** १ टाकणें; सोडणें. २ स्वाधीन करणें.

संन्यस्त [**सं०**] **वि०** १ त्यागिलेला; वर्जिलेला. २ ठेविलेला. ३ अर्पिलेला.

संन्यास [**सं०**] **पु०** १ सोडून देणें; त्याग. २ प्रपंचाचा आणि वैभवाचा पूर्ण त्याग करून ब्रह्माच्या चिंतनांत मग्न होणें. ३ काम्य कर्माचा त्याग.४चवथा आश्रम. मागें'आश्रम' पहा. ५ठेव.

संन्यासणें [**म०** संन्यास] **स० क्रि०** १ सोडून देणें; अजीबात टाकून देणें. २ (प्रपंचाचा) त्याग करणें.

संन्यासी [**सं०** संन्यासिन्] **पु०** १ त्याग करणारा. २ चतुर्थाश्रमांत गेलेला.मागें 'आश्रम' पहा.

संप पु० १ जूट; एकी. २ आपलीं गाऱ्हाणीं वरिष्ठाकडून दूर करवून घेण्यासाठीं अर्ज,विनंत्या, प्रार्थना, मध्यस्थ्या, इ० मार्ग निष्फळ झाल्यावर संस्था, कारखाना, इ० तील कामकरी काम बंद पाडण्यासाठीं करतात ती जूट(करणें,मिटणें,इ०).

सपक वि० नीरस; बेचव; पाणचट.

सपखल, सपकल, सबखल मागें 'चबकल' पहा.

संपच्छनवार, संपत्‌शनवार [**म०** श्रावण+ शनिवार] **पु०** श्रावण महिन्यांतील शनिवार.

संपच्छुक्रवार, संपत्‌शुक्रवार [**म०**श्रावण+ शुक्रवार] **पु०** श्रावण महिन्यांतील शुक्रवार.

सपटोळी, सापटोळी स्त्री० एक विषारी सर्पाची जात.

संपणें [**सं०** सम्+आप्] **अ० क्रि०** १ समाप्त होणें. २ खलास होणें; शिलक न राहाणें. ३ पूर्ण होणें. ४ शेवटास जाणें. ५ मरणें.

संपत्ति [**सं०**] **स्त्री०** १ द्रव्य. २ भरभराट;

उत्कर्ष; वैभव. ३ वैपुल्य; रेलचेल. ४ प्राप्ति; सिद्धि. ५ योग्य स्थिति. ☸ **शरीरसंपत्ति स्त्री०** कोणकाची निकोप प्रकृति किं० आरोग्य. **संपत्तिमान वि०** श्रीमंत. **इष्टफलसंपत्ति वि०** जें इच्छिलें तें मिळणें.

सपत्न [**सं०**] **पु०** वैरी; शत्रु.

सपत्नी[**सं०**]**स्त्री०** आपल्या नवऱ्याची दुसरी बायको; सवत. ☸ **सपत्नीक वि०** भार्येसहित.

संपद् [**सं०**]**स्त्री०** १ संपत्ति; द्रव्य.२ वैपुल्य; समृद्धि. ३ वैभव; उत्कर्ष; भरभराट. ४ सिद्धि.

संपन्न [**सं०**] **वि०** १ श्रीमंत; संपत्तिमान्. २ समृद्ध, ३ वैभवशाली. ४ युक्त; सहित; उ० एकेकाळीं हिंदुस्थान धनधान्यसंपन्न होता; उ० वेदशास्त्रसंपन्न. ५ निष्णात.

संपत् शनवार, संपत् शुक्रवार वर ' संपच्छनवार, ' ' संपच्छुक्रवार ' पहा.

संपदा [सं० संपद्] **स्त्री०** वर ' संपद् 'पहा.

सपरिवार [**सं०**] **वि०** परिवारासह; इष्टमित्र, आश्रित, नोकरचाकर, यांचेसहित.

संपर्क [**सं०**] **पु०** १ मिश्रण. २ संयोग; संगम. ३ स्पर्श. ४ सहवास. ५ मैथुन. ६ स्पर्शानें होणारा विटाळ. ☸ **ह्या मसलतीचा त्याला संपर्क नाहीं** त्याला ही मसलत मुळीच ठाऊक नाहीं. **मला विडीचा संपर्क नाहीं** मी विडी मुळींच ओढीत नाहीं.

संपविणें [**म०** ' संपणें ' चें प्रयोजक] **सं० क्रि०** समाप्त करणें; शेवटास नेणें; बंद करणें; खलास करणें.

सपशेल (**–लां**), **सपशैल**(**–लां**) **क्रि० वि०** १ प्रशस्तपणें; ऐसपैस; अवळपघळ रीतीनें (बसणें, हात पाय ताणून निजणें, इ०). २ अस्ताव्यस्तपणें (ढीग, रास, घर, इ० ढासळणें किं० कोसळून पडणें). ३ धडधडीत; संशय न राहील अशा प्रकारें; संकोच न बाळगतां (खोटें बोलणें, शिव्या देणें).

सपसप, सपसपां क्रि० वि० १ घाईघाईनें; झपाट्यानें. २ संकोच न बाळगतां; बेधडक; उ० लोकांच्या घरांत स्वयंपाकघरापर्यंत तूं सपसप जातोस हें वाईट आहे. ३ मर्यादा सोडून, आपला दर्जा मनांत न घेतां (बोलणें).

सपसला(**–लां**), **सपसेल**(**–लां**), **सपसैल** (**–लां**) वर ' सपशेल ' पहा.

सपक्ष [**सं०**] **वि०** १ एका पक्षाचें. २ सदृश. **पु०** १ कैवारी; अनुयायी. २ भाऊबंद. ३ (**न्याय**) ज्यांत साध्य निश्चयानें असतें असें उदाहरण. मागें ' विपक्ष ' मध्यें ' साध्य, ' ' पक्ष, ' ' सपक्ष, ' ' विपक्ष ' हे शब्द पहा.

सपाट वि० १ समतल; उखीर वाखीर नाहीं किं० उंचसखल नाहीं असा (पृष्ठभाग). २ (**मराठींत**) पाटानें युक्त, जीवर पाट आहे अशी (जमीन); उ० पाट कशाला आणतां? ही जमीन सपाटच आहे. ३ जिचेवर कांहीं इमारत किं० बांधकाम किं० रचना नाहीं किं० उरली नाहीं अशी (जमीन); ४विध्वस्त. ५ विसरलेली (विद्या,ज्ञान, इ०);उ० पुढें पाठ मागें सपाट. ☸ **सपाट सुपली स्त्री०** चपटें नाक किं० चपट्या नाकाचा माणूस.

सपाटणें, सपाटा मागें 'झपाटणें,' 'झपाटा' [पहा.

सपाटी [**म०** सपाट] **स्त्री०** १ सपाट प्रदेश. २ सपाटपणा.

संपात [**सं०**] **पु०** १ उतरणें; उडी. २ संयोग; भिडणें. ३ टक्कर; धडक. ४ पक्ष्याची एक गतिविशेष. ५ तडाका; प्रहार; रट्टा. ६ गर्दी; दाटी. ७ प्रादुर्भाव; दृष्टोत्पत्तीस येणें. ८ पतन; पडणें. ९ दोन नद्यांचा संगम. १० (**ज्योतिष**) दोन रेषांचा छेदबिंदु. ११ दोन वर्तुळांचे जे दोन छेदबिंदु ते प्रत्येक. १२ (**ज्योतिष**) क्रांतिवृत्त आणि विषुववृत्त हीं दोन वर्तुळें ज्या बिंदूंत परस्परांस छेदितात ते बिंदु प्रत्येक. मागें ' याम्य ' मध्यें ' संपात, ' ' संपातरेषा ' पहा.

संपादक [**सं०**] **पु०** १ मिळविणारा; साधणारा. २ जुळणी करणारा. ३ संशोधक. ४ वर्तमानपत्र किं०मासिक इ० चालविणारा. ५दुसऱ्याचा लेख तपासणारा किं० तपासून छापणारा.

संपादकीय वि०संपादकानें लिहिलेला (लेख), केलेला (फेरफार), दाखविलेली (अक्कल).

संपादणी, संपादणूक [**म०** संपादणें] **स्त्री०** १ प्राप्ति; मिळविणें; इच्छिलेली वस्तु मिळविणें किं० साध्य करून घेणें. २ अंगीकारलेल्या भूमिकेला साजेल असें भाषण, वर्तन, पोशाख, हाव-

भाव,इ० करणें. ३ खोटा पक्ष खरासा भासविणें. ४ गोष्ट, हकीगत, कथा, इ० हावभाव, भाषण-शैली, दाखले, इ० च्या योगानें मनोहर करून श्रोत्यांच्या मनांत ठसविणें. ५ काम यथायोग्य प्रकारें शेवटास नेणें.

संपादणें [**सं०** सम्+पद्, पाद्] **स० क्रि०** १ मिळविणें; साध्य करून घेणें. २ (कांहीं कार्य) शेवटास नेणें; (कांहीं हेतु, उद्देश, बेत) सफळ करून घेणें. ३ (अंगीकृत पक्ष) खरासा भासविणें. ४ (अंगीकृत भूमिका) हावभाव इ० नीं उत्तम रीतीनें वठविणें. ५ (दुसऱ्याचा ग्रंथ, लेख, इ०) तपासणें किं० सुधारणें किं० नीटनेटक्या रूपांत घालणें.

संपादन [**सं०**] **न०** १ मिळविणें. २ साध्य करणें. ३ शुद्ध करणें; तपासणें.

संपादित [**म०** संपादणें] **वि०** १ मिळविलेला; साध्य केलेला. २ वठविलेली(भूमिका). ३ खरासा भासविलेला (पक्ष). ४ मनोरंजक किं० चित्ताकर्षक केलेली (हकीगत, कथा, वृत्तान्त, इ०).५ शेवटास नेलेलें (काम); सफळ केलेला (बेत, उद्देश).

सपासप क्रि० वि० १ जोरानें, आवेशानें. २ एका मागून दुसरा अशा क्रमानें,त्वरेनें,आणि न थांबतां.

सपिठी स्त्री०, सपीठ न० गव्हाचें अत्यंत बारीक पीठ; गहूं ओलवून, दळून, आणि चाळून बारीक केलेलें पीठ.

सपिंड [**सं०**] **पु०** सात पिढ्यांपर्यंतचा भाऊबंद; मूळ पुरुषापासून सात पिढ्यांपर्यंत जी संतति तिच्यांतील जे लोक ते परस्परांचे; एका कुटुंबांतील पिंडाला पात्र असा जो कोणी तो. ꕥ **सपिंडी स्त्री०** मृत मनुष्याचें बहुधा बाराव्या दिवशीं जें त्याच्यप्रीत्यर्थ पारलौकिक कर्म करतात तें. ह्यालाच ' सपिंडीकरण, ' ' सपिंडीश्राद्ध ' **न०** म्हणतात.

सपीठ न० वर ' सपिटी ' पहा.

सपीति, संपीति [**सं०**] **स्त्री०**सहपान.

सपील [**म०** सर्व+पिणें] **वि०** आपल्या मातेचें सर्व दूध प्यावयास सोडलेलें (गाय,म्हैस, इ० चें वासरूं). **क्रि० वि०** मातेचें सर्व दूध प्यावयास (वासरूं सोडणें); मातेचें दूध पूर्णपणें (वासरानें पिणें). वासरूं सपील सोडणें, वासरानें सपील पिणें, असे प्रयोग होतात.

संपुट [**सं०**] **पु०** १ पेटी, बारदान, इ० चें पूड किं० कप्पा. २ द्रोण.३अंतर्गोल किं० आंतून पोकळ अशा दोन अर्धुकांच्या रूपाचें बारदान, डबा, इ०. ४ उताण्या तळहातावर पालथा तळहात ठेवून मध्यें झालेली पोकळी. ५ करंडा; संबळी; संपुष्ट. ꕥ **संपुटीकरण** अंतर्गोल किं० आंतून पोकळ अशा दोन पदार्थांच्या पोकळींत कांहीं पदार्थ पकडणें किं० धरून ठेवणें.

सपुट वि० १ जिवंत (लीख),–केशांतील कीटविशेष. ह्याच्या उलट ' पोली. ' २ दाण्यांनीं भरलेली (शेंग). मागें ' पोल, ' ' पोला, ' ' पोली ' पहा.

सपुरता [**म०** पुरता] **वि०** पूर्ण; पुरता; ज्या कामाला पदार्थविशेष जितका पाहिजे तितका; भरपूर; अघळपघळ.

संपुष्ट [**सं०** संपुट] **पु०** १ पेटी. २ डबा. ३ देवांच्या पूजेच्या उपकरणांतील एक आकारविशेषाचें लहान पात्र. **टीप**,–संपुष्ट हें पूजेंतील पात्र लहान असल्या कारणानें त्यांत घातलेला किं० असलेला पदार्थ अर्थात् थोडाच असावयाचा. यावरून ' संपुष्टांत येणें ' याचे पुढील तीन अर्थ झाले आहेत. १ आकारमानानें, संख्येनें, विस्तारानें, किं० महत्वानें कमी होणें. २ आटोक्यांत येणें. ३ कवज्यांत येणें किं०तावडींत सांपडणें. ' गोकर्णांत येणें, ' ' गोकुळांत येणें ' हेही ह्या तीन्ही अर्थांचेच वाक्प्रचार आहेत. मागें ' गोकर्ण, ' ' गोकुल ' हे शब्द पहा.

सपूत [**सं०** सुपुत्र] **पु०** आज्ञाधारक आणि कर्तव्यतत्पर पुत्र किं० मुलगा.

संपूर्ण [**सं०**] **वि०** १ सर्व; समग्र; बिनबाकी. २ अखण्ड. ३ शेवटास गेलेला; अर्धवट न राहिलेला. **न०** व्रत, पारायण, इ० विधि संपल्यावर उद्यापन, ब्राह्मणभोजन, इ० रूप कर्म करतात तें. ह्या अर्थीं ' संप्रण ' हा बायकी अपभ्रंश. ꕥ **संपूर्णता स्त्री०** १ समाप्ति; शेवट. २ व्रत, नेम, इ० ची सांगतासिद्धि किं० यथासांग समाप्ति. **संपूर्ण कलावंतीची खाण स्त्री०** हर-

हुन्नरी माणूस. हाव्या त्या कामांत घालतां किं० योजतां येईल असा माणूस.

सपेल, सपेली, सफील, सफेल, सफेली [अ० फसील] **स्त्री०** १ किल्ल्याच्या तटबंदीच्या आंतील ओटा किं० गच्ची. २ विहिरीच्या सभोंवारची फरशी. ३ घराच्या माथ्यावरची गच्ची किं० फरशी.

सपोट, सपोटी [म० स (सह) + पोट] **क्रि० वि०** नोकराच्या पोटाला लागणारा खर्च समाविष्ट करून (नोकराचा पगार ठरविणें). **वि०** यजमानानें नोकराला जेवूं घालून शिवाय पैशाच्या रूपानें पगार द्यावा अशा शर्तीवर ठरविलेली (नोकरी).

सपोत [म० स+पोत] **वि०** उत्तम किं० नाजूक पोताचें (वस्त्र). मागें 'पोत' [हिं०]पहा.

सपोळा पु० कागदाचा आकाशांत उडवावयाचा एक प्रकारचा पतंग.

सप्त [सं० सप्तन्] **वि०** चारांत तीन मिळवून होणाऱ्या संख्येइतका; सात. ꣸ **सप्तांशु, सप्तार्चिस्, सप्तरुचि पु०** अग्नि. **सप्ताश्व पु०**सूर्य. **सप्तोपचार पु०** पाचन, रेचन, क्लेदन, शमन, मोहन, स्तंभन, आणि वर्द्धन, हे वैद्यांच्या उपचारांचे सात प्रकार. **सप्ताह पु०** आठवडा. **सप्ताह, सप्ताहा पु०** सात दिवस चालविलेलें पुराण, प्रवचन, इ०. **सप्तऋषि, सप्तर्षि पु० अ० व०** १ मरीचि, अत्रि, अंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु, आणि वसिष्ठ, हे सात ऋषि. २ ह्या नांवाचे उत्तर ध्रुवाजवळचे सात तारे. **सप्तशैल, सप्तकुलाचल, सप्तपर्वत पु०** महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, गंधमादन, विंध्य, आणि पारियात्र, हे सात पर्वत. **सप्तगोदावरीतीर पु०** गोदावरीच्या नदीच्या सात शाखांनीं सुपीक प्रदेश. **सप्तग्रही स्त्री०** सात ग्रह एका विशिष्ट समयीं एका राशींत येणें. **सप्तचैतन्यें न० अ० व०** एक मुख्य शाश्वत चैतन्य आणि ब्रह्म, ईश, जीव, प्रमाण, प्रमातृ आणि प्रमेय, हीं सहा मायिक चैतन्यें मिळून एकंदर सात चैतन्यें. **सप्तच्छद, सप्तपर्ण पु०**सातवीण हा वृक्ष. **सप्तदश वि०**सतरा. **सप्तजिह्व, सप्तज्वाल पु०** अग्नि. **सप्ततंतु पु०** यज्ञ. **सप्तद्वीपा स्त्री०** पृथ्वी.–जीवर जंबु, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक, आणि पुष्कर, अशीं सात द्वीपें आहेत. **सप्तधातु पु० अ० व०** रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, आणि वीर्य, हे शरीरांतील सात पदार्थ. **सप्तपदार्थ पु०** पदार्थांचे वैशेषिक मताप्रमाणें जे सात वर्ग ते. मागें ' पदार्थ ' पहा. **सप्तपदी स्त्री०** लग्नाच्या विधींत वधूवरांनीं तांदुळाच्या राशीवरून सात पावलें बरोबर चालणें. ह्याच अर्थी 'सप्तपदीक्रमण' **न०. सप्त प्रकृति स्त्री०** राजा, अमात्य, दोस्त, देश, दुर्ग, सैन्य, आणि खजिना, ही राज्याचीं सात अंगें. **सप्तमृत्तिका स्त्री० अ० व०** घोडे बांधतात तेथील, हत्ती बांधतात तेथील, चवाठ्यावरील, वारुळाची, इ० ठिकाणच्या मृत्तिका.–ज्या कांहीं विशिष्ट धर्मकृत्यांत लागतात त्या. **सप्तकोण, सप्तास्र पु०** सात समान कोण किं० बाजू जिला आहेत अशी आकृति. **सप्तस्कंद पु०** आवह, प्रवह, उद्वह, संवह, वैवह, पष्ठापरा, आणि परिवाह, हे जे वायूचे सात प्रदेश ते. **सप्तपाताल न०** अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, आणि पाताल, हे सात लोक. **सप्तमातृका स्त्री० अ० व०** ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, आणि चामुंडा, ह्या सात देवता. **सप्तराशिक न०** सात राशींचें गणितकृत्यविशेष. मागें ' पंच ' मध्यें ' सप्तराशिक ' पहा. **सप्तलोक पु० अ० व०** भूर्, भुवर्, स्वर्, महर्, जनर्, तपर्, आणि सत्य किं० ब्रह्मन्, हे सात लोक. **सप्तशती स्त्री०** १ सातशें ही संख्या. २ सातशें श्लोक समुच्चयानें. ३ सातशें श्लोकांचा ग्रंथ. **सप्त समुद्र पु०** क्षार, क्षीर, दधि, घृत, इक्षुरस, मध, आणि स्वादुजल, यांचे सागर प्रत्येक. **सप्तसप्ति** [सं० सप्तत्+सप्ति (घोडा)] **पु०** सूर्य.– ज्याच्या रथाला सात घोडे आहेत. **सप्तस्वर पु० (संगीत)** सा, री, ग, म, प, ध, आणि नी, हे गाण्यांतील सात स्वर.

सप्तक [सं०] **न०** सात एकजातीय पदार्थांचा समुच्चय.

सप्तति [सं०] **स्त्री०** सत्तर ही संख्या.

सप्पा, सफ्फा पु० १ रट्टा; प्रहार. २ पूर्ण नाश किं० विध्वंस.

संप्रचीत, सप्रचीत [सं० स+प्रतीति] **वि०** अनुभवानें कळलेलें किं० प्राप्त झालेलें (ज्ञान).

संप्रति [**सं०**] **क्रि० वि०** आतां; हल्लीं.

सप्रतिबंधदाय[**सं०**]**पु०** कांहीं शर्तींवर कोणे-काला मिळावयाचा वडिलोपार्जित संपत्तीचा भाग; उ० चुलता निपुत्रिक मेला तर मिळतो तो त्याचा भाग हा सप्रतिबंधदाय.

संप्रदान [**सं०**] **न०** १ देणें. २ प्रीतिपूर्वक जें दान तें; आहेर इ०. ३ (**व्याकरण**) चतुर्थीचा अर्थ; उ० त्यानें ब्राह्मणाला गाय दिली.

संप्रदाय [**सं०**] **पु०** १ गुरुपरंपरागत उपदेश. २ चाल; रीति. ३ धर्माचा एक भेद किं० विशिष्ट प्रकार; पंथ. ४ (**व्याकरण**) भाषेची रूढीनें ठरलेली सरणी; उ० तोंड काळें करणें, डोळ्यांत तेल घालून, इ० रूप. ❀ **संप्रदायशुद्ध वि०** भाषेंतलि किं० समाजांतील किं० धर्मपंथांतील रूढ जी चाल किं० रीति तिला अनुसरून असलेलें.

सप्रयोजन [**सं०**] **वि०** १ ज्याची जरूरी आहे असें. २ ज्यांत कांहीं उद्देश किं० हेतु आहे असें.

सप्रवर, संप्रवर [**सं०**] **वि०** ज्या कुटुंबांचा मूळ पुरुष एकच आहे अशीं कुटुंबें (लग्नाची योजना करतांना).

संप्रसारण [**सं०**] **न०** (**संस्कृत व्याकरण**) य्, र्, ल्, आणि व्, ह्यांचे बद्दल इ, ऋ, ऌ, आणि उ येणें हा बदल.

संप्राप्त [**सं०**] **वि०** १ ओघानें किं० क्रमानें आलेलें. २ आलेला; उपस्थित झालेला. ३ भोगास आलेला. ४ पूर्ण किं० समाप्त केलेला किं० झालेला.

संप्राप्ति [**सं०**] **स्त्री०** १ पूर्णता. २ सिद्धीस जाणें. ३ उपस्थित होणें; येणें; घडणें. ४ भोगास येणें.

सप्रेम [**सं०**] **वि०** १प्रेमळ; प्रेमयुक्त; प्रेमानें परिप्लुत. २ प्रेम व्यक्त करणारें.

सफ [**अ०**] **पु०** १ एका मागून एक अशा अखंड क्रमानें मरणें किं० मारणें. २ पूर्ण संहार किं० विध्वंस; सत्यानाश.

सफई स्त्री० खालीं ' सफाई ' पहा.

सफर [**अ०**] **न०** मुसलमानांच्या वर्षांतील दुसरा महिना.

सफर [**अ०**] **स्त्री०** १ प्रवास. २ कोणेका ठिकाणीं जाणें किं० जाऊन येणें. ३ जलमार्गानें केलेला प्रवास. ४ जलमार्गानें केलेल्या फेरीबद्दल गलबताच्या मालकास किं० खलाशास दिलेलें भाडें. ❀ **सफरनामा पु०** प्रवासांत घडलेल्या किं० पाहिलेल्या वरतूंचें वर्णन. **सफर साधणें** ज्या कामासाठीं फेरी केली किं० खेप घातली तें काम साध्य होणें किं०सफल होणें. **सफरी पु०** १खलाशी, नाखवा. २ जलमार्गानें प्रवास ज्याणें केला आहे असा किं० जलप्रवासास निघालेला. ३ दर्यावर्दी.

सफल [**सं०**] **वि०** १ ज्याला फळें आलीं आहेत किं० येत आहेत असें (झाड). २ फळें देणारें (झाड). ३ यशस्वी किं० पूर्ण झालेला किं० साध्य झालेला (प्रयत्न, मनोरथ, हेतु, उद्देश, इच्छा, धंदा, इ०); फायदेशीर.

सफाई [**अ०** साफ्; सफा] **स्त्री०** १ (पाणी इ० ची) शुद्धता किं० स्वच्छता. २ कारागिरीच्या पदार्थाचा नीटनेटकेपणा किं० सुबकपणा. ३ गुळगुळीतपणा. ४ तीच गोष्ट सतत करीत असल्याकारणानें साधते ती हातोटी किं० येतो तो सहजपणा; अभ्यासानें किं० परिचयानें कामांत येणारी जलदी किं० चपळाई. ५ चकचकीतपणा; तकाकी. ६ न आडखळतां सारख्या वेगानें बोलणें, लिहिणें, इ० कामांतील कौशल्य. ७ वैमनस्यानंतर पुन्हां झालेली मैत्री; दिलजमाई. ८ हिशेबांतील गुंतागुंतीच्या बाबींचा निकाल. **क्रि० वि०** अगदीं; पूर्णपणें; सर्वथैव (बुडणें, जळणें, नष्ट होणें). ❀ **सफाईदार वि०** गुळगुळीत; चकचकीत; झोकदार; इ०. **सफागिरी, सफाईदारी स्त्री०** चकाकी; तकाकी; गुळगुळीतपणा; इ०. वर ' सफाई ' चे सर्व अर्थ पहा.

सफाशी [**म०** स+फासा] **वि०** फासा, अडकण, किं० कोयंडा ज्याला आहे असा (दागिना, मोहोर, पुतळी, किं० कोणताही पदार्थ) .

सफील, सफेला मागें ' सपेली ' पहा.

सफेजंग, सफेजंगी [**अ०**सफ्फ् (शिपायांची रांग)+जंग् (लढाई)] **स्त्री०** १ घनघोर लढाई; तुमुल युद्ध. २ युद्ध, दरोडा, टोळधाड, इ० मुळें देश, गांव, इ० ची नासाडी, विध्वंस, किं०खराबी. ३ सामग्री, बेगमी, पैसा, इ० अगदीं संपून जाणें किं० त्यांची निःशेषता.

सफेत, सफेद [फा०] वि० पांढरा. ॐ **पांढरा सफेत** (-द) वि० अगदीं पांढरा. **सफेत (-द-) मुसळी** स्त्री० मुसळी नांवाच्या वनस्पतीची पांढरी जात. मागें ' मुसळ ' मध्यें ' मुसळी ' पहा.

सफेता पु० १ खडीसारखा पांढरा रंग. २ (**लाक्षणिक**) कांहीं वाईट कर्माला दिलेलें चांगलेपणाचें रूप. **सफेती** स्त्री० १ पांढरेपणा. २ भिंत इ० ना दिलेला पांढरा रंग. ३ (**लाक्षणिक**) वाईट कृत्याला दिलेलें चांगलेपणाचें रूप.

सफेली मागें ' सपेल, "सफील'पहा.

सफोल [स०स+फोल]वि०व्यर्थ; निष्फल.

सफ्फर, सफ्फरी मागें 'सफर,"सफरी' पहा.

सबकल, सबखल मागें ' चबकल ' पहा.

सबजा [फा०] पु० तुळशीच्या जातीची एक सुगंधी वनस्पति.

सबजी [फा०] स्त्री० १ हिरवेपणा; हिरवळ. २ टवटवी. ३ पालेभाजी. ४ भांगेचें पेय. ५ भांग.

सबतुटी [हिं० सब् (सर्व)+तुट्ना (तुटणें)] स्त्री० सर्व सोंगट्या मरून शिल्लक राहिलेली सोंगटी (नरद). मागें ' नरद ' पहा. ॐ **सबतुटी आणि भलताच कुटी** ज्याला कोणी वाली राहिलेला नाहीं त्याला हावा तो छळतो.

सबंद, सबंध [सं० स+बंध] वि० १ सर्व; दरोबस्त.२ एकत्रित; संघटित. ३अखंड; न फोडलेला; न कापलेला; न तोडलेला; अभग्न. ॐ **सबंधवहीत** वि० सर्व भागीं लागवडींत असलेली किं० आणलेली (जमीन).

संबद्ध [सं०] वि० जोडलेला; बांधलेला; जुळलेला.

संबंध [सं०] पु० १ संयोग; जोडणें. २ संसर्ग; स्पर्श. ३ नातें. ४ विवाहविधीनें झालेला किं० होणारा संयोग. ह्यालाच ' शरीरसंबंध ' म्हणतात. ५ स्नेह; दोस्ती. ६ कांहीं कार्यांत कोणेकाचें जें अंग तें. ७ गुंतलेपणाची स्थिति. ८ नातलग. ९ (**व्याकरण**) षष्ठीचा अर्थ. १० योग्यपणा; उचितता; अनुरूपता. ११ मृत ब्राह्मणाचें भूत किं० पिशाच. ह्या अर्थी ' समंध ' अधिक रूढ आहे. ॐ **संबंधी** पु० नातलग; सोयरा. **संबंधीक** वि० १ संबंधाचा. २ उग्र किं० तामसी स्वभावाचा; तामसी. ३ समंधाचा (उपद्रव, पीडा, बाधा).

सबनिशी खालीं ' सबनीस ' मध्यें पहा.

सबनीस [फा० सूबाह् नवीस] पु० दरकदाराचा कारकून,-शिबंदी, कामगार, इ० चे पगार आदा करणारा. ॐ **सबनिशी** स्त्री० सबनिसाचा हुद्दा, दर्जा, अधिकार, किं० वेतन.

सबब [अ०] स्त्री० १ कारण; निमित्त. २ खोटें कारण किं० निमित्त; बहाणा. **उभयान्वयी** अ० या कारणास्तव; म्हणून.

सबर वि० गरोदर (घोडी, गाढवी, किं० खेचरी).

सबर, सबुर [अ० सब्र्] स्त्री० धीर(करणें); थांबणूक; वाट पाहाणें. ॐ **सबुरी** स्त्री० दम धरणें; वाट पाहाणें; धीर धरणें; उतावळी न करणें; तहकुबी; शांतपणा.

सबल, सबळ [सं० सबल] वि० १ बळकट; भक्कम. २ यथार्थ (कारण, सबब).

सबसणीस क्रि० वि० धक्का लागला असतां किं० हालविण्याचा प्रयत्न केला असतां न हालणारा म्ह० पक्का बसविलेला किं० पुरलेला (खांब, धोंडा, इ०).

सबसब (-बां), सपसप (-पां) क्रि० वि० संकोच न बाळगतां किं० वारंवार किं० दुसऱ्याला उपद्रव होईल अशा प्रकारें (स्थळविशेषीं येणें, जाणें).

संबळ,सबळ पु० स्त्री० एक प्रकारची पहार.

संबळ पु० गोंधळी, वाजंत्री, इ० चें एक चर्मवाद्यविशेष. ॐ **संबळ्या** पु० संबळ वाजविणारा.

संबळी स्त्री० देवपूजेचीं उपकरणीं ठेवण्याची बांबू , वेत, गवत, इ० ची लहानशी पेटी.

सबा, सब्बा [अ० सब्अ] वि० सात; (मुसलमानी वर्षांत).

सबाध [सं० स+बाधा] वि०१ बाधायुक्त; उपद्रव पावलेला. २ दोषयुक्त, चुकीचा, अपवाद ज्याला आहे असा (मुद्दा, वाद, मत, इ०).

सबाह्य [सं०] वि० १बाहेरच्या बाजूसहित.२ आंतल्या आणि बाहेरच्या बाजूंसहित.ॐ**सबाह्या-**

भ्यंतर क्रि० वि० १ आंतून आणि बाहेरून; पूर्णत्वानें (पवित्र, शुचि). २ मनानें आणि कृतीनें(प्रार्थना किं०विनंती करणें).न०ए०व०मन आणि आचरण ही जोडी किं० ह्यांची एकवाक्यता; उ० ह्या गृहस्थाच्या सबाह्याभ्यंतराबद्दल मी खात्री देतों.

संबुद्ध [सं०] पु० बुद्धावतार.

संबुद्धि [सं०] स्त्री० १ ज्ञान; पूर्ण जाणीव. २ कोणेकाला हाक मारणें. ३ (व्याकरण) संबोधनाचें एकवचन.

सबुरी, सबूर, सबोरी, सबुराई [अ० सब्र्] स्त्री० धीर (करणें); थांबणूक;सावकाशी; तहकुबी; घाई न करणें; उ० ह्या लग्नसराईंत लुगडें घेऊं नका, महाग पडेल, दोन महिने सबुरी करा. ॐ **सबुऱ्या वि०** शांत; दम किं० धीर धरण्याच्या स्वभावाचा. **सबूर उ० वा० अ०**थांबा ! घाई करूं नका !

सबैन, सब्बैन [अ० सब्ईन्] वि० सत्तर (अरबी सालांत).

संबोखणें [म० संबोधणें] स० क्रि० (कोणेकाला) हाक मारणें किं० बोलविणें.

संबोध [सं०] पु० १ ज्ञान. २ उपदेश;बोध.

संबोधणें [सं० सम् + बुध्] स० क्रि० (कोणेकाला) हाक मारणें; (कोणेकाला) उद्देशून बोलणें.

संबोधन [सं०] न० १ उपदेश किं० बोध करणें. २ हाक मारणें. ३ (व्याकरण) हाक मारण्याची विभक्ति. ४ हाक मारतांना योजलेलें नांव. ५ (मराठींत) कोणेकाच्या वर्णनाचे म्ह० स्तुतीचे किं० निंदेचे शब्द; कोणेकाची स्तुति; कोणेकाची निंदा; उ० तो सुज्ञ आहे, तो तो धीट आहे, तो थोर आहे, हीं इतकीं संबोधनें त्याला कशाला देतां ? तो कसा आहे, हें मला पूर्णपणें ठाऊक आहे; उ० तो लुच्चा आहे, व्यभिचारी आहे, अशीं लोक त्याला संबोधनें देतात, त्याच्याशीं तुम्ही स्नेह ठेवूं नका.

संबोधित [सं०]वि० १ज्याला हाक मारली आहे तो; ज्याला बोलाविलें आहे तो.२ ज्याला बोध केला आहे तो.

सब्बा, सब्बैन वर ' सबा, ''सबैन ' पहा.

सब्रह्मचारी [सं० सब्रह्मचारिन्] पु० १ सहाध्यायी. २ समान स्थितींतील.

सभय [सं०] वि० १ भ्यालेला. २ भय वाटविणारा; भयावह; भयंकर.

सभर [सं० स+भर (भार)] वि० गरोदर (घोडी, गाढवी, किं० खेचरी). क्रि० वि० सर्व भार किं० जोर किं० वजन यांचेसहित (कोसळणें, ढासळणें, पडणें, रट्टा बसणें, तडाखा मारणें); उ० ह्या घड्याळावर तुझा सभर पाय पडला मग तें फुटलें यांत नवल काय ?

सभराभरी क्रि० वि० जिकडे तिकडे.

सभराभरीत वि० पूर्णपणें भरलेलें किं० व्यापिलेलें.

सभर्तृका [सं०] स्त्री० १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री; सुवासिनी.२ जिच्यासह भर्ता आहे अशी स्त्री.

संभव [सं०] पु० १ जन्म; उत्पत्ति. २ उत्पत्तिस्थान. ३ हेतु; कारण. ४ शक्यता; शक्य होणें किं० असणें; रंग; कांहीं तर्क किं० अटकळ करावयाला आधार किं० जागा; उ० आज पाऊस पडण्याचा संभव आहे; उ० तो वशीला घालील असा संभव आहे. ५ मिश्रण; एकीकरण. कांहीं उपयुक्त समास पुढें दिले आहेत. कुंभसंभव म्ह० घागरीपासून जन्मलेला म्ह० अगस्त्य ऋषि. पद्मसंभव म्ह० कमळापासून जन्मलेला म्ह० ब्रह्मदेव. अयोनिसंभव म्ह० योनींतून न जन्मलेली म्ह० सीता. पित्तसंभव म्ह० पित्तापासून उत्पन्न झालेला (रोग इ०).

संभवणें [सं०सम्+भू]अ०क्रि०१शक्य होणें किं० असणें; अटकळींत किं० तर्कांत येणें. २ उद्भवणें; जन्मणें; उत्पन्न होणें. ३ कोणेक स्थळीं सोयीनें राहूं किं० असूं शकणें; उ० येवढ्याशा घरांत किं० जागेंत दोन कुटुंबें संभवत नाहींत.

सभंवतां, सभंवताला, सभंवतीं,सभोंवतीं श० यो० अ०, क्रि० वि० सर्व बाजूंनीं; भोंवतालीं; उ० त्याणें घरासभंवतां तुळशी लाविल्या आहेत.

सभा [सं०] स्त्री० १ कांहीं विषयाच्या चर्चेसाठीं किं०विचारविनिमयासाठीं एके स्थळीं जमलेले लोक समुच्चयानें किं० हें स्थळ. २ धर्म-

शाळा. ३ न्यायमंदिर. ४ द्यूत. ५ जुगाऱ्यांचा अड्डा. ६ राजाचा दरबार. ❀ **सभापति पु०** सभेचा अध्यक्ष. **सभामंडप पु०** १ सभेसाठीं उभारलेला तात्पुरता मांडव. २ देवळापुढें कथा, पुराण,प्रवचन,भजन, इ० साठीं कायमची दगड, विटा,चुना,इ०ची रचना असते ती.**सभासद पु०** १एकाद्या संस्थेच्या नियमाला अनुसरून चालणारा जो मनुष्य तो त्या संस्थेचा सभासद. २ एकाद्या संस्थेचीं जीं विविध कामें तीं करणारीं जीं माणसें तीं प्रत्येक. ३ एकाद्या मंडळीची किं० संस्थेचीं जीं घटक माणसें तीं प्रत्येक. ४ एकाद्या खटल्याचा किं० वादग्रस्त विषयाचा निकाल करण्यासाठीं नेमिलेलीं जीं माणसें तीं प्रत्येक. **सभाकंप पु०** चार मंडळींत किं० सभेंत जावयाला किं० बोलावयाला किं० कांहीं गाणें म्हणावयाला कोणेकाला भीति वाटून गात्रांना कंप सुटतो तो. ज्या माणसाला अशी भीति वाटत नाहीं त्याला ' सभाधीट ' म्हणतात आणि ह्या गुणाला ' सभाधीटपणा ' म्हणतात. **सभागृह न०** सभा भरविण्याची जागा. **सभाचातुर्य, सभाकौशल्य,सभापाटव न०** सभेंमध्यें शिष्ट चालीरीतींना अनुसरून वागण्याचा किं० बोलण्याचा जो गुण तो.**सभाजन पु०अ०व०**सभेंत जमलेले लोक. **सभाजय पु०** आपला पक्ष खरा आहे असें सभेंत सिद्ध करून देऊन मिळविलेला जय; आपल्या मताची सभेंत करून दाखविलेली सिद्धता. **सभादीप पु०** १ श्रावणीचे दिवशीं सभेंत ब्राह्मण, अग्नि, ह्यांचे सन्निध ब्राह्मणांस स्त्रिया दान देतात जो दिवा तो. २ सभेमध्यें गुणविशेषानें भूषणभूत जो मनुष्य तो. ३ श्रावणीचे दिवशीं धान्याचें पीठ, हळद, इ० चें दान स्त्रिया स्त्रियांस देतात तें किं० तें दान देण्याचा विधि. **सभाध्यक्ष, सभाधिकारी पु०** सभेचा चालक,– ज्याचे हुकूम तेथें जमलेल्या लोकांना पाळावे लागतात. **सभाधीट वि०** सभेंत किं० चार मंडळींत बोलावयाला किं० गावयाला जो कचरत नाहीं तो. **सभाधूर्त वि०** सभेमध्यें आपल्या पक्षाचें मंडन आणि प्रतिपक्षाचें खंडन करण्यांत जो पटाईत तो.

सभाजन [सं०] न० १ सत्कार. २ सेवा; पूजन. ३ स्वागतपर संभाषण; अभिनंदन.

संभार [सं०] पु० १ संग्रह; गोळा करणें. २ समुदाय; रास; ढीग. ३ सामग्री; कार्यविशेषाला लागणारें सामानसुमान; साहित्य. ४ पालनपोषण; रक्षण; जोपासना.

संभावना स्त्री०, संभावन न० [सं०] १ विचार; समजूत. २ तर्क; कल्पना. ३ संभव. ४ योग्यता. ५ लायकी. ६ सन्मान.७ कोणी शास्त्री, पुराणिक, दशग्रंथी, गवई, इ०ना त्यांचे गुणाबद्दल देतात तें पारितोषिक (करणें).८(**साहित्य**) उपमेय हें उपमानच असावें असा उत्कट संदेह व्यक्त करणें. ९ (**विपरीत लक्षणेनें**) कोणेकाला शिव्या देणें किं० त्याचा बोऱ्या उडविणें.

संभाविणें [म० संभावना] स० क्रि० (अतिथि, थोर माणूस, इ०ना) योग्य मान देणें किं० त्यांचा उचित सत्कार करणें.

संभावित [सं०] वि० १ कल्पिलेलें; तर्किलेलें. २ ज्याला मान देण्यांत आला आहे असा. ३ सन्मान्य; पूज्य. ४ अनुरूप. ५ संभवनीय. ६ अपेक्षिलेलें; अटकळींत आलेलें.

संभाव्य [सं०] वि० १ मानण्याजोगें; कल्पनेंत येण्याजोगें किं० आणतां येईल असें. २ संभवनीय. ३ शक्य कोटींतील.

संभाषण [सं०] न० १ मंडळींत बसून एकमेकांशीं बोलणें किं० विचारविनिमय करणें; गप्पा मारणें; उ० सभेंत उत्तम भाषण करणारे लोक संभाषण करण्यांत चतुर असतातच असें नव्हे.

संभाळ [सं० संभार] पु० १ कोणेकाचें केलेलें पालनपोषण; प्रतिपाळ. २ रक्षण.❀ **कांहीं वस्तु कोणेकाच्या संभाळीं करणें** ती रक्षणार्थ त्याच्या जवळ देणें किं० त्याच्या हवालीं करणें.

संभाळणें [सं० सम्+भृ] स० क्रि० १ रक्षिणें; जतन करणें. २ अन्नवस्त्र इ० कोणेकाला देऊन त्याचा प्रतिपाळ करणें. ३ (शिस्त,नियम, कायदा, आचार, इ०) पाळणें म्ह० न उल्लंघिला जाईल अशाबद्दल जपणें. **अ० क्रि०** १ त्वगिंद्रियानें जाणणें; उ० त्याचें उजवें अंग बधिर

झालें आहे, त्याला चिमटा घेतला किं० सुई बोचली तरी संभाळत नाहीं. २ जपून असणें; उ० संभाळ, भलता शब्द तोंडावाटें काढू नको.

सभिक, सभीक [**सं०**] **पु०** जुगाराच्या अड्ड्याचा मालक; द्यूतगृहाचा मालक.

सभींज [**म०** स+भिजणें] **क्रि० वि०** पूर्णपणें (वस्त्र इ० पाणी इ० मध्यें भिजणें).

संभूत [**सं०**] **वि०** १ उत्पन्न झालेला; जन्मलेला. २ जोडलेला. ३ योग्य; अनुरूप. ४ युक्त; सहित. **संभूत स्त्री०** (**मराठींत**) गंधवार्ता सुद्धां (नसणें); अगदीं देखील संभव किं० शक्यता (नसणें); उ० ह्या गांवांत सर्पाची संभूत नाहीं, मग तुला सर्प डसेल कोठून ? ह्याच अर्थी ' संभूत वार्ता ' **स्त्री०**; उ० तुमच्या रामूचें लग्न होणार आहे ह्याची आम्हाला संभूत वार्ता ठाऊक नव्हती.

संभूति [**सं०**] **स्त्री०** १ जन्म. २ संयोग; समागम; मिलाफ. ३ योग्यता; अनुरूपता. ४ विभूति. ५ वैभव. ६ शक्यता; संभव.

संभूय [**सं०**] **क्रि० वि०** एकत्र. ॐ **संभूय समुत्थान न०** पातीचा धंदा.

संभृत [**सं०**] **वि०** १ जमविलेलें; एकत्रित केलेलें; जुळविलेलें. २ संपादित. ३ सज्ज किं० सिद्ध केलेलें. ४ पूर्ण. ५ युक्त; सहित.

संभेद [**सं०**] **पु०** १ संगम; नद्यांचा संगम. २ मिश्रण. ३ घोटाळा. ४ फितुरी; विश्वासघात.

संभोग [**सं०**] **पु०** १ वापरणें; भोगवटा. २ सुख; विलास. ३ उपभोग्य वस्तु. ४ मैथुन. ५ (**साहित्य**) शृंगाराचा एक प्रकार. यांत नायक आणि नायिका यांची गांठ पडली असल्याचें वर्णन असतें. संभोगशृंगाराच्या व्यावर्तकत्वें 'विप्रलंभ शृंगार. 'मागें ' विप्रलंभ ' पहा.

संभोगणें [**सं०** सम्+भुज्] **स० क्रि०** १ भोगणें; अनुभविणें; वापरणें; (कोणेक वस्तूचा) उपभोग घेणें किं० तिच्या उपभोगाचें सुख घेणें. २ (स्त्रीला) मैथुनविषय करणें.

संभोगी [**म०** संभोग] **वि०** १ भोगणारा; वापरणारा; भोग घेऊन तृप्त झालेला. २ नानाप्रकारच्या विलासांत रमणारा.

सभोंवतां, सभोंवताला, सभोंवतीं, सभोंवर, सभोंवार क्रि० वि० सर्व बाजूंनीं (वेढणें, गराडणें, असणें, राहाणें, इ०); उ० आम्ही घरा सभोंवार देवकापशींचीं झाडें लाविलीं आहेत.

सभ्य [**सं०**] **वि०** १ सभेसंबंधी. २ सुसंस्कृत. ३ संभावित. **पु०** १ सभासद; कोणत्याही संस्थेतील एक एक व्यक्ति. २ सज्जन.

संभ्रम [**सं०**] **पु०** १ वाटोळें फिरणें; चक्राकार गति. २ त्वरा; घाई; लगबग. ३ भयानें उडालेली धांदल. ४ धामधूम; दंगा. ५ चित्तक्षोभ. ६ दवावचळलेपणाची स्थिति; गोंधळ; घोटाळा. ७ उद्वेग; चिंता. ८ भ्रम; भ्रमिष्टपणा. ९ आदर; संमान; पूज्यबुद्धि. १० चुकी. ११ (**मराठींत**) छाकटेगिरीचे प्रकार; नटवेगिरी किं० छानछुकी; उ० चक्रीदार पागोटें घालावें, गंध रेखून लावावें, डौलानें चालावें, मिशांना पीळ भरावा, असे हा दिवसभर आपल्या जिवाचे संभ्रम करीत असतो.

संभ्रांत [**सं०**] **वि०** १ भ्यालेला. २ भयचकित; भांबावलेला. ३ घोटाळ्यांत पडलेला.

सम् [**सं०**] **उपसर्ग** ह्याचे पुढें दिल्याप्रमाणें कांहीं अर्थ आहेत. १ सहित; बरोबर; उ० संभाषण, समागम. २ पूर्णपणें; पुष्कळ; अतिशय; उ० संतुष्ट; संताप; समुत्सुक. ३समोर; उ० समक्ष (म्ह० डोळ्यापुढें).

सम [**सं०**] **वि०** १ तेंच. २ तुल्य; सदृश; सारखें. ३ सपाट, सरळ (पृष्ठभाग). ४(**गणित**) दोहोंनें निःशेष भागिली जाणारी (संख्या); उ० ८, १२,२४,इ०.५निःपक्षपाती. ६प्रामाणिक. ७ सद्गुणी. ८ सामान्य. ९ मध्यम. १० योग्य. ११ (**गणित**) कांहीं गणितकृत्यांत एक परिमाण ज्या प्रमाणांत कमी किं० अधिक होईल त्याच प्रमाणांत दुसरें परिमाण कमी किं० अधिक होत असेल तर त्या परिमाणाचें पहिल्या परिमाणाशीं जें प्रमाण तें सम(प्रमाण);उ०पांच माणसें जें काम कांहीं काळांत करतात त्याच्या दुप्पट काम दहा माणसें तितक्याच काळांत करतील.येथें माणसामाणसांत जें प्रमाण आहे तेंच कामाकामांत आहे म्हणून हें सम प्रमाण. मागें ' व्यस्त ' मध्यें ' व्यस्त प्रमाण ' पहा. **न०** १ सपाट प्रदेश किं०

पृष्ठभाग. २ (संगीत) तालविशेष. ३ (साहित्य) परस्परांस योग्य किं० अनुरूप अशा दोन चांगल्या किं० दोन वाईट वस्तूंचा संयोग झाल्याचें वर्णन असल्यास'सम'हा अलंकार होतो. विशेष खुलासा आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. ֍ **समवर्ती** [सं० समवर्तिन्] **वि०** निःपक्षपाती. **पु०** यम. **सम अपूर्णांक पु०** ज्या अपूर्णांकाचा अंश छेदापेक्षां लहान असतो तो सम अपूर्णांक;उ० $\frac{२}{५}$, $\frac{३}{८}$, इ० **समकक्ष वि०** सारखा; तुल्य परिमाणाचा; बरोबरीचा.**समकालीन वि०** एकाच वेळचे; एकाच वेळीं हयात असलेले; एकाच कालीं घडलेले (प्रकार इ०).**समकेंद्र वि०**ज्यांचा मध्यबिंदु तोच किं० एकच आहे अशीं (वर्तुळें). **समकोण(-न)वि०** जिचे सगळे कोन सारख्याच अंशाचे आहेत अशी (आकृति). **समगुणन न०** एका संख्येस त्याच संख्येनें गुणणें. **समघर न०** घराचा मध्यभाग किं०मध्यभागाची खोली. **समचतुरस्र वि०** जिचे चारी कोन सारख्या सारख्या अंशाचे आहेत अशी(आकृति).**समचित्त वि०** १ निःपक्षपाती. २ शांत आहे चित्तवृत्ति ज्याची असा.३कशाचीही पर्वा न करणारा;बेफिकीर.**समच्छेद वि०** तोच किं० एकच आहे छेद ज्यांचा असे (अपूर्णांक); उ० $\frac{१}{३}$, $\frac{५}{७}$ हे अपूर्णांक समच्छेद केलें असतां $\frac{७}{२१}$ आणि $\frac{१५}{२१}$ असे होतात.**समचतुरस्र,समचौरस वि०**ज्याचे चारी कोन काटकोन आहेत अशी आकृति. **समतोल, समतुक वि०** १ सारख्याच वजनाचें. २ एकमेकांस तोलून धरणारें. ३ गुण, धर्म, बल, विद्या, इ० नीं बरोबरीचे किं० समान. **क्रि० वि०** सर्व बाजूंस सारखाच भार घालून; उ० होडीमध्यें समतोल बसावें म्हणजे होडी कलंडत नाहीं. **समतोल बुद्धि स्त्री०** निःपक्षपाती बुद्धि. **समथळ वि०** सपाट (प्रदेश). **समदर्शी वि०** सर्व प्राणिमात्रांकडे आपलेपणाच्या बुद्धीनें पाहणारा. **समत्रिभुज पु०** ज्याच्या तीन्ही बाजू सारख्या आहेत असा त्रिकोण. **समरस पु०** १ ऐक्य; तादात्म्य. २ ब्रह्मानंद. **वि०** १ सर्वांशीं मिळून राहणारा. २ दुसऱ्याच्या चित्तवृत्तींशीं एकरूप झालेला; उ० जो कवींशीं समरस होऊं शकेल तोच अपूर्व काव्य आस्वादूं शकेल. **समरसता स्त्री०** मानसिक वृत्तींची एकरूपता; तल्लीनता. **समरास स्त्री०** १ शेतांतील पिकाची अविभक्त रास. २ अविभक्त मालमत्ता. **समवयस्क, समवयी वि०** सारख्याच वयाचे. **समसमान वि०** अगदीं सारखें,-ज्यांत मुळींच भेद किं० तफावत नाहीं असें. **समविषम न० ए० व०** १ कमी जास्ती; अधिक उणें. २ किरकोळ चुका; उ० मी बोललों त्यांत कांहीं समविषम असल्यास क्षमा करावी.

समई स्त्री०मध्यें स्तंभ असून खालीं वर चाडी असलेला धातूचा केलेला एक पदार्थ. वरच्या चाड्यांत तेल घालून वातेऱ्यांतील वात पेटवावयाची असते.

समईक, समाईक [सं० सामयिक] **वि०** १ अनेकांच्या मालकीचें असून अविभक्त असें (घर, शेत, उत्पन्न, इ०). २ सर्कत, पाती, इ० शर्तीवर चालविलेला (धंदा, व्यापार, इ०).

समकणें, संवकणें अ० क्रि० कांहीं एका गोष्टीची गोडी किं० चटक कोणेकाला लागल्याकारणानें त्याणें ती गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याकडे कललेलें असणें किं० करण्याला प्रवृत्त होणें किं० तिच्याबद्दल उत्सुक झालेलें असणें.

समग्र [सं०] **वि०** १ आरंभापासून शेवटपर्यंत असलेलें. २ सर्व; अखिल.

समज [म० समजणें] **पु०, स्त्री०** १ अमुक वस्तु अमुक स्वरूपाची आहे असा ग्रह किं० असें मत. २ एकाद्या विषयाची गुंतागुंत नाहींशी होऊन तिच्याबद्दल जी स्वच्छ, स्पष्ट, किं० असंदिग्ध कल्पना आपल्या मनांत येतें ती. ३ सदसद्विवेकबुद्धि. ४ कोणी कांहीं शहाणपणाचा विचार सांगितला असतां तो ऐकण्याकडे प्रवृत्ति. **समज स्त्री०** धाकदपटशा, धमकी (देणें). ֍ **समजउमज स्त्री० ए० व०** १ विषयाचें ग्रहण करण्याची ताकद; आकलनशक्ति. २ सारासारविचार. **समजदार वि०** शहाणा; कोणी केलेला बोधाचा विचार मान्य करणारा; हेकट नव्हे तो.

समजणें स० **क्रि०** १ बुद्धीनें ग्रहण करणें; जाणणें. २ मानणें. ३ कल्पिणें. **अ०** **क्रि०** १ज्ञात होणें; कळणें. २ रुसवा टाकून देणें; ताळ्यावर येणें. ३ वेबनाव नाहींसा होऊन पुन्हां दोस्त होणें. ॐ **समजून उमजून क्रि० वि०** १ जाणूनबुझून; सर्व गोष्टी विचारांत घेऊन. २ मुद्दाम; बुद्धिपुरःसर.

समजाविणें, समजाविणें [**म०** ' समजणें ' चें प्रयोजक] **स०** **क्रि०** १ कोणेकाला (कांहीं विषय) स्पष्ट करून सांगणें. २ (कोणेकाचा) राग, रुसवा, घोटाळा, किं० भ्रम निरस्त करणें.

समंजस [**सं०**] **वि०** १ योग्य. २ बिनचूक; सुसंगत. ३ शाहाणपणाचा; समजूतदारपणाचा. ४ सुबोध. ५ सद्गुणी; न्यायी; दोन्ही बाजू विचारांत घेणारा; निःपक्षपाती.

समजस [**म०** समजणें] **वि०** समजूतदार; शहाणा; हेकट नव्हे तो.

समजावण, समजावणी, समजाविशी, समजावशी, समजावीस, समजी[**म०** समजणें, समजाविणें] **स्त्री०** १ कोणेकाचा राग किं० रुसवा घालविणें. २ कोणेकाला बोध करणें किं० वस्तुस्थिति स्पष्ट करून सांगणें. ३ कोणेकाचें मन वळाविणें किं० त्याला ताळ्यावर आणणें. ४ स्पष्टीकरण; उलगडा.

समजीक, समजीस [**म०** समजणें] **वि०** १ शाहाणा. २ समजूतदार. ३ न्यायी; निःपक्षपाती.

समजूत [**म०** समजणें] **स्त्री०** १ मनाचा ग्रह; मत. २ उलगडा; संदिग्धता नाहींशी होऊन एकाद्या विषयाची आलेली खरी कल्पना. ३ रुसव्याचें निरसन; राग घालविणें; उ० त्या मुलाची समजूत करण्याचा तुमचा प्रयत्न फुकट जाईल. ॐ **समजूतदार वि०** १ शाहाणा; दुसऱ्याचा बोध ऐकून हेकटपणा सोडणारा. २ चांगलें काय आणि वाईट काय हें ठरवून वागणारा.

संमत [**अ०** सम्त्] **स्त्री०** दिशा; तरफ; रोख; उ० मौजा कातरज, संमत पुणें.

संमत [**सं०**] **वि०** १ पसंत; मान्य; कबूल; उ० शास्त्रसंमत, आचारसंमत, इ०. २ पूज्य; आदरास पात्र. ३ सदृश.

समंत [**सं०**] **वि०** १ विश्वव्यापी. २ पूर्ण; समग्र. **पु०** मर्यादा; सीमा. ॐ **समंततः क्रि० वि०** सर्व बाजूंनीं; सभोंवार. **समंतात्, आसमंतात् क्रि० वि०** सभोंवार.

११७

संमति [**सं०**] **स्त्री०** १ पसंती; मान्यता; रुकार (देणें, असणें). २ परवानगी; अनुज्ञा; कबूली. ३ सत्यज्ञान; आत्मज्ञान. ४ संमान; सत्कार. ॐ **संमतिपत्रक न०** पंचांच्या निर्णयाचा कागद.

समतुक, समतोल मागें ' सम ' मध्यें पहा.

समंत्र, समंत्रक [**सं०**] **वि०** मंत्र म्हणून केलेलें कांहीं कर्म (पूजा, प्रेतदहन, इ०).

समथळ, समदर्शी मागें ' सम ' मध्यें पहा.

संमद [**सं०**] **पु०** हर्ष; अति आनंद.

समंध, संमंध [**सं०**] **पु०** भूत; पिशाच.

समधात, समधातू [**सं०** समधातु] **वि०** फारच शीत किं० उष्ण नव्हे असें, फारच तिखट किं० मळमळीत नव्हे असें (औषध, खाद्य, हवा, इ०).

समन्वय [**सं०**] **पु०** १ संबंध. २ उदाहरणाचा लक्षणाशीं म्ह० व्याख्येशीं संबंध जोडून दाखविणें; उदाहरणानें व्याख्येचें स्पष्टीकरण करून दाखविणें. ३ परंपरेचा संबंध.

समन्वित [**सं०**] **वि०** १ युक्त. २ जुळलेला; संबद्ध. ॐ **समान्वित लय पु०** **(संगीत)** ताल.

समभिव्याहार [**सं०**] **पु०** १ एकत्र उल्लेख. २ शब्दसान्निध्य. ३ ज्याचा अर्थ स्पष्ट आहे त्याच्या शेजारीं संदिग्ध शब्दाचें असणें.

समभिहार [**सं०**] **पु०** १ पुन्हां पुन्हां करणें. २ आधिक्य.

समय [**सं०**] **पु०** १ वेळ; तंतोतंत वेळ. २ योग्य वेळ; संधी; अवसर; सोयीची वेळ. ३ हंगाम; वैपुल्याचा काळ. ४ रूढि; आचार; ठरलेला परिपाठ. ५ ठराव; करार; वचन. ६ प्रतिज्ञा. ७ अट; शर्त; बोली. ८ संकेत; खूण. ९ नियम; कायदा. ॐ **कोणेकावर समय येणें** (किं० **पडणें**) त्याच्यावर कांहीं संकट कोसळणें. **समयविशेषीं क्रि० वि०** विशिष्ट प्रसंगीं. **समयाचें शिरीं** (किं० **समयास**, किं० **समयीं**) **उपयोगास येणें** अडचणीच्या वेळीं किं० ऐन वेळीं उपयोगास येणें किं० उपयोगीं पडणें किं० अडचण दूर करणें. **समयवेत्ता, समयज्ञ पु०** १ कोणेका कार्याला योग्य वेळ कोणता हें जाणणारा. २ योग्य वेळीं योग्य गोष्ट करणारा. **समयशीर क्रि० वि०** योग्य वेळीं; ठरलेल्या वेळीं; वक्तशीरपणें. **वि०** ठरलेली वेळ

पाळणारा. **समयसूचक** **वि०** १ विशिष्ट वेळीं योग्य (उत्तर, युक्ति, इ०).२ ऐन समयाला सुचलेलें(उत्तर,युक्ति, इ०).३प्रसंगाला जें योग्य तें करणारा(माणूस). **समयानुसार** **क्रि० वि०** १ प्रसंगाला अनुसरून.२ कदाचित्. **वि०** प्रसंगाला योग्य.

समर [**सं०**] **पु०,न०** लढाई. ॐ **समरधीर** **वि०** लढाईत न कचरणारा. **समरभूमि** **स्त्री०**, **समरांगण** **न०** लढाईची जागा. **समरविजयी** **वि०** लढाईत ज्यानें जय मिळविला आहे असा.

समरस [**सं०**] **वि०** १ सर्वांशीं सारख्या रीतीनें वागणारा. २ दुसऱ्याच्या चित्तवृत्तीशीं एकरूप होणारा. **पु०** १ ऐक्य; तादात्म्य. २ ब्रह्मानंद. मागें ' सम 'मध्यें ' समरस ' पहा.

समरसणें [**म०** समरस] **अ० क्रि०** १ एकरूप होणें; तादात्म्य पावणें. २ कांहीं विषयांत गढून गेल्यामुळें स्वत्त्वाची जाणीव गमावून घेणें.

समर्थ [**सं०**] **वि०**१ बलिष्ठ. २ योग्य;उचित. ३ अधिकारी; अंमलदार; उ० स्वाभिमानशून्य लोक समर्थांची थुंकी घ्यावयाला उत्सुक असतात. ४ पैसा, अधिकार, किं० वशीला, यांचें पाठबळ ज्याला आहे असा. ५सार्थ; यथार्थ; विशिष्ट अर्थ व्यक्त करूं शकणारा (शब्द).

समर्थन [**सं०**] **न०** १ सिद्ध करणें. २ कोणेकाचें कांहीं वर्तन किं० भाषण किं० मत योग्य आहे असें सिद्ध करणें. ३ कोणेकाचा पक्ष घेणें. ४ परीक्षा; तत्त्वनिर्णय. ५ सार्थकता. **समर्थना** **स्त्री०** ह्या पांची अर्थीं.

समर्थनीय [**सं०**] **वि०** जें योग्य, उचित, किं० बरोबर आहे असें सिद्ध करून दाखवितां येईल असें; पुराव्यानें सिद्ध करतां येईल किं० खरें म्हणून ठरवितां येईल असें.

समर्द [**सं०**] **पु०** १ तुडविणें; चुरगळणें; कुसकरणें. २ घर्षण. ३ गर्दी; खेचाखेच; दाटी. ४गर्दीचें युद्ध; हातझोंबीची मारामारी.

समर्पक [**सं०**] **वि०** असावें तसें, बरोबर लागू पडणारें (उत्तर); प्रतिपक्ष्याला निरुत्तर करणारें (विधान, उत्तर, कोटी, इ०).

समर्पण [**सं०**] **न०** १ देऊन टाकणें; हवालीं करणें. २ कायमचें देणें. ३ देव, ब्राह्मण, इ० ना देणें किं० अर्पिणें किं० वाहणें.

समर्पिणें [**सं०** सम्+अर्प्] **स० क्रि०** १ देणें, देऊन टाकणें. २ देव, ब्राह्मण, इ० ना देणें.

समर्पित [**सं०**] **वि०** जें दिलें किं० देऊन टाकलें तें.

समर्याद [**सं०**] **वि०** १ मर्यादित; ज्याला नियंत्रणा घालण्यांत आली आहे असें; ज्याच्या विस्ताराला अडथळा आहे असा. २ समीपस्थ. ३ विस्तार, अधिकार, कर्तृत्व, अमल, ह्यांना नियंत्रणा किं० प्रतिबंध असलेला.

समला, **सम्ला** [**फा०** षम्लाह्] **पु०** फेट्याचा किं० मुंडाशाचा पाठीवर सोडलेला पदर. ॐ **समलेदार** **वि०** ज्याचा पदर पाठीवर सोडलेला आहे असा (फेटा किं० मुंडासें).

समवाय [**सं०**] **पु०** १ संयोग; संबंध. २ समागम. ३ एकोपा; जूट. ४ साहाय्य. ५ समुदाय; समूह. ६ (**न्याय**) गुण आणि गुणी, क्रिया आणि क्रियावान्, जाति आणि व्यक्ति, यांचा जो परस्पर संबंध तो. ॐ **समवायी** [**सं०** समवायिन्]**वि०** निकटसंबंधी. **समवायिकारण** **न०** घटकद्रव्य; ज्यावरसमवाय संबंधानें कार्य उत्पन्न होतें त्या कार्याचें तें समवायिकारण.

समवेत [**सं०**] **वि०** १ गोळा झालेलें. २ मिश्रित.३संबद्ध.**श०यो०व०** (**मराठींत**)सह;बरोबर;तहवर्तमान;उ०भार्येसमवेत मी काशीस गेलों.

समशेर [**फा०** षम्षेर्]**स्त्री०** तरवार.ॐ**समशेर बहादू** (**–द–**)**र** **वि०**१तरवारीच्या लढाईत. कुशल.२युद्धांत पटाईत.**पु०**चंगकांचन गंजिफांतील आठवा रंग. **पु०**१ श्रीमंत गायकवाडांचा किताब. २ मस्तानीच्या मुलाचें नांव. ३ कोणीही दांडगेश्वर. **समशेरासमशेर** **स्त्री०** तरवारींनीं रणांवर केलेली काटाकाटी. **समशेरी** **वि०** १ ज्या पुतळीच्या दोहों अंगच्या बाहुल्यांचीं किं० आकृतींचीं डोकीं एका दिशेकडे होतात अशी झालेली (पुतळी). २ समशेर म्हणून जो गंजिफांतील रंग तत्संबंधी (पान, तलब, इ०).

समष्टि [**सं०**] **स्त्री०** १ समुदाय. २ समग्रता. ३ हिरण्यगर्भ. ४ घटक भागांनीं संघटित जो पदार्थ तो (घटक भागांच्या अपेक्षेनें). मागें ' व्यष्टि ' पहा.

समसका [**म०** सा(सहा)+मास(महिना)]

वि० सहा महिने दूध देऊन दरवर्षी विणारा (पशु). **समसकें न०**असें विणारें गुरूं.**समसकी स्त्री०** अशी विणारी(गाय, म्हैस,इ०).पुढें 'समां-समीना [सं०] स्त्री० दरवर्षी विणारी गाय'पहा.

समसीम [सं० सम+सीमा] **वि०** ज्यांच्या हद्दी एकमेकींना चिकटलेल्या आहेत असे (गांव, देश, इ०).

समस्त [सं०] **वि०** १ एकीभूत; एकत्रित; एके ठिकाणीं आणलेलें किंवा ठेविलेलें. २ सर्व; दरोबस्त. ३ (**व्याकरण**) समास झालेलें (पद); समासांत अडकलेलें पद.

समस्या [सं०] **स्त्री०** १ वाक्य, श्लोक, इ० चा कांहीं भाग देऊन उरलेला भाग कोणेकास भरावयास सांगणें (घालणें). २ असा अर्धवट दिलेला भाग (घालणें). वाक्य, श्लोक, इ० पूर्ण करून सांगणें ह्याला'समस्या पुरविणें'म्हणतात.'तर्क शक्रस्य दुर्लभम्'ही समस्या सर्वांस ठाऊक आहेच.

समळ, समळ्या, समळी मागें ' संबळ, ' ' संबळ्या, ' ' संबळी ' पहा.

समक्ष [सं०] **श० यो०अ०** समोर; देखत; उ० गोविंदरावासमक्ष मी हा निरोप त्याला सांगितला. **क्रि० वि०** स्वतः; उ० तूं त्याला समक्ष भेटून काय सांगावयाचें तें सांग. ⊛ **समक्षता स्त्री०** कोणेकाचें स्थलविशेषीं हजर असणें; हजेरी; उ० त्याची समक्षता येथें जरूर आहे (म्ह० तो येथें हजर असणें जरूर आहे); उ० तुमच्या समक्षतेंत त्यानें ही दांडगाई केली काय ? (म्ह० तुमच्या देखत). **समक्षा स्त्री०** देवानें किंवा साधुपुरुषानें प्रत्यक्ष पुढें येऊन उभें राहाणें (भक्तांस साहाय्य करण्यासाठीं). **समक्षासमक्ष क्रि० वि०** दोहों पक्षाचें लोक हजर असतां. **स्त्री०** दोन माणसांची प्रत्यक्ष गांठ (होणें); दोन माणसें एकाच समयीं एके ठिकाणीं (हजर असणें).

समा पु० १ एक प्रकारचें भूत किंवा पिशाच. २ समुद्रास येते त्या भरतीची पूर्णावस्था. ३ फळें, पिकें, इ० चा वैपुल्यानें येण्याचा किंवा पिकण्याचा काळ; उ० हा आंब्याचा समा आहे तों पोटभर आंबे खाऊन घ्या. ४ ऐक्य; एकोपा; अविरोधाची स्थिति.

समा [सं०] **स्त्री०** वर्ष; संवत्सर.

समाईक मागें ' समईक ' पहा.

समाकुल [सं०] **वि०** १ गोंधळलेला; व्यग्र झालें आहे मन ज्याचें असा. २ व्याप्त; भरलेला; युक्त. **समाकुळ,समाकुळ वि०**१सर्व; दरोबस्त.२ एकवटलेले किंवा जमलेले (गांवकरी, गांवकामगार, कुटुंबांतील माणसें, जातींतील माणसें, इ०). ⊛ **समाकुल पांढर स्त्री०** १ कांहीं एका उद्देशानें एकत्र जमलेले गांवकामगार, गांवकरी, संस्थेचे सभासद, इ० समुच्चयानें. २ एका संस्थेचे किंवा धंद्याचे सर्व लोक समुच्चयानें.

समाक्रान्त [सं०] **वि०** १ व्यापिलेलें. २ जिंकिलेलें. ३ कबज्यांत घेतलेलें.

समागत [सं०] **वि०** १ आलेला; येऊन पोंचलेला. २ जुळलेला; एकत्रित. ३ सहित; युक्त. **न०** गांठ; भेट.

समागम पु०, समागति स्त्री० [सं०] १ येणें; आगमन. २ संयोग; संगम. ३ सहवास. ⊛ **सत्समागम पु०** चांगल्या लोकांची किंवा साधुपुरुषांची भेट, गांठ, किंवा सहवास.

समाचार [सं०] **पु०** १ वर्तन; आचरण. २ सद्वर्तन. ३ बातमी; वार्ता; कोणेक ठिकाणीं घडलेल्या गोष्टी; कोणेकाचें आरोग्य, सुस्थिति, इ० संबंधाची खबर; उ० आपला समाचार बरेच दिवसांत कळला नाहीं तो पत्र पाठवून कळवावा. ⊛ **शुद्धसमाचार, शुद्धिसमाचार पु०** एकादें गांव, कुटुंब, किंवा कोणी माणूस, यांच्या संबंधाची तपशीलवार माहिती किंवा खबर. मागें ' शुद्ध ' मध्यें ' शुद्ध समाचार ' पहा.

समाज [सं०] **पु०** १ मेळा; जमाव; समुदाय. २ सभा. ३ सभागृह; आड्डा. ⊛ **समाजशास्त्र न०** मानवी समाजाची उत्पत्ति, घटना, रचना, उत्क्रांति, सुधारणा, इ० संबंधाचे नियम, विवेचन, इ० चें शास्त्र. **सामाजिक वि०** समाजासंबंधाची(सुधारणा इ०).**सामाजिक बहिष्कार पु०** समाजानें कोणेकावर घातलेला बहिष्कार.

समाधान [सं०] **न०** १ जोडणें; एकत्र ठेवणें किंवा आणणें. २ एकाग्रता. ३ मनन. ४ चित्ताची शांति; तृप्ति; संतोष; इष्ट वस्तु मिळाल्यानें वाटतो तो आनंद.५शंका किंवा संशय यांचें निरसन; शंका फिटणें. ६ शरीरास किंवा मनास

दुःखदायक जी गोष्ट ती तिचें निरसन होतांच वाटतो तो आराम किं० आनंद. ७ एकाद्या विधानावर आलेल्या आक्षेपाचें खंडन. ❀ **समाधानी वि०** थोडक्यांत तृप्ति पावणारा; ज्यास्ती मिळालें नाहीं किं० मिळूं शकत नाहीं म्हणून चरफडत न बसणारा.

समाधि [**सं०**] **पु०** १ चित्ताची एकाग्रता; ध्यान; लय. २ केंद्रीभवन. ३ मौन; न बोलतां बसणें. ४ भक्ति. ५ चित्ताची शांतपणाची वृत्ति. ६ संतोष. ७ संयोग; अनेक पदार्थ एकत्रित करून नवीन पदार्थ करणें. ८ भांडण मिटविणें; तोडजोड करणें. ९ करार; वचन. १० परब्रह्माच्या चिंतनांत पूर्णपणें गढल्याची स्थिति,—योगाच्या अष्ट अंगांपैकीं शेवटचें. ११ धान्यसंचय; बेगमी. १२समर्थन. १३ (**साहित्य**) एका कारणानें होणारें कार्य दुसऱ्या एका किं० अनेक आकस्मिक कारणांमुळें सुकर किं० सोपें झाल्याचें वर्णन केलेलें असल्यास समाधिनामक अलंकार होतो. उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. १४ संन्याशानें केलेलें प्राणविसर्जन. १५ संन्यासी मेला असतां त्याला जलांत टाकणें किं० जमीनींत पुरणें हा विधि. १६ संन्याशाला जेथें पुरलें आहे तेथें तुळशीवृंदावन इ० बांधतात तें. **टीप;**—' समाधि ' शब्द मराठींत वरील सर्व अर्थी बहुधा **स्त्री०** वापरतात. ❀ **समाधिस्थ वि०** १ ज्याणें समाधि लाविली आहे असा. २ मेलेला (संन्यासी). **समाधिस्थ होणें** (संन्यासी) मरणें.

समान [**अ०**] **वि०** आठ (अरबी सालांत)

समान [**सं०**] **वि०** १ तेंच, एकच.२ सारख्या प्रमाणाचें, किंमतीचें, किं० महत्वाचें. ३ सारखा; तुल्य. ४ सपाट, नितळ (पृष्ठभाग). **पु०** पंचप्राणांपैकीं एक. प्राण, अपान, व्यान, उदान, आणि समान, हे पंचप्राण. ❀ **समानाधिकरण न०** १ दोन शब्दांची एकच विभक्ति असणें. ' नीलांबर ' (बलराम) ह्यांत ' नील ' आणि ' अंबर ' ह्यांची एकच म्हणजे प्रथमा विभक्ति आहे. २ सामान्य गुण. ३ एक अर्थ. **समानोदक पु०** सातव्या पिढीपुढचे आप्त (जन्म आणि नांव माहीत असलेले). **समानोदर्य पु०** सख्खा भाऊ. **समानोदर्या स्त्री०** सख्खी बहीण. **समानकक्ष वि०** सारख्याच योग्यतेचा किं० दर्जाचा. **समानकालीन वि०** त्याच काळचा; एके काळीं असलेला, घडलेला, किं० झालेला. **समानवयस्क वि०** त्याच किं० एकाच वयाचे. **समानशील वि०** त्याच स्वभावाचा किं० वृत्तीचा; ज्यांच्या आवडी सारख्याच आहेत असे; उ०समानशीलव्यसनेषु सख्यम्. **समानस्कंध वि०** सारख्याच उंचीचे (मजूर,बैल,हमाल,इ०). **समानार्थ, समानार्थक वि०** त्याच अर्थाचे (शब्द इ०).

समानीन [**अ०**] **वि०** ऐंशी (अरबी [सालांत).

समापत्र [**म०** संमतिपत्र] **न०** संमतीचें म्ह० कबूलीचें पत्र.

समापत्ति [**सं०**] **स्त्री०** १ भेटणें; भेट; गांठ. २ यदृच्छा; कर्मधर्मसंयोग. [२ वध.

समापन [**सं०**] **न०** १ संपविणें; समाप्ति,

समापन्न [**सं०**] **वि०** १ युक्त; सहित. २ प्रवीण. ३ समाप्त.

समापित [**सं०**] **वि०** संपविलेलें.

समाप्त [**सं०**] **वि०** १ संपलेलें; शेवटास गेलेलें. २ श्रांत; दमलेला; थकलेला.

समाप्ति [**सं०**] **स्त्री०** १ शेवट. २ पूर्णता. ३ दमलेपणाची स्थिति. ४ मरण; नाश; विध्वंस.

समाम्नात [**स०**] **वि०** एकत्र सांगितलेलें.

समाम्नाय [**सं०**] **पु०** १ परंपरा. २ परंपरागत ग्रंथ. ३ पठन. ४ वेद. ५ समुदाय.

समायत [**सं०**] **वि०** १ पसरलेला. २ लांबरुंद; विस्तीर्ण.

समायुक्त [**सं०**] **वि०** १ युक्त; (सर्व अर्थी). २ सज्ज केलेलें (धनुष्य इ०). ३ एकाग्र (चित्त).

समायुत [**सं०**] **वि०** १ जोडलेलें. २ सहित. ३ युक्त. ४ एकत्रित; गोळा केलेलें.

समारंभ [**सं०**] **पु०** १ करणें. २ कर्म; कृत्य; उद्योग. ३ (**मराठींत**) थाटमाट. ४ (**मराठींत**) लग्न, मुंज, मेजवानी, पानसुपारी, ब्राह्मणभोजन, इ० प्रसंग, किं० ह्या प्रसंगीं लागणारीं भांडींकुंडीं, लोड, सतरंज्या, पाट, इ० जरूर अशा वस्तूंचा समुच्चय.५ (**मराठींत**)कोणे-

काला दिलेला मान किं० त्याची ठेवलेली प्रतिष्ठा किं० बरदास्त.

समाराधन न०, **समाराधना** स्त्री० [सं०] १ आनंदविण्याचें साधन. २ सेवा. ३ ब्राह्मण-भोजन.

समारोप पु०, **समारोपण** न० [सं०] १ स्थापणें; स्थापना; ठेवणें. २ (झाड) लावणें. ३ विषय, विवरण, चर्चा, इ० चा उपसंहार किं० मुख्य मुद्यांचें संक्षिप्त वर्णन.

संमार्जन [सं०] न० १ झाडणें; साफ करणें. २ धुऊन स्वच्छ करणें. ॐ **संमार्जनी** स्त्री० केरसुणी. **सडासंमार्जन** न० ए० व० घर, अंगण, इ० झाडणें, जागोजाग शेणाचा सडा घालणें, सारविणें, रांगोळी घालणें, इ० स्वच्छतेचीं कामें समुच्चयानें.

समावणें [सं० सम्+आ+विश्]अ०क्रि० १ पेटी, पोतें, बारदान, भांडें, इ० मध्यें (कांहीं पदार्थ) घातला, ओतला, किं० भरला असतां त्यांत तो राहूं शकणें; मावणें; उ० ह्या पोत्यांत आधा पल्ला तांदूळ सहज समावतील. २ (एक पदार्थ, माणूस, पशु, इ०)दुसऱ्या पदार्थ, माणसें, पशु, इ० च्या समुदयांत सुखानें, अडचण किं० गैरसोय इ० न करतां, ठेवतां, घालतां, किं० बसवितां येणें; उ० ह्या खोलींत बारा माणसें राहातात त्यांत अकरावा समावेल;उ० वीसांच्या भोजनांत एकवीसावा समावतो. ३ खपणें; उघडकीस न येणें; उ० दोन शेर दुधांत पावशेर पाणी समावतें. [मुंज.

समावर्तन [सं०] न० १ परत येणें. २सोडमुंज.

समाविष्ट [सं०] वि० १ आंत राहिलेलें. २ अंतर्भूत झालेलें; आंत घातलेलें; आंत भरलेलें. ३ पिशाचानें ग्रस्त (माणूस).

समावृत्त [सं०] वि० १ सोडमुंज झालेला (मुलगा). २ एकत्र जमलेलें.

समावेश [सं०] पु० १ प्रवेश. २ आंत राहाणें; अंतर्भूत होणें; अंतर्भाव. ३ आंत भरणें, कोंबणें, खुपसणें, ठासणें. ४ पिशाचबाधा.

समाश्रय [सं०] पु० आधार, टेका, रक्षण, (देणें, मिळणें).

समाश्रित [सं०] वि० १ज्याला आधार किं० संरक्षण मिळालें आहे किं० दिलें गेलें आहे असा. २ कोणेकाच्या आश्रयास राहिलेला (मनुष्य इ०).

समास [सं०] पु० १ एकीकरण; संयोग. २ समुदाय. ३ पूर्णता. ४ सारांश; संक्षेप. ५ सलोखा करणें. ६ लिहिलेल्या किं० छापलेल्या कागदाच्या कडांना जी रिकामी जागा सोडतात ती. ७ (**व्याकरण**) दोन शब्दांचा संयोग होऊन एक नवा शब्द नव्या विशिष्ट अर्थानें उत्पन्न होणें, किं० ह्या दोन घटक शब्दांचा परस्परांशीं जो संबंध तो. समासानें बांधलेला किं० समासांत अडकडेला जो शब्द तो'समस्त शब्द'.नवा निर्माण झालेला जो शब्द तो सामासिक शब्द. सामासिक शब्द मोडून घटक पदांच्या रूपांत घालून अर्थ करणें ह्याला ' विग्रह करणें'म्हणतात.द्वंद्व,तत्पुरुष, अव्ययीभाव, आणि बहुव्रीहि, हे मुख्य तीन समास असून प्रत्येकाचे पोटभेद पुष्कळ आहेत. **टीप,**–द्वंद्व समासांत मात्र दोहोंपेक्षां अधिक पदें असूं शकतात.

समासक्त [सं०] वि० १ ठेविलेला. २ सांधलेला; जोडलेला. ३ समाविष्ट. ४ लंपट.

समासक्ति स्त्री०, **समासंग** पु० [सं०] १ संयोग; जुळणी. २ अंतर्भाव. ३ प्रेम; आवड; गोडी; लंपटपणा.

समांसमीना [सं०] स्त्री० दरवर्षी विणारी गाय. मागें ' समसका ' पहा.

समासंजन [सं०] न० १ संयोग. २ चिकटणें. ३ लंपटपणा.

समासर्जन [सं०] पु० १ पूर्ण त्याग. २ हवालीं किं० स्वाधीन करणें.

समासादन [सं०] न० १ संपादन; मिळविणें;गांठणें;प्राप्ति. २ स्थळविशेषीं जाऊन पोंचणें.

समासाद्य [सं०] वि० मिळण्याजोगें.

समाहरण [सं०] न० एकीकरण; एकत्रित करणें; जुळविणें; गोळा करणें.

समाहार [सं०] पु० १ समुदाय. २ (**व्याकरण**) द्वंद्व आणि द्विगु ह्या समासांचा एक प्रकार; उ० भाजीपाला हा समाहार द्वंद्व; पंचपाळें हा समाहार द्विगु.

समाहार [सं० सम (सारखा)+आहार (खाणें)] वि० सारखा आहे आहार ज्यांचा अशीं (माणसें, गुरें, इ०).

समाहित [सं०] वि० १ कबूल किं० मान्य केलेलें. २ विहित; ठरविलेलें. ३ शेवटास नेलेलें. ४ स्वाधीन किं० हवालीं केलेलें. ५ एकाग्र; समाधिस्थ. ६ शांत; समाधान पावलेला.

समिति [सं०] स्त्री० १ संयोग. २ सभा. संस्था. ४ जमाव; समुदाय; टोळी. ५ युद्ध.

समिध, समिधा [सं० समिध्] स्त्री० १ होमांत ज्याची आहुति द्यावयाची तें काष्ठ. २ सर्पण; इंधन (सामान्यतः). मागें ' शेकणें ' मध्यें ' समिध शेकणें ' पहा.

समिना, समीना [फा० शामीयानाह्] पु० मोठा डेरा किं० मांडव.मागें 'शामियाना ' पहा.

समीकरण [सं०] न० १ एकसारखें करणें. २(गणित) अपूर्णांकांना समच्छेद रूप देणें. ३ (बीजगणित) दोन राशींची समता दर्शविणारी मांडणी.

समीचीन [सं०] वि० १ चांगलें.२ योग्य; यथार्थ. ३ सत्य; बिनचूक; दोषरहित.

समीध मागें ' समिध्, समिधा ' पहा.

समीप [सं०] वि० जवळचें. क्रि० वि० संनिधीस; जवळ; शेजारीं. ❀ **समीपता** स्त्री० १ शेजार; सांनिध्य. २ चतुर्विध मुक्तींपैकीं एक,–जींमध्यें ईश्वराचें भक्ताला सांनिद्धय घडतें. सायुज्यता, सलोकता, समीपता, आणि सरूपता, ह्या मुक्तीच्या चार अवस्था मानल्या गेल्या आहेत. मागें ' मुक्ति ' पहा.

समीर, समीरण [सं०] पु० वारा; वायु.

समीक्षण न०, **समीक्षा** स्त्री० [सं०] १ न्याहाळून पाहाणें. २ तपासणें. ३ पूर्ण विचार.४ विषयाचा साधकबाधक प्रमाणांनीं विचार करणें.

समीक्षित [सं०] वि० पूर्णपणें विचारांत घेतलेलें किं० परीक्षिलेलें. [वाचाळ.

समुख [सं०] वि० १ वक्ता. २ बडबड्या;

संमुख [सं०] वि० १ समोर असलेलें. २ अनुकूल. क्रि० वि० (मराठींत) समक्षांत; समोर; उ० माझ्या संमुख येऊं द्या त्याला कीं काढतों त्याची भोसडपट्टी. [अनुकूल.

संमुखीन [सं०] वि० १ समोर असलेलें. २

समुचित [सं] वि० योग्य; असावें तसें.

समुच्चय [सं०] पु० १ समूह; ढीग; रास. २ (व्याकरण) परस्परनिरपेक्ष अशा शब्दांचा एकत्र अन्वय. ३ समुदाय किं० वर्ग विचारांत घेऊन त्यांतील एकाद्या व्यक्तीच्या संबंधानें ठरविलेला निर्णय. ४ (साहित्य) एकादा परिणाम घडवून आणावयाला एक कारण पुरेसें असतां आणखीही कांहीं कारणें उपस्थित आहेत असें सांगितलें असतें तेथें ' समुच्चय ' ह्या अलंकाराचा एक प्रकार होतो. दोन गुण किं० दोन क्रिया, किं० एक गुण आणि एक क्रिया, यांचा एकदम प्रादुर्भाव झाल्याचें वर्णन असल्यास दुसऱ्या प्रकारचा ' समुच्चय ' अलंकार होतो. ह्या दोन्ही प्रकारच्या समुच्चयाचीं उदाहरणें इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. [नाश.

समुच्छेद [सं०] पु० नाश; विध्वंस; समूळ

समुछ्रय [सं०] पु० १ ढीग; रास. २ उंचपणा; उन्नति. ३ युद्ध. ' समुछ्राय ' ह्याच अर्थीं.

समुच्छ्रित [सं०] वि०अतिशय उंच.

समुच्छ्वसित न०, **समुच्छ्वास** पु० [सं०] सुसकारा.

समुच्छ्वासित [सं०] वि० प्रत्युज्जीवित; शुद्धीवर आणलेला; मूर्च्छेंतून उठविलेला.

समुज्जृंभण[सं०]न० १उसळणें. २ वरयेणें. ३ झटणें;यत्न करणें.४वाढणें. [परित्यक्त.

समुज्झित [सं०] वि० सोडलेला;टाकलेला;

समुत्कट [सं०]वि० अतिशय;अत्यंत तीव्र.

समुत्कर्ष [सं०] पु० श्रेष्ठता; उत्कर्ष.

समुत्थान [सं०] न० १ वर होणें. २ दीर्घोद्योग. ३ व्यवसाय; धंदा. ४ हल्ला. ५ बंड.

समुत्पत्ति [सं०] स्त्री० १ घडणें; घडून येणें. २ वृत्तान्त.

समुदय, समुदाय [सं०] पु० १ वर येणें. २वाढ;उत्कर्ष. ३ढीग;रास; जमाव; टोळी.४उत्पन्न; वसूल.५ साकल्य. ६ युद्ध. ७ (ज्योतिष) लग्न.

समुदित [सं०] वि० १ उत्पन्न झालेला, उगवलेला. २ उदय पावलेला. ३ एकत्र झालेला. ४ उत्कर्ष पावलेला.

समुदीरित [सं०] वि०१ बोललेलें; उच्चारलेलें. २ प्रेरित; प्रेरिलेलें.

समुद्ग [सं०] वि० आच्छादनयुक्त. पु० १

पुडा; करंडा; डबा. २ पेटी, पिशवी, इ० चा कप्पा किंवा पूड; पाळें.

समुद्गक [**सं०**] **पु०** १ पुडा; करंडा; डबा. २ (**साहित्य**) पद्याचें एक अर्ध आणि दुसरें अर्ध हीं अगदीं समान असल्यास ' समुद्गक यमक' होतें; अशा ठिकाणीं समग्र पद्यच यमकमय होतें. याचें प्रसिद्ध उदाहरण मोरोपंताची प्रसिद्ध आर्या ' अनलसमीहितसाधी इ०. '

समुद्गम [**सं०**] **पु०** १ उत्पत्ति. २ अधिकपणा.

समुद्गिरण [**सं०**] **न०** ओकणें; जें ओकलें [तें; ओक.

समुद्गीत [**सं०**] **वि०** मोठ्यानें गायिलेलें.

समुद्गीर्ण [**सं०**]**वि०**ओकलेलें;बाहेर टाकलेलें.

समुद्धत [**सं०**] **वि०**१धीट.२उद्धट.३गर्विष्ठ.

समुद्धरण [**सं०**] **न०** १ उद्धार. २ उपटून काढणें.३वर किंवा बाहेर काढणें;उचलणें.४ओकणें.

समुद्भव [**सं०**] **पु०** उत्पत्ति; उगम; उ० कुंभसमुद्भव (म्ह० घटापासून जन्मलेला म्ह० अगस्त्य ऋषि).

समुद्भूत [**सं०**] **वि०** उत्पन्न झालेला.

समुद्यत [**सं०**] **वि०** १ उचललेला. २सज्ज; सिद्ध; उद्युक्त. ३ शेवटास नेलेलें.

समुद्यम [**सं०**] **पु०** १ दीर्घ प्रयत्न. २ काम; कार्य. ३ गुरूनें शिकविलेला विषय आपणास समजला आहे किंवा नाहीं हें आजमावण्यासाठीं विद्यार्थी प्रश्न सोडविण्याचा करतो तो प्रयत्न.

समुद्र [**सं०** स (सहित)+मुद्रा (शिक्का)] **वि०** मोहोरबंद; ज्यावर शिक्का करण्यांत आला आहे असा.

समुद्र [**सं०**] **पु०** १ सागर; उदधि. २ (**संकेतानें**) चार ही संख्या. ३ (**लक्षणेनें**) अफाट, अमर्याद, किंवा अमोज असा साठा किंवा संग्रह. ४ (**लक्षणेनें**) अगम्य, दुर्ज्ञेय, किंवा गहन विषय किंवा विद्या; ॐ **समुद्राची दांडी स्त्री०** किनाऱ्यावर आपटणाऱ्या समुद्राच्या लाटांची जमीनीवरची मर्यादारेषा. **समुद्रिय, समुद्र्य वि०** समुद्रासंबंधाचा. **समुद्रकांठ, समुद्रकांठा, समुद्रकिनारा पु०, समुद्रतीर न०** समुद्राच्या लगतचा भूप्रदेश. **समुद्रशोक (-शोष,-सोक,-सोख) पु०** एक वेल. **समुद्रस्नान न०** ग्रहणाच्या पर्वणीस किंवा अन्य प्रसंगीं समुद्रांत जाऊन केलेलें स्नान. **समुद्रकफ, समुद्रफेन (-ण), समुद्रफेस पु०, समुद्रमाणकी स्त्री०** समुद्रांतील एका जलचर प्राण्याचें अंग,-समुद्राच्या कांठावर लाटांनीं ढकललें जाऊन येऊन पडतें तें. हें पांढरें आणि भुसभुशीत असून औषधाच्या उपयोगाचें असतें. **समुद्रमेखला, समुद्ररसना स्त्री०** पृथ्वी,-जिच्या भोंवतीं कंबरपट्ट्याप्रमाणें समुद्र पसरलेला आहे. **समुद्रवलयांकित वि०** समुद्ररूपी वलयानें वेढिलेली (पृथ्वी म्ह० सर्व पृथ्वी). **समुद्रशोक (-शोष)** पु० एक वेल. **समुद्रास दुखणें आणि शिंपींत औषध** जेथें फारच मोठ्या प्रमाणांत एकाद्या वस्तूची गरज किंवा जरूरी आहे तेथें अत्यल्प वस्तु मिळाल्यानें काय होणार ? **समुद्राचें अर्घ्य समुद्रास** उदार दात्यानें दिलेल्या मोठ्या देणगींतलिच अत्यल्प भाग दात्याला परत नजर करणें. **समुद्राचें मीठ आणि डोंगराचे आवळे ह्यांची गांठ पडणें** अत्यंत विजातीय आणि दूरच्या स्थळांतील पदार्थ, किंवा माणसें, ह्यांचा सुखदायक संयोग, भेट, किंवा संबंध. **साता समुद्रांपलीकडे क्रि० वि०** १ अत्यंत दूर. २ हातीं न येण्याच्या स्थितींत (पदार्थ जतन करून ठेवणें). ३ कांहीं पदार्थ अत्यंत मूल्यवान समजून (तो रक्षिणें). **समुद्रांत जाऊन** (किंवा **पडून**) **कोरडा** (किंवा **सुका**) १ लाभ होण्याची अनुकूलता असतां किंवा परिस्थिति जुळून आली असतां ज्याला कांहीं लाभ झाला नाहीं असा दुर्दैवी किंवा कर्तृत्वशून्य (माणूस). २ पापांत नखशिखांत मुरलेला असून जो पवित्रपणाची बढाई मारतो असा (मनुष्य,-उपहासाचा विषय). **समुद्रांत सुई शोधणें** (किंवा **पाहाणें**) खूप मोठ्या राशींत हरवलेला अति लहान पदार्थ त्या राशींत हुडकीत बसणें(हा मूर्खपणा होय).

समुन्नत [**सं०**] **वि०** १ उंच. २ प्रौढ. ३ गर्विष्ठ. ४ ठळक.

समुन्नति [**सं०**] **स्त्री०** १ उंची. २ मोठेपणा. ३ वैभव; उत्कर्ष; समृद्धि. ४ गर्व; ताठा.

समूर, समोर [**सं०** संमुख] **क्रि० वि०,श० यो०** अ० पुढें, अग्रभागीं, नंतर (स्थलासंबंधानें किंवा कालासंबंधानें).

समूल [सं०] क्रि०वि० मुळासकट. ❀**समूलघात** पु० मुळासकट विध्वंस.

समूह [सं०]पु० १समुदाय; ढीग;रास.२कळप.

समृद्ध [सं०] १ वृद्धिंगत. २ वैभवशाली; भरभराटलेला; धनधान्यादींनीं संपन्न.३ युक्त;पूर्ण.

समृद्धि [सं०] स्त्री० १ वाढ. २ ऐश्वर्य;वैभव; भरभराट. ३ वैपुल्य; उ० पाण्याची, धान्याची, किं० पैशाची समृद्धि.

समेट [सं० समेत] पु० सलोखा; ऐक्य; बेवनावानंतर झालेली दिलजमाई.

समेटणें [म० समेट] स० क्रि० १ (वाद, तंटा, बेबनाव, इ०) मिटाविणें, संपविणें, किं० समाप्त करणें. २ (दोन भांडणाऱ्या माणसांत) सलोखा घडवून आणणें किं० त्यांच्यांत दिलजमाई करून देणें. अ० क्रि० १ पुन्हा मित्र होणें.२ वाद,बेबनाव, किं०तंटा,समाप्त होणें किं० मिटणें.

समेत [सं०] वि० १एकत्र आलेलें; भेटलेलें. २ जवळ आलेलें. ३ युक्त; सहित; उ० भार्यासमेत तो गांवास गेला. ❀ **समेतबाबती** क्रि० वि० गांवकामगार इ० ना द्यावयाचे जे अंश (ज्यांना ' बाबती ' म्हणतात) ते धरून म्ह० त्यांचा समावेश करून; उ० त्या शेतास समेतबाबती पांच मण भात पडतें. मागें ' देखील ' मध्यें ' देखील बाबती ' पहा.

संमेलन [सं०] न० १ एकत्र जुळणें. २ कांहीं कार्यासाठीं एकत्र जमलेली मंडळी; कांहीं उद्देशानें एके ठिकाणीं जुळलेली मंडळी.३एकाद्या संस्थेंतील किं० शाळेंतील जीं मुलें, माणसें, इ० त्यांचा ठरावीक प्रसंगीं विचारविनिमयार्थ किं० परिचयार्थ किं० विनोदार्थ एकत्र जुळण्याचा समारंभ (भरणें, भरविणें).

समेसमान, समसमान [सं० सम+समान] वि० अगदीं सारखा; पूर्णपणें सारखा; उ० ही सतरंजी आणि ती सतरंजी अगदीं समेसमान आहेत.

समेळ पु० एक वाद्य. मागें ' संबळ ' पहा.

समोर मागें ' समूर ' पहा.

संमद [सं०] पु० हर्ष; अति आनंद.

सम्राट् [सं० सम्राज्] पु० १ सार्वभौम राजा. २ एक ते दहा कोटि ज्याचें उत्पन्न आहे असा राजा.

सय स्त्री० आठवण; स्मरण.

सय [सं० सखी] स्त्री० मैत्रीण.

संयत [सं०] वि० बांधलेला. पु० कैदी. ❀ **संयतात्मा** [सं० संयतात्मन्] पु० ज्याचे मनोविकार नियंत्रणेंत आहेत असा मनुष्य;तपस्वी.

संयम [सं०] पु० १ निग्रह; दाब; बंधन; निरोध. २ मनोनिग्रह. ३ एकाग्रता. ४ तपश्चर्या. ❀ **संयमी** [सं० संयमिन्] वि० जितेंद्रिय. पु० मुनि;तपस्वी.

संयमन [सं०] न० १ आवरणें. २ बांधणें. ३ अडथळा; अटकाव; प्रतिबंध.४बांधणें. ५ मनोनिग्रह. ६ चौसोपी घर. ७ व्रत. ❀ **संयमनी** स्त्री० यमपुरी. **आत्मसंयमन** न० पापापासून मन निवृत्त करणें.

सयर [अ० सैर्] स्त्री० सहल; हिंडणें.

सयसद क्रि० वि० मध्यें खंड न पडतां. मागें ' सतसय ' पहा.

सयसुमार मागें ' सईसुमार ' पहा.

सया [अ०] पु० महमदाचा जांवई अली याच्या पंथांतील इसम. सुनी म्ह० महमदाच्या नंतरचे चार अनुयायी मानणारा मुसलमान.

संयात्रा [सं०] स्त्री० परद्वीपास जाणें.

संयान [सं०] पु० १सांचा. न० १ हिंडणें; पर्यटन. २ कोणेकाच्या बरोबर जाणें. ३ दहनार्थ स्मशानांत प्रेत वाहून नेणें.

सयार पु० जादूगिरी; चेटूक. ❀ **सयारीण** स्त्री० चेटकीण.

संयाव [सं०] पु० १ सांजा,–एक खाद्य. २ चुरमा,–एक खाद्य.

संयुक्त [सं०] पु० १ जोडलेला; बांधलेला. २ रत; आसक्त. ३ संबंधी; आप्त.

संयुग [सं०]पु० १संयोग. २ सांनिध्य.३युद्ध.

संयुत[सं०]वि० जोडलेलें;जुळलेलें;जुळविलेलें.

संयुति [सं०] स्त्री० १ संयोग; जुळणी. २ मैथुन संभोग.

संयोग [सं०] पु० १ जोडणें;संबंध;मिलाफ. मिश्रण. २ जवळ असणें. ३ (**गणित**) बेरीज. ४ राजा आणि प्रजा यांचा एकोपा. ५ (**व्याकरण**) जोडाक्षर. ६ मैथुन. ❀ **संयोगपृथक्त्व** न०

(मीमांसा) एकच कर्म नित्य आणि अनित्य असणें. **संयोगविधि** पु० जीव आणि ब्रह्म ह्यांचें ऐक्य प्रतिपादणारा वेदान्त. **संयोगी** पु० ज्यानें लग्न केलें आहे असा गोसावी किं० बैरागी. **संयोगभूमि, संयोगी भूमि** स्त्री० दोन मोठ्या भूप्रदेशांना जोडणारा भूमीचा अरुंद पट्टा.

संयोजक [सं०] वि० १जोडणारा; मिलाफ करून देणारा; मध्यस्थ. २ सुरळीत मांडणी किं० रचना करणारा. ३ आपुकमापुकांची गांठ घालून देणारा. [२ मैथुन.

संयोजन [सं०] न० १ मिलाफ; जुळणी.

संयोजित [सं०] वि० जोडलेला;जुळविलेला.

सय्यद [अ० सय्यिद्] पु० बिबी फातमा हिच्या वंशांतील मनुष्य; महमदाच्या पांचव्या पिढींतील मनुष्य.

सर [सं०] पु० १ हार. २ मणि, मोती, फुलें, इ० एकजातीय पदार्थ ज्यांत ओविले आहेत असें सूत्र. २ इमारती इ० कामासाठीं तासून चौरस केलेली तुळई, वांसा, दांडा, इ०. ३ मांडव इ० च्या उपयोगाचा लांब, सरळ, आणि जाडी वांसा. ४ मुसळ करावयाच्या उपयोगाचें जाडी, जड, आणि सरळ लाकूड; मुसळसळई. ५ वेंदूर किं० पोळा ह्या उत्सवांत बैलांच्या शिंगाभोंवतीं बांधतात ती दोरी.

सर [फा० सर्=डोकें] पु० १ अनेक अधिकारी किं० कामगार यांच्यावरचा मुख्य; उ० ह्या सर्वांवर हरीपंत सर आहेत. २ कोणेक संस्था, मंडळी, किं० टोळी, ह्यांचा मुख्य. ३ वरच्या दर्जाचा.ह्या अर्थी'सर'हा शब्द गांवकामगाराच्या आणि अधिकाऱ्याच्या वाचकशब्दामागें लावितात; उ० सरदेशमुख, सरदेशपांड्या, सरसुभेदार, सरनायक, सरकमावीसदार, इ०. ४ (गायी, म्हशी, इ० च्या परिगणनाच्या प्रसंगीं) व्यक्ति; उ० गाय सर एक; म्हैस सर दोन. मागें ' नफर ' अर्थ ४, ' नग ' अर्थ ४ पहा.

सर, सरी स्त्री० १ बरोबरी; तुल्यता; सारखी योग्यता (येणें, पावणें). २ (गंजिफांच्या खेळांत) तलफ. ३ पाण्याचा पाट. ४ झाडांची ओळ.

सर [सं० सरा, सरी=धबधबा] स्त्री० १ पावसाची मध्यें खंड न पडतां झालेली वृष्टि; उ० आज सरीमागून सरी येत आहेत. ' पावसाची सर ' ह्याच अर्थी. २ इसळी; झपाटा; उद्रेक; उ० रागाची, मत्सराची, वेडाची, रडण्याची, तापाची,हिंवाची,पिशाचाची,किं०हसण्याची सर येणें. **टीप**,–वरील दोन्ही अर्थीं ' सरकट ' न० हें तुच्छतादर्शक रूप. सरकट म्ह० लहान सर. ❀ **सर करणें** जिंकणें; कबज्यांत घेणें.

सर प्रत्यय १ किंचित्; कांहीं अंशीं ह्या अर्थी; उ० काळसर, पिवळसर, कडसर. २ पूर्ण मर्यादा भरून किं० गांठून किं० ओलांडून ह्या अर्थीं; उ० नदी वरसर (किं० कांठसर) भरून चालली; उ० भांडें वरसर (किं० तोंडसर) भर.

सरई स्त्री० तासून बांधकाम, रचाई काम,इ० साठीं तयार केलेली तुळई, खांब, वांसा, इ०.

सरकटणें [म० ' सरकणें ' चें एक रूप] अ० क्रि० १ सरणें; स्थानभ्रष्ट होणें. २ (विणलेल्या वस्त्राचें तंतु सरून) खिडी किं० भोकें पडणें. ३ बुळबुळीत जमीन इ० वर (पाय इ०) निसरणें किं० घसरणें; सरकणें. [ळीत.

सरकटा [म० सरकणें] वि०निसरडा;बुळबु-

सरकटें [म० सरकणें] न० १ बुळबुळीतपणा. २ बुळबुळीत पृष्ठभाग.

सरकणें [सं० सृ] अ० क्रि० १ (विशिष्ट ठिकाणीं ठेविलेलें पाऊल, पदार्थ, इ०) त्या ठिकाणापासून स्थानभ्रष्ट होणें किं० दूर जाणें. २ इच्छापूर्वक दूर होणें, दूर बसणें, किं० बाजूस जाणें; उ० थोडे पलीकडे सरकून बसा म्हणजे आम्हाला येथें नीट बसतां येईल. ३(रांगेनें स्थित जे पदार्थ किं० माणसें त्यांनीं) क्रमानें आपल्या जागा सोडून पुढच्या जागांवर स्थित होणें. ४ जोरानें किं० वेगानें पुढें जाणें. ५ सैन्य इ० शत्रु इ० वर हल्ला करावयास निघणें.

सरकत [अ० शिर्कत] स्त्री० १ भागीदारी; वाटणी; हिस्सा. २ एकमेकांनीं एकमेकांस मदत करणें हा प्रकार. ❀ **सरकतदार** पु० भागीदार; पातीदार. **सरकतनामा** पु० भागीदारांच्या शर्तींचा कागद किं० करारपत्रक. **सरकतवाटणी** स्त्री० (**गणित**) सरकतीनें केलेल्या व्यापारांत प्रत्येक भागीदाराचा नफानुकसानीचा हिस्सा

किं० असा हिस्सा काढण्याची रीति. ह्या रीतीचे 'एकेरी सरकत,' आणि 'दुहेरी सरकत' असे दोन प्रकार आहेत. **सरकती (-त्या)** पु० सरकतींतील जे भागीदार ते प्रत्येक. **सरकती** वि० १ सरकतीनें केलेला (व्यापार, धंदा). २ ज्यांत इतर भागीदार आहेत असा (गांव, वतन, हक्क, इ०).

सरकन, सरकर, सरदिनीं, सरदिशीं क्रि० वि० वेगानें, झपाट्यानें, घाईनें.

सरकफास [म० सरकणें + फास] पु० घागर इ० च्या गळ्याला घालावयाचा दोरीचा फास,-जो हावा तितका मोठा किं० लहान करतां येतो.

सरकविणें, सरकाविणें [म० 'सरकणें' चें प्रयोजक] स० क्रि० पुढें ढकलणें, लोटणें, किं० सारणें.

सरकांडी मागें 'सणकांडी' पहा.

सरकानूगो [फा० सर् कानून् गो] पु० खानदेशच्या प्रांतांतील विशिष्ट कामावर नेमिलेला एक अमलदार किं० अधिकारी.

सरकार [फा०] न० १ राज्ययंत्र चालविणारे अधिकारी समुच्चयानें. २ राजानें किं० सत्ताधिकाऱ्यांच्या संस्थेनें नेमिलेला कोणीही अधिकारी. ३ कोणा नोकराचा यजमान किं० स्वामी किं० मालक. ॐ **सरकार खराब** वि० वतनदार इ० कोणाच्या दुमाल्यास न लागतां सरकारांतच राहिलेली पडीत (जमीन). **सरकारमहशूर** सर्व जनतेस ठाऊक असलेली (कांहीं गोष्ट किं० वृत्तान्त). **सरकारी** वि० सरकारासंबंधाचा. **सरकारी अमल** पु० सरकारांत कोणेकाला असलेली नोकरी.

सरकावणें [सं० स; म० सरकणें] स० क्रि० पुढें किं० बाजूस सारणें किं० ढकलणें.

सरकाळ (-ळी) स्त्री०, **सरकाळें** न० १ जोंधळ्याच्या किं० बाजरीच्या ताटाचा शेंडा. २ बोथट बाण. ३ सूत गुंडाळावयाची कांडी.

सरकी स्त्री० कापशीच्या बोंडांतील ज्या बिया त्या प्रत्येक. **सरक्या** स्त्री० अ० व० पाण्याच्या दमामुळें किं० दुसऱ्या कांहीं कारणानें नासल्यामुळें ढेपेसारखे झालेले जोंधळा, बाजरी, इ० धान्याचे दाणे.

सरखत [फा०] न० अनेक वेळां म्ह० हप्त्याहप्त्यांनीं सरकारांत भरलेल्या पैशाची पावती एकाच कागदावर दिली जाते ती.

सरखत, सरखतदार, इ० वर 'सरकत,' 'सरकतदार,' इ० पहा.

सरखेल [फा०] पु० १ स्वारांच्या तुकडीचा अधिपति. २ राजानें कोणा सरदाराला दिलेली बहुमानाची पदवी. ॐ **सरखेल** स्त्री० सरखेलाचा हुद्दा किं० दर्जा. [मळा.

सरगड पु०, न० नुकतांच लाविलेला पान-

सरगरम [फा०] वि० १ कोंबट; साधारण तापलेलें. २ अनिश्चित; संदिग्ध. ३ आवेशाचें किं० उत्साहाचें नव्हे असें (भाषण, वर्तन). ४ तत्पर; उद्युक्त.

सरगा पु० खाऱ्या पाण्यांतील एक मत्स्य.

सरगावडा पु० हलक्या दर्जाचा एक गांवकामगार. हा धनगर जातीचा असे.

सरचश्मा, सरचष्मा [फा० सर्चष्माह्] पु० १ झऱ्याचा उगम. २ एकाद्या मंडळीचा किं० संस्थेचा मुख्य, अध्यक्ष, किं० अग्रगण्य माणूस.

सरजा [फा० सराचाह्] पु १ बायकांच्या नथेला मुख्य मोत्यांच्या वर गाळ्याला जीं लांबोडीं मोतीं लाविलेलीं असतात तीं समुच्चयानें. अशीं मोतीं ज्या नथेला लाविलेलीं आहेत तीं 'सरजेदार नथ.' २ बंदुकीस तोडा अडकावावयाच्या उपयोगाचा जो लोखंडाचा आंकडा असतो तो. ३ बैलांच्या जोतांतील धिप्पाड बैल.

सरजा [फा०] पु० सिंह.

सरंजाम [फा०] पु० १ कार्यविशेषास लागणारी साधनसामग्री. २ किल्ल्याचें रक्षण करणें, सरकारी कामावर जावयासाठीं फौज बाळगणें, सरकारनें संमानार्थ दिलेली पालखी, हत्ती, घोडा, इ० बाळगणें, ह्यासाठीं होणारा खर्च भागविण्यासाठीं त्या माणसास सरकार गांव, शेत, इ० बक्षीस देतें तें इनाम. ह्या गांव, शेत, इ० ना 'सरंजामी गांव, शेत,' इ० म्हणतात. सरंजाम दोन प्रकारचा असतो,-जात सरंजाम आणि फौज सरंजाम. हे शब्द मागें 'जात' आणि 'फौज' मध्यें पहा. ॐ **सरंजामी फौज** स्त्री० सरकारच्या कामगिरीसाठीं कोणेकानें ठेविलेली फौज. स्वताच्या उपयोगाची जी फौज

ती ' खाजगी फौज. ' **सरंजामी** वि० १ सरकारांतून ग्रामादिरूप सरंजाम ज्यास देण्यांत आला आहे असा(मनुष्य). २ सरंजाम म्हणून बक्षीस दिलेला(गांव). **सरंजामी पद्धति** स्त्री० जातीचीं वतनें आणि इनाम गांवें यांशिवाय फौजेच्या खर्चासाठीं आणखी कांहीं नेमणूक आणि मुलूखगिरीसाठीं प्रांत तोडून देण्याची चाल.

सरट, सरड, सरडा, सरडोका, सरढा [सं० सरट] पु० पालीच्या जातीचा एक प्राणी. ꕥ **सरड्याची धाव कुंपणापर्यंत** मागें ' कुंप, कुंपण, कुपण ' मध्यें पहा.

सरण न० प्रेत जाळण्यासाठीं रचितात तीं लाकडें, गोंवऱ्या, इ० ची रास.

सरणि [सं०] स्त्री० १ मार्ग; वाट. २ पद्धति; रीति. ३ रांग; ओळ;पंक्ति.४ शिकविणें, लिहिणें, बोलणें, निरूपण करणें, ह्या संबंधाची कोणेकाची जी तऱ्हा किं० धाटणी ती.

सरणें [सं० सृ] अ० क्रि० १ पुढें, मागें, बाजूस, किं० वर जाणें; सरकणें; घसरणें.२संपणें; खलास होणें; खर्चलें जाणें. ३ योग्य किं० उचित असणें, दिसणें, किं०होणें; उ०तुमच्या दर्जाला हा पोरकटपणा सरत नाहीं.४भागणें;निभणें; चालणें; उ० पैशावांचून कोणाचें सरत नाहीं; उ० कांहीं तरी उद्योग असल्यावांचून माझें सरत नाहीं(म्ह० मला चैन पडत नाहीं, माझें भागत नाहीं);उ० शेजीविण सरेना आणि घडीभर पडेना.५ गुदद्वारें (वायु) बाहेर पडणें. ꕥ **कांहीं काम, कर्तव्य,** इ० **सरोसरोसें होणें** तें केव्हां एकदा संपेल असें होणें; त्यामुळें अति त्रासून जाणें;त्यामुळें अगदीं जर्जर होणें.

सरता [म० सरणें] वि० १ सरण्याच्या पंथास लागलेला.२ शेवटाकडचा;शेवटचा;कडेचा. ꕥ **सरता पालव** पु० १ ऋतु संपत चालला असतां वेलीला जीं शेवटचीं पानें येतात तीं समुच्चयानें. २ शेवट; शेवटचा पल्ला; समाप्तीचा काळ; उ० तुम्ही लग्नाच्या सरत्या पालवीं आलां (म्ह० लग्नाचा समारंभ सरतां सरतां). ३ आयुष्याची चरमावस्था; म्हातारपण; उ० हा माझा मुलगा सरत्या पालवीचा आहे म्हणून तो मला प्राणाहून प्रिय आहे; उ० दिवसाचा सरता पालव (म्ह० संध्याकाळ); उ० उत्कर्षाचा सरता पालव (म्ह० अपकर्ष सुरू होण्याचा समय). **सरता पुरता** वि० पूर्णपणें झालेलें किं० करून टाकलेलें. **सरते रात्र** (–रात), **सरती रात्र** (–रात) क्रि० वि० सर्व रात्रभर. **सरते शेवटीं** क्रि० वि० अगदीं शेवटीं;अखेरीस.

सरद स्त्री० पुढें ' सरहद्द ' पहा.

सरद [फा०] वि० १ थंड; गार; शीत. २ पाण्याच्या वाफेनें भरलेली (हवा). ꕥ **सरदी** स्त्री० १ जमीन, भिंत, मीठ, साखर, इ० मध्यें शिरलेला हवेंतील जलांश किं० अशा जलांशानें त्या पदार्थांत झालेली विकृति.२ शरीरांत झालेला शैत्याचा विकार. ३ खाद्यपदार्थ, औषध, इ० चा शरीरांत शैत्य उत्पन्न करण्याचा गुण. ४ पडसें इ० रूप शैत्याची बाधा.**सरद होणें** (किं० **मनांत सरद होणें**) असंतुष्ट किं० नाखूष होणें; मनाजोगी गोष्ट झाली नाहीं म्हणून रुसणें. **सरदगरमी** स्त्री० सरदीनें मिश्रित जी गरमी ती किं० अशा गरमीमुळें शरीरांत जी विकृति होते ती.

सरदणें, सरदावणें, सरदेणें [म० सरद] अ० क्रि० १ (जमीन, मीठ, वस्त्र, इ० मध्यें) जलांश भिनणें किं० शिरणें. २ गारठणें. ३ थंडीच्या अतिशयामुळें (शरीरास) बाधा होणें.

सरदार [फा०] पु० १ बडा अधिकारी. २ श्रीमंत आणि कुलीन मनुष्य. ३ सरकारनें कोणा मनुष्याला दिलेली बहुमानाची पदवी. ४ मोठा योद्धा. ५ फौजेचा मुख्य. ꕥ **सरदारगिरी, सरदारी, सरदारकी** स्त्री० सरदाराचा हुद्दा, दर्जा, किं० अधिकार; सरदार ही पदवी.

सरदारी [फा० सर्दवाल्=डोक्याचा पट्टा] स्त्री०लगामाचा घोड्याच्या डोक्यावरून जाणारा पट्टा.

सरदावणें, सरदेणें वर ' सरदणें ' पहा.

सरदावरदा [फा० सर्आवुर्द] स्त्री० १ मध्यम प्रमाण किं० सरासरी; स्थूलमान. २ भिन्न भिन्न गुणधर्मांच्या पदार्थांच्या मिश्रणांत जे नवे गुणधर्म उत्पन्न होतात ते समुच्चयानें. मागें ' वरावर्द, ' 'वरावर्दी ' अर्थ ३ आणि ४ पहा.

सरदी वर ' सरद ' मध्यें पहा.

सरदणें वर ' सरदणें ' पहा.

सरदेशपांड्या पु० मुख्य देशपांड्या.

सरदेशमुख, सरदेसाई पु० मुख्य देशमुख. ॐ **सरदेशमुखी स्त्री०** उत्पन्नाचा दहावा अंश घेण्याचा मराठ्यांनीं मुसलमानी राज्याकडून मिळविलेला हक्क.

सरधोपट [**म०** धोपट] **सि०** १ सरळ किं० साधी अशी (वर्तनसरणी, भाषण). २ ज्यांत वळणें किं० अडचणी नाहींत अशी (वाट, मार्ग). ३ जिला वळणें नाहींत अशी(नदी). **क्रि०वि०** न अडखळतां, न थांबतां (लिहिणें, वाचणें, पुराण सांगणें, इ०). [करतां.

सरनिखर क्रि० वि० सरसकट; निवड न

सरनौ(–नो–)बत(–द) [**फा०**]**पु०**१ हवालदाराच्या हाताखालचा एक अधिकारी. २सेनापति. ३ डंक्यावरील मुख्य अधिकारी.

सरपट स्त्री० १ साप, आळी, इ० चें चालणें किं० त्यांच्या चालण्याचा जमीनीवर उठलेला मार्ग. २ कोणताही पदार्थ, पशु, किं० माणूस जमीनीवरून ओढीत नेल्यानें जमीनीवर जो पट्टा उठतो तो.

सरपट श० यो० अ० १ पृष्ठभागाला स्पर्श करीत करीत (जाणें, ओढणें, इ०); उ० जमीनीसरपट तो ओंडा ओढीत आण, उचलून आणूं नको. २ जमीन इ० ला चिकटून; उ० विंचू जमीनीसरपट बसला आहे.

सरपटणें अ० क्रि०१जमीन इ०च्या पृष्ठभागाला चिकटून (जाणें, सरणें, इ०). २ ढुंगणानें पुढें सरकत जाणें.

सरपण न० जाळण्यासाठीं गोळा केलेलीं किं० साठविलेलीं लाकडें; गोवऱ्या, इ०.

सरपागा (–ग्या,–गे) **पु०** पागेवरील मुख्य अधिकारी.

सरपाटील [**फा०** सर+पाटील]**पु०**तरफेचा मुख्य पाटील; अनेक गांवांच्या पाटलांचा मुख्य.

सरपोस [**फा०** सर् (डोकें)+पोस् (झाकण); पोषीदन् (झाकणें)] **पु०** १ आच्छादन. २ चादर; पलंगपोस. ३ (**लाक्षणिक**) गुप्तपणा; रहस्य.

सरफराज [**फा०**] **वि०**१ मान पावलेला.२ मानास चढविलेला; बहुमान ज्याचा करण्यांत आला आहे असा.ॐ**सरफराजी स्त्री०** १ बहुमान. २ बढती; उन्नति. ३ शिफारस; तारीफ.

सरफळा स्त्री० १ सर्पाच्या आकाराचें मुलांच्या कमरेस बांधावयाचें एक भूषण. २ सुवर्णादिधातूंची आकारविशेषाची दागिना म्हणून गळ्यांत घालावयाची सांखळी.

सरफा, सरिफा [अ० सर्फाह्] **पु०** फायदा; नफा. ॐ **सरफेवार, सरफेवाईक वि०** फायदेशीर.

सरफास, सरकफास [**म०** सरणें+फास] **पु०** घागर इ० च्या गळ्याला घालावयाचा दोरीचा फास,–जो गरज पडेल त्याप्रमाणें लहान किं० मोठा करतां येतो.

सरबडणें अ० क्रि० (पदार्थाच्या पृष्ठभागाला) स्पर्श करीत करीत जाणें; पदार्थाला स्पर्श करून किं० चाटून जाणें. ॐ **सरबडता गोळा पु०** जमीनीला स्पर्श करीत करीत जाणारा तोफेचा गोळा. उंचावरून हवेंतून जाणाऱ्या गोळ्याला ' अधांतरींचा गोळा ' म्हणतात.

सरबत [**अ०** षर्बत्] **न०** लिंबू, आंबा, चिंच, इ० चें साखर, वेलदोडे, इ० द्रव्यें घालून केलेलें पेय. ॐ **सरबतखाना पु०** बड्या लोकांच्या घरांत सरबतें करण्याची किं० साठवून ठेवण्याची जी खोली असते ती.

सरबत्ती स्त्री० १ बंदुका, तोफा, इ० तून एकदम सोडलेल्या गोळ्यांचा वर्षाव.२(**लाक्षणिक**) कोणेकावर केलेला शिव्यांचा वर्षाव.

सरबर, सरबरा [**फा०** सर्वर्=मुख्य] **स्त्री०** स्पर्धा; चढाओढ; बरोबरी.

सरबरा [**फा०** सर्बराह्] **पु०** काम, कारभार, इ० करणें किं० चालविणें. पुढें ' सरभरा ' पहा. ॐ **सरबराई स्त्री०** बड्या माणसाची किं० पाहुण्याची किं० अधिकाऱ्याची व्यवस्था,–त्याला जरूर तें धान्य, गाड्या, गवत, इ०पदार्थ पुरविणें.

सरबरीत वि० पातळसर (भात, चुना, शेण, चिखल, इ०).

सरबसर, सरबासर [**फा०** सर्बसर्] **वि०** किंचित भिन्न दर्जाचे, गुणाचे, किं० किंमतींचे

(पदार्थ). क्रि० वि० १ मिश्र करून; भिन्न जातींच्या किं० गुणधर्मांच्या पदार्थांची मिसळ करून. २मध्यम प्रकारें; साधारणपणें.३एकंदरीनें.

सरभरा, सरबरा [फा० सरबराह्] स्त्री० अंगानें, पैशानें, किं० अन्य प्रकारें कोणेकास केलेलें साहाय्य किं० मदत.

सरम, सरमड, सरमाड न० बाजरीच्या ताटांचा समूह. ॐ **सरमडी, सरमाडी, सरमाडा** वि० १ बाजरी लावण्याच्या उपयोगाची (जमीन). २ जीच्यावर बाजरी लाविली आहे अशी (जमीन). ३ बाजरीच्या शेतांत केलेला (हरभरा इ०).

सरम मागें ' शरम ' पहा.

सरामिसळ स्त्री० मिश्रण. वि० मिसळींचा.

सररहा [फा० सर् राह्] क्रि० वि० अड-थळा न येतां; मोकळेपणानें; सुरळीत रीतीनें.

सरराास [फा० सर् (डोकें) + म० रास (ढीग)] वि० श्रेष्ठ; अग्रगण्य; मुख्य. क्रि० वि० निवड न करतां; सरसकट; चांगला वाईट, उंची निंची, असा भेद न करतां; उ० त्यानें हे आंबे सरराास रुपायाला दीडशे घेतले.

सरल, सरळ [सं० सरल] वि० १ वाकडा नव्हे तो; उजू. २ निष्कपट, प्रामाणिक (वर्तन, भाषण). ३ थेट समोर असलेला. पु० देवदार वृक्ष. ॐ **सरलद्रव** पु० सरल ह्या वृक्षाचा चीक.

सरवट [म० सरवा] न० १ एक प्रकारचा तांदूळ. २ सरवा करावयाच्या उपयोगाची जमीन. खालीं ' सरवा ' पहा. ३ पावसाची लहानशी सर. [रीति.

सरवळा पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक

सरवा [म० सरणें] पु० १ नुकतेंच कापलेलें शेत,–ज्यांत कणसें, दाणे, ताटें, इ० इतस्ततः पडलेलीं आहेत. २ फळें, भाजीपाला, मिरच्या, हळद, इ० तोडून किं० काढून नेल्यानंतर त्या जमीनीवर पडलेला अवशेष,–जो गरीब लोक वेचून नेतात. ३ प्रथम वर्षीं भाजून तयार केलेलें जें डोंगराळ जमीनीवरील शेत त्यास पुढें दोन वर्षें ' सरवा ' म्हणतात.

सरवा [म० सर] पु० पावसाची सर.

सरशी [म० सरस] स्त्री० १ श्रेष्ठपणा; वर-चढपणा. २ जय. ३ चलती, उत्कर्ष, भरभराट.

सरशेवट [म० सरणें+शेवट] पु० अगदीं अंत किं० अखेर. ॐ **सरशेवटीं, सरते शेवटीं** क्रि० वि० अगदीं अखेरीस.

सरस [फा०सरीष्] पु०प्राण्यांचीं नखें किं० शिंगें, यांपासून काढलेला एक प्रकारचा डींक.

सरस [सं०] वि० १ रसयुक्त (पान, लाकूड, फळ, इ०). २ वरच्या प्रतींचा किं० दर्जाचा; अधिक चांगला किं० मूल्यवंत. ३ हृद-यंगम; अंतःकरणास वेधणारा. टीप,–' सरस ' हें अकारान्त विशेषण असून ' गोड ' प्रमाणें कधीं कधीं आकारान्त होतें; उ० गोडें पाणी, गोडें वरण, सरशी डाळ, सरसे आंबे, सरसें मोती, इ०. ॐ **सरसाई** स्त्री० १ सरस असण्याचा गुण. २ वरचढपणा; श्रेष्ठता; वरचस्व. ३ मनोहरपणा; मोहकपणाचा गुण.

सरसकट, सरसगट क्रि० वि० निवड न करतां; चांगला वाईट असा भेद न करतां.

सरसंदा, सरसोंदा वि० त्याच किं० बहु-तेक त्याच उंचीचा, वयाचा, सामर्थ्याचा, किं० जोराचा (बैल, मित्र, सार्थीदार, पतिपत्नी,इ०).

सरसपाट वि० अगदीं सपाट (जमीन). ॐ **सरसपाटी** स्त्री० जमीनीची सर्व भागीं सारखी सपाटी.

सरसरणें अ० क्रि०सर् सर् असा शब्द होईल अशा रीतीनें (चालणें, सर्पादिकें जाणें, वारा किं० पाणी वाहणें, इ०).

सरसा [सं० सदृश] वि० सारखा; तुल्य; उ० नांवासरशी तुझी करणी नाहीं. श० यो० अ० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) १ शेजारीं; चिकटून; जवळ; जवळून; उ० भिंतीसरसे पाट मांड. २ त्याच समयीं; उ० चाराच्या ठोक्या-सरसा मी जागा झालों. ३ वेगानें, जोरानें, प्रयत्नानें; उ० त्याणें एका बुक्कीसरसा नारळ फोडला.

सरसाल [फा० सर+साल् (वर्ष)] न० सबंध वर्ष; उ० यंदाच्या सरसालांत माझें एकही इरकली लुगडें विकलें गेलें नाहीं. क्रि० वि० १ सबंध वर्षांत; सर्व वर्षभर; उ० तो सरसाल ग्वालेरीसच आहे, दक्षिणेंत मुळींच आला नाहीं. २ दरवर्षास; उ० आम्हाला सरसाल चार पल्ले

तांदूळ लागतात. टीप,–ह्या दोन्हीं अर्थीं 'सरसालां' सुद्धां. ॐ **सरसाला, सरसाली, सरसालिना** वि० सबंध वर्षाचा; सर्व वर्षासंबंधाचा.

सरसावणें [म० ' सरणें ' चें एक रूप] अ० क्रि० १ पुढें होणें किं० पुढें जाणें. २ वेगानें सरणें; आवेशानें चाल करून जाणें. ३ जोरानें किं० उफाळ्यानें वाढणें किं० उंच होणें; उ० लग्न झाल्याबरोबर ही मुलगी सरसावली आणि पोक्त बाईसारखी दिसूं लागली. ४ बरोबरच्या लोकांना मागें टाकून पुढें सरणें किं० पुढें जाणें.

सरसाविणें [म० ' सरसावणें ' चे प्रयोजक] स० क्रि० १ पुढें लोटणें, ढकलणें, रेटणें, किं० सारणें. २ कोणेकाला भर देणें किं० उत्तेजन देणें.

सरसी वर ' सरशी ' पहा.

सरसुंदा वर ' सरसंदा ' पहा.

सरसुभा पु०, **सरसुभेदारी** स्त्री० [फा० सर्; अ० सुबाह्] सुभेदाराचें कार्यक्षेत्र, हुद्दा, किं० अधिकार. **सरसुभेदार** पु० मामलतदाराच्या वरचा सरकारी अधिकारी. **सुभा** [अ० सुबाह्] पु० प्रांत, परगणा.

सरसुमार पु० १ सारासार विचार. २ भाषण, वर्तन, इ० कांवर आळा किं० नियंत्रणा.

सरसून [म० सरसा] क्रि० वि० लगटून; चिकटून; शेजारून.

सरसोंदा वि० १ वयांत आलेला; प्रौढ वयाचा. २ त्याच वयाचा किं० वाढीचा किं० सामर्थ्याचा (माणूस, पशु).

सरसोंवरशीं [म० सरसावणें] क्रि० वि० जोरानें, नेटानें, धमकदारीनें, उत्साहानें (चाल करून जाणें, हल्ला करणें, शिव्या देणें).

सरस्वती [सं०] स्त्री० १ विद्येची देवता. २ भाषण. ३ सुंदर स्त्री. ४ नदी. ५ नदीविशेष,–जी कांहीं मार्ग जमीनींतून जाऊन पुढें गंगा आणि यमुना ह्यांना आलाहाबादेस मिळते. ६ गाय. ७ सरस्वतीचें चित्र,–जें अक्षरें शिकणारीं मुलें पाटीवर काढून पूजितात. ८ बोलण्यांत चतुर आणि विद्वान स्त्री. ९ वेद, पुराणें, इ०-रूप भाषेचें वाङ्मय. १० कोणा जाड्या पंडिताला किं० मोठ्या साधूला देतात ती पदवी; उ० नृसिंहसरस्वती. ॐ **सरस्वती अनध्याय** पु० आश्विन महिन्याच्या शुक्लपक्षांत मूळ नक्षत्रीं सरस्वतीचें आवाहन करतात त्या दिवसापासून श्रवण नक्षत्रापर्यंत जें अनध्ययन तें. **सरस्वती-पूजन** न० आश्विनमासीं मूळ नक्षत्रावर पोथ्या, पुस्तकें, इ० वर सरस्वतीचें आवाहन करून दुसऱ्या दिवशीं तिचें पूजन करतात तें. **सरस्वतीदान** न० कोणेकापासून द्रव्यादि घेऊन किं०एरव्हींच म्ह०फुकट त्यास जें खत इ०दस्तऐवज करून देतात तो (देणें, लिहून देणें).

सरहद्द [फा० सर्हद्] स्त्री० गांव, प्रान्त, देश, इ० ची मर्यादा किं० अगदीं शेवटाकडची सीमेची रेषा; सीमा; शींव. मागें ' सरद ' पहा.

सरळ [सं० सरल] वि० १ वाकडें नव्हे असें; एका रेषेंत किं० त्याच दिशेंत असलेलें; नीट (नदीचा प्रवाह, रस्ता, इ०), २ ज्यांत लबाडी, छक्केपंजे, किं० दुटप्पी शब्दरचना नाहीं असें (भाषण, व्यवहार, वर्तन, इ०). ॐ**सरळव्याज** न० मूळच्या मुद्दलावरच आकारलें जाणारें व्याज. मुद्दल आणि त्याच्यावरचें व्याज ह्या दोहोंवर आकारलेलें जें व्याज तें ' चक्रवाढ व्याज '.

सरळ स्त्री० भाताचीं ताटें; भातेण.

सरळणें [म० सरळ] अ० क्रि० १ वाद, भांडण, मारामारी, कुस्ती, इ० मध्यें भाग घ्यावयाला पुढें येणें किं० सरसावणें. २ कांहीं कामाचा पुढारीपणा पथकरणें. ३ (मूल, माणूस, झाड, किं०) जोरानें वाढणें किं० फोफावणें.

सरळी [म० सरळ] स्त्री० पाण्यांत प्रथम खूप वेगानें घुसून नंतर अंगांत आलेल्या वेगानें आणि हात पाय मुळींच न हालवितां पुढें सरळ रेषेंत तरंगत जाणें (मारणें).

संरक्षक [सं०] वि० १ रक्षण करणारा. २ पालक; पालनपोषण करणारा. ३ कैदी, घर, किल्ला, इ० वरचा रखवालदार. ४ देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं त्याच जातीच्या परदेशी मालावर बसविलेली (जकात).

संरक्षण [सं०] न० १ रक्षण; जोपासना; पालनपोषण. २ चोर, दरवडेखोर, इ० पासून बचाव, किं० बचाव करण्याची तजवीज किं० व्यवस्था.

संरक्षिणें [सं० सम्+रक्ष्] स० क्रि० १

(कोणेकाचें) पालन, पोषण, किं० जोपासना करणें. २ जतन करून ठेविणें; राखणें; शाबूत ठेवणें.

सरा पु० १ लांब आणि सरळ बांबू. २ विणलेल्या कापडाचीं विरळ विरळ झालेलीं किं० असलेलीं जीं सुतें तीं प्रत्येक; दुस्ता. ३ खटारा गाडीच्या चौकटीचीं पुढची आणि मागचीं जीं दोन लाकडें तीं प्रत्येक. चौकटीच्या उजव्या आणि डाव्या बाजूच्या दोन लाकडांना 'घोडीं' म्हणतात. मागें 'घोडें' अर्थ २ पहा. ४ सुतें, लाकडाचीं धसकटें, इ०चीं टोकें प्रत्येक.

सरा [सं० सुरा] पु० ताड, माड, किं० इतर झाडें यांपासून काढलेली दारू.

सराई स्त्री० १ फळें, धान्यें, इ०चीं वैपुल्यानें उत्पन्न होण्याची किं०पिकण्याची वेळ.२लग्नें,मुंजी, इ०विधि मोठ्या प्रमाणांत म्ह० पुष्कळ होण्याचा जो काळ तो;उ०लग्नसराईमध्यें,(किं०लगीनसराईमध्यें) सणंगें महाग होतात.

सराई [फा० सराय्] स्त्री० धर्मशाळा; मुसाफरखाना.

सराईत [म० सराव; हिं० सरायत] वि० पोहोणें, गाणें, घोड्यावर बसणें, निशाण मारणें, कुस्त्या खेळणें, इ० कांहीं काम करण्यांत पटाईत किं० अभ्यस्त किं० वहिवाटलेला.

सराटा पु० १ एक औषधी झुडूप किं० त्याचें फळ. २ माड, पोफळी, इ० झाडांचे जे हिरके ते प्रत्येक किं० त्यांचीं धसकटें जीं तीं प्रत्येक (गात्रांत बोचण्याचे संबंधानें प्रयोग).३ गायनांत घेतलेली सकंप लांब तान (घेणें,वाजणें, वाजविणें).

सराफ [अ० सर्राफ्] पु० १ हुंड्या, हरएक देशचीं नाणीं, रोकड, इ० ची देवघेव करून चरितार्थ चालवितो तो. २ (**लाक्षणिक**)चिकू, कंजूष,किं०लोभी माणूस.ꕥ**सराफकट्टा** पु०सराफ लोक जेथें धंदा करावयाला बसतात ती आळी. **सराफफाटा, सराफा** पु० धंद्यासाठीं बसलेले जे सराफ लोक त्यांची ओळ किं० पंक्ति. **सराफहट्टा** पु० १गांवांतलि सराफांची आळी. २ धंद्यासाठीं बसलेले सराफ समुच्चयानें. **सराफी** स्त्री० सराफाचा धंदा. **सराफी कावा** पु० १ सराफ लोकांची गिऱ्हाइकांना फसविण्याची कुशलता. २ संसारांत फाजिल चिकूपणा किं० काटकसर.

सराब, शराब [फा० शराब्] पु० दारू; मद्य.

सराय मागें 'सराई' पहा.

सराव[सं०स्राव]पु०कांहीं काम पुष्कळ दिवस करीत असल्यानें प्राप्त होणारी सफाई किं० कुशलता.

सरावलें न० मातीचें परळ किं०ताट (भाकरी भाजणें, जेवणें, इ० च्या उपयोगाचें).

सरासरी [फा०] स्त्री० मध्यम प्रमाण; उ० सात, अकरा,आणि चोवीस, ह्यांची सरासरी चवदा. **टीप**,—अनेक सजातीय संख्यांच्या बेरजेस त्या संख्यांच्या गणनेच्या अंकानें भागून सरासरी येते. **वि०** साधारण बरा; फारसा उंची नव्हे असा; उ० कालचें गोविंदरावांचें व्याख्यान सरासरी होतें; उ० तो हरिदास सरासरीच आहे. ꕥ **सरासरीं, सरासरीनें, सरासरीस** क्रि० वि० १ साधारणतः; वरवर पाहून. २ अंदाजानें. ३ सरसकट; आवड निवड न करतां. ४ यथाकथंचित्; कसेंबसें.

सराळी स्त्री० पोहोण्याची एक तऱ्हा. मागें 'सरळी' पहा.

सरिखा [सं० सदृश] वि० सारखा (कवितेंत).

सरिगम [सं० षड्ज, ऋषभ, गांधार, आणि मध्यम, ह्या सुरांचीं आद्याक्षरें] स्त्री० गायनांतील सा, रि, ग, म, प, ध, नी, हे जे सात सूर त्यांचें मिश्रण करून गायिलेला राग.

सरित्, सरिता [सं० सरित्] स्त्री० नदी.

सरिफा [अ० सर्फाह्] पु० नफा; लाभ; प्राप्ति. ꕥ **सरिफेवार** वि० फायदेशीर; लाभदायक.

सरिफी स्त्री० बंदुकीचा काना.

सरिरास [फा० सर् ओ रास] क्रि० वि० १अखंड प्रवाहानें;मध्यें न थांबतां.२व्यत्यय किं० अडथळा न होतां.

सरी [सं० सर] स्त्री० १ कोणत्याही धातूची तार. २ स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना.३ बांबूची किं० वेत पिंजून लांबलचक काढलेली पट्टी. ४ बागेंतलि पाण्याचा पाट. ५ अशा पाटाचें पाणी ज्यांना लाविलें

आहे अशा झाडांची ओळ. ६ विणलेल्या वस्त्राचे तंतु दूर सरून मध्यें ज्या लांबट फिडी पडतात त्या प्रत्येक; दुस्ता. ७ भिंतीचा माथा. ८ खांबांच्या माथ्यावरचें लाकूड; लग. ९ जात्याची वरची तळी जड करण्यासाठीं जें दगडाचें किं० मातीचें कडें तिच्यावर ठेवितात तें. ह्याला 'पेंड' असेंही म्हणतात. १० गळ्याचें पुढें आलेलें हाड. ११ बागेंतील वाफ्यांचे विभाग करण्यासाठीं जे लहान लहान बांध घातलेले असतात ते प्रत्येक.

सरी, सर [**सं०** सदृश्] **स्त्री०** बरोबरी; साम्य; उ०मुरकुटाला गरुडाची सरी कशी येईल?

सरीक [**फा०** परीक] **पु०** १ मित्र. २ पातीदार; भागीदार;सर्कती.

सरीसर्वत्र [**सं०** सर्वत्र] **क्रि० वि०** सर्व ठिकाणीं; जागोंजाग; इकडे तिकडे.

सरू [**सं०** त्सरु] **पु०** तरवार, कोयता, इ० ची मूठ. मागें ' थरू ' पहा.

सरू, सुरू [**अ०**] **पु०** एक झाड,–हें सरळ, उंच, आणि अग्राकडे निमुळतें होत गेलेलें असतें. ॐ **सरूचा, सरूदार वि०** सुरूच्या झाडासारखा उभा, सरळ, आणि निमुळता (पदार्थ,–समई, गुलाबदाणी, इ०).

सरूप [**सं०**] **वि०** १ दिसण्यांत सारखा. २ सुंदर. ॐ **सरूपता स्त्री०** १ दिसण्यांत सारखेपणा. २ सौन्दर्य. ३ चार मुक्तींपैकीं एक. सायुज्यता, सलोकता, समीपता, आणि सरूपता, ह्या चार मुक्ति. सरूपता मुक्तीमध्यें ईश्वराचें रूप मुक्ताला प्राप्त होतें.

सरेकरी [**सं०** सुरा; **म०** सरा] **पु०** दारू विकणारा. मागें ' सरा ' पहा.

सरेसाल [**फा०** सर्+साल् (वर्ष)] **क्रि० वि०** सर्व वर्षांत; सबंध वर्षभर.

सरोज [**सं०**] **न०** कमळ. ॐ**सरोजिनी स्त्री०** १ कमळाची वेली. २ कमळांचें वन.

सरोता [**हिं०** सरवता] **पु०** सुपारी फोडण्याचें हत्यार,– आडकित्ता.

सरोदा पु० हात किं०पत्रिका पाहून भाकित सांगणारा; डाकोचा. मागें ' डाकोचा, ' ' डाकोता ' पहा.

सरोदा पु० एक तंतुवाद्य.

संरोध [**सं०**] **पु०** १ प्रतिबंध. २ विघ्न. ३ कैद. ४ वेढा; गराडा.

संरोधन [**सं०**] **न०** १ कैदेंत टाकणें. २ आडथळा करणें. ३ विघ्न उपस्थित करणें. ४ वेढणें.

सरोबरी [**फा०** सर्वरी=वर्चस्व] **स्त्री०** १ सारखें प्रमाण; सारख्या प्रमाणांत असणें; उ० ह्या गव्हांत सरोबरीनें हरभरे मिसळले आहेत ते निवडावयाला फार वेळ लागेल. २ स्पर्धा; चढाओढ.

सरोरुह [**सं०**] **न०** कमळ.

सरोवर [**सं०**] **न०** तळें; उ० मानस सरोवर हिमालयांत आहे. ॐ **सरोवर न्हाणें** सती जाऊं इच्छिणारी स्त्री यथाविधि स्नान करते तें.

सरोसर [**फा०** सरासर] **स्त्री०, पु०** १ डोक्यावर घालण्याचा एक दागिना. २ घोड्याच्या तोंडावर आणि डोक्यावर घालावयाचा पट्टा. ह्याचे ' कपाळपट्टा ' आणि ' मुखपट्टा ' असे दोन अवयव असतात. मागें ' मुख ' मध्यें ' मुखपट्टा ' आणि ' कपाळ ' मध्यें ' कपाळपट्टा ' पहा.

सरोळा पु० बेरजेचा ताळा पाहाण्याची एक रीति. मागें ' सरवळा ' आणि पुढें ' सारोळा ' पहा.

सर्ग [**सं०**] **पु०** १ जन्म; उत्पत्ति. २ जगाची उत्पत्ति. ३ सृष्टि; जग. ४ स्वभाव; जन्मजात धर्म. ५ निश्चय; हट्ट. ६ उत्सर्जन; त्याग. ७ रघुवंश इ० ग्रंथांचा एक भाग. ॐ **सर्गबंध पु०** महाकाव्य.

सर्ज [**सं**] **पु०** १ साल नांवाचा वृक्ष. २ राळ. ॐ**सर्जगंधा स्त्री०** रास्ना. **सर्जरस पु०** राळ.

सर्जि, सर्जी, संर्जिका स्त्री०, सर्जिक्षार पु० सज्जीखार. [पहा.

सर्द, सर्दार इ० मागें ' सरद, ' ' सरदार '

सर्प [**सं०**] **पु०** १ सरपटत जाणें. २ साप. ३ वाकडी गति. ॐ **सर्पारि पु०** १ गरुड हा पक्षी. २ मोर हा पक्षी. ३ मुंगुस हें जनावर. **सर्पराज पु०** वासुकी. **सर्पविद्या स्त्री०** गारुड. **सर्पसत्र न०** सर्पांचा नाश करण्यासाठीं जनमेजयानें केला जो यज्ञ तो.

सर्पमणि [सं०] पु०सापाच्या डोक्यांत असतो म्हणून कल्पिलेला मणि.

सर्पिणी, सर्पीण [सं०]स्त्री० सर्पजातीची स्त्री.

सर्पटणें मागें ' सरपटणें ' पहा.

सर्पोस मागें ' सरपोस ' पहा.

सर्व [सं०] वि० १ सगळें; अशेष. २ पूर्ण. पु० शिव. ॐ **सर्वांगीण** वि० १ सर्व अंगास व्यापिणारें. २सर्व अंगास लाविलेलें (चंदन इ०). **सर्वार्थसिद्ध** पु० गौतमबुद्ध. **सर्वंकष** वि० १ सर्वनाशक. २ सर्वव्यापक. पु० ठग; पापी. **सर्वकालीन** वि० १ सर्व काळीं सारखेंच लागू पडणारें (तत्त्व).२सर्व काळ टिकणारें. **सर्वग** पु० परमात्मा.**सर्वज्ञ** वि०सर्व जाणणारा.पु० १ परमेश्वर.२ शंकर. ३बुद्ध. **सर्वजनीन** वि० १ सर्वांस सारखें लागू पडणारें. २ सर्व लोकांसंबंधाचें. ३ सर्वांना हितकर. **सर्वथा, सर्वथैव** क्रि० वि० १ सर्व प्रकारें. २ एकंदरींत. ३ पूर्णपणें. ४ अगदीं. **सर्वदा** क्रि० वि० नेहेमीं; सदैव. **सर्वनाम** न० नामाचा उच्चार वारंवार होऊं नये म्हणून नामाच्या बद्दल योजतात तो शब्द.**सर्वमंगला** स्त्री० पार्वती. **सर्वसहा** स्त्री० पृथ्वी. **सर्वसह** वि० अत्यन्त सहनशील. **सर्वस्व** न० १ सर्व मालमत्ता. २ तत्त्वांश; सार. **सर्वस्वीं** क्रि० वि० पूर्णपणें; अगदीं.**सर्वतः** क्रि० वि० सर्व बाजूंनीं; सभोंवार; सर्व ठिकाणीं; पूर्णपणें. **सर्वतोभद्र** पु० १ विष्णूचा रथ. २ चक्राकार व्यूहरचना. ३ उलटें सुलटें वाचलें तरी ज्याचा अर्थ सारखाच होतो असें वाक्य, श्लोक, इ०; उ० ' रामाला भाला मारा ' हें वाक्य. ४ (ज्योतिष) शुभाशुभ जाणण्यासाठीं काढतात तें चक्र. ५चारी बाजूंनीं आणि समोरासमोर दरवाजे असलेला अनेकमजली राजवाडा किं० देवालय.**सर्वशः** क्रि० वि०१ पूर्णपणें. २ सर्व बाजूंनीं. **सर्वदा** पु० १ भाकितें सांगण्याचा धंदा करणारा.२पंचांगें करणारा.**सर्वधन** न० (गणित) श्रेणींतील पदांची बेरीज. **सर्वन्यास** पु० ऐहिक वस्तूंचा सर्वथैव परित्याग. **सर्वपित्री अमावास्या** स्त्री० भाद्रपद महिन्याची अमावास्या. **सर्वभक्ष** पु० १ अग्नि. २ कावळा.३ज्याला खावयाला हावें तें चालतें,–मग तें चांगलें असो किं० वाईट असो,–असा माणूस. **सर्वसाक्षी** [सं० सर्वसाक्षिन्] पु० जो सर्व कांहीं पाहातो तो म्ह० ईश्वर. **सर्ववल्लभा** स्त्री० वेश्या.**सर्वशाक** (–ख) स्त्री० अनेक पालेभाज्या, मुळे,इ०च्या मिश्रणाची भाजी. **सर्वांची मेहुणी** स्त्री० १ खंडोबाला वाहिलेली मुलगी. २ अजागळ पोरगी.**सर्वात्मना** क्रि० वि०१अंतःकरणपूर्वक.२ पूर्णपणें; अगदीं. ३ मुळींच (अकरणरूपी प्रयोगांत); उ० माझे हातून ही गोष्ट सर्वात्मना घडावयाची नाहीं; उ० घरांत सर्वात्मना एक पैसा उरला नाहीं.

सर्षप [सं०] पु० १ मोहोरी. २ मोहोरीच्या दाण्याइतका कांहीं पदार्थ. ३ एक वजन.

सल [सं० शल्य] पु०, न० १ स्त्रीच्या पोटांत न वाढतां आणि बाहेर न पडतां राहिलेला गर्भ.२लाकूड इ०चें अंगांत शिरून राहिलेलें कुसळ.३(**लाक्षणिक**)मनांत डवचत असलेले दुसऱ्यानें बोललेले अपशब्द किं०केलेलें वर्तन.४उपद्रवकारक माणूस. ५ वाळून गेलेलें झाड. ६ तरवारीच्या म्यानाला कंबरपट्ट्याशीं जोडणारा बंध.७ गुरांना होतो तो एक रोग. ॐ **कोणी स्त्री सलीं लागणें** पोटांत सल राहिल्यामुळें स्त्री जर्जर झालेली असणें. [तिडीक.

सल, सलक [सं० शल्य] स्त्री० सांधिवाताची

सलक (–ख) स्त्री० १ पावसाची जोराची सर. २ तोफांची किं० बंदुकांची सरबत्ती.

सलकडें न० १ दुःखनिवारणासाठीं हातांत घातलेलें मंतरलेलें लोखंडाचें कडें. २ सोनें, चांदी, इ० चें मणगटांत भूषण म्हणून घातलेलें कडें.

सलग [सं० संलग्न] वि० १ मध्यें खंड नसलेलें. २ ज्याचे तुकडे पाडलेले नाहींत असें (वस्त्र, लाकूड, इ०).३ एकाला एक अशीं लागून असलेलीं(घरें, झाडें, इ०).ॐ **सलगी** स्त्री० मैत्री; दोस्ती; घरोबा. **सलगी** पु० पाठीराखा; यजमानाच्या बरोबर सदैव असणारा. [टलेलें.

संलग्न [सं०] वि०जुळलेलें; जोडलेलें; चिक-

सलटनगर पु० कातडीं रंगाविणारांची किं० कमावणारांची जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

सलणें [सं० शल्य] अ० क्रि० १ (कांटा,धस, दुसऱ्यानें बोललेला अपशब्द,केलेला अपमान,इ०)

अंगांत किं०मनांत बोचत असणें. २ (लाक्षणिक) जाचक होणें किं० असणें; असह्य झालेला असणें; उ० तो मनुष्य माझ्या डोळ्यांत सलतो.३ (आपण केलेल्या दुष्कृत्याचें स्मरण)मनाला दुःख देत असणें.

सलतन, सलतनत स्त्री०, **सलतान** न०, **सलतना** पु० [अ०] सर्व सामानसुमान, तोफा, बंदुका, दारूगोळा, हत्यारें, इ० नीं सज्ज किं० सिद्ध झालेली फौज. **सलतनत** स्त्री०, **सलतना** पु० सुल्तानाची राज्यसरणी किं० अमल.

सलद पु० पेटी; संदुक.

सलद स्त्री०, **सलदें** न० घर, परसूं, इ० च्या हद्दीचें काटक्याकुटक्याचें दार.

सलम [अ० सल्म्] वि० १ अखंड; शाबूत स्थितींत असलेलें. २ सईल (कपडा गट्ठा, गांठोडें, इ०).

सला, सल्ला पु० १ हितोपदेश. २ कांहीं काम करण्याची कोणेकानें कोणेकास सांगितलेली किं० लावून दिलेली सरणी; बोध; उपदेश; ताकीद. उ० **वा० अ०** बरें ! ठीक ! योग्य ! तुमचें म्हणणें कबूल !

सलाबत [अ०] स्त्री० १ वैभव; थोरवी.२ अधिकाराचा दरारा. ३ ऋद्धिसिद्धींची अनुकूलता. ‡**सलाबतपणा** पु० १दरारा;अधिकाराचा जोर किं० दट्ट्या. २ दैवशालित्व; ऋद्धिसिद्धींची अनुकूलता.

सलाम [अ०] पु० १मुसलमान लोक कोणाची गांठ पडली असतां हा शब्द 'नमस्कार' ह्या अर्थी योजतात. २ मुसलमानास हिंदू इ० ह्या शब्दानें नमस्कार करतात. ‡ **सलामी** स्त्री० १ एकमेकांनीं एकमेकांस सलाम करणें ही सभ्यपणाची चाल किं०ह्या चालीला अनुसरून केलेले सलाम. २ गांठ पडली असतां एकमेकांनीं एकमेकांस सलाम करण्याइतका परिचय म्ह०साधारण ओळख. ३ स्वामित्वाबद्दलचें अत्यल्प देय, सारा, इ०. ४ पहिली भेट; नमस्कारचमत्कार. ५ प्रतिपक्ष्यांची पहिली झटापट किं० झटापटीची सुरवात. वि० कललेला (खांब, भिंत, घर, इ०). **सलामीचा हात** पु० दांडपट्टा, कुस्ती, इ० करणाऱ्यांचे पहिले पवित्रे. **सलामत** [अ०] क्रि० वि० १ सुरक्षितपणाच्या स्थितींत; उ० शिरें सलामत तर पगड्या पंचाऐंशीं (हा० उपभोग घेणारा सुस्थितींत असला तर उपभोग्य पदार्थ हावे तितके मिळतील).२कांहीं विघ्नें किं०हरकती नयेतां; कांहीं नाश किं० नुकसान न होतां.‡**कीर मोर खाइ तर तारूं सलामत जाई** आपण हाताचे सढळ असलों तर आपलीं सर्व कामें सुरळीतपणें चालतात म्ह० आपल्या मार्गांत विघ्नें, हरकती, इ० येत नाहीत.

सलामालकी [अ० सलाम् अलीक्] स्त्री० तोंडओळख; साधारण परिचय.

सलिता,सलिदा [हिं० सलीदाह्] पु०उंटाचे पाठीवर लादलेलें ओझें आवळावयाचा पट्टा.

सलील [सं०] वि० लीलायुक्त; नखरेबाज; रंगेल. क्रि० वि० अनायासानें; सहज; खेळांत जणों काय.

सलील [अ० सहल्] वि० सोपें; सुकर.

सलींव वि० १ सईल (कपडा); घट्ट न बांधलेलें (ओझें). २ अघळपघळ; पोकळ.

सलीस [अ०] वि० १ मध्यम प्रतीचा किं० दर्जाचा. २ फारशी जड नव्हे अशी (सारा, वर्गणी, इ०ची रक्कम). ३फारसें जिकीरीचें,कष्टाचें, त्रासाचें,किं० जोखमीचें नव्हे असें; सुसह्य(काम).

सलुका(-खा),सलूक(-ख),सलोका(-खा), सलोगा[अ०सलूक्] पु० १ परिचय;ओळखीचा संबंध.दोस्ती; मैत्री. २ युध्यमान प्रतिपक्ष्यांनीं वैर किं० चढाईचें धोरण बंद पाडून केलेली दोस्ती.

सलोकता [सं०] स्त्री०चार मुक्तींपैकीं एक. मागें ' सरूपता,' ' समीपता ' पहा. सायुज्य हा मुक्तीचा चवथा प्रकार.

सलोगा वर 'सलुका (-खा)' पहा.

सल्ला पु०बोटांत घालावयाची पैलूदार अंगठी.

सल्ला [अ० सलाअ] पु०, स्त्री० १ बोध, हिताची गोष्ट (कोणीं कोणास सांगितलेली). २ युद्ध, भांडण, वाद, इ० संपवून केलेली दोस्ती. ‡ **सल्ला मसलत** स्त्री० ए० व० कोणीं कोणास सांगितलेली युक्ति, हिकमत, किं० योजना (करणें, सांगणें, देणें).

सल्लास [अ०] वि०तीन(अरबी सालांत).‡ **सल्लाशीन, सल्लासैन** वि०तीस(अरबी सालांत).

सव [**म०**; **सं० सव्य**] **स्त्री०** उत्तर दिशा (अशिक्षितांत रूढ). ॐ **सवचा, सवेचा वि०** उत्तरेकडचा.

सव [**म०** चव] **स्त्री०** पदार्थाची चव किं० रूचि (अशिक्षितांत रूढ).

सव [**सं०**] **पु०** १ सोमरस काढणें. २ समंत्रक याज्ञिय स्नान.३दारू गाळणें.४ यज्ञ.५ संतति.

संव,सव,सवई,सवय स्त्री०कांहीं गोष्ट नियमित प्रकारें करणें किं०अशा नियमित प्रकारें करण्यानें अंगीं जडलेला परिपाठ किं० ती करण्यानें तिच्या विषयीं उत्पन्न झालेली प्रवृत्ति किं०आसक्ति. 'खोड,' 'व्यसन' हे शब्द याच अर्थाचे असून ते वाईट गोष्ट दर्शविणारे आहेत;उ० त्याला प्रातःस्नानाची संवय लागली; उ० मला उपास करण्याची संवय आहे;उ० त्याला दारूचें व्यसन (किं०खोड) आहे.

सवकणें, सवकावणें, सोकावणें, सोकणें अ० क्रि० कांहीं गोष्टीपासून लाभ होतो असें दिसून आलें असतां ती गोष्ट वारंवार करण्याकडे आकृष्ट किं० प्रवृत्त होणें किं० तिची चट किं० चटक लागणें; उ० ह्या मांजराला रोज रोज दूध घालूं नका, तें सवकेल.

सवंग वि० १ अल्प किंमतीस मिळणारा (माल); नेहेमीपेक्षां किं० अपेक्षेपेक्षां कमी किंमतीस मिळणारा किं० मिळालेला (पदार्थ); स्वस्ता. २ अल्प श्रमानें मिळणारी किं० साध्य होणारी (वस्तु). ॐ **सवंग सवदा हगवण लावी** स्वस्त मिळणारा पदार्थ बहुधा वाईट असतो, आणि म्हणून तो प्रकृतीला अपायकारक होतो. **सवंगाई स्त्री०** स्वस्ताई.

सवंगडी, सवंगडा [**सं०** सह; **म०** सवें+गडी] **पु०** जोडीदार; साथीदार.

सवंगणें [**म०** सवंग] **अ० क्रि०** (धान्यादि पदार्थ) स्वस्त होणें किं०त्यांच्या किंमती उतरणें.

सवंगणें, संवगणें स० क्रि० (शेतांत पिकलेलें धान्य) कापणें.

सवंगाई स्त्री० स्वस्ताई. वर 'सवंग' पहा.

सवघड [**सं०**सु+घट्] **वि०** १ करावयास सोपें (काम). २ करतां येण्याजोगें (काम). ३ अर्थ करावयाला किं० समजावयाला सोपा (ग्रंथ, रचना, इ०). **टीप**,–सर्व अर्थीं उलट अर्थाचा शब्द 'अवघड.'

सवच, संवच पुढें 'सवें, सवंच, सवेंची' पहा.

सवड [**सं०** सु+वेला] **स्त्री०** १ सोयीचा किं० फुरसतीचा वेळ. २ जागेचा प्रशस्तपणा; उ० तेथें इतकी दाटी होती कीं एक आधिक मनुष्य बसण्यास सवड नव्हती. ३ काठिण पेचांतून निसटण्याची कांहीं युक्ति किं० हिकमत किं० सोय; उ० धन्याची परवानगी मिळाल्यास येईन अशी नाहीं म्हणावयाला सवड राखून ठेव. ४ दिलेल्या वचनांतून किं० केलेल्या प्रतिज्ञेंतून निसटावयाला सबब. ५ कोणेकाची कांहीं विनंति अमान्य करण्याला पुरेशी सबब. ६ (बायकी भाषेंत) स्त्रीच्या पोटांत राहातो तो गर्भाचा सल. मागें 'सल' पहा.

सवड,सवडे,सवड्यां क्रि० वि० समक्ष;कोणेकाच्या पुढें किं०देखत किं०समक्षांत(अशिक्षितांत).

सवडणें, सवणणें स० क्रि० (दळण,कांडण, स्वयंपाक, इ० जीं स्त्रियांचीं घरगुती कामें तीं) करून टाकणें किं० उरकून घेणें. ह्या शब्दाची बायकांत रूढि आहे.

संवत् [**सं०**] **पु०** वर्ष;विक्रमानें सुरू केलेला शक. हा इसवी सनापूर्वी ५७ वर्षें सुरू झाला.

सवत [**सं०** सपत्नी] **स्त्री०** एका पतीच्या ज्या बायका परस्परांच्या सवती. ॐ **सवत (-ती-) मत्सर पु०** १ सवतींसवतींमध्यें जो मत्सर किं० द्वेषभाव असतो तो. २ एकाच संस्थेंतील किं० कुटुंबांतील जीं अनेक माणसें त्यांचा परस्परांविषयीं असतो जो मत्सर किं० द्वैधीभाव तो.**सवतवळा स्त्री०** एकाच नवऱ्याच्या अनेक बायका समुच्चयानें. **सवतळा, सवताळा पु०** एकाच स्त्रीशीं किं० रखेलीशीं संभोग करणारे जे जार ते प्रत्येक.

सवतवणी माघवणी [**म०** सटवणी+माघवणी] **न०** फार जोरदार नव्हे अशी पावसाची सर.

सवता वि० वेगळा; भिन्न. ॐ **सवता सुभा पु०** दुसऱ्यापासून अलग ठेविलेला किं० केलेला (व्यवहार); पृथक् मांडणी; स्वतंत्र योजना.

संवत्सर [**सं०**] **पु०** १ वर्ष. २ एक विशिष्ट

मोडणीचें वर्ष; विक्रमाचें वर्ष. मागें 'संवत्' पहा. ३ संवत्सराभिमानी देवता (प्रजापति).**टीप**,–संवत्सर साठ आहेत. त्यांचीं नांवें प्रभव, विभव, शुक्ल,इ० अशीं आहेत.⊛**संवत्सर प्रतिपदा स्त्री०** चैत्र शुक्ल प्रतिपदा,–ज्या दिवशीं चांद्र संवत्सराचा आरंभ होतो. [भूप्रदेश.

संवथळ [**सं०** सम+स्थल] **न०** सपाट

संवदर [**म०** सोंड+दोर] **पु०** मोटेच्या सोंडेला बांधलेली दोरी.

संवदर [**सं०** सुंदर] **वि०** सुंदर (कवितेंत).

संवदर फळ [**सं०** समुद्रफळ] **न०** एक औषधोपयोगी फळ.

सवदा, सौदा [**फा०**] **पु०** १ विकणें किं० विकत घेणें ह्या रूपाचा व्यवहार; क्रय किं० विक्रय. २ विकत घेतलेला पदार्थ. ३ विकलेला पदार्थ. ⊛ **सवदागर, सवदागीर पु०** व्यापारी. **सवदागरी,सवदागिरी,स्त्री०**व्यापार;व्यापाऱ्याचा धंदा. **सवदासूत न०, पु०** व्यापारविपार; व्यापारी मालवील.

सवन [**सं०**] **न०** १ सोमरस काढणें. २ यज्ञ. ३ आहुति. ४ मंत्रपूर्वक यज्ञिय स्नान. ५ काळ, वेळ. ६ प्रसवणें; प्रसूति.७ स्वराचा प्रकार. **टीप**,–संगीत शास्त्रांत मंद्र, मध्य, आणि तार, अशीं तीन सवनें म्ह० स्वरांचे प्रकार आहेत. हीं सवनें चढत्या क्रमानें उंच होत गेलेल्या स्वरांचीं सप्तकें आहेत. यावरून 'तिसरें सवन' म्ह० अत्यन्त उंच स्वराचें सप्तक. तिसऱ्या सवनावर येणें (किं० जाणें), तिसरे सवन काढणें म्हणजे अत्यन्त उंच स्वर काढणें; उ० हें मूल इतका वेळ हळूं हळूं रडत होतें, पण मी त्याची समजूत करावयाला गेलों त्या बरोबर तें एकदम तिसऱ्या सवनावर गेलें (म्ह० तें मोठमोठ्यानें रडूं लागलें); उ० तो वक्ता रागाच्या भरांत तृतीय सवनावर गेला (म्ह० मोठमोठ्यानें ओरडून बोलूं लागला).

सवय मागें 'सव,' 'सवई' पहा.

सवरणें, संवरणें क्रियापदाचा अर्थ व्यापक किं० पूर्ण करणारें हें क्रियापद असून क्रियापदाचा जो काळ,वचन, रूप, तोच 'सरसावणें' ह्याचा काळ, वचन, रूप, इ० असतो;उ० लिहिणें सवरणें, खाऊन सवरून, जेवतां सवरतां,बोलेल संवरेल, इ०. **टीप**,–भाजीविजी, टेबल बिबल, इ० शब्दांतील जसा अंत्य भाग तसा क्रियापदाच्या रूपाचा अंत्यभाग 'सवरणें' ह्या क्रियापदानें केला जातो, त्याला स्वकीय असा कांहींच अर्थ नाहीं.

सवर्ण [**सं०**] **वि०** १ एकाच रंगाचें. २ एकाच जातीचें. ३ तुल्यरूप. [देणें.

सवर्णन [**सं०**] **न०** (**गणित**) समच्छेदरूप

सवर्णित [**सं०**] **वि०** (**गणित**) समच्छेद रूपांत घातलेला.

संवर्त [**सं०**] **पु०** १ नाश. २ प्रलय; प्रलयकाळ. ३ प्रलयकाळचा वहूदक मेघ. ४ समूह. ५ आकुंचन.

संवर्तक [**सं०**] **पु०** १ प्रलयाग्नि.२ वडवानल. ३ बळरामाचा नांगर.

संवर्तिका [**सं०**] **स्त्री०** १ कमळ इ० चें कोंवळें पान.२ दिव्याची ज्योत.

संवर्धक [**सं०**] **वि०** १ वाढविणारा. २ सत्कार करणारा.

संवर्धन [**सं०**] **न०** १ वाढणें.२वाढविणें. ३ पालनपोषण; संगोपन;जोपासना.४ बढती करणें.

सवलत, सोहलत [**अ०** सुहूलत्] **स्त्री०** १ सवड; सोय. २ सौम्यपणा. ३परवानगी.४ सूट; सोडवणूक. ५ माफी.

सवसांज स्त्री० सायंकाळ. ⊛ **सवसांजचा क्रि० वि०** (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) संध्याकाळच्या वेळीं; उ० सवसांजचा तूं जंगलांतून जात जाऊं नको.

सवा, सव्वा [**अ०** सपाद=चतुर्थांशासह] **वि०** चतुर्थांशासहित; ज्यांत पाव अधिक आहे असा; उ० सव्वाशे म्ह० शंभर आणि पावशंभर म्ह० एकशे पंचवीस; उ० सवा रुपाया म्ह० एक रुपाया अधिक रुपायाचा चतुर्थांश म्ह० एक रुपाया चार आणे. ⊛ **सवाई वि०** चतुर्थांशानें अधिक; उ० कोंकणच्या मापापेक्षां देशचें माप सवाई आहे. **सवाई स्त्री०** १ सवा पट; चतुर्थांशानें अधिक असें परिमाण. २ तंबूच्या माथ्याला बांधून जमीनीला खुंट्या, मेखा, इ०ला बांधलेल्या ज्या दोऱ्या त्या प्रत्येक.ह्या अर्थी 'सवाईची दोरी' सुद्धां. **सवाईसूट, सवाईवजा,सवाईबाद स्त्री०**

शेतकरी, कूळ, इ० ना सरकार, सावकार इ०नीं दिलेली उत्पन्नाच्या किं०कर्जाच्या पंचमांशाची सूट किं०माफी.**सवाईजमा स्त्री**०शेतकरी आणि इतर गांवकरीं यांचेकडून सरकारनें घेतलेला जादा कर.

सवाकी,सवायकी स्त्री०,सवायकें न०एक,दोन, तीन,इ० शंभरापर्यंत जे अंक त्यांच्या सवापटींची पंक्ति,–जी मुलांकडून पाठ करवितात ती; उ० एक सवें सवें, वे सवें आडीच, तीन सवें पावणे-चार, इ० पासून शंभर सवें सवाशे येथपर्यंतची श्रेणी.

सवाई स्त्री० मागें ' संवय ' पहा.

सवाई स्त्री० एक प्राकृत छंद.यांत सात भगण असून शेवटीं एक गुरु अक्षर असतें. ह्या छंदांचे अनेक प्रकार आहेत.

सवागी [**हिं**०] **पु**०, **स्त्री**० एक क्षार.

सवाणणें स० **वि**० ठासणें; ठासून भरणें; खांब, खुंटी, दारू, इ० जमीन, भिंत, बंदूक, इ० मध्यें आंत खुपसून पक्कें करणें. खांब किं० खांबाचा दरा,दारू किं०बंदूक,यांचेवर कर्मता असूं शकते; उ० खांब सवाणला; खांबाच्या दऱ्यांत माती सवाणली; दारू सवाणली; बंदूक सवाणली; इ०. [हत्यार.

सवाणा पु० सोनारांचें चिमट्यासारखें एक

संवाद [**सं**०] **पु**० १ संभाषण. २ वाद-विवाद; चर्चा. ३ सादृश्य; मेळ; सारखेपणा. ४ जमणें; जुळणें; जुळणी. ५ मतैक्य. ६ बातमी. ◈ **संवादी वि**० मेळांत असलेलें; जुळणारें; सारखें; जाबदार; सदृश.

सवायकी, सवायकें मागें 'सवा' मध्यें पहा.

सवार, स्वार [**फा**० सवार्] **पु**० १ घोड्या-वर बसलेला किं० आरूढ झालेला. २ घोड्यावर बसून लढणारा. ३ घोड्यावर बसून टपाल, बातम्या, इ०ची नेआण करणारा. **सवारी, स्वारी स्त्री**० १ प्रवास, गमन, इ० प्रसंगीं घोडा, गाडी, उंट, इ० वाहनांवर बसणें किं० बसणारी व्यक्ति किं० बसलेपणाची स्थिति; उ० ह्या टांग्यांत दोन स्वाऱ्या नेण्याचा हुकूम आहे; उ० हें स्वारीचें घोडें आहे, ओझ्याचें नव्हे. २ राजा किं० कोणी बडा अधिकारी किं० बडा माणूस शिकारीस किं० प्रवासास किं० फिरावयास निघाला असतां त्याच्याबरोबर जीं माणसें, गाड्या, घोडे, इ० सरंजाम असतो तो. ३ (गौरवानें) यजमान; घराचा मालक; कोणी-ही माणूस; उ० मी मामलेदाराच्या भेटीस गेलों तेव्हां स्वारी निजली होती(म्ह० मामलेदार);उ० आपली स्वारी आतां कोणीकडे निघाली ? (म्ह० आपण) ४ घोडेस्वारांची टोळी. ५ लढाईचें धोरण धरून देश, किल्ला,इ० वर केलेला हल्ला. ६ कुस्तींतील एक पेंच.

संवार [**सं**०] **पु**० १ झाकणें. २ आकुंचन. ३ संगोपन. ४ (**व्याकरण**) वर्णाचा बाह्य प्रयत्न-विशेष. [तीचा परमावधि.

संवारी, सवारी (**स्त्री**०) समुद्राच्या भर-

सवारी पु० गानांतील तालाचा एक भेद. **वि**० ह्या जातीचा (ख्याल).

सवाल, सव्वाल [**अ**०] **पु**० प्रश्न; चौकशी.

सवाल [**अ**०] **पु**० मुसलमानी वर्षाचा दहावा महिना. पुढें ' साबान ' पहा.

सवाशा [**म**० सवाशें=१२५] **पु**० ब्राह्म-णांची एक जाति किं० त्या जातीचा कोणी इसम **टीप**,–दक्षिणेच्या लोभानें अपवित्र अन्न खाल्ल्या-मुळें सव्वाशे ब्राह्मण भ्रष्ट झाले, ते आणि त्यांची संतति सवाशे ही एक वेगळी जात झाली.

सवाशीण, सवाष्ण, सवाष्णी [**सं**० सुवा-सिनी] **स्त्री**० १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. २ मंगल किं०अन्य प्रसंगीं जेवावयास बोला-वलेली सुवासिनी स्त्री. ◈ **ब्राह्मण सवाशीण स्त्री**० **ए**० **व**०, **सवाशीण ब्राह्मण पु**०**ए**० **व**० कांहीं धार्मिक विधीसाठीं जेवावयास बोलाव-लेला ब्राह्मण आणि सुवासिनी.

संवास [**सं**०] **पु**० १ सहवास. २ मैथुन. ३ रहावयाचें किं० वसतीचें घर. ४ माळ, मैदान.

संवाह पु० पुढें ' संवाहन ' पहा.

संवाहक [**सं**०] **पु**० अंग चेपणारा किं० रगडणारा सेवक.

संवाहन न०, **संवाहना स्त्री**० [**सं**०] १ वाहणें; नेणें; वाहून नेणें.२अंग चेपणें किं० रगडणें किं० मर्दिणें.

सवाहाती [**म**० सवा हात] **स्त्री**० बकरी इ० ची मलविसर्जनाची नळी,–जी सुमारें सवा हात लांबीची असते (खाटिक लोकांत रूढ).

सविकल्प, सविकल्पक [**सं०**] **वि०** १ इच्छेवर अवलंबून असलेलें; ऐच्छिक. २ संशयित; ज्याचें संबंधानें संशय आहे असा. ३ भेद करणारा; भेदयुक्त. ४ (**योगशास्त्र**) ज्ञाता आणि ज्ञेय ह्यांच्यांतील भेदाच्या ज्ञानानें युक्त(समाधि).

सविता [**सं०**सवितृ] **पु०** १ सूर्य. २ परमेश्वर. **वि०**उत्पादक. **सवित्री स्त्री०** १ आई.२गाय.

संवित्ति [**सं०**] १ अनुभव. २ ज्ञान. ३ बुद्धि. ४ ओळखणें.५अंगीकार.६चेतना. ७जाणीव. ८ (**मराठींत**) घरोबा.९(**मराठींत**) एकोपा.

सविध [**सं०**] **वि०** १ सजातीय. २ जवळचें. **न०**सांनिध्य. [सामग्री.

संविधा [**सं०**] **स्त्री०** व्यवस्था; तयारी;

संविधान [**सं०**] **न०** १ मांडणी; रचना; व्यवस्था. २ तजवीज; योजना. ३ उपाय.

संविधानक [**सं०**] **न०** १ नाटक, कादंबरी, गोष्ट, इ०तील मजकुराची मांडणी,जुळणी, किं० रचना. २ अघटित गोष्ट. [लवार.

सविस्तर [**सं०**] **वि०** १ साद्यंत.२ तपशी-

सविस्मय [**सं०**] **वि०** आश्चर्यचकित; विस्मित. [धुंडाळणें.

संवीक्षण [**सं०**] **न०** १ न्याहाळणें. २

संवृत [**सं०**] **वि०** १ झाकलेलें; गुप्त. २ वेष्टित; व्याप्त. ३गराडलेला; वेढलेला.**न०** एकान्त.

संवृति [**सं०**]**स्त्री०** १ झाकणें; लपविणें. २ गुप्त बेत.

संवृत्त [**सं०**] **वि०** घडून आलेलें; झालेलें.

संवृद्धि [**सं०**] **स्त्री०** १ वाढ. २ वैपुल्य. ३ वैभव; उत्कर्ष; भरभराट. [पहा.

सवे, संव स्त्री० संवय; खोड. मागें ' संवई '

सवें श० यो० अ० बरोबर; सहवर्तमान (कवितेंत).

सवें, सवेंच, सवेंचि [**सं०**स्वयमेव] **क्रि० वि०** १ स्वतः; स्वयंस्फूर्तीनें; आपण होऊन. २ तावडतोब;विलंब न लावतां. [नाशवंत.

सवेच [**म०** वेचणें] **वि०** संपून जाणारें;

सवेण्या [**म०** स (सहित)+विहीण]**स्त्री० अ०व०** लग्नांतील रासन्हाणी म्हणून जो समारंभ तो.वरपक्षाकडील स्त्रियांना न्हाऊं घालणें, त्यांना बांगड्या भरणें,ह्या रूपाचा हा समारंभ असतो.

सवेसांजचा [**म०** समय+सांज (संध्याकाळ)] **क्रि० वि०** सायंकाळीं.

सव्य [**सं०**] **वि०** १ डावा. २दक्षिण दिशेकडचा. ३ प्रतिकूळ; उलट.४(**मराठींत**) उजवा.

❀ **सव्यसाची** [**सं०** सव्यसाचिन्] **पु०** १ अर्जुन,–जो उजव्या आणि डाव्या हातानें सारख्याच कौशल्यानें बाण सोडूं शकत होता. २ जो एकादें काम डाव्या हातानें आणि उजव्या हातानें सारख्याच सफाईनें करूं शकतो तो. ३ (**मराठींत**) उत्तम गद्यरचना आणि उत्तम पद्यरचना करणारा. ४ (**मराठींत**) भाषणांत आणि संभाषणांत सारखाच पटाईत. **सव्यापसव्य** [**सं०** सव्य+अपसव्य] **न०** ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण, श्राद्ध, इ० धार्मिक विधींमध्यें जानवें कांहीं वेळां उजव्या खांद्यावरून (अपसव्य),आणि कांही वेळां डाव्या खांद्यावरून (सव्य),लोंबत सोडावें लागतें. ह्या क्रमाला ' सव्यापसव्य ' म्हणतात. ह्यावरून ' सव्यापसव्य ' ह्याचा अर्थ,' व्यर्थ सोसावा लागणारा त्रास ' किं०' जाणूनबुजून अंगावर ओढून घेतलेला उपद्रव ' असा वात्रटपणानें करण्यांत आला. **विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करीत बसणें** मागें ' विकत ' मध्यें पहा. **सव्यगत** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

सव्यगत[**सं०**सुव्यक्त]**वि०**स्पष्टपणें दिसण्याच्या स्थितींत असलेला किं० अगदीं स्पष्ट दिसणारा (पदार्थ).

सव्याज [**म०** स+व्याज] **वि०** १ व्याजासहित (मुद्दल).२ व्याजाच्या शर्तीवर दिलेली किं०घेतलेली कर्जाची रक्कम.**टीप**,–ह्या शब्दांतील ' ज ' चा उच्चार दंततालव्य आहे.

सव्याज [**सं०**] **वि०** कपटी; ढोंगी;लबाड. **टीप**,–'सव्याज' यांतील'ज'चा उच्चार तालव्य.

सव्वा, सव्वाई, सव्वाकी इ० मागें 'सवा,' ' सवाई, ' ' सवाकी,' इ० पहा.

सव्वाल मागें ' सवाल ' पहा.

सव्वीस [**म०** सहा+वीस] **वि०** वीसांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सशक्त [**सं०** सुशक्त] **वि०** प्रकृतीनें चांगला असून बळकट.

संशय [**सं०**] **पु०** १ शंका; अनिश्चय. २

भय; धोका; संकट. ॐ **संशयालु, संशयी** वि० संशयखोर; कुत्सित शंका काढीत बसणारा. **संशयवाईक** वि० नसते संशय काढीत बसणारा. **संशयात्मक** वि० संदिग्ध; ज्याचे संबंधानें संशय किं० शंका आहे असा; संशयास पात्र. **संशय-निवृत्ति** स्त्री० शंकेचें निवारण. **संशयापन्न-मानस** वि० ज्याच्या मनांत कांहीं शंका आली आहे असा.

सशाची अंधेरी स्त्री०पुढें ' ससा' मध्यें पहा.

संशुद्ध [सं०] वि० १ धुऊन टाकलेला. २ दोषमुक्त. ३ ऋणमुक्त.

संशुद्धि [सं०] स्त्री० १ पूर्णपणें धुणें; धुऊन स्वच्छ करणें. २ शुद्धपणा. ३निष्पापपणा .४ऋणा-पासून मुक्तता.

संशोधक [सं०] वि० १ दुरुस्त करणारा; तपासणारा. २ चौकस बुद्धीचा. ३ शोधून किं० हुडकून काढणारा.

संशोधन [सं०] न० १ शुद्ध करणें; दुरुस्त करणें; मलरहित करणें. २ ग्रंथ बारकाईनें पाहून तपासून त्यांतील चुका, दोष, इ० काढून टाकणें. ३ कर्जाची फेड करणें. ४ वैर शमवून घेणें; सूड घेणें. ५ खनिज धातु इ० शुद्ध करणें.

संशोधित [सं०] वि० तपासलेला; दुरुस्त केलेला (ग्रंथ, खनिज पदार्थ, इ०).

संश्लिष्ट [सं०] वि० १ कवटाळलेला; आलिं-गिलेला. २ निकट संबंधानें जुळलेला.

संश्लेष [सं०] पु० १ आलिंगन. २ स्पर्श. ३संयोग.

संश्लेषण न०, **संश्लेषणा** स्त्री० [सं०] १ जोडणें. २ आलिंगन. ३ बांधणें; बंधन.

सष्टम [सं० सत्तम] वि० मोठा, ठसठशीत, सणसणीत, दडदडीत (दागिना, भांडें, वस्त्र, किं० कोणताही पदार्थ).

ससकर [सं० शर्करा; म० साखर] पु० १ केरकचरा ज्यांत फार आहे असा धान्य, डाळ, साखर, इ० पदार्थ. २ दोन धान्यें, डाळी, इ० चें मिश्रण. वि० १ मिसळीचें (धान्य, इ०). २ केरकचऱ्यानें भरलेलें (धान्य इ०).

ससकार पु० विसार. मागें ' सचकार ' पहा.

संसक्त [सं०] वि० १ चिकटलेला. २ बांध-लेला. ३ मिश्रित. ४ जवळचें; निकट किं० शेजारीं असलेलें. ५ आसक्त; अनुरक्त. ६ युक्त; सहित. ७ अविच्छिन्न; अखंड.

संसक्ति [सं०] स्त्री० १ चिकटणें. २ निकट संबंध; दाट परिचय. ३ आसक्ति.

ससगणी, ससगाणी, सजगणी स्त्री० ढब्बू,—दोन पैसे किमतीचें एक नाणें.

ससंबंधिक, ससंबंधी [म० स+संबंधी] वि० दुसऱ्याच्या अपेक्षेनें असलेला किं० ध्याव-याचा किं० जाणावयाचा; उ० सेव्य आणि सेवक हे एकमेकांचे ससंबंधी आहेत.

संसरण [सं०] न० १ गमन; जाणें. २ उत्पत्ति; जन्म. ३ संसार; प्रपंच. ४ युद्धाचा आरंभ. ५ सैन्याचें निर्वेध गमन किं० चाल. ६ राजमार्ग. ७ नगराबाहेरचें विश्रांतीचें स्थान. ८ वाऱ्याचें किं० पाण्याचें वाहाणें.

संसरणें [सं० सम्+सृ] अ० क्रि० जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून जाणें.

संसर्ग [सं०] पु० १ संबंध; संपर्क. २ सह-वास. ३ स्पर्श. ४ सांनिध्य; शेजार. ५ परिचय. ६ आसक्ति; व्यसन. ७ मैथुन. ८वाटण्या झाल्या-नंतरचें भाऊबंदांचें सलोख्यानें एकत्र राहाणें. ॐ **संसर्गी** [सं० संसर्गिन्] वि० १ संबंध अस-लेला. २ वाटण्या झाल्यानंतर एकत्र राहाणारा

संसर्जन [सं०] न० १ त्यागणें; सोडणें. २ मिश्रण.

संसर्प [सं०] पु० १ सरपटत जाणें. २ [अधिक मास.

ससा [सं० शश] पु० एक भित्रा प्राणि-विशेष. ॐ **सशाची अंधेरी** स्त्री० आपल्यावरच्या संकटाकडे केलेलें दुर्लक्ष्य किं०दुर्लक्ष्य करून (म्ह०तें न पाहातां)स्वस्थ आणि आरामांत राहाणें.**ससे-धाकें** न० अतोनात भीति किं० भितरेपणा; क्षुल्लक कारणावरून फारच घाबरणें; कारण नसतां कारण कल्पून भिणें.

ससाणा [सं० श्येन] पु० एक क्रूर आणि मोठ्या आकाराचा आणि शक्तिमान् पक्षी.

संसार [सं०] पु० १ जन्ममरणाचा फेरा. २ ऐहिक जीवित; जीवनाचा प्रकार; प्रपंच. ३ प्रवाह; मार्ग. ४ (**सांख्य**) विश्व. ५ विस्तार. ६ आयुष्यांत सोसाव्या लागणाऱ्या अडचणी अपमान, खटपटी, त्रास, जबाबदाऱ्या, इ०

चा समुचय. ७ कुटुंबांतील माणसें, त्यांच्या-संबंधाचीं आपलीं कर्तव्यें, इ० समुच्चयानें. ८ घरांतील भांडींकुंडीं, सामानसुमान, इ० समुच्चयानें. ꣸ **संसार करणें** (किं० **हाकणें**) बायको, मुलें, आश्रित, इ० ची जबाबदारी वाहून आयुष्य-क्रमण करणें. **कोणेकाच्या संसाराची मात्रा होणें** (किं० **करणें**) त्याचे बेत, योजना, प्रयत्न, आशा, इ० ची माती होणें (किं० करणें). **संसारसाक्षी पु०** परमेश्वर. **संसाराचा गाडा पु०** संसाररूपी ओझ्याचा गाडा (ओढणें). ओझ्याची गाडी ओढणाऱ्या बैलाच्या स्थितीवरून वैतागांत हा शब्द योजला जातो. **संसाराचें जोकड न०** संसाराची त्रासदायक जबाबदारी. **संसारी वि०** बायको, मुलें, इ० ची जबाबदारी ज्याच्या शिरावर आहे किं० ज्याणें पथकरली आहे असा माणूस (योगी, संन्यासी, इ० च्या व्यावर्तकत्वें).

ससाक्ष [**म०** स + साक्ष] **वि०** ज्यावर साक्षी घातल्या आहेत असा (दस्तऐवज इ०).

संसिद्धि [**सं०**] **स्त्री०** १ पूर्ण होणें; शेवटास जाणें. २ प्राप्ति; ध्येय गांठणें किं० मिळविणें. ३ फळ; परिणति. ४ मोक्ष. ५ स्वभाव. ६ परिपूर्णता.

संसृति [**सं०**] **स्त्री०** १ संसार. २ गति. ३ भूलोकवास. **टीप**,–वर ' संसार ' सर्व अर्थीं पहा.

संसृष्ट [**सं०**] **वि०** १ ग्रस्त; उपद्रविलेला; बाधा पावलेला. २ युक्त; सहित. ३ मिश्रित. ४ उत्पन्न केलेला किं० उत्पन्न झालेला ꣸ **संसृष्टत्व न०** १ संयोग. २ प्राप्ति. ३ कायदेशीर रीतीनें विभक्त झाल्यानंतर पितापुत्र, भाऊ भाऊ, इ० चें पुन्हा सलोख्यानें एकत्र राहाणें.

संसृष्टि [**सं०**] **स्त्री०** १ संयोग. २ पाती; भागी; भागीदारीचा व्यवहार. ३ एकत्र वास; सहवास. ४ समूह. ५ मिश्रण. ६ (**साहित्य**) परस्परांवर अवलंबून नसलेले असे कोणतेही दोन किं० अधिक अलंकार एकाच पद्यांत आले तर ' संसृष्टि ' हा अलंकार होतो. ह्या अलंकाराचे प्रकार, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.

ससेधोंकें न० मागें ' ससा ' मध्यें पहा.

ससोरा पु० गळा, नरडें (धरणें, चेपणें).

संस्कर्ता [**सं०** संस्कर्तृ] **पु०** १ शिजविणारा. २ कोणताही संस्कार करणारा.

संस्कार [**सं०**] **पु०** १ पूजा करणें. २ घासणें, शिजविणें, वाळविणें, पुटें देणें, इ० क्रियांनीं पदार्थांत कांहीं नवा गुण किं० धर्म उत्पन्न करणें. ३ उजळणें; स्वच्छ करणें. ४ शिक्षण. ५ सज्ज करणें. ६ भूषविणें. ७ शिजविणें. ८ कार्य; परिणाम. ९ कर्माचा मनावर राहाणारा परिणाम; वासना. १० अनुभव. ११ विचार; भावना; संकल्प. १२ गर्भाधान, उपनयन, इ० जे विधि ते प्रत्येक. हे संस्कार सोळा आहेत. १३ उपनयन. १४ शुद्धता. १५ ठसा; छाप. १६ देहशुद्धीसाठीं केलेलें कोणतेंही कर्म.

संस्कारणें [**म०** संस्कार; **सं०** संस्कार] **स० क्रि०** (कोणा मनुष्यावर किं० पदार्थावर) कांहीं संस्कार करणें.

संस्कृत [**सं०**] **वि०** १ संस्कारानें शुद्ध किं० पवित्र किं० निर्मल केलेला. २ पूर्ण केलेलें. ३ पक्व; शिजविलेलें. ४ घडविलेलें. ५ उत्तम; वरच्या दर्जाचा. ६ निष्कलंक. ७ शिक्षित, प्रौढ (बुद्धि, विचार, मन). ८ दागिने, पोशाख, इ० नीं शोभविलेला. ९ शास्त्रोक्त लक्षणांनीं युक्त. १० मलरहित केलेला. **पु०** १ व्याकरणशुद्ध (शब्द). २ पंडित. **न०** हिंदुस्तानांत आलेल्या आर्यांची बोलावयाची भाषा,–जिच्यापासून पैशाची, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, ह्या मुख्य चार प्राकृत भाषा उत्पन्न झाल्या.

संस्कृति [**सं०**] **स्त्री०** १ संस्कार. २ विवाह-संस्कार. ३ कोण्या एका समाजांतील लोकांचे अनुभव, त्यांच्यावर होणारे आघात, त्यांचा धर्म, त्यांचीं ध्येयें, हवापाणी, संनिधीच्या लोकांचा संसर्ग, इ० च्या समुच्चयाच्या परिणामानें त्या समाजाला जें दृढमूल वैशिष्ट्य प्राप्त होतें तें; उ० पौरस्त्य संस्कृतींत विश्वबंधुत्व, सत्य, पावित्र्य, इ० गुण प्रमुखत्वानें दृष्टीस पडतात; पाश्चात्य संस्कृतींत ऐहिक वैभवाची हाव, परस्वाचा अपहार करण्याची प्रवृत्ति, इ० गुण प्रामुख्यानें दृष्टीस पडतात.

सस्त, स्वस्त, सस्ता, स्वस्ता [**हिं०**] **वि०** सवंग; नेहेमीपेक्षां किं० अपेक्षित किमतीपेक्षां कमी किमतीस मिळणारा (पदार्थ). ' महाग '

याच्या उलट. ꕥ **सस्ताई, स्वस्ताई स्त्री०**सवंगपणा. ' महागाई 'च्या उलट. **सस्तासुकाळ, स्वस्तासुकाळ पु०**पदार्थांचें वैपुल्य आणि स्वताई.

संस्तर [सं०] **पु०** १ विस्तार. २ रचना. ३ अनुष्ठान. ४शय्या.५स्थंडिलाची रचना.६ थर.

संस्तव [सं०] **पु०** १ स्तुति; परिचय. २ मतैक्य.

संस्ताव [सं०] **पु०** १ स्तुति. २ वेदघोष.३ यज्ञांत विप्रांनीं देवादींची स्तोत्रें म्हणण्याची जागा.

सस्तावणें, स्वस्तावणें [**म०** सस्त, स्वस्त] **अ० क्रि०** (पदार्थांची) किमत उतरणें.

सस्ताविणें, स्वस्ताविणें [**म०** सस्त, स्वस्त] **स० क्रि०** (पदार्थांची) किमत उतरविणें किं० कमी करणें.

संस्तुत [**सं०**] **वि०**१अतिशय वाखाणलेलें. २ नेहेमीचें; परिचयाचें.

संस्थ [**सं०**] **वि०** विशिष्ट स्थळीं असलेला; उ० प्राक्संस्थ म्ह० पूर्वेकडील; वृक्षसंस्थ म्ह० वृक्षावर बसलेला.

संस्था [सं०] **स्त्री०** १ सभा. २ रचना. ३ आकार; स्वरूप. ४ अवस्था; स्थिति. ५ व्यवस्था. ६ मुदत; करार. ७ योग्य मार्ग; न्याय्य मार्ग. ८ समाप्ति; नाश. ९ मृत्यु; मरण. १० (**मराठींत**) सर्व गोष्टींचें आनुकूल्य असल्याची स्थिति. ११ विशिष्ट उद्देश किं० ध्येय साधण्यासाठीं किं० विशिष्ट कार्य करण्यासाठीं कांहीं नियमांनीं बांधलेल्या लोकांची मंडळी किं० जूट. १२ शिकणाऱ्या विद्यार्थ्याला स्वर, उच्चार, इ० मोडणी सांगून पाठ (म्ह० धडा) नेमून देणें. ह्या अर्थीं 'संथा' हें अपभ्रष्ट रूप.

संस्थान [**सं०**] **न०** १ समुदाय. २ स्थिति. ३ वासस्थान. ४ सांनिध्य. ५ ठेवण; रचना; मांडणी; नेम धरणें, कुस्ती, न्याहाळणें, आश्चर्य, दुःख, आनंद, इ० प्रसंगीं शरीराच्या गात्रांची जी विशिष्ट प्रकारची ठेवण होते ती. ६ आकृति; वेष. ७ शरीर. ८ मरण. ९ चवाठा. १० (**मराठींत**) राजाचा राजकीय व्यवहार जेथें मुख्यत्वें करून होतो असें शहर. ११(**मराठींत**) देवालय, साधु, विद्वान्, मांडलिक, इ० ह्या खर्चासाठीं राजा किं० सरकार ह्यांनीं तोडून दिलेला गांव, शेत, इ०. १२ (**मराठींत**) प्रसिद्ध देवस्थान किं० कोणा साधूच्या निवासाचें स्थान. १३ (**मराठींत**) जेथें कांहीं दैवी चमत्कार घडतो असें स्थान. १४ (**मराठींत**) कोणत्याही कारणानें आदराला, वंदनाला, किं० पूजेला पात्र असें स्थान. १५ (**मराठींत**) सार्वभौम राजाच्या अंकित जे लहान लहान राजे त्यांच्या अधिकाराचें क्षेत्र. ꕥ **संस्थानी वि०** संस्थानांतील किं० संस्थानासंबंधाचा (खटला,गांव, खर्च, प्रजा,इ०). **संस्थानिक पु०** सार्वभौम राजाच्या हाताखालचे जे बारकेसारके राजे ते प्रत्येक.**सांस्थानिक वि०** समानदेशीय.

संस्थापक [**सं०**] **पु०** धर्मपंथ, संस्था,सभा, शाळा, अन्नसत्र,तालीमखाना,वर्तमानपत्र,मासिक पुस्तक, इ० स्थापणारा किं०सुरू करणारा माणूस.

संस्थापणें [**सं०** सम्+स्था, स्थाप्] **स० क्रि०** (सभा, पंथ, अन्नसत्र, इ०ची) मांडणी, सुरवात, किं० व्यवस्था करणें.

संस्थापन न०, संस्थापना स्त्री० [**सं०**] १ स्थापण्याची क्रिया. २ जमविणें. ३ ठरविणें. ४ प्रचारांत आणणें. ५ निग्रह; नियमन.

संस्थित [**सं०**] **वि०** १ राहाणारा. २ जवळचा. ३ संपलेलें. ४ मृत; मेलेला. ५ बांधेसूद. ६ स्थिर.

संस्थिति [**सं०**] **स्त्री०** १ सांनिध्य. २ स्वस्थ राहाणें. ३ कायमचें स्थान. ४ आधार. ५ जमाव; ढीग. ६ टिकून राहणें. ७ शेवट;समाप्ति. ८ मृत्यु. ९ एकाग्रता.

संस्पर्श [**सं०**] **पु०** संबंध; संपर्क.

सस्मित [**सं०**] **वि०** ज्याच्या मुखावर हास्य आहे असा. **क्रि० वि०** हसत; हसून.

सस्य [**सं०**] **न०** १ धान्य. २ फळ. ꕥ **सस्यमंजरी स्त्री०** कणीस.

सह [**सं०** सह] **वि०** (**समासान्तीं**) सोसणारा; सोसेल असा; सोसण्याजोगा; उ० दुःसह, सुसह. **पु०** मार्गशीर्ष महिना.

सह [**सं०**] **उपसर्ग,श० यो० अ०** बरोबर; सहवर्तमान; उ० रामासह मी विठ्ठलवाडीस जाणार आहें. ꕥ **सहाध्यायी** [**सं०** सहाध्यायिन्] **पु०** एकाच गुरूपाशीं शिकणारे विद्यार्थी

प्रत्येक. **सहायन न०** सांनिध्य;सहवास. **सहोक्ति स्त्री०** (**साहित्य**) जेव्हां एकाद्या वस्तूसंबंधानें कांहीं विधान केलेलें असतें आणि त्याच विधानांत त्याच वस्तूशीं ' सह ' किं० ' सह ' ह्या अर्थाचा शब्द योजून दुसरी एकादी वस्तु गोविलेली असते तेव्हां सहोक्ति हा अलंकार होतो; उ० छाया मृगांसह बसे तरुच्या बुडास.ह्या अलंकाराचें विशेष निरूपण, खुलासा, उदाहरणें, इ० आमचें 'अर्थालंकारांचें निरूपण' ह्या पुस्तकांत पहा. **सहोढ, सहोढज पु०** लग्नाच्या वेळीं गरोदर असलेल्या स्त्रीचा पुत्र. **सहोदर पु०** सख्खा भाऊ. **सहकार पु०** १आंबा. २रसाळ आंबा. ३ संघटित प्रयत्न; अनेक माणसांनीं एकजुटीनें चालविलेली खटपट. याच्या उलट ' असहकार. ' **टीप**,–अर्थ ३ बद्दल ' सहकारिता ' असाही शब्द आहे. ह्याच्या उलट अर्थाचा शब्द ' असहकारिता. ' **सहकार्य न०** १ अनेकांनीं जूट करून आणि एकोप्यानें आणि भेदभाव विसरून कांहीं कार्य करणें. २ मदत; साहाय्य. **सहकारी** [**सं०** सहकारिन्] **पु०** मदतनीस; साहाय्यकर्ता. **सहगमन, सहमरण न०** मृत पतीबरोबर त्याच्या पत्नीनें स्वतास जाळून घेणें; सती जाणें. **सहचर पु०** १सोबती.२ मदतनीस.३मित्र.४ नवरा. ५ सेवक. ६ प्रतिबिंब. **सहचरी स्त्री०** १ पत्नी. २ सखी. **सहचार पु०** (**न्याय**) सामानाधिकरण्य. **सहज वि०** १ स्वाभाविक २ जन्मसिद्ध. **पु०** १ सख्खा भाऊ. २ जातिस्वभाव. **सहधर्मचारी, सहधर्मी** [**सं०** सहधर्मचारिन्, सहधर्मिन्] **पु०** पति. **सहधर्मचारिणी, सहधर्मिणी स्त्री०** पत्नी. **सहपांशुकिल, सहपांशुलिक, सहपांसुनिक पु०** आपणाबरोबर धुळींत खेळलेला म्ह० लंगोटीयार. **सहभोजन न०** एकत्र भोजन. **सहपान न०** एकत्र पान. **सहवर्तमान वि०** जवळ किं० शेजारीं असलेला किं० राहाणारा. **क्रि० वि०** बरोबर; उ० तो पुत्रासहवर्तमान पुण्यास आला. **सहवास पु०** १परिचय; सांनिध्यास राहाणें. २ एकत्र राहाणें. **सहवासी पु०** परिचित; दुसऱ्याच्या बरोबर स्थलविशेषीं राहाणारा;शेजारी. **सहवासाखालीं पडणें**(कांहीं काम)परिपाठाचें होणें;सोयीनें किं० अल्प कष्टानें होऊं लागणें;अंगवळणी पडणें. **सहज** ' ज ' चा उच्चार दंततालव्य खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

सहज [**सं०** सह+जन्] **वि०** पैशावांचून किं० कष्टावांचून होणारें किं० साधणारें; उ० काशीस जाणें कांहीं सहज नाहीं. **क्रि० वि०** १ श्रमाशिवाय;कांहीं त्रास न होतां; अल्प अवधीत; उ० दहा लाडू मी सहज खाईन. २ विशेषसें कांहीं कारण नसतां;उ०मी इकडे सहज आलों.❀ **सहजगत्या,सहजगतीनें,सहजरीत्या,सहजांत, सहजासहजीं क्रि० वि०** १ अल्प श्रमानें; फारसा त्रास न होतां.२ विशेषकारण नसतां.**सहजाखालीं क्रि० वि०**१श्रमावांचून; त्रास न पडतां; सोप्या रीतीनें.२अंगवळणीं (पडणें); परिपाठांत(येणें).

संहत [**सं०**] **वि०** १ एकवटलेलें. २ जोडलेलें; बांधलेलें.३ एकमत किं० एकजूट झालेला. ४ घट्ट; दृढ; आटोपशीर. ❀ **संहतजानु, संहतजानुक वि०** चालतांना ज्याचे गुडघे एकमेकांवर आपटतात असा.

संहति [**सं०**] **स्त्री०** १ निकटसंबंध. २ ऐक्य. ३ घट्टपणा. ४ जूट; एका कार्यासाठीं जुळलेली मंडळी. ५ समूह.

सहदेव [**सं०**] **पु०** १ पांच पांडवांपैकीं एक. २ एक शूद्र ज्योतिषी. ❀ **सहदेवमत न०** सहदेव ह्या शूद्र ज्योतिष्यानें शेतकरी लोकांच्या उपयोगासाठीं केलेले आडाखे समुच्चयानें. सहदेवाची बायको ' भाडळी ' हिनेंही असेच अनेक आडाखे केले आहेत.

सहन [**सं०**] **न०** १ सोसणें. २ क्षमिणें. **वि०** १ सोसणारा. २ क्षमाशील. ❀ **सहनशील वि०** सोसण्याच्या स्वभावाचा; अपमान, त्रास, कष्ट, इ० न चरफडतां सोसणारा. **सहनशक्ति स्त्री०** कष्ट करण्याची किं० अपमान सोसण्याची किं० भार वाहण्याची कोणेकाची ताकद.

संहरण [**सं०**] **न०** १ गोळा करणें; एकत्रित करणें. २नियमन;नियंत्रण. ३अस्त्र परत घेणें. ४ विध्वंस. ५ अपहार; लुबाडणें; लुटणें.

संहर्ष पु०, संहर्षण न०[**सं०**] १ आनंद. २ स्पर्धा.

सहल [**अ०** सैर्] **स्त्री०** १ घराच्या बाहेर मोकळ्या हवेंत केलेला फेरफटका (करणें).

२ घोड्याला मोकळ्या हवेंत हिंडविणें. ॐ **सहल-शिकार स्त्री०** १ सैरशिकार. २ मर्दानी खेळ.

सहल [सहल्] **वि०** सोपें; सहज होण्याजोगें; सुकर. **क्रि० वि०** सोयीनें; श्रम किं० कष्ट न पडतां.

सहवर्तमान, सहवास, सहवासी मागें ' सह ' मध्यें पहा.

सहवासणें [**म०** सहवास] **स० क्रि०** १ (कोणी मनुष्य, पशु, इ० शीं) सहवास किं० परिचय किं० घरोबा करणें (तो कसा आहे, कोणच्या गुणांचा आहे, कोणच्या स्वभावाचा आहे, इ० जाणतां येईल अशा प्रकारें). २(स्थळविशेषीं) वास्तव्य करणें, (त्यांतील सोयी, गैरसोयी, इ० समजतील अशा रीतीनें).

सहसा [**सं०**] **क्रि० वि०** १ जबरीनें. २ अविचारानें. ३ (**मराठींत**) एकाएकीं; बहुतकरून; परिपाठाच्या सरणीनें; कारणावांचून. ह्या सर्व अर्थीं अकरणरूपी प्रयोग होतो; उ० तो सहसा साप मारावयाला पुढें सरसावत नाहीं; उ० मी सहसा कोणाच्या घरीं जात नाहीं; तो सहसा खोटें बोलत नाहीं.

सहस्र [**सं०**] **वि०** हजार. ॐ **सहस्रांशु, सहस्रकर, सहस्रकिरण पु०** सूर्य. **सहस्राक्ष पु०** इंद्र. **सहस्रपत्र न०** कमळ.**सहस्रबाहु,सहस्रभुज पु०**१कार्तवीर्य.२बाणासुर. **सहस्ररश्मि पु०** सूर्य. **सहस्रघृत न०** (**वैद्यक**) हजार वेळां धुतलेलें तूप. **सहस्रनाम न० ए० व०** विष्णु, शिव, इ० देवांचीं हजार नांवें समुच्चयानें किं० त्यांचा पाठ. **तुळशींचें, बिल्वपत्रांचें,** किं० **फुलें, इ० चें सहस्रनाम वाहाणें** त्या त्या देवाचें एक एक नांव घेऊन तुळस, बेल, इ० चीं पानें किं० फुलें त्यांना पूजेंत वाहणें. **सहस्रभोजन न०** हजार ब्राह्मणांस पुण्यार्जनार्थ जेवूं घालणें.**सहस्रशः क्रि० वि०** हजारों; हजारोंनीं.

सहा [**सं०** षष्] **वि०**तीन ह्या संख्येच्या दुपटी इतका.ॐ **सहा महिन्यांची जांभई स्त्री०** आळसानें, चुकारतट्टूपणानें, किं० रेंगाळत काम करणारा जो सुतार,सोनार,इ०कारागीर त्याचें काम किं०त्यानें काम पुरतें करण्याला लाविलेला उशीर; उ० ह्या विठ्ठलशेट सोनाराकडे कांहीं दागिना करावयाला दिला कीं सहा महिन्यांची जांभई.

सहाकार, सहाकारी मागें ' सह ' मध्यें ' सहकार ' अर्थ ३ आणि ' सहकारी ' पहा.

सहाण [**सं०**शाण] **स्त्री०** १ चंदन,रवा,इ० गंधासाठीं किं० सुंठ इ० औषधासाठीं उगाळतात ज्यावर असा कुरुंद इ०चा सपाट धोंडा. २ हिरा इ० रत्नें पैलू पाडण्यासाठीं ज्यावर घासतात तो धोंडा. ३ शस्त्रांस धार लावण्यासाठीं योजतात जो धोंडा तो.

सहाध्यायी मागें ' सह ' मध्यें पहा.

सहानक, सहानकी पुढें 'सानक,' 'सानकी' पहा.

सहाय [**सं०**] **पु०** १ बरोबर जाणारा किं० असणारा. २ जोडीदार. ३ मित्र. ४ साहाय्य करणारा. ५ सेवक. ॐ **सहायक पु०** मदतगार. **सहायता स्त्री०** १मदत. २ मित्र, जोडीदार, इ० चा समुदाय. **साहाय्य न०** मदत.

संहार [**सं०**] **पु०** १ गोळा करणें;जुळविणें. २ संचय. ३ संक्षेप. ४ अस्त्र परत घेणें. ५ विध्वंस; नाश. ६ प्रळय; जगाचा नाश.

संहारक [**सं०**] **वि०** नाश किं० विध्वंस करणारा.

संहारण [**सं०**] **न०** नाश; विध्वंस.

संहारणें [**सं०** सम्+हृ] **स० क्रि०** १ नष्ट किं० विध्वंस्त करणें. २ आवरणें. ३ परत घेणें. ४ संक्षिप्त करणें.

सहासष्ट [**म०** सहा+साठ] **वि०** साठांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

संहित [**सं०**] **वि०** १ गोळा केलेलें; एकत्र जुळलेलें. २ जवळ आलेला किं० ठेविलेला. ३ धनुष्यावर ठेविलेला किं० जोडलेला (बाण). ४ युक्त; सहित. ५ नेमलेला; योजिलेला.

सहित [**सं०**] **वि०** १ युक्त. २ बरोबर असलेला. ३ सहवर्तमान असलेला. **श० यो० अ०** ४ (**मराठींत**) सह; उ० मी आपल्या चारी भावांसहित काशीयात्रेस जाणार आहें.

संहिता[**सं०**] **स्त्री०** १ संयोग. २ (**व्याकरण**) वर्णसंयोग. ३ मंत्रात्मक जो वेदाचा भाग तो.

इतर भाग 'ब्राह्मणें,' 'उपनिषदा,' इ०. ४ मन्वादिप्रणीत धर्मशास्त्र.

सहिलावणें सइलावण[म० सईल, सहील] स० क्रि० सईल किं० ढिलें करणें; पोकळ करणें.

सहिष्णु [सं०] वि० १ सहनशील; सोशिक. २ क्षमाशील. ❁ **सहिष्णुता** स्त्री० १ सहन करण्याची ताकद. २ क्षमा. ३ क्षमा करण्याकडे प्रवृत्ति.

सही, सहीसाक्ष, सहीसूद मागें 'सई,सही' [मध्यें पहा.

सहील, सैल वि० १ पोकळ (अंगरखा, बंडी, चोळी, इ०). २ दृढ नियंत्रणेंत नसलेला (माणूस, पशु). ३ फारसें घट्ट बांधलेलें नाहीं असें (गांठोडें इ०). [ओरडणें.

संहूति [सं०] स्त्री० पुष्कळांनीं एकदम

संहृत [सं०] वि० १ संकुचित. २ आवरलेलें. ३परत घेतलेलें. [३ विध्वंस.

संहृति [सं०] स्त्री० १ संक्षेप. २ नियंत्रणा.

सहृदय [सं०] वि० १ मार्मिक; दर्दी; काव्यादिरचनेचा अंतर्मुख होऊन आस्वाद घेण्याची ताकद ज्याला आहे असा. २ सौम्य दृष्टीनें किं० दयार्द्र अंतःकरणानें अनाथ किं० गरीब माणसांकडे पाहाणारा; कनवाळू. ३ चांगल्या मनाचा; प्रेमळ. ४ विद्वान्.

सहेली [अ० सैर्] स्त्री० १ व्यायामासाठीं किं० आरामासाठीं फिरणें किं० रपेट करणें. २ मैत्रीण; स्त्रीसहचरी. ३ फकीर लोक गळ्यांत घालतात ती माळ.

सहोक्ति मागें ' सह ' मध्यें पहा.

सहोढ, सहोदर मागें ' सह ' मध्यें पहा.

सह्य [सं०] वि० १ सोसण्याजोगें. २ लायक. पु० एक पर्वत,—ज्याला 'सह्याद्रि' म्हणतात. हा हिंदुस्तानांतील सात मोठ्या पर्वतांपैकीं एक आहे. ह्या पर्वतांना ' कुलपर्वत ' म्हणतात. त्यांचीं नांवें ' कुल ' मध्यें पहा.

सळ [म० सल] पु० १ तरवारीचें म्यान कंबरपट्ट्याला बांधावयाचा पट्टा किं० बंध. २ वस्त्र, कागद, इ० ची घडी घातल्यानें पडते ती दुमडीची रेषा. [तेंत).

सळ [सं० छळ] पु० छळ; गांजणूक (कवि-

सळई [सं० शलाका; हिं० सलाई] स्त्री० १ बांबू, धातूची तार, लाकूड, इ० ची लांब आणि बारीक काडी. २ मुसळाचा दांडा (विडी बसविण्याच्या पूर्वीचा). ३ जनानी मुगट्यावर ज्या उभ्या रेषा असतात त्या प्रत्येक. ४ सर्पणाच्या मणांची किं० गवताच्या पेंढ्यांच्या शेकड्यांची मोजदाद करणें असतां दर शेकड्यास किं० दर मणास जी एक एक लाकडाची अथवा एक पेंढीची खूण बाजूस काढून ठेवतात ती.

सळक स्त्री० पावसाची सर. ❁ **सळकधार पाऊस** पु० एकामागून एक अशा येणाऱ्या सरींच्या रूपाचा पाऊस.

सळकणें अ० क्रि० दुळुकदिशीं, आवाज न करतां निसटणें, निघून जाणें, बाहेर पडणें, किं० पळून जाणें.

सळका पु० हिरड्या शिवशिवत असतां उठतात त्या वेदना प्रत्येक.

सळणें[सं० छल]स० क्रि० १ गांजणें; सतावणें; उपद्रविणें(कवितेंत). २ पाणी कढत होऊन त्याला बुडबुडे येऊं लागणें. ह्या अर्थीं 'सळसळणें' अधिक रूढ आहे.

सळनळीत, सळनळ वि० सरळ आणि ताठ. ❁ **सळनळीत उभा** पु० अगदीं नम्र स्थितींत ताठ उभा राहिलेला (माणूस).

सळंप, सळप न०, स्त्री० लाकडाची लांबलचक धलपी.

सळमिसळ [म० मिसळणें] स्त्री० मिश्रण.

सळय, सळयी स्त्री० मागें ' सळई ' पहा.

सळसळणें, सळाळणें अ० क्रि० १ (आधणाचें पाणी इ० नीं) सळसळ असा आवाज करणें. २ वेदनेच्या लहरींनीं(गळूं, जखम, फोड, इ०) जर्जर होणें. ३ (खावयाला तोंड, मारावयाला हात, चालावयाला पाय, इ०) अति उत्कंठित झालेलें असणें.

सळा पु० मागें ' सळई ' पहा.

सळाथी [म० सड] स्त्री० केरसुणी.

सळाळणें मागें ' सळसळणें ' पहा.

सळी स्त्री० मागें ' सळई ' पहा.

संक्षय [सं०] पु० १ नाश; विध्वंस. २ जगाचा अंत; प्रळय. ३ मृत्यु.

संक्षिप्त [**सं०**] **वि०** १ कमी केलेलें. २ थोडक्यांत केलेलें (विवरण इ०). ३सारांशरूपांत असलेलें;थोडकें.

संक्षेप [**सं०**] **पु०** १ थोडक्यांत आणणें; छाटाछाट. २ सारांश. ३ अपहार. ४ संहार. ५ (**गणित**) अंश आणि छेद यांच्यांतून समान गुणक काढून टाकणें ही क्रिया (देणें, जाणें); उ० $\frac{२४}{३६}$ या अपूर्णांकाला १२ चा संक्षेप दिला असतां $\frac{२}{३}$ हें रूप होतें. ६ गाळणें; अजीबात सोडून देणें; टाळणें; उ० आज मला कचेरींत लवकर जावयाचें होतें म्हणून जेवणांत मी भाकरीला संक्षेप दिला (म्ह० भाकरी मुळींच खाल्ली नाहीं). ॐ **संक्षेपतः क्रि० वि०** संक्षिप्त रूपांत; सारांशानें; थोडक्यांत.

संज्ञा [**सं०**] **स्त्री०** १ शुद्धि; चेतना;चैतन्य. २ ज्ञान. ३ बुद्धि. ४ बेशुद्ध स्थितींतून पुन्हा देहभानावर येणें.५हात, डोळा,इ० नीं कोणेकाला केलेली इशारत किं० खूण. ६ संकेत; सांकेतिक भाषा. ६ नांव; पदवी. ७ (**व्याकरण**) विशेषनाम. ८ पारिभाषिक नांव किं० शब्द. ९ गायत्रीमंत्र. १० विश्वकर्म्याची कन्या,-सूर्याची पत्नी. हिला यम, यमुना, वैवस्वत, आणि अश्विनी कुमार, अशीं अपत्यें होतीं. ॐ **संज्ञावान् वि०** सचेतन; चैतन्ययुक्त; मूर्च्छेतून उठलेला. **संज्ञी** [**सं०** संज्ञिन्] **वि०** ज्याला संज्ञा देण्यांत आली आहे असा (कोणताही पदार्थ).

संज्ञान [**सं०**] **न०** १ चैतन्य. २ बेशुद्ध स्थितींतून शुद्धीवर येणें.

संज्ञापन [**सं०**] **न०** १ शिकविणें. २ कळविणें.

संज्ञु [**सं०**] **वि०** १ फेंगडा. २ चालतांना ज्याचे गुडघे एकमेकांवर आपटतात असा.

सा [**म०** सहा] **वि०** सहा (कवितेंत).

सा [**म०** असा] **वि०** असा; उ० मोठासा; उ० पाऊस येईलसा रंग दिसतो.

साइला पु० १ जंगली जनावर. २ देवास बळी द्यावयाचा जंगली प्राणी,-शिकारींत मारून आणलेला.

साई, साय स्त्री० १ दूध तापविलें असतां त्याचेवर जो स्निग्ध अंशाचा थर जमतो तो. २ कोणत्याही पदार्थावर जमतो तो तवंग किं० थर. ३ छाया (कवितेंत).

साई [**सं०** स्वामिन्] **पु०** गोसावी; बोवा.

साईर [**सं०** स्वैर] **स्त्री०** १ मुंग्या, मुंगळे, इ० ची चालती रांग. २ पक्ष्यांची उडती पंक्ति ३ वानर, डुकर, इ० ची चालती रांग. ४ समुदाय; थवा (सामान्यतः).

साईर,सायर [**अ०**] **न०**१ सामान, व्यापारी माल,इ०वरची जकात.२ही जकात घेण्याचें ठिकाण किं० चौकी किं० नाकें. ॐ **साईर बाब, सायर बाब स्त्री०** सामानसुमान, व्यापारी माल, इ० वरच्या जकातीचें खातें किं० ह्या जकातीसंबंधाचा वसूल.

साईल पु० वर ' साइला ' पहा.

साउली, सावली [**सं०**छाया] **स्त्री०** १ प्रकाशाला प्रतिबंध करणाऱ्या पदार्थांची जमीन,भिंत, इ० वर उमटते ती आकृति. २ पाणी, आरसा, इ० वर पदार्थांचें पडतें तें प्रतिबिंब.

सांउळा,सांवळा[**सं०** शामल] **वि०** काळसर; किंचित् काळा. ॐ **काळासांवळा वि०** काळसर वर्णाचा; फारसा गोरा किं० पांढरा नव्हे तो.

साऊ, साव पु० १ सावकार. २ पेढीवाला.

साऊळ स्त्री०, न० नारळ, पोफळ, इ० झाडांची फांदी. अशी फांदी विणली असतां तिला ' कडण ' म्हणतात. मागें ' झावळी ' ' कडण, कडणें ' पहा.

साक स्त्री० खोलगट केलेला तळहात (पाणी पिणें, पदार्थ घेणें, इ० साठीं).

साक [**सं०** साक्ष] **स्त्री०**१ येणारीं जाणारीं माणसें, जनावरें, चोर, इ० वर ठेविलेली पाळथ किं० नजर (बसविणें, ठेवणें, राखणें). २ पाळथ किं० नजर ठेवणारीं माणसें किं०त्यांची सांखळी.

साक, साख [**सं०**साक्ष्य] **स्त्री०** व्यापारांत कोणेकाची सचोटी किं० पत. ॐ **साक (-ख-) सुरत** [**म०** साख+सुरत (चेहेरा)] **क्रि०वि०** राजरोस; उघडपणानें;सर्वांच्या समक्ष. **साकपाक स्त्री०** पत; सचोटी.

सांकटण (-णें) **न०** पदार्थांचा हत्यारानें तुकडा तोडतांना पदार्थाखालीं ठेवितात तो ठोकळा.

इतर भाग 'ब्राह्मणें,' 'उपनिषदा,' इ०. ४ मन्वादिप्रणीत धर्मशास्त्र.

सहिलावणें सहलावणं [म० सईल, सहील] स० क्रि० सईल किं० ढिलें करणें; पोकळ करणें.

सहिष्णु [सं०] वि० १ सहनशील; सोशिक. २ क्षमाशील. ॐ **सहिष्णुता** स्त्री० १ सहन करण्याची ताकद. २ क्षमा. ३ क्षमा करण्याकडे प्रवृत्ति. [मध्यें पहा.

सही, सहीसाक्ष, सहीसूद मागें 'सई,सही'

सहील, सैल वि० १ पोकळ (अंगरखा, बंडी, चोळी, इ०). २ दृढ नियंत्रणेंत नसलेला (माणूस, पशु). ३ फारसें घट्ट बांधलेलें नाहीं असें (गांठोडें इ०). [ओरडणें.

संहूति [सं०] स्त्री० पुष्कळांनीं एकदम

संहत [सं०] वि० १ संकुचित. २ आवरलेलें. ३परत घेतलेलें. [३ विध्वंस.

संहति [सं०] स्त्री० १ संक्षेप. २ नियंत्रणा.

सहृदय [सं०] वि० १ मार्मिक; दर्दी; काव्यादिरचनेचा अंतर्मुख होऊन आस्वाद घेण्याची ताकद ज्याला आहे असा. २ सौम्य दृष्टीनें किं० दयार्द्र अंतःकरणानें अनाथ किं० गरीब माणसांकडे पाहाणारा; कनवाळू. ३ चांगल्या मनाचा; प्रेमळ. ४ विद्वान्.

सहेली [अ० सैर्] स्त्री० १ व्यायामासाठीं किं० आरामासाठीं फिरणें किं० रपेट करणें. २ मैत्रीण; स्त्रीसहचरी. ३ फकीर लोक गळ्यांत घालतात ती माळ.

सहोक्ति मागें 'सह' मध्यें पहा.

सहोढ, सहोदर मागें 'सह' मध्यें पहा.

सह्य [सं०] वि० १ सोसण्याजोगें. २ लायक. पु० एक पर्वत,—ज्याला 'सह्याद्रि' म्हणतात. हा हिंदुस्तानांतील सात मोठ्या पर्वतांपैकीं एक आहे. ह्या पर्वतांना 'कुलपर्वत' म्हणतात. त्यांचीं नांवें 'कुल' मध्यें पहा.

सळ [म० सल] पु० १ तरवारीचें म्यान कंबरपट्ट्याला बांधावयाचा पट्टा किं० बंध. २ वस्त्र, कागद, इ० ची घडी घातल्यानें पडते ती दुमडीची रेषा. [तेंत).

सळ [सं० छळ] पु० छळ; गांजणूक (कवि-

सळई [सं० शलाका; हिं० सलाई] स्त्री० १ बांबू, धातूची तार, लाकूड, इ० ची लांब आणि बारीक कांडी. २ मुसळाचा दांडा (विडी बसविण्याच्या पूर्वीचा). ३ जनांनीं मुगट्यावर ज्या उभ्या रेषा असतात त्या प्रत्येक. ४ सर्पणाच्या मणांची किं० गवताच्या पेंढ्यांच्या शेकड्यांची मोजदाद करणें असतां दर शेकड्यास किं० दर मणास जी एक एक लाकडाची अथवा एक पेंढीची खूण बाजूस काढून ठेवतात ती.

सळक स्त्री० पावसाची सर. ॐ **सळकधार पाऊस** पु० एकामागून एक अशा येणाऱ्या सरींच्या रूपाचा पाऊस.

सळकणें अ० क्रि० हुळुकदिशीं, आवाज न करतां निसटणें, निघून जाणें, बाहेर पडणें, किं० पळून जाणें.

सळका पु० हिरड्या शिवशिवत असतां उठतात त्या वेदना प्रत्येक.

सळणें[सं०छल्]स० क्रि० १ गांजणें; सतावणें; उपद्रविणें(कवितेंत). २ पाणी कढत होऊन त्याला बुडबुडे येऊं लागणें. ह्या अर्थीं 'सळसळणें' अधिक रूढ आहे.

सळनळीत, सळनळ वि० सरळ आणि ताठ. ॐ **सळनळीत उभा** पु० अगदीं नग्न स्थितींत ताठ उभा राहिलेला (माणूस).

सळंप, सळप न०, स्त्री० लाकडाची लांबलचक धलपी.

सळमिसळ [म० मिसळणें] स्त्री० मिश्रण.

सळय, सळयी स्त्री० मागें 'सळई' पहा.

सळसळणें, सळाळणें अ० क्रि० १ (आधणाचें पाणी इ० नीं) सळसळ असा आवाज करणें. २ वेदनेच्या लहरींनीं(गळूं, जखम, फोड, इ०) जर्जर होणें. ३ (खावयाला तोंड, मारावयाला हात, चालावयाला पाय, इ०) अति उत्कंठित झालेलें असणें.

सळा पु० मागें 'सळई' पहा.

सळाथी [म० सड] स्त्री० केरसुणी.

सळाळणें मागें 'सळसळणें' पहा.

सळी स्त्री० मागें 'सळई' पहा.

संक्षय [सं०] पु० १ नाश; विध्वंस. २ जगाचा अंत; प्रळय. ३ मृत्यु.

ों किं० त्याला लुटणें. साखरेची साल

संक्षिप्त [सं०] वि० १ कमी केलेलें. २ थोडक्यांत केलेलें (विवरण इ०). ३ सारांशरूपांत असलेलें; थोडकें.

संक्षेप [सं०] पु० १ थोडक्यांत आणणें; छाटाछाट. २ सारांश. ३ अपहार. ४ संहार. ५ (**गणित**) अंश आणि छेद यांच्यांतून समान गुणक काढून टाकणें ही क्रिया (देणें, जाणें); उ० २४/३६ या अपूर्णांकाला १२ चा संक्षेप दिला असतां २/३ हें रूप होतें. ६ गाळणें; अजीबात सोडून देणें; टाळणें; उ० आज मला कचेरींत लवकर जावयाचें होतें म्हणून जेवणांत मी भाकरीला संक्षेप दिला (म्ह० भाकरी मुळींच खाल्ली नाहीं). ❀ **संक्षेपतः** क्रि० वि० संक्षिप्त रूपांत; सारांशानें; थोडक्यांत.

संज्ञा [सं०] स्त्री० १ शुद्धि; चेतना; चैतन्य. २ ज्ञान. ३ बुद्धि. ४ बेशुद्ध स्थितींतून पुन्हा देहभानावर येणें. ५हात, डोळा, इ० नीं कोणेकाला केलेली इशारत किं० खूण. ६ संकेत; सांकेतिक भाषा. ६ नांव; पदवी. ७ (**व्याकरण**) विशेषनाम. ८ पारिभाषिक नांव किं० शब्द. ९ गायत्रीमंत्र. १० विश्वकर्म्याची कन्या,–सूर्याची पत्नी. हिला यम, यमुना, वैवस्वत, आणि अश्विनीकुमार, अशीं अपत्यें होतीं. ❀ **संज्ञावान्** वि० सचेतन; चैतन्ययुक्त; मूर्च्छेतून उठलेला. **संज्ञी** [सं० संज्ञिन्] वि० ज्याला संज्ञा देण्यांत आली आहे असा (कोणताही पदार्थ).

संज्ञान [सं०] न० १ चैतन्य. २ बेशुद्ध स्थितींतून शुद्धीवर येणें.

संज्ञापन [सं०] न० १ शिकविणें. २ कळविणें.

संज्ञु [सं०] वि० १ फेंगडा. २ चालतांना ज्याचे गुडघे एकमेकांवर आपटतात असा.

सा [म० सहा] वि० सहा (कवितेंत).

सा [म० असा] वि० असा; उ० मोठासा; उ० पाऊस येईलसा रंग दिसतो.

साइला पु० १ जंगली जनावर. २ देवास बळी द्यावयाचा जंगली प्राणी,–शिकारींत मारून आणलेला.

साई, साय स्त्री० १ दूध तापविलें असतां त्याचेवर जो स्निग्ध अंशाचा थर जमतो तो. २ कोणत्याही पदार्थावर जमतो तो तवंग किंवा पर. ३ छाया (कवितेंत).

साई [सं० स्वामिन्] पु० गोसावी; बावा.

साईर [सं० स्वैर] स्त्री० १ मुंग्या, मुंगळे, इ० ची चालती रांग. २ पक्ष्यांची उडती पंक्ति ३ वानर, डुकर, इ० ची चालती रांग. ४ समुदाय; थवा (सामान्यतः).

साईर,सायर [अ०] न० १ सामान, व्यापारी माल,इ०वरची जकात.२हीं जकात घेण्याचें ठिकाण किं० चौकी किं० नाकें. ❀ **साईर बाब, सायर बाब** स्त्री० सामानसुमान, व्यापारी माल, इ० वरच्या जकातीचें खातें किं० ह्या जकातीसंबंधाचा वसूल.

साईल पु० वर ' साइला ' पहा.

साउली, सावली [सं०छाया] स्त्री० १ प्रकाशाला प्रतिबंध करणाऱ्या पदार्थाची जमीन,भिंत, इ० वर उमटते ती आकृति. २ पाणी, आरसा, इ० वर पदार्थाचें पडतें तें प्रतिबिंब.

सांउळा,सांवळा[सं० शामल] वि० काळसर; किंचित् काळा. ❀ **काळासांवळा** वि० काळसर वर्णाचा; फारसा गोरा किं० पांढरा नव्हे तो.

साऊ, साव पु० १ सावकार. २ पेढीवाला.

साऊळ स्त्री०, न० नारळ, पोफळ, इ० झाडांची फांदी. अशी फांदी विणली असतां तिला ' कडण ' म्हणतात. मागें ' झावळी ' ' कडण, कडणें ' पहा.

साक स्त्री० खोलगट केलेला तळहात (पाणी पिणें, पदार्थ घेणें, इ० साठीं).

साक [सं० साक्ष] स्त्री० १ येणारीं जाणारीं माणसें, जनावरें, चोर, इ० वर ठेविलेली पाळथ किं० नजर (बसविणें, ठेवणें, राखणें). २ पाळथ किं० नजर ठेवणारीं माणसें किं०त्यांची सांखळी.

साक, साख [सं०साक्ष्य] स्त्री० व्यापारांत कोणेकाची सचोटी किं० पत. ❀ **साक (–ख–) सुरत** [म० साख+सुरत (चेहेरा)] क्रि०वि० राजरोस; उघडपणानें;सर्वांच्या समक्ष. **साकपाक** स्त्री० पत; सचोटी.

सांकटण (–णें) न० पदार्थाचा हत्यारानें तुकडा तोडतांना पदार्थाखालीं ठेवितात तो ठोकळा.

सांकटणें सं० क्रि० १(पदार्थांचे) हत्यारानें तुकडे पाडणें. २ (सैन्यांतील शिपायांची) कत्तल उडविणें.

सांकड, सांकडा [सं० संकट] वि० १आकुंचित;अडचणीचें;अवळपवळ किं०प्रशस्त नव्हे असें. २ तंग किं० घट्ट, बसणारा (कपडा).

सांकड, सांकडें [सं० संकट] न० संकट; दुःख; अडचण.

साकडा पु० खटारा गाडीची तबकडी,– कठडा असलेली किं० नसलेली.

सांकण न०, स्त्री० खटारा गाडीचा आंख आणि जूं यांना जोडून बांधणारी दोरी.

सांकणें, सांखणें अ० क्रि० रक्त, दूध, इ० गोठणें किं० घट्ट होणें.

साकर [सं० शर्करा] स्त्री० उसाचा रस, इ० पासून जो गोड पदार्थ तयार करतात तो. 'साकर' पूर्वपदीं येऊन जे संयुक्त शब्द होतात ते पुढें 'साखर'शब्दांत पहा.

सांकर पु० १ पाणी वहावयाच्या पाटांत सांचलेली माती, गाळ, कचरा, इ० चा समुच्चय. २ गातांना, बोलतांना, किं० घोकतांना उच्चार साफ न होऊं देणारा जो घशांत कफरूप मळ सांचतो तो.

सांकल्पिक [सं०] वि० संकल्प किं० निश्चय करून जें ठरविलें किं०पथकरलें तें (व्रत इ०).

साकल्य [सं०] न० समग्रता; पूर्णता.

सांकव, सांकू [हिं० सांखव] पु० ओढ्यावर केलेला तात्पुरता पूल.

सांकविणें [म० 'सांकणें' चें प्रयोजक] स० क्रि० दूध, दहीं, पाणी, इ० गोठविणें किं० घट्ट करणें किं० थिजाविणें.

सांकशी स्त्री० गवत, वेत, बांबूच्या काड्या, इ० ची बनविलेली लहानशी पेटी.

साकसुरत मागें 'साक, साख' मध्यें पहा.

सांकळ, सांखळ [सं० शृंखला] स्त्री० १ सांखळी. २ (दांतांची) पंक्ति किं० ओळ. ॐ **सांकळरीति** स्त्री० एक गणितकृत्य; किमतीनें सारख्या अशा अनेक परिमाणांच्या जोड्यांत कांहीं विशिष्ट सरणीनें समीकरणें बसवून दिलेल्या परिमाणाची किमत काढण्याची रीति. **सांकळकर** पु० भिक्षेकऱ्यांचा एक पंथ किं० त्या पंथाचा कोणीही भिक्षेकरी. हे भिक्षेकरी लोकांकडून पैसे उकळण्यासाठीं स्वतास सांकळीनें बडवून घेतात. **सांकळदंड, सांखळदंड** पु०लांबलचक सांखळी; जाड सांखळी.

सांकळणें, सांखळणें [म० सांकळी] स० क्रि० १ सांखळीनें बांधणें. २ नियंत्रिणें; आवरणें; आडविणें.

सांकळणें अ० क्रि० १(दूध, पाणी, रक्त,इ०) गोठणें किं० घट्ट होणें. २ (कोठा) बद्ध होणें,– ज्यामुळें शौचास साफ होत नाहीं.३(तूप, साखरेचा पाक, इ०) नीं कण्यांचें किं० कणांचें रूप पावणें.

सांकळा, साकळा पु० १ रक्त, दूध, पू, इ० ची गोठलेपणाची स्थिति. २ गोठलेलें रक्त, दूध, इ०.

सांकळी, सांखळी [सं० शृंखला] स्त्री० धातूच्या तारेचे तुकडे कांहीं विशिष्ट प्रकारें वळवून एकांत एक आडकवून जी लांबलचक दोरीसारखी रचना करतात ती.

साकळी स्त्री० गाय इ० च्या गळ्याखालीं लोंबत असते ती पोळी; सास्ना.

सांकळी, साकळी स्त्री० पावसाळ्यांत नदीचें पाणी आसपासच्या नाल्यांत किं० ओढ्यांत जोरानें भरतें तें (भरणें, फुटणें, पडणें).

साका, सांका पु० १ दागिन्यांना डाग लावावयासाठीं तांबें आणि सोनें यांचें करतात तें मिश्रण. २ दागिन्यांतील सोनें चोरून सोनारानें त्याच्या भारंभार घातलेला हीण धातु. ३ नदी, नाला, इ० च्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला आणि कांठावर जमलेला गाळ, गवत, पानें, इ० समुच्चयानें.४ गाळ (सामान्यतः).

सांकाटा पु० घर, होडी,पडवी, मांडव, इ० ची मुख्य रचना किं० उभारणी.

साकार [सं० स (सह)+आकार] वि० ज्याला आकार किं० विशिष्ट आकार आहे किं० देण्यांत आला आहे असा (ईश्वर इ०).

साकांक्ष [सं०] वि० १ इच्छाशील. २ उत्सुक. ३ संशयित. ४ श्रद्धाळू.

साकी, साख, साखी स्त्री० व्यापारांत

कोणेकाची जी पत ती; प्रामाणिकपणा; सचोटी.

साकीबाकी स्त्री० ह्याच अर्थी.

साकी स्त्री० एक प्राकृत वृत्तविशेष. हें वृत्त आर्येप्रमाणें मात्रांच्या गणतीनें रचलेलें असतें.

सांकुळणें मागें ' सांकळणें ' पहा.

सांकू मागें ' सांकव, सांकू ' पहा.

सांकूळ न० पाटाच्या पाण्याच्या प्रवाहाला प्रतिबंध करणारा गाळ, कचरा, इ०.

साकें, सांकें न० दागिन्याला डाग लावण्यासाठीं सोनार करतात तें मिश्रण. मागें 'साका, सांका ' पहा.

सांकेणें अ०क्रि०(दूध, रक्त, इ०)गोठणें किं० घट्ट होणें. मागें ' सांकणें, सांखणें ' पहा.

सांकेतिक [सं०] त्रि० १ खुणेचें. २ संकेत करून ठरविलेलें (स्थल, शब्द, इ०).

सांकेरा, सांकोरा पु० मागें ' सांकर ' पहा.

सांक्रामिक [सं०] वि० संसर्गानें किं० स्पर्शानें उत्पन्न होणारा किं० पसरणारा (रोग, विटाळ, इ०).

साख [सं० साक्ष्य=पुरावा] **स्त्री०** व्यापारांत कोणेकाची पत; प्रामाणिकपणा. ॐ **साखबाज वि०** पतीचा (माणूस); प्रामाणिकपणाचा (व्यवहार).

साखणें अ० क्रि० गोठणें. मागें ' सांकणें ' [पहा.

साखर [सं०शर्करा;**फा०**षक्र] **स्त्री०**१ उसाचा रस इ०पासून जो एक गोड पदार्थ तयार करतात तो. २ लव्हाच्या बरोबर जो पांढरा पदार्थ बाहेर पडतो,–ज्याला मुंग्या येतात तो. ॐ **साखर पसरणें** (किं० **पेरणें**) गोड गोड बोलून एकाद्याचें मन वश किं० अनुकूल करून घेणें. **साखरेचा खाणार त्याला देव देणार** ज्याच्या नशीबीं साखर खाणें आहे (म्ह० सुख भोगणें आहे) त्याला साखर (म्ह० सुखोपभोगाची साधनें) देवच पुरवितो; भाग्यवंताला कशाचीही उणीव पडत नाहीं. **साखरेची सुरी स्त्री०** आपला दुष्ट हेतु प्रकट न होऊं देतां गोड गोड भाषण करून दुसऱ्याचा नाश करणारा माणूस किं० त्याचें गोड गोड भाषण किं० त्यानें रचिलेलें कारस्थान. **हातावर साखर आणि मानेवर कातर** प्रेमाच्या पांघरुणाखालीं दुसऱ्याचा सत्यानाश करणें किं० त्याला लुटणें. **साखरेची साल काढणें** कोणेकाचा सरळ आणि साखीचा जो व्यवहार त्यांत कांहीं दुष्ट हेतु आहे किं० कपट आहे असें गृहीत धरून त्याच्या व्यवहारावर कुत्सितपणानें टीका करणें. **कोणेकाचें तोंड साखरेनें भरणें** किं० **त्याचें तोंड भरून साखर घालणें** त्यानें कांहीं चांगली गोष्ट केली किं० चांगली बातमी सांगितली म्हणून त्याला बक्षिसादाखल साखर खावयास देणें. **साखरकिडा पु०** साखर खाऊनच राहाणारा एक कल्पित कीट किं० किडा. **साखरगोटी स्त्री०** आकारानें लहान पण अतिगोड आंबा. **साखरजांब, साखरजांभ पु०** आंतून आणि बाहेरून तांबूस असा जांब म्ह० पेरू. **साखरझोप स्त्री०** पहाटेस लागलेली झोंप. **साखर नातें न०** १ प्रेमळपणाचें नातें; प्रेमाचा संबंध. २ बायकोच्या माहेराकडून झालेला जो संबंध तो (निंदेंत). मागें ' सकर नातें ' पहा. **साखर निंबू (–लिंबू) न०** गोड लिंबाची एक जात. **साखरानिंबी (-लिंबी) स्त्री०** वरील फळ ज्या झाडावर येतें तें झाड. **साखरपाणी न०** १ लिंबाचा रस, साखर, इ० द्रव्यें घालून करतात तें पेय. २ अल्प उपहार (सामान्यतः). **साखरपारा(फा०** षक्र पाराह्) **पु०** सपींटांत तूप आणि साखर घालून मंद अग्नीवर भाजून करतात तें खाद्य. **साखरपुडा पु०** वधूवरांचें लग्न ठरलें म्हणजे त्या भावी वधूच्या हातांत जो साखर, पेढे, इ० चा पुडा देतात तो किं० असा पुडा देण्याचा विधि. **साखरपेंढ्यांचा खेळ पु०** भाद्रपद आणि आश्विन महिन्यांत शेतकऱ्यांचीं मुलें गवताच्या पेंढ्या इ० नीं खेळ खेळतात तो. **साखरफुटाणा पु०** साखरेच्या पाकानें मढविलेला फुटाणा किं० वेलदोड्याचा दाणा. **साखरफेणी स्त्री०** साखरेच्या पाकाचा बत्तासा,–जो आकारानें मोठा आणि आंत बऱ्याच भागीं पोकळ असून भारी हलका असतो. **साखरबोंड न०** कणीक इ० पिठांत साखर मिश्र करून त्यांचे तळून काढलेले गोटे. **साखरभात पु०** साखर, केशर, वेलदोड्यांचें चूर्ण, बेदाणा, इ० द्रव्यें आंत घालून केलेला भात,–एक पक्वान्न. **साखररंगी वि०**

गुळीसाखरेच्या रंगाचें (वस्त्र, कागद, इ०). **साखरलाडू** पु० डाळीच्या पिठांत साखर घालून केलेला लाडू,-एक पक्वान्न. **साखरवळी** स्त्री० एक साखरेचें पक्वान्न. **साखरी गोडांबी** स्त्री० साखरेच्या पाकानें मढविलेली काजूबी.

साखसुरत [फा० षाख् सूरत] वि० १ गोंडस; बांधेसूद; प्रमाणशुद्ध (माणूस, पशु, पदार्थ). २ नीटनेटका, यथास्थित, असावा तसा (पोशाख, लेख, भाषण, इ०). क्रि० वि० उघडपणें, उजळमाथ्यानें, स्पष्टपणें, सर्वांच्या समक्ष, राजरोस. मागें ' साकसुरत ' पहा.

सांखळ, साखळ, दांतांची सांखळ, साखळकर, इ० मागें ' सांकळ, ' ' साकळ ' इ० [पहा. पहा.

साखी स्त्री० व्यापारांत पत. मागें ' साख '

साखेय [सं०] वि० मित्रासंबंधाचें; मित्रत्वाचें; प्रेमळपणाचें.

साख्य [सं०] न० मैत्री; दोस्ती.

सांख्य [सं०] वि० १ संख्येसंबंधाचें. २ तर्कांत प्रवीण. ३ ज्ञानवान्. पु० सांख्य शास्त्र जाणणारा. न० सर्व जग परमाणूंपासून झालें आहे असें मत. ह्या मताप्रमाणें पंचवीस तत्त्वें आहेत.

साग [हिं०] पु० इमारत कामाच्या उपयोगाचा एक वृक्ष. ह्याला सागवान, साय, अशींही नांवें आहेत.

सांग [हिं०] स्त्री० लोखंडी मुठीचा भाला.

सांग [सं०] वि० सर्व अंगांसहित; पूर्ण. ॐ **सांगोपांग** वि० अंगें आणि उपांगें ह्यांसहित; तपशीलवार; सर्वांगांनीं पूर्ण. **सांग संपूर्ण** वि० सर्व अंगांनीं आणि उपांगांनीं पूर्ण किं० समाप्त झालेला (विधि, उद्देश, ध्येय, विवेचन, इ०).

सांग [म० सांगणें] पु० सांगण्याची क्रिया; ताकीद; हुकूम (सांगणें); (अशिक्षितांत रूढि).

सांगकाम्या [म० सांगणें+काम] वि० सांगावें तितकेंच काम करणारा,-स्वताच्या बुद्धीनें काम योजून ज्याला करतां येत नाहीं असा.

सांगट्या वि० ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा.

सांगड [सं० संघट्ट] पु०, स्त्री० १ एकत्र संबद्ध असे दोन पशु, दोन माणसें, दोन होड्या, दोन भोपळे, इ० ची जोडी. २ कातार्‍याची चौकट,-जिच्यांत सळयांवर कातावयाचें लाकूड धनुकलीनें फिरविण्यांत येतें. ॐ **सांगड घालणें** १ संबंध जोडून देणें; उ० रामा आणि विनायक ह्यांची सांगड घालून द्या म्हणजे ते एकमेकांना अभ्यासांत मदत करतील. २ दोन गोष्टींची किं० विधानांची एकवाक्यता; दोन गोष्टी किं० विधानें ह्यांच्यांतील भासमान विरोधाचा परिहार. **सांगडीस धरणें** कोणेकाला कांहीं कामांत दुसर्‍या माणसाचा जोडीदार करणें. **सांगडबाहुली** स्त्री० मुलींची खेळण्याची कळसूत्री बाहुली.

सांगडणें[म० सांगड]स० क्रि०(कोणी माणूस, पशु, फळ, होडी, इ० ना) दुसरा माणूस, पशु, फळ, होडी, इ० शीं कांहीं कामीं जोडणें किं० संबद्ध करणें.

सांगणें [म० सांगणें] स्त्री० १ ताकीद; बोध; कोणेकाला म्हणणें, पाठ करणें, कांहीं कृति करणें, इ० बाबतींत घालून दिलेली शिस्त. २ पुराण, कथेंत निरूपण, इ० मध्यें हरिदास, पुराणिक, इ० ची विषयाच्या प्रतिपादनाची जी हातोटी, शैली, किं० सरणी ती. ॐ **सांगणीची मुलगी** स्त्री० कांहीं द्रव्य न घेतां वराला मुलीच्या बापानें किं० पालकानें देऊं केलेली मुलगी. अशा प्रकारचें जे लग्न तें ' सांगणीचें लग्न '

सांगणें [सं० शंस] स० क्रि० १(आपला विचार, मत, हेतु, इ०)दुसर्‍यास शब्दादि द्वारां कळविणें. २ विद्यार्थ्याला (वेदादींचा पाठ) देणें किं० स्पष्टावणें. ३ भाविक लोकांपुढें (पुराणादि ग्रंथांतील भगवल्लीलांचें) निरूपण करणें. ४ (संकल्प किं० यथोचित मंत्रतंत्र इ०) उपाध्यायानें यजमानाकडून ऐकविणें आणि तदनुसार कृति करविणें. ५ कोणेकाला (कांहीं काम) करावयाला विनंती किं० आज्ञा करणें. ६ कथिणें; निवेदिणें; निरूपिणें; स्पष्टावणें. ७ कोणेकाला जेवावयाचें आमंत्रण करणें; उ० दर द्वादशीला मी एक ब्राह्मण सांगतों. ८ (कांहीं काम) कोणेकाच्या माथीं मारणें किं० (कामाची जबाबदारी) कोणेकाकडे देणें. अ० क्रि० दृष्टोत्पत्तीस येणें, आढळून येणें, ठरणें, परिणामीं दिसून येणें; उ० हें दुखणें कठिण (किं० अवघड किं० जड) सांगतें म्ह० हें दुखणें

हटेल असा संभव दिसत नाहीं. ꣵ **सांगितल्या कामाचा आणि दिल्या भाकरीचा** यजमान सांगतो तें काम मुकाट्यानें आणि आपली अक्कल न लढवितां करणें आणि पोटाला देईल ती भाकरी तकरार न करतां खाणें (अशी नोकराची वर्तनाची सरणी असावी).**मुलगी सांगून येणें** मुलीच्या बापानें किं० पालकानें आमची मुलगी स्वीकारा अशी मुलास किं० मुलाच्या बापास किं०पालकास विनंती करणें; उ० आमच्या मुलाला पुष्कळ मुली सांगून आल्या पण त्या परगांवच्या होत्या म्हणून आम्ही त्या नाकारल्या.

सांगता [**सं०**] **स्त्री०** १ व्रत, पूजा, वाती लावणें, इ० जीं धर्मकृत्यें त्यांची सर्व अंगांनीं पूर्णता. २ (**मराठींत**) ह्या पूर्णतेसाठीं घातलेलें ब्राह्मणभोजन किं० दिलेली दक्षिणा.

सांगतीं, सांगतें क्रि० वि० मागें 'संगतीं,' 'संगतें' पहा.

सागर [सं०] **पु०** १ समुद्र; उ० हिंदी महासागर. २ चार ही संख्या. ३ (**लाक्षणिक**) मोठा साठा किं० संचय; उ० गुणसागर, विद्यासागर, शांतिसागर, इ०. ꣵ **सागरांबरा स्त्री०** पृथ्वी. **सागरालय पु०** वरुण. **सागरगोटा पु०** सागरगोटी नांवाच्या झाडाचें फळ. **सागरगोटी स्त्री०** एक कांटेरी वेल.

सागलाग [**म०** लागणें] **पु०** १ उद्देश;हेतु. २ धोरण; ध्येय; नेम; लक्ष्य. ३ इष्ट किं० उद्दिष्ट फळ.

सागली [**म०** साग] **वि०**सागाच्या लाकडाचा; सागासंबंधाचा.

सागवली स्त्री० लागवडींत असलेली जमीन.

सागवान [**हिं०**] **पु०** १ एक झाड,—याचें लाकूड इमारती कामें, गलबतें, इ० साठीं योजतात. २ घर बांधणें इ० कामासाठीं गोळा केलेलें खांब, तुळया, इ० रूप सामान. **न०** सागांच्या झाडांचें जंगल.

सांगशी स्त्री० मागें 'सांकशी' पहा.

सांगसरभरा [**म०** सांगणें+**फा०** सर्‌बराह्] **स्त्री०** १ कोणेकाची शिफारस (मदत)] **स्त्री०** १ कोणेकाची शिफारस

(मदत) करून, त्याचेबद्दल वशीला घालून, किं० रदबदली करून, किं० अंगें मेहेनत करून त्याला मदत करणें;उ० तुम्ही सर्व जणांनीं माझी सांगसरभरा केली म्हणून माझें गरीबाचें लग्न झालें.२ शिफारस किं० रदबदली करणें. ३ कोणेकाला हरएक प्रकारें केलेली मदत. मागें 'सरभरा' पहा.

सांगसुगरण, सांगसुग्रण [**म०** सांगणें +सुगरण; **सं०** सुगृहिणी] **स्त्री०** आपण स्वता कांहींच काम न करतां लोकांना कामें सांगण्यांत किं०असें करावें तसें करावें असा बोध करण्यांत पटाईत स्त्री (निंदेंत किं० उपहासांत प्रयोग).ꣵ **सांगसुगराई(-सुग्राई)स्त्री०**आपण स्वता कांहीं न करतां दुसऱ्याला सूचना करण्यांत मात्र पटाईतपणा (उपहासांत प्रयोग).

सागळ [**सं०** छागल=बोकड] **स्त्री०** बकऱ्याचें कमावलेलें किं० रंगविलेलें कातडें (जोडा इ० च्या उपयोगाचें).

सांगळ्या [**म०** सा (सहा)+अंगुळी (बोट)] **पु०** ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा माणूस. मागें 'सांगठ्या' पहा.

सागा[**सं०**छाग]**पु०**मेंढरें,बकरीं,इ०चा कळप.

सांगाडा पु० १ घर, गाडी, पलंग, नाव, छत्री, इ० पदार्थांच्या रचनेंतील जीं मुख्य खांब, तुळया, वांसे, लाकडें, तक्ते, काड्या, इ० अंगें तीं यथायोग्य प्रकारें खिळवून किं० जोडून जी उभारणी होते ती; अशी रचना किं० मुख्य उभारणी झाल्यावर भिंती,तक्तपोशी, वस्त्राच्छादन, इ० यथास्थानीं घातल्यानें तो पदार्थविशेष परिपूर्ण रूपांत येतो; ठोकळ उभारणी; खोका; पिंजरा; सापळा. २ प्राण्याच्या शरीरांतील हाडांची जोडणी,-मांस, चर्म, इ० वगळून. ꣵ **हाडांचा सांगाडा पु०**अति किडकिडीत माणूस,-ज्याचीं हाडें मांसानें आच्छादित नाहींत.

सांगाडी स्त्री० कातान्याची चौकट,-जीमध्यें दोन खिळ्यांच्या अडकणांत कसणीनें लाकूड इ० फिरविलें जातें.

सांगाती [**सं०** संगत] **पु०** जोडीदार; साथीदार; दोस्त. मागें 'सगती' पहा.

सांगातीं, सांगातें [**सं०** संगत] **श० यो० अ०** सह; बरोबर. मागें 'संगत, संगति' मध्यें 'संगतीं, संगतें' पहा.

सांगावांगी, सांगासांगी, सांगीवांगी, सांगोवांगी, सांगोसांगी [**म०** सांगणें] **स्त्री०**

उडत उडत ऐकिलेली, केवळ एकानें दुसऱ्याला, दुसऱ्यानें तिसऱ्याला सांगितल्यावरून कळलेली, विशेषसा आधार जिला नाहीं अशी गोष्ट, खबर, बातमी, इ०. **टीप,**– या शब्दांचा बहुधा अप्रथमा विभक्तींत प्रयोग होतो; उ० ही गोष्ट सांगोवांगीची नाहीं, मी ती प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली आहे. ꙮ **सांगोसांगी आणि वडाला वांगीं** प्रवासी इ० लोकांनीं केलेलीं वर्णनें अत्यन्त मूर्खपणाचीं किं० अतिशयोक्तींनीं भरलेलीं असतात.

सांगी [**म०** सांगणें] **स्त्री०** कोणेकाला कांहीं कामीं दिलेली इशारत किं० दाखवून दिलेली सरणी किं० केलेला उपदेश किं० सोडलेला हुकूम; ताकीद; उ० माझ्या सांगीप्रमाणें चाललास तर त्यांत तुझें कल्याण आहे.

सागुती, सागोती [**हिं०**;**सं०** छाग]**स्त्री०** भक्षणार्थ शिजवून तयार केलेलें बकरा इ० चें मांस.

सांगुळणें अ० क्रि० दूध, दही,रक्त, तूप, इ० गोठणें किं० घट्ट होणें; सांकळणें.

सागू [**हिं०**] **पु०** १ ताडाच्या जातीचें एक झाड,–ज्याच्या मगजाच्या पांढऱ्या गोळ्या होतात.२ ह्या झाडाच्या मगजाच्या ज्या गोळ्या होतात त्या प्रत्येक.पुण्यास ह्या गोळ्यांना ' साबूदाणे, ' ' साबूचे तांदूळ, ' अशीं नांवें आहेत.

सांगूळ, सागूळ स्त्री० फणसाच्या चारखंडावरील जीं चार ती.

सागोती [**हिं०**;**सं०**छाग] **स्त्री०** बकरा इ० चें शिजविलेलें मांस. वर ' सागुती ' पहा.

सांगोपांग [**सं०**] **वि०** अंगें आणि उपांगें ह्यांसहित (विवेचन, वर्णन, व्याख्यान, इ०).

सांगोवांगी,सांगोसांगी वर'सांगावांगी'पहा.

साग्या, सांग्या [**सं०** संग]**पु०**(वाईट कृत्यांत) दोस्त; जोडीदार; साथीदार.

साग्यालाग्या [**म०**सागलाग] **वि०** १ युक्त्या, हिकमती, डावपेंच, इ० करण्यांत पटाईत. २ वदमाषपणाचीं कृत्यें करण्यांत पटाईत.

साग्र [**सं०** स+अग्र (टोक)] **वि०** १ ज्याचें टोक बारीक किं० निमूळतें आहे असा (खुंटा, सुई, दाभण, सळई, इ०). २ समग्र; साद्यंत; पूर्ण; उ० साग्र संगीत शाकुंतल.

सांग्रामिक [**सं०**] **वि०** लष्करी; लढाऊ. **पु०** सेनापति. **न०** युद्धाची सामुग्री.

सांच [**सं०** संचय] **पु०** आंत घालावयाचा किं० भरावयाचा पदार्थ राहाण्याला पात्रादींतील जो अवकाश तो; उ० ही हांडी फार लहान आहे, हींत इतकीं पोतीं राहावयाजोगा सांच नाहीं.

साच [**सं०** सत्य] **वि०** खरा; प्रामाणिक; यथार्थ; वास्तविक. **टीप,**–' साच' ह्या शब्दाचें 'साचा'हें आकारान्त रूप लिंगवचनांप्रमाणें फिरणारें असून कवितेंत ह्याचा उपयोग केला जातो. कित्येक प्रसंगीं तो शब्द पादपूरक ह्या नात्यानेंही योजला जातो.

सांचणें [**सं०** सम्+चि] **अ० क्रि०** थोडथोड्या प्रमाणांत भरती होऊन किं० भर पडून (पदार्थ विशेष) पुष्कळ होणें किं० सांठणें; उ० ह्या खळग्यांत पाणी सांचलें आहे, आतां घागर भरून घ्या; उ० धोतर विकत घेण्याइतके पैसे सांचले म्हणजे मी धोतर विकत घेणार आहें.

सांचल, साचल स्त्री०, पु० माणूस, पशु, साप, इ० च्या चालण्याचा किं० सरपटण्याचा आवाज (लागणें, येणें, इ०); चाहूल; उ० मला चोरांच्या पावलांची सांचल लागतांच मी सोटा घेऊन अंगणांत गेलों. [लेलें पाणी.

सांचवणी [**म०** सांचणें+पाणी] **न०** सांच-

सांचविणें [**म०** ' सांचणें 'चें प्रयोजक] **स०** **क्रि०** थोडथोड्या प्रमाणांत भरती घालून पैसा, धान्य, इ० पदार्थांचा संचय किं० साठा वाढविणें किं० मोठा करणें; उ० मी बायकोच्या नथेसाठीं दरमहा पांच पांच रुपये बाजूस काढून तीनशे रुपये सांचविणार आहें.

सांचा [**हिं०**] **पु०** १ अगदीं एकसारखे अनेक पदार्थ, चित्रें, इ० अल्पश्रमानें करावयाचे असतां चिखल इ०द्रव्य ज्या विशेष प्रकारें कोरलेल्या लाकूड इ० मध्यें चेपून भरतात तें लाकूड इ०; ठसा, छाप, नमुना. २ कुंभार ज्या आधारावर मडकें इ० करण्यासाठीं कमावलेली माती ठेवतो तो आधार. ꙮ **एका सांच्यांतील वि०** अगदीं सारखीं (माणसें, चित्रें, भांडीं,इ०).

साचार [**सं०**] **वि०** १ योग्य आचार किं०

सरणी पाळणारा (माणूस). २ योग्य शिस्त पाळून केलेलें कोणतेंही (कर्म). **क्रि० वि०** खरोखरीं; निश्चयें करून.

साचिव्य [**सं०**] **न०** १ प्रधानाचा दर्जा किं० अधिकार; प्रधानाचें काम. २ मैत्री;साहाय्य.

सांचीव [**म०** सांचणें] **वि०**१ थोडथोडी भर पडून किं० भर घालून जें जमलें किं० सांठलें तें. २ज्यांत वेळोवेळीं भरती होत नाहीं असें (पाणी, संपत्ति, इ०).

सांचोल पु०, स्त्री०, सांचोला पु० चालणें, बोलणें, इ० चा दूरून आलेला म्ह०कानीं पडलेला आवाज; कानोसा; चाहूल (ऐकणें, भासणें).

साज [**सं०** सज्ज] **पु०** १ कांहीं काम करण्यांत जीं नानाविध साधनें, हत्यारें, उपकरणीं, इ० जरूर लागतात तीं समुच्चयानें; साधनसामग्री. २ नर्तकी स्त्रिया, गवई, हरिदास, तमासगीर, इ० चीं कामें चाललीं असतां सारंगी, तबला, इ० संच आवश्यक असतो तो.३ नाटकांतील पात्रें इ० चे पोशाख, दागिने, इ० सरंजाम. ४ मृदंग; पखवाज. ॐ **साजकरी पु०** गवई, वाजंत्री, इ० च्या ताफ्यांतील एक एक व्यक्ति.

साजसरंजाम पु० 'साज' अर्थ १, २, ३ पहा.

साज न० गवताची एक जात. ॐ **साजारा पु०** अशा गवताचा भारा.

सांज [**सं०** संध्या] **स्त्री०** १ सूर्यास्ताचा समय. २ संध्याकाळीं देवापुढें लाविलेला दिवा. ह्या दिवा लावण्याला 'सांजवात करणें किं० सांजवात लावणें' म्हणतात.

सांज [**सं०** सत्य; **म०**साच] **स्त्री०** १ भुतांखेतांना अर्पण केलेला नवीन धान्याचा नैवेद्य. २ एकाद्या शेतांत दरवर्षी अमुक धान्य निघत आलें तितकें यंदाही निघेल अशी अटकळ. ३ जमीनीच्या उत्पन्नाबद्दल केलेला आजमास.

साजक [**सं०** श्यामक] **पु०** सावा हें धान्य.

साजण [**सं०** सज्जन] **पु०** प्रियकर; दोस्त; यार. **साजणी स्त्री०**१ प्रियकरीण; रांड; रखेली. २ मैत्रीण.

सांजण, सांदण न० तांदुळाच्या पिठाचें एक पक्वान्न. ॐ **सांजणपात्र, सांदणपात्र न०** सांदण हें पक्वान्न करण्याचें पात्र.

साजणें [**सं०** सज्ज] **अ० क्रि०** १ कोणेकाला (कांहीं गोष्ट, वर्तन, भाषण) शोभणें किं०योग्य असणें; उ० हे असले पोरकट चाळे तुला साजत नाहींत. २ खपणें; उघडकीस न येणें; पचणें; उ० दोन शेर दुधांत छटाक पाणी सहज साजेल. ३ समाविष्ट होऊं शकणें.

साजरा, साजिरा [**म०** साजणें] **वि०** १ सुशोभित; भूषणादिकांनीं अलंकृत किं० डौलदार. २ सुंदर; नीटनेटका. ३ फलद्रूप; सार्थ; व्यर्थ न गेलेला; फुकट न घालविलेला; उ० आज दसरा आहे, घरांत तीन माणसें आजारी आहेत, पण दिवस साजरा केला पाहिजे म्हणून मुठीचें पुरण केलें. ॐ **फुटका डोळा काजळानें साजरा करावा** आपल्या ठायीं जो कमीपणा असेल तो यथाशक्ति भरून काढावा.

सांजवणें, सांजावणें, सांजळणें [**म०**सांज] **अ० क्रि०** किं० **भावकर्तरी** संध्याकाळ होणें; उ० मला विठ्ठलवाडांस सांजावलें.

सांजवरी, सांजोरा [**म०** सांजा] **स्त्री०** पोटांत सांजा घालून तळून काढलेली पुरी,–एक पक्वान्न.

सांजळणें वर ' सांजवणें ' पहा.

सांजा [**सं०** संयाव=सांजा, चुरमा] **पु०** १ कणकेंतील रवाळ अंश. २ चाळावयाच्या अगोदरचें दळलेल्या गव्हाचें रूप. ३ कणकेंतील रवाळ अंशांत तूप, दूध, साखर, इ० द्रव्यें घालून शिजवून करतात तें पक्वान्न.

साजात्य [**सं०**] **न०** सजातीयपणा; एकाच जातीचें असणें.

साजारा पु० साज नांवाच्या गवताचा भारा. मागें ' साज ' **न०** पहा.

सांजावणें मागें ' सांजवणें ' पहा.

सांजिदा [**फा०**] **पु०** १कोणीही बजवय्या. २ नर्तकीच्या मागें उभा राहून सारंगी इ० वाद्य वाजवितो तो. ॐ **सांजिंदगी स्त्री०** साजिंद्याचें कर्तव्य किं० धंदा. **साजिंदी स्त्री०** १ देहविक्रयानें द्रव्य मिळविणारी स्त्री; वेश्या; कुलटा. २ नर्तकी स्त्रीच्या मागें वाद्य वाजविणारी स्त्री.

साजिरा पु० इमारती लाकडें ज्यापासून मिळतात असा एक वृक्षविशेष.

साजिरा मागें ' साजरा ' पहा.

साजीखार पु० मागें ' सजिखार ' पहा.

साजूक [**सं०** सद्यस्] वि० ताजें (तूप, पाणी, कांहीं खाद्य किं० पेय, इ०).

सांजें [**म०** साच; **सं०** सत्य] **न०** १ देवाला केलेला नवस (करणें). २ कांहीं धार्मिक नियम पथकरणें (धरणें). ३ अमुक जमीनींत अमुक धान्यादि उत्पन्न होईल अशी अटकळ किं० अशा अटकळीनें ठरविलेलें धान्यादीचें परिमाण. मागें' सांज ' [**सं०**सत्य; **म०**सच]अर्थ२आणि३पहा.

सांजें [**म०** सांज; **सं०**संध्या] **न०** कोणेका-वरून दृष्टिबाधा इ० च्या निरसनार्थ संध्याकाळीं ओवाळून टाकलेला भात, मीठ, मोहोऱ्या, इ० पदार्थ (टाकणें).

सांजें, सांझें [**सं०** संध्या] **क्रि० वि०** संध्याकाळीं; सायंकाळीं; तिन्ही सांजा.

सांजोरी [**म०** सांजा] **स्त्री०** पोटांत सांजा घालून तळून काढलेली पुरी. [काळ.

सांझ [**सं०** संध्या] **स्त्री०** संध्याकाळ;सायं-

सांझळणें मागें ' सांजळणें ' पहा.

सांझें [**सं०** संध्या] **क्रि० वि०** सायंकाळीं; सूर्यास्ताच्या समयीं. वर ' सांजें, सांझें ' पहा.

सांट, सांठ [**म०** सांठणें] **पु०, स्त्री०** पोतें, वर, बारदान, गलबत, इ० मध्यें पदार्थ भरणें, ठेवणें, इ० ची जागा किं० अवकाश.

साट न० फणस,आंबा, इ० चा रस, ताटांत घालून वाळवून केलेला पातळ पोळीसारखा जो पदार्थ तो.

साट पु० १ बांबूच्या चिरफळ्या, काठ्या, इ० एकीशीं एक बांधून जी माळा, गलबत, इ० मध्यें बसणें, निजणें,इ०साठीं करतात ती सपाटी किं० पृष्ठभाग. २ अशा प्रकारचा घराच्या छप-राखालीं केलेला माळा.

साटकाविटका[**म०**विटणें]**वि०**विटाळलेला, शिळा झालेला, किं० नासलेला (खाद्यादि पदार्थ).

साटगी स्त्री० लहान साटा. खालीं ' साटा, सांट्या ' पहा.

साटणें [**म०** साटें] **स० क्रि०** (बाजारांत विकावयास आलेला माल) एकदम आणि एका राशीच्या रूपानें विकत घेणें,—त्या मालाची किरकोळीनें विक्री करून नफा मिळविण्याच्या उद्देशानें.

सांटणें,सांठणें[**सं०**सम्+चि]**अ०क्रि०**१क्रमा-क्रमानें भरती होऊन पदार्थ मोठ्या परिमाणाचा होणें; संचित होणें. २ बारदानांत पदार्थविशेष भरला जाणें किं० राहाणें किं० मावणें.

सांटपा [**म०** सांटणें]**पु०** १ पदार्थांचा संचय किं० बेगमी. २ पदार्थ साठविण्याची किं० भरण्याची जागा किं० बारदान. ३ जमा केलेलें सामानसुमान; हरएक पदार्थांचा संग्रह.

साटभाऊ, साडभाऊ, साडू पु० आपल्या पत्नीच्या बहिणीचा पति. पुढें ' साडू ' पहा.

साटमार पु०,साटमारी स्त्री० [**हिं०**सांठा+**म०** मारणें]माजलेल्या हत्तीला रंगणावर मोकळा सोडून त्याला खिजविण्याचा एक खेळ. ह्या खेळांत हत्तीशीं झुंजणारा जो पहिलवान त्याला 'साटमाऱ्या,' ' साठमाऱ्या,' किं० ' साट्या ' म्हणतात.

साटल्यामोटल्या [**म०** मोटली=गांठोडें] **स्त्री० अ० व०** १ संसारांतील सामानसुमानाचीं बोचकीं किं० गांठोडीं. २ प्रवासास निघालेला मनुष्य बरोबर घेतो तीं चिरगुटें, भांडीकुंडीं, इ० चीं बोचकीं.

साटवण, साटवणी इ० पुढें ' साठवण, ' ' साठवणी, ' इ० पहा.

साटा पु० पाणी इ० चा शिंतोडा किं० थेंब.

साटा, साट्या पुढें ' साठा,' 'साठ्या' पहा.

साटा पु० १ करंजी, मोदक, इ० च्या गर्भांत जें खोबरें, पुरण, इ० भरतात तें; सारण. २ घडीची पोळी, चिरोटा, इ० चे पदर सुटे राहावे म्हणून घडी घालतांना लावतात तें तेल,तूप, इ०.

सांटारा [**म०** सांटणें] **पु०** खूप मोठा ढीग किं० रास. [पहा.

साटारणा, साटारा पु० मागें ' सटारणा '

साटी स्त्री०खटाऱ्याचा तळ,-जो तक्ते,वांसे,इ० एकमेकांशीं जोडून किं०बांधून बनविलेला असतो.

साटीं श० यो० अ० करितां; ह्या उद्देशानें; मुळें (कवितेंत).

साटें [**सं०** संचय] **न०** १ कोणी व्यापा-ऱ्यानें बाजारांत विकावयास आणलेला सर्व माल.

२ असा सर्वचा सर्व माल एकदम दुसऱ्या व्यापाऱ्यानें विकत घेणें ह्या रूपांचा सौदा. ॐ **साटेखत, साटेपत्र न०** माल विकणारा आणि विकत घेणारा ह्यांच्या दरम्यान जो ठरावासंबंधानें कच्चा कागद करतात तो. गिऱ्हाइकानें सर्व पैसे विकणाराला दिल्यानंतर पक्कें खरेदीखत होतें.

सार्टेंलोटें [**म०** साटें+लोटणें] **न०** १ दोन्ही पक्षांना सोयीवार असा अदलाबदलीचा व्यवहार. २ एका कुटुंबांतील मुलगी दुसऱ्या कुटुंबांत देणें, आणि त्या दुसऱ्या कुटुंबांतील मुलगी आपण आपल्या कुटुंबांत करून घेणें, ह्या रूपाचीं लग्नें ठरविण्याचा प्रकार.

साटोप [**म०** स+आटोपणें]**वि०** १ संसार, धंदा, व्यापार,इ०ची जबाबदारी अंगावर घेण्याला समर्थ असा (माणूस); कर्तबगार. २ आटोपसर, विशेष त्रासाशिवाय चालवितां येण्याजोगा (धंदा, व्यापार, कारभार, इ०).

साटोरी स्त्री० जिच्या पोटांत नारळ इ० चें सारण घातलें आहे अशी पुरी हें खाद्य.

साट्या वर ' साटमारी ' मध्यें ' साटमाऱ्या ' पहा.

साट्या करवत, साठ्या करवत पु० चौकटींत बसविलेली करवत.

साठ पु० बांबूच्या काठ्या, तक्ते, इ० ची तक्तपोशी. मागें ' साट ' **पु०** पहा.

साठ [**सं०** षष्टि] **वि०** पन्नासांत दहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.

सांठ [**सं०** सम्+चि] **पु०** १ पदार्थ भरण्याला किं० ठेवण्याला अवकाश. २ संचय; बेगमी. ह्या अर्थी 'सांठा' अधिक रूढ आहे. ३ क्षमा,–दुसऱ्याचा अपराध पोटांत सांठविण्याची प्रवृत्ति.

सांठपा पु० मागें ' सांटपा ' पहा.

साठमार, साठसाऱ्या, साठ्या, इ० मागें ' साटमार ' इ० पहा.

साठवण [**म०** सांठविणें] **न०** १ धान्य, पाणी, इ० पदार्थ सांठविण्याची क्रिया. २ सांठविलेले धान्य, पाणी, इ० पदार्थ समुच्चयानें. ३ धान्य, पाणी, इ० पदार्थ सांठविण्याचें बारदान.

सांठवणी [**म०** सांठणें+पाणी] **न०** १ सांठलेलें किं० सांठविलेलें पाणी.

सांठवणी,सांठवणूक [**म०** सांठविणें] **स्त्री०** धान्यादि पदार्थांची बेगमी किं०संचय करून ठेवणें.

सांठविणें [**म०** ' सांठणें ' चें प्रयोजक] **स० क्रि०** धान्य, पैसा, इ० पदार्थ संचित करून ठेवणें किं० जमवून किं० गोळा करून किं० जुळवून ठेवणें किं० त्यांची बेगमी करून ठेवणें.

साठळणें [**म०** साठ] **अ० क्रि०** १ (कोणी माणूस)साठ वर्षें वयाचें होणें. २ (कोणेकाला) म्हातारचळ लागणें किं० लागलेला असणें.

साठा, सांठ्या पु० १ मखर, डोला (ताबूत), छत्री, घर, टेबल, गाडी, मेणा, इ० च्या मुख्य मुख्य अवयवांची मांडणी किं० जोडणी;सांगाडा. २ माणूस, प्राणी, इ० च्या शरीरांतील हाडांचा पिंजरा किं० सांगाडा (मांस, कातडी, इ० च्या विरहित शरीर).

सांठा [**सं०** संचय] **पु०** १ संग्रह; बेगमी; शिलकींत पडलेला किं० पाडलेला कोणताही पदार्थ. २ रास; ढीग; संचय. ॐ **सांठ्याचा वि०** सणाच्या दिवशीं किं० प्रसंगविशेषीं वापरावयाचें (वस्त्र, दागिना, इ०).

साठी [**म०** साठ] **स्त्री०** १ साठ वर्षें वय; उ० साठी बुद्धि नाठी(म्ह०साठ वर्षांचें वय ज्याचें उलटून गेलें आहे त्याला बुद्धिभ्रंश होतो).२ एक प्रकारचें भात,–जें साठ दिवसांत पिकून तयार होतें.**साठी स्त्री०**गाडीचा तळ;घराच्या माळ्याचा पृष्ठभाग; होडींत घातलेले बसावयाचे तक्ते; छपराचें ओंबण. ह्या सर्व अर्थीं'साटी'सुद्धां. ॐ **साठी बुद्धि स्त्री०** म्हातारपणचा बुद्धिभ्रंश किं० विवेकशून्यता.

साठीं श०यो०अ० कारितां;०च्या उद्देशानें;उ० मी बायकोच्या चंद्रहारासाठीं पांचशें रुपये बाजूस काढून ठेविले आहेत.

साठेरा,साठेरीं[**म०** साठ]**वि०**साठ दिवसांत पिकणारें (भात किं० नाचणी).

साठोरी स्त्री० जिच्या पोटांत पुरण भरलें आहे अशी पुरी. मागें ' साटोरी ' पहा.

साठ्या करवत पु० चौकटींत बसविलेली करवत. मागें ' साट्या करवत ' पहा.

साड [**सं०** सार] **पु०** १ कडब्याचें ताट, झाडाचें खोड,इ० च्या गर्भांतील मऊ भाग किं० गाभा. २ चंदनाच्या पोटांतील गाभा.

सांड [**सं०** षंड=बैल, पोळ] **पु०** १ देवाच्या नांवानें मोकळा सोडलेला बैल. २ (**लाक्षणिक**) धिप्पाड माणूस.

सांड [**हिं०**] **स्त्री०** उंटाची स्त्री. ह्याच अर्थी ' सांडणी ' सुद्धां.

सांड [**म०** सांडणें] **स्त्री०** १ धक्का, बंधारा, इ० तून ज्यादा पाणी वाहून जाण्यासाठीं ठेविलेलें भोक. २ हातांत घेतलेला पदार्थ सांडणें किं० गळूं देणें अशी अजागळपणाची कोणेकाला खोड असते ती. ३ कांहीं गोष्ट स्मरणांतून गळणें किं० विसरणें अशी कोणेकाला असते ती खोड. ३ एकाद्या गोष्टीची उपेक्षा किं० अनास्था; उ० मुलांच्या विद्येची (किं० विद्येविषयीं) अशी सांड करणें तुम्हाला शोभत नाहीं. ५ कांहीं गोष्टीकडे केलेलें दुर्लक्ष्य किं० तिच्या संबंधानें बेपरवाईची वृत्ति. ६ नवऱ्यानें टाकून दिलेली बायको. **न०** कोणेकाच्या हातांतून गळून पडलेली वस्तु; हरवलेली वस्तु. **वि०** कोणेकाच्या मालकीचा रस्त्यावर गळून पडलेला (पदार्थ). ❀ **पदार्थाची (किं० माणसाची) सांड करणें, पदार्थाला (किं० माणसाला) सांड देणें** त्याची हेळसांड किं० उपेक्षा करणें; त्याचेकडे दुर्लक्ष्य करणें; त्याच्या संबंधानें बेफिकीर असणें. **अपराधाची सांड करणें** तो क्षमिणें किं० माफ करणें. **पदार्थाची (किं०माणसाची) सांड करणें** त्याला सोडून देणें; तो वर्ज करणें किं० त्यागणें.

सांडई स्त्री० तांदुळाच्या पिठाचें एक तोंडींलावणें.

साडखत न०, सांडचिठी स्त्री०[**म०**सांडणें+ चिठी; **अ०** खत] बायको, गुलाम, घर किं० कांहीं पदार्थ, यांवरचा हक्क, ताबा, किं०स्वामित्व आपण सोडून दिलें आहे अशा अर्थाचें पत्र.

सांडगा पु० १ भोपळा, कोहळा, भेंड्या, इ० पदार्थ एकत्र ठेचून त्यांचे ठेच्यांत तिखट, मीठ, इ० मसाला घालून त्याच्या पोफळाएवढ्या गोट्या करून उन्हांत वाळवितात त्या प्रत्येक. ह्या गोट्या तळून तोंडींलावणें म्हणून भोजनांत खातात. २ हरभऱ्याच्या पिठाच्या अशाच गोट्या तोंडीं लावण्यासाठीं करतात त्या प्रत्येक.

सांडण, सांडणी [**हिं०**] **स्त्री०** उंटाची स्त्री. हिच्यावरच्या स्वाराला ' सांडणीस्वार ' म्हणतात.

सांडणी [**म०** सांडणें] **स्त्री०** १ सांडण्याची क्रिया. २ स्मृतींतून सांडण्याची म्ह० गळण्याची क्रिया; विस्मृति; विसरणें. ❀ **कांहीं गोष्ट सांडणीस पडणें** ती विसरली जाणें; ती स्मरणांतून गळणें.

सांडणें अ० क्रि० १ भांडें किं० बारदान ह्यांत (ठेविलेला पदार्थ) धक्का लागून किं० त्याला भोक पडून(तो)बाहेर पडणें.२पात्रादींत कांठोकांठ पदार्थ भरल्यावर तो पदार्थ आणखी त्यांत घालूं गेल्यास (तो) त्या पात्रादींत अवकाश नसल्याकारणानें बाहेर पडणें. ३ विशिष्ट ठिकाणीं ठेविलेला पदार्थ तेथून नाहींसा झाल्यामुळें तो पुन्हां न सापडणें; हरवणें. **स० क्रि०** १ पात्रादींत ठेविलेला पदार्थ त्या पात्रादींतून आपल्या निष्काळजीपणानें बाहेर पडेलसा करणें. २आठवण न राहिल्याकारणानें आपण विशिष्ट ठिकाणीं ठेविलेला पदार्थ आपणास सापडूं नये असा करणें; गमावून घेणें. ३ गर्व, ताठा, अभिमान, इ० त्यागणें किं० सोडून देणें.

सांडपत्र न० मागें ' सांडखत ' पहा.

साडभाऊ, साडू [**सं०** श्याली (बायकोची बहीण)+वोढृ (पति)] **पु०** आपल्या बायकोच्या बहिणीचा पति.

सांडभोळा [**म०** सांडणें+भोळा] **वि०** आठवण न राहिल्यामुळें पदार्थ गमावून घेणारा; विसरभोळा.

सांडरा [**म०** सांडणें] **वि०** १ आपण पदार्थ कोठें ठेविला याची ज्याला आठवण राहात नाहीं म्हणून ज्याचे पदार्थ वेळेवर मिळत नाहींत अशा स्वभावाचा; ज्याचे पदार्थ नेहेमीं हरवत असतात असा.२पदार्थांची उधळपट्टी करण्याच्या स्वभावाचा; उधळ्या.

सांडरांड [**म०** सांडणें+रांड] **स्त्री०** नवऱ्यानें टाकून दिलेली बायको.

सांडरूं [**म०** सांड] **न०** १ उंटाची स्त्री

(तुच्छतेंत). २ नवऱ्यानें टाकून दिलेली बायको (तुच्छतेंत).

सांडलवंड [म० सांडणें+लवंडणें] स्त्री० पदार्थ सांडणें, लवंडणें, इ० रूप नाश, किं० हानि.

सांडवणें [म० सांडणें] अ० क्रि० आजार, चिंता, उपास, इ० कारणामुळें रोड किं० किड-किडीत होणें.

सांडवा[म०सांडणें]पु० १धरण,धक्का,बंधारा, इ० नीं आडविलेल्या पाण्यापैकीं जादा पाणी बाहेर सोडण्यासाठीं ठेविलेलीं जीं भोकें किं० दारें तीं प्रत्येक. २ पाण्याच्या प्रवाहासाठीं दगड,विटा, चुना, इ० नीं बांधून काढलेला पाट.

सांडशी [सं०संदंश हिं०] स्त्री०एक प्रकारचा चिमटा,–भांडें किं० कोणताही पदार्थ घट्ट धर-ण्याच्या उपयोगाचें साधन.

सांडस[सं०संदंश]पु०सोनार,लोहार,इ०कारा-गिरांचा आकारविशेषाचा चिमटा किं० पक्कड.

सांडसूट [म० सांडणें+सुटणें] स्त्री० साव-कार, सरकार, इ०नीं कुळें किं०रयत यांना कर्ज, सारा,इ०च्या रकमेंतील.माफ,केलेला किं०सोडलेला अंश;दिलेली सूट; माफ केलेला पैसा किं० ऐवज.

साडा [सं० शाटी; म० साडी] पु० साडे हा जो लग्नांतील विधि त्या विधींत नवऱ्या-मुलीला दिलेली साडी.

साडा [सं० स+अर्ध] पु० अर्धा अंश (अंकानें परिमाण दाखवितांना); उ० तुम्हीं लुगड्याची किंमत साडेसात रुपयेसांगतां,त्यांतील साडा सोडा(म्ह०सात रुपये किंमत सांगा). वि० अर्ध्यासहित; उ० साडे आठ रुपये (म्ह० अर्ध्या-रुपयासहित आठ रुपये. टीप,–ह्या अर्थीं 'साडा' चें ' साडे ' हें रूप होतें.

साडादिडा [म० साडा+दीड] वि०कांहीं विशिष्ट सरणी न अनुसरतां वस्त्र, पागोटें, लुगडें, इ० ची घातलेली (घडी); सर्व भागीं जी एकेरी नव्हे, किं० दुहेरी नव्हे, किं० तिहेरी नव्हे अशी वस्त्र, दोरी, इ०ची घडी.

सांडावा पु० बांध, बंधारा, इ० तून जादा पाणी वाहून जाण्यासाठीं राखिलेलें भोक. मागें ' सांडवा ' पहा.

साडी [सं० शाटी] स्त्री० मुलीचें नेसाव-याचें लुगडें; लहान लुगडें.

सांडी स्वार पु० मागें ' सांडणी ' मध्यें ' सांडणीस्वार ' पहा.

साडू [सं० श्यालीं=बायकोची बहिण; वोढृ= नवरा] पु० आपल्या बायकोच्या बहिणीचा पति. ह्याच अर्थीं ' साडभाऊ, ' ' साडू भाऊ ' सुद्धां.ꣳ**सोयऱ्यांत साडू,भोजनांत लाडू,आणि हत्यारांत माडू** नातलगांत साडू हा मैत्रीला उत्तम, पकान्नांत खावयाला लाडू उत्तम, आणि हत्यारांत चालवावयाला माडू हें हत्यार उत्तम.

साडे, साढे [म० ' साडा, ' ' साढा ' चें अ० व०] पु० अ० व० लग्नाच्या समारंभाच्या अखेरीस ऐरणीपूजनाच्या वेळीं नवरीमुलगी, नवरामुलगा, इ० ना वस्त्रें देण्याचा विधि. ꣳ **कोणेकाचे साडे करणें** १ त्याला कामावरून काढून टाकणें; त्याला हाकलून देणें. २ त्याची मानखण्डना करणें; त्याची छीथू करणें.

साडे [म० साडा, सं० सार्ध] वि० अर्ध्या-सहित. अर्ध्यासहित एकाला 'दीड,' अर्ध्यासहित दोहोंना'अडीच'म्हणतात.एक, दोन, यांच्या पुढें ' साडे ' हें विशेषण योजतात; इ० साडेतीन म्ह० अर्ध्यासहित तीन; साडेचार म्ह० अर्ध्या-सहित चार; इ०. टीप,–१ ' साडेतीन ' ह्या शब्दाबद्दल ' औट ' हा पर्याय शब्द आहे. टीप,–२ ' दीड शाहाणा' ह्या शब्दांतील 'दीड ' प्रमाणें ' साडे ' चा उपयोग ' अत्यन्त हलकट, फारच वाईट, ' ह्या अर्थीं निंदाप्रसंगीं करतात; उ० साडेशिनळीचा, साडे हरामी; साडे मात्रा-गमनी, इ०. ꣳ **साडेतीन** वि० तीन आणि अर्धा इतक्या परिमाणाचें; उ० साडेतीन रुपये म्ह० छपन्न आणे. **साडेतीन मुहूर्त** पु० अ०व० दसरा, बलिप्रतिपदा, आणि वर्षप्रतिपदा. हे तीन अत्यन्त उत्कृष्ट मुहूर्त आणि अक्षय तृतीया (किं० कित्येकांच्या मतें नागपंचमी) हा साधारणपणें उत्कृष्ट (म्ह०अर्धवट उत्कृष्ट) मुहूर्त असे एकंदर साडेतीन मुहूर्त. **साडेतीन शाहाणे** पु० अ० व० १ सखाराम बापू फडके, विठ्ठल सुंदर, देवराव हिंगणे, हे तीन पुरते शाहाणे. २ आणि नानाफडणीस हा अर्धा शहाणा असे एकं-दर साडेतीन शाहाणे पेशवाईंत होऊन गेले. ३ मूर्ख शाहाणे. ४ मूर्ख आणि बढाईखोर माणूस; उ० तुम्ही मोठे साडेतीन शाहाणे आहां. **साडे-**

सात वि० सात पूर्ण आणि एक आधा ह्या परिमाणाचा;उ० साडे सात शेर म्ह०पंधरा आच्छेर. साडेसाती स्त्री०, साडेसातीचा फेरा पु० दुर्दैवाचा फेरा; कोणेकाचा आपत्काळ;उपद्रव.टीप,–एकाद्या माणसाच्या जन्मराशीपासून शनि १२, १, आणि २ ह्या राशींत असतां ' त्या माणसास साडेसाती आली आहे ' असें म्हणतात. ह्या तीन राशि क्रमण्यास शनीला साडेसात वर्षें लागतात. ह्या साडेसात वर्षांच्या मुदतींत त्या माणसाला अनेनात दुःखें भोगावीं लागतात. साडेभावार्थी वि० दिसण्यांत साधाभोळा पण अंतःकरणांत मत्सरी आणि कपटी असा (माणूस). साडेसातकी स्त्री० साडेसात विघे विस्ताराची जमीन.

सांडोसांड [म०सांडेंणें+सांडणें] क्रि०वि० कांठोकांठ (पात्र, बारदान, पोतें, इ० भरणें).

साढू मागें ' साडू ' पहा.

साढे पु० अ० व० मागें ' साडे ' पहा.

साण स्त्री० होलिका देवी (किं० होळीची देवता) हिच्या पालखीची योग्य जागा.

साण [सं० शाण] स्त्री० १ गंध उगाळणें, चटणी वाटणें, इ० च्या उपयोगाचा टांकी दिलेला धोंडा. २ हत्यारांना धार देण्याचा धोंडा. टीप,–ह्या दोन्ही अर्थीं 'सहाण' हा शब्द अधिक प्रचलित आहे. ॠसाणपट्टी स्त्री०, साणा पु०वर ' साण ' चे दोन्ही अर्थ पहा.

साणा पु० नदी किं० खाडी ह्यांच्या पलीकडे उतारू किं० सामान होडीनें जेथून वाहून नेलें जातें ती जागा.

साणा [सं० शाण] पु० वर ' साण ' सं० सर्व अर्थीं पहा.

साणा [म० शाहाणा] पु० पिकलेलें शेत, गुऱ्हाळ, इ० चीं कामें चाललेलीं असतां मालक किं० भागीदार हे माल चोरिला जाऊं नये म्हणून आपल्या वतीचा जो रखवाल्दार तेथें बसवून ठेवितात तो.

साणीलाणी स्त्री० खडक इ० वर कोरलेली शेत इ० च्या मर्यादेची खूण.

साणें न० माळवदी घराच्या किं० कौलारू घराच्या माथ्याला जें धूर बाहेर जावा म्हणून किं० स्वच्छ हवा आंत यावी म्हणून ठेवितात तें भोक.

सात [सं० सप्तन्] वि० १ चारांत तीन मिळवून होणाऱ्या संख्येइतका. २ पुष्कळ;अनेक; उ० सात ताड उंच (म्ह० फारच उंच); उ० सात लबाड (म्ह०फार लबाड); उ०सात आळशी (म्ह०अत्यन्त आळशी). ॠसातपांच करणें एकदा एक बोलणें आणि नंतर दुसरें बोलणें; ज्या बोलण्यांत ताळमेळ नाहीं असें बोलणें बोलणें;विसंगतपणाचें भाषण करणें. साता समुद्रांपलीकडे ठेवणें फार जपून ठेवणें; कोणास न दिसेल अशा ठिकाणी किं०अशा बंदोबस्तानें ठेवणें.साता सायासांनीं क्रि०वि० फार श्रमांनीं;कष्ट सोसून; काळजी वाहून; खटाटोप करून. सातपानी वि० उगवल्यापासून सात पानें आलीं म्हणजे ज्याला फूल येतें अशा जातीचा (दुधभोपळी, काकडी, इ० चा वेल). सातपुती स्त्री० १ सात आहेत पुत्र जिला अशी स्त्री; उ० एकपुती रडे सातपुती रडे. मागें ' एक ' मध्यें 'एकपुती' पहा. २घडघोसाळी नांवाची वनस्पति. ह्याच्या फळास ' सातपुतें' न० म्हणतात. सातें न० १ सात दिवस सतत एकाच दिशेनें वाहणारा वारा किं० सात दिवस सतत पडत असलेला पाऊस किं० सात दिवस टिकून राहिलेलें हवेचें मान. २सात दिवस सौम्य हवेचे होऊन गेल्यावर पडलेली हिवस हवा. ३ भोजनें, कीर्तनें, जलसे,पुराणें, व्याख्यानें, खेळ,इ०चा सात दिवस चाललेला कार्यक्रम. ४ सात दिवस घेतलेलें किं० घ्यावयाचें औषध. ह्या अर्थीं ' सात्रक ' न० सुद्धां. सातपुडी स्त्री० प्राण्याच्या शरीरांतील एक आंतडें. सातपुडी गलांड न० एक प्रकारचें गळूं. सातवण, सातवीण [सं० सप्त+पर्ण]पु०, स्त्री०,न० एक वृक्ष,–ज्याच्या एका एका पानांत सात सात पोटपानें असतात. सातवार पु० सहा लहान लहान लाटा येऊन गेल्यावर सातवी जी मोठी लाट येते ती (खलाशांचा शब्द). सात सडका स्त्री० अ० व० उन्मत्त हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणाऱ्या पाण्याचे सात पाट किं० ओघळ. सात लबाड वि० अत्यंत लबाड. सात लाजा स्त्री० अ० व० जनलज्जा, मनोलज्जा,

वयोलज्जा, धर्मलज्जा, कर्मलज्जा, जातिलज्जा, आणि कुललज्जा, अशा सात प्रकारच्या लज्जा किं० लाजा; उ० हा सात लाजा पदरीं बांधून देशद्रोहाला प्रवृत्त झाला आहे. **सात लाजा पदरीं बांधणें** अत्यन्त निर्लज्ज किं० बेशरम होणें किं० असणें. **सातवडा पु०** १ सात दिवसांचा अखंड अवधि. २ सात दिवसांचा हिशेब, खर्च, इ०. **सात सवाई, सात सवाईनें क्रि० वि०** सातपटीपेक्षां आधिक्यानें; पुष्कळ पटीनें (अधिक जोरदार, लबाड, पटाईत, इ०); उ० तुमच्या घोड्यापेक्षां आमचा घोडा सातसवाईनें चांगला आहे. **सात सायास पु० अ० व०, सात साया स्त्री० अ० व०** अनेक कष्ट किं० खटपटी किं० प्रयत्न; उ० साता सायासांनीं बांधलेलें माझें घर जळून गेलें. **कोणेकाच्या सातसाया करणें** त्याच्या बद्दल भारी कष्ट किं० झीज सोसणें; त्याचे फार फार लाड करणें; त्याच्या तालेवाऱ्या चालविणें. **साता गुणांचा खंडोबा पु०** १ ज्याला नेहेमीं कांहींना कांहीं तरी दुखणीं येत असतात असा माणूस. २ ज्याला अनेक व्यसनें आहेत असा माणूस. ३ ज्याचे ठायीं अनेक दुर्गुण आहेत असा माणूस. **सातारें न०, सातवळा, सातोळा पु०** गर्भधारणानंतर सातच महिन्यांनीं जन्मलेलें मूल. **साताळशी वि०** अत्यन्त आळशी. **साती, सत्ते क्रि० वि०** सात पटीनें; उ० आठी सत्ते छप्पन. **सातेरूं न०** सात पुडांचें मोहोळ; या मोहोळांत सात पुडे किं० कप्पे असून ह्यांत मध साठविलेला असतो. **सातेरें न०** सात अहोरात्र पडत असलेला पाऊस किं० पडलेली हवा किं० एकाच दिशेनें वाहणारा वारा. ह्याच प्रतीकांत वर ' सातें ' पहा.

सात, साथ स्त्री० सहवास; सोबत; साहचर्य; उ० आम्ही हें काम साथीनें एका दिवसांत करूं.

सात, साथ स्त्री० १ हिंवताप, पटकी, कावीळ, इ० कांहीं रोगांचा एकाद्या गांवांत एकदम होतो तो उद्रेक. २ कोणत्याही गोष्टीचा कोणेक स्थळीं किं० काळीं जो विपुलपणा तो.

सात, सांत स्त्री० एक मत्स्यविशेष.

सांतडें न० १ माणूस किं० पशु ह्याचें कातडें, -खरचटून निघालेलें किं० सोलून काढलेलें. २ झाडाची साल किं० त्वचा (सोलून काढणें किं० निघणें).

सातत्य [सं०] न० सततपणा; अखंडित क्रम किं० सरणी; चालत आलेली परंपरा.

सांतपन [सं०] न० एक प्रायश्चित्तविशेष.

सांतर [सं० स+अंतर] वि० १ ज्याला किं० ज्यांत मध्यें मध्यें फटी किं० खिंडी आहेत असें; विरळ (वस्त्र, दन्तपंक्ति, बसलेले लोक, इ०). २ व्यवधानसहित. ३ अट किं० शर्त असलेलें (वचन, करार, हक्क). ¤ **सांतर स्पर्श वि०** ज्यांच्यामध्यें थोडेंसें अंतर आहे असे (शेजारीं असलेले पदार्थ).

सातरणें [सं० सम्+स्तृ] अ० क्रि० (वृक्ष, एकादी संस्था, धंदा, इ०) सर्व बाजूंनीं विस्तार, उत्कर्ष, किं० भरभराट पावत असणें.

सातरस, सातरवारा पु० ईशानी दिशेकडून वाहातो तो वारा.

सांतवन, शांतवन न० पुढें ' सांत्वन ' पहा.

सांतविणें पुढें ' सांत्विणें ' पहा.

सातळणी, सांतळणी [म० सातळणें] स्त्री० कढई, तवा, इ० वर थोडेंसें तेल किं० तूप घालून त्यावर हरभरे, डाळ, मिरच्या, दाणे, इ० पदार्थ भाजून काढण्याची क्रिया.

सातळणें, सांतळणें [म० तळणें] स० क्रि० १ कढई, तवा, इ० वर तेल किं० तूप घालून भुईमुगाचे दाणे, मिरच्या, इ० पदार्थ भाजून काढणें. २ (कांहीं खाद्य, जमीन, इ०) सरदणें.

सातारा [म० सातरणें] वि० सर्व बाजूंनीं शाखा आणि पानें ह्यांनीं समृद्ध (वृक्ष); गेंदासारखें वाढलेलें (झाड).

सातारी स्त्री० जेथें मुंग्याचीं अनेक वारुळें आहेत अशी जागा किं० अशा जागीं बांधलेलें नागोबाचें देऊळ.

साती, साथी पु० जोडीदार; दोस्त.

साती स्त्री० मोठ्या प्रमाणावर कोणेक स्थळीं झालेला देवी, पटकी, आमांश, इ० चा फैलाव.

सातू [सं० सक्तु] पु० १ जव, -गव्हासारखें एक धान्य. २ जोंधळा, बाजरी, इ० च्या लाह्यांचें पीठ.

सातेरा वि० मागें ' सातारा ' पहा.

सातेरूं न० मागें ' सात ' मध्यें पहा.

सातेरें, सातोळा मागें ' सात ' मध्यें पहा.

सात्रक, सात्रक चाल स्त्री० घोड्याची एक प्रकारची चाल.

सात्वत[सं०] वि० १ वैष्णव. २ भक्त. **पु०** १ कृष्ण. २ बलराम. ३ यादव. ४ सप्तर्षिप्रणीत धार्मिक ग्रंथविशेष किं० त्यांत सांगितलेला विधि. ५ हिंदूंची एक संकर जात.

सात्वती [सं०] स्त्री० एक प्रकारची काव्यरचना.

सांत्वन न०, सांत्व पु०, सांत्वना: स्त्री०[सं०] १शांत करणें; दुःखाचें निरसन. २ सौम्य उपाय. ३ कुशल प्रश्न. ❀ **सांत्ववाद पु०** सहानुभूतीचे शब्द बोलून कोणेकाच्या दुःखाचें किं० निराशेचें निरसन करणें.

सात्त्विक [सं०] वि० १ खरें. २ स्वाभाविक. ३ सद्गुणी; निष्पाप. ४ जोमदार. ५ मानसिक. ६ प्रामाणिक. ७ सत्त्वगुणी; सत्त्वगुण ज्यांत फार आहे असा. ८ सौम्य (खाद्य). ९ पौष्टिक (गहूं, दूध, इ० पदार्थ). ❀ **सात्त्विक चंडाळ पु०** दिसण्यांत साधाभोळा पण खरोखरीं लुच्चा, कपटी, किं० दुष्ट असा (माणूस).

साथ [हिं०] स्त्री० १ सोबत; सहवास. २ पाती; सर्कत. ❀ **साथकरी पु०** गाणारा किं० बजवय्या ह्यांच्या सुराशीं आपला सूर जोडणारा किं० री ओढणारा. **साथी, साथीदार पु०** १ जोडीदार; दोस्त. २ आपला भागीदार किं० सरकत्या. ३ री ओढणारा.

साद [सं०] पु० १ खचणें. २ थकवा. ३ थांबणें. ४ कृशता. ५ नाश; शेवट.

साद [सं० शब्द] पु०, स्त्री० १ शब्द; आवाज. २ हाक मारणें; आरोळी. ३ पडसें किं० फार बोलणें इ० मुळें कांहीं काळापुरता घोगरा झालेला किं० बसलेला आवाज. ४ कोणी कोणा दूर असलेल्या माणसास मारलेली हाक किं० त्यानें दिलेलें उत्तर. ❀ **सादपरका, सादपरता [म० साद (आवाज)+परका (वेगळा); परता=(परतलेला)] वि०** फणस इ० फळ पक्क होत चाललें असतां तें फळ दिवसा दिवसांनीं टिचकी मारल्यावर बदललेल्या आवाजाचें (होणें, वाटणें). **कोणेकाला साद घालणें** त्याला मोठ्यानें हाक मारून जवळ बोलावणें.

सांदण, सादणें न० तांदुळाचें एक पक्कान्न. हें पक्कान्न ज्यांत करतात त्याला ' सांदणपात्र ' **न०** किं० ' सांदण ताटली ' **स्त्री०** म्हणतात.

सादपरतणें [म० साद+परतणें] अ० क्रि० (पिकत चाललेला फणस इ० फळ) दिवसादिवसांनीं भिन्न आवाजाचें होणें. हा भिन्न आवाज त्या फळावर टिचकी मारल्यानें उत्पन्न होतो. मागें 'साद' मध्यें ' सादपरका ' पहा.

सादपरता मागें ' साद ' मध्यें ' सादपरता ' पहा.

सादर [सं०] वि० १ पूज्यतेच्या भावनेनें प्रेरित; आदरयुक्त; कोणेकासंबंधानें मनांत आदर बाळगणारा. २ सज्ज; सिद्ध; तयार; तत्पर. **क्रि० वि०** बहुमानानें; आदरानें; पूज्यताबुद्धीनें.

सादर [अ०] वि० १ आलेला; येऊन पोचलेला; दाखल झालेला. २ सोडलेला (हुकूम); केलेली (आज्ञा). ❀ **सादर करणें** १ कोणेकाकडे पाठविणें; कोणेकाला देणें किं० नजर करणें. २ कोणेकाला कांहीं माहिती, जबाब, इ० देणें.

सादवणें, सादविणें, सादाविणें [म० साद; सं० शब्द] स० क्रि० (कोणेकाला) मोठ्यानें किं० दूरून हाक मारणें किं० बोलावणें.

सादळणें [सं० सार्द्र=जलयुक्त] अ० क्रि० (पदार्थ, जमीन, भिंत, इ०) हवेंतील जलांशानें युक्त होणें म्ह० सरदणें.

सादापत न०साधनपत्र(अशिक्षितांचा शब्द).

सादि [सं०] पु० १ योद्धा. २ सारथि.

सादित [सं०] वि० १ जेरीस आणलेलें. २ विध्वंसिलेलें.

सादिरवारिद, सादिलवार (-री) [अ० सादिर् वारिद्] स्त्री० गांवाच्या संबंधाचे जे मुख्य खर्च त्याशिवाय जो किरकोळ खर्च (फकीर, गोसावी, उरूस, उत्सव, गांवजेवण, इ० करितां होणारा) तो भागविण्यासाठीं गांवकऱ्यांवर जी पट्टी बसवितात ती किं० सरकारांतून जी रक्कम दिली जाते ती. ❀ **सादिलवार, सादिलवारी वि०** वर सांगितलेली जी पट्टी किं० सरकारांतून

आलेली रकम तिच्यासंबंधाचा(हिशेब, जमा,इ०).

सादी [सं० सादिन्] **वि०** वर बसणारा; उ० अश्वसादी (घोडेस्वार); गजसादी (महात). **पु०** १ घोडेस्वार. २ हत्तीवरचा स्वार.३ रथावर बसणारा. ४ सारथि.

सांदी, सांदीकोंदी, सांदीचा, सांदोसांदी, इ० पुढें ' सांधी,' ' सांधी कोंदी,' 'सांधीचा,' ' सांधोसांधीं, ' इ० पहा.

सादृश्य [सं०] **न०** सारखेपणा;तुल्यरूपता.

साद्यंत [सं० स+आदि+अंत] **वि०** आरंभापासून शेवटपर्यंत जें अखण्ड तें; समग्र.**क्रि० वि०** आरंभापासून शेवटापर्यंत (हकीगत इ०).

सांद्र [सं०] **वि०** १ निबिड, दाट (जंगल). २ अति विपुल. ३ जोरदार. ४ घट्ट;गोळा झालेलें. ॐ **सांद्र मेह पु०** घट्ट लघवी; घट्ट लघवी होणें हा रोग.

सांध, सांद [सं० संधि] **स्त्री०** १ सांधा; एक पदार्थ जेथें दुसऱ्या पदार्थाला जोडलेला आहे ती जागा. २ दोन पदार्थांना जोडणारा तिसरा पदार्थ. ३ चीर; भेग; फट; खिंड. ४ बोटांच्या दोन पेरांचा संयोग. ५ हातमागांतील ताण्याचा तिडा. ॐ **सांधींत** (किं० **सांदीत**) **पडणें** १ अज्ञात स्थितींत राहाणें किं० असणें.२ वरिष्ठाची खुशामत करण्याचा गुण अंगीं नसल्याकारणानें कोणी मनुष्यानें कोपऱ्यांत पडणें किं० त्याच्या गुणाचें चीज न होणें. **सांधकाम न०** पदार्थाचे भिन्न भिन्न भाग किं० अवयव जोडणें किं० जोडण्याची तऱ्हा किं० कुशलता. **सांदकोंद, सांधकोंद स्त्री०** १ फट, भेग, चीर. २ कोनाकोपरा; फारसा वहिवाटींत नसलेला किं० अडचणींतला घराचा भाग. **सांदींतला, सांदीकोंदीचा, सांदीचा वि०** कोंपऱ्यांतील; अप्रसिद्ध; बाजूस टाकलेला किं०पडलेला.

सांधण, सांधणपात्र, सांदन ताटली मागें ' सांदण ' इ० पहा.

सांधणी [**म०** सांधणें] **स्त्री०** १ जोडण्याची किं० जुळविण्याची क्रिया. २ मागावरील ताण्याच्या तंतूंना जोड देणें किं० नवीन धागे जोडणें ही क्रिया.३ हीं सुतें जोडण्याचें एक हत्यार.

साधणूक, साधणी [म० साधणें] **स्त्री०** १ कांहीं ध्येय, उद्देश, इष्ट वस्तु, इ० मिळविणें किं० प्राप्त करून घेणें. २ मिळविलेलें ध्येय; सफळ झालेला उद्देश. ३ इष्ट वस्तु मिळविण्याची तऱ्हा किं० युक्ति.

साधणें [सं० साध्] **अ० क्रि०** १ सिद्धीस जाणें; फलद्रूप होणें. २ प्राप्त होणें. **स० क्रि०** १ मिळविणें; प्राप्त करून घेणें. २ सिद्धीस नेणें. ॐ **संधि साधणें** अनुकूल समयाचा फायदा करून घेणें.

सांधणें [**सं०** सम्+धा] **स० क्रि०** (दोन लाकडें कुसुं आणि विंधी या योगें किं० खिळा ठोकून, दोन धातु डागानें, कपड्याचे दोन तुकडे शिवून, दोन कागद डिकानें किं० अन्य प्रकारें) जोडणें, जुळविणें, किं० खिळविणें. **अ० क्रि०** (एक पदार्थ)दुसऱ्याशीं चिटकणें किं०जोडला जाणें.

सांधणें न० तांदुळाचें एक पक्वान्न.

साधन [सं०] **न०** १ संपादणें; मिळविणें. २सिद्धीस नेणें. ३ सिद्धीस जाणें. ४ इलाज;उपाय; इष्ट वस्तु मिळविण्याचा मार्ग किं० युक्ति. ५कांहीं वस्तु बनविण्याला लागणारें हत्यार किं० यंत्र. ६ कांहीं कामची उपंकरणें समुच्चयानें.किं०सामग्री.७ **(न्याय)** हेतु; प्रमाण. ८ सैन्य. ९ मदत.१० मोह पाडणें. ११ जारणमारण.१२ पुरुषाचें जननेंद्रिय. ॐ**साधन द्वादशी स्त्री०** आधल्या दिवशीं एकादशीचा उपवास करून दुसऱ्या दिवशीं द्वादशी कांहीं राहाते त्यांत पारणा साधणें अशी विवक्षा असतां त्या द्वादशीस ' साधन द्वादशी ' म्हणतात. पहाटेस थोडा वेळ द्वादशी असून पुढें त्रयोदशी लागते तेव्हां त्या थोड्या वेळांत एकादशीचा उपास सोडण्याची व्यवस्था करून ती द्वादशी साधावी लागते असा दिवस. **साधनचतुष्टय न०** ब्रह्मप्राप्तीचे मुख्य चार उपाय समुच्चयानें,—वस्तुविवेक, वैराग्य, शमादि (शम, दम, दया, तितिक्षा, उपरति,समाधान), आणि मुमुक्षुत्व. **साधनपत्र न०** खत, दस्तऐवज, इ० रूप पुरावा.

साधनिका [सं०] **स्त्री०** १ करणें, रचणें, गुंफिणें, इ० क्रिया करण्याची रीति किं० तऱ्हा. २ वाक्याचे घटक भाग वेगवेगळे करून त्यांचा परस्परांशीं संबंध दाखविणें.

साधनी [म० साधन+ई (प्रत्यय)] **वि०** १ आपलें उद्दिष्ट नानाविध हिकमतींनीं मिळविण्यांत पटाईत. २ कांहीं उद्दिष्ट साधण्याच्या उपयोगाचा (दस्तऐवज, पुरावा, हत्यार, वशीला, इ०). **स्त्री०** १ गवंडी, सुतार, इ० चा ओळंबा किं० पाणसळ. २ नक्षीदार कंगोरा.

सांधप [म० सांधणें] **न०** दोन पदार्थ किं० पदार्थाचे दोन भाग किं० अवयव जोडणें किं० जोडण्याची तऱ्हा.

सांधमोड पुढें ' सांधा ' मध्यें पहा.

साधर्म्य [सं०] **न०** समान गुण किं० धर्म यामुळें येतें किं० होतें जें सादृश्य तें.

साधलाध, साधलाद [म०साधणें+लाधणें] **स्त्री०** दैवानें होतो तो हानिलाभ किं० नफानुकसान; दोन माणसांचे प्रयत्न किं०अंगचे गुण सारखे असून त्या दोघांना भिन्न प्रकारचीं फळें मिळणें हा जो दैवयोग तो; दैवगति; नशीब.

साधा [फा० सादाह्] **वि०**१त्या त्या पदार्थाची किं० माणसाची शोभा, कर्तृत्व, वक्तृत्व, इ० गुणाचा उत्कर्ष करणारें जें कांहीं तें ज्याच्या ठायीं नाहीं असा (पदार्थ, माणूस).२ मोकळ्या मनानें बोलणारा किं० वागणारा(मनुष्य).३छानछोकी न करणारा, छाकटेगिरी न करणारा,छक्केपंजे न करणारा.४बोलण्यांत अलंकार न योजणारा (माणूस).५ नक्षी नसलेला (पदार्थ).६पुरण जीत नाहीं अशी (पोळी). **टीप**,–विशेष्याच्या अनुरोधानें ' साधा ' शब्दाचा अर्थ विद्यार्थ्याला वरील सरणीनें करतां येईल. ꠸ **साधाभोळा, साधामिधा वि०** १ सरळ वर्तनाचा माणूस. २ अजागळ. **साधापिधा वि०**गुटगुटीत शरीराचा; भरदार अंगाचा आणि चेहऱ्याचा. **साधाभादा वि०** वयोतीत असून सरळ वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा वयोतीत (माणूस).

सांधा [सं० संधि] **पु०** १ दोन वस्तूंचा जोड; दोन वस्तु जोडण्याची क्रिया किं० तऱ्हा. २ दोन वस्तूंना जोडणारी तिसरी वस्तु. ३ एकादी वस्तु कमी पडल्यास तिला भरतीसाठीं जो तुकडा जोडतात तो; पुरवणीचा पदार्थ; पुरवणी; घातलेली भर. ꠸ **एकाद्या व्यवहाराचा सांधा बसणें** (किं० **जुळणें**) तो सुरळीतपणें चालू लागणें. **सांधमोड स्त्री०** भिंतीच्या रचाईत खालच्या थराच्या दोन विटांतील सांध्यावर वरच्या थरांतील वीट येईल अशी रचना.

साधारण [सं०] **वि०** १ समाईक; अनेकांचें. २ मध्यम प्रतीचा; फार उंची नव्हे किं० फार निंची नव्हे असा. ३ समान, सारखा. ४ सर्वांस सारखा लागू असणारा किं० लागू पडणारा; सामान्य; समूहांतील सर्व व्यक्तींत असणारा (गुण, धर्म).५ सर्वोपयोगी. ६ (**न्याय**) एक हेत्वाभासविशेष. **न०** १ सामान्य नियम. २ सामान्य गुण. **साधारणा स्त्री०** वेश्या.

साधित [सं०]१साध्य केलेलें; मिळविलेलें.२ सिद्ध, तयार, किं० सज्ज केलेलें.꠸**साधित शब्द** पु०एका शब्दाला दुसरा शब्द किं०प्रत्यय जोडून झालेला शब्द; उ० लाकूडतोड्या, दगडफोड्या, इ०. सिद्ध शब्द म्हणजे जो स्वयंसिद्ध शब्द तो किं० ज्याचा घटक अंगें दाखवितां येत नाहींत असा शब्द; उ० दगड, धोंडा, इ०.

सांधित [म० सांधणें] **वि०** जोडलेला; सांध्यानें बांधलेला, जोडलेला, किं० जुळविलेला.

सांधी, सांदी [म० सांधा, सांद, सांदी] **स्त्री०** १ सांधा. २ फट, चीर, भेग. ꠸ **सांधीकोंदी, सांदीकोंदी** [म० सांध+कोंद] **स्त्री० अ० व०** १ घर, पेटी, बारदान, इ०तील कोपरे किं० फारसे उपयोगांत नसलेले भाग; उ० तो सांदीकोंदींत पडलेला माणि मी कोठें म्हणून शोधूं? २ समाजांतील अप्रसिद्ध भाग किं० व्यवसाय किं० कार्यक्षेत्र; उ० मूर्ख राजाच्या कारकीर्दींत विद्वान माणसें सांधीकोंदींत पडून राहातात; थुंकीचाटये मूर्ख असून अधिकाराच्या जागीं बसतात. **सांदीकोंदीचा माणूस पु०** माणूसघाण्या; एकलकोंडा. **सांदीकोंदीचा वि०** समाजाला फारसा ठाऊक नसलेला(माणूस,पदार्थ);अज्ञात. **सांदींतला व्यवहार पु०** चोरटा किं० गुप्त कारभार.**सांदोसांदा क्रि० वि०** कोपऱ्यांत किं० अप्रसिद्ध ठिकाणीं.

साधु [सं०] **वि०** १ चांगलें. २ योग्य. ३ गुणी; पुण्यशील. ४ सद्वर्तनी. ५ प्रिय; रम्य. ६ कुलीन. ७ निर्दोष, शुद्ध, यथार्थ (शब्द,विधान). **पु०** १ निष्पाप माणूस; सरळ वर्तनाचा माणूस;

सज्जन. २ ईश्वरचिंतनांत काळ घालविणारा आणि संसार ज्यानें त्यागिला आहे असा माणूस. ३ व्यापारी. ४ सावकार. **साध्वी स्त्री०** १सत्त्वशील स्त्री. २ पतिव्रता. ❀ **साधुकार पु०** स्तुति; प्रशंसा; तारीफ. **साधुसंत पु० अ० व०** संसार टाकून मोकळे झालले, ईश्वरभजनांत निमग्न असे लोक,–फकीर, तपस्वी, इ०.

सांधोरी [सं० संधि] **स्त्री०** १ मोठा किं० बोजड सांधा. २ मोठी भेग, चीर, किं० फट. ३ गांवांतील अरुंद रस्ता;बोळ.❀**सांधोरी कोनदोरी वि०** मागें 'सांधी,सांदी' मध्यें 'सांधीकोंदी' पहा.

साध्य [**सं०**] **वि०** १ होण्याजोगें; शक्य.२ मिळण्याजोगें; मिळेल असें. ३ बरा होण्याजोगा (रोग). ४ सिद्धीस नेतां येईल असा (प्रयत्न, खटपट). ५ प्राप्त झालेलें; मिळालेलें; सफळ. **पु०** देवविशेष. हे बारा आहेत. **न०** १ संपादन; संपादणें. २ सिद्ध करावयाची गोष्ट. ३ (**न्याय**) ज्यावर जो कांहीं धर्म आहे असें सिद्ध करावयाचें तो पक्ष आणि जो कांहीं धर्म तो साध्य; उ० 'पर्वत हा धूमवान् आहे म्हणून पर्वत हा अग्निमान् आहे' ह्या वाक्यांत 'पर्वत' हा पक्ष आणि 'अग्निमत्व हें साध्य'. मागें 'पक्ष' अर्थ १२ पहा. ४ प्रतिपाद्य विषय. ५ सत्तावीस योगांतील बावीसावा योग. ❀ **कष्टसाध्य वि०** कष्टानें मिळवितां येईल असें. याच सरणीनें श्रमसाध्य, सुखसाध्य, भक्तिसाध्य, ज्ञानसाध्य, इ० चे अर्थ जाणावे.

सांध्य [**सं०**] **वि०** १ संध्याकाळचें. २ सकाळचें.

साध्वी स्त्री० वर 'साधु' मध्यें पहा.

सान, साना वि० लहान.

सानक [**हिं०** सह्नक्; **अ०** सहन्] **स्त्री०** १ ताटली; तबक. २ कोणेकाला चरितार्थासाठीं सरकारनें बक्षीस दिलेली जमीन, शेत, इ०. अशा जमीन, शेत, इ० ला 'सानकी जमीन,' 'सानकी शेत,' इ० म्हणतात.

साना वि० लहान. मागें 'सान' पहा.

सांनिध्य [**सं०**] **न०** १ जवळ असणें; शेजार. २ स्थलविशेषीं हजर असणें.

सांनिपातिक [सं०] **वि०** वात, पित्त, आणि कफ, ह्या तीन दोषांच्या विकारानें उत्पन्न झालेला (रोग).

सान्नें, सान्यें [**म०** सांड + अन्न] **न०** ज्याच्या अंगांत भूतसंचार झाला आहे अशा माणसावरून ओवाळून टाकलेला भात, कोंबडें, इ० (उतरणें, देणें, टाकणें).

साप [**सं०** सर्प] **पु०** सरपटत जाणारा एक प्राणी. सापाच्या असंख्य जाति असून कांहीं निर्विष असतात. कोकणांत नागाला 'साप' म्हणतात आणि घांटावर ज्याला 'साप' म्हणतात त्याला कोकणांत विशिष्ट नांवें आहेत. फुरसें, मण्यार, घोणस, आधेलें, धामण, जोगी, नानोटी, शेण्या, इ०. ❀ **साप साप म्हणून भुई धोपटणें** १ कोणेकावर खोटें बालंट घेऊन त्याला शिक्षा करणें किं० निंदिणें. २ जेथें भीतीला मुळींच कारण नाहीं तेथें तें कल्पून मोठा कांगावा किं० बोभाटा करणें.

सापई स्त्री० कुबट किं० दमट (घाण).

सापका, साबका पु० व्यापारांत पत; व्यवहारांत कोणेकाची जी सचोटी ती.

सापका पु० कोणेकावर गुदरलेला संकटाचा प्रसंग (पडणे); उ० हल्लीं त्याच्या जिवाशीं (किं० प्राणाशीं) मोठा सापका पडला आहे.

सापका [**सं०** स्वप्न] **पु०** झोपेंत किं० जागृतावस्थेंत कोणेकाला पडलेलें स्वप्न किं० झालेला दृष्टांत (पडणें).

सापट, सापट स्त्री० लाकूड, भिंत, खडक, सांधा, इ० तील फट, चीर, किं० भेग.

सापट वि० कुबट किं० दमट(जमीन); (सरदलेलें धान्य, इ०).

सापटणें पुढें 'सापडणें' पहा.

सापटोळी स्त्री०एका जातीचा विषारी साप.

सापड [**म०** सापडणें] **पु०** दोरीचा फास, हाताचीं बोटें, इ० च्या पकडींत अडकलेला जो पक्षी, उंदीर, साप, इ०च्या शरीराचा भाग तो (घेणें).

सांपड पु०, स्त्री० शेताची लावणी, बेणणी, कापणी, इ० कामें करावयाला अनेक गडी एकदम प्रवृत्त झाले असतां त्यांच्या श्रमाच्या परिहारार्थ कांहींनीं गाणें गाणें, कांहींनीं 'भलेरे

दादा, '' भले रे भले, ' इ० आरोळ्या ठोकणें, इ० रूप जी उत्तेजनपर कृति केली जाते ती (घालणें).

सापड, सापूड स्त्री० झाडाची बारीक आणि लवचीक फांदी किं० साल,–भारा किं० मोळी बांधणें ह्या कामासाठीं योजतात ती.

सापडणें, सापटणें [सं० सम्+पद्] अ० क्रि० १ हरवलेली वस्तु पुन्हा आढळणे किं० मिळणें. २आपण शोधीत आहों तो पदार्थ मिळणें किं०दृष्टीस पडणें. ३चोर,मांजर,पक्षी,इ०आपल्या तावडींत येणें किं०आपल्या कबज्यांत येणें.४लपून बसलेला चोर, भामटा, इ० अधिकाऱ्याच्या दृष्टीस पडणें. ५ कर्मधर्मसंयोगानें अडचणीत गुंतणें किं० अडकणें; उ० मी कालच्या गर्दींत सापडलों आणि पोलिसच्या पांच लाठ्या खाल्ल्या. ६ (संधी) मिळणें किं० दिसणें. ७ मिळणें (सामान्यतः); उ० फुरसत सापडणें, इ०.

सापडा [म० सापडणें] पु० १ बांबूच्या काठ्या, झाडाच्या बारीक फांद्या, इ० ताटी,कूड, मांडव, इ०साठीं केलेल्या त्या प्रत्येक.२ माळ्यावर अशाच काठ्या आंथरून करतात ती जमीन. ३ मुकटे, धोतरें, भांडीं, इ० पदार्थ ठेवण्यासाठीं टांगतात ती ताटी; मंडपी. ४ घराच्या छपरावर घातलेलें गवत इ० उडून न जावें किं० सरकूं नये म्हणून खालीं आणि वर काठ्या बांधतात त्या प्रत्येक.

सांपडो स्त्री० झाडाची लवचीक फांदी किं० साल,–मोळ्या किं०भारे बांधावयासाठीं योजावयाची.

सापत्न [सं०] वि० १ सवतीचा. २ शत्रूचा; शत्रुपक्षाकडचा. ३ शत्रूसंबंधाचा.

सापत्न्य, सापत्नक [सं०] पु० १ शत्रु. २ सावत्र भाऊ. न० १ सवतपणा. २ शत्रुत्व.

सांपसारणें [म० संपविणें+सारणें] स० क्रि० १ (अव्यव.स्थितपणें इतस्ततः पडलेलीं चिरगुटें, भांडींकुंडीं, पुस्तकें,इ०) गोळा करून पुन्हा व्यवस्थित रीतीनें ठेवणें. २ (अनेकांचीं भाषणें, विधानें, उलट सुलट मुद्दे, प्रमाणें, इ० चा विचार करून) समारोप करणें किं० मत ठरविणें. ३ (एकाद्या विषयाचा) उपसंहार करणें.

सापसुरळी,सापसोळी स्त्री० चोपई नांवाचा प्राणी.

सापळा [म० सापडणें] पु० १ वाघ, उंदीर, घूस, इ० ना पकडण्यासाठीं लाकूड, लोखंड, कामट्या, इ० साधनांनीं जी रचना करतात ती. २ (**लाक्षणिक**) अत्यंत किडकिडीत किं० रोड असा जो मनुष्य, जनावर, इ० प्राणी तो. ३ अस्थिपंजर. ꙮ **कोणेकाचा सापळा वळणें** आजार, उपवास, चिंता, इ० कारणांमुळें तो अतिशय रोड होणें किं० त्याची हाडें दिसतील अशी त्याची दशा होणें.

सापालें [म० साप; सं० सर्प+आलय (जागा)] न० जेथें मनुष्यवसति नाहीं असे पडकें घर,–जेथें जीवजिवाणूं असण्याचा संभव आहे.

सापिका स्त्री० १ अर्धा पैसा ह्या किंमतीचें एक प्राचीन काळचें तांब्याचें नाणें.२ साडे सात बिघे किं० दीड रुका हें जमीनीच्या मोजदादीचें माप.

सापिंड मागें ' सपिंड ' पहा.

सापिंड्य [सं०] न० सपिंड असण्याचा गुण.

सापीण [म० साप] स्त्री० सर्पाच्या जातीची स्त्री.

सांपूड स्त्री० बारीक असून लांब असा वेलीचा तुकडा किं० झाडाची साल,–गवताचा भारा, लाकडें, इ० बांधावयासाठीं योजावयाची.

सापेजणें अ० क्रि० (जमीन, भिंत, धान्याचे दाणे, इ० ना) कुबट घाण येणें.

सापेक्ष [सं०] वि० १ अपेक्षा बाळगून केलेलें किं० ठरलेलें; तुलनेनें ठरलेलें किं० ठरविलेलें;तौलनिक. २ अवलंबणारे;संबद्ध. पु० कृपादृष्टि ठेविणारा; पक्षपाती. **सापेक्ष स्त्री० (मराठींत**) इच्छा, गरज, जरूरी.

सांप्रत [सं०] क्रि०वि० १ हल्लीं; वर्तमान काळीं. २ योग्य तऱ्हेनें.

सांप्रदाय पु० मागें ' संप्रदाय ' पहा. 'सांप्रदाय' हें ' संप्रदाय ' चें अपभ्रष्ट रूप.

सांप्रदायिक [सं०] वि० परंपरागत; संप्रदाय असल्यामुळें जें रूढ किं० प्रचलित झालें आहे तें; संप्रदायाला अनुसरून करावयाचें असें.

साफ [अ०] वि० १ स्वच्छ; मलरहित

(पदार्थ). २ सपाट; खळगे किं० उंचवटे नसलेला (पृष्ठभाग). ३ अंधक किं० गढूळ नव्हे अशी (दृष्टि). ४ ज्यांत घोटाळा किं० गुंतागुंत नाहीं अशी(कल्पना, युक्ति,विचार).५दोषरहित; पापरहित. ६ ज्यांत कांहीं लबाडी नाहीं असा (व्यवहार, सौदा). ७ ज्यांत आडपडदा नाहीं असें (भाषण, कथन). ८ ज्यांत कांहीं शंकास्थळें राहाणार नाहींत असें (स्पष्टीकरण,विवरण, इ०). क्रि० वि० १ स्पष्टपणें; आडपडदा न ठेवतां; संकोच न बाळगतां; न कचरतां. २थेट, मध्यें वळणें नसलेला (रस्ता, वाट). ३ पूर्णपणें; सर्वथैव; उ० मी पावसानें साफ भिजलों. ४ न कुथतां,पातळ नव्हे असें(शौचास म्ह०परसाकडे होणें). ५ स्पष्टपणें (दिसणें). ६ उघडपणें. ꕥ **साफसुफी, साफसफाई स्त्री०** स्वच्छता करणें; नीटनेटकी मांडणी करणें; पदार्थाला उजळा देणें, घासणें, पुसणें, इ० क्रिया समुच्चयानें. **साफसफा वि०** स्वच्छ; स्पष्ट; नीटनेटका; यथास्थित. **साफी स्त्री०** १ साफ असण्याचा गुण. वर सर्व अर्थी ' साफ ' पहा. २ औषधें,भांग,इ० गाळावयाचें वस्त्र.

साफळा पु० मागें ' सापळा ' पहा.

सांब [सं०] पु० १ शंकर.२ अजागळ किं० भोळा माणूस,–ज्याला सहज फसवितां येईल.

साबक पुढें ' साबीक ' पहा.

साबका पु० कोणी माणसानें एकाद्या प्रसंगीं कांहीं विशेष गोष्ट केल्यामुळें त्याची त्या संबंधानें लोकांत जी कीर्ति किं० बदनामी होते ती; कांहीं कारणांमुळें कोणेकाचा समाजांत होतो तो लौकिक (चांगल्या किं० वाईट गुणासंबंधानें) (असणें, पडणें, होणें); उ० तो साप मारणारा असा त्याचा साबका आहे.

साबडा वि० साधा; भोळा; अजागळ. ꕥ **साबडाभाबडा वि०** साधाभोळा; अजागळ; ज्याचे ठायीं छक्केपंजे मुळींच नाहींत असा.

साबण, साबुण, साबू [अ० साबून्] पु० अंग,कपडे,किं०कोणताही पदार्थ स्वच्छ करण्याचा एक रांधा.

साबणी स्त्री०मुलांचें गुळाचें एक खाद्य.साबणी पांढरी स्वच्छ असून हलकी असते.

सांबता, सामता पु० लाकडाला भोक पाडण्याचें सुतारांचें एक हत्यार. हें लोड आणि त्यांत बसविलेलें फळ ह्या रूपाचें असून तें कसणीनें फिरवावयाचें असतें.

सांबर [सं० शंबर] पु०, न० एक चतुष्पाद जनावर,–हरिणाच्या जातीचें; याच्या शिंगांस अनेक फाटे असतात. **सांबरी स्त्री०** १ चकमक, सुई, बिब्बा, नाचकण, इ० विविध पदार्थ ठेवण्यासाठीं सांबराच्या कातड्याची आणि कंबरपट्ट्यांत आडकावावयाची पिशवी. २ सांबराचें आसनार्थ कमावलेलें कातडें. **सांबर भोवली स्त्री०** एक वेली,–जिचा पाला सांबराची पोटदुखी बंद करते. **सांबरशिंग न०** सांबराचें शिंग,–जें उगाळून कपाळ दुखत असतां त्याचा लेप करतात.

सांबर, साबर [सं० शांबरी] न० इंद्रजाल; जादू; गौडबंगाल.

साबरमीठ, सांबरमीठ, सांबरीमीठ न० मातीपासून काढतात तें एक प्रकारचें ' मीठ. ' ह्यालाच ' मेंगळमीठ, ' ' मेंगें मीठ ' असें म्हणतात. [पहा.

साबळा, साबळाभाबळा मागें ' साबडा '

साबान [अ० षअबान्] पु० मुसलमानी वर्षाचा आठवा महिना. मोहोरम, सफर, रविलावल, रविलाखर, जमादिलावल, जमादिलाखर, रज्जब, साबान, रमझान, सव्वाल, जिल्काद, आणि जिल्हेज, हे मुसलमानांचे बारा महिने.

सांबार, सांबारें पुढें ' सांभार, ' ' सांभारें ' पहा.

साबीक [अ०] वि० पूर्वीचा. **क्रि० वि०** पूर्वी; अगोदर.

साबीत [अ०] वि० १ अभग्न; अखंड; समग्र. २ सिद्ध केलेलें; सिद्ध झालेलें.

साबू, साबूण [अ० साबून्] पु० मागें ' साबण ' पहा.

साबू मागें ' सागू ' पहा.

साबूत (–द) मागें ' साबीत ' पहा.

साबोटी, साबोट्या [म० सा (सहा) + बोट] वि० ज्याच्या हाताला किं० पायाला सहा बोटें आहेत असा (मनुष्य).

साभडा, साभळा वि० मागें 'सावडा' पहा.

साभण, साभूण वर 'सावण' पहा.

साभणी वर 'सावणी' पहा.

साभार [म० स (सह)+आभार] क्रि० वि० कृतज्ञतापूर्वक; आभार प्रदर्शित करून (स्वीकार).

सांभार [सं० संभार] पु० तयार करून ठेविलेला मसाला.

साभारी पु० १ आश्रयदाता. २ मदतनीस.

सांभारें [म० सांभार] न० ताकांत काकडी, मुळे, इ० च्या फोडी घालून फोडणी देऊन केलेलें पातळ तोंडीलावणें.

सांभाळ, सांभाळणें मागें 'संभाळ,' 'संभाळणें' पहा.

साम [सं० सामन्] न० १ सांत्वन. २ (राजनीति) सलोखा; तह; गोडीगुलाबीचें भाषण. ३ सौम्यपणा. ४ स्तोत्र. ५ सामवेद. ६ सुरावर म्हटलेली ऋचा. ॐ **साम दान दण्ड भेद** पु० अ० व० कोणेकाला वश करून घेण्याचे चार उपाय; (१) गोड भाषण; सलोख्याची वागणूक; (२) दान, पैसे देणें; (३) पारिपत्य करणें; जबरदस्तीचे उपाय योजणे; (४) त्याचे नोकरचाकर, मित्र, इ० मध्यें फूट पाडून त्यांपैकीं कांहीं आपणाला अनुकूल करून घेणें, हे चार उपाय राजनीतींत सांगितले आहेत. **सामदाम** [सं० सामदान] न० ए० व० (मराठींत) गोडीगुलाबीचे उपाय समुच्चयानें.

साम [सं० स+आम] वि० शरीरांत न पचलेला जो अन्नांश त्याचेमुळें उत्पन्न झालेला (रोग इ०). ह्याचे उलट 'निराम.'

सामका [सं० संमुख] क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) पुढें, समोर; उ० माझ्या सामका उभा राहूं नको.

सामग्री [सं०] स्त्री० १ कांहीं काम करावयाला जीं साधनें किं० उपकरणें लागतात तीं समुच्चयानें. २ माल; द्रव्य.

सामग्र्य [सं०] न० १ पूर्णता; पूर्णपणाची स्थिति. २ परिवार. ३ सामग्री; साधनें आणि उपकरणें समुच्चयानें.

सामंजस्य [सं०] न० १ योग्यपणा; औचित्य. २ बिनचूकपणा. ३ शाहाणपणा.

सामंत [सं०] वि० जवळ राहाणारा. पु० १ शेजारच्या देशाचा राजा. २ मांडलिक राजा. ३ शेजारी. ४ सेनापति. ५ एक ते तीन लक्ष इतक्या उत्पन्नाचा राजा. ॐ **सामंतवासी** वि० शेजारीं राहणारा.

सामता पु० लाकडाला भोक पाडावयाचें सुतारलोकांचें एक हत्यार.

सामदस्तक, सामदस्तखत, सामदस्कत [सं० स्व; फा० दस्त् (हात)+अ० खत] न० सावकाराच्याच चोपडीवर कुळानें घेतलेल्या कर्जाची पावती दिली असते ती.

सामदान वर 'साम' मध्यें पहा.

सामना [हिं०] पु० १ शत्रूच्या समोर धिटाईनें युद्धास उभें राहणें; युद्ध; लढाई. २ स्पर्धेनें कोणेकाशीं बरोबरी करण्यासाठीं उठणें.

सामयिक [सं०] वि० १ ठरावाचें; ठरलेलें; ठरावाला अनुसरून असलेलें. २ रूढ. ३ केलेला करार पाळणारा. ४ समयाला योग्य; प्रसंगाला उचित किं० साजेसें. ५ नियतकालिक; विशिष्ट समयीं करावयाचें म्हणून ठरलेलें. ६ तात्पुरतें; सध्याची नड भागविणारें.

सामर, सामरी वर 'सांबर,' 'सांबरी' पहा.

सामरिक [सं०] वि० युद्धांत उपयोगी पडणारें किं० उपयोगांत आणावयाचें (वाद्य, शस्त्र, इ०).

सामर्थ्य [सं०] न० १ शक्ति. २ तेज. ३ पराक्रम. ४ कर्तव्य. ५ वीर्य. ६ (व्याकरण) अपेक्षा; अन्वय. ७ (व्याकरण) विशिष्ट अर्थ व्यक्त करण्याची शब्दाची शक्ति; शब्दाची अर्थबोधकता किं० अर्थव्यंजकता. ८ शब्दांचें एकार्थत्व.

सामलात [अ० 'षामिल्' चें अ० व० षामिलात्] स्त्री० १ सामिल होणें. २ कट. ३ भागीदारी; कांहीं काम, धंदा, व्यापार, इ० मध्यें कोणेकाची जी वाटणी ती. ॐ **सामलाती** वि० भागीदारीचा; कोणेकाच्या मदतीनें केलेला किं० चालविलेला.

सामवणें अ० क्रि० मावणें; समाविष्ट होणें. मागें ' समावणें ' पहा.

सामवायिक [सं०] वि० समवाय संबंधानें जुळलेला किं० जुळविलेला. मागें ' समवाय' पहा. पु० मंत्री; प्रधान.

सामवेद मागें ' साम ' मध्यें पहा.

सामसूम न० स्त्री० शांतता; गडबड, गलबला, इ० चा पूर्ण अभाव; निःशब्दता. क्रि०वि० आवाज न होईल अशा प्रकारें (निजणें, बसणें, कांहीं काम करणें, इ०).

सामक्षा [सं० समक्ष] स्त्री० १ देव, साधुपुरुष, इ० चें दर्शन.२ देव किं० साधु पुरुष यांनीं भक्ताला दिलेला दृष्टान्त किं० साक्षात्कार.

सामाईक मागें ' समाईक ' पहा.

सामाजिक [सं०] वि० १ समाजाचा; समाजासंबंधाची (सुधारणा); समाजानें कोणेकावर घातलेला (बहिष्कार).२ समाजांत रूढ. पु० १ सभासद; पंच. २ पंचाचा निवाडा ऐकावयास बसलेला कोणीही माणूस.

सामादस्तक, सामादस्तखत,सामादस्तकी मागें ' सामदस्तक ' इ० पहा.

सामान, सामायन [फा०सामान्] न०१घर बांधणें किं०पलंग, खुर्ची, देव्हारा, इ०कांहीं पदार्थ बनविणें, ह्या साठीं जरूर जे लाकूड,दगड, चुना, इ० पदार्थ ते समुच्चयानें. २ कारागिराचीं हत्यारें किं० साधनें समुच्चयानें. ३ संसार, कारखाना, इ० तील भांडींकुंडीं, उखळ, मुसळ, जातीं, पेट्या, कपडे,इ० पदार्थ समुच्चयानें. ꣸ **सामानसुमान** न० ए० व० सामानविमान.

सामान मोहोरा खालीं ' सामान्य ' मध्यें पहा.

सामानाधिकरण्य [सं०]न० १ (**न्याय**) एकदेशीत्व; एक कालिकत्व. २ एकार्थत्व. ३ (**व्याकरण**) दोन पदें एका विभक्तींत असणें; उ० 'नीलोत्पल' (निळें कमळ) ह्या सामासिक शब्दांत ' नील ' आणि ' उत्पल ' ह्या दोन पदांची विभक्ति एक म्ह० प्रथमा आहे.

सामान्य [सं०] वि० १ सर्वांस साधारण किं० सारखेंच लागूं पडणारें; समुदायांतील बहुतेक व्यक्तींना लागूं पडणारा (गुण, धर्म,नियम). ' अपवाद ' च्या व्यावर्तकत्वें.२ सारखें. ३ मध्यम प्रतीचा; फारसा उंची किं० उत्तम नव्हे असा. न० १ सार्वत्रिक नियम. २ साधारण धर्म. ३ जाति; वर्ग. ४ तुल्यता. ५ (**साहित्य**) प्रस्तुत वस्तु अप्रस्तुत वस्तूशीं अगदीं सदृश असल्यामुळें त्या दोहोंतील भेद लक्ष्यांत येत नाहीं, अशा अर्थाच्या वर्णनाला ' सामान्य ' म्हणतात. विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' या पुस्तकांत पहा. ꣸ **सामान्या** स्त्री० वेश्या. **सामान्यनाम** न० जातिवाचकःशब्द,–ज्यांत त्या जातीचा धर्म प्रत्येक व्यक्तीवर असतो; उ० झाड, मनुष्य,घर, जनावर, इ०. **विशेषनाम** न० एका एका व्यक्तीचें वाचक जें नाम तें;उ०हिंदुस्तान,महात्मा गांधी,गंगा,इ०. **सामान मोहोरा** पु० सामान्य दर्जाचा माणूस; उत्कृष्ट प्रतीचा नव्हे असा इसम; उ०रामभाऊला कोणी विचारीत नाहीं, ह्या गांवात तो सामान मोहोरा समजला जातो;उ०महात्मा गांधी सामान मोहोरा नव्हे. हा वाक्प्रचार अशिक्षितांत रूढ आहे.**सामान्य नियम** पु०समुदायांतील व्यक्तींना किं० बहुतेक व्यक्तींना लागूं पडणारा नियम; याच्या व्यावर्तकत्वें ' विशेष नियम. ' **सामान्यरूप** न० (**व्याकरण**) विभक्तीचे प्रत्यय किं० शब्दयोगी अव्यय हीं नामाला लावावयाचीं असतां त्या नामाचें जें रूप होतें तें; उ० ' घर ' याचें ' घरा ' हें सामान्य रूप होऊन ' घरावर, ' ' घराखालीं, ' ' घराला, ' अशीं रूपें होतात.**सामान्य पक्ष** पु० मध्यम पक्ष; ह्याही टोकाचा नसलेला आणि त्याही टोकाचा नसलेला.**सामान्य सर्वनाम** न०ज्या सर्वनामाचा सामान्यें करून अर्थ होतो तें सामान्य सर्वनाम; उ० कोणी, अमका, सर्व, अवधा, कित्येक, इ०. **सामान्यतः** क्रि० वि० बहुतकरून; सर्वसाधारणपणें.

सामायन न० वर ' सामान ' पहा.

सामावणें, सामेणें वर ' समावणें ' पहा.

सामाशी, सामासकी [म० सा (सहा) + मास (महिना)] स्त्री० १ दर सहा सहा महिन्यांनीं विणारी गाय. मागें ' समस्की ' पहा.

२ मृत मनुष्याच्या प्रीत्यर्थ मरणानंतर सहाव्या महिन्यांत जो जेवण इ० रूप विधि करतात तो (शूद्रांत).

सामाशी [म० सा (सहा)+मासा (आठ गुंजा हें वजन)] सहा **वि०**मासे वजनाचें (वळें, चांदी, सोनें, इ०).

सामाशी, सामासिक [म० सा (सहा) +मास (महिना)] **वि०** दर सहा सहा महिन्यांनीं करावयाचा (विधि, अहवाल, तपासणी, इ०).

सामाशें, सामासें [म० सा (सहा)+ मास (महिना)] **न०** मृत मनुष्यांच्या मरणानंतर त्याच्या प्रीत्यर्थ सहाव्या महिन्यांत करावयाचा विधि (शूद्रांत).

सामासिक [**सं०**] **वि०** १ समासानें उत्पन्न झालेला (शब्द); उ०'चक्रपाणी' (विष्णु) हा सामासिक शब्द आहे. २ संक्षिप्त.

सामिलात स्त्री० सरकत; भागी. वर 'सामलात ' पहा.

सामीप्य [**सं०**] **न०** १ समीपता; जवळपणा; शेजार. २ एक प्रकारची मुक्ति. मागें ' समीपता ' सर्व अर्थी पहा.

सामील [अ० षामिल्] **वि०** १ अंतर्भूत; समाविष्ट केलेला; आंत घेतलेला. २कांहीं कृत्यांत कोणी कोणेकाला जो मदत करतो तो; एकाद्या कृत्यांतील मदतनीस. ३ गुंतलेला; आडकलेला. ४ मिश्रित; मिसळलेला.

सामुग्री, सामोग्री स्त्री० मागें 'सामग्री'पहा.

सामुदायिक [**सं०**] **वि०** समुदायांतील सर्व व्यक्तींनीं एकदम केलेला किं० आरंभिलेला (प्रयत्न, चळवळ); समुदायांतील सर्व व्यक्ति ज्यांत भाग घेत आहेत असा (कायदेभंग इ०).

सामुद्र [**सं०**] **वि०** समुद्रासंबंधाचा. **पु०** समुद्रावरचा व्यापारी. **न०** १ मीठ. २समुद्रफेस. ३ शुभाशुभ सुचविणाऱ्या हात इ० गात्रावरच्या रेषा समुच्चयानें. ❀ **सामुद्रधुनी स्त्री०** दोन जलाशयांना जोडणारा जलाचा अरुंद पट्टा. **सामुद्रक** [**सं०**] **पु०** १ खलाशी. २ जलमार्गानें प्रवास करणारा. **सामुद्रिक** [**सं०**] **वि०** समुद्रासंबंधाचें; समुद्रांतील.**पु०**हात,पाय,इ०कांवरील रेषा पाहून भविष्य सांगणारा. **न०** हात,पाय, इ० वरील रेषा पाहून भाकितें सांगण्याचें शास्त्र.

सामेणें मागें ' समावणें ' पहा.

सामोग्री मागें ' सामग्री ' पहा.

सामोपचार, सामोपाय [**सं०** सामन् (दोस्तीचें वर्तन)+उपचार, उपाय] **पु०** १ सौम्य उपचार; सौम्य उपाय. २ गोड बोलणें किं० सौम्य वर्तन करणें ह्या रूपाचा इलाज किं०उपाय.

सामोरा [म० समोर] **वि०** १कोणेकाच्या भेटीसाठीं पुढें झालेला, आलेला, किं० गेलेला. २ पुढें असलेला किं० आलेला.

साम्य [**सं०**] **न०** १ सारखेपणा; सादृश्य. २ एकरूपता; तादात्म्य. ३ तुल्यता; बरोबरी. ४ एकोपा. ५ समवृत्ति.

साम्राज्य [**सं०**] **न०** १ सार्वभौमत्व. २ एकच्छत्री राज्य. ३ दशलक्ष गांवांचें आधिपत्य. ❀ **साम्राज्यतृष्णा स्त्री०**आपल्या देशानें दुसऱ्या देशास पादाक्रान्त करून त्यांतील लोकांवर राज्य करावें किं० स्वामित्व मिरवावें अशी इच्छा.

साय [**सं०** शाक] **पु०** साग हा वृक्ष. ह्याचें लाकूड तुळया,खांब,इ०करण्या साठीं किं०होड्या, गलबतें, इ० बांधण्यासाठीं योजतात. 'सायवान,' 'सागवान' ह्याच अर्थी. **सायवान न०** सागाच्या झाडांचें रान.

साय [**सं०** सार] **स्त्री०** १ दूध, उसाचा रस, इ० पदार्थांवर अग्निसंयोगानें किं० अन्य कारणांनीं कांहींसा दाट किं० घट्ट जो थर जमतो तो. २मोरींतील रद्दी पाणी,सांचलेलें पाणी,इ० वर जो मळाचा थर जमतो तो.

सायक [**सं०**] **पु०** १ बाण. २ खड्ग. ❀ **सायकासन न०** धनुष्य.

सायकाल (-ळ) [**सं०** सायम्+काल] **पु०** १ संध्याकाळची वेळ. २ दिनमानाच्या पांच विभागांपैकीं शेवटचा विभाग. ❀**सायंकाळी स्त्री०** एक फुलझाड,-ज्याला संध्याकाळीं फुलें येतात. **सायंकाळें न०** ह्या झाडाचें फूल.

सायटी स्त्री०, सायटें न०[म० साय]पातळ साय. मागें ' साय ' [**सं०**सार] सर्व अर्थी पहा.

सायंतन [**सं०**] **वि०** संध्याकाळचा;संध्याकाळीं करावयाचा.

सायतुळव स्त्री० खटारा गाडीचा एक अवयवविशेष.

सायन [**सं०**] **न०** अयनांशयुक्त ग्रहगणितविशेष. याच्या व्यावर्तकत्वें ' निरयण. ' ꠸ **सायनपंचांग न०** सायनपद्धतीनें तयार केलेलें पंचांग. **सायनपद्धति स्त्री०**(**ज्योतिष**)ग्रहाचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत घेण्याची पद्धति. **सायनसौरवर्ष न०** संपातापासून सूर्य निघाल्यापासून पुनः तो तेथें येण्यास लागणारा काळ. (३६५ दिवस १४ घटका ३२ पळें). **सायनखेट, सायनग्रह पु०** (**ज्योतिष**) ग्रहाचा रेखांश.

सायर स्त्री० मुंग्यांची रांग; माशा, पक्षी, इ० चा थवा. मागें ' साईर ' सर्व अर्थीं पहा.

सायर [**अ०**] **न०** गुरेंढोरें, सामानसुमान, इ०च्या रहदारीवर जकात किं० अशा जकातीचें नाकें. ꠸ **सायरबाब स्त्री०** वाहतुकीच्या पदार्थावरची जकात. याच्या व्यावर्तकत्वें ' जमीनबाब '.

सायरा पु० पाण्यावर किं० डोळ्यावर येतो तो तवंग किं० मळाचा थर.

सायरी स्त्री० एक झाड. **सायरेल,सायऱ्येल न०** ह्या झाडाचें तेल.

सायल मागें ' साइला ' पहा.

सायला [**सं०**शाक] **पु०**सागाचें झाड; सागाचें लाकूड. ꠸ **सायली, सायवानी वि०**सागाच्या झाडाचा किं० झाडासंबंधाचा.

सायवान, सागवान [**सं०** शाक] **पु०** सागाचें झाड. **न०** सागाच्या झाडांचें जंगल.

सायवान [**फा०**] **पु०** १ छप्पर. २ हत्तीवरच्या अंबारीचा माथा किं० ह्या माथ्याचें छत. ३मांडवाची पडवीच्या आकाराची उतरती बाजू.

सायसंगीत [**म०** संगीत] **वि०** १ जुळणारा; मेळांत असलेला. २ तंतोतंत; बरोबर. ३ जितक्यास तितका. ४ सायसंगीन.खालीं ' सायसंगीन ' पहा.

सायसंगीन [**म०** संगिन] **वि०** सर्व अंगें आणि उपांगें ह्यांनीं युक्त; सर्वांगसंपूर्ण.

साया [**सं०** शाक] **पु०** साग नांवाचें झाड. ꠸ **साया वृक्षांचा राया** सर्व वृक्षांत सागाचा वृक्ष मूल्यवान् किं० उपयुक्त असतो.

सायास [**सं०** स+आयास] **पु०** प्रयास; खटपट; कष्ट. ꠸ **सायाशीं न घडे तें सहज घडे** मोठ्या प्रयासानें जें होत नाहीं तें कधीं कधीं दैववशात् आपोआप घडून येतें.

सायाह्न [**सं०**] **पु०** संध्याकाळ.

सायाळ [**सं०** शल्य] **स्त्री०** साळई हा प्राणी. याच्या अंगावर दाभणासारखे असंख्य अवयव असतात. या प्राण्याला 'साळू,' 'सारसई,' ' साळशिंदर ' अशींही नांवें आहेत.

सायीर मागें ' साईर ' पहा.

सायुज्य [**सं०**] **न०** १ सारखेपणा. २ एकरूपता,–चार मुक्तींपैकीं एक. मागें ' सलोकता, ' ' समीपता, ' ' सरूपता ' हे शब्द पहा.

सायुध [**सं०** स (सह)+आयुध(शस्त्र)] **वि०** आयुधें म्ह० शस्त्रें घेऊन सज्ज किं० सिद्ध झालेला (वीर, योद्धा).

सार [**सं०**] **पु०, न०** १ अर्क; तत्त्वांश; सत्त्व. २ मुख्य भाग; गाभा. ३ तात्पर्य. ४ बळ; सामर्थ्य. ५ शौर्य; धैर्य.६ कठिणपणा; टणकपणा. ७ संपत्ति. ८ दूध, दहीं, इ०वर येते ती साय. ९ लोणी. १० (**साहित्य**) एकाद्या वस्तूचा उत्कर्ष किं० अपकर्ष चढत्या पाहिऱ्यांनीं किं० उतरत्या पाहिऱ्यांनीं झाला आहे असें वर्णन असल्यास ' सार ' नांवाचा अलंकार होतो.विशेष खुलासा, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा.**न०**(**मराठींत**)चिंच,आमसोल, आंबा, इ० आंबट पदार्थ पाण्यांत कोळून त्यांत मीठ, हिंग, इ० घालून जें कालवण करतात तें. **टीप,**–'सार' हा शब्द सर्व अर्थीं मराठींत **न०** योजण्यांत येतो. ꠸ **सारवान् पु०** १ संपन्न; श्रीमंत. २ सत्त्वस; सत्त्वांशयुक्त. **सारलोह** [**सं०** सार (कठिण, टणक)+लोह (लोखंड)]**न०**पोलाद. **सारगंध पु०** चंदन. **सारद्रुम पु०** खैर. **सारज न०** लोभ. **सरभोक्ता** [**सं०** सारभोक्तृ] **पु०** दुसऱ्याच्या श्रमाचें फळ आयतेंच जो भोगतो तो. **सारांश पु०** सारभूत अंश; तात्पर्य; गोळाबेरीज. **क्रि० वि०** एकंदरींत. **सारासारविचार पु०** १ ग्राह्य काय, अग्राह्य काय, ह्या संबंधाचा विचार. २ व्यवहारचातुर्य. ३ विवेक.

सार न० होडी, गलबत, इ०चीं अवजारें

डोलकाठीला ज्या दोरीनें किं०पट्टयानें आवरून बांधतात ती दोरी किं० तो पट्टा.

सार [**सं०** सार=बुद्धिबळ, सोंगटी] **पु०** १ सोंगटी. २ बुद्धिबळाच्या खेळांतील मोहोरें किं० प्यादें. ३ (**लाक्षणिक**) जुगारीचा खेळ; द्यूत. ॐ **टार, गार, नार, सार, ह्या चार वस्तु एका वर्गांतलि होत** मागें ' टार ' मध्यें पहा.

सार मागें ' साईर ' पहा.

सारक [**सं०**] **वि०**रेचक;ढाळक. **पु०** जेपाळ.

सारक न० १सुरमाडाची झावळी.२ह्या झावळीचा बुडखा.३ह्या बुडख्याचें पाणी शिंपण्याचें साधन करतात तें. ४ सुरमाडाला फळें ज्या लोंगरासारख्या अवयवाला येतात तो अवयव. ॐ **सारकी स्त्री०, सारक,सारूक न०** सुरमाडाच्या झावळीच्या बुडख्याचें जें पाणींशिंपणें करतात तें.

सारखा [**सं०**सदृश] **वि०** १ सदृश;समान; तुल्य; रूप, गुण, आकार, किंमत, योग्यता, इ० बाबतींत बरोबरीचा.२उंचसखल किं०उखीरवाखीर नव्हे असा (पृष्ठभाग); नितळ (जमीन, भिंत, इ०). ३ सर्व भागीं एकाच गुणधर्मांचा. ४ सर्वांशीं एकरूप असें (वर्तन). ५ निःपक्षपाती; समभाव. ६ अनुरूप; योग्य; उ० तो वळण्यासारखा मनुष्य आहे; उ० कारलेकराची सरकस पाहण्यासारखी आहे.**क्रि०वि०**(लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) अखंड क्रमानें; न थांबतां;न खळतां; उ० हें पोर सकाळपासून सारखें रडतें आहे; उ० कालपासून पाऊस सारखा पडतो आहे. **सारखवट न०,स्त्री०, सारखवटा पु०** [**म०** सारखा +वत् (प्रत्यय)] सारखेपणा; सादृश्य; साम्य.

सारखाविणें [**म०** सारखा] **स० क्रि०** १ सपाट,नितळ, एकरूप, किं० सदृश करणें.२एकाच किमतीचें किं० महत्त्वाचें किं०परिमाणाचें करणें.

सारंग, सारण स्त्री० तोडलेले किं० पाडविलेले आंबे भरावयाचें जाळें.

सारंग [**सं०**] **वि०** चित्रविचित्र. **पु०** १ काळवीट हा जंगली पशु. २ हरिण. ३ भ्रमर. ४ हत्ती. ५ चातक. ६ एक राग. ॐ **सारंगी स्त्री०** एक तंतुवाद्य. **सारंगा वि०** घोड्याचा एक रंग,– तांबड्यांत काळसर छटा आहे असा.**सारंगिक पु०** पारधी. **सारंग्या पु०** सारंगी वाजविण्याचा धंदा करतो तो.

सारंगपाट [**सं०** शारिपट्ट] **पु०** सोंगट्या, फासे, पट, ह्या साधनांनीं खेळावयाचा एक खेळ.

सारजा [**सं०** शारदा] **स्त्री०** सरस्वती ही विद्येची देवता.

सारडूळ न० एक जंगली वृक्ष.

सारढेकर पु० आंबट किं० करपट ढेकर.

सारण [**सं०**] **पु०** (**वैद्यक**) संग्रहणी; अतिसार. **सारणी स्त्री०** पंचांग करण्याचें कोष्टक किं० अशीं कोष्टकें समुच्चयानें.

सारण [**सं०**] **न०** सारणें; ढकलणें; लोटणें.

सारण, सारणि, सारणी [**सं०**] **स्त्री०** १ कालवा; पाण्याचा पाट.२ओढा.३पाण्याचा नळ.

सारण स्त्री० १ बांबू पिंजून त्याची काढलेली पट्टी. २ आंबे गोळा करावयाचें किं० भरावयाचें जाळें.

सारण [**म०** सारणें] **न०** पुरी, करंजी, गुरवळी, साटोरी, कचोरी, इ०च्या पोटांत भरतात तें गुळखोबरें, खवा, पुरण, इ०.

सारणिक [**सं०**]**पु०**प्रवासी;पांथस्थ;मुशाफर.

सारणी [**सं०**] **स्त्री०** १ पंचाग करतांना योजतात तीं कोष्टकें समुच्चयानें किं० व्यक्तिशः. २ हीं कोष्टकें लागू करण्याची क्रिया किं० सरणी. ३ पाण्याचा कालवा, पाट, किं० नळ. ४सांडपाणी बाहेर काढून लावण्याची मोरी. ५ आंबे गोळा करावयाचें किं० भरावयाचें जाळें. ६ मोटेचे बैल जीवरून चालतात ती उतरण (किं० चढण).

सारणें [**सं०** 'सृ' चें प्रयोजक; **म०** 'सरणें' चें प्रयोजक] **स० क्रि०** १ बाजूस किं० पलीकडे किं० दूर लोटणें किं० ढकलणें. २ संपवून किं० खर्चून टाकणें; उडविणें. ३ (काम, कर्तव्य, धंदा, इ०) करणें, निस्तरणें, संपविणें, पार पाडणें, किं० आवरणें.

सारथि [**सं०**]**पु०** १ घोडे इ० हाकणारा. २ रथ हाकणारा. ३ मदतनीस. ४ कांहीं कामांत मार्गदर्शक; अग्रणी; पुढारी; चालक. ५ वाली; आश्रयदाता.

सारथ्य [**सं०**] **न०** गाडी हाकणें किं० रथ चालविणें हें काम किं० ह्या कामांतील कौशल्य.

सारपा, सालपा [म० साल] **पु०** लाकूड तासलें किं० फोडलें असतां निघतात त्या धलप्या व्यक्तिशः किं० समुच्चयानें.

सारफा, सारफेवार मागें 'सरफा,' ' सरफेवार ' पहा.

सारभुंकन वि० ज्याच्या नाकपुडींत पांढरा ठिबका आहे असा (घोडा). असा घोडा अशुभलक्षणी समजला जातो.

सारभोक्ता [सं० सारभोक्तृ] **पु०** दुसऱ्याच्या श्रमाचें फळ ज्याला कांहीं कष्ट न करतां म्ह० रिकामें बसून भोगावयास मिळतें असा (माणूस). मागें ' सार ' मध्यें' सारभोक्ता ' पहा.

सारमंडल न० बत्तीस तारा ज्याला असतात असें एक तंतुवाद्य.

सारल्य [सं०] **न०** सरळपणा,–भाषण,वर्तन, इ० तील.

सारवण [म० सारविणें] **न०** १ शेण, माती, पाणी, इ० द्रव्य जें जमीन, भिंत,इ०सारविण्यासाठीं घेतात तें. २ ह्या द्रव्यानें जमीन, भिंत, इ० वर जो संस्कार करतात तो. ❀ **धुळीवर सारवण न०** निष्फळ प्रयत्न; जिचा परिणाम फार वेळ टिकत नाहीं अशी कृति.

सारवत न० १ नागवेलीवर पडतो तो एक रोग. २ नागवेलीचें जून पान.

सारवळा पुढें ' सारोळा ' पहा.

सारवान [फा० सार्बान्] **पु०** उंट हाकण्याचा धंदा करणारा.

सारविणें स० क्रि० १ (जमीन, भिंत, इ०) शेण, माती, पाणी, रंग,इ०नीं माखणें. २जमीन, भिंत, इ०(शेण, माती, पाणी,रंग,इ०नीं) माखणें.

सारस [सं०] **वि०** सरोवरासंबंधाचें. **पु०** १ एक पक्षी. २ हंस. **न०** कमळ. **सारसी स्त्री०** सारस पक्ष्याची स्त्री. ❀ **सारसक पु०** चक्रवाक पक्षी. **सारसिका स्त्री०** चक्रवाक पक्ष्याची स्त्री.

सारस पु० १ सुरमाडाच्या झावळीच्या बुंध्याकडचा जो पन्हळासारखा भाग असतो तो.हा भाग वांगीं, मिरच्या,इ० वर पाणी शिंपडण्याचे कामीं योजतात. २ माडाच्या झावळीचा कांहीं भाग विणून असेंच जें पाणी शिंपडण्याचें साधन करतात तें.

सारसई स्त्री०१ साळू हा प्राणी. २ह्याचें पांस.

सारसी [सं०] **स्त्री०** सारस पक्ष्याची स्त्री. मागें ' सारस '[सं०] मध्यें पहा.

सारसुसर स्त्री०, न० १ प्रवासांत बरोबर घेतलेलें सामानसुमान. २ संसारांतील सामानसुमान; सटरफटर; चीजवस्त.

सारस्य ' स्वारस्य ' चें अशिक्षितांत रूढ रूप. पुढें ' स्वारस्य ' पहा.

सारस्वत [सं०] **वि०** सरस्वती संबंधाचें. **पु०** महाराष्ट्रांतील पंचगौड ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम. **न०** १ वक्तृत्व. २ भाषेंतील वाङ्मय.

सारा [सं० सर्व] **वि०** सगळा; अशेष; समग्र; बिनबाकी. ❀ **सारासुदीस क्रि० वि०** सबंध दिवसभर.

सारा पु० १ शेत, वाडी, इ० संबंधानें सरकारला जें देय द्यावें लागतें तें. सारादोरा म्ह० अशा प्रकारचीं हरएक देयें समुच्चयानें. २नेत्रावर येतो तो मळाचा किं० पुवाचा थर. ❀ **सारेकरी पु०** सरकारांत सारा देतो तो.

सारांश, सारासारविचार मागें ' सार ' मध्यें पहा.

सारि, सारी [सं०] **स्त्री०** १ सोंगटी. २ बुदबळ. ❀ **सारिपाट,सारीपाट,सारिंगपाट पु०** सोंगट्यांचा किं० बुदबळांचा पट किं०पाट.

सारिका, सारी [सं०] **स्त्री०** एक पक्षी.

सारिखा वर ' सारखा ' पहा.

सारिंगपाट, सारिपाट वर ' सारि, सारी ' मध्यें पहा.

सारिगम मागें ' सरिगम ' पहा.

सारिफा, सारिफेवार मागें ' सारिफा, ' ' सरिफेवार ' पहा.

सारी वर ' सारिका, सारी ' पहा.

सारीस, सारूक न० मागें ' सारक ' **न०** मध्यें पहा.

सारूप्य [सं०] **न०** १ समानरूपता. २ सादृश्य. ३ चार मुक्तींपैकीं 'सरूपता' ही मुक्ति. मागें ' सलोकता, ' ' सरूपता, ' ' सायुज्य, ' हे शब्द पहा.

सारेकरी पु० सारा देतो तो. मागें ' सारा ' मध्यें पहा.

सारोख, सारूख [म० राख+रोख] **वि०**

१ पतीचा किं० चांगल्या लौकिकाचा (माणूस; व्यापारी). २ प्रामाणिक (व्यापार, व्यवहार). ३ मूल्यवान; किमतीचा.४खरा,वजनदार (पदार्थ, माणूस). ५ लबाड्या, लुचेगिऱ्या, किं० अन्य दुष्कर्में करून तीं लपविण्यांत आणि आपण साधुवृत्तीचे आहों असें लोकांना भासवून देण्यांत पटाईत (वाईट अर्थानें). स्त्री० १ पत; चांगला लौकिक. २ व्यापारांत सचोटी. ३ बाहाणा; कांगाव; नसत्या पावित्र्याचा देखावा.**॰सारोखी, सारुखी स्त्री०** चोरी, लबाडी, इ०पापकर्म करून आपण त्यापासून अगदीं अलिप्त आहों असें लोकांना भासविण्याची जी कोणेकाची कुशलता किं० सफाई ती. **सारोखीच्या गोष्टी सांगणें** अलिप्तपणाचा बहाणा करणें;खोट्या सबबी सांगणें.

सारोळा [**गुजराथी** सर्वाळा] **पु०** बेरजेचा ताळा पाहाण्याची एक रीति.बेरजेच्या रकमांतून एक रक्कम बाजूस काढून बाकीच्या रकमांची बेरीज करून त्यांत ही बाजूस काढून ठेविलेली रकम मिळवून पहिल्या इतकी बेरीज आली तर मिळवणी खरी आहे असें ठरविणें ह्या रूपाचा ताळा.

सार्थ[**सं०**स+अर्थ]**वि०**१अर्थयुक्त..२उपयुक्त.३ श्रीमंत; धनसंपन्न. ४ उद्दिष्ट मिळवून देणारा किं०हेतु सफळ करणारा (प्रयत्न). ५ योग्य; वाजवी; यथान्याय. **पु०** व्यापारी, प्रवासी, इ० चा तांडा; पशु, पक्षी, इ० चा कळप. ॰ **सार्थवाह पु०** व्यापारी.

सार्थक [**सं०** स+अर्थ+क (प्रत्यय)] **वि०** १ अर्थयुक्त. २ महत्त्वाचें. ३ उपयुक्त. ४ उद्दिष्ट मिळवून देणारा (प्रयत्न). **न०** १ (**मराठींत**) योग्य प्रयत्न. २ (**मराठींत**) फलद्रूपता; योग्य विनियोग; साफल्य; उ० माझा भाचा बी. ए. च्या परीक्षेंत पास झाला, त्याच्या विद्येवर मी जो पैसा खर्च केला त्याचें सार्थक झालें. **टीप,–** ह्या तीन्ही अर्थीं'सार्थक'हें मराठी रूप **'सार्थक्य'** ह्या शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय. ॰ **सार्थकीं लागणें** प्रयत्न, खर्च, इ० फळास येणें किं० फलद्रूप होणें; उद्दिष्ट सफळ करून देणें.

सार्थक्य [**सं०**] **न०** १ सफलता; फलद्रूपता; उद्दिष्टाचें साफल्य. २ अर्थयुक्तता.

सार्द्र [**सं०** आर्द्र] **वि०** जलयुक्त; ओला.

सार्ध [**सं०** स+अर्ध] **वि०** अर्ध्यानें युक्त. 'सार्ध 'याचें मराठी अपभ्रष्ट रूप ' साडा, ' ' साडे, ' असें आहे; उ० साडे आठ इ०. ॰ **सार्धशत न०**अर्ध्या शेकड्यानें सहित असा एक शेकडा म्ह० दीडशें.

सार्प, सार्प्य [**सं०**] **पु०** आश्लेषा हें नक्षत्र.

सार्प [**सं०**] **वि०** सर्पासंबंधाचें.

सार्व [**सं०**] **वि०** १ सर्वोपयोगी. २सर्वांसंबंधाचा. ॰ **सार्वकामिक वि०** सर्व इच्छा पुरविणारा (प्रयत्न, विधि, इ०). **सार्वकालिक वि०** सर्व काळीं किं०सर्व काळांस लागू पडणारें. **सार्वजनिक वि०** १ सर्वांना हितकर. २ सर्वांना लागू पडणारा. ३ सर्व लोकांनीं केलेला (प्रयत्न, मागणी, इ०).**सार्वजनान वि०** १ सर्व लोकांना विदित. २ सर्व लोकांसंबंधाचा. **सार्वधातुक न०** (**व्याकरण**) धातूंना लागणारे प्रत्ययविशेष. **सार्वभौक्तिक वि०** पंचमहाभूतांच्या संबंधाचें. २ प्राणिमात्रांचें. **सार्वभौम वि०** विश्वासंबंधी. **पु०** १ चक्रवर्ती राजा;पन्नास कोटी उत्पन्नाचा राजा.२उत्तर दिशेचा अधिष्ठाता हत्ती. मागें' दिग्'मध्यें' दिग्गज' पहा. **सार्वलौकिक वि०** १ सर्वांना विदित. २ सार्वत्रिक. **सार्ववेदस पु०** यज्ञांत सर्वस्वाचें दान करणारा. **सार्ववेद्य पु०** चारही वेद म्हटलेला (ब्राह्मण). **सार्वत्रिक** [**सं०**] **वि०** १ सर्व ठिकाणीं चालू. २ सर्व ठिकाणांस सारखाच लागू पडणारा. ३ सर्व ठिकाणच्या लोकांनीं सारखाच केलेला, आचरलेला, पुकारलेला, रूढ केलेला, (आचार, बहिष्कार, हरताळ, इ०).

सार्ष्टि, सार्ष्टिता स्त्री०, सार्ष्ट्य न० [**सं०**] पांच प्रकारची मुक्ति मानिला असतां चवथा प्रकार. ह्या प्रकारांत ईश्वराचें सामर्थ्य, सर्वज्ञत्व, वैभव, इ० गुण प्राप्त होतात.

साल [**सं०**छल्लि,छल्ली=झाड किं०वेली यांची साल] **स्त्री०** १ झाड,वेली, इ० च्या खोडावरील किं०काष्ठावर जी त्वचा ती. २ फणस, पपनस, इ० फळांची जी जाड त्वचा ती. **न०** १ धान्याचे दाणे इ० वरचा जो पातळ पापुद्रा तो. २ प्राण्याच्या शरीराची त्वचा किं० कातडी. ३ प्राण्याच्या शरीरावर दगड, लाकूड, इ० चें घर्षण झाल्यानें निघून जातें तें कातडें. ४ राता.

ज्याचें वाळविलेलें जें बाहेरचें आच्छादन तें. ५ भातशेत नांगरल्यावर त्यांतील केरकचरा इ० गोळा करण्याची फळी. ❀ **सालखाद्या** वि० केवळ नफ्यावर दृष्टि ठेवून कोणतेंही काम करणारा किं० चालविणारा. **सालभेंडा, सालभेंडी** वि० जाड सालीचें (फळ, झाड, इ०).

साल [सं०] पु०१सालई वृक्ष.२कुंपण. ३तट (सर्व अर्थीं). ❀ **सालग्राम** पु० शालिग्राम. **सालभंजिका** स्त्री०मुलीची खेळण्याची बाहुली. **सालरस** पु० राळ.

साल [अ०] न० वर्ष,–बारा महिन्यांचा काळ. ❀ **बहुसाल** वि० दीर्घायुषी. **सालबंदी** स्त्री० १ कौल, हसे, इ० अमुक वेळीं अमुक परिमाणाचे शेतकरी, कुळें, इ० नीं सरकारांत भरावे अशा तपशिलाचा ठराव किं० अशा तपशीलाचा ठराव ज्यावर लिहिलेला असतो तो कागद. २ पुजारीपणा, कुलकर्णपणा, इ० जी समाईक वृत्ति तिचा अमक्या सालीं अमक्यानें भोगवटा घ्यावा असा ठराव किं० अशा ठरावाचा कागद. **सालमजकूर** न० चालू वर्ष; हल्लींचें साल. **सालवारी** स्त्री० १ दरवर्षी घडलेल्या गोष्टींची नोंद. २ अमुक वर्षी अमक्यानें अमुक करावें ह्या संबंधाची नोंद. **सालबोली** स्त्री० एका वर्षापुरता किं० एका वर्षासंबंधाचा ठराव.**सालगुदस्त** [अ० साल्–ए–गुझस्ताह्]न० मागलें वर्ष; गत वर्ष. **क्रि० वि०** गेल्या वर्षी; मागल्या सालीं. ह्या अर्थी ' सालगुदस्ता ' सुद्धां. **सालकरी** पु० जोसपणा, पुजारीपणा, कुलकर्णपणा, इ० वृत्तीचे जे अनेक विभागी त्यांपैकीं ज्या कोणाकडे एका विशिष्ट वर्षाची वृत्ति आली आहे तो त्या वर्षाचा सालकरी. **सालोसाल, सालबसाल, सालदरसाल** क्रि० वि० प्रतिवर्षी. **सालहाल** न० चालू साल. **सालाबाद** [अ० साल् बअद्=वर्षानंतर] **क्रि० वि०** दरवर्षी. ' सालाबाज ' ह्याच अर्थी. **सालाबादप्रमाणें** **क्रि० वि०** दरवर्षी होतें, घडतें, किं० केलें जातें त्याप्रमाणें किं० त्या सरणीनें.**सालिना,सालीना, सालाना** [अ०सालियानाह्] वि०वार्षिक;दरवर्षाचा.**सालहाल, हालसाल** क्रि० वि० दरवर्षी. **सालजाब** मागें ' जाब 'मध्यें'जाबसाल' पहा.

सालंकृत [म० स+अलंकृत] वि० अलंकारांनीं शोभविलेली (लग्नांत दान केलेली वधू). टीप,–' सालंकृत ' हें मराठी संस्कृत रूप. ❀ **सालंकृत कन्यादान** न० मुलीच्या अंगावर दागिने घालून आणि दोन्ही मांडवांचा खर्च करून कोणा वराला लग्नाच्या विधीनें मुलगी देणें. 'शालंकृत' हें रूप अशिक्षितांत रूढ आहे.

सालखादें [म० साल (अंगावरील त्वचा) +खाणें] न० दंश करणारी एक माशी.

सालट [म० साल] न० १ थोडेसें साल किं० टरफल ज्यांवर आहे असें (डाळ इ०धान्य). २ दाणे काढून घेतल्यानंतर राहिलेलें शेंगेचें टरफल. अशी जीं टरफलें त्यांना'सालटें'न० अ० व० म्हणतात.

सालट[म०साल]वि०ज्यांत कोंडा,टरफलें, इ० अवशिष्ट राहिलीं आहेत असे (तांदूळ,डाळ,शेंगा, इ०).

सालटी, सालडी स्त्री०, **सालटें, सालडें** न० [म० साल] १ मनुष्य किं० जनावर ह्यांच्या शरीरांवरील आवरणभूत जें सबंध चर्म तें. २ घर्षणानें मनुष्य किं० जनावर यांचें निघालेलें कातडें.

सालढोल, सालफळी [सं० सल्लकी] स्त्री० सालई वृक्ष. **सालढोल, सालफळ** न० ह्या झाडाचें फळ.

सालदाटा, सालमोटा, सालमोठा [म० साल] वि० ज्याच्यावरील साल जाडी आहे असा (आंबा, केळें, वृक्ष, इ०).**सालदाटी** स्त्री० जिच्या केळ्याचें साल फार जाडी असतें अशी केळीची एक जात.

सालदोडा [म० साल] पु० १ जाड सालाचा आंबा. २ जाड सालांचें शेंदाड.

सालपट [म० साल] न० झाडाची, प्राण्याच्या अंगाची, लाकडाची, किं० धान्याच्या दाण्याची त्वचा.

सालपा [म० साल] पु० लाकडाच्या धलप्या, तास, इ० समुच्चयानें. मागें ' सारपा ' पहा.

सालफळ, सालफळी मागें ' सालढोल ' पहा.

सालबंदी, सालबोली, सालमजकूर, [पहा.

साळवारी मागें ' साल ' [अ०] मध्यें पहा.

सालंमिश्री, सालमिश्री स्त्री० एका झाडाचें मूळ. हें फार पौष्टिक असतें.

सालमोटा (–ठा) मागें ' सालदाटा ' पहा.

सालवणी, सोलवणी [**म०** साल+पाणी] **न०** आमसुलाचें पाणी,–भाजी इ० मध्यें घालावयासाठीं कोळून तयार केलेलें.

सालस [**सं०** शाला; शालाशुद्ध; **म०** साळसूद] **वि०** निष्पाप आणि साध्या वर्तनाचा, गरीब (माणूस, पशु). ※ **सालसाई, सालशी स्त्री०** गरीबपणाची आणि साधी वर्तणूक.

साला [**सं०** श्यालक] **पु०** १ बायकोचा भाऊ. २ बहिणीचा नवरा. ३ शिवीप्रमाणें हा शब्द योजतात. **साली स्त्री०** बायकोची बहीण.

सालाघाला [**म०** घाला=तृप्त] **वि०** १ अल्पसंतोषी; अल्पसंतुष्ट. २ निष्पाप; साधा.

सालोक्य [**सं०**] **न०** मागें 'सलोकता' पहा.

साव [**हिं०** साह] **पु०** १ गहाण ठेवून किं० हातावर किं० पतीवर कर्ज देऊन व्याजावर चरितार्थ चालवितो तो; सावकार. २ पेढीवाला. ३ धनाढ्य माणूस. ४ प्रामाणिक; सरळ; छक्केपंजे न करणारा. **सावकार पु०** १ गहाणाचा व्यापार करून किं० कर्ज देऊन व्याज मिळवून चरितार्थ करतो तो. २ जो कोणाला कर्ज देतो तो. ३ कोणीही श्रीमंत व्यापारी. **टीप,–**' सावकार ' ह्या शब्दाची विनोदी व्युत्पत्ति वस्त्र, वपु, विद्या, विनय, वाणी, आणि वित्त, ह्या सहा वकारांनीं संपन्न माणूस अशी आहे. उंची कपडे, भव्य शरीर, शास्त्रादींत परिचय, नम्रपणा, गोड भाषण, आणि पैसा, हीं सहा ज्याच्यापाशीं आहेत तो. **सावकारी, सावकारकी स्त्री०** सावकाराचा धंदा किं० दर्जा. **सावकारा पु०** १ सावकार लोक समुच्चयानें. २ एकाद्या गांवचे सर्व सावकार समुच्चयानें. ३ कोणा सावकाराच्या देवघेवीचा पसारा किं० विस्तार किं० व्याप. **सावकाराचा नातू पु०** गरीब किं० दरिद्री असून जो मिजास फार करतो तो. **सावसावकारा** पुढें स्वतंत्र प्रतीकांत दहा.

साव, सांव [**सं०** स्नायु] **स्त्री०** १ बकरा इ० च्या आंतड्याचा जो लांब तंतु काढलेला असतो तो. हा तंतु पिंजाऱ्याच्या यंत्राला किं० सारंगी इ० वाद्यांना लावतात. २ मनुष्य इ० प्राण्याची शीर किं० स्नायू (शेकणें, फुगणें, दुखणें, चोळणें, इ०).

सावकाश [**सं०** स+अवकाश] **वि०** १ अघळपघळ; प्रशस्त (घर, स्थळ). २ फुरसतीचें. **क्रि० वि०** १ घाई न करतां; संथपणानें. २ मोकळेपणानें (बसणें, निजणें, इ०). ※ **सावकाशी स्त्री०** सावकाशपणा; मंदपणा; संथपणा. **सावकाशीवर येणें** घाई न करणें; संथपणें कांहीं काम चालविणें.

सावकें सेवकें क्रि० वि० टोमणे मारून; घालून पाडून, टोचून, वर्मी लागेल अशा प्रकारें (बोलणें); (बायकांत रूढि).

सावचित [**म०**सावध+चित्त] **वि०** जागता; जागरूक; सर्व बाजूंकडे लक्ष्य देणारा; सावधान.

सावज [**सं०** श्वापद] **न०** जंगली जनावर. ※ **सावज पाडणें** वाद, कुस्ती, इ० मध्यें प्रतिपक्ष्याला चीत करणें.

सावाजिरा पु० मागें ' शंखजिरें ' पहा.

सावजी [**म०** साव+जी (प्रत्यय)] **पु०** सावकार; पेढीवाला (बहुमानांत).

सावट [**म०** सावली; **सं०** छाया] **न०, स्त्री०** १ वांगीं, मिरच्या, फुलझाडें, इ०च्या वाढीला अपायकारक अशी जवळच्या एकाद्या वृक्षाची छाया किं० सावली; उ० वडाच्या सावटाला हीं रोपें लावूं नका. २ (**लाक्षणिक**) अपायकारक किं० बाधक असें सांनिध्य; उ० इंग्रजांच्या सावटाला देशी भाषांना प्रगल्भ दशा कधींच प्राप्त होणार नाहीं. **न०** समुद्रांत अंतरावर दिसणारें गलबत. ※ **सावटी वि०** सावलींतील शेत, मळा, बाग, किं० जागा.

सावड स्त्री० एकमेकांच्या गरजेच्या वेळीं एकमेकांनीं एकमेकांस बैल, नांगर, इ० उसने देणें किं० उसने देण्याची चाल. मागें 'आवड सावड,' ' इरजीक ' पहा.

सावडणें, सांवडणें स० क्रि० १ (इतस्ततः पडलेले पदार्थ) नीट गोळा करून व्यवस्थितपणें ठेवणें. २ सावरणें.

सावत्र [**सं०** सापत्न्य] **वि०** आपल्या

आईच्या सवतीचा; उ० सावत्र भाऊ, सावत्र बहीण, सावत्र आई. ✽ **सावत्र मामा** पु०सावत्र आईचा भाऊ. **सावत्र चुलता** पु०सावत्र आईचा चुलता. **सावत्र भाव** पु० १ सवतीसवतींचा एकमेकींशीं विरोध. २ पक्षपातबुद्धि.

सावत्राई स्त्री० घराच्या बांधणीचा एक प्रकार. घराच्या बांधणीचे इतर प्रकार एकघई, दुघई, तिघई, चौसोपी, शृंगारी, इ०.

सांवत्सर, सांवत्सरिक [सं०] वि० दरवर्षी होणारें, व्हावयाचें,किं० करावयाचें,(कर्म,–श्राद्ध इ०). **टीप**,–'प्रतिसांवत्सरिक ' ह्या अर्थी.

सावद न० जंगली पशु. मागें' सावज ' पहा.

सावध [सं० सावधान] वि० १ दक्ष;जागरूक. २ आपल्या भोंवतीं काय घडत आहे याची जाणीव ज्याला आहे असा. ३ मूर्च्छेतून देहभानावर आलेला (होणें). ४ निद्रेंतून उठलेला; जागा झालेला. ५ आपल्याविरुद्ध शत्रु काय डावपेच करीत आहे ह्याची माहिती ज्याला आहे असा. ६ दारिद्र्यांतून, संकटांतून, आजारांतून, किं०बदनामींतून बाहेर पडून पूर्वीसारखा झालेला. ✽ **सावधगिरी** स्त्री० १ जागरूकता; दक्षता. २ खबरदारी.

सावधान [सं०] वि० १ लक्ष्य देणारा; लक्ष्य जो देत आहे असा. २ सावध. ३ दक्ष. ४ जागरूक. ५ (**मराठींत**) लग्न; विवाहविधि. ✽ **शुभ मंगल सावधान** न० लग्न, मुंज,इ०विधींत अंत:पट काढून टाकतांना भिक्षुक लोक हे शब्द उच्चारतात. ह्यावरून ' कोणेकाचें शुभ मंगल सावधान होणें' म्ह०त्याचें लग्न होणें किं० त्याची मुंज होणें.

सावधि, सावधिक [सं०] वि० १ मर्यादित; नियंत्रित; गणलेलें; गणण्याजोगें; मोजतां येण्याजोगें. २ (**व्याकरण**) क्रियापदाच्या ज्या रूपावरून त्याचा काळ, लिंग, वचन, इ० चा बोध होतो तें (रूप) किं० त्या रूपांत असलेलें (क्रियापद). ' बायका गेल्या ' ह्या वाक्यांतील ' गेल्या ' ह्या रूपावरून भूतकाळ,स्त्रीलिंग,अनेकवचन, इ०चा बोध होतो. हें सावधिक क्रियापद. ' जाणें, ' ' जाऊन, ' जातांना ' हीं रूपें निरवधिक. ३ जें घडावयाला अद्यापि अवकाश किं० विलंब आहे असें; उ० तुमच्या मुलीचें लग्न सावधि आहे,इतक्यांतच मांडव कशाला घालतां? ४ ज्याची मर्यादा अद्यापि संपली नाहीं असा (भोगवटा, वतन, हक्क). ५ दूर असलेला (गांव, पल्ला); उ० रामाचें देऊळ अझून सावधि आहे. ६ तुलनेनें घ्यावयाचें; तुलनात्मक. ७ असाधारण.

सावन [सं०] पु० १ यज्ञ करणारा. २ यज्ञाची समाप्ति. वि०सौरमानाचें (वर्ष,महिना, इ०).

सावपा वि० मूर्च्छेतून उठलेला.

सावयव [सं०] वि० १ अवयवांनीं युक्त. २ मूर्तिमंत. ३ (**गणित**) अपूर्णांकानें युक्त (पूर्णांक);उ०३$\frac{1}{2}$हा सावयव पूर्णांक.ह्यांत३ हा पूर्ण अंक आणि $\frac{1}{2}$ हा अवयव.

सांवर [सं० शाल्मली] स्त्री० एक वृक्ष. ह्याच्या फळांत जे तंतु असतात त्यांना 'म्हाताऱ्या' म्हणतात.

सावर न०, स्त्री० शीर; स्नायु. प्रयोग बहुधा अ० व०; उ०सावरें धरतात (किं०ओढतात,वळतात, इ०).

सावर [म० सावरणें] पु० दारिद्र्याची, आजारीपणाची, किं० अपकर्षाची स्थिति जाऊन पूर्वीची श्रीमंती, आरोग्य, किं० वैभव, यांची कोणेकाला झालेली प्राप्ति; उ० पाटीलबोवांचा आश्रय मिळाल्यापासून गोविंदपंतानें सावर घेतला.

सावरणें स० क्रि० १ (अस्ताव्यस्त पडलेला पदार्थ किं० लोंबत असलेला पदर इ०) पुन्हा यथास्थानीं ठेवणें. २ (डळमळणाऱ्या किं० कललेल्या पदार्थाला) टेका किं० आश्रय देऊन तो पक्का किं० स्थिर करणें. ३ (कोणेकाचा बसत चाललेला जो धंदा, व्यापार, इ० त्याला) गिऱ्हाईक, भांडवल, इ० पुरवून पूर्वीसारखा जोरांत चालेल असें करणें. ४ (ज्याचा तोल गेला आहे असा माणूस, पशु, इ० ना) हात देऊन पडूं न देणें. ५ पौष्टिक खाद्यें किं० औषधें देऊन (कोणेकाची ढासळलेली प्रकृति) पूर्वीप्रमाणें नीरोगी करणें. ६ (बोलतांना झालेली चुकी किं० लिहितांना झालेली चुकी) नंतर सुधारणें किं० सुधारून घेणें. ७ (मर्यादा,

नियम, व्रत, इ०) उल्लंघिलें न जाऊं देणें म्ह० तें पाळणें. ८ काळजीपूर्वक जपणें किं० जोपासणें किं० पाळणें. अ० क्रि० १ (बिघडलेल्या प्रकृतीनें) पूर्वीप्रमाणें नीरोगी होणें. २ (ढासळलेल्या व्यापारानें किं० धंद्यानें) पूर्वीप्रमाणें वैभवशाली होणें. ३ (वाईट मार्गास लागलेल्या माणसानें) पुन्हा सद्वर्तनी होणें. ४(ज्याचा तोल गेला आहे अशा माणसानें) पुन्हा स्थिर होणें. ५ (बिनसलेलें काम) मार्गावर येणें. टीप.–ह्याच सरणीनें ' सावरणें ' ह्या क्रियापदाचे इतर अर्थ संदर्भावरून विद्यार्थ्यांनीं जाणावे.

सांवरी [**सं**०शाल्मली] **स्त्री**० मागें 'सांवर' पहा.

सावर्ण्य [**सं**०] **न**० वर्णाची समता; रंग किं० जाति एक असणें.

सांवऱ्या [**म**० सांवरी] **पु**० घरावर घालण्यासाठीं तोडलेला सांवरीचा वांसा.

सांवली [**सं**०श्यामलिका] **स्त्री**० १ छाया; प्रकाशाला एखाद्या पदार्थाचा अडथळा झाला असतां त्या पदार्थाची जमीन, भिंत, इ० वर पडते ती आकृति. २ (**लाक्षणिक**) संबंध, संपर्क (पडणें); उ० नवव्या महिन्याची सांवली पडल्यावर स्त्री बाळंतीण झाली असतां मुलाला भय नसतें. ❀ **एखाद्याच्या सांवलीस उभें न राहाणें** त्याची संगत न धरणें; त्याचा संबंध टाळणें. **कोणेकाची कोणेकावर सांवली पडणें** त्याचे गुण त्याच्या अंगीं येणें; उ० गोविंदाची सांवली तुझ्यावर पडली खास, कारण तूंही गोविंदासारखाच आळशी होत चालला आहेस. **पायाखालीं सांवली येणें** मध्यान्ह होणें. **सांवल्या जाणें** सायंकाळ होणें.

सावलें **न**० १ एक प्रकारचें लुगडें. २ स्त्रियांचें कोणतेंही वस्त्र.

सावशेष [**सं**०] **वि**० ज्यांत मागल्याचा कांहीं अवशेष आहे असा.

सावसावकारा [**म**० साव + सावकारा] **पु**० **ए**० **व**० व्यापारी लोक आणि त्यांच्या धंद्याचा पसारा समुच्चयानें.

सावळ **न**०, **स्त्री**० ताड, माड, सुरमाड, किं० पोफळी ह्यांची फांदी.

सावळणें [**म**० वळणें] **अ**० **क्रि**० ताप, देवी, कांजिण्या, इ० कमजोर होणें किं० कमजोर होऊं लागणें किं० हटूं लागणें.

सांवळणें [**म**० सांवळा] **अ**० **क्रि**० १ (देवी, गळूं, इ०) काळसर होणें किं० कमजोर होणें. २ (लांबच्या प्रवासाहून परत आलेलें काळवंडलेलें माणूस) पूर्ववत् गोरें होऊं लागणें.

सांवळा [**सं**० श्यामल] **वि**० १ काळसर रंगाचा (माणूस, अंगवर्ण, इ०). २तांबूस काळसर (गाय, बैल, वासरूं). ❀ **सांवळा गोंधळ** **पु**०, **सांवळगोंदें (–धें)**, **सांवळें गोंधळें न**० १ काम, कारभार, जमाखर्च, हिशेब, इ० मध्यें जो पराकाष्ठेचा गोंधळ तो किं०जी अव्यवस्था ती. २ सोंवळ्या ओंवळ्याचें मिश्रण किं० त्याचेकडे दुर्लक्ष्य करून जें भोजन तें. ३ स्पृश्यास्पृश्यांचें मिश्रण. ४ कोणत्याही प्रकारची अव्यवस्था; भलत्या वस्तूंचें मिश्रण.

सावळी **स्त्री**० १ पोफळीची झावळी किं० फांदी. २ ताड, माड, सुरमाड, किं० शिंदी, यांची झावळी.

सांवा [**सं**० श्यामाक] **पु**० एक तृणधान्य. ❀ **सांव्याण न**० सावा धान्याचें तृण किं० पेंढा. **सांवाबीवड स्त्री**०सावा किं०तीळ लावावयासाठीं ढेखळें फोडून जमीन तयार करणें ही क्रिया.

सावा **पु**० मागें ' साग, ' ' सागवान ' पहा.

सावारे **पु**० **अ**० **व**० शिरा किं० स्नायु (ओढणें, वळणें, तुटणें).

सावित्री [**सं**०] **स्त्री**० १ पार्वती. २गायत्रीमंत्र. ❀ **सावित्रीव्रत न**० वटपौर्णिमेचें व्रत. **सावित्रीसूत्र न**० यज्ञोपवीत; जानवें.

सावीज (–द) मागें ' सावज ' पहा.

सांव्याण **न**० वर ' सांवा ' मध्यें पहा.

साव्वी, सावी [**म**०सहावी] **स्त्री**० स्त्रीच्या प्रसूतिनंतर सहाव्या दिवशीं षष्ठीदेवतेची करतात ती पूजा.

साशंक [**सं**०] **वि**० १ शंकित; शंकायुक्त. २ चिकित्सेखोर.

सांशयिक [**सं**०] **वि**० १ अनिश्चित. २ संशययुक्त; ज्याच्या संबंधानें कांहीं शंका आहे

असें. ३ संशयखोर (माणूस). न० अनिश्चित कृत्य.

साष्टांग [सं०] वि० आठ अंगें जमिनीवर टेकून केलेला (नमस्कार, प्रणाम). क्रि० घालणें.

सासपणें मागें ' चाचपणें ' सर्व अर्थी पहा.

सासर, सासरें [सं० श्वशुरगृह] न० नवऱ्याचें किं० नवऱ्याच्या बापाचें घर,—' माहेर ' च्या व्यावर्तकत्वें. ❀ **सासरेवाट, सासुरवाट** स्त्री० मागें ' माहेर ' मध्यें पहा. **सासुरवास, सासरेवास** पु०मुलीचें नवऱ्याच्या बापाच्या घरीं वास्तव्य म्ह० राहाणें. २ कोणेकाला कोणेकाच्या सहवासापासून किं० संसर्गापासून होतो तो छळ किं० उपद्रव किं० गांजणूक. **सासुरवाशिण, सासुरवाशी** स्त्री० १ लग्न झाल्यानंतर मुलगी ज्या घरांत जाते तेथील ती सासुरवाशिण आणि पूर्वीच्या घरची ती माहेरवाशीण. २ (लाक्षणिक) कोणा समर्थाचा जो आज्ञांकित थुंकीचाट्या तो.

सासरा[सं०श्वशुर] पु०१बायकोचा बाप.२नवऱ्याचा बाप. ❀ **आजेसासरा** पु० १ नवऱ्याचा आजा. २ बायकोचा आजा. **मामेसासरा** पु० १ आपल्या नवऱ्याचा मामा. २आपल्या बायकोचा मामा.**चुलतसासरा** पु० १ बायकोचा चुलता. २ नवऱ्याचा चुलता.**सासुरवड, सासुरवाडी** स्त्री० बायकोचें माहेर.

सासू, सासूस [सं० श्वश्रू] स्त्री० १ बायकोची आई. २ नवऱ्याची आई.

सासूर न० मागें ' सासर, सासरें ' पहा.

सांस्थानिक मागें ' संस्थान ' मध्यें पहा.

सास्ना [सं०] स्त्री० गाय किं० बैल ह्यांच्या गळ्याखालीं जें चर्म लोंबत असतें तें.

साहकार, साहकारी, साहाकार मागें 'संह' मध्यें ' सहकार, ' ' सहकारी ' पहा.

साहचर्य [सं०] न० १ सहवास; एकत्र असणें किं० राहणें. २ उल्लेख.

साहजिक [म० सहज]वि०१ सुसाध्य;सोपें; सुकर. २ ओघानें प्राप्त झालेलें किं० होणारें. ३ निसर्गाच्या नियमाप्रमाणें होणारें किं० घडणारें.

साहटें मागें ' सायटी, ' ' सायटें ' पहा.

साहणें [सं० सह्] स० क्रि० १ सोसणें; सहन करणें; दुःख, पीडा, चिंता, इ० ना पात्र होणें. २ क्षमिणें; माफ करणें; निमूटपणें किं० न चरफडतां कांहीं अप्रिय गोष्ट पथकरणें. ❀ **साहत साहत** क्रि० वि० १ मोठ्या कष्टानें. २ त्रास सोसून. **साहून पाहून** क्रि० वि० थोडीशी घस किं० हानि किं० तोटा पथकरून; थोडीशी हार खाऊन.

साहणें न०धूर जाणें,हवा खेळणें, किं०प्रकाश येणें, यांसाठीं घराच्या माथ्याला ठेविलेलें असतें तें भोक.

साहन, सहान वि० लहान. 'लहानसहान' ह्या वाक्प्रचारांत किं० कवितेंत मात्र रूढि.

साहनक मागें ' सानक ' पहा.

साहनट, साहनवट स्त्री० गांवांतील रिकामी किं० ओसाड जागा किं० पटांगण.

साहरा [म० सहकार] पु० मदत, साहाय्य (अशिक्षितांत रूढि).

साहरा पु० थर. मागें ' सायरा ' पहा.

साहरी,साहरेल मागें'सायरी,''सायरेल'पहा.

साहस [सं०] न० १ धाडस; पराकाष्ठेचा धीटपणा; मूर्खपणाचें धैर्य. २ अविचार. ❀ **साहसिक** वि० फाजील धाडसाचें; अविचारीपणाचें;फाजील धीटाईचें. **साहसी** वि०साहसाचें कृत्य करणारा.

साहस्र [सं०] वि० १ हजाराचें.२ हजारपट.'पु०एक हजार शिपायांच्या फौजेचा नायक.

साहा [सं० षष्] वि० तिहींच्या दुपटीइतका. मागें ' सहा ' पहा.

साहाय्य, साहायक, साह्य [सं०] न० १ स्नेह. २ मदत.

साहित्य [सं०] न० १ कोणत्याही कामाला जरूर अशी जी साधनसामग्री ती. २ एकोपा; ऐक्य. ३ मदत; साहाय्य. ३ जूट. ४ काव्यें, नाटकें, त्यांची रचना, त्यांचे अलंकार किं० गुणदोष, इ० संबंधाचें शास्त्र.

साही [म० सहा] वि० १ सहापट; उ० एकी साही सहा. २ सहाचे सहा; सगळे सहा.

साहुकार, साहुकाराचा नातू, इ० मागें ' सावकार, ' ' सावकाराचा नातू ,' इ० पहा.

साहून पाहून क्रि० वि० मागें ' साहणें ' मध्यें पहा.

साहेब [अ० साहिब] **पु०** १ मालक; यजमान; स्वामी. २कोणीही युरोपी टोपीवाला. ३बहुमानार्थक शब्द; उ० तात्यासाहेब; रावसाहेब; ताईसाहेब; बाईसाहेब; इ०. **टीप,**–स्त्रियांच्या नांवापुढें ' साहेब ' आला,असतां **स्त्री० अ० व०** किं० **न० अ० व०** होतें; उ०बाईसाहेब आल्या, ताईसाहेबें आलीं. ꙮ **साहेबनौवत स्त्री०** राजा इ० बड्या माणसाच्या स्वारीपुढें हत्तींच्या पाठीवर घालून वाजवीत जातात ती नौबत.

साहोत्रा [**म०** सहा+उत्तर] **पु०** १ दरसाल (किं० दरमहा)शेंकरास सहा हा व्याजाचा दर. २ कोणेक गांवाच्या उत्पन्नांत जो कोणेकाचा शेंकडा सहा प्रमाणें उत्पन्न घ्यावयाचा हक्क असतो तो किं० अशा हक्कानें घेतलेली रकम.

साह्य न० मागें ' साहाय्य ' पहा.

साह्यटें, साह्यरा, इ० मागें ' सायटें, ' ' सायरा, ' इ० पहा.

साह्या पु० इमारती लाकडाचा एक वृक्ष. मागें ' साग, ' ' साय ' पहा.

साळ [**सं०** शाला] **स्त्री०** शाळा (अशिक्षितांत रूढि). मागें ' शाळा ' पहा. ꙮ **साळसूद वि०** मागें ' शाळा ' मध्यें पहा. **टांकसाळ स्त्री०** नाणीं पाडण्याचा सरकारी कारखाना. **साळ घालणें** जितकें लांब सणंग विणावयाचें असेल तितक्या अंतरावर जमीनीवर खुंट्या ठोकून त्यांचे भोंवतीं सूत किं० रेशीम गुंडाळून इष्ट मापाचा ताणा करणें. **साळ मांडणें** तात्यापंतोजीनें शाळा काढणें किं० स्थापणें.

साळ [**सं०** शालि] **स्त्री०** १ भाताची एक जात. २ टरफलासहित भात.

साळई [**सं०** शल्य] **स्त्री०** दाभणासारखे केंश किं० पिसें ज्याच्या अंगावर असतात असा एक प्राणी. ह्या केशांना किं० पिसांना व्यक्तिशः ' साळपीस, ' ' शाळशीत, ' ' साळशीद, ' ' साळशीट ' म्हणतात.

साळकेंगोळके पु० अ० व०, साळकाया माळकाया स्त्री० अ० व कोणी तरी माणसें,–ज्यांचीं नांवें गांवें सांगण्याचें महत्त्व नाहीं; उ० चार साळके गोळके (किं० साळकाया माळकाया) एके ठिकाणीं जमल्यानें असलीं मोठीं कामें कधींही होत नसतात.

साळकोजी माळकोजी पु० कोणीतरी माणूस,–ज्याचें नांव सांगण्याची जरूरी नाहीं; एक माणूस,–मग तो कोणी कां असेना. मागें ' गोमा ' मध्यें अशा जातीचे इतर शब्द पहा.

साळखादें न० एक प्रकारची माशी.

साळजिवाद न० मागें ' साळई' पहा.

साळढाळ वि० साधा, धोपटमार्गी (माणूस, व्यवहार).

साळणें [**म०** साल=त्वचा, कातडें] **स० क्रि०** १ गुळगुळीत किं० साफ करण्यासाठीं (लाकूड इ०) तासणें. २ (झाडाची) खची करणें. ३ (झाड, प्राणी, इ० ची) साल किं० कातडें सोलून काढणें.

साळपीस न० मागें ' साळई ' मध्यें पहा.

साळमाळ [**म०** माळ (जमीन)] **वि०** खूपच लांब; लांबलचक; अतोनात विस्तीर्ण (घर, शेत, कारखाना, इ०).

साळवट, साळवटी, साळवी [**म०** साळी= विणणारा] **वि०** साळयानें विणलेला (धोतरजोडा, लुगडें, इ०). ह्याच्या व्यावर्तकत्वें 'कोष्टी' किं० ' कोष्टाऊ. '

साळवण (–न) [**सं०** शाली+तृण] **न०** भाताचें तृण; भातेण.

साळवाडा [**म०** साळी + वाडा] **पु०** गांवांतील साळी लोकांच्या वसतीचा मोहल्ला.

साळशीत (–द, –ट) मागें ' साळई ' मध्यें पहा.

साळसुदकी खालीं ' साळसूद ' मध्यें पहा.

साळसूद (–ध) [**सं०** शाला+शुद्ध] **वि०** साध्या वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा; सरळ; प्रामाणिक. ꙮ **साळसुदकी, साळसुधकी स्त्री०** वर्तनाचा साधेपणा किं०सरळपणा;प्रामाणिकपणा.

साळस्त्री, साळोत्तरी, शालिहोत्री [**सं०**] [शालिहोत्र=घोडा; **सं०** शालिहोत्रिन्=घोड्यांचे गुणधर्म जाणणारा] **पु०** १ घोड्याच्या जाति, गुणधर्म, इ० संबंधाच्या शास्त्रांत प्रवीण. २ घोडवैद्य.

साळा पु० बायकोचा भाऊ. मागें ' साला ' [पहा.

साळाऊ मागें ' साळवट ' पहा.

साळाभोळा [**म०** शाला+भोळा] **वि०** साधा; सरळ वर्तनाचा; छक्केपंजे न करणारा.

साळिंदर, साळिंद्र न० १ साळू किं० साळई नांवाचा प्राणी. २ ह्या प्राण्याचें पीस.

साळी [**सं०** शालि] **स्त्री०** न सडलेला तांदूळ.

साळी [**सं०** शाल] **स्त्री०** एक जंगली वृक्ष.

साळी पु० रेशमाचीं किं० कापसाचीं वस्त्रें विणणाऱ्या हिंदूंची एक जात किं० ह्या जातीचा कोणी इसम. ◊ **साळीमाळी पु० अ० व०** अशिक्षित असे धंदेवाले लोक. **साळ्याची गाय आणि माळ्याचें वासरूं** १ एकाद्या कार्याच्या सिद्धतेसाठीं भिन्न भिन्न ठिकाणांहून सामग्री गोळा करणें हा प्रकार.२ विजोड जुळणी; परस्परांशीं सुसंगत नसलेल्या पदार्थांची किं० माणसांची जुळणी (निंदेंत).

साळी [**सं०** श्याली] **स्त्री०** बायकोची बहीण.

साळी [**सं०** शल्य]**स्त्री०**एक जंगली प्राणी; [सायाळ.

साळुंकी, साळुंखी, साळोंकी, साळोंखी स्त्री० एक पक्षी,–मंजुळ वाणी बोलणारा.

साळू [**सं०** शल्य]**स्त्री०** सायाळ किं०साळई ह्रा प्राणी. [पहा.

साळेंगोंदें (–धें) न० मागें ' सावळें गोंधळें'

साळोंका (–खा) स्त्री० मागें ' शाळुंका (–खा) ' पहा.

साळोत्तर, साळोत्र [**सं०** शालिहोत्र=घोडा] **न०** घोड्यांच्या जाति, त्यांची निपज, त्यांचीं लक्षणें, त्यांचे रोग,इ० संबंधाचें शास्त्र. ◊**शाळोत्तरी पु०** घोड्यांचा वैद्य.

साळ्या वि०पावसाळ्याच्या नंतर पिकणारा (तीळ). प्रयोग ' साळे तीळ ' असा बहुधा **अ० व०** होतो. गोंडे तीळ म्ह० पावसाळ्यांत पिकलेले तीळ.

साक्ष [**सं०** साक्ष=पुरावा] **पु०** ज्याणें कांहीं वृत्तान्त डोळ्यांनीं पाहिला आहे असा माणूस. **स्त्री०** १ पुरावा. २ पुरावा देणाऱ्या माणसाची जबानी. ३ साक्ष. पुढें ' साक्षा ' पहा. ◊ **साक्ष घालणें** एकादा दस्तऐवज आपल्या समक्ष झाला आहे अशा अर्थाची कोणेकानें त्या दस्तऐवजावर घातलेली आपली सही. **साक्षमोज्यानें, साक्षमोझ्यानें क्रि० वि०** पुराव्यावरून; पुराव्यानें.

साक्षर [**सं०**] **वि०** १ सुशिक्षित. २ ज्याला लिहितां वाचतां येतें असा;अगदींच अडाणी नव्हे असा. ३ (**थट्टेंत**) अगदीं ढ; अगदीं अशिक्षित; मूर्ख. **टीप,**–' कांहीं येत नाहीं ' हीं सहा अक्षरें ज्याच्या संबंधानें योजतां येतील असा.

साक्षा [**सं०**साक्ष्य=पुरावा] **स्त्री०**१ देवाचें दर्शन, औषधाचा गुण, मंत्राचा परिणाम,जोशानें सांगितलेलें भाकित, इ० प्रत्यक्ष अनुभवास किं० दृष्टोत्पत्तीस किं० प्रतीतीस येणें. २ पुरावा;कांहीं गोष्ट सिद्ध करणारा पदार्थ, कागद, खूण,वृत्तान्त, इ०.

साक्षात् [**सं०**] **क्रि० वि०** १ स्वता; उ० तुम्ही साक्षात् जाऊन पहा, दुसऱ्या कोणास पाठवूं नका. २ प्रत्यक्षपणें; उ० साक्षात् दृष्ट. ३ मूर्तिमंत; उ० माझ्या पुढें ईश्वर साक्षात् उभा ठाकला. ४ उघडपणें; राजरोस. **श० यो० अ०** कोणेकाच्या देखत किं०समोर;कोणी हजर असतां; उ० माझ्या साक्षात् असें बोलणें तुला शोभत नाहीं. ◊ **साक्षात्कार पु०** १ प्रत्यक्ष ज्ञान; स्वताचा अनुभव; प्रतीतीस येणें; दृष्टान्त.२ देव, साधुपुरुष, इ० चें आपल्यापुढें स्वप्नांत किं० आपल्या जागृतावस्थेंत येणें किं० त्यांणीं येऊन सांगितलेली गोष्ट(होणें, दाखविणें). **साक्षात्कारी वि०** ज्याला देवाचें किं० साधूचें दर्शन स्वप्नांत किं० जागृतावस्थेंत होतें किं० झालें आहे असा. **साक्षात्कृत वि०** १ स्वता अनुभविलेला किं० पाहिलेला किं० जाणलेला. २ स्वता केलेला किं० रचिलेला (ग्रंथ, श्लोक, इ०).**साक्षात्संबंध पु०** प्रत्यक्ष झालेला किं०घडलेला संबंध.याच्या व्यावर्तकत्वें 'परंपरेनें झालेला, आलेला, किं० घडलेला संबंध.' **साक्षाद्द्रष्टा पु०** ज्याणें कांहीं गोष्ट स्वताच्या डोळ्यांनीं पाहिली आहे असा.

साक्षी [**सं०** साक्षिन्] **वि०** पाहणारा. **पु०**१ साक्षीदार. २ परमात्मा. ◊ **साक्षीदार पु०** न्यायाच्या कचेरींत कांहीं गोष्ट खरी म्हणून सांगणारा किं० कांहीं विधान करणारा. **साक्षी**

स्त्री० न्यायाच्या कचेरींत कोणी खरी म्हणून सांगितलेली गोष्ट किं० केलेलें विधान. **साक्षी मोज्या पु०** साक्षीदार; कांहीं गोष्टीला पुरावा देणारा. **कांहीं लेखावर साक्षी(किं०साक्ष)घालणें** लेख आपल्या देखत लिहिला आहे असें म्हणून त्या लेखावर सही करणें.

साक्षेप [सं०]पु० १एकादी गोष्ट करण्याविषयीं किं० साधण्याविषयीं जो कोणेकाचा दृढनिश्चय किं० प्रयत्न तो. २ कोणेकाला कांहीं गोष्टीचा जो पराकाष्ठेचा नाद तो किं०जी आवड ती; उ० त्याला सतारीचा भारी साक्षेप आहे. ३ कांहीं कृत्य नियमितपणें आणि न चुकतां करण्याकडे प्रवृत्ति किं० ओढा; उ० तो साक्षेपानें संध्याकाळच्या वेळेस निजतो;उ०कथाकीर्तनास जाण्याचा त्याचा साक्षेप आहे.॰ **साक्षेपानें क्रि० वि०**मुद्दाम; जाणून बुझून;न चुकतां; निश्चयपूर्वक. **साक्षेपी वि०**कांहीं गोष्ट न चुकतां करणारा; निश्चयी. 'साक्षाप,' 'साक्षोपी' हीं रूपें ह्याच अर्थी अशिक्षितांत रूढ आहेत.

साक्ष्य [सं०] **वि०** दृश्य. **न०** १ पुरावा; साक्ष. २ कांहीं लेख आपल्या देखत झाला आहे म्हणून त्यावर घातलेली सही. ३ साक्षीपत्र.

सिकंजी [**फा०** सिकंजीन्] **स्त्री०** लिंबाचें सरवत.

सिकता [**सं०**] **स्त्री०** १ वाळू. २ मुतखडा हा रोग.॰ **सिकतातैल न०**अशक्य किं० असाध्य गोष्ट. **सिकतामेह पु०**लघ्वींतून रेव जाणें हा रोग.

सिकंदर मागें ' शिकंदर ' सर्व अर्थी पहा.

सिक्त [**सं०**] **वि०** १ शिंपडलेलें (पाणी, तूप, दूध, इ०). २ ज्यावर पाणी इ० शिंपडण्यांत आलें आहे असा (सांजा, गाजी, इ० पदार्थ).

सिंचणें [**सं०** सिंच्] **स० क्रि०** (पाणी, दूध, तूप, इ०) शिंपडणें म्ह० थेंबांच्या रूपानें ओतणें, फेकणें,मारणें, इ०.२ पाणी, दूध,इ० चा (पदार्थावर) शिडकाव करणें.

सिंचन [**सं०**] **न०** पाणी, दूध, गुलाबपाणी, इ० शिंपडणें ही क्रिया.

सित [**सं०**] **वि०** शुभ्र; पांढरा. **पु०** हिंदू महिन्याचा शुक्लपक्ष.

सिता स्त्री० १ साखर. २ खडीसाखर. ३ चांदणें. ४ पौर्णिमा. ॰ **सितधातु पु०** खडू.

सिताब, सिताबी मागें 'शिताब,' 'शिताबी' पहा.

सिती मागें ' शिती ' पहा.

सितेन [अ०] **वि०** साठ. मागें ' शितेन ' पहा.

सिंदूर [**सं०**] **पु०** १ शेंदूर. २ एक वृक्ष.

सिद्ध [**सं०**]. **वि०** १ पूर्णतेस पोंचलेलें; शेवटास गेलेलें; साध्य केलेलें. २ पुराव्यानें किं० प्रमाणानें खरें किं० योग्य किं० न्याय्य म्हणून ठरलेलें. ३ ज्याचा निकाल किं० निर्णय झाला आहे असा (वाद, तंटा, खटला). ४ ठरविण्यांत आलेला निश्चित (नियम, कायदा).५ शिजवून, भाजून,उकडून, किं०तळून तयार केलेला(खाद्य, पेय, औषध, इ० पदार्थ). ६ कांहीं काम करण्यास तयार किं०सज्ज झालेला किं० केलेला (माणूस, गाडी, घोडा, इ०). ७ रसायन, किमया, मंत्रतंत्र, इ० मध्यें वाकबगार झालेला (माणूस); तज्ञ; पटाईत; निष्णात. ८ (**व्याकरण**) ज्या शब्दाचे घटक अवयव सांगतां येत नाहींत असा (शब्द). याच्या व्यावर्तकत्वें ' साधित. ' ९. प्रख्यात. १० लागू पडणारा (नियम, कायदा, मंत्र, इ०). **पु०** १ उपदेव. २ साधु; ऋषि (व्यास इ०). ३ त्रिकालज्ञानी. ४ मांत्रिक. ५ ज्याला अष्टसिद्धि मिळाल्या आहेत तो. ६ ज्याला मोक्ष मिळाला आहे तो. ७ एकविसावा योग. ॰ **सिद्धान्त पु०** १ तर्कानें ठरविलेला नियम. २ निश्चित मत. ३ उपपत्तियुक्त ग्रंथ. **सिद्धासन न०** योग्याचें एक आसन. **अनुभवासिद्ध वि०** अनुभवानें किं० प्रत्यय आल्यावरून खरें, योग्य, किं० न्याय्य म्हणून ठरलेलें. **शास्त्रसिद्ध वि०** शास्त्रावरून ठरलेलें; ज्याला शास्त्रांत आधार आहे असें. **अनादिसिद्ध वि०** पूर्वीपासून चालू असलेलें,स्थापित झालेलें,रूढ,किं०प्रचलित. मागें 'अनादि' मध्यें पहा. **टीप**,–धातूच्या 'ऊन' प्रत्ययान्त रूपापुढें ' सिद्ध ' शब्द लाविल्यानें ती क्रिया करून पूर्ण किं० तयार झालेला असा अर्थ होतो; उ० करून सिद्ध, अनुभवून सिद्ध, इ०. **सिद्धसाधक पु० अ० व०** एकमेकांस पाठबळ

किं० दुजोरा देऊन कोणेकाला फसवूं इच्छिणारे दोन भामटे किं०लुच्चे. **सिद्धवत्** वि०गृहीत कृत्य किं०ठरलेला सिद्धान्त ह्या दृष्टीनें स्वीकारावयास पाहिजे असा.**सिद्धसाधनदोष** पु०जें ठरलेलें किं० निश्चित झालेलें आहे तें ठरवीत किं० निश्चित करीत बसणें हा दोष. **सिद्धस्थाली** स्त्री० ज्या स्थालींतून हावा तो इष्ट पदार्थ इच्छा केल्याबरोबर प्राप्त होतो अशी स्थाली (म्ह० परात, ताट, इ०). **सिद्धाई** स्त्री० अणिमा, महिमा, इ० ज्या अष्टसिद्धि त्यांची प्राप्ति (अशिक्षितांचा शब्द).

सिद्धि [सं०] स्त्री० १ अणिमा, महिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशिता, वशिता, कामावसायिता, ह्या ज्या अष्टसिद्धि त्या प्रत्येक. २ कांहीं अद्भुत गोष्ट करण्याचें सामर्थ्य (सामान्यतः). ३ तप, ईश्वरसेवा, ध्यान, कांहीं विधि, कर्म, इ० चीं जी सफळता ती किं० जें फल तें. ४ कोणत्याही ध्येयाची सफलता किं० प्राप्ति. ५ वादाचा निकाल; तंट्याचा निर्णय. ६ तयारी; सज्जता; कोणतीही गोष्ट करावयाला सिद्ध असण्याची स्थिति. ७ औषधी रांधा, कांहीं खाद्य किं० पेय, इ० वर अग्न्यादि संस्कार होऊन जी पूर्णता ती. ८ मोक्ष. ९ वैभव; समृद्धि. १० सत्तावीस योगांतील सोळावा. ११ संपादणें; मिळविणें. १२ पुरावा. १३ सत्यता. १४ कर्जाची फेड. १५ पूर्ण ज्ञान. ❀ **सिद्धीस जाणें** सफल होणें.

सिद्दी पु० हबसाणांतील कोणीही माणूस.

सिंधु [सं०] पु० १ समुद्र. २ हत्ती. ३ हत्तीचा मद. स्त्री० पंजाबांतील नदीविशेष; सिंधुनद. ❀ **सिंधुवार** पु० जातिवंत घोडा. **सिंधुपुष्प** न० शंख.

सिनीवाली [सं०] स्त्री० अमावास्येचा पूर्वभाग (चंद्रयुक्त); अमावास्येच्या आधला दिवस,–ज्यांत चंद्राची अत्यल्प कला दृग्गोचर असते.

सिंह [सं०] पु० १ मृगांचा अधिपति. २ (ज्योतिष) बारा राशींपैकीं पांचवी रास. ३ (समासाच्या उत्तरपदीं) श्रेष्ठ; उ० पुरुषसिंह, पंडितसिंह, रघुसिंह, इ०. **सिंही** स्त्री० १ सिंहाच्या जातीची स्त्री. २ राहूची माता. **सिंहावलोकन** न० आपण करावयाला घेतलेलें काम किती झालें किं०कसें झालें, हे पाहाण्यासाठीं आपण कांहीं वेळ काम थांबवून झालेल्या कामाकडे नजर फेकतों तीं; झालेल्या कामाचे निरीक्षण किं०आढावा. **टीप**,– कांहीं मार्ग चालून गेल्यावर सिंह मागें वळून पाहातो ह्या त्याच्या वर्तनावरून 'सिंहावलोकन' ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति. **सिंहावलोकनन्याय** पु०झालेल्या कामाचें वेळोवेळीं निरीक्षण करणें ही सरणी. **सिंहासन** पु० राजाचें दरबारी आसन. **सिंहतल** पु०एकाला एक असे जोडलेले तळहात. **सिंहनाद** पु० १ सिंहाची गर्जना. २ रणांगणावर वीर करतात ती गर्जना. ३ शंकर. ४ देवळाच्या गाभाऱ्यांत शांतता असली म्हणजे जो एक बारीक नाद ऐकूं येतो तो. ५ गुहेंत एकदम वारा शिरल्यानें होतो तो ध्वनि. **सिंहयाना, सिंहरथा** स्त्री० पार्वती. **सिंहस्थ** पु० १ सिंहराशींत असलेला गुरु हा ग्रह. २ सिंहराशींत गुरु हा ग्रह असण्याचा काळ. **सिंहकटी** स्त्री० सिंहाच्या कंबरेसारखी बारीक कंबर जिची आहे अशी स्त्री. **सिंहद्वार** न० राजवाड्याचा, किल्ल्याचा, किं०देवळाचा अगदीं पुढचा दरवाजा. **सिंहावतार** पु० क्रोधानें मनुष्याचें होतें तें उग्र रूप (धारण करणें, होणें, दाखविणें).

सिंहल, सिंहलद्वीप [सं०] न० लंका हें बेट.

सिंहिका [सं०] स्त्री० राहूची आई. मागें ' सिंह ' मध्यें ' सिंही ' अर्थ २ पहा.

सिंहीण [म० सिंह] स्त्री० सिंहाची स्त्री; सिंही.

सीता [सं०] स्त्री० १ नांगराचें तास. २ नांगरलेली जमीन. ३ रामाची पत्नी; जानकी. ४ स्वर्गांतून गंगा भूतलावर पडली तेव्हां तिच्या प्रवाहाचे जे चार फाटे झाले त्यांपैकीं पूर्वेकडचा फाटा. ५ फळें, धान्यें, इ० ची अधिष्ठात्री देवता. ६ (भिक्षुकांच्या सांकेतिक भाषेंत) अधेली; अर्धा रुपाया ही दक्षिणा. ह्या अर्थीं ' सीताबाई ' सुद्धां. भिक्षुकांच्या भाषेंत ' राम ' म्हणजे रुपाया. मागें ' राम ' अर्थ ३ पहा. ❀ **सीतादेवी** स्त्री० १ शेतकापणीचे वेळीं महाराचा हक्क म्हणून राखून ठेविलेला कोपरा. २ खळ्यावरील

धान्य तेथून मालकानें उचलून नेल्यावर तेथें जो धान्याचा अवशेष राहिलेला असतो तो. हा महाराचा हक्क समजला जातो. **सीतेचा पोल्हारा** पु० मोठ्या आकाराची आणि तपकिरी वर्णाची कवडी. **सीताफळ** न० खवलेदार त्वचेचें एक फळ. हें रामफळाच्या वर्गातील फळ आहे. ह्याला 'शिताफळ' असेंही व्यवहारांत म्हणतात.

सीत्कार पु०, **सीत्कृति** स्त्री० [सं०] थंडी, दुःख, इ०मुळें तोंडांतून निघणारा सशब्द वारा.

सीम फा० [सिव्युम्=तिसरा] वि० १ तिसरा. २ तिसऱ्या म्ह० अगदीं हलक्या प्रतीची (जमीन).

सीमंत [सं०] पु० १ हद्द. २ हद्दीची खूण. ३ डोईवरील केशांचा भांग. ॐ **सीमंतोन्नयन** न०, **सीमंतोत्सव** पु० गर्भिणी स्त्रीच्या चवथ्या, सहाव्या, किं० आठव्या महिन्यांत करावयाचा एक संस्कार. **सीमंतिनी** स्त्री० स्त्री.

सीमा [सं०] स्त्री० १ हद्द; मर्यादा. २ हद्दीची खूण. ३ किनारा. ४ यत्न, दुःख, इ० चीं पराकाष्ठा. ५ मानेचा कांटा. ६ आचारमर्यादा. ॐ **सीमांतपूजन** न० लग्नापूर्वीचें वरपूजन. 'श्रीमंतपूजन' हें अपभ्रष्ट रूप. **सीमोल्लंघन** न० दसऱ्याच्या दिवशीं गांवाची हद्द ओलांडण्याचा समारंभ करतात तो. 'शिलंगण' हें अपभ्रष्ट रूप. **सीमासूत्र** न० (भूमिति) आकृतीच्या हद्दीच्या लांबीचें परिमाण; घेर; परीघ.

सीर [सं०] पु० नांगर. ॐ **सीरपाणि**, **सीरी** [सं० सीरिन्] पु० बलराम. **सीरध्वज** पु० जनक राजा,—सीतेचा पालक पिता.

सींव [सं० सीमा] स्त्री० गांवाची हद्द. ॐ **सींवशेजारी** पु० आपल्या गांवाच्या हद्दीला लागून असलेल्या गांवचा रहिवासी. मागें 'शिम' मध्यें हा शब्द पहा.

सीवन [सं०] न० शिवणें (सुई, दोरा, इ० साधनानें).

सीस, **सीसक** [सं०] न० शिसें हा धातु.

सु [सं०] उपसर्ग १ चांगलें; उ० सुगंध, सुजन, सुविद्य, इ०. २ सुंदर; उ० सुकेशी इ०. ३ पूर्णपणें; उ० सुदृढ, सुव्यक्त, सुशिक्षित, इ०. ४ अनायासें; उ० सुकर, सुसाध्य, सुलभ, इ०. ५ अति, अगदीं, अत्यन्त; उ० सुदीर्घ, स्वच्छ (सु+अच्छ म्ह० निर्मल); स्वल्प (सु+अल्प म्ह० थोडें). ६ योग्य रीतीनें. ७खुषीनें. ॐ **सूक्त** न० १चांगलें भाषण; सुभाषित. २स्तोत्र; उ० पुरुषसूक्त. **सुकर्म** न० १ चांगलें कृत्य. २ पुण्य. **सुकर्मा** पु० सत्तावीस योगांतील सातवा योग. **सुकाल**, **सुकाळ** पु० समृद्धीचा, वैभवाचा, किं० स्वस्ताईचा काल. खालीं 'सुकाळ' स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुक्तासुक्त** पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुकुमार** वि० मृदु; नाजूक. **सुकृत्** वि० १ पुण्यवान्. २ दैववान्. **सुकृत** न० १ सत्कृत्य, पुण्य. २ तप. ३ सुदैव. वि० सपविलेलें; तडीस नेलेलें. **सुकृति** स्त्री० १ सद्वर्तन. २ पुण्य. **सुकृती** [सं० सुकृतिन्] वि० पुण्यवान्. **सुगत** पु० १ बुद्धसाधु. २बुद्धधर्मीय. **सुगंध** न० चंदन. **सुगंधि** वि० सुवासिक. **सुगंधी** पु० (मराठींत) उदबत्त्या, अरगजे, रवे, अत्तरें, तेलें, इ० करणारा किं० विकणारा. **सुजात** वि० १कुलीन. २ सुंदर. ३ सुकुमार; नाजूक. **सुतराम्** क्रि० वि० १ अतिशय. २अर्थात्; जास्तच. **सुतल** पु०, न० सप्तपातालांपैकीं एक. **सुदर्शन** वि० सुंदर. पु० मेरु पर्वत. न०, पु० १ विष्णूचें चक्र. २ (मराठींत) पाठीस लागलेलें शुक्लकाष्ट. **सुधन्वा** [सं० सुधन्वन्] वि० उत्तम धनुर्धर. **सुधर्मा** स्त्री० देवांची सभा. **सुधी** पु० विद्वान्; शहाणा. **सुपर्ण** पु० गरुडपक्षी. **सुप्रतीक** पु० ईशान्य दिशेचा दिग्गज. **सुभग** वि० १ दैववान्. २ सुंदर. **सुभाषित** न० चटकदार वचन किं० विधान. **सुभिक्ष** न० सुकाळ; स्वस्ताई. **सुमेरु** पु० मेरु पर्वत. **सुयोधन** पु० दुर्योधन. **सुरंग** पु०, **सुरंगा** स्त्री० १ खडक फोडण्यासाठीं लाविलेला सुरुंग. २ भुयार. ३ भिंतीला पाडलेलें भोक. **सुरंग** पु० नारिंग हें फळ. **सुरत** न० मैथुन. **सुरस** वि० १ स्वादिष्ट; रुचकर. २ मनोरंजक; चित्तवेधक. **सुलभ** वि० मिळण्यास सोपें. **सुवह** वि० सुखानें म्ह० अल्प श्रमानें वाहून नेतां येईल असा; सोसतां येईल असा. **सुवासिनी** स्त्री० १ माहेरीं राहणारी तरुण विवाहित स्त्री. २ धर्मकृत्याच्या सांगतासिद्ध्यर्थ जेवावयास बोलाविलेली सवाशीण. ३ जिचा पति जिवंत आहे अशी कोणीही स्त्री.

सुवृत्त वि० १सद्वर्तनी.२गरगरीत वाटोळा; अगदीं वाटोळा.**सुस्थ** वि० १ सुखी; संतुष्ट. २ नीरोगी. **सुस्थित** वि० आरामांत स्वस्थ बसलेला. **सुहृद्** वि० चांगल्या अंतःकरणाचा. पु० मित्र. **सुहृदय** वि० प्रेमळ; कनवाळू.

सुई [**सं०** सूचि, सूची] **स्त्री०** १ वस्त्र, कातडें, इ० शिवण्याचें साधनविशेष. याचें एक टोक अत्यंत बारीक असून दुसऱ्या टोकाच्या छिद्रांत (म्ह० नेढ्यांत) दोरा ओविलेला असतो. २ माड, पोफळ, केळ, गहूं, इ० कांच्या झाडाच्या गर्भातून नुकतेंच बाहेर पडलेलें पान,–विकसण्याच्या पूर्वावस्थेतील. ह्या अर्थी ' सुइरा, ' ' सुइटा, ' पु० आणि ' सुइटी ' **स्त्री०** सुद्धां. **सुइरा पु०** कोणत्याही झाडाचें कोंवळें पान,–कळीच्या रूपांतील.

सुईण, सुवीण [**म०** सु+विणें] **स्त्री०** १ प्रसूत होत असलेल्या स्त्रीस हरएक प्रकारें सूचना करणारी आणि तिचें मूल सुलभ रीतीनें बाहेर यावें म्हणून तजवीज करणारी स्त्री. २ हीच स्त्री किं० दुसरी कोणी स्त्री जी नंतर बाळंतिणीच्या अंगास तेल लावणें, न्हाहूं घालणें, इ० कामें करते ती. ꕥ **सुईणपण न०** सुइणीचें काम, धंदा, किं० कर्तव्य.

सुएर पुढें ' सुवेर ' पहा.

सुकट [**म०** सुका] **स्त्री०** वाळविलेला बोंबील हा मासा. ह्या माशाच्या भुग्याला ' सुकटी ' **स्त्री०** म्हणतात. **वि०** १ (**लाक्षणिक**) रोग, चिंता, इ० कारणांमुळें कृश झालेलें (शरीर). २ वाळलेलें, सुकलेलें (पान, फूल, इ०).

सुकटणें [**म०** सुका होणें] **अ० क्रि०** वाळणें; नीरस होणें; कोमेजणें.

सुकटा (–ट्या) [**म०** सुकणें] **वि०** वाळलेला; वाळून कृश झालेलें (शरीर, गात्र, इ०).

सुकटी स्त्री० वर ' सुकट ' **स्त्री०** मध्यें पहा.

सुकड, सुकडी [**म०** सुका] **स्त्री०** जून होऊन वाळलेला जो चोंडासकट नारळ तो; पूर्ण वाळलेला असोल्या नारळ.

सुकड [**म०** सुकणें] **वि०** शुष्क किं० रूक्ष (शरीर, त्वचा).

सुकडा [**म०** सुकणें] **वि०** आजार, चिंता, इ० कारणांमुळें रोड किं० कृश झालेला (माणूस, पशु).

सुकडी वर ' सुकड, सुकडी ' पहा.

सुकणावळ [**म०** सुकणें] **स्त्री०** सुकणें, वाळणें, आटणें, उडून जाणें, इ० कारणांमुळें पदार्थाच्या परिमाणांत कमीपणा येणें किं० आलेला कमीपणा.

सुकणें, सुखणें [**सं०**शुष्=वाळणें]**अ०क्रि०**१ (पदार्थ) कोरडा किं० नीरस होणें; (पदार्थांतील) जलांश वाऱ्यानें किं० उष्णतेनें किं० उन्हानें नष्ट होणें. २आजार, उपवास, चिंता, इ० कांमुळें (माणूस इ०) रोड किं० किडकिडीत होणें. ३ श्रमानें (मुख) निस्तेज होणें. ४ (नदी, ओढा, खाडी, इ० तील पाणी) नाहींसें होणें किं० आटणें किं० ओहोटणें. ५ (गात्रविशेषाला) योग्य तें काम करण्याची संधि न मिळाल्यामुळें तें निर्बल किं० निर्वीर्य होणें.

सुकतळ [**म०** सुकणें+तळ] **न०**१ तळपायाचा घाम शोषून घेण्यासाठीं जें पातळ कातडें जोड्यांत घालतात तें. २ घोड्याच्या पाठीवर घाम शोषून घेण्यासाठीं जो बुरणूस इ० चा तुकडा खोगिराखालीं घालतात तो. ३ अंगरखा, बंडी, इ० कपड्यांच्या खाकांच्या जागीं जें घाम शोषून घेण्यासाठीं वस्त्रादि शिवलेलें असतें तें.

सुक ताव, सुका ताव [**म०** सुका+ताव] **पु०** १ सोनें, रुपें, इ० च्या पदार्थांना अग्नींत घालून तापवून मग पाण्यांत न बुडवितां तसेच ठेवून निववणें ही क्रिया (देणें).२(**लाक्षणिक**) फार भूक लागली असतां पोटांत पडते ती आग; भुकेची आग. ३ (**लाक्षणिक**)शुष्क पाहुणचार; वरपांगीं आदरातिथ्य; कोरडा सत्कार. ४(**लाक्षणिक**) भीड मुरवत न ठेवतां कोणेकाच्या विनंतीला किं० मागणीला दिलेला साफ नकार; सडेतोड नकार. ५ (**लाक्षणिक**) कोणेकाची काढलेली भोसडपट्टी किं० खरडपट्टी.

सुकती [**म०** सुकणें] **स्त्री०** समुद्र, खाडी, इ० च्या पाण्याची ओहोटी किं० ओहोटीचा काळ. ꕥ **सुकती भरती स्त्री० ए० व०** १ ओहोटणें आणि भरणें ह्या समुद्राच्या पाण्याच्या दोन अवस्था जोडीनें.२(**लाक्षणिक**)चढउतार; उत्कर्ष अपकर्ष; प्रापंचिक परिवर्तनें समुच्चयानें.

सुकर, सुकर्म, सुकर्मा मागें 'सु' मध्यें पहा.

सुकलें न० नाक, कान, इ० ना भोकें पाडून त्यांत सोनें, रुपें, इ० चें जें बारीक वलय शोभेसाठीं घालतात तें.

सुकवण [**म०** सुकणें] **न०** १ वाऱ्यावर किं० उन्हांत वाळावयासाठीं घातलेलें धान्य, मीठ, इ० जें कांहीं तें. २ मनुष्याची उमेद, उत्साह, इ० खचणें; निर्वीर्यता. ३ सुकलेपणाची स्थिति.

सुकवत [**म०** सुकणें+पत्र] **न०** द्रोण इ० करावयासाठीं उन्हांत किं० विस्तवाशेजारीं ठेवून सुकविलेलें केळीचें पान.

सुकवशी, सुखवशी [**म०** सुकणें] **स्त्री०** १ अपुरें खाणें, रोग, चिंता, इ० कारणामुळें शरीराला येतो तो कृशपणा किं० असा कृशपणा आल्याची स्थिति (येणें, लागणें). २ वृक्षादींना जलाच्या अभावीं येतो तो कृशपणा.

सुकवें [**म०** सुकणें] **न०** शेतें, बागा, पिकें, इ० ची वाळलेपणाची स्थिति.

सुकळास [**म०** सु + क्लेश] **क्रि० वि०** सोयीनें, वेदनेशिवाय, त्रासाशिवाय, सरळ मार्गानें (अशिक्षितांत रूढि).

सुका, सुखा [**म०** सुकणें, सुखणें; **सं०** शुष्क; शुष=वाळणें] **वि०** १ कोरडा, त्राळलेला, वाळविलेला (मेवा, केळें, अंजीर, इ०). २ (**लाक्षणिक**) ज्यांत फायदा, लाभ, फळ, वीर्य, इ० नाहीं असा (धंदा, कष्ट, काम, इ०). ❀ **सुक ताव, सुका ताव पु०** वर स्वतंत्र प्रतीकांत पहा. **सुकाटणक, सुकाठणक वि०** अगदीं कोरडा; ठणठणीत कोरडी किं० सुकी(जमीन इ०). **सुकादुकळ, सुकादुकाळ पु०** अवर्षणामुळें पडलेला दुष्काळ किं० झालेली महर्घता. **सुका लफडा पु०** १ रिकामी पंचाईत; पाठीस लागलेलें लचांड; शुष्ककाष्ठ. २ निरर्थक कष्ट किं० यातायात. **सुकें केळें न०** सोलून वाळविलेलें केळें. **सुकी खरूज, सुक्खरूज स्त्री०** जींतून लस गळत नाहीं आणि जिला एकसारखी कंड सुटत असते अशी खरूज.

सुकाकुलमिश्री [**फा०** षुकाकुल्; **हिं०** मिस्री] **स्त्री०** एक फलविशेष.

सुकाड [**म०** सुकें+काष्ठ] **पु०** पाखरें, गुरें, इ० नीं शेताला उपद्रव करूं नये म्हणून जें बुजगावणें उभारतात तें.

सुकाण, सुकाणूं [**सं०** सुकर्ण; **अ०** सुकान्] **न०** होडी, गलबत, इ० ना विशिष्ट गति द्यावयासाठीं मागल्या बाजूस जें साधन केलेलें असतें तें. ❀ **सुकाणदार, सुकाण्या पु०** १ होडी, गलबत, इ० चें सुकाणूं जो फिरवितो तो इसम. २ (**लाक्षणिक**) मार्गदर्शक; पुढारी; नेता.

सुका ताव मागें 'सुक ताव' पहा. [पहा.

सुका दुकळ, सुका लफडा वर 'सुका' मध्यें

सुकाळ [**सं०** सु (चांगला)+काल] **पु०** समृद्धीचा किं० वैपुल्याचा काळ. याच्या व्यावर्तकत्वें 'दुकाळ'. ❀ **सुकाळपुरा पु०** १ फळें, पिकें, व्यापारांत नफा, बाजारांतील पदार्थ, इ० ची समृद्धि किं० वैपुल्य. २ वारा, पाऊस, चिखल, धूळ, केरकचरा, इ० ची रेलचेल, अतिरेक, किं० पराकाष्ठा. **सुकाळ सौदा पु०** फारच स्वस्त मिळालेला पदार्थ (असा पदार्थ बहुधा वाईट आणि अपायकारक असतो अशा दृष्टीनें); उ० सुकाळ सौदा आणि हगवणीस काळ.

सुकाळा (-ळया) **पु०** १ जबरदस्त कामविकार आहे ज्याला असा पुरुष. २ गुदमैथुन करणारा किं० करून घेणारा. **सुकाळी स्त्री०** जबरदस्त कामविकार आहे जिला अशी स्त्री.

सुकुमार वि० मृदु; नाजूक. मागें 'सु' मध्यें पहा.

सुकृत, सुकृति मागें 'सु' मध्यें पहा.

सुकेड [**म०** सु+कड] **स्त्री०** कोरडें स्थळ; उ० ह्या ओलींत बसूं नको, तिकडे सुकेडीस जाऊन बैस. [चिट्टी.

सुक्का [**फा०** षुकाह्] **पु०** लहानसें पत्र;

सुक्का मागें सर्व अर्थीं 'सुका' पहा.

सुक्खरूज मागें 'सुका' मध्यें पहा.

सुक्तासुक्त [**सं०** सु+उक्त (चांगलें बोललेलें)+अ+सु+उक्त (वाईट बोललेलें)] **न०** बरें वाईट जें कोणी माणूस बोललें असेल तें; उ० तो लहान मुलगा तुम्हाला जें कांहीं सुक्तासुक्त बोलला असेल तें मनावर घेऊं नका. 'सूक्तासूक्त' हें शुद्ध रूप.

सुख [**सं०**] **वि०** १ सुखी. २ सुखदायक.

३ सोपें, सुलभ. **न०** १ आनंद. २ आराम,
स्वस्थता. ३ कल्याण. ४ आरोग्य. ॐ **सुखात्मा**
[**सं०** सुखात्मन्] **पु०** १ परमात्मा. २ ब्रह्म.
सुखद, सुखावह वि० परिणामीं सुख देणारें;
सुखकर. **सुखास पडणें** (किं० **वाटणें** किं०
येणें) १ चैन पडणें; आराम वाटणें. २ आवडणें.
सुखढाळ पु० फारसा त्रास न देणारें रेचक
किं० जुलाब करणारें औषध. **सुखनिद्रा**
स्त्री० स्वप्नें न पडतां आलेली किं० घेत-
लेली झोप. **सुखप्रसव पु०** कांहीं त्रास
न होतां स्त्रीचें बाळंत होणें. **सुखभाक्, सुख-**
भागी वि० सुखाला पात्र किं० विषय जो तो;
सुखाचा आस्वाद किं०अनुभव घेणारा.**सुखमांस**
न०वेताचें काम आणि पोटभर अन्न यांचे योगानें
अंगावर चढतें तें गुटगुटीतपणाचें मांस. **सुखरीण**
[**म०** सुख+ऋण] **न०** १ आपल्या सोयीला
येईल तेव्हां फेडावयाचें क़र्ज; ज्या कर्जाबद्दल
सावकाराकडून तगादा होत नाहीं किं० व्हाव-
याचा नाहीं असें कर्ज. २ फारशी जरूरी नसतां
काढलेलें कर्ज. **सुखरूप वि०** १ खुशाल; चिंता,
आजार, इ० ज्याला नाहींत असा. २ज्याला किं०
ज्यांत कांहीं त्रास किं० कोणत्याही प्रकारचा
उपद्रव नाहीं किं०झाला नाहीं असा(माणूस,प्रवास,
इ०).**क्रि० वि०** बेलाशक; शंका न बाळगतां;उ०
तुम्हीं तसें करणार असला तर सुखरूप करा,
माझी कांहीं हरकत नाहीं. **सुखवस्तु वि०**ताबे-
दारी, नोकरी, उद्योग, धंदा, इ० प्रकारचे कष्ट न
करतां संग्रहीं असलेल्या संपत्तीवर सुखानें राहिला
आहे तो; उ० आज पुणें शहरांत पन्नास पाऊ-
णशे पेक्षां अधिक सुखवस्तु कुटुंबें उरलीं नाहींत.
क्रि० वि० कष्ट न करतां सुखांत राहाण्याच्या
स्थितींत (असणें); उ० मी चिंचवडास सुखवस्तु
राहिलों आहें. **सुखवस्ती, सुखवस्तु वि०** ज्या
गांवांत कोणेकाचें शेत, वतनवाडी, व्यापार, इ०
कांहीं नाहीं आणि जो केवळ सुखासाठीं किं०
चैनींत त्या गांवीं राहिला आहे असा. **सुखशयन**
न०, सुखशय्या, सुखशेज स्त्री० १ जिच्या
योगानें आराम वाटतो अशी झोप (विनोदांत). २
चैनींत घेतलेली झोप (विनोदांत). **सुखासंतो-**
षानें क्रि० वि० न चरफडतां; मुकाट्यानें; तक-
रार न करतां;आपखुषीनें; राजीखुषीनें.**सुखास-**
माधानानें क्रि० वि० बलात्कार करण्याचा
प्रसंग न येतां. **सुखसोहाळा पु०** लग्न, मुंज,
मिरवणूक, मेजवानी, इ० रूप आनंदाचा प्रसंग.
सुखाचा प्राणी पु० १ ज्याला कसलीही
चिंता नाहीं आणि ज्याला खावयाला भरपूर
आहे असा माणूस.२ ज्याला कष्ट न करतां खाव-
यास भरपूर मिळतें असा सुदैवी माणूस.**सुखाचा**
जीव पु० काळजीकांटा नसल्यामुळें सुखांत जें
राहाणें तें किं० सुखांत राहाण्याची शक्यता.
सुखाचा जीव दुःखांत घालूं नये नसत्या
लचांडांत पडूं नये आणि दुःख भोगीत बसूं नये.
सुखाची आईबाई स्त्री० आपल्या वैभवकाळीं
मात्र आपल्याशीं प्रेमानें वागणारी (आपत्का-
ळांत आपल्या उपयोगीं न पडणारी स्त्री).
सुखाचा भाकर स्त्री० फारसे कष्ट न करतां
चाललेला जो चरितार्थ तो. **सुखाचें शरीर न०**
चिंता नसल्याकारणानें किं० कष्टाशिवाय पोट
भरत असल्यामुळें लठ्ठ, गुटगुटीत, आणि तेजस्वी
झालेलें शरीर. **सुखाड वि०** सुखदायक.
सुखदुःखाचा सोबती पु० १ नवरा; पति.
२ खरा आणि प्रेमळ मित्र. **सुखदुःखाची सोब-**
तीण स्त्री० १ आपली पत्नी. २ प्रेमळ मैत्रीण.
सुखानंद पु० चैनी, विलास, नाचरंग, इ० मध्यें
काळ घालविणारा (निंदेंत). **सुखावा पु०**
आराम; काळजीकांटा नसणें ही स्थिति. **सुखा-**
पुरी वि० कशाचीही काळजी न करतां किं०
कोणत्याही प्रकारचे कष्ट न करतां ज्याचें आयु-
ष्य सुखांत जात आहे असा. **सुखावा, सुखोपा**
पु० सुख; आराम; निश्चितपणाची स्थिति.
सुखासुखीं क्रि० वि० १ उगीचच्या उगीच;
चरफडण्याला कांहीं कारण नसतां. २ सहजपणें;
विशेष कांहीं कारण नसतां (कोणेक स्थळीं
जाणें, येणें, कोणेकाला भेटणें, इ०). **सुखी वि०**
आनंदी; संतुष्ट.

सुखा वि० वाळलेला; कोरडा. वर ‘ सुका ’
सर्व अर्थीं आणि सर्व वाक्प्रचारांतर्गत पहा.

सुखांगणें [**म०** सुख+अंग] **अ० क्रि०** १
खाणें, पिणें, सुखोपभोग, इ० मनाप्रमाणें मिळत
असतां आणि काळजी नसतां (मनुष्य) गुटगु-

टीत आणि तेजस्वी होणें. २ निस्तरलेल्या संकटानंतर आराम पावणें; चिंता नष्ट झाली आहे अशा स्थितींत असणें.

सुखाडणें, सुखांडणें [म० सुख] अ० क्रि० आनंदित होणें; सुख पावणें.

सुखाडी [म० सुकणें, सुखणें] स्त्री० शेतें, बागा, इ० ची पाण्याच्या अभावामुळें शुष्कपणाची स्थिति.

सुखारुखा[म० सुका+रूक्ष] वि० कोरडें; भाजी, तूप, दूध, इ० पदार्थ ज्यांत नाहींत असें (जेवण).

सुखावणें [म० सुख]अ० क्रि० १ आनंद पावणें; संतुष्ट किं० तृप्त होणें. २ संकटाच्या स्थितींतून बाहेर पडून सुखी होणें.

सुखाविणें, सुखविणें [म० सुख] स०क्रि० (कोणेकाला) संतोष, सुख, किं० आनंद देणें किं० वाटविणें. [घाचें मृत्तिकापत्र.

सुगड [सं० सु+घट] न० आकारविशे-

सुगड [म० सुवड] वि० चतुर; हुशार.

सुंगणें [सं० सु+घ्राण] अ० क्रि० हुंगणें; ०चा वास घेणें.

सुगंध [सं०] पु० चांगला वास. ꕥ **सुगंधिक, सुगंधक, सुगंधी** वि० चांगला वास ज्याला येत आहे असा (कोणताही पदार्थ,– अरगजा, अत्तर, इ०). मागें ‘ सु ’ मध्यें पहा.

सुगंधी [म० सु+गंध+ई (प्रत्यय)]पु० अत्तरें, उदबत्त्या, मसाल्याचीं तेलें, इ० करणारा किं० विकणारा. मागें ‘ सु ’ मध्यें पहा.

सुगम[सं०]वि०समजण्यास,शिकण्यास,साध्य करण्यास, जाण्यास सोपा (ग्रंथ, रस्ता,गांव,इ०).

सुगर, सुगरण, सुगरीण, इ० खालीं ‘सुगृहिणी ’ मध्यें पहा.

सुगरीण स्त्री० एक जंगली झाड.

सुगावणें [म० सुख]अ० क्रि० कांहीं कृत्य उत्साहानें, हौसेनें,किं० आनंदानें करण्यास तत्पर किं० सिद्ध होणें; कांहीं कृत्य करावयास आढेवेढे न घेतां सरसावणें.

सुगावा, सुदावा [म० सु+गावणें] पु० आपण शोधीत आहों त्या वस्तूचा किं० माणसाचा तपास किं० ठावठिकाण कळण्याला साधनभूत अशी कांहीं गोष्ट; तपासाला उपयोगी पडणाऱ्या ज्या गोष्टी त्यांच्या सांखळींतील शेवटचा दुवा (लागणें, काढणें, निघणें, इ०).

सुगी स्त्री० पिकें, फळें, इ० च्या वैपुल्याचा किं० हंगामाचा किं० स्वस्ताईचा ऐन काळ.

सुगुण [सं०] पु० चांगला गुण.

सुगृहिणी [सं०] स्त्री० गृहकृत्यांत तत्पर आणि चतुर स्त्री.‘ सुगृहिणी ’ चीं अपभ्रंष्ट रूपें ‘ सुग्रण, ’ ‘ सुग्रीण, ’ इ० होत. यांच्यापासून साधलेले शब्द ‘ सुग्राई, ’ ‘सुग्रणपणा,‘सुग्रावा,’ इ०. यांचे अर्थ सहज कळण्यासारखे आहेत.

सुग्रास [सं० सु (चांगलें)+ग्रास (घास, जेवण)] पु० उत्तम प्रकारचें आणि चांगलें शिजविलेलें जें अन्न तें; उ० खाणावळींत सुग्रास अन्न (किं० जेवण) कसचें मिळणार? ꕥ **सुग्रास जेवण** (किं० **भोजन**) न० चमचमीत, चांगलें शिजविलेलें, नानाविध भाजीपाले, चटण्याकोशिंबिरी, इ० चें जेवण किं० भोजन.

सुग्रीव [सं०] पु०रामाचा एक वानरमित्र.

सुघटित [सं०] वि० १ चांगला केलेला किं० बनविलेला (कोणताही पदार्थ). २ गोंडस किं० बांधेसूद (शरीर). ३ करावयास सोपें. ४ ज्याचें जडकाम किं० सांधकाम बळकट किं० शास्त्रशुद्ध आहे असा (दागिना, पात्र, इ०). ५ सर्व अंगें आणि उपांगें ज्याचीं नीट जुळविलीं आहेत असा (बेत, योजना, युक्ति, मसलत, इ०).

सुघड [सं० सुघट] न० एक प्रकारचें मृत्तिकापात्र.

सुचणें [सं० सूच्] अ० क्रि० १ एकदम स्मरणांत येणें किं० आठवणें. २ योग्य किं० अनुकूल मार्ग किं० सरणी अकस्मात् मनांत येणें. ३ योग्य वेळीं (उत्तर, कोटी, इ०) मनांत येणें किं० आठवणें; स्फुरणें.

सुचना पुढें ‘ सूचना ’ पहा.

सुचविणें [म० ‘ सुचणें ’ चें प्रयोजक] स० क्रि०१ कोणेकाला (कांहीं गोष्ट) सांगणें किं०दाखवून देणें किं० करावयाला सांगणें. २ कोणेकाला (आठवत नसलेल्या गोष्टीचें,द्यावयाच्या उत्तराचें, किं० अनुसरावयाच्या सरणीचें) स्मरण करून देणें. ३ (कांहीं कर्तव्यसरणी, मत, इ०) कोणेका-

पुढें विचारासाठीं ठेवणें किं० मांडणें किं० सभा इ० प्रसंगीं उपस्थित करणें.

सुचित [सं० सुचित्त] वि० १ उपद्रव-रहित; शांत; स्वस्थ. २ सावधान चित्त आहे ज्याचें असा.

सुचिंत [सं० सु+चिंता]वि० (मराठींत) निश्चित;आरामांत असलेला;ज्याला काळजीकांटा कांहीं नाहीं असा.

सुचिन्ह [सं०] न० चांगल्याची द्योतक अशी कांहीं गोष्ट; शुभसूचक असें कांहीं लक्षण.

सुचें [म० सुचणें] न० कोणेकाला सुचविलेली किं० सांगितलेली कांहीं गोष्ट; सूचना.

सुजट, सुजकट [म० सुजणें] वि० किंचित् सुजलेला किं० फुगलेला.

सुजणें [सं० श्वि= सुजणें, फुगणें, वाढणें] अ० क्रि० १ शरीराचा विकृत (भाग)किं० रट्टा लागलेला (भाग) तेथें रक्त जमल्यानें फुगणें. २ कांहीं पदार्थ मिळण्यासाठीं रागावून बसणें किं० हेका धरणें;उ०मी तुझ्या पेढ्यासाठीं कांहीं सुजलों नाहीं. ꙮ **सुजलें भूत कोडबुळयास राजी** जेथें कांहींच मिळण्याचा संभव नाहीं तेथें अत्यल्प मिळालें तरी क्षुद्र वृत्तीचा मनुष्य संतुष्ट होतो.

सुजनी स्त्री० १ एक प्रकारचें गभसुती रेशमी वस्त्र. २ दुलई; लेप.

सुजमरणें, सुजमिरणें [म० सुजणें]अ० क्रि० (शरीराचें गात्र)शैत्यादि कारणांनीं किंचित् सुजणें.

सुजमीर [म० सुजमिरणें] वि० किंचित् सुजलेलें किं० फुगलेलें (गात्र).

सुजरा [म० सुजणें] वि० १ सुजलेला; फुगलेला. २ कांहीं पदार्थासाठीं हट्ट घेणारा. ꙮ **सुजरें भूत** न० कांहीं पदार्थासाठीं रागावून बसणारा किं० बसलेला.

सुजाण [म० सु+जाणणें] वि० बरें वाईट ज्याला समजतें किं० समजण्याची ज्याला पात्रता आहे असा.

सुजीर [म० सुजणें] वि० सुजलेला; किंचित् सुजलेला किं० फुगलेला (शरीराचा विशिष्ट भाग).

सुटकणें अ० क्रि० झटकन् निघून किं० निसटून जाणें.

सुटका[म०सुटणें]स्त्री० नियंत्रणेंतून,कैदेंतून, संकटांतून, किं०पेचांतून मोकळें होणें किं०मोकळें झाल्याची स्थिति.

सुटगांठ [म० सुटणें+गांठ] स्त्री० ज्या गांठीचें एक टोक ओढलें असतां सुटते ती गांठ. ‘ सरगांठ, ’ ‘ सुरगांठ ’ ह्याच अर्थीं.

सुटणूक [म० सुटणें] स्त्री० सुटका. वर ‘ सुटका ’, पहा.

सुटणें अ० क्रि० १ (दोरी इ० ची गांठ) उकलणें किं० मोकळी होणें; विमुक्त होणें. २ बंधनांतून किं० कोणत्याही प्रकारच्या पकडींतून किं० नियंत्रणांतून मोकळें होणें; उ० तुझ्या हातांतील टोंक घट्ट धर तें सुटलें तर धोतर चिखलांत पडून मळेल. ३(आडकावून ठेविलेलें माणूस, जनावर, पक्षी, इ०) तुरुंग, घोडा, पिंजरा, कोंडवाडा, इ० तून निसटून पळून जाणें. ४ बंधांतून मोकळें केलें जाणें; उ० आज पांच कैदी सुटले (म्ह० त्यांना सोडून देण्यांत आलें). ५ ज्याच्याशीं (जो पदार्थ) गांठ, डीक, डाग, दोरी, इ० साधनांनीं चिकटाविलेला, जोडलेला, जडविलेला, खिळविलेला, किं० बांधलेला आहे त्यापासून (तो) वियुक्त होणें; उ० कोंदणांतून हिरा, सांध्यांतून कुसूं, खोप्यांतून वेणीचें टोक, इ० सुटणें. ६ (बंदूक, तोफ, इ०) उडविली जाणें. ७ (वारा, हिंवस किं० उष्ण हवा, इ०) सुरू होणें. ८ (जाहीरनामा, हुकूम, ताकीद, नियम, इ०) जाहिर केला जाणें. ९ (दोंद, पोट, इ०) आरामाच्या किं० सुखाच्या राहाणीमुळें वाढणें; उ० विठोबानें मलईचा खुराक सुरू केल्यापासून त्याचें पोट फार सुटलें आहे. १० (कंड, खाज, घाम, इ०) गात्रांत भासमान होणें किं० सुरू होणें. ११ सईल पडणें, शिथिल होणें (सामान्यत:). १२ (सांधा, जोड,गांठ, अडकण, इ०) निखळणें, उचकटणें, इ०.१३ सुरू होणें (सामान्यत:). **टीप**,–१ धातूच्या ‘त’ किं० ‘ईत’ प्रत्ययान्त रूपापुढें ‘ सुटणें ’ क्रियापद आल्यास त्या धातूच्या क्रियेचा सततपणा किं० अखण्डितपणा दर्शविला जातो; उ० तो त्या माणसाला शिव्या देत सुटला म्ह० एकसारख्या शिव्या देऊं लागला. करीत सुटणें, बोलत सुटणें, इ० चे अर्थ ह्याच सरणीनें जाणावे. **टीप**,–२‘ सुटणें ’ ह्याचे अर्थ

जवळच्या शब्दावरून भिन्न भिन्न छटांनीं वेगळे वेगळे आहेत असें दिसतें पण वस्तुतः ते एकाच मूळच्या अर्थावर आधारलेले असतात. **शाळा सुटणें** त्या दिवसाचा कार्यक्रम समाप्त होऊन मुलांना घरोघर जाण्यास परवानगी मिळणें. **लोणच्याला खार सुटणें** त्यांतून मीठ इ० पदार्थ पातळ होऊन त्यांत तिखट, हिंग, इ० कालविलें जाणें. **तोंडाला पाणी सुटणें** १ कांहीं रुचकर किं० चमचमीत खाद्य पदार्थ दृष्टीस पडला असतां तोंडांत लाळ जमूं लागणें. २ कांहीं लाभ आपणाला होईल ह्या आशेनें किं० व्हावा ह्या इच्छेनें उल्हसित होणें किं० आनंद पावणें किं० आकृष्ट होणें. **एकाद्याचें तोंड सुटणें** तो शिव्या देऊं लागणें; तो चरफडूं लागणें; तो अद्वातद्वा बोलूं लागणें; त्याच्या तोंडाचा पट्टा सुरूं होणें. **ह्या औषधानें कफ सुटेल** ह्या औषधाच्या सेवनानें कफ मोकळा होऊन तो तोंडाबाहेर थुंकून टाकतां येईल.

सुटरूं, सुंठरूं, सुंठर न० ज्यांत पूं उत्पन्न झाला आहे असें गळूं किं० उठाणूं.

सुटसुटीत, सुडसुडीत [म० सुटणें] वि० १ थोडक्या विस्ताराचा (संसार, धंदा, व्यापार). २ चलाख, चपळ (शरीर). ३ ज्यांत गुंतागुंत, घोटाळा, इ० नाहीं असा (कार्यक्रम). ४ ज्यांत फारसे पदार्थ करावे लागत नाहीं असा (स्वयंपाक, घरकाम, इ०). ५ ज्यांत फारशी जबाबदारी किं० जिकीर नाहीं असें (कोणतेंही काम).

सुटा [म० सुटणें] वि० १ मोकळा; न अडकलेला; न गुंतलेला (सामान्यतः). २ स्वतंत्र रूपांत असलेला; दुसऱ्याच्या पोटांत नसलेला. ३ मांडणी, रचना, इ० तून वियुक्त झालेला किं० मोकळा पडलेला; संघटनेंत न गेलेला; बंधनांत नसलेला. ४ अंतरा अंतरावर असलेलीं (झाडें, खुर्च्या, दांत, माणसें, इ०). ꣸**सुटा रुपाया** पु० नोट मोडून तींतून घ्यावयाचा नव्हे असा रुपाया. **सुटा पैसा** पु० एकच पैसा हें नाणें,–चवली, पावली, रुपाया, इ० मोठें नाणें बदलून त्यांतून घ्यावयाची जरूर नाहीं असा पैसा. **लोभाचा सुटा** वि० लोभ ज्याला नाहीं असा. याच सरणीनें इतर वाक्प्रचारांचे अर्थ जाणावे.

सुटारा पु० घाणा, चरक, राहाट, इ० फिरवावयाला शिकवावयाचा जो बैल, त्याला वाटोळें फिरावयाला शिकविण्यासाठीं जो मध्यावर खांब किं० खुंटा पुरलेला असतो तो.

सुटावणें [म० ‘ सुटणें ’ चें एक रूप] अ० क्रि० १ मोकळें होणें; सईल पडणें; ढासळणें; सांध्यांतून, मांडणींतून, रचनेंतून, किं० संघटनेंतून अल्प प्रमाणांत किं० सर्व प्रमाणांत निखळणें, निसटणें, किं० बाहेर पडणें. २ (भिंत, जमीन, इ० मध्यें) पाणी इ० शिरल्यामुळें पोपडे धरणें, पदर सुटणें, किं० गिलावा सईल पडणें. ३ सुखाच्या आणि आरामाच्या राहाणीमुळें (पोट, शरीर, इ०) वाढणें किं० गुबगुबीत किं० थिलथिलीत होणें. ४ बांध, बंधारा, दरड, इ० ची रचना खिळखिळी होऊन ढासळण्याच्या स्थितीस आलेली असणें. ५ (बांधलेलें गाठोडें, गवताचा भारा, लाकडाची मोळी, इ०) सईल होणें किं० सईल पडणें.

सुटी [म० सुटणें] स्त्री० १ मोकळीक; परवानगी; रजा. २ शाळा, कचेरी, कारखाना, इ० तील कामें बंद होऊन विद्यार्थी, कारकून, मजूर, इ० ना आरामांत काळ घालविण्याला मिळते ती मोकळीक.

सुट्टयो [म० सुटणें] न० हिशेब, देणें घेणें, इ० चा करून टाकलेला निकाल; निरवानिरव; उ० कापडवाल्याचा हिशेब करून त्याचें देणें निघालें तें देऊन टाकून त्याचें सुट्टयो करून टाकलें. उ० वा० अ० मुलांचा लपंडाव इ० खेळांत कोणेकावर जी कांहीं बावतींत आडकाठी असते ती काढून टाकली आहे ह्या अर्थाचा हा उद्गार आहे.

सुंठ [सं० शुंठी] स्त्री० एक वनस्पति. आल्यावर वाळविणें इ० संस्कार करून जो पदार्थ बनवितात तो. ꣸ **साठा वर्षीं सुंठ फुलणें** अकस्मात् कांहीं आनंदकारक गोष्ट घडून येणें. **सुंठीचें फूल** न० क्वचित् प्रसंगीं घडणारी कांहीं चांगली गोष्ट. **टीप,**–सुंठीच्या झाडाला साठ वर्षांनीं फुलें येतात या समजावरून ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति झाली आहे.

सुंठवडा पु० १ बाळंतिणीला सुंठ, गूळ,

आणि कांहीं औषधीं द्रव्यें यांचें मिश्रण खावयाला देतात तें. २ कथा, पुराण, रामनवमी, इ० रूप उत्सव ह्यांच्या समाप्तीस सुंठ आणि साखर (किं० गूळ) ह्यांचें श्रोत्यांना वाटतात तें मिश्रण. **सुंठसुंठवणी न०** सुंठीचा काढा किं० पाणी. **सुंठसाखर स्त्री० ए० व०** सुंठ आणि साखर ह्यांचें मिश्रण पोटदुखी, पित्त, इ० च्या प्रतिकारासाठीं घेतात तें.

सुंठरूं, सुंठरें, सुंठर, सुंठार [म० सुंठ] **न०** गळूं किं० उठाणूं,—जें स्पर्शाला सुंठीच्या कुड्यासारखें टणक लागतें.

सुडका पु०, सुडकें न० १ चिंधी. २ वस्त्राचा वाभाडा. ३ लुगडे, धोतर, पंचा, इ० (तुच्छतेंत). ४ (**लाक्षणिक**) हलकट किं० पाजी माणूस. ५ (**लाक्षणिक**) व्यभिचाराचें अपत्य.

सुडबुड स्त्री० १ उंदीर, घुशी, इ० चा अंधारांत संचार किं० वावर. २ लहान मुलांचे उपद्रवकारक व्यवसाय किं० कारभार.

सुडसुडीत मागें ' सुटसुटीत ' पहा.

सुडावणें [**म०** सूड=शोध] **अ० क्रि०** येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या इराद्यानें कांहीं मूर्खपणाचें, साहसाचें, दांडगाईचें, किं० अनीतीचें कृत्य करावयाला सरसावणें.

सुडी [**सं०** शंड=रास] **स्त्री०** १ जोंधळा, बाजरी, इ० ची रचून ठेविलेली जीं कणसांसकट ताटें तीं समुच्चयानें. २ गवताचा भारा.

सुढाळ [**म०** सु+ढाळ (रचना)]**वि०**१गोंडस बांध्याचा; गुटगुटीत आकाराचा. २ तेजस्वी, पाणीदार, टवटवीत (चेहरा, रत्न, रंग, इ०).

सुणें [**सं०** श्वन्=कुत्रा] **न०** कुत्रा (कवितेंत).

सुणा, सुना [**सं०** शून्य] **वि०** १ शून्य; ओसाड (गांव, घर). २ विरहित; रहित. ३ जेथें जो पदार्थ असावयास पाहिजे तेथें तो नसल्यामुळें विशोभित किं० ओका.

सुत [**सं०**] **पु०** १ पुत्र. २ सोमरस. **सुता स्त्री०** कन्या. ꣸ **सुती** [**सं०** सुतिन्] **वि०** पुत्र आहे किं० आहेत ज्याला असा. **सुतिनी स्त्री०** आई.

सुतक [**सं०** सूतक] **न०** १ जन्म देणें; प्रसवणें. २ सुवेर; जाताशौच. ३ कोणत्याही प्रकारचें अशौच. ४ (**मराठींत**) कुटुंबांत कोणी मनुष्य मेल्यानें येतो तो विटाळ (येणें, धरणें, पाळणें, फिटणें). ꣸ **सुतकतुला, सुतकाळा (–ळ्या**), **सुतकी, सुतकीळ वि०** सुतक आल्यामुळें जो अस्पृश्य झाला तो.

सुतकी स्त्री० पाथरवटांचें एक हत्यार.

सुतरनाल (–ळ) [**फा०** शुत्रनाल्] **स्त्री०** उंटाच्या पाठीवर घालून रणावर न्यावयाची तोफ.

सुतरस्वार [**फा०** शुत्र् सवार्] **पु०** १ उंट हाकणारा. २ उंटावरून पत्रें, निरोप, इ० नेणारा किं० आणणारा. ३ सांडणीस्वार.

सुतरा [**हिं०**]**वि०**१हुशार;तल्लख.२कावेबाज.

सुतराम् [**सं०**] **क्रि० वि०** १ अतिशय. २ अर्थात्; ज्यास्तच; उ० शिवी देणें हें निंद्य, आणि आईवरून शिवी देणें हें सुतराम् निंद्य.३ सर्वथैव; उ० सुतराम् वाईट, मूर्ख, लबाड, त्याज्य, इ०.४ अगदीं; बिलकूल (निषेधीं प्रयोग); उ० मजकडून ही गोष्ट सुतराम् घडावयाची नाहीं; उ० आज सुतराम् पाऊस पडला नाहीं; उ० मजजवळ सुतराम् एक पैसा नाहीं.

सुतल [**सं०**] **न०, पु०** सात पाताळांपैकीं एक. अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल, आणि पाताल हीं सात पाताळें.

सुतवाच, सुतवाच्य [**सं०** सूतः (सूत)+उवाच (बोलला)] **न०** १ सुरवात; प्रारंभ. २ एकाद्या गोष्टीचें अंधुक वर्णन किं० दिग्दर्शन. ꣸ **एकाद्या गोष्टीला सुतवाच्य करणें** ती आरंभिणें. **एकाद्या गोष्टीचें सूतवाच्य करणें** तिची अंधुक कल्पना सांगणें किं० देणें. **टीप,**–सर्व पौराणिक कथा सूतानें शौनकास सांगितल्या आहेत म्हणून प्रत्येक कथेच्या आरंभीं ' सूत उवाच ' असे दोन शब्द येतात. त्यांचा अर्थ सूत बोलला. ' सुतवाच ', ' सुतवाच्य ', ' सुतौवाच ' हीं मराठींतील अपभ्रष्ट रूपें. पुढें ' सुतौवाच ' पहा.

सुताविणें, सुतिवणें [**म०** सूत] **स० क्रि०** (संक्रांतीचीं मडकीं, रुखवताचे लाडू, पिंपळाच्या झाडाचें खोड, इ० ना) सुत वेढणें किं० गुंडाळणें किं० सुताचें लपेटे देणें.

सुतळी, सुतळ [सं० सूत्र] **स्त्री०** ताग किं० आंबाडी यांची वळलेली बारीक दोरी. ❀ **सुतळ्या लगाम** पु० एक प्रकारचा लगाम,–घोड्याच्या तोंडांत घालतात तो.

सुता [सं०] **स्त्री०** कन्या.

सुंता [अ०सुन्नत] **पु०** पुरुषाच्या शिश्नाचें लाल बोंड झाकणारें जें निसर्गजन्य चर्म तें यहुदी, मुसलमान, इ० धर्मीयांत कापतात तो विधि किं० संस्कार. मागें 'बोंड' अर्थ ८ पहा.

सुताडा [म० सूत; सं० सूत्र] **पु०** १ जाड्या भरड्या सुताचें जमीनींवर आंथरावयाचें किं० पांघरावयाचें वस्त्र. २एक प्रकारचें नागपुरी लुगडें. ३ जाडेंभरडें लुगडें, धोतर, किं०उपरणें (निंदेंत).

सुताडें [म० सूत; सं० सूत्र] **न०** वर 'सुताडा'चे दोन्हीं अर्थ पहा.३ अनेक कुटुंबें परस्परांशीं लग्नाच्या नात्यानें जुळल्यानें होतो जो संबंध तो; उ० तुम्ही आम्ही एकाच सुताड्यांतले आहों. **सुताडें गोताडें, सुताडगुताड, सुताडें-गाताडें न०** १ एकमेकांशीं कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला संबंध. २ कोणेकाच्या उद्योग-धंद्याचा विस्तार किं० पसारा. ३ गुंतागुंत. ४ दोन माणसांचें सख्य किं० दोस्ती (निंदेंत).

सुतार [सं० सूत्रकार] **पु०** १ लाकडाचे पदार्थ (चवरंग, पाट, देव्हारे, इ०) बनविणारे किं० घरबांधणीसाठीं तुळया, खांब, इ० तासून यथास्थानीं बसविणारे जे कारागीर त्यांची जात किं० त्या जातीचा इसम. २ असलीं कारागिरीचीं कामें करणारा अन्य जातीचा कोणीही इसम. ३ एक पक्षी,–जो झाडावर चोंचीचे आघात करून धलप्या पाडून आंत लपलेले किडे खातो. ❀ **सुतारकाम न०** १ घर बांधणें इ० रूप अनेक कारागिरांच्या साहाय्यानें करावयाचें जें काम त्यांपैकीं खांब, तुळ्या, पाटणी, इ० रचना करणें हें जें सुताराचें काम तें. २ सुताराची कारागिरी. **सुतारकी स्त्री०** सुताराचा धंदा किं० कारागिरी. **सुतारडा पु०** सुतार (निंदेंत).

सुतारनाळ स्त्री० मागें 'सुतरनाळ' पहा.

सुतारा [म० सूत] **पु०** कोष्ट्याच्या मागांतील एक अवयवविशेष.

ताळ स्त्री० भाताची एक जात.

सुती [म० सूत+ई (प्रत्यय)] **वि०** १ सुताचा बनविलेला (दोरी, वस्त्र, इ०पदार्थ). २योग्य रेषेंत, प्रमाणांत, ओळंब्यांत, किं० पातळींत असलेला (खांब, तुळई, तक्तपोशी, रस्ता, इ०). ❀ **एकसुती, दोनसुती,** इ० एका सुतानें, दोन सुतांनीं, किं० अधिक सुतांनीं बनविलेला (दोरी इ० पदार्थ). **गर्भसुती वि०** रेशीम आणि कापसाचें सूत यांच्या मिश्रणानें विणलेलें (लुगडें, मंदील, इ०).

सुतींव [म० सूत+ईव (प्रत्यय)] **वि०** वर 'सुती' अर्थ १ आणि २ पहा.

सुतेरा [सं० सूत्रकार] **पु०** १ कोळी ह्या नांवाचा एक क्षुद्र किडा,–जो आपल्या अंगांतून बारीक सूत्र काढून त्यांचें स्वतास राहाण्यासाठीं आणि माशा इ०खाद्य पकडण्यासाठीं जाळें करतो. २ह्या किड्यानें केलेलें जाळें किं०अशा जाळ्यांचा घर इ० मध्यें जमलेला हिडिरस समुदाय.

सुतोंवाच, सुतवाच, सुतवाच्य [सं० सूतः उवाच=सूत बोलला] **न०** १ कांहीं गोष्ट सांगायाला सुरवात (करणें). २ कांहीं कामाचें दिग्दर्शन (करणें). ३ कांहीं गोष्टीची अंधुक कल्पना देणें (करणें). मागें 'सुतवाच्य' पहा.

सुत्रा, सुत्री, सूत्रा, सूत्री, सूत्रक [सं० सूत्र=दोरा] १ सुतांत म्ह० ओळंब्यांत किं० पाणसळींत किं० पातळींत असलेला (पदार्थ,–खांब, तुळई, भिंत, रस्ता, इ०). २ योग्य सरणीनें किं० शिस्तीनें काम करणारा (कारागीर). ३ नियमित; वक्तशीर; नियमानें चालणारा (माणूस) किं० केलें जाणारें (काम).

सुथारणें [सं० सुस्थिर] **स० क्रि०** (बिघडलेलें यंत्र, काम, संस्था, कारभार, इ०) शिस्तीवर आणणें किं० सुरळीतपणें चालेल असें करणें; दुरस्त करणें; (चुकलेलें भाषण, विधान, इ०) सुधारणें.

सुंदडणें, सुंदणें स० क्रि० १(शेण, चिखल, चुना, इ०) पायाखालीं तुडवून कमावणें किं० मळणें. २ (पदार्थाची) तुडवून नासाडी करणें.

सुदणें [सिव्=विणणें, शिवणें, जोडणें] **अ० क्रि०** शिरणें; घुसणें; बसणें; जडणें; घातलें जाणें. **स० क्रि०** घालणें; शिरकाविणें; जडविणें; बांधणें.

सुंदणें मागें ' सुंदडणें ' पहा.

सुदम [**सं०**] **वि०** नियंत्रणेंत किं० कह्यांत ठेवतां येण्याजोगा.

सुंदर [**सं०**] **वि०** देखणा; रमणीय.**सुंदरी, सुंदरा स्त्री०** मनोहर किं० रमणीय स्त्री.

सुंदरी स्त्री० सतार, रुद्रवीणा, इ० वाद्यांस विवक्षित स्वरानुसंधानानें त्याच्या दांडीस जे बंध बांधतात ते प्रत्येक.

सुदर्शन [**सं०**] **वि०** सुंदर; दिसण्यांत मोहक. **पु०, न०** १ विष्णूचें चक्र. मागें ' सु ' मध्यें ' सुदर्शन ' पहा. २ शालिग्राम शिळा फुटली असतां तिचें जें चक्रविशिष्ट शकल निघतें तें. **सुदर्शन न०** (**मराठींत**) कोणेकाचे पाठीस लागलेलें लचांड; शुष्ककाष्ट. ह्या अर्थी ' सुदर्शन चक्र ' सुद्धां. ❀ **सुदर्शनचूर्ण न०** (**वैद्यक**) कांहीं विशिष्ट द्रव्यें एकत्र कुटून जें एक विशिष्ट औषध करतात तें.

सुदविणें [**सं०** सिव्=शिवणें] **स० क्रि०** आंत ढकलणें; खुपसणें; कोंबणें.

सुदामत [**फा०** मुदामद्=झालें आहे, आलें आहे] **स्त्री०** १ चाल; प्राचीन वहिवाट; रूढि. २ सलोखा. **वि०** सुरक्षित; निर्भय. **क्रि० वि०** सरळपणें; बिनहरकत; निर्भय रीतीनें; उ० काचेचीं भांडीं कावडींत घालून पाठवा म्हणजे तीं सुदामत पोचतील; उ० ही गाय सुदामत दूध देईल तर तिला भाला घालण्याचें कारण पडणार नाहीं. मागें ' भाला ' अर्थ २ पहा.

सुदामा [**सं०** सुदामन्] **पु०** १ कृष्णाचा एक अत्यन्त दरिद्री गुरुबंधु. २ (**लाक्षणिक**) अत्यन्त किडकिडीत माणूस. ❀**सुदामपुरी स्त्री०** अत्यन्त दरिद्री लोकांची वसति किं० गांव किं० गांवाचा मोहल्ला. **सुदामदारिद्य न०** पराकाष्ठेचें दारिद्य. **सुदामदरिद्री वि०** अत्यन्त दरिद्री माणूस. **सुदामेदेवाचें वस्त्र न०** अत्यन्त जीर्ण किं० फाटकें तुटकें असें वस्त्र. **सुदामदेव पु०** अत्यन्त रोडका आणि फाटकीं वस्त्रें पेहेरलेला मनुष्य. **सुदामपोहे पु० अ० व०** कोणेकाला दिलेला नजराणा,-जो अति हलक्या दर्जाचा कल्पून देणारा शालीनतेनें आपणाकडे कमीपणा घेतो. **सुदामे पु०अ०व०** पोहे. **टीप,**-सुदाम्यानें कृष्णाला पोहे भेट म्हणून दिले त्यावरून ही रूढि.

सुदावा पु० तपासाचें साधन. मागें 'सुगावा' पहा.

सुदिन न०, पु०, सुदिवस पु० [**सं०**] १ व्यतिपात, भद्रा, इ० दोषांनीं राहित दिवस. २ सणाचा दिवस. ३ मित्राची भेट होणें, व्यापारांत मोठा लाभ होणें, अरिष्ट टळणें, सुवार्ता कानीं पडणें, इ० रूप कोणत्याही कारणानें जो कोणेकाचा आनंदाचा दिवस तो. **टीप,**-वरील सर्व अर्थीं 'सुदीस' हा गांवढळ अपभ्रंश.

सुदीस, सदीस [**म०** सर्व+दिवस] **क्रि० वि०** सर्व दिवसभर; सारा दिवस.

सुदुर्लभ [**सं०**] **वि०** मिळावयाला अति कठिण.

सुदुश्चर [**सं०**] **वि०** १ मंदचालीचा(पशु). २ करावयास किं० चालवावयास कठिण (तप, व्रत, नेम, इ०).

सुदुस्सह [**सं०**] **वि०** सोसावयास किं० भोगावयास कठिण.

सुदुस्तर [**सं०**] **वि०**तरून जावयास किं०पार पाडण्यास कठिण (नदी, प्रतिज्ञा,व्रत,काम, इ०).

सुदृढ [**सं०**] **वि०** १ खूप बळकट, भक्कम, किं० पक्का. २ नीरोगी (प्रकृति, शरीर, इ०).

सुद्ध बुद्ध [**सं०** शुद्धि बुद्धि] **स्त्री०**१जाणीव, माहिती, ज्ञान. २ मूर्च्छेंतून उठल्याची स्थिति. **टीप,**-दोन्ही अर्थीं अशिक्षितांतच रूढि.

सुद्धां [**सं०** सत्रा=बरोबर; सह; खरोखर] **क्रि० वि०** १ सकट; उ० जोड्यासुद्धां येऊं कां ? उ० कपड्यासुद्धां फराळास बसूं कां ? २ देखील; उ० माझ्या बोलावण्यानें रामभाऊ येतील यांत नवल काय ? तात्यासाहेब त्याचे वडीलसुद्धां येतील.

सुद्धा [**सं०** शुद्ध] **वि०** निर्भेळ; खरेंखुरें; उ० हें दूध म्हणजे सुद्धें पाणी; उ०हें सोनें अगदीं सुद्धें आहे; उ० ही सुद्धी लबाडी आहे. **टीप,**-ह्या शब्दाची अशिक्षितांतच रूढि.

सुंघडणें, सुंधणें मागें ' सुंदडणें, ' ' सुंदणें ' पहा.

सुधरणें पुढें ' सुधारणें ' पहा.

सुधर्ष [सं०] **वि०** १ नियंत्रणेंत, कह्यांत, किं० दाबांत ठेवतां येण्याजोगा. २ ज्याच्याजवळ जातां येईल असा (माणूस, स्थळ, इ०). ह्या दोन्ही अर्थी उलट शब्द ' दुर्धर्ष '.

सुधा [सं०] **स्त्री०** १ अमृत,–देवांचें खाद्य. २ भिंत इ०ना देतात तो चुना;सफेता.३विड्याच्या पानाला लावतात तो चुना. ४ फुलांतील मध. **छसुधारस पु०** साखरेच्या पाकांत लिंबाचा रस, वेलदोड्याचें चूर्ण,केशर, इ० द्रव्यें घालून पोळी इ० बरोबर खावयास करतात तो पदार्थ.

सुधा [सं० शुद्ध]**वि०**१सन्मार्गानें चालणारा; आडमुठा किं० हट्टी नव्हे तो.२सरळ(सर्व अर्थी); उ० सुधा माणूस, रस्ता, वर्तन, भाषण, व्यवहार, इ०.

सुधारणा, सुधारणी, सुधारणूक [सं० सु+धारण (किं० धारणा)] **स्त्री०** १ उत्कर्षाची स्थिति; अधिक चांगलेपणाची स्थिति. २ लेख,भाषण,अभ्यास, इ०मध्यें प्रगति.३बिघडलेली प्रकृति, वाईट मार्गाला लागलेला माणूस, किं० बिनसलेलें काम पुन्हां चांगल्या स्थितीस येणें. ४ वाइटाचा अंश कमी होऊन किं० अजीबाद नष्ट होऊन अधिक चांगल्या दशेप्रत येणें.

सुधारणें [सं० सु+धृ, धारय्] **अ० क्रि०** १ बिघडलेलें किं० बिनसलेलें जें कांहीं तें चांगलें किं० पूर्वींप्रमाणें चांगलें होणें. २ भलत्याच मार्गाला लागलेला मनुष्य चांगल्या मार्गावर येणें. **स० क्रि०** १ चांगलें करणें; सुव्यवस्थित करणें; सन्मार्गाला लावणें; चांगल्या पायावर स्थापिणें. २ निर्दोष करणें; बिनचूक करणें; काम, पदार्थ, मांडणी, इ० तील चांगल्याचा अंश वाढविणें.

सुधी [सं०] **वि०** १ विद्वान्. २ शाहाणा. **स्त्री०** चांगली किं० तल्लख बुद्धि.

सुधीर [सं०] **वि०** नेटदार; गंभीर.

सुनका, सुना, सुणा [सं० शून्य] **वि०** नग्न; उघडा; रिकामा;ओका; विरहित;रिकामा; लाभरहित; उ० बांगड्यांवांचून हात सुना; उ० मार खाल्यावांचून त्याचा एक दिवस सुना जात नाहीं; उ० ह्या सुन्या वाड्यांत मला एकट्याला रहावयाची भीति वाटते.

सुनत, सुनता मागें ' सुंता ' पहा.

सुनवाहिरी [हिं०] **स्त्री०** स्पर्शज्ञान ज्यांत नाहींसें होतें असा एक रोग.

सुनावणें, सुनाविणें [सं० श्रु=ऐकणें; श्रावय्=ऐकविणें, सांगणें] **स० क्रि०** स्पष्ट करून सांगणें; सांगणें; (तकरार, खटला, वाद, पुरावा, इ०) न्यायाधीशाच्या नजरेस आणून देणें किं० त्याच्या पुढें मांडणें.

सुनी, सुन्नी [अ०] **पु०** मुसलमानांतील एक धर्मपंथ. दुसरा पंथ ' शिया. ' मागें ' शिया ' पहा. सुन्नी लोक पहिल्या तीन खलिफांना चवथ्या खलिफाइतकाच मान देतात आणि उलट पक्षीं शिया लोक पहिल्या तिघांचा तीव्र निषेध करतात आणि चवथा खलिफा हझरत अली याला आणि त्याच्या वंशजांस फार पूज्य मानतात.

सुपक [सं०सुपक्व]**वि०**१उत्तम प्रकारें शिजलेलें किं० भाजलेलें (खाद्य). २ खमंग वास आणि रुचि येईल अशा प्रकारें भाजलेली (पोळी इ०).

सुपडें न०, सुपली स्त्री० [म० सूप; सं० शूर्प] १ लहान सूप,–धान्य पाखडणें इ० च्या उपयोगाचें. २ सूप (तुच्छतेंत).

सुपतळ न० घाम टिपून घेण्यासाठीं जोड्यांत किं० घोड्याच्या पाठीवर घालतात तें कातडें, बुरणूस, इ०. मागें ' सुकतळ ' पहा.

सुपती स्त्री० पाथरवटाचा हातोडा.

सुपरीत [म० 'विपरीत' ला जाबदार आणि उलट अर्थाचा घडविलेला शब्द]**वि०**१न बदललेला; न चळलेला.२सुलटा. ३खरा. ४ नियमाला धरून असलेला. ५ अनुकूल. ६ शास्त्र, रूढि, इ० शीं जुळणारा. **टीप,**–जें ' विपरीत ' नव्हे तें ' सुपरीत '. मागें 'विपरीत' पहा.

सुपली, सुंपली स्त्री० मागें ' सुपडें ' पहा.

सुपात्र [सं०] **न०** देणगी, आश्रय, विद्या, संस्कार, उपदेश, इ० चें ग्रहण करावयास योग्य आहे असा मनुष्य, पशु, पदार्थ.

सुपानी स्त्री० स्त्रिया नाकांत किं० कानांत घालतात तें सुकलें.

सुपारी स्त्री० १ पोफळीच्या झाडाचें फळ; पोफळाची साल काढून आंत जी गोटी राहाते

ती. सुपारी विड्यांत खातात. सुपारीच्या शेकडों जाति आहेत. २ पोफळीचें झाड. ❀ **ब्राह्मणाला अनुष्ठान, लग्न, मुंज, इ०साठीं सुपारी देणें** त्याला अनुष्ठान चालविण्याला किं० लग्न, मुंज, इ० संस्कार करण्यास निश्चित करणें. याच सरणीनें वाजंत्री, गोंधळी, वढाई, सुतार, इ०स सुपारी देणें म्ह० त्यांना त्या त्या कामीं निश्चित करणें किं० ठरविणें. **टीप,**–' सुपारी' हा शब्द एका व्यक्तीचा वाचक असून शिवाय समुदायाचाही वाचक आहे; उ० यंदा सुपारी चांगली पिकली. **टीप,**–'सुपारी' शब्दाच्या वरील दोन अर्थांवरून 'सगळ्या गल्लतांत अर्धी सुपारी माझी' असा झोंडपणा दाखविणारा श्लेषमूलक वाक्प्रचार उत्पन्न झाला आहे. चिकणी, बरडी, रोठी, श्रीवर्धनी, कापी, लवंगचूर, दगडीं, खाडी, पांढरी, ओली, इ० सुपारीचे शेकडों प्रकार बाजारांत विकावयास येतात. ❀ **सुपारीवाटी मोती** इ० **न०** सुपारीच्या घाटाचे मोती इ०.

सुपिंड [**सं०** सु+पिंड] **वि०** धष्टपुष्ट किं० गोटीदार शरीराचा (घोडा, माणूस, इ०).

सुपीक [**म०** सु+पीक] **न०** पर्जन्यादिकांच्या अनुकूलतेमुळें जें विपुल पीक येतें तें.

सुपुर्त, सुपुर्द [**फा०** सुपुर्द्=देणें] **वि०** दान केलेलें, हवालीं केलेलें, बक्षीस दिलेलें (करणें). **टीप,**–' सुपुर्द ' स्वतंत्रपणें योजण्यांत येत नाहीं. ' सुपुर्द करणें ' असा प्रयोग होतो; उ० पुढें शाहूमहाराज यांनीं पेशव्यांस सर्व राज्याधिकार सुपुर्त केला.

सुपेती [**सं०** स्वापिति=तो निजतो] **स्त्री०** निजावयाची गादी.

सुप्त [**सं०**] **वि०** १ निजलेला; झोपलेला; निद्रित. २ बधिर झालेलें (गात्र). ३ प्रगल्भ दशेंत न आलेली (बुद्धि, कल्पकता, वाचा, गुण, कौशल्य, चातुर्य, इ०).

सुप्ति [**सं०**] **स्त्री०** १ झोप; निद्रा. २ बेशुद्धि. ३ स्वप्न. ❀ **सुषुप्ति स्त्री०** १ गाढ निद्रा. २ ज्ञानशून्य जीवावस्था. ३ अज्ञान.

सुप्रभात [**सं**] **न०** १ फटफटीत दिवस उजाडणें. २ अगदीं पहाटे. ❀ **सुप्रभा, सुप्रभातें क्रि० वि०** अगदीं पहाटेस; मोठ्या पहाटेस.

सुप्रयुक्त [**सं०**] **वि०** उत्तम प्रकारें किं० शास्त्रशुद्ध रीतीनें योजलेला किं० कामीं लाविलेला. **क्रि० वि०** १ खराबी किं० नासाडी न होईल अशा रीतीनें किं० अशा प्रकारानें. २ सुसंघटित रीतीनें.

सुप्रसन्न [**सं०**] **वि०** अत्यन्त आनंदित किं० संतुष्ट.

सुफराटा [**म०** सुपरीत] **वि०** योग्य दिशेस किं० दिशेकडे वळविलेला किं० चाललेला; योग्य प्रकारें म्हणजे सुलट रीतीनें बांधलेला, ठेविलेला, वापरलेला, किं० पेहेरलेला.

सुफल न० सुई, दाभण, बाण, इ०ना पाडलेली खाच किं० भोक.

सुफल [**सं०**] **वि०** १ ज्याला चांगली किं० विपुल फळें येतात असें (झाड). २ ज्याचा योग्य किं० इष्ट परिणाम झाला आहे असा (प्रयत्न, खटपट, किं० कोणतेंही कर्म). ३ फायदेशीर (व्यापार, धंदा, इ०).

सुंब, सुंभ न०, पु०, सुंबाडी, सुंभाडी स्त्री० १ नारळाच्या कवचीचे म्हणजे सोंडणाचे तंतु किं० ह्या तंतूंची वळलेली दोरी. २ ताग, आंबाडी, मोळ, इ०च्या तंतूंची वळलेली दोरी. ❀ **सुंबखंड न०, सुंबखंडी, सुंभखंडी स्त्री०, सुंभखंड न०** सुंभाचा तुकडा. **सुंभ जळे पण पीळ न जळे** हट्टी माणसाचें नुकसान झालें तरी तो आपला हट्ट सोडीत नाहीं.

सुंब [**हिं०** सुम्] **पु०** घोडा, गाढव, किं० खेचर यांचा खूर. ❀ **सुंबतराष** [**फा०** सुंब्+तराष्; तराषीदन्=कापणें, तासणें] **पु०** घोड्याचे खूर तासण्याचा धंदा करणारा. **सुंबतराषी स्त्री०** हा धंदा.

सुबक [**फा०**] **वि०** घाटांत, डौलांत, घडणींत, किं० रचनेंत सुंदर, नीटनेटका, किं० आटोपसर (दागिना, देव्हारा, कपडा, भांडें, इ०).

सुबकणें स० क्रि० धुवावयाचें वस्त्र पाण्यांत भिजवून दोन्ही हातांत धरून दगडावर अनेकवार हापटणें; चुबकणें. मागें ' चुबकणें ' पहा.

सुंबणें, सुंभणें [**म०** सुंब, सुंभ] **स० क्रि०** (बाज, पलंग, माचा, इ०) सुंभाच्या दोरीनें विणणें.

सुबत्ता [**हिं०** सूभता] **स्त्री०** देश, गांव

इ० ची वैभवाची, समृद्धीची, किं० वैपुल्याची स्थिति; सुखशांतीचा काळ.

सुंबा, सुंभा पु० १ खडक किं० मोठा फत्तर फोडावयाचें एक आउत. २ तोफ ठासावयाचा गज. ३ घोडा, गाढव, खेचर, इ० चा खूर.

सुबा, सुबेदार इ० पुढें 'सुभा,' 'सुभेदार,' इ० पहा.

सुबाईक [म० सुभिक्ष] न० समृद्धीचा किं० सुखशांतीचा काळ.

सुंबाडी, सुंभाडी स्त्री० मागें 'सुंब, सुंभ' मध्यें पहा.

सुबारा [म० सु + बारा] पु० १ सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. २ झुकांडी देणें; पळून जाणें.

सुंबी वि० चार जाड आऱ्यांचें (चाक).

सुबुद्ध [सं०] वि० १ जाणता; ज्ञानी; समंजस. २ सुशिक्षित.

सुबोध [सं०] वि० १ आकलन करावयास किं० शिकावयास सोपें. २ शिकविण्यास सोपा किं० सोयीचा (विद्यार्थी). ३ ज्याचा सहज उलगडा करतां येईल असा (प्रश्न, विधान, श्लोक, ग्रंथ, व्याख्यान, इ०). पु० चांगला उपदेश.

सुंभ मागें 'शुंभ' सर्व अर्थी पहा.

सुभक मागें 'सुबक' पहा.

सुभग [सं०] वि० १ दैववान्. २ सुंदर. ३ मधुर; रम्य. ४ प्रिय. ५ सुखदायक. **सुभग** न० सुदैव; चांगलें नशीब. **सुभगा** स्त्री० १ प्रिय पत्नी. २ सुवासिनी.

सुभट [सं०] पु० उत्तम योद्धा.

सुभट वि० १ चांगल्या घडणीचें. २ आटोपसर. ३ मोठा; भव्य; टोलेजंग.

सुभा [अ० सूबाह्] पु० १ प्रांत; परगणा. २ विशिष्ट प्रांत किं० परगणा यांचा अधिकार. ३ सुभ्यावर अमल करणारा अधिकारी. **सुभेदार** पु० १ सुभ्यावर अमल करणारा अधिकारी. २ मल्हारराव होळकराचें टोपण नांव. **सुभेदारी** स्त्री० सुभेदाराचा अधिकार, दर्जा, किं० कार्यक्षेत्र. **सुभां** क्रि० वि० सुभ्याकडे, सुभ्यामध्यें, सुभ्याच्या खात्यांत (नमूद करणें). **सुभापेटा** पु० सुभ्याचा पोटभाग.

सुभाज [म० सु+भाजणें] वि० चांगली भाजलेली (पोळी, भाकरी, हरभरे, पापड, इ०).

सुंभाडी स्त्री० मागें 'सुंब, सुंभ' मध्यें पहा.

सुभावणा [सं० शुभ (सुंदर)+म० वाणा (सारखा)] वि० सुंदर, देखणा, गोंडस (माणूस, पशु, पदार्थ).

सुभाषित [सं०] न० १ चटकदार वाक्य किं० वचन. २ म्हण. वि० उत्तम प्रकारें बोललेलें, योग्य, अनुरूप (उत्तर, कोटि, इ०). मागें 'सु' मध्यें पहा.

सुभित्ता स्त्री० मागें 'सुबत्ता' पहा.

सुभिक्ष [सं०] न० सुकाळ; पिकें, स्वस्ताई, पाणी, इ० संबंधानें जो सुखाचा काळ तो. वि० स्वस्ताईचा, समृद्धीचा, वैपुल्याचा (काळ, देश).

सुभेदार, सुभेदारी मागें 'सुभा' मध्यें पहा.

सुमंत [सं० सु + मंत्र+इन् (प्रत्यय)] पु० शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं एक.

सुमधुम वि० १ सरळ; वाकडा नव्हे तो (रस्ता, नदीचा प्रवाह). २ स्वच्छ, स्पष्ट, बिनचूक, आरशासारखा (हिशेब, जमाखर्च). ३ धोपटमार्गी (वर्तन).

सुमन [सं०] पु० १ गहूं. २ धोत्रा.

सुमना [सं०] स्त्री० जाई,-सुवासिक आणि नाजुक फुलांची एक वेल.

सुमना [सं० सुमनस्] वि० प्रसन्न मनाचा. पु० १ देव. २ पंडित. ३ गहूं. **सुमना** स्त्री० फूल. **सुमन** न० (**मराठींत**) फूल. **सुमनस्क** वि० १ प्रसन्न आहे मन ज्याचें असा. २ शांत. ३ प्रामाणिक, निष्कपट (माणूस).

सुमसाम मागें 'सामसूम' पहा.

सुमार [फा० पुमार्] पु० १ गणती. २ अंदाज; अजमास; तर्क. ३ गमनाचा रोख; दिशा; उ० दख्खनचा सुमार धरून फौज निघाली. ४ साधारणपणें खरें किं० नक्की स्थल, काळ, मुदत, संख्या, परिमाण, अवधि, इ०; उ० ह्या सुमारास वडगांव असणार; उ० चाराच्या सुमारास आपण मुंबईस पोहोचूं. ५ बंदूक, बाण, इ० चा धरलेला रोख किं० नेम. ६ (**मराठींत**) बेतबात, योग्य मर्यादा, सभ्य चाल, रीति, किं० शिस्त; उ० गुरुजनाशीं सुमारानें बोलावें; उ० तो रागावला

म्हणजे त्याला सुमार राहात नाहीं. ❀ **सुमाराचें** वि० मध्यम प्रतीचें. **सुमारमाफक** वि० मध्यम प्रतीचा; साधारण दर्जाचा किं० गुणाचा. **सुमारी** स्त्री० गणती, मोजदाद; उ० खानेसुमारी; शेतसुमारी. **सुमारें** क्रि० वि० आजमासें. **सुमारी** स्त्री० आजमास.

सुमारणें [म० सुमार] अ० क्रि० १ अटकळींत येणें. २ (धान्यें, पिकें, मसलत, बेत, इ०) बऱ्याच रंगारूपास येणें. ३ (काम, खटपट, प्रयत्न, इ०) बऱ्याच पल्ल्यापर्यंत गेलेला असणें.

सुमेधा [सं० सु+मेधस्] वि० १ शाहाणा. २ बुद्धिमान्.

सुमेरु [सं०] पु० मेरु पर्वत. ह्याचीं अन्य नांवें मेरु, हेमाद्रि, रत्नसानु, सुरालय, इ० आहेत.

सुयटा पु०, **सुयटी** स्त्री० माड, पोफळ, केळ, गहूं, इ० झाडांच्या पोटांतून नुकतेंच बाहेर पडलेलें साग्र पर्ण,–विकसित व्हावयाच्या पूर्व स्थितींतील.

सुयंत्र [म० सु+यंत्र] न० (शब्दशः) उपयुक्त यंत्र; सुस्थितींत असलेलें यंत्र. **क्रि० वि० (मराठींत)** विघ्नें, हरकती, निराशा, किं० थांबणूक न येतां (विद्या, अभ्यास, काम, प्रवास, इ० चालणें).

सुयरणें, **सुयारणें** [म० सुई] अ० क्रि० (केळ, माड, पोफळ, इ० झाडें) कांहीं रोगामुळें सुयटा बाहेर न पडण्याच्या स्थितींत येणें किं० असणें.

सुयेर, **सुयेरणें** पुढें 'सुवेर,' 'सुवेरणें' पहा.

सुर [सं०] पु० देव. ❀ **सुरांगना** स्त्री० अप्सरा. **सुराधिप**, **सुरेंद्र**, **सुरेश्वर** पु० १ इंद्र. २ विष्णु. **सुराचार्य** पु० बृहस्पति. **सुरालय** पु० १ मेरु पर्वत. २ स्वर्ग. ३ देऊळ. **सुरर्षि** पु० देवर्षि. **सुरगुरु** पु० १ बृहस्पति. २ विष्णु. **सुरज्येष्ठ** पु० ब्रह्मदेव. **सुरधनु** [सं० सुरधनुस्] न० इंद्रधनुष्य. **सुरतरु** पु० कल्पवृक्ष. **सुरदीर्घिका**, **सुरनदी**, **सुरसरित्** स्त्री० गंगा; स्वर्गांतील नदी. **सुरद्विष्** पु० १ राहु. २ राक्षस. **सुरपति** पु० इंद्र.

सुरई वि० १ उकडे नव्हेत असे (तांदूळ). २ लवंगा, वेलदोडे, जायफळ, जायपत्री, इ० रूप उंची मसाल्याचीं किं० बाळंतिणीस द्यावयाचीं (औषधें).

सुरई [हिं० सुराही] स्त्री० कट्यारीसारखें एक हत्यार.

सुरई [सं० सुरा] स्त्री० जस्ताचें, उंच गळ्याचें, चिंचोळ तोंडाचें, आणि आकारविशेषाचें पात्र,–पाणी ठेवणें, सरबतें ठेवणें, इ० च्या उपयोगाचें.

सुरकंडी, **सुरकांडी**, **सुरकुंडी** स्त्री० १ मागें 'सरळी' पहा. २ डोकें पुढें कलवून दाटींत घुसणें.

सुरकंडो, **सुरकांडी** स्त्री० पिचकारींतून किं० तोंडांतून जोरानें उडविलेली पाणी इ० ची धार.

सुरकणें अ० क्रि० १ जोरानें किं० वेगानें उडणें किं० निसटणें. २ मंडळींतून हळूंच निघून किं० निसटून जाणें.

सुरकुतणें अ० क्रि० (वस्त्र, चर्म, कागद, पान, इ० चें) अनियमित प्रकारें आकुंचन झाल्याकारणानें त्यांचा सपाटपणा भंग पावणें.

सुरकुती स्त्री० वस्त्र, चर्म, कागद, पान, इ० च्या पृष्ठभागाचा सपाटपणा आकुंचनादि कारणांनीं किं० अव्यवस्थितपणें घडी घातल्यामुळें नष्ट होऊन जे मध्यें मध्यें उंचवटे उत्पन्न होतात ते प्रत्येक.

सुरक्या [म० सूर] पु० १ वाजंत्र्यांच्या ताफ्यांतील सूर धरणारा माणूस. २ आट्यापाट्या ह्या खेळांत मधल्या उभ्या रेषेवर काम करतो तो गडी. ह्याला 'सुरदुंग्या' असेंही म्हणतात.

सुरख्या, **सुरख्या** [म० सुरू=प्रारंभ] पु० गंजिफांच्या खेळांत ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो तें चित्र.

सुरखाई [म० सुरेख] स्त्री० सुंदरपणा; दिसण्यांत मोहकपणा.

सुरखाई, **सुरखी** [फा० सुरखी=तांबडा, तांबडा रंग] स्त्री० १ चटकदार दिसणारा असा वस्त्र, चेहेरा, इ० चा तांबूसपणा किं० तांबडेपणा. २ औषधाच्या किं० अमली पदार्थांच्या सेवनानें तोंडावर किं० डोळ्यांना येतो तो तांबडेपणा. ३ फुलें, झाडें, इ० वर येतो तो टवटवीतपणा किं० तजेला.

सुरखुती स्त्री० मागें 'सुरकुती' पहा.

सुरख्या पु० गंजिफांच्या खेळांत ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो तें चित्र.

सुरंग, सुरुंग [सं० सुरंग, सुरंगा] पु० १ खडक, किल्याचा तट, इ० ढासळावा म्हणून त्याला खालीं जें भोक पाडून त्यांत दारू ठासून त्या दारूला वत्ती लावितात तें भोक (पाडणें, उडविणें). २ भुयार. ३ भिंतीला चोरांनीं पाडलेलें भोक. ४ भूगर्भात प्रवेशासाठीं किं० वाट करण्याठीं माती खोदून केलेला रस्ता. ५दोन डोंगरांच्या मधील अरुंद वाट.

सुरंग, सुरंगी [सं० सुरंगी] **स्त्री०** एक झाड. याचें लाकूड तांबडें किं० तांबूस असतें.

सुरंग [सं०] **पु०** चटकदार रंगाचा; तजेलेदार. ꙮ **सुरंग धातु** पु० गेरू; काव.

सुरगांठ स्त्री० मागें ' सरगांठ ' पहा.

सुरंगी [सं० सुरंग] **स्त्री०** १ खडक, किल्याचा तट, इ० फोडण्यासाठीं आणि दारू ठासण्यासाठीं भोक पाडावयाची पहार. २कोणत्याही कामीं भोक पाडावयाची पहार. [पहा.

सुरंगी स्त्री० एक झाड. माग ' सुरंग, सुरंगी'

सुरंज पु० सुरंजी नांवाच्या झाडाचें मूळ. ह्याचा तांबडा रंग होतो.

सुरंजी स्त्री० एक झाड. याच्या मुळापासून तांबडा रंग होतो. **वि०** ह्या रंगानें रंगविलेला (कपडा).

सुरंट, सुरट पु०, न० एक प्रकारची केसाळ आळी. ह्याचे केश अंगाला लागले असतां भारी कंड सुटते. ' सुरवंट ' हा शब्द. अधिक प्रचलित ' घुला ' हाही ह्याच प्राण्याचा वाचक शब्द आहे.

सुरण [सं० शूरण] **पु०** एक कंद. हा खाजरा किं० गोडा असतो. ह्याची भाजी करतात. मुळव्याधीवर याचा उपयोग होतो.

सुरत [सं०] **न०** मैथुन.

सुरत [अ० सूरत] **स्त्री०** १ चेहेऱ्याची ठेवण; चेहेरा; दर्शन. ꙮ **खूबसूरत वि०** सुंदर; मोहक. **सुरतपाक** [अ० सूरत+फा० पाक् (स्वच्छ)] **वि०** टवटवीत; दिसण्यांत चटकदार; मोहक.

सुरत्या [म० सूर]**पु०** सूर धरणाराचा जोडीदार किं० मदतनीस. पुढें 'सूरकरी' पहा.

सुरदार वि० मागें ' सुरूदार ' पहा.

सुरनदी मागें ' सुर ' मध्यें पहा.

सुरनीस, सुरनवीस [फा० पुरूअ+नवीस् (लेखक); नविष्तन्=लिहिणें] **पु०** सरकारांतून देण्यांत येणाऱ्या सनदा, वराती, आणि कौलनामे, इ० वर सुरू, पुद, आणि बार ह्या तीन शब्दांचा शिक्का मारणारा अधिकारी. यालाच पुढें ' सचिव ' म्हणूं लागले.

सुरनीस [म० सूर+फा० नवीस्] **पु०** १ देवळांत वाजंत्र्यांच्या ताफ्यांत सनई वाजविणारा इसम. २ हरिदास इ० च्या मागें सूर लांबविणारा इसम.

सुरपणें अ० क्रि (सांठवून ठेविलेलें भात) आंत भुरली पडल्यामुळें फोलासारखें हलकें होणें. मागें ' भुरलें ' पहा.

सुरपाटी स्त्री० आट्यापाट्यांच्या खेळांत दोन्ही बाजूंनीं पाट्या (चौकटी) पाडलेल्या असून मध्यें एक उभी थेटपर्यंत जाणारी रेघ असते ती. हिला ' मुरदुंग पाटी ' असेंही म्हणतात. मागें ' मुरदंग, मुरदुंग ' पहा.

सुरपारंबी स्त्री०, सुरपारंबा पु०, सुरपारंब्या स्त्री० अ० व० झाडावर सरसर चढावयाचें, सरसर उतरावयाचें, आणि एक काठी (जिला ' सूर ' म्हणतात ती) फेकावयाची ह्या रूपाचा मुलांचा एक खेळ (खेळणें). ꙮ **कोणेकाशीं सुरपारंब्या करणें** त्याला वात्रटपणें उडवाउडवीचीं उत्तरें देणें.

सुरफाक पु० गायनांतील एक ताल.

सुरफाटणें, सुरफाटा मागें ' सुफराटणें, ' ' सुफराटा ' पहा.

सुरबंद [सं० शूल+म० बंद] **स्त्री०** पोटदुखी, जंत, इ० बंद किं० नष्ट करण्यासाठीं ज्याचा उपयोग होतो असें एक झाड.

सुरभि [सं०] **वि०** १ रमणीय; सुंदर. २ सुवासिक. ३ सुखदायक. **पु०** १ सुवास; सुगंध. २ वसंत. ३ चंपक; वकुल. **सुरभि,सुरभी स्त्री०** १ कामधेनु. २ गाय.

सुरमा [फा०] **पु०** १ शिबें हा शरीराच्या त्वचेवर वेगळ्या रंगाचे डाग पाडणारा एक रोग. २ डोळ्यांत घालावयाचें एक अंजन.

सुरमाड पु० एक प्रकारचा माड. याला ' भेरळ, ' ' भेरला माड, ' ' भेरली माड, ' 'भेरळी माड' अशीं अन्य नांवें आहेत. मागें हे शब्द पहा.

सुरमी स्त्री० १ फार जेवण झाल्यामुळें अंगांत येते ती सुस्ती. २ एक मत्स्यविशेष. ह्या अर्थी ' सुरमई ' सुद्धां. ३ एक त्वग्रोग.

सुरय, सुरयी स्त्री० १ एक प्रकारची तरवार. २ एक प्रकारचें भांडें. मागें ' सुरई ' पहा.

सुरवंट [म० सड (केश)+वंत (युक्त)] एक सरपटत जाणारा आळीसारखा प्राणी. मागें ' सुरट, ' 'सुरट' पहा.

सुरवा पु० माड, केळ, इ० झाडांची सुई.

सुरवाडा पु० पोवाड्याच्या चालीवरचें देवाचें स्तोत्र.

सुरवात [अ० पुरूआत] स्त्री० प्रारंभ.

सुरवार [फा० पुल्वार्] स्त्री० एक प्रकारची विजार.

सुरवारी वि० एक प्रकारचा (हिरडा).

सुरवेंट मागें ' सुरवंट ' पहा.

सुरस [सं०] वि० १ गोड, रुचकर, चवदार. २ मनोरंजक (कादंबरी, भाषण, इ०).

सुरसन्न, सुरुसन [अ० शुहूर्=महिने; सन्=वर्ष] पु०,न० हिजरी शकानंतर सातशे पंचेचाळीस वर्षांनीं म्हणजे इसवी सन १३४४ सालीं सुरूं झालेला मुसलमानी शक.

सुरसा पु० लाकडाच्या दोन फळ्या कडांनीं संबद्ध करण्यासाठीं दोन्ही टोकांकडे जे निमुळते खिळे योजतात ते प्रत्येक.

सुरसाबिज न० सबज्याचें बीज.

सुरसुर स्त्री० अंगाला मुंग्या येणें हा विकार.

सुरसुरी स्त्री० १ उडवावयाच्या दारूचा म्ह० आतिषबाजीचा एक पदार्थ. २फार जेवणामुळें येतें तें मांद्य. ३कांहीं काम करण्याची उत्कट इच्छा (येणें).

सुरसोटा पु० सोटयाच्या आकाराचा वीणा [हें तंतुवाद्य.

सुरळी स्त्री० १ कागद, कातडें, वस्त्र, इ०ची गुंडाळी किं० वळकटी. २ एक प्रकारचें रेशमी वस्त्र किं० लुगडें. ३ह्या प्रकारच्या वस्त्राची चोळी.

सुरळीत [म० सरळ] वि० मध्यें विघ्नें, अडचणी, थांबणूक, इ०न येतां चाललेला (प्रवास, काम, अभ्यास, वाचन, वर्तन, इ०).

सुरक्षित [सं०] वि० चोर, नाश, अपहार, अव्यवस्था, इ० मुळें न बिघडलेला; पूर्वींच्याच स्थितींत असलेला; यथास्थित.

सुरा [अ० सूरा] पु० कुराणाचा खंड.

सुरा [सं० छुरी] पु० १ कापण्याचें शस्त्रविशेष. लहान जो सुरा त्याला 'सुरी' म्हणतात. २ एक प्रकारचा खंजीर.

सुरा [सं०] स्त्री० १ मद्य; दारू. २ पाणी अत्तर, तेल, इ० ठेवण्याचें आकारविशेषाचें पात्र; सुरई. ॐ **सुराप** वि० दारूचें व्यसन असलेला; दारू पिणारा. **सुरापान** न० दारू पिणें. **सुरामंड** पु० मद्याची साय.

सुराख [म० सु (चांगली)+राखणें] स्त्री० चांगली टेहळणी किं० देखरेख.

सुराखार, सुऱ्याखार पु० सोरा ह्या नांवाचा क्षार.

सुरांगना, सुराचार्य, सुरालय मागें ' सुर ' मध्यें पहा.

सुरी [सं० छुरी] स्त्री० पदार्थ कापावयाचें शस्त्रविशेष; लहान सुरा.

सुरुंग मागें ' सुरंग ' पहा.

सुरुवात, सुरुवात [अ० ' पुरूअ ' चें अ० व० पुरूआत] स्त्री० प्रारंभ; आरंभ.

सुरूं [अ० पुरूअ] वि० १ आरंभिलेलें. २ चालू असलेलें (काम). ॐ **सुरूघोडा** पु० प्रजोत्पादनार्थ ठेविलेला घोडा; वळू घोडा. **सुरूतहकूब** वि० एकदा सुरूं करून पुढें बंद केलेलें किं० बंद टाकलेलें (काम).

सुरू [फा० सर्व्] पु० एक प्रकारचें झाड. हें सदा हिरवें, उंच, सरळ, आणि माथ्याकडे निमुळतें होत गेलेलें असतें. फारशी कवि स्त्रीच्या शरीराला ह्या झाडाची उपमा देतात. ॐ **सुरूचा, सुरूदार** वि० सुरूच्या झाडासारखी (गुलाबदाणी, समई, इ०).

सुरूख मागें ' सुरक्या, सुरख्या ' पहा.

सुरूखुरू, सुर्खरू, सुरूखरू [फा० सुर्ख् (तांबडा)+रू (चेहरा)] वि०१(**शब्दशः**) तांबड्या तोंडाचा. २ (**लाक्षणिक**) तजेलेदार

३ उजळ तोंडाचा. ४ (**लाक्षणिक**) अंगावर आलेल्या दोषारोपापासून मुक्त झालेला. ५ (**लाक्षणिक**) पाप करून आपण निष्पाप आहों असें निर्लज्जपणानें सिद्ध करूं पाहणारा; निर्लज्ज; बेशरम. [सुंदर.

सुरूप [सं० सु (चांगलें) + रूप] **वि०**

सुरेख [सं० सु+रेखा] **वि०** सुंदर; रेखींव आकृतीचा. ॐ **सुरेखाई, सुरखाई, सुरेखी स्त्री०** सुंदरपणा; मोहकपणा.

सुऱ्या पु० कुरड्या, चकल्या, इ० करण्याचें सच्छिद्र पात्र.

सुऱ्या [म० सूर] पु० गवयाशीं सूर धरून साथ करणारा. पुढें ' सूरकरी ' पहा.

सुऱ्या खार [सं० सूर्य+म० खार] **पु०** एक क्षार.

सुलखणी [म० सुलखणें] **स्त्री०** सोनें पारखण्याची एक क्रिया. पुढें ' सुलाख ' पहा.

सुलखणें स० क्रि० संस्कारविशेष करून (सोनें) पारखणें. पुढें ' सुलाख ' पहा.

सुलटणें [म० सुलटा] **अ० क्रि०** सुलटा होणें. **स० क्रि०** सुलटा करणें.

सुलट, सुलटा वि० १ इष्ट किं० योग्य किं० अनुकूल दिशेस असलेला किं० चाललेला.२ज्याची आंतली बाजू आंत आणि बाहेरची बाजू बाहेर आहे असा. ३ नेहमींच्या रीतीनें किं० क्रमानें करावयाचें (काम); क्रमवार;शिस्तवार. **टीप,**– सर्व अर्थी ' सुलटा' ह्याच्या व्यावर्तकत्वें 'उलटा'.

सुलतान [अ० सुल्तान्] पु० १ पादशहा. २ अनियंत्रित रीतीनें किं० जुलमानें राज्य करणारा राजा किं० अंमलदार. ॐ **सुलतान ढवा पु०** १ हल्ला. २ अत्यन्त धाडसी पुरुष. **सुलताना स्त्री०** १ महाराणी. २ सुलतानाची पत्नी. **सुलतानी स्त्री०** १ अधिराज्य. २ जुलमी राजसत्ता. **अस्मानी सुलतानी** [**फा०** आस्मान्=आकाश; सुलतान्=बादशहा] **स्त्री०** दुर्दैवामुळें किं० राजाच्या दुष्टपणामुळें अंगावर कोसळलेलीं संकटें समुच्चयानें; हरएक प्रकारचीं संकटें समुच्चयानें.**सुलताना स्त्री०** द्राक्षाची एक जात. **सुलतानी कोस पु०** टिपू सुलतानानें रूढ केलेला कोस;हा सुमारें पांच मैल लांबीचा असतो.

सुलभ [सं०] **वि०** मिळवावयास किं० करावयास सोपें. मागें ' सु ' मध्यें पहा.

सुलक्षण [सं०] न० १ शुभ लक्षण; शुभ सुचविणारें कांहीं चिन्ह. २ सद्गुण. ३ शोभादायक चिन्ह. ॐ **सुलक्षण, सुलक्षणी वि०** १ चांगल्या किं० शुभ लक्षणांनीं युक्त (माणूस, पशु). २ सद्गुणी.

सुलाख [म० सराग्]पु० १ भोक (सामान्यतः). २ अग्नींत घालून तापवून कस पाहण्यासाठीं सोनार लोक सोनें, रुपें, इ० ना जी खळगी पाडतात ती (घालणें, पाडणें, टाकणें).

सुलाखणें [म० सुलाख] **स० क्रि०** सुलाख घालून (सोनें, रुपें, इ०) पारखणें. वर 'सुलाख' पहा. ॐ **सुलाखणी स्त्री०** सुलाख घालणें हा संस्कार.

सुलाखणें [म० लाख]**अ० क्रि०** दागिन्याच्या पोटांत घातलेली लाख (दागिना झिजल्यामुळें) उघडी पडणें.

सुलूक, सुळूख, सुलह् [अ० सुल्क्] **पु०** सख्य; दोस्ती.

सुंवरा मागें ' सुयरा ' पहा.

सुवर्ण [सं०] **वि०** १ चांगला आहे वर्ण (किं० तेज) ज्याचा असा. २ सोनेरी. ३ तेजस्वी. ४ सुंदर. ५ उत्तम जातकुळीचा. **न०** १ सोनें. २ द्रव्य. ३ नागचांफा. ॐ **सुवर्णकदली स्त्री०** सोनकेळ. **सुवर्णकार पु०** सोनार. **सुवर्णकेतकी स्त्री०** सोनकेवडा. **सुवर्णवर्णा स्त्री०** हळद. **सुवर्णकीटक पु०** काजवा. **सुवर्णमालिनी वसंत पु०** एक औषधी रांधा. **सुवर्णाभिषेक पु०** लग्नाच्या विधींत वधूवरांवर करतात तो जलांचा अभिषेक. ह्या जलांत सुवर्ण घातलेलें असतें.

सुवह [सं०] **वि०** सोसावयास किं० वहावयास सोपा. [ण्याची).

सुवा [म० सुई]पु० मोठी सुई (शिव-

सुवाच्य [सं०] **वि०** वाचावयास सोपें आणि स्पष्ट असें लिहिलेलें (अक्षर, पत्र).

सुवारा [म० सु+वारा] **पु०** १ अत्यल्प सुखसंबंध किं० सहवास; उ० मला नवऱ्याचा कधीं सुवारा नाहीं. २ गंधवार्ता;अत्यल्प सुगावा;

किं०तपास; उ० हरवलेल्या चंद्रहाराचा तुम्हाला सुवारा लागल्यास आम्हाला कळवा.

सुवार्ता [सं०] स्त्री० आनंदाची खबर किं० बातमी.

सुवाशीण (-न) [सं० सुवासिनी] स्त्री० जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री. मागें 'सवाशीण ' पहा.

सुवासिक [म० सु+वास] वि० सुगंधी.

सुवासिनी वर ' सुवाशीण ' पहा.

सुवाळा पु० शंभर दीडशे खंडींची वाहतूक करणारी फत्तेमारी (म्ह० एक प्रकारचें गलबत).

सुवाळीमवाळी [म० मवाळी] स्त्री० मृदु आणि गोड भाषण.

सुविद्य [सं०] वि० १ सुशिक्षित; चांगला शिकलेला; विद्वान्. २ समंजस; चांगला शहाणा.

सुविण [म० सु+विणें] स्त्री० प्रसूतिसमयींचीं कामें करणारी स्त्री. मागें ' सुईण ' पहा.

सुवेत [म० सु+वेत, विणें] न० न अडतां सुरळीत रीतीनें स्त्रीची प्रसूति होणें.

सुवेर [म० सु+वेळा] पु० कुटुंबांत कोणा मुलाचा जन्म झाल्यानें येतो तो विटाळ; जाताशौच. याच्या व्यावर्तकत्वें ' मृताशौच ' किं० ' सुतक. ' ॐ **सुवेरतुला** वि० सुवेराच्या विटाळाचा.

सुवेरणें [म० सुवेर] अ० क्रि० कुटुंबांत मुलाचा जन्म झाल्यामुळें विटाळाच्या स्थितींत असणें; सुवेरानें युक्त होणें.

सुवेळ [म० सु+वेळ] स्त्री० शुभ समय; चांगली वेळ.

सुशक, सुशक्य [म० सु+शकणें] वि० सहज किं० सुलभ रीतीनें करतां येईल असें (काम).

सुशिक्षित [सं०] वि०१चांगला शिकलेला. २ योग्य शिस्तीनें वागणारा.

सुशी [हिं० सूसी] स्त्री० रेशमाचे रुंद रुंद पट्टे ज्याच्या विणींत आहेत असें कापसाचें वस्त्र.

सुशी स्त्री० लहान मुलांच्या पोटांत होतो तो एक रोग. ' सुसें ' न० ह्याच अर्थी.

सुशील [सं०सु(चांगलें)+शील] वि०चांगलें आहे शील म्ह०वर्तन (किं० स्वभाव)ज्याचें असा.

सुशोभित [सं० सु+शोभित] वि० उत्तम प्रकारें शोभविलेला;शोभायुक्त;उठावदार केलेला.

सुश्रांतणें [म० सु (फार) + श्रांतणें] अ० क्रि० अगदीं दमणें किं० थकणें.

सुश्राव्य [सं०] वि० ऐकण्यास योग्य; कानाला गोड वाटणारें (भाषण, गायन, पुराण, निरूपण, इ०).

सुषमा [सं०] स्त्री० उत्तम शोभा.

सुषुप्त [सं०] वि०गाढ झोप ज्याला लागली आहे असा.

सुषुप्ति [सं०] स्त्री० गाढ झोप; जींत स्वप्नें पडलीं नाहींत अशी निद्रा. जागृति,स्वप्न, आणि सुषुप्ति, अशा देहाच्या तीन अवस्था आहेत.

सुषुम्ना [सं०] स्त्री० शरीरांतलि एक नाडी,-इडा आणि पिंगला ह्यांच्या मधील. मागें ' इडा, ' ' पिंगला ' पहा.

सुष्ट[सं०'दुष्ट'ह्या शब्दाच्या उलट मराठींत बनलेला शब्द] वि०दुष्ट नव्हे असा;सुशील; सद्वर्तनी.

सुसकार, सुसकारा नाकांतून जोरानें श्वास सोडणें (टाकणें, सोडणें).

सुसत क्रि० वि० सूसू असा आवाज करून.

सुसंबद्ध [सं०] वि० योग्य प्रकारें जुळणारें; संवादी; ज्याचे सर्व भाग किं० अवयव योग्य प्रकारें जुळलेले किं० जुळविलेले आहेत असें.

सुसर स्त्री० एक जलचर प्राणी; नक्र.

सुसर [सं० सु+सर (चालणारा)] वि० बोध करून किं० शिक्षा करून पुन्हा सद्वर्तनी करण्यांत आलेला (मनुष्य, पशु).

सुसह, सुसह्य[सं०]वि० सोसतां येईल असा.

सुसा पु० १ गुरांचा एक रोग. २ सोनार लोकांचें झारीसारखें एक भांडें.

सुसाट, सुंसाट क्रि० वि० जोरानें, झपाट्यानें, किं०आवाज करून (वारा वाहणें, घोडा धावणें, पक्षी उडणें, इ०). पु० आवेश, झपाटा, सोसाटा.

सुसाध्य [सं०] वि० सहज मिळवितां येईल असा; विशेष श्रमांवांचून साध्य करतां येईल असा.

सुसासा पु० वर ' सुसकारा ' पहा.

सुसूत्र [सं०] वि० १ नियमित; नियंत्रित.

२ योग्य मार्गानें चाललेलें (काम, भाषण, वर्तन, अभ्यास, इ०). ३ सरळ रेषेंत असलेले. **क्रि० वि०** योग्य मार्गानें; कांहीं विघ्नें न येतां किं० अडथळा न होतां.

सुसें न० लहान मुलांच्या पोटांत होतो तो एक रोग. वर ' सुशी ' पहा.

सुस्कार, सुस्कारा पु० मागें ' सुसकार, ' ' सुस्कारा ' पहा.

सुस्त, सुस्ता [फा०] वि० १ आळशी. २ फार जेवण झाल्यामुळें ज्याची हालचाल मंदावली आहे असा. ३ रेंगाळत काम करणारा(माणूस). ४ फाजिल सावकाशीनें चाललेलें (काम). ꠸ **सुस्ताई, सुस्ती स्त्री०** १ आळस. २ मांद्य. ३ संथपणा; दिरिंगाई.

सुस्तावणें [फा०सुस्त] अ० क्रि० आळसावणें. २ मंदावणें. ३ दिरिंगाईवर पडणें किं० टाकलें जाणें.

सुस्थ [सं०] वि० १ सुस्थितींत असलेला. २ ज्याला काळजी किं० विवंचना नाहीं असा. ३ नीरोगी.

सुस्थित [सं०] वि० आरामांत किं० शांतपणांत बसलेला किं० असलेला.

सुस्थिति [सं०] स्त्री० १संपन्नपणाची किं० समृद्धीची स्थिति;खाऊनपिऊन सुखी असण्याची स्थिति; चार पैसे संग्रहीं असण्याची स्थिति. २ आरोग्य.

सुस्नात [सं०] वि० १ यथाशास्त्र ज्यानें स्नान केलें आहे असा. २ यज्ञापूर्वीचें किं० नंतरचें स्नान.

सुहागी [हिं०] स्त्री० एक क्षार.

सुहीण स्त्री० मागें ' सुईण, ' 'सुविण' पहा.

सुहृत् (-द्) [सं०] वि० १चांगल्या अंतःकरणाचा. २ ममताळू. **पु०** मित्र.

सुहृदय [सं०] वि० १ प्रेमळ. २ रसिक.

सहेर, सुहेरणें, सुहेरतुला मागें ' सुवेर, ' ' सुवेरणें, ' ' सुवेरतुला ' पहा.

सुळकंडी इ० मागें ' सुरकुंडी ' इ० पहा.

सुळका पु० १ एकदम उंच झालेलें डोंगर, टेकडी, इ० चें शिखर. २ अणकुचीदार पदार्थ किं० पदार्थाचा अणकुचीदार भाग. ३ फारशा शाखा ज्याला नाहींत असा उंच वृक्ष. ४ दुहेरी चौकटीच्या दाराच्या आंतल्या चौकटीचों उभी लाकडें प्रत्येक. ह्या लाकडांवरची जी आडवी पट्टी तिला ' सुळकेपट्टी ' म्हणतात.

सुळकी स्त्री० पदार्थाचें अणकुचीदार टोंक.

सुळकुंबा, सुळकंबा, सुळखांब, सुळखुंबा [**म०** सूळ+खांब] **पु० १** बैलरहाटाच्या कणेकडाखालीं आंत तुंब भरून जो सूच्यग्र स्तंभ फिरावयाजोगा उभा केलेला असतो तो. २ सुळका.

सुळकेपट्टी वर ' सुळका ' मध्यें पहा.

सुळसुळाट पु० १ मुलें, उंदीर, घुशी, इ०ची कोणेक स्थळीं धावपळ,लगबग,किं०गोंधळ. २ढेकूण, पिसवा, माशा, इ० चें कोणेक स्थळीं वैपुल्य. ३ एकाद्या कुटुंबांत पडतो तो पाहुण्यांचा धबडगा.

सुळसुळीत वि० निसरडी (जमीन); घट्ट न नेसलेलें (धोतर); घट्ट न आवळलेलें (गांठोडें).

सुळा [सं० शूल; म० सूळ]पु०१अणकुचीदार दांत. २ अणकुचीदार खांब, खुंटा, खडक, दगड, इ०. ३गायी,म्हशी,इ० च्या अंगावर गोचिडासारखा चिकटून बसून रक्त शोषण करणारा एक कृमि. ४ कसई किं० कशेट नांवाच्या गवताचें बीज. ५ मोटेचें चाक ज्या आडव्या लाकडावर बसविलेलें असतें त्या लाकडाखालीं जो दोन उभे खांब असतात ते प्रत्येक. ६ शेकोटीसाठीं केलेला खळगा.

सुज्ञ [सं०] वि० १ विद्वान्. २ समंजस; जाणता; समजूतदार.

सू [म० सुई] स्त्री० शिवण्याची सुई (अडाण्यांचा शब्द).

सूं क्रि० वि० १ वेगानें; जोरानें. २ सूं असा आवाज करीत (बाण, धोंडा, इ० सुटणें). ꠸ **सूं बाल्या हाकणें** जोरानें आणि वेगानें पळून जाणें.

सू [सं० सु=प्रसवणें] वि० (उपपद तत्पुरुषाच्या अंतीं) जन्म देणारी; उ० वीरसू.

सूक [सं०शुक्र] पु० शुक्राची चांदणी; शुक्र हा ग्रह. हा ग्रह बुध आणि पृथ्वी यांच्या मध्यें सूर्याभोंवतीं फिरतो.

सूकर [सं०] पु० डुकर.

सूक्त मागें ' सु ' मध्यें पहा.

सूचक [**सं०**] **वि०** १ सुचविणारा; दर्शक; बोधक. २ चहाडखोर; निंदक. **पु०** १ हेर; दूत-विशेष. २ शिक्षक. ३ सूत्रधार. **न०** १ चिन्ह; खूण. २ इशारा.

सूचन न०, सूचना स्त्री०[**सं०**] १कोणेकाला कांहीं गोष्ट सुचविणें,कळविणें,किं०त्याच्या नजरेस आणून देणें. २ कोणेकाला जें कांहीं सुचविलें, सांगितलें, किं० कळविलें तें. ३ कोणेकाला विचार करण्यासाठीं त्याच्यापुढें आणलेली कांहीं गोष्ट.४ टोचणें; रोवणें. ५ अप्रत्यक्षपणें कथन. ६ इशारा. ७ गुप्त बातमी काढणें. ८ चहाडी.

सूचिका, सूची [**सं०**] **स्त्री०** १ टोचणें.२ सूई. ३ सळई. ४ पान, फूल, इ० च्या कळीचें टोक. ५ (**रणांगण**) सुईच्या आकाराची शिपायांची रचना. ६ (**भूमिति**) खालीं जाडी आणि वर बिंदुरूप टोक असलेली आकृति; शंकु. ७ ग्रंथाची अनुक्रमणिका. ८ ग्रंथांतील विषयांची यादी. ९ ग्रंथाचा उपोद्घातरूप भाग. १० ग्रहणांत पृथ्वीची वर्तुलाकार छाया किं० ह्या छायेचा एक भाग.११कोणताही निमुळता पदार्थ किं०आकृति.֎**सूचिभेद्य वि०** गहन,निबिड(अंधकार). **सूचीकटाहन्याय पु०**लहान आणि लवकर संपवितां येईल असें काम (सुई करण्यासारखे) मागून निघालेले असलें तरी तें अगोदर करून टाकून अगोदरचें मोठें काम (कढई घडविणें यासारखें) मागून करावें ही वर्तनाची अनुसरणीय रीति.

सूचित [**सं०** सूच्=कळविणें]**वि०** १ टोचलेलें; वेधलेलें; भोक पाडलेलें. २ सुचविलेलें; दिग्दर्शित केलेलें. **न०** जें सुचविलें तें. [**सं०**सु+उचित]**वि०** फार योग्य.

सूची [**सं०** सूचिन्] **वि०**(समासांतीं) सुचविणारें;दर्शविणारें;उ० हर्षसूची, दारिद्र्यसूची,इ०.

सूज [**सं०** श्वि=सुजणें] **स्त्री०** शरीर किं० शरीराचें हस्तपादादि गात्र यांवर शैत्यादि कारणानें किं० रक्ताच्या दोषामुळें उत्पन्न होतो तो फुगवटा.

सूंझ्या [**म०** सूं (वेगानें)+झ्या (घोड्याला हाकण्याचा शब्द)] **स्त्री०** पळून जाणें;पलायन.

सूट [**म०** सुटणें] **स्त्री०** १ बंधनापासून किं० नियंत्रणेंतून मुक्तता. २ सावकार, सरकार, ह्यांनीं कुळें, रयत, किं० मक्तेवाले ह्यांना माफ केलेली रकम. ३ गुलाम,नोकर, इ०ना मालकानें दिलेलें स्वातन्त्र्य. ४ दोन पदार्थांतील अंतर; मधली रिकामी जागा; उ० पाट मांडतांना एका विटीची सूट वस्स होईल. ֎ **सूट मोकळ स्त्री०** १ कांहीं काळापुरती कोणेकाला दिलेली मोकळीक. २ कर, सारा, व्याज, इ० बाबतींत दिलेली माफी. **सूटसाट, सूटसांड,सूटतूट स्त्री०** कर, सारा, व्याज, इ० बाबतींत सोडलेली किं० माफ केलेली रकम.

सूड [**सं०** शुध्] **पु०** १ चौकशी; तपास; पत्ता. २ गुंतागुंतीचा किं० घोटाळलेला हिशेब दुरस्त करून यथास्थित करणें. ३ गांवखतावणींतून काढलेला किं० घेतलेला उतारा. ४ ढोल इ० वाद्य वाजविण्याची एक फेर(झाडणें, मारणें). ५ कांहीं कामीं मारलेला एक तडाखा किं० एकदमानें केलेला भाग. ֎ **सूडबंद पु०** १ चौकशी, तपास, किं०शोध करून टांचणें किं० टिपणें ज्या कागदावर केलीं आहेत असा कागद.२ गांवखतावणींतील उताऱ्याचा कागद.**सूड घेणें** अपकाराची फेड करणें; वैर उगवून घेणें. ' सूड घेणें ' ह्याच अर्थीं.

सूत [**सं०** सूत्र] **न०** १ कापूस, रेशीम, लोकर, इ० चा धागा किं० दोरा. २ सोनें, रुपें, इ०ची बारीक तार. ३ लाखेची काढलेली तार.४ एका माणसाचा मैत्री, परस्पर साहाय्य करणें, इ० बाबतींत जो दुसऱ्याशीं संबंध असतो तो. ५ कोणेकाचें कोणेकाशीं असतें जें संधान तें. ६ मैत्री; सख्य; सलोखा. ७ दोन माणसांचा एकाविचारानें चालण्याचा जो क्रम तो. ८ वशीत्याची सांखळी (बांधणें). ९ फळें, लोणचें,इ० कुजलीं असतां त्यांत जें सुताच्या आकाराचें प्राणी पडतात ते प्रत्येक.१० विणलेल्या वस्त्राची वीण. ֎ **दोघांचें सूत असणें** त्यांच्यांत निकट मैत्रीचा संबंध असणें. **कोणेकाचें कोणेकाशीं सूत नसणें** त्याचा त्याच्याशीं मैत्रीचा किं०सलोख्याचा संबंध नसणें.**सुतानें सूत लागणें** एक गोष्ट शोधून काढल्यामुळें दुसरी समजणें; थोडासा सुगावा लागून एकादी गुप्त गोष्ट क्रमानें आणि ओघानें समजत

किं० उकलत जाणें. **सुतास लागणें, सुती लागणें,** किं० **सुतींपातीं लागणें** सुरळीतपणें चालू लागणें; उ० माझ्या मुलाला मी मास्तर ठेविल्यापासून त्याचे सर्व अभ्यास सुतास लागले. **सुतानें चंद्राला ओंवाळणें** महिन्याच्या शुद्ध द्वितीयेला वस्त्राचें सूत काढून तें चंद्राला अर्पण करून त्याचेपाशीं वस्त्राची समृद्धि मागणें. **सुतानें स्वर्गास जाणें** (किं० **चढणें**), **सुतानें स्वर्ग गांठणें** वस्तूचा यत्किंचित् सुगावा लागतांच वस्तूचें सर्व स्वरूप तर्कानें जाणणें. **कोणेकाच्या नाकीं सूत धरलेलें असणें** तो अगदीं मरणाच्या अवस्थेस पोंचलेला असणें. **टीप,**–प्राण जाण्याचा समय ठेपलेला असतां श्वासोच्छ्वास अति मंद चालतो. श्वासोच्छ्वास चालला आहे किं० नाहीं हें ठरविण्यासाठीं त्याच्या नाकपुडीपुढें सूत धरतात. तें हालल्यास श्वास चालत आहे आणि न हालल्यास प्राण गेला असें अनुमान करतात. **सुतानें स्वर्ग गांठणें** देशांतील प्रत्येक मनुष्यानें आपल्या पुरतें चरका, टकली, इ० साधनानें कापसापासून सूत काढल्यास तो देश स्वतंत्र होऊं शकेल म्ह० गुलामगिरींतून मुक्त होऊं शकेल. **सुताचा तोडा, सुतळीचा तोडा** पु० अत्यल्प किं० यत्किंचित् सुद्धां भाग (निषेधीं प्रयोग); उ० हा माझा प्रपंच माझ्या स्वताच्या कमाईचा आहे. यांत वडिलोपार्जित असा सुतळीचा तोडा नाहीं. **सुतास** (किं० **सुती** किं० **सुतींपातीं**) **चालणें** सुरळीतपणें चालू लागणें. **सूत बांधणें** वशीला लागणें. **कोणेकाला मूढभर सूत बांधणें** (किं० **देणें**) त्याला संमानपूर्वक पागोट्याचा नजराणा देणें. **सूतपाड पु०, न०** किंमत, विणकर, इ० बाबतींत वस्त्राचा दर्जा किं० योग्यता. **सूतपात, सूतपोत** पु० वस्त्राची वीण, सूत, सफाई, इ० गुण समुच्चयानें.

सूत [**सं०**] **पु०** १ सारथि. २ सुतार. ३ स्तुतिपाठक. ४ संजय. ५ क्षत्रिय पति आणि ब्राह्मण जातीची बायको यांचा पुत्र. **पु०, न०** पारा हा धातु. ❀ **सूतपुत्र, सूतज पु०** १ कर्ण,–अर्जुनानें ज्याला रणांत वधिलें. २ संजय. **सूतराज पु०** पारा,–एक धातु. (स्त्री).

सूत [**सं०**] **वि०** १ जन्मलेला. २ बाळंत झालेली.

सूतक [**सं०**] **न०** १ प्रसवणें; जन्म देणें. २ सुवेर,–कुटुंबांत मूल जन्मल्याचा विटाळ. ३ ग्रहणादिकांचें अशौच.

सूतशेखर [**सं०**] **पु०** एक औषधी मात्रा.

सूता, सूतका, सूतिका [**सं०**] **स्त्री०** बाळंतीण. ❀ **सूतागार, सूतिकागृह न०** बाळंतिणीची खोली.

सूति, सूती [**सं०**] **स्त्री०** १ प्रसवणें; जन्म देणें. २ जन्म. ३ संतति. ४ उत्पत्तिस्थान. ५ धान्यादींचें उगवणें. ६ सोमरस काढण्याचें स्थळ. ❀ **सूत्याशौच न०** सोयर; सुवेर.

सूत्र [**सं०**] **न०** १ दोरा; सूत; धागा. २ तंतु. ३ तार. ४ जानवें; यज्ञोपवीत. ५ कमरबंध. ६ संक्षिप्त, स्पष्टार्थक, आणि व्यापक असा नियम. ७ कांहीं काम किं० व्यवहार करण्याची सरणी किं० ठरलेला नियम. ८ व्याकरण, मीमांसा, वेदान्त, इ० विषयांवरील जे ग्रंथ त्यांतील अत्यन्त संक्षिप्त रूपांत घातलेलीं जीं वाक्यें तीं प्रत्येक. ह्या सूत्रांत मजकूर अति ठासून भरलेला असतो म्हणून त्यांवर भाष्यें, टीका, इ० ची जरूरी असते. ९ बाहुल्या इ० ची हालचाल दाखविण्यासाठीं जे दोरे गुप्तपणें ओढावयाचे असतात ते प्रत्येक. १० कांहीं काम करण्याची गुप्त खुबी किं० युक्ति. ११ नियम, सरणी (सामान्यत:). ❀ **सूत्रक वि०** १ बिनचूक किं० कळाशीदार काम करणारा (कारागीर). २ पाणसळ, ओळंबा, ह्यांत बरोबर (खांब, तुळई, भिंत, इ०). ३ यथास्थित, नीटनेटकें, बिनचूक, असावें तसें (सामान्यत:). **सूत्रधार पु०** १ नाटकांतील पात्रांची जुळणी करणें, पात्रांचीं कर्तव्यें ठरविणें, इ० कामें ज्याच्या आज्ञेनें चालतात तो मनुष्य. २ कोणत्याही कामाला सरणी लावणारा; कोणत्याही कामाची किं० संस्थेची जबाबदारी वाहणारा; शिस्त लावून देणारा. ३ बाहुल्यांच्या खेळांत गुप्त दोऱ्या ओढून बाहुल्यांच्याकडून हालचाली करविणारा इसम. **टीप,**–अर्थ २ आणि ३ मध्यें 'सूत्रधारी' सुद्धां. **सूत्रा, सूत्री वि०** १ टापटिपीचा; टापटिपीनें काम करणारा; कळाशीनें काम करणारा. २ कुशल; चतुर. ३ काम करण्यांत तल्लख.

सूद कल्याण पु० गायनांतील एक राग.

सूदणें [**सं०** सूद्] **स० क्रि०** ठार मारणें; वधिणें (कवितेंत रूढि).

सूदणें मागें ' सुदणें ' पहा.

सूदन [**सं०**] **न०** ठार मारणें; वधिणें (कवितेंत).

सून [**सं०**सूना=मुलगी] **स्त्री०** १ आपल्या मुलाची पत्नी. २ पुत्रस्थानीं असलेला जो पुतण्या त्याची बायको. ३ दिराच्या मुलाची बायको.✿ **सूनमुख, सुनमुख न०** लग्नाचा विधि संपून वरात घरीं आल्यावर सासूनें सुनेचें मुख पाहणें हा समारंभ.

सूनृत [**सं०**] **वि०** १ सत्य आणि प्रिय (भाषण). २ शुभ; मंगल. **न०** सत्य असून प्रिय असें भाषण.

सूप [**सं०** शूर्प] **न०** १ धान्य पाखडणें इ० च्या उपयोगाचें वेळूच्या पातीचें पसरट असें पात्र. २ वांगीं, मिरच्या, इ० च्या झाडांना ओढा इ० चें पाणी देण्याचें खोलगट आकाराची पाटी इ०. साधन. ✿ **भरल्या गाड्यास सूप जड नाहीं** ज्याला पुष्कळ भार वाहण्याचें सामर्थ्य आहे त्याला मर्यादेच्या भाराहून थोडासा अधिक भार वाह-ण्याचा प्रसंग आला तर तो खचत नाहीं किं०डगत नाहीं. **सूप फडफडणें** लग्न, मुंज, इ० मंगल कार्य समाप्त होणें. सर्व विधि आटोपला म्हणजे उपाध्या खरोखरींच एका समिधेनें सुपावर थापट्या मारून फडफड असा त्यांतून आवाज काढतो. **कोणेकाचें सुपाएवढें काळीज होणें** इष्ट वस्तु मिळाल्यामुळें तो अत्यन्त आनंदित होणें; मनोरथ सफल झाल्यामुळें त्याला परमावधीचा संतोष होणें.

सूप[**सं०**]**पु०**१भोजनांत,आमटी,इ०पातळ असें कांहींही तोंडींलावणें. २ आचारी; स्वयंपाकी.✿ **सूपकार पु०** आचारी. **सूपशास्त्र न०** भोजनाचे विविध पदार्थ कसे करावे हें ज्यांत सांगितलें आहे असा ग्रंथ.

सूय [**सं०** सूचि; **म०** सूई] **स्त्री०** १ सुई,– शिवण्याचें एक साधन. २ केळ, माड, इ० झाडांचें नवें कोंवळें पान.

सूर [**सं०**] **पुं०** १ सूर्य. २ पंडित.३ योद्धा.

सूर [**सं०** स्वर] **पु०** १ अखंड चाललेला मंजुळ ध्वनि. २ कोणताही अखंड आणि एक-सारखा चालत असलेला आवाज. ३ कंठाचें किं० वाद्याचें गायन किं० वादन चाललेलें असतां त्याच्याशीं साथ करण्यासाठीं जो एकसारखा आणि अखंड ध्वनि चालवितात तो (धरणें). ४ मुलानें रडण्याला केलेली सुरवात (काढणें). ५ विशिष्ट समयीं उजव्या किं० डाव्या नाकपुडीं-तून श्वासोच्छ्वास चालत असणें (वाहणें, लागणें, इ०). ६ कांहीं कामाला योग्य असा समय; कांहीं काम करण्याची प्रेरणा किं० इच्छा;प्रवृत्ति; कल; उ० आतां बाहेर पडण्यास माझा सूर लागत नाहीं; उ० माझा सूर लागेल तेव्हां मी तुझें काम करीन. ७ तर्क; अटकळ (वाहणें); उ० तुझा सूर काय वाहतो ? आज रामभाऊ येतील किं० नाहीं येणार ? **टीप**–विशिष्ट समयीं विशिष्ट नाकपुडींतून श्वास चालत असल्यास तो कांहीं संकल्पित कार्याला अनुकूल किं० प्रतिकूल समय मानण्यांत येतो. यावरून' सूर ' चे वरील-प्रमाणें ६आणि७हे दोन अर्थ व्यवहारांत रूढ झाले आहेत.८वाजंत्र्यांचें एक मुखवाद्य.यांतून एकच सूर साथ करण्यासाठीं काढला जातो.✿**सूर धरणें** १ गाणाऱ्या किं० वाद्य वाजविणाऱ्या माणसाच्या सुराशीं साथ करणें.२सूर देणें री ओढणें. **(पडसें, शैत्य, इ०मुळें) नाकाचे सूर बंद होणें** नाक चोंदणें.**सूर वाहाणें** शैत्यादि बरें झाल्यानं-तर पूर्वींसारखा अनियंत्रितपणें श्वासोच्छ्वास चालू लागणें.**सूर वाहणें**१तर्कात येणें;संभवनीयता किं० शक्यता असणें; रंग दिसणें; उ० मला नोकरी मिळण्याचा सूर वाहात नाहीं. २ प्रवृत्ति होणें;उ० मला मदत करावयाला तुझा सूर वाहात नाहीं काय ? **सूरकरी, सूरदास, सूरनीस पु०**री ओढ-णारा; गायक किं० वादक यांच्याशीं साथ कर-णारा. ह्या साथीला ' सूरभरणा ' **पु०**, ' सूर-भरणी ' **स्त्री०** म्हणतात. **सूरभरणी स्त्री०** अनेक वाद्यांच्या किं० गायकांच्या सुरांची एक-वाक्यता किं० संवाद. **सूरज्ञान न०** गायन किं० वादन ह्यांतील सुरांचें म्ह० स्वरांचें ज्ञान.

सूर [**सं०** सुरा] **स्त्री०** दारू; मद्य.

सूर पु० सुरपारंब्या ह्या खेळांत जी काठी

मुळें फेकतात ती. मागें 'सुरपारंबी (–बा,–ब्या)' पहा.

सूरण [**सं०** शूरण] पु० मागें ' सुरण ' पहा.

सूरपारंब (–बा,–ब्या) मागें ' सुरपारंबी (–बा,–ब्या) ' पहा.

सूरमर्द [**म०** शूर+ **फा०** मर्द् (माणूस)] पु० धाडसी किं० साहसी पुरुष.

सूर्य [**सं० पु०** १ आकाशांतील एक गोल,– ज्याच्या भोंवतीं बुध, शुक्र, भूमि, मंगळ, गुरु, शनि, इ० ग्रह फिरतात. सूर्याच्या उदयास्तां-वरून दिवस आणि रात्र हे कालभाग पडतात. २ हा गोल,–देवत्वच्या भावनेनें. ❀ **सूर्यउजेडीं क्रि० वि०** सूर्य प्रकाशत असतां; सूर्याच्या प्रकाशांत; दिवस मावळण्याच्या अगोदर. **सूर्यकन्या, सूर्यतनया स्त्री०** यमुना नदी. **सूर्यतनय पु०** राम. **सूर्यद्वार न०** उत्तरायण. **सूर्यपुत्र, सुर्यसूत पु०** १ सुग्रीव. २ कर्ण. ३ यम. ४ शनिग्रह. **सूर्यसारथि पु०** अरुण. **सूर्यकन्या स्त्री०**भाकरी. **टीप**,–' भास्कर ' (म्ह० सूर्य) ह्या शब्दांतील व्यंजनें' भाकरी 'ह्या शब्दांत असल्यावरून विनोदांत 'सूर्यकन्या' हा शब्द भाकरीला लावतात. **सूर्यकमळ न०** एक फुलझाड किं० त्याचें फूल. **सूर्यकांत पु०**उन्हांत धरला असतां ज्यांतून ठिणगी पडते असा एक पदार्थविशेष. **सूर्यग्रहण न०**सूर्यास लागतें तें ग्रहण,–पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्यें चंद्र हा सूर्याच्या आड आल्यानें उत्पन्न होतो तो देखावा.**सूर्यनक्षत्र न०**सूर्य ज्या नक्षत्रांत विशिष्ट-समयीं असतो तें नक्षत्र. **सूर्यनारायण पु०** सूर्य (देवत्वाच्या भावनेनें). **सूर्यपर्व** [**सं०** सूर्यपर्वन्] **न०** सूर्यग्रहण, व्यतिपात, सूर्यसंक्रांति, अमावास्या, इ० जीं पर्वें तीं प्रत्येक. **सूर्यपुट न०** सूर्याच्या उन्हांत कांहीं औषध कांहीं काळ ठेवणें हा वैद्यकी संस्कार. **सूर्यापुढें काजवात स्त्री०, सूर्यापुढें काजवा पु०** मोठ्याशीं लहानाची तुलना (हा मूर्खपणाचा प्रकार). **सूर्याचे घोडे (किं० पिलें किं० हरिणें) दाखविणें** मुलाचे कान धरून त्याला उंच उचलणें; मुलाच्या दोन कानशिलावर दोन तळहात दाबून त्याला हवेंत उंच उचलणें. **हा सूर्य आणि हा जयद्रथ** एकादें विशिष्ट कार्य घडावयाला ज्या दोन गोष्टींची अनुकूलता असावी लागते ती आतां आहे; कार्य घडावयाला आतां कांहीं अडथळा राहिला नाहीं. **सूर्यापोटीं शनैश्चर पु०** भाग्यशाली आणि पराक्रमी बापाचा मूर्ख आणि नादान मुलगा. **सूर्यवंशी वि०** सूर्य उगवल्यानंतर बऱ्याच वेळानें निजून उठणारा. **सूर्यवंशी क्षत्रिय पु०** हिंदूंची एक जात किं०त्या जातीचा इसम.**सूर्यमाला स्त्री०** सूर्याभोंवतीं फिरणारे ग्रह,–बुध,शुक्र,भूमि,मंगल, गुरु,शनि,इ०आणि धूमकेतु इ० समुच्चयानें. **सूर्यसंतान न०**१नीतिमान् बापाच्या पोटीं जन्मलेले मूर्ख मूल.२भाकरी. मागें 'सूर्यकन्या' वरील टीप पहा. **सूर्यवंश पु०** रघु,राम,इ०पुरुष ज्या कुळांत झाले तें कुळ.**सूर्यसूर पु०** उजव्या नाकपुडींतून सोडलेला श्वास. डाव्या नाकपुडींतून सोडलेल्या श्वासाला ' चंद्रसूर 'म्हणतात.**सूर्येन्दुसंगम पु०**दर्श;अमावास्या,–जेव्हां सूर्य आणि चंद्र हे दोन्ही पृथ्वीच्या एकाच बाजूस असतात. दोहोंच्यामध्यें पृथ्वी असतां पौर्णिमा असते.

सूळ [**सं०** शूल] **पु०**१ फाशीं देण्याचा खांब. २ चढण्यास कठिण असा डोंगर किं० पर्वताचा कडा. ३अगदीं उभें आणि चढण्यास कठिण असें झाड. ४ डोकें, पोट, सांधा, किं० कोणतेंही गात्र ह्यांत उठते ती बराच वेळ टिकणारी वेदना किं० अशा वेदना सतत उठत असण्याची व्यथा; पोटशूळ,मस्तकशूळ,इ०.५ भाल्यासारखें एक शस्त्र.६ मांस विस्तवावर भाजावयाची लोखंडाची सळई. ❀ **सुळीं द्यावयाची वेळ स्त्री०**ऐन मध्यान्हाचा समय,– जेंव्हां सूर्याच्या उन्हाचा ताप अत्यन्त असह्य असतो. ❀ **सूळघेणा (–ण्या) वि०** करावयाला अति कठिण किं० त्रासदायक किं० जिकीरीचें (काम). **सूळवांध पु०** चढणीची आणि अरुंद पायवाट.

सूक्ष्मना स्त्री०एक नाडी.मागें'सुषुम्ना'पहा.

सूक्ष्म [**सं०**] **वि०** १ बारीक. २ लहान. ३ अत्यन्त बारीक; अणकुचीदार. ४ अति बारीक म्हणून दिसावयास किं० समजावयास कठिण. ५ नाजूक; तलम (वस्त्र, सूत). ६ अत्यन्त थोडा किं० लहान. **पु०** १ परमाणु. २ निवळीचें बीज. **न०** १ परब्रह्म. २ अध्यात्म. ३ (**साहित्य**) एक अर्थालंकार. दुसऱ्याचा गूढ अभिप्राय नेत्र,

मुद्रा, इ० चिन्हांवरून जाणून जर कोणी आपल्या मनांतलि अभिप्राय अशाच चिन्हांनीं व्यक्त केला तर सूक्ष्म हा अलंकार होतो. विशेष तपशील, उदाहरणें, इ० आमचें ' अर्थालंकारांचें निरूपण' या पुस्तकांत पहा. ❀ **सूक्ष्मदर्शी** [**सं०** सूक्ष्मदर्शिन्] **वि०** १ अति बुद्धिमान्. २ ज्याला पदार्थांचे अति गूढ किं० बारीक गुणधर्म समजतात तो. ३ दुसऱ्याच्या कारभारांत लक्ष्य घालणारा (निंदेंत). ४ फाजिल बारकाईनें गुणदोष पाहात बसणारा (निंदेंत). **सूक्ष्मदेह पु०, सूक्ष्मशरीर न०** लिंगदेह. मागें 'लिंग' अर्थ १४ पहा. मागें 'लिंग' मध्यें ' लिंगदेह,' ' लिंगशरीर ' पहा. **सूक्ष्ममान न०** अत्यन्त तंतोतंत असें काल, विस्तार, इ० चें माप किं० परिगणन. **सूक्ष्मवाद पु०** आत्मा एकाच परमाणूच्या रूपाचा आहे असें मत. याच्या व्यावर्तकत्वें ' स्थूलवाद. ' **सूक्ष्मबुद्धि स्त्री०** तल्लख बुद्धि. **वि०** तल्लख बुद्धीचा (मनुष्य).

सृजणें [**सं०** सृज्=उत्पन्न करणें] **स० क्रि०** उत्पन्न करणें (कवितेंत उपयोग).

सृष्ट [**सं०**] **वि०** निर्मित; उत्पन्न केलेलें. ❀ **सृष्टपदार्थविज्ञान न०** सृष्टींतलि पदार्थांचे गुणधर्म इ० संबंधाचें शास्त्र.

सृष्टि [**सं०**] **वि०** १ जगांतील सर्व पदार्थ समुच्चयानें. २ जगाची उत्पत्ति. ३ जन्म. ४ उत्पन्न करण्याची क्रिया. ५ संतान. ६ देणें. ७ त्याग. ❀ **सृष्टिक्रम पु०** जगाची राहाटी; ऐहिक जीवन. **स्वप्नसृष्टि स्त्री०** स्वप्नांत पाहिलेला देखावा; स्वप्नांत जें दिसलें तें.

सेक [**सं०**] **पु०** १ पाणी, दूध, इ० शिंपडणें. २ जें शिंपडलें तें. ३ वीर्योत्सर्ग. ❀ **सेकपात्र न०** १ झारी.
[इ० पहा.
२ पोहोरा.

सेक, सेकडा, इ० मागें ' शेक, ' ' शेकडा, '

सेचन [**सं०**] **न०** १ पाणी इ० शिंपडणें ही क्रिया. २ ठिबकणें; पाझरणें. **सेचनी स्त्री०**
[इ० पहा.
पोहोरा; बालदी.

सेचाळ, सेज, इ० मागें ' शेचाळ, ' ' शेज, '

सेतु [**सं०**] **पु०** १ बांध; धरण; बंधारा. २ पूल. ३ हद्दीचा दगड. ४ खिंड. ५ नीति, धर्म, इ० ची मर्यादा किं० नियंत्रणा. ६ ओंकार. ७ रामेश्वरास आहे तो सेतु. ❀ **सेतुबंध पु०** रामानें लंकेस जावयासाठीं समुद्रावर बांधला तो पूल.

सेंदाड इ० मागें ' शेंदाड ' इ० पहा.

सेना [**सं०**] **स्त्री०** १ फौज; सैन्य; लढणारे शिपायी, त्यांचीं शस्त्रास्त्रें, त्यांचें सामान, घोडे, हत्ती, इ० समुच्चयानें. २ मुलें, मुंग्या, माशा, इ० चा चालता किं० स्थिर समुदाय. ❀ **सेनासंवेश पु०, सेनासंवेशन न०** लष्करी ठाणें. **सेनांग न०** सैन्यांतील हत्ती, घोडे, रथ, आणि पायदळ, हीं प्रत्येक. **सेनाध्यक्ष, सेनाधिपति पु०** सैन्याचा मुख्य अधिकारी. **सैनापत्य, सैनाधिपत्य न०** सेनापतीचा अधिकार, हुद्दा, किं० कार्यक्षेत्र. **सैनिक वि०** लढाऊ; सैन्यासंबंधाचा. **पु०** लढणारा शिपाई. **सेनानी, सेनानायक, सेनापति पु०** सैन्याचा मुख्य अधिकारी. **सेनांगचतुष्टय न०** वरचा हत्ती, घोडे, रथ, आणि पायदळ, हीं सैन्याचीं चार अंगें समुच्चयानें. **सेनाचर पु०** सैन्याच्या बरोबरचे बिन लढवय्ये लोक ते व्यक्तिशः किं० समुच्चयानें. **सेनाभार पु०** सैन्य; फौज. **सेनाखासखेल** [**सं०** सेना+**अ०** खास्+**अ०** खेल्] **पु०** गायकवाड सरकारचा किताब. **सेनासरखेल पु०** पेशव्यांनीं आंग्रे ह्यांना दिलेला किताब.

सेप, सेपकिडा, सेपूट, इ० मागें ' शेप, ' ' शेपकिडा, ' ' शेपूट, ' इ० पहा.

सेवक [**सं०**] **पु०** सेवा करणारा; चाकर; नोकर. २ देव, साधु, इ० चा भक्त, किं० अनुयायी, किं० चाहता.

सेवणें [**स०** सेव] **स० क्रि०** १ (कोणेकाची) सेवा, भक्ति, उपासना, नोकरी, इ० करणें. २ (ओषध, पाणी, अन्न, इ०) खाणें किं० भक्षिणें. ३ (मार्ग, सरणी, बोध, इ०) अनुसरणें किं० अवलंबिणें.

सेवन [**सं०**] **न०** १ चाकरी; नोकरी; सेवा. २ भक्ति. ३ पूजा; उपासना. ४ आचरणें. ५ उपभोग. ६ आसक्ति. ७ एकाद्या ठिकाणीं वारंवार जाणें. ८ पाणी, अन्न, औषध, इ० खाणें किं० भक्षिणें. ९ तंबाखू, गांजा, इ० चा उपभोग. १० सुई, दोरा, इ० नीं शिवणें. ११ मानवी शरीरांतील सात बंध किं० शिवणीं प्रत्येक, —गुदापासून शिश्नापर्यंतची एक, जिभेखालची एक, आणि इतर ठिकाणच्या पांच.

सेवनीय [सं०] **वि०** १ भोगण्यास किं० खाण्यास योग्य (औषध, पाणी, खाद्य, इ०). २ अनुसरावयास योग्य (मार्ग, उपदेश, शिस्त, इ०). ३ नोकरी करून घेण्यास योग्य.

सेवा [सं०] **स्त्री०** १ नोकरी; चाकरी. २ भक्ति; उपासना. ३ खुशामत. ❀ **देशसेवा स्त्री०** आपल्या देशाचा उत्कर्ष, संपत्ति, इभ्रत, इ० वाढविणें आणि टिकविणें ह्या संबंधाचें जें आपलें कर्तव्य तें. **सेवाधर्म पु०**दुसऱ्याची नोकरी करणें. **सेवेकरी पु०** खंडोबा, नरसोबा, इ० ची सेवा करण्यासाठीं त्या त्या देवस्थानीं जाऊन राहिलेला भक्त.

सेवाळ, सेवाळणें,इ० ' शेवाळ, 'शेवाळणें, ' [इ० पहा.

सेवित [सं०] **वि०** अवलंबिलेला, अनुसरलेला (मार्ग); खाल्लेलें (औषध, अन्न, पाणी, इ०); सेवा ज्याची केली आहे असा (यजमान); योजलेला (उपाय); कोणत्याही इंद्रियानें उपभोगिलेला (पदार्थ).

सेव्य [सं०] **वि०**ज्याची सेवा करावयाची तो (देव, यजमान, स्वामी). सेवा करणारा तो जो सेवक.

सैतान [स० पैतान्] **पु०** १ देवाचा शत्रु. २ (**लाक्षणिक**)कोणीही भयंकर कृत्यें करणारा माणूस. ३ अत्यंत मोठा, अवाढव्य, जगडव्याळ असा कोणताही पदार्थ.

सैती न० फेकून मारावयाचें एक शस्त्र. या शस्त्राला दोरी बांधलेली असून तें परत ओढून घेऊन पुन्हां शत्रूवर फेकतां येतें.

सैदोन [फा०] **पु०** एक प्रकारचा नगारा.

सैंधव [सं०] **वि०** १ सिंधुनदीसंबंधाचें. २ समुद्रासंबंधाचें. **पु०**१ जयद्रथ हा भारती युद्धांतील वीर. २ घोडा. **पु०, न०** शेंदेलोण नांवाचें मीठ.

सैंधवी स्त्री०(**संगीतांत**) एक रागिणी.

सैनाधिपति, सैनाध्यक्ष,सैनापत्य, सैनिक, इ० मागें ' सेना 'मध्यें पहा.

सैन्य [सं०] **न०** १ फौज. २ पहारेकरी. ३ (**लाक्षणिक**) मुलें, माकडें, गुरें, इ०चा समूह. ❀ **सैन्याध्यक्ष पु०** सैन्यावरचा मुख्य अमलदार.

सैंपाक [सं० स्वयंपाक] **पु०** भात,भाकरी, भाजी, इ०भोजनार्थ सिद्ध करणें किं० अशा रीतीनें सिद्ध केलेले पदार्थ समुच्चयानें. **सैंपाकघर न०** घराच्या ज्या भागांत भोजनार्थ पदार्थ सिद्ध करण्यांत येतात तो भाग. **सैंपाकी पु०** सैंपाक करणारा. **सैंपाकीण स्त्री०** सैंपाक करणारी स्त्री.

सैफ [अ०] **पु०** १ तरवार. २ कट्यार.

सैयद [अ० सय्यिद] **पु०** बिबी फातिमेच्या वंशांतील इसम. मागें ' सयद ' पहा.

सैर [अ०] **स्त्री०** आरामासाठीं किं० स्वच्छ हवा खाण्यासाठीं उघड्या हवेंत हिंडणें (करणें).

सैर पु० चोरी करणें हाच ज्यांचा चरितार्थाचा धंदा अशा लोकांची एक जात किं० त्या जातीचा कोणी इसम.

सैर [सं० स्वैर] **क्रि० वि०** मोकळेपणानें; अनियंत्रितपणें; स्वच्छन्दानें. ❀ **सैरावैरा क्रि० वि०** आकस्मिक भयामुळें अव्यवस्थितपणें अनेकांनीं अनेक दिशांस एकदम (पळत सुटणें).

सैरट, सैराट वि० १ स्वच्छंदी; अनियंत्रितपणें वागणारा. २ मूर्ख; अजागळ; बावळट.

सैरंध्री [सं०] **स्त्री०** १ अंत:पुराची दासी. २ परगृहीं काम करणारी स्वतंत्र स्त्री.

सैरिक [सं०] **वि०** १ नांगर चालविणारा (माणूस). २ नांगर ओढणारा (बैल).

सैल [सं० शिथिल] **वि०** कमी घट्ट (बंधन); ढिली झालेली (गांठ); सुसह्य (शिस्त, कायदा, नियम); मोकळा, अनियंत्रित (पशु, माणूस); खिळखिळा झालेला (सांधा, जोड). ❀ **कोणेकाला सैल सोडणें** त्याला स्वच्छंदानें वागूं देणें; त्याच्यावरची कडक नियंत्रणा कमी कडक करणें.

सैलावणें [म० सैल] **स० क्रि०** (घट्ट जें बंधन तें) कमी घट्ट करणें; (कडक जी शिस्त ती) कमी कडक करणें; (गांठोडें इ० ला मारलेली गांठ)ढिली करणें. **अ० क्रि०** कमी होणें; कमी कडक होणें; ढिला किं० खिळखिळा होणें.

सैली[**हिं०**]**स्त्री०**फकीर इ०गळ्यांत माळेप्रमाणें घालतात तो खाल,नाडी, इ० सारखा पदार्थ.

सैंवर [सं० स्वयंवर] **न०** स्वताला स्वताच पति ठरविणें (अशिक्षितांत किं० कवितेंत). ' स्वयंवर ' चा अपभ्रंश.

सैसद क्रि० वि० १अखंड प्रवाहानें;मध्यें खंड न पडूं देतां; न थांबतां.२लांब ओळीच्या रूपांत.

सैंह [सं०] वि० सिंहासंबंधाचें; सिंहाचें.

सोइरा, सोइरगत, इ० पुढें'सोयरा'इ०पहा.

सोई, सोय स्त्री० १ परिस्थितीची अनुकूलता; स्थळ आणि काळ ह्यांचें औचित्य; कांहीं गोष्ट शक्य होण्याचा संभव; उ० ह्या कचेरींत तुला नोकरी देण्याची सोय नाहीं.२ व्यवस्थितपणा; शिस्त; योग्य अनुक्रम किं० मांडणी किं० रचना; उ० तुम्ही सोईनें बसलां तर सर्वांचा समावेश या खोलींत होऊं शकेल. ३ कांहीं कार्याला जरूर जी साधनसामग्री, उपकरणें, इ० तीं मिळण्याची शक्यता किं० संभव; उ० ह्या घरांत पाण्याची सोय नाहीं. ॐ **सोयीनें घेणें** उगीच घाई न करणें. येथें ' घेणें' अ०क्रि०. **सोयीसोयीनें क्रि० वि०** परिस्थितीची अनुकूलता असेल त्याप्रमाणें.**सोय पाहील तो सोयरा** आपल्याशीं सोयीनें वागेल तोच आपला सोयरा (नाहीं तर तो परका).**सोयीवार, सोयीसार, सोइस्कर वि०** सोयीला येईल असें. **सोयसुमार पु० ए०व०** १परिस्थितीची अनुकूलता; प्रसंगाचें औचित्य. २योग्य नियंत्रणा; शिस्त. ३ योग्य धोरण; समंजसपणा.

सोएर, सोएरतुला, इ० मागें ' सुवेर, ' ' सुवेरतुला, ' इ० पहा.

सोकट पु० वाळविलेला बोंबील नांवाचा मासा. मागें ' सुकट ' पहा.

सोंकटी, सोंगटी स्त्री०, सोंकटें, सोंगटें न० १ एका विशेष प्रकारच्या खेळासाठीं खालीं सपाट, आणि वर घुमटाकार जें लाकूड किं० हस्तीदंत यांचे कातून गुळगुळीत केलेले तुकडे घेतात ते प्रत्येक. ह्या खेळांत चार चार तुकडे एका रंगाचे असे चार रंगांचे मिळून सोळा तुकडे असतात.२ भोजनाच्या पंक्तींत किं० कथा, पुराण, सभा, इ० प्रसंगीं असेच तुकडे उदबत्त्या खोंचण्यासाठीं ठेवतात ते प्रत्येक. ॐ **सोंगटी कांठी वि०**सोंगटीच्या आकाराची वीण ज्याच्या कांठांत आहे असें (वस्त्र). **सोंगटी घाटी वि०** खेळावयाच्या सोंगटीच्या आकाराचें (मोतीं इ०). **सोंगटीबाज वि०** सोंगट्यांचा खेळ खेळण्याचें ज्याला व्यसन आहे असा.

सोकणें, सोकावणें मागें ' सवकणें ' पहा.

सोकरा पु० मुलगा. **सोकरी स्त्री०** मुलगी.

सोकरें न० मूल.

सोकळ वि० फोडणें,तोडणें,कातणें, कापणें, इ० ला सोपा (दगड, लाकूड, इ०).

सोकील,सोकेल,सोकींव[म०सोकणें]वि० कांहीं गोष्ट करण्याला सवकलेला. मागें'सवकणें' पहा.

सोक्त वि० गंजिफांच्या खेळांत बारा पानांपैकीं एकही पान दुसऱ्याच्या हातांत राहिलें नाहीं असा जो रंग होतो तो.

सोख, सोखणें मागें ' शोष, ' 'शोषणें'पहा.

सोंग न० १नाटक,तमाशा, इ० मध्यें कोणेकानें करावयाला घेतलेली भूमिका.२ ही भूमिका करणारा माणूस. ३ कोणत्याही प्रसंगीं दुसऱ्या माणसाचें केलेलें अनुकरण.४ कोणताही बनावट किं० नकली पदार्थ. ५ विचित्र, तऱ्हेवाईक, किं० चमत्कारिक पेहेराव केलेलें माणूस; विचित्रपणें सजविलेला पशु, पदार्थ, इ०. ६ कोणेकाला न साजणारा किं० शोभणारा सरंजाम;उ० आम्हांसारख्या भटभाईना टांग्याचें सोंग कशाला ? आमचे पाय दहा मैल चालावयाला खंबीर आहेत. ७ खोट्याची बतावणी; बाहाणा; रिकामा देखावा.ॐ**सोंगढोंग पु० ए० व०**खोटा आविर्भाव;खोट्याची बतावणी;खोट्याचा देखावा. **सोंगसंपादणी स्त्री०** करावयाला घेतलेली जी भूमिका तिला अनुसरून जें वर्तन किं० भाषण तें.**सोंगाड्या, सोंगाडी,सोंगाळ्या, सोंग्या वि०**१सोंग घेणारा; नाटक, तमाशा, इ० प्रसंगीं विशिष्ट भूमिका घेणारा. २ ढोंगी; बहाणा करणारा. **वेडीचें सोंग घेतलें म्हणजे पाटाव फाडावा लागतो** खोट्याची बतावणी करणें सोपें नाहीं,प्रसंगीं नुकसानही करून घ्यावें लागतें. **रात्र थोडी सोंगें फार** वेळ थोडा आणि कर्तव्यें पुष्कळ (हा पंचायतीचा प्रसंग होय). **सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं** सर्व स्थितींची बतावणी करतां येते परंतु श्रीमंतीची करतां येत नाहीं. आपली जी स्थिति नाहीं तिचा देखावा करणें शक्य आहे परंतु जवळ पैसे

नसतां आपण पैसेवाले आहों असा खोटा डामडौल करतां येत नाहीं किं० केला तरी तो फार वेळ कायम ठेवतां येत नाहीं.

सोंगद, सोंगण [फा० सवगंद्] **स्त्री०** शपथ (घेणें, खाणें, वाहणें).

सोंगळ [सं०सुमंगल] **वि०** १ओंगळपणा,अस्पृश्यांचा विटाळ, उच्छिष्टाचें भक्षण, इ०ची ज्याला खंत आहे असा किं० अशी खंत असल्याचा जो डौल मिरवितो तो. २ चोखंदळा; चिकित्सेखोर.

सोगा पु० नेसलेलें धोतर किं० लुगडें किं० अंगावर घेतलेलें उपरणें, शेला, इ० चा मोकळा सुटलेला पदर.

सोजी [सं० शुचि] **स्त्री०** १ तांदूळ फोडणीस टाकून किं० तव्यावर परतून त्यांचा केलेला भात,–जो उपहारार्थ ओंवळ्यानें खावयास हरकत नसते.२ गव्हाचा मैदा. ३ गव्हाचा रवा किं० ह्या रव्याची खीर.

सोज्वल, सोज्वलित [सं० उज्वल] **वि०** १ स्वच्छ. २ चकचकित. ३ पवित्र; निष्पाप.

सोट [म० सोटा] **पु०** १ ज्याला विशेष शाखा नाहींत आणि जो सरळ आणि उंच आहे असा वृक्ष. २ खूप जाडी आणि लांब असें लाकूड किं० अशी तुळई किं० खांब. ३ कोणतीहि फार जाडी नाहीं अशी उंच रचना,–मनोरा, दीपमाळ, इ० रूप. ४ कठिण चढणीची घांटी किं० जिना.५विद्याविहीन आणि अगडबंब असा माणूस. ६ज्याला (किं० जिला) कुटुंबाचे पाश(मुलेंबाळें इ० रूप) नाहींत असा (पुरुष) किं० अशी (स्त्री). **सोटगा पु०,सोटगें न०**१ लहान सोटा. २ सोटा (तुच्छतेंत). **सोटशिंग पु०** वयानें मोठा असून अद्यापि अविवाहित आहे असा पुरुष. **सोटबहिरव, सोटभैरव, सोटबहिरी वि०** अगडबंब आणि खोडकर किं० व्रात्य मुलगा किं० पुरुष.**सोटा दुपट्टा पु० ए०व०**१प्रवासास निघालेल्या माणसाचें अत्यल्प सामानसुमान,–एक सोटा आणि एक उपरणें ह्या रूपाचें. २ अत्यन्त लहान संसार,–थोडक्या भांड्याकुंड्यांवर किं० सामानासुमानावर चालविलेला.**सोटेपान्हवण न०** आंबोण पुढें ठेविलें तरी जी पान्हवत नाहीं, आणि म्हणून जिला सोटे मारून पान्हवावी लागते अशा गायीचें किं० म्हशीचें पान्हवण. **सोटेपीर, सोटेवारगीर, सोटेभैरव, सोटभैरव सोटसुंभ, सोटेसुलतान पु०**१ लठ्ठ,उंच, आणि अगडबंब माणूस. २ दांडगेश्वर. ३ सडाफटिंग; सडेसोट. **सोटेबरदार पु०** कोणा बड्या अमलदाराचा शिपायी किं० पट्टेवाला. **सोटेबाजी स्त्री०** मुलांचा एक खेळ. **सोटेशाई, सोटेशाही स्त्री०** दांडगाईचें वर्तन.

सोटळणें, सोटाळणें [म० सोटा] **अ० क्रि०** (व्यालेल्या गायीम्हशींच्या) पोटांतून पाण्याची पिशवी बाहेर पडणें.

सोटा [हिं० सोंटा] **पु०** १ लांब आणि जाडी लाकूड,–हातांत घेणें, खांब करणें, निशाण बांधणें, शीड उभारणें, इ०च्या उपयोगाचें. २ व्यालेल्या गायीम्हशींच्या पोटांतून पाण्याची पिशवी बाहेर पडते ती. **टीप,**–संयुक्त शब्द वर 'सोट' मध्यें पहा.

सोड [म० सोडणें] **स्त्री०** १ कर्जाऊ रकमेंत सावकारानें दिलेली सूट (देणें). २ नियंत्रणा घालावयाचा हक्क असून नियंत्रणा न घालणें.३स्वैर वर्तनास मुभा. ॐ **सोडखत, सोडचिट्टी** खालीं ' सोडणें ' मध्यें पहा.

सोंड [सं० शुंडा] **स्त्री०** १ पाणी, खाद्य, इ० तोंडांत घालण्याचें आणि वास घेण्याचें हत्तीचें साधन. २ मोटेचें पाणी ज्या अवयवांतून बाहेर पडतें तो अवयव. ३ जिना, घाट, इ० च्या दोन बाजूंस ज्या उतरत्या कठड्याच्या भिंती असतात त्या प्रत्येक. ४पर्वत, टेकडी, इ० पासून जी खडकाची ओळ दूरवर गेलेली असते ती. ॐ **सोंडका पु०** बैल, घोडा, इ०च्या पाठीवर कंठाळ, पडशी, इ० ठेवावयाची असतां तिच्या खालीं दोन उशांच्या रूपाचा जो पदार्थ ठेवितात तो. **सोंडगादी स्त्री०** पालखी वाहाणारे भोई खांद्यावर पालखीच्या दांड्याखालीं ठेवितात ती गादी. **सोंडदोर (–रा)** [म० सोंड+दोर, दोरा] **पु०** मोटेच्या सोंडेस लाविलेली दोरी. **सोंडवादी, सोनवादी स्त्री०** मोटेच्या सोंडेस जी लांब दोरी असते तिला जोडलेली जी मोटेच्या तोंडाची वादी ती.

सोड, सोडण [म० सोडणें] **न०** असोल्या

नारळ सोलला असतां त्याचें जें कवच निघतें तें
किं० ह्या कवचाचे जे तीन तुकडे निघतात ते
प्रत्येक. ह्यांतील तंतूंचा काथ्या करतात.

सोंडका वर ' सोंड ' मध्यें पहा.

सोडणूक [म० सोडणें] **स्त्री०** १ सोड-
ण्याची क्रिया. २ मोकळें करणें. ३ तोडणें किं०
वियुक्त करणें. ४ पंचायतीच्या वेळीं कांहीं सब-
बीवर निसटून जाण्याची पूर्वी करून ठेविलेली
युक्ति किं० योजना.

सोडणें स० क्रि० १ बंधनांतून किं० नियंत्र-
णेंतून मुक्त करणें. २ (गांठोडें इ०तील पदार्थ)
दिसतील असें करणें. ३ (गांठ, पक्कड, बंधन,
इ०) काढणें किं० काढून टाकणें किं०नष्ट करणें.
४(पाणी इ०च्या प्रवाहाला)गति देणें.५(पाण्याच्या
नळांतून) पाणी बाहेर पडावें ह्यासाठीं चाप,
चावी, किं० किल्ली फिराविणें. ६ (कर्ज, व्याज,
सारा, इ०ची रक्कम) माफ करणें. ७ (कोणेकानें
कांहीं व्यवहारांत घातलेली शर्त) परत घेणें. ८
(वास, वारा, ध्वनि, इ० च्या गतीस) मोकळीक
देणें. ९ (घोडा, बैल,गाय,म्हैस,इ०ना) दांव्यांतून
मोकळें करून फिरावयास नेणें किं० कामास
लावणें. १० (बंदूक, तोफ, इ०) उडविणें. ११
टाळणें; वगळणें; हिशेबांत किं० गणनेंत न घेणें.
टीप,–धातूच्या ' ऊन ' प्रत्ययान्त रूपापुढें
' सोडणें ' आल्यास त्या धातूची क्रियापूर्ण किं०
समाप्त करणें असा अर्थ होतो; उ० हें काम एक-
दाचें करून सोड (म्ह० संपवून टाक).

सोडधाव [म० सोडणें+धावणें] **स्त्री०**
चुकारतट्टूपणानें काम करण्याचा प्रकार. कामांत
टंगळमंगळ.

सोडपत्र [म०सोडणें+पत्र]**न०** कांहीं हक्क,
रक्कम, वसूल, व्याज, इ०माफ केलें अशा अर्थाचा
कागद किं० चिठ्ठी. **सोडखत न०**, **सोडचिट्ठी**
स्त्री० ह्याच अर्थी.

सोडमुंज [म० सोडणें+मुंज] **स्त्री०** मुंज
झालेल्या मुलाच्या कंबरेस असते ती मुंज (गव-
ताची दोरी) सोडून टाकण्याचा संस्कार.

सोडवण [म० सोडणें, सोडविणें] **स्त्री०**
नियंत्रणा, बंधन, कर्तव्य, जबाबदारी, काम, इ०
तून कोणेकाची जी सुटका ती; मोकळीक.

सोडवणी [म० सोडणें+पाणी] **न०** बाग,
मळा, इ० तील झाडांस पाटानें दिलेलें पाणी.
कारंजें, घागर, पोहोरा, शेलणें,इ०नीं घातलेल्या
पाण्याच्या व्यावर्तकत्वें.

सोडवणी, सोडवणूक[**म०**सोडविणें]**स्त्री०**
१ मुक्त करणें किं० मोकळीक देणें ही क्रिया. २
आपल्या डोक्यावरची जबाबदारी वहावयाला
दुसऱ्या कोणाची तरी सिद्धता; उ० माझा मुलगा
ही मला सोडवणूक आहे म्हणून संसाराचीं कामें
मी रेटूं शकतों, नाहीं तर मला एकट्याला संसार
चालवितां आला नसता. ३ आपल्या कामांत
मदत करणारा कोणी माणूस;आपलें हित चिंति-
णारा किं० आपल्याबद्दल खटपट करणारा किं०
वशीला घालणारा माणूस.

सोडविणें [**म०** ' सोडणें ' चे प्रयोजक]
स० क्रि० १ कांहीं बंधन, जबाबदारी, कर्तव्य,इ०
तून(कोणेकाला)मोकळें करणें किं०करविणें.२(गुंत-
लेला दोरा) उकलणें; (डोईच्या केशांच्या
जटा) मोडणें. ३ (कोणेकाची) वचनांतून
किं० प्रतिज्ञेतून मुक्तता करणें. ४ (अडकलेला
किं० गुंतलेला हात, पाय, बोट, वस्त्र, इ०)
बाहेर काढणें किं० मोकळें करणें;(कांटेरी झाडांत
अडकलेलें वस्त्र इ०) कांट्यापासून मुक्त करणें. ५
(गहाण पडलेला पदार्थ) सावकाराला पैसे भरून
किं० सावकाराची प्रार्थना करून परत आपल्या
कबज्यांत घेणें. ६ भिंत, जमीन, इ० वर शोभे-
साठीं (फुलें, रंग, इ०) लावणें किं० पसरणें. ❀
सोडवून ठेवणें झालेल्या कराराचा भंग झाल्यास
येणारा जो टपका तो न येईल अशी अगोदरच
तजवीज करून ठेवणें. **उदाहरण सोडणें** तें न
करणें किं० वगळणें.**उदाहरण सोडविणें** तें योग्य
सरणीनें करून त्याचें योग्य उत्तर देणें किं०
त्याचा उलगडा किं० विवरण करणें.

सोडसांड [**म०** सोडणें+सांडणें] **स्त्री० ए०**
व० वादाच्या किं० तंट्याच्या बाबतींत दिलेली
किं० पथकरलेली माफी किं० सोसलेली हानि.

सोंडसोळ पु० विहिरींतून पाणी काढाव-
याच्या घागर, पोहोरा, इ० ला ज्या दोरीचा
फास घालतात ती दोरी.

सोड्याळ [**म०** सोडणें] **वि०** खाद्य,पेय,

वस्त्र, इ० पदार्थांत ज्याला यत्किंचित् अमंगलपणा पथकरत नाहीं असा माणूस; चिकित्सेखोर; चो-खंदळा.

सोत, सोंती [सं० सूति=उत्पत्तिस्थान] **स्त्री०** गाय, म्हैस, इ० चें जननेंद्रिय; निरण.

सोतरणें, सोताडणें, सोतारणें स० क्रि० झोडपणें, झोडपून काढणें (अशिक्षितांत रूढि).

सोत्कंठ [सं०] **वि०** अति उत्कंठित.

सोदर, सोदर्य, सोदरीय [सं०] **वि०** सारखा; सदृश..**पु०** सख्खा भाऊ.

सोदा, सोद्या [हिं०] **पु० १** रंगेल गडी; विलासी माणूस. २ लुच्चा; लफंगा; ठग; फसव्या. ॐ **सोदाई, सोदेगिरी, सोदेशाई स्त्री०** लबाडी; लुच्चेगिरी; फसवेगिरी. **सोदावें न०** लबाडीचीं किं० लफंगेपणाचीं कृत्यें समुच्चयानें.

सोधणें मागें ' शोधणें ' पहा.

सोन ओळख [म० सोनें+ओळख] **स्त्री०** दसऱ्याचे दिवशीं सोनें(आपटा इ०झाडांचीं पानें) देण्याघेण्याइतकी ओळख; अल्प ओळख; केवळ तोंडओळख.

सोनकळी [म० सोनें+कळी] **स्त्री०** स्त्रियांचा एक गळ्यांत घालावयाचा दागिना. याला ' चांफेकळी ' असेंही म्हणतात.

सोनका वर ' सोंड ' मध्यें ' सोंडका ' पहा.

सोनकाव (-ऊ) [म० सोनें+काव] **स्त्री०** कावेची एक जात. मागें ' काव ' पहा.

सोनकावळा [म० सोनें+कावळा] **पु०** भारद्वाज नांवाचा पक्षी.

सोनकुला, सोनुकला, सोनक्या [म०सोनें] **पु०** मूल (प्रेमानें).

सोनकेळ स्त्री० केळीची एक जात.**सोनकेळें न०** ह्या केळीचें फळ.

सोनगादी स्त्री० मागें 'सोंड'मध्यें'सोंडगादी' [पहा.

सोनखत, सोनखात [म० सोनें+खत]**न०** शेत इ० ला मनुष्याच्या विष्टेचें घालतात तें खत.

सोनचडी, सोनचिडी, सोनचेड (-डी) **स्त्री०** दोरीवर चालणें, उड्या मारणें, इ० कामें करणारी डोंबाऱ्याच्या खेळांतील मुलगी.

सोनचांपा (-फा) [म० सोनें+चांफा; सं० चंपक]**पु०** चांफ्याच्या झाडाची एक जात. **सोनचांपें** (-फें) **न०** ह्या झाडाचें फूल.

सोनटका (-क्का) **न० १** एक फुलझाड. २ प्राचीन काळचें एक सोन्याचें नाणें. ३ (**लाक्षणिक**) सोन्याच्या रूपाचा ऐवज. ४ (**लाक्षणिक**) थोडेसे पैसे.

सोनताव पु० १ घोड्याच्या खुराला कांहीं रोग झाला असतां तापलेल्या तव्यावर तो खूर ठेवून त्याचेवर थंड पाणी ओततात.अशा रीतीनें त्या खुराला जो ताव म्ह० शेक देतात तो. २ सोनें अग्नींत तापवून तें पाण्यांत न विझवितां हवेंत ठेवून थंड करणें हा संस्कार (देणें). ३ (**लाक्षणिक**) कोणेकावर केलेला शिव्यागाळींचा वर्षाव; त्याची काढलेली भोसडपट्टी(देणें,बसणें).

सोनदोर (-रा)मागें 'सोंडदोर(-रा)'पहा.

सोनपावडा [म० सोनें+पाय, पाव] **पु०** दुर्दैवी आणि दारिद्री माणूस.

सोनपितळ [म० सोनें+पितळ] **न०** अत्यन्त चकचकीत असा पितळ हा धातु.

सोनफळ स्त्री० भाताची एक जात.

सोनवणी [म० सोनें+पाणी] **न०** सोन्याचा तुकडा पाण्यांत घालून त्या पाण्याला आधण आणून तें पाणी निवल्यावर बाळंतिणीस किं० आजाऱ्यास प्यावयास देतात तें; लाल तापविलेला सोन्याचा तुकडा पाण्यांत विझवून तें पाणी बाळंतिणीस किं० आजारी माणसास प्यावयास देतात तें.

सोनवादी मागें 'सोंड' मध्यें'सोंडवादी' पहा.

सोनवेल [म० सोनें+वेल] **स्त्री० १** भाताची एक जात. २ एक वेल. हिला ' अमरवेल, ' ' आकाश वेल ' अशीं अन्य नांवें आहेत. ३ मेंढ्यांचा कळप (मेंढ्यांचा कळप बाळगल्यानें खूप पैसा मिळतो अशा संभावनेनें). ४ नागवेली (ह्या लावून पिकाविणें हा फायदेशीर धंदा अशा समजुतीवरून).

सोनसळा वि० १ पिवळ्या जातीचा गहूं. २ पिंगट वर्णाचे (केश). ३ पिवळ्या काठ्या ज्याच्या विणींत आहेत असें (वस्त्र,-लुगडें, पितांबर, इ०). ४ पिवळ्या रंगाचा (घोडा).

सोना, सोन्या [म० सोनें] **पु०**मूल,-प्रेमांत.

सोनामुखी [हिं० सूनामुकी] **स्त्री०** भुईतरवडाचा पाला.

सोनार [सं० सुवर्णकार] पु० १ सोनें,रुपें,
इ० चे दागिने किं० पदार्थ करणाऱ्या कारागि-
राची जात किं० त्या जातीचा इसम. २ चिक्कू
किं० कंजूष. ३ एक पक्षी. ❀ **होणार सोडील**
पण सोनार सोडणार नाहीं दैव चुकेल किं०
टळेल पण सोनार सोनें चोरणें हें कधीं सांड-
णार नाहीं;दैव आपला भाग सोडील पण सोनार
सोडणार नाहीं. **सोनारानें कान टोचणें** घरच्या
माणसांनीं कोणा माणसाला दिलेली ताकीद त्याला
रुचत नाहीं पण तिऱ्हाइतानें किं० जबरदस्तानें
दिलेली ताकीद मुकाट्यानें ऐकिली जाते. **सोना-**
रकी स्त्री० सोनाराचें काम किं० धंदा. **सोनारी**
कावा पु० सोनाराची लबाडी. **सोनारडा** पु०
सोनार(तुच्छतेंत).**सोनारी मत** न० आपलपोटे-
पणाची प्रवृत्ति.

सोनी स्त्री० एक रागिणी.

सोनें [सं० सुवर्ण] न० १ एक उंची धातु.
ह्याचा रंग पिवळा असतो. सोन्याला कळकणें,
गंजणें, विटणें, इ० विकार होत नाहींत. २ दस-
ऱ्याच्या दिवशीं आपटा, शमी, इ० चीं पानें
परस्परांस हिंदू लोक देतात तीं. ३ (लाक्षणिक)
कोणतीही मूल्यवान वस्तू किं० उंची दर्जाची
वस्तु. सोन्यासारखी संधी म्ह० अमूल्य संधी;
सोन्यासारखा दिवस म्ह० ज्याचा फायदा
करून घेतां येईल असा दिवस; भाग्यानें प्राप्त
झालेला दिवस. सोन्यासारखें आयुष्य म्ह० देवानें
दिलेलें अमूल्य असें मानवजीवित. ह्याच सरणीनें
इतर शब्दसंहतींचे अर्थ विद्यार्थ्यांनें करावे. ❀
एकाद्याचें सोनें होणें मृत्यु आल्यामुळें त्याच्या
हालअपेष्टा चुकणें; त्याचें दुःख संपणें. **एकाद्या**
स्त्रीचें सोनें होणें वृद्ध पतीच्या अगोदर तिला
मरण आल्यामुळें तिची वैधव्यदशा टळणें. **एका-**
द्याच्या घरांत सोन्याचा धूर निघत असणें
तो अतिशय श्रीमंत असणें. **सोन्याचा दिवस**
पु० अतिशय सुखाचा किं० आनंदाचा दिवस.
कोणेकावर सोन्याचा पाऊस पडणें त्याला
अकस्मात् मोठा लाभ होणें किं० अलोट संपत्ति
प्राप्त होणें. **कोणेकाचे सोन्यानें दांत किसलेले**
असणें तो अतोनात श्रीमंत असणें. **सोन्याहून**
पिवळें होणें अति उत्तम गोष्ट होणें; मोठी बहार
होणें; जें इष्ट तें अनायासें हातीं येणें;
जें पाहिजे होतें तेंच प्राप्त होणें. **सोनें**
नाणें, सोनें वानें न० ए० व० दागिने,
पैसा, इ० सर्व मूल्यवान जिनसा समुच्चयानें;
उ० आम्ही सोनें नाणें (किं० सोनें वानें)जमी-
नींत पुरून टाकून झोपडींत राहावयास गेलों.
सोन्याचा दिवस पु० आनंदाचा दिवस;
भाग्यानें प्राप्त झालेला दिवस. **सोनेरी** वि०
सोन्याचें पाणी ज्यावर चढविलें आहे असा
(दागिना, डबा, इ०).**सोनेळ, सोनेळें** मागें
' सोनकेळ, ' ' सोनकेळें ' पहा. **सोन्याचें हाड**
न० जो सदा सर्वदा वैभवाच्या स्थितींत आयुष्य
घालवूं शकतो असा माणूस.

सोप पु०, न०, **सोपट** न० १ केळ, चवई,
इ० च्या बुंध्याचें साल. २ बैलाच्या गळ्यांतील
घांट बांधावयाची दोरी,–जी बहुधा केळीच्या
सालीची वळलेली असते.❀**सोपट्या** पु० उसाच्या
गुऱ्हाळांत पिळून काढलेलें ऊस बाहेर काढणारा.

सोपटणें अ० क्रि० किडकिडीत होणें; वाळणें;
(कोणेकाचीं)हाडें निघणें.

सोपटें न० मागें ' सोंगटी ' पहा.

सोपणें, सोपाविणें स० क्रि० १ (माणूस,
पशु, पदार्थ) कोणेकाच्या हवालीं करणें किं०
ताब्यांत देणें. २ कोणेकावर (कांहीं कामाची
जबाबदारी) टाकणें.❀**सोपींव** वि० दुसऱ्याच्या
हवालीं केलेलें किं० दुसऱ्याच्या जबाबदारीवर
टाकलेलें.**सोपींव खातें** न० हिंदुस्तानच्या राज्य-
व्यवस्थेंतील जें खातें हिंदी दिवाणाकडे सोपविलेलें
असतें तें. [न राहाणें.

सोपणें अ० क्रि०समाप्त होणें; संपणें; अवशेष

सोपस स्त्री० अति लोभ; अधाशीपणा;अतृप्ति.

सोपस वि० अत्यन्त नाजूक,—ज्याला
यत्किंचित् इजा, कष्ट, ऊन्ह, वारा, शीत, इ०
मुळींच सहन होत नाहीं.

सोपस्कर [सं० स (सहित)+ उपस्कर
(द्रव्य, सामग्री)] वि० सर्व सामान, सामग्री,
उपकरणें, साधनें, इ० नीं सज्ज, सिद्ध, किं०
तयार (घर, मांडव, सभागृह, खाद्य, पेय, इ०).

सोपस्कार [सं० स (सहित) + उपस्कार
(दागिने, कपडे, शस्त्रें, सामान, इ०)] वि०

हरएक प्रकारचीं साधनें, शोभेचे पदार्थ, मसाले, उपकरणें, इ०नीं युक्त,शृंगारलेलें,किं०तयार केलेलें (घर, मांडव, शरीर, सैन्य, खाद्य, इ०).पु० अ० व० रुचि, शोभा, उठाव, इ० आणणारे जे पदार्थ, मसाले, दागिने, उपकरणें, शस्त्रें, इ० ते; उ०एका दिवसांत लग्न व्हावयाचें, मग मांडवाला झालरी,झुंबरें,छतें,इ०सोपस्कार कशाला पाहिजेत? उ० सारे सोपस्कार केले तरी साखरभाताची भट्टी बिघडली. ॐ **सोपस्कारानें क्रि० वि०** सर्व सामग्री, उपकरणें, मसाले, इ० चा उपयोग करून; काळजीपूर्वक; मेहनत घेऊन. **जिवाचे सोपस्कार करणें** स्वताला सुखदायक किं० शोभादायक दागिने, कपडे, खाद्यें, पेयें, इ० चा उपयोग करणें. **कोणेकाचे सोपस्कार करणें** (किं० **लावणें**) त्याच्या सुखाला, आरामाला, किं० शोभेला जरूर असें जें कांहीं तें त्याला देणें किं० पुरविणें.

सोपा वि० जें करावयाला श्रम पडत नाहींत असें (काम); जें समजावयाला फारशी बुद्धि चालवावी लागत नाहीं असें (वाक्य, ग्रंथ, श्लोक, इ०); जो चालावयाला, अनुसरावयाला, किं० अवलंबावयाला श्रम,कष्ट,धोका,इ०ची जरूरी पडत नाहीं असा (मार्ग, औषध, युक्ति, वर्तन, इ०); सुलभ; सुकर; सुसाध्य.

सोपा [अ०सुफ्फा] **पु०** १ मुख्य वरापासून कांहीं अंतरावर बांधलेलें साधें घर (नोकरांसाठीं किं०दळण, कांडण, इ० साठीं, किं० सर्पण, गवत, इ० साठीं). २ ओटा. ३ घराच्या मधल्या चौकाच्या बाजूस जीं दालनें असतात तीं प्रत्येक.

सोपाट न० मागें ‘ सोपट ’ पहा.

सोपाधि, सोपाधिक [**सं०** स (सह)+ उपाधि+क (प्रत्यय)] **वि०** १ मर्यादित. २ विशिष्ट. **सोपाधिक पु० (न्याय)** एक हेत्वाभास. [जिना.

सोपान [**सं०**] **न०** १ पायरी. २ शिडी;

सोपारा [**सं०** सोपा] **वि०** सुलभ; सुकर; सुसाध्य; सुबोध.वर ‘सोपा’ **वि०** सर्व अर्थीं पहा.

सोपें न० १ शाईच्या दौतींत घातलेला फडक्याचा बोळा. २ गरज लागेल तेव्हां शाई करण्यासाठीं शाईंत भिजवून वाळवून ठेविलेली चिंधी,—जी पाण्यांत टाकिली असतां शाई तयार होते.

सोप्ती पुढें ‘ सोबती ’ पहा.

सोबकणें मागें ‘ चुबकणें ’ पहा.

सोबकणें अ० क्रि० जमीन इ० वर जोरानें पडणें, आपटणें, कोसळून पडणें, किं० ढासळणें.

सोंवट, सोमट वि० किंचित उष्ण (पाणी, दूध, आजाऱ्याचें अंग, इ०).

सोंवटी स्त्री० मागें ‘ सोंकटी,’ ‘सोंगटी’ पहा.

सोबणी स्त्री० पिशाच स्त्रीची बाधा झाल्यामुळें जो क्षयरोग जडतो तो.

सोबणी [**फा०** चुबनी] **स्त्री०** १ पातळ भाजी,आमटी,इ०खाद्यें ताटांत इकडे तिकडे वाहूं नयेत म्हणून ताटाखालीं सारतात तें लाकडाचें टेंकण. २ पात्रांतील पातळ पदार्थ (तेल, तूप, दूध, इ०) एका बाजूस गोळा होऊन सांचावा म्हणून खालीं दुसऱ्या बाजूस जें टेकण लावितात तें. ३ पात्रावर झाकण ठेवावयाची फळी, ताट, तवक, इ०.

सोबत [अ० सुहृबत] **स्त्री०** १ संगत; सहवास; साहचर्य. २ मित्र; दोस्त; बरोबर असणारा माणूस. **श० यो० अ०** सह; सहवर्तमान; बरोबर;उ०ह्याच पत्रासोबत पावती पाठविली आहे.

सोबती पु० १ मित्र; दोस्त. २बरोबर असणारा माणूस. ३ जोडीदार; बरोबरीचा; प्रतिस्पर्धी. ह्या दोन्ही अर्थीं ‘ सोबतीण ’ हें **स्त्री०**. ॐ **सोबतसंगत स्त्री० ए० व०** सुखासाठीं किं० भयनिवारणासाठीं बरोबर असलेला माणूस किं० माणसें समुच्चयानें; उ० सोबत घेतल्यावांचून तूं रात्रीच्या वेळीं वडगांवला जात जाऊं नको. **सोबतीवेल्हाळ वि०**१ सहवासाला योग्य. २ मित्राची आवड ज्याला फार आहे असा. **सोबतीसंगती पु०** जोडीदार; दोस्त.

सोभत वर ‘ सोबत ’ सर्व अर्थीं आणि सर्व वाक्प्रचारांतर्गत पहा.

सोम [**सं०**] **पु०** १ सोमलता. २ सोमलतेचा रस. ३ अमृत. ४ चंद्र. ५ इडा ह्या नांवाची शरीरांतील नाडी. ६ अष्ट वसूंपैकीं एक. आप, ध्रुव, सोम, धर किं० धव, अनिल, अनल, प्रत्यूष, आणि प्रभास, हे अष्ट वसु. ७ कुबेर. ८ यम. ९ शंकर. १० उत्कृष्ट (समासाच्या

उत्तरपदीं); उ० नृसोम म्ह० मोठा वैभवशाली माणूस; ❀ **सोमाह, सोमवार, सोमवासर** पु० आदित्यवाराच्या पुढचा आणि मंगळवाराच्या मागचा आठवड्याचा दिवस. **सोमोद्भवा** स्त्री० नर्मदा नदी. **सोमकान्त** पु० चंद्रप्रकाशांत ठेविला असतां ज्यांतून जलाच्या किं० अमृताच्या धारा निघूं लागतात असा एक कल्पित मणि. ह्याला ' चंद्रकांत ' असेंही म्हणतात. **सोमनाथ** पु० बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. मागें ' ज्योति ' मध्यें हीं बारा ज्योतिर्लिंगें पहा. **सोमपुत्र** पु० बुध हा ग्रह. **सोमसूत्र** न० शिवाच्या लिंगावरचें अभिषेकाचें पाणी ज्या मोरींतून बाहेर काढून लाविलें असतें ती मोरी. **सोमसूत्री प्रदक्षिणा** स्त्री० शिवाच्या अभिषेकाचें पाणी ज्या मोरींतून बाहेर काढून लाविलेलें असतें ती न उल्लंघितां शिवलिंगाला घातलेली प्रदक्षिणा. ह्या प्रदक्षिणेंत साध्या प्रदक्षिणा आडीच होतात. **सोमयाग** पु० एक यज्ञ,–ज्यांत सोमलतेचा रस पितात. ह्या यज्ञ करणाऱ्याला ' सोमयाजी ' म्हणतात. **सोमवती** स्त्री० सोमवारीं आलेली अमावास्या ही तिथि. ह्या दिवशीं स्त्रिया एकशेआठ फळें किं० दुसरें कांहीं एकशेआठ पदार्थ वडाच्या झाडाला अर्पण करून नंतर वाटतात. **सोमवल्ली, सोमलता** स्त्री० जींतून सोमरस ठेचून पिळून काढतात ती वल्ली किं० वनस्पती. **सोमवंश** पु० कृष्ण ज्या कुळांत जन्मला तें कुळ. **सोमवंशी** पु० हिंदूंची एक जात किं० त्या जातीचा इसम. **सोमवाऱ्या तेली** पु० तेल्यांची एक जात. ह्या जातींचे तेली सोमवारीं घाणा चालवीत नाहींत.

सोमट,सोमळ वि०किंचित् उष्ण(पाणी,दूध, अंग, इ०).

सोमल, सोमलखार [अ० सुमाल्कार्] पु० एक जहर विष.

सोमाजी सकलकळ्या म० [सर्व कलांत निष्णात असा एक कवि] पु० १ कुशल, हुशार, आणि हरहुनरी असा कोणीही माणूस. २(विपरीत लक्षणेनें) कोणीही मूर्ख आणि बढाईखोर माणूस.

सोमासा, सोमोसा पु० कंठी, चंद्रहार, इ० दागिन्यांचे पदर ज्या एका कडींत गुंतविलेले असतात ती कडी.

सोमाळा वि० किंचित् कोंबट (पाणी, दूध, इ०).

सोय, सोयकर मागें ' सोई ' मध्यें पहा.

सोयरगत [म० सोयरा+गति] स्त्री० विवाहाच्या संबंधामुळें उत्पन्न झालेलें नातें.

सोयरा [सं० स्वीय] पु० १ लग्नाच्या संबंधामुळें झालेला जो नातलग किं० आप्त तो; वरपक्षीय आणि वधूपक्षीय जे लोक ते परस्परांचे सोयरे. २ कलावंतीण,नर्तकी,किं० गाण्याचा धंदा करणारी जी स्त्री तिनें कामविकाराच्या शांतीसाठीं बाळगलेला असतो तो पुरुष. ❀ **सोयराधायरा** पु० सोयरा, इष्टमित्र, इ० जे ते प्रत्येक. **सोयरें माणूस** न० कोणीही नातलग माणूस. **सोयरी** स्त्री० कोणेकाची राख; रखेली. **सोयरीक** स्त्री० विवाहसंबंध किं० ह्या संबंधामुळें उत्पन्न झालेलें नातें.

सोर स्त्री० आकारविशेषाचें मृत्तिकापात्र.

सोरंजन, सोरंजनमिश्री स्त्री० सुरंजन ही औषधी वनस्पति.

सोरट, सोरटाई, सोरटी पुढें ' सोरठ ' इ० पहा.

सोरटी स्त्री० भाताची एक जात.

सोरठ [हिं० सोरठाह्] पु०, स्त्री० गायनांतील एक राग.

सोरठ [सं० सौराष्ट्र] पु० १ वायव्यदिशेकडील एक देश.२ कोणीही दांडगेश्वर. ❀ **सोरठाई** स्त्री० दांडगाई; धटिंगणपणा. **सोरठी** वि० सुराष्ट्र देशासंबंधाचा.

सोरमीठ न० सूर्याखार.

सोरा पु० १ सांध्यानें जोडलेलीं दोन लाकडें निघून न यावीं म्हणून बांबूची किं० लाकडाची जी खिळ दोहोंतून घालतात ती. २ उसाचा रस कढविण्याच्या काहिलीखालीं सर्पणाची राख भरण्याचा खळगा. ३ ह्या काहिलीखालच्या विस्तवाचा धूर मोकळ्या हवेंत सोडण्यासाठीं जें भोक ठेविलेलें असतें तें.

सोरा,सोऱ्या पु०कुरड्या करावयाचें सच्छिद्र पात्र.

सोल न० कोकंब्याचें वाळविलेलें साल;आमसूल; आमसोल.

सोल पु० जाडी दोरी किं० चऱ्हाट. ❀

सोलखंड न० १ सोल किं० सोलाचा तुकडा. २ दोऱ्यांची रास.

सोलणें [म० साल] स० क्रि० १ (फळ, झाड, इ० ची) साल किं० त्वचा, नखें किं० शस्त्र ह्या साधनांनीं काढणें किं० काढून टाकणें. २ (शेंगा इ० चीं) टरफलें उकलून आंतील दाणे काढणें. ३ (प्राण्याच्या शरीराची त्वचा) काढणें.

सोलवणी [म० सोल+पाणी] न० आमसुलाचें पाणी,–खाद्य,पेय,जे पदार्थ त्यांची चव वाढविण्यासाठीं घालतात तें.

सोला, सोलाणा [म० सोलणें] पु० टरफलांतून सोलून बाहेर काढलेले जे हरभरे, वाल, इ० ते प्रत्येक.

सोलींव [म० सोलणें] वि १ टरफलांतून सोलून काढलेले (दाणे). २ पहिल्या दर्जाचा म्ह० अट्टल (चोर, भामटा, लफंगा इ०). ❀ **सोलींव दरिद्री** वि० अत्यन्त दरिद्री (माणूस). **सोलींव दारिद्र्य** न० अठरा विसवे म्ह० पराकाष्ठेचें दारिद्र्य.

सोंग पु० अ० व० दारिद्र्य, संपत्ति, आजार, नाजूकपणा, इ० चा लबाडीनें केलेला म्ह० खोटा देखावा किं० आविर्भाव (करणें,मांडणें, लावणें). ❀ **सोंगाड्या** वि० ढोंग करणारा.

सोवन, सोवनं न० घरांतला धूर बाहेर जाणें, बाहेरचा उजेड किं० हवा आंत येणें, ह्यासाठीं छप्पर, भिंत, इ० मध्यें ठेविलेलीं असतात तीं भोकें प्रत्येक.

सोंवळ वि० किंचित् उष्ण (पाणी, दूध, इ०). वर ‘ सोमट ’ पहा.

सोंवळा [सं० सुमंगल] वि० १ भोजन देवपूजा, इ० कर्मांना जितकें पावित्र्य किं० शुचितां पाहिजे असते तितकी ज्याची आहे असा (माणूस, वस्त्र, पाणी, इ०). २ (**लाक्षणिक**) लाच खाणें शक्य असून ज्याणें लाच खाल्ला नाहीं, आजूबाजूचे लोक लाच खात असतां जो लाच खात नाहीं, मित्रमंडळी दारू, व्यभिचार, गांजा, इ० व्यसनें करीत असतां जो त्यापासून अलिप्त राहिला आहे असा. ३ वपन झालें आहे जिचे अशी (विधवा). ‘ सोंवळी होणें ’ ‘ सोंवळी करणें ’ असे प्रयोग होतात. ४ सम्प्रवर नव्हेत अशीं कुटुंबें (लग्न ठरवितांना). ५ लुटारू, चोर, इ० ना सरकारनें हाकलून देऊन सुरक्षित केला आहे असा (मार्ग, रस्ता, इ०). ❀ **सोंवळी गोंबाई** स्त्री० फाजिल सोंवळेपणा करणारी स्त्री; सोंवळपणाची ऐट मिरविणारी स्त्री (निंदेंत).**टीप,**–गोंबाई ही काशींतील एक शुद्ध आणि पवित्र देवी आहे. **सोंवळें** न० जेवण, देवपूजा, इ० प्रसंगाला योग्य असें वस्त्र. **सोंवळें** न० देवपूजा, भोजन,इ०ला योग्य अशी पवित्रपणाची स्थिति.

सोवागी एक क्षार; सवागी.

सोव्हाळा, सोहाळा पु०१ लग्न, गर्भाधान, इ० जे शोभन संस्कार ते प्रत्येक. २ आनंदाचा प्रसंग किं०उत्सव. ३ परिस्थितीनें किं० दैवयोगानें कोणेकाच्या भोगास आलेला सुखाचा किं० दुःखाचा प्रसंग; उ० सरकारचा पाहुणचार घेण्याचा सोहोळा त्याचेवर तीन वेळां आला (म्ह० तो तीन वेळां कैदेंत गेला).

सोशा वि० जोराचा, सोसाट्याचा(वारा)·

सोशी खालीं ‘ सोस ’ मध्यें पहा.

सोशीक, सोसक, सोसाळ [म० सोसणें] वि० श्रम, कष्ट, अपमान, भूक, आजार, इ० न चरफडतां सोसण्याचा गुण किं० स्वभाव आहे ज्याचा असा (मनुष्य, प्राणी).

सोस [म० सोसणें] पु० सहनशीलता; कष्ट, दुःख, अपमान, भूक, इ० सहन करण्याची ताकद (धरणें).

सोस [सं० शोष] पु० हरएक पदार्थासंबंधानें उत्कट इच्छा; सर्व कांहीं आपणांस मिळावें अशी इच्छा; हव्यास; अधाशीपणा. ❀ **सोसासोसानें, सोसें सोसें** क्रि० वि० अधाशीपणानें; फाजिल किं० उत्कट इच्छेनें; उ० सोसासोसानें तूं कांद्यांचीं भजीं खात आहेस पण बाधतील हें लक्ष्यांत ठेव. **सोसमावशी, सोसघेवडी** वि० दागिने, उंची वस्त्रें, इ० ची उत्कट इच्छा जिला आहे अशी (मुलगी).**सोशी** वि०अधाशी;हावरा.

सोसणूक [म० सोसणें] स्त्री० १ सोसण्याची ताकद; सहनशीलता. २ सोसण्याचा गुण.

सोसणें [सं० सह्]स० क्रि० सहन करणें;

साहणें; मुकाट्यानें पथकरणें; उ० हा तोटा मी नाहीं सोसणार. अ० क्रि० पथकरलें जाणें; बाधक किं० अपायकारक न होणें; उ० मला थंडी (वारा, गहू, किं० पाणी) बिलकूल सोसत नाहीं; उ० मला अपमान सोसत नाहीं.

सोसा पु०वाऱ्याचा जोर किं०जोराचा वारा.

सोसाट, सोसाटा पु० पाण्याचा किं० वाऱ्याचा जोरदार प्रवाह.

सोसाळू मागें 'सोशिक' पहा.

सोस्ता, सोस्ती [म० सोसणें] वि० जिच्यावर साऱ्याची पूर्ण आकारणी करण्यांत आली आहे अशी (जमीन,–मळा, शेत, इ०).

सोस्ती स्त्री०, **सोस्तें** न० जमीन, मळा, शेत, इ० वरची साऱ्याची पूर्ण आकारणी किं० पूर्ण सारा.

सोहनी [हिं० सोहा] पु० गायनांतील एक राग.

सोहनें न० धूर बाहेर जाण्यासाठीं किं० वारा आणि प्रकाश आंत यावयासाठीं घराच्या माथ्याला किं० छपराला ठेविलेलें भोंक.

सोहपा वि० कठिण नव्हे असा. मागें 'सोपा' पहा.

सोहंभाव [सं० सः=(तो म्ह० तो परमात्मा)+अहं (मी)+भाव (बुद्धि)] पु० जो परमात्मा तो मी, जो मी तो परमात्मा अशी बुद्धि; मी परमात्म्याशीं एकरूप आहें हा विचार; परमात्म्याहून मी कोणी भिन्न नाहीं अशी भावना.

सोहलत, सौलत, सवलत [अ० सुहूलत] स्त्री० १ कठोरपणाचा अभाव; गोडीगुलाबी; प्रेमभाव. २ दुसऱ्याचें तंत्र चालूं देण्याकडे प्रवृत्ति; दुसऱ्याची सोय पहाण्याकडे कल. ३ सोडणूक; सूट; माफी.

सोहळा, सोहाळा पु० मागें 'सोव्हाळा' पहा.

सोहागा पु०,**सोहागी** स्त्री० सवागी.

सोहेर, सोहेरणें, इ० मागें 'सुवेर,' 'सुवेरणें' पहा.

सोळका (–क्या) [म० सोलणें] पु०गुऱ्हाळांत उसाचे शेंड कापून काढणारा.

सोळकी [म० सोळा] स्त्री० जड धोंडा, तुळई, इ० उचलण्यासाठीं लागलेल्या सोळा गड्यांची टोळी. वि० जें उचलावयाला सोळा गडी लागतात असें (ओझें).' सोळकीचा 'ह्याच अर्थी.

सोळन्हाण(–णें), **सोळवंदन** (–ण) [म० सोळा+न्हाणें, वंदन (–णें)] न० लग्नानंतर सोळाव्या दिवशीं जांवयाला आपल्या घरीं बोलावून त्याला त्याच्या बायकोसह न्हाहूं घालणें, त्याला मिष्टान्नाची मेजवानी देणें, वस्त्रें आणि अलंकार देणें, इ० रूप जो सोहाळा किं० समारंभ तो.

सोळभोक [म० सोळा भोकांचें म्ह० फुटकें पात्र] पु० १ अव्यवस्थित, असभ्य, निर्लज्ज, अविद्य असा माणूस. २ जो कसलीच जबाबदारी वाहात नाहीं आणि रिकामपणांत काळ घालवितो तो. ३ लोकांच्या उठाठेवी करणारा माणूस.

सोळवंड [म० सोळा+वृंद (समूह)] स्त्री० सोळा फळें, सोळा फुलें, इ० पदार्थांचें सोळा संच करून सोळा ब्राह्मणांस एक एक संच देणें ह्या रूपाचें स्त्रिया करतात तें व्रत.

सोळवंदण (–न)न०मागें'सोळन्हाण (–णें)' पहा.

सोळा [सं० षोडश] वि० दहांत सहा मिळवून होणाऱ्या संख्येइतका.॰**सोळा संस्कार** पु० अ० व० गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, चौल, उपनयन, मेधाजनन, महानाम्नीव्रत, महाव्रत, उपनिषद्व्रत, गोदान, विष्णुबलि, विवाह, आणि मरण, हे द्विजातींचे सोळा संस्कार. **सोळा शृंगार, सोळा शिंगार** हा 'सोळा संस्कार 'चा गांवढळ अपभ्रंश. **कोणेक माणसाचे**(किं० **पदार्थाचे**)**सोळा संस्कार होणें** सर्व स्थिति, अवस्था, भोग, इ० चे चांगले किं०वाईट परिमाण त्याचेवर झालेले असणें. **सोळा उपचार** पु० अ० व० मागें 'उपचार' मध्यें 'षोडश उपचार' पहा. **सोळा आणे** पूर्ण. टीप,–रुपायाचे सोळा आणे म्ह० भरपूर रुपाया, सबंध रुपाया. **सोळा गुणांचा खंडोबा** पु० सर्व दुर्गुण ज्याचें अंगीं आहेत असा (माणूस, पशु). **सोळा सूक्ष्म भूतें** न० अ० व० ज्ञान आणि कर्में ह्यांचें सोळा उगम; पंचतन्मात्रें,पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, आणि मन.

सोळुला, सोळुली, सोळोला, सोळोली [**म०** सोळा] **वि०** सोळा पायलींचा एक मण अशा संकेताचा (मण, खंडी, इ०).

सोक्षमोक्ष [**म०** मोक्ष] **पु०** पुष्कळ दिवस भिजत पडलेल्या कामाचा कसाबसा लाविलेला निकाल; निकाल प्रतिकूल झाला तरी पुरवेल परंतु एकदां तो लागू द्या अशा बुद्धीनें लाविलेला निकाल. ॐ **सोक्षमोक्ष होणें** १ निकाल लागणें. २ पूर्ण विध्वंस किं० नासाडी होणें.

सौकणें, सौकील, इ० मार्गे 'सवकणें' इ० पहा.

सौकर्य [**सं०**] **न०** सोपेपणा; सहज करतां येण्याची शक्यता किं० संभव. [पणा.

सौकुमार्य [**सं०**] **न०** सुकुमारपणा; नाजूक-

सौख्य [**सं०**] **न०** सुखाची स्थिति; आरामाची किं० संतुष्टपणाची भावना.

सौगंध [**सं०**] **न०** १ सुवास. २ रोहिस हें गवत. ॐ **सौगंधिक वि०** सुवासिक. **न०** पांढरें कमळ. **सौगंध्य न०** सुगंध.

सौजन [**सं०** सुजन] **पु०** देशमुख आणि देशपांड्या ह्या गांवकामगारांची पदवी.

सौजन्य [**सं०**] **न०** १ चांगुलपणा; सुस्वभाव. २ दया. ३ मैत्री.

सौज्वल (–**ळ**) [**सं०** उज्ज्वल] **वि०** १ चकचकीत; नकतकीत; तेजस्वी. २ अति पवित्र (निंदेंत).

सौतें [**सं०** स्वतः] **क्रि० वि०** स्वतः; आपल्या इच्छेनें; स्वतंत्रपणें. **वि०** वेगळा; भिन्न; स्वतंत्र. **सौतासुभा पु०** दुसऱ्यावर रुसून किं० दुसऱ्याशीं न पटल्यामुळें केलेली स्वतंत्र किं० वेगळी मांडणी, रचना, संस्था, इ०.

सौत्र [**सं०**] **वि०** सूत्रासंबंधाचा; सूत्राप्रमाणें केलेला, चालविलेला, अनुसरलेला (विधि, संस्कार, इ०). **पु०** ब्राह्मण. [यज्ञविशेष.

सौत्रामणी [**सं०**] **स्त्री०** १ पूर्वदिशा. २

सौंदण (–**णी**) **स्त्री०** पाणी साठविणें, कपडे पाण्यांत धुवावयाच्या पूर्वी भिजत घालणें, इ० च्या उपयोगाचें दगडाचें किं० धातूचें पात्र.

सौंदर [**म०** सोंड+दोर] **पु०** विहिरींतून पाणी काढण्याच्या पोहोऱ्याची दोरी.

सौंदर्य [**सं०**] **न०** सुंदरपणा; सुरेखपणा.

सौदा [**फा०**] **पु०** १ क्रयविक्रयाचा पदार्थ किं० माल; विकत घेतलेला किं० विकलेला माल. २ क्रयविक्रयरूप व्यवहार. ॐ **सौदागर, सौदागोर पु०** व्यापारी. **वि०** व्यापाराच्या निमित्तानें आलेले (म्ह० लढण्याकरतां न आलेले लोक). **सौदागरी, सौदागिरी स्त्री०** व्यापार; क्रयविक्रय. **सौदासूत न०, पु०** व्यापार, व्यवहार, किं० तत्संबंधी माल, शर्ती, इ० समुच्चयानें.

सौदामनी, सौदामिनी, सौदाम्नी [**सं०**] **स्त्री०** १ वीज; विद्युलता. **सौदामिनी स्त्री०** एक वृत्त. याचे चारी चरण सारखे असून प्रत्येक चरणांत य, य, य, ल, ग, असे गण असतात.

सौध [**सं०**] **वि०** चुनेगच्ची. **पु०, न०** १ राजवाडा. २ कोणताही मोठा वाडा. ३ रुपें हा धातु.

सौनिक [**सं०**] **पु०** खाटीक; कसाई.

सौप्तिक [**सं०**] **न०** १ झोप; निद्रा. २ रात्रीं केलेलें युद्ध. ३ निजलेलें सैन्य.

सौभग [**सं०**] **न०** १ सुदैव. २ संपत्ति.

सौभद्र, सौभद्रेय [**सं०**] **पु०** अभिमन्यु,—सुभद्रेचा पुत्र.

सौभाग्य [**सं०**] **न०** १ सुदैव. २ सौंदर्य. ३ सुवासिनीत्व; सवाशिणपणा; सवाष्णपणाची स्थिति. ४ विद्या, शौर्य, अधिकार, श्रीमंती, इ० गुणांमुळें कोणेकाची जी समाजांत मानमान्यता होते ती. ५ सत्तावीस योगांतील चवथा योग. ॐ **सौभाग्यतंतु पु०** स्त्रियांचें मंगळसूत्र. **सौभाग्यचिन्ह, सौभाग्यद्रव्य न०** काजळ, कुंकूं, हळद, दागिने, इ० जे सुवासिनीस वापरतां येतात ते पदार्थ प्रत्येक किं० समुच्चयानें. **सौभाग्यवती स्त्री०** १ जिचा पति जिवंत आहे अशी स्त्री; सवाशीण. २ (बोलणाऱ्याची किं० पत्र लिहिणाऱ्याची) पत्नी. **सौभाग्यवाण, सौभाग्यवायन न०** सुवासिनी स्त्रिया एकमेकींस किं० ब्राह्मणास जें हळद, कुंकूं, फळें, खण, इ० चें देतात तें दान. **सौभाग्यशुंठी (–सुंठ) स्त्री०** सुंठ आणि इतर द्रव्यें घालून जें औषध म्हणून मिश्रण करतात तें. **गौर रुसली आणि सौभाग्य घेऊन बसली** गौरीची यथासांग पूजा माझ्या हातून झाली नाहीं तर गौर रागावेल आणि मला विधवा करील इतकेंच. ह्या नुकसानीची मला काय पर्वा ? माझ्या वरिष्ठाची मी खुशामत

नाहीं केली तर तो मला नोकरींतून काढून टाकील; टाको, इथें कोणाला नोकरीची पर्वा आहे? **सौभाग्य मिरविणें** सवाष्णपणाची ऐट दाखविणें. **सौभाग्याचा टिळा** पु० सवाष्ण स्त्रिया कपाळावर लावितात तो कुंकवाचा टिळा.

सौभांजन [सं०] पु० शेवगा हें झाड.

सौभिक [सं०] पु० गारोडी.

सौभ्रात्र [सं०] न० बंधुप्रेम.

सौमंगल्य [सं०] न० १ मंगल; शुभ. २ सौभाग्यादि अलंकार.

सौमनस [सं०] वि० १ फुलासंबंधाचें. २ प्रिय. न० दया.

सौमनस्य [सं०] न० १ आनंद. २ फूल. ३ मनाची शांतवृत्ति. ४ मैत्री. ५ सुस्वभावीपणा. ६ श्राद्धांत ब्राह्मणास फुलें देणें.

सौमास [म० सुकुमार+मांस] न० शरीराचा नाजूक भाग किं० मर्मस्थळ (बायकांत रूढि).

सौमिक [सं०] वि० चंद्रासंबंधाचें.

सौमिकी स्त्री० पौर्णिमेचा होमविशेष.

सौम्य [सं०] वि० १ चंद्रासंबंधाचें. २ सुंदर; मोहक; प्रिय. ३ मृदु; कोमळ; उग्र, कडक, किं० कठोर नव्हे असा. ४ शुभ (ग्रह). ५ साधु; भला. पु० १ (ज्योतिष) बुध हा ग्रह. २ साठ संवत्सरांतील त्रेचाळिसावा. ॐ **सौम्यवार, सौम्यवासर** पु० बुधवार हा आठवड्याचा दिवस. **सौम्यकृच्छ्र** न० एक प्रायश्चित्त. **सौम्योपचार** पु० मृदु किं० सौम्य उपाय.

सौर [सं०] वि० १ सूर्यासंबंधाचें. २ देवासंबंधाचें. ३ (ज्योतिष) सूर्याच्या गतीवरून मोजलेलें (वर्ष, दिवस, इ०). पु० १ शनि हा ग्रह. २ एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा कालावधि; सौर दिवस. ३ तीस सौर दिवसांचा कालावधि; सौरमास. ४ बारा सौरमासांचा कालावधि; सौरवर्ष. ५ सूर्याचा उपासक. ६ यम. ७ ' उदित्यं जातवेदसम् ' इ० सूक्त.

सौरभ, सौरभ्य [सं०] वि० सुवासिक; सुगंधी. न० सुगंध; सुवास.

सौरभेयी [सं०] स्त्री० १ गाय. २ कामधेनूची कन्या.

सौरस्य [सं०] न० १ चवदारपणा. २ प्रेमभाव. ह्या अर्थी ' सौरहस्य ' हा गांवढळ अपभ्रंश.

सौरी स्त्री० १ स्त्रीवेषधारी नपुंसक. २ (लाक्षणिक) निर्लज्ज स्त्री.

सौलत [अ० सुह्लत] स्त्री० परस्परांचा स्नेहभाव; सलोखा. मागें ' सोहलत ' सर्व अर्थी पहा.

सौलभ्य [सं०] न० सुलभपणा; सुकरपणा; सोपेपणा; शक्यता. [संचळखार.

सौवर्चल [सं०] न० १ लवणविशेष. २

सौवर्ण [सं०] वि० १ सोन्यासंबंधाचा. २ सोन्याचा (दागिना, पात्र, इ०).

सौविद, सौविदल्ल [सं०] पु० अंत:पुराचा रखवालदार.

सौवीर, सौविरिक [सं०] न० १ बोर हें फळ. २ काळा सुरमा.

सौशिल्य [सं०] न० सुशीलपणा.

सौष्टव [सं०] न० १ सौंदर्य. २ लाघव; चपलपणा; चापल्य. ३ श्रेष्ठत्व; उत्कृष्टपणा.

सौस्नातिक [सं०] पु० ' तुमचें यथाविधि स्नान झालें ना ?' असें विचारणारा.

सौहार्द [सं०] न० १ मित्रत्व; स्नेहभाव. २ आवड. [भाव; स्नेह.

सौहार्द्य, सौहृद [सं०] न० मैत्री; प्रेम-

सौळ वि० किंचित् कढत (पाणी इ०).

सौक्ष्म्य [सं०] न० सूक्ष्मपणा. मागें 'सूक्ष्म' पहा.

स्कंद [सं०] पु० १ उडी मारणें; मारलेली उडी. २ कार्तिक स्वामी; कार्तिकेय.

स्कंध [सं०] पु० १ खांदा. २ झाडाचें खोड. ३ झाडाची खांदी किं० फांदी. ४ ग्रंथभाग (भागवत इ० चा). ५ शरीर. ६ सैन्यभाग; टोळी. ७ सैन्याचा व्यूह. ८ लढाई. ९ समूह. १० राज्याभिषेकाची सामग्री,–क्षेत्रोदक, छत्र, चामर, इ०. ११ वायूचे सात प्रदेश प्रत्येक. अवस्कंध, प्रवस्कंध, उद्वस्कंध, सहस्कंध, विवस्कंध, परास्कंध, आणि परिव्राहस्कंध, हे ते सात स्कंध. १२ ज्योतिषाचे जे गणितस्कंध, होरास्कंध, आणि संहितास्कंध हे तीन विभाग ते प्रत्येक.

स्खलद्गी [**सं०**] **वि०** लागत लागत बोलणारा; तोतरा.

स्खलन [**सं०**] **न०** १खालीं पडणें; घसरणें. २ झोकांडी जाणें. ३ धर्मादिपासून भ्रंश; अवनति. ४ चूक; चुकी; दोष. ५ अपयश. ६ तोतरें बोलणें. ७ पाणी, पुरुषाचें वीर्य, इ० बिंदुबिंदुरूपानें पडणें.

स्खलित [**सं०**] **वि०** १ घसरलेला; ढासळलेला; पडलेला. २ रेतस्खलन ज्याचें झालें आहे असा. ३ गळलेलें (पाणी, वीर्य, इ०). ४ चुकी ज्यानें केली आहे असा. ५ चुकलेला (शब्द इ०).

स्तन [**सं०**] **पु०** १ गाय, म्हैस, शेळी, घोडी, मानवी स्त्री, इ० च्या शरीराचे जे अपत्यांच्या पोषणासाठीं दूध देणारे अवयव असतात ते प्रत्येक. २ मानवजातीचा पुरुष, बैल, रेडा, इ० नरांच्या शरीरास त्या त्या जागीं ह्या अवयवांच्या स्थानीं असतात जे अप्रौढ अवयव ते प्रत्येक. घोडा हा पुरुष असून त्याला हे अवयव नसतात. ३ शेळीच्या गळ्याला जे दोन अवयव लोंबत असतात ते प्रत्येक. त्यांना ‘अजागलस्तन’ म्हणतात. ꕥ **स्तनपान न०** १ मातेच्या स्तनांतील दूध अपत्यानें चोखून पिणें (करणें). २ मातेनें अपत्याला स्तनाशीं घेणें (देणें). **स्तनमुक्त वि०** आईचें दूध ज्याचें बंद करण्यांत आलें आहे असें (अपत्य).

स्तनयित्नु [**सं०**] **पु०** १ मेघ. २ मेघाची गर्जना. ३ वांज. [कडकडाट.

स्तनित [**सं०**] **न०** मेघगर्जना; विजांचा

स्तन्य [**सं०**] **न०** दूध. ꕥ **स्तन्यत्याग पु०** मूल अंगावरचें सुटणें किं० सोडविणें.

स्तंब [**सं०**] **पु०** १गवत,रोपडीं,इ०चा गुच्छ; गवताचें बेट. २ झुबका. ३ खोड नसलेला वृक्ष. ४ समूह. [ग्रंथभाग.

स्तबक [**सं०**] **पु०** १ झुबका; गुच्छ. २

स्तंबेरम [**सं०**] **पु०** हत्ती.

स्तब्ध [**सं०**] **वि०** १ थांबलेला; चालणें, बोलणें, हसणें, इ० चाललेली क्रिया ज्याची बंद पडली आहे किं० ज्यानें बंद केली आहे असा. २ मुकाट्यानें बसलेला; जागच्या जागीं निश्चल राहिलेला. ३ आळशी. ४ ताठ्यानें युक्त.४ मूर्ख; जड. ५ क्रियाहीन. ६ ताठलेला.

स्तंभ [**सं०**] **पु०** १ स्तब्धता; थांबणूक; कुंठितपणा. २ बधिरता; जडता. ३ प्रतिबंध. ४ दाबणें; नियमन. ५ टेकू; आधार. ६ खांब,–घर, मांडव, इ० चा. ७ वृक्षाचें खोड. ८ गर्व; ताठा; हेकटपणा. ९ मूर्खपणा. १० बुद्धिभ्रंश.

स्तंभणें, स्तब्धणें [**सं०** स्तंभ्] **अ० क्रि०** थांबणें, अडणें, बंद होणें (कवितेंत).

स्तंभन [**सं०**] **न०** १ प्रतिबंध. २ प्रवाह, गति, क्रिया, इ० थांबणें किं० थांबविणें. ३ अंग बधिर करणें. ४ विग्रह; नियमन. ५ टेकू; आधार. ६ मदनाचा एक बाण. ७ मैथुनप्रसंगीं वीर्य लवकर न पडणें किं० लवकर न पडावें म्हणून घेतात तें औषध.

स्तंभित [**सं०**] **वि०** १ आडविलेलें; थांबविलेलें; कुंठित केलेलें. २ निश्चेष्ट केलेलें.

स्तव, स्ताव पु०, स्तवन न० [**सं०**] स्तुति; तारीफ; प्रशंसा.

स्तव श० यो० अ० १ मुळें; कारणानें; उ० पाऊस पडला यास्तव जमीन ओली झाली. २साठीं; करितां; उ० तूं नोकरीस्तव खटपट कां करतोस?

स्तवणें, स्तविणें [**सं०** स्तु] **स० क्रि०** प्रशंसिणें; वाखाणणें.

स्तवन [**सं०**] **न०** १ स्तुति; प्रशंसा. २ देवादिकांच्या स्तुतीचें पद किं० गाणें. ꕥ **स्तवनार्ह वि०** स्तुतीस पात्र किं० योग्य.

स्तवनीय, स्तुत्य [**सं०**] **वि०** स्तुतीस पात्र किं०लायक; प्रशंसनीय.

स्तावक [**सं०**] **पु०** स्तुति करणारा.

स्तिमित [**सं०**] **वि०** १ ओलें (वस्त्र इ०). २ निश्चल; स्थिर; स्तब्ध; कुंठित. ३ शांत. ४ मिटलेलें, झाकलेलें (डोळा, फूल, इ०). ५ बधिर किं०जड (इंद्रिय). ६ आश्चर्यचकित. ७ मऊ. ꕥ **स्तिमिताई स्त्री०** सावकाशी; मंदपणा; दिरंगाई.

स्तुत [**सं०**] **वि०** स्तविलेला; प्रशंसिलेला.

स्तुति [**सं०**] **वि०** प्रशंसा; तारीफ; वाखाणणी. ꕥ **स्तुतिपाठक पु०** १ राजाचा भाट. २ स्वार्थासाठीं वरिष्ठाची अवास्तव स्तुति करून

त्याचे पाय चाटतो तो नीच मनुष्य. **स्तुतिप्रिय** वि० लोकांनीं आपली स्तुति करावी अशी अनिवार इच्छा करणारा; कोणी आपली स्तुति केली असतां आनंद पावतो तो. **स्तुतिवाद** पु० कोणेकाची केलेली स्तुति, तारीफ, किं० प्रशंसा

स्तुत्य वर ' स्तवनीय ' पहा.

स्तेय, स्तैन्य, स्तैन [सं०] न० चोरी.

स्तैमित्य [सं०] न० १ स्तिमितपणा; स्तब्धता; कुंठितपणाची स्थिति. २ अंगाची बधिरता; जडता. ३ ओलावा.

स्तोतव्य [सं०] वि० स्तुति करण्यास योग्य किं० पात्र.

स्तोता[सं०स्तोतृ]पु०स्तविणारा;प्रशंसिणारा.

स्तोत्र [सं०] न० १ स्तुति; प्रशंसा. २ देव,साधु, इ० च्या स्तुतीचें पद्य.

स्तोम [सं०] पु० १ स्तुति. २ स्तोत्र. ३ यज्ञ; उ० ज्योतिष्टोम. ४ जमाव; समूह. न० १ (**मराठींत**) कोणेकाला दिलेलें अवास्तव महत्त्व; उ० बगलबच्चे नादान अमल्दाराचें स्तोम वाढवितात. २ टोळी; जमाव.

स्त्री [सं०] **स्त्री**० १ पुरुषापासून गर्भधारण करून अपत्यें उत्पन्न करणारी मानवी किं० इतर प्राण्यांतील व्यक्ति. प्राणिवर्गातील अशा व्यक्तीला ' मादी ' म्हणतात. २ कोणेकाची पत्नी. ३ नरकेसरांच्या संयोगानें फळें उत्पन्न करणारें फूल किं० झाड तें स्त्रीफूल किं० स्त्रीझाड. **टीप**,–पुष्कळ झाडांत एकाच फुलांत स्त्रीकेसर आणि पुरुषकेसर असतात. कित्येक झाडांत फळें धरणारींच फुलें असतात म्ह० फक्त स्त्रीफुलें असतात आणि दुसरीकडे तज्जातीय पुरुषझाडें असतात त्यांतील फुलें फक्त पुरुषफुलें असतात आणि पुरुषकेसर वाऱ्यानें उडून ह्या स्त्रीफुलांत पडून फळें होतात. कित्येक झाडांवर वेगळीं स्त्रीफुलें आणि एकाच झाडावर वेगळीं पुरुषफुलें असतात. ४ (**व्याकरण**) पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग, अशीं जीं तीन लिंगें मराठी भाषेंत यदृच्छेनें ठरलेलीं आहेत,त्यांपैकीं **स्त्रीलिंग नामानें** वाच्य जो अर्थ तो; उ० लेखणी ही स्त्री आणि चाकू हा पुरुष. ५ (**लक्षणेनें**) भितरा माणूस. ꕥ **स्त्र्यगार** न० अंतःपुर. **स्त्र्याजीव** पु० पत्नीच्या उद्योगावर किं० व्यभिचारावर मिळालेल्या पैशानें ज्याचा चरितार्थ चालतो तो. **स्त्रीजित, स्त्रीपूर्व, स्त्रीविधेय, स्त्रीदास** पु० स्त्रीचा अमल ज्याच्यावर चालतो तो; जो स्त्रीच्या आज्ञेंत राहातो तो; बाइल्या. **स्त्रीधन** न० स्त्रीची हक्काची मालमत्ता. **स्त्रीधर्म** पु० स्त्रीचा मासिक रजःस्राव; विटाळ. **स्त्रीधर्मिणी** स्त्री० रजस्वला; विटाळशी. **स्त्रीपर** वि० कामुक; अनिवार कामेच्छा आहे ज्याला असा.**स्त्रीपुरुषें** न० अ० व०नवरा आणि बायको. **स्त्रीबुद्धि** स्त्री० स्त्रीची सल्लामसलत (नादानपणाच्या दृष्टीनें). **स्त्रीरत्न** न० उत्तम स्त्री; लाखांत एक स्त्री. **स्त्रीलंपट** वि० स्त्रीशीं फाजिल आसक्त. **स्त्रीवश** वि० स्त्रीच्या आज्ञेंत राहाणारा.

स्त्रैण [सं०] वि० स्त्रीलंपट.

स्थ [सं०] वि० (शब्दाच्या शेवटीं) असणारा; राहाणारा; उ० गर्भस्थ, मार्गस्थ, इ०.

स्थंडिल [सं०] न० १ यज्ञार्थ तयार केलेली जमीन. २ ओटा. ३ सपाट जमीन. ४ हद्द.

स्थपति [सं०] वि० मुख्य; श्रेष्ठ. पु० १ अधिपति. २ शिल्पशास्त्रवेत्ता. ३ सुतार. ४ सारथि. ५ अंतःपुररक्षक. ६ बृहस्पति यज्ञ करणारा. ꕥ **स्थापत्य** न० शिल्पविद्या.

स्थल [सं०] न० १ जमीन,भूपृष्ठ (जलाच्या व्यावर्तकत्वें). २ ठिकाण; जागा. ३ उघडा प्रदेश (वनाच्या व्यावर्तकत्वें). ४ (**मराठींत**) अनेक शेतांनीं व्यापिलेला प्रदेश; टापू. ५ (**मराठींत**) कांहीं अधिकाराची जागा; असामी. ६ (मुलगी लग्नाच्या विधीनें देण्याची वाटाघाट चालली असतां) कोणेक कुटुंब; कोणेक नवरामुलगा. ꕥ **स्थलचर** वि० जमीनीवर राहाणारा (प्राणी); उ० मनुष्य हा स्थलचर. ' स्थलचर ' च्या व्यावर्तकत्वें ' जलचर ' (म्ह० मासे इ०). **स्थलमार्ग** पु० भूपृष्ठावरचा मार्ग; खुषकीचा रस्ता.याच्या व्यावर्तकत्वें ' जलमार्ग. ' **स्थलदेवता** स्त्री० एकाद्या विशिष्ट गांवाची अधिष्ठात्री देवता. **स्थलशुद्धि** स्त्री० १ झाडणें,सडासंमार्जन, इ० नीं कांहीं कामासाठीं योग्य केलेली जमीन.

२ मुक्कामाला ठिकाण शोधणें. **स्थलांतर न०** १ दुसरें ठिकाण. २ (**मराठींत**) दुसऱ्या ठिकाणीं जाणें किं० जाऊन तेथें वसति करणें किं० राहाणें.

स्थविर [**सं०**] **वि०** वृद्ध; जीर्ण. **पु०** १ म्हातारा. २ भिक्षु.

स्थाणु [**सं०**] **वि०** १ निश्चल. २ स्थावर (संपत्ति). ३ वृद्ध. **पु०** १ शंकर. २ मेढ; खांब. ३ खुंटा. **पु०, न०** वृक्षाचा बुंधा किं० खोड.

स्थातव्य [**सं०**] **वि०** ठेवण्यास, वसविण्यास, किं० जडविण्यास योग्य. **न० (मराठींत)** कोणेक स्थळीं कोणेकाचें राहाणें किं० वसति किं० मुक्काम; उ० ह्या गांवीं माझें महिनाभर स्थातव्य व्हावयाचें आहे.

स्थाता [**सं०** स्थातृ] **पु०** कोणेक अधिकारावरचा कोणी अमलदार किं० अधिकारी.

स्थान [**सं०**] **न०** १ राहाणें; वास्तव्य; वसति. २ ठिकाण; वसतीची जागा. ३ प्रदेश. ४ शहर. ५ संधी; अवकाश; कांहीं कामाला अनुरूप ठिकाण किं० स्थळ. ६ प्रसंग. ७ वयानें, नात्यानें, दर्जानें, किं० अधिकारानें प्राप्त झालेलें महत्त्व किं० योग्यता; उ० तुम्ही मला पितृस्थानीं आहां (म्ह० मी तुम्हाला पित्याला द्यावा तसा मान देतों). ८ अवकाश; जागेचा अघळपघळपणा. ९ संख्या मांडतांना एकेका अंकाला विशिष्ट किंमत देण्याचें सामर्थ्य ज्यांत आहे असें स्थळ; उ० ४५९ ह्या संख्येंत नवाची किंमत फक्त नऊ होते, पांचाची किंमत पन्नास होते, आणि चाराची किंमत चारशें होते. ह्याचें कारण त्या त्या अंकाचें स्थान होय. येथें चाराला चारशें ही किंमत स्थानमाहात्म्यानें आलेली आहे. १० वर्णोच्चाराचा उगम; उ० उ, ऊ, प, फ, ब, भ, आणि म, ह्याचें ओष्ठ हें स्थान होय. ११ पदवी; अधिकार; उ० अमात्यस्थान. ॐ **स्थानच्युत, स्थानभ्रष्ट वि०** योग्य किं० स्वकीय स्थानापासून जो पतन पावला तो; बडतर्फ झालेला. **स्थानमाहात्म्य न०** विशिष्ट स्थळीं असल्यामुळें अंगीं जो सामर्थ्य, योग्यता, गर्व, अधिकार, इ० गुण प्राप्त होतो तो किं० ह्या गुणाचा परिणाम जो दृष्टीस पडतो तो; उ० मूर्ख माणूस मोठ्या अधिकारावर चढविला गेला म्हणजे तो म्हाताऱ्या आणि अनुभविक माणसांना तुच्छ करतो हा स्थानमहात्म्याचा गुण. **स्थानापन्न वि०** विशिष्ट स्थानीं बसलेला किं० चढलेला.

स्थानिक [**सं०**] **वि०** १ विशिष्ट स्थानाचा किं० स्थानासंबंधाचा; उ० स्थानिक स्वराज्य. २ विशिष्ट स्थानालाच लागूं पडणारा.

स्थानीय [**सं०**] **वि०** वसतीला योग्य (स्थळ, घर, इ०). **न०** शहर.

स्थापक [**सं०**] **पु०** १ स्थापणारा; उ० धर्मस्थापक, मतस्थापक, इ०. २ सूत्रधार; कांहीं कामाचा चालक.

स्थापणें [**सं०** ' स्था ' चें प्रयोजक 'स्थापय्'] **स० क्रि०** १ विशिष्ट अधिकारावर नेमणें किं० योजणें; विशिष्ट स्थानीं ठेवणें, खिळविणें, बसविणें, किं० पक्कें करणें. २ विशिष्ट पदार्थावर (विशिष्ट गुण किं० धर्म) आरोपिणें. ३ (कांहीं अपराध) कोणेकावर सिद्ध किं० लागूं करणें. ४ (दुकान, संस्था, शाळा, पंथ, संप्रदाय, अडत, इ०) सुरूं करणें. ५ ध्यानाच्या विषयावर (मन) स्थिर करणें.

स्थापन न०, स्थापना स्त्री० [**सं०**] १ स्थापन करण्याची क्रिया. २ स्थिर करणें. ३ व्यवस्था करणें. ४ यथायोग्य आधारावर शाळा, संस्था, मत, इ० उभारणें किं० सुरूं करणें. ५ चित्ताची एकाग्रता. ६ घट्ट रोवणें, खिळविणें, जडविणें, किं० बसविणें; पक्कें करणें. ७ पुंसवन हा संस्कार.

स्थायिक [**सं०** स्था] **वि०** १ कोणेक स्थळीं कायमचा राहणारा; उपरी नव्हे तो. २ पदार्थांत पूर्णपणें भिनून राहाणारा (रंग इ०).

स्थायी [**सं०** स्थायिन्] **वि०** (समासांतीं) १ राहाणारें; असणारें; टिकून राहाणारें; निश्चल; उ० चिरस्थायी. **पु०** (**साहित्य**) टिकणारा मनोविकार. ॐ **स्थायिभाव पु०** विभाव, अनुभाव, आणि व्यभिचारिभाव, ह्या सर्वांच्या व्यापारांमुळें व्यक्त झालेल्या कोणत्याही एका स्थिर चित्तवृत्तीच्या उद्रेकास रस असें म्हणतात. ह्या स्थिर आणि उत्कट चित्तवृत्तीस 'स्थायिभाव' असें नांव आहे.

स्थाली [**सं०**] **स्त्री०** १ थाळा; पसरट आकाराचें आणि उथळ ताट. २ पातेलें, तपेलें, इ०

भात इ० शिजविण्याचें भांडें. ॐ स्थालीपुलाक न्याय पु० तपेलींतील भात शिजला आहे किं० नाहीं हे पहावयाचें असतां एक शीत दोन बोटांत चेपून पाहातात. तें चांगलें मऊ हाताला लागलें म्हणजे सारा भात चांगला शिजला आहे असें आपण अनुमान काढतों. एका लहानशा भागाची चांचणी करून सर्व वस्तूची परीक्षा आपण करतों ती स्थालीपुलाकन्यायानें. शिता-वरून भाताची परीक्षा करणें ही रीति.

स्थावर [सं०] वि० १ न हालणारें; निश्चल; स्थिर. २ शेत, मळा, बाग, इ० रूप (जी कोणे-काची संपत्ति ती). ह्याच्या व्यावर्तकत्वें जंगम. भांडींकुंडीं, दागिने, पलंग, पुस्तकें, इ० जंगम संपत्ति.

स्थावरणें [म० स्थावर] अ० क्रि० १ कोणेक स्थलीं स्थिरपणें किं० कायमचें राहाणें; सर्व मांडणी, रचना, सोयी, इ० जमवून कोणे-कानें कोणेक स्थळीं स्थिरपणें राहाणें. २ आजार, संकट, दोषारोप, इ० तून बचावून कोणेकानें पूर्वींच्या स्थितीस येणें. ३ ढासळलेली रचना पुन्हा नीट केली जाणें.

स्थास्नु [सं०] वि० १ स्थिर; निश्चल. २ शाश्वत टिकणारें. पु० वृक्ष.

स्थित [सं०] वि० १ असलेलें; राहिलेलें; हजर. २ कुंठित झालेलें; थांबलेलें; आडलेलें. ३ स्थिर; अढळ. ४ सद्गुणी; पूज्य. ५ सत्यवचनी.

स्थिति [सं०] स्त्री० १राहाणें; वास; वसति. २ बसणें; न हालणें. ३ थांबणें. ४ स्थैर्य. ५ अवस्था. ६ शाश्वती; टिकणें; अविच्छिन्नता. ७ योग्य व्यवस्था; यथायोग्य वर्तनाची सरणी; सद्वर्तन; शील. ८ आचार; मर्यादा; न्याय्य मार्ग. ९ उच्च दर्जा. १० पोषण. ११ सत्त्वगुण. १२ जगाची उत्पत्ति आणि जगाचा लय किं० अंत ह्या दोहोंच्या मधलीं जी जगाची अवस्था ती. १२ (ज्योतिष) ग्रहणाचा अवधि. ॐ **स्थिति-स्थापक** वि० लवचीक; पूर्व स्थितीवर येणारा किं० येऊं शकणारा. पु० (**न्याय**) पूर्व स्थितीवर येण्याचा गुण; लवचीकपणा. **तो स्थितीवर नाहीं** १ तो शिस्तीनें, सभ्यपणानें, किं० सन्मा-र्गानें वागत नाहीं. २ त्याचें देहभान नष्ट झालें आहे. **स्थितिरीति** स्त्री०ए० व०कोणेकाची वर्तन-सरणी; योग्य वर्तनक्रम; वागण्याची तऱ्हा.

स्थिर [सं०] वि० १ स्थावर; एक जागा किं० क्रम धरून असणारें. २ निश्चल; चंचल नव्हे असें. ३ पक्कें; घट्ट. ४न बदलणारें. ५शांत किं० निर्विकार (मन, मति). ६ निश्चयी; निष्ठा-वंत. ७ खात्रीचें. ८ ज्यांचे ठायीं आरंभिलेलें कार्य लवकर होत नाहीं आणि झालें तर लवकर नाश पावत नाहीं(अशीं नक्षत्रें, राशि, वार, इ०). ॐ **स्थिरा** स्त्री० पृथ्वी. **स्थिरप्रतिष्ठा** स्त्री० १ देऊळ इ० मध्यें देवतेची मूर्ति स्थापिणें,—जी मिरवणूकींत बाहेर काढली जात नाहीं ती. २ कोणेक स्थळीं कोणेकाचें कायम म्हणून किं०काय-मचें राहाणें किं० वास्तव्य. **स्थिरप्राय** वि० स्थिर किं० कायमचें असल्याप्रमाणें असलेलें. **स्थिरबुद्धि** वि० १ एक विचार कायम ठेवून चालणारा; चंचल मनाचा नव्हे असा (चांगल्या अर्थानें). २ मंदबुद्धीचा (निंदेंत). **स्थिरवेळ, स्थिरवेळा** स्त्री० ज्या काळीं आरं-भिलेलें कार्य लवकर संपत नाहीं किं० लांबणीवर पडतें तो काळ. **स्थिरस्थावर** वि० पूर्वस्थितीवर किं० क्रमावर येऊन सुरळीतपणें चालूं लागलेलें (काम, राहाणी, धंदा, इ०). न० शांत किं० बिनगडबडीची किं० नेहमींच्या परिपाठाची सरणी किं० राहाणी; शांतपणाची स्थिति.

स्थिरावणें [म० स्थिर] अ० क्रि० १ स्थिर होणें; शांत होणें; सुरळीतपणें चालूं लागणें. २ (वारा, पाऊस, इ०) बंद पडणें. ३ थांबणें; एक स्थिति किं० क्रम धरून राहाणें.

स्थिराविणें [म० ' स्थिरावणें ' चें प्रयोजक] स० क्रि० स्थिर करणें; शांत करणें; पक्कें किं० कायम करणें.

स्थूणा [सं०] स्त्री० १ खांब. २ प्रतिमा. ३ लोहमूर्ति. ४ ऐरण. ॐ **स्थूणावतार** पु० रुद्राव-तारविशेष. **स्थूणानिखननन्याय** पु० पुन्हा पुन्हा पुरावे किं० प्रमाणें देऊन सिद्धान्ताला किं० कांहीं विधानाला बळकटी आणणें; हालवून खुंटा बळकट करणें ही सरणी.

स्थूल [सं०] वि० १ मोठा. २ लठ्ठ. ३ जोराचा. ४ जाडें भरडें (वस्त्र इ०). ५ अंदाजानें

ठरविलेलें; ठोकळ मानाचें. ६ मंद, जड, मठ्ठ (बुद्धि, मति). ७ फोपसें, थिलथिलीत (शरीर). ८ फोपशा किं०थिलथिलीत शरीराचा(माणूस,पशु). ❀ **स्थूलभूत न०** पृथ्वी, अप्, तेज, इ०. **स्थूललक्ष (-क्ष्य) वि०** १ दानशूर. २ पंडित. **स्थूलशरीर न०**पंचमहाभूतात्मक देह.उलट 'लिंगदेह.' **स्थूलमान न०**ठोकळ मानाची गणती;तपशील किं० क्षुल्लक बाबी विचारांत न घेतां ठरविलेला आंकडा, मोजदाद, किं० गणती.

स्थेय [सं०] पु० १ पंच; न्यायाधीश. २ उपाध्याय. [शाश्वत.

स्थेय [सं० स्थेयस्] वि० १ स्थिर. २

स्थैर्य [सं०] न० १ स्थिरपणा; निश्चलता. २ शाश्वतपणा . ३ चंचलपणाचा अभाव; अचांचल्य. ४ इंद्रियनिग्रह. ५ घट्टपणा; दृढपणा.

स्थौल्य [सं०] न० स्थूलपणा; लठ्ठपणा; बोजडपणा; थिलथिलीतपणा; ठोकळपणा.

स्नपन [सं०] न० १ स्नान घालणें. २ धुणें; शिंपडणें.

स्नात [सं०] वि० १ स्नान केलेला. २ पारंगत. **पु०** ज्यानें ब्रह्मचर्यव्रत संपविलें आहे असा मनुष्य.ह्या अर्थी ' स्नातक ' सुद्धां. **स्नाता स्त्री०** विटासपणानंतर स्नान करून शुद्ध झालेली स्त्री.

स्नान [सं०] न० १ अंघोळ; पाण्यानें अंग धुणें. २ जलाभावीं भस्म, गोमय, इ० द्रव्यांनीं शरीर लिप्त करणें. ❀ **स्नानपान न० ए० व०** १ अंघोळ,जेवण,इ०कृत्यें समुच्चयानें. २ राहाण्याची किं० उतरण्याची सोय. **स्नानविधि पु०** स्नान हा विधि किं० संस्कार. **स्नानसंध्या स्त्री० ए० व०** स्नान, संध्या, जप, पूजा, इ० जीं ब्राह्मणांनी करावयाचीं किं० पाळावयाचीं कर्तव्यें तीं समुच्चयानें. **स्नानसंध्याशील वि०** स्नानसंध्या इ० कर्तव्यें यथाविधि करण्यांत न चुकणारा (ब्राह्मण). **स्नानीय वि०** स्नानासंबंधी (विधि, पाणी,मंत्र, इ०).

स्नायी [सं० स्नायिन्] वि० ज्यानें स्नान केलें आहे असा; उ० तीर्थस्नायी (म्ह०तीर्थाच्या पवित्र जलानें स्नात); उ० जलस्नायी, तिलस्नायी, भस्मस्नायी, गंगास्नायी, इ०.

स्नायु [सं०] पु० प्राण्याच्या शरीरांतील ज्या शिरा किं० धमन्या त्या प्रत्येक. ❀ **स्नायुगत वि०** स्नायूंत असलेला (रोग, विकृति).

स्निग्ध [सं०] वि० १ प्रेमयुक्त; स्नेही; प्रेमळ. २ तेलकट किं० तुपट; ओषट. ३ चिकट. ४ तुळतुळीत; तुकतुकीत; चकचकीत. ५ मऊ. ६ ओलें; भिजलेलें. ७ सौम्य; दूध, तूप, इ० नीं युक्त (अन्न). तेल, मिरच्या हें रुक्ष अन्न. ८ रम्य; मधुर. ९ दाट. **पु०** १ आप्त. २ स्नेही; मित्र.

स्नुषा [सं०] स्त्री० सून; आपल्या मुलाची बायको.

स्नेह [सं०] पु० १ प्रेम; प्रेमभाव; प्रेमळपणा; मैत्री; दोस्ती. २ तेलकटपणा; ओषटपणा. ३ ओलावा. ४ चरबी, तेल, इ० स्निग्ध पदार्थ. ५ चिकटपणा. ❀ **स्नेहबस्ति पु०** स्निग्ध पदार्थांचा बस्ति. मागें ' बस्ति ' पहा. **स्नेहाळू, स्नेहाळ वि०** ममताळू; मायाळू. **स्नेहभाव पु०** मैत्रीचा संबंध; मित्रत्वाची भावना. **स्नेहाकर्षण न०** एकाच जातीचे दोन परमाणु एकत्र ठेविणारी शक्ति. **स्नेहांकित वि०**स्नेहानें बांधलेला(पत्रांत). **स्नेहाभिलाषी वि०** कोणेकाच्या स्नेहाची इच्छा करणारा (पत्रांत). **स्नेहार्द्र वि०** प्रेमानें युक्त; प्रेमळ. **स्नेही पु०** मित्र; दोस्त.

स्पंदन [सं०] न० १ कांपणें. २ स्फुरण. ३ गर्भाचें चलन. [३बरोबरी.

स्पर्धा [सं०] स्त्री० १ चढाओढ. २ मत्सर.

स्पर्धी [सं० स्पर्धिन्] १ मत्सरी. २ अभिमानी. ३ जोडीदार. ❀ **प्रतिस्पर्धी [सं० प्रतिस्पर्धिन्] पु०** १कुस्ती,वाद,इ०मध्यें उलट पक्षाचा मनुष्य. २ एकाच मानासाठीं किं० स्थानासाठीं यत्न करणारे जे असामी ते परस्परांचे प्रतिस्पर्धी.

स्पर्श [सं०] पु० १ एक पदार्थ दुसऱ्या पदार्थास लागणें; शिवणें. २ कांहीं एक पदार्थ शरीरास लागल्यानें त्याचें जें ज्ञान बुद्धीस होतें तें किं० जी भावना मनाला होते ती. ३ हें ज्ञान किं० ही भावना उत्पन्न करणारी जी शक्ति ती. ४ ही शक्ति ज्या इन्द्रियाला असतें तें इंद्रिय. ५ ह्या इंद्रियाचा विषय. ६ शरीराची त्वचा. ७ संपर्क; संयोग. ८ परीस.–जो लोखंडास लागला असतां लोखंडाचें सोनें होतें. ९

(व्याकरण) क पासून म पर्यंत जे वर्ण ते प्रत्येक. १० टक्कर. ११ युद्ध. १२ हेर. १३ वायु. १४ पदार्थाचा अत्यल्प अंश; उ० ह्या लाडवाला तुपाचा स्पर्श नाहीं; उ० त्याच्या हृदयांत दयेचा स्पर्श नाहीं; उ० त्याला व्याकरणाचा स्पर्श नाहीं. ꣸ **स्पर्शेंद्रिय न०** त्वचा. **स्पर्शमणि पु०** परीस. **स्पर्शस्नान न०** ग्रहणाचे आरंभीं करतात तें स्नान. **स्पर्शास्पर्श पु० ए० व०** सोंवळे आणि ओंवळे पदार्थ किं० माणसें यांचा एकमेकांना झालेला स्पर्श; विटाळाची कालवाकालव; अमुक माणसाला किं० पदार्थाला शिवणें किं० न शिवणें हें कर्म (योग्य आहे हा विचार.)

स्पर्शणें, स्पार्शणें [सं० स्पृश्]**स०क्रि०**शिवणें; ०ला हात लावणें; ०शीं संबद्ध होणें किं० जुळणें.

स्पर्शन [**सं०**] **न०** १ स्पर्श करणें किं० शिवणें ही क्रिया. २ संबंध. ३ स्पर्शज्ञान. ४ स्पर्शेन्द्रिय. **पु०** वारा; वायु.

स्पश [**सं०**] **पु०** १ हेर. २ द्रव्यासाठीं हिंस्र पशूंशीं झुंजणें.

स्पष्ट [**सं०**] **वि०** १ उघड; व्यक्त; ज्याच्या संबंधानें शंका किं० घोटाळा नाहीं असें. २ उमललेलें (फूल); प्रफुल्लित. ३ तंतोतंत मोजणी किं० गणती ज्यांत केलेली आहे असें (गणित, कृत्य, हिशेब, इ०). ४ खरें; वस्तुस्थितीस धरून असलेलें. ५ जें समजावयास खटपट करण्याची जरूरी नाहीं असें. ꣸ **स्पष्टगर्भा स्त्री०** गरोदरपणाचीं लक्षणें जिच्या मुखावर किं० शरीरावर स्पष्ट दिसूं लागलीं आहेत अशी(स्त्री).**स्पष्टार्थ वि०** स्पष्टपणें दिसणारा किं०प्रतीतीस येणारा (विषय, वस्तु). **स्पष्ट प्रतिपत्ति स्त्री०** पदार्थाचें स्पष्ट रूपानें जें ज्ञान होतें तें. **स्पष्टभाषी,स्पष्टवक्ता**[**सं०** स्पष्टभाषिन्, स्पष्टवक्तृ] **पु०** १ कोणाची भीडमुरवत न ठेवितां आपले विचार स्पष्टपणें सांगणारा. २ ज्याचें भाषण असंदिग्ध आहे किं० असतें असा (मनुष्य). **स्पष्टीकरण न०** कोणेक विषयाचा किं० अर्थाचा उलगडा किं० खुलासा. **स्पष्टीकृत वि०** जें स्पष्ट करण्यांत आलें आहे असें; ज्याचा उलगडा किं० खुलासा करण्यांत आला आहे असा.

स्पर्शन [**सं०** स्पर्शन्] **न०** १ स्पर्श; चिकटणें; लागणें. २ स्पर्शानें होणारें ज्ञान. ३ स्पर्शेन्द्रिय; त्वचा हें इंद्रिय.

स्पृश्य [**सं०**] **वि०** ज्याला स्पर्श करतां येईल किं० करावयास हरकत नाहीं असा (माणूस, पदार्थ).

स्पृष्ट [**सं०**] **वि०**१ ज्याला स्पर्श करण्यांत आला आहे असा; स्पर्श केलेला. २ अनुभविलेला. ꣸ **स्पृष्टास्पृष्ट न०,स्पृष्टास्पृष्टि स्त्री०** परस्परांस स्पर्श करणें.

स्पृहणीय [**सं०**] **वि०** १ इच्छा करण्याजोगें; इच्छिण्याजोगें. २ श्लाघ्य; स्तुत्य.

स्पृहयालु [**सं०**] **वि०** इच्छिणारा; उत्सुक.

स्पृहा [**सं०**] **स्त्री०** इच्छा.

स्पृह्य [**सं०**] **वि०** इच्छिण्यास योग्य; वांछनीय; इष्ट.

स्फटिक [**सं०**] **पु०** एक प्रकारचा टणक पांढरा दगड. ह्याच्या जपमाळा इ० पदार्थ करतात.

स्फटा, स्फटी [**सं०**] **स्त्री०** तुरटी.

स्फाटिक [**सं०**] **वि०** स्फटिकाचा केलेला किं०बनविलेला. **न०** स्फटिक. वर 'स्फटिक' पहा.

स्फालन [**सं०**] **न०** १ कंप; चलन. २ घर्षण. ३ थोपटणें.

स्फिच् [**सं०**] **स्त्री०** १ कुल्ला. २ यज्ञपात्रविशेष. ꣸ **स्फिगास्थि न०** पाठीच्या कण्याचें टोक.

स्फीत [**सं०**] **वि०** १ वृद्धिंगत. २ समृद्ध (देश). ३ पुष्ट, लठ्ठ, गुबगुबीत (शरीर, गात्र). ४ मोठें, विस्तीर्ण, विशाल. ५ पुष्कळ, विपुल. ६ सुजलेलें, फुगलेलें. ७ रक्तपीति, गरमी, इ० आनुवंशिक रोगानें ग्रस्त. **टीप**,-' स्फीत ' चा मराठी अपभ्रंश 'फीत' होय. मागें 'फीत' पहा.

स्फीति [**सं०**] **स्त्री०** १ वाढ, विपुलता, समृद्धि, वैपुल्य. २ आनुवंशिक रोगानें ग्रस्तता. ३ धनधान्यादींच्या योगानें देशाची संपन्नता. ४ गालाचा फुगीरपणा; सूज. ५ (**मराठींत**) बढाई, फुशारकी (मारणें). **टीप**,-' स्फीति ' चीं मराठी अपभ्रष्ट रूपें ' स्फीत, ' ' फीत. मागें ' फीति ' पहा.

स्फुंजणें पुढें ' स्फुंदणें ' पहा.

स्फुट [सं०] वि० १ फुटलेलें (पात्र,धोंडा, इ०). २ विकसित (फूल, कळी, पान). ३स्पष्ट-पणें दिसणारें; दृग्गोचर . ४ उघड; स्पष्ट; व्यक्त. ५ स्वच्छ; निर्मल. ६ (**मराठींत**) ग्रंथांत अंग-भूत नसलेला (श्लोक, वाक्य). ७ (**मराठींत**) ज्याचा अर्थ समजावयास संदर्भाची जरूरी नाहीं असा ग्रंथांतून वेगळा काढलेला(भाग,श्लोक,उतारा, इ०). ८ (**मराठींत**) लहान, किरकोळ (प्रक-रण, विषय, इ०). ९ (**ज्योतिष**) भासमान (सूर्यादींची गति).

स्फुटन [सं०] न० १ फुटणें. २ फुलें, कळ्या, इ० चें उमलणें.

स्फुटित [वि०] वि० १ फुटलेलें. २ उमल-लेलें, विकसलेलें. ३ प्रकट; व्यक्त केलेलें किं० झालेलें.

स्फुत्कर [सं०] पु० अग्नि.

स्फुंदणें [सं० स्फुंद] अ० क्रि० रडणें आवरण्याचा प्रयत्न सफल न झाल्यामुळें दवकत दवकत रडणें.

स्फुंदन [सं०] न० दवकत दवकत रडणें.

स्फुरण [सं०] न० १ फुरफुर असा आवाज किं० असा आवाज करणें. २ डोळा, बाहू, इ०चा कंप; उ० नेत्राचें स्फुरण. ३ (वीज, रत्न,प्रकाश इ० चें) चमकणें. ४ मनांत अकस्मात् कांहीं विचार किं० कल्पना येणें किं० सुचणें किं०आठ-वणें. ५ कांहीं गोष्ट करण्याविषयीं कोणेकाला जी एकदम उत्कट इच्छा उत्पन्न होते ती; वाद, कुस्ती, मारामारी, इ० मध्यें भाग घेण्याविषयीं जी अनावर आणि आकस्मित् इच्छा ती.६ चंद्र, सूर्य, दिवा, इ० च्या प्रकाशाचें हालणाऱ्या पाण्याच्या पृष्ठभागावर होतें तें कंपन.

स्फुरणें [सं०स्फुर्]अ०क्रि०१कांपणें;हादरणें; थरथरणें. २ मनांत अकस्मात्(कांहीं कल्पना)येणें, सुचणें, किं०आठवणें.३डोळा किं० कोणतेंही गात्र यांमध्यें किंचित् काल जोराचें चलनवलन होणें. ४ प्रकाशकिरण पाण्याच्या हालणाऱ्या पृष्ठभागा-वर नाचणें.

स्फुरद्रूप [सं०] वि० १ स्पष्टपणें दिसणारा किं० दिसलेला. २ थरथरणारा; हालणारा. ३ पूर्णपणें आठवलेला किं० आठवत असलेला.

स्फुलिंग पु०, न०, **स्फुलिंगा** स्त्री० [सं०] १ अग्नीची ठिणगी. (**लाक्षणिक**) २ अत्यन्त सूक्ष्म भाग.

स्फूर्ज [सं०] पु० १ मेघगर्जना. २ वज्र. ३ स्फूर्ति.

स्फूर्जथु, स्फूर्जथु पु०, **स्फूर्जन** न० [सं०] विजांचा कडकडाट.

स्फूर्त [सं०] वि० स्फुरलेलें. वर ' स्फुरणें' सर्व अर्थीं पहा.

स्फूर्ति [सं०] स्त्री० १ स्फुरणें. २ प्रादुर्भाव होणें;प्रादुर्भूत होणें.३अकस्मात् कांहीं गोष्ट सुचणें किं०आठवणें. ४उमलणें; विकसणें.५उत्कट इच्छा.

स्फोट [सं०] पु० १ फुटणें; फाटणें. २ उघड होणें किं० करणें; कांहीं रहस्याचें प्रकटी-करण किं०प्रकटीभवन. ३फोड; गळूं. ४ध्वनीचा मनावर.होणारा.परिणाम.५परा ह्या जातीची वाणी (शब्द तन्मात्र). मागें ' परा ' पहा. ६ नाद-ब्रह्म. ७ ज्वालामुखीचा उद्रेक.८ कळीचें उमलणें.

स्फोटन [सं०] वि० १ फोडणें; विदारण. २ चुटकी वाजविणें. ३ पाखडणें. ४ विकसणें.

स्मय [सं०] पु० १ आश्चर्य. २ गर्व; ताठा; उद्धटपणा.

स्मर [सं०] पु० १ स्मरण. २मदन; मन्मथ. ॐ **स्मरहर, स्मरशासन** पु० शंकर,–ज्यानें मन्मथास जाळून भस्म केलें.

स्मरण [सं०] न० १ स्मृति; आठवण. २ चिंतन. ३ (**साहित्य**) एक अलंकार. पूर्वीं अनुभविलेल्या गोष्टीचें तत्सदृश वस्तु पाहिल्यानें स्मरण झालें अशा अर्थाचें विधान. ॐ **स्मरणप-दवी** स्त्री० मृत्यु, मरण. **स्मरणटिपण** न०आठ-वणीसाठीं केलेलें टांचण. **स्मरणी** [सं० स्मरण्] स्त्री० १ कोणेक गोष्ट सतत मनांत आणणें; कोणेक गोष्टीचा निदिध्यास (घेणें); उ० त्या मुलानें सकाळपासून आईची स्मरणी घेतली आहे. २ देवाचीं नांवें मनांत उच्चारून त्यांची संख्या मोजण्याची मण्यांची माळ.

स्मरणीय [सं०] वि० महत्त्वाचा म्हणून लक्षांत बाळगण्याच्या योग्यतेची (कांहीं गोष्ट).

स्मरणें [सं० स्मृ] अ० क्रि० (कांहीं गोष्ट) कोणेकास आठवणें किं० त्याच्या स्मृतींत येणें.

स० क्रि० १ मनांत घेणें; महत्त्वाचा समजणें; उ० मी तुजवर उपकार केले तें तूं स्मरत नाहींस. २ (कांहीं विसरलेली गोष्ट) प्रयत्नानें मनांत प्रादुर्भूत करणें. ३(देवाचा) मनांत जप करणें;(ईश्वरनामाची)मनांत आवृत्ति करणें.

स्मर्तव्य [सं०] वि० १ स्मरण्यास योग्य; चिंतिण्यास योग्य. २ लक्ष्यांत धरून ठेवण्याच्या महत्वाची (कांहीं गोष्ट).

स्मर्ता [सं० स्मर्तृ] वि० स्मरणारा; लक्ष्यांत घेणारा किं० ठेवणारा; उ० न स्मर्त्याला उपकार आणि मढ्याला शृंगार (व्यर्थ होत).

स्मर्तृत्व [सं०] न० १ स्मरणांत ठेवण्याची शक्ति. २स्मरणांत कांहीं गोष्ट ठेविली जाण्याची पात्रता किं० लायकी.

स्मशान, स्मशानवैराग्य, इ० मागें ' श्मशान, ' ' श्मशानवैराग्य, ' इ० पहा.

स्मारक [सं०] वि० आठवण करून देणारें (टिपण, पदरास बांधलेली गांठ, किं० कोणताही पदार्थ). न० घडलेल्या एकाद्या गोष्टीचें किं० कोणा थोर पुरुषाचें पुतळा,इमारत, पुस्तकालय, इ० रूप जो स्मरण करून देणारा पदार्थ तो.

स्मार्त [सं०]वि० १स्मरणांतलें. २ मनु इ० च्या स्मृतींत सांगितलेलें (कर्म,विधि,संस्कार,इ०). ३ स्मृतिधर्मवेत्ता. ४ स्मृतिधर्मानुयायी. ५ (वैष्णवांच्या व्यावर्तकत्वें) एका विशिष्ट संप्रदायाचा (मनुष्य).꠸ **स्मार्ताग्नि** पु० गृह्याग्नि. **स्मार्तकाळ** पु० स्मृतींत सांगितलेला कायदेशीर कालावधि (म्ह० शंभर वर्षांचा).

स्मित [सं०] वि० १ जो हसला तो. २विकसलेलें, उमललेलें (फूल). न० गालांत हसणें (करणें).

स्मृत [सं०] वि० १ आठवलेलें; स्मरलेलें. २ मन्वादि स्मृतींत सांगितलेलें किं० उपदेशिलेलें. न० १ स्मरण; स्मृति. २ स्मृतींत सांगितलेला धर्म.

स्मृति [सं०] स्त्री० १ स्मरण; आठवण. २ स्मरणशक्ति. ३ धर्मशास्त्र; हिंदू कायद्यांचा ग्रंथ. ꠸ **स्मृतिपथ** पु०, **स्मृतिपद** न० मृत्यु; मरण. **स्मृतिशेष** वि० (लाक्षणिक) मृत; मेलेला. **स्मृतिमान्** वि० ज्याची स्मरणशक्ति चांगली आहे असा. **स्मृतिविरोध** पु० १ स्मृतिग्रंथाशीं विसंवाद. २ दोन किं० अधिक स्मृतिग्रंथांत कर्तव्य म्हणून जें सांगितलें आहे त्यांत भिन्नता म्ह० एकांत एक आणि दुसऱ्यांत दुसरें असणें.

स्यंदन [सं०]पु०१रथ.२रणांगणावर न्यावयाचा रथ. न० १ ठिबकणें; स्रवणें;थेंबांथेंबांच्या रूपानें पाझरणें. २ पाझरणें (कोणत्याही प्रकारें).

स्यमन्तक [सं०] पु०सूर्यानें सत्राजिताला दिलेला मणि. [गर्भाचें पतन.

स्रव [सं०] पु० १ पाझर; पाझरणें. २

स्रवण [सं०] न० १ पाझरणें. २ घाम, मूत्र, पू, रक्त, इ० वाहाणें.

स्रवणें [सं० स्रु] अ० क्रि० थेंबांथेंबांनीं बाहेर येणें; पाझरणें; गळणें.

स्रष्टा [सं० स्रष्टृ] पु० १उत्पादक. २ ब्रह्मदेव.

स्रस्त [सं०] वि० १ पडलेलें; घसरलेलें. २ ढिलें; सैल.

स्राव [सं०] पु० १ पाझर; थेंबांथेंबांच्या रूपानें वाहाणें किं० जें रक्त, पाणी, इ० वाहलें तें. २ झरा. ३ गर्भिणीचा पांच महिन्यांपर्यंतचा अपूर्ण गर्भ बाहेर पडणें.

स्रावक [सं०] वि० पाझरावयास लावणारें (औषध, खाद्य, इ०).

स्रुघ्न [सं०] पु० सज्जखार.

स्रुचा [सं० स्रुच्] स्त्री० अग्नींत तूप इ० टाकण्याची वटपत्राकार लाकडी पळी.

स्रुत [सं०] वि० पाझरून बाहेर पडलेलें.

स्रुति [सं०] स्त्री० १ पाझर; प्रवाह. २ वृक्षादींचा चीक. [पहा.

स्रुव पु०, **स्रुवा** स्त्री० [सं०] वर ' स्रुचा '

स्रोत [सं०] न० जलप्रवाह.

स्रोत [सं० स्रोतस्] न० १प्रवाह. २नदीचा लोंढा. ३ वेग.४नदी. ५ लाट. ६ नाक, डोळे, इ० जीं शरीराचीं रंध्रें तीं प्रत्येक.७ वीर्य; रेत. ꠸ **स्रोतोवहा** स्त्री० नदी. **स्रोतस्वती, स्रोतस्विनी** स्त्री० नदी.

स्व [सं०] वि० १ स्वताचें. २ स्वाभाविक. ३ स्वजातीय. पु० १ आपण. २ नातलग; भाऊबंद; ज्ञाति. ३ आत्मा. पु०, न० १ धन; द्रव्य. २ स्वभाव. ३ (गणित) धनसंख्या. ꠸

'स्व' पूर्वपदीं येऊन घटित जे शब्द ते खालीं यथास्थानीं पहा.

स्वक, स्वकीय [सं०] वि० आपलें; स्वताचें.

स्वकपोलकल्पित [सं० स्व (आपला)+ कपोल (गाल) + कल्पित (रचलेलें)]वि० मागें 'कपोल' मध्यें दोन्हीं अर्थ पहा.

स्वकर्म [सं० स्वकर्मन्] न० १ जाति, वर्ण, अधिकार, इ० ला अनुसरून जें कोणेकाचें कर्तव्य तें; उ०क्षत्रियानें स्वदेशासाठीं लढावें हें त्याचें स्वकर्म होय.२कोणेकानें हट्टानें किं०उत्सेखळपणानें करावयाचें म्हणून ठरविलेलें जें कर्म तें (चांगल्या किं० वाईट अर्थानें).

स्वकष्टसंपादित, स्वकष्टार्जित [सं० स्व (आपला)+कष्ट (अंगमेहनत)+संपादित, अर्जित (मिळविलेला)] वि० आपल्या कर्तृत्वानें किं० श्रमानें मिळविलेलें (शेत, घर, वतन, द्रव्य, इ०). 'वडिलोपार्जित' किं० 'दान म्हणून मिळालेलें' ह्याच्या उलट.

स्वकीय [सं०] वि० १ आपलें; स्वताचें. २ आपल्या नात्याचा. ३ आपल्या हक्काचा.**स्वकीया** स्त्री० १ आपली स्वताची वायको. २ आपली स्वताची रांड किं० रखेली.

स्वगत [सं०] वि० आपल्या स्वतासंबंधाचें क्रि० वि० (नाटकांत) आपल्याशीं (भाषण).

स्वगोचर [सं०स्व+गोचर] वि० १ आपल्या आटोक्यांतील. २ आपणाला समजणारें किं० समजलेलें.

स्वगोत्री[सं०स्वगोत्र]वि०आपल्याच गोत्राचा.

स्वचक्र [सं०] न० आपल्याच देशाचें सैन्य. ह्याच्या उलट 'परचक्र' (म्ह० शत्रूचें सैन्य).

स्वच्छ [सं० सु (अत्यन्त)+अच्छ(निर्मल)] वि० १ अत्यन्त शुद्ध किं० पवित्र किं० निर्मळ. २मलरहित;ज्यांत घाण नाहीं असें (दूध,पाणी,इ०).

स्वच्छंद [सं०] पु० १ आपली लहर किं० इच्छा. २ दुसऱ्याची नियंत्रणा नसलेला. ॐ **स्वच्छंदानें** क्रि० वि० आपल्या लहरीप्रमाणें (चांगल्या किं० वाईट अर्थानें). **स्वच्छंदी** वि० आपल्या लहरीप्रमाणें वागणारा (वाईट अर्थानें).

स्वज [सं०] वि० आपला; आपल्याच नात्याचा किं० संबंधाचा.पु० आपला पुत्र.

स्वजन[सं०स्व+जन] पु०१ भाऊबंद; ज्ञाति.२ कोणेक देवाचा किं० साधूचा भक्त.

स्वजाति [सं०] स्त्री० आपली जात; आपला वर्ग.ॐ **स्वजातीय** वि० आपल्या जातीचा, गुणाचा, किं० धर्माचा.

स्वतंत्र [सं०]वि० १ पराधीन किं० परावलंबी नव्हे असा. २ दुसऱ्याच्या गुलामगिरींत नसलेला (देश, समाज, माणूस, प्राणी). ३ वयांत आलेला.

स्वता, स्वतें, स्वतः [सं० स्वतस्] क्रि० वि० जातीनें; प्रत्यक्ष; उ० तुम्ही स्वतः गेलां तरच हें काम होईल; उ०आधीं दूध स्वतःच गोड, त्यांत साखर घातली म्हणजे गोडी काय विचारावी ? ॐ **स्वतःसिद्ध** वि० १ आपल्या आपण झालेला; निसर्गांत निर्मिला गेलेला असा; उ० डोंगर, पर्वत, हे स्वतःसिद्ध पदार्थ. घर, वाडा, हे मनुष्यानें केलेले पदार्थ. २ स्वताच्या कर्तृत्वावर अवलंबून असलेला; दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा ज्याला नाहीं असा. **स्वतःप्रमाण** वि० १ जें प्रमाणांनीं सिद्ध करण्याची गरज किं० आवश्यकता नाहीं असें. २ जे स्वताच प्रमाण घेण्याच्या योग्यतेचें आहेत, ज्यांना दुसऱ्या प्रमाणांची गरज नाहीं असे (वेद). **स्वतःसिद्ध वस्तु** न० जें सिद्ध करण्याची गरज नाहीं असें विधान; उ० बापापेक्षां मुलाचें वय कमी असणार; उ० जें ह्या काळीं येथें आहे तें ह्याच काळीं तेथें असणार नाहीं हीं विधानें.

स्वत्व [सं०] न० १ स्वातन्त्र्य. २ मालकी; स्वामित्व; हक्क. ॐ **स्वत्वनिवृत्ति** स्त्री० दान देणें, विकून टाकणें, सोडून जाणें, इ० मुळें आपल्या पदार्थावरचें आपलें स्वामित्व सोडून देणें. **स्वत्वबोधन** न० पदार्थावर आपला हक्क स्थापित करणें ही क्रिया. **स्वत्वहानि** स्त्री० १ पदार्थावर आपला असलेला हक्क नष्ट होणें. २ आपलेपणाचा अभाव किं० नाश.

स्वदस्तूर [सं० स्व; म० स्व+फा० दस्तूर (सही)] न० १ आपली सही; स्वताची सही. २ आपण स्वता लिहिलेला कागद, पत्र, खत, इ०. ह्याच्या उलट कारकुनाकडून किं० मित्राकडून लिहविलेला कागद इ०.

स्वधर्म [सं०]पु० १ आपला धर्म;उ०स्वधर्मांत मरणसुद्धां श्रेयस्कर आहे. २ ज्या त्या जातीला योग्य किं०विहित जें कर्तव्य तें; आपल्या वर्णाला उचित जें कर्म तें.

स्वधा [सं०] **स्त्री०** १ पितरांना दिलेलें अन्न. २ श्राद्ध. ३ मातृकाविशेष. **क्रि० वि०** पितरांप्रीत्यर्थ. ॐ **स्वधाकर पु०** और्ध्वदैहिक करणारा. **स्वधाप्रिय पु०** १अग्नि.२तीळ.३पितर. **स्वधाभुक् पु० अ० व०** १ पितर. २ देव.

स्वधिति, स्वधिती [**सं०**] **स्त्री०** कुऱ्हाड.

स्वधीति [**सं०**] **पु०** चांगलें पढणारा ब्रह्मचारी.

स्वन [**सं०**]पु० आवाज; ध्वनि.

स्वनित [**सं०**] **वि०** ध्वनियुक्त; वाजणारें. **न०** १ ध्वनि. २ मेघगर्जना.

स्वपन [**सं०**] **न०** १ निजणें. २ निद्रा.

स्वपरभाव [**सं०**] **पु०** मागें ' आप ' मध्यें ' आपपरभाव ' पहा.

स्वप्न [**सं०**] **न०** १ झोप. २ झोपेंत पाहिलेला देखावा (पडणें, पाहाणें). ३ जीवावस्थाविशेष. ॐ **स्वप्नदोष पु०, स्वप्नावस्था स्त्री०** स्वप्नांत किं० झोप लागली असतां वीर्य पडणें. **स्वप्नप्रपंच पु०, स्वप्नसृष्टि स्त्री०** स्वप्नांत पाहिलेला देखावा. **स्वप्नवत् वि०**१ स्वप्नांत पाहिल्यासारखें;जणों काय स्वप्नांत पाहिलें असें.२क्षणभंगुर; अशाश्वत. **स्वप्नविचार पु०** स्वप्नांत जें पाहिलें त्याचा उलगडा किं०तें वस्तुस्थितीला लागू करणें किं०त्यावरून भविष्य वर्तविणें. **स्वप्नाकार वि०** स्वप्नासारखें; क्षणभंगुर; अशाश्वत (ऐश्वर्य इ०).

स्वप्रकाश [**सं०**] **वि०** १ अंगच्या तेजानें प्रकाशित (सूर्य). परप्रकाश म्ह० दुसऱ्या खस्थ गोलाच्या तेजानें प्रकाशणारा (चंद्र इ०). २ स्वताच्या बुद्धिमत्तेनें किं० प्रयत्नानें वैभवास चढून प्रसिद्ध झालेला. समर्थांची थुंकी चाटून किं० लाच भरून वैभवास किं० प्रसिद्धीस चढलेला जो तो परप्रकाश.

स्वप्रख्य [**सं०**] **वि०** स्वताचा पराक्रम, विद्वत्ता, चातुर्य, इ० गुणांमुळें जो लोकांस ठाऊक आहे असा म्हणजे हा अमक्याचा मुलगा किं० अमक्याचा नातू किं० अमक्याचा जांवई असें ज्याच्याबद्दल सांगावें लागत नाहीं असा.

स्वभाव [**सं०**] **पु०** १ प्रकृतिगुण; कोणेकाच्या अंगीं भाषण, वर्तन, रागीटपणा, सौम्यपणा, इ० जो कांहीं धर्मविशेष असतो तो. २ पदार्थाच्या ठायीं जो निसर्गसिद्ध गुण किं० धर्म असतो तो; सहज धर्म.३पदार्थाची किं० माणसाची प्रकृति; मूळ गुण; सहज धर्म. ४ विशिष्ट वर्तनाला प्रेरणारी जी मनाची घटना किं० रचना ती; उ० त्याचा स्वभाव भारी तापट आहे. ५ (**वेदान्त**) माया; प्रकृति. ॐ**स्वभावोक्ति स्त्री० (साहित्य)** एकाद्या चेतन किं० अचेतन वस्तूचें स्वरूप, स्वभाव, गुण, वर्ण, किं०शरीराचें संस्थान, हालचाली, इ० चें हुबेहूब वर्णन. उदाहरणें आणि विशेष खुलासा आमचें ' अथालंकारांचें निरूपण ' ह्या पुस्तकांत पहा. **स्वभावगत्या,स्वभावगतीनें क्रि० वि०**सहजपणें; मुद्दाम किं० बुद्धिपुरस्सर नव्हे अशा रीतीनें. **स्वभावतः क्रि० वि०**१स्वभावानें;जात्या;उ०सर्व मुलें स्वभावतःच चंचल असतात. २ अंगच्या गुणानें; उ० पाणी स्वभावतः सखल प्रदेशाकडे धावतें. **स्वभाववाद पु०** ह्या जगाचा उत्पादक आणि नियंता ईश्वर नाहीं, जग स्वयंसिद्ध आहे आणि जगांतील घडामोडी निसर्गाच्या नियमांनीं किं० प्रेरणांनीं होतात असें मत. अशा मताचा जो तो ' स्वभाववादी. ' **स्वभावसिद्ध वि०** पदार्थाच्या घटनेंतच उत्पन्न झालेला; बाहेरून आलेला किं० घातलेला नव्हे असा (धर्म).

स्वभाविक पुढें ' स्वाभाविक ' पहा.

स्वभू [**सं०**] **पु०** १ ब्रह्मदेव.२विष्णु.३ शंकर. ४ईश्वर.

स्वयं [सं० स्वयम्] **क्रि० वि०** स्वतः;अंतःस्फूर्तीनें. ॐ **स्वयंज्योति वि०** स्वताच्या सामर्थ्यानें प्रकाशणारा. **स्वयंदत्त वि०** स्वता दत्तक गेलेला; बापानें दत्तक दिला नाहीं असा. **स्वयंदास पु०** आपलीं कामें आपणच करून घेतो असा; ज्याचीं कामें करावयाला नोकर चाकर कोणी नाहीं असा. **स्वयपाक पु०** १ आपल्यासाठीं आपल्याच हातानें रांधलेले ,भाजलेले,किं० शिजविलेले पदार्थ समुच्चयानें; आपणच स्वता सिद्ध केलेले भोजनाचें पदार्थ समुच्चयानें. २ भोजनार्थ (कोणीही)सिद्ध केलेलें पदार्थ. **टीप,**–

"स्वयंपाक"चें अपभ्रष्ट रूप 'सैंपाक'. ह्यावरून सैंपाकर, सैंपाकी, सैंपाकीण, इ० साधित शब्द झालेले आहेत. **स्वयंप्रकाश** वि० १ अंगच्या तेजानें शोभणारा; मेहनतीनें विद्वान झालेला. **स्वयभु, स्वयंभू** वि० स्वतः उत्पन्न होणारें किं० झालेलें. पु० ब्रह्मदेव. **स्वयंवर** पु० स्वताचा पति स्वता पाहून ठरविणें. **स्वयंवरा** स्त्री० स्वताचा पति स्वता पाहून ठरविणारी स्त्री. 'पतिंवरा' ह्याच अर्थी. **स्वयंभावें** क्रि० वि० स्वताच्याच प्रेरणेनें; आपखुषीनें. **स्वयमेव, स्वयें** क्रि० वि० स्वतः; जातीनें. **स्वयमुक्ति** स्त्री० स्वताची जबानी किं० साक्ष. **स्वयंवह** वि० आपल्या आपण चालणारें (यंत्र).

स्वर् [सं०] क्रि० वि० स्वर्गामध्यें. ❀ **स्वर्धुनी** स्त्री० स्वर्गातील नदी.

स्वर [सं०] पु० १ आवाज; ध्वनि. २ (**संगीत**) सा, री, ग, म, प, ध, नि, ह्यांपैकीं प्रत्येक. ३ (**व्याकरण**) उदात्त, अनुदात्त, आणि स्वरित, हे उच्चारांतील आघात प्रत्येक. ४ नाकाच्या दोन नाकपुड्यांतून वाहातात ते वायु. ५ भाषेच्या वर्णमालेंतील अ, आ, इ० औपर्यंत जे वर्ण ते प्रत्येक,—(व्यंजनांच्या व्यावर्तकत्वें). ६ कोणा माणसाचा शब्दोच्चारणाचा प्रकार. ७ विशिष्ट वाद्यांतून निघणारा विशिष्ट ध्वनि. ❀ **स्वर देणें** दुसऱ्यानें आरंभिलेल्या सुराचें पूरण करणें; त्याच्या सुरांत आपला सूर सामील करणें. **कोणेकाचा स्वर वाहाणें** (किं० **भजणें**) कांहीं काम करण्याविषयीं त्याची प्रवृत्ति होणें; तो तें करण्याकडे कलणें. **स्वरकरण** न० सा, री, ग, म, प, ध, आणि नी, ह्या अक्षरांच्या उलटापालटीनें बांधलें असतें तें गाणें. **स्वरग्राम** पु० सा, री, ग, म, प, ध, आणि नी, हे गायनांतलि सात स्वर समुच्चयानें. **स्वरपत्तन** न० सामवेद. **स्वरब्रह्म** न० नादब्रह्म. **स्वरबद्ध** वि० संगीत शास्त्राला अनुसरून जें (गायन किं० वादन) तें. **स्वरभंग, स्वरभेद** पु० घसा बसणें ही विकृति. **स्वरमंडली, स्वरमंडलिका** स्त्री० सारमंडळ नांवाचें वाद्य. **स्वरशास्त्र** न० नासिकाद्वारानें जें वायु बाहेर पडतात त्यांच्या गतीवरून प्रश्न पाहाण्याची रीति ज्यांत निरूपिली आहे तें शास्त्र. **स्वरशून्य** वि० संगीतशास्त्राला अनुसरून नसलेलें (गाणें, वाजविणें, इ०). **स्वरक्रम** पु० आलाप. **स्वरसंधि** पु० (**व्याकरण**) दोन स्वजातीय किं० विजातीय स्वरांचा संयोग; उ० गंगा+अर्पण=गंगार्पण; हरि+इच्छा=हरीच्छा; भानु+उदय=भानूदय; मुख+इंदु=मुखेंदु; शीत+उष्ण=शीतोष्ण; मत+ऐक्य=मतैक्य; गुरु+आज्ञा=गुर्वाज्ञा; इ०.

स्वराज्य [सं० स्व+राज्य] न० आपल्या लोकांनीं, आपल्या लोकांच्या हितासाठीं, आपण नेमिलेल्या नोकरांकडून चालविलेली आपणास जबाबदार अशी राज्यपद्धति.

स्वरित [सं०] वि० १ वाजणारें. २ सूर धरलेलें (पद). पु० स्वरविशेष; उदात्त, अनुदात्त, आणि स्वरित हे उच्चारांतील आघात होत.

स्वरूप न० १ कोणेक पदार्थाचें जें दिसतें तें रूप. २ देखावा. ३ साहजिक स्थिति. ४ पदार्थाची रचना; घटना; विशिष्ट गुणधर्मानीं युक्त अशी जी पदार्थाची मांडणी किं० घटना ती. ५ प्रकार. मागें 'रूप' सर्व अर्थी पहा. ❀ **स्वरूपप्राप्ति** स्त्री० ब्रह्मांत विलीनता. **स्व-रूपवान्** वि० सुंदर; देखणा.

स्वर्ग [सं०] पु० इंद्रादिदेवांचें वसतिस्थान. ❀ **कोणेकाला स्वर्ग दोन बोटें उरणें** त्यानें गर्वानें अतिशय फुगून जाणें; त्याणें उन्मत्त होणें. **कोणेकाचे स्वर्गाला हात पोंचणें** १ त्यानें इच्छिलेलें जें अति उच्च पद तें त्याला मिळणें; आतुरतेनें इच्छिलेली वस्तु त्याला प्राप्त होणें; तो कृतकृत्य होणें. २ त्याची परावलंबित्वाची दशा संपून तो स्वतंत्र होणें. **स्वर्गीं ध्वज लावणें** मोठें कृत्य करणें, शत कृत्य करणें (उपहासांत). ह्या वाक्प्रचारांत 'स्वर्गीं' हा शब्द गाळला तरी चालतो. **आपण मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं** आपण स्वता कष्ट केल्याशिवाय किं० तसदी घेतल्याशिवाय आपणास सुख होत नाहीं किं० आपली सोय जुळत नाहीं; आपलीं कामें आपण केल्याशिवाय तीं आपल्या मनाप्रमाणें होत नाहींत. **कोणेकानें स्वर्गाची वाट धरणें** तो मरणें. **स्वर्गवासी** [सं० स्वर्गवासिन्] वि० मेलेला.

स्वर्गीय [सं०] वि० स्वर्गांतील (सुख, भोग, इ०).

स्वर्ण [सं०] न० १ सोनें हा धातु. २ सोन्याचें नाणें. ❀ **स्वर्णकार** पु० सोनार. **स्वर्ण**—

पुष्पी स्त्री० सोनटक्का हें झाड. **स्वर्णपुष्प** न० त्याचें फूल.

स्वर्णदी [सं०] स्त्री० गंगानदी.

स्ववैंद्य पु०अ०व०अश्विनी कुमार,–देवांचे वैद्य.

स्वर्लोक पु० स्वर्ग हा लोक.

स्वल्प [सं० सु (अगदीं)+अल्प (थोडें)] अगदीं थोडें; अत्यल्प. ॠ **स्वल्पविराम** पु० लेखनांतील एक चिन्हविशेष (,) हें. **स्वल्पाहार, अल्पाहार** पु० थोडासा फराळ; हलकें खाणें.

स्ववृत्ति [सं०] स्त्री० १ त्या त्या जातीची धर्मशास्त्रानुरूप आचारसरणी. २ आपणा स्वताचें शेत इ० वर चरितार्थ.

स्वसंतोषें, स्वसंतोषानें [सं० स्व+संतोष] क्रि० वि० आपखुषीनें; दुसऱ्याची सक्ती नसतां.

स्वसत्ताक [सं० स्व+सत्ता+क (प्रत्यय)] वि० १ आपल्या सत्तेचा. २ आपल्या देशावर आपलेंच राज्य असणें ह्या रूपाची(शासनपद्धति).

स्वसंवेद्य[सं०]वि०ज्याचें त्यानेंच भोगावयाचें किं० सोसावयाचें असें; ज्याची जाणीव तिऱ्हाइतास होणें शक्य नाहीं असें (सुख, दुःख, इ०).

स्वसा [सं० स्वसृ] स्त्री० बहीण.

स्वस्त मागें ' सस्त, ' ' सस्ता ' पहा.

स्वस्तावणें [म० स्वस्त होणें] अ० क्रि० (विक्रीच्या पदार्थांची)किंमत उतरणें;(पदार्थ)स्वस्त होणें.

स्वस्ति [सं०] स्त्री० उत्कर्ष; कल्याण. न० कुशल.(उद्गार)कल्याण असो ! नमस्कार ! उ० हे राजा, तुला स्वस्ति असो!ॠ**स्वस्त्ययन** न०१अरिष्टशांत्यर्थ मंत्रपाठ, यज्ञ, इ० करणें. २ आशीर्वाद. ३ कर्मसमाप्तीचा आशीर्वाद. **स्वस्तिमुख** पु० १ ब्राह्मण. २ भाट; स्तुतिपाठक. **स्वस्तिमान्** वि०सुखी. **स्वस्तिवाचन, स्वस्तिवाचन (–नि–)क** न० मंगलकार्यारंभींचा विधिविशेष; पुण्याहवाचन. **स्वस्तिवाचनिक** वि०आशीर्वाद देणारा. **रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति** १ रामाचें कल्याण होवो आणि रावणाचें कल्याण होवो ! सर्वांचेंच कल्याण होवो ! २ कोणाचा जय झाला तरी आम्हाला त्याचें महत्त्व नाहीं; कोणत्याही पक्षाची सरशी झाली तरी आम्हाला सारखेंच. हा औदासीन्याचा किं० तटस्थपणाचा किं० बेपर्वाईचा उद्गार आहे. **स्वस्तिक्षेम** क्रि० वि० कोणत्याही प्रकारचा उपद्रव किं०नाश न होतां (असणें, गांवास पोंचणें, इ०).

स्वस्तिक [सं०] न०१भूमि, भिंत, इ० वर आकारविशेषाचें जें चिन्ह काढतात तें. 卐 अशा आकाराचें. २ हात एकावर एक टाकणें. ३ चव्हाठा. ४ पूर्व बाजूला दार आणि इतर बाजूंना देवळ्या असलेला वाडा किं० देवालय. ५ योगाचें एक आसन. ६ मंगल पदार्थ. पु०, न० देवतास्थापनार्थ केलेलें मंडळ. ॠ **स्वस्तिकपाणि** वि० छातीवर स्वस्तिकासारखे हात ठेविलेला.

स्वस्थ [सं०] वि० १ निरोगी. २ सुखी; खुशाल. ३ निश्चयी. ४ स्वावलंबी.

स्वस्थ, स्वस्था, स्वस्थाई, स्वस्थावणें मागें ' स्वस्त, ' 'स्वस्ता,' 'स्वस्ताई,' 'स्वस्तावणें' पहा.

स्वस्थान [सं०] न० १ आपली हक्काची जागा, मुलूख,इ०.२ आपलें जें परिचित स्थळ तें. ३ जेथें आपलें सामर्थ्य असतें असें स्थळ; उ० स्वस्थानीं असलेला नक्र हत्तीलासुद्धां खेचूं शकतो.

स्वस्त्रिय, स्वस्रीय, स्वस्रेय [सं०] पु० आपल्या स्वसेचा म्हणजे बहिणीचा मुलगा; भाचा. ॠ **स्वस्त्रिया, स्वस्रीया, स्वस्रेया** स्त्री० बहिणीची मुलगी म्ह० भाची.

स्वहस्त [सं०] पु० १ हस्ताक्षर. २ पुरावा.

स्वाहित[सं०]न०आपलें हित; स्वतःचें कल्याण.

स्वागत [सं० सु+आगत] न० कोणेकाचा केलेला आदरसत्कार; आपलें घरीं किं० गांवीं कोणी मनुष्य आलें असतां त्याच्याशीं 'या बसा, आला, बरें झालें,' इ० रूप जीं प्रेमभाषणें होतात तीं समुच्चयानें.

स्वागी मागें ' सवागी 'पहा.

स्वाच्छंद्य [सं०] न० १ स्वैरवृत्ति; स्वैरवर्तन. २आपल्या कलाप्रमाणें चालण्याची प्रवृत्ति. ३ अनियंत्रितपणा; एककल्लीपणा.

स्वाड [म० ' द्वाड ' चा जाबदार] वि० जो द्वाड नव्हे तो; शुभ, मंगल (समय, शकुन); सुशील, सद्वर्तनी (माणूस, पशु); कर्तव्यतत्पर. **टीप,**– ' स्वाड ' हा शब्द नेहमीं ' द्वाड ' च्या शेजारीं किं० त्याच वाक्यांत येतो; उ० बाहेर पडतांना स्वाडद्वाड मुहूर्त पहावा; उ० गांवांत कांहीं मुलें स्वाड आणि कांहीं मुलें द्वाड असतात.

स्वातन्त्र्य [सं०] न० १ स्वतन्त्रपणा; मोकळीक. २ आपल्याच देशाच्या राज्यांत असणें ही स्थिति. दुसऱ्या देशाच्या अमलाखालीं असणें हें पारतंत्र्य.

स्वाति, स्वाती [सं०] स्त्री० पंधरावें नक्षत्र. टीप,–ह्या नक्षत्रांत पडलेल्या पावसानें मोत्याची उत्पत्ति होते अशी हिंदूंची समजूत आहे.

स्वाद [सं०] पु० १ चव घेणें. २ खाणें. ३ चव; गोडी. ४ मधुर किं० सुखावह वास. ५ आवड. [२ सुखविणें.

स्वादन [सं०] न० १ वर ' स्वाद ' पहा.

स्वादित [सं०] वि० १चव घेतलेलें; खाल्लेलें. २अनुभविलेलें; उपभोगिलेलें.

स्वादिष्ट [सं०] वि० अत्यन्त गोड, रुचकर, मधुर, सुखावह.

स्वादु [सं०] वि० १ चवदार. २ गोड; मधुर. ३ रमणीय; सुंदर. ४ प्रिय; आवडता. ❀ **स्वादु, स्वाद्वी** स्त्री० द्राक्ष. **स्वाद्वन्न** न० १पक्वान. २ रुचकर किं० चमचमीत खाद्य.

स्वाधीन [सं०] वि० स्वतांच्या तंत्रानें जो वागूं शकतो तो; स्वतंत्र. टीप,–मराठींत शब्दाच्या षष्ठ्यन्त रूपापुढें ' स्वाधीन ' चा क्रि० वि० प्रमाणें उपयोग केला जातो. त्याचा अर्थ ताब्यांत, आज्ञेंत, संरक्षणांत, देखरेखींत, असा होतो; उ० मी बापाच्या स्वाधीन आहें; उ०तुम्ही काशीस जातांना म्हैस कोणाच्या स्वाधीन करणार आहां ?

स्वाध्याय [सं०] पु० १ पाठ करणें. २ वेदांचा अभ्यास; अध्ययन. ३ वेद. ४ प्रतिपदादि अनध्याय सोडून ज्या दिवशीं अध्ययन करण्याची योग्यता आहे असा दिवस. ❀ **स्वाध्यायी** [सं० स्वाध्यायिन्] पु० वेद पढणारा. टीप,–मराठींत ' सहाध्यायी ' बद्दल ' स्वाध्यायी ' हा शब्द चुकीनें योजला जातो.

स्वाभाविक [सं०] वि० स्वभावाला किं० मूलप्रकृतीला धरून असलेलें; नैसर्गिक; स्वभावसिद्ध. ❀**स्वाभाविकपणें** क्रि० वि० सहजपणें; विशेष उद्देश मनांत न धरतां (बोलणें, करणें, इ०); उ० मी तुम्हाला स्वाभाविकपणें बोललों, तुम्हाला खिजविण्यासाठीं बोललों नाहीं.

स्वाभिमान [सं०] पु० स्वताच्या योग्यतेची जाणीव.

स्वाम [सं० स्वामिन्] पु० (मराठींत) आपला धनी, मालक, किं० यजमान; उ० स्वाम आज्ञा करतील त्याप्रमाणें मी वागेन.

स्वामित्व खालीं ' स्वामी ' मध्यें पहा.

स्वामी [सं० स्वामिन्] फ० १ मालक. २ अधिपति; राजा. ३ नवरा; पति. ४ परमहंस; यति. ५ पंडित (पदवी). ६ कार्तिकेय. ७ देव, गुरु, राजा, सन्यासी, तपस्वी, इ० (गौरवानें बोलतांना). ❀ **स्वामित्व** न० मालकी हक्क; मालक ह्या नात्याचा अधिकार. **स्वामिनी** स्त्री० मालकीण; यजमानीण; राणी.

स्वाम्य [सं०] न० १ धनीपणा. २ सत्ता; अधिकार. ३ हक्क.

स्वायत्त [सं०] वि० १ आपल्या स्वाधीन असलेला; स्वतंत्र; आपल्या इच्छेप्रमाणें किं० लहरीप्रमाणें किं० सोयीप्रमाणें वागणारा किं० वागूं शकणारा (माणूस, देश, इ०). 'परतंत्र, '' परावलंबी ' ह्यांच्या उलट. २ आपल्या हातांत किं० ताब्यांत असलेला; आपणाला इच्छा होईल तेव्हां उपयोगांत आणतां येईल असें (सामर्थ्य, गुण, इ०).

स्वार [अ० सवार्] पु० घोड्यावर बसलेला माणूस किं० शिपायी. वि० १ घोड्यावर आरूढ झालेला. २ बैल, हत्ती, उंट, इ० वर बसलेला. ❀ **स्वारी** स्त्री० १ घोडा, उंट, हत्ती, इ० वर आरूढ झाल्याची स्थिति. २ टांगा, गाडी, इ० मध्यें बसणारी किं०बसलेलीं जीं माणसें तीं प्रत्येक; उ० टांग्यांत दोन स्वाऱ्या घेण्याचा आम्हाला हुकूम आहे. ३राजा किं०कोणी वडा माणूस आणि त्याचे नोकर चाकर, गाड्या, घोडे, इ० ची मिरवणूक किं० प्रयाण. ४कोणीही माणूस (गौरवाच्या भाषणांत); उ०मी गेलों तेव्हां ती स्वारी निजली होती (म्ह०तो निजला होता); उ०आतां आपली स्वारी कोणीकडे जाणार ? (म्ह०तुम्ही कोणीकडे जाणार ?) ५ कुस्तींतील एक पेच (घालणें, भरणें). 'स्वारीपेच'ह्याच अर्थीं. ❀**स्वारीचा** वि०

माणूस किं० माणसें वाहाण्याच्या लायकीचा किं० योग्यतेचा; उ० हें स्वारीचें घोडें नव्हे, हें ओझ्याचें घोडें; उ० ह्या स्वारीच्या टांग्यांत इतकीं पोतीं ठेवतां येणार नाहींत. **आपली स्वारी स्त्री०** आपण (विनोदांत). **कोणेकावर स्वारी करणें** त्याच्यावर हल्ला करणें. **स्वारीशिकारी स्त्री०** ए० व० स्वारी करणें, शिकारीस जाणें, इ० रूप जें राजा, अधिकारी, इ० चें प्रयाण तें.

स्वार्थ [सं०] पु० १आपलें हित. २दुसऱ्याचें नुकसान करून साधलेलें स्वताचें हित. ३पुरुषार्थ. ४(व्याकरण)एकादी क्रिया करण्याविषयींचे कर्त्याच्या मनांतील निरनिराळे भाव ज्यावरून कळतात अशीं जीं क्रियापदांचीं रूपें त्यांना 'अर्थ'म्हणतात. हे अर्थ पांच आहेत. जेथें बोलणारा नुसतें होय किं० नाहीं असें सांगतो तेथें त्या क्रियापदाचा स्वार्थ असतो; उ० तो करतो, तो करणार नाहीं, इ०. आज्ञार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ. आणि संशयार्थ, हे बाकीचे चार अर्थ. ॐ**स्वार्थी क्रि० वि०** (व्याकरण)शब्दाच्या अर्थांत फरक न करणारा (प्रत्यय). **स्वार्थसाधू वि०** दुसऱ्याच्या हिताकडे किं० सोयीकडे दुर्लक्ष्य करून आपलें हित किं० आपली सोय करून घेणारा (निंदेंत).

स्वास्थ्य [सं०] न० १स्वस्थपणा. २ स्वावलंबन. ३ आरोग्य. ४ समृद्धि. ५ खाण्यापिण्याची सोय, आरोग्य, सोयिस्कर घर, इ० बाबतींत जी कोणेकाची सुस्थिति किं० संतोषवृत्ति ती. ६ फुरसत; कामाची घाई नाहीं अशी वेळ. ७ दगदगीनंतर मिळालेला आराम किं० रिकामपणा. ८ चरितार्थाचें साधन,-शेत, वतन, इ०.

स्वाहा [सं०] स्त्री० १ अग्नीची पत्नी. २ देवांना दिलेली आहुति. **उद्गार वा० अ०** अर्पण होओ ! मिळो ! उ० अग्नये स्वाहा म्ह० अग्नीला हें मिळो. **वि०** गिळंकृत केलेला. **टीप**,-होमांत आहुति टाकतांना इष्टदेवतेचें नांव चतुर्थ्यन्त करून त्यापुढें ' स्वाहा ' शब्द योजतात यावरून ह्या वाक्प्रचाराची उत्पत्ति; उ० तें घर अग्नीनें स्वाहा केलें (म्ह० जाळून टाकलें). ॐ **स्वाहा करणें (लाक्षणिक)**गिळंकृत करणें; खाऊन टाकणें. **स्वाहाकार पु०** स्वाहा ह्या शब्दाचा उच्चार; आहुति देणें. **स्वाहापति पु०** अग्नि. **स्वाहाभुज् पु०** देवता. **स्वाहपी वि०** शांति किं० तृप्ति पावलेला. [कोणेकाची सही.

स्वाक्षर [सं०] **न०** १ कोणेकाचें अक्षर. २

स्वीकरण न०, स्वीकार पु०,स्वीकृति स्त्री० [सं०]१घेणें;अंगीकार;पथकरणें.२संमति;कबूली.

स्वीकरणीय [सं०] **वि०** घेण्याजोगा; पथकरण्यास योग्य.

स्वीकारणें [सं० स्व+कृ] **स० क्रि०** पथकरणें; अंगीकारणें; कबूल करणें.

स्वीकृत [सं०] **वि०** अंगीकारलेला; पथकरलेला; कबूल केलेला.

स्वीय [सं०] **वि०** स्वताचें; आपलें स्वताचें. ॐ **स्वीया स्त्री०** १ आपली पत्नी. २आपली रांड किं० रखेली.

स्वेच्छ[सं०]**वि०**१आपल्याच इच्छेनें किं० लहरीनें वागणारा (वाईट अर्थी).२ परतंत्र नाहीं तो.

स्वेच्छा [सं०] **स्त्री०** आपली इच्छा. ॐ **स्वेच्छेनें, स्वेच्छापूर्वक क्रि० वि०** आपल्याच इच्छेनें; दुसऱ्याची सक्ती नसतां; स्वयंप्रेरणेनें. **स्वेच्छाचार पु०** आपल्याच लहरीप्रमाणें चालविलेला वर्तनक्रम;उच्छृंखळपणा.**स्वेच्छाप्रारब्ध न०** मागें ' अनिच्छा 'मध्यें पहा.

स्वेद [सं०] **पु०** १ घाम. २ उष्णता. ३ वाफ. ॐ **स्वेदज वि०** घामापासून उत्पन्न झालेला (प्राणी,-ऊ, ढेकूण, इ०). १ अंडज म्ह० साप, पक्षी, इ० प्राणी. २ उद्भिज्ज म्ह० झाडें इ०. ३ जरायुज म्ह० मातेच्या पोटांतून जन्मलेले प्राणी -माणूस, घोडा, इ०. ४ स्वेदज म्ह० घामापासून जन्मलेले प्राणी,-उवा इ०,अशा प्राण्यांच्या चार कोटी आहेत.

स्वेदन [सं०] **न०** १ घाम. २ घाम येणें.३ घाम आणणें. ४ घाम आणणारें औषध.

स्वेदित [सं०] **वि०** १ घाम ज्याला आला आहे असा. २ बाहेरचें पाणी न घालतां पदार्थाच्या अंगच्या पाण्याच्या वाफेनेंच शिजलेला किं० शिजविलेला भाजी इ० पदार्थ. [पहा.

स्वैपाक.**स्वैंपाक, स्वैंपाकी** मागें'स्वयंपाक' इ०

स्वैर [सं०] **वि०** स्वेच्छाचारी; स्वच्छंदानें वागणारा;स्वच्छंदी. **न०**स्वच्छंदी वर्तन.**क्रि० वि०** स्वच्छंदानें;आपल्या लहरीनें (वागणें) ॐ**स्वैरगति स्त्री०** स्वच्छंदी वर्तन. **वि०**स्वच्छंदानें वागणारा. **स्वैरगामी वि०** आपल्याच इच्छेनें वर्तणारा.

स्वैरी [सं० स्वैरिन्]**वि०** स्वतंत्र; स्वच्छंदी; हेकट; उत्सृंखळ. **स्वैरिणी स्त्री०** जारिणी.

स्वोदय [सं०] **पु०** स्थलविशेषीं खस्थ गोल किं० राशि यांचा उदय किं० उदयाचा काळ. हा लंकोदयावरून ठरविलेला असतो. मागें 'लंका' मध्यें ' लंकोदय ' पहा.

स्वोपार्जित [सं०] **वि०** आपण स्वता मिळविलेलें (द्रव्य, सामान, शेत, वतन, इ०). ' वडिलोपार्जित ' ह्याच्या व्यावर्तकत्वें.

ह

ह मराठी व्यंजनमालेंतील तेहेतिसावें व्यंजन.

हं **उ० वा० अ०** बरें ! ठीक ! समजलें ! पुरें ! पुढें ! **टीप**,–भिन्न भिन्न प्रसंगीं स्वराच्या भिन्न भिन्न आघातांवरून हे अर्थ होतात.

हऊस, हौस [**अ०** हवस्] **पु०** १ उत्साह; उत्साहपूर्वक कांहीं काम करण्याची इच्छा किं० प्रेरणा. २ कांहीं वस्तु आपणास सुखावह वाटत असल्यामुळें ती मिळविण्याची किं० संग्रहीं ठेवण्याची इच्छा. ॐ **हौशी** **वि०** आनंदासाठीं कांहीं काम उत्साहानें करणारा; स्वेच्छेनें आणि आनंदानें कांहीं काम करणारा; उ० तो हौसी कारागीर आहे.

हक, हक्क [**अ०**] **पु०** १ कांहीं वस्तूवर कोणेकाचा स्वामित्वाचा किं० उपभोगाचा जो अधिकार किं० तावा असतो तो. २ लायकी किं० पात्रता, कायदा, शिरस्ता, रूढि, इ० मुळें कोणेकास जें मिळावयाचें किं० मिळालेंच पाहिजे तें; उ० शेताच्या उत्पन्नावर अंशतः बलुतेदारांचा हक्क असतो; उ० ह्या सभेंत माझे विचार कळविण्याचा माझा हक्क आहे. ३ निसर्गसिद्ध गुण, धर्म, किं० क्रिया; उ० झाडांवर चढणें हा वानरांचा हक्क आहे. ॐ **हकटक.** **हक्कटक** [अ० हक्+टका] **पु० ए० व०** वतनदार, मिरासदार, देशमुख, इ० ना सरकाराकडून किं० रयतेकडून जें पैसा, धान्य, इ० शिरस्त्याप्रमाणें मिळतें किं० मिळावयाचें तें. **हक्काटक्कांत येणें** १ आटोक्यांत किं० कबज्यांत येणें; तावडींत सापडणें. २ मिळण्याजोगें असणें; सुसाध्य होण्याच्या स्थितींत असणें. ३ कार्यक्षेत्रांत येणें किं० असणें. ४ मेहेरनजर; मर्जी; उ० त्याच्या हक्काटक्कांत आलें तर तो ही जागा तुम्हांला देईल. ५ **हक्काटक्कांत जाणें** (किं० **गुदरणें, उरकणें, मरणें**)ऐन उमेदीच्या, अवसानांच्या, किं० वैभवाच्या स्थितींत असतां नष्ट होणें.**हक्क होणें** मरणें. **हक्क करणें** देहान्त शिक्षा करणें. **हक्कदार** **पु०** १ मालक. २ हक्क सांगणारा; वारस. **हक्क रसूम, हक्क लाजिमा** **पु०** हरएक प्रकारचे हक्क.**हक्क ताला** [अ० हक्क त आला]पु० सर्वश्रेष्ठ ईश्वर. **हक्कपरस्ती** **स्त्री०**सत्यपूजा;कृतज्ञता. **हक्कनहक्क, हकनाहक, हकनाक** **क्रि० वि०** १ विनाकारण; उगीचच्या उगीच. २अन्यायानें.**हक्क अदाव** [अ० हक् अदा] **पु०** देशमुख इ० ना मिळावयाचे जें पैसा, धान्य, इ० तें समुच्चयानें. **हक्कदस्तुरी** **स्त्री०** शिरस्त्याप्रमाणें किं० हक्क म्हणून जें मिळावयाचें तें. **हक्कमाल** **पु०** १ हक्क म्हणून किं०न्यायानें आपणांस जें मिळालें पाहिजे तें. २ जें मालकी हक्कानें आपलें तें; निःसंशय जें आपलें तें.**हक्क रसूम**[अ०हक+रसूम (चाली); रस्म्=चाल]**पु० अ० व०** हक्क, चाली, शिरस्ते. किं० त्यांचेमुळें मिळणारे पैसे,अधिकार,अमल, इ०. **हक्कहराम, हक्का हरामाचा** [अ० हक (सत्य, मालकी)+ हराम् (निषिद्ध, अन्याय्य)] **वि०** १(**अरबी भाषेंत**) अन्याय्य; बिन हक्काचा; ज्यावर आपला हक्क नाहीं असा. २ (**मराठींत**) न्याय्य आणि हक्काचा; निःसंशय आपला. **हक्कहवाल** [अ० हक्+अहवाल् (स्थिति)] **वि०** कुशल; क्षेमरूप; यथास्थित. **हक्कहिशेब** **पु०** हिशेबानें किं० न्यायानें जें आपल्या हक्काचें किं० स्वामित्वाचें तें. **हक्काहरामाचा** **वि०** न्यायाचा किं० अन्यायाचा. बाजवी किं० गैरवाजवी (पैसा, मिळकत); उ० हा पैसा माझ्या हक्काहरामाचा आहे किं० नाहीं ह्याची चौकशी करण्याची तुला उठाठेव कशाला ?

हकणें, हाकणें [**हिं०** हांक्ना] **स० क्रि०** १ (गाडीचे किं० सामानाचे बैल, घोडे, इ० ना) चालवयास किं० वेगानें चालवयास लावणें; (आरोहिलेला घोडा, बैल, इ० ना) चालावयाची किं० वेगानें चालावयाची इशारत करणें. २ (संसार, धंदा, संस्था, इ०) चालविणें. ३ (कांहीं व्यवहार, सौदा, इ०) करणें किं० निश्चित करणें. ४ व्यवहार, सौदा, इ० मध्यें (कांहीं बाबतींत) हेका किं० हट्ट धरणें. ५ (खोट्या किं० संदिग्ध बातम्या) गमतीखातर समाजांत प्रसृत किं० प्रचलित करणें किं० उठविणें.

हकम, हाकीम [अ० हाकिम्] **पु०** प्रांत, परगणा, पेटा, इ० वरचा मुख्य अमलदार किं०

अधिकारी. ® **हकमी, हकिमी, हकिमाई, हकमाई, हाकिमाई स्त्री॰** हाकिमाचा अधिकार किं॰ कार्यक्षेत्र.

हकलणें, हकालणें, हाकलणें, हाकालणें [हिं॰हकारना]स॰क्रि॰१(पक्षी, गुरें, पोरें,इ॰ना) उधळून लावणें किं॰ उडून किं॰ पळून जावयास भाग पाडणें. २ (नोकर, मजूर,इ॰ ना)कामावरून काढून टाकणें. ३ वर 'हकणें, हाकणें' चे पहिले दोन्ही अर्थ पहा.

हकाटणें, हाकाटणें, हा... [म॰ हाक] **स॰ क्रि॰** १ (कोणेकाला) मोठ्यानें ओरडून हाक मारणें किं॰ बोलावणें. २ (कांहीं गोष्ट किं॰ बातमी) प्रसिद्ध किं॰ जाहीर करणें.

हकारणें, हाकारणें [हिं॰ हाकारना] **स॰ क्रि॰** १ गलबत, नाव, इ॰ पाण्यांत चालू करणें. २ (बैलाचा तांडा, मुशाफरांची टोळी, इ॰ ना) प्रवास चालू करण्यास उठविणें. ३ (गलबताचें शीड) गलबत चालू करण्यासाठीं वाऱ्यावर पसरणें किं॰ पसरून बांधणें. ३ (जासुदाला) कांहीं कामगिरीवर पिटाळणें. ४ (घोडा इ॰ ला) जल्द चालण्याचा इशारा करणें किं॰ त्याला जल्द चालविणें.

हकाहाक, हाकाहाक [म॰ हाक+हाक] **स्त्री॰**ओरड; नापसंतीची ओरड; आरडा ओरडा; गवगवा (होणें, करणें).

हकिकत, हकिगत, हकीकत, हकीगत [अ॰ हकीकत] **स्त्री॰** १ वृत्तान्त; बातमी; वर्तमान. २ घडलेल्या गोष्टी समुच्चयानें. ® **हकीगतनामा पु॰** बातमीपत्र; घडलेल्या गोष्टीच्या वृत्तान्ताचा कागद किं॰ लेख.

हकीम [अ॰] **पु॰** १ मुसलमान जातीचा वैद्य. २ मागें 'हकम' पहा. ® **हकिमी, हकिमाई स्त्री॰** १ वैद्याला द्यावयाची बक्षीशी. २ मागें 'हकम' मध्यें 'हकिमी, हकिमाई' पहा.

हक्क मागें 'हक, हक' पहा.

हक्कार [म॰ हाक] **पु॰** एकाद्यास बोलावण्यासाठीं मारलेली हाक किं॰ आरोळी.

हग [सं॰ हद्] **पु॰** मनुष्याची किं॰ पशूची किं॰ पक्ष्याची विष्टा. ® **हगओक स्त्री॰** मोडशी, अजीर्ण, इ॰मुळें वारंवार हगणें,ओकणें, इ॰ रूप जी विकृति होते ती; वारंवार हगणें आणि ओकणें.

हगटणें, हगुटणें [म॰ हगणें] **अ॰ क्रि॰** हगणें (तुच्छतेंत).

हगणें [सं॰ हद्] **स॰ क्रि॰** (भक्षिलेल्या अन्नाचा जो रद्दी किं॰नीरस भाग तो) गुदद्वारा बाहेर टाकणें. **अ॰ क्रि॰** (मनुष्य, पशु, पक्षी, इ॰ नीं) मलविसर्जन करणें. ® **डोळा हगणें** डोळ्यांतून पू बाहेर येणें. **समुद्र हगणें** समुद्रानें लाटांच्या जोरानें केरकचरा, फेस, इ॰ किनाऱ्यावर ढकलून देणें. **पुस्तकावर, भिंतीवर, जमीनीवर हगून ठेवणें** वेड्या वाकड्या आकृति, अक्षरें, चित्रें, इ॰ काढून पुस्तक इ॰ हिडिस्स करून टाकणें. **आतां कां हगलां?** आतां कां डरलां किं॰ मागें हटलां?

हगंदरी,हगदरी [म॰हगणें]**स्त्री॰** अनेक लोक जेथें हगतात ती जागा;गू,शेण,इ॰नीं घाण झालेली जागा.

हगमूती, हगमूत [म॰हगणें+मुतणें] **स्त्री॰** भयामुळें कोणेकाची होते ती गाळण; घाबरगुंडी.

हगरडा, हगिरडा [म॰हगणें] **वि॰**१ मलविसर्जनानंतर ज्याचें गुदप्रक्षालन झालें नाहीं असें (मूल). २अर्धवट टाकलेलें किं॰ राहिलेलें(काम). ३ टाकाऊ; भिकार; नादान.

हगरा [म॰ हगणें] **वि॰** १ वारंवार हगणारा. २ भितरा; पुचाट; ज्याच्या अंगीं कांहीं कर्तबगारी नाहीं असा. 'हगीर' ह्याच अर्थी. ३ लंगडी (सबब).४ अशक्त (खांब,तुळई,इ॰).

हगरी [म॰ हगणें] **स्त्री॰** १ शेतखान्यांत हगणाऱ्याचा मळ पाटींत पडावा म्हणून जो भोंक पाडलेला धोंडा बसविलेला असतो तो. २ गलबतावरच्या लोकांना हगण्यासाठीं जी बाहेरच्या बाजूस चौकट टांगलेली असते ती.

हगिरडें न॰ फुरसें नांवाचा साप.

हगलीमुतली स्त्री॰, हगलेंमुतलें न॰ [म॰ हगणें+मुतणें]कोणेकाच्या संबंधाच्या ज्या क्षुल्लक गोष्टी(हगणें,मुतणें,इ॰सारख्या)त्या समुच्चयानें (सांगणें, कळविणें); उ॰ तुमचीं हगलींमुतलीं रोज माझ्या हेरांकडून मला कळतात.

हगीर मुतीर [म० हगणें+मुतणें] वि० फारच घाबरलेला.

हगवक [म० हगणें+ओकणें] स्त्री० वारंवार हगणें आणि ओकणें ही विकृति (होणें, लागणें). अशिक्षितांत रूढि.

हगवण [म० हगणें] स्त्री० अजीर्णामुळें वारंवार हगत असणें ही विकृति. ❀ **हगवणकर (-करी)** वि० ज्याला हगवण लागली आहे असा.

हगविणें [म० ' हगणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ (कोणेकाला) हगावयास लावणें. २ (कोणेकाचा)बोऱ्या उडाविणें किं०फजीती करणें. ३ (कोणेकाला) पैसे, पदार्थ, इ० द्यावयास भाग पाडणें. ४ कोणेकाकडून (पैसे, पदार्थ, इ०) वसूल करणें; उ० मी रामड्याकडून माझे तीस रुपये हगविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीं.

हगाड [म० हगणें] स्त्री० गांवाबाहेर गांवकरी लोक जेथें हगावयास जातात ती जागा.

हंगाम [फा०] पु० कोणेक पदार्थाचें वैपुल्यानें पीक येणें, पुष्कळ मोठ्या प्रमाणांत त्याचा प्रादुर्भाव होणें, इ०चा ऐन समय; पदार्थाच्या विपुलपणाचा समय; ऋतु; मोसम. ❀ **हंगामशीर** क्रि० वि० हंगाम चालू असतां; योग्य वेळीं म्ह० पदार्थांच्या वैपुल्याच्या वेळीं. **हंगामी** वि० विशिष्ट अवधीपुरताच केलेला, ठेविलेला, नेमिलेला, किं० योजिलेला; तात्पुरता(नोकर, अधिकारी, इ०).

हंगामा [फा० हन्गामाह्] पु० १ गडबड; धुमाकूळ; आरडा ओरडा; गहजब. २ हल्ला. ३ गर्दी; दंगा. ४ मारामारी.

हगुटणें [म० हगूट] अ० क्रि० १ मलविसर्जनाची (कोणेकाला) घाई झालेली असणें. २ (कोणेकानें) गुदद्वारा मल विसर्जिणें. ३ फारच घाबरून आपोआप मलविसर्जन होण्याच्या स्थितीस येणें. ४ (कोणेकाला) कोणत्याही कामाची फारच घाई लागलेली असणें.

हगूट [म० हगणें] पु० १गुदद्वारा मल आपोआप बाहेर पडण्याची स्थिति किं० बाहेर पडलेला मल. २मलविसर्जनाची झालेली अनिवार घाई.

हगें, हंगें क्रि० वि० १ आतांच; आतांच्या आतां. २ इकडे. **टीप**,–दोन्ही अर्थीं अशिक्षितांतच रूढि.

हंगेंतंगें न० कामाची टोलवाटोलवी किं० उडवाउडवी (करणें); धरसोडपणाचीं उत्तरें देणें (लावणें). क्रि० वि० अनिश्चितपणें; अर्धवट किं० संदिग्ध स्थितींत; निकालांत न काढतां किं० न निघतां.

हगेरा, हगेला [म० हगणें] वि० मलविसर्जनानंतर गुदप्रक्षालनाच्या अगोदरच्या स्थितींत असलेलें (मूल).

हगेरें, हगोळें [म० हगणें] न० गुवानें लडबडलेलें चिरगूट.

हग्या [म० हगणें] वि० १ शौचास जावयास निघालेला किं० गेलेला. २ शौचास जातेसमयीं न्यावयाची आणि न घासतां बाजूस ठेविलेली असते ती (तपेली); शौचास जातेसमयीं घालावयाचा (जोडा). ३ कोणेकास हगावयास लावण्याइतका त्याला दिलेला (मार, चोप).

हंचत्वंच न०, **हंचात्वंचा** स्त्री० [सं० अहं (मी)+च (आणि)+त्वं (तूं)+च(आणि)] रागानें आणि एकेरीवर येऊन केलेला वाद किं० केलेलें भांडण; असभ्यपणाची बोलाचाली.

हजबी, हसबी स्त्री० पडशी किं० कंठाळ ह्यांच्या रूपाची पण लहान अशी रुपये इ० भरून घोडा, बैल, इ० च्या पाठीवर घालून परगांवीं न्यावयाची पिशवी.

हजर, हाजर, हजीर, हाजीर [फा०हाझिर्] विद्यमान; उपस्थित; विशिष्ट समयीं किं० स्थळीं असलेला किं० आलेला. ❀ **हजर करणें** आणून देणें; सादर करणें. **हजरजबाब, हजरजाब** पु० प्रसंगीं दिलेलें योग्य उत्तर; न कचरतां आणि विचार करण्यास उशीर न लावितां प्रतिपक्ष्याला दिलेलें उत्तर. **हजरजबाबी** वि० ताबडतोब समर्पक उत्तर देणारा; हजरजबाब देण्यांत पटाईत. **हजर जामीन** पु० कोणेक माणूस कोणेक प्रसंगीं आणि कोणेक स्थळीं हजर राहील अशाबद्दल त्याचा घेतलेला जामीन. **हजरजामिनकी** स्त्री० हजरजामीन राहणाऱ्यावरची जबाबदारी. **हजीरनीस** पु०सैन्यांतील शिपायी, कचेरींतील कारकून, इ० ची हजीरी घेणारा किं० हजीरी ठेवणारा माणूस. **हाजिरनिशी** स्त्री० हाजिरनिसाचें काम, हुद्दा, दर्जा, किं० अधिकार. **हजीरी, हजेरी** स्त्री० कोणेक

स्थळीं कोणेक माणसाची किं० पदार्थाची उपस्थिति किं० विद्यमानता म्हणजे त्याचें हजर असणें किं० आलेलें असणें. **कोणेकानें आपली हजेरी लावणें** मी हजर आहें किं० आलों आहें असें सांगणें. **हजेरीची फौज स्त्री०** नेहेमींचें खडें सैन्य. **हजीरबिगार स्त्री०** एका हेलकऱ्यानें कांहीं ओझें दुसऱ्या गांवास पोचवावें, ह्या दुसऱ्या गांवच्या हेलकऱ्यानें तें ओझें पुढच्या गांवास पोचवावें, अशा प्रकारची वाहतुकीची सरणी. ह्या कामगिरीवर लाविलेले जे हेलकरी ते 'हजीर बिगारी.' **हाजीरमजालस(–लिस,–लीस)स्त्री०** १ खटल्याचे निकाल करणारी सरकारी किं० खाजगी संस्था. २ अशा संस्थेंत काम करण्यासाठीं नेमिलेलीं माणसें प्रत्येक किं० समुच्चयानें. ३ ह्या संस्थेच्या कामाच्या समयीं तेथें हजर असलेलीं कोणीहीं माणसें व्यक्तिशः किं० समुच्चयानें. ४ मामलतदार इ० सरकारी अधिकाऱ्याकडे कोणेकाविरुद्ध केलेली लेखी तकरार. **हाजिरमजालस (–लिस,–लीस) क्रि० वि०** सर्व लोकांसमक्ष; चारचौघांत; उघडपणें. **हाजिरमजालिसीची याद स्त्री०** हाजिरमजालिसींतील सर्व लोकांच्या सह्या ज्यावर घेतल्या आहेत असा निकालाचा कागद. **हजिराहजीर वि०** तात्पुरती व्यवस्था लावून केलेलें.

हजरत, हझरत [अ०] **पु०** राजा, पैगंबर, इमाम, इ० ना लावावयाची बहुमानाची पदवी.

हजाम [अ०] **पु०** न्हावी; नापित. ꙮ **हजामत स्त्री०** १ न्हाव्याचें काम; वस्तरा, कातरी, इ० नीं डोकें, हनुवटी, गाल, इ० वरील किं० हैस इ० च्या अंगावरील केंश तासणें किं० कापणें ही क्रिया. २ (**लाक्षणिक**) कोणेकाची केलेली फजिती किं० केलेली बोडंती (करणें, उडविणें). ३ (**लाक्षणिक**) लुटणें; लुबाडणें; नागविणें; सर्वस्व हरणें.

हजार, हज्जार [**फा०**] **पु०** सहस्र ही संख्या; दशशत. **वि०** सहस्र संख्येच्या परिमाणाचा. ꙮ **हजार पांचशे पाऊस पडणें** अगदीं थोडा पाऊस पडणें; पावसाची नुसती शिंपडणूक होणें. **हजारी स्त्री०** हजार सैनिक बाळगण्याची मनसब. **हजारी स्त्री०** झाडांना पाणी घालण्याचें सच्छिद्र पात्र. **हजारी कारंजें न०** ज्या कारंज्याच्या तोंडांतून हजार धारा (म्ह० पुष्कळ धारा) उडतात असें कारंजें. **हजारी घर न०** एका विशिष्ट बांधणीचें किं० मांडणीचें घर. **हजारी पान** [**म०** हजार पानांत आढळणारें एक पान म्ह० दुर्मिळ पान] **न०** १ नागवेलीचें पान.–ज्याच्या दोहों कडांस मधोमध एक एक लवण आलेलें असतें. २ दुसऱ्या कोणत्याही झाडाचें अशा आकाराचें पान. **हजारीमाड पु०** ज्या नारळीच्या झाडाला दरसाल सुमारें एक हजार नारळ येतात असें झाड. **हजारों, हज्जारों, हजार पु० अ० व०** अनेक हजार; अनेक हजारांच्या परिमाणाचें.

हजारा [**फा०** हझाराह्] **पु०** तिफाशी सोंगट्यांच्या खेळांत नवांचा किं० सातांचा जो डाव पडतो तो,–विशेषतः सोंगट्या उठावयाच्या प्रसंगीं.

हजिंबा, हजिम्मा, हजिमा [अ० हझीमा] **पु०** १ फडशा; धुव्वा; नासाडी; विध्वंस. २ पराभव. ३ बेशिस्तपणानें गोळा झालेले लोक; अव्यवस्थितपणें जमलेल्या लोकांचा खूप मोठा समुदाय.

हंजी, हांजी [**म०** हां+जी (महाराज)] **उद्गार वा० अ०** होय महाराज ! ꙮ **हांजी हांजी स्त्री०** १ कोणेकाची केलेली खुशामत. २ स्वार्थ साधण्यासाठीं वरिष्ठाची लाळ घोटणें.

हज्जार मागें 'हजार' पहा.

हज्जंबा, हज्जंमा मागें 'हजिंबा' पहा.

हट, हट्ट [**सं०** हठ] **पु०** १ कोणेका गोष्टीसंबंधानें कोणेकाचा जो आग्रह तो; अभिनिवेश. २ बलात्कार; दांडगाई. ३ द्वेषभाव; वैरबुद्धि. ꙮ **कोणेकाचा हट्ट जिरणें** त्याणें हट्टानें मागितलेली वस्तु त्याला देण्यांत न आल्याकारणानें त्याला हट्ट सोडून द्यावा लागणें. **हट्टास पेटणें** कांहींही नुकसान झालें तरी तें पथकरणें पण आपला हेका न सोडण्याचा निश्चय करून वागणें. **हटतट पु०** आग्रह; हेका; मूर्खपणाचा धरलेला आग्रह. **हटखोर वि०** हट्ट धरणारा किं० हट्ट करणारा; हट्टी.

हट [**सं०** हट्ट] **पु०** १ बाजार. २ जत्रा इ० प्रसंगविशेषीं कोणेक स्थळीं उपरीं आलेलीं दुकानें

समुच्चयानें. ❀ **हटबाजार** पु० १ बाजार; बाजारांतील दुकानें; बाजारपेठ. २ खरेदीविक्री इ०रूप घडामोड.**हटकरी, हटकोरी** पु० बाजारांत दुकान मांडून बसलेला माणूस. **हटाऊ** वि० बाजारी (पदार्थ तो ओंगळ, कच्चा, किं०अशक्त असतो ह्या दृष्टीनें). पुढें ' हट्ट,' ' हट्टी ' पहा.

हटक [म० हटकणें] स्त्री०१ हाक; आरोळी. २ कोणेकाशीं बोलण्यासाठीं त्याला चालतांना थांबविणें (लावणें, लागणें).

हटकणें स० क्रि० १ (कोणेकाला) हाक मारणें किं० हाक मारून बोलावणें. २ (रस्त्यांत चालणाऱ्याला)हाक मारून (त्याला) थांबवून त्याच्याशीं बोलणें.

हटकून [म० हटकणें] क्रि० वि० १मुद्दाम; जाणून बुझून. २ निःसंशय; खचित; न चुकतां.

हटणें [हिं० हटना] अ० क्रि० कचरणें; मागें सरणें; पराभूत होऊन माघार खाणें; डरणें.

हटणें स० क्रि० पळीच्या बोंडानें (डाळ, पुरण, इ०) ठेंचून चूर्णरूप करणें; अहाटणें. मागें ' अहाटणें ' पहा.

हटविणें [म० ' हटणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ मागें सारणें; मागें रेटणें. २ पराभूत करणें; (कोणेकावर) जय किं० सरशी मिळविणें; वरचढ ठरणें.

हट्ट मागें ' हट, हट्ट ' पहा.

हट्ट [सं० हट्ट] पु० १ बाजार. २ जत्रा इ० प्रसंगीं भरलेला तात्पुरता बाजार.

हट्टी [सं० हट्ट] स्त्री० १ लहानसा बाजार. २ एका जातीच्या किं० एका धंद्याच्या लोकांचीं एकाला एक लागून असलेलीं घरें;उ० बुरूडहट्टी, जिनगरहट्टी, गळळहट्टी, भिल्लांची हट्टी. ३ एका उद्देशानें किं० एका कार्यासाठीं निघालेल्या माणसांचा वाटेंत पडलेला तळ किं० मुक्काम.

हठ [सं०]पु० १ बलात्कार; जुलूम. २ दांडगाई; जोर. ३ कांहीं गोष्टीबद्दल दुराग्रह (करणें, धरणें). ४ कोणेकाच्या इच्छेविरुद्ध केलेली कांहीं गोष्ट. ❀ **हठयोग** पु० योगाचा म्हणजे ध्यानाचा एक प्रकार (एका पायावर उभें राहाणें, धूर सेविणें,हात वर उभारून धरणें, इ० रूप). याच्या उलट 'राजयोग'.

हड स्त्री० तळें इ०तील शेवाळ्याची एक जात. उं०वा०अ० निघून जा!(कुत्र्याला हाकून लावतांना). ❀ **हडहड** स्त्री० १ भिकारी इ० ना तिरस्कार किं० तुच्छता दाखवून त्यांची केलेली हाकालपट्टी. २मूल किं० कोणी माणूस यांच्याशीं तुच्छतेची वर्तणूक.

हडकणें अ० क्रि० ओलें वस्त्र, झाडाची तोडलेली फांदी, इ० पूर्णपणें वाळणें किं० शुष्क होणें.

हडकणें स० क्रि० (वस्त्राच्या विणीचें तंतु, विणलेल्या झापांच्या पाती, इ० ची रचना) घट्ट होण्यासाठीं(ते तंतु किं० त्या पाती) ठासून जवळ जवळ आणणें. वस्त्र, झांप यांवरही कर्मता येऊं शकते; उ० वस्त्र किं० झाप हडकणें; तंतु किं० पाती हडकणें.

हडकी, हाडकी [म० हाड] स्त्री० गांवचीं मेलेलीं गुरें आणून ठेवण्यासाठीं किं० त्यांचीं हाडें सांठविण्यासाठीं महाराला गांवाबाहेर नेमून दिलेली जागा,–ज्यावरचा कर अंशतः किं० सर्वस्वीं माफ असतो. ❀ **हडकी, हडोळा** पु० ए० व०महारास इनाम दिलेली जमीन,वतन,इ०.

हडक्या, हाडक्या [म० हाड, हडूक] वि० १ किडकिडीत,–ज्याचीं हाडें उठून दिसतात असा (माणूस, जनावर). २ वाळलेलें किं० सुकलेलें (फळ). ❀ **हडक्या ऊस** पु० बारीक पण मधुर रसाचा एक प्रकारचा ऊस.

हडंगा, हडगा वि० बायकांत बसणें, बायकांशीं गप्पा मारणें,इ० ची ज्याला फार आवड आहे असा; रांड्याराघोजी.

हडद स्त्री०, **हडदें** न०, **हडदा** पु०१ कुटुंब, जनावर, कांहीं काम, इ० संबंधाची कोणेकाकडे असलेली त्रासदायक जबाबदारी (बसणें, येणें, टाळणें, इ०). २ कामाची घाई, निकड, इ०.

हडप न० अमुक देणें मी देईन, अमुक काम मी करीन, असें कोणेकास सांगून त्याची खात्री होण्यासाठीं त्याच्याजवळ आपल्या मालकीची वस्तु जी ठेवितात ती. देण दिल्यानंतर आणि काम केल्यानंतर ही वस्तु परत द्यावयाची असते.

हडपणें स० क्रि० (अग्नि) प्रज्वलित करण्यासाठीं किं० (धान्यांतील) केरकचरा उडवून लावण्यासाठीं त्यांच्यावर सूप, पंखा, इ०

न्नीं वारा घालणें. 'विस्तव हडपणें,' 'धान्य हडपणें,' असे प्रयोग होतात.

हडपा पु० १ खूप मोठी पेटी,–धान्य सांठविणें इ० च्या उपयोगाची. २ जिना, बळद, भुयार, इ० झाकण्याचें दार. ३ भिंतींत असतें तें फडताळ.

हडबड स्त्री० १ गोंधळ, गडबड, धावाधाव. २ वेगानें किं० जोरानें हालणें किं० हदरणें. ३ भयामुळें झालेली धावपळ किं० पांगापांग.

हडबडाविणें स० क्रि० चल, नीघ, दूर हो, इ० शब्द उच्चारून (कोणेकास) हकलून देणें.

हडबडीत वि० ज्याचा पृष्ठभाग गुळगुळीत नाहीं असा; खरखरीत; उखीरवाखीर.

हंडरीं मडकीं [म० हंडा+मडकें] न० अ० व० घरांतील हरएक कामाचीं भांडीं, मडकीं, इ०.

हडवंग पु० चुरशीची झटापट; स्पर्धा; चढाओढ.

हडवंगणें, हडवांगणें [म० हाड+अंग] अ० क्रि०(मनुष्य, मूल, पशु) रोड होणें किं० वाळणें.

हडवंगी वि० हट्टी; हेकट; हेकेखोर.

हडवळा, हाडोळा [म०हाड] पु० १ महाराला इनाम दिलेली जमीन. २ अशा जमीनीवरचें सरकारला द्यावें लागतें तें देय.

हडविणें स० क्रि० (झाडाची फांदी, मनुष्याची मान, इ०) दाब घालून वाकविणें.

हडवैर, हाडवैर [म० हाड+वैर] न० पराकाष्ठेचें वैर किं० शत्रुत्व; हाडीं मासीं खिळलेला द्वेषभाव.

हडस, हाडस [म० हाड] वि० मजबूत हाडांचा; घट्ट बांध्याचा; दणगट हाडपेरांचा.

हडसणी [म० हडसणें] स्त्री० १ विणलेल्या वस्त्राचे आडवे धागे ठासावयाची कोष्ट्यांची फणी. २ विणलेल्या तट्टयाच्या पातीं ठासून बसविण्याची बुरडाची लाकडी पट्टी.३ओढाताण; धक्काबुक्की; रेटारेटी.

हडसणें स० क्रि० १ आंत घातलेला पदार्थ तांदूळ, भांडीं, इ० ठासून बसविण्यासाठीं (पोतें, बारदान,इ०)हालविणें किं०(त्यांना) हिसके देणें.२ (कोणत्याही पदार्थाला) जोराचा हासडा किं० हिसका देणें.३मारलेली गांठ घट्ट करण्यासाठीं(दोरी इ०च्या टोकांना) हिसका देणें. ४ दुकानदारानें गिऱ्हाइकाला विकलेला कापड, भांडें, इ० पदार्थ 'हा सौदा तुम्हाला फायदेशीर होओ' असे शब्द उच्चारून जमीनीवर सौम्यपणें आपटणें. ५(कोणेकाला) कांहीं काम करावयाला निक्षून आणि बजावून सांगणें. ६ केरकचरा उडवून लावण्यासाठीं (धान्याला)सुपानें वारा घालणें किं० सुपांत धान्य घालून (सूप) विशिष्ट प्रकारें हालविणें. ❁ **हडसून खडसून** क्रि० वि० १ जोरानें हिसके देऊन. २ आग्रहपूर्वक बजावून. ३ शंका न राहील अशा प्रकारें; स्पष्टपणें. ४ निक्षून. ५ न कचरतां; न भितां; भीडमर्यादा न धरतां.

हडहडणें अ० क्रि०१(चिरगूट,लाकूड,जमीन, इ०) पूर्णपणें वाळणें किं० कोरडी होणें. २ (माणूस, जनावर, झाड,इ०) वाळणें,निस्तेज होणें, किं० सुकणें.

हडहडीत वि०आजार, अपुरें खाणें, काळजी, संकट, इ०मुळें रोड, किडकिडीत झालेलें(माणूस, जनावर).

हडळ, हडळी स्त्री० स्त्रीपिशाच;पिशाच स्त्री.

हंडा [सं० हंडा=मातीचें मोठें पात्र] पु० पाणी भरणें, पुरण, भात, इ० शिजविणें, इ० च्या उपयोगाचें मोठें भांडें. ❁ **हंडापळी** स्त्री० ए० व० १ धिप्पाड बायको आणि किडकिडित नवरा ह्यांचें जोडपें. २ अशा प्रकारची पतिपत्नींची विषमता. मागें 'वरण' मध्यें 'वरणभात' पहा.

हंडी [म० हंडा] स्त्री० १ लहान हंडा. २ धातूचें किं० मातीचें भांडें; उ० दहीहंडी, उकडहंडी, इ०. ३ दिवा लावण्याचें आणि टांगावयाचें काचेचें पात्र. ❁ **हंडीशीं हंडी फुटणें** कोणेक स्थळीं माणसें, पदार्थ,इ० ची गर्दी, दाटी, किं० खेचाखेच झालेली असणें. **कोणेकाचे डोईवर हंडी फुटणें** त्याच्यावर दोषारोप केला जाणें, –विशेषत: विनाकारण; त्याचेवर खापर फोडलें जाणें. **उकडहंडी** स्त्री० मागें 'उकड' मध्यें पहा. **दहीहंडी** स्त्री०ज्या मडक्यांत दहीकाल्याच्या दिवशीं दही, लाह्या, इ० घालून टांगतात तें मडकें. मागें 'दही' मध्यें पहा. **हंडीमडकी** स्त्री० ए० व०, **हंडेंभांडें, हंडें मडकें** न० ए०

व० संसारांतील हरएक उपयोगाचीं लहान मोठीं भांडीं समुच्चयानें.

हडंबाग [हिं० हंडी बागाइ] पु० १ गारोडी, जादूगार, डोंबारी, तमासगीर, इ० च्या टोळींतील मुख्याला मदत करणारा पोऱ्या. हा पोऱ्या मुख्यानें विचारलेल्या प्रश्नांस धीटाईनें खडाखडा उत्तरें देतो. २ फाजील धीट पोर. ३ खाद्य पदार्थ मिळावे म्हणून स्वयंपाकघरांत बसून राहाणारें पोर.

हडुंग, हडोंग न०, पु० १ विघ्न; अडथळा (घालणें, पडणें). २ अडकलेपणाची किं० कुंठितपणाची स्थिति.

हडूक [म० हाड] न० १हाड. २लहान हाड.

हडें [म० हंडी] न० हंडी, हंडा (तुच्छतेनें).

हंडेसाडी स्त्री० स्त्रियाचें एक प्रकारचें लुगडें; साडी.

हडोंग न० वर ' हडुंग ' पहा.

हंडोल [म० हंडा] नं० हंडा किं० हंडी (तुच्छतेनें).

हडोळा पु० वर ' हडकी ' पहा.

हडोळी स्त्री० वर ' हडळ ' पहा.

हड्यावर्ण पुढें ' हाड ' मध्यें पहा.

हण [सं० हण] पु० एक म्लेंच्छ जाति किं० त्या जातीचा माणूस.

हणगोबा [म० हनुमान्] पु० १ मारुति, हनुमान्. २ निरुद्योगी, निरुपयोगी माणूस. ❀**कोणेकाचा हणगोबा करणें** त्याला कांहीं गोष्ट करावयास भर देऊन उठविणें. **मारून मुटकून हणगोबा करणें** कोणेकावर सक्तीनें कांहीं काम लादणें.

हणणें, हिणणें न० बांबूच्या पातींची आकारविशेषाची पाटी.

हणणें, हाणणें [सं० हन्] स० क्रि० १ तडाखा मारणें; रट्टा लगावणें. २ (कांहीं काम) नेटानें रेटणें किं० करून टाकणें.

हणमंत, हनुमंत [सं० हनुमान्] पु० मारुति. ❀ **हणमंताचें शेपूट** न० लवकर न संपणारी हकीगत, गोष्ट, किं० काम.

हणवटली, हणवटी, हणू, हनुवटी [सं० हनु] स्त्री० तोंडाचें खालचें टोक.

हणावणें स० क्रि० रट्टा मारणें.

हत [सं०] वि० १ मारलेला. २ ठार मारलेला. ३ नष्ट; उ० हतभाग्य (म्ह० दुर्दैवी). ४ ज्याची आशा भग्न झाली आहे असा. ५ निंद्य. ❀ **हताश** वि० १ निराश; नाउमेद झालेला. २ नीच; दुष्ट; निर्दय. ३ निर्बल; क्षुद्र. ४ निष्फळ. **हतक** वि० १ दुर्दैवी; कपाळकरंटा. २ दुष्ट; नीच.

हतगा, हातगा, हादगा पु० एक झाड, शेवगा.

हतरकी स्त्री० जमीन भाजावयासाठीं जमीनीवर पसरतात त्या काटक्याकुटक्या, गवत, पानें, इ० समुच्चयानें.

हंतर, हंतरणें, हंतरीय मागें ' आंथर, ' ' आंथरणें, " आंथरीय ' पहा.

हतरूं, हतरूड [म० हत्ती] न० हत्ती (तुच्छतेत).

हतवा, हातवा [म० हात] पु० हळद, कुंकूं, इ० पाण्यांत कालवून त्यांत हात बुचकळून भिंतीवर वठविलेली हाताच्या पंज्याची आकृति (देणें).

हंता [सं० हन्तृ] पु० १ मारणारा. २ ठार मारणारा. ३ रट्टा मारणारा. ४ नाश करणारा; विध्वंसिणारा. ❀ **कार्यहंता** पु० दुसऱ्याचें काम विघडविणारा.

हतेर, हत्यार [हिं० हथियार] न० १ शस्त्र. २ कोणत्याही कामाचें साधन. ३ कोणेकाला वश करण्याचें किं० आपल्या ताब्यांत आणण्याचें आपल्या हातांत असलेलें कांहीं साधन. ❀ **हतेरबंद, हत्यारबंद** वि० हत्यारांनीं सज्ज (शिपायी, चोर, इ०).

हतोडा, हातोडा [हिं० हथोडा] पु० घण. **हतोडी, हातोडी** स्त्री० लहान घण.

हत् उ० वा० अ० नकार, निषेध, तिरस्कार, इ० दाखविण्याचा शब्द.

हत्ता [म०] पु० १ दंड किं० जोर काढतांना ज्यावर हात टेकतात तो ठोकळा. २ (मुलांच्या खेळांत) मर्यादेची रेषा. ३ केवड्याचें वालदशेंतील कणीस. ४ कुंकूं, हळद, केशर, इ० च्या पाण्यांत हात बुडवून भिंत इ० वर वठविलेली पंज्याची आकृति (देणें).

हत्ती [सं० हस्तिन्] पु० १ सर्व स्थलचर

प्राण्यांहून आकारानें मोठा असा एक प्राणी. ह्याला असते त्या सोंडेनें तो पदार्थ हुंगतो, पाणी पितो,भक्ष्य आपल्या तोंडांत घालतो,आणि झाडें पिळवटून उपटतो. २ हस्तनक्षत्र (बायकी शब्द). ॥ **हत्तीण स्त्री**०हत्तीची स्त्री.**हत्तीचें मढें न० १ (लक्षणेनें)** अवाढव्य किं० अगडबंब असा संसार, काम,कारखाना, कारभार, खातें, नोकरी, किं० कोणताही पदार्थ.२**(लक्षणेनें)** खेळावयाला, वापरावयाला, किं० उचलावयाला कठिण असा कोणताही पदार्थ. ॥ **हत्तीखाना, हत्तीमहाल पु०** हत्ती बांधावयाची पागा. **हत्तीचा पाय पु०** ज्यांत किं० ज्याचे योगानें आपला आणि आपणावर अवलंबून असणाऱ्या माणसांचा उत्तम प्रकारें चरितार्थ चालतो असें शेत, वतन,राज्य, देश,इ०.**हत्तीचा अंकुश पु०** काम करून घेण्यांत जो नोकरांवर किं० हाताखालच्या माणसांवर तिळमात्र दया दाखवीत नाहीं असा मालक किं० अमलदार.**हत्तीबार पु०**हस्तनक्षत्रीं जें पीक किं० फळादींचा बार येतो तो. मृगबार आणि आंबेबार हे दुसरे दोन बार.**हत्तीभोग तांदूळ** जाडी तांदूळ.**हत्तीबरोबर बैलाचें वारगोळें** दोन भिन्न दर्जाच्या, भिन्न सामर्थ्यांच्या, भिन्न गुणधर्मांच्या पदार्थांची बरोबरी करणें किं० अदलाबदल करणें किं०सांगड घालणें(हा मूर्खपणा होय).मागें 'वारगोळें' पहा.**हत्तीला अंकुश केवढा असतो?**शत्रूला मर्मस्थानीं भेदणारें लहान देखील साधन आपल्याजवळ असलें म्हणजे शत्रूला वश करून घेतां येतें,–मग तो शत्रु कितीही पराक्रमी असो.**कोणेकाच्या दारीं हत्ती झुलत असणें** तो अत्यन्त श्रीमंत असणें. **हत्ती गेला आणि शेपूट राहिलें** कामाचा बहुतेक भाग झाला, आतां अत्यल्प भाग राहिला आहे (यासाठीं इतक्यांत धीर खचूं देऊं नका). **हत्ती गेला आणि शेपटाशीं आडकला** बहुतेक काम झालें होतें पण अगदीं थोडक्यानें विघाड झाला (हें मोठें दुर्दैव होय). **हत्ती चालतो आणि कुत्रीं भोंकतात** थोर मनुष्य सरळ मार्गानें चालत असतो आणि हलकट लोक त्याला निंदीत असतात; त्यांचेकडे तो थोर मनुष्य मुळींच लक्ष्य देत नाहीं किं०त्यांची परवा करीत नाहीं. **हत्तीच्या आहारांत लाखों मुंग्यांचा आहार चालतो** श्रीमंतांच्या असंख्य चैनीवर अनेक गरीब कुटुंबांना चरितार्थाचीं साधनें अनायासें प्राप्त होतात. **हत्तीच्या गंडस्थळीं बसणें** उच्च किं० वैभवाच्या स्थानीं असणें किं० चढणें. **हत्तीच्या दांतांसारखे दांत** ढोंगीपणा; खोटा आविर्भाव. **हत्तीच्या पायांत (किं० पावलांत) सगळ्यांचे पाय (किं० सगळ्याचीं पावलें)** १ यजमानाचा सत्कार झाला म्हणजे आश्रित,मित्र, इ० चा सत्कार होतोच होतो. २ मुख्य बाबत संभाळली म्हणजे अवांतर किं० किरकोळ बाबतींकडे दुर्लक्ष केलें तरी चालण्याजोगें असतें. **हत्तीवर बसणें** १ दारू पिऊन झिंगलेलें असणें. २ अतोनात मगरूरी करणें किं० दाखविणें. **हत्तीशीं टक्कर घेऊं नये** समर्थाशीं वैर करूं नये. **हत्तीला ओढाळ कोण म्हणेल ?** समर्थानें झोंडपणा केला तर त्याला निंदावयाला कोण धजेल ? कोणी धजणार नाहीं. मुकाट्यानें सोसून घेतील.**हत्तीसारखें वतन न०**खूप विस्तीर्ण आणि उत्पन्नाचीं शेत, वागा, इ० रूप कोणेकाची जिंदगी. **हत्ती होऊन लांकडें खाऊं नयेत मुंगी होऊन साखर खावी** ताठा धरल्यास कष्ट भोगावे लागतील, नम्रपणा स्वीकारल्यास सुखोपभोग मिळतील. **हत्तीचे दाखवावयाचे दांत वेगळे आणि खावयाचे दांत वेगळे** लबाड मनुष्याच्या पोटांत कपट असतें, वरवर जरी त्यानें साधेपणा दाखविला तरी. **हत्तीच्या पायीं येते आणि मुंगीच्या पायीं जाते** आजार, विपत्ति, इ० येतांना जलद येतात आणि जातांना सावकाश जातात.

हत्या पु० मागें ' हत्ता ' पहा.

हत्या [सं०] स्त्री० १ वध; ठार मारणें; उ० ब्रह्महत्या,स्त्रीहत्या,आत्महत्या. २**(मराठींत)** वध केल्यानें लागतें तें पातक. ३ **(मराठींत लक्षणेनें)** मरतुकडा, भिकार, किं० नादान माणूस, पशु, किं० पदार्थ. पुढें ' हत्या ' पहा.

हत्या,हात्या [म०हात **] पु०**१ कोष्ट्याच्या मागांत वाण्याचे तंतु ठासावयाची फणी,–जी जोरानें हातानें ओढावयाची असते. २ वर 'हत्ता' सर्व अर्थीं पहा.

हत्याण न० घोडी, गाढवी, खेचरी, इ० प्राण्यांस संभोगेच्छा होणें. 'घोडी इ० नीं हत्याण करणें' किं० 'घोडी इ० नीं हत्याणास येणें' असे प्रयोग होतात.

हत्यार, हत्यारबंद, इ० मागें 'हतेर' इ०पहा.

हत्यारा [सं० हत्याकार] वि० ठार मारणारा; ज्यानें कोणेकास ठार मारलें आहे असा; उ० बाळहत्यारा, ब्रह्महत्यारा, स्त्रीहत्यारा, इ०.

हत्रें [म० हत्ती] न० हत्ती (तुच्छतेनें).

हद, हदनामा इ० पुढें ' हद्द, ' 'हद्दनामा,' इ० पहा.

हदगा पु० अगस्ता हें झाड.

हदरणें, हादरणें अ० क्रि० कंपयुक्त होणें; थरथरणें; उ० तोफेचा गोळा उडविला असतां आसमंतांतील खिडक्या, दारें, इ० हदरतात. स० क्रि० कंपित करणें; अनेकवार हलविणें.

हदहदणें अ० क्रि० १ एकसारखें हलत राहाणें किं० कंपयुक्त होणें. २ काळज्या, संकटें, उपवास, दारिद्र्य, इ०च्या योगानें जर्जर होणें.

हदाल, हदाळ वि० लठ्ठ; खूप मोठा; अवाढव्य (माणूस, प्राणी, पदार्थ). ꙮ **हदालपार्वती** स्त्री० खूप उंच आणि लठ्ठ स्त्री. 'हदालपारोती' ह्याच अर्थी (अशिक्षितांचे शब्द).

हदालीपुदाली स्त्री० १ माणूस, पशु, पदार्थ, इ०चा निष्काळजीपणानें किं० दांडगाईनें उपयोग करणें किं० उपभोग घेणें (करणें). २ भटकन्ती; भ्रमंती.

हदाळ वर ' हदाल ' पहा.

हदीस [अ०] स्त्री० पैगंबराचें वाक्य.

हंदुळणें, हंदळणें, हांदुळणें, हांदळणें [सं० आंदोलन] अ० क्रि० हलणें, झोके खाणें, कंपित होणें. स०क्रि०हालविणें; कंपित करणें; ०ला झोके देणें.

हद्द [अ० हद्द] स्त्री० १ सीमा; मर्यादा; उ० माझ्या शेताची हद्द येथें संपली. २ (**लाक्षणिक**) पराकाष्ठा; परमावधि; उ० आतां तुझ्या वात्रटपणाची हद्द झाली. ꙮ **हद्दमहदूद, हद्दमौदूद** वि० मर्यादित. **हद्दहदूद** स्त्री० १ मर्यादा. २ मर्यादा दाखविणारी भिंत, धोंडा, इ०. **हद्दनामा** पु० १ शेतें, घरें, इ०च्या हद्दींचें टांचण. २ पराकाष्ठा; परमावधि; उ० आतां मात्र तुझ्या शौर्याचा हद्दनामा झाला.

हद्या पु० रेडा; हल्या; टोणगा.

हनन [सं०] न० १ वध. २ इजा; प्रहार; तडाखा. ३ (**गणित**) गुणणें ही क्रिया.

हनवट पु० स्त्रियांचें एक पादभूषण.

हनवटी, हनुवटी, हनु[सं० हनु, वाटी] स्त्री० मुखाच्या खालच्या टोकास असतो तो उंचवटा.

हनुमान्, हनूमान् [सं० हनुमत् , हनूमत्] पु० मारुति,–रामाचा भक्त वानर. ꙮ **हनुमज्जयंती** स्त्री० चैत्री पौर्णिमा,–ज्या दिवशीं मारुतीचा जन्म झाला. **गांव जळाला आणि हनुमान्** (किं० **मारुति**) **गांवानिराळा** दोघांत भांडण लावून देऊन किं० कोणाची हानि करून आपण अलिप्त आहों असें दाखविणें. **सूर्यापुढें दिवटी आणि हनुमंतापुढें कोल्हांटी** अत्यन्त मोठा पराक्रम आणि अत्यन्त क्षुद्र कृति ह्यांची तुलना किं० बरोबरी कशी होणार ?

हनुवटी वर ' हनवट ' आणि 'हनवटी' पहा.

हपका पु० मागें ' अपका ' पहा.

हपटणें, हापटणें मागें ' अपटणें, आपटणें ' सर्व अर्थी पहा.

हपशी, हबशी [अ० हबसी] पु० हबसाणांतील किं० जंजिऱ्यांतील मनुष्य. वि० हबसाणांतील किं० जंजिऱ्यांतील राज्य. ꙮ **हपसाण, हबसाण** न० कोंकणपट्टींतील हपशांचा मुलख किं० त्यांचें राज्य; जंजिऱ्याचें राज्य.

हपाप [सं० हा पाप !] पु० १ तळतळाट, शिव्याशाप (देणें, घेणें); उ० रयतेला नाडतो त्या राजाला रयत हपाप देते ! उ० हे राजा, रयतेचें मीठ तोडून आपल्या डोक्यावर हपाप कां ओढून घेतोस ? २ गांजणूक; छळ (लावणें, देणें, लागणें, इ०). ꙮ **हपापाचा माल गपापा जातो** जुलूमजबरदस्तीनें मिळविलेला पदार्थ उधळला जातो किं० त्याची नासाडी करावयाला कचर किं० दिक्कत वाटत नाहीं.

हपापणें [म० हपाप] अ० क्रि० क्रूर राजाच्या छळाखालीं गांजून जाऊन ओरडणें.

हपापणें, हापापणें अ० क्रि० कांहीं पदार्थासाठीं फाजिल उत्कंठित होणें; उ० पेढ्यासाठीं असा

कां हापापला आहेस ? कधीं खाल्ला होतास कीं नव्हतास ?

हपापी [म० हपाप] **स्त्री०** धास्ती; भय; दहशत (घेणें).

हप्ता, हफ्ता, हाप्ता, हाफ्ता [फा०हफ्ताह्] **पु०** १ आठवडा. २ कांहीं एका द्यावयाच्या रकमेचे अमुक समयीं अमुक भाग द्यावे असे ठरविण्यांत आलेले जे भाग ते प्रत्येक किं० हे भाग ज्या समयीं द्यावयाचे ते समय प्रत्येक. ⊛ **हप्ते-बंदी स्त्री०** द्यावयाच्या रकमेचे अमुक भाग अमुक समयीं द्यावे असा केलेला ठराव.

हबक स्त्री० १ नुकसानीची बाबत; आंतबट्ट्याचा धंदा किं० व्यापार. २ आलेलें नुकसान किं० बसलेली ठोकर (येणें, बसणें, देणें); उ० ह्या चिंचेच्या व्यापारांत मला चार हजारांची हबक आली (किं० बसली किं० लागली). ३ विघ्न; संकट; अडथळा (येणें). ४ धक्का; रट्टा; तडाखा; हिसका. ह्या अर्थी ' हबका ' सुद्धां. ५ अंगांत यावें म्हणून वाघ्या (खंडोबाचा भक्त) ' हबक हबा ' हा शब्द उच्चारतो.

हबकणें अ० क्रि० १ वाघ्यानें (खंडोबाच्या भक्तानें) हबा ! हबा ! असा ध्वनि काढणें(अंगांत वारें आणून घेतांना). २ (वाघानें) सावजावर उडी मारतांना गर्जणें.

हबकणें स० क्रि० १ हसडा देणें, हिसकणें. २ सक्तीनें, आग्रहानें,किं० भीड घालून कोणेकापासून(पैसे, पदार्थ,इ०) मिळविणें, लुबाडणें, किं० हिरावणें; उ० गोंदोबानें मजकडून पंचवीस रुपये ह्या स्मारकफंडासाठीं हबकले.

हबका पु० १ रट्टा; तडाखा; हिसका (बसणें, देणें). २ व्यापारांत ठोकर किं० हानि (बसणें). ३ अपका. मागें ' अपका ' पहा.

हबकी स्त्री० वर ' हबका ' अर्थ१आणि २ पहा.

हंबरडा, हंबारडा पु० १ गाय, बैल, इ० चा शब्द किं० गर्जना किं० ओरडणें. २ दुःखानें किं० कोणत्याही प्रकारच्या हानीनें काढलेला शोकाचा उद्गार (फोडणें); उ० पतीची मरणवार्ता ऐकतांच तिनें हंबरडा फोडला.

हंबरणें, हंबारणें अ० क्रि० (गाय, बैल, इ० नीं) शब्द करणें किं० ओरडणें.

हंबरातुंबरी, हमरीतुमरी [हिं० हं (मी), तुं (तूं)]**स्त्री०** एकमेकांनीं एकमेकांना अरे तुरे करून केलेलें भांडण; कचाकचीची बोलाचाली; रागाची बोलाचाली.

हंबरू, हमरू [फा० अम्रू] **पु०** एक प्रकारचें कशीदा काढलेलें रेशमी कापड.

हबशी इ० मागें ' हपशी ' इ० पहा.

हबा मागें ' हबक ' अर्थ ५ पहा.

हबा, हंबा स्त्री० (मुलांच्या भाषेंत) गाय, बैल, इ०.

हंबे तुंबे [हिं० हं (मी)+तुं (तूं)+बे (अरे)] **न०,स्त्री०** एकेरीवर येऊन केलेलें भांडण (करणें).

हबेलंडी, हाबेलंडी [हिं० हा+बे+लवंडी] **स्त्री०** फजीती, त्रेधा, घाबरगुंडी (होणें, उडणें, उडविणें).

हमखास, हमखास्त [अ० आम्खास्] **वि०** सर्वसामान्य. **क्रि० वि०** १ चौघाचारी; चारचौघांत; सार्वजनिक रीत्या; जाहीर रीतीनें. २ खात्रीनें; निश्चयपूर्वक; खचित; निःसंशय.

हमचौरस [फा०हम् (तोच)+म०चौरस] **वि०** ज्याची लांबी आणि रुंदी सारखी आणि काटकोनांत आहे अशी (आकृति किं० पदार्थ).

हमजात [फा० हम् (तोच)+म० जात] **वि०** त्याच म्ह० एकाच जातीचा; सजातीय (माणूस, पशु).

हमजात [फा० हम् झाद्] **वि०** त्याच किं० सारख्याच वयाचा.

हमदर्द [फा० हम् (तेंच)+दर्द् (दुःख)] **वि०** १ सहानुभूतीमुळें दुसऱ्याच्याबद्दल दुःखित झालेला. २ सारखेंच आहे दुःख ज्याचें असा; सारख्याच किं० त्याच दुःखानें पीडित. ह्या दोन्ही अर्थी ' हमदर्दी ' सुद्धां. **न०** १ तेंच दुःख; सारखेंच दुःख. २ सहानुभूति.

हमन (-ण-) गोळा पु० १ फोपशा, थिलथिलीत अंगाचा आणि संथ हालचालींचा मनुष्य किं० प्राणी. २ कोणत्याही शेण, गू, इ० ओंगळ पदार्थाची रास. ३ बेढब आणि उखीरवाखीर अशी भिंत, दगड, कारागिराचा पदार्थ, इ०.

हमरंग [फा० हम् (तोच)+रंग] **वि०** त्याच रंगाचा.पु०(गंजिफाच्या खेळांत) तोच रंग.

हमरस्ता, हमरहा [फा० हम् (तोच)+ रस्ताह्,राह्] **पु०** रहदारीचा रस्ता.

हमरा पु० सोंवळें,ओंवळें. सुपक अन्न, इ०कडे फारसें लक्ष्य ज्यांत दिलें जात नाहीं असें लग्न, मुंज, इ० प्रसंगाचें जेवण.

हमरा वि० लायक; समर्थ; कर्तृत्ववान्.

हमरातुमरी, हमरीतुमरी [हिं०] **स्त्री०** एकेरीवर येऊन केलेलें भांडण; बोलाचाली; शिवीगाळ; कचाकचीचें भांडण.

हमरू [फा०] **पु०** बुटीदार रेशमी कापड.

हमशा, हमशाधुमशा पु० दांडगाईचें खेळणें, धावपळ, उड्या मारणें, मस्ती, कुस्ती, इ० प्रकार.

हमशाई [फा० हम्सायाह्] **स्त्री०** शेजार; जवळपणा. ❀ **हमशाईदार वि०** शेजारचा; जवळचा.

हंमा स्त्री० (मुलांच्या भाषेंत) गाय.

हमाणी, हमानी, हमिणी, हामिनी स्त्री० १ पैसे इ० ठेवण्याची पिशवी.२कोडबुळें हें खाद्य.

हमाम [हिं०] **पु०** खल,-बत्त्यानें ज्यांत पदार्थ कुटतात तो. **हमामदस्ता पु०** खल आणि बत्ता ही जोडी.

हमामखाना [अ० हमाम्+फा० खानाह्] **पु०** स्नानासाठीं बांधलेलें घर.

हमामा पु० १ गुराखी पोरांचा एक खेळ. २ धांगडधिंगा; दांडगाईचे चाळे समुच्चयानें; धिंगाणा (घालणें, मांडणें, चालविणें). ३अव्यवस्थितपणें केलेली रास किं० ढीग; नीटनेटकी नाहीं अशी पोथ्या,चिरगुटें, भांडीकुंडीं, पुस्तकें, इ०ची रास.

हमाल, हामाल [अ० हमाल्] **पु०** १ लोकांचीं ओझीं वाहणारा. २ पालखी, मेणा, डोली, इ० वाहाणारा; भोई. **हमाली, हामाली स्त्री०** हमालाला दिलेली मजुरी.

हमिचा पु० खुर्दा ठेवण्याची जनावराच्या कातड्याची थैली.

हमी [अ० हामी] **स्त्री०** जामिनकी; कोणेकाबद्दल कोणी पत्करलेली जबाबदारी; कोणेकाबद्दल खात्री देणें किं० पटविणें (देणें, पटविणें, भरणें). ❀ **हमीटमी स्त्री०** जामिनकी इ० बाबी समुच्चयानें (करणें, होणें). **हमीतारण न०** जामिनकी किं० खात्री पटविणें (घेणें, देणें, इ०). **हमीदार पु०** जामीन राहिलेला इसम. **हमीपत्र न०** जामीन राहिल्यासंबंधाचा कागद.

हमीधुमीचा वि० झोकदार; अक्कडबाज. (माणूस, पोशाख).

हमीन स्त्री० खाण्यांत येणारा एक कंदविशेष. [एक प्रकार.

हमीर पु०(संगीतांत)कल्याण नामक रागाचा

हमीश, हमेश, हमेशा [फा० हमीशाह्] **क्रि० वि०** नेहेमीं; सर्वदा. [पहा.

हमेणी, हमेनी स्त्री० वर ' हमाणी(-नी) '

हम्माल मागें ' हमाल ' पहा.

हय [सं०] **पु०** घोडा. ❀ **हयग्रीव, हयमुख पु०** विष्णूचा एक अवतार. **हयकंठी वि०** ज्याच्या गळ्यावर केशांचा भोवरा आहे असा (घोडा). हें घोड्याचें शुभलक्षण मानलें जातें.

हयकत स्त्री० पंचाइतीची स्थिति; संकट; दुर्दशा.

हयकोल [अ०] **पु०** स्त्रियांचा कंठांत घालावयाचा एक दागिना.

हयगय,हयगई, हयगयी स्त्री० करावयाच्या कामाची हेळसांड; कामाची टाळाटाळ; काम करण्यांत निष्काळजीपणा; कांहीं कामाकडे किं० कर्तव्याकडे दुर्लक्ष्य.

हयता सर्वनाम तो तिकडचा. ❀**हयतिकडे क्रि० वि०** त्यातिकडे; पलीकडे. ❀**हयतसा वि०** त्या तशा प्रकारचा. **हयतेवढा वि०** त्याच्या एवढा. **हयतिथें क्रि० वि०** त्यातिकडे.

हयराण पुढें ' हैराण ' पहा.

हयवान [अ०] **पु०** १ पशु; जनावर. २ बेवकूब माणूस; पच्च्या माणूस.

हया [अ०] **स्त्री०** १ लाज; शरम. २ मर्यादशीलपणा. ३ संकोचवृत्ति. ❀ **बेहया वि०** निर्लज्ज; बेशरम.

हया [म० हाय] **स्त्री०** अगदीं दमलेपणाची स्थिति. ❀ **हयास येणें** अगदीं दमून जाणें; मट्टयास येणें; पुढें कांहीं काम करवत नाहीं

अशा अवस्थेस येणें. **कोणेकाला हयास आणणें** त्याला अति दमविणें; त्याला जेरीस आणणें.

हयात [अ०] **स्त्री०** १ आयुष्य;आयुर्मर्यादा; कोणेकाच्या आयुष्याचा कालावधि. २ जिवंतपणा.३उमर; वय.ꕥ **हयातमुलात, हयातमुलाखत स्त्री०**जिवंतपणीं पुन्हा भेट(होओ,झाली तर, इ०).**हयातीचा दम पु०** आयुष्याची मर्यादा;उ० हयातीचा दम असला तर मी ह्या आजारांतून उठेन (किं० त्याचें पारिपत्य करीन, किं० पुन्हां आपली भेट होईल, इ०).

हयासा पु० घोड्याचा तंग आवळणें इ० कामाच्या उपयोगाची वीटभर रुंद आणि दोन तीन हात लांब अशी जी वादी ती.

हर [**फा०**] **वि०** प्रत्येक; सर्व;उ० हरघडी (प्रत्येक घटकेस), हररोज (प्रत्येक दिवशीं), हरवक्त (वेळोंवेळीं, सर्वदा, इ०). ꕥ **हरएक प्रकारें क्रि० वि०** प्रत्येक प्रकारानें; नानाविध प्रकारांनीं किं० उपायांनीं. **हरएकरंगी घोडा पु०** शरीराच्या प्रत्येक भागीं एकाच रंगाचा घोडा. असा घोडा अशुभ समजला जातो. **हरकसबी वि०** नानाप्रकारचीं कसबें म्ह० कला ज्याला अवगत आहेत असा; हरहुन्नरी. **हरकाम न०** कोणतेंही काम. **हरकामी वि०** १ सर्व प्रकारचीं कामें करणारा (मनुष्य). २ सर्व किं० नानाविध कामीं उपयोगास येणारा (पदार्थ).३ कोणत्याही कामीं योजतां येईल असा (मनुष्य, हत्यार, पदार्थ). **हरकसा क्रि० वि०** कोणत्याही प्रकारें किं० रीतीनें. **हरगाह क्रि० वि०**१ जेव्हां जेव्हां. २ ज्या अर्थी. **हरकोणी सर्वनाम** कोणीही (माणूस, पदार्थ). **हरजिनशी (-सी) वि०** प्रत्येक प्रकारचे किं० जातीचे (लोक, माल, पदार्थ). **हरजिन्नस पु०** प्रत्येक प्रकारचा माल.

हर [**सं०**] **वि०** लोपविणारा, नष्ट करणारा (समासान्तीं); उ० शोकहर, पित्तहर, ज्वरहर, वातहर, गर्वहर, मनहर, कीर्तिहर. ꕥ **स्मरहर पु०** शंकर.

हर [**सं०**] **पु०** १ शंकर; शिव.२ (**गणित**) भाजक; जिनें भागावयाचें ती संख्या. ३ (**गणित**) अपूर्णांकाचा छेद. ꕥ **हरचूडामणि पु०** चंद्र. **हरसूनु पु०** कार्तिकेय; कार्तिकस्वामी.

हरक [**सं०**] **पु०** १ चोर. २ भामटा; ठग. ३ (**गणित**) भाजक; भाज्याला जिनें भागावयाचें ती संख्या.

हरकत [**अ०**] **स्त्री०** १ चाललेल्या कामांत अडथळा किं० विघ्न. २ प्रतिबंध; कुंठितपणाची स्थिति. ३ आक्षेप; उलट विधान; निरसन. ꕥ **हरकतखोर, हरकती वि०** चाललेल्या कामांत विघ्नें आणणारा.

हरकल पु० एक प्रकारचा तांदूळ; पटणी.

हरकारा, हलकारा [**फा०** हर्काराह्] **पु०** १ जासूद; हेर.२पडेल तें काम करणारा. ꕥ **हरकारगिरी, हरकारगी स्त्री०** जासुदाचें काम किं० धंदा.

हरकी, हरखी [**सं०** हर्ष] **स्त्री०** आपणास खूप मोठा लाभ झाला असतां, आपणास वादांत जय मिळाला असतां, आपणास राजानें कांहीं वतन, जहागिर, इ० बक्षीस दिलीं असतां, आपणास कोणी आनंदाची खबर सांगितली असतां, किं०हरवलेली मूल्यवान् वस्तु कोणी आणून दिली असतां आपण खूष होऊन ज्या देणग्या, बक्षिसें, इ० देतों तीं प्रत्येक. ह्या सर्व अर्थी ' हरकी शिरीनी ' सुद्धां.

हरकेंड [**म०** हरीक+केंड] **न०** हरीक धान्याचें फोल दाणे.

हरकेण, हरक्येण, हरक्याण [**म०** हरीक+ तृण] **न०** हरीक धान्याचीं ताटें समुच्चयानें.

हरकोल, हरकल पु० एक प्रकारचा तांदूळ.

हरख, हरिख [**सं०** हर्ष] **पु०** आनंद; हर्ष.

हरखी वर ' हरकी ' पहा.

हरगा, हरगेचार, हरगेभाई पुढें ' हिडगा ' मध्यें पहा.

हरगीज (-स), हरघीज (-स) [**फा०**] **क्रि० वि०** सदासर्वदा; नेहेमीं; उ० तो मला हरगीज त्रास देतो. २ कधींही (निषेधी वाक्यांत); उ० मी हरगीज खोटें बोलत नाहीं.

हरडा,हरडी पुढें ' हिरडा ', ' हिरडी ' पहा.

हरण [**सं०**] **न०** १ पकडणें; धरणें. २

घेऊन जाणें; दूर नेणें; हिरावून किं० लुटून नेणें. ३ चोरणें. ४ नाश; उ० प्राणहरण.

हरण [हिं० अहरन्] **स्त्री०** सोनार, लोहार, इ० ची ऐरण.

हरण [**सं०** हरिण] पुढें ' हरिण ' पहा.

हरणें [**सं०** हृ] **स० क्रि०** १ चोरून नेणें; चोरणें. २ जिंकून घेणें. ३ (दुःख, काळजी, इ०) नष्ट करणें. **अ० क्रि०** १ गमावणें; गमावून घेणें. २ पराभव पावणें. ३ वाद, खेळ, पैज, इ० मध्यें हार खाणें किं० जिकलें जाणें किं० अयशस्वी होणें. ४ (बुद्धि, सारासारविचार, इ०) कुंठित होणें; स्तब्ध होणें; हतवीर्य होणें.

हरताळ [**सं०** हरिताल] **पु०, स्त्री०** एक पिवळें द्रव्य (पोथींतील चुकलेल्या अक्षरावर याचा लेप करून तें बुझवून टाकीत असत). **पु०** सार्वजनिक रीत्या दुःख, निषेध, नापसंती, इ० दर्शविण्यासाठीं गांवांतील दुकानें बंद करणें आणि सर्व व्यवहार बंद ठेवणें (पडणें, पाडणें). ꙮ **हरताळ पडणें** दुर्मिळ होणें. **हरताळ लावणें** १ रद्द करणें. २ कोणेकावर टपका ठेवणें किं० दोषारोप करणें. **त्यानें बदफैलीपणानें कुटुंबाच्या लौकिकास हरताळ लावला** (किं० **फासला**) त्यानें कुटुंबाची आबरू गमावली.

हरताळका [**सं०** हरितालिका] **स्त्री०** १ भाद्रपद शुद्ध तृतीया ही तिथि. २ ह्या तिथीस पूजनार्थ स्त्रिया गौरीची मूर्ति करतात ती. ꙮ **हरताळतीज स्त्री०** भाद्रपद शुद्ध तृतीया ही तिथी.

हरदम [**फा०**] **क्रि० वि०** प्रत्येक क्षणीं; क्षणोक्षणीं. ꙮ **हरदमख्याल** [**फा०**] **पु० अ० व०** १ प्रतिक्षणीं योजलेल्या वेगळ्या वेगळ्या युक्त्या, हिकमती, डावपेच, इ०; उ० त्याला उदरनिर्वाहार्थ हरदमख्याल करावे लागत आहेत. २ प्रसंगाला योग्य उपाय किं० युक्त्या हुडकून काढण्याची ताकद; उ० ज्याचें अंगीं हरदमख्याल असतील असाच मनुष्य ह्या कामगिरीला लायक होय. ३ वरिष्ठाची मर्जी सुप्रसन्न ठेवण्याचा कोणेकाच्या अंगीं असलेला गुण.

हरदावळ [**सं०** हृदावर्त=घोड्याच्या उरावरील केशांचा भोंवरा] **पु०, स्त्री०** कांहीं घोड्याच्या छातीवर असलेला केशांचा भोंवरा-हा स्वाराला अशुभ समजला जातो.

हरदास, हरिदास [**सं०** हरि+दास] **पु०** ईश्वराचें, ईश्वराच्या हरएक अवताराचें, किं० भगवद्भक्तांच्या कृतींचें सार्वजनिक रीत्या गायन, वादन, इ० सरंजामासह निरूपण करणारा; कथेकरी. **हरदासी(-शी)** [**सं०** हरि+दास+**म०** ई (प्रत्यय)] **वि०** हरदासासंबंधाचें (वाद्य, थाट, पोशाख, घोडें, नकल, इ०)]. **हरदाशी घोडें न०** हाडकें रोडकें घोडें.

हरदू, हरदो [**फा०**] **वि०** १ दोन्हींही; दोघेही. २ दोहोंपैकीं किं० दोघांपैकीं प्रत्येक. **स्त्री०** गंजिफांच्या खेळांतील एक्का, दुव्वा, इ० जे लगत दोन हुकूम त्या दोहों मिळून जी तलफ देतात ती.

हरद्र, हरिद्र [**सं०** हार्द] **वि०** मनांतील; हृदयस्थ. **न०** १ स्नेह, प्रेम. २ दया. ३ अभिप्राय; इच्छा. ४ (**मराठींत**) कोणेकाचें रहस्य किं० गुप्त गोष्ट; उ० लोकांचें हरिद्र प्रकट करून तुला काय फायदा ?

हरप, हरफ, हर्फ [**अ०** हर्फ़] **पु०** १ अरबी किं० फारशी वर्णमालेंतील किं० लेखांतील अक्षर. २ लेख. ३ टपका; दोषारोप.

हरपणें [**सं०** हृ] **अ० क्रि०** नष्ट होणें; गमावणें; उ० त्याचें सर्व धन हरपलें; उ० माझी स्मृति हरपली.

हरपरेवडी स्त्री० १ एक आंबट फळाचें झाड. २ त्याचें फळ.

हरफ वर ' हरप ' पहा.

हरबटणें अ० क्रि० चिखल, शेण, गू, इ०नीं लडबडलेलें असणें. मागें ' बरबटणें ' पहा.

हरबयाज (-द) [**फा०**] **पु०** खोटी सबब; बहाणा (आपल्यावरचा टपका टाळण्यासाठीं केलेला).

हरबहाणा [**फा०**] **पु०** हरएक प्रकारचें सोंगढोंग किं० सबब (टपका टाळण्यासाठीं) कोणेकानें पुढें केलेली.

हरभरा, हरबरा पु० एक द्विदल धान्य. **टीप,**–ह्या धान्याच्या एका एका दाण्याला 'हरभरा ' म्हणतात तेव्हां त्यांचे ' हरभरे ' हें अ०

व० होतें. राशीभूत धान्याला ' हरभरा ' ए० व० म्हणतात. ॐ **कोणेकाला हरभऱ्याच्या झाडावर चढविणें** त्याची स्तुति करून त्याला आनंदित करणें आणि त्याला कांहीं काम करावयाला उत्तेजित करणें.

हरभांस, हरभास [फा० हर् (प्रत्येक)+ माइस् (शौर्य, सद्गुण)] **वि०** १ हुशार;हरहुनरी;सर्व कामांत पटाईत.२ हर एक प्रकारचा; नानाविध.

हरंबळणें, हरमळणें अ० क्रि०१ तळमळणें; अस्वस्थ होणें.२अव्यवस्थितपणें टाकलें जाणें;हेळसांड केली जाणें;(पदार्थाचा) गुधडा केला जाणें.

हरमळ खालीं ' हरमाळ ' पहा.

हरमळ वि० अस्वस्थ; जर्जर.

हरमळणें अ० क्रि० दुःख, वेदना, इ० मुळें तळमळणें किं० तडफडणें.

हरमळणें अ० क्रि० कला, शास्त्र, हुन्नर, इ० मध्यें परिचित किं० वाकबगार असणें.

हरमाळ [**म०** हर (एकसारखी) + माळ (पंक्ति)] **स्त्री०** (माणसें, गुरें, मुंग्या, इ०) ची चालती रांग किं० ओळ.

हरमोर वर ' हरमाळ ' पहा.

हरला पु० वांबूच्या पातींची टोपली.

हरला पु० १ पावसाळ्यांत उत्पन्न होतात ते पाण्याचे ओहोळ. २ असे ओहोळ पावसाळ्यानंतर कोरडे झालेले जे ते प्रत्येक.

हरवळ [**म०** हारी+आवली] **स्त्री०** माणसें, गाड्या, बैल, मुंग्या, इ० चीं चालती रांग.

हरवळ वि० खेळकर (मूल, कुत्रा, इ०).

हरवणें, हारवणें [सं० हृ] **अ० क्रि०** १ (आपली किं० आपणाजवळची वस्तु)आपण कोठें ठेविली किं० कोणाला दिली हें आठवत नसणें. २ वाळवंट, गवताची रास, हरएक सामान, इ० मध्यें (कांहीं वस्तु) गळून किं०पडून ती पुन्हां न सापडणें. **स० क्रि०** १ (कांहीं वस्तु) गमावणें किं० गमावून घेणें. २ (कोणेकाची) कांहीं वस्तु नष्ट करणें किं० त्याच्यापासून काढून घेणें. ३ (कोणेकाला) वाद, कुस्ती, पैज, इ० मध्यें पराजित करणें. ४ कोणेकापासून (कांहीं वस्तु) जिंकून किं० लुबाडून घेणें.

हरवार, हरवाळ वि० मऊ, उंची, स्वादिष्ट, ढिसूळ,किं० खमंग असें(खाद्य),मागें'अरवार'पहा.

हरसाळ न० दरवडेखोर, परचक्र, पेंढारी, इ० ना रोध करण्यासाठीं किं० पिटाळून लावण्यासाठीं कुऱ्हाडी, कोयते, काठ्या, इ० सामान घेऊन उठलेले शेतकरी किं० गांवकरी (उठणें, मिळणें).

हरहमेश (-शा) [**फा०**] **क्रि० वि०** सदा-[सर्वदा; सदोदित.

हरहर महादेव [सं०] **पु०** १ लढाईस निघालेले किं० शत्रूवर हल्ला करावयास सिद्ध झालेले शिपाई एकमेकांना उत्तेजन देण्यासाठीं ही आरोळी काढतात. २ भोजनास सुरवात करतांना हा शब्द उच्चारतात. ३ सत्यानास; पूर्ण विध्वंस; नासाडी (होणें, करणें).

हरहरला क्रि० वि० सदासर्वदा; हमेशा; नेहेमीं; घडींघडीं.

हरहुनर, हरहुन्नर [**फा०**] **न०** नानाप्रकारच्या युक्त्या किं० कलाकसबें व्यक्तिशः किं० समुच्चयानें. ॐ **हरहुनरी वि०** नानाप्रकारचीं कसबें किं० कला ज्याला अवगत आहेत असा; चौरस.

हरळ, हरळी [**म०** हिरवळ] **स्त्री०** १ एक प्रकारचें गवत. ॐ**हरळीची मुळी स्त्री० (लाक्षणिक)** कितीही प्रकारें नाश करावयाचा प्रयत्न केला तरी नाश न पावणारें कुटुंब, संस्था,विद्या, धर्म, पंथ, जात, इ०. २ मोठ्या विस्तीर्ण कुटुंबाचा अवशिष्ट राहिलेला एकच लहान मुलगा. **टीप**,–हरळी कितीही काळजीपूर्वक उपटून टाकिली तरी तिचे जे बारीकसारीक अवशेष मातींत पडलेले असतात त्यांना पाण्याचा यत्किंचित् अंश मिळाला तरी त्यापासून नवी वृद्धि होते ह्यावरून वरील लाक्षणिक अर्थ उत्पन्न झाले आहेत.**हरळी प्रसाद**[**म०**हरळी खावयास मिळणें हेंच मोठें भाग्य असें समजणारा प्राणी] **पु०** १ भिकार घोडें, बैल, इ०. २ मालक स्वताच्या घोड्याविषयीं बोलतांना शालीनतेनें आपल्या घोड्याला ' हरळीप्रसाद ' म्हणतो. ३ ज्याला दाणा दिला जात नाहीं, ज्याला फक्त गवतच खावयास दिलें जातें असा घोडा; हा अर्थात् हाडका आणि रोडकाच असावयाचा.४ भिकार, कुचकामाचा नोकर.

हरळ पु०, न० १ डोळे चुरचुरणें,

त्यांतून पाणी गळणें, त्यांना कंड सुटणें, ह्या रूपाचा डोळ्यांचा एक विकार. २ अशा विकारामुळें डोळ्यांना कंड सुटणें (येणें).

हरळ पु० दगडाचे खडे व्यक्तिशः किं०समुच्चयानें. **स्त्री०** वाळू; रेती.

हरळ स्त्री० कोणेकाला संतुष्ट ठेवण्याची त्रासदायक जबाबदारी किं० ह्या जबाबदारीमुळें होणारा उपद्रव (लागणें).

हरळ वि० विरळ; सैल; ढिसूळ; पोकळ.मागें ' अरळ ' सर्व अर्थीं पहा.

हरळ पु० १ वांगीं, मिरच्या, कोथिंबीर, इ० लावण्यासाठीं करतात तो चर किं० वाफा. २ ज्यादा पाणी काढून टाकण्यासाठीं केलेला चर. ३ पाण्याचा पाट.

हरळणें अ० क्रि० (दांत, माणसें, झाडें, इ०). विरळ विरळ असणें किं० होणें.

हरळा पु० १ पाण्याचा पाट. २ ओहोळ. ३ ज्यादा पाणी काढून लावण्यासाठीं खणलेला चर.

हरळी स्त्री० एक प्रकारचें गवत. वर 'हरळ, हरळी ' पहा.

हरळी स्त्री० हाक, आरोळी (अशिक्षितांत [रूढि).

हरा, हारा पु० बांबूच्या पातींची मोठी टोपली किं० पाटी.

हराम [अ०] **वि०** १ निषिद्ध; अमंगळ. २ अन्यायाचा. ३ लुचा; लबाड. ह्या तीन्ही अर्थीं उलट शब्द ' हलाल '. ꣸ **हरामखोर वि०** १ लुचा; लबाड; अप्रामाणिक. २ स्वामिद्रोही. **हरामजादगी स्त्री०** १ लबाडी; लुचेगिरी. २ स्वामिद्रोह. **हरामजादा वि०** लुच्चा; लबाड; अप्रामाणिक; स्वामिद्रोही. २ जारज; रांडेचा मुलगा; रांडलेक. **हरामजादी, हरामी स्त्री०** लबाडी; कपट. **हरामनमकी, नमकहरामी स्त्री०** स्वामिद्रोह; विश्वासघात.**हरामाचा वि०**लबाडीनें मिळविलेला.

हरावल, हरोल पु० सैन्याची पिछाडी.

हराष,हराश,हरास [सं० ऱ्हास]**पु०**१ व्यापारादिकांत झालेली हानि किं० बसलेली ठोकर. २ व्यापारांत अपकर्ष किं० उतरती कळा. ꣸**हराश (–ष,–स) काळ पु०** अपकर्षाचा किं० ऱ्हासाचा काळ; उतरती कळा.

हराहोरा पु०, हरेंवारें न०, हरें होरें न० क्षणभंगुर डौल किं० थाटमाट; ऐट किं० दिमाखदारी ,–जी फार दिवस टिकणें शक्य नाहीं; इहलोकचें वैभव,–जें पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें पोकळ आणि नश्वर असतें.

हरि [सं०] **पु०** १ विष्णु. २ इंद्र. ३ सूर्य. ४ वायु. ५ सिंह. ६ घोडा. ७ इंद्राचा घोडा. ८ वानर. ९ बेडूक. १० यम. ११ वायु. ꣸ **हरिचंदन पु०, न०** १ एक स्वर्गीय तरु. २ चंदनाची एक जात. **हरिप्रिय पु०** मूर्ख; ठोंब्या; ढ. **हरिवासर पु०** १ द्वादशीचा जो प्रथम पाद तो;– ज्यांत भोजन करूं नये असें सांगितलें आहे. २ आषाढ, भाद्रपद, कार्तिक, एतत्संबंधीं शुक्लपक्षीय द्वादशी तिथींचा आणि अनुराधा, श्रवण, रेवती, ह्या नक्षत्रांचा जो योग तो. **हरिहय पु०** इंद्र. **हरिहेति स्त्री०** १ इंद्रधनुष्य. २ विष्णूचें सुदर्शन चक्र. **हरिजागर पु०** एकादशीच्या रात्रीं विष्णूच्या प्रीत्यर्थ केलेलें जागरण. **हरिदास** मागें ' हरदास ' पहा. **हरिदिनी स्त्री०** एकादशी ही तिथि,–व्रताच्या दृष्टीनें. **हरिद्वार न०** एक पुण्यक्षेत्र.**हरिविठ्ठल न०**१पूर्ण नाश किं०विध्वंस. २ भोजनारंभीं किं० भोजनांत कोणी श्लोक इ० म्हटल्यानंतर त्याच्या शेवटीं ह्या शब्दांचा मोठ्यानें सर्व लोक एकदम उच्चार करतात.

हरिक, हरीक पु० कोद्रू ह्या नांवाचें धान्य.

हरिक, हरीक (–ख) [सं० हर्ष] **पु०** हर्ष (कवितेंत रूढि).

हरिण [सं०]**पु०** १ एक जंगली चतुष्पाद पशु- ह्याची सुंदर डोळयांबद्दल आणि चपलपणाबद्दल प्रसिद्धि आहे. ह्याची स्त्री ती ' हरिणी. ' ꣸ **हरिणी स्त्री०** १ हरिणी ह्या पशूची स्त्री. २ एक वृत्त. याच्या प्रत्येक चरणांत न, स, म, र, स, हे गण असून पुढें एक लघु आणि एक गुरु अशीं अक्षरें येतात. यति सहाव्या आणि दहाव्या अक्षरांवर आणि पादान्तीं. ३ स्त्रियांच्या चार जाति करण्यांत आलेल्या आहेत त्यांपैकीं एक.

हरित [सं०] **वि०** १ हिरवा. २ पिवळा. **पु०** १ पिवळसर हिरवा रंग. २ सूर्याचा घोडा. ꣸ **हरिताश्व पु०** सूर्य. **हरितमणि पु०** पाच हें रत्न. **हरितलता स्त्री०** पाच हीं वनस्पति.

हरिताल पु० न० मागें ' हरताळ ' पहा.
हरितालिका मागें ' हरताळका ' पहा.
हरिदिनी स्त्री० एकादशी. मागें ' हरि ' मध्यें पहा.
हरिद्र [सं० हार्द] न० मनांतील गुप्त गोष्ट; मनांतील अगदीं अंतस्थ विचार; रहस्य;गुजगोष्ट.
हरिद्रा [सं०] स्त्री० हळद,-एक पिवळा कंद. ❀ **हरिद्राप्रमेह** पु० ज्यांत लघवी पिवळी होते असा एक रोग.**हरिद्राराग** वि०प्रेमांत चंचल; ज्याचें प्रेम धरसोडीचें आहे असा. याच्या उलट ' नीलराग '(म्ह० दृढ आहे प्रेम ज्याचें असा).
हरिन्मणि [सं०] पु० पाच हें रत्न.
हरिप, हरीफ, हरिपी.हरिप्या[अ०'हरीफ्'] वि० धूर्त; कावेबाज. पु० १ शत्रु. २प्रतिपक्ष्याला जेरीस आणणारा.❀**हरिपी.हरिफी.हरिफाई**[अ० हरीफ्]स्त्री० १ धूर्तपणा;कावेबाजपणा.२चतुराई.
हरिपद [सं०] न० क्रांतिवृत्ताच्या पातळीला विषुवाची पातळी ज्या रेषेंत छेदिते तिला ' संपातरेषा ' म्हणतात. संपातरेषेच्या दोन टोकांना ' संपात ' किं० ' संपातबिंदु' म्हणतात. क्रांतिवृत्तांतून फिरणारा सूर्य ज्या संपातांतून विषुवाच्या उत्तरेस जातो तो उत्तरायणपात किं० वसंतारंभपात; ह्यालाच ' हरिपद ' म्हणतात. क्रांतिवृत्ताच्या दक्षिणेस सूर्य ज्या संपातांतून जातो तो'दक्षिणायनपात' किं० 'शरदारंभपात.' मागें ' संपात,' ' याम्य ' पहा.
हरिपाठ [सं०] पु० विठोबाच्या स्तुतीचे नामदेवानें रचिलेले अभंग समुच्चयानें.
हरिभक्त [सं०] न० १ हरीची भक्ति करणारा. २ संसाराचा त्याग करून भिक्षा मागून यात्रा करीत हिंडणारा माणूस. ३ साधुत्वाचें ढोंग करणारा; भोंदू.
हरिवर्ष [सं०] न० निषध आणि हिमकूट ह्यांच्या दरम्यानचा भूभाग.
हरी, हारी [सं० हार] स्त्री० ओळ, पंक्ति.
हरीक पु० कोद्रू ह्या नांवाचें धान्य.
हरीक, हरीख [सं० हर्ष] पु० हर्ष; आनंद.
हरीतकी [सं०] स्त्री० हिरडा ह्या फळाची एक जात.
हरीप, हरीफ मागें 'हरिप, हरीफ,' इ०पहा.

हरूख, हरूष [सं० हर्ष] पु० आनंद; हर्ष. ❀ **हरूपमात** स्त्री० आनंदाची गोष्ट किं० खबर (कवितेंत).
हरेंवारें, हरेंहोरें न० क्षणभंगुरपणा,–आनंद, उत्कर्ष, वैभव, इ० चा.
हरोल [हिं० हरावल्]पु०सैन्याची पिछाडी.
हर्तकी वर ' हरीतकी ' पहा.
हर्ता [सं० हर्तृ] वि० निवारण करणारा; हरण करणारा; उ० दुःखहर्ता, कालहर्ता, इ०. पु० चोर; लुटारू; दरवडेखोर. ❀ **हर्तृत्व** न० १ चोरी करण्याची प्रवृत्ति. २ व्यथा इ० हरण करण्याचा गुण. [एक जात.
हऱ्याळ पु०, स्त्री० हिरव्या रंगाच्या सापाची
हर्ष [सं०] पु० १ आनंद. २ अंगावर केश उभे राहाणें; रोमांच. ❀ **हर्षसंभव** न० पुरुषाचें वीर्य. ❀ **हर्षवायु** पु० अत्यानंदामुळें उत्पन्न होतें तें वेड.**हर्षामर्ष** [सं० हर्ष(आनंद) +अमर्ष(राग)]पु० ए० व० १ बोलाचाली;हमरीतुमरी. २ आनंद आणि राग; आनंद किं० राग; उ० मला तुझ्या हर्षामर्षाची परवा नाहीं. 'हर्षामर्षा' पु० ह्याच अर्थानें योजतात.
हर्षण [सं०] वि० १ हर्ष देणारा; आनंदविणारा. २ अंगावर केश उभे करणारा; रोमांच उत्पन्न करणारा. पु० १ श्राद्धदेवता. २ एक नेत्ररोग. न० १ आनंद. २ उत्तेजन. ❀ **रोमहर्षण** वि० अति आनंद किं० भीति ह्यांचेमुळें अंगावर रोमांच उभे करणारा (देखावा, बातमी, इ०).
हर्षणें [सं० हृष्] अ० क्रि० आनंदित होणें; हर्ष पावणें.
हर्षमाण [सं०] वि०१ आनंद पावलेला. २ आनंद पावणारा. [संतुष्ट.
हर्षित, हृष्ट [सं०] वि० आनंद पावलेला;
हल् [सं०] न० १ (**व्याकरण**) व्यंजन. ' अच् ' ही स्वराची संज्ञा. २ व्यंजनाला स्वर मिळवावयाच्या अगोदर त्या व्यंजनाच्या खालीं ्असें चिन्ह करतात तें; उ० ' क् ' ला ' अ ' मिळविला म्हणजे ' क ' होतें. ❀ **हल्संधि** पु० (व्याकरण) व्यंजनसंधि.
हल [सं०] न० शेतकऱ्याचा नांगर. ❀ **हलधर, हलभृत, हलायुध** पु० बलराम.**हलधर** पु० नांगर चालविणारा; शेतकरी.

हलक [अ० हल्क्] **स्त्री०** गाणाऱ्याचा गळा (गोड, कर्कश, कोमल,इ० दृष्टीनें).

हलक (-ख),हल्लक (-ख), हलाक (-ख) [अ० हलाक्] **वि०** दुःख, अतिश्रम, उपवास, इ० मुळें जो थकवा येतो तो किं० जो गळाठा होतो तो. ॐ **हलाकी, हलाखी स्त्री०** १दारिद्र्य, दुःख,इ०मुळें कोणेकाची जी निकृष्टावस्था होते ती. २ आजार, उपवास,इ०मुळें आलेला परमावधीचा अशक्तपणा. [अधम.

हलकट [म० हलका] **वि०** नीच; पाजी;

हलकडी स्त्री० १ बायकांच्या नथेला लोंबतीं मोतीं लाविलेलीं असतात तीं किं०त्यांचा घोस. २ दुफाशी नथेला मोतीं ओवावयासाठीं जो दुसरा तुकडा जडवितात तो.

हलकथील न० चित्रें इ० ना रंग देण्याच्या उपयोगाचा एक पदार्थ,–ज्यांत कथील असतें.

हलकलणें अ० क्रि० गांवांवर लुटारू,पेंढारी, इ०चीं धाड आल्यामुळें (लोकांची)गडबड उडणें किं० (लोक) सैरावैरा धावत सुटणें.

हलकल्लोळ, हलकल्होळ [म०कल्लोळ]**पु०** १ आरडाओरड;धांदल;फार मोठी गडबड;हाहाकार. २वाद्यांच्या ध्वनींचें अव्यवस्थितपणाचें मिश्रण.

हलकल्हई स्त्री० वर ' हलकथील ' पहा.

हलका [हिं०] **वि०** १ वजनानें कमी. २ वजनदारपणानें किं० प्रतिष्ठेनें किं० लौकिकानें कमी. ३ किंमत,मजबूती,टिकाऊपणा,कुशलपणा, कारागिरी, सौंदर्य, इ० बाबतींत कमी योग्यतेचा किं० दर्जाचा. ४ ज्याचा सामाजिक दर्जा कमी असा (मनुष्य). ५ लांबी, रुंदी, विस्तार, इ० बाबतींत कमी. ६ तीव्रपणा,प्रखरपणा, कैफ, इ० बाबतींत कमी (तंबाखू, अफू, इ०). ७ सौम्य (वारा, थंडी, उष्णता, इ०). ८ पचवावयास सोपें (खाद्य). ९फार वेळ ज्याच्या योगानें भूक धरत नाहीं असें (खाद्य). १० सहन करावयास सोपें (दुःख, वेदना, दुखणें). ११ ज्याची जबाबदारी किं० जोखीम फारशी नाहीं असें (काम, नोकरी, इ०). १२ ज्याच्या शब्दाला किं० उपदेशाला समाजांत फारशी किंमत दिली जात नाहीं असा (माणूस, पुढारी, इ०). १३ सहज पाळतां येईल अशी (शर्त, नियंत्रणा). १४ क्षुल्लक,पोरकट, क्षुद्र (विषय,चर्चा,इ०).ॐ**हलक्या कानाचा** किं० **कानाचा हलका वि०** कोणी कांहींही गोष्ट सांगितली तरी ती खरी समजणारा. **जिवाचा हलका वि०**ज्याचें मन मोठें नाहीं असा; अनुदार अंतःकरणाचा. **बुद्धीचा हलका** मूर्ख; विचार करून योग्य सरणी ज्याला ठरवितां येत नाहीं म्हणून जो दुसऱ्याच्या तंत्रानें चालत असतो असा. **हलका हात पु०** १ नाजूक हात,– कांहीं काम करण्याविषयीं बोलतांना; उ० हलक्या हातानें हें गळूं फोड. २ फार दाब न घालणारा; फार न चेपणारा. **हलक्या हातानें क्रि० वि०** फारसा दाब न घालतां, फारसा जोर न करतां, फारशी घाई न करतां (कांहीं काम करणें). **हलका फराळ पु०** कांहीं वेळ भूक धरावी येवढ्यासाठीं पोहे, लाह्या, दशमी, इ० जें थोडेंसें खातात तें. **हलकें फूल न०** १(लाक्षणिक) फुलाइतका हलका असा पदार्थ. २ करावयाला सोपें काम. **हलका भार पु०** कोणेकाचा कमी लौकिक किं० पत. **हलकें डोसकें, हलकें डोकसें न०** वस्तऱ्यानें तासावयाला किं० भादरावयाला सोपें डोकें (न्हाव्यांचा शब्द). ह्याच्या उलट ' जड डोसकें, ' ' जड डोकसें. '

हलका, हलगा [अ०हल्काह्=कडी, वर्तुळ] **पु०** झोपाळ्याच्या किं० पाळण्याच्या कड्या किं० दोऱ्या लोंबत्या सोडण्यासाठीं पाटणीला ज्या आकारविशेषाच्या कड्या बसविलेल्या असतात त्या प्रत्येक.

हलकारती, हलकारत [म० हलकी+आरती] **स्त्री०** आंत दिवे ठेवून देवाच्या मूर्तीपुढें ओवाळावयासाठीं घेतात तें लांबोडें आणि उथळ पात्र किं०तबक.

हलकारा, हरकारा [फा० हर्काराह्] **पु०** राजा, बडा अधिकारी, इ०च्या पदरीं जे निरोप, पत्रें, इ० नेणें, आणणें, इ० कामें करणारे हुजरे असतात ते प्रत्येक. ॐ **हरकारगिरी, हलकारगिरी, हलकरगिरी स्त्री०** हलकाऱ्याचें काम, कर्तव्य, किं० दर्जा.

हलकालोळ वर ' हलकल्लोळ ' पहा.

हलकावणें [म० हलका होणें] **अ० क्रि०** हलकें होणें. वर ' हलका ' पहा.

हलकाविणें [म० ' हलकावणें ' चें प्रयोजक] स० क्रि० हलकें करणें. वर ' हलका ' पहा.

हलकी स्त्री० १ एक चर्मवाद्य. २ लहान हलगा किं० हल्का (आकारविशेषाची कडी).

हलकूत (-द) वि० मऊ, नाजूक, सुकुमार (माणूस, अंग, प्रकृति, पदार्थ).

हलकें न० १ लहान हलगा किं० हल्का. २ लहान हल्कारती. [वि० पहा.

हलख मागें ' हलक ' स्त्री०, ' हलक(-ख) '

हलखुशामत पुढें ' हालखुशामत ' पहा.

हलखूद वि० आटोपसर (गांठोडें, शरीर, ओझें, इ०).

हलगरजी (-गरज्) [अ० अहलू-इ-गर्झ्= स्वार्थी] वि० निष्काळजी; बेपरवा; योग्य ती काळजी न घेणारा. मागें 'अलगरजी (-जू)' पहा.

हलगी स्त्री० एक चर्मवाद्य. मागें ' हलकी ' दोन्ही अर्थी पहा.

हलगोमालगो स्त्री० काम करण्यांत टंगळ-मंगळ किं० निष्काळजीपणा. क्रि० वि० कचरत कचरत; आवंकत.

हलचाल, हलणें, इ० पुढें ' हालचाल, ' ' हालणें, ' इ० पहा.

हलफिलाल [अ० हाल् फेअल् हाल्] क्रि० वि० ह्या क्षणीं; आतांच. [हलका.

हलफूल [म० हलकें+फूल] वि० अत्यन्त

हलबेलंडी, हलबालेंडी, हबेलंडी स्त्री०, **हलबेलंडें** न०, **हलबंड्या, हलबिंड्या** स्त्री० अ० व० [हिं०अबेलंडी] दुर्दशा, घाबरगुंडी (होणें, उडणें).

हलमस्त, हालमस्त [अ० हाल+मस्त्] वि० गरीब असून सुद्धां मगरूर; गरीब पण गर्विष्ठ.

हलवई, हलवाई, हालवई, हालवाई [हिं०]पु० हलवा, पेढे, बर्फी, गांठ्या, इ० करून त्या विकून त्यांवर चरितार्थ करणारा.

हलवा, हालवा [अ०] पु० १ तीळ, वेल-दोड्याचे दाणे, लवंगा, इ० वर साखरेचा पाक चढवून करतात ते दाणे समुच्चयानें. २ एक गोड खाद्य. ३ एक मत्स्य.

हलवान न० शालजोडीचा एक फरद.

हलसूद [म० हलका+शुद्ध] वि० हलकें आणि चपल (शरीर).

हलहलणें, हलहालणें [हिं०] अ० क्रि० भय, आश्चर्य, आनंद, इ० विकारांनी क्षुब्ध किं० जर्जर होणें; भांबावून जाणें. ꣸ **हलहलून** क्रि० वि० धडपडून; घाईनें आणि खडबडून.

हलहलीत वि०अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडेल असा पैसा, मित्र, आश्रयदाता ज्याला कोणी नाहीं तो; अत्यन्त विपन्न आणि निराश्रित.

हलहवाल अ० [हाल्+अह्वाल्] पु०,स्त्री० १ कैफीयत. २ दुर्दशा.

हलाक (-ख) [अ० हलाक्] वि० आजार, दारिद्र्य, कष्ट, चिंता, उपवास, इ० मुळें अत्यन्त जर्जर किं० त्रस्त. ꣸ **हलाकी** (-खी) स्त्री० हलाख झालेलें असण्याची स्थिति; दारिद्र्य; दुर्दशा; थकवा; अपकर्ष.

हलाल [अ०] वि० १ योग्य; उचित. २ धर्म्य. ३ न्याय्य. ४ विधिपूर्वक मारलेल्या पशूचें (मांस); उ० मुलान्यानें फात्या न दिला तर बकरें मुर्दाड राहातें म्हणजे तें हलाल होत नाहीं. ꣸ **हलालखोर** पु० १ झाडू; भंगी. २ हलकीं कामें करणारा. **हलालखोरी** स्त्री० १ हल्का धंदा. २ प्रामाणिकपणा; इमानीपणा. **हलाल करणें** मुसलमानी धर्माप्रमाणें (बकरा, कोंबडा, इ०) मारणें. **हलालाचा** वि० हक्कानें किं० न्याय्य मार्गानें मिळालेला किं० मिळविलेला किं० संपादिलेला (पैसा इ०). [थरथरणें.

हलालणें अ० क्रि० अत्यन्त कंपित होणें;

हलाहल, हालहल [सं०] न० १ समुद्राचें मंथन करून देवदानवांनीं जें विष बाहेर काढलें तें. २ कोणतेंही अत्यंत भयंकर विष.

हली [सं० हलिन्] पु० १ नांगर चालविणारा. २ बलराम.

हलीमवाली [अ० अहालीमवाली] पु० अ० व० लहान थोर; उत्कृष्ट आणि निकृष्ट; गरीब आणि श्रीमंत; सर्व लोक.

हलीहरामी [अ० हराम्] वि० लुच्चा; कपटी; काविबाज; मात्रागमनी. स्त्री० लुच्चेगिरी; लबाडी.

हलूमालू स्त्री० कचर; धरसोड; करूं न करूं अशी मनाची संदिग्धपणाची स्थिति(करणें). क्रि० वि० कचरत; दबकत दबकत; साशं कप

हलोहल, हलोहाल, हालोहाल[अ० हाल् ओ हाल्]**क्रि० वि०** तत्काळ; तत्क्षणीं; ताबडतोब.

हल्य [**सं०**] **वि०** नांगरण्याच्या कामाचा किं० कामासंबंधाचा. **न०** नांगरलेलें शेत. **हल्या पु०** रेडा, टोणगा,-जो नांगरण्याच्या कामीं लावतात.

हलक (-ख), हलाकी (-खी), इ० मागें ' हलाक, '' हलाकी, ' इ० पहा.

हलर पु० मुलाला पाळण्यांत निजवितांना बायका गातात तीं गाणीं प्रत्येक.

हल्ला [**अ०** हम्लाह्] **पु०** १ चढाई; शत्रू-वर केलेली स्वारी. २ कोणतेंही काम करण्याला लाविलेला नेट किं०जोर. ३(विनोदांत) खाद्यपेय पदार्थांवर हात मारणें म्ह० ते यथेच्छ खाणें किं० पिणें (करणें).॰**हल्लाहरकत स्त्री०ए०व०**१विघ्न, उपद्रव, त्रास, खोळंबा (करणें).२ भयाचें कारण; भिण्याचें कारण.

हल्लीं क्रि० वि० ह्या काळीं. पुढें ' हालीं ' पहा. [पहा.

हल्लीं, हल्लींमाजीं पुढें'हालीं,' ' हालींमाजीं'

हलसंधि [**सं०** हल् (व्यंजन)+संधि (संयोग)] **पु०** (**व्याकरण**) व्यंजनांचा संधि; उ० सरस्+रुह्=सरोरुह्, ककुभ्+प्रान्त=ककुप्-प्रान्त, इ०. [मोठी चंद्रज्योत.

हवई, हवाई, हवायी स्त्री०आतषबाजींतील

हवडा पु० लबाडीनें किं० झोंडपणानें कांहीं वस्तु घेणें (मारणें).

हवदा पुढें ' हौदा ' पहा.

हवन [**सं०**] **न०** १ अग्नींत आहुति टाकणें. २ होम. ३ आमंत्रण. ४ युद्धार्थ आव्हान.

हवनी, हवित्री [**सं०**] **स्त्री०** १ होमकुंड.२ जमीनींत केलेलें खळगीच्या रूपाचें वैश्वदेवाचें कुंड.

हवरा, हावरा [**म०** हावें हावें म्हणणारा] **वि०** अधाशी; मागरा; हें मला हावें तें मला हावें असें सदा म्हणणारा.

हवरा पु०, हवरी स्त्री० पांढरा तीळ.

हवलदार इ० पुढें ' हवालदार ' इ० पहा.

हवलदिल [**फा०** हवल्दिल्] **वि०** १ भय-भीत; घाबरलेला. २ चिंताग्रस्त; व्यग्र. ॰ **हव-लदिली स्त्री०** अस्वस्थपणा; चिंता; व्यग्रता.

हवशा, हवस, इ० पुढें ' हौशा, '' हौस, इ० पहा.

हवळा, हुळा पु० भाजलेले हरभऱ्याचे घाटे किं० वाटाण्याच्या शेंगा समुच्चयानें.

हवळा [**म०**हावें]**वि०**जें जें पाहील तें तें मला हावें असें म्हणणारा; अधाशी.

हवळा वि० नाजूक, कोमल (मन, शरीर, झाड, प्रकृति, इ०).

हवा [**अ०**] **स्त्री०** १ वारा. २ उष्णता, थंडी, सर्दपणा, इ० गोष्टींच्या समुच्चयावरून जी एकाद्या ठिकाणची स्थिति ती. ३ वाताव-रणाचे जे घटक थर ते समुच्चयानें. ४ एकाद्या विशिष्ट दिवसाची उष्णता, थंडी, इ० चें माप. ५ उघड्या जागेचें हुशारी देणारें वातावरण. ॰ **हवा खाणें** उघड्या हवेत मनाला हुशारी वाटण्यासाठीं जाणें किं० हिंडणें. **हवाशीर वि०** जेथें मोकळी हवा वाहत आहे असें (घर, पटां-गण, इ०).

हवा, ह्वावा, व्हावा [**म०** ' होणें ' चें एक विध्यर्थ रूप] **वि०** पाहिजे असा, जरूर, किं० इष्ट. हवी, हवे, हवें,हावें,व्हावें,इ० रूपें लिंगवच-नांप्रमाणें वेगळीं वेगळीं होतात.

हवाई [**फा०**] **स्त्री०** आतिषबाजींतील मोठी चंद्रज्योत. वर ' हवई ' पहा.

हवाडी स्त्री० सुकाणूचा दांडा.

हवायी स्त्री० वर ' हवई 'पहा.

हवाल [अ० ' हाल् ' चें **अ० व०** अह्वाल्] **पु०, स्त्री०** देश, गांव, माणूस, इ० ची हल्लींची स्थिति, वर्तमान, इ०. ' अहवाल ' हा मूळचा **अ० व०** शब्द असून त्याचा **पु० ए० व०** प्रमाणें मराठींत उपयोग होतो. एकाद्या संस्थेची विशिष्ट कालावधीची हकीगत असा ' अहवाल ' चा मराठींत अर्थ आहे.॰ **हालहवाल स्त्री०** कोणेक माणूस, देश, चळवळ, इ० ची हल्लींची स्थिति, वर्तमान, किं० सद्यःस्थिति.

हवालणें [**म०** हवाला] **स० क्रि०** १ (कांहीं काम, जबाबदारी, इ०) कोणेकाकडे सोपविणें किं० त्याच्या माथीं मारणें.२(आपल्या-वरची कांहीं जबाबदारी) दुसऱ्या माणसाकडे देणें (आणि आपण मोकळें होणें).

हवालत [अ०] **स्त्री०** सोपवणूक; दुसऱ्यावर टाकलेली जबाबदारी किं० ठेविलेली भिस्त.

हवालदार [अ०] **पु०** १ सुभ्याच्या पोटचे जे अनेक महाल त्यांचे जे अमलदार ते प्रत्येक. २ किल्ला इ० च्या रक्षणार्थ ठेविलेला अधिकारी. ३ एकाद्या कामावर लाविलेले जे अनेक गडी किं० मजूर त्यांच्यावर देखरेख करण्यासाठीं नेमिलेला मुकदम. ❀ **हवालदारी स्त्री०** हवालदाराचा हुद्दा किं० अधिकार किं० कार्यक्षेत्र.

हवालदिल, हवालदिली वर 'हवलदिल' पहा.

हवाला [अ० हवालाह्] **पु०** आपल्या बद्दल किं० आपल्या वतीनें कोणेकानें कांहीं काम करावें किं० जबाबदारी वाहावी अशी केलेली व्यवस्था; सोपवणूक; भिस्त; जबाबदारी (देणें, घेणें); उ० ह्या कामाचा हवाला मला द्या. ❀ **हवालां, हवालीं, हवालें क्रि० वि०** ताब्यांत (देणें). कोणेकाच्या जबाबदारीवर (ठेवणें), देखरेखीखालीं (देणें, ठेवणें). **हवालाकपाला, हवालाटवाला पु०** हमी; जबाबदारी; हवालाबिवाला.

हवावी स्त्री० कष्टाचें काम केल्यामुळें किं० धावल्यामुळें किं० डोंगर इ०चढल्यामुळें जोराजोरानें चालतो तो श्वासोच्छ्वास (लागणें).

हवि [**सं०** हविस्] **न०** १ हवन करावयाचें द्रव्य. २ तूप. ३ होम. ४ अन्न. ❀ **हविर्भुज, हविरशन पु०** अग्नि.

हविष्य [**सं०**] **न०** १ आहुतिद्रव्य. २ तूप. ३ व्रताच्या दिवशीं भक्षणास उचित म्हणून धर्मशास्त्रांत गहूं, गायीचें दूध, इ०पदार्थ सांगितले आहेत ते प्रत्येक. ४ हेच पदार्थ भक्षावयाचे अशा संकल्पाचें व्रत. ५ (**लाक्षणिक**) जें वाईट किं० निंद्य तें हटकून करण्याचा कोणेकाचा जो स्वभाव तो; परिपाठांतील वाईट गोष्ट; उ० ह्या गांवांत सर्व लोकांस रांडबाजी हें हविष्यच होऊन बसलें आहे. ❀ **हविष्यान्न न०** वर 'हविष्य' अर्थ १, २, ३ पहा.

हवेली [अ०] **स्त्री०**१ अनेक मजल्यांचें आणि टुमदार घर. २ राजधानीच्या सभोंवतालचा भाग. ३ अनेक कसब्यांच्या एकीकरणानें होणारा जो प्रांत त्याला ज्या कसब्याचें नांव देतात तो कसबा.

हव्य [सं०] **न०** १ आहुति; हविर्द्रव्य. २ देवाला द्यावयाचें अन्न. ३ तूप. ४ होम. ❀ **हव्याश, हव्यवाहन, हव्यवाह पु०** अग्नि. **हव्यपाक पु०** चरु. **हव्यकव्य न० ए० व०** पितरें आणि देवता यांच्या प्रीत्यर्थ जे हरएक विधि ते समुच्चयानें.

हव्यास [अ० हवस्] **पु०** उत्कट इच्छा; कांहीं वस्तु मिळेपर्यंत चैन न पडणें हा स्वभाव; अनावर लोभ किं० इच्छा. ❀ **हव्यासी (–शी) वि०** अत्यन्त उत्सुकतेनें किं० उत्कंठेनें कांहीं वस्तु इच्छिणारा; नादिष्ट.

हशम [अ० हशम्] **पु०**१ बड्या माणसाचे नोकरचाकर, आश्रित, इ० रूप परिवार. २ पादचारी शिपायी समुच्चयानें. ❀ **हशमपन्हा वि०** वैभवशाली. **हशम फडनीस, हशम फडनवीस, हशमनवीस, हशमनीस, हशामनवीस, हशामनीस, हशामफडनवीस, हशमफडनीस पु०** किल्ल्यावरील शिबंदीची हजीरी ठेवणारा कारकून.

हशा [अ० हाषीयाह्] **पु०** १ वस्त्राचा किं० कपड्याचा घेर किं० सोगा किं० पदर. २ शालजोडी, दुपट्टा, गालिचा, दुलई, इ० ना कांठाशीं जो वेगळ्या रंगाचा किं० वेगळ्या वस्त्राचा पट्टा लावितात तो.

हशा [**म०** हसणें] **पु०** १ मोठमोठ्यानें हसणें(पिकणें, होणें). २मोठमोठ्यानें हसून कोणेकाची केलेली फजिती किं० हुर्यो (होणें). ❀ **कांहीं गोष्ट हशावारीं नेणें** आपणावर कोणी दोषारोप केला असून त्याचें आपण खण्डन न करतां नुसतें हसून त्या दोषारोपाचें महत्त्व कमी करणें; उत्तर देणें अशक्य आहे आणि दोष तर पदरांत घ्यावयाचा नाहीं अशा इराद्यानें केवळ हसून तो दोष उडवून लावण्याचा प्रयत्न करणें.

हशी [**म०** हसणें] **स्त्री०** टवाळकी, उपहास (करणें, मांडणें). वर 'हशा' सर्व अर्थी पहा. ❀ **हशीखेळी स्त्री० ए० व०** हसणें आणि खेळणें खेळणें; बागडणें; गंमत करणें.

हशील, हाशील, हासील [अ० हासिल

न० १ देश, गांव, जकातीचें नाकें, इ० संबंधाचें जें सरकारला किं० मालकाला द्यावें लागतें तें देय. २ गाडी, आगगाडी, आगबोट, इ० नीं प्रवास करणें किं० सामान किं० पत्र पोहोचविणें इ० बद्दल जें भाडें किं० देय प्रत्यक्ष पैशाच्या रूपानें किं० अन्य प्रकारानें द्यावें लागतें तें. ३ महत्त्व, तात्पर्य; उ०तुझ्या आक्षेपाचें मला कांहीं हाशील वाटत नाहीं. ४ उपयोग; उ० तुझ्याशीं बोलत बसण्यांत कांहीं हाशील नाहीं.

हंस [सं०] पु० १ एक पक्षी. ह्या पक्ष्याच्या गतीची स्त्रीच्या सविलास गतीला उपमा देण्याचा कविसंप्रदाय आहे. तसेंच पाणी आणि दूध ह्यांच्या मिश्रणांतून दूध वेगळें करण्याची ताकद ह्या पक्ष्याचे ठायीं आहे हाही एक कविसंप्रदाय आहे. २ परमात्मा. ३ जीवात्मा. ४ ज्ञानी माणूस. ५ संन्याशांतील एक भेद. ६ अजपा हा मंत्र. ७ सूर्य. ८ निर्लोभी राजा. ९ विष्णु. ꣸ **हंसगामिनी, हंसगति** स्त्री० ठमकत ठमकत चालणारी स्त्री. **हंसवाहन, हंसस्थ** पु० ब्रह्मदेव. **हंसी** स्त्री० हंस पक्ष्याची स्त्री.

हसकार (-रा) पु० यत्किंचित् किं० अत्यल्प सुद्धां अंश (नसणें); उ० हा रडत आहे पण ह्याच्या डोळ्यांत पाण्याचा हसकारा नाहीं; उ० ह्या भांड्यांत तुपाचा हसकार नाहीं. हा शब्द बायकांच्या भाषेंतील आहे.

हसडणें, हंसडणें स० क्रि० १ (पदार्थाला) हातानें किं० कोणत्याही प्रकारानें एकदम हसडा किं० हिसका देणें. २ कोणेकाकडून (पैसे, पदार्थ, इ०) जोर करून किं० कठोर उपायांनीं मिळविणें. ३ (कोणेकावर) शिव्यांचा मारा करणें किं० (त्याला) रागें भरणें.

हसडा, हंसडा [म० हसडणें, हंसडणें] पु० १ एकदम पुढें किं० मागें दिलेला हिसका (देणें). २ एकदम केलेली आणि जोराची ओढणें,लोटणें, ढकलणें, इ० क्रिया (देणें, मारणें). ३ मरणोन्मुख माणसाचा शेवटचा जोरानें सोडलेला श्वास (देणें). ४ कोणेकावर झाडलेला ताशेरा किं० त्याची काढलेली भोसडपट्टी (देणें).

हसणें [सं० हस्] अ० क्रि० १स्मित करणें. २ निंदिणें; दोष देणें; नांवें ठेवणें. ३ (करंज्या गुरवळ्या, इ० नीं) उलणें किं० फुगणें. ४(चुलीवर) ठेविलेल्या खापरानें (म्ह० वर जमलेल्या मशीनें)रेट घेणें.꣸**हसून गोड**(किं०**साजरें**)**करणें?** आपला कांहीं अपराध उघडकीस आला असतां नुसतें हसून त्याला थट्टेचें रूप देणें किं० त्याचें महत्त्व कमी करणें.

हसता [म० हसणें] वि० १ हसणारा. २ रंगेल; उल्हसित किं० आनंदी वृत्तीचा. ३ टवटवीत रूपाचा किं० चेहेऱ्याचा. ꣸ **हसत गौरी (-र), हसत पार्वती, हसत लक्ष्मी** स्त्री० सदा प्रसन्न मुद्रा धारण करणारी आणि सुस्वभावी स्त्री. **हसत चहाड** पु० शत्रुत्व प्रकट न होऊं देतां हसत हसत कोणेकाची निंदा करणारा किं० रहस्यें प्रकट करणारा.**हसतमुख,हस्तमुख** वि० १ रंगेल आणि प्रसन्न मुद्रेचा. २ ज्याच्या मुखावर सदा हास्य झळकत असतें किं० ज्याची मुद्रा सदा प्रसन्न असते असा. **हसतशिंदळ** स्त्री० गोड गोड बोलून कोणा स्त्रीला व्यभिचारकर्माकडे प्रवृत्त करणारी स्त्री.

हसंती, हंसंतिका, हसनिका [सं०] स्त्री० शेगडी; दुसरीकडे नेतां येण्याजोगी चूल.

हसबी [अ०] स्त्री० पडशीसारखी पण लहान पिशवी,-खुर्दा इ० भरून खांद्यावर किं० घोड्याच्या पाठीवर घालून परगांवास न्यावयाची.

हसरा [म० हसणें] वि० एकसारखा हसत सुटणारा किं० वारंवार हसणारा किं० यत्किंचित् कारण झालें असता हसणारा (मनुष्य).

हसळी, हंसळी[हिं०]स्त्री० मुलांच्या गळ्यांत घालावयाचें सोन्याचें किं० चांदीचें एक भूषण.

हसाबाजी [म० हसणें+फा० बाजी (खेळ)] स्त्री० १ हसणें, खिदळणें, इ० करमणुकीचा कांहीं प्रकार. २ कोणेकाची टवाळकी करणें किं० बोऱ्या उडविणें.

हंसी [सं०] स्त्री० हंस पक्ष्याची स्त्री.

हसूं, हंसूं, हसें, हंसें [म० हसणें] न० १ स्मित; हसण्याची क्रिया. २ उपहास; बोऱ्या; फजीती.

हंसोळी, हसोळी स्त्री० वर ‘ हसळी ’ [पहा.

हस्कार (-रा) मागें ‘ हसकार ’ पहा.

हस्त [**सं०**] **पु०** १ हात. २ चोवीस अंगुळें इतें लांबीचें प्रमाण;कोपरापासून मधल्या बोटाच्या टोकापर्यंत जी लांबी ती. ३ हत्तीची सोंड. ४ तेरावें नक्षत्र (लागणें,पडणें).ह्या अर्थी **अ० व०** प्रयोग होतो. ५ खांबाच्या माथ्यावर आणि तुळई, आढें, इ० च्या खालीं जो चपटा ठोकळा बसवितात तो. ६ ज्या मोहोऱ्याला बोट लाविलें तें हालवून दुसरीकडे ठेविलें पाहिजे अशा शर्तीवर खेळतात तो बुद्धिबळांचा डाव. ७ कोणेकाच्या अक्षराचें विशिष्ट वळण; उ० हा गोविंदरावांचा हस्त खास नव्हे. ८ (**संस्कृतांत**) किरण. ९ (**संस्कृतांत**) समुदाय; उ० केशहस्त. ॐहस्तें खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.**हस्तामलक न०** (**लाक्षणिक**) अनायासानें दिसणारा पदार्थ. **हस्तावाप पु०** १ अंगुलित्राण. २ हातकडी. ३ हातबेडी. **हस्तगत, हस्तगामी, हस्तवर्ती वि०** हातांत पडलेलें; ताब्यांत आलेलें; मिळविलेलें; जिंकून घेतलेलें. **हस्तकौशल, हस्तकौशल्य,हस्तलाघव न०** हाताची कारागिरी किं० हाताच्या सफाईनें कांहीं कारागिरीचा पदार्थ करण्याचें कौशल्य किं० खुबी. **हस्तोदक न०** १ हस्तनक्षत्रांत पडलेला पाऊस. २ भोजनादिप्रसंगीं संन्याशाच्या हातावर घालतात तें उदक. **हस्तक पु०**हात. **हस्तक, हस्तक्या पु०** १ कांहीं कामीं कोणेकाचा मदतनीस किं० जोडीदार. २ पूर्णपणें आपला आज्ञांकित मनुष्य.**हस्तगुण,हातगुण पु०** कोणेकानें करावयाला घेतलेलें जें कांहीं काम तें यशस्वी किं० अयशस्वी होणें ह्या बाबतींत जो त्याचा दैवयोग तो;कोणेकानें करावयाला घेतलेलें काम सफळ व्हावयाचेंच किं० निष्फळ व्हावयाचेंच असा जो त्याच्या कामासंबंधाचा पूर्वानुभवानें ठरून गेलेला सिद्धान्त तो;यश किं० अपयश येणें ह्या संबंधानें जें कोणेकाचें मानलें गेलेलें कर्तृत्व तें; उ०तुझ्या हातगुणानें हीं रोपडीं जगलीं; उ० तुमच्या हातगुणानें आमचा मुलगा परीक्षेंत उतरला. **हस्तदोष पु०** लिहिणाराची किं० लेखकाची चुकी. **हस्तपत्रक न०** सभा, मिरवणूक, नाटक, जलसा,इ० संबंधाची माहिती किं० कार्यक्रम ह्यांच्या ज्या कच्या तपशिलाच्या जाहिराती अगोदर लोकांत वाटतात त्या व्यक्तिशः. **हस्तपगदस्त (-स्ती)** [**म०** हस्त (हात)+पग (पटांतील चौक)+**फा०** दस्त (हात)] **वि०** बुद्धिबळाला स्पर्श केला असतां तेंच बुद्धिबळ खेळणाऱ्यानें खेळलें पाहिजे आणि जेथें तो तें एकदा ठेवील तेथून तें हालवितां कामा नये अशा शर्तीवर खेळावयाचा बुद्धिबळांचा (डाव). **हस्तपाव** [**सं०** हस्त (हात)+**म०** पाव (पाय)] **पु०** घर बांधतांना खांबाच्या तळाला आणि माथ्याला जे लाकडाचे ठोकळे बसवितात ते प्रत्येक. **हस्तसंकोच पु०**चिकूपणा; कंजूषपणा. **हस्तागौर (-री) स्त्री०** हस्तनक्षत्रीं सूर्य असतां हत्तीवर बसलेल्या गौरीचें केलेलें किं०काढलेलें चित्र किं० गौरीची आकृति किं० त्यांचें स्त्रिया करतात तें पूजन किं० ह्या पूजनाचें व्रत.

हस्ती [**सं०** हस्तिन्] **पु०** हत्ती हा चतुष्पाद प्राणी. ॐ **हस्तिस्नान न०** निरुपयोगी प्रयत्न, खटपट, किं० उद्योग. मागें ' गज ' मध्यें ' गजस्नान ' पहा. **हास्तिमद पु०** हत्तीच्या गंडस्थळांतून स्रवणारा चिकट आणि पातळ पदार्थ. **हास्तिदंत पु०** १ हत्तीचा दांत. २ हत्तीचें कोणतेंही हाड. **हास्तिनापुर न०** ' हस्ति ' नांवाच्या राजानें वसविलेलें नगर; कौरवांची राजधानी. हल्लीं हें नगर गंगेच्या प्रवाहानें वाहून गेलेलें आहे. **हस्तिनी स्त्री०** १ हत्तीजातीची स्त्री. २ स्त्रियांच्या ज्या चार जाति केल्या आहेत त्यांतील शेवटची. ह्या जातीची स्त्री ठेंगणी, लठ्ठ, कुरळ्या केशांची,काळसर वर्णाची, कोपिष्ट,आणि अतिकामी असते. ३ लठ्ठ आणि कामुक स्त्री.

हस्तें [**म०** ' हस्त ' च्या तृतीयेचें **ए० व०**] **श० यो० अ०** (देणें, घेणें, इ० व्यवहारांत) अमुक मनुष्याच्या हातानें किं० हातून किं० मार्फतीनें; प्रत्यक्ष. ॐ **हस्तेंपरहस्तें क्रि० वि०** आपण स्वतः किं० दुसऱ्याच्या हातून; स्वयंप्रेरणेनें आपण किं० दुसऱ्याला सांगून दुसऱ्याकडून; प्रत्यक्ष किं० अप्रत्यक्ष रीतीनें.

हस्तोदक न० मागें ' हस्त ' मध्यें पहा.

हस्त्य [**सं०**]**वि०** हातानें दिलेलें किं० केलेलें.

हहह न० हसणें किं० हसण्याचा आवाज (करणें).

हळ स्त्री० १ अग्नीचा किं० सूर्याचा ताप

किं० झळई. २ तापलेल्या पदार्थाची कांहीं अंतरावर लागते ती धग. ३ उष्ण वाऱ्याचा झोत.

हळ पु० लांबलचक आणि अरुंद चर. पुढें ' हाळ ' पहा.

हल [सं० हल्] पु० नांगर,–शेत नांगरण्याचें आउत. मागें ' हल ' पहा.

हळआयी, हळई स्त्री० लहान मुलाला पाळण्यांत निजवून झोके देतांना स्त्रिया म्हणतात तें गाणें.

हळकण अ०क्रि० (ओलें वस्त्र, ताजी तोडलेली झाडाची फांदी, इ०) वाळणें किं० शुष्क होणें.

हळकुंड, हळखुंड [म० हळद+खंड] न० हळदीच्या झाडाचें खोड. ❀ **अर्ध्या हळकुंडानें पिवळें होणें** थोड्याशा लाभानें अति आनंदित होणें किं० फुगून जाणें; थोडक्यानें संतुष्ट होणें; अल्पसंतोषी असणें. **टीप,**–ह्या वाक्प्रचाराचा स्तुतींत किं० निंदेंत प्रयोग केला जातो. **हळकुंडासाठीं लग्न मोडणें** क्षुल्लक कारणावरून मोठें कार्य बिघडविणें किं० बंद पाडणें.

हळद [सं० हरिद्रा] स्त्री० १ कचोऱ्याच्या झाडासारखें एक झाड. ह्या झाडाचा कंद किं० त्याच्या शाखा ह्यांचा रंग पिवळा असतो. २ ह्या झाडाच्या कंदाचें किं० शाखांचें चूर्ण. ❀ **पी हळद आणि हो गोरी** हळद प्याल्यानें मनुष्य गोरें होत नाहीं आणि होतें असें गृहीत धरलें तरी तावडतोब गोरें होणें शक्य नाहीं. जेव्हा कोणी मनुष्य कांहीं इच्छा मनांत धरून कांहीं मूर्खपणाचा उपाय करूं लागतो आणि इच्छा सफल व्हावी आणि पुन्हा तत्काळ सफल व्हावी अशी इच्छा करतो तेव्हां ह्या वाक्यानें त्याचा उपहास केला जातो. **कोणेकाला हळद लागणें** १त्याच्या लग्नाचा समारंभ सुरू झालेला असणें.२ तो उत्कर्ष पावूं लागणें; तो वैभवास चढूं लागणें. **तिला हळदीचा डाग लागला** किं० **तिला हळदीचा विटाळ झाला** लग्न झाल्याबरोबर तिचा पति मरण पावला(अनुकंपेचा उद्गार). **हळद कुंकूं** न० ए० व० चैत्र महिन्यांत किं० नवरात्रांत किं० अन्य प्रसंगीं सुवासिनी स्त्रिया एकमेकींना हळद आणि कुंकूं हीं सौभाग्यद्रव्यें देण्याचा समारंभ किं० विधि करतात तो. **हळदविडे** पु० अ० व० वर ' हळद कुंकूं ' पहा. **हळदिवा, हळदुवा** वि० हळदीच्या रंगाचा म्ह० पिवळा (कोणताही पदार्थ). **हळदीकुंकूं** न० ए० व०, **हळदीविडे** पु० अ० व० वर ' हळद कुंकू ' आणि ' हळदविडे ' पहा. **हळदीचा गाभा** पु० हळकुंडाच्या आंतील भागासारखा म्ह०पिवळसर, नाजूक, आणि चटकदार गोरेपणा. **हळदेमाळी** पु० हळद पिकविण्याचा धंदा करणारांची जात किं० त्या जातीचा इसम.

हळद्या पु० १ मनुष्यें, झाडें, कंद, इ० ना होतो तो एक रोग,–ज्यांत त्यांची त्वचा पिवळी होते. २ एक विष. ३ मधमाशांच्या पोळ्यांत हळदीसारखा पिवळा असा एक पदार्थ असतो तो.

हळबळा वि० मनमिळाऊ आणि सौम्य स्वभावाचा.

हळवट वि० १ लवकर पिकून तयार होणारें (भात, धान्यें, इ०). ह्याच्या उलट ' महान्. ' २ सौम्य स्वभावाचा (माणूस). ३ सौम्य (स्वभाव). ४ नाजूक, ढिसूळ (रचना, घटना). ५ निःसत्त्व (जमीन). ६ कमी, थोडी (बुद्धि). ७ ज्याला कोणी रागें भरलें किं० ज्याचा कोणी अपमान केला तर रडें येतें किं० भारी अस्वस्थता वाटते असा (माणूस) किं० असा (स्वभाव).

हळवा,हळा वि०१ लवकर पिकणारें(धान्य). २ जींत धान्यें लवकर पिकतात अशी (जमीन). लावल्यानंतर पिकावयाला उशीर लागतो असें जें भात इ० तें ' महान् भात.'

हळवार वि० मागें ' अरवार, ' आणि 'अरुवार ' पहा.

हळवें न० लवकर म्हणजे नागपंचमीच्या अगोदर पिकणारें भात,नाचणी,वरी,सावा, इ०.

हळस पु०, स्त्री० नांगराचा दांडा.

हळहळ, हळहाळ स्त्री० १ अस्वस्थपणा. २ कांहीं कर्तव्यांत चूक झाल्यानें वाटतें तें दुःख. ३ मनोरथाची सफलता बहुतेक झाल्यावर तो मनोरथ फिसकटल्यानें होतें तें दुःख. ❀ **हळहळ खळखळ** स्त्री० त्रास आणि चिंता; अस्वस्थपणा.

हळहळणें अ० क्रि० १ पश्चात्तापानें युक्त होणें; पश्चात्ताप पावणें. २ अगदीं थोडक्यानें मनोरथ फिसकटल्यामुळें दुःखित होणें. ३ प्रिय वस्तु, माणूस, इ० च्या हानीनें किं० मरणानें दुःखित होणें.

हळहळीत वि० अस्वस्थ; चिंताग्रस्त.

हळा वि० वर ' हळवा ' पहा.

हळाखळ स्त्री० मनःक्षोभ; अस्वस्थपणा. ꣸ **कोणेकाच्या हळाखळा डोकीवर येणें** त्याचें आपण नुकसान केल्यामुळें त्याच्या शिव्याशापांस आपण पात्र होणें. **हळाखळीचा माल पु०** जो प्रिय माल किं० पदार्थ मालकाला नाइलाजानें किं० अत्यन्त संकटामुळें विकावा लागत आहे असा माल किं० पदार्थ.

हळी, हाळ स्त्री० १ टोपली. २ बायकांचा डोकींत घालण्याचा एक दागिना.

हळीस पु०, न० नांगराचा दांडा.

हळुमळ, हळुमाळ वि० कोमल, नाजूक (मनुष्य, फूल, प्रकृति,पदार्थ).

हळुवट वि० १ सौम्य, नाजूक, कोमळ. २ क्षुद्र; हलकट; अधम.

हळू वि० १ जड नव्हे असा. २ कष्टकर नव्हे असा. ३ नाजूक. ४ क्षुल्लक कारणावरून अस्वस्थ होणारा (माणूस, स्वभाव).

हळूं क्रि० वि० १ सावकास. २ संथपणानें; घाई किंo जल्दी न करतां. ३ नाजूकपणानें; सौम्यपणानें; दांडगाई न करतां.४ हलक्या स्वरांत (बोलणें). वि० वेदनारहित; उ० कपाळाला सुंठ लाविली, कपाळ हळूं झालें. ꣸ **हळूंहळूं** क्रि० वि० क्रमाक्रमानें; दिवसगतीनें. **हळूंच** क्रि० वि० १ सौम्यपणें. २ मुकाट्यानें; आवाज न करतां. ३ कोणाच्या लक्ष्यांत न येईल अशा प्रकारें. [रचा तवा.

हळया पु० पोळ्या इ० भाजण्याचा एक प्रका-

हा [सं० इदम्] **सर्वनाम** १ जवळचा पदार्थ दाखविणारें हें सर्वनाम आहे. ' तो ' हें सर्वनाम दूरचा पदार्थ दाखवितें. हा घोडा, तो घोडा, इ०. हें दर्शक सर्वनाम विशेषणरूप असून तें लिंगवचनांप्रमाणें फिरतें. हा, ही, हें, हे, ह्या, हीं, इ०. २ विलंबाचा अभाव दाखविण्यासाठीं ' हा ' हें सर्वनाम कर्त्याच्या लिंगवचनांप्रमाणें बदलून योजतात; उ० तुम्ही पुढें व्हा, हा मी (हे आम्ही, ह्या आम्ही) तुमच्या पाठोपाठ येतोंच. [अरेरे !

हा [सं०] **उद्गारवाचक अ०** हाय हाय !

हां उद्गारवाचक अ०१ थांब, असें करूं नको ! सावकाश ! २ होय; समजलों; बरें. ३ ठीक; असेंच. ४ ओहो ! नामी गोष्ट. ५ अहो ! अरे ! ६ खबरदार !

हाक, हांक [हिं० हांक्] **स्त्री०** १ कोणेकाला केलेलें बोलावणें किं० ये असें म्हणणें (मारणें).२ आरडाओरडा. ३ बोभाटा;हाकाटी. ४ हाक मारली असतां जितक्या अंतरावर ती ऐकूं जाईल तितकें अंतर; उ० त्या वेळीं हाके हाकेवर रखवालदार उभे करण्यांत आले होते. ५ दुकानदार आपल्या मालाची ओरडून आणि स्तुति करून सांगतो ती किंमत; उ० बाजारांत जिन्नस पुष्कळ येतांच वाण्याची हाक बंद पडली; उ० बाजारांत तांदुळाची हाक चाळीस रुपये पल्ला अशी आहे. ꣸ **हाका मारीत बसणें** चरफडत किं० ओरडत वसणें; बोंबलत वसणें. **टीप**,— प्रयोग नेहेमीं **अ० व०. कोणेकाच्या नांवानें हाका मारीत बसणें** त्याणें माझें नुकसान केलें अशी विनाकारण ओरड करीत सुटणें; त्याच्यावर टपका ठेवणें.प्रयोग नेहेमीं **अ०व०.कोणेकाला हाक देणें** १ त्याला बोलावणें; आरोळी मारून त्याला जवळ येण्यास सांगणें.२त्याच्या हाकेला ' ओ ' म्हणणें. **हाक ना बोंब** १ ओरडण्याचा कांहीं उपयोग नाहीं ! कोणी तिकडे लक्ष्य देणार नाहीं ! २ ह्या गोष्टीचा बोभाटा होणार नाहीं; ही गोष्ट कोणाला कळणार नाहीं.

हाकणें, हांकणें [हिं० हांक्ना] **स० क्रि०** १ (पोरें, पक्षी, गुरें, माशा, इ० ना) ओरडण्यानें किं० हात हालवून दूर जावयास भाग पाडणें. २ (बैल, घोडा, इ० ना) इशारत करून चालावयास किं० जलद चालावयास लावणें. ३ (गाडी, संसार, संस्था, इ०) ठराविक सरणीनें चालविणें किं० चालू ठेवणें. ४ (एकादा सौदा, व्यवहार, काम, इ०) ठरविणें किं० नक्की करणें. ५ (बातमी) उठविणें. ६ (गप्पा) मारणें.

हाकबोंब, हाकबोंम [**म०** हाक+बाब] **स्त्री०** १ हाकाटी; आरडाओरडा. २ बोभाटा.

हाकम, हाकमाई, हाकमी पुढें ' हाकिम, ' ' हाकिमाई ' पहा.

हाकविणें वर ' हाकणें ' पहा.

हाकहूल [हिं०] **स्त्री०** १ आरडाओरडा; कलकलाट.२ एकाद्या गोष्टीचा बोभाटा.३ आवई; आफवा; बातमी.

हाकटणें [म० हाक] **स० क्रि०**१ (कोणेकाला) मोठ्यानें हाक मारणें किं० बोलावणें. २ (कांहीं बातमी इ०)जाहीर करणें,चारचौघांत प्रसृत करणें, किं० फैलावणें.

हाकाटा पु०, हाकाटी स्त्री० [म० हाक] १ मोठमोठ्यानें ओरडून कोणेकाला बोलावणें. २ बोभाटा. ३ कांहीं गोष्टीविरुद्ध तक्रार किं० आरडाओरडा. ४ गोंगाट; गलबला; कलकलाट. ❀ **हाकाट्याचा वि०** संपत्ति, विद्वत्ता, कांहीं गुण, इ० संबंधानें लोकांस ठाऊक असलेला (माणूस, पदार्थ, इ०).

हाकारणें स० क्रि० १ (गलबत इ०) चालविणें. २ (कोणेकाला) हाक मारणें. ३ (संसार इ०) चालू ठेवणें.

हाकारा [म० हाक] **पु०** १ अनेकवार ओरडून कोणेकाला केलेलें बोलावणें किं० मारलेली हाक. २ बोभाटा. ३ गलबला; गोंगाट.

हाकाल, हाकाळ [म० हा+काल (वेळ)] **क्रि० वि०** आतांपर्यंत; अझून; अद्यापपावेतों; ह्या वेळेपर्यंत.

हाकालणें वर ' हकालणें ' पहा.

हाकाहाक (–की) [म० हाक+हाक] **स्त्री०** १ खूप मोठी ओरड; आरडाओरडा. २ नापसंतीनें केलेला बोभाटा; असंतुष्टपणानें लोकांनीं किं० रयतेनें सरकारविरुद्ध दाखविलेला निषेध. ३ पाऊस, धान्यें, तेल, तूप, इ० कोणेक पदार्थाच्या उणीवीमुळें जी अडचण तिच्यामुळें उठलेले लोकांचे दुःखाचे उद्गार समुच्चयानें.४कोणेक अमलदाराच्या दुर्वर्तनामुळें त्याच्या संबंधानें नापसंतीचा झालेला बोभाटा. ५ बाजारांत धारणींत झालेला असह्य चढ.

हाकाळ मागें ' हाकाल ' पहा.

हाकिकत इ० मागें ' हकीकत ' इ० पहा.

हाकीम [अ० हाकिम] **पु०** गांव, प्रांत, परगणा, इ० वरचा अधिकारी किं० अमलदार.

हाकिमी, हाकेमाई [फा० हाकिमी, हाकीम] **पु०** गांव, परगणा, इ० वरच्या अधिकाऱ्याचा दर्जा किं० अमल.

हाग, हागणें,इ० मागें 'हग,''हगणें,'इ०पहा.

हाज स्त्री० पर्वताच्या कड्याखालचा प्रदेश किं० टापू.

हांजा पु० व्यापारी लोकांचा निकालांत न निघालेला व्यवहार किं०त्या व्यवहाराची अनिर्णीत स्थिति (तुटणें, राहणें, इ०).

हाजिबा इ० मागें ' हजिम्मा ' पहा.

हाजिराहाजरीं, हाजिराहाजिरीं [म०हाजीर+हाजीर] **क्रि० वि०** टपाल वाहणें, ओझें नेणें, इ०कामीं जागोंजाग माणसांचे टप्पे ठेवून.

हाजिरी [फा०] **स्त्री०**१कोणेक स्थळीं आणि कोणेक समयीं कोणेकाचें असणें; उपस्थित असणें; उपस्थिति; विद्यमानता. २ संस्था, वर्ग, इ० तील सभासद, मुलें, इ० चीं क्रमानें नांवें घेऊन कोण आले आहेत आणि कोण आले नाहींत ह्यांची नोंद करणें(घेणें). ❀ **कोणेकाची हाजिरी घेणें** त्याचा दोष त्याच्या पदरांत घालून त्याला रागें भरणें.

हांजी [हिं० हां+जी] **उद्गार वा०अ०** होय महाराज!जी सरकार. ❀ **कोणेकानें कोणेकाची हांजी हांजी करणें** स्वाभिमान बाजूस सारून त्याणें त्याची खुशामत करणें,त्याचे जोडे चाटणें, त्याची थुंकी पिणें, इ०.

हाजीर, हाजीरजबाब, इ० मागें ' हजर, ' ' हजरजबाब,' इ० पहा.

हाट [सं० हट्ट] **पु०** १ बाजार.२ जत्रा इ० प्रसंगींचा उपरी बाजार. ❀ **हाटबाजर पु० ए० व०** बाजार आणि बाजारांतील खरेदीविक्री इ०.

हाटक [सं०]**न०** सोनें हा धातु.

हाटणें मागें ' अहाटणें ' पहा.

हाड [सं० हड्डु] **न०** १ प्राण्याच्या शरीरांतील टणक भाग,–ज्याचे आश्रयानें मांस,स्नायु, इ० असतात. २ स्वभाव; उ० तो हाडाचा गरीब आहे. ३ शरीराची जन्मजात बळकटी किं०तालमीच्या कामांनीं प्राप्त झालेली बळकटी; उ०त्याचें हाड फार बळकट आहे. ४ मनुष्य, जनावर, इ० चें शरीर,–सामान्यतः. ५ मनुष्याचा स्वभाव किं०गुणधर्म इ०जे त्याच्या ठायीं असतात त्यांना कारणभूत जें कांहीं तत्त्व त्याच्या अंगीं असतें तें.

*हाडाचा क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) मूळचा; जातीनें; जन्मानें; उ०हा हाडाचा ब्राह्मण खरा पण त्याला विद्या नाहीं. **एका हाडाचा वि०** सारख्याच स्वभावाचा किं० गुणधर्मांचा (मनुष्य). **एका हाडामासाचे** त्याच आईबापांच्या पोटचे (दोन भाऊ); त्याच कुळांतील (भाऊबंद).**हाडाचा क्रि०वि०** शरीराच्या घटनेनें; जन्मतः; उ० हाडाचा खंबीर, बळकट, धीट, इ०. **कोणेकानें हाडांचीं काडें करणें** कांहीं कार्यार्थ त्याणे फार फार कष्ट करणें. हाडांचा चुना करणें,हाडांचा चुरा करणें, हाडांचें पाणी करणें, हाडांचे मणि करणें, हाडांच्या फुकण्या करणें, इ० सर्व वाक्प्रचारांचा अर्थ'कांहीं कामीं फार फार कष्ट करणें किंवा झीज सोसणें' असा होतो.**कोणेकाच्या हाडांचीं काडें होणें** (किं० **मणि, चुरा, चुना, पाणी,फुकण्या होणें**) आजार, चिंता, दारिद्र्य, कष्ट, इ० मुळें तो फार जीर्ण, जर्जर, किं० रोड होणें. **कांहीं रोग** किं० **स्वभाव** किं० **वर्तन कोणेकाचे हाडांला** (किं० **हाडीं**) **खिळलेलें असणें** तो रोग स्वभाव, इ० त्याच्या अंगीं पूर्णपणें किं० खोल भिनलेला असणें म्ह० तो नष्ट होण्याची मुळींच आशा राहिलेली नसणें.**कांहीं गोष्ट (रोग आजार, चिंता, जबाबदारी, अपमान,** इ०) **हाडाला लागलेला असणें** १ ती मर्माला झोंबणारी किं० झोंबलेली असणें. २ तिच्यामुळें मनाची स्वस्थता भंगलेली असणें. ३ ती मनांत सलत असणें. **हाडाला** (किं० **हाडीं**) **फासण्या घालणें** (किं० **मारणें**) मर्माला किं० मर्मस्थानीं वेधणें. **कोणेकाच्या हाडावर** (किं० **हाडीं**) **घाव घालणें** १ त्याला मर्मीं प्रहार करणें; त्याच्या मर्माला झोंबेल अशी कांहीं गोष्ट बोलणें किं० करणें. २ त्याला कठोरपणें वागविणें; त्याला अतोनात जाच करणें. **कोणा मुलीचें हाडांशीं लग्न लावणें** तिचें म्हाताऱ्या आणि अशक्त माणसाशीं लग्न लावून देणें. **हाडीं विसावलेला वि०** १ रोमरोमीं भिनलेला (द्वेष, वैर, शत्रुत्व, राग). **हाडीं शुद्ध वि०** अत्यन्त शुद्ध;मूळचा शुद्ध; निसर्गानेंच शुद्ध. **कोणेकाचीं हाडें उजाविणें**(किं० **भाजणें** किं०**शेकणें**)कसें-तरी किं० हरप्रयत्नांनीं त्याचें (किं० तिचें) लग्न करून टाकणें किं० लग्न पार पाडणें. **माझीं हाडें उजवलीं**(किं० **भाजलीं** किं० **शेकलीं**) माझें लग्न एकदाचें झालें.**कोणेकाचीं हाडें घुसळणें** (किं० **मोडणें** किं० **खिळखिळीं करणें**) त्याला छळणें, सतावणें, किं० गांजणें. **कोणेकाचीं हाडें निघणें** तो फार रोड होणें म्ह० वाळणें. **कोणेकाचीं हाडें पडणें** तो कामानें, कष्टानें, किं० आजारानें अगदीं हैराण, बेहोष, किं० जर्जर झालेला असणें. **कांहीं गोष्ट कोणेकाच्या हाडीं (किं० हाडींमासीं) खिळलेली असणें** ती त्याच्या नसानसांत भिनलेली असणें; उ० अनत्याचाराचें व्रत त्याच्या हाडींमासीं खिळलेलें निदर्शनास आलें; उ० खोटें बोलणें त्याच्या हाडींमासीं खिळलेलें आहे. **हाडकपाळ्या वि०**दुर्दैवी;कपाळकरंटा; हतभाग्य. **हाडकपाळी वि०**१दुर्दैवी;हतभाग्य.२हट्टी;हेकट; स्वच्छंदी.**हाडकी स्त्री०**पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **हाडकुरकुटी स्त्री०** शरीरांत खोल भिनलेला ताप. **हाडकें काडकें न० अ० व०** गुरेंढोरें, नांगर, इ०शेतकीचीं साधनें. **कोणेकाच्या शरीराचीं हाडकें काडकें होणें**(किं०**उरणें** किं०**राहणें**) तो आजार, दारिद्र्य, चिंता, इ० कारणांनीं अगदीं रोड झालेला असणें. **हाडखाऊ वि०** मृत पशु, पक्षी, इ० चें मांस खाणारा. **हाडगळ वि०** अत्यन्त रोड किं० किडकिडीत (माणूस, प्राणी). **हाडगात न०** कोणेकाच्या शरीराचा अस्थिरूप सांगाडा; उ० रामभाऊ हल्लीं वाळला आहे पण त्याचें हाडगात मोठें आहे. **हाडजर, हाडज्वर पु०** शरीरांत खोल भिनलेला ताप. **हाडपेर न० ए० व०** कोणेकाच्या शरीरांतील हाडांचा सांगाडा; उ० त्याचें हाडपेर अति भक्कम आहे. **हाडहाड, हाडोहाड,हाडींहाडीं क्रि०वि०**प्रत्येक हाडांत म्ह० फार खोल(द्वेष, वैर,रोग, विष, इ० भिनलेलें असणें). **हाडळ वि०** अत्यंत किडकिडीत किं० रोड (मनुष्य, प्राणी). **हाडांचा पंजर, हाडांचा पिंजरा, हाडांचा सांपळा पु०** १ कोणत्याही प्राण्याच्या हाडांची रचना किं० मांडणी. २ (**लाक्षणिक**) अत्यन्त किडकिडीत माणूस किं०प्राणी. **हाडीज्वर(–ताप) पु०** बारीक आणि अंगांत सतत असणारा ताप.

कोणेकाच्या शरीराचीं हाडेंकाडें होणें तो आजार, चिंता, दारिद्र्य, इ० मुळें फारच रोड झालेला असणें. **हाडोंहाड** क्रि० वि० शरीरांत पूर्णपणें (रोग, विष, वैर, इ० भिनणें). **हाड्या** वि० अत्यन्त रोड किं० किडकिडीत. **हाड्यावर्ण** पु० शरीराचीं हाडें कुजविणारें गळूं, कीड, जखम, इ०. **हाडवळा, हाडोळा** पुढें स्वतंत्र प्रतीकांत पहा. **हाडवैर** न० अत्यन्त तीव्र वैर,–जें मनुष्य मरेपर्यंत लोपणें किं०शमणें शक्य नाहीं. **हाडशिंगारी, हाडसांधण** [म० हाड+ सांधणें] स्त्री०एक वेली,–जिच्या पाल्याचा ठेचा तालिमबाज इ०लोक निखळलेल्या हाडास बांधतात.

हाडकी [म० हाड] स्त्री० १ लहान हाड. २ गांवांतील मेलेलीं गुरें वाहून नेऊन बाहेर टाकावयासाठीं महाराला फुकट किं० अल्प साऱ्यावर सरकारनें बक्षीस दिलेली जागा.

हाडवळा, हाडोळा [म० हाड] पु० महाराला बक्षीस दिलेली जमीन किं० अशा जमीनीवरचा सरकारसारा.

हाडसणें मागें ' हडसणें ' पहा.

हाडळ स्त्री० स्त्रीपिशाच.

हांडा [सं० हंड] पु० खूप मोठें तपेलें.

हांडा, हांडीवाग,इ० मागें ' हंडी' इ० पहा.

हाडूक [म० हाड] न० १ लहान हाड. २ हाड (तुच्छतेनें). ❀ **हाडूक गळ्याशीं** (किं० **दाराला**) **बांधणें** १ रांड किं० रखेली निर्लज्जपणें घरांत ठेवून घेणें. २ नसतें लचांड लावून घेणें. **कोणेकाच्या दाराला हाडूक बांधणें** त्याला जातींतून काढून टाकणें; त्याला बहिष्कृत करणें.

हांडूल, हाडोरें [म०हांडा] न० लहान हंडा.

हाण पुढें ' हानि ' पहा.

हाणणें [सं० हन्] स० क्रि० १ (काठी, चापटी, तरवार, इ०) कोणेक माणूस, पशु, पदार्थ,इ० वर मारणें. २ (कोणा माणूस, पशु, पदार्थ, इ० वर)काठीं इ०नीं प्रहार करणें.३(कांहीं काम इ०) रेटणें किं० पार पाडणें.४(जिलब्या, लाडू, इ०) खाणें किं० खाऊन टाकणें.अ० क्रि० रट्टा मारणें; प्रहार करणें.

हाणमार, हाणामार, हाणामारी [म० हाणणें+मारणें] स्त्री० दोन किं० अधिक माणसांनीं एकमेकास प्रहार करणें; मारामारी.

हाणी स्त्री० हानि, नुकसान (अशिक्षितांत रूढि).

हात [सं० हस्त] पु० १ मनगटाच्या पुढचा जो बाहूचा भाग तो. २ स्कंधबाहु म्ह० खांद्यापासून तों बोटाच्या टोकापर्यंतचा मानवी शरीराचा अवयव. ३ कोपरापासून तों मधल्या बोटाच्या टोकापर्यंत जो लांबी ती किं०जें लांबीचें माप तें; उ० ही काठी साडेपांच हात लांब आहे. ४ बाजू, तरफ; उ० आमचें घर मारुतीच्या देवळाच्या उजव्या हातास आहे. ५ अधिकाराचा किं० सामर्थ्याचा टप्पा किं० पोंच; उ० तुला बढती देणें माझ्या हातीं नाहीं. ६ स्वामित्व; कबजा; मालकी; उ०हल्लीं माझ्या हातांत मुळींच पैसा नसतो; उ० रामभाऊंचीं सर्व शेतें माझ्या हातांत आहेत. ७ डाव, खेळ; उ० मी तुझ्यावर पांच हात लाविले. ८ खेळण्याची पाळी; उ० आतां माझा हात आला आहे.९कोणतेंही हत्यार, शस्त्र, वाद्य, इ० वापरण्याच्या कामीं कोणेकाचें कौशल्य किं०सफाई;उ० पांडोबा सारंगीवाल्याचा हात चांगला आहे;उ०ह्या न्हाव्याचा हात हलका आहे. १० एका पक्षांतील खेळणारे जे गडी ते प्रत्येक; उ० अझून आमच्याकडचा एक हात खेळावयाचा आहे. ११ कुलपाचा हात म्ह० किल्ली (कर्णाटकांतील रूढि). १२ मदतनीस; साहाय्य करणारा; कामकरी. १३ तालमींत जोर काढतांना ज्या दोन ठोकळ्यांवर हात टेकतात ते प्रत्येक.ह्या अर्थी'हत्ता,"हत्ते'अशींहीं रूपें आहेत. १४हातानें केलेले थर किं० दिलेले लेप प्रत्येक; उ० ह्या भिंतीला चुन्याचा पहिला आडवा हात दिला आतां दुसरा उभा हात दिला म्हणजे चुना चांगला उठून दिसेल. १५ हातानें मारलेला तडाखा किं० रट्टा.१६तेलाच्या घाण्याचा एक बांकदार तुकडा,–जो कातरीला लाविलेला असतो. १७ हात टेकावयाचे किं० हातांत धरावयाचे जे कोणत्याही पदार्थाचे भाग किं० अवयव ते; उ० खुर्चीचे हात, रहाटाचे हात, इ०. ❀ **हाताखालचा** [म० हात + खालीं +चा (प्रत्यय)] वि० १ आपल्याहून खालच्या

दर्जाचा आणि आपणाला जबाबदार असा आपला (मदतनीस, कारकून, शिपायी, इ०). २ हाताच्या परिचयाचें किं० सहज करतां येईल असें (काम); सवईचें; नित्याच्या परिपाठांतलें. ३ पूर्णपणें आपल्या ताब्यांत असलेला किं० आपल्या स्वामित्वाचा (पदार्थ,–जो आपण हावा तेव्हां हावा त्याला देऊं शकूं). **हातानिराळा** [म० हात+निराळा] वि० १ पूर्णपणें करून टाकलेलें (काम,– ज्याला पुन्हा हात लावण्याचें कारण पडण्याचा संभव राहिलेला नाहीं). २ संसार, संस्था, इ० त सध्यां ज्यांची गरज नाहीं म्हणून जीं बाजूस काढून ठेविलेलीं असतात अशीं (भांडीं, चिरगुटें, इ० सामानसुमान). **हातावेगळा** [म० हात+वेगळा] वि०वर ' हातानिराळा ' पहा. **हातासरसा** [म० हात +सरसा] क्रि० वि० (लिंगवचनांप्रमाणें फिरणारें) हाताच्या त्याच प्रयत्नानें; त्याच कामाबरोबर; उ० तूं उष्टीं काढतोच आहेस, हातासरसें शेण लावून टाक (किं०भांडीं घासून टाक) आणि मग हात धू. **हात ओटोपणें** मारणें इ० हातानें करावयाची कोणतीही क्रिया बंद करणें. **हात ओवाळणें** तुच्छता दर्शविणें. **हात करणें** हातानें मारणें किं० त्रास देणें; उ० स्त्रीच्या अंगावर हात करणें बरोबर नाहीं. **हात घालणें** १ पथकरणें; करावयाला घेणें; उ० जें काम आपणाला होण्याजोगें नसेल त्याला कधीं हात घालूं नये. २ एकादी वस्तु घ्यावयासाठीं किं० धरावयासाठीं किं० ओढावयासाठीं हात पुढें करणें. ३ ढवळाढवळ करणें; दुसऱ्याच्या कामांत, व्यवस्थेंत, किं० कारभारांत लुडबुड करणें; उ० जित देशाच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालतो त्या राजाचें राज्य फार दिवस टिकत नाहीं. **हात चालणें** एकादी गोष्ट सफाईनें करतां येणें. **हात चेपणें** लाचाचे पैसे मुकाट्यानें एकाद्याला हातांत देणें. **हात जोडणें** १ नमस्कार करणें. २ प्रार्थना करणें; विनविणें; शरण जाणें किं० येणें. ३ नको असलेला पदार्थ हात जोडून आर्जवानें दूर सारणें किं० आव्हेरणें. **एकाद्या पुढें हात जोडून उभें असणें** (किं० राहणें) त्याची आज्ञा अमलांत आणावयास किं० त्याची सेवाचाकरी करावयास सिद्ध असणें; आमचा स्वीकार करा, आमचेकडून सेवा करून घ्या, अशी त्याची प्रार्थना करणें. **हात झाडणें** १ अगदीं नापसंत ठरविणें; झिडकारणें. २ निराशेनें सोडून देणें. **हात टाकणें** १ पोहोतांना पाण्यावर हात मारणें. २ प्रहार करणें; मारणें; उ० बायकोमाणसाच्या अंगावर हात टाकणें तुम्हांला शोभत नाहीं. **हात टेकणें** १ म्हातारपणानें अशक्त होणें किं० थकणें. २ एकादें काम आपणास करतां येत नाहीं असें म्हणणें किं० कबूल करणें. **आपला हात सोडून देणें, आपला हात कापून देणें, आपला हात गुंतवून घेणें** लेखानें आपणास बांधून घेणें. **हात दाखविणें** १ आपली शक्ति किं० सामर्थ्य दाखविणें. २ नाडीपरीक्षा करावयासाठीं वैद्यापुढें हात करणें. ३ तळहातावरच्या रेषा पाहून भविष्य करण्यासाठीं हुडुक्क जोशापुढें हात करणें. ४ हातानें एकाद्या पदार्थाचा निर्देश करणें. ५ अडवून काढणें, पारिपत्य करणें, सूड घेणें, उट्टें काढणें. ६ अहितकारक परिणाम करणें; उ० कालच्या कांद्याच्या भज्यांनीं मला चांगलाच हात दाखविला, आज मला चार रेच झाले. **हात देणें** मदत करणें; तारणें; उ० बाजी तया त्वरित धावुनि देइ हात ! जेव्हां पडे चतुरसालहि संकटांत ! **हातावर धरणें** (मुलासंबंधानें) एकसारखें रडत राहून आपणास घ्यावयास लावणें. **हात धुऊन एकाद्याच्या पाठीस लागणें** त्याचा पिच्छा पुरविणें; त्याला सतावून सोडणें. **हात धुणें** एकाद्या कामांतून आपलें अंग काढून घेणें. **हात नाचविणें** चेष्टा करण्याच्या उद्देशानें दुसऱ्याच्या तोंडापुढें हातवारे करणें. **कपाळावर हात मारणें** नशिबास दोष देणें. **ही म्हैस आतां हातावर आली** किं० **ही म्हैस आतां हातावर दूध देऊं लागली** ह्या म्हशीला पान्हा फुटण्यास रेडकाची जरूरी उरली नाहीं; तिच्या कासेला हात घातला म्हणजे ती दूध देऊं लागली आहे. **हातावर शीर घेऊन असणें** कोणतेंही धाडसाचें कृत्य करावयास पूर्णपणें सिद्ध असणें; उ० हातावर शीर घेऊन आम्हीं आपली नोकरी केली आहे. **हातावर पोट भरणें** किं० **हातावर संसार करणें** अंगमेहनतीनें पैसे मिळवून उपजीविका करणें.

कोणेकाच्या हातावर हात देऊन (किं० **हातावर हात मारून**) **पळून जाणें** त्याच्या डोळ्यादेखत र्‍नेसटून किं० पळून जाणें. **हाताला हात लावणें** १ पति कांहीं धर्मकृत्य करीत असतां त्या धर्मकृत्याची सांगता आणि सफलता होण्यासाठीं स्त्रीनें त्याच्या हाताला आपला हात लावणें. २ एकाद्या माणसाला खूष करण्यासाठीं त्याच्या मूर्ख विधानांना संमति दर्शविणें, त्याची री ओढणें, किं० त्याच्याबरोबर पापकर्म करावयाला सिद्ध होणें. **हातीं धरणें** १ आपल्या देखरेखीखालीं घेणें; उ० माझ्या मुलाला तुम्ही हातीं धरल्यास तो पास होईल. २ एकाद्या विषयाकडे वळणें (किं० तो पथकरणें किं० त्याचेकडे लक्ष्य देणें); उ० तो विषय सध्यांच आम्हांला हातीं धरतां येणार नाहीं. **हात गाहाण ठेवणें** उजवा हात देवाला वाहून त्याचा कोणत्याही कामीं उपयोग करावयाचा नाहीं असा नवस करणें. **हाताचा मळ** किं० **तळहाताचा मळ** पु० अल्प श्रमानें म्हणजे सहजासहजीं होणारें कांहीं काम. **हाताच्या धारणेनें घेणें** मारणें, बुकलणें. **हातावर घेणें** (किं० **आणणें**) तारण किं० गहाण न ठेवितां (पैसे) उसने घेणें, आणणें, किं० काढणें. **हातावर दिवस काढणें** (किं० **लोटणें**) मोठ्या कष्टानें किं० विवंचनेंत दिवस घालविणें. **हातावर मिळविणें** आज मिळवावें आणि आज खावें अशा स्थितींत असणें. **हातावर हात मारणें** (किं० **देणें**) एकादा सट्टा किं० विचार किं० कल्पना आपणास पटली किं० आवडली म्हणून दुसऱ्याच्या हातावर आपला हात मारणें (म्हणजे टाळी देणें.) **हातास चढणें** किं० **हातां चढणें** किं० **हातीं चढणें** प्राप्त होणें; उ० इ० स० १७३९ मध्यें कोरलईचा किल्ला बाजीरावाच्या हातास चढला; उ० अदत्तापासून पैसा हातीं चढत नाहीं. **जीभ** (किं० **तोंड**) **हातीं धरणें** मन मानेल तसें बोलणें किं० खाणें. **हातीं भोपळा घेणें** भिक्षा मागणें. **टीप**,—भोपळ्याच्या शकलांत भिक्षेकरी भिक्षा घेतात ह्यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला आहे. **आपला हात आणि जगन्नाथ** एकादी वस्तु आपल्या हातानें घ्यावयाची आपणास संधी मिळाली असतां ती हावी तितकी घेण्यास कोण कमी करणार ? हावी तितकें घेणारच. **कोणेकाचे दोन हाताचे चार हात करणें** त्याचें लग्न करणें किं० करून देणें. **कोणेकाचे दोन हाताचे चार हात होणें** त्याचें लग्न होणें. **टीप**,—एकाद्या पुरुषाचें लग्न झालें म्हणजे घरांतील कामें करावयाला पूर्वी जेथें दोन हात होते तेथें त्याच्या बायकोचे आणखी दोन हात काम करावयाला होतात. **एकाद्याचा हात धरणें** १ त्याला आडविणें; त्याला हरकत करणें. २ त्याच्याशीं स्पर्धा करणें; त्याची बरोबरी करणें; उ० चित्रकलेंत त्याचा हात धरणारा आज पुणें शहरांत कोणी नाहीं. ३ त्याला लाच देणें; उ० मी शिरस्तेदाराचा हात धरला तेव्हां त्याणें मला ही जागा देवविली. ४ त्याच्या आश्रयास जाणें; त्याच्यावर अवलंबून राहाणें; त्याच्यावर भिस्त ठेवणें. **ह्या हाताचें त्या हाताला कळूं न देणें** अत्यन्त गुप्तपणें कांहीं गोष्ट करणें; अगदीं जवळच्या नातलगांस सुद्धां ती कळूं न देणें. **ह्या हाताचें त्या हातावर** जेव्हांच्या तेव्हांच; तावडतोब; सबुरी न करतां. **एकाद्याला हातीं धरणें** त्याला मदत करावयाला तत्पर असणें. **एकाद्या पदार्थावर हात मारणें** १ तो बळकावणें. २ तो आधाशीपणानें खाणें किं० खात सुटणें किं० खाऊन टाकणें. **हात राखणें** कुचराई करणें; उ० असे हात राखून जेवूं नका. **हात लावणें** मदत करणें; उ० हें जातें भारी जड आहे, वहिनी मला जरा हात लाव. **हातबोट लावणें** किं० **हातभार लावणें** मदत करणें; उ० ह्या कार्याला सर्वांनी हातभार लावल्यास हें काम तडीस जाईल. **हात वळणें** सरावामुळें किं० परिपाठामुळें हाताला कांहीं कामीं सफाई प्राप्त होणें. **हाताचें पायावर लोटणें** आजची अडचण उद्यावर ढकलणें; हल्लींचें संकट लांबणीवर टाकणें. **हाततोंडास येणें** किं० **हातींतोंडीं येणें** उपयोगी पडण्याच्या स्थितीस येणें; लोकांना मदत करावयास लायक होणें; उपभोगण्यास लायक होणें. **हातावर असणें** पूर्णपणें साध्य असणें. **कोणेकाच्या हातावर तुरी देणें** किं० **कोणेकाच्या हातावर तुरी देऊन पळून जाणें** त्याला फसविणें किं० फसवून पळून जाणें. **हातावर येणें** किं० **हातांबोटांवर येणें**

एकादा विशिष्ट दिवस अगदीं जवळ येऊन ठेपणें किं० ठेपलेला असणें; उ० माझी परीक्षा आतां हातावर आली आहे. २ कांहीं गोष्ट हस्तगत होण्याच्या किं० कवज्यांत येण्याच्या किं० साध्य होण्याच्या अगदीं बेतांत असणें; उ० मुक्कामाचा गांव आतां अगदीं हातावर आला आहे. **एकाद्याचा हात मोडणें** तो अनाथ होणें (येथें ' मोडणें ' अ० क्रि०). **हात वाहाणें** १ प्रवृत्त होणें; उ० मुलांनीं कितीही दांडगाई केली तरी त्यांना मारावयाला माझा हात सहसा वाहात नाहीं. **कोणेकाचा हात सोडणें** १त्याची संगति सोडणें.२त्याच्यावर पूर्वीप्रमाणे कृपालोभ न करणें. **हाताखालीं घालणें** देखरेखीखालीं घेणें; कवज्यांत किं० ताब्यांत घेणें. **हाताचे लाडू होणें** फार काम केल्यामुळें किं० खरूज इ० कारणांमुळें हात साफ उघडतां न आल्याकारणानें ते मिटलेल्या स्थितींत राहाणें. **हातांत कंकण बांधणें** एकादें काम करण्याबद्दल प्रतिज्ञा करणें; एकादें काम पथकरणें किं० अंगावर घेणें; उ० त्या चोराला पकडण्याविषयीं कोतवालानें हातांत कंकण बांधलें आहे. **कोणेकाच्या हातांत हात घालणें** १ त्याला लाच देणें.२ त्याच्याशीं मैत्रीच्या भावानें वागणें; त्याच्यावर प्रेम करणें. **हातातोंडाशीं गांठ पडणें** १ बोंब मारणें. २ जेवतांना घास तोंडांत पडणें; खावयाला सुरवात होणें; उ० दोन दिवसांच्या उपासानंतर एकदाची माझ्या हातातोंडाशीं गांठ पडली. **हाताला येईल तें** जें कांहीं हाताला सापडेल तें; ज्याच्यावर हात पडेल तें; उ० घराला आग लागली तेंव्हा आम्हीं सारीं माणसें घरातले सारे पदार्थ बाहेर काढूं लागलों, ज्याच्या हाताला जें येईल तें तो उचलून अंगणांत आणून ठेवीत होता. **हाताला लागणें** १गमावलेल्या किं०फुकट गेलेल्या किं०नासलेल्या किं० टाकून द्यावयाच्या वस्तूंतून अल्प अंश मिळणें; उ० तुम्ही सोन्याच्या दागिन्यांत बेलाशक पैसा घाला,मोत्यांत किं० कापडांत घालूं नका, कारण शेवटीं मोत्यांतून किं० कापडांतून हाताला कांहीं सुद्धां लागत नाहीं.२ दुसऱ्याच्या पैशाची किं० सामानासुमानाची व्यवस्था करीत असतां आपल्या उपभोगाकडे त्याचा कांहीं अंश येणें. **हाताला एकाद्या वस्तूचा विटाळ** हाताला अपवित्र पदार्थाचा स्पर्श. **टीप**,–' हात ' ह्या शब्दाचे शेकडों वाक्प्रचार विस्तारभयास्तव येथें दिले नाहींत,तरी वर दिलेल्या वाक्प्रचारांच्या स्पष्टीकरणांच्या धोरणानें विद्यार्थ्यांना त्यांचा उलगडा करतां येण्याजोगा आहे. आतां ' हात ' शब्द पूर्वपदीं येऊन जे सामासिक शब्द होतात त्यांपैकीं कांहीं पुढें स्वतंत्र प्रतीकांत यथास्थानीं देतों.

हातउगावा[**म०**हात उगाविणें] **पु०**१कोणेक व्यवहारांतून किं० अडचणींतून किं० पेचांतून आपली सुटका.२सूड घेणें;वैर शमवून घेणें(करणें). ३ व्यापारांत घातलेलें भांडवल परत मिळविणें किं० वसूल करणें.

हातउचल [**म०** हात+उचलणें] **स्त्री०** सावकाराकडे आपण ठेव म्हणून ठेविलेल्या पैशांतून वेळोवेळीं आपण परत घेतलेल्या ज्या रकमा त्या प्रत्येक.

हातउचलला [**म०** हात+उचलणें] **वि०** १ आपखुषीनें दिलेला. २ स्वता करावयासाठीं पथकरलेलें (काम, व्यवहार, संसार, इ०).

हातउसना (–णा) [**म०** हात+उसना (–णा)] **वि०** थोडक्याच वेळापुरतें आणि पावती न देतां किं० कर्जरोखा न करतां काढलेलें (कर्ज).

हातकरीण [**म०** हात] **स्त्री०** आंबोण किं० वासरूं पुढें न ठेवतां जी दूध देते अशी गाय किं० म्हैस.ह्याच्या व्यावकर्तत्वें 'पान्हवणकरीण.'

हातखंड [**म०** हात+खंड (थांबणूक, विसावा)] **पु०** १ आपल्याला मदत करणारा; आपलें काम कांहीं वेळ करून तोंपर्यंत आपणाला विसावा देणारा कोणीही माणूस. २ आपणाला वेळीं उपयोगीं पडणारी विद्या किं० कला.

हातखंडा [**म०** हात+**हिं०** खडा (सिद्ध, तयार)] **वि०** आपल्या ऐन गरजेच्या किं० जरूरीच्या वेळीं उपयोगीं पडणारी विद्या, कला, कोटी, उत्तर, इ०. **टीप**,–लिंगवचनांप्रमाणें न फिरणारें हें विशेषण आहे. उ० झाशीकर राणीसारखी तरवारबहादुरींत हातखंडा असणारी

महापराक्रमी स्त्री पुनश्च होणें नाहीं (पारसनीस). पु० कांहीं कामीं कोणेकाचें अप्रतिम कौशल्य, चातुर्य, खुबी, किं० कर्तबगारी; उ० प्याद्याला चुना लावून त्या प्याद्यानें प्रतिपक्ष्यावर मात करण्यांत त्याचा हातखंडा आहे.

हातखुंटा, हातखुंट [म० हात+खुंटा, खुंट] पु० कोष्ट्याच्या मागांतील ताण्याचीं सुतें परदेशीपाशीं वळवून मागें ज्या मेढीशीं बांधलेलीं असतात ती मेढ.

हातखुरपा [म० हात+खुरपणें] वि० ज्या शाहाळ्यांतील कोंवळें खोबरें अंगठ्याच्या नखानें खरवडून काढतां येतें असें शाहाळें म्ह० कोंवळा नारळ. **हातखुरपें** न० वर सांगितलेल्या प्रकारचा कोंवळा नारळ किं० कोंवळें शाहाळें.

हातखेवणें न० लहान वर्‍हें.

हातखेवा, हातखेव्या पु० नाखव्याच्या हाताखालचा इसम.

हातखोरणें [म० हात+खोरणें] न० चुलींतील किं० शेगडींतील निखारे चाळविण्याचा लोखंडी दांडा. मागें ' खोरणें ' पहा. ❀ **पैसा, धान्य,** इ० **ला हातखोरणें लावणें** तो औदार्यानें खर्चणें (किं० संपादन करणें).

हातगुण [म० हात+गुण] पु० कोणेकानें करावयाला हातीं घेतलेल्या कामांत त्याला यश येणें किं० अपयश येणें ह्या संबंधानें जो त्याचा दैवयोग तो किं० ह्या संबंधानें लोक त्याचे ठायीं आरोपितात जो दैवयोग तो; उ० तुमच्या हातगुणानें माझा मुलगा परीक्षेंत उतरला. मागें ' पाय ' मध्यें ' पायगुण' आणि 'हातगुण' पहा.

हातघाई [म० हात+घाई] स्त्री० १ हातानें करावयाच्या कामांत कांहीं प्रसंगीं जी विशेष घाई किं० जलदी करतात ती. ❀ **हातघाईवर येणें** १ हातांनीं बुक्क्या, चापट्या, इ० मारण्यापर्यंत बेबनाव होणें. २ सामोपचारानें भांडण न मिटेसें होणें. ३ कांहीं काम आतांच्या आतांच झालें पाहिजे अशी बिकट परिस्थिति उत्पन्न होणें. ४ दोन्ही पक्ष आपला हेका सोडावयास तयार नाहींत अशा पल्ल्यास भांडण, वाद, इ० येणें किं० आलेलें असणें.

हातचलाखी (–की) [म० हात+चलाखी] स्त्री० १ हाताचा चपळपणा. २ हाताच्या सफाईदार चपळपणामुळें आपण कोणता पदार्थ कोठून घेतो किं० कोठें लपवितो इ० क्रिया लोकांना न कळूं देण्याचें गारोडी, जादुगार, लबाड दुकानदार, इ० चें जें कौशल्य तें.

हातचा [म० ' हात ' च्या षष्ठीचें एक रूप] वि० १ आटोक्यांतील; सुसाध्य; कोणेकाच्या कर्तृत्वानें होण्याजोगें किं० साध्य होण्याजोगें; उ० तुला नोकरी देणें हें माझ्या हातचें नाहीं; उ० रोग्याला औषध देणें वैद्याच्या हातचें आहे पण आयुष्य घालणें त्याच्या हातचें नाहीं. २ कोणेकानें आपल्या कर्तृत्वानें मिळविलेलें किं० संपादिलेलें किं० घडविलेलें किं० केलेलें; उ० माझ्या संसारांतील सारीं भांडींकुंडीं, सामानसुमान वगैरे सर्व कांहीं माझ्या हातचें आहे, यांत वडिलोपार्जित असें कांहीं नाहीं; उ० शेटजी, ही अत्तरदाणी तुमच्या हातची आहे म्हणून ती इतके दिवस पोचे न येतां टिकली. ३ आपल्या ताब्यांत असलेलें; आपल्याजवळ असलेलें; हवें तेव्हां पुढें ठेवतां येण्याजोगें; उ० हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागूं नये. ४ कोणेकानें दिलेलें, आणलेलें, किं० स्थापिलेलें; उ० महाराच्या हातचें पाणी तो पीत नाहीं. ५ (**गणित**) कांहीं गणितकृत्य करतांना संख्येंतील एका विशिष्ट स्थानचा आंकडा त्याच्या स्थानीं मांडून पुढच्या स्थानीं सामील करण्यासाठीं जो आंकडा वेगळा काढतात तो; उ० आकरा आणि तीन चवदा, चवदाचे चार, हातचा एक. ❀ **कोणेकाच्या हातचें पाडणें** त्याच्या जवळ किं० ताब्यांत जें कांहीं असेल तें त्याला सोडून किं० टाकून द्यावयास भाग पाडणें. **हातच्या कांकणाला आरसा कशाला ?** जें स्पष्ट किं० अनायासें दिसण्याजोगें आहे तें पहावयाला आरसा कशाला हावा? टीप,–आपलें कपाळ, नाक, डोळे, इ० आपणाला आरशावांचून दिसत नाहींत, पण आपलीं कांकणें आपणाला सहज दिसतात. **हातच्या हातीं** क्रिवि० तावडतोब; हां हां म्हणता; मोठ्या चपळाईनें; भारी शिताफीनें; लक्ष्यांत न येईल इतक्या त्वरेनें.

हातजतन [म० हात+जतन] स्त्री०

घोड्याला खरारा करणें, त्याला चोळणें, इ० रूप माणसानें त्याची केकेली जी चाकरी ती.

हातझालणा [म० हात+झालणा] पु० मासे धरावयाचें हातानें पाण्यांत फेकावयाचें जाळें. मागें ' झालणा ' पहा.

हातझोंबी [म० हात+झोंबणें] स्त्री० एकमेकांचे हात धरून जी मारामारी ती (करणें). ⚘**हातझोंबीवर येणें** आपल्या हातांनीं दुसऱ्याचे हात धरून मारामारी करावयास सिद्ध होणें.

हातणी, हातनी [म० हात] स्त्री० १ घोड्याचें अंग चोळण्यासाठीं हातांत काथ्या, गवत, इ० ची जी पिशवी घालतात ती. २ विहिरीवरील पायराहाटाच्या कणेकडाचें टोक टेकण्यासाठीं जी दगडविटांची रचना केलेली असते ती. ३ झाडाच्या फांद्यांचे शेंडे तोडून ते एकत्र बांधून जी तात्पुरती केरसुणी केलेली असते ती. ४ कातडें कमावतांना चांभार, ढोर, इ० लोक योजतात तें आउत.

हातधरणी [म०हात धरणें] स्त्री०धान्य मोजतांना मापाच्या कांठास डावा हात लावून केलेली धान्याची मोजणी. अशा रीतीनें गिऱ्हाइकाला धान्याचें थोडेंसें अधिक परिमाण मिळतें. मागें ' वोटधरणी ' पहा. मागें ' रास्त ' मध्यें 'रास्ती माप ' पहा.

हातपडत[म० हात+पडणें] वि० हावा तेव्हां मिळण्याजोगा किं०हातीं येण्याजोगा असा (कांहीं पदार्थ); अडचणींत किं० दुसऱ्याच्या ताब्यांत नसलेला.

हातपा [म० हात] पु० अंगरखा, बंडी, चोळी, इ० चा हात झाकणारा भाग; बाही.

हातपाटिलकी [म० हात+पाटिलकी] स्त्री० १ हातानें किं० स्वता कांहीं काम करणें. ' तोंडपाटिलकी ' च्या व्यावर्तकत्वें. २ दुसऱ्याची वस्तु हळूंच चोरून नेणें. **तोंडपाटिलकी** स्त्री० आपण स्वता कांहीं काम न करतां दुसऱ्याला हुकूम सोडणें किं०दुसऱ्यानें केलेल्या कामांत दोष काढणें; उ० तोंडपाटिलकी सगळ्यांस येते पण हातपाटिलकी कठिण.

हातपाणी [म० हात+पाणी] पु० लग्नामध्यें रासन्हाणीचे दिवशीं नवऱ्यामुलीच्या हातावर सासू पाणी घालते तो विधि किं० अशा प्रकारें घातलेलें पाणी.

हातपात पु० वर ' हातपडत ' पहा.

हातपान न० केळीचा कोंका बाहेर पडावयाच्या अगोदर जें केळीचें पान येतें तें.

हातपान्हा[म०हात+पान्हा]पु०वासरूं जवळ नसतां किं०आंचोण पुढें नसतां कासेस हात घालतांच गाय,म्हैस,इ० नीं सोडलेला पान्हा.'हातपान्ह्याची गाय,म्हैस,'किं०'गाय,म्हैस,इ०नीं हातपान्ह्यास येणें,किं०आलेलें असणें'असे प्रयोग होतात.

हातपाय [म० हात+पाय] पु० अ० व० हात आणि पाय. ⚘ **कोणेकाचे हातपाय गळणें** १ तो खचून जाणें; तो नाउमेद होणें; त्याचा धीर सुटणें. २ आजार, चिंता, उपवास, इ० मुळें तो अशक्त होणें. **एकाद्यावर हातपाय चोळणें** त्याच्यावर रागानें चरफडणें किं० तणतणणें. **कोणेकानें कांहीं कामांत हातपाय पसरणें** १ त्या कामीं त्यानें आळस किं० टंगळमंगळ करणें.२ तें काम आपल्या हातून होत नाहीं असें म्हणणें; सबबी सांगणें. **कांहीं कामानें हातपाय पसरणें** तें मर्यादेच्या किं०अटकळीच्यापेक्षां पुष्कळ वाढणें; तें विस्तार पावणें. **कोणेकानें हातपाय पसरणें** त्याणें मरणाच्या वेळीं हातपाय ताणणें. **हातपाय पांघरून** (किं० **पोटाळून**) **बसणें** आळशासारखें बसणें; जुडी करून बसणें. **हातींपायीं अन्न येणें** खाल्लेलें अन्न जडसें वाटणें; उ० आजचें जिलबीचें जेवण माझ्या हातींपायीं आलें आहे. **हातपाय फुटणें** थंडीमुळें हातापायांना चिरा किं० भेगा पडणें. **कोणेकाला हातपाय फुटणें** तो लबाड्यांत आणि लुच्चेगिऱ्यांत तरबेज होणें. **पैशाला हातपाय फुटणें** तो खर्चला जाणें; त्याची उधळपट्टी होणें किं० केली जाणें. **हातपाय मोकळे करणें** (किं० **होणें**) चालून किं० फेरफटका करून हातपाय सैल किं० हलके करणें (किं० होणें). **कोणेकाचे हातपाय मोडणें** १ त्याला बलहीन किं० सामर्थ्यहीन करून टाकणें; त्याला निःसत्त्व करणें; त्याला हरकत करणें; त्याला खचविणें. **टीप,**—येथें ' मोडणें ' **स० क्रि०.** २ त्याच्या अंगांत ताप यावयाच्या अगोदरचा अशक्तपणा

किं० निरंगळी येणें. टीप,–येथें ' मोडणें ' अ० क्रि०. याच अर्थी ' हातपाय मोडून येणें ' किं० ' अंग मोडून येणें ' याचा उपयोग होतो. कोणेकानें हातपाय सोडणें मरणकालच्या यातनांमुळें त्याणें हातपाय ताणणें किं० ताठ करणें. कोणेकानें हातपाय गाळणें १ त्यानें निराश किं० नाउमेद होणें. २ त्यानें अशक्त आणि रोड होणें. कोणेकानें हातपाय गुंडाळणें अंतकाळच्या वेदनांमुळें त्याणें हातपाय आखडणें. हातपाय गार पडणें मरणकाळ जवळ आल्यामुळें हातापायांची उष्णता कमी होणें किं० अजीबात नाहींशी होणें. कोणेकाचे हातपाय गुंडाळणें त्याला हरकत करणें; त्याला अडथळा करणें. कोणेकानें हातपाय चोळणें त्याणें कोणेकावर सूड घेण्याची प्रतिज्ञा करणें. हातपाय झाडणें १ अंतकाळच्या वेदनांमुळें पाय इतस्तत: हासडणें. २ बचावासाठीं किं० सुटकेसाठीं त्याणें हातापायांचा उपयोग करणें किं० मेहनत करणें. हातपाय ताणणें आरामानें, सुखानें, किं० कांहीं काळजी नसल्यामुळें हातपाय पसरून पडणें. हातपाय आखडणें अंतकाळच्या वेदनांमुळें किं० संतापानें हातपाय इकडे तिकडे हासडणें. हातपाय हालविणें उद्योग, परिश्रम, मेहेनत, किं० खटपट करणें; उ० तूं स्वतः कांहीं तरी हातपाय हालविलेस तर तुला नोकरी मिळेल. कोणेकाच्या हातांपायांचा चौरंग होणें पेटके इ० च्या योगानें त्याचे हातपाय आखडणें. कोणेकाच्या हातांपायांच्या फुंकण्या होणें आजार इ० मुळें तो अत्यन्त रोड होणें. कोणेकाच्या हातांपायां पडणें (किं० हातींपायीं पडणें) त्याची नम्रपणें प्रार्थना करणें; त्याला विनविणें; त्याला शरण जाणें; त्याची दया भाकणें. हातीं पायीं उतरणें (किं० सुटणें किं० मोकळी होणें) प्रसूतीच्या धोक्यांतून निभावणें; त्रास न होतां प्रसूत होणें. टीप,– घोडी, गाय, म्हैस, इ० [illegible]हीं हा वाक्प्रचार योजला जातो.

हातपावा [म० हात+[illegible]ावणें] वि० १ हातानें (म्ह० दोरीशिवाय) जिचें पाणी भांड्यानें भरून घेतां येईल अशी (विहीर, टांकें). २ ज्याचीं पानें, फुलें, फळें, हीं काठी, इ० चा उपयोग न करतां तोडून घेतां येतील असें (झाड).

हातबिडी, हातबेडी [म० हात+बिडी, बेडी] स्त्री० कैद्याचे हात एकाशीं एक जोडण्याची लोखंडाची कडी किं० सांखळी.

हातभार [म० हात+भार] पु० १ हातानें केलेली मदत. २ पैसा, देहकष्ट, इ० रूप कांहीं कार्याला कोणेकानें केलेली मदत (लावणें).

हांतर, हांथर, हांतरणें, हांथरणें, हांत(–थ–)रीय मागें ' आंथर, ' ' आंथरणें, ' ' आंथरीय ' पहा.

हातरगाडा पु० हातानें चालवावयाचा उसाचा रस काढण्याचा चरक; बैलांनीं ओढल्याशिवाय चालवितां येण्याजोगा लहान चरक.

हातलाग [म० हात+लागणें] पु० १ हाताचा पल्ला, टप्पा, किं० आटोका. २ सहजासहजीं करून टाकतां येण्याइतकें कांहीं कामाचें परिमाण किं० महत्त्व. ॐ हातलागास येणें, हातलागीं येणें (किं० असणें) कांहीं काम आपल्या आटोक्यांत येणें किं० असणें.

हातलावणी [म० हात+लावणें] स्त्री० १ वेश्येचा धंदा करूं इच्छिणाऱ्या पोरीचा कोणेकानें पहिला संभोग घेण्याचा समारंभ. ह्या समारंभास ' चिरा उतरणें ' असाही शब्द आहे. २ कोणेकानें हातानें झाड लावणें, जमीनींत बीजें पेरणें, इ०.

हातलावा [म० हात+लावणें] वि० दुसऱ्याचे पदार्थ हळूंच चोरण्याकडे ज्याचा कल आहे असा (माणूस); चोरटा; हाताळ.

हातवटी, हातोटी [म० हात] स्त्री० भाषण, लेखन, मातीचीं चित्रें करणें, इ० क्रिया किं० कामें करण्याची कोणेकाची जी सरणी, तऱ्हा, ढब, किं० चाल ती.

हातवडा, हातोडा [म० हात] पु० पदार्थावर रट्टे मारण्याची मुद्गर; घण.

हातवळा [म० हात+वळणें] पु० लिहिणें, चित्रें काढणें, इ० मध्यें कोणेकाची तऱ्हा किं० सफाई; उ० गातां गळा, शिंपतां मळा, आणि लिहितां हातवळा.

हातवा [म० हात] पु० १ हळद, कुंकू,

केशर, इ० रंगाचीं द्रव्यें पाण्यांत कालवून त्यांत हात बुचकळून भिंतीवर वठविलेली हाताच्या पंज्याची आकृति. २ कणकेची पणती करून तींत तेलवात घालून ती वात लावून ती पणती तव- कांत घालून वराला वधूच्या घरीं लग्नासाठीं आणावयाला जाणाऱ्या किं० आणणाऱ्या मिरव- णूकीबरोबर घेतात ती पणती. ३ घोड्याचें अंग चोळण्यासाठीं काथ्या, गवत, इ० चीं पिशवी घेतात ती.

हातवारे [**म०** हात+वारणें] **पु० अ० व०** बोलतांना भाषणाला जोर येण्यासाठीं किं० भाषण स्पष्ट करण्यासाठीं हाताचें करतात तें चलनवलन किं० हावभाव.

हातविंड न० वांबूच्या टोकाला लाविलेलें मासे पकडावयाचें जाळें. मागें 'हातझाळणा' पहा.

हातविरजा, हातविरंगुळा [**म०** हात+ विरजणें, विरंगुळा] **वि०** अडचणीच्या प्रसंगीं आपल्या कामाची जबावदारी वाहाणारा(आपला मुलगा, पुतण्या, सून, इ०).

हातशेकणें [**म०** हात+शेकणें] **न०** उसाचा रस कढवितांना चूलजाळ्याला म्ह० चुल्यांत सर्पण घालणाऱ्या मनुष्याला गूळ, काकवी, इ० रूपाचें जें वेतन देतात तें.

हातसर [**म०** हात+सर] **पु०** स्त्रियांचें एक हस्तभूषण.

हातसुख [**म०** हात+सुख] **न०** शत्रूला किं० कोणा अपराध्याला हातानें बुक्क्या, चापट्या, इ० मारण्याचें मारणाऱ्याला होतें तें सुख (घेणें).

हातसुटका [**म०** हात+सुटका] **स्त्री०** १ कांहीं काम कांहीं वेळ बंद पडल्यामुळें किं० थांब- विल्यामुळें जो विसावा मिळतो तो. २ आपल्या कामाचा भार किं० जबावदारी कांहीं काळ वाहून आपणाला कांहीं काळ विसावा देणारा; मदतनीस. ३ हाताचा सढळपणा; खर्चिकपणा; औदार्य.

हातसुतकी [**म०** हात+सुतकी] **स्त्री०** पाथरवटाचा लहान आकाराचा हातोडा.

हातसोडवण स्त्री० वर ' हातसुटका ' अर्थ १ पहा.

हातळ, हाताळ, हाताळू [**म०** हत] **वि०** दुसऱ्याची वस्तु चोरण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; चोरटा.

हातळणें, हाताळणें [**म०**हात] **स० क्रि०** १ वारंवार हातांत घेऊन (फळ, वस्त्र, इ० पदार्थ) चोळवटणें किं० मळविणें. २ (दुसऱ्याची वस्तु) हातांत चोरून घेऊन पळवून नेणें; चोरणें.

हातळी [**म०** हात] **स्त्री०** घोड्याचें अंग चोळण्याची काथ्या इ० ची हातांत घालवयाची पिशवी.

हाता पु० १ केतकीचें कणीस. २ फळें, फुलें, इ० मोजतांना प्रत्येक खेपेस चार,पांच,सहा, इ० ची जी एक एक मूठ घेतात ती.

हाताफळी [**म०** हात+फळी (पक्ष,बाजू)] **स्त्री०** एकमेकांना चापट्या किं० बुक्क्या मारून केलेली मारामारी; एकमेकांना रट्टे मारून किं० गुध्धे लगावून केलेलें भांडण. **क्रि० वि०** बुक्क्या, चापट्या, किं० गुद्दे मारून. [पहा.

हाताळ, हाताळणें मागें 'हातळ,' 'हातळणें'

हाताळी स्त्री०, हाताळें न० [**म०** हात]१ घोड्याचें अंग चोळावयाची काथ्या, गवत, इ० ची हातांत घालवयाची पिशवी. २ हातानें चालवावयाच्या लोहार इ० च्या भात्याच्या तोंडाला हात आडकावावयाच्या ज्या वाद्या असतात त्या प्रत्येक. [पहा.

हाताळू [**म०** हात] **वि०** मागें ' हातळ '

हातेण न० घोडी, गाढवी, इ० ना होते ती संभोगेच्छा. ' घोडी इ० नीं हातेण करणें ' किं० ' हातेणास येणें ' असे प्रयोग होतात.

हातेर न० गांवचा पाटील, खोत, इ० सर- कारी अमलदारांचीं शेतें नांगरणें, लावणें, इ० कामें रयतेनें फुकट करून द्यावीं ही सरणी.

हातेर, हातेरबंद मागें ' हत्यार, ' ' हतेर, ' इ० पहा.

हातोटी [**म०** हात] **स्त्री०** कोणेकाची कांहीं काम करण्याची तऱ्हा किं० सरणी. मागें ' हातवटी ' पहा.

हातोडा [**म०** हात] **पु०** पदार्थ ऐरणीवर ठेवून त्यावर रट्टे मारावयाचें एक आउत. मागें 'हातवडा ' पहा. **हातोडी स्त्री०**लहान हातोडा.

हातोपा [**म०** हात]**पु०** अंगरखा, चोळी,

इ० चा हात झाकणारा भाग; बाही. मागें ' हातपा ' पहा.

हातोपात, हातोहात, हातोहातीं [म० हात+हात] क्रि० वि० १ कांहीं पदार्थ एकानें दुसऱ्याच्या हातीं देणें, दुसऱ्यानें तिसऱ्याच्या हातीं देणें, तिसऱ्यानें चवथ्याच्या हातीं देणें, अशा प्रकारें (तो पदार्थ एका स्थळापासून दुसऱ्या स्थळापर्यंत जलदीनें पोंचविणें किं० वाहून नेला जाणें). २ हांहां म्हणतां; जलदीनें.

हातोपात, हातोपातीं क्रि० वि० मागें ' हाताफळी ' मध्यें पहा.

हातोसा [म० हात] पु० कोणेकाला कांहीं काम करावयाला हात लावणें म्ह० मदत करणें (देणें).

हातोहात वर ' हातोपात ' पहा.

हातोळा वर ' हातवळा ' पहा.

हात्या वर ' हत्या ' पहा.

हात्याण न० घोडी, गाढवी, इ० ना झालेली कामेच्छा. ' हात्याणास येणें ' किं० ' हात्याण करणें ' असें प्रयोग होतात.

हात्यादांडी [म० हात्या+दांडी] स्त्री० कोष्टयाच्या मागांतील आडवे धागे ठासावयाची रचना. [इ० पहा.

हात्यार, हात्यारबंद, इ० मागें ' हत्यार '

हाथरणें इ० मागें ' आंथरणें ' इ० पहा.

हादगा मागें ' हदगा ' पहा.

हादरणें मागें ' हदरणें ' पहा.

हांदळणें खालीं ' हांदुळणें ' पहा.

हांदा पु० एका शेतकऱ्यानें दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतांत जातीनें खपणें किं० आपले बैल, नांगर, इ० दुसऱ्या शेतकऱ्याला गरजेच्या वेळीं देणें आणि आपल्या गरजेच्या वेळीं त्याची मदत घेणें ह्या रूपानें एकमेकांनीं एकमेकांच्या उपयोगीं पडणें ही सरणी. मागें ' इरजीक ' पहा. ॐ **हांदेकरी, हांदेलकरी** पु० वरील सरणीनें मदतीला दिलेला किं० घेतलेला गडी किं० बैल.

हादाल, हादालपार्वती मागें ' हदाल, ' ' हदालपार्वती ' पहा.

हांदुळणें, हांदळणें [सं० आंदोलन] अ० क्रि० १ कंपित होणें. २ झोके खाणें. स० क्रि० १ हालविणें. २ कंपित करणें. ३ ०ला झोके देणें. मागें ' आंदुळणें ' पहा.

हानि [सं०] स्त्री० १ तोटा; नुकसान. २ नाश; क्षय. ३ कमी करणें; कमी होणें. ॐ **हानिपंचक** न० फलज्योतिषांत जे पांच अशुभ मुहूर्त सांगितले आहेत त्यांपैकीं एक. मागें ' चौरपंचक ' पहा.

हापटणें मागें ' अपटणें, आपटणें ' पहा.

हांपा पु० धापा टाकणें; जोरा जोरानें श्वासोच्छ्वास करणें (भरणें, टाकणें, देणें, सोडणें).

हाबकणें स० क्रि० १ (कांहीं पदार्थ) कोणेकापासून जबरीनें किं० धाकदपटशानें मिळविणें. २ (पदार्थाला) हिसका देणें.

हाबका [म० हाबकणें] पु० पदार्थाला दिलेला हिसका किं० मारलेला रट्टा.

हांबरडा, हांबरणें मागें ' हंबरडा, ' ' हंबरणें ' पहा. [साण ' पहा.

हाबशी, हाबसाण मागें ' हबशी, ' ' हब-

हामी, हामीदार मागें ' हमी, ' ' हमीदार ' पहा. [मर्यादा.

हाय [अ० हय्] स्त्री० आयुष्य; आयुष्याची

हाय [सं०] **उद्गार वा० अ०** १ (दुःखोद्गार) अरेरे ! शिवशिव ! २ (सुखोद्गार) पंख्यानें वारा घेणें, शेगडीनें अंगांत उष्णता आणणें, इ० नीं उकडणें, थंडी, इ० चा प्रतिकार झाला असतां ' हाय ' हा सुखाचा उद्गार काढला जातो. **हाय** स्त्री० धास्ती किं० दहशत (घेणें); जिवाला लावून घेणें; हैबत घेणें किं० खाणें. वि० तिखट किं० कढत किं० तीक्ष्ण (मुलांचा शब्द); उ० ही चटणी हाय आहे; उ० हें दूध हाय आहे; उ० हा चाकू हाय आहे. ॐ **हाय पथकरणें, हाय मोकलणें** आपल्या हातून कांहीं भलतीच गोष्ट झाली म्हणून कबूल करणें. **हायसा** खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा. **हाय सोडणें** (किं० **देणें** किं० **घालणें**) मोठ्यानें किं० जोरानें उसासा देणें. **हायास येणें** अगदीं दमून जाणें; मट्टयास येणें. **हायास आणणें** दमविणें; जर्जर करणें. **हायहाय** उ०

चा० अ० अरेरे ! शिवशिव ! **हायहूय स्त्री०** दुःखानें किं० वेदनेनें मारलेली किंचाळी; ओरडा.

हायत, हायात [अ० हयात] **स्त्री०** आयुष्य; आयुष्याची मर्यादा. मागें ' हयात ' पहा.

हायदोस [**फा०** या दोस्त=अरे मित्रा] **पु०** १ मोहरमांतील दंगल. २ धांगडधिंगा; धुडगूस (माजणें, घालणें, इ०). **टीप,**–'हायेदोस्त दूल्हा' ह्याचा अर्थ ' हाय हाय ! मित्रा नवरदेवा ! ' असा आहे. ' हाये दोस्त दूल्हा ' चा मराठींत अपभ्रंश ' हायदोस ' असा झाला आहे. इमाम हसन आणि इमाम हुसेन ह्यांचीं लग्नें झालेलीं होतीं आणि त्यांना लवकरच करबलाच्या लढाईत मरण आलें. त्यांच्या संबंधाचा हा दुःखोद्गार असून डोले हे त्यांच्या कबरा होत. हा उद्गार काढतांना मुसलमान लोक ताबुतांच्या पुढें नाचून धिंगामस्ती करीत असतात. ह्यावरून ' हायदोस घालणें' ह्याचा धिंगामस्ती करणें असा अर्थ मराठींत रूढ झाला.

हायसा [**म०**हाय+असा] **वि०**दुःख, संकट, अडचण, प्रतिबंध, इ० तून मोकळा होऊन आराम पावलेला. ꕥ**कोणेकाला हायसें वाटणें** अडचण, दुःख, पेच, नियंत्रणा, इ० तून मोकळें होऊन त्याला आराम किं० स्वस्थता वाटणें.

हार [**सं०**] **पु०** १ मोत्यांची माळ. २ माळ (सामान्यतः). ३ (**गणित**) भाजक; अपूर्णांकाचा छेद. ४ ओळ; पंक्ति; रांग.

हार [**सं०**] **स्त्री०** १ नुकसान; तोटा; हानि. २ पराभव, पिछेहाटी, कचर (खाणें, येणें, बसणें). ꕥ **मी चित्रकलेंत कोणाला हार जाणार नाहीं** मी कोणापेक्षांही कमी दर्जाचा किं० योग्यतेचा आहें असें म्हणणार नाहीं किं० कबूल करणार नाहीं; मी कमी ठरणार नाहीं. **हार खाणें** आपण कमी दर्जाचें आहों असें कबूल करणें; आपला पक्ष कमी जोराचा आहे असें कबूल करणें; चीत होणें; पराभव पावणें; खचून जाणें. **कोणेकाला हार जाणें** त्याच्याकडून पराभव पावणें; त्याच्याहून आपण कमी दर्जाचे आहों असें म्हणावयास लोकांना संधी देणें. **आजपर्यंत तो कोणालाही हारी गेला नव्हता** तो कोणाकडूनही पराभूत झाला नव्हता; कोणाच्याही पेक्षा तो कमी योग्यतेचा ठरला नव्हता. **हार मानली कीं झगडा तुटला** आपण कमी आहों असें किं० आपला पराभव झाला असें आपण कबूल केलें म्हणजे तंट्याचें कारणच राहिलें नाहीं, तंटा मिटलाच. **हार मानली पण झगडा तुटो** आम्ही चुकलों असें आम्ही कबूल करतों, कोणीकडून तरी तंटा मिटो म्हणजे झालें. **हारजित स्त्री० ए० व०** जय किं० अपजय; उ० हारजित कोणाच्या स्वाधीन नाहीं.

हारक[**सं०**]**वि०**हरण करणारा, नष्ट करणारा; (समासान्तीं); उ० चिंताहारक, पित्तहारक, इ०. **पु०** १ चोर. २ (**गणित**) भाजक.

हारणें [**सं०** हृ; **म०** हरणें] **स० क्रि०** १ जिंकणें, जिंकून घेणें; उ० मी त्याला शंभर रुपयांस हारलें; उ० मी त्याचें शंभर रुपये हारलें. २ मागें 'हरणें ' सर्व अर्थी पहा.

हारपणें, हारविणें मागें ' हरपणें, 'हरविणें' [पहा.

हारसडणें स० क्रि०कांहीं अफाट किं० गुंतागुंतीच्या कामाची एक एक बाबत निकालांत काढून ती हातानिराळी करून क्रमाक्रमानें सर्व बाबतींचा निकाल करीत जाऊन हळू हळू तें (सर्व काम) आटोक्यांत आणणें; मोठेपणामुळें भिवविणाऱ्या सर्व कामाला एकदम हात न घालतां एक एक भाग वेगळा वेगळा हातांत घेऊन तें (सर्व काम) सोयीनें आणि व्यवस्थितपणें करून टाकणें. कामावर कर्मत्व येतें; उ०काम हारसडणें. काम ' हारसडीं आणणें ' असाही प्रयोग होतो. ' हारसड ' हें **स्त्री०** नाम भाषेंतून गळालें आहे पण त्याचीं रूपें अप्रथमांत राहिलीं आहेत.

हारसरणें [**म०** हार+सरणें] **अ० क्रि०** हार खाणें, आपला पराभव कबूल करणें, किं० शरण जाणें.

हारा, हरा पु०बांबूच्या पातींची मोठी पाटी.

हाराश, हाराष, हारास [**सं०** ऱ्हास] **पु०** व्यापारादिकांत नाश; हानि; नुकसान; ठोकर (बसणें, येणें, होणें).

हारि [**सं०**] **स्त्री०**१ प्रवाशाचा तांडा. २रांग; ओळ; पंक्ति.

हारिद्र [**सं०**] **वि०**हळदीच्या संबंधाचें किं० हळदीच्या रंगाचें.

हारिद्र [**सं०** हार्द] **वि०** मनांतील; हृदयस्थित. **न०** १ स्नेह; प्रेम. २ दया; अनुकंपा. ३ **(मराठींत)** कोणेकाच्या मनांतील गुप्त गोष्ट किं० अभिप्राय किं० हृद्गत; उ०तो भारी मख्ख आहे, त्याचें हारिद्र समजणें कठिण आहे.

हारीं [**म०** हार=ओळ] **श० यो० अ०** १ ०कडे; ०च्या दिसेस; उ० तो शेताहारीं गेला;उ० त्याहारीं माझे दहा रुपये आहेत. २ संन्निधीस; शेजारीं; जवळ; उ० डोंगराहारीं. **टीप**,–'हारीं' हा शब्द अशिक्षितांतच रूढ आहे.

हारी [**सं०** हारिन्] **वि०** १ (उपपद तत्पुरुष समासांतीं) चोरणारा; उ० द्रव्यहारी; वीर्यहारी. २ चित्ताकर्षक; रंजविणारें.

हारेमोहरे, हारेमोहरेस, हारेम्होरे, हारेम्होरेस, हाऱ्यामोहऱ्यास, हाऱ्यामोऱ्याला [**म०** हारीं, हारीं+मोहरें, म्होरें (पुढें)] **क्रि० वि०** पुढें, समोर, शेजारीं; उ० त्याला कांहीं काम सांगेन म्हटलें तर तो माझ्या हाऱ्यामोहऱ्यास उभा रहात नाहीं;उ० तो व्यसनी आहे, त्याच्या हारेमोहरे तूं जाऊं नको. **टीप**,–ह्या शब्दांचा निषेधींच प्रयोग होतो.

हारोहार [**म०** हार+हार] **क्रि० वि०** लागोपाठ; मध्यें खंड न पडतां एकामागून एक अशा क्रमानें; क्रमांत खंड न पडतां; अखंडित क्रमानें; उ० त्याच्या बायकोला हारोहार आठ खेपा मुली झाल्या, मुलगा मुलींच झाला नाहीं.

हार्द [**सं०**] **वि०** १ मनांतील; हृदयास्थित. २ गुप्त. **न०** १ स्नेह; २ अभिप्राय; मनांतील गुप्त गोष्ट. ३ भाषणांतील मख्खी किं० कटाक्ष किं० मुद्दा. ह्या सर्व अर्थी मराठींतील अपभ्रंश 'हार्द,' 'हारिद्र,' 'हरिद्र.'

हाल [**अ०**] **पु० अ० व०** १ दुःखमय अवस्था; कष्टमय स्थिति; आजार, चिंता, दारिद्र्य, इ० मुळें झालेली जी कोणेकाची स्थिति ती; आवश्यक वस्तु न मिळाल्यामुळें झालेली अडचण (काढणें, भोगणें, इ०); उ० त्याला अर्धांगवायु झाला आहे, शुश्रूषेला बायको नाहीं, त्याचे फार हाल होत आहेत; उ० त्या प्रवासांत आमचे फार हाल झाले. २ माणूस, पशु, किं० पदार्थ, यांना वाईट रीतीनें किं० निष्काळजीपणानें वागविणें किं० वापरणें; उ० त्या मांजराचे असे हाल करूं नको; उ० चिंगीनें त्या बाहुलीचे भारी हाल मांडले आहेत. ꣸ **त्याचे हाल कुत्रा खाईना** त्याला अत्यन्त कष्टमय स्थिति प्राप्त झाली. **हालअपेष्टा, हालआपदा, हालअपदा स्त्री०** कष्ट, त्रास, संकट, अडचणीची स्थिति; पेंच. **हालमस्त वि०** गरीब किं० दरिद्री असून गर्विष्ठ किं० उन्मत्त.

हाल [**अ०**] **पु०** १ स्थिति. २ सुस्थिति. ꣸ **हालहवाल, हालअहवाल** [**अ०** हाल = स्थिति; 'अहवाल' हें 'हाल' चें**अ० व०**] **स्त्री०** १ कैफियत; वर्तमान; बातमी.२ दुर्दशा;दुःस्थिति. ३ खुशालीचें वर्तमान. **हालखुद्द क्रि० वि०** १ हलींच्या स्थितींत. २ जागच्या जागीं. **हालहकीगत स्त्री०** कैफियत; वर्तमान. **हालोहाल क्रि० वि०** तत्काळ; ताबडतोब.

हाल [**अ०**] **क्रि० वि०**१ ह्या काळीं; चालू स्थितींत; वर्तमानकाळीं.२वेळोवेळीं; प्रतिक्षणीं.꣸ **हालखुशामती वि०** हांजीहांजी करणारा;थुंकीचाट्या.**हालीं, हल्लीं क्रि० वि०**सांप्रत;ह्या काळीं. **हाल खुशामत ताजी रोटी** (किं० **ताजा रोजगार**) खुशामत करणाराला खाद्यें, पेयें, इ० भोग्य पदार्थ हावे तितके मिळूं शकतात. **हालअमल पु०** हल्लींचें राज्य; चालू शासनपद्धति. **हालफिलाल क्रि० वि०** ह्या क्षणीं; ताबडतोब. **हालसाल न०** चालू वर्ष; यंदाचें साल. **क्रि० वि०** यंदा; चालू वर्षी.

हाल स्त्री० १ हेका; हट्ट; दृढनिश्चय. २ पैज (बांधणें किं० मारणें);उ०आज रंगोपंत येणारच अशी त्यानें माझ्याशीं हाल बांधली (म्ह० पैज मारली). ३ स्पर्धा, चढाओढ (बांधणें).

हालकडी [**म०** हालणें+कडी] **स्त्री०** नथेला लाविलेला लोंबत्या मोत्यांचा घोस.

हालचाल [**म०** हालणें+चालणें] **स्त्री० ए० व०** चलनवलन; चळवळ.

हालणें, हलणें [**हिं०** हलना] **अ० क्रि०** १ कंपित होणें. २ हेलकावे खाणें. ३ भीति, आनंद, इ० भावनांमुळें क्षुब्ध होणें. ४ स्थानावरून सरकणें; स्थान सोडणें.

हालता [**म०** हालणें] **वि०** १ हालणारा;

कंपित होणारा; अस्थिर. २ जो हालविला असतां आंतील पाणी वाजतें असा (नारळ).

हालफिलाल वर ' हाल ' क्रि० वि० मध्यें पहा.

हालबोंदरा (–द्रा) [म० हालणें+बोंदर, बोंदरी (रद्दी चिरगुट)] वि० १ फाटकीं तुटकीं वस्त्रें अंगावर धारण केलेला. २ अजागळ; वेंधळा; बुद्धीनें कमी. **हालबेंद्रा** वि०बुद्धीनें कमी; अजागळ; अर्धवट.

हालमस्त मागें ' हाल ' पु० अ० मध्यें पहा.

हालविणें [म० ' हालणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ सरकाविणें; कंपित करणें; स्थानावरून दूर करणें; इकडे तिकडे वळविणें. २ कोणेकाला चेतविणें किं० उत्तेजित करणें. ꣸ **हालवून सोडणें** वक्त्यानें किं० कथेकऱ्यानें श्रोत्यांच्या मनांवर आपल्या भाषणानें जबरदस्त परिणाम करणें. **हालवून खुंटा बळकट करणें** मागें 'खुंटा' मध्यें पहा.

हालसाल, हालहवाल मागें ' हाल ' क्रि० वि० आणि ' हाल ' पु० मध्यें पहा.

हालहूल स्त्री० चोरांचा हल्ला, राज्यक्रांति, रोगाची साथ, इ० मुळें गांवांत लोकांची धांदल, गडबड, किं० धावपळ होते ती.

हालाहल [सं०] न० समुद्रमंथनांत देवदानवांनीं बाहेर काढलें तें विष. मागें ' हलाहल' पहा. [कामासंबंधाचा.

हालिक [सं] वि० नांगरणें इ० शेतकीच्या

हालीं, हाल्लीं, हल्लीं [अ० हाल] क्रि० वि० चालू वेळीं; वर्तमान काळीं; सांप्रत.

हालीमवाली,अहालीमवाली [अ० अहाली मवाली] पु० अ० व० गांवांतील सर्व लहान मोठीं, श्रीमंत गरीब,इ० माणसें;यच्चयावत् माणसें.

हालीमाजी [अ० हाली=(वर्तमान काळ)+माजी (गतकाळ)] स्त्री० ए० व० १ समाजस्थितींत मोठें परिवर्तन; राज्यक्रांति. २ उलथापालथ; अव्यवस्था. ३ कामगार लोकांच्या बदल्या.

हालीहरामी [म० हरामी] वि० लुचा; लफंगा; बदमाष. स्त्री० लबाडी; लुच्चेगिरी.

हालोहाल [अ० हाल् ओ हाल्] क्रि०वि० ताबडतोब; तत्क्षणीं.

हाल्या, हल्या [सं० हल=नांगर] पु० रेडा,–जो प्राणी नांगर ओढण्याच्या कामीं लावण्याच्या योग्यतेचा आहे.

हाल्ली, हल्लीमाजी मागें 'हाली,' 'हालीमाजी ' पहा.

हाव [सं०] पु० १ बोलावणें. २ स्त्रियांची शृंगारजन्य चेष्टा; हावभाव. पु० अ० व० स्त्रियांचे नखरे (करणें). ꣸ **हावभाव** पु० अ० व० १ अभिनय आणि तेणेंकरून प्रकट होतात ते रसाचे भाव. २ तर्क;अटकळ;अंदाज(बांधणें).

हाव, हांव [अ० हवा] स्त्री० १ उत्कट इच्छा. २ महत्त्वाकांक्षा; वैभवाची किं० उत्कर्षाची उत्कट इच्छा. ३ वीर्य; उत्साह;धमकदारी. ४ वदंता; अफवा; बातमी. ꣸ **हाव घालणें** आशाळभूतपणानें एकाद्या पदार्थाकडे दृष्टि लावणें. **हावहाव करणें** एकादा पदार्थ मिळविण्यासाठीं धडपड करणें.**हावभरीं भरणें**(किं०**होणें**) अत्यन्त उत्कट इच्छेनें प्रेरित होणें. **हावेस भरणें** किं० **हावेनें भरणें** कांहीं मोठा किं० अचाट बेत किं० मनोरथ करून तो सफल करण्याकडे तनमनधन लावणें. **हावभरी** वि० कांहीं धाडसी बेत करून त्याच्या सिद्धीसाठीं खटपट करणारा.

हावर पु०, स्त्री० एकदा बरें झालेल्या गळूं, फोड, जखम, इ० नीं पुन्हा जोर करणें किं० चिघळूं लागणें किं०विकोपास जाऊं लागणें(धरणें).

हावर पु०,स्त्री०, **हावरें** न० [म० हावरा] अत्युत्कट इच्छा (सुटणें, लावणें, भरणें).

हावरा [म०हावें हावें] वि० आधाशी; जें जें पाहील तें तें मागत सुटणारा किं०आपणाला मिळावें असें इच्छिणारा.

हावळा वर ' हावरा ' पहा.

हावेली स्त्री० टुमदार घर,–लहान आणि आटोपसर असून सुंदर.

हाशा [अ० हाषियाह्] पु० वस्त्राचा कांठ; वस्त्राच्या आंचळ्या.

हाशील [अ० ह सिल्] न० १ सारा, जकाती, इ० चें सरकारचें उत्पन्न. २ महत्त्व; अर्थ; उपयोग; उ० तुझ्या बोलण्यांत कांहीं हाशील नाहीं. ३ कोणेकाच्या भाषणाचा किं० लेखाचा मथितार्थ किं० तात्पर्य. ४ लाभ; नफा.

❀ **हाशील करणें** १ मिळविणें; संपादणें. २ जिंकून घेणें; कबज्यांत घेणें.

हास [**सं०**] **पु०** १ हसणें. २ आनंद. ३ उपहास. ४ (लक्षणेनें) फुलाचें उमलणें.

हासडणें, हासडा, इ० मागें ' हसडणें, ' ' हसडा, ' इ० पहा.

हासील वर ' हाशील ' पहा.

हास्तिन [**सं०**] **वि०** हत्तीच्या परिमाणाइतकें (उंच, खोल, मोठें, अवाढव्य, इ०).

हास्य [**सं०**] **वि०** हसण्याला पात्र; उपहासास पात्र. **न०** १ हसणें. २ थट्टा, उपहास. ३ (**साहित्य**)एक रस. शृंगार, वीर,इ०जे नऊ रस त्यापैकीं एक. मागें ' नव ' मध्यें हे नऊ रस पहा. ❀**हास्यमुख,हास्यवदन न०**ज्या मुखावर हास्य शोभत आहे असें मुख. **वि०**ज्याचें मुख सदा आनंदाच्या छटेनें युक्त असतें असा(माणूस). **हास्यास्पद वि०**हसण्यास लायक; उपासाहाला पात्र.

हाहा [**सं०**] **पु०** स्वर्गांत राहाणाऱ्यांची एक जात किं० वर्ग; गंधर्वविशेष. **उ० वा० अ०** हाय हाय! अरेरे ! हायहाय!❀**हाहाकार, हाहाःकार पु०** आक्रोश; विलाप; आरडाओरडा; शोकाचा ध्वनि.

हांहां उ० वा० अ० थांबा ! पुढें जाऊं नका ! असें करूं नका. ❀ **हांहां म्हणतां क्रि० वि०** १ प्रतिबंध किं० अडथळा करीत असतां; नको नको म्हणत असतां; थांबा थांबा, धीर धरा अशी सूचना करीत असतां. २ अत्यल्प काळांत; उ० हांहां म्हणतां तो केळीचा घड आम्ही खाऊन फस्त केला.

हांहूं उ० वा० अ० आपण जागे आहों,सावध आहों, इ० अर्थ दाखविण्यासाठीं मुखांतून सार्थ शब्द न उच्चारतां कंठांतून काढतात तो ध्वनि (करणें). **स्त्री०** कचर, माघार (करणें); उ० त्यानें हांहूं न करतां तें एरंडेल घेतलें.

हाल स्त्री० १ आकारविशेषाची पाटी, हारा, किं० टोपली. २ विकावयासाठीं पदार्थ हाळींत म्हणजे मोठ्या पाटींत घालून पाटी डोक्यावरून वाहून बाजारांत किं०परगांवीं विकावयास जाणें. ३असे विकावयास नेलेले पदार्थ समुच्चयानें.४अशा प्रकारें पदार्थ विकून आलेले पैसे. ५ शेतकीसाठीं रान तोडलें असतां मोठ्या झाडाची जागा दाखविण्यासाठीं तेथें धोंडा इ० पुरून करतात ती खूण. ❀**हाळबाजार पु०**हाळींत म्ह०पाटींत पदार्थ घालून ते विकावयास जाणें, ते विकणें, इ० रूप व्यवहार.

हाळ पु० १गुरांना पाणी पिण्यासाठीं दगड, विटा, चुना, इ० द्रव्यांनीं बांधलेला हौद किं० डोणी. २ लांबलचक चर. ३ लग्न, मुंज,इ० प्रसंगीं मोठ्या स्वयंपाकासाठीं खणतात तो चर. ४ डोंगरावरून वाहात येणारा पाण्याचा ओहोळ किं० ह्या ओहोळाचा पडलेला चर.

हाळीव न० मागें ' अहाळीव ' पहा.

हिकडचा, हिकडे, हिकडून मागें 'इकडचा,' ' इकडे, ' ' इकडून ' पहा.

हिकमत [**अ०**] **स्त्री०** १ शहाणपण. २ युक्ति; कांहीं कार्य साधावयाला योजलेली शक्कल किं० खुबी; लाविलेला वशीला. ❀ **हिकमती** (**–त्या**) **वि०** कांहीं काम तडीस लावण्यासाठीं हरएक युक्त्या प्रयुक्त्या करणारा; चतुर.

हिंका, हिंकेखोर, हिक्केखोर पुढें ' हेका, ' ' हेकेखोर, ' हिक्केखोर ' पहा.

हिकाती स्त्री० मूर्खपणाची हरकत; कोणेकाच्या चालेल्या कांहीं कामांत कांहीं कुत्सित दोष काढणें. ❀ **हिकात्या, हिकाती, हिकात्याखोर वि०** करावयाच्या किं० चालल्या कांहीं कामांत कुत्सित कल्पना किं० दोष काढून तें काम बंद पाडूं इच्छिण्याच्या स्वभावाचा.

हिकायत [**अ०**] **स्त्री०** १ गोष्ट. २ चुटका; नक्कल; चटकदार गोष्ट. ❀ **हिकायती स्त्री०**कागदाच्या बंदाला घड्या घालून उभे चार रकानें करून त्या चारी रकान्यांतून ओढलेली रेघ. **वि०** चटकदार गोष्टी सांगण्यांत पटाईत.

हिक्का [**सं०**] **स्त्री०** हिसक्याचा श्वास; उचकी.

हिंग [**सं०** हिंगु] **पु०** मसाला, फोडणी, इ० मध्यें घालतात तो उग्रवासाचा आणि तिखट असा एका झाडाचा चीक. ह्याच्या योगानें पदार्थाला चव येते. ❀ **हिंगाचा खडा पु०** १ गडबड्या, चळवळ्या, आणि तल्लख माणूस. २ कांहीं कामांत विनाकारण फाटे फोडून बिघाड करणारा माणूस. **कोणेकाला हिंग लावून न**

विचारणें तो अगदीं टाकाऊ, कुचकिमतीचा, आणि नादान माणूस आहे म्हणून त्याला टाळणें किं० बिलकूल महत्त्व न देणें. **हिंग हगणें** (कांहीं आजारानें) झुरणीस लागणें किं० झिजत असणें. **हिंगडा पु०** हलक्या दर्जाचा हिंग. **हिंगातुपास, हिंगातुपाखालीं, हिंगातुपावारीं, हिंगाधुपास, हिंगाधुपाखालीं क्रि० वि०** १ किरकोळ पण जरूरीच्या वस्तु विकत घेण्यांत (मोठी रक्कम खर्चली जाणें); उ० त्या लग्नांत पांचशे रुपये नुसते हिंगाधुपाखालीं खर्चले गेले. २ (वाईट अर्थानें) हरएक प्रकारच्या चैनीमध्यें; उ० बाप मेल्यापासून एका वर्षाच्या आंत त्यानें लाखाची संपत्ति हिंगाधुपावारीं उडविली. **हिंगाचें पोतें न०** ज्याच्याजवळ कांहीं संपत्ति नाहीं पण हा श्रीमंत आहे अशी ज्याच्या संबंधानें लोकांत समजूत आहे असा मनुष्य. **हिंगाष्टक न०** हिंग, जिरे, मिरे, सुंठ, ओवा, पिंपळी, आजमोदा, आणि सैंधव, हीं आठ द्रव्यें समभाग घेऊन त्यांचें केलेलें चूर्ण,–पाचक म्हणून घेतात तें.

हिंगण पु०,हिंगणबेट न०,हिंगणबेटी स्त्री० [सं० इंगुदी] एक कांटेरी वृक्ष. **हिंगणबेट न०, हिंगणामिठा पु०** ह्या झाडाचें फळ.ह्या फळाच्या पोटांत दारू ठासून भरून तें आतिषबाजीचा एक पदार्थ म्हणून उडावितात.

हिंगणें वाफणें [**म०** हिंग+वाफ] **स० क्रि०** १ कांहीं काम किं०पदार्थ पूर्ण तयार होऊन उपभोगास योग्य किं० लायक होणें. ह्या वाक्प्रचाराचा नेहेमीं अकरणरूपीं प्रयोग होतो. २खाद्य पदार्थाला चव येण्यासाठीं हिंग लावून वाफ द्यावी लागते ह्यावरून ह्या वाक्प्रचाराची रूढि. उ० अझून खिचडी हिंगली नाहीं वाफली नाहीं आणि तूं तर पानावर बसलास, तुला काय वाढूं? उ० अझून शेत हिंगलें नाहीं वाफलें नाहीं इतक्यांत पट्टी काय म्हणून केली ? ३ कांहीं कामाची पूर्वतयारी करणें. ४ आजारांतून उठून हिंडूं फिरूं लागणें.

हिंगरूड, हिंगरडूं [**म०** हिंग] **न०** शरीरावर कांहीं क्षत झालें असतां जर त्या क्षताला हिंगाचा स्पर्श झाला किं० त्या माणसाच्या खाण्यांत हिंग आला तर त्या क्षतांत जी ठणक गांठ उत्पन्न होते ती.

हिंगळूक, हिंगुळूक खालीं ' हिंगूळ ' पहा.

हिंगारी रब्बीचीं पिकें. दुसरीं पिकें 'मुगरी'.

हिंगूळ [**सं०** हिंगुल] **पु०** पाऱ्याचा एक रांधा. हा कुंकवांत तांबडा रंग चटकदार व्हावयासाठीं घालतात.

हिंगें क्रि० वि० १ इकडे; ह्या बाजूस. २ आतां. **टीप,**–दोन्ही अर्थी अशिक्षितांतच रूढि.

हिंगेंतिंगें न० टाळाटाळीचीं उत्तरें, टंगळमंगळ (करणें. लावणें, मांडणें, इ०). **क्रि० वि०** मुद्याला सोडून (बोलणें, उत्तरें देणें).

हिंगोतिंगो स्त्री० टाळाटाळ; चुकारतट्टूपणा; अळंटळं (लावणें, मांडणें, करणें).

हिंगोळ पु० वर ' हिंगूळ ' पहा.

हिचकणें,हिचका पुढें'हिसकणें,' 'हिसका' पहा.

हिचमिचणें अ० क्रि० गर्दीत किं० दाटींत किं०अडचणीच्या जागेंत बसलेल्या माणसाचीं गात्रें एकाच संस्थानांत फार वेळ राहिल्याकारणानें त्यांना कळ लागते. ती कळ शमविण्यासाठीं गात्रें हालविणें, ताणणें, किं० वेगळ्या संस्थानांत घालणें; उ० ह्या खोलींत खूप दाटी आहे मघापासून माझ्या अंगाला कळ लागली आहे, पण जरा हिचमिचेन म्हणावें तर मुळींच वाव नाहीं; उ० शिपयांनीं त्या कैद्यांना साऱ्या रात्रभर तेथें बसवून ठेविलें होतें, त्यांना त्यांनीं मुळींच हिचमिचूं दिलें नाहीं.

हिंचुटा, हिमचुटा वि० आपल्या जवळचा किं० आपल्या ताब्यांतील किं० आपल्या मालकीचा कांहीं पदार्थ कोणी मागितला असतां त्याचा यत्किंचित् अंश देखील जो द्यावयाला नाखूष असतो अशा स्वभावाचा; अनुदार; कंजूष; उ० गोंद्याच्या जवळ पांच पेढे होते मी एक मागितला तेव्हां त्यानें मला गुंजेएवढा कण दिला आणि म्हणाला आतां आणखी देणार नाहीं, गोंद्या मोठा हिंचुटा आहे.

हिजडा [**हिं०**] **पु०** १ बऱ्याच प्रमाणांत जो पुरुषासारखा दिसतो असा नपुसंक.२ निर्लज्ज आणि असभ्य चालीरीतींचा माणूस.**टीप,**–गांवांतील हिजडा दरसाल सर्व लोकांपासून पैसे,धान्य, इ० जबरीनें मिळवितो त्याला 'वतनदार हिजडा'

म्हणतात. **हिजडी स्त्री०** स्त्रीवेषधारी हिजडा. **हिजडें न०** कोणीही स्त्रीवेषांतील किं० पुरुषवेशांतील हिजडा.

हिजरी [अ० हिज्रा=वतनाचा त्याग] महमद पैगंबर मक्का सोडून मदिनेस गेला त्या दिवसापासून म्हणजे इ० स० ६२२ च्या ज्युलाई महिन्याच्या सोळाव्या तारखेपासून सुरू झालेला शक. ॐ **हिजरी साल न०** वरील शकाप्रमाणें सांगितलेलें वर्ष.

हिडगा पु० १ छांदिष्ट किं० लहरी किं० विक्षिप्त माणूस. २ विषयासक्त आणि रांडबाज माणूस. ३ अस्थिर, चंचल, किं० सदा भटकंती करणारा माणूस. ॐ **हिडगेचार पु० अ० व०** हिडग्याचीं कृत्यें; स्वच्छंदी, लहरी, किं० छांदिष्टपणाचीं कृत्यें.

हिंडणवारे [म० हिंडणें] **पु० अ० व०** भटकंती; भ्रमंती; आपला उद्योग सोडून इकडे तिकडे भटकणें (करणें).

हिंडणें [सं० हिंड्] **अ० क्रि०** इकडे तिकडे फेऱ्या करणें; एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं आरामासाठीं किं० कामासाठीं भटकणें.

हिंडफेऱ्या [म० हिंडणें+फेरी] **वि०** इकडून तिकडे तिकडून आणखी दुसरीकडे हिंडण्याच्या स्वभावाचा.

हिडशा, हिडशी, हिडसा वि० ओंगळ, गलिच्छ, ग्राम्य, किळसवाणा (मनुष्य, वर्तन, पदार्थ, भाषण).

हिडसणें, हिडसावणें स० क्रि० १ धिक्कारणें; तुच्छ म्हणून दूर सारणें. २ ओंगळ किं० गलिच्छ करणें; मळविणें; घाण करणें; उ० ह्या स्वयंपाकीबाईनें सारी भांडीं हिडसावून टाकिलीं तीं घासण्यांत माझी सबंध दुपार खर्च झाली.

हिंडळणें स० क्रि० खालीं वर, उलथा पालथा, किं० वाकडा तिकडा करून (पदार्थाची) दुर्दशा करणें.

हिंडावें मुंडावें [म० हिंडणें (भटकणें)+ मुंडणें (न्हाव्याकडून डोकें तासविणें)] **न०** संन्यास घेऊन तीर्थें हिंडत राहाण्याचा क्रम किं० सरणी.

हिंडाळा [सं० हिंदाल] **पु०** पाळणा (मुलांना निजवून झोके देणें इ० च्या उपयोगाचा).

हिडिंबा [सं०] **स्त्री०** १ हिडिंब राक्षसाची बहिण. हिडिंबानें पांडवांना आणण्यासाठीं हिडिंबेला पाठविलें. पण भीमाचें रूप पाहून ही मोहित झाली आणि हिनें त्याला वरिलें तेव्हां हिडिंबाचें भीमाशीं युद्ध झालें आणि त्यांत हिडिंब मारला गेला. हिडिंबेचा भीमापासून झालेला पुत्र घटोत्कच. २ केश विसकटलेली, अव्यवस्थितपणें परकर नेसलेली, आणि मळलेली चोळी घातलेली पोरगी. ३ भांडखोर स्त्री. **टीप,**–मराठींत अपभ्रष्ट रूप 'हेडंबा.'

हिडिस, हिडिस्स, हिडुस वि० ओंगळ, गलिच्छ, घाण (भाषण, माणूस, पदार्थ, स्थळ, इ०). **न०** उकिरडा; केरकचऱ्याची रास. ॐ **कोणेकाला हिडिसफिडीस करणें** त्याला तुच्छता दर्शविणें (जणों काय तो उकिरड्यासारखा ओंगळ आणि दुर्गंधीयुक्त आहे).

हिंडोल पु० (**संगीतांत**) एक राग.

हिंडोळा[सं० हिंदोल]**पु०** १ झोपाळा. २ पाळणा.

हिणकस [म० हीन; सं० हीन; कस=उत्कृष्ट अंश] **वि०** १ ज्यांत अन्य धातूची भेसळ आहे असा (सोनें, रुपें, इ० धातु) किं० अशा धातूचा बनविलेला (पदार्थ). २ दोन भिन्न जातींच्या मिश्रणाचें (अपत्य). [पात्र.

हिणगें न० शिपतरासारखें बांबूच्या पातींचें

हिणवणी, हिणावणी [म० हिणवणें, हिणावणें] १ कोणेकाला तुच्छ करणें किं० झिडकारणें किं० लाजविणें. २ कोणेकाच्या कांहीं कमीपणाबद्दल त्याला टोमणे मारणें किं० तुच्छता दर्शविणें. ३ (कोणेक माणूस, पशु, पदार्थ) कमी किं० हलक्या दर्जाचा लेखणें, मानणें, किं० म्हणणें.

हिणविणें, हिणाविणें, हिण्याविणें [सं० हीन; म० हीण] **स० क्रि०** १ (कोणेकाचा) कांहीं उणेंपणा काढून (त्याला) लाजविणें. २ कमी करणें; कमजोर करणें.

हिणें, हीन [सं० हीन] **न०** उणेंपणा; व्यंग; निंद्य किं० दोषास्पद अशी कांहीं गोष्ट.

हित [सं०] **वि०** १ कल्याणकारक. २ फायदेशीर. ३ उपयुक्त. ४ इष्टार्थसाधक. ५ योग्य. ६ आपलें कल्याण चिंतिणारा किं० करणारा (माणूस). ७ (**वैद्यक**) पथ्यकर. **पु०** कल्याण करणारा; स्नेही; मित्र. **न०** कल्याण;

फायदा. ॐ हितेच्छु, हितान्वेषी, हितैषी [सं० हित, इच्छु (इच्छिणारा), अन्वेषिन् (शोधणारा), एषिन् (इच्छिणारा)] वि० आपल्या हितास किं० कल्याणास जपणारा; आपला उत्कर्ष किं० लाभ झाल्यानें आनंद पावणारा (मित्र, दोस्त). हितकर वि० फायदेशीर; लाभदायक. हितगुज[सं० हित+गुह्य]न० कोणेकाचें रहस्य किं० गुप्त गोष्ट;मन मोकळें करून सांगितलेली किं० सांगावयाची कांहीं गोष्ट. हितबुद्धि स्त्री० कोणेकाचें हित करण्याची इच्छा. हितवादी [सं० हितवादिन्] वि० आपणाला आपल्या कल्याणाचा बोध करणारा. हितशत्रु पु० १ आपल्या हिताची परवा ज्याला नाहीं असा (आपला नातलग, मित्र, इ०).२ बाहेरून मैत्री दाखवून गुप्तपणें आपलें नुकसान करूं पाहणारा माणूस. हितोपदेश पु० आपलें कल्याण ज्याच्या योगें होईल असा कोणी आपणास केलेला बोध.

हिंताळ [सं०] पु० शिंदी हें झाड.

हिताळ, हिताळा, हिताळू [म० हित] वि० हित करणारा; हित चिंतिणारा.

हिंदकळणें, हिनकळणें, हिंदळणें अ० क्रि० १ (पातळ पदार्थ,–दहीं, दूध, बासुंदी, इ०) भांड्यांत घालून तें भांडें हातांत घेऊन चालणें किं० गाडींत बसणें याच्या योगानें (तो पदार्थ) हालणें किं० डिचमळणें. २ गाडींत बसून किं० घोड्यावर बसून जात असतां (गात्रें)खिळखिळीं होणें किं० (त्यांना) हिसके बसणें.

हिंदण (–न),हिंदाण (–न) [सं० व्यध्; म० विंधणें] न० १ बाण, बंदूक, इ० चें लक्ष्य म्ह० ज्यावर प्रहार करावयाचा तो पदार्थ. २ ऐन वेळ; आणीबाणीचा समय. ३ (बंदूक, धनुष्य, इ०) पदार्थांवर रोखणें (धरणें, बांधणें). ४ कट; व्यूह; चक्रान्त; मसलत.

हिंदवानी, हिंदवी [हिं०] वि० हिंदूच्या संबंधाचें.

हिदहिदणें अ० क्रि० (गव्हूं, आंबा, फणस, इ०) चेपणें, चोळवटणें, आपटणें, इ० कारणांमुळें किं० शिळेपणामुळें मऊ, बिलबिलीत, किं० विसविशीत होणें.

हिदहिदीत, हिदहिदा वि० मऊ; विसविशीत; निस्तेज (फळ, चेहरा, इ०).

हिंदळणें मागें ' हिंदकळणें ' पहा.

हिंदाण(–न) वर ' हिंदण (–न) ' पहा.

हिंदुस्तान, हिंदुस्थान [फा० हिंदुस्तान्; हिंदु+सं० स्थान] पु०,न० १पश्चिमेस सिंधुनदी, अफगाणिस्तान, आणि अरबी समुद्र, दक्षिणेस हिंदी महासागर, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि ब्रम्हपुत्रानदी, उत्तरेस हिमालयपर्वत ह्यांच्या मध्यें असलेला जो देश तो. २ विंध्याच्या उत्तरेस आणि हिमालयाच्या दक्षिणेस असलेला जो वरील देशाचा भाग तो; आर्यावर्त. ॐ हिंदुस्तानी वि० आर्यावर्तातील (भाषा,जोडा, पेहराव, इ०). हिंदू पु० हिंदुस्तान अर्थ १ मधील कोणीही वैदिक धर्म किं० तद्भव धर्मांचा अनुयायी. हिंदी धर्म पु०सत्य,पावित्र्य,अहिंसा, आणि विश्वबंधुत्व,ह्या चतुष्टयावर आधारलेला धर्म. हिंदी संस्कृति स्त्री० वरील चतुष्टयापासून निसर्गाच्या नियमानें परिणत झालेली संस्कृति. हिंदी पु० पहिल्या अर्थाच्या हिंदुस्तानांत जन्मलेला, आणि त्याच हिंदुस्तानचा कायमचा रहिवासी, आणि त्याच हिंदुस्तानचें कल्याण, उत्कर्ष, आणि वैभव इच्छिणारा आणि तदर्थ झटणारा कोणत्याही धर्माचा किं० जातीचा मनुष्य. हिंदीभाषा स्त्री० संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेल्या मुख्य चार भाषा (पैशाची, मागधी, शौरसेनी,आणि महाराष्ट्री) त्यांपैकीं शौरसेनीची कन्या.

हिंदुळा, हिंदोळा [सं० हिंदोल] पु० १ झोपाळा. २ पाळणा.

हिंदू वर ' हिंदुस्तान ' मध्यें पहा.

हिंदोल, हिंदोळा [सं० हिंदोल] पु० १ झोपाळा. २ पाळणा. ३ हेलकावा. ४ एक राग (संगीतांत).

हिंपुटी, हिंपूट, हिंपुटा वि० १ चिवळ तोंडाचा; बारीक मुखाचा; किरट्या चेहेऱ्याचा (मनुष्य). २ खिन्न किं० उदासीन अशा चेहेऱ्याचा (निसर्गतः किं० दुःख, चिंता, इ०मुळें). ३ देण्यांत अनुदार.

हिम [सं०] वि० थंड, गार. पु० १ हेमंत ऋतु. २ चंद्र. ३ हिमालय पर्वत. ४ कापूर. न० १ बर्फ; दंव. २ थंडी. ३ चंदन. ॐ हिमनदी

स्त्री० थंड प्रदेशांतील डोंगराच्या दरींतून सरकत सरकत येणारा बर्फाचा प्रचंड आणि लांबच लांब पट्टा,–जो ऊष्ण कटिबंधांत सरकत येऊन वितळतो तो. **हिमज्वर** पु० थंडी वाजून येतो तो ताप. **हिमवान्** पु० हिमालय पर्वत. वि० थंड; शीत. **हिमवृत्त** न० जेथें सदैव बर्फ असतें असा भूमीचा पट्टा. **हिमाचल, हिमाद्रि** पु० हिमालय पर्वत. **हिमट, हिमटतोंड्या** वि० उदासीन किं० निस्तेज आणि विषण्ण मुद्रेचा (मनुष्य).

हिमटा, हिमटी, हिमट्या, हेमटा वि० कोणाला कांहीं पदार्थ देण्यांत जो चिक्कू तो.

हिंमत, हिम्मत [अ०] स्त्री० १ कांहीं कार्य करण्याविषयीं कोणेकाची जी महत्त्वाकांक्षा ती; उत्साह; उमेद; हिय्या; अवसान; धमक. २ नेट; निश्चय. ३ धैर्य.❀ **हिम्मतदार** वि० १ उत्साही; नेट्या; धमकदार. २ धैर्यवान्. **हिंम्मतबहादर** पु० शूर वीर,–राजानें कोणेकाला बहुमानपूर्वक दिलेली पदवी.

हिमळ [सं० हिम] वि० पांचट; वेचव; उ० तापविलेलें पाणी हिमळ लागतें.

हिमाईत, हिमायत, हिमात [अ० हिमायत्] स्त्री० १ राजाश्रय, पैसा, उच्च अधिकार, विद्वत्ता, इ० गुणांमुळें कोणेकाला झालेला गर्व किं० अंगीं आलेली मगरूरी.२ऐहिक वैभव किं० उत्कर्ष.**हिमाइती** (–त्या),**हिमायती**(–त्या), **हिमाइतीचा, हिमायतदार, हिमाइतदार (–गार)**वि० ज्याला समर्थाचा आश्रय किं०संरक्षण आहे असा. **हिमायतीचा गाढव** पु० समर्थाचा आश्रित किं० बगलबच्चा किं० थुंकीचाट्या,–जो समर्थाच्या जोरावर लोकांना तुच्छ लेखतो. **हिमायतीची गधडी** स्त्री० समर्थाचा बगलबच्चा, आश्रित, किं० थुंकीचाट्या. **हिमायतीचा गाढव तेजीला लाथा मारी** मागें ‘ तेजी ’ मध्यें पहा.

हिमानी, हिमिका [सं०]स्त्री० दाट बर्फ.

हिम्य [सं०] वि० १ बर्फानें आच्छादलेला (डोंगर, भूभाग). २ थंड, गार.

हियो, हिय्यो उ० वा० अ० नांगराच्या बैलांना दिशा वळवितांना नांगर हाकणारा गडी हा उद्गार काढतो.

हिय्या [सं० हृदय; प्राकृत हिअअ] छाती; छातीठोकपणा; धाडस; धारिष्ट. **हिय्येदार** वि० छातीचा; हिमतदार (माणूस,कृत्य).

हिय्यो वर ‘ हियो ’ पहा.

हिरक स्त्री० लाकडाच्या घिरटाला गोलाकार पाडलेल्या त्रिज्या.

हिरकणी [म० हिरा+कणी] स्त्री० लहान आकाराचा हिरा.

हिरका [म० हीर] पु० १ ताड, माड, सुरमाड, वेळू, पोफळ, इ० झाडांच्या खोडांतील किं० फांद्यांच्या देठांतील लांब लांब तंतु प्रत्येक. २ कोणत्याही झाडाच्या खोडांतील वेगळ्या रंगाच्या किं० त्याच रंगाच्या रेषा समुच्चयानें किं० व्यक्तिशः.ह्या रेषांना लाकूड समांतर चिरणें किं० फोडणें सोपें जातें आणि काटकोनांत तुकडा पाडणें कठिण जातें. ३ सुपारी, खापरपोळी, इ० च्या पोटीं रेषांनीं भिन्न भिन्न झालेले जे अवयव ते प्रत्येक.

हिरकूट [म० हीर] न० १ बांबू, ताड, माड, इ० झाडांचे जे खोडांतील किं० देठांतील किं० पानांतील समान्तर तंतु ते प्रत्येक. २ अंगांत शिरलेलें लाकडाचें कुसळ किं० धसकट.३ नारळ इ०च्या झावळींतील पातींच्या दांड्यांतील जी जाडी आणि लांब काडी ती.ह्या काड्या एकत्र बांधून खराटा करतात.

हिरकूट[म०हिरा] हिरा हें रत्न,–तुच्छतेनें.

हिरगण न० खांबाच्या माथ्यावर तुळईखालीं जी लाकडाची+ह्या आकाराची फुली बसवितात ती.

हिरडा [सं० हरीतकी] पु० १ एक झाड. २ त्याचें फळ. हें फळ रंगाच्या कामीं उपयोगी पडतें. ह्या फळाच्या अनेक जाती आहेत,–चांभारी हिरडा, रंगारी हिरडा, बाळहिरडा, सुरवारी हिरडा, इ०. ३ मनुष्याच्या गळ्याचें पुढें आलेलें हाड. ४ पळी, चमचा, इ० चें परडें. ❀ **हिरडी** स्त्री० कोंवळा वाळविलेला हिरडा.

हिरडी स्त्री० १ मुखांतील निमगोलाकार

मांसाचे उंचवटे, ज्यांत दांत बसलेले असतात, ते प्रत्येक. २ दांत व्यक्तिशः जींत बसलेले असतात ती मांसाची खळगी.

हिरणें [म० 'हरणें' चें एक रूप] **स० क्रि०** कोणेकाची (कांहीं वस्तु) लबाडीनें किं० जबरदस्तीनें घेणें; लुटणें.

हिरण्मय [सं०] **वि०** १ सोन्याचें बनविलेलें. २ सोन्याच्या किं० सोनें, रूपें, इ०च्या पदार्थांच्या रूपांत असलेली कोणेकाची (संपत्ति).

हिरण्य [सं०] **न०** १ सोनें हा धातु. २ सोन्याचें पात्र. ३ (**संस्कृतांत**) रूपें. ४ द्रव्य; धन; संपत्ति. ५ पुरुषाचें वीर्य, रेत, किं० धातु. ❀ **हिरण्यगर्भ पु०** ब्रह्मदेव. **हिरण्यरेता** [सं० हिरण्यरेतस्] **पु०** अग्नि. **हिरण्यकेशी स्त्री०** यजुर्वेदाची एक शाखा. **पु०** ह्या शाखेचा कोणीही ब्राह्मण.

हिरमुशी [म० हिरमुसणें] **स्त्री०** हौस, उमेद, इ० चा कांहीं दुर्दैवानें झालेला भंग किं० अशा भंगानें प्राप्त झालेली स्थिति.

हिरमुसणें [सं० न्ही (लाज)+मूढ होणें] **अ० क्रि०** इच्छिलेलें फळ हातीं पडावयाच्या ऐन समयीं दुर्दैवानें तें हातीं न पडल्यामुळें लाजणें किं० खचणें.

हिरमूस, हिरमोडी स्त्री०, हिरमोड पु० [म० हिरमुसणें; सं० न्ही (लाज)+मूढ होणें] इष्ट फळ हातीं पडावयाच्या ऐन वेळीं तें हातीं न पडल्यानें येते ती खच किं० वाटते ती लाज.

हिरमोड [म० हिरवा+मोडणें] **वि०** किंचित् हिरवा (रंग).

हिरली स्त्री०, हिरलें न० मागें 'इरलें' पहा.

हिरवट, हिरवस [म० हिरवा] **वि०** १ किंचित् हिरव्या रंगाचा. २ दुसऱ्यावर रागावून कांहीं न बोलतां घुम्यासारखा बसणारा. ३तंबाखू आणि गांजा मिश्र करून तें ओढणारा. ४ असभ्य किं० गांवढळ चालीरीतींचा (मनुष्य). ५ अविचारानें भलतीच गोष्ट करणारा; रानदांडगा. ❀ **हिरवटाण** [म० हिरवट+घाण] **स्त्री०** गवत, भाजीपाला, लाकूड, फळें, इ० ना ओलेपणाची किं० अपकतेची येते ती घाण.

हिरवंडा [म० हिरवा=अपक] **वि०** न भाजलेलें (मडकें), पूर्ण पक न झालेला (आंबा इ० फळ).

हिरवस [म० हिरवा] **वि०** पूर्णपणें न शिजलेलें (खाद्य), न भाजलेलें (मडकें), न पिकलेलें (फळ), न वाळलेलें (लाकूड), किं० अशा पदार्थांना येणारी (घाण).

हिरवळ, हिरवाळ [म० हिरवा] **स्त्री०** पावसाळ्यांत हिरवें गवत, शेतें, रोपटीं, इ० उगवल्यामुळें जिकडे तिकडे हिरव्या रंगाचा भूपृष्ठ होतो तो किं० अशीं हिरवीं रोपटीं, गवत, झाडें, इ० समुच्चयानें; उ० पाऊस पडल्यावर लवकरच चोहोकडे हिरवळ होते.

हिरवा [सं० हरित] **वि०** १ गवत, पाच, इ० च्या रंगाचा (पदार्थ). २ पूर्णपणें न पिकलेलें (फळ), न शिजविलेलें (खाद्य), न भाजलेलें (मडकें, कौल, वीट, भाकरी), प्रौढ न झालेली (बुद्धि, सारासार विचार). ३ अपकपणाचा वास ज्याला येत आहे असा. ४ एकलकोंड्या स्वभावाचा, तुसडा (माणूस). **हिरवानिळा, हिरवापिवळा वि०** रागानें किं० मत्सरानें किं० अंगांत विषसंचार झाल्यानें ज्याचा वर्ण विरूप झाला आहे असा (चेहेरा, गात्र, शरीर, इ०). **हिरवी जमीन स्त्री०** भाजल्याशिवाय जींत पेरणी केली आहे अशी जमीन. **हिरवी तंबाखू स्त्री०**(संकेतानें)भांग किं० गांजा. **हिरवें न०** गुरांनीं चरावयाचें जमिनीवरचें गवत. **हिरवी स्त्री०** भांग किं० गांजा (सांकेतिक). **हिरवा वि०** भांगेच्या किं०गांजाच्या व्यसनाला आसक्त. ❀ **हिरवा कच्चा वि०** १ पूर्णपणें न पिकलेलें (फळ). २ पूर्ण न शिजलेला(भात); पूर्णपणें न भाजलेली (भाकरी); शेवटास न लाविलेलें (काम).

हिरवाळ वर 'हिरवळ' पहा.

हिरविणें पुढें 'हिराविणें' पहा.

हिरशी (-सी) खालीं 'हिरस' मध्यें पहा.

हिरस, हिरीस [अ० हिर्स्] **स्त्री०** हावरेपणा; लोभ; फाजिल तृष्णा. ❀ **हिरशी, हिरसी वि०** १ लोभी. २ कुजक्या किं० हिरवट स्वभावाचा आणि उन्मत्त.

हिरसा [म०हिसणें] **वि०** वारंवार खिंका-

ळण्याची सवय ज्याला आहे असा (घोडा). ॐ हिरसा तट्टू पु० १ वढाईखोर माणूस. २ रांडबाज माणूस; परस्त्रीलंपट माणूस.

हिरहिरी, हिरिरी [सं० वीरश्री] स्त्री० १ कांहीं काम करावयासाठीं एका खेपेस घेतलेला दम किं० लाविलेला नेट किं० धरलेली हिम्मत; उ०येथून जी फौज निघाली तिनें पहिल्या हिरिरीस दहा कोश मजल मारली. २राग, मत्सर, इ० चा एकदम झालेला उद्रेक किं० उद्भव; लहर.

हिरा [सं० हीरक, हीर] पु० पांढऱ्या रंगाचें एक महारत्न. ॐ **हिरा तो हिरा आणि गार ती गार** साधु पुरुषाची हलकट लोकांनीं कितीही निंदा केली आणि दुष्टाची कितीही थोरवी गायिली तरी साधूची महात्मता आपोआप प्रकट होतेच होते आणि दुष्टाचा दुष्टपणा आपोआप व्यक्त होतोच होतो. **हिरादिवा** [म० हिरा दिवा] वि० जो मूर्ख आणि अडाणी असून शहाणपणाची आणि विद्वत्तेची ऐट मिरवितो असा (माणूस). **हिराहिंग** पु० उत्कृष्ट दर्जाचा हिंग. **हिरेदिवे** [म० हिरे+दिवे] पु० अ० व० मकरसंक्रांतीचे दिवशीं स्त्रिया ब्राह्मणास दोन आरसे आणि दोन दिवे ह्या रूपाचें देतात तें वाण.

हिराकस पु०,**हिराकशी** स्त्री० [हिं० हिराकसीस्] लोखंड आणि गंधक यांचें निसर्गात झालेलें मिश्रण. ह्याचा रंगाकडे उपयोग होतो.

हिरामण [हिं० हीरामन्] पु० पोपटाची एक जात.

हिरावळ वर ' हिरवळ ' पहा.

हिरावळी स्त्री० स्त्रियांचें पांघरावयाचें एक वस्त्र.

हिराविणें [म० ' हिरणें ' चें प्रयोजक] स० क्रि० १ (कोणेकापासून) बलात्कारानें किं० फसवून कांहीं वस्तु घेणें. २ कोणेकाची (कांहीं वस्तु) बलात्कारानें किं० लबाडीनें घेणें.

हिरासा [फा० हिरासान्] वि० भयभीत; त्रस्त; हैराण.

हिरिरी मागें ' हिरहिरी ' पहा.

हिलगड [म० हिलगणें=लोंबत राहाणें] स्त्री० १ देणें घेणें इ० संबंधाची निकालांत न निघालेली बाबत; वांध्यांत पडलेली बाबत; भानगड. २ चालू कामांत कांहीं विघ्न आल्यामुळें झालेला कुंठितपणा किं० कुंठितपणाची स्थिति.

हिलगडणें [म० ' हिलगणें ' चें एक रूप] स० क्रि० (कांहीं काम, व्यवहार) अर्धवट ठेवणें; निकालांत न काढणें; लोंबत ठेवणें. ह्या अर्थी ' हिलगडून पाडणें ' सुद्धां. अ० क्रि० लोंबत राहाणें; निकालांत न निघणें किं० न काढलें जाणें; भिजत पडणें.

हिलगडा पु०, **हिलगण** स्त्री० वर ' हिलगड ' पहा.

हिलगणें [हिं० हिलगना] स० क्रि० (एक वस्तु) दुसऱ्या वस्तूस जोडून देणें किं० सईलसर बांधणें किं० लपेटणें किं० आडकावणें; (एकाची) दुसऱ्याशीं सांगड घालून देणें; एकत्र बांधणें. अ० क्रि० १लोंबत राहाणें; आडकून पडणें.२संदिग्धपणाच्या स्थितींत असणें किं०पडणें.३निकालांत न काढलें जातां (कांहीं काम) लोंबत राहाणें.४ कुंठित होणें.५कांहीं कामांत गुंतलेलें असणें;उ०मी ती बातमी मिळविण्यासाठीं दिवसभर हिलगलों.

हिलगवण [म० हिलगाविणें]न० आडथळा; विघ्न; आडकण. [क्रि० पहा.

हिलगावणें अ० क्रि० वर ' हिलगणें ' अ०

हिलगाविणें स० क्रि० वर ' हिलगणें ' स० क्रि० पहा.

हिलणें अ० क्रि० हलणें; हालणें.

हिलारी, हिलारणी स्त्री० १ धावाधाव; धावपळ. २ हल्ला. ३ घोड्याकडून त्याची चाल पाहाण्यासाठीं करविलेला फेरफटका (देणें). ४ हिरिरी.

हिलाल [अ०] पु० १ चंद्राची कोर. २ चंद्रज्योत (आतिषबाजींतील). ३ अंधेरांतून जातांना पेटवितात तो टेंभा.ह्या टेंभ्यांच्या काठीच्या टोकाला असलेल्या परड्यांत चिंध्या तेलांत बुडवून पेटविलेल्या असतात.

हिल्ला [अ० हीलाह्] पु०१धनी, सावकार, इ० कांशीं सोयीनें न वागतां दांडगाई, कुभांडें, कांघावे, इ०रूप कोणी करतो त्या लबाड्या समुयानें २ चरितार्थाचें जें कोणेकाचें साधन (समर्थाचा आश्रय, उद्योग, धंदा, इ० रूप) तें.

ॐ **हिला हरकत स्त्री० ए० व०** कोणी आपणावर सोपविलेल्या कामांत किं० कर्ज इ० फेडण्यांत ज्या सबबी किं० अडचणी आपल्या पुढें आणतो त्या समुच्चयानें.

हिंव [**सं०** हिम] **न०** १ हवेंतील थंडपणा. २ शरीराला भासतो तो थंडपणा. ३ थंडी वाजून येतो तो ताप. ४ अति थंडीमुळें नासलेलें पीक. ॐ **हिंवज्वर, हिंवताप पु०** वर ' हिंव ' अर्थ ३ पहा.

हिंवडणें, हिंवणें [**म०** हिव] **अ० क्रि०** थंडीनें जर्जर होणें किं० पीडित होणें.

हिंवडी [**म०** हिंव] **स्त्री०** थंडीनें भरलेली हुडहुडी; अति थंडीमुळें शरीराला झालेली असह्य भावना.

हिंवत [**म०** हिंव] **पु०** हिंवाळ्यांत नांगरून ठेविलेली रानजमीन किं० माळजमीन (पावसाळ्यांत पेरणी करण्याच्या उद्देशानें). ॐ **हिंवताड न०** हिंवत (तुच्छतेंत).

हिंवर, हिवर पु०एक वृक्षविशेष. ह्या झाडाच्या छायेंत बसणें निषिद्ध मानलेलें आहे.

हिंवस [**म०** हिंव] **स्त्री०** बाहेर पाऊस पडत असतां वाऱ्याच्या झोतानें जे पावसाचे तुषार घरांत येतात ते समुच्चयानें. **वि०** पाण्याची वाफ ज्यांत आहे अशी थड (हवा).

हिंवसणें [**म०** हिंवस] **अ० क्रि०** १ हवेंतील जलांशानें (पदार्थ) सरदणें. २ (**लाक्षणिक**) खचणें; निरुत्साह होणें.

हिंवसा [**म०** हिंव्] **वि०** थंड, गार (पाणी); सरदट (वारा, चिरगूट).

हिंवसाण [**म०** हिंवस+घाण] **स्त्री०** सरदलेल्या चिरगुटाची किं०जमीनीची किं०फळाची घाण.

हिंवळणें, हिंवळावणें, हिंवाळणें अ० क्रि० वेदना, दुःख, चिंता, इ० मुळें कण्हणें किं० किंचाळणें; विव्हळणें.

हिंवाडी, हिंवडी [**म०** हिंव] **स्त्री०** थंडीनें किं० थंड वाऱ्यानें किं० हिंवतापानें अंगांत उठते ती अस्वस्थपणाची भावना; हुडहुडी (भरणें).

हिंवाळा पु०,हिंवाळी स्त्री० [**सं०** हिम+काळ] थंडीचा ऋतु; कार्तिकापासून माघापर्यंतचा वर्षाचा अवधि.

हिशेब, हिशोब, हिसाब [[**अ०** हिसाब्] **पु०** १ बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, त्रिराशिक, इ० जीं गणितकृत्यें त्यांच्या सरणीनें देणें, घेणें, खरेदी, विक्री, इ० चें परिमाण ठरविणें किं० अशा ठरविण्यानें निश्चित केलेलें जें परिमाण तें.२ गणती;परिगणन; मोजदाद. ३ कोणेकाचा दुसऱ्या कोणाशीं जो देणें घेणें इ० संबंधाचा व्यवहार तो. ४ मोजदादींत किं० परिगणनांत घ्यावयाची किं० घेतलेली एक एक बाबत. ५ (**लाक्षणिक**) शास्त्रशुद्ध किं० आचारशुद्ध जी वर्तनाची सरणी ती. ६ (**लाक्षणिक**) महत्त्व; उ० तुझ्या शंभर रुपड्यांचा मला काय हिशेब ? ७ (**लाक्षणिक**) आदराला कोणेकाची जी पात्रता ती; विचारांत घेतलें जाण्याची जी कोण्या माणूस, पशु, पदार्थ, इ० ची लायकी किं० योग्यता ती. ८ जमाखर्च. ॐ**हिशेब कितेब** [**अ०** हिसाब+किताब] **पु० ए०व०**मोजदाद, परिगणन, गणती, इ०संबंधाचीं कृत्यें समुच्चयानें. **हिशेबी, हिशोबी वि०** १ हिशेब करून ठरलेला(आंकडा); हिशेबाप्रमाणें योग्य. २ काय करणें योग्य आहे, कोणती गोष्ट अंगावर येण्याचा संभव आहे, किती खोटें खपेल, किती धाडस योग्य आहे, इ० सर्व गोष्टींचा विचार करून वागणारा. ३ गणितकृत्यें करण्यांत पटाईत. **हिसाबी किताबी वि०** रास्त; वाजवी.

हिंसक [**सं०**] **वि०** १ घातुक (प्राणी,– वाघ, सिंह, इ०). २ क्रूर; दुसऱ्याच्या प्राणांची परवा न करणारा. **पु०**१हिंस्र पशु.२(**संस्कृतांत**) अथर्व वेद पढलेला.

हिसकणें [**म०** हिसका] **स० क्रि०** १ (झाडाची फांदी, माणसाचा हात, पाय, बैल इ० ची शेपटी) एकदम जोरानें ओढणें. २कोणेकापासून (पैसा, पदार्थ, इ०) त्याच्या इच्छेविरुद्ध काढणें किं० मिळविणें. ३ (कांहीं काम, मसलत, व्यूह, इ०) बिघडाविणें.

हिसका पु० १ जोराचा हासडा; जोरानें ओढणें, ढकलणें, ताणणें, किं० पिळवटणें, ह्या

कामीं मारलेला एक दम.२धक्का; तडाखा (बसणें, देणें). ३ कांहीं कामीं एकदम आलेलें विघ्न; एकदम झालेली कुंठितपणाची स्थिति. ४ व्यर्थ पडलेली खेप; हेलपाटा.

हिसकाविणें [म० 'हिसकणें' चें प्रयोजक] स० क्रि० कोणेकापासून(कांहीं वस्तु)जबरदस्तीनें घेणें, मिळविणें, किं० काढणें.

हिसडणें [म० हिसका] स० क्रि०१ हिसकावून घेणें. २ जोरानें ओढणें. ३ कोणेकापासून (पैसे) काढणें किं० मिळविणे.

हिसडा पु०, **हिसडी** स्त्री० [म० हिसडणें] एकदम दिलेला जोराचा तडाखा किं० हिसका; एकदम लाविलेला ताण.

हिसणें, हिंसणें [सं० हेष्] अ० क्रि० (घोड्यानें) खिंकाळणें.

हिंसणें [सं० हिंस्] स० क्रि० (कोणेकाचा) वध करणें; ठार मारणें (कवितेंत).

हिसळणें मागें 'उसळणें' सर्व अर्थी पहा.

हिंसा [सं०] स्त्री० १ इजा; पीडा. २ वध; ठार मारणें; प्राण हरणें. ३ नासाडी. ४ चोरी इ० दुष्कर्म. ❀ **हिंसाकर्म** [सं० हिंसाकर्मन्] न० जारण, मारण, इ० कर्म.

हिसा, हिस्सा [अ०] पु० १ अनेकांच्या मालकीचा किं० संबंधाचा जो पदार्थ त्यांतील एका एकाच्या वाट्याचा जो अंश तो. २ अनेकांच्या कर्तृत्वाचें जें कार्य त्यांतील हानिलाभाचा किं० यशोपयशाचा प्रत्येकाकडे येणारा जो भाग तो. ३ समायिक किं० वडिलोपार्जित संपत्ति इ० चा एका एका माणसाचा भाग. ❀ **हिस्सेदार** पु० समाईक पदार्थाचे जे वाटेकरी ते प्रत्येक.

हिस्सेरशी (-सी), हिस्सेरसीद [अ० हिसाह्+रसी] स्त्री० समाईकींतील जें कांहीं त्याचा हिशेबानें एकाएकाला मिळावयाचा भाग काढणें किं० काढलेला भाग; सारखी वाटणी; वाटा.

हिंसालु [सं०] वि० १ हिंस्र (पशु). २ खून करण्याकडे प्रवृत्ति असलेला (माणूस).

हिंस्र [सं०] वि० १घातुक.२ भयंकर.३ क्रूर.

हिस्सा वर 'हिसा' पहा.

हिहिहि स्त्री० १ हसणें (करणें). २ उपहास (करणें). क्रि० वि० आवाज करून (हसणें).

हिळणें अ०क्रि०(माणूस,किं०पशु)आज्ञाधारक होणें, वठणीस येणें. 'हिळणें मिळणें' ह्याच अर्थी.

ही श० यो० अ० सुद्धां; देखील; उ० गोविंदा गेला आणि रामाही गेला.

हींड स्त्री० घराची वळचण किं० तिच्याखालची जागा.

हीण [सं० हीन] न० १सोनें, रुपें, इ०मध्यें जो हलक्या धातूचा अंश असतो तो.२कमीपणा; उणेपणा. ३ कोणेकाचा बदलौकिक होईल असा त्याच्या अंगचा कांहीं दुर्गुण. ४ करावयास पाहिजे असें जें कांहीं तें न केल्यानें कोणेकाची होते ती बदनामी; उ० ऋण फिटेल पण हीण फिटणार नाहीं. ❀ **हिणकट, हिणकशी, हिणकस, हिणवट** वि० कमी कसाचें (सोनें इ० धातु) किं० त्या तशा धातूचा (पदार्थ). **हिणकौल** पु० जमीनीवर पूर्ण सारा न भरतां कसावयास जमीन घेण्या किं० देण्यासंबंधाचा लेखी करार. **हीणवर** पु० १ वयानें किं० शक्तीनें वधूपेक्षां कमी असा (नवरामुलगा). २ अशा विजोड वधूवरांचा संबंध. ३ भव्य नोकर आणि किरटा यजमान यांची जोडी.

हीन [सं०] वि० १ टाकलेला; सोडून दिलेला.२ रहित; उ० द्रव्यहीन,विद्याहीन,कायाहीन (कयाहीन), वस्त्रहीन,इ०.३हलक्या दर्जाचा; कमी प्रतीचा; उ० हीन वर्ण. ४ नीच; निंद्य. ५ दोन जातींच्या मिश्रणानें झालेली (जात). ❀ **हीनवादी** [सं० हीनवादिन्] वि० १ मुका. २ दुतोंड्या. ३ दुटप्पी (साक्षीदार).**हीनांग** वि० जन्मतः व्यंग.

हीनकट, हीनकस वर 'हीण'मध्यें' हिणकट,' 'हिणकस' पहा.

हीनवर वर 'हीण' मध्यें 'हीण वर पहा.

हीर पु० १ माड, शिंदी, इ० च्या झावळीच्या पानांत जी मधोमध काडी असते ती.माडाच्या झाडाच्या अशा काड्यांचे खराटे करतात. २ माड, ताड, पोफळी, बांबू, इ० झाडांच्या खोडांतील जे उभे आणि लांबलचक तंतु ते

प्रत्येक. ३ कोणत्याही झाडाचें खोड, फांदी, इ० तील मुळाकडून टोकाकडे जी वाढ होत जाते त्या वाढीची दिशा; उ० लाकडाच्या हिराला काटकोनांत लाकूड तोडणें कठिण जातें, हिराला समांतर तोडणें सोपें जातें. ४ चांगला न शिजलेल्या भाताच्या शितांत जो टणक अंश असतो तो; कणी. ५ बांबू, बोरू, इ० ची उभी बारीक काडी. ६ ह्या काडीचा अंगांत बोचलेला तुकडा; धस; धसकट (शिरणें, सलणें,उपटणें). ❀ **कोणेकाचा हीर भाजणें** त्याचा नक्षा उतरणें; त्याची फजीती उडविणें. ह्या वाक्प्रचारांत ' हीर ' चा अर्थ ५ आहे.

हीर [सं० वीर्य] **स्त्री०** मागें ' ईर ' पहा.

हीर [**सं०**] **पु०, न०**१वज्र.२हिरा हें रत्न.

हीरक [**सं०**] **पु०** हिरा हें रत्न.

हीरमोड,हिरमोड[**सं०**ह्री(लाज)+मूढ(गांगरलेला)] **पु०** कांहीं कामांत अपयश आल्यामुळें येते ती खचलेपणाची स्थिति (होणें).

हींव [**सं०** हिम] **न०**१थंडी; गारठा.२थंडी वाजून येतो तो ताप (येणें, भरणें).

हीही स्त्री० हसण्याचा किं० खिदळण्याचा आवाज (करणें).

हुं, हूं उ० वा० अ० बरें ! ठीक ! होय !

हुकचूक [**म०** हुकणें+चुकणें] **स्त्री०ए०व०** १चूक;दोष;हरएक प्रकारचे हस्तदोष समुच्चयानें.२ बाण इ०च्या लक्ष्यांत किं०नेमांत कोणत्याही कारणानें झालेली चूक. ३ धोरणांत झालेली चूक.

हुकणें अ० क्रि० १ लक्ष्याला (बाण, धोंडा, इ०) न लागणें. २ (बेत, ध्येय, धोरण, इ०) विफल होणें. ३ पराजित होणें.

हुकमत [अ० हुकूमत] **स्त्री०** १ अधिकार; अमल; सत्ता; नियंत्रणा. २ कोणेकाला वर्तनाची घालून दिलेली सरणी; सांगी. ❀ **हुकमतपन्हा पु०** सत्ताधीश. **हुकमती वि०** कोणेकाच्या ताब्यांत, अमलाखालीं, नियंत्रणेंत, किं० देखरेखीखालीं असलेला. खालीं ' हुकुमत ' पहा.

हुकमा [अ० हुक्म्] **क्रि० वि०**(घडावयास नको त्या गोष्टीसंबंधानें बोलतांना)हटकून;अगदीं खास; उ० पाऊस नको तेव्हां तो हुकमा पडतो; उ० त्याला जेवूं नको म्हटलें तर हुकमा जेवतो.

हुकमी [**अ०** हुक्म्] **वि०** १ कोणेकाच्या अमलांतील; कोणेकाच्या आज्ञेप्रमाणें वागणारा (नोकर इ०). २ न चुकतां लागणारा किं०वेधणारा (बाण); हमखास पडणारें (खेळणाऱ्याचें दान); इच्छिलेल्या वेळीं किं० आजमासानें ठरविलेल्या वेळीं पडणारा (पाऊस); हटकून गुण दाखविणारें(औषध,माला,युक्ति);जींत सेनापतीला खास जय मिळतोच मिळतो अशी (लढाई). ३ निःसंशय आपल्या हक्काची (बाब, गोष्ट). ४ नियमानें आणि न्यायानें चालविलेलें (राज्य इ०). ५ ज्यांत हरएक प्रकारचें हुकूम,आज्ञापत्रें,नियम, इ०च्या नोंदींचे किं० नकलांचें कागद आहेत असें (दफ्तर).

हुकमें [**म०** ' हुकूम ' च्या तृतीयेचें **ए० व०**] **क्रि० वि०** हुकमानें; हुकमाप्रमाणें; हुकमाला अनुसरून.

हुका, हुक्का पुढें ' हुक्का ' पहा.

हुकार [**अ०** हू=(देव) आहे+**म०** कार (प्रत्यय)] **पु०** मुसलमान लोक पत्र लिहितांना किं० हिंदूलोक अहिंदूंना पत्र लिहितांना ' श्री ' च्या जागीं मथळ्यास हा शब्द लिहितात.

हुंकार पु० तुच्छतादर्शक ' हुं ' हा उद्गार.

हुंकार [**म०** हूं+कार] **पु०** १ संमति किं० नापसंती किं० अवधान दर्शविणारा उद्गार. २ धनुष्याचा टणत्कार. ३ जोरानें सोडलेला श्वास. ❀ **हुंकारा पु०** कोणी सांगत असलेल्या गोष्टीकडे किं०हकीगतीकडे आपलें लक्ष्य आहे असें दर्शविणारा हा शब्द आहे; होय; बरें; ठीक; हं;पुढें.

हुकावणें अ० क्रि० कांहीं काम करावयाला जोरानें, आवेशानें, किं० उत्साहानें पुढें सरणें.

हुकी, हुक्की स्त्री० १ कोल्ह्याची ओरड किं० गर्जना. २ कांहीं गोष्ट करण्याची कोणेकाला येते ती लहर किं० उसळी.

हुकुमत, हुकमत [**अ०** हुकूमत] **स्त्री०** अमल; अधिकार; वर्चस्व; उ० ह्या प्रान्तावर पेशव्यांची हुकुमत चालत असे. वर ' हुकमत ' पहा.

हुकू स्त्री० एक अक्षरसुद्धां (तोंडावाटें न काढणें); उ०तो देतो आहे तितके रुपये आतां घे, हुकू करूं नको.

हुकूम [**अ०** हुक्म्] **पु०** १आज्ञा.२पत्त्यांच्या

खेळांत डावापुरता ठरलेल्या जोरावर रंग.३गंजि-फांच्या पानांत चोर नव्हे असें जें खरें पान तें. ® हुकमाबाहेरचा वि०हुकूम नसतां किं० दिला गेलेला नसतां केलेलें, आणलेलें,किं० दिलेलें;ज्याला पूर्वी हुकूम देण्यांत आला नव्हता असा; हुकमा-शिवायचा; सांगीचा नव्हे असा. हुकूमगारदाई [अ० हुकूम+अ० गारत (लूट, नाश)] स्त्री० सैन्यांतील शिपायांचें बंड; वरिष्ठाची आज्ञा न पाळतां केलेली दांडगाई. हुकूमनामा पु० खट-ल्याचा निकाल केल्यावर न्यायाधीश करतात तो निकालाचा कागद;न्यायाच्या निर्णयाचें पत्र. हुकूमबंदा पु० हुकमाप्रमाणें वागणारा; हुकूम पूर्णपणें आणि तकरार न करतां अमलांत आण-णारा; आज्ञाधारक. हुकूमबंदी वि० १ हुकमाला अनुसरून असलेला. २ हुकमाचा बंदा. ३ हुक-मानें बांधलेला. हुकूम हाकमत स्त्री० वर्चस्व; सत्ता; अधिकार; अमल. हुकूम अहकाम पु० अधिकार; सत्ता. हकूमखुदाई स्त्री०देवाज्ञा; मरण. हुकूमबरदार वि० आज्ञाधारक.

हुक स्त्री० प्रभात; पहाट.

हुका, हुक्का [अ० हुक्काह्] पु० तंबाखू ओढण्याचें एक यंत्र;जळत्या तंबाखूचा धूर पाण्यां-त स्वच्छ होऊन तोंडांत ज्या साधनानें येतो तें साधन; गुरगुडी; गुडगुडी. ® हुकामुका पु० ए० व० पुरुष पुरुष किं० पुरुष आणि बायका ह्यांनीं आळीपाळीनें तीच गुरगुडी ओढणें, एकमेकांचे मुके घेणें, इ० रूप फाजिलपणाच्या चेष्टा समुच्चयानें; उ० आलीकडे त्या दोघांचे हुकेमुके अगदीं हिंदस्स घराला जाऊन पोंचले आहेत. हुकेबरदान पु० समर्थाला हुक्का ओढावयाला तयार करून देणारा हुजऱ्या. कोणेकाचें हुक्कापाणी बंद करणें त्याला जातींतून बाहेर टाकणें. टीप.—बहिष्कृत माणसाला आपली गुरगुडी ओढावयास देणें किं० त्याची आपण ओढणें हें निषिद्ध मान-ण्यांत आलें आहे.

हुकी स्त्री० वर ' हुकी, हुकी ' पहा.

हुंगणें स० क्रि० १ (पदार्थाचा) वास घेणें; उ० हीं फुलें हुंगूं नको, तीं देवाला वहावयास मी आणिलीं आहेत. २ (लाक्षणिक) दुस-ऱ्याच्या हालचालीं, मुद्रा, शब्द, दृष्टि, इ० वरून त्याचीं (रहस्यें) धूर्तपणानें हुडकून काढणें. असें करण्यांत जो पटाईत त्याला 'हुंग्या' किं० 'हुंगाड्या' म्हणतात.

हुचमणी पु० हलकट किं० पाजी माणूस.

हुचमली, हुचमुली स्त्री० बुद्धिबळांच्या खेळांत प्याद्यानें राजाला शह देण्याचा एक प्रकार.

हुंचूं न०, स्त्री० यत्किंचित शब्द; ब्र; (निषे-धीं प्रयोग); उ०त्या पंडितानें सभेमध्यें हुंचूं केलें नाहीं; उ० हुंचूं न करतां आतां हें परंडेल पी; उ० चोराला चावला विंचू, चोर करीना हूं कां चूं. टीप.—येथें ' हूं ' ' चूं ' हे शब्द फोडून योजले आहेत. वर ' हूकू ' पहा.

हुच्चा [कानडी] वि० मूर्ख; अचरट; वेडसर, बदफैली.'हुच्चे दिवाण,' 'हुच्चभाई' ह्याच अर्थी.

हुजत, हुज्जत [अ०] स्त्री० १ शेतसारा इ० चा भरणा सरकारांत केल्याबद्दल सरकार शेतकऱ्याला देते ती पावती. २ तकरार; उजू प्रकारें बोलणें, चालणें, इ० व्यवहार न करतां वाकड्या मार्गाचा केलेला अवलंब; घासाघीस (घालणें). ® हुजतखोर, हुजती, हुजत्या वि० भांडखोर; तकरारी.

हुजूर [अ० हुजूर] पु० १ राजाचा दर-बार. २ राजाची स्वारी म्ह० राजेसाहेब स्वतः. ३ राजानें नेमलेले जे अधिकारी ते समुच्चयानें. ४ राजधानी; राजधानीचें मुख्य ठिकाण. ५ राजाच्या वतीनें अमल करणारे जे अधिकारी ते समुच्चयानें किं० त्यांची कचेरी किं० त्यांचा अमल. ५ प्रांताचा अधिकारी किं०त्याच्या अधि-काराचें ठिकाण,—खेडेगावें इ० च्या व्यावर्तकत्वें. क्रि०वि० दरबारांत; राजाच्यापुढें किं० राजाच्या अधिकाऱ्यापुढें;उ० महालांत चोर धरले असतील ते हुजूर पाठवून द्यावे. श० यो० अ० समक्षांत; समोर; पुढें; उ० माझे हुजूर त्याला आणून उभा करा. ® हुजूर कामगार पु० खुद्द राजाच्या तैनातीकडचा अमलदार. हुजूरचौकशी स्त्री० खुद्द राजानें किं० त्याच्या दरबारानें केलेली चौकशी. हुजूरजमा पु० खजिन्यांतून महाला-कडे पाठविलेली रक्कम. हुजूरनेमणूक स्त्री० १ खुद्द राजाच्या कुटुंबाकडे नेमस्त केलेली रक्कम.

२ राजाच्या खाजगीकडची नोकरी. **हुजूरपागा** स्त्री० १ राजाचे किं० सरकारी घोडे समुच्चयानें. २ अशा घोड्यांची पागा. **हुजूरमामला** पु० सरदार इ० कांस सरकारांतून गांव देतात त्यांत जो कांहीं अमल अंशतः सरकारचा असतो तो. **हुजूरमोकद्दमा** पु० राजाच्या दरबारांतच ज्याचा निवाडा करावयाला पाहिजे अशी बाबत किं० असें प्रकरण. **हुजूरसनदी** वि० खुद्द राजानें दिलेली किं० सनद करून दिलेली (जमीन). **हुजूरहशम** पु० खुद्द राजाचे शरीरसंरक्षक शिपायी किं० हुजरे प्रत्येक. **हुजरात, हुजुरात** स्त्री० खुद्द हुजूरची खडी फौज. **हुजऱ्या** पु० सदा यजमानाच्या अगदीं जवळ असणारा आणि त्याचीं हरएक किरकोळ कामें करणारा सेवक.

हुटकणें स० क्रि० १ (कोणेकाला) कांहीं कामाबद्दल घाई करणें किं० तगादा लावणें. २ हालविणें; चाळविणें. ३ (कोणेकाला) हासडा किं० धक्का देणें.

हुटहुट स्त्री० कांहीं गोष्टीबद्दल अत्यन्त उत्कंठा किं० फाजिल उत्सुकता.

हुटहुटणें अ० क्रि० कांहीं गोष्टींबद्दल अत्युत्कंठित झालेलें असणें.

हुटहुटी, हुटहूट स्त्री० फाजिल उत्कंठा; कोणेकाला लाविलेला तगादा (निंदेंत) (क्रि० चालविणें, लावणें, करणें). वर ' हुटहुट ' पहा.

हुटाट, हुटाटा पु० फाजिल उत्कंठा किं० उत्सुकता (भरणें, लावणें).

हुटाटणें अ० क्रि० फाजिल उत्कंठित होणें (निंदेंत).

हुंड पु० १ सोन्याचा मळ किं० सोन्यावर बसलेलें कीट निघून जावें म्हणून विटकर, मीठ, इ० चा लेप त्याचेवर करून त्याला अग्नीची आच देणें (देणें). २ हा संस्कार किं० विटकर, मीठ, इ० द्रव्य. **टीप,**–हा संस्कार सोन्यावर करण्याच्या क्रियेला ' हुंडणें ' म्हणतात.

हुडकणें स० क्रि० शोधणें; धुंडणें. **टीप,**–जो पदार्थ शोधावयाचा त्याचेवर किं० ज्या स्थळीं तो शोधावयाचा त्याचेवर कर्मता येऊं शकते; उ० हरवलेली नथ मी त्या पेटींत हुडकली; उ० हरवलेल्या नथेसाठीं मी सारी पेटी हुडकली.

हुंडका, हुंदका पु० १ रडण्याचा एकदम येतो तो उमाळा (येणें). २ वासरूं मातेचें दूध पितांना कासेस तोंडानें देतें तो धक्का (देणें). ३ डोक्यानें मारलेला धक्का; मुसंडी (देणें, मारणें). ४ दंडानें बाजूकडून दिलेला धक्का.

हुडकाविणें स० क्रि० (पाखरें, गुरें, भिकारी, इ० ना) हाकून देणें किं० उधळून लावणें.

हुडकी स्त्री० वासरानें दूध पितांना मातेच्या कासेस मुखानें दिलेला धक्का.

हुडंगणें अ० क्रि० रिकामपणांत भटकणें.

हुंडण न० १ धावत जाऊन माणूस, पदार्थ, इ० ना शरीरानें मारलेला धक्का (मारणें). २ (तालमीच्या व्यायामांत) भिंत, मल्लखांब, इ० वर दंडानें दिलेला धक्का. ३ मुंग्या, माशा, गुरें, पाखरें, पोरें, इ० चा वेगानें धावणारा किं० उडणारा समुदाय, गर्दी, किं० दाटी (फुटणें, जमणें, येणें, इ०).

हुंडणावळ [म० हुंडी] स्त्री० रुपये इ० ची हुंडी घेतली असतां त्याबद्दल सावकाराला बट्टा, खर्च, इ० संबंधीं जें देय द्यावें लागतें तें.

हुंडणें [म० हुंड] स० क्रि० हुंड ह्या संस्कारानें (सोन्याचा दागिना) उजळणें. मागें ' हुंड ' पहा.

हुंडवा पु० १ कांहीं माल विकण्याचा किं० कांहीं काम करण्याचा कोणेकाला दिलेला मक्ता. २ अनिश्चित उत्पन्न, नफा, मिळकत, इ० ची जी कांहीं बाबत तिच्याबद्दल अमुक पैसे मालकाला द्यावे असा जो झालेला ठराव तो. ३ शेतकऱ्यानें किं० कुळानें सावकाराला किं० गांवकामगारांना अमुक धान्य, फळें, किं० भाजीपाला द्यावा असा ठराव

हुडसाम, हुडसुदूद स्त्री० १ मुलांचा एक खेळ (खेळणें, घालणें). २ ह्या खेळांतील विशिष्ट पदार्थाला शिवावें म्हणून केलेली धावपळ. ३ माणसें, गुरें, इ० चा कोणेक दिशेनें वेगानें चाललेला घोळका किं० समूह.

हुडहुड, हुडहुडी स्त्री० १ थंडीनें किं० तापानें अंगाला सुटतो तो कंप किं० भरतें तें कांपरें (भरणें, भरून येणें). २ कोणत्याही कामाबद्दल परमावधीची उत्कंठा (भरणें, मांडणें, इ०).

हुडहुडणें अ० क्रि० १ थंडीनें किं० तापानें

कंपित होणें किं० थरथरणें. २ अत्युत्कंठेनें कंपित होणें.

हुडहुडा वि० थंडी वाजून येणारा किं० आलेला (ताप, ज्वर).

हुडा पु० ग्रामदेवतंप्रीत्यर्थ भरलेली जत्रा किं० ह्या जत्रेस जाणाऱ्या किं० गेलेल्या लोकांचा घोळका किं० समूह.

हुडा पु० १ बुरूज. २ शेणानें लिंपून काढलेली गोवऱ्यांची किं० शेणींची उभटी रास. ३ कडब्याची रास; गवताची गंजी. ४ घराच्या माथ्यावर गच्ची करून तिच्यावर मांडवासारखी जी रचना निजणें, हवा खाणें, इ० साठीं केलेली असते ती; गच्चीवरची खोली.

हुंडा पु० १ मुलीच्या बापानें वरास द्यावयाची म्हणून ठरविलेली रक्कम; वरदक्षिणा. हुंडा घेतल्याशिवाय लग्नाला उभा राहात नाहीं असा जो प्रतिष्ठित आणि हट्टी वर त्याला 'हुंडेकरी' म्हणतात. २जोंधळ्याचीं कणसें, हरभऱ्याचे घाटे, इ० भाजून त्यांचे दाणे खावयासाठीं काढतात ते समुच्चयानें. ३ भरीव वांबूची एक जात. ४ कांहीं मालाची खरेदी, विक्री, इ० संबंधाचा कोणेकाला दिलेला मक्ता. ५ शेत कसणारा शेताच्या मालकास देतो ती वट रक्कम. ६ गांवकामगार किं० सरकार ह्यांना शेतकरी किं० कूळ देतो ती रकम. वर 'हुंडवा' पहा.७विहिरीच्या पाण्यानें पिकविलेल्या शेतावर वट रकमेनें बसविलेला सारा. असा सारा ठरविणें ह्याला 'हुंडेबंदी' स्त्री०म्हणतात. ८तेल्याच्या घाण्यांतील दाणे चिरडणारें गोल तुळवट,—जें उभें असून आंसाभोंवतीं फिरत असतें. ९ सोन्याच्या दागिन्याला उजळ्यासाठीं विटकर आणि मीठ यांचा लेप करून अग्नींत आंच देणें हा संस्कार (देणें). चपका म्ह० सोन्याला मोरचूत, गेरू, इ० पदार्थ लावून ताव देणें हा संस्कार. मागें 'चपका' पहा. **हुंडाचपका देणें**(किं० **लावणें**)सोन्यावर हरएक प्रकारचे(म्ह०हुंडा देणें, चपका देणें, इ० रूप) संस्कार करणें. **हुंडापांडा** पु० ए० व० लग्नांत वरपक्षाकडील लोकांना हुंडा, करणी, वस्त्रें, इ०द्यावयाचीं देयें समुच्चयानें. **हुंडेकरी** पु० ह्याच प्रतीकांत वर अर्थ १ मध्यें पहा आणि खालीं स्वतंत्र प्रतीकांत पहा.

हुंडाभाडा पु०, **हुंडेंभाडें** न० कोणेक व्यवहारीं भाडें, जकात, सारा, इ० जीं देणीं त्यांचेबद्दल वेगळे वेगळे ठराव न करतां तो व्यवहार कोणेकाच्या जबाबदारीवर टाकतांना त्याला द्यावयास कबूल केलेली वट्ट रक्कम.

हुंडा वि० ज्याचीं शिंगें आखूड किं० खुरटी आहेत किं०ज्याला मुळींच शिंगें नाहींत किं०शिंगें असून मागें वळलेलीं आहेत असा (बैल, गाय, इ०). ❀ **हुंडा बैल** पु० ठोंब्या; ढ;मूर्ख माणूस. **हुंड्या कपाळाचा** वि० ज्याचें कपाळ फारच अरुंद आहे असा (माणूस).

हुंडारणें, हुंदाडणें[हिं० हुंडारना]स० क्रि०१ गाय, म्हैस, बैल, इ० नीं डोक्याच्या तडाख्यानें (माणूस, जनावर, भिंत, इ० वर)प्रहार करणें. २ डोक्यानें (कोणेक पदार्थ, माणूस,इ० ना) पुढें सारणें किं० ढकलणें. ३(कांहीं गोष्ट, सूचना, इ०) तुच्छतापूर्वक दूर सारणें किं० झिडकारणें.

हुंडारणें न० पाण्याच्या लाटांचे किं०लोंढ्याचे प्रहार सोसण्यासाठीं जो धक्का किं० बंधारा रचतात तो. [दिलेलें देय.

हुंडावण [हिं० हुंडावन्] स्त्री० हुंडीवर

हुंडी [हिं०] स्त्री० एका ठिकाणच्या सावकाराकडे पैसे भरून दुसऱ्या ठिकाणच्या सावकाराकडून तितके पैसे मिळावे ह्यासाठीं पहिल्या सावकाराकडून दुसऱ्या सावकारास दाखवावयासाठीं जें पत्र घेतात तें. हें पत्र दुसऱ्या सावकारास दाखविणें ह्या क्रियेला 'हुंडी लावणें 'म्हणतात. ह्या पत्राला'हुंडीपत्र' न० किं० 'हुंडीचिट्टी' स्त्री० म्हणतात. **हुंडीपांडी** स्त्री० ए० व० हुंडी, पत्रें, इ० कागद समुच्चयानें.

हुंडी स्त्री० १ एका ठिकाणाहून उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावावयाचें जें रोप तें.२ बुधला ह्या चर्मपात्राच्या तोंडाला बसवावयाचें फडक्याचें बूच. हें बूच शेणमातीनें सारवून मुंग्या, हवा, इ० च्या प्रवेशापासून त्याचा बचाव करावयाचा असतो. ३परठिकाणीं मेलेला जो आपला गोत्रज त्याच्या मरणाची खबर देणारें पत्र. ४ उन्हाळ्यांत पिकवितात ती जोंधळ्याची एक जात. ह्या अर्थीं अ० व० प्रयोग होतो.

हुडुक पु०, **हुडूक** न० [सं० हुडुक,

हुडुक=डमरु] जें मध्यें चिवळ आणि दोन बाजूंस पसरट असून त्यावर चर्म ताणून बसवून करतात तें वाद्य;कुडमुडें. छहुडुकजोशी, हुडुकजोशी पु० वरील प्रकारचें वाद्य वाजवून भाकितें सांगून भिक्षा मिळविणारा जोशी.

हुडूक न० एक आंबट रुचीचें तोंडीलावणें.

हुडुत्त उ० वा० अ० १ जा ! निघ ! चालतां हो ! पक्षी, गुरें, इ० ना हाकून लावतांना हा उद्गार काढतात. २ छीः ! हट् ! छट् ! कोणेकाला तिरस्कार दाखवितांना हा उद्गार काढतात. ३ तसें नव्हे ! अगदीं खोटें ! ठार चूक !

हुडूक, हुंडू, हुंडुका पु० मागें 'हुंडका' पहा.

हुंडेकरी [**म०** हुंडा+करी (प्रत्यय)] **पु०** दुसऱ्यासाठीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल पोंचविणें किंवा तेथून इकडे आणणें हीं कामें करणारा धंदेवाला.

हुंडेकरी पु० 'हुंडा' **पु०** मध्यें पहा.

हुंडेबंदी मागें 'हुंडा' **पु०** अर्थ ७ मध्यें पहा.

हुंडेभाडें न० वर 'हुंडा' **पु०**मध्यें 'हुंडाभाडा' पहा.

हुणूक स्त्री० १ मुद्दाम कोणेकाचा गैरसमज किंवा खोटा ग्रह होण्यासाठीं केलेलें भाषण किंवा वर्तन (करणें, दाखविणें). २ खूण; चिन्ह; इशारा. ३ कोणेकाची कांहीं काम किंवा कृति करण्याची तऱ्हा किंवा खुबी; हातोटी (येणें, साधणें).

हुत [**सं०**] **वि०** १ अग्नीस अर्पण केलेलें (द्रव्य). २ ज्यांत कांहीं आहुति टाकली आहे असा (अग्नि). ३ (**लाक्षणिक**) जळून रक्षा झालेला (भात, भाकरी, इ०). ४ जळून रक्षारूप झालेलें (घर इ०). ५ आमंत्रिलेला; बोलाविलेला. **न०**अग्नींत टाकलेली आहुति.छ **हुताग्नि वि०** अग्नींत ज्याणें आहुति टाकिली आहे असा. **हुताशन पु०** १ अग्नि. २ शंकर. **हुताशनी स्त्री०** १ फाल्गुनी पौर्णिमा. २ (**मराठींत**) होळीचे प्रसंगीं जाळावयाची सर्पणाची रास. ३ (**मराठींत**) होळी. ४ होळीचा अग्नि. **हुताश पु०** अग्नि.

हुतका पु० १ मुंग्या, माशा, आळ्या, ढेकूण, उवा, इ० चा एकाद्या ठिकाणीं जमलेला किंवा वळवळ करणारा थवा. २ कोणत्याही स्थळीं पोरें, भिकारी, इ० चा गोळा झालेला जमाव. ३ तीव्र कंड सुटली असतां खाजविण्याची प्रवृत्ति (येणें, होणें,सुटणें).४डांस,ढेकूण,इ०चा एकाद्या ठिकाणीं जमाव किंवा त्यांनीं दंश करून दिलेला उपद्रव. ५ धावणें, बोलणें, मारामारी, इ० ची कोणेकाला होते ती अनिवार इच्छा किंवा लहर (येणें.).

हुताट, हुताटा पु०, हुताटकी स्त्री० परमावधीची उत्कंठा किंवा उत्सुकता. **हुताटचा वि०** फाजील उत्सुक किंवा उतावळा.

हुताटणें अ० क्रि० उतावीळ होणें; अति उत्कंठित होणें.

हुताशन, हुताशनी वर 'हुत' मध्यें पहा.

हुतुतू, हुतुतू हमामा पु० १ मुलांचा धावाधावीचा एक खेळ. २ मुलांचा धांगडधिंगा.

हुदकणें, हुदगणें अ० क्रि० १ (घोड्यानें) हिसके देत देत किंवा घेत घेत चालणें.२ (स्वाराला किंवा त्याच्या अंगाला) हिसके बसणें.**स० क्रि०** १ (मूल, माणूस, सूप, झाड, फांदी, इ० ना) हिसके देणें.२(कोणेकाला)धक्के मारून हाकलून देणें.

हुंदका पु० रडण्याचा उद्रेक; रोदनाचा उमाळा. मागें 'हुंडका' पहा.

हुंदका पु० मुंग्या, माशा, इ० चा थवा. वर 'हुतका' पहा.

हुदगणें वर 'हुदकणें' पहा.

हुदडणें स० क्रि० १ (गाय, म्हैस, इ० नीं) डोक्यानें किंवा शिंगांनीं ढकलणें किंवा रेटणें. २ हाकलून देणें.३ (आरोप, टपका) निरस्त करणें किंवा खोटा आहे असें सिद्ध करणें. **अ० क्रि०** (मूल, वासरूं, शिंगरूं, इ० नीं) धावणें, उड्या मारणें, किंवा स्वच्छंदानें बागडणें.

हुंदडा पु० १ डोक्यानें दिलेला रट्टा. २ वासरूं दूध पितांना मातेच्या कासेला मुखानें देते ती ढुसाणी. ३ माणूस, भिंत,इ० ना दंडानें मारलेला धक्का किंवा लाविलेला नेट. ४ गुरें किंवा माणसें ह्यांच्यावर येते ती एकाद्या रोगाची साथ. ५ हीं साथ आणणारें भूत किंवा पिशाच. ६ कोणीही धटिंगण; दांडगेश्वर. ७ सोंगट्यांच्या खेळांत शेवटीं एकच उरलेली फिरती सोंगटी.

हुंदडी स्त्री० दूध पितांना वासरूं मातेच्या

कासेस देते ती ढुसाणी. वर ' हुंदडा ' अर्थ २ पहा.

हुंदाडणें इ० वर ' हुंदडणें ' इ० पहा.

हुदुकणें वर ' हुदकणें ' पहा.

हुदुदू, हुदुदूसुदुदू पु०मुलांचा एक खेळ.वर 'हुतुतू ' पहा.

हुद्दा [अ० उह्दाह्] पु० १ अधिकार; अधिकाराचें स्थान. २ ताशा, मर्फा, आणि ढोल, ह्या तीन वाद्यांचा ताफा किं० संच. ३ हीं वाद्यें वाजविणारे जे असामी ते प्रत्येक. ॐ **हुद्देदार, हुद्देकरी** पु० सुभेदार, मामलतदार, इ०जे सरकारी अधिकारी ते प्रत्येक.

हुद्रक वि० ज्याला अद्यापि चाली शिकविलेल्या नाहींत अशा घोड्याची (चालण्याची हेंगाडी तऱ्हा).

हुनर, हुन्नर, हुनेर, हुन्नेर [फा०हुनर]पु०, स्त्री०, न० कांहीं कारागिरीचा पदार्थ करण्याची कला, खुबी, किं० युक्ति. ॐ **हुनरी** वि० कारागिरीच्या युक्त्या किं० खुब्या जाणणारा; ज्याच्या अंगीं हरएक प्रकारचीं कसबें आहेत असा. **हरहुनरी** वि० हरएक प्रकारच्या युक्त्या, खुब्या, इ० जाणणारा किं० त्यांत तरबेज.

हुनूक मागें ' हुणूक ' पहा.

हुनेर, हुन्नर, इ० मागें ' हुनर ' इ० पहा.

हुपट, हुप्या पु० १ नर वानर किं० माकड. २ माकडांच्या किं०वानरांच्या टोळीचा म्होरक्या. ३ निरुद्योगीपणांत भटक्या मारणारा माणूस.

हुबकणें स० क्रि० १ पकडणें; एकदम हल्ला करून किं० धाड घालून (कांहीं पदार्थ) घेणें किं० मिळविणें. २ (दुसऱ्याचा पैसा, ऐवज, इ०) लाटणें, लुटणें, किं० हिरावणें. अ० क्रि० कोसळणें; धाडदिशीं पडणें; ढासळणें.

हुंबणें अ० क्रि० कण्हणें; कुंथणें (कवितेंत).

हुंबर स्त्री० गुराखी पोरांचा एक खेळ (घालणें, खेळणें).

हुंबरड स्त्री० अनेक गायीम्हशींचें एकदम [ओरडणें.

हुंबरणें अ० क्रि० १ (गायीनें किं० बैलानें) ओरडणें किं० रेकाटणें. २ उन्हाच्या तापानें (तोंड) शुष्क किं० निस्तेज होणें.

हुबरहु क्रि० वि० पुढें 'हुबहू,' 'हुबेहूब' पहा.

हुंबरी स्त्री० गुराखीपोरांचा एक खेळ (घालणें, खेळणें). वर ' हुंबर ' पहा.

हुंबरीतुंबरी मागें ' हमरीतुमरी ' पहा.

हुंबल, हुंबली स्त्री०, **हुंबलें** न० एक खेळ (घालणें, खेळणें). वर ' हुंबरी ' पहा.

हुबहू,हुबेहू,हुबेहूब,हुबरहु क्रि०वि०पूर्णपणें (एक पदार्थ दुसऱ्याशा सारखा); प्रत्येक बाबतींत (अगदीं सारखा).

हुंबारडा, हुंबरडा, हंबरडा पु० गायी, म्हशी,इ० चें ओरडणें.

हुंबारणें वर ' हुंबरणें ' पहा.

हुमण पु०, न० घुबड हा पक्षी.

हुमणी स्त्री० वासरूं दूध पीत असतां मातेच्या कासेस तें मारते ती ढुसाणी.

हुमरडा, हुमारडा, हुमरणें वर ' हुंबरडा हुंबरणें ' इ० पहा.

हुमरणें अ० क्रि० अंगांत ताप भरला असतां (तोंड) सुजल्यासारखें आणि तांबूस होणें किं० दिसणें. ' तोंड हुमरून येणें ' ह्याच अर्थी.

हुमरातुमरी, हुमरीतुमरी स्त्री० एकमेकांना अरेतुरे करून केलेलें भांडण.

हुमरी, हुम्मल, हुमल स्त्री० १ गुराखीपोरांचा एक खेळ (घालणें, खेळणें). २ तकरार करणें; बयादी लावणें; टोलवाटोलवी करणें.

हुमला पु० मुंगीसारखा एक प्राणी. हा तांबूस असून त्याचा दंश तीव्र वेदना उत्पन्न करणारा असतो.

हुमा खालीं ' हुम्या ' पहा.

हुमाणा पु०, **हुमाणें, हुमणें** न० कोडें; उखाणा.

हुमारडा पु० गाय इ० चें ओरडणें.

हुम्मा [फा० हुमा] पु० १ एक पक्षी. हा शुभ सुचविणारा असून तो कधीं जमीनीवर बसत नाहीं आणि तो आकाशांतून उडत असतां त्याची सावली ज्याच्या डोक्यावर पडेल तो राजा होऊन मुकुट धारण करतो अशी लोकांची समजूत आहे. २ घोड्याच्या डोक्यावर शोभेसाठीं लावितात तो तुरा.

हुम्या, हुमा [म० हुं=होय] वि० १ कोणीं कांहींही विचारलें तरी कांहीं उत्तर न देतां

आणि जागेवरून न हालतां नुसतें 'हुं' म्हणणारा (निंदेंत). २ मुखस्तंभासारखा बसणारा (निंदेंत). ३ संथ, सुस्त, आळशी, मट्ठ (निंदेंत).

हुरकुंड पु० एक खेळ.

हुरडणें स० क्रि० होरपळून किं० भाजून [काढणें.

हुरडफुंक्या [म० हुरडा+फुंकणें] वि० हुरड्यांतील राख फुंकून मालकाला तो खावयाला देण्याच्याच उपयोगाचा म्ह० कर्तृत्वशून्य आणि निरुपयोगी असा (मनुष्य).

हुरडभाज [म० हुरडा+भाजणें] स्त्री० १ हुरडा भाजणें ही क्रिया. २ साधारणपणें भाजून किं० होरपळून किं० शेकून काढणें ही क्रिया.

हुरडा पु० १ मका, जोंधळा, वाटाणा, इ० चीं कणसें किं० शेंगा भाजून त्यांचे खावयासाठीं तयार केलेले दाणे समुच्चयानें. २ ज्याचे दाणे भाजून खावयाजोगे झाले आहेत अशा वाढीचा जोंधळा, मका, इ० चीं कणसें किं० वाटाणा इ० च्या शेंगा. ꣸ **करड हुरडा पु०** निबर झाल्याकारणानें ज्याचे किं० ज्यांतील दाणे भाजून खाण्याजोगे राहिले नाहींत अशीं कणसें, शेंगा, इ०. **बामणी हुरडा, ब्राह्मणी हुरडा पु०** हुरडा करण्यासाठीं भाजावयाला निबरपणामुळें निरुपयोगी कणसें,–जीं शेतकरी लोक भिक्षा मागावयाला शेतावर आलेल्या ब्राह्मणांस देतात तीं समुच्चयानें. **शेत हुरड्यास येणें** हुरड्यासाठीं कणसें तोडण्याच्या स्थितीस शेत येणें.

हुरण न० १ मुंग्यांचा थवा किं० जमाव. २ एक प्रकारची मुंगी. ३ अनेक मनुष्यांचा जमाव.

हुरणी, हुरणें पुढें 'हारणी,' 'होरणें' पहा.

हुरदंग, हुरदंगा, हुडदुंग पु० धांगडधिंगा; धिंगामस्ती; दांडगेपणाचे चाळे किं० खोड्या समुच्चयानें.

हुरदावळ [म० हृदय+आवली]पु०, स्त्री० घोड्याच्या पोटावरील किं० छातीवरील लांबसर केशांचा भोंवरा.

हुरपळ, हुरपळा, हुरफळणी, होरपळ[म०] हुरपळणें किं० होरपळणें ही क्रिया.

हुरप (-पा-)ळणें, हुरफळणें, होरपळणें स० क्रि० अग्नीनें भाजणें; उन्ह, अग्नि, इ०च्या उष्णतेनें तप्त करणें किं० पोळणें. अ० क्रि० १ भाजलें किं० तापविलें जाणें. २ व्यापारादिकांत (कोणेकानें) ठोकर खाणें.

हुरमट [म० उर्मट] वि० उर्मट; उद्धट.

हुरमत [अ०] स्त्री० आबरू; पत; लौकिक. ꣸ **हुरमतखाऊ, हुरमतघेऊ, हुरमतघेणा** वि० ज्यांत किं० जेणेंकरून कोणेकाची पत, आबरू, किं० लौकिक यांना बाध किंवा धोका येतो किं० येण्याचा संभव आहे असा (व्यवहार, वर्तन, काम, इ०). **हुरमतीचा, हुरमतदार, हुरमती** वि० लौकिकवान्; आबरूदार; प्रतिष्ठित; संमान्य.

हुरमूज, हुरमोज [अ०] स्त्री० काचेसारखी एक माती. ꣸ **हुरमुजी, हुरमोजी** वि० ह्या मातीच्या रंगाचा (कांहीं पदार्थ,–मोती, वस्त्र, इ०).

हुररेवडी, हुरली, हुरवावडी स्त्री० कोणेकाची केलेली फजीती किं० उडविलेला बोऱ्या (करणें).

हुरशी स्त्री० हुरूप; ईर्ष्या; वीरश्री; उत्साह.

हुरहुर स्त्री० १ अस्वस्थपणा; शांति नाहीं अशी स्थिति. २ आपल्या हातून कांहीं चुकी झाली असतां होतो तो पश्चात्ताप. ३ कांहीं गोष्ट घडून यावी म्हणून जी अति उत्कंठा लागते ती.

हुरहुरणें १ आपल्या हातून झालेल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप पावणें किं० अस्वस्थ होणें. २ कांहीं गोष्टीसंबंधानें उत्कंठित होणें.

हुरळणें, हुराळणें अ० क्रि० १ आपलें बलाबल न पाहातां कांहीं कामास प्रवृत्त होणें. २ कांहीं गोष्ट करण्याबद्दल फाजील उत्कंठित होणें. ३ कांहीं कामीं यश मिळाल्याकारणानें फाजील गर्विष्ठ होणें; फुशारून जाणें. ४ कोणी आपली थोडीशी स्तुति केल्यानें शेफारून जाणें. स० क्रि० (कोणेकाला) कांहीं भलती गोष्ट करावयाला उत्तेजन देणें.

हुरा पु० एक झाड.

हुरावणें अ० क्रि० आपलें सामर्थ्य विचारांत न घेतां कांहीं जड कार्य करावयास प्रवृत्त होणें.

हुराळा पु० भाजणें, तापविणें, इ० क्रिया.

हुरूप स्त्री० उत्साह; अवसान; विघ्नांना न जुमानतां प्रयत्न करण्याकडे किं० प्रयत्न चालू ठेवण्याकडे प्रवृत्ति (धरणें). पुढें 'हूप' पहा.

हुरूम [**अ०** हुर्म=मन, अंतःकरण] **स्त्री०** निश्चय; अवसान; नेट.

हुर्यो, हुर्रे उ० वा० अ० कोणेकाची फजीती उडवितांना हा उद्गार काढतात. **स्त्री०** फजीती; बोऱ्या (करणें, उडविणें, होणें).

हुर्रे उ० वा० अ० पक्ष्यांना उडवून लावतांना हा उद्गार काढतात. **स्त्री०** फजीती; बोऱ्या (करणें).

हुलकट स्त्री० परचक्र, दरवडेखोर, इ० चाल करून आले असतां लोकांची होते ती धांदल किं० धावपळ (माजणें, होणें, करणें).

हुलकटणें भाव क० क्रि० बंड उठणें; अशांततेची स्थिति असणें; दंगल चाललेली असणें; उ० गंगातीराकडे हल्लीं हुलकटलें आहे, तिकडे जाणें धोक्याचें झालें आहे.

हुलकावणी [**म०** हुलकावणें] **स्त्री०** आपल्या खऱ्या गतीचा रोख दुसऱ्याला न कळूं देतां त्याला भलत्याच रोखाकडे प्रवृत्त करणें; त्याची दिशाभूल करणें (दाखविणें).

हुलकावणें [**म०** हूल] **स० क्रि०** आपला खरा रोख किं० आपलें खरें धोरण (प्रतिपक्षाला) कळूं न देणें; (प्रतिपक्ष्याची) दिशाभूल करणें.

हुलगा, हुलवळा, हुलोळा पु०, हुलगी स्त्री० कुळीथ नांवाचें द्विदल धान्य.

हुलगूड न० एक पक्षी.

हुलचुतिया, हुला पु० ठोंब्या; मूर्ख; अजागळ.

हुलड, हुल्लड [**हिं०**] **स्त्री०** १ परचक्र, दरवडेखोर, इ०ची एकाधा गांवावर धाड आली असतां लोकांची होते ती धांदल, धावपळ, इ०. २ कोणेकाविरुद्ध केलेला गिल्ला किं० गवगवा किं० आरडाओरडा (उठणें, करणें, इ०).

हुलसरा पु० जमाबंदीच्या खात्यांतील एक अमलदार. [' हूलस्वार ' पहा.

हुलसार, हुलस्वार पुढें ' हूल ' मध्यें

हुलहुल्या [**म०** हुलहुल] **वि०** सदा चंचल; जो कधींही स्वस्थ बसत नाहीं असा; जो सदा धांदलींत असतो असा.

हुलहूल स्त्री० कोणेकाला कांहीं कामीं घाई करणें किं० त्याच्या मागें नेट किं० तगादा लावणें (मांडणें, करणें).

हुला मागें ' हुलचुतिया ' पहा.

हुलुसवार वि० नाजूक, कोमल (माणूस, प्रकृति, पदार्थ).

हुल्लड मागें ' हुलड ' पहा.

हुवळा वि० म्होरक्या; पुढारी; टोळीचा मुख्य.

हुशार [**फा०** हुषियार्] **वि०** १ बुद्धिमान्; तरतरीत; तल्लख. २ दक्ष; सावध; जागरूक. ३ झोपेंतून उठून पुन्हा तरतरीत झालेला. ४ आजारांतून बरा होऊन पूर्वीप्रमाणें कामकाज करावयाला समर्थ झालेला. ॥ **हुशारी स्त्री०** १ कामकाज करण्यांत तल्लखपणा; कामांत किं० काम लवकर आटोपण्यांत तरतरी. २ दक्षता; सावधगिरी; जागरूकता. ३ उघड्या हवेंत गेल्यानें वाटतो तो आराम. ४ मूर्च्छेंतून उठल्याची स्थिति. ५ श्रमानंतर विसावा घेतल्यानें वाटतो तो आराम.

हुशारणें [**म०** हुशार] **अ० क्रि०** १ झोपेंतून जागें होणें. २ झोपेंतून किं० मूर्च्छेंतून उठल्यावर पुन्हा तरतरीतपणानें काम करावयाला समर्थ होणें.

हुशी, हुसी स्त्री० चेंडू जमीनीवर किं० भिंतीवर आपटला असतां त्याचा वर उठण्याचा किं० परत येण्याचा जो जोर तो; झाडाची फांदी ओढून किं० वाकवून नंतर एकदम सोडली असतां तिचा चटकन् परत वर जाण्याचा जो जोर तो.

हुश्श, हुस्स उ० वा० अ० १ पक्षी इ० ना उडवून लावतांना काढतात तो उद्गार. २ उकाड्यानें किं० उन्हाच्या तापानें किं० अग्नीच्या शेकानें जर्जर झालेला मनुष्य गार वाऱ्याची झुळूक अंगास लागतांच काढतो तो आरामाचा उद्गार.

हुसकटणें स० क्रि० १ (पक्षी इ०ना) उडवून किं० उधळून लावणें किं० हाकलून लावणें. २ (पदार्थ) अस्ताव्यस्त फेकून किं० उडवून (त्यांची) नासाडी करणें. ३ (कांहीं कामांत) विघ्न आणणें किं० तें कुंठित करणें किं० बिघडविणें. **अ० क्रि०** १ (गाय, म्हैस, इ० नीं) वाघ इ०ना पाहून बुजणें. २ माघार खाणें; दबकणें; कचरणें.

हुसकणें स० क्रि० १ (गुरें, पक्षी, इ० ना) हाकलून देणें किं० उधळून लावणें. २ (कांहीं कार्य) बिघडविणें; (कांहीं कामांत) गोंधळ,

बखेडा, किं० अव्यवस्था माजविणें. ३ हिसके देऊन (पदार्थ) हालविणें. ४ (लक्ष्य, शिस्त, धोरण, इ०) सोडणें किं० चुकाविणें.

हुसका पु० मनाला लागलेला कांहीं गोष्टींचा ध्यास; मनांत सदैव जागृत असलेली कांहीं कल्पना.

हुसळसें, हुसळी मागें 'उसळणें,' 'उसळी' पहा.

हुसी मागें 'हुशी' पहा.

हुसूक स्त्री० १फटाकड्याची वात किं० दारूची ओळ आवाज न करतां जागच्या जागींच पेटून जाणें. २ कांहीं कार्यांत विफलता किं० मनोरथाचा भंग. [मासा.

हुसैनी स्त्री० खाऱ्या पाण्यांतील एक मोठा

हुस्कार (–रा) पु० जोरानें सोडलेला श्वास.

हुहा स्त्री० आपण दक्ष, सावध, किं० हुशार आहों हें दाखविण्यासाठीं शब्द न उच्चारतां कंठांतून काढलेला आवाज (करणें).

हुळम पु० वांगीं, मिरच्या, इ० च्या झाडांवर पडतो तो एक रोग.

हुळवाजणें अ० क्रि० १ निघून जाणें. २पळून जाणें; सुळुकूदिशीं निसटून जाणें.३ भटक्या मारीत हिंडणें.

हुळहुळणें अ० क्रि० १ अंगावरून मुंगी चालली किं० अंगावर केश फिरविला म्हणजे (अंगाला) कंड सुटणें किं० गुदगुल्या होणें. २ अंगाला अशी भावना उत्पन्न करीत करीत (मुंगी, ढेकूण, पिसू, इ०) अंगावरून चालणें. ३ बोलावयाला (जीभ) किं० मारावयाला(हात) अत्युत्कंठेनें वळवळत असणें.

हुळहुळा वि० फार घर्षण झाल्यामुळें कोणत्याही पदार्थाचा स्पर्श सहन करण्यास असमर्थ झालेली (शरीराची त्वचा).

हुळहुळी [म० हुळहुळणें] वि० अति चपळ आणि लहान अशी एका जातीची (मुंगी).

हुळा [सं० होलक, होळा] पु० ओल्या हरभऱ्याचे खावयासाठीं भाजलेले घाटे समुच्चयानें.

हूं उ० वा० अ० होय ! ठीक ! बरें !

हूक स्त्री० १ कोल्ह्याची आरोळी.२ समाजांत उठलेली किं० पसरलेली बातमी किं०अफवा, ३ कंबर, पाय, इ०त भरते ती उसण. ४ प्रभात; पहाट. ५सकाळचा संधिप्रकाश.

हूड वि० मारामारी, भांडण, किं० दांडगाईचे चाळे करणारा; आर्ष; धटिंगण.

हूप न०, स्त्री० वानर किं० माकड ह्यांचा स्वजातीय शब्द. [मागें 'हुरूप' पहा.

हूप पु०, स्त्री० उत्साह; अवसान (धरणें).

हूल [हिं०] स्त्री० १ कोणेकाला फसविण्यासाठीं केलेला खोटा आविर्भाव; कोणेकाची दिशाभूल करण्यासाठीं केलेलें भाषण,वर्तन, इ०; हुलकावणी (दाखविणें). २ गांवांत उठलेली फारशी साधार नव्हे अशी बातमी किं० अफवा. ३ कोणी माणूस, जनावर, इ० स्थलविशेषीं असल्याचें किं० येऊन गेल्याचें कांहीं चिन्ह. ४ दुफाशी सोंगट्यांच्या खेळांत कदललेल्या जुगापुढें पक्की व्हावयास जाणारी जी सोंगटी ती. ॐ **हूलचाल स्त्री०** दंगा; गडबड; अशान्तता. **हूलस्वार पु०** शत्रूची टेहळणी करावयासाठीं सैन्याच्या पुढें गेलेले जे घोडेस्वार ते प्रत्येक. हे स्वार शत्रूची कांहीं हालचाल दिसतांच आपल्या सैन्याला ती खबर देतात.

हूळ [म०हूल] स्त्री०१भयानें झालेली ओरड. २ परचक्र, चोरांचें येणें, इ० मुळें गांवकऱ्यांची होते ती धांदल किं० धावपळ. ३ (कोणेकाची) झालेली फजीती किं० उडालेला बोऱ्या. ॐ**कोणेकाची हूळ काढणें** त्याला गाढवावर बसवून त्याची धिंड काढून अप्रतिष्ठा करणें.

हृत् [सं० हृ] वि० हरणारा, चोरणारा, नष्ट करणारा (उपपद तत्पुरुषाच्या अंतीं); उ० प्राणहृत्, पुण्यहृत्, इ०.

हृत [सं०] वि० हरण केलेलें; चोरलेलें; घेतलेलें; उ० हृतसर्वस्व (म्ह० ज्याचें सर्वस्व नष्ट झालें आहे असा).

हृद् [सं०] न० १ मन; अंतःकरण. २ हृदय; काळीज. ३ आत्मा. ॐ **हृदावर्त पु०** घोड्याच्या उरावरील लांबसर केशांचा भोंवरा. मागें 'हरदावळ' पहा. **हृद्गत वि०** १ योजलेलें. २ मनांतील. ३ हृदयांत गुप्त. **न०** १ हेतु. २ अंतःकरणांतील गूढ विचार किं० बेत. **हृत्पिंड न०, पु०**काळीज. **हृद्रोग पु०**१ काळजाचा विकार. २

चिंता; कांहीं गोष्टींबद्दल लागलेली विवंचना. ३ अंतःकरणाला बोचत किं० सलत असलेली कांहीं गोष्ट. **हृत्ताप पु०** अंतःकरणाला झालेला ताप किं० दुःख. **हृदाकाश पु०** १ हृदयाची पोकळी. २ हृदय. **हृदिस्पृश् वि०** १ अंतःकरणास वेधणारा. २ प्रिय; आवडता. ३ सुंदर; मोहक.

हृदय [**सं०**] **न०** १ काळीज. २ अंतःकरण. ३ छाती; ऊर. ४ मन. ५ इच्छा; हेतु. ६ प्राण; जीवित. ७ पदार्थांचा आंतला भाग; गाभा. ८ रहस्य; मर्म; तत्त्व. ८ अहंकार. ९ अंतःकरणांतील गुप्त गोष्ट. ॐ **अश्वहृदय न०** १ शालिहोत्र; घोड्यासंबंधाचें शास्त्र. २ घोड्यावर बसण्याची कला. मागें ' अश्व ' मध्यें पहा. **हृदयेश न०** पति. **हृदयंगम वि०** १ मोहक. २ प्रिय. ३ सुंदर. ४ सुसंगत (भाषण). **हृदयग्रंथि पु०** १ अविद्यारूप संसारबंधन. २ वासनासमूह. **हृदयग्राही** [**सं०** हृदयग्राहिन्] **वि०** मोहक; सुंदर; चित्तवेधक. **हृदयशून्य वि०** १ कठोर अंतःकरणाचा; क्रूर स्वभावाचा. २ अरसिक. ३ निर्विकार; फाजील शांत. **हृदयालु, हृदयी वि०** सुस्वभावी; दयाळू.

हृद्य [**सं०**] **वि०** १ आल्हादक; रम्य. २ प्रिय; आवडता. ३ मायाळू; दयाळू. ४ मनापासूनचें.

हृषित [**सं०**] **वि०** हर्ष पावलेला.

हृष्ट [**सं०**] **वि०** १ हर्ष पावलेला; आनंदित. २ विस्मित. ३ रोमांचित. ॐ **हृष्टपुष्ट वि०** खाऊन पिऊन धष्टपुष्ट झालेला आणि आनंदी.

हे [**सं०**] **उ० वा० अ०** संबोधनार्थी; उ० हे देवा ! मला ह्या पारतंत्र्यांतून लवकर सोडीव.

हेकट (**–ड**), **हेंकट, हेंगट, हेंकट** (**–ड**) **वि०** हट्टी; हेकेखोर; दुसऱ्यानें सांगितलेली हिताची गोष्ट न ऐकतां आपल्याच लहरीप्रमाणें वागणारा. ' हेकडखोर, ' ' हेकलवाईक, ' ' हेकडवाईक ' हे ह्याच अर्थाचे शब्द आहेत.

हेकणें (गाय, म्हैस, इ० नीं) खोकणें.

हेका पु० दुसऱ्याचा हितोपदेश, विचार, विधान, आक्षेप, इ० कडे लक्ष्य न देतां आपल्या लहरीनें चालण्याची जी कोणेकाची प्रवृत्ति ती; हट्ट; दुराग्रह (धरणें). ॐ **हेकेखोर वि०** वरील प्रकारचा ज्याचा स्वभाव आहे असा.

हेक्का [**सं०**] **स्त्री०** उचकी.

हेंगड, हेंगाडा, हेंगडा वि० १ ज्याला कोणतीही कृति किं० काम सफाईनें आणि व्यवस्थितपणें करतां येत नाहीं असा; ज्याला कांहीं काम करतांना सरळ आणि सोपा मार्ग सुचत नाहीं आणि जो लांबच्या मार्गानें तें काम करतो तो; अडाणी. २ वाकड्यातिकड्या किं० अडाणी प्रकारचें (काम); कर्कश किं० कठोर (भाषा); गैरसोयीचा किं० न शोभणारा (पोशाख); आपल्याला परिचित नव्हे म्हणून विचित्र वाटणारें असें जें दुसऱ्याचें कांहीं तें. ॐ **हेंगाड दासी स्त्री०** अडाणी, हट्टी, आणि हेकट स्त्री. **हेंगाडमत न०** मूर्खपणाचें मत; अडाणी समजूत. **हेंगड तट्टू न०** १ हट्टी आणि हेकट माणूस. २ अडाण्यासारखें भाषण किं० वर्तन करणारा माणूस. **हेंगडमेंगड, हेंगडामेंगडा वि०** १ भिकार; कुचकिमतीचा; टाकाऊ (दागिना, पशु, पदार्थ, नोकर, इ०). २ मूर्खपणाचें (भाषण, विधान). **हेंगडमेंगड स्त्री०, न०, हेंगड्डं मेंगड्डं न०** भिकार, टाकाऊ, कुचकिमतीचा (पदार्थ, पशु, लेख, भाषण, दागिना, माणूस, इ०).

हेंगडाविणें [**म०** हेंगडा] **स० क्रि०** (कांहीं चालरीति, भाषा, पोशाख, व्याख्यान, तऱ्हा, इ० चा) उपहास किं० टवाळकी करणें.

हेंगल स्त्री० अडाणी समजुतीचा वाद; हुज्जत (घालणें); दुसरा मनुष्य जें सांगत आहे तें ज्याला समजत नाहीं आणि म्हणून तो ज्या मूर्खासारख्या हरकती किं० अडथळे पुढें आणतो ते समुच्चयानें (घालणें).

हेंगाडेंगी स्त्री० अनादर, उपहास, थट्टा, टवाळकी (करणें, मांडणें, चालविणें).

हेंगाळणें स० क्रि० हेटाळणें; तुच्छतेनें अनादरणें; झिडकारणें.

हेजीब [**अ०** हाजिब्] **पु०** १ मामलतदार इ० गांवकामगारांचा मदतनीस किं० कारकून. २ वकील. ३ नोकर, हुजऱ्या,– सामान्यतः. ॐ **हेजिबी स्त्री०** शिष्टाई; दूताचें काम.

हेट [**हिं०** हेटाह्] **क्रि० वि०** खालीं; खालच्या प्रदेशीं (दर्यावर्दी लोकांचा शब्द); उ० हें गलबत हेट जातें आहे; उ० ओझीं हेट ठेवा आणि वरती माणसें बसवा. **पु०** साविर्ली

नदीच्या दक्षिणेकडचा प्रांत (समुद्रकांठच्या लोकांचा शब्द);उ० यंदा हेट प्रांत चांगला पिकला. ꙮ **हेटकरी पु०** १ हेटप्रांतींचा राहाणारा. २ हेटप्रांतांतील बरकंदाज शिपायी. बरकंदाज म्ह० बंदूक मारणारा. मागें ' बरकंदाज ' पहा. **हेट-बाहेरचा वारा पु०** वायव्य दिशेकडचा वारा.

हेटा, हेटाशेटा वि० १ हलकट,नीच(माणूस). २ छाकटा (माणूस). ३ रंगेलपणाचीं, किं० छाकटेगिरीचीं (कृत्यें).

हेटाळणी, हेटाळी,हेटाळकी स्त्री०, हेटाळा पु० [म० हेटाळणें] तुच्छतेनें कोणेकाला दिलेली वागवणूक; झिडकारणें; अनादर.

हेटाळणें स० क्रि० (कोणी माणूस, वर्तन, भाषण, पदार्थ, इ० ना) झिडकारणें किं० तुच्छ करणें किं० अनादरणें.

हेटीमेटी स्त्री० १ तुच्छता; तिरस्कार; अनादर; झिडकारणें. २ निष्काळजीपणा; दुर्लक्ष्य. बेपरवाई. ꙮ **हेटीमेटीखालीं क्रि० वि०** आळसांत, टवाळक्यांत, किं० उनाडक्यांत.

हेड स्त्री० गायी,म्हशी, घोडे, बैल,इ०पशूंचा विकावयासाठीं व्यापारी लोक एका गांवाहून दुसरीकडे नेतात किं०आणतात तो तांडा किं०कळप. ꙮ **हेड्या** [**म०** हेड] **पु०** १ गायी, म्हशी, इ० जनावरें गांवोंगांव विकावयास नेऊन तीं विकून चरितार्थ करणाऱ्या लोकांच्या जातीचा कोणीही माणूस. **२** हरएक ठिकाणची माहिती ज्याला आहे,अमुक पदार्थ अमक्या गांवीं अमक्या मनुष्यापाशीं मिळेल असें सांगूं शकणारा मनुष्य.

हेंडगा पु० १ भातेण, नाचणकांड, साऱ्याण, चिपाड, इ० चा डोईवरून वाहून नेलेला भारा. २ घराच्या गवती छपराच्या आढ्याला किं० कडांना जे गवताचे उंचवटे बांधलेले असतात ते प्रत्येक.

हेंडगूळ न० १ कुतऱ्याचें शिश्न (गुंतणें, लागणें). २ कुतराकुतरीचें मैथुनोत्तर अडकलेलें जोडपें.

हेडंबा [**सं०** हिडिंबा] **स्त्री०** ओंगळपणामुळें विरूप दिसणारी स्त्री. मागें ' हिडिंबा ' पहा.

हेडली स्त्री० मृतविधवेचें पिशाच.

हेडस, हेडसफेडस वि० ओंगळ; किळसवाणा; घाणेरडा. **हेडसफेडस क्रि० वि०** टवाळकी करून; तुच्छता दर्शवून; उपहासपूर्वक. **न०, स्त्री०** कोणेकाला दाखविलेली तुच्छता; झिडकारणें;तिरस्कार(करणें, दाखविणें,मांडणें).

हेडसाविणें, हेडाविणें स० क्रि० तुच्छ करणें; झिडकारणें; अनादरणें.

हेडा पु० खाजणांत म्ह० खारट जमीनींत उगवतें तें गवत. हें गुरांना पुष्टिदायक असतें.

हेंडाळणी, हेंडाळी,हेंडाळणें वर 'हेंटाळणी,' ' हेंटाळी, ' ' हेंटाळणें ' पहा.

हेंडाळू पु० गोराडू हा कंद,–जो उपवासाला खातात.

हेडीस इ० मागें ' हेडस ' पहा.

हेंडूकमेंडूक न० श्वमैथुन (गुंतणें, लागणें).

हेंडेहोळकर पु० अ० व० वात्रट आणि टवाळ माणसें,–होळीच्या सभोवतीं जमलेल्या मागसांप्रमाणें वागणारीं.

हेड्या वर ' हेड ' मध्यें पहा.

हेण्याचा पु०खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

हेत [**सं०** हेतु] **पु०** उद्देश; धोरण; उत्कंठेनें अपेक्षिलेली किं० इच्छिलेली कांहीं गोष्ट; उ० डोळ्यांदेखत मुलाचें लग्न व्हावें एवढामात्र आतां हेत राहिला आहे. ꙮ **हेतप्रीत स्त्री०** कृपालोभ; प्रेम आणि सहानुभूति. [३ इजा.

हेति [**सं०**] **पु०, स्त्री०** १ शस्त्र. २ साधन.

हेतु [**सं०**] **पु०** १ उद्देश; ध्येय. **२** निमित्त; कारण. ३ साधन. ४ (**न्याय**) अनुमानकारण. ५ तर्कशास्त्र. ६ पुरावा; उपपत्ति. ७ उगम; उगमाचें स्थान. ꙮ **हेत्वाभास पु०** (**न्याय**) भ्रामक हेतु; व्यभिचार, विरुद्धता, असिद्धि, सत्प्रतिपक्षता, आणि बाध, ह्या पांच दोषांनीं युक्त असें विधान. **हेतुगर्भ वि०** ज्यांत हेतु गर्भित आहे असें; सहेतुक.**हेतुवाद पु०** १ वादविवाद. २ कपट. ३ हेतूचा श्रद्धारहित शोध. **हेतुगर्भ विशेषण न०** ज्यांत हेतु किं०कारण दिलेलें असतें असें विशेषण.**हेतुशास्त्र न०**तर्कशास्त्र. **हेतुमान् वि०** ज्याला हेतु आहे असा.**हेतुमाला स्त्री०**मागें ' कारण ' मध्यें ' कारणमाला ' पहा.

हेतुक [**सं०**] **पु०** १ हेतु (सर्व अर्थीं). २ हेतुवाद करणारा. **वि०** (समासान्तीं) अमुक

हेतु ज्याला आहे असा; उ० ज्ञानहेतुक विद्या ही श्रेयस्कर होय,वादहेतुक विद्या ही निंद्य होय.

हेद पु०,स्त्री०, **हेदी** स्त्री०एक झाड. ह्याच्या लाकडाचा रंग पिवळसर असतो.

हेंदर स्त्री०, न०, **हेंदररेंदड** स्त्री०केरकचरा; ओंगळ पदार्थांची रास; उकिरडा. **हेंदरा** वि० ओंगळ; गलिच्छ; कळकट; घाणेरडा.

हेदू, हेद् पु० वर ' हेद, हेदी ' पहा.

हेपलणें, हेपालणें स० क्रि० (स्त्रीशीं) संभोग करणें.

हेपसलिंगा, हेपसलुंगा, हेपुसलुंगा वि० पादरफुसका; अशक्त; निःसत्त्व; निर्बल (माणूस, पदार्थ इ०).

हेबळणें, हेबाळणें, हेबालणें, हेबलणें स० क्रि०(पदार्थ, पशु, माणूस, इ० चा) दांडगाईनें, कठोरपणानें, किं० क्रूरपणानें उपयोग करणें किं० उपभोग घेणें; अव्यवस्थितपणें उपयोगास लावणें.

हेबाळणें अ० क्रि० हेलकावे खाणें; खालीं-वर जाणें किं० सरणें; (पदार्थ) उडत किं० नाचत राहाणें; उ० समुद्राच्या पाण्यांत होडी हेबाळत होती.

हेम [सं०] न० सोनें. खालीं ' हेम ' पहा.

हेम [सं० हेमन्] पु०१हिंवाळा.२बुध हा ग्रह. न० सोनें. ❀ **हेमांग** पु० १ गरुड. २ ब्रह्मदेव. **हेमाद्रि** पु० मेरुपर्वत. **हेमकार** पु० सोनार. **हेमकेश** पु० शंकर. **हेमदुग्धक** पु० उंबर. **हेमकूट** पु० एक पर्वत. **हेमगर्भ** पु० (वैद्यक) एक मात्रा.

हेमटी स्त्री० वासरूं मातेचें दूध पितांना डोक्यानें कासेला देते ते रट्टे प्रत्येक (मारणें, देणें).

हेमंत [सं०] पु०,न०सहा ऋतूंपैकीं एक,— मार्गशीर्ष आणि पौष ह्या दोन महिन्यांचा अवधि.

हेमाडपंती [म० हेमाडपंत] वि० १ मोडी अक्षरांची (लिपि). २ देवळें इ० बांधण्याची एक प्रकारची (रचना किं० मोडणी).

हेय [सं०] वि० टाकून देण्यास किं० सोड-ण्यास योग्य; टाकावयाचें; सोडावयाचें.

हेर [सं०हेरिक=गुप्त हेर] पु० राजा इ० कानीं गुप्त बातम्या आणावयास पाठविलेला मनुष्य. स्त्री० बारकाईनें आणि गुप्तपणें केलेली तपासणी किं० टेहळणी.

हेर वि० टाकाऊ; त्याज्य; कुचकिमतीचें; क्षुल्लक. मागें ' एर ' अर्थ २ पहा.

हेरणें [म० हेर] स० क्रि० गुप्तपणें (शत्रू-च्या हालचाली, बंदिस्ती, सैन्य, इ०) पाहाणें किं० पाहून येणें.

हेरफेर [म० फेर=फरक] स्त्री० १ अल्प अंशाची तफावत; थोडासा फरक. २ विरोध; विसंवाद.

हेरफेर [म० हेरणें+फिरणें] स्त्री० १ खालीं,वर,पुढें,मागें, आंत,किं०बाहेर हिंडणें किं० हिंडून केलेली टेहळणी. २ कामगार लोकांची वर्गावर्गी, नेमणुका, बदल्या, इ० समुच्चयानें.

हेरंब [सं०] पु० गणपति हा विघ्नहर्ता देव.

हेरवां, हेरवीं, इ०मागें ' एरवां, '' एरवीं, ' इ० पहा.

हेरसू क्रि० वि० व्यर्थ, फुकट, वायां (अशि-क्षितांत रूढि).

हेराहेरी [म० हेरणें] स्त्री० गुप्तपणें केलेली टेहळणी किं० तपासणी किं० काढलेली बातमी.

हेरून फेरून [म० हेरणें+फेरणें] क्रि०वि०१उलटून सुलटून; खालींवर किं० पालथें उलथें करून. २ पुन्हा पुन्हा; अनेक वेळां.

हेरें, हेऱ्यें न० गलबताचें शीड फिरवून वाकडा घेतात तो घेरा (घेणें). ❀ **हेऱ्येंबोऱ्यें** न०वारा प्रतिकूल असतां गलबताला जो गतीचा रोख देतात तो.

हेऱ्या [म० हेरणें] वि०१ बारकाईनें पाहा-णारा किं० तपासणारा. २ हेराचें काम करणारा.

हेल पु०, स्त्री० १ लोकांचीं ओझीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणें किं० नेऊन मिळविलेली मजूरी. २ कोणा कुटुंबांत पुत्र किं० कन्या ह्यांचा जन्म झाला असतां शूद्र स्त्रिया त्या घरीं जें दूध, पाणी, इ० आणून घालतात तें. ३ गाड्यावर रचिलेला कडबा, सर्पण, तुळया, गवत, इ० चा ढीग. ४ दीर्घ किं० लांबट स्वर किं० सूर (रडण्याचा, हाका मारण्याचा काढणें, निघणें). ५ आट्यापाट्यांच्या खेळाच्या समाप्तीस

हा शब्द उच्चारतात. ❀ **हेलकरी** पु० लोकांचीं ओझीं वाहून किं० पत्रें, निरोप, इ० पोचवून चरितार्थ करणारा. **हेलपाटी** स्त्री० वाहून न्यावयाचे पदार्थ हेलकरी ज्या पाटींत भरून डोक्यावर घेतो ती पाटी किं० अशी पाटी डोक्यावरून वाहून नेणें ही क्रिया. **हेलपायकी** स्त्री० १ लोकांचीं पत्रें, निरोप, इ० दुसऱ्या ठिकाणीं पोचविणें किं० पोचविण्याचा धंदा. २ व्यर्थ झालेली खेप किं० निष्फळ पडलेला हेलपाटा (वेतागांत).

हेलकावणें अ० क्रि० झोपाळा, पाळणा, फांदी, होडी, इ० कोणेक पदार्थ वाऱ्याच्या किं० हाताच्या किं० अन्य प्रकारच्या गतीनें खालीं वर किं० पुढें मागें होणें.

हेलकावा [म० हेलकावणें] पु० १ खालींवर, पुढेंमागें, आंतबाहेर, असे पदार्थाला झोपाळा, वारा, पाणी, इ० च्या चलनवलनानें बसतात ते हिसके प्रत्येक; आंदोलन (बसणें, खाणें, देणें). २ कोणेकाला व्यर्थ दिलेला हेलपाटा.

हेलकाविणें [म० ' हेलकावणें ' चें प्रयोजक] स० क्रि० (पदार्थाला) पुढेंमागें, खालींवर, आंत बाहेर, इ० रूप हिसके किं० गति देणें. २ हालविणें. ३ कोणेकाला व्यर्थ किं० त्याच्या मर्जीविरुद्ध जावयास सांगणें किं० पाठविणें. ४ उधळून लावणें; हाकलून देणें. ५ तुच्छतेनें नाकारणें; झिडकारणें.

हेलको स्त्री० भटक्या मारणारी स्त्री; निरुद्योगी स्त्री; चकाट्या पिटीत बसणारी स्त्री.

हेलगट [म० हेला] न० रेडा (तुच्छतेनें).

हेलगड स्त्री० हिशेब, जमाखर्च, देणें घेणें, इ० बाबतींतील भानगड, घोटाळा, किं० निकालांत न निघाल्याची स्थिति. मागें 'हिलगड' पहा.

हेलगा [सं० हल=नांगर] पु० रेडा; टोणगा.

हेलन न०, **हेलना** स्त्री० [सं०] तिरस्कार; तुच्छता; झिडकारणी.

हेलपटणें स० क्रि० १ (कोणा माणसाला त्याच्या मर्जीविरुद्ध कोणेक स्थळीं पाठविणें. २ कोणेक कामगिरीवर (कोणेकाची) रवानगी करणें,–जी निष्फळ झाली किं० होण्याचा संभव आहे . ३ (कोणेकाचा व्यूह, बेत, किं० संकल्प.) निष्फळ करून सोडणें.

अ० क्रि० १ निष्फळ होणें; बिनसणें; बिघडणें. २ नाश पावणें; उलथून, कोसळून, किं० ढासळून पडणें. ३ (कोणेकानें) व्यर्थ खेप घालणें.

हेलपटनिशी [म० हेलपाटा+फा० निशी] (प्रत्यय)] स्त्री० व्यर्थ अनेक हेलपाटे खाणें किं० करणें; फुकट गेलेला हेलपाटा किं० फेरी किं० चक्कर.

हेलपटा, हेलपाटा पु० १ ज्या जाण्याचा किं० फेरीचा कांहीं उपयोग झाला नाहीं किं० होण्याजोगा नाहीं असें जाणें किं० अशी फेरी (पडणें, घेणें, देणें). २ वाट माहीत नसल्याकारणानें प्रवाशाला अधिक चालावी लागलेली मजल किं० अंतर; जवळची वाट सोडून द्यावी लागल्याकारणानें लांबच्या वाटेनें गेल्यानें झालेली अधिक मजल.

हेलसांड, हेलसांडणी, हेळसांड, हेळसांडणी [म० हेल (–ळ–) सांडणें] स्त्री० कांहीं काम, पदार्थ, इ० कडे केलेलें दुर्लक्ष्य किं० त्याची केलेली अनास्था किं० त्याच्या संबंधानें दाखविलेली बेपरवाई (करणें).

हेल (–ळ–) सांडणें [सं० हेला (क्रीडा) +सांडणें] स० क्रि० (कोणेक पदार्थ, माणूस, काम, इ० कडे) दुर्लक्ष्य करणें किं० त्यांच्या संबंधानें घ्यावी तितकी काळजी न घेणें; हेटाळणें; अनास्थेनें दूर सारणें.

हेला [सं० हल=नांगर; हल्य=रेडा] पु० रेडा; टोणगा. मागें ' हेलगट ' हेला पहा.

हेला [सं०] स्त्री० १ अपमान; तिरस्कार. तुच्छता; अनादर. २ लीला; शृंगारजन्य विलासभेद. ३ उत्कट मैथुनेच्छा. ४ क्रीडा; खेळ; गंमत.

हेलावणें, हेलावा, हेलाविणें मागें ' हेलकावणें, ' ' हेलकावा, ' ' हेलकाविणें ' पहा.

हेलि [सं०] पु० १ सूर्य. २ अवज्ञा. स्त्री० शृंगारजन्य विलास; लीला.

हेवडदेवड स्त्री० आपलीं माणसें, बैल, नांगर, इ० दुसऱ्या शेतकऱ्याच्या गरजेच्या वेळीं त्याला देणें आणि आपल्या गरजेच्या वेळीं त्याचीं घेणें ह्या रूपाची एकमेकांना मदत करण्याची चाल, सरणी, किं० परिपाठ. मागें ' इरजीक ' पहा.

हेवा, हेवादेवा पु० १ मत्सर. २ स्पर्धा;

चढाओढ; चुरस. ❀ **हेवेखोर** वि० मत्सरी; परोत्कर्षासहिष्णु.

हेवा [अ० हवा]पु० १ अति लोभ. २ परमावधीची इच्छा; सोस.

हेप पु०, **हेपा** स्त्री०, **हेपण, हेपित** न० [सं०] घोड्याचें खिकाळणें.

हेंस स्त्री० १समुद्राच्या पाण्याचे वाऱ्यानें उडून आलेले तुषार समुच्चयानें. २ भांडें डिचमळलें असतां त्यांतील पाणी, दूध, तेल, इ० चे बाहेर उडतात ते थेंब किं० शितोंडे समुच्चयानें.

हेसणें [सं० हेष्] अ० क्रि० (घोड्यानें) खिकाळणें.

हेसळणें अ० क्रि० (पाणी, दूध, तेल, इ०) हालविलें गेल्याकारणानें भांड्याच्या बाहेर थेंबांच्या रूपानें उडणें.

हेसा पु० भांड्याच्या बुडाला किं० छप्पर इ०ला जमते ती जळ किं० मशेरी.

हेळणा, हेळणी मागें ' हेलना ' पहा.

हेळणें [सं० हेळ] स० क्रि० तुच्छतेनें वागविणें; अनादरणें.

हेळणें मेळणें अ० क्रि० कोणेकाशीं प्रेमबद्ध होणें; कोणेकाशीं सख्य किं०घरोबा करणें.

हेळसणें [सं० हेला]स० क्रि० तुच्छ करणें; अनादरणें; अवमानणें.

हेळसण [म० हेळसणें] स्त्री० अनादर; कोणेकाशीं केलेली बेपरवाईची वर्तणूक;हेळसांड.

हेळीमेळी स्त्री० सख्य; मनमिळाऊपणा; घरोबा; घसड.

हैक, हैकथैक उ० वा० अ० १ गाडीस जुंपलेल्या बैलांना जलद चालण्याचा इषारा करतांना हा शब्द उच्चारतात. २ गाय, बैल, इ०ना एकाद्या ठिकाणापासून हाकलून देतांना हा शब्द उच्चारतात. स्त्री० कोणेकाला हिडिसफिडिस करणें किं० तुच्छता दर्शविणें.

हैकत मागें ' हयकत ' पहा.

हैकोल [अ० हय्कल] पु० स्त्रियांचा गळ्यांत घालावयाचा एक दागिना.

हैद पु० खाऱ्या पाण्यांतील एक मासा.

हैदऱ्या वि० भाताची एक जात.

हैपत, हैबत [अ० हय्बत्] स्त्री० भीति, दरारा, धास्ती (घेणें, खाणें, धरणें, बसणें);उ० फौजेनें हैबत खाल्ली, आतां तह ठरवावा. ❀ **हैबती** वि० भ्याड; ज्याला दरारा वाटत आहे किं० धडकी भरली आहे असा. **हैबतखाल्ला** वि० ज्यानें कांहीं गोष्टीची धास्ती घेतलेली आहे असा. **हैबती गैबती** वि० अजागळ आणि अव्यवस्थित असा (माणूस); जो कोणतेंही काम नीटनेटकें करूं शकत नाहीं असा.

हैम [सं०] वि० १ सोन्याचें. २ पिवळें.

हैम [सं० हिम] वि० १ थंड. २ बर्फानें झालेलें. न० १ दंव. २ थंडी.

हैमन [सं०] वि० हेमंतऋतूसंबंधाचें. पु० १ हेमंत ऋतु. २ मार्गशीर्ष महिना.

हैयत, हैयती मागें ' हयात, '' हयाती ' पहा.

हैर पु० एक पिवळसर आणि सापासारखा [मासा.

हैरत [अ०] स्त्री० धास्ती, दरारा (खाणें).

हैराण (–न) [अ० हैरान्] वि० १अस्वस्थ; अशान्त. २ दुःखित; पीडित. ३ चिंताग्रस्त. ४ आजार, उपवास, संकट,इ०मुळें जर्जर झालेला.❀ **हैराणगत** स्त्री० अशांत, अस्वस्थ, दुःखित,किं० चिंताग्रस्त झाल्याची स्थिति; अस्वस्थता; अशांतता. **हैराणी** स्त्री० अस्वस्थता; अशांतता; चिंताग्रस्तपणा; दुःखित स्थिति. **हैराणपरेशान** वि० १ भयभीत. २ चिंताग्रस्त. **हैराणगी** स्त्री० दुर्दशा; आपदा; संकटाची स्थिति; पंचाईत.

हैवा पु० ब्राह्मणांची एक जात किं० त्या जातीचा ब्राह्मण.

हैवान [अ०] पु० १ पशु; जनावर. २ बुद्धिहीन प्राणी. ३ अजागळ किं० मूर्ख माणूस.

हो [सं०] उ० वा० अ० १ अरे ! अहो ! २ बरें ! ठीक ! ३ जरा थांब ! सबूर कर ! ४ बरें कां ! उ० तुला भूक लागली आहे, आतां स्वस्थपणानें पोटभर जेव हो ! ❀ **होस हो मिळविणें** (किं० **जोडणें, म्हणणें, करणें**, किं० **देणें**) १ दुसऱ्याच्या मताला आपला दुजोरा देणें; दुसऱ्याच्या विधानाला पुष्टि देणें. २ आपण कांहीं विचार न करतां कोणी अधिकारी जें विधान करीत असेल त्याला होय म्हणणें किं० दुजोरा देणें (निंदेंत प्रयोग). **होना करणें** अ० क्रि० कच-

रणें; आवंकणें; किंचित् नाखूष असणें; आढेवेढे घेणें (करणें, म्हणणें, सांगणें).

होईक [म० होणें] न० १ जें होणार, जें व्हावयाचें म्हणून ठरलेलें, कीं० जें निश्चित झालें आहे तें.२ नशीब; भवितव्यता; दैवयोग; दैवगति.

होऊन [म० होणें] क्रि० वि० १ ' होणें ' पासून ' ऊन ' प्रत्ययान्त धातुसाधित अव्यय; उ० त्याचें लग्न होऊन तीन महिने झालें.२स्वयं-प्रेरणेनें; स्वताच्या बुद्धीनें; दुसऱ्याची सक्ती नसतां; आपल्या खुषीनें; उ० त्यानें होऊन मला ही देणगी दिली, मी मागितली नव्हती.॰**आपण होऊन खोड्यांत पडणें** धोका किं० संकट जाणत असतां तें अंगावर ओढून घेणें; भयंकर परिणाम दिसत असतां कांहीं कृत्यास हेकटपणानें किं० मूर्खपणानें किं० जाणून बुझून प्रवृत्त होणें.

होकरणें, होकारणें स० क्रि० १ बोलाविणें; आमंत्रिणें. २ थांबाविणें.

होकल स्त्री० लग्नाला योग्य झालेली मुलगी; जिचें लग्न व्हावयाचें आहे अशी मुलगी.

होका पु० गलबतावर असतें तें दिशा दाखविणारें यंत्र. ' होकायंत्र ' ह्याच अर्थीं.

होकार [म० हो+कार (प्रत्यय)] पु० १ संमति, अनुमति. २ कांहीं गोष्टीस कोणेकाची अनुकूलता (मिळणें, असणें).

होकारणें स० क्रि० (कोणेकास) हाक मारणें क्रि० बोलावणें, क्रि०थांबविणें. वर 'होकरणें' पहा.

होगडणें, होगाडणें स० क्रि० १हाकून देणें; उडवून लावणें. २ खर्चून टाकणें; संपवून टाकणें. ३ कामावरून (कोणेकाला) बडतर्फ करणें. ४ (संपत्ति, धान्य, इ०) उधळेपणानें खर्चून टाकणें. ५ (उत्कर्ष, वैभव, इ०ची) शक्यता किं० संभवनीयता आपल्या दुर्वर्तनानें किं० हेकटपणानें नष्ट करणें.

होगा वि० १ दांडगा; धाडसी; साहसी. २ मंद; सुस्त;आळशी.३अव्यवस्थित;गैबती;अजागळ.

होट, होटाळ, होटाळी मागें ' ओठ, ' ' ओठाळी ' पहा.

होड [हिं०] स्त्री० १ पैज (मारणें,बांधणें, करणें). २ ठराव, करार (करणें).

होडकी स्त्री०, **होडकें** न० [म० होडी] १ लहान होडी. २ होडी,–तुच्छतेनें. ३ गलबत,–तुच्छतेनें.

होडंगणें [म० होडंगा] स० क्रि० (कोणा माणूस, पशु,पदार्थ, इ० वर) होडंगा (म्ह० लांब काठी) फेकून प्रहार करणें; होडंग्यानें मारणें.

होडंगा, होडगा पु० १ वृक्षादिकांवरचें फळ इ० पाडविण्यासाठीं हात दोन हात लांबीची जी जाडी काठी योजतात ती. २लठ्ठ आणि दोन तीन हात लांब काठी; सोटा. ॰ **होडगानडग** [म० होडगा (सोटा)+नडग (अस्वल)] स्त्री० जोराजोरानें चालविलेलें भांडण; एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून चालविलेलें भांडण; कचाकची; बोलाचाली. **टीप**,–अस्वलास शिकवितांना त्याला दरवेशी काठीनें मारतो यावरून वरील शब्दाची उत्पत्ति.

होडगें, होडकें [म० होडी] न० १ लहान होडी. २ होडी (तुच्छतेनें). ३ गलबत, मचवा, इ० (तुच्छतेनें).

होडत [म० होड] स्त्री० पैज (मारणें, करणें, लावणें, बांधणें, लागणें).

होडा पु० खोल खळगा.

होडा मागें ' हुंडा ' पहा.

होडांका, होडिंगा पु० सोटा; लठ्ठ काठी.

होडी [हिं० होला] स्त्री० झाडाचा बुंधा पोखरून करतात तें जलयान.

होंडी स्त्री० जोंधळ्याची एक जात.

होणजे, होणसे, व्हणजे, व्हणसे स्त्री० नवऱ्याची बहीण.

होणसणें स० क्रि० काठी, कोपर, इ० नीं (कोणेकास) ढोसणें किं० प्रहार करणें.

होणें [स० भू; हिं० होना] अ० क्रि० १ असणें; विद्यमान किं० उपस्थित असणें; उ० तो तेथें होता म्हणून मी बचावलों. २ जन्मास येणें; उत्पन्न होणें; उ० ह्या गायीला लागोपाठ तीन गोऱ्हे झाले. ३(कोणेकास) विशिष्ट स्थिति, दर्जा, अधिकार, पदवी, इ० पावणें; उ० तो राजा झाला; उ० तो मामलेदार झाला; उ० तो पास झाला; उ० रामभाऊ अध्यक्ष झाले. ४ संपणें; खर्चलें जाणें; उ० आतां चटणी झाली; उ० मजजवळ शिलक होते ते सारे पैसे झाले. ५ घडून

येणें; उ० तह झाला; लढाई झाली. ❀ होऊन जाणें कांहीं कार्य घडून समाप्त होणें,–त्यांत बदल किं०सुधारणा होणें आतां शक्य नाहीं अशा दृष्टीनें. होती नव्हती तितकी केली पोटभर शिव्या दिल्या; मनसोक्त शिव्या दिल्या. टीप,– संस्कृतांतील ' तृ ' प्रत्ययान्त जे शब्द ते मराठींत ' ता ' प्रत्ययान्त होतात. त्यांचे पुढें ' हो ' च्या भूतकाळाचीं रूपें योजून पूर्ण भूतकाळाचीं रूपें होतात. उ० तो करता झाला; उ० ते बोलते झाले इ०.

होतकर, होतकरू [म० होणें] वि० जो उत्कर्ष पावेल, वैभवास चढेल, व्यवस्थितपणें वागेल, विद्या करील, इ०आशा ज्याच्या संबंधानें आजच्या त्याच्या गुणांवरून किं० वर्तनावरून बाळगतां येतील असा(मुलगा, माणूस, इ०). उ० ह्या मुलाला तुम्ही हाताशीं धरा, तो होतकरू आहे; ह्या मुलाला तुम्ही मुलगी द्या, तो होतकरू आहे.

होतव्य [म० होणें+ सं० तव्य (प्रत्यय)] वि० जें होण्याजोगें आहे असें; जें होणें शक्य किं० संभवनीय आहे असें. न० नशीब; दैव; उ० होतव्य कोण फिरवूं शकेल ? उ० होतव्य होतें तसें झालें, त्याला आपला काय इलाज ?

होता [म० होणें] वि० होण्याजोगा; होईल असा; व्हावयाचा; होण्याच्या शक्यतेचा किं० संभवाचा. ❀ होती वाट स्त्री० १ जी वाट सुरू झाली आहे अशी वाट (किं० मार्ग, पंथ, स्थिति). २ कांहीं ध्येयाच्या शक्यतेची सरणी. ३ (मुलीस ऋतु प्राप्त होऊन गर्भाधान-विधि होणें ही) पुत्रप्राप्तीच्या शक्यतेची स्थिति. होती वस्त, होतवस्तू स्त्री०, होता माल पु० [म० होता, ‑ती, वस्तु, माल] १ ज्याचा गुण, दर्जा, किं० चांगलेपणा दिवसेंदिवस वाढत चालला आहे असा पदार्थ. २ जो मिळणें शक्य आहे असा पदार्थ (माणूस, पैसा,इ०). होती वेळ स्त्री०, होता काळ पु० ध्येयाच्या प्राप्तीला अनुकूल असा समय; उ० होता काळ आला म्हणजे श्रमाशिवाय देखील इष्टप्राप्ति होते.

होता [सं० होतृ] वि० हवन करणारा. पु० १ ऋग्वेददेवता. २ ऋत्विज्विशेष. २ यज्ञकर्ता.

होत्र [सं०] न० १ हवनद्रव्य २ आहुति.

होत्साता [म० होत('होणें ' किं० 'असणें' पासून)+असता (असणारा)] वि० झालेला; असलेला; उ० तो खिन्न होत्साता परत आला. होत्साती, होत्साते, अशीं 'होत्साता' ह्या विशेषणाचीं लिंगवचनांप्रमाणें रूपें बदलतात. होत्सातां [म० होत+असतां (असतांना)] क्रि० वि० असतां; उ० विक्रमराजा राज्य करीत होत्सातां एक गरीब ब्राह्मण त्याच्याकडे द्रव्यार्थ आला.

होन पु० प्राचीन काळचें आणि सुमारें चार रुपये किंमतीचें एक सोन्याचें नाणें.ह्या नाण्याचे सुमारें वीस प्रकार प्राचीन काळीं हिंदुस्तानांत प्रचलित होते. ❀ होना पायली होणें फार महाग होणें,–एका पायलीला एक होन अशी बाजारांत धारण असणें. होनमाळ स्त्री० होनांची गळ्यांत घालावयासाठीं केलेली माळ.

होना [म० हो (होय)+ना (नाहीं)] स्त्री० एकदा ' होय ' म्हणण्याकडे प्रवृत्ति आणि नंतर लगेच ' नाहीं ' म्हणण्याकडे प्रवृत्ति;मनाची संदिग्धता; साशंक वृत्ति; कचर; धरसोडीचें वर्तन किं० उत्तर; उ० हीच नोकरी तुला सोयीची आहे, आतां होना करीत बसूं नको ती पथकर, त्यांत तुझें हित आहे. ❀ होना होना करणें शुष्क वादविवाद किं० वाटाघाट करणें.

होपळ, होपळसुती वि० १ अव्यवस्थित (कारभार); सईल बांधलेलें (गांठोडें); जमा किती, खर्च किती, हें विचारांत न घेतां चालविलेला (संसार); अंदाधुंदीचा. मागें ' भोपळा ' मध्यें ' भोपळसुती ' पहा. २ मंद बुद्धीचा; मूर्ख.

होबा [म० हो (अहो)+बा (अहो] पु० स्वता कांहीं विचार न करतां दुसऱ्याच्या प्रत्येक वाक्याला ' होय ' असें उत्तर देणारा; खुशामत्या; समर्थाचा बगलबच्चा. ❀ होबासा [म० हो (होय)+बा (अहो)+असा] पु० होय म्हणणें; संमति; रुकार (देणें,असणें,मिळणें); उ० माझ्या विचाराला तुझा होबासा आहेना ?

होम [सं०] पु० १ यज्ञ. २ आहुति. न० यज्ञविधि.❀होमधान्य न०१तीळ.२यव. होमकुंड न० होमासाठीं जमीनींत केलेली खळगी किं० धातूचें पात्र.होमकुंडीं पडणें (किं०टाकणें,घालणें

संकटांत किं० पेचांत किं० अडचणींत पडणें (टाकणें इ०). **होमद्रव्य न०** होमांत ज्याची आहुति द्यावयाची तो पदार्थ,–तूप, तीळ, इ०. **होमशाला (–ळा) स्त्री०** अग्निहोत्री जेथें अग्नि ठेवतो आणि आहुति देतो ती खोली. **होमहवन न० ए० व०** अग्नींत आहुति देणें इ० संबंधाचीं धार्मिक कृत्यें समुच्चयानें. **होमाग्नि पु०** शमीचीं काष्ठें एकमेकांवर घासून उत्पन्न केलेला पवित्र अग्नि. ह्या काष्ठांना ' अरणी ' म्हणतात.

होमणें [म० होम] **स० क्रि०** १ होमाच्या अग्नींत (आहुति) देऊन जाळणें. २ अग्नींत जाळून टाकणें; उ० वरिले हेचि चरण ग्यां, त्यजितां ज्वलनांत काय होमीन (मोरोपंत).

होय [म० होणें] **उ० वा० अ०** १ बरें; ठीक. २ हें असें आहे; तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. **स्त्री०** संमति; रुकार; उ० तुझी होय मिळाली तर हें लग्न आम्ही ठरवूं. ‖ **होयनाहीं स्त्री०** १ कचर; साशंक वृत्ति; संदिग्धपणाची स्थिति; उ० आतां होयनाहीं करीत बसूं नको, हा सौदा बेलाशक ठरीव. २ संदिग्ध गोष्टीचा निकाल किं० निर्णय; विचार करून ठरविलेला बेत किं० निश्चय; उ० तुझी होयनाहीं कळली म्हणजे तसें उत्तर देईन. **होयीस होय ह्मणणें** (किं० **ठोकून देणें**) आपण विचार न करतां लाळघोटेपणानें समर्थांच्या विधानास संमति देणें. **होयकार पु०** संमति; रुकार; अनुमति. **होयाबा, होयबा स्त्री०** समर्थांच्या प्रत्येक विधानाला लाळघोटेपणानें संमति देणारा; थुंकीचाट्या; बगलबच्चा. **होय नव्हे स्त्री०** विचार करून ठरविलेला निकाल, निश्चय, किं० बेत.

होर [म० होरणें, ओहरणें] **स्त्री०** पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहात आलेला आणि जमीन, शेत, इ० च्या खळग्यांत किं० सखल प्रदेशांत साचलेला केरकचरा, माती, इ०. मागें 'ओहरणें' पहा.

होरट स्त्री०, पु० १ कोणेक गोष्टीसंबंधानें कोणाचा हेका किं० दुराग्रह. २ गलका; आरडाओरडा; कलकलाट. ३ मिरच्या, शिकेकायी, इ० पदार्थ कुटला जात असतांना किं० तेलांत कांहीं पदार्थ तळला जात असतां जो दर्प किं० भपकारा नाकातोंडांत शिरून ठसका, शिंका, इ० उत्पन्न करतो तो; ओरट; ओरड. मागें ' ओरट, ओरड ' पहा.

होरणी [म० होरणें] **स्त्री०** शेत किं० जमीन यांतील खळगे किं० सखल प्रदेश भरून काढणें किं० भरून काढण्यासाठीं त्यांत टाकलेला केरकचरा, माती, इ०.

होरणें अ० क्रि० १ जमीनींतील खळगे माती इ० नीं भरून जाणें. २ जखम, क्षत, इ० बरें होऊन भरून येणें. ३ दागिने इ० च्या योगानें अंग भरून जाणें किं० व्यापिलें जाणें. **स० क्रि०** १ (जमीनींतील खळगे) भरणी घालून भरून काढणें. २ मलमें इ० उपचारांनीं (जखम, क्षत, इ०) बरीं करून भरून काढणें. ३ दागिने इ० नीं (शरीर) भरून काढणें.

होरपळणें, होरपाळणें, होरफळणें, हुरप-(–फ–)ळणें स० क्रि० (पदार्थाला) अग्नीचे चटके देणें; अर्धवट भाजून काढणें; (पदार्थ) जळूं न देतां भाजणें किं० शेकणें; डागणें. **अ० क्रि०** अग्नीचा ताप, सूर्याचें ऊन्ह, जमीनीची किं० हवेची आच, इ० च्या योगें भाजून जाणें किं० तप्त होणें किं० उबणें.

होरा [सं०] **स्त्री०** १ मेषादि लग्नावरून किं० आठवड्याचे सोमवार इ० जे वार त्यांवरून साधावयाचे दिवसाचे चोवीस मुहूर्त ज्योतिषशास्त्रांत सांगितले आहेत ते प्रत्येक. २ राशीचा अर्ध; आडीच घटका. **पु०** अमुक गोष्ट संभवनीय आहे असा कोणेकाचा तर्क किं० आदमास किं० अटकळ (असणें, होणें, चालणें, वाहाणें); उ० तुला बढती मिळेल असें माझ्या होऱ्यांत येत नाहीं; इ० ही वाटाघाट निष्फळ ठरेल असा माझा होरा वाहातो.

होराबारी स्त्री०, होरेबारे पु० अ० व० आपआपला पक्ष खरा म्हणून ठरविण्यासाठीं दोन किं० अधिक माणसांनीं चालविलेला कचाकचीचा वादविवाद; दुराग्रहाचा वाद (करणें, चालविणें, मांडणें).

होरी [हिं० होली] **स्त्री०** ज्यांत वसंतोत्सवासंबंधीं वर्णन असतें असा गानामध्यें हिंदुस्तानी भाषेंत कवितेचा एक प्रकार आहे तो; हा बहुधा शिमग्याच्या उत्सवांत गातात.

होलकांडा पु० तोल चुकल्यामुळें जातो तो झोकांडा (जाणें, खाणें); झोक, झुकांडी (जाणें, खाणें).

होलगट [म० होलगा] न० होलगा (तुच्छतेनें). पुढें ' होलगा, होला 'दोन्ही अर्थी पहा.

होलगटणें स० क्रि० १ फेकून देणें. २ नापसंत म्हणून झिडकारणें.

होलगड [म० होला] न० होला नांवाचा पक्षी (तुच्छतेंत).

होलगडणें [म० होला] अ० क्रि० १ मर्तिकाच्या विधींतील मडक्याच्या खापरांतील पाणी पिऊन उडून गेलेला होला पक्षी गाय,बैल,इ०च्या पाठीवर बसल्यानें किं० त्या पक्ष्याची त्याच्यावर सावली पडल्यानें (गाय,बैल,इ०ना) मोडक्या किं० अधू किं० खिळखिळ्या कंबरेचें होणें. ही अडाणी लोकांची समजूत आहे. २ तोल जाऊन जमीनीवर जोरानें पालथें आपटणें किं० पडणें. ह्या अर्थी ' होलगाडणें ' सुद्धां.

होलगडणें, होलगाडणें [म० होलगाडा] स० क्रि० (काठी, सोटा,इ०) फळ,माणूस,इ०पदार्थावर फेकणें. पुढें ' होलपटणें, ' ' होलपटा, ' इ०पहा. ॐ**होलगडून पडणें** अ० क्रि० कोसळून किं० ढासळून जोरानें पडणें.

होलगडा पु० काठी; सोटा.

होलगा, होला पु० १ रेडा. २ एक पक्षी.

होलगा पु० हुलगा हें द्विदल धान्य.

होलगें [म० होलगा] न० होलगा हा पक्षी (तुच्छतेनें).

होलपटणें, होलपाटणें न० १ काठी; सोटा. २ गंजिफांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द (मागणें, घेणें, पाडणें).

होलपटा,होलपाटा पु० १काठी किं० सोटा; दांडकें. २ फेकणें किं० भिरकावून देणें ही क्रिया (मारणें, देणें).

होला पु० एक पक्षी. ॐ **होलाकोला** [म० होला+कोल्हा] पु० १ नामर्द, कमकुवत, किं० कर्तृत्वशून्य असा माणूस. २ भितरा; भागूबाई.

होलार पु० महार, मांग, इ० हलक्या जातीचे जे वाजंत्री त्यांची जात किं० त्या जातीचा कोणीही माणूस.

होलिका, होली [सं०] स्त्री० १शिमग्याच्या सणांत पेटवितात ती होळी. हा विधि फाल्गुनी पौर्णिमेस करतात. २ फाल्गुनी पौर्णिमा ही तिथि.३ ह्या दिवशीं जाळावयासाठीं केलेली सर्पणाची रास. ४ ह्या प्रसंगीं पूजितात ती देवता. ॐ **होलिकोत्सव** पु० होलिका देवीची पूजा करणें,लाकडें,गोवऱ्या,इ० पेटविणें, इ०रूप विधि.

होवर [म० वधू+वर] पु० १ लग्नानंतर परत आलेले नवरा आणि नवरी ह्यांचें देवदर्शनास जावयास निघालेलें किं० जाऊन आलेलें जोडपें. २ वधूवरांचें जोडपें. मागें 'वहर' पहा.

होवळा पु० गांवांतील लोकांचे तंटे तोडणें, लग्नें जुळविणें, गांवकऱ्यांच्या सार्वजनिक हिताच्या गोष्टींत पुढाकार घेणें, इ० मध्यें खटपट करणारा माणूस. आपलीं घरचीं कामें टाकून लोकांच्या कामांत लुडबुडणारा अशी ह्या शब्दांत निंदेची कधीं कधीं छटा असते; उ० रिकामटवळा आणि गांवचा होवळा. ॐ **होवळकी** स्त्री० १ होवळ्याचा उद्योग किं० खटपट. २ रिकामी उठाठेव किं० लुडबूड,-दुसऱ्याच्या कारभारांत.

होश, होशा, होष [फा० होष्=बुद्धि, जाणीव] पु० १ कांहीं कामीं उत्साह; अंगावर कांहीं प्रसंग आला असतां त्यांतून निभाव काढण्याची कोणेकाची हिम्मत. २ प्रसंगावधान; योग्य समयीं योग्य इलाज हुडकून काढून तो अमलांत आणण्याची जी कोणेकाची ताकद ती; उ० गांवावर पेंढारी आले असें ऐकतांच माझा होष गेला आणि कांहीं सुचेनासें झालें.

होष्य, होष्यमाण [म० ' होणें ' पासून संस्कृतच्या धर्तीवर केलेला शब्द] वि० १ जें होणार आहे किं० व्हावयाचें आहे किं० होऊं घातलें आहे तें. २ नशीब; दैव.

होळकर [म० होळी+कर] पु० १ होळीच्या प्रसंगीं खेळावयासाठीं जमलेलीं जीं पोरें तीं प्रत्येक. २ मूळचे होळचे राहाणारे आणि पेशव्यांनीं स्थापिलेले इंदूरचे संस्थानिक.

होळणी [म० होळणें] स्त्री० एक रोग.

होळणें स० क्रि०१ ओहोळणें. २पाझरणें स० क्रि० धुणें. [तें चिरगुट इ०

होळणें [म० होळणें] न० जें धुवावयाचें

होळपणें, होळफणें स० क्रि० वरवर किं० थोडथोडे भाजणें; तापविणें; शेकणें. मागें ' होरपळणें ' पहा.

होळंबण्या स्त्री० अ० व० मनाला लागलेली चिंता किं० हुरहूर किं० विवंचना; हृद्रोग; मनस्ताप. बायकाच्या वापरण्यांतील हा शब्द आहे.

होळा [म० होळी] पु० अग्नीचा उंच आणि प्रचंड झोत; आगीचा डोंबाळा.

होळा वि० मागें ' हवळा ' पहा.

होळी [सं० होली] स्त्री० १ फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला होलिका देवीची पूजा करून पेटवितात तीं लाकडें, गोवऱ्या, इ० चीं रास. २ होळीची देवता; होलिका. ३ फाल्गुन किं० माघ महिन्याची पौर्णिमा. ४ होळीच्या प्रसंगीं जाळावयासाठीं केलेल्या राशीच्या मध्यभागीं एरंड, पोफळ, केळ, इ० चा पुरतात तो खुंट. ॐ **एकाद्या पदार्थाची होळी करणें** तो जाळणें; त्याचा विध्वंस करणें; उ० मारुतीनें लंकेची होळी केली. **होळी होणें** जळून जाणें; खाक होणें. **होळीची कर** स्त्री० होळीच्या पुढचा दिवस. **होळीची पोळी** स्त्री० होळीच्या राशीवर जाळावयासाठीं ठेविलेली पोळी,–जी ठेवणें हा गांवच्या मुखत्यार पाटलाचा हक्क समजला जातो. **होळीचें शिंपणें, होळीशिंपण** न० होळीच्या कांहीं दिवस अगोदर किं० नंतर पडतो तो पाऊस. **होळीचे होळकर** पु० अ० व० १ होळी पेटविली असतां तिच्या भोंवतीं खेळणारीं पोरें. २ कांहीं कामांत पडून त्या कामाचा विचका करणारीं बेजबाबदार माणसें.

होंज्या पु० फजिता; बोऱ्या; फजितवाडा; मानखंडना (उडणें, उडविणें).

हौद [अ० हौज] पु० १ दगड, विटा, चुना, इ० सामग्रीनें बांधून काढलेला असतो तो खळगा,–पाणी साठविणें इ०च्या उपयोगाचा. २ धातूचें पात्र,–पाणी साठविणें इ० कामीं योजावयाचें. ३ कारंज्यांतून उडणारें पाणी ज्यांत साठतें तो दगड, विटा, इ० नीं बांधून काढलेला खळगा. ४ पाण्याचें टाकें. ५ तालमींतील कुस्त्या खेळण्याच्या उपयोगाचा बांधून काढलेला खळगा.

हौदा [अ० हौदज] पु० १ हत्तीवरील बसावयाची कठडा असलेली बैठक. २ 'हौद'. अर्थ ५ पहा.

हौम्य [सं०] पु० १ हवनद्रव्य. २ तूप.

हौर [सं० ऊर्मि] न० १ नदींतून जोरानें आणि एकदम आलेला पाण्याचा लोंढा. २ बोलणें, खेळणें, मस्ती करणें, गाणें, इ०ची अंगांत एकदम उठलेली लहर किं० इसळी.

हौरा पु०, **हौरी** स्त्री० पांढरा तीळ. मागें ' हवरा पु०, हवरी स्त्री० ' पहा.

हौरी [अ०] स्त्री० स्वर्गातील स्त्री; सुंदर स्त्री.

हौलदिल, हौलदिली मागें ' हवलदिल, ' ' हवलदिली ' पहा.

हौशा, हौशी, हौसी [म० हौस] वि० ज्याला कांहीं काम करण्याची हौस किं० उत्कट इच्छा आहे असा.

हौस [म० हवस्] स्त्री० १ इच्छा; आवड; नाद. २ उमेद; उत्साह.

हौशेणें. हौसणें [म० हौस] अ० क्रि० १ कांहीं कामीं (कोणेकाला) हौस उत्पन्न झालेली असणें; कांहीं काम करावयाला हौसेनें प्रवृत्त झालेलें असणें. २ कांहीं गोष्टीकडे हौसेनें किं० आवडीनें आकृष्ट झालेलें असणें.

हौस [अ० हवस्] स्त्री० एकादी वस्तु आपल्याजवळ असल्यानें किं० भोगावयास मिळाल्यानें आपलें वैभव वाढेल किं० आपली महत्त्वाकांक्षा तृप्त होईल ह्या भावनेनें युक्त अशी जी त्या वस्तूसंबंधाची आवड ती; इच्छा; आवड. ॐ **हौसें हौसें** क्रि० वि० मोठ्या उत्साहानें आणि आनंदानें; मनांत उत्कट हौस उत्पन्न होऊन किं० झाल्यामुळें. **हौसदार, हौशी, हौसी** वि० ज्याला हौस आहे असा; कांहीं काम उत्साहानें आणि आनंदानें करावयास प्रवृत्त झालेला किं० होणारा.

हौसा पु० भाद्रपद महिन्यांत अनुराधा नक्षत्रावर मराठे लोक करतात तो एक उत्सव.

हौळा पु० भाजलेले हरभऱ्याचे घाटे किं० वाटाण्याच्या शेंगा ह्यांमधून खावयासाठीं काढलेले दाणे.

ह्नव पु०, **ह्नवन** न० [सं०] लपविणें; झाकणें.

ह्नुति [सं०] स्त्री० १ लपविणें; झाकणें. २ नाकारणें.

ह्यस्तन [सं०] वि० कालचा.

ऱ्हद [सं०] वि० १ पाण्याचा डोह. २ खोल तळें.

ऱ्हस्व [सं०] **वि०** १ थोडें. २ आखूड. ३ ठेंगणा; खुजा; ठेंगू. ४ (**व्याकरण**) अ, इ, उ, हे एका मात्रेचे (स्वर) प्रत्येक किं० हे स्वर व्यंजनाला मिळून झालेलें (एक व्यंजन); ज्याच्या उच्चारणास एका मात्रेचा काल लागतो असें (अक्षर). ॐ **ऱ्हस्वमूर्ति वि०** ठेंगणा (माणूस, पशु, पदार्थ).

ऱ्हाद [सं०] **पु०** आवाज; शब्द.

ऱ्हादिनी [सं०] **स्त्री०** १ वज्र; इंद्राचें आयुध. २ वीज; विद्युत्. ३ नदी.

ऱ्हास [सं०] **पु०** १ आवाज. २ नाश; क्षय; अपकर्ष. ३ टंचाई. ॐ **ऱ्हासकाळ पु०** विनाशकाळ; अपकर्षाचा काळ.

ल्हादन [सं०] **न०** आनंदविणें.

ल्हाव [म० लाहो; सं० लाभ] **पु०** लोभ; उत्कट इच्छा; आधाशीपणाची इच्छा.

व्हावा [म० ' होणें ' चें एक विध्यर्थ रूप] **वि०** इष्ट; प्रिय; हावा असा. ॐ **हावा नकोसा म्हणणें** (किं० **करणें**) कांहीं पदार्थाची जरूरी आहे किं० नाहीं हें ठरविणें.

ळ

ळ मराठी व्यंजनमालेंतील चवतिसावें व्यंजन. ह्या व्यंजनानें सुरू होणारे शब्द मराठी भाषेंत नाहींत.

क्ष

क्ष [सं० क्+ष्] मराठी व्यंजनमालेंतील पसतिसावें व्यंजन.

क्षण [सं०]**पु०** १ तीस कलांचा कालावधि; एका मुहूर्ताचा बारावा भाग; सुमारें चार मिनिटांचा काळ. २ अत्यन्त थोडा कालावधि. ३ फुरसत; विश्रान्तीचा काळ. ४ कांहीं कामाला योग्य किं० सोयीची वेळ. ५ आनंद; उत्सव. ६ नियम; निश्चय; ठराव. ७ श्राद्धकर्मांचे वेळीं ब्राह्मणानें स्वस्थ चित्तानें श्राद्धविधीस बसावें म्हणून त्याच्या हातावर दर्भ देतात तो विधि किं० हा दिलेला दर्भ (देणें, घेणें); उ० हे पांच ब्राह्मण माझ्या घरीं उद्या क्षणाला येणार आहेत; उ० मी क्षण घेतला आहे, मला आतां उठतां येणार नाहीं; उ० गोविंदभटजींना क्षण द्या. ॐ **क्षणद पु०** ज्योतिषी. **क्षणदा स्त्री०** रात्र. **क्षणदाचर पु०** राक्षस. **क्षणद्युति, क्षणप्रभा स्त्री०** वीज. **क्षणबुद्धि वि०** चंचल मनाचा. **क्षणभंगुर वि०** नाशवंत; फार वेळ न टिकणारें (आयुष्य, सुख, आनंद). **क्षणभर क्रि० वि०** एका क्षणाच्या कालावधींत; जरा वेळ. **क्षणक्षणां, क्षणक्षणीं, क्षणोक्षणीं क्रि० वि०** दर क्षणास; प्रतिक्षणीं. **क्षणावधि पु०** एका क्षणाइतका वेळ ग्ह०अत्यन्त अल्प वेळ. **क्षणिक वि०** अत्यन्त अल्प काळ टिकणारें; नाशवन्त; क्षणभंगुर.

क्षणणें [क्षण;सं० क्षण;म० क्षण अर्थ ७]**स० क्रि०** श्राद्धकर्मासाठीं (ब्राह्मणास) आमंत्रिणें किं०येऊन पाटावर बसलेल्या (ब्राह्मणास) दर्भ देणें.

क्षणन [सं०] **न०** १ वध. २ जखम.

क्षत [सं०] **वि०** मोडलेला; विध्वंसिलेला; नष्ट झालेला; नष्ट केलेला. **न०** १ ओरखडा. २ जखम. ॐ **क्षतज न०** रक्त; रुधिर. **क्षतयोनि स्त्री०** जिला पुरुषसंग घडला आहे अशी स्त्री. **अक्षतयोनि स्त्री०** जिला पुरुषसंग घडला नाहीं अशी स्त्री. **क्षतदृष्टि स्त्री०** दुसऱ्यांचीं वर्मे कर्मे हुडकून काढणें आणि त्यांच्यावर प्रतिकूल टीका करणें ह्या प्रवृत्तीचा (माणूस); छिद्रान्वेषी. **क्षतवृत्ति वि०** ज्याचीं चरितार्थाचीं साधनें नष्ट झालीं आहेत असा (माणूस). **क्षतव्रत वि०** ज्याचें व्रत भग्न झालें आहे असा; ज्यानें व्रत मोडलें आहे असा.

क्षंतव्य [सं०] **वि०** १ क्षमेस पात्र; ज्याला क्षमा करणें योग्य आहे असा (माणूस). २ जें क्षमिणें योग्य आहे असें (कृत्य).

क्षंता [सं० क्षन्तृ] **वि०** क्षमा करणारा; क्षमा करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा; सहनशील.

क्षति [सं०] **स्त्री०** १ इजा; प्रहार. २ जखम. ३ नाश; ऱ्हास. ४ मरण. ५ तोटा; नुकसान; हानि. ६ (**मराठींत**) परवा; काळजी. ह्या अर्थी ' क्षिति ' हें मराठींतील अपभ्रष्ट रूप. ॐ **क्षति** (किं० **क्षिति**) **न बाळगणें** परवा न

करणें; अंतःकरणाला लावून न घेणें; उ० त्याला कशाचीच क्षति नाहीं; उ० मी त्याच्या नापसंतीची क्षतीच बाळगीत नाहीं.

क्षत्र [सं०] पु०, न० १ क्षत्रिय जात. २ क्षत्रिय जातीचा मनुष्य.

क्षत्रिय [सं०] पु० ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र, ह्या ज्या हिंदूंच्या चार जाति त्यांतील दुसरी जात किं० त्या जातीचा कोणीही इसम. ‡ **क्षत्रियान्तक** पु० परशुराम. **टीप,**– ' क्षत्रिय ' हा शब्द हिरा, मोती, भांग, सब्जी, पिंपळ, इ० शब्दांच्या मागें सामानाधिकरण्यांत घातला असतां दुय्यम प्रतीचा असा त्याचा अर्थ होतो; उ० क्षत्रिय हिरा म्ह० उत्कृष्ट दर्जाचा नव्हे असा. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र हे शब्द उत्कृष्ट गुण किं० धर्म यांच्या एका खालीं एक अशा पायऱ्या दाखविण्यासाठीं योजतात. मागें 'वैश्य' वि० आणि 'शूद्र' मधील टीप पहा.

क्षपण, क्षपणक [सं०] पु० बुद्ध किं० जैन भिक्षु.

क्षपा [सं०] स्त्री० रात्र; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ.

क्षम [सं०] वि० १ सोशीक; सहनशील; सहिष्णु. २ कांहीं काम किं० कार्य करावयाला समर्थ किं० लायक. ३ योग्य. ४ संभवनीय. ५ सह्य; सोसतां येण्याजोगें. ६ हितकर.

क्षमा [सं०] स्त्री० १ माफी; दुसऱ्याच्या अपराधाकडे सौम्य नजरेनें पाहाणें किं० पाहाण्याची प्रवृत्ति (करणें). २ पृथ्वी. ‡ **क्षमावान्, क्षमावंत, क्षमी** वि० क्षमा करण्याच्या स्वभावाचा; सहनशील.

क्षमापन [सं०] न० १ माफी मागणें. २ गोड भाषण, आर्जव, इ० नीं कोणेकाचा राग शांत करणें.

क्षमिता [सं० क्षमितृ] पु० क्षमा करणारा; क्षमा करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा.

क्षय [सं०] पु० १ ऱ्हास; कमी होणें. २ नाश; पूर्ण विध्वंस. ३ प्रलय; जगाचा अंत. ४ दिवसेंदिवस झिजत जाणें हा रोग. ५ (**गणित**) ऋणसंख्या. याच्या उलट ' वृद्धि. ' ६ तेरावा संवत्सर. ७ चंद्राच्या कलांचें दिवसेंदिवस कमी कमी होत जाणें; उ० क्षयपक्ष (म्ह० महिन्याचा कृष्णपक्ष). ‡ **क्षयतिथि** स्त्री०, **क्षययोग** पु०, **क्षयनक्षत्र** न० सूर्योदयीं नसणारी तिथि किं० नसणारा योग किं० नसलेलें नक्षत्र; सूर्योदयानंतर सुरू होऊन दुसऱ्या सूर्योदयापूर्वी समाप्त होणारी तिथि किं० समाप्त होणारा योग किं० समाप्त होणारें नक्षत्र. **क्षयमास** पु० दोन संक्रान्तीचा मास. **क्षयगामी** [सं० क्षयगामिन्] वि० उत्तरोत्तर ज्याचा ऱ्हास होत चालला आहे असा. **क्षयतिथि** स्त्री० ज्या तिथीस जो कोणी मरण पावला असतो ती त्याची प्रतिमासाची किं० प्रतिवर्षाची तिथि. **क्षयदिवस** पु० १ ज्या दिवशीं जो मेला तो त्याचा. २ क्षयतिथि. **क्षयवृद्धि** स्त्री० उत्कर्ष आणि अपकर्ष; चढ आणि उतार. **क्षयसूतक** न० कुटुंबांत कोणी मेल्यामुळें येतो तो विटाळ. **क्षयाह** [सं० क्षय + अहन् (दिवस)] पु० कोणेकाच्या मरणाचा महिन्यानें किं० वर्षानें येणारा दिवस.

क्षयिष्णु [सं०] वि० १ विनाशी. २ ऱ्हास पावणारें.

क्षर [सं०] वि० १ विनाशी. २ पाझरणारें.

क्षरण [सं०] न० १ पाझरणें. २ घाम येणें.

क्षरित [सं०] वि० पाझरलेलें.

क्षव [सं०] पु० १ शिंक. २ खोकला.

क्षवथु [सं०] पु० १ घशांत उठते ती खवखव. २ शिंक. ३ खोकला.

क्षांत [सं०] वि० १ सहन केलेलें. २ क्षमाशील; क्षमा करण्याकडे ज्याची प्रवृत्ति आहे असा.

क्षांति [सं०] स्त्री० सहनशीलता; सोशिकपणा; क्षमा करण्याकडे प्रवृत्ति.

क्षात्र [सं०] वि० क्षत्रियाचें; क्षत्रियासंबंधाचें; उ० क्षात्रधर्म, क्षात्रतेज. न० क्षत्रियजात; क्षत्रियसमूह.

क्षार [सं०] वि० खारट; मिठाच्या चवीचें. पु० १ खारटपणा. २ खारट पदार्थ. ३ ठक. ४ भस्म; राख. न० काळें मीठ. ‡ **क्षारत्रय** न० सज्जीखार, जवखार, आणि टाकणखार, हीं तीन द्रव्यें समुच्चयानें. **क्षारमृत्तिका** स्त्री० खारी माती. **क्षारवृक्ष** पु० क्षार देणारे केळ, आघाडा, इ० वृक्ष.

क्षारित [सं०] वि० अर्काच्या रूपानें काढलेला (क्षार).

क्षालन [सं०] न० धुणें.

क्षित [सं०] वि० १ झुरणीस लागलेला; २ झिजलेला.

क्षिति [सं०] स्त्री० १ पृथ्वी. २ जमीन. ३ भूमीचा पृष्ठभाग. ४ (मराठींत ' क्षति ' बद्दल चुकीनें ' क्षिति ' योजण्यांत आला असतां) परवा; फिकीर. मागें ' क्षति ' पहा. ❀ **क्षितिज** न०पृथ्वीच्या पृष्ठभागाला जेथें आकाश चिकटलेलें असें दिसतें तें वर्तुळ;उ०सूर्य क्षितिजाखालीं गेला. **क्षितीश,क्षितिपति, क्षितिपाल,** इ० पु०राजा. **क्षितिसुत, क्षितिपुत्र** पु० १ मंगळ हा ग्रह. २ नरकासुर. **क्षितिधर, क्षितिभृत्** पु० १ पर्वत. २ राजा. **क्षितिसुता, क्षितिकन्या** स्त्री० सीता,– रामाची पत्नी.

क्षिपक[सं०] वि०फेकून देणारा. पु० योद्धा.

क्षिपण [सं०] न० फेकणें.

क्षिप्त [सं०] वि० १ फेकलेला. २ क्षुब्ध. ३ वेडा. ४ वातरोगानें ग्रस्त. ५ प्रपंचाला आसक्त.

क्षिप्र [सं०] वि० वेगवान्; जलद; न० एका मुहूर्ताचा पंधरावा अंश. क्रि० वि० जलदीनें; वेगानें. ❀ **क्षिप्रहस्त** वि० उत्तम तिरंदाज; उत्तम धनुर्धारी. [नदी.

क्षिप्रा स्त्री० (मराठींत) १ खीर. २ एक

क्षिरापत स्त्री० ' खिरापत 'चें अशुद्ध रूप. मागें ' खिरापत ' पहा.

क्षीण [सं०] वि० १ नष्ट झालेलें; संपलेलें. २ मृत. ३ दुर्बल; अशक्त. ४ रोडका. ❀ **क्षीणायु** वि० मृत.

क्षीत [सं० क्षति] स्त्री० ' क्षति ' चें अशुद्ध रूप ' क्षिति '; ' क्षिति ' चें अशुद्ध रूप ' क्षीत. ' मागें ' क्षिति ' पहा.

क्षीर [सं०] पु०, न० १ दूध. २ झाडाचा चीक. ३ पाणी. ४ (मराठींत) खीर. ❀ **क्षीराब्धि, क्षीरसमुद्र, क्षीरोदधि** पु० दुधाचा समुद्र,–सात समुद्रांपैकीं एक. मागें ' सप्त ' मध्यें ' सप्तसमुद्र ' पहा. **क्षीरनीरन्याय** पु०दूध आणि पाणी यांच्या मिश्रणाची तऱ्हा किं० सरणी; पूर्ण मिलाफ. **क्षीरनीरविवेक** पु० चांगलें आणि वाईट ह्यांचा भेद; चांगलें आणि वाईट यांचें पृथक्करण. **क्षीरवृक्ष** पु० १ पिंपळ; वड; उंबर. २ ज्यांतून चीक निघतो असा वृक्ष,–वड,रुई,सावरी,चाफा, उंबर, शेर, इ०. **क्षीरनीर** न० घट्ट मिठी.

क्षुण्ण [सं०] वि० १ मळविलेला. २ तुडविलेला. ३ कुसकरलेला. ४ आचरलेला (मार्ग). ५ भग्न केलेला. [(येणें).

क्षुत् स्त्री० **क्षुत** न०, **क्षुता** स्त्री०[सं०] शिंक

क्षुद्बोध पुढें ' क्षुध्, क्षुधा ' मध्यें पहा.

क्षुद्र [सं०] वि० १ आकारानें, योग्यतेनें, महत्त्वानें, सामर्थ्यानें, किं० औदार्यानें अत्यन्त हलक्या दर्जाचा किं० पाहिरीचा; लहान; थोडा; अल्प. २ मनानें किं० अंतःकरणानें हलका किं० अनुदार. ३ कुत्सित (कल्पना, विचार, दृष्टि, बुद्धि).४ कृपण.५ दरिद्री. ❀ **क्षुद्रघंटिका** स्त्री० १ घुंगरू.२ घागऱ्यांचा दागिना.३ लांक हें धान्य. **क्षुद्रदृष्टि** स्त्री० अनुदार स्वभावानें दोष काढीत बसण्याची प्रवृत्ति. वि०अशा प्रवृत्तीचा (मनुष्य). **क्षुद्रमेह** पु० थोडी थोडी लघवी होणें हा रोग. **क्षुद्ररोग** न० महारोग नव्हे तो. वैद्यकांत सुमारें दोनशें क्षुद्र रोग सांगितले आहेत. **क्षुद्रान्वेषी** वि० क्षुल्लक दोष काढीत बसण्याच्या स्वभावाचा. **क्षुद्र, क्षुद्रक** न० कोणेकाचें न्यून किं० वर्म किं० लज्जास्पद वर्तन.

क्षुध्, क्षुधा [सं०] स्त्री० भूक. ❀ **क्षुत्पिपासा** स्त्री० अ० व० भूक आणि तहान; खाण्याची आणि पिण्याची इच्छा.**क्षुद्बोध** पु० भूक लागल्याची जाणीव; कांहीं खाण्याची इच्छा; भुकेचें उद्दीपन. **क्षुधाक्रान्त, क्षुधातुर, क्षुधार्त** वि० भुकेनें व्याकुळ झालेला.

क्षुधालु [सं०] वि० भुकेलेला.

क्षुधित [सं] वि० ज्याला भूक लागली आहे असा.

क्षुब्ध [सं०] वि० १ खवळलेला (समुद्र, वृत्ति). २ चेतलेला (क्रोध). ३ ढवळलेला. ४ अस्वस्थ; चिंताग्रस्त. ५ रागावलेला. ६ उद्दीपित झालेला(कोणताही मनोविकार,–काम,क्रोध,इ०).

क्षुर [सं०] पु० १ न्हाव्याचा वस्तरा. २ बाणविशेष. ३ गाय, म्हैस, इ० चा खूर. ४ पलंग इ०चा खूर किं०पाय.५तालिमखाना ही वनस्पति. **क्षुरा** स्त्री० सुरी. ❀ **क्षुरकर्म** न०, **क्षुरक्रिया**

स्त्री० वपन; वस्त्र्यानें केश तासणें. **क्षुरप्र पु०** घोड्याच्या नालाच्या आकाराचें टोंक असलेला बाण.

क्षुल्लक [सं०] वि० १ अल्प; लहान. २ महत्त्वाची नव्हे अशी (वस्तु). ३ हलक्या किंमतीचा किं० योग्यतेचा (माणूस, पदार्थ). ४ विचारांत घेण्याच्या लायकीचा नव्हे असा. **न० (मराठींत)** कोणेकांचें कांहीं न्यून किं० कमीपणा; दोष.

क्षेत्र [सं०] न० १ शेत. २ स्थान; स्थळ. ३ पवित्र ठिकाण,–नाशिक, काशी, इ०. ४ देह. ५ उत्पत्तिस्थान. ६ पत्नी,–पुत्रोत्पादनार्थ बीज (पुरुषाचें वीर्य) पेरावयाचें स्थल. ७ भूप्रदेशाचा नकाशा. ८ (**गणित**) आकृति. ९ लांबी, रुंदी, उंची, खोली, ह्या परिमाणांनीं विशिष्ट असा कोणताही पदार्थ. १० नक्षत्र. ११ मन; आत्मा. १२ (**मराठींत**) पूर्ण उपवास; अगदीं कांहीं न खाणें (पडणें, घालणें, होणें). प्रकृतीच्या दृष्टीनें ह्या अर्थी 'क्षेत्र' शब्दाचा उपयोग केला जातो. १३ बारा शाळिग्राम किं० अकरा बाण किं० एकवीस नर्मदा गणपति किं० बारा सूर्यकांत किं० आठ देवी ह्यांचा समुदाय. ॐ **क्षेत्राजीव, क्षेत्रकर पु०** शेतकरी. **क्षेत्रगणित न०** भूमिति; भूमीचें मापन म्ह० मोजणी करण्याचें शास्त्र. **क्षेत्रज पु०** आपल्या पत्नीस परपुरुषापासून आपल्या आज्ञेनें झालेला पुत्र. धर्मशास्त्रांत सांगितलेल्या बारा पुत्रांपैकीं हा एक आहे. **क्षेत्रज्ञ वि०** प्रवीण. **पु०** १ जीवात्मा. २ परमेश्वर. ३ रांडबाज पुरुष. ४ शेतकरी. **क्षेत्रफळ न०** १ लांबी आणि रुंदी हीं दोन्हीं विचारांत घेऊन ठरलेलें जें विस्ताराचें माप तें; उ० ह्या खोलीची लांबी बारा हात आणि रुंदी आठ हात आहे, म्हणून तिचें क्षेत्रफळ षाण्णव चौरस हात हें होय. २ (**मराठींत**) कोणत्याही विशिष्ट सरणीचें फळ (दुसऱ्या सरणीच्या फळाशीं समत्व दाखविणें असतां); उ० त्यानें तुला पांच रुपये दिले काय किं० दहा अधेल्या दिल्या काय क्षेत्रफळ एकच. **क्षेत्राजीव, क्षेत्रजीवी [सं० क्षेत्रजीविन्] पु०** शेतकरी. **क्षेत्रतीर्थ न०** काशी, रामेश्वर, इ० यात्रेचें स्थळ. **क्षेत्रपाल पु०** स्थलविशेषाची अधिष्ठात्री किं० अभिमानी देवता. **क्षेत्रभूमि स्त्री०** १ शेताची जमीन. २ काशी, नाशिक, इ० पवित्र स्थळ. **क्षेत्रसंन्यास पु०** कोणेकाचा काशी इ० पवित्र स्थळीं आमरण राहण्याचा संकल्प. **क्षेत्रसंस्कार पु०** गर्भाधान, पुंसवन, इ० संस्कार स्त्रीस करतात तो. **क्षेत्रिक, क्षेत्रिन् पु०** १ शेतकरी. २ नवरा.

क्षेप [सं०] पु० १ फेकणें. २ फुकट किं० व्यर्थ घालविणें; उ० कालक्षेप, धनक्षेप, आयुष्यक्षेप, इ०. ३ पाठविणें. ४ उशीर; विलंब. ५ निंदा; अनादर. ६ गर्व. ७ पुष्पगुच्छ. ८ (**गणित**) मिळविण्याची संख्या. ह्या अर्थी ' क्षेपक ' सुद्धां. ९ खस्थ गोलाचा अक्षांश. १० (**मराठींत**) एक खेप, बारी, प्रसंग, किं० वेळ; उ० पहिल्या क्षेपीं, दुसऱ्या क्षेपीं, देता क्षेपें, जेवता क्षेपीं, इ०. ११ (**ज्योतिष**) ग्रहादिकांचें सिद्ध झालेलें जें गणित तें स्पष्ट व्हावें म्हणून त्यांत मिळवावा किं० वजा करावा म्हणून सांगितला असतो जो अंकराशि तो. ॐ **क्षेपनिक्षेप क्रि० वि०** खचित; निश्चयपूर्वक; न चुकतां; कांहीं झालें तरी; उ० मी आज कांहीं येत नाहीं पण उद्या क्षेपनिक्षेप येईन. मागें ' खामखा, खामाखा ' इ० पहा.

क्षेपक [सं०] पु० १ आंत घुसडून दिलेला भाग; कोणा ग्रंथकाराच्या ग्रथांत दुसऱ्या कोणी घुसडून दिलेलें वाक्य, श्लोक, इ०. २ ग्रहादिकांचें सिद्ध झालेलें गणित तें स्पष्ट व्हावें इत्याद्यर्थ त्यांत मिळवावा किं० उणा करावा म्हणून सांगितला असतो जो अंकराशि तो.

क्षेपण [सं०] न० १ फेकणें. २ दूर सारणें. ३ अनध्याय. ४ वल्हें.

क्षेपणी [सं०] स्त्री० १ गोफण. २ वल्हें. ह्या अर्थी ' क्षेपण ' **न०** सुद्धां.

क्षेपणें [सं० क्षिप्] स० क्रि० १ फेकणें. २ दूर सारणें. ३ तुच्छतेनें टाकून देणें.

क्षेपनिक्षेप मागें ' क्षेप ' मध्यें पहा.

क्षेप्ता [सं० क्षेप्तृ] पु० १ फेकणारा. २ घालवून देणारा.

क्षेम [सं०] वि० १ हितकर. २ सुखी. ३ निर्भय; सुरक्षित. ४ सुखदायक. **पु०, न०** १ सुरक्षितपणा; खुशाली. २ रक्षण. ३ जें मिळविलें

त्याचें रक्षण; उ० योगक्षेम. खालीं 'योगक्षेम' पहा. ४ कल्याण; हित. ५ मोक्ष. ६ (मराठींत) आलिंगन (घेणें, देणें). ह्या अर्थी 'क्षमालिंगन' सुद्धां; उ०भरतानें रामाचें क्षेम घेतलें; उ० रामानें भरताला क्षेम दिला. ह्या अर्थी 'क्षेम' चा मराठींत 'खेंव' स्त्री० हा अपभ्रष्ट शब्द झाला आहे. मागें 'खेंव' पहा. ꕥ **क्षेमकर** वि० कल्याणकारक; हितकर. **क्षेमालिंगन** न० प्रेमानें दिलेलें किं० घेतलेलें आलिंगन. **योगक्षेम** मागें 'योग' मध्यें 'योगक्षेम' पहा.

क्षोणि, क्षोणी [सं०] **स्त्री०** पृथ्वी. ꕥ **क्षोणीश्वर पु०** राजा.

क्षोद [सं०] **पु०** १ कुटणें ही क्रिया. २ ठेचणें; चिरडणें. ३ चूर्ण करणें. ४ खल. ५पाटा. ६ चूर्ण; भुकटी; पीठ. ७ सूक्ष्मांश; कण. ८ (लाक्षणिक)वाटाघाट;चर्चा. ꕥ **क्षोदक्षम वि०**१ जें चिरडून किं० ठेचून चूर्णरूप करतां येईल असें. २ (लाक्षणिक) ज्याची चर्चा करतां येईल असा (विषय). **क्षोदक्षम पु०**१चर्चेचा विषय. २ चर्चेला योग्य असा विषय.हे दोन्हीं अर्थ मराठींतच आहेत.

क्षोभ [सं०] **पु०** १ हलणें. २ हबका. ३ विघ्न. ४ मनाची खळबळ; अस्वस्थता. ५ मनोविकाराची उसळी; कोणत्याही मनोविकाराचा उद्रेक. ६ क्रोध.

क्षोभणें [सं० क्षुभ्] **अ० क्रि०** १खवळणें; उ० तेव्हां समुद्र अतिशय क्षोभला होता. २ क्रुद्ध होणें. ३ (कोणताही मनोविकार) उद्दीप्त होणें किं० चेतणें.

क्षोभित [सं०] **वि०** चेतविलेला; उद्दीप्त [केलेला.

क्षोभ्य [सं०] **वि०** १ ज्याला सहज राग येतो असा; झुरझुऱ्या. २ ज्याच्यांत क्षोभ किं० खळबळ किं० चेतना उत्पन्न करतां येईल असा.

क्षौम [सं०] **वि०** १ रेशमी. २ तागाचें बनविलेलें. **पु०, न०** रेशमी किं० तागाचें वस्त्र.

क्षौर [सं०] **न०** वपन; केश तासून टाकणें. ꕥ **क्षौरिक पु०** न्हावी.

क्ष्मा [सं०] **स्त्री०** पृथ्वी. ꕥ **क्ष्माप, क्ष्मापाल, क्ष्मापति पु०** राजा. **क्ष्माभृत् पु०**१राजा. २ पर्वत.

क्ष्वेड [सं०] **पु०** १ गर्जना. २ विष. ३ कानांत घंटानाद होणें हा रोग.

ज्ञ

ज्ञ मराठी व्यंजनमालेंतील हें छत्तिसावें व्यंजन. हें संस्कृतांत ज् आणि ञ ह्यांच्या संयोगानें झालेलें आहे.मराठींत त्याचा उच्चार द, न्, आणि य् ह्यांच्या संयोगासारखा केला जातो.

ज्ञ [सं०] **वि०**जाणणारा; उ० धर्मज्ञ (म्ह० धर्म जाणणारा), शास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्रज्ञ, इ०. **पु०** १ विद्वान्. २ जीवात्मा. ३ ब्रह्मदेव.

ज्ञपित, ज्ञप्त [सं०] **वि०** शिकविलेला; कळविलेला.

ज्ञप्ति [सं०] **स्त्री०** १ जाणणें; जाणीव. २ बुद्धि. ३ चेतना. ४ ज्ञातपणा; ज्ञान.

ज्ञात [सं०] **वि०** १ जाणलेला. २ ठाऊक असलेला; उ० ज्ञातपाप. ३शिकलेलें (शास्त्र इ०).

ज्ञातव्य [सं०] **वि०** जाणण्यास योग्य; जाणून घेतला पाहिजे असा; उ० अरे ! आत्मा ज्ञातव्य, मंतव्य, आणि निदिध्यासितव्य आहे. ꕥ **ज्ञातसिद्धान्त पु०**ज्याला शास्त्रविशेषाची पूर्ण माहिती आहे किं० त्यांत जो निष्णात आहे तो.

ज्ञाता [सं० ज्ञातृ] **पु०** १ जाणणारा. २ मर्मज्ञ; रसिक. ३ शास्त्रविशेषाशीं पूर्ण परिचित. ४ शाहाणा किं० समंजस माणूस. ५ जामीन राहिलेला माणूस. ज्ञात्री हें **स्त्री०**.

ज्ञाति [सं०] **स्त्री०** १ जात; जातींतील लोक; उ०काल विठोबानें ज्ञातीला जेवण घातलें. २ जाति. **पु०** १ बाप. २ सगोत्र. ३ नातलग. ꕥ **ज्ञातिभाव पु०** नात्याचा संबंध.

ज्ञातृ [सं०] **वि०** जाणणारा. वर 'ज्ञाता' पहा. ꕥ **ज्ञातृत्व न०** १ शाहाणपणा. २जाणीव. ३ ज्ञान ग्रहण करण्याची पात्रता.

ज्ञातेय [सं०] **न०** आप्तपणा; नातें.

ज्ञान [सं०] **न०** १ जाणणें. २ तत्त्वाचा अवबोध; तत्त्व जाणणें. ३ माहीत असणें; ठाऊक असणें; माहिती. ४ जाणीव. ५ ब्रह्माच्या स्वरूपाचें दर्शन किं० आकलन. ६ बुद्धि. ७ मत. ८ भावना उत्पन्न करून देणारें इन्द्रिय. ९ मंत्र. १० जीवात्मा. ११ परमात्मा.१२ शास्त्र,कांहीं विषय, किं० विद्या ह्यांत प्रावीण्य. १३ आपण कोण आहों, आपल्या जन्माचें सार्थक्य कशांत आहे, ह्याचा शास्त्र, मनन, इ० च्या योगें आपणाला ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचा झालेला बोध; उ० ज्ञानमार्गानें मोक्ष मिळवावें हें शंकराचार्यांचें मत.

१४ वेद समुच्चयानें. ❀ ज्ञानेन्द्रिय न० त्वचा
(स्पर्श), रसना (जीभ), नेत्र, कर्ण, आणि
घ्राण (वास), हीं ज्ञानाचीं पांच इंद्रियें प्रत्येक.
ज्ञानकला स्त्री० १ बुद्धीचें वैभव किं० तेज. २
जाणती कला. मागें ' जाणता ' मध्यें ' जाणती
कला ' तीन्ही अर्थीं पहा. ज्ञानकाण्ड न० वेदांचा
परमात्म्याच्या स्वरूपाचें कथन करणारा आणि
विशेष प्रकारें अभ्यासिला पाहिजे असा भाग.
ज्ञानकृत वि० १ जाणून बुझून केलेलें. २ कर-
तांना ज्याचें स्वरूप कळलें आहे असें. ज्ञानगम्य
वि०बुद्धीनेंच किं०प्रत्यक्ष अनुभवानेंच जें जाणतां
येईल असें. ज्ञानघन पु० ज्ञानानें पूर्ण; पूर्ण ज्ञान
ज्याला झालें आहे असा. ज्ञानचक्षु [सं०
ज्ञानचक्षुस्] न० १ ज्ञानरूपी डोळा. २ कांहीं
विषयाचें आकलन करण्याचें बुद्धिरूप साधन. ३
बाह्येन्द्रियाचा विषय नव्हे असा जो आत्मस्वरू-
पाचें ज्ञान हा पदार्थ तो जाणण्याला समर्थ असें जें
कोणेकाचें ज्ञान तें. पु० विद्वान् माणूस; पण्डित.
ज्ञानतत्त्व न० सत्य ज्ञान (म्ह० परमात्म्याचें
ज्ञान). ज्ञानद पु० गुरु.ज्ञानदा स्त्री० देवी सर-
स्वती. ज्ञानदीप, ज्ञानदिवा पु० बुद्धि किं०
ज्ञान ह्या रूपाचा दिवा,–जो आत्म्याचें स्वरूप
दाखवून देण्यास समर्थ असतो. ज्ञानदृष्टि
स्त्री० मागें ' ज्ञानचक्षु ' पहा. ज्ञान-
दुर्बल वि० अडाणी. ज्ञाननिष्ठ वि० पर-
मात्म्याचें ज्ञान करून घेण्यास उद्युक्त झालेला.
ज्ञानमार्ग पु० वेदान्तशास्त्रोक्त जो ईश्वरप्राप्तीचा
मार्ग तो. ज्ञानमठ पु०, ज्ञानमठी स्त्री०
१ चिंतनाची एकान्तांतील जागा. २ तुरुंग,
कैदखाना. ज्ञानयोग पु० परमात्म्याचें पूर्ण ज्ञान
व्हावयाचा चिंतन हा मार्ग. ज्ञानलक्षण न०
तर्क करण्याचें साधन. ज्ञानवल्ली स्त्री० भांग
(थट्टेनें). ज्ञानवायु पु० एक वातरोग,–जो
झाला असतां रोगी गहन विषयावर खूप बोलत
सुटतो. ज्ञानविज्ञान न० ए० व० वेद आणि
वेदांगें समुच्चयानें. ज्ञानोपदेश पु० १ ज्ञानाचा
उपदेश; ज्ञान देणें. २ ब्रह्मात्म्यैक्यज्ञानाचा उप-
देश. ज्ञानोपासना स्त्री० आत्मोपासना, कर्मो-
पासना, आणि ज्ञानोपासना, हे जे ईश्वरप्राप्तीचे तीन
प्रकार त्यांतील तिसरा म्ह० वेदादिकांच्या अध्य-
नानें व चिंतनानें ब्रह्मप्राप्ति करून घेण्याचा
प्रकार. ज्ञानमाला स्त्री० वेदविद्येचा अभ्यास
सुरू करतेसमयीं ऋषि शिष्याच्या किंवा पिता
पुत्राच्या गळ्यांत जी पुष्पमाला घालीत असे ती,
किंवा तो घालण्याचा विधि. ज्ञानरत्नांची
मांदूस स्त्री० जाडा विद्वान्. ज्ञानशास्त्र न०
भविष्यें वर्तविणें हें शास्त्र. ज्ञानसाधन न० १
वर ' ज्ञानेंद्रिय ' पहा. २ परमात्म्याचें ज्ञान
करून घेण्याचा मार्ग. ज्ञानतः क्रि० वि०जाणून;
ठाऊक असून; जाणून बुझून. ज्ञानमठांत बसणें
१ संसारत्याग करून परमात्म्याच्या चिंतनांत
काळ घालविणें. २ आपल्या विद्वत्तेची ऐट मिर-
विणें किं० फाजील स्तोम माजविणें. वर ' ज्ञान-
मठ ' ह्याच प्रतीकांत पहा. ज्ञानी [सं०ज्ञानिन्]
वि० शाहाणा. पु० १ भविष्य कथन करणारा;
भाकित्या. २ आत्म्याचें ज्ञान ज्याला झालें आहे
असा माणूस. ३ शास्त्रव्यवहारादिसंबंधीं विशिष्ट
ज्ञान ज्याला आहे तो. ज्ञानित्व न० भाकितें
सांगण्याची कला.

ज्ञापक [सं०] वि० कळविणारा; जाणवि-
णारा. पु० गुरु; शिक्षक. न० प्रत्यक्ष शब्दांनीं
जें सांगितलें आहे त्याहून अधिकाचा बोध करून
देणारा नियम किं० विधि किं० शासन.

ज्ञापन [सं०] न० १ कळविणें; जाणविणें.
२ शिकविणें; उलगडा करून सांगणें. [शक्य.

ज्ञापनीय [सं०] वि०कळविण्यास योग्य किं०

ज्ञापविणें [सं०' ज्ञापणें 'चें प्रयोजक] स०
क्रि० कोणेकाकडून कोणेकाला (कांहीं गोष्ट)
कळविणें किं० सांगणें किं० जाणविणें.

ज्ञापित [सं०] वि० कळविलेलें; सांगितलेलें;
बोध करून दिलेलें.

ज्ञाप्य [सं०] वि० कळविण्याला, शिक-
विण्याला, किं० सांगण्याला योग्य.

ज्ञीप्सा [सं०] स्त्री० ज्ञान करून घेण्याची
किं० जाणण्याची इच्छा.

ज्ञेय [सं०] वि० १ जें जाणतां येईल असें.
२ जें जाणणें जरूर आहे असें. ❀ ज्ञेयवाद पु०
आपल्या बुद्धीनें ईश्वराचें ज्ञान होणें शक्य आहे
असें मत. अज्ञेयवाद पु० ईश्वर हा निरवधि
आहे म्हणून आपल्या सावधि बुद्धीनें त्याचें ज्ञान
होणें म्ह० ईश्वर आहे किं० नाहीं हें ठरविणें
शक्य नाहीं असें मत.

समाप्त.

परिशिष्टें.

१ वृत्तें.

विशिष्ट संख्येनें आणि विशिष्ट नियमांनीं नियंत्रित अशी ऱ्हस्व दीर्घ अक्षरांची जी कर्णमधुर रचना, किंवा लघु गुरु मात्रांची विशिष्ट नियमांनीं नियंत्रित अशी जी कर्णमधुर रचना, तिला वृत्त म्हणतात. वृत्तें दोन प्रकारचीं आहेत. अक्षरवृत्तें आणि मात्रावृत्तें. कांहीं नियमानुसार येणाऱ्या अक्षरांच्या संख्येवर मोजावयाचीं जीं वृत्तें तीं अक्षरवृत्तें. लघुगुरु मात्रांच्या संख्येवर मोजावयाचीं जीं वृत्तें तीं मात्रावृत्तें. अक्षरवृत्तांचे तीन पोटभेद आहेत. समवृत्तें, अर्धसमवृत्तें, आणि विषमवृत्तें. ज्या वृत्ताचे चारी चरण सारखे असतात तें समवृत्त. ज्याचा पहिला आणि तिसरा हे चरण सारखे असून दुसरा आणि चवथा हे चरण सारखे असतात तें अर्धसमवृत्त; आणि ज्याचे चारी चरण एकमेकांहून भिन्न असतात तें विषमवृत्त.

अक्षरवृत्ताची रचना गणांवरून केली जाते. तीन तीन अक्षरांचा एक एक गण होतो. हे गण आठ होऊं शकतात. ते म, य, र, स, त, ज, भ, आणि न, हे होत. अक्षरें लघु आणि गुरु अशीं दोन प्रकारचीं असतात. ऱ्हस्व अक्षरास लघु आणि दीर्घ अक्षरास गुरु म्हणतात. पुढें जोडाक्षर किं० विसर्ग आल्यास मागचें अक्षर लघु असूनही त्याला गुरुत्व प्राप्त होतें. तसेंच संस्कृत सानुस्वार अक्षरही गुरु मानलें जातें. निवळ मराठी सानुस्वार अक्षर लघु असल्यास लघुच गणलें जातें, पादान्तीं लघु अक्षर असल्यास तें समानिका, दोहा, इ० वृत्त खेरीज करून गुरु म्हणून समजतां येतें. प्र, ऱ्ह, इ० कांहीं जोडाक्षरांपूर्वीचें अक्षर लघु असल्यास कधीं कधीं त्याला गुरुत्व दिलें जात नाहीं.

वृत्ताची घटना मापतांना लघु अक्षर पूर्वी । अशा रेघेनें आणि गुरु अक्षर ऽ अशा रेघेनें दर्शवीत असत. हल्लीं लघु अक्षर ∪ अशा रेघेनें आणि गुरु अक्षर — अशा रेघेनें दर्शवितात. वर जे आठ गण सांगितले आहेत त्यांची घटना ह्या चिन्हांनीं पुढें दिल्याप्रमाणें उदाहरणांसह आम्हीं दाखवितों.

म गण — — —	न गण ∪ ∪ ∪
उ० मानावा	उ० नमन
य गण ∪ — —	भगण — ∪ ∪
उ० यमाचा	उ० भास्कर
र गण — ∪ —	ज गण ∪ — ∪
उ० राधिका	उ० जनास
स गण ∪ ∪ —	त गण — — ∪
उ० समरा	उ० ताराप

लघु स्वराच्या उच्चारणास लागणारा जो काळ त्याला त्याला मात्रा म्हणतात. गुरु स्वराच्या उच्चारणास लागणारा काळ दोन मात्रांचा असतो. अक्षरवृत्ताच्या घटनेंत तीन तीन अक्षरांचा एक एक गण केला जातो तसा मात्रावृत्तांत चार चार मात्रांचा एक एक गण केला जातो. मात्रागण पांच आहेत. त्यांचीं नांवें आणि घटना पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

म गण — —	उ० जनास
उ० मेधा	भ गण — ∪ ∪
स गण ∪ ∪ —	उ० भाजन
उ० सविता	न गण ∪ ∪ ∪ ∪
ज गण ∪ — ∪	उ० नवरस

यति म्हणजे वृत्त म्हणतांना थांबण्याची किंवा विरामाची जागा. ही यति प्रत्येक पद्याच्या चरणाच्या अंतीं असते आणि कांहीं पद्यांच्या चरणांच्या मध्यें एक किंवा दोन ठिकाणींही असते. यति असते तेथें शब्द तुटला पाहिजे असा नियम आहे. शब्द न तुटल्यास जो दोष होतो त्याला ‘ यतिभंग ’ म्हणतात.

यापुढें आम्ही वृत्तें देतांना समवृत्तें, अर्धसमवृत्तें, विषमवृत्तें, मात्रावृत्तें, दोहा, आणि निवळ मराठी वृत्तें, असा क्रम अवलंबिणार आहों.

प्रथम वृत्ताचें नांव जाडी टाईपांत देऊन नंतर त्यांतील गण देऊं. समवृत्ताचे चारी चरण सारखे असल्यामुळें एकाच चरणाच्या रूपानें उदाहरण दिलें आहे. अर्धसमवृत्ताच्या प्रथम आणि तृतीय चरणांचे गण देऊन पुढें द्वितीय आणि चतुर्थ चरणांचे गण दिले आहेत आणि उदाहरण अर्थात् प्रथम आणि द्वितीय चरणांच्या रूपांत दिलें आहे. विषमवृत्ताच्या उदाहरणांत चारी चरण दिले आहेत.

चरणांत जेथें यतीनें दोन किंवा तीन विभाग पडतात तेथें एका एका विभागांतील अक्षरसंख्या पृथक् पृथक् निर्दिष्ट केली आहे; उ० मंदाक्रांता वृत्तांत ४+६+७ अशा यति दाखविल्या आहेत. त्याचा अर्थ असा कीं ह्या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत सतरा

अक्षरें असून पहिली यति चवथ्या अक्षरावर पडते,
दुसरी यति त्याच्या पुढच्या सहाव्या अक्षरावर
पडते,आणि तिसरी याति त्याच्या पुढच्या सातव्या
अक्षरावर पडते.

मंदाक्रान्ता,स्रग्धरा,शार्दूलविक्रीडित,इ०वृत्तां-
तील यति कठोर असून त्या पाळाव्याच लाग-
तात. पण विबुधप्रिया, प्रतानिनी, इ० वृत्तांतील
यति सौम्य असून त्या मागें पुढें सरकाविल्या
तरी चालण्याजोग्या असतात.वृत्त म्हणणाऱ्याच्या
धाटणीवर त्या अवलंबून ठेवितां येतात. जीव-
जागृति ह्या आमच्या काव्यांत ज्या यति आम्ही
दाखविल्या आहेत त्यांत आणि ह्याच परिशि-
ष्टांत दाखविलेल्या यति वाचकांस कोठें कोठें भिन्न
दिसून येतील, परंतु वस्तुतः त्यांत वरील तत्त्वा-
प्रमाणें विसंवाद आहे असें म्हणण्याचें कारण
नाहीं.

समवृत्तें.

१ **कन्या**; गण म, ग; अ० सं० ४; यति
पादान्तीं; उ० काव्यें वाचा.
२ **पंक्ति**; गण भ, ग, ग; अ० सं० ५; यति
पादान्तीं; उ० ग्रंथ पढावे.
३ **प्रीति**; गण र, ग, ग; अ० सं० ५; यति
पादान्तीं; उ० कोण मी आहें.
४ **नंदिनी**; गण र, र; अ० सं० ६; यति
पादान्तीं; उ० मान्य व्हा सज्जनीं.
५ **तनुमध्या**; गण त, य; अ० सं० ६; यति
पादान्तीं; उ० ज्याचें अघ त्याला.
६ **विद्युल्लेखा** अथवा **मातंगी**;गण म, म; अ०
सं० ६; यति पादान्तीं; उ० मान्यातें मानावें.
७ **शशिवदना**; गण न, य; अ० सं० ६;यति
पादान्तीं; उ० गुरुस नमावें.
८ **सोमराजी**; गण य, य; अ० सं० ६; याति
पादान्तीं; उ० स्वकर्तव्य जाणा.
९ **वसुधा**; गण स, स; अ० सं० ६; यति
पादान्तीं; उ० सुपथास धरा.
१० **माधवी**; गण र, ज, ग; अ० सं० ७;
याति पादान्तीं; उ० सत्य बोल हो ! वदा.
११ **धात्री** किं० **हेमाक्षी**; गण म, म, ग;अ०
सं० ७; यति पादान्तीं; उ० सन्मार्गें साधू चाले.

१२ **मदलेखा**; गण म, स, ग; अ० सं० ७.
यति पादान्तीं; उ० देशार्थ श्रम सोसा.
१३ **कुमारललिता**; गण ज, स, ग; अ०
सं० ७; यति पादान्तीं; उ० अघांत न रमावें.
१४ **सुमना**; गण न, न, ग; अ० सं० ७;
यति पादान्तीं; उ० शुचिपथाचि धरा.
१५ **हंसमाला**; गण स, र, ग; अ० सं० ७;
यति पादान्तीं; उ० कविता तोष देते.
१६ **मधुमती**; गण न, भ, ग; अ० सं० ७;
यति पादान्तीं; उ० अघपथीं न रमा.
१७ **विद्युन्माला**;गण म,म, ग,ग; अ०सं० ८;
यति पादान्तीं; उ० मित्राच्या कल्याणा जागा.
१८ **समानिका**; गण र, ज, ग, ल; अ०
सं० ८; यति पादान्तीं; उ० सत्पथा धरा सदैव.
१९ **माणवक**; गण भ, त, ल, ग; अ० सं०
८; यति पादान्तीं; उ० आयु असें अल्पमिती.
२० **प्रमाणिका**; गण ज, र, ल, ग; अ० सं०
८;यति पादान्तीं; उ० नका त्यजूं नया कधीं.
२१ **गजगती**; गण न, भ, ल, ग; अ० सं०
८; यति पादान्तीं; उ० सुजन न त्यजि नया.
२२ **चित्रपदा**; गण भ, भ, ग, ग; अ० सं०
८; यति पादान्तीं; उ० शुद्धिमुळें शम येतो.
२३ **मणिबंध**; गण भ, म, स; अ० सं० ८;
यति पादान्तीं; उ० भारत माझा देश असे.
२४ **सरला**; गण स, भ, म; अ० सं० ९;
यति पादान्तीं; उ० रसनालोल नरा टाळा.
२५ **भुजंगशशिभृता**; गण न,न, म; अ०सं०
९; यति पादान्तीं; उ० खल निज विसरे देशा.
२६ **भुजंगसंगता**; गण स, ज, र; अ० सं०
९; यति पादान्तीं; उ० मनिं कोप चेपणें बरें.
२७ **हलमुखी**; गण र, न, स; अ० सं० ९;
याति पादान्तीं; उ० साधुला न धन भुलवी.
२८ **त्वरितगति**; गण न, ज, न, ग; अ०सं०
१०;याति पादान्तीं; उ० ध्रुव सुकृतीं सुजन रमे.
२९ **मत्ता**; गण म,भ, स, ग; अ०सं०१०;यति
पादान्तीं किं० ४+६; उ० देशासाठीं तनु
झिजवावी.

३० **चंपकमाला** किं० **रूपवती** किं० **रुक्म-
वती**; गण भ, म, स, ग; अ०सं० ५ + ५; उ०
मूर्ख नरा ये बोध न कामा.

३१ **कामदा** किं० **मनोरमा**; गण र, य, ज, ग; अ० सं० १०; यति ५ + ५; उ० आर्यभूमि ही वंद्य मायशी.

३२ **हंसी**; गण म, भ, न, ग; अ० सं० ४+६; उ० हीनां दीनां कधि न विसरा.

३३ **मयूरी**; गण म, म, म, ग; अ० सं० ५+५; उ० द्रव्यानें शांती लाभेना कोणा.

३४ **पद्मिनी**; गण र, म, य, ग; अ० सं० ५+५; उ० सत्पथें चाले तो शमा लाहे.

३५ **कमला**; गण स, म, स, ग; अ० सं० ५+५; उ० विसरे देशा तो नर पापी.

३६ **मनोहरा**; गण न, र, ज, ग; अ० सं० ६+४; उ० बघवतें खला न चांगलें.

३७ **भामिनी**; गण र, र, र, ग; अ० सं० ६+४; उ० सत्पथें चालतो साधु नित्य.

३८ **मयूरसारिणी**; गण र, ज, र, ग; अ० सं० १०; यति पादान्तीं; उ० मध्यम स्थितींत सौख्य आहे.

३९ **रथोद्धता**; गण र, न, र, ल, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० किंप्रभूस जन शापिती सदा.

४० **वातोर्मि**; गण म, भ, त, ग, ग; अ० सं० ४+७; उ० चित्ताला दे कविता फार तोष.

४१ **स्वागता**; गण र, न, भ, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० स्थान किंप्रभु लहे नरकांत.

४२ **इंद्रवज्रा**; गण त, त, ज, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० देशार्थ साधू झिजवी स्वकाया.

४३ **नलिनी**; गण स, स, भ, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० रिपुला विकितो दुर्जन देशा.

४४ **शुद्ध कामदा**; गण न, र, र, ल, ग; अ० सं० ६+५; उ० अनुसरा सदा पुण्य मार्ग हो!

४५ **सौदामिनी**; गण य, य, य, ल, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० नको द्रव्य जें पातकें लाभतें.

४६ **उपजाति**; गण ज (किं० त), त, ज, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० स्वनाश (किं० स्वापत्ति) देशार्थ सहाल साधू. इंद्रवज्रा आणि उपेंद्रवज्रा यांचें मिश्रण.

४७ **दोधक**; गण भ, भ, भ, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० बुद्बुदभंगुर वैभव जाणा.

४८ **चंद्रांकमाला**; गण त, त, त, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० कामास येईल तो मित्र मिळे.

४९ **उपेंद्रवज्रा**; गण ज, त, ज, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० सदैव देशार्थ झटेल साधू.

५० **शालिनी**; गण म, त, त, ग, ग; अ० सं० ४+७ उ०; विद्या नाहीं त्यास लाधे न मान.

५१ **भद्रिका**; गण न, न, र, ल, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं. उ० धनिक नृपति मृत्यु लाहले.

५२ **मौक्तिकमाला**; गण भ, त, न, ग, ग; अ० सं० ५+६; उ० आळस टाळा, शुचिपथ सेवा.

५३ **भ्रमरविलसित**; गण म, भ, न, ल, ग; अ० सं० ४+७; उ० प्रेमा पाहे स्वसुत, न पितरें.

५४ **सुमुखी**; गण न, ज, ज, ल, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० निज तनु चंदन तो झिजवी.

५५ **श्री**; गण भ, त, न, ग, ग; अ० सं० ५+६; उ० मेघजलानें तरु फुलतात.

५६ **सहृदला**; गण न, न, स, ग, ग; अ० सं० ११; यति पादान्तीं; उ० समर्थि करिति बुध साहाय्या.

५७ **तोटक**; गण स, स, स, स; अ० सं० ६+६; उ० धरसोडपणा करि हानि महा.

५८ **प्रमिताक्षरा**; गण स, ज, स, स; अ० सं० १२; यति पादान्तीं; उ० परघातपात कधिं चिंतुं नका.

५९ **वैश्वदेवी**; गण म, म, य, य; अ० सं० ५+७; उ० काया वाचिचत्तें लोककल्याण साधा.

६० **चंद्रवर्त्म**; गण र, न, भ, स; अ० सं० ४+८; चित्रगुप्त तुमचें अघ बघतो.

६१ **जलधरमाला**; गण म, भ, स, म; अ० सं० ४+८; उ० आईबापांप्रति ममता दावावी.

६२ **सारंग**; गण त, त, त, त; अ० सं० १२; यति पादान्तीं; उ० चांचल्य हा दोष नाहींच विद्येंत.

६३ **यूथिका**; गण र, न, भ, र; अ० सं० १२; यति पादान्तीं; उ० ज्ञान हें बल करी सकलां वश.

६४ **इंद्रवंशा**; गण त, त, ज, र; अ० सं० १२ यति पादान्तीं; उ० देशार्थ साधू स्वविनाश आदरी.

६५ **वंशस्थ**; गण ज, त, ज, र; अ० सं०१२; यति पादान्तीं; उ०श्मशानवैराग्य न मानवें खरें.

६६ **भुजंगप्रयात**; गण य, य, य, य;अ०सं० १२;यति पादान्तीं; उ०श्रियाळें दिला पुत्र खाया द्विजाला.

६७ **द्रुतविलंबित**; गण न, भ, भ, र; अ० सं० १२; यति पादान्तीं; उ० वरुनि साधुपरी विसतो खल.

६८ **जलोद्धतगति**; गण ज, स, ज, स; अ० सं० ६+६; उ० सदा करित जा पशूंवरि दया.

६९ **तामरस**; गण न, ज, ज, य; अ० सं० १२;यति पादान्तीं; उ० त्यजुनि कुमार्ग सुमार्गि असा हो !

७० **प्रभा**; गण न, न, र, र; अ०सं०७+५; उ० निटिललिखित तें मिळे मानवा.

७१ **मालती**; गण न, ज, ज, र; अ० सं०१२ यति पादान्तीं; उ० विभव अशाश्वत हें मनीं स्मरा.

७२ **प्रियंवदा**; गण न, भ, ज, र;अ०सं०१२; यति पादान्तीं; उ०सतत ये यश असें न निश्चित.

७३ **मणिमाला**; गण त, य, त, य; अ० सं० ६+६; उ० प्रामाणिक जो तो पावे सुख अंतीं.

७४ **स्रग्विणी**; गण र,र,र,र; अ० सं०६+६; उ० विंदुनें विंदुनें होतसे सागर.

७५ **प्रमुदितवदना**, गण न, न, र, र; अ० सं० १२; यति ७+५; उ० श्रमसहानि कधीं न साधू हटे.

७६ **कुसुमविचित्रा**; गण न, य, न, य; अ० सं०६+६; उ० प्रणय असावा मनिं सकलांच्या.

७७ **ललिता**; गण त, भ, ज, र; अ० सं० १२; यति पादान्तीं किं०४+८; उ० बोलावया नवस जीभ बोलकी.

७८ **नवमालिनी**; गण न, ज, भ, य; अ० सं०५+७; उ० कृति कविची न कालभय जाणे.

७९ **विभावरी**; गण न, भ, ज,ज,ग;अ०सं० १३; यति पादान्तीं; उ० विभव शाश्वत म्हणे नर तो फसे.

८० **कलहंस**; गण स, ज, स, स, ग; अ० सं०१३;यति पादान्तीं किं०५+८;उ०करिते नरा स्तुतिस पात्र न सत्ता.

८१ **क्षमा**; गण न, न, त, त, ग; अ० सं० ७+६; उ० विधि न वळविजे हा कधीं मानवें.

८२ **चंद्रिका**; गण न, न, त, र, ग; अ० सं०८+५;उ० अगुण भुवनिं कांहीं न वस्तु आहे.

८३ **प्रहर्षिणी**; गण म, न, ज, र, ग; अ० सं० ३ + १०; उ० आलें तें सहन करा प्रशांत चित्तें.

८४ **मंजुभाषिणी**; गण स, ज, स, ज, ग; अ० सं०१३;यति पादान्तीं; उ० सुखरूप एकचि असे महीवरी.

८५ **मत्तमयूरी**; गण म, त, य, स, ग; अ० सं०५+८;उ० साधूला पापी हसती मूर्ख म्हणून.

८६ **प्रभावती**, गण ज, भ, स, ज, ग; अ० सं० ४+९; उ० न आळसा अवसर द्या क्षणावधी.

८७ **रुचिरा**; गण ज, भ, स, र, ग; अ० सं० ४+९; उ० त्यजूं असे निज मत कोणी न सिद्ध.

८८ **चंचरीकावली**; गण य, म, र, र, ग; अ० सं० ६+७; उ० न वर्षांची संख्या पात्र मानास होई.

८९ **उर्वशी**; गण न, त, त, त, ग;अ०सं०१३; यति पादान्तीं किं० ४+३+३+३; उ० स्थिर मनें मर्त्य अन्यायही सोशितो.

९० **मत्तहासिनी**; गण ज, त, स, ज, ग;अ० सं० ५+८; उ०नका करूं हां ! गुरुजनां वहेलना.

९१ **अपराजिता**; गण न, न, र,स, ल,ग;अ० सं०७+७; उ० खलवचन खरें म्हणून फसूं नका.

९२ **कमलिनी**; गण स, ज, स, स, ल, ग; अ०सं०५+९ किं० यति पादान्तीं;उ० बहुधा बुधा अवकरीं स्थल लाभतें.

९३ **पथ्या**; गण स, ज, स, य, ल, ग; अ० सं० ५+९; उ० पतिता त्यजूनि पळती नरा मित्र ते.

९४ **मध्यक्षामा**; गण म, भ, न, य, ग, ग; अ० सं० ४+१०; उ० शांती लाभे अतुल न कनकें कोणाही.

९५ **असंबाधा**; गण म, त, न, स, ग; अ० सं०५+९; उ० धिक् लक्ष्मीपुत्रा ! धन न वितरि दीना जो.

९६ **घनमाला**; गण स, भ, स, ज,ग, ग;अ०

सं० ४+१०; उ० खल झाकी अघ मनिचें अहो! उपायें.

९७ **प्रहरणकलिता**; गण न, न, म, न, ल, ग; अ० सं० ७+७; उ० अवपथ धरुनी खल धन मिळवी.

९८ **प्रमदा**; गण न, ज, भ, ज, ल, ग; अ० सं० ५+९; उ० प्रकट करा सदैव नरहो! नरता.

९९ **वसंततिलका**; गण त, भ, ज, ज, ग, ग; अ० सं० १४; यति पादान्तीं; उ० वैश्वानरें त्वरित पारखिजे सुवर्ण.

१०० **लोला**; गण म, स, म, भ, ग, ग; अ० सं० ७+७; उ० पापानें मिळतें तें देहातें धन जाळी.

१०१ **रुक्मिणी**; गण ज, भ, स, ज, ग, ग; अ० सं० ४+१०; उ० धरोनियां नयपथ साधु दुःख साहे.

१०२ **वासंती**; गण म, त, न, म, ग, ग; अ० सं० ५+९; उ० आली आपत्ती अनुभवि ज्याचा तो लोकीं.

१०३ **इंदुवदना**; गण भ, ज, स, न, ग, ग; अ० सं० १४; यति पादान्तीं; उ० गूळ न दिला तरि गुळापरि वदावें.

१०४ **चामर किं० तूणक**; गण र, ज, र, ज, र; अ० सं० १५; यति पादान्तीं; उ० आपुल्या रहा स्थितींत सर्व सोडुनी भय.

१०५ **लीलाखेल**; गण म, म, म, म, म; अ० सं १५; यति पादान्तीं; उ० विद्वत्तेच्या पासंगाला श्रीमंती ती लागेना.

१०६ **शशिकला**; गण न, न, न, न, स; यति पादान्तीं किं० ८+७; उ० व्रत मरणभयिं न सुजन विसरतो.

१०७ **रमा**; गण न, ज, न, र, य; अ० सं० ५+१०; उ० जन नमती बघुनि गुणाढ्य पुरुषास.

१०८ **मालिनी**; गण न, न, म, य, य; अ० सं० ८+७; उ० अतिपरिचययोगें स्नेह जातो लयास.

१०९ **सहदळा**; गण स, ज, न, न, स; अ० सं० १५; यति पादान्तीं; उ०

सुपथा धरोनि सुजन शमसुख लहे.

११० **उन्मालया**; गण म, ज, स, स, स; अ० संख्या ३+६+६ किं० ३+१२; उ० सत्याच्या परीक्षणिं न लोक मुळीं श्रम घे.

१११ **प्रभद्रक**; न, ज, भ, ज, र; अ० सं० ५+६+४. उ० भरवसतो धनाउपरि तो पुढें फसे.

११२ **स्वर्णाक्षी**; गण म, ज, स, स, य; अ० सं० ३+६+६; उ० स्वर्गाचीं न हेम उकली कधिही कपाटें.

११३ **शशिकला**; गण न, न, न, न, स; अ० सं० ८+७; किं० यति पादान्तीं; उ० व्रत मरणभयिं न सुजन विसरतो.

११४ **कुमुदिनी**; गण न, भ, ज, स, न, ग; अ० सं० ४+४+४+४ किं० ८+८; उ० मलिनता शिरुं न द्या तनुमनःकृतिमधीं.

११५ **माल्यवती**; गण भ, र, न, भ, भ, ग; अ० सं० ४+१२; उ० चिंतुनियां सुकर्म मनिं आरभि तें सुजन.

११६ **चित्र**; गण र, ज, र, ज, र, ल; अ० सं० १६; यति पादान्तीं; उ० स्वामिला न जें रुचेल तें न भाट संस्तवील.

११७ **वाणिनी**; गण न, ज, भ, ज, र, ग; अ० सं० ५+६+५; उ० बुडविल जो स्वदेश नर तो न शांति लाहे.

११८ **सूरा**; गण त, म, य, र, त, ग; अ० सं० ४+४+४+४; उ० भूमीवरी चालावया नौकेमधें शक्ती नसे.

११९ **पंचचामर**; गण ज, र, ज, र, ज, ग; अ० सं० १६; यति पादान्तीं; उ० असत्य बोलणें असे अतीव घोर पातक.

१२० **अतिशायिनी**; गण स, स, ज, भ, ज, ग, ग; अ० सं० १०+७; उ० परि योग्य करी कृती तया भय न ये मनांत.

१२१ **नर्दटक**; गण न, ज, भ, ज, ज, ल, ग; अ० सं० ५+६+६; उ० विधिरचना अतर्क्य, कवणासहि ती नुकळे.

१२२ **पृथ्वी**; गण ज, स, ज, स, य, ल, ग; अ० सं० ८+९; उ० यशास मळ लागल्यावरि न होइ तें निर्मळ.

१२३ **मन्दाक्रान्ता**; गण म, भ, न, त, त, ग, ग; अ० सं० ४+६+७; उ० क्रोधा ज्ञानी पुरुष म्हणती अल्पकालीन वेड.

१२४ **हरिणी**; गण न, स, म, र, स, ल, ग;

अ० सं० ६+४+७; उ० रुचिकर गमे साधें अन्न क्षुधा असतां नरा.

१२५ शिखरिणी; गण य, म, न, स, भ, ल, ग; अ० सं० ६+११; उ० कुऱ्हाडीच्या दांड्या! अधम तुजसा तूंच भुवनीं !

१२६ कुसुमशर; गण न, न, न, न, न, ग, ग; अ० सं०; १७ यति पादान्तीं; उ० करुनि उपकृति मनुज निजहिताचि साधी.

१२७ वंशपत्रपतित; गण भ, र, न, भ, न, ल,ग;अ० सं० १०+७किं०४+६+७; उ० उच्च पदीं अनर्ह दिसती नर बहु बसले.

१२८ कुसुमितलतावेल्लिता; गण म, त, न, य, य, य; अ० सं० ५+६+७; उ० साधूच्या नाशा खल बहु झटे गूढ युत्त्क्या करून.

१२९ चित्रलेखा; गण म, भ, न, य, य, य; अ० सं० ४+७+७; उ० होओ राज्यक्षय परि न शिवे ग्रंथकारास काल.

१३० नंदन; गण न, ज, भ, ज, र, र; अ० सं० ११+७; उ० जंव अनुकूल काल तव घ्या स्वहेतुतें साधुनी.

१३१ नाराच; गण न, न, र, र, र, र;अ० सं० ७+११; उ० न धन न यश वा श्रमावांचुनी मानवा लाभतें.

१३२ शार्दुलललित; गण म, स, ज, स, त, स; अ० सं० १२+६; उ० कस्तूरी कळते स्वयें परिमळें लोकां सुखकरें.

१३३ विबुधप्रिया; गण र, स,ज, ज, भ, र; अ० सं० १८; यति पादान्तीं किं०हावी तेथें; उ० मित्रता न कळे खरी जंव ती कसास न लागली.

१३४ सुमधुरा; गण म, र, भ, न, म, न,ग; अ० सं० ७+६+६; उ० जो आहे सुस्वभावी सकरुण मृदू त्याला छळि जन.

१३५ सुरसा; गण म, र, भ, न, य, न, ग; अ० सं० ७+७+५; उ० ध्येयें जो दोन ठेवी पुरुष हृदयीं तो अंतिं फसतो.

१३६ शार्दूलविक्रीडित; म, स, ज, स, त, त, ग; अ० सं० १२+७; उ० गेला प्राण निघून काय मग ती कामास येई सुधा ?

१३७ मेघविस्फूर्जित; गण य, म, न, स, र, र, ग; अ० सं० ६+६+७; उ० तिथें आला स्वर्ग क्षितिवरि असे कां न वाटो जनाला ?

१३८ प्रतानिनी; गण ज, भ, र, स, ज, ज, ग; अ० सं० १९; यति पादान्तीं किं० हावी तेथें; उ० सदैव सौम्य धरोनि वृत्ति जनाचिया सुख दे मना.

१३९ गीतिका; गण स, ज, ज, भ, र, स, ल, ग; अ० सं० २०; यति पादान्तीं किं० हावी तेथें; उ० उपयोग दोन जगामधें करिजेति सर्वहि वस्तुंचे.

१४० सुवदना; गण म, र, भ, न, य, भ, ल, ग; अ० सं० ७+७+६; उ० तेथें सांडावयाला जलकणहि न तो आवश्यक धसे.

१४१ मत्तेभविक्रीडित; गण स, भ, र, न, म, य, ल, ग; अ० सं० १३+७; उ० अनुकंपा कवि ती खरी न गणि जी कांहीं न दावी फळ.

१४२ पंचकावली; गण न, ज, भ, ज, ज, ज, र; अ० सं० ५+६+१०; उ० निजराचित कर्मी भरंवसा असतो अपुला दृढ स्थिर.

१४३ स्रग्धरा; गण म, र, भ, न, य, य, य; अ० सं० ७+७+७; उ० दारें कारागृहाचीं असुनिहि मिटलीं लोक जातात आंत.

१४४ मदनसायक; गण न, भ, न, भ, न, भ, र; अ० सं० ६+६+६+३; उ० विभव शाश्वत टिकुनि राहिल जर पया वृष देईल.

१४५ कनकलता; गण न, न, न, न, न, न, स; अ० सं०२१; यति पादान्तीं; उ० क्षणिकसुखद दुरितसरणिस कधिहि नच भुलतो.

१४६ हंसी; गण म, म, त, न, न, न, स, ग; अ० सं० ८+१४. उ० वेडा होतो वेडा शब्द श्रवणिं पडुनि नर असुनि शहाणा.

१४७ अमृतध्वनि; गण त, भ, य, ज, स, र, न, ग; अ० सं० ४+७+७+४; उ० धिक् त्या नरा ! स्वशिर नीचाचिया चरणिं वित्तार्थ जो नमवितो.

१४८ अश्वधाटी; गण त, त, त, त, त, त, त, ग; अ० सं० ११+११ किं०४+६+६+६; उ० मोठ्या वयांतील खोटीच मैत्री, जरी ती स्वरूपें खरी वाटली.

१४९ उमा; गण भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग; अ० सं० १२+१०; उ० तो फळलें बघतो स्वमनोरथ यन्मनिं धीर अखंड वसे.

१५० मदिरा; गण भ, भ, भ, भ, भ, भ, भ, ग,ग; अ० सं० १२+११; उ० ग्रंथसमान खरें स्थिर मित्र न या भुवनीं मिळती मनुजास.

१५१ सवाई; गण भ, भ, भ, भ, र, न, भ, ग, ग; अ० सं० १२+११; उ० प्रेम नरा स्वजनीं कृति वाटवि नित्य गळे असतां स्तवपात्र.

१५२ अद्रितनया; गण न, ज, भ, ज, भ, ज, भ, ल, ग; अ० सं० ५+६+१२; उ० करित असे दुजा अघ म्हणोनियां तुह्मि करूं नका अघ कधीं.

१५३ तन्वी; गण भ, त, न, स, भ, भ, न, य; अ० सं० १२+१२; उ० आयु तयाला द्विगुणित मिळतें, तो शकतो करुं बहुविध कामें.

१५४ क्रौंचपदा; गण भ, म, स, भ, न, न, न, न,ग; अ० सं० ५+५+८+७; उ० संसृतिमार्गीं त्रस्त न होतो, मग नर अतितम शमसुख चघतो.

१५५ बंधुर; न, न, न, न, स, भ, भ, भ, ग; अ० सं० १५+१०; उ० हितपरिणतिकर अवसर मिळतां साधुनि घे हित तूं अपुलें.

१५६ कामकला; गण स, स, स, स, स, स, स, स, ग; अ० सं० १४+११; उ० सुख दुःख समान मिळे सकलांप्रति हेंच दिसे बहुधा विबुधांतें.

१५७ भुजंगविजृंभित; गण म, म, त, न, न, न, र, स, ल,ग; अ० सं० ८+११+७; उ० लक्ष्मीच्या उन्मादें दीना सतत तुर्डावे अकरुण तो पडे नरकामधीं.

१५८ सुधा; गण ज, स, न, भ, ज, स, न, भ, ल, ग; अ० सं० १४+१२; उ० घडी गत पुन्हा नच तुम्हा मिळुं शके बहुधनार्पण करूनिहि अहा !

१५९ दंडक; गण न, न, र, र, र, र, र, र, र, र; यति ७+५+६+६+६; उ० पुरुषतम मनें जना वाकडीं कुत्सितें भाषणें बोलणें हें न साजे कधीं मानवा.

अर्धसमवृत्तें.

१ अपरवक्र; विषम चरणीं न, न, र, ल, ग; सम चरणीं न, ज, ज, र; उ० मजवरि करिसी न कां कृपा, विसरुनि जा मम मंतु हा नृपा !

२ सुंदरी किंवा वियोगिनी; विषम चरणीं स, स, ज, ग; सम चरणीं स, भ, र, ल ग; उ० मनि भाषणिं वर्तनीं असे शुचि तो वंद्य जनास होतसे.

३ पुष्पिताग्रा; विषम चरणीं न, न, र, य; समचरणीं न, ज, ज, र, ग. उ० नृपजन नगरींत सोय पाहा, नृपभजना त्यजुनी घरीं न राहा.

४ हरिणीप्लुता; विषम चरणीं स, स, स, ल, ग; सम चरणीं न, भ, भ, र; उ० कृश अंग तिचें अति निर्मल प्रिय निरंतर भाषण कोमल.

५ माल्यभारा; विषम चरणीं स, स, ज, ग, ग; सम चरणीं स, भ, र, य. उ० निजकाव्यरसेंच तृप्त होती, पण काव्यें परकीय साधु गाती.

६ वेगवती; विषम चरणीं स, स, स, ग; सम चरणीं भ, भ, भ, ग, ग. उ० असतां परतंत्रचि देश भोगिति लोक न वैभवलेश.

७ अनुष्टुभ्; हें वृत्त जरी सम वृत्तांत समाविष्ट केलें जातें तरी तें अर्धसमवृत्तांत येण्याच्या लायकीचें आहे. ह्या वृत्ताचे चार चरण असून प्रत्येकांत आठ आठ अक्षरें असतात; कोणत्याही चरणाच्या आरंभीं नगण किंवा भगण येऊं शकत नाहीं. पहिल्या आणि तिसऱ्या चरणांत पांचवें अक्षर बहुधा लघु आणि सहावें गुरु असतें; कधीं कधीं पांचवें अक्षर गुरु आणि सहावें लघु असतें. सातवें अक्षर सर्वदा गुरु असतें पण जर शेवटचीं चारी अक्षरें लघु असलीं तर हा नियम उल्लंघिण्यास मोकळीक असते. आठवें अक्षर लघु किंवा गुरु असणें हें लक्ष्यांत घेण्याचें कारण नाहीं.

दुसऱ्या आणि चवथ्या चरणांत पांचवें अक्षर आणि सातवें अक्षर हीं निरपवाद लघु असावीं लागतात आणि सहावें आणि आठवें अक्षर हीं निरपवाद गुरु असावीं लागतात. ह्या अनुष्टुभ् वृत्तासंबंधानें आणखीही कांहीं किरकोळ बंधनें आहेत तीं येथें आम्हीं देत नाहीं; उ० अष्ट सिद्धींत दारिद्र्य नववी सिद्धि मानिजे.

विषमवृत्तें.

उद्गता; याचे चारी चरण परस्परांपासून भिन्न असतात. प्रथम चरण स, ज, स, ल; द्वितीय चरण न, स, ज, ग; तृतीय चरण भ, न, ज, ल, ग; चतुर्थ चरण स, ज, स, ज, ग; उ० जर तूं मनांत

वचनांत शुचि असमि, वर्तनांतही ! लाहशिल तर शमास सदा, उपदेशिती सरणि धर्म सर्व ही.

मात्रावृत्तें.

आर्यंमध्यें चार चरण असून पहिला आणि तिसरा निरपवाद बारा मात्रांचे असतात. दुसरा आणि चवथा हे चरण अठरा किं० पंधरा किं० वीस मात्रांचे केल्यानें आर्यांचे अनेक प्रकार होतात.

दोहा किंवा दोहरा हें मोरोपंतानें योजलेलें वृत्त मात्रावृत्त आहे. याच्या प्रथम आणि तृतीय चरणांत तेरा तेरा मात्रा असून द्वितीय आणि चतुर्थ चरणांत अकरा अकरा मात्रा असतात आणि शेवटचें अक्षर लघु असावें लागतें.

निंवळ मराठी वृत्तें.

अभंग—अभंग लहान आणि मोठा असे दोन प्रकारचे आहेत; मोठ्या अभंगाचे चार चरण असून पहिल्या तीन चरणांत सहा सहा आणि चवथ्यांत चार अक्षरें असतात. दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणांस यमक असतें. ह्या अभंगांत पहिल्या, दुसऱ्या, आणि तिसऱ्या चरणांस यमक असल्यास ह्या अभंगाचा दुसरा प्रकार होतो. ह्या अभंगाचा आणखी एक प्रकार आहे त्यांत चार चरण आठ आठ अक्षरांचे असून पहिल्या तिहींस यमक असतें. लहान अभंगाच्या पहिल्या प्रकारांत आठ आठ अक्षरांचे दोन चरण असून त्यांना यमक असतें. दुसऱ्या प्रकारांत पहिल्या चरणाला आठ आणि दुसऱ्या चरणाला सात अक्षरें असून चवथें अक्षर यमकाक्षर असतें.

दिंडी—दिंडी हें चार चरणांचें मात्रावृत्त असून प्रत्येक चरणांत एकोणीस मात्रा असतात आणि नवव्या मात्रेवर यति असते. तिसरा चरण चाल बदलून म्हणतात.

साकी—साकीला अठ्ठावीस मात्रांचा एक एक अशीं दोन अर्धें असून दोन्ही अर्धांच्या शेवटीं यमक असतें. प्रत्येक अर्धाच्या आठव्या मात्रेवर वर एक, पुढच्या आठव्या मात्रेवर दुसरी, आणि अर्धाच्या अंतीं तिसरी यति असतें. म्हणण्याच्या धाटणीवर पहिल्या दोन यति न मानल्यास चालतें.

ओवी—ओवीचे चार चरण असून पहिल्या तिहींत आठ आठ अक्षरें असतात आणि चवथ्यांत सात असतात. परंतु हा नियम निरपवाद नाहीं. म्हणण्याच्या धाटणीवर चरणांतील अक्षरें कमी जास्ती केलीं जातात. पहिल्या तीन चरणांस एक यमक असतें. घनाक्षरी—चार ओव्या मिळून एक घनाक्षरी होते.

याशिवाय कटाव, चूर्णिका, भूपाळी, आरती, इ० अनेक निंवळ मराठी छंद आहेत.

२ करणें.

१ बव; २ बालव; ३ कौलव; ४ तैतिल; ५ गर; ६ वणिज; ७ भद्रा किं० विष्टि; ८ शकुनि; ९ चतुष्पाद; १० नाग; ११ किंस्तुघ्न.

३ संवत्सर.

१ प्रभव; २ विभव; ३ शुक्ल; ४ प्रमोद; ५ प्रजापति; ६ अंगिरस्; ७ श्रीमुख; ८ भाव; ९ युवन; १० धातृ; ११ ईश्वर; १२ बहुधान्य; १३ प्रमाथिन्; १४ विक्रम; १५ वृष; १६ चित्रभानु; १७ सुभानु; १८ तारण; १९ पार्थिव; २० व्यय; २१ सर्वजित्; २२ सर्वधारिन्; २३ विरोधिन्; २४ विकृति; २५ खर; २६ नंदन; २७ विजय; २८ जय; २९ मन्मथ; ३० दुर्मुख; ३१ हेमलंबिन्; ३२ विलंबिन्; ३३ विकारिन्; ३४ शार्वरिन्; ३५ प्लव; ३६ शुभकृत्; ३७ शोभन; ३८ क्रोधिन्; ३९ विश्वावसु; ४० पराभव; ४१ प्लवंग; ४२ कीलक; ४३ सौम्य; ४४ साधारण; ४५ विरोधकृत्; ४६ परिधाविन्; ४७ प्रमादिन्; ५८ आनंद; ४९ राक्षस; ५० नल; ५१ पिंगल; ५२ कालयुक्त; ५३ सिद्धार्थिन्; ५४ रौद्र; ५५ दुर्मति; ५६ दुंदुभि; ५७ रुधिरोद्गारिन्; ५८ रक्ताक्षिन्; ५९ क्रोधन; ६० क्षय.

४ बारा राशि.

१ मेष; २ वृषभ; ३ मिथुन; ४ कर्क; ५ सिंह; ६ कन्या; ७ तुला; ८ वृश्चिक; ९ धन; १० मकर; ११ कुंभ; १२ मीन.

५ सत्तावीस नक्षत्रें.

१ अश्विनी; २ भरणी; ३ कृत्तिका; ४ रोहिणी; ५ मृग; ६ आर्द्रा; ७ पुनर्वसु; ८ पुष्य; ९ आश्लेषा; १० मघा; ११ पूर्वा; १२ उत्तरा; १३ हस्त; १४ चित्रा; १५ स्वाति; १६ विशाखा; १७ अनुराधा; १८ ज्येष्ठा; १९ मूल; २० पूर्वाषाढा; २१ उत्तराषाढा; श्रवण; २३ धनिष्ठा; २५ शततारका; २५ पूर्वाभाद्रपदा; २६ उत्तराभाद्रपदा; २७ रेवती.

६ आठवड्याचे सात दिवस.

१ सोमवार; २ मंगळवार; ३ बुधवार; ४ गुरुवार; ५ शुक्रवार; ६ शनिवार; ७ आदित्यवार किं० रविवार.

७ हिंदूंचे बारा महिने

१ चैत्र;२ वैशाख; ३ज्येष्ठ;४ आषाढ;५श्रावण; ६ भाद्रपद;७ आश्विन; ८ कार्तिक; ९ मार्गशीर्ष; १० पौष; ११ माघ; १२ फाल्गुन.

८ ऋतु

१ वसंत (चैत्र आणि वैशाख); २ ग्रीष्म (ज्येष्ठ आणि आषाढ); ३ वर्षा (श्रावण आणि भाद्रपद); ४ शरद (आश्विन आणि कार्तिक) ५ हेमंत (मार्गशीर्ष आणि पौष); ६ शिशिर (माघ आणि फाल्गुन).

९ तिथि

१ प्रतिपदा, २द्वितीया, ३ तृतीया, ४ चतुर्थी, ५ पंचमी, ६ षष्ठी, ७ सप्तमी, ८ अष्टमी, ९नवमी, १० दशमी, ११ एकादशी, १२ द्वादशी, १३ त्रयोदशी, १४ चतुर्दशी, १५ पौर्णिमा, ३० अमावास्या.

१० काल

१ उन्हाळा—फाल्गुनपासून ज्येष्ठपर्यंत.
२ पावसाळा—आषाढपासून आश्विनपर्यंत.
३ हिंवाळा—कार्तिकपासून माघापर्यंत.

११ योग

१ विष्कंभ. २ प्रीति. ३आयुष्मत्.४सौभाग्य. ५ शोभन. ६ अतिगंड. ७ सुकर्मन्. ८ धृति. ९ शूल. १० गंड. ११ वृद्धि. १२ ध्रुव. १३ व्याघात. १४ हर्षण. १५ वज्र. १६ सिद्धि. १७ व्यतिपात. १८ वर्यान. १९ परिघ. २० शिव. २१ सिद्धि. २२ साध्य. २३ शुभ. २४ शुक्ल. २५ ब्रह्मन्. २६ ऐंद्र. २७ वैधृति.

१२ मुसलमानी महिने

१ मोहोरम, २ सफर, ३ रबिलावर, ४ रबिलाखर, ५ जमादिलावल, ६ जमादिलाखर, ७ रज्जब, ८ साबान, ९ रमझान, १० सव्वाल,११ जिल्काद, १२ जिल्हेज.

१३ इस्राएली आठवड्याचे दिवस.

योम एहाद (पहिला दिवस) रविवार.
योम शेनी (दुसरा दिवस) सोमवार.
योम शेलीशी (तिसरा दिवस) मंगळवार.
योम रेबीई (चवथा दिवस) बुधवार.
योम हामिशी (पांचवा दिवस) गुरुवार.
योम हाशिशी (सहावा दिवस) शुक्रवार.
शब्बाथ (विश्रांतीचा दिवस) शनिवार.

१४इस्राएली महिने निसान,इयार,सीवान,तम्मूज, आब, एलुल, तिषरी, हेश्वान, किस्लेव्ह, तेबेथ, शेबाथ, आदार, वेआदार (अधिक आदार)

१५ फारशी महिने

आजूर, दय, बहिमन, स्पंदारमद, फरवर्दिन, आर्दीबेहस्त, खुर्दाद, तीर, आमरदाद, शहरेवर, मेहेर, आणि आबान.

१६ हिंदूंचे सण, उपास, उत्सव,इ०

वर्षप्रतिपदा किं० गुढीचा पाडवा चैत्र शुद्ध१. बलिप्रतिपदा कार्तिक शु १. यमद्वितीया किं० भाऊबीज कार्तिक शु. २. अक्षय तृतीया वैशाख शु. ३.गणेशचतुर्थी भाद्रपद शु. ४. संकष्टी चतुर्थी प्रत्येक महिन्याची वद्य ४. विनायकी चतुर्थी प्रत्येक महिन्याची शु.४.रंगपंचमी फाल्गुन व.५. नागपंचमी श्रावण शु. ५. चंपाषष्टी मार्गशीर्ष शु. ६. कपिला षष्ठी भाद्रपद व.रथसप्तमी माघ शु.७. गोकुल अष्टमी किं० जन्माष्टमी श्रावण व. ८. रामनवमी चैत्र शु. ९. कांदेनवमी आषाढ शु. ९. विजयादशमी किं० दसरा आश्विन शु. १०. आषाढी एकादशी आषाढ शु.११.कार्तिकी एकादशी कार्तिक शु. ११.वसुबारस आश्विन व. १२. धनत्रयोदशी आश्विन व. १३. वैकुंठ चतुर्दशी कार्तिक शु. १४.होळी पौर्णिमा फाल्गुन शु. १५. दांडीपौर्णिमा माघ शु.१५.नारळी पौर्णिमा श्रावण शु.१५. पोवळी पौर्णिमा स्थानपरत्वें भिन्न, म्ह० आषाढ, श्रावण, किं० भाद्रपद.कोजागरी पौर्णिमा आश्विन शु. १५. राखी पौर्णिमा श्रावण शु.१५. सर्वपित्री अमावास्या भाद्रपद व. ३०. दिव्याची आंवस आषाढ व. ३०. नवरात्र आश्विन शु. १. ते आश्विन शु. ९.खटींचें नवरात्र मार्गशीर्ष. शु. १ ते मार्गशीर्ष शु. ६.कर्क संक्रान्ति आषाढ शुद्ध किं० वद्य. मकरसंक्रान्ति माघ किं० पौष. नृसिंहजयंती वैशाख शु. १४. हनुमान् जयंती चै. शु. १५.दत्तजयंती मार्ग शु. १५.

१७. भाषा बोलणारांची संख्या.

हिंदी—सुमारें	१० कोटि
बंगाली— —	५ कोटि
मराठी— —	२ कोटि
पंजाबी सुमारें	१ कोटि
राजस्थानी —	१ कोटि
गुजराथी —	१ कोटि
सिंधी— —	५ लक्ष

